कोश १६०

# मराठी शब्दरत्नाकर



कोश १६०

किंमत १२ रुपये

वा. गो. आपटे

प्र का श क

गो. ब. जोशी
आनंदकार्यालय
३३० सदाशिव पेठ, पुणें २

मु द्र क

दि. दा. गांगल, एम्. एस्सी.
लोकसंग्रह कारखाना
६२४ सदाशिव पेठ, पुणें २

# अनुक्रम


| | |
|---|---|
| | पृष्ठ |
| या कोशांत योजलेले संक्षेप | ४ |
| पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना | ५– २१ |
| तिसऱ्या आवृत्तीसंबंधीं निवेदन | २२– २६ |
| कै. वासुदेव गोविंद आपटे | |
| : चरित्र | २७– ३६ |
| : वाङ्मयकार्य | ३६– ४६ |
| आनंद कार्यालयनिधीचा | |
| स्फूर्तिदायक इतिहास | ४७– ५० |
| मराठी शब्दरत्नाकर | १–७२० |
| मराठी भाषेची शब्दसंपत्ति | ७२१–७५७ |
| शब्दसिद्धि आणि भाषासौंदर्य | ७५८–७७५ |

# या कोशांत योजिलेले संक्षेप

अ०—अव्यय.
अनंत०—अनंतफंदीचे पोवाडे इ. ( चित्रशाळा आवृत्ति ).
अने०, अने० व०—अनेकवचन.
अमृत०—अमृतानुभव.
अर०—अरबी भाषा.
आनंद०—आनंदतनय.
इं०—इंग्रजी.
उदा०—उदाहरणार्थ.
ए०, एक०—एकनाथांची गाथा (इंदिरा प्रेस)
ऐति० पो०—ऐतिहासिक पोवाडे ( ऑक्वर्थ आणि शालिग्राम. )
का०—कानडी.
गणि०—गणितशास्त्र.
गुज०—गुजराथी.
चां० पा०—चांगदेवपासष्टी.
ज०—जनाबाई.
जु० दा०—जुना दासबोध.
ज्योति०—ज्योतिषशास्त्र.
ता०—तामिळ भाषा.
तुका०—तुकारामाच्या अभंगांचा गाथा ( इंदुप्रकाश ).
तुळ०—तुळशीदास पोवाडे.
ते०, तेलु०—तेलगु भाषा.
द० प्र०—दर्शनप्रकाश ( मानभावी ग्रंथ ).
दयाळ०—दयाळनाथ (अ. सी. साठ्ये यांची प्रत ).
दा०—दासबोध ( यशवंत प्रेस ).
देव०—देवनाथ ( साठ्ये ).
दासो० गीता०—दासोपंत-गीतार्णव.
न०—नपुंसकलिंग.
ना०—नामदेव ( इंदिरा प्रेस ).
परश०—परशरामकवीचे पोवाडे, लावण्या इ. ( चित्रशाळा ).
पां० प्र०—पांडवप्रताप.
पृ०—पृष्ठ.
प्रा०—प्राकृत ग्रंथांतला शब्द.
प्रभा०—प्रभाकराचे पोवाडे ( चित्रशाळा ).
फा०—फारशी.
बहि०—बहिणाबाई.
भा०, भाग०—एकनाथी भागवत ( निर्णयसागर प्रत ).
भक्तिवि०—भक्तिविजय.
म० र०—मतिरत्नाकर ( मानभावी ग्रंथ. )
मान०—मानभावी ग्रंथ.
मुक्ते०—मुक्तेश्वर ( निर्णयसागर. )
मोरो०—मोरोपंत ( ,, )
रघु०—रघुनाथपंडित
रं० यो०—रंगनाथस्वामिकृत योगवासिष्ठ.
रामजो०· रामजोशाच्या लावण्या इ०(चित्रशाळा ).
राम० वि०—रामविजय.
वाक्य०—वाक्यवृत्ति.
वामन०—वामनपंडित ( निर्णयसागर ).
वि०—विशेषण.
विवे०—विवेकसिंधु.
व्यंक०—व्यंकटेशस्तोत्र.
शिव०—शिवलीलामृत.
शुभा०—शुभानंद.
सं०—संस्कृत किंवा संस्कृतोत्पन्न.
सदा०—सदाचार ( हंसस्वामी ).
संतली०—संतलीलामृत.
सोहि० अद्व०—सोहिरोबा—अद्वयानंद ( पै प्रत ).
सोहि० मह० – सोहिरोबा – महदनुभवेश्वरी ( पै प्रत ).
सोहि० – सिद्धांत०-सोहिरोबा-सिद्धांतसंहिता। ( पै प्रत ).
स्त्री०—स्त्रीलिंग.
हरि०—हरिपाठ.
हरि० वि०—हरिविजय.
हिं०—हिंदी किंवा हिंदुस्थानी ( उर्दू ).
होना०—होनाजीबाळाच्या लावण्या ( चित्रशाळा ).
ज्ञा०—ज्ञानदेव ( माडगांवकर ).
ज्ञा० यो०—ज्ञानेश्वर योगवासिष्ठ (चांदोरकर)
ज्ञा० प्र०—ज्ञानप्रबोध ( मानभावी ग्रंथ. )

सातारा

# पहिल्या आवृत्तीची
# प्रस्तावना

' अहं च भाष्यकारश्च कुशाग्रीयधियावुभौ ।
नैतौ शब्दांबुधेः पारं किमन्ये जडबुद्धयः ॥ '

अर्थः—मी व भाष्यकार दोघेहि कुशाग्रबुद्धीचे असतां आम्हांलाहि शब्दसमुद्राचें पैलतीर गांठतां आलें नाहीं, मग जडबुद्धीच्या इतर माणसांची काय कथा ?

ही उक्ति कोणाची आहे तें ठाऊक नाहीं; पण कोणाचीहि असली तरी ती अर्थपूर्ण व अनुभवसिद्ध आहे यांत कांहीं शंका नाहीं. शब्द हे गतकालीन व विद्यमान व्यक्तींच्या अमूर्त विचारांच्या दृश्यमान मूर्ति होत. अर्थात् स्थलकालादिकांनीं त्यांचें स्वरूप मर्यादित केलेलें असावयाचें हें अगदीं उघड आहे. तसेंच स्थल व काल या दोन्ही गोष्टी वारंवार पालटणाऱ्या असल्यामुळें व त्यांचा परिणाम मनुष्याच्या विचारावर होत असल्यामुळें त्या विचारांच्या दृश्य मूर्ति जे शब्द त्यांच्यांतहि वरचेवर पालट होत असतो; कांहीं जुने शब्द लुप्त होतात किंवा विकार पावतात, व कांहीं अगदीं नवे शब्द माणसांच्या प्रचारांत येतात. एकंदर मनुष्यांच्या भाषेंत अशी घडामोड सारखी चाललेली आहे व पुढेंहि चालत राहणार. सर्वसामान्य मानवी भाषेसंबंधानें हें विधान जितकें खरें आहे, त्यापेक्षांहि मर्यादित स्वरूपाच्या म्हणजे विशिष्ट देशापुरत्या किंवा प्रांतापुरत्या बोलण्याचालण्यांत असलेल्या भाषांसंबंधानें तें अधिक खरें आहे. कारण, सर्वसामान्य मानवी भाषेंत फरक होण्याला विचारक्रांति येवढेंच एक कारण असतें, परंतु अधिक मर्यादित अशा देशीय किंवा प्रांतिक भाषांत उलथापालथ होण्याला राजकीय घडामोडी, सामाजिक उत्क्रांति किंवा अधोगति, व्यापारादि निमित्तांनीं परकीयांशीं घडणारा संसर्ग इ. अनेक बाह्य उपाधि कारण होत असतात, आणि म्हणून प्रत्येक भाषेचा शब्दसंग्रह शतकाशतकानें किंवा कमी अधिक कालमानानें रूपांतर पावत जात असतो. म्हणून पूर्वकालीन व विद्यमान काळच्या विचारांविषयींच्या जिज्ञासु माणसाला आपापल्या भाषेच्या अव्वल काळापासून तों विद्यमान कालापर्यंतच्या शब्दांच्या संग्रहाची आवश्यकता भासूं लागते, आणि त्यामुळेंच असे शब्दकोश हरएक प्रौढ भाषेंत निर्माण होत असतात.

हे शब्दकोश म्हणजे गतकालीन व विद्यमान व्यक्तींच्या विचारांची तिजोरी होत. येवढेंच नाहीं, तर भावी पिढ्यांतील लोकांच्या विचारबुद्धीची ती एक

प्रकारची तयारीहि असते असें म्हणतां येईल. मनुष्याच्या विचाररूपी शिडीचें अगदीं वरचें अग्र जरी दिसलें नाहीं, तरी वरच्या एक दोन पायऱ्या खास दिसत असतात व जसजसा तो वरवर जाऊं लागतो, तसतशा त्या त्याला अधिकाधिक स्पष्ट दिसूं लागतात. खालून चढून आलेल्या पायऱ्यांच्या भक्कम आधारावरच तो पुढच्या पायऱ्या आक्रमण्याची हिंमत बांधीत असतो. सारांश, पूर्वीच्या विचारांच्या व त्यांच्या दृश्य मूर्ति म्हणजे भाषेंतले शब्द यांच्या भरभक्कम शिडीवरच सगळे लेखक, वक्ते, धर्मोपदेशक वगैरे लोकांची व्यवहारयात्रा चालते व त्यांचें मार्ग-क्रमण सुकर होतें. म्हणून या लोकांनीं आपल्या अगोदरच्या काळांत होऊन गेलेल्या लोकांचें सदैव ऋणी असलें पाहिजे.

मराठी लेखकांपुरतांच विचार केला तर गेल्या शंभर वर्षांतले आमचे मराठी लेखक आपल्यावरचें मायभाषेचें हें ऋण पूर्णपणें स्मरून वागले नाहींत असें मोठ्या दुःखानें म्हणावें लागतें. इंग्रजी विद्येच्या नादीं लागून त्यांनीं आपल्या वडिलांनीं ठेविलेल्या विचारसंपत्तीचा व शब्दसंपत्तीचा अनादर केला. त्यामुळें पूर्वीच्या विचारपरंपरेस ते पारखे झाले, आणि शिडीवर चढणारा माणूस प्रखर सूर्यप्रकाशानें डोळे दिपून गेल्यामुळें बावरून जातो व पुढची पायरी चढण्याचें त्याचें अवसान सुटतें, तशी आमच्या लोकांची सध्यां स्थिति झाली आहे. अशा वेळीं थोडा वेळ तरी वर सूर्यप्रकाशाकडे न पाहतां खालच्या पायऱ्यांकडे जर आपण पाहूं किंवा असलेल्या ठिकाणींच पण पाय लटपटूं न देतां डोळे मिटून स्वस्थपणानें उभें राहूं, तर थोड्याच वेळांत आपल्या डोळ्यांपुढें दिसणारे काजवे नाहींतसे होऊन आपणांस आपला पुढचा मार्ग स्पष्ट दिसूं लागेल. याचसाठीं जुन्या संस्कृत व मराठी वाङ्मयाचें अध्ययन हल्लींच्या काळीं अवश्य आहे व त्यांचीं साधनें उपलब्ध करून घेतां येतील तेवढीं घेणें हें आपलें एक अवश्य कर्तव्य आहे. कोश हें एक असें साधन आहे.

दुसऱ्याहि एका प्रकारें मराठी कोशाची आज अत्यंत आवश्यकता आहे. गेल्या शंभर वर्षांत मराठी साहित्याची वाढ निरनिराळ्या अंगांनीं करण्याचे प्रयत्न चालले आहेत. काव्यें, नाटकें, इतिहास व चरित्रें, तत्त्वज्ञान, भाषा, अलंकार, व्याकरण, भौतिकशास्त्रें इ. विषयांवर नवी नवी ग्रंथरचना झाली आहे व होत आहे. ती करतांना पुष्कळ वेळां आपले विचार यथार्थरीत्या व्यक्त करण्याच्या कामीं समर्पक शब्द शोधून काढण्याची यातायात लेखकांना कमजास्त मानानें करावी लागली यांत शंका नाहीं. मराठी भाषेचा आजतागाईत संपूर्ण कोश उपलब्ध असता तर आपणांस हवा आहे त्या अर्थाचा एखादा शब्द आपल्या भाषेंत

...वाचनालय, सातारा.



अगोदरचा आहे कीं नाहीं हें त्यांना पाहतां आलें असतें व असल्यास त्या जुन्या शब्दाचाच उपयोग करून त्यांनीं त्या शब्दाला चिरायु केलें असतें. पण दुर्दैवानें तसा कोश नसल्यामुळें लेखकांना नवे शब्द बनविण्याची दगदग निष्कारण झाली, व जुने चांगले शब्द लुप्त होऊन मराठी भाषेंत नव्या शब्दांना धुडगूस घालण्यास संधि मिळाली.

आतांपर्यंत मराठींत मुळींच शब्दकोश झाले नाहींत असें म्हणण्याचें धाडस कोणाला करतां यावयाचें नाहीं. आतांपर्यंत कांहीं नाहीं तरी लहान मोठे १८ शब्द-कोश मराठींत झाले आहेत. रा. राजवाडे यांनीं एके ठिकाणीं त्यांच्या माहितींतल्या कित्येक कोशांचा परिचय मराठी वाचकांस यापूर्वीं करून दिलाच आहे. त्यांच्या माहितींत थोडीशी भर घालून पुढील यादी तयार करण्यांत आली आहे—

१. महानुभाव ग्रंथकारांनीं रचलेला मध्यकालीन मराठी शब्दांचा कोश.

२. हेमाद्रि पंडितानें शके ११६० सालीं केलेला कांहीं संस्कृत शब्दांच मराठींत अर्थ देणारा कोश.

३. शके १२३९ पर्यंतच्या काळांत महाराष्ट्रांत यादवांच्या राजवटींत झालेले एक शुद्ध मराठी व संस्कृत-मराठी असे दोन कोश.

४. शके १२३९ नंतरच्या तीनशें वर्षांच्या काळांत मुसलमानी अंमल दक्षिणेंत जारीनें चालू असतां अनेक यावनी शब्द मराठी भाषेंत प्रविष्ट झाले होते. त्यांचे अर्थ मराठींत देणारा एक श्लोकबद्ध कोश झाला होता व त्यांत विशेषतः जमाखर्चविषयक शब्दांचाच भरणा होता असें रा. राजवाडे लिहितात.

५. श्री छत्रपति शिवाजी महाराजांनीं तयार करविलेला 'राजव्यवहारकोश.'

६. निजामाच्या दरबारीं असलेले पेशव्यांचे वकील व प्रसिद्ध मुत्सद्दी गोविंद-राव काळे यांनीं युरोपियन लष्करी शब्दांची परिभाषा लिहून ठेविली होती ती.

७. इ. स. १८१० सालीं केरी नांवाच्या साहेबांनीं केलेला कोश.

८. इ. स. १८२४ सालीं लेफ्टनंट कर्नल केनेडी यांनीं केलेला मराठी—इंग्रजी कोश.

९. इ. स. १८२९ सालीं झालेला शास्त्र्यांचा मराठी—मराठी कोश.

१०।११. क्यांडी साहेबांचा इंग्रजी—मराठी व मोल्स्वर्थ आणि क्यांडी यांचा मराठी—इंग्रजी कोश.

१२. इ. स. १८६३ सालीं प्रसिद्ध झालेला रघुनाथ भास्कर गोडबोले यांचा हंसकोश.

१३. इ. स. १८७० सालीं माधव चंद्रोबा नांवाच्या गृहस्थानें छापून प्रसिद्ध केलेला ' संस्कृत शब्दरत्नाकर अथवा संस्कृत–प्राकृत कोश. '

१४. शके १७८९ ( इ. स. १८६७ ) सालीं रा. रखमाजी देवजी मुळे नांवाच्या गृहस्थानें केलेला ' हिंदुशास्त्रांतील संख्याबोधक दुर्बोध शब्दार्थ कोश. '

१५. याच सालीं वर सांगितलेले रा. गोडबोले यांनीं केलेला ' मराठी भाषेचा नवीन कोश. '

१६. याच सालीं निघालेला ' मराठी भाषेचा सुबहकोश ', नांवाचा आणखी एक मराठी कोश.

१७. रा. बाळकृष्ण मल्हार हंस यांचा ' रत्नकोश. '

१८. इ. स. १८९० सालीं रा. विष्णु रामचंद्र बापट व रा. बाळकृष्ण विष्णु पंडित यांनीं तयार केलेला व येथील ' जगद्धितेच्छु ' छापखान्यांत छापलेला ' शुद्ध मराठी कोश. '

यांशिवाय 'ज्ञानेश्वरीपरिभाषा,' रा. गोडबोले यांचे 'प्राचीन व अर्वाचीन ऐतिहासिक कोश,' रा. आठल्ये यांचा ' विद्यामाला ' कोश, रा. सांबारे यांचा 'विद्याकल्पतरु,' रा. पटवर्धन यांचा 'वनस्पति–कोश,' निर्णयसागर छापखान्यानें प्रकाशित केलेला ' स्थलनाम–कोश, ' प्रो. रानडे यांचा 'इंग्रजी–मराठी कोश,' रे. बाबा पदमनजी यांचा कोश, रा. विष्णु परशुरामपंडित यांचा 'संस्कृत–महाराष्ट्र धातुकोश, ' सध्यां ' ज्ञानकोशमंडळा ' मार्फत तयार होत असलेला ' ज्ञानकोश, ' व अनेक शालोपयोगी बारीक सारीक कोश झालेले आहेत.

या यादींतल्या कित्येक कोशांसंबंधानें नामनिर्देशापलीकडे विशेष माहिती देणें अवश्य आहे म्हणून ती येथें देतों—

**राजव्यवहार-कोशः**—हा इ. स. १६७५।७६ च्या सुमारास श्री छत्रपति शिवाजी महाराज यांनीं आपल्या अष्टप्रधानांपैकीं वे. शा. सं. रघुनाथ नारायण अध्वरी, पंडितराव, यांचेकडून मुद्दाम करविला होता. हा अमरकोशासारखा अनुष्टुप छंदांत असून याची श्लोकसंख्या ३८४ आहे. यांत सुमारें दीड हजार यावनी शब्दांचे संस्कृत पर्याय दिले आहेत. नमुन्यासाठीं या कोशांतले दोन तीन श्लोक येथ उतरून घेतों:—

**खलवता** इति यत्तत्तु खल्वोपलमिति स्मृतम् ।
**शिकारखाना** पक्षिशाला **शिकारी** मृगयुर्मतः ॥ १०० ॥
संभारलेखकः **कारखाननीसः** प्रकीर्तितः ।
**हवालदार**स्तत्र मुद्राधिकारी परिभाषितः ॥ २०० ॥

नगर वाचनालय, सातारा.



अन्यायवार्ता फिर्यादिर्वाजे ज्ञेयमवांतरम् ।
प्रान्तोनाम जिल्हे अर्जिदास्तं विनतिपत्रकम् ॥ ३०० ॥

हा कोश प्रथम इ. स. १८६० सालीं रा. काशीनाथ गंगाधरजी नांवाच्या गृहस्थानें प्रकाशित केला होता. पुढें शके १८०२ सालीं रा. ब. काशीनाथ नारायण साने यांनीं तो अनेक प्रतींवरून शुद्ध करून व सूचि, टीपा वगैरे देऊन त्याची आवृत्ति ' श्रीशिवाजी ' छापखान्यांत छापिली. ' हा कोश शिवाजी राजानें स्वतां आपल्याला मराठी भाषेचें ज्ञान ·प्रौढ आणि विद्वान् लोकांप्रमाणें बोलतां येण्यासारखें व्हावें येवढ्याकरितां मुद्दाम करविला ' असें प्रकाशक रा. काशीनाथ गंगाधरजी प्रस्तावनेंत म्हणतात. पण ' मुसलमानांच्या प्राबल्यानें पुष्कळ फारशी, अरबी व उडदु वगैरे शब्द मराठी भाषेंत मिसळून गेले होते, त्या यावनी शब्दांच्या स्थळीं संस्कृत पर्याय योजून ते परिपाठांत आणण्याचा या कोशाचा मूळचा आशय दिसतो ' असें रा. ब. साने म्हणतात. पहिल्याचें म्हणणें असंभवनीय दिसतें. दुसऱ्या विधानांत बराच तथ्यांश दिसतो, तरी त्या विधानांत सूचित केलेला श्री शिवाजीमहाराजांचा उद्देश त्या प्रतापशाली व कर्तृत्ववान् नृपतीच्या हातून सिद्धीस नेववला नाहीं याचें आश्चर्य वाटतें. अस्तु.

नं. ८ चा ले. **कर्नल केनडी यांचा कोश:**—पेशवाई नष्ट झाल्यापासून साऱ्या सहा वर्षांनींच हा बाहेर पडलेला म्हणून याला विशेष महत्त्व आहे. हा इ. स. १८२४ मध्यें श्रीकृष्ण जगन्नाथजी प्रभु नांवाच्या गृहस्थानें मुंबईस कुरिएर प्रेस नांवाच्या छापखान्यांत इंग्रजी व मराठी टैपांनीं छापिलेला आहे. याचे दोन भाग असून एकांत इंग्रजी शब्दांचे मराठींत अर्थ व दुसऱ्यांत मराठी शब्दांचे इंग्रजींत अर्थ दिले आहेत. याच्या अगोदर केरीसाहेबांचा एक मराठी कोश झाला होता. पण त्यांत संस्कृत शब्द फार व मराठी अगदीं थोडे होते. म्हणून हा कोश तयार करावा लागला असें क. केनडीसाहेबांनीं आपल्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे. या कोशाला मुख्य आधार अमरकोशाचें एका ब्राह्मणानें करून दिलेलें भाषांतर व सरकारी कागदपत्रांतून व अर्ज वगैरेंतून साहेबाला आढळून आलेले शब्द होत. याशिवाय अर्स्किनसाहेबाजवळ कॅ. कॉक नांवाच्या एका लष्करी अंमलदारासाठीं त्याच्या दोन मुनशींनीं तयार करून दिलेल्या कोशाचे दोन हस्तलेख अर्स्किनसाहेबाच्या दप्तरांत आढळले. ते मदतीस घेऊन क. केनेडी यांनीं हा ७।८ हजार शब्दांचा कोश तयार केला. या साहेबाला मराठी भाषेचें ज्ञान किती अगाध होतें व मराठी साहित्याची कितीशी माहिती होती तें त्याच्या प्रस्तावनेंतल्या पुढील उद्गारांवरून कोणालाहि दिसून येईल. ते म्हणतात– " It must

be observed that Marathi is merely a spoken language and that it has never been cultivated or refined by authors either in prose or verse. Its formation took place amongst a people solely engaged in agriculture, and as all terms relating to science, language and religion were adopted from another language, and as the vernacular tongue was not employed in composing it, it will be obvious that under such circumstances a language could never become copious." म्हणजे मराठी भाषा ही केवळ बोली आहे, ग्रंथाची भाषा नव्हे, तिच्यांत गद्यपद्यरचना कोणीं केली नाहीं, ती केवळ अडाणी कुणब्यांची भाषा आहे, तिच्यांत शास्त्र, भाषा, धर्म इ. विषयांसंबंधाचे जे शब्द आहेत ते परभाषें-तून घेतलेले आहेत, अर्थात् ती अगदीं दरिद्री भाषा आहे असा साहेबांचा अभिप्राय आहे. हा अभिप्राय ठासून सांगितल्यानंतर साहेब पुढें म्हणतात कीं-या ( मराठी ) भाषेंत सामासिक शब्द एकहि नाहीं ! इतकेंच नाहीं तर केवळ भाववाचक अशी एकही संज्ञा ( abstract term ) नाहीं ! ज्यानें ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथप्रभृति जुन्या महान् मराठी कवींचें राहो, पण नुकत्या होऊन गेलेल्या तुळसीदास, रामजोशी, होनाजीप्रभृति शाहिरांचींसुद्धां नांवें ऐकिलीं नाहींत, मराठीचा संस्कृत भाषेशीं असलेला संबंध ज्याच्या गांवींही नाहीं, किंवा घोडा-गाडी, शेतवाडी, नोकरचाकर इ० साधे सामासिक शब्दसुद्धां ज्याच्या कानावरून गेले नाहींत असे हे मराठी भाषेचे महापंडित मराठी भाषेचा कोश तयार करण्यास सरसावलेले पाहून कोणास त्याच्या धाष्टर्याचें कौतुक करावेंसें वाट-णार नाहीं ? या कोशाच्या प्रस्तावनेंत शेवटीं एक लहानसेंच पण महत्त्वाचें वाक्य आहे. त्यावरून मराठी भाषेविषयींची अशी बहुमोल माहिती देणारा कोश कोणा-साठीं साहेबांनीं तयार केला त्याचें बरोबर उत्तर मिळतें. साहेबबहादुर म्हणतात कीं, 'या कोशाच्या साह्यानें मराठी भाषा शिकण्याचे कामीं एखाद्या गृहस्थास जरी मदत झाली तरी प्रस्तुत कोशकर्त्यांचे श्रम अगदींच वाया गेले असें होणार नाहीं.' या वाक्यावरून मराठी भाषा शिकणाऱ्या इंग्रजांसाठीं हा कोश तयार करण्यांत आला होता हें उघड दिसतें. अशा गुरूपासून मराठी भाषेविषयींची वरच्या-सारखी बिनचूक माहिती घेणारा शिष्यवर्ग 'गुरूसे चेला सवाई' निघाला तर काय नवल ?

नं. ९ चा **शास्त्र्यांचा मराठी–मराठी कोश**:–इ. स. १८२९साली वे. शा. सं. जगन्नाथशास्त्री क्रमवंत, बाळशास्त्री घगवे, रामचंद्रशास्त्री जन्हवेकर,

सखाराम जोशी, दाजीशास्त्री शुक्ल व परशुरामपंततात्या गोडबोले या मंडळींच्या संयुक्त प्रयत्नानें मराठी शब्दांचे मराठींत अर्थ देणारा हा पहिला कोश तयार होऊन बाहेर पडला. अलीकडच्या काळांत खऱ्या अधिकारी पुरुषांनीं तयार केलेला हाच पहिला मराठी-मराठी कोश होय. या कोशांत शब्द थोडे—सुमारें सातआठ हजार-आहेत. फारशी अरबी, ऊर्दू वगैरे यावनी भाषेंतून सरकारी दरबारीं कामानिमित्तानें मराठींत आलेले शब्द या कोशांत नाहींत. याचें कारण कोशकार प्रस्तावनेंत असें देतात कीं, ' या देशाचें राज्य पूर्वी कित्येक वर्षें यवनांनीं केलें. त्यामुळें यवनी भाषेंतील दर, तयार, रोज, साल, गुदस्त इ. कितीएक शब्द या भाषेंत मिसळले आहेत. ते राजकीय व्यवहाराचे अनुरोधानें आले म्हणून राजकीय व्यवहारींच प्राधान्येंकरून वर्ततात आणि तेथेंच शोभतात. इतर साधारण व्यवहारीं सरासरी बरे दिसतात; परंतु शास्त्रीय व्यवहारादिसंबंधीं प्रौढ म्हणून जी भाषा तींत तर अगदींच शोभत नाहींत. याकरितां प्रौढ भाषेंत ते शब्द घेऊं नयेत. ' कोश शिळाप्रेसवर छापलेला व अक्षर ठळक मोत्याच्या दाण्यासारखें सुंदर आहे. कागदहि जाड वापरल्यामुळें पुस्तक मोठें भरीव दिसतें. या कोशांत दिलेले अर्थ बहुधा बिनचूक आहेत. भाषा मात्र जुन्या पद्धतीची, पाल्हाळिक व क्लिष्ट आहे. बरेचसे अर्थ साध्या शब्दांनीं सरळपणें सांगण्यासारखे असतां उगाच द्राविडी प्राणायाम केला आहे. या कोशांत विशेष हा आहे कीं, यांत मराठी भाषेचे संप्रदायहि अर्थांसह दिले आहेत. ज्ञानेश्वरी, मानभावी ग्रंथ, एकनाथी भागवत इ. ग्रंथांतले कांहीं जुने मराठी शब्द या कोशांत सांपडतात. एकंदरींत हा कोश बराच महत्त्वाचा आहे यांत शंका नाहीं.

या कोशाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं, ' आजपर्यंत या (मराठी) भाषेवर कोश व व्याकरण करण्यास कोणी प्रवृत्त झाला नाहीं हें मनांत आणून सर्व लोकांचे कल्याणार्थ राजकार्यधुरंधर प्रजापालनैकरत हानरेबल मौंट स्तुर्त एलफिंस्तनसाहेब बहादुर पात्रण आणि गव्हर्नर यांनीं मुंबईतील शिक्षकमंडळीस आज्ञा करून हा ग्रंथ बाळशास्त्री घगवे इत्यादिकांचे हातून करावयास आरंभिला. पुढें त्यांचेच हातून प्रतापसिंह परम कारुणिक हानरेबल जनरल सिरजान मालकम साहेब बहादुर पात्रण आणि गव्हर्नर यांनीं शेवटास नेला. ' यावरून या कोशाच्या रचनेला इंग्रज सरकारच कारणीभूत झालें होतें असें दिसतें. त्या काळाच्या मानानें हा कोश सर्वोत्कृष्ट झाला होता यांत शंका नाहीं. त्या गोष्टीला आज जवळ जवळ १०० वर्षें होत आलीं, पण त्याची सुधारून वाढविलेली नवी आवृत्ति काढण्याचा किंवा त्यासारखा दुसरा एकादा कोश नवीन तऱ्हेवर तयार करवून छाप-

ण्याचा विचार इंग्रज अधिकाऱ्यांच्या मनांत आला नाहीं हें आश्चर्य आहे. 'प्रजापालनैकरत' अधिकाऱ्यांना 'सर्व लोकांचे कल्याणार्थ' अशा कोशासाठीं लाख पन्नास हजार रुपये खर्चणें जड नव्हतें. त्या काळीं महाराष्ट्रांत विद्वानांची वाण होती असेंहि नाहीं. कृष्णशास्त्री चिपळूणकर, कृष्णशास्त्री गोडबोले, कृष्णशास्त्री राजवाडे, बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर प्रभृति विद्वान् शास्त्री पंडितांकडे हें काम सरकारला सहज सोपवितां आलें असतें, व त्यांनीं केलेला कोश मराठी भाषेच्या लौकिकास व इंग्रजसरकारच्या इभ्रतीस भूषणभूत झाला असता यांत शंका नाहीं. हा योग कां जमून आला नाहीं याचें गूढ तत्कालिन लोकांनाहि पडलें होतें असें दिसतें. या गूढाचा उलगडा त्या काळचे विद्वान् कोणत्या रीतीनें करीत तें पुढें मोलस्वर्थ साहेबांच्या कोशासंबंधानें लिहितांना सांगण्यांत येईल.

या कोशाच्या नंतरचे सांगण्यासारखे प्रयत्न म्हणजे **क्यांडीसाहेबांचा इंग्रजी-मराठी व मोलस्वर्थ साहेबांचा मराठी-इंग्रजी हे दोन कोश** होत. पैकीं मराठी शब्दांच्या कोशापुरतेंच आपणांस तूर्त बोलावयाचें असल्यामुळें क्यांडीसाहेबांच्या कोशाशीं आपणांस कांहीं कर्तव्य नाहीं. मोलस्वर्थ साहेबांचा कोश शास्त्र्यांच्या कोशाप्रमाणें इंग्रज सरकारच्याच आश्रयानें तयार झाला व छापिला गेला. त्या कामीं इंग्रजसरकारनें बिलकुल कुचरपणा केला नाहीं. असें सांगतात कीं, आपापल्या प्रांतांतले शब्द गोळा करून ते कोशकर्त्याकडे पाठविण्याविषयीं प्रत्येक जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांकडून ठिकठिकाणच्या अधिकाऱ्यांना हुकूम सुटले होते. शिवाय, संस्कृत, मराठी, अरबी, फारशी, उर्दू वगैरे भाषांतले उत्तम उत्तम निष्णात पंडित व मुनशी कोशकर्त्या साहेबांच्या मदतीसाठीं देण्यांत आले होते. अशा सर्वतोपरि अनुकूल स्थितींत निर्माण झालेल्या कोशाला सर्वांगसुंदर होण्याचें व तो उत्तम कागदावर सुवाच्य टाइपांनीं छापला जाऊन सर्व शिक्षणसंस्था, अदालती, कचेऱ्या यांच्या व प्रोफेसर, न्यायाधीश, वकील इ० मंडळींच्या खाजगी ग्रंथसंग्रहांच्या कपाटाला भूषविण्याचें सौभाग्य प्राप्त झालें. इतकेंच नाहीं तर आज पाऊणशें वर्षांनंतरसुद्धां हाच कोश सर्वत्र प्रमाणभूत मानण्यांत येत असतो, यांत आश्चर्य नाहीं.

ज्या 'प्रजापालनैकरत' सरकारला थोड्या वर्षांपूर्वीं मराठी शब्दांचे मराठींत अर्थ देणाऱ्या, अर्थात महाराष्ट्रांतल्या यच्चयावत् प्रजेस अत्यंत उपयोगी अशा, कोशाची पुनरावृत्ति काढण्यासाठीं दहा वीस हजार रुपये खर्च करण्याची बुद्धि झाली नाहीं, तेंच सरकार मोलस्वर्थ साहेबाच्या कोशाच्या रचनेप्रीत्यर्थ व मुद्रणाप्रीत्यर्थ येवढा खटाटोप करण्यास व सहस्रावधि रुपये खर्च करण्यास कसें तयार

झालें याचें तत्कालिन लोकांसहि मोठें गूढ वाटलें होतें. या गूढाचा उलगडा एका तत्कालीन लेखकानें केलेला आहे व तो विचार करण्यासारखा आहे. तो असाः—

**विविधज्ञानविस्तार**, पु. ४ अं. ५ यांत या कोशासंबंधानें लिहितांना एक लेखक म्हणतो—"क्यांडी व मोलस्वर्थ यांच्या कोशांच्या योगानें मराठी भाषेला जरी कांहीं मदत झाली नाहीं असें म्हणवत नाहीं, तरी ते ( कोश ) मराठी लोकांचें व मराठी भाषेचें हित ध्यानांत धरून तयार केले आहेत, किंवा त्यांच्या हिताकरितां त्यांच्या पुनरावृत्ति चालल्या आहेत असें म्हणतां येत नाहीं. कारण जो कोणी त्या कोशाकडे नजर लावील त्यास उघड दिसेल कीं ते मराठी शिकणाऱ्या इंग्लिश लोकांकरितां आहेत, किंवा ज्याला प्रथमतः इंग्लिश चांगलें समजत असेल अशा मराठी लोकांना इंग्रजी ग्रंथांचे मराठी तरजुमे करण्यास मात्र ते साह्य करीत आहेत."

तत्कालीन पंडिताची ही समजूत खरी आहे असें सदर कोश लक्षपूर्वक पाहणाऱ्या आतांच्या लोकांना सुद्धां वाटल्यावांचून राहत नाहीं. मराठे लोकांच्या व मराठी भाषेच्या हिताकडे दृष्टि देऊन इंग्रजसरकारनें कोश तयार करविला असता तर तो त्या काळच्या बहुजनसमाजास अपरिचित अशा इंग्रजी भाषेंत तयार करविला नसता, व मराठी भाषेला ललामभूत झालेल्या ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ–प्रभृति कवींच्या लेखनांत आलेले शब्द बुद्धिपुरःसर गाळून कुणबी, अडाणी लोकांच्या गांवढळ शब्दांची जी रेलचेल त्यांत केलेली आहे ती खात्रीनें दिसली नसती. सारांश, या कोशाचें एकंदर स्वरूप पाहिलें म्हणजे महाराष्ट्रांत महत्प्रयासानें स्थापन केलेली इंग्रजी सत्ता दृढ करण्यास व अखंड टिकविण्यास त्या प्रांतांतल्या समाजाची खडान्‌खडा माहिती करून घेणें इंग्रज अधिकाऱ्यांस अवश्य होतें व ती माहिती करून घेण्यास अशा कोशाची अत्यंत आवश्यकता होती, म्हणून हा कोश निर्माण झाला याविषयीं शंका राहत नाहीं. कोणताहि हेतु या कोशरचनेच्या मुळाशीं असला तरी येवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, अर्वाचीन मराठी शब्दांचा येवढा संग्रह व त्यांचे इंग्रजींत कां होईना पण अर्थ देणारा दुसरा कोश अद्याप झाला नाहीं आणि म्हणून या कोशाचें महत्त्व आतांपर्यंत अबाधित राहिलें आहे. इतक्या महत्प्रयासानें तयार केलेल्या कोशांत मुळींच चुका नाहींत अशी पुष्कळांची समजूत आहे, व ही समजूत ते वेळोवेळीं भाषणांतून व लेखांतूनहि प्रकट करीत असतात. म्हणून त्यांची ती गैरसमजूत दूर करण्यासाठीं ( दोष दाखविण्याच्या हेतूनें नव्हे ) या कोशांतल्या पांच चार ठळक हास्यास्पद

चुका नमुन्यादाखल येथें दाखवितों. ' गुण्यागोविंदानें ' याचा ' अर्थ न भांडतां सवरतां ' किंवा ' शांततेनें ' असा होतो. पण साहेबांनीं ' खुषीनें, सढळ हातानें, किंवा अगदीं मनाच्या उत्कट इच्छेनें ' असाहि दिला आहे. मेहुणी म्हणजे मामाची किंवा आत्तेची मुलगी अर्थात् मामेबहीण किंवा आतेबहीण असा अर्थ दिला आहे ! हा विलक्षण अर्थ त्यांस कोणी सांगितला न कळे ! ' धर्मपरायण ' शब्दाला अव्यय व 'धर्मशाळे'ला 'न्यायमंदिर' बनविलें आहे ! कुशावर्त शब्दाचा अर्थ देतांना खूपच बहार केली आहे ! ' गंगेच्या उगमाजवळचें एक तीर्थ' असा त्या शब्दाचा खरा अर्थ असतां तो न देतां कुशावर्त व केशावर्त एकच समजून 'घोड्याच्या अंगावरचा केसांचा भोंवरा' असा अर्थ दिला आहे ! यापेक्षांहि अधिक मौज पाहावयाची असली तर 'धेडगुजरी' शब्दाचा अर्थ साहेबांनीं काय केला आहे तो पहा. धेडगुजरी म्हणजे कांहीं शब्द एका भाषेंतले व कांहीं शब्द दुसऱ्या भाषेंतले घेऊन त्यांची केलेली खिचडी असा वास्तविक अर्थ असतां या अर्थाच्या जोडीला साहेबांनीं हिंदुस्थानची सर्व प्रांतांत समजण्यासारखी अथवा लोकांच्या परस्परव्यवहाराची भाषा ( Lingua franca ) असा पर्यायशब्द दिला आहे ! 'वाळा' या मराठी शब्दाला हिंदी भाषेंत 'खस' असा पर्यायशब्द आहे. पण साहेबांनीं ' खस ' व ' खसखस ' यांत भेद न ठेवतां वाळ्यालाच दुसरें खसखस हें नांव असल्याची अपूर्व माहिती आपल्या वाचकांस दिली आहे ! ' सिनीवाली ' या शब्दाचा अर्थ चतुर्दशीयुक्त अमावास्या असा असतां साहेब बहादुरांनीं ' पौर्णिमेचा दिवस ' असा अर्थ देऊन धडधडीत अमावास्येच्या दिवशीं चंद्राला आपल्या संपूर्ण कलांसह प्रकाशमान होण्याचा हुकूम सोडला आहे ! चंद्र तो हुकूम मानीत नाहीं हा भाग निराळा, पण साहेब बहादुरांनीं अगोदर असा विचित्र हुकूम सोडावा आणि चंद्रावर तो अमान्य करण्याची पाळी आणावी हीच गोष्ट अगोदर कशीशी वाटण्यासारखी आहे. पन्नास साठ हजार शब्दांच्या कोशांत अशा शेपन्नास चुका म्हणजे फार आहेत असें नाहीं व त्यांच्या योगानें सदर कोशाच्या उपयुक्ततेला विशेषसा बाध येतो अशांतलाहि प्रकार नाहीं हें खरें; तथापि हा कोश सर्वथा विश्वसनीय आहे ही आमच्या पुष्कळ सुशिक्षितांची समजूत वाळूच्या पायावर रचलेल्या इमारतीसारखी आहे येवढेंच दाखविण्यासाठीं हीं चुक्यांचीं उदाहरणें येथें दिलीं आहेत, उपहास करण्याच्या हेतूनें नव्हे.

**हंसकोश**—हा इ. स. १८६३ सालीं शिळाप्रेसवर छापलेला आहे. यांत जुन्या मराठी भाषेंतले म्हणजे ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकारामप्रभृति अनेक

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

प्राकृत कवींच्या ग्रंथांतले निवडक कठीण शब्द व कांहीं संस्कृत अर्थ व स्थल-निर्देश यांसह दिले आहेत.

गोडबोलेशास्त्र्यांच्या अगोदरच्या काळांतहि हे जुने ग्रंथ लोकांच्या नित्य पाठांतरांत होते; पण ते बहुधा धार्मिक दृष्टीनें वाचले जात. अर्थाकडे फारशी कोणाची दृष्टि नसे. या ग्रंथांचें प्रवचन करणारांना ओवीचा किंवा अभंगाचा सांप्रदायिक अर्थ ढोबळ मानानें बिनचूक सांगतां येई; पण अमक्या एका विशिष्ट शब्दाचा अर्थ काय असें विचारलें तर तो सांगण्याची बहुधा पंचाईत पडे. आजच्या घटकेलासुद्धां ही स्थिति पुष्कळ अंशानें दिसते. हंसकोशाच्या रचनेच्या वेळीं तर शब्दार्थाविषयींची ही अनास्था अधिकच तीव्र स्वरूपांत लोकांच्या ठायीं वसत असली पाहिजे. शिवाय, त्या काळीं दुसरीहि एक मोठी अडचण असे. ती ही कीं, त्या काळच्या पोथ्या बहुधा शब्द तोडून लिहिलेल्या किंवा छापलेल्या नसत. त्यामुळें शब्द तोडून वाचतांना पुष्कळ हास्यास्पद चुका होत. अशा कांहीं चुका हंसकोशाच्या कर्त्यांच्या हातूनहि झालेल्या आहेत. उदाहरणार्थ, ज्ञानेश्वरी अ. १८ ओवी १० पहा. ही ओवी अशी आहे—

' जयजय देव श्रीगुरो । अकल्पनाप्यकल्पतरो । स्वसंविद्द्रुमबीजप्रो–। हणावनी । ' यांत ' बीजप्रोहणावनी ' हा एक सामासिक शब्द असून त्याचा अर्थ बीजाचें उत्पत्तिस्थान असा आहे. पण हंसकोशकर्त्यांनीं ' हणावनी ' असा शब्द वेगळा काढून त्याचा अर्थ 'आवड' असा दिला आहे (हंसकोश पृ. २३० पहा). प्रोहण + अवनी हे दोन शब्द सांधले असतां 'प्रोहणावनी' असा समास झाला पाहिजे हें उघड आहे. कोशकर्त्याजवळच्या पोथींत 'हाणावनी' असा पाठ असला तर तो अर्थात् चुकीचा पाठ होय. दुसरी गोष्ट –' प्रोहणावनी ' या शब्दांतून ' हाणावनी ' येवढीं अक्षरें काढून टाकिल्यावर बाकी ' प्रो ' हा भाग राहतो, त्याचा अर्थ काय ? हंसकोशांत ' प्रो ' असा शब्द कोठेंच दिलेला आढळत नाहीं; आणि तिसरी गोष्ट म्हणजे ' हाणावनी ' या शब्दाची व्युत्पत्ति काय ? त्याला ' आवड ' हा अर्थ कोशकारांनीं चिकटविला, त्याला आधार काय ? सारांश, योग्य स्थळीं शब्द न तोडल्यामुळें साराच गोंधळ उडाला आहे.

अशा चुका सध्यांच्या काळींहि जुन्या आध्यात्मिक पोथ्यांच्या व ऐतिहासिक कागदपत्रांच्या संशोधनाचे कामांत कमजास्त मानानें होत असतात. प्रस्तुत कोशाच्या कामासंबंधानें मीं जें अशा पोथ्यांचें व ऐतिहासिक वाङ्मयाचें वाचन केलें आहे त्यांत अशा शेंकडो चुका मला आढळल्या आहेत. अशा चुकांचे कांहीं गमतीचे नमुने येथें द्यावेसे वाटतात. ' हो मदनतात ' बद्दल ' होम दनतात, '

'शाईशिरस्ती' बद्दल 'शाईसी रस्ती,' 'रणखंदळ' बद्दल 'रणखंदळ,' 'निरे भिवरे' बद्दल 'निरेभि वरे', 'जराक यास्तव' याचे जागीं 'जराकया स्तव', 'कोरखू' बद्दल 'कोरकू', 'बुरा' बद्दल 'बरा', अशा प्रकारें चुकीनें भलत्याच ठिकाणीं भलते शब्द वाचल्यावर दनतात, रस्ती, खंदळ, निरेभि, जराकया, कोरकू इ. शब्दांचे अर्थ सांगण्यास अडचण पडली तर काय नवल आहे? पण टीपा देणारे आमचे बहाद्दर अशा लुंग्यासुंग्या अडचणींना थोडेच दाद देणारे आहेत? त्यांनीं मागचा पुढचा संदर्भ पाहून आणि विशाल कल्पनेचें साह्य घेऊन असा एखादा अर्थ त्या हातपाय मोडलेल्या शब्दाच्या माथीं मारावयाचा कीं, वाचक गारच झाला पाहिजे! असा प्रकार जर या विसाव्या शतकांत अजून खपतो, तर पन्नास वर्षांपूर्वी झालेल्या या कोशांतहि क्वचित् स्थळीं असा प्रकार घडलेला दिसून आला तर नवल काय? अशा अडचणीच्या काळांत व कोशरचनेस अवश्य लागणाऱ्या साधनांचा बहुतेक अभाव असतां शास्त्रीबुवांनीं अतिशय परिश्रम करून प्राचीन मराठी शब्दांचा कोश निर्माण करण्यांत यश मिळविलें ही गोष्ट खरोखर अभिनंदनीय म्हटली पाहिजे.

याच पंडितानें 'मराठी भाषेचा कोश' नांवाचा आणखी एक कोश इ. स. १८७० सालीं केला. हंसकोशांतले बरेचसे शब्द घेऊन व शास्त्र्यांच्या कोशांतल्या शब्दांची भर त्यांत घालून हा तयार केला आहे. यांत सुमारें १३ हजार शब्द आहेत. भाषा जुन्या पद्धतीचीच आहे. संस्कृत, अरबी व फारशी या भाषांतून आलेल्या शब्दांपुढें मात्र अनुक्रमें सं. अ. व फा. अशा संक्षेपानें त्या त्या शब्दांचे उगम दाखविले आहेत. पण हिंदुस्थानी, गुजराथी, कानडी, तामिळ, तेलगु, पोर्तुगीज इ. भाषांतून आलेल्या शब्दांविषयीं पूर्ण मौनच धरलें आहे.

मराठी भाषेंतल्या शब्दकोशासंबंधानें आतांपर्यंत जे ठळक ठळक प्रयत्न झाले त्यांचें स्वरूप कशा प्रकारचें होतें तें यावरून दिसून येईल. इंग्रजी भाषेच्या उत्तम कोशांचीं उदाहरणें डोळ्यांपुढें असल्यामुळें वर सांगितलेले कोश आपापल्यापरी चांगले असतांहि मार्मिक वाचकांच्या डोळ्यांत ते भरत नाहींत, आणि दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, राजाश्रयाच्या अभावामुळें किंवा मातृभाषेविषयींच्या आमच्या अनास्थेमुळें अथवा दोन्ही कारणांचा संयोग होऊन म्हणा, या कोशांत सुधारणा करण्याचें तर राहोच, पण त्यांचें पुनर्मुद्रण करण्याचें सुद्धां काम आतांपर्यंत कोणीं केलें नाहीं. त्यामुळें हे जुने कोश सगळे दुर्मिळ होऊन जुन्या मराठी ग्रंथांचें आस्थापूर्वक अध्ययन करणाराला त्या त्या ग्रंथांतल्या टीपांवरच सर्वथा अवलंबून राहण्याची पाळी आली; व टीपा देणाऱ्यांच्या हातून अनेक वेळां अक्षम्य चुका घडत

असतात ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे असल्या टीपांच्या द्वारें मिळविण्यांत येणारें जुन्या मराठी भाषेचें ज्ञान कशा प्रकारचें असतें तें वेगळें सांगण्याची आवश्यकता नाहीं. प्रस्तुत लेखकानें या गोष्टीचा स्वतः पूर्ण अनुभव घेतला असल्यामुळेंच प्रस्तुत कोश तयार करण्याची बुद्धि त्याला झाली. सन १९०८साली त्यानें ज्ञानेश्वरी व एकनाथी भागवत या ग्रंथांचें विशेष आस्थापूर्वक अध्ययन करण्यास सुरुवात केली, व या ग्रंथांच्या निरनिराळ्या प्रति ताडून पाहून त्यांतल्या कठिण शब्दांवरच्या टीपा पाहिल्या. त्यामुळें अर्थाचा खुलासा तर झाला नाहींच, पण उलट त्या शब्दांच्या अर्थासंबंधानें डोक्यांत इतका घोटाळा माजला कीं, कांहीं पुसूं नये ! जुन्या मराठी ग्रंथांच्या अध्ययनांत येणारी ही मोठी धोंड हरप्रयत्नानें दूर करण्याचा संकल्प तेव्हांच त्यानें केला, व पांचसात वर्षांत आपलें सारें तनमनधन या विषयाकडे लावून डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, रा. ब. महाजनि, गणपतराव आगाशे, हरिभाऊ आपटे, हरिभक्तिपरायण विष्णुबोवा जोग, कलकत्त्याचे दीनानाथ विष्णु माडगांवकर प्रभृति विद्वानांपुढें आपल्या शंका मांडून आणि त्यांचेकडून पुष्कळ शब्दांचे खरे अर्थ मिळवून, व त्याचप्रमाणें तुकाराम सोसायटीचें दप्तर चाळून जुन्या मराठी शब्दांचा कोश स्वतःच्या उपयोगार्थ तयार केला. इतक्या परिश्रमानें तयार केलेल्या कोशाचा फायदा आपल्या महाराष्ट्रीय बंधुभगिनींनाहि मिळावा म्हणून तो छापून काढण्यासाठीं इंदूरच्या माझ्या अनेक मित्रांनीं फार आग्रहाच्या सूचना केल्या, पण द्रव्यानुकूलतेच्या अभावीं हा कोश अनेक वर्षे तसाच पडून राहिला होता. पुढें शक्य तितकें मराठी भाषेच्या द्वारेंच शिक्षण देण्याविषयींची चळवळ महाराष्ट्रांत जोरानें सुरू झाली, तेव्हां अशा चळवळीविषयीं सक्रिय सहानुभूति दाखविण्याचा उत्तम मार्ग म्हणजे या कोशांत अलीकडचेहि शब्द घालून त्याला आजतागाईत संपूर्ण करून सोडणें हा होय असें मनानें घेतलें व त्या दिशेनें काम करण्यास मी एकदम जोरानें लागलों. त्याचें हें दृश्य फळ आज महाराष्ट्रीय बंधुभगिनींपुढें मी अत्यादरपूर्वक ठेवीत आहें.

'कर्मण्येवाधिकारस्ते' या भगवदुक्तीवर पूर्ण श्रद्धा ठेवून काम केल्यानें त्या कामाची सांगता करण्याचा भार परमेश्वरावर कसा पडतो व त्यामुळें त्या कार्याच्या आड येणाऱ्या महत्संकटांचाहि कसा अकल्पित रीतीनें परिहार होतो तें या कोशाच्या संबंधांत माझ्या अनुभवाला पूर्णपणें आलें आहे. हा कोश तयार होत असतां नानाप्रकारच्या प्रापंचिक व दैवी आपत्ति माझ्यावर आल्या. दोनदां तर शारीरिक व्याधींनीं अगदीं आसन्नमरणस्थिति प्राप्त झाली होती. तथापि माझ्या हातून ही मराठी भाषेची सेवा घडावी असा ईश्वरी संकल्पच होता, म्हणून मी

त्या दुर्धर संकटांतूनहि पार पडलों. हीच मनाची प्रबळ भावना हें महत्कार्य तडीस जाण्यास बहुतांशीं कारण झाली आहे.

मराठी भाषेच्या वैभवाला शोभण्यासारखा व अव्यंग असा हा कोश नाहीं हें मी पूर्णपणें जाणून आहें. तसा कोश करण्यास लागणारें बुद्धिवैभवादि सामर्थ्यहि माझे ठायीं नाहीं हें मी कबूल करतों. तथापि मराठी भाषेचा सर्वांगसुंदर कोश व्हावा अशी महाराष्ट्राची इच्छा आज अनेक वर्षें विविधज्ञानविस्तारासारख्या सुप्रतिष्ठित मासिकाच्या द्वारें अनेकवेळां व्यक्त झाली असतांहि हें अत्यंत परिश्रमाचें, जबाबदारीचें, दीर्घोद्योगाचें व खर्चाचें काम हातीं घेण्यास कोणी तयार होईना. तेव्हां सर्वांगसुंदर व आदर्शभूत कोश राहो, पण निदान मध्यम प्रतीच्या व तात्पुरती गरज भागविणाऱ्या कोशाचा कच्चा खर्डा तरी विद्वज्जनांपुढें मांडावा अशा बुद्धीनेंच हें कार्य हातीं घेऊन व आपल्या आयुष्यांतला सारा व्यासंग व इतिकर्तव्य हेंच अशा दृष्टीनें सारें तनमनधन त्याकडे लावून मी हें कार्य आज ८।१० वर्षें केलें आहे. आपल्या मराठी भाषेचा आदर्श–कोश कोणी करावयाचा झाला तर माझ्या मतें तो असा व्हावयास पाहिजे —

१ आदर्श–कोशांत व्यवहाराच्या भिन्नभिन्न शाखांतले झाडून सारे मराठी शब्द तर यावेच, पण याशिवाय जुनें वाङ्मय, ताम्रपट, शिलालेख यांच्यांतले अप्रसिद्ध शब्द, ऐतिहासिक कागदपत्रें, बखरी, सनदा, निवाडपत्रें वगैरेंतले शब्द व त्याचप्रमाणें नवे जुने सर्व पारिभाषिक शब्दहि अंतर्भूत व्हावे.

२ जुन्या शब्दांच्या स्वरूपांत नवीन लेखनपद्धतीप्रमाणें फिरवाफिरव न करतां ते शब्द मूळच्या स्वरूपांतच ठेवावे.

३ शक्य तितक्या शब्दांची सर्वमान्य झालेली व्युत्पत्ति कोशांत यावी. वादग्रस्त असलेली व्युत्पत्ति कोशाच्या परिशिष्टांत द्यावी. परक्या भाषेंतून आलेल्या शब्दांचें त्या त्या भाषेंत मूळ रूप कोणतें होतें तेंहि सर्वांना कळण्यासाठीं बाळबोध लिपींत द्यावें.

४ व्युत्पत्तीच्या पुढें त्या शब्दाचें व्याकरण म्हणजे शब्दाची जात व लिंग हीं द्यावीं.

५ त्यापुढें शब्दाचे अर्थ पुढील क्रमानें द्यावे—१ व्युत्पत्यर्थ; २ व्याख्या किंवा विस्तृत रूढ अर्थ; ३ पर्याय शब्द; ४ लाक्षणिक, आलंकारिक व व्यंग्यार्थ; ५ शब्दासंबंधाची पौराणिक, ऐतिहासिक व अवांतर माहिती; ६ संप्रदाय व म्हणी; ७ सामासिक शब्द; ८ तत्सदृश किंवा विरोधी शब्द ( अर्थाच्या कमजास्त छायांसह ).

वेब्स्टरसारखा बृहत् मराठी कोश करतांना हा आदर्श दृष्टीपुढें ठेवणें शक्य आहे. असा बृहत्कोश करण्याचें काम माझ्यासारख्या क्षुद्र व्यक्तीच्या आवांक्याबाहेरचें असल्यामुळें व प्रस्तुतसारख्या आटोपशीर कोशांत इतक्या गोष्टींचा समावेश करणें अशक्य असल्यामुळें वरील ८ कलमांपैकीं कित्येक कलमांना या कोशांत फांटा द्यावा लागला; पण बाकीचीं कलमें शक्य तितक्या प्रकारें पाळण्यांत आलीं आहेत असें दिसून येईल.

कोशांत प्रादेशिक म्हणजे विशिष्ट प्रांतांतच रूढ असलेले शब्द द्यावे कीं न द्यावे या संबंधानें मतभेद होण्याचा संभव आहे. कित्येक चांगल्या उत्कृष्ट इंग्रजी कोशांतून प्रादेशिक इंग्रजी शब्द दिलेले नाहींत, कित्येकांत आहेत. माझी स्वतःची अशी समजूत आहे कीं, शक्य असेल तर निदान ठळक तरी प्रादेशिक शब्द अवश्य द्यावेत. मोलस्वर्थच्या कोशांत असे कांहीं शब्द दिले आहेत. मीहि या कोशासाठीं गोमांतक, कोंकण, सावंतवाडी, नागपूर, वऱ्हाड, कारवार, मालवण, खानदेश, माळवा, कोल्हापूर इ. प्रांतांतले ठळक प्रादेशिक शब्द मुद्दाम आणवून घातले आहेत. स्थलसंकोचामुळें या सगळ्या शब्दांना जोडून प्रांताचें नांव देतां आलें नाहीं. तथापि कांहीं शब्दांचे प्रांत स्पष्टपणें निर्दिष्ट केलेले आढळतील.

प्रस्तुत कोशांत अनेक व्यंगें आहेत. तीं माझीं मला दिसत आहेत. कांहीं संख्यावाचक शब्द, औषधें, वनस्पति, प्राणी, खाद्य पदार्थ इ. चीं वर्णनें मला स्थलसंकोचास्तव देतां आलीं नाहींत. व्युत्पत्तीकडेहि मला विशेषसें लक्ष देतां आलें नाहीं. जुन्या प्राकृत शब्दांचे निरनिराळे अर्थ देतांना ज्ञानेश्वरी, भागवत, दासबोध, गीतार्णव इ. ग्रंथांतलीं अवतरणें देण्याच्या ऐवजीं त्यांच्या नुसत्या स्थलनिर्देशावरच मीं काम भागवून नेलें आहे. घोडा, कुत्रा, इ. सामान्य व सोप्या मराठी शब्दांचे अर्थ त्याहून सोप्या व आबालवृद्धांस परिचित अशा शब्दांनीं न देतां आल्यामुळें मूळ शब्दांचे संस्कृत पर्याय देण्यावाचून गत्यंतर नव्हतें. सुमारें पांच सहा हजार प्रचलित शब्दांचे अर्थ कोठेंहि लिहिलेले आयते न मिळाल्यामुळें मला ते नव्यानेंच यथामति जुळवून घालावे लागले आहेत. ऐतिहासिक कागदपत्रांतून अरबी, फारशी, उर्दू व इंग्रजी शब्दांचे हातपाय मोडून इतके विचित्र अपभ्रंश केलेले आढळले कीं, मूळचे शब्द कोणते असावे हें त्या भाषेच्या अभिज्ञांससुद्धां ओळखण्यास महत्प्रयास पडले, व तासचे तास खटपट करूनहि शेवटीं कित्येक शब्द ओळखतां आले नाहींत, व त्यांचा अर्थहि लागला नाहीं. कांहीं तरी अंदाजानें अर्थ देण्यापेक्षां असे शब्द गाळून टाकणेंच मला योग्य दिसलें म्हणून ते शब्द दिले नाहींत. सारांश, माझ्या या कोशांत सर्व

प्रकारचीं व्यंगें राहिलीं आहेत हें माझें मनच मला सांगतें आहे. पण माझ्या सारख्या रुग्ण, अल्पज्ञ व निर्धन माणसाला जेवढें कांहीं करणें शक्य होतें तेवढें करून मीं हा कोश–नव्हे, कोशाचा कच्चा खर्डा–विद्वानांच्या पुढें मांडला आहे. त्यांनीं त्यांतल्या हव्या तेवढ्या चुका काढून मला कळवाव्या, व व्यंगें दाखवून तीं भरून काढण्याचे उपायहि कृपा करून सुचवावे म्हणजे पुढच्या आवृत्तीच्या वेळीं मला फार उपयोग होईल. कारण, हा दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग लवकरच येईल असा रंग दिसत आहे.

कोशरचनेचें काम अतिशय दगदगीचें, किचकट व जोखमीचें असतें. तें करण्याची माझी खरोखर पात्रता नसतांहि दुसरा कोणी अधिक योग्यतेचा मनुष्य तें करीना, येवढ्याचसाठीं मी तें करण्यास धजलों व सर्व तऱ्हेच्या अडचणी सोसून आणि बारीकसारीक गोष्टीसुद्धां स्वतः करून यथामति आणि यथाशक्ति तें पार पाडलें. पण बिनचूक, सुंदर प्रकारें व लवकर छापून काढण्यास एखाद्या मोठ्या छापखान्याचें साह्य मिळणें अवश्य होतें. तें मला मिळवितां आलें नाहीं. म्हणून तीन निरनिराळ्या छापखान्यांत काम वांटून द्यावें लागलें. कोशाचे तीन खंड करून प्रत्येकाला पृष्ठांक निरनिराळे देण्यांतलें इंगित हें आहे. कोशरचनेच्या कामीं माझी असहायता व मुद्रणाच्या कामीं पराधीनता या दोन्ही कारणांमुळें पुस्तकांत दोषांची रेलचेल झालेली आहे. छापखान्यांतल्या भूतांनींहि जागोजाग पुष्कळ धुमाकूळ घातला आहे. पण माझें अगतिकत्व हें त्याचें खरें कारण लक्षांत घेऊन सुज्ञ वाचक क्षमा करतील अशी आशा करतों.

शेवटीं, या कोशरचनेच्या कामीं आजपर्यंत निघालेले संस्कृत, मराठी, इंग्रजी, अरबी, फारशी, उर्दू, हिंदी, गुजराथी व बंगाली शब्दकोश यांची व त्याचप्रमाणें निरनिराळ्या विषयांवर झालेले मराठी ग्रंथ यांची अतिशय मोठी मदत झाली आहे; व या सर्व कोशकर्त्यांचे व ग्रंथकारांचे आभार मानणें हें माझें पहिलें कर्तव्य आहे. त्याचप्रमाणें मला प्रोत्साहन व प्रत्यक्ष साह्य देणाऱ्या इतर मंडळींचे मनःपूर्वक आभार मानल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. त्यांनीं साह्य केलें तें अगदीं निरपेक्षपणें केलें आणि माझ्या मनांतील त्यांच्याविषयींचा आदर व कृतज्ञताबुद्धि शाब्दिक आभारप्रदर्शनानें फारच अल्पांशानें व्यक्त होणार आहे. तथापि कर्तव्य व शिष्टाचार म्हणून मला तें केलें पाहिजे. विद्वन्मुकुटमणि डॉ. सर रामकृष्ण भांडारकर, रा. बं. विष्णु मोरेश्वर महाजनि, प. वा. दीनानाथ विष्णु माडगांवकर, हरिभाऊ आपटे व गणपतराव आगाशे या मंडळींनीं आपला अमूल्य वेळ खर्चून जुन्या मराठी शब्दांचे अर्थ उलगडून सांगितले; माझे सहा-

ध्यायी प. वा. प्रिन्सिपाल वासुदेवराव पटवर्धन यांनीं तुकाराम सोसायटीचें दप्तर मला पाहूं दिलें; मुनशी चंडिकाप्रसाद, मौलवी फैजुद्दिन अहमद व इंदूरचे पंडित नानाजी केशव यांनीं अरबी, फारशी, उर्दू व हिंदी शब्दांचे अर्थ लावण्यांत फार परिश्रम केल्यामुळें मराठी ऐतिहासिक कागदपत्रांतल्या शेकडों अपरिचित शब्दांवर प्रथमच प्रकाश पडला आहे. वैकुंठवासी ह. भ. विष्णुबोवा जोग, रा. केशवराव देशमुख व रा. माधवराव देशमुख यांचीहि जुन्या शब्दांचे सांप्रदायिक अर्थ देण्याचे कामीं मोठी मदत झाली. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे होणार आहेत. माझ्या कोशांत चांगुलपणाचा जो भाग असेल त्याचें श्रेय अर्थात् या विद्वान् मंडळींकडे आहे. दोषाचा अधिकारी मात्र मी एकटाच आहें हें सांगावयास नकोच.

प्रो. दत्तो वामन पोतदार, प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले, रा. मंगेश रामकृष्ण तेलंग, रा. आनंदराव सोहिरोबा तेलंग, रा. गोविंद सखाराम सरदेसाई, रा. आनंदराव कृष्णाजी टेकाडे, रा. वामन चिंतामण देव, रा. एम्. के. नाडकर्णी, माझे ज्येष्ठ बंधु ती० दत्तात्रय गोविंद आपटे (उमरावती), रा. गंगाधर नारायण सहस्रबुद्धे, रा. व्यंकटेश नारायण सहस्रबुद्धे, रा. रामचंद्र मोरेश्वर साने, रा. गणेश सीताराम मराठे, रा. पां. वि. देसाई, रा. दत्तात्रय केशव जोशी, रा. बाळकृष्ण नारायण देव, रा. कृष्णाजी शंकर दीक्षित व रा. नरहरि रघुनाथ फाटक इ. गृहस्थांनीं नानाप्रकारें मला मदत केली. टिळक महाविद्यालयांतले माझे शिष्य रा. गोडसे यांनीं लेखकाचें काम फार आस्थापूर्वक केलें. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतों आणि ही माझी अल्पस्वल्प सेवा माझ्या महाराष्ट्रबंधुभगिनींनीं प्रेमानें गोड करून घ्यावी अशी प्रार्थना करून ही लेखणी खालीं ठेवतों.

**आनंदकार्यालय,**
पुणें, माघ शुद्ध ८ शके १८४२. }

**वासुदेव गोविंद आपटे**

# तिसऱ्या आवृत्तीसंबंधीं निवेदन

कै. वासुदेव गोविंद आपटे यांच्या 'मराठी शब्दरत्नाकरा'ची पहिली आवृत्ति १९२० सालीं प्रसिद्ध झाली. त्यावेळीं आपल्या डोळ्यांपुढें बहुसंख्य अशा अभ्यासकांचा एक वर्ग कल्पून त्यांनीं या शब्दकोशाला त्या दृष्टीनें शक्य तेवढें पूर्णत्व देण्याचा प्रयत्न केला होता. या कोशाचें स्वागत जनतेनें फार उत्तम प्रकारें केलें. त्यांच्या हयातींतच पहिली आवृत्ति संपत आली होती. परंतु ती सुधारून वाढविण्याचे अगोदरच दुर्दैवानें १९३० सालीं त्यांचें देहावसान झालें ! यानंतर दुसरेच वर्षी 'मराठी शब्दरत्नाकरा'ची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाली. या आवृत्तींत नवे शब्द घालून ती 'अद्यावत्' करण्यासाठीं कै. प्रो. लक्ष्मणशास्त्री लेले यांना आनंदकार्यालयाच्या विश्वस्तांनीं विनंति केली. कै. आपटे यांचा व लेल्यांचा स्नेह होता. प्रा. लेले स्वतः संस्कृत व मराठी भाषांचे रसिक पंडित आणि लोकप्रिय प्राध्यापक होते. स्नेहाचें कर्तव्य आणि हौसेचें काम दोन्ही दृष्टींनीं विश्वस्तांच्या विनंतीला कै. लेले यांनीं तात्काळ होकार दिला आणि 'मराठी शब्दरत्नाकर' तपासून व गरज होती तेथें शुद्ध करून त्यांनीं त्यांत १५०० शब्दांची भर घातली. ती दुसरी आवृत्ति संपून आज ही तिसरी आवृत्ति परमेश्वरकृपेनें प्रसिद्ध होत आहे. यांत सुमारें ४५०० शब्दांची भर घालून मराठी अभ्यासकांच्या हातीं ती देण्यांत येत आहे.

'मराठी शब्दरत्नाकर' हें वासुदेवरावांचें एक मोठें स्मारक आहे. या स्मारकाचा जीर्णोद्धार करून कांहींसें नव्या स्वरूपांत तें पुढें आणावें असें आनंद-कार्यालयाच्या विश्वस्तांनीं योजिलें आणि माझ्याकडे तें काम सोपविलें. कै. आपट्यांचा वाङ्मयीन वारस या नात्यानें मींच तें काम करणें उचित आहे असें विश्वस्तांना वाटणें साहजिक होतें. या कामासाठीं माझ्याहून अधिक लायक माणसें महाराष्ट्रांत पुष्कळच आहेत. तथापि वासुदेवरावांचा अन्तेवासी होण्याचें जें भाग्य मला लाभलें त्याची भर पडून माझें पारडें जड झालें इतकेंच. अर्थात् यांत वाटणारा अभिमान व आनंद मी लपवूं इच्छित नाहीं. पण 'अहंकाराचा वारा' मात्र मला मुळींच लागलेला नाहीं, हें नम्रपणें सांगूं इच्छितों. आत्म-विश्वासावर कुणी अहंकाराचा आरोप करूं नये एवढीच इच्छा.

विश्वस्तांनीं दिलेला आदेश स्वीकारतांना मी प्रथम कांहींसा गोंधळलों होतों हें सांगण्यास मला संकोच वाटत नाहीं. परंतु नंतर हा गोंधळ दूर झाला. आपण ज्यांच्या गादीवर बसलों आहों त्यांची पुण्याई आपल्या मागें आहे हा विश्वास होताच. कै. वासुदेवराव आपटे यांच्या हाताखालीं दोन वर्षें मी होतों. तेवढ्या अवधींत आपल्या कोशरचनेविषयीं त्यांनीं मला पुष्कळ सांगितलें होतें. त्याप्रमाणें 'शब्दरत्नाकरा'ची दुरुस्तीहि माझ्यासमोर ते कित्येकदां करीत आणि तत्संबंधीं दिशा समजून देत. तेव्हां या कार्याची अटकळ मला होती. शिवाय कुठल्याही कार्याला लागेल तेवढी मदत करणारे विद्वान् व प्रेमळ मित्र भोंवतीं असल्यानें मी निश्चिंत होतों. त्यांतून हें अवघड कोशकार्य सर्व उभेंच होतें. चिरेबंदी इमला आहे, त्यांत फक्त कुठें डागडुजी करावयाची, कुठें एखादी खोली बांधायची, तर कुठें भिंत घालून एखादें दालन तयार करावयाचें एवढीच कामगिरी माझ्याकडे होती. तेवढी मी शक्य तेवढ्या परिश्रमपूर्वक केली हें समाधान प्रकट केल्याशिवाय राहवत नाहीं.

'मराठी शब्दरत्नाकरा'ची ही तिसरी आवृत्ति तयार करतांना मी काम कसें व कोणत्या पद्धतीनें केलें याचें वाङ्मयप्रेमी बांधवांपुढें निवेदन करणें मला अगत्याचें वाटतें. 'शब्दकोशा'चे प्रचंड असे सहासात खंड हा मुख्य आधार होता. 'मानसशास्त्र-परिभाषा-कोश,' 'फार्शी मराठी-कोश,' 'शास्त्रीय परिभाषा-कोश' इ० विशिष्ट शास्त्रांच्या सूक्ष्म अभ्यासासाठीं रचलेले कोश आहेत. आतां डॉ. रघुवीर यांचें तर अखिल राष्ट्रीय भूमिकेवरून विराट काम चालू आहे. या कोशांपैकीं बहुतेक सर्व कोशांचा परामर्श घेऊन 'मराठी शब्द-रत्नाकर' मी प्रथम तपासला. नजरचुकीनें गळलेले ठळक शब्द घालून कांहीं स्थूल पारिभाषिक शब्द 'रत्नाकरां'त घातले. इंग्रजी भाषेचें दडपण आज बरेंच कमी झालें आहे. आतां देशी भाषांतून सर्व व्यवहार चालावेत ही कल्पना विशेष दृढमूल झाली आहे. अर्थात् देशी भाषांमध्यें इंग्रजी व तत्सम शब्दांना स्वदेशी पर्यायशब्द निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्र साहित्य परि-षदेनें या कामासाठीं विद्वानांचें एक परिभाषा मंडळ नेमलें असून त्याचें कार्य पुष्कळच प्रगत झालें आहे. या मंडळानें निर्मिलेले शब्द पाहून त्यांतले जरूर ते शब्द मीं 'रत्नाकरां'त अंतर्भूत करून घेतले; मात्र या सर्व भांडाराचा उपयोग करतांना 'शब्दरत्नाकर' हा कोश मध्यम अभ्यासकांकरितां आहे, त्याची शब्द-संख्या अमुक एका मर्यादेपर्यंतच वाढविली पाहिजे (कारण त्याचा आकार प्रचंड करून मध्यम स्थितींतल्या लोकांना त्याची किंमत न झेपेल एवढी करणें योग्य

नाहीं.) आणि सूक्ष्म अभ्यासासाठीं असलेल्या इतर विद्वत्ताप्रचुर कोशांवर आक्रमण होतां कामां नये. हीं सर्व अवधानें मीं पाळलीं.

या कोशाची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध झाल्यानंतर गेल्या २०-२२ वर्षांत विविध प्रकारचें व शैलीदार वाङ्मय प्रसिद्ध झालें. संगीत, क्रीडा, मृगया, नाट्य, नृत्य इ. अनेक विषयांवर पुस्तकें निघालीं. राजकीय वाङ्मयहि बरेंच निर्माण झालें. ग्रामीण जीवनाला ललित-वाङ्मयांत प्रमुख स्थान मिळाल्यामुळें बोलींतले अनेक शब्द साहित्यांत आले. या नवीन व ढंगदार साहित्याचें सूक्ष्म वाचन करून त्यांतले सर्वसंमत होण्यासारखे शब्द मी निवडले. वृत्तपत्रीय वाङ्मयांतहि बरीच क्रांति झाली आहे. भाषाशुद्धीची चळवळ जरी संपूर्णपणें यशस्वी झाली नाहीं तरी तिला कांहीं अनुयायी लाभले आणि बरेंवाईट अनेक शब्द रूढ करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. यांपैकीं नेहमीं आढळणाऱ्या शब्दांना फारसा पात्रापात्रविचार न करतां मी 'शब्दरत्नाकरां'त स्थान दिलें आहे. अशा रीतीनें कोशाची उपयुक्तता वाढवून त्याला आजतागायतपणा आणण्याची कोशीस मीं केली आहे.

या सर्व खटाटोपामध्यें 'शब्दरत्नाकरा'वर मला सर्वत्र संचार करावा लागला. खुद्द कै. आपट्यांनीं कांहीं विशिष्ट ध्येय ठेवून हा कोश तयार केला. त्या ध्येयाचें पालन करण्यांत कसूर होऊं नये हें अवधान मी राखलें आहे. गेल्या दोन तपांत मराठीच्या ललित आणि गंभीर दोन्ही अंगांची पुष्कळ वाढ झाली आहे. त्याचप्रमाणें अनेक भाषाविषयक सिद्धांत चर्चिले जाऊन कांहीं मतप्रणालि तयार झाल्या आहेत. विद्यापीठांत मराठीला मानाचें स्थान मिळाल्यानंतर साहजिकच अभ्यास अधिक आस्थापूर्वक होऊं लागला. पदवीप्रबंधासाठीं अभ्यासकांनीं निरनिराळे विषय घेतल्यानें साहित्यतंत्राविषयीं आणि भाषाशास्त्राविषयीं उत्कट विचार होत चालला आहे. कै. आपटे यांनीं मराठी भाषेचा उगम आणि विकास यासंबंधीं जें लिहिलें होतें त्यानंतर आतां पुष्कळच संशोधन झालें आहे. या सर्व पसाऱ्यांतील कांहीं प्रश्नांची चर्चा सामान्य रसिकास उपयुक्त व उद्बोधक ठरेल म्हणून मी शेवटीं जोडलेल्या "शब्दसिद्धि आणि भाषा-सौंदर्य" या निबंधांत केली आहे, ती पाहावी अशी आग्रहाची विनंति आहे. कोशाचा उपयोग करतांनाच नव्हे तर साहित्याविषयींचा सौंदर्यवादी दृष्टिकोन प्रथमपासूनच तयार करण्यासाठींहि तरुण अभ्यासकांना शेवटचे दोन निबंध मार्गदर्शक ठरतील.

अमर वाचनालय, सातारा.



कुठलेंहि चांगलें वाङ्मय तयार होईपर्यंत तें लेखकाच्या किंवा संपादकाच्या मालकीचें असतें. तें तयार होऊन प्रसिद्ध झालें कीं समाजाचा त्यावर सामुदायिक हक्क प्रस्थापित होतो. कोशाला तर हें विशेषच लागू पडेल आणि म्हणूनच आपल्या मायबोलीच्या उपासनेचें मुख्य उपकरण म्हणून याकडे भाषेच्या विद्यार्थ्यांनीं आपलेपणानें पाहिलें पाहिजे. हा कोश पंडितांकरितां नाहीं अथवा विशिष्ट अभ्यासाच्या तडीपार जाण्यासहि तो सहाय्यक होणार नाहीं. त्यासाठीं सुदैवानें इतर मोठे कोश आतां तयार झाले आहेत. तरीहि सामान्य वाचक, महाविद्यालयांतले विद्यार्थी, माध्यमिक शाला व अध्यापन-विद्यालयें यांतले शिक्षक-प्राध्यापक इ० ची गरज भागविण्यास तो पूर्ण समर्थ होईल असा विश्वास आहे.

जिवंत भाषेंतला शब्दकोश पूर्णपणें ‘ अद्ययावत् ’ कसा होईल ? कारण स्थूलमुद्रितांत नवा शब्द बसविला तरी फर्मा छापून वाळेपर्यंतहि त्यांत बसण्या-सारखा एकादा नवा शब्द आढळेल. ‘ शब्दरत्नाकर ’ हातीं आल्यानंतर साक्षेपी अभ्यासकांनीं त्यांतल्या उणीवा दिसल्यास व त्यांत अंतर्भूत करण्यासारखे नवे शब्द आढळल्यास जरूर कळवावेत. पुढील संस्करणाचे वेळीं संपादकास या सूचनांचा खास उपयोग होईल. असो. शेवटीं मुख्य काम ऋणनिर्देशाचें. ज्यांच्या ग्रंथामुळें प्रस्तुत कोश ‘ अद्ययावत् ’ करतां आला त्या ग्रंथकारांना श्रेयाचा मोठा वाटा द्यावा लागेल. साधनसामुग्री जमविण्यासाठीं महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या मंडळींनीं फारच श्रम घेतले. येथील प्रसिद्ध प्रकाशक श्री. अनंतराव कुलकर्णी स्नेहाखातर दिली ती तसदी नेहमीं सोसतात. ‘अभिनव पुस्तक मंदिरा’ चाहि मी फायदा घेतला. मित्र० प्रा. निरंतर यांना तर मी विशेष त्रास दिला व तो त्यांनीं सानंद सोसला. प्रा. श्री. म. माटे, प्रा. डॉ. वाटवे, प्रा. ग. ह. रानडे, प्रा. श्री. के. क्षीरसागर, रा. केशवराव भोळे, प्रा. दे. द. वाडेकर, प्रा. वा. दा. गोखले, रा. डब्लू. जी. गोडबोले, श्री. चिं. ग. कर्वे इ. विद्वान् मित्रांनीं चर्चा करून, पुस्तकें पुरवून, प्रोत्साहन देऊन अनेक तऱ्हांनीं हातभार लाविला. त्यांच्या सक्रिय साह्याचे अभावीं मला कांहींच करतां आलें नसतें. अ. वि. गृहाच्या मुद्रणालयावर तर छपाईची मुख्य मदार होती. केवळ व्यावसायिक दृष्टि न ठेवतां आस्थेवाईक-पणें त्यांनीं मुद्रणाचें प्रचंड काम उरकलें. माझे युवक मित्र रा. बर्वे, रा. चौगुले आणि रा. बोकील ह्यांनीं हार्दिक सहकार्य करून कामाचा बोजा हलका केला. आनंद कार्यालयाचे कारकून रा. देशमुख यांचीहि मदत झाली. तेव्हां या सर्व लहानथोर मित्रांचें ऋण सहर्ष व कृतज्ञतापूर्वक मी मान्य करतों.

शेवटीं आनंद कार्यालयाचे विश्वस्त श्री. गोपाळराव जोशी आणि आनंद मुद्रणालयाचे तरुण मालक श्री. यशवंतराव जोशी या पितापुत्रांनीं प्रस्तुत कोश निर्दोष व्हावा यासाठीं जिवापाड श्रम घेतले हें सांगणें अत्यावश्यक आहे. या कोशांत बरीच निर्दोषता येण्यास या दोघांचें निरलस व साक्षेपी पर्यवेक्षणच मुख्यतः कारण झालें. कै. आपट्यांच्या ह्या वाङ्मयीन स्मारकाचा जीर्णोद्धार झाला याबद्दल आम्हां तिघांना व विश्वस्तांना जो आनंद होत आहे त्याची कल्पना श्रद्धाजीवि रसिकास खास येईल. मूळ ' शब्दरत्नाकरां 'तलें कांहींहि न गाळतां त्यांत सुमारें साडेचार हजार नवीन शब्द आणि एकदोन प्रबंध घालून तो जनताजनार्दनास सादर केला आहे. या उपायनाचा तो मागीलप्रमाणें प्रेमपूर्वक स्वीकार करो ही प्रार्थना !

आनंदकार्यालय पुणें २<br>
दि. २९।११।५२<br>
माधव जूलियन्-स्मृतिदिन

**गोपीनाथ तळवलकर**

# कै. वासुदेव गोविंद आपटे

## ( चरित्र आणि वाङ्मयकार्य )

---

## १ : चरित्र

एखाद्या घराण्याला निसर्ग मोठ्या खुशीनें व मोकळ्या मुठीनें आपल्या जवळच्या बहुमोल देणग्या देतो. आपटे हें घराणें अशांपैकींच एक आहे. स्थानिक स्वराज्य, विज्ञान, वाङ्मय, व्यापार, कला इ. अनेक क्षेत्रांत बिनीच्या माणसांत आपटे मंडळी चमकतांना दिसतात. वाङ्मयांतहि कोश, कथा, पत्रपांडित्य, नाट्य, बालवाङ्मय, प्रबंध इ. अनेक शाखांत आपटे यांनीं घातलेली भर मोलाची ठरेल. या प्रभावळींत कै. वासुदेव गोविंद आपटे यांचें नांव अविस्मरणीय आहे. आपल्या ५९ वर्षांच्या आयुष्यांत त्यांनीं विविध प्रकारचें सत्वगुणयुक्त वाङ्मय निर्माण केलें. त्यांच्या वाङ्मयीन व्यापाचें वर्णन सुप्रसिद्ध विद्वान् श्री. नानासाहेब चाफेकर यांनीं थोडक्यांत पण समर्पक रीतीनें केलें आहे. ते म्हणतात—

> " कविता आणि नाटकेंखेरीज करून त्यांची लेखणी बहुतेक सर्व विषयांवर चाललेली आहे. त्यांनीं कादंबऱ्या लिहिल्या आहेत. इतिहास प्रसिद्ध केले आहेत. पुराणांचें सार काढलें आहे. स्मृतिग्रंथांचा मराठी मुलांना परिचय करून दिला आहे. राजकारणहि त्यांनीं आपल्या कक्षेंत समाविष्ट करून घेतलें आहे. वर्तमानपत्र व मासिक यांचाहि त्यांना अनुभव आहे. "
>
> ( विविधज्ञानविस्तार, सप्टेंबर १९२६ )

आणि हें सर्व प्रकृति आणि परिस्थिति यांची विशेष अनुकूलता नसतांना वासुदेवरावांनीं केलें हें लक्षांत ठेविलें पाहिजे. " आपलें काम ज्याला सांपडलें तो धन्य होय. " असें कार्लाईल म्हणतो, या दृष्टीनें वासुदेवरावांचें जीवन कृतार्थ झालें असें म्हणतां येईल. कारण आपल्या विशिष्ट शक्ति आणि मर्यादा ओळखून त्यांनीं जीवनाचा शक्य तेवढा सदुपयोग केला आणि आबालवृद्धांचें रंजन व उद्बोधन करील असें विपुल वाङ्मय प्रसिद्ध केलें. त्या सर्वांचा परामर्ष घेण्यापूर्वीं त्यांच्या जीवनाचा स्थूल परिचय करून घेणें जरूर आहे.

## बालपणींचा काळ

कांहीं माणसें सुवर्णाचें गोकर्ण तोंडांत धरून जन्मास येतात. कित्येकांना जन्मतः असें वैभव न मिळालें तरी त्यांच्यावर कांहीं योगायोगानें महत्पद लादलें जातें. वासुदेवरावांचें असें कांहींच झालें नाहीं. १८७१ मध्यें पूर्वखानदेश जिल्ह्यांत धरणगांव येथें त्यांचा जन्म झाला. वडील पोलिस खात्यांत नोकर होते. चार मुली आणि तीन मुलगे एवढा संसार असल्यानें संसाराची स्थिति ओढगस्तीचीच होती. वासुदेवरावांच्या बालपणीं त्यांचे वडील निवर्तले. परंतु त्यांची आई अत्यंत कर्तबगार आणि नेकीची स्त्री होती. तिनें मोठ्या धीरानें प्रपंचाचा गाडा हांकला. 'दुःखाअंतीं सुख' या कादंबरींत राधाबाईचें जें चित्र वासुदेवरावांनीं रंगविलें आहे तें त्यांच्या मातोश्रींचेंच प्रतिमान होय.

"घरांत मीटभाकर खावी, पण ती स्वतःच्या कष्टाची खावी, कोणाचें देणें करूं नये, असा उपदेश राधाबाई आपल्या मुलांस नेहमीं करीत असत, आणि स्वतः तसें वागून दाखवीत हें त्यांत विशेष होतें... राधाबाईंना मोठ्या लोकांच्या घरीं कामावांचून जाणें व त्यांच्या खुशामती करीत बसणें बिलकुल आवडत नव्हतें. त्या आपल्या अगदीं जवळच्या नात्यांतल्या पण श्रीमंत माणसांशीं तुटून वागत. गरिबांशीं मन मोकळें करून बोलत. एकादे वेळीं त्यांच्या घरीं जात, किंवा त्यांना आपल्या घरीं बोलावीत; पण श्रीमंत आणि त्यांतूनहि गोदूताईसारख्या गर्विष्ठ बायकांना तर, आपण जसे रक्तपित्यांच्या संसर्गाला भिऊन त्यांना टाळतों, तशा त्या टाळीत असत."

('दुःखाअंतीं सुख' पृ. ३१२–१३.)

आपटे मंडळींचा भडगांव येथें वाडा होता. तेथें राधाबाई मुलांस घेऊन राहूं लागल्या. वासुदेवरावांचें कांहीं प्राथमिक शिक्षण या ठिकाणीं झालें. प्रथम शाळेला अर्धचंद्र देण्याकडे त्यांची प्रवृत्ति असे. त्या वयांत ते एकांतप्रिय होते. परंतु नंतर त्यांचें मन शाळेंत रमूं लागलें. 'हरिविजय' आणि 'भक्तिविजय' हे ग्रंथ त्यांनीं वयाच्या बाराव्या वर्षींच वाचले. कीर्तनें ऐकावीं आणि घरीं भगिनींपुढें तीं तशींच वठवून दाखवावींत हा त्यांचा बालवयांत एक आवडता छंद असे. त्याचबरोबर ते कावळा चिमणीच्या गोष्टी पाटीवर लिहून भगिनींना दाखवीत. पुढें उच्च इंग्रजी शिक्षणाकरितां मुलांना घेऊन राधाबाई धुळ्यास आल्या. आणि मॅट्रिकपर्यंत वासुदेवरावांनीं मजल मारली.

## वाङ्मयसरितेचा उगम

धुळ्यास असतांना वासुदेवरावांच्या सुप्त वाङ्मयीन प्रतिभेला अंकुर फुटण्याचा मजेदार योग आला. तेथें एक नाटककंपनी आली होती. त्या नाटककंपनीचीं नाटकें पहावीं अशी वासुदेवरावांची इच्छा असे; पण घरखर्चाची तोंड-मिळवणी जेथें कशीबशी व्हायची तेथें नाटकासाठीं पैसे कसे मिळावेत ? याचवेळीं वासुदेवरावांना असें आढळून आलें कीं, 'नाटककार' गणला गेलेला गृहस्थ नाटककंपनींत फार आदरपूर्वक वागविला जातो. तेव्हां स्वतः त्यांनीं एक नाटक रचलें आणि तें नाटककंपनीस दिलें. या वाङ्मयकृतीची कंपनीनें संभावना कशी केली हें जरी कळलें नाहीं तरी 'नाटककार' या प्रतिष्ठित नात्यानें वासुदेवरावांना नाटकास जातां येऊं लागलें. या एकाच उदाहरणावरून वासुदेवरावांची उच्च नैसर्गिक अभिरुचि व वाङ्मयीन महत्त्वाकांक्षा स्पष्ट होते. वासुदेवरावांच्या वाङ्मयसरितेचा हा उगम मात्र कायमचाच लुप्त झाला आहे. तें नाटक उपलब्ध नाहीं. धुळे येथें रा. टकले नांवाचे गृहस्थ होते. त्यांनीं आपले स्नेही बळवंतराव जोशी यांच्या कन्येकरितां राधाबाईजवळ शब्द टाकला आणि वासुदेवरावांचें लग्न एका सुमुहूर्तावर बळवंतरावांच्या कन्येशीं (काशीताईशीं) झालें.

प्रवेशपरीक्षा आणि पहिलें वर्ष एवढ्याकरितां वासुदेवरावांना इंदूर येथें रहावें लागलें. रावजी जनार्दन भिडे हे प्रसिद्ध गृहस्थ आपटेबंधूंचे साह्यकारी झाले. वासुदेवरावांचे वडील बंधु दत्तोपंत यांना देवास संस्थानांत शिक्षकाची नोकरी लागल्यानें कुटुंबाच्या खर्चाचा प्रश्न सुटला. पहिलें वर्ष झाल्यानंतर वासुदेवराव नागपुरास आले आणि १८९३ सालीं त्यांनीं बी. ए. ही पदवी मिळविली. कॉलेजचा काल हा जीवनांतील अत्यंत रमणीय असा समजला जातो, पण वासुदेवरावांना त्या काळांतहि जीवनाचा उपभोग असा घेतां आला नाहीं. एकतर आर्थिक सुस्थिति नव्हती. दुसरें, त्या काळांतच त्यांना पोटाचा विकार जडला ! प्रो० वा ब. पटवर्धन, मोतीझुलासा असे सज्जन स्नेही त्यांना याच काळांत मिळाले आणि बंगाली भाषेशीं त्यांचा याच वेळीं परिचय जडला. बंगालीमुळें त्यांना बी. ए. चें संस्कृत तर सोपें गेलेंच पण मराठींतील बालवाङ्मयाची शाखाहि त्यांना समृद्ध करतां आली. बी. ए. झाल्यानंतर त्यांना सरकारी नोकरींत शिरतां आलें असतें. आणि ऐहिक वैभवाची परिसीमा सहज गांठतां आली असती. त्यांच्या कित्येक समकालिनांनीं याच राजमार्गानें जाऊन अर्थ व

काम हे पुरुषार्थ भरपूर प्रमाणांत मिळविले. पण वासुदेवरावांच्या अंतःकरणांत ध्येयाची ज्योत तेवत होती. मेघाप्रमाणें संचय केलेलें शिक्षण परत जनतेला द्यावें अशी त्यांची मनोदेवता त्यांना सांगू लागली आणि म्हणून विद्येचें माहेरघर म्हणून प्रसिद्ध असलेल्या पुण्यास ते आले व नूतन मराठी विद्यालयांत त्यांनीं नोकरी धरली.

## साहित्याची साधना

लेखनाविषयीं वासुदेवरावांना प्रथमपासूनच हव्यास होता. १८९१ सालीं हरिभाऊ आपटे भाचीच्या लग्नासाठीं नागपुरास गेले असतां वासुदेव-रावांची आणि त्यांची ओळख झाली. पुण्यास आल्यानंतर त्या ओळखीचें दाट स्नेहांत रूपांतर झालें. हरिभाऊ हे केवळ असामान्य प्रतिभेचे साहित्यिकच होते असें नाहीं तर स्फूर्तिदाते गुरु, मनमिळाऊ मित्र आणि प्रेमळ लोकसंग्राहक होते. हरिभाऊंच्यावर मृत्युलेख लिहितांना वासुदेवरावांनीं त्यांच्याविषयीं वाटणारा गाढ प्रेमादर उत्कटतेनें व्यक्त केला आहे. ते म्हणतात —

" मला लहानपणापासून लिहिण्यावाचण्याची फार हौस आहे, पण त्या हौसेच्या अंकुराला हरिभाऊंकडून प्रोत्साहन व योग्य वळण मिळालें नसतें तर कदाचित् तो अंकुर जागच्याजागीं करपून गेला असता; किंवा मी भलत्याच दिशेकडे वळलों असतों. हरिभाऊंच्या सहवासांत आल्यानें मला लेखनाचे कामीं स्फूर्ति व प्रेरणा मिळाली. इतकेंच नाहीं, तर लेखन-व्यवसायाची पद्धति कळून त्या व्यवसायाला कांहीं व्यवस्थित स्वरूप आलें व विचारांची दिशाहि पालटली. "

( विचारसाधन, १५ मार्च १९१९ )

१८९७-९८ चे सुमारास वासुदेवरावांनीं ' अशोकचरित्र ' प्रसिद्ध केलें. हें पुस्तक लहानसेंच होतें पण त्या काळीं अशोकावर जेवढें संशोधन झालें होतें तेवढ्या सर्वांचा आधार वासुदेवरावांनीं घेतला होता. डॉ. भांडारकर व न्याय-मूर्ति रानडे या ज्ञानमहर्षींनीं त्या पुस्तकाचें कौतुक केलें. न्या. रानडे यांनीं तर तें वाचून बौद्धवाङ्मयाचा विशेष अभ्यास चालू ठेवण्याबद्दल त्यांना आग्रह केला. आपल्या खास ग्रंथालयाचीं दारें भांडारकरांनीं त्यांच्याकरितां खुलीं करून दिलीं. यावरून वासुदेवरावांच्या पहिल्याच पुस्तकानें तत्कालीन विद्वानांचीं मनें कशीं ओढून घेतलीं हें दिसून येईल.

पुण्यांत त्यावेळीं राजकीय व सामाजिक क्षेत्रांत दोन आखाडे होते. लोकमान्य टिळकांचा जहाल आणि पुनरुत्थानवादी ( revivalist ) राष्ट्रवादावर आधारलेला आखाडा आणि रानडेगोखल्यांचा नेमस्त उदारमतवादाचा आखाडा. लोकमान्यांचे व वासुदेवरावांचे प्रथम संबंध आले पण दोघांच्या वृत्ती जमल्या नाहींत. वासुदेवरावांचें नेमस्त संप्रदायाशींच सख्य झालें. पुण्यांत एका दृष्टीनें ते परकेच होते. अशा वेळीं हरिभाऊंचें घर हें त्यांना विसाव्याचें ठिकाण असे. नामदार गोखलेहि तेथेंच येत. हरिभाऊंचा लोकसंग्रह फार मोठा आणि दृष्टि अतिशय विशाल. या गोष्टीचा अर्थातच वासुदेवरावांच्या मनावर विशेष संस्कार झाला. त्यांचें लेखन, वाचन आणि चिंतन व्यवस्थित चालू झालें. पण पुण्याचें हें पहिलें वास्तव्य फार दिवस टिकावें असें नियतीचे मनांत नव्हतें. कारण त्यांच्या पोटाचा विकार याच वेळीं इतका बळावला आणि पुण्याची हवा त्यांच्या प्रकृतीस इतकी प्रतिकूल ठरूं लागली कीं, वासुदेवरावांना पुणें सोडणें भागच पडलें.

## पुनः भ्रमन्ती !

कांहीं दिवस मुंबईस 'रिपोर्टर ऑफ दि नेटिव्ह प्रेस' या जागेवर त्यांनीं काम केलें. पण वासुदेवराव हे कलकत्ता विद्यापीठाचे पदवीधर असल्यानें मुंबई विद्यापीठाचे अभिमानी व अहंकारी वरिष्ठ त्यांना कमी लेखूं लागले. तत्काळ वासुदेवरावांनीं आपल्या नोकरीचा राजिनामा दिला. सुदैव असें कीं, दुसरेच दिवशीं इंदूरच्या महाराणीसाहेबांकडून राजकन्यांचे शिक्षक म्हणून अलाहाबादेस येण्याबद्दल त्यांना तार आली. आणि त्याप्रमाणें वासुदेवराव अलाहाबादेस गेले. अलाहाबाद येथें ते ८।१० महिनेच होते. पण तेवढे त्यांचे दिवस विशेष आनंदांत गेले. राजकन्यांना 'ईसलिन' ही कादंबरी शिकवावी लागे. या सुंदर कादंबरीचें रूपांतर वासुदेवरावांनीं अलाहाबाद येथेंच केलें. तीच सुप्रसिद्ध 'माणिक बाग' होय. पुढें मिसेस हेनरीवुडची दुसरी एक कादंबरी ' मिसेस हलिबर्टनस् ट्रबल्स ' वासुदेवरावांनीं रूपांतरित केली. याच कादंबरींत त्यांनीं आपल्या धीरोदात्त जननीचें चित्र रेखाटलें आहे.

अलाहाबाद येथील वास्तव्यांत दोन श्रेष्ठ बंगाली माणसांच्या परिचयाचा मोठाच लाभ वासुदेवरावांना झाला. माणसाला भिन्नभिन्न प्रांतांतील व क्षेत्रांतील थोर विभूति जवळून पाहायला मिळाल्या तर त्याच्या बुद्धीचें आवाहन खात्रीनें विशाल होतें. आपलें जन्मग्राम न सोडतां ठराविक वर्तुळांत राहणाऱ्या माणसाची

बुद्धि विशाल कशी होणार? सुदैवानें वासुदेवरावांना खानदेश, मध्यप्रांत, पुणें, मुंबई, अलाहाबाद, इंदूर इ० अनेक ठिकाणीं रहावें लागलें. त्यामुळें त्यांच्या सहानुभूतीचीं क्षितिजें अतिशय विशाल झालीं, मूळची उदार मनोवृत्ति पोसली गेली आणि जातीयता किंवा प्रांतीयता यांनीं त्यांचें मन कधींहि झाकळलें नाहीं. असो. अलाहाबाद येथें ज्या दोघा बंगाली विभूतींचा ऋणानुबंध जडला असें वर सांगितलें, त्यांपैकीं एक ' मॉडर्न रिव्ह्यू ' चे ध्येयवादी संपादक रामानंद चटर्जी होत. संपादन हें रामानंदबाबूंनीं धर्मांप्रमाणें उच्च जीवनकार्य मानलें. आपल्या संपादकीय व्यवसायांत वासुदेवरावांच्या पुढें रामानंदांचाच आदर्श होता. ' मॉडर्न रिव्ह्यूंत ' वासुदेवराव हे मराठी पुस्तकांचें समीक्षण करीत ही गोष्ट प्रसिद्धच आहे. बंग आणि महाराष्ट्र यांच्यांत हा एक स्नेहाचा दुवाच निर्माण झाला. अलाहाबाद येथें असतांनाच वासुदेवरावांना शिवाजीराव होळकरांचे कामासाठीं सुरेंद्रनाथ बानर्जी यांचेकडे जावें लागलें. सुरेंद्रनाथ हे त्यावेळीं बंगालचे अनभिषिक्त राजे होते. कायदेपांडित्य, वक्तृत्व, नेतृत्व इ. सर्वच दृष्टींनीं त्यांना अखिल भारतीय नेत्यांत अग्रस्थान मिळालें होतें. तत्कालीन जहालांचा हा जहांबाज नेता अत्यंत प्रेमळ व सौजन्यशील आहे असें वासुदेवरावांच्या अनुभवास आलें. पुढें आणखी एकदोन वेळ सुरेंद्रबाबूंचा पाहुणचार घेण्याचें भाग्य वासुदेवरावांना लाभलें.

अलाहाबाद येथील मुक्काम संपवून वासुदेवरावांना इंदूरला यावें लागलें. होळकरशाहीच्या जुन्या कागदपत्रांची तपासणी करण्याकरितां एक कचेरी दरबारनें उघडली होती. तीमध्यें वासुदेवरावांची नेमणूक झाली. पुढें शिवाजीराव होळकरांचे खाजगी चिटणीस हें पद त्यांना मिळालें. पण त्या गमत्या व तऱ्हेवाईक नृपतीच्या लहरी संभाळणें त्यांना जड जाऊं लागलें. पुढें देवानेंच गाऱ्हाणें ऐकलें म्हणावयाचें, कारण हरिभाऊंची निकडीची तार आली आणि इंदूर सोडून वासुदेवराव पुण्यास आले.

## पत्रपांडित्यांत विक्रम

यावेळीं नामदार गोखल्यांच्या नेतृत्वाखालीं चाललेलें ' ज्ञानप्रकाश ' हें पत्र द्विसाप्ताहिक होतें. त्याच्या संपादकाचे जागीं कोणी लायक माणूस नेमावा अशी गोखल्यांची इच्छा होती. हरिभाऊंनीं वासुदेवरावांचें नांव सुचवतांच हें त्यांना तात्काळ पसंत पडलें. वासुदेवरावांनीं कामावर येतांच ' ज्ञानप्रकाश ' दैनिक केला. त्या काळीं जहाल पक्षाचा जोर विशेष होता. ' केसरी ' ची

मंगळवारची गर्जना आसेतु–हिमाचल घुमत राही. आणि जनता साश्चर्य, सकौतुक व सादर ‘ केसरी ’ कडे पहात असे. अशा स्थितींत ‘ ज्ञानप्रकाश ’ लोकप्रिय करण्याचें कठिण काम वासुदेवरावांना करावयाचें होतें. तें त्यांनीं पुष्कळच यशस्वी केलें असें म्हणावयास हरकत नाहीं. देशांतल्या उत्तम वर्तमानपत्रांतील उतारे, उद्बोधक लेख आणि ताज्या बातम्या देऊन ‘ ज्ञानप्रकाश ’ चा कायापालट त्यांनीं केला. वासुदेवराव नेमस्त असले तरी त्यांच्या लेखणीला चांगली धार असे, आणि स्पष्टवक्तेपणांतहि ते पुढें असत. त्यावेळीं कर्झनशहाची कारकीर्द चालू होती. कर्झनच्या अपकृत्यावर वासुदेवरावांनीं एक सणसणीत लेख लिहिला. त्याची झळ दिल्लीदरबारला लागली आणि कर्झनसाहेबांनीं गोखल्यांस म्हटलें, ‘ तुमच्या पत्रांत माझ्यावर कडक टीका यावी हें नवल आहे.’ गोखल्यांनीं हरिभाऊंना कळविलें कीं, वासुदेवरावांना जरा जपून लिहावयास सांगा. या व अशा गोष्टी घडत गेल्या. त्यांतच अंतर्गत राजकारणानें सरलमनस्क वासुदेवराव कंटाळून गेले. पुनः, दैनिकाच्या व्यापामुळें वासुदेवरावांची प्रकृति ढासळली; तेव्हां त्यांनीं दैनिकाचा राजिनामा देऊन पुनः नूतन मराठी विद्यालयांत नोकरी धरली.

या कालांत १९०६ हें साल, वासुदेवरावांच्याच नव्हें, तर महाराष्ट्राच्या वाङ्मयेतिहासांत महत्त्वाचें म्हणून गणलें जाईल. कारण या वर्षीं सुप्रसिद्ध बालमासिक ‘ आनंद ’ जन्माला आलें. यापूर्वीं विनायक कोंडदेव ओकांचें ‘ बालबोध ’ हें एक बालमासिक होतें. तें ओक स्वतःच लिहून काढीत. त्यामध्यें सुधारणा व्हाव्यात असें वासुदेवरावांना वाटलें. आणि तसें त्यांनीं ओकांना कळविलेंहि. परंतु नवीन चाकोरी पाडणारीं माणसें अहंकारी असावचींच असा नियमच दिसतो. दुसऱ्या कुणाचेंहि लेखन किंवा सल्ला मला नको असें स्वच्छ उत्तर ओकांनीं दिलें. तेव्हां आपल्या मनांतील बालमासिकाविषयींच्या कल्पना साकार करण्यासाठीं वासुदेवरावांनीं ऑगस्ट १९०६ मध्यें ‘ आनंद ’ मासिक काढलें. हें आज ४६ वर्षें अव्याहत चालू आहे. पितामह दादाभाईपासून नेताजी सुभाषचंद्रांच्यापर्यंत अनेक महान् भारतीयांचे आशीर्वाद व लक्षावधि बालबालिकांचें प्रेम या मासिकास लाभलें आहे. हें मासिक सुरू करतांना बँकेंत असलेले ५०० रु. काढून वासुदेवरावांनीं पूर्व तयारी केली. १९१३ सालीं एका बँकेचें दिवाळें निघून ‘ आनंदा ’ ची एक वर्षाची वर्गणी त्यांत बुडाली ! ’ पण तेंहि नुकसान सोसून वासुदेवरावांनीं आनंद चालविला. ‘ आनंदा ’चा स्वतंत्र छापखाना सुरू करून त्यावर आपले पुत्रवत् मानलेले शालक श्री. गोपाळराव जोशी यांची

नियुक्ति केली. पुढें हा छापखाना त्यांनीं रा. जोशांना विकला. त्याला आतां जोशी व त्यांचे कर्तबगार पुत्र यशवंतराव यांनीं वरच्या दर्जाचें स्वरूप आणलें आहे. पुढें वासुदेवरावांनीं प्रकृतिस्वास्थ्यासाठीं पुनः इंदूर गांठलें.

इंदूर येथें ते 'मल्हारी मार्तंडा 'चे संपादक होते. या पत्रांत त्यांनीं अनेक सुधारणा केल्या. इंदूरचे दिवाण रामप्रसाद दुबे हे वासुदेवरावांचे वर्गबंधु असल्याकारणानें वासुदेवरावांना संस्थानी नियमांचा कडकपणा कमी प्रमाणांत सहन करावा लागे. पण ती एक तारेवरची कसरत होती हें खास. राजानें प्रजेच्या सुखाकरतां सर्वस्व वेंचावें आणि वेळ व पैसा राहिल्यास मग ललित-कलांची जोपासना करावी असा रोकठोक सल्ला वासुदेवरावांनीं इंदूर नरेशांना दिला होता. वातावरण तापलें पण लवकरच थंड झालें. तथापि सरंजाम-शाहीच्या लहरी व स्वातंत्र्यपराङ्मुख वातावरणांत आपलें सुरळीत चालेल असें त्यांना वाटेना. अखेर १९१९ सालीं नोकरीचा राजिनामा देऊन ते पुण्यास आले. आणि येथेंच त्यांनीं कायमचें वास्तव्य केलें.

## शेवटचीं वर्षें

याच वर्षी 'विचारसाधन' हें नमुनेदार साप्ताहिक त्यांनीं काढलें. पक्षाभिनिवेशाच्या मर्यादा पडून सत्य झांकळून जातें. म्हणून पक्षभेदातीत राहून लोकांना उद्बोधन व ज्ञानदान देणारें नियतकालिक चालवावें ही वासुदेवरावांची मनीषा होती. या नियतकालिकाचें स्वागतहि फार चांगलें झालें. वासुदेव-रावांच्या प्रिय कन्येच्या मृत्यूनें ते अत्यंत कष्टी झाले. या शोकावर्तांत हें नियत-कालिक बंद पडलें.

या सुमारास म. गांधींचा भारतीय राजकारणाच्या क्षितिजावर उदय झाला. राजकारणाला नीतीची जोड मिळाली. सत्याग्रहाचें अमोघ शस्त्र हातीं येऊन निराशेच्या अंधारांत चांचपडणाऱ्या जनतेला प्रकाशकिरण दिसूं लागले. राजकीय स्वातंत्र्य हें सामाजिक क्रांतीबरोबरच आलें पाहिजे आणि त्यासाठीं प्रत्येक देशबांधवानें स्वतःचें जिवनच बदलून टाकलें पाहिजे ही नवीन दिव्य दृष्टि गांधींजींनीं दिली. वासुदेवरावांसारख्या उदारमतवादी नैतिक प्रवृत्तीच्या माण-साला गांधीजींच्या अलौकिक अवतारानें आकर्षित केलें यांत काय नवल! ते संपूर्ण खादीधारी बनले. टिळक महाविद्यालयांत ते शिकवूं लागले. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाची सुंदर व सुबोध माहिती करून देणारी 'गांधीगीता' व 'उत्तर-गीता' हीं दोन पुस्तकें त्यांनीं लिहिलीं. परंतु प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें

गांधीजींच्या क्रियाशील तत्त्वज्ञानांत यापेक्षां अधिक भाग त्यांना घेतां आला नाहीं. शेवटपर्यंत त्यांचा विद्याव्यासंग मात्र चालू होता. १९२८ सालीं काशी-यात्रेहून परत आल्यानंतर त्यांनीं 'ज्ञानदीप' व 'अशोक चरित्र' हीं पुस्तकें लिहिलीं. पण नंतर त्यांची प्रकृति जी एकदां बिघडली ती पूर्ण सुधारलीच नाहीं. २ फेब्रुवारी १९३० रोजीं सायंकाळीं ७ वाजतां त्यांचें देहावसान झालें !

## खाजगी जीवन

वासुदेवरावांची शरीरयष्टि भव्य नव्हती. जन्मभर रोगानें हैराण केल्यामुळें ते नेहमींच थोडे जर्जर दिसत. मुद्रा अबोल, चिंतनशील आणि सात्त्विक दिसे. गांधीयुगांत ते खादीधारी बनले. त्यानुळें पोशाखांत पूर्वीं थोडाफार भडकपणा होता तोहि नाहींसा झाला. वाचन, चिंतन आणि लेखन असें त्यांचें त्रिविध जीवन म्हणतां येईल. स्वभावाचा दिखाऊ गोडवेपणा त्यांच्यांत नव्हता. कित्येकदां त्यांच्या बोलण्याचालण्यावरून ते कांहींसे तुसडे व स्नेहशून्यहि वाटत. परंतु दरबारी दांभिकपणाऐवजीं अंतःकरणाची ऋजुता ज्यांना पाहिजे होती असे अनेक सज्जन वासुदेवरावांना परममित्र मानीत. ते वृत्तीनें पूर्ण सुधारक होते. आणि बुद्धिग्राह्य असें नवें पत्करण्याची त्यांची तयारी असे. सार्वजनिक जीवनांत त्यांनीं हिरीरीनें भाग घेतला नाहीं. परंतु बडोदें व इंदूर येथील साहित्य संमेलनांत आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या संसारांत त्यांनीं परोपरीनें साह्य केलें. व्यासपीठावर येऊन वक्तृत्व करण्याची मात्र त्यांना हौस नव्हती.

पहिल्यानें जीवनांत स्थिर होण्यासाठीं त्यांना बरेच कष्ट सोसावे लागले. आणि जीवनांत जरा स्थैर्य आलें तों व्याधीनें त्यांना पोखरून टाकलें. त्यामुळें एक प्रकारें त्यांचें जीवित उपभोगशून्यच झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यांतून त्यांची प्रिय कन्या सुंदर ही चांगली जाणती होऊन निवर्तली ! मरणोत्तर अवस्थेंतहि ती त्यांना भेटावयास येत असे असें ते सांगत. पुढें त्यांच्या एकुलत्या एक प्रियपुत्रालाहि (चि. आनंद) काळानें ओढून नेलें ! त्यामुळें जीवनावर पडलेली औदासीन्याची छाया अधिकच दाट व उत्कट झाली. असो. त्यांची एकुलती एक कन्या सौ. शांताबाई ही सांगलीचे सुप्रसिद्ध करमरकर सराफ यांच्याकडे दिली आहे. वासुदेवरावांचे अखेरच्या दिवसांत तेंच एक कैवल्य होतें. त्यांच्या साध्वी व सोशिक अर्धांगी लक्ष्मीबाई सौजन्याची मूसच होत्या. आपलें वेगळें अस्तित्व उरूं न देतां सतत पतीची सेवाशुश्रूषा त्यांनीं केली. बाई १९४३ सालीं निवर्तल्या. वासुदेवरावांची वृत्ति मूलतः अज्ञेयवादी होती आणि

बुद्धाच्या निरीश्वरवादी तत्त्वज्ञानाची त्यांच्यावर जबरदस्त छाप असल्यानें ईश्वर-भक्तीचें माधुर्य त्यांना अनेक वर्षे पटलें नाहीं. परंतु जीवनांतील वादळांनीं त्यांचें मन हळुवार केलें आणि अखेर ' नित्यपाठ भजनावलि ' ही त्यांची विसाव्याची पुस्तिका होऊन बसली. त्यांच्या जीवनांतील शांतीचें रहस्य ध्येयनिष्ठता आणि आस्तिकवाद यांतच सांपडेल याविषयीं संदेह वाटत नाहीं.

# २ : वाङ्मयकार्य

## वाङ्मय परपुष्ट म्हणजे काय ?

वासुदेवरावांच्या निधनाला आतां पुरेसा काळ लोटला आहे. तेव्हां त्यांच्या वाङ्मयीन कार्याचें स्वरूप ठरविण्यास व महत्त्वमापन करण्यास योग्य वेळ आली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. भव्य देखाव्यापासून थोडें दूर गेलें म्हणजेच त्याचें यथार्थ दर्शन आपणांस होतें. काळ हा कठोर परीक्षक आहे. त्याच्या कसोटीवर जें उतरेल तेंच निर्मल सुवर्ण असें म्हणावयास हरकत नाहीं. वासुदेव-रावांच्या साहित्यांत असा भाग पुष्कळच निघेल. त्यांचें बरेंचसें वाङ्मय रूपांतर, अनुवाद, संक्षेप, अनुकरण या स्वरूपाचें आहे असें दिसेल आणि ही गोष्ट थोडी उपहासपूर्वक सांगणारे अहंमन्य टीकाकार आपल्यांत आढळतात !

या टीकाकारांच्या म्हणण्यांतला ग्राह्यांश मान्य केला तरीहि त्यांच्या वृत्तीची मात्र कींवच करावी लागेल.

संत, पंडित, आणि शाहीर यांच्या काव्याची कारकीर्द संपून आधुनिक मराठीचा प्रारंभ झाला तेव्हां गद्याचे विविध प्रकारांचे आदर्श मराठींत नव्हतेच म्हटलें तरी चालेल. कादंबरी, प्रबंध, नाटक, लघुकथा, चरित्र इ० वाङ्मय-प्रकारांचा परिचय इंग्रजी वाङ्मयाच्या संसर्गानेंच आम्हांला प्रथम झाला. न्या. रानड्यांनीं इंग्रजांची व आमची मैत्री जमली या गोष्टीस ' दैवी घटना ' म्हटलें. त्यांची चार उथळ जहालांनीं कितीहि टर केली असली तरी रानड्यांची भविष्य-वाणी खरीच होती. कारण इंग्रज व त्यांची भाषा यामुळें आम्हांला जगाच्या समृद्ध भांडाराचें महाद्वार खुलें झालें. साहित्याचे वर सांगितलेले प्रकार आम्हांला प्रथमच दिसल्यामुळें ते मराठींत यावेत असें देशभक्तांना वाटणें साहजिकच होतें. पण त्यांचे साचे मराठींत तयार नव्हते. ते तयार करण्यास अनुवाद, अनुकरण हें

एकच साधन होतें आणि थोरल्या चिपळूणकरांपासून या साधनाचा अवलंब केला गेला. या साधनाची महति एवढी आहे कीं, तें केव्हांच जुनें होणें शक्य नाहीं. आज आधुनिक मराठीचा विस्तार एवढा झाला असला तरी फडके, खांडेकर, साने गुरुजी यांसारखीं प्रतिभासंपन्न माणसें त्याच साधनांचा थोडाफार वापर करीत आहेत. मग वासुदेवरावांनीं त्याच धर्तीचें कार्य केलें तर त्यास परप्रकाशित म्हणून हेटाळण्यांत काय अर्थ आहे ?

## स्वतंत्रता हें प्रमुख मूल्य खरें ! पण—

असामान्य प्रतिभेच्या साहित्यसूर्यांचें महत्त्व तर अलौकिकच असतें. व्यास, वाल्मीकि, शेक्सपीअर, टॉलस्टॉय, ज्ञानेश्वर, रवीन्द्र, हरिभाऊ इ० शब्द-सृष्टीच्या ईश्वरांचें माहात्म्य शाश्वत व स्वयंभू आहे. त्यांच्या यशःरूपी शरिराला जरामरणाचें भय नाहीं हें सुभाषित सत्यच आहे. परंतु असे साहित्यसूर्य युगायुगाचे ठायीं क्वचितच अवतीर्ण होतात. याखेरीज जे कमीजास्त प्रज्ञावान् लेखक असतात त्यांच्यांत संपादित विचार व स्वतःचें मनन असाच मिलाफ असतो. यांचें वाङ्मय उद्‌बोधन करतें आणि सर्व भाषांत अशाच प्रज्ञावंत लेखकांची बहुसंख्या असते. मनाला सुसंस्कृत करण्याचें मोठें कार्य यांचें वाङ्मय करीत असतें. हेहि स्वभाषेला संपन्नच करतात. आपण व्यास-वाल्मीकि असल्याचा बहाणा ते करीत नाहींत. आपण कुणाचा आदर्श पुढें ठेविला, कुणाच्या विचार-भांडारांतून ऋण घेतलें हें ते प्रामाणिकपणें सांगतात. ते केवळ प्रांजल आहेत व आपल्या मर्यादा ओळखून आहेत एवढ्या ‘ गुन्ह्या ’ साठीं त्यांना अगदीं खालच्या दर्ज्यावर बसविणें युक्त होणार नाहीं.

असामान्य अशी स्वतंत्र निर्मिति आपणांस करतां येणें शक्य नसलें तरी अभ्यास-योग आचरून परभाषेंतील उत्कृष्ट विचार—कल्पना—भावना आपण स्वभाषेंत आणाव्या ही एक सात्त्विक व उच्च महत्त्वाकांक्षा आहे. उत्कृष्ट परकीय वाङ्मय वाचण्याची कुवत नाहीं आणि स्वतंत्रतेच्या भलत्या कल्पना उराशीं धरलेल्या, असे जे कोणी फुटकळ साहित्यिक आहेत त्यांनीं वरील प्रज्ञावंतांना तुच्छ लेखणें हास्यास्पद ठरेल. किर्लोस्करांनीं ‘ शाकुंतल ’ संस्कृतवरून घेतलें किंवा देवलांनीं ‘ संशयकल्लोळ ’ हें एका युरोपीय नाटकावरून अनुवादिलें म्हणून त्या नाट्याचार्यांना आजचा एकादा स्वतंत्र ‘ औटघटकी ’ नाटकांचा प्रतिभा—दरिद्री जनक हेटाळूं लागला तर त्या बापड्याची कींवच करणें बरें

स्वतंत्रता हें कलाकृतीचें एक महत्त्वाचें मूल्य खरें. पण प्रतिभेची दीप्ति तेवढी असेल तरच त्या स्वतंत्रतेला महत्त्व येतें. भिकार पुस्तक केवळ स्वतंत्र आहे म्हणून तें कांहीं रसाळ अनुवादाच्या डोक्यावर जाऊन बसूं शकणार नाहीं. हें तारतम्य लक्षांत घेतलें म्हणजे कै. आपट्यांच्या सुरस ग्रंथांना ते केवळ अनुवाद आहेत म्हणून तुच्छ लेखणाऱ्या टीकाकारांच्या टीकेंतील पोकळपणा सहज लक्षांत येईल. वासुदेवराव रवीन्द्र-शरश्चंद्र नाहींत हें खरेंच; पण त्यांना परपुष्ट म्हणून लेखणारेहि मम्मट-मॅथ्यू अर्नोल्ड नव्हेत आणि हे टीकाकार ज्या मराठी लेखकांना ' स्वतंत्र ' म्हणून चढवितात तेहि सर्व शेक्सपीअर-कालिदासाच्या पंक्तीचे नव्हेत हें विसरणें योग्य नाहीं.

## प्रांतभारतीचे आद्यप्रवर्तक

वासुदेवरावांच्या वाङ्मयसेवेविषयीं सांगतांना प्रथम एक गोष्ट त्यांच्या जमेच्या बाजूची म्हणून सांगितली पाहिजे आणि ती म्हणजे हिंदी, बंगाली, गुजराथी इ० भाषाभगिनींच्या समृद्ध भांडारांतून आपल्या मायबोलीसाठीं त्यांनीं अनेक रत्नें पैदा करून आणिलीं. आज प्रांतभारतीची चळवळ सुरू झाली आहे. या चळवळीचा उद्देश खरोखरच फार चांगला आहे. भारतांतील प्रमुख प्रांत-भाषांचा परिचय झाला तर असें दिसेल कीं, यांपैकीं प्रत्येक भाषेचें सौंदर्य अलग आहे आणि तरीहि या सर्व भाषांत भारतीय संस्कृतीचें सुवर्णसूत्र ओवलेलें आहे. तेव्हां या प्रांतभाषांत दळणवळण सुरू झालें तर हें भारतीय एकत्त्व कळून येईल आणि परस्परांचीं मनें निवळून एकराष्ट्रीयत्वाचा साक्षात्कार होणें शक्य होईल. भारतीय संस्कृति ही मानवतेच्या पायावर रचिलेली संपन्न व सर्वंकष अशी संस्कृति असल्यानें या संस्कृतीचें रहस्य कळलें, कीं माणूस परमोच्च पातळीवर येईल. कविसम्राट् रवीन्द्रनाथांनीं ' विश्वभारती 'चें ध्येयवाक्य ' **यत्र विश्वं भवत्येकनीडम्** ' ( हें सर्व विश्व एक घरट्याप्रमाणें जेथें होतें ) असें ठरविलें तें याच हेतूनें. रवीन्द्रांची दृष्टि सर्व विश्वाला पालाण घालणारी असल्यानें त्यांनीं सर्व राष्ट्रांचें ऐक्य व्हावें या कल्पनेचा पुरस्कार केला. प्रांतभारतीची कल्पना मर्यादित पण त्याच पद्धतीची आहे. या कल्पनेला विशेष चालना पूज्य साने-गुरुजींनीं दिली असली तरी कै. वा. गो. आपटे यांनीं आपल्या कार्यांत त्या कल्पनेला पूर्वींच आकार दिला होता हें प्रांत-भारतीच्या पुरस्कर्त्यांनीं ध्यानांत ठेवणें जरूर आहे. ज्याचें श्रेय त्याला देणें हें संस्कृतीचेंच एक अंग नाहीं का ?

मराठींत अनेक भाषांतील धन वासुदेवराव आणूं शकले याचें कारण

नगर वाचनालय सातारा
ग्रंथपालकीकृत



त्यांचें मन मूलतः उदार होतें आणि त्यांचे अन्यप्रांतीयांशीं ऋणानुबंधहि पुष्कळ असत हेंच होय. ' संपूर्ण बंकीमचंद्र ' त्यांनीं बंगालींतून मराठींत उतरविला. या तीन भागांतील अद्भुतरम्य कादंबऱ्यांची गोडी किती अवीट आहे हें त्या कादंबऱ्यांच्या वाचकांना सांगायला पाहिजे असें नाहीं. सुरेन्द्रनाथ, रामानंद इ० प्रख्यात वंग विभूतींशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध आल्यानें खुद्द वासुदेवरावांनाच नव्हे तर महाराष्ट्र व मराठी भाषा यांनाहि फायदा झाला. बंगालच्या फाळणीनें आणि 'बाल-पालां'च्या स्नेहामुळें स्वातंत्र्य–संग्रामांत बंगाल व महाराष्ट्र एकत्र येत होते. **'वंग आमुचा खरा सहोदर'** असें वाटूं लागलें होतें. अशा वेळीं बंगाल-मधील द्रष्ट्या पुरुषांविषयीं एक प्रकारचें आदरयुक्त कुतूहल आम्हांला होतें. रामकृष्ण–विवेकानंदांची तेजस्वी वाणी आमचीं अंतःकरणें आकर्षित करूं लागली होती. आमच्या कुतूहलाला वासुदेवरावांनीं वंग साहित्यक्षेत्रांतील अतिरथींची ओळख आम्हांला करून देऊन पौष्टिक खाद्य पुरविलें. रवींद्रांना जगविख्यात नोबेल पारितोषिक मिळालें तेव्हां 'मनोरंजनां'त **''रवीन्द्राचा जयजयकार'** या मथळ्या-खालीं एक लेख लिहून वासुदेवरावांनीं रवीन्द्रनाथांच्या जीवनकार्याचा व वाङ्मयाचा परिचय महाराष्ट्राला करून दिला. हा लेख माहिती आणि सुबोधता या दोन्ही गोष्टींनीं केवळ अजोड ठरेल. रवीन्द्रांच्या 'शिशु ' या परमरमणीय शिशुकाव्याचा त्यांनीं सुरस अनुवाद केला होता. ' वाल्मीकीचा जय ' हें वंग विद्वत्कुलशेखर हर-प्रसादशास्त्री यांचें पुस्तक त्यांनीं मराठींत आणिलें. महर्षि अरविंदांनीं आपल्या पत्नीस लिहिलेलीं तीन सुंदर पत्रें त्यांनीं भाषांतरिलीं आहेत. नंतर ' रवींचे उज्ज्वल किरण ' हें रवीन्द्रनाथांच्या गोष्टींचें सुंदर भाषांतरहि त्यांनीं प्रसिद्ध केलें. बंगाली साहित्यसंमेलनाचीं महत्त्वाचीं भाषणें ' विविध ज्ञानविस्तारां 'त ते अनुवादित करून देत. आजहि तीं वाचनीय ठरतील. ' मॉडर्न रिव्ह्यू 'मध्यें नव्या नव्या मराठी पुस्तकांचा परिचय त्यांनीं नियमित व निरलसपणें करून दिला. आणि बंगाल आणि महाराष्ट्र या दोन प्रांतांतील साहित्य आणि संस्कृति यांची देवघेव करून दोन प्रांतांतील रसिकांत परस्परांविषयीं बंधुभाव व समजूत वाढेल असा मोठा प्रयत्न केला. 'मराठी-बंगाली शिक्षक' आणि ' बंगाली मराठी कोश ' हीं दोन पुस्तकें लिहून त्यांनीं वंग-वाङ्मय-सागरांत शिरण्यासाठीं एक कायमचा कालवा तयार करून ठेविला. हें ऋण कोणीहि डोळ्यांआड करूं नये.

बंगालीपेक्षां गुजराथी आपणांला सोपेपणा व भौगोलिक सांनिध्य यांमुळें अधिक जवळ. याहि भाषाभगिनींच्या संसारांत त्यांनीं आपलेपणानें लक्ष

[faint library stamp]

घातलें. गुजराथी बालवाङ्मयाचे मशहूर अग्रणी गिजूभाई बधेका आणि वासुदेवराव यांचा फार ऋणानुबंध होता आणि गिजूभाईंच्या चटकदार व सोप्या शिशुवाङ्मयाच्या धर्तीवरच ' बाल विनोदमाला ' व ' बाल विहारमाला ' या दोन माला वासुदेवरावांनीं रचिल्या. आपल्या गुजराथी शिशु वाङ्मयांतील कुठलाहि भाग केव्हांहि ' आनंदां 'त घेण्याची कायमची परवानगी गिजूभाईंनीं वासुदेवरावांना देऊन ठेविली होती. अगदीं मृत्युशय्येवर असतांना वासुदेवरावांनीं मुंबईस डॉ. त्रिभुवनदास शहा यांनीं अशोकचरित्रावर वाचलेला निबंध मागविला व त्यांनींहि तो प्रेमपूर्वक पाठविला. गुजराथींतील हरएक बालमासिक व ' प्रस्थान ' सारखे नमुनेदार प्रौढ मासिक ते आस्थेनें वाचीत आणि त्यांतून ' मधाच्या पोळ्यां 'करितां सामुग्री मिळाल्यास आस्थापूर्वक तिचा संग्रह करीत.

हिंदी ही राष्ट्रभाषा होऊं घातलेली आणि समजायला तर फारच सोपी. शिवाय भाषांतररूपानें निरनिराळ्या प्रांतभाषांचे प्रवाह या महानदीस मिळालेले. वासुदेवरावांचें हिंदीचें अध्ययन चांगलें होतें. ' सुधा ', ' सरस्वती ', ' चांद ' या मासिकांच्या संपादकांशीं त्यांचा परिचय होता आणि बनारस येथें ' आज ' हें प्रसिद्ध दैनिक चालविणारे श्री. बाबुराव पराडकर हे तर त्यांचे परममित्र होते. श्री. पराडकरांच्या स्नेहामुळें हिंदी जगाशीं वासुदेवराव विशेष निगडित झाले. त्यांच्या कांहीं पुस्तकांचीं भाषांतरें हिंदींत झालीं आहेत. कानडी, तेलगू, तामिल इ० भाषांचाहि परिचय करून घेण्याचा वासुदेवरावांनीं प्रयत्न केला. अशा रीतीनें स्वतंत्र भारतांत भिन्न प्रांतीय घटकांच्या भाषा व संस्कृति यांचें संमीलन व्हावें असा जो विचार आकार धरीत आहे,त्यास अनुसरून वासुदेवरावांनीं फार पूर्वींपासून साहित्यिक कार्य केलें आहे हें सहज दिसून येईल.

## बुद्ध आणि त्याचा संप्रदाय यांचे पूजक

आज कोणत्या एका तत्त्वज्ञानाला तेजी आली असेल तर ती बौद्धतत्त्वज्ञानाला होय. सुप्रसिद्ध बौद्ध सम्राट् अशोक याचें अहिंसाचक्र आमच्या राष्ट्रध्वजावर स्थिर झालें आणि अशोकाच्या सिंहस्तंभांना राजमुद्रेची प्रतिष्ठा मिळाली. महात्मा गांधी हे अहिंसेचे एक असामान्य प्रचारक असल्यामुळें बुद्धाची शिकवण ही पुनः एकदां आम्हांला आकर्षित करूं लागली. या बौद्धधर्मानें वासुदेवरावांच्या मनाची पकड प्रथमपासूनच घेतली होती असें दिसतें. १८९८ मध्यें विजापूरकरांनीं आपल्या ग्रंथमालेंतून वासुदेवरावांचें पहिलें पुस्तक ' अशोक चरित्र ' हें प्रसिद्ध केलें आणि वासुदेवराव मृत्युशय्येवर असतांना याच

वाचनालय

पुस्तकाची दुसरी आवृत्ति निघाली. मध्यंतरींच्या ३०-३२ वर्षांच्या काळांत सम्राट् अशोकावर जें मौलिक संशोधन झालें तें वेळोवेळीं पाहून त्याच्या आधारें वासुदेवरावांनीं 'अशोकचरित्रा'ची सुधारलेली आवृत्ति काढली होती. वास्तविक या आवृत्तीस दुसरी आवृत्ति म्हणण्यापेक्षां स्वतंत्र ग्रंथच म्हणणें अधिक शोभेल. भगवान् बुद्धाचा आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा परिचय करून देणारें 'बौद्धपर्व' हें वासुदेवरावांचें पुस्तक अत्यंत नमुनेदार आहे. भगवान् बुद्धाचें हृदयंगम व्यक्तित्व हा सर्व जगाच्याच आदराचा विषय आहे. वैदिक कर्मकांड आणि वर्णविषमता यांविरुद्ध बंड उभारून "**बहुजनहिताय बहुजनसुखाय**" असें एक मानवतावादी तत्वज्ञान बुद्धानें प्रस्थापित केलें आणि त्यानें सारा भरतखंड व्यापून टाकला. इतकेंच नव्हें तर सातासमुद्रांपलीकडे त्याची पिवळी पताका फडकूं लागली. हा सारा भव्यदिव्य इतिहास वासुदेवरावांनीं बौद्धपर्वांत दिला आहे. आधुनिक जगाला बौद्धधर्माइतका विवेकवादी धर्म सांपडणें कठीण. म्हणून विज्ञानयुगांत जर एखाद्या धर्माचें अस्तित्व राहिलें तर बौद्ध धर्माचेंच राहील असा निर्वाळा सुप्रसिद्ध इतिहासकार एच्. जी. वेल्स यांनीं दिला आहे. वासुदेवरावांना या गोष्टीचें नैसर्गिक आकर्षण होतें. त्यांच्या वाङ्मयीन कामगिरीचा आरंभ आणि शेवट 'अशोकचरित्रा'नें केला तर मध्यबिंदु 'बौद्धपर्वा'त साधला. आज स्वतंत्र भारतांत बौद्धधर्माच्या मूल्यांना राजमान्यता मिळालेली पाहून त्यांना खरोखरच स्वर्गांत धन्यता वाटत असेल.

## आदर्शवादी साहित्यिक

साहित्यामध्यें ज्या अनेक प्रवृत्ति आहेत त्यांमध्यें सौंदर्यवाद आणि आदर्शवाद या दोन प्रमुख गणल्या जातात. या दोन प्रवृत्तींचा साम्यविरोध विस्तारानें सांगण्याचें हें स्थळ नाहीं. थोडक्यांत दिग्दर्शन करावयाचें म्हटल्यास सौंदर्यवाद हा स्वप्नाळू, सौंदर्यशोधक, क्रांतिकारक, समर्पणशील असा असतो. त्याला अद्भुताचें विलक्षण वेड असतें. उलट आदर्शवाद ध्येयनिष्ठ पण सुधारणावादी, स्थिर मूल्यांची जोपासना करणारा, उदात्ततेवर भर देणारा असतो. या दोन प्रवृत्तींपैकीं वासुदेवराव हे आदर्शवादी प्रवृत्तीचे होते असें म्हणतां येईल आणि त्यामुळें अनुवाद किंवा अनुकरण यासाठीं निवड करतांना त्यांनीं तशाच ग्रंथांची निवड केली असें आपणांस दिसून येईल. मिसेस् हेन्री वुड यांच्या दोन्ही कादंबऱ्या त्यांनीं भाषांतारिल्या; त्याहि या प्रवृत्तीस पोषक आहेत सें दिसून येईल. बंकिमचंद्रांच्या कादंबऱ्या या कांहींशा अद्भुत् असल्या तरी

त्यांचा कल आदर्शाकडेच होता. हरप्रसादशास्त्री यांच्या पुस्तकांतून 'वाल्मीकीचा जय' हें भाषांतर केलें. त्यांतहि आदर्शाचें मंडन आहे. वशिष्ट, विश्वामित्र आणि वाल्मीकि या कवित्रयामध्यें श्रेष्ठतेची चढाओढ लागली असतां शक्तिशाली विश्वामित्र आणि बुद्धिशाली वशिष्ट मागें पडले आणि अखेर भावनामय वाल्मीकीचा कसा जय झाला हें अतीव काव्यमय पद्धतीनें यांत दाखविलें आहे. या पुस्तकाच्या ओघांत वहात गेलें म्हणजे एका रमणीय प्रांतांत आपण येऊन पोंचतों आणि शब्दसृष्टि निर्माण करणारा वाल्मीकि हाच कसा श्रेष्ठ आहे याचा साक्षात्कार आपणांस होतो.

"कालाच्या अति कराल दाढा
सकल वस्तुचा करिति चुराडा
कालशिरिं झडे तुझा चौघडा
जय मृत्युंजय, कविकुलभूषण"

ही कविवर्य तांबे यांची उक्ति किती खरी आहे हें बरोबर पटतें. याच पुस्तकाच्या अंतरंगाप्रमाणें मनाला कल्पकतेचे पंख लावून अध्यात्माच्या अंतराळांत नेणारें दुसरें पुस्तक 'ज्ञानदीप' हें होय. ज्ञानेश्वर महाराजांच्या अलौकिक ग्रंथराजाचें हें सुबोध गद्यांत केलेलें संक्षिप्त रूप आहे. ज्ञानेश्वरी हा एक वासुदेवरावांच्या नित्य चिंतनाचा विषय होता. इंदूर येथें साखरे महाराजांचे चिरंजीव ज्ञानेश्वरीवर कीर्तन करीत. मंडळी कीर्तनसुखाचा मनमुराद आनंद लुटत असत. त्यावेळीं वासुदेवराव ब्रह्मदेवास म्हणाले, 'ब्रह्मदेवा, मी ज्ञानेश्वरीवर प्रवचन करीन आणि ज्ञानेश्वरीचा सारांशहि लिहून काढीन.' प्रवचनाचें कांहीं जमलें नाहीं. परंतु त्यांनीं 'ज्ञानदीप' हें पुस्तक लिहून आपली दुसरी प्रतिज्ञा मात्र पुरी केली. या पुस्तकांत संक्षेप देतांना ज्ञानेश्वरींतलीं महत्त्वाचीं वचनें, रम्य कल्पना, समर्पक दृष्टांत सहसा सुटूं नयेत अशी त्यांनीं काळजी घेतली. त्यामुळें या पुस्तकाचें रूप मनोहर झालें आहे.

## कोशकार्य

'मराठी शब्दरत्नाकर' हा त्यांच्या वाङ्मयसंपदेंतील बहुमोल असा अलंकार म्हणतां येईल. हा कोश त्यांनीं स्वतःच्या बळावर रचला आहे ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे. या कोशांत मराठी संतवाङ्मयांत आलेले बहुतेक शब्द इतक्या विपुलतेनें आले आहेत कीं, 'शब्दरत्नाकरा'ची तिसरी आवृत्ति

काढतांना हा मुख्यतः संत-वाङ्मय कोशच करावा अशी सूचना एका विद्वा( कोशकारानें केली होती. सुमारें ३९ हजार शब्द असलेला आणि काळजीपूर्वक रचलेला एवढा कोश त्या काळपर्यंत नव्हताच असें म्हटलें तरी चालेल. पुढें राजवाडे–केतकरांच्या तपश्चर्येनुळें कोशवाङ्मयाची विशेष भरभराट झाली. असो. ' मराठी शब्दरत्नाकरां 'त विपुल शब्द आहेत आणि अनेक शब्दांचें मूळ त्यांत आलें आहे एवढेंच त्याचें वैशिष्ट्य नाहीं. भाषाभिवृद्धीला व भाषा-सौंदर्याला विघातक ठरणारी भाषाशुद्धीसारखी चळवळ देशभक्तीची गुंगी देऊन लोकांना मोहवूं पहात होती. त्यावेळीं वासुदेवरावांनीं सर्वसमावेशक अशी उदार भूमिका स्वीकारली हें विशेष आहे. ' मराठी भाषेचे सांप्रदाय आणि म्हणी ' हाहि नमुनेदार ग्रंथ त्यांनीं रचून भाषाभ्यासी विद्यार्थ्यांची सोय करून दिली.

## बालवाङ्मयाचें विविधतापूर्ण लेखन

बालवाङ्मय हें तर त्यांचें प्रमुख जीवितकार्य होतें. पण त्यांतहि त्यांची आदर्शवादी भूमिका स्पष्ट होते. आपल्या महाकाव्यामध्यें स्फूर्ति देण्याचें सामर्थ्य फार मोठें आहे म्हणून कुमारकालाच्या सुमारासच जर रामकृष्णांची उदात्त चरित्रें मुलांना अवगत झालीं तर त्यांच्या जीवितावर निःसंशय सुसंस्कार होतील असें वाटून ' बालभारत ', ' बालरामायण ', ' बालभागवत ' इ. पुस्तकें त्यांनीं रचलीं. या पुस्तकाच्या नकला पुष्कळ झाल्या परंतु मूळ पुस्तकांची सर कुणालाच आली नाहीं. जवळ जवळ दोन पिढ्यांना या चिमकुल्या पुस्तकांनीं स्फूर्ति दिली आहे. नाट्याच्या द्वारां एखादी गोष्ट मनावर अधिक ठसते म्हणून याच पुस्तकाची नाट्यमय रूपांतरें त्यांनीं केलीं आणि तींहि बालवर्गात अत्यंत प्रिय झालीं.

" महर्षींचा प्रसाद " त्यांनीं मुलांपुढें ठेविला. उपदेशाइतकेंच मुलांचें मनोरंजन हेंहि ते प्रिय कार्य मानीत. ' चित्तरंजन ', ' मनी आणि मोत्या ' इ० पुस्तकें त्यासाठीं त्यांनीं लिहिलीं. मुलांचें उद्बोधन किंवा मनोरंजन यांपैकीं कांहींतरी एक झालेंच पाहिजे असें त्यांचें पाहणें असे. त्यांचे ' देशभक्तिपर वाचनपाठ ' आजहि पाठ्यपुस्तकांत समाविष्ट करण्यासारखे आहेत. नागरिक नीतीची व देशभक्तीची शिकवण आणि तीहि पक्षातीत भूमिकेवरून दिलेली या पुस्तकांत आढळेल. मुलांसाठीं त्यांनीं बहुत लिहिलें आणि त्यांत विविधता आणण्याची खटपट केली. पुस्तक लिहायला घेतलें कीं, तें कोणत्या वयाचे मुलां-करितां आहे हें ते प्रथम निश्चित करीत आणि त्या वयास झेपेल व रुचकर वाटेल अशी भाषाशैली ते वापरीत. बालसाहित्य हें वाजवीपेक्षां अधिक सोपें आणि

फिकट करण्याची किंवा त्यांत नसता लडिवाळपणा आणण्याची चूक त्यांनीं केली नाहीं.

## साहित्य आणि कला यांची मूलग्राही चर्चा

वासुदेवरावांनीं विविध साहित्य निर्माण केलें, त्याप्रमाणें साहित्यनिर्मितीची गुरुकिल्लीहि सांगितली. हडसन्च्या इंग्रजी पुस्तकाचा नमुना पुढें ठेवून त्यांनीं रचलेलें 'लेखनकला आणि लेखनव्यवसाय' हें पुस्तक अजूनहि मार्गदर्शक ठरण्यासारखें आहे. या पुस्तकांत वाङ्मयाचें स्वरूप व ध्येय यासंबंधींची आपली कल्पना त्यांनीं स्पष्ट केली आहे.

> " मनुष्याचा विवेक जागृत करून त्याला नेहमीं सन्मार्गांत ठेवण्याचें, त्याच्या विविध मनोवृत्तींचा विकास करून अशुद्ध, अपवित्र व अमंगल अशा गोष्टींपासून परावृत्त होण्याचा बोध देण्याचें, आणि नेहमीं उदार व उदात्त विचारांचा त्याच्या मनांत संचार करून त्याला मनुष्यकोटीहून उच्च कोटीला नेऊन सोडण्याचें महत्कार्य करण्याची जबाबदारी साहित्यावर असल्यामुळें तें नेहमीं शुद्ध, पवित्र व हितकर गोष्टींनीं परिपूर्ण असेंच असलें पाहिजे. "
>
> ( लेखनकला, पृ. १ )

वाङ्मयासंबंधीं त्यांची कल्पना एवढी उंच असल्यामुळें त्यांच्या साऱ्या साहित्यावर सात्त्विकतेचें कोवळें ऊन पडलेलें दिसून येईल. लेखनकलेवर अलीकडे पुष्कळ पुस्तकें झालीं आहेत आणि त्यांतलीं कित्येक फार उच्च दर्जाचीं आहेत. परंतु लेखनकला आणि लेखनव्यवसाय हें साहित्याच्या रचनात्मक व व्यावहारिक अशा दोन्ही बाजूंचें उत्कृष्ट ज्ञान करून देणारें पहिलेंच पुस्तक होय असें म्हणावयास हरकत नाहीं.

साहित्यांतील आणखीहि एका दालनाचा पाया घातल्याचें श्रेय वासुदेवरावांकडे जातें. अलीकडे सौंदर्यशास्त्राचा बराच सूक्ष्म विचार होऊं लागला आहे. मनुष्याला सौंदर्यप्रतीति कशी येते आणि कां येते याचा शोध घेण्याची पराकाष्ठा तज्ज्ञ माणसें करीत आहेत. प्राचीन संस्कृत वाङ्मयांत या तऱ्हेचा विचार झाला होता. आतां मनोविश्लेषणादि नव्या शास्त्रांचा आधार घेऊन सौंदर्याचें रहस्य जाणण्याची धडपड अनेक सौंदर्यशास्त्रज्ञ करीत आहेत. ' सौंदर्य आणि ललितकला ' हें पुस्तक लिहून वासुदेवरावांनीं अशा तऱ्हेच्या चर्चेचा पायाच घालून दिला असें म्हणावयास हरकत नाहीं. हें पुस्तक जितकें सखोल

तितकेंच सुबोध आहे. शिल्प, संगीत आणि चित्र या तीन कलांविषयींच या पुस्तकांत मुख्यतः ऊहापोह केलेला असला तरी तो इतका मूलग्राही आहे, कीं त्यावरून एकंदर कलानंद व कलानिर्मिति यांचें पूर्ण आकलन होण्यास अडचण पडत नाहीं. हा विषय त्यावेळीं नवा होता; परिभाषा तयार नव्हती; साधनेंहि थोडीं होतीं. इतक्या प्रतिकूल परिस्थितींत वासुदेवरावांनीं तो फार उत्तम रीतीनें सजविला आहे असें आढळून येईल.

## भाषाशैली

प्रसाद हा वासुदेवरावांच्या शैलीचा मुख्य गुण होता. असंबद्धता, नकलीपणा, दुर्बोधता इ० दोष त्यांच्या लिखाणांत नाहींत. कल्पकतेची भरारी किंवा भावनांचा खळखळाट त्यांच्या वाङ्मयांत नाहीं. 'अशोकचरित्रां'च्या काव्यमय आरंभाप्रमाणें क्वचित् भाषेचा फुलोरा त्यांनीं दाखविला आहे, नाहीं असें नाहीं. परंतु शक्य तोंवर संथ, स्वच्छ व खोल लेखनाकडे त्यांची प्रवृत्ति विशेष दिसते. दूरान्वय, अप्रयोजक व ओबडधोबड शब्द, वाक्यांची हेमाडपंती बांधणी त्यांच्या पुस्तकांत कुठेंहि आढळणार नाहीं. जगांतील उत्कृष्ट विचार भांडारांतलीं रत्नें मायभाषेंत आणावयाचीं आणि तीं वेचतांना मेहनतींत कसूर करावयाची नाहीं हें त्यांच्या वाङ्मयसेवेचें सूत्र म्हणून सांगतां येईल. घरांत शिरल्यानंतर एकंदर मांडणीवरून यजमानाच्या व्यवस्थितपणाची व सुस्थितीची कल्पना येते त्याप्रमाणें त्यांच्या कुठल्याहि पुस्तकाचें पान वाचलें तरी त्यांचा ध्येयनिष्ठ, सात्त्विक, साक्षेपी स्वभाव प्रत्ययाला येतो. वाङ्मयीन यशाचें याहून दुसरें गमक कोणतें असेल ?

## अराजकावर तोडगा

वासुदेवरावांच्या वाङ्मय-सृष्टीचें स्वरूप हें असें आहे. या विवेचनाबद्दल अलीकडे प्रगट झालेल्या अनेक प्रवृत्तींची व मूल्यांची चाहूल वासुदेवरावांना पूर्वींच कशी लागली होती हें स्पष्ट कळून येईल आणि त्यांच्या व्यापक दूरदृष्टी-बद्दल आदर वाटूं लागेल. या साहित्यापैकीं पुष्कळसें साहित्य 'अद्ययावत्' वाटावें अशा योग्यतेचें आहे. मात्र आमच्या शैक्षणिक व साहित्यिक धुरीणांनीं सांप्रदायिक चाकोरी सोडून जरा आजूबाजूस पाहण्याचें औदार्य दाखविलें पाहिजे. चांगलीं पुस्तकें निर्माण व्हावींत ही अपेक्षा तर रास्तच आहे. परंतु विस्मृतीच्या अडगळींत पडलेलीं उत्कृष्ट पुस्तकें पुढें आणून राष्ट्रसंवर्धनाचे व संस्कृतिशिक्षणाचे कामीं त्यांचा उपयोग करणें हेंहि एक अवश्य करावें असें काम आहे. आमच्या

राष्ट्रांत आज जीवनाच्या प्रत्येक शाखेंत नवी मांडामांड चालू आहे. प्रौढशिक्षण साक्षरता प्रसार यांचा प्रसार होत आहे; नागरिक-नीतीची शिकवण दिली जात आहे; प्रांताप्रांतांतल्या संस्कृतींचें दळणवळण वाढावें अशी खटपट सुरू आहे. या व अशा अनेक राष्ट्रीय कार्यांना पोषण मिळण्यासारखें खाद्य वासुदेवरावांच्या वाङ्मयांत भरपूर सांपडेल.

आज वाङ्मयांत अनेक अनिष्ट प्रवृत्ति प्रबळ होऊं पहात आहेत. उदात्तपणाचीं कृत्रिम पिसें डकवून भाविक वाचकांची दिशाभूल करावी, प्रयोगशीलतेच्या नांवाखालीं विदुषकी लेखन करून तेंच श्रेष्ठ म्हणून ठरवावें, आणि वास्तवाची बैठक द्यायच्या मिषानें बीभत्स रसाचीं कुंडें तयार करावींत असें चाललें आहे! अशा वेळीं जाणत्या लोकांनीं प्रसन्न व शुद्ध असें वाङ्मय तरुणांपुढें ठेवून त्यांच्या अभिरुचीला प्रथमपासून सुसंस्कृत करणें हा एकच या अराजकावर तोडगा आहे. हें कार्य करण्यास वासुदेवरावांचें वाङ्मय खास समर्थ ठरेल ही खात्री वाटते. इतरांनाहि ती तशीच वाटो ही प्रार्थना.

# आनंदकार्यालयनिधीचा स्फूर्तिदायक इतिहास

[ पुण्याचे लॉ कॉलेजचे संस्थापक व माजी प्राचार्य आणि एक विख्यात कायदेपंडित व धर्मशास्त्रज्ञ प्रा. ज. र. घारपुरे यांचा व कै. वा. गो. आपट्यांचा स्नेह होता. अशा ऋणानुबंधी विद्वद्वर्यानें आनंदकार्यालयनिधीसंबंधीं दिलेली माहिती वाचकांना स्फूर्तिदायक वाटेल. ]

आपल्या धर्मशास्त्रांत देवऋण, पितृऋण इ० अनेक ऋणें सांगितलीं आहेत. जीवनाच्या सार्थकतेची मुख्य साधना म्हणजे हीं ऋणें फेडणें ही होय. अर्थात् यांत कर्तव्याचा मुख्य भाग येतो. प्रेयापेक्षां श्रेयाला प्राधान्य मिळून एकंदर समाजाच्या चक्रांना व्यवस्थित व अखंडित गति मिळत रहावी हाच या कर्तव्याचा उद्देश होय. आपण ज्या गादीवर आलों तिची परंपरा कायम ठेवून त्या परंपरेंत यथाशक्ति भर घालणें हाहि याच कर्तव्याचा भाग आहे. हें कर्तव्य आनंद-कार्यालयाच्या तिघां विश्वस्तांनीं उत्तम तऱ्हेनें पार पाडलें आहे. या संस्थेच्या मंडळाशीं कै. वासुदेवराव आपटे यांच्या इच्छेस अनुसरून घनिष्ठ संबंध आला आणि व्यावहारिक घडामोडीसंबंधानें विश्वस्त म्हणूनच तिघां विश्वस्तांचें कार्य व तें करण्याची पद्धति मी पाहात आलों आहें. या कार्यामध्यें कधीं मार्गदर्शन करणाराची तर क्वचित् सहकाऱ्याची भूमिकाहि मजकडे आलेली आहे. एका सत्त्वगुणसंपन्न वाङ्मयसेवकानें समाजहितास पोषक असें वाङ्मय निर्माण करून मरतेसमयीं त्यावर मिळविलेला सर्व निधि निःस्वार्थबुद्धीनें आपल्या मातृभाषेच्या विकासा-करितां समर्पण केला व त्याच्या सुरक्षिततेची व्यवस्था केली आणि त्याच्या विश्वस्तांनीं तो यथाशक्य वाढवून दिवंगत संस्थापकाच्या सात्त्विक महत्त्वाकांक्षेची पूर्तता केली व तीही निःस्वार्थबुद्धीनें चालविली, ही गोष्ट या युगांत फार महत्त्वाची वाटते. या सर्व कार्यामध्यें जी निष्ठा, कार्यक्षमता आणि समाजाभिमुखता दिसून आली ती प्रशंसनीय आहे. आणि सामाजिक नीतिमत्तेचें एक पर्व या दृष्टीनें हें कार्य लोकांना कळावें असें मला वाटतें.

कै. वासुदेव गोविंद आपटे यांनीं २१ ऑगस्ट १९२६ रोजीं आपल्या स्वकष्टार्जित मिळकतीचें मृत्युपत्र केलें. या मृत्युपत्राप्रमाणें एकंदर मिळकत सुमारें ५५ हजार रुपयांची होती. या मृत्युपत्रामध्यें शासनव्यावहारिकदृष्ट्या कोणच्याही

प्रकारची विसंगति न रहावी म्हणून त्यांचा व माझा विचारविनिमय होत असे. व त्यांच्या इच्छेप्रमाणें त्यांच्यामागून त्यांचे विश्वस्तही तोच मार्ग चालवीत आलेले आहेत. विश्वस्त नेमावयाचे ते योग्य आणि निष्ठावान् पाहिजेत म्हणून वासुदेवरावांनीं विचारपूर्वक तिघां विश्वस्तांची निवड केली त्यांपैकीं एक श्री. केशव दाजी पुराणिक, हे इंदूर येथील कोट्याधीश श्री. हुकुमचंद यांच्या मिलचे मुख्याधिकारी होत. श्री. तात्यासाहेब पुराणिक यांचा व्यावसायिक व्याप, अनुभव व दूरदृष्टि सर्वच फार मोठी आहे. दुसरे विश्वस्त श्री. व्यंकटेश नारायण सहस्रबुद्धे हे कै. वासुदेवरावांचे भागिनेय आणि त्यांच्याच संस्करणानें वाढलेले. मध्यप्रदेशामध्यें इन्स्पेक्टर ऑफ वॉयलर्स या हुद्द्यावर त्यांनीं काम केलें. सरकारी कामकाजाचा अनुभव त्यांना पुष्कळ असून वासुदेवरावांचें मनोगत त्यांनीं चांगलें जाणलें होतें. तिसरे श्री. गोपाळ बळवंत जोशी हे वासुदेवरावांचे नर्मसुहृद् ( पत्नीचे बंधु ) असून कुमार कालापासून ह्यांनीं कै. आपट्यांच्या हाताखालींच शिक्षण घेतलें. जीवनाचा पाया त्यांचेच मार्गदर्शित्वानें घातला. आनंद मुद्रणालय हें त्यांच्या मालकीचें मुद्रणालय, आनंद कार्यालय आणि आनंद मासिक या कै. आपट्यांच्या कर्तृत्वाच्या तिन्ही शाखांना श्री. जोशी यांनींच खतपाणी सतत घातलें. सतत सान्निध्य, तज्जनित विश्वास व आत्मीयता आणि प्रत्यक्ष माहिती या तिन्ही दृष्टींनीं श्री. जोशी यांना कै. आपट्यांनीं कार्यकारी विश्वस्त नेमलें, तें योग्यच होतें. या तिघांनीं कै. आपटे यांचें निधन ( ता. २–२–३० ) झाल्यानंतर एकोप्यानें वागून हा निधि समाजोपयोगी कार्यांस लाविला.

मृत्युपत्रामध्यें मिळकत ५५ हजारांपर्यंत होती. तरी खुद्द कै. आपट्यांनींच जे खर्च व देणग्या लिहून ठेविल्या होत्या त्या वजा जातां सुमारें ३८ हजार रुपयेच विश्वस्तांच्या जवळ खर्चासाठीं राहिले. आनंद मासिक आणि आनंद-कार्यालयाचीं प्रकाशनें ही काय ती मिळकतीची वर्धिष्णु बाजू होती. निधीचा पैसा व्यवस्थित गुंतवून त्याचप्रमाणें मासिक व प्रकाशनें यांचा धंदा काटकसरीनें व हिशेबीपणानें करून विश्वस्तांनीं सुमारें वीस वर्षांत ही रकम दीड लाखापर्यंत नेली. आणि म्हणूनच मराठी भाषेच्या सेवेसाठीं एक लाख रुपये विश्वस्त देऊं शकले.

मराठी भाषा आणि बालकें ह्यांच्या सेवेंत आपला निधि खर्च व्हावा असा कै. वासुदेवराव यांचा मनोदय होता. त्यांनीं आपला सर्व काळ मराठी

साहित्याच्या उपासनेंत घालविला आणि मुख्यतः मुलांसाठींच त्यांनीं पुस्तकें लिहिलीं. बालसृष्टीकडून मिळालेलें ऐश्वर्य परत तिलाच अर्पण करणें कै. आपट्यांना योग्य वाटलें. भाषेच्या विद्यार्थ्यांसाठीं जर उत्तम शैक्षणिक सोयी करून दिल्या तर कै. आपट्यांचें ईप्सित पूर्णपणें सफल होईल, म्हणजे भाषा व मुलें या दोघांचेंहि ऋण फेडल्यासारखें होईल. म्हणून पुणें विद्यापीठाला विश्वस्तांनीं एक लाख रुपये दिले. या देणगीचें महत्त्व फार मोठें होतें. एक तर पुणें विद्यापीठाच्या नुकत्याच सुरू झालेल्या संसाराला मोठी मदत मिळाली. दुसरें एका मध्यम स्थितींतील साहित्यिकालाहि केवढें कर्तृत्व शक्य करून दाखवितां येतें याचा प्रत्यय येऊन होतकरू विद्यार्थ्यांना आशास्थान निर्माण झालें. पुणें विद्यापीठातर्फे या देणगीचा मुक्तहस्तानें व कृतज्ञतापूर्वक स्वीकार करतांना पुणें विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. जयकर यांनीं या देणगीचें वैशिष्ट्य समर्पक शब्दांत उद्घोषित केलें.

ही देणगी देण्यापूर्वी अनेक वर्षें साहित्यिक संस्थांना व बालशिक्षणाला विश्वस्त साहाय्य करीत होतेच. महाराष्ट्राच्या निरनिराळ्या टापूंतील चांगल्या शाळा निवडून दरवर्षीं "वासुदेव गोविंद आपटे पारितोषिकें" म्हणून या शाळांना कांहीं देणगी देण्यांत येई व अभ्यासक्रमाच्या कक्षेंतील कोणत्याही चांगल्या कलांमध्यें विशेष नैपुण्य दाखविणाऱ्या विद्यार्थ्यांना हीं बक्षिसें दिलीं जात. सांगली येथें डॉ. बापट बालशिक्षण मंदिर या संस्थेस पांच हजार रुपये देण्यांत आले. त्याचप्रमाणें पुणें येथें भरलेल्या साहित्यसंमेलनाचे वेळीं महाराष्ट्रांतील युवकवर्गासाठीं लाविलेल्या निबंधस्पर्धेला रु. १०० चीं पारितोषिकें देण्यांत आलीं. पुण्यास आनंदकार्यालयामध्यें सुमारें ७–८ वर्षें एक मोफत बालग्रंथालय चालवण्यांत आलें होतें. शेकडों मुलांना त्याचा उपयोग झाला.

इंदूर येथील साहित्यसभेला रु. ५०० देण्यांत आले. महाराष्ट्रसाहित्य परिषदेला दिलेली दहा हजारांची देणगी ही विशेष उल्लेखनीय गोष्ट होय. इंदूर नरेशांच्या देणगीखेरीज एवढी मोठी देणगी म. सा. परिषदेला मिळालेली नाहीं. या देणगींतून " वा. गो. आपटे ग्रंथालय " हा स्वतंत्र भाग म. सा. परिषदेच्या पुणें येथील मध्यवर्ती कचेरींत निर्माण करण्यांत आला आहे. ' माधवराव पटवर्धन साहित्यमंदिरा 'च्या तळघरांत हें ग्रंथालय आहे. मराठी भाषाभ्यासकांची उत्तम सोय त्यायोगें झाली आहे.

वासुदेवरावांचें ' आनंद ' हें सर्वांत मोठें स्मारक म्हणतां येईल. त्यांच्या निधनानंतर आज २२ वर्षें तें आपलें स्थान टिकवून आहे. संस्थापक गेल्यानंतर

एकादें नियतकालिक इतकें दीर्घकाळ टिकून राहणें हें महाराष्ट्रांत तरी कौतुकाचेंच म्हणावें लागेल. कागदनियंत्रणाची कुऱ्हाड जेव्हां पडली तेव्हां एकदोन अंक तर ४–६ पानांचेच काढावे लागले ! वाढती महागता व प्रतिस्पर्धा यांची झळ तीव्रपणें लागली; पण मासिकाचा उच्चांक व लोकप्रियता यथापूर्व आहे. याचें बरेचसें श्रेय त्यांचे आप्तविश्वस्त गोपाळराव जोशी यांचें व्यवहारचातुर्य, दक्षता व असामान्य धार्मिकता यांजकडे व तितक्याच प्रमाणानें ख्यातनाम साहित्यिक श्री. गोपीनाथ तळवलकर यांना आहे. आनंद कार्यालयाचीं प्रकाशनेंहि पुनः संस्कारित होत असतात. त्या शाखेमध्यें जीर्णोद्धार आणि नवरचना चालू आहे.

अशा रीतीनें संस्थापकाच्या कार्याची ज्योत तेवती ठेवून त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करण्याची कामगिरी तिन्हीं विश्वस्तांनीं बजाविली आहे. प्रत्येक व्यक्तीचें कर्तृत्व ही समाजाची एक ठेव असते. ती जपणें व वाढविणें हें एक समाजकार्यच म्हणतां येईल; किंबहुना हेंच त्यांचें श्राद्ध व त्यासंबंधींची ऋणपूर्ति. एका स्वावलंबी व ध्येयनिष्ठ साहित्यिकानें निर्माण केलेला निधि पद्धतशीरपणें लोककार्यास लागला, ही गोष्ट वरवर साधारण वाटत असली तरी ती साध्य होण्यास कारण झालेली निष्ठा फार उच्च दर्जाची आहे.


या निधीच्या व्यवस्थेंत मूळ संस्थापकाचें दिसून आलेलें औदार्य व कर्तव्यप्रीति ही जितकी स्पृहणीय तितकीच विश्वस्तांची निष्ठा, तादात्म्यता व कार्यक्षमता हींहि अभिनंदनीय होत. या प्रकारच्याच गुणांनीं समाजाचें उत्तम धारण व पोषण होतें. आज वासुदेवरावांचें फार मोठें वाङ्मयीन स्मारक ' मराठी शब्दरत्नाकर ' हें नव्या व विकसित स्वरूपांत पुढें येत आहे. अशा वेळीं आनंद कार्यालय–निधीचा थोडासा पण स्फूर्तिदायक इतिहास जनतेपुढें ठेवणें क्रमप्राप्तच होतें. त्याचा विचार व त्यांतील मूल्यें माझ्याप्रमाणेंच सर्वांना अनुकरणीय वाटतील ही खात्री आहे.

**जगन्नाथ रघुनाथ धारपुरे**

नगर वाचनालय, सातारा.

# मराठी शब्द रत्नाकर

## मराठी शब्दरत्नाकराचे कर्ते



**वासुदेव गोविंद आपटे**

[ जन्म—चैत्र व. ८ शके १७९३
दि. १२-४-१८७१ ]

[ मृत्यु—माघ शु. ४ शके १८५१
दि. २-२-१९३० ]

श्री

# मराठी शब्दरत्नाकर

## अ

[ टीप—अ अक्षरानें आरंभ झालेले पुष्कळ शब्द आ अक्षर आरंभीं घालून लिहिण्याचा प्रघात आहे. म्हणून जे शब्द अ या अक्षराखालीं आढळणार नाहींत ते आ या अक्षराखालीं पहावे. ]

**अ** मराठी वर्णमालेंतील पहिला वर्ण, अकार; विष्णु; (अ.) शब्दाच्या आरंभीं जोडिलें असतां हें (१) सादृश्य (२) अभाव (३) भेद (४) लघुत्व (५) अप्रशस्तपणा व (६) विरोध दर्शवितें. याचीं अनुक्रमें उदाहरणें :–(१) अब्राह्मण = ब्राह्मणासारखा; (२) अक्रोध = क्रोधाचा अभाव; (३) अपट = पटाहून निराळें; (४) अनुदरा = कृशोदरी; (५) अकार्य = वाईट काम; (६) अनीति = अन्याय. शब्दाच्या आरंभीं स्वर असतां या अचा अन् होतो. जसें :—अ + अंत = अनंत.

**अईन** (फा. आइन स्त्री.) चांगली चाल.

**अउत्या** (वि.) शेतकाम करणारा; शेतकऱ्याचा मुलगा.

**अउलें** (प्रा. न.) प्रेमाचें बोलावणें.

**अऊत** (सं. आयुध न.) शेतकीसंबंधाचें हत्यार, नांगर; बैलाच्या एका जोडीनें नांगरली जाईल इतकी जमीन.

**अकंटक** (सं. वि.) निष्कंटक, विघ्नरहित, कांटे नसलेलें; शत्रुरहित.

**अंक** (सं. पु.) चिन्ह; आंकडा; मांडी; नाटकाचा भाग.

**अंकगणित** (सं.न.) अंकांनीं करण्याचें गणित.

**अंकजाल** (सं. न.) अंकांचें कोष्टक.

**अकटोविकट** (सं. वि.) प्रचंड.

**अकड** (हिं. स्त्री.) ऐट; अभिमान, ताठा.

**अकडणें** (क्रि.) ऐट मिरविणें; ताठणें.

**अकडबाज** (हिं. वि.) ऐटबाज; गर्विष्ठ.

**अंकडा** (सं. अंक पु.) संख्येचें चिन्ह; वांकडया टोंकाचा पदार्थ; विंचवाचा नांगाडा. [लांब काठी.

**अंकडी** (स्त्री.) टोंकाला आंकडा असलेली

**अंकणकडवें** (न.) पालुपद, ध्रुपद.

**अंकणा** (सं. पु.) पायांतला पैंजण. (भा० ११।१४२).

**अंकणी** (सं. स्त्री.) आंखण्याची पट्टी.

**अकबरी मोहोर** (स्त्री.) उत्कृष्ट सोन्याची मोहोर; सच्च्या दिलाचा; पतदार मनुष्य; फायदेशीर धंदा; सुपीक जमीन इत्यादि.

**अकरकी** (स्त्री.) अकरे अकरे एकवीसाशेंपासून वीसे वीसे चारशेंपर्यंतचे पाढे.

**अकरताळा** (पु.) आडमुठा, आडदांड, हेकट, हट्टी. [हीन जन्माचा.

**अकरमाशा** (वि.) जारज, अनौरस,

**अकरमाही** (स्त्री.) बारा महिने चाकरी घेऊन अकरा महिन्यांचा पगार देण्याची पद्धति.

**अकरसणें** (क्रि.) सकोचणें.

**अकरावा बृहस्पति** दाट मैत्री.

**अकराळ विकराळ** (सं. कराल वि.) भयंकर. [नांवाचें फळ.

**अकरोट–ड** (सं. अक्षोट. पु.) अक्रोड

**अकर्तृक** (सं. वि.) कर्त्यावांचून असलेलें. (व्याक०) ज्यास स्वतंत्रपणें दृश्य कर्ता

नसून केवळ क्रियापदानेंच तत्संबंधाचें विधान पूर्ण झालेलें असतें असा (अकर्मक धातु).
**अकर्म** (सं. न.) कुकर्म, पापकृत्य.
**अकर्मक** (सं. वि.) व्याकरणांत ज्याला कर्म नाहीं असा धातु.
**अकल, अक्कल** (अर. अकल. स्त्री.) शहाणपण. **अ०चा खंदक**—दीड शहाणा, मूर्ख; **अ० विकत घेणें**—शहाणपण शिकणें.
**अकलमंद** (वि.) शहाणा, चतुर.
**अकलंक** (सं. वि.) शुद्ध, निर्दोष, निष्कलंक.
**अंकलिपि** (सं. अंक स्त्री.) आंकड्यांनीं संख्या लिहिण्याची पद्धति.
**अकल्पित** (सं. वि.) अचिंतित, अतर्कित, (अ०) एकाएकीं.
**अकल्याण** (सं. न.) अमंगल.
**अकला** (पु.) घोड्याचा रोग.
**अकस्ताळा** (वि.) माथेफिरू.
**अकशीं** (क्रि. वि.) समूळ (कुण०)
**अकस** (स्त्री. पु.) द्वेष, दावा, चुरस.
**अकसखोर** (फा. वि.) दुष्ट, खुनशी.
**अंकसळ, अंकसळू** (प्रा. पु. )रुपें इ० धातूंना कसास लावणारा. (ज्ञा० १८।४९२)
**अकस्मात्** (सं. अ.) एकाएकीं, अकल्पित.
**अकळी** (स्त्री.) श्वासाचें जोरानें निर्गमन; जांभई; तोंड वासणें.
**अका–क्का** (प्रा. स्त्री.) वडील वहीण.
**अकांडतांडव** (सं. न.) मोठें गजवजून सोडणारें कार्य; रागाचें फाजील भाषण.
**अकांतणें** (क्रि.) आक्रोश करणें.
**अकाबाई** (स्त्री.) लक्ष्मीची वडील वहीण; दुर्दैव.
**अकामी** (वि.) निरुपयोगी.
**अकारण** (सं. क्रि. वि.) विनाकारण, उगीचच्या उगीच.
**अकाल** (सं पु.) भलती-वेळ; शीखांचा ईश्वर, 'सत्श्री अकाल.'
**अकालीन** (सं. वि.)अयोग्य काळीं झालेलें.
**अकाळवणी** (पु.) भलत्याच वेळीं पडलेला पाऊस.
**अंकित** (वि.) चिन्ह केलेला; वश; गुलाम.
**अकिंचन** (सं. वि.) अतिशय दरिद्री.
**अंकिला** (प्रा. वि.) अंकित, स्वाधीन. (भा. ३१।१४)
**अकीक** (अर. पु.) एक उत्तम रत्न.
**अकीद** (फा. वि.) निष्ठ.
**अकीन** (अर. यकीन पु.) सत्याचा वाली.
**अकीर्ति** (सं. स्त्री.) बदनामी, दुर्लौकिक, नाचक्की, दुष्कीर्ति.
**अंकु, अंकू** (सं. पु. ) शिष्य, सेवक. (ज्ञा० १८।१६५९).
**अकुंठ** (सं. वि.) अकुंठित, अबाधित.
**अकुंठित** (सं. वि.)अबाधित, न अडविलेला.
**अंकुडें** (प्रा. वि.) वांकड्या अणीचें.
**अकुतोभय** (सं. वि.) कोठूनही भय नाहीं असा, अत्यंत सुरक्षित, निर्धास्त.
**अंकुर** (सं. पु.) मोड.
**अंकुरणें** (क्रि.) मोड फुटूं लागणें.
**अंकुरित** (सं. वि.) अंकुर किंवा मोड फुटूं लागलेलें; प्रादुर्भूत झालेलें.
**अंकुश** (सं. पु.) हत्तीला ताब्यांत ठेवण्यासाठीं महात हातीं शस्त्र घेतो तें.
**अकूर** (पु.) घोड्याचा रोग.
**अक्कड** (हिं. स्त्री.) मिजास, ऐट, झोक, इष्की.
**अक्कडसासू** (स्त्री.) वऱ्हाडप्रांतीं बायकोची वडील वहीण.
**अकृत्रिम** (सं. वि.) निष्कपट, खरा.
**अक्कल** (स्त्री.) अकल शब्द पहा.
**अक्कलकरा-काढा** (पु.) एक औषधि.
**अक्कलदाढ** (स्त्री.) बत्तिसावा किंवा शेवटीं उगवणारा दांत. [मान्.
**अक्कलवंत–वान्** (वि.) शहाणा; बुद्धि-
**अक्कलहुषारीनें** (अ.) स्वतांच्या बुद्धीनें, कोणी जबरदस्ती न करतां.
**अक्का** (का. स्त्री.) वडील बहीण.
**अक्काबाई** (स्त्री.) अवदसा; कुबुद्धि.
**अक्काबाईचा फेरा** (पु.) दारिद्र्य येणें.
**ॲक्टिंग** (इं. वि.) बदली काम करणारा; (न.) अभिनय, हावभाव.

**अक्राळविक्राळ** (वि.) भयंकर स्वरूपाचा.
**अक्रिय** (सं. वि.) क्रियारहित.
**अक्रीत** (सं. वि.) विकत न घेतलेलें, मोबदला किंवा किंमत न देतां घेतलेलें, फुकटचें; लबाडीनें घेतलेलें.
**अक्रुसणें–अक्रसणें** (क्रि.) आंखूड होणें.
**अक्लेश** (सं. क्रि. वि.) सहजासहजीं; श्रमावांचून.
**अक्रोड** (सं. अक्षोटक. पु. न.) एक फळ.
**अक्सावोकशीं** (अ.) फार जोरानें.
**अखण** (न.) एकदां मळलेलीं कणसें. आकण पहा.
**अखंड** (सं. वि.) सगळा, संपूर्ण; (अ.) सतत.
**अखंडणें** (प्रा. क्रि.) चिकटून राहणें. (तुका० १७३८).
**अखई** (वि.) सदोदित, अखंड, अक्षय. (क्रि. वि.) अनंतकालपर्यंत.
**अखडणें** (क्रि.) आटणें; थांबणें.
**अखंड सौभाग्यवती** (सं. वि.) चिरसौभाग्यसुख भोगणारी; (ग्राम्य) वेश्या.
**अखंडित** (सं. वि.) सतत चालणारा.
**अखंडैकरस** (सं. पु.) परब्रह्म.
**अखता** (सं. स्त्री.) अक्षता.
**अखत्यार** (अर. पु.) **अखत्यारी** (स्त्री.) अधिकार.
**अखम** (वि.) पंगु.
**अखबार** (अर. स्त्री.) बातमी; वर्तमानपत्र; (फा. पु.) **अ० नवीस**––बातम्या लिहिणारा.
**अखय** (वि.) नित्य.
**अखर** (सं. अक्षर न.) अक्षर; (फा. आखर पु.) गुरांची एके ठिकाणीं जमून बसण्याची जागा (वि.) अविनाशी.
**अखरा** (प्रा. पु.) आखाडा; शस्त्रागार (ऐति. को.) [ (ज्ञा० १३।८४८).
**अखलेख** (प्रा. अ.) वारंवार, सहज.
**अखसें** (प्रा. वि.) सर्व.
**अखा** (सं. अखिल वि.) सगळा, सर्व.
**अखाडा** (हिं. पु.) अड्डा; कुस्ती करण्याची जागा, हौदा.
**अखिल–ळ** (सं. वि.) सर्व, संपूर्ण.
**अखुडणें** (क्रि.) लहान होणें, खुरटणें.
**अखुड** (वि.) लहान, अपुरा, लांडा.
**अखे** (हिं. आखा न.) कंठाळीची अथवा पखालीची एक बाजू.
**अखेतीज** (स्त्री. सं. अक्षय्यतृतीया) वैशाख शुद्ध तृतीयेचा फार शुभ मानलेला दिवस.
**अखेर** (फा. आखर स्त्री. ) समाप्ति, शेवट; (अ.) शेवटीं.
**अखेरी** (फा. आखरी स्त्री. ) शेवट; **अ० मारणें**–शेवटचा डाव साधणें; अखेर यश मिळविणें.
**अखेंलेखें** (प्रा. अ.) वारंवार.
**अखों** (हिं. पु.) डोळे.
**अग** (अ.) बायकोविषयीं संबोधनार्थक अव्यय; (सं. पु.) पर्वत; वृक्ष.
**अंग** (सं. शरीर न.) शरीरावयव; बाजू; अंश, भाग; प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कर्तृत्वसंबंध; भेद, मांस; मनाची प्रवृत्ति, आकलनशक्ति; वशिला; मदत करणारा. **अंग काढून घेणें**–संबंध तोडणें; **अंग चोरणें**–कुचरपणानें काम करणें; **अंगाबाहेर टाकणें**–संबंध तोडून टाकणें; **अंग धरणें**–थंडीनें अंग दुखणें; गुटगुटीत होणें; **अंग मोडून काम करणें**–फार परिश्रम करणें; **अंगाची लाही होणें**–खवळणें; **अंगास येणें**–नुकसानीची बाब होणें; **अंगांत येणें**–पिशाच्चाचा वगैरे संचार होणें.
**अगइ–ई** (अ.) भय किंवा आश्चर्य दाखविणारा उद्गार.
**अंगकाठी, अंगलट, अंगलोट** (सं. स्त्री.) शरीराची ठेवण.
**अंगकवळी** (प्रा. स्त्री.) आलिंगन.
**अंगचा** (वि.) स्वाभाविक, जन्मसिद्ध.
**अंगच्छाया** (सं. स्त्री.) आश्रय; कृपेची सावली. [युद्ध. (नास० १८०९)
**अंगजूठ** (प्रा. स्त्री.) अंगझटापट, मल्ल–
**अंगझाप** (स्त्री.) पेंढारी लोकांपैकीं कोणी झटपटींत मारला गेला तर त्याला तेव्हां कोठेंतरी तात्पुरती मूठमाती देण्याची चाल असे ती.

**अंगझोल** (प्रा. पु.) अंगरखा. [ शेगडी.
**अगटी** (सं. अग्निस्थिति स्त्री.) शेकोटी,
**अंगठा** (सं. अंगुष्ठ पु.) अंगुष्ठ; **अं० दाखविणें**—नाकबूल जाणें; वंचना करणें.
**अंगठी** (सं. अंगुष्ठ स्त्री.) हाताच्या बोटां-तील अलंकार. [अवघड वाट.
**अगड** (प्रा. स्त्री.) लवणामधील वाट;
**अगडतगड** (वि.) अमर्याद, शुष्क.
**अगडधू** (वि.) अतिलठ्ठ, फोपशा (माणूस) [गोसावी.
**अगडधूत** (सं. अवधूत पु.) लठ्ठंभारती;
**अगडबंब** (वि.) फार लठ्ठ, अवजड.
**अगडा** (पु.) गाडीचें जूं व दांडी यांना बांधणारी दोरी.
**अंगडें** (न.) लहान मुलाचें अंगांत घाल-ण्याचें वस्त्र.
**अंगण** (सं. न.) घरापुढची मोकळी जागा; रंगण; भूमि, क्षेत्र.
**अगणित** (सं. वि.) असंख्य, अलोट, अपार.
**अगतिक** (सं. वि.) निरुपाय; निराधार.
**अगत्य** (सं. अगति न.) जरुरी; आस्था, कळकळ; आदर; **अ० पूर्वक** (अ.)—अवश्यमेव. **अ०वाद** (पुं.)—कळ-कळीची, आस्थेची भावना किंवा वृद्धि.
**अगद** (सं. न.) औषध (वि.) निरोगी.
**अंगत्राण** (सं. न.) चिलखत.
**अंगत्वानें** (अ.) वतीनें. [ मुलगा.
**अंगद** (सं. न.) बाहुभूषण, (पु.) वालीचा
**अंगदनीति** (सं. स्त्री.) अंगदानें रावणास केलेला उपदेश.
**अंगदशिष्टाई** (सं. स्त्री.) सीता परत देण्याबद्दल रामानें अंगदाबरोबर राव-णाला पाठविलेला निरोप.
**अंगदट** (प्रा. वि.) बळकट.
**अगदीं** (अ.) निखालस, पूर्णपणें.
**अंगना** (सं. स्त्री.) स्त्री.
**अंगपिळा** (पु.) अंगमोडा, अळापिळा.
**अंगभूत** (सं. वि.) अंग मानलेलें; समा-विष्ट. [अंगमोडा.
**अंगभंग** (सं. पु.) अभिनय, हावभाव;
**अंगमेहनत** (स्त्री.) शारीरिक श्रम.
**अंगमोड** (स्त्री.) सक्त मेहनत.

**अगम्य** (सं. वि.) अप्राप्य; दुर्गम; दुर्बोध, अज्ञेय.
**अगर** (फा. अ.) अथवा, किंवा.
**अगर** (सं. आकार न.) शेत, मळा; (सं. अगरु) चंदनविशेष.
**अंगरखा** (सं. अंगरक्षक पु.) अंगावरचा कपडा, अंगरखा.
**अगरगंड** (वि.) हट्टी.
**अगरबत्ती** (फा. स्त्री.) धूपकाडी, उदबत्ती.
**अंगरस** (सं. पु.) पाणी न घालतां फळें, वनस्पति इ. चा काढलेला रस; ओली वनस्पति कुटून निघणारा रस.
**अंगराग** (सं. पु.) सुगंधि उटणें; उटी.
**अगरी** (स्त्री.) शहरांतील व्यापाराची पेठ.
**अंगरोग** (सं. पु.) स्वाभाविक म्हणजे पिशाच्चबाधेनें न झालेली व्याधि.
**अगल** (पु.) दाराला लावण्याचा अडसर.
**अंगलग** (प्रा. पु.) समागम (ज्ञा० ११। २५७); संबंध (विवे. उ. ११।१६) आश्रय; साह्य (वि.); जिव्हाळ्याचा, नातलग, (शुभा० उद्योग० ३।३२)
**अंगलट** (स्त्री.) अंगकाठी पहा.
**अंगलट घेणें** (क्रि.) जबाबदारींत अडकणें.
**अंगलणें** (प्रा. क्रि.) स्वाधीन होणें.
**अंगली** (प्रा. क्रि.) औषध देणें. (ज्ञा० १६।४२) [बच्चा.
**अगल्याबगल्या** (पु.) आश्रित, बगल-
**अंगवखा** (प्रा. अ.) अंगावर (ज्ञा० ११–४२५).
**अंगवटा** (प्रा. अ.) स्वाधीन.
**अंगवण** (प्रा. स्त्री.) स्वेच्छा (ज्ञा. ७।९२) सामर्थ्य (तुका० ३०३४) संवय; साह्य. मदत; पक्ष (भा० ३०।११७) खूण, वण,
**अंगवणीयेचें** (प्रा. वि.) अलीकडचें. (ज्ञा० ११।६३०–३१).
**अंगवणें** (ना.) शक्ति (नाम. ११२७) (क्रि.) मुकणें, (अमृ० १।३४) आवरणें. (ना० ५६८) (प्रा. वि.) प्राप्त.
**अंगवला** (प्रा. अ.) जवळ.
**अंगवसा** (प्रा. पु.) साल; पाला; अग्रभाग (ज्ञा० ११।४१४)

**अंगवसें** (फा. न.) रूप.
**अंगवस्त्र** (सं. न.) उपरणें; राख, रखेली.
**अगवळ** (सं. वि.) अमंगळ (ज्ञा० १३।९७) (पु.) वेणीच्या केसांचीं अग्रें बांधतांना लागतो तो लोकरीचा धागा किंवा केसांची दोरी.
**अंगवळा** (प्रा. पु.) अंगाची ठेवण, (नाम० गा० १२८); संगत; आळेपिळे.
**अंगवळणीं पडणें** सराव होणें.
**अंगवाटा** (पु.) शेतांतल्या उत्पन्नांतला खास शेत वाहणाराचा हिस्सा.
**अंगविला** (प्रा. वि.) उपाधिरहित.
**अंगविक्षेप** (सं. पु.) हावभाव.
**अंगवें** (प्रा. न.) सामर्थ्य.
**अंगस्तनें** (प्रा. न.) लेंकरूं.
**अगस्ता** (पु.) हदगा.
**अगस्ताळ** (प्रा. वि.) उमट, अनियंत्रित.
**अगस्ति** (सं. पु.) १ देहाभिमान (ज्ञा० ९।१८३); २ ऋषिविशेष; ३ नक्षत्रविशेष; ४ खादाड मनुष्य; ५ वृक्षविशेष.
**अंगस्वभाव** (सं. पु.) जन्मतः प्राप्त स्वभाव.
**अंगहीन** (सं.) १ वेश्या (ज्ञा. १७।२४६); २ मदन; ३ चाकाशिवाय असलेला रथ (ज्ञा० १०।३८७); (वि.) पंगु.
**अगळ** (सं. अर्गला स्त्री.) दाराला घालण्याची सांखळी, अडसर, निर्बंध.
**अगळा** (हिं. वि.) श्रेष्ठ; अधिक; (सं. अर्गला, स्त्री.) सांखळी.
**अगळीक** (स्त्री.) खोडी; चूक; अपराध.
**अंगळी** (सं. अंगुलि स्त्री.) अंगुलि, सर्वांत लहान बोट.
**अगा** (अ.) पुरुषवाचक संबोधनार्थक शब्द.
**अगई** (स्त्री.) झोंप. [प्रथम.
**अगाऊ** (वि.) आधींचा; (अ.) आधीं;
**अगाजणें** (क्रि.) गाजावाजा होणें; टिमकी वाजणें.
**अगाजा** (फा. आगाजा पु.) बोभाटा.
**अगांतुक** (सं. आगंतुक पु.) न बोलावतां जेवण्यास गेलेला मनुष्य; (वि.) आकस्मिक; बाह्य; अनित्य; केव्हां आहे केव्हां नाहीं असें.
**अगाध** (वि.) फार खोल; अगम्य; अतर्क्य.
**अगापिछा** (हिं. पु.) पुढचा व मागचा भाग; पुढचा मागचा संबंध; जवळचे आप्तसंबंधी (आईबाप, मुलें वगैरे).
**अगार** (सं. न.) घर, मंदिर.
**अंगार** (सं. पु.) निखारा, विस्तव.
**अंगारक** (सं. पु.) मंगळ–ग्रह; (सांकेतिक) आंग्रे.
**अंगारकी चतुर्थी** (स्त्री.) कृष्णपक्षांत मंगळवारीं येणारी चतुर्थी.
**अंगारा** (सं. अंगार पु.) देवाचा प्रसाद म्हणून धूपारतींतील घेतलेली राख; जोंधळ्यावर पडणारा एक रोग.
**अगारामेर** (प्रा.) शेताची कड. (ज्ञा० १८।४३८).
**अगारी** (सं. अग्र स्त्री.) अंकुर.
**अगाशी** (सं. आकाश स्त्री.) गच्ची.
**अगास** (सं. आकाश न.) आकाश.
**अंगिक** (सं. न.) १ सामर्थ्य (भा० ४।९); २ स्वभाव (ज्ञा० १८।५२४); अ० भाव (सं. पु.) आकृति.
**अंगिकें** (सं. न.) सामर्थ्य (ज्ञा. १६। २९९–३००)
**अगियाळें** (सं. न.) १ अग्निकुंड (ज्ञा० १४।१६२); २ ललाटस्थ अग्निचक्र.
**अंगिसुनी** (प्रा. वि.) निश्चळ.
**अगी** (प्रा. ना.) आग, अग्नि.
**अंगीकार** (पु.) स्वीकार.–**णें** (क्रि.) पतकरणें.
**अंगीकृत** (सं. वि.) पतकरलेलें.
**अंगीं पडणें** संवय होणें; साह्य होणें; (प्रा.) पक्षपात करणें (अमृ० ६।६)
**अगीन** (सं. अग्नि पु.) विस्तव.
**अगीनगाडी** (स्त्री.) आगगाडी. [बोट.
**अंगुली** (सं. स्त्री.) हाताचें किंवा पायाचें
**अंगुलें** (प्रा. न.) अलंकार (तुका० १८५३)
**अंगुष्ठ** (सं. पु.) अंगुठा, अंगठा, आंगठा.
**अंगुलीयक** (सं. न.) आंगठी, मुदी.
**अंगुस्तान** (सं. अंगुलित्राण न.) हाताच्या बोटाच्या रक्षणासाठीं घातलेलें टोपण.
**अंगुस्ती** (स्त्री.) शिरशिरी.
**अंगुळवेढें** (सं. न.) आंगठी (दासबोध ३।६।१८)

**अंगें** (प्रा. अ.) स्वतः.
**अंगेज** (पु.) स्वीकार.
**अंगेजणें** (प्रा. क्रि.) अंगीकारणें.
**अंगेष्टी** (प्रा. स्त्री.) साष्टांग नमन (ज्ञाने० १७।२०३–४).
**अंगूर** (फा. पु.) द्राक्ष. [माप.
**अंगूळ** (सं. न.) लांबी मोजण्याचें एक
**अगे, अगो** (अ.) स्त्रीविषयक संबोधनार्थी अव्यय.
**अगोचर** (वि.) ज्ञानेंद्रियांनीं ग्रहण करण्यास अशक्य; अज्ञात.
**अगोचरी मुद्रा** (सं. स्त्री.) योग-शास्त्रांतली चौथी मुद्रा.
**अगोठ** (सं. अग्रवर्षा पु.) पावसाळ्याचा प्रारंभ.
**अगोदर** (अ.) पूर्वी, प्रथम.
**अगोदरचा** (वि.) पूर्वीचा, आधींचा.
**अंगोवांगीं** (प्रा. अ.) जातीनें, स्वत; सहज, अनायासें (भा० २०।३८३).
**अंगोन** (प्रा. वि.) अंगावरला.
**अंगोळी** (सं. अंगुलि स्त्री.) बोट.
**अग्नि** (सं. पु.) विस्तव.
**अग्निकाष्ठ भक्षणें** स्वतःस जाळून घेणें; सती जाणें. [दारूकाम.
**अग्निक्रीडा** (सं. स्त्री.) आतषबाजी;
**अग्निपरीक्षा** (सं. स्त्री.) अग्नीच्या द्वारें वस्तूच्या शुद्धाशुद्धतेची केलेली परीक्षा. (पूर्वीच्या काळीं स्त्रियांच्या पातिव्रत्यासंबंधानें किंवा पुरुषाच्या दोषित्वादोषित्वाच्या किंवा हक्कविषयक मागणीच्या संबंधानें संदेह उत्पन्न झाला असतां त्या स्त्रीला किंवा पुरुषाला अग्नीचें दिव्य म्हणजे हातावर जळते निखारे घेणें, कडकडीत तापलेल्या तेलांत हात बुडविणें, किंवा तापवून लाल केलेल्या धातूच्या सळईच्या डागण्या घेणें इ० करावें लागे व त्या दिव्यांतून विशेषसा अपाय न होतां ती स्त्री किंवा तो पुरुष सुखरूपपणें पार पडल्यास तिचें किंवा त्याचें निर्दोषित्व सिद्ध मानलें जाई. अशा दिव्यास अग्निपरीक्षा हें नांव होतें).
**अग्निप्रवेश** (सं. पु.) स्त्रीचें सती जाणें म्हणजे पतीच्या शवाबरोबर तिनें आपणास जाळून घेणें.
**अग्निहोत्र** (सं. न.) शास्त्रोक्त अग्नि ठेवून सांजसकाळ होम करण्याचें कर्म.
**अग्निहोत्री** (सं. पु.) अग्निहोत्र घेतलेला पुरुष.
**अग्निमांद्य** (सं. न.) अपचनाचा रोग.
**अग्यारी** (सं. अग्निगृह स्त्री.) पारशी लोकांचें अग्निपूजेचें मंदिर.
**अग्र** (सं. न.) शेवट, टोक, पुढचा भाग; मुख्य भाग.
**अग्रका, अग्रज्या** (सं. स्त्री.) ग्रहाच्या उदयास्तींचे क्षितिजबिंदु व पूर्वपश्चिम क्षितिजबिंदू यांच्या मधला कंस.
**अग्रगण्य** (सं. वि.) मुख्य, नायक, शिष्ट.
**अग्रगामी** (सं. पु.) पुढारी; (वि.) पुढें जाणारा.
**अग्रणी** (सं. पु.) नेता, नायक, मुख्य.
**अग्रज** (सं. पु.) वडील बंधु.
**अग्रधान्यें** (सं. न.) खरीपाच्या हंगामाचीं धान्यें. [मान.
**अग्रपूजा** (सं. स्त्री.) पहिली पूजा; श्रेष्ठ
**अग्रलेख** (सं. पु.) वर्तमानपत्रांतील मुख्य लेख.
**अग्रहार** (सं. पु.) पुजाऱ्याच्या कुटुंबपोषणार्थ देवस्थानास अर्पण केलेलें इनाम गांव, जमीन इत्यादि.
**अग्रा** (सं. स्त्री.) खस्थ ज्योति उगवतात किंवा मावळतात तेव्हां त्यांचें पूर्वबिंदूपासून जें अंतर असतें तें.
**अग्राह्य** (सं. वि.) स्वीकारण्यास अयोग्य किंवा अशक्य.
**अग्रेसर** (सं. पु.) नेता, नायक, मुख्य.
**अग्रोदक** (सं. न.) स्वयंपाकासाठीं सोंवळ्यानें आणलेलें पाणी.
**अघ** (सं. न.) पाप.
**अघटघटी** (वि.) अशक्य गोष्ट घडवून आणणारी.
**अघटित** (वि.) असंभाव्य, विलक्षण.
**अघमर्षण** (स. वि.) पापनाशक.
**अघवा** (प्रा. वि.) अवघा, सर्व.

नगर वाचनालय, सातारा.



**अघळपघळ** (वि.) लांबलचक; मोकळे-पणानें केलेलें.
**अघाडी** (सं. अग्र न.) पुढचा भाग; **अ० साधणें**–इतरांच्या अगोदर कार्य साधणें.
**अघाडीपिछाडी** (स्त्री.)दावें किंवा लगाम आणि पायबंद; पुढचा व मागचा भाग.
**अघोट** (पु.) पावसाळ्याची सुरुवात.
**अघोर** (सं. वि.) भयंकर; अमंगळ; **–पंथ** (सं. पु.) नग्न, अतिशय घाणेरडे व हातांत नरकपालांचें भिक्षापात्र घेऊन भिक्षा मागणारे अशा भिक्षेकऱ्यांचा एक संप्रदाय आहे, तो संप्रदाय.
**अघोरी** (सं. पु.)अघोर पंथांतील मनुष्य; (वि.) साहसकर्मी.
**अंघोळ** (स्त्री.) स्नान, अंग धुणें.
**अंघ्रि** (सं. पु.) पाय.
**अघ्रो** (सं. पु.)आग्रह (भाग०३०।१०९).
**अच्संधि** (सं. पु.)व्याकरणांतील स्वरसंधि.
**अचकटविचकट** (वि.) अश्लील.
**अचकन** (न.) बंद गळ्याचा लांब कोट.
**अचकाविचका** (पु.) अव्यवस्था, गोंधळ, विघाड.
**अचकी** (स्त्री.) उचकी.
**अचडेंबचडें** (न.) लाडकें मूल.
**अचपळ** (सं. वि.) उत्पाती, खोडकर.
**अचंबा** (फा. अचंभा पु.) आश्चर्य, नवल.
**अचरट** (वि.) व्रात्य; उच्छृंखल.
**अचल, अचळ** (सं. पु.) पर्वत; (वि.) न ढळणारें.
**अंचल** (सं. पु.) पदर; ओचा.
**अंचवणें, अंचविणें** (सं. आचम् क्रि.) कांहीं खाल्ल्यानंतर तोंड धुणें; मुकणें; नुकसान सोसावें लागणें.
**अचळागौर** (स्त्री.) मकरसंक्रांतीस जिला वाण देतात ती सुवासिनी माता.
**अचिंत्य** (सं. वि.) ज्याचा विचार किंवा तर्क करतां येत नाहीं असें; गूढ, दुर्ज्ञेय.
**अचिरेंकरून** (अ.) लवकर.
**अचळ** (पु.) स्तन. [स्वयं. ९।४.
**अचांगळी** (प्रा. वि.) निष्फळ; रुक्मिणी-
**अचाट** (वि.) विलक्षण; अद्‍भुत.
**अचानक** (हिं. अ.) अकस्मात्, अवचित.
**अचावचा** (सं. यद्वातद्वा अ.) अद्वातद्वा, अमर्यादपणें. [२।३।१४).
**अचुंगळ** (प्रा. वि.) कृपण, भ्रमिष्ट (दा०
**अचुंबित** (सं. वि.) १ संपूर्ण (ज्ञा०५।७); २ अगणित (भा०१३।२३३); ३ अति-निःसंग (भा० ३।२९३).
**अचूक** (अ.) बिनचूक; अकस्मात्.
**अचेत, अचेतन** (सं. वि.) जड, निश्चेष्ट.
**अचोज** (प्रा. न.) नवल (एक० १२५).
**अच्छेर** (पु.) अर्धा शेर.
**अच्युत** (सं. पु.) विष्णु.
**अज** (सं. पु.) ईश्वर; बोकड.
**अजका** (वि.) अजिंक्य.
**अजगर** (सं. पु.) मोठा सर्प.
**अजतरफ** (फा. अ.) कडून.
**अंजन** (सं. न.) काजळ; दृष्टि साफ कर-णारें औषध.
**अजपत्र** (अर. अजापत्र न.) अभिप्रायपत्र.
**अजब** (अर. वि.) आश्चर्यकारक.
**अजबखाना** (अर. पु.) पदार्थसंग्रहालय.
**अजबाई** (स्त्री.)नवल, आश्चर्य, चमत्कार.
**अजबाब** (अर. स्त्री.) चीजवस्त.
**अजम, अज्जम** (अर. वि.) थोर, सन्मान्य.
**अजमत** (अर. अजीमत स्त्री.) सामर्थ्य. औरंगजेब बादशहानें जेजुरीच्या खंडो-बाला दिलेलें नांव. [अजमास पाहणें.
**अजमावणें** (क्रि.) परीक्षून पाहणें;
**अजमास** (फा. अजमाईस पु.) अंदाज.
**अजमासी** (वि.) अंदाज करण्यांत हुशार, पटाईत; (वि.) अंदाजें, गणती केलेला.
**अजरखतखानें** (फा. अ.) यांच्या कचेरींतून, यांच्याकडून.
**अजरामर** (सं. वि.) ज्यास वार्धक्य व मरण नाहीं असें; अक्षय.
**अंजलि** (सं. पु.) ओंजळ; नमस्कारार्थ हात जोडणें.
**अंजलिपुट** (सं. न.) ओंजळ.
**अजस्त्र** (सं. वि.) फार मोठा.
**अजस्त्रलय** (स्त्री.) नृत्यांतील मोठी लयदारी
**अजा** (सं. स्त्री.) शेळी. [वेडसर.
**अजागळ** (सं. वि.) निरुपयोगी, खुळा,

**अजाण** (सं. अज्ञान वि.) अज्ञानी.
**अजातशत्रु** (सं. वि.) ज्याला कोणी शत्रु नाहीं किंवा जो दुसऱ्याचें शत्रुत्व करीत नाहीं असा.
**अजानवृक्ष** (पु.) आळंदीस ज्ञानेश्वरांनीं लावलेल्या फांदीपासून वाढलेला वृक्ष.
**अजापुत्र** (सं. पु.) कोंकरूं; (लक्षणेनें) गरीब प्राणी.
**अजार** उपद्रव, पीडा, दुखणें.
**अजारणें** (क्रि.) कुरवाळणें.
**अंजारणें गोंजारणें** (क्रि.) कुरवाळणें; लाडीगोडीनें बोलणें.
**अजारी** (हिं. वि.) दुखणाईत.
**अजाहृत** (अर. वि.) अबाधित. (पु.) मानाची एक पदवी.
**अजि** (उद्गा.)अहो ! (क्रि. वि.) आज.
**अजिक्य** (वि.) न जिंकला गेलेला, पराभूत न होण्यासारखा.
**अजिजी** (स्त्री.) गयावया.
**अजित** (सं. वि.) न जिंकलेला.
**अजितपत्र** (सं. न.) वादांत किंवा युद्धांत हरलेल्या पक्षाकडून दुसऱ्या पक्षाची सरशी झाल्याबद्दलचें कबुलीपत्र.
**अजिटन, अजिटंट** (इं. ॲडज्युटंट पु.) सेनापतीचा एक हस्तक.
**अजिन** (सं. न.) मृगचर्म, हरिणाचें कातडें.
**अंजिरी** (वि.) अंजिराच्या रंगाचा.
**अजीं, अजीबात** (अ.) अगदीं, मुळींच.
**अजीज** (अर. पु.) आप्त.
**अंजीर** (फा. पु.) एक फळ.
**अजीर्ण** (सं. न.) अपचन.
**अजुनि** (सं. अद्य अ.) अद्याप, अजून.
**अजुरा** (अर. उजरत पु.) मजुरी, मेहनताना, भाडें.
**अजुर्दा** (फा. वि.) खट्टू, उदासीन;
**अजुर्दार** (फा. पु. ना.) मजूर; भाडेकरी; जासूद.
**अंजुळ** (सं. अंजलि स्त्री.) ओंजळ.
**अजून** (सं. अद्य अ.) अद्याप.
**अजूरा** (अर. पु.) मजुरी, वेतन.
**अजोळ** (सं. आर्यालय न.) आईच्या बापाचें घर.
**अट** (स्त्री.) अटक; वीणेचा सूर उंच होण्यासाठीं असलेली घोडी; करार, शर्त; विपरीत ग्रह; मोट थांबल्यानंतर वाहणारें पाणी.
**अटक** (स्त्री.) प्रतिबंध; कैद; अ०स झेंडे लावणें–शतक्रत्य करणें; मोठा दिग्विजय करणें.
**अटकणें** (क्रि.) गुंतून किंवा अडकून पडणें.
**अटकर** (प्रा. वि.) १ घट्ट, गच्च. (अनंत. पृ. ८०); लहान; ठसठशीत (अनंत. लावण्या); २ हट्टी.
**अटंका** (प्रा. पु.) व्याप, शक्तिक्षेत्र.
**अटकळ, अटकळपंचविशी** (स्त्री.) तर्क, अजमास, अनुमान.
**अटकाव** (पु.) प्रतिबंध.
**अटकावण** (स्त्री.) अडथळा.
**अटकी** (स्त्री.) सागरगोट्यांतील डाव.
**अटकु** (प्रा. वि.) बाधक (ज्ञा.६।११५).
**अटकें** (न.) विड्याच्या पानांचें अंखें.
**अटंग** (प्रा. वि.) अवाढव्य. [मजुरी.
**अटणावळ** (स्त्री.) अटविण्याबद्दलची
**अटणी** (स्त्री.) सोनाराची सोनें वगैरे आटविण्याची मूस; निर्बंध.
**अटणें**(क्रि.)कमी होणें; रस होणें; घट्ट होणें; वळकट होणें; अडून बसणें; वितळणें.
**अटन** (सं. न.) फिरणें, भ्रमण.
**अटप** (पु.) आवरशक्ति, आवरण्याची क्रिया **–शीर–सर** (वि.) सोयिस्कर, आवाक्यांत असलेलें.
**अटपता** (वि.) आंखडता.
**अटपळ** (न.) कांवळ्याचा एक पट्टा.
**अटपाअटप** (स्त्री.) निरवानिरव; आवराआवर.
**अटवळा** (पु. न.) शेताची राखण करण्यासाठीं किंवा धान्य पाखडण्यासाठीं बांधलेला माळा.
**अटवी** (सं. स्त्री.) अरण्य, रान.
**अटाआट** (पु.) पराकाष्ठेचा यत्न; अट्टाहास; त्रास, संताप; छळ, गांजणूक; यातायात, दगदग.

**अटाटी** (प्रा. पु.) सायास; छळणूक.
**अटापिटा** (पु.) यातायात, खटाटोप, श्रम.
**अटापीट** (स्त्री.) परिश्रम, कष्ट.
**अटारा** (पु.) थकवा, ग्लानि.
**अटरणें** (क्रि.) थकणें; थकविणें.
**अटाली** (सं. अट्टालिका स्त्री.) मोठा वाडा; गच्ची; मनोरा.
**अटळ** (वि.) न टळणारा.
**अटाळा** (पु.) **अटाळी** (स्त्री.) अटवळा पहा.
**अटाहास्य** (सं.न.) अट्टाहास (नाम०५६९)
**अटी** (प्रा. स्त्री.) कष्ट (एक० २१४३)
**अटी(ट्टी)ल** (वि.) हट्टी.
**अटीव** (वि.) अटविलेलें; घट्ट.
**अटु** (प्रा. न.) दुर्भाषण; (वि.) कठिण. (भा. ६।११५) [६।७७]
**अटुवें** (प्रा. वि.) संकुचित, वांकडें (ज्ञा०
**अटूळणें** (प्रा. क्रि.) बांधणें.
**अटोकाट** (वि. ) अतोनात, पराकाष्ठेचा; सर्व शक्ति किंवा बुद्धि खर्चून केलेला.
**अटोफळी** (स्त्री.) आठ फळांचें वायन.
**अटोळा** अटवळा पहा.
**अटोळी** (स्त्री.) फणसासारख्या फळांतील बी.
**अट्टल** (वि.) पक्का, वस्ताद.
**अट्टहास** (सं. पु.) भारी मोठा प्रयत्न; मोठ्यानें हंसणें.
**अट्यापाट्या** (स्त्री.) मुलांचा एक खेळ.
**अठव** (प्रा. पु.) आठवण, स्मरण.
**अठंगूळ, अठंगुळा** (वि.) गर्भधारणापासून आठव्या महिन्यांत जन्मलेला.
**अठरणें** (क्रि.) आकुसणें, संकोचणें; रुसून किंवा रागावून बसणें.
**अठरा कारखाने** पूर्वीच्या काळीं राज्याचीं अठरा खातीं असत. त्यांचीं नांवें निरनिराळ्या काळांत व निरनिराळ्या राज्यांत निरनिराळीं असत. पैकीं एक यादी अशी आढळते :—

तोफखाना, पीलखाना, उष्टर०, फरास०, शिकार०, रथ०, जामदार०, जवाहीर०, जिराईत०, नगार०, दारू०, वैद्य०, लकड०, इमारती०, मुदबख०, कुणबिणी०, खाजगत०, थट्टी०.

**अठरापगड जात** अनेक जातींचे लोक.
**अठरा पुराणें** ब्रह्म, पद्म, विष्णु, शिव, लिंग, गरुड, नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मत्स्य, कूर्म आणि ब्रह्मांड.
**अठरा धान्यांचें कडबोळें** (न.) अनेक भिन्न वस्तूंचें मिश्रण; अठरा धान्यांचीं नांवें :—गहूं, साळ, तूर, जव, जोंधळा, बाटाणा, लाख, चणा, जवस, मसूर, मूग, राळा, तीळ, हरिक, कुळीथ, सावा, उडीद व चवळी.
**अठरा विसवे दारिद्र्य** अतिशय गरिबी.
**अठवडा** (पु.) लागोपाठ सात दिवसांचा अवधि.
**अठवें** (न.) अर्ध्या शेराचें माप. (पायलीचा आठवा भाग.)
**अठी** (स्त्री.) वळी, सुरकुती; गांठ, अढी; नाडा; फळांतील बी.
**अंठी** (प्रा. स्त्री.) १ ऐक्य; २ आलिंगन, (ज्ञा० ५, १३२)
**अठीवेठी** (प्रा. स्त्री.)वेरझार. [३०८१]
**अठोनीवेठोनी** वेडावांकडा, (तुका०
**अठोळी–अठळी** (स्त्री.) फणसांतील बी.
**अड** (स्त्री.) अट, शर्त; अडथळा; हट्ट.
**अडमाप** (न.) अनिश्चित माप; खऱ्या मापापेक्षां कमी अधिक माप.
**अंड** (प्रा. वि.) मोठा (वा. सीता. ५०)
**अंड** (सं. पु.) वृषण; अंडें; **अं० स लोणी लावणें**–खुशामत करणें.
**अडक** (प्रा. न.) आडनांव, कुलनाम.
**अडकट** (प्रा. स्त्री.) आडमार्ग, रान.
**अडकणें** (क्रि.) कुंठित होणें; थांबून राहणें.
**अडकण** (न.) **अडकणी** (स्त्री.) आडकाठी; अडकण्यासाठीं योजिलेली वस्तु; (अडसर, खिळा वगैरे.)
**अडकथा** (स्त्री.) उपकथा.
**अडकवण** (स्त्री.) अडकण पहा.
**अडका** (पु.) अर्धी पै.
**अडकाम** (न.) मुख्य कामाला उपयोगीं पडणारें हलकें काम.

**अडकिता, अडकित्ता** (का. पु.) सरोता, सुपारी वगैरे कातरण्याचें साधन.
**अडकुल** (न.) पोहे; भातकूल.
**अडखर्च** (पु.) किरकोळ खर्च.
**अडखळणें** (क्रि.) ठेचा लागत किंवा अडथळे येत जाणें, चालणें वगैरे; बोलतांना अडणें, कचरणें.
**अडगल्ली** (स्त्री.) बोळ, लहानशी गल्ली.
**अडगळ** (स्त्री.) निरुपयोगी, अडचण करणाऱ्या वस्तु.
**अडकाव** (पु.) अटकाव, प्रतिबंध.
**अडगांव** (न.) लहान गांव.
**अडगुलें-मडगुलें** (वि.) खेळकर, बोलकें.
**अडघर** (न.) बाजूस असलेलें घर; सोपा.
**अडघाली** (प्रा. स्त्री.) आडमार्ग.
**अडघोडा** (पु.) तट्टू, लहान घोडा.
**अडगिऱ्हाइकी** (वि.) दुकानदाराकडून नव्हे तर खासगी गृहस्थाकडून विकत घेतलेली. [घोटाळा; न्यूनता; संकोच.
**अडचण** अडचणूक (स्त्री.) पंचाईत;
**अडची** (प्रा. स्त्री.) दुर्गम मार्ग.
**अडजिना** (पु.) रहदारीचा नसलेला जिना; जरुरीच्या वेळीं वापरण्याचा जिना.
**अडण** (न.) सुपाच्या कांठाला मजबुतीसाठीं लाविलेली कांबीट; गाई-म्हशींची ओटी.
**अडंडळ** (प्रा. वि ) अढळ.
**अडणी** (स्त्री.) लहानशी तिवई; संकट (तुका० १८८१); अ० **वरचा शंख**-उच्च पदावर बसलेला मूर्ख मनुष्य.
**अडणूक** (स्त्री.) अडचण; अडथळा; हरकत; आग्रह, अट. [धरून बसणें.
**अडणें** (क्रि.) कुंठणें, कुंठित होणें; हट्ट
**अडत** (स्त्री.) दलाली, मध्यस्थी, एजन्सी; सदर कामाबद्दल द्यावयाचें द्रव्य, दस्तुरी.
**अडतट्टू** (मु.) अडून बसणारा किंवा काम बंद पाडणारा माणूस, घोडा, वगैरे.
**अडत्या** (पु.) दलाल, गुमास्ता, एजंट.
**अडताळा** (प्रा. पु.) अडथळा (दा० १।२।६).
**अडथळा** (पु.) प्रतिबंध, अटकाव.
**अडदर, अडदरा** (प्रा. पु.) भय (ज्ञा० १६।३१६)

**अडदांड** (वि.) अडाणी व दांडगा.
**अडधोतर** (न.) पंचा, लहान धोतर.
**अडनांव** (न.) कुलनाम.
**अडनांवाचा** (वि.) नामधारी.
**अडनीड** (वि.) गैरसोयीचा.
**अडप-अडप** (अ.) चोपनमारून.
**अडपणें** (प्रा. क्रि.) अडविणें.
**अडपता दडपता** (वि.) वर देखरेख करणारा; नियंता.
**अडपैजणें** (प्रा. क्रि.) अडचणींत पडणें; (ज्ञा० २।२९४).
**अडफळें** (प्रा. न.) रुंदी.
**अडफाटा** (पु.) अडथळा, विघ्न.
**अडबंक, अडबंग** (प्रा. वि.) स्वेच्छाचारी, दुराग्रही.
**अडबंकी** (प्रा. स्त्री.) दाराची खीळ.
**अडबंद** (प्रा. पु.) करदोडा, कटिसूत्र.
**अडमडणें** (क्रि.) धडपडणें.
**अडमाप** (न.) ठराविक मापाच्या बरोबर नसणारें माप
**अडमिळकत** (स्त्री.) ठराविक मिळकतीहून दुसरी मिळकत.
**अडमुठा, अडमुठ्या** (वि.) अडाणी.
**अडमुठी** (प्रा. वि.) अक्लेश, सुलभ.
**अडमुळीं** (अ.) अकस्मात्.
**अडल** (प्रा. स्त्री.) अडचण, प्रतिबंध.
**अडला नारायण** (पु.) अडचणींत सांपडलेला मनुष्य.
**अडव** (प्रा. वि.) असार (ज्ञा० १८।३६); (न. ) १ अरण्य; (ज्ञा० १३।७६४); २ अडचण; ३ परीक्षा, कसोटी, (सोहिमहदनु.)
**अडवट** (न.) लांकडाचा न घडविलेला लांब सोटा; ओबडधोबड तासलेली आडवी तुळई; नथेच्या चौकड्याशेजारीं आडवें बसविलेलें लांबोडें मोतीं.
**अडवटी** (प्रा. स्त्री.) आडमार्ग, कुमार्ग.
**अडवतावो** (प्रा. पु.) अडथळा.
**अडवट–ठ** (न.) अडवी तुळई (पु.) नथीच्या मधल्या भागांतलीं दोन मोत्यें.
**अडवणूक** (स्त्री.) प्रतिबंध.
**अडवळणी** (अ.) एकीकडे.

नगर वाचनालय सातारा

**अडवा** (वि.) तिरपा; सामोरा; प्रतिबंध करणारा.

**अडवा; अडवी पालखी** (स्त्री.) रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पालखीच्या दांड्यांचीं टोकें करून पालखी आडवी नेण्याचा मान. हा मान शृंगेरीच्या श्रीशंकराचार्यांना आहे.

**अडवा-तिडवा** (वि.) वांकडातिकडा.

**अडवारा** (पु.) धरबंध.

**अडवाळ, अडिवाळ** (वि.) हट्टी.

**अडविणें** (क्रि.) थांबविणें; प्रतिबंध करणें.

**अडवी** (प्रा. स्त्री.) अटक; अरण्य.

**अडवें पाणी** (न.) कालवा, तळेंङ्.चें पाणी.

**अडवें होणें** अंमळ निजणें, वामकुक्षी करणें.

**अडव्या अंगाचा** लठ्ठ.

**अडशेरी** (स्त्री.) धान्याचें एक माप.

**अडस** (प्रा. पु.) खोळंबा; (वि.) गच्च.

**अडसट्टा** (हिं. पु.) अंदाज; बेत, आटोका.

**अडसण** (न.) खटचाळ गाई-म्हशीला दूध काढण्याचे वेळीं अडवून धरण्यासाठीं केलेली योजना; सुपानें वेगळे काढलेले स्वच्छ दाणे.

**अडसणें** (प्रा. क्रि.) अडचण करणें; पाखडणें; छाटणें.

**अडसर** (पु.) दरवाजा बंद करून त्याला जें आडवें लांकडी टेकण लावितात तें.

**अडसाळ** (न.) कुळवाचें आडवें लांकूड.

**अडसून खडसून** (क्रि. वि.) स्पष्टपणें बजावून.

**अडसो** (प्रा. पु.) खोळंबा.

**अडळ** (प्रा. पु.) साह्य; मदत, पृथक्पणा (सोहि० सिद्धान्त); खोळंबा, अडचण; स्पर्श; सुमुहूर्त; परिमळ.

**अडळणें** (प्रा. क्रि.) अडखळणें.

**अडाअड** (प्रा. स्त्री.) अडचण (ना० १०२२).

**अडाखा** (पु.) मेळ, ताळा.

**अडाघडी** (प्रा. स्त्री.) जगाची रचना, (हरि० १९।७७).

**अडाण** (न.) शेतकामांत न गुंतलेला असा गांवचा जनसमूह; कास; तलाव, कालवे, विहिरी इ. पाटबंधारे.

**अडाणा** (पु.) एक [illegible]

**अडाणी** (वि. ) अकुशल; सनटी.

**अडातुडी** (अ.) मधून मधून, केव्हांतरी.

**अडिंबा** (पु.) अडसर.

**अडिसेरी** (स्त्री.) नोकरांना निर्वाहार्थ दरमहा देण्याचें अडीच शेर धान्य.

**अडावा** (पु.) अढावा पहा.

**अडी** (प्रा. स्त्री.) प्रतिबंध.

**अडीच** (वि.) दोन आणि अर्धे मिळून जें परिमाण तें.

**अडीमोडी** (प्रा. स्त्री.) अंगपिळा.

**अंडील** (वि.) खच्ची न केलेला.

**अंडुकली** (स्त्री.) **अंडुकलें** (न.) अंडकुळी.

**अडुमाडू** (वि.) धाडसी, मारायला व मरायला सिद्ध.

**अडुळसा** (पु.) एक औषधि वनस्पति.

**अडू** (पु.) अडणा; पाथरवटाचें एक हत्यार; तरफ. (वि.) हट्टी.

**अडून-आडून** (क्रि. वि.) कशाच्या तरी आड किंवा मागें राहून; न दिसेल अशा रीतीनें.

**अंडें** (सं. अंड न.) पिलाचें उत्पत्तिस्थान. **अंडीं पिलीं बाहेर काढणें**-गुप्त गोष्टी उघडकीस आणणें.

**अडेल** (वि.) हट्टी, अडून बसणारा.

**अडेल तट्टू** (वि.) हट्टी मनुष्य.

**अडोशीं-पडोशीं** (अ.) आसपास, शेजारीं पाजारीं (हिं. पु.) शेजारी पाजारी.

**अडोसा** (पु.) दृष्टीस प्रतिबंध करण्यासाठीं केलेली पडद्यासारखी योजना.

**अडोळणें** (प्रा. क्रि.) आढळणें.

**अड्डा** (सं. अड्ड. पु.) जमण्याचें ठिकाण.

**अढंच** (प्रा. वि.) मोठा. (ज्ञा. १७।३४१).

**अढळ** (वि.) अचल, स्थिर, (न.) सांपडणें, उपलब्धि; अनुभव.

**अढळणें** (क्रि.) सांपडणें; भेटणें.

**अढा** (पु.) वेटोळें, मुरड; पेंच.

**अढावा** (पु.) हिशोबाचा झाडा; तेरीज, शिल्लकपत्रक.

**अढी** (स्त्री.) आंबे वगैरे फळें पिकण्यासाठीं गवत वगैरे अंथरून केलेली योजना; विरुद्ध भाव; गुंताडा, गुंतागुंत. मनांत

सातारा

अ० धरणें—मनांत गुप्तपणें वैरबुद्धि बाळगणें. [ ठिकाणीं दीड खर्चून.

**अढीच्या दिढी** उधळेपणानें; एकाच्या

**अढें** (न.) घराच्या दोन्ही पाख्यांच्या मधोमध घातलेली लांब तुळई.

**अढेवेढे घेणें** कांकू करणें.

**अणकुची** (स्त्री.) अणी, टोंक.

**अणगट** (स्त्री.) अणी, टोंक.

**अणगट** (प्रा. न.) अंकुर; मूळ.

**अणवूज** (फा. वि.) परका, अपरिचित; आश्चर्यकारक. [ वाक्य; कोडें.

**अणा** (पु.) म्हण, आलाणा; सांप्रदायिक

**अण्णा** (कानडी) मानाची पदवी; वडील भाऊ; एखाद्याचें नांव.

**अणवाणी** (क्रि. वि.) उघड्या पायांनीं.

**अणिमा** (सं. पु.) सूक्ष्मपणा; स्वतःच्या शरीराला इच्छेनुसार सूक्ष्मरूप देण्याची शक्ति. ही अष्टसिद्धींतली एक गणिली आहे.

**अणिमोल** (वि.) फार मूल्यवान्.

**अणियाळें** (प्रा. वि.) अणीदार, (न.) अग्र.

**अणी** (प्रा. स्त्री.) शस्त्राचें बारीक टोंक.

**अणीक** (सं. अनेक वि.) आणखी.

**अणीबाणी** (स्त्री.) कार्यसिद्धी होण्याची जवळ आलेली स्थिति; क्षुब्धता; निकर.

**अणु** (सं. पु.) सूक्ष्म कण. [ चुरा.

**अणुआर, अणुआरु** (प्रा. पु.) बारीक

**अणुध्वम्** (पु.) एक भयानक अस्त्र (बाँब).

**अणुरेणु** (पु.) सूर्यकिरणांत दिसणारे धुळीचे वगैरे सूक्ष्म कण.

**अणुसुट** (प्रा. वि.) अनुच्छिष्ट.

**अतल** (सं. वि.) अगाध; (न.) विवर; नरक; सप्तपातालांपैकीं पहिलें. सप्त पातालांचीं नांवें:—अतल, वितल, सुतल, तलातल, महातल, रसातल व पाताल.

**अंत** (सं. पु.) शेवट, समाप्ति; मर्यादा, कड; दम, ताकद; **अंत पहाणें**—पूर्णपणें कसास लावणें.

**अतःपर** (क्रि. वि.) यापुढें.

**अतएव** (अ.) यासाठीं.

**अंतक** (सं. पु.) यम; काळ.

**अतर्क्य** (वि.) कल्पनातीत.

**अंतःकरण** (न.) मन. अंतर्याम.

**अंतडी** (सं. अंत्र न.) **अंतडें** (न.) आंतडें; **अं०ला पीळ पडणें**—करी कळकळ वाटणें.

**अतत्यायी** (सं. आततायी वि.) साहसकर्म अथवा त्रागा करणारा.

**अंतपार** (पु.) अखेरची मर्यादा.

**अंतःपुर** (सं. न.) स्त्रियांची जागा, जनानखाना, राणीवसा.

**अंतमाळ** (सं. अंत्रमाला स्त्री.) आंतडीं.

**अंतर्मुख** (वि.) दृष्टि स्वतःभोंवतीं केंद्रित करून पाहणारा.

**अंतर** (न.) पोकळी, मध्यभाग, अवकाश; सीमा; भेद, तफावत; चुकी; खंड; अंतर्याम, अंतःकरण, अभिप्राय; **अं० देणें**—सोडणें.

**अंतरंग** (सं. न.) अंतःकरण; आंतील भाग; गुह्य; (वि.) जवळचा; अत्यंत प्रिय, जिवलग.

**अंतरणें** (क्रि.) कालातिक्रम होणें; मुकणें.

**अंतरपाट** (सं. अंतःपट पु.) लग्नाच्या वेळीं वधू आणि वर यांच्यामध्यें आडवा धरलेला पडदा.

**अंतरसाक्षी** (पु.) अंतर्याम जाणणारा.

**अंतरा** (पु.) मर्म; (अ.) दूर.

**अंतरा** (फा. पु.) तरवारीच्या मुठीवरील बोटांचा आसरा.

**अंतरात्मा** (सं. पु.) जीवात्मा; मन.

**अंतराय** (सं. पु.) विघ्न, संकट, अडथळा.

**अंतराल** (सं. न.) आकाश.

**अंतरीक** (वि.) उपेक्षिलेला; पूर्वनिश्चित.

**अंतरीक्ष-रिक्ष** (न.) आकाश; नभोमंडळ.

**अंतर्कळा** (सं. स्त्री.) चाणाक्षपणा, हुषारी.

**अतर्क्य** (वि.) अचिंत्य, गूढ.

**अंतर्गडु** (वि.) अंतर्भेद्या, निष्णात.

**अंतर्गत** (सं. वि.) समाविष्ट; पोटांत आलेलें; गुप्त. [ नांव.

**अंतर्गळ** (पु.) अंत्रवृद्धि, एका रोगाचें

**अंतर्गृह** (सं. न.) घराचा आंतला भाग.

**अंतर्झूली** (स्त्री.) हत्तीची चित्रविचित्र रंगाची झूल.

**अंतर्दशा** (सं. स्त्री.) ग्रहाचा फल देण्याचा काळ; अंतस्थ किंवा खरी स्थिति.
**अंतर्धान** (सं. न.) अदृश्य होणें, गुप्तता.
**अंतर्भाव** (सं. पु.) समावेश; मनोभाव.
**अंतर्भूत** (सं. वि.) समाविष्ट.
**अंतर्मुख** (सं. वि.) आंत वळलेला; आत्मचिंतनपर.
**अंतर्याग** (सं. न.) अंतःकरण, अंतरंग.
**अंतर्लापिका** (सं. स्त्री.) जेथें श्लोकाचें मर्म त्या श्लोकांतच गुप्त असतें तो श्लोक.
**अंतर्वत्नी** (सं. स्त्री.) गर्भिणी.
**अंतर्वेदी** (सं. स्त्री.) गंगा व यमुना यांच्या मधला प्रदेश.
**अंतर्हित** (सं. वि.) अदृश्य; लपविलेला.
**अंतर्ज्ञान** (सं. न.) गुप्त ज्ञान.
**अतसबाजी** (फा. आतशबाजी स्त्री.) दारूकाम.
**अंतःस्थ** (सं. वि.) आंतील.
**अंतःक्षेपण** (सं. न.) इंजेक्शन.
**अतळस** (प्रा. पु.) परिमळ (दास० १८।१८).
**अतार–री** (पु.) सुगंधि, अत्तरें विकणारा; गंधी.
**अतांशी** (अ.) अलीकडे, सध्यां.
**अति** (सं. अ.) फार.
**अतिक्रम** (सं. पु.) **अतिक्रम** (सं. न.) उल्लंघन; अपमान; (वेळ) निघून जाणें.
**अतिक्रांत** (सं. वि.) टळलेली किंवा उलटलेली (वेळ वगैरे); जिंकलेला, व्यापलेला; मोडलेला.
**अतिथि** (पु.) पांथस्थ; भोजनसमयीं आलेला आगंतुक; पाहुणा; अ० **वेळा** (स्त्री.) अतिथि येण्याची (दुपारची जेवणाची) वेळ.
**अतिपरिचय** (सं. पु.) फाजील सलगी किंवा संघट्टन किंवा ओळख.
**अतिपात** (सं. पु.) नाश.
**अतिप्रसंग** (सं. पु.) मर्यादेचें उल्लंघन; निकटसंबंध.
**अतिमात्र** (सं. वि. अ.) फार.
**अंतिम** (सं. वि.) अखेरचा.
**अतिमानुष** (सं. वि.) मनुष्याहून अधिक शक्तीचा.
**अतिरथी** (सं. पु.) मोठा योद्धा.
**अतिरस** (सं. पु.) अत्युष्णत्व; कडकऊन (ज्ञा. ९।१०१).
**अतिरिक्त** (वि.) अतिशयित.
**अतिरेक** (सं. पु.) अतिशयपणा; विपुलता.
**अतिविष** (सं. न.) एक औषधि वनस्पति.
**अतिवृष्टि** (सं. स्त्री.) फाजील पर्जन्य किंवा पाऊस.
**अतिव्याप्ति** (सं. स्त्री.) फाजील गोष्टीचा समावेश; वाजवीपेक्षां फार, अधिक व्याप्ति. नियमाखालीं न येणाऱ्या गोष्टींचाही समावेश.
**अतिशय** (प्रा., पु.) अत्यासक्ति (तुका० ६३) (वि.) फार.
**अतिशयोक्ति** (सं. स्त्री.) फुगवून सांगणें.
**अतिशहाणा** (पु.) फाजील शहाणा, दीडशहाणा, मूर्ख.
**अतिशूद्र** (सं. पु.) शूद्रापेक्षां हीन (महार, मांग इ०).
**अतिशो, अतिसो** (वि.) अतिशय, (पु.) पराकाष्ठा, आधिक्य; भेद (ज्ञा०७।२७)
**अतिसार** (सं. पु.) हगवण.
**अतिसो** (प्रा. पु.) अतिशयपणा.
**अंतीं** (अ.) अखेरीस, शेवटीं; नंतर, मग, मुळें, स्तव.
**अतीत** (सं. वि.) गत, मागें घडलेलें; (पु.) अतिथि.
**अतींद्रिय** (सं. वि.) इंद्रियांस अगोचर.
**अतीव** (वि.) अतिशय.
**अतुट** (प्रा. अ.) सतत.
**अतुडणें** (प्रा. क्रि.) सांपडणें; (अमृ० ६।३२).
**अतुर्बळ–ळी** (प्रा. वि.) अतिबलाढ्य (भा० १।२२९).
**अंतरा** (पु.) पदाची ध्रुपद सोडून पुढील बाजू.
**अंतुरी, अंतोरी** (प्रा. स्त्री.) स्त्री; (दास. २।१।८).
**अतुल** (सं. वि.) ज्याच्या जोडीला किंवा तोडीला दुसरें नाहीं असें.
**अंतुवट** (प्रा. न.) गुह्य; अंतरंग (ज्ञा० ८।२१३) (वि.) अंतरंगांतील.

**अतेव** (सं. अत एव वि.) मूर्तिमंत (भा० १८।१८४) (अ.) यासाठीं.
**अतूट** (वि.) अक्षय.
**अंतेवासी** (सं. पु.) शिष्य.
**अतोनात** (वि.) पुष्कळ.
**अंतौर** (प्रा. न.) अंतःपुर (भा०४।२२७).
**अतौतें** (प्रा. अ.) मध्यें, आंत.
**अत्तर** (फा. अतर न.) पुष्पांचा अर्क; **अ०चे दिवे लावणें**–मूर्खपणानें उधळपट्टी करणें. [अत्तरपात्र.
**अत्तरदाणी** (अर.) अत्तरदान. (स्त्री.)
**अत्यवस्थ** (सं. वि.) मरायला टेंकलेला.
**अंत्यज** (सं. वि.) शेवटचा.
**अंत्यज** (सं. पु.) अतिशूद्र, चांडाल.
**अंत्यनाडी** (सं. स्त्री.) ज्योतिष शास्त्रांत नाडी म्हणजे घटिका अथवा चोवीस मिनिटांचा काळ; नऊ नऊ नक्षत्रांचा एकेक असे सत्तावीस नक्षत्रांचे तीन विभाग (आदिनाडी, मध्यनाडी व अंत्यनाडी) कल्पिले आहेत. त्यांतला शेवटला विभाग.
**अत्यंत** (अ.) फार; अतिशय.
**अत्याग्रह** (सं. पु.) फाजील आग्रह; अभिनिवेश.
**अत्याचार** (पु.) अधर्माचरण, जुलूम.
**अत्युक्ति** (सं. स्त्री.) अतिशयोक्ति.
**अंत्येष्टि** (स्त्री.) प्रेतसंस्कार.
**अत्र** (सं. अत्र अ.) येथें.
**अंत्र** (सं. न.) आंतडें.
**अंत्रा** (पु.) धृपदाच्या चार भागांपैकीं दुसरा भाग.
**अथ** (अ.) (ग्रंथारंभ) आतां, येथून, तर.
**अथणें** (प्रा. क्रि.) असणें. [शेवटापर्यंत.
**अथपासून इतिपर्यंत** आरंभापासून
**अंथरणें** (क्रि.) चटई वगैरे पसरणें.
**अंथरी** (सं. आस्तरण स्त्री.) चटई.
**अंथरुण** (सं. आस्तरण न.) बिछाना.
**अर्थसंकल्प** (सं. पु.) अंदाजपत्रक.
**अथर्वण** (सं. पु.) चार वेदांपैकीं चौथा.
**अथवा** (सं. अ.) किंवा, अगर.
**अथाक, अथांग** (वि.) तळाचा ठाव लागत नसलेलें, अतिशय खोल.
**अथाव** (प्रा. वि.) अथांग.
**अथिला** (प्रा. वि.) आश्रय केलेला; भाग्यवान्; थोर; समर्थ (ज्ञा. ११।६६३)
**अथी** (प्रा. क्रि. ) आहे.
**अदखणा** (वि.) कुरूप.
**अदट** (प्रा. वि.) धीट, पराक्रमी, अजिंक्य; (भावार्थ. युद्ध. १।१६)
**अंदण** (न.) कन्येच्या विवाहाच्या वेळीं तिला किंवा जावयाला दिलेली देणगी; करणी.
**अंदणा, अंदणी** (प्रा. वि.) दिलेली.
**अदत्त** (सं. वि.) कृपण.
**अदपाद** (पु.)पावशेराचा अर्धा भाग
**अदब** (अर. स्त्री.) आदर, सन्मान.
**अदबखाना** (पु.) तुरुंग.
**अदबशीर** (वि.) सुरक्षित; मर्यादेनें वागणारा.
**अदंभित्व** (न.) साधेपणा. [मण वजनाचें.
**अदमण** (पु.) अर्धा मण (वि.) अर्धा-
**अदमास** (पु.) अंदाज, सुमार.
**अदमुरें-अदमोरें** (न.) अर्धवट विरजलेलें दहीं.
**अदय** (सं. वि.) निर्दय, निष्करुण.
**अदर्शन** (सं. न.) लोप.
**अदल, अदळ** (प्रा. वि.)असार; अयोग्य.
**अदलाबदल** (हिं. स्त्री.) याचें त्याला व त्याचें याला असा फेरफार.
**अदलें** (वि.) अगोदरचें.
**अदळ** (पु. स्त्री.) रहदारी, दबडगा, वापर; त्रास, उपद्रव; **अ०आपट–उफळ** (स्त्री.) बेफामपणें हातपाय झाडणें किंवा आपटणें.
**अदळणें** (क्रि.) आपटणें; कोसळणें; धडकणें; अधाशीपणानें पोटांत कोंबणें.
**अदा** (अर. पु.) उत्पन्न, प्राप्ति; लाभ, नफा, (क्रि. वि.) येणें पोंचणें.(पु.) फाजील खर्च. [अदमास.
**अंदाज** (फा. अंदाजा. पु.) सुमार,
**अंदाधुंदी** (हिं. स्त्री.) अव्यवस्थितपणा वेलगामीपणा, बेशिस्तपणा.
**अदालत** (अर. स्त्री.) न्यायसभा, कोर्ट.
**अदायत** (अर. स्त्री.) द्वेष; अकस.

**अदिती** (स्त्री.) देवांची माता.
**अंदु, अंदू** (सं. पु.) पायहंसळा; (भा० १४।४९४) हत्तीच्या पायांतील सांखळी (कृष्णच. ८.); सांखळ, निर्बंध.
**अंदुज** (सं. पु.) हडचाव्रण; (दास० ३।६।२१).
**अदूरदृष्टि** (सं. स्त्री.) ज्याला दूरचें दिसत नाहीं असा.
**अदृश्य** (सं. वि.) न दिसेसा.
**अदृष्ट** (वि.) न पाहिलेलें; (न.) दैव, प्रारब्ध; **अ०पूर्व** (सं. वि.) पूर्वी कधीं न पाहिलेलें. **अ०वाद** (सं. पु.) दैवांत जें असेल तेंच घडेल असें मत.
**अदेख** (प्रा.वि.) मत्सरी; (तुका० ३११७)
**अदेखाई** (प्रा. स्त्री.) मत्सर, हेवा.
**अंदेशा** (फा. पु.) शंका.
**अंदोळणें** (सं. क्रि.) हलणें.
**अद्दल** (अर. अदल स्त्री.) ठेंच, ठोकर.
**अद्भुत** (वि.) अपूर्व, आश्चर्यकारक; (पु.) नवरसांपैकीं एक.
**अद्याप, अद्यापि** (सं. अ.) अजून, अजूनहि.
**अद्रि** (सं. पु.) पर्वत.
**अद्वय** (सं. वि.) एकरूप.
**अद्वातद्वा** (सं. यद् वा तद् वा अ.) बेतालपणानें.
**अद्वितीय** (सं. वि.) विलक्षण.
**अद्वैत** (सं. न.) एकत्व; जीव आणि ब्रह्म एकच असें मत.
**अधवड** (स्त्री. ) मेलेल्या ढोराचें अर्धें कातडें, किंवा तें घेण्याचा गांवच्या महाराचा हक्क.
**अंध** (सं. वि.) आंधळा.
**अंधक** (सं. वि.) अंधुक पहा.
**अंधकार** (सं. पु.) अंधेर, काळोख.
**अधचा मधचा, अधलंड मधलंड** (वि.) अर्धवट.
**अधण** (न.) उकळी फुटणें.
**अधन** (वि.) दरिद्री.
**अधपणें** (प्रा. क्रि.) होरपळणें. (ज्ञाने० १२।४६)
**अधःपतन** (सं. न.) **अधःपात** (सं. पु.) खालीं पडणें.
**अधम** (सं. वि.) नीच.
**अधर** (पु.) खालचा ओंठ; (वि.) अधीर, उतावीळ; (अ.) आधारावांचून; हलकेंच; वरचेवर. [ पाप.
**अधर्म** (सं. पु.) शास्त्रविरुद्ध आचरण,
**अधला मधला** (वि.) मधचा.
**अधवणी** (न.) अधणाचें पाणी.
**अधवरौतें** (अ.) खालचें वर.
**अधःस्थळीं** (सं.) खालीं.
**अधःस्वस्तिक** (सं. न.) आकाशांतला अगदीं खालचा बिंदु.
**अधस्त्री** (स्त्री.) दासी, रखेली.
**अंधपरंपरा** (सं. स्त्री.) आंधळयाची माळका; मागपासून चालत आलेल्या मार्गानें अविचारानें जाण्याची प्रवृत्ति.
**अंधळा** (वि.) अंध, दृष्टिहीन; **अंधळें दळतें आणि कुतरें पीठ खातें**–एकानें कष्ट करावे व भलत्यानेंच त्याचा फायदा घ्यावा अशी अव्यवस्था.
**अंधळी कोशिंबीर** (स्त्री.) मुलांचा एक खेळ. [ खलबत, कट.
**अंधळें गारुड** (न.) लबाडी, लुच्चेगिरी;
**अंधळें नक्षत्र लागणें** शोध करूनहि पुष्कळ वेळपर्यंत वस्तु न सांपडणें.
**अधाडा** (प्रा. वि.) अधांतरीं. [ राळीं.
**अधांतरीं, अधांत्रीं** (अ.) हवेंत, अंत-
**अधांतुरें** (प्रा. वि.) अधांतरीं.
**अंधाधुंदी** (स्त्री.) अंदाधुंदी पहा.
**आधधिणें** (प्रा. क्रि.) भेडसावणें.
**अंधार** (सं. अंधकार पु.) अंधेर, काळोख.
**अंधारकोठडी** (स्त्री.) अंधेराच्या खोलींत एकटें बसण्याची शिक्षा.
**अंधारी अंधेरी** (स्त्री.) पावसाच्या ढगामुळें पडणारा अंधार, झापड.
**अधाशी** (सं. अत्याशी वि.) खादाड.
**अधिक** (वि.) जास्त, फार, श्रेष्ठ; द्वाड, खोडकर, (पु.) चांद्रमास व सौरमास यांमधील अंतर काढून टाकण्यासाठीं दर अडीच वर्षांनीं एक महिना चांद्रवर्षांत मिळवितात तो.
**अधिक उणा शब्द** मर्यादेचें उल्लंघन करण्यासारखा शब्द.

**अधिकभेट** (प्रा. स्त्री.) साक्षात्कार.
**अधिकमास** अधिक (पु.) पहा.
**अधिकरण** (न.) स्थान; सप्तमी विभक्तीचा अर्थ. [ सत्ता.
**अधिकार** (सं. पु.) पदवी; योग्यता;
**अधिकारी** (सं. पु.) अधिकारयुक्त मनुष्य.
**अधिकृत** (सं. न.) साधार किंवा अधिकारानें सांगितलेलें.
**अधिचार** (सं. पु.) मंत्रप्रयोग.
**अधिदैवत** (सं. न.) कोणत्याही कर्माची मुख्य देवता.
**अधिप, अधिपति** (सं. पु.) राजा.
**अधिभूत** (सं. न.) साक्षात् वस्तु.
**अधिराज** (सं. पु.) सार्वभौम राजा.
**अधिवेशन** (सं. न.) सभा, बैठक.
**अधिष्ठान** (सं. न.) वसतिस्थान; सत्ता.
**अधिष्ठित** (सं. वि.) ताब्यांत घेतलेला, आक्रांत केलेला; व्यापलेला; नेतृत्व किंवा प्रभुत्व असलेला; स्थापलेला; सुरू केलेला.
**अधिक्षेप** (सं. पु.) आरोप; निंदा.
**अधीं आधीं** (क्रि. वि.) अगोदर.
**आधींविदीं** (क्रि. वि.) (मुलांच्या तोंडांत) सर्वांच्या अगोदर; अगदीं तावडतोब.
**अधीत** (सं. वि.) शिकलेला, पढिक.
**अधींमधीं** (क्रि. वि.) भलत्याच वेळीं, मध्येंच.
**अधीन** (सं. वि.) हातांतलें; वश.
**अधीर** (सं. वि.) उतावळा.
**अधीलपणा** (प्रा. पु.) श्रेष्ठत्व.
**अधीश** (सं. पु.) स्वामी, धनी.
**अंधुक** (वि.) मंद.
**अधुना** (वि.) आतां.
**अधुरा** (वि.) अपुरता.
**अधू** (वि.) अशक्त; विकल, पंगु.
**अंधुळी** (प्रा. स्त्री.) छाया, सावली.
**अंधेर** (पु.) काळोख, अंधार.
**अंधेरनगरी** बेबंदशाही.
**अधेंमधें–अध्यामध्यांत पडणें** (क्रि.) दुसऱ्याच्या भानगडींत, कारभारांत किंवा व्यवहारांत लुडबुडणें.
**अधेला** (पु.) अर्धा पैसा.
**अधेली** (स्त्री.) अर्धा रुपया. [ नति
**अधोगति** (सं. स्त्री.) खालीं जाणें; अव-
**अधोमुखी** (सं. वि.) खालीं तोंड केलेली.
**अधोरी** (वि.) अधाशी; अधीर, उतावळा.
**अधोली** (स्त्री.) दोन शेराचें माप.
**अध्ययन** (सं. न.) पठण, शिकणें.
**अध्यवसाय** (सं. पु.) दीर्घोद्योग; निश्चय.
**अध्यक्ष** (सं. पु.) मुख्य, नियंता.
**अध्यात्म** (सं. वि.) आत्म्याबद्दलचें; **अ०** विद्या, **अ० ज्ञान**–आत्मविद्या, वेदान्त.
**अध्यात्मिक** (सं. वि.) ब्रह्मज्ञानासंबंधीं.
**अध्यापक** (सं. पु.) शिक्षक, प्रोफेसर.
**अध्यापन** (सं. पु.) शिकविणें.
**अध्याय** (सं. पु.) प्रकरण, विभाग.
**अध्यास** (सं. पु.) आरोप.
**अध्याहार** (सं.पु.) पूर्ततेसाठीं पदरचें घालणें.
**अध्याहृत** (सं. वि.) पदरचें घातलेलें.
**अध्वर** (सं. पु.) यज्ञ, याग.
**अध्वर्यु** (सं. पु.) नायक, मुख्य.
**अन** (वि.) अन्य, दुसरा, आणखी; (अ.) अतिशयेंकरून.
**अनकळित** (प्रा. वि.) निरुपद्रवी, अक्लेश. (ज्ञा० ७।१११) समग्र.
**अनंग** (सं. पु.) मदन.
**अनघ** (वि.) निष्पाप.
**अनघड** (वि.) न घासलेला.
**अनंत** (सं. वि.) अमर्याद; (पु.) विष्णु; शेष; वासुकि. (सं. पु.) अनंत चतुर्दशीच्या दिवशीं कुशनिर्मित शेषाची पूजा करून सुताचा किंवा रेशमाचा चौदा गांठी दिलेला दोरा भक्तिभावानें बाहूला किंवा मनगटाला बांधतात तो.
**अनंत–चतुर्दशी** (स्त्री.) भाद्रपद शु. १४.
**अनध्याय** (सं. स्त्री.) सुटी.
**अननस** (न.) एक फळ.
**अनन्य** (सं. वि.) एकरूप; एकटा. [ लेला.
**अनन्यगतिक** (सं. वि.) दुसरा मार्ग नस-
**अनन्वय** (सं. पु.) एक अर्थालंकार. यांत उपमेयाला उपमेयाचीच उपमा दिलेली असते; म्हणजे त्यासारखें तेंच असें वर्णन असतें.

**अनन्वित** (सं. वि.) भलभलतें.
**अनपाय** (वि.) अपाय न करणारा.
**अनपेक्षित** (सं. न.) ध्यानींमनीं नसलेलें; अनिष्ट.
**अनमान** (पु.) अनादर; संकोच.
**अनमानीत** (वि.) साशंक, संदिग्ध.
**अनभिषिक्त** (वि.) अभिषेक न झालेला.
**अनभिज्ञ** (सं. वि.) अजाण.
**अनमानधपका** (पु.) केवळ अटकळ,अंदाज.
**अनमोल** (सं. अमूल्य वि.) अतिशय किंमतीचें, अमोल.
**अनयाळें** (प्रा. वि.) अणीदार.
**अनरसा** (पु.) एक प्रकारचें पक्वान्न.
**अनर्गळ** (सं. वि.) अप्रतिबंध; मनस्वी (दा० २।३।१८).
**अनर्थ** (वि.) निरर्थक; (पु.) संकट; भयंकर; परिणाम; पराकाष्ठा.
**अनल** (सं. पु.) अग्नि.
**अनलस** (सं. वि.) आळस नसलेला.
**अनवटी** (स्त्री.) हनुवटी.
**अनवरत** (सं. अ.) निरंतर, सतत.
**अनशन** (सं. न.) उपवास, निरशन.
**अनवणी** (वि.) पायांत वहाण किंवा जोडा नसलेला.
**अनवधान** (सं. न.) दुर्लक्ष, बेफिकिरी.
**अनवसर** (सं. पु.) दुष्काळ; संकट; (ज्ञा० ८।२१२).
**अनवसरें** (अ.) अवेळीं.
**अनवस्था** (सं. स्त्री.) घोटाळा; चंचलपणा. **अ० प्रसंग**–अनिश्चितपणाची किंवा अमर्यादपणाची स्थिति.
**अनवाणी** (वि.) जोड्यावांचून.
**अनवाळें** (सं. अनाविल न.) कारवाराकडे-सोंवळें.
**अनशुद्ध, अनशूद** (सं. अन्नशुद्धि स्त्री.) तूप.
**अनशेपोटीं** (सं. अनशन अ.) रिकाम्या पोटीं, खाल्ल्यावांचून.
**अनश्वर** (वि.) शाश्वत.
**अनसाईपणा** (सं. पु.) असहिष्णुता; उतावीळ; वेगळेपणा (अमृ. ७।७९)
**अनसूट** (सं. वि.) अनुच्छिष्ट. (भा० २९।३६१) श्राद्धपक्ष; श्राद्धाचे पूर्वीचा दिवस.
**अनसूया** (स्त्री.) मत्सरराहित्य; दत्तमाता.
**अनहित** (न.) तोटा.
**अनळ** (सं. पु.) अग्नि (रघु०नलोपा.)
**अनाइकी** (स्त्री.) अराजकता.
**अनागत** (वि.) पुढें होणारा.
**अनागोंदी** (का. वि.) भपकेदार; ताळतंत्र नसलेला (कारभार, जमाखच, व्यवहार वगैरे).
**अनाघात** (क्रि. वि.) प्रमाणाबाहेर.
**अनाज** (हिं. न.) धान्य.
**अनाचार** (सं. पु.) दुराचार, अधर्म.
**अनाठायीं** (अ.) अयोग्य ठिकाणीं; व्यर्थ.
**अनाड** (स्त्री.) अडचण.
**अनाडी** (वि.) मूर्ख, अजाण, अज्ञान.
**अनाथ** (सं. वि.) निराश्रित, दीन.
**अनात्मवर्ग** (सं. पु.) मायाकार्य, जग.
**अनादर** (सं. पु.) अपमान, अवज्ञा.
**अनादि** (वि.) ज्याच्या आरंभ-काळाचा थांग नाहीं असा.
**अनान** (सं. अन्य+अन्य वि.) निरनिराळें.
**अनामत** (अर. अमानत वि.) मोघम ठेवलेलें.
**अनामिक** (सं. वि.) अंत्यज.
**अनामिका** (सं. स्त्री.) करंगळीच्या शेजारचें बोट.
[ कृपादृष्टि.
**अनायती नजर** (फा. इनायत स्त्री.)
**अनायासें** (अ.) श्रमावांचून.
**अनार** (हिं. न.) डाळिंब.
**अनारत** (प्रा. वि.) अप्राप्त.
**अनारिसें** (प्रा. वि.) वेगळा, निराळा, भलता (ज्ञा. १६।४६५; तुका. ९८४; ना. ५२.)
**अनार्य** (वि.) आर्यास अनुचित.
**अनावड** (स्त्री.) गोडी; आवड वगैरेचा अभाव.
**अनावर** (वि.) न आवरतां येणारा; अनिवार्य, बेलगामी, स्वैर.
**अनावरण** (वि.) ज्यावर झांकण नाहीं असा; उद्‌घाटन (समारंभ).
**अनावृत** (वि.) जाहीर.

**अनावृष्टि** (सं. स्त्री.) पर्जन्याचा अभाव.
**अनाविल** (सं. वि.) शुद्ध; (पु.) गुजराथी ब्राम्हणाची जात.
**अनासनी** (प्रा. वि.) अनवाणी (ज्ञा० यो. ७।१५)
**अनाक्षर** (सं. अनक्षर वि.) शब्दातीत.
**अनास्था** (सं. स्त्री.) हेळसांड.
**अनाहूत** (सं. वि. ) न बोलावलेला.
**अनिश्चित** (सं. वि.) डळमळित, संदिग्ध, न ठरलेलें.
**अनिर्वचनीय, अनिर्वाच्य** (वि.)अवर्णनीय.
**अनिगुत** (स्त्री.) आवाळ, दुर्लक्ष, हयगय.
**अनिमि(मे)ष** (क्रि.वि.) डोळे न मिटतां; टक लावून.
**अनिल** (सं. पु.) वायु.
**अनिवार** (वि.) फार मोठा.
**अनिवार्य** (प्रा. वि.) न आवरला जाणारा; खोडसाळ (रामजोशी ४९).
**अनिष्ट** (सं. वि.) प्रतिकूल, वाईट.
**अनिष्टापात** (सं. पु.) दुर्घटना, संकट, अपशकुन. [ अपघात होणें.
**अनिष्टापत्ति** (सं. स्त्री.) अनिष्ट घडणें,
**अनीकसा** (प्रा. वि.) भिन्न.
**अनीति** (सं. स्त्री.) अधर्म, पाप.
**अनीन** (अर. स्त्री.) लगामाची दोरी.
**अनीश्वरवाद** (सं. पु.) ईश्वर नाहीं असें मत. [ उणा; हीन; सह.
**अनु** (सं. वि.) अन्य (अमृ० ६।३३);
**अनुकंपा** (सं. स्त्री.) दया, करुणा, कृपा.
**अनुकरण** (सं. न.) नक्कल, दुसऱ्यासारखें करणें.
**अनुकरणें** (सं. क्रि.) अनुकूल किंवा सदृश होणें; आकारास येणें (ज्ञा०१५।४९४).
**अनुकार** (सं. पु.) नक्कल, सादृश्य.
**अनुकूळ** (सं. वि.) हितकर, इष्ट, प्रिय; योग्य.
**अनुकूळता** (सं. स्त्री.) संमति; ऐपत.
**अनुकृति** (सं. स्त्री.) अनुकरण; वेडावणें.
**अनुक्रम** (सं. पु.) परंपरा, ओळ; व्यवस्थित रचना. [ क्रमवार यादी.
**अनुक्रमणिका** (सं. स्त्री.) विषयांची
**अनुक्रोश** (सं. पु.) कींव, दया, अनुकंपा.
**अनुगमन** (सं. न.) मागें जाणें; सती जाणें; अनुमरण. [ शिष्य.
**अनुगामी** (सं. वि.) अनुसरणारा, नोकर,
**अनुगृहीत** (सं. वि.) ज्यावर उपकार केले आहेत तो; स्वीकारलेला.
**अनुग्रह** (सं. पु.) कृपा, प्रसाद; अनुकूळता.
**अनुघडी** (प्रा. अ.) निरंतर.
**अनुघडु** (प्रा. पु.) गुप्तपणा; अ०फुटणें शरत्काळ प्राप्त होणें; (ज्ञा० ९।११२)
**अनुचर** (सं. पु.) सोबती; सेवक.
**अनुचित** (सं. वि.) अयोग्य, वावगें.
**अनुज** (सं. पु.) धाकटा भाऊ.
**अनुजा** (सं. स्त्री.) धाकटी बहीण.
**अनुजाइनी** (सं. वि.) अनुकूळ; जागृत (ज्ञा० ११।२७९). [ आश्रित.
**अनुजीवी** (सं. पु.) सेवक, परिचारक,
**अनुतप्त** (सं. वि.) पश्चात्ताप पावलेला.
**अनुताप** (सं. पु.) पश्चात्ताप.
**अनुदात्त** (पु.) वेदांतील तीन सुरांपैकीं ज्याला कोणचाही स्वर नाहीं असा वर्ण.
**अनुदार** (सं. वि.) कृपण, स्वार्थी, कोत्या मनाचा.
**अनुदिन-नीं** (क्रि. वि.) प्रतिदिवशीं,दररोज.
**अनुद्वेग** (पु.) संतोष. [ धरणी.
**अनुनय** (सं. पु.) नम्रपणाची वृत्ति; मन-
**अनुनासिक** (सं. पु.) ज्याचा नाकांतून ओझरता उच्चार निघतो तो वर्ण.
**अनुपम** (सं. वि.) ज्यास उपमा देतां येत नाहीं तें; उत्कृष्ट, उत्तम, अद्वितीय.
**अनुपम्य, अनुपमेय** (सं. वि.) अनुपम.
**अनुपस्थिति** (स्त्री.) गैरहजेरी.
**अनुपान** (सं. न.) मुख्य औषधाबरोबर किंवा त्याच्या मागून औषधाला उपकारक असें जें खाद्य किंवा पेय तें.
**अनुपेगी** (वि.) निरुपयोगी.
**अनुप्रास** (सं. पु.) पद्यामध्यें व्यंजनांची वारंवार आवृत्ति.
**अनुफा** (अर. पु.) शिधा.
**अनुबंध** (सं. पु.) परस्पर संबंध; बंधन, अटकाव; आरंभ; अवस्था.
**अनुबोधपट** (पु.) माहितीसाठीं तयार करण्यांत आलेला चित्रपट.

**अनावृष्टि** (सं. स्त्री.) पर्जन्याचा अभाव.
**अनाविल** (सं. वि.) शुद्ध; (पु.) गुजराथी ब्राम्हणाची जात.
**अनासनी** (प्रा. वि.) अनवाणी (ज्ञा० यो. ७।१५)
**अनाक्षर** (सं. अनक्षर वि.) शब्दातीत.
**अनास्था** (सं. स्त्री.) हेळसांड.
**अनाहूत** (सं. वि. ) न बोलावलेला.
**अनिश्चित** (सं. वि.) डळमळित, संदिग्ध, न ठरलेलें.
**अनिर्वचनीय, अनिर्वाच्य** (वि.) अवर्णनीय.
**अनिगत** (स्त्री.) आबाळ, दुर्लक्ष, हयगय.
**अनिमि(मे)ष** (क्रि.वि.) डोळे न मिटतां; टक लावून.
**अनिल** (सं. पु.) वायु.
**अनिवार** (वि.) फार मोठा.
**अनिवार्य** (प्रा. वि.) न आवरला जाणारा; खोडसाळ (रामजोशी ४९).
**अनिष्ट** (सं. वि.) प्रतिकूल, वाईट.
**अनिष्टापात** (सं. पु.) दुर्घटना, संकट, अपशकुन. [ अपघात होणें.
**अनिष्टापत्ति** (सं. स्त्री.) अनिष्ट घडणें,
**अनीकसा** (प्रा. वि.) भिन्न.
**अनीति** (सं. स्त्री.) अधर्म, पाप.
**अनीन** (अर. स्त्री.) लगामाची दोरी.
**अनीश्वरवाद** (सं. पु.) ईश्वर नाहीं असें मत. [ उणा; हीन; सह.
**अनु** (सं. वि.) अन्य (अमृ० ६।३३);
**अनुकंपा** (सं. स्त्री.) दया, करुणा, कृपा.
**अनुकरण** (सं. न.) नक्कल, दुसऱ्यासारखें करणें.
**अनुकरणें** (सं. क्रि.) अनुकूल किंवा सदृश होणें; आकारास येणें (ज्ञा०१५।४९४).
**अनुकार** (सं. पु.) नक्कल, सादृश्य.
**अनुकूळ** (सं. वि.) हितकर, इष्ट, प्रिय; योग्य.
**अनुकूळता** (सं. स्त्री.) संमति; ऐपत.
**अनुकृति** (सं. स्त्री.) अनुकरण; वेडावणें.
**अनुक्रम** (सं. पु.) परंपरा, ओळ; व्यवस्थित रचना. [ क्रमवार यादी.
**अनुक्रमणिका** (सं. स्त्री.) विषयांची
**अनुक्रोश** (सं. पु.) कींव, दया, अनुकंपा.
**अनुगमन** (सं. न.) मागें जाणें; सती जाणें; अनुमरण. [ शिष्य.
**अनुगामी** (सं. वि.) अनुसरणारा, नोकर,
**अनुगृहीत** (सं. वि.) ज्यावर उपकार केले आहेत तो; स्वीकारलेला.
**अनुग्रह** (सं. पु.) कृपा, प्रसाद; अनुकूळता.
**अनुघडी** (प्रा. अ.) निरंतर.
**अनुघड** (प्रा. पु.) गुप्तपणा; **अ०फुटणें** शरत्काळ प्राप्त होणें; (ज्ञा० ९।११२)
**अनुचर** (सं. पु.) सोबती; सेवक.
**अनुचित** (सं. वि.) अयोग्य, वावगें.
**अनुज** (सं. पु.) धाकटा भाऊ.
**अनुजा** (सं. स्त्री.) धाकटी बहीण.
**अनुजाइनी** (सं. वि.) अनुकूळ; जागृत (ज्ञा० ११।२७९). [ आश्रित.
**अनुजीवी** (सं. पु.) सेवक, परिचारक,
**अनुतप्त** (सं. वि.) पश्चात्ताप पावलेला.
**अनुताप** (सं. पु.) पश्चात्ताप.
**अनुदात्त** (पु.) वेदांतील तीन सुरांपैकीं ज्याला कोणचाही स्वर नाहीं असा वर्ण.
**अनुदार** (सं. वि.) कृपण, स्वार्थी, कोत्या मनाचा.
**अनुदिन-नीं** (क्रि. वि.) प्रतिदिवशीं, दररोज.
**अनुद्वेग** (पु.) संतोष. [ धरणी.
**अनुनय** (सं. पु.) नम्रपणाची वृत्ति; मन-
**अनुनासिक** (सं. पु.) ज्याचा नाकांतून ओझरता उच्चार निघतो तो वर्ण.
**अनुपम** (सं. वि.) ज्यास उपमा देतां येत नाहीं तें; उत्कृष्ट, उत्तम, अद्वितीय.
**अनुपम्य, अनुपमेय** (सं. वि.) अनुपम.
**अनुपस्थिति** (स्त्री.) गैरहजेरी.
**अनुपान** (सं. न.) मुख्य औषधाबरोबर किंवा त्याच्या मागून औषधाला उपकारक असें जें खाद्य किंवा पेय तें.
**अनुपेगी** (वि.) निरुपयोगी.
**अनुप्रास** (सं. पु.) पद्यामध्यें व्यंजनांची वारंवार आवृत्ति.
**अनुफा** (अर. पु.) शिधा.
**अनुबंध** (सं. पु.) परस्पर संबंध; बंधन, अटकाव; आरंभ; अवस्था.
**अनुबोधपट** (पु.) माहितीसाठीं तयार करण्यांत आलेला चित्रपट.

वाचनालय, सातारा.

**अनुभव** (सं. पु.) प्रत्यक्ष माहिती; परीक्षा.
**अनुभविक** (वि.) अनुभवसिद्ध.
**अनुभवी** (वि.) ज्याला अनुभव प्राप्त झाला आहे असा.
**अनुभाव** (सं. पु.) अलंकार–शास्त्रांत रसाचें कार्य (भावनेचा शरीरावर किंवा कृतींत दिसून येणारा परिणाम) प्रभाव.
**अनुभूति** (सं. स्त्री.) **अनुभूतिक** (सं. न.) अनुभव. [ आज्ञा.
**अनुमति** (सं. स्त्री.) अनुमोदन, मान्यता;
**अनुमरण** (सं. न.) अनुगमन पहा.
**अनुमान** (सं. न.) तर्क, अंदाज.
**अनुमेय** (सं. वि.) अटकळ करतां येण्यासारखें.
**अनुमोदन** (सं. न.) संमति, दुजोरा.
**अनुयायी** (सं. पु.) अनुसरणारा, शिष्य.
**अनुरक्त** (सं. वि.) प्रेमबद्ध; निष्ठावंत.
**अनुराग** (सं. पु.) प्रेम; निष्ठा.
**अनुराधा** (सं. स्त्री.) १७ वें नक्षत्र.
**अनुरूप** (सं. वि.) साजेसा.
**अनुरोध** (सं. पु.) धोरण, कल; प्रेरकशक्ति.
**अनुलक्षून** उद्देशून.
**अनुलेपन** (सं. न.) चोपडणें, माखणें; चोपडण्याचा पदार्थ.
**अनुलोम** (सं. वि.) स्वाभाविक क्रमानें आलेला; सुलटा. **अ० विवाह** (पु.) वरच्या जातीचा पुरुष व खालच्या जातीची स्त्री यांचा विवाह.
**अनुवर्तणें** (सं. क्रि.) दुसऱ्याच्या मर्जीप्रमाणें वागणें; सेवा करणें.
**अनुवाद** (सं. पु.) पुनरुच्चार, स्पष्टीकरण; भाषांतर, नक्कल; व्यर्थ भाषण.
**अनुवादक** (सं. वि.) भाषांतरकर्ता.
**अनुवाहणी** (प्रा. स्त्री.) भोई वगैरे.
**अनुवृत्ति** (सं. वि.) अनुकरण; वंशपरंपरा चालत आलेली वृत्ति; पुरवणी.
**अनुवेल** (सं. अ.) पुनः पुनः
**अनुशासन** (सं. न.) आज्ञा, कायदा.
**अनुशीलन** (सं. न.) अभ्यास, सराव.
**अनुषंग** (सं. पु.) संगति; मिश्रण.
**अनुष्ठान** (सं. न.) विधिपूर्वक धर्मकृत्य.
**अनुष्टुभ्** (सं. पु.) गणांचा नियम नाहीं व चार चरण आणि प्रत्येक चरणांत आठ अक्षरें असा छंदाचा एक प्रकार; बहुतेक अभाव किंवा संक्षेप : (अ.) थोडक्यांत (भा० ४।२८४).
**अनुसंधान** (सं. न.) युक्ति; धोरण; योग्य संबंध; लक्ष, चित्त; आख्यान.
**अनुसरणें** (सं. क्रि.) मागून जाणें; एकाद्याच्या मताचा स्वीकार करणें.
**अनुसार** (अ.) धोरणानें, क्रमानें, अनुरूप.
**अनुसारा** (पु.) मार्ग (ज्ञा० ५।१६५).
**अनुसूचित** (वि.) स्वतंत्र वर्गवारी केलेलें.
**अनुसूट** (प्रा. वि.) विकारहीन; निर्लेप (भा० २९।३६१); नियंत्रित (भा० १७।२३८).
**अनुस्यूत** (वि.) अखंडित जाणारा.
**अनुस्वार** (सं. पु.) नाकांतून होणारा खणखणीत उच्चार; लिहिण्यांत त्याचें चिन्ह ं असें असतें.
**अनुहत, अनुहात** (सं. वि.) अखंड, निरंतर (ना० ५७९).
**अनुज्ञा** (सं. स्त्री.) परवानगी, संमति.
**अनृत** (सं. न.) असत्य; (वि.) खोटें.
**अनृणी** (सं. वि.) ऋणमुक्त.
**अनूप** (वि.) निरुपम.
**अनेक, अनेग** (सं. वि.) एकाहून अधिक.
**अनोळखी** (वि.) नवखा.
**अनौचित्य** (सं. न.) अनुचितपणा.
**अनौतें** (प्रा. वि.) अन्य.
**अनौरस** (वि.) औरस नसलेली.
**अन्न** (सं. न.) भक्ष्य; पृथ्वी. (वाक्य० १९४२).
**अन्नास जागणें** कृतज्ञ असणें.
**अन्नास महाग** अतिशय दरिद्री; **अन्नांत माती कालवणें**–चरितार्थाचीं साधनें नाहींशीं करणें; **अन्नाला लावणें**-चरितार्थाचें साधन मिळवून देणें, नोकरी वगैरे लावून देणें.
**अन्नकूट** (सं. पु.) देवास अर्पिलेली अन्नाची रास.
**अन्नछत्र** (सं. अन्नसत्र न.) धर्मार्थ जेवण मिळण्याची जागा.

**अन्नपूर्णा** (सं. स्त्री.) पार्वती; स्वयंपाकीण बाई; भिक्षेची झोळी.
**अन्नमयकोश** (सं. पु.) चैतन्याच्या पांच आवरणांपैकीं पहिलें आवरण म्ह. शरीर.
**अन्नव्यवहार** रोटीव्यवहार पहा. [ घालणें.
**अन्नशांति** (सं. स्त्री.) क्षुधितांना अन्न
**अन्नशुद्धि** (सं. स्त्री.) तूप.
**अन्नसत्र** (सं. न.) अन्नछत्र शब्द पहा.
**अन्नान्नगत, अन्नान्नदशा** ( स्त्री. ) अन्न मिळण्याची भ्रांति अशी स्थिति.
**अन्नाशय** (सं. पु.) कोठा, कोथळा, पोट.
**अन्य** (सं. वि.) दुसरा, निराळा, भिन्न.
**अन्यत्र** (सं. अ.) दुसरीकडे.
**अन्यथा** (सं. अ.) अन्यप्रकारें; मिथ्या.
**अन्याय** (सं. पु.) नीतिमार्गाचा अतिक्रम, न्यायाचा अभाव, अनीति; अपराध.
**अन्यून** (सं. वि.) अव्यंग; पूर्ण.
**अन्योक्ति** (सं. स्त्री.) जेथें अप्रकृत वर्णनावरून प्रकृत गोष्टींचा बोध होतो तो अलंकार.
**अन्योन्य** (सं. वि.) परस्पर; (पु.) एक अलंकार; (यांत परस्परांनीं परस्परांना भूषविण्याचा प्रकार असतो.)
**अन्योविन्य** (प्रा. वि.) विसंगत, गैरशिस्त. (तुका० ६७).
**अन्वय** (सं. पु.) संबंध; कुळ, वंश.
**अन्वयव्यतिरेक** (सं. पु.) अन्वय म्हणजे अमुक गोष्ट असतां अमुक गोष्ट घडणें आणि व्यतिरेक म्हणजे अमुक गोष्ट न घडली तर अमुक दोष उत्पन्न होईल, अशा प्रकारचा साध्य व साधन यांच्यामधील परस्परसंबंध.
**अन्वर्थ, अन्वर्थक** (सं. वि.) सार्थ.
**अन्वित** (सं. वि.) युक्त, संबद्ध.
**अन्वेषण** (सं. न.) शोध.
**अन्हाड** (प्रा. वि.) उनाड (भा० ११।५५८)
**अप्** (सं. स्त्री.) पाणी.
**अपकरा, अफखरा** (फा. आपखरा पु.) पाणी पिण्याची झारी.
**अपकर्ष** (सं. पु.) ऱ्हास, अवनति.
**अपका** (पु.) पाण्याचा जोराचा शिडकाव.
**अपकार** (सं. पु.) हानि; दुखापत; गुन्हा.
**अपकारक** (सं. वि.) अपकार करणारें.
**अपकीर्ति** (सं. स्त्री.) दुष्कीर्ति, अलौकिक.
**अपक्व** (सं. वि.) न पिकलेला; अननुभविक; हिरवा, कच्चा.
**अपंक्त** (सं. अपांक्त वि.) पंक्तींतून बहिष्कृत; वाळींत टाकलेला.
**अपखडी** (प्रा. स्त्री.) निंदा.
**अपख्यात** (सं. अपख्याति स्त्री.) अपकीर्ति (मुक्ते० रामा. २।८७)
**अपंग** (सं. अपंगु वि.) पंगू, लुळा.
**अपंगणें** (क्रि.) जवळ करणें, आश्रय देणें.
**अपंगिता** (पु.) आश्रयदाता.
**अपघात** (सं. पु.) आकस्मिक कारणानें घडलेली हानि किंवा मृत्यु.
**अपजय** (सं. पु.) पराजय, पराभव.
**अपजाल** (सं. न.) आळ (हरि० २५।१४३)
**अपटणें** (क्रि.) आदळणें, जोरानें खालीं पडणें किंवा पाडणें.
**अपटधोपट** (स्त्री.) आदळआपट.
**अपटा** (पु.) एक वनस्पति. (दसऱ्याच्या दिवशीं याचीं पानें सोनें म्हणून इष्टमित्र परस्परांस देतात.)
**अपटाअपट–टी** (स्त्री.) आदळणें, अपटधोपट.
**अपटी** (स्त्री.) व्यवहारांत नुकसान.
**अपत्नीक** (सं. वि.) विधुर किंवा अविवाहित.
**अपत्य** (सं. वि.) संतति, मूल. [ बेशरम.
**अपत्रप** (सं. वि.) निलाजरा, निर्लज्ज,
**अपदास्थपण** (प्रा. ना.) पदभ्रष्टता.
**अपथ्य** (सं. न.) प्रकृतीला न मानवणारें खाद्यपेय.
**अपधाक** (पु.) भय; एकाएकीं प्राप्त झालेल्या भीतीचा मनावर होणारा परिणाम.
**अपन्हुति** (सं. स्त्री.) उपमेयावर त्याच्या वास्तविक स्वरूपाचा अपलाप करून उपमानाचा आरोप करतात तो अलंकार.
**अपपाठ** (सं. पु.) चुकीचा पाठ.
**अपप्रयोग** (सं. पु.) चुकीची योजना; शब्दाचा अशुद्ध प्रयोग.
**अपभाषण** (सं. न.) निंदा, शिवीगाळ.

**अपभ्रंश** (सं. पु.) विकार; नाश; हानि (ज्ञा० २।२१); भ्रम.
**अपमान** (सं. न.) मानखंडना.
**अपमृत्यु** (सं. पु.) आकस्मिक मृत्यु.
**अपयश** (सं. न.) अपकीर्ति; पराभव.
**अपर** (सं. वि.) दुसरा; पलीकडचा.
**अपरंपार** (सं. वि.) अमर्याद.
**अपरमाय** (प्रा. वि.) सर्वश्रेष्ठ (स्वा० दि. १।४।५).
**अपरवड** (प्रा. स्त्री.) विचित्रपणा.
**अपरवडी** (प्रा. स्त्री.) अन्याय; गैरचाल; अपकीर्ति.
**अपरवासी** (वि.) विटाळशी. [ भलती रात्र.
**अपरात्र** (स्त्री.) रात्रीचा शेवटचा भाग;
**अपरांपरी** (प्रा. स्त्री.) वाताहत (तुका. २९९३); परकेपणा.
**अपराह्ण** (सं. पु.) तिसरा प्रहर, दुपार.
**अपराध** (सं. पु.) अन्याय, चूक, गुन्हा.
**अपरिग्रह** (सं. पु.) कोणत्याही वस्तूचा संग्रह न करणें.
**अपरिचित** (सं. वि.) अनोळखी, माहित नसलेला, तिऱ्हाईत; परकी. [ बाहेरचा.
**अपरिमित** (सं. वि.) असंख्य; प्रमाणा-
**अपरिहार्य** (सं. वि.) न टाळतां येणारे.
**अपरूप** (वि.) विचित्र; कुरूप; आश्चर्यकारक.
**अपरोक्ष** (सं. अ.) डोळ्यांदेखत, समक्ष; पश्चात् (चुकीचा पण रूढ अर्थ); **अ० ज्ञान**–आत्मप्रतीति. [ उडवाउडवी.
**अपलाप** (सं. पु.) लपविणें, गोपन;
**अपलाणी** (पु.) खोगीर न घातलेला घोडा (भा० २।२१४).
**अपवर्ग** (सं. पु.) मोक्ष.
**अपवाद** (सं. पु.) निंदा; आळ; नियमास बाधक गोष्ट.
**अपवित्र** (सं. वि.) मलिन, अशुद्ध.
**अपविध्द** (वि.) आईबापांनीं टाकलेला.
**अपव्यय** (सं. पु.) उधळपट्टी; निरर्थक खर्च.
**अपशकुन** (सं. पु.) दुश्चिन्ह.
**अपशब्द** (सं. पु.) दुर्भाषण, शिवी.
**अपसद** (वि.) अधम, दुष्ट.
**अपसया** (प्रा. अ.) आपोआप, सहजासहजीं (नाम० १४१).
**अपसव्य** (सं. वि.) उजवें; उलटें (न.) उजव्या खांद्यावर जानवें घेणें.
**अपसिद्धान्त** (सं. पु.) न्यायशास्त्राच्या नियमांशीं विसंगत, अर्थात् चुकीचा सिद्धान्त. [ पश्चात्ताप.
**अपसोस** (फा. अफ्सोस पु.) दुःख,
**अपस्मार** (सं. पु.) फेंफरें.
**अपस्वर** (सं. पु.) बेसूर.
**अपहार** (सं. पु.) दुसऱ्याच्या द्रव्याची अन्यायानें लूट करणें.
**अपळें** (वि.) पूर्ण वाढ न झालेलें (मूल).
**अपक्ष** (वि.) पंख नसलेला; कोणत्याही पक्षांत नसलेला.
**अपांक्त** (सं. वि.) वाळींत टाकलेला.
**अपांग** (सं. वि.) ज्याचें एकादें इंद्रिय उणें आहे असा. जसें अंधळा, बहिरा इ.
**अपांगणें** (क्रि.) जाचणुकीच्या स्थितींत असणें, पेंचांत सांपडणें.
**अपाड** (प्रा. पु.) अंतर, भेद; विलक्षणपणा; अपात्र.
**अपाडु** (प्रा. पु.) अप्रतिबंध.
**अपाडें** (प्रा. अ.) सत्वर; अत्यंत.
**अपात्र** (सं. वि.) अयोग्य, नालायक.
**अपादणें** (प्रा. क्रि.) संपादणें.
**अपादान** (सं. न.) दूर करणें; पंचमी विभक्तीचा अर्थ (वियोग).
**अपांपति** (सं. पु.) समुद्र.
**अपांपरी** (प्रा. स्त्री.) दुर्दशा.
**अपामार्ग** (सं. पु.) आघाडा.
**अपाय** (सं. पु.) इजा.
**अपार** (सं. वि.) अमर्याद, अनंत.
**अपारणें** (प्रा. क्रि.) ओसरणें.
**अपावृत** (वि.) प्रगट, उघड.
**अपावो** (सं. अपाय पु.) अपाय, नाश.
**अपील** (इं. न.) खालच्या अधिकाऱ्यानें दिलेला निकाल तपासण्यासाठीं वरच्या अधिकाऱ्यास केलेला अर्ज; विनवणी.
**अपुरा** (वि.) अपुरता; अपूर्ण.
**अपूट** (सं. अस्पृष्ट वि.) अचूक, अखंड.
**अपूर्ण** (सं. वि.) अपुरा, तुटक.

**अपूर्णांक** (सं. पु.) अंकाचा भाग; बाकी.
**अपूप** (पु.) अनरसा.
**अपूर्व** (सं. वि.) विलक्षण, नवीन.
**अपूस** (पोर्तु. आल्फान्सो पु.) एक उत्कृष्ट जातीचा आंबा.
**अपेट** (वि.) न शिकविलेलें; वेशिस्तीचें; अननुभविक (प्रभा० पृ. १२६).
**अपेत** (प्रा. अ.) सहज.
**अपेय** (सं. वि.) पिण्यास अयोग्य.
**अपेश** (सं. अपयश न.) दुष्कीर्ति; पराभव. अ० चें वापर—अपयशाबद्दलचा दोष.
**अपेशी** (वि.) ज्याला यश किंवा सिद्धि मिळाली नाहीं असा; दुर्दैवी.
**अपेष्टा** (सं. अपेष्टता स्त्री.) दुःख, विटंबना.
**अपेक्षा** (सं. स्त्री.) इच्छा, आकांक्षा.
**अपेक्षित** (सं. वि.) इच्छिलेलें; जरूर असलेलें; अटकळ केलेलें.
**अपैता** (प्रा. वि.) स्वाधीन, प्राप्त. [ १५३.
**अपैशून्य** (सं. न.) सौजन्य (ज्ञा० १६।
**अपैसा–सी–सें** (प्रा. अ.) आपोआप, सहज; लागलीच; संनिध. [ यन पहा.
**अपोष्णी** (सं. आपोशन स्त्री.) आपो-
**अपोस** अपूस पहा.
**अपौरुष** (सं. वि.) ईश्वरकृत.
**अप्रकृत** (वि.) प्रसंग सोडून असलेलें.
**अप्रगल्भ** (सं. वि.) भिडस्त, लाजाळू; अपरिपक्व, पुरा विकास झाला नाहीं असा.
**अप्रत्यक्ष** (वि.) समक्ष नव्हे तो.
**अप्रतिम** (सं. वि.) अद्वितीय, अनुपम.
**अप्रतिष्ठा** (सं. स्त्री.) अपमान; दुर्लौकिक.
**अप्रतिहत** (सं. वि.) अप्रतिबंध; निराश न झालेला.
**अप्रधान** (सं. वि.) गौण, दुय्यम प्रतीचें.
**अप्रबुद्ध** (सं. वि.) अज्ञानी, मंद; अनभिज्ञ, अपरिचित, अननुभविक.
**अप्रमत्त** (सं. वि.) कर्तव्यांत न चुकणारा; सावध, हुषार, दक्ष, जागरूक.
**अप्रमाण** (सं. वि.) निराधार, अविश्वसनीय; नाकबूल. [ वश्यक; अनुचित.
**अप्रयोजक** (सं. वि.) निरुपयोगी; अना-
**अप्रशस्त** (सं. वि.) अश्लाघ्य, निंद्य; हलक्या दर्जाचा; आकुंचित (जागा); असंस्कृत, ग्राम्य.
**अप्रसन्न** (सं. वि.) अस्वच्छ (पाणी इ०); असंतुष्ट, आनंदित नसलेली, नाखूष, नाराज.
**अप्रसिद्ध** (सं. वि.) माहीत नसलेला; गौण, हलक्या प्रतीचा; चालू नसलेला.
**अप्रस्तुत** (सं. वि.) काळास अनुचित; असंबद्ध, अप्रकृत. [ शब्द पहा.
**अप्रस्तुत प्रशंसा** (सं. स्त्री.) अन्योक्ति
**अप्रा** (वि.) अपुरा, आंखुड.
**अप्राप्य** (सं. वि.) न मिळण्यासारखा.
**अप्रामाणिक** (सं. वि.) खोटा, बेविश्वासू, लुच्चा, विश्वासाला नालायक.
**अप्रासंगिक** (सं. वि.) अयोग्य काळीं केलेलें; असमयोचित.
**अप्रिय** (सं. वि.) न रुचणारें, नावडतें.
**अप्रीति** (सं. स्त्री.) प्रेमाचा अभाव; वैरभाव; नावड. [ किंवा वेश्या.
**अप्सरा** (सं. स्त्री.) स्वर्गलोकची नर्तकी
**अफतरी** (फा. इफतरा स्त्री.) आरोप; दुर्दशा, (फा. अब्तरी स्त्री.) खराबी, नाश, हानि (राम जो. पृ. १०७).
**अफरातफर** (फा. अफिरदा = नवीन केलेलें, तफरीक = घालवून दिलेलें. स्त्री.) अव्यवस्था, अपहार.
**अफराद** (फा. पु.) सेवक.
**अफलाद** (अर. स्त्री.) स्त्रीशाखेकडील वंशज; दासीपुत्र; दत्तकाची संतति.
**अफळणें** (क्रि.) अपक्व किंवा अपुरा राहणें; आदळणें. [ खबर.
**अफवा** (अर. अफवाह स्त्री.) गप्प, अवाई,
**अफाट** (वि.) अतिविस्तृत; अतिशय सामर्थ्यवान्; प्रचंड.
**अफीण, अफीम, अफू** (सं. अहिफेन स्त्री.) खसखशीच्या बोंडाचा चीक.
**अफीमबाज** (पु.) अफू खाण्याचें व्यसन लागलेला मनुष्य.
**अफुट** (प्रा. वि.) अद्वैत (अमृ. ६।६).
**अफू** अफीण पहा.
**अबई** (स्त्री.) एक फुलझाड.

**अवक** (स्त्री.) विटीदांडूच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. [ लहान भांडें.
**अवकरा** (फार. पु.) पाणी प्यावयाचें एक
**अवका** (सं. अप् स्त्री.) पाण्याचा शिपका.
**अवकारी** (वि.) मादक पदार्थासंबंधाचें; (स्त्री.) मादक पदार्थावरची जकात; मादक पदार्थ करण्याचा धंदा.
**अवजाळ** (सं. न.) आळ, आरोप.
**अवडधोवड** (वि.) बोजड, वेडब.
**अंव, अंवु** (सं. अंबु न.) पाणी.
**अंवट** (सं. अम्ल वि.) आम्ल; **अं० ओला**—कांहींसा ओला; **अं० ढाण**—अतिशय अंवट; **अं० शोकी**—भलत्याच चैनी करणारा; **अं० तोंड**—खिन्न मुद्रा.
**अंवणें** (क्रि.) अंवट होणें.
**अवदागीर** (फा. अफतावगीर न.) एक प्रकारचें शोभिवंत छत्र.
**अवदारखाना** (फा. आव पु.) स्वच्छ, गार पाणी ठेवण्याची जागा. [ अडकवण.
**अवनाळ** (न.) म्यानाच्या वरील बाजूचें
**अवब** (अ.) आश्चर्यवाचक उद्गार.
**अंवर** (सं. न.) आकाश; वस्त्र; एक सुगंधि द्रव्य; (फा. अंबार पु.) कोठार.
**अंवर, अंबुर** (पु.) जाड तार धरतां येईल असें गोल तोंडाचें हत्यार.
**अबरख** (न.) अभ्रक.
**अबरचबर** (न.) निःसत्त्व अन्न.
**अंबरस—आंबरस** (पु.) आंब्याचा रस.
**अंबराई** (हिं. आमराई स्त्री.) आंब्याच्या झाडांचा समुदाय.
**अबलक** (अर. अबलख वि.) पांढऱ्या व काळ्या दोन रंगांचा; बांडा, कवरा.
**अबला** (सं. स्त्री.) स्त्री.
**अंबला** (प्रा. वि.) अंवलेला.
**अंबवणें** अंवणें पहा.
**अंबशी** (वि.) मेघाच्या रंगाचें.
**अंबा** (सं. स्त्री.) देवी; आई.
**अंबा** (सं. आम्र पु.) आम्रवृक्ष किंवा त्याचें फळ; **अं० शिंपणें**—विवाहानंतर वधूवरांनीं मिळून करण्याचा एक विधि.
**अंबाडा** (पु.) वृक्षविशेष; स्त्रिया वेणी न घालतां केसांचा बुचडा बांधतात तो.
**अंबाडी** (स्त्री.) एक वनस्पति; तिचें फळ; तिचा काढलेला वाख.
**अबाधित** (सं. वि.) अनिर्बंध, मुक्त.
**अंबारखाना** (फा. पु.) धान्याचें कोठार.
**अंबारी** (अर. अमारी स्त्री.) हत्तीच्या पाठीवरचा आच्छादिलेला शोभिवंत हौदा; **उलटी अं०**—भिक्षेची झोळी.
**अबाशाई** (पु.) एक रंग.
**अंबाळ, अबाळी** (प्रा. स्त्री.) क्लेश.
**अबाळणें** (क्रि.) हेळसांड किंवा उपेक्षा करणें.
**अबीर** (हिं. पु.) एक सुगंधि पूड.
**अंबीर** (फा. अमीर पु.) सरदार.
**अंबील** (स्त्री.) नाचण्याचें पीठ आंबवून केलेला एक पातळ पदार्थ; गढूळ पाणी.
**अबुद्ध्या** (क्रि. वि.) अजाणतां.
**अंबु** (सं. न.) पाणी; **अंबुज** (न.) कमळ; **अंबु—द** (पु.) मेघ; **अंबु—धि** (पु.) समुद्र.
**अंबुखा** (प्रा. पु.) वृष्टि; शिंतोडा (ज्ञा० १६।२७–६१); गवसणी.
**अंबुयणें** (प्रा. क्रि.) पेटणें, विकोपास जाणें (ज्ञा० १३।७२२).
**अंबुला** (प्रा. पु.) नवरा.
**अंबुली** (प्रा. स्त्री.) स्त्री.
**अंबुसणें** (क्रि.) अंवणें.
**अंबूर** (पु.) खिळे उपटण्याची पकड.
**अंबूस** (वि.) किंचित् अंवट.
**अबेदबे** (स्त्री.) अरे तुरे; हमरी तुमरी.
**अंबें** (न.) वल्हें; **अंबेंकरी** (पु.) वल्हें मारणारा नावाडी.
**अंबेमोहोर** (पु.) उंची तांदुळाची एक जात.
**अबोट** (प्रा. पु.) अखंडित लेप.
**अंबोण** (न.) गुरांसाठीं धान्य, कोंडा इ० चें तयार केलेलें खाणें; विवाहांत विहिणींनीं परस्परांकडे शिधा, फराळाचें सामान, भाजीचीं डेखें इ० ची पाठविलेली देणगी.
**अबोल** (वि.) कमी बोलणारा.
**अबोला** (पु.) भाषण न करणें.
**अंबोशी** (स्त्री.) हिरव्या आंब्याच्या वाळविलेल्या फोडी.

**अंबोळी** (स्त्री.) पीठ आंबवून तव्यावर केलेला सच्छिद्र खाद्यविशेष; धिरडें.
**अब्ज** (सं. न.) कमळ; शंभर कोटींची संख्या.
**अब्धि** (सं. पु.) समुद्र.
**अब्रह्मण्य** (सं. न.) ब्राह्मणाला अनुचित किंवा अपायकारक कृत्य; भयंकर कृत्य; (अ.) आश्चर्याचा उद्गार.
**अब्रू** (फा. आब्रू स्त्री.) इज्जत, लौकिक.
**अब्रूदार** (वि.) सन्मान्य, प्रतिष्ठित.
**अब्द** (पु.) वर्ष; मेघ.
**अंभ** (सं. अंभस् न.) पाणी; **अंभोज** (न.) कमळ; **अंभोधि** (पु.) समुद्र.
**अभंग** (सं. वि.) भंग न पावणारा, अक्षय; (पु.) एक प्राकृत छंद. (सं. पु.) खडे बोल.
**अभंगी** (प्रा. ना.) अयोग्य रीत (ज्ञा० १८।२८०); (वि.) अविनाशी.
**अभंड** (प्रा. वि.) खोडसाळ; पुष्कळ; अमर्याद; (न.)पासंग; (ना. ७४३).
**अभद्र** (सं. वि.) अमंगळ; बीभत्स.
**अभय** (सं. न.) शिक्षा न देण्याविषयींचें अभिवचन; **अ० वचन**—सुरक्षितपणा-बद्दल दिलेलें वचन.
**अभयंकर** (वि.) सौम्य.
**अभर** (प्रा. वि.) भरपूर; (पु.) आकंठ तृप्ति; (सं. पु.) गांवचें उत्पन्न.
**अभर्तृका** (सं. स्त्री.) विधवा.
**अभा** (सं. आभा स्त्री.) प्रभा, कांति.
**अभागी** (सं. वि.) फुटक्या नशीबाचा.
**अभाव** (सं. पु.) मुळींच नसणें.
**अभावणी** (स्त्री.) शेतांत होणाऱ्या पिकाचा अंदाज.
**अभाविक** (सं. न.) श्रद्धा नसलेला.
**अभाळ** (सं. अभ्र न.) आकाश; मेघ-पटल; **अ० कोसळणें**—अनर्थ गुदरणें. **अ० फाटणें**—सर्व बाजूंनीं विपत्ति येणें.
**अभिचार, अभिचारू** (सं. पु.) जारण-मारण. [ परिवार.
**अभिजन** (सं. पु.) उत्तम कुल; कीर्ति;
**अभिजात** (सं. वि.) कुलीन; सभ्य; उच्च; सुसंस्कृत.
**अभिजित्** (न.) अठ्ठाविसावें नक्षत्र.
**अभिधान** (सं. न.) नांव.
**अभिन्नव** (सं. वि.) अभिनव, अपूर्व; (न.) नवल (ना० ६३०).
**अभिनंदन** (सं. न.) स्तुति, सत्कृत्याबद्दल आनंद मानणें किंवा व्यक्त करणें.
**अभिनय** (सं. न.) हावभाव, अंगविक्षेप.
**अभिनव** (सं. वि.) नवीन, अपूर्व.
**अभिनिवेश** (सं. पु.) अहंकार, अभिमान.
**अभिपट्टी** (स्त्री.) जादा कर.
**अभिप्राय, अभिप्राव** (सं. पु.) आशय, अर्थ; मत.
**अभिप्रेत** (न.) उद्देश, योजना.
**अभिभव** (सं. पु.) पराभव; उपमर्द; पीडा.
**अभिभवणें** (प्रा. क्रि.) उदय पावणें, (स्वा. दि. ५।८।८).
**अभिमत** (सं. वि.) पसंत, संमत.
**अभिमंत्रण** (न.) मंतरणें.
**अभिमान** (सं. पु.) योग्य गर्व; आपलेपण; ईर्ष्या.
**अभियत्न** (सं. पु.) जवळ नेणारा प्रयत्न.
**अभियुक्त** (सं. वि.) तत्पर; उद्योगी; निष्णात; प्रमाणभूत.
**अभियोग** (पु.) खटला.
**अभिराम** (सं. वि.) सुंदर, रमणीय.
**अभिरुचि** (सं. स्त्री.) आवड.
**अभिरूप** (सं. वि.) सदृश, सारखें.
**अभिलाष** (सं. पु.) **अभिलास** (प्रा.) लोभ, इच्छा; अपहार.
**अभिवादन** (सं. न.) नमन.
**अभिवृद्धि** (सं. स्त्री.) उत्कर्ष.
**अभिव्यक्ति** (स्त्री.) खुलासा; पूर्ण प्रगट करणें.
**अभिशाप** (सं. पु.) तळतळाट; आळ.
**अभिषेक** (सं. पु.) मंत्रयुक्त पाणी शिंप-डणें; स्नान.
**अभिसारिका** (सं. स्त्री.) प्रियकराकडे संकेतस्थानीं जाणारी स्त्री.
**अभिज्ञ** (सं. वि.) विशेष जाणणारा, निष्णात, कुशल.
**अभिज्ञान** (सं. न.) खूण, चिन्ह, ओळख.

अमर वाचनालय, सातारा.

अभीर (पु.) गवळी.
अभीष्ट (सं. न.) इच्छिलेली वस्तु; कल्याण.
अभुला (प्रा. वि.) न विसरणारा.
अभेद्य (सं. वि.) फोडण्यास अशक्य.
अभोट (पु.) पावसाळ्याची सुरवात.
अभ्यंग (सं. न.) स्नानापूर्वी तेल लावणें.
अभ्यंतर (सं. न.) आंतील भाग.
अभ्यर्थना (स्त्री.) प्रार्थना.
अभ्यागत (सं. पु.) पाहुणा.
अभ्यास (सं. पु.) आवृत्ति; सराव.
अभ्यासी (सं. वि.) व्यासंगी.
अभ्यस्त (वि.) निपुण.
अभ्युत्थान (सं. न.) सन्मानार्थ उठणें; उदय; उत्कर्ष; शस्त्र उचलणें.
अभ्युदय (सं. पु.) उत्कर्ष, भरभराट.
अभ्र (सं. न.) आभाळ, मेघपटल.
अभ्रक (सं. न.) पारदर्शक व पापुद्र्यांनीं युक्त असा एक खनिज पदार्थ. [आवरण.
अभ्रपडळ (सं. अभ्रपटल न.) मेघांचें
अभ्रा (सं. पु.) आच्छादन.
अमका (सं. अमुक वि.) फलाणा.
अमटी (स्त्री.) डाळीचें पीठ, चिंच किंवा अमसूल व मसाला वगैरे घालून केलेलें पातळ कालवण.
अमंगळ (सं. वि.) वाईट, अशुभ, घाणेरडें.
अमत्र (सं. न.) पात्र, भांडें; (मोरो० कृष्ण० ३४।२५).
अमदानी (फा. आमदनी स्त्री.) कारकीर्द, अंमल; भरभराटीचा काळ.
अमर (सं. वि.) मरण नसलेला; (पु.) देव; अ० पट्टा—मरणापासून भय नाहीं असें आश्वासन.
अमर्याद (सं. वि.) अतिशय, बेसुमार.
अमर्यादा (सं. स्त्री.) मर्यादेचा भंग; अपमान.
अमरावती (सं. स्त्री.) इंद्राची नगरी.
अंमल (अर. अमल पु.) सत्ता; अधिकार; कैफ.
अंमलदार (पु.) अधिकारी, कामदार.
अमली (अर. अमल वि.) कैफ करणारा; कैफ आणणारा.
अमसूल (न.) रातंबीची साल.

अमळ, अमळसा (अ.) किंचित्, थोडा.
अमा (सं. स्त्री.) अमावास्या.
अमा-प्रदक्षिणा (सं. न.) पृथ्वीवरून पहाणारास सूर्य व दुसरें एखादें खस्थ तेज हीं एकदां एके ठिकाणीं दिसल्यापासून पुन्हां त्याच ठिकाणीं दिसेतोंपर्यंत त्या दुसऱ्या तेजाची होणारी प्रदक्षिणा.
अमात्य (सं. पु.) प्रधान.
अमानत (अर. स्त्री.) ठेव; हिशोबांत न दाखविलेली रक्कम.
अमान्य (सं. वि.) असंमत; त्याज्य.
अमानित्व (सं. न.) निगर्वीपणा.
अमानुष (सं. वि.) अद्‌भुत; मनुष्याच्या शक्तीबाहेरचें; मनुष्याला न शोभणारें अर्थात् दुष्टपणाचें वगैरे.
अमावास्या (सं. स्त्री.) आवस; महिन्याच्या शेवटचा दिवस.
अमांश (पु.) आंव.
अमासा, असासें (प्रा. अ.) अंमळ.
अमित (सं. वि.) अमर्याद, असंख्य.
अमित्र (सं. पु.) शत्रु, वैरी.
अमीन (अर. पु.) न्यायाधीश; अधिकारी.
अमीर (अर. पु.) सरदार; अ० उमराव—सरदार मंडळी.
अमुक (सं. वि.) कोणीएक.
अमुत्र (सं. अ.) परलोकीं.
अमुळेपण (प्रा. न.) आपलेपण.
अमू (पु.) आईचा स्तन.
अमूप (प्रा. वि.) पुष्कळ, अमित.
अमूपार (प्रा. वि.) अनंत.
अमूर्त (सं. वि.) आकाररहित.
अमूल्य (सं. वि.) बिनमोल, अतिशय मूल्यवान्.
अमृत (सं. न.) अमरता देणारें देवाचें पेय, सुधा. अ० कळा—चंद्राची कळा; गालफड (दा० ३।५।४) अ० सिद्धियोग—शुभ काळ; अ० फळ—द्राक्ष; अ० ध्वनि—एक छंद.
अमेद्य, अमेध्य (सं. वि.) अपवित्र.
अमोघ (सं. वि.) अव्यर्थ, अचूक.
अमोल (वि.) भारी किमतीचा.

**अम्ल** (सं. वि.) अंबट; **अ० पित्त** (न.) एक रोग.
**अय** (सं. अयस् न.) लोखंड.
**अयणी** (प्रा. स्त्री.) समुदाय.
**अयता** (वि.) कष्टावांचून मिळालेलें.
**अयत्या पिठावर रेघा** (स्त्री.) श्रमावांचून मिळालेल्या पैशावर चैन.
**अयदी** (वि.) आळशी.
**अयन** (सं. न.) मार्ग; सूर्य-चंद्राचें दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे जाणें; सहामाही.
**अयनक** (पु. न.) लोखंडी भिंग, चष्मा.
**अयना** (फा. आयना पु.) आरसा.
**अयनी** (प्रा. स्त्री.) युक्ति; समुदाय.
**अयब** (अर. पु.) व्यंग, खोडी.
**अयस्** (सं. न.) लोखंड.
**अयस्कान्त** (सं. पु.) लोहचुंबक.
**अयाचितवृत्ति** (सं. स्त्री.) याचना न करतां मिळेल तेवढ्यावर संतोषानें राहणें.
**अयाळ** (फा. अयाल स्त्री.) मानेवरचे लांब केस.
**अयुत** (सं. वि.) दहा हजार.
**अयुक्त** (वि.) न जोडलेलें.
**अयोनिसंभव** (वि.) शुक्रशोणित संयोगानें उत्पन्न न झालेला.
**अर** (प्रा. पु.) अजगर.
**अरकस** (फा. अरकश न.) करवत.
**अरकसी** (पु.) करवतीनें काम करणारा. (न.) त्यानें केलेलें काम.
**अरखडा** अराखडा पहा.
**अरगजा** (हिं. पु.) एक सुवासिक पूड.
**अरगडी** (स्त्री.) खरीपाच्या पिकांपैकीं हलकी ज्वारी.
**अरगी पारगी** (स्त्री. ) आळीपाळी.
**अरड** (स्त्री.) तेल काढण्यासाठीं बिया भाजण्याची, उकळण्याची, ठेंचण्याची वगैरे क्रिया; आक्रोश.
**अरडाओरड** (स्त्री.) गलबला.
**अरडीदरडी** (प्रा. स्त्री.) झाडें-झुडपें.
**अरणी** (स्त्री.) जमिनीची हद्द दाखविण्यासाठीं घातलेला बांध; मैदान.
**अरण्य** (सं. न.) वन, झाडी; **अ० पंडित** (पु.) मूर्ख; **अ० रुदन**—निष्फळ आक्रोश, व्यर्थ श्रम.
**अरता, अरुता** (प्रा. अ.) इकडे.
**अरता परता** (वि.) क्षुद्र, किरकोळ. (अ.) जवळपास, कमज्यास्त.
**अरती** (स्त्री.) कंटाळा.
**अत्र** (क्रि. वि.) येथें.
**अरंदळणें** (क्रि.) ओरडणें; हातपाय आपटणें. [ (दा० ३।३।३७)
**अरंधें** (प्रा. न.) अनपत्यत्वाचें दुःख;
**अरब** (पु.) अरबस्थानांतील रहिवासी.
**अरबट चरबट** (वि.) वाईट, नीरस.
**अरंबळणें** (क्रि.) वरळणें.
**अरबा** (अर. वि.) चार; (पु.) आवेश, झटका. **अरबैन** (वि.) चाळीस.
**अरबी सन** (न.) अरबी वर्ष; सुरुसन पहा. अरबी वर्षांची संख्या येणेंप्रमाणें आहे—अहदे **इहदे**—१; **इसन्ने**—२; **सल्लास**—३; **अरबा**—४; **खम्मससिन**—५; **सव्वा**—६; **सम्मान**—७; **तिस्सा**—८; **अशर**—९; **अहद अशर**— १०; **इसन्ने अशर**—११; याप्रमाणें विसापर्यंत; **अशरीन**—२० **सल्लासीन**—३०; **अरबैन**—४०; **खमसैन** —५०; **मया**—१००; **मयातैन**—२००; **सल्लास मया**—३००; **अरबा मया**—४००; **खम्मस मया**—५००; **सित्तमया**—६००; **सब्बामया** —७००; **सम्मस मया**—८००; **निस्सामया**—९००; **अलफ**—१०००.
**अरबूज—द** (वि.) आडदांड, ओबडधोबड.
**अरब** (सं. अर्बुद न.) शंभर कोटि.
**अरवा** (स्त्री.) मर्जी.
**अरवस** (प्रा. पु.) अंकुर (ज्ञा० १५।१०९)
**अरवार, अरवाळ, अरु** (प्रा. वि.) हलका, मृदु, नाजूक; खोडकर; (मोरो० कर्ण० १२।२६); अनिवार (मोरो० कृष्ण० ८।१३७).
**अरविंद** (सं. न.) कमळ.
**अरशी** (हिं. आरसी स्त्री.) लहान आरसा; चष्मा, उपनेत्र.
**अरसपरस** (अ.) भोंवतालीं.

**अरसा** (पु.) एका बाजूस पारा लावून प्रतिबिंब पाहण्याकरितां तयार केलेली कांच.
**अरसिक** (वि.) रसिकता नसलेला.
**अरळ** (प्रा. वि.) मृदु, हलकें; संदिग्ध (सोहि० सिद्धान्त. रुक्मि० ३।२६).
**अराइणें** (प्रा. क्रि.) उत्पन्न करणें (ज्ञा० १६।१६०); अर्पण करणें.
**अराखडा** (पु.) रूपरेषा; कच्चा खरडा.
**अराजकता** (सं. स्त्री.) राजावांचून असण्याची स्थिति; शास्त्याचा अभाव.
**अराटी** (प्रा. स्त्री.) कांटी.
**अराध** (प्रा. ना.) श्रम (तुका० ३८२२).
**अराणूक** (प्रा. स्त्री.) प्रतिबंध; तृप्ति, आवड.
**अराबा** (फा. स्त्री.) नोकरचाकर, गाड्या-घोडे इ० सरंजाम; प्रपंच; डामडौल.
**अराव** (फा. पु.) आरास.
**अरि** (सं. पु.) शत्रु.
**अरिख** (सं. आर्ष वि.) ऋषिप्रणीत.
**अरिष्ट** (सं. न.) संकट, कठिण प्रसंग; मद्य.
**अरी** (स्त्री.) चांभाराची आर किंवा टोपणें.
**अरीन् वखत्** (फार. अ.) सध्यां.
**अरीभवन** (सं. न.) प्रकाश, उष्णता इ० च्या किरणांचें एका बिंदूपासून सरळ रेषांनीं चोहोंकडे बाहेर पडणें. [नापसंती
**अरुचि** (सं. स्त्री.) तोंडाची चव जाणें;
**अरुचिर** (वि.) कुरूप.
**अरुण** (सं. पु.) सूर्याचा सारथि.
**अरुता, अरू** (प्रा. स्त्री.) योग्यता; योग्य स्थान; अत्यंत जरुरी. [कडचें.
**अरुतें** (प्रा. अ.) अलीकडे (वि.) अली-
**अरुंद** (वि.) तोकडें; हवें त्यापेक्षां कमी रुंद.
**अरुंधती** (सं. स्त्री.) वसिष्ठाची पत्नी.
**अरुवार** (प्रा. पु.) अरवार पहा.
**अरुष** (सं. आर्ष वि.) विक्षिप्त, वेडेंवाकडें.
**अरेतुरे करणें** एकेरीवर येणें.
**अरेराव** (पु.) चढाईच्या गोष्टी सांगणारा, तिस्मारखान; टेकोजी.
**अरेरावी** (स्त्री.) फुशारकी, चढाई.
**अरोगण** (प्रा. न.) जेवण.
**अरोगणें** (प्रा. क्रि.) जेवणें (ना.९४७)
**अरोया** (प्रा. पु.) अपूर्व इच्छा (तुका. २६२६).
**अरोसा** (पु.) टोंक, अग्र.
**अरोळी** (स्त्री.) मोठी हांक.
**अरोतें** (प्रा. वि.) अल्पसें (अमृ०४।२१); अलीकडचें (ज्ञा. २।२।७४); (अ.) वांचून. [द्रवरूप सत्त्वांश.
**अर्क** (सं. पु.) सूर्य; रुई; औषधाचा
**अर्की** (सं. स्त्री.) रुईचें झाड. [(१९।१।३)
**अर्कुलें** (प्रा. न.) रेफाचें चिन्ह (दा०
**अर्गला, अर्गळा** (सं. स्त्री.) शृंखला, सांखळी, अगळ, अडसर, कडी.
**अर्घ्य** (सं. पु.) पूजा, अर्घ्या, सन्मान, (वि.) मूल्यवान्.
**अर्घ्या** (पु.) अर्घ्यपात्र.
**अर्चणें अर्चिणें** (क्रि.) पूजणें.
**अर्चन** (सं. न.) **अर्चा** (सं. स्त्री.) पूजा; पूजेची मूर्ति.
**अर्चिरामार्ग** (सं. पु.) सूर्यकिरणद्वारा जाण्याचा उर्ध्वगतिक मार्ग; उत्तम मार्ग.
**अर्ची** (सं. अर्चिस् स्त्री.) ज्वाला.
**अर्ज** (अर. पु.) विनंति, प्रार्थना; रुंदी.
**अर्जणें** (क्रि.) मिळविणें, संपादणें.
**अर्जंट** (इं. वि.) जरुरीचा, तांतडीचा.
**अर्जदार** (पु.) अर्ज करणारा, फिर्यादी.
**अर्जदास्त** (फा. पु.) लेखी अर्जी किंवा विज्ञापना (तुका० ४३५४).
**अर्जन** (सं. न.) संपादणें; प्राप्ति.
**अर्जित** (सं. वि.) मिळविलेलें.
**अर्जी** (हिं. स्त्री.) अर्ज, फिर्याद. अ० **इनाम** (फा. न.) नजर देऊन घेतलेलें इनाम.
**अर्जुनवाद्य** (सं. न.) शंख; बोंब.
**अर्णव** (सं. पु.) सागर, समुद्र.
**अर्ती** (सं. आर्ति स्त्री.) अपेक्षा, आवड. (ज्ञा० ६।३७२; रंग० पदें).
**अर्तु** (सं. आर्त पु.) रोगी.
**अर्थ** (सं. पु.) आशय, हेतु; बोध; विषय; धन, द्रव्य; चार पुरुषार्थांपैकीं एक; फायदा; फल; **अ० गौरव** (न.) अर्थाचा भारदस्तपणा. [राजनीति.
**अर्थशास्त्र** (सं. न.) संपत्तिशास्त्र;
**अर्थणें** (सं. क्रि.) इच्छिणें; प्रार्थणें.

**अर्यार्यी** (सं. वि.) कामी भक्त.

**अर्याअर्यी** (अ.) यत्किंचितहि.

**अर्थात्** (सं. अ.) ओघानेंच, साहजिकच; म्हणजे.

**अर्थान्तरन्यास** (सं. पु.) प्रकृत सामान्यार्थाचा बोध होण्याकरितां विशेष अप्रकृतार्थ सांगणें किंवा प्रकृत विशेषार्थ मनांत ठिवण्याकरितां अप्रकृत सामान्य अर्थ सांगणें.

**अर्थान्तरोपन्यास** (सं. पु.) सामान्यानें विशेषाचें किंवा विशेषानें सामान्याचें समर्थन.

**अर्थापत्ति** (सं. स्त्री.) अनमान, तर्क.

**अर्थालंकार** (सं. पु.) वाक्याच्या प्रधान अर्थास शोभा आणणारा अर्थ.

**अर्थी** (सं. वि.) गरजू, अर्जदार.

**अर्थेला** (प्रा. वि.) याचक.

**अर्ध** (सं. न.) निम्मा भाग **अर्ध नारीनटेश्वर** (पु.) उमामहेश्वर. या मूर्तीत अर्धे अंग शंकराचें अर्थात् पुरुषाचें व अर्धे पार्वतीचें अर्थात् स्त्रीचें दाखविलेलें असतें.

**अर्धचंद्र** (सं. पु.) अष्टमीचा चंद्र; गचांडी.

**अर्धवट** (वि.) अपुरा. [कपाळ दुखणें.

**अर्धशिशी** (सं. अर्धशीर्ष स्त्री.) अर्धे

**अर्धांगी** (स्त्री.) भार्या, बायको.

**अर्धामुर्धा** (वि.) सरासरी अर्धा.

**अर्धाला** (वि.) प्रत्येकीं अर्धा.

**अर्धासन** (न.) अर्धें आसन.

**अर्धी** (स्त्री.) (मुंबईत) पै.

**अर्धूक** (न.) अर्धा भाग. [सरकत.

**अर्धेल, अर्धेली** (स्त्री.) अर्ध्या भागाची

**अर्ध्या वचनांत असणें** अतिशय आज्ञाधारकतेनें असणें.

**अर्धोदयपर्व** (सं. न.) पौष किंवा माघ या महिन्यांत रविवारीं सूर्योदयीं अमावास्येचा प्रथम भाग, श्रवण नक्षत्राचा मध्यभाग व व्यतिपाताचा अंत्यभाग इतक्या गोष्टी ज्यांत जुळून येतात तो योग.

**अर्धोन्मीलित** (वि.) अर्धें उघडलेलें.

**अर्पण** (सं. न.) दान; वाहणें.

**अर्बुद** (सं. वि.) दहा कोटि संख्या; अवाळू.

**अर्भक** (सं. न.) लहान मूल. [तला.

**अर्वाचीन** (सं. वि.) अलीकडल्या काळां-

**अर्वाच्य** (सं. वि.) उच्छृंखल; द्वाड.

**अर्ह** (सं. वि.) योग्य.

**अलक** (सं. पु.) कुरळे केस.

**अलंकार** (सं. पु.) दागिना; शोभा आणणारी वस्तु.

**अलख** (प्रा. न.) अलक्ष्य; ब्रह्म (रंग० पदें) (वि.) अदृश्य (एक० १९.३५).

**अलग** (वि.) निराळा, स्वतंत्र; (अ.) हळूच धक्का न बसेल अशा रीतीनें.

**अलंग** (स्त्री.) चाल, बराक; खंदक.

**अलंगनोवत** (फा. अ.) स्वतंत्रपणें.

**अलगट** (प्रा. वि.) वेगळा (रंग०पदें) भटक्या (ना० २०५३).

**अलगत** (अ.) इकडे तिकडे न लागतां; न हालतां; हळूच; अलग. [मुरली

**अलगुजा, अलगुजें** (अर. पु. न.) पावा,

**अलगों** (प्रा. अ.) समोर.

**अलफ** (अर. वि.) एक हजार.

**अलबत, अलबत्ता** (फा. अ.) अर्थात्, खात्रीनें; निदान. [लुडबुड्या माणूस.

**अलबत्या गलबत्या** कोणी तरी यःकश्चित्

**अलबेला** (वि.) हलका; प्रिय.

**अलम** (वि.) सर्व, दरोबस्त.

**अलमारी** (पोर्तु० स्त्री. अलमारिया) खण असलेलें कपाट.

**अलम् दुनिया** (अर. स्त्री.) सारें जग.

**अलवान** (अर. न.) एक प्रकारची शाल.

**अलांछन** (वि.) निष्कलंक.

**अलायी कारखाना** (फा. पु.) प्रचंड किंवा अवाढव्य कारखाना.

**अलाद** (अ.) अलग.

**अलाप** (पु.) तान.

**अलाबु** (सं. पु.) भोपळा.

**अलाय बलाय** (हिं. स्त्री.) दुःख, संकट.

**अलायी** (अर. अलाही वि.) प्रचंड.

**अलाहिदा** (अर. वि.) निराळा, स्वतंत्र.

**अलि** (सं. पु.) कृष्ण भ्रमर. [(एक० १००२).

**अलिक** (न.) कपाळ.

**अलिकुळ** (सं. पु.) भ्रमरांचा समुदाय,

अलिखित (वि.) न लिहिलेला.
अलिगोल (हि. पु.) मराठ्यांच्या सैन्यांतलें विनकवायती पायदळ.
अलिता (सं. अलक्त पु.) अळता; लाखेचा तांबडा रंग.
अलिप्त (सं. वि.) अलग.
अलिशान (अर. वि.) उच्च दर्जाचा.
अलीकडे (अ.) या बाजूस; या काळांत.
अलुकी (प्रा. स्त्री.) व्यसन; भूक.
अलुते (पु.) बलुत्याच्या खालच्या दर्जाचे गांव-कामगार. हे बारा असत. त्यांचीं नांवें :—तेली, तांबोळी, साळी, माळी, जंगम, कळवांत, डवऱ्या, ठाकर, घडशी, तराळ, सोनार आणि चौगुला.
अलुलकी (फार. स्त्री.) मोहबत, कृपा, मेहेरबानी.
अलें, आलें (न.) ओली सुंठ, आलें.
अलेकम् सलाम (अर. अस्सलाम आलिकुम्) तुमच्याशीं सख्य राहो अशा अर्थाचा मुसलमानांतला नमस्कारवाचक शब्द.
अलेमान (अर. स्त्री.) उत्कृष्ट पोलादाची लांब वांकडी तलवार.
अलोचन जाग्रण (सं. न.) डोळ्याशीं डोळा न लागतां झालेलें जागरण.
अलोट (अ + लुट् बोलणें वि.) अनिर्वचनीय, अतिशय; अचूक; अचाट.
अलोढणें (सं. आलोडन क्रि.) धुंडाळणें (भा० २४।२०६).
अलोलीक (वि.) अपूर्व; नाजूक; प्रेमळ; (स्त्री.) आवड.
अलौकिक (सं. वि.) अपूर्व, विलक्षण.
अल्प (सं. वि.) थोडें, लहान.
अल्पकु (सं.वि.) दरिद्री (ज्ञा० १६।२२७).
अल्पप्राण (सं. वि.) ज्या व्यंजनाच्या उच्चारांत हकाराचा ध्वनि विशेषेंकरून नसतो तें.
अल्पविणें (क्रि.) बुडविणें (ज्ञा० ११।३१६)
अल्पसंख्याक (सं. वि.) थोडें.
अल्पस्वल्प (सं. वि.) थोडेंबहुत.
अल्विदा (अर. पु.) अखेरचा सलाम.
अल्लड (वि.) अप्रौढ, अपक्व बुद्धीचा.
अल्लाची गाय अतिशय सौम्य वृत्तीचा निरुपद्रवी मनुष्य.
अल्याडपल्याड (क्रि. वि.) अलीकडे पलीकडे
अल्हें (प्रा. अ.) लवकर, एकदम.
अवई, अवाई (स्त्री.) गप्प, खबर.
अवकटा (प्रा. अ.) अकस्मात्.
अवकळा (सं. स्त्री.) तेजोहीनता; दुर्दशा; दुश्चिन्ह.
अवकाश (सं. पु.) उशीर, वेळ; जागा; आकाश; (प्रा.) भेद; सामर्थ्य.
अवकाळ (प्रा. अ.) अलीकडेस; हल्लीं.
अवकृपा (सं. स्त्री.) इतराजी. [महद०).
अवकादा (प्रा. पु.) पृथक् ओझें (सोहि०
अवक्रिया (सं. स्त्री.) अपमान.
अवखळ (व.) चंचल, दांडगा. [सामर्थ्य.
अवखात, अवखाद (प्रा. स्त्री.) शक्ति,
अवखुळा (प्रा. पु.) आडकाठी.
अवगण (पु.) अवगणना (सं. स्त्री.) अनादर, उपेक्षा.
अवगणियेचें (प्रा. वि.) अलीकडचें (ज्ञा० ११।६३०–३१).
अवगणी (प्रा. ना.) सोंग (ज्ञा० ११।८४).
अवगणें (सं. क्रि.) ओळखला जाणें, (तुका० ४५७०); भासणें, दिसणें; समजणें (भा० ११।३६८); भुलण (सोहि० महदनु०); असणें (स्वा० दि० १।१।९९).
अवगणें (क्रि.) थांबणें, वाट पाहणें.
अवगत (सं. वि.) जाणिलेला.
अवगतणें (प्रा. क्रि.) अवलंबणें.
अवगमणें (सं. क्रि.) भासणें; जाणणें; वाटणें.
अवगळ (प्रा. वि.) अमंगळ.
अवगळणें (सं. क्रि.) टाकणें (ज्ञा० १८।२०४) अमंगळ मानणें; चुकून राहणें.
अवगळा (प्रा. पु.) हीनता. [७।७८).
अवगळें (प्रा. न.) खोलगटपणा (ज्ञा०
अवगाहन (सं. न.) बुडी मारणें, स्नान; पूर्ण अध्ययन.
अवगाळें (प्रा. न.) दलदल.
अवगु (प्रा. पु.) कलंक, दोष.
अवगुण (सं. पु.) दुर्गुण, खोड.

**अवगुंठन** (सं. न.) वेष्टन; आच्छादन.
**अवगुंठित** आच्छादिलेला; लपविलेला.
**अवगुनी** (प्रा. स्त्री.) स्वैरिणी.
**अवग्र** (सं. अव्यग्र वि.) सर्व.
**अवघड** (वि.) कठिण, दुष्कर, गैरसोयीचें, (प्रा. स्त्री.) अडचण. [ ताठून जाणें.
**अवघडणें** (क्रि.) अडचणींत सांपडणें,
**अवघा** (वि.) सगळा.
**अवघ्राण** (सं. न.) वास घेणें.
**अवचट** (सं. अवचित्त न.) अनपेक्षित प्रसंग किंवा संकट. [ मानसीं नसतां.
**अवचटें** (अ.) अकल्पित, अवचित, मनीं
**अवचित** (अ.) अकस्मात्.
**अवचितराव** (पु.) मूळचा आईबापांनीं टाकिलेला पण पालनकर्त्याची जिंदगी आयती हातीं घेऊन तिच्यावर मौजा करणारा.
**अवचिन्ह** (सं. न.) दुश्चिन्ह.
**अवजड** (वि.) बोजड, मोठा.
**अवजतन** (प्रा. ना.) अडचण. [ हत्यार.
**अवजार** (अर. न.) शीड; कारागिराचें
**अवझरता** (वि.) ओझरता.
**अवटळणें** (क्रि.) ताठरणें.
**अवटळा** (पु.) मानेंत किंवा दुसऱ्या कोणत्याहि अवयवांतील लचक.
**अवटी** (सं. अवट स्त्री.) नकशीकामाचा छाप; (पु.) दुकानदारांच्या वजनामापांवर देखरेख ठेवणारा कामदार; (प्रा.) ओहोटी.
**अवठाणूं** (न.) गळूं, उठाणूं.
**अवड** (स्त्री.) रुचि, पसंती. [ एक खेळ.
**अवडक चवडक** (न.) लहान मुलांचा
**अवडणें** (क्रि.) रुचणें.
**अवडतें** (प्रा. वि.) भलतें (ज्ञा० ६।३३७).
**अवडंबर** (सं. आडंबर न.) भपका, डौल; गर्व; आवेश; मेघाची किंवा हत्तीची गर्जना; आरंभ.
**अवडळु** (प्रा. वि.) किंचित्, थोडासा.
**अवढंगी** (वि.) वाईट चालीचा.
**अंवढा** (पु.) मुखांत सांचलेली थुंकी गिळण्यात येते ती.
**अंवतण, अवतणें** (सं. आमंत्रण न.) आमंत्रण, बोलावणें.
**अवतरण** (सं. न.) खालीं उतरणें; ग्रंथांतला किंवा भाषणांतला उतारा.
**अवतरणिका** (सं. स्त्री.) प्रस्ताव. सूचना.
**अवतरणें** (क्रि.) खालीं उतरणें; अवतार घेणें.
**अवतंस** (सं. पु.) कर्णभूषण; तुरा.
**अवतार** (सं. पु.) देवादिकाचें अन्यरूपानें पृथ्वीवर येणें; प्रादुर्भाव; भाषांतर; प्रस्तावना; स्वरूप. [ असलेला.
**अवतारी** (वि.) देवादिकांचा अवतार
**अवंति, अवन्तिका** (सं. स्त्री.) उज्जयिनी.
**अवतीर्ण** (सं. वि.) अवतरलेला.
**अवथिणें** (प्रा. क्रि.) योजणें (वामन० भीष्मयुद्ध ३).
**अवद** (प्राः पु.) अवधि.
**अवदशा, अवदसा** (सं. स्त्री.) दुर्दशा, अवकळा; कर्कशा स्त्री.
**अवदा** (सं. अवधि पु.) अवधि.
**अवदान** (सं. न.) एका आहुतीपुरतें होमद्रव्य; लांच वगैरे अन्यायानें मिळणारें द्रव्य.
**अवधण, अवधणा, अवधाण** (न.) एका ठिकाणीं दुखापत झाली असतां त्याच्या नसेवर दुसऱ्या ठिकाणीं दुःख उद्भवतें तें. **खाजवून अ०आणणें**– नसतें भांडण उकरून काढणें.
**अवधान** (सं. न.) लक्ष, चित्त.
**अवधानी** (वि.) एकाच वेळीं अनेक गोष्टी लक्षपूर्वक करणारा.
**अवधारा** (सं. स्त्री.) निश्चय करणें; चित्ताची स्थिरता.
**अवधारणें** (क्रि.) ऐकणें, लक्षांत ठेवणें, खात्री ठेवणें. [ वेळ; अंतर.
**अवधि** (सं. पु.) मर्यादा; अवकाश,
**अवधूत** (सं. पु.) विरक्त पुरुष; दत्तात्रेयाचा अवतार; (वि.) नग्न.
**अवध्य** (सं. वि.) न मारला जाणारा.
**अवन** (सं. न.) रक्षण. [ अपकर्ष.
**अवनति** (सं. स्त्री.) खालीं खालीं जाणें,
**अवनि** (सं. स्त्री.) पृथ्वी. [ स्नान.
**अवभृथस्नान** (सं. न.) यज्ञसमाप्तीचें

**अवमर्यादा** (सं. अमर्यादा स्त्री.) मर्यादेचा अतिक्रम.
**अवमान** (सं. न.) दुर्लक्ष; अपमान.
**अवमूलन** (न.) नाण्याची किंमत कमी होणें.
**अवयव** (सं. पु.) शरीराचा भाग.
**अवरठा** (पु.) ब्रह्मचारी.
**अवरपर** (प्रा. वि.) परोक्षापरोक्ष.
**अवरस** (सं. वि.) औरस किंवा स्वतःची (संतति).
**अवरस चवरस** (क्रि. वि.) सर्व बाजूंनीं, सभोंवतीं; लांबीकडून आणि रुंदीकडून (वि.) लांबीरुंदीनें सारखा.
**अवरात्र** (स्त्री.) रात्रीचा शेवटचा प्रहर.
**अवरी** (वि.) अविवाहित (कुमारी).
**अवरोध** (सं. पु.) अडथळा; अवष्टंभ; जनानखाना.
**अवरोह** (सं. पु.) **अवरोहण** (सं. न.) खालीं उतरणें; (गायनांत) उच्च स्वरापासून नीच स्वरांपर्यंत स्वरांचें आवर्तन.
**अवर्षण** (सं. न.) अनावृष्टि, पर्जन्याचा अभाव.
**अवल** (अर. वि.) पहिला, मुख्य; (अ.) पहिल्यांदा. (स्त्री.) प्रथम भाग.
**अवल अखेर** (अर. फा. अ.) आरंभापासून शेवटापर्यंत.
**अवलणें** (क्रि.) वल्हवणें; हांकारणें.
**अवलंब** (सं. पु.) **अवलंबन** (सं. न.) आश्रय, आधार; [ धरून राहणें.
**अवलंबणें** (क्रि.) आश्रय करणें, आधार
**अवलक्षण** (सं. न.) दुश्चिन्ह.
**अवलक्षणी** (वि.) दुर्गुणी, खोडसाळ.
**अवला** (प्रा. पु.) वल्हें; वल्हें हलविणारा; (प्रा. पु.) नवरा (अमृ० १।३४).
**अवळ** (वि.) घट्ट, अडस; संकुचित.
**अवळकठी** (सं. आमलक + काष्ठ स्त्री.) वाळवून ठेविलेली अंवळ्याची साल.
**अवळणें** (क्रि.) गच्च बांधणें.
**अवळसर** (वि.) कांहींसें घट्ट.
**अवळा, आंवळा** (सं. आमळक पु.) आंवळीचें फळ.
**अवळा देऊन कोहळा काढणें** (क्रि.) थोडया मोबदल्यानें मोठा फायदा साधणें.
**अंवळी** (स्त्री.) आंवळ्याचें झाड.
**अवळ्याएवढें पूज्य** (न.) शून्य, पूर्ण अभाव.
**अवळ्याची मोट** (स्त्री.) अशक्य घटना.
**अवलाद** (अर. स्त्री.) संतति; कुळी; व्रात्य.
**अवलावो** (सं. पु.) अवलंब.
**अवलाहो** (प्रा. पु.) अनिष्ट प्राप्ति
**अवलिया** (अर. अवली पु.) साधु, विदेही पुरुष; लहरी किंवा छांदिष्ट मनुष्य.
**अवलीळा** (सं. अवलीलया अ.) सहज, लीलेनें.
**अवलें** (प्रा. म.) वल्हें.
**अवलेह** (सं. पु.) चाटण.
**अवलोकणें** (क्रि.) पाहणें.
**अवलोकन** (सं. न.) निरीक्षण.
**अवशिष्ट** (सं. वि.) उरलेलें; बाकी.
**अवशी, अवशीस** (अ.) पूर्वरात्रीं.
**अवशेष** (सं. पु.) उरलेला भाग.
**अवश्य** (सं. अ.) जरूर; खात्रीनें.
**अवश्यक** (सं. वि.) जरुरीचा; अगत्याचा.
**अवश्यमेव** (सं. अ.) अगदीं जरूर.
**अवष्टंभ** (सं. पु.) प्रपंच (ज्ञा० ९।४१५); अहंकार (ज्ञा० १३।५२९); अष्टसात्त्विक भावांची ऊर्मि (ज्ञा० १८। १६२३); महत्त्व; अवरोध, अटकाव.
**अवस** (स्त्री.) अमावास्या.
**अवसति** (अ.) अकस्मात्.
**अवसर** (प्रा. पु.) अंगांत येणें (सो० हि०सिद्धान्त); अवकाश, फुरसत, प्रसंग.
**अवसरी** (प्रा. स्त्री.) अडचण.
**अवसात** (प्रा. अ.) अकस्मात्.
**अवसाद** (सं. पु.) थकवा, ग्लानि.
**अवसान** (सं. न.) समाप्ति; विराम; हिंमत; धैर्य; (गायनांत) सम; अ० **घातकी**—ऐन वेळीं हिंमत सोडणारा.
**अवसार** अवसर पहा.
**अवसो** (प्रा. पु.) रात्रीचा पूर्वभाग.
**अवस्तु** (न.) वस्तूचा अभाव.
**अवस्था** (सं. स्त्री.) उत्कंठा (ज्ञा० ६।१३१ रुक्मि० ५।४३); आस्था, आवड (भा० ९।५००); दशा, स्थिति; प्रसंग.

अवस्थिति (सं. स्त्री.) राहणें; स्थल.
अवसर (सं. अवसर पु.) वेळ, प्रसंग. (तुका० १५७१).
अवहेलना (सं. स्त्री.) हेटाळणी, अव्हेर.
अवक्षर (सं. न.) चकार शब्द; दुर्भाषण.
अवज्ञा (सं. स्त्री.) अनादर, तिरस्कार.
अवा (सं. अंबा स्त्री.) माया; स्त्री; (पु.) कुंभाराची भट्टी.
अवाई (स्त्री.) गप्प, बातमी, बोलवा.
अवांका (पु.) अवसान, हिंमत, आटोका, पकड, आकार; द्वैतविकल्प (भा० २। ७३४); अभिप्राय (भा० १७।१८).
अवाच्य (वि.) सांगण्यास कठिण.
अवाचे सवा, अवासवा (अ.) प्रमाणा-बाहेर, भलतेंच जास्त.
अवाज (पु.) शब्द; सूर. [गोड आवाज.
अवाजदारी (स्त्री.) सुरेल आवाज; मोठा व
अवाट (प्रा. वि.) आडमार्गानें जाणारा.
अवाड (न.) अंगण.
अवाडाव (स्त्री.) लूट, जाळपोळ, नाश.
अवाढव्य (वि.) विशाळ, फार मोठा.
अवांतर (सं. वि.) इतर; गौण.
अवाति (सं. स्त्री.) प्राप्ति, लाभ.
अवार (प्रा. वि.) मोठें, अपार.
अवारू (न.) साधन.
अवाळूं, अवाळें (न.) गळूं, उठाणूं.
अवाक्षर (न.) अशुद्ध उच्चार; एकहि अक्षर.
अविकारी (सं. वि.) विकृति न पावणारें.
अविचार (पु.) अविवेक.
अविच्छिन्न (सं. अ.) निरंतर; निवळ.
अविद्यमान (सं. वि.) अस्तित्वांत नसलेला उपस्थित नसणारा. [माया.
अविद्या (सं. स्त्री.) अज्ञान; भ्रामक ज्ञान,
अविंध (वि.) कान न टोंचलेला; (पु.) मुसलमान, यवन. [स्त्री.
अविधवा (सं. स्त्री.) पति जिवंत असलेली
अविधवानवमी (सं.स्त्री.) भाद्रपद वद्य ९.
अविनय (सं. पु.) गैरशिस्त वर्तन; गर्व, ताठा. [रहित असा.
अविनाश (पु.) शाश्वतता; (वि.)नाश–
अविलंब (पु.) शीघ्रता.
अविवक्षित (सं. वि.) अनिश्चित.
अविर्भव (सं. आविर्भाव पु.) प्रगटपणा.
अविश्रांत (सं. वि.) न थकणारा.
अविसाळें (प्रा. न.) पक्ष्याचें घरटें.
अवी (सं. अवि पु.) बोकड (मोरो० कृष्ण० ३८।४८).
अवीट (वि.) न बिघडणारा (रंग); कंटाळा न आणणारा; चवदार.
अवीस (सं. आमिष न.) मांस.
अवेच (वि.) चिक्कू, कृपण.
अवेला (पु.) चुलीच्या एका भागाचें नांव.
अवेव (सं. अवयव पु.) शरीरभाग.
अवेश (प्रा. पु.) अवकाश. [५।१).
अवेश्वरी (प्रा. अ.) वेळीं (शुभा०उद्यो०
अवेळ (स्त्री.) अयोग्य वेळ; उशीर.
अवो (प्रा. पु.) आकार; आव; स्फुरण.
अवो (संबो. अ.) अरे, अगे.
अव्यक्त (सं. वि.) अस्पष्ट, अदृश्य.
अव्यंग (सं. वि.) निर्दोष; पूर्ण.
अव्यंगवाणें (अ.) यथासांग.
अव्यभिचार (सं. पु.) एकनिष्ठता.
अव्यवस्था (सं. स्त्री.) घोटाळा, गोंधळ, गैरशिस्तपणा. [न पावणारा शब्द.
अव्यय (वि.) शाश्वत; (व्याक.) विकार
अव्याज (वि) निष्कपट; साधा. [काम.
अव्यापार (सं. पु.) भलतेंच किंवा अयोग्य
अव्याप्ति (स्त्री.) अपुरी व्याख्या.
अव्याहत (सं. वि.) सतत, चालणारें, अखंड; (अ.) सदोदित.
अव्हा (प्रा. वि.) उजवा; भलता, नियम-रहित. **अ० सव्हा**–इकडे तिकडे.
अव्हाटणें (प्रा. क्रि.) आडमार्गानें जाणें.
अव्हेर (सं. पु.) अवहेलना, अनादर.
अव्हेरणें (क्रि.) दुर्लक्ष करणें.
अंश (सं. पु.) भाग, खंड.
अशक्त (सं. वि.) दुर्बळ, दुबळा.
अशक्य (सं. वि.) न घडण्यासारखें.
अंशतः (सं. अ.) थोडथोडें, भागाभागानें.
अशन (सं. न.) भक्षण, भोजन.
अशनि (सं. पु.) वज्र.
अशर (अर. वि.) दहा.

**अशरीरिणी वाणी** (स्त्री.) आकाशवाणी.
**अशाश्वत** (सं. वि.) क्षणभंगुर, क्षणिक.
**अशिक्षित** (सं. वि.) न शिकलेला, अडाणी, गांवढळ.
**अशी** (सं. आशिस् स्त्री.) आशीर्वाद.
**अशील** (पु.न.) वकिलाचें कूळ.
**अशुचि** (वि.) अशुद्ध. [गवाळचा.
**अशुढाळ** (सं. अश्रु + ढाळ वि.) नेभळट,
**अशुद्ध** (सं. वि.) शुद्ध नव्हे तें, (न.) रक्त. [संकट.
**अशुभ** (सं. वि.) अमंगळ. (न.) पाप;
**अशेख** (सं. अशेष वि.) निःशेष, सर्व.
**अशेख** (वि.) एकंदर.
**अशोक** (पु.) वृक्षविशेष; बौद्धकालीन एक सम्राट्.
**अशौच** (सं. न.) मलिनपणा; सुएर; सुतक.
**अश्मरी** (सं. पु.) मूतखडा.
**अश्मा** (सं. पु.) प्रेतसंस्काराचे वेळीं ज्यावर पाणी ओततात तो दगड.
**अश्रफी** (फा. स्त्री.) सोन्याची मोहोर.
**अश्राप** (वि.) गरीब.
**अश्रायिणें** (क्रि.) आश्रय करणें.
**अश्रु** (सं. पु.) असू, टीप, डोळ्यांतलें पाणी.
**अश्लील** (सं. वि.) असभ्य, ग्राम्य; नीच.
**अश्व** (सं. पु.) घोडा.
**अश्वत्थ** (सं. पु.) पिंपळ.
**अश्विनी** (सं. स्त्री.) घोडी; पहिलें नक्षत्र.
**अश्विनीकुमार** (पु.) देवांचे वैद्य.
**अश्वमेध** (सं. पु.) सार्वभौम राजानें करण्याचा यज्ञ.
**अष्ट** (सं. वि.) आठ.
**अष्टक** (सं.न.) आठांचा समुदाय. [आकृति.
**अष्टकोण** (पु.) आठ कोन असलेली
**अष्टघ्राण** (स्त्री.) अतिशय दुर्गंधी.
**अष्टदिक्पाल** (सं. पु.) आठ दिशांच्या आठ रक्षक देवता. त्यांचीं नांवें—पूर्वेची इंद्र, पश्चिमेची वरुण, दक्षिणेची यम, उत्तरेची कुबेर, ईशान्येची ईश, आग्नेयीची अग्नि, नैर्ऋत्येची नैर्ऋत्य, व वायव्येची वायु.
**अष्टपदी** (स्त्री.) कविताविशेष.
**अष्टपुत्री** (स्त्री.) विवाहसमयीं नवरीस हळदीनें कांठ रंगविलेलें शुभ्र वस्त्र नेसवितात तें.
**अष्टपैलू** (वि.) अष्टकोनी; हरएक बाबतींत माहितगार व हुषार.
**अष्टभाव** (सं. पु.) साहित्यशास्त्रांत—स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, वेपथु, वैवर्ण्य, अश्रु व प्रलय हे आठ भाव.
**अष्टम** (सं. वि.) आठवा. [८वी तिथि.
**अष्टमी** (सं. स्त्री.) प्रत्येक पंधरवड्यांतली
**अष्टवर्ग्या** (पु.) मुलाच्या मुंजीच्या वेळीं त्याच्या बरोबर भोजनासाठीं मुंज झालेले आठ मुलगे बोलावितात त्यांतील प्रत्येक.
**अष्टाधिकार** (पु.) गांवासंबंधीं पाटील, कुलकर्णी, ज्योतिषी इत्यादिकांचे जे आठ अधिकार ते.
**अष्टाक्षरी मंत्र** (पु.) 'कसें करूं, काय करूं' हा मंत्र.
**अष्टावक्र** (वि.) आठ ठिकाणीं वाकडा.
**अष्टौप्रहर** (अ.) रात्रंदिवस.
**असकट** (प्रा. वि.) निर्मळ; सरसकट.
**असकें, असिकें** (प्रा. वि.) सर्व, असलेलें.
**असंख्य** (सं. वि.) अगणित. [माणूस.
**असंग** (सं. पु.) असाधु किंवा अयोग्य
**असंगति** (सं. स्त्री.) विरोध.
**असट** (प्रा. वि.) आसक्त, (तुका. २१८५); पातळसर, पानचट.
**असडा** (पु.) आंचका, हिसका (वि.) न सडलेला; गांवढळ, अशिक्षित.
**असडीक** (वि.) न कांडलेले.
**असत्** (सं. वि.) नसलेलें; वाईट.
**अस्ताई** (स्त्री.) ध्रुपदाच्या तीन भागांपैकीं पहिला.
**असतियें** (प्रा. अ.) यथाशक्ति.
**अस्तुरी** (स्त्री.) स्त्री.
**असतेनी** असूनहि.
**असत्य** (सं. वि.) काल्पनिक, खोटें.
**असंबद्ध** (सं. वि.) विसंगत; भलतेंच.
**असबाब** (अर. पु.) सामान.
**असंभड** (सं. असंबद्ध वि.) असंबद्ध, असंभाव्य (ज्ञा० १३।३१).
**असंभाव्य** (सं. वि.) असंभवनीय.

**असभ्य** (सं. वि.) हलकट, शिष्टाचार न पाळणारा.
**असमसहास** (प्रा.वि.) असंख्यात, (ज्ञा० ८।२४); अनिवार (भा०३।२६७).
**असमंजस** (सं. वि.) मूर्ख, मूढ, अडाणी; अविचारी.
**असमाई** (प्रा. वि.) न मावणारें.
**असमाधान** (सं. न.) अतृप्ति; नाखुषी; शारीरिक अस्वस्थता. [विस्तृत.
**असमास** (सं. वि.) अनिर्बंध, अमर्याद,
**असल** (अर. वि.) मूळचा; उत्तम; (प्रा. वि.) सुगम.
**असलग, असलंग** (प्रा. स्त्री.) संगत, (रामजोशी पृ०४४); (वि.) सुगम.
**असलणें** (क्रि.) उसळणें, (ज्ञा०१३।२६८)
**असला, असा** (वि.) या प्रकारचा.
**असलाई** (फा. स्त्री.) अस्सलपणा.
**असवर्ण** (सं. वि.) भिन्नवर्णाचा.
**असहकारिता** (सं. स्त्री.) दुसऱ्याशीं मिळून काम न करणें; मदत करण्यास नाकारणें.
**असहाय** (सं. वि.) एकटा.
**असह्य** (सं. वि.) सहन न होण्यासारखें.
**असांगडें, असांघडें** (प्रा. वि.) निरुपम.
**असा** (वि.) या जातीचा, असला.
**असा तसा** (वि.) सामान्य, हलका.
**असाधारण** (सं.वि.) लोकोत्तर, असामान्य, अप्रतिम.
**असाध्य** (सं. वि.) बरा न होण्याजोगा (रोग); अप्राप्य, अलभ्य.
**असाध्वस** (वि.) निर्भय.
**असान** (अर. न.) उपकार; दया.
**असांप्रत** (सं. वि.) अयुक्त, अनुचित.
**असामी** (अर. पु.) माणूस; ऋणको, भाडेकरी वगैरे; पटावर नांव असलेला; (स्त्री.) चाकरी; नेमणूक; पत्र (राजव्य. २८६). [पचपचीत.
**असार** (सं. वि.) शुष्क, नीरस, पाणचट,
**असाल** (अर. पु.) मध.
**असावणें** (क्रि.) अश्रुयुक्त होणें.
**असावध** (वि.) गैरसावध. [चें नांव.
**असावरी** (स्त्री.) गायनांत एका रागिणी-
**असाळी** (प्रा. स्त्री.) राक्षशीण, कृत्या.
**असि** (सं. पु.) तलवार.
**असिकें** (प्रा. वि.) सर्व.
**असित** (वि.) काळें.
**असिधारा** (सं. स्त्री.) तलवारीची धार किंवा अग्र. **अ०व्रत**—स्त्रीपुरुषांनीं संगमनिवारणार्थ उभयतांच्या मध्यें नागवी तलवार ठेवून एका शय्येवर निजणें. तरुण स्त्री व पुरुष एका शय्येवर असतां त्यांच्या मनोविकारांचें संयमन होणें फार कठीण असतें. यावरून अत्यंत दुर्घट व्रत असा अर्थ रूढ झाला.
**असिलता** (स्त्री.) तलवार.
**असिवार** (प्रा. पु.) खड्गधारी; घोडेस्वार (रं० यो० ८।४१५).
**अॅसिड** (इं. न.) अम्ल, तेजाव.
**असीग** (प्रा. वि.) गौण.
**असीम** (वि.) अमर्याद.
**असु** (सं. पु.) प्राण.
**असुखी** (सं. वि.) बेचैन.
**असुडणें** (क्रि.) हिसकणें; फेंकणें.
**असुद** (सं. अशुद्ध न.) रक्त.
**असुदें** (फा. आसुदा वि.) आयतें (दा० २।२।२६); ताजें; मोकळें; अननुभवी.
**असुर** (सं. पु.) दैत्य, दानव, राक्षस.
**असुरबाड** (प्रा. पु.) त्रास, कष्ट.
**असुरी** (सं. वि.) राक्षसी, धाडसी.
**असू** (सं. अश्रु पु. न.) अश्रु पहा.
**असूड** (पु.) चाबूक, कोरडा.
**असूत, असूद** (न.) ठसका; रक्त.
**असूया** (सं. स्त्री.) मत्सर, द्वेष.
**असूर** (न.) रक्त.
**असोला** (वि.) न सोललेला (नारळ).
**असोशी** (स्त्री.) अतृप्ति, हाव.
**असोस, असोसा** (प्रा. वि.) फार मोठें, सहन न होणारें; (पु). उत्कट प्रेम; हाव (नाम० ४८).
**असोळी** (प्रा. स्त्री.) पक्ष्याचें घरटें.
**अस्करणें** (प्रा. क्रि.) धिक्कारून बोलणें.
**अस्करा** (प्रा. ना.) ख्याति, कीर्ति.
**अस्खलित** (सं. वि.) अखंड, अचूक.
**अस्त** (सं. पु.) अंतर्धान, मावळणें, शेवट.
**अस्तंगत** (वि.)मावळलेला, अदृश्य झालेला.

**अस्तनी** (फा. स्त्री.) बाही; अ० तील निखारा–घरभेद्या, दगलबाज मित्र.
**अस्तमान** (सं. न. पु.) सूर्यास्ताची वेळ.
**अस्तर** (फा. न.) कपड्याच्या आंतील बाजूस लाविलेलें कापड.
**अस्तवणें** (प्रा. क्रि.) मावळणें.
**अस्ताई** (स्त्री.) ध्रुपदाच्या तीन भागांपैकीं पहिला.
**अस्ताचल** (सं. पु.) सूर्यास्ताची जागा (पश्चिमेकडील पर्वत).
**अस्तावा** (पु.) रातकिडा (राजव्य.८३).
**अस्ताव्यस्त** (सं. अस्तव्यस्त वि.) अव्यवस्थित, बेशिस्त.
**अस्तित्व** (सं. न.) असण्याचा धर्म किंवा स्थिति.
**अस्तु** (सं. अ.) असो.
**अस्तुरी** (सं. स्त्री.) स्त्री (ऐति०पो०).
**अस्तेय** (सं. न.) चोरी न करणें.
**अस्पृश्य** (सं. वि.) स्पर्श करण्याला अयोग्य, अपवित्र.
**अस्त्र** (सं. न.) फेंकण्याचें हत्यार. [प्रसंगीं.
**अस्थानीं** (अ.) अयोग्य ठिकाणीं किंवा
**अस्थायी** (सं. वि.) चिरकाल न राहणारें.
**अस्थि** (सं. न.) हाड.
**अस्थिपंजर** (सं. पु.) हाडांचा सांपळा.
**अस्थिर** (सं. वि.) चंचल, क्षणिक.
**अस्पर्श** (सं. अस्पृश्य वि.) स्पर्श करण्यास अपात्र; अशुद्ध; रजस्वला; विटाळशी.
**अस्मतपना–न्हा** (फा. स्त्री.) सामान्य कुलीन स्त्रीला पत्रांत लिहिण्याचा मायना.
**अस्मादिक** (सं. सर्वनाम) आम्ही.
**अस्मान** (फा. न.) आकाश.
**अस्मानी** (वि.) आकाशासारख्या निळ्या रंगाचें; अ० सुलतानी– अस्मानी म्ह० दैवी व सुलतानी म्ह० राजाज्ञेनें प्राप्त झालेली संकटावस्था.
**अस्वरस** (पु.) नापसंति.
**अस्वल** (पु. न.) रीस.
**अस्वास्थ्य** (सं. न.) चैन न पडणें; आजार; दुःख; काळजी.
**अस्सल** (अर. असल वि.) मूळचा; खरा.
**अहंकार** (सं. पु.) अहंकृति (स्त्री.), **अहंता** (स्त्री.) **अहंभाव** (पु.) मीपणा, गर्व.
**अहटणें** (क्रि.) पळीनें घाटणें.
**अहमहमिका** (सं. स्त्री.) स्पर्धा. [दिवस.
**अहर्निश, अहर्निशी** (सं. अ.) रात्रं-
**अहल्या** (स्त्री.) पांच पतिव्रतांपैकीं एक.
**अहंप्रेमी** (वि.) स्वतःवर लुब्ध असलेला.
**अहंमन्य** (वि.) स्वतःस मोठें मानणारा.
**अहवाल** (हिं. स्त्री.) हकीकत, रिपोर्ट.
**अहळणें** (प्रा. क्रि.) तापणें.
**अहळवहळ** (प्रा. अ.) अघळपघळ. (भा० ३।४७९).
**अहळी** (प्रा. स्त्री.) उष्णता, तेज.
**अहळींव** (न.) एक पौष्टिक वनस्पतिबीज.
**अहा, अहाहा** (अ.) आनंद, खेद इ० चे वाचक उद्गार.
**अहाई** (स्त्री.) अग्नीची धग, झळई, शोक, आंच. [५।६९).
**अहाकट** (प्रा. पु.) शोक (रुक्मिणी०
**अहाःकार** (पु.) आक्रोश, आकांत.
**अहाच** (प्रा. अ.) वरवर, सहज रीतीनें.
**अहाटणें** (प्रा. क्रि.) ठेचणें, चिरडणें, रगडणें; भिसळणें.
**अहाणा** (प्रा. वि.) आत्मघातकी (ज्ञा० २।१९६); (ना.) विवाहासारख्या प्रसंगीं स्त्रिया करतात ती गमतीची शब्दरचना.
**अहारोळी** (स्त्री.) फुपाट्यांत किंवा निखाऱ्यांवर भाजलेला रोट. [उत्कंठा.
**अहाळणी** (प्रा. स्त्री.) उष्णता; अतिशय
**अहाळणें** (प्रा. क्रि.) पोळणें.
**अहि** (सं. पु.) सर्प.
**अहित** (सं. पु.) शत्रु; (न.) अकल्याण; (वि.) हानिकारक.
**अहिमहि** (पु.) रामानें मारलेले पाताळांतले दोन राक्षस. यावरून दोघांच्या जोडीला हें नांव देतात.
**अहिराणी** (स्त्री.) खानदेशांत चालू असलेली मराठीची एक पोटभाषा.
**अहिरण, अहिरणी** (प्रा. स्त्री.) ऐरण.
**अहिरा, अहेरा** (पु.) डोळ्याचा एक रोग; तांबूस रंगाचा व कठीण असा एक मणि.

**अहिंसा** (सं. स्त्री.) प्राण्यास न मारणें, न दुखविणें.

**अहीर** (सं. अभीर पु.) गवळी. [न केलेलें.

**अहेतुक** (सं. वि.) निःस्वार्थ, हेतुपुरस्सर

**अहेवनवमी** (स्त्री.) भाद्रपद कृष्ण नवमी. सुवासिनीपणें मेलेल्या स्त्रीचें श्राद्ध ज्या दिवशीं करतात ती तिथि.

**अहेर** (पु.) मंगलकार्याचे प्रसंगीं आप्तवर्गाकडून देण्यांत येणारी देणगी.

**अहेरण** (प्रा. स्त्री.) ऐरण.

**अहेव** (सं. अविधवा स्त्री.) सुवासिनी; अ०दोर–मंगळसूत्र; अ० पण–सौभाग्य.

**अहोपी** (प्रा. वि.) लोभी.

**अळंगें विळंगें** (न.) आळापिळा.

**अहोरात्र** (अ.) रात्रंदिवस. [मंगळ.

**अळंटाळं** (स्त्री.) चुकवाचुकव, टंगळ-

**अळण** (न.) भाजीला दाटपणा आणण्यासाठीं लावण्याचें पीठ.

**अळणी** (सं. अलवण वि.) कमी मिठाचा; मीठ न घातलेला; मिळमिळीत.

**अळता** (सं. अलक्तक पु.) लाखेचा तांबडा रंग.

**अळपणें** (क्रि.) वेष्टून बांधणें.

**अळपा** (पु.) वेढा.

**अळवळीत, गळवळीत** (वि.) भला, मनमिळाऊ, सहज वळणारा.

**अळंबें** (न.) भुईछत्री.

**अळवट** (स्त्री.) नांगरलेली जमीन साफ करण्याचें हत्यार.

**अळविणें** (क्रि.) गोड शब्दांनीं प्रसन्न करणें; विनवणें; सुस्वरानें गाणें.

**अळशी** (स्त्री.) जवस.

**अळा** (पु.) बांध, नियमन.

**अळापिळा** (पु.) अंगाचा मुरडा.

**अळिउळ** (सं. अलिकुल पु.) भ्रमरांचा समुदाय (ज्ञा० ११।२४९).

**अळी** (सं. अलि पु.) कृमी, सुरवंट.

**अळीकर** (प्रा. वि.) छांदिष्ट.

**अळीमिळी गुपचिळी** गप्प बसणें.

**अळुकी** (प्रा. ना.) आवड; भूक (अमृ. प्र. १।५); (वि.) भुकेलेली.

**अळुकैलें** (प्रा. वि.) भुकेलें.

**अळमाळ** (प्रा. वि.) किंचित्, थोडें विस्मृत.

**अळूं** (न.) एका पालेभाजीचें नांव; अ० वरचें पाणी–अशाश्वत वस्तु.

**अळें** (सं. आलवाल न.) झाडाच्या मुळाशीं पाणी राहण्याकरितां घातलेलें कोंडाळें किंवा बांध.

**अळेंबळें** (अ०) कसेंतरी; संकटानें, प्रयासानें.

**अळोंच** (प्रा. पु.) सूक्ष्म ध्वनि (ज्ञा० ६।२३१).

**अळोंचणें** (प्रा. क्रि.) हळून सांगणें.

**अक्ष** (सं. पु.) फांसा; अक्षक्रीडा–द्यूत.

**अक्षत** (स्त्री.) देवपूजेस लागणारे तांदूळ; निमंत्रण; कपाळीं लावण्याच्या गंधांत काळ्या रंगाचा ठिपका लावितात तो; अ० देणें–आमंत्रण करणें (ज्ञा० १८।२७३). अ० तृतीया–वैशाख शु० ३; **अक्षता पडणें**–लग्न होणें.

**अक्षतयोनि** (सं. स्त्री.) कुमारी.

**अक्षयवट** (पु.) प्रयागजवळील प्रसिद्ध वटवृक्ष. [जपमाळ.

**अक्षमाळा** (सं. स्त्री.) मण्यांची माळ;

**अक्षय** (सं. वि.) अविनाशी.

**अक्षयीं** (क्रि. वि.) नेहमीं; वारंवार.

**अक्षर** (सं. न.) स्वर किंवा स्वरयुक्त व्यंजन; अ०शत्रु–अशिक्षित, निरक्षर.

**अक्षरशः** (अ.) अक्षरागणिक.

**अक्षवाण** (सं. न.) आरती, ओवाळणी.

**अक्षि** (सं. अक्षिन् न.) डोळा, नेत्र.

**अक्षीं** (अ.) सदोदित; निखालस.

**अक्षीर** (वि.) अरुंद.

**अक्षुण्ण** (सं. वि.) न झिजलेला.

**अक्षोभ** (वि.) फार खोल.

**अक्षौहिणी** (सं. स्त्री.) २१८७० हत्ती, तितकेच रथ, ६५६१० घोडे, व १०९३५० पायदळ मिळून होणारें सैन्य.

**अज्ञ** (सं. वि.) मूर्ख, अजाण.

**अज्ञातवास** (सं. पु.) गुप्तपणें राहणें.

**अज्ञान** (सं. न.) ज्ञानाचा अभाव; भ्रमात्मक ज्ञान; (वि.) अडाणी, अजाण.

**अज्ञेय** (सं. वि.) विचारशक्तीच्या पलीकडील.

नगर वाचनालय, सातारा.



# आ

[ टीप—आनें प्रारंभ होणारे कित्येक शब्द अ हें अक्षर आरंभीं घालून लिहिण्याचाहि प्रघात आहे. म्हणून असे शब्द आ खालीं न आढळल्यास अ खालीं पहावे. ]

**आ** दुसरा स्वर; मर्यादा व अभिवृद्धि यांचा दर्शक संस्कृत उपसर्ग; (पु.) पसरलेलें तोंड; पक्ष्यास बोलाण्याचा शब्द.

**आइकणें** (क्रि.) ऐकणें (कवितेंतील रूप).

**आइणी** (प्रा. स्त्री.) सामर्थ्य.

**आइती** (प्रा. स्त्री.) सामग्री, डौल (स्वा० दि० ५।१।३७); तयारी (रुक्मिणी० १४।५२); विस्तार; ऐट.

**आइतें** (प्रा. वि.) सहज; (अ.) स्वतः—सिद्ध (भा. १०।१११); (न.) स्वयंपाकाचें साहित्य.

**आइतोजी** (वि.) काम न करतां फुकट उपभोग घेणारा.

**आइसा, आइसी** (प्रा. भा.) लक्ष्मी.

**आई** (स्त्री.) माता; **आईजीच्या जिवावर बाईजी उदार**—दुसऱ्याची मालमत्ता सढळ हातानें खर्च करणारा.

**आईभाई उद्धारणें** आईवरून शिवी देणें.

**आईक** (प्रा. वि.) ऐकीव (वामन०बालक्रीडा ७३).

**आईस्क्रीम** (इं. न.) बर्फाच्या योगानें घट्ट केलेलें शर्करायुक्त दूध.

**आउठावें** (प्रा. वि.) साडेतीन मात्रांच्या पलीकडील म्ह०ब्रह्मपद (तुका०४३२५)

**आउत्या** (पु.) शेतांत काम करणारा.

**आउक्ष** (बायकांच्या भाषेंत) आयुष्य; आ० वान्—आयुष्मान्.

**आऊ** (स्त्री.) वृद्ध स्त्री; स्त्रियांच्या नांवामागें बहुमानार्थ जोडावयाचा शब्द. हा मराठ्यांत लावतात.

**आऊत, आऊतफाटा** (सं. आयुध न.) शेतकीच्या उपयोगाचें सामान.

**आऊतकी** (स्त्री.) प्रत्येक नांगराच्या मागें कांहीं ठराविक माप पाटलाचा हक्क म्हणून देण्यांत येई तें.

**आक** (पु.) गाडीचा कणा.

**आकंठ** (सं. अ.) गळ्यापर्यंत.

**आकंठणें** (प्रा. क्रि.) गांठणें, आटोपणें.

**आकडसासू** (स्त्री.) वडील मेहुणी.

**आंकडा** अंकडा पहा.

**आकण** (प्रा. स्त्री.) दुसऱ्यांदा मळलेलीं कणसें; धान्यांतील खडा-माती (ज्ञा० यो०१।४४).

**आंकण** (प्रा. न.) पराक्रमसूचक पादभूषण (भा० १९।१४३.)

**आंकणकडवें** (न.) गाण्यांतील पालुपद; त्याच त्या गोष्टीची पुनरावृत्ति.

**आकर** (सं. पु.) खाण, ठेवा.

**आंकरा** (सं. अंकुर स्त्री.) कोंब.

**आकर्ण** (सं. अ.) कानापर्यंत.

**आकर्णणें** (सं. क्रि.) ऐकणें.

**आकर्णन** (सं. न.) ऐकणें, श्रवण.

**आकर्णवरी** (अ.) कानापर्यंत.

**आकर्णित** (सं. वि.) ऐकलेला.

**आकंपित** (न.) नृत्यांतील एक अभिनय.

**आकवंद** (वि.) संपूर्ण.

**आकल्प** (का.अ.) जगाच्या अन्तापर्यंत.

**आकर्षक** (वि.) ओढणारें, वेधणारें.

**आकर्षण** (सं. न.) ओढणें, ओढा; संकोच.

**आकर्षणें** (सं. क्रि.) ओढणें.

**आकर्षित** (सं. वि.) ओढलेलें; संकुचित.

**आकलन** (सं. न.) धरणें; ग्रहण करणें; स्वाधीन ठेवणें; दाब.

**आकला** (प्रा. वि.) अंकित.

**आकस** (प्रा. पु.) द्वेष.

**आकसणें** (क्रि.) लांबीरुंदी कमी होणें.

**आकसा बोकशीं** (क्रि. वि.) मोठे लांबलचक सूर काढून (रडणें.).

**आकस्मिक** (वि.) अवचित घडलेलें.

**आकळ** (प्रा. वि.) अत्यंत ज्ञानी; (न.) परब्रह्म.

**आकळणें** (प्रा. क्रि.) जाणणें; बांधणें. (ज्ञा० २।१२३); समाविष्ट करणें.

**आकांत** (सं. पु.) कल्लोळ, गोंधळ.

**आकार** (सं. पु.) आकृति, स्वरूप; जमाबंदी; रकम; अंदाज; रीत, प्रकार.

**आकारणी** (स्त्री.) पतबंदी; हिशोबानें रक्कम आकारणें; दर; वर्गणी.

**आकारणें** (प्रा. क्रि.) बोलावणें; रंग-रूपास आणणें; घ्यावयाची रकम ठरविणें.

**आकाश** (सं. न.) पंचमहाभूतांपैकीं एक; आभाळ; शून्य जागा; **आ० पाताळ एक करणें**–आकांत करणें; **आ० ची कुऱ्हाड**–दैविक हानि; **आ० ठेंगणें होणें, आ० पाताळ एक होणें**–गर्वानें फुगून जाणें.

**आकाशकुसुम** (सं. न.) असंभाव्य किंवा अवास्तविक गोष्ट; खपुष्प.

**आकाशगंगा** (सं. स्त्री.) मंदाकिनी, स्वर्गंगा; आकाशांत ताऱ्यांचे पुंजके मिळून दिसणारी नदीच्या प्रवाहासारखी आकृति.

**आकाशदिवा** (पु.) आश्विन शु० १५ पासून एक महिनाभर प्रत्येक रात्रीं उंच काठीला किंवा झाडाला अडकवून ठेव-तात तो (कागदाचा) दिवा.

**आकाशनगर** गंधर्वनगर पहा.

**आकाशपाणी** मद्य, ताडी किंवा माडी.

**आकाश भाषण** (सं. न.) नाटकांत रंग-भूमीवर नसलेल्या दुसऱ्या एकाद्या पात्राचे जे शब्द आपण ऐकत आहों असें रंगभूमीवरील पात्र हावभावादि-कांनीं सुचवितें व त्यास उत्तर देतें ते शब्द.

**आकाशयान** (सं. न.) विमान.

**आकाशवाणी** (सं. स्त्री.) आकाशांतून येणारे देवाचे शब्द; रेडिओ.

**आकांक्षा** (सं. स्त्री.) इच्छा, मागणी.

**आकांक्षित** (सं. वि.) इच्छिलेलें.

**आकांक्षा** (सं. वि.) इच्छा करणारा.

**आकीर्ण** (सं. वि.) व्याप्त, पूर्ण.

**आकुंचन** (सं. न.) संकोचणें, आक्रसणें.

**आकुंचित** (सं. वि.) संकुचित; लहान.

**आकुल** (सं. वि.) पूर्ण; व्याप्त.

**आकुलित** (सं. वि.) आकुल.

**आकूत** (सं. पु.) हेतु, अभिप्राय, इच्छा.

**आकृति** (सं. स्त्री.) आकार, मूर्ति.

**आकृष्ट** (सं. वि.) ओढलेला, आकर्षित.

**आकोल, आंकोल** (न.) सोललेली चिंच.

**आक्ट** (इं. ॲक्ट पु.) कायदा.

**आक्टोबर** (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा दहावा महिना.

**आक्रंदणें** (सं. क्रि.) रडणें, आकांत करणें.

**आक्रंदन** (सं. न.) आरडाओरड.

**आक्रमण** (सं. न.) वलांडणें; हल्ला.

**आक्रमशक्ति** (सं. स्त्री.) आवांका, सामर्थ्य.

**आक्रांत** (सं. वि.) दडपलेला; (पु.) आकांत.

**आक्रोश** (सं. पु.) आकांत, कल्होळ.

**आंख** (सं. अक्ष पु.) अंक; नेत्र; डोळा व कान यांच्यामधलें मर्मस्थळ; गंड-स्थळ; चाकाचा कणा.

**आखडणें** (सं. आकुंचन क्रि.) आटोपतें घेणें; आखुड करणें किंवा होणें.

**आखंडल** (सं. पु.) इंद्र.

**आखत** (सं. अक्षत स्त्री.) अक्षता.

**आखर** (सं. अक्षर न.) अक्षरत्व, अवि-नाशीपणा; गुरांचें गोठण (भा०५। ४११); गांवाची हद्द; विश्रांतिस्थान (ऐ० पो०); (न.) गांवाजवळचें शेत.

**आखरपख** (पु.) पितृपक्ष; सर्वपित्री अमावास्या.

**आखाड** (सं. आषाढ पु.) आषाढाचा महिना; **आ० पाटी**—लग्नानंतरच्या पहिल्या आषाढांत जावयाकडे फळें, खेळणीं वगैरेची पाटी पाठवितात ती; **आ० सासरा, आ० सासू**—नसता मोठपणा आपल्याकडे घेऊन कडक अंमल चालवूं पाहणारें मनुष्य.

**आखाडखाना** (फा. पु.) शस्त्रागार.

**आखाडभूती** (सं. वि.) ठक; ढोंग.

**आखाडा** (पु.) कुस्तीची जागा; **आ० त उतरणें**–वादास सिद्ध होणें.

**आखात** (सं. न.) समुद्राचा जमिनीवर लांवपर्यंत गेलेला फाटा.

**आखाडी** (स्त्री.) आषाढी पौर्णिमा; पाव-साची झडी, टंचाई, दुष्काळ.

**आंखिली** (प्रा. वि.) नेमकी (भा० ११।१५२५).

**आंखी** (स्त्री.) आंकडी.

**आंखु** (सं. अक्ष पु.) आंस, कणा.

**आखु** (सं. पु.) उंदीर.
**आखुड** (सं. अखुड् वि.) कमी; लहान.
**आंखें** (न.) अखें पहा.
**आंखेंलेखें** (प्रा. अ.) आंकडे मांडून (ज्ञा० १३।८४७).
**आख्या** (सं. स्त्री.) नांव; कीर्ति.
**आख्यान** (सं. न.) कथा, चरित्र.
**आख्यायिका** (सं. स्त्री.) दंतकथा.
**आग** (सं. अग्नि स्त्री.) विस्तव; अग्नीचा भडका; दाह; **आग लावणें**–कलागत लावणें; आ० त तेल ओतणें-विकोपास जाईल असें करणें; **आग पाखडणें**— शिव्यांचा वर्षाव करणें.
**आंग** (प्रा. न.) अवयव; रूप.
**आगकाडी** (स्त्री. ना.) जिच्या एका टोंकाला ज्वालाग्राही द्रव्य लाविलेलें असतें व म्हणून जी विशिष्ट द्रव्य लाविलेल्या पृष्ठभागांवर घासल्याबरोबर पेट घेते अशी लाकडाची काडी.
**आगगाडी** (स्त्री.) पाण्याच्या वाफेनें चालणारी गाडी. [खोडसाळ.
**आगजाळ्या** (वि.) आग लावणारा,
**आंग झाडणें** मालकी देऊन टाकणें (ज्ञा० १७।३७२).
**आगट** (न.) प्रेतयात्रेचे वेळीं ज्यांतून अग्नि नेतात तें मडकें.
**आगटी** (स्त्री.) अगटी पहा.
**आंगठसा** (प्रा. पु.) शरीराचा बांधा.
**आगड** (प्रा. पु.) खंदक; खळगा; लवणीची वाट (भा० ३१।४००).
**आगडा** (प्रा. अ.) बळजबरीनें (ज्ञा० यो० ६।११७.)
**आंगडें** (प्रा. न.) वेष (तुका० ३७६२).
**आगडोंब** (पु.) आगीचा भडका.
**आगतस्वागत** (सं. न.) आदरातिथ्य; आदरसत्कार.
**आगंतुक** (सं. पु.) अगांतुक पहा.
**आगंतुक खर्च** अनपेक्षित खर्च.
**आगंतुकी** (स्त्री.) न बोलावतां जेवायला जाणें; परान्नपुष्टता.
**आंगतपंगत** (स्त्री.) बालगोपालांचें एकत्र भोजन.
**आंगदट** (सं. अंग + दृढ वि.) अंगानें बळकट
**आगप** (अ.) आगाऊ.
**आगपाई** (स्त्री.) घाई.
**आगपेटी** (स्त्री.) आगकाड्या भरलेली पेटी.
**आगपैण** (स्त्री.) एक त्वचारोग.
**आगबोट** (स्त्री.) वाफेनें चालणारें जहाज.
**आंगभर** (प्रा. ना.) शक्ति, जोर.
**आगम** (सं.पु.) येणें, प्राप्ति, लाभ; विद्या; शास्त्र; वेद; शब्दांत नवीन येणारा वर्ण; फळ; प्रारंभ; दस्तऐवज.
**आगमन** (सं. न.) येणें.
**आगमनिर्गम** (सं. पु.) आरंभ आणि शेवट.
**आगमाग** (पु.) पत्ता, माग, चिन्ह.
**आगर** (सं. आकर न.) शेत, मळा; खाण; अग्र, टोंक.
**आंगरखा** (पु.) अंगरखा पहा.
**आगरडा, आगरडें** (प्रा. वि.) अग्र.
**आगरू** (ना.) स्थान, आगर.
**आगलाव्या** (वि.) भांडण लावणारा.
**आगली** (सं. अग्र स्त्री.) नांगर हाकणाराची बसण्याची जागा; नांगराला जुंपलेल्या बैलांची तिसरी जोडी.
**आंगवठा** (प्रा. पु.) शरीराचा बांधा.
**आंगवण** (प्रा. स्त्री.) इच्छा; शक्ति (मुक्ते. वन० १३।१४); छंद; नित्यक्रम (राम वि. १।१११); नवस, प्रतिज्ञा.
**आंगवणें** (प्रा. क्रि.) मिळणें (भा० २३।७०५); अनुकूल होणें, मानवणें.
**आंगवसा** (प्रा. पु.) साल; पाला.
**आगवळ** (पु.) बायका वेणी घालतांना केसाची दोरी, गंगावन, किंवा लोकरीचा धागा वापरतात तो.
**आंगवळा** (प्रा. पु.) संबंध, सहवास.
**आगवाडा** (पु.) घराची पुढील बाजू.
**आगशी** (स्त्री.) गच्ची.
**आगसणें** (क्रि.) लवकर पक्व होणें.
**आंगसूट** (वि.) चपळ.
**आगळ** (सं. अर्गला स्त्री.) अडसर.
**आगळा** (प्रा. वि.) अधिक.

आगळिक (प्रा. स्त्री.) आविक्य; मर्यादेचें उल्लंघन; अपराध; अपूर्वपण.
आगळिया (प्रा. वि.) आगळा, अधिक.
आगळी (स्त्री.) खोडी, आगळिक.
आगा (पु.) पुढील भाग; अंगरख्याची पेशकळी व खुंटकळी यांच्या मधला भाग; (वि.) थोर. (फा. पु.) पंडित, धर्मशास्त्रज्ञ.
आगाज (पु.) आवाज.
आगांतुक अगांतुक शब्द पहा.
आगापिछा (सं. पु.) पुढचा व मागचा भाग; मागचा पुढचा विचार.
आगामी (सं. वि.) येणारें.
आगारा (प्रा. पु.) अंकुर.
आगारी (प्रा.स्त्री.) अंकुर, डिरी; लागवड.
आंगावी (प्रा. पु.) मोठेपणा.
आगाही (फा. स्त्री.) खबर; दक्षता; ज्ञान.
आगाळा (पु.) जुडी, कोळें. [सामर्थ्य.
आंगिक (प्रा. वि.) आंगचा, (न०)
आंगिठ, आगिठी, आगिठें (सं. ना.) आगटी, भट्टी, शेगडी (स्वा० दि० ११।२।५१).
आगिवल (न.) आगीचा डांब. [अग्निकुंड.
आगियाळें (सं. अग्नि + आलय न.)
आगी (सं. अग्नि पु.) अग्नि.
आंगी (प्रा. पु.) आंगरखा, आंगडें.
आंगीक (प्रा. ना.) साह्य; अवयव.
आंगीकणें (क्रि.) अंगीकारणें; (रं० यो० २।२५).
आंगीठ (प्रा. स्त्री.) आगटी.
आगीढुगी (स्त्री.) भानगड. [इतकें माप.
आंगुळ (सं. अंगुल न.) बोटाच्या रुंदी-
आगेमागें (अ.) अलीकडे पलीकडे, जवळपास.
आंगोगडी (प्रा. अ.) पृथक्पणें.
आगोज (प्रा. वि.) अगाध, मोठा.
आगोठ (स्त्री.) पावसाळा; पावसाळ्याचा आरंभ.
आगोतली (स्त्री.) केळ, चवई वगैरेच्या पानाच्या अग्राकडचा तुकडा जेवण्याकरितां घेतात तो.
आंगोपती (अ.) पृथक्पणें.
आगोस (स्त्री.) उष्ण काळाचा प्रारंभ.
आंगोळी (सं. अंगुलि स्त्री.) बोट.
आग्नेयी (सं. स्त्री.) दक्षिण-पूर्व दिशा.
आग्या (सं. वि.) ज्याच्या मुखांतून अग्नीच्या ज्वाळा निघतात असा सर्प (भा० ४।८६९); अंगाचा दाह करणारा एक पाला (दा० ३।७।५); जहाल मनुष्य.
आग्या वेताळ (पु.) आग लावणारा पिशाच्चांचा राजा; अतिशय तापट, साहसी किंवा जहाल मनुष्य.
आग्रह (सं. पु.) हट्ट, गळ, अतिप्रार्थना, मिनतवारी.
आग्रही (वि.) हट्टी, चिकाटी धरणारा.
आघवा (वि.) अवघा, सगळा.
आघळणें—पाघळणें (क्रि.) पाण्यांत बुचकळून हलविणें.
आघाट (प्रा.पु.) भाग (ज्ञा० १३।४५).
आघाडी (स्त्री.) अघाडी पहा.
आघात ((सं. पु.) धक्का, प्रहार.
आघ्राण (सं. न.) वास घेणें, हुंगणें.
आघ्रो (सं. आग्रह न.) आग्रह.
आंच (सं. अर्चिस् स्त्री.) अग्निसंस्कार; उष्णता; भय; काळजी.
आंचका (पु.) झटका, कंप.
आचंगुल (प्रा. वि.) कृपण (दा० २।३।१४)
आंचणी (स्त्री.) घुसळखांबाची दोरी.
आचंद्रार्क (सं. अ.) चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत.
आचमन (सं. न.) तळहातावरून संध्येच्या पळीभर पाणी पिणें.
आचरण (सं. न.) वर्तन, चाल.
आचरणें (क्रि.) वर्तनांत आणणें.
आंचवण (सं. न.) हात धुणें; त्याग.
आंचवणें (क्रि.) भोजनानंतर हाततोंड धुणें; मुकणें, अंतरणें.
आंचळ (सं. अंचल न.) वस्त्र.
आंचळ (पु.) गाय, म्हैस इ० चा स्तन.
आचांगळा (प्रा. वि.) निष्फळ.
आचार (सं. पु.) वर्तन, चाल, रीत.
आचारी (पु.) स्वैंपाकी.
आचावाचा (प्रा. स्त्री.) बडबड.
आचार्य (सं. पु.) गुरु, शास्त्रप्रवर्तक; निष्णात; पंडित.

आचूडमूळ (अ.) आमूलाग्र (ज्ञा.५।१७४)
आचूळ, आंचूळ (पु.) बोंडी; आसड.
आच्छादणें (क्रि.) पांघरूण घालणें, झांकणें.
आच्छादन (सं. न.) आवरण, पांघरूण.
आज (सं. अद्य अ.) या चालू दिवशीं.
आजकाल (अ.) सांप्रतकाळीं.
आजन्म (अ.) जन्मापासून; जन्मभर.
आजन्मांत (अ.) आयुष्यभरांत.
आजलग (अ.) आजपर्यंत.
आजवर, आजवेरीं (अ.) आजपर्यंत.
आजा (सं. आर्य पु.) आईचा किंवा बापाचा बाप.
आजानुबाहु (सं. वि.) उभा राहिला असतां गुडघ्यास सहज पुरण्याजोग्या लांब हाताचा (मनुष्य.)
आजमावा (प्रा. पु.) अजमास (वामन-विराट. ८।३१).
आजार (फा. पु.) दुखणें, रोग.
आजारी (वि.) दुखणाईत.
आजि (सं. स्त्री.) लढाई, युद्ध.
आजिजी (फा. स्त्री.) विनंति, प्रार्थना.
आजी (स्त्री.) आईची किंवा बापाची आई.
आजीव (क्रि.) जन्मभर.
आजीवळ (पु.) भिक्षुक; ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतील एक धर्मपंथ.
आजूबाजू (अ.) इकडे तिकडे, सभोंवतीं.
आजेगुरु (पु.) गुरूचा गुरु.
आजेसासरा (पु.) सासऱ्याचा बाप. [सासू.
आजेसासू (स्त्री.) सासूची आई किंवा
आजोबा (पु.) आजा.
आज्य (सं. न.) तूप.
आझादी (स्त्री.) स्वतंत्रता.
आझूं, आझून, आझूनि (प्रा. अ.) अद्यापि.
आट (प्रा. पु.) संताप; त्रास; हट्ट (वा० यथार्थ २।१३२); नाश (रुक्मि० १०।४२); हरकत (मुक्ते० रामा० ६।४०१.)
आट (पु. स्त्री.) हातमागावर विणण्यांत आडवीं सुतें दाबून बसविण्याची योजना.
आटकाळ (पु.) दुष्काळ, दुर्मिळता.
आटकें (न.) अर्ध्या शेराचें माप.
आटघाट (प्रा. पु.) श्रम, त्रास, छळ (दा० १९।२।७); विनाश.
आटण (सं. अटन न.) परिभ्रमण.
आटणी (प्रा. स्त्री.) मूस (दा. ३।१।२); मिश्रण; आटविणें (र० यो० ८।२८); लय (अमृ० १।१५); प्रदक्षिणा, भ्रमण.
आटणें (प्रा. क्रि.) जिकणें; सुकणें; आक्रसणें.
आटपणें (क्रि.) गोळा करणें; संपविणें; संपणें; मरणें; हातीं व्यवस्था घेणें.
आटपता (वि.) आटपसर, बेताचा.
आटपाआटप (स्त्री.) वारासार, पसारा आवरणें.
आटपाट (स्त्री.) शिवाशिवीचा खेळ.
आटपाटनगर (न.) कोणी एक शहर.
आटरणें (क्रि.) आक्रसणें.
आटवळ (न.) एक प्रकारचें पातळ खाद्य.
आटवी (सं. अटवी स्त्री.) अरण्य.
आटा (पु.) इरलें किंवा छत्री यांचा सांगाडा; वेढा; पीठ. [दग, श्रम.
आटाआटी, आटाटी (प्रा. स्त्री.) दग-
आटाणु (प्रा. पु.) ढाल तलवार धरणारा.
आटाळ (प्रा. पु.) अडथळा.
आटी (प्रा. ना.) यत्न, श्रम, खटपट; हट्ट; (स्त्री.) गाभा.
आंटी (स्त्री.) गांठ; मिठी.
आंटीव (पु.) आटवलेलें (दूध); पिळदार.
आंटू (प्रा. पु.) शरीराचा संकोच.
आटू (प्रा. वि.) कोरडें, दुर्बोध.
आटेजणें (प्रा. क्रि.) आळणें. [आवांका.
आटोका (पु.) आकलनशक्ति; पोंच;
आटोकाट (वि.) शिकस्तीचा, मोठा.
आटोप (प्रा. पु.) सामर्थ्य; तंत्र, संधान; महत्त्व; डौल; व्यापकता; उपसंहार; क्षोभ.
आटोळा (प्रा. पु.) ओटा.
आठउ, आठव (प्रा. स्त्री.) आठवण.
आठकी (प्रा. ) आठांचा समुदाय.
आठव (पु.) स्मरण.
आठवडा (पु.) सप्ताह; सात दिवस.
आठवण (स्त्री.) स्मरण, याद.
आठवणूक (स्त्री.) स्मरण देणारी वस्तु.
आठळी (सं. अष्टि स्त्री.) फळांतील बी.
आठी (प्रा. स्त्री.) मिठी.

**आठीवेठी** (प्रा. स्त्री.) वेरझार, विघ्न.
**आठुवें** (प्रा. न.) हृदय. [घट्ट होणें.
**आठुळणें** (प्रा. क्रि.) बांधणें, आवळणें,
**आठोळा** (वि.) गर्भधारणापासून आठ महिन्यांत जन्मलेला.
**आठोळी** (सं. अष्टि स्त्री.) फळांतील बी.
**आड** (प्रा. स्त्री.) प्रतिबंधक अट; उडी; प्रेम; (अ.) जवळ. **आड जाणें**—चुकून जाणें; **आड पडणें**—नमस्कार करणें.
**आड** (पु.) विहीर, कुवा; (अ.) मध्यंतरीं; टाकून; मागें.
**आडकडा** (प्रा. पु.) कडयाचा मध्यभाग.
**आडकाठी** (स्त्री.) अडथळा; प्रतिबंध.
**आडकोठा** (प्रा. अ.) कोपऱ्यांत, एकीकडे.
**आडगल्ली** (स्त्री.) बोळ.
**आडचोर** (पु.) उचल्या, भामटया.
**आडजात** (स्त्री.) हलकी जात.
**आडण** (प्रा. स्त्री.) अडचण.
**आडणी** (प्रा. स्त्री.) अडचणीची वेळ.
**आडणें** (प्रा. क्रि.) साठवणें (ज्ञा० ९।११)
**आडताळा** (प्रा. पु.) अडथळा.
**आडनांव** (न.) यथार्थ नव्हे असें नांव; उपनांव; कुळाचें नांव.
**आडपडदा** (पु.) मर्यादा.
**आडपतादडपता** (पु.) वचक ठेवणारा.
**आडपाड** (प्रा. पु.) आडरस्ता (सोहि० अद्व० २); (अ.) पुढें मागें (सोहि० महदनु०)
**आडपाडी** (प्रा. स्त्री.) खटपट, श्रम; (विवे० पू० ११५).
**आडफाटा** (पु.) हरकत, आडकाठी.
**आडंबा** (प्रा. पु.) अडसर.
**आडमार्ग** (पु.) मधलीच रहदारीची नव्हे अशी वाट. [होणारी प्राप्ति.
**आडमिळकत** (स्त्री.) अवांतर अन्यायानें
**आडमुठा** (वि.) अडदांड, अडाणी, मूर्ख.
**आडमुठी** (प्रा. अ.) अनायासें.
**आडमूठ** (स्त्री.) डोंगराळ जमिनींत फार सावधगिरीनें व फुकट न जाईल अशा बेतानें बीं पेरणें.
**आडरान** (न.) रस्त्यापासून दूरचा प्रदेश; विषयांतर.
**आडल** (प्रा. पु.) वृक्ष (राम०स्फु०श्लोक.)
**आडफाटा** (पु.) विघ्न अडथळा.
**आडव** (प्रा. न.) अडचणीची जागा.
**आडवंगी** (प्रा. पु.) अडथळा.
**आडवण** (स्त्री.) उताराची जागा, उतरण.
**आडवळण** (न.) रस्त्यापासून दूरची जागा.
**आडवा** (वि.) वाकडा, तिरपा; **आ० जाणें**—हरकत करणें; **आ० होणें**—थोडेसें निजणें; **आडव्या अंगाचा**—लठ्ठ.
**आडवाट** (स्त्री.) आडमार्ग पहा.
**आडवार** (पु.) कांहीं विशेष दिवसाहून अन्य दिवस.
**आडवारा** (प्रा. पु.) प्रतिबंध, धरबंध.
**आडवी** (सं. अटवी स्त्री.) आडमार्ग; (ज्ञा०८।२४०); अरण्य (ज्ञा०१३।६२)
**आडवें** (सं. अटवी स्त्री.) अरण्य.
**आडस** (प्रा. पु.) अडथळा.
**आडसणें** (प्रा. क्रि.) लपणें (अमृ०७।२).
**आडळ** (प्रा. ना.) अडचण (ना० २७६); स्पर्श; वृक्ष.
**आडळणें** (प्रा. क्रि.) आढळणें; अडखळणें.
**आडा** (पु.) टिळा; पट्टा.
**आडाखा** (प्रा. पु.) तपशीलवार तक्ता (तुका० १८५७); धोरण, युक्ति.
**आडाडी** (प्रा. स्त्री.) उत्कंठा, घाई (भा० ३१।३०).
**आडाव** (वि.) हलकीं शस्त्रें धारण करणारा.
**आडिका** (प्रा. पु.) पैसा, अडका.
**आंडिबा** (पु.) अडसर
**आडी** (प्रा. स्त्री.) प्रतिबंध; शंका (भा० २०।५६).
**आडें** (प्रा. न.) तागडी; आढें, आडोळा.
**आडेकरी** (प्रा. पु.) तागडीवाला.
**आडेपाडें** (न.) प्रत्येक शेतकऱ्याच्या खळयांतल्या धान्याच्या राशींतून पाटील आपला हक्क म्हणून घेई तो अंश.
**आढवारा** (प्रा. पु.) छळ (शुभा० उद्योग० १२।२८).
**आढाउ** (प्रा. पु.) सैनिक, शिपाई. (रुक्मिणी० ६।५२).
**आढाल ढालाची** (प्रा. वि.) ढालगज, धीट (रुक्मिणी० ५।४५).

**आढें** (न.) उंसाच्या चरकाऱ्या लाटा फिरविण्याकरितां व बैल जोडण्याकरितां वर बसविलेला लांब दांडा.
**आढ्यता** (सं. स्त्री.) प्रतिष्ठितपणाचा डौल; अहंपणा, गर्व.
**आतर, आतार** (सं. पु.) नावेचें भाडें.
**आत्मगत** (सं. वि.) स्वगत; मनांत केलेलें (भाषण).
**आद** (वि.) अर्धा.
**आदखाना** (फा. पु.) कैदखाना, तुरुंग.
**आण** (स्त्री.) शपथ, प्रतिज्ञा; (प्रा. अ.) आणि. **आणनें** (क्रि.) नेणें आणि आणणें.
**आणखी** (वि.) अधिक; (अ.) शिवाय.
**आणणें** (क्रि.) घेऊन येणें.
**आणप्रमाण** (स्त्री.) शपथक्रिया.
**आणभाक** (स्त्री.) शपथपूर्वक वचन; करारमदार.
**आणा** (पु.) रुपयाचा सोळावा अंश; गुंठ्याचा सोळावा अंश; षोडशांश.
**आणि** (अ.) शिवाय, अधिक.
**आणिक** (प्रा. वि.) आणखी.
**आणियाळें** (प्रा. वि.) अणकुचीदार.
**आणी** (प्रा.) टोंक, अग्र.
**आणीवाणी** (स्त्री. ना.) अणीवाणी पहा.
**आणोजें** (प्रा.न.) अंकुर (ज्ञा०१४।३२७).
**आत** (स्त्री.) बापाची बहीण, आत्या.
**आंत** (सं. अंत्र न.) आंतडें (रुक्मिणी० १२।२२).
**आंत** (सं. अंतर अ.) अंतर्भागीं, मध्यें.
**आंतउता, आंतउतीं** (प्रा. अ.) आंत.
**आतंक** (पु.) भीति; धाक; व्याधि.
**आंतडी** (सं. अंत्र स्त्री.) **आंतडें** (न.) अंत्रमाळ, तांतीचें चर्म; **आं० ला पीळ बसणें**—खरी कळकळ वाटणें.
**आतणें** (प्रा. क्रि.) प्राप्त होणें, व्यापणें; होणें; पावणें; स्पर्शणें; तळमळणें.
**आततायी** (वि.) मारावयाला तयार झालेला; खुनी, आगलाव्या; साहसी, मूर्खपणाचें काम करणारा.
**आतप** (सं. पु.) ऊन्ह.
**आतपत्र** (सं. न.) छत्री, आबदागीर.
**आतपमूर्च्छा** (सं. स्त्री.) उन्हाचा ताप लागून मूर्च्छा व ज्वर येणें.
**आंतबट्टा** (पु.) खोट, तोटा, बटाव.
**आंतबट्ट्याचा व्यापार** नुकसान सोसून चालविलेला व्यापार.
**आंतर** (सं. वि.) आंतल्या बाजूचा.
**आंतल्या गांठीचा** मिस्किल, मतलबी.
**आतवता** (प्रा. अ.) आंत.
**आतसबाजी** (प्रा. स्त्री.) दारूकाम.
**आतळणें** (प्रा. क्रि.) स्पर्श करणें.
**आतां, आतांशीं** (अ.) सांप्रत काळीं, अलीकडे.
**आतिथ्य** (सं. न.) पाहुणचार.
**आतिसो** (सं. अतिशय वि.) अतिशय (वाक्य० ४५७६).
**आंतील** (वि.) आंतला, अंतर्भागाचा.
**आतु** (प्रा. अ.) मध्यें.
**आतुटो** (अ.) अखंड.
**आतुडणें** (प्रा. क्रि.) सांपडणें (तुका० २५६५); समजणें.
**आतुर** (सं. वि.) दुखणाईत; उतावळा, अतिशय उत्सुक; **आ० संन्यास**—मरणोन्मुख स्थितींत घेतलेला संन्यास.
**आतुरता** (सं. स्त्री.) अतिशय उत्सुकता.
**आंतुरी** (स्त्री.) स्त्री.
**आतुर्बळी** (सं. वि.) अति बलाढ्य.
**आंतुल** (प्रा. न.) हृदय, जीव.
**आंतुवट** (प्रा. वि.) अंतरगांतील (ज्ञा० १६।४५); बळकट; (न.) हृदय, मर्म.
**आंतुवटें** (प्रा. अ.) आंत.
**आतू** (स्त्री.) बापाची बहीण.
**आतृप्ति** (क्रि. वि.) तृप्ति होईपर्यंत.
**आतें** (प्रा. अ.) व्याप्त (ज्ञा०८।२१३).
**आते** (स्त्री.) आत्या; **आतेभाऊ**–आतेचा मुलगा; **आते सासरा**–सासऱ्याचा आतेभाऊ; **आते सासू**–नवऱ्याची आत; **आते दीर**–नवऱ्याचा आतेभाऊ.
**आतौता, आतौतें** (प्रा. अ.) आंत, (वि.) आंतील.
**आत्मघात** (सं. पु.) स्वतःचा नाश.
**आत्मज** (सं. पु.) पुत्र.
**आत्मजा** (स्त्री.) मुलगी.

**आत्मविद्या** (सं. स्त्री.) ब्रह्मविद्या.
**आत्मसंयमन** (सं. न.) स्वतःचें मन स्वतःच्या ताब्यांत ठेवणें.
**आत्मज्ञान** (सं. न.) ब्रह्मज्ञान. [स्वभाव.
**आत्मा** (सं. पु.) जीव; अंतःकरण; आपण;
**आत्मानुभव** (सं. पु.) आत्मज्ञान.
**आत्माराम** (सं. पु.) अंतःकरण (वि.) स्वसंतुष्ट.
**आत्मीय** (सं. वि.) आपला स्वताचा, आपल्या आवडीचा किंवा प्रेमाचा.
**आत्यंतिक** (सं. वि.) अत्यंत.
**आत्या** (स्त्री.) आत, बापाची बहीण.
**आत्याती** (प्रा. स्त्री.) आततायीपणा.
**आत्राटणें** (प्रा. क्रि.) थापटणें; (न.) नाद, घोष.
**आथडणें** (प्रा. क्रि.) हिसकावणें.
**आंथरणें** (सं. क्रि.) पसरणें.
**आंथरीय** (सं. आस्तरणी न.) आंथरण्याचें जाजम वगैरे.
**आथि, आथी** (प्रा. क्रि.) आहे.
**आथिला** (प्रा. वि.) भाग्यवान्, थोर; असलेला; संपन्न, युक्त.
**आथिलेंपण** (प्रा. न.) थोरपणा, भाग्य.
**आंदण** (प्रा. न.) लग्नाच्या संबंधाची देणगी.
**आंदणा** (प्रा. पु.) दास, गुलाम (भा० २२।१६३).
**आंदणी** (प्रा. वि.) आंदणांत मिळालेली दासी (तुका० ६१६).
**आदत** (अर. स्त्री.) खोड, वाईट संवय.
**आदब** (अर. अदब स्त्री.) सन्मान.
**आदमी** (अर.पु.) मनुष्य (आदमचा वंशज).
**आदर** (सं. पु.) सद्भाव, सन्मान, सत्कार.
**आदमुसा** (वि.) अर्धमेला.
**आदरणीय** (सं. वि.) आदर करण्यास पात्र.
**आदरसत्कार, आदरातिथ्य, आदरोपचार** (सं. पु.) मानपान.
**आदरून** (प्रा. अ.) मुद्दाम.
**आदर्श** (सं. पु.) आरसा, कित्ता.
**आदला** (सं. आदि वि.) मागचा.
**आदळणें** (प्रा. क्रि.) पावणें; उणें पडणें; आपटणें; (लाक्षणिक अर्थानें) खाणें.
**आदळपण** (प्रा. न.) असमर्थता.
**आवा** (हिं. पु.) प्राप्ति, लाभ; जमा; भाव; अभिनय.
**आदान** (सं. न.) कुयोग; प्राणांतिक अपघात; स्वीकारणें किंवा घेणें.
**आदाबअर्ज** (अर. स्त्री.) वंदन, मुजरा.
**आदि** (सं. पु.) प्रारंभ; प्रमुख; (अ.) अगोदर.
**आदिअंत** (सं. पु.) आरंभ व शेवट; शेंडा आणि बुडखा; अवल अखेर.
**आदिकरून** (अ.) इत्यादि, वगैरे.
**आदिकारण** (सं. न.) मुख्य कारण.
**आदित्य** (सं. पु.) सूर्य, रवि.
**आदित्यवार** (सं. पु.) रविवार.
**आदिपुरुष** (सं. पु.) मूळपुरुष, परमेश्वर.
**आदिम** (सं. वि.) पहिला, मूळचा.
**आदिमाया** (सं. स्त्री.) ईश्वरी शक्ति, पार्वती.
**आदिल** (सं. आदि वि.) पहिलें.
**आदींमिदीं, आदींमदीं** (वि.) पहिला.
**आदिवासी** (पु.) देशांत अगदीं प्रथम वस्ती करून राहिलेले लोक.
**आंदु** (प्रा. पु.) सांखळी.
**आदेय** (सं. वि.) ग्राह्य.
**आदेश** (सं. पु.) हुकूम, आज्ञा; गोसावी लोकांत परस्परांना नमस्कार करण्याचे वेळीं उच्चारण्याचा शब्द; (व्याक०) बदली येणारा वर्ण.
**आंदोल** (सं. पु.) झोपाळा.
**आंदोलणें** (क्रि.) झोके किंवा हेलकावे घेणें.
**आंदोलन** (सं. न.) हेलकावे खाणें, झोके घेणें; राजकीय किंवा औद्योगिक चळवळ.
**आद्दल** (प्रा. वि.) कृपण, कवडीचुंबक. (दा० २।३।२८).
**आद्य** (सं. वि.) प्रथम, पूर्वींचा.
**आद्धा** (पु.) नफा.
**आध** (प्रा. अ.) खालीं.
**आधण** (न.) कढ.
**आधा** (सं. अर्ध वि.) अर्धा.
**आधवड** (न.) अर्धें पशुचर्म.
**आंधळा** (सं. अंध वि.) अंधळा पहा.

आंधळी कोशिंबीर (स्त्री.) मुलांचा एक खेळ. [६।५६).
आधाडा (प्रा. पु.) मध्यभाग (ज्ञा०
आधातुरें (प्रा. वि.) अर्धतृप्त; अतृप्त.
आधाधिला (प्रा. वि.) भ्यालेला.
आधार (सं. पु.) आश्रय; टेंका; प्रमाण.
आधावती (प्रा. स्त्री.) मूळ कारण (भा० २८।२०१). [लचांड; गहाण.
आधि (सं. पु. स्त्री.) मानसिक व्यथा;
आधिक्य (सं. न.) अधिकता.
आधिदैविक (सं. वि.) दैवकृत.
आधिपत्य (सं. न.) मुख्यपणा; मुखत्यारी; प्रतिष्ठा.
आधिविधीं (अ.) अगोदर, सर्वांच्या आधीं.
आधिभौतिक (सं. वि.) प्राण्यापासून झालेलें.
आधिला (प्रा. वि.) पहिला, अगोदरचा (कथासा० ११।११०); अर्धा.
आधीं (सं. आदि अ.) अगोदर.
आधुनिक (सं.वि.) आतांचा, अलीकडचा.
आधेला (पु.) अर्धा पैसा. [साप.
आधेलें (न.) एका जातीचा बिनविषारी
आधैलें (प्रा. न.) अर्ध्या ताटांत जेवणें.
आधोडी (प्रा. वि.) अर्धे फाटलेलें (तुका० २१९४).
आधोरण (सं. पु.) महात (विठ्ठल-रुक्मिणी० ४।४) [२२३८).
आधोरीं (प्रा. अ.) अर्ध्या मार्गांत (एक०
आंध्य (सं. न.) अंधकार, आंधळेपणा; (ज्ञा० १६।१९९) . [धार्मिक.
आध्यात्मिक (सं. वि.) परमात्म्यासंबंधीं;
आन (सं. अन्य वि.) अन्य, भिन्न.
आनआनें (प्रा. अ.) निरनिराळ्या प्रकारें.
आनक (सं. पु.) नगारा; गर्जणारा मेघ.
आनक-दुंदुभि (पु.) श्रीकृष्णाचा पिता वसुदेव.
आनंद (सं. पु.) हर्ष; ४८ वें संवत्सर.
आनंदकंद (सं. पु.) आनंदाचा गड्डा किंवा उगम. [ब्रह्म.
आनंदघन (सं. पु.) आनंदानें परिपूर्ण
आनंदणें (क्रि.) हर्षित होणें. [पावलेला.
आनंदित (सं. वि.) हर्ष किंवा आनंद
आनंदी (सं. वि.) उल्लासी, रंगेल.
आनंदीआनंद अतिशय आनंद, पूर्णानंद.
आनन (सं. न.) मुख, तोंड.
आनस (न.) अन्न.
आनाकानी (हिं. स्त्री.) दुर्लक्ष, निष्काळजीपण, कानाडोळा.
आनाड (प्रा. वि.) अडाणी, नास्तिक (तुका० ११४) [निरनिराळा.
आनान (सं. अन्य + अन्य वि.) वेगवेगळा,
आनार (हिं. ना.) अनार, डाळिंब.
आनिकी (प्रा. स्त्री.) भ्रान्ति.
आनु (वि.) आणखी, अन्य, अल्प.
आनुकूल्य (सं. न.) अनुकूलता; कृपा.
आनुवंशिक (वि.) वंशपरंपरागत चालत आलेला.
आनुषंगिक (सं. वि.) तत्संबंधीं; वरोवर येणारा; गौण. [तून सुटका.
आनृण्य (सं. न.) कर्जमुक्त होणें; कर्जा-
आनोज (प्रा. पु.) अंकुर.
आन्हिक (सं. न.) नित्यकृत्य.
आप (सं. स्त्री.) उदक, पाणी; आपण, स्वत:; (वि.) आपला. [देणगी; ठेव.
आपई (सं. आप्त स्त्री.) इष्टमित्रांची
आपका (पु.) हातानें केलेला पाण्याचा जोराचा शिडकाव.
आपखरा (फा. पु.) आपकरा पहा.
आपखुषीनें (अ.) स्वत:च्या इच्छेनें.
आपंगणें (प्रा. क्रि.) प्रेमानें जवळ घेणें; पोसणें, स्वीकारणें (ना० १७।४५); (ना.) पोर.
आपगा (सं. स्त्री.) नदी.
आपंगिता (प्रा.पु.) संभाळणारा, पोसणारा.
आपचंग (पु.) मूर्खपणाचे चाळे; वेडेचार.
आपडी (स्त्री.) शिवाशिव.
आपण (सं. आत्मन् सर्वनाम) मी व तुम्ही; तुम्ही; आपले लोक; आ० होऊन-आपखुषीनें.
आपणपा, आपणपें (प्रा. पु. न. ना.) आत्मस्वरूप (ज्ञा० ५।१०५); जागृति (अ.) स्वत: आपण; आपलेकडे, आपल्या ठायीं.
आपणें (प्रा. क्रि.) पावणें; वाटणें.

**आपत्ति** (सं. आपद् स्त्री.) कष्टावस्था, विपत्ति.

**आपदा** (सं. आपद् स्त्री.) आपत्ति.

**आपदावणें** (क्रि.) अडचणींत सांपडणें.

**आपद्** (सं. स्त्री.) विपत्ति. [ण्याची गोष्ट.

**आपद्धर्म** (सं. पु.) निरुपायास्तव कर-

**आपन्न** (सं. वि.) संकटग्रस्त; प्राप्त.

**आपपर** (सं. न.) हें आपलें व हें दुसऱ्याचें असा भेद; द्वैत.

**आपमतलबी** (वि.) स्वार्थसाधु.

**आपमुखत्यार** (वि.) स्वतंत्र.

**आपलपोटचा** (वि.) स्वतःचा तेवढा मतलब पाहणारा.

**आपला** (वि.) स्वतःचा.

**आपलिक** (प्रा. वि.) आपलें (तुका० ३८८५); (न.) अभिमान.

**आपले आपण** (अ.) स्वयंप्रेरणेनें, आपण होऊन.

**आपलेपणा** (पु.) स्वाभिमान; ममता.

**आपसया** (प्रा. अ.) आपोआप (रंग० यो० ६।३३७).

**आपसांत** आपल्यांत. [च्या खुपीनें.

**आपसुख** (अ.) आपण होऊन, स्वतः-

**आपस्तंब** (सं. पु.) यजुर्वेदाची एक शाखा; त्या शाखेचा ब्राह्मण.

**आपा** (सं. अप् स्त्री.) पाणी.

**आपा** (का. अप्प पु.) एक टोपण नांव.

**आपाड** (प्रा. वि.) अत्युत्तम (विवे० पू० १।१९।२१); (पु.) अंतर (ज्ञा० १८।२७४); मोठेपणा; आधिक्य; भिन्नता.

**आपाद** (क्रि. वि.) पायापर्यंत.

**आपादणें** (प्रा. क्रि.) कर्म करणें (रंग० यो० ७।११६); संपादणें; स्वीकारणें, घेणें (ज्ञा० ३।१८५).

**आपांपरी** (प्रा. स्त्री.) दुर्दशा, अव्यवस्था (ज्ञा० ११।६६५). [वांचून.

**आपाप** (अ.) आपले आपण; प्रयत्ना-

**आपालिया** (पु.) लिपीछिपीचा खेळ.

**आपी** (प्रा. पु.) नातेवाईक (तुका० २३०५). [स्वकीय, आप्त.

**आपु** (प्रा. पु.) हितकर्ता; (वि.)

**आपुथिणें** (प्रा. क्रि.) गांजणें.

**आपुलीक, आपुलकी** (प्रा. स्त्री.) ममता (ज्ञा० यो० ६।४८). [२५१५).

**आपुलेपण** (प्रा. न.) अहंभाव (तुका०

**आपे** (प्रा. अ.) आपोआप (सोहि० अद्वयानंद). [आपण.

**आपोआप** (अ.) प्रयत्नावांचून; आपले

**आपैतिया** (प्रा. वि.) प्राप्त (रंग० यो. १।३२२).

**आपैतें** (प्रा. वि.) आयतें, आपोआप (ज्ञा० ३।४५); वश (स्वा० दि० ६।५।६).

**आपैशीं** (प्रा. अ.) स्वभावतः

**आपैसें** (प्रा. अ.) आपोआप, सहज.

**आपोशन** (सं. न.) आपोष्णी.

**आपोष्णी** (स्त्री.) भोजनापूर्वी व नंतर ब्राह्मण आचमन करतात तें.

**आप्त** (सं. वि.) यथार्थ बोलणारा; संबंधी, नात्याचा; प्राप्त.

**आप्रांत** (प्रा. वि.) अमर्याद.

**आफडणें, आफुडणें** (प्रा. क्रि.) स्पर्शणें.

**आफत** (अर. स्त्री.) संकट, विपत्ति.

**आफळणें** (प्रा. क्रि.) आपटणें.

**ऑफ़िस** (इं. न.) कचेरी.

**ऑफिसर** (इं. पु.) अधिकारी, कामगार.

**आब** (स्त्री.) पत, नांव, अब्रू; योग्य डौल; पाणी.

**आंब** (सं. अम्ल स्त्री.) अम्लसार, अंबटपणा; हरभऱ्याच्या झाडावरील दंवाचें पाणी.

**आबकारी** (स्त्री.) मादक पदार्थावरील जकात; (वि.) मादक पदार्थासंबंधीं.

**आबनूस** (फा. पु.) टेंभुर्णीच्या आंतला काळा नार; (इंग्रजींत) एबनी.

**आंबली** (सं. आम्लिका स्त्री.) चिंच.

**आंबलें** (प्रा. न.) भोपळा.

**आंबसोल** (न.) कच्च्या आंब्याचा वाळविलेला गीर व सालपट.

**आबळा-गोबळा** (प्रा. वि.) आपला आपण (दा० ५।६।५६); व्यापून राहिलेला; (अ.) एकंदर.

**आबा** (पु. ना.) एक टोपणनांव.

**आंबा** (सं. आम्र पु.) आम्रफळ, किंवा त्याचें झाड.
**आंबाडा** अंबाडा पहा.
**आबाद** (फा. वि.) भरभराटलेलें.
**आबादानी** (फा. स्त्री.) भरभराट.
**आबादी आबाद** (फा. स्त्री.) खूप भरभराट.
**आबाशाई** (पु.) एका रंगाचें नांव.
**आबालवृद्ध** (अ.) लहानापासून थोरापर्यंत.
**आबालसुबोध** (सं. वि.) लहानमुलापासून मोठ्यांपर्यंत सर्वांना कळणारें.
**आबाळ** (स्त्री.) हेळसांड.
**आबाळी** (प्रा. स्त्री.) फजीती, दुर्दशा.
**आबाळचा** (प्रा. वि.) निर्बळ.
**आबुखणें, आंबुखणें** (प्रा. क्रि.) शिंपणें; पसरणें, टाकणें.
**आंबुखा** (प्रा. पु.) शिंतोडा; आच्छादन.
**आंबुथणें** (प्रा. क्रि.) पेटणें.
**आंबुला** (प्रा. पु.) पति.
**आंबुली** (प्रा. स्त्री.) पत्नी.
**आबूदारखाना** (फा. पु.) जलस्थान, पाणी साठविण्याची जागा. [चिमटा.
**आंबूर** (पु.) मोठा खिळे उपटण्याचा
**आंबेकरी** (पु.) नावाडी.
**आंबोण** (न.) धान्य, कोंडा इ० शिजवून गुरांसाठीं केलेलें खाद्य; लग्नांत शिधा, कोंडा, भाजीचीं डेखें इ० पदार्थ वाजतगाजत विहिणीकडे नेतात तें.
**आ (अ) बोली** (स्त्री.) पिवळी कोरांटी.
**आभ** (प्रा. न.) आभाळ; प्रतिबिंब.
**आभरण** (सं. न.) अलंकार.
**आभंड, आभांड** (प्रा. न.) पासंग; (वि.) भांडखोर, खोडकर.
**आभार** (प्रा. पु.) ओझें (ज्ञा० १८।९१०); ऋणभार; जबाबदारी (तुका० १८३९).
**आभास** (सं. पु.) प्रतिबिंब, सादृश्य; भ्रम.
**आभासणें** (प्रा. क्रि.) प्रतिबिंबित होणें.
**आभाळ** अभाळ पहा.
**आभाळी** (सं. स्त्री.) ढग.
**आभोग** (सं. पु.) ध्रुपदाच्या चार भागांपैकीं शेवटचा भाग. याला दोन तुकडे असतात.

**आभोळा** (प्रा. वि.) अत्यंत भोळा.
**आम** (सं. वि.) कच्चें, न पचलेलें.
**आम** (अर. वि.) सार्वजनिक, सामान्य.
**आमटी** (सं. अम्ल स्त्री.) एक पातळ पदार्थ. [खाना.
**आमखास** (फा. पु.) दरबारचा दिवाण-
**आमडी** (प्रा. स्त्री.) अंबाडी.
**आमंत्रण** (सं. न.) बोलावणें, अवतणें.
**आमदार** (पु.) प्रांतिक कायदेमंडळाचा सभासद.
**आमने-सामने** (हिं. अ.) समोरासमोर.
**आमय** (सं. पु.) रोग.
**आमरण, आमरणान्त** (सं. अ.) मरेपर्यंत.
**आम्ररस** (पु.) आंब्याचा रस.
**आमलक** (सं. पु.) आंवळा.
**आमवात, आमवायु** (सं.पु.) संधिवात.
**आमसाण, आमसूल, आमसोल** (न.) रातंबीची साल.
**आम्नाय** (सं. पु.) वेद.
**आमा** (प्रा. पु.) आईचा स्तन.
**आमातिसार** (सं. पु.) एक रोग.
**आमांश** (सं. पु.) आंव.
**आमाशय** (सं. पु.) कोठा.
**आमासा** (प्रा. वि.) अमळसा. [पदार्थ.
**आमिष** (सं. न.) मांस; लांच; मोहक
**आमोद** (सं. पु.) आनंद; सुगंध.
**आम्र** (सं. पु.) आंबा; आंब्याचें झाड.
**आम्ल, आम्लपित्त** अम्ल शब्द पहा.
**आम्ही** (सं. अहम् सर्वनाम) प्रथमपुरुषाचें अनेकवचन.
**आय** (प्रा. पु.) प्राप्ति, नफा; अस्तित्व (सोहि०अद्वया० ३); आकार, रूप (भा० ३।३२); आटोप, आटोका (भा. २।४५१); (स्त्री.) आई (न.) लोखंड.
**आयंडा** (पु.) कापून आणलेल्या भाताच्या रोपांचा भारा.
**आयणी** (प्रा. स्त्री.) इच्छा (ज्ञा० ६।१०) (एक० ४१२); मन; प्रसार; मत; समुदाय (भाग० ४।२३वाक्य० ११५८; सामर्थ्य; म्हण; चांगली चाल.
**आयत** (सं. वि.) मोठें; विस्तीर्ण; दीर्घ; ताणलेलें, ओढलेलें.

आयतन (सं. न.) देऊळ, स्थान.
आयता (सं. अयत्न वि.) प्रयत्नावांचून प्राप्त, मोफत; (सं.आयात) येऊन पोंचलेला; आयत्या पिठावर रेघा ओढणें -श्रमावांचून मिळालेल्या संपत्तीवर चैन करणें.
आयताळें (प्रा. न.) तयारी.
आयती (सं. स्त्री.) विस्तार; डौल; प्रकार; प्रतिष्ठा; स्थान; सामग्रीची तयारी.
आयतोजी, आयतोबा (पु.) स्वतः श्रम न करतां दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा घेण्यास मात्र पुढें होणारा.
आयना (फा.पु.) अरसा.
आयल (न.) लोखंड; (वि.) लोखंडाचें.
आयव्यय (सं. पु.) जमा व खर्च.
आया (प्रा.पु.) आकार (भाग० ३।३२); मान, प्रतिष्ठा; अटकळ, अंत.
आयात (सं. वि.) बाहेरून आलेला.
आयाबाया (स्त्री.) रद्दड किंवा कुच-कामाचीं माणसें.
आयास (सं. पु.) श्रम, कष्ट.
आयासी (वि.) कष्टाळू.
आयु (सं. न.) आयुष्य.
आयुध (सं. न.) शस्त्र, हत्यार.
आयुरारोग्य (सं. न.) दीर्घायुष्य आणि आरोग्य.
आयुर्दाय (सं. पु.) आयुष्यमर्यादा.
आयुर्वेद (सं. पु.) वैद्यशास्त्र.
आयुष्मान् (सं. वि.) दीर्घायु.
आयुष्य (सं. न.) जीवितकाळ, उमर.
आयोधन (सं. न.) युद्ध, लढाई.
आर (प्रा. स्त्री.) उत्कंठा (सोहि० सिद्धांत०); अंकुर (ज्ञा० १४।९६); अजगर (मोरो०द्रोण०१६।८८); अणी; आरा, चाकाच्या तुंब्यापासून धावेपर्यंत ठोकलेलें लाकूड. [तील एक संज्ञा).
आर (का.वि.) सहा (विटीदांडूच्या खेळा-
आरक्त (सं.वि.) तांबडा.
आरज (सं. आर्य स्त्री.) आढचता (नाम० ५३); (वि.) आर्य, श्रेष्ठ (रास०२।१।२०).
आरजा (प्रा०वि.) ऋतु प्राप्त झालेली (हरिवि० ९।९७४).
आरणूक (स्त्री.) विश्रान्ति.
आरडणें (क्रि.) ओरडणें, कल्ला करणें.
आरडाओरड (स्त्री.) आक्रोश, गडबड.
आरण (प्रा. न.) युद्धस्थान.
आरण (प्रा. क्रि.) मन आवरणें; उत्सुक होणें.
आरण्यक (सं. न.) वैदिक वाङ्मयांतील अध्यात्मविषयक भाग.
आरणी (प्रा.स्त्री.) शस्त्र (नाम०२१०८).
आरत (सं. आर्ति स्त्री.) इच्छा; आरती.
आरता (प्रा.वि.) अलीकडचा; (अ.) अलीकडे; आ० परता—इकडेतिकडे.
आरती (सं.स्त्री.) देवादिकांस दीपांनीं ओवाळणें; ओवाळण्याचें दीपपात्र; ओवाळते वेळीं म्हणण्याचें गीत.
आरतें (प्रा.अ.) आधीं; अलीकडे.
आरंधें (प्रा. न.) अनपत्यत्वदुःख; दुःखाचा कोलाहल (दा०३।३।३७).
आरपणें (प्रा.क्रि.) नष्ट होणें (सदा. १५९९.)
आरपार (अ.) मधून; पलीकडे; या बाजूपासून त्या बाजूपर्यंत.
आरंबळणें (प्रा. क्रि.) बरळणें; ओरडणें, भाजणें (ज्ञा० ११।३२५); मरगळणें; क्षीण होणें (रं० यो० १०८७).
आरब्ध (सं. वि.) आरंभिलेलें.
आरबाज (वि.) आढचतेखोर.
आरंभ (सं. पु.) सुरुवात, प्रारंभ; आ० शूर—आरंभीं मोठा उत्साह पण पुढें शिथिलता दाखविणारा.
आरभटी (प्रा. स्त्री.) ओढाताण.
आरंभणें (क्रि.) सुरुवात करणें.
आरसपान (पु.) संगमरवरी दगड.
आरमार (पोर्तु. आरमाडा न.) लढाऊ जहाजांचा समुदाय. [ओरडणें.
आरवणें (क्रि.) कोंवडा इ० पक्ष्यांचें
आरवट (पु.) भाताच्या पेरणीसाठीं तयार करून ठेविलेलें शेत.
आरवसा (प्रा. पु.) अंकुर.
आरशी (स्त्री.) चष्मा, चाळिशी.

**आरसा** (सं. आदर्श पु.) मागें पारा लावलेली काच.
**आरसेमहाल** (हिं. पु.) सर्वत्र आरसे लावलेला महाल; ऐनेमहाल.
**आरळ** (प्रा. वि.) मृदु (रुक्मि० ३।२६).
**आरा** (फा. पु.) करवत.
**आराइणें** (प्रा. क्रि.) अनुकूल असणें; विश्रांति घेणें. [स्थूल नकाशा.
**आराखडा** (पु.) कच्चा कागद; खर्डा;
**आराटी** (प्रा. स्त्री.) कांटेरी झुडूप, कांटी.
**आराणूक** (प्रा. स्त्री.) आवड, प्रीति; विश्रांति (रुक्मि०१८।२३); शांति; सौख्य; वेळ (तुका०७३); खटपट (तुका० ११३४); विघ्न.
**आराधन** (सं. न.) **आराधना** (सं. स्त्री.) प्रार्थना, पूजा.
**आराध्य** (सं. वि.) उपास्य.
**आराध्यदैवत-देवता** (न. स्त्री.) कुटुंबांत उपास्य म्हणून मानलेलें दैवत किंवा देवता. [(स्त्री.) गाडी.
**आराबा** (फा. पु.) सरंजाम; तोफखाना;
**आराम** (सं. पु.) दुखण्याचा उपशम; सुख; विश्रांति; बाग.
**आरामखुर्ची** (स्त्री.) ईझीचेअर; अर्धवट निजतां येण्यासारखी खुर्ची.
**आरामशीर** (वि.) विश्रांतिसुख देणारें.
**आराला** (प्रा. वि.) उत्कंठित.
**आराव, आरव** (सं. पु.) शब्द, आवाज.
**आरास** (फा. स्त्री.) शोभा; शोभिवंत व्यवस्था; दिव्यांची मौज. [वस्थित.
**आरिख** (सं. आर्ष वि.) आर्ष; अव्य-
**आरी** (सं. आरा स्त्री.) कोळशाची भुकटी.
**आरीफ** (अर. वि.) जाणता, सूज्ञ.
**आरीबोरी** (प्रा. स्त्री.) निर्गंध वृक्ष.
**आरुता** (प्रा. अ.) अलीकडे.
**आरुष** (सं. आर्ष वि.) आर्ष; छांदिष्ट; असमंजस; असंबद्ध, वेडीवांकडी.
**आरू** (प्रा. ना.) अंग (ना० गा० ५४४).
**आरूढ** (सं. वि.) चढलेला.
**आरूढणें** (क्रि.) चढणें.
**आरोगण** (प्रा. न.) भोजन; सेवन.
**आरोगणें** (प्रा. क्रि.) भक्षण करणें.

४

**आरोग्य** (सं. न.) निरोगीपणा.
**आरोंठा** (पु.) कापणी केलेलें भाताचें शेत.
**आरोधा** (प्रा. स्त्री.) अपूर्व इच्छा.
**आरोप** (सं. पु.) नसता गुण कल्पिणें; दोषाचा बोजा लादणें; आळ, बालंट; रोप लावणें.
**आरोपी** (सं. पु.) गुन्हेगार, अपराधी.
**आरोरा** (पु.) उषा; प्रभातकालीन आकाशाचा वर्ण.
**आरोसा** (पु.) सुळका.
**आरोसा-परोसा** (वि.) स्नान न केलेला किंवा न धुतलेला.
**आरोह** (पु.) खालच्या स्वरापासून वर चढत जाणें.
**आरोहण** (सं. न.) वर चढणें.
**आरोळी** (स्त्री.) मोठी हांक; जाड पोळी.
**आरौतें** (प्रा. अ.) अलीकडे.
**आर्जव** (सं. पु.) विनवणी; हांजी हांजी.
**आर्जवी** (वि.) हाजीहाजीखोर.
**आर्जुरपत्र** (प्रा. न.) आळवाचें पान.
**आर्त** (सं. वि.) पीडिलेला; (स्त्री.) उत्कट इच्छा. **आर्त स्वर**-दुःखिताचा आक्रोश.
**आर्तव** (सं. पु.) स्त्रियांचा विटाळ.
**आर्ति** (सं. स्त्री.) उत्कट इच्छा; दुःख.
**आर्तें** (प्रा. अ.) आवडीनें.
**आर्थिक** (सं. वि.) द्रव्यासंबंधाचें.
**आर्द्र** (सं. वि.) ओला.
**आर्द्रक** (सं. न.) आलें.
**आर्द्रता** (सं. स्त्री.) ओलावा.
**आर्द्रा** (सं. स्त्री.) सहावें नक्षत्र.
**आर्य** (सं. वि.) श्रेष्ठ; (पु.) आर्य लोक.
**आर्यभाषा** (सं. स्त्री.) संस्कृत भाषा.
**आर्या** (सं. स्त्री.) श्रेष्ठ स्त्री; एक मात्रागणवृत्त.
**आर्यावर्त** (सं. पु.) हिमालयापासून विंध्याद्रिपर्यंतचा प्रदेश.
**आर्ष** (सं. वि.) ऋषिप्रणीत; अनियमित; छांदिष्ट; बोबडें (विवे० पू० १।१६).
**आर्‍हां** (प्रा. अ.) अलीकडे.
**आलकट, आलगट** (प्रा. वि.) हलकट; अल्लड, हूड (तुका० १९७).
**आलंकारिक** (सं. वि.) अलंकारयुक्त.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आलक्तक (सं. पु.) अळिता.
आलखपलख (क्रि.) मांडी घालणें—मारणें.
आलग (प्रा. न.) अग्र (अमृ० २।१९)
आलवेला (प्रा. वि.) हलका; सैल; अनिश्चित; लाडका.
आलवेलीं (प्रा. अ.) सहजासहजीं.
आलमखाना (फा. पु.) वाद्यशाळा.
आलय (सं. पु.) घर.
आलवाल (सं. न.) आळें.
आलस्य (सं. न.) आळस.
आलाप (सं. पु.) भाषण, गप्पासप्पा; (गायनांत) तान.
आलापिनी (स्त्री.) सतराव्या श्रुतीचें नांव, वीणा.
आलाय-बलाय घेणें कुरवाळणें.
आलिंगणें (सं. क्रि.) भेटणें, कवटाळणें.
आलिंगन (सं. न.) कवटाळणें, मिठी मारणें.
आलिजाहा (फा. आलिजाह वि.) भव्य; उदार; विस्तृत.
आली (सं. स्त्री.) सखी.
आलुबोखार (फा. पु.) एक औषध.
आलें (सं. आर्द्रक न.) ओली सुंठ.
आलेख्य (सं. न.) चित्र.
आलोक (सं. पु.) देखावा; दृष्टीचा टप्पा.
आलोच (प्रा. पु.) विचार.
आलोचन (सं. न.) आलोचना (सं.) स्त्री.) पूर्ण विचार, परीक्षण.
आलोट (प्रा. वि.) खरें.
आलोडणें (क्रि.) घुसळणें; विचार करणें.
आलोढणें (प्रा. क्रि.) पारंगत होणें; हस्तगत करणें; घुसळणें.
आल्याड (प्रा. अ.) या पार.
आल्हाद (सं. पु.) हर्ष, आनंद.
आव (प्रा. पु.) प्रतिष्ठा, महत्त्व; आकार; डौल; उद्भव, उगम (सोहि० मह०); अवडंबर; धैर्य; उत्साह (मोरो० उद्यो० ५।३४); पकडशक्ति.
आंव (स्त्री.) आम, आमांश.
आवई (स्त्री.) बातमी, गप्प.
आवक (हिं. वि.) आलेला, आयात.
आंवक (प्रा. वि.) अवाच्य.
आवग (प्रा. पु.) अहंकार.
आवगणें (प्रा. क्रि.) आटोपणें; स्वच्छंदानें वागणें; अंगीं आणणें (तुका० ६५८).
आवगी (प्रा. स्त्री.) स्वैर बुद्धि.
आवजाव (हिं. स्त्री.) विनाकारण हेलपाटे, येरझारा.
आवट (पु.) इमारती लांकडांचा ढीग.
आवटचावट (वि.) भलतें सलतें.
आवटणें (प्रा. वि.) उरणें.
आवड (स्त्री.) प्रीति.
आवडणें (क्रि.) प्रीतीस पात्र होणें.
आवडताही भलत्यासही.
आवडळ (प्रा. वि.) साकार, दृश्य.
आवडाव (पु.) आटोका, सपाटा.
आवडी (प्रा. स्त्री.) आवड.
आवडें (प्रा. वि.) भलतें (ज्ञा० ७।११९).
आवण (न.) गाडीच्या चाकाच्या भोंकांत घातलेले लोखंडी वेढे.
आंवणी (स्त्री.) भाताच्या रोपांचें स्थलांतर करणें.
आंवणू (न.) रोपांची आंवणी करण्यासाठीं तयार केलेली जागा.
आवतणें, आवंतणें (सं. आमंत्रण न.) बोलावणें.
आवंतर (वि.) बाकीचे, किरकोळ, इतर.
आवंदा (क्रि. वि.) यंदा.
आवर आटोप (पु.) संकोच; व्यवहार बंद करणें; व्यवस्था, कारभार.
आवरजून (अ.) मुद्दाम; निक्षून.
आवरण (सं. न.) आच्छादन; आटोप; भाद्रपद शु० २ च्या रात्रीचें बायकांचें आकंठ भोजन.
आवरणें (सं. क्रि.) व्यवस्था लावणें, संभाळणें; आटोपण; वेष्टणें. [वगैरे.
आवरसावर (स्त्री.) बांधाबांध; झाकपाक
आवरी (प्रा. पु.) कारभारी.
आवर्त (सं. पु.) भोंवरा.
आवर्तन (सं. न.) आवृत्ति, पाठ.
आवलणें (प्रा. क्रि.) वल्हवणें.
आवला (प्रा. पु.) पुरुष.
आवलि-ली (सं. स्त्री.) रांग, पंक्ति.
आवलें (प्रा. न.) वल्हें.

नगर वाचनालय, सातारा.


**आवश्यक** (सं. वि.) जरूरीचा, निकडीचा.
**आंवस** (सं. अमावास्या स्त्री.) अमावास्या.
**आवसा** (स्त्री.) अमावास्या (अमृ० ४।२५); पर्णकुटि.
**आंवळणें** (क्रि.) मिठी मारणें, घट्ट बांधणें.
**आंवळा** (सं. आमलक पु.) फलविशेष; **आं० येवढें पुज्य**—अत्यंत अभाव; **आं० देऊन कोहळा काढणें**—क्षुद्र वस्तूच्या मोबदल्यांत पुष्कळ घेणें.
**आवळीं जावळीं** (वि. अने.) जुळीं.
**आवा** (पु.) ओल्या भाताची मूठ; कुंभाराची भट्टी; (स्त्री.) स्त्री.
**आवांका** (प्रा. पु.) विचार, वैर्य, अभिमान, एकीकरण; सार; आकलन.
**आवाज** (फा. पु.) नाद, सूर, ध्वनि.
**आवाजदारी, आवाजी** (फा. स्त्री.) सुरेलपणा.
**आवाजेवा** (पु.) येण्याजाण्याचा रस्ता, वहिवाटीचा हक्क.
**आवारा, आवारूं** (प्रा. पु.) खटाटोप; (न.) अंगण. (पु.) भटक्या.
**आवारी** (पु.) शेतावरचा मुकादम.
**आवारूं** (नंदभाषा) दोन. [भिंत.
**आवारूं** (प्रा. ना.) कुंपण, भोंवतालची
**आवास** (सं. पु.) राहणें, वस्ति.
**आवाहन** (सं. न.) बोलावणें; प्रारंभ.
**आवाळी** (प्रा. स्त्री.) राक्षसी (मुक्ते० रामा० ४।६५) [चामखीळ.
**आवाळूं** (न.) मांसपिंड, मांसवृद्धि,
**आवाळें** (प्रा. न.) डोकें (वेणा० सीता० १।६५) [होणें.
**आविर्भवणें** (सं. क्रि.) दिसणें, व्यक्त
**आविर्भाव** (सं. पु.) प्रकट स्वरूप; डौल; अवतार. [तरलेला.
**आविर्भूत** (सं. वि.) प्रकट झालेला; अव-
**आविष्करण** (सं. न.) प्रकट करणें; उघडकीस आणणें.
**आविष्ट** (सं. वि.) पछाडलेला; युक्त.
**आंविस** (सं. आमिष न.) लालूच.
**आविसाळें** (प्रा. न.) घरटें.
**आवीज** (पु.) सूचना, नोटीस.
**आवृत** (सं. वि.) व्याप्त.
**आवृत्ति** (सं. स्त्री.) उजळणी; पुनर्जन्म; पुनर्मुद्रण.
**आवेग** (सं. पु.) मनःक्षोभ; आवेश.
**आवेदन** (सं. न.) नम्रतापूर्वक विनंति.
**आवेव** (पु.) अवयव.
**आवेश** (सं. पु.) जोर; क्षोभ; वेग; त्वरा.
**आवो** (पु.) प्रतिष्ठा.
**आव्हाटचक्र** (न.) मायाजाळ.
**आव्हा** (प्रा. वि.) उजवा; (सं. आह्व स्त्री.) नांव.
**आव्हाटा** (प्रा. पु.) प्रतिबंध, आडमार्ग (ना० १४।२९); आखाडा (सोहि० अक्षय०).
**आव्हान** (सं. न.) बोलावणें.
**आव्हानणें** (क्रि.) बोलावणें.
**आव्हाशंख** (प्रा. पु.) दक्षिणावर्ती शंख; अतिशय दरिद्री मनुष्य.
**आश** (सं. आशा स्त्री.) आशा. [प्रणयी.
**आशक** (अर. वि.) खुष, फिदा, अनुरक्त,
**आशकडी** (प्रा. स्त्री.) असंगतपणा.
**आशंका** (सं. स्त्री.) संशय, अंदेशा.
**आशय** (सं. पु.) अभिप्राय; हेतु; स्थान; संग्रह.
**आशा** (सं. स्त्री.) इच्छा, अपेक्षा.
**आशाहामतपन्हा** (अर. पु.) राज्याचा रक्षणकर्ता.
**आशाळभूत** (वि.) दृढ आशा धरून याचना करीत बसलेला.
**आशीर्वचन** (न.) **आशीर्वाद** (पु.) तुझें कल्याण होवो अशा अर्थाचें बोलणें.
**आशीविष** (सं. पु.) साप.
**आशु** (क्रि. वि.) लवकर.
**आश्चर्य** (सं. न.) नवल, चमत्कार, अद्भुत गोष्ट.
**आश्रम** (सं. पु.) पर्णकुटिका; ऋषीचें निवासस्थान; ब्रह्मचर्यादि चार अवस्था.
**आश्रय** (सं. पु.) आधार, थारा.
**आश्राइणें** (प्रा. क्रि.) आश्रय करणें.
**आश्राप** (वि.) गरीब.
**आश्रित** (सं. वि.) आश्रयास असलेलें.
**आश्लेषणें** (सं. क्रि.) आलिंगणें.
**आश्लेषा** (सं. स्त्री.) नववें नक्षत्र.

**आश्वलायन** (सं. पु.) ऋग्वेदाची एक शाखा, किंवा त्या शाखेचा ब्राह्मण.
**आश्वासन** (सं. न.) धैर्य देणारें भाषण; वचन. [ सातवा महिना.
**आश्विन** (सं. पु.) चैत्रापासून अनुक्रमानें
**आषाढ** (सं. पु.) हिंदुवर्षाचा अनुक्रमानें चौथा महिना.
**आषाढी** (स्त्री.) आषाढांतील एकादशी.
**आस** (सं. स्त्री.) इच्छा; अस्तित्व.
**आंस** (सं. अक्ष पु.) गाडीचा कणा.
**आसकड** (प्रा. न.) दुर्गम स्थान; गाडीचा आंस.
**आसकें** (प्रा. वि.) सर्व. [ रक्त, रत.
**आसक्त** (सं. वि.) तत्पर; तल्लीन; अनु-
**आसक्ति** (सं. स्त्री.) अनुराग; तत्परता.
**आसट** (प्रा. वि.) आशाळभूत; पातळसर.
**आंसड** (पु.) सड.
**आसडा** (प्रा. पु.) हिसका; आसडी.
**आसडी** (स्त्री.) गाय, म्हैस, बैल वगैरेंनीं मारलेली लाथ.
**आसणी** (स्त्री.) घुसळखांबाची दोरी.
**आसन** (सं. न.) आंगठाण; बैठक, बसकर. [ पद्धति.
**आसनमांडी** (स्त्री.) बसण्याची एक
**आसन्नमरण** (सं. वि.) मरणोन्मुख.
**आसपाय** (अ.) जवळपास, भोंवतालीं.
**आसपास** (क्रि. वि.) भोंवतालीं.
**आसमंतात्** (अ.) आसपास.
**आसमाय** (प्रा. वि.) न मावणारा, फार.
**आसमास** (प्रा. वि.) पुष्कळ; (अ.) भोंवतीं (रामवि० १८।१३६); नेहमीं (हरिवि० ७।१४९).
**आसर** (हिं. असर पु.) परिणाम.
**आसरा** (सं. आश्रय पु.) थारा; (स्त्री.) जलदेवता.
**आसव** (सं. पु.) मद्य; निचरून काढलेला द्रव.
**आसवणें** (प्रा. क्रि.) आशावद्ध होणें.
**आसामी** (अर. स्त्री.) असामी पहा.
**आसान** (फा. वि.) सोपें.
**आसार** (प्रा. पु.) पर्जन्यधारा. [ करणें.
**आसवणें** (प्रा. क्रि.) आशा उत्पन्न
**आसावरी** (स्त्री.) एक रागिणी.
**आसाहेब** (अ.) अधिकाऱ्यास उद्देशून घालावयाचें संबोधन. [ रामा० ८।६५).
**आसाळी** (प्रा. स्त्री.) भूत (मुक्ते०
**आसिक** (प्रा. वि.) असणारा.
**आसुक** (प्रा. न.) वस्त्र.
**आंसुडणें** (क्रि.) पाखडणें; झटका देणें.
**आसुदें** (प्रा. वि.) आयतें, कष्टरहित.
**आसुरी** (वि.) राक्षसी; आ० उपाय—धाडसाचे उपचार; आ० निद्रा—कुंभकर्णाची झोंप, घोर निद्रा. आ० संपत्ति—जोरजुलमानें, अन्यायानें अथवा निंद्य मार्गानें मिळविलेलें धन; तमोगुणांचा संचय.
**आसू** (न.) बाष्प; अश्रु.
**आसूड** (पु.) चाबूक.
**आंसें** (न.) किंकरें.
**आसोस** (प्रा. वि.) फार; (स्त्री.) इच्छा.
**आसोळें** (प्रा. न.) घरटें, कोठा.
**आस्तिक** (सं. पु.) ईश्वर आहे असें मानणारा; परलोक मानणारा.
**आस्तिक्य** (सं. न.) ईश्वराच्या किंवा परलोकाच्या अस्तित्वाविषयीं मान्यता, आस्तिकपणा.
**आस्ते** (फा. क्रि. वि.) सावकाश.
**आस्था** (सं. स्त्री.) काळजी; आदर; मनापासून अगत्य.
**आस्थेवाईक** (वि.) आस्था बाळगणारा.
**आस्पद** (सं. न.) स्थान.
**आस्फालणें** (क्रि.) आपटणें.
**आस्फुरणें** (क्रि.) फुंकणें; वाजविणें.
**आस्मानगिरी** (फा. स्त्री.) छत.
**आस्वल** (पु. स्त्री. न.) अस्वल.
**आस्वाद** (सं. पु.) चव, लज्जत.
**आहणा** (प्रा. पु.) म्हण, वचन, कोडें.
**आहवन** (न.) वचन.
**आहवनीय** (सं. वि.) अग्निहोत्र्याच्या पांच अग्नींपैकीं एक.
**आहाकटा, आहाकाटा** (प्रा. पु.) हांकाटी, ओरड (तुका० ७५).
**आहाच** (प्रा. अ.) वरवर, साधारणपणें; (वि.) सामान्य.

आहाचपण (प्रा. न.) वरवरची कृति.
आहाच-वाहाच (प्रा. अ.) वरवर.
आहाण (प्रा. वि.) सर्व.
आहाणा (पु.) म्हण, उखाणा, कोडें; (वि.) आत्मघातकी.
आहार (सं. पु.) खाणें, भक्ष्य; आहारीं असणें—आटोक्यांत असणें.
आहारोळी (स्त्री.) अरोळी पहा.
आहाळ (प्रा. पु.) खळगा.
आहाळणी (प्रा. स्त्री.) दुःख, त्रास.
आहाळणें (प्रा. क्रि.) पोळणें; हालणें.
आहाळ-वाहाळ (प्रा. वि.) संपूर्ण.
आहिक्य (सं. ऐहिक्यम् न.) ऐहिकता.
आहिताग्नि (सं. पु.) अग्निहोत्री.
आहुति (सं. स्त्री.) हवनद्रव्य. [ दिलेला.
आहूत (सं. वि.) बोलाविलेला; नांव
आहे (प्रा. स्त्री.) ज्वाळा.
आहेवपण (सं. अविधवा न.) सौभाग्य.
आहो (पु.) प्रतिष्ठा; आकार.
आह्निक (सं. वि.) रोजचें; दिवसाचें (न.) दिवसाचें धार्मिक कृत्य; स्नान, भोजन वगैरे नित्यविधि. [ ३।१६०).
आह्या (प्रा. स्त्री.) झळा, ज्वाळा (भा०
आल्हाद (सं. पु.) आनंद.
आव्हान (सं. न.) बोलावणें; न्यायसभेचें बोलावणें; कुस्तीला किंवा वादाला बोलावणें.
आळ आळी (प्रा. पु.) आरोप; लळा; छंद, हट्ट; गल्ली; पट्टी. [ २।५।३१).
आळकेपण (प्रा. न.) आवड (दा०
आळंच (पु.) आळस.
आळणा (पु.) पंखा.
आळमाळ (प्रा. वि.) थोडा, अल्प, अळुमाळ.
आळवण (प्रा. स्त्री.) विनवणी.
आळवणें अळवणें पहा.
आळवाळ (सं. आलवाल न.) अळें.
आळशी (सं. अलस वि.) सुस्त; (स्त्री.) जवस; आळशावर गंगा—अनायासें घडून आलेली भाग्याची गोष्ट.
आळस (सं. आलस्य वि.) सुस्ती. [ होणें.
आळसावणें (क्रि.) आळशी किंवा सुस्त
आळा (पु.) निर्बंध, मर्यादा, बांध.
आळाटोळा (पु.) अंदाज.
आळाबांधा (पु.) निर्बंध. [ २।३।३३).
आळिका (प्रा. वि.) हावरा (दा०
आळियाडें (प्रा. न.) आळ; हट्ट.
आळी (प्रा. ना.) छंद, हट्ट (ज्ञा० ११। ५७९).
आळीकें (प्रा. वि.) हट्ट किंवा छंद घेणारें.
आळीपाळीनें (क्रि. वि.) कांहीं वेळ एकानें आणि कांहीं वेळ दुसऱ्यानें अशा प्रकारें.
आळीव (प्रा. स्त्री.) नाद; प्रेम.
आळु (हिं. पु.) बटाटा.
आळुक (प्रा. वि.) भुकेला; आसक्त; लाडका; (स्त्री.) असह्यता.
आळुकेलें (प्रा. वि.) भुकेलें.
आळें (न.) 'अळें' पहा [ मुरगळा.
आळेपिळे (मु. अनें.) अंगाचें पिळवटणें,
आक्षिप्त (सं. वि.) नामंजूर केलेला.
आक्षेप (सं. पु.) शंका; निंदा.
आक्षेपक (सं. पु.) शंका काढणारा.
आक्षेपणें (सं. क्रि. ) आकर्षणें; वाद घालणें, शंका घेणें, विचारणें.
आज्ञा (सं. स्त्री.) हुकूम.
आज्ञाधारक (सं. पु.) आज्ञा पाळणारा.
आज्ञापणें (सं. क्रि.) आज्ञा करणें.
आज्ञापत्र (सं. न.) सरकारी हुकूम.

---

## इ

इ मराठी वर्णमालेंतील तिसरा वर्ण.
इकडचा (वि.) या बाजूचा; **इकडचा तिकडचा**—चार ठिकाणचा; **इ०चा डोंगर तिकडे करणें**—फार प्रचंड काम करणें.
इकडून (अ.) येथून; (बायका 'नवऱ्याकडून' या अर्थी इकडून असें म्हणतात.)
इकडे, इकडेस (अ.) या बाजूस.
इकडे-तिकडे (अ.)अलीकडे पलीकडे, चार ठिकाणीं, आसपास.
इकरार (अर. पु.) कबुली, ठराव.
इखलास (अर. स्त्री.) मैत्री, स्नेहभाव.

**इंगरेज, इंग्रज** (पोर्तु. पु.) साहेब; इंग्लंड देशाचा मनुष्य.
**इंगळ, इंगळा** (सं. अंगार पु.) निखारा.
**इंगळी** (प्रा. स्त्री.) ठिणगी; मोठा काळा विंचू.
**इंगा** (पु.) कातडें घोटण्याचें चांभाराचें हत्यार; नांगरलेल्या जमिनींतील मातीचीं ढेकळें फोडण्याचें लांकूड; इं० **फिरणें**—दुर्दैवाच्या तडाख्यांत सांपडणें.
**इंगित** (सं. न.) अभिप्राय; मनोविकाराची बाह्य खूण; अंतस्थ उद्देश.
**इंग्लिश** (इं. वि.) इंग्रजी, विलायती; (न.) इंग्रजी भाषा.
**इंच** (पु.) फुटाचा बारावा भाग.
**इचका** (पु.) एक प्रकारची गोफण.
**इच्छा** (सं. स्त्री.) वासना, वांच्छा, आकांक्षा; (गणितांत) त्रैराशिकांतल्या तीन पदांपैकीं एक; इ० **फल**—त्रैराशिकाचें उत्तर; इ० **भोजन**—जेवणाराला इष्ट वाटेल त्या पदार्थाचें भोजन; इ० **मरण**—मरण्याची इच्छा होईल तेव्हां मृत्यु येणें; इ० **अंक** (सं. पु.)—अंकगणितांत त्रैराशिकांतली प्रमाणांक व मध्यांक या शिवाय असलेली तिसरी रक्कम.
**इच्छिणें** (सं. क्रि.) चिंतणें, वांच्छिणें.
**इच्छित** (सं. वि.) इच्छिलेलें.
**इच्छु** (समासांत वि.) इच्छा करणारा.
**इच्छुक** (पु.) उमेदवार.
**इजत, इज्जत** (अर. स्त्री.) अब्रू, पत.
**इज्जत आसार** (फार. वि.) लौकिकवान्; सन्मान्य.
**इजा** (अर. स्त्री.) अपाय, पीडा.
**इजाफत** (अर. स्त्री.) उत्पन्नांतील वाढ.
**इजाफतखातें** एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं पाठविलेली रक्कम ज्या खातीं लिहितात तें खातें.
**इजाफा** (हिं. पु.) वाढ. [ तीन वेळां.
**इजा बिजा तिजा** एकामागून एक असें
**इजार** (फा. स्त्री.) कमरेपासून पायाच्या घोट्यापर्यंत शरीर झांकावयाचा शिवलेला कपडा.
**इजारदार** (फा. पु.) मक्तेदार.
**इजारा** (फा. पु.) मक्ता.
**इंजिन, एंजिन** (इं. न.) चालक यंत्र.
**इंजिनीयर** (इं. पु.) यंत्राचें काम जाणणारा; रस्ते, घरें इ० कामांची देखरेख करणारा. [ टोला.
**इटकर, इटकूर** (स्त्री.) विटकर; रोडा;
**इटकुली-मिटकुली** (वि.) लहानशी.
**इटबंदी** (स्त्री.) विटांची रचाई.
**इटा** (स्त्री. ) वीट; (पु.) भाला, बर्ची.
**इटाळें** (सं. इष्टिका न.) दगड; विटेचा तुकडा; विटा करण्याचा साचा.
**इटीमिटी** (प्रा. स्त्री.) मुलाची मातीनें दृष्ट काढणें (हकिम० १८।९१).
**इटेकरी** (पु.) बर्ची धारण करणारा.
**इडपाड** (प्रा. पु.) नेट.
**इडपाडीं** (प्रा. अ.) अतिशय कडाक्यानें (शुभा०उद्योग० ११८८).
**इडा** (सं. स्त्री.) नाभिचक्रापासून निघालेली उजव्या बाजूची शरीरांतील मुख्य नाडी.
**इडापिडा** (स्त्री.) सर्व दुःख.
**इंडिया** (इं. पु.) हिंदुस्थान.
**इडूरी** (प्रा. स्त्री.) सांजोरी.
**इडेपाडे** (प्रा. अ.) ईर्ष्येनें.
**इतउत्तर** (सं. अ.) यानंतर, पुढें, इतःपर.
**इतका** (सं. इयत् वि.) येवढा.
**इंतकाल** (अर. पु.) मृत्यु.
**इतकासा** (वि.) थोडा.
**इंतजाम** (अर. पु.) बंदोबस्त , व्यवस्था.
**इंतजारी** (अर. स्त्री.) मार्गप्रतीक्षा.
**इतपत** (वि.) इतक्या प्रमाणापर्यंतचा.
**इतःपर** (सं. अ.) यानंतर, पुढें, इतउत्तर.
**इतबार** (अर. पु.) विश्वास.
**इतबारी** (अर. वि.) विश्वासूक.
**इतमाम** (अर. पु.) सरंजाम; थाटमाट; पूर्णता.
**इतर** (सं. वि.) दुसरें.
**इतरत्र** (सं. अ.) दुसरीकडे.
**इतराजी** (अर. स्त्री.) अवकृपा, गैरमर्जी.
**इतरेतर** (सं. पु.) व्याकरणांत—द्वंद्वसमासाचा एक प्रकार.

**इतलाख** (अर. इतलाक स्त्री.) सूट; इनाम; ठराविक नेमणूक.
**इतलाखी** (अर. वि.) सरकारचा पगार खाणारी, पगारी.
**इतल्ला** (अर. पु.) संबंध; मतलब; बातमी, रिपोर्ट; सूचना.
**इतस्ततः** (सं. अ.) इकडेतिकडे.
**इति** (अ.) समाप्तिदर्शक अव्यय; (स्त्री.) अखेर, शेवट. [ कर्तव्याची समाप्ति.
**इतिकर्तव्यता** (सं. स्त्री.) कार्यक्रम;
**इतिश्री** (सं. स्त्री.) समाप्ति.
**इतिहास** (सं. पु.) वृत्तान्त, कथा.
**इतुका** (प्रा. वि.) इतका.
**इतुकें** (प्रा. वि.) येवढें, इतकें.
**इत्थंभूत** (सं. वि.) सविस्तर.
**इत्यर्थ** (सं. पु.) तात्पर्य, सारांश.
**इत्यादि** (सं. अ.) हे व इतर, वगैरे.
**इदगा** (फा. पु.) इदेच्या दिवशीं प्रार्थनेसाठीं मुसलमानांनीं गांवाबाहेर बांधलेली जागा.
**इदंता** (सं. स्त्री.) हें अमुक असा निर्देश (ज्ञा० १५।२६७).
**इंदिरा** (सं. स्त्री.) लक्ष्मी.
**इंदु** (सं. पु) चंद्र.
**इंद्र** (सं. पु.) देवांचा राजा, श्रेष्ठ.
**इंद्रजव** (न.) कुडयाचें बीं.
**इंद्रजाल** (सं. न.) नजरबंदी, जादू.
**इंद्रधनुष्य** (सं. न.) सूर्याचे किरण मेघावर पडल्यामुळें आकाशांत चित्रविचित्र रंगांची जी धनुष्याकृति दिसते ती.
**इंद्रनीळ** (पु.) एक उंची रत्न.
**इंद्रभुवन** (सं. न. ) इंद्राचें वसतिस्थान; टोलेजंग शोभिवंत वाडा.
**इंद्रवज्रा** (सं. स्त्री.) एक वृत्त, याच्या प्रत्येक चरणांत ११ अक्षरें व त, त, ज, ग, ग हे गण असतात.
**इंद्राणी** (सं. स्त्री.) इंद्राची स्त्री.
**इंद्रायण**, **इंद्रावण** (प्रा. न.) कडू वृंदावन, कवंडळ.
**इंद्रिय** (सं. न.) ज्ञानाचें किंवा कर्माचें साधन व मन; लिंग.
**इंधन** (सं. न.) सर्पण.
**इनसान्** (अर. पु.) माणूस.
**इनसाफ** (अर. पु.) न्याय; निर्णय.
**इनाम** (अर. न.) बक्षीस.
**इनामत** (अर. स्त्री.) देणगी; सारामाफ केलेल्या जमिनीचें दान. [ णारा मनुष्य.
**इनामदार** (फा. पु.) इनाम धारण कर-
**इनायत** (अर. स्त्री. ) मेहेरबानगी, देणगी.
**इनायतनामा** (फार. पु.) वरिष्ठांचें कृपापत्र.
**इबलिस** (अर. पु.) सैतान; खोडकर, व्रात्य; दिसण्यांत साधा पण आंतल्या गांठीचा.
**इभ** (सं. पु.) हत्ती. [धाक.
**इभ्रत** (अर. इब्रत स्त्री.)आब, पत; वजन;
**इमला** (अर. पु.) घर.
**इमान** (अर. न.) सचोटी; सत्यता.
**इ०स जागणें**—इमान कायम ठेवणें.
**इमान-इतबार** (अर. पु.) विश्वास; सद्बुद्धि; प्रामाणिकपणा.
**इमानी** (अर. वि.) इमानदार, प्रामाणिक.
**इमानदार** (अर. वि.) सच्चा, विश्वासूक.
**इमाम** (अर. पु.) मुख्य गुरु, उपदेशक.
**इमामजयंति** (अर. + सं. स्त्री.) मोहरमचा सण.
**इमारत** (अर. स्त्री.) वाडा, इमला.
**इयत्ता** (सं. स्त्री.) प्रमाण, मर्यादा, शाळेंतला वर्ग.
**इयें** (प्रा. सर्वनाम ) हीं.
**इरकली** (वि.) इलकल या विजापूर जिल्ह्यांतील गांवाचें लुगडें. [ओझें.
**इरड** (न.) खाण्यासाठीं धरपड; डोई-
**इर्जिक** (स्त्री.) शेतकऱ्यांचें श्रम-भोजन.
**इरलें** (न.) पळसाचीं पानें, कामटया वगैरेची केलेली छत्री.
**इरस** (पु.) गाडीचा आंस.
**इरसाल** (अर. वि.) अस्सल, उत्तम.
**इराणी** (फा. वि.) इराण देशांतील.
**इराणी घोडा** गाढव.
**इरादा** (अर. पु.) हेतु; बेत; इच्छा.
**इरीरी** (करणें) (क्रि.) बैलांना हांकणें.
**इल्म** (अर. पु.) विद्या, हुन्नर.

**इलाखा** (अर. इलाका पु.) सत्ता; सत्तेखालचा मुलूख; संबंध.
**इलाची, इलायची** (हिं. स्त्री.) वेलदोडे.
**इलाज** (अर. पु.) उपाय; युक्ति.
**इलाही** (हिं. पु.) परमेश्वर.
**इल्ला** (का. पु.) नकार.
**इवलासा** (वि.) थोडासा.
**इश्** (अ.) छि:
**इशारत** (स्त्री.) **इशारा** (अर० पु०) खूण, सूचना.
**इषारा** (पु.) इशारत पहा. [ नाद.
**इष्क** (हिं. पु.) शृंगार; विषय-प्रीति; छंद,
**इष्कबाज** (फा. वि.) विषयासक्त.
**इष्ट** (सं. वि.) इच्छित; हितावह.
**इष्टकाल** (सं. पु.) शुभकाल.
**इष्टापत्ति** (सं. स्त्री.) हवी असलेली गोष्ट विरुद्ध पक्षाकडून आयती मिळणें; प्रतिपक्षाचें आपणांस अनुकूल भाषण.
**इष्टि** (सं. स्त्री.) होम; दर्शादि कर्म.
**इसकील** (अर. स्त्री.) हरकत, अडचण.
**इसन्ने** (अर. इसनान वि.) दोन.
**इसप, इसब** (सं. विसर्पिका पु.) एक त्वचारोग.
**इसम** (अर. पु.) मनुष्य.
**इसम मजकूर** (फार. पु.) मागें किंवा वर सांगितलेला मनुष्य.
**इसमवारी** (स्त्री.) इसमांची यादी.
**इसवी** (अर. इसावी वि.) येशू ख्रिस्ताचा.
**इसळ, इसाळ, इसाळा, इसाळु** (प्रा. पु.) ब्रह्मराक्षस (मुक्ते० सभा० ७।३८); स्पर्धा, ईर्षा, (मुक्ते०रामा० ६।२३)
**इसळ, इसळी** (स्त्री.) **इसळा** (पु.) ईर्षा.
**इसा** (स्त्री.) वीस.
**इसाड** (पु.) नांगराचा दांडा.
**इसार, इसारा** (पु.) विसार, करार पक्का करण्यासाठीं आगाऊ दिलेलें द्रव्य.
**इसितव्य** (सं. न.) ईशित्व.
**इस्टेट** (इं. स्त्री.) मालमत्ता.
**इस्तकबील** (अर० अ.) आरंभापासून.
**इस्तमाली, इस्तयामाली** (अर० वि.) वापरलेला; जुनापुराणा; मामुली; वापरण्यास योग्य; **इ० करणें**–गुधडणें.
**इस्तरी, इस्त्री** (हिं. स्त्री.) ओलसर कपड्याच्या घड्यांवर कडकपणा आणण्यासाठीं फिरविण्याचें अग्निपात्र.
**इस्ताद** (अर. स्त्री.) सामानसुमान, भांडीकुंडी.
**इस्ताफा** (अर. पु.) राजिनामा, पदत्याग.
**इस्लाम** (अर. पु.) महंमदानें स्थापलेला धर्म.
**इस्पितळ** (इं. हॉस्पिटल न.) रुग्णालय, रोग्यांच्या शुश्रूषेचें स्थान.
**इह्दि** (अर. इहद वि.) एक. [ पर्यंत.
**इळवरी** (प्रा. अ.) इतका वेळ, आतां-
**इळा** (पु.) विळा; **इळ्या भोपळ्या इतकें सूत**—शत्रुत्याचें नातें, विरोधी संबंध.
**इळीमिळी** (स्त्री.) एकमेकांना गप्प बसण्याची मुलें इशारत करतात ती.
**इक्षु** (सं. पु.) ऊंस.

---

## ई

ई मराठी वर्णमालेंतील चवथा वर्ण.
**ईचा** (प्रा. पु.) संशय.
**ईट** (सं. इष्टिका स्त्री.) वीट.
**ईटबंदी** (वि.) विटांनीं बांधलेलें.
**ईडलिंबु** (पु.) मोठ्या लिंबांची एक जात.
**ईड्य** ( सं. वि.) स्तवन करण्यास योग्य.
**ईथर** (इं. न.) आकाशतत्त्व.
**ईद** (अर. स्त्री.) मुसलमानांचा सण.
**ईनमीन सवातीन** अगदीं अल्पसंख्या.
**ईर** (सं. वीर्य स्त्री.) शक्ति, जोर; चुरस, ईर्ष्या. **ईरेस घालणें**–स्वत:च्या बचावासाठीं दुसऱ्यास पुढें घालणें; **इ० स चढणें**–चुरस लावून पुढें सरसावणें.
**ईर्ष्या–र्षा** (सं. स्त्री.) उत्साह, हौस.
**ईव** (पु.) पाठीचे सर; पाठींत येणारी कळ; प्रत्येक.
**ईश** (सं. पु.) धनी, राजा.
**ईशत्** (क्रि. वि.) थोडेसें. [ मधील दिशा.
**ईशान्य** (सं. स्त्री.) उत्तर व पूर्व यांच्या-
**ईश्वर** (सं. पु.) देव, भगवान्.
**ईश्वरी तंत्र** (सं. न.) देवाची योजना.

**ईश्वरी देणगी** (स्त्री.) देवानें दिलेली गोष्ट.
**ईश्वरी साक्षात्कार** (सं. पु.) देवाचें प्रत्यक्ष दर्शन.
**ईश्वरी सूत्र** (सं. न.) ईश्वरनिर्मित योजना.
**ईषणा** (सं. स्त्री.) स्त्री–पुत्रादिकांबद्दल आसक्ति; आस्था.
**ईस** (न.) इसाड, नांगराचा दांडा.
**ईसा** (पु.) येशु ख्रिस्त.
**ईहा** (सं. स्त्री.) इच्छा.
**ईक्षण** (सं. न.) अवलोकन; नेत्र.

---

## उ

**उ** मराठी वर्णमालेंतील पांचवा वर्ण.
**उं** (स्त्री.) केंसांत होणारा कृमिविशेष.
**उंः** (अ.) नापसंती किंवा तिरस्कार दर्शविणारें उद्‌गारवाचक अव्यय.
**उकटणें** (क्रि.) रंधून लांकडाला किंवा टाकी देऊन जात्याला नव्यासारखें स्वरूप देणें.
**उकड** (स्त्री.) मोदक वगैरे करण्यासाठीं शिजवून तयार केलेलें पीठ.
**उकडणें** (सं. उत् + क्वथन क्रि.) शिजविणें; उष्मा वाटणें.
**उकडवा, उकिडवा** (वि.) चवड्यावर [ बसलेला.
**उकरडा** उकिरडा पहा.
**उकरणें** (सं. उत् + कृ क्रि.) हलक्या शस्त्रानें खोदणें; **उकरून काढणें**-मागची गोष्ट मुद्दाम पुनः उपस्थित करणें.
**उकल** (सं. पु.) उमज; उलगडा; विवेचन (ज्ञा० ३।५२); अनुभव; सुटका.
**उकलणें** (सं. उत् + किल् क्रि.) गुंता काढणें; उलगडणें; उलणें.
**उकळणें** (सं. उत् + कल् क्रि.) शिजविणें, कढणें; वसूल करणें.
**उकळी** (सं. उत्कलिका स्त्री.) कढ, आधण, उमाळा, आवेशयुक्त उन्मुखता; **उ० फुटणें**–मनोविकारांचा जोर अंतःकरणांत एकाएकीं होणें.
**उकळीत** (न.) वसूल केलेली रक्कम.
**उकाडा** (पु.) उष्मा, गर्मी; दागिन्यांना उजळा देण्यासाठीं तयार करून ठेविलेलें मिश्रण; रतीब.
**उकाल** (पु.) निवाडा.
**उकासु** (प्रा. पु.) प्रवासी.
**उकाळा** (पु.) काढा.
**उकिडवा** टांचा टिरीशीं व गुडघे पोटाशीं येत अशा प्रकारें पावलें टेंकून बसलेला.
**उकिरडा** (सं. उत् + कृ पु.) केरकचऱ्याचा ढीग; **उ० फुंकणें**–दारिद्र्यामुळें यःकश्चित लाभासाठीं भटकणें. [ कचरा.
**उकीर** (पु.) उकरलेल्या मातीचा ढीग;
**उक्त** (सं. वि.) बोललेलें; प्रकट, व्यक्त.
**उक्ता** (वि.) उघडा; मक्त्यानें दिलेला.
**उक्ति** (सं. स्त्री.) भाषण, वचन, वाक्य.
**उक्तें** (अ.) न मागतां; ठोकळ अंदाजानें. (वि.) अंदाजी (माप).
**उक्साबुक्शीं** (क्रि. वि.) मोठ्यानें हेल काढून रडणें.
**उखका** (प्रा. पु.) भावार्थ; कर्तव्यार्थ.
**उखडणें** (हिं. क्रि.) काढणें; हाकून देणें; रागावणें.
**उखणें** (प्रा.क्रि.) जाणणें (भा० २८।४६९).
**उखता** (प्रा. वि.) मोजका, सगळा, (तुका० १४६४).
**उखर** (सं. उषर न.) खडबडीत, रेताड, नापीक जमीन (वाक्य. २३४६); उकिरडा.
**उखरवळी, उखारी** (स्त्री.) पापुद्रा.
**उखर-वाखर** (प्रा. वि.) उच्चनीच.
**उखळ–ळी** (सं. उलूखल न.) कुटण्यासाठीं केलेला दगडाचा खळगा; **उ० पांढरें होणें**–वैभव प्राप्त होणें, नशीब उघडणें.
**उखळणें** ( सं. उत्किरण क्रि. ) ढळणें, सुटणें; उकरणें.
**उखळी** (स्त्री.) उखळ; चरकाच्या लाटांचे आंख ज्यांत फिरतात ती. [ काळ.
**उखा** (सं. उषा स्त्री.) उषःकाळ, प्रातः-
**उखाणा** (पु.) कूटप्रश्न, आहाणा.
**उखाणी** (प्रा. वि.) कल्पित (सोहि०पदें.)
**उखार** (वि.) उथळ.
**उखारी** (प्रा. स्त्री.) दुकान; उंसाचा मळा.
**उखाळ** (प्रा. पु.) वांतीचें औषध (दा० ३।७।३३).

**उखाळी, उखाळीपाखाळी** (स्त्री.) एकाद्याचें वैगुण्य काढून उपस्थित केलेलें भांडण. [(वि.) उदासीन.
**उखित, उखिता** (प्रा. पु.) वाटसरु;
**उखितां** (प्रा. अ.) पूर्णपणें (भा० २९।५५०).
**उखितें** (प्रा. वि.) अवघें; उक्तें.
**उखी** (प्रा. स्त्री.) उठवणीस येणें; मरगळणें (ज्ञा० १३।५३०); नाश; बोलणें; मिथ्याभास; (वि०) व्यर्थ; अनित्य; मरगळलेलें. [पहा.
**उखीर-वाखीर** (प्रा. वि.) उखरवाखर
**उखी-विखी** (प्रा. स्त्री.) ऊहापोह, वादविवाद; घडामोड; आस्था.
**उगटिलें** (प्रा. वि.) वाईट.
**उगड, उगंड** (प्रा. पु.) उद्धार (भा० १७।२२७); सुटका (वा. बो.)
**उगडणें** (प्रा. क्रि.) विसरणें (भा० ९।४५५).
**उगंडू** (प्रा. पु.) विसांवा (भा० ९।४५६).
**उगंत** (प्रा. स्त्री.) उत्पत्ति. [उत्पत्ति.
**उगम** (सं. उद्गम पु.) उत्पत्तिस्थान;
**उगराणी** (स्त्री.) वसूल; वसुली.
**उगला** (प्रा. वि.) उगाच (वामन—राधाविलास); निरिच्छ (रंग. पदें.); (अ०) व्यर्थ (तुका० १०३३)
**उगव** (प्रा. पु.) मूळ, उगम (आनंद—लहरी १०५); उलगडा (एक०३१६७).
**उगवण—णी** (स्त्री.) उगराणी, वसूल.
**उगवणें, उगविणें** (सं. उद्गम् क्रि.) उलगडणें; उकलणें; फोड करून सांगणें (मोरो—कृष्ण. १६।३०); टाकणें; रुजणें.
**उगवत, उगवती** (स्त्री.) पूर्वदिशा.
**उगविणें** (क्रि.) गुंत्यांतून मोकळें करणें; वसूल करणें. [विलेली वैरण.
**उगळ** (स्त्री.) वमन; पायाखालीं तुड-
**उगळणें** (सं. उद्गिरण क्रि.) दयार्द्र होणें; वश होणें (मोरो० कर्ण० २९२९); ओकणें; सोडणें (अमृ० १।३) माघार घेणें.
**उगा** (वि.) स्वस्थ, गप्प.

**उगाच** (अ.) व्यर्थ, निरर्थक, उगीच.
**उगाण** (प्रा. पु.) स्पष्टीकरण, अनुभव.
**उगाणणें** (प्रा. क्रि.) अर्पण करणें; लांबविणें, उपटून नेणें; प्रकट होणें (सोहि० अद्वया. ३।२).
**उगाणवा** (प्रा. पु.) लूट (भा. १।२०९).
**उगाणा** (प्रा. पु.) गणना; झाडा; अनुभव; रुचि (अमृ० ६।१०); नागवण (भा० ८।७८); मुक्तता (तुका०५२); परीक्षा; नाश; उपदेशपर भाषण.
**उगाणें** (प्रा. न.) अगाध अनुभव. (ज्ञा० ७।१९८); हिशोब; ज्ञान (अमृता० ६।११).
**उगासुगा** (अ.) स्वस्थ; बोलल्यावांचून, हालचाल केल्यावांचून.
**उगारणें** (प्रा. क्रि.) वर करणें; चाल करून जाणें (मोरो० द्रोण० १।८५).
**उगाळ** (प्रा. पु.) चावलेला विडा; पीक.
**उगाळदान** (फा. न.) पिकदाणी.
**उगाळणें** (क्रि.) घांसणें, घोटणें, वांटणें.
**उगाळी** (स्त्री.) फोडलेली खडी.
**उगिया** (प्रा. वि.) रिकामा, फुकटचा.
**उगीच** (अ.) उगाच; निष्कारण; स्वस्थपणें; मुकाटयानें; विनाकारण.
**उगीर** (सं. उग्र) उग्र.
**उगेलें** (क्रि. वि.) निवान्त. [रागीट.
**उग्र** (सं. वि.) भयंकर; दुःसह; तामसी,
**उग्रट** (वि.) दुःसह, उग्र वासाचा.
**उग्राणी** (स्त्री.) वसुली.
**उघड** (वि.) स्पष्ट; प्रसिद्धपणानें; (स्त्री.) स्वच्छ हवा, उघाड.
**उघडझांप** (स्त्री.) उघडणें व झांकणें अशी एकीमागून एक होणारी क्रिया.
**उघडणें** (सं. उत् + घट् क्रि.) आच्छादन काढणें; प्रकट करणें; **पर्जन्य उ०**-पाऊस थांवणें; **दैव उ०**—उत्कर्ष होणें.
**उघडमाथा** (अ.) न लाजतां.
**उघड-वाघड** (अ.) उघड उघड.
**उघडा** (वि.) उघडलेला ; खुला; स्पष्ट; निराश्रित; **उ० धोत, उ० बंब, उ०-बागडा**—नग्न. **उघडया डोळयांनीं**—जाणूनबुजून.

**उघडीक** (स्त्री.) प्रसिद्धि; उघाड.
**उघाड** (स्त्री.) पावसाची तहकुबी.
**उंच** (सं. उच्च वि.) वरपर्यंत गेलेला; (अ.) वरपर्यंत.
**उचकटणें** (क्रि.) जोरानें बाहेर काढणें.
**उचकणें** (क्रि.) चोरणें, उपटणें.
**उचका** (पु.) काळजी; घाई; भय; ध्यास.
**उचका, उचक्या** (पु.) उचल्या, भामटा.
**उचकी** (स्त्री.) गुचकी, हिक्का.
**उचटणें** (क्रि.) चिकटलेला पदार्थ वर उचलून काढणें; (न.) तसें करण्याचें साधन.
**उंचनीच** (वि.) उंचसखल; उत्तमाधम.
**उचंबळणें** (प्रा. क्रि.) हेलकावणें (विवे० पू. १।४१); वाढणें; वर येणें; हर्षणें.
**उचंबळा** (प्रा. पु.) उकळी. [ जागृति.
**उचल** (स्त्री.) उत्थान; उठाण, उत्तेजन.
**उचलणें** (सं. उच्चल क्रि.) वर करणें; उठविणें; रक्कम घेणें.
**उचलपांगडी, उचलबांगडी** (स्त्री.) बलात्कारानें उचलणें.
**उचलून धरणें** (क्रि.) समर्थन करणें, आधार देणें; उत्कर्ष करणें.
**उचल्या** (पु.) भामटा.
**उंचवटा** (पु.) उंच भाग, टेकाड.
**उंछवृत्ति** (स्त्री.) शेत कापून नेल्यावर राहिलेले दाणे घेऊन निर्वाह करणें.
**उचाट** (प्रा. ना.) उत्कंठा; लिलांव; घाई.
**उचापत** (हिं. स्त्री.) उधारी, कर्ज.
**उंचावणें** (क्रि.) उंच होणें.
**उचित** (सं. वि.) संवयीचें, अभ्यासांतलें; योग्य.
**उंची** (सं. उच्च वि.) सरस, श्रेष्ठ. (स्त्री.) उंचपणाचें प्रमाण.
**उंचेला** (वि.) उंचसा.
**उच्च** (सं. वि.) उंच, श्रेष्ठ.
**उच्चपदस्थ** (सं. वि.) मोठ्या अधिकाराच्या किंवा मानाच्या जागीं असलेला.
**उच्चाट** (पु.) उचल्या, भामटा; आतुरता.
**उच्चाटन** (सं. न.) उखडणें, घालवून देणें; उचलबांगडी.
**उच्चार** (सं. पु.) बोलून दाखविणें.
**उच्चारणें** (क्रि.) तोंडांतून काढणें.
**उच्छाद** (पु.) पुरेपुरेसें करणें; अतिशय त्रास, उपद्रव.
**उच्छाल** (पु.) वाढ. [ मारणें.
**उच्छाल जाणें** (क्रि.) संतापणें; उडी
**उच्छ्वास** (सं. पु.) श्वास टाकणें; सुस्कारा.
**उच्छिन्न** (सं. वि.) नष्ट झालेलें.
**उच्छिष्ट** (सं. वि.) उष्टें. **उ० कल्पना**—(स्त्री.) उष्टी कल्पना.
**उच्छृंखल** (सं. वि.) स्वैर, स्वेच्छाचारी.
**उच्छेद** (सं. पु.) समूळ नाश.
**उजगारा** (सं. उज्जागृ पु.) जागरण; दुःख; श्रम; कंटाळा (तुका० १६७६); उशीर.
**उजगारी** (स्त्री.) उत्कर्ष, उघडकी, प्रसिद्धि.
**उजदार** (उज + दार न.) पुढचा दरवाजा (देवनाथ पृ. ५६१).
**उजर** (सं. उज्ज्वल पु.) उत्कर्ष.
**उजरणें** (क्रि.) डागडुजी करणें.
**उजरा** (प्रा. पु.) प्रसिद्धि; प्रसिद्ध मार्ग.
**उजरी, उजिरी** (प्रा. स्त्री.) चकाकितपणा, तेज (ज्ञा० १५।५९०); उत्कर्ष (र. यो. १०।५९१); उदय, प्रभा (तुका० ४१३१); (वि.) स्वच्छ; निर्मळ (ज्ञा. ६।९७).
**उजवण** (सं. उज्ज्वलन न.) विवाह (दा० ३।४।७); साफल्य (ज्ञा. १०।१४७); उद्यापन, समाप्ति (भा० ३०।४०).
**उजवा** (वि०) सव्य; सरळ; सरस.
**उजळ** (सं. उज्ज्वल वि.) निर्मळ, चकचकीत. **उ० माथा** (पु.) आरोपांतून सुटका.
**उजळणी** (स्त्री.) शिकलेल्या धड्यांची आवृत्ति; आंकडे व त्यांचे पाढे.
**उजळणें** (सं. उज्ज्वलन क्रि.) चकाकी आणणें; प्रकाशित होणें; निवळणें.
**उजळा** (पु.) दागिन्याला चकाकी येण्यासाठीं सोरा, नवसागर, मोरचूद व पाणी यांचा केलेला खल; तकाकी.
**उजागर** (सं. उत् + जागर अ.) उघडपणें.

**उजागरा** (पु.) जागरण; धैर्य. [ उत्कर्ष.
**उजागरी** (स्त्री.) प्रसिद्धि; प्रज्वलता;
**उजागीर** (वि.) निर्लज्ज; उघड.
**उजाड** (वि.) ओसाड; वस्तिहीन.
**उजाडणें, उजेडणें** (प्रा. क्रि.) प्रभात होणें; कार्यारंभ होणें; अनुकूल काळ प्राप्त होणें.
**उजाडी** (स्त्री.) ओसाडपणा, उध्वस्तता.
**उजाळ, उजाळू, उजाळें** (सं. उज्ज्वल वि.) उजळ, पांढरें (अमृ० ५।३); (पु.) प्रकाश; कीर्ति; स्वच्छपणा.
**उजिवड, उजिवडें** (प्रा. न.) उजेड.
**उजिवण** (प्रा. स्त्री.) सार्थक (ज्ञा० १०।१४७).
**उजीर** (सं. ऋजु वि.) सरळ.
**उजुकार** (प्रा. पु.) सरळ रीत, सरळपणा.
**उजू** (सं. ऋजु वि.) सरळ, नीट, योग्य.
**उजूर** (अर. पु.) आक्षेप; सबब (तुका० ३०१०); काम; हक्क.
**उजेड** (उत् + ज्वल् पु.) प्रकाश, प्रभा; **उ० पाडणें** (उपहासार्थीनें) मोठें कृत्य करणें. [ चकीत.
**उज्ज्वल** (सं. वि.) प्रकाशमान, चक-
**उट** (प्रा. ना.) हूटहूट, कटकट (तुका० ७९).
**उंट** (सं. उष्ट्र पु.) उंट; **उं० वरचा शहाणा**—मूर्खपणाची मसलत देणारा.
**उटक** (प्रा. वि.) उथळ (विवे० पू० १।८४); उंचवटयाची, खडकाळ.
**उटकण** (प्रा. न.) दूर होणें, अवर्षण.
**उटकणें** (प्रा. क्रि.) उच्चाटन होणें.
**उटकर, उटकळ** (वि.) डगमगणारा, (धोंडा).
**उटकें** (प्रा. न.) उंच खडक.
**उटंगळ** (वि.) वर खालीं झालेला; साफ न वसलेला. (पु.) उंचवटा; उटंगर.
**उटज** (सं. न.) पर्णकुटि.
**उटणें** (प्रा. क्रि.) घांसणें, स्वच्छ करणें (ज्ञा० ११।१५७); (न०) मळ काढण्यासाठीं अंगाला लावावयाचा पदार्थ, उटी. [ ठेव; नसता उद्योग.
**उटारेटा** (पु.) **उटारेटी** (स्त्री.) उठा-
**उटाळणें** (प्रा. क्रि.) उठविणें, उत्पन्न करणें (दयाळ० पृष्ठ ९३).
**उटाळा–ळी** (पु. स्त्री.) तरफ.
**उटी** (स्त्री.) महात्म्य, तेज, रंग (भा० ११।७४६); सुगंधि द्रव्याचा लेप.
**उट्टें** (न.) मोबदला.
**उठकळ–ळा** (स्त्री.) उठण्यास होणारें कारण; निघून जाण्याची पाळी; निघून जाण्याविषयींचा तगादा.
**उठणें** (उत् + स्था क्रि.) उभें राहणें; जागें होणें; **उठतां बसतां, उठल्या बसल्या**—प्रतिक्षणीं; **रोज उठून**—रोजच्यारोज.
**उठवशी** (स्त्री.) उठण्याबसण्याची मेहनत.
**उठवळ** (वि.) आळशी.
**उठविणें** (क्रि.) उभें करणें; जागृत करणें; चेतवणें, कंडी पिकवणें.
**उठाउठी** (प्रा. अ.) तत्काळ, सत्वर.
**उठागीर** (हिं. पु.) उचल्या.
**उठाठेव** (स्त्री.) रिकामी खटपट, पंचाईत.
**उठाण, उठाणें** (सं. उत्थान न.) उठवणी, उसळी (दयाळ० पृ. ३८).
**उठाणूं** (न.) गळूं, बेंड.
**उठाबशी** उठवशी पहा.
**उठारेठा** (पु.) उठाठेव, लुडबूड; भलताच उद्योग; कुटाळक्या, टेलटिकोऱ्या.
**उठाव** (पु.) वर आलेला भाग; एकंदर स्वरूप; खर्च. [ खोरी.
**उठावणी** (स्त्री.) उत्तेजन, जागृति; बंड-
**उठावदार** (वि.) डोळ्यांत भरणारा; चांगला उठाव असलेला.
**उडगण** (सं. उडुगण पु.) नक्षत्रें.
**उडंग, उडंगु** (प्रा. पु.) त्रास.
**उंडगा** (पु.) उडाणटप्पू, उपरा.
**उंडण, उंडणी** (प्रा. स्त्री.) किडी, अळी, (भा० ५।९३).
**उडणें** (सं. उत् + डी क्रि.) अंतरिक्षांत संचार करणें; स्फोट होणें, फुटणें; खपणें; मैथुन करणें; मंद होणें; नाहींसें होणें; खर्च होणें; घडणें; पळून जाणें; उडी मारणें.
**उडतें पांखरूं** (न.) चंचल, अस्थिर माणूस.

**उडत वातमी** (स्त्री.) गप्प, भुमका.
**उडंत** (स्त्री.) वानरांची लढाई.
**उडप** (न.) वाघाला मारण्याकरतां मेलेलें जनावर ठेवून भोंवतीं केलेलें कुंपण.
**उडवा** (स्त्री.) **उडवें** (न.) रास, ढीग (ज्ञा० १८।७२५). [ कोलवी.
**उडवाउडव** (स्त्री.) टाळाटाळी, कोलवा-
**उंडा** (प्रा. पु.) गोळा.
**उडाऊ** (वि.) उधळ्या. [ (पु.) गांदगुंड.
**उडाणटप्पू** (वि.) खुशालचंद, भटक्या,
**उंडारणें** (क्रि.) भाजणें.
**उडाळ** (वि.) चंचल.
**उडी** (सं. उत् + डी स्त्री.) झेंप, उड्डाण; तीव्र आकांक्षा; उमेद; गर्दी.
**उंडी** (प्रा. स्त्री.) नैवेद्य, वळी (ज्ञा० १७।९७); कवळ, घांस (भा० ८।१७३).
**उडीद** (पु.) एक धान्य, माष.
**उडु** (सं. न.) नक्षत्र.
**उड्डान, उड्डाण** (सं. न.) उडी.
**उड्डियान** (सं. न.) हृदयस्थान.
**उढा** (पु.) बांबूची एक जात.
**उणखूण** (प्रा. स्त्री.) हेतु, मनोगत (ज्ञा० १३।८०१); पूर्ण प्रत्यय.
**उणवट** (प्रा. वि.) अल्प मोलाचें.
**उणा** (सं. ऊन वि.) कमी, न्यून; हलका; अयोग्य.
**उणापुरा** (वि.) कमजास्त; सरासरी.
**उणाव** (प्रा. पु.) कमताई.
**उणी** (प्रा. वि.) कमी.
**उणीव** (सं. ऊन स्त्री.) कमीपणा, न्यूनता.
**उणें** (सं. ऊन न.) धिक् जिणें (ज्ञा० ११।३७); न्यून, कमीपणा; हलकें काम (ज्ञा० १५।२५); (वि.) कमी; (अ०) वांचून (ज्ञा. १८।९४५).
**उणें उत्तर** (न.) अपमानकारक भाषण. **उणें पाहणें**–दोष काढणें.
**उत** (प्रा. पु.) ऊत, भर.
**उतटणें** (सं. उत् + तट्ट क्रि.) उचंबळणें (दा० १।७।३३); उकलणें (भा० १२।९७५); फाटणें.
**उतणें** (क्रि.) माजणें; वरून वाहणें; चिडणें; खतखतणें; फुगणें, ताठणें.
**उतणें** (क्रि.) बिब्याचें तेल, उंबर वगैरेचा चीक त्वचेला लागून तिच्यावर पुट-कुळ्या किंवा फोड उठणें.
**उतती** (प्रा. स्त्री.) उदवृत्ती (विठ्ठल-रुक्मिणी० ४।११).
**उतरड, उतरंड, उतरण** (सं. उत् + तरण स्त्री.) उतार, उतरती जागा.
**उतरंड** (स्त्री.) खालीं मोठें व वर लहान अशा रीतीनें एकावर एक भांडीं ठेवून केलेली रचना.
**उतरणें** (स्त्री.) खालीं येणें; उचलून खालीं ठेवणें; पार जाणें; उंची कमी करणें; नक्कल करणें; टिपून घेणें; दर्जा कमी करणें; ओंवाळून टाकणें; काढून ठेवणें; पास होणें, उत्तीर्ण होणें; कमीपणा येणें. [ खालीं येणारा.
**उतरता** (वि.) क्षीण होत चाललेला;
**उतरती कमान** क्षय, ऱ्हास.
**उतरती भांजणी** मोठ्या परिमाणाला हलक्या परिमाणाचें स्वरूप देणें.
**उतरपेठ** (प्रा. स्त्री.) व्यापाराचें मुख्य ठिकाण.
**उतराई** (सं. उत् + तॄ वि.) ज्याच्या हातून उपकार फिटले आहेत असा.
**उतराण** (स्त्री.) उत्तरेचा वारा.
**उताट, उताटकी** (स्त्री.) उतावळी.
**उताणणें** (प्रा. क्रि.) वर्णन करणें.
**उताणा** (सं. उत्तान् वि.) उलथा, चीत.
**उताणा-पाताणा** (अ.) गडबडां फिर-वून; एकदां पाठ व एकदां पोट जमि-नीस लागेल अशा रीतीनें फिरून.
**उतानी** (प्रा. स्त्री.) इच्छा, आवड.
**उतार** (सं. उत् + तॄ पु.) नदी ओलां-डून जाण्यासारखी जागा; औषधाची तीव्रता किंवा विषारी पदार्थाचे परिणाम कमी करणारें औषध; ऱ्हास; नावेचें भाडें, नोर. [ प्रवासी.
**उतारकरी, उतारकरू** (पु.) पांथस्थ,
**उतारचढ** (पु.) खालीं वर होणें.
**उतारपेठ** (स्त्री.) व्यापाराची पेठ; व्यापा-राचें शहर किंवा बंदर.
**उतारवय** (न.) म्हातारपण.

**उतारा** (पु.) उपाय; उतरून घेतलेला ग्रंथाचा किंवा भाषणाचा भाग; नक्कल; ओंवाळून टाकलेला पदार्थ.
**उतारी** (स्त्री.) गंजिफाच्या डावांत शेवटीं हुकूम किंवा वंद खेळून जाणें; (पु.) नावाडी.
**उतारू** (पु.) उतारकरी पहा.
**उताऱ्या** (पु.) नावाडी.
**उतावळ–ळी** (स्त्री.) उतावळेपणा, घाई.
**उतावळा** (वि.) अधीर, घाई करणारा. **उ० नवरा गुडघ्याला बाशिंग**— उतावळेपणानें केलेलें मूर्खासारखें वर्तन.
**उतावीळ** (वि.) उतावळा पहा.
**उतींव** (वि.) उतास जात असलेली.
**उतें** (न.) जमीन भाजल्याशिवाय तींत काढलेलें भाताचें पीक.
**उत्कट** (सं. वि.) जोरदार, अतिशय.
**उत्कंठा** (स्त्री.) औत्सुक्य; अतिशय इच्छा.
**उत्कंठित** (सं. वि.) उत्कंठा लागलेला; उत्सुक.
**उत्कर्ष** (सं. पु.) भरभराट, चलती.
**उत्कळ** (प्रा. स्त्री.) उत्कंठा, उतावीळ.
**उत्कळित** (प्रा. न.) युद्ध, कलह.
**उत्कृष्ट** (सं. वि.) नामी, फार चांगला.
**उत्क्रमण** (सं. न.) बाहेर निघून जाणें.
**उत्क्रान्ति** (सं. स्त्री.) ऊर्ध्वगति, उन्नति.
**उत्तम** (सं. वि.) अतिशय चांगलें; उत्कृष्ट.
**उत्तमगति** (सं. स्त्री.) मोक्ष.
**उत्तमांग** (सं. न.) डोकें, मस्तक.
**उत्तमोत्तम** (सं. वि.) फार उत्तम.
**उत्तर** (सं. न.) प्रतिवचन, जवाव; (स्त्री.) दक्षिण दिशेच्या समोरची दिशा; (वि.) मागाहूनचा, पुढला, अधिक (अ.) नंतर.
**उत्तरकार्य** (न.) **उत्तरक्रिया** (सं. स्त्री.) प्रेतसंस्कार.
**उत्तरपद** (सं. न.) समासांतलें शेवटचें पद.
**उत्तरपक्ष** (सं. पु.) कृष्णपक्ष; प्रतिपक्ष; शंकेचें समाधान, आरोपाचें निरसन, खंडण.
**उत्तरपूजा** (सं. स्त्री.) पूजेचा शेवटचा [ भाग.
**उत्तरमीमांसा** (सं. स्त्री.) वेदान्त.
**उत्तररात्र** (सं. स्त्री.) मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंतचा काळ.
**उत्तरा** (सं. स्त्री.) बारावें नक्षत्र; उत्तर [ दिशा.
**उत्तरायण** (सं. न.) सूर्याचें उत्तरदिशेकडे जाणें. (माघापासून पुढील सहा-महिने)
**उत्तरार्ध** (सं. पु.) वस्तूच्या दोन अर्धा- [ पैकीं दुसरा अर्ध.
**उत्तराषाढा** (स्त्री.) एकविसावें नक्षत्र.
**उत्तरी** (सं. उत्तरीय स्त्री.) उत्तरक्रिया करणारा खांद्यावर नव्या वस्त्राची चिंधी घेतो ती.
**उत्तरोत्तर** (सं. अ.) पुढें पुढें.
**उत्तंस** (सं. वि.) भूषण, अलंकार.
**उत्तान** (सं. वि.) उताणा; उथळ.
**उत्तानार्थ** (सं. पु.) उघड किंवा स्पष्ट अर्थ.
**उत्तीर्ण** (सं. वि.) उतरून पार गेलेला.
**उत्तुंग** (सं. वि.) फार उंच.
**उत्तेजक** (सं. वि.) हुरूप आणणारें; प्रोत्साहक.
**उत्तेजन** (सं. न.) प्रोत्साहन, हुरूप देणें.
**उत्थान** (सं. न.) उभें राहणें; उदय.
**उत्थापन** (सं. न.) सन्मानार्थ उभें राहणें, ताजीम; उत्तेजन, उठावणी.
**उत्पत्ति** (सं. स्त्री.) जन्म, प्रादुर्भाव.
**उत्पन्न** (सं. वि.) उत्पत्ति पावलेलें, जन्मलेलें; (न.) मिळकत, प्राप्ति; मूळ ठिकाण, मूळ कारण.
**उत्पात** (सं. पु.) अपशकुन; अनर्थ.
**उत्पाती** (सं. वि.) व्रात्य, खोडकर, द्वाड.
**उत्पादक** (सं. पु.) पिता, निर्माणकर्ता.
**उत्पादन** (सं. न.) उत्पन्न करण्याचा व्यापार; उत्पन्न केलेला माल.
**उत्प्रेक्षा** (सं. स्त्री.) काल्पनिक साम्य; एक अर्थालंकार. (यांत उपमेयावर जणूं काय हें उपमानच आहे अशा रीतीनें संभावना केलेली असते); कल्पना.
**उत्संक, उत्संकळ** (सं.उत् + शृंखला वि.) उतावळा, अमर्याद.
**उत्संग** (सं. पु.) मांडी. [ करणें.
**उत्सर्ग** (सं. पु.) त्याग; दान, अर्पण
**उत्सर्जन** (सं. न.) उत्सर्ग; वेदाध्ययन थांबविणें.

**उत्सव** (सं. पु.) आनंद, उल्हास, आनंदाचा दिवस.
**उत्सवमूर्ति** (सं. स्त्री.) मिरवणुकींत नेण्याची देवाची प्रतिमा.
**उत्साद** (सं. पु.) नाश.
**उत्साह** (सं. पु.) उल्हास, उत्सुकता; धैर्य; आनंद; धार्मिक सण.
**उत्साही** (सं. वि.) उत्साहानें काम करणारा; दीर्घोद्योगी.
**उत्सुक** (सं. वि.) उत्कंठित.
**उत्सुकता** (सं. स्त्री.) उत्कट इच्छा.
**उत्सृष्ट** (सं. वि.) टाकलेलें; सोडून दिलेलें.
**उत्सेक** (सं. पु.) उफाळून वर येणें, वाढ.
**उत्क्षेप** (सं. पु.) पुन्हां वर फेंकणें.
**उथळ** (वि.) कमी खोल; साधाभोळा.
**उथळणें** (प्रा. क्रि.) उत्पन्न होणें; (भा० १२।५९०); उसळणें.
**उथळा** (पु.) **उथळी** (स्त्री.) **उथळें** (न.) खांव बसविण्याकरितां तयार केलेला चौकोनी लहान व उंच दगड; खांबाचा तळखडा.
**उथाण** (न.) उबटपणा; कोंदट हवा.
**उदई** (फा. स्त्री.) वाळवी.
**उदईक** (अ.) उद्यां.
**उदक** (सं. न.) पाणी. **उ० सोडणें**–त्याग करणें.
**उदक-शांति** (सं. स्त्री.) आजारी माणसाच्या अंगावर मंत्राचें पाणी शिंपडण्याचा विधि.
**उदकाडी** (स्त्री.) उदबत्ती.
**उदकुंभ** (सं. पु.) पाणी भरलेला घट.
**उदगयन** (सं. न.) सूर्याचें उत्तर दिशेस जाणें; उत्तरायण.
**उदंड** (सं. वि.) पुष्कळ, फार.
**उदंत** (सं. पु.) वृत्तान्त; शुद्ध अंतःकरणाचा मनुष्य; उद्योग करून पोट भरणारा.
**उदधि** (सं. पु.) समुद्र, सागर.
**उदबत्ती** (स्त्री.) ऊद व दुसरे कांहीं सुगंधी पदार्थ यांचें मिश्रण लावलेली काडी. ही पेटवून ठेविली म्हणजे सुगंधी धूर हवेंत पसरतो.
**उदमी** (पु.) व्यापारी, दुकानदार.
**उदमेखून** (प्रा. अ.) मुद्दाम, निक्षून.
**उदय** (सं. पु.) वर येणें, उगवणें, प्रादुर्भाव, उत्कर्ष.
**उदयाचल** (सं. पु.) ज्याच्या आडून चंद्रसूर्यांचा उदय झालेला दिसतो तो पर्वत.
**उदयीक** (सं. उदयिक अ.) उद्यां.
**उदर** (सं. न.) पोट, कोठा; एक रोग.
**उदरनिर्वाह** (सं. पु.) चरितार्थ.
**उंदरी** (स्त्री.) एक परोपजीवि वनस्पति; डोक्यावरून केंस गळून पडतात असा रोग.
**उदविणें** (क्रि.) केंसांना उदाची धुरी देणें.
**उदळणें** (प्रा. क्रि.) उसळणें (अमृ० ९।५६).
**उदात्त** (सं. वि.) उच्च, श्रेष्ठ, मोठा.
**उदान** (सं. पु.) कंठांतील वायु; अजीर्णामुळें श्वासोच्छ्वासाला प्रतिबंध.
**उदार** (सं. वि.) थोर मनाचा, धर्मात्मा.
**उदाराव** (प्रा. न.) उदारपणा (तुका० २२७४).
**उदावादा** (प्रा. अ.) उघड उघड; पूर्णपणें (ज्ञा. १३।३०५); (पु.) पूर्णत्व (भा० ११।१४७३) [ निरपेक्ष.
**उदास, उदासी** (सं. वि.) खिन्न, कष्टी;
**उदासीन** (सं. वि.) विरक्त; तटस्थ.
**उदाहरण** (सं. न.) दाखला, नमुना, कित्ता; (गणितांत) सोडविण्याचा प्रश्न.
**उदाळणें** (प्रा. क्रि.) उडविणें.
**उदित** (सं. वि.) चढतें (ज्ञा० १०।११५); उद्युक्त (मुक्ते० आदि० ३०।१४९).
**उदी** (वि.) उदाच्या रंगाचा.
**उदीपणें** (सं. उत् + दीप क्रि.) उगवणें.
**उदीम** (पु.) देवघेव; व्यापार.
**उदीमपट्टी** (स्त्री.) धान्याच्या व्यापाऱ्यांवर बसविलेला कर.
**उंदीर** (सं. उंदरु पु.) मूषक.
**उदे उदे करणें** अतिशय स्तुति करणें; प्रस्थ माजविणें; जयजयकार करणें.
**उदेजणें, उदेणें** (प्रा. क्रि.) उदय पावणें.

उदेल (न.) उदाचें तेल.
उदो (सं. उदय पु.) प्रादुर्भाव (अमृ. २।८८); उदयोऽस्तु असा मंगल शब्द.
उद्गदणें (प्रा.क्रि.) खवळणें.
उद्गम (सं. पु.) उगम, मूळ.
उद्गाता (सं. पु.) यज्ञांत सामगायन करणारा ऋत्विज.
उद्गार (सं. पु.) तोंडांतून बाहेर पडलेला शब्द.
उद्गारणें (क्रि.) उच्चारणें, बोलणें.
उद्घाटण (सं. न.) उघडकीस आणणें, चर्चा.
उद्घोष (सं. पु.) तीच गोष्ट पुन्हां पुन्हां बोलणें, गर्जना.
उद्दाम (सं. वि.) उग्र; बेफाम.
उद्दिष्ट (सं. न.) अभिप्रेत; लक्ष्य. [दिणारें.
उद्दीपक (सं. वि.) पेटविणारें, उत्तेजन-
उद्दीपन (सं. न.) उत्तेजन.
उद्देश (सं. पु.) हेतु, आशय.
उद्देश्य (सं. न.) वाक्यांत ज्या अर्थाला उद्देशून विधान केलें असतें तो. [उद्दाम.
उद्धट (सं. उद्धत वि.) उर्मट, दांडगा,
उद्धरणें (सं. क्रि.) वर काढणें; मुक्त होणें; (विपरीत लक्षणेनें) शिव्या देणें.
उद्धार (सं. पु.) वर काढणें; मुक्ति.
उद्धृत (सं. वि.) उचललेला; अवतरण घेतलेला.
उद्बोधक (सं. वि.) बोध करणारें.
उद्भट (सं. वि.) धाडशी; बलवान्; कठोर; श्रेष्ठ; प्रचंड.
उद्भव (सं. पु.) उत्पत्ति; प्रारंभ. [होणें.
उद्भवणें (सं. क्रि.) उत्पन्न होणें, प्रारंभ
उद्भिज्ज (सं. वि.) जमिनींत उगवणारे.
उद्यत (सं. वि.) तत्पर.
उद्यम (सं. वि.) उद्योग.
उद्यमशील (सं. वि.) उद्योगी.
उद्यां (सं. उदय अ.) उदईक.
उद्याणी (प्रा. स्त्री.) मांडणी, उद्घाटण.
उद्यान (सं. न.) बाग.
उद्यापन (सं. न.) व्रताची समाप्ति.
उद्युक्त (सं. वि.) तयार, सिद्ध.
उद्युतकार (सं. पु.) उदयकर्ता; प्रकाश.
उद्योग (सं. पु.) प्रयत्न; काम; धंदा.
उद्योगी (सं. वि.) नेहमी कामांत गुंतणारा; मेहनती.
उद्रेक (सं. पु.) अतिरेक, वेग, लहर.
उद्वस (सं. उत् + वस् वि.) ओस, शून्य.
उद्वसु (प्रा. वि.) व्यर्थ (अमृता. ६।१९).
उद्विग्न (सं. वि.) उदास, खिन्न.
उद्वेग (सं. पु.) खेद; काळजी; भीति; अस्वस्थता.
उधई, उधय (स्त्री.) वाळवी.
उधड, उधडा (वि.) उघडा. [कावणें.
उधडणें (क्रि.) उसवणें; फाडणें; धुड-
उधडमाप (न.) अंदाजी माप.
उधणी, उधवणी (प्रा. स्त्री.) गवाक्ष, द्वार.
उधमणें (क्रि.) बुडबुडे येणें.
उधवणी (प्रा.स्त्री.) धुराडें.
उधवणें (सं. क्रि.) उसळणें, वर येणें; भडकणें; उचलणें, वर करणें.
उधळणें (क्रि.) पसरणें; फेंकणें; फाजील खर्च करणें; अनावरपणें धांवणें.
उधळपट्टी (स्त्री.) फाजील किंवा मनस्वीपणाचा खर्च.
उधळमाणकी (स्त्री.) उधळपट्टी.
उधळ्या (वि.) उधळपट्टी करणारा.
उधाण, उधान, उधानु (प्रा. वि.) तीन (तुका. ४३६०); (न.) भरती, तारुण्याचा भर.
उधार (प्रा. पु.) अवकाश, विलंब. (भा० ३८।२६६); (वि.) पतीवर किंवा खात्यावर आणलेला (जिन्नस).
उधारी (स्त्री.) कालांतरानें किंमत देण्याच्या कबुलीनें नेलेल्या जिनसांच्या किंमतीबद्दल नेणाराकडे राहणारी रक्कम; जिन्नस उधार देण्याचा व्यवहार.
उधी (प्रा. पु. स्त्री.) निर्णय. | भटक्या.
उनाड (वि.) मोकळा सुटलेला, निरुद्योगी,
उनाडकी (स्त्री.) उनाडपणा.
उनिद्रिया (सं. उन्निद्र वि.) जागृत.
उनून (वि.) गरम.
उन्नत (वि.) उच्च, श्रेष्ठ.
उन्नति (सं. स्त्री.) उत्कर्षावस्था; श्रेष्ठता.
उन्नयन (सं. पु.) उदात्तीकरण.

सातारा

**उन्नावो, उन्नाह, उन्नाहो** (प्रा. पु.) वाढ (ज्ञा० १८।८१३); (वि.) आशय.
**उन्मत्त** (सं. वि.) मस्त, माजलेला, दांडगा.
**उन्मन** (सं. वि.) विरक्त (रंग०पदें.).
**उन्मनी** (सं. स्त्री.) अध्यात्मांतील एक वरची अवस्था.
**उन्मळणें** (सं. उन्मूलन क्रि.) समूळ उच्छेद करणें; भडभडून येणें; उघडणें.
**उन्माद** (सं. पु.) उत्कट मनोविकार; कैफ.
**उन्मिळणें** (सं. क्रि.) विकासणें.
**उन्मुख** (सं. वि.) सामोरा, सज्ज, उत्सुक.
**उन्मेख** (सं. उन्मेष पु.) नेत्र उघडणें (ना० २१३); ज्ञान, प्रकाश (ज्ञा० १।१५); उल्लास, संतोष (भावार्थ० ११।१६).
**उन्मेखून** (सं. अ.) निश्चयानें; मुद्दाम.
**उन्मेषलता** (सं. स्त्री.) ज्ञानरूपी वेल.
**उन्हवणी** (स्त्री.) ऊन पाणी.
**उन्हाळा** (सं. उष्णकाळ पु.) उष्णकाळ; निराश्रित स्थिति.
**उन्हाळी** (स्त्री.) उष्णतेचा विकार.
**उन्हाळी-पावसाळी** (स्त्री.) खेळांतल्या दोन पक्षांपैकीं कोणी डावाला सुरुवात करावयाची हें ठरविण्यासाठीं खापरी किंवा पैसा यास एका बाजूनें थुंकी लावून तो वर फेंकतात. त्या खापरीचें किंवा पैशाचें कोरडें अंग ती उन्हाळी; व थुंकी लावलेलें अंग ती पावसाळी.
**उन्हाळें** (न.) उष्ण पाण्याचा झरा.
**उन्हून** उनून पहा.
**उन्होटी** (प्रा. स्त्री.) उवारा.
**उनकंठ** (क्रि. वि.) गळ्यापर्यंत. [ गोष्ट.
**उपकथा** (सं. स्त्री.) पोटकथा, लहानशी
**उपक्रम** (सं. पु.) आरंभ.
**उपकरण** (सं. न.) साहित्य.
**उपकरणें** (सं. न.) पूजेचें भांडें; सेवा करणें.
**उपकार** (सं. वि.) आभार, मेहेरबानगी.
**उपकारक** (सं. वि.) हितकारक.
**उपकार ठेवणें** (क्रि.) उपकाराची फेड न करणें.
**उपकारी** (वि.) उपकार करणारा.

५

**उपखणें** (प्रा. क्रि.) उगेंच बसणें; नाश पावणें (अमृता० ५।२२); खर्च होणें.
**उपखा** (प्रा. पु.) खंड, खळ (स्वा० दि० १२।२।६८); श्रम; खर्च; नाम; कमीपणा (ज्ञा० १८।६५३); (वि०) वृथा (ज्ञा० ११।९५).
**उपगणें** (प्रा. क्रि.) उवगणें, कंटाळणें.
**उपग्रह** (सं. पु.) गौण ग्रह. [ शिष्टाचार.
**उपचार** (सं. पु.) उपाय, इलाज;
**उपचारहोडें** (प्रा. वि.) क्षणिक.
**उपज** (स्त्री.) उत्पन्न, प्राप्ति.
**उपजंघा** (पु.) घोड्याच्या पायाचा रोग.
**उपजणें** (सं. उत्पद् क्रि.) जन्मणें, उद्भवणें.
**उपजत** (अ.) जन्मतः (वि.) जातीचा, स्वाभाविक.
**उपजाति** (स्त्री.) एक वृत्त : इंद्रवज्रा, व उपेंद्रवज्रा यांच्या मिश्रणानें झालेलें.
**उपजीवन** (सं. न.) उदरनिर्वाह.
**उपजीविका** (सं. स्त्री.) उदरनिर्वाह.
**उपट** (प्रा. पु.) आघात (अमृता०९।५६).
**उपटणें** (क्रि.) बाहेर काढणें; चोरणें, पळविणें; पुनः उद्भवणें.
**उपटसुंभ** (पु.) हक्क नसतां अधिकाराच्या पदावर येऊन बसणारा.
**उपट सूळ घे खांद्यावर** नसतें लचांड मागें लावून घेणें.
**उपटाउपटी** (स्त्री.) युक्तीनें, जबरीनें अथवा फसवेगिरीनें द्रव्यादि काढणें.
**उपट्या** (पु.) दुसऱ्याची वस्तु लाटणारा; खिसेकापू, भामट्या.
**उपडणें** (प्रा. क्रि.) उपटणें; पडणें.
**उपडा** (वि.) पालथा, अधोमुख.
**उपडु** (प्रा. न.) जागरण.
**उपढर** (प्रा. पु.) दंभस्फोट; अव्यवस्था (दा. २।१०।३७)
**उपणणें** (प्रा. क्रि.) उत्पन्न होणें. (ज्ञा. यो. ४।२४); पाखडणें (तुका. ९१८).
**उपणी** (स्त्री.) पेरा.
**उपणें** (प्रा. वि.) उपयोगी.
**उपतिणें** (प्रा. क्रि.) मिळणें, उत्पन्न होणें.
**उपतिष्ठणें** (सं. क्रि.) मनांत बिंबणें.
**उपदंश** (सं. पु.) गर्मीचा विकार.

**उपदिशा** (सं. स्त्री.) पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या मुख्य दिशा. यांशिवाय बाकीच्या म्हणजे आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य आणि ईशान्य व वरची व खालची अशा सहा उपदिशा होत.
**उपदिष्ट** (सं. वि.) शिकविलेलें.
**उपदेश** (सं. पु.) गुरुमंत्र, बोध.
**उपदेशक** (सं. पु.) उपदेश करणारा.
**उपद्रव** (सं. पु.) पीडा, त्रास, बाधा.
**उपद्व्याप** (सं. पु.) रिकामा उद्योग; त्रास.
**उपद्वचापी** (सं. वि.) खोडकर.
**उपधातु** (सं. पु.) तांबें सोनें, इ. मुख्य धातू-खेरीज इतर धातू (उदा०कासें, पितळ इत्यादि).
**उपधान्य** (सं. न.) हलकें--गौण प्रतीचें धान्य.
**उपनगर** (सं. न.) मोठ्या शहराला लागून असलेली वस्ती किंवा गांव.
**उपनणें** (प्रा. क्रि.) उपजणें, उत्पन्न होणें (ज्ञा. १।२१५).
**उपनयन** (सं. न.) मुंज; वेदाधिकार प्राप्त करून घेण्याच्या वेळचा संस्कार.
**उपनांव** (सं. न.) आडनांव.
**उपनिषद्** (सं. न.) गुरुचरणांजवळ बसून मिळविलेलें ज्ञान.
**उपनेत्र** (सं. न.) चष्मा, चाळिशी.
**उपन्यास** (सं. पु.) मुद्द्याचें स्पष्टीकरण करणें; कादंबरी (हिंदी व बंगाली).
**उपपत्ति** (सं. स्त्री.) सयुक्तिक कार्यकारण संबंध; युक्ति (अमृता. ५।५५).
**उपपद** (सं. न.) पदवी; गौणपद; तत्पुरुष समासाचा एक प्रकार
**उपपत्नी** (सं. स्त्री.) अंगवस्त्र, रखेली.
**उपपादणें** (क्रि.) विवरण करून सांगणें.
**उपपुराणें** (सं. न.) अठरा पुराणें पहा.
**उपभुक्त** (सं. वि.) उपभोग घेतलेलें.
**उपभोग** (सं. पु.) सुखदुःखांचा अनुभव.
**उपभोगणें** (क्रि.) अनुभवणें; उपयोग करणें; विषयरत होणें.
**उपभोग्य** (सं. वि.) उपभोगाला योग्य.
**उपमर्द** (सं. पु.) अपमान, मानखंडना.
**उपमा** (सं. स्त्री.) दोन पदार्थांचें सादृश्य वर्णिणारा अलंकार; सादृश्य, तुलना.
**उपमाता** (सं. स्त्री.) दायी.
**उपमान** (सं. न.) ज्याशीं तुलना दाखवावयाची तें; दृष्टान्त, उदाहरण. [ तें.
**उपमेय** (सं. न.) ज्याचें साम्य दाखवावयाचें
**उपयुक्त** (सं. वि.) उपयोगी, कामाचें.
**उपयोग** (सं. पु.) कामीं योजना; फलप्राप्ति.
**उपर, उपरी** (अ.) नंतर, वर.
**उपरा** (पु.) बहार, मोसम, आगंतुक.
**उपरणें** (न.) अंगावर घेण्याचें लहान धोतर.
**उपरतविणें** (प्रा. क्रि.) उफराटें फिरविणें (ज्ञा० १८।८३).
**उपरति** (सं. स्त्री.) वैराग्य.
**उपरतें** (प्रा. वि.) वरलें, उलट, विपरीत (ज्ञा० १८।७२८).
**उपरम** (सं. पु.) थांबणें; विश्रांति; शेवट.
**उपरमणें** (सं.क्रि.) बंद होणें; प्रफुल्लित होणें; संतुष्ट होणें.
**उपराग** (सं. पु.) ग्रहण; गौण राग.
**उपराठा, उफराठा** (वि.) उलटा.
**उपरान्त** (अ.) नंतर.
**उपरान्तिक** (अ.) नंतर.
**उपराळ** (प्राः वि.) अधिक फाजील.
**उपराळा** (प्रा. पु.) आधिक्य, वर्चस्व; खोटा आरोप; मदत; मोबदला; दडपण (स्वा० दि० ३।३।१०.).
**उपरी** (पु.) वतनदार नाहीं असा; तात्पुरता राहणारा; (स्त्री.) माडी; (अ.) वर, वरतीं.
**उपरू** (प्रा. पु.) योग्यता.
**उपरें** (प्रा. न.) अधिकता (अ.) आधिक्यानें.
**उपरोध** (सं. पु.) आग्रह, हट्ट; प्रतिबंध; शंका; संकोच; संकट (ज्ञा. १३।२८९).
**उपरोधिक** (सं. वि.) छद्मी; व्याजोक्तीचें.
**उपर्जन** (सं.न.) बागाइताच्या लागवडीची वाढ (सोहि० पदें.).
**उपलब्ध** (सं. वि.) सांपडलेलें.
**उपलंभणें** (प्रा. क्रि.) प्राप्त होणें.
**उपलवण** (प्रा.न.) **उपलवणी** (स्त्री.) वर्णन; विस्तार; व्याख्यान ( विवे. पू. १।१८); शोभा (अमृ० ९।८)

**उपलवणें** (प्रा. क्रि.) उघडें करणें (ज्ञा. १८।८३); सविस्तर सांगणें (अमृता. ९।७); विकासित होणें.
**उपलक्षण** (सं. न.) अंशावरून पूर्णाचा निर्देश करणें.
**उपलाण, उपलाणा, उपलाणी** (प्रा. वि.) खोगीर न घातलेला.
**उपवड, उपवढ** (प्रा. स्त्री.) जागृति.
**उपवन** (सं. न.) बाग, उद्यान.
**उपवर** (सं. वि.) लग्नास योग्य वयाची.
**उपवस्त्र** (सं. न.) पांघरण्याचें वस्त्र; अंगवस्त्र.
**उपवास** (सं. पु.) उपास, लंघन.
**उपवेद** (सं. पु.) आयुर्वेद, धनुर्वेद, गांधर्व-वेद व स्थापत्य अशा चार विद्या.
**उपशम** (सं. पु.) शांति; नाश.
**उपसणें** (सं. उपसृप् क्रि.) बाहेर काढणें.
**उपसर्ग** (सं. पु.) उपद्रव, त्रास; (व्याक०) शब्दाच्या आरंभीं लागणारें अव्यय.
**उपसंहार** (सं. पु.) गुंडाळा; सारांश.
**उपसळा** (वि.) खोडकर.
**उपसळो** (प्रा. पु.) कटकट.
**उपसा** (पु.) बाहेर काढणें.
**उपसागर** (सं. पु.) लहान समुद्र.
**उपसाहणें** (क्रि.) क्षमा करणें.
**उपसाहो** (प्रा. अ.) सहज.
**उपस्थित** (सं. वि.) पोंचलेलें; ज्ञात; हजर.
**उपसूचना** (सं. स्त्री.) मुख्य विषयाला पुस्ती किंवा दुरुस्ती.
**उपहर्ता** (सं. पु.) निस्तेजपणा; नाश; अपमान (ज्ञा. २।१९९).
**उपहार** (सं. पु.) देणगी.
**उपहास** (सं. पु.) थट्टा, फजिती; निंदा; निर्भर्त्सना.
**उपहासास्पद** (सं. वि.) थट्टेस पात्र.
**उपहित** (सं. न.) अंबोण (ज्ञा. १७।१५४).
**उपळ, उपळी** (स्त्री.) जमिनींतून पाझ-रून निघणारा झरा.
**उपळणें** (सं. उत्फुल्ल क्रि.) फुटून वर येणें; उपटून पडणें.
**उपळवट–टा** (प्रा. स्त्री.) भिजलेली जमीन.
**उपाइणें** (प्रा. वि.) आवडतें; उत्कृष्ट.
**उपाईणें** (प्रा. क्रि.) आरंभिणें; अकस्मात् मिळणें; उत्पन्न होणें.
**उपाकर्म** (सं. न.) वेदाध्ययनारंभ; श्रावणी.
**उपाख्यान** (सं. न.) आख्यानाच्या पोटांतली लहान गोष्ट.
**उपांग** (सं. न.) गौण अंग.
**उपाट** (प्रा. पु.) कडेपर्यंत भांडें भरणें.
**उपाडा** (प्रा. पु.) पराभव, उच्छेद (भा. ११।९३७) [२।१३०).
**उपाणणें** (प्रा. क्रि.) पाखडणें (ज्ञा०
**उपाणें** (प्रा. न.) कोडें.
**उपान्त्य** (सं. वि.) अंत्याच्या मागचा.
**उपादान** (सं.न.) पदार्थाचें घटकद्रव्य.
**उपाधि** (सं. स्त्री.) त्रास, उपसर्ग; पदवी; विशेषण; कारण; बाह्यपाश.
**उपाध्या** (सं. उपाध्याय पु.) पुरोहित.
**उपाध्याय** (सं. पु.) पुरोहित, उपाध्या.
**उपानह्** (सं. पु.) जोडा, पायतण.
**उपाय** (सं. पु.) इलाज, तजवीज; युक्ति; सामदामदंडभेदादिक.
**उपायन** (सं. न.) भेट, नजराणा.
**उपार्जणें** (प्रा. क्रि.) संपादन करणें.
**उपार्जन** (सं. न.) संपादन, प्राप्ति.
**उपार्जित** (सं. वि.) मिळविलेलें.
**उपाव** (सं. उपाय पु.) इलाज, युक्ति.
**उपाशी** (अ.) न जेवतां; रिकाम्या पोटीं.
**उपाशीं पोटीं** (अ.) न खातां.
**उपास** (सं. उपवास पु.) उपवास पहा.
**उपासक** (सं. पु.) उपासना करणारा.
**उपासणें** (सं. क्रि.) प्रार्थणें, पूजा करणें.
**उपास-तापास** (पु.) उपवास व त्याच्या आनुषंगिक गोष्टी (जागरणें इ.).
**उपासना** (सं. स्त्री.) आराधना, पूजा.
**उपासमार** (स्त्री.) अन्न न मिळण्यासारखी स्थिति.
**उपास्ती** (सं. स्त्री.) उपासना, भक्ति, सेवा.
**उपास्य** (वि.) पूज्य. (न.) पूज्य दैवत; अतिशय पूज्य मानलेला माणूस.
**उपाहार** (सं. पु.) फराळ.
**उपीट** (का. न.) वाफ दिलेलें लाह्यांचें तिखट पीठ.
**उपेग** (सं. उपयोग पु.) उपयोग; प्रयोजन.

**उपेणें** (प्रा. न.) विश्रांतिस्थान (ज्ञा.१८। १७४७).
**उपेंद्रवज्रा** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १२ अक्षरें व ज, त, ज, ग, ग, हे पांच गण असतात.
**उपेय** (प्रा. वि.) उपायानें साध्य.
**उपेक्षा** (सं. स्त्री.) दुर्लक्ष्य, हयगय, अनादर.
**उपेक्षित** (सं. वि.) टाकलेला, आवाळलेला.
**उपोद्घात** (सं. पु.) आरंभ; प्रस्तावना; परिचय.
**उपोषण** (सं. न.) उपास.
**उपोषित** (सं. वि.) उपाशी.
**उप्रांत** (प्रा. अ.) नंतर, मागून.
**उफका, उफखा** (प्रा. पु.) नाश.
**उफखणें, उफगणें** (प्रा. क्रि.) रिकामा पडणें, दवणें (ज्ञा. १३।६६४).
**उफणणें** (क्रि.) पाखडणें, चाळणें.
**उफरणें** (क्रि.) उफणणें.
**उफराटणें** (प्रा. क्रि.) उलटणें, विपरीत [ होणें.
**उफराटा** (वि.) उलटा; मागें.
**उफलणें** (सं. उत्फुल्ल क्रि.) उमलणें, विकसित होणें.
**उफळणें** (प्रा. क्रि.) उडणें; नांगरणें.
**उफाडा** (प्रा. पु.) जोर (भा १५/१५).
**उफाड्याची** लवकर वाढणारी.
**उफाणणें** (क्रि.) उभारणें.
**उफाणा** (पु.) कुजलेल्या वस्तूपासून निघणारा बुडबुडा.
**उफाळणें** (प्रा. क्रि.) कढणें; वर येणें; उसळणें; उद्भवणें; प्रचलित होणें; फुगणें; नांगरणें.
**उफेणें** (प्रा. क्रि.) वर येऊन तरंगणें.
**उबक** (प्रा. स्त्री.) वांति; दया, करुणा.
**उबग** (प्रा. पु.) कंटाळा; त्रास; उद्वेग.
**उबगणें** (प्रा. क्रि.) कंटाळणें; घाबरणें; अपमान करणें; उपेक्षिणें; समजणें.
**उबगवट** (प्रा. पु.) कंटाळा (यो० २।७७).
**उबगवाणें** (प्रा. वि.) दुःखदायक (भावार्थ० १।२।५२).
**उबट** (वि.) किंचित् उष्ण, कोंबट; उष्णतेमुळें किंचित् दुर्गंधि देणारा.
**उबडण** (प्रा. न.) कर्मोद्भव.
**उबडणें** (प्रा. क्रि.) उद्भवणें (स्वा० दि० ७।४।२८).
**उबणें** (क्रि.) उष्णता पावणें; घाम सुटणें; उष्णतेनें विकृत होणें.
**उबविणें** (क्रि.) गवताच्या उष्णतेनें किंवा उबाऱ्यांत ठेवून पिकविणें; गळू वगैरे पोटिस लावून फुटण्याच्या स्थितीला आणणें.
**उंबर** (सं. उदुंबर पु. न.) औदुंबर वृक्ष; त्याचें फळ. उं० चें फूल—दुर्मिळ वस्तु.
**उंबरठा** (पु.) उंबरा; दाराच्या चौकटीचा तळभाग.
**उंबरवट** (प्रा. पु.) उंबरठा.
**उंबरा** (पु.) उंबरठा; घरांची संख्या.
**उंबरापट्टी** (स्त्री.) घरपट्टी
**उबळ, उबळा** (प्रा. स्त्री.) ढांस.
**उबार** (स्त्री.) हातांतील शिल्लक.
**उबारा** (प्रा. पु.) उष्णता.
**उबाळा** (पु.) हवेची उष्णता.
**उभ** (स्त्री.) उभारणी; उत्पत्ति; (वि.) दोघे.
**उभज** (प्रा. पु.) संतोष; दुःख (ज्ञा० १४।३२९)
**उभट** (वि.) उंचेला.
**उभड, उभडा, उभट** (प्रा. पु.) गहिंवर (दा., ३।५।६); झरा; उमाळा, (ज्ञा० ७।६९); लोट, पूर.
**उभणें** (प्रा. क्रि.) थांबणें.
**उभय** (सं. सर्व.) दोघे.
**उभयचर** (वि.) जलस्थलवासी.
**उभयतां** (सं. वि.) दोघेजण.
**उभयपण** (प्रा. न.) द्वैत.
**उभयविध** (सं. वि.) सकर्मक व अकर्मक असे दोन प्रकारचे (धातु).
**उभयान्वयी** (वि.) दोघांस जोडणारा.
**उभरण** (न.) पावसापासून रक्षण करण्याचें साधन (छत्री, इरलें इ.); उभें सूत, ताणा.
**उभरणी** (प्रा. स्त्री.) उभारणी, रचना.
**उभरणें** (क्रि.) पाखडणें.
**उभरा** (सं. पु.) भरण; खटपट (नाम० ३८३); (वि.) फिका.

**उभरिणें** (क्रि.) उभें करणें, थांबविणें.
**उभला** (पु.) **उभलें** (प्रा. न.) उंबरठा (ज्ञा० १३।७००); उद्भव.
**उभविणें** (क्रि.) उभारणें. [ उसळी.
**उभळ** (स्त्री.) उभड, खोकल्याची जोराची
**उभळा** (प्रा. वि.) उभारलेला.
**उभळी** (प्रा. स्त्री.) खोकला, ढांस.
**उभा** (वि.) आडवा नव्हे तो; पायावर ताठ राहिलेला; स्तब्ध.
**उभाउभी** (प्रा. अ.) त्वरेनें; उभ्यां उभ्यां.
**उभाट** (सं. उद्भट वि.) विशाळ, मोठें.
**उभादांडा** (पु.) सरळ खांब; सरळपणाचें वर्तन.
**उभा बाजार** (पु.) सगळा बाजार.
**उभा मार्ग** (पु.) रहदारीचा रस्ता; सगळा रस्ता; सरळ रस्ता किंवा वर्तन.
**उभारणी** (स्त्री.) उभा करण्याचें काम.
**उभारणें** (सं. उत् + भृ क्रि.) उभारणें; बांधणें.
**उभारत** (अ.) अनिश्चितपणें; निर्णय, करार, मोजमाप इ० केल्यावांचून.
**उभारतपणा** (पु.) निःपक्षपातीपणा.
**उभारा** (पु.) नालबंदाची ऐरण; उमाळा; मांडणी; उत्पत्ति; चालू राहणें; स्थिरता; आकृति (भा० १३।६१९).
**उभारी** (स्त्री.) उत्साह.
**उभारू** (प्रा. पु.) ताठपणा, ताठा.
**उभास** (प्रा. पु.) दिसणें. [ चित्सुधा १.)
**उभासणें** (प्रा. क्रि.) दिसणें (वाम०
**उभेय** (प्रा. वि.) उभा असलेला, जिवंत.
**उभें वारें** (प्रा. न.) क्षुब्धता; गोंधळ.
**उभ्यां उभ्यां** उभाउभी पहा.
**उभ्यानें** (अ.) उभें राहून; उभें असतां.
**उभ्या वर्षात** सबंध वर्षांत. [४९१६).
**उमग** (प्रा. पु.) शोध (मोरो० कृष्ण०
**उमंग** (हिं. स्त्री.) भावना.
**उमगणें** (क्रि.) सांपडणें, उलगडा होणें.
**उमच** (प्रा. पु.) कृतज्ञता. [५४२).
**उमचणें** (प्रा. क्रि.) फेडणें (ज्ञा० १३।
**उमज** (पु.) ज्ञान; समज; शहाणपण; आकलनशक्ति. [ जाणणें;
**उमजणें** (सं. उत् + मज्ज् क्रि.) रहस्य
**उमजीक** (वि.) तल्लख बुद्धीचा, समजदार.
**उमटणें** (क्रि.) दिसणें; उघडकीस येणें; स्पष्ट होणें; (प्रतिबिंब) उठणें; (छाप) वठणें. [ ३।३४).
**उमंडणें** (प्रा. क्रि.) असणें (अमृता०
**उमदळणें** (क्रि.) मळमळणें, कालवाकालव होणें.
**उमदा** (अर. वि.) छानदार, चांगला.
**उमप** (प्रा. वि.) अमूप, पुष्कळ.
**उमर** (अर. स्त्री.) वय.
**उमरडणें** (प्रा. क्रि.) त्याग करणें; उल्लंघणें (ज्ञा० ९।२०७, भा० १०।४).
**उमराव** (अर. पु.) अमीर शब्दाचें अनेकवचन; सरदार, मानकरी.
**उमलणें** (क्रि.) विकसित होणें; फुलणें; भेग पडणें; फुटणें.
**उमस** (प्रा. पु.) उद्भव; स्फूर्ति; विस्तार; दम, विसांवा (तुका० ३१११); अवकाश (सदा० ७८१); अवशेष.
**उमसणें** (प्रा. क्रि.) सांगणें, उघड करणें, (ज्ञा० १३।२०३); गर्भधारणा होणें; उल्लंघणें (सदा० ४४०).
**उमसो** (प्रा. पु.) ठाव.
**उमळ** (सं. उत् + वम् स्त्री.) मळमळ.
**उमळणें** (क्रि.) उत्पन्न होणें; धुणें; मऊ होणें; उमलणें; मळमळणें.
**उमळा** (वि.) बुळबुळीत.
**उमा** (अर. वि.) खेडवळ, आडाणी.
**उमा** (वि. ना.) पार्वती.
**उमाठ, उमेठ** (प्रा. वि.) फुगलेला; उंच.
**उमाठा** (पु.) डोंगराचा माथा; उंच जागा.
**उमाड** (स्त्री.) तुफान.
**उमाणणें** (प्रा. क्रि.) मोजणें; हिशोब देणें; ताडून पाहणें (मुक्ते० आदि० ११।९३).
**उमाणा** (प्रा. पु.) माप.
**उमाणी** (प्रा. स्त्री.) उमाणें (न.) मोजणी, माप; झडती; अटकळ. [ २३१४).
**उमान** (प्रा. पु.) उखाणा; कोडें (तुका०
**उमानें** (प्रा. न.) अनुमान, अटकळ.
**उमाप** (वि.) अगणित. [वळा; विश्रांति.
**उमासा** (पु.) मळमळ, उच्छ्वास; उचं-

**उमाळा** (पु.) **उमाळी** (स्त्री.) लाट; तरंग, उकळी; जाळ; धान्याचा रोग.
**उमेंठ** (प्रा. वि.) पुष्कळ, अमूप (ज्ञा० यो० १।३४).
**उमेठा** (प्रा. पु.) मेळावा. [ परिपक्वता.
**उमेद** (प्रा. स्त्री.) धैर्य, अवसान; आशा;
**उमेदवार** (प्रा. वि.) हिंमतवान्; प्रौढ; (पु.) परीक्षा देणारा; नोकरी मिळ-ण्याच्या आशेनें आलेला.
**उमोप** (वि.) पुष्कळ, विपुल.
**उर** (प्रा. स्त्री.) हौस (सोहि० महदनु०).
**उरउरीत** (प्रा. अ.) वेगळेपणानें (तुका० २९०४).
**उरक** (पु.) काम उरकण्याचें सामर्थ्य.
**उरकणें** (क्रि.) तडीस नेणें, संपणें, संप-विणें, पार पाडणें.
**उरग** (सं. पु.) सर्प.
**उरंग** (प्रा. वि.) हीनरंग. [ २८।८३).
**उरण** (सं. पु.) मेंढा (मोरो० कर्ण०
**उरणें** (क्रि.) बाकी राहणें; ज्यास्त होणें.
**उरता, उर्ता** (प्रा. पु.) आक्षेप; भीड.
**उर्दू** सैन्याचा तळ; एक देशी भाषा.
**उरफाटा** (वि.) उलटा, प्रतिकूळ.
**उरमट** (वि.) उद्धट, फाजील धीट, असभ्य.
**उरमोडा** (पु.) जनावरांस होणारा एक रोग.
**उरविणें** (क्रि.) शिल्लक राखणें.
**उरवी** (सं. उर्वी स्त्री.) पृथ्वी.
**उरस्फोड** (सं. उरस् + स्फोट स्त्री.) समजावून देण्यासाठीं माथेफोड; मनस्वी प्रयत्न.
**उरःसर** (सं. पु.) उरानें सरपटणारा; सर्प.
**उरःस्थल** (सं. न.) वक्षस्थल.
**उरःक्षत** (सं. पु.) छातींत होणारा रोग.
**उराउरी** (प्रा. अ.) झटपट.
**उराड** (न.) निंदार्थी-उर, छाति. [स्थिति.
**उरी** (प्रा. स्त्री.) बाकी, अवशेष; ठाव;
**उरुग** (सं. उरग पु.) सर्प, शेष.
**उरूस** (अर. पु.) मुसलमान साधूच्या संबंधाचा उत्सव; लग्नांतील मेजवानी.

**उरोटा-पुरोटा** (पु.) उणें असेल तें पुरें करणारें. [ साठीं घातलेला बांध.
**उरोळी** (स्त्री.) शेताची हद्द दाखविण्या-
**उर्जित** (प्रा. वि.) मोठा.
**उर्फ** (हिं. अ.) प्रसिद्धीचें नांव; अमक्या नांवानें महशूर.
**उर्मट** (वि.) उरमट पहा.
**उर्वी** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**उलकटणें, उलगडणें** (क्रि.) सोडविणें, मोकळें करणें; संपणें; संपविणें.
**उलगडा** (पु.) फेड; मक्तता; निकाल.
**उलट** (स्त्री.) पुनरुत्थान; (वि.) उफ-राटें, प्रतिकूल; (अ.) परत, मागें.
**उलटणें** (क्रि.) पालथें किंवा उताणें होणें; परतणें; प्रतिकूळ होणें. [ अव्यवस्था.
**उलटापालट** (स्त्री.) विपरीत रचना;
**उलटा-सुलटा** (वि.) वेडावाकडा.
**उलटी** (स्त्री.) वांति, ओकारी.
**उलटी अंबारी** भिक्षेची झोळी.
**उलटून** (अ.) उलट, विरुद्ध रीतीनें.
**उलंडणें** (प्रा. क्रि.) कलंडणें; पालथें घालणें; उसळणें; सांडणें.
**उलडु** (प्रा. पु.) उगव. [ फाटणें.
**उलणें** (क्रि.) फांकणें; आंतल्या नेटानें
**उलथणें** (क्रि.) उलटणें; (न.) भाकरी इ. उलटविण्याचें साधन.
**उलथा** (प्रा. पु.) उत्तर; उलट स्थिति; संस्कार; ठसा; (वि.) उताणा.
**उलथा, उलथा जमीन** (स्त्री.) पडीत जमीन.
**उलथापालथ** (स्त्री.) वरचें अंग खालीं व खालचें वर करणें; मोठी घडामोड.
**उलाट** (प्रा. स्त्री.) वांति; उडी; (वि.) उलटलेली.
**उलाढाल** (स्त्री.) घालमेल, कारभार.
**उलाढाल्या** (पु.) घालमेली करणारा.
**उलिंगें** (प्रा. न.) वेठकाम, बिगार.
**उलिसा** (प्रा. वि.) येवढासा, लहानसा.
**उलूक** (सं. पु.) घुबड.
**उलेमा** (अर. पु.) इस्लामी पंडित.
**उल्का** (सं. स्त्री.) तुटलेला तारा.
**उल्ब** (सं. न.) गर्भावरील वेष्टण.
**उल्मुक** (सं. न.) कोलीत.

**उल्लंघणें** (सं. क्रि.) ओलांडणें, पार जाणें.
**उल्लसित** (सं. वि.) प्रफुल्लित, आनंदित.
**उल्लाट** (प्रा. वि.) उग्र.
**उल्लास** (सं. पु.) उत्साह, आनंद.
**उल्लासणें** (सं. क्रि.) आनंदित होणें.
**उल्लाळ** (प्रा. पु.) **उल्लाळा** (स्त्री.) भरती (भा० २।५।१६); उडी (रुक्मि० १२।२८).
**उल्लाळणें** (क्रि.) आनंदानें उड्या मारणें.
**उल्लू** (हिं. वि.) मूर्ख, अविचारी; धुंद.
**उल्लेख** (सं. पु.) निर्देश, उच्चार.
**उल्लोलणें** (क्रि.) हर्षित होणें.
**उल्हाट-यंत्र** (सं. न.) तोफ, गरनाळ.
**उल्हाटी** (प्रा. वि.) उलटी.
**उल्हास** (पु.) उल्लास पहा.
**उवलें** (प्रा. वि.) प्रसन्न; शुद्ध.
**उवाइला, उवायिला** (प्रा. वि.) सुखावलेला, प्रसन्न (ज्ञा० २।३०१); शांत; प्रकट; (पु.) अभिप्राय (ज्ञा० ५।१४३).
**उवाड** (प्रा. पु.) उत्साह.
**उवाय** (प्रा. पु.) सुख, आनंद; विकास.
**उवायिणें** (प्रा. क्रि.) विस्तारानें सांगणें.
**उवावी** (प्रा. पु.) अवकाश; वाव; प्रसर; उत्कर्ष; आटोप.
**उवाहणें** (प्रा. क्रि.) प्रकटणें.
**उवेड** (प्रा. वि.) उलगडा करणारें.
**उवेडा, उवेढा** (प्रा. पु.) परचक्र; पराभव; उलगडा (ज्ञा० ११।३८७).
**उवेरी** (प्रा. स्त्री.) शेषभाग.
**उशना** (सं. वि. ना.) शुक्राचार्य.
**उशागत** (न.) बिछान्याची डोक्याकडची बाजू. [करणारें वचन.
**उःशाप** (पु.) शापाची तीव्रता कमी
**उशिटणें** (प्रा. क्रि.) उष्टें होणें.
**उशिरां** (अ.) दिरंगाईनें. [गिरदी, उसें.
**उशी** (स्त्री.) डोक्याखालीं ठेवण्याची
**उशीर** (पु.) अवकाश, विलंब, दिरंगाई.
**उश्वास** (सं. उच्छ्वास पु.) श्वास सोडणें.
**उषःकाल** (सं. पु.) पहांट, प्रभात.
**उषःपान** (सं. न.) पहांटेस उठल्याबरोबर थंड पाणी पिणें.
**उष्टर** (सं. उष्ट्र पु.) उंट.

**उष्टरखाना** (फा. पु.) उंटशाळा.
**उष्टवण, उष्टावण** (न.) अन्नग्रहणाचा संस्कार. [बाकी टाकलेला, उच्छिष्ट.
**उष्टा** (सं. उच्छिष्ट वि.) थोडें खाऊन
**उष्टावणें** (क्रि.) तोंड उष्टें करणें.
**उष्ण** (सं. वि.) गरम, ऊन.
**उष्णता** (सं. स्त्री.) गरमी.
**उष्मा** (सं. पु.) उकाडा, दाह.
**उसकटणें** (क्रि.) विचकणें; मोडणें.
**उसण** (स्त्री.) पाठींत एकाएकीं निघणारी कळ किंवा तिडीक.
**उसणाघाई** (प्रा. अ.) समोरासमोर.
**उसंत** (स्त्री.) विश्रांति, फुरसत.
**उसंतणें** (प्रा. क्रि.) शेवटास नेणें; दूर करणें; थांबवणें; विसांवा घेणें; बंद करणें.
**उसनवारी** (स्त्री.) उसनें देणेंघेणें.
**उसनें, उसनें-पासनें** (वि.) परत देण्याच्या करारानें मागून आणलेलें.
**उसपणें** (क्रि.) काढणें.
**उसर, उसरी** (स्त्री.) वाळविलेली फळभाजी.
**उसरत** (सं. विश्रांति स्त्री.) रिकामपणाची वेळ. [केलेली जमीन.
**उसराण** (न.) ऊंस लावण्यासाठीं तयार
**उसरें** (प्रा. न.) सुकलेलें वांगें (मोरो० कृष्ण० ४९।८).
**उसवण** उसण पहा. [शिवण निघणें.
**उसवणें** (क्रि.) उधडणें, शिवण काढणें;
**उसवास** (सं. उच्छ्वास पु.) नळांतून आणलेलें पाणी मोकळें वहावें म्हणून मधून मधून हौद बांधून ठेविलेला अवकाश; उसासा.
**उससणें** (प्रा. क्रि.) श्वासोच्छ्वास टाकणें; जिवंत होणें (ज्ञा० १४।९९).
**उससा, उसासा** (सं. उच्छ्वास पु.) सुख, स्वस्थता; सुसकारा.
**उसळ** (स्त्री.) कडधान्य भिजत ठेवून दाणे चांगले फुगल्यावर उकडून मसाला वगैरे घालून केलेलें खाद्य.
**उसळणें** (क्रि.) उफळणें; जोरानें वर येणें; फार रागावणें.

**उसळी** (स्त्री.) उसळणें, जोरानें वर येणें; आवेग.
**उसार** (पु.) रिकामी जागा.
**उसाळणें** (प्रा. क्रि.) हर्षविणें. [ पहा.
**उसाळी** (प्रा. स्त्री.) श्वासोच्छ्वास, उसळी
**उसिटें** (सं. वि.) उष्टें (अमृ० २।१४).
**उसींत जाणें** (प्रा. क्रि.) वशांत घांस अडकणें (दा० ३।५।३३).
**उसीसी** (प्रा. स्त्री.) उशी. [ बाजू.
**उसें** (न.) बिछान्याची डोक्याकडची
**उस्तरणें** (क्रि.) उसकटणें, काढणें.
**उस्तवारी** (फा. स्त्री.) दुरुस्ती.
**उस्ताद** (पु.) वस्ताद, आचार्य.
**उश्शाप** उःशाप.
**उहु** (सं. व्यूह पु.) तर्क, कल्पना (भा० २३।२२७); विभू, व्यूह.
**उळ** (प्रा. न.) फूल (अम० ४।८).
**उळकंबणें** (क्रि.) लटकणें, टांगणें.
**उळकंबा** (पु.) झोंका, हेलकावा.
**उळगी, उळिगी, उळीग** (प्रा. स्त्री.) बिगार.
**उळंबणें** (क्रि.) अवलंबणें.
**उळा** (पु.) भाजलेला हरभरा.
**उक्षण** (न.) सिंचन.

——

## ऊ

**ऊ** मराठी वर्णमालेंतील सहावा वर्ण.
**ऊ, ऊं** (सं. यूका स्त्री.) केसांत उत्पन्न होणारा एक जीव.
**ऊकलू** (प्रा. पु.) उलगडा; अनुभव; विचार (केशव–पदें).
**ऊठबशी, उठाबशी** (स्त्री.) वारंवार बसण्याउठण्याची क्रिया.
**ऊठी** (प्रा. स्त्री.) वाकी.
**ऊण-खूण** (प्रा. स्त्री.) वाटाघाट; ओळखण (भा० ३।११५); कमी-अधिकपणा.
**ऊत** (पु.) वर येणें; अतिशयता; उन्माद.
**ऊत-मात** (पु.) उन्माद, माज. [जनावर.
**ऊद** (अर. पु.) एक सुगंधि धूपद्रव्य; एक
**ऊदकाडी, ऊदबत्ती** (स्त्री.) ऊद लाविलेली काडी; धूपकाडी.
**ऊन** (सं. उष्ण वि.) उष्ण; उना; (न.) सूर्याचें किरण अथवा तेज.
**ऊब** (सं. ऊष्मा स्त्री.) उष्णता, उष्ण वाफ; आधार; सुख.
**ऊर** (सं. उरस् न.) छाती; **ऊर फाटणें**–घाबरणें; असह्य होणें; **उरावर धोंडा ठेवणें**—अवघड काम करावयास सांगणें. **उराशीं धरणें**—प्रेमानें कवटाळणें.
**ऊरु** (सं. पु.) मांडी.
**ऊर्ज** (पु.) शक्ति, हिंमत. [ स्थिति.
**ऊर्जितकळा** (सं. स्त्री.) भरभराटीची
**ऊर्जितकाळ** (सं. पु.) अभ्युदय.
**ऊर्णनाभि** (सं. पु.) कोळी.
**ऊर्णा** (सं. स्त्री.) लोकर.
**ऊर्ध्व** (सं. वि.) वरचा; (अ.) वर, उंच; (पु.) मरणाच्या वेळची घरघर.
**ऊर्ध्वरेता** (सं. वि.) आजन्म ब्रह्मचारी.
**ऊर्ध्वासन** (न.) ८४ आसनांपैकीं एक.
**ऊर्फ** (अर. अ.) अथवा, म्हणजे.
**ऊर्मि** (सं. पु. स्त्री.) तरंग, लहरी; प्रवाह.
**ऊंस** (सं. इक्षु पु.) ऊंस; साठा.
**ऊळ** (स्त्री.) कांद्याचें रोप.
**ऊहापोह** (सं. पु.) चर्चा, वाटाघाट.

——

## ऋ

**ऋ** मराठी वर्णमालेंतील सातवा वर्ण.
**ऋग्वेद** (सं. पु.) प्रथमवेद. [ प्रकार.
**ऋग्वेदी** (सं. वि.) ब्राह्मणांतला एक
**ऋचा** (सं. पु.) ऋग्वेद सूक्तांतील एक मंत्र.
**ऋजु** (सं. वि.) सरळ, रुजू.
**ऋण** (सं. न.) कर्ज; (गणितांत)–वजा करावयाची संख्या; वजाबाकीचें चिन्ह; (बीजगणितांत )–असें चिन्ह मागें असलेली संख्या.
**ऋणकरी** (पु.) कर्ज घेणारा, रिणको, सावकार; ज्यापासून कांहीं उपयोग नसतां त्यास पोसावें लागतें तो.
**ऋणवई** (प्रा. पु.) ऋणी (ना० ६३५).
**ऋणाईत, ऋणाईत स्वरूपी**(पु.) ऋणकरी.
**ऋणानुबंध** (सं. पु.) इष्टानिष्ट फल देणारा पूर्वसंबंध; मित्रभाव; घरोबा.

**ऋणिया** (प्रा. पु.) रिणको, देणेकरी,
**ऋणी** (सं. वि.) ऋणकरी, ऋणको.
**ऋत** (सं. न.) सत्य, परब्रह्म.
**ऋतु** (सं. पु.) दोन महिन्यांचा एकेक असे वर्षाचे सहा भाग; हंगाम, मोसम; स्त्रियांचा मासिक स्राव.
**ऋतुमती** (सं. स्त्री.) प्रथमच ऋतु प्राप्त झालेली स्त्री.
**ऋतुशांति** (सं. स्त्री.) गर्भाधानविधि.
**ऋत्विज्** (सं. पु.) यज्ञकर्म करण्यासाठीं नेमलेला ब्राह्मण.
**ऋद्धि** (सं. स्त्री. ) लक्ष्मी; भरभराट.
**ऋषभ** (सं. पु.) बैल.
**ऋषि** (सं. पु.) मुनि; साधु; सात्त्विक ब्राह्मण; ज्ञानी; तपस्वी.
**ऋषिपंचमी** (सं. स्त्री.) भाद्रपद शु. ५.
**ऋषियज्ञ** (सं. पु.) पंचमहायज्ञांपैकीं दुसरा ब्रह्मयज्ञ.

---

ॠ, ऌ, ॡ हे स्वर आरंभीं असलेले शब्द मराठींत नाहींत.

---

## ए

**ए** मराठी वर्णमालेंतील अकरावा वर्ण; (अ.) संबोधनार्थी अव्यय.
**एक** (वि.) १ ही संख्या; कांहींजण; अनिश्चित; ठळक; समाईक; एकसारखा; सुमारें; अंदाजें.
**एकएकटा-ला** (वि.) निरनिराळा, एकेक.
**एककल्ली** (वि.) जिकडे झुकेल तिकडेच दुराग्रहानें राहणारा; एकदेशीय बुद्धीचा.
**एकंकार** (प्रा. पु.) गोंधळ.
**एकखटा, एखट्टा** (अ.) एकत्र.
**एकचित्त** (सं. न.) एकमत; एकाग्रचित्त; सर्वांचें भोजन आटोपून उठण्याची तयारी.
**एकछत्री** (वि.) एका राजाच्या अमलाखालचें (राज्य). [ बिनभेसळ.
**एकजात** (वि.) सजातीय; एकसारखा;
**एकट** (प्रा. वि.) एकटा.
**एकटाकी** (वि.) एका घाटाचा.
**एकटें-दुकटें** (वि.) सोबतीवांचून.
**एकठोक** (वि.) ठोकळ.
**एकडोळा** (पु.) एकुलता एक मुलगा.
**एकतंत्री** (वि.) एकाच्याच सत्तेनें चाललेलें.
**एकतरफी** (एक + तरफ = बाजू वि.) एका बाजूचा (निःपक्षपाती नव्हे असा).
**एकतर्फा** (अ.) एका बाजूस.
**एकतर्फी** (वि.) एकपक्षीय.
**एकतान** (सं. वि.) एकाग्र.
**एकतानता** (सं. स्त्री.) एकाग्रता.
**एकतारी** (स्त्री.) एकच तार असलेलें वीणेसारखें तंतुवाद्य.
**एकतुकें** (प्रा. अ.) एकसारखें.
**एकत्र** (अ.) एके ठिकाणीं मिळून.
**एकदंत** (सं. पु.) गणपति.
**एकदम** (अ.) एका दमास; ताबडतोब.
**एकंदर** (सं. एकत्र प्रा. वि.) स्वाधीन (ज्ञा० ४।२२६); एकवट; (अ.)सगळें मिळून.
**एकंदरी** (स्त्री.) एकूण बेरीज.
**एकंदरींत** (अ.) सारांश.
**एकंदरें** (प्रा.न.)एकवटपण; (वि.) एकवट, एकाग्र (ज्ञा० ५।१५१).
**एकदा, एकदां** (अ.) एके काळीं.
**एकदांचा** (अ.) मोठ्या सायासानें.
**एकदाणी** (वि.) सर्व दाणे सारखे असलेले; (स्त्री.) एकेरी मण्यांची माळ.
**एकदिल** (हिं. वि.) एका मनाचे.
**एकदेशी** (सं. वि.) एका अंशापुरतें; एकपक्षी. [ धान्यावर निर्वाह.
**एकधान्य** (सं. न.) एकाच प्रकारच्या
**एकनाड** (स्त्री.) जन्मनक्षत्रांतील तीन नाडींपैकीं एक; ही मुलांमुलींत समान असल्यास त्यांचें लग्न होत नाहीं.
**एकनाळ** (वि.) एक नाळ असलेलें जुळें (मूल).
**एकनिकी** (प्रा. स्त्री.) एकपणा.
**एकनिष्ठ** (सं. वि.) एकावर दृढ निष्ठा ठेवून चालणारा.
**एकपत्नीव्रत** (सं. न.) एकाच पत्नीशीं आजन्म विवाह-संबंध ठेवण्याचा बाणा राखणारा.

**एकपाठी** (वि.) एकदां वाचून पाठ म्हणणारा.
**एकपांक्त** (वि.) ज्याच्या पंक्तीस जेवतां येतें असा.
**एकपुती** (स्त्री.) एकच पुत्र असलेली स्त्री.
**एकबाणी** (वि.) ज्याचा कुठलाही बाण व्यर्थ जात नाहीं असा = राम.
**एकवेक** (प्रा. वि.) समविषम (रंग० पदें).
**एकबेरजी** (स्त्री.) जमा किंवा खर्च झालेल्या रकमेची हिशेबांत पहिली नोंद.
**एकभुक्त** (सं. वि.) एकदां जेवणारा.
**एकमत** (सं. न.) सर्वांचें सारखें मत; एक विचार.
**एकमार्गी** (वि.) सरळ वागणारा.
**एकमुख** (सं. अ.) सन्मुख (भा० ११।५१); (वि.) एक. [ लेली सत्ता.
**एकमुखी सत्ता** एकाच्याच हातांत अस-
**एकमुठाण** (प्रा. न.) एकमत, कट.
**एकमुळा** (प्रा. वि.) एकुलता; एकल-कोंडा.
**एकमेक** (वि.) परस्पर.
**एकमेळ** (पु.) एकांत एक मिसळून जाणें; हातघाई.
**एकमेळणीं, एकमेळीं** (अ.) सर्वजण जमून; समुदायानें.
**एकमोहरें** (प्रा. अ.) एकत्र, एकमार्गी.
**एकर** (पु.) ४८४० चौरस यार्ड एवढा भाग.
**एक-रकमी** (क्रि. वि.) एका रकमेनें.
**एकरस** (सं. पु.) परब्रह्म (अमृ० १।९).
**एकराष्ट्रीयत्व** (न.) राष्ट्रांतील सर्व घटक एक आहेत ही भावना.
**एकरूप** (वि.) सारख्या आकाराचें.
**एकलकोंडा** (वि.) एकांतप्रिय.
**एकलग** (क्रि. वि.) एकीकडे.
**एकला** (वि.) एकटा.
**एकलाग** (प्रा. पु.) अनुसंधान. [ रूपता.
**एकलाधी** (सं. स्त्री.) एकबुद्धित्व; एक-
**एकलिंग** (न.) शिवस्थान (ज्याच्या भोंवतीं पंचक्रोशींत तसें दुसरें स्थान नाहीं असें). (पु.) उदेपुराजवळील रजपुतांची कुलदेवता.
**एकलें** (प्रा. वि.) सामर्थ्यहीन; एकटें.
**एकलौती** (प्रा. वि.) एकपुती; एकुलता.
**एकवंक-की-कें, एकवगिया** (सं. ना.) एकाकारता, ऐक्य (ज्ञा० ६।३९७); (वि.) भेदरहित.
**एकवचन** (सं. न.) एकच बोलणें; (व्याक०) वस्तूचें एकत्व.
**एकवचनी** (वि.) बोलेल त्याप्रमाणें करून दाखविणारा, सत्यप्रतिज्ञ (व्याक०); वस्तूचें एकत्व दाखविणारा.
**एकवट** (प्रा. अ.) एकट्यानें (भा० ३०।२५८); एकत्र. [ गोळा करणें.
**एकवटणें** (क्रि.) एकांत एक मिसळणें;
**एकवटा** (पु.) घाऊक दिलेला किंवा घेतलेला माल.
**एकवडें** (प्रा. वि.) एकवट.
**एकवद** (प्रा. न.) एकत्व; (वि.) एकवट, एकत्रित (भा० २४।५३८).
**एकवसा** (पु.) एकान्त जागा.
**एकवळा** (प्रा. पु.) एकोपा (ना०७३२).
**एकवाक्यता** (सं. स्त्री.) मेळ, ऐकमत्य.
**एकवाट** (प्रा. अ.) एकत्र, एकदम.
**एकवार** (क्रि. वि.) एकवेळ.
**एकवेळ** (प्रा. पु.) मरण (ज्ञा० ९।२०६).
**एकसमयावच्छेदेंकरून** (अ.) एकदम.
**एकसर** (प्रा. अ.) एकसारखा; (पु.) एकावली; एकपदरी माळ.
**एकसरणें** (सं. क्रि.) अनुसरणें (ज्ञा० १३।६०६).
**एकसरा, रीं, रें** (प्रा. अ.) एकाएकीं; एकट्यानें (दा० २।१।२९).
**एकसहा, एकसाहां** (अ.) एकसारखें.
**एकसांज** (अ.) एकवेळ.
**एकसाथ** (हिं. क्रि. वि.) कवायतीतील 'एकदम' अशा अर्थाचा हुकूम.
**एकसार** (सं. वि.) अनन्य.
**एकसारखा** (अ.) न थांबतां.
**एकसुती** (वि.) एक प्रकारचें, अखंड.
**एकाएकीं** (अ.) अकस्मात्.
**एक्का** (पु.) एक ठिपका असलेला पत्ता; तबल्याचा एक ठेका; एका बैलाचा छकडा.
**एकाकार** (सं. पु.) गोंधळ, सवगोलंकार; (वि.) एकरूप, एकाग्र.

नगर वा. वाचनालय, स. तोफ

**एकांकिका** (स्त्री.) एक अंकाचें नाटक.
**एकाकी** (सं. वि.) एकटा.
**एकांगी** (सं. वि.) एकदेशी.
**एकाग्र** (सं. वि.) एकतान, एकलय.
**एकाड-ढ** (प्रा. वि.) एककल्ली, विलक्षण; लहरी.
**एकांड्या** (पु.) कोणत्याही पलटणींत न राहतां एकटा स्वतंत्रपणें लढणारा शिपाई.
**एकान्त** (सं. पु.) निवान्त जागा; गुजगोष्ट.
**एकान्तर** (सं. न.) धरणें पारणें.
**एकान्तिक** (वि.) ब्रह्मांत लीन असलेला; एकाण्डा.
**एकांत्रा** (अ.) एक दिवसाआड; एक दिवस टाकून.
**एकांत्रें** (न.) एक दिवसाआड येणारा ताप.
**एकादशी** (सं. स्त्री.) प्रत्येक पक्षाचा अकरावा दिवस.
**एकादा** (वि.) कोणीएक.
**एका पायावर तयार असणें** अत्यंत उत्सुक असणें.
**एका माळेचे मणी** सगळे एकसारखे.
**एकासें** (प्रा. अ.) एकदम (मोरो०कर्ण० १९।२१).
**एकामेळीं** (प्रा. अ.) एकत्र.
**एकायतन-नु** (सं. न.) एक स्थान, आश्रय; अधिष्ठान (ब्रह्म).
**एकारती** (स्त्री.) आरतीचें नीरांजन.
**एकावळी** (सं. स्त्री.) एकपदरी हार किंवा कंठा (रुक्मि० १।४०).
**एकाक्ष** (वि.) एकडोळ्या; (पु.) कावळा; शुक्राचार्य.
**एकी** (स्त्री.) ऐक्य, मैत्री; (शाळेंतल्या मुलांच्या भाषेंत) लघ्वी.
**एकीकडे** एका बाजूस.
**एकीकरण** (सं. न.) मिलाफ, जुळणी.
**एकीकाष्ठां** (प्रा. अ.) पराकाष्ठेनें (अमृ० ज्ञा० ७।२४४).
**एकीबेकी** (स्त्री.) मुलांचा समविषमत्व ओळखण्याचा एक खेळ.
**एकीसवा** (प्रा. वि.) एकसारख्या, एकत्र.
**एकीहेळा** (प्रा. अ.) अकस्मात्.
**एकुणात, एकुनात** (स्त्री.) जमाखर्चाचा आढावा; हिशेबावर केलेली सही; त्या सहीवर केलेलें — असें चिन्ह.
**एकुलता, एकुलताएक** (वि.) एकटाच.
**एकूण** (अ.) एकंदरींत; तर मग.
**एकूणएक** (अ. वि.) चटसारे, सर्व.
**एकूण एकच** (अ.) सारखेंच.
**एके** (सर्वनाम) कित्येक.
**एकेरी** (वि.) घडी नसलेला; (स्त्री.) कडाक्याचें भांडण; **ए० वर येणें**— अरेतुरे करणें.
**एकोत्रा** (पु.) दरमहा दर शेंकडा एक रुपया याप्रमाणें व्याजाचा दर.
**एकोत्री** (स्त्री.) संख्येच्या वर्गाचा पाढा.
**एकोत्रें** (सं. एकोत्तर न.) संख्येचा वर्ग.
**एकोद्दिष्ट** (सं. न.) एका व्यक्तीला उद्देशून करावयाचें श्राद्ध; मृताचें वार्षिक श्राद्ध.
**एकोपा** (पु.) जूट, एकी.
**एकोशास, एकोशीं, एकोस** (अ०) एकांतीं, रहदारीपासून दूर.
**एखाद, एखादा** (प्रा. वि.) कोणी एक.
**एजंट** (इं. पु.) अडत्या; मुखत्यार.
**एजन्सी** (इं. स्त्री.) अडतीचें काम करणारी संस्था; अडत; मध्यस्थी.
**एटक** (न.) गाड्याची सांठी व वुटें यांना जोडणारा दांडा.
**एडका** (सं. एडक पु.) मेंढा.
**एडिटर** (इं. पु.) संपादक; मुख्य लेखक.
**एणाक्षी** (सं. स्त्री.) हरणासारखे सुंदर डोळे असलेली. (**एण** = हरिण.)
**एतद्देशीय** (सं. वि.) या देशचा. [ तथापि.
**एतावता** (अ.) येवढ्यानें, इतक्यावरून;
**एतुलें** (प्रा. वि.) इतकें, येवढें.
**एथ** (सं. अत्र अ.) या ठिकाणीं.
**एधवा** (क्रि. वि.) एव्हांना.
**एधवां** (प्रा. अ.) आतां.
**एर** (सं. इतर वि.) दुसरें, अन्य, इतर.
**एरका, एरिका** (प्रा. ना.) लव्हाळे (भा० ३०।१४६; मोरो० मंत्र-भाग० ११।५९५). [ हेलपाटे.
**एरझार, रा, वेरझारा** (स्त्री.) निष्फळ

**एरंड** (पु.) एरंड वृक्ष; **ए० चें गुऱ्हाळ**–कंटाळवाणें नीरस भाषण; निष्फळ प्रयत्न.
**एरंडी** (स्त्री.) एरंडाची बी.
**एरंडेल** (न.) एरंड्याचें तेल.
**एरवां** (अ.) गेल्या चौथ्या दिवशीं; पुढें येणाऱ्या चौथ्या दिवशीं.
**एरवीं, एरव्हीं** (अ.) इतर वेळेस; तसें नसतें तर; उगाच, सहज.
**एरु** (सं. इतर प्रा. सर्वनाम) हा, दुसरा.
**एल्गार** (फा. पु.) निकराचा हल्ला.
**एलची** (हिं. स्त्री.) विलायची, वेलदोडा.
**एलदोडा** (पु.) शीतल व सुगंधि असें एक फळ. याचा विड्यांत, पक्वान्नांत व औषधांत उपयोग करितात.
**एले** (न.) दांडी व जोखड यांना बांधण्याची दोरी.
**एवंच** (अ.) सारांश. [मोठा.
**एवढा** (सं. एतावत् वि.) इतका, इतका
**एवंथितिया** (सं. एवं + स्थित्या अ.) अशा रीतीनें; सर्वदा असणाऱ्या (ज्ञा० ९।३३०).
**एवींतेवीं** (अ.) कोणत्याही प्रकारें.
**एव्याच** (प्रा. अ.) मुकाट्यानें.
**एव्हां** (अ.) आतां, या वेळेस. [त्या अर्थी.
**एव्हांना** (क्रि. वि.) इतका अवधि गेला
**एव्हांशीं** (अ.) इतक्यांत, आतांच.
**एषा** (सं. ईर्ष्या स्त्री.) ईर्षा, बरोबरी.
**एसणें** (प्रा. वि.) असलें. [महार.
**एसकर** (पु.) वेशीवरचा पाहरेकरी;
**एळकोट** (पु.) खंडोबाच्या पूजेच्या वेळेस तळी भरतांना उच्चारतात तो शब्द; संयुक्त व नेटाचा प्रयत्न; गोंधळ.

---

## ऐ

**ऐ** मराठी वर्णमालेंतील बारावा वर्ण.
**ऐकोणें** (क्रि.) श्रवण करणें; हुकूम मानणें.
**ऐकतखेंवो** (अ.) ऐकण्याबरोबर.
**ऐकमत्य** (सं. न.) सर्वांचें एकमत असणें.
**ऐकीव** (वि.) ऐकलेला.
**ऐक्य** (सं. न.) एकोपा.
**ऐच्छिक** (सं. वि.) स्वेच्छेवर सोंपविलेलें; स्वेच्छेनें पसंत केलेलें.
**ऐट** (स्त्री.) डौल, अवकाड.
**ऐटबाज** (वि.) डामडौली, भपकेदार.
**ऐणी** (प्रा. स्त्री.) आयनी शब्द पहा.
**ऐतखाऊ** (वि.) ऐतोबा.
**ऐतरेय** (पु.) एक वैदिक ऋषि. (याच्या नांवाचें आरण्यक व उपनिषद आहे.)
**ऐतिह्य** (सं. न.) दंतकथा.
**ऐतें** (प्रा. वि.) कष्टावांचून मिळालेलें.
**ऐतोजी** (पु.) दुसऱ्याच्या श्रमाचें आयतें फल भोगणारा.
**ऐदी** (वि.) सुस्त, आळशी, अव्यवस्थित.
**ऐंद्रजालिक** (सं. पु.) गारुडी; (वि.) जादूसंबंधाचा. [बर; (न.) भांडवल.
**ऐन** (अर. वि.) भर; मूळ; मूळचा; बरो-
**ऐनक** (फा. न.) चष्मा.
**ऐन जिन्नस** (अर. स्त्री.) मालच (त्याच्या किंमतीबद्दल रोकड नव्हे.).
**ऐनजमा** (अर. स्त्री.) निव्वळ मुख्य उत्पन्न.
**ऐना** (अर. पु.) आरसा.
**ऐनेमहाल** (फा. पु.) आरसेमहाल.
**ऐपत** (अर. स्त्री.) सांपत्तिक सामर्थ्य; शक्ति; योग्यता.
**ऐपतदार** (अर. वि.) ऐपत असलेला.
**ऐब** (अर. पु.) खोड, दोष, दुर्गुण.
**ऐरण** (हिं. स्त्री.) ज्यावर अलंकार, भांडीं वगैरे घडतात तो ठोकळा.
**ऐरावत** (सं. पु.) इंद्राचा हत्ती.
**ऐरिणी, ऐरीण** (सं. स्त्री.) लग्नांतील झाल.
**ऐल, ऐलाड, ऐलाडी, ऐली** (प्रा. अ.) अलीकडे; (वि.) अलीकडचा.
**ऐलपैल** (फार. स्त्री.) बंड; वेडे वेडेचार.
**ऐलान** (पु.) शासन, वटहुकूम.
**ऐलीकडी** (प्रा. अ.) पूर्वी (भा. ३।१५५); अंतःकरणाकडे.
**ऐवज** (अर. पु.) मालमत्ता; द्रव्य.
**ऐवजीं** (अर. अ.) बद्दल, जागीं; मोबदला.
**ऐश (ष) आराम** (अर. फा. पु.) सुखोपभोग, चैन, ख्यालीखुशाली.
**ऐश्वर्य** (सं. न.) वैभव, प्रतिष्ठा, सत्ता; संपत्ति; ईश्वरीगुण; **ऐ० योग**–सामर्थ्य.

**ऐसपैस** (वि.) प्रशस्त, मोकळें.
**ऐसा** (वि.) असा.
**ऐसेनी** (प्रा. अ.) अशा प्रकारें.
**ऐहिक** (सं. वि.) इहलोकसंबंधाचा.

---

## ओ

**ओ** मराठी वर्णमालेंतील तेरावा वर्ण.
**ओ** (अ.) हांकेच्या उत्तरादाखल उच्चारण्याचा शब्द; (स्त्री.) हांकेस उत्तर.
**ओक** (स्त्री.) ओकारी, वांति. [ पिशाच्च.
**ओकटें** (प्रा. न.) अडचण, संकट; घुवड;
**ओकणें** (क्रि.) वांतीच्या रूपानें बाहेर टाकणें; पोटांत डांचणारी गोष्ट बोलून टाकणें.
**ओकरा** (वि.) ओकणारा.
**ओका** (वि.) शून्य, सुना.
**ओ-का-ठो** कांहीं देखील.
**ओकांबा** (पु.) कोकम.
**ओकारी** (स्त्री.) वांति; वीट, किळस.
**ओंकार** (सं. पु.) ओम् हा पवित्र मंत्र.
**ओंकारेश्वर** (पु.) बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक.
**ओक्साबोक्सीं** (अ.) जोराजोरानें.
**ओखट** (वि.) घाणेरें, किळसवाणें.
**ओखटवण** (न.) **ओखटवणी** (स्त्री.) खरकटें अन्न मिसळलेलें पाणी.
**ओखटवाणा** (वि.) किळस आणणारा.
**ओखद** (सं. औषधि न.) औषध, दवा.
**ओंगण** (न.) गाडीच्या वगैरे आंखाला लावण्याचा स्निग्ध पदार्थ; वंगण.
**ओगर** (प्रा. पु.) वाढपी.
**ओगरणें** (प्रा. क्रि.) (अन्न) वाढणें.
**ओगराळें** (न.) भाताची मूद ठोकण्याचें पळीसारखें दांडा असलेलें भांडें.
**ओगरू** (प्रा. पु.) वाढपी (रंग० पदें).
**ओंगळ** (वि.) अमंगळ, किळसवाणें.
**ओंगळवाणा** (वि.) घाणेरडा, किळस आणणारा. [ दाय; क्रम.
**ओघ** (सं. पु.) प्रवाह; वेग; कल; समु-
**ओघळ** (पु.) बारीक प्रवाह; (स्त्री.) दोन डोंगरांमधला संकुचित सखलप्रदेश.
**ओघळणें** (क्रि.) पाझरणें; ओघळलेले मणि वगैरे दोऱ्यांतून बाहेर काढणें किंवा निघणें; घर्षणानें भोंक मोठें होणें.
**ओघळी** (स्त्री.) लहान ओघ; त्यानें केलेली सखल जागा.
**ओंचा** (पु.) लुगड्याचा घोळ.
**ओज** (स्त्री.) लक्षपूर्वक सांभाळ; सुव्यवस्था; चातुर्य.
**ओज** (सं.) तेजस्विता; पाणी; तेज; बळ; काव्याचा एक गुण. [ बलाढ्यता.
**ओजस्विता** (सं. स्त्री.) तेजस्वीपणा;
**ओंजळ** (सं. अंजलि स्त्री.) दोन पसे.
**ओजा** (अ.) चांगल्या प्रकारें.
**ओझरणें** (क्रि.) पाझरणें; वाहूं लागणें; निसटणें; कमी होणें.
**ओझरता** (वि.) अर्धवट, निसटता.
**ओझें** (न.) भार, बोजा, वजन.
**ओझेकरी, ओझेली** (पु.) भारवाहक, हमाल, हेलकरी.
**ओटंगण** (प्रा. न.) लोड, तक्क्या; टेकण.
**ओंटभरण** (न.) **ओंटभरणी** (स्त्री.) गर्भवती स्त्रीची ओटी भरणें.
**ओटा** (पु.) चवुतरा.
**ओटी** (स्त्री.) सोपा, ओसरी.
**ओटी** (स्त्री.) ओंचा, पदर; कोस; अंगावरच्या पदराचा खोलगट भाग करून त्यांत तांदूळ, सुपारी, हळकुंडें, नारळ इ. पदार्थ घालतात तें; **ओ० त घालणें**---आश्रयाखालीं देणें; **ओटींत देणें**—दत्तक देणें. **भरल्या ओटीनें**—सुखरूप प्रसूत होऊन मुलासकट.
**ओटीभरण** (न.) गरोदर स्त्रीची ओटी भरण्याचा एक विशेष प्रकारचा विधि.
**ओठ** (सं. ओष्ठ पु.) ओष्ठ; **ओठाबाहेर काढणें**—बोलून दाखविणें; **ओठापर्यंत येणें**—प्राप्त होण्याची संधि येऊन पोहोंचणें.
**ओठंगणें** (न.) टेंकू, आधार.
**ओठंगणें** (क्रि.) टेंकणें; आधार शोधणें.
**ओठाळी** (स्त्री.) काढणी, दोरी.
**ओंड** (वि.) खोल; (स्त्री.) खोली; (न.) भातपेरणीला योग्य जमीन.

**ओंडका** (पु.) **ओंडकें** (न.) लांकडाचा ठोकळा, खोड.

**ओडण** (प्रा. स्त्री. न.) ढाल.

**ओडंबर** (प्रा. पु.) गारुडी, जादुगार.

**ओडंबरी** (प्रा. स्त्री.) इंद्रजाल, माया. **ओ० चें लेणें**—तकलादी वस्तु.

**ओडंबा** (प्रा. स्त्री.) वाळवी.

**ओंडा** (पु.) ठोकळा, टोणका, खोड.

**ओढ** (स्त्री.) आकर्षण; कल; ताण; ओढण्याची शक्ति; पैशाची टंचाई.

**ओढगस्त** (वि.) पैशाच्या टंचाईंत सांपडलेला.

**ओढगस्ती** (स्त्री.) द्रव्याच्या संबंधाची अडचण.

**ओढण** (स्त्री.) मागील बाकी; रूढी, प्रचार; दोरी; तणावा; ओढण्याचे श्रम; ढाल; लुगडयाचा पदर; ओझें.

**ओढणी** (हिं. स्त्री.) पांघरण्याचें वस्त्र (शाल वगैरे); दोरी.

**ओढणें** (क्रि.) खेंचणें; (रेघ) काढणें; (विडी, हुक्का इ०) पिणें; सुंगणें; अंमल करणें; (कोरडा, छडी इ० नें) झोडपणें.

**ओढवण** (न.) सुकलेल्या ओढयाचें पात्र.

**ओढवणें** (क्रि.) ओढलें जाणें; येणें.

**ओढा** (पु.) झरा, नाला; आकर्षण; कल, प्रवृत्ति; लेप; जाड दोरी.

**ओढाताण** (स्त्री.) तारांबळ, धांदल.

**ओढावण** (न.) लांकडाचा ओंडा.

**ओढावारा** (प्रा. पु.) वेठ वळणें (तुका० २२८४).

**ओढाळ** (वि.) उनाड, भटक्या, द्वाड.

**ओढाळी** (प्रा. स्त्री.) लटिकें प्रेम.

**ओढियाण** (न.) उड्डीयान नांवाचा बंध.

**ओढिस्त** (वि.) अडचणीची, टंचाईची.

**ओढीक** (वि.) मोट वगैरे ओढणारा; सांपत्तिक अडचणींत असलेला; कृपण.

**ओढून-ताणून** (क्रि. वि.) जोरानें खेंचून.

**ओढें** (प्रा. न.) उट्टें, सूड (तुका० ३३८).

**ओणव** (स्त्री.) ओणवें होणें; शरीराचा पुढें गेलेला झोक.

**ओणवणें** (क्रि.) पुढें वांकणें, ओणवें होणें.

**ओणवा** (वि.) पुढें वांकलेला; आडवा; (प्रा. पु.) वणवा (ना० ८९५).

**ओत** (प्रा. पु.) प्रवाह (ज्ञा० १५।३३७).

**ओतकाम** (न.) धातूचा रस सांच्यांत ओतण्याचें वगैरे काम.

**ओतणें** (क्रि.) पातळ पदार्थ भांडयाबाहेर पडेल असें करणें; धातूचा रस सांच्यांत घालून इच्छित प्रतिमा तयार करणें.

**ओतप्रोत** (सं. अ.) ओत—आडवें सूत, प्रोत—उभें सूत; यावरून ओ० = सर्व बाजूंनीं पूर्ण; पुष्कळ.

**ओतारी** (पु.) ओतकाम करणारा.

**ओतींव** (वि.) ओतून केलेलें.

**ओथंबणें** (क्रि.) थबथबणें; लोंबणें; लवणें, वांकणें; आश्रय पाहणें.

**ओथंबा** (पु.) टेंका, आधार.

**ओथळा, ओथिबळा** (पु.) पावसाच्या सरीनें झाडांचीं पानें वगैरे पडतात त्यांचा खच.

**ओंध** (स्त्री.) अंधारी.

**ओंधट** (वि.) अंधारीचा.

**ओनामा** (सं. ॐ नमः सिद्धाय पु.) पहिला धडा; प्रारंभ.

**ओप** (पु. स्त्री.) उजळा, चकाकी, जिल्हई; ऊन; उन्हाचा ताव; वाफ.

**ओपणी** (स्त्री.) जिल्हई देण्याचें हत्यार.

**ओपणें** (सं. अर्प् प्रा. क्रि.) अर्पण करणें; विकणें; उन्हांत वाळत घालणें.

**ओपसरा** (प्रा. पु.) रत्नाचें तेज वाढावें म्हणून त्याच्या खालीं घातलेला चकचकीत वर्ख.

**ओपसळई** (स्त्री.) झिलई देण्याची गारेची कांडी.

**ओपळी, ओपाळी** (स्त्री.) उन्हाची तिरीप.

**ओपिवणें** (क्रि.) उन्हांत वाळत घालणें.

**ओफरें** (न.) भूतबाधा; रागाचा झटका.

**ओंबकळणें** (क्रि.) लोंबकळणें.

**ओंबट** (वि.) कोंवट; सोमळ.

**ओबडधोबड** (वि.) बेढब, वेडें वांकडें, खरखरीत.

**ओंबण** (न.) घराच्या वाशांवर आडव्या बसविलेल्या कारव्या; पांझरण.

**ओंबळणें** (क्रि.) हलक्या हातानें न आपटतां धुणें.
**ओंबी** (स्त्री.) गव्हाचें कणीस, लोंबी.
**ओभाणें** (प्रा. न.) पूर, वेग.
**ओम्** (सं. अ.) मंत्रारंभींचा पवित्र शब्द.
**ओमण** ओंवण पहा.
**ओय** (अ.) दुःखोद्‌गार.
**ओयरा** (पु.) रोजच्या स्वयंपाकासाठीं कोठींतून काढून घेतलेले तांदूळ; स्वैंपाकघर.
**ओरकल** (पु. स्त्री. न.) कसोटीचा दगड.
**ओरखडणें** (क्रि.) रेघा काढणें; विचकोरे घेणें. [ खडल्याची खूण.
**ओरखडा** (पु.) बोचकुरा, चरा, ओर-
**ओरड** (स्त्री.) तक्रार, बोभाट. [ बोलणें.
**ओरडणें** (क्रि.) आरडणें, मोठयानें
**ओरप** (पु. स्त्री.) जोरानें कैंस विंचरणें; लूट; बलात्कारानें केलेलें द्रव्यापहरण.
**ओरपणें** (क्रि.) भुरकणें; जोरानें खाजविणें; लुटणें.
**ओरवडा** ओरखडा पहा.
**ओरवाडणें** (क्रि.) ओचकरणें, बोंचकरणें, वाकोरे काढणें. [ साखरेचा गोळा.
**ओरा** (हिं. पु.) लाडवासारखा बांधलेला
**ओरी** (स्त्री.) ओवरी, यात्रेकरूंसाठीं बांधलेली धर्मशाळा किंवा सोपा; सोपा.
**ओल** (सं. आर्द्रता स्त्री.) लोणा; तारण; शत्रूनें तहाच्या अटी पाळाव्या म्हणून त्याच्याकडून खातरजमेसाठीं मनुष्य मागून घेऊन अटी पूर्ण होईपर्यंत त्यास अडकवून ठेवणें.
**ओलंगर** (पु.) पाझर.
**ओलट** (वि.) सर्द, ओली. [ पार जाणें.
**ओलंडणें, ओलांडणें** (क्रि.) उल्लंघणें,
**ओलवण** (न.) ओलें करण्यासाठीं लागणारा पदार्थ (पाणी, दूध इ०).
**ओलवा** (पु.) ओलावा, आर्द्रता.
**ओलवाहू** (वि.) ओलावा धरणारी (जमीन); अशा जमिनींत होणारें (पीक).
**ओलविणें** (क्रि.) ओलें करणें.
**ओलसर** (वि.) किंचित् ओला; भिजकट.
**ओला** (वि.) सर्द, दमट.
**ओलाचिंब** (वि.) अतिशय आर्द्र, फार सर्द.
**ओलांडणें** (क्रि.) उतरणें, पार जाणें; स्पर्श न करतां वरून पलीकडे जाणें.
**ओलांडा** (प्रा. पु.) उपदंश रोग.
**ओलाणी** (स्त्री.) लांवणदिव्याची दोरी.
**ओला दुष्काळ** (पु.) अतिवृष्टीमुळें होणारें दुर्भिक्ष.
**ओलावाणी** (स्त्री.) शांति.
**ओलावा** (पु.) आर्द्रता; ओल; लाभ; द्रव्य; माया; अंतःकरणांत असलेली सदयता; तत्त्वांश.
**ओली आग** (स्त्री.) अतिवृष्टि, महापूर इत्यादि कारणांनीं उद्‌भवलेलें संकट.
**ओली भिक्षा** (स्त्री.) माधुकरी: शिजल्या अन्नाची भिक्षा.
**ओलें** (सं. आर्द्र वि.) शिजलेलें, रसयुक्त.
**ओलेता** (वि.) ज्याचें नेसलेलें वस्त्र भिजलें आहे असा.
**ओलेतें** (न.) ओलें वस्त्र.
**ओंवण** (स्त्री.) शिवण.
**ओंवणें** (क्रि.) मण्याच्या किंवा सुईच्या छिद्रांत दोरा भरणें; गुंफणें; गोंवणें; अडकविणें. [ वधूवरांचें जोडपें.
**ओवर, ओहर** (न.) नवी नवराबायको,
**ओवरजत्रा** (स्त्री.) नूतन विवाहित वधूवरांनीं कुलदेवतेचें दर्शन घेण्याकरतां जाणें किंवा तन्निमित्त निघालेली मिरवणूक.
**ओवरजेवण** (न.) वधूच्या बापानें वधूवरांस दिलेली मेजवानी.
**ओवरा** (पु.) स्वैंपाकघर.
**ओवरी** (प्रा. स्त्री.) देवळासभोंवार यात्रेकरूंकरितां बांधलेली खोली; सोपा.
**ओंवसणें** (क्रि.) व्रत वगैरे पाळणें.
**ओंवसा** (पु.) व्रत.
**ओंवळा** (सं. अमंगल वि.) अशुद्ध, अपवित्र, सोंवळें न नेसलेला.
**ओवा, ओंवा** (पु.) अज्वान, एक औषध.
**ओंवाळणी** (स्त्री.) ओवाळणारास दिलेलें बक्षीस, देणगी; ओवाळून टाकलेलें द्रव्य.
**ओंवाळणें** (क्रि.) मंगलार्थ देवाच्या किंवा माणसाच्या मुखासमोर दिवा इ. फिरविणें.

**ओवी, ओंवी** (स्त्री.) चार चरणांचा एक प्राकृत छंद; सदर छंदांत रचलेलें गीत; बायका दळतांना किंवा झोंपाळ्यावर बसून म्हणतात तें गीत.
**ओव्हरसियर** (इं. पु.) देखरेख करणारा; इंजिनियरच्या हाताखालचा अधिकारी.
**ओशट** (वि.) स्निग्ध; बुळबुळीत; (न.) स्निग्ध द्रव्य.
**ओशाळगत** मिंधेपण.
**ओशाळणें** (क्रि.) शरमणें, लाजणें.
**ओशाळा** (वि.) लाजलेला, दबेल.
**ओशाळी, ओशाळीक** (स्त्री.) ओशाळगत, मिंधेपण. [ वटा, वशिड.
**ओशिड** (न.) बैलाच्या मानेवरचा उंचओषधि (सं. स्त्री.) वनस्पति.
**ओष्ठ** (सं. पु.) ओठ. [ वर्णाचा एक प्रकार.
**ओष्ठ्य** (वि.) ओठापासून निघणारा;
**ओस** (वि.) निर्जन, उजाड, रिकामें.
**ओसंग** (सं. उत्संग स्त्री.) मांडी; **ओसंगीं घालणें**—हवालीं करणें; **ओसंगीं निघणें**—लीन होणें.
**ओसंगळ** (प्रा. स्त्री.) छत्र; कृपा; आश्रय.
**ओसंडणें** (प्रा. क्रि.) गळणें, पडणें; वरून वाहणें; टाकणें. [ ओंविलेली दोरी.
**ओसण-वेसण** (स्त्री.) बैलाच्या नाकांत
**ओसणें** (क्रि.) साल सोलणें.
**ओसर** (स्त्री.) दुसऱ्यास जाण्यासाठीं दिलेली वाट; पुराच्या पाण्याची ओहटी.
**ओसरणें** (क्रि.) कमी होणें, मागें हटणें.
**ओसरी** (स्त्री.) पडवी, सोपा, ओटी.
**ओसाड** (वि.) निर्जन, उजाड.
**ओसाडा** (पु.) पावसाचे तुषार.
**ओसाडी** (स्त्री.) उजाडपणा; उजाड जागा.
**ओसाणें** (न.) केर, कसपट. [ जाडी.
**ओसार** (पु.) उतार, उपशम, भिंतीची
**ओसारा** (पु.) तहकुबी, खाडा, खंड.
**ओहट** (स्त्री.) ओहोटी. [ ओहोटी लागणें.
**ओहटणें** (क्रि.) मागें हटणें, कमी होणें,
**ओहर** (न.) नवरानवरीचें जोडपें; (पु.) खाडीचा लहानसा फांटा.
**ओहरा** (पु.) नांगरटीचा तास.
**ओहळ** (पु.) लहान ओढा; ओघळ.
**ओहळणें** (क्रि.) पाझरणें; ओघळणें; उलटणें.
**ओहळी** (स्त्री.) लहान ओढा.
**ओहिरा** (स्त्री.) खोली.
**ओहो** (अ.) आश्चर्योद्‍गार.
**ओहोबाप** (पु.) वधूपिता; वरपिता.
**ओहोमाय** (स्त्री.) वधूमाता; वरमाता.
**ओहोळ** (पु.) लहान ओढा, नाला.
**ओळ** (स्त्री.) रांग, मालिका, पंक्ति; सभ्यपणाची रीत; पलटण. [ ढवळी.
**ओळक** (का. स्त्री.) लांब दांड्याची
**ओळकंबणें** (क्रि.) लोंबणें.
**ओळकंबा** (पु.) लोंबण्यासाठीं आधार.
**ओळख** (स्त्री.) परिचय, माहिती; जामीन; ओळखण्याची खूण.
**ओळखण** (स्त्री.) ओळखण्याची खूण.
**ओळखणें** (क्रि.) जाणणें.
**ओळखदेख** (स्त्री.) परिचय, ओळख.
**ओळग** (प्रा. पु.) आश्रय.
**ओळंगणा** (वि.) चिकटणारा.
**ओळंगणें** (क्रि.) आलिंगन देणें, बिलगणें.
**ओळंगा** (प्रा. पु.) आश्रय.
**ओळणें** (प्रा. क्रि.) वळणें, प्राप्त होणें.
**ओळंबणें** (प्रा. क्रि.) झोंबणें.
**ओळंबा** (पु.) भिंतीचा सरळपणा पाहण्याचें गवंड्याजवळचें एक साधन.
**ओळीचा** (वि.) समान योग्यतेचा.

——

## औ

**औ** मराठी वर्णमालेंतील चौदावा वर्ण.
**औचित्य** (सं. न.) उचितपणा, योग्यपणा.
**औट** (वि.) साडेतीन.
**औटकें** (न.) एकपासून शंभरपर्यंतच्या प्रत्येक संख्येची साडेतीनपट देणारें कोष्टक.
**औट घटकांचें राज्य** क्षणभंगुर अंमल.
**औटपीठ** (प्रा. न.) योगशास्त्रांत सांगितलेलें अग्निचक्रावरील स्थान.
**औटमात्रा** (प्रा. स्त्री.) ॐकार.
**औठडें** (प्रा. न.) औटपीठ (योगशास्त्रांतलें चौथें स्थान.)

**औंठणें** (प्रा. क्रि.) ओसरणें.
**औडंबर** (न.) पसारा.
**औत** अऊत पहा.
**औत्सुक्य** (सं. न.) उत्सुकता, उतावळी.
**औदार्य** (सं. न.) दातृत्व, उदारपणा.
**औदासीन्य** (सं. न.) उदासीनपणा.
**औदुंबर** (पु.) उंबराचा वृक्ष.
**औद्योगिक** (वि.) उद्योगासंबंधीं.
**औधत्य** (सं. न.) उद्धटपणा.
**औपचारिक** (सं. वि.) शिष्टाचार म्हणून पाळलेले; वरवर; शिष्टाचारासंबंधीं.
**औपम्य** (सं. न.) उपमा, सादृश्य, तुलना.
**और** (हिं. वि.) निराळें; विचित्र, मजेदार; आणखी.
**औरंग** (फा. न.) सिंहासन.
**औरत** (अर. स्त्री.) पत्नी, स्त्री.
**औरस** (सं. उरस् वि.) लग्नाच्या स्त्रीपासून झालेला; अस्सल.
**औरस-चौरस** (वि.) विस्तृत; लांबरुंद.
**और्ध्वदेहिक** (सं. वि.) प्रेतासंबंधीं.
**औषध** (सं. न.) ओखद, दवा; इलाज; **औ०ला नसणें**—अत्यंत अभाव.
**औषधि** (सं. स्त्री.) वनस्पति; जडीबुट्टी.
**औषधोपचार** (सं. पु.) रोगावर उपाय; दवा.
**औस** (स्त्री.) अमावास्या.
**औंस** (इं.) $\frac{1}{12}$ किंवा $\frac{1}{16}$ पौंड.
**औक्ष** (सं. आयुष्य न.) आयुष्य.
**औक्षण, औक्षवण** (प्रा. न.) ओवाळणें.
**औक्षवंत** (पु.) उदंड आयुष्याचा.

---

## क

**क** मराठी व्यंजनांतील पहिलें व्यंजन.
**कइवाड** (प्रा. न.) युक्ति; अंगीकार; कैवार.
**कईं** (प्रा. अ.) कधीं; कोठें.
**कंकट** (सं. पु.) चिलखत.
**कईपक्षी** (प्रा. पु.) कैवारी (तुका० ३२२५).
**कंक** (पु.) बगळा.
**कंकण** (सं. न.) कांकण; यज्ञांत किंवा विवाहप्रसंगीं मंत्रून मनगटांत बांधलेला दोरा.

**कंकणाकृति** (वि.) कंकणाच्या आकाराचें.
**कंकर** (पु.) लहान खडा; तबल्याची वादी.
**कंकरी** (स्त्री.) रेशमाची लड, काकरी.
**कंकास** (पु.) भांडणतंटा.
**कंकाळा** (प्रा. वि.) क्रूर, रानटी.
**कंकोळ** (सं. पु.) कबाबचिनी.
**कंगण** (प्रा. स्त्री.) घोड्याची कलगी.
**कंगणी** (स्त्री.) स्त्रियांचें एक हस्तभूषण; पागोट्याच्या विनीवरचा उंच व टोंकदार भाग; भिंत, लांकूड इ. स शोभेसाठीं राखिलेला कंकणाकृति उंचवटा; कोर.
**कंगणीदार** (वि.) कंगणी असलेलें.
**कंगवा** (पु.) कंगई; फणीचा एक प्रकार.
**कंगाल** (हिं. वि.) दरिद्री, भिकारी.
**कंगाली** (स्त्री.) दारिद्र्य.
**कंगोरा** (फा. पु.) कांठ; कोर, कंगणी.
**कंगोरी** (स्त्री.) एक फुलझाड.
**कच** (सं. पु.) केंस.
**कच** (स्त्री.) चहूंकडून आलेल्या अडचणींमुळें झालेला कोंडमारा; अशा वेळीं सुटणारें धैर्य; **कच खाणें**—भीतीमुळें माघार घेणें. [ शिणक; कडी, आंकडा.
**कचक** (स्त्री.) चकमक; तंटा; शिळक,
**कचकच** (स्त्री.) रेती, माती इ. चे खाण्याच्या पदार्थांत आलेले सूक्ष्म कण, रेव; भांडण.
**कचकचीत** (वि.) टणक; अपक्व; कचकच वाजणारें; पुरेपूर.
**कचकडा** (पु.) सेल्युलाईड; कांसवाची पाठ.
**कचकणें** (क्रि.) किंचित् हार खाणें; मोडण्यास सुरवात होणें.
**कचकन-कर-दिशीं** (अ.) कच असा आवाज करून.
**कचका** (पु.) जोर, बळ, आवेश, झपाटा; जोराचा प्रहार; कामांचा भार.
**कचकावणें** (क्रि.) घट्ट बांधणें; ठोकणें; दरडावणें; आवेशानें कामास लागणें.
**कचकावून** (अ.) खूप ताणून आवळून; सणसणीतपणें, चोपून.
**कचक्या** (वि.) नेटानें किंवा जोरानें काम करणारा; धमकदार.

**कचणें** (क्रि.) कचरणें; घसरणें; माघार घेणें.
**कचदील** (पु.) भित्रा.
**कंचणी** (स्त्री.) आंवळून बांधलेली दोरी.
**कंचन** (सं. कांचन न.) सोनें.
**कंचनी** (स्त्री.) नर्तिका; कसबीण.
**कचपाश** (सं. पु.) डोक्यावरचे केस.
**कचर** (स्त्री.) भीति, माघार; साशंकपणा.
**कचरट** (प्रा. वि.) न पिकलेला, कच्चा, ठिसूळ; हलकट; (न.) कचरा, घाण.
**कचरणें** (क्रि.) कच खाणें.
**कचरा** (सं. कच्चर पु.) केर, गाळसाळ.
**कचाकच–ची** (स्त्री.) चकमक; जोराचें भांडण; (क्रि. वि.) सपाट्यानें.
**कचाट** (प्रा. न.) खटपट; संकट; युक्ति, योजना.
**कचाटी** (स्त्री.) अडचण, अडचणीचा प्रसंग; पकड. [भाग.
**कचाडें** (न.) फुटक्या मडक्याचा वरचा
**कचावणें** (क्रि.) कचणें.
**कंचुक** (सं. पु.) बंडी, आंगरखा इ. वस्त्र; चोळी; सापाची कांत; कवच.
**कंचुकी** (सं. स्त्री.) चोळी; (पु.) चोप-दार; जनानखान्यांतला नोकर.
**कचेरी** (हिं. कचहरी स्त्री.) दप्तर; कार्यालय, ऑफिस.
**कचोरा** (पु.) कचरकंद; हळद.
**कचोरी** (स्त्री.) तळलेला एक खाद्य पदार्थ.
**कचोळा** (प्रा. पु.) एक सुगंधि द्रव्य.
**कचोळें** (न.) लहानसें पूजापात्र.
**कच्चा** (वि.) अपक्व; अपूर्ण, अप्रौढ; सविस्तर, साद्यंत; (पु.) हिशेबांत पूर्णता येण्यापूर्वीची आंकड्यांची अर्ध-वट स्थिति; जोर.
**कच्ची असामी** (स्त्री.) दिवाळखोर कुळ.
**कच्ची मुदत** (स्त्री.) हुंडीची मुदत पूर्ण होण्याच्या अगोदरची मुदत.
**कच्ची हुंडी** अद्याप न स्वीकारलेली हुंडी.
**कच्चें कातडें** न कमावलेलें कातडें.
**कच्छ** (सं. पु.) कासोटा; कांसव.
**कच्छप** (सं. पु.) कांसव. [पाठीस लागणें.
**कच्छपीं लागणें** (क्रि.) नादीं लागणें;
**कच्छी** (वि.) कच्छ देशांतला.
**कजाख, कजाग** (तुर्की वि.) भांडखोर.
**कजिया** (अर. पु.) तंटा, भांडण.
**कंजूश––ष–स** (हि. कंजूस वि.) कृपण.
**कज्जल** (सं. न.) काजळ.
**कज्जली** (सं. स्त्री.) गंधक व पारा यांचा एकत्र केलेला बारीक खल.
**कज्जा, कज्या** (अर. कजिया पु.) भांडण, खटला; **क० खोकला, क० कफावत** ––लहानमोठें भांडण.
**कंजार, कंजारभाट** (पु.) एक भटकी जात.
**कज्जेखोर** (वि.) भांडकुदळ.
**कज्जेदलाल** (पु.) भांडण लावणारा.
**कट** (सं. पु.) संगनमत; बंदुकीस दस्ता व नळी मिळून असलेला बंद; गंडस्थळ; सोंगट्यांच्या पटांत × अशी खूण केलेलें घर; (प्रा.) कंबर; कष्ट; कांडा; प्रारब्ध.
**कंटक** (सं. पु.) कांटा; अडफाटा; (वि.) कांटक, शोषिक.
**कटक** (सं. न.) सैन्य; कडें.
**कटकट** (स्त्री.) किरकिर; गडबड; त्रास; भांडण; (प्रा.) प्रारब्ध.
**कटकटा** (प्रा. अ.) हायहाय !
**कटकट्या** (वि.) किरकिर करणारा.
**कटकन्** (अ.) कट् असा आवाज करून.
**कटणें** (हिं. क्रि.) कापलें जाणें; **कटून लढणें**–लढतां लढतां पुष्कळांना मारणें.
**कटदार, कटबाज** (वि.) कारस्थानी, मसलती.
**कटदोरा** (पु.) करदोडा.
**कटमिति** (स्त्री.) व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार; (यांत कर्जाची रक्कम व्याजासह जसजशी फेडली जाते तसतसें मुद्दल कमी कमी होत जातें).
**कटवणी** (न.) पुरण शिजवून आमटी वगैरे करितां त्यांतील जें पाणी काढतात तें; मळकट कपडे धुतलेलें पाणी; पहार.
**कट्टर** (वि.) पिळाचा.
**कट्टब** (वि.) कडू.
**कटा** (हिं. पु.) वध, हत्या.
**कटा, कटाकटा** (प्रा. अ.) हाय हाय !

•**कटाकटी** (स्त्री.) काटाकाट; छाटाछाट.
**कटाकटीनें** (अ.) भारी ओढाताण करून, जेमतेम.
**कटाप** (न.) रद्द व नाहींसें (करणें. होणें).
**कटायी** (प्रा. स्त्री.) कढई. [धास्ती.
**कटार** (हिं. स्त्री.) कट्यार; तीक्ष्ण शस्त्र;
**कटारा** (पु.) कठडा. [छंद; कट.
**कटाव** (हिं. पु.) भपका; कवितेचा एक
**कटाह** (सं. पु.) कढई.
**कंटाळणें** (क्रि.) त्रासणें; आळसणें.
**कंटाळवाणा** (वि.) कंटाळा आणणारा.
**कंटाळा** (पु.) वीट, खंती; त्रास; आळस.
**कटाक्ष** (सं. पु.) अपांगदर्शन, नेत्रकोणानें पाहणें; रोख; कल, लक्ष; रागाची दृष्टि; काटकपणा.
**कटि** (सं. स्त्री.) कंबर; **कटितट**— ढुंगण, कंबर इ. भाग.
**कटिबंध** (सं. पु.) कमरपट्टा, भूमेखला.
**कटिरव** (प्रा. पु.) सिंह. [पणा.
**कटिशूळाची व्यथा** (स्त्री.) बाहेरख्याली-
**कटिसूत्र** (सं. न.) करगोटा; कंबरपट्टा.
**कटिस्नान** (सं. न.) कंबरेपासून खालच्या भागाचें स्नान.
**कटु** (सं. वि.) कडू; तिखट; अप्रिय.
**कटुळतें, कटोळतें** (न.) सराफाची किंवा सोनाराची वाटोळी पिशवी.
**कटोरा** (हिं. पु.) **कटोरी** (स्त्री.) मोठी वाटी.
**कट्ट** (सं. कटि स्त्री.) कंबर (दा० १।२।१६).
**कट्टबंद** (प्रा. पु.) जूट.
**कट्टा** (वि.) पक्का, मजबूत; हुशार; धाडशी; (पु.) ओटा; कत्तल; जूट.
**कट्यार** (स्त्री.) खंजीर, विचवा इ० च्या जातीचें एक शस्त्र.
**कठ** (न.) यजुर्वेदाची एक शाखा; एका उपनिषदाचें नांव.
**कंठ** (सं. पु.) गळा, घांटी, नरडी; आवाज, स्वर; **कंठ दाटणें**—प्रेमातिशयामुळें घसा भरून येणें; **कंठ फुटणें**—शब्दोच्चार प्रौढ किंवा खणखणीत होणें; पिचका आवाज निघूं लागणें; **कंठीं प्राण येणें**—भयानें घाबरगुंडी वळणें.
**कठडा** (सं. काष्ठ पु.) गज बसविलेली चौकट.
**कंठणें** (क्रि.) दुःखानें काळ काढणें.
**कंठमणि** (सं. पु.) रत्नहारांतला मधला मुख्य मणि; अतिप्रिय मनुष्य.
**कंठशोष** (सं. पु.) घसा कोरडा करणें; व्यर्थ सांगणें.
**कंठस्नान** (सं. न.) गळ्याखालचें स्नान; क० **घालणें**—ठार मारणें.
**कंठा** (सं. कंठ पु.) स्त्रियांचा गळ्यांत घालण्याचा एक दागिना.
**कठाण** (न.) डाळ.
**कंठाळ** (स्त्री.) पडशी, गोणी.
**कंठाळ्या** (वि.) कंठाळ वाहण्याच्या उपयोगाचा.
**कंठाळी** (वि.) कंटाळवाणें, ठरीव सांच्यांचें; बैलाच्या गळ्यांतील माळ.
**कठिण, कठिन** (सं. वि.) कडक, कठोर; अवघड.
**कंठी** (सं. कंठ स्त्री.) पुरुषांनीं गळ्यांत घालण्याचा अलंकार.
**कंठीरव** (पु.) सिंह.
**कठोर** (सं. वि.) कठिण, निर्दय; उद्दाम.
**कंठ्य** (सं. वि.) कंठसंबंधीं; कंठांतून बाहेर पडणारा (उच्चार).
**कड** (सं. कट स्त्री.) बाजू; शेवट.
**कंड** (सं. कंडू स्त्री.) खाज.
**कंडा** (पु.) दिमाख, डौल.
**कडक** (वि.) कठिण; तापट, तिखट.
**कडकडणें** (क्रि.) कडकड आवाज करणें; अतिशय तापणें; रागानें बोलणें.
**कडकडाट** (पु.) गर्जना. [तीव्र, कट्टें.
**कडकडीत** (वि.) शुष्क; अति उष्ण,
**कडकडून** (अ.) दृढ आलिंगनपूर्वक; आवेशानें.
**कडकणा** (पु.) **कडकणी** (स्त्री.) **कडकणें** (न.) करंजीसारखें एक पक्वान्न (रुक्मिणी० १५।१०).
**कडकलक्ष्मी** (स्त्री.) लक्ष्मीच्या उग्र स्वरूपाचें सोंग घेऊन भिक्षा मागणारा.
**कडका** (पु.) तीव्रता.
**कडकी** (स्त्री.) आग, दाह.

**कडंग** (पु.) धान्यांतला टणक दाणा.
**कडगलें** (न.) बांगडी.
**कडगें** (प्रा. न.) अलंकार, भूषण, बांकी.
**कडची** (स्त्री.) लहान कढई.
**कडण** (स्त्री.) कड्याची बाजू, कांठ; झावळी.
**कडतरणें** (प्रा. क्रि.) अंगीं भिनणें.
**कडदण, कडधण, कडधान्य** (न.) मूग, मठ, हरभरा, वाटाणा इ० द्विदल धान्यें; शेंग.
**कडदोरा** (पु.) करगोटा, कटिसूत्र.
**कंडण** (न.) कांडणें; ठेंचणें; मारणें.
**कंडणी, कंडनी** (सं. स्त्री.) मुसळ.
**कडप** (न.) हरभऱ्याचीं, तुरीचीं वगैरे रोपटीं; मुळांसकट उपटून वाळण्यासाठीं त्यांची घातलेली रास.
**कडवा** (पु.) **कडवी** (स्त्री.) जोंधळ्याचीं वाळलेलीं ताटें.
**कडवाडें** (प्रा. न.) कडवा (ज्ञा० १८।२४०).
**कडवू** (पु.) कणकेच्या कवच्यांत पुरण घालून चौकोनी गाठोड्याच्या आकाराचें तळून काढलेलें एक खाद्य; लठ्ठ फोपशा माणूस.
**कडवोळें** (न.) मिश्र धान्यांच्या पिठाचा केलेला एक खाद्य पदार्थ.
**कडभडणें** (क्रि.) ताप भरण्याचीं पूर्वचिन्हें होणें.
**कडवकें** (प्रा. न.) कडकपणा.
**कडवट** (वि.) किंचित् कडू.
**कडवसा** (प्रा. पु.) भिवई (ज्ञा. ११।३६४); पडछाया; अंधार (ज्ञा. ७।११२).
**कडवा** (वि.) कडू; रानवट; कठोर.
**कडवा** (पु.) **कडवी** (स्त्री.) कडू वाल.
**कडविखा** (प्रा. स्त्री.) कडवटपणा.
**कडविड** (प्रा. पु. न.) सोन्याचा चाराचुरा (तुका. ३६११).
**कडवें** (न.) पद्याचा एक विशिष्ट अंश.
**कडस, कडसणी** (प्रा. स्त्री.) विचार; निवड; शोध; गांठ (परमा० २।१९); परीक्षण, विवेचन; बाजू; घुसळणी; नाडी, दोरी.
**कडसणींत धरणें** घोटाळ्यांत पाडणें.
**कडसणें** (प्रा. क्रि.) सांवध करणें; कसाला लावणें; घुसळणें; विचार करणें; आकळणें; क्षीण होणें.
**कडसर** (वि.) कडवट; किंचित् कडू.
**कडसरी** (स्त्री.) दुरडी, पाटी इ. चा कांठ; डोंगराच्या कड्याच्या पायथ्याजवळचा प्रदेश.
**कडा** (पु.) सुळका, खडपा.
**कडाका, कडाखा** (पु.) झपाटा, अतिशयपणा, फटकारा.
**कडाडणें** (क्रि.) कडकड आवाज करणें.
**कडाड** (प्रा. वि.) जाणता; पढीक (ज्ञा० ११।९७); तापलेला.
**कडाडगहीस** (प्रा. वि.) पढतमूर्ख; अविचारी.
**कडाडां, कडाडीं** (प्रा. अ.) कडकडाट करून; झपाट्यानें.
**कडाफोडी** (प्रा. स्त्री.) आदळआपट.
**कडाबीन** (फ्रें. इं. कार्बाइन स्त्री.) रुंद तोंडाची आखुड बंदुक.
**कडासणी, नी** (स्त्री.) ओझें बांधण्याची दोरी.
**कडासन** (सं. कटासन न.) चर्मासन.
**कंडाळी** (स्त्री.) कंडी, गप्प.
**कडियाळी** (प्रा. स्त्री.) माळ; सांखळी.
**कडी** (स्त्री.) दुवा, सांखळी; तोड, रीत; कात.
**कंडी** (स्त्री.) बाजारगप्प.
**कडीकोट, कडेकोट** (वि.) पक्का; पुरा; (पु.) बंदोबस्ताची किंवा सुरक्षित जागा.
**कडीपाट** (पु.) लांकडाच्या फळ्यांचें छत.
**कडील** (वि.) कडचा, बाजूचा.
**कडु, कडे** (प्रा. स्त्री.) कड, बाजू.
**कडू** (वि.) कटु, अप्रिय; **कडू काळ**—विपत्तीचा काळ.
**कंडू** (सं. स्त्री.) खाज.
**कडून** (अ.) पासून; मार्फत, द्वारें; मुळें.
**कडें** (न.) वेटाळें; वर्तुळ; डफ.
**कडे** (अ.) बाजूस; पाशीं; —ला.
**कडेकोट** (वि.) पक्का, पूर्ण.
**कडेपाट** (पु.) कडीपाट पहा.
**कडेलग** (प्रा. अ.) अगदीं शेवटीं.
**कडेलोट** (पु.) डोंगराच्या कड्यावरून ढकलण्याची शिक्षा; कमाल, पराकाष्ठा.

**कडेस** (क्रि. वि.) कडे, बाजूस.
**कंडोरा** (पु.) उसाची गंडेरी.
**कडोविकडी** (प्रा. स्त्री.) मोठमोठ्या किंवा अलंकारिक गोष्टी (मुक्ते०आदि० ४२।२४); (वि.) कडेकोट बंदोबस्ताचा (राम० ८।३०३); (अ.) जोरानें; खुबीनें; नाना प्रकारें.
**कडोसरी** (स्त्री.) नेसलेल्या वस्त्राची कंबरेभोंवतालची बाजू; कमरेभोंवतालचा प्रदेश.
**कडोसा** कवडसा शब्द पहा.
**कडोळी** (स्त्री.) **कडोळें** (न.) वर्तुळ; कड्यांचा लगाम.
**कड्याळ** (न.) गुरांच्या वैरणीसाठीं पेरलेलें धान्य; अतिशय नफा; संकट.
**कढ** (पु.) उकळी, आधण.
**कढई** (सं. कटाह स्त्री.) तळण्याचें भांडें.
**कढण** (न.) कढण्यासाठीं ठेविलेला पदार्थ; काढा. [येणें.
**कढणें** (सं. क्वथ् क्रि.) शिजणें; आधण
**कढत** (वि.) ऊन, कडकडीत.
**कढविणें** (क्रि.) उकळी फुटेल इतकें तापविणें.
**कढी** (स्त्री.) एक प्रकारचें पातळ खाद्य; **कढी पातळ होणें**—शरीराची हल्लक स्थिति होणें, दुर्बळता येणें.
**कण** (सं. पु.) दाणा; सूक्ष्म अंश.
**कणकण—णी** (स्त्री.) अंग मोडून येणें.
**कणकणणें** (क्रि.) अंगांत ज्वरांश असणें.
**कणखर** (वि.) टिकाऊ, मजबूत.
**कणगा, कणगुला** (पु.) **कणगी, कणगुली** (स्त्री.) धान्य सांठविण्याची कोठी.
**कणणें** (क्रि.) विवळणें.
**कणदार** (वि.) कण्या असलेलें, खूप कणसें असलेलें.
**कणबार** (पु.) रेड्याच्या चामड्याची पट्टी.
**कणव** (स्त्री.) **कणवा** (पु.) दया, करुणा; परमावधि (सोहि०महदनु०).
**कणवट** (स्त्री.) कडोसरी पहा.
**कणवणणें** (क्रि.) कण्हणें.
**कणवाळु** (वि.) दयाळु.
**कणशः** (क्रि. वि.) कणाकणानें.
**कणशी** (सं. कणिश स्त्री.) भाताचें कणीस.
**कणा** (पु.) पाठीचा दांडा, किंवा मधली हाडांची मालिका; डोंगराचा कडा; रांगोळीची नक्षी; गाडीचा आंख.
**कणाळी** (सं. स्त्री.) प्रवाह.
**कणिका** (सं. स्त्री.) कणी, बारीक कण; एक काव्यप्रकार.
**कणिकोंडा** (पु.) कण्या आणि कोंडा.
**कणिंग, कणंग** (स्त्री.) कोथळी, कोठार.
**कणी** (स्त्री.) कण शब्द पहा; तुकडा; सूक्ष्म वर्तुलाकार अंश; डोळ्यांतील बाहुली.
**कणीक** (सं.कण स्त्री.) गव्हाचें पीठ, आटा; **कणीक तिंबणें**—खूप चोप देणें.
**कणीस** (सं. कणिश न.) भुट्टा, तुरा.
**कणेर, कण्हेर** (स्त्री.) एक फुलझाड.
**कणेरी** (सं.कण स्त्री.) कांजी; पेज, मंड.
**कण्व** (पु.) एक ऋषि; यजुर्वेदाची एक शाखा.
**कण्हणें** (क्रि.) विवळणें.
**कतक** (सं. कृतक न.) पदक.
**कतरण** (स्त्री.) कातरलेले तुकडे.
**कतरा** (पु.) कचरा.
**कतवर, कतवार** (हिं. न.) बाजारबुणगे.
**कतवा** (अर. पु.) रोखा, खत.
**कतार, कतारा** (अर. पु.) रांग, ओळ (विशेषतः उंटांची).
**कत्तल** (अर. कतल स्त्री.) कापाकापी, तोडातोडी; मोहोरमच्या दहाव्या तारखेस रात्रीं मुसलमान फकीर एक विधि करतात तो.
**कतिपय** (वि.) कित्येक.
**कत्ती** (का. स्त्री.) तलवार.
**कंत्राट** (इं. न.) अमुक काम अमक्या दरानें करून देऊं असा करार; गुप्त मसलत.
**कंत्राटदार** (इं.कॉंट्रॅक्टर पु.) कंत्राट घेणारा.
**कंथ** (सं. कांत पु.) पति, नवरा.
**कथक** (सं. पु.) पुराणिक.
**कथ्थक** (पु.) नृत्य करीत गाणारा.
**कथकली** (पु.) एक नृत्यप्रकार.
**कथणें** (सं. क्रि.) सांगणें.
**कथन** (सं. न.) सांगणें.
**कथनीय** (सं. वि.) सांगण्यास योग्य.

**कथली** (स्त्री.) कथलाचें भांडें; (वि.) कथलाचें.
**कथा** (सं.स्त्री.) हरिकीर्तन; गोष्ट; महत्त्व.
**कंथा** (सं. स्त्री.) गोधडी.
**कथानक** (सं.न.) गोष्ट. [ आय.
**कथाप्रसंग** (सं. पु.) कथेचा किंवा भाषणाचा
**कथाभाग** (सं. पु.) पुराणादि ग्रंथांतलें किंवा कथा-कीर्तनांतलें आख्यान.
**कथिल** (फा. न.) एक धातु.
**कथेकरी** (पु.) कीर्तनकार, हरदास.
**कद** (पु.) पुरुषांचें नेसण्याचें रेशमी वस्त्र.
**कद** (अर. स्त्री.) ताकद; किमत; चांगुलपणा (मोरो० कृष्ण. ४७।२४);
**कंद** (सं. पु.) कांदा; साखर.
**कंदमूळ** (न.) खाण्याच्या उपयोगी असे कंद व मुळें.
**कदन, कंदन** (सं. कदन न.) युद्ध; कत्तल.
**कदन्न** (सं. न.) वाईट अन्न.
**कदंब** (सं. पु.) वृक्षविशेष; समूह.
**कदबा** (अर. पु.) करार, करारनामा.
**कदंबोसी** (फा. स्त्री.) पादस्पर्श.
**कदम** (अर. पु.) पाऊल; थोडें अंतर.
**कदर** (अर. स्त्री.) गुणांची पारख किंवा चहा; फिकीर; प्रकार.
**कदरदान** (फा. वि.) गुणज्ञ.
**कदर्थणें** (प्रा. क्रि.) अवमानणें, कासावीस होणें.
**कंदर्प** (सं.पु.) मदन; कांदा.
**कदर्य, कदर्यु** (सं. पु.) कंजूष मनुष्य.
**कंदरा** (सं. स्त्री.) गुहा; दरी.
**कदली** (सं. स्त्री.) केळी.
**कदा** (सं. अ.) केव्हां.
**कदाकाळीं** (अ.) क्वचित् एकाद्या प्रसंगीं.
**कदाचित्, कदांचित** (सं. अ.) क्वचित्.
**कदापि** (सं. अ.) केव्हांही.
**कंदिल** (अर. पु.) फाणस दिवा.
**कंदिली पागोटें** मंदिलासारखें पागोटें.
**कदीम** (अर. वि.) जुनें.
**कंदी** (वि.) भुरकट; (स्त्री.) खाण; पेढ्यांचा एक प्रकार.
**कंदु** (सं. कंद पु.) कांदा, बीज.
**कंदुक** (सं. पु.) चेंडू.

**कंदोरी** (फा. स्त्री.) अन्न; दाण्यांना पीळ घालण्याची जागा; गळ्यांत बांधावयाचा मंतरलेला दोरा; (पु.) कंजारी जातीचा मनुष्य.
**कद्रू** (वि.) चिक्कू, कंजूष.
**कंधरा** (सं. स्त्री.) मान; गळा.
**कधीं** (अ.) कोणत्या दिवशीं; केव्हां?
**कधींकधीं** मधूनमधून. [ वेळीं.
**कधींकाळीं** (अ.) फार दिवसांनीं; एखादे
**कधींमधीं** (अ.) मध्यें एखाद्या दिवशीं, विरळा.
**कधींनवत** (अ.) पूर्वी कधीं न घडलेलें.
**कनक** (सं. न.) सोनें; धोत्रा.
**कनकाचल** (सं. पु.) सोन्याचा पर्वत.
**कनकावळा** (पु.) बायडीचा एक प्रकार; दारूचा बाण.
**कनव, कन्हव** (प्रा. स्त्री.) विनवणी.
**कनवट** (स्त्री.) कडेलारी.
**कनवळा, कनवाळा** (पु.) दया, करुणा.
**कनवास** (इं. कॅनव्हस पु. न.) किनतान.
**कनवाळू** (वि.) दयाशील, कृपाळू.
**कनात, कनाथ** (अर. स्त्री.) कापडाची वाटेल तेव्हां काढतां येणारी भिंत.
**कनाळी** (स्त्री.) प्रवाह.
**कनिष्ठ** (सं. वि.) सर्वांत धाकटा; शेवटल्या प्रतीचा; क० पक्ष—कमीतकमी प्रमाण.
**कनिष्ठिका** (सं.स्त्री.) करंगळी.
**कनी** (अ.) किनई या अर्थानें.
**कनीनिका** (सं. स्त्री.) डोळ्यांतील बाहुली.
**कनोजा** (सं. कान्यकुब्ज पु.) हिंदुस्तानी ब्राह्मणांची एक जात.
**कन्यका, कन्या** (सं. स्त्री.) लहान मुलगी; कन्यारास.
**कन्याकुमारी** (सं. स्त्री.) हिंदुस्थानचें दक्षिण टोंक. [ असतो तो काळ.
**कन्यागत** (सं. पु.) गुरु कन्याराशींत
**कन्यादान** (सं. न.) लग्नाच्या वेळीं मुलीच्या बापानें वरास तिचें दान करणें.
**कन्हव** (स्त्री.) करुणा भाकणें.
**कन्हैया** (हिं. वि.) खेळकर; (पु.) कृष्ण.
**कप** (इं. पु.) प्याला.
**कप** (प्रा. पु.) कापूस; ज्वालाग्राही पदार्थ.

**कंप** (सं. पु.) कांपरें.
**कंपन** (न.) थरथरणें.
**कंपवायु** (पु.) कंपवात.
**कपचा** (पु.) **कपची** (स्त्री.) दगडाचा काढलेला कपरा.
**कपट** (सं. न.) लबाडी, कृत्रिमता.
**कपटा** (पु.) तुकडा.
**कपटी** (वि.) फसव्या, लबाड.
**कपडा** (हिं. पु.) कापड, वस्त्र.
**कपडालत्ता** (हिं.पु.) कापडचोपड; वस्त्र-प्रावरण.
**कपदरी** (स्त्री.) खबदडी, कपार, दरा.
**कःपदार्थ** (वि.) तुच्छ.
**कंपनी** (इं. स्त्री.) मंडळी.
**कंपमान, कंपायमान** (सं. वि.) कांपणारें.
**कपरा** (पु.) **कपरी** (स्त्री.) दगडाची पातळ कपची.
**कर्पादिका** (स्त्री.) **कपर्दीक** (पु.) कवडी.
**कपळा** (पु.) ढलपा, टवका, कपरा.
**कपा, कप्पा** (हिं. पु.) खण, पुड; वस्त्राचा तुकडा.
**कंपाउंड** (इं. न.) कुंपण.
**कंपाउंडर** (इं. पु.) औषधें तयार करून देणारा.
**कपाट** (सं. न.) दार; दाराची फळी; उभी पेटी.
**कपाट देणें** दार लावणें (हरि० १४।५५).
**कपात** (स्त्री.) काट, कमी करणें.
**कपार** (अर. खफर स्त्री.) खबदडी.
**कपाल, कपाळ** (सं. न.) डोक्याची करटी; डोकें; ललाट, भाळ.
**कपाशी** (स्त्री.) सरकी असलेला कापूस.
**कपास** (हिं. पु.) कापूस.
**कंपास** (इं. पु.) वर्तुळ काढण्याचें यंत्र.
**कपाळ** (सं. न.) मस्तक; भालप्रदेश; अदृष्ट, दैव; गाल (ज्ञा०१४।१८६); (पु.) समुदाय (देवनाथ पृ० १५३); **क० फुटणें**—दुर्दैव ओढवणें; **क०चें कातडें नेणें**—विपत्तींत लोटणें.
**कपाळकरंटा** (वि.) दुर्दैवी.
**कपाळकूट** (स्त्री.) माथेफोड, शिकविण्याचे व्यर्थ श्रम.
**कपाळपट्टी** (स्त्री.) कपाळ; दाराच्या वरच्या भागाचें आडवें लाकूड.
**कपाळमोक्ष** (सं. पु.) प्रेत जळत असतां त्याच्या डोक्याची कवटी फुटणें; डोक्यावर आघात होऊन तें फुटणें.
**कपि** (सं. पु.) वानर; अनुभविक म्हातारा मनुष्य.
**कपिंजल** (सं. पु.) कवडा, चातक पक्षी.
**कपित्थ** (सं. पु.) कवठीचें झाड; (न.) कवठ.
**कपिल** (सं. पु.) मुनिविशेष; (वि.) पिंगट वर्णाचा, पिंगट केसांचा.
**कपिला** (सं. स्त्री.) पिंगट रंगाची किंवा सबंध शरीरभर कोणत्या तरी एका रंगाची गाय.
**कपिलाषष्ठी** (सं. स्त्री.) भाद्रपद महिना, वद्य ६, मंगळवार, रोहिणी नक्षत्र, व्यतिपात व हस्त या सहा गोष्टी जुळणारा दिवस; **क० चा योग**—दुर्मिळ संधि.
**कपिश** (सं. वि.) काळसर; तांबूस; पिंगट.
**कपी** (स्त्री.) फुटलेल्या लांकडास बसविलेला दुसऱ्या लांकडाचा तुकडा; कप्पी; ओझें वर ओढून नेण्यासाठीं योजिलेलें चक्र (पुली).
**कंपू** (इं. कँप पु.) जमाव, टोळी, लष्कराचा तळ; अकरा पलटणें.
**कंपेश** (फा. पु.) कमजास्त प्रमाण.
**कपोत** (सं. पु.) खबूतर, पारवा.
**कपोल** (सं. पु.) गाल.
**कप्पा** कपा पहा.
**कप्पी** (स्त्री.) मणका; धावेच्या ठिकाणीं खोबण असलेलें लहान चाक; पुली.
**कफ** (सं. पु.) वैद्यकशास्त्रांतल्या त्रिदोषांपैकीं एक; श्लेष्मा.
**कफ** (प्रा. पु.) कापूस; नारळाचें भूस.
**कफण** (अर. न.) मुसलमानाच्या प्रेतावरचें वस्त्र.
**कफणी, कफनी** (स्त्री.) एक प्रकारचा ढिला व पायघोळ झगा.
**कफल्लक** (वि.) कंगाल, भिकारी.
**कफावत** (स्त्री.) बारीक दोष; भांडण.

**कंबखत** (फा. वि.) दुर्दैवी.
**कंबखती** (फा. स्त्री.) दुर्दैव; मार खाण्याची वेळ. [ मलावरोध.
**कबज** (अर. कब्ज न.) पावती; जप्ती;
**कबजगिरी** (अर. स्त्री.) ताबा.
**कबजा** (अर. पु.) ताबा, भोगवटा; अस्तनीशिवाय बंडी; बिजागिरी.
**कबंध** (सं. पु.) धड; मस्तकहीन शरीर.
**कबर** (अर. स्त्री.) मुसलमानाचें थडगें.
**कंबर** (फा. कमर स्त्री.) कटि, कमर, शरीराचा मध्यभाग; हिंमत, धैर्य. **कं० खचणें**–नाउमेद होणें; **कं० बांधणें** –तयार होणें, धैर्य धरणें.
**कंबरबस्ता** (फा. पु.) कंबर कसणें.
**कबरा** (सं. वि.) ठिपक्या ठिपक्यांचा; चित्रविचित्र रंगांचा.
**कबरी** (सं. स्त्री.) वेणी, खोपा.
**कंबळी** (स्त्री.) कांबळें.
**कबाड** (न.) जनावराच्या पाठीवर आणिलेलें वैरणीचें किंवा सर्पणाचें ओझें.
**कबाब** (फा. पु.) मांसाचें पक्वान्न.
**कबाबचिनी** (स्त्री.) कंकोळ.
**कबिला** (अर. पु.) स्त्री, कुटुंब; जनाना.
**कबीर** (पु.) मुसलमान जातीचा एक रामभक्त साधु कवि. **क० पंथ** (पु.) कबीरानें प्रवर्तिलेला ईश्वरभजनाचा मार्ग.
**कंबु** (सं. पु.) शंख.
**कबुतर** (सं. कपोत न.) खबुतर, पारवा.
**कबुतरखाना** (फा. पु.) खबुतरें ठेवण्याची जागा. [ करारनामा.
**कबुलात, कबुलायत** (अर. स्त्री.)
**कबू** (फा. कव्बू वि.) चिवट व कठिण.
**कबूल** (अर. वि.) राजी; मान्य, पसंत.
**कबूली** (स्त्री.) मान्यता, पसंती.
**कम** (फा. वि.) उणा, कमी.
**कमकुवत** (वि.) अशक्त.
**कमचा** (हिं. स्त्री.) फोक; छडी.
**कमजोर** (वि.) अशक्त, दुर्बळ.
**कमज्यास्त** (फा. वि.) अधिकउणा.
**कमटा, कमठा** (सं. कमठ पु.) धनुष्य.
**कमंडलु** (सं. पु.) संन्याशाचें जलपात्र.

**कमतर** (हिं. पु.) दोष, उणीव.
**कमताई** (स्त्री.) कमीपणा, उणीव.
**कमती** (फा. वि.) कमी; उणें.
**कमती-वढती** (हिं. स्त्री.) क्षयवृद्धि.
**कमतोल** (वि.) कमी वजनाचें.
**कमनीय** (सं. वि.) सुंदर, रमणीय.
**कमबखती** (फा. स्त्री.) कंबखती पहा.
**कमर** (फा. स्त्री.) कटि, कंबर.
**कमरबंद** (फा. पु.) कमरपट्टा.
**कमरबस्ता** (फा. पु.) कंबर बांधणें; तयारी; कमरपट्टा.
**कमल–ळ** (सं. न.) कमळ.
**कमला–ळा** (सं. स्त्री.) लक्ष्मी; भ्रमरी.
**कमलाकर** (न.) कमळांचें तळें.
**कमलिनी** (सं. स्त्री.) कमळांची वेल.
**कमविणें** (क्रि.) मिळविणें; कातडें इ० वर संस्कार करणें.
**कमशकुनी** (फा. पु.) नाजुक.
**कमसल** (फा. कम असल वि.) हीन.
**कमळिणी** (सं. स्त्री.) कमळांची वेल.
**कमाई** (स्त्री.) मिळकत; कातडीं इ. कमाविण्याची क्रिया.
**कमाऊ** (वि.) मिळविता.
**कमाण, कमान** (फा. स्त्री.) धनुष्य; मेहरप; स्प्रिंग.
**कमाल** (अर. स्त्री. ) पूर्णता; अतिशयपणा; सर्वांत उच्च मर्यादा; पराकाष्ठा.
**कमालखानी हार** (पु.) पायांपर्यंत लोंबणारा अनेक पदरांचा हार.
**कमावणें** (क्रि.) मिळविणें; संस्कार वगैरे करून व्यवहारोपयोगी करणें.
**कमावता** (वि.) मिळविणारा.
**कमाविशी–वीस** (स्त्री.) धारावसुली.
**कमावीसदार** (फा. पु.) मामलेदार.
**कमिटी** (इं. स्त्री.) पंचायत, नियुक्तमंडळ.
**कमिशन** (इं. न.) विवक्षित कामाकरितां नेमिलेली मंडळी; दलाली.
**कमी** (वि.) थोडें लहान, कमती.
**कमीज** (इटा. कॅमिसा व अर. न.) शर्ट.
**कमोद** (सं. पु.) तांदुळाची एक उत्तम जात; (गायनांत) एका रागाचें नांव.
**कया** (स्त्री.) तजेला.

**कयास** (अर. पु.) निर्णय, निवाडा; विचार; तर्क, अनुमान.

**कर** (सं. पु.) हात; किरण; धारा, सरकारी देणें; करणें; (स्त्री.) संक्रान्त, ग्रहण इ.च्या पुढचा दिवस.

**करक** (प्रा. पु. न.) कमंडलु; लचक; झालीमधला दिवा. [ बांधणें.

**करकवणें** (क्रि.) घट्ट किंवा आवळून

**करकर, करकरा** (प्रा. स्त्री.) कटकट, कुरकुर, भांडण (ना. २०४७).

**करकरा** (अ.) करकर असा आवाज करीत.

**करकरीत** (वि.) कोरा, नवा; ऐन.

**करकोचा** (पु.) घट्ट आवळल्याची खूण, वण; एका पक्ष्याचें नांव.

**करग्रहण** (न.) पाणि-ग्रहण. [ लहान बोट.

**करंगळी** (सं. करांगुली स्त्री.) सर्वांत

**करगोटा** (पु.) कमरेभोंवतीं बांधण्याचा गोफ; कटिसूत्र.

**करंजी** (स्त्री.) एका पक्वान्नाचें नांव; करंज्याच्या झाडाचें बीं.

**करंजेल** (न.) करंज्याच्या बियांचें तेल.

**करट** (न.) आग होणारें गळूं.

**करटा, करंटा** (वि.) अभागी; कृपण.

**करटी, करंटी** (स्त्री.) करवंटी; डोक्याची कवटी.

**करड** (स्त्री.) भरड; असडीक तांदूळ; गळूं; तृणविशेष; शुष्क व खरखरीत केस.

**करंड, करंडक** (न.) करंडी; डबा.

**करडई** (स्त्री.) एक पालेभाजी; तिचें बी.

**करडणें, करंडणें** (क्रि.) कुरतडणें.

**करडा** (वि.) पांढुरका; कडक.

**करंडा** (सं. पु.) डबा.

**करंडी** (स्त्री.) टोपली.

**करडूं** (न.) शेळीचें पिलूं.

**करडेल** (न.) करडईचें तेल.

**करण** (सं. न.) साधन, साहित्य; इंद्रिय; (व्याक.) तृतीया विभक्तीचा अर्थ; (ज्यो.) अर्धी तिथि; ग्रहणें वर्तविण्याविषयींचा ग्रंथ.

**करणरूप** (न.) 'आहे' या अर्थी धातूचें रूप.

**करणा** (हिं. पु.) एक वाद्य.

**करणावळ** (स्त्री.) करण्याबद्दलची मजुरी.

**करणी** (स्त्री.) वागणूक; लग्नांत नवऱ्या मुलास व तत्पक्षीयांस देण्याची देणगी; जारणमारणादि प्रयोग; गवंड्याचें एक हत्यार, थापी.

**करणें** (क्रि.) आचरणें; (न.) कृति.

**करणेर** (न.) वरास द्यावयाची देणगी.

**करतल** (सं. न.) तळहात.

**करतलामलक** (सं. पु.) सहज करतां येण्यासारखी गोष्ट; हातचा मळ.

**करतळें** (प्रा. अ.) प्रत्यक्ष.

**करताळ** (पु. न.) तळहातांत घेऊन वाजविण्याचें एक वाद्य.

**करद** (वि.) कर देणारा, मांडलिक.

**करंद, करवंदी** (स्त्री.) एक झाड; (न.) त्याचें फळ.

**करदनकाळ** (पु.) कठोर आणि क्रूर स्वभावाचा माणूस. [ करणारा.

**करदा** (फा. करदकार पु.) स्वतः शेतकाम

**करदोडा** (पु.) करगोटा पहा.

**करनकर, करनकरी** (वि.) जें करावयास पाहिजे तें करावयाचें नाहीं आणि जें करूं नये तें हटकून करावयाचें अशा वर्तनाचा.

**करप** (स्त्री.) जास्त भाजलेला किंवा करपलेला पदार्थ; कांचेचा किंवा दगडाचा तुकडा. [वास; आंबट ढेंकर.

**करपट** (वि.) अर्धवट जळालेला, त्याचा

**करपणें** (क्रि.) जास्त भाजलें जाणें.

**करपल्लवी** (स्त्री.) हातांच्या खुणांची भाषा.

**करपा** (पु.) करपलेला भाग.

**करपी** (स्त्री.) पिकें जळणें; पोटांत आग पडणें; भांड्याचें बूड जळणें.

**करपुतळी** (स्त्री.) दिवे आणि काजळ लाविलेलें भांडें यांच्या योगानें शकुन पाहणें.

**करपुष्कर** (सं. पु.) हत्तीच्या सोंडेचें किंवा हाताच्या बोटाचें अग्र.

**करबाड, करबाडें** (प्रा. न.) गुरांनीं खाऊन तुडविलेला कडबा.

**करभ** (सं. पु.) हत्तीचा छावा; मनगट व करंगळी यांच्या मधला भाग.

**करभार** (सं. पु.) खंडणी.
**करम** (फा.) दया.
**करमणूक** (स्त्री.) मौज, मनोरंजन.
**करमणें** (क्रि.) मौजेनें वेळ जाणें.
**करमर** (प्रा. न.) शस्त्रविशेष.
**करमरा मणी** (पु.) जवाचा मणी; करमरें नांवाच्या फळासारखा मणी.
**करमरें** (न.) हरपररेवडीच्या पाकळीसारखी आकृति.
**करमुर** (प्रा. स्त्री.) कळा.
**करवट** (पु. न.) एक कडू फळ.
**करवटणें** (क्रि.) एका कुशीवर निजणें.
**करवटी, करवंटी** (स्त्री.) नारळाची कवटी, तुरटी. [ खाच.
**करवडी, करवंडी** (प्रा. स्त्री.) पोटाची
**करवत** (सं. करपत्र स्त्री.) लांकूड इ० कापण्याचें हत्यार.
**करवतणें** (क्रि.) करवतीनें कापणें.
**करवती** (स्त्री.) लहान करवत.
**करवंद** (न.) एक लहान जंगली फळ.
**करवला** (पु.) नवऱ्याचा किंवा नवरीचा भाऊ.
**करवली** (हिं. स्त्री.) लग्नांत वधू किंवा वर यांची बहीण; मानकरीण.
**करवळ, करोळ** (हिं. पु.) बंदुकी स्वार.
**करवा** (पु.) सोललेल्या उसाचा लहान तुकडा, गंडेरी.
**करवाल** (सं. पु.) तरवार.
**करवीं** (अ.) कडून.
**करवीर** (सं. पु.) कण्हेर; (न.) कोल्हापूर.
**करवील** (प्रा. पु.) ब्रगळा.
**करळ** (न.) **करळा** (पु.) **कराळ** (पु.) झुकती रेघ.
**करा** (प्रा. पु.) मडकें.
**करांगुलि** (स्त्री.) करंगळी.
**कराड** (पु.) आवेग; चीड.
**करांडणें** (क्रि.) कुरतुडणें.
**कराडी** (प्रा. स्त्री.) दरड (भा० १२। ५७६); जोर; कष्ट (तुका० २३४५).
**करामत** (अर. स्त्री.) युक्ति, चातुर्य, कर्तृत्व.
**करामती** (वि.) बुद्धिमान्, कुशल.

**करार** (अर. पु.) ठराव; निश्चय.
**करारनामा** (अर. पु.) ठरावपत्र; कराराचा कागद.
**करारमदार** (फा. पु.) आणभाक; बेलभंडार वगैरे आश्वासनाचे प्रकार.
**करारी** (वि.) पक्क्या मनाचा; दृढप्रतिज्ञ.
**कराल** (सं. वि.) भयंकर.
**कराष्टमी** (सं. स्त्री.) आश्विन व॥ ८.
**करिणा** (अर. पु.) पाल्हाळ (सोहिसिद्धान्त०); अर्ज.
**करितां** (अ.) साठीं, प्रीत्यर्थ, मुळें.
**करी** (सं. पु.) हत्ती.
**करीणा** (अर. पु.) हकीकत, वर्तमान.
**करुण** (सं. वि.) दयाळु; दीन; (पु.) नवरसांपैकी एक.
**करुणा** (सं. स्त्री.) दया, कीव. [ द्वारानें,
**करून** (अ.) योगानें, मुळें, साधनानें,
**करें, कऱ्हें** (प्रा. न.) उंट.
**करेला** (पु.) दोन्ही हातांनी फिरविण्याचें मोठें मुद्‌गल.
**करोट** (न.) धान्य.
**करोटी** (स्त्री.) करवंटी.
**करोड** (हिं. वि.) कोटि.
**करोंडी** (प्रा. स्त्री.) कुरवंडी. [ शिपाई.
**करोळ** (हिं. पु.) घोड्यावरील बंदुकवाला
**करोळी** (हिं. स्त्री.) बंदुकांचा मारा.
**कर्क, कर्कट, कर्कटक** (सं. पु.) खेंकडा; (ज्यो.) एका राशीचें नांव.
**कर्कवृत्त** (सं. न.) पृथ्वीचा उत्तरध्रुव सूर्याकडे पूर्णपणें कलला म्हणजे २३॥ उत्तर अक्षांशापर्यंत सूर्यकिरण लंबरूप पडतात, या अंतरावरून जाणारें जें अक्षवृत्त तें.
**कर्कश** (सं. वि.) कर्णकठोर.
**कर्कशा** (स्त्री.) कृत्या, त्राटिका, कजाग.
**कर्कोट** (प्रा. वि.) भयंकर.
**कर्ज** (अर. वि.) ऋण.
**कर्जखत** (अर. न.) कर्जरोखा.
**कर्जदार** (अर. पु.) ऋणको, कर्ज काढणारा.
**कर्जबाजारी** (फा. वि.) ज्यास पुष्कळांचें देणें आहे असा.

**कर्जरोखा** (अर. पु.) कर्ज घेतल्याविषयीचा दस्तऐवज.
**कर्जदाम** (अर. न.) कर्ज; लोकांचें देणें.
**कर्जाऊ** (वि.) कर्ज म्हणून दिलेलें किंवा घेतलेलें.
**कर्ण** (सं. पु.) कान; (भूमितींत) काटकोन त्रिकोणाच्या काटकोनासमोरची बाजू; अंगदेशचा सुप्रसिद्ध राजा व भारतीय वीर; उदार मनुष्य; सुकाणू.
**कर्णधार** (सं. पु.) सुकाण्या.
**कर्णपिशाच्च** (सं. पु.) गुप्तगोष्टी सांगणारा अज्ञात मनुष्य.
**कर्णमात्रा** (सं. स्त्री.) कर्णभूषण.
**कर्णवेध** (सं. पु.) कान टोचण्याचा समारंभ.
**कर्णा** (पु.) ध्वनिक्षेपक यंत्र.
**कर्णिक** (प्रा. पु.) गांवचे हिशेब ठेवणारा कामगार.
**कर्णोपकर्णी** (अ.) एकानें दुसऱ्यापासून, दुसऱ्यानें तिसऱ्यापासून याप्रमाणें ऐकता ऐकतां; उडत उडत.
**कर्तन** (सं. न.) कापणें.
**कर्तब** (हिं. न.) कर्तृत्व; धमक; कौशल्य.
**कर्तबगारी** (फा. स्त्री.) कर्तृत्व, हुशारी.
**कर्तरि** (सं. पु.) व्याकरणांत––वाक्यांत कर्त्याप्रमाणें जेथें क्रियापद फिरतें तो प्रयोग.
**कर्तव्य** (सं. न.) अवश्य कर्म; (वि.) करावयाचें, करण्यास योग्य.
**कर्तव्यशून्य** (सं. वि.) आपलें आवश्यक कर्म न करणारा; कर्तृत्वहीन.
**कर्ता** (सं. पु.) करणारा; (व्याक.) कर्तृत्व ज्याचे कडेस जातें तो; घरचा मुख्य मनुष्य; पराक्रमी.
**कर्ताहर्ता** (सं. पु.) निर्माण करणारा व नाश करणारा अर्थात् परमेश्वर.
**कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं समर्थ** (सं. वि.) हवें तें करण्याचें, न करण्याचें, किंवा अन्य प्रकारें करण्याचें सामर्थ्य असलेला.
**कर्तृत्व** (सं. न.) कर्तेपणा; सामर्थ्य; हिकमत; कृत्य. [ भयंकर मनुष्य.
**कर्दनकाळ** (सं. पु.) प्रत्यक्ष यमासारखा
**कर्दम** (सं. पु.) चिखल.
**कर्दळी** (सं. स्त्री.) केळ, रानकेळी.
**कर्दी** (प्रा. स्त्री.) लागवडींतील जमीन.
**कर्नाटकी** (वि.) कानडी; संगीताची एक परंपरा.
**कर्पूर** (सं. पु.) कापूर; (वि.) कबरा.
**कर्बुर** (सं. वि.) चित्रविचित्र रंगांचा.
**कर्म** (सं. न.) काम, कृत्य, उद्योगधंदा; नशीब; (व्याक.) क्रियेचा व्यापार कर्त्यापासून निघून ज्यावर घडतो तद्वाचक शब्द. [ आलेलें त्रासदायक काम.
**कर्मकटकट** (स्त्री.) प्रारब्धानें वांट्यास
**कर्मकथा** (सं. स्त्री.) प्रारब्धाच्या लीलेची दुःखदायक कहाणी. [ संबंधाचा भाग.
**कर्मकांड** (सं. न.) वेदांतला यज्ञादि-
**कर्मगति** (सं. स्त्री.) दैव, प्रारब्ध.
**कर्मठ** (सं. वि.) स्नानसंध्याशील; धर्मिष्ठ.
**कर्मणिप्रयोग** (सं. पु.) व्याकरणांत–– जेथें वाक्यांत कर्माप्रमाणें क्रियापदाचें लिंगवचन फिरतें तेथें होणारा प्रयोग.
**कर्मधर्म** (सं. पु.) वर्तन, आचरण.
**कर्मधर्मसंयोग** (सं. पु.) दैव आणि सत्कर्म यांचा संयोग; पूर्वजन्मीचें पुण्य व या जन्मीचें दैव यांचा संयोग; प्रारब्धयोग. क॰ **नें**––अकल्पित घटनांच्या योगानें.
**कर्मधारय** ( सं. पु. ) व्याकरणांत–– तत्पुरुष समासाचा एक प्रकार; (यांत प्रायः पहिला शब्द विशेषण किंवा विशेषणरूप असून दुसरा नाम असतो.).
**कर्मनिष्ठ** (सं. वि.) शास्त्रविहित कर्में यथाविधि आचरणारा.
**कर्मफल** (सं. न.) केलेल्या कर्मापासून प्राप्त होणारें पापपुण्य.
**कर्मभूमि** (सं. स्त्री.) कर्म करण्याचें स्थान; इहलोक; भारतवर्ष.
**कर्मभोग** (सं. पु.) कर्मानुरूप प्राप्त होणारीं सुखदुःखें.
**कर्ममार्ग** (सं. पु.) कर्माच्या द्वारें मोक्षप्राप्ति करून घेण्याचा मार्ग.
**कर्मयोग** (सं. पु.) धर्मकृत्य; दैव; दैवगतीनें घडणारी गोष्ट; कर्माच्या द्वारें मोक्षप्राप्ति करून घेणें.

**कर्मविपाक** (सं. पु.) कर्माची फलनिष्पत्ति.
**कर्मान्तर** (सं. न.) उत्तरक्रिया; प्रायश्चित्त.
**कर्मिष्ठ** (सं. वि.) कर्मठ.
**कर्मी** (प्रा. वि.) कर्मठ.
**कर्मेन्द्रिय** (सं. न.) कर्मे करणारा शरीरावयव (हस्त, पाद, गुद, उपस्थ आणि वाणी.).
**कर्मोपासना** (सं. स्त्री.) धार्मिक विधि करीत राहणें.
**कर्ष** (सं. पु.) एक वजन.
**कर्षण** (सं. न.) ओढणें; नांगरणें.
**कऱ्हा** (पु.) लग्नांत एका पात्रांत पाणी व आंब्याचीं पानें घालून त्यावर नारळ ठेविला असतो व तें पात्र वधूवरांच्या बहिणीच्या हातांत दिलें असतें, त्याची संज्ञा; कलश; झारी. [ एक वर्ग.
**कऱ्हाडा** (पु.) महाराष्ट्रीय ब्राह्मणांचा
**कऱ्हें** (प्रा. न.) उंट (ज्ञा० ११।४१८).
**कऱ्हेरा** (प्रा. पु.) चवरी धरणारा.
**कल** (सं. पु.) प्रवृत्ति, झोक, वळण, रोख; (वि.) अस्पष्ट (स्वर).
**कलई** (स्त्री.) कथिलाचा मुलामा.
**कलईकर-गार** (पु.) कलई करणारा.
**कलंक** (सं. पु.) डाग; बट्टा; मळ, गंज.
**कलकल** (स्त्री.) कल्ला, गडबड, ओरडा.
**कलकलणें** (क्रि.) गडबड करणें; मस्तक फिरणें.
**कलकलाट** (पु.) कोलाहल, मोठा कल्ला.
**कलंकी** (सं. पु.) विष्णूचा दहावा अवतार (कल्कि); (वि.) डागलेला.
**कलंगडा** (पु.) गायनांतील एक राग.
**कलगी** (तु. स्त्री.) पागोट्यावर बांधावयाचें रत्नखचित भूषण; तुरा; शृंगारिक लावणी. [ म्हणणारा.
**कलगीवाला** (हिं. पु.) शृंगारिक लावण्या
**कलच** (पु.) मळ, किटण. [ पालथें होणें.
**कलंडणें** (क्रि.) लवंडणें; बाजूस वळणें;
**कलणें** (क्रि.) झुकणें, टेंकणें; ऱ्हास होऊं लागणें; (प्रा.) जाणणें.
**कलता** (वि.) झुकता, झुकलेला, वळलेला.
**कलत्र** (सं. न.) विवाहाची स्त्री.
**कलथणें** (क्रि.) उलटविणें.
**कलथा** (पु.) उलथणें, काविलथा.
**कलथा** (स्त्री.) एका बाजूला वळणें; धक्का, ठोसा.
**कलंदर** (फा. पु.) योगी; व्यसनी; छांदिष्ट आणि घाणेरडा; भटक्या मारणारा; पिसाट मनुष्य.
**कलंदरा, कलंद्रा** (फा. पु.) गर्भरेशमी वस्त्र; तंबूच्या रक्षणार्थ बाहेर लाविलेली जाड कनात.
**कलदार** (वि.) ज्या नाण्यावर शिक्का आहे असें नाणें.
**कलंद्री** (फा. पु.) मध्यमंडप.
**कलप, कलफ** (हिं. पु.) केंसाला लावावयाचा रंग; खळ.
**कलबी, कलंबी, कळंबी** (स्त्री.) अगदीं पाठीमागचें शीड.
**कलबूत–द** (पु.) पगडी बांधण्याचा किंवा जोडे शिवण्याचा लांकडी ठोकळा, सांगाडा.
**कलभ** (सं. पु.) हत्तीचा छावा; पशुबालक.
**कलभंत, कलभंड** (प्रा. वि.) भांडखोर.
**कलभा, कलंभा** (पु.) वाचावाच, झगडा.
**कलभांड** (वि.) भांडखोर; (पु.) गोसाव्यांचा एक पंथ.
**कलभूत, कलाबूत** (प्रा. पु.) कातडें काढून आंत भुसा भरून केलेली आकृति.
**कलम** (अर. न.) बाब; रक्कम; लेखणी, कुंचली; प्यारा; एका झाडापासून दुसरें झाड लावण्यासाठीं पहिल्या झाडाची तोडलेली फांदी.
**कलम करणें** तोडणें.
**कलमकसाई** कारकुनी डावपेंचानें दुसऱ्याची मान तोडणारा.
**कलमदान** (फा. न.) दौत लेखणी इ. ठेवण्याची लहानशी पेटी.
**कलमबंदी** (फा. स्त्री.) प्रत्येक बाब निरनिराळ्या कलमाखालीं लिहिलेली असा कागद. [ स्थता; मूर्च्छा.
**कलमल** (स्त्री.) अतिशय थकवा; अस्व-
**कलमलणें** (क्रि.) मळमळणें, फिरणें; व्याकुळ होणें; अस्वस्थ वाटणें. [ घेऊन.
**कलमवार** (अ.) एकेक बाब निरनिराळी

**कलमा** (अर. पु.) इस्लाम धर्मतत्त्वावरच्या श्रद्धेचा उच्चार.
**कलमी** (फा. वि.) उत्तम झाडांच्या कलमापासून झालेला; लेखबद्ध; सप्रमाण.
**कलमी करणें** (क्रि.) लिहिणें.
**कलरव** (सं. पु.) किलबिल (पक्ष्यांची).
**कलवड, कलवडू** (ग्रा. पु.) डेऱ्याचें लिंपण (तुका० ४२१८).
**कलश** (सं. पु.) तांब्या, घागर, पात्र.
**कलह** (सं. पु.) भांडण, दुही.
**कलहंस** (सं. पु.) राजहंस.
**कलहान्तरिता** (सं. स्त्री.) भांडणामुळें दुरावलेली स्त्री.
**कला** (सं. स्त्री.) काव्य, गायन, शिल्प, चित्रलेखन इ० कौशल्याचीं कामें; अंश, भाग; चंद्राचा सोळावा भाग; अंशाचा साठावा भाग.
**कलाक** (पु.) तास.
**कलाकार** (पु.) कलावंत.
**कलागत** (स्त्री.) भांडण, तंटा.
**कलागती, कलागत्या** (वि.) भांडखोर.
**कलांट** (पु.) त्रासदायक मनुष्य.
**कलांतर** (सं. न.) व्याज.
**कलाप** (सं. पु.) समुदाय, समूह.
**कलाफ** (सं. कल्प पु.) शंका, भीति.
**कलाबतू** (हिं. पु.) रेशमी धाग्याभोंवतीं चांदीचे तंतु गुंडाळून पीळ दिलेला धागा.
**कलाल** (अर. कलवार, सं. कल्यापाल पु.) मद्य तयार करणारा; मद्य विकणारा.
**कलाली** (स्त्री.) कलालाचें दुकान; कलालाच्या दुकानावरचा कर; (प्रा. वि.) कपटी; मतलबी.
**कलावंत** (सं. वि.) कलाभिज्ञ; एखाद्या कलेंत निष्णात. [ वेश्या.
**कलावंतीण** (सं. स्त्री.) नर्तकी, नायकीण,
**कलावा** (हिं. पु.) हत्तीवर बसणारांनीं पाय घालण्याची रिकीब; झोक, कल; वळण; फेरफटका; कळवा पहा.
**कलि** (सं. पु.) चार युगांपैकीं शेवटचें; कलह; एक देवता.
**कलिका** (सं. स्त्री.) कळी.
**कलिंगड** (सं. कलिंग न.) टरबूज.
**कलिजा** (अर. पु.) काळीज.
**कलिंदर** (पु.) काळमांजर; ऊद; (वि.) बदफैली, व्यसनी.
**कलिदा** (हिं. पु.) काळीज, पित्ताशय; प्रियवस्तु.
**कलिपुरुष** (सं. पु.) दुष्ट मनुष्य.
**कलियुग** (सं. न.) चार युगांपैकीं शेवटचें.
**कलिवर** (सं. कलेवर न.) शरीर.
**कलुली** (सं. कल्लोल स्त्री.) मस्ती येऊन मारलेल्या उड्या, उसळी; तलफ.
**कलुषित** (सं. वि.) गढूळ, दूषित.
**कलेक्टर** (इं. पु.) जिल्ह्यावरील मुख्य अधिकारी.
**कॅलेंडर** (इं. न.) पंचांग; तारखांची जंत्री.
**कलेवर** (सं. न.) शरीर, देह.
**कलोड** (पु.) कलवड, वाळलेल्या गोवऱ्यांचा लिंपण लावून ठेविलेला ढीग.
**कल्क** (सं. पु.) चूर्ण, ठेंचा.
**कल्की** (सं. पु.) कलंकी पहा.
**कल्प** (सं. पु.) ब्रह्मदेवाचा दिवस; धर्मविधि सांगणारें वेदांग; शंका; निश्चय.
**कल्पक** (सं. वि.) नव्या कल्पना किंवा युक्ति लढविणारा; चतुर.
**कल्पतरु, कल्पद्रुम, कल्पवृक्ष** (सं. पु.) इच्छित वस्तु देणारा वृक्ष.
**कल्पना** (सं. स्त्री.) तर्क; युक्ति; विचार; मनांत केलेली योजना; शंका; आभास; तरंग.
**कल्पनावेल्हाळ** (वि.) कल्पनेंत रमणारा.
**कल्पनाशक्ति** (सं. स्त्री.) तर्कशक्ति; बुद्धिसामर्थ्य; भावनेचा जोर.
**कल्पान्त** (सं.पु.) कल्पाचा शेवट; आकान्त.
**कल्पान्तरीं** (अ.) कधींही.
**कल्पिणें** (क्रि.) कल्पना करणें.
**कल्पित** (सं. वि.) कल्पिलेलें, खरें नव्हे तें.
**कल्पितें** (प्रा. न.) मन (ज्ञा० ९।९२).
**कल्या** (सं. कुल्या स्त्री.) पाट.
**कल्याण** (सं. न.) मंगल, सुख, भलें; **क० थाट**-(गायनांत) मध्यम, तीव्र व बाकीचे बिलावल थाटाचे ज्यांत असतात तो.
**कल्ला** (हिं. पु.) गालावरचा मिशांच्या केसांचा झुबका; कल्लोळ; गडबड.

**कल्लोळ, कल्होळ** (सं. पु.) मोठी लाट; आगीचा लोट; कल्ला; गडबड.
**कल्हई** (अर. स्त्री.) कलई पहा.
**कल्हईगार** (पु.) कलई करणारा.
**कल्हार** (सं. पु.) कमळ; कथिल.
**कल्होळणें** (सं. क्रि.) उचंबळणें.
**कव** (प्रा. पु.) वेंघ, मिठी; झडप, उडी.
**कवइता** (प्रा. पु.) कवि.
**कवकवीत** (वि.) वेचव, पचपचीत.
**कवच** (सं. न.) चिलखत; तोडगा; ताईत; मंत्रांतलें 'हुं' हें अक्षर.
**कंवचाळ** (न.) वर्तुळ, घेरा.
**कंवची** (स्त्री.) कवटी, करवंटी.
**कवट** (न.) अंडें; क० गाळणें—धीर सोडणें.
**कवट** (स्त्री.) कव पहा.
**कंवटळ, कंवटाळ** (न.) जारणमारणादि प्रयोग; तुफान; कारस्थान.
**कंवटाळ** (प्रा. न.) लबाडीचें तुफान.
**कंवटाळणें** (क्रि.) मिठी मारणें, आलिंगणें.
**कंवटाळीण** (स्त्री.) कंवटाळ करणारी स्त्री.
**कवटी** (स्त्री.) मिठी, कव.
**कंवटी** (स्त्री.) कंवची.
**कवटें** (न.) अंडें. [नांवाचें फळ.
**कंवठ** (सं. कपित्थ न.) कवीठ किंवा कौठ
**कवठी** (स्त्री.) मस्तकाचा अग्रभाग; कौठाचें झाड.
**कवड** (स्त्री.) अर्धा नारळ. [येणारा उजेड.
**कवडसा** (पु.) प्रतिबिंब; गवाक्षांतून
**कवडळ** (न.) कडू वृंदावन; दुष्ट माणूस.
**कवडा** (पु.) मोठी कवडी; अति अल्प अंश (भा० ३।५६०); एक पक्षी.
**कवडी** (स्त्री.) समुद्रांतील एका प्राण्याचें हाड; कपर्दिका; अल्प अंश (भा० १४।९७); पांढरा ठिपका; डोळ्यांतलें फूल; दह्याचा गोळा.
**कवडीमोल** (वि.) अगदीं क्षुल्लक किंमतीचें.
**कवड्यासाप** (पु.) कवडीसारखे ठिपके अंगावर असलेला सर्प. [काय ?
**कवण—णा** (प्रा. सर्वना.) कोण ? कोणता?
**कवणें** (क्रि.) कविता रचणें.
**कवण्या गुणें** कां ? कशामुळें ? [नवल.
**कवतिक—तीक—तूक** (प्रा. न.) कौतुक,
**कवंद** (स्त्री.) खपली.
**कवन** (सं. न.) पद्य, कविता, गाणें.
**कवल** (सं. पु.) घास; मिठी.
**कवलिता** (प्रा. पु.) रक्षणकर्ता, रक्षक.
**कवळ** (सं. पु.) कावीळ (तुका० २८८). घास; मागील भाग (कविम० १।२१).
**कवळणें** (क्रि.) कवटाळणें; गोळा करणें.
**कवळासणें** (क्रि.) गणपति, गौरी० इ बोळविणें.
**कवळी** (स्त्री.) वेंघेत मावण्याजोगा पदार्थ; कव; दंतपंक्ति; विड्याची पाचशें पानें.
**कवळ** (प्रा. पु.) स्पर्श (नाम०गा०३८२).
**कवाईत** (अर. कवाइद स्त्री.) शिस्तीनें वागण्याचें शिक्षण; युद्धकलेचें शिक्षण.
**कवाड** (सं. कपाट न.) दार.
**कवाल** (अर. पु.) ख्याल गाणारा.
**कवाला** (अर. पु.) क्रयपत्र.
**कवाली** (अर. स्त्री.) कवाल गातो तें गाणें.
**कवि** (सं. पु.) काव्यकर्ता, शाहीर.
**कविता** (सं. स्त्री.) काव्य; कविवृंद.
**कविताशक्ति** (सं. स्त्री.) प्रतिभा; काव्यरचनेचें सामर्थ्य.
**कविलास** (सं. कैलास पु.) कैलास.
**कवेतळ** (प्रा. स्त्री.) वेंघ.
**कवेश** (पु.) प्राणप्रिय, पति. (होना. पृ. १११). [अन्न.
**कव्य** (सं. न.) पितरांस अर्पण करण्याचें
**कव्हाळ** (प्रा. पु.) वेढा; ग्रास (ज्ञा० ११।२५१); मिठी. [पट्टा.
**कशा** (सं. स्त्री.) चाबूक; (फा. पु.) कमर-
**कशास** (अ.) कशाला ?
**कशिदा, कशीदा** (फा. पु.) वस्त्रावर सुतानें अगर रेशमानें केलेलें वेलबुट्टीचें वगैरे काम.
**कशी** (प्रा. स्त्री.) कांचणी.
**कश्मल** (सं. न.) मळ, दोष.
**कष** (सं. पु.) कसोटीचा दगड.
**कषाय** (सं. पु.) काढा.
**कष्ट** (सं. पु.) मेहनत, श्रम; दुःख.
**कष्टकरी** (पु.) मजूर. [सारखें.
**कष्टसाध्य** (सं. वि.) श्रम करून मिळण्या-
**कष्टाळू** (सं. वि.) मेहनती, उद्योगी.

**कष्टी** (सं. वि.) मेहनती; खिन्न, थकलेला.
**कस** (सं. पु.) तत्त्वांश, अर्क; सोनें रुपें इ० धातूंची परीक्षा; जातीचा गुण.
**कंस** (सं. पु.) वर्तुळाचा भाग. [दुखणें.
**कसकस** (स्त्री.) अंग मोडून येणें; अंग
**कसणी** (सं. स्त्री.) दोरी, काढणी; अरुंद व लांब कसा (पैसे वगैरे ठेवण्याची पिशवी); घट्ट बांधणें; आंवळणें; परीक्षा पाहणें; सामत्याची धनुष्याकार पकड.
**कसणें** (सं. क्रि.) घट्ट बांधणें, आंवळणें, करकचणें; परीक्षणें; व्यायामानें शरीर दृढ होणें.
**कसदार** (वि.) भरीव, सकस.
**कसपट** (न.) गवत, काष्ठ इ० कांचा अनुरेणूयेवढा भाग.
**कसब** (अर. न.) काम, धंदा; लबाडीची युक्ति; कौशल्य; गुण; वेश्येचा धंदा.
**कसबा** (अर. पु.) महालाचें किंवा परगण्याचें मुख्य ठिकाण; जुनी वस्ती.
**कसबी** (अर. वि.) गुणी, कुशल.
**कसबीण** (अर. स्त्री.) वेश्या, रांड.
**कसम** (अर. स्त्री.) शपथ, प्रतिज्ञा.
**कसमस** (प्रा. स्त्री.) चंचलता, चळवळ.
**कसमळ** (सं. कश्मल वि.) ओंगळ.
**कसर** (अर. स्त्री.) उणीव, कमीपणा; बाकी; फायदा; कणकणी; वाळवी; छाटाछाट.
**कसरणें** (क्रि.) कमी होणें; घसरणें.
**कसरत** (अर. स्त्री.) व्यायाम, मेहनत.
**कसरती** (अर. वि.) कसरत करणारा; तालीमबाज.
**कसरा** (वि.) पांढुरक्या रंगाचा.
**कसरी** (वि.) मितव्ययी, कृपण.
**कसला** (वि.) कशा प्रकारचा ?
**कसवट** (प्रा. ना.) करामत; कसोटी; शेताची कमाविशी.
**कसवटी** (प्रा. स्त्री.) परीक्षा, कसोटी; परीक्षक (ज्ञा० ९।३०७).
**कसा** (पु.) अंगरख्याचा बंद; लांब व अरुंद पिशवी; (वि.) कोणत्या प्रकारचा?
**कसाई** (अर. पु.) गुरें मारून त्यांच्या मांसाच्या विक्रीनें पोट भरणारा.
**कसाब** (अर. पु.) कसाई, खाटीक.
**कसाबी** (स्त्री.) खाटकाचा धंदा.
**कसालत** (अर. कसला स्त्री.) सक्त मेहनत, परिश्रम.
**कसाला** (अर. पु.) कष्टी मेहनत.
**कसिदा** (अर. पु.) कशिदा पहा.
**कसुदी** (स्त्री.) (नागपूरकडे) मिरच्यांची पूड.
**कसूर** (अर. पु. स्त्री.) दोष, चूक.
**कसोटा** (पु.) कुस्तींतला एक पेंच.
**कसोटी** (सं. हिं. स्त्री.) परीक्षा; कस लावण्याचा दगड.
**कसोशी** (स्त्री.) काळजी, दक्षता; त्रास.
**कस्त** (सं. कष्ट स्त्री.) झीज, नुकसान; तसदी, परिश्रम; उणेपणा; न्यून.
**कस्तन, कस्तान** (सं. कुत्सित + तृण न.) पाचोळा; कसण्याचा दोरखंड.
**कस्तर, कस्तूर** (पु. न.) डांक, डांख. (भंगलेल्या वस्तूस जोडण्यासाठीं लावतात तो पदार्थ.)
**कस्ता** (वि.) झुकलेला; हलका; अप्रामाणिक.
**कस्ती** (वि.) कष्टाचें; (स्त्री.) श्रम.
**कस्तुरी, कस्तूरी** (सं. स्त्री.) एक अतिशय सुगंधि द्रव्य.
**कस्तूरीमृग** (सं. पु.) ज्याच्या नाभींत कस्तूरी उत्पन्न होते तो हरिण.
**कहर** (अर. पु.) अनर्थ, विकट प्रसंग; पराकाष्ठा; **कहरदर्या** (अर. फा. पु.)–अफाट समुद्र.
**कहाँ** (हिं. क्रि. वि.) कोठें.
**कहाणी** (हिं. स्त्री.) गोष्ट, कथा; उपदेश.
**कहात** (स्त्री.) चोरांची धाड; चढाई, चाल.
**कहाती** (वि.) धाडसी; फार मोठें.
**कहार** (प्रा. वि.) अतिशय (जना० ३१२); (हिं. पु.) भोई.
**कहिं, कहीं** (प्रा. अ.) कधीं. [टोळी.
**कहो** (हिं. स्त्री.) दाणावैरण आणणारांची
**कह्या** (हिं. पु.) हुकूम; ताबा.
**कळ** (सं. स्त्री.) युक्ति, कळ, यंत्र; तिडीक; दुःखाची रग; भांडण; भांडणाचें मूळ; (वि.) मंजुळ.
**कळक, कळंक** (पु.) वांबू, वेळू.

**कळंक** (सं. कलंक पु.) डाग; बट्टा; कीट, जंग.
**कळकट** (वि.) किंचित् कळकलेला; घाणेरडा; भांडखोर (दास० १९।३।९).
**कळंकट** (वि.) कळकट, घाणेरडें.
**कळकणें, कळंकणें** (क्रि.) जंग येणें, बिघडणें.
**कळकळ** (स्त्री.) आस्था, काळजी; मनाला येणारा द्रव, दया.
**कळकळणें** (क्रि.) मळमळणें; तळपणें; तळमळणें; व्याकुळ होणें.
**कळकळीत** (वि.) लवकर मोडण्यासारखें; न चिकटणारें.
**कळकी** (स्त्री.) वेळूची बनविलेली टोपली.
**कळगा** (पु.) बांगड्यांचे तुकडे; (वि.) भांडखोर. [ होणें.
**कळंजणें** (क्रि.) थकून जाणें; मूर्च्छित
**कळण** (न.) **कळणा** (पु.) डाळीची किंवा इतर धान्याची चुरी.
**कळणें** (सं. कलन क्रि.) समजणें, जाणणें.
**कळत न कळत** अतिशय थोडा.
**कळत्र** (सं. कलत्र न.) स्त्री.
**कळप** (सं. कलाप पु.) समुदाय, झुंड.
**कळपा** (पु.) खपली, पापडा, पापुद्रा.
**कळंबें** (न.) आळंबें; कुत्र्याचें मूत.
**कळंभा** (प्रा. पु.) भांडण (ज्ञा० ६।१६).
**कळभांड** (वि.) भांडखोर.
**कळमळ** (स्त्री.) मळमळ. [ कळीचा नारद.
**कळलाव्या** (वि.) भांडण लावणारा,
**कळवंडणें** (क्रि.) भांडणें; दुसऱ्याच्या अंगावरून जाऊन पलीकडे पडणें.
**कळवंडा** (पु.) भांडण, वाचावाच.
**कळवंडी** (प्रा. पु.) भांडाभांडी.
**कळवंतीण** (स्त्री.) नायकीण, नर्तकी.
**कळवळ** (प्रा. स्त्री.) कालवाकालव; आस्था; माया; करुणा (तुका० ८२).
**कळवळणें** (क्रि.) द्रवणें, कींव येणें; व्यथित होणें.
**कळवळा** (पु.) कळवळ पहा.
**कळवा** (पु.) घोड्याच्या दोन पायांना बांधलेली दोरी; खोडा.
**कळविणें** (क्रि.) वातमी देणें, समजावणें.
**कळवी** (स्त्री.) खोटें नाणें.
**कळशी** (सं. कलश स्त्री.) लहान घागर.
**कळस** (सं. कलश पु.) शिखर; पराकाष्ठा, कमाल; शेवट.
**कळसा** (पु.) मोठी कळशी, घागर.
**कळसूत्र** (सं. न.) खरा चालक अदृश्य राहून निर्जीव वस्तु स्वयंप्रेरणेनें चलनवलन करतात असें भासविण्याची युक्ति.
**कळहे** (प्रा. पु.) कलह.
**कळा** (सं. कला स्त्री.) चंद्राचा सोळावा अंश; सोळा ही संख्या; कौशल्य, युक्ति; (पु.) मोठी कळी.
**कळाईत** (प्रा. पु.) कुशल मनुष्य.
**कळाकुसरी** (स्त्री.) कौशल्य, चातुर्य; बारीक नक्षीकाम.
**कळांतर** (प्रा. न.) व्याज.
**कळातीत** (सं. वि.) निर्गुण (परब्रह्म).
**कळान्यास** (प्रा. वि.) कौशल्यानें बनविलेलें, नक्षीदार (रुक्मिणी० १५।५३).
**कळापात्र** (प्रा. न.) कलावंतीण (राम० ३६।१०६).
**कळावंतीण** कळवंतीण पहा. [ १२।२६).
**कळावा** (प्रा. पु.) पायबंद (मोरो० द्रोण०
**कळाशी** (स्त्री.) सांधा बेमालूम जोडण्याचें काम; त्या कामाचें हत्यार.
**कळास** (प्रा. स्त्री.) कौशल्य (ज्ञा० १७।८); (वि.) घाटदार (रुक्मि० १२।५३).
**कळासणें** (प्रा. क्रि.) खिळणें, बंद होणें.
**कळासी** (स्त्री.) कळाशी पहा.
**कळासूत्रीचा खेळ** (पु.) कळसूत्री भावल्यांचा तमाशा.
**कळि** (सं. कलि पु.) भांडण, कलियुग.
**कळिकटा, कळिकाटा** (प्रा. वि.) निमित्तभूत; भांडखोर; कळ लावणारा.
**कळिरव** (सं. कलरव पु.) मंजुळ शब्द (ज्ञा० ११।३३६).
**कळिवर** (सं. कलेवर पु.) देह, शरीर.
**कळी** (सं. स्त्री.) न उमललेलें फूल; बुंदी, मोतीचूर, इ. चा एकेक दाणा; भाजलेली चुनखडी; अंगरख्याचा एक त्रिकोणाकृति भाग; कली; भांडण लावणारा. **क० उमलणें**—प्रफुल्लित मनानें बोलणें चालणें.

**कळीकाळ** (सं. पु.) कलियुग; विपत्ति-काळ, संकट.
**कळीचें पान** कळीसारखें लांबट गोल आकाराचें विड्याचें पान.
**कळीत** (न.) उभ्या पिकाचा अंदाज.
**कक्ष** (सं. पु.) खाक, बगल; बाजू; वाळ-लेलें गवत; अरण्य; कासोटा.
**कक्षा** (सं. स्त्री.) ग्रहांचा संचारमार्ग; वादी-प्रतिवादींचा कोटिक्रम; खाक.
**का** (प्रा. अ.) अथवा, आणि, किमर्थ.
**कां** (अ.) कशासाठीं ? काय म्हणून ?
**काइणी** (स्त्री.) जोंधळ्यावरचा एक रोग.
**काई** (प्रा.अ.)काय ? कसें? (पु.)काय,देह.
**काईल** (स्त्री.) रुंद तोंडाची व बिनकानाची कढई; (वि.) कुंठित झालेला.
**काउ** (पु.) कावळा.
**काउटी** (प्रा. स्त्री.) महत्त्व (भा० १।३०६)
**काउरें** (प्रा. न.) वेड.
**काक** (सं. पु.) कावळा.
**काकड, कांकड, काकुर** (प्रा. न.) चाड; न शिजणारें धान्य (रुक्मि० १८।४९); खडा; हरळ (भा० १७१५).
**काकड आरती** (स्त्री.) प्रभातसमयीं काकडा ओवाळून देवाची आरती कर-तात ती.
**काकडणें** (क्रि.) आवळणें, संकोच पावणें.
**काकडा** (पु.) चिंधीला पीळ देऊन केलेली मोठी वात; तडाखा; तीव्रता.
**काकडी** (सं. कर्कटी स्त्री.) खिरा.
**कांकडें** (न.) कोंवळा नारळ.
**कांकण** (सं. कंकण न.) कंकण, काकणी, कंगणी; स्त्रियांच्या मनगटांतलें एक भूषण.
**काकणता, काकता** (पु.) गोठ, पाटल्या वगैरे वांकविण्याचा ठोकळा.
**कांकणभर** (वि.) थोडेंसें.
**कांकणा** (पु.) काकणता पहा.
**काकतालीय न्याय** कावळ्याचें ताडाच्या झाडावर बसणें व त्या झाडाचें फळ पडणें यांच्या समकालीनत्वामुळें त्यांमध्यें कार्यकारणसंबंध असला पाहिजे अशी होणारी समजूत.

**काकदृष्टि** (सं. वि.) बारीक व चलाख नजरेचा. छिद्रदर्शी.
**काकपद** (सं. न.) लिहितांना गळालेल्या अक्षराच्या दुरुस्तीच्या वेळीं करण्याची ^ अशी खूण.
**काकपक्ष** (सं. पु.) झुलूप.
**काकबलि** (सं. पु.) कागवळ, वैश्वदेवाच्या शेवटीं कावळ्यासाठीं टाकिलेला भाताचा घास.
**कांकर** (पु.) तबला ढोलकें इ. ची वादी.
**काकरी** (स्त्री.) नांगराची खेप.
**कांकरी** (स्त्री.) रेशमाचा धागा; कुकडें.
**काकवी** (स्त्री.) उंसाचा कढविलेला घट्ट रस.
**काकस्नान** (सं. न.) घाईघाईनें केलेली [आंघोळ.
**काकळ** (वि.) हळूवार मनाचा.
**काकळूत** (स्त्री.) करुणेची याचना; करुणा.
**काकळूतवाणा** (वि.) करुणा उत्पन्न करणारा.
**काका** (हिं. पु.) चुलता. [जात.
**काकाकुवा, काकातू** (पु.) पोपटाची एक
**काकाक्षिगोलकन्याय** कावळ्याच्या डोळ्यां-तील फिरत्या भावलीप्रमाणें एकच शब्द अनेकार्थांनीं योजतां येणें.
**काकी** (हिं. स्त्री.) चुलती.
**कां कीं** (अ.) कारण.
**काकुळता, काकुळत** काकळूत पहा.
**कां कूं करणें** घुटमळणें; आशंकणें.
**काकोळ** (सं. पु.) विषविशेष; डोमकावळा.
**काख** (सं. कक्ष स्त्री) बगल; **काखा वर करणें**--दिवाळें काढणें; **काखेस मारणें**--आश्रयाखालीं घेणें; घेऊन पळून जाणें.
**काखमांजरी** (स्त्री.) बगलेंत होणारी पुटकुळी.
**कांखा** (पु.) पर्णरहित वृक्ष; खुंट.
**काखोटी** (सं. कक्ष स्त्री.) खाक, बगल; **काखोटीस मारणें**--घेऊन जाणें.
**काग** (सं. काक पु.) कावळा.
**कागडा** (हिं. वि.) धूर्त.
**कागद** (फा. कागज पु.) कागद, पत्र, चिठ्ठी; दस्तऐवज.

**कागदी** (वि.) कागदाचा; हलका; (पु.) कागद करणारा.
**कागदी घोडा नाचविणें** (प्रत्यक्ष कृति न करतां) कागदोपत्रीं लिहिणें.
**कागदी जवान** अशक्त मनुष्य.
**कागदी लिंबू** पातळ सालीचें लहान लिंबू.
**कागदोपत्रीं** पत्रें वगैरेंतून; लिहिण्यांत.
**कागवळ** (सं. काकबलि स्त्री.) काकबलि पहा.
**कांगाई** (स्त्री.) **कांगावा, कांघावा** (पु.) थोडेंसें नुकसान किंवा दुखापत फुग-वून सांगणें.
**कांगावखोर** (वि.) कांगावा करणारा.
**कागाळखोर** (वि.) दुसऱ्याविरुद्ध गाऱ्हाणीं करणारा. [तक्रार, गाऱ्हाणें.
**कागाळी** (सं. काकालि स्त्री.) ओरड,
**कांग्रेस** (इं. स्त्री.) सभा; राष्ट्रीय सभा.
**कांघाई, कांघावा** कांगाई, कांगावा पहा.
**कांघाईखोर, कांघावखोर** (वि.) कांगावा करणारा.
**काच** (सं. स्त्री.) भिंग.
**कांच** (पु.) जाच, त्रास. [एक वनस्पति.
**काचकुइरी** (स्त्री.) खाज उत्पन्न करणारी
**काचकुली** (स्त्री.) गुदगुली.
**कांचणी, काचणी** (स्त्री.) काळजी, भीति, त्रास,जाच; घाताचें कारण(तुका० ६६); घर्षण (भा० २१।२४६).
**काचणें, कांचणें** (सं. क्रकच् क्रि.) घांसून झिजणें; क्षीण होणें.
**कांचन** (सं. न.) सोनें; एक वृक्ष; पत्त्यांचा एक प्रकार.
**काचबिंदु** (सं. पु.) एक नेत्ररोग.
**काचय** (प्रा. वि.) भित्रा, अधीर.
**काचया** (प्रा. पु.) कासोटा.
**काचरी** (प्रा. स्त्री.) भाजीचे चिरून वाळ-वून ठेविलेले काप; सुरकुती.
**काचवटी** (प्रा. स्त्री.) काच. [खडकाळ.
**काचळ** (स्त्री.) दगडाची चीप; (वि.)
**काचा** (प्रा. वि.) कच्चा.
**काचाकुची** (प्रा. स्त्री.) संकोच, काचकूच.
**काचावणें** (क्रि.) क्षीण होणें; भिणें, धैर्य सोडणें; खचणें.
**काची** (हिं. पु.) फळफळावळ विकणारा.
**कांची** (सं. स्त्री.) कमरपट्टा.
**कांचोटी** (स्त्री.) कांचेचा मणि.
**काचोळणें** (स्त्री.) आंब्यांत बाठा तयार होणें.
**कांचोळा** (पु.) दगडाची चीप.
**कांचोळी** (स्त्री.) मागें बंद असलेली चोळी.
**काचोळें** (न.) गंध, अक्षता, कुंकूं इ० ठेवण्याचें लहानसें पुडदार पात्र.
**काच्या** (सं. कच्छ पु.) नेसलेल्या धोत-राचा सोगा मागें नेऊन कमरेपाशीं खोचतात तो; लंगोट.
**काच्छी** (सं. कच्छ पु.) कच्छ देशचा मनुष्य; फळें विकणारा.
**काज** (सं. कार्य न.) काम; कारण; (हिं. पु.) गुंडीचें भोंक.
**कांजणी** (स्त्री.) देवीसारखा एक रोग.
**काजर** (प्रा. न.) विष.
**काजरा** (पु.) कुचल्याचें झाड.
**कांजवणी** (न.) कांजी.
**काजवा** (सं. खद्योत पु.) एक प्रकाशमान किडा; आघातामुळें डोळ्यापुढें जे सूक्ष्म प्रकाशमान अणु दिसतात ते; अंधारी, मस्तकभ्रमण.
**काजळ** (सं. कज्जल न.) मस; डोळ्यांत घालण्याचें अंजन.
**काजळी, काजळचा** (सं. कज्जल स्त्री.) दिव्याची काजळी; जोंधळ्यावरचा एक रोग; अंधारी; शाई.
**कांजळी** (स्त्री.) गाय किंवा म्हैस व्याल्या-वर जें पहिलें दूध काढतात तें; चीक.
**कांजिणी** कांजणी पहा.
**काजी** (अर. पु.) मुसलमान पंडित, किंवा न्यायाधीश. [पेज.
**कांजी** (अर. स्त्री.) भाताची अंबविलेली
**काजू** (पु.) एक प्रकारचें फळ.
**काट** (प्रा. पु.) संगति; जंग, मळ; इच्छा (मोरो०कृष्ण० ४२।२४); कृपणपणा; कमी करणें; पत्त्यांची कापलेली रास; कारस्थान.
**काटक** (वि.) कष्टाळू; शीतोष्णादिक सहन करणारा; कणखर.

**काटकसर** (हिं. अर. स्त्री.) किरटेपणा; खर्च कमी करणें; मितव्यय.
**काटकसऱ्या** (वि.) मितव्ययी.
**काटकी** (स्त्री.) काडी.
**काटकुळा** (वि.) कृश, रोडका.
**काटकूट** (स्त्री.) काडीकुडी; चर्चा.
**काटकोन** (पु.) पंचेचाळीस अंशांचा कोन.
**काटणी** (स्त्री.) कापणी; पत्त्यांच्या खेळांत पत्त्यांची रास कापणें.
**काटणें** (प्रा. क्रि.) कमी करणें (ना० १९३५); मळणें, लेंप चढणें; कापणें; कष्टानें काढणें. [१५७०).
**काटलें** (प्रा. वि.) किटलेलें (तुका०
**कांटवण** (प्रा. न.) कांटेरी रान.
**काटवणी** (न.) अतिशय गढूळ पाणी.
**काटवल, काटवळ** (न.) गवत; तोडलेलें झुडूप. [महागाई.
**काटविकरा** (न.) अतिशय दुर्मिळता,
**कांटल** (प्रा. वि.) कांटेरी.
**कांटा** (सं. कंटक पु.) कांटा, अडचण; व्यत्यय; छोटी तराजू; तराजूंत दांडीच्या मध्यभागीं उभा असलेला खिळा किंवा तार; रोमांच; किल्लीच्या भोंकांत जाणारा कुलुपांतला खिळा; **कां०चा नायटा होणें**—क्षुद्र कारणावरून अनर्थ उद्‌भवणें; **कां०नें कांटा काढणें**—एका अनिष्ट गोष्टीचा उपयोग दुसरी अनिष्ट गोष्ट नाहींशी करण्याकडे करणें.
**काटाकाट** (स्त्री.) छाटाछाट.
**काटागिरी** (स्त्री.) धूर्तता, कारस्थानीपणा.
**कांटारा** (पु.) कांटा.
**कांटालें** (न.) तराजू; रोमांच.
**कांटाळा** (प्रा. पु.) कांटा, रोमांच; बरोबरी; ताजवा (ज्ञा० ८।२६३);
**कांटाळें** (प्रा. न.) तुलना; समतोल पदार्थ, तराजू (स्वा. दि. १२।४।९०); (अ.) बरोबर (ज्ञा० १२।१६१).
**कांटिवडें** (प्रा. न.) कांटी.
**काटी** (नंदभाषा) वीस.
**कांटी** (स्त्री.) कांटेरी झुडूप; कुंपण; **कां० लावणें**—नाश करणें; **कांटी लागणें**-ओस पडणें.
**काटूक** (न.) काटकी, काडी.
**कांटेकोर** (वि.) रेखलेला, नेमका, बिनचूक; कडक. [चूक; फार नाजूक.
**काटेतोल** (वि.) नक्की वचनाचा; बिन-
**कांटेरी** (वि.) कांट्यांनीं युक्त.
**काठ, कांठ** (सं. कंठ पु.) किनार, कोर.
**कांठपरा, कांटप्रा, कांठफरा** (प्रा. पु.) फुटक्या मडक्याचा कांठ (भा० २६। २०६).
**कांठमोरा** (पु.), **कांठमोरें** (न.) खापर.
**काठवट, काठवटी** (प्रा. स्त्री.) लांकडाचें परळ. [खडकाचा थर.
**काठा** (सं. कंठ पु.) काठ, किनारा;
**काठाण** (न.) द्विदल धान्य.
**कांठाळी** (स्त्री.) वस्त्रादिकांची किनार.
**काठिन्य** (सं. न.) कठिणपणा.
**काठी** (सं. काष्ठ स्त्री.) यष्टी, लकडी; पांच हात व पांच मुठी लांबीचें जमीन मोजण्याचें परिमाण; हाडपेर, बांधा; आडकाठी. **काठीकरू** (प्रा. पु.) चोपदार.
**कांठोकांठ** (सं. अ.) अगदीं कांठापर्यंत.
**काठ्याळ** (वि.) कृश.
**काड** (न.) धान्य काढून घेतल्यावर राहिलेलें धान्याचें ताट.
**कांड** (सं. न.) कांडें, पेरें, भाग; झाडाचें खोड; प्रकरण; शिडाचें दोरखंड; बाण.
**कांडकें** (न.) लांकडाचा ठोकळा; भाग; गलेलठ्ठ मनुष्य.
**कांडण, कांडप** (सं. कंडण न.) कांडण्याचें काम; कांडण्यासाठीं घेतलेलें धान्य.
**कांडणावळ** (स्त्री.) कांडण्याबद्दलची मजुरी.
**कांडणें** (क्रि.) सडणें, कुटणें; मारणें.
**काडवात** (स्त्री.) तुळस वगैरेंच्या काडीभोंवतीं कापूस गुंडाळून देवापुढें लावण्याकरितां जी वात किंवा कांकडा करतात तो.
**कांडात काढणें** खरपूस मार देणें.
**कांडारणें** (क्रि.) जोराचा कोंब फुटणें.
**कांडारा** (पु.) उभी फाक. [नावाडी.
**कांडारी** (प्रा. पु.) सुकाणू धरणारा,
**कांडाळणें** कांडारणें पहा; पिकास रोग होणें; खाजवणें.

**काडी** (स्त्री.) गवताचा तुकडा; काटकी; रेघ; धार; **काडी मोडून देणें**–विवाह-संबंध नाहींसा करणें; नागपुराकडे–हातीं धरण्याची काठी.

**काडीवजा** तुच्छ.

**कांडी** (स्त्री.) तुकडा; पेरें; कोंब; नळी; सूत गुंडाळण्याची नळी; बावीन.

**काडीमात्र** (अ.) किंचित्मुद्धां.

**कांडुळणें** (क्रि.) खाजविणें.

**काडू** (पु.) गांडवळ; सुताराचें एक हत्यार.

**कांडें** (सं. न.) पेरें, तुकडा, भाग; टिपरें; हाताच्या बोटाच्या सांध्याला होणारा रोग; (प्रा. न.) बाण.

**कांडकरी** (पु.) चरकांत उंसाचीं कांडीं घालणारा; सुतार.

**काडेचिराईत** (न.) एका औषधाचें नांव.

**कांडोरी** (स्त्री.) **कांडोरें** (न.) तुकडा, पेर.

**कांडोळणें** (प्रा. क्रि.) खाजविणें (दा० २।१६४); बोटांनीं कुरवाळणें (हरि० ३१।१).

**कांडोळी** (स्त्री.), **कांडोळें** (न.) पाण्यास घातलेला बांध.

**काडया** (स्त्री. अने.) सरपण. [ काढणें.

**काढणी** (स्त्री.) वळकट दोरी; पिकें

**काढणें** (क्रि.) बाहेर आणणें; कागदावर वगैरे उमटविणें; शोध लावणें; ओढणें; निर्माण करणें.

**काढलें** (न.) माघार.

**काढा** (सं. कषाय पु.) कषाय; व्याजाच्या जागीं धान्य देण्याची कबुली; माळवे विकत घेतले असतां बोलीच्या बाहेर मागून घेतलेली रक्कम.

**काढाकाढी** (प्रा. स्त्री.) त्वरा, लगबग.

**काढावा** (पु.) शोध, तपास.

**काढीव** (वि.) मुद्दाम सांगितल्यावरून निघलेलें. [ काढणारा.

**काढू** (वि.) दुसऱ्यापासून निघेल तितकें

**काणकूण** (स्त्री.) कुणकूण; हळूंच कानांत सांगितलेली बातमी; कुरकुर.

**काणगो** (प्रा. स्त्री.) कानगोष्ट.

**काणा** (वि.) एकाक्ष; डुचका; तिरवा.

**काणी** (प्रा. स्त्री.) क्लेश.

**काणोसें** (प्रा. वि.) वाकडें.

**कात** (सं. क्वाथ पु.) काथ, कत्था, खैराचा चीक; सापानें टाकिलेली त्वचा.

**कांत** (सं. पु.) नवरा; (स्त्री.) कांति, तेज; सापाची त्वचा.

**कांत** (पु.) कांतलेल्या पदार्थाचा कीस.

**कातकरी** (पु.) एक जात.

**कातगोळी** (स्त्री.) सुगंधि द्रव्यें घालून केलेली काताची गोळी.

**कातडी** (स्त्री.) चामडी.

**कातण, कातणी** (सं. कर्तन स्त्री.) कीस; कोळयाच्या जातीचा एक क्षुद्र जीव.

**कातणें, कांतणें** (क्रि.) सूत काढणें; चरकावर धरून कीस काढणें; पिसाळणें; क्षीण होणें; जुंपणें; त्रासविणें.

**कातर, कातरी** (सं. कर्तरी स्त्री.) केसाला लागणारी चाई; कैंची. (वि.) भित्रा, भेकड.

**कातरण, कातरणी** (स्त्री.) कातरून निघालेला भाग; सणंग पुरें झाल्यावर फणींत राहिलेलीं ताण्याचीं टोकें.

**कातरणें** (क्रि.) कातरीनें कापणें.

**कातरमाळा** (पु.) घराचा अगदीं वरचा मजला.

**कातरा** (अ.) तिरका, ओझरता; (पु.) दोन तिरकस ओघांचा संगम; पेच.

**कातरी** (स्त्री.) कैंची.

**कांतलें** (प्रा. वि.) पिसाळलेलें.

**कातवळ** (वि.) खडकाळ प्रदेश.

**कातळ** (पु. न.) खडकाळ जमीन.

**कातळा** (प्रा. पु.) पापुद्रा.

**कांता** (सं. स्त्री.) स्त्री, पत्नी.

**कांतार** (सं. न.) अरण्य.

**कातारी** (पु.) कातणारा.

**कातावणें** (क्रि.) रागावणें, चिडणें.

**कांति** (सं. स्त्री.) तेज, प्रभा, वर्ण.

**कांतिमान्** (सं. वि.) तेजस्वी, प्रभाशाली.

**कांतिया** (प्रा. पु.) कोयता.

**काती** (स्त्री.) चीर पाडण्याचें हत्यार.

**कातीखुमारी** (स्त्री.) ताडावरचा कर.

**कातीण, कांतीण** (स्त्री.) कोळयाच्या जातीचा एक कीटक.

**कातोडी** (पु.) उत्तर कोंकणांतील एक जात.
**कात्यायन** (पु.) एक ऋषि.
**कात्यायन करणें** नाश करणें.
**कात्यायनी** (सं. स्त्री.) पार्वती.
**कात्री** (स्त्री.) कैंची. [ पहा.
**काथ, काथकरी** इ० शब्द कात याखाली
**काथवट** (प्रा. स्त्री.) काष्ठपात्र; उंसाच्या चरकाचें खालचें तक्त.
**काथा, काथ्या** (पु.) नारळाची शेंडी; सुंभ.
**काथाकूट, काथ्याकूट** (सं. स्त्री.) रिकामी चर्चा; निरर्थक वाद.
**काथिका** (स्त्री.) कढी.
**कादंबरी** (सं. स्त्री.) कल्पित कथा.
**कांदल** (पु. न.) खाऱ्या जमिनींत उगवणारें झाड.
**कांदा** (सं. कंद पु.) कंदर्प; कंद; गड्डा; मधाच्या पोळ्यांत मध जेथें असतो तो भाग.
**काद्रव** (पु.) पाताळांतील सर्प; नाग.
**कान** (सं. कर्ण पु.) कर्ण, श्रवणेंद्रिय; कढईच्या दोन बाजूच्या कड्या; **कान-उघाडणी करणें**—एकाद्याची चूक कडक शब्दांनीं दाखवून त्याला ताळ्यावर आणणें; **कान उघडून सांगणें**—स्पष्ट शब्दांनीं बजावणें; **कान किटणें**—तीच ती गोष्ट वारंवार ऐकून कंटाळणें; **कान उपटणें**—शिक्षा करण्यासाठीं कान धरून ओढणें; **कानाला खडा लावून घेणें**—एकदां केलेली चूक पुन्हां करावयाची नाहीं असा निर्धार करणें; **सोनारानें कान टोंचणें**—तिऱ्हाइतानें कानउघाडणी करणें; **कान फुंकणें**—गुप्तपणें मसलत देणें; **कानच्या कोपऱ्यास**—कोणालाही; **कानाचा हलका**—कोणाच्याही सांगण्यावर सहज विश्वास ठेवणारा; **कानांत तुळशीपत्र घालणें**—ऐकू येत नाहीं असा बहाणा करणें; **कानामागें टाकणें**—दुर्लक्ष करणें; **कानावर हात ठेवणें**—आपणांस माहीत नाहीं किंवा आपला कांहीं संबंध नाहीं असें दाखविणें; **कानाशीं लागणें**—चहाड्या सांगणें.

**कानकळाशी** (स्त्री.) जनावराचे कान, डोकें इ० अवयवांची ठेवण.
**कानकूण** (स्त्री.) गुणगुण, कुजबुज; कांकू.
**कानकोंडा** (वि.) ओशाळलेला; बहिरा.
**कानकोपरा** (पु.) पुढें आलेला भाग.
**कानकोरणी** (स्त्री.) **कानकोरणें** (न.) कानांतला मळ काढण्याची सळई.
**कानगी** (प्रा. स्त्री.) देवास अर्पिलेलें द्रव्य; कानोसा.
**कानगुजणें** (क्रि.) कानांत सांगणें.
**कानगो** (फार. पु.) कुलकर्ण्यासारखा एक ग्रामाधिकारी.
**कानठळी, कानठाळी बसणें** मोठा आवाज ऐकल्यानें बधिरता येणें.
**कानडा** (प्रा. वि.) वेडावाकडा; दुर्बोध; कर्नाटकी; एक राग. [ प्रांतांतला.
**कानडी** (सं. कर्णाट वि.) कर्नाटक
**कानडें** (न.) गुह्य; सुताच्या चरख्याच्या चक्राचे दोन आधार.
**कानन** (सं. न.) अरण्य, जंगल.
**कानपणें** (क्रि.) कमी होणें; सुकणें; लाजणें.
**कानपा** (पु.) कढई इ. भांड्यांच्या कानाच्या आकाराचा भाग; तोफेचा गाडीवर टेकणारा अवयव.
**कानपिसा** (वि.) भोळा, भोळसर.
**कानपिळा** (पु.) लग्नांत वधूच्या भावाविषयींची संज्ञा.
**कानफड** (सं. कर्णफलक स्त्री. न.) कानाच्या जवळचा तोंडाचा भाग.
**कानफाट्या** (पु.) गोरखनाथपंथी भिक्षेकरी.
**कानमंत्र** (सं. पु.) कानांत गुप्तपणें सांगितलेली गोष्ट.
**कानवडणें** (क्रि.) कुशीवर निजणें.
**कानवडा** (वि.) कुशीवर निजलेला; आडवा झालेला; (प्रा. पु.) दाराचें झांकण; वस्त्राचा आड पडदा.
**कानवडें** (प्रा. वि.) एका अंगावरलें.
**कानवला** (प्रा. वि.) कानापर्यंत पोंचलेला; (पु.) पोटांत गूळ किंवा साखर घातलेली हारोळी.
**कानवसा** (पु. ) दूरचा शब्द एकाग्रतेनें ऐकणें.

**कानवळे** (पु. अने.) कानाच्या जवळचे चेहऱ्यावरचे केस.
**कानशील** (न.) कानाच्या व डोळयाच्या मधली जागा.
**कानस** (पु. स्त्री.) घांसणी; लोखंड घांसून साफ करण्याचें एक हत्यार.
**कानसणें** (स्त्री.) कानशीनें घांसणें.
**काना** (पु.) बंदुकीचें व तोफेचें वत्ती देण्याचें छिद्र; 'आ' या स्वराचें चिन्ह; (वि.) काणा.
**कानाकोपरा** (पु.) एकूणएक भाग.
**कानागाडा** (पु.) बहिरेपणाचें सोंग; ऐकलें न ऐकलेंसें करणें; टंगळमंगळ, दुर्लक्ष.
**कानाडी** (प्रा. अ.) आकर्ण, कानापर्यंत. (स्त्री.) आकर्ण ओढलेली धनुष्याची दोरी.
**कानाडोळा** (पु.) दुर्लक्ष.
**कानी** (प्रा. स्त्री.) दाव्याचा फास; जोंधळयावर पडणारा एक रोग.
**कानीन** (सं. पु.) अविवाहित कन्येचा पुत्र.
**कानुगो** (फा. पु.) कानगो पहा.
**कानुडा** (वि.) लुच्चा.
**कानू** (अर. स्त्री. पु.) नियम, शास्त्र.
**कानेकोंचे** (पु. अने.) गूढ अर्थ; खुब्या; मर्म.
**कानोड** (वि.) वाकडें, कललेलें.
**कानोसा** (पु.) कानवसा पहा.
**कान्सुरें** (न.) शक्तिहीनाचें भाषण.
**कान्हा** (सं. कृष्ण पु.) मुलगा, वाळ.
**कान्हाई** (प्रा. पु.) कृष्ण; तान्हुलें.
**कान्हाडें** (प्रा. न.) तानुलें (नाम०गा०१०).
**कान्हो** (प्रा. पु.) मुलगा.
**कान्होबा** (पु.) श्रीकृष्ण.
**काप** (पु.) स्त्रियांचें एक कर्णभूषण; [ तुकडा.
**कांप** (सं. पु.) कंप.
**कापटा** (पु.), **कापटी** (स्त्री.) तुकडा.
**कापट्य** (सं. न.) लबाडी, फसवणूक.
**कापड** (न.) वस्त्र.
**कापडनीस** (हिं. पु.) राजाच्या येथें कापड वगैरेच्या हिशेबी खात्यावरचा मुख्य.
**कापडी, कापडीक** (वि.) कापडाची; (पु.) खांद्यावर कावड घेऊन तीर्थयात्रा करीत फिरणारा मनुष्य.
**कापणावळ** (स्त्री.) कापण्याबद्दलची मजुरी.
**कापणी** (स्त्री.) कापण्याची क्रिया; शेतांतील धान्य कापणें.
**कांपणें** (क्रि.) हलणें, कंपायमान होणें.
**कांपरा** (वि.) कंपायमान, कांपणारा.
**कापशी** (स्त्री.) कापसाचें झाड.
**कापा** (पु.) फणसाची एक जात.
**कापालिक** (सं. पु.) वाममार्गी; शक्तीचा उपासक. [ काढलेला.
**कापीव** (वि.) कापणीला योग्य; कापून
**कापुसणें** (क्रि.) मऊ व बिलबिलीत होणें.
**कापूर** (सं. कर्पूर पु.) एक ज्वालाग्राही पदार्थ.
**कापूस** (सं. कार्पास पु.) कपास.
**काफर** (अर. वि.) परधर्मी, लबाड.
**काफला** (अर. पु.) यात्रेकरूंचा किंवा प्रवाशांचा जमाव. [ रागिणी; वृंद.
**काफी** (स्त्री.) गायनांतील एक थाट; एक
**कांब** (स्त्री.) उभा, चापट तुकडा; कोपरापासून मनगटापर्यंतचें हाड.
**कांबट, कांबटी** (स्त्री.) कांबीट पहा.
**काबरा** (वि.) भुरकट.
**कांबरूण** (न.) पांघरूण.
**काबली** (स्त्री.) वाटाण्याची एक जात.
**कांबळा** (सं. कंबळ पु.) दोन घोंगड्या एकत्र शिवून केलेलें वस्त्र. [ दगड.
**काबा** (पु.) मक्केच्या मशिदींतील पवित्र
**काबाड** (प्रा. न.) ओझें, खोगिरभरती; पाचोळा (तुका० १७६९); विस्तार.
**काबाडकष्ट, काबाडकाम** हलकें पण मेहनतीचें काम. [ विषयींचा सक्ता.
**काबाडखोती** (स्त्री.) सरपण पुरविण्या-
**काबिल** (अर. वि.) हुशार.
**कांबी** (प्रा. स्त्री.) धनुष्यदंड.
**काबीज** (अर. वि.) हस्तगत, स्वाधीन.
**कांबीट** (स्त्री.) वेळूची उभी लांब फाक.
**कांबीण** (स्त्री.) कावीळ.
**काबू** (अर. पु.) ताबा, सत्ता; (वि.) लबाड, युक्तिबाज.
**काम** (सं. कर्म न.) कृत्य, उद्योग, कर्म; मदन; इच्छा; प्रयोजन; कारण; उपयोग; चार पुरुषार्थांपैकीं तिसरा.

**कामकरी** (पु.) मजूर, हेलकरी. [ काम.
**कामकाज** (हिं. न.) कोणत्याही प्रकारचें
**कामगार** (फा. पु.) कारखान्यांत काम करणारा, मजूर.
**कामगिरी** (फा. स्त्री.) विशेष काम; कामाची बजावणी; कारागिरी.
**कामचलाऊ** (विं.) खपण्यासारखें, निर्वाह होण्यासारखें; साधारण.
**कामचुकाऊ, कामचुकार, कामचुकाव्या** (वि.) कामाची टोलवाटोलव करणारा.
**कामटी** (स्त्री.) कांबीट.
**कामठ** (प्रा. स्त्री.) दुकान, कारखाना; टांकसाळ (ज्ञा० १८।४८०).
**कामणें** (सं. क्रि.) इच्छा करणें. [ जमीन.
**कामथ** (स्त्री.) चाकरीबद्दल दिलेली इनाम
**कामदा** (सं. स्त्री.) एक वृत्त. याच्या चरणांत १० अक्षरें व र, य, ज, ग हे गण असतात.
**कामदार** (हिं. पु.) अंमलदार, ऑफिसर.
**कामधंदा** (पु.) उद्योग, व्यवसाय.
**कामधेनु** (सं. स्त्री.) इच्छित वस्तु देणारी गाय; सुरभि; भिक्षेची झोळी.
**कामना** ( सं. स्त्री.) इच्छा, वासना.
**कामनिक** (सं. वि.) इच्छापूर्तीसाठीं करावयाचें (व्रत इ.).
**कामरूप** (पु.) आसाम प्रांत; इच्छेप्रमाणें रूप बदलणारा.
**कामला** (सं. स्त्री.) कावीळ, हळद्या रोग.
**कामविणें** (प्रा. क्रि.) कमावणें; संपादणें; पूर्ण करणें. [ शास्त्र.
**कामशास्त्र** (सं. न.) स्त्रीपुरुष-प्रेमविषयक
**कामसाधु** (वि.) आपमतलबी.
**कामसू** (वि.) कष्टाळू.
**कामळ** (स्त्री.) कावीळ. [ कृति.
**कामाकार** (प्रा. पु.) अंकितपणा; कामाची
**कामाठी** (पु.) शूद्रांमधील एक जात; झाडझूड करणारा नोकर.
**कामातुर** (सं. वि.) विषयलुब्ध.
**कामारी** (पु.) कामारें (न.) कामकरी; सेवक (तुका० ४०; भा० ७।१११).
**कामावणें** (प्रा. क्रि.) मेहनत करणें (तुका० . १५४१).

**कामिणी** (प्रा. स्त्री.) कावीळ.
**कामिनी** (सं. स्त्री.) स्त्री, नारी.
**कामी** (सं. वि.) विषयासक्त; उद्योगरत.
**कामीण** (सं. स्त्री.) कावीळ.
**कामुक** (सं. वि.) विषयासक्त, लोभी.
**कामूत** (अ.) वऱ्हाड, नागपूरप्रांतीं— काय म्हणून, कां ?
**कामेरपण** (प्रा. न.) शेतकाम.
**कामोखी** (स्त्री.) लोहाराचा किंवा तांबटाचा चिमटा.
**कामोद** (पु.) एक राग.
**काम्य** (सं. वि.) इच्छिण्यास योग्य; ऐच्छिक; इच्छा धरून केलेलें, सहेतुक.
**काम्यभक्ति** (सं. स्त्री.) फलप्राप्तीच्या इच्छेनें केलेली भक्ति. [ शंक अव्यय.
**काय** (सं. पु.) देह; (अ.) एक प्रश्ना-
**कार्यकारिणी** (स्त्री.) संस्थेची कार्यकर्ती मुख्य शाखा.
**कार्याध्यक्ष** (पु.) कार्यकारिणीचा मुख्य.
**कार्यवाह** (पु.) चिटणीस.
**कायटी** (प्रा. स्त्री.) घालमेल, युद्ध.
**कायदा** (अर. पु.) नियम, दस्तुर; लगाम.
**कायदेशीर** (वि.) सशास्त्र; कायद्यास धरून असलेलें. [ फळाचें नांव.
**कायफळ** (सं. कटफल न.) एका औषधि
**कायम** (अर. वि.) सततचा, ठाम.
**कायसया** (प्रा. अ.) कशाला ?
**कायस्थ** (सं. पु.) लेखनकर्म करणारी एक जात.
**काया** (सं. स्त्री.) शरीर, देह.
**कायापूर** (सं. पु.) देह, शरीर.
**कायिक** (सं. वि.) शरीरसंबंधीं.
**कायिसा** (प्रा. अ.) कशाकरितां ?
**कायी** (प्रा. वि.) कोणतें ?
**कार** (हिं. पु.) काम; करार (अनंत० पृ० २०); खत; (वि. समासांत) करणारा.
**कारक** (सं. वि.) करणारा; (व्याक०न.) नामाचा क्रियापदाशीं असणारा संबंध.
**कारकीर्द** (फा. स्त्री.) काळ, अमलाची मुदत. [ हुषार मनुष्य.
**कारकून** (फा. पु.) लेखक, हिशोबी

**कारखानदार** (फा. पु.) कारखान्याचा मालक; व्यवस्थापक.
**कारखाननवीस, कारखाननीस, कारखानीस** (फा. पु.) मुनीम, हिशोबी कारकून.
**कारखाना** (फा. पु.) कामें करण्याची जागा; यंत्रशाला.
**कारगुजार** (हिं. वि.) कामकाजांत हुषार; अनुभविक.
**कारंजें** (न.) पाणी उंच उडविणारें यंत्र.
**कारटा** (सं. करट पु.) मृताचें कर्म चालविणारा; द्वाड मुलगा. [साधन.
**कारण** (सं. न.) प्रयोजन; हेतु; निमित्त;
**कारणदेह** (सं. पु.) अविद्या; अज्ञान.
**कारणें** (अ.) साठीं, प्रीत्यर्थ.
**कारभार** (हिं. सं. पु.) व्यवस्था; जबाबदारीचें काम; उद्योग; खटपट.
**कारभारी** (पु.) व्यवस्थापक, दिवाण, मॅनेजर; खटपटी मनुष्य; उठाठेवी करणारा. [एक हस्तभूषण.
**कारला** (पु.) स्त्रियांचें बांगडीसारखें
**कारली** (स्त्री.) कारलीची वेल.
**कारलें** (न.) एक कडू फळ; त्या आकाराचा एक दागिना; हल्ला करणाऱ्या शत्रूवर फेंकण्याचें अणकुचीदार खिळ्याचें एक अस्त्र; तालमींतला मोठा मुद्गल.
**कारवणें** (क्रि.) कुजून खताला योग्य होणें; फोफावणें.
**कारवा** (हिं. पु.) सोंग; सोंग घेऊन केलेला नाच.
**कारवाई** (फा. स्त्री.) हुशारीनें काम चालविणें; व्यवस्थित कारभार.
**कारवान** (फा. पु. न.) लमाण, तांडा; तांड्यांतला माणूस.
**कारसई** (स्त्री.) हंगामाच्या वेळीं धान्याच्या रूपानें फेडण्याच्या करारावर शेतकऱ्यांना आगाऊ दिलेला पैसा.
**कारस्थान** (सं. कार्यस्थान न.) मसलत, बेत; युक्ति. [करण्यांत कुशल.
**कारस्थानी** (वि.) काटकसरी; मसलती
**कारळा** (पु.) **कारळें** (न.) तिळासारखें पण मोठें असें एक बीज.
**कारा** (सं. स्त्री.) तुरुंग.
**कारागार** (सं. पु.) तुरुंग, बंदिखाना.
**कारागिरी** (स्त्री.) कौशल्य, चातुर्य.
**कारागीर** (हिं. कारिकर वि.) शिल्पी; न्हावी; (फा. पु.) हुशार शिल्पी.
**कारागृह** (सं. पु.) तुरुंग, बंदिखाना.
**कारिका** (सं. स्त्री.) टीकाश्लोक; क्रिया.
**कारी** (समासांत उत्तरपदीं) करणारा.
**कारुणिक** (सं. वि.) दयाळू.
**कारुण्य** (सं. न.) दयाळुत्व.
**कारु** (सं. पु.) सुतार, लोहार, सोनार इ. कारागीर.
**कारुनारु** (पु.) अलुतें-बलुतें.
**कारेवारे** (पु. अने.) द्रव्याचा फडशा.
**कारोट** (पु.) पूर्ण नाश.
**कार्कश्य** (सं. न.) कर्कशपणा.
**कार्टा** (पु.) मुलगा (तुच्छतेनें वापरण्याची संज्ञा); स्मशानांतील भटजी.
**कार्ड** (इं. न.) चकती; गंजिफांतलें पान.
**कार्डबोर्ड** (इं. पु.) पुठ्ठ्याचा जाड कागद.
**कार्तिक** (सं. पु.) हिंदूंचा आठवा महिना; देवांचा सेनापति.
**कार्तिकस्नान** (सं. न.) आश्विन शु० १५ पासून कार्तिक शु. १५ पर्यंत रोज पहाटेस स्नान करण्याचा नियम.
**कार्तिकस्वामी** (सं. पु.) षडानन.
**कार्तिकी** (सं. स्त्री.) कार्तिकांतील एकादशी.
**कार्तूस, काडतूस** (न.) बंदुकींतून उडवावयाचें शिसें व दारू यांचें कवच.
**कार्पण्य** (सं. न.) कृपणता, कंजूषपणा.
**कार्पास** (सं. पु.) कापूस.
**कार्मुक** (सं. न.) धनुष्य.
**कार्य** (सं. न.) काम, कृत्य; लग्नमुंजीसारखें मंगल कृत्य; परिणाम.
**कार्यप्रयोजन** (सं. न.) मंगलकार्य.
**कार्यभाग** (सं. पु.) काम; हातीं घेतलेलें काम साधावयाचा उद्देश.
**कार्श्य** (सं. न.) कृशता.
**काल** (सं. पु.) वेळ, प्रसंग; यम, मृत्यु; (न.) केळीचा गाभा; (अ.) गेल्या दिवशीं.
**कालकल्ला** (पु.) वेळ, प्रसंग.

**कालकूट** (सं. न.) एक अतिशय जालिम विष; द्वेषाची भावना.
**कालक्रमण** (सं. स्त्री.) वेळ घालविणें.
**कालगति** (सं. स्त्री.) कालाचा प्रभाव.
**कालगुजारा** (सं. फा. पु.) कष्टानें काळ काढणें.
**कालगूत** (न.) कला, युक्ति; गूढ.
**कालचक्र** (सं. न.) कालाची राहाटी.
**कालत्रय** (सं. न.) भूत, वर्तमान व भविष्य.
**कालथा** कलथा पहा.
**कालदशा** (सं. स्त्री.) दैवगति.
**कालपीसाखर** (स्त्री.) खडीसाखर.
**कालवेल** (स्त्री.) भविष्यकथन.
**कालम** (इं. पु.) रकाना; सैन्याची तुकडी.
**कालमान** (सं. न.) कालाचें परिमाण; परिस्थिति; कालाचें स्वरूप.
**कालरा** (इं. पु.) पटकी, वाखा.
**कालव** (न.) कालू; शिंपला.
**कालवड** (स्त्री.) गोजी, पाडी.
**कालवण** (न.) पातळ तोंडीं लावणें, मिश्रण.
**कालवणें** (क्रि.) ढवळणें, मिसळणें.
**कालवा** (सं. कुल्या पु.) पाट; नदीचें फोडून आणिलेलें पाणी.
**कालवाकालव** (स्त्री.) ढवळाढवळ, गडवड.
**कालहरण** (सं. न.) कालक्षेप, कालक्रमण, वेळ घालविणें.
**कालक्षेप** (सं. पु.) वेळ काढणें, आयुष्याचे दिवस काढणें; निर्वाह.
**काला** (पु.) मिश्रण; खिचडी.
**कालाबुल–ली, कालाभूल–ली** (प्रा. स्त्री.) कासाविशी.
**कालाष्टमी** (स्त्री.) श्रीकृष्णाचा जन्मदिन. (श्रावण वद्य अष्टमी).
**कालिक** (सं. वि.) काळासंबंधाचें, मुदतीचें.
**कालिका, काली** (सं. स्त्री.) देवी.
**कालिंगडा** (पु.) गायनांतल्या एका रागाचें नांव.
**कालिमा** (सं. पु.) डाग, कलंक, काळेपण.
**कालीन** (सं. वि.) कालासंबंधीं; काळाचा.
**कालू** (पु.) शिंप; लाकडी सनई.
**कालूं** (न.) कालव.
**कालें** (न.) केळीच्या गाभ्यांतला गीर.
**कालेज** (इं. न.) महाविद्यालय; उच्च शिक्षण देणारी संस्था.
**कालोवा** (प्रा. पु.) मेळ, मिलाफ, ऐक्य.
**काल्पनिक** (सं. वि.) कल्पित.
**काव** (स्त्री.) गेरू, तांबडी माती; (प्रा. पु.) त्रास, कंटाळा. [ ओरड; त्रास.
**कावकाव** (स्त्री.) कावळ्याचा शब्द;
**कावड** (स्त्री.) जड पदार्थ नेण्यासाठीं आडव्या वेळूच्या दोन टोंकास दोन दोऱ्या बांधून त्याला ओझीं अडकविण्याची केलेली व्यवस्था.
**कावड्या** (पु.) कावड वाहणारा.
**कावणें** (प्रा. क्रि.) त्रासणें.
**कावर** (स्त्री.) पाचर.
**कावरा** (वि.) पिसाळलेला, भयभीत.
**कावरावावरा** (वि.) घावरलेला, बुजलेला.
**कावरुख** (प्रा. न.) झाडावर वाढलेल्या जाळ्या.
**कावरें** (प्रा. वि.) भ्रमात्मक, आश्चर्यकारक (ज्ञा० १५।१०९); (न.) वेड, भ्रांत.
**कावल** (प्रा. न.) जुनें मोडीचें भांडें (स्वा. दि. ६।४।७७); (वि.) झिजलेलें, निरुपयोगी.
**कावळा** (सं. पु.) काकपक्षी; का० शिवणें—विटाळशी होणें.
**कावळी** (स्त्री.) विस्तवांतील मूस उचलण्याचा चिमटा; वनस्पतिविशेष.
**कावा** (हिं. पु.) घोड्याला त्याची दौड आवरण्यासाठीं दिलेले हिसके; लबाडी, कारस्थान, ढोंग; घिरटी; (मोरो० द्रोण० १५।२०). [ वेडगळ.
**काविरें** (प्रा. न.) वेड, धुंदी; (वि.)
**कावीळ** (सं. स्त्री.) एक पित्तरोग.
**कावेबाज** (फा. वि.) कारस्थानी, लबाड.
**कावेरी** (सं. स्त्री.) एका नदीचें नांव.
**कावो** (प्रा. पु.) कंटाळा, त्रास.
**काव्य** (सं. न.) रसयुक्त रचना; कविता; (पु.) शुक्राचार्य. [ चोरणारा.
**काव्यचोर** (सं. पु.) दुसऱ्याचा लेख
**काशा** (सं. काश पु.) एक प्रकारचें गवत.
**काशा** (प्रा. अ.) कशाला?

**काशी** (सं. स्त्री.) सुप्रसिद्ध पुण्यक्षेत्र बनारस.

**काशीकर** (पु.) काशीचा राहणारा; काशीयात्रा केलेला; लफंगा, धूर्त.

**काशीद, कासीद** (अर. पु.) जासूद.

**काशीफळ** (सं. न.) एक जातीचा भोपळा.

**काश्मीर** (प्रा. पु.) स्फटिक (ज्ञा. १५। ३४१); (न.) एका प्रांताचें नांव; (न.) केशर.

**काश्मीरी** (वि.) काश्मीर देशाचा; (प्रा. स्त्री.) वाणीची चपळता (ज्ञा० १३।११६८).

**काषाय** (सं. वि.) भगव्या रंगाचा.

**काष्टा** (सं. कच्छ पु.) कासोटा.

**काष्टी** (सं. कच्छ स्त्री.) लंगोटी.

**काष्ठ** (सं. न.) लाकूड; सर्पण.

**काष्ठा** (सं. स्त्री.) मर्यादा, अतिरेक.

**काष्ठौषधि** (सं. स्त्री.) औषधोपयोगी वनस्पति.

**कास, कांस** (स्त्री.) कासोटा; ओटी, कंवर; खोकला; एक प्रकारचें गवत; कुरण; (अ.) सरळ फाडलेलें कापड.

**कासकुस** (स्त्री.) मागेंपुढें पाहणें, कांकू करणें.

**कासजमीन** (स्त्री.) निरनिराळे तुकडे पाडून त्यांची प्रत न लावतां सरसकट ठराविक साऱ्यानें देतात अशी जमीन.

**कासंडी** (स्त्री.) एक प्रकारचें भांडें.

**कांसणें** (क्रि.) झिजणें, कांचणें.

**कासबंदी** (स्त्री.) जमिनीच्या सरासरी कसाप्रमाणें साऱ्याचा आकार ठरविण्याची पद्धति.

**कासया** (प्रा. अ.) कां? कशासाठीं?

**कासर** (प्रा. पु.) रेडा; कोकिळ (मोरो० द्रोण० ६।७२). [ बांधण्याची दोरी.

**कासरा** (पु.) असूड; बैलाच्या शिंगास

**कासव, कांसव** (सं. कच्छ न.) कूर्म, कच्छप.

**कांसवीचें तूप** असंभाव्य गोष्ट; मिथ्या कथा.

**कासळणें** (क्रि.) धापा टाकणें.

**क़ासा** (फा. पु.) डेऱ्याचा मध्यभाग; पाण्यांतला खडक.

**कासाई** (स्त्री.) लुगडें.

**कासाकुळी** (प्रा. स्त्री.) घाबरगुंडी.

**कासार, कांसार** (सं. कांस्यकार पु.) तांब्या-पितळेचीं भांडीं करणारा.

**कासार** (पु.) बांगड्या भरणारा व विकणारा; (सं. न.) तळें, सरोवर.

**कासावणें** (क्रि.) धापा टाकणें.

**कासाविस** (प्रा. वि.) व्याकुळ, घाबरा.

**क़ासाविसी** (स्त्री.) व्याकुळता, घाबरगुंडी.

**कासिया** (प्रा. अ.) कासा शब्द पहा.

**कासीद** (अर. पु.) जासूद.

**कांसें** (सं. कांस्य न.) जस्त व तांबें यांच्यापासून होणाऱ्या एका मिश्र धातूचें नांव.

**कासेनि** (प्रा. अ.) कशानेंही.

**कासोटा** (सं. पु.) काष्ठा.

**कास्मिरा** (प्रा. ना.) काश्मीरी शब्द पहा.

**काहणी** (प्रा. स्त्री.) गोष्ट; (वि.) फोल.

**काहली, काहिली** (हिं. स्त्री.) आग, तळमळ.

**काहवा** (प्रा. पु.) गोंधळ, कोलाहल.

**काहळ, काहाळ** (प्रा. न.) वाजविण्याचें शिंग.

**काहार** (प्रा. पु.) कपट; पराकाष्ठा.

**काह्यवणें** (प्रा. क्रि.) कष्टी होणें.

**काहाळ, काहाळा** (प्रा. पु.) रणवाद्य (भावार्थ० युद्ध० ५९।३६); झांज.

**काहिल** (स्त्री.) मोठी व रुंद तोंडाची कढई.

**कांहीं** (वि.) थोडें.

**कांहींएक, कांहींक** (वि.) कित्येक.

**कांहींचें बाही** (अ.) वेताल, बाष्कळपणानें.

**कांहीं-बाहीं** (न.) भलभलतें, अवास्तव, निरुपयोगी. [ कढई.

**काहील** (स्त्री.) गूळ करण्याची मोठी

**काहुरा** (प्रा. स्त्री.) अंधारी. [ कां?

**काहून** (अ.) नागपुराकडे—काय म्हणून

**काहूर** (प्रा. न.) संकट, भय; कलंक; कुभांड; ढगांचा समुदाय (कथासारा० २१।७७).

**काहूर-बाहूर** (प्रा. वि.) कावराबावरा.

**काहूल** (प्रा. स्त्री.) ओरड.

**काहो** (प्रा. पु.) घोष.
**काह्या** (प्रा. अ.) कशाला ?
**काळ** (सं. पु.) वेळ, प्रसंग; नाशकर्ता, मृत्यु; दुष्काळ.
**काळकाई** (सं. स्त्री.) देवीचें नांव.
**काळकोळु** (सं. काल + कवल वि.) काळाला खाऊन टाकणारा (ना०७४३).
**काळजी** (स्त्री.) चिंता, फिकीर; आस्था.
**काळझोप** (स्त्री.) मरणप्राय निद्रा, घोर निद्रा; मृत्यु.
**काळतोंड्या** (वि.) दुर्दैवी; अपशकुनी.
**काळधाड** (स्त्री.) संकटांचा आकस्मिक हल्ला.
**काळपुळी** (स्त्री.) चाळपुळी, एक रोग.
**काळंबं** (न.) मधमाशांचें पोळें; मोहोळ.
**काळभैरव** (सं. पु.) श्री काशीक्षेत्राची संरक्षक देवता. [ आळस.
**काळवख** (प्रा. पु.) काळोख, अंधार;
**काळवटणें** (क्रि.) काळें पडणें; मलिन होणें.
**काळवंडी** (स्त्री.) काळा रंग चढणें.
**काळवसें** (प्रा. न.) काळोख (भक्तलीला० , ५।१६०); (अ.) कालांतरानें.
**काळवीट** (पु.) काळ्या पाठीचा हरिण.
**काळसर** (वि.) किंचित् काळा. [ दिव्बा.
**काळा** (वि.) कृष्णवर्ण, अस्मानी; (पु.)
**काळाकिट्ट, काळाकुट्ट** (वि.) अतिशय काळा.
**काळाकुळकुळीत** (वि.) काळाकिट्ट.
**काळा-सांवळा** (वि.) काळसर, श्याम.
**काळिमा** (पु.) कलंक.
**काळियाना** (पु.) कृष्णसर्प (भा. ५।१००).
**काळी** (स्त्री.) शेतजमीन.
**काळीज** (हिं. कलिजा न.) पित्ताशय; हृदय, अंतःकरण, कलीजा.
**काळुंदरा** (वि.) फार काळा.
**काळें** (न.) कलंक; **काळें करणें**—निघून जाणें.
**काळें पाणी** (वि.) हद्दपारीची शिक्षा.
**काळें-बेरें** (न.) वाईटपणा; कपट, लबाडी.
**काळें-मीठ** (न.) पादेलोण.
**काळोख** (पु.) अंधेर.
**काळोखी** (स्त्री.) अंधारी; बट्टा, कलंक.
**काळोसा** (प्रा. पु.) काळोख, अंधार.
**कांक्षा** (स्त्री.) शंका, संशय; इच्छा.
**कांक्षेखोर** (वि.) संशयी, शंकेखोर; भ्रमिष्ट.
**किक** (प्रा. स्त्री.) किकाळी.
**किंकणी** (सं. किंकिणी स्त्री.) घुंगुर.
**किंकर** (सं. पु.) चाकर, सेवक.
**किंकरें** (न.) सुताराचें एक हत्यार.
**किंकार** (वि.) चक्राकार.
**किंकाळणें** (क्रि.) कर्कश स्वरानें ओरडणें.
**किंकाळी** (स्त्री.) आरोळी.
**किंकिणी** (सं. स्त्री.) घुंगुर, गुंगरमाळ.
**किंक्रान्त** (स्त्री.) करीचा दिवस.
**किचकट, किचकाड** (वि.) कृश, बारीक.
**किचाट** (स्त्री.) गर्दी.
**किंचित्** (अ.) अगदीं थोडें.
**किचबिड, किचलिडीत** (वि.) न वाचतां येण्यासारखें.
**किंचळणें, किंचाळणें** (क्रि.) किंकाळणें, किंकाळ्या मारणें. [मळ.
**किटण** (सं. किट्ट न.) कीट, सांचलेला
**किटणें** (क्रि.) मळानें व्याप्त होणें, कंटाळणें.
**किटाळ** (न.) फुणगी, ठिणगी; खोटा आरोप; संकट.
**किट्ट, किट्टी** (न.) मळ, घाण.
**किड-कीडमुंगी** (स्त्री.) किडे, मुंग्या इ. सर्व कृमिकीटक (समुच्चयानें).
**किडका** (वि.) कीड लागलेला. [ कृश.
**किडकिडीत, किडकोळा** (वि.) लुकडा,
**किडकुल** (न.) सर्पाचें बारीकसें पिलूं.
**किडणें** (क्रि.) कीड लागणें.
**किडमिडें** (न.) पिंगळ्याच्या हातांतलें कुडबुड वाजणारें वाद्य.
**किडा** (सं. कीर पु.) जीव, कीड, कीटक, लाख (सोहि० महद०).
**किडाल, किडाळ** (प्रा. वि.) खोटें, लटकें, खोडसाळ, हिणवट; (न.) अरिष्ट, हिणकटपणा (परमा० ६।१७); कुभांड.
**किडुकमिडुक** (न.) क्षुद्र दागिने; त्यांचे सुटे भाग.
**किडूक** (न.) लहान किडा, आळी.

**किण** (सं. पु.) किणें; (न.) घट्टा, वण.

**किणका** (सं. कणिका स्त्री.) कण.

**किणें** (सं. किण न.) घट्टा. [ कंटाळा.

**कित** (सं. कितु पु.) विपरीत भाव; शंका;

**कितपत** (सं. अ.) कितीसा ? कोठपर्यंत ?

**कितव** (सं. पु.) ठक; धूर्त; जुगारी.

**कितवा** (वि.) क्रमानें कोणत्या नंबरचा ?

**कितान** (अर. कितान न.) ताग किंवा सण; त्यांचें कापड.

**किताब, किताबत** (अर. खिताब पु.) पदवी, सन्मानवाचक संज्ञा; (अर. किताब स्त्री.) पुस्तक.

**कितिएक, कितेक** (वि.) कांहीं.

**किती** (वि.) कोणत्या संख्येनें परिमित ?

**कितु** (सं. पु.) शंका; संशय.

**कित्ता** (अर. किता पु.) नमुना, वळण; (अ.) सदरप्रमाणें.

**कित्याक** (अ.) कारवाराकडे–कशाला ?

**कित्येक** (वि.) कांहीं, थोडें.

**किनखाप, किनखाब** (अर. कमखवाब पु.) जरीच्या वुटीचें वस्त्र; भरजरी कापड.

**किनरी** (सं. किन्नर स्त्री.) बारीक उंच आवाज; एक वाद्य.

**किनारा** (फा. पु.) काठ; तीर.

**किनारी** (फा. स्त्री.) काठ, कोर.

**किनें** (सं. किण न.) घट्टा.

**किपळी** (स्त्री.) दगडाची चीप. [ मनुष्य.

**किंपुरुष** (पु.) देवांतील एक गायक; क्षुद्र

**किफाइती, किफायत** (वि.) फायदेशीर.

**किफाईल, किफायत** (फा. स्त्री.) फायदा, नफा, लाभ. [ तर काय पण.

**किंबहुना** (सं. अ.) इतकेंच नव्हे, फार

**किंमत** (अर. स्त्री.) मूल्य, मोल; महत्त्व; योग्यता.

**किमती** (वि.) मूल्यवान्.

**किमर्थ** (क्रि. वि.) कां ? काय म्हणून ?

**किमपि** (अ.) थोडेंसुद्धां.

**किमया** (अर. स्त्री.) हलक्या धातूचें सोनें करण्याची विद्या.

**किमयागार** (फा. पु.) किमया करणारा.

**किमानपक्ष** (सं. किम् + मान + पक्ष अ.) निदान, कमींत कमी.

**कियत्** (वि.) किती, कितीसें ?

**किर** (अ.) खरोखर.

**किरकणें** (क्रि.) किंकाळणें, ओरडणें.

**किरकिर** (स्त्री.) कटकट. [ एक खेळणें.

**किरकिरें** (न.) किरकिर आवाज करणारें

**किरकी** (स्त्री.) फिरकी. [ गान; फुटकळ.

**किरकोळ** (वि.) बारीकसारीक, लहान-

**किरटा** (वि.) बारीक; कृपण.

**किरड** (प्रा. न.) कीटक.

**किरडी** (स्त्री.) तिरडी, ताटी.

**किरडूं** (न.) निर्विष सर्पाची एक जात.

**किरण** (प्रा. पु. न.) उड्डाण (राम० १८।१५१); प्रकाशरश्मि. [ कंजूष.

**किरपण** (सं. कृपण पु.) निश्चितपणा;

**किरपाण** (न.) खड्ग; शीख हातांत बाळगतात तें शस्त्र.

**किरमिजी** (सं. कृमिज वि.) लाल रंगाचा.

**किरवण** (सं. कीर न.) चित्रकाम, चित्राचें कसब (रामजोशी० पृ. ३७).

**किरवंत** (पु.) ब्राह्मणांची एक पोटजात.

**किरवा, किरव** (प्रा. पु.) खेंकडा (राम० १५।४); गाठ; फास. [ वरची कीड.

**किरळ** (न.) **किरळी** (स्त्री.) जोंधळ्या-

**किराईत** (न.) काडेचिराईत.

**किराण** (प्रा. न.) उड्डाण.

**किराणा** (पु.) किरकोळ वाणसौदा.

**किरात** (सं. पु.) भिल्ल.

**किराळी** (स्त्री.) आरोळी.

**किरी** (स्त्री.) झिजावयास लावणारा रोग.

**किरीट** (सं. पु.) मुकुट.

**किरु** (प्रा. अ.) निश्चयेंकरून, खरोखर.

**किरें** (सं. कीर न.) पोपट.

**किर्द** (फा. स्त्री.) जमिनीची लागवड; रोजचा जमाखर्च लिहिण्याची वही.

**किर्र** (वि.) पशुपक्ष्यांनीं गजबजलेलें; निबिड.

**किलकिलाट** (पु.) पक्ष्यांच्या शब्दांची गडबड. [ अर्धवट उघडें.

**किलकिलें** (वि.) अर्धवट लागलेलें व

**किलच, किलिच** (स्त्री.) भेगांतून भरण्याच्या रिपा.

**किलबिल** (स्त्री.) पक्ष्यांची किलकिल.

**किलबिलाट** किलकिलाट पहा.
**किलवाणा** (वि.) केविलवाणा.
**किलाण** (हिं. न.) उडी; उड्डाण.
**किलाफ** (फा. पु. ) कपट.
**किलावर** (पु.) खेळण्याच्या पत्त्यांतील एक काळा रंग.
**किलावा** (हिं. पु.) हत्तीच्या गळ्यांतील रिकिबीसारखें उपयोगी पडणारें दोरीचें पेंडकें.
**किल्मिष** (सं. न.) पाप, मळ, दोष.
**किल्ला** (अर. पु.) कोट बांधलेली संरक्षणाची जागा; मोठी गढी.
**किल्ली** (सं. कील स्त्री.) चावी; गूढ उकलण्याची युक्ति. [ दार.
**किल्लेदार** (फा. पु.) किल्ल्यावरील अंमल-
**किवटा** (वि. ) कृपण.
**किवडा** (का. किवी वि.) बहिरा.
**किवण** (स्त्री.) सदयता; (न.) व्रण.
**किंवदन्ती** (स्त्री.) बाजारगप्प.
**किंवा** (अ.) अथवा.
**किशोर** (सं. पु.) अज्ञान मुलगा, पोर.
**किशोरी** (सं. स्त्री.) मुलगी.
**किंशुक** (सं. पु.) पळसाचें झाड.
**किष्किंधा** (स्त्री.) वालीच्या राजधानीचें नांव.
**किसकिस** (स्त्री.) कळा निघणें, पोटांत चावणें.
**किसगणती** (हिं. किसगनती का. स्त्री.) खातरजमा; फिकीर; हिशेब; कःपदार्थ.
**किसणी** (स्त्री.) किसण्याचें साधन.
**किसणें** (क्रि.) कीस काढणें.
**किसमिस** खिसमिस पहा.
**किस्त, किस्तबंदी** (फा. स्त्री.) हप्तेबंदी.
**किस्ती** (फा. स्त्री.) होडी.
**किस्मत** (अर. स्त्री.) नशीब.
**किसलय** (सं. पु. न.) कोमल अंकुर.
**किसान** (हिं. पु.) शेतकरी, खेडवळ किंवा गांवढळ माणूस.
**किळ** (प्रा. न.) प्रभा (भा. ५।८४).
**किळस** (सं. क्लेश स्त्री.) वीट, शिसारी.
**कीं** (अ.) अथवा; काय?
**कीचक** (सं. पु.) वेळू, बांबू.
**कीजे** (क्रि.) केलें जावें.
**कीजो** (क्रि.) करा.
**कीट** (सं. किट्ट न.) घाण, किट्टण, जंग; हिणकस सोनें; (सं. कीट स्त्री.) कीड.
**कीटक** (सं. पु.) किडा. [(वि.) खोटें.
**कीड** (प्रा. न.) खोटेंपण (भा. १०।६३);
**कीड** (सं. कीट न.) किडा, आळी इ. **कीड लागणें**–क्षय पावणें.
**कीडखाद** (प्रा. वि.) किडयांनीं खाल्लेलें.
**कीडरूं** (न.) सर्प. [ खचित.
**कीर** (सं. पु.) पोपट; (सं. किल अ.)
**कीरवा** (प्रा. पु.) डुकर. [ ख्याति.
**कीर्त** (सं. किर्ति स्त्री.) कीर्ति, प्रसिद्धि,
**कीर्तन** (सं. न.) हरिकथा; वाखाणणी.
**कीर्ति** (सं. स्त्री.) ख्याति; नांवलौकिक.
**कीर्तिमान** (सं. वि.) सुप्रसिद्ध, विख्यात.
**कीर्तिमुख** (सं. न.) देवळाच्या उंबरठ्यावरील राक्षसाच्या तोंडासारखा आकार (रुक्मि० १।५०.).
**कीर्द** किर्द पहा. [ पाचर, खुंटा.
**कील, कीलक** (सं. पु.) खिळा, खुंटी,
**कीलखाना** (हिं. पु.) अडगळ ठेवण्याची जागा.
**कीलना** (प्रा. पु.) दृढ निश्चय.
**कीलवाणा** (प्रा. वि.) केविलवाणा.
**कींव** (स्त्री.) करुणा, दया.
**कीश** (न.) माकड.
**कीस** (पु.) किसणीनें किंवा खवणीनें केलेला चुरा.
**कीसार** (प्रा. न.) शल्य (सोहि०मह०).
**कीळ** (प्रा. स्त्री.) प्रभा, तेज; किरण.
**कु** (सं. वि.) वाईट; (स्त्री.) पृथ्वी.
**कुइरा** (पु.) कोंवळा फणस.
**कुइरी** (स्त्री.) एक वनस्पति; तिची शेंग; त्या शेंगेच्या आकाराचा अलंकार.
**कुई** (स्त्री.) कोल्हयाचें ओरडणें; ओरड.
**कुईट** (वि.) खवट, नासकें; कुत्सित; (न.) घाण; आरोप.
**कुकडी** (स्त्री.) जनावराचा पश्चात् भाग.
**कुकडें** (न.) चातीच्या सुताची गुंडी.
**कुंकणें** (प्रा. क्रि.) ओरडणें.
**कुकर** (पु.) कुत्रा.

**कुकरी** (स्त्री.) गुरखे लोकांचें हत्यार.
**कुकरणें** (प्रा. क्रि.) निंदा करणें.
**कुकवाकू** (सं. कुकवाकु पु.) कोंबडा.
**कुकारा** (प्रा. पु.) आरोळी.
**कुकुटकुंभा** (पु.) भारद्वाज पक्षी.
**कुकुड** (प्रा. अ.) कोणीकडे ?
**कुकुबाळ, कुकुलें बाळ** (न.) तान्हें बाळ; थोर मनुष्य पोरास साजेसें वर्तन करूं लागल्यास त्याला हा शब्द लावितात.
**कुंकुम** (सं.न.) कुंकूं; केशर.
**कुंकुमपत्रिका** (सं. स्त्री.) लग्न वगैरे मंगलकार्यासाठीं निमंत्रण.
**कुंकूं** (सं. न.) कुंकुम.
**कुक्कुट** (सं. पु.) कोंबडा.
**कुग्राम** (सं. न.) आडगांव.
**कुक्कुर** (सं. पु.) कुत्रा.
**कुच** (सं. पु.) स्त्रीचा स्तन.
**कुचकट, कुचका** (वि.) कुजलेला, नासलेला; कुत्सित. [ निरुपयोगी
**कुचकामाचा** (हिं. कुछ कामका नहीं)
**कुचकुच** (स्त्री.) कुजबूज.
**कुंचडें** (न.) टोपडें, लहान मुलाची टोपी.
**कुचंबणें** (क्रि.) अडचणींतून सुटका न होतां दुःखांत कांहीं काळ काढावा लागणें.
**कुचर** (पु.) धान्याचा न शिजणारा दाणा; (वि.) कामचोर; दुर्मुखलेला; कपटी.
**कुचराई** (स्त्री.) कुचरपणा.
**कुचला** (पु.) **कुचली** (स्त्री.) रंग देण्याचा ब्रश.
**कुचला** (पु.) एक विषारी वनस्पति.
**कुंचा** (सं. कूर्च पु.) लहान केरसुणी; ब्रश; मोरचल (रामवि. २३।१६९).
**कुचाळ** (वि.) खोड्या किंवा निंदा करणारा.
**कुचाळी** (स्त्री.) खोडी, निंदा, कुचेष्टा.
**कुची, कुंची** (स्त्री.) इरल्याच्या आकाराची लहान मुलाची टोपी.
**कुची** (प्रा. वि.) व्यर्थ (तुका. १३६४); (स्त्री.) टोक (तुका. ३०६५).
**कुचुंबणें** (प्रा. क्रि.) कोमेजणें.
**कुचेदा** (हिं. पु.) खटपट, कारस्थान.
**कुचेष्टा** (सं. स्त्री.) थट्टा, कुचाळी.
**कुच्चा** (प्रा. स्त्री.) खांच (तुका.८५१); गुच्चा.
**कुंज** (सं. पु. न.) लतामंडप, लतागृह.
**कुजका** (वि.) कुजका, नासलेला, कुत्सित, कपटी, छिद्रान्वेषी.
**कुजणें** (क्रि.) सडणें, निरुपयोगी होणें.
**कुजबुजणें** (क्रि.) कुचकुचणें.
**कुजबूज** (स्त्री.) कुणकुण.
**कुंजर, कुंजरू** (सं. पु.) हत्ती.
**कुंजरी** (प्रा. स्त्री.) सेना; हत्तीण.
**कुजा** (फा. पु.) सुरई, खुजा.
**कुजष्टाण** (न.) कुजलेल्या पदार्थाची घाण.
**कुटका** (पु.) तुकडा.
**कुटकी** (स्त्री.) एक औषध.
**कुटकें** (प्रा. वि.) तुटलेलें.
**कुटण** (न.) कुटणें; झोडणें; ठोक.
**कुटणें** (क्रि.) कांडून किंवा सडून चूर्ण करणें.
**कुंटण** (सं. कुट्टिनी स्त्री.) जार आणि जारिणी यांचा संयोग घडवून आणणारी स्त्री.
**कुंटणकी** (स्त्री.) कुंटणीचें काम.
**कुंटणखाना** (पु.) कुंटणकीची जागा.
**कुंटा** (पु.) पूड; लाह्यांचें पीठ.
**कुटाकुटी** (प्रा. स्त्री.) मारामारी, भांडण; क्षय; मृत्यूचें भय.
**कुटारें** (प्रा. न.) कटचार (ज्ञा.४।२२३).
**कुटाळ** (सं. कुटिल वि.) कुचाळ कुचेष्टेखोर; निंदक. [ निंदा, कुचाळी.
**कुटाळकी, कुटाळी** (सं. स्त्री.) कुचेष्टा,
**कुटिल** (सं. वि.) वक्र.
**कुटी** (सं. स्त्री.) झोपडी.
**कुटी** (प्रा. स्त्री.) आळ, आरोप, निंदा (अमृ.७।१०५); बीळ (ज्ञा. १६।२४३) स्थान (ज्ञा० १३।१०७१); पूड; मार.
**कुटीचें बोट** निंदापवाद (ज्ञा. १६।१७८).
**कुटीमेटी** (प्रा. स्त्री.) घरदार.
**कुटीर** (सं. न.) लहानसें घर, झोपडी.
**कुटीळ** (सं. कुटिल वि.) कुटाळ, दुष्ट, द्वेष करणारा.

**कुटींव** (वि.) कुठलेलें.
**कुटुंब** (सं. न.) मुलें-माणसें, खटला; स्त्री.
**कुटुंबवत्सल** (सं. वि.) पदरीं मुलेंबाळें असलेला.
**कुटुंबारी** (प्रा. पु.) कुटुंबवत्सल, कुटुंबांतला कर्ता पुरुष (तुका. २००६).
**कुटें** (प्रा. वि.) लंगडें, कुवडें.
**कुट्टणें** (सं. कुट्टन न.) कुटणें.
**कुट्टनी** (सं. स्त्री.) कुंटण पहा.
**कुट्टा** (पु.) लाहयांचें पीठ.
**कुट्टा काढणें** मार देणें, ठोकणें.
**कुंठणें** (सं. क्रि.) थांबणें, बंद होणें.
**कुठणें, कुठने** (प्रा. अ.) कोठून ?
**कुठवर** (अ.) कोठपर्यंत ?
**कुठार** (सं. स्त्री.) कुऱ्हाड.
**कुठावा** (प्रा. पु.) रक्षण (तुका. ३३।२).
**कुंठित** (सं. वि.) खुंटलेला.
**कुठील, कुठचा** (वि.) कोणत्या ठिकाणचा?
**कुठून** (अ.) कोणत्या. स्थलापासून ?
**कुठें** (अ.) कोणत्या ठिकाणीं ?
**कुठोरा** (प्रा. वि.) दुसरा.
**कुठोरी** (प्रा. पु.) कोठारी ( तुका. ११३७); (अ.) कोठवर ?
**कुंड** (सं. न.) टाकी, पुष्करिणी; हवन करण्याची जागा.
**कुडकी** (स्त्री.) स्त्रियांचें एक कर्णभूषण.
**कुडकुडणें** (क्रि.) कुड् कुड् आवाज होणें; थंडीनें गात्रें त्रस्त होणें.
**कुडकुडा** (प्रा. पु.) कुरकुर करणारा, संकुचित (तुका. ३२९५).
**कुडकुडी** (प्रा. पु.) पापडासारखा कुडकुडीत पदार्थ ( भा. २५।३७३. ); (स्त्री.) थंडीचा कडाका.
**कुडकुडीत** (वि.) कुरकुरीत.
**कुंडजार** (प्रा. पु.) कुंडगोळक; ब्राह्मण स्त्रीचा व्यभिचारजन्य पुत्र (कथासारा० २१।१५).
**कुडण** (प्रा. न.) चीप; प्रतिबंध; कुंपण. (तुका. ३६७१।६०). [सदरा
**कुडता** (पु.) ओंजळ; अंगांत घालण्याचा
**कुडताळा** (पु.) **कुडताळें** (न.) संकुचित जागा. **कु०त येणें**–संपुष्टांत येणें.
**कुडती** (स्त्री.) उंची; खोली.
**कुडती** (फा. स्त्री.) सुताराचें एक हत्यार.
**कुडपणें** (प्रा. क्रि.) व्यापणें (तुका० ४६१); (न.) लहान जाड काठी.
**कुडबुडा, कुडमुडा, कुडमुड्या** (पु.) नशीब वर्तविणारा. [खुळखुळा.
**कुडबुडें** (न.) भाकीत सांगणाऱ्या जोशाचा
**कुडमुळी** (सं. कुड्मल स्त्री.) कमळ.
**कुंडल** (सं. न.) वर्तुळ; कर्णभूषण; कुडुक.
**कुंडलिनी** (सं. स्त्री.) शरीरांतील प्राणरूप शक्ति (योगशास्त्र).
**कुंडली** (सं. स्त्री.) राशिचक्र; चौकडी.
**कुडव** (पु.) दोन पायल्यांचें धान्याचें माप; (कोंकणांत आठ पायल्यांचें, हें माप सर्व ठिकाणीं सारखें नाहीं.)
**कुडा** (सं. कुटज पु.) एका औषधीचें नांव.
**कुडा** (प्रा. वि.) वाकडा, कपटाचा.
**कुंडा** (सं. कुंड पु.) मोठी कुंडी.
**कुडावा** (प्रा. पु.) रक्षण, भिंत, कूड.
**कुडी** (सं. कुटि स्त्री.) देह, शरीर; वीस, ही संख्या; (वि.) वाईट, व्यर्थ
**कुडी तशी पुडी** जसें शरीर तसा आहार.
**कुंडी** (सं. कुंड स्त्री.) मातीचें भांडें.
**कुडें** (प्रा. वि.) वाईट, वांकडें; मत्सरी; खोटें ( भा० १३।६२१ ); (न.) खोपटी; देह; कपट; वीस.
**कुडें पावडें** (न.) दुष्ट विचार; अंतःस्थ द्वेष; कारस्थान; जादूटोणा.
**कुड्मल** (सं. कुड्मल स्त्री.) कळी.
**कुड्या, कुट्या** (वि.) कुरठा, घुम्या.
**कुढणें** (हिं. क्रि.) मनांतल्या मनांत चरफडणें; कष्टी होणें; (प्रा.) रक्षण करणें.
**कुढा** (वि.) खोटा, कपटी, कुरठा.
**कुढापा** (पु.) द्वेष; संताप.
**कुढावणें** (प्रा. क्रि.) सुखी करणें (भा० युद्ध० ५६।१२०).
**कुणकुण** (स्त्री.) कुजबूज; वातमी.
**कुणगा** (पु.) छपवून ठेविलेलें द्रव्य.
**कुणबट** (पु.) कुणब्याविषयीं तुच्छता किंवा तिरस्कार दाखविणारा शब्द.
**कुणबाऊ** (वि.) कुणब्यास योग्य, कुणब्याची.

**कुणबी** (पु.) कुळंबी, शेतकरी.
**कुणबीण** (स्त्री.) कुणब्याची बायको; दासी.
**कुणी** (स्त्री.) पोकळ दाणा; लांकडाची खुंटी, पाचर.
**कुंत** (प्रा. पु.) भाला.
**कुतका** (पु.) वरवंटा; ठोसा; तडाखा.
**कुतंगळ, कुतुंगळ** (प्रा. वि.) नाजूक, दुबळ.
**कुतप** (सं. कुतुप पु. न.) मध्याह्नकाळ.
**कुतवा** (फा. पु.) कबुलीचा लेख.
**कुतरओढ** (स्त्री.) तारांबळ, दुर्दशा.
**कुतर्क** (सं. पु.) वाकडी किंवा वाईट शंका किंवा कल्पना.
**कुतुक** (सं. न.) कौतुक.
**कुतूहल** (सं. न.) नवल, कौतुक.
**कुत्ता** (हि.) कुत्रा.
**कुत्रा** (पु.) श्वान, कुक्कुर.
**कुत्री** (स्त्री.) कुत्र्याची मादी.
**कुत्रें** (न.) श्वान; सूक्ष्म कंटकयुक्त गवताचा तुरा; अडकवण.
**कुत्र्याचें मूत** छत्री (वनस्पति); द्वाड स्वभावाचा, दुसऱ्याच्या अंगावर बसकन येणारा.
**कुत्र्याचें शेपूट** सुधारण्याचा कितीही यत्न केला तरी तो व्यर्थ होऊन पूर्वीच्या वळणावर जाणारा.
**कुत्र्यामांजराचे पाय** वाईट हस्ताक्षर.
**कुत्सित** (सं. वि.) तिरस्कार्य; दुष्ट; क्षुद्र; नीच.
**कुंतल** (सं. पु.) केस.
**कुंथणें** (क्रि.) कण्हणें; बळानें कार्यसिद्धि करण्याचा यत्न करणें; खेद करणें.
**कुंद** (वि.) कोंदलेली, बंद; (पु.) एक पुष्पवेल; छपराच्या दोन पाख्यांमधला कोन; रस्त्याचें वळण; नक्षीकाम.
**कुदणें** (हिं. क्रि.) उडी मारणें.
**कुदरत** (फा. न.) सामर्थ्य; ईश्वरी शक्ति; निसर्ग.
**कुदळ, कुदळी** (स्त्री.) **कुदळें** (न.) जमीन खणण्याचें हत्यार.
**कुंदा** (पु.) ठेंचा. **कुंदा काढणें** (क्रि.) ठेंचणें, मारणें, चोपणें.
**कुदी** (स्त्री.) (खानदेशाकडे) उडी.

**कुंदी** (स्त्री.) कपडे धुतांना आपटणें, घांसणें, चोपणें इ० करावी लागणारी क्रिया.
**कुन्हा** (फा. किना पु.) चुरस, द्वेष, मत्सर.
**कुंप** (पु.) कुंपण. [ हद्द.
**कुपट** (प्रा.स्त्री.) शेताची किंवा जमिनीची
**कुंपण** (न.) आवरण, बांध.
**कुपथ** (सं. पु.) दुर्मार्ग.
**कुपथ्य** (सं. न.) बावड्या पदार्थाचें सेवन; पथ्याचा भंग.'
**कुपरी** (प्रा. स्त्री.) वाईट संगत.
**कुपा** (सं. कुतुप पु.) मोठी शिशी.
**कुपात्र** (सं. न.) दक्षिणा किंवा देणगी देण्यास अयोग्य मनुष्य.
**कुपित** (सं. वि.) रागावलेला.
**कुपित्थ** (सं. कुपित्त न.) अपचन; मनांत धुमसत असलेला द्वेष.
**कुपी** (सं. कुतुप स्त्री.) लहान बाटली.
**कुफरांड, कुफराण** (अर. कुफरान न.) कुभांड.
**कुफरांडी** (वि.) कुभांडखोर.
**कुबट** (वि.) कुजकट.
**कुबड** (सं. कुब्ज न.) पाठीला आलेलें पोक.
**कुबडा** (सं. कुब्ज वि.) कुबड असलेला.
**कुबडी** (स्त्री.) वैराग्याची दुबळके असलेली अंग टेकण्याची काठी.
**कुबलणें** (क्रि.) मारणें, ठेंचणें.
**कुर्बानी** (स्त्री.) बलिदान.
**कुबेर** (सं. पु.) देवांचा कोशाध्यक्ष; अतिशय श्रीमंत मनुष्य.
**कुब्बल** (वि.) वळकट; वजनदार, प्रचंड,
**कुंभ** (सं. पु.) घागर, कलश; हत्तीचें गंडस्थळ; अकरावी रास.
**कुंभक** (सं. पु.) श्वास कोंडून धरणें; (प्राणायामांतील एक भाग).
**कुंभकर्ण** (सं. पु.) रावणाचा भाऊ; फार झोपाळू मनुष्य.
**कुंभकार** (सं. पु.) कुंभार.
**कुभांड** (अर. कुफरान न.) आळ; कपटाचें कारस्थान. [ विणारा.
**कुंभार** (सं. कुंभकार पु.) मडकीं घड-
**कुंभारीण** (स्त्री.) कुंभाराची बायको; एक जातीची माशी.

**कुंभिनी** (स्त्री.) पृथ्वी.
**कुंभीपाक** (सं. पु.) एका नरकाचें नांव.
**कुमक** (फा. स्त्री.) मदत.
**कुमकणें** (क्रि.) मारणें, चोपणें.
**कुमका** (पु.) ठोसा, तडाखा.
**कुमकुमा** (अर. पु.) गुलालगोटा.
**कुमर, कुमरु** (सं. कुमार पु.) बाळ.
**कुमाईत** (अर. वि.) सारंगा.
**कुमार** (सं. पु.) पांच वर्षांच्या आंतील मुलगा; कार्तिकस्वामी.
**कुमारिका, कुमारी** (सं. स्त्री.) अविवाहित मुलगी.
**कुमारीआसव** (सं. न.) एका औषधाचें नांव.
**कुमुद** (सं. न.) पांढरें कमळ; श्वेतकमळ.
**कुमुदिनी** (सं. स्त्री.) श्वेतकमळाची वेल; श्वेतकमळें असलेलें तळें.
**कुमेत** (अर. वि.) कुमाईत पहा.
**कुयाडें** (न.) कोडें.
**कुरकुर** (स्त्री.) तक्रार, पिरपीर.
**कुरकुरीत** (वि.) कुडकुडीत.
**कुरकुरला** (पु.)--**ली** (स्त्री.)--**लें** (न.) टोपली.
**कुरकुली--लें** (स्त्री. न.) वांबूची टोपली.
**कुरंग** (सं. न.) हरिण.
**कुरघोडी** (स्त्री.) एक चेंडूचा खेळ, (यांत एका मुलानें दुसऱ्याच्या पाठीवर बसून चेंडू जमिनीवर आपटावयाचा असतो); वर्चस्व स्थापित करणें; उपहास करणें.
**कुरठा** (वि.) कुढा; कुरकुऱ्या; कपटी.
**कुरडई** (स्त्री.) एक तळलेला वर्तुळाकार पदार्थ.
**कुरडू** (पु.) स्त्रियांचें एक कर्णभूषण.
**कुरण** (न.) गवत उगवलेलें मैदान.
**कुरतुडणें** (क्रि.) दांतांनीं लहान लहान तुकडे काढून खाणें. [पात, सलाम.
**कुरनिशात, कुरनीस** (फा. स्त्री.) प्रणि-
**कुरबुर** (स्त्री.) कुरकुर; असंतोषाचे उद्‌गार.
**कुरमुडें** (न.) नागपुराकडे--कोशिंबीर.
**कुरमुरण** (क्रि.) चुरमुरणें, धुमसणें.
**कुरमुरे** (पु.) भाजलेले तांदूळ, चुरमुरे. **कु० खाणें**---आंतल्या आंत चरफडणें.

**कुरवंडणें** (क्रि.) ओवाळून टाकणें.
**कुरवंडी** (स्त्री.) ओवाळणी.
**कुरवाळणें** (क्रि.) गोंजारणें.
**कुरळ, कुरळित** (सं. कुरल वि.) वेटाळलेलें.
**कुरळी करणें** चिडवणें.
**कुराण** (अर. न.) मुसलमानांचें धर्मपुस्तक.
**कुरापत** (अर. खुराफात स्त्री.) गुप्त दोष, व्यंग; खोडी, कुचेष्टा, कुचाळी; जखमे-वर टोंचणें; भांडण उकरून काढणें.
**कुरी** (प्रा. स्त्री.) नवस, करार; नवसाचा दिवस; वळी; कराराची मुदत; अर्धा विघा रान; पाभर. [आरक्त वर्ण.
**कुरुंग** (पु.) डोळ्याच्या कोपऱ्याचा
**कुरुठा** (प्रा. पु.) आश्रय; घरटें; (वि.) शहाणा.
**कुरुंद** (पु.) तांबडा व मऊ दगड.
**कुरुळ** (सं. कुरल वि.) वर्तुळाकार शोभि-वंत वेटाळीं असणारे (केश).
**कुरुक्षेत्र** (सं. न.) भारतीय युद्धाचें स्थान.
**कुरूप** (सं. वि.) विद्रूप, बेढब.
**कुरूम** (पु.) डोळ्याच्या पांढऱ्या भागावर येणारें मांस.
**कुरूळ** (सं. कुरल वि.) कुरळ पहा.
**कुर्निसात** (फा. स्त्री.) नम्रतेचा सलाम.
**कुरें** (प्रा. अ.) निश्चयानें (शुभा० उद्योग० ५।१४).
**कुर्रा** (पु.) डौल, ऐट, ताठा. [आढ्यतेखोर.
**कुर्रेबाज** (वि.) तोरा मिरवणारा,
**कुऱ्हाड** (सं. कुठार स्त्री.) लाकडें फोड-ण्याचें हत्यार.
**कुऱ्हाडीचा दांडा** सजातीयांवर उलट-णारा; जातिद्रोही.
**कुऱ्हें** (प्रा. वि.) कुबडा.
**कुल** (सं. न.) वंश; (सं. कूल पु.) किनारा.
**कुलअखत्यारी** (हिं. पु.) पूर्ण अधिकार.
**कुलकल्ला** (प्रा. पु.) प्रीतींतला मनुष्य; पूर्णसत्ताधारी (अनंतफंदी०लावण्या.)
**कुलंगडें** (न.) भानगड, अडचण, त्रास.
**कुलगुरु** (पु.) विद्यापीठाचा उपप्रमुख.
**कुलंगें** (वि.) लहान आणि गिड्डें.
**कुलटा** (सं. स्त्री.) व्यभिचारिणी, छिनाल.
**कुलदीपक** (सं. पु.) कुलाला भूषविणारा.

**कुलदैवत** (न.), **कुलस्वामी** (सं. पु.) कुळाची रक्षक देवता.
**कुलपणें** (क्रि.) लंगडणें.
**कुलपति** (पु.) विद्यापीठाचा मुख्य.
**कुलपी गोळा** (पु.) पोटांत लोखंडाचे खिळे वगैरे वस्तु भरलेला गोळा.
**कुलपी विडा** दहा बारा पानांचा लाविलेला व केळीच्या पानांत गुंडाळून चोयीनें बंद केलेला विडा.
**कुलपुरुष** (सं. पु.) पूर्वज.
**कुलशाव, कुलकानू** सर्व कर, पट्टया, वहिवाटीचे हक्क वगैरे.
**कुलमर्यादा** (सं. स्त्री.) कुलांत चालत आलेलें सांप्रदायिक शिष्टाचाराचें वर्तन.
**कुलवधू** (सं. स्त्री.) कुलीन, गुणवती स्त्री.
**कुला** (पु.) कुल्ला, नितंब; **कुले थोपटणें**—आनंदानें नाचणें.
**कुलांगार** (पु.) कुलाचा नाश करणारा.
**कुलाबा** (अर. पु.) समुद्रांत गेलेली जमिनीची अरुंद पट्टी.
**कुलायिका** (सं. स्त्री.) पक्षिशाला.
**कुलाल, कुल्लाळ** (सं. पु.) कुंभार.
**कुलावतंस** (सं. न.) कुलाचें भूषण.
**कुलित्थ** (सं. पु.) कुळीथ, हुलगे.
**कुलीन** (सं. वि.) चांगल्या कुळांतला; खानदानीचा.
**कुलुंगें** (वि.) ठेंगणें व गुटगुटीत (कुत्रें).
**कुलुली** (सं. स्त्री.) खाज; आवेग; आनंद; कुई.
**कुलूप** (अर. न.) टाळें, ताळा.
**कुल्ला** (पु.) नितंब.
**कुवत** (अर. स्त्री.) शक्ति, सामर्थ्य.
**कुंवर** (सं. कुमार पु.) पांच वर्षांच्या आंतला मुलगा; दासीपुत्र.
**कुंवरा** (पु.), **कुंवरी** (स्त्री.) कोंवळा फणस.
**कुवसा, कुंवसा, कुवासा** (प्रा. पु.) आश्रय (ज्ञा० ६।१२५).
**कुंवळ** (पु.) दोष, खोड, न्यून.
**कुवा** (सं. कूप पु.) आड, विहीर.
**कुवाड** (वि.) दुर्घट.
**कुवाडें** (प्रा. न.) कोडें; मंत्रतंत्र; (वि.) गूढ (ज्ञा० १२।४२).
**कुंवार, कुंवारी-रीण** (सं. कुमारी स्त्री.) अविवाहित मुलगी.
**कुंवारकांडें, कुंवारफोड** (सं. कुमारी स्त्री.) कोरफड.
**कुवासा** (प्रा. पु.) कुवसा शब्द पहा.
**कुविद्या** (सं. स्त्री.) जारणमारणाची विद्या.
**कुवीट** (वि.) कुजलेलें.
**कुवेकाठी** (प्रा. स्त्री.) डोलकाठी.
**कुश** (सं. पु. न.) दर्भ.
**कुशल, कुशळ** (वि.) खुशाल, सुखरूप; शिल्पविद्येंत प्रवीण; चतुर.
**कुशलप्रश्न** (सं. पु.) भेट होतांच प्रथम 'कसें काय ? ठीक आहेना ?' वगैरे औपचारिक प्रश्न विचारतात ते.
**कुशलार्थ** (सं. पु.) क्षेम–समाचार.
**कुशाग्रबुद्धि** (सं. स्त्री.) तीक्ष्ण बुद्धि.
**कुशावर्त** (सं. न.) गोदेच्या उगमाजवळचें तीर्थ.
**कुशासन** (सं. न.) दर्भासन.
**कुशी** (सं. कुक्षि स्त्री.) कूस.
**कुश्चळ** (वि.) अपवित्र, मलिन; ख्यालीखुशाली; तिरस्कारार्ह, कुत्सित.
**कुष्ट** (सं. न.) कोड, रक्तपिती.
**कुष्टाण** (स्त्री.) कुजलेल्याची घाण.
**कुष्टी** (वि.) घाणेरें; (पु.) कुष्टरोगी; रक्तपित्या.
**कुष्मांड** (सं. पु.) कोहळें; खोटा आरोप.
**कुसकरणें** (क्रि.) भुगा करणें.
**कुसकरा** (पु.) भुगा. [ णाला कारण.
**कुसपट** (न.) खुसपट, क्षुद्र दोष; भांड-
**कुसमडणें, कुसमरणें** (क्रि.) कुसकरणें.
**कुसमुस** (प्रा. स्त्री.) चळवळ, अस्वस्थता, कुरकुर.
**कुसमुसणें** (क्रि.) कुरकुरणें; जळफळणें.
**कुसरी** (स्त्री.) कौशल्य; कारागिरी.
**कुसरूड** (पु.) सुरवंट, घुला. [ नाश.
**कुसवळ** (न.) अतिवृष्टीनें होणारा पिकांचा
**कुसवा** (पु.) कूस, गर्भाशय.
**कुसळ** (न.) तृणाचें सूक्ष्म अग्र; धस.
**कुसळी** (प्रा. स्त्री.) मंत्रविद्येनें दुसऱ्याच्या घरचें लोणी खाणारी.
**कुसा** (पु.) कुसवा; कूस.

**कुसुंब, कुसंवा** (सं. कुसुंभ पु.) करडईचें फूल; त्यापासून काढलेला रंग; अफूच्या बोंडाचा अर्क.
**कुसुंबी** (वि.) कुसुंब्याच्या रंगाचें.
**कुसुम** (सं. न.) पुष्प, फूल. (स्त्री.) मराठ्यांच्या सैन्यांतील कवायती पलटण. हिच्यांत १२०६ शिपाई असत.
**कुसुमाकर** (सं. पु.) फुलांची खाण; वसंत ऋतु.
**कुसूं** (न.) खोबणींत फिरण्यासारखें दाराच्या लांकडाचें पुढें आलेलें टोंक; कुंपणाची भिंत; धान्याचें भूस,
**कुसूर** (फा. स्त्री.) चूक.
**कुस्करी** (स्त्री.) भांडण.
**कुस्ती** (फा. कुस्ती स्त्री.) मल्लयुद्ध.
**कुऱ्ही** (स्त्री.) कुबडी (ना. ६२९).
**कुहजक** (वि.) कुजलेलें (भा० १३७७०).
**कुहडें** (न.) कोडें.
**कुहणें** (क्रि.) कुजणें (ज्ञा० १३।५२२).
**कुहर** (सं. न.) गुहा, दरी.
**कुहा** (पु.) थंडी; (हिं. कुवा पु.) कूप.
**कुहाड, कुहाडा** (प्रा. पु.) वेदना.
**कुहार** (प्रा. न.) कोठार.
**कुहिजक** (प्रा. वि.) कुजट.
**कुहिट** (प्रा. वि.) नासकें. **कु० खोबरें**-कुरठा, दुष्ट स्वभावाचा मनुष्य.
**कुहिटार** (न.) केंवळ, झावळ्या.
**कुहिना** (वि.) संशयी, मत्सरी, कुरठा.
**कुहीटुळी** (प्रा. स्त्री.) कुजकी घाण.
**कुहु** (अ.) कोकिळेचा शब्द.
**कुहू** (स्त्री.) अमावास्या.
**कुहेडें** (न.) कोडें, कूटप्रश्न.
**कुळकणी** (प्रा. स्त्री.) चातुर्य.[कर्मकहाणी.
**कुळकथा** (स्त्री.) कुलाचा इतिहास;
**कुळकरण** (न.) कुळकर्ण्याचें काम.
**कुळकर्णी** (सं. पु.) गांवच्या पाटलाच्या हाताखालचा हिशेब वगैरे ठेवणारा अधिकारी.
**कुळकुळीत** (वि.) काळ्या रंगाचा भडकपणा दाखविण्यासाठीं योजलेला शब्द.
**कुळपट** (न.) चूक, व्यंग, गुप्त दोष.
**कुळपटा** (पु.) कपटा, चीप, भुसा.
**कुळागर** (न.) पोफळीचा बाग.
**कुळार** (न.) माहेर.
**कुळंबी** (पु.) कुणबी.
**कुळव** (न.) जमीन नांगरल्यावर तिचीं ढेकळें वगैरे फोडून तीं एकसारखी सरसरीत करणारें शेतकीचें अवजार.
**कुळवणी** (स्त्री.) जमीन सपाट किंवा भुसभुशीत करणें.
**कुळवाड** (प्रा. स्त्री.) उदीम; शेतकी.
**कुळवाडी** (स्त्री.) वतन; धंदा (ना० १७); शेतकी; (पु.) शेतकरी.
**कुळी** (सं. स्त्री.) कुळ, वंश, घराणें.
**कुळीक** (प्रा. स्त्री.) मोडशी, अजीर्ण.
**कुळीथ** (सं. कुलित्थ पु.) एक प्रकारचें हलकें धान्य, हुलगा.
**कुक्षि** (सं. स्त्री.) कूस, पोट, गर्भाशय; आंतील भाग; म्यान. [विणें, जाणें.
**कूच** (हिं. न.) सैनिक यात्रा; तळ हाल-
**कूजणें** (सं. कूजन क्रि.) शब्द करणें.
**कूट** (न.) चूर्ण, भूस, कोडें, उखाणा; एकोप्यानें राहणारें, कपट; निंदा.
**कूटप्रश्न**—घोटाळ्याचा प्रश्न, कोडें.
**कूटसाक्षी** (पु.) खोटी साक्ष देणारा.
**कूटस्थ** (सं. वि.) स्तब्ध; अविनाशी; (पु.) मूळ पुरुष; आत्मा.
**कूठि** (स्त्री.) निंदा, अपवाद; आण, शपथ.
**कूड** (सं. कुड्या पु.) कारव्या, कामटया इ० ची भिंत; (स्त्री.) शरीर; (वि.) दगलबाज.
**कूत** (पु.) आवेश; उत्साह; कामाची उत्कंठा; अंदाज.
**कूप** (पु.) कुंपण; (सं. पु.) आड, विहीर.
**कूपमंडूक** (सं. पु.) संकुचित स्थळीं वाढलेला; घरकोंबडा.
**कूर्म** (सं. पु.) कांसव.
**कूर्मदुग्ध** (सं. न.) असंभाव्य गोष्ट.
**कूर्मदृष्टि** (सं. स्त्री.) प्रेमपूर्ण दृष्टि.
**कूल** (सं. न.) तीर, काठ, किनारा.
**कूष्मांड** कुष्मांड पहा.
**कूस** (सं. कुक्षि स्त्री.) कड, बाजू; उदर; कसर, नफा; कुसळ.
**कूंस** (न.) कुसूं पहा.

**कूळ** (सं. कुल न.) घराणें, वंश; कर्जदार; पक्षकार; शेतकरी; पट्ट्यानें जमीन धारण करणारा.

**कूळकट** (सं. कुलकथा न.) कुळाची चिरे.

**कूळशीळ** (सं. कुलशील न.) घराण्याचा लौकिक; शिस्त, स्वभाव, चालीरीति इत्यादि.

**कृच्छ्र** (सं. न.) पहिल्या दिवशीं एकवार भोजन, दुसऱ्या दिवशीं नक्त (सायंकाळीं भोजन), तिसऱ्या दिवशीं न मागतां आपोआप प्राप्त होईल तें खाणें व चौथ्या दिवशीं उपोषण याप्रमाणें क्रमानें बारा दिवस करण्याचें व्रत; कष्ट, दुःख; संकट; प्रायश्चित्त. [ पैकीं पहिलें.

**कृत** (सं. वि.) केलेलें; (न.) चार युगां-

**कृतकार्य** (सं. वि.) कृतकृत्य, कृतार्थ.

**कृतकृत्य** (सं. वि.) कृतकार्य पहा.

**कृतघ्न** (सं. वि.) उपकार विसरणारा; हरामखोर.

**कृन्तन** (सं. न.) कापणें; कुरतुडणें.

**कृतज्ञ** (सं. वि.) उपकार जाणणारा.

**कृतज्ञता** (सं. स्त्री.) उपकाराची जाणीव.

**कृतान्त** (सं. पु.) यम, मृत्यु.

**कृतार्थ** (सं. कृतकृत्य वि.) करावयाचें कांहीं उरलें नाहीं असा. [ केलेलें काम.

**कृति** (सं. स्त्री.) क्रिया करण्याची रीत;

**कृत्तिका** (सं. स्त्री.) २७ नक्षत्रांपैकीं तिसरें.

**कृत्य** (सं. न.) काम, कृति; भूमितींत— करावयास सांगितलेली रचना.

**कृत्या** (सं. स्त्री.) दुष्ट देवता; लक्षणेनें— कजाग बायको.

**कृत्रिम** (सं. वि.) बनावट; (न.) कपट.

**कृत्रिमी** (सं. वि.) कपटी, दिखाऊ.

**कृत्स्न** (सं. वि.) सगळें, सर्व.

**कृपण** (सं. वि.) कंजूष; गरीब.

**कृपा** (सं. स्त्री.) मेहेरबानी; दया.

**कृपाळु** (सं. कृपालु वि.) दयाळु.

**कृपावंत, कृपावान्** (वि.) दयाळु.

**कृमि** (सं. पु.) किडा, आळी, जंत, जीव.

**कृश** (सं. वि.) रोड, लुकडा, किडकिडीत.

**कृशरान्न** (प्रा. न.) खिचडी.

**कृशांगी** (सं. स्त्री.) सडपातळ अंगाची स्त्री.

**कृशानु, कृशानन** (सं. पु.) अग्नि.

**कृषि** (सं. स्त्री.), **कृषिकर्म** (सं. न.) शेतकी.

**कृषिक, कृषीवल** (सं. पु.) शेतकरी.

**कृष्ण** (सं. वि.) काळा, श्याम; कपटी; (पु.) विष्णूचा आठवा अवतार.

**कृष्णकृत्य** (सं. न.) कपटाचें वाईट कृत्य.

**कृष्णग्रंथि** (सं. स्त्री.) सोडण्यास कठिण अशी गाठ.

**कृष्णपक्ष** (सं. पु.) महिन्यांतला वद्यपक्ष, उतरती कळा.

**कृष्णमृग** (सं. पु.) काळवीट. [ दिलेलें.

**कृष्णार्पण** (सं. न.) सर्व हक्क सोडून

**क्लृप्ति** (सं. स्त्री.) युक्ति, कल्पना.

**कें** (प्रा. अ.) कोठें ? काय ? कसें ?

**केउता-ती-तें** (प्रा. अ.) कोठें ? कोणता ? कसा ? केव्हां ? कोठील ?

**केउलवाणा** (वि.) केविलवाणा.

**केंकटणें, केंकणें, केकावणें** (क्रि.) ओरडणें.

**केकत, केकती** (सं. केतक, केतकी स्त्री.) केवडा.

**केकताड–ल** (न.) केतकीचें कुंपण; उंच वाढलेलीं केतकीचीं झाडें.

**केकया, केकयी** (सं. कैकेयी स्त्री.) जहां-बाज, कजाग किंवा खाष्ट स्त्री; वाटिका.

**केंकरें** (प्रा. न.) केरसुणी; एक हत्यार.

**केकसा, के० मावशी** (सं. कर्कशा स्त्री.) खाष्ट बायको.

**केका** (सं. स्त्री.) मोराचा ध्वनि.

**केंकाणें** (प्रा. न.) दौड, धाव.

**केकी** (सं. पु.) मोर.

**केचित्** (वि.) कांहीं कांहीं लोक.

**केजें** (प्रा. न.) भाजीपाल्याबद्दल दिलेला नारळ किंवा धान्य; नारळ.

**केंड** (वि.) कृपण, कंजूष.

**केंडणें** (प्रा. क्रि.) निर्भर्त्सना करणें; वृथा आरोप करणें (तुका० ४०७७); अड-चण करणें, त्रास देणें.

**केणी** (प्रा. स्त्री.) जिन्नस, वस्तु; प्रकार; किडाळ; गांठोडें (ज्ञा० ६।२९).

**केणें** (सं. क्रय न.) विक्रीची वस्तु; वस्त्रा-च्या घडीभोंवतीं बांधलेली दोरी.

**केतक** (सं. न.), **केतकी** (स्त्री.) केवडा; बायकांचा केसांत घालण्याचा एक दागिना.
**केतन** (सं. न.) पताका, ध्वज.
**केतु** (सं. पु.) ध्वज, पताका; एका ग्रहाचें नांव.
**केतुकें** (प्रा. वि.) किती ? कसलें ?
**केतुला–ली–लें** (प्रा. वि.) केवढा; कसा.
**केतें** (प्रा. न.) चंगकांचनी गंजिफाच्या खेळांत चारी हुकूम एकास आल्यानें होणारी जीत (साहि०अध्या० ३).
**केथवर** (प्रा. अ.) कोठपर्यंत ?
**केदार** (प्रा. न.) मळा; एक राग.
**केदारा** (पु.) गायनांतला एक राग.
**केंद्र** (सं. न.) वर्तुळमध्य.
**केधवां** (अ.) केव्हां ?
**केनशी** (स्त्री.) बुरा, बुरशी.
**केप** (इंग्र. कॅप स्त्री.) बंदुकींत ज्यावर घोड्याचा आघात होऊन बार उडतो तें तांब्याचें टोपण.
**केंबरें** (न.) घुंगुरटें, चिलट.
**केंबळ** (न.) जुनें गवत.
**केमटा** (वि.) कृपण, कंजूष.
**केमशी** (स्त्री.) बुरशी.
**केर** (पु.) कचरा; तुकडेताकडे वगैरे; गदळ, घाण. **केर फिटणें**–नाश होणें. **केर फेडणें** नाश करणें. [ करणें.
**केरवारा** करून टाकणें गुंडाळून खराब
**केरकचरा** (पु.) केर पहा.
**केरडोक** (न.) आळ्यापासून खालीं लोंबणारीं जळमटें.
**केरणें** (प्रा. क्रि.) खाणें.
**केरपोतेरें** (न.) घरांतला केर काढणें, सारवणें, इ० गृहिणीचीं प्रातःकृत्यें.
**केरवा, कारवा** (पु.)एक प्रकारचा नाच; तबल्याचा एक बोल; बांगड्यांचा एक प्रकार.
**केरसुणी** (स्त्री.) झाडू; शिंदीच्या झावळ्यांचा केलेला खराटा.
**केरी** (स्त्री.) शेतांतले खुंट; पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून येणारा केरकचरा.
**केरू** (प्रा. पु.) केर, अडचण.

**केल** (न.) दुफांदी; आंकडी.
**केलडें** (न.) माकड.
**केली** (सं. स्त्री.) क्रीडा.
**केव, केंव** (स्त्री.) कींव, याचना.
**केवट** (न.) किरकोळ विक्री.
**केवटा** (वि.) कृपण; किरकोळ विक्री करणारा; (पु.) नदीकाठची जमीन.
**केवडा** (पु.) केतक पहा.
**केवढा** (वि.) किती मोठा ?
**केवढ्यांदां** (अ.) केवढ्या मोठ्या आवाजानें.
**केवणें** (न.) वस्त्राच्या घडीभोंवतालची दोरी; सांठा, संचय.
**केवल** (सं. न.) शुद्ध, निवळ, एकटा; (अ.) मात्र, अगदीं.
**केवलप्रयोगी** (न.) उद्‌गारवाचक अव्यय.
**केवळ** (अ.) फक्त, मात्र, अगदीं; (प्रा. वि.) स्वतंत्र.
**केवा** (प्रा. पु.) थोरवी, सामर्थ्य; (मोरो० आदि० १७।१०; मुक्ते० वन० ९।१५७); रोकड पैसा, खजिना.
**केंवि** (प्रा. अ.) कसें ? [ आणणारा.
**केंविलवाणा** (वि.) दीनवाणा; कींव
**केंवी** (अ.) कोणत्या प्रकारें ?
**केव्हां** (अ.) कोणत्या काळीं ?
**केव्हेळी** (प्रा. अ.) केव्हांतरी.
**केश** (सं. पु.) केस.
**केशर** (सं. न.) एक सुगंधि द्रव्य.
**केशरा** (पु.) मारूं किंवा मरूं या निश्चयानें वीरांनीं युद्धासाठीं बाहेर पडतांना घालण्याचा केशरी रंगाचा झगा.
**केशरी** (वि.) केशराच्या रंगाचा.
**केशऱ्या** (वि.) तंतुयुक्त.
**केशव** (सं. पु.) विष्णु.
**केशाकर्षण** (सं. न.) केसासारख्या सूक्ष्म तंतूंच्या द्वारें घडणारें आकर्षण.
**केस** (सं. केश पु.) केश. **केसांच्या आंबाड्या होणें**––वृद्धावस्था येणें. **के०नें गळा कापणें**–विश्वासघात करणें.
**केसतूड** (न.) गळूं, फोड. [ आयाळ.
**केसर** (सं. पु.) फुलांतला तंतु; सिंहाची
**केसरी** (सं. पु.) सिंह.

**केसारी** (स्त्री.) केसांची दोरी.
**केसाळ** (वि.) पुष्कळ केस असलेला.
**केळ** (सं. कदली न.) केळीचें फळ व झाड.
**केळंबा** (पु.) केळीचा कोंब.
**केळवंड** (स्त्री.) केळांचा घड.
**केळवण** (सं. केलि स्त्री.) लग्नामुंजीच्या अगोदरची मेजवानी; गडगनेर; रीत, चाल.
**केळवणें** (प्रा. क्रि.) शोभिवंत दिसणें.
**केळवली** (प्रा. स्त्री.) केळवण झालेली (ज्ञा० १३।५५१); सुखी.
**केळबा** (पु.) केळीचा कोंब.
**केळा** (पु.) लहान मडकें. [ घागर.
**केळी** (सं. केलि स्त्री.) क्रीडा; लहान
**केळें** (न.) केळ.
**कैं, कैं** (अ.) केव्हां, कोठें; (वि.) कित्येक.
**कैक** (वि.) कित्येक, पुष्कळ.
**कैकट** (प्रा. वि.) यवनांनीं व्याप्त म्हणून अपवित्र झालेली भूमि (ज्ञा० १७।२९४).
**कैकाडी** (पु.) एका जातीचें नांव.
**कैकेयी** (सं. स्त्री.) दशरथाची तिसरी वायको; हिनें हट्ट वरून दशरथाकरवीं रामास वनवासाला धाडिलें; हिचा मुलगा भरत; हिच्या हट्टी स्वभावावरून लक्षणेनें कजाग, हट्टी स्त्री.
**कैचा** (प्रा. वि.) कोणता ? कोठील ?
**कैची** (हिं. स्त्री.) कातरी; धीर देण्यासाठीं एकमेकांस बांधलेले वासे.
**कैतव** (सं. न.) कपट, लबाडी.
**कैद** (अर. स्त्री.) तुरुंगवास; कारागृह.
**कैदखाना** (फा. पु.) तुरुंग.
**कैदवार** (अ.) आज्ञाधारकपणें, नियम-पालनपूर्वक.
**कैदाशीण** (स्त्री.) कैकाडीण; भांडखोर स्त्री.
**कैदी** (हिं. पु.) बंदिवान्. [ कारस्थान.
**कैफत** (अर. स्त्री. न.) दुष्टपणाची युक्ति,
**कैपक्ष** (प्रा. पु.) कैवार, पक्षपात.
**कैपक्षी** (प्रा. पु.) कैवारी.
**कैफ** (अर. पु.) अंमल, धुंदी, तार. [ गोष्ट.
**कैफियत** (अर. स्त्री.) जबानी; हकीकत;
**कैरव** (सं. न.) चंद्रविकासित कमळ.
**कैरा** (वि.) घाऱ्या डोळ्याचा; चकणा.
**कैरी** (स्त्री.) हिरवा आंबा.
**कैल** (फा. न.) शेतांतील धान्याचें मान.
**कैलास** (सं. पु.) महादेवाचें निवासस्थान.
**कैलासवासी** (सं. वि.) मृत.
**कैली** (वि.) मापी.
**कैवर्त** (सं. पु.) कोळी.
**कैवल्य** (सं. न.) मोक्ष, मुक्ति.
**कैवाड** (न.) कारस्थान, मसलत.
**कैवाडी** (वि.) धूर्त, शहाणा.
**कैवार** (प्रा. पु.) साह्य, पक्ष उचलणें; कंपास; कंपासानें काढलेलें वर्तुळ.
**कैवारी** (पु.) कैवार घेणारा, पक्ष सावरून धरणारा; साह्यकर्ता.
**कैसा** (प्रा. अ.) कसा ? कसला ?
**कैसेन** (प्रा. अ.) कशाच्या योगानें ?
**कोइटारू** (वि.) कोइटानें शाकारलेलें.
**कोई** (स्त्री.) कोवी; कोय, आंब्याची बाठी.
**कोईट** (न.) छपर शाकारण्याचें गवत इ.
**कोईल** (स्त्री.) विटीदांडूच्या खेळांत विटी उडविण्यासाठीं खणलेली लहानशी खाच; कोकिळ.
**कोक** (पु.) चक्रवाक पक्षी.
**कोंक** (न.) कुबड; कुबडचा.
**कोंकण** (सं. न.) सह्याद्रि पर्वताच्या पश्चिमेस समुद्राच्या कांठीं जी अरुंद व लांब जमिनीची पट्टी आहे तो प्रदेश.
**कोंकणस्थ** (सं. पु.) कोंकणांत राहणारा; महाराष्ट्रीय ब्राह्मणांतला एक वर्ग.
**कोंकणी** (वि.) कोंकणांतला.
**कोंकणें** (क्रि.) ओरडणें. [ झाड; त्याचें फळ.
**कोकंब** (न.). **कोकंबी** (स्त्री.) अमसुलाचें
**कोकंबेल** (न.) अमसुलाच्या फळाचें तेल;
**कोंकरूं** (न.) शेळीचें पिलूं.
**कोकलणें** (क्रि.) ओरडणें, तक्रार करणें.
**कोकशास्त्र** (न.) कामशास्त्र; स्त्री व पुरुष यांच्या संयोगासंबंधींचें शास्त्र; स्त्री व पुरुष यांचीं लक्षणें, संभोगाचीं आसनें, वशीकरणाचे प्रयोग इ. चें विवेचन करणारा ग्रंथ.
**कोंका** (पु.) कानफाटयाचें तंतुवाद्य; नुकतेंच बाहेर पडलेलें केळफूल.
**कोकिल** (सं. पु.) कोकिळपक्षी.

**कोकिला-व्रत** (सं. न.) स्त्रियांचें एक व्रत.
**कोकी** (स्त्री.) चोंच; चोंचीसारखें निघालेलें टोंक.
**कोकीदार** (वि.) कोकी असलेलें.
**कोको** (इं. पु.) एक प्रकारच्या फळापासून केलेलें पेय.
**कोंक्या** (वि.). कोंकणस्थाविषयीं तिरस्कारार्थी किंवा निंदाव्यंजक शब्द.
**कोंग** (न.) ढोंग, मिष; कुबड.
**कोंग्या** (वि.) ढोंगी.
**कोंगें** (न.) मधाचें पोळें.
**कोच** (पु. न.) बैठकीचा एक प्रकार.
**कोंच** (स्त्री. ना.) टोक लागून पडलेली खळी; टोक, कोकी.
**कोचकी** (प्रा. स्त्री.) पागोटें. [(जागा).
**कोचकील** (वि.) अरुंद, संकुचित, कोंदट
**कोचमन** (इं. पु.) गाडीवान.
**कोचाळें** (न.) वर्तुळ, कोंडाळें.
**कोंचिदा** (पु.) एक वनस्पति.
**कोचें** (प्रा. वि.) चकणा (तुका०३८२२).
**कोंज़ट** (वि.) चिंबलेला; दबलेला; आकुंचित; विनवाऱ्याची अंधेराची कोंडीव (जागा).
**कोंजळी** (प्रा. पु.) ओंजळी.
**कोजळी** (सं. कज्जल स्त्री.) दिव्याची वात जळून गेल्यावर राहिलेला शेष; कोळी. [शु० १५.
**कोजागर, कोजागरी** (स्त्री.) आश्विन
**कोंजा, कोंझा** (वि.) खोलगट डोळयांचा माणूस; तुसडा.
**कोट** (पु.) तट, मजबूत भिंत; इंग्रजी तऱ्हेचा अंगरखा; पत्त्यांच्या खेळांत अंगावर आलेली संपूर्ण हार; सैन्याची विशेष रचना; कोटि.
**कोटकल्याण** (न.) पराकाष्ठेचा लाभ.
**कोटगा** (वि.) कोडगा, निर्लज्ज, निर्ढावलेला.
**कोटंबा** (पु.) बाध्याचें लांकडी भिक्षापात्र.
**कोटर** (सं. न.) झाडांतली ढोली.
**कोटि** (सं. स्त्री.) शंभर लक्षांची संख्या; कल्पना; प्रतिवाद; वर्ग; टोक; अग्र; त्रिकोणाचा लंब; काटकोनाची उभी रेषा; शब्दावरील श्लेष.
**कोटिक्रम** (सं. पु.) युक्तिवाद; पेंच; शक्कल.
**कोटिगा** (वि.) कोडगा.
**कोटीर** (सं. पु.) मुकुट.
**कोटें** (न.) पक्ष्याचें घरटें. [करोडपति.
**कोटचधीश, कोटचाधीश** (सं. पु.)
**कोटचवधि, कोटचावधि** (वि.) कोटींनीं मोजण्यासारखें.
**कोठ** (सं. कोट्ट पु.) किल्ला; तटबंदी.
**कोठडी** (हिं. स्त्री.) खोली.
**कोठनीस** (फा. पु.) कोठीवरचा अंमलदार.
**कोठवळा, कोठावळा** (पु.) कोठीवरचा मनुष्य.
**कोठा** (सं. कोष्ठ पु.) जठर; अंतर्भाग; वखार; कोष्टक; त्यांतलें सदर.
**कोठार, कोठारें** (सं. कोष्ठ न.) वखार, माल सांठविण्याची जागा.
**कोठारी** (पु.) कोठारावरचा मनुष्य.
**कोठी** (सं. कोष्ठ स्त्री.) कोठार, वखार; धान्य किंवा पाणी भरून ठेवण्यासाठीं केलेलें मोठें पात्र.
**कोठून** (अ.) कोणत्या ठिकाणाहून, काळापासून किंवा प्रसंगापासून.
**कोठील** (वि.) कोणत्या समयाचा, स्थलाचा किंवा प्रसंगाचा ?
**कोठें** (सं. कुत्र अ.) कोणत्या ठिकाणीं?
**कोठें कोठें** (अ.) कांहीं कांहीं ठिकाणीं.
**कोड** (न.) कौतुक; आवड; (सं. कुष्ठ न.) कुष्ठरोग; (इं. न.) कायद्याचें पुस्तक.
**कोंड** (पु.) वर्तुळ; एकाच्या ताब्यांतल्या अनेक जमिनी; नदीचा खोल भाग; डोह; गांवकुसू. [गाठ.
**कोंडका** (पु.) लांकडाचा ओंडका किंवा
**कोंडकी** (स्त्री.) बगीच्यांत पाणी साठविण्यासाठीं केलेली खोल जागा; खड्डा; खाचरें. [मार; चाबूक.
**कोडगा** (वि.) निर्लज्ज; (पु.) चोप,
**कोडगेला** (वि.) कांहींसा कोडगा.
**कोंडण** (स्त्री.) कोंडण्याची जागा; गोठा.
**कोंडणें** (क्रि.) अडकविणें, बंद करणें.
**कोडबोळें** (न) कोडोळें; एक खाद्य.

**कोंडमार, कोंडमारा** (पु.) अडवणूक; निरुपाय; अगतिकत्व.
**कोंडवाडा** (पु.) भटक्या गुरांना अडकवून ठेवण्याची जागा.
**कोंडा** (पु.) भुसा; भूस; कोयंडा.
**कोंडाळें** (न.) वर्तुळ.
**कोडिसवाणा** (प्रा. वि.) लहान, मनोहर; स्पष्ट; लज्जित.
**कोडी** (स्त्री.) वीस ही संख्या; उंची किंवा खोली; (पु.) कुष्ठरोगी.
**कोंडी** (स्त्री.) चोहोंकडून बंद व मध्यें खुली अशी जागा.
**कोंडीव** (वि.) अडकावून ठेविलेलें.
**कोडें** (न.) कोटी; कूट, गूढ प्रश्न; (प्रा.) पणर्थी.
**कोंडाळें** (सं. कुंडलि न.) वेटाळें.
**कोंढ** (न.) गांवकुसूं.
**कोंढी** (स्त्री.) मिठागर. [ कोन.
**कोण** (सर्व.) प्रश्नार्थी; (सं. पु.) कोपरा,
**कोणीएक** (प्रा. वि.) अमुक.
**कोत, कोंत** (न.) भाल्याचें लोखंडी अग्रफळ; भाला; शस्त्र (ज्ञा० १३।५३८-३९, रुक्मि० ११।११).
**कोतवाल** (फा. पु.) लोकांच्या संरक्षणार्थ ठेविलेला अधिकारी; फौजदार.
**कोतवालघोडा** मिरवणुकीच्या अग्रभागीं शोभेसाठीं चालविलेला शृंगारलेला घोडा.
**कोतवाली** (स्त्री.) कोतवालाची कचेरी; पोलिसठाणें.
**कोता** (फा. वि.) अपुरता; संकुचित.
**कोताई** (स्त्री.) कमीपणा, संकुचितपणा.
**कोतेकर** (प्रा. पु.) भालेकरी.
**कोथळा** (पु.) पोटाचा कोठा; पिशवी.
**कोथळी** (स्त्री.) लहान कोथळा.
**कोथिंबीर** (सं. स्त्री.) धण्याचें रोप.
**कोंद** (स्त्री.) तीळ परतून, कुटून व साखर घालून केलेलें चूर्ण.
**कोंदट** (वि.) कोंडमाऱ्याची, बंद केलेली.
**कोदंड** (सं. न.) धनुष्य; उद्धट, दांडगा, बेपर्वा; मोठें संकट.
**कोद्रव** (पु.) हलकें धान्य.
**कोंदण** (सं. न.) अलंकारांत हिरे वगैरे जडविण्यासाठीं ठेविलेल्या जागेच्या भोंवतालीं जें सोन्याचें काम केलेलें असतें तें.
**कोंदणें** (क्रि.) कोंबणें; भरून जाणें.
**कोंदा** (पु.) घाण; कष्टाचें काम.
**कोंदाकोंदी** (स्त्री.) दाटी.
**कोंदी** (स्त्री.) कोन; जोड. [११।२५०).
**कोंदाट** (प्रा. स्त्री.) पूर्णता; दाटी (ज्ञा०
**कोंदाटणें** (क्रि.) कोंदणें, गर्दी होणें.
**कोन** (सं. पु.) कोपरा; बाळंत.
**कोनटा** (पु.) नागपुराकडे—कोनाडा.
**कोनडा, कोनाडा** (पु.) भिंतींत पदार्थ ठेवण्याकरितां जी वाटोळी किंवा चौकोनी पोकळी ठेवितात ती.
**कोनसो** (पु.) कोपरा.
**कोना कोपरा** (पु.) एकीकडची सहज लक्षांत न येण्यासारखी जागा; पुढें आलेला भाग.
**कोन्हें** (न.) मधाचें पोळें.
**कोप** (सं. पु.) राग, त्वेष.
**कोप, कोंप, कोपी** (प्रा. स्त्री.) खोपटी.
**कोपट** (वि.) रागीट; (न.) खोपटें; (स्त्री.) झोपडें.
**कोपट** (न.) घरदार (ना० १०२२); शरीर (ज्ञा० १४।२१८).
**कोपणें** (क्रि.) रागावणें.
**कोपर** (सं. कूर्पर न.) भुजा आणि हात यांच्या मधल्या सांध्याचें मागील टोक.
**कोपरखळी** (स्त्री.) कोपराचा प्रहार; कोपरानें उकरलेली जागा.
**कोपरबरास** (इं. कॉपर—ब्रास न.) तांबें व पितळ यांची मिश्रधातु.
**कोपरा** (पु.) कोन; उपदिशा; टोक; (स्त्री.) नागपुराकडे—मोठी परात.
**कोपायमान** (वि.) रागावलेला.
**कोपिष्ठ** (वि.) रागीट.
**कोपी** (स्त्री.) खोपटी; शेतांत बसण्याकरितां केलेलें लहानसें घर, झोपडी.
**कोपीण** (सं. कौपीन स्त्री.) लंगोटी.
**कोंब** (पु.) अंकुर.
**कोंबट** (वि.) किंचित् उष्ण, सोमळ.

**कोंवडसाद** (स्त्री.) कोंबडा आरवण्याची वेळ, पहाट; चंद्राभोंवतीं पडलेलें खळें.
**कोंवडा** (पु.)–डी (स्त्री.)–डें (न.) कुक्कुट, मुरगा–गी–गें.
**कोंबणें** (क्रि.) ठासून भरणें; अंकुर फुटणें.
**कोंबरा, कोंबारा** (पु.) कोंब.
**कोवा** (पु.) चुना, माती, कॉंक्रीट, शेळीच्या लेंड्या इत्यादींचें मिश्रण.
**कोंबा** (पु.) कोंबडा.
**कोवाळ** (पु.) फारसें काम न करणारा मुलगा.
**कोवी** (पोर्तु. कौवी स्त्री.) कोबीचा कांदा.
**कोंभ** (पु.) कोंब, अंकुर.
**कोंभणें** (क्रि.) अंकुर येणें.
**कोंभरा, कोंभारा** (पु.) कोंब.
**कोम** (अर. कौम स्त्री.) जात; भ्रतार.
**कोमजणें** (क्रि.) म्लान होणें.
**कोमट** कोंवट पहा.
**कोमटी** (पु.) वैश्याची एक पोटजात.
**कोमणें, कोमाइणें, कोमायणें** (क्रि.) कोमजणें. [मृदु.
**कोमल** (वि.) कोंवळा, नाजूक, सौम्य,
**कोमलणें** (क्रि.) कोमजणें, म्लान होणें.
**कोमाइलें** (वि.) कोंवळें, नाजूक.
**कोमावणें** (क्रि.) द्रवणें, सद्गदित होणें.
**कोमेजणें** (क्रि.) म्लान होणें.
**कोय** (स्त्री.) दाठा, आंब्यांतील वी. [आड.
**कोयंडा** (पु.) आंकडा; कडी लावण्याची
**कोयता** (पु.) विळा. [एक इंग्रजी औषध.
**कोयनेल** (इं. क्विनीन न.) तापावरचें
**कोयरी** (स्त्री.) चांदीची आंव्याच्या छेदासारखी डवी.
**कोयल, कोयाळ** (न.) कोकिळ; कोयींचें केलेलें मुलांचें एक वाद्य.
**कोयाडें** (न.) आंब्याचें पन्हें. [भाग; द्वेष.
**कोर** (स्त्री.) काठ, रेघ; चतकोर, सूक्ष्म
**कोरक** (न.) कळी; भाजी (ना०पृ.२०८).
**कोरकांडें** (न.) कोरफड.
**कोरकें** (न.) कोरान्न.
**कोरट** (स्त्री.) कच्चें रेशीम.
**कोरंटा** (पु.), **कोरंटी** (स्त्री.) कोऱ्हांटीचें फुलझाड.
**कोरड** (स्त्री.) शुष्कता.
**कोरडणें** (क्रि.) कोरडें पडणें, शुष्क होणें.
**कोरडवट** (स्त्री.) विहीर वगैरे नसल्यामुळें केवळ पावसावर अवलंबून असलेली जमीन.
**कोरडवाहू** (वि.) कोरडवट पहा.
**कोरडा** (वि.) शुष्क; (पु.) चावूक.
**कोरड्यास** (न.) कालवण, तोंडीं लावणें.
**कोरण** (स्त्री.) खोवण; कोरून काढलेला भाग.
**कोरणी** (स्त्री.) कोरण्याचें हत्यार.
**कोरणें** (क्रि.) खोदणें, नकसणें, किरविणें.
**कोरणेल** (इं. कर्नल पु.) इंग्रजी फौजेवरचा एक वडा अम्मलदार.
**कोरफड** (स्त्री.) एक कांटेरी औषधोपयोगी वनस्पति. [करणें.
**कोरबंदी** (स्त्री.) पलटणी रांगेनें उभ्या
**कोरबी** (स्त्री.) झिंगा; एक प्रकारचा मासा.
**कोरबू** (का. पु.) धनगर; बलुतेदार.
**कोरमा** (पु.) एक मांसयुक्त खाद्य.
**कोरव्हाण** (न.) कोऱ्या मडक्याला किंवा कपड्याला येणारा दुर्गंध.
**कोरा** (वि.) न वापरलेला, नवा.
**कोरा करकरीत** (वि.) अगदीं नवा.
**कोरांटा** (सं. कुरंटक पु.), **कोरांटी** (स्त्री.) एक फुलझाड.
**कोरान्न** (न.) कोरडी ( न शिजविलेल्या अन्नाची ) भिक्षा.
**कोराळें** (न.) डोंगरावरील कोरींव लेणें; पर्वताचा कडा; दगड.
**कोरी** (स्त्री.) भिकार जमीन.
**कोरींव** (वि.) कोरलेलें.
**कोर्ट** (इं. न.) कचेरी, न्यायाधीश.
**कोल** (वि.) असमर्थ; (पु.) कर्जाच्या फेडीसाठीं जप्त केलेला माल; (पु.) विटीदांडूच्या किंवा गोट्यांच्या खेळांत लहानसा खळगा खणतात तो.
**कोलकाठी** (स्त्री.) दांडपट्टा.
**कोलणें** (क्रि.) उचकणें; उडविणें; लोटणें, फेंकणें.
**कोलती** (स्त्री.) लहान जळतें लांकूड; कोलीत.

**कोलदं(दां)डा** (पु.) मध्यें दांडा घालून त्याच्याशीं हातपाय जखडून टाकण्याची शिक्षा.
**कोलमडणें** (क्रि.) धडपडून पडणें; पाय मुरगळून, ठेंच लागून किंवा जोराचा धक्का लागून एकाएकीं वांकडेंतिकडें पडणें.
**कोलवाकोलव, कोलाकोल** (स्त्री.) ढकलाढकली, टाळाटाळ.
**कोलांटी** (स्त्री.) एक विशेष प्रकारची उडी.
**कोलावण** (स्त्री.) जहाजावरील जकात.
**कोलाहल** (सं. पु.) कल्ला, गडबड, ओरडा.
**कोलिता** (प्रा. पु.) रक्षणकर्ता.
**कोली** (स्त्री.) लहान खळगा. (कोल पहा).
**कोलीत** कोलती पहा.
**कोलू** (स्त्री.) विटी.
**कोल्हरी** (प्रा. स्त्री.) सोंग, मिष.
**कोल्हा** (पु.) जंबूक, शृगाल; (प्रा.) चोर (ज्ञा० ४।२३).
**कोल्हाट** (प्रा. पु.) कोल्हाट्याचा खेळ.
**कोल्हाटी** (पु.) डोंबारी.
**कोल्हार** (पु.) कुंभार.
**कोल्हाळ** (सं. कोलाहल पु.) कल्लोळा, आक्रोश; (न.) एक खाद्य.
**कोल्हेकुई** (स्त्री.) कोल्ह्यांचा शब्द; धूर्त लोकांची ओरड.
**कोल्हेर** (न.) लाकूड (रं०यो० ८।३१५).
**कोल्हेरी** (स्त्री.) मातीचें चित्र.
**कोल्हेरी वेताळ** (पु.) शेतांतलें बुजगावणें (ज्ञा०११।४६६).
**कोवसा** (प्रा. पु.) आश्रय; कैवारी.
**कोवळणें** (प्रा. क्रि.) आलिंगणें.
**कोंवळा** (सं. कोमल वि.) कोमल, नाजूक; अपक्व.
**कोंवळिक, कोंवळीक** (प्रा. वि.) कोंवळा.
**कोविद** (सं. वि.) (समासांत शेवटीं) विशारद; तज्ज्ञ; हुषार; जसें:—भाषाकोविद.
**कोश** (सं. पु.) आच्छादन, म्यान; खजिना; शब्दसंग्रह; अंतर्भाग; कोसला, रेशमाच्या किड्याचें घर; आत्म्याचें आवरण; कळा.
**कोशा** (पु.) डोक्यास पटक्यासारखें बांधण्याचें रेशमी पांढरें किंवा पिवळें वस्त्र; रेशमी वस्त्र; (वि.) काळसर रंगाची (गाय अथवा बैल).
**कोशागार** (सं. पु.) खजिना.
**कोशाध्यक्ष** (सं. पु.) खजीनदार.
**कोशिंबीर** (स्त्री.) एक प्रकारचें तोंडीं-लावणें; रायतें.
**कोशीस** (फा. स्त्री.) प्रयत्न.
**कोशेटा, कोशेरा** (पु.) कोश, कोसला.
**कोष** कोश पहा. [पत्रक.
**कोष्टक** (सं. न.) घरटें; घर; तक्ता,
**कोष्टा** (प्रा. पु.) कोष्टी, कोळी.
**कोष्ठ** (सं. पु.) पोट, कोठा; धान्याचें कोठार; खोली.
**कोष्ठी** (सं.) विणकरी; साळी. [करणारें.
**कोष्ठबंधक** (सं. वि.) मलाचा अवरोध
**कोस** (सं. क्रोश पु.) योजनाचा चतुर्थांश, सुमारें दोन मैल.
**कोस, कोंस** (पु.) बरोबर चतुष्कोणादि आकृति न होतां वांकडी रेघ गेल्यामुळें येणारा कमजास्तपणा.
**कोसल** (सं. पु.) देशाचें नांव.
**कोसला** (पु.) एक प्रकारचा रेशमाचा किडा; कोशेटा. [करंजी.
**कोसली** (स्त्री.) नागपुराकडे—तिळाची
**कोसळणें** (क्रि.) ढासळून पडणें; विस्कळित होणें; मोडणें; प्रतिकूल होणें.
**कोसेरा** (प्रा. पु.) कोळ्याचें घर.
**कोऽहम्** (सं.पु.) "मी कोण" असा ध्वनि.
**कोहळा, कोहाळा, कोहोळा** (पु.) कूष्मांड; भुरा; गड्डा (एक० ५३६).
**कोहळी** (प्रा.स्त्री.) करंडा (राम० २७।४).
**कोहळें, कोहाळें, कोहोळें** (न.) कोहळा पहा.
**कोळ** (पु.) तिळाची कळी किंवा बोंड (ज्ञा० १३।५८६); चिंच कुसकरलेलें पाणी; गहाण माल; खाडीचा फाटा.
**कोळंगा** (पु.) जळजळीत निखारा.
**कोळंगी** (स्त्री.) काजळी; गूल; ठिणगी.
**कोळणें** (क्रि.) कालविणें; सार काढून घेणें.
**कोळपणी** (स्त्री.), **कोळपणें** (न.) कोळप्यानें उकरणें.

**कोळपें** (न.) गवत वगैरे उपटून काढण्याचें हत्यार; पिकाच्या दोन सरांमधील जमीन भुसभुशीत करण्याचें औत.
**कोळंबें** (स्त्री.) कुंडी.
**कोळवण** (न.) वसईपासून कल्याण-पर्यंतचा कोळी लोकांच्या वस्तीचा प्रदेश.
**कोळवें** (न.) अदपावाचें माप; स्वयंपाकाच्या भांड्याची खोली; बैलाचें वशिंड.
**कोळशी** (स्त्री.) काजळी.
**कोळसा** (पु.) विझलेला निखारा; (न.) ज्याचा फाळ झिजला आहे असा नांगर; (पु.) एक पक्षी. **को० तलें माणिक**—अतिशय काळा मनुष्य.
**कोळसें** (न.) फाळ वसविण्याचा लाकडी ठोकळा.
**कोळष्टक, कोळशीट, कोळिष्टक** (न.) कोळयाच्या जाळयाचे तंतु किंवा जाळें.
**कोळिंदर** (पु.) एक हिंसक पशु.
**कोळी** (पु.) मासे मारून निर्वाह करणारा, धीवर; नावाडी; एक प्रकारचा पोटांतून तंतु काढणारा किडा.
**कोळें** (न.) बैलाच्या पाठीवरचें वशिंड.
**कौटळ, कौटाळ** (सं. कौटिल्य न.) दुसऱ्याच्या नाशासाठीं केलेला जादु-प्रयोग किंवा कपटयुक्ति; गूढ विद्या.
**कौटाळीण** (सं. कुटिल स्त्री.) कुटिल कृत्य करणारी स्त्री.
**कौटिल्य** (सं. न.) वक्रता; कपट; चाणाक्षपणा; (पु.) चाणक्य.
**कौटुंबिक** (वि.) कुटुंबासंबंधीं.
**कौंती** (प्रा. स्त्री.) भाल्यासारखें हत्यार.
**कौतुक** (सं. न.) आश्चर्य; नवल; आनंद; जिज्ञासा.
**कौतूहल** (सं. न.) कौतुक.
**कौपीन** (सं. न.) लंगोटी.
**कौमार** (सं. न.) बालपण.
**कौमुदी** (सं. स्त्री.) चांदणें; व्याकरणग्रंथ.
**कौरव** (सं. पु.) कुरूचे वंशज.
**कौल** (न.) घराच्या छपरावर; आच्छादनासाठीं घातलेलें मातीचें पन्हळ. (अर. पु.) लेखी करार; प्रश्न; साक्ष; देवाची संमति.
**कौलकरार** (अर. पु.) आश्वासन; करार.
**कौलनामा** (फा. पु.) करारपत्र; आश्वासनपत्र.
**कौलार** (न.) कौलें घातलेलें छप्पर.
**कौलारू** (वि.) कौलें घातलेलें.
**कौलिक** (सं. पु.) मांत्रिक; शाक्त; (वि.) वंशपरंपरागत.
**कौली** (स्त्री.) सरकारांतून कौल घेऊन लागवडीस आणलेली जमीन.
**कौलू** (स्त्री.) पानथरी.
**कौशल्य** (सं. न.) कुशलता, चातुर्य.
**कौशेय** (सं. न.) रेशमी वस्त्र.
**कौसल-साल** (न.) गुप्त मसलत.
**कौसाळ** (प्रा. वि.) कुशल.
**कौंसिल** (इं. न.) मंत्रिमंडळ.
**कौंसिलर** (इं. पु.) मंत्री.
**कौसुंभ** (सं. वि.) कुसुंब्याच्या रंगाचें.
**कौस्तुभ** (सं. पु.) चौदा रत्नांपैकीं एक.
**कौळिक** (पु.)कोळी, भिल्ल (भा० १।४२).
**क्यारी** (सं. केदार स्त्री.) फुलझाडांचा ताटवा, वाफा.
**क्रतु** (सं. पु.) यज्ञ.
**क्रंदन** (सं. न.) रडणें.
**क्रम** (सं. पु.) नंबरवारी; व्यवस्था.
**क्रमणें** (सं. न.) जाणें, गमन.
**क्रमणें** (सं. क्रि.) वेळ घालविणें; मरणें.
**क्रमशः** (अ.) क्रमाक्रमानें.
**क्रय** (सं. पु.) विकत घेणें; सौदा.
**क्रयविक्रय** (सं. पु.) देवघेव, व्यापार.
**क्रव्य** (सं. न.) मांस.
**क्रव्याद** (सं. वि.) मांसभक्षक.
**क्रान्त** (सं. वि.) चालून गेलेला; व्याकुळ.
**क्रान्ति** (सं. स्त्री.) उलथापालथ, फेरफार.
**क्रान्तिवृत्त** (सं. न.) ज्या कल्पित वर्तुळावर सूर्याचे किरण लंबरूपानें पडतात, व जें विषुववृत्तास दोन ठिकाणीं छेदून त्याशीं तिर्कस असतें तें.
**क्रिमी** (सं. कृमि पु.) किडा; जंत.
**क्रिकेट** (इं. पु.) चेंडूफळीचा खेळ.
**क्रिया** (सं. स्त्री.) कृति; उत्तरकार्य; शपथ; आणभाक.

क्रियापद (सं. न.) कांहीं क्रिया किंवा स्थिति दाखविणारा शब्द.
क्रियाविशेषण (सं. न.) क्रियेचा किंवा विशेषणाचा गुण दाखविणारा शब्द.
क्रियाशील (सं. वि.) प्रत्यक्ष कार्य करणारा.
क्रीडन (सं. न.) खेळ; विहार.
क्रीडा (सं. स्त्री.) करमणूक, खेळ, लीला.
क्रीडामृग (सं. पु.) करमणुकीसाठीं पाळलेला पशुपक्षी; लाळघोटचा.
क्रीडारोळ (प्रा. पु.) खेळ.
क्रीत (सं. वि.) विकत घेतलेला.
क्रुद्ध (सं. वि.) रागावलेला.
क्रूर (सं. वि.) निर्दय, उग्र, भयंकर.
क्रूस (इं. क्रॉस पु.) खिस्ती धर्मचिन्ह.
क्रेता (सं. वि.) विकत घेणारा.
क्रोड (सं. स्त्री.) कोटि; शंभर लक्ष संख्या.
क्रोडपत्र (सं. न.) पुरवणी.
क्रोडों (वि.) कोटचवधि.
क्रोध (सं. पु.) राग, संताप.
क्रोधणें (क्रि.) रागावणें.
क्रोधायमान (सं. वि.) रागावलेली.
क्रोश (सं. पु.) कोस.
क्रौंच (सं. पु.) एक पक्षी.
क्रौर्य (सं. न.) क्रूरता, निर्दयपणा.
क्लब (इं. पु.) मंडळ; क्रीडागृह.
क्लान्त (सं. वि.) थकलेला.
क्लान्ति (सं. स्त्री.) थकवा, ग्लानि.
क्लास (इं. पु.) वर्ग, दर्जा.
क्लिन्न (सं. वि.) ओलें; माखलेलें.
क्लिष्ट (सं. वि.) ओढूनताणून आणिलेलें; त्रासदायक; दुर्बोध.
क्लीब (सं. वि.) नपुंसक.
क्लेद (सं. पु.) घाम; आर्द्रता, ओलावा.
क्लेश (सं. पु.) कष्ट, दुःख, यातना.
क्वचित् (अ.) कोठें कोठें, केव्हां केव्हां.
क्वाथ (सं. पु.) काढा.
क्वारंटीन (इं. न.) सांसर्गिक सांथीच्या रोगानें दूषित असलेल्या ठिकाणच्या मनुष्यास गांवाबाहेर कांहीं दिवस ठेवण्याची व्यवस्था.

——

## ख

ख मराठी व्यंजनांतील दुसरें व्यंजन.
ख (सं. न.) आकाश, पोकळी. [क्रूर.
खंक, खंख (हिं.वि.) दरिद्री; कृपण; द्वाड;
खंकर (पु.) खड्डा; कृपण.
खकाणा (फा. पु.) केर, धूळ. [काढणें.
खंकारणें (क्रि.) खोकणें, घशांतला कफ
खंकाळणें (क्रि.) खिंकाळणें.
खंक्या (वि.) खणक्या, खणखणीत.
खग (सं. पु.) पक्षी.
खंग (प्रा. पु.) न्यूनता; व्यत्यय.
खंगणें (क्रि.) अशक्त होणें; कमी होणें.
खंगर, खंगार (पु.) पक्की भाजलेली वीट.
खगा (प्रा. पु.) वळवाचा पाऊस. [वाईट.
खंगाळ (वि.) दुर्बळ, क्षीण; नापीक,
खंगाळणें (क्रि.) विसळणें; साफ करणें.
खगेंद्र (सं. पु.) गरुड.
खगोल (सं. पु.) आकाशस्थ गोल.
खग्रास (सं. वि.) पूर्ण ग्रस्त; (पु.) पूर्ण ग्रास, चंद्रसूर्याचा पूर्ण लोप होऊन होणारें ग्रहण; नायनाट. [लय.
खच (पु.) दाटी, गर्दी; रास; (प्रा.)
खच्च, खच्चून (क्रि. वि.) दाटीनें.
खंचणी (स्त्री.) खोबण.
खंचणें (सं. खच् क्रि.) कोंदणें; कमी होणें; गलित होणें; (रत्नें) जडविणें.
खचता पाया (पु.) ऱ्हास, अपकर्ष.
खचर (फा. न.) खेचर पहा.
खचरट (वि.) खडतर, त्रासदायक.
खचरण (स्त्री.) ताडपत्रावर लिहिण्याची लोखंडाची लेखणी; वाईट रस्ता.
खचरा (पु.) सुताराचें खोबण पाडण्याचें हत्यार; खोबण.
खचित (सं. वि.) जडित, बसविलेलें; (अ.) खरोखर, निश्चित.
खचिती (स्त्री.) पक्केपणा.
खचितार्थ (पु.) निर्णय.
खच्ची (वि.) तोडलेला; अंड वडविलेला.
खंज (सं. वि.) लंगडा.
खंजन (सं. पु.) ताजवापक्षी.
खजानची (अर. पु.) खजिनदार.

नगर वाचनालय, सातारा

**खजाना** (फा. पु.) खजीना.
**खजाळ** (वि.) भांडखोर, व्रात्य.
**खजाळी** (स्त्री.) खोडी, चेष्टा.
**खजिना** (पु.) खजीना पहा. [ लहान डफ.
**खंजिरी** (फा. स्त्री.) घुंगुर लाविलेला
**खजीनदार** (फा. पु.) खजिन्यावरचा मुख्य अधिकारी; कोशाध्यक्ष.
**खजीना** (फा. पु.) कोशागार; भांडार.
**खंजीर** (फा. पु.) कट्यारीसारखें एक शस्त्र.
**खजील** (अर. वि.) लज्जित, ओशाळा.
**खजुरा** (पु.) अनेक पदरांचा दोरा.
**खजुरी** (सं. खर्जूर स्त्री.) खजुराचें झाड.
**खजूर** (सं. खर्जूर पु.) खजुरीचें फळ.
**खट** (सं. शठ वि.) खट्याळ, खोडकर, द्वाड, खोटें; एक राग.
**खट** (सं. क्षत न.) व्रण; (पु.) एका रोगाचें नांव; (स्त्री.) केर, कचरा; (वि.) दुर्जन.
**खटकन्** (अ.) चटकन्.
**खटका** (हिं. पु.) खट् असा मोठा आवाज; भांडण; अडकवण; शंका.
**खटकूळ** (न.) कर्ज किंवा सारा न देणारें कूळ.
**खटखट** (स्त्री.) त्रास, यातायात; भांडण; किरकिर.
**खटणें** (क्रि.) थांवणें; रुसून वसणें.
**खटनट** (वि.) वाईट साईट, दुष्ट; (स्त्री.) त्रास, कटकट.
**खटपट** (स्त्री.) मेहनत, त्रास; यत्न.
**खटपटणें** (क्रि.) भांडणें.
**खटपट्या** (वि.) आचाऱ्याच्या हाताखालचा बारीकसारीक कामें करणारा; मेहनती; उलाढाली करणारा.
**खटमल** (पु.) ढेकूण.
**खटरक** (न.) लचांड, लफडें; झेंगट, शुक्लकाष्ठ.
**खटराग** (पु.) लचांड, त्रास; लटांबर.
**खटला** (पु.), **खटलें** (न.) भांडण, कज्जा; कुटुंब, परिवार वगैरे; कामधंदा; भानगड.
**खटलेवाईक** (वि.) कुटुंबवत्सल.
**खटवें** (न.) पायांतलें एक भूषण; जोडव्याची अडवण.
**खटाई** (हिं. स्त्री.) आंवटपणा.
**खटाटोप** (हिं. पु.) पसारा; दांभिकता; अवडंवर; उलाढाल. [जाळपोळ करणें.
**खटारणें** (क्रि.) मरणें; उध्वस्त करणें,
**खटारा** (पु.) अवजड काम; वैलगाडा; सांगाडा; कवच (रुक्मिणी० १२।२७).
**खटास** (हिं. स्त्री.) आंवटपणा.
**खटाळणें** (क्रि.) पुढें ढकलणें.
**खट्याळ** (वि.) द्वाड, उपद्व्यापी.
**खटी** (वि.) खाष्ट, द्वाड.
**खटू** (न.) खटवें पहा.
**खटेली** (पु.) जमिनीचा मालक.
**खटंग** (न.) खाटलें, वाज.
**खटांबा** (पु.) आंवट आंवा.
**खट्टा** (हिं. वि.) आंवट; (पु.) कमरेचा सांधा.
**खट्टू** (हिं. वि.) निरुत्साह.
**खट्याळ** (वि.) द्वाड, हट्टी.
**खट्वा** (सं. स्त्री.) खाट, वाज.
**खट्वांग** (सं. न.) शिवाचें आयुध.
**खंड** (सं. पु.) तुकडा, भाग; दंड; मक्ता; ठराव; करारानें ठरलेली रक्कम; खळ, विराम; (न.) अनेक देशांचा समुच्चय.
**खंडगुन्हेगारी** (स्त्री.) खटल्यांत हरलेल्या पक्षाकडून सरकारांत घेण्यांत येणारा दंड.
**खड** (स्त्री.) कोंवळें गवत; वैरण.
**खडक** (पु.) पथ्थराची जमीन, दगड; (वि.) पूर्णपणें वाळलेला, खडखडीत.
**खडकणें** (क्रि.) वाळून ताठ होणें; थांवणें.
**खडकपात्र** (न.) मुलाम्याची वांगडी.
**खडकावणें** (क्रि.) खरड काढणें, रागावून बोलणें.
**खडकाळ, खडकाळी** (वि.) पाषाणमय.
**खडक्या** (वि.) निर्भीड.
**खडकील, खडकूत, खडकूळ** (वि.) खडकाळ.
**खडकुती** (प्रा. स्त्री.) सूर्याच्या प्रखर तापानें शेत जळून जाणें (दा० ३।७।४२).
**खंडकुली** (प्रा. स्त्री.) जलाशय.
**खडखडणें** (क्रि.) वाजणें.

**खडखडविणें** (क्रि.) खरडपट्टी काढणें; खडखड वाजविणें. [अभाव.
**खडखडाट** (पु.) मोठा आवाज; अत्यंत
**खडखडीत** (वि.) शुष्क; स्पष्ट; टणक.
**खडगळ, खडगूळ** (वि.) खडकाळ.
**खडंग** (वि.) पुरें वाळलेलें.
**खडंजा** (पु.) उभ्या विटेचा थर.
**खडण** (प्रा. वि.) वांझ किंवा नाठाळ.
**खंडण** (सं. न.) खोडून काढणें; निरुत्तर करणें; थांबविणें.
**खंडणी** (सं. खंड स्त्री.) कर, वसूल; मांडलिक राजापासून सम्राटास मिळणारें ठराविक द्रव्य.
**खंडणें** (क्रि.) फेडणें.
**खडतर** (वि.) कठिण, त्रासदायक; उग्र.
**खडतरणें** (क्रि.) भेदणें, खोचणें.
**खंडन** खंडण पहा. [पोळयांची रास.
**खडप** (पु.) खडकाचा थर, खडक;
**खडपा** (पु.) कडा, सुळका.
**खडबड** (स्त्री.) आवाज, गडबड, अडगळ.
**खडबडखुंटा** (पु.) अत्यंत अभाव.
**खडबडणें** (क्रि.) घाबरणें; आवाज करणें.
**खडबडाट** (पु.) गोंधळ; मोठा आवाज.
**खडबडीत** (वि.) उखीर-वाखीर.
**खंडमेरु** (सं. पु.) कमी कमी होणारी रास.
**खडवण** (न.) खडकाळ जमीन; उंच कडा; खडे.
**खडवा** (प्रा. पु.) पर्वत.
**खंडविखंड** (सं. पु.) तुकडे तुकडे. [पर्जन्य.
**खंडवृष्टि** (सं. स्त्री.) मधून मधून पडणारा
**खडवें** (न.) डोंगरावरची नागमोडी वाट.
**खडसणी** (स्त्री.) तोडणें; खरडपट्टी.
**खडसणें** (क्रि.) छाटणें; खडकावून बोलणें.
**खडसर** (वि.) खडकाळ.
**खडसा** (पु.) नांगराचें अग्र.
**खडसावणें** (क्रि.) ताकीद देणें.
**खडळ** (पु.) खडा (ज्ञा० १३।३३६).
**खडा** (सं. खंड पु.) बारीक दगड, लहानसें रत्न; (हि. वि.) उभा. **खडे चारणें**–हालअपेष्टा भोगावयास लावणें. **एखाद्याच्या नांवानें खडे फोडणें**!– त्याला शिव्याशाप देणें.
**खंडा** (सं. खड्ग पु.) दुधारी तलवार.
**खंडाईत** (पु.) खड्गधारी.
**खडाखड** (अ.) जोरानें, स्पष्टपणानें.
**खडाचढ** (स्त्री.) पानथरी; पोटांत विष्ठेचा खडा जमून होणारें दुःख (दा० ३।६२).
**खडाजंगी** (स्त्री.) जोराचें भांडण.
**खडाडता** (प्रा. स्त्री.) क्षोभ.
**खडाण** (स्त्री.) लाथा मारणारें जनावर; (वि.) चटपट उरकणारें, चपळ.
**खडानखडा माहिती** बारीकसारीक गोष्टींची देखील माहिती.
**खडाना** (वि.) खोडकर (हरि० १३।१६).
**खडावा, खडव** (स्त्री.) लाकडी पादुका.
**खडाष्टक** (सं. षडाष्टक न.) ज्योतिषांत– एका माणसाच्या राशीपासून दुसऱ्याची रास सहावी व दुसऱ्याच्या राशीपासून पहिल्याची रास आठवी असणें; वैरभाव, शत्रुत्व.
**खडाळ** (वि.) खड्यांनीं भरलेली, धोंडाळ.
**खंडारवाणी–खंडारी** (स्त्री.) एक गायनपद्धति.
**खंडाळी** (स्त्री.) उपद्रव, सतावणूक, गांजणूक; चिडवणूक. [केलेलें.
**खंडित** (सं. वि.) भंगलेलें; निरुत्तर
**खडिया** (पु.) उंसाची एक जात.
**खडी** (सं. खटी स्त्री.) बारीक खड्यांचा समुदाय; एक चपळ जीव; पांढरी माती; एक चिकट रंग.
**खंडी** (स्त्री.) वीस मणांचें एक माप किंवा वजन; वीस ही संख्या.
**खडी चाकरी** (स्त्री.) जींत विश्रांति नाहीं अशी चाकरी. [उभें राहणें.
**खडी ताजीम** (अर. स्त्री.) सत्कारार्थ
**खडी दुपार** (स्त्री.) ऐन मध्यान्ह काळ.
**खंडीवारी** (अ.) खंडीनें मोजण्याइतकी पुष्कळ. [साखर.
**खडीसाखर** (स्त्री.) मिश्री; खडे जमलेली
**खडु** (प्रा. वि.) गढूळ.
**खडुलें** (न.) गढूळ पाणी; गाळ.
**खडुवा** (प्रा. पु.) पर्वत.
**खडू** (पु.) शाडू; पांढरी माती.
**खडें** (प्रा. न.) वस्त्र (ना० ८७).

**खडेघाट** (पु.) नदीवरील कपडे धुण्याचा घाट.
**खडे जंगी** (फा. स्त्री.) जोराचें भांडण.
**खडेफोड** (वि.) कठिण, त्रासदायक (काम).
**खडेबंद** (पु.) रोजखर्डा.
**खंडेराव** (पु.) शंकराचा अवतार, जेजुरीचा खंडोबा; मुद्दाम घोड्यावर बसविलेला मनुष्य.
**खंडेश्वरी** (स्त्री.) तलवार. [ इतकें.
**खंडोगणती** (अ.) खंडीनें मोजतां येण्या-
**खड्ग** (सं. न.) तलवार.
**खड्डा** (सं. खन् पु.) खाच. [ वनस्पति.
**खड्यानाग** (पु.) वचनागासारखी एक
**खण** (पु.) पेटी वगैरेचा कप्पा; एकोणीस तसू लांबीचा चोळी शिवण्यासाठीं कापडाचा तुकडा; इमारतीच्या दोन खांबांतली जागा; पांच सुगडांचा समुदाय.
**खणकत** (स्त्री.) कुलकथा.
**खणकरी** (पु.) खणण्याचें काम करणारा.
**खणका** (पु.) खण् असा मोठा आवाज; आवेशाचें भांडण; खणखणाट; गर्जना.
**खणकावणें** (क्रि.) दरडावणें, रागानें बोलणें. [ लागणें.
**खणकुदळ** (स्त्री.) एकसारखें पाठीस
**खणक्या** (वि.) दांडगा, उत्साही, खणखणीत.
**खणखणाट** (पु.) मोठा खणखण आवाज.
**खणखणीत** (वि.) स्पष्ट.
**खणणें** (क्रि.) खोदणें.
**खणती** (स्त्री.) खणणें; सतत व्यासंग.
**खणतें** (न.) जमिनींत भोंक पाडण्याचें हत्यार; खुंटाळी.
**खणपट** (स्त्री.) पिच्छा.
**खणपटीस बसणें** पिच्छा पुरविणें.
**खणपटें** (न.) लाकडाची कुदळ.
**खणपूट, खणपूस** (न.) टोक, खिळा.
**खणाणणें** (क्रि.) खण्खण् वाजणें.
**खणाळें** (न.) कापडाच्या पुष्कळ खणांचा सलंग समुदाय. [ निबर.
**खणुबाळ** (प्रा. वि.) खरबडीत, कठिण;
**खणेरें** (न.) खणाळें पहा.

**खंत** (स्त्री.) खेद, खिन्नता; उत्कंठा; किळस; चीड.
**खत** (अर.न.) चिठ्ठी; रोखा, दस्तऐवज; हजामत न करतां राखलेले केस; शेताला घालावयाचें खत, कार, राब इ.
**खत** (सं. क्षत न.) व्रण.
**खतखतणें** (क्रि.) शिजतांना खदखद आवाज होणें; उत्कंठित होणें.
**खतखुत** (प्रा. न.) खतपत्रें.
**खतणें** (प्रा. क्रि.) मलिन होणें (सोहि० सिद्धान्त०); सांचणें (भा० ११।५९०).
**खतम्** (अर. वि.) समाप्त.
**खतरा, खत्रा** (सं. क्षिति पु.) भय; शंका.
**खतलें** (प्रा. वि.) धरणघेऊ.
**खतबड** (न.) उकिरडा.
**खता, खत्ता** (अर. स्त्री.) भयाविषयींची आशंका; दुःख; नुकसान; दोष; अपराध.
**खताबणी** (स्त्री.) रोजखर्डयावरील पक्क्या रकमा खातेवारीं लिहिण्याची वही; सुताराचें एक हत्यार.
**खंती** (स्त्री.) खंत पहा.
**खतीब** (अर. पु.) वक्ता; धर्मप्रचारक.
**खतीबी** (अर. स्त्री.) धर्मोपदेशकाचें काम.
**खतेलें** (प्रा. वि.) व्याप्त, भरलेलें.
**खत्ता** (पु.) अफू, तुरटी, लिंबाचा रस इ० चें केलेलें डोळ्याचें औषध; भयाविषयींची आशंका; नुकसान.
**खत्रा** खतरा पहा. [ नांव.
**खत्री** (सं. क्षत्रिय पु.) एका जातीचें
**खंदक** (सं. खन् पु.) किल्ल्याच्या भोंवतालचा चर; खाई.
**खदखदणें** (क्रि.) उकळणें, शिजणें.
**खदखद** (अ.) मोठ्यानें.
**खंदणें** (प्रा. क्रि.) अवमानणें.
**खंदस्त** (फा. वि.) खंदा पहा.
**खंदस्ती** (प्रा. स्त्री.) द्वेष; (वि.) दांडगा.
**खंदा** (फा. वि.) पाणीदार; चपळ; क्रूर; खोडसाळ.
**खंदारी** (वि.) कंदाहाराचा उत्तम (घोडा).
**खदिर** (सं. पु.) खैराचें झाड.
**खंदील, कंदील** (अर.) कंदील.

खंदोस (पु.) द्वेष, वैरभाव, मत्सरयुक्त स्पर्धा.
खद्योत (सं. पु.) काजवा.
खनन (सं. न.) खणणें.
खनाळ (प्रा. न.) एकांत स्थळ.
खनि (सं. स्त्री.) खाण.
खनिज (पु.) खाणींतील पदार्थ; (वि.) खाणींत असलेला.
खप (पु.) विक्री; खर्च; मेहनत.
खपक्या (वि.) खमक्या; जोरदार, उत्साही.
खपट (न.) खवला; डोळ्यावरचें कातडें किंवा पडदा. [ मरणें; मेहनत करणें.
खपणें (क्रि.) विकलें जाणें; संपणें;
खपती (वि.) चिकट, दीर्घोद्योगी; चपळ, हुशार, उत्साही; चिडखोर; वेडा.
खपरी (स्त्री.) ढलपी; ठिकरी.
खपरेल (न.) चपटें कौल; कौलारू घर.
खपला (पु.), खपली (स्त्री.) खरपुडी, पापुद्रा; खवला. [ खपला.
खपली (स्त्री.) लहान किंवा पातळ
खपला काढणें (क्रि.) विझालेलें भांडण मुद्दाम उकरून काढणें.
खपवा (फा. पु.) बाहीचें मागील तोंड.
खपा (फा. ख़फा वि.) नाराज.
खपाट (सं. कपाट न.) रिकामें पोट; खबदड, पोकळ जागा. **खपाटीस बसणें**–पिच्छा पुरविणें.
खपुष्प (सं. न.) आकाशाचें पुष्प; अविद्यमान किंवा अशक्य गोष्ट.
खप्पड (वि.) गाल बसलेला, सुरकुत्या पडलेला, चिवलेला.
खप्पा खपा पहा.
खप्पी (वि.) पक्का; उत्साही; धूर्त.
खबदड, खबदाड (न.), खबदडी (स्त्री.) खळगी; दरा; मोठें भोंक.
खबर (अर. स्त्री.) बातमी; माहिती; गप्प. **ख०घेणें**–शिक्षा करणें, मारणें.
खबरदार (फा. वि.) सावध; निष्णात, हुशार; संपन्न; मजबूत; (अ.) ध्यानांत धर. [ दृढता; निश्चय.
खबरदारी (स्त्री.) सावधगिरी; हुशारी;
खबरबात (फा. हिं. स्त्री.) बातमी.
खबळ (स्त्री.) खोल दरी.
खंबाइत (प्रा. न.) उंची वस्त्र.
खबाल्या (वि.) बडबड्या; खादाड.
खंबावती (पु.) एक राग.
खंबाळ, खंबाळें (प्रा. न.) उंची वस्त्र.
खंबीर (प्रा. ना.) आश्रय, बळकट जागा (दा० २०।७।१८); (वि.) बळकट; निश्चयी, पक्का. **खं० खुंट**–पक्का.
खबूतर (फा. कबूतर न.) कबूतर, पारवा.
खबूतरखाना (फा. पु.) खबुतरें ठेवण्याची जागा.
खवेड (वि.) हट्टी, दांडगा, खडतर.
खब्बू (वि.) म्हातारा.
खमखमीत, खमंग (वि.) मसालेदार.
खमखविणें (क्रि.) दरडावून सांगणें; कानउघाडणी करणें; आवळणें.
खमक्या (वि.) पक्का, जोरदार; तल्लख.
खमखम (स्त्री.) खुमखूम. [ झणझणीत.
खमंग (वि.) स्वादिष्ट, रुचकर; खप्पी;
खमस (अर. वि.) पांच.
खमसीन-सैन (अर. वि.) पन्नास; मिसर देशांत वाहणारा उष्ण वारा.
खमाज (हिं. पु.) गायनांतल्या एका रागाचें नांव.
खमीर (अर. न.) आंबवण, फुगवण, मंड; (अर. पु.) अंतःकरणाच्या क्षोभाचें कारण.
खमीस (पो. कॅमिसा न.) कमीज, शर्ट.
खय (स्त्री.) रग, गर्व, ताठा.
खर (सं. पु.) गाढव, गधडा; रेव, रेती; चुरा; (सं. क्षर स्त्री.) लववीवाटे जाणारी धातु; (वि.) तीक्ष्ण; दाट; उभा.
खरकटणें (क्रि.) रेघोट्या ओढणें; जाडें-भरडें वांटणें. [ उष्टें; अर्धवट झालेलें.
खरकटें (न.) निर्लेप'नसलेलें अन्न; (वि.)
खरकणें (क्रि.) घसरणें; जोरानें खालीं जाणें; तोंड म्लान होणें; कमी होणें.
खरखटणें (प्रा. क्रि.) मलिन होणें.
खरकन् (अ.) एकदम, चटकन्.
खरखरमुंडा-ढा (पु.) मुसलमान भिक्षेकऱ्यांचा एक वर्ग; दरिद्री.

**खरखरा** (प्रा. स्त्री.) काळजी (रामजोशी पृ० १०); राग, कुरकुर; तृष्णा; खाज; कफ.
**खरखरीत** (वि.) खडबडीत; शुष्क.
**खरखा** (पु.) अंग शुष्क किंवा खरखरीत झाल्यानें किंवा त्यास भेगा पडल्यानें सुटणारी कंड.
**खरग** (न.) शेतांत पिकांमध्यें पडलेलें ठिगळ.
**खरगोश** (फार. पु.) ससा.
**खरचणें** (क्रि.) खर्च होणें; वेचणें.
**खरचटणें** (क्रि.) घसटणें, खरडलें जाणें.
**खरज** (सं. पु.) गायनांत—नीच स्वर; घोगरा आवाज.
**खरट** (पु.) खडी; क्षत, व्रण.
**खरंटा** (पु.) खराटा.
**खरड** (स्त्री.) विरखुड्या, रेखोट्या; खरडून काढलेला भाग; जोराची निर्भर्त्सना.
**खरडपट्टी** (स्त्री.) दटावणी, चापणें.
**खरडा** (पु.) खरडून काढलेला भाग; गिच-मीड लिहिलेला किंवा डाग पडलेला लेख, मसुदा.
**खरप** (स्त्री.) काजळ, भांड्याची जळ, मस.
**खरपड** (स्त्री.) दुष्काळ.
**खरपणें** (क्रि.) खरवडणें.
**खरपा** (पु.) बारीक सूत ओढण्याची पट्टी.
**खरपुट** (न.) जनावराच्या पायाचा खूर.
**खरपुडी, खरपुळी** (स्त्री.) खपली, पापुद्रा.
**खरपूस** (वि.) चांगलें भाजलेलें, खमंग; सणसणीत; निर्भीडपणाचें.
**खरपें** (प्रा. न.) रुक्षपण, नीरसता (ज्ञा० ६।४९०); मातीचें ढेंकूळ.
**खरबरीत** (वि.) भसाडें, खडबडीत.
**खरबुजी** (स्त्री.) खरबुजाचा वेल. **खरबुजी चेहरा**—देवीच्या वणांनीं कुरूप झालेला चेहरा.
**खरबूज** (प्रा. न.) एका फळाचें नांव.
**खरमरा** (प्रा. वि.) प्रखर; हुशार.
**खरमरीत** (वि.) तीक्ष्ण, झणझणीत; आवेशयुक्त; निर्भीड.
**खरवट** (वि.) खडबडीत.

९

**खरवड** (स्त्री.) तापविलेल्या दुधाची खरपुडी; खरवडून काढलेला भाग; दुष्ट स्वभावाचा मनुष्य.
**खरवडणें** (क्रि.) घासून किंवा तासून काढणें; निरपणें.
**खरवस** (पु. स्त्री.) कोंवळें दूध तापवून त्यांत साखर वगैरे घालून केलेलें खाद्य.
**खरविखर** (वि.) उंच-सखल.
**खरस** (प्रा. पु.) मळ, चिकटा (रुक्मि० ११।५५); खरवस.
**खरसिंग** (न.) शिंगाचें एक वाद्य.
**खरळखोचर** (प्रा. पु.) छिद्र, दोष.
**खरळा** (पु.) बोथट व जाड धारेचा विळा.
**खरा** (वि.) सत्य, अस्सल, शुद्ध; बरोबर; पूर्ण; कायम. [ गंधाचा रवा.
**खरा** (प्रा. पु.) खडा (ज्ञा० १४।१२८);
**खराखुरा** (वि.) अस्सल.
**खराट** (वि.) नापीक; पर्णहीन, शुष्क.
**खराटा** (पु.) हिरांची केरसुणी, झाडू.
**खरांटा** (प्रा.पु.) तोटा, तूट (ज्ञा० ५।११२).
**खराटें** (प्रा. न.) गुरांच्या पायांनीं झालेला चिखल.
**खराणा** (वि.) उष्ण.
**खराब** (अर. वि.) वाईट; ओस पडलेली.
**खराबा** (पु.) नासाडी, नुकसान.
**खराबी** (स्त्री.) नासाडी. [ साधन.
**खरारा** (फा. पु.) घोडा खाजविण्याचें
**खराळ** (पु.), **खराळी** (स्त्री.) कोयता.
**खरीद** (फा. वि.) विकत घेतलेला.
**खरीददार** (पु.) विकत घेणारा.
**खरीदी** (फा. स्त्री.) विकत घेणें, क्रय.
**खरीप** (प्रा. स्त्री.) पडीत जमिनीची शुद्धि.
**खरीप, खरीफ** (अर. पु.) पूर्व धान्यें; पावसाळ्यांतलें पीक.
**खरूज** (सं. खर्ज् स्त्री.) त्वचेचा एक रोग.
**खरें** (प्रा. न.) जीभकांटें नांवाचा रोग.
**खरेदी** खरीद पहा. [ निःसंशय.
**खरोखर** (अ.) वस्तुतः; निश्चयेंकरून,
**खर्ग** (सं. खड्ग न.) खड्ग, तलवार.
**खर्च** (फा. पु.) व्यय.
**खर्चवेंच** (पु.) खर्च वगैरे.
**खर्ची** (स्त्री.) खर्चासाठीं घेतलेली रक्कम.

**खर्ची पडणें** (क्रि.) कामास येणें.
**खर्चीक** (वि.) सढळ हातानें खर्च करणारा.
**खर्ज** (पु.) गाण्यांतल्या एका सुराचें नांव; षड्ज.
**खर्जूर** (सं. पु.) खजुराचें झाड; त्याचें फळ.
**खर्पर** (सं. पु.) खापर.
**खर्व** (वि.) ठेंगणा; (न.) दहा अब्जांची संख्या; खिसमिसासारखा रंग.
**खल** (सं. पु.) दुष्ट माणूस.
**खल** (पु.) चूर्ण करण्याचें पात्र; चूर्ण करणें; चर्चा. [ ११।१।१८).
**खलक** (हिं. पु.) कारस्थानी लोक (दा.
**खलक-दुनिया** (अर. फा. स्त्री.) सारें जग.
**खलखला** (प्रा. वि.) त्रासलेला.
**खलणें** (क्रि.) घोटणें.
**खलबत** (फा. न.) दुसऱ्याशीं एकांतीं केलेला विचार; मसलत.
**खलबत्ता** (पु.) उखळी आणि लहान दस्ता.
**खलम** (फा. स्त्री.) कुरापत.
**खलश** (फा. पु.) खंड.
**खलाशी** (अर. पु.) गलबतावरील नोकर, नावाडी; मजूर; तोफखान्यांतला नोकर.
**खलास** (अर. वि.) समाप्त.
**खलिता** (अर. पु.) पत्र, थैली.
**खलिपा** (अर. पु.) वस्ताद; ज्ञानी; महंमद पैगंबराच्या पदावर आरूढ होणारा.
**खली** (स्त्री.) ढेप. [ सीतास्व. ६।१६).
**खलीन** (प्रा. पु.) लगाम (विठ्ठल०
**खलेती** (प्रा. स्त्री.) अर्ज घालण्यासाठीं केलेली रेशमी पिशवी (तुका. ४३५४).
**खलेल** (प्रा.वि.) उद्दाम, उमट; भांडखोर; हट्टी.
**खल्लक** (वि.) निष्कांचन, दरिद्री; कृश.
**खल्लाळ** (प्रा. पु.) खळखळ वाहणारा प्रवाह (ना० पृ० ५५९).
**खल्ली** (स्त्री.) ढेप.
**खल्वाट** (पु.) टकल्या.
**खवखव** (स्त्री.) खाज, मस्ती; प्रबळ इच्छा.
**खवखवणें** (क्रि.) आग होणें; खाज सुटणें; प्रबळ इच्छा होणें; डंवचणें.
**खवचट, खऊट, खवट, खंवट** (वि.) नासकें; दुर्गंधयुक्त. ख० खोबरें—तुसडा प्रबळ माणूस.
**खवटेल** (वि.) खवट. [ चहाडखोरी.
**खवडव, खवदव** (स्त्री.) खोडया, उपद्रव;
**खवडा** (सं. स्फुट पु.) डोक्यांतला फोड. ख० काढणें, जिरविणें, किंवा उडविणें—रग जिरविणें, खरड काढणें.
**खंवडाळणें** (क्रि.) भांडण काढणें, चिडविणें.
**खंवडाळी** (स्त्री.) खोडी; चीड; त्रास.
**खवण** (न.) आकाश (अमृ. ६।५९); पडसाद.
**खवणलें** (न.) कोड; उत्कंठा.
**खवणा** (पु.), **खवणी** (स्त्री.) खवण्याचें हत्यार.
**खवणा** (सं. क्षपणक पु.) जैन यति.
**खवणी** (प्रा. पु.) माकड; आकाश.
**खवणें** (प्रा.क्रि.) लागणें, खवखवणें; खरवडून आंतला गीर काढणें.
**खवंद, खवंदल** (प्रा. न.) क्षत.
**खवदव** (स्त्री.) त्रास, काळजी, श्रम.
**खवदवणें** (क्रि.) गडबड करणें.
**खवदळणें** (क्रि.) ढवळणें; क्षुब्ध होणें; रागावणें. [ शोकीन.
**खवय्या** (हिं. पु.) चमचमीत खाद्यांचा
**खवला** (पु.) कवची; डाग.
**खवळ, खवळी** (स्त्री.) भेग, चीर.
**खवळणें** (क्रि.) क्षुब्ध होणें, रागावणें.
**खवा** (पु.) दूध आटवून तयार होणारा घट्ट पदार्थ, मावा.
**खवा** (पु.), **खवाट** (न.), **खवाटा** (पु.) खांद्याचा व हाताचा संधि; खांदा.
**खवाशी—सा** (स्त्री. पु.) हत्तीवरील अंबारी किंवा हौदा यांच्या मागें मानकरी बसण्याची जागा.
**खवास** (पु.) हुजऱ्या, नोकर, खिजमतगार.
**खवासखाना** (फा. पु.) हत्तीवर अंबारीच्या मागें खिजमतगाराची बसण्याची जागा. [ पिशाच्च; दुष्ट मनुष्य.
**खवीस** (अर. पु.) मेलेल्या मुसलमानाचें
**खस** (पु.) खच, ढीग, रास; विपुलता; वाळा; वाळयाचें अत्तर.

**खसका** (पु.) जोराचा रट्टा, तडाखा.
**खसखशीत** (वि.) स्पष्ट, निर्भीड, निश्चित.
**खसखस** (स्त्री.) अफचें बीं. **खसखस पिकणें**—मोठ्यानें व पुष्कळ हंसणें.
**खसालत** (अर. पु.) उग्र स्वभाव.
**खसासित** (प्रा. वि.) कठोर, त्रासदायक.
**खस्त** (फा. वि.) भरलेलें; कापलें गेलेलें; (न. ) घाण; नाश; (पु.) चूर (मुक्ते० रामा. ४।३१) [ चिता.
**खस्ता** (सं. कष्ट अनेक व.) कष्ट, त्रास,
**खस्तावस्त** (प्रा. स्त्री.) ओढाताण.
**खस्वस्तिक** (सं. न.) आपल्या थेट डोक्यावरचा आकाशांतला बिंदु.
**खळ** (स्त्री.) चिकट पेज; खंड; (सं.खल पु.) दुष्ट मनुष्य. [ अंगण,उघडी जागा.
**खळ** (पु.) नाद, छंद (तुका. २५७१);
**खळका** (पु.) काचेच्या बांगड्यांचे तुकडे; पाण्याच्या प्रवाहाचा नाद; भांडण.
**खळखळ** (स्त्री.) खळ् असा आवाज; यातायात, त्रास, कष्ट; आढेवेढे.
**खळखळणें** (क्रि.) जोरानें धांवणें; आवाज करणें.
**खळखळाट** (पु.) मोठा खळखळ आवाज; गडबड. [स्वच्छ.
**खळखळीत** (वि.) आवाजदार; शुष्क;
**खळगा** (पु.) लहान खड्डा, खोलगा, डबरा; बांगडीचा तुकडा.
**खळगी** (स्त्री.) लहान खळगा.
**खळगें** (प्रा. वि.) लहान.
**खळणें** (सं. स्खल् क्रि.) थांबणें, खळ पडणें; खळ लावणें.
**खळबळणें** (क्रि.) धुण्यासाठीं पाण्यांत जोरानें हालविणें; क्षुब्ध करणें, उत्तेजित करणें. [ धुमश्चक्री.
**खळबळा, खळबळाट** (पु.) गडबड;
**खळबळीत** (वि.) मोकळें, अनियंत्रित.
**खळभट** (पु.) चिकट व फार त्रास देणारा मनुष्य; धान्याच्या खळयावर भिक्षा मागून निर्वाह करणारा ब्राह्मण.
**खळमळ** (पु.) घाण.
**खळव** (पु.) खंड; खळ.
**खळवट** (स्त्री.) शेतमाल तयार होऊन खळें लागून धान्याच्या राशि पडण्याचा काळ.
**खळवटणें** (क्रि.) सर्व भागांतून खरडून काढणें; गोळा करणें; शोधून काढणें.
**खळवळ** (न.) खळयांत पसरलेलें धान्य.
**खळवाद** (पु.) रिकामटेकडा वाद.
**खळाळ** (पु.) घोष, मोठा ध्वनि; मोठा प्रवाह; (वि.) खळखळाट करणारा.
**खळाळणें** (क्रि.) गर्जना करणें.
**खळाळी** (स्त्री.) पाण्याच्या लाटा दगडावर आपटून होणारा खळखळ आवाज.
**खळी** (सं. स्खल स्त्री.) खळगी; (प्रा.स्त्री.) तुरटी; चिकट पदार्थ.
**खळें** (सं. स्खल न.) सूर्य-चंद्राभोंवतालीं कधीं कधीं दिसणारें चित्रविचित्र रंगांचें मंडळ; अंगण; धान्याची मळणी करण्याची जागा; झोंबी.
**खळेंतळवें** (न.) खळयांत सांडलेलें किंवा तळाशीं राहिलेलें धान्य.
**खाइरा** (प्रा. वि.) खाणारा. [ चर.
**खाइ** (स्त्री.) पेटलेली चिता; छाया; खाच,
**खाईश** (फा. पु.) इच्छा.
**खाऊ** (सं. खाद्य पु.) खाण्याची गोड वस्तु; मुलांचें गोड खाद्य.
**खाक** (फा. वि.) जळून राख झालेलें.
**खाक** (फा. स्त्री.) रक्षा, राख; (सं. कुक्षि स्त्री.) बगल. **खाका वर करणें**—आपल्याजवळ कांहीं नाहीं असें दाखविणें; **खाकेस मारणें**—आश्रयाखालीं घेणें.
**खाकर** (प्रा. वि.) शुष्क; क्षीण; (न.) वाळून गेलेलें झाड; (पु.) सागवानी वाशाचें निमुळतें टोक.
**खांकर** (फा. स्त्री.) झांज.
**खांकरणें** (प्रा. न.) कार्यास आरंभ करणें (ज्ञा. १७।९३); (क्रि.) गळयांतला कफ बाहेर येईल असा ऊर्ध्व शब्द करणें.
**खाकरवसा** (पु.) खरडपट्टी.
**खांकरा** (प्रा. पु.) घोड्यास चाल शिकविण्याचा खुळखुळा (भा. २०।२१४); कफाचा गोळा.
**खाकरैंजणें** (प्रा. क्रि.) उद्‌भवणें.

**खाका** (पु.) वाणा; तऱ्हा, वृत्ति; चित्रें काढण्यापूर्वी त्यांचा केलेला मसुदा.
**खाकावणें** (प्रा. क्रि.) गर्जना.
**खाकी** (स्त्री.) हीनता; धुळीसारखा रंग.
**खाकोटी** (स्त्री.) काखोटी, वगल; **खा०स मारणें**--पळवून नेणें.
**खाक्या** (पु.) रंगस्वरूप; युक्ति; वाणा; ठराविक वर्तनक्रम.
**खाखा** (स्त्री.) पोटांतली आग; भयंकर क्षुधा; **खाखावणें** (क्रि.)—भुकेनें व्याकुळ होणें.
**खाखाइणें, खाखाणें** (प्रा. क्रि.) कर्कश वाजणें (रुक्मि० ८।२१).
**खाखात** (प्रा. वि.) कर्कश (ज्ञा० ११।३१)
**खागें, खांगें** (प्रा. न.) खळें, मंडळ (स्वा० दि० ३।४।३५); शेवटचें स्थळ (ज्ञा० १८।९५४); विषय (ज्ञा० १४।२५५); खळगा.
**खाच, खांच** (सं. खाद स्त्री.) खड्डा, खळगा.
**खाचखोच** (स्त्री.) न्यूनाधिकता; मर्म, वर्म.
**खाचणें** (प्रा. क्रि.) दमणें; कमी पडणें (ज्ञा० ९।३२६); खंडन करणें.
**खाचर** (सं. खच् न.) खड्डा; अळू, भात, ऊंस इ. लावलेलें क्षेत्र; एक प्रकारची बैलगाडी.
**खांचु** (प्रा. न.) खंडन (ज्ञा० १३।१०५१).
**खाज** (सं. खर्जू स्त्री.) कंडू, खाजविण्याची इच्छा; खुमखुमी; प्रबळ इच्छा.
**खाजकुइरी** (स्त्री.) जिच्या स्पर्शानें अंग खाजवतें अशी एक वनस्पति.
**खाजगत, खाजगी** (वि.) खासगत, खासगी पहा.
**खाजगीवाले** (फा. पु.) संस्थानांत खाजगी-कडील रोकड ठेवणारे.
**खाजण** (स्त्री.) भरतीचें पाणी जिला मिळतें अशी समुद्रकिनाऱ्याची शेत-कीच्या उपयोगाची जमीन.
**खांजणी-भांजणी** (सं. खंडन + भंजन स्त्री.) वेरीजवजाबाकी, क्षयवृद्धि.
**खाजरें** (वि.) खाज उत्पन्न करणारें.
**खाजव** (स्त्री.) खाज, कंडू.
**खाजवाखाजव** (स्त्री.) भांडण उपस्थित होण्यासारखी मुद्दाम केलेली चेष्टा.
**खाजविणें** (क्रि.) कंडूशमनार्थ अंग खरडणें; चिडविणें.
**खाजाळा, खाजाळू** (वि.) खाजदार, खाज उत्पन्न करणारें; भांडखोर.
**खाजुकें, खाजुगें** (प्रा. न.) खाद्य, भक्ष्य.
**खाजें** (सं. खाद्य न.) खाऊ; मिठाई.
**खाट** (सं. खटवा स्त्री.) वाज, वाजलें, खाटलें; (वि.) तुसडा, उग्र, उर्मट.
**खाटमार** (पु.) खाटेला बांधून दिलेला मार (अनंतफंदी पृ० ६६).
**खाटलें** (न.) लहानशी खाट. **खाटल्यावर जाणें**—व्यभिचार करणें.
**खाटसरी** (स्त्री.) विणलेला भाग घट्ट दावण्यासाठीं हातमागांत काठ्या वगैरेंची केलेली योजना; कटतर.
**खाटा** (स्त्री.) नांगरून बीं न पेरतां तशीच ठेविलेली जमीन. [ विकणारा.
**खाटिक, खाटीक** (सं. खाटी पु.) मांस
**खाटी** (वि.) आंबट, वाईट. **खाटी मेजवानी**—मांसाहारी भोजन.
**खाटू—टूळ—टोळ** (वि.) आंबलेलें.
**खाड** (न.) दाढी; कल्ले; तूट, अभाव.
**खांड** (सं. खंड न.) चीर, भेग; तुकडा.
**खांडकी** (स्त्री.) दगडाचा उडालेला तुकडा किंवा कळपा; तुळई; मेंढरांचा वगैरे कळप; दाटी; (स्त्री.) चाकूच्या धारे-वर पडणारी खिंड; साखर; (पु). तरवार; (वि.) दाट.
**खांडणें** (प्रा. क्रि.) खणणें; तोडणें.
**खांड-मिशा** (स्त्री. अने.) अर्धवट काढ-लेल्या मिशा.
**खांडव—वा** (पु.) नदीचें शुष्क पात्र; डोह.
**खांडवा** (पु.) लग्नाच्या वेळीं पानसुपारी वांटण्याची झोळी.
**खांडवी** (स्त्री.), **खांडवें** (न.) एक खाद्य.
**खांडवें** (न.) ताडामाडावर चढतांना पायांत घालण्याचा दोरीचा फांस.
**खांडी** (प्रा. स्त्री.) दाढी (ज्ञाने. १३-५६८).
**खाडा** (सं. खंड पु.) खळगा; गैरहजिरी.

नगर वाचनालय, सातारा.



**खांडा** (पु.) रुंद पात्याची दुधारी सरळ तरवार; दांता.
**खांडाईत** (पु.) खांडा धरणारा शिपाई.
**खांडाण** (वि.) नाठाळ.
**खांडार** (न.) खिंडार, खिंड.
**खाडी** (स्त्री.) नदींत जेथवर समुद्राच्या भरतीचें पाणी येतें तेथवरचा नदीचा भाग; खिंड; शरीरावरील खवंद.
**खाडू** (वि.) मिशा काढणारा; षंढ.
**खांडूक** (सं. कंडु न.) फोड, गळू.
**खाडूस** (न.) अडचण, गाठ.
**खांडें** (प्रा. न.) तलवार; नदीच्या पात्रांतली उघडी जागा.
**खांडेकरी** (पु.) खांडाईत पहा.
**खांडेनवमी** (स्त्री.) नवरात्र उत्सवांतील शेवटचा दिवस.
**खांडोळी** (स्त्री.) एक खाद्य.
**खांडोळें** (न.) तुकडा.
**खाण** (सं. खनि स्त्री.) खनि; उत्पत्तिस्थान; जात.
**खाण** (प्रा. न.) तोटा (तुका० ३२८८); ठिकाण; वस्ती; खाणेंपिणें.
**खाणगत** (स्त्री.) खाणीपासून सरकारास होणारें उत्पन्न.
**खाणचोर** (पु.) घरफोडया चोर.
**खाणवट** (स्त्री.) चोळीची पाठ.
**खाणाखुणा** (स्त्री. अने.) तपशीलवार माहिती; पत्ता लावण्याचीं साधनें; तपास करण्याला आधारभूत वर्णन.
**खाणावळ** (स्त्री.) पैसे दिले असतां जेवण मिळतें अशी जागा; जेवणाबद्दलचे पैसे.
**खाणी** (सं. स्त्री.) खाण पहा.
**खाणींव** (प्रा. वि.) खणून काढलेलें (रुक्मिणी० १४।१०४).
**खाणें** (सं. खाद् क्रि.) खाणें; गिळंकृत करणें; शोषून घेणें; गाळणें, वगळणें; त्रास देणें; दुखणें; (न.) खाण्याचा पदार्थ; अन्न; जेवण.
**खाणोरा–री** (वि.) अधाशी; काळीजखाऊ.
**खात** (न.) जमिनीस घालण्याचें खत.
**खातड, खातर** (प्रा. पु.) उकिरडा, उकिरडयांत राहणारा (तुका० ३६७७).
**खातर** (अर. स्त्री.) मान, सत्कार; खात्री, आश्वासन; आवड; (फा. स्त्री.) भोक, भगदाड; (अ.) साठीं, करितां.
**खातरखा** (फा. अ.) निःसंशय.
**खातरजमा** (फा. स्त्री.) खातरी; मनाचें समाधान; गुमान; हिशोब.
**खातरदारी** (फा. स्त्री.) आश्वासन, हमी.
**खातरा** (पु.) खत; खडा.
**खातरी** (हिं. स्त्री.) मनाचा दृढ ग्रह; भरंवसा, विश्वास; ओळख, जामिनकी.
**खातरीलायक** (वि.) विश्वसनीय.
**खातवड** (प्रा. न.) उकिरडा; (वि.) दुर्गंध; खत घातलेली (जमीन).
**खाता** (वि.) खाणारा.
**खाताडें** (न.) गांवाबाहेरचा उकिरडा.
**खाताडें** (न.) खरकटें.
**खाती** (प्रा. पु.) लोहार.
**खातें** (न.) एखाद्या माणसाशीं जो देवघेवीचा व्यवहार होतो त्याची त्याच्या नांवावर एकत्र केलेली तारीखवार नोंद; भाग; प्रांत; सदर खातेदारानें धारण केलेला जमिनीचा भाग.
**खातेदार** (पु.) कूळ खेरीज करून दुमाला नसणाऱ्या जमिनीचा प्रत्यक्ष कबजा धारण करणारा. [ खजिना (प्राप्ति.).
**खातेंपोतें** खातें म्ह० खर्च व पोतें म्ह०
**खातेंबाकी** (स्त्री.) हिशेबाच्या वहींतली अखेरची शिल्लक.
**खातेरें** (न.) उकिरडा; उकिरडयाची खांच.
**खातेंवही** (स्त्री.) निरनिराळ्या माणसांचीं खातीं लिहून ठेविलेली वही.
**खात्री, खात्रीलायक** खातरी, खातरीलायक पहा.
**खाद** (स्त्री.) खाद्य, अन्न; खाणें; खाज.
**खांद** (पु.) खांदा; सराव.
**खादगी** (स्त्री.) द्रव्याचा अपहार; पोटासाठीं केलेली नेमणूक.
**खादणें** (प्रा. क्रि.) खाणें.
**खांदणें** (क्रि.) खणणें.
**खांदवडा** (पु.) उसनवार आणलेल्या बैलाच्या मालकाला बैल परत करतांना धान्य किंवा पैसे देणें.

**खांदा** (सं. स्कंध पु.) स्कंध; ओझें.
**खांदाडीं घालून नेणें** (क्रि.) खांद्यावर घालून नेणें.
**खादाड** (वि.) अधाशी.
**खादी** (स्त्री.) जाड सुताचें कापड; चांगलें खाणें, पौष्टिक अन्न. (वि.) धष्टपुष्ट (प्रभा० पृ० २१९). **खा० चें शरीर**– धष्टपुष्ट शरीर.
**खांदी** (स्त्री.) फांदी, शाखा.
**खादू** (वि.) खादाड.
**खांदेकरी** (पु.) खांद्यावर ओझें वाहणारा; शवाला खांदा देणारा.
**खांदेपालट** (न. स्त्री.) ओझें एका खांद्या-वरून दुसऱ्या खांद्यावर देणें.
**खांदोडा–डी** खांदवडा पहा.
**खाद्य** (सं. न.) खाण्याचा पदार्थ.
**खान** (प्रा. पु.) खणती लावून चोरी कर-णारा (तुका० ३३७७); (फा. पु.) मुसलमान सरदार.
**खानगी** (वि.) खाजगत, स्वतःचें.
**खानदान** (फा. पु. स्त्री.) उच्च कुळ.
**खानदानी** (फा. स्त्री.) कुळाची उच्चता.
**खानवटा** (पु.) कुल, वंश; खांद्याचा सांधा.
**खानवठा** (पु.) गुरांचा गोठा; गुरांसाठीं छाया.
**खानसामा** (फा. पु.) आचारी.
**खाना** (फा. पु.) मेजवानी; जागा; पेटी वगैरेचें पूड, खण.
**खानेसुमारी** (फा. खानाशुमार स्त्री.) घरांची व माणसांची गणती; मोजणी.
**खानोटा** (पु.) खानवटा पहा.
**खानोरी** (प्रा. पु.) खाणोरी शब्द पहा.
**खाप** (स्त्री.) काप, फाक, तुकडा; ढीग.
**खापकडी** (स्त्री.) सुपारीचीं शिजविलेलीं खांडें.
**खापटी** (स्त्री.) कान्हवला; गुळाची पोळी.
**खापर** (सं. खर्पर न.), **खापरी** (स्त्री.) मडक्याचा तुकडा; मातीचें भांडें; अपेश; (प्रा.) मस्तकाची कवटी.
**खापरखुंटी** (स्त्री.) खापर.
**खापरतोंड्या** (पु.) निपणतूचा मुलगा; (वि.) दुर्दैवी.
**खापरपणजा** (पु.) पणजाचा आजा.
**खापरपोळी** (स्त्री.) खापरांत केलेलें एक प्रकारचें धिरडें. [ खापराचा.
**खापरी** (स्त्री.) खापराचा, तुकडा; (वि.)
**खापऱ्या** (वि.) दुर्दैवी.
**खापलणें** (क्रि.) छाटणें, कापणें.
**खांब** (सं. स्तंभ पु.) स्तंभ, आधार.
**खांबला** (पु.) चरकाचें दालन व काथ-वड जोडणारा भाग. [ बाहुलें.
**खांबसूत्र** (प्रा. न.) कळसूत्र; कळसूत्री
**खांबा** (प्रा. पु.) अंकुर; फाटा.
**खाबू** (वि.) खादाड, अधाशी.
**खांबोटी** (स्त्री.) लहान खांब.
**खांबोळ, खांबोळें** (न.), **खांबोळी** (स्त्री.) घर बांधतांना खांबासाठीं भिंतींत ठेविलेली जागा.
**खामखा** (फा. अ.) व्यर्थ, उगाच, विना-कारण.
**खामी** (फा. स्त्री.) नुकसान.
**खामोश** (अर. वि.) शांत, स्तब्ध.
**खामोशी** (स्त्री.) स्तब्धपणा, शांतता.
**खाय** (स्त्री.) खाऊ.
**खायखाय** (स्त्री.) अधाशीपणा.
**खायनिंदक** (वि.) आपणास पोसणाऱ्या माणसाची निंदा करणारा; कृतघ्न.
**खायिर** (प्रा. वि.) खाणारा.
**खार** (सं. क्षार पु.) क्षार; लोणच्यांतला रस; (स्त्री.) खडी नांवाचा क्षुद्र व चपळ प्राणी; नुकसान; तोटा; बादलाची हवा; लोणा. [ क्षारयुक्त.
**खारट** (वि.) क्षाराची चव असलेला;
**खारणें** (क्रि.) खारट होणें; मीठ भरणें.
**खारवणी** (न.) क्षारयुक्त पाणी.
**खारवा** (पु.) लाल रंगाची खादी.
**खारवी** (पु.) एक दर्यावर्दी जात.
**खारवें** (न.) लाल रंगाचें कापड; अलवणं.
**खारा** (वि.) खारट.
**खाराखिरी** (स्त्री.) वारकाईची पहाणी; थोडक्यासाठीं घासाघीस, ओढाताण.
**खारावारा** जमीन आणि समुद्र यांची उष्णता सारखी होऊन स्तब्ध झालेला वारा.

**खारी** (स्त्री.) आभाळ येऊन थंडी पडते अशी हवा, पिवळसर रंगाची क्षारयुक्त माती; गुरांचा रोग.
**खारीक** (स्त्री.) वाळलेली खजुराची बी. (पु.) मीठ पिकविणारा.
**खारीव** (वि.) खारलेलें.
**खारेंमीठ** खाणींतून काढलेलें मीठ.
**खाल** (हिं. स्त्री.) अंगचें कातडें.
**खालता–तो–तें** (अ.) खालीं.
**खालपट** (वि.) सखल; ठेंगणा, खुजा.
**खालवणें, खालावणें** ( क्रि. ) खालीं जाणें, दुर्दशा होणें, गरीबीची स्थिति येणें; वाकविणें.
**खालवर** (अ.) उलथेंपालथें. **मन खा० होणें**–मन डळमळीत होणें.
**खालसा** (अर. वि.) सरकारच्या व्यवस्थे-खालचा किंवा त्याच्या मालकीचा; संस्थानिकांच्या मुलखाहून इतर म्हणजे इंग्रज सरकारच्या अंमलाखालचा मिरासी खेरीज सरकारच्या वहिवाटीला असलेली कीर्दसार जमीन; शीख जातींतील एक पंथ.
**खाला** (प्रा. स्त्री.) वाहुली, खेळणें.
**खालां** (प्रा. अ.) खालीं.
**खालाट, खालाटी** (स्त्री.) सखल जमीन.
**खालाटीवेलाटी** (वि.) खालचावरचा.
**खालारा** (प्रा. अ.) खालीं; उतरणीकडे.
**खालावणें** खालवणें पहा.
**खाली** (अर. वि.) रिकामा; (प्रा. स्त्री.) साल; चामडें.
**खालीं** (अ.) अधोभागीं, खालतीं.
**खालीबार** (पु.) गोळी न घालतां नुसता केलेला बंदुकीचा आवाज, दायबार.
**खालील** (वि.) खालचा; हलक्या दर्जाचा.
**खालीखाल** (वि.) किंचित् न्यून.
**खालौता** (प्रा. अ.) खालीं.
**खाल्ल्या घरचे वासे मोजणारा** कृतघ्न.
**खावटी** (स्त्री.) खाणें; खाण्यावद्दलचे पैसे; खाद्यांचा संग्रह.
**खावड** (स्त्री.) गुरांचें खाणें.
**खांवडें** (न.) नांगरलेल्या किंवा पेरलेल्या शेतांतली न नांगरलेली किंवा न पेरलेली थोडीशी जमीन; लिहिलेल्या काग-दांतली कोरी जागा. [ मालक.
**खावंद** (फा. पु.) सरकार, महाराज;
**खाशानिशीं** (अ.) स्वतः [ निवडक.
**खाशी** (अ.) वाहवा ! शावास ! (वि.)
**खाशी पंगत** (स्त्री.) निवडक उच्च प्रतीच्या मंडळींचें जेवण.
**खाष्ट** (वि.) द्वाड, दुष्ट.
**खास** (अ.) खरोखर; खुद्द; स्वतः; (वि.) स्वतःचें; अस्सल; विशेष, मुद्दाम योजिलेलें; शुद्ध.
**खासखबर** (स्त्री.) खात्रीलायक बातमी.
**खासगत** (वि.) स्वतःचें; (अ.) स्वतंत्र.
**खासगी** (वि.) स्वतःचें; (स्त्री.) राजाची स्वतःची जिंदगी.
**खासगीवाले** (पु.) राजाची स्वतःची रोकड वगैरे ठेवणारा.
**खासडा** (पु.) जोडा; आघात; प्रहार.
**खासदार** (पु.) मोतद्दार, नोकर; वरिष्ठ विधिमंडळांतील सभासद.
**खासबरदार** (फा. पु.) खाशांची बंदूक वगैरे शस्त्रें बाळगणारा. [ घोडेस्वार.
**खासबारगीर** (पु.) राजाच्या पाहऱ्यावरील
**खासा** (अर. वि.) चांगला; मुख्य; श्रेष्ठ; नोकरांनीं राजे सरदार वगैरेंस उद्देशून बोलण्याचा शब्द.
**खासी** (फा. स्त्री.) खोकला.
**खास्त** (अ.) खात्रीनें; (स्त्री.) द्वेष; डाव.
**खास्ती** (स्त्री.) झुरणी; खोडसाळपणा.
**खाळ** (फा. पु.) नाला; खांच; खाई.
**खाळणें** (न.) नकासगाराचें हत्यार.
**खिकाळणें** (क्रि.) घोड्याचें ओरडणें.
**खिखि** (अ.) फिदीफिदी. [मिसळ.
**खिच, खिचट, खिचटें** (प्रा. न.) खिचडी, **खिचडा** (पु.), **खिचडी** (स्त्री.) डाळ व तांदूळ यांचें मिश्रण; मिसळ; दाटी, गर्दी.
**खिचणें** (क्रि.) मागें हटणें.
**खिचवटणें** (प्रा. क्रि.) खाजवणें, चिडविणें.
**खिचा** (प्रा. स्त्री.) खिचडी.
**खिची** (प्रा. स्त्री.) दाटी.
**खिजगणती** (हिं. किसगिनती स्त्री.) गिणती, मोजदाद; पर्वा.

**खिजणें** (सं. खिद् क्रि.) चिडणें; रागावणें; खजील होणें.
**खिजविड** (वि.) सुवाच्य नसलेलें, किजबिड.
**खिजमत, खिजमतगार** खिदमत, खिदमतगार पहा.
**खिजवणी** (स्त्री.) चिडविणें.
**खिजविणें** (क्रि.) चिडविणें.
**खिजाणा** (वि.) खिशाणा, निराश, शर्मिदा.
**खिटी** (स्त्री.) अडकवण म्हणून घातलेली चीप.
**खिंड** (स्त्री.) दोन उंचवट्यांमधला अरुंद मार्ग; दरी.
**खिडकी** (हिं. स्त्री.) हवा आणि उजेड येण्यासाठीं ठेवलेलें लहान दार, बारी, जाळी, झरोका.
**खिंडार, खिंडारें** (न.) भगदाड, खिंड; भग्नावशेष; (वि.) मोडकळीस आलेलें.
**खिंडी** (स्त्री.) खिंड, भेग; अरुंद रस्ता.
**खिडुकमिडुक** (न.) मोडकेतोडके बारीक दागिने.
**खिडें** (न.) पोलादाची एक जात.
**खिंडोर** (प्रा. स्त्री.) खिंडार, दरी.
**खितपण, खितपणी** (स्त्री.) क्षीणावस्था.
**खितपणें** (क्रि.) क्षीण होत जाणें.
**खिदखिदा** (अ.) फिदफिदी, खिखि, खोखो.
**खिदमत** (फा. स्त्री.) तैनात, नोकरी.
**खिदमतगार** (अर. पु.) नोकर.
**खिदळणें** (क्रि.) अमर्यादपणें खेळणें, नाचणें वगैरे.
**खिन्न** (सं. वि.) दुःखी, कष्टी, मलूल.
**खिमट** (न.) कुस्करलेला भात.
**खिमा** (अर. पु.) बारीक केलेल्या मांसाचा पदार्थ.
**खिरंगटणें** (प्रा. क्रि.) खुरटणें.
**खिरटें** (वि.) खुरटलेलें, ठेंगणें.
**खिरडण** (प्रा. क्रि.) मागें सरणें.
**खिरणी** (स्त्री.) एक लहान फळ.
**खिरणें** (सं. न.) चाळणी; (क्रि.) गळणें.
**खिरा** (पु.) काकडीची एक जात.
**खिरापत** (फा. स्त्री.) कथेच्या शेवटीं वांटतात तो प्रसाद; सढळ हातानें दिलेली देणगी; उधळपट्टीचा खर्च.
**खिरारी** (प्रा. पु.) गवळी.
**खिलाई** (हि. स्त्री.) खुराक.
**खिलाडी** (वि.) खेळण्यांत पटाईत; हंसून-खेळून वागणारा.
**खिलात** (अर. स्त्री.) सन्मानाचा पोषाख.
**खिलापत** (अर. स्त्री.) खलीपाची पदवी आणि त्याचें काम; महंमद पैगंबराची वंशावळ.
**खिलाफ** (अर. वि.) प्रतिकूल.
**खिल्लार** (न.) जनावरांचा कळप; जमाव.
**खिलारी** (पु.) गुराखी; गुरें विकणारा; लमाण; बैलांची एक जात.
**खिलावणें** (हिं. खिलौना न.) खेळ, क्रीडा; प्रीतिपात्र.
**खिसमिस** (फा. स्त्री.) बेदाणा.
**खिसा** (फा. पु.) कप्पा, कसा.
**खिसा** (अर. किस्सा पु.) कहाणी, कथा.
**खिसारा** .(पु.) नाश, खराबी.
**खिस्त** (अर. किश्त स्त्री.) हप्ता; हप्तेबंदी; हप्त्याची मुदत. [देण्याचा करार.
**खिस्तबंदी** (स्त्री.) हप्त्याहप्त्यांनीं रक्कम
**खिस्ती** ( पु. ) सावकार; ( स्त्री. ) सावकारी व्याजबट्टा.
**खिळखिळा** (वि.) ढिला; डगमगणारा.
**खिळणें** (सं. कील क्रि.) चिकटून राहणें, पक्कें होणें. [ खीळ.
**खिळा** (सं. कील पु.) लोखंडाची खुंटी;
**खिळोरें** (न.) दाराचा अडसर आंत घालण्यासाठीं दाराच्या भिंतीला ठेविलेला पोकळ भाग.
**खीच** (प्रा. स्त्री.) खिचडी(ज्ञा० ८।१४४).
**खीर** (सं. क्षीर स्त्री.) एक खाद्य.
**खीरम्या** (प्रा. पु.) उंची वस्त्र.
**खीळ** (सं. कील स्त्री.) अडकवण. 'चालत्या गाड्याला खीळ घालणें'— सुरळीतपणें चालत आलेल्या कामांत विघ्न आणणें.
**खुजट** (सं. कुब्ज वि.) ठेंगणा, अकालीं वाढ खुंटलेला.
**खुजा** (सं. कुब्ज वि.) ठेंगणा.
**खुंट** (पु.) सोट; कोपरा; कडा; चव्हाटा; स्वारी (उतारू); केसांचे बुडखे.

**खुटखुटणें** (क्रि.) बारीक आवाज करणें; पोटांत दुखणें.
**खुटखुटीत** (वि.) लहान आणि टुमदार; घट्ट; आटपशीर; खुसखुशीत.
**खुंटणें** (क्रि.) थांबणें, कुंठित होणें; अडून बसणें; कमी पडणें.
**खुटवा** (पु.) बंदरांत येणाऱ्या मालावरील जकात.
**खुंटा** (पु.) मोठी खुंटी; दांडा; दांडकें.
**खुंटाळी** (स्त्री.) वांझ स्त्री.
**खुंटाळें** (न.) खुंट्यांचा संच.
**खुंटी** (स्त्री.) लहान खुंटा.
**खुटुरुटु** (अ.) हळू हळू, मंदगतीनें.
**खुट्ट** (न.) यत्किंचित् आवाज.
**खुडकणें** (प्रा. क्रि.) अडकणं.
**खुडखुडणें** (क्रि.) खुडखुड आवाज होणें.
**खुडखुडीत** (वि.) हलकें आणि सुदृढ; खुटखुटीत. [ तोडणें.
**खुडणें** (सं. कृत् क्रि.) हलक्या हातानें
**खुडबुड** (स्त्री.) हलका आवाज.
**खुडमुळ** (सं. कुड्मल न.) फुलाची कळी.
**खुडसणी** (स्त्री.) खेद, मनाला लागलेली रुखरुख; उत्कट इच्छा; खुडणें.
**खुडा** (प्रा.वि.) अंग आखडलेला; (पु.) खंदक.
**खुडींव** (प्रा. वि.) खुडलेलें.
**खुडुकणें** (प्रा. वि.) अडकणें.
**खुडूक** (न.) खुंट, खोड, बुंधा.
**खुडें** (न.) कोंबडी, खवुतरें इ० ठेवण्याची जागा; खुराडें. [ गांठ.
**खुणगांठ** (स्त्री.) स्मरणार्थ पदरास दिलेली
**खुणावणें** (क्रि.) खूण करणें; खुणेनें सुचविणें.
**खुतखावणी** (हिं. स्त्री.) धनीण.
**खुतखुत** (स्त्री.) मनाची टोचणी; पुंजका.
**खुतणें** (प्रा. क्रि.) ध्यान धरून बसणें.
**खुतबा** (अर. पु.) मुसलमानांत शुक्रवारीं निमाजानंतर पांच साधु पुरुषांचीं स्तोत्रें म्हणतात तीं.
**खुतला** (प्रा. वि.) भुकेला; तटस्थ.
**खुद** (फा. वि.) स्वतःचें; (अ.) स्वतः.
**खुदकी** (हिं. स्त्री.) घोड्याची चालण्याची एक गति.
**खुदबा** (फा. पु.) फकीर वगैरे जेवायला घालावयाचा ईदच्या अखेरचा समारंभ.
**खुदरत** (अर. कुदरत स्त्री.) ईश्वरी शक्ति.
**खुदळणें** (क्रि.) तुडविणें, चोपणें; चोळामोळा करणें.
**खुदा** (फा. पु.) ईश्वर.
**खुदाई** (स्त्री.) खोदण्याची कला.
**खुदायताला** (अर. पु.) परमेश्वर.
**खुदायवंद** (फा. पु.) मालक, धनी.
**खुदावंत** (फा. खुदावंद पु.) मालक.
**खुनशी** (वि.) दीर्घद्वेषी; आकसखोर.
**खुनी** (फा. वि.) खून करणारा; खुनासंबंधाचा.
**खुपणें** (क्रि.) टोचणें, लागणें, बोचणें, सलणें.
**खुपणी** (स्त्री.) बोचणी, टोचणी.
**खुपरा** (वि.) खुपणारा.
**खुपरी** (स्त्री.) डोळ्याच्या पापणीचा सुजून लाल झालेला अंतर्भाग.
**खुपसणें** (क्रि.) जोरानें घालणें; दडपणें.
**खुफिया** (हिं. वि.) गुप्त.
**खुबचार** (पु.) डावपेच.
**खुबडी** (स्त्री.) खुराडें.
**खुबलणें** (क्रि.) चोपणें, मारणें.
**खुबसुरत** (फा. वि.) सुंदर, देखणा.
**खुबळणें** (क्रि.) जोरानें हलविणें, वर फेकणें, झेलणें इ.
**खुबा** (पु.) उंचवटा. [ युक्ति.
**खुबी** (फा. स्त्री.) मर्म, विशिष्ट गुण;
**खुबीदार** (फा. वि.) मजेदार, छानदार.
**खुमखुम** (स्त्री.) रग, ताठा; लढण्याची, सूड घेण्याची वगैरे प्रबळ इच्छा.
**खुमस** (फा. खुम्स पु.) पांचवा हिस्सा.
**खुमारी** (अर. स्त्री.) लज्जत, स्वाद; खुबी, मर्म.
**खुमास** (अर. पु.) सौंदर्य; चांगुलपणा.
**खुर** (पु.) पाय; तंगडी; कित्येक जनावरांच्या पावलावर टणक त्वचा असते तो भाग. [ घसटत चालणें.
**खुरकटणें** (क्रि.) कुल्ल्यावर भार देऊन
**खुरकी** (स्त्री.) खुरांतली घाण.
**खुरखुर** (स्त्री.) चुटपुट; खुमखुम.

**खुरखोडी** (ग्रा. वि.) लाचाळ.
**खुरट, खुरटा** (वि.) वाढ खुंटलेला.
**खुरटणें** (क्रि.) खुजटणें, वाढ खुंटणें.
**खुरडणें.** (क्रि.) फरफटणें, सरपटणें.
**खुरपणें** (क्रि.) गवत काढणें, खरडून काढणें. [ हत्यार.
**खुरपी** (स्त्री.), खुरपें (न.) खुरपण्याचें
**खुरवाण** (अर. कुरबान न.) उतारा, ओवाळून टाकलेला पदार्थ.
**खुरस** (स्त्री.) खारीक.
**खुरमांडी** (स्त्री.) मांड्यांखालीं पाय घालून व गुडघे आणि पायाचीं बोटें टेकून बसण्याची तऱ्हा.
**खुरमुंडी** (स्त्री.) बकरा मारण्याचा महाराचा हक्क; पाय आणि डोकें एकत्र बांधणें; पायांत डोकें घालून बसणें; अंगाचें गाठोडें करून निजणें.
**खुरची** (अर. कुरसी स्त्री.) एका प्रकारची बैठक; खांब जींत बसवितात ती बैठक; मुलांना देण्याच्या शिक्षेचा एक प्रकार.
**खुराक** (फा. पु.) पौष्टिक पदार्थांचा आहार; रतीब.
**खुराडें** (न.) कबुतरें, कोंबड्या इ. ठेवण्याची जागा.
**खुरासनी–णी** (फा. स्त्री.) तीळ किंवा हळद यांची एक जात; एक वनस्पति.
**खुरी** (ग्रा. स्त्री.) गुरांची बसण्याची जागा; मूर्ति; अंगाची ठेवण (होना. पृ.१५७).
**खुरें** (न.) जोड्याची टांच.
**खुर्ची** खुरची पहा.
**खुर्द** (सं. क्षुद्र न.) लहान गांव.
**खुर्दा** (पु.) फुटकळ पैसे.
**खुर्निसात** कुर्निसात पहा.
**खुलणें** (हिं. क्रि.) उघडणें, फुलणें, उमलणें.
**खुलखर** (स्त्री. न.) लाच; पारितोषिक.
**खुलविणें** (क्रि.) शोभिवंत करणें; प्रसन्न करणें.
**खुला** (हिं. वि.) उघडा, मोकळा.
**खुलावट** (स्त्री.) सजावट.
**खुलास** (अर. वि.) उघडा; मोकळा.
**खुलासा** (अर. पु.) अर्थ, उद्देश; स्पष्टीकरण; मोकळेपणा; निर्णय.

**खुश** (फा. वि.) प्रसन्न, आनंदित.
**खुशकी** (फा. स्त्री.) जमीन, स्थलमार्ग; स्थलमार्गानें येणाऱ्या मालावरील जकात.
**खुशबो** (फा. स्त्री.) सुगंध.
**खुशमस्करी** (हिं. पु.) राजे लोकांजवळ विनोदार्थ असलेला गमत्या.
**खुशरजीवंदी** (फा. स्त्री.) खुषीची संमति.
**खुशामत** (फा. खुशामद स्त्री.) हांजी हांजी; आर्जव.
**खुशामती, खुषमस्कऱ्या** (वि.) हांजीहांजीखोर.
**खुशाल** (सं. कुशल फा. खुशहाल वि.) सुखी, आनंदी, कुशल. [ दंग असणारा.
**खुशालचंद** (वि.) चैनी; ऐषआरामांत
**खुशाली** (सं. फा. स्त्री.) संतोष, आनंद; सुख, मौज.
**खुशी** (फा. स्त्री.) मर्जी, संतोष, इच्छा.
**खुशीचा सौदा** मर्जीची गोष्ट.
**खुशामद** (फा. स्त्री.) हांजी हांजी, खुशामत.
**खुसखुशीत** (वि.) सहज मोडणारें.
**खुसपट** (न.) क्षुद्र दोष; भांडणास कारण, निमित्त; एकाद्याचें चीड येण्यासारखें वर्म.
**खुसपणें** खुपसणें पहा.
**खुळकट** (वि.) खुळा, वेडसर.
**खुळखुळा** (पु.) खुळखुळ वाजणारें लहान मुलांचें खेळणें.
**खुळगा** (ग्रा. पु.) रेडा.
**खुळबुळणें** (क्रि.) गुळणा करणें.
**खुळसट, खुळसर** (वि.) वेडसर.
**खुळा** (वि.) वेडा, मूर्ख; (पु.) रेडा.
**खुळावणें** (क्रि.) वेडे होणें.
**खूट** (स्त्री.) तूट, उणीव; (पु.) अंगरख्याच्या वाहीखालीं चुण्या करून त्यावर पट्टीसारखी शिवण केलेली असते ती.
**खूण, खूणखाण** (स्त्री.) चिन्ह; संकेत, मनोगत. [ बांधलेली गांठ; खात्री.
**खूणगांठ** (स्त्री.) स्मरणासाठीं वस्त्राला
**खूद** (पु.) भंडारी लोकांचें ताडी ठेवण्याचें भांडें.

**खून** (फा. खून पु.) रक्त; हत्या, ठार मारणें.
**खूप** (स्त्री.) ठणका, वेदना; (अ.) पुष्कळ.
**खूब** (फा. अ.) चांगल्या प्रकारें; पुष्कळ.
**खूम** (अर. कोम पु.) लोक, राष्ट्र; कुळ; जात.
**खूर** खुर पहा. [ गडबड.
**खूळ** (न.) वेड, छंद, वेडी समजूत; विघ्न;
**खेंक** (स्त्री.) खोकला, ढास.
**खेंकटें** (न.) लचांड; त्रासदायक गोष्ट; संकट; योजना, मसलत; अडचण, विघ्न; अव्यवस्था, गोंधळ; (वि.) त्रासदायक.
**खेकडा** (सं. कर्कटक पु.) एका प्राण्याचें नांव.
**खेंकणें, खेंकटणें, खेंकसणें** (क्रि.) कातावणें, चिडणें, वसकन् अंगावर येणें.
**खेंगटें** खेंकटें पहा.
**खेंचणें** (हि. क्रि.) ओढणें, ताणणें.
**खेचर, खेचरु** (सं. न.) आकाशांत फिरणारे पक्षी, नक्षत्रें, देवता इ०; समंध; भूत.
**खेंचर** (फा. न.) घोडा आणि गाढवी यांच्यापासून झालेली मिश्र उत्पत्ति.
**खेंचाखेंच** (स्त्री.) ओढाताण.
**खेट** (स्त्री.) पाचर, अड्डा; गर्दी.
**खेटक, खेटकें** (सं. न.) ढाल; भाला; खेडेगांव (मुक्ते० रामा० ६।१०९).
**खटखर्वट** (प्रा. न.) खेडेंपाडें; बाजार भरतो तो गांव (भा० २३।४९७).
**खेटणी** (स्त्री.) कापडाची वीण.
**खेटणें** (क्रि.) भिडणें; शिवणें; पार पाडणें; मजल करणें.
**खेटर** (न.) जोडा, पायपोस.
**खेटराखेटरी** (स्त्री.) जोड्यांची मारामारी.
**खेटा** (पु.) फेरा, यात्रा (दा० १३।९।११); व्यर्थ खेप; येरझार.
**खेटी** (प्रा. स्त्री.) भेट; येरझार.
**खेडकुली** (प्रा. स्त्री.) उपवन.
**खेडणें** (क्रि.) जमीन करणें. [ गांवठी.
**खेडवळ** (वि.) खेड्यांतला, गांवढळ,
**खेंडा** (पु.) खेडें; (न.) प्रेतावरचें वस्त्र.
**खेडू** (पु.) जमीन कसणारा.
**खेडें, खेडेंपाडें** (सं. खेटक न.) लहान गांव, गांवढें गांव.
**खेती** (सं. क्षेत्र स्त्री.) शेतकी.
**खेद** (सं. पु.) दुःख, शोक. [ उनाड.
**खेदडा** (वि.) खट्याळ, मस्ती करणारा;
**खेप** (सं. क्षिप् स्त्री.) जाणें व येणें, येरझार, फेरी, वारी; वेळ; प्रतिबंध.
**खेपणें** (प्रा. क्रि.) अडकणें.
**खेबडा, खेबडालेबडा** (वि.) वेडावाकडा, कुरूप.
**खेम** (सं. क्षेम न.) आलिंगन.
**खेमालिंगन** (प्रा. न.) मित्रप्रेमाचें आलिंगन.
**खेर, खेरसेर** (स्त्री.) घाण, कचरा.
**खेरखैरात** (हिं. स्त्री.) खुशाली.
**खेरीज** (अर. खारज वि.) अधिक, अवांतर; काढून टाकलेला; (अ.) शिवाय.
**खेरीज जमा** (अर. स्त्री.) अवांतर जमा झालेली रक्कम.
**खेरीज मुशारा** (पु.) पगाराशिवाय इतर प्राप्ति.
**खेलखाना** (फा. पु.) बाजारबुणगे; अडगळ.
**खेव, खेंव** (सं. क्षेम स्त्री.) आलिंगन; अपाय; **देखतखेवों** (क्रि. वि.)—तत्क्षणींच.
**खेव** (प्रा. पु.) आलिंगन.
**खेवट** (हिं. पु.) नावाडी.
**खेवण** (प्रा. न.) कोंदण.
**खेवणी** (स्त्री.), **खेवणें** (न.) जडाव, भूषण. [ जडणें.
**खेवणें** (प्रा. न.) शोभा; (क्रि.) कोंदण
**खेवलें** (प्रा. वि.) जडलेलें.
**खेंवा** (हिं. पु.) वल्हविणें.
**खेळ** (सं. खेला पु.) क्रीडा; करमणुकीचें साधन; खेळण्याचा जिन्नस; तमाशा; नाटकाचा प्रयोग; लीला.
**खेळकर** (वि.) खेळणारा, खेळाडू; आनंदी.
**खेळकुडी** (स्त्री.) गंमत, खेळ, युक्ति, थट्टा.
**खेळकुली** (स्त्री.) खेळण्याची जागा.
**खेळखंडोबा** (पु.) विघाड, नाश.
**खेळगडी** (पु.) खेळांतला सोबती; सोबती.
**खेळणी** (स्त्री.) खेळण्याचा दिवस; सुट्टी.

**खेळणें** (क्रि.) क्रीडा करणें, संचार करणें; फिरणें; (न.) खेळण्याची वस्तु.
**खेळविणें** (क्रि.) फिरविणें; खेळायला लावणें.
**खेळिया** (प्रा. पु.) सोंगाड्या.
**खेळाखेळी** (स्त्री.) मौज, थट्टामस्करी.
**खेळीमेळीं** (अ.) मौजेनें.
**खेळुगा** (प्रा. वि.) खेळाडू.
**खैं** (अ.) कारवाराकडे—कोठें ?
**खैर** (सं. खदिर पु.) एका वृक्षाचें नांव.
**खैर** (फा. स्त्री.) कल्याण, कुशलक्षेम; समाधान, संतोष; संकटांतून बचाव.
**खैरात** (फा. स्त्री.) धर्मादाय, दान.
**खैरियत** (फा. स्त्री.) खुशाली.
**खैवंग** (सं. क्षेमांग वि.) बळकट.
**खो** (सं. क्षय पु.) नाश; विपत्तिकाळ.
**खो** (पु.) खोखोच्या खेळांत बसलेल्या गड्यास उठविण्याच्या वेळीं उच्चारतात तो शब्द. **खो घालणें**—सुरळीत चाललेल्या कामांत विघ्न आणणें.
**खोक, खोकर** (स्त्री.) आघातामुळें डोक्यास पडणारें क्षत.
**खोकड** (न.) कोल्ह्याच्या जातीचें एक जनावर.
**खोकणें** (क्रि.) खोकला येणें. | नागवंत.
**खोकर, खोंकर** (प्रा. वि.) जीर्ण; फुटका,
**खोकरणें** (प्रा. क्रि.) क्षय पावणें; फुटणें.
**खोकला** (पु.) कास रोग.
**खोका, खोखा** (हिं. खोल पु.) हुंडी दिल्याचें सूचनापत्र; सुटका; झांकण नसलेली पेटी.
**खोकाळें** (न.) मस्तकाची टाळू.
**खो खो** (पु.) मुलांचा एक खेळ; (अ.) मोठ्यानें हंसतांना होणारा ध्वनि.
**खोंगळा** (पु.), **खोंगळी** (स्त्री.) चर.
**खोगीर** (फा. पु.) घोड्याचें जीन, पलाण.
**खोगीरभरती** (स्त्री.) निरुपयोगी लोकांची भरती; बाजारबुणगे.
**खोंच** (स्त्री.) खोक; खुबी, मर्म, वळण; नुकसान, तोटा; (नंद भाषेंत) स्वस्त.
**खोचणें** (क्रि.) टोचणें, वळेंच शिरकविणें; उत्साहहीन होणें.
**खोंचरा, खोंचारा** (प्रा. पु.) भोसकण्याचें शस्त्र (भाला, बरची इत्यादि).
**खोचा** (पु.) खुंटाळें.
**खोंचा** (पु.) धोतराचा पदर; खिळा वगैरेचा धस लागून वस्त्र फाटणें.
**खोंची** (स्त्री.) लहान चळगी.
**खोंचेरा** (पु.) सर्पाला बिळांतून बाहेर काढण्याचा चिमटा.
**खोजा** (फा. पु.) मुसलमानांमधली एक जात; हिजडा, नपुंसक.
**खोट, खोंट** (स्त्री.) सोन्याचांदीची लगड; तोटा, नुकसान; टांच.
**खोटपत्र** (न.) रुजुवातींत खोटा ठरलेल्यापासून लिहून घेतलेलें कबुलीपत्र.
**खोटवेरा** (पु.) सरकारी उत्पन्नांतून येणारी तूट भरून काढण्यासाठीं केलेली कराची जादा आकारणी.
**खोटा** (सं. कूट वि.) असत्य; बेइमान; कृत्रिम, नकली.
**खोटाई** (स्त्री.) खोटेपणा, लबाडी.
**खोटी** (स्त्री.) लगड; गोळा; मूस; अडचण; विलंब.
**खोंड** (पु.) तरणा सांड, पोळ.
**खोड** (सं. खुड स्त्री.) दोष, उणीव; वाईट संवय; (न.) लाकडाचा ठोकळा किंवा तुकडा.
**खोडकर** (वि.) खोड्या करणारा, खोडसाळ.
**खोडणें** (क्रि.) रद्द करणें.
**खोंडवा, खोडावा** (पु.) एकदां ऊंस कापल्यावर त्याच्या खुंटाला फुटणारा कोंब.
**खोडवें** (न.) मडकें.
**खोडसर, खोडसाळ** (वि.) खोडकर.
**खोडा** (पु.) गुन्हेगाराचे हातपाय अडकविण्याकरितां केलेली लाकडाची चौकट; अडचण करणारें लटांबर; कुंठितावस्था.
**खोंडा** (पु.) एक टोक टोपीसारखें वळविलेलें असा कांबळा; दरा.
**खोडाखोड** (स्त्री.) दुरुस्त्या, काढून टाकलेला भाग इ० मुळें मूळच्यांत झालेला विघाड.

वाचनालय सातारा

खोडाळी (स्त्री.) चेष्टा, खोडी.
खोडी (स्त्री.) संवय, खोड.
खोणें (क्रि.) खोंवणें, खोंचणें.
खोत (पु.) गांवाचा वसूल जमा करणारा वतनदार अधिकारी; वसुलाचा मक्तेदार.
खोती (स्त्री.) गांवाची मुखत्यारी; मक्ता
खोदरा (पु.) चर, खोवण.
खोंद (न.) कुबड; फुगीर भाग.
खोदकाम (न.) खोदून करावयाचें काम.
खोदणें (सं. क्षुद् क्रि.) कोरणें, उकरणें.
खोदाई (हिं.स्त्री.) खोदण्याबद्दलची मजुरी.
खोदींव (वि.) खोदलेलें.
खोप (स्त्री.) पोट, पोकळी; सांधीचा प्रसार; खोक; झोंपडी; केसांचा झुबका; ढोली.
खोपट (न.), खोपटी, खोपडी (स्त्री.) झोपडी. [ढोली; घरटें.
खोपड (स्त्री.), खोपाड (न.) झाडाची
खोपरी (स्त्री.) डोकें, कवटी, कपाळ.
खोंपा (पु.) वेणीचा बुचडा; घरटें; झाडाची ढोली; निवांत जागा.
खोपी (स्त्री.) झोंपडी.
खोबण, खोबणी (स्त्री.) खळगी, पन्हाळी; खाप. [गाभा.
खोबरें (का. खोव्वरि न.) नारळांतला
खोबरेल (न.) खोबऱ्याचें तेल.
खोबळा (पु.), खोबळी (स्त्री.) लहान छिद्र; पोकळी.
खोवळें (प्रा. न.) वुजवण.
खोमणें (न.) वाकडेपणा, कमीपणा; (प्रा. क्रि.) कमी होणें (ज्ञानेश्वरी १४। २८५.)
खोमा (पु.) भांड्यावरचा चरा, पोचा, खळगा.
खोरण (स्त्री.), खोरें (न.) रुंद खिंड, निखारे; फावडें, उचटणें.
खोरपणें (क्रि.) नासाडी करणें.
खोरसणी (स्त्री.) कसून केलेली तपासणी.
खोरा (पु.) एका टाक्याचा पानाचा द्रोण; एक प्रकारचें इरलें; दरी.
खोराडें (न.) खुराडें पहा.
खोरी (स्त्री.) दरी; फावडें.
खोरें (न.) फावडें; अरुंद दरी.
खोल (वि.) ओंड; गूढ.
खोलगट (वि.) थोडासा खोल.
खोलणी (प्रा. स्त्री.) पुढें चालणें; कोतवाल घोडे. [करणें.
खोलणें (क्रि.) उघडणें; स्पष्ट करणें; खोल
खोलता (प्रा. पु.) दिवटया, मशालजी.
खोलवट (वि.) कांहींसें खोल.
खोलवा (पु.) खळगा, सखल प्रदेश.
खोलावा (पु.) खोलपणा.
खोलिजणें (प्रा. क्रि.) चालतां येणें.
खोली (स्त्री.) खोलपणा; कोठडी.
खोंवणें (क्रि.) खोंचणें. [बसणें.
खोवणें (हिं. क्रि.) फुकट दवडणें, घालवून
खोवा (पु.) खवा.
खोळ (स्त्री.) डोक्यावरून घेतलेला घोंगडीचा भाग.
खोळ, खोळी (प्रा.स्त्री.) पिशवी; पोट; खळगा; आच्छादन; पदर; झोळी; गुह्य.
खोळंबणें (क्रि.) स्तब्ध राहणें; वाट पाहणें.
खोळंबा (पु.) खोटी, विलंब, उशीर; (वि.) अक्रिय, कांहीं न करणारा (तुका० १८६५).
खोळंबेला (पु.) खुशाली.
खौस (प्रा. पु.) खिजमतगार.
ख्यात (सं. वि.) प्रसिद्ध.
ख्याति (सं. स्त्री.) प्रसिद्धि, कीर्ति.
ख्याल (फा. पु.) एक प्रकारचें गीत; चेष्टा; गंमत; विचार.
ख्यालतमाशा (फा. पु.) गाणें, नाचणें इ० मौजा.
ख्यालीखुशाली (फा. स्त्री.) चैन, मौज, गाणेंबजावणें वगैरे.

---

## ग

ग मराठी व्यंजनांतील तिसरें व्यंजन.
ग (पु.) (संकेतानें) गर्व; (वि.) (समासांत उत्तरपदीं) जाणारा. **ग ची बाधा होणें**—गर्व होणें.

**गई** (स्त्री.) गय, दुर्लक्ष, क्षमा.
**गईव** (वि.) अदृश्य, हरवलेला.
**गऊळवाडा** (पु.) गवळी लोकांचा गांव किंवा वसाहत; गाई, म्हशी इ. पशु बांधावयाची जागा. [ कांठचा प्रदेश.
**गंगथडी** (सं. गंगातट स्त्री.) गोदावरीच्या
**गगन** (सं. न.) आकाश.
**गगनचुंबित, गगनचुंबी** (सं. वि.) आकाशाला पोंचण्याइतका उंच. [ पुष्प.
**गगनोल, गगनीळ** (प्रा. न.) आकाश-
**गंगा** (सं. स्त्री.) भागीरथी; गोदावरी; पवित्र नदी; पवित्र नदीचें पाणी. **गं० स घोडे न्हाणें**—महत् कृत्य तडीस जाणें. **वाहत्या गंगेंत हात धुऊन घेणें**—सहजगत्या आपला फायदा करून घेणें.
**गंगाजमनी** (सं. हिं. वि.) दोन कांठ दोन निराळया रंगांचे असें (वस्त्र); मिसळीचें.
**गंगाजळी** (सं. स्त्री.) गंगा ठेवण्याचें भांडें; ठेव. **गं० उचलणें**—गंगेची शपथ घेणें.
**गंगाद्वार** (सं. न.) गोदावरीचें उगमस्थान.
**गंगाभागीरथी** (सं. स्त्री.) विधवा.
**गंगावन** (सं. न.) वनगाईचे काळे केस.
**गंगासागर** (वि. ना.) बंगालच्या आखाताचें शुद्धीकृत नांव.
**गंगाळ** (सं. गंगालय न.) स्नानासाठीं पाणी काढण्याचें एक विशेष आकाराचें भांडें. [ उगमस्थान.
**गंगोत्री** (सं. स्त्री.) गंगेचें हिमालयांतील
**गचकणें** (क्रि.) गचका खाणें.
**गचकळी** (स्त्री.) गटांगळी, डुबकी.
**गचका** (पु.) आंचका, धक्का; धक्का बसण्याची जागा; दुर्दैवाचा आघात.
**गचगच** (स्त्री.) ढिलाई.
**गचगचीत** (वि.) दाट; रगड; विपुल.
**गचपच** (स्त्री.) रेंदा, चिखल.
**गचपण** (न.) केरकचरा; अडगळ; अंगणांत वाढलेलें रान.
**गचाड** (न.) गर्द झाडी; घनता.
**गचांडी** (स्त्री.) मानेला धक्का; अर्धचंद्र.
**गचावणें** (क्रि.) बुडणें; धीर सोडणें.
**गचाळ** (वि.) नेभळट, भोंगळ, गैदी.
**गची** (प्रा. स्त्री.) मान; गचांडी (ज्ञा० ६।२३६).
**गचोरा** (पु.) कणसें येणें; ठोसा, धक्का.
**गच्च** (अ.) घट्ट, बळकट.
**गच्ची** (स्त्री.) चुन्याची जमीन; आगाशी.
**गच्चू** (पु.) नकार, हकालपट्टी.
**गच्छन्ती** (सं. स्त्री.) नाश होणें.
**गज** (सं. पु.) हत्ती.
**गज** (फा. पु.) २४ तसूंचें एक परिमाण; या लांबीची काठी; बंदुकींतली दारू ठासण्याची सळई. [जंग.
**गंज** (फा. पु.) रास; पेटी; उभट भांडें;
**गजकर्ण** (सं. न.) एक त्वचारोग.
**गजगजाट** (पु.) गलबला, गर्दी.
**गजगजीत** (वि.) गजबजलेलें.
**गजगति** (सं. स्त्री.) हत्तीसारखें हळू व डौलानें चालणें.
**गजघंट** (प्रा. पु.) हत्तींचा समुदाय.
**गजढाळा** (स्त्री.) हत्तीवरची नौबत; निशाण.
**गंजणें** (क्रि.) जंग चढणें, कीट बसणें.
**गजनी** (स्त्री.) एक प्रकारचें गर्भसुती वस्त्र.
**गजब** (अर. पु.) कमाल; हद्द; जुलूम; संकट; जोराचा मारा.
**गजबज** (स्त्री.) गडबड, गलबला.
**गजबजणें** (क्रि.) गर्दीमुळें गलबला होणें, गोंधळणें.
**गजंबु** (प्रा. पु.) गडबड.
**गजमोंगळी** (स्त्री.) कौलें घसरूं नयेत म्हणून माहुटीच्या पानाला लाविलेली काठी.
**गजर** (सं. पु.) घोष; वाद्यांचा मोठा आवाज.
**गजरा** (हिं. पु.) फुलांचें गुंफून केलेलें हस्तभूषण; स्त्रिया वेणींत घालतात तो पुष्पगुच्छ.
**गजल** (फा. पु.) फारशी प्रेमकाव्याचा एक प्रकार.
**गजान्तलक्ष्मी** (सं. स्त्री.) दाराशीं हत्ती झुलण्याइतकी संपत्ति.
**गजानन** (सं. पु.) गणपति.
**गजाल** (स्त्री.) गोष्ट; गप्प; ओरड.

**गंजिफा** (फा. स्त्री.) दशावतारी वाटोळ्या पत्त्यांचा खेळ.
**गंजी** (हिं. स्त्री.) रास.
**गंजीकोट** (वि.) प्रचंड, विशाल, असंख्य.
**गंजीखाना** (पु.) कडवा, गवत इत्यादींच्या अनेक गंजी ठेवण्याची जागा.
**गजेरी** (स्त्री.) नदीच्या पुरानें वाहत आलेला गाळ.
**गॅझिट** (सं. न.) वर्तमानपत्र.
**गट** (पु.) समुदाय, रास.
**गटकळी, गटंकळी** (स्त्री.) गचकळी, डुबकी.
**गटगट, गटगटां** (अ.) भराभर (पिणें).
**गटगटणें** (क्रि.) गटगट असा आवाज करणें; घोरणें.
**गटगटीत** (वि.) टपोरें.
**गटगटें** (न.) सुके मासे, बोंबील.
**गटंगळी, गटांगळी** (स्त्री.) गचकळी पहा.
**गटपटणें** (क्रि.) भांबावणें.
**गटर, गटार** (इं. न.) रस्त्याच्या बाजूची मोरी; नाली.
**गटार बातमी** अफवा, वदंता.
**गटारयंत्र** (न.) निराधार खोट्या बातम्या उत्पन्न करणारा.
**गट्ट करणें** खाऊन टाकणें.
**गट्टी** (स्त्री.) गाढ मैत्री.
**गटटू** (पु.) आच्छेराचें पितळी भांडें; (वि.) ठेंगणा, ठुसका पण मजबूत.
**गट्टेछाड** (पु.) मालाचे गठ्ठे सोडून आंतला माल चोरणारे.
**गठडी** (हिं. स्त्री.) पुरचुंडी, गांठोडें; गुप्त धन. **ग० वळणें**–भीतीनें निश्चेष्ट पडणें; अतिशय त्रेधा उडणें.
**गटडें** (न.) लहानसें गाठोडें; गुप्तपणें बाळगून ठेवलेलें द्रव्य, दागिने इ०
**गठली** (स्त्री.) गुंडी.
**गंठीखोड** (प्रा. पु.) भामटया.
**गंठीछोड** (वि.) कृपण.
**गठ्ठा** (पु.) बांधलेलें ओझें; गांठ; बोजा.
**गड** (हिं. पु.) दुर्ग, डोंगरी किल्ला; मोठें कठिण काम; संकट; गायवाडा.
**गंड** (सं. पु.) गाल; हत्तीचें डोकें; ज्योतिषांतला दहावा योग; गर्व, ताठा.

**गडकरी** (पु.) किल्ल्यावरचा शिपाई.
**गंडकीशिला** (सं. स्त्री.) शालिग्राम.
**गडकोन** (फा. पु.) पुढें आलेली टेकडी.
**गडखळ** (वि.) विकट, दुःसाध्य, गूढ; (न.) अडचण, संकट.
**गडखोल** (फा. पु.) घोड्याचा गळा.
**गडगच्च** (अ.) दाट, पुष्कळ, विपुल.
**गडगंज** (वि.) पुरून उरण्याजोगें; विपुल.
**गडगनेर** (पु.) केळवण पहा.
**गडगर्ज** (प्रा. पु.) मोठी गर्जना.
**गंडगोळ** (स्त्री.) उखळी तोफ; गरनाळ; (पु.) गिड्डा मनुष्य.
**गडगडणें** (क्रि.) गर्जना होणें; मोठा नाद करणें; गडगडत खालीं येणें; मरणें.
**गडगडाट** (पु.) गर्जना.
**गडघेणा** (वि.) किल्ला सर करण्याइतकें कठिण काम.
**गडण, गडणी** (प्रा. स्त्री.) मैत्रीण.
**गडत, गडद** (फा. वि. अ.) दाट; गाढ; अत्यंत निकट; निबिड; ठार, नष्ट; (पु.) अंधकार (स्वा०दि०२९।३।६९).
**गडदर, गडवर** (प्रा. पु.) खाच, खळगा; आड, विहीर (दा० ५।१।३७).
**गडडू** (पु.) भार, ओझें; (वि.) अगडबंब.
**गडनीस** (फा. पु.) डोंगरी किल्ल्यावरील एक अधिकारी.
**गडप** (अर. अ.) बेपत्ता, ठावठिकाण न लागे अशा प्रकारें. **ग० करणें**–दडपून टाकणें; लाटणें.
**गडबड** (स्त्री.) गोंगाट, गोंधळ; घोटाळा; बिघाड; व्यग्रता; धांदल.
**गडबडगुंडा करणें** गडबडीनें कसेंतरी उरकणें.
**गडबडणें** (क्रि.) गोंधळणें, व्यग्र होणें; गैरविल्हेस लागणें; घडघडत जाणें.
**गडबडाट** (पु.) अतिशय गोंधळ.
**गडबडाध्याय** (पु.) गोंधळ, घोटाळा.
**गडबड्या** (वि.) गडबड करणारा; धांदल्या, व्यग्र चित्ताचा.
**गंड** (पु.) ग्रंथी किंवा गांठ. **मनोगंड**–मानसिक विकृति.
**गंडभैरव** (प्रा. पु.) एक प्राणी, गेंडा.

**गंडमाळा** (स्त्री.) एका रोगाचें नांव.
**गंडमृग** (सं. पु.) गेंडा.
**गडवा** (पु.), **गडवी** (स्त्री.) तांब्या.
**गडसंद** (प्रा. स्त्री.) अडचण; ऐनवेळ; वोक्याची जागा.
**गंडस्थळ** (सं. न.) हत्तीचें मस्तक.
**गंडा** (पु.) चारांचा समुदाय; चार कवड्या; मंतरलेला दोरा. **गंडा घालणें**—भुलथापीनें दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणें.
**गडाडणें** (क्रि.) गर्जना करणें.
**गंडांतर** (सं. न.) जिवावरचें दुखणें; अपमृत्यु; भयंकर संकट.
**गंडार** (स्त्री.) लळीत; सोंगाचें भजन.
**गंडिया** (पु.) नपुंसक, षंढ; पराक्रमशून्य.
**गंडी** (स्त्री.) लहान चंबू.
**गडी** (पु.) मित्र, सोबती; किरकोळ नोकर; (खेळांत) भिडू; (स्त्री.) गड्डी, जुडी; गढी; मैत्री; मैत्रीण.
**गंडू** (प्रा. पु.) दर्प, गर्व.
**गडू** (पु.) पाणी पिण्याचें विशेष आकाराचें लहान पात्र.
**गंडूष** (सं. पु.) चूळ; घोट.
**गडे** (संबो.) सखे !
**गडेकरी** (पु.) हत्तीपुढें चालणारा भोलकरी.
**गंडेरी, गंडोरी** (स्त्री.) उंसाचा करवा; लुगड्याच्या पदराचा एक विशेष प्रकार.
**गड्डा** (पु.) कंद; गोळा; सांठा.
**गड्डी** (स्त्री.) जुडी; कागदाचे दहा दस्ते.
**गढणें** (क्रि.) तल्लीन होणें.
**गढा** (स्त्री.) भुईकोट किल्ला.
**गढी** (हिं. स्त्री.) लहान किल्ला; लहान तर; सोनाराचें एक हत्यार.
**गढूळ** (वि.) गदळ, कलुषित, राड, मातट.
**गण** (सं. पु.) समुदाय; वर्ग; सेवक किंवा भक्त यांचा समूह; जन्मनक्षत्रावरून देवगण, राक्षसगण इ० पाडलेले वर्ग; कवितेंत अक्षरांच्या गुरुलघुत्वावरून पाडलेला मगण, भगण इ० वर्ग; गुण्यांक व गुणकांक एकच कल्पून जो गुणाकार होतो तो वर्ग.
**गणक** (सं. पु.) ज्योतिषी; मतें मोजण्यास नेमलेला माणूस.
**गणंग** (पु.) टचटचीत दाणा. [वाईक.
**गणगोत** (सं. न.) आप्त, सोयरे, नाते-
**गणणें** (सं. गण् क्रि.) मोजणें, मापणें; पर्वा करणें; महत्त्व देणें.
**गणतंत्र** (न.) प्रजासत्ताक शासन.
**गणती** (सं. गण स्त्री.) मोजणी. [भाव.
**गणना** (सं. स्त्री.) संख्या; हिशेब; अंत-
**गणनीय** (सं. वि.) हिशेबांत घेण्याच्या लायकीचा; गणण्यास योग्य; महत्त्वाचा.
**गणपति** (सं. पु.) गजानन.
**गणवेश** (पु.) विशिष्ट संप्रदायाचा किंवा संस्थेचा पोशाख.
**गणसत्ताक** (वि.) प्रजासत्ताक.
**गणसंख्या** (स्त्री.) सभेचें काम चालू होण्यासाठीं अवश्य असलेली सदस्यांची संख्या.
**गणाधीश** (पु.) गणपति.
**गणिका** (सं. स्त्री.) वेश्या.
**गणित** (सं. न.) अंकांची घडामोड करून त्यापासून कांहीं फळ काढण्याची विद्या.
**गणितश्रेढी** (सं. स्त्री.) ज्या श्रेढीतील संख्या कोणत्या तरी एका अंतरानें वाढत जातात किंवा कमी होतात ती.
**गणीक, गणीत** (अ.) प्रत्येकीं.
**गणेश** (सं. पु.) गजानन, गणपति.
**गणेशचतुर्थी** (स्त्री.) भाद्रपद शु० ४.
**गणेशटोपी** (स्त्री.) मुलें खेळतांना एकाद्याला बडविण्यापूर्वी त्याच्या डोक्यावरून जें वस्त्र घालतात तें.
**गण्य** (सं. वि.) गणण्यास योग्य.
**गण्या** (पु.) खंड्या, पानकावळा.
**गत** (सं. वि.) गेलेला, (सं. गति स्त्री.) गति; दशा; अवस्था; (गायनांत) वाद्य वाजविण्याची रीत; (अ.) प्रमाणें. **गत होणें**—मरणें.
**गतका, गदका** (पु.) घामाघूम शरीरावस्था. कढ; गदगद कढणें.
**गतप्राण** (सं. वि.) मेलेला.
**गतभर्तृका** (सं. स्त्री.) विधवा.
**गंतव्य करणें** जाणें.

**गतानुगतिक** (सं. वि.) पुढें गेलेल्यांच्या मागून डोळे मिटून जाणारा.
**गतायु** (सं. वि.) मृत.
**गताळका** (सं. गतालका स्त्री.) अकेशा, विधवा. [ ण्याची ढब; क्रम.
**गति** (सं. स्त्री.) गमन; धाव; वेग; चाल-
**गत्यंतर** (सं. न.) अन्य मार्ग; इलाज; सवड.
**गथागोवी** (प्रा. स्त्री.) गाथागोवी शब्द पहा.
**गदगदणें, गदमदणें** (क्रि.) उष्मा होणें.
**गदगदां** (अ.) मोठ्यानें (हंसणें.).
**गदगा** (पु.), **गदगी** (स्त्री.) चामड्यानें मढविलेला सोटा; लाकडी तलवार.
**गदर** (पु.) गजर.
**गदरणें** (क्रि.) पिकण्याच्या स्थितीला येणें; घामानें डवडवणें.
**गदळ** (न.) केरकचरा, घाण; (वि.) घाणेरडा; मळकट.
**गदा** (सं. स्त्री.) एक आयुध; लोखंडाची कांव; मधुकरी (तुका० ७९३)..
**गदाधर** (सं. पु.) गदा धारण करणारा.
**गदारणें** (प्रा. क्रि.) तृप्त होणें, उकडणें.
**गदारोळ** (पु.), **गदारोळी** (स्त्री.) गर्जना, कल्लोळ; पांडित्य; निरूपण.
**गदेला** (पु.) मोठी गादी.
**गद्‍गद** (सं. वि.) अंतःकरण उचंबळून आल्यामुळें तोंडांतून अडखळत निघणारा अथवा अस्पष्ट (ध्वनि).
**गदीन** (वि.) गदायुद्धनिपुण.
**गद्दी जमीन** (स्त्री.) पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत आलेला खळमळ व गाळ सांठून झालेली जमीन; ही फार सुपीक म्हणून भातास चांगली असते.
**गद्धा** (सं. गर्दभ पु.) गाढव.
**गद्धेपंचविशी** (स्त्री.) विवेक न राहण्याचा तारुण्यांतील काळ.
**गद्धेमल्हार** (पु.) कर्कश सुरांतलें गायन किंवा भाषण.
**गद्य** (सं. न.) ज्यांत गण, मात्रा, अक्षरें वगैरेविषयीं कांहीं निर्बंध नसतो असें लेखन, गाथा.
**गंदकी** (स्त्री.) घाण, कचरा.

**गंध** (सं. पु.) वास; सुवास; चंदन वगैरेचा टिळा. [ पदार्थ.
**गंधक** (सं. न.) एक ज्वालाग्राही खनिज
**गधडा** (पु.) गाढव.
**गंधर्व** (सं. पु.) देवांचा गवई; उत्तम गाणारा; (पु.) स्त्रीचा पुनर्विवाह.
**गंधर्व-नगर** (सं. न.) मिथ्या भास; आकाशांतल्या ढगांचा देखावा.
**गंधर्व-विद्या** (सं. स्त्री.), **गंधर्व-वेद** (सं. पु.) गायनकला.
**गंधर्व-विवाह** (सं. पु.) स्त्रीपुरुषांच्या परस्पर प्रेमानें किंवा करारानें झालेलें लग्न.
**गंधवार्ता** (सं. स्त्री.) यत्किंचित् ज्ञान.
**गंधाक्षत** (सं. स्त्री.) धार्मिक कृत्याला प्रारंभ करतांना यजमानानें उपाध्यायाच्या कपाळीं लावण्याचा टिळा.
**गंधी** (सं. स्त्री.) दुर्गंध; (पु.) सुगंधि सामान विकणारा.
**गनिमाई** (अर. स्त्री.) शत्रूची धाड; गनिमी कावा. [ईश्वरी कृपा.
**गनिमात** (अर. स्त्री.) विपुलता; लूट;
**गनीम** (अर. पु.) शत्रु. [ स्तब्ध.
**गप, गप्प** (हिं. स्त्री.) अफवा, वार्ता; (वि.)
**गप्‌कन्** (अ.) एकदम.
**गपचीप, गपचूप, गपगार** (हिं. अ.) मुकाट्यानें.
**गप्प** (स्त्री.) गप पहा.
**गप्पागोष्टी** (स्त्री. अने.) इकडच्या तिकडच्या रिकाम्या गोष्टी. [ गोष्टी.
**गप्पाष्टक** (न.) चकाट्या; निरुपयोगी
**गप्पोदास** (पु.) थाप्या, गप्पा मारणारा.
**गफलत** (हिं. स्त्री.) असावधानता, हलगर्जीपणा; चूक.
**गफलती** (वि.) लबाड, हलगर्जी.
**गबगबीत** (वि.) मांसल, लठ्ठ.
**गबदू, गबदूल** (हिं. वि.) लठ्ठ, वाटोळ्या अंगाचा.
**गबर, गब्बर** (हिं. वि.) श्रीमंत.
**गबान** (वि.) सुपीक; फायदेशीर.
**गबाळ** (वि.) निरुपयोगी, टाकाऊ, अव्यवस्थित.

**गवेलें** (न.) घमेलें.
**गव्बू** (वि.) लठ्ठ आणि ठेंगणा; गिड्डा.
**गब्रू** (हिं. पु.) सुंदर तरुण; (आढचतेनें) हुशार.
**गभस्ति** (सं. पु.) सूर्य.
**गंभीर** (सं. वि.) खोल; शांत; धैर्यवान्.
**गम** (अर. पु. स्त्री.) स्तब्धता, शांतता; दुर्लक्ष, क्षमा. **गम खाणें**—धीर धरणें, क्षमा करणें.
**गमक** (सं. न.) पुरावा, आधार, प्रमाण; गर्व; ऐकणारांच्या चित्ताचें हरण करील असें स्वराचें कंपन; (वि.) सूचक.
**गमजा** (फा. पु. स्त्री.) ऐट, नखरा; गर्व; लटपट. **ग० करणें**–वेडे वेडे चाळे करणें.
**गमणें** (क्रि.) भासणें, वाटणें; पावण (ज्ञा० ५।२९); रमणें (विठ्ठल-सीतास्व०४।१); रंगाळणें.
**गंमत** (स्त्री.) मौज, करमणूक, खेळ.
**गमती** (वि.) मौजा करणारा; विनोदी.
**गमन** (सं. न.) जाणें.
**गमविणें** (सं. गम् क्रि.) फुकट घालविणें.
**गमाऊ** (वि.) घालविणारा,
**गमावणें** (क्रि.) मरणें; हरवणें.
**गमावा** (प्रा. वि.) चालण्याचा, जाण्याचा.
**गम्य** (सं. वि.) जाण्यास योग्य; जाणण्यास योग्य; ज्ञान, परिचय.
**गय** गई पहा.
**गयावया** (अ.) करुणास्पद रीतीनें.
**गयावर्जन** (सं. न.) गया क्षेत्रीं यात्रेकरू श्राद्ध वगैरे विधि करतात तें.
**गयावळ** (पु.) गया क्षेत्रांतला उपाध्याय; आचारहीन भिक्षुक.
**गयाळ** (वि.) अजागळ, गचाळ, वावळा.
**गर** (पु.) गीर, मगज; (न.) विष.
**गरका** (पु.) घेर; प्रदक्षिणा; चक्कर; वाटोळें फिरणें; घोटाळा.
**गरगट** (पु. न.) अर्धवट घट्ट व अर्धवट पातळ असें मिश्रण; एक औषध.
**गरगटणें** (क्रि.) वाटणें, उगाळणें, घोटणें.
**गरगटा** (पु.) दगडाचा खल.
**गरगडा** (पु.) बाळंतिणीला देण्याचा काढा; गर्दी, गोंधळ.
**गरगरा** (अ.) चक्राकार.
**गरगरीत** (वि.) अगदीं वाटोळा.
**ग़रगशा, गर्गशा** (फा. पु.) गोंधळ; आरडाओरड.
**गरगा** (पु.) खळगा.
**गरगुटी** (स्त्री.) मानगुटी.
**गरगोटी** (स्त्री.) मान.
**गरज** (अर. स्त्री.) जरुरी, आवश्यकता; (पु.) मोत्यांतील नर दाणा.
**गरजणें** (सं. गर्ज् क्रि.) गर्जना करणें.
**गरजवंत** (वि.) गरजू.
**गरजू** (वि.) ज्याला जरुरी किंवा वाण भासते असा.
**गॅरंटी** (इं. स्त्री.) हमी, जिम्मा.
**गरड** (स्त्री.) जोराची वावटळ. [स्त्री.
**गरती** (सं. गृहवती वि.) कुलीन, संभावित
**गरद** (वि.) गर्द, दाट.
**गरदन** (फा. स्त्री.) गर्दन, मान.
**गरनाळ** (हिं. स्त्री.) एक प्रकारची तोफ.
**गरबरणें** (क्रि.) गुरगुरणें.
**गरभा** (पु.) गुजराथी लोकनृत्य.
**गरम** (हिं. वि.) उष्ण. [ण्याचा मसाला.
**गरम मसाला** (पु.) भाजीला वगैरे घाल-
**गरमागरम** (हिं. वि.) फार उष्ण; उन्हून.
**गरमी** (हिं. स्त्री.) उष्णता; उपदंश रोग.
**गरल** (सं. न.) विष. [(धान्य).
**गरवस, गरवा** (वि.) उशिरानें पिकणारें
**गरवार** (प्रा. वि.) गर्भार, गरोदर.
**गरस** (स्त्री.) तोंडावांचून असलेलें गळू.
**गरसळी** (स्त्री.) गळसरी; पुतळ्या व मणि यांची माळ.
**गरळ** (सं. न.) विष.
**गरळा** (पु.) वनस्पतीचा रस व विडा चावून थुंकणारी पिंक यांचें मिश्रण.
**गरा** (पु.) फणसांतला मगज.
**गरांठी** (स्त्री.) दुबेळकी काठी.
**गराडा** (पु.) घेरा, वेढा.
**गराडी** (स्त्री.) गाडीची चाकोरी.
**गरादा** (पोर्तु. पु.) गज, कठडा.
**गरिमा** (पु.) भारदस्तपणा, गांभीर्य.
**गरीतोड** (अ.) तावडतोब, त्वरेनें, एकदम.
**गरीब** (अर. वि.) दरिद्री; सात्त्विक वृत्तीचा.

**गरीबनवाज** (फा. पु.) गरिबांचे धनी.
**गरीबपरवर** (अर. वि.) गरिबांचा कनवाळू.
**गरीबी** (स्त्री.) दारिद्र्य ; सात्त्विक वृत्ति.
**गरीबी हरीपी** (स्त्री.) दारिद्र्य आणि श्रीमंती.
**गरुड** (सं. पु.) विष्णूचें वाहन; गरुडपक्षी.
**गरुडटका** (प्रा. पु.) गरुडाचें चिन्ह धारण करणारी पताका.
**गरुडपार** (पु.) विष्णूच्या किंवा त्याच्या अवताराच्या मूर्तीपुढें गरुडाची मूर्ति जेथें बसविली असते ती उंच जागा.
**गरुरी** (अर. स्त्री.) मगरुरी, ताठा; गर्व.
**गरुवती, गुरुवती** (स्त्री.) श्रेष्ठता.
**गरुवा** (प्रा. वि.) म्हातारा, मोठा; (पु.) गर्व.
**गरोदर** (सं. गुरु + उदर वि.) गर्भार.
**गर्क, गरक** (वि.) बुडालेला, मग्न, तल्लीन; गाढ.
**गर्ग** (पु.) मुनिविशेष.
**गर्गशा** (फा. पु.) गोंधळ, आरडाओरड.
**गर्गाचार्याचा मुहूर्त** सूर्योदयापूर्वी ५ घटकांपासून सूर्योदयानंतर ३ घटकांपर्यंतचा काल; हा फार शुभ मुहूर्त समजतात. पांच घटका रात्र उरली म्हणजे उषःकाल होतो. तो गर्गमुनीनें शुभ मुहूर्त मानिला आहे, म्हणून त्याला हें नांव आहे.
**गर्जना** (सं. स्त्री.) गडगडाट, मोठा शब्द.
**गर्जित** (न.) मेघाची गर्जना; गडगडाट.
**गर्ता** (सं. स्त्री.) खांच.
**गर्द** (वि.) दाट, निबिड.
**गर्दन** (फा. स्त्री.) मान.
**गर्दभ** (सं. पु.) गाढव.
**गर्दी** (फा. स्त्री.) दाटी; विपुलता; आरडाओरड; झटापट, गडबड.
**गर्दोवर्दी** (अ.) आवतीभोंवतीं.
**गर्नाळा** (हिं. स्त्री.) एक प्रकारची तोफ.
**गर्भ** (सं. पु.) गाभा, अंतर्भाग; पोट; पोटांतलें पोर; तात्पर्य.
**गर्भगळित** (सं. वि.) अतिशय भ्यालेला.
**गर्भगाळ कोसळणें** गर्भगळित होणें; भेदरून जाणें.
**गर्भपात** (सं. पु.) चार महिन्यांनंतरचा गर्भ गळून पडणें किंवा पाडणें.
**गर्भश्रीमंत** (सं. वि.) श्रीमंतींत जन्मलेला.
**गर्भसुती** (सं. वि.) ज्याचें उभें सूत कापसाचें व आडवें रेशमाचें आहे असें.
**गर्भस्थ** (सं. वि.) गर्भांत राहणारा; (प्रा.) गर्भार.
**गर्भा** (सं. पु.) गुजराथी चालीचा एक नाच; त्या नाचाच्या वेळेस म्हणण्याचें एक गाणें.
**गर्भाधान** (सं. न.) ऋतुशान्ति.
**गर्भार, गर्भारशी** (सं. वि.) गरोदर.
**गर्भाशय** (सं. पु.) गर्भ राहण्याची जागा, कूस.
**गर्भिणी** (सं. स्त्री.) गरोदर स्त्री.
**गर्भित** (सं. वि.) ध्वनित, फलित. [ताठा.
**गर्व** (सं. पु.) अहंकार, अभिमान, मान,
**गर्हणीय** (सं. वि.) निंद्य.
**गर्ह्य** (सं. वि.) निंद्य.
**गल** (सं. पु.) गळा. **ग०ग्रह** (पु.) गळा दावणें; एक कंठरोग; अनध्यायाचा दिवस; भारभूत माणूस.
**गलका, गलगा** (पु.) गलबला, गडबड.
**गलगंड** (सं. पु.) गंडमाळा. [झुबका.
**गलगुच्छ** (सं. पु.) गालावरचा मिशांचा
**गलची** (स्त्री.) गळा, मानगुटी.
**गलंड** (न.) बेंड.
**गलत** (अर. स्त्री.) गडबड, अव्यवस्था; पत्त्यांच्या खेळण्यांत पानांची पिसणी.
**गलतन** (स्त्री.) गलत पहा.
**गलतान** (सं. गलस्तन न.) निरुपयोगी प्राणी.
**गलती** (अर. स्त्री.) चूक, दोष.
**गलत्कुष्ट** (सं. न.) ज्यांत रोग्याचे अवयव हळू हळू क्षीण होऊन गळून पडतात असा एक भयंकर रोग.
**गलथा** (पु.) लाकडाच्या किंवा भिंतीच्या शेवटास दिलेला गोल आकार; कंगोरा; ओटा.
**गलन** (सं. न.) वितळणें, गळणें.
**गलफ** (न.) आच्छादन.
**गलफटणें, गलफाटणें** (क्रि.) गुरफटून जाणें; घोटाळणें, घोटाळून जाणें.

**गलफाडा** (पु.) गोंधळ, अव्यवस्था.
**गलवत** (न.) जहाज, तारू.
**गलबल** (स्त्री.), **गलबला** (पु.) कल्ला, गलका, गडबड.
**गलबलणें** (क्रि.) घाबरणें.
**गलबला, गलबलाट** (पु.) मोठा गोंगाट, कलकलाट, आरडाओरड.
**गलबल्या** (वि.) गलबल करणारा.
**गलबा** (अर. पु.) गडबड, मोठा आवाज.
**गलमुच्छ** (वि.) ज्याच्या मिशांचीं जाड अग्रें गालावर वळविलेलीं आहेत असा.
**गलश्च कंठश्च** (सं. न.) अतिशय दाट मैत्री.
**गल्हाटा** (पु.) दुर्दशा.
**गलांड** (न.), **गलांडा** (पु.) गळू.
**गलिचा** (पु.) गालिचा.
**गलिच्छ** (अर. वि.) घाणेरडा, मळिण.
**गलित** (सं. वि.) गळालेलें.
**गलिम** गनीम पहा.
**गलेफ** (फा. पु.) गवसणी, पिशवी; (अर. पु.) पिराच्या कबरेवर घालण्याचें झालर लावलेलें वस्त्र.
**गलेलठ्ठ** (वि.) धष्टपुष्ट.
**गलोल** (पु.), **गलोली** (स्त्री.) गोफण.
**गल्ल** (सं. पु.) गाल; (स्त्री.) गोट्या टाकण्यासाठीं केलेली लहान खांच.
**गल्ला** (फा. पु.) धान्याचा सांठा.
**गल्ली, गल्लीकुची** (हिं. स्त्री.) बोळ, आळी, लहान रस्ता.
**गलहाला** (पु.) दुर्दशा.
**गंव, गव** (स्त्री.) आटोका, ताकत; हातांची वेंघ; पत; गुप्तपणा; मतलब.
**गवई** (सं. गै पु.) गायक; गाणारा.
**गवख, गवखें** (सं. गवाक्ष न.) गवाक्ष, खिडकी; मध्य.
**गवगवा** (पु.) बोभाट, गडबड, गर्दी.
**गवंड** (पु. न.) जंगलांत चरणाऱ्या गुरांची पाऊलवाट.
**गवंड** (सं. गोवर्तनी न.), **गवंडी** (स्त्री.), **गोवंडी** (स्त्री.) डोंगरांत चरणाऱ्या गुरांच्या पायांनीं मळलेली वाट.
**गवंडी** (पु.) घराचें बांधकाम करणारा.
**गवणें** (प्रा. क्रि.) प्राप्त होणें.

**गवत** (न.) तृण.
**गवताळ** (वि.) जेथें पुष्कळ गवत उगवतें तें.
**गवत्यागोमाजी** कोणी एक क्षुद्र मनुष्य.
**गवद** (न.) रानोमाळ उगवणारी वनस्पति.
**गवय्या** (हिं. पु.) गवई.
**गंवरी** (स्त्री.) गोंवरी.
**गवशा** (वि.) सांपडलेला.
**गवस** (पु.) शोध, तपास.
**गवसणी** (स्त्री.) आच्छादन, वेष्टन; व्याप्ति.
**गवसणें** (सं. गवेष् क्रि.) सांपडणें; आच्छादणें.
**गवसार** (अ.) फायदेशीर रीतीनें.
**गवळण** (स्त्री.) गवळ्याची बायको; कोष्टी पक्षी.
**गवळी** (पु.) दुधाचा व्यापारधंदा करणारा.
**गवा** (सं. गवय पु.) रानरेडा; रानगाय.
**गवादी, गवांदी** (प्रा. स्त्री.) अन्नछत्र (तुका० २३।४०); गव्याचें शिंग.
**गवाणी** (स्त्री.) जनावरापुढील चाऱ्याची जागा.
**गंवार** (हिं. वि.) गांवढळ, अडाणी.
**गवारी** (स्त्री.) गोवारी (एक भाजी).
**गवाळा** (प्रा. पु.) पोथ्यापत्रें.
**गवाळें** (न.) सोंवळ्याचें वासन; सामानसुमान. [झरोका.
**गवाक्ष** (सं. पु. न.) जाळी, खिडकी,
**गवी, गावी** (स्त्री.) चिमटा.
**गवी** (स्त्री.) सरकारी कामदारांनीं केलेली जमाबंदी किंवा सोडलेले हुकूम मान्य न करणाऱ्या गांवकऱ्यांची जूट.
**गवेषण** (सं. न.) शोध, अभ्यास.
**गव्य** (सं. वि.) गाईचें; (न.) गोरस.
**गव्हर** (सं. पु.) गुन्हा; अंतर्याम, हृद्गत.
**गव्हरणें** (प्रा. क्रि.) गौरविणें, वर्णणें.
**गव्हरनर** (इं. पु.) इलाख्याचा अधिकारी.
**गव्हला** (पु.) गव्हाच्या रव्याची किंवा सपीटाची मळून कांहीं विशेष प्रकारची केलेली लहान गोळी.
**गव्हळी** (प्रा. वि.) पिवळीजर्द.
**गव्हाण, गव्हान** (न.) पागळयाच्या हातांतलें टेंकण.
**गंव्हार** (वि.) गांवढळ, अडाणी.

**गव्हाळी** (स्त्री.) गहूं पेरण्यास योग्य जमीन.
**गस्त** (फा. स्त्री.) रात्रीं लोकांच्या संरक्षणार्थ फिरणारे शिपाई; त्यांची फिरती; पहारा; (न.) ग्रहण, सोपा. [शिपाई.
**गस्तकरी** (पु.) रात्रीं फिरती करणारा
**गस्तगीर** (पु.) फिरता व्यापारी; अडाणी, गांवढळ मनुष्य.
**गस्ती** (फा. स्त्री.) पहारा.
**गहजब** गजब पहा.
**गहजरी** (स्त्री.) जोराचा तडाखा.
**गहदम** (हिं. अ.) वेळोवेळीं, एकसारखा, सतत.
**गहन** (सं. वि.) कठिण, दुर्गम, दुर्ज्ञेय.
**गहना, गह्ना** (हिं. पु.) दागिना, किडूकमिडूक.
**गहाण, गहाणवट** (फा. न.) कर्जाऊ रकमेच्या मोबदल्यांत सावकाराजवळ जो जिन्नस, जमीन, घर इ. ठेवतात तें.
**गहाळ** (वि.) अव्यवस्थित; गैरविल्हेस लागलेला.
**गहिरा** (हिं. वि.) खोल; सुरेख, खुललेली.
**गहिला** (प्रा. वि.) वेडा.
**गहिंवर** (सं. पु.) कंठ दाटून येणें.
**गहिंवरणें** (क्रि.) कंठ दाटून येणें.
**गहिंस** (प्रा. वि.) जड, मूढ, अडाणी (भा० ३।६७८); वाईट; प्रचंड (भा० ३।१७४).
**गहूं** (सं. गोधूम पु.) एका धान्याचें नांव.
**गळ** (पु.) मासे धरण्याची आकडा लाविलेली काठी; लोखंडाचा आकडा; फाशीं देण्याचा आकडा; (स्त्री.) भीड. **गळ घालणें**–आग्रह करणें.
**गळका** (वि.) पाझरता, फुटका.
**गळगा** (प्रा. पु.) गळती.
**गळंगा** (प्रा. पु.) घोटाळा.
**गळग्रह** (सं. पु.) फार त्रास देणारा.
**गळचिपी, गळचेपी** (स्त्री.) दाबून टाकण्याचा किंवा मारण्याचा यत्न.
**गळचेंडी** (स्त्री.) मानेची मागची बाजू.
**गळचोंडी** (स्त्री.) गचांडी.
**गळजोट** (प्रा. स्त्री.) गट्टी, मैत्री.
**गळणी** (स्त्री.) चाळण, गाळण, नरसाळें.
**गळणें** (सं. गल् क्रि.) पाझरणें, निघणें, वाहणें; क्षीण होणें; सुटणें.
**गळंत** (न.) एकाद्या शब्दाचा संक्षेप करतेवेळीं त्याचें पहिलें अक्षर लिहून पुढें पूज्य लिहितात तें; (वि.) गळालेला.
**गळती** (स्त्री.) अभिषेकपात्र.
**गळतें** (न.) वुळकी, भोक.
**गळदंडा** (पु.) गळ्यांतला हार (मा०भा०).
**गळपट** (अ.) गच्च.
**गळफटणें** (क्रि.) गुरफटणें; गुंतागुंत होणें.
**गळफटा, गळफाटा** (पु.) गुंतागुंत.
**गळफास** (पु.) गळ्याला घातलेला फास.
**गळबंद** (पु.) खोगिराच्या पुढच्या भागाचा बंद. [पोळें.
**गळवटी** (स्त्री.) बैलाच्या मानेखालचें
**गळस** (प्रा. वि.) मांसल. [कंठभूषण.
**गळसर, गळसरी** (स्त्री.) स्त्रियांचें एक
**गळसुटी, गळसोटी** (प्रा. पु.) गळ्याचा एक रोग.
**गळसूत्र** (सं. न.) गळ्यांतील पट्टा.
**गळश्च कंठश्च** (न.) दाट मैत्री.
**गळा** (सं. गल पु.) कंठ; स्वर; आवाज. **गळा काढणें**–मोठ्यानें रडणें; **गळा कापणें**—फसविणें; **गळा गुंतणें**—पेंचांत सांपडणें; **गळा फुटणें**—आवाजांत चीर किंवा कर्कशता येणें; **गळीं उतरणें**—पटणें, समजणें; **गळीं पडणें**–फार फार भीड घालणें; **गळ्यांत बांधणें**—पतकरण्यास भाग पाडणें; **गळ्यांत घोंगडें येणें**–लचांड येणें; **गळ्यावर म्हणणें**–मधुर शास्त्रशुद्ध रीतीनें चालीवर गाणें; **गळ्याशीं येणें**–नुकसानीची वाव होणें; **गळ्यांतला ताईत**–अत्यंत प्रिय.
**गळाकापू** (पु.) गळेकापू.
**गळाठणें** (क्रि.) थकणें, दमणें.
**गळाठा** (पु.) थकवा; दुर्दशा; अव्यवस्था; पाचोळा. [अडचण.
**गळाठी** (स्त्री.) भानगड, गुंतागुंत,
**गळांड** (न.), **गळांडा** (पु.) गळू.
**गळापडू, गळेपडू** (वि.) लोचट, हट्टी, हेकेखोर, पिच्छा पुरविणारा; अनिवार्य.
**गळाळा** (प्रा. पु.) घोट.

**गळी** (वि.) खड्या सुराचा.
**गळीत** (सं. गलित न.) ज्यापासून तेल निघतें असा पदार्थ.
**गळूं** (न.) वेंड, उठाणूं.
**गळूंगा** (वि.) घट्ट (प्रभा० पृ० २३५).
**गळेकापू** (वि.) दगलबाज.
**गळेहाटा** (पु.) पेच; अशक्तपणा, थकवा.
**गळोटी, गळोठी** (स्त्री.) गळपट्टी, गळयास बांधण्याची कापडाची पट्टी.
**गा** (अ.) अग, अरे.
**गाईर** (स्त्री.) गांठ, ग्रंथि.
**गाई** (सं. गो स्त्री.) गाय.
**गाउली** (स्त्री.) गाईस प्रेमानें मारण्याची हाक.
**गाऊडी** (प्रा. वि.) गांवढळ.
**गाऊल** (न.) प्राप्ति; अकल्पित फायदा.
**गाकर, गाखर** (पु.) गव्हाची एक प्रकारची निखाऱ्यावर भाजलेली जाड पोळी.
**गाखर** (पु.) निखारा.
**गागणें** (क्रि.) ओरडणें, त्रासणें.
**गांगरडा** (पु.) ओरडा.
**गांगरणें** (क्रि.) भीतीनें घाबरणें, गांधळणें.
**गागरा** (पु.) नागपुराकडे–धूळ, कचरा.
**गागाचार्य** (पु.) शिवाजीला राज्याभिषेक करणारा पंडित; पोकळ पांडित्य मिरविणारा.
**गागादीक्षित, गागाभट्ट** (पु.) गागाचार्य पहा.
**गागाभट्टी** (स्त्री.) पोकळ पांडित्य.
**गागावणें** (क्रि.) रागानें ओरडणें.
**गांगेय** (सं. पु.) गंगेचा पुत्र, भीष्म.
**गांजणूक** (स्त्री.) छळ, त्रास. [होणें.
**गाजणें** (सं. गर्ज् क्रि.) नांवाजणें; जाहीर
**गांजणें** (क्रि.) छळणें, जाच करणें.
**गाजर** (का. गज्जरि न.) भाजीचा एक कंद. [नाहीं असा; वेवकूफ.
**गाजरपारखी** (पु.) ज्याला खरी परीक्षा
**गाजविणें** (क्रि.) प्रसिद्धीस आणणें. **तलवार गाजविणें**—पराक्रम करणें.
**गांजवा** (पु.) फळें वगैरे नेण्याचें जाळें.
**गांजा** (सं. गंजा पु.) भांगेच्या रोपाच्या मंजिऱ्या.
**गाजावज्य** (प्रा. न.) गजवज.
**गाजावाजा** (पु.) प्रसिद्धि.
**गांजिवा** (प्रा. पु.) पिशवीसारखें जाळें.
**गाजी** (अर. पु.) वीर, योद्धा, पराक्रमी पुरुष; धर्मसंरक्षक.
**गांजेकस** (हिं. वि.) गांजा ओढणारा.
**गांझा** (पु.) आंबे ठेवण्याचें जाळें.
**गाटा, गाटचा** (वि.) हट्टी.
**गांठ** (सं. ग्रंथि स्त्री.) भेट; काम; संबंध; ग्रंथि; तोंड न पडलेलें गळूं; गड्डा; लक्ष.
**गांठीस असणें** जवळ असणें.
**गांठणें** (क्रि.) गांठ देऊन सांधणें; पकडणें, पांचणें; वठणीवर आणणें.
**गांठलें** (न.) माळ, गळयांतला एक अलंकार.
**गांठळ, गांठाळ** (वि.) ग्रंथियुक्त; मांसल.
**गांठा** (प्रा. पु.) पिंजरा; कंठमणि.
**गांठी** (स्त्री.) माळ (साखरेच्या पदकांची, लवंगांची वगैरे); (प्रा.) अहंकार.
**गांठोडी** (स्त्री.) गठडी.
**गांठोडें** (न.) बोचकें; गुप्त धन.
**गांठोळी** (प्रा. स्त्री.) पदरचें द्रव्य; भांडवल.
**गांठ्याळ** (वि.) गांठळ; (प्रा. वि.) कपटी.
**गांड** (स्त्री.) गुदद्वार.
**गाडगें** (न.) मडकें.
**गाडणें** (सं. गर्त् क्रि.) पुरणें.
**गाडद** (पोर्तु० गार्ड पु.) पाहरा, चौकी.
**गाडदी** (पोर्तु. गारडा पु.) पाहरेवाला शिपाई.
**गांडमणी** (प्रा. पु.) गुह्य.
**गाडा** (पु.) ओझ्याची किंवा मोठी गाडी; चाकाचा घेर; डफाचें कडें. **चालत्या गाड्याला खीळ घालणें**—सुरळीतपणें चाललेल्या कामांत विघ्न करणें.
**गाडानाडा** (पु.) व्याप, पसारा.
**गाडी** (हिं. स्त्री.) धमनी; वाहन; ढोलक्याचें कडें. [धनुष्य.
**गांडीव** (सं. न.) अर्जुनाचें सुप्रसिद्ध
**गाडीवान** (पु.) गाडी हाकणारा.
**गांडू** (वि.) दुबळ, भित्रा; निरुपयोगी.
**गांडूळ** (न.) आळीसारखा एक क्षुद्र जीव.

**गोंड** (न.) गाडी; व्यवहार; काम.
**गाडोर, गांडोरा, गाडोरा** (प्रा. पु.) पायांतली भर; पाया.
**गांड्या** (वि.) गांडू पहा.
**गाढ** (वि.) दाट, निबिड; खोल; मोठा.
**गाढमूढ** (वि.) अतिशय गाढ (निद्रा.).
**गाढव** (सं. गर्दभ न.) गर्दभ. **गाढवाचा खरारा**—मूर्ख; **गाढवाचा नांगर फिरवणें**—जमीनदोस्त करणें; **गाढवानें शेत खाल्ल्याचें पाप ना पुण्य**—हलकटावर केलेले उपकार फुकट जातात.
**गाढवी** (स्त्री.) गर्दभी. [ पटाईत.
**गाढा** (हिं. वि.) दाट; दृढ; पक्का; धीट,
**गांढा** (प्रा. वि.) गांडू; नपुंसक.
**गाढिका** (प्रा. स्त्री.) दृढता.
**गाढें** (प्रा. वि.) दुर्बळ. [ भित्रा.
**गांढ्या** (प्रा. वि.) फजीतखोर, दुबळा,
**गाण** (प्रा. पु.) गायक, गाणारा (ना० गा० २१९); (न.) डोंगरावरची पाण्याची जागा.
**गाणी** (वि.) गाणारीण.
**गाणीव** (प्रा. वि.) गाणारा (ना० गा० २१९); (न.) गायनचातुर्य.
**गाणें** (सं. गायन न.) गायन.
**गाणें** (क्रि.) गायन करणें; स्तुति करणें.
**गाणें बजावणें** (न.) गायनवादन.
**गाताडा** (वि.) हट्टी.
**गात्र** (सं. न.) देहाचा अवयव.
**गाथा** (सं. स्त्री.) प्राकृत भाषा; गद्य; आर्याछंद; रचना; संग्रह; (पु.) अभिमान; पारशांचा धार्मिक ग्रंथ; गुंतागुंत.
**गाथागोवा** (पु.), **गाथागोवी** (स्त्री.) गलबला; गुंताडा (दा० ३।१।४); (वि.) व्यर्थ.
**गादणें, गांदणें** (प्रा. क्रि.) पीडा पावणें किंवा देणें (भा० २३।१००); मळणें.
**गादला** (प्रा. वि.) मलिन.
**गादा** (पु.) पातळ चिखल, राड.
**गादी** (स्त्री.) मऊ आसन किंवा बिछाना; एकाद्या थोर माणसाचा अधिकार; मुठीच्या आंतला मऊ भाग; दारूचें दुकान.
**गांध** (स्त्री.) गांठ; गांधिलमाशी.
**गांधर्वविवाह** (सं. पु.) प्रीतिविवाह.
**गांधल** (प्रा. स्त्री.) गांधिलमाशी.
**गांधार** (सं. पु.) सप्त स्वरांपैकीं तिसरा.
**गांधी** (सं. गंधिन् पु.) औषधें विकणारा.
**गांधीण, गांधील, गांधल** (स्त्री.) गांधिलमाशी (जी चावली असतां दंशाच्या जागीं गांध उठते.).
**गान** (सं. न.) गाणें. [ निष्काळजी.
**गाफल, गाफील** (अर. वि.) गैरसावध,
**गाबडी** (स्त्री.), **गाबडें** (न.) ठिगळ.
**गाबती, गाबदी** (पु.) मासे धरणारा कोळी.
**गाबाळ** (पु.) गाळसाळ, केर; (वि.) जीर्ण.
**गाबाळग्रंथ** (पु.) कसरीनें खाल्लेली पोथी; दुसऱ्या ग्रंथांतून भाग चोरून घेऊन बनविलेला ग्रंथ; उतारे. [ अव्यवस्थित.
**गाबाळी** (वि.) अजागळ, गैवल्या,
**गाभ** (सं. गर्भ पु.) गर्भ; मध्य.
**गाभटणें, गाभडणें** (वि.) पुरे दिवस भरण्याच्या अगोदर प्रसवणें किंवा विणें.
**गाभडा** (स्त्री.), **गाभडें** (न.) ठिगळ.
**गाभण** (वि.) गर्भार, सबर.
**गाभा** (सं. गर्भ पु.) गर्भ; मधला भाग; माजघर. **गा०गोभा** (प्रा. पु.) हरकत (ज्ञाने० १८।१३६५).
**गाभार** (न.) माजघर (ज्ञाने० १८।४६).
**गाभारा** (सं. गर्भ पु.) देवालयांत देवाच्या मूर्ति असतात तो मुख्य अंतर्भाग.
**गाभिणी, गाभीण** (सं. गर्भिणी स्त्री.) गाभण.
**गाभिणें** (प्रा. वि.) फुगलेलें.
**गाभी** (प्रा. स्त्री.) गर्भावस्था; ठिगळ.
**गांभीर्य** (सं. न.) गंभीरता; खोलपणा.
**गाभुडणें** (क्रि.) गर्भपात झालेल्या स्थितींत असणें.
**गाभुळणें** (क्रि.) पक्व होत जाणें.
**गाभेवन** (सं. गर्भपर्ण न.) गाभ्यांतलें पान; सूक्ष्मांकुर (ज्ञा० १०।७०).
**गाय** (सं. स्त्री.) धेनु; (वि.) गरीब, दीन, अनाथ.
**गाय गोवणें** अयोग्य स्थळीं मुलगी देणें.
**गायक** (सं. पु.) गाणारा, गवय्या.

**गायकी** (सं. स्त्री.) गाणें; गायनांतली कुशलता; गायनपद्धति; गायनाचा धंदा.
**गायणी, गायनी** (प्रा. स्त्री.) गाणारीण.
**गायत्री** (सं. स्त्री.) एक देवता; तिचा मंत्र; ब्रह्मदेवाची स्त्री.
**गायन** (सं. न.) गाणें; गाण्याची कला.
**गायनश्रेढी** (सं. स्त्री.) ज्या श्रेढींतील जवळजवळचीं तीन पदें घेतलीं असतां पहिल्या व दुसऱ्या पदांतील अंतर आणि दुसऱ्या व तिसऱ्या पदांतील अंतर या दोन अंतरांचें जें गुणोत्तर तेंच गुणोत्तर पहिल्या व तिसऱ्या पदांचें असतें ती श्रेढी.
**गायरान** (न.) गुरांना चारण्यासाठीं राखून ठेविलेलें गवताचें कुरण.
**गार** (स्त्री.) गारगोटी; प्रकृतिसिद्ध वर्फ; खाच; घोरपड; (वि.) थंड.
**गारगोटी** (वि.) एक कठिण पांढरा दगड, चकमकीचा दगड.
**गारठण** (वि.) थंडीनें थिजणें; थंडीची वाधा होणें; कडक होणें.
**गारठा** (पु.) अतिशय थंडपणा.
**गारत, गारद** (अर. अ.) पुरलेलें, मेलेलें.
**गारदी** (पोर्तु. गार्डा पु.) गाडदी, पहारेवाला; गोंधळ, गडवड; वंड; नाश.
**गारभांड, गारभांडें** (न.) चापाची वंदूक.
**गारमणी** (प्रा. पु.) गारगोटी.
**गारवट** (वि.) काहींसें थंड.
**गारवा** (पु.) थंडपणा, गारठा.
**गारसणें** (क्रि.) गाभुळणें.
**गारा** (पु.) चिखल; एक राग.
**गारुड** (सं. न.) इंद्रजाल; सर्पदंशनवरचा मंत्र; दुसऱ्यास फसविण्याच्या युक्त्या.
**गारुडी** (सं. गारुड पु.) सापांचे खेळ करणारा; इंद्रजाल, नजरवंदी, जादू इ० करणारा.
**गारोळा** (वि.) घाऱ्या डोळयाचा.
**गार्ड** (इं. पु.) रखवालदार.
**गाऱ्या-भिंगोऱ्या** (स्त्री.) सभोंवार चक्र वरण्याचा मुलांचा एक खेळ. [ निवेदन.
**गाऱ्हाणें** (सं. गर्ह न.) तक्रार, दुःख-
**गाल** (सं. गल्ल पु.) कपोल, गालफड.
**गाल फुगविणें** वढाई मारणें, शेखी मिरविणें; रुसणें.
**गालगुच्चा** (पु.) गालास घेतलेला चिमटा.
**गालगुंड** (न.) गालाच्या एका रोगाचें नांव.
**गालपट, गालफड** (न.) गाल, थोवाड.
**गालफुगी** (स्त्री.) गालाच्या एका रोगाचें नांव.
**गालवोट** (न.) दृष्ट लागूं नये म्हणून लहान मुलाच्या गालावर वोटानें काजळाचा ठिपका लावितात तो.
**गालिचा** (फा. पु.) चित्रविचित्र रंगांच्या नक्षीचें लोकरीचें मोठें आसन.
**गाली** (सं. स्त्री.) शिवी, अपशब्द.
**गालीप्रदान** (सं. न.) शिवी देणें.
**गालोरा** (पु.) गालगुच्चा.
**गाव** (प्रा. पु.) आश्रय.
**गांव** (सं. ग्राम न.) ग्राम; वस्ती करुन राहिलेल्या अनेक कुटुंवांचा समुदाय; एक योजन अंतर (रं० यो० ८।२०६). **गांवीं नसणें**—अत्यंत अभाव किंवा पूर्ण दुर्लक्ष असणें.
**गांवकुंप** (न.) गांवाभोंवतालचें कुंपण.
**गांवई** (स्त्री.) गांव सोडून जाणें; गांवची वस्ती उठणें.
**गांवकरी** (पु.) गांवचे लोक; शेतकरी.
**गांवकी** (स्त्री.) गांवाच्या संवंधाचा अधिकार; गांवकऱ्यांची सभा.
**गांवकूस–कुसूं** (न.) गांवाभोंवतालचा तट.
**गांवखर** (न.) गांवावाहेरचा प्रदेश.
**गांव खूरीस** (अ.) गांवाचे आसपास.
**गांवगन्ना** (अ.) हरएक गांवास.
**गांव-गाडा** (पु.) गांवासंवंधाचीं सर्व प्रकारचीं कामें.
**गांवगुंड** (पु.) अंगांत विद्या नसतां दुसऱ्यास जिंकण्यांत व नानाप्रकारचे ढंग करण्यांत प्रवीण असा गांवांतला मनुष्य. **गां० की** (स्त्री.)—गांवगुंडाचें काम, गांवगुंडपणा.
**गांवठण, गांवठाण** (सं. ग्रामस्थान स्त्री.न.) गांवाची जागा.
**गावठा** (पु.) गांवचा वतनदार; शेतकरी.

**गांवठी** (वि.) गांवांत झालेला; देशी.
**गांवडें** (प्रा. पु.) अनाडीपण.
**गांवढळ** (वि.) खेडवळ.
**गांवढा** (प्रा. वि.) गांवढळ.
**गांवढें** (न.) लहान गांव.
**गावणें** (क्रि.) सांपडणें; माहीत होणें.
**गांवथळ** (सं. ग्रामस्थल न.) गांवाची जागा.
**गावथा** (प्रा. वि.) गांवढळ. [ज़ागा.
**गांवदर, गांवदरी** (स्त्री.) गांवाजवळची
**गावधणें** (न.) गांवचीं गुरें. [काम.
**गांवधें** (न.) झोपडी; दुसऱ्या गांवातलें
**गांवधोंड** (स्त्री.) गांवावरलें संकट.
**गांवपण** (प्रा. न.) ग्रामस्थांची सभा.
**गांवबंदी** (वि.) गांवांत वस्ती करून असलेला (फिरस्ता नव्हे).
**गांवनिसबत इनाम** गांवाला झालेल्या कर्जाच्या फेडीसाठीं गांवकऱ्यांनीं लावून दिलेली जमीन.
**गांवमुकादमानी, गांवमुकादमी** (फा.स्त्री.) वतनी ग्रामव्यवस्था.
**गांवरस** (प्रा. पु.) गांवांतलें घाणेरडें पाणी.
**गांवरान** (न.) नैर्ऋत्येकडील वारा.
**गांवराणी** (वि.) गांवांत झालेला; ओबड-धोबड.
**गावली** (स्त्री.) गाउली पहा.
**गावलें** (न.) ओल्या हरबऱ्याची पेंढी.
**गांववर्दळ** (स्त्री.) वनचराई, गांवरानें इ० साठीं दिलेल्या जमिनीखेरीज गांवाच्या दिमतीला दिलेली इतर जमीन.
**गांववहीत** (न.) गांवची लागडीखालची जमीन.
**गांवसई** (स्त्री.) गांवच्या भूतखेतांना दर-साल फळें फुलें अर्पण करतात तें.
**गावा** (पु.) पुनः पुनः बोलून दाखविलेली इच्छा.
**गावारें** (प्रा. न.) गव्हारपण.
**गावी** (स्त्री.) सोनाराचें किंवा लोहाराचें चिमटयासारखें हत्यार.
**गाशा** (अर. पु.) घोड्याच्या खोगिरावर घालण्याची गादी; आसन. **गाशा गुंडाळणें**–बिऱ्हाड आटोपून पळून जाणें.
**गाहण, गाहणदार** गहाण, गहाणदार, पहा.
**गाहाळ, गहाळ** (वि.) हरवलेला, सांड-लेला; अव्यवस्थित.
**गाहाळणें** (क्रि.) हरवणें, सांडणें.
**गाही** (स्त्री.) गाळी, चिमटा; ग्वाही, शपथ.
**गाळ** (सं. गल पु.) चिखल; केरकचरा; घाण; उरला सुरलेला वाईट भाग; (सं. गालि स्त्री.) शिवी, अपशब्द.
**गाळण** (सं. गल स्त्री.) गाळण्याची वस्तु; थकवा, ग्लानि; दुर्दशा, त्रेधा, तिरपिट, तारंबळ.
**गाळणा** (प्रा. वि.) भयभीत.
**गाळणी** (स्त्री.) चाळणी, ज्यांतून गाळ-तात तें पात्र; गाळण्याची क्रिया.
**गाळणें** (क्रि.) गाळणीनें चांगला भाग काढून घेणें; तेल किंवा अर्क काढणें; वगळणें. [कापूस.
**गाळा** (पु.) गाळ, केरकचरा; पिंजलेला
**गाळी** (सं. गालि स्त्री.) शिवी.
**गाळीत** (प्रा. न.) गाळण्याचें वस्त्र.
**गाळींव** (वि.) गाळून घेतलेलें, निवडक; अट्टल, लुच्चा.
**गाळींव मूर्ति** सर्व दुर्गुणांचा पुतळा; अट्टल सोदा.
**गिचगिचीत** (वि.) मऊ आणि चिकट; चिकचिकीत. [येशारें.
**गिचमीड** (वि.) घोटाळयाचें, न वाचतां
**गिच्च** (क्रि.) दाट, गर्द.
**गिच्ची** (स्त्री.) भोंवऱ्याचा खेळ.
**गिचाड** (न.) दाट जंगल.
**गिडी** (स्त्री.) खालीं रुंद पोट व वर अरुंद मान अशा आकाराचें भांडें; चंबू.
**गिड्डा** (वि.) ठेंगणा आणि लठ्ठ.
**गिणगिणा** (वि.) नाकांत बोलणारा.
**गितु** (सं. गीत न.) गीत, गाणें.
**गिदवा, गिदावा** (पु.) विटा वगैरेची पूड.
**गिधड, गिधाड** (सं. पु.) गृध्र, एक पक्षी.
**गिनी** (इं. स्त्री.) सोन्याचें एक नाणें.
**गिमवस** (स्त्री.) उन्हाळयांत पाटाच्या पाण्यावर पीक काढण्यासाठीं तयार केलेली जमीन.

**गिमाळा** (पु.) उन्हाळा.
**गिरका** (पु.) चक्कर, हेलपाटा.
**गिरकांडी, गिरकी** (स्त्री.) चक्कर, वर्तुळाकार गति.
**गिरगिरी** (स्त्री.) मूर्च्छा, भोंवंड.
**गिरगिरें** (न.) हवेनें गरगर फिरणारें कागदाचें चक्र.
**गिरटी** (स्त्री.) प्रदक्षिणा; घिरटी.
**गिरणी** (स्त्री.) यंत्रांनीं चालणारा कारखाना.
**गिरदा** (फा. पु.) गिरदी; हुक्याच्या खालचा गालिचा.
**गिरदी** (फा. स्त्री.) लहान वाटोळी उशी.
**गिरफ्तार** (फा. वि.) अडकलेला.
**गिरमाळ** (वि.) उंच व नापीक सपाट मैदान असलेला (प्रदेश).
**गिरमीट** (न.) भोंक पाडण्याचें एक हत्यार.
**गिरविणें** (क्रि.) वळविणें, कित्त्यांतल्या अक्षराच्या वळणावरून लेखणी फिरविणें.
**गिरा** (पु.) दीड तसूचें लांबीचें माप; वाचा, भाषा.
**गिराणी** (फा. स्त्री.) संकट; ओझें; मेटाकुटी; महागाई; दुर्मिळता.
**गिराशी** (पु.) गुजराथेंतील एक जमीनदार.
**गिरावण** (फा. न.) अंगरख्याचा खांद्याचा भाग.
**गिरास** (स्त्री.) लूट.
**गिरि** (सं. पु.) पर्वत, डोंगर; गोसाव्यांतला एक पंथ.
**गिरिकंदर** (सं. पु.) डोंगरांतली गुहा.
**गिरीविरी** (प्रा. पु.) एका रोगाचें नांव.
**गिरेबाज** (वि.) आकाशांत मंडलाकार फिरावयाला शिकवून तयार केलेलें (कबूतर).
**गिरो** (न.) गहाण. [(स्त्री.) परिघ.
**गिर्द** (फा. अ.) आसपास, भोंवतालीं;
**गिर्दी** (फा. स्त्री.) घेरा, वर्तुळाकार वस्तु; आसपासचा प्रदेश; गस्त.
**गिऱ्हा** (सं. ग्रह पु.) जलग्रह; पीडा, त्रास.
**गिऱ्हाइकी** (सं. गृह स्त्री.) गिऱ्हाईक; धंदा. [घेणारे.
**गिऱ्हाईक** (सं. ग्राहक पु.) ग्राहक, विकत
**गिऱ्हें** (सं. ग्रह पु.) ग्रह.
**गिलकी** (स्त्री.), **गिलकें** (न.) घोसाळीं–ळें.
**गिलगिलीत** (वि.) थलथलित, विलविलीत.
**गिलावा** (फा. पु.) लिंपण, लेप.
**गिलीट** (इं. गिल्ट न.) मुलामा, पाणी.
**गिलेफ** (फा. पु.) अभ्रा, आच्छादन.
**गिल्ला** (फा. पु.) तक्रार, गाऱ्हाणें; बोंब.
**गिवसणें** (प्रा. क्रि.) शोधणें.
**गिवसणें** (प्रा. क्रि.) शोषून टाकणें; ग्रासणें.
**गिवसु** (प्रा. पु.) विस्तार.
**गिळंकृत** (सं. वि.) गिळलेलें.
**गिळणें** (सं. गिल् क्रि.) तोंडांत घेऊन घशाखालीं उतरविणें; दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करणें; मुकाट्यानें सहन करणें.
**गिळगिळीत** (वि.) खावयाला मऊ आणि वेचव; पाणचट; बेचव; बुळबुळीत आणि शिसारी उत्पन्न करणारा; गळगळीत.
**गीत** (सं. न.) गाणें, गायन.
**गीता** (सं. स्त्री.) भगवद्गुणानुवाद करणारा बोधपर ग्रंथ–मुख्यतः श्रीमत् भगवद्गीता.
**गीति** (सं. स्त्री.) गाणें; आर्या–छंदांतला एक भेद.
**गीध** (सं. गृध्र पु.) गिधाड.
**गीर** (पु.) गर, मगज; खोबरें.
**गीर्वाण** (सं. पु.) देवभाषा (संस्कृत).
**गुखाडी** (स्त्री.) लोकांची हगण्याची जागा.
**गुंग** (फा. वि.) गर्क; धुंद; कैफ चढलेला.
**गुंगणें** (क्रि.) तल्लीन होणें, धुंद होणें; अस्पष्ट वाद करणें
**गुंगा** (हिं. वि.) मुका.
**गुंगारा** (पु.) दुसऱ्यास फसवून पळून जाणें.
**गुंगी** (स्त्री.) धुंदी, वेशुद्धि.
**गुग्गुळ** (सं. पु.) एक सुगंधि द्रव्य.
**गुचकी** (स्त्री.) उचकी.
**गुच्चा** (पु.) बोटाचा तडाखा.
**गुच्छ** (सं. पु.) झुबका, जुडी; घोस; फुलें एकत्र बांधून शोभेसाठीं केलेला गोटा.

**गुंज** (सं. गुंजा स्त्री.) एक लहानसें फळ; एक लहान वजन; माशाचा एक अष्टमांश; (पु.) गुंजारव.
**गुज** (सं. गुह्य न.) गुह्य, रहस्य.
**गुजगुज** (स्त्री.) गुणगुण, हळूंच बोललेली गोष्ट.
**गुजगोष्ट** (पु. स्त्री.) गुप्त गोष्ट.
**गुंजडी** (स्त्री.), **गुंजडें** (न.) वर गुंजा चिकटविलेल्या आहेत असा मेणाचा चेंडू; सुताचें किंवा दोऱ्याचें पेंडाळें.
**गुजर** (सं. पु.) गुजराथी मनुष्य.
**गुजर** (फा. पु.) निर्वाह.
**गुजरणी** (स्त्री.) नकासगाराचें हत्यार.
**गुजरणें** (हिं. क्रि.) काढणें; गुदरणें; येऊन वेतणें; जाणें; मरणें; स्वाधीन करणें.
**गुजराण** (फा. स्त्री.) कष्टाचा निर्वाह.
**गुजराथ** (स्त्री.) एका प्रांताचें नांव.
**गुजराथी** (पु.) गुजराथ प्रांतांतला मनुष्य; (वि.) गुजराथेसंबंधीं.
**गुजरी** (स्त्री.) संध्याकाळचा बाजार; पायांतला दागिना; एक प्रकारचें कापड.
**गुंजस** (फा. वि.) गत.
**गुजी** (स्त्री.) गुह्य गोष्ट (होना० पृ. १०६).
**गुंजा** (प्रा. स्त्री.) गुंडी (चांग० पास० १९).
**गुंजाईस–ष** (फा. स्त्री.) कमीपणा; चूक, दोष; नफा; कसर.
**गुंजवडा, गुंजवला, गुंजाडा** (पु.) वर गुंजा चिकटविलेला मेणाचा चेंडू.
**गुंजार** (न.) गांठयाळ लाकूड; गांठ.
**गुजारत, गुजारती** (फा. गुजारा स्त्री.) मध्यस्थी; साक्ष.
**गुंजारव** (सं. पु.) भ्रमराचा गुणगुण नाद.
**गुजारा** (हिं. पु.) निर्वाह.
**गुंजाष** (फा. गुंजायश स्त्री.) फायदा, नफा; सवड; वाढलेली पट्टी देण्याचें सामर्थ्य.
**गुंजाळें** (न.) एक प्रकारचें लुगडें.
**गुजी** (स्त्री.) गोजी, वासरी, कालवड, पाडी. [ कुळी.
**गुटकळी** (स्त्री.) गचका, बुचकळी, बुट-
**गुटका** (सं. गुटिका स्त्री.) गोळी; लहानसें पुस्तक. [ गमणें.
**गुटमळणें** (क्रि.) आशंकणें, अडखळणें,

**गुटिका** (सं. स्त्री.) गोळी; घुटका; लहानशी पोथी.
**गुटी** (स्त्री.) गोळी; फळ येणारें पण फूल न येणारें एक झाड.
**गुठळी** (स्त्री.) गोटी, गोळी, बी.
**गुठळेबाज** (वि.) कामचुकार.
**गुंठा** (पु.) जमिनीच्या मोजणीचें एक माप. (एकराचा एक चाळीसांश भाग).
**गुठा** (पु.), **गुठें** (न.) नांगरलेली जमीन साफ करण्याचें आऊत.
**गुड** (सं. पु.) गूळ.
**गुंड** (पु.) वस्ताद; बदमाष; पाणी भरण्याचें किंवा तापविण्याचें मोठें भांडें; खंड; मोत्याचा फुगीर भाग; दगड; गुंडाळी.
**गुंड** (पु.) वारीक वाटोळा खडा; हुंडा.
**गुंडगाळें, गुंडगुळें** (न.) एक प्रकारचें भांडें; (वि.) वर्तुळाकार.
**गुडगुडी** (स्त्री.) लहान हुक्का.
**गुडघा** (पु.) जानु, पोटऱ्या व मांड्या यांच्यामधला सांधा.
**गुडघी** (हिं. स्त्री.) एका रोगाचें नांव.
**गुडणें** (प्रा. क्रि.) गुंत्यांत सांपडणें, गुंडाळणें.
**गुडदा** (पु.) एक हत्यार, लोखंडी गदा.
**गुडदी** (स्त्री.) वुटणें; बूच; झाकण.
**गुडदाणी, गुडधानी** (स्त्री.) चिकी, गुळाच्या पाकांत पाकविलेले चुरमुरे व०
**गुडदू** (वि.) लठ्ठ आणि ठेंगणा.
**गुंडळी, गुंडाळी** (स्त्री.) गुंजडी.
**गुंडा** (पु.) वाटोळा दगड; दोन पाटथऱ्यांमधला दगड; (वाईट अर्थानें) आटोकाट शहाणा.
**गुंडा, गुंढा** (प्रा. पु.) वाटोळा दगड (तुका० २१३८); आटोकाट शहाणा.
**गुडाकु–खू** (पु.) तंबाखूंत गूळ व सुगंधि द्रव्यें घालून केलेला पदार्थ; दुर्दशा.
**गुडाकेश** (सं. वि.) निद्रेला जिंकणारा; (गुडाका = निद्रा + ईश).
**गुंडाळणें** (क्रि.) वळकटी करणें; लपेटणें; आटोपणें.
**गुंडाळा** (पु.), **गुंडाळी** (स्त्री.), **गुंडाळें** (न.) वळकटी; रोळ.

**गुंडिका** (सं. गुंड स्त्री.) पुनः पुनः उजळणी करणें. [ गोळा.
**गुंडी** (हि. स्त्री.) लहान गुंडा; वटण; पेंडी;
**गुढणें** (क्रि.) गुंडाळणें, व्याप्त होणें.
**गुढर** (पु.) हत्तीचें खोगीर.
**गुढा** (प्रा. पु.) दगड.
**गुढार** (प्रा. पु.) अंबारी, हौदा, डोलारा (मुक्ते० रामा० १।६५); कोडें, गूढ (तुका० ५४१); दंग्यामुळें पळून आलेले लोक.
**गुढारणें** (प्रा. क्रि.) आच्छादणें.
**गुढाव** (प्रा. पु.) गौरव; गुह्य.
**गुढी** (स्त्री.) आनंदप्रदर्शनार्थ उभारलेलें निशाण; देशांतरावरून आलेली मृत्यूची वातमी.
**गुढीपाडवा** (पु.) चैत्र शु० १.
**गुढें** (न.) शत्रूच्या किंवा लुटारूंच्या भयामुळें पळालेले लोक; धान्याच्या कणसांची पेंढी; कोडें.
**गण** (सं. पु.) धर्म, लक्षण; सत्त्वरजस्तमादि; उपयोग; कार्य; परिणाम; धनुष्याची दोरी; (व्याक०) अ, ए, व ओ हे वर्ण.
**गुणक** (सं. पु.) जिनें गुणावयाचें ती संख्या.
**गुणकारक, गुणकारी** (वि.) परिणामकारक.
**गुणगुण** (स्त्री.) कुणकुण, वातमी.
**गुणगुणा** (पु.) वोणा; नाकाचा भाग.
**गुणणें** (क्रि.) पट करणें; गुणाकार करणें; (न.) भ्रमराचा गुंजारव, गुणगुणणें.
**गुणत** (सं. न.) गुणणें; मोजणें.
**गुणवान** (सं. वि.) गुणी; गुणसंपन्न.
**गुणज्ञ** (सं. वि.) गुण जाणणारा.
**गुणाकार** (सं. पु.) गुणण्याची क्रिया; गुणून आलेली संख्या.
**गुणानुवाद** (सं. पु.) गुणांचें वर्णन, स्तुति.
**गुणावह** (सं. वि.) गुणकारक.
**गुणिया** (प्रा. पु.) पंचाक्षरी; जादुगार.
**गुणी** (प्रा. पु.) मांत्रिक, गारुडी, पंचाक्षरी (भा० ७।२०८); गुणवान्; खोडकर.
**गुणोत्तर** (सं. न.) दोन पदार्थांत एक दुसऱ्याच्या कितीपट आहे हें दाखविणारी संख्या.
**गुण्य** (सं. न.) जिला गुणावयाचें ती संख्या.
**गुण्या** (पु.) काटकोन वघण्याचें साधन.
**गुण्यागोविंदानें** (अ.) शांततेनें, मित्रत्वानें.
**गुतकुली** (प्रा. स्त्री.) गुदगुली.
**गुंतणें** (क्रि.) अडकणें, फसणें; घोटाळणें, कामांत व्यापृत असणें.
**गुंतलें** (प्रा. न.) गुंतागुंत.
**गुतवळ, गुंतवळ** (पु.) विंचरतांना गळून पडलेले केसाचे तुकडे.
**गुंता** (पु.) अडथळा, खोळंबा; सुतक.
**गुतागुत, गुंतागुंत** (स्त्री.) गुंताडा, गोंधळ, घोटाळा.
**गुंताड** (पु. न.) गुंतागुंत, घोटाळा; गुंतवळ.
**गुति** (प्रा. स्त्री.) गरज.
**गुंती** (प्रा. स्त्री.) प्रतिबंध, बंधन.
**गुत्ता** (पु.) दारूचें दुकान.
**गुथणें** (प्रा. क्रि.) गुंफणें.
**गुद** (सं. न.) गांड.
**गुदगुद, गुदगुली** (स्त्री.) शरीरास स्पर्शानें उत्पन्न होणारा एक सौम्य व हास्योत्पादक विकार; आनंदाची उकळी.
**गुदमरणें** (क्रि.) कोंडमारा होणें, दम कोंडणें.
**गुदमारा** (पु.) कोंडमारा; श्वासावरोध.
**गुदरणें** गुजरणें पहा.
**गुदस्त** (फा. वि.) गत, मागचें.
**गुदस्तां** (फा. अ.) गतवर्षी.
**गुदाम** (पोर्तु. गुदांव पु.) वखार.
**गुदारा** गुजारा पहा.
**गुद्दा** (पु.) ठोसा, बुक्की. [ टाकणें.
**गुधडणें** (क्रि.) तुडविणें, चोळामोळा करून
**गुधडा** (पु.) धुडगुस; चोळामोळा.
**गुन्हा** (फा. गुनाह पु.) अपराध.
**गुन्हेगार** (फा. पु.) अपराधी.
**गुन्हेगारी** (हिं. स्त्री.) अपराधाबद्दल दंड.
**गुप्, गुपचिप** (सं. गुप अ.) मुकाट्यानें, चोरून लपून.
**गुपित** (सं. वि.) लपविलेलें; (न.) गुह्य गोष्ट.
**गुप्त** (सं. वि.) छपून राहिलेलें; गूढ.
**गुप्ती** (स्त्री.) आंत तलवार असलेली काठी.
**गुप्तगो** (स्त्री.) एकांतांतील मसलत.

**गुंफणें** (क्रि.) ओवणें, गुंतविणें.

**गुंफा** (सं. स्त्री.) गुहा, गुंफा, डोंगरांत राहण्यासारखी कोरलेली जागा.

**गुंफिरा** (पु.), **गुंफिरें** (न.) गुंतागुंत; जाळें (ज्ञा० ४।२८५). [हार वगैरे).

**गुंफीव** (वि.) गुंफून वनविलेला (माळ,

**गुबगुबीत** (वि.) लठ्ठ.

**गुबदुल** (वि.) लठ्ठ.

**गुबर** (न.) भ्रम.

**गुबारणें** (क्रि.) उकाड्यानें अस्वस्थ होणें.

**गुबारा** (पु.) फुगा; वातानें फुगणें.

**गुम** (फा. अ.) स्तब्ध, मुकाट्यानें.

**गुमान** (फा. पु.) पर्वा, खातर, फिकीर; लक्ष; पोकळ गर्व, अहंकार; आधिक्य; (वि.) तृप्त; थंड; मुकाट्यानें.

**गुमास्ता** (फा. पु.) मुखत्यार, मुनीम.

**गुरकणी** (स्त्री.) डरकावणी, धमकी; रागाचें बोलणें.

**गुरका** (पु.) रागाचा फणकारा; आवेश.

**गुरकावणी** गुरकणी पहा.

**गुरकावणें** (क्रि.) रागानें ओरडणें किंवा मोठ्यानें बोलणें; धमकी; रागानें डोळे वटारणें.

**गुरखी** (पु.) गुराखी. [सोटा.

**गुरगुज** (न.) तोमर नांवाचें शस्त्र; लोखंडी

**गुरगून** (फा. पु.) सांखळ्या लाविलेला सोटा.

**गुरगुडी** गुडगुडी पहा. [काढणें, कुरकुरणें.

**गुरगुरणें** (क्रि.) घुरकणें, गुरगुर आवाज

**गुरगुराट** (पु.) एकसारखें गुरगुरणें.

**गुरचरण** (स्त्री.) गुरांना चरण्याचें कुरण; चारण्याबद्दलची फी.

**गुरचराई** (स्त्री.) गुरें चरण्याच्या परवानगीबद्दल कुरणाच्या मालकाला दिलेला पैसा. [मूत्रपिंड.

**गुरदा** (फा. गुरज पु.) लोखंडी सोटा;

**गुरफटणें** (क्रि.) अडकणें, सांपडणें.

**गुरफटा, गुरफाटा** (पु.) गुंतागुंत.

**गुरफाटणें** (क्रि.) अडकविणें, गुंतविणें.

**गुरंभा** (वि.) गदरलेलें (फळ.)

**गुरमी** (स्त्री.) गुर्मी पहा. [जात आहे.

**गुरव** (पु.) शंकराचे पुजारी; ही एक

**गुरवाडा** (पु.) गोठा; अंगण.

**गुरवा** (सं. गुर्वी वि.) श्रेष्ठ.

**गुरवीण** (स्त्री.) गुरवाची बायको.

**गुरळा** (प्रा. पु.) चूळ.

**गुरळी** (प्रा. स्त्री.) चूळ; गूळ किंवा साखर घातलेली पुरी.

**गुराखी** (पु.) गुरें राखणारा.

**गुराब** (अर. स्त्री.) एक प्रकारचें तारूं.

**गुराब, गुराबा** (प्रा. स्त्री.) नौका (मोरो० उद्यो० १३।१७३).

**गुरु** (सं. पु.) विद्या शिकविणारा, शिक्षक, आचार्य; बृहस्पति; (वि.) जड, वजनदार; मोठा; दोन मात्रात्मक.

**गुरुकिल्ली** (स्त्री.) गूढ उकलण्याची युक्ति.

**गुरुकुल** (सं. न.) गुरूचें कुटुंब; जेथें विद्यार्थ्यांना पुत्रवत् मानून त्यांच्या खाण्यापिण्याची, विद्याभ्यासाची वगैरे सगळी सोय गुरुकडून केली जाते अशी पाठशाळा.

**गुरुत्व** (सं. न.) जडत्व; वजन.

**गुरुत्वमध्य** (सं. न.) गुरुत्वाकर्षणाचा केंद्र.

**गुरुत्वाकर्षण** (सं. न.) विश्वांतील वस्तूंचें परस्पराकर्षण.

**गुरुपूजा** (सं. स्त्री.) आषाढ शु० १५ च्या दिवशीं करतात ती गुरूची पूजा.

**गुरुबंधु** (सं. पु.) एकाच गुरूचे दोघे शिष्य ते परस्पर.

**गुरुमंत्र** (सं. पु.) शिकवण; मसलत.

**गुरुमुखी** (स्त्री.) शिखांच्या धर्मग्रंथाची लिपी.

**गुरुवती** (प्रा. स्त्री.) महत्त्व.

**गुरुवार** (सं. पु.) बृहस्पतिवार.

**गुरुळा** (प्रा. स्त्री.) चूळ.

**गुरूं** (न.) गाय, म्हैस इ० जनावर.

**गुरूळ** (पु.) बांधाला पडलेलें छिद्र.

**गुरोळी** गुरळी पहा. [गुजर.

**गुर्जर** (सं. पु.) गुजराथ; तेथचा रहिवासी;

**गुर्विणी** (स्त्री.) गर्भिणी.

**गुऱ्हाळ** (न.) उंसाचा रस काढण्याचा व त्यापासून गूळ व साखर करण्याचा कारखाना; उंसाचा रस विकण्याची जागा, गुराळ.

**गुल** (फार. स्त्री.) गहजब; फूल; दिव्याची काजळी.
**गुलकंद** (फा. पु.) गुलाबाच्या पाकळ्यांचा मुरम्बा. [कातरण्याची कातरी.
**गुलकातरी** (स्त्री.) दिव्याची कोजळी
**गुलकावणी** (स्त्री.) ढोंग; फसवणूक; हुलकावणी.
**गुलगुलीत** (वि.) फार मऊ.
**गुलछडी** (स्त्री.) एकप्रकारचें फूल.
**गुलछब्बू** (फा. पु.) एक फुलझाड.
**गुलजार** (फा. वि.) सुंदर, रमणीय.
**गुलदस्त** (पु.) गंजिफाच्या खेळांतली एक संज्ञा. **गु०त ठेवणें**—लपवून ठेवणें.
**गुलदावदी–री** (फा. स्त्री.) एका फुलाचें नांव (प्रभा० पृ. १११).
**गुलन्न** (न.) राव, काकवी; गुळवणी.
**गुलनार** (न.) डाळिंबीचें फूल.
**गुलबास** (न.) एक प्रकारचें झाड, त्याचें फूल.
**गुलबासी** (वि.) गुलबास नांवाच्या फुलाच्या रंगाचें.
**गुलमुच्छा** (स्त्री.) गालमिशा.
**गुलहौशी** (फा. वि.) चैनी; आंबटशोकी.
**गुलाब** (फा. पु.) गुलाबाचें फूल.
**गुलाबछकडी** (स्त्री.) चटकचांदणी; एक प्रकारचें गाणें.
**गुलाबदाणी** (फा. गुलाबदान स्त्री.) गुलाबपाणी ठेवण्याचें उभें पात्र.
**गुलाबी झोप** पहाटची थंड वेळची झोप.
**गुलाबी थंडी** सौम्य प्रकारची सुखावह थंडी.
**गुलाम** (अर. पु.) दासीपुत्र; विकत घेतलेला मनुष्य; लुच्चा; हरामखोर; (लडिवाळपणानें मुलालाही 'हुशार, कावेबाज' या अर्थानें हा शब्द लावितात).
**गुलामगिरी** (अर. स्त्री.) दास्य.
**गुलाल** (पु.) आबाशाही रंगाची पूड.
**गुलालगोटा** (पु.) लाखेच्या अतिशय पातळ पापुद्र्याचा पोकळ चेंडू करून आंत गुलाल भरतात तो.
**गुल्फ** (सं. पु.) पायाचा घोटा.
**गुल्म** (पु.) एका रोगाचें नांव; वायगोळा; पाणथरी; (सं. पु.) तीन सेनामुखें परिमित सेना; सैन्याची तुकडी.
**गुल्ल** (हिं. पु.) गलबला.
**गुल्लडाग** (प्रा. पु.) चोचें, गूल. [ विटी.
**गुल्ली** (प्रा. स्त्री.) गलबला, कोलाहल;
**गुंवरें** (न.) गवानें भरलेलें वस्त्र.
**गुंसाई, गोसाई** (सं. गोस्वामी पु.) साधु, हरिदास.
**गुस्सा** (अर. पु.) राग, क्रोध.
**गुह** (पु.) कार्तिकस्वामी.
**गुहक** (पु.) रामास गंगापार नेणारा नावाडी.
**गुहा** (सं. स्त्री.) डोंगराचा पोकळ भाग, कंदरा. [प्राणी.
**गुहिरा** (पु.) सरडयाच्या जातीचा एक
**गुह्य** (सं. न.) उपस्थ; गुप्त गोष्ट.
**गुळखोबरें** (न.) लालूच. **गु० देणें**—लालूच दाखविणें. [ गुळमुळीत भाषण.
**गुळ, गुळथापडी** (स्त्री.) गोड गोड शब्द;
**गुळगुळ गोष्टी** गोड गोड भाषण; हळूं हळूं केलेलें संभाषण.
**गुळगुळीत** (वि.) साफ, नितळ, सफाईदार.
**गुळचट** (वि.) गोड, गोडसर.
**गुळणा** (पु.), **गुळणी** (स्त्री.) चूळ.
**गुळधाव** (प्रा. वि.) गुळाच्या रंगाचें, पिवळेंधमक.
**गुळंबा, गुळांबा** (पु.) गूळ किंवा साखर यांच्या पाकांत कच्च्या आंब्याच्या फोडी किंवा कीस घालून केलेला पदार्थ.
**गुळमट** (वि.) गोडसर.
**गुळमुळीत** (वि.) अस्पष्ट, अर्धवट.
**गुळवणी** (न.) गूळ घातलेलें पाणी.
**गुळवेल** (स्त्री.) दुसऱ्या झाडावर पोसणारी एक औषधोपयोगी लता.
**गुळहार** (प्रा. न.) गुऱ्हाळ.
**गुळा, गुळाळा** (प्रा. पु.) चूळ, गुळणा.
**गुळी** (स्त्री.) नीळ; एक प्रकारची हलकी साखर.
**गुळुंब, गुळूम** (सं. गुल्म न.) गुल्म, फोड, गळू; परोपजीवी वनस्पति.
**गू** (पु.) विष्ठा.
**गूज** (सं. गुह्य न.) गुप्त गोष्ट.

**गूढ** (न.) समजण्यास कठिण गोष्ट; (वि.) दुर्बोध, गुप्त.
**गूत** (स्त्री.) गुंतागुंत, गांठ, तिढा.
**गूद** (पु.) कंडू, खाज.
**गूम** (फा. वि.) नष्ट, गुप्त.
**गूल** (फा. पु.) दिव्याची काजळी; आगकाडीच्या टोकाला लाविलेला ज्वालाग्राही पदार्थाचा थेंब; खिळयाचें जाड टोंक; तापविलेल्या वस्तूनें दिलेला डाग; (स्त्री.) वोभाटा. [रस.
**गूळ** (सं. गुड पु.) गुड; आटवलेला उंसाचा
**गूळखोबरें** लालूच.
**गृध्र** (सं. पु.) गिधाड पक्षी.
**गृह** (सं. न.) घर.
**गृहछिद्र** (सं. न.) घरगुती दोषयुक्त गोष्टी.
**गृहरत्न** (सं. न.) मूल.
**गृहस्थ** (सं. पु.) प्रापंचिक. [ दुसरा.
**गृहस्थाश्रम** (सं. पु.) चार आश्रमांपैकीं
**गृहिणी** (सं. स्त्री.) पत्नी, घरधनीण.
**गृहीत** (सं. वि.) घेतलेलें; कबूल केलेलें.
**गृहीतागमा** (स्त्री.) बी. ए. च्या तोडीची महिला विद्यापीठाची पदवी.
**गृह्य** (सं. वि.) घरासंबंधाचें.
**गें** (उद्गा. अ.) अगेचें संक्षिप्त रूप.
**गेंगणें** (क्रि.) नाकांतून उच्चारणें.
**गेंगाणा** (वि.) नाकांत वोलणारा.
**गेज** (पु.) माप.
**गेजमाण** (स्त्री.) गौरीला वहावयाची कापसाची सांखळीसारखी माळ.
**गेट** (ई. न.) पोलिसचौकी.
**गेठा** (पु.) कमर व पाय उपरण्यानें बांधून वसणें, जेठा मारणें; गळयांतला अलंकार.
**गेंडा** (पु.) नाकावर शिंग असलेला एक जंगली प्राणी.
**गेणी** (स्त्री.) शेतसारा.
**गेताडपट्टी** (स्त्री.) जोराची चपराक.
**गेंद** (पु.) तुरा, गुच्छ; स्त्रियांच्या पायांच्या वोटांतलें एक भूषण.
**गेरवा** (पु.) गेरू नांवाची तांबडी माती.
**गेरुंडी** (स्त्री.) सुताराची गेरू ठेवण्याची पेटी. [तांबडी माती.
**गेरू** (सं. गैरिक पु.) काव; एक प्रकारची
**गेल** (स्त्री.) चेष्टा.
**गेलामेला** (अ.) कांहीं झालें तरी; निदान.
**गेह** (सं. न.) घर.
**गेहेशूर** (वि.) शेंदाड शिपाई; घरच्या माणसापुढें शौर्याच्या वढाया मारणारा.
**गेळ** (न.) पशूच्या चिरलेल्या खुराच्या दोन भागांपैकीं प्रत्येक भाग; एक औषधि.
**गेळी** (स्त्री.) गेळ पहा.
**गै** (प्रा. क्रि.) गय, क्षमा; हयगय.
**गैंदी** (हिं. वि.) गवाळया, अव्यवस्थित.
**गैब** (अर. वि.) गहाळ झालेला.
**गैबी** (अर. वि.) गुप्त, निनांवी.
**गैर** (अर. वि.) अयोग्य, व्यर्थ (हा शब्द नामाच्या किंवा विशेषणाच्या आरंभीं जोडतात तेव्हा त्याचा 'विपरीत' असा अर्थ होतो); (स्त्री.) परचक्र, लुटारूंची धाड; प्रजेनें असंतोषामुळें केलेला दंगा.
**गैरमर्जी** (हिं. स्त्री.) नाराजी. [असा.
**गैरमाहितगार** (वि.) ज्याला माहिती नाहीं
**गैररहा** (हिं. वि.) अयोग्य, विचित्र.
**गैरवाका** (वि.) वेडावाकडा.
**गैरविल्हेस लागणें** भलतीकडे जाणें.
**गैरशिस्त** (फा. वि.) रीतीस सोडून असलेलें, असभ्य. [समज.
**गैरसमजूत** (वि.) उलट समजूत, चुकीची
**गैरसावध** (वि.) वेसावध, गाफील.
**गैरसाळ** (वि.) बनावट (नाणें); अयोग्य.
**गैरसोय** (स्त्री.) अडचण.
**गैरहजीर** (हिं. वि.) हजर नसलेला, अविद्यमान. [निष्काळजी.
**गैरा, गैरी** (वि.) अशक्त; खुळा;
**गो** (सं. स्त्री.) गाय; (अ.) अग.
**गोकटी** (स्त्री.) मान, गळा.
**गोकर्ण** (सं. न.) एका क्षेत्राचें नांव; एक फूल; लहान मुलास दूध घालावयाचें चांदीचें वोंडलें.
**गोकुळ** (सं. न.) कृष्णाच्या लहानपणचें रहाण्याचें ठिकाण.
**गोकुळाष्टमी** (सं. स्त्री.) श्रावण वद्य ८ (कृष्णाची जन्मतिथि.) [झरोका.
**गोख, गोखडा** (सं. गवाक्ष न.) पोट, मध्य,

**गोखणें** (क्रि.) घोकणें, पाठ करणें.
**गोखरू** (सं. गोक्षुर पु.) एक औषधि.
**गोखरें** (न.) गुरापुढें घातलेल्या वैरणीचा उरलेला भाग.
**गोखातु** (प्रा. अ.) मध्येंच.
**गोगलगाय** (स्त्री.) एक अतिशय हळू सरपटत जाणारा निरुपद्रवी प्राणी; अत्यंत गरीब स्वभावाचा मनुष्य.
**गोंग** (स्त्री.) हाक.
**गोंगाट** (पु.) गलबला, कोलाहल.
**गोग्रास** (सं. पु.) भोजनास बसण्याचे अगोदर गाईसाठीं राखून ठेविलेला अन्नाचा भाग.
**गोच** (स्त्री.) खोंच.
**गोचकुला** (वि.) लहान असून सुंदर.
**गोचडी** (स्त्री.) एक प्रकारचा जीव; फार लगट करणारा मनुष्य.
**गोचर** (वि.) दृश्य; माहीत.
**गोचीड** (पु.) गोचडी पहा. [आवळणें.
**गोंजारणें** (क्रि.) लाडीगोडीनें बोलणें, किंवा
**गोजिरवाणें** (वि.) नाजूक, सुरेख.
**गोजिरें** (वि.) सुंदर, देखणें.
**गोजी** (सं. गो स्त्री.) कालवड, पाडी.
**गोट** (हिं. पु.) सैन्याचा तळ उतरण्याकरितां केलेली जागा; बायकांच्या हातांतला एक दागिना; कांठ फाटूं नये म्हणून घातलेली शिवण.
**गोटा** (पु.) वाटोळा दगड; डाळींत सांपडणारा सबंध दाणा; सुका नारळ; कलाबतू; बेंदूल.
**गोटी** (स्त्री.) मुलांचा खेळण्याचा लहान वाटोळा दगड; कसरतीनें मजबूत बनविलेलें शरीर; वाटोळा आणि लहान आंबा.
**गोटोळा** (वि.) वाटोळा, गोल.
**गोठ** (फा. पु.) सैन्याचा तळ.
**गोठण** (सं. गोठ स्त्री.) पाण्याच्या जवळ दुपारचे वेळीं गुरांस बसण्याची आश्रयाची जागा.
**गोठणें** (क्रि.) थिजणें, घट्ट होणें.
**गोठा** (सं. गोष्ठ पु.) गुरें बांधण्याची जागा.
**गोठी** (प्रा. स्त्री.) गोष्ट.
**गोठुलें** (प्रा. न.) गाठोडें.
**गोठुळी** (स्त्री.) गोळी, गुठुळी पहा.
**गोड** (वि.) मधुर; स्वादिष्ट; सुंदर; नीटनेटकें. [असलेला.
**गोडघाशा** (वि.) गोड खाण्याची आवड
**गोडधोड** (न.) मिष्टान्न, पक्वान्न.
**गोडंबी** (स्त्री.) बिब्ब्याच्या आंतील बी.
**गोडबोल्या** (वि.) मृदु व रुचकर भाषण करणारा.
**गोंड** (पु.) विंध्य पर्वतांतील अनार्य जात; (न.) देंठासकट घड; (स्त्री. न.) गल्ली, खिंड; (पु. न.) टोपणें वर असलेलें धान्य.
**गोंडवण** (न.) गोंड लोकांचा प्रांत.
**गोडवा, गोडा** (वि.) गोड; (पु.) स्तुति, प्रशंसा.
**गोडवी** (स्त्री.) गोडी, रुचि.
**गोडवे गाणें** स्तुति करणें.
**गोंडस** (वि.) मांसल.
**गोंडा** (पु.) गुच्छ, झुबका. **गोंडा घोळणें**–खुशामत करणें.
**गोडांबी** (स्त्री.) गोडंबी पहा.
**गोडिरें** (प्रा. वि.) गोड.
**गोड्या** (वि.) गोडखाऊ.
**गोडावणें** (क्रि.) गोडी लावणें.
**गोंडाळ** (वि.) गोंडस; (प्रा. न.) शेवाळें (रामीराम० सुगमो० ९।६९).
**गोडिसा** (प्रा. वि.) गोड. [सख्यभाव.
**गोडी** (स्त्री.) मधुरता, रुचि, आवड,
**गोडी गुलाबी** (स्त्री.) भलेपणा.
**गोण** (पु.) कोथळा, पोतें, मोठी पिशवी. **गोण घालून बसणें**—हट्ट धरून बसणें.
**गोणताट, गोणपाट** (न.) तागाचें केलेलें जाड कापड.
**गोणी** (स्त्री.) कंठाळ, ओझें; संकट.
**गोत** (सं. न.) गोत्रजांचा समुदाय; नातें.
**गोतपत, गोतपात** (पु.), **गोताई** (स्त्री.) जाति-बहिष्कृतास परत जातींत घेण्यासाठीं बहिष्कृत माणसानें करावयाचें प्रायश्चित्त व देण्याचें ज्ञातिभोजन.
**गोतपत्र** (सं. गोतपत्र न.) वंशावळ.

वाचनालय

**गोतपात** (न.) नात्यागोत्याचीं माणसें; कुटुंब; गोताई पहा.
**गोतरणी** (पु. स्त्री.) कातकऱ्यांच्या जातिसभेचीं आमंत्रणें करणारा.
**गोता** (अर. पु.) हिसका; आंचडा, पेंच; संकट; तोटा; व्यर्थ येरझार.
**गोताई** (स्त्री.) जातिभ्रष्ट झालेल्या शूद्रानें परत जातींत येण्याचे वेळीं करण्याचें प्रायश्चित्त.
**गोतांबाल** (प्रा. स्त्री.) एका ताटांत सर्वांनीं जेवणें (ज्ञा० १७।१६०); गोंधळ.
**गोतावळ** (स्त्री.), **गोतावळा** (पु.), **गोतावळें** (न.) नात्याची किंवा आप्तसंबंधाची मंडळी.
**गोती** (वि.) नात्याचा.
**गोत्र** (सं. न.) कुळ.
**गोत्रज** (सं. वि.) स्वतःच्या गोत्रांतला.
**गोंद** (हिं. पु.) डिंक.
**गोदडी** (स्त्री.) पुष्कळ ठिगळें लावून केलेलें वस्त्र, वाकळ.
**गोंदणें** (प्रा. क्रि.) गुंतविणें, सुईनें शरीरावर टोंचून नक्षी काढणें. [ पात्र.
**गोंददाणी** (हिं. स्त्री.) डिंक ठेवण्याचें
**गोंदळा** (प्रा. पु.) समुदाय.
**गोदा, गोदावरी** (सं. स्त्री.) त्रिंबकेश्वराजवळ उगम पावणारी पुण्यनदी.
**गोदी** (हिं. स्त्री.) बंदराचे ठिकाणीं जहाजें उतरण्यासाठीं केलेली सुरक्षित जागा.
**गोधडी** (स्त्री.) गोदडी पहा.
**गोधन** (सं. न.) गायी, म्हशी, बैल इत्यादिरूप संपत्ति.
**गोंधळ** (पु.) गडबड, कोलाहल, अव्यवस्था; गोंधळयाचें कीर्तन.
**गोंधळणें** (क्रि.) गडबडणें, अव्यवस्था होणें.
**गोंधळी** (पु.) एका जातीचें नांव; (प्रा. पु.) दुर्जन, भोंदू (ज्ञा० १३।१०१०).
**गोंधळीक** (प्रा. न.) गोरज मुहूर्तावरचें लग्न.
**गोंधुळुक** (पु.) भ्रम.
**गोधूम** (सं. पु.) गहूं.
**गोंधांधळी** (स्त्री.) धनुर्धराचें अंगुस्तान.
**गोप** (पु.) गुराखी.

**गोपद्म** (सं. न.) गाईच्या पावलाचें चिन्ह.
**गोपन** (सं. न.) गुप्त राखणें, संरक्षण.
**गोपनीय** (सं. वि.) गुप्त ठेवण्यासारखें.
**गोपानशी–सी** (सं. स्त्री.) छप्पर, छप्पराचा वासा.
**गोप्य** (सं. वि.) लपविण्यास योग्य.
**गोपायिता** (सं. गुप् वि.) रक्षणकर्ता.
**गोपाल** (सं. पु.) गुराखी, श्रीकृष्ण.
**गोपाळ** (सं. पु.) गोपाल.
**गोपाळकाला** (पु.) श्रीकृष्णांनीं सर्व गोपाळांच्या शिदोऱ्या एकत्र जमवून केलेला काला; त्याच्या स्मरणार्थ उत्सवाचे शेवटीं करतात तो दहींहंडीचा प्रसंग.
**गोपी** (स्त्री.) गुराख्याची बायको.
**गोपीचंदन** (सं. न.) एक प्रकारची पांढरी माती.
**गोपूर** (सं. न.) देवळाचें मुख्य द्वार किंवा वेस.
**गोफ** (पु.) गळयांत घालण्याचा एक अलंकार; वीण घातलेला दोरा.
**गोफण** (स्त्री.), **गोफणें** (न.) दगड मारण्यासाठीं दोरीची केलेली विशेष प्रकारची आकृति.
**गोफाटणें** (प्रा. क्रि.) गुरफाटणें; घाबरविणें; घाईनें करणें; झुगारणें.
**गोबरा** (वि.) कुरूप.
**गोंबी** (प्रा. स्त्री.) गोम, घोण.
**गोबें** (न.) डवोलें; पुरलेलें द्रव्य.
**गोम** (स्त्री.) वैगुण्य, दोष; खुबी; पुष्कळ पायांचा एक प्राणी; घोडयाच्या अंगावरचें एक दुर्लक्षण; कांठावरची शिवण.
**गोमटी** (स्त्री.) कांचेची बांगडी; मान.
**गोमटें** (प्रा. वि.) सुखरूप; सुरेख.
**गोमय** (सं. न.) गाईचें शेण.
**गोमा** (पु.) ढोंग.
**गोमागणेश** (पु.), **गोमाजी कापशे** (पु.) कोणीतरी उपटसुंभ, अविवक्षित मनुष्य.
**गोमांतक** (पु.) गोंवा प्रांत.
**गोमाशी** (स्त्री.) एक जातीची माशी.
**गोमुख** (सं. न.) जलाशयाला बसविलेली गाईच्या तोंडाची आकृति; त्यांतून बाहेर पडणारें पाणी पवित्र मानतात.

**गोमुखी** (सं. स्त्री.) जप करण्याची ⌈ या आकाराची पिशवी.
**गोमेद** (पु.) एक रत्न.
**गोरकफन** (फा. न.) उत्तरक्रिया, मूठमाती.
**गोरख** (प्रा. पु.) गुराखी; नाथसंप्रदायाचा आदिपुरुष.
**गोरखचाळा** (पु.), **गोरखसाखळी** (स्त्री.) गोसाव्यांची कडीदार लोखंडी सळई.
**गोरखी** (पु.) गुराखी.
**गोरगरीब** दरिद्री, गरजू लोक.
**गोरजमुहूर्त** (सं. पु.) सूर्यास्तापूर्वी ३० पळें व नंतर ३० पळें यांच्या मधला काळ; ही घटिका लग्नाला फार मंगलकारक समजतात.
**गोरटा** (सं. गौर वि.) गोरा.
**गोरटेला** (वि.) गोरा.
**गोरस** (सं. पु.) गाईपासून उत्पन्न होणारे पदार्थ (दूध, ताक, दहीं, लोणी, तूप इ.)
**गोरक्षण** (सं. न.) कसायांपासून गाईचे जीव वांचविणें. [ गोऱ्हा.
**गोरा** (सं. गौर वि.) गौरवर्ण; (पु.)
**गोरांजण, गोरांजन** (प्रा. पु.) ज्ञानाग्नि.
**गोरागोरापान** (वि.) अतिशय गोरा.
**गोरामोरा** (वि.) भीतीनें घाबरा झालेला.
**गोरी** (प्रा. पु.) पारधी; गुराखी; गाणें.
**गोरुव** (प्रा. न.) गोवत्स.
**गोरूं** (प्रा. न.) गुरूं. [ गुरवाडी.
**गोऱ्हवाडी** (प्रा. स्त्री.) गुरांचा गोठा,
**गोऱ्हा** (पु.) पाडा, खोंड.
**गोल** (वि.) वाटोळा; (पु.) वाटोळी वस्तु; अर्ध-वर्तुळाचा व्यास स्थिर राखून त्या व्यासाभोंवती तें अर्ध-वर्तुळ फिरविलें असतां होणारी आकृति; पागोट्याचा जरीचा पदर; (इं.पु.) हॉकी, फुटबॉल इत्यादि खेळांत डाव होण्याकरितां हद्दीवरील ज्या दोन खांबांतून चेंडू दवडावा लागतो ती रेषा.
**गोलक** (पु.) एकादी वाटोळी वस्तू.
**गोलची** (स्त्री.) लाकूड गोल करण्याचें सुताराचें हत्यार
**गोलंदाज** (फा. पु.) तोफ डागणारा, क्रिकेटमध्यें चेंडू टाकणारा.
**गोलांगूल** (सं. पु.) एक प्रकारचा वानर.
**गोलांटी** (स्त्री.) खालीं डोकें वर पाय करून मारलेली उलटी उडी.
**गोल्हाटउल्हाट** (प्रा. स्त्री.) उलट्या सुलट्या उड्या, कोल्हांटी.
**गोलार्ध** (पु.) पृथ्वीचा अर्धा भाग.
**गोंव** (प्रा. स्त्री.) गुंता.
**गोंवणें** (क्रि.) गुंतविणें, गुंफणें.
**गोंवर** (सं. गोवण पु.) एका रोगाचें नांव.
**गोंवरी** (सं. गोविट् स्त्री.) शेणाची थापटलेली थापटी. [टेकडी.
**गोवर्धन** (सं. पु.) मथुरेजवळची एक
**गोवसा** (प्रा. पु.) नवस.
**गोंवळ** (पु.) गोशाळा.
**गोवळ, गोवळा** (सं. गोपाल पु.) गौळी.
**गोवळजेणें** (प्रा. क्रि.) घुसळणें.
**गोंवा** (पु.) गुंता, घोटाळा.
**गोवाई** (प्रा. स्त्री.) गुंतागुंत (ज्ञा. ३।११).
**गोवार** (प्रा. न.) शेणखळा.
**गोवारी** (पु.) गुराखी; (स्त्री.) एक भाजी.
**गोविंद** (सं. पु.) श्रीकृष्णाचें एक नांव. गो० विडा–एक विशेष प्रकारें बांधलेला विडा. [ खूण.
**गोवी, गोंवी** (प्रा. स्त्री.) गुंतागुंत; गोम;
**गोशपेच, गोषपेच** (फा. पु.) टापशी.
**गोशमाल** (फा. स्त्री.) कानउघाडणी.
**गोशा, गोषा** (फा. पु.) पडदपोशी. [गोठा.
**गोशाळा** (सं. स्त्री.) गाई ठेवण्याची जागा;
**गोष** (फा. न.) मांस.
**गोषपेच** (फा. पु.) टापशी बांधण्याचें वस्त्र.
**गोषवारा** (फा. गोश्वारा पु.) सारांश, मुख्य गोष्ट. [ घटना.
**गोष्ट** (सं. स्त्री.) कथा, हकीकत; काम;
**गोष्ठ** (सं. पु.) गोठा.
**गोष्पदोपम** (सं. वि.) गाईच्या पावलाप्रमाणें ओलांडून जाण्यास सुलभ.
**गोसमाल, गोसमाळी** (फा. स्त्री.) कान उपटणें; चोसवाळी (तुका० ३९७७).
**गोसा, गोशा** (फा. स्त्री.) धनुष्याचें टोक.
**गोसाई, गोसावी** (सं. गोस्वामी पु.) विरक्त; बैरागी; हरदास; धनी; मालक; एक सन्मानाची पदवी.

**गोस्तनदेवी** (स्त्री.) गाईच्या स्तनावरच्या देवीच्या फोडांतील लस काढून ती माणसाच्या शरीरांत टोंचून घालण्याचा डॉ. जेनर यांचा शोध. [मोती.
**गोहर** (पु.) हुरहुर, काळजी; अवगुण;
**गोहाडी** (प्रा. स्त्री.) गूरवाडी.
**गोहरा, गोहोरा** (पु.) गोऱ्हा.
**गोही** (प्रा. पु. स्त्री.) ग्वाही, साक्ष.
**गोहो** (प्रा. पु.) नवरा.
**गोळ** (सं. गोल पु.) गोल; अंडें.
**गोळक** (सं. गोलक पु.) एका जातीचें नांव.
**गोळा** (सं. गोलक पु.) गोल; अन्न; वीं; समाज; (अ.) एकत्र; जमा.
**गोळाबेरीज** (स्त्री.) एकंदर बेरीज.
**गोळी** (सं. गुलिका स्त्री.) लहान गोळा.
**गोळीबार** (पु.) बंदुकींत गोळी घालून उडविणें.
**गोळुजणें** (प्रा. क्रि.) घुसळणें (ना. १७०९).
**गौ** (सं. स्त्री.) गाय.
**गौड** (प्रा. पु.) गूढ जाणणारा; एक देश (मध्य बंगाल); ब्राह्मणांची एक पोटजात.
**गौडबंगाल** (न.) जादू (गौड आणि बंगाल हे दोन्ही प्रांत पूर्वींच्या काळीं जादूविद्येसाठीं प्रसिद्ध होते.). [नांव.
**गौड सारंग** (पु.) गायनांतल्या एका रागाचें
**गौडारी**–(वाणी) (स्त्री.) तानसेनाची संगीत पद्धति.
**गौण** (वि.) अप्रधान; कमी महत्त्वाचें.
**गौप्य** (सं. न.) गुप्त गोष्ट.
**गौतमी** (स्त्री.) नदी.
**गौर** (सं. वि.) गोरा; (स्त्री.) देवी.
**गौरनर** (इं. गव्हर्नर पु.) गव्हर्नर.
**गौरव** (सं. न.) महत्त्व, मोठेपणा; (पु.) मान, सन्मान.
**गौरवणें** (प्रा. न.) मोठेपणा देणें.
**गौरविणें** (सं. क्रि.) आदर करणें.
**गौरशी** (हिं. स्त्री.) वाहवा.
**गौरी** (सं. स्त्री.) पार्वती; एक राग.
**गौरीहर** (सं. पु.) लग्नाचे दिवशीं वधू शिवपार्वतीची पूजा करते ती पूजा किंवा मूर्ति.
**गौल** (प्रा. वि.) मधुर. [रुचि.
**गौलता** (प्रा. स्त्री.), **गौल्य** (न.) गोडी;
**गौसी** (प्रा. स्त्री.) परस्परसंबंध; साखळी.
**गौही** (स्त्री.) ग्वाहि, साक्ष; साक्षीदार.
**ग्याझिट** (इं. न.) वर्तमानपत्र.
**ग्यान** (सं. ज्ञान न.) ज्ञान.
**ग्यानी** (पु.) ज्ञानी.
**ग्याली** (स्त्री.) मुद्रापाठ.
**ग्यालरी** (इं. स्त्री.) सज्जा.
**ग्यास** (इं. पु.) धूर, वायु.
**ग्रथित** (वि.) गुंफलेलें.
**ग्रंथ** (सं. पु.) पुस्तक, पोथी; ग्रंथ मोजण्याचें मान (बत्तीस अक्षरें).
**ग्रंथकार** (सं. पु.) ग्रंथ रचणारा, ग्रंथकर्ता.
**ग्रंथणें** (सं. ग्रंथ् क्रि.) गुंफणें, जुळणें.
**ग्रंथि** (सं. स्त्री.) गांठ; संबंध; गुंतागुंत.
**ग्रसणें** (सं. क्रि.) गिळणें; आच्छादणें; व्यापणें.
**ग्रस्त** (सं. वि.) ग्रासलेला, गिळलेला, व्यापलेला.
**ग्रस्तास्त** (सं. पु.) ग्रहण सुटण्यापूर्वींच सूर्याचा किंवा चंद्राचा झालेला अस्त.
**ग्रस्तोदय** (सं. पु.) ग्रहण लागलें आहे अशा स्थितींतच चंद्राचा किंवा सूर्याचा उदय.
**ग्रह** (सं. पु.) घेणें; स्वीकार, अंगीकार; पृथ्वी, बुध, गुरु इ० सूर्यमालेंतले मुख्य मुख्य गोल; ग्रहण; पिशाच्च; पीडा देणारा; समजूत. [गणित.
**ग्रहगणित** (सं. न.) ग्रहांच्या गतीविषयींचें
**ग्रहण** (सं. न.) स्वीकार; चंद्र किंवा सूर्य यांच्या बिंबाचें दुसरे ग्रह आड आल्यामुळें होणारें आच्छादन.
**ग्रहणी** (स्त्री.) संग्रहणी; तीन लहानसर आंतडी; धमणी.
**ग्रहणीय** (वि.) स्वीकारण्यास योग्य.
**ग्रांथिक** (वि.) ग्रंथासंबंधी.
**ग्राम** (सं. पु.) गांव; खेडें; समूह; गायनांत सप्त स्वरांतले मुख्य तीन अवधि.
**ग्रामकेसरी** (सं. पु.) कुत्रा.
**ग्रामणी** (सं. पु.) ग्रामस्थवृत्ति; गांवांतले कुटाळ; गांवांत राहून उपभोगाचीच केवळ इच्छा करणारा.

**ग्रामण्य** (सं. न.) एकाद्याच्या आचरणाविषयींचा विचार करण्यासाठीं भरलेली ग्रामस्थांची सभा; बहिष्कार.
**ग्रामस्थ** (सं. पु.) गांवकरी.
**ग्रामिणी** (स्त्री.) हरामखोरी.
**ग्रामोफोन** (इं. पु.) फोनोग्राफ.
**ग्राम्य** (सं. वि.) गांवासंबंधीं; खेडवळ; असभ्य; अश्लील; माणसाळलेला (पशु).
**ग्राव** (सं. पु.) धोंडा.
**ग्रास** (सं. पु.) गिळणें; घास; अन्न; ग्रहण लागलेला भाग; स्वतंत्र राज्य, संस्थान किंवा सरदारकी वडील मुलाला मिळते म्हणून धाकट्या मुलांचा इतमाम चालण्यासाठीं त्यांना जो ऐवज देतात तो.
**ग्रासणें** (सं. क्रि.) खाणें; ग्रासून सोडणें; पीडणें, व्यापणें.
**ग्राह** (सं. पु.) सुसर; जलचर.
**ग्राहक** (सं. पु.) गिऱ्हाईक; स्वीकार करणारा; ज्ञाता.
**ग्राहकी, ग्राहिकी** (प्रा. स्त्री.) गिऱ्हाइकी.
**ग्राह्य** (सं. वि.) घेण्यास योग्य; स्वीकारास पात्र.
**ग्रीवा** (सं. स्त्री.) मान.
**ग्रीष्म**'(सं. पु.) उन्हाळा.
**ग्लांती** (सं. ग्लै स्त्री.) खंती, दुःख; पश्चात्ताप (दा० ५।२।१४).
**ग्लानि** (सं. स्त्री.) थकवा; उतरती कळा; दुर्बलता; विनवणी, काकळूत.
**ग्लास** (इं. पु.) पेला.
**ग्लोब** (इं.पु.) पृथ्वीचा गोल; विजेचा दिवा.
**ग्वाही** (फा. स्त्री.) साक्ष; (पु.) साक्षीदार.

---

## घ

घ मराठी व्यंजनांतील चवथें व्यंजन.
**घंगाट** (प्रा. पु.) सोसाटा.
**घंगाळ** (सं. गंगालय न.) एक विशिष्ट आकाराचें मोठ्या पसरट तोंडाचें व कडीदार भांडें; गंगाळ.
**घघाची विद्या किंवा बाराखडी** दुसऱ्याचें घेण्याचें ज्ञान.
**घट** (सं. पु.) पात्र, भांडें; मडकें; शरीर; तूट; नवरात्रांत देवीच्या पूजेचा एक विशेष प्रकार; (स्त्री.) झीज, नुकसान.
**घटक** (सं. पु.) ज्योतिषी; परमाणु; अवयव.
**घटका** (सं. घटिका स्त्री.) घटि; साठ पळांचा किंवा चोवीस मिनिटांचा काळ; वेळ मोजण्याचें एक धातुपात्र.
**घटघटा** (क्रि. वि.) घाईघाईनें (पिणें).
**घटणें** (प्रा. क्रि.) कमी होणें; शांत होणें; संवय होणें; पक्कें होणें. [ ऱ्हास.
**घटती** (हिं. स्त्री.) नुकसान; कमती.
**घटन** (न.), **घटना** (स्त्री.) बनण्याची क्रिया. **घटनात्मक**–रचनेसंबंधीं; **घटनासमिति** (स्त्री.)–राज्यघटना तयार करण्यासाठीं नेमलेली लोकनियुक्त संस्था.
**घटपटा** (स्त्री.) खटपट.
**घटमान** (वि.) हातीं धरलेलें.
**घटमूट** (वि.) मजबूत.
**घटवटना** (स्त्री.) चर्चा.
**घटवात** (पु.) एका हक्काचें नांव.
**घटसर्प** (पु.) एका रोगाचें नांव.
**घटस्थापना** (सं. स्त्री.) आश्विन शु० १ ला देवीच्या नवरात्राच्या आरंभीं पाण्याच्या कलशाची समंत्रक स्थापना करून पूजा करतात ती.
**घटस्फोट** (सं. पु.) नवराबायकोची फारकत; पतिताचा त्याच्या जिवंतपणींच प्रेतसंस्कारविधि.
**घटा** (सं. स्त्री.) समुदाय, जमाव.
**घटाकाश** (सं. न.) घटांतील पोकळी.
**घंटा** (स्त्री.) एक वाद्यविशेष.
**घंटाघोष** (सं. पु.) प्रसिद्धि.
**घंटापथ** (सं. पु.) राजमार्ग.
**घटाव** (प्रा. पु.) प्रकार, व्यवस्था, ऐक्य.
**घंटापारधी** (प्रा. पु.) घंटा-नादानें मृगास भुलवून त्यास फासांत अडकविणारा पारधी.
**घटि, घटिका, घटी** घटका पहा.
**घंटिका** (सं. स्त्री.) गळयाचा अस्थिमणि (ज्ञा० ६।२८); लहान घंटा.

**घटित** (सं. न.) वधूवरांच्या जन्मकाळा-वरून ज्योतिःशास्त्राच्या नियमानें ठर-णारा परस्परांविषयींचा अनुकूल भाव.
**घटी** (सं. स्त्री.) घडी, घड्याळ.
**घटीयंत्र** (सं. न.) रहाटगाडगें.
**घंटी** (स्त्री.) दळण्याचें जातें; लहान घंटा.
**घंटीचोर** (पु.) चोरांची एक जात; उचल्या.
**घटोत्कचाचा बाजार** मायेचा बाजार; फसवणूक.
**घट्ट** (वि.) दाट; जड; आवळ. [ खूण.
**घट्टा** (पु.) घर्षणाच्या योगानें पडणारी
**घट्टीकरण** (सं. न.) घनीकरण.
**घड** (पु.) समुदाय; जुडगा; घोंस.
**घडघड, घडघडां** (अ.) अस्खलित.
**घडघडणें** (क्रि.) गडगडणें, गर्जना करणें; लोळणें; कोसळून पडणें; मरणें.
**घडघडाट** (पु.) घडघड असा मोठा आवाज; गर्जना.
**घडघडे** (प्रा. अ.) पटापट, तडास्यानें.
**घडण** (सं. घटना स्त्री.) रचना, आकार; डौल; घडण्याचें काम.
**घडणावळ** (स्त्री.) घडण्याबद्दल मजुरी.
**घडणी** (स्त्री.) बनवणें; हिशेबाचा तक्ता; समुदाय.
**घडणें** (क्रि.) बनविणें; तयार करणें; रचना करणें; होणें.
**घडता** (प्रा. वि.) योग्य; मान्य.
**घडती** (स्त्री.) नुकसान.
**घडतें** (प्रा. न.) प्राप्ति, अनुकूलता; साधन.
**घडवंची** (स्त्री.) उंच बैठक; चौकी, घोडी इ.
**घडवट** (प्रा. न.) घडविलेला पदार्थ; देह; पायघड्या (रुक्मिणी० १५।१२).
**घडशी** (स्त्री.) विटाळशी.
**घडसण** (स्त्री.) गर्दी, दाटी.
**घडा** (सं. घट पु.) घागर; जम.
**घडाई** (स्त्री.) घडविण्याबद्दलची मजुरी.
**घडाडणें** (क्रि.) कोसळणें.
**घडामोड** (स्त्री.) जुनें मोडणें आणि नवें करणें असा फेरफार; उलथापालथ.
**डिया** (प्रा. स्त्री.) पात्र; तस्त.

**घडी** (स्त्री.) घटि, लहान घागर; घटका, घड्याळ; पडदा; दुमड; चूण; पट.
**घडीघडी, घडोघडी** (अ.) दर घटकेस; वारंवार.
**घडीबंद** (वि.) घडी न उलगडलेलें.
**घडींव** (वि.) घडवून तयार केलेलें; घडीदार.
**घडुलें** (प्रा. न.) डेरा.
**घडेबाजी** (हि. स्त्री.) मडक्यांत फटाके वगैरे भरून त्यांना वत्ती देणें.
**घडौतें** (प्रा. न.) साधन.
**घड्याळ** (न.) वेळ समजण्याचें यंत्र.
**घड्याळ टिपरूं** आवाजदार धातूचा वाटोळा जाड पत्रा व तो वाजविण्याची मोगरी; जेवणांतले दोनच पदार्थ म्हणजे भाकर आणि तिखट.
**घण** (सं. घन पु.) मोठा हातोडा.
**घणघण घंटा** अगदीं ठणठणीत रिकामें.
**घणघणणें** (क्रि.) घणघण नाद करणें; फिकीर वाटणें.
**घणवट** (प्रा. वि.) जड, सारभूत.
**घणस** (सं. घोनस पु.) सर्प.
**घणसर** (वि.) जाड, मजबूत, भक्कम.
**घणावणें** (प्रा. क्रि.) दृढ होणें.
**घणावली** (प्रा. वि.) घट्ट झालेली.
**घन** (सं. वि.) दाट; (पु.) मेघ; घण; अंकगणितांत–एखाद्या संख्येच्या वर्गाला तिनें गुणून येणारी संख्या; ज्या आकृ-तीची मर्यादा सहा चौरसांनीं दाखविली जाते अशी भरीव आकृति.
**घनघटा** (सं. स्त्री.) मेघडंबर, मेघपटल (रामजोशी प. ५६) [ राचें.
**घनघोर** (वि.) भयंकर, हातघाईचें, निक-
**घनचक्कर** (वि.) विपुल; दाट; गर्द; गजबजलेलें. [मोठा वैदिक.
**घनपाठी** (सं. वि.) वेदाचा घन म्हणणारा;
**घनफळ** (सं. न.) लांबी, रुंदी व उंची यांचा गुणाकार करून येणारी संख्या.
**घनवट** (वि.) घट्ट विणीचें; सर्वव्यापी; गंभीर; भारी; परिपूर्ण. [ जमणें.
**घनवटणें** (क्रि.) गर्दी करणें; दाटणें,
**घनवटता** (स्त्री.) भारीपणा; घट्टपणा.

**घनवटा** (प्रा. स्त्री.) गादी; गालीचा.
**घनवर्धनीय** (सं. वि.) घणानें ठोकल्यानें किंवा दाब घातल्यानें न मोडतां पसरणारें.
**घनवाड** (प्रा. वि.) निबिड.
**घनःश्याम** (वि.) मेघासारखा कृष्णवर्णाचा.
**घनावणें** (क्रि.) घट्ट होणें; ढग येणें.
**घनाक्षरी** (सं. स्त्री.) ओंवीसारखा पण सोळा चरणांचा एक छंद.
**घनिष्ठ** (सं. वि.) अतिशय दाट.
**घप्पाघोळ** (पु.) गोंधळ.
**घबदूल** (वि.) लठ्ठ, गबदूल.
**घबराट** (हिं. स्त्री.) धास्ती, घोटाळा.
**घबाड** (पु. न.) एका मुहूर्ताचें नांव; अल्प प्रयत्नानें एकदम पुष्कळ मिळालेलें द्रव्य; लाट; (वि.) मोठें.
**घम** (अर. स्त्री.) क्षमा, गय; विश्रांति.
**घमघमाट** (पु.) सुवासाची अतिशयता.
**घमंड, घमेंडी** (हिं. स्त्री.) समृद्धि; बढाई, गर्व, पोकळ डौल, अहंता.
**घमंडानंद** (पु.) घमंडखोर.
**घमस्यान, घमशान** (स्त्री.) दांडगाई; विपुलता, लयलूट (दा. १८।३।१८).
**घमेलें** (न.) लोखंडी पाटी.
**घम्म** (वि.) मुकाट्यानें.
**घर** (सं. गृह न.) गृह; कुटुंबांतलीं माणसें; बिऱ्हाड; संसार, प्रपंच; घराणें; उत्पत्ति; स्थान; आगर; खण; कप्पा; कोष्टकांतलें सदर किंवा कोठा; चौक; भोक, बीळ, क्षत. **घर करणें**—वास्तव्य करणें; छिद्र पाडणें; **घर घेणें**—बुडविणें, नाश करणें; **घरीं आलेली—(मुलगी)**—विधवा झालेली (मुलगी); **घर धुऊन नेणें**—सर्वस्वाचा अपहार करणें; **घरोघरीं मातीच्या चुली**—सगळीकडे एकच प्रकार; **घर म्हणून ठेवणें**—पुढें प्रपंचाला जरूर लागेल म्हणून संग्रह करून ठेवणें; **खाल्ल्या घरचे वासे मोजणें**—उपकारकर्त्याशीं कृतघ्न होणें, **घर डोईवर घेणें**—अतिशय गडबड करून त्रासवून सोडणें.
**घरकार** (प्रा. पु.) घरचा यजमान.
**घरकुल** (न.) मुलींच्या खेळांतलें लहानसें घर.
**घरकोंबडा** (पु.) घरांत बसून राहणारा.
**घरगुती** (वि.) घरीं तयार केलेला; घरचा.
**घरघर** (स्त्री.) घर घर आवाज.
**घरघाला** (पु.) कुळाची अब्रू घालविणारा.
**घरघाली—घालू** (पु.) घरबुडव्या; (वि.) खोडसाळ, फसविणारा.
**घरघेऊ, घरघेणा** (वि.) दुसऱ्यास फसवून लुबाडणारा; घरबुडव्या.
**घरचा** (वि.) कुटुंबांतला; घरीं केलेला. **घ० सुखी**—निर्वाहासाठीं नोकरी वगैरे करणें आवश्यक नसलेला; सुस्थितींतला.
**घरचारीण** (प्रा. स्त्री.) घरधनीन.
**घरजावई** (पु.) बायकोसह आपल्या सासऱ्याच्या घरीं येऊन राहिलेला.
**घरट** (पु.) मोठें जातें; (प्रा. न.) तस्त.
**घरटका** (पु.) घरपट्टी.
**घरटा** (पु.) पक्ष्याचें घरटें; पडक्या घराची जागा; (प्रा.) तस्त; न्हाणीघर.
**घरटी** (स्त्री.) प्रत्येक निरनिराळें घर; घरपट्टी; मोठें जातें; घिरटी, फेरी.
**घरटीकार** (प्रा. पु.) गस्तकरी.
**घरटी खोटी** (स्त्री.) गांवचें सगळें दळण दळून देण्याचा मक्ता.
**घरटें** (न.) पक्ष्याचें घर.
**घरठाण, घरठाणा, घरबंद** (न.) पडक्या घराची जागा; जमिनीचा जो विभाग इमारती कामासाठीं धारण केला असेल तो.
**घरडहुळी** (प्रा. स्त्री.) घराचा झाडा.
**घरडुळणें** (प्रा. क्रि.) धुंडाळणें.
**घरडोळी** (प्रा. स्त्री.) घरडहुळी पहा.
**घरणी** (सं. गृहिणी स्त्री.) भार्या, पत्नी.
**घरंदाज** (फा. वि.) कुलीन.
**घरदार** (न.) चीजवस्त; खटलें.
**घरधनीण, घरली** (स्त्री.) गृहिणी.
**घरपट्टी** (स्त्री.) घरावरचा कर.
**घरफोडी** (स्त्री.) घराची भिंत फोडून झालेली चोरी वगैरे.
**घरबारी** (प्रा. पु.) गृहस्थाश्रमी.
**घरबुडव्या** (वि.) घरादाराचा नाश करणारा

**घरबुडी** (प्रा. स्त्री.) घर बुडणें; सर्वनाश.
**घरबैठा** (वि.) घरीं बसून करतां येणारा.
**घरभरणी** (स्त्री.) नवीन बांधलेल्या घरांत राहण्यास येण्याचे वेळीं प्रथम करावा लागणारा धार्मिक विधि.
**घरभेद्या** (वि.) घरांतली पक्की माहिती दुसऱ्यास विशेषतः शत्रूस सांगणारा.
**घरवरीत** (स्त्री.) प्रपंच. [ गोष्टी.
**घरवात** (सं. गृहवार्ता स्त्री.) प्रपंचाच्या
**घरवी** (स्त्री.) घरास लागणारा लाकूड-फाटा वगैरेंचा संग्रह.
**घरा** (पु.) छिद्र, भोक, जखम.
**घराऊ** (वि.) घरगुती.
**घराचार, घराचारू** (प्रा. पु.) गृह-व्यवहार; राहटी; पसारा.
**घराचारी** (प्रा. वि.) घरदाज.
**घराणें** (फा. न.) कुल, वंश; (प्रा. न.) साधन; योग.
**घरोटी** (स्त्री.) कुटुंबांतली संयुक्त माल-मत्ता; वडिलोपार्जित इस्टेट.
**घरोवा** (पु.) घरच्या माणसाइतका मित्र-त्वाचा निकट संबंध. [ जळमटें इ.
**घरोसा** (पु.) घरांत छपरांपासून लोंबणारीं
**घरौते** (पु.) गृहस्थ.
**घरौते वरौते** (पु.) वायकोपुरुष.
**घर्म** (सं. पु.) घाम.
**घर्षण** (सं. न.) घासणें, घसट.
**घवघवणें** (प्रा. कि.) घू घू असा नाद करणें (ना. २२८५).
**घवघवीत** (वि.) ठळक, मोठें, मजबूत.
**घवा** (पु.) खोल खळगा.
**घष्टनी** (प्रा. स्त्री.) घासाघासी.
**घशा** (पु.) चुन्यासारखी माती.
**घस** (स्त्री.) झीज, नुकसान; सोन्याचा कस.
**घसघस** (प्रा. स्त्री.) रिकामा वाद.
**घसघसीत** (वि.) पक्का, भरपूर.
**घसट, घसटणी** (स्त्री.) घरोवा, संघटन.
**घसण** (स्त्री.) संवय; घरोवा; नुकसान.
**घसणी** (प्रा. स्त्री.) दाटी.
**घसमस** (प्रा. वि.) असार; (स्त्री.) भांडण.
**घसरट** (वि.) निसरती, बुळबुळीत.
**घसरडें** (न.) निसरट जागा.
**घसरणी** (स्त्री.) निसरडी जागा.
**घसरणें** (क्रि.) निसटून खालीं येणें; पडणें; क्षीण होणें. [ जडयाचें एक हत्यार.
**घसरपट्टी** (स्त्री.) खरड, खरडपट्टी, बोडंती;
**घसरा** (पु.) घर्षण; घस, नुकसान.
**घसवटणें** (प्रा. क्रि.) घासणें, झिजणें.
**घसवटी** (प्रा. स्त्री.) संवय.
**घसा** (पु.) गळा, नरडें; आवाज. [ पट्टीनें.
**घसाघस** (अ.) मनसोक्तपणानें, उचळ-
**घसारा** (पु.) औषधांचें मिश्रण; ओरखडा; इमारत, यंत्रें वगैरे वापरल्यामुळें किंम-तींत पडणारी तूट.
**घसीट** (पु. स्त्री.) उंच स्वरापासून सफाईनें खालच्या स्वराकडे जाणें.
**घसें** (न.) हातगाडी.
**घस्त** (स्त्री.) तोटा, नुकसान.
**घस्मर** (वि.) जाडेभरडें; खादाड.
**घळ** (स्त्री.) खोलगट जागा; भेग.
**घळघळ, घळघळा** (अ.) अश्रूंचा प्रवाह दर्शविणारा शब्द. [ पणाचा.
**घळघळीत** (वि.) विपुल; ढिला; मोकळे-
**घळण** (स्त्री.) चर, खांच.
**घाइवटा** (प्रा. पु.) घाव, जखम.
**घाई** (स्त्री.) त्वरा, गर्दी, जलदी; उतावळी; गाण्यांतला ताल; चर्मवाद्यांचा गजर; (प्रा.) घाव, जखम.
**घाईं** (प्रा. अ.) तडकाफडकीं.
**घाऊक** (वि.) ठोक, ठोकळ. [ घास.
**घाऊस** (प्रा. न.) गोमांस; (सं. ग्रास पु.)
**घांग** (स्त्री.) स्मरण, सावधानता.
**घागर** (स्त्री.) घडा, कळशी.
**घागरगडचा सुभा** पाणक्याचें काम.
**घागरा** (हिं. पु.) मोठ्या स्त्रियांचें पर-करासारखें नेसावयाचें वस्त्र. [ भूषण.
**घागरी** (स्त्री.) घुंगरूं; पायांतलें एक
**घागऱ्याघोळ** (पु.) गडबड, घाबरगुंडी.
**घांघुसणें, घांगोसणें** (क्रि.) शोधणें.
**घांची** (पु.) तेली.
**घाट** (सं. घट्ट पु.) डौल, आकार, स्वरूप; डोंगरांतला रस्ता; नदीच्या कांठीं पायऱ्या बांधून केलेलें काम. **घाट घालणें** —बेत करणें.

**घांट** (सं. घंटा स्त्री.) घंटा.
**घाटण** (न.) डाळ शिजविल्यानंतर ठेचून केलेलें दाट पाणी.
**घाटणा, घाटणेरा** (पु.) लाह्या भाजतांना त्या वर खालीं करण्यासाठीं केलेलें वस्त्राचा बोळा बसविलेलें दांडकें.
**घाटणें** (क्रि.) वांटणें; चेंदामेंदा करणें; चर्चा चालणें; ठरणें. [रस्ता.
**घाटनाळ** (स्त्री.) डोंगरांतून गेलेला अरुंद
**घाटपांडे** (पु.) घाटाच्या तोंडाशीं ठेविलेली जकात वसूल करणारा मनुष्य.
**घाटमाथा** (पु.) डोंगरावरचा प्रदेश.
**घाटलें** (न.) एक प्रकारचें कोंकणी खाद्य.
**घाटवळ** (वि.) देशावरचा; सह्याद्रि पर्वतावरचा.
**घाटसरी** (स्त्री.) घाटमाथा. [दाणा.
**घाटा** (पु.) फोलासुद्धां ओल्या हरभऱ्याचा
**घांटी** (प्रा. वि.) कंठ.
**घाटी** (वि.) घाटावरचा; देशावरचा; (स्त्री.) लहान वाट.
**घाट्या** (पु.) लहान हातोडी; घाटावरचा ब्राह्मण; (स्त्री.) रांधलेल्या कण्या.
**घाडी** (पु.) गुरव.
**घाण** (स्त्री.) केरकचरा; दुर्गंधि.
**घाणवटा** (पु.) घाणा.
**घाणा** (पु.) तेल काढण्याचें यंत्र; उंसाचा चरक; भाजण्यास, कुटण्यास, दळण्यास वगैरे एकावेळीं घेण्याचें परिमाण; लग्नादि कार्यांतला एक विधि.
**घाणाळ** (वि.) घानाळ पहा.
**घाणी** (स्त्री.) चुना मळण्याची जागा.
**घाणेरडा, घाणेरा** (वि.) दुर्गंधियुक्त, कळकट, ओंगळवाणा.
**घात** (सं. पु.) वध; नाश; समान संख्यांचा गुणाकार; (स्त्री.) हंगाम.
**घातक, घातकी** (वि.) हानिकारक, नाशकारक.
**घातघेणा** (प्रा. वि.) घातकी. [करणें.
**घातणें** (प्रा. क्रि.) मारणें, घालणें, घात
**घातपात** (सं. पु.) नाश; वध.
**घातवार** (सं. पु.) अशुभ दिवस.
**घातुक** (वि.) घातक पहा.
**घानाळ** (प्रा. वि.) लांब नाकाचा.
**घापणें** (प्रा. क्रि.) घालणें; सोडणें; सांपडणें; पोचणें.
**घापती** (प्रा. वि.) घातलेली; भाजलेली.
**घाब** (स्त्री.) भगदाड.
**घाबरणें** (क्रि.) बावरणें, भयभीत होणें.
**घाबरा** (हिं. वि.) उतावळा; भयभीत; बावरलेला; गोंधळलेला.
**घाम** (सं. घर्म पु.) घाम; उष्णतेमुळें अंगांतून निघाणारें पाणी; दया.
**घामघूम** (वि.) घामाघूम पहा.
**घामट** (वि.) घाणेरडा, मलिन, ओंगळ.
**घामटा** (पु.) अतिपरिश्रमामुळें अंगांतून निघणारा घाम.
**घामाघूम** (वि.) घामानें डबडबलेला.
**घामेजणें** (प्रा. क्रि.) घामानें डवरणें, श्रमी होणें. [पुरळ.
**घामोळी** (स्त्री.) उष्णतेमुळें अंगावर उठणारें
**घामोळें** (न.) घामोळी; खोगीर, जोडा इ० चें कातडें घामानें खराब होऊं नये म्हणून त्याच्याखालीं घातलेलें दुसरें कातडें किंवा वस्त्र.
**घाय** (हिं. पु.) घाव, जखम; प्रहार.
**घायकूत** (स्त्री.) मोठी उतावीळ; अतिशय त्वरा; मनाची अशांतता; शरीराचें अस्वास्थ्य.
**घायडाय** (प्रा. पु.) आणीबाणीचा प्रसंग.
**घायतळ** (प्रा. न.) खालचा भाग (रुक्मि० १२।१३६); (स्त्री.) चक्कर, घेरी.
**घायपात** (स्त्री.) एक तंतुयुक्त वनस्पति.
**घायवट** (प्रा. क्रि.) घायाळ.
**घायवटणें** (प्रा. क्रि.) जखमी किंवा घायाळ होणें.
**घायवटा** (प्रा. स्त्री.) जखम; तडाखा; पराकाष्ठेचा शीण.
**घायवारें** (प्रा. न.) जखम.
**घायाळ** (स्त्री.) घायपात; (वि.) जखमी.
**घार** (सं. स्त्री.) एका पक्ष्याचें नांव.
**घारगा** (पु.) एक तळलेलें मिष्टान्न.
**घारणें** (प्रा. क्रि.) भाजणें; व्यापणें; बांधणें.
**घारमोर** (न.) लहान मुलांचा एक खेळ.
**घारा** (वि.) मांजरासारख्या डोळ्यांचा

**घारी** (प्रा. स्त्री.) घारगा.
**घारेला, घारोळा, घाऱ्या** (वि.) घारा.
**घाल** (स्त्री.) हल्ला; आपत्ति.
**घालघुसड** (स्त्री.) मूळ ग्रंथांत किंवा वस्तूंत पदरचा दडपून दिलेला भाग.
**घालणी** (प्रा. स्त्री.) हल्ला, छापा; धोका.
**घालणें** (क्रि.) आंत ठेवणें; ओतणें; शिरकविणें; ढकलणें.
**घालन** (प्रा. पु.) धोका, संकट.
**घालमेल** (हिं. स्त्री.) इकडचें तिकडे किंवा तिकडचें इकडे करणें; गडबड, गर्दी.
**घालमेली** (प्रा. स्त्री.) विचार.
**घालमेल्या** (वि.) घालमेल करणारा, गडबड्या, कारस्थानी.
**घालविणें** (क्रि.) बाहेर लावणें, हांकून देणें; जाऊं देणें.
**घालवेड** (न.) वेडाचें आणलेलें सोंग.
**घालवेडा** (पु.) वेड्याचें ढोंग करणारा, पण खरा अट्टल सोदा.
**घाला** (पु.) हल्ला, प्रहार, छापा; एक प्रकारचा मासा.
**घाव** (हि. पु.) जखम; शस्त्रप्रहार; धक्का; नुकसान.
**घावडाव** (पु.) आटोका; योग्य संधि; युक्ति, पेंच, कपटप्रयोग; प्रयत्न, खटपट; (प्रा.) संस्कार; सामर्थ्य; अधिकार.
**घावणें** (क्रि.) गावणें, सांपडणें, आढळणें.
**घावन** (न.) दगडाची उखळी; एक पक्वान्न.
**घावना** (पु.) एक पक्वान्न.
**घाशीरामी** (स्त्री.) घाशीराम कोतवाल यानें केल्यासारखें जुलमाचें कृत्य; झोंटिंग पाच्छाई.
**घास** (हिं. पु.) गवत; (स्त्री.) मोत्यास छेद पाडल्यानें वजनांत होणारी घट.
**घास** (सं. ग्रास पु.) तोंडांत घातलेला अन्नाचा गोळा.
**घासघीस** (स्त्री.) घासाघीस पहा.
**घासणी** (स्त्री.) जिनें घासतात ती वस्तु.
**घासणें** (क्रि.) घर्षण करणें; साफ करणें.
**घासदाणा** (हिं. पु.) सैन्याला गवत व वैरण पुरविण्याच्या खर्चासाठीं बसविलेली पट्टी; पूर्वीच्या काळीं मराठे मुलुखगिरी करीत, तेव्हां घोडेस्वारांच्या रोजच्या खर्चासाठीं प्रत्येक गांवाकडून जी ठराविक रक्कम घेत ती.
**घासाघीस** (स्त्री.) ओढाताण, जिकीर, वाद.
**घाळ** (स्त्री.) चर, खांच.
**घाळण** (स्त्री.) खंड, भेग.
**घिरघिरें** (न.) लहान मुलांचें एक खेळणें.
**घिरटी** (स्त्री.) चक्की; फेरी; गरगर फिरणें.
**घिवर** (पु.) एका पक्वान्नाचें नांव.
**घिसघिस** घासाघीस पहा.
**घिसणी** (प्रा. स्त्री.) घिसघिस.
**घिसाडी** (पु.) लोखंडाचें काम करणारा.
**घी** (हिं. न.) तूप.
**घीस** (स्त्री.) झीज.
**घुंगट, घुंगूट** (हिं. न.) तोंडावरून घेतलेलें वस्त्र. [ चिलट.
**घुंघरट, घुंघरूट** (न.) मच्छर, डांस,
**घुगरी, घुघरी** (स्त्री.) चण्याची उसळ; धान्याची मळणी झाल्यावर पाटलाला अगर सरकारला केलेली धान्याची नजर. **एखाद्याच्या सटीच्या घुगऱ्या खाणें**—त्याच्याहून अधिक अनुभव असणें.
**घुंघरू—रूं** (हिं. न.) अगदीं लहान घंटेच्या आकाराचा मणि.
**घुगी** (फा. स्त्री.) शिरस्त्राण; वाऱ्याचा झपाटा; किंचाळी.
**घुंगुरमाळ** (हिं. स्त्री.) घुंगरांची माळ.
**घुंगुरवाळा** (पु.) घुंगरें लावलेला मुलाच्या पायांतला वाळा.
**घुंघातणें** (प्रा. क्रि.) ओरडणें; गुणगुणणें.
**घुघु** (स्त्री.) घुवड, पारवा इ० पक्ष्यांचा शब्द; घूत्कार.
**घुघुबाळ** (न.) अजाणतें लेंकरूं.
**घुटका** (हिं. पु.) घोट, आवंढा, चूळ.
**घुटमळणें** (क्रि.) अडखळणें, घोटाळ्यांत पडणें.
**घुट्ट** (न.) प्राणोत्क्रमण होतांना कंठांतून निघणारा आवाज.
**घुटी** (स्त्री.) लहान अर्भकाला आरोग्यावह असें औषधांचें मिश्रण देतात तें.

**घुड** (पु.) घुमट. [मांसल भाग.
**घुणघुणा** (पु.) घोणा, नाकांतल्या पडद्याचा
**घुणा** (पु.) सांखळीचा दुहेरी दुवा; तोंड्याचा पेच. **घुणा घालणें**—व्यत्यय आणणें.
**घुण्या** (वि.) दुर्मुखलेला; घुम्या पहा.
**घुणाक्षर** (सं. न.) किड्यानें कोरलेल्या आंकड्यांत अक्षरासारखी कांहीं आकृति दिसते ती.
**घुणाक्षरन्याय** (सं. पु.) सहज ओरखडलेल्या रेघोट्यांतून कांहींतरी वस्तूशीं सादृश्य दिसणें.
**घुबड** (न.) दिवाभीत.
**घुमट** (पु.) देवळास कळसाखालीं असलेली डेऱ्याच्या आकाराची बंदिस्त जागा; कळस, मनोरा; (न.) एक चर्मवाद्य.
**घुमड** (पु.) पापणीचा अंतर्भाग; डोळ्यांतल्या खुपऱ्या.
**घुमणें** (हिं. क्रि.) प्रतिध्वनि निघणें; आंतल्या आंत घोटाळणें; टिकणें; पिशाच्याच्या संचारामुळें चाळे करणें.
**घुमराई** (स्त्री.) विपुलता; धामधूम (होना० पृ० १८८).
**घुमरी** (स्त्री.) एका वाद्याचें नांव; गुराख्यांचा एक खेळ; सामर्थ्य; विपुलता.
**घुमा** (पु.) भोंवऱ्याच्या डोक्यावर पाडलेला खोंचा; जनावराला किंवा माणसाला वठणीवर आणण्यासाठीं दिलेला चोप; लांवणीवर टाकणें.
**घुमा, घुम्या** (वि.) वरून स्तब्ध पण आंतल्याआंत धुसफुसणारा; दुर्मुखलेला; सुस्त.
**घुमारा** (पु.) पिशाच्चाचा संचार; पुगा.
**घुमिली** (वि.) धुंद.
**घुरट–टा** (वि.) ज्याच्या अंगास दूध, दहीं, ताक इत्यादिकांचा वास येतो असा.
**घुराब** (अर. न.) एक प्रकारचें गलबत.
**घुरें** (न.) अपस्मार; एका रोगाचें नांव; खोटें सोनें.
**घुलकावणी** (स्त्री.) गुलकावणी पहा.
**घुला** (पु.), **घुलें** (न.) सुरवंट, कुसरूड; (वि.) मान वांकडी करून पाहणारा.

**घुसडणें** (क्रि.) जोरानें घालणें; आडदांडपणानें वापरणें.
**घुसडा** (पु.) दुर्दशा.
**घुसणें** (हिं. क्रि.) प्रवेश करणें.
**घुसमांडणें** (प्रा. क्रि.) कोंडमारा करणें.
**घुसलखाना** (हिं. पु.) स्नानमंदिर.
**घुसळखांब** (पु.) ज्या खांबाभोंवतीं दोरी बांधून ताक करतात तो.
**घुसळणें** (क्रि.) मंथन करणें; जोराजोरानें हालविणें; काम देऊन घाम काढणें.
**घुसळा** (पु.) घुसळून निघालेला पदार्थ.
**घुसा, घुस्सा** (अर. पु.) राग.
**घुळणा, घोंगणा, घोंगाणा, घोणा** (पु.) नाकांतला पडदा, घोणा.
**घुळी** (प्रा. पु.) पोळ, सांड; देवाला अर्पण केलेला बैल.
**घूम** (पु.) खुपरी. **घूमजाव**–(हिं. अ.) कवायतींतील एक हुकूम (विरुद्ध दिशेस वळा.)
**घूर्ण** (सं. वि.) धुंद.
**घूर्णित** (सं. वि.) भ्रमण करावयास लावलेलें.
**घूस** (हिं. स्त्री.) उंदराच्या जातीचा एक प्राणी.
**घृणा** (सं. स्त्री.) दया; वीट; तिरस्कार.
**घृत** (सं. न.) तूप.
**घृतकुल्या** (स्त्री.) मूळ अर्थ–तुपाची नदी; चमचमीत भोजन.
**घृतकुल्या मधुकुल्या** तूप व मिष्ट पदार्थ यांची समृद्धि.
**घृष्टि** (सं. स्त्री.) घर्षण, सहवास, संघट्टन (ज्ञा० १७।५१).
**घेऊ** (वि.) घेण्यांत पटाईत; दुसऱ्याचा पदार्थ लाटण्यांत कुशल.
**घेंगडी, घेंगरी, घेंडी, घेंडीमुंगी, घेंडा** (स्त्री. पु.) एक जातीची तांबडी मुंगी.
**घेगा–घा** (पु.) सर्वांनीं मिळून एकाद्यास दिलेली उठावणी.
**घेघे** (स्त्री.) नेटाचा प्रयत्न.
**घेणी** (स्त्री.) गंजिफाच्या खेळांत ज्याच्याकडे राजा असेल त्याचा वजीरवाल्या इसमावरचा हक्क; स्वीकार; मान.

**घेणें** (क्रि.) ग्रहण करणें; स्वीकारणें; हिसकावणें; खरीद करणें; (न.) कर्ज.
**घेणेकरी** (पु.) सावकार; ऋणको; कांहीं काम न करतां हक्कानें मागणारा.
**घेणें-देणें** (न.) व्यवहार.
**घेतें** (प्रा. न.) अंतःकरण. [ जाणें.
**घेपणें** (प्रा. क्रि.) घेणें; सांपडणें; घेतला
**घेपुदेपु, घेपोदेपो** (प्रा. पु.) बिनव्याजी रक्कम देणें.
**घेमार** (पु.) हल्ला.
**घेर, घेरा** (हिं. पु.) परीघ; वस्त्राचा पदर; वेढा; शेंडीभोंवतीं ठेवलेलें केसांचें वर्तुळ; संजाब. [ पछाडणें.
**घेरणें** (क्रि.) वेढा देणें; संकटांत गोंवणें;
**घेरी** (हिं. स्त्री.) चक्कर; मूर्च्छा; भोंवळ.
**घेरोसा** (पु.) जळमटें.
**घेलचोद्या** (वि.) वेडझवा; मूर्ख; मठ्ठ.
**घेलाशेट** (पु.) उलाढाल्या व्यापारी; बावळट मनुष्य.
**घेव** (पु.) एकाद्यापासून घ्यावयाचा जिन्नस.
**घेवडा** (पु.) एक प्रकारचा भाजीचा वेल; त्याच्या शेंगा.
**घेवदेव** व्यवहार.
**घेवाण, देवाण** (न.) आपसांतलें देणें-घेणें; तडजोड; व्यवहार.
**घेवारी** (पु.) ठोक किंवा घाऊक माल घेऊन किरकोळीनें विकणारा.
**घो** (पु.) गोहो, नवरा. [चिता.
**घोक** (सं. घोष पु.) गजर; घोकणी;
**घोककाम्या** (वि.) अर्थाकडे लक्ष्य न देतां घोकंपट्टी करणारा (विद्यार्थी).
**घोकणी** (सं. घुष् स्त्री.) पुनः पुनः आवृत्ति, उजळणी, त्याच त्या गोष्टीचा उच्चार; निदिध्यास. [ करणें.
**घोकणें** (क्रि.) पुनः पुनः म्हणून पाठ
**घोकरी** (प्रा. अ.) लवकर.
**घोकींव** (वि.) पाठ केलेलें.
**घोक्या** (वि.) घोकणारा.
**घोख** (प्रा. पु.) घोष; गजर
**घोंग** (न.) सोंग.
**घोंगट** (न.) तोंडावरचें पांघरूण; अभ्रें; लचांड. **घों० घालणें**—रुसणें.
**घोंगडी** (स्त्री.) कांबळें.
**घोंगडें** (न.) कांबळ्याची एक पट्टी; ओझें; लचांड.
**घोंगड्या** (पु.) गरीब मजूर.
**घोंगणें** (क्रि.) घो घो असा नाद करणें; (माशा) जमा होणें.
**घोंगता** (प्रा. स्त्री.) कांबळीची बंडी.
**घोगरा** (वि.) फुटलेला किंवा पिचका (आवाज).
**घोंगा** (पु.) बाऊ; बागुलबोवा. [ दाय.
**घोंगाट** (पु.) घोंगट पहा; माशांचा समु-
**घोंगाण** (प्रा. स्त्री.) माशांचा थवा.
**घोंगाणी** (प्रा. स्त्री.) आरडाओरड कर-णारी; (वि.) ओंगळ, घाणेरी.
**घोंगावणें** (क्रि.) (माशांविषयीं) जमून मोठा शब्द करणें.
**घोगें, घोघें** (प्रा. वि.) मोठें; (अ.) सत्वर.
**घोघो** (पु.) गर्जना; मोठा आवाज.
**घोट** (हिं. पु.) चुळका; चूळ.
**घोटक** (सं. पु.) घोडा.
**घोटखोर** (पु.) गांवचा पाणवड्या.
**घोटणी** (स्त्री.) सोन्याचे मणि सारखे करण्याची आवटी.
**घोटणें** (क्रि.) घासणें; खलांत घालून बारीक करणें; मळणें; पाठ करणें.
**घोंटा, घोटा** (पु.) वाटलेली पातळ भांग; घोटण्यासाठीं लाकडाचा वत्ता; पाऊल आणि त्याच्या वरील हाड यांचा सांधा.
**घोटाळणें** (क्रि.) मागें पुढें जाणें; अनिश्चितपणा असणें; गोंधळांत पडणें, गडबडणें.
**घोटाळा** (पु.) अस्ताव्यस्त दशा, गोंधळ; वाकडातिकडा प्रकार; अनिश्चितपणा; गोलंकार; (प्रा. पु.) कागद घोट-ण्याचा कवडा.
**घोंटी** (स्त्री.) फणसाच्या गऱ्यांतील बी.
**घोटींव** (वि.) घोटून गुळगुळीत केलेला.
**घोट्या** (पु.) अड्याचें हत्यार; गिलावा गुळगुळीत करण्याचें गवंड्याचें हत्यार.
**घोडचूक** (स्त्री.) मोठी चूक.
**घोडदळ** (न.) घोडेस्वारांची तुकडी.

**घोडनवरा** (पु.), **घोडनवरी** (स्त्री.) मोठ्या वयाचा नवरदेव किंवा नवरी-मुलगी. [ टांगलेला पाळणा.
**घोडपाळणा** (पु.) लाकडी घोड्याला
**घोडला** (पु.) मुलाचें रांगणें.
**घोडशाळा** (स्त्री.) घोड्यांचा तबेला.
**घोडा** (पु.) अश्व; बुदबळांतलें एक मोहरें; बंदुकीचा आकडा; पाळणा अडकविण्यासाठीं खालीं पाय बसविलेला आडवा दांडा; उंच घडवंची; घोडेस्वार या अर्थी समुच्चयवाचक शब्द.
**घोडी** (स्त्री.) सतारीत तबलीवर मध्यभागीं बसविलेला लाकडी अगर हस्तिदंती चौकोनी नक्षीदार तुकडा; घोड्याची मादी, तुरंगी; मुलास टांगण्यासाठीं उंच जागीं बांधलेली लोंबकळती दोरी; फळा, मृदंग इ० ठेवण्याची लाकडी आकृति; घडवंची; खिदळणारी स्त्री.
**घोडें** (न.) सामान्यतः घोड्याच्या जातीचें जनावर. **आपलें घोडें पुढें ढकलणें**—आपलें काम लवकर काढणें, मतलब साधून घेणें. **घोडें मारणें**—नुकसान करणें.
**घोण** (स्त्री.) गोम.
**घोणशा** (वि.) सुस्त, मंद.
**घोणस** (पु.) सर्पाची विषारी जात.
**घोणा** (पु.) घुळणा; नाकांतला पडदा.
**घोप** (पु.) झुबका, गुच्छ.
**घोबार** (न.) भ्रम.
**घोबें** (न.) घबाड, अकल्पित मोठा लाभ.
**घोर** (वि.) भयंकर; दाट; गाढ; (पु.) वीण्यास लावलेली खरज स्वराची तार; काळजी; आकांत, कल्लोळ; घोरण्याचा शब्द. [श्वासोच्छ्वास करणें.
**घोरणें** (क्रि.) झोपेंत घर्घर शब्द होईल असा
**घोरंदर**, **घोरांदर** (प्रा. वि.) भयंकर; (न.) घोर युद्ध.
**घोरपड** (स्त्री.) सरड्याच्या आकाराचा एक प्राणी; संकट, लचांड; आरोप.
**घोरबंद** (पु.) खोगिराचा पुढचा बंद.
**घोरांदर** (प्रा. वि.) भयंकर.
**घोल** (पु.) खोल खिंडार.
**घोलमडणें** (सं. क्रि.) घोळणें.
**घोलांट**, **घोलांटी** (स्त्री.) एक प्रकारची उडी; कोल्हांटी उडी.
**घोलावणी** (स्त्री.) फुसलावणी. [ दादला.
**घोव** (प्रा. गोहो पु.) कारवाराकडे-नवरा,
**घोवकी** (स्त्री.) पुरुषत्व, मर्दपणा.
**घोवगांडा** (घोव + (का.) गंडा = नवरा पु). नवरा, दीर, इ० सासरचें वडील माणूस.
**घोवपण** (न.) पुरुषत्व.
**घोष** (सं. पु.) मोठा आवाज, गर्जना; घोकणी, गौळीवाडा.
**घोषवाक्य** (न.) संस्था किंवा पक्ष यांनीं प्रचारासाठीं वापरलेलें वाक्य.
**घोषण** (न.), **घोषणा** (स्त्री.) प्रसिद्धि, जाहीर करणें.
**घोस**, **घोंस** (सं. गुच्छ पु.) झुबका, गुच्छ; जलप्रवास; (समुद्रांत) वाऱ्याची बाजू किंवा दिशा; उत्साह; आवेश; उत्कर्ष.
**घोसणें** (प्रा. क्रि.) शोधणें; सांपडणें, गवसणें.
**घोसदार** (वि.) घोस लागलेलें. [ भूषण.
**घोसबाळी** (स्त्री.) स्त्रियांचें एक कर्ण-
**घोंसाळें** (सं. घोषक न.) गिलकी.
**घोसुलें** (प्रा. न.) घोस, घड.
**घोळ** (स्त्री.) एक वनस्पति; (पु.) गोंधळ, घोटाळा; वस्त्राचा सोगा, ओचा; घेर; चर्चा, वाद; लोखंडाची कडी बसविलेली काठी.
**घोळका** (पु.) समुदाय; आरडाओरड.
**घोळघोळून** (प्रा. अ.) पुनः पुनः.
**घोळणें** (क्रि.) उलटापालट करणें; हलविणें; सराव करणें.
**घोळविणें** (क्रि.) त्रास देणें; दमविणें.
**घोळाणा** (पु.) गुणगुणा; बाजरीचा ओला दाणा.
**घोंस** (वि.) खणखणीत.
**घ्न** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) ठार मारणारा; नाश करणारा.
**घ्राण** (सं. न.) नाक.
**घ्रात** (वि.) वास घेतलेलें.

——

## ङ

[ ङ ज्यांच्या आरंभीं आहे असे शब्दच मराठी भाषेंत नाहींत. ]

———

## च

**च** मराठी व्यंजनमालेंतील सहावें व्यंजन.
**च** (अ.) निश्चय, खात्री, विशिष्टता इ. अर्थांचें दर्शक अव्यय.
**चई** (स्त्री.) केस व लोकर खाणारा रोग.
**चउदशी** (प्रा. स्त्री.) चतुर्दशी.
**चक** (सं. चक्र पु.) वचक, धाक; नियम, पद्धति; फी; हक्काची रक्कम; एकमत; सत्ता; शेत किंवा जमीन; (इं. चेक पु.) दर्शनी हुंडी; (प्रा.) ठक.
**चकचकणें** (क्रि.) झळकणें, लकाकणें.
**चकचकाट** (पु.) लखलखाट; प्रकाश.
**चकचकी** (स्त्री.) तेज, प्रभा.
**चकचकीत** (वि.) स्वच्छ, प्रकाशमान.
**चकणा** (वि.) काणा, तिरवा.
**चकणें** (सं. चक् क्रि.) फसणें, भूल पडणें; खेळांत गडी ठरणें.
**चकती** (स्त्री.) वाटोळा तुकडा; डाग.
**चकंदळ, चकदळ** (न.) चकदा; (पु.) खंवदा, चकती; वाटोळे भोंक.
**चकनाचूर** (पु.) भुगा; पूड; सत्यानाश.
**चकनामा** (पु.) गांवच्या जमिनीच्या माहितीचें पत्रक.
**चकपक** (वि.) नीटनेटका; स्वच्छ.
**चकबंदी** (स्त्री.) जमिनीच्या मर्यादा व आकारणी वगैरेबद्दलचा ठराव.
**चकमक** (हिं. स्त्री.) घर्षणानें अग्नीची ठिणगी पाडणारी गार व पोलादाची पट्टी; बोलाचाल; भांडण.
**चकला** (हिं. पु.) शहराचा भाग; अड्डा; कोतवालकचेरी; सराफीचें दुकान.
**चकला** (पु.) टीक किंवा फुली भेटविण्याचा सोनाराचा ठसा; हलक्या प्रकारचें गर्भसुती वस्त्र; जरींतून काढलेली चांदी.
**चकली** (सं. चक्र स्त्री.) एक चक्राकार तळलेलें खाद्य.
**चकवा** (पु.) एक पक्षी; नावाड्यांच्या गाण्याचा एक प्रकार; दिशाभ्रम होऊन मनुष्य अलतीभलतीकडे जातो त्यास चकवा म्हणतात.
**चकविणें** (क्रि.) चकित करून सोडणें; फसविणें.
**चकळ** (सं. शकल न.) तुकडा, भाग.
**चकाकणें, चकमकणें** (क्रि.) प्रकाशणें.
**चकाकी** (स्त्री.) चकचकीतपणा, तेज, प्रभा.
**चकाट्या** (स्त्री. अने. व.) गप्पासप्पा; वायफळ गोष्टी. [ करणारा.
**चकारविल्हयांतला** चोरी किंवा चहाडी
**चकार शब्द** एकही शब्द. [ गराडी.
**चकारी** (स्त्री.) चाकाची खण, चाकोरें;
**चकित** (सं. वि.) थक्क, विस्मित.
**चकोर, चकी** (सं. स्त्री.) दोरा घालून फिरविण्याचें लहानसें लाकडी चक्र.
**चकोत्रा** (हिं. पु.) एका फळाचें नांव.
**चकोर** (सं. पु.) चांदणें हेंच ज्याचें जीवन असा एक पक्षी.
**चक्क** (वि.) लख्ख, स्वच्छ.
**चक्कर** (सं. चक्र न.) घेरी; भोंवरा; चाक; फेरी, भ्रमण.
**चक्का** (पु.), **चक्कादहीं** (न.) घट्ट दहीं.
**चक्काचक्की** (स्त्री.) हमरी-तुमरी.
**चक्की** (हिं. स्त्री.) जातें; चाकी.
**चक्र** (सं. न.) चाक; वर्तुळ; भोंवरा; एक शस्त्र; संकट; कोडें. **च० नेमिक्रम** (सं. पु.) गाडी धावत असतां तिच्या चाकाच्या धावेच्या खालचा भाग क्रमानें खालीं जातो व पुन्हां वर येतो, याप्रमाणें चालणारा क्रम.
**चक्रपाणी** (सं. पु.) विष्णु.
**चक्रम** (पु.) दोन रुपये दहा आणे किंमतीचा होन; तऱ्हेवाईक माणूस.
**चक्रमण** (सं. न.) सतत भ्रमण; नागमोडी गति; उडी.
**चक्रवर्ती** (सं. पु.) सार्वभौम, बादशहा.
**चक्रवाक** (सं. न.) एका पक्ष्याचें नांव.
**चक्रवाटी** (सं. चक्रवातिका स्त्री.) वावटळ.

**चक्रवाढव्याज** (सं. चक्रवर्धित वि.) कांहीं नियमित मुदतीचें व्याज मुद्दलांत मिळवून ती रास पुढच्या मुदतीस मुद्दल मानून व्याजाची आकारणी करण्याची पद्धति.
**चक्रवात** (सं. पु.) वावटळ.
**चक्रवाल** (सं. पु.) एक पक्षी.
**चक्रव्यूह** (सं. पु.) एक प्रकारची सैन्याची वाटोळी रचना.
**चक्राकार** (वि.) वाटोळें.
**चक्री** (सं. चक्र स्त्री.) भिंगरी; लहान चाक; ब्राह्मणी पागोटें; परंपरा. **चक्री उडविणें**—हुर्यो करणें; **चक्री गुंग होणें**—गोंधळणें; **चक्री फिरविणें**—लढण्यास सिद्ध होणें. [ फुगीर.
**चक्रीदार** (वि.) चक्रासारखें वाटोळें व
**चक्रीपुराण** (न.) एकाच बैठकींत एकामागून एक असें अनेकांनीं सांगितलेलें पुराण.
**चखोट, चोखट** (वि.) चांगलें स्वच्छ.
**चंग** (फा. पु.) दांतांत धरून वाजविण्याचें एक पोलादी वाद्य; पैज; प्रतिज्ञा. **चंग बांधणें**—प्रतिज्ञा करणें. [ प्रकार.
**चंगकांचनी** (वि.) गंजिफांचा एक जुना
**चगडग** (स्त्री.) गोंधळ.
**चगदळ** (न.) चकदळ पहा.
**चंगळ, चंगळपट्टी** (हिं.) समृद्धि, विपुलता.
**चंगा** (वि.) शुद्ध; चांगलें.
**चंगाराणी** (स्त्री.) अत्यंत प्रेमांतली स्त्री.
**चंगाळें** (न.) घुंगरमाळ.
**चंगाळ, चंगाळी** (स्त्री.) चंगळ पहा.
**चंगीभंगी** (वि.) दुर्व्यसनी, भंगड.
**चघळ** (न.) गवत, कडवा वगैरेचा पाचोळा; गळाठा; केरकचरा; (वि.) चावट.
**चघळणें** (क्रि.) तोंडांत घोळणें, चर्वण करणें.
**चंघी** (प्रा. वि.) वेगवान्.
**चचणें** (क्रि.) मरणें, आटोपणें.
**चंचल** (वि.) चपल, चलाख; अस्थिर.
**चचविणें** (क्रि.) फसवून मारणें, नाश करणें.
**चंचिवाग, चंचुवाग** (वि.) धूर्त, लुच्चा.
**चंची** (स्त्री.) पानतंबाखूसाठीं पुडाची लहान पिशवी; बटवी.
**चंचु** (सं. स्त्री.), **चंचुपुट** (सं. न.) चोंच.
**चंचुप्रवेश** (सं. पु.) अल्प प्रवेश.
**चंचू** (सं. वि.) निष्णात.
**चट** (स्त्री.) चटक; पातळ थर; (पु.) श्राद्धांत ब्राह्मणाच्या ऐवजीं दर्भाची आकृति बसवितात ती; (अ.) सर्वस्वीं; त्वरेनें.
**चटई** (हिं. चटई स्त्री.) अंथरी, हतरी.
**चटक** (स्त्री.) खोट, चट; (वि.) छान.
**चटकचांदणी** (स्त्री.) सुंदर मोहक स्त्री.
**चटकन्** (अ.) झटपट, त्वरेनें.
**चटका** (पु.) अग्नि, तिखट वगैरेच्या योगानें जिभेस किंवा शरीरास होणारी व्यथा; ध्यास, छंद, चुटपुट.
**चटकी** (स्त्री.) चुटकी. [म्हणतां.
**चटक्या, चटक्यांत** (अ.) चटकन्, हां हां
**चटचट** (अ.) लवकर.
**चटचटीत** (वि.) मऊ न झालेला.
**चटणी** (हिं. स्त्री.) तोंडीं लावण्याचा वाटून केलेला रुचकर पदार्थ.
**चटपट** (अ.) सत्वर; (स्त्री.) चटका, ध्यास; चुटपुट; न्हाव्याच्या जवळचें वस्तऱ्याची धार साफ करण्याचें कातडें.
**चटपट्या** (वि.) न रेंगाळतां तलखपणानें काम करणारा.
**चंट** (वि.) वस्ताद.
**चटाचट** (अ.) झटपट, त्वरेनें.
**चटावणें** (क्रि.) चट लागणें; संवय जडणें.
**चटोर** (वि.) चावट, हलकट, छचोर.
**चट्ट** (क्रि. वि.) सबंध, लख्ख.
**चट्टा** (पु.) वण; नुकसान; नायटा.
**चट्टामट्टा** (पु.) खाऊन निःशेष करणें.
**चट्टी** (स्त्री.) नुकसान, चट्टा.
**चट्टीपट्टी** (स्त्री.) फाजील नीटनेटकेपणा, छानछोकपणा.
**चंड** (वि.) अवाढव्य, मोठा; प्रखर.
**चडक, चडकण, चडकणा** (स्त्री.) चापटी, चपराक.
**चंडकाई, चंडाबाई** (स्त्री.) एक देवता.

...मर वाचनालय, सातारा.

**चंडकिरण** (प्रा. पु.) सूर्य.
**चडचड** (स्त्री.) दुर्मिळता, चणचण.
**चंडप्रचंड** (वि.) एकापेक्षां एक अधिक उग्र.
**चडफड** (स्त्री.) संतापामुळें होणारा चडफडाट; अशांति. [ कातावणें.
**चडफडणें** (क्रि.) रागानें दांत-ओंठ चावणें;
**चडफडाट** (पु.) संताप.
**चडळ, चढळ** (प्रा. न.) ढेकूळ, तुकडा; अडथळा.
**चंडांशु** (सं. पु.) सूर्य.
**चंडाळ** (सं. पु.) शूद्र व ब्राह्मणी यांच्यापासून झालेली संतति; निर्दय; पापी, दुष्ट मनुष्य.
**चंडाळी** (स्त्री.) दुष्ट कृत्य; नीचपणा.
**चड्डी** (स्त्री.) कुस्ती व तालीम करतेवेळीं वापरावयाची लांडी विजार; लहान मुलांची गुडघ्यापर्यंतची विजार.
**चंडिका, चंडी** (सं. स्त्री.) दुर्गा; निर्दय, उग्र, दुष्ट स्त्री.
**चंडोल** (हिं. पु.) एक पक्षी; अफूचा धूर नळीच्या द्वारें सेवन करण्याचें व्यसन; हुषार व गोड बोलणारा मनुष्य; सर्व बाजूंनीं व्याप्त करण्याची क्रिया.
**चढ** (पु.) उंच भाग; चढण; वृद्धि; वरचष्मा; हल्ला; (वि.) श्रेष्ठ.
**चढउतार** (पु.) चढणें व उतरणें; क्षयवृद्धि.
**चढण** (स्त्री.) चढती जागा.
**चढणें** (क्रि.) वर जाणें; ज्यास्त होणें; तीव्र होणें; सांचणें; (डोळे) फिरणें; गर्वानें ताठणें.
**चढता** (वि.) उत्तरोत्तर उंच होत जाणारा.
**चढती कमान** उत्तरोत्तर उत्कर्षाचे दिवस.
**चढती कळा** शुक्लपक्षाचे दिवस; उत्कर्ष.
**चढती भांजणी** (स्त्री.) अंकगणितांत—हलक्या परिमाणाच्या संख्येस भारी परिमाणाच्या संख्येचें रूप देण्याची कृति.
**चढतें व्याज** चक्रवाढव्याज.
**चढविणें** (क्रि.) वर करणें; वाढविणें; लावणें; पिणें; उद्युक्त करणें; कपटानें स्तुति करणें. [ बढाई; वरचष्मा.
**चढाई** (स्त्री.) चाल, अंगावर जाणें, हल्ला;
**चढाऊ** (वि.) पुढें चालून जाणारा.
**चढाव** (पु.) चढ, चढण; चढाई; पायांत मागच्या बाजूनें चढवितां येणारा जोडा.
**चढावा** (पु.) परदेशी लोकांत विवाहविधींत मुलीकरतां आलेला पोशाख.
**चढी** (प्रा. वि.) श्रेष्ठ, थोर.
**चढीत** (प्रा. पु.) अधिकमास.
**चढे घोड्यानिशीं** (अ.) घोड्यावरून न उतरतां; न थांबतां.
**चढेल** (वि.) गर्विष्ठ, उन्मत्त.
**चढोवढी** (प्रा. स्त्री.) चढाओढ; परंपरा.
**चढोवढीं** (प्रा. अ.) उत्तरोत्तर.
**चण** (स्त्री.) ठेवण, बांधा.
**चणका** (पु.) दंशानें बसणारा चटका; तीक्ष्ण वेदना; रागाचा झटका.
**चणचण** (स्त्री.) दुर्मिळता, अभाव.
**चणचणाट** (पु.) मोठी दुर्मिळता; मोठा चटका.
**चणचणीत** (वि.) झणझणीत; तिखट.
**चणा** (सं. चणक पु.) हरभरा.
**चणी** (स्त्री.) बारीक हरभरा.
**चतकोर** (पु.) पाव भाग; एक चतुर्थांश.
**चणोर** (वि.) लहान.
**चतुर** (सं. वि.) कुशल, धूर्त, हुषार.
**चतुरंग सेना** (सं. स्त्री.) हत्ती, घोडे, रथ व पायदळ हीं चार अंगें ज्यांत आहेत असें सैन्य; बुद्धिबळाचा खेळ; पद्याचा एक प्रकार.
**चतुरस्र** (सं. वि.) चौकोनी, चोहींकडून सारखा; चतुर; गुंडा; (पु.) चौकोन, चौरस.
**चतुराई** (स्त्री.) हुशारी, चातुर्य, कुशलता.
**चतुरानन** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**चतुष्कोण** (सं. पु.) चौकोन.
**चतुर्थाश्रम** (सं. पु.) ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ व संन्यास या चार आश्रमांपैकीं शेवटचा म्ह० संन्यास.
**चतुर्थी** (सं. स्त्री.) चौथ; चवथी तिथि; चवथी विभक्ति.
**चतुर्भुज** (सं. वि.) चार हातांचा; कैदी; लग्न झालेला.
**चतुर्मास** (सं. पु.) आषाढ शु० ११ पासून कार्तिक शु० ११ पर्यंतचा काळ.

**चतुर्मुख, चतुर्वक्त्र, चतुर्वदन, चतुरानन** (पु.) ब्रह्मदेव.
**चतुर्वर्ग** (पु.) धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष हे चार पुरुषार्थ.
**चतुःषष्टिकला** (स्त्री.) चौसष्ट कला.
**चतुःसूत्री** (स्त्री.) स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही लोकमान्यांची चतुःसूत्री म्हणजे चार तत्त्वांची चौकडी होती.
**चतुष्टय** (सं. न.) चौकडी.
**चतुष्पथ** (सं. पु.) चौक.
**चतुष्पाद** (वि.) चार पायांचें. [ हद्द.
**चतुःसीमा** (सं. स्त्री.) चारी दिशांकडची
**चंदन** (सं. चद् पु. न.) एक सुगंधी वृक्ष; त्याच्या गाभ्याचा तुकडा. **चंदन करणें**—नाश करणें.
**चंदरोज** (फा. पु.) कांहीं दिवस.
**चंद** (वि.) थोडें.
**चंदा** (हिं. पु.) वर्गणी.
**चंदी** (हिं. स्त्री.) गुरांचा रोजचा दाणा.
**चंदेरी** (वि.) चंदेरी येथें झालेलें (कापड).
**चंदोल, चंडोल** (पु.) पक्षिविशेष.
**चंद्र** (सं. पु.) चंद्रमा, चांद, चांदोबा; मुसलमानी तारीख.
**चंद्रकळा** (स्त्री.) चंद्रबिंबाचा सोळावा अंश; निरुज्वळ काळ्या किंवा तांबड्या रंगाचें लुगडें.
**चंद्रकांत** (सं. पु.) ज्यावर चंद्राचे किरण पडले असतां द्रव सुटतो असा एक मणि.
**चंद्रकोर** (स्त्री.) चंद्राची किनार.
**चंद्रचूड, चंद्रशेखर** (सं. पु.) शिव, श्रीशंकर.
**चंद्रजोत** (सं. चंद्रज्योति स्त्री.) चंद्रासारखा प्रकाश देणारें दारूकाम; हवाई.
**चंद्रधणी** (प्रा. स्त्री.) मनाची तृप्ति.
**चंद्रबळ** (सं. न.) माणसाच्या राशीला चंद्राचें आनुकूल्य. **ओढून चं० आणणें**—एखादी गोष्ट मनांतून करावयाची असली तरी वरपांगीं तिच्याविषयीं अनिच्छा दाखविणें.
**चंद्रमा** (सं. पु.) चंद्र, चांद.
**चंद्रमौळी** (सं. पु.) शंकराचें नांव; मोडकें तोडकें घर; अतिशय दारिद्र्य.
**चंद्रविकासी** (सं. वि.) चंद्रोदयानंतर उमलणारें.
**चंद्रशाला** (सं. स्त्री.) गच्ची.
**चंद्रस, चंद्रोस** (प्रा. स्त्री.) राळ.
**चंद्रहार** (सं. पु.) स्त्रियांच्या गळयांतला एक अलंकार.
**चंद्रार्कवरी** (प्रा. अ.) आचंद्रार्क, चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत; कायम.
**चंद्रिका** (सं. स्त्री.) चांदणें.
**चंद्री** (सं. तंद्री स्त्री.) टक, एकसारखी नजर, एकलय; अतिशय उत्कंठा.
**चप** (अ.) गप, गुपचीप, मुकाट्यानें.
**चंपकमाला** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव. याच्या एकेका चरणांत १० अक्षरें व ब, भ, म, स, ग हे गण असतात.
**चपका** (पु.) सोन्याला मोरचूद, गेरू वगैरे पदार्थ लावून दिलेला ताव; चापट, चपराक, थापटी.
**चपखल** (क्रि. वि.) नीट, ठाकठीक.
**चपटा** (वि.) बसका, चापट, कमी जाड.
**चपटी** (वि.) नकटी. [थप्पड.
**चपडाक, चपराक** (हिं. स्त्री.) चापट,
**चपडी** (हिं. स्त्री.) लाख.
**चपणी** (स्त्री.) वल्ह्याची फळी, वल्ह्याचें पातें; (वि.) नकटा.
**चपतळ** (वि.) पातळ व सपाट.
**चंपत होणें** पळून जाणें, नाहींसें होणें.
**चपना** (वि.) डावखुरा; डावा (हात).
**चपरंग** (पु. स्त्री.) घासून गुळगुळीत केलेली कवडी.
**चपराक** (स्त्री.) चापट, थप्पड.
**चपराशी** (हिं. पु.) पट्टेवाला.
**चपरास** (हिं. स्त्री.) बिल्ला, पट्टा.
**चपल, चपळ** (सं. वि.) चलाख.
**चपला, चपळा** (सं. स्त्री.) वीज; कुलटा.
**चपली** (स्त्री.) पायांतली वहाण.
**चपळाई** (स्त्री.) चलाखी, तरतरी.
**चपाटणें** (क्रि.) खाऊन टाकणें; फन्ना पाडणें.
**चपाटा** (पु.) वेग; सपाटा.
**चपाती** (हिं. स्त्री.) पातळशी पोळी.
**चपापणें** (क्रि.) दचकणें, भिणें, घाबरणें.
**चंपा** (पु.) वऱ्हाडांत–चमचा.

**चंपाषष्ठी** (सं. स्त्री.) मार्गशीर्ष शु० ६.
**चंपी** (स्त्री.) मर्दन. **चंपी करणें** (क्रि.)–खरड काढणें.
**चंपू** (सं. पु.) गद्यपद्ययुक्त काव्य.
**चपेट** (सं. स्त्री.), **चपेटा** (पु.) थप्पडा, तळहाताचा प्रहार; ओघ; झपाटा; वेग.
**चप्प** (वि.) स्तब्ध, शांत.
**चप्पल** (स्त्री.) पायांतली वहाण. [ ठिकी.
**चप्पी** (स्त्री.) अंग रगडणें; वस्त्रांची ठाक-
**चप्पू** (वि.) हुशार, सावध, शहाणा.
**चबकल** (अ.) बरोबर, तंतोतंत.
**चबढब** (स्त्री.) ढवळाढवळ.
**चबरख** (स्त्री.) चापटी.
**चबरचबर** (अ.) चुरचुर; तोंडास येईल तें.
**चबिना** (सं. चर्वण पु.) चुरमुरे फुटाणे इ० चावून खाण्याचे पदार्थ.
**चबुतरा, चबुत्रा** (पु.) चौकोनी ओटा; कुटाळांचा अड्डा; कोतवालकचेरी; जकातीचें नाकें.
**चंबू** (पु.) गर्भ मोठा व मान बारीक अशा प्रकारचें भांडें; सुराई.
**चमक** (स्त्री.) चकाकी, तकतकी; छटा; ढोंग; उसण, एकदम तीव्र वेदना उठणें.
**चमकणें** (क्रि.) प्रकाशणें, तकतकणें; चकित होणें; (प्रा.) डौलानें चालणें.
**चमकबिजली** (स्त्री.) सौंदर्यसंपन्न स्त्री.
**चमकावणें** (क्रि.) मारणें; रागें भरणें; प्रकाशण्यास लावणें.
**चमकी** (स्त्री.) चमचम चमकणारी टिकली; बायकांचा एक अलंकार; छडी; चाबूक.
**चमचमाट** (सं. चम् पु.) लखलखाट; शोभा; खाद्यांची विपुलता.
**चमचमीत** (सं. चम् वि.) मसालेदार; खमंग; अचळपचळ.
**चमचा** (सं. चमस पु.) उथळ लांबट तोंडाची पळी.
**चमडी** (सं. चर्म स्त्री.) कातडें, चर्म.
**चमत्कार** (सं. पु.) आश्चर्यकारक गोष्ट; नवल; **च०णें** (क्रि.)–चकित होणें.
**चमत्कारिक** (वि.) विलक्षण; आश्चर्यकारक.

**चमन** (फा. पु.) फुलांचा ताटवा; दिखाऊपणा; चैन; मजा, अत्यानंद; पानांत घालावयाचा मसाला.
**चमनी** (वि.) रंगेल.
**चमरी** (सं. पु.) वनगाय.
**चमस** (सं. पु.) चमचा.
**चमू** (सं. स्त्री.) सेना.
**चमेटी** (फा. स्त्री.) हत्तीच्या पायास बांधण्याचा फास.
**चमेल, चमेली** (स्त्री.) एक वेल; तिचें फूल.
**चय** (सं. पु.) समूह; संग्रह, जमाव.
**चयन** (हिं. स्त्री.) विश्रांति, आराम.
**चयनी** (हिं. वि.) रंगेल, करमणुकींत काळ घालविणारा.
**चर** (सं. वि.) चल; जंगम; (पु.) हेर; खंदक; हाळ.
**चरक** (सं. पु.) आयुर्वेदावर ग्रंथ रचणारा एक ऋषि. **च० संहिता** (सं. स्त्री.)–आयुर्वेदावर चरक ऋषीनें लिहिलेला ग्रंथ.
**चरक** (फा. पु.) उंसाचा रस काढण्याचें यंत्र; धातुपात्रें साफ करण्याचें फिरतें यंत्र; कोणतेंहि सतत चालणारें काम. **चरकीं धरणें**—एखाद्याला सतत कामाला लावणें.
**चरकटणें, चर्कटणें** (प्रा.क्रि.) निष्काळजीपणानें काम करणें; गोंवळणें.
**चरकणें** (क्रि.) एकाएकीं व्यग्र होणें; घाबरणें.
**चरका** (पु.) डाव देतांना होणारा चर्रर आवाज; चटका; चट्टा; लास.
**चरखा** (हिं. पु.) सूत काढण्याचा रहाट.
**चरखी** (फा. स्त्री.) चाकू, कात्र्या इ०ना धार लावण्याचें चाक.
**चरगण** (न.) कुरण.
**चरचर, चरचरां** (अ.) चिरण्याच्या वेळीं होणाऱ्या आवाजाचें अनुकरण करीत.
**चरचरीत** (वि.) खरबरीत; झोंबणारें.
**चरण** (सं. पु.) पाय; कवितेंत–वृत्ताचा एकेक भाग; पाद; नक्षत्राच्या मुदतीचा चतुर्थांश; (न.) गुरें चारण्याबद्दल सरकारास द्यावी लागणारी रक्कम; (स्त्री.) कुरण; गायरान.

**चरणचाल** (स्त्री.) पायीं चालणें.
**चरणारविंद** (सं. न.) चरण-कमल.
**चरणसंपुष्ट** (सं. पु.) जोडे.
**चरणी** (स्त्री.) सेवा (ज्ञा० २१।७०१).
**चरणें** (क्रि.) गुरांचें गवत, पाला इ० खाणें; यथेच्छ खाणें; (क्षत) वाढत जाणें; चिडणें.
**चरपट्टी** (स्त्री.) लाकडी सांध्याचा एक प्रकार.
**चरफडणें** (क्रि.) चडफडणें पहा.
**चरफडाट** (पु.) शब्दांनीं किंवा कृतीनें दर्शविलेला असंतोष किंवा राग.
**चरबट** (क्रि.) ओबडधोबड, तीक्ष्ण.
**चरबटणें** (क्रि.) घासणें, खरबरीत होणें, चाटून जाणें.
**चरबरीत** (वि.) खरबरीत.
**चरबी** (फा. स्त्री.) मांसांतला स्निग्धांश.
**चरम** (सं. वि.) शेवटचा, अंत्य.
**चरमरीत** (वि.) झणझणीत, खणखणीत; झोंबणारें.
**चर्मी** (वि.) चामड्याचा.
**चरवण** (न.), **चरवा** (पु.) कुरण.
**चरविणें** (क्रि.) चारणें.
**चरवी** (स्त्री.) मोठें भांडें.
**चरस** (हिं. पु.) भांगेच्या बोंडाचा चीक.
**चरा** (पु.) ओरखाडा, रेषा.
**चराई** (हिं. स्त्री.) चारण्याबद्दलची फी.
**चराचर** (सं. वि.) हलणारे व न हलणारे, सजीव व निर्जीव असे दोन्ही प्रकारचे; (अ.) चरचर आवाज करीत.
**चरित** (सं. न.) आचरण; चरित्र; कथा.
**चरितार्थ** (सं. पु.) उदरनिर्वाह. [ चरित.
**चरित्र** (सं. न.) वर्तन, इतिहास, कथा,
**चरी** (स्त्री.) लहान चर, खांच; सुताची हातानें वळलेली दोरी.
**चरु** (सं. पु.) शिजवलेला भात.
**चरोळें** (न.) मातीचें पात्र.
**चर्चणें, चर्चिणें** (क्रि.) चोपडणें, माखणें.
**चर्चा** (सं. स्त्री.) वादविवाद, विचार, ऊहापोह; उटणें; लेप.
**चर्पटपंजरी** (स्त्री.) एका स्तोत्राचें नांव; वडवड; चऱ्हाटा.
**चर्पटिका** (स्त्री.) एक वृत्त; प्रौढ-भारदस्त वाक्य.
**चर्म** (सं. न.) चामडें, कातडें.
**चर्मकार** (सं. पु.) चांभार.
**चर्मचक्षु** (सं. पु.) डोळे, नेत्र.
**चर्मवाद्य** (सं. न.) चामड्यानें मढविलेलें वाद्य (पखवाज, नगारा वगैरे).
**चर्मातु** (प्रा. न.) कातडें (तुका० ४५४).
**चर्मी** (वि.) कमावलेल्या कातड्याचा.
**चर्या** (सं. स्त्री.) चालचलणूक; संचार; रीत; मुद्रा; सतत आचरण.
**चर्र** (अ.) भीतीचा किंवा दुःखाचा आकस्मिक उद्रेक.
**चर्वण** (सं.न.) खाणें, चावणें, रवंथ करणें.
**चर्वितचर्वण** (सं. न.) काथ्याकूट, पुनरुक्ति.
**चऱ्हाट** (सं. वराट न.) मोठी दोरी, दोरखंड; लांब कंटाळा आणणारी गोष्ट.
**चल** (सं. वि.) हलणारें; विनाशी.
**चलचलाट** (स्त्री.) चलती, अनुकूल काळ, भरभराट. [ लागणें.
**चलणें** (क्रि.) निघणें, चालणें, वाटेला
**चलत्चित्रपट** (पु.) सिनेमा.
**चलती** (स्त्री.) भरभराट, अभ्युदय.
**चलन** (सं. न.) चालणें; चालू नाणें.
**चलनवलन** (सं. न.) हालचाल.
**चलनी** (वि.) बाजारांत चालणारें; व्यवहारोपयोगी.
**चलकर्ण** (सं. पु.) पृथ्वीपासून ग्रहाचें अंतर.
**चलविचल** (हिं. स्त्री.) अनिश्चितता; अस्थिरता; (वि.) अस्थिर.
**चलाऊ** (वि.) काम भागविण्यासारखा.
**चलाख** (फा. चालाक वि.) हुशार, चाणाक्ष, पाणीदार, धूर्त.
**चलाखी** (फा. चालाखी स्त्री.) हुशारी, चाणाक्षपणा, धूर्तता.
**चलान** (न.) दरवडेखोरांचा समुदाय; खटला भरणें; मालाची यादी.
**चव** (स्त्री.) रुचि, गोडी; स्वाद; नारळाचा खरडून काढलेला कीस; मोत्याचें वजन व संख्या यांजवरून त्यांच्या विषयींचा अंदाज करण्याची रीत.
**चवई** (प्रा. स्त्री.) चौरंग; रानकेळ.

**चवकट** (स्त्री.) चौकट पहा.
**चवकणें** (क्रि.) दचकणें; चकित होणें.
**चवकशी** (स्त्री.) चौकशी पहा.
**चवकळ** (प्रा. वि.) पुष्कळ.
**चवचव** (स्त्री.) गोंधळ, अव्यवस्था.
**चवचाल** (वि.) फाजील.
**चवड** (स्त्री.) चळत, रास, ढीग; चोयटी.
**चवडचाल** (स्त्री.) घोड्याच्या चालीचा एक प्रकार.
**चवठाई, चवंढाई** (प्रा. अ.) चार जागीं.
**चवंडकें** (न.) गोंधळयाचें एकतारी वाद्य.
**चवडा** (पु.) तळवा, पायाचा बोटांकडील अर्धा भाग; पंजा; (वि.) रुंद.
**चवढव** (स्त्री.) चवचव पहा.
**चवढाई** (प्रा. अ.) चार जागीं.
**चवणा, चवना** (पु.) चव, गोडी, खोड.
**चवणा** (पु.) नखरा. [व्यसनासक्त होणें.
**चवणें** (क्रि.) ढिलें होणें; वेडे होणें;
**चवताळणें** (क्रि.) संतापणें, क्रुद्ध होणें.
**चवताळें** (न.) केरकचरा काढण्याचें एक प्रकारचें दांताळें. [स्वादिष्ठ.
**चवदार** (वि.) रुचकर, लज्जतदार,
**चवनट** (वि.) चोखंदळ, विचक्षणखोर.
**चंवर** (सं. न.) चामर, चवरी.
**चंवरडोला** (पु.) हत्तीवरील अंबारी, हौदा.
**चवरधर** (प्रा. पु.) चवरी धरणारा.
**चवरंग** (न.) पंगुत्व; (वि.) हातपाय तोडलेला.
**चवरी** (सं. चामर स्त्री.) चामर; वनगाईच्या केसांच्या झुबक्यास मूठ बसवून माशा वगैरे वारण्यासाठीं केलेलें साधन.
**चवरें** (प्रा. न.) मस्तक; शेवट.
**चवल, चव्वल** (पु.) दोन आण्यांचें नाणें, चवली. [आण्यांचें नाणें.
**चवला** (पु.), **चवली** (स्त्री.) दोन
**चवविणें** (प्रा. क्रि.) जागृत करणें.
**चवळई, चवळा, चवळी** (स्त्री.) एका धान्याचें नांव.
**चवळी** (स्त्री.) अफवा, वातमी.
**चवाठा** (पु.) खुंट, चौक, चार रस्ते मिळण्याची जागा.
**चवाई** (प्रा. स्त्री.) चौरंग. [कापड.
**चवाळ** (स्त्री.) चार पंचे एकत्र जोडलेलें
**चवाळें** (न.) कांबळें, लहान घोंगडी.
**चविष्ट** (वि.) चवदार, रुचकर, स्वादिष्ठ.
**चवी** (स्त्री.) चव, रुचि; रानकेळ; (प्रा.) वऱ्यावाइटाची परीक्षा.
**चव्या** (पु.) पत्त्याच्या डावांतलें चार ठिपक्यांचें पान.
**चव्हाटा** (पु.) चवाठा पहा.
**चव्हाळें** (न.) जाभाडा.
**चषक** (सं. पु.) भांडें, पात्र.
**चश्मा, चष्मा** (पु.) उपनेत्र, आरसी; वराचा खण.
**चष्मपोशी** (फा. स्त्री.) डोळेझाक.
**चसणें** (क्रि.) बुडणें (व्यवहारांत); मरणें. [कारी कर.
**चहलदा** (पु.) बंजारी लोकांवरचा सर-
**चहा** (स्त्री.) आवड; वासना; (पोर्तु० शा पु.) एक पेय.
**चहाटळ** (वि.) चावट, चघळ.
**चहाड** (वि.) चुगलखोर; भिजत घातला असतां ज्याला कोंब फुटत नाहीं असा किंवा न शिजणारा (दाणा).
**चहाडबुचका, चहाडलुतरा** (वि.) गुप्त गोष्टी फोडणारा; चहाडी करणारा.
**चहाडी** (स्त्री.) चुगली, लावालावी.
**चहाता** (वि.) आवड बाळगणारा, भक्त.
**चहादाणी** (फा. स्त्री.) उकळलेला चहा ठेवण्याचें भांडें.
**चहुंकोण** (प्रा. अ.) चोहींकडून.
**चहुत्रा** (पु.) शेंकडा ४ टक्के व्याजाचा दर; चवुत्रा.
**चहूंकडे** (अ.) सर्व बाजूंस.
**चहोटा** (पु.) चवाठा पहा.
**चळ** (सं. स्खल् पु.) स्खलन; भ्रंश; भ्रम.
**चळक** (स्त्री.) पलटण; पावसाची सर; जोराचा प्रवाह; चळथ, रास; (प्रा. न.) आश्चर्य.
**चळकांडी** (स्त्री.) चिळकांडी पहा.
**चळकांप** (पु.) थरकांप, घाबरगुंडी.
**चळचळाट** (पु.) विपुलता, समृद्धि; दरारा, दबदबा; इभ्रत.

**चळचळीत** (वि.) विपुल.
**चळणवळण** (स्त्री.) हालचाल.
**चळणें** (सं. स्खल क्रि.) हलणें, स्थलांतर करणें, ढळणें; भ्रंश पावणें; वेड लागणें; फसणें; क्षुब्ध होणें.
**चळत, चळथ** (स्त्री.) चवड, नीटनेटकी लावलेली रास.
**चळतें** (प्रा. वि.) चालणारें.
**चळथा** (प्रा. स्त्री.) श्वासोच्छ्वासक्रिया.
**चळवळित** (वि.) तुपानें किंवा तेलानें चोपडलेली (पोळी, भाकर). [गडबड.
**चळवळ** (सं. स्त्री.) हालचाल; उद्योग,
**चळवळणें** (क्रि.) हालचाल करणें.
**चळवळाट** (पु.) अतिशय मोठी चळवळ; क्षुब्धता.
**चळवळ्या** (वि.) चळवळणारा, अस्वस्थ; उलाढाल्या करणारा.
**चळिया** (प्रा. स्त्री.) चंचलता.
**चळीं पडणें** (क्रि.) झोप दूर होणें.
**चळें** (न.) मुडी; धान्याची टोपली.
**चळेल** (वि.) चळ लागलेला; वेडा, भ्रमिष्ट.
**चक्ष, चक्षु** (सं. पु.) नेत्र.
**चक्षुरिंद्रिय** (सं. न.) नेत्रेंद्रिय.
**चक्षुःश्रवा** (सं. पु.) सर्प.
**चाई** (स्त्री.) शरीरावरील केस ज्यानें झडतात असा एक रोग; उंदरी; कातरी.
**चाईचाट** (प्रा. पु.) केस गळण्याचा रोग.
**चाउटी** (प्रा. स्त्री.) वाष्कळ गोष्टी.
**चाऊल** (स्त्री.) एखाद्याच्या सांनिध्या-विषयींचा आवाज, वास इ० वरून मिळणारी सूचना.
**चाऊस** (हिं. पु.) अरबांचा जमादार.
**चाक** (सं. न.) चक्र; (वि.) नीटनेटकें.
**चाकचक्य** (सं. न.) चकाकी, तजेला.
**चॉक** (इं. पु.) खडू.
**चाकचोपी** (स्त्री.) नीटनेटकेपणा.
**चाकटणें** (क्रि.) चकित होणें.
**चाकण** (स्त्री.) एक जातीचा साप.
**चाकपट्टी** (स्त्री.) मोटवणाची वरची पट्टी.
**चाकपाक, चकपक** (वि.) स्वच्छ, नीट-नेटकें, गोंडस.
**चाकर** (हिं. पु.) नोकर, सेवक.
**चाकरपेशा** (फा. पु.) चाकरीचा धंदा.
**चाकरी** (हिं. स्त्री.) नोकरी.
**चाकवत** (पु.) एका पालेभाजीचें नांव.
**चाकळा** (पु.) मलद्वाराच्या मांसाचा गोळा; घास.
**चाकाटणें** (क्रि.) चकित होणें, डोळे दिपणें.
**चाकारी** (स्त्री.) चाकोरें, गराडी, गाडी-रस्त्यावर पडलेली चाकांची खूण.
**चाकी** (स्त्री.) धातूचा किंवा लाकडाचा वाटोळा तुकडा; चपटा भोपळा.
**चाकू** (हिं. पु.) लहान सुरी.
**चाकोता** (पु.) चाकवत.
**चाकोरी** चाकारी पहा.
**चाकोळें** (न.) चक्री; रिकामटेकड्या लोकांचा अड्डा.
**चाख** (वि.) नीटनेटकें, चकपक, ठाकठीक.
**चाखणें** (हिं. क्रि.) चव घेणें, रुचि पाहणें.
**चाखळ** (वि.) चपळ.
**चाखंदा** (पु.) दुर्दशा, गोंधळ.
**चाखोळा** (पु.) प्रीतिभोजन; मुलाच्या मुंजीच्या वेळीं आई मुंज्या मुलास आपल्या ताटांत भोजनास घेते तो समारंभ. [जमाव.
**चाखोळें** (न.) रिकामटेकड्या मंडळींचा
**चांग** (वि.) चांगला.
**चांगट** (प्रा. वि.) देखणें, सुंदर, चांगलें.
**चांगटणें** (क्रि.) थक्क होणें.
**चांगलें** (वि.) बरें, योग्य, भलें, नीट.
**चांगा** (प्रा. वि.) चांगला.
**चांगावा** (प्रा. पु.) चांगुलपणा.
**चांगुलपणा** (पु.), **चांगलेपणा** (न.) भले-पणा, भलाई.
**चांच** (वि.) हुशार, चपळ.
**चांच** (न.) चांचे लोकांची टोळी.
**चांचड** (न.) मोठी तांबडी मुंगी.
**चांचण** (न.) मच्छर, डास.
**चाचणी** (स्त्री.) साखरेचा पाक.
**चांचणी** (स्त्री.) थोड्या भागाची परीक्षा.
**चाचपडणें** (क्रि.) धडपडणें, अडखळणें.
**चाचपणें** (क्रि.) अंधारांत शोधणें.
**चाचर** (प्रा. स्त्री.) बोबडी.

**चाचरणें** (प्रा. क्रि.) भुलणें; भटकणें; बोलतांना अडखळणें.
**चाचरा** (वि.) बोबडा, तोतरा.
**चांचरी** (प्रा. स्त्री.) मुद्रेचा एक प्रकार.
**चांचल्य** (सं. न.) चंचलता, क्षणिकत्व.
**चाचा–चाची** (हिं. पु. स्त्री.) चुलता-चुलती.
**चांचा, चांचवा** (पु.) समुद्रावरील लुटारू.
**चाचारें** (प्रा. अ.) झुकत झुकत; अडखळत.
**चाचावणें** (क्रि.) चरफडणें.
**चांचुवडें** (सं. चंचु न.) चोंच.
**चाचुवेस** (प्रा. स्त्री.) चोंच; तोंड.
**चांचू** (सं. चंचु स्त्री.) चोंच.
**चांचोड** (स्त्री.) चोंच.
**चाट** (वि.) उनाड, हलकट, चघळ, चहाटळ, दुष्ट, चावट; (स्त्री.) इच्छा; गप्प; पायाची धडक देणें; (पु.) तवल्याच्या काठावरची बाजू.
**चाटक** (स्त्री.) रमणीयता, सौंदर्य.
**चाटण** (न.) चाटण्याचें औषध.
**चाटणें** (क्रि.) जिभेनें ग्रहण करणें; ओझरता स्पर्श होणें. [लागलेलें गवत.
**चाटवण** (न.) पाऊस पडल्यानंतर उगवू
**चाटळ** (वि.) चहाटळ. [बडबड्या.
**चाटा** (प्रा. पु.) मुलगा; (वि.) स्वच्छंदी;
**चाटारु** (प्रा. वि.) बडबड्या.
**चाटी, चाटट्या** (पु.) कापडाचा दुकानदार.
**चाटु** (सं. वि.) मनाला संतोष देणारें.
**चाटुक** (प्रा. वि.) गुळचट; चघळ.
**चाटू** (वि.) लाचखाऊ; (प्रा. स्त्री.) स्वैंपाकांतली पळी (नाम०१५८३); वल्हें.
**चाटेपण** (प्रा. न.) कापडाचा व्यापार.
**चाड** (स्त्री.) आवड, गोडी; इच्छा; गरज; शरम.
**चाडा** (वि.) बडबड्या.
**चांडाळ** चंडाळ पहा.
**चांडाळचौकडी** (स्त्री.) दुष्ट लोकांची जूट.
**चाडी** (प्रा. स्त्री.) चहाड शब्द पहा.
**चाडें, चाढें** (न.) समईंत जेथें तेल घालतात तो भाग; टाळें, टवळें; बीं पेरण्याकरितां पाभरीवर जें लाकडाचें पात्र असतें तें.
**चाणाक्ष** (सं. वि.) धूर्त, बुद्धिमान्, हुषार.
**चात** (स्त्री.) लोखंडी सळई, सामता; सूत काढण्याची फिरकी.
**चातक** (सं. पु.) एक पक्षी.
**चाती** (स्त्री.) सूत काढण्याची फिरकी.
**चातुरी** (सं. स्त्री.) चतुराई, हुशारी, धूर्तता. [येणारा हिंवताप.
**चातुर्थिक** (सं. न.) दर चवथ्या दिवशीं
**चातुर्मास्य** (सं. न.) आषाढ शु० ११ पासून कार्तिक शु० ११ पर्यंतचा काळ; पावसाळा.
**चातुर्य** (सं. न.) कुशलता, हुशारी.
**चातुर्वर्ण्य** (सं. न.) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे समाजाचे चार वर्ग.
**चांथी** (प्रा. स्त्री.) बडबड.
**चांद** (सं. चंद्र पु.) चंद्र; बिल्ली, पदक.
**चांदई, चांधई** (स्त्री.) दुपाखी घराची आढ्यापर्यंतची उंच भिंत; कडेची रुंद भिंत.
**चांदकी** (सं. चंद्र स्त्री.) लहानशी भाकरी.
**चांदणी** (सं. चद् स्त्री.) मोठें पाल; छत; चांदवा; तारका, नक्षत्र. [प्रकाश.
**चांदणें** (सं. चद् न.) चंद्रप्रकाश; ताऱ्यांचा
**चांदमारी** (स्त्री.) निशाण मारण्याचा अभ्यास. [आच्छादन.
**चादर** (हिं. स्त्री.) पलंगपोस, वस्त्राचें
**चांदरात** (हिं. स्त्री.) शु. १ ची रात्र; आनंदाचा काळ; सढळ हाताचा खर्च.
**चांदला** (पु.) स्त्रियांच्या कपाळावरची कुंकवावर लावण्याची चकचकीत टिकली.
**चांदवा** (हिं. पु.) छत; टोपीचा वर्तुळाकार भाग.
**चांदिणें** (प्रा. वि.) पांढरें.
**चांदी** (हिं. स्त्री.) शुद्ध रुपें; रुपें.
**चांदुकली** (स्त्री.) लहान भाकरी.
**चांदें** (न.) रेडा, बैल यांच्या कपाळावरचा पांढरा भाग.
**चांदोबा** (पु.) (मुलांच्या भाषेंत) चंद्र.
**चांद्र** (सं. वि.) चंद्रासंबंधीं.
**चांद्रमान** (सं. न.) चंद्राच्या स्थितीवरून केलेली गणना.

**चांद्रमास** (सं. पु.) चंद्र एकदां पूर्ण झाल्या-पासून पुनः पूर्ण होईपर्यंत किंवा एका रात्रीं मुळींच न दिसल्यापासून पुनः दिसेनासा होईपर्यंत जाणारा काळ (सुमारें २९॥ दिवस).

**चांद्रायण** (सं. न.) पौर्णिमेस पंधरा घास खाणें व नंतर वद्य पक्षांत रोज एकेक घास कमी करून शुक्ल पक्षांत एकेक घास वाढविणें अशा प्रकारचें व्रत.

**चांधई** (स्त्री.) दुपाखी घराची आढ्या-पर्यंत उंच जी भिंत ती, चांदई.

**चाप** (सं. न.) धनुष्य; एक पक्षी; खणाळें; (स्त्री.) ढीग, रास; (पु.) तंबाखूची लागवड; तट्टया.

**चाप** (पु.) मळसूत्र वगैरेच्या योगानें दावण्याचें यंत्र; कानाची पाळ.

**चांप** (स्त्री.) उडी.

**चापकेसी** (स्त्री.) धमकावणी.

**चापट** (वि.) चपटा; सपाट; (सं. चपट स्त्री.) थप्पड.

**चापटपोळी** तळहाताची थप्पड.

**चापटी** (सं. चपेट स्त्री.) थप्पड.

**चापल्य** (सं. न.) चपळता, चलाखी.

**चापसणें** (स्त्री.) चाचपणें.

**चापसाचापसी** (स्त्री.) चाचपण्याचा सपाटा; लाच खाण्याचा क्रम.

**चापा** (पु.) कानाची पाळ.

**चांपा, चंपक** (सं. पु.) चंपक वृक्ष.

**चांपेकळी** (स्त्री.) चाफ्याच्या फुलाची कळी.

**चांपेगोर** (वि.) चाफ्याप्रमाणें गोरी असलेली.

**चांपेखण** (पु.) घराचा सर्वांत मोठा खण; माजघर (मुक्त० आदि० २९।५०).

**चापेपण** (प्रा. न.) सुगंध.

**चांपोळी, चांपोळ** (प्रा. स्त्री.) चाफ्याची कळी (ज्ञा० १८।८५३).

**चांफा** चांपा पहा.

**चाबा** (पु.) चावण्याचा उद्योग. **चा० चबीना**—चावून खाण्याचा पदार्थ.

**चाबूक** (फा. पु.) असूड, कोरडा.

**चाबूकस्वार** (हिं. पु.) घोड्याला चाल शिकविणारा मनुष्य.

**चाभाड** (प्रा. न.) जबडा.

**चांभार** (सं. चर्मकार पु.) जोडे शिवणारा.

**चांभारी** (स्त्री.) एक प्रकारचें झुडूप; जनावराच्या अंगावर उठलेला माराचा वळ.

**चाम** (सं. चर्मन न.) चामडें.

**चामकणें** (प्रा. क्रि.) जाणें.

**चामखीळ** (सं. चर्मकील पु. स्त्री.) चामफोड.

**चामचोरी** (स्त्री.) गुरें चोरणें.

**चामट** (वि.) चिवट.

**चामडी** (स्त्री.), **चामडें** (न.) कातडें, चर्म.

**चामर** (सं. न.) चवरी; एका वृत्ताचें नांव. त्याच्या चरणांत १५ अक्षरें व र, ज, र, ज, र असे गण असतात.

**चानाठी** (प्रा. स्त्री.) चाबूक.

**चामाडौली** (वि.) चामडा.

**चामीकर** (सं. न.) सोनें.

**चार** (वि.) अतिशय (हिरवें); (पु.) चेष्टा; चाळा; आचार; कोंवळें गवत.

**चारदिशा** पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या दिशा.

**चारधामें** केदारेश्वर (उत्तर), रामेश्वर (दक्षिण), हीं दोन शिवधामें आणि जगन्नाथ (पूर्व), द्वारका (पश्चिम) हीं दोन विष्णुधामें मिळून चार. **चार पुरुषार्थ**—धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष. **चार युगें**—कृत, त्रेता, द्वापार आणि कलि.

**चार** (सं. पु.) हेर, गुप्त दूत; जासूद; (सं. चतुर वि.) ४ ही संख्या. [खोडसाळ.

**चारकट, चारगट** (वि.) वाह्यात;

**चारकुबा** (अर. पु.) मुसलमानी तऱ्हेचा एक उंची पोषाख; चौकटीदार कापड.

**चार खुंटांची जहागीर** भिक्षावृत्ति.

**चारचक्षु** (सं. वि.) गुप्त दूतांच्या डोळ्यांनीं पाहणारे (राजे).

**चारचाकी** (स्त्री.) वग्गी.

**चारट** (प्रा. वि.) हिरवें.

**चार ठाव** जेवणांतले चार मुख्य पदार्थ; (भात, वरण, भाजी, पोळी किंवा भाकरी).

**चारण** (सं. पु.) भाट; स्तुतिपाठक; तांडेवाला; धान्याची ने आण करणारा.

**चारण** (स्त्री.) पुष्कळ चाऱ्याचें ठिकाण.
**चारणी** (स्त्री.) गुरांना चारणें. [ सोडणें.
**चारणें** (क्रि.) खाऊं घालणें; चरण्यास
**चार्वाक** (पु.) एक नास्तिक तत्त्वज्ञ.
**चारा** (हिं. पु.) गवत, पशुपक्ष्यांचें खाद्य.
**चाराचुरा** (पु.) तुकडे, भुगा इ०
**चारी** (सं. स्त्री.) मोटेची उतरण; धाव; कालवा; (स्त्री.) नर्तनांत एका पायानें केली जाणारी क्रिया.
**चारु** (पु.) चारा, गवत; (ज्ञा० १७।२८१); (सं. वि.) सुंदर, रमणीय.
**चारुगात्री** (सं. वि.) सुंदर अवयवांची.
**चारुस्थळ** (सं. न.) शरीर (ज्ञा०६।७२).
**चारुळें** (प्रा. न.) भांडें; चरवी.
**चारोळी** (स्त्री.) एक प्रकारचें गोड बीं.
**चार्ज** (इं. पु.) कामाचा भार; गुन्ह्याचा आरोप.
**चाल** (स्त्री.) रीत, रिवाज; वर्तणूक; हल्ला, चढाई; चालण्याची ढब.
**चालक** (वि.) चालविणारा, मुख्य, सूत्रधार.
**चालचर्या** (स्त्री.) वागणूक, रीत.
**चालचलन** (न.) वर्तणूक, वर्तन.
**चालढकल** (स्त्री.) हयगय, आळसानें कालगतीवर टाकणें.
**चालढाल** (पु.) संवय; क्रम; रीत.
**चालणें** (क्रि.) जाण्यासाठीं पावलें टाकणें, फिरणें; (नाणें) उपयोगांत असणें; वागणें; सहन होणें इ०
**चालता काळ** भरभराटीचा काळ.
**चालन** (सं.न.) गति; फेरबदल, सुधारणा.
**चालविणें** (क्रि.) परामर्ष घेणें; (व्याक०) शब्दाचीं सर्व रूपें सांगणें; चालण्यास लावणें; उपयोगांत आणणें.
**चाली** (स्त्री.) प्रवेश. [ सभ्यांचा.
**चालू** (वि.) चालता, सुरू असलेला,
**चाव** (पु. अने.) लहरीचीं कृत्यें; हुक्की.
**चावका** (वि.) चावणारा, चावरा.
**चावट** (वि.) चहाटळ, वात्रट.
**चावटी** (प्रा.स्त्री.) चघळपणा, वाचाळपणा.
**चावडी** (हिं. स्त्री.) कोतवाल-कचेरी; गांवांतल्या लोकांची सार्वजनिक जागा; सरकारला देण्याचा कर.

**चावणें** (क्रि.) दंश करणें, खाणें. **चावून चिकट** —फार वेळ चर्चा केल्यामुळें कंटाळवाणा झालेला. [ कट करणारा.
**चावनट** (वि.) त्याच त्या गोष्टीची कट-
**चावदशी** (प्रा. स्त्री.) जागेपणा.
**चावर** (प्रा. पु.) चाहूर.
**चावरा** (वि.) चावणारा.
**चावरी** (प्रा. स्त्री.) चौरंग; जनावरांनीं चावून तुडविलेला चारा. [ मोट.
**चावरी मोट** चार बैलांनीं ओढावयाची
**चावल** (हिं. पु.) तांदूळ; (स्त्री.) चाहूल.
**चावळ** (प्रा. स्त्री.) चळवळ.
**चावळणें** (क्रि.) वरळणें, मळमळतें बोलणें.
**चावा** (पु.) दंश; दंशाचें चिन्ह; वण.
**चावी** (पोतु. चावे स्त्री.) किल्ली.
**चाष** (सं. पु.) तास पक्षी.
**चास** (स्त्री.) नांगराची रेषा.
**चाह** (प्रा. स्त्री.) आवड.
**चाहणें** (हिं. क्रि.) आवडणें, मान्य करणें.
**चाहूर** (पु. न.) १२० चौरस बिघे.
**चाहूल** (स्त्री.) चिन्ह; माणसाच्या येण्याची सूचना; चाळवण.
**चाळ** (स्त्री.) घुंगरांचा झुबका; पैंजण; बिऱ्हाडांसाठीं एका नमुन्याच्या घरांची पट्टी.
**चाळढाळ** (प्रा. वि.) आपत्तिनिवारण.
**चाळण, चाळणी** (स्त्री.) गाळण्याचें साधन.
**चाळणें** (सं. चालन क्रि.) फिरविणें; उलटापालट करणें. [ होणारा व्रण.
**चाळपुळी** (स्त्री.) हाडांच्या सांध्यावर
**चाळवण** (स्त्री.) आशा लावून दिरंगाईवर टाकणें. [ झुलविणें; ढळण्यास लावणें.
**चाळवणें** (क्रि.) आज उद्यां सांगणें;
**चाळवाचाळव** (स्त्री.) अनेक प्रकारें केलेली चाळवणूक किंवा झुलवणी.
**चाळा** (पु.) खोड, संवय, नाद; चाळणींत राहिलेला शेष भाग; सांधा; बिजागरी (तोंडाची). **चा०चूळ** (वि.) उतावळा.
**चाळिशी** (स्त्री.) वयाचें ४० वें वर्ष; दृष्टीची मंदता; उपनेत्र, चष्मा.
**चाळिसा** (पु.) चाळीस शेरांचा मण; चाळीसांचा समुदाय.

**चाळीसपत्र** (न.) चष्मा.
**चाळें** (प्रा. न.) फसविण्याची युक्ति; छक्केपंजे (तुका० ३००१)
**चाक्षुप** (न.) डोळ्यांपासून होणारें ज्ञान; (पु.) सहावा मनु.
**चाक्षुषी** (वि.) डोळ्यासंबंधाची; (स्त्री.) एक अस्त्र.
**चाक्षुषी विद्या** (स्त्री.) नजरबंदीची विद्या.
**चिऊ** (स्त्री.) लहान मुलांच्या भाषेंत–चिमणी.
**चिक** (हिं. पु.) वांबूच्या बारीक काड्यांचा केलेला पडदा.
**चिकचिक** (स्त्री.) चिकटी, चिकटाई.
**चिकट** (वि.) चिकटणारा, लगटणारा.
**चिकटी** (स्त्री.), **चिकटा** (पु.) चिकट अंश; चिकणाई.
**चिकण, चिकणा** (वि.) गुळगुळीत; चिकट; दुर्भेद्य; स्निग्ध.
**चिकणसुपारी** कोंवळी सुपारी तोडून दुधांत शिजवून वाळवितात ती.
**चिकरणें** (प्रा. स्त्री.) विखरणें.
**चिकवडी** (स्त्री.) तांदुळाचें पीठ शिजवून त्याच्या बारीक बारीक गोळ्या वस्त्रावर हातानें घालून उन्हांत वाळवून तेलांत तळून खावयाचें जें तोंडीं लावणें करतात तें.
**चिकसा** (प्रा. पु.) उटणें, सुगंधि द्रव्य.
**चिकाचा पडदा** बारीक कांबटयांचा पडदा.
**चिकाटी** (स्त्री.) पकड; दीर्घोद्योग; अत्याग्रह; लोचटपणा; पक्षी धरण्यासाठीं चिकट पदार्थ लावलेली काठी.
**चिकार** (वि.) दाट, गच्च; (न.) मूल.
**चिकाळ** (वि.) फार चीक असलेला.
**चिकित्सक** (सं. पु.) वारकाईनें परीक्षा करणारा; वैद्य; मांत्रिक.
**चिकित्सा** (सं. स्त्री.) रोगाचें निदान; वारीक शोध.
**चिकित्सालय** (सं. न.) दवाखाना.
**चिकी** (स्त्री.) पातळ गूळ, काकवी.
**चिकीर्षा** (सं. स्त्री.) करण्याची इच्छा.
**चकू, चिक्कू** (वि.) कंजूप, कृपण; (न.) एक फळ.
**चिकोटी** (स्त्री.) घट्ट मिठी; चिकटपणा.
**चिकोरी** (स्त्री.) मातीची पणती. [कीचड़.
**चिखल** (सं. चिकिल पु.) गारा; रेंदा,
**चिखलवट** (वि.) जेथें चिखल लवकर होतो अशी; रेंदाड.
**चिखल्या** (स्त्री. अने.) चिखलांत फिरण्यापासून पायांना होणारा एक विकार.
**चिगर** (हिं. वि.) किरकोळ.
**चिघळ** (पु.) द्रव, पाझर.
**चिघळणें** (क्रि.) द्रवणें, पाझरणें.
**चिघळ्या** (वि.) चिघळणारा.
**चिघुर** (वि.) लहान. [त्याचें फळ.
**चिंच** (सं. चिंचा स्त्री.) चिंचेचें झाड;
**चिंचकुली** (स्त्री.) चिमटी.
**चिंचपेटी** (स्त्री.) स्त्रियांचा एक दागिना.
**चिंचावणें** (प्रा. स्त्री.) चिंव चिंव करणें.
**चिंचपानी** (वि.) चिंचेच्या पानाइतक्या अरुंद कांठाचें (धोतर.)
**चिंचवणी** (न.) चिंचेचें पाणी.
**चिंचळा** (पु.) दिव्याची काजळी.
**चिचुंदरी, चिचुंद्री** (सं. छुच्छुंदरी स्त्री.) उंदराची एक जात; दारूकामांतला एक प्रकार.
**चिंचोका** (पु.) चिंचेची बी.
**चिचोंदरा** (वि.) चपळ, हुषार व चुरुचुरु बोलणारा (मुलगा).
**चिचोर** (वि.) छिचोर, दुर्व्यसनी, हलकट.
**चिंचोरी** (स्त्री.) चिंचोका. [गेलेला.
**चिंचोळा** (वि.) क्रमानें निमुळता होत
**चिच्छक्ति** (सं. स्त्री.) परमात्मा, शुद्ध चैतन्य; बुद्धि; मन.
**चिट** (अ.) मुकाट्यानें; स्तब्धपणें.
**चिटकी** (स्त्री.) चुटकी, मधलें बोट व आंगठा यांच्या योगानें होणारा आवाज.
**चिटकुला** (वि.) लहान. [माप.
**चिटकें** (न.) शेराच्या एक सोळांशायेवढें
**चिटणीस** चिटनवीस पहा.
**चिटणें** (न.) थेंबथेंब पिळून काढलेलें दूध; (क्रि.) विलगणें.
**चिटनवीस, चिटनीस, चिटणीस** (फा. पु.) पत्रव्यवहार वगैरे करणारा अधिकारी; शिरस्तेदार; सेक्रेटरी.

**चिटनविशी** (स्त्री.) चिटनिसाचें काम, चिटनिसी.
**चिटपांखरूं** (न.) कोणीहि, एकही प्राणी.
**चिटोरा** (पु.), **चिटोरें** (न.) कागदाचा तुकडा.
**चिट्टी, चिठ्ठी** (हिं. स्त्री.) लहानसें पत्र.
**चिठ्ठी परतविणें** मरतां मरतां वांचणें.
**चिठ्ठा** (पु.) जमावंदीचें पत्रक; खजिन्यावर मागणी; इनामजमिनीचें पत्रक; पगारवांटणी. [चिडखोर.
**चिड, चिडा, चिडचिडया** (वि.) रेंदाड,
**चिडखोर** (वि.) चिडका, चिडणारा.
**चिडणें** (क्रि.) रागावणें, खिजणें; (विवाइ.) उभरणें, उतणें.
**चिडविणें** (क्रि.) चेतविणें, खिजविणें.
**चिडाणी** (प्रा. पु.) चिखल, घाण; कुपात्र.
**चिडिया, चिडी** (हिं. स्त्री.) चिमणी.
**चिडीचिप्प** (अ.) गप्प, शांत.
**चिणका, चिणक्या** (वि.) चिडखोर.
**चिणका, चिणकारा** (पु.) चीड, रागाचा झटका.
**चिणचिण** (प्रा. स्त्री.) धुसफुस.
**चिणणें** (क्रि.) बांधणें, रचणें; (वीळ) बुजविणें; भितींत दाबून मारणें; वीण घालणें.
**चित्** (सं. न.) ज्ञान; बुद्धिशक्ति; चैतन्य.
**चिंतक** (सं. वि.) चिंतणारा; इच्छिणारा.
**चिंतणें** (क्रि.) विचार करणें, इच्छिणें; देवाजवळ मागणें.
**चिंतन** (सं. न.) विचार, ध्यास.
**चिंतनिका** (सं. स्त्री.) मनन, विचार.
**चिंतनीय** (सं. वि.) मनन करण्यास योग्य.
**चितरणें** (सं. क्रि.) चित्रें काढणें, वेड्यावाकड्या रेघोट्या ओढणें.
**चिंतवणी** (स्त्री.) चिंता, काळजी; (वि.) ध्यास लावणारी.
**चिंतवणें** (प्रा. न.) चिंतन.
**चितवाती** (सं. चित्तवृत्ति स्त्री.) मनस्थिति.
**चितळ** (न.) एक जंगली पशु.
**चिता** (सं. स्त्री.) सरण, प्रेत जाळण्याकरितां केलेली काष्ठांची रचना.
**चिंता** (सं. स्त्री.) काळजी, फिकीर, धास्ती.
**चितांक, चितांग** (स्त्री.) स्त्रियांच्या गळयांतला एक दागिना. [पडलेला.
**चिंताकुल, चिंताग्रस्त** (वि.) फिकिरींत
**चिताड** (वि.) खरडून ठेविलेलें, खराब केलेलें; गिचमीड.
**चिताभस्म** (सं. न.) चितेंतली राख.
**चिंतामणि** (सं. पु.) इच्छिलेलें देणारा मणि; गणपति.
**चितारणें** (क्रि.) चितरणें पहा.
**चितारी** (सं. चित्रकार पु.) चित्रकार.
**चिंतावणें** (प्रा. क्रि.) चिंतणें, काळजी करणें.
**चिति** (सं. स्त्री.) चित्; ज्ञान; ज्या घनाकृतीची मर्यादा सहा काटकोन चौकोनांनीं दाखविली जाते ती.
**चिंतित** (सं. वि.) चिंतलेलें, मनांत आणलेलें.
**चिती** (स्त्री.) बुरसा, बुरा.
**चित्कळा** (सं. चित्कला स्त्री.) ज्ञान-शक्ति.
**चित्त** (सं. न.) लक्ष, मन, अंतःकरण.
**चित्तचालक** (प्रा. वि.) चित्ताचें नियमन करणारा (परमेश्वर).
**चित्तनिर्वृत्ति** (स्त्री.) चित्ताची शांति.
**चित्पावन, चित्तपावन** (सं. पु.) कोंकणस्थ ब्राह्मणांतला एक भेद.
**चित्तवृत्ति** (सं.स्त्री.) मन, लक्ष, अंतःकरण.
**चित्ता** (सं. चित्रक पु.) वाघाच्या जातीचें एक जनावर.
**चित्ताथिला** (प्रा. वि.) सजीव; विचारी.
**चिंत्य** (सं. वि.) विचारणीय; शंकायुक्त.
**चित्र** (सं. न.) तसबीर; (वि.) चमत्कारिक; विविध.
**चित्रकार** (सं. पु.) चितारी.
**चित्रकाव्य** (सं. न.) ज्यांत व्यंग्य प्रधान नसून केवळ शब्द किंवा अर्थ यांची चमत्कृति मात्र असते असें काव्य.
**चित्रगुप्त** (सं. पु.) प्राणिमात्रांच्या पापपुण्याचा हिशेब ठेवणारा यमाचा लेखक; हुशार कारकून. [नकाशा; सिनेमा.
**चित्रपट** (सं. पु.) चित्र काढलेलें कापड;
**चित्ररथ** (पु.) एक गंधर्व.
**चित्रविचित्र** (सं. वि.) चमत्कारिक, आश्चर्यकारक; अनेक रंगांनीं युक्त.

**चित्रशाळा** (स्त्री.) चित्रसंग्रह.
**चित्रा** (सं. स्त्री.) तेरावें नक्षत्र.
**चित्रान्न** (सं. न.) खिचडी; साखरभात.
**चित्रालंकार** (सं. पु.) ज्यांत प्रश्न व त्याचें उत्तर एकाच वाक्यांत असतात किंवा एकाच वाक्यांत दोन प्रश्नांचें उत्तर दिलें असतें तो.
**चित्रावती, चित्राहुति** (सं. स्त्री.) ब्राह्मण भोजनारंभीं कांहीं घास ताटाचे बाहेर उजव्या हातास देवतांच्या नांवानें काढून ठेवतात ते.
**चित्रिणी** (सं. स्त्री.) स्त्रियांचा एक प्रकार.
**चित्रींचा लेप** सुंदर प्राणी.
**चिथडा** (पु.), **चिथडी** (स्त्री.) तुकडा, चिंधी.
**चिथवणी, चिथावणी** (स्त्री.) उत्तेजन, उठावणी.
**चिथविणें** (क्रि.) चिडविणें, संतापविणें.
**चिद्गगन** (सं. न.) चैतन्यरूप आकाश.
**चिंदडी, चिंधडी, चिंधी, चिंधुकली, चिंधोडी** (स्त्री.) कापडाचा लहान तुकडा.
**चिद्शक्ति** (स्त्री.) आदिप्रकृति.
**चिंधी** (का. चिंदि स्त्री.) कापडाचा तुकडा.
**चिंधी चोळा करणें** (घर) लुटणें, नाश करणें.
**चिनई** (वि.) चिनी, चीन देशचें.
**चिनन्दिनी** (प्रा. स्त्री.) कटकट; रात्र.
**चिन्मय, चिन्मात्र** (वि.) ज्ञानस्वरूप.
**चिनापट्टण** (न.) मद्रास.
**चिनार** (पु.) काश्मिरांतील एक वृक्ष.
**चिनी** (वि.) लहानसा; (स्त्री.) चिटी; चुनी (धोतराची); पांढरी पिठीसाखर.
**चिनुला** (वि.) छोटा.
**चिन्ह** (सं. न.) खूण, लक्षण; खोडी; खोडकर, अवलक्षणी मुलगा.
**चिपकी** (स्त्री.) चिमूट, चिमटी.
**चिपकुरा** (पु.) अळू.
**चिपट** (स्त्री.) कारवाराकडे—सध्येची पळी.
**चिपटी** (स्त्री.) चिपाड, ढामटी; संकोच पावलेला भाग.
**चिपटें** (न.) पावशेराचें माप.
**चिपड** (न.) फोलासुद्धां असलेला दाणा; उंसाचा रस काढून घेतल्यावर उरलेला त्याचा भाग; चिपाड; डोळयाला येणारा चिकट पदार्थ.
**चिपतळा, चिपताळा** (वि.) चपटा, थबकडा, बसकट.
**चिपनळी** (स्त्री.) पिचकारी; सळई.
**चिपळी** (स्त्री.) सळई; भजनोपयोगी एक विशेष प्रकारचें लाकडी वाद्य; ओहळ; दोन मडक्यांमधली पकड.
**चिपाट** (न.) कडव्याचें ताट; ऊंस गाळल्यावर राहिलेला अवशिष्ट भाग.
**चिपाड** (न.) ऊंस पिळून रस काढल्यावर राहिलेला भाग; भुरकट दिसणारें.
**चिपुट चिंगळी** (स्त्री.) चिटपाखरूं.
**चिपोटा** (पु.) चीप; क्षीण व कृश शरीर.
**चिपोळी** (स्त्री.) लहान चीप; चिपळी पहा.
**चिप्प** (हिं. वि.) गप, स्तब्ध; चिंब.
**चिंब** (न.) आंत दाणा नसलेली शेंग; वेळूची काढलेली चिरोटी; (वि.) थबथबीत भिजलेला.
**चिंबका** (वि.) चिंबळ, दाबलेला.
**चिंबचळें** (न.) न भरलेला दाणा.
**चिंबचिबीत** (वि.) थबथबलेलें.
**चिंबट** (वि.) चिबट; चिबळ, आक्रसलेलें; हिरवें, रसभरित; ओलें; (न.) कांबटी.
**चिंबटणें** (क्रि.) दावणें, आवळणें.
**चिबड** (न.) दलदल; ओलसर जमीन.
**चिबणें, चिंबळणें** (क्रि.) दावणें; चिरणें.
**चिबल्लें** (हिं. वि.) खोडकर.
**चिबुक** (सं. पु.) हनुवटी.
**चिबूड** (न.) शेंदाड नांवाचें फळ.
**चिंभोरी** (स्त्री.) खेकडयाची एक जात.
**चिभट** (स्त्री.) चिबूड, शेंदाड.
**चिमका** (वि.) चिमुकला.
**चिमकुरा, चिमकोरा** (पु.) चिमटी; विचकुरा, ओरखडा.
**चिमखडा** (पु.) लहान खडा; चलाख मुलगा; रस्त्याचा बाजूची दगडाची रास.
**चिमखुरा, चिमखोडा** चिमकुरा पहा.

**चिमट** (स्त्री.) चिमटी, चिमूट; आंगठा आणि तर्जनी यांच्या संयोगानें होणारी आकृति.
**चिमट–टा** (पु.) कपाळावर दोन भोंवरे असलेला घोडा; सांडस; पकड; चिमकुरा; नद्यांच्या प्रवाहांचा संगम होण्यापूर्वी त्या प्रवाहांच्यामध्यें सांपडलेला प्रदेश; पेंच, संकट. [होणें.
**चिमटणें** (क्रि.) दावलें जाणें; संकुचित.
**चिमटी** चिमट पहा.
**चिमणचारा** (पु.) मुलांचा खाऊ.
**चिमणसाळ** (स्त्री.) एक प्रकारचें भात.
**चिमणा** (पु.) चिमणीचा नर; (वि.) चिमकुला.
**चिमणी** (स्त्री.) एक लहान पक्षी; दिव्यावरची कांचेची नळी; उंच धुराडें; घासलेटचा लहान दिवा.
**चिमणीच्या दांतांनीं फोडणें** वस्तु वस्त्रांत ठेवून दांतांनीं फोडणें.
**चिमुकलें** (वि.) लहानसें, चिमणेंसें, छोटें.
**चिमटणें** (प्रा. क्रि.) चिमटा घेणें.
**चिमुरडा** (वि.) लहान, खुजट; वात्रट (पोर).
**चिमुरा, चिमोरा** (प्रा. पु.) चिमटा.
**चिमूट, चिमोट** (स्त्री.) चिमट पहा.
**चिमोरा** (प्रा. पु.) चिमटा.
**चिर** (सं. अ.) दीर्घ कालपर्यंत.
**चिरकणें** (क्रि.) फुटणें; चीर पडणें; थोडें थोडें हगणें.
**चिरका** (वि.) चिरकणारा.
**चिरकांडी** (स्त्री.) जोरानें उडणारी धार.
**चिरकाल–ळ** (सं. अ.) दीर्घ काळपर्यंत.
**चिरकी** (स्त्री.) चिरकांडी.
**चिरक्या** (वि.) लाकडें करवतणारा.
**चिरगटणें, चिरंगटणें** (क्रि.) दाबणें; दावलें जाणें.
**चिरगूट** (न.) वस्त्र, चिंधी.
**चिरचिरीत** (वि.) जीर्ण, जुनें झालेलें.
**चिरंजीव** (वि.) दीर्घायुषी; अमर; (पु.) पुत्र; अश्वत्थामा, बलि, व्यास, मारुति, बिभीषण, कृप व परशुराम अशीं सात अमर माणसें.
**चिरंजीवी** (स्त्री.) कन्या. [मच्छर.
**चिरट, चिरटूं, चिलट** (न.) मुरकूट,
**चिरटी** (स्त्री.) पट्टी, चिरफळी.
**चिरटोळी** (स्त्री.) चिंधी; लहान मुलांस पिण्याचें शिकविण्यासाठीं दुधांत भिजवून देतात ती चिंधी.
**चिरड** (स्त्री.) चीड.
**चिरडखोर** (वि.) चिडणारा.
**चिरडणें** (क्रि.) रगडणें, चुराडा करणें.
**चिरडी** (स्त्री.) साडी.
**चिरणी** (स्त्री.) खोवण; खोंवण पाडण्याचें एक हत्यार; भिंतीच्या पुढें आलेली फळी; एकविटी भिंत.
**चिरणें** (क्रि.) फाडणें, कापणें; पसरणें.
**चिरणें** (न.) सुताराचें एक हत्यार.
**चिरंतन** (सं. वि.) जुना, प्राचीन.
**चिरफळी** (स्त्री.) चिरटी, तुकडा.
**चिरमी** (स्त्री.) सुरकुती. [चुरमुडणें.
**चिरमुटणें** (क्रि.) सुरकुत्या पडणें,
**चिरंवटा** (पु.) चिरोटा पहा. [टिकणारें.
**चिरस्थायी** (सं. वि.) पुष्कळ काळपर्यंत
**चिरा** (हिं. पु.) घडींव दगड; ज्वानी; (प्रा.) पागोटें; (सं. चीर पु.) मंदील; वाफा. **चिरा घालणें**–बंद करणें.
**चिराईत, चिरायत** (सं. किरात न.) काडेचिराईत, एक औषध.
**चिराक–ख** चिराग पहा.
**चिराखी** (फा. स्त्री.) भिक्षा, धर्म.
**चिराग** (फा. पु.) दिवा. [ण्याची चौकट.
**चिरागदान** (फा. न.) वत्त्यांची रांग ठेव-
**चिरांबा** (पु.) आंब्याच्या फाकीचें लोणचें.
**चिरायु** (सं. वि.) दीर्घायुषी.
**चिरिमिरी** (स्त्री.) लहानशी लाच.
**चिरी** (स्त्री.) बारीक रेघ; भेग, चीर.
**चिरूट** (पोर्तु. शारूट पु.) तमाखू पत्रांची जाड विडी.
**चिरेबंदी** (स्त्री.) फरशी; (वि.) फरसबंदी, मजबूत. [चिरंवटा, चिऱ्हवटा.
**चिरोटा** (पु.) एक पक्वान्न, चिऱ्होटा,
**चिऱ्यावरची रेघ** कधीं खोटी न ठरणारी गोष्ट.
**चिल** (स्त्री.) घार.

**चिलखत** (न.) लोखंडाचा पोशाख.
**चिलट** (न.) मच्छर.
**चिलम, चिलीम** (हिं. स्त्री.) तंबाखूचा धूर ओढण्याची नळी.
**चिलारी** (वि.) लहानगा.
**चिलींपिलीं** (न. अने.) मुलेंलेंकरें, वालवच्चीं.
**चिल्लर, चिल्हर** (फा. वि.) किरकोळ, लहानसान; (स्त्री.) हलकीं नाणीं, खुर्दा; कांटेरी झाड.
**चिल्ला** (हिं. पु.) धनुष्याची दोरी; चाळीस दिवसांचें उपोषण.
**चिल्हार** (स्त्री.) कांटेरी जाळी; (अलंकारिक अर्थानें) बाजारबुणगें.
**चिल्हार-पिल्हार** (न.) मुलेंलेंकरें.
**चिवट** (वि.) चामट, वातड, चिकण.
**चिवट** (न. ना.) कापसाच्या जाड दोऱ्याचें पेंडाळें.
**चिवटणें** (क्रि.) चिमटणें, एक होणें.
**चिवटा** (न.) किंतान, कॅनव्हस.
**चिवटणें** (क्रि.) चुरडणें; चेंदामेंदा करणें.
**चिवडा** (पु.) पोहे चुरमुरे इ० चें रुचकर मिश्रण; चिचका.
**चिवर, चिंवर** (न.) फणसाच्या गऱ्याभोंवतालचें ततूंचें वेष्टण.
**चिवरें** (न.) कच्चें सुपारीचें फळ.
**चिवळ** (वि.) रोड, सडपातळ, बारीक.
**चिवार** (स्त्री. न.) वांबूचें वेट.
**चिव्हाळ** (पु.) द्रव्य; पाझर.
**चिन्ह** (सं. न.) खूण; लक्षण; विलक्षण प्रकारचा मनुष्य किंवा कृति.
**चिळकांडी, चिळकांडी** (स्त्री.) जोरानें उडणारी धार.
**चिळवें** (न.) शेराच्या ३२ व्या अंशा- इतकें माप.
**चिळस, चिळशी, चिळसी** (स्त्री.) वीट, शिसारी.
**चीक** (सं. चिक्कण पु.) चिकट रस किंवा दूध; चिकट वलक.
**चीची** (स्त्री.) छीः थूः, फजिती; ओरडणें.
**चीज** (फा. स्त्री.) वस्तु, पदार्थ; गाणें, गीत; ध्रुपद इ.; (न.) सार्थकता.
**चीजवस्त** (हिं. स्त्री.) सामानसुमान.
**चीट** (न.) रंगीत नक्षीचें कापड, छीट.
**चीड** (स्त्री.) राग, तिटकारा; कोयंड्यासह असलेला कलदार रुपाया.
**चीण** (फा. पु.) नेसलेल्या परकरादि वस्त्रास कमरेजवळील भागास शिवण्यासाठीं घातलेल्या चुन्या; घराला ओल न यावी म्हणून खालीं लावावयाचा दगडांचा थर.
**चीत** (वि.) उताणा पडलेला; पराभूत.
**चीत्कार** (सं. पु.) हत्तीचें ओरडणें.
**चीन** (फा. पु. न.) कंबरेजवळच्या चुन्या; (पु.) चीन देश.
**चीप** (स्त्री.) पातळ दगड; छलपी; तुरा; (वि.) गप, स्तब्ध; पुरा भिजलेला.
**चीर** (हिं. स्त्री.) फट, भेग; कपाळीं कुंकू लावण्याची चांदीची काडी.
**चीर** (सं. न.) वस्त्र; जंबीयाच्या डावापैकीं एक.
**चीळ** (स्त्री.) स्तनांतून निघणारी दुधाची चिरकांडी; पान्हा.
**चुइटी** (स्त्री.) चावून टाकिलेला उंसाच्या करव्याचा अवशिष्ट भाग.
**चुई** (स्त्री.) चोय, चोई.
**चुकचुकणें** (क्रि.) (पालीचें) ओरडणें; त्यासारखा चुकचुक आवाज करणें.
**चुकटी** (हिं. स्त्री.) चिमूट.
**चुकणें** (क्रि.) करावयास पाहिजे तें न करणें किंवा नको तें करणें; अपराध करणें; विसरणें; करून मोकळें होणें; हुकणें.
**चुकतमाकत** चुकतां चुकतां.
**चुकता करणें** निकालास लावणें.
**चुकर** (वि.) गोंधळलेला.
**चुकलामाकला** भलतीकडे गेलेला; चुकून राहिलेला.
**चुकवती** (स्त्री.) कर्जाची फेड.
**चुकवाचुकव** (स्त्री.) टाळाटाळ.
**चुकविणें** (क्रि.) चूक करण्यास कारण होणें; टाळणें; फसविणें.
**चुका** (प्रा. स्त्री.) पोटावर घातली असता गर्भ उमळून पडतो अशी एक वनस्पति; (पु.) आंबट चुका नांवाची पालेभाजी; हिशेबाचा निकाल (तुका० २९४).

**चुकाऊ** (वि.) टाळणारा; चुकविणारा.
**चुकांडी** (स्त्री.) झुकांडी; लक्ष नाहीं असें पाहून पळून जाणें.
**चुकामूक** (स्त्री.) परस्परांची भेट व्हावी असा अजमास असतां तो चुकणें.
**चुकार, चुकारी, चुकारू** (वि.) भटक्या मारणारें.
**चुकारतट्टू** (पु.) कामाची चुकवाचुकव करणारा.
**चुकावणा** (प्रा. वि.) चुकार.
**चुकी** (स्त्री.) चूक, अपराध.
**चुकुर** (प्रा. पु.) भ्रम; चुकवाचुकव (तुका० ९७९); (वि.) भ्रमिष्ट (दा० २।२।३४); चकित; वावरलेला.
**चुकूनमाकून** चुकीमुळें, दुर्लक्ष होऊन.
**चुकोति** (हिं.स्त्री.) व्यवस्था।; घटवटना; फेड (कर्जाची).
**चुंग** (स्त्री.) तुकडी, समुदाय, संघ.
**चुंगडा** (पु.), **चुगडें** (न.) मोत्यांचें पेंडाळें, घोस; पेंडी; जुडी.
**चुगलखोर** (हिं. वि.) चहाडखोर.
**चुगली** (हिं. स्त्री.) चहाडी, लावालावी.
**चुंगा** (प्रा. पु.) समुदाय.
**चुंगी** (स्त्री.) चुंग पहा; गवताचा भारा.
**चुचकारणें** (क्रि.) लाडीगोडी लावणें, गोंजारणें.
**चुंचु** (सं. चंचु स्त्री.) चोंच.
**चुटका** (हिं. पु.) विनोदपर किंवा गमतीची लहानशी गोष्ट; चुटपुट.
**चुटकी** (स्त्री.) अंगठा व मधलें बोट यांच्या संयोगापासून होणारा आवाज.
**चुटक्यांचे मांडव** लुटुपुटीचा पराक्रम; वल्गना.
**चुटकुला** (पु.) छोटासा चुटका.
**चुटपुंजी** (वि.) तुटपुंजी, थोड्याशा भांडवलावर केलेला; लहानसा. [ हुरहुर.
**चुटपुट** (स्त्री.) पश्चात्तापाचा चटका;
**चुटपुटता** (वि.) बेताचा, अल्प.
**चुटिया, चुटियाचुरमा** (पु.) खुसखुशीत हरोळ्या चुरून त्यावर तूपसाखर घालून केलेला लाडू.
**चुटी, चुट्टी** (स्त्री.), **चुट्टा** (पु.) विडी.
**चुडा** (सं. चूडा पु.) कांकण, बांगडी; स्त्रियांचें सौभाग्य.
**चुडी** (स्त्री.) कोलती, दिवटी; बांगडी.
**चुडीत** (न.) नारळीचा न विणलेला झाप.
**चुडीपुनव** माघ शु० १५ (होळीचा प्रारंभ). [ जीव वांचविणें.
**चुडेदान** (न.) एखाद्या स्त्रीच्या नवऱ्याचा
**चुडेल** (स्त्री.) स्त्रीचें दुष्ट पिशाच्च; हडळ.
**चुड्या** (वि.) दिवट्या; आगलाव्या.
**चुणका** (पु.), **चूणूक** (वि.) चपळ; निवडक. [ चपळ मुलगा.
**चुणखडा** (पु.) निवडक रत्न; हुशार
**चुणचुण** (स्त्री.) थोडी आग; पश्चात्ताप.
**चुणचुणीत** (वि.) चलाख; हुशार; तरतरीत.
**चुणणें** (क्रि.) निऱ्या करणें; निवडणें.
**चुणी** (स्त्री.) निरी; घडी; हिरकणी; (सं. चूर्ण स्त्री.) आंबोण.
**चुणूक** (स्त्री.) थोडासा नमुना, मासला.
**चुतिया, चुतियानंदन** (हिं. वि.) मूर्ख.
**चुथडा** (पु.) गोंधळ, फजिती.
**चुथाचुथ** (स्त्री.) गोंधळ, अव्यवस्था; चुथडा; खोडाखोड.
**चुनकळी** (स्त्री.) भाजलेल्या चुन्याचा खडा.
**चुनखडी** (स्त्री.) चुन्याचे दगड; असे दगड असलेली माती; चुणचुणीत मूल.
**चुनडी** (हिं. स्त्री.) बारीक ठिपक्यांचें स्त्रियांचें एक वस्त्र; उत्तम लाल रंगाचें डाळिंबांच्या दाण्यासारखें रत्न.
**चुनणें** (क्रि.) निऱ्या करणें; घडी घालणें.
**चुनपट्टी** (स्त्री.) चुना ठेविलेलें पान.
**चुनभट्टी** (स्त्री.) चुनखडी भाजण्याची भट्टी.
**चुनवटा** (पु.) चुनखडीची खाण.
**चुना** (सं. चूर्ण पु.) चुनकळ्यांचें चूर्ण.
**चुनाळें** (न.) पानाला लावण्याचा चुना ठेवण्याचें लहानसें पात्र.
**चुनेगच्ची** (स्त्री.) चुन्यानें बांधलेली आगाशी; (वि.) चुन्यानें बांधलेलें काम.
**चुपकड** (न.) रहाटगाड्याचें चाक.
**चुप्प, चुपचाप** (अ.) मुकाट्यानें.
**चुंफणी** (स्त्री.) लहान मुलांच्या गळयांत बांधलेली चोखणी.

**चुंब** (स्त्री.) गर्दी, दाटी.
**चुंबक** (सं. वि.) ओढणारा; मुका घेणारा; कद्रू, कृपण; (पु.) लोहचुंबक.
**चुबक** (स्त्री.) लहानसें भोक.
**चुबकणें** (क्रि.) तुडविणें, गळणें; घुसणें; (न.) शिल्पकाराचें एक हत्यार.
**चुबकळणें** (क्रि.) बुचकळणें, बुडविणें.
**चुबकळी** (स्त्री.) लहान बुडी, बुचकळी.
**चुबका** (पु.) बुजका; जमाव, गर्दी.
**चुंबणें** (क्रि.) मुका घेणें; ओढणें.
**चुंबकाकर्षण** (सं. न.) लोहचुंबकाच्या अंगीं लोखंडास आपल्याकडे ओढण्याची असलेली शक्ति.
**चुंबन** (सं. न.) मुका.
**चुंबळ** (प्रा. स्त्री.) ओझ्याखालीं ठेविलेली डोक्यावरची चिरगुटाची गुंडाळी; मूळव्याधीचे तांबडे मोड.
**चुंबा** (पु.) मुंग्या, माशा इ० चा थवा किंवा जमाव; मुका.
**चुंबाचुंबी** (स्त्री.) एकाद्या गोष्टीशीं वरवर सलगी करणें.　　　[ ओढिलेला.
**चुंबित** (सं. वि.) स्पर्शिलेला; चुंबिलेला;
**चुंबीत** (अ.) नाइलाज होऊन, झक मारीत.　　　[ पोचणारा.
**चुंबी** (समासांत वि.) चुंबणारा; ओढणारा;
**चुंभळ** (प्रा. वि.) आशाळभूत (तुका० १३१२); (स्त्री.) चुंबळ पहा.
**चुयटी** (स्त्री.) चुई.
**चुरंगटणें** (क्रि.) चुरगळणें.
**चुरगळणें, चुरगाळणें** (क्रि.) कुसकरणें, चुरा करणें, रगडणें.
**चुरगळा, चुरगाळा, चुरगळामुरगळा** (पु.) चेंदामेंदा करून केलेला गोळा.
**चुरचुर** (स्त्री.) थोडीशी आग, अल्प वेदना; काळजी, खेद; पश्चात्ताप.
**चुरचुरणें** (क्रि.) चुणचुणणें, थोडी आग होणें.　　　[ चुरचुरणारें.
**चुरचुरीत** (वि.) खुसखुशीत; पूर्ण वाळलेलें,
**चुरडणें** (क्रि.) रगडणें; भुगा करणें.
**चुरडा, चुराडा** (पु.) चुरा; नाश.
**चुरणें** (सं. चूर्ण क्रि.) चुरा किंवा भुगा करणें; मोडणें; हलक्या हातानें दाबणें.
**चुरबुरा** (वि.) तीक्ष्ण.
**चुरबुरीत** (प्रा. वि.) तीक्ष्ण.
**चुरसरणें** (क्रि.) मुरुडणें, सुरकतविणें.
**चुरमा** (पु.) चुटिया पहा.
**चुरमुरणें** (क्रि.) कुरकुरणें; मुळमुळणें.
**चुरमुरा** (पु.) मुरमुरा; तांदुळाची लाही.
**चुरमुरे खाणें**—हातपाय आपटीत किंवा मुकाट्यानें जागच्या जागीं कुरकुरत बसणें.
**चुरस** (हिं. स्त्री.) ईर्षा; द्वेष, वैमनस्य.
**चुरा** (सं. चूर्ण पु.) भुगा.
**चुरी** (स्त्री.) भरडलेल्या डाळीचा चुरा.
**चुरुचुरु** (अ.) उद्धटपणानें; मर्यादा सोडून.
**चुलत** (वि.) चुलत्याच्या संबंधानें असलेला.
**चुलता** (पु.) काका, बापाचा भाऊ.
**चुलवण, चुलाण** (न.) उंसाचा रस शिजविण्याची भट्टी.　　　[ चूल.
**चुला, चुल्ला** (पु.), **चुलाण** (न.) मोठी
**चुवा—व्वा** (हिं. पु.) उंदीर.
**चुस्त** (वि.) तंग, घट्ट; हुषार.
**चुळका** (सं. पु.) ओंजळ; तळहातांत मावेल इतकें पाणी; चूळ.
**चुळचुळ** (स्त्री.) घाई, उतावळी; चळवळ.
**चुळचुळ मुंगळा** (पु.) मुलांच्या खेळांतली एक संज्ञा; अतिशय घाईनें जाणारा.
**चु० लागणें**—अतिशय उतावीळ होणें; फार त्वरा करणें.
**चुळचुळा** (पु.) उतावळी, अस्वस्थता, चुळचुळ.
**चुळणी** (स्त्री.) चूळ.
**चुळबुळ** (स्त्री.) चळवळ, चलनवलन.
**चुळबुळ करणें** (क्रि.) चळवळ करणें.
**चुळबुळाट** (पु.) फार उतावळेपणा.
**चुळबुळीत** (वि.) तेलानें माखलेला.
**चुळी** (स्त्री.) पाणी वगैरे घेण्यासाठीं केलेली तळहाताची खळगी.
**चुळुक** (प्रा. वि.) सुंदर (ज्ञा० ११।१३३).
**चूक** (स्त्री.) दोष; लहान खिळा.
**चूकभूल** (स्त्री.) चुकी, विस्मरणानें घडलेला दोष.　　　[ बोंड.
**चूचुक** (सं. न.) स्त्रीच्या स्तनाचें अग्र किंवा
**चूड** (स्त्री.) चुडी पहा.

**चूडा** (सं. स्त्री.) शेंडी; तुरा; शिखर.
**चूडाकर्म** (सं. स्त्री.) चौल, जावळ राखणें.
**चूडामणि** (सं. पु.) शिरोभूषण.
**चूण** (स्त्री.) टरफल, आंत्रोण; मुरड, चीण.
**चूत** (हिं. स्त्री.) स्त्रीजननेंद्रिय, स्त्रीयोनि.
**चूत** (सं. पु.) आम्रवृक्ष, आंब्याचें झाड.
**चूतिया, चूत्या** (वि.) मूर्ख.
**चूर** (पु.) चूर्ण, पूड, भुगा; (वि.) गुंग, गर्क.
**चूष** (स्त्री.) मजा, गंमत.
**चूर्ण** (सं. न.) बुकणी, भुगा, पीठ; चुना.
**चूर्णिका** (सं. स्त्री.) शब्द-अर्थादि अलंकारयुक्त गद्यपद्यात्मक कविता; गद्यात्मक तात्पर्यरूप टीका. [ आगा.
**चूल** (सं. चुल्ली स्त्री.) विस्तव पेटविण्याची
**चूलखंड** (सं. न.) चूल.
**चूळ** (स्त्री.) चुळी पहा.
**चेइणें** (प्रा. क्रि.) जागृत होणें, चेतणें.
**चेइरी** (प्रा. स्त्री.) जागृति.
**चेइलेपण** (न.) जागृतावस्था.
**चेक** (इं. पु.) दगटशा, तंत्री; चौकटीदार कापड; हुंडी.
**चेकळणें, चेकाळणें** (क्रि.) आवेशानें कामास लागणें; धुमाकूळ घालणें; पेट घेणें.
**चेंगट** (वि.) आळशी, सुस्त, मठ्ठ.
**चेंगरणें** (क्रि.) दावलें जाणें, चेंदामेंदा होणें. [ झिजलेला.
**चेचका** (वि.) घासलेला, ठेचलेला,
**चेचणें** (क्रि.) ठेचणें, चिरडणें.
**चेंचा** (पु.) कोथिंबीर, मिरच्या इत्यादि पदार्थ ठेचून करतात तें तोंडीलावणें; ठेचा.
**चेट** (स्त्री.) चेटक; (हिं. न.) जादूटोणा, करणी.
**चेटकी** (स्त्री.) जादूटोणा करणारी.
**चेटूक** (न.) चेट पहा.
**चेड, चेडूं** (सं. न.) लहान मूल.
**चेडवा, चेडी** (स्त्री.) मुलगी.
**चेडा, चेडो** (सं. चेट पु.) मुलगा; चेटुक.
**चेडी** (स्त्री.) मुलगी.
**चेडूं** (न.) मूल. [ गोळा.
**चेंडू** (पु.) खेळण्याचा चिंध्या, रबर इ०चा
**चेंडूफळी** (स्त्री.) एक खेळ, क्रिकेट.
**चेडें** (प्रा. न.) चेटूक.
**चेणें** (प्रा. न.) जागृति; (वि.) जागृत.
**चेत** (प्रा. वि.) जागृत; (पु.) पेट.
**चेतणें** (क्रि.) पेट घेणें; भडकणें, चिडणें.
**चेतन** (सं. वि.) सजीव.
**चेतना** (सं. स्त्री.) प्राणसंचार; जीवनशक्ति; पुरुषत्व; बुद्धि; मन.
**चेतव** (सं. पु.) क्षुब्धता; राग; प्राणसंचार; पाझर.
**चेतवण** (न.) पेटवण, आग पेटवणारें.
**चेतवणें** (क्रि.) पेटवणें, आग लावणें.
**चेतळणें** (क्रि.) चेकळणें पहा.
**चेंद** (स्त्री.) गर्दी; ठेचलेली वस्तु.
**चेंदणें** (क्रि.) ठेचणें, दाबणें.
**चेंदा, चेंदामेंदा** (पु.) ठेचा.
**चेंदाड** (स्त्री.) रेवड, राड.
**चेप** (स्त्री.) अतिशय दाटी; रोगाची साथ; गुळाची वसकी ढेप.
**चेपट** (वि.) चापट.
**चेपणी** (प्रा. स्त्री.) अट; आढी.
**चेपणें** (क्रि.) दाबणें; दाबून लहान करणें.
**चेपली, चेपळी** (स्त्री.) वाहाणा.
**चेपाटी** (स्त्री.) कापड विणतांना उपयोगांत आणावयाचा मागाचा एक भाग.
**चेपारा** (पु. न.) गर्दी; दाब.
**चेपें** (न.) वसकी टोपी.
**चेंबट** (वि.) सर्द; चिबट.
**चेंबरी, चेमरी** (स्त्री.) दार, खिडकी इत्यादि बंद करावयाची योजना.
**चेयिरें** (प्रा. न.) जागृति ज्ञा०(१०।१०६); (वि.) जागृत.
**चेर** (स्त्री.) क्षुब्धता.
**चेरा** (पु.) फजिती.
**चेल** (सं. न.) वस्त्र.
**चेलगडी** (पु.) खेळगडी.
**चेला** (सं. चेट हिं. पु.) शिष्य.
**चेली** (हिं. स्त्री.) शिष्या.
**चेव** (सं. पु.) उत्कंठा; मस्ती; त्वेष.
**चेवणें** (क्रि.) मुकणें; चळणें, हलणें.
**चेवा** (प्रा. पु.) जागृति.
**चेष्टणें** (सं. क्रि.) वर्तणें.

**चेष्टा** (सं. स्त्री.) चलनवलनादि क्रिया; प्रयत्न; खोडी; चीड आणणारें कृत्य.
**चेष्टेखोर** (वि.) खोडकर, थट्टेबाज.
**चेहरा, चेहेरा** (फा. पु.) तोंड; मुद्रा, मुखचर्या.
**चेहरामोहरा** (पु.) मुद्रा, चर्या.
**चेहळ** (पु.) घाम; द्रव; (स्त्री.) चंगळ.
**चेहेरेपट्टी** (स्त्री.) एकाद्याच्या चेहऱ्याचें पूर्ण वर्णन.
**चेळणें** (क्रि.) जोरानें आंत शिरकावणें.
**चेळा** (वि.) हट्टी, खोडकर, दांडगा.
**चेळें** (न.) म्हातारचळ.
**चैतन्य** (सं. न.) जीव, प्राण; परमात्मा.
**चैत्य** (प्रा. न.) चित्ताचा चंचलपणा; एखाद्या वृक्षाभोंवतीं बांधलेला पार; बौद्धमंदिर.
**चैत्यद्रुम** (सं. न.) अश्वत्थ, पिंपळ.
**चैत्र** (सं. पु.) वर्षाचा पहिला महिना.
**चैत्रांगण** (सं. न.) चैत्राच्या महिन्यांत बायका अंगणांत किंवा घरापुढें रांगोळीचीं चित्रें काढतात तें.
**चैत्रागौरी** (सं. स्त्री.) चैत्र महिन्यांत एकाद्या शुभ दिवशीं गौर थाटानें मांडून स्त्रिया सवाष्णींना हळदकुंकूं देतात तें.
**चैत्री** (सं. वि.) चैत्र महिन्यासंबंधीं; (स्त्री.) चैत्र शु० १५.
**चैन** (हिं. स्त्री.) मजा, सुख; थाट.
**चैल** (सं. न. ) वस्त्र.
**चोइटी** (स्त्री.) चुई, चुइटी पहा.
**चोख** (हिं. वि.) खरा, चांगला; (प्रा. पु.) विचार, चांगुलपणा (ज्ञा० १७।२३०).
**चोखट** (वि.) शुद्ध, उत्तम.
**चोखटीव** (प्रा. स्त्री.) चांगुलपणा.
**चोखटें** (प्रा. वि.) चांगलें.
**चोखडें** (प्रा. वि.) खरें; यथार्थ; शुद्ध; सुंदर , नीटनेटकें, चोखट.
**चोखणी** (स्त्री.) उटी; मुलांस चोखण्यासाठीं दिलेली वस्तु; चोखण्याची क्रिया.
**चोखणें** (क्रि.) चुंकणें, तोंडानें शोषणें.
**चोखनळ, चोखंदळ** (वि.) बारकाईनें खोड काढणारा; चिकित्सखोर; मळमळ सुटलेला.
**चोखा** (हिं. वि.) चांगला, उत्तम, शुद्ध.
**चोखामेळा** (पु. ना.) महारांतला पूर्वी होऊन गेलेला एक साधु; कोणताही महार.
**चोखारी** (वि.) चोखंदळ, चोखनळ.
**चोखाळ** (वि.) शुद्ध, स्वच्छ, निर्दोष.
**चोखाळणें** (क्रि.) साफसूफ करणें; स्वच्छ करणें; बारकाईनें शोधणें; अभ्यंग करणें.
**चोखाळता** (प्रा. वि.) शुद्ध, निर्मळ.
**चोखी** (प्रा. स्त्री.) निर्मळपणा, चांगुलपणा.
**चोखौळ** (प्रा. न.) चांगलें फूल.
**चोगा** (हिं. पु.) पायघोळ अंगरखा.
**चोंच** (स्त्री.) चंचु, पक्ष्याच्या तोंडाचा अग्रभाग.
**चोंचण** (न.) नारळाची शेंडी.
**चोचरा** (वि.) तोतरा.
**चोच(चे)ला** (पु.) स्तन; प्रियकर; नखरा; कामचेष्टा. [ मान; डौल.
**चोचले** (पु. अने.) कौतुक, कोड; नखरा;
**चोंचा** (पु.) डाग, लोखंडाची वस्तु तापवून तिच्या अग्रानें कातडी जाळल्यानें पडणारी खूण.
**चोचावणें** (क्रि.) आंवा, आंवळा, मुळा इत्यादींना, त्यांत क्षार, पाक वगैरे भिनण्यासाठीं भोंकें पाडणें; मुळा वगैरे कोशिंबिरीसाठीं विळीवर उभा फिरवून त्याच्या बारीक चिंधोट्या करणें.
**चोज** (सं. पु. न.) कौतुक, नवल; चोचला आवड.
**चोजणें** (प्रा. क्रि.) जाणणें.
**चोजवणें** (प्रा. क्रि.) संतोषणें (ना० १७४२); जाणणें; (मुक्ते० रामा० ७।४२६); समजावणें.
**चोजविणें** (प्रा. क्रि.) शोधणें.
**चोट** (हिं. स्त्री.) चाट; जखम; नुकसान; (पु.) पुरुषाचें जननेंद्रिय.
**चोटाळणें** (क्रि.) फसविणें; पर्वा न करणें.
**चोटी** (हिं. स्त्री.) शेंडी.
**चोड** (न.) नारळावरचें जाड कवच.
**चोंडक** (प्रा. पु.) तुणतुणेंवाला.
**चोंडकें** (प्रा. पु.) तुणतुणें.

वाचनालय सातारा

**चोंडा** (पु.) भाताच्या रोपांचा झुपका.
**चोंढ, चोंढा** (पु.), **चोंढी** (स्त्री.), **चोंढें** (न.) खांच.
**चोथळणें** (क्रि.) माखणें; चोपडणें.
**चोथा, चोथड** (पु.) सत्त्व काढून घेतल्या-नंतर राहिलेला त्याज्य भाग.
**चोंदणें** (क्रि.) ठासून भरणें.
**चोंदळणें** (क्रि.) तुडविणें.
**चोंदा** (पु.) बंदूक ठासण्यासाठीं चिंध्या वगैरेंचा गोळा.
**चोंदी** (स्त्री.) चोंदा पहा.
**चोप** (पु.) मार, ठोक; चोपणी.
**चोपडणें** (क्रि.) माखणें, लावणें.
**चोपडा** (वि.) तेलकट; गुळगुळीत.
**चोपडी** (हिं. स्त्री.) वही, पुस्तक.
**चोपडू** (प्रा. पु.) चोपडलेला पदार्थ.
**चोपडें** (न.) लहानसें किंवा भिकार पुस्तक.
**चोपणी** (स्त्री.) गवंड्याचें हत्यार; भुई चोपण्याचें लाकूड.
**चोपणें** (क्रि.) मारणें; ठोकणें; (न.) जमीन ठोकण्याचें लाकूड.
**चोपदार** (हिं. चोबदार पु.) वेत्रधारी; चांदीसोन्याची काठी हातीं धरून राजाच्या पुढें चालणारा.
**चोपाळा, चोफाळा** (पु.) झोपा, झोपाळा, दोला.
**चोफाळ** (पु.) पातळ; पासोडी, चादर.
**चोंबडकी** (स्त्री.), **चोंबडचाळा** (पु.) लांडा कारभार; लुडबुडेपणा; नाचरे-पणा; चहाडी; चुगली.
**चोंबडा** (वि.) चहाडखोर, चुगलखोर; लांड्या, लुडबुड्या.
**चोंबडेपणा** (पु.) चुगलखोरपणा, चहाड-खोरपणा.
**चोबदार** (फा. पु.) चोपदार पहा.
**चोंबा** (पु.) तोंडांत कोंबलेला बोळा; गोळा; गांठ.
**चोंबारा** (पु.) चवाठा.
**चोमडा** (वि.) चोंबडा पहा.
**चोय, चोयटी** चुई, चुइटी पहा.
**चोर** (सं. पु.) चोरणारा, भामट्या, लुटारू; गंजीफाच्या खेळांत ज्याच्यावरचा हुकूम पडला नाहीं असें पान; (वि.) गुप्त. **चोराच्या मनांत चांदणें**—वाईट कर्म करणाराचें मन त्याला खातें.
**चोरकांटा** (पु.) किंचित् तापाची कसर.
**चोरखिसा** (पु.) आंतील खिसा.
**चोरग्रस्त** (स्त्री.) रात्रीं दुसऱ्याला कळूं न देतां मुकाट्यानें गांवांत फेरी घालतात ती.
**चोरघडी** (स्त्री.) कोऱ्या वस्त्राच्या पोटांत दुसऱ्याच्या नजरेस न येण्यासारखी अस-लेली अपुरी घडी.
**चोरचुंबा** (पु.) लाच.
**चोरजासूद** (पु.) हेर.
**चोरटा** (वि.) वरून न दिसणारा, गुप्त;
**चोरटावें** (न.), **चोरटाई** (स्त्री.), **चोरावा** (पु.), **चोरावें** (न.) चोरांचा धुमाकूळ; चोरांनीं केलेला उपद्रव किंवा नासाडी.
**चोरटें** (प्रा. न.) चोरांचा उपद्रव.
**चोरणें** (क्रि.) दुसऱ्याच्या वस्तूचा अपहार करणें; गुप्त राखणें.
**चोरपाइकी** (स्त्री.) चोरून हल्ला करणें.
**चोरपाऊल** (न.) न वाजणारें पाऊल.
**चोरपान्हा** (पु.) दूध काढतेवेळीं गाय किंवा म्हैस मुद्दाम कासेचा संकोच करून दुधाचा कांहीं अंश वासरासाठीं राखून ठेविते तो.
**चोरवड** (स्त्री.), **चोरवण** (न.), **चोरवाण** (न.), **चोरवें** (न.), **चोरवंड** (न.), **चोरवडा** (पु.), **चोरवंडा** (पु.) चोरांनीं केलेला उत्पात.
**चोरवाट** (स्त्री.) गुप्त वाट.
**चोरळी** (प्रा. स्त्री.) चोरवेळ.
**चोरी** (सं. चौर्य स्त्री.) चोरण्याची क्रिया, अपहार; लपवून ठेवणें; संयमनाची आवश्यकता.
**चोरूनमारून** (अ.) गुप्तपणें.
**चोव, चोवा** (पु.) ओल्या नारळाच्या खोबऱ्यांतलें दूध काढून घेतल्यानंतर राहिलेला चोथा; ओल्या खोबऱ्याचा कीस.
**चोवा, चोहा** (प्रा. पु.) चंदनाची उटी (वेणा० सीना० ७।५).
**चोंवा** (प्रा. वि.) शुष्क, निस्तेज.

**चोहट, चोहटा** (प्रा. पु.) चवाठा, बाजार-चौक.
**चोहट** (प्रा. वि.) चोखट, चांगलें, उत्तम.
**चोहटा, चोहाट, चोहोटा, चवाटा** (प्रा.पु.) बाजार चौक.
**चोहोंकडे, चोहोंकडे** (अ.) सर्व बाजूंस.
**चोळ** (पु.) चोळण्यानें येणारी तूट; झीज; (डोळे) चोळल्यानें होणारा त्रास.
**चोळखा** (प्रा. पु.) सुरकुती.
**चोळणा** (हिं. पु.) आखुड विजार किंवा पायजमा.
**चोळणें** (क्रि.) घासणें, जिरविणें; माखणें.
**चोळवटणें** (क्रि.) गुधडलें जाणें; चुरगटणें; चुरडणें.
**चोळामोळा** (पु.) अयोग्य रीतीनें वापरल्यामुळें किंवा गुधडलें गेल्यानें होणारी दुर्दशा.
**चोळी** (सं. चोली स्त्री.) कंचुकी; स्त्रियांचा उरोभाग झाकणारें व हाताच्या कोपरापर्यंतच्या बाह्यांचें शिवलेलें एक वस्त्र.
**चोळीबांगडी** (स्त्री.) सामान्यत: स्त्रियांचा पोषाख व वेणीफणी इ० चें साहित्य.
**चोळें** (न.) चौल पहा.
**चौ** (वि.) चार.
**चौचा आंकडा** आसनमांडी.
**चौक** (हिं. पु.) चवाठा, चार रस्ते मिळण्याची जागा; चतुष्कोण; चतुष्कोणाकृति; अंगण; पोवाडयांतलें किंवा लावणींतलें कडवें; फाशावरचे चार ठिपके.
**चौकट** (हिं. स्त्री.) चार कडा असलेली वस्तु; मधला भाग पोकळ असा चौरस; चार भुतांची किंवा दुष्टांची जूट.
**चौकडा** (पु.) पुरुषाचें एक कर्णभूषण; चार समान मोत्यांचा समुदाय.
**चौकडी** (स्त्री.) चौघांची जूट; वस्त्रावर काढलेला लहान चौकोन; हरिणाची उडी; चार युगांमिळून होणारी कालगणना. **चौ० गुंग होणें**—अक्कल न चालणें.
**चौकशी** (हिं. स्त्री.) तपास, शोध.
**चौकस** (हिं. वि.) शोधक, जिज्ञासू.
**चौकळ, चौकाळ** (वि.) विपुल, पुरून उरण्याइतका.
**चौका** (हिं. पु.) स्वैंपाकाची झाडलीसारवलेली जागा; जरब, धाक.
**चौकार** (पु.) क्रिकेटमधील चार धांवांचा टोला.
**चौकी** (हिं. स्त्री.) चौरंग; घडवंची; नाकें; पोलिसचें ठाणें; पहारा; चार ध्रुपदांचा समुदाय.
**चौकीदार** (हिं. पु.) पाहारेकरी.
**चौकोन** (सं. चतुष्कोन पु.) चार बाजू असलेली सरलरेषाकृति.
**चौकोनी** (वि.) चार कोन असलेला. **चौ० चिरा**—हव्या त्या कामाला किंवा प्रसंगाला पुढें होणारा; हुशार मनुष्य.
**चौखणी** (वि.) चार खणांची; चार मजल्यांची. [ताणून बांधणें.
**चौखरणें, चौखुरणें** (क्रि.) चोहोंबाजूंनीं
**चौखुरी** (प्रा. स्त्री.) चतुष्पाद; बाज.
**चौगर्द, चौगर्दा** (फा. अ.) चोहोंबाजूंनीं.
**चौगस्त** (फा. न.) मागें मोजीत गेलें असतां चौथें वर्ष.
**चौगा** (पु.) चार अंगुळें.
**चौगुणी** (प्रा. पु.) **चौपट.**
**चौगुला** (पु.) बारा बलुत्यांतला एक.
**चौघडा** (पु.) देवालयांतून अगर राजप्रासादांतून नित्य चार घटकांनीं वाजविण्याकरितां ठेवलेल्या वाद्यांचा समुदाय.
**चौघडी** (स्त्री.) वस्त्राची चारपदरी घडी.
**चौघे** (वि.) चार जण.
**चौचक** (प्रा. न.) दार, कवाड.
**चौचाकी पांढर** गांवचे लहानमोठे सर्व प्रकारचे लोक; ग्रामव्यवस्थेला गाडयाचा दृष्टान्त देऊन देशमुख, देशपांडया, पाटील व कुलकर्णी हीं त्याला गति देणारीं चार चाकें समजण्याचा प्रघात आहे.
**चौचाल** (वि.) नव्या नव्या चालीची आवड असणारा; स्वेच्छाचारी.
**चौजारें** (न.) चातुर्थिक ज्वर. [माप.
**चौटकें** (न.) शेराच्या सोळाव्या भागाचें

**चौंडका** (प्रा. पु.) तुणतुणें.
**चौढाल** (प्रा. वि.) चौकोनी.
**चौढाळ** (वि.) हर एक कामांत ढवळा-ढवळ करणारा; पाचकळ.
**चौढाळ** (न.) जातिधर्मविरहित आचरण.
**चौढाळणें** (क्रि.) जातिनिर्बंध तोडून सव-गोलंकार करणें.
**चौढाळें** (प्रा. न.) गर्दी.
**चौणा** (पु.) चव; मस्ती; दुष्ट संवय.
**चौतकर, चौतकोर** (पु.) चतकोर; चवथा हिस्सा.
**चौतर्फा** (अ.) चोहोंवाजूंस.
**चौत्य** (पु.) चतुर्थांश, पाव.
**चौत्रा** (फा. पु.) ओटा, वेदी.
**चौथ** (स्त्री.) चतुर्थी; चतुर्थांश.
**चौथरा** (पु.) घराखालचा चौकोनी उंच ओटा अथवा वंदिस्त जागा.
**चौथाई** (स्त्री.) उत्पन्नाचा चौथा भाग.
**चौथाई अंमल** (पु.)चौथाईचा हक्क.[हिस्सा.
**चौथेली** (स्त्री.) शेताच्या उत्पन्नाचा चौथा
**चौदा नारू** (पु. अने.) चौदा अलुतेदार.
**चौदारत्नें** (सं. न. अने. व.) देव आणि दैत्य यांनीं समुद्रमंथन करून चौदा रत्नें काढलीं तीं—लक्ष्मी, कौस्तुक, पारि-जातक, सुरा, धन्वंतरी, चंद्रमा, काम-धेनु, ऐरावत, अप्सरा, सप्तमुखी अश्व, विष, हरिधनु, शंख आणि अमृत.
**चौदाविद्या** (सं. न. अने. व.) चार वेद, सहा वेदांगें, मीमांसा, न्याय, इतिहास व पुराणें अशा चौदा विद्या.
**चौसष्टकला** (सं. स्त्री. अने. व.) कलांचे चौसष्ट प्रकार मानले आहेत, त्यांतले कांहीं ठळक प्रकार असे :—गीत, नृत्य, नाट्य, आलेख्य (चित्र), पुष्पास्तरण, शय्यारचना, वाचन, काव्य, समस्या-पूरण, खोदकाम, केशमार्जन, छंदोज्ञान, हस्तलाघव इ.
**चौदावें रत्न** खरपूस मार.
**चौधरी** (प्रा. पु.) पाटलाच्या हाताखालचा एक अधिकारी; चौगुला.
**चौपट** (वि.) चारपट; (स्त्री.)सोंगट्यांचा खेळ; त्या खेळांतला घरें आखलेला पट.
**चौपदरी** (वि.) चार पदरांची; (स्त्री.) झोळी.
**चौपदरी गळा काढणें** मोठ्यानें रडणें.
**चौपाई** (स्त्री.) चार पायांची ख़ाट; सोळा मात्रांचें एक हिंदी वृत्त.
**चौपाशीं, चौपास, चौपासी** (प्रा. अ.) चोहोंकडे; सर्व बाजूंस.
**चौपाळा** (पु.) चोपाळा पहा.
**चौफळ** (प्रा. वि.) चौकोन.
**चौफळा** (प्रा. पु.) चौरंग, झोपाळा.
**चौफुला** (पु.) फुलाच्या आकाराचा चार पुडांचा डबा. [फुली; एक अलंकार.
**चौफुली** (स्त्री.) नक्षत्राच्या आकाराची
**चौफेर, चौफेरी** (हिं. अ.) सर्व बाजूंनीं.
**चौबक** (स्त्री.) विटीदांडूच्या खेळांत विटी खालीं न पडूं देतां वरचेवर दांडूनें चार वेळां लागोपाठ उडविणें.
**चौबळा** (प्रा. वि.) चौकोनी.
**चौबार, चौबारा** (प्रा. पु.) चवाटा (दा० २।१।३४); गच्ची (हरि० १९।७४).
**चौमेर** (प्रा. पु.) चवाठा.
**चौमेरी, चौमेरीं, चौमेरें** (प्रा. अ.) चौफेर, चहूंकडून.
**चौरडोल** (प्रा. पु.) अंबारी.
**चौरंग** (प्रा. वि.) हस्तपाद-विरहित (रामदास० युद्ध० ४।४१); (पु.) मोठी चौकी.
**चौरंगी** (पु.) नवनाथांपैकीं एक; वडाचा एक प्रकार. [एक.
**चौरपंचक** (सं. न.) पांच अशुभ मुहूर्तांपैकीं
**चौरली** (प्रा. स्त्री.) चार वेळ.
**चौरस** (सं. चतुरस्र पु.) समचतुष्कोन; (वि.) हरएक कामांत प्रवीण.
**चौरी** (सं. चामर स्त्री.) चवरी.
**चौरीबर्दार** (सं. फा. पु.) चवरी ढाळणारा.
**चौर्य** (सं. न.) चोरण्याची क्रिया.
**चौऱ्यायशीचा फेरा** चौऱ्यायशी लक्ष योनीं-तून भ्रमण. [चूडाकरण.
**चौल** (सं. न.) शेंडी ठेवण्याचा विधि,
**चौसार** (पु.) बुद्धिबळाचा खेळ; त्याचा पट.

**चौसोपी** (वि.) चार सोपे असलेला.
**च्यवन** (सं.न.) च्युति; (स्त्री.) नायकीण.
**च्यवणें** (प्रा. वि.) भ्रंश पावणें; पडणें.
**च्याऊम्याऊ** (स्त्री.) लहान मुलांचा एक खेळ.
**च्युत** (सं. वि.) भ्रष्ट; गळालेला.
**च्युति** (स्त्री.) उतरती कळा.

---

## छ

**छ** मराठी व्यंजनमालेंतील सातवें व्यंजन.
**छ** (अ.) छि:, भलतेंच; (पु.) हुंड्या, पत्रें इ० वर महिन्याची तारीख दर्शविण्यासाठीं 'चंद्र' याबद्दल लिहितात तें अक्षर. [ कपट; तगादा.
**छकड** (हिं.स्त्री.) चापटी; तोटा, नुकसान;
**छकडा** (सं. शकट पु.) सामान वाहण्याचा लहान गाडा; गाडी.
**छकडी** (सं. षट्क स्त्री.) सहा वस्तूंचा गट; फाशांच्या खेळांतलें सहा संख्येचें दान; (हिं. स्त्री.) गाडी.
**छकडें** (न.) लहान लाडकें मूल.
**छकणें** (सं. चक क्रि.) खोडणें; ठकणें, फसविलें जाणें.
**छकल** (सं. शकल न.) तुकडा.
**छकवणी** (स्त्री.) फसवणूक. [ फसविणें.
**छकवाछकवी** (स्त्री.) खोडणें, बदलणें;
**छक्क** (वि.) चकित.
**छक्कड** (स्त्री.) नुकसान, तोटा; लवाडी, फसवणूक; तगादा; तमाशाचा एक प्रकार.
**छक्का** (पु.) सहा ठिपक्यांचें पत्त्याचें पान.
**छक्केपंजे** (पु. अने.) लुच्चेगिरीच्या युक्त्या; डावपेच.
**छचोर** (वि.) हलकट, चटोर, बदफैली.
**छचोरी** (स्त्री.) चटोरपणा; रंगेलपणा.
**छट** (सं. शठ पु.) लुच्चा, सोदा; कृपण.
**छटका** (पु.) ढलपी; गोंडेदार चाबूक.
**छटा** (हिं. स्त्री.) छाया, झाक, प्रतिबिंब; मर्यादा; आटोका; शैली; लज्जत; टप्पा.
**छटांक** (सं. षट् + टंक पु.) शेराचा सोळावा भाग.
**छटाकी** (स्त्री.) छटाकाचें वजन किंवा माप.
**छटेल** (वि.) दुर्व्यसनी, छिचोर, बदफैली.
**छटेला** (वि.) दारू पिऊन धुंद झालेला.
**छट्टा** (पु.) अंतर, टप्पा.
**छडणें** (क्रि.) गांजणें; खोदखोदून विचारणें; गायनांत स्वर बदलणें.
**छडा** (पु.) तपास, पत्ता, शोध; शेडा, घड्याळाची सांखळी; गोफ.
**छडी** (स्त्री.) काठी, चमकी, यष्टि, दंड; चोपदाराची चांदी–सोन्याची काठी.
**छडीदार** (पु.) भालदार, चोपदार; (वि.) उभ्या रेघा असलेलें (कापड).
**छणछणणें** (क्रि.) रुपयांचा छणछण नाद होणें. [ विषयींची मोठी ओरड.
**छणछणाट** (पु.) छणछण नाद; दुर्भिक्षा-
**छत्** (अ.) छिः ! थू :!
**छत** (सं. छत्र न.) चांदणी, चांदवा, आच्छादन. (गायनांत) **छत भरणें**–पराकाष्ठेची बहार करणें.
**छत्तिशी** (स्त्री.) विरोध, द्वेष; छत्तीस हा आंकडा एकमेकांच्या उलट दिशेला तोंड करून बसविलेल्या माणसांप्रमाणें ३६ असा काढतात, यावरून वरील अर्थ. याच्या उलट त्रेसष्टी ६३ म्ह. पूर्ण ऐक्य, एकोपा किंवा सख्य.
**छत्तिसाचा आकडा** (पु.) दोघांमधलें वितुष्ट.
**छत्र** (सं. न.) मोठी छत्री; आश्रय, आधार; अन्नछत्र.
**छत्रचामर** (सं. न.) राजभूषणें.
**छत्रपति** (सं. पु.) सार्वभौम राजा; श्रीशिवाजी महाराजांनीं पाडलेलें नाणें; दुदांडी पैसा.
**छत्री** (स्त्री.) उष्णता, पाऊस इ० पासून रक्षण करण्यासाठीं डोक्यावर धरतात ती; समाधिस्थान; अळंबें; कुत्र्याचें मूत.
**छत्र्या** (पु.) मोठ्यांच्या डोक्यावर छत्री धरणारा मनुष्य.
**छंद** (सं. पु.) हट्ट, नाद; (न.) कवितेचें वृत्त.
**छंदछंद, छंदफंद** (पु.) वाष्कळपणा; धुमाकूळ; खोड्या (तुका० १५५).

**छंदःशास्त्र** (सं. न.) वृत्ताविषयीचें शास्त्र.
**छदाम** (हिं. पु.) सहा दाम; एक चतुर्थांश पैशाहूनहि कमी किंमतीचें नाणें.
**छंदीफंदी** (वि.) दुर्व्यसनी; नादी, छांदिष्ट.
**छंदोबद्ध** (सं. वि.) वृत्तांत गोंवलेलें.
**छंदोभंग** (सं. पु.) वृत्तांच्या नियमाचें उल्लंघन. [ गुप्त दंश.
**छद्म** (सं. न.) कपट, लबाडी; भाषणांत-
**छद्मी** (वि.) कपटी; मर्मी लागण्यासारखें.
**छपणें** (हिं. क्रि.) लपणें, दडणें, गुप्त राहणें.
**छपवणी, छपवणूक** (स्त्री.) छपविण्याची क्रिया.
**छपर** (हिं. न.) घरावरचें आच्छादन.
**छपरपलंग** (पु.) ज्यावर वस्त्राचें आच्छादन करण्याची सोय आहे असा पलंग.
**छपरबंद** (पु.) छपर तयार करणारा; तें शाकारणारा.
**छपरी** (स्त्री.) खोपटी; पडवी.
**छप्पर, छप्परपलंग, छप्परबंद** छपर इ० शब्द पहा.
**छपाई** (स्त्री.) छापण्याची क्रिया. [हल्ला.
**छप्पा** (पु.) छाप, ठसा; छापा, अचानक
**छब** (सं. छवि स्त्री.) घडण, ठेवण; आकृति; नीटनेटकेपणा, ठाकठिकी; सौंदर्य; मोहकपणा. [ छानदार.
**छबकडा, छबडा** (वि.) लहान पण सुरेख,
**छबडी** (स्त्री.) करंडी.
**छबडें** (न.) आवडतें लहान मूल.
**छबिना** (फा. शबीना पु.) घोडेस्वारांचा रात्रीचा पाहारा; मिरवणूक. [ मोहक.
**छबिला, छबेला** (हिं. वि.) सुरेख, सुंदर,
**छबी** (स्त्री.) छब पहा; तसबीर, चित्र.
**छबीदार** (हिं. वि.) सुंदर, रमणीय.
**छब्बा** (पु.) सुरेख मुलगा; रुपया.
**छम्‌छम्, छमछमा, छमाछम्** (अ.) छम् छम् ध्वनि होईल अशा प्रकारें.
**छर्रा** (हिं. पु.) बंदुकीची बारीक गोळी.
**छल** (सं. पु. न.) वेष, सोंग; कृत्रिमपणा; छळणूक, त्रास; कपट.
**छल्ला** (हिं. पु.) करंगळीत घालण्याचें पैलूदार वेढें, सल्ला. [ लावण्य.
**वि, छवी** (सं. स्त्री.) शोभा, कांति,

**छळ** (सं. छल पु.) गांजणूक; कपट.
**छळणें** (क्रि.) गांजणें, त्रासविणें, जाचणें.
**छळवाद** (सं. पु.) गांजणूक, छळणूक.
**छळवादी** (सं. वि.) छळ करणारा.
**छाउ** (प्रा. पु.) आश्रय.
**छाक** (प्रा. स्त्री.) छायामात्र.
**छाकटा** (हिं. वि.) दारूबाज, छचोर.
**छाग, छागल** (सं. पु.) बोकड; कात-ड्याचा पोहरा. [ टोणा.
**छांछू** (न.) मंत्रतंत्राचा वहाणा; टाणा-
**छाट** (हिं. पु.) कापून काढलेला किंवा कापायचा भाग; निवड; वर्गीकरण.
**छाटणी** (हिं. स्त्री.) कापणी, तोडण्याची क्रिया; निवड; वर्गवारी.
**छाटा** (हिं. पु.) तुषार, बारीक थेंब.
**छाटाछाट** (स्त्री.) कापाकापी.
**छाटी** (सं. शाटी स्त्री.) संन्याशाचें वस्त्र.
**छाताड** (न.) मोठी रुंद छाती. [ हिय्या.
**छाती** (हिं. स्त्री.) ऊर; हिंमत, धैर्य;
**छातीचा, छातीदार** (वि.) धैर्यवान्, धाडशी. **छातीचा कोट करणें**—प्रसंगाला टक्कर देण्यासाठीं अंगीं मोठें धैर्य आणणें.
**छातीठोक** (वि.) सडेतोड, धैर्याचें.
**छातीफोड** (स्त्री.) उरस्फोड.
**छात्र** (सं. पु.) शिष्य, विद्यार्थी.
**छात्रक** (सं. न.) घोड्याची चौकी चाल.
**छांदस, छांदिष्ट** (सं. वि.) नादी, लहरी.
**छान** (हिं. स्त्री.) चौकशी; डामडौल; उत्तमपणा; (वि.) चांगलें; फक्कड.
**छानछुकी** (अर. स्त्री.) डामडौल; शोभा; दिमाख; नटवेपणा; चट्टीपट्टी.
**छानछोक** (वि.) ऐटबाज, झोकदार.
**छानणें** (हिं. क्रि.) निवडणें, चाळणें.
**छानदार** (वि.) शोभिवंत, चांगला, फक्कड.
**छाप** (हिं. पु.) उमटलेलें चिन्ह; शिक्का; चिन्ह उमटविण्याचें यंत्र; वजन; तेज; घोड्याच्या जिनाखालीं घालायचा लोकरीचा कपडा.
**छापखाना** (हिं. पु.) छापण्याचा कारखाना.
**छापणें** (क्रि.) ठसा उमटविणें; एक-सारख्या प्रति काढणें; लिपणें.

**छापा** (पु.) ठसा; आकस्मिक हल्ला; गुप्त मारा. [ गुंडाळण्याचें वस्त्र, शापी.
**छापी** (वि.) छापलेलें; (स्त्री.) चिलमीला
**छापील** (वि.) छापलेलें.
**छापेकरी** (पु.) शिक्के मारणारा; छापा घालणारा; लष्करी अधिकारी.
**छाया** (सं. स्त्री.) सावली; आश्रय; सूचक चिन्ह; लक्षण; किंचित् दर्शन; मुद्रा; चर्या; कांति; सूर्याची स्त्री.
**छायाचित्र** (सं. न.) पडद्यावर पाडलेली चित्राची छाया; फोटोग्राफ.
**छायानट** (सं. पु.) एका रागाचें नांव.
**छायामंडप** (प्रा. पु.) बारीक शुभ्र वस्त्राच्या आंतल्या दिव्याच्या प्रकाशानें कागदाच्या कातरलेल्या चित्राची छाया पाडण्याचा खेळ.
**छायारंग** (सं. पु.) सूर्य. [ छुकीदार.
**छालछबीला** (हिं. वि.) शोकीन, छान-
**छावणी** (हिं. छावनी स्त्री.) लष्करी लोकांची वस्ती; सैन्याचा तळ; छप्पर घालणें किंवा तें शाकारणें.
**छावा** (सं. शावक पु.) हत्तीचें पिलूं.
**छिः छिः छिः** (अ.) तिरस्कारार्थी उद्गार.
**छिटा** (हिं. पु.) डाग.
**छिडकाव** (हिं. पु.) शिडकाव, सिंचन.
**छियू** (स्त्री.) फजिती, धिक्कार.
**छिदणें** (सं. क्रि.) तोडणें.
**छिद्र** (सं. न.) भोक; छेद; दोष, न्यून; मर्माची जागा; पळवाट; छद्म, कपट.
**छिद्रदर्शी** (वि.) दुसऱ्याचे दोष तेवढे पाहणारा.
**छिद्रान्वेषण** (सं. न.) दोष शोधणें.
**छिनाल** (हिं. वि.) रांडबाज, बदफैली.
**छिनावणें** (क्रि.) हिसकावून घेणें.
**छिन्न** (सं. वि.) तोडलेला, तुकडे झालेला.
**छिन्नभिन्न** (वि.) तुटून फुटून तुकडे झालेला.
**छिन्नी** (स्त्री.) तोडण्याचें एक पोलादी हत्यार.
**छिलटा, छिलपा** (पु.) झिलपी, सालीचा तुकडा,
**छीट** (हिं. न.) चीट, छापलेलें कापसाचें कापड, चित्रवस्त्र.

**छुः** (अ.) कुत्र्याला धाव म्हणण्याचा शब्द.
**छुमछुम** (क्रि.) छणछणा शब्द होऊन.
**छुरिका** (सं. स्त्री.) सुरी.
**छुरी** (हिं. स्त्री.) सुरी.
**छेकणें** (क्रि.) खोडणें, छकणें.
**छेका** (पु.) ठोकर; रकम खोडल्याची खूण.
**छेकापन्हुति** (सं. स्त्री.) एक अर्थालंकार.
**छेकोक्ति** (सं. स्त्री.) वक्रोक्ति; वाकडें भाषण.
**छेडणें** (क्रि.) रागें भरणें, खरड काढणें; वाद्य वाजविणें; सहज एखादी गोष्ट अजमावणें.
**छेद** (सं. पु.) तोडण्याची क्रिया; तुकडा; भेग; अंतर; छिद्र; (गणितांत) अपूर्णांकांतला भाजक. [ पाडणें.
**छेदणें** (सं. क्रि.) तोडणें; फाडणें; भोक
**छेलछबिना** (हिं. वि.) चैनी; आनंदी.
**छेला** (पु.) नखरेबाज माणूस.
**छेळणें** (प्रा. क्रि.) टोचणें.
**छोकरा-री** (पु. स्त्री.) मुलगा–मुलगी.
**छोटा** (सं. क्षुद्र वि.), **छोटेखानी** (वि.) लहानसें.
**छोटी** (पु.) गुरांचा एक रोग; घटसर्प.
**छोटी हजेरी** (स्त्री.) सकाळची न्याहारी.

---

## ज

**ज** मराठी व्यंजनमालेंतील आठवें व्यंजन.
**ज** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) उत्पन्न झालेला.
**जइत** (प्रा. पु.) जय.
**जई** (प्रा. अ.) जेव्हां.
**जई** (स्त्री.) वळचण.
**जकड, जखड** (फा. स्त्री.) ताण.
**जकात** (अर. स्त्री.) आयात–निर्यातीवरचा कर, महसूल, दस्तुरी; मुसलमानांत प्राप्तीचा कांहीं ठराविक अंश धर्मादाय म्हणून काढून इमामाच्या स्वाधीन करावयाचा असा संप्रदाय असे; त्यावरून धर्मादाय, कर, पट्टी असे अर्थ प्रचारांत आले.

**जकातदार** (पु.) जकात वसूल करणारा अधिकारी किंवा मक्तेदार.
**जकिरा, जकेरा** (अर. पु.) सटरफटर वस्तु; अडगळ; सामानसुमान.
**जकीरखाना** (अर. पु.) अडगळ ठेवण्याची जागा.
**जखडणें** (क्रि.) आवळून बांधणें.
**जखडबंदी** (स्त्री.) आवळून टाकणें.
**जखम** (फा. स्त्री.) घाव, घाय. [ मलमपट्टी.
**जखमपट्टी** (स्त्री.) जखमेवर बांधण्याची
**जखमाना** (फा. पु.) जखमी झालेल्या शिपायांना दिलेली देणगी.
**जखमी** (फा. वि.) जखम झालेला. [ देवता.
**जखाईजुखाई** (स्त्री.) हलक्या प्रतीच्या
**जखीण** (सं. स्त्री.) डाकिनी, हडळ.
**जख्ख, जख्खडम्हातारा** (वि.) अतिशय म्हातारा, जुनापुराणा. [ पृथ्वी.
**जग** (सं. जगत् न.) सृष्टि, विश्व; दुनिया,
**जंग** (फा. पु.) धातूवरचें कीट, मळ, गंज; मलिनता; युद्ध.
**जंगजंग पछाडणें** खूप युद्ध करणें; अतिशय जोराचे प्रयत्न करणें. [ गोल.
**जगगोळ** (सं. जगत् + गोल पु.) पृथ्वीचा
**जगजट** (प्रा. पु.) सुव्यवस्था.
**जगजेठी** (सं. जगत् + ज्येष्ठ पु.) परमेश्वर.
**जगजीवन** (सं. जगज्जीवन पु.) जगाचा प्राण किंवा आधार, परमेश्वर.
**जगझोडी** (प्रा. स्त्री.) बटीक.
**जंगट** (न.) झेंगट; कांशाचें एक वाद्य; (वि.) जंगलेलें.
**जंगड, जंगडी** (स्त्री.) दाट मैत्री. [ ... ]
**जगडंबर** (सं. न.) जगत्‌रूपी पसारा.
**जगड्वाळ, जगड्व्याळ** (वि.) प्रचंड, अवाढव्य.
**जगढाल, जगढाळ** (प्रा. पु.) ध्वज, झेंडा.
**जगणें** (क्रि.) वांचणें; जिवंत राहणें.
**जंगणें** (क्रि.) कीट किंवा मळ चढणें.
**जगत्** (सं. न.) जग पहा. **ज०शेटी** (पु.) अतिशय श्रीमंत मनुष्य. [ नांव.
**जगती** (सं. स्त्री.) पृथ्वी; एका छंदाचें
**जगदंबा, जगदंबिका** (सं. स्त्री.) देवी, लक्ष्मी, पार्वती.
**जगदाळ** (स्त्री.) वाऱ्याशीं भांडणारी बायको.
**जगद्गुरु** (सं. स्त्री.) श्री शंकराचार्यांची पदवी. [ राहणारा, परमेश्वर.
**जगधाम** (सं. वि.) सगळें जग व्यापून
**जगनाड** (स्त्री.) भांडखोर शिवराळ स्त्री.
**जगन्नाथ** (सं. पु.) जगाचा स्वामी, परमेश्वर.
**जगन्नाथी** (स्त्री.) तलम सुती कापड.
**जगन्निवास** (सं. पु.) जगधाम पहा.
**जंगम** (सं. वि.) गतिमान्, हलणारे; (पु.) एक जाति; शिवपूजकांची एक जात; लिंगायत लोकांचा गुरु.
**जंगम विष** (सं.) प्राणिज विष.
**जंगर** (फा. न.) अन्नसत्र. [ रान.
**जंगल** (पु.) कळंक, गंज; (न.) अरण्य,
**जगल** (स्त्री.) नांगराचा फाळ.
**जंगलट** (वि.) खेडवळ, रानटी.
**जंगला** (स्त्री.) एक रागिणी; (पु.) कळंक, जंग; कठडा.
**जंगली** (वि.) जंगलसंबंधीं; जंगलांत राहणारा; रानवट.
**जगविणें** (क्रि.) वांचविणें.
**जंगाल** (पु.) कळंक, जंग.
**जंगी** (फा. वि.) लष्करी युद्धासंबंधीं; फार मोठा, विस्तीर्ण, भयंकर इ.; (स्त्री.) गवाक्ष.
**जंगी भोंवरा** (पु.) गुं गुं गुं असा मोठा आवाज करीत फिरणारा भोंवरा.
**जघन** (सं. पु.) ओटी; कमर; कटिप्रदेश.
**जघन्य** (सं. वि.) निकृष्ट, अधम; शेवटचें; (न.) वाईट कृत्याविषयींची प्रसिद्धि (भक्तलीला० १३।१३४).
**जंघा** (सं. स्त्री.) मांडी; पोटरी.
**जंघाळ** (सं. जंघाल वि.) चपळ, वेगवान्.
**जंघी** (वि.) चपळ, वेगवान्.
**जचणें, जाचणें** (प्रा. वि.) जपणें; सूड उगविणें; परिश्रम करणें.
**जज्ज** (इं. पु.) न्यायाधीश.
**जंजार** (प्रा. पु. न.) ओझें, त्रास.
**जंजाळ** (सं. जंजाल पु. न.) ऐहिक गोष्टींची गुंतागुंत; भानगड; चिंता, त्रास.

**जंजिरा** (फा. पु.) समुद्रांतला किल्ला.
**जंजिरी** (स्त्री.) साखळी; गवाक्ष.
**जंजीर** (फा. स्त्री.) साखळी; वेडी.
**जंजीरा** (अर. पु.) वेट.
**जजू** (सं. यजुस् पु.) निंदार्थी—यजुर्वेदी.
**जंजरिया** (फा. स्त्री.) साखळी.
**जट, जटा** (सं. स्त्री.) गुंतागुंत झालेले डोक्यावरले केस; गुंतागुंत; संघ, जूट; गट, समुदाय.
**जटणें** (क्रि.) जूट करणें.
**जटाजूट** (सं. पु.) जटेचा समूह.
**जटापाठी** (सं. वि.) वेदांच्या जटा (पदाची कांहीं विशेष नियमाप्रमाणें आवृत्ति) पढलेला. [ पक्ष्याचें नांव.
**जटायु** (सं. पु.) रामायणांतल्या एका गृध्र
**जटाळ्या** (वि.) जटा धारण केलेला.
**जटिल** (सं. वि.) जटाधारी.
**जट्याळ** (सं. जटिल वि.) जटाधारी.
**जठर** (सं. न.) उदर, पोट.
**जठराग्नि** (सं. पु.) पचनशक्ति.
**जड** (सं. वि.) अचेतन; वजनदार; स्थूळ, मंद बुद्धीचा; आटोक्यावाहेरचा; (स्त्री.) मुळी; भांडवल.
**जडकाम** (न.) जोडण्याचें काम.
**जडजवाहीर** (फा. अर. जरजवाहर न.) सोन्यामोत्यांचे इ० सर्व दागिने.
**जडजवाहीर** (फा. जर म्ह० सोनें न.) सोनें व मोत्यें, हिरे इ. रत्नें.
**जडजोखीम** (स्त्री.) सर्व प्रकारचा अनर्थापात.
**जडण** (स्त्री.) एकत्र जुळविणें, जोडणें; वसविणें. [ कुशलता.
**जडणी** (स्त्री.) जडण्याची क्रिया किंवा
**जडणें** (क्रि.) जोडणें, कोंदणांत बसविणें; लागणें, चिकटणें.
**जडत्व** (सं. न.) वजन; सुस्ती.
**जडप** (न.) जोडणी; मेळ; मिलाफ.
**जडपारडें** (न.) श्रीमंत वजनदार मनुष्य; महत्त्वाचें काम. [ भयंकर.
**जडव** (अ. जरव वि.) कठिण; जरव;
**जडभरत** (सं. पु.) एका ऋषीचें नांव; अतिशय सुस्त माणूस.
**जडभारी** (प्रा. पु.) संकट (तुका.२१४०); (वि.) दुष्कर, कठिण.
**जडवळी** (प्रा. स्त्री.) एकत्र करणें.
**जडवाद** (सं. पु.) जगांत पंचभूतात्मक वस्तु येवढ्याच काय त्या आहेत, आत्मा नाहीं, अशा प्रकारचें मत.
**जडाई** (स्त्री.) जडण्याबद्दलचा खर्च.
**जडाव** (हिं. पु.) कोंदणांत वसविण्याचें वगैरे ज्यांत आहे असें काम.
**जडी** (हिं. स्त्री.) मुळी.
**जडीबुटी** (हिं. स्त्री.) औषधोपयोगी मुळ्या, पाला इ०; संचित द्रव्य.
**जडींव** (वि.) ज्यांत मोत्यें, हिरे, माणकें इ० जडले आहेत असें. [ करणारा.
**जड्या** (पु.) रत्नें वगैरें जडींव कामें
**जण** (सं. जन पु.) असामी, मनुष्य; लोक.
**जणू** (सं. जाने अ.) जसें काय, जणों.
**जण** (प्रा. न.) जिणें, जगणें.
**जणों** (सं. जाने अ.) असें कांहीं; जणू काय.
**जंत** (सं. जंतु पु.) पोटांत होणारे कृमि.
**जतन** (सं. यत्न न.) काळजीपूर्वक रक्षण, संगोपन. [ तत्परता.
**जतना** (प्रा. स्त्री.) निगा, जपणूक;
**जंतरमंतर** (सं. पु.) छांछू; छूमंतर; थातुरमातुर.
**जतावणी** (स्त्री.) ताकीद, इशारा, सूचना.
**जती** (सं. पु.) यति, जैनधर्मी संन्यासी; जत्रा (तुका० ४१७).
**जतीर** (न.) कुंभाराचें चाक; सरकी काढण्याचें एक यंत्र.
**जंतु** (सं. पु.) क्षुद्र प्राणी; कृमि.
**जंत्र** (सं. यंत्र न.) तोफ, बंदूक इ० शस्त्र.
**जत्रा** (सं. यात्रा स्त्री.) मेळा, यात्रा.
**जंत्री** (सं. स्त्री.) क्रमवार यादी; अनुक्रमणिका; मूस.
**जथ** (स्त्री.) समुदाय, जूट, जमाव.
**जथण** (सं. यूथ क्रि.) जमणें, सांचणें; गोळा करणें.
**जथा** (सं. यूथ पु.) समुदाय, टोळी.
**जथावळ** (स्त्री.) सगळें कुटुंब, कुळी किंवा जात.
**जदीद** (अर. वि.) नवा, नवशिक्या.

**जधीं** (अ.) जेव्हां.
**जन** (सं. पु.) लोक; जग.
**जनक** (सं. पु.) बाप; उत्पन्नकर्ता; मिथिलेचा एक राजा; (वि.) समासांतीं उत्पन्न करणारा.
**जनणें** (सं. क्रि.) प्रसवणें. [ लोक.
**जनता** (सं. स्त्री.) जनसमूह; एकंदर सगळे
**जनन** (सं. न.) जन्म; उत्पत्ती.
**जननी** (सं. स्त्री.) आई, माता.
**जनपद** (सं. पु.) देश. [ भीति.
**जनलज्जा** (सं. स्त्री.) लोक हंसतील अशी
**जनस्थान** (सं. न.) नासिक.
**जनानखाना** (फा. पु.) स्त्रियांचा राहण्याच्या घरांतला भाग; अंतःपुर.
**जनानी** (फा. वि.) स्त्रियांस योग्य किंवा शोभणारे; स्त्रियांसंबंधीचें.
**जनापवाद** (सं. पु.) लोकांचा ठपका, निंदा.
**जनाब** (अर. संबोधन) महाराज; स्वामी.
**जनार्दन** (सं. पु.) विष्णु. **जनीं ज०**—लोकमत हेंच देवाचें मत.
**जनावर** (फा. जानवर न.) पशु; सर्प.
**जनित** (वि.) समासांतीं-उत्पन्न झालेलें.
**जनिता** (सं. पु.) निर्माणकर्ता; बाप.
**जनेदारखाना** (पु.) जनानखाना.
**जन्म** (सं. पु. न.) उत्पत्ति, संभव, जनन; उत्पत्तीपासून मरणापर्यंतचा काळ; आयुष्य. **जन्माची बेगमी किंवा भाकर**—जन्मभर पुरणारें निर्वाहाचें साधन.
**जन्मगांठ** (सं. जन्मग्रंथि स्त्री.) जन्मभर टिकणारा संबंध; वाढदिवस.
**जन्मकुंडली** (सं. स्त्री.) जन्माच्या वेळच्या ग्रहांच्या स्थितीचें कोष्टक.
**जन्मजन्मांतरीं** (अ.) या किंवा कोणत्याहि अन्य जन्मांत.
**जन्मणें** (क्रि.) उत्पन्न होणें.
**जन्मतः** (अ.) जन्मापासून.
**जन्मप्रभृति** (अ.) जन्मापासून.
**जन्मदरिद्री** (वि.) जन्मापासून भिकारी असलेला. [भूमीची भाषा, मातृभाषा.
**जन्मभाषा** (सं. स्त्री.) आपल्या जन्म-
**जन्मरास** (सं. जन्मराशि स्त्री.) जन्माच्या वेळीं सूर्य ज्या राशींत होता ती.

**जन्मवर** (अ.) आयुष्यभर.
**जन्मसाफल्य, जन्मसार्थक्य** (सं. न.) आयुष्यांतलें जें उद्दिष्ट त्याची सिद्धि.
**जन्मसावित्री** (सं. स्त्री.) आयुष्यभर सुवासिनी.
**जन्मांतर** (सं. न.) दुसरा जन्म; दैव.
**जन्मादारभ्य** (अ.) जन्मापासून.
**जन्माष्टमी** (सं. स्त्री.) श्रावण वद्य ८, गोकुळाष्टमी.
**जन्मोजन्मीं** (अ.) प्रत्येक जन्मांत.
**जन्मोत्तरी** (प्रा. स्त्री.) जन्मपत्रिका.
**जन्य** (सं. वि.) समासांतीं—उत्पन्न होणारें.
**जप** (सं. पु.) देवाचें नांव, मंत्र इ० ची पुनः पुनः आवृत्ति; ध्यास, ध्यान.
**जपजाप्य** (न.) जप व त्यासारखीं धर्मकृत्यें. [ संभाळ; राखण.
**जपण, जपणी, जपणूक** (स्त्री.) जतन,
**जपणें** (क्रि.) मंत्राची वगैरे आवृत्ति करणें; लक्ष ठेवणें; राखणें.
**जंपती** (सं. पु.) दांपत्य, नवराबायको.
**जपमाळ** (सं. स्त्री.) स्मरणी; घोकणी.
**जपा** (स्त्री.) जास्वंद.
**जपी तपी** (वि.) नेमानें जप व तपश्चर्या करणारा.
**जपून** (अ.) काळजीपूर्वक.
**जप्त** (अर. वि.) सरकारनें अडकवून ठेवलेलें.
**जप्ती** (अर. स्त्री.) सरकारनें आपल्या ताब्यांत घेणें.
**जब–बा–बे** (अर. स्त्री.) विधिपूर्वक हत्या.
**जंब** (सं. दंभ पु.) ढोंग.
**जबडा** (हिं. पु.) जाबडा, दाभाड; तोंड; दाढ.
**जबर, जबरा** (अर. वि.) मोठा; शक्तिमान्; ज्यास्त. [ खंबीर.
**जबरदस्त** (फा. वि.) जुलमी; श्रेष्ठ;
**जबरदस्ती** (फा. स्त्री.) बळजोरी; जोराचा प्रयत्न. [ जबरदस्ती.
**जबरी** (अर. स्त्री.) बळजोरी; जुलूम,
**जबर्जंग** (फा. स्त्री.) लहान तोफ.
**जंबा** (अर. पु.) जंबिया; एक प्रकारची कटयार.

**जवान** (फा. स्त्री.) जीभ; वाणी.
**जबानी** (हि. स्त्री.) तोंडी हकीकत; साक्ष.
**जबाब** (फा. पु.) उत्तर; उलटून बोलणें.
**जबाबदार** (हि. वि.) जिम्मेदार, जोखीम घेणारा; भरंवशाचा.
**जबाबदारी** (स्त्री.) जिम्मा; जोखीम; भार.
**जबाबी** (वि.) उत्तर देण्यांत तत्पर किंवा कुशल. **ज०कार्ड**–रिप्लाय कार्ड.
**जंबाळ** (प्रा. पु.) चिखल.
**जंबिया, जंब्या** (अर. जंबा पु.) एक प्रकारची कट्यार.
**जंबीर** (सं.) लिंबाची एक जात.
**जंबु** (सं. न.) जांबफळ.
**जंबुद्वीप** (सं. न.) पृथ्वी.
**जंबुरा, जंबूर** (फा. पु.) लहान तोफ.
**जंबूक** (सं. पु.) कोल्हा.
**जबे करणें** ठार मारणें.
**जबेतरासी** (फा. स्त्री.) हजरजबाबीपणा.
**जंब्या** (अर. जंबा पु.) जंबिया पहा.
**जंभ** (सं. दंभ पु.) ढोंग.
**जम** (पु.) जमाव; जुळणी; एकी.
**जमई** (स्त्री.) एक शस्त्र. [ गालिचा.
**जमखाना** (फा. पु.) सतरंजी, जाजम,
**जमणें** (क्रि.) एकत्र होणें, जुळणें; पटणें, भरभराटणें.
**जमदग्नि** (सं. पु.) एका ऋषीचें नांव; फार रागीट मनुष्य.
**जमदाड** (सं. यमदंष्ट्रा स्त्री.) एक प्रकारची मोठी तलवार.
**जमदाडा** (वि.) लठ्ठ; धटिंगण.
**जमनिका** (सं. यवनिका स्त्री.) पडदा.
**जमनीस** (फा. पु.) मुलकी कामगार; जुने डेरे वगैरेवरचा अधिकारी.
**जमवाजमव** (स्त्री.) अनेक वस्तु एकत्र करण्याची क्रिया. [ एकी करणें.
**जमविणें** (क्रि.) गोळा करणें; जुळविणें;
**जमा** (अर. स्त्री.) मिळकत,आय, प्राप्ति; (वि.) गोळा झालेलें.
**जमाखर्च** (फा. जमाख़रच पु.) देण्या-घेण्याचा हिशोब; हिशेब.
**जमात** (अर. स्त्री.) समुदाय; जमाव.
**जमातदार** (फा. पु.) टोळीचा नायक.
**जमादार** (फा. पु.) टोळीवरचा एक अधिकारी; शिपायांवरील मुख्य.
**जमादिलाखर** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा सहावा महिना.
**जमादिलावल** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा पांचवा महिना.
**जमान** (पु.) जामीन.
**जमानत** (हि. स्त्री.) जामीनकी.
**जमाना** (फा. पु.) काळ; युग; हंगाम.
**जमाबंदी** (हि. स्त्री.) जमिनीची पाहणी करून सरकारचा महसूल ठरविणें; जमिनीचा वसूल; उत्पन्न.
**जमालगोटा** (पु.) एक अतिशय तीव्र रेचक; औषध.
**जमाव** (हि. पु.) समुदाय, जमात.
**जमावर्दी** (हि. स्त्री.) पराक्रम, बहादुरी.
**जमी** (स्त्री.) जमीन. [ वतनदार.
**जमीदार** (हि. पु.) जमिनीचा मालक;
**जमीन** (फा. स्त्री.) भूमि; काळी; भुई; तळ; भूमिका; मूळ आधार.
**जमीनजुमला** (फा. अर. पु.) शेतभात; वतनवाडी.
**जमीनदोस्त** (फा. वि.) भुईला पाठ लागलेला; मातींत मिळालेला; नष्ट.
**जमीनबाब** (स्त्री.) जमिनीवरचा कर.
**जमेत** जमात पहा. [ अधिकारी.
**जमेदार** (अर. पु.) देशमुख, देशपांडे वगैरे
**जय** (सं. पु.) यश, सिद्धि; देवाच्या नांवाचा उच्चार करतांना किंवा त्याच्या कृपेची याचना करतांना त्याच्या नांवाला जोडून उच्चारण्याचा शब्द.
**जयगोपाळ** (सं. पु.) वंदनाचा गुजराथी लोकांचा शब्द; नमस्कार.
**जयघोष** (सं. पु.) जयाची किंवा दुसरी एखादी सुवार्ता ऐकून किंवा एखाद्या थोर पुरुषाच्या सन्मानार्थ पुष्कळांनीं मिळून केलेला मोठा हर्षध्वनि.
**जयजय, जयजयकार** (सं. पु.) जयघोष.
**जयजयवंती** (पु.) एक राग.
**जयंती** (सं. स्त्री.) अवतारी पुरुषांच्या जन्मदिवसाचा समारंभ.

**जयपत्र** (सं. न.) वादांत हरलेल्या पक्षानें हरल्याबद्दल देण्याची लेखी कबुली.
**जयमंगळ** (प्रा. वि.) शुभलक्षणी.
**जयविजय** (सं. पु.) वैकुंठ लोकचे विष्णूचे दोघे द्वारपाळ.
**जयस्तंभ** (सं. पु.) जयाचें स्मारक म्हणून रोविलेला खांब.
**जया** (सं. स्त्री.) तृतीया, अष्टमी व त्रयोदशी तिथि; भांग.
**जयी** (सं. त्रि.) जय मिळालेला; यशस्वी.
**जर** (सं. ज्वर पु.) ताप; तापामुळें तोंडापाशीं उठणाऱ्या बारिक पुटकुळया.
**जर** (फा. पु.) कलावतूनें विणलेलें वस्त्र.
**जर** (अ.) संकेतार्थी अव्यय.
**जरकरतां** (अ.) जर एखाद्या वेळीं, जर.
**जरंगा** (प्रा. पु.) पाण्यांत टाकण्याचें जाळें (ज्ञा० ७।८६).
**जरगूड** (न. ) आंब्याच्या कोयीभोंवतालचें तंतुमय वेष्टन; तंतूंचा समूह.
**जरजर** (प्रा. वि.) जीर्ण; (न.) जीर्ण वस्त्र (तुका० १९३८). [ निवर.
**जरठ, जरंड** (सं. जरठ त्रि.) म्हातारा;
**जरडी** (स्त्री.) वयोवृद्ध सवाष्ण.
**जरंडी** (प्रा. स्त्री.) पानथरी.
**जरतारी** (वि.) कलावतूचें.
**जरत्कारु** (सं. पु.) एका ऋषीचें नांव; कृश व अशक्त मनुष्य. [ रंगाचा.
**जरद** (अ.) जर्द पहा. (वि.) पिवळट
**जरदा** (फा. जरद पु.) खाण्याची तंबाखू.
**जरब** (अर. स्त्री.) दरारा; धास्ती, दहशत; (वि.) ज्यास्त, भारी; बंदूक, तोफ.
**जरबंद** (पु.) तापाचा मंत्र.
**जरबी** (वि.) भयंकर, जुलमी. [ वस्त्र.
**जरमिना** (अर. पु.) भरजरीचें मूल्यवान्
**जरा** (सं. स्त्री.) वार्धक्य; म्हातारपण; (अ.) क़ाहींसें, अल्पांशानें; थोडा वेळपर्यंत.
**जराक** (अ.) जरा; थोडेंसें. [ सामान.
**जराबाजरा** (पु. न.) सटरफटर; किरकोळ
**जरायुज** (सं. वि.) गर्भाशयापासून उत्पन्न झालेला.
**जरारा** (फा. वि.) फरारी.
**जरारी** (अर. वि.) सडेसोट, एकटा.
**जरासा** (वि.) थोडासा.
**जरियान** (फा. जरीन न.) सोन्याचे किरकोळ अलंकार; जवाहीर; भरजरी कापड. [ कलावतू.
**जरी** (फा. वि.) कलावतूचें; (स्त्री.)
**जरी** (अ.) यद्यपि. [ कांठाचें.
**जरीकांठी** (वि.) कलावतूनें विणलेल्या
**जरीदा** (फा. वि.) एकटा.
**जरीपटका** (हिं. पु.) पेशव्यांचें निशाण; भरजरी कमरपट्टा. [ मोजणीचें एक माप.
**जरीब** (अर. पु.) जमिनीची मोजणी;
**जरीबादली** (वि.) कलावतूच्या काड्या असलेलें वस्त्र.
**जरीबुटी** (स्त्री.) जुनें जरतारी वस्त्र जाळून निघालेली चांदी किंवा सोनें; गुप्त धन.
**जरीमरी** (स्त्री.) वाख्याची सांथ; तत्संबंधाची देवता.
**जरूर** (अर. अ.) अवश्य; (स्त्री.) गरज, आवश्यकता.
**जरूरी** (स्त्री.) आवश्यकता, गरज.
**जर्जर** (सं. वि.) जीर्ण; वृद्ध; पीडित.
**जर्द** (फा. अ.) अतिशय गहरा.
**जर्दा** जरदा पहा.
**जर्मनसिल्व्हर** (इं. न.) चांदीसारखी दिसणारी एक प्रकारचीं धातु.
**जऱ्ही** (प्रा. अ.) जरी.
**जल** (इं. न.) पाणी.
**जलक्रिया** (सं. स्त्री.) पितरांचें तर्पण.
**जलचर** (सं. पु.) पाण्यांत फिरणारा प्राणी.
**जलज** (सं. वि.) पाण्यापासून झालेला; (पु.) मेघ. ज० **घोष**—मेघगर्जना.
**जलतरंग** (सं. पु.) चिनी मातीच्या पेल्यांत पाणी घालून त्यांच्यांतून सप्तस्वर काढणारें वाद्य.
**जलतरण** (न.) पोहणें.
**जलताडन** (सं. न.) निष्फळ प्रयत्न.
**जलद** (फा. वि.) चपळ; (अ.) लवकर, त्वरेनें.

**जलद** (सं. पु.) मेघ.

**जलदगति**(वि.) जोरदार गतीचा(गोलंदाज).

**जलदी** (फा. स्त्री.) त्वरा, घाई.

**जलधि** (सं. पु.) समुद्र; अंकगणितांत-दहा शंकु अथवा एकावर १४ पूज्यें इतकी संख्या.

**जलमंदिर** (सं. न.) उष्णतेच्या काळांत जाऊन रहाण्यासाठीं तळयांत किंवा अन्य जलाशयांत बांधलेलें मंदिर.

**जलयंत्र** (सं. न.) रहाट; कारंजें.

**जलयात्रा** (सं. स्त्री.) जलप्रवास.

**जलविहार** (सं. पु.) जलक्रीडा.

**जलसमाधि** (सं. स्त्री.) संसारतापापासून सुटका करून घेण्यासाठीं स्वतःला पाण्यांत बुडवून घेणें. ही फक्त संन्याशांना व तीही प्रयागच्या गंगायमुनांच्या संगमांत शास्त्रविहित आहे.

**जलसा** (अर. पु.) बैठक; संमेलन.

**जलांजलि** (सं. स्त्री.) मृतांना उदक देणें.

**जलाभास** (सं. पु.) मृगजळ.

**जलाल** (अर. वि.) उग्र, तापट, तीक्ष्ण.

**जलाशय** (सं. पु.) पाण्याचा सांठा (तळें, डोह, विहीर इ०).

**जलुका** (सं. स्त्री.) जळू.

**जलोदर** (सं. न.) एका रोगाचें नांव.

**जल्प** (सं. पु.) शब्द; वाक्य; बडबड.

**जल्पना** (सं. स्त्री.) वटवट, बडबड; पोकळ बढाईच्या गोष्टी. [ बडबडणें.

**जल्पणें** (सं. क्रि.) पोकळ बढाया मारणें,

**जव** (सं. पु.) वेग; (सं. यव पु.) एक धान्य; सातू; जवाइतकें वजन; आंगठयाच्या मध्यावरील शुभदायक यवाकृति.

**जंव** (अ.) जोंपर्यंत, जेव्हां.

**जव** (फा. पु.) मगगटांतलें कंकण.

**जवट** (प्रा. न.) जोडपें; जुळें.

**जवखार** (सं. यवक्षार पु.) एका क्षाराचें नांव.

**जवंजार, जवंजाळ** (पु.) जंजाळ पहा.

**जंवट** (न.) मंडळी, समुदाय, टोळी.

**जवन** (वि.) वेगवान्.

**जवनीक** (सं. यवनिका स्त्री.) पडदा.

**जवरा** (सं. यमराज पु.) काळ; स्मशान; पिशाच्च.

**जंववर, जंववरी** (अ.) जोंपर्यंत.

**जवशी, जवस** (सं. अतसी स्त्री.) एका धान्याचें नांव; अळशी.

**जवळ** (अ.) नजीक, समीप, पाशीं. (न. ना.) वादळ, वादळी ढग.

**जवळचा** (वि.) नात्याचा, संबंधी.

**जवळजवळ** (अ.) बहुतेक, बहुतांशी; शेजारीं शेजारीं. [ प्रदेशांत.

**जवळपास** (अ.) जवळ, आसमंतांतल्या

**जवळला, जवळील** (वि.) निकट संबंधाचा.

**जवळिक, जवळीक** (प्रा. वि.) जवळ असणारें; (पु.) नातेवाईक, शेजार; हुजऱ्या, सेवक; (स्त्री.) निकटपणा, सान्निध्य. [ एक अलंकार.

**जवा** (सं. यु पु.) संगम, मेळ; (सं.यव पु.)

**जवाद, जवादा** (अर. ज्यादा वि.) अधिक श्रेष्ठ.

**जवादी** (प्रा. स्त्री.) कस्तूरी.

**जवादीपेर** (न.) काळा बोरू.

**जवान** (फा. वि.) तरुण बांड; (पु.) तरणाताठा माणूस.

**जवानमर्द** (फा. वि.) तरुण आणि शूर.

**जवानमर्दी** (फा. स्त्री.) पराक्रम, शौर्याचें कृत्य.

**जवानी** (फा. स्त्री.) तारुण्याचा भर.

**जवाब** जबाब पहा. [ दारी पहा.

**जवाबदार, जवाबदारी** जबाबदार, जबाब-

**जवार** (अर. स्त्री. न.) शहराजवळचीं गांवें; (अर. जवाहर न.) जवाहीर; (स्त्री.) ज्वारी. [ घोडी.

**जवारी** (हि. स्त्री.) ज्वारी, सतारीची

**जवाहीर** (अर. न.) मोलवान् रत्नें.

**जवाहीरखाना** (फा. पु.) रत्नशाला.

**जवी** (सं. वि.) वेगवान्, चपळ.

**जशन** (फा. पु. न.) समारंभ, उत्सव.

**जसन** (प्रा. न.) विनोद, मनोरंजक गोष्ट.

**जसला, जसा** (वि.) ज्या प्रकारचा.

**जसातसा** (अ.) मोठ्या कष्टानें.

**जस्त** (न. ना.) कथील व शिसें यांची मिश्र धातु.

नगर वाचनालय, सातारा.

**जहन, जहान** (फा. न.) जग; जनता; मनुष्यजात.
**जहन्नम** (पु.) नरक.
**जहर** (फा. न.) विष.
**जहरी** (फा. वि.) विषारी.
**जहागीर** जाहगीर पहा.
**जहाज** (फा. न.) तारूं, गलबत.
**जहान** (फा. स्त्री.) समुदाय, लोक, फौज.
**जहापन्हा** (फा. पु.) जगाचा रक्षणकर्ता; (राजाची एक पदवी.)
**जहांबाज** (स्त्री.) पक्की, हुशार.
**जहाल** (हिं. वि.) उग्र, जलाल, तिखट.
**जळ** (स्त्री.) जळून गेलेला भाग; भाड्याच्या वुडाशीं लागलेली करप किंवा मस.
**जळ** (स्त्री.) दोन फळ्यांचा सांधा झाकणारी रीप.
**जळ** (सं. जल न.) पाणी, उदक.
**जळकट, जळका** (वि.) थोडेंसें जळालेलें.
**जळजळ** (स्त्री.) दाह, आग. [संताप.
**जळजळाट** (पु.) अत्यंत मोठा दाह;
**जळण** (न.) सर्पण, इंधन. [फडणें.
**जळणें** (क्रि.) दहन होणें; पेटणें; तर-
**जळतघर** अतिशय हानिकारक गोष्ट; भांडण.
**जळतोंड्या** (वि.) दुर्दैवी.
**जळत्या घराचा पळता वासा** दिवाळें वाजलेल्या माणसाकडून परत मिळणारी अतिशय क्षुद्र रक्कम.
**जळप** (पु.) भयंकर उष्णता; त्वेष; भ्रम; स्वप्नांत दिसणाऱ्या गोष्टी; धातु वितळण्यांत होणारें नुकसान; जळ; व्यर्थ बडबड; कल्पना. [बडबडणें.
**जळपणें** (प्रा. क्रि.) रागावणें, तडफडणें,
**जळफळणें** (क्रि.) रागानें लाल होणें.
**जळंबट** (प्रा. न.) लाळ; खांकरा.
**जळमट** (न.) कोळिष्टकाचें सुतेरें; पिठांत फार दिवसांनीं कृमीच्या योगानें होणारे दोरे.
**जळमळणें** (प्रा. क्रि.) कांठोकांठ भरणें.
**जळमाणूस** (पु.) मत्स्यपुत्र; अतिशय लहान खुजा माणूस.
**जळवेकरी** (पु.) जळवा लावणारा.
**जळाऊ** (वि.) जाळण्यास योग्य.
**जळीत** (न.) जळ; धातु तापविण्यांत किंवा त्याचा रस काढण्यांत होणारें नुकसान.
**जळीतबाकी** (स्त्री.) कुळाकडे थकलेली रक्कम.
**जळू** (स्त्री.) एका रक्तशोषक जंतूचें नांव.
**जाइजणें** (प्रा. वि.) जाणारें, अशाश्वत.
**जाई** (सं. जाति स्त्री.) एक लता; तिचें फूल.
**जाईऊळ** (प्रा. न.) जाईचें फूल.
**जाउपें** (न.) जुळें मूल; लेंकरूं.
**जाउळ** (प्रा. न.) जाईचें फूल.
**जाऊ** (स्त्री.) दिराची वायको.
**जाकलि** (प्रा. अ.) ज्या काळीं.
**जाकळणें** (प्रा. स्त्री.) पोळणें, कळवळणें; मोह पावणें; व्यापणें (ज्ञा० १८।१७). ग्रासणें (ज्ञा० १४।६२).
**जाकिट** (इं. जॅकेट न.) बिनबाह्यांची वंडी.
**जाख** (स्त्री.) गवताच्या मुळाचे तंतु.
**जाखमाता** (प्रा. स्त्री.) क्षुद्र देवता.
**जाखाईजुखाई** (स्त्री.) क्षुद्र देवता.
**जाखीण** (सं. यक्षिणी स्त्री.) जखीण पहा.
**जाग** (स्त्री.) जागृति.
**जांग** जांघ पहा.
**जांगट** (प्रा. न.) घड्याळ; झेंगट.
**जांगड** (स्त्री.) परतबोलीचा माल, पसंत पडलें तर ठेवावयाचा नाहीं तर परत करावयाचा अशा करारानें आणिलेला माल; जोडणी; संबंध.
**जागणा** (प्रा. वि.) जागृत.
**जागणें** (सं. जागृ क्रि.) जागृत राहणें; सावध असणें; स्मरणें.
**जागता** (वि.) जागृत; सावध.
**जागतीजोत** (स्त्री.) तत्काळ फळ देणारी देवता किंवा मंत्र.
**जागर** (सं. पु.) जागणें; देवाच्या उद्देशानें निद्रा न घेतां जागत बसणें.
**जागरण** (सं. न.) जागर.
**जागरा** (वि.) जागा राहणारा.
**जागरूक** (सं. वि.) जागा; सावध.
**जागरें** (प्रा. न.) जागृति.
**जागल** (स्त्री.) जागरण; रात्रींचा पहारा; त्याबद्दल द्यावें लागणारें द्रव्य.

**जांगल** ( स्त्री. ) जोडणी.
**जांगला** ( वि. ) जंगली.
**जांगली** ( पु. ) गुराखी.
**जागल्या** (पु.) रात्रीं पाहरा करणारा.
**जागवणें** (प्रा. क्रि. ) समजणें; राखणें; जागरण करणें.
**जागविणें** ( क्रि. ) जागें राहणें; जागृत ठेवणें; जागें राहून काळ काढणें.
**जागसूद** ( वि. ) सावध, जागा.
**जागा** (वि.) जागृत, सावध; (स्त्री.) स्थळ; ठिकाण; नोकरी; आधार; स्वतःच.
**जागां, जागीं, जागें** (अ.) बद्दल.
**जागाईल, जागाईत** (पु.) जागल्या.
**जांगाड** (न.) जांघ, मांडी.
**जागृत** (सं. वि.) जागा, सावध.
**जागृति** (सं. स्त्री.) जागेपणा; चळवळ.
**जागृतस्थान** (सं. न.) जागतीजोत पहा.
**जागेश्वर** ( प्रा. पु. ) जागतीज्योत, आराध्य देवता.
**जागोवा** ( प्रा. पु. ) जागरण.
**जांघ** (सं. जंघा स्त्री) मांडी.
**जाच** (पु.) गांजणूक, त्रास, छळणूक.
**जाचणी** (स्त्री.) त्रास, छळ, जाच.
**जाचणें** (क्रि.) छळणें, त्रास देणें, नाडणें.
**जाजती** (अर. वि.) ज्यास्ती, आणखी.
**जाजम** (हिं. न.) बिछाईत; बिछाइती-साठीं तांवडया खारव्यास अस्तर लावून केलेलें वस्त्र.
**जा जा ये ये** (स्त्री.) खेपा.
**जाजावणें** (प्रा. क्रि.) त्रासणें; रागावणें (वामन० विराट० ७।१७०).
**जाजू** (प्रा. स्त्री.) वितंडवाद; आरोप, आळ (दा० २।२।२१).
**जाज्वल्य** (सं. वि.) प्रखर; तेजस्वी; कडकडीत.
**जाज्वल्यमान** (सं. वि.) जाज्वल्य पहा.
**जाट** (हिं. पु.) रजपुतांतल्या एका जातीचें नांव.
**जाटी** (स्त्री.) छाटी; चाबूक.
**जाठर** (सं. वि.) जठरासंबंधी.
**जाड** (वि.) लठ्ठ, दांडगा, मोठा, स्थूल; घट्ट; (प्रा. वि.) प्रौढ; (प्रा. न.) बळ; पचंग; थोर.
**जाडगेला** (वि.) लठ्ठसा.
**जाडय** (न.) वजन; औदासीन्य; जडत्व, अजीर्ण; सुस्ती; मंदपणा.
**जाडवीं** (न. अने.) वधूवरांच्या किंवा न्हाणवलीच्या पावलांवर काढावयाच्या कुंकवाच्या रेघा.
**जाडसर** (वि.) कांहींसा लठ्ठ.
**जाडा** (वि.) लठ्ठ, स्थूल; गहन; महान्; विद्वत्तापूर्ण.
**जाडाभरडा** (वि.) जाड सुती, भरभरीत.
**जाडी** (स्त्री.) जाडपणा; (वि.) जाड.
**जाडेला** (वि.) लठ्ठचा.
**जाण** (वि.) ज्ञाता, जाणणारा; (स्त्री.) ओळख; गुणज्ञता; प्रत्युपकार.
**जाणणें** (क्रि.) समजणें, ओळखणें, माहीत असणें.
**जाणता** (वि.) जाणणारा; शहाणा; परीक्षा करणारा.
**जाणती** (प्रा. स्त्री.) बुद्धि.
**जाणवणी** (प्रा. स्त्री.) सूचना, इषारा.
**जाणवसा** (प्रा. पु.) वस्ती.
**जाणविणें** (क्रि.) समजण्यास लावणें; परिणाम करणें.
**जाणसळ, जाणसाल** (स्त्री.) माहिती, जानपछान; (वि.) चतुर, शहाणा.
**जाणिजे** समजावें कीं इ०; जाहीर करतों कीं इ०. [ मनुष्य.
**जाणी** (सं. ज्ञानी पु.) शहाणा किंवा ज्ञानी
**जाणीव** (स्त्री.) जाणण्याची शक्ति, ज्ञान; बुद्धि.
**जाणूं** (अ.) जणूं काय.
**जाणूनबुजून** (अ.) मुद्दाम, जाणत असतां; उघडया डोळयांनीं.
**जाणें** (क्रि.) गमन करणें; नष्ट होणें; लोटणें (काळ); चुकणें; वजा होणें; विझणें इ०.
**जाणों** (अ.) जणूं काय.
**जाणोपरी** (अ.) पाहण्यांत, देखत.
**जात** (सं. स्त्री.) ज्ञाति; समाज; समुदाय; प्रकार,तऱ्हा, (वि.) जन्मलेला; स्वतः.

**जातक** (सं. न.) जन्मकाळाच्या ग्रहांच्या स्थितीवरून माणसाच्या आयुष्यांत घडणाऱ्या शुभाशुभ गोष्टींविषयींचें वर्णन करणारा ज्योतिषशास्त्राचा एक विषय.

**जातकर्म** (सं. न.) १६ संस्कारांपैकीं एक संस्कार.

**जातखेवो** (प्रा. अ.) जातांच.

**जातगंगा** (सं. स्त्री.) सगळी जात.

**जातगोत** (न.) जातीचे सगळे लोक.

**जांतण** (न.) जातें.

**जांतणी** (स्त्री.) मोठें जातें.

**जातपत्र** (न.) स्वतः लिहून दिलेला करार.

**जातपात** (स्त्री.) जाति, कुळी इ०

**जातपाटील** (पु.) जातीनें नेमून दिलेला मुख्य अम्मलदार.

**जातमुचलका** (पु.) मी अमुक गोष्ट करीन किंवा करणार नाहीं असा मॅजिस्ट्रेट-पुढें लिहून दिलेला करारनामा.

**जातलग** (वि.) उच्च जातीचा.

**जातवेद** (सं. पु. ना.) अग्नि.

**जातसरंजाम** (पु.) लष्करी चाकरीबद्दल स्वतःचा पगार म्हणून झालेला ठराव; स्वतः चाकरी केली पाहिजे अशा करारावर मिळालेला सरंजाम.

**जाति** (सं. स्त्री.) वर्ण, प्रकार, वर्ग; मात्रावृत्त.

**जातिपरंपरा** (स्त्री.) वंश.

**जातिभ्रष्ट** (सं. वि.) जातीनें वाळींत टाकलेला. [दानीचा; घरंदाज.

**जातिवंत** (वि.) उच्च जातीचा; खान-

**जातिस्वभाव** (सं. पु. ना.) जन्मस्वभाव.

**जाती** (स्त्री.) जाई–वेल व फूल.

**जातीनें** (अ.) स्वतः, खुद्द.

**जातीपुती** (स्त्री.) कुळी.

**जातीफळ** (प्रा. न.) जायफळ.

**जातीय** (सं. वि.) जातीचा.

**जातें** (न.) घट्टी; दळण्यासाठीं दगडाच्या दोन वर्तुळाकार शिळा एकमेकींवर घर्षण करतील अशी योजना असलेलें यंत्र.

**जात्या** (अ.) स्वभावानें.

**जाथू** (वि.) फार दिवसांची; (अ.) कायम.

**जादा** (अर. वि.) अधिक; विशेष.

**जादू** (फा. स्त्री.) चेटूक, इंद्रजाल, जारण-मारण. [करणारा.

**जादूगर, जादूगार, जादूगीर** (पु.) जादू

**जादूटोणा** (पु.) मंत्रतंत्र, जादू इ०

**जान** (फा. पु.) जीव.

**जानपछान** (हिं. स्त्री.) ओळखदेख.

**जानवसा** (सं. जनवासि पु.) परगांवाहून आलेल्या वधू किंवा वर पक्षाकडच्या मंडळीस उतरण्यासाठीं दिलेली जागा.

**जानवें** (न.) यज्ञोपवीत.

**जानी** (स्त्री.) गाय; वासरूं; मुरळी; (फा. वि.) अतिनिकट, जिवलग.

**जानु** (पु.) गुडघा. [पहिला महिना.

**जानेवारी** (इं. पु. ना.) इंग्रजी वर्षाचा

**जानोसा-जान (नि) वसा** (पु.) वधू किंवा वर यांचें आप्तांसह एकाद्या गांवांत उतरणें; वराचें किंवा वधूचें स्थळ.

**जान्हवी** (सं. स्त्री.) गंगानदी.

**जाप** (प्रा. न.) प्रत्युत्तर.

**जापणें** (क्रि.) जाब देणें, म्हणणें.

**जापाणणें** (प्रा. क्रि.) आच्छादणें; अप-मान करणें; आटोपणें.

**जापारणें** (क्रि.) प्रत्युत्तर करणें.

**जाप्यक** (सं. जापक पु.) जप करणारा.

**जाफत, जियाफत** (अर. स्त्री.) आतिथ्य; मेजवानी.

**जाफरणें** (क्रि.) रागानें चरफडणें, आदळ-आपट करणें.

**जाफरा** (अर. पु.) केशर.

**जाफराबादी** (वि.) जाफराबाद गांवची (म्हैस).

**जाफा** (अर. वि.) ज्यास्त, अधिक.

**जांब** (सं. जंबु पु.) पेरू; (फा. जाम पु.) पेला.

**जाब** (फा. पु.) जबाब, उत्तर; म्हणणें; (अर. पु.) हुंडी हरवली असतां ती पुनः लिहून घेणें.

**जाबता** (अर. पु.) कायदा; अधिकारपत्र; अंमल; देखरेख; संरक्षणार्थ असलेले शिपाई, पहारा; यादी; मालाची मागणी; मोजलेल्या जमिनीचा तुकडा.

**जाबसाल** (फा. जवाबसवाल) प्रश्नोत्तरें.
**जाबसाली** (हिं. जवाबसवाली वि.) ज्या संबधानें प्रश्न विचारले जाण्याचा व उत्तरें देण्याचा प्रसंग असे अर्थात् महत्वाचे कागद.
**जांबळा** (सं. जंबूल वि.) जांबळाच्या रंगाचा.
**जांबळी** (स्त्री.) जांबळाचें झाड.
**जाबाड** (न.) जाभाड, तोंडाचे वरचा व खालचा असे दोन भाग.
**जांबुवंत** (सं. जांबुवत् पु.) रामचंद्राच्या सैन्यांतला एक वृद्ध अस्वल; वृद्ध कपि.
**जांबूळ** (सं. जंबूल न.) एक प्रकारचें फळ.
**जांभई, जांभळी** (हिं. स्त्री.) तोंड वासणें.
**जाभाड, जाभाडें** (हिं. पु.) जभडा, तोंड.
**जाम** (फा. पु.) पेला.
**जामगी** (फा. स्त्री.) तोफ डागण्याची वत्ती.
**जामदानी** (फा. स्त्री.) फुलदार वस्त्र.
**जामदार** (फा. पु.) खजीनदार; पोषाख संभाळणारा मनुष्य.
**जामदारखाना** (फा. पु.) जवाहीरखाना; खजिना; पोषाख ठेवण्याची जागा.
**जामा** (फा. पु.) पायघोळ अंगरखा.
**जामात, जामाता** (सं. जामातृ पु.) जांवई.
**जामानिमा** (फा. पु.) पोषाख.
**जामीन** (अर. पु.) हमी, ओळख देणारा; निसटलेल्या खांबास दिलेला आधार. **जा० कतबा** (पु.) जामीनपत्र.
**जामीनकी, जामीनगत** (स्त्री.) हमी.
**जामीनसांखळी** (स्त्री.) गांवांतल्या लोकांनीं परस्परांना जामीन राहणें.
**जामून** (प्रा. वि.) अति ठेंगणें.
**जाय** (क्रि.) पाहिजे.
**जाजगण, जायजाणा** (वि.) दुसऱ्यापासून चार दिवस उसना मागून आणिलेला.
**जायजिणें** (प्रा. वि.) अशाश्वत.
**जायदाते** (अर. जायदाद पु. अने.) सनदी.
**जायदाद** (फा. स्त्री.) जागा, नेमणूक; उत्पन्न; इस्टेट, मालमत्ता; सैन्याच्या वगैरे खर्चासाठीं तहाहयात लावून दिलेलें जागेचें उत्पन्न.
**जायपत्री** (सं. स्त्री.) जायफळावरची साल.
**जायफळ** (सं. न.) एक प्रकारचें फळ.
**जायबंदी** (अर. फा. वि.) दुखावलेला; निरुपयोगी झालेला.
**जायलेणें** (न.) परत करावयाच्या बोलीनें आणलेले दागिने.
**जाया** (सं. स्त्री.) पत्नी, बायको.
**जायां** (वि.) जायबंदी, निरुपयोगी झालेला.
**जायाचें** (प्रा. वि.) जाणारें, उसनें आणिलेलें.
**जायापती** (सं. पु.) दांपत्य, नवराबायको.
**जाये** (स्त्री.) निष्कारण येरझारा.
**जार** (सं. पु.) परस्त्रीशीं संग करणारा, यार.
**जार** (सं. जरायु पु.) प्रसूतीनंतर निघणारी वार; खोळ; तान्ह्या मुलाच्या तोंडांतला दुधाचा फेस किंवा ओठावरची अत्यंत कोमल त्वचा; समुद्रकांठचा फेस; त्रस्त.
**जारकर्म** (सं. न.) वदफैली. [ अनौरस.
**जारज** (सं. वि.) जारापासून झालेला;
**जारटणें** (क्रि.) कडक होणें; आक्रसणें.
**जारण** (सं. न.) वैद्यकांत–धातूचें भस्म करणें; जादूटोणा.
**जारणमारण** (सं. न.) शत्रूला वेड लागावें किंवा मरण यावें वगैरेसाठीं केलेला मंत्रप्रयोग.
**जारिणी, जारीण** (सं. स्त्री.) व्यभिचारिणी स्त्री. [झपाट्यानें.
**जारी** (अर. वि.) चालू, सुरू; (अ.)
**जारीण** (सं. जारिणी स्त्री.) जारकर्म करणारी स्त्री.
**जाल** (सं. न.) जाळें; समुदाय.
**जालंदर** (पु.) गोसाव्यांचा एक पंथ.
**जालंदाज** (पु.) युक्तीनें शत्रूला जाळ्यांत धरणारा; कपटी.
**जालंधर** (प्रा. पु. न.) झरोका.
**जालीम** (अर. वि.) जलाल, उग्र, प्रखर.
**जालें** (प्रा. न.) उत्पत्ति, जन्म.
**जावई, जांवई** (सं. जामातृ पु.) जामात; मुलीचा नवरा.
**जावईशोध** (पु. न.) चुकीनें घातलेला शोध; मूळचें बरोबर असतां त्यांत अज्ञानानें घुसडविलेली चूक.

**जावक** (हिं. वि.) बाहेर जाणारें.
**जावड, जावडीं** जाडवीं पहा.
**जावत्काळ, जावत्** (अ.) जोंपर्यंत.
**जावपें** (न.) वासरूं; पारडूं.
**जावयाची कीड** जावयाविषयींची लडिवाळपणाची संज्ञा. [ आयात माल.
**जावर्दा, आवर्दा** (अर. पु.) निर्गत आणि
**जावळ** (न.) लहान मुलाच्या डोक्यावरले मूळचे केस.
**जावळा** (सं. यमल पु.) जुळा.
**जावळिया** (पु.) शेजारीपाजारी.
**जावळी** (प्रा. स्त्री.) भावंड; सोबती; बरोबरी, सादृश्य; शेजार.
**जावळें** (न.) जुळें मूल.
**जावा** (पु.) जाणें.
**जावाई** (सं. जामाता पु.) जांवई.
**जावानिर्णें** (प्रा. वि.) नामांकित.
**जावायेवा** (पु.) जाणें येणें.
**जावू, जाऊ** (स्त्री.) पतीच्या भावाची किंवा दिराची वायको.
**जासूद** (अर. पु.) हलकारा; निरोप्या; पत्रें पोंचविणारा.
**जासुदी** (वि.) जासुदाची.
**जास्त** (अर. वि.) अधिक. [ अधिक.
**जास्ती** (अर. स्त्री.) जुलूम, जोर; (वि.)
**जाश्वनीळ** (पु.) शंकर.
**जास्वंद** (न.) एक प्रकारचें फूल.
**जाहगीर** (फा. स्त्री.) सरकारांतून फौजखर्चासाठीं, इतमामासाठीं किंवा इनाम धर्मदाय म्हणून दिला गेलेला मुलूख किंवा गांव.
**जहागीरदार** (फा. पु.) ज्यास जहागीर मिळालेली आहे तो.
**जाहंबाज** (फा. जानबाज .वि.) पक्का, वस्ताद, हुशार.
**जाहली** (हिं. स्त्री.) उग्रपणा; तिखटपणा; प्रखरपणा; त्वरा, घाई.
**जाहाती** (प्रा. वि.) जुलमी. [ जाहीरनामा.
**जाहिरात** (अर. स्त्री.) प्रसिद्धिपत्रक;
**जाहिराणा** (पु.) प्रसिद्धि, उघडीक.
**जाहिरदारी** (हिं. स्त्री.) प्रसिद्धि.
**जाहीर** (वि.) सर्वश्रुत, प्रसिद्ध.

**जाहीरनामा** (फा. पु.) प्रसिद्धिपत्रक.
**जाळ** (सं. ज्वाला पु.) ज्वाला; ज्वर; (सं. जालन.) जाळें, समुदाय.
**जाळगा** (वि) हट्टी, दुराग्रही.
**जाळण** (न.) सर्पण, इंधन.
**जाळणें** (सं. ज्वल् क्रि.) दहन करणें; त्रास देणें; तिरस्कार्य म्हणून फेकून देणें; नीच उपायांनीं (पोट) भरणें.
**जाळपुळी** (स्त्री.) एक त्वचारोग.
**जाळपोळ** (स्त्री.) जाळणें वगैरे प्रकारांनीं केलेली नासाडी.
**जाळाऊ** (वि.) जाळण्यास योग्य.
**जाळितें** (प्रा. न.) ज्ञान.
**जाळी** (सं. जाल स्त्री.) खिडकी, झरोका; छिद्रें ठेवलेलें विणकाम; फुलांची विशेष प्रकारची रचना; झाडांची गर्दी; भोंवऱ्याभोंवतीं गुंडाळण्याची दोरी.
**जाळीदार** (वि.) जाळी असलेलें.
**जाळीव** (वि.) जळाऊ.
**जाळें** (सं. जाल न.) मासे वगैरे धरण्याची गुंफणी; पाश; जळमट; कोळ्यानें तंतूंचें बनविलेलें घर.
**जिऊ** (सं. जीव पु.) जीव, प्राण; प्राणी.
**जिकडचा** (वि.) ज्या बाजूचा किंवा दिशेचा.
**जिकडील** (वि.) जिकडचा.
**जिकडून तिकडून** (अ.) सर्व बाजूंनीं.
**जिकडे** (अ.) ज्या बाजूस. **जि० तिकडे**— सर्वत्र.
**जिंकणें** (क्रि.) दुसऱ्याचा पराजय करणें; वादाचा निकाल आपल्या सारखा करून घेणें.
**जिंकणी, जिंकणूक** (स्त्री.) जिंकणें.
**जिंकणें** (सं. जि क्रि.) दुसऱ्याचा पाडाव करणें; यश मिळविणें; श्रेष्ठता संपादणें.
**जिकीर** (अर. स्त्री.) कटकट, घासाघीस; मेटाकुटीची किंवा निरुपायाची स्थिति.
**जिक्क** (अर. जिक वि.) कंटाळलेला.
**जिगजिग** (स्त्री.) कटकट; त्रास; परिश्रम; खटपट; (वि. ) जर्जर.
**जिगर** (फा. पु.) हृदय; प्राण.
**जिगीषा** (सं. स्त्री.) जिंकण्याची इच्छा; महत्वाकांक्षा, आकांक्षा.

**जिगीषु** (सं. वि.) जिंकण्याची इच्छा करणारा.
**जिजी** (स्त्री.) वडील बहीण.
**जिणणें** (प्रा.क्रि.) जिंकणें (तुका० १०११).
**जिणतें** (प्रा. वि.) जिंकणारें.
**जिणी** (स्त्री.) जन्माची सफलता; जीवन.
**जिणें** (सं. जीवन न.) जीवन, जन्म; (क्रि.) वांचणें, जगणें; जिंकणें.
**जित** (सं. वि.) पराभव पावलेला; जिंकलेला; (प्रा. वि.) जिवंत.
**जितका** (वि.) जेवढा.
**जितका, जितुला** (वि.) जितका.
**जितक्यास तितका** वेताल्वा.
**जितखोर** (फा. जिद्दखोर वि.) जिद्द पहा.
**जितणें, जितणें** (क्रि.) जिंकणें.
**जितपत** (वि.) जेवढा.
**जित(रा)रब** (न.) उभें पीक; गुरेंढोरें इ०
**जितवणी** (न.) वाहतें पाणी; जीवनोपाय.
**जिता** (वि.) जिवंत. **जि०जीव** (पु.) जिवंत प्राणी.
**जिताड** (स्त्री.) जळून गेलेल्या झाडांतलें एखाद दुसरें जिवंत झाड.
**जिताडा** (पु.) उन्हाळयांतल्या ओल्या जमिनीवर उगवलेलें हिरवें गवत.
**जितारणें** (प्रा. न.) निंवलोण (ज्ञा० १३।३३७); जीवन (ज्ञा० ११।६६६).
**जिती** (स्त्री.) वाढती दशा.
**जितुला** (वि.) जेवढा.
**जितेंद्रिय** (सं. वि.) ज्यानें आपलीं इंद्रियें जिंकलीं आहेत असा; संयमी.
**जियला** (वि.) जेथील.
**जिद** (स्त्री.) जिकीर.
**जिंद** (फा. पु.) मेलेल्या मुसलमानाचें पिशाच्च; दुष्ट मनुष्य.
**जिंदगी** (फा. स्त्री.) मालमिळकत, इस्टेट.
**जिद्द** (अर. जिद पु.) हट्ट.
**जिद्दखोर** (वि.) हट्टी, दुराग्रही, भांडखोर.
**जिन** (सं. पु.) जितेंद्रिय; जैनधर्मी साधु; कापूस तोडण्याचें यंत्र; कारखाना; समंध.
**जिनगर** (फा. पु.) खोगीर तयार करणारा; चित्रें, वाहुल्या इ० करणारा.
**जिनगाणी, जिनगानी, जिनगी** (फा. जिंदगानी, जिंदगी स्त्री.) जिणें, जीवन; निर्वाहाचें साधन.
**जिनसखाना** (पु.) कोठार. [अधिकारी.
**जिनसीवाले** (फा. पु.) तोफखान्यावरील
**जिनसीसामान** (न.) तोफखान्याचें सामान.
**जिना** (फा. पु.) सोपान, पायऱ्यांचा मार्ग, दादर.
**जिन्नस** (अर. स्त्री.) वस्तु, पदार्थ.
**जिन्नसी** (वि.) मालाच्या वाहतुकीचें (जहाज).
**जिबूड** (न.) चिबूड पहा.
**जिभई** (स्त्री.) मागावर वाणा ताठ बसविण्याची पट्टी.
**जिभली, जिभळी** (स्त्री.) लहान जीभ.
**जिभाळी** (स्त्री.) नखाखालची अतिशय नाजुक कातडी.
**जिमखाना** (इं. पु.) व्यायामशाळा. [दारी.
**जिम्मा** (अर. पु. स्त्री.) पतकरलेली जबाब-
**जिम्मेदार** (फा. वि.) हमी घेणारा.
**जियालें** (प्रा. न.) जीवित, जिणें.
**जिरगा** (फा. पु.) पुढाऱ्यांची किंवा मतदारांची सभा; तांदुळांतील एक प्रकार.
**जिरणें** (क्रि.) पचणें; मुरणें; नाहींसें होणें.
**जिरमाणीस पडणें** मानवणें.
**जिरवण** (न.) पाचक औषध.
**जिरवणी** (स्त्री.) पाचक औषध; केलेला अपराध पचविण्यासाठीं पुढें केलेली सबब.
**जिरवाजिरव** (स्त्री.) आंतल्या आंत दाबून टाकणें, बाहेर फुटूं न देणें.
**जिरविणें** (क्रि.) आंत शोषिलें जाईल असें करणें; पचविणें.
**जिरा** (फा. जिराह पु.) लोखंडाचें कडें.
**जिराईत** (अर. वि.) शेतीच्या कामाची; पावसाच्या पाण्यावर होणारें (पीक).
**जिरातखाना** (फा. पु.) धान्यांचें कोठार.
**जिराफ** (पु.) आफ्रिकेंतील एक प्राणी.
**जिराह** (फा. पु.) कवच; चिलखत.
**जिरें** (फा. जिराह न.) चिलखत.
**जिरें** (सं. जीर न.) मसाल्यांतील एक स्वादिष्ठ पदार्थ.

**जिरेगार** (फा. पु.) चिलखत तयार करणारा.
**जिरेटोप** (फा. पु.) शिरस्त्राण. [ जात.
**जिरेळ, जिरेळी** (स्त्री.) केळ्यांची एक
**जिलकाद** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा ११ वा महिना.
**जिलबी, जिलिबी** (हिं.स्त्री.) एक पक्वान्न.
**जिलीद** (फा. न.) बांधीव पुस्तक.
**जिलीब** (अर. स्त्री.) लवाजमा.
**जिलेबंत** (वि.) चकचकीत, प्रकाशमान.
**जिल्हई** (अर. स्त्री.) तकाकी, पॉलिश.
**जिल्हा** (अर. पु.) परगणा; प्रांताचा एक भाग; करारनामा; गायनांतला एक मिश्र राग. [ बारावा महिना.
**जिल्हेज** (फा. पु.) मुसलमानी धर्माचा
**जिवट** (वि.) वळकट, दृढ, उत्पादक.
**जिवडा** (पु.) जीव, जंतु. [ मुख.
**जिवणी, जेवणी** (स्त्री.) मनुष्याचें तोंड,
**जिवंत** (वि.) जीव असलेला.
**जिवंत हत्यार** (न.) खात्रीनें काम करणारें शस्त्र.
**जिवती, जिवंतिका** (सं. स्त्री.) एक देवता; तिची प्रतिमा.
**जिवलग** (वि.) प्रिय; जिव्हाळयाचा, जिवाचा.
**जिवविणें** (क्रि.) जिवंत करणें.
**जिवस** (वि.) जिवट पहा.
**जिवसा** (वि.) जिवलग, जिव्हाळयाचा.
**जिवा** (पु.) जिवंत.
**जियाचा** (वि.) जिवासंबंधाचा; जिवलग.
**जिवाणू, जिवाणें** (न.) क्षुद्र जीव; सर्पाच्या जातीचा प्राणी.
**जिवापाड** (अ.) जिवाला अतिशय कष्ट देऊन; शक्तीबाहेर.
**जिवाभ्यासानें** (अ.) अगदीं मनापासून.
**जिवाविशेष** (अ.) शक्तीच्या पलीकडे.
**जिवासांड** (वि.) जिवाला धोका आणण्याइतकें.
**जिवाळे** (प्रा. वि.) सजीव (अमृ०७।३६).
**जिव्हा** (सं.स्त्री.) जीभ. [ काळीज; जीवन.
**जिव्हार** (प्रा. न.) मर्म, अंतःकरण;
**जिव्हाळा** (सं. जीवालय पु.) अंतःकरण; मर्म; जिवंत झरा (तुका० २४४२); माया, ममता.
**जिव्हाळी** (स्त्री.) जिभाळी पहा.
**जिष्णु** (सं. वि.) सदा विजयी; जिंकू इच्छिणारा; (पु. ना.) इंद्र, अर्जुन.
**जिज्ञासा** (सं. स्त्री.) जाणण्याची इच्छा.
**जिज्ञासु** (सं. वि.) जाणण्यास उत्सुक.
**जी** (अ.) हाकेस उत्तर देण्याचा एक प्रकार; नांवापुढें आदरार्थी लावावयाचा प्रत्यय–जसें गणपतरावजी.
**जीत** (सं. जित स्त्री.) जय, सरशी; (वि.) जिवंत.
**जीन** (फा. न.) खोगीर, पलाण; (सं. जीर्ण वि.) वृद्ध..
**जीनबंदी** (फा. स्त्री.) खोगीर चढविणें.
**जीभ** (सं. जिव्हा स्त्री.) जिव्हा; **जीभ चावणें**–संकोच धरून बोलणें; **जीभ पाघळणें**–अनियंत्रितपणें बोलून जाणें; **जीभ लांब करून बोलणें**–उर्मटपणानें बोलणें; **जिभेला हाड नसणें**––अमर्याद–पणानें बोलणें.
**जीमूत** (सं. पु.) मेघ, ढग.
**जीय** (प्रा. पु.) जीव.
**जीर** (फा. ) जंजीर; लहान साखळी.
**जीर्ण** (सं. वि.) जुनें पुराणें, फाटकें; जिरलेलें, पचलेलें.
**जीर्णोद्धार** (सं. पु.) जीर्ण झालेली मूर्ति किंवा देऊळ काढून तेथें नवें बांधणें, किंवा जुन्याची दुरुस्ती करणें.
**जीव** (सं. पु.) चैतन्य, प्राण; प्राणी; जंतु; ध्यान; मन; सत्त्व, सार, राम; अर्थ. **अर्धा जीव होणें**––कष्ट, काळजी इ० मुळें जर्जर होणें; **जिवाला खाणें**––झुरणें, पश्चात्ताप पावणें; **जीव अटविणें**—त्रासविणें; **जीव टांगणीला लागणें**––काळजी वाटणें; **जीव खालीं पडणें**––काळजी दूर होऊन जिवाला स्वस्थता वाटणें; **जीव टाकणें**–– अतिशय धडपड करणें; **जीव तोडून काम करणें**—अतिशय कष्ट करणें; **जीव थोडा थोडा होणें**—जिवाला अस्वस्थता वाटणें; **जीव देणें**––

आत्महत्या करणें; **एखाद्यावर जीव बसणें**—तो त्याला फार आवडणें; **जीव मुठींत धरून**—मन घट्ट करून; **जिवांत जीव आहे तोंपर्यंत**—जन्मभर; **जिवाचा धडा करणें**—हिय्या करणें; मनाचा निश्चय करणें; **जिवावर उदार होणें**—जिवाची पर्वा न करणें; **जिवावर येणें**—संकट वाटणें.

**जीवकळा** (सं. स्त्री.) जिवंत माणसाच्या तोंडावरचें तेज.

**जीवकोश** (सं. पु.) शरीर, आत्म्याचें आवरण. [ फार लोचट.

**जीवघेणा** (वि.) अतिशय त्रास देणारा;

**जीवजंतु** (सं. पु.) क्षुद्र प्राणी.

**जीवंतिका** (सं. स्त्री.) जिवती; एक देवता.

**जीवदान देणें** मृत्यूपासून वांचविणें.

**जीवन** (सं. न.) प्राणधारणा, तिचें साधन (पाणी, अन्न इ).

**जीवन्मुक्त** (सं. वि.) जिवंत असतांच ज्ञानाच्या योगानें देहाभिमान सुटून मुक्त झालेला. [ शब्द.

**जीवश्चकंठश्च** अतिशय दृढ मैत्रीचा सूचक

**जीवात्मा** (सं. पु.) देहाभिमानी आत्मा.

**जीवाद्धारभ्य** (अ.) सर्व बळ खर्चून.

**जीवाभावाचा** अत्यंत प्रिय.

**जीवाभावानें, जिवें भावें** अगदीं मनापासून. [ साधन.

**जीविका** (सं. स्त्री.) निर्वाह; निर्वाहाचें

**जीवित** (सं. न.) प्राणधारणा, जीवन, अस्तित्व.

**जीवित्व** (सं. जीवित न.) जीव, प्राण.

**जीवी** (समासांत उत्तरपदीं वि.) वर निर्वाह करणारा.

**जुई** (सं. यूथिका स्त्री.) एक पुष्पलता.

**जुकड, जुखड** (सं. युग न.) जूं, जोखड.

**जुकविणें** (क्रि.) फसविणें; युक्तीनें टाळणें (होना० पृ० ७६).

**जुकाड** (न.) जूं.

**जुकाम** (न.) थंडी, पडसें.

**जुखेळ** (पु.) जुगार, द्यूत. [ जोडी.

**जुग** (सं. युग न.) युग; (सं. युग्मन्) जुळें,

**जुगणी** (स्त्री.) छातीवरचें पदक.

**जुगणें** (सं. युज् क्रि.) जुळणें, एकत्र येणें.

**जुगत** (सं. युक्ति स्त्री.) युक्ति, शकल.

**जुगदान** (न.) कागद वगैरे ठेवण्याची पिशवी. [ मिलाफ करणें.

**जुगविणें** (सं. युज् क्रि.) जोडणें, जुळविणें;

**जुंगा** (वि.) निपुण, निष्णात.

**जुंगाड** (वि.) भव्य (पुरुष, रेडा, सर्प इ०)

**जुगांत** (प्रा. न.) घनघोर युद्ध.

**जुगार** (पोर्तु. जोगार स्त्री.) जुव्वा, पैसे लावून खेळणें.

**जुगारी** (वि.) जुव्वेबाज, जुगार खेळणारी.

**जुजवी** (अर. वि.) किरकोळ, हलकें; लहान; (अ.) बेतावेतानें, हळू हळू.

**जुंज, जुंझ** (सं. युद्ध स्त्री.) झुंज, युद्ध.

**जुंजार, जुंझार** (वि.) युद्धकर्मांत निष्णात, लढवय्या.

**जुजुत्सु** (पु.) जपानमधील एका प्रसिद्ध खेळाचें नांव.

**जुटणें** (सं. यूथ क्रि.) जुळणें.

**जुटी** (स्त्री.) जूट, एकी, ऐक्य.

**जुडगा** (पु.), **जुडगें** (न.) समुदाय, बंडल.

**जुडणी** (स्त्री.) सांधणी, समुदाय, जोडणें.

**जुडणें** (क्रि.) जुळणें, जडणें, घडणें.

**जुडा** (पु.), **जुडी** (स्त्री.) जुडगा, समुदाय.

**जुडी** (स्त्री.) सरकारी नोकराला त्याच्या चाकरीबद्दल दिलेली इनाम जमीन; जुडगें, पेंढी.

**जुतणें** (प्रा. क्रि.) जुंपणें.

**जुतरी, जुंत्री** (स्त्री.) ओहोळ.

**जुतें** (न.) जोडे, वाहन, पादुका.

**जुत्पति** (सं. युद्धपति पु.) मोठा योद्धा.

**जुंती** (प्रा. स्त्री.) जुंपणी (तुका० ८८).

**जुदा** (फा. वि.) निराळा, अलग.

**जुदाई** (स्त्री.) निराळेपणा, वेगळीक.

**जुनट** (फा. वि.) जुना, अनुभविक.

**जुनवत** (स्त्री.) जुनीं पानें. [ प्राचीन.

**जुन, जुनाट** (सं. जीर्ण वि.) पुराणा,

**जुनापाना** (वि.) जुना.

**जुनेरें** (न.) जुनें वस्त्र.

**जुपणें** (क्रि.) जोडणें, रचणें, कामास लावणें; (न.) जूं.

**जुबा** (अर. पु.) पायघोळ झगा.

**जुंबाड** (पु. न.), **जुंबाडें** (न.) जुडगा; टोळी; दाटी, समुदाय.
**जुभा** (हिं. स्त्री.) कफनी (एक० ३३४६).
**जुमला** (अर. पु.) रक्कम, रोकड; एकंदर रक्कम; सवाशें घोडेस्वारांची पलटण.
**जुमलेदार** (फा. पु.) जुमल्याचा जमाखर्च ठेवणारा, हिशेबी अधिकारी.
**जुमानणें** (फा. क्रि.) मानणें, भिणें.
**जुम्मा** (पु.) शुक्रवार (मुसलमानी).
**जुमारत** (हिं. जुमेरात स्त्री.) गुरुवार.
**जुयटें** (न.) नदीच्या पात्रांतला उघडा पडलेला लहानसा भाग. [ मकी.
**जुरत** (अर. स्त्री.) धिटाई; आवेश; मर्दु-
**जुरतदार, जुरती, जुरा** (अर. वि.) प्रतापवान्; धैर्यशाली; कुर्रेबाज.
**जुर्माना** (अर. पु.) दंड, शिक्षा.
**जुलमाचा रामराम** केवळ बलात्कारामुळें केलेलें काम. [ प्रजापीडक.
**जुलमी** (अर. वि.) जुलूम करणारा,
**जुलाब** (फा.) रेचक, ढाळक, ढाळ.
**जुलूम** (अर. पु.) जबरदस्ती, प्रजापीडन, बलात्कार; अतिशयपणा.
**जुलूस** (अर. जलूष वि.) वजनदार.
**जुलूस** (फा. पु.) सिंहासनारूढ होणें; डामडौल, भपका; मिरवणूक; समारंभ.
**जुलै** (इं. पु. ना.) इंग्रजी वर्षाचा सातवा महिना.
**जुवा** (सं. पु.) सांधा; कडी; फासा.
**जुवा** (हिं. पु.) जुगार.
**जुवाड** (न.) लहान जूं.
**जुवामर्दी** जवामर्दी पहा.
**जुवार, जुंबार** (प्रा. स्त्री.) जुगार.
**जुवारी** (प्रा. पु.) जुगार खेळणारा.
**जुवारी** (हिं. स्त्री.) ज्वारी, जोंधळा.
**जुवें** (न.) नदीच्या पात्रांतलें बेट.
**जुवेबाज** (हिं. वि.) जुगार खेळणारा.
**जुवेबाजी** (हिं. स्त्री.) जुगार खेळण्याचा नाद.
**जुळणी** (स्त्री.) मेळ; एकत्रपणा; रचना.
**जुळणें** (क्रि.) एकत्र करणें, मेळ बसणें.
**जुळविणें** (क्रि.) एकत्र करणें, मेळ घालणें.
**जुळा** (वि.) आंवळाजावळा; जोडलेला.
**जुळारी** (पु.) छापखान्यांतील खिळे जोडणारा.
**जुळी** (स्त्री.) गड्डी, जुडी, युग्म, जोड.
**जुळें** (सं. युगल न.) युग्म; आवळीजावळी मुलें.
**जूं** (सं. युग न.) जोकड; भार; जोखीम; नदीच्या पात्रांतलें बेट; (प्रा. न.) जुगार.
**जूग** (सं. योग न.) एकोपा, संघ; दोन किंवा अधिक सोंगटया पटाच्या एका घरांत एकदम येणें.
**जूट** (सं. यूथ स्त्री.) एकोपा; एकमताची मंडळी, संघ, समुदाय.
**जून** (वि.) निबर, राठ; जुना.
**जून** (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा सहावा महिना.
**जृंभा** (सं. स्त्री.) जांभई, जांभळी.
**जे** (अ.) कीं, कारण कीं.
**जेउतें** (प्रा. वि.) जेवढें, जितकें.
**जेगा** (पु.) पुरुषांचें एक शिरोभूषण, तुरा.
**जेंगट** (प्रा. न.) हातघड्याळ; भिक्षेची थाळी.
**जेजाणें** (प्रा. न.) युद्ध.
**जेजाल** (हिं. स्त्री.) लांब नळीची फिरकीची तोफ.
**जेठवड** (पु.) ज्येष्ठाचा महिना.
**जेठ** (पु.) वडील दीर; (क्रि. वि.) जेथें; (वि.) वडील. **जेठ्या**—वडील.
**जेठा** (प्रा. पु.) गुडघे उभे करून ते व कमर या भोंवतीं अंगवस्त्र गुंडाळून बसणें.
**जेठाणी** (स्त्री.) थोरली जाऊ. [ योद्धा.
**जेठी** (सं. ज्येष्ठ पु.) मल्ल, पैलवान;
**जेठोडें, जेठोडी** (न.) ज्येष्ठांतला पाऊस.
**जेणें** (प्रा. न.) जिणें; (अ.) ज्या योगें.
**जेता** (सं. वि.) जिंकणारा, विजयी.
**जेतुलें** (प्रा. वि.) जेवढें, जितकें.
**जेथ** (अ.) जेथें, ज्या ठिकाणीं.
**जेथें** (अ.) ज्या ठिकाणीं.
**जेथें तेथें** (अ.) सर्व ठिकाणीं.
**जेधवां** (अ.) जेव्हां.
**जेन** (प्रा. न.) वुरणूस.
**जेपाळ** (पु.) एक तीव्र रेचक.
**जेब** (फा. पु.) खिसा; (वि.) ठार.

**जेमतेम** (अ.) मोठ्या मुष्किलीनें.
**जेर** (फा. वि.) अशक्त, लेचापेचा; हलका.
**जेरकडी** (फा. स्त्री.) लगामाची कडी.
**जेरदस्त** (फा. वि.) दुर्बळ; दीन; गरजू.
**जेरबंद** (फा. पु.) घोड्याला वर तोंड करतां येऊं नये म्हणून बांधलेला बंद.
**जेल** (इं. पु.) तुरुंग.
**जेवडें** (प्रा. न.) म्हसरें, टोणगें.
**जेवढें** (वि.) जितकें, ज्या आकाराचें.
**जेवण** (सं. जेमन न.) भोजन.
**जेवणाईत** (पु.) पंक्तीस घेतलेला; आश्रित.
**जेवणावळ** (स्त्री.) मेजवानी; जेवणाचा खर्च; खाणावळ, हॉटेल.
**जेवणी** (स्त्री.) शिधा.
**जेवणें** (क्रि.) भोजन करणें.
**जेवा** (प्रा. पु.) अन्नखर्च.
**जेवीं** (अ.) जसा, ज्याप्रमाणें.
**जेवीं तेवीं** (अ.) कसेंवसें, हरप्रकारें.
**जेव्हां** (अ.) ज्या काळीं.
**जेव्हां तेव्हां** (अ.) सदोदित.
**जेसणा** (प्रा. वि.) जेवढा. [ केस.
**जेहेपटी** (स्त्री.) झिपटी, झिपरी, मोकळे
**जैं, जैं** (अ.) जर; ज्यापक्षीं; जेव्हां; जों जों; (स्त्री.) जई, वळचण.
**जैत, जैती, जैत्य, जैत्र** (पु.) जय.
**जैन** (सं. पु.) जिनमतानुयायी.
**जैयत** (हिं. वि.) तयार.
**जैसा** (अ.) ज्या प्रकारचा.
**जों** (अ.) जेथपर्यंत, जोंवर, जेव्हां.
**जो** (सर्व.) पुल्लिंगी संबंधीं सर्वनाम.
**जोइस, जोईस** (सं. ज्योतिष न.) ज्योतिः-शास्त्र; भाकित.
**जोइसी** (सं. ज्योतिषी पु.) जोशी.
**जोकड, जोखड** (न.) जूं.
**जोख** (प्रा. न.) माप, प्रमाण, वजन.
**जोख** (स्त्री.) जळू.
**जोखणें** (क्रि.) वजन करणें, माप घेणें; अजमास करणें, परीक्षा पाहणें. [संकट.
**जोखन, जोखीम** (हिं. स्त्री.) धोका, भय,
**जोखींव** (वि.) वजन केलेलें.
**जोग** (सं. योग पु.) संसारत्याग; ध्यान; समाधि, चित्तवृत्तिनिरोध.
**जोगडा** (पु.) बैरागी (निंदाव्यंजक).
**जोगता** (सं. वि.) योग्य, बेताचा.
**जोगती** (पु.) हिंदु हिजडा.
**जोगतीण** (स्त्री.) जोगवा मागणारी स्त्री.
**जोगवण, जोगवणी, जोगवणूक** (स्त्री.) जुळवून घेणें, चालविणें, निर्वाह; सुस्तपणा.
**जोगवणें** (प्रा. क्रि.) पुष्ट होणें, संपादणें.
**जोगवा** (सं. पु.) जोगेश्वरी देवीच्या नांवावर मागितलेली भिक्षा.
**जोगवणूक** (प्रा. स्त्री.) निर्वाह; निर्वाहा-पुरतें जिन्नस.
**जोगविणें** (प्रा. क्रि.) काटकसरीनें निर्वाह करणें; पोसणें, सांभाळणें.
**जोगी** (सं. योगी पु.) बैरागी, गोसावी; एक राग.
**जोग्या** (पु.) कुस्तींतला एक पेच.
**जोजार** (पु.) मोठा प्रपंच; प्रपंचभार; व्याप.
**जोजारी** (वि.) मोठें कुटुंब असलेला.
**जो जो करणें** (मुलांच्या भाषेंत) झोपी जाणें.
**जोट, जोठ** (पु.) जाड खादीचें पांघरूण.
**जोड** (पु.) सांधा; युग्म, जोडी; संग्रह; मिळकत; फायदा; मैत्री; बरोबरी; तंतुवाद्यांत मध्यमच्या दोन तारा.
**जोडणी** (स्त्री.) सांधा, जोडण.
**जोडणें** (क्रि.) जुळविणें, सांधणें, मिलाफ करणें; जुंपणें, कामाला लावणें; मिळविणें.
**जोडता** (वि.) मिळविता, जोडका.
**जोडपें** (न.) नवरा आणि बायको यांची जोडी; युग्म.
**जोडवें** (न.) बायकांच्या पायाच्या बोटांत घालण्याचा एक दागिना.
**जोडा** (पु.) पायपोस; जोडपें; समुदाय; उपमा. **जोडे फाडणें**—खेटया घालणें; **कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नसणें**—सगळा गोंधळ अथवा अव्य-वस्था असणें.
**जोडाक्षर** (न.) संयुक्त वर्ण.
**जोडी** (स्त्री.) युग्म; जोड; एकावेळीं फिरविण्याचे दोन मुद्‌गल; (प्रा.) धन; लाभ; संग्रह.

**जोडें** (प्रा. न.) जोडपें; अंगठी.
**जोडें-पाडें** द्वंद्वानें.
**जोत** (न.) जूं; दोन बैलांनीं चालविलेला नांगर; घुमटवाद्यावर म्हणावयाचें एक गीत.
**जोत** (सं. ज्योति स्त्री.) ज्वाळा; तेज.
**जोतपात** (न.) नांगर, बैल वगैरे शेतकीस लागणारें सामान.
**जोतें** (न.) घराचा चौथरा.
**जोतें** (सं. योत्र न.) बैलाचा गळा जोखडाशीं जिनें बांधला जातो ती दोरी.
**जो तो** (सर्व.) प्रत्येक.
**जोत्या** (पु.) नांगऱ्या.
**जोंधळा** (पु.) ज्वारी.
**जोधा** (सं. युध् वि.) मजबूत, धष्टपुष्ट.
**जोपा** (स्त्री.) संरक्षण, संगोपन.
**जोपारणें** (क्रि.) प्रत्युत्तर करणें; उमट-पणानें वागणें.
**जोपावणें** (क्रि.) संगोपन करणें.
**जोपासणी, जोपासना** (स्त्री.) संगोपन.
**जोबन** (सं. यौवन न.) तारुण्य, ज्वानी.
**जोम** (पु.) दम; जोर; बळ; अवसान.
**जोमदार** (वि.) दमदार, अवसानयुक्त.
**जोर** (फा. पु.) दम, शक्ति; दृढता; आघात; जुलूम, जबाबदारी; व्यायामाचा एक प्रकार; भरती.
**जोरकस** (फा. वि.) बळवान्, सशक्त.
**जोरजबरी** (फा. अ. स्त्री.) जुलूम.
**जोरदार** (फा. वि.) ताकदवान्, दमदार, बळवान्.
**जोरा** (फा. पु.) अधिकार, सत्ता, जबरी.
**जोरावणें** (क्रि.) अधिक शक्तिमान् होणें; बळावणें. [ जुलमी.
**जोरावर** (फा. वि.) सशक्त; जबरदस्त,
**जोरावा** (फा. पु.) जोर; जुलूम; पाठवळ.
**जोरी** (फा. वि.) बुद्धिबळाच्या खेळांत दुसऱ्या मोहऱ्याला पाठवळ देणारें (मोहोरें); (स्त्री.) ज्वारी, जोंधळा.
**जोरू** (हिं. स्त्री.) पत्नी.
**जोव** (सं. जव स्त्री.) वीज.
**जोवणी** (स्त्री.) जोखडाची खुंटी.
**जोंवर** (अ.) जोंपर्यंत.
**जोशी** (सं. ज्योतिषी पु.) ज्योतिषी; भविष्य सांगणारा.
**जोसकी** (स्त्री.), **जोसपण** (न.) जोश्याचें वतन किंवा काम.
**जोहर** (प्रा. पु.) अग्नि.
**जोहर** (अर. जवाहर न.) जवाहीर.
**जोहरी** (अर. पु.) रत्नपारखी; जवाहिऱ्या.
**जोहा** (पु.) जोंधळे.
**जोहार** (प्रा. पु.) अग्निप्रलय; जवाहीर.
**जोहार** (पु.) अंत्यजांनीं म्हणावयाचा रामराम.
**जोहारणें** (प्रा. क्रि.) प्रणिपात करणें.
**जौं** (प्रा. अ.) जोंपर्यंत; पर्यंत.
**जौंजार** (प्रा. पु.) त्रास, कंटाळा.
**ज्या** (सं. स्त्री.) धनुष्याची दोरी; पृथ्वी.
**ज्यामिती** (सं. स्त्री.) भूमापनशास्त्र.
**ज्यारी** (वि.) चालू.
**ज्याले** (प्रा. न.) जन्म.
**ज्यालेपण** (प्रा. न.) जन्म, आयुष्य.
**ज्यास्तसाल बेरीज** (हिं. स्त्री.) गांवचा जास्तींत जास्त आलेला वसूल.
**ज्याहांपन्हा** (अर. पु.) जगाचा पालनकर्ता.
**ज्यूरी** (इं. स्त्री.) पंच.
**ज्येष्ठ** (सं. वि.) वडील; उत्कृष्ट; (पु.) हिंदु वर्षाचा तिसरा महिना.
**ज्युबिली** (इं. स्त्री.) आनंदोत्सव.
**ज्येष्ठमध** (सं. मधुयष्टिका पु.) एक औषधि मुळी.
**ज्येष्ठा** (सं. स्त्री.) २७ नक्षत्रांपैकीं १८ वें.
**ज्योति** (सं. स्त्री.) ज्योत; प्रभा; प्रकाश.
**ज्योतिर्लिंग** (सं. न.) शिवाच्या सुप्रसिद्ध बारा लिंगांपैकीं प्रत्येक; (नांवांसाठीं ‘बारा ज्योतिर्लिंगें’ शब्द पहा.)
**ज्योतिःशास्त्र** (सं. न.) खगोलशास्त्र.
**ज्योतिष** (सं. न.) ताऱ्यांच्या स्थितिगतीवरून केलेलें गणित; सदर गणितावरून भविष्यकथन करण्याची विद्या.
**ज्योतिषी** (सं. पु.) जोशी, गणक, ज्योतिःशास्त्रज्ञ.
**ज्योतिष्टोम** (सं. पु.) एका यज्ञाचें नांव.
**ज्योतिष्मान्** (वि.) प्रकाशमान, तेजस्वी.
**ज्योत्स्ना** (सं. स्त्री.) चांदणें.

**ज्वर** (सं. पु.) ताप. **ज्वर पांचवा, ज्वर पांचावा** (पु.) रोगी बरा होत चालला असतां दृष्ट लागून त्याचें दुखणें उलटणें.
**ज्वरसृष्टि** (प्रा. स्त्री.) तापाच्या गुंगींत पडणारें स्वप्न.
**ज्वरांकुश** (सं. पु.) तापावरचें एक औषध.
**ज्वरांश** (सं. पु.) बारीक ज्वर, तापाची कसर.
**ज्वलज्जहाल** (वि.) जहालापेक्षां जास्त.
**ज्वलन** (सं. न.) अग्नि; जळणें.
**ज्वलन्त** (वि.) तेजस्वी.
**ज्वानी** (स्त्री.) तारुण्याचा भर.
**ज्वार, ज्वारी** (स्त्री.) जोंधळा.
**ज्वल्प** (न.) त्वेष, संताप; दुर्गंधी; भीति.
**ज्वाला** (सं. स्त्री.) जाळ.
**ज्वालाग्राही** (सं. वि.) जलद पेट घेणारें.
**ज्वालामुखी** (सं. पु.) ज्याच्या तोंडांतून ज्वाळा निघतात असा पर्वत.
**ज्वाळामाळी** (प्रा. पु.) अग्नि.

---

## झ

**झ** मराठी व्यंजनमालेंतील नववें व्यंजन.
**झक** (सं. झष स्त्री.) मासा. **झक मारणें**—(मासे मारण्यासारखें) निंद्य कर्म करणें; चूक करणें.
**झक** (वि.) भपकेदार, चकचकीत.
**झकझक** (वि.) लखलखीत, प्रकाशमान.
**झकझकणें** (क्रि.) चकाकणें.
**झकझकाट** (पु.) लख्ख प्रकाश; चकचकीतपणा. [ तेजस्वी.
**झकझकीत** (वि.) लखलखीत, झळझळीत,
**झकटणें** (प्रा. क्रि.) झगडणें, घासणें.
**झकणें** (क्रि.) दिपून जाळें, चकित होणें; चकणें, फसणें. [ अवश्य.
**झकत** (अ.) झक मारीत, आपल्याआपण;
**झकपक** (स्त्री.) चकाकी; नीटनेटकेपणा.
**झकमक** (स्त्री.) चकमक, भांडण.
**झकवणूक** (स्त्री.) फसवणूक.
**झकविणें** (क्रि.) फसविणें.
**झकाकत** (अ.) त्वरेनें.
**झकाकी** (स्त्री.) चकचकाट, तेजस्विता.
**झकाकीत** (वि.) चकचकीत.
**झकाझकी** (स्त्री.) भांडण.
**झकाझोक** (स्त्री.) डौल, ऐट.
**झंकार** (पु.) छन् छन् नाद.
**झकास** (वि.) चांगला, उत्कृष्ट.
**झक्क** (वि.) चक्क; लख्ख.
**झक्कड** (वि.) हट्टी, दुराग्रही. [ संज्ञा.
**झक्कू** (पु.) विटीदांडूच्या खेळांतली एक
**झगझगाट** झकझकाट पहा.
**झंगट** (न.), **झंगड** (स्त्री.) मोगरीनें ठोके वाजविण्याचें धातूचें घड्याळ; वाद्यांचा गजर; विपुलता; कचाट. [ लढणें.
**झगडणें** (क्रि.) विलगणें, झोंबणें, भांडणें,
**झगडा** (पु.) भांडण, कज्जा, युद्ध.
**झगमग** (स्त्री.) झाक, झुळूक, चकचकीतपणा; (वि.) चकचकीत.
**झगरें** (न.) गोवऱ्यांची रास घालून पेटविलेला अग्नि.
**झगा** (हिं. पु.) पायघोळ अंगरखा.
**झगार** (न.) अभ्रमंडल; अंधारी, आभाळ.
**झंगी** (प्रा. स्त्री.) चकाकी (भा० २२।२३९).
**झंझावात** (सं. पु.) वावटळ; पर्जन्यासह वारा. [ प्रहार.
**झट** (न.) उपाधि, लचांड; आकस्मिक
**झटकणें** (क्रि.) झाडणें; झटकन् निघून जाणें.
**झटकन्** (अ.) पटकन्, त्वरेनें. [ झपाटा.
**झटका, झटकारा** (पु.) रागाचा फणका;
**झटकारणें** (क्रि.) झिटकारणें, धिक्कारणें.
**झटपट** (अ.) लवकर.
**झटझोंबट** (न.) भांडणतंटे.
**झटणें** (क्रि.) नेटानें काम करणें, एकसारखा प्रयत्न करणें; झोंबणें.
**झटपट** (अ.) लवकर, त्वरेनें; (स्त्री.) झटापट, चकमक; त्वरा.
**झटाझट** (अ.) चटपट, त्वरेनें.
**झटापट** (स्त्री.) भांडण, चकमक.
**झटाळ, झटचाळ, झटचाळी** (वि.) मसलती, युक्तिबाज; कर्जबाजारीपणामुळें संकटांनीं घेरलेला.
**झटें** (न.) ओढाताण; झोंबी.
**झड** (स्त्री.) एकसारखा पडणारा पाऊस; झिवड, धाड, झडप; लगट, झुंज.

**झडकणें** (क्रि.) हालविणें, झडणें.
**झडकरी, झडकरून** (अ.) लवकर, जलद.
**झडका** (वि.) क्षीण झालेला.
**झडकें** (प्रा. अ.) झपाट्यानें.
**झडझडीत, झडझडून** (क्रि. वि.) त्वरेनें; अंग मोडून.
**झडणी, झडणूक** (स्त्री.) गळणें; पडणें.
**झडणें** (क्रि.) गळून पडणें; (वाद्यें) वाजणें; पगार वक्तशीर दिला जाणें; रोडावणें; (वाद) सुरू होणें.
**झडती** (स्त्री.) वारकाईचा तपास; फेड; तपशीलवार हिशेब; (अ.) लवकर.
**झडप** (स्त्री.) उडी, उड्डाण, पकड, दाराची फळी.
**झडपड** (स्त्री.) तडफड; झटापट.
**झडपडा** (पु.) झडप, उडी; जोरानें हिसकावून घेणें.
**झडपण** (न.), **झडपणा*** (स्त्री.) भूतबाधा; वारा घालण्याचें साधन, पंखा; आच्छादन. [भूतबाधानिरसन.
**झडपणी** (प्रा. स्त्री.) वारा घालणें; पंखा;
**झडपणें** (न.) विस्तवाला वारा घालण्याचें साधन; (क्रि.) वारा घालणें; भुतानें पछाडणें; उडी घालणें.
**झडपा** (पु.) झाकण, दार.
**झड्या** (वि.) रोगानें क्षीण होत जाणारा.
**झडी** (प्रा. स्त्री.) झडप; (अ.) तडकाफडकी.
**झडाझड, झडाडां** (अ.) त्वरेनें.
**झर्डिति** (सं. झटिति अ.) लवकर.
**झडी** (प्रा. स्त्री.) गळणें, गळती (भा. ३।१५५); एकसारखी वृष्टि; क्षयरोग; झडप. [वेदना.
**झणका** (पु.) झटका; फणकारा; तीव्र
**झणकार, झणकारा** (पु.) झणत्कार; नाद; झपाटा; वेग.
**झणकी** (स्त्री.) तीव्र वेदना, दाह.
**झणझणणें** (क्रि.) झोंबणें; आग होणें.
**झणझणाट** (पु.) मोठा झणझण आवाज; अतिशय दाह किंवा आग.
**झणझणीत** (वि.) तिखट,. झोंबणारें, आग करणारें.
**झणत्कार** (पु.) झणझण आवाज.
**झणाटा** (पु.) टणत्कार; झणझणणारा दंश; उष्ण वाऱ्याचा झोत; उमाळा; विशालता.
**झणाणणें** (क्रि.) मोठा आवाज होणें.
**झणाणां** (अ.) खणखण आवाज करीत.
**झणीं, झणें** (अ.) लवकर, कदाचित्; नको (ज्ञा. २।१७); खरोखर.
**झपझप, झपाझप, झपांझपां** (अ.) जलद, सत्वर, झपाट्यानें.
**झपका** (पु.) झुबका (फुलें वगैरेचा).
**झंपा** (पु.) एका तालाचें नांव; एक प्रकारची झांज.
**झपाटणें** (क्रि.) खाऊन टाकणें, त्वरेनें करून टाकणें; पछाडणें.
**झपाटा** (पु.) सपाटा, तडाखा; आवेश; त्वरा; भुतांचा संचार.
**झपूर्झा** (जा! पोरी जा! हें वाक्य झपाट्यानें उच्चारलें असतां होणारा शब्द) अत्यानंदाची सीमा; अज्ञेयाच्या अफाट मैदानांत संचार करण्याला मनुष्याची चिच्छक्ति उद्युक्त होते तेव्हां तिला जीं दिव्य गीतें ऐकल्याचा भास होतो तो या शब्दानें आधुनिक काव्यप्रवर्तक 'केशवसुत' यांनीं निर्दिष्ट केला आहे.
**झपेट** (स्त्री.) झाप, उडी.
**झबक** (प्रा. न.) झुबका. [ प्रकारचें अंगडें.
**झबलें** (न.) लहान मुलाचें एक विशेष
**झबा** (पु.) झगा. [ एक खेळ.
**झब्बू** (पु.) घमेंडखोर माणूस, पत्त्यांचा
**झमकणें** (क्रि.) चमकणें, प्रकाशणें.
**झरकणें** (क्रि.) झटकन निघून जाणें.
**झरकन्** (अ.) चटदिशीं, सत्वर.
**झरका** (पु.) त्वरा, चपळता.
**झरझर, झरझरां** (अ.) लवकर, त्वरेनें.
**झरझरी** (स्त्री.) हुक्का; त्याची नळी.
**झरझरीत** (वि.) विरविरीत, पातळ.
**झरणें** (सं. झृ क्रि.) पाझरणें, क्षीण होणें.
**झरवण** (प्रा. न.) झरा.
**झरवणी** (न.) झऱ्याचें पाणी; झिरपणें.
**झरा** (पु.) झिरा; उगम; पाण्याची वाट.
**झराझर** (अ.) सत्वर, लवकर.
**झरी** (सं. स्त्री.) झरा; प्रवाह; क्षय; झारी.

**झरोका** (हिं. झरोका पु.) लहान खिडकी, गवाक्ष.
**झलक** (हिं. स्त्री.) चलाखपणा; हुषारी.
**झलाळ, झल्लाळ** (प्रा. स्त्री.) चमक, तेज.
**झल्लर** (प्रा. स्त्री.) झालर, किनार.
**झल्लरी** (स्त्री.) झांज, टाळ.
**झवणें** (क्रि.) संभोगणें.
**झंवतरोड** (वि.) रोडका, दुर्बळ.
**झंवाडणें** (क्रि.) शिक्षा देणें, खरडपट्टी काढणें.
**झळ, झळई** (सं. स्त्री.) उष्णता; ऊन वारा, वाफारा.
**झळ** (स्त्री.) धातु तापविण्यांत होणारें नुकसान; व्यापार-धंद्यांतलें नुकसान.
**झळई** (प्रा. स्त्री.) मृगजळ; उष्णता.
**झळक** (सं. झला स्त्री.) चमक, चकाकी; उन्हाची झळ.
**झळकणें** (क्रि.) प्रकाशणें, चकाकणें.
**झळकफळक**, झळझळ (स्त्री.), **झळझळाट** (पु.) चकाकी, तेजस्विता.
**झळझळीत** (वि.) चकचकीत, स्पष्ट.
**झळणें** (क्रि.) सांधलें जाणें; जोडलें जाणें; तापणें.
**झळफळाट** (पु.) दाह, तडफडाट.
**झळंबणें** (क्रि.) स्पर्श करणें; पोळणें; उन्हांत तापणें; मर्मी लागणें; बुडणें; बुडविणें; गुंडाळणें; झोका घेणें; पछाडणें; चिकटणें.
**झळमणें** (क्रि.) लोंबणें, लोंबकळणें; आंदोलणें; झपाटलें जाणें.
**झळवणी** (न.) उन्हानें गरम झालेलें पाणी.
**झळाळ, झळाळी** (स्त्री.) तरंग; प्रकाश; तेज.
**झळाळणें** (क्रि.) प्रकाशणें.
**झळाळी** (स्त्री.) चकाकी, उज्ज्वलता.
**झाऊ** (वि.) झिरझिरीत; तकलादी; नाजूक; निरुपयोगी.
**झाक, झांक** (स्त्री.) चकाकी; तेजस्विता; मुलामा; पावसाची लहान पण जोराची सर; (पक्ष्यांचा) जमाव; टोळधाड; उष्ण वारा; झुळुक; (वि.) चकाकित; तेजस्वी.
**झांक** (स्त्री.) झांपड; चक्कर, भोंवंड; गुंगी; डोळे जड होणें; छाया.
**झांकण** (न.) आच्छादन, झापड.
**झांकणी** (स्त्री.) आच्छादन; पशूच्या डोक्यावर बांधलेला पडदा; झांपड.
**झांकणें** (क्रि.) आच्छादणें; लपविणें; दाबून ठेवणें; (प्रा. क्रि.) बडबडणें.
**झाकर** (न.) वेलीची जाळी; दाट झाडी; पानांची गर्दी.
**झाकरणें** (क्रि.) झाडाच्या दाट पालवींत लपून बसणें.
**झाकरणें** (क्रि.) पळून जाणें.
**झांकलें माणिक** बाहेर तादृश डौल न दिसूं देणारा पण गुणवान् मनुष्य.
**झांकली मूठ सवा लाखाची** आपण होऊन आपली स्थिति उघडी करून दाखवूं नये यांत आपली अब्रू राहते.
**झांकळणें, झांकाळणें** (क्रि.) लपविणें; आच्छादित करणें; व्यापणें.
**झांकापाक** (स्त्री.) जेवण झाल्यानंतरचीं स्वैंपाकघरांतलीं उरलीं सुरलीं कामें.
**झांकी** (स्त्री.) शोभिवंत मांडणी; झांपड.
**झांकुळणें** (प्रा. क्रि.) झांकणें (वामन० विराट० ७।१४७); चकित होणें.
**झांकुन** (अ.) संक्षेपानें (तुका० २२७६).
**झांके** (प्रा. अ.) व्यर्थ.
**झांकोळणें** (प्रा. क्रि.) झांकलें जाणें; व्यापणें; बंद होणें (ना०२५१); गुरफटलें जाणें. [होणारा ध्वनि; गजर.
**झांगड** (स्त्री.) पुष्कळ वाद्यांचा एकदम
**झांगडझिंगा** (पु.) भांडण, तंटेबखेडे.
**झांज** (स्त्री.) धातूचें एक चपटें वाद्य; मूर्छा.
**झांजड, झांजर** (स्त्री.) माणसाला माणूस दिसतें न दिसतें इतकी पहाट.
**झांजर** (प्रा. वि.) जीर्ण; जर्जर.
**झांजरता** (वि.) ओझरता.
**झांजरमांजर** (स्त्री.) झांजड पहा.
**झांजरी** (स्त्री.) लहान झांज.
**झा झा** (उद्गार०) घोडा, बैल इत्यादींनें जलद चालावें म्हणून उच्चारावयाचा शब्द.
**झाट** (हिं. न.) शेट, शप्प.

**झाड** (न.) वृक्ष; पिशाच्च-संचार झालेलें माणूस; वृक्षाच्या आकृतीचें दारूकाम किंवा कांचेचें सामान. **कोणत्या झाडाचा पाला**—क्षुद्र माणूस.
**झाडकी** (प्रा. स्त्री.) किर्र झाडी.
**झाडझाडोरा** (पु.), **झाडझुडूप** (न.) लहानमोठीं सर्व झाडें. [सारवणें इ.कामें.
**झाडझूड** (स्त्री.) केरकचरा काढणें,
**झाडणा** (प्रा. पु.) झाडणारा.
**झाडणी** (स्त्री.) केरसुणी; खरडपट्टी; भूत काढणें; विष उतरविणें.
**झाडणें** (क्रि.) केर काढणें; झटकणें; खरडपट्टी काढणें.
**झाडपट्टी** (स्त्री.) जमिनीचा सारा किंवा घरपट्टी याबद्दलची सरकारची अखेरची मागणी.
**झाडपाला** (पु. ना.) वनस्पति वगैरे.
**झाडपोतें** (न.) कर्जफेडीचा शेवटचा हप्ता.
**झाडबाकी** (स्त्री.) पूर्ण फेड.
**झाडलोट** (स्त्री.) केरकचरा काढून टाकण्याची क्रिया.
**झाडसारव, झाडसारवण** (न.) झाडझुडीचें व सारविण्याचें काम.
**झाडा** (हिं. पु.) कसून तपासणी; झडती; निकाल; निरास; जुलाब, मल-विसर्जन.
**झाडापवाडा** (पु.) हिशेब. [निकाल.
**झाडापाडा** (प्रा. पु.) झडती, हिशेबाचा
**झाडावा** (पु.) तपासणी, शुद्धि.
**झाडी** (स्त्री.) झाडा, निकाल (भा० १०।२९); झाडांचा समुदाय, राई.
**झाडू** (हिं. पु.) केरसुणी; भंगी.
**झाडून** (अ.) यच्चयावत्, सर्व.
**झाडूवाला** भंगी.
**झाडोरा** (पु.) दाट झाडी.
**झांप** (पु.) झाडाच्या तोडलेल्या फांद्या; छप्पर; पोहतांना पुढचें अंग वर उचलणें; झडप, हल्ला; (स्त्री.) शेतांतली झोंपडी.
**झापड** (स्त्री.) डोळे जड होणें; गुंगी.
**झापडी, झांपण, झांपणी** (स्त्री.) जनावराच्या डोळ्यावर बांधावयाचा पडदा.
**झापरें** (न.) डोक्यावरील केसांचें छप्पर.
**झापळ** (स्त्री.) गर्द छाया; (वि.) पुष्कळ फांद्या असलेलें. [केलेला दरवाजा.
**झांपा** (पु.) गवत, कामटया, सावळ्या इ०चा
**झापाळणें** (क्रि.) व्यापणें, आच्छादणें.
**झांपी** (प्रा. स्त्री.) झापड.
**झांब** (स्त्री.) घेरी, मूर्च्छा. [रास प्रारंभ.
**झांबड** (वि.) स्थूल; (स्त्री.) लूट; अंधा-
**झांबडणें** (क्रि.) लुटणें; सुस्तावणें.
**झांबरा** (वि.) विसराळू; चुक्या करणारा; अव्यवस्थित. [कोळयाचें जाळें.
**झाबली** (स्त्री.) पकडलेले मासे ठेवावयाचें
**झावा, झावू** (पु.) तेलाचें भांडें.
**झार** (प्रा. पु. न.) शेवाळ्यासारखा नदींतून वाहून तीरास लागणारा एक बुळबुळीत पदार्थ; भूमिशोधक; रशियाच्या माजी राजाची पदवी (झार—कैसर—सम्राट् हे समानार्थी शब्द आहेत.).
**झारगें** (न.) जाळें लाविलेली आंबे काढण्याची आकडी.
**झारणें** (क्रि.) चाळणें.
**झारंबा** (पु.) गुन्हाळांत मळी काढण्याची टोपली; तेलांतली गदळ.
**झारा** (फा. पु.) स्वयंपाकांतलें सपाट तोंडाचें व सच्छिद्र असें एक उपकरण.
**झारिया** (प्रा. पु.) झारेकरी.
**झारी** (हिं. स्त्री.) तोटी असलेला गडू.
**झारेकरी** (पु.) सोनाराच्या दुकानांतली राख वगैरे गाळून सोन्याचे कण काढणारा.
**झाल** (स्त्री.) वेळूची केलेली उथळ व पसरट मोठी टोपली. लग्नांत हिची पूजा करून ती वरपक्षाला देतात. सायंकाळचा अंधार; सुरमाडाच्या पानाचें पाय पुसणें.
**झालर** (हि.स्त्री.) मगजी; छताच्या कांठास शोभिवंत रंगीत कापडाच्या चुण्या बांधतात त्या.
**झावळ** (वि.) विसराळू, भ्रमिष्ट, छाकटा.
**झांवळणें** (प्रा. क्रि.) भ्रमिष्ट होणें.
**झांस** (पु.) दाट झाडी.
**झावळमावळ** (स्त्री.) प्रभात, पहाट.
**झावळी** (प्रा. स्त्री.) झांजड, अंधार.

**झावळी** (स्त्री.) नारळाच्या झाडाचें पान; सावळी. [(अ.) अस्पष्टपणें.
**झांवळें** (प्रा. पु.) भ्रांतिकारक, संदिग्ध,
**झावाड** (न.) खडकावर आपटणाऱ्या पाण्याच्या लाटा.
**झासा** (पु.) दपटशा, धमकावणी, दहशत (तुका० ३७००); निद्रा (भा० २३।६१७); तळमळ.
**झांसुरणें** (प्रा. क्रि.) निश्चेष्ट पडणें.
**झाळ** (स्त्री.) झळ, तिरीप (उन्हाची).
**झाळणें** (क्रि.) पात्रादिकास डांक लावून अग्निसंयोगानें घट्ट वसविणें.
**झिगझिग** (स्त्री.) जिगजिग, रडगाणें, पिरपिर; पावसाची वुरवुर.
**झिंगट** (वि.) निशाखोर, अमली.
**झिंगणें** (क्रि.) अमल करण्यानें वेशुद्ध होणें; कैफ चढणें. [मासा.
**झिंगरूं** (न.), **झिंगा** (पु.) एक प्रकारचा
**झिंगी** (स्त्री.) धुंदी, अमल; मादक द्रव्य; झिंझोटी. [रोड होणें; झरणें.
**झिजणें** (क्रि.) घर्षण वगैरेमुळें कमी होणें;
**झिंजाटणें, झिंजाडणें** (प्रा. क्रि.) केस धरून खालीं पाडणें; झुगारणें.
**झिंजारा** (पु.) उलट खाणें; झटका.
**झिंजी, झिंजोटी** (स्त्री.) झिपरी; (झिंझोटी) गायनांतल्या एका रागिणीचें नांव.
**झिटकारणें, झिटकावणें** (क्रि.) धिक्कारणें, तिरस्कारानें उडवून देणें.
**झिणकार** (पु.) वाद्याचा झंकार.
**झिणझिणणें** (क्रि.) झणाणणें, सणसणणें.
**झिनी** (स्त्री.) ठिणगी.
**झिपरा** (स्त्री.) अव्यवस्थित व तोंडावर लोंवणारी केसांची वट; हिडिस बायको.
**झिंबड** (स्त्री.) पावसाची झड; विपुलता; अतोनात गर्दी. [(पाऊस).
**झिमझिम** (वि.) वारीक पण टिकाऊ
**झिम्मा** (पु.) लहान मुलींचा एक खेळ.
**झिरकणी** (स्त्री.) झुरणी.
**झिरझिरा, झिरझिरीत** (वि.) जीर्ण झालेला; किरकिरीत.
**झिरपणें** (क्रि.) पाझरणें, गळणें, झरणें.
**झिरपा** (पु.) ओघळ; गळती; ओहोळ.
**झिरमिरी** (स्त्री.) मूर्च्छा; (वि.) थोडा थोडा. [तंतूंचा झुबका.
**झिरमिळी** (स्त्री.) लोंवणाऱ्या कलावतूच्या
**झिरवणी** (न.) झऱ्याचें पाणी.
**झिरा** (पु.) झरा; उगम, उत्पत्तिस्थान.
**झिरुमिरु** (वि.) कसातरी जीव धरून राहिलेला; अतिशय अशक्त.
**झिरें** (न.) शिरें; झाडाची तोडलेली फांदी.
**झिल** (स्त्री.) वैलाच्या गळयांतील घुंगरांची माळ; (पु.) मुलगा.
**झिलई** (हिं. झील स्त्री.) तकाकी, चकाकी, झील.
**झिलकाद** (अर पु.) अरबी अकरावा महिना.
**झिलाण** (न.) पाणथळ जागा; जमिनीची आर्द्रता; जमिनीच्या पोटांतले झरे.
**झिलों** (प्रा.अ.) हळू (केश० पद० ५३८).
**झिल्लट** (वि.) विरविरीत, पातळ.
**झिल्ली** (प्रा. स्त्री.) मुरकुट.
**झिलो** (प्रा. पु.) मुलगा (ना० २२९०).
**झिळमिळी** (स्त्री.) झिरमिळी पहा.
**झीज** (स्त्री.) वस्तूस झिजल्यामुळें येणारा उणेपणा; शारीरिक कष्ट; घस, नकसान.
**झीट** (स्त्री.) घेरी, अंधेरी.
**झीण** (स्त्री.) खोड.
**झील** (स्त्री.) झिलई, तेज; पालुपद; कच्चे आंबे काढण्यासाठीं जाळी अडकवलेली आकडी; जमिनीची आर्द्रता; दाट झाडी; (हिं.) सरोवर; विटीदांडूच्या खेळांतील एक सप्तक; (वि.) हलकें (ज्ञा० १३।२१४). **झील ओढणें**—दुसऱ्याचा अनुवाद करणें.
**झुई** (स्त्री.) नदींतलें वेट.
**झुकणें** (क्रि.) वाकणें, कलणें, वळणें; दृष्टि चुकवून पळून जाणें; कृश होणें.
**झुकविणें** (क्रि.) वाकविणें; फसविणें; झुकांडी देणें.
**झुकाटा** (पु.), **झुकाटी, झुकांडी** (स्त्री.) दृष्टि चुकवून निघून जाणें, हुलकावणी दाखवून निसटणें.
**झुकांडा** (पु.), **झुकांडी, झुळकांडी** (स्त्री.) झेप, झोकांडी, भिरकांडी.

**झुकापुरी** (स्त्री.) झुकांडी.
**झुगझुग** (अ.) अतिशय मंदत्वानें, आहे नाहीं अशा रीतीनें.
**झुगझुगी** (क्रि.) अतिशय मंद प्रकाश.
**झुगटणें** (प्रा. क्रि.) फेकणें.
**झुगर, झुगार** (वि.) जुने, जीर्ण झालेले (कपडे); (न.) लग्नकार्यांत पाटील, देशमुख इ० स देण्याचा मानापानाचा पोषाख; झुंवर; दिव्यांचें झाड.
**झुगारणें** (क्रि.) फेकून देणें; उडविणें.
**झुगारणें** (न.) दुर्बळ, कृश मनुष्य किंवा जनावर.
**झुगारपट्टी** (स्त्री.) आज उद्यां असें सांगून किंवा कांहींतरी पोकळ सबबी सांगून लांबणीवर टाकणें. [झुकांडी.
**झुगारा** (पु.) नजर चुकवून काढलेला पळ;
**झुंज** (सं. युद्ध न.) लढाई; टक्कर.
**झुंजणें** (सं. युध् क्रि.) भांडणें; लढणें.
**झुंजरूक-मुंजरूक** (न.) उजाडण्याची वेळ, प्रभात.
**झुंजविणें** (क्रि.) लढविणें.
**झुंजाट** (वि.) दांडगा, रणशूर.
**झुजाट** (वि.) जोराचा वारा, वावटळ.
**झुजाटा, झुझाटा** (पु.) सोसाट्याचा वारा.
**झुंजात** (न.) तुफान (ना. पृ. ५६१).
**झुंजार** (वि.) लढाऊ, युद्धांत कुशल; (स्त्री.) लढाई, झुंज.
**झुंजारराव** (पु.) योद्धा; लढवय्या.
**झुंजुरका** (अ.) मोठ्या पहाटेस.
**झुंजुमुंजु** (न.) उजाडण्याची वेळ, पहाट; (वि.) अस्पष्ट, कष्टानें दिसण्यासारखें.
**झुटकणें** (क्रि.) पळून जाणें, झुकांडी देणें.
**झुटका** (पु.) झुरका, वायु किंवा धूर यांचा घोट.
**झुटामुटा** (अ.) थोडाथोडा, थेंबथेंब.
**झुटा, झुटीसानक** (हिं. स्त्री.) परत न घेतां येण्यासारखी (कायमची) जहागीर किंवा इनाम जमीन.
**झुंड** (स्त्री.) टोळी, समुदाय, जमाव.
**झुडप, झुडूप** (न.) लहान किंवा खुरटें झाड.
**झुडपी** (स्त्री.) झुडपांची दाटी.
**झुंडाई** (स्त्री.) झुंडपणा, दांडगाई.
**झुंडो** झुंड पहा.
**झुणका** (पु.) पिठलें, अळण, वेसन.
**झुणा** (पु.) परकर.
**झुणूक** (स्त्री.) किंचित् भास, चुणूक.
**झुतरी, झुत्री** (स्त्री.) लहान प्रवाह.
**झुबकळी, झुबकबाळी** (स्त्री.) मोत्यांचा घोस; खाली लोंबकळत असलेलें एक कर्णभूषण. [घोस; डूल.
**झुबका, झुपका, झुमका** (हिं. पु.) गुच्छ,
**झुंबड** (स्त्री.) दाटी, गर्दी, झिंबड.
**झुंबर** (पु. न.) बिलोरी काचेचें शोभिवंत झाड; (प्रा. स्त्री.) झोंबी. [झुबकबाळी.
**झुबा** (पु.) पायघोळ अंगरखा, झगा;
**झुमकणें** (क्रि.) ठुमकत चालणें.
**झुमका** (हिं. पु.) झुबका, गुच्छ, गांठ.
**झुमझुम** (अ.) घुंगराच्या आवाजासारखें.
**झुरकणें** (क्रि.) धूर किंवा वायु जोरानें आंत ओढणें.
**झुरकन** (अ.) त्वरेनें. [घोट.
**झुरका** (पु.) वायूचा किंवा धुराचा घुटका,
**झुरझुरणें** (क्रि.) झिरपून जाणें, झुरणें; क्षय पावणें.
**झुरझुरीत** (वि.) झिरझिरित, झिजून विरळ झालेलें.
**झुरट** (वि.) क्षीण झालेला, कृश.
**झुरटी** (प्रा. स्त्री.) सुरकुती; क्षीणता.
**झुरण** (स्त्री.) तांदुळाचा चुरा. [क्षीणता.
**झुरणी** (स्त्री.) शरीरास व मनास येणारी
**झुरणें** (क्रि.) दुःखानें क्षीण होणें.
**झुरती** (स्त्री.) पलायन.
**झुरळ** (न.) एक क्षुद्र जीव; वागुरडा.
**झुरळी** (स्त्री.) सुरकुती.
**झुरा, झुराबावरा** (वि.) रंगेल, इष्कीबाज.
**झुरुमुरु** (पु.) अशक्त; धुगधुगी वरून असलेला मनुष्य; (क्रि. वि.) हळूंहळू.
**झुलणें** (क्रि.) डोलणें, डुलणें.
**झुलवा** (पु.) झोका, आंदोलन; मुसलमानांत वेश्या किंवा विधवा स्त्रीस स्वपत्नी म्हणून बाळगतांना करावयाचा विधि.
**झुलविणें** (क्रि.) नादीं लावणें; फसविणें.

**झुला** (हिं.पु.) झोपाळा, पाळणा, हिंदोळा; डोंगराच्या दोन कड्यांना दोरखंडानें जुडून त्या दोरावरून सरकणाऱ्या टोपलींतून जाण्याची योजना.
**झुलावणें** (हिं. न.) हिंदोला, झोपाळा.
**झुलूप** (फा. न.) कानावर लोंबलेले डोक्याचे केस.
**झुळंबक** (प्रा. न.) कर्णभूषण. [पणें.
**झुळझुळ** (अ.) मंदपणें; अंधुकपणें; अस्पष्ट-
**झुळझुळीत** (वि.) चकचकीत.
**झुळूक** (स्त्री.) मंदमंद वायु; किंचित् भास; अल्प अनुभव.
**झूज** (स्त्री.) झुंज, लढाई.
**झूट** (हिं. वि.) खोटें, लबाड.
**झूल** (हिं. स्त्री.) जनावराच्या पाठीवर घालण्याचें वस्त्र.
**झूला** (फा. पु.) दोला, झोपाळा.
**झूली** (फा. स्त्री.) झूल.
**झेंगट** (न.) मोगरीनें ठोके वाजविण्याचें धातूचें वडचाळ; घोटाळयाचा प्रश्न; अडचण.
**झेंडा** (पु.) निशाण, ध्वज.
**झेंडू** (पु.) एक फुलझाड. [कावा, आंदोलन.
**झेंप** (स्त्री.) झोक, झोकांडें; झडप; हेल-
**झेंपणें** (क्रि.) आटोक्यांत येणें; करणें.
**झेपावणें** (प्रा. क्रि.) उडी टाकणें.
**झेपुटा** (पु.) पाळणा हालविण्याची दोरी.
**झेंबणें** (क्रि.) कोमेजणें, वाळत जाणें; डुलकी घेणें.
**झेल** (स्त्री.) झोका; (पुं.) चेंडू वरच्यावर पकडणें.
**झेलगें** (न.) कच्चे आंबे झाडावरून उतरण्यासाठीं जाळें लावलेली आकडी.
**झेलणें** (क्रि.) वरून पडणारा पदार्थ वरचेवर हातांत घेणें; उत्सुकतेनें एखाद्याच्या शब्दास मान देणें.
**झेला** (पु.) झुबका, गुच्छ; आंबे उतरण्याची मोठी अरवी; झेलगें.
**झोक, झोंक** (पु.) कल; डौल; शरीराचा तोल; झटका; झपाटा.
**झोंकणें** (क्रि.) घटाघट पिणें; झुगारणें. फेंकणें; (गप्प) ठोकून देणें, सांगणें.
**झोंका** (पु.) हेलकावा; तोटा; नुकसान; हेलपाटा.
**झोकांडी** (स्त्री.) झुकांडी पहा.
**झोजा, झोझा** (वि.) लठ्ठ; दोंदील; पोटाळ.
**झोजामल्लारी** (पु.) लठ्ठ किंवा अगडबंब असा माणूस; ज्याचें नेसतें धोतर व अंगावरील कपडे अव्यवस्थित आहेत असा मनुष्य.
**झोंट, झोंटी** (स्त्री.) डोक्याच्या केसांची मोकळी सुटलेली बट; केस; शेंडी; (पु.) निर्लज्ज, दांडगा, जुलमी माणूस.
**झोटिंग** (सं. जोटिंग शंकर पु.) मुसलमानाचें पिशाच्च; सडेतोड मनुष्य; जुलमी माणूस.
**झोंटधरणी** (स्त्री.) भांडण, तंटा; शेंडी धरून केलेली मारामारी.
**झोटिंगपातशाही** (फा. स्त्री.) बेबंदशाही, अंदाधुंदी.
**झोटी** (स्त्री.) डोक्याचे लांब केस.
**झोड** (स्त्री.) खरपूस मार, झोडपणें; जोराचा पाऊस; अतिशयपणा.
**झोंड** (पु.) अरेराव; निलाजरा; पुंड; दांगडा.
**झोडगा** (वि.) झोडणारा, मारका; निर्लज्ज; हट्टी, हेकेखोर.
**झोडगी** (स्त्री.) धान्याचीं कणसें झोडपून त्यांतून दाणे काढण्याची क्रिया.
**झोडणें** (क्रि.) बडविणें; कांडणें.
**झोडपट्टी** (स्त्री.) खरपूस मार.
**झोडपणें** (क्रि.) ठोकणें, बडविणें; ताव मारणें; फडशा पाडणें; झोडणें; बडवून दाणे वगैरे वेगळे करणें. [प्रवाह.
**झोत** (पु.) अग्नीची मोठी ज्वाला; मोठा
**झोतावा** (पु.) झोत, प्रवाह.
**झोप, झोंप** (स्त्री.) निद्रा, नीज.
**झोपडी** (स्त्री.), **झोपडें** (न.) काड्यामोड्याचें घर, पर्णकुटी. [निद्राभंग.
**झोंपमोड** (स्त्री.) झोंपेंत पडणारा खळ;
**झोंपा, झोपा** (पु.) चोपाळा; झोपडी; कुंपणाच्या दाराची झडप, फाटक.
**झोपाळा** (पु.) चोपाळा, झुला.
**झोपाळू** (वि.) फार झोंप घेणारा, निद्राळू

**झोंबट** (न.) तंटा, वखेडा; लचांड, संकट.
**झोंबणें** (क्रि.) चरचरणें, झणाणणें, मर्मी लागणें; दंश करणें; तीव्र वेदना करणें; मस्ती करणें; पकडणें.
**झोंबरें** (वि.) झोंबणारें.
**झोंबी** (स्त्री.) कुस्ती, झुंज, लढाई.
**झोन्या** (पु.) सुताडा; अतिशय जाड सुताचें विछायतीचें वस्त्र.
**झोल** (पु.) घोळ, लोंबता भाग; झटका, त्वरित गति; लफंगा.
**झोला** (पु.) झोपाळा; हिंदोळा; सोगा; टाळाटाळ; गप्प. [ झोल घेणें.
**झोळकंबणें, झोळंबणें** (क्रि.) लोंबकाळणें;
**झोळकंबा** (पु.) झोका, हेलकावा.
**झोळणा** (पु.) चार तोंडी पिशवी; बटवा.
**झोळी** (स्त्री.) लोंबती मोठी पिशवी.
**झोळू, झोळ** (प्रा.) पदर (अमृ० २।४८); (वि.) मिथ्या (ज्ञा० ८।६०).

---

## ञ

ञ मराठी व्यंजनमालेंतील दहावें व्यंजन. (या अक्षरानें आरंभ झालेले शब्द मराठींत नाहींत.)

---

## ट

**ट** मराठी व्यंजनमालेंतील अकरावें व्यंजन.
**टक** (स्त्री.) एकाग्र दृष्टि; एकसारखी सतत क्रिया; (प्रा.) संकट; नवल.
**टंक** (सं. पु.) पाथरवटाचें एक हत्यार (टांकी); एक वजन (४ माप); अक्षराचा खिळा; (अ.) तंतोतंत; बरोबर.
**टकटक** (अ.) एकसारखें (पाहणें); (स्त्री.) टकळी, वटवट.
**टकटकां** (अ.) एकसारखें लक्ष लावून.
**टकटकी** (वि.) टवटवीत.
**टंकण** (सं. न.) टांकणखार.
**टकणें** (प्रा. क्रि.) सोडवणें (ज्ञा० १८। १३५); प्राप्त होणें (ज्ञा० ६।२३५); टाकणें (ज्ञा० १८।२२६); एकसारखें पाहणें.
**टकमक** (स्त्री.) चकितपणा; (अ.) चकितपणानें; (पु.) पर्वताचा उंच तुटलेला कडा.
**टकमकां** (अ.) एकसारखें लक्ष लावून; चकितपणानें.
**टंकयंत्र** (न.) टाइपरायटर.
**टकल** (न.) डोक्याचा वरचा भाग.
**टकली–लें** (स्त्री. न.) डोकें; टेकडी.
**टकल्या** (वि.) डोक्यास टक्कल असलेला.
**टंकशाला** (सं. स्त्री.) टांकसाळ.
**टकळा** (प्रा. पु.) ध्यास; वेध; हौस; छंद (मोरो० ४६।२); घोष, घोकणी.
**टकळी, टकुळी** (प्रा. स्त्री.) अतिशय प्रबळ इच्छा, आशा (मोरो० उद्योग० ७।३७); एकसारखी वडबड.
**टका** (हिं. पु.) पैका, पैसा; रुपया; जमीन मोजण्याचें एक माप; (प्रा.) निशाण; अग्रभाग; कोंब.
**टंकार** (सं. पु.) टणत्कार.
**टकारी, टंकारी** (पु.) टाकारी, दगड घडण्याचें काम करणारा.
**टकुली** (स्त्री.) आशा, उत्कट इच्छा.
**टकुलें, टकोलें** (न.) डोकें, टाळू.
**टकें** (प्रा. न.) प्रतिमा, ठसा.
**टकेकारी** (प्रा. पु.) द्वारपाळ.
**टकेटोणपे** (पु. अने.) आघात, प्रहार, ठेचा इ०.
**टकोर** (वि.) कठीण; (पु. स्त्री.) गोंगाट.
**टकोरा** (पु.) ठोका; एकसारखा नाद.
**टक्कर** (स्त्री.) मस्तकावर मस्तक आदळणें; सशृंग पशूंची झोंबी; सामना; बरोबरी.
**टक्कल** (सं. तालु न.) केस गळून पडल्यामुळें उघडा पडलेला मस्तकाचा भाग.
**टंगचाई** (स्त्री.) तुटवडा, टंचाई, तंगचाई.
**टंगळमंगळ** (स्त्री.) चुकवाचुकव; मुद्दाम केलेला चेंगटपणा.
**टग्या** (पु.) शिसें भरलेली मोठी कवडी; (वि.) गबदूल, गलेलठ्ठ, धटिंगण.
**टच** (इं. पु.) सोन्याचा कस.
**टचकन्, टचदिशीं** (अ.) टोचण्यानें बाहेर पडावें तसें एकदम.

**टचका** (पु.) टोचणी, टोचा; नखानें आघात केल्यानें होणारा आवाज; तुणतुण्याच्या लावण्या म्हणण्यांतला झोक; खटका.
**टचटचणें** (क्रि.) ठसठसणें.
**टचटचीत** (वि.) घट्ट, टणक, निबर.
**टंचाई** (स्त्री.) दुर्मिळता, तंगाई; महागाई.
**टटोरी** (स्त्री.) घोसदार कणीस; श्वासनलिका.
**टणक** (वि.) कठिण, कडक, निबर; धट्टाकट्टा; (प्रा.) मोठें.
**टणकणें** (प्रा. वि.) श्रमणें.
**टणका, टणकारा** (पु.) आघात; टोमणा.
**टणटण–णां** (अ.) भराभर (उडचामारण्यासंबंधानें). [दोरीचा शब्द.
**टणत्कार** (सं. टंकार पु.) धनुष्याच्या
**टणाटण** (अ.) भराभर; टणटण पहा.
**टणू** (पु. न.) टेंगूळ.
**टप** (पु.) मोठी गोटी; गाडीचें किंवा तंबूचें आच्छादन; त्याचा अर्ध भाग.
**टपकणें** (क्रि.) गळणें, झरणें.
**टपकन्** (अ.) टप असा आवाज करून.
**टपकळ** (वि.) भरींव; भक्कम; मोठें ठळक.
**टपका** (पु.) टपकत पडणारा पाण्याचा थेंब; ठपका; दोषारोप.
**टपटप, टपाटप** (अ.) टप टप आवाज होईल अशा रीतीनें (गळणें, वाहाणें, पडणें).
**टपणी** (स्त्री.) दक्षतेनें बसणें. [बसणें.
**टपणें** (क्रि.) जपत राहणें; वाट पहात
**टपला** (पु.) चापट, थप्पड.
**टपली** (स्त्री.) लाकडाची उडालेली ढपली; खपली; थकवा.
**टपाल** (हिं. न.) डाक, पत्रें वगैरे.
**टपूर** (पु.) धष्टपुष्ट मेंढा; (वि.) मोठा.
**टपोरा** (पु.) तडाखा, प्रहार; (वि.) मोठा.
**टप्पल** (न.) खपली.
**टप्पा** (हिं. पु.) एक प्रकारचें गीत (याला दोन अवयव असतात); विश्रांतिस्थान; प्रवासांत घोडा बदलण्याची जागा; मर्यादा; आटोका. **टप्पा खाणें** –उसळणें; थांबणें.

**ट फ करीत वाचणें** एकेक अक्षर लावून अडखळत वाचणें.
**टमक** (प्रा. स्त्री.) टिमकी.
**टमका** (प्रा. पु.) चापटी.
**टमटम** (स्त्री.) घोंडयाची गाडी. [आगर.
**टमटमनगरी** (स्त्री.) प्रसिद्धि; गप्पांचें
**टमटमराज्य** (न.) गोंधळ, अव्यवस्था.
**टमटमीत** (वि.) टुमटुमीत; धट्टाकट्टा; निरोगी.
**टर** (स्त्री.) उपहास, फजिती.
**टरकणें** (क्रि.) फाटणें; घाबरणें.
**टरका** (वि.) तिरळा.
**टरकावणें** (क्रि.) फाडणें; कानउघाडणी करणें.
**टरघाणी** (स्त्री.) मुलांचा एक खेळ (एका खांबावर एक आडवें लाकूड अडकविलें असून त्याच्या दोन टोकांना दोऱ्या असतात. त्यांना धरून दोन मुलें लोंबकळतात व तें आडवें लाकूड गरगर फिरवितात.
**टरफल** (न.) कवच, फोल, बाहेरची त्वचा.
**टरबूज** (न.) कलिंगड.
**टरळी** (स्त्री.) चर, खळी, पाळी.
**टरारणें** (क्रि.) तरारणें, उत्तेजित होणें.
**टरूं** (न.) घट्टा.
**टराव टराव** (पु.) बेडकांचा आवाज.
**टर्पेंटाईन** (इं. न.) टारपीण तेल (देवद्वारापासून काढलेलें एक प्रकारचें तेल).
**टर्रेबाज** (वि.) मुजोर; दांडगा.
**टल्ला** (पु.) चक्कर, फेरी.
**टवका** (पु.) पृष्ठभागावरचा लहानसा तुकडा. [करणें.
**टवकारणें** (क्रि.) कान किंवा डोळे ताठ
**टवंच, टवंच** (प्रा. न.) दुःख, त्रास, टोचणी.
**टवटवणें** (क्रि.) तजेलदार दिसणें किंवा होणें.
**टवटवी** (स्त्री.) प्रफुल्लता, तेज.
**टवटवीत** (वि.) प्रफुल्लित.
**टवरा** (पु.) टवका.
**टवळी** (स्त्री.) ढलपी; नारळाची करवंटी; डोक्याची करटी; स्त्रीला उद्देशून दिलेली एक शिवी.

**टवळें** (न.) समईचें किंवा पळीचें तोंड (ज्यांत तेलवात घालतात); चुनाळयाचा झाकणावांचून बाकीचा भाग.
**टवाळ** (प्रा. वि.) मिथ्या, खोटें; (स्त्री.) थट्टा; नक्कल; टवाळी.
**टवाळ, टवाळखोर** (वि.) उनाड, टवाळया करणारा.
**टवाळकी, टवाळी, टवाळगिरी** (स्त्री.) उनाडपणा; कुचेष्टा; चटोरपणा, निंदा.
**टवाळें** (प्रा. न.) खोटेपण.
**टहाळा** (हिं. पु.), **टहाळी** (स्त्री.), **टहाळें** (न.) पानासकट फांदी, डहाळी.
**टळटळीत** (वि.) स्पष्ट; भर.
**टळणें** (क्रि.) चुकणें; न घडणें; प्रतिज्ञेपासून ढळणें; निघून जाणें.
**टाइप** (इं. पु.) अक्षराचा वगैरे ठसा, खिळा; नमुना.
**टाइमपीस** (इं. न.) घड्याळाचा एक प्रकार.
**टाऊक** (न.) लाभ, प्राप्ति, फायदा.
**टांक** (सं. टंक पु.) ठसा, प्रतिमा; लेखणीचें अग्र; त्या अग्रांत मावणारी शाई; लेख; टाकी, छिनी; (प्रा. पु.) नाणें (ज्ञा० ७।२५); शहाणपण.
**टाक** (पु.) तोळा; नऊ मासे; चार मासे.
**टांकणखार** (पु.) एक प्रकारचा क्षार.
**टांकणी** (स्त्री.) पखवाजाच्या शाईच्या पुडीबाहेरचा भाग.
**टाकणें** (क्रि.) त्याग करणें, सोडणें, वर्जिणें; (प्रा.) मिळणें, पावणें; घडणें.
**टाकून बोलणें**—अमर्यादा करून बोलणें.
**टाकभाडें** (न.) नुसतें पोचविण्याबद्दलचें भाडें.
**टाकमटिकला, टाकटिळा** (पु.) डौल; नखरा, छानछुकी.
**टांकसाळ** (सं. टंकशाळा स्त्री.) नाणें पाडण्याचा कारखाना.
**टाकळणें** (क्रि.) थकणें, श्रमणें.
**टाकळा** (पु.), **टाकळी** (स्त्री.) एका वनस्पतीचें नांव.
**टाका, टांका** (पु.) टांचा, शिवण; शरीराचा सांधा; पाठीचा मणका.
**टाकाऊ** (वि.) टाकण्याजोगा; निरुपयोगी.
**टाकाटाकीं** (प्रा. अ.) त्वरेनें.
**टाकारी** (पु.) दगडाच्या जात्यास टांकी देणारा.
**टाकी** (प्रा. स्त्री.) कृति; आवड; आटोका.
**टांकी** (स्त्री.) हौद, पाण्याचा साठा; दगडांस टोचे पाडण्याचें एक औत; त्यानें पाडलेले टोचे.
**टांकें** (न.) हौद.
**टांकोटाक** (अ.) एकामागून एक; तंतोतंत; अतिशय त्वरेनें.
**टांकोटाकीं** (प्रा. अ.) टाकतां टाकतां.
**टांग** (हि. स्त्री.) तंगडी; ढेंग; चालतांना दोन पावलांमधलें ज्यास्तींत ज्यास्त अंतर.
**टांगणें** (क्रि.) लटकावणें, लोंबवणें.
**टांगरें** (न.) मोळी वगैरे आवळतांना दोरीला पीळ घालण्याकरितां घेतलेली काठी.
**टांगळ** (वि.) लांबटांग्या.
**टांगा** (हिं. पु.) तांगा, गाडी.
**टांगें** (प्रा. न.) मस्तक.
**टाच** (स्त्री.) पायाची खोट; जप्ती, हुकुमनाम्याची बजावणी.
**टांचण** (न.) टिपण, यादी.
**टाचणी** (स्त्री.) नेढें नसलेली सुई.
**टाचणी, टांचणी** (प्रा. स्त्री.) दुर्दशा (भा० २०।१६); संकोच (तुका० २९१३); टंचाई, उणीव.
**टांचणें** (प्रा. क्रि.) टंचाई पडणें.
**टांचर, टांचरूं** (प्रा. न.) टांच.
**टांचा** (पु.) टाका, शिवण; (प्रा. वि.) अपुरता, लहान.
**टाचें** (प्रा. वि.) उणें, थोडें; (न.) टंचाई.
**टाटोळा** (पु.) केळीच्या पानाचा दांडा; जोंधळयाचें ताट.
**टाणाटोणा** (हिं. पु.) मंत्रतंत्र.
**टाप** (स्त्री.) घोड्याचा तळपाय; लाथ.
**टापटीप** (स्त्री.) नीटनेटकेपणा, सुव्यवस्था.
**टापर** (स्त्री.) घोड्याची लाथ; डोक्याभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र.
**टापरण** (न.) डोक्याला गुंडाळलेलें वस्त्र; उपकाराचें ओझें.
**टापरणें** (क्रि.) हातोडीनें ठोकणें; रागावणें; खरडपट्टी काढणें; टोमणा मारणें.

**टापरणें** (न.) मोगरी, हातोडी.
**टापरा** (पु.) लाकडाची मोठी खुंटी.
**टापरी** (स्त्री.) डोक्याचें पागोटें इ० वरून उपरणें वगैरे वस्त्र गुंडाळतात तें; टापशी.
**टापशी** (स्त्री.) टापरी पहा.
**टापसा** (पु.) फुगीर भाग; फुगी.
**टापासटीप** (पु.) वेतास वात.
**टापू, टापूं** (हि. पु.) बेट; समुद्रांतली हद्द; प्रांत; टप्पा; वनस्पतीचें कोंवळें अग्र; रोप; जोंधळ्याचें किंवा बाजरीचें ताट.
**टाफ, टाफर** (स्त्री.) टाप, टापर पहा.
**टाफरें** (प्रा. वि.) ठेचाळत चालणारें.
**टामटूम** (हिं. स्त्री.) नगाऱ्याचा आवाज; डामडौल; तमाशा.
**टार** (पु.) घोडा. [ खरटा.
**टारगट, टारगा** (वि.) चटोर; फाजील;
**टारगेपणा** (पु.) वात्रटपणा, चटोरपणा, छचोरपणा.
**टारलें** (न.) पाळणा. [प्रयत्न; टुरटुर.
**टाराटुरी** (स्त्री.) पोकळ धमकी; निष्फळ
**टाल** (पु. न.) इमारतीचीं किंवा सर्पणाचीं लाकडें मिळण्याचें दुकान; डोक्याची गुळगुळीत हजामत.
**टालमटोला** (पु.) टंगळमंगळ, टाळाटाळ; कालवाकालव. [सतत ओरडणें.
**टाहो** (पु.) लहान मुलांचा मोठा आक्रोश;
**टाळ** (सं. स्त्री.) झांजेसारखें एक वाद्य.
**टाळकुटचा** (वि.) तिरस्कारार्थी--भजनी; भक्तिमार्गी; मनांत खरोखर भक्ति वागत नसतां केवळ तोंडानें भक्तिपर अभंग वगैरे म्हणून जोरानें टाळ वाजविणारा.
**टाळकें** (सं. ताल न.) तिरस्कारार्थी--डोकें.
**टाळणें** (क्रि.) चुकविणें.
**टाळा** (पु.) टाळणें; टहाळा; फांदी; वरच्या जबडयाचा मध्यभाग (टाळू); कुलूप.
**टाळाटाळ** (स्त्री.) चुकवाचुकव.
**टाळी** (स्त्री.) दोन्ही तळहात एकमेकांवर आपटण्यानें होणारा आवाज; (प्रा.) समाधि. **टाळी वाजणें**--लग्न लागणें.
**टाळु** (सं. तालु स्त्री.) तालु, कवटी, मस्तकाचा अग्रभाग.
**टाळू** (स्त्री.) वरच्या जबडयाचा मध्यभाग.
**टाळें** (न.) तालु; कुलूप; जमिनींतील मोरीला ठेवलेलें दार.
**टिकणें** (क्रि.) नाश न पावतां राहणें, टिकाव धरून राहणें.
**टिकलग** (प्रा. वि.) शोभिवंत.
**टिकला** (सं. पु.) टिळा, टिक्का, तिलक.
**टिकली** (स्त्री.) लहान टिळा; वाटोळा लहान तुकडा.
**टिकविणें** (क्रि.) राखणें; (पैसे) देणें.
**टिकशी** (स्त्री.) अंकुर, कोमल अग्र.
**टिका** (पु.) टिळा.
**टिकाईत** (हिं. पु.) गादीचा हक्कदार.
**टिकाऊ** (वि.) टिकणारा, दमदार.
**टिकारणें** (न.) हातांत घ्यावयाचें दांडकें.
**टिकाव** (पु.) निभाव; कुदळ.
**टिकी** (स्त्री.) निर्वाहाचें साधन; नोकरी; रोपाचें अग्र, डिगशी. **टिकी लागणें**--नोकरी वगैरे मिळणें.
**टिकु** (प्रा. पु.) टिकला; स्थिति.
**टिकेलें** (प्रा. वि.) टिकलेलें, स्थिर.
**टिकोजी** (पु.) बाजीराव.
**टिकोरा** टकोरा पहा.
**टिकोरी** (स्त्री.) डोक्याची कवची.
**टिकोरें** (न.) लांब जाड लाकूड, दांडकें.
**टिक्का** (पु.) टिळा, तिलक.
**टिंगणें** (क्रि.) लंगडणें; लोंबकाळणें (गुज०).
**टिचकी** (स्त्री.) चुटकी, टचका. [देणें.
**टिचणें** (क्रि.) नेम मारणें; (पैसे) भरणें,
**टिचा** (पु.) दुष्कीर्ति.
**टिच्चून** (क्रि. वि.) समोरासमोर; रोखठोक.
**टिचें** (न.) तीव्र वेदना; गळू.
**टिट** (प्रा. न.) चोंच (ज्ञा० ६।७७).
**टिटघर** (प्रा. न.) सोंगटयांतील कटवर.
**टिटवी** (स्त्री.) एक पक्षी.
**टिटिभ** (प्रा. पु.) टिटवी.
**टिनपाट** (इं. न.) हलकें भांडें; **टि० वाजणें**--दिवाळें निघणें.
**टिपकणें** (क्रि.) टप् टप् गळणें.

**टिपका** (पु.) थेंब; गळती; ठिपका.
**टिपण** (न.) टांचण, यादी; जन्मपत्रिका.
**टिपणबुक** (न.) पैमाष खात्यांतले लोक जमिनीचें क्षेत्रफळ काढतांना लांबी रुंदीची टिपणें एका बुकांत लिहितात तें बुक. इंग्रजींत याला फील्ड बुक म्हणतात.
**टिपणी** (सं. स्त्री.) टीप.
**टिपणें** (क्रि.) टांचणें, लिहून ठेवणें; एक एक दाणा वेचणें; पुसणें; सारवणें.
**टिपणीस** (हिं. पु.) गांवांची, लष्कराची वगैरे मोजदाद ठेवणारा अधिकारी.
**टिपरघाई** (स्त्री.) अतिशय त्वरा.
**टिपरी** (प्रा. स्त्री.) चिमटा (मोरो०कृ० ४९।४५); घट्ट पोषाख; खेळांतलें टिपरूं; एक माप.
**टिपरीपुनव** (स्त्री.) त्रिपुरी पौर्णिमा.
**टिपरूं** (न.) दांडू; उंसाचा तुकडा. [राहणें.
**टिपुसणें** (क्रि.) थेंबाथेंबानें पाणी गळत
**टिपूं** (न.) थेंब; अश्रूचा बिंदु.
**टिपूर** (सं. त्रिपुर पु.) दीपमाळ; चांदणें; (वि.) प्रकाशमान.
**टिपूरघाई** (स्त्री.) टिपऱ्या खेळणाऱ्या मुलांची घाई; फार जलदी.
**टिपूस** (पु.) थेंब; स्वल्पांश.
**टिप्पण** (न.) टिपण पहा.
**टिप्पणी** (स्त्री.) टीप, खुलासा.
**टिंब** (न.) पूज्य; अनुस्वार.
**टिबकणें** (क्रि.) थेंबथेंब गळणें.
**टिबका, टिबुक** (पु.) ठिपका; बिंदु.
**टिमकी** (स्त्री.) एक चर्मवाद्य.
**टिरटिर** (स्त्री.) क्षणभंगुर तेजस्विता.
**टिरी** (स्त्री.) ढुंगण.
**टिल्लू** (वि.) लहान, खुंजा.
**टिवल्या-भावल्या** (स्त्री. अने.) उनाड-पणा, कुचेष्टा; रिकामटेकडचा गोष्टी.
**टिवा** (पु.) टिपका.
**टिळ** (सं. तिलक पु.) टिळा.
**टिळक** (सं. तिलक पु.) टिकला, तिलक, टिळा.
**टिळा** (सं. तिलक पु.) टिकला, ठिपका.
**टिळाटोपी** (स्त्री.) टिळेमाळा; पवित्र-पणाचा बाह्य देखावा.
**टीक** (स्त्री.) लहान, सुशोभित, नकशीची टिकली; हिरेमोत्यांची चौकडी; डोळयांतल्या भावलीवर येणारा पांढरा ठिपका.
**टीका** (सं. स्त्री.) व्याख्या; स्पष्टीकरण; गुणदोष-विवेचन; दोषदर्शन; निंदा.
**टीकाकार** (सं. पु.) टीका करणारा.
**टीच** (स्त्री.) अंगठा आणि तर्जनी ताणली असतां त्यांच्यामध्यें पडणारें अंतर; टिचकी; तीट.
**टीप** (हि. स्त्री.) मोजदाद; गणती; शब्दार्थ वगैरेचें स्पष्टीकरण; वस्त्रास दोरा घालणें; यादी; अश्रु; (न.) नेम.
**टीपकागद** (पु.) शाई टिपण्याचा कागद.
**टीर** (स्त्री.) कुल्ला, ढुंगण, टिरी. **टीर बडविणें**—अत्यानंद होणें.
**टुक** (प्रा. स्त्री.) तजवीज, व्यवस्था (तुका० ४३९५); कसोटी (मोरो० कृष्ण० ५७।२०); (वि.) थोडा.
**टुकटुक** (अ.) लोभयुक्त दृष्टीनें. **टु० नाकड करणें**—कांहीं खाण्याची वस्तु एकटयानेंच घेऊन दुसऱ्यास चिडवि-ण्यासारख्या खुणा करणें. [तजेलदार.
**टुकटुकीत** (वि.) तुकतुकीत, ताजा;
**टुकणी** (स्त्री.) विणकऱ्याच्या फणीच्या दांत्यांकरितां बांबूच्या चोया करण्या-साठीं खोवणी पाडलेली फळी.
**टुकणें** (क्रि.) रोखून पाहणें.
**टुकळा** (पु.) झुरणी, नाद, छंद.
**टुंग, टुंगर, टुंगळ, टुंगूळ** (न.) टेंगूळ; झाडावर वाढलेली गांठ; जमिनीवरचा लहान उंचवटा.
**टुचकुली** (स्त्री.) टोचणी, बुचकी, ढुसणी, चिमटी.
**टुणकन्** (क्रि. वि.) टुणदिशीं, टुणकन्.
**टुपणें** (क्रि.) बुसडणें, शिरकाविणें; सुईच्या नेंडयांत दोरा घालणें.
**टुंबर, टुंबरूक** (न.) टुंग पहा.
**टुमटाम** (पु.) डामडौल, दिमाख.
**टुमटुमीत** (वि.) गुबगुबीत, ताजातवाना.
**टुमणी, टुमणें** (स्त्री.) निकड, टोचणी; नेट.
**टुमदार** (वि.) शोभिवंत, लहान असून रम्य.

**टुरटुर** (स्त्री.) किरकिर; थोडा वेळपर्यंत चकित करून सोडण्यासारखें कृत्य.
**टुरमा** (वि.) ठेंगणा ठुसका.
**टुल्लु** (वि.) ठेंगणा व गुबगुबीत.
**टूक** (स्त्री.) युक्ति, कुशलता, चापल्य; टक, सारखी नजर; अतिशय बेतावात.
**टूम** (स्त्री.) पद्धत; चाल; नवी तऱ्हा.
**टेक** (प्रा. न.) पेव, समूह, पुंज.
**टेक, टेंक** (स्त्री.) शिकस्त; धैर्य, दृढता; (पु. न.) उंचवटा; डोंगर; इच्छा. **टेक धरणें**—नेट धरणें; **टेकोस टेक उतरणें**—स्पर्धा लावणें.
**टेकडी** (हिं. स्त्री.) लहान डोंगर.
**टेकण** (न.) आधार. [बेतांत असणें.
**टेकणें** (क्रि.) आधार घेणें, अंग टाकणें,
**टेकबाज, टेचबाज** (वि.) गर्विष्ठ.
**टेका** (पु.) आधार, दुजोरा, पुष्टि.
**टेकाड** (न.) उंचवटा, उंच जागा.
**टेकाडी** (स्त्री.) लहान टेकडी.
**टेकावणें** (क्रि.) होण्याच्या किंवा करण्याच्या बेतांत असणें. [आधार, पाठबळ.
**टेकू** (पु.) ज्याच्यावर तरफ टेकतात तो;
**टेंगळ, टेंगूळ** (न.) आघातामुळें डोक्याला येणारी गांठ; उटंगळ.
**टेणपणें** (क्रि.) काठीनें मारणें.
**टेणपा** (पु.) सोटा, जाड काठी, दांडकें.
**टेणा** (पु.) दिव्याची जाड वात; लठ्ठ, धष्टपुष्ट प्राणी.
**टेणें** (न.) उडी. [फीत किंवा नाडी.
**टेप** (इं. स्त्री.) लांबी रुंदी इ० मोजण्याची
**टेप** (न.) टेकाड; डोक्यानें दिलेली धडकी; शिक्षेची मुदत; प्रहार.
**टेपण, टेपणें** (न.) खांब अपुरा पडल्यास त्याच्यावर किंवा खालीं भरतीसाठीं लाकडाचा तुकडा बसवतात तो.
**टेपण, टेपर, टेपरें** (न.) दोष, बोल, ठपका; निमित्त.
**टेपरणें** (क्रि.) ढकलणें, कोलणें; (न.) मोगरी; लाकडाची हातोडी; सोटा.
**टेपरा, टेंटरा** (पु.) उंचवटा; दोष, बोल, टपका. [सोटा, दांडकें.
**टेपलणें** (क्रि.) आदळणें, आपटणें; (न.)

**टेंबरूं** (न.) टेंबुरणीचें फळ.
**टेबल** (इं. न.) मेज.
**टेंबा** (पु.) मशाल; मोठा काकडा; डौल; ऐट; शिखर; आधार, आश्रय.
**टेंबुरणी, टेंभुरणी** (सं. तिंदुक स्त्री.) एक वृक्ष.
**टेंभलणें** (क्रि.) ओरडणें.
**टेंभा** (पु.) मशाल. **टेंभा पाजळणें**—(निंदार्थी) प्रकाश पाडणें, पराक्रम करून दाखविणें; **टेंभा मिरविणें**—ऐट दाखविणें.
**टेंभेकरी, टेंभ्या** (पु.) टेंभा धरणारा.
**टेर** (स्त्री.) अतितृप्ति; (पु.) विष्ठेचा ढीग.
**टेर्लटिकोरी** (स्त्री.) उगाच भटकणें; टाळाटाळ.
**टेव** (पु.) युक्ति; खोड, वाईट संवय; हौस, आवड.
**टेवा** (प्रा. पु.) ढव, डौल; बीळ, छिद्र.
**टेहणी** (प्रा. स्त्री.) अटकाव, प्रतिबंध; टवाळी, हंसें; देखरेख (ज्ञा० १३।५०६); अनास्था (रुक्मि० ८।५२). [पोहो.
**टेहर** (स्त्री.) टर, फजिती; (पु.) विष्ठेचा
**टेहलटिकोरी** (स्त्री.) उगाच भटकणें.
**टेहलणें** (क्रि.) इकडे तिकडे फिरणें, खेपा घालणें.
**टेहळणी** (स्त्री.) दुरून लक्ष ठेवणें; दुरून केलेली बारकाईची पाहणी.
**टेहळणें** (स्त्री.) दुरून बारकाईनें पहाणें किंवा तपासणें; पाहरा करणें.
**टेहळ्या** (पु.) टेहळणी करणारा.
**टोंक** (न.) अग्र, चोंच.
**टोक, टोंक** (स्त्री.) चोंच; (न.) अग्र.
**टोकण** (न.) टोंक, अग्र.
**टोकणें** (हिं. क्रि.) रोखणें, पुढें न जाऊं देणें; आशेनें दृष्टि लावणें; निघून पहाणें.
**टोकर** (पु.) बुधली, चामडयानें मढविलेली डोणी; घमेलें; लांब व जाड बांबू.
**टोकरा** (पु.), **टोकरी** (स्त्री.) चामडयानें मढविलेली डोणी; बुधली; चिंचोळें टोंक; चोंच; जाड कागद; होडी.
**टोकरे हशील** (न.) नावेवरचा कर.

**टोकळा** (पु.) नाद, ध्यास; रोजच्या स्वैंपाकाचा शिधा; तोंडांत जिभेनें काढलेला चमत्कारिक आवाज. [ कीड.
**टोका** (प्रा. पु.) माप, ताजवा; धान्यावरची
**टोंग** (वि.) हट्टी, छांदिष्ट; उर्मट; आडदांड.
**टोंगळ** (वि.) जाड, भक्कम.
**टोंगदार** (वि.) पोकळ डौली, बढाईखोर.
**टोच, टोंच** (स्त्री.) चोंच; टोचून केलेलें छिद्र.
**टोंचणी** (स्त्री.) सूक्ष्म अग्राचा तीव्र आघात; जाचणी; टुमणी; काडीचें तीक्ष्ण टोंक.
**टोंचणें** (क्रि.) तीक्ष्ण टोंकानें आघात करणें; बोचणें; खोचणें.
**टोचा** (पु.) टोचल्याची खूण; छिद्र; टोचणी.
**टोटरा** (पु.), घशाची कोरड.
**टोणका** (पु.) ओंडका, ओंडा.
**टोणगा** (पु.) रेडा, हल्या.
**टोणगी** (स्त्री.) म्हैस; आडदांड, प्रौढ मुलगी.
**टोणपणें** (क्रि.) दांडुक्यानें बडविणें.
**टोणपा** (प्रा.) लाकडाचा ठोकळा, सोडगा; (वि.) मूर्ख, विद्याहीन.
**टोणपेश्वर** (पु.) जंगी सोटा; ठोंब्या.
**टोणवा** (प्रा. पु.) दांडा.
**टोणा—ण्या** (पु.) लठ्ठ ढेकूण.
**टोणी** (स्त्री.) लाकडाची गांठ. [ चेटुक.
**टोणें** (न.) जड ओझें; मिळकतीचें द्वार;
**टोप** (पु.) धातूचें उभट व रुंद तोंडाचें पात्र; बनावट केसांची वेणी; मुखवटा; मुकुट; शिरस्त्राण.
**टोपकर** (पु.) टोपी घालणारा; युरोपियन.
**टोपडा** (पु.) युरोपियनांसंबंधाचा निंदाव्यंजक शब्द.
**टोपडें** (न.) लहान मुलाची टोपी.
**टोपण** (न.) झाकण, अंगुस्तान; गिरमीट, सामता; नगाऱ्याच्या उपयोगाचें पात्र; (वि.) प्रचारांतलें; ऊर्फ.
**टोपणें** (न.) गिरमीट, सामता.
**टोपपदर** (पु.) ज्या पदरांत उभी आडवी वीण सर्व रेशमी असते असा पदर.
**टोपरवेणी** (स्त्री.) लहान मुलींची वेणी घालण्याचा एक प्रकार.
**टोपरें** (न.) टोपडें.
**टोपला** (पु.) हारा, मोठी पाटी.
**टोपली** (स्त्री.), **टोपलें** (न.) पाटी.
**टोपशी** (स्त्री.) सूज; डोक्याची कातडी.
**टोपसण** (न.) लहान डबी किंवा ताईत इ० चें झाकण.
**टोपसणें** (क्रि.) सुजणें.
**टोपसल, टोपसाल** (स्त्री.) सालडें, कातडें.
**टोपसा** (पु.) डोकें व कान यांवरून गुंडाळलेलें वस्त्र.
**टोपा** (पु.) इरल्यासारखें एक आच्छादन.
**टोपी** (पोर्तु. तापीज स्त्री.) विशेष प्रकारचें डोक्याचें एक आच्छादन. **एखाद्याला टोपी घालणें**—त्याला फसविणें; बुडविणें.
**टोपीकर, टोपीवाला** (पु.) युरोपियन.
**टोपु** (पु.) फुगवटा, फुगारा, सूज.
**टोपें** (न.) मोठा द्रोण.
**टोमणा** (पु.) विटीला बसणारा टोला, रट्टा, आघात; छद्मी भाषण.
**टोलणें** (क्रि.) धक्काबुक्की करणें.
**टोलर, टोल्हर** (प्रा. वि.) पोकळ.
**टोलवाटोलव** (स्त्री.) ढकलाढकल; टंगळमंगळ.
**टोलविणें, टोलावणें** (क्रि.) आज उद्यां अशा थापा मारून लांबणीवर ढकलणें; लांबणीवर टाकणें; अंगावर पडलेलें काम उडवन देणें; टोमणा मारणें.
**टोला** (पु.) रट्टा, आघात; रोडा, विटेचा तुकडा. [ पोकळ.
**टोलार** (वि.) किडचांनीं पोखरलेला;
**टोली** (स्त्री.) अर्धी दमडी.
**टोलेजंग** (वि.) भव्य, प्रचंड.
**टोल्या** (वि.) एखादें काम स्वतःच्या अंगावरून काढून दुसऱ्यावर घालणारा.
**टोल्हार** (वि.) टोलार पहा.
**टोव** (पु.) लहान खळगा; सीमेची खूण म्हणून दगडावर खूण करतात ती.
**टोवणें** (क्रि.) वाटाणे वगैरे पेरणें; खळगींत टाकणें; (न.) तेलाचें पांच शेरांचें माप. [ पंख असलेला एक किडा.
**टोळ** (पु.) पिकांचा नाश करणारा व

**टोळधाड** (स्त्री.) टोळांची झुंड उतरणें.
**टोळपणें** (क्रि.) उतरणें, कमी होणें.
**टोळभैरव** (पु.) उनाड; रिकामटेकडा.
**टोळी** (स्त्री.) समुदाय, घोळका, जमाव; एक प्रकारची मासळी.
**टौका** टवका पहा.
**टौकारणें-टवकारणें** (क्रि.) पाहतांना डोळे वटारणें.
**टौर** (वि.) उडाणटप्पू, पाजी.
**ट्याहां** (न.) लहान मुलाचें रडणें.
**ट्रंक** (इं. पु. स्त्री.) लोखंडी पेटी.
**ट्रॅम** (इं. स्त्री.) सार्वजनिक रस्त्यांतून रुळांवरून चालणारी गाडी.

---

## ठ

**ठ** मराठी व्यंजनमालेंतील बारावें व्यंजन.
**ठक** (पु.) फसव्या, धूर्त मनुष्य ; (प्रा. वि.) तटस्थ; (प्रा. न.) तटस्थपणा; एकाग्रता (भा० १०।७०९); आश्चर्य.
**ठकठक** (स्त्री.) ठकठक आवाज, किटकिट.
**ठकडा** (प्रा. वि.) ठकबाज, लुच्चा, सोदा.
**ठकडेपणा** (प्रा. पु.) फसवेगिरी.
**ठकणूक** (स्त्री.) फसवणूक, फसगत.
**ठकणें** (प्रा. क्रि.) ठाकणें पहा; अंतरणें; बंद पडणें (ज्ञा० यो० ७।३०); बंद राहणें (ज्ञा० १७।१८६); फसणें; बुडणें.
**ठकबाज** (वि.) लुच्चा, कपटी.
**ठकबाजी** (हिं. स्त्री.) लुच्चेगिरी, फसवेगिरी.
**ठकवणी, ठकवणूक** (स्त्री.) फसवणूक.
**ठकविद्या** (स्त्री.) दुसऱ्याला फसविण्याची विद्या; ठकाचें चातुर्य.
**ठकाठकी** (प्रा. स्त्री.) फसवाफसवी.
**ठकार** (प्रा. वि.) मनोहर; तोटा येणारा.
**ठकोर** (पु.) परिपाठ; कार्यक्रम.
**ठग** (पु.) ठक, फसव्या.
**ठगाई** (हिं. स्त्री.) लुच्चेगिरी, फसवेगिरी.
**ठगी** (स्त्री.) ठग लोकांचा धंदा.
**ठणकणें** (क्रि.) दुखणें, वेदना होणें.
**ठणका** (पु.) दुःख, वेदना.
**ठणकावणें** (क्रि.) ठोठावणें, जोरानें प्रहार करणें; भांड्यावर आवाज काढणें; खरडपट्टी काढणें; विंचू वगैरेनें नांगी मारणें किंवा दंश करणें. [करणें.
**ठणठणणें** (क्रि.) टणटण उडणें; वेदना
**ठणठणपाळ** (पु.) मूर्ख, गयाळ; दरिद्री; कफल्लक.
**ठणठणाट** (पु.) वोंब; शुष्कता; दुर्मिळता.
**ठणठणीत** (वि.) अगदीं कोरडें.
**ठपका** (हिं. पु.) टपका, दोष, बोल.
**ठमकठावणी** (प्रा. स्त्री.) सुंदर स्त्री.
**ठमकणें** (क्रि.) नखऱ्यानें चालणें.
**ठमका** (पु.) ऐटबाज चाल; आवेग; उसळी.
**ठमकारा** (पु.) ताठा, गर्व, नखरा.
**ठरणें** (क्रि.) निश्चय होणें, टिकणें.
**ठरविणें** (क्रि.) निश्चित करणें; नेमणें; करार करणें. [कायदा.
**ठराव** (हिं. पु.) निकाल; सिद्धांत; नियम,
**ठरीव, ठराविक** (वि.) कायमचा.
**ठरोती** (स्त्री.) ठराव; निर्णय; करार.
**ठस** (प्रा. वि.) स्पष्ट, स्वच्छ; निश्चित, निर्भीड (दा० २।३।३२).
**ठसक** (स्त्री.) ऐट; नाजूकपणा; उठाव, मनावर पडणारी छाप.
**ठसकदार** (वि.) नादयुक्त; ऐटदार.
**ठसका, ठसकारा** (पु.) खोकला; ढास; ठणकारा; तोरा. [डौलदार.
**ठसकेबाज** (वि.) फाकडा, छानदार,
**ठसठशीत** (वि.) ठळक, घस्मरित.
**ठसठस** (स्त्री.) ठणका, तीव्र वेदना.
**ठसठसणें** (क्रि.) तीव्र वेदना किंवा ठणका होणें. [शत्रु (दा०२।३।३२).
**ठसठोंबस** (प्रा. वि.) निर्भीड व अक्षर-
**ठसणें** (क्रि.) बिंबणें.
**ठसविणें** (क्रि.) मनांत उतरेल असें करणें, बिंबविणें.
**ठसा** (हिं. पु.) छाप, प्रतिबिंब; मुद्रा; साचा.
**ठसील** (प्रा. वि.) ठशाचें.
**ठसेंठोंबसें** (प्रा. वि.) ओबड धोबड, मोठें घाटें (ज्ञा० १५।५९३).
**ठळक** (वि.) मोठें, ठळठळीत; स्पष्ट.
**ठाइका** (वि.) तसाच.

**ठाऊ-व, ठावो, ठाओ** (पु.) ठिकाण, जागा
**ठाउका** (वि.) प्रसिद्ध.
**ठाउवें** (प्रा. वि.) माहितीचें.
**ठाऊक** (वि.) माहीत, कळलेलें.
**ठाक** (प्रा. पु.) ठसा.
**ठाकठिकी** (स्त्री.) सुव्यवस्था, वेतवात.
**ठाकठीक** (वि.) व्यवस्थित, बरोबर.
**ठाकठोक** (प्रा. वि.) रोख, प्रत्यक्ष; (अ.) तत्काळ.
**ठाकण, ठाकणी** (स्त्री.) स्थान.
**ठाकणें** (प्रा. क्रि.) उभें राहणें, स्तब्ध राहणें; स्वीकारणें (भा० १९।११४); जवळ करणें; प्राप्त होणें; बंद होणें.
**ठाकत** (प्रा. पु.) ध्यास.
**ठाकतें** (प्रा. वि.) साध्य (ज्ञा० १०।१८०).
**ठाका** (पु.) रट्टा, तडाखा; जोराचें युद्ध.
**ठाकाठोका** (पु.) जोशानें सांगितलेलें भविष्य.
**ठाकी** (स्त्री.) चाल, पद्धत; पखवाज वाजविण्याची एक तऱ्हा.
**ठाकुर** (पु.) देव; एका जातीचें नांव.
**ठाकुरद्वार** (न.) देवमंदिर.
**ठाकून ठोकून** (अ.) युक्तिप्रयुक्तीनें, अनेक हिकमती करून.
**ठाठ-ठं** (न.) बंदुकीच्या बाराचा आवाज.
**ठाडे** (हिं. वि.) उभें.
**ठाण** (सं. स्थान न.) शरीराची ठेवण; ठिकाण, स्थळ; आसन, पवित्रा; धैर्य. **ठाण मांडणें**—सज्ज होणें.
**ठाणक** (सं. स्थान न.) देवस्थान.
**ठाणगा** (पु.) ठाण्याचा शिपाई; किल्ल्यावरचा नाईक; एक हलका अंमलदार; ठाणेदार.
**ठाणठकारें** (प्रा. वि.) उत्तम बांध्याचें.
**ठाणदिवी** (प्रा. स्त्री.) टांगलेला दिवा; ठाणवई.
**ठाणबंद** (वि.) ठाण्यांतच नेहमीं बांधून [ठेविलेला (घोडा).
**ठाणमाण** (प्रा. न.) शरीराचा बांधा.
**ठाणवई, ठाणवी** (प्रा. स्त्री.) दिवा ठेवण्याकरितां केलेली घडवंची; समई.
**ठाणांतर** (प्रा. न.) चौकी, पाहाऱ्याची जागा (ज्ञा० १३।५०९).
**ठाणांतरी** (प्रा. पु.) पाहारेकरी.
**ठाणें** (प्रा. क्रि.) राहणें.
**ठाणें** (हिं. न.) मुख्य ठिकाण; स्थिति; मुक्काम; राहणें; स्वरूप, आकार.
**ठाणेदार** (पु.) ठाण्यावरचा मुख्य अधिकारी.
**ठाणेबंद** (वि.) ठाणावरच बांधून ठेवलेला (घोडा इ०)
**ठाणोरी, ठाणौरी** (प्रा. पु.) रणांत पडलेला योद्धा (ज्ञा० १८।४३५).
**ठांबी** (स्त्री.) वासा; स्तंभ.
**ठाम** (हिं. वि.) दृढ, पक्का, कायम.
**ठामणें** (न.) भांडें, पात्र.
**ठाय** (सं. स्थान पु.) स्थान, ठिकाण; निश्चय (ज्ञा० ९।२६३); ठाव; प्रकार (ना० ७५५); (क्रि.) उभा रहाणें (भा० १४।१०९). **ठायीं पडणें**—आढळणें, उघडकीस येणें. **ठायीं पाडणें**—थांग लावणें; निश्चितपणें समजणें; मानवणें; **ठाय फेडणें**—फडशा करणें; **ठायीं ठेवणें**-जाणणें. [खरोखर, परिपूर्ण.
**ठायींठाव, ठायेठाव** (प्रा. अ.) तत्काळ;
**ठार** (अ.) अगदी, सर्वथा; मारलेला.
**ठाव** (प्रा. पु.) पात्र, ताट (तुका० १०४०); भाव (ना० ७५६).
**ठाव** (पु.) जलाशयाचें तळ; आश्रय; थांग, पत्ता, अंत; केळीचें पान. **ठाव पाहणें**—अजमास पाहणें; अंत पाहणें.
**ठावका** (वि.) ठाऊक; माहीत असलेला; (पु.) पान, पत्रावळ; पणती.
**ठावठिकाण** (न.) पत्ता.
**ठावणें** (सं. स्था क्रि.) राहणें.
**ठावा** (वि.) ठाऊक, ज्ञात.
**ठावें** (प्रा. न.) ठिकाण; (वि.) ठाऊक.
**ठावोवरी** (प्रा. अ.) पर्यंत.
**ठास** (वि.) टणक; गच्च; कर्कश; स्पष्ट, सडेतोड; ठरलेला; विश्वसनीय.
**ठासणी** (स्त्री.) चेपून भरणें.
**ठासणें** (क्रि.) खच्चून भरणें.
**ठासा** (पु.) मागावर आडवी सुतें फणीनें घट्ट बसविण्याची क्रिया.
**ठीं** (प्रा. स्त्री.) नांव; दोष.
**ठिक** (प्रा. पु.) चट्टा.

**ठिकडें** (न.) अंगठींतला हिऱ्याचा खडा; सुंदर मोहक माणूस, मूल इत्यादि.
**ठिकणें** (प्रा. क्रि.) स्थिर राहणें.
**ठिकरी** (स्त्री.) लहान तुकडा; खापरी; (वि.) भिन्न.
**ठिकाण** (न.) स्थान; घरदार; पत्ता, खूण; अंत; आश्रय; थांग.
**ठिकाणा** (हिं. पु.) ठिकाण.
**ठिकी** (स्त्री.) गोणपाटाची शिवलेली कणगीसारखी मोठी पिशवी; इमारती लाकडांची रास.
**ठिकें** (न.) ठिकाण.
**ठिकोळें** (न.) लहान पत्रावळ.
**ठिक्कर** (वि.) अतिशय काळा.
**ठिगणा, ठेंगणा, ठिगू, ठिग्या** (वि.) अंगानें जाड पण उंचीनें लहान.
**ठिगळ** (न.) जुन्या फाटक्या वस्त्राला लावलेला कप्पा; जोड. **ठिगळणें** (क्रि.)– भोंक पडलेल्या वस्त्राला कप्पी किंवा जोड देणें.
**ठिगळी** (स्त्री.) ठिणगी.
**ठिणगी** (हिं. स्त्री.) अग्नीचा कण, स्फुलिंग.
**ठिपकणें, ठिबकणें** (क्रि.) थेंब थेंब गळणें.
**ठिपका** (पु.) थेंब, बिंदु, ठिकला.
**ठिया** (पु.) कमी उंचीच्या खांबाला वेताचा उंच करण्याकरितां खालीं लावलेला लांकडाचा किंवा दगडाचा तुकडा.
**ठिला–ली–ल्या** (पु.) दहीं-दूध ठेवण्याचें मडकें; (वि.) वाटोळा.
**ठिसरी** (स्त्री.) निंदा.
**ठिसूळ** (वि.) ढिसूळ, लवकर मोडणारें.
**ठी** (प्रा. स्त्री.) ठिकाण; युक्ति; मार्ग (ज्ञा० १५।४३२); शेवट (ज्ञा० २।३६४); नांव, दोष, निश्चय. **ठी ठेवणें**–नांवें ठेवणें (मोरो०कृष्ण० ३६। २३); **ठीस ठी मिळविणें**—मेळ बसविणें.
**ठीक** (अ.) बरोबर, योग्य, बेताचें; (स्त्री.) मोत्यांचा झुबका.
**ठीकठाक** (वि.) व्यवस्थित, बरोबर.
**ठुणका** (प्रा. पु.) ठोसा (दा० ३।७।२५).
**ठुणगुण** (प्रा. पु.) गाजावाजा, दांभिकपणा (तुका० २१६८).
**ठुणठुणणें** (क्रि.) ठुसठुसणें.
**ठुठण** (हिं. न.) झाडाचें अग्रभाग तुटलेलें खोड; टोक तुटलेलें शस्त्र.
**ठुंबरी** (स्त्री.) शृंगारिक कविता.
**ठुमकणें** (क्रि.) नखऱ्यानें चालणें.
**ठुमरी** (स्त्री.) ठुंबरी पहा.
**ठुशी** (स्त्री.) बायकांच्या गळयांतला एक [दागिना.
**ठुसका** (वि.) भरींव.
**ठुसठुस** (स्त्री.) ठणका.
**ठेऊ** (वि.) राखीव; ठेवणीचें; काटकसरी.
**ठेक** (प्रा. पु.) अंकुश.
**ठेका** (पु.) पखवाजाच्या आवाजांतलें कालमापन; (हिं. पु.) मक्ता; खोती; मुसळधार पाऊस; जोराचा ताप.
**ठेका चालवणें**(क्रि.)हेका किंवा हट्ट चालवणें
**ठेकेदार** (हिं. पु.) मक्तेदार.
**ठेंगडा** (पु.) गाढव.
**ठेंगडी** (स्त्री.) गाढवी.
**ठेंगणा** (वि.) खुजा, वामनमूर्ति; (प्रा. वि.) नीच, हलका; उणा.
**ठेंगणें** (प्रा. वि.) उणें (विवे०पू०१।७५); हलकें (भा० ५।१५८).
**ठेंगा** (पु.) वाळलेला सोट (तुका०२२०३); सोटा; उर्मटपणा; बंड; नास्तिक मत.
**ठेंगू, ठेंग्या** (वि.) ठेंगणा, खुजा.
**ठेंगेपण** (प्रा. न.) कृपणता.
**ठेच** (स्त्री.) ठोकर, अड्‌ल.
**ठेचणें** (क्रि.) चेचणें, ठासून भरणें.
**ठेचा** (पु.) धणा; ठेचलेला पदार्थ; चटणी.
**ठेचाळणें** (क्रि.) ठेच लागणें.
**ठेणें** (प्रा. क्रि.) उभें राहणें; राहणें (याचा फक्त भूतकाळीं उपयोग होतो).
**ठेप** (स्त्री.) मर्यादा; कैद; संघर्षण होऊन बंद पडणें.
**ठेपणें** (क्रि.) टेकणें, भिडणें, येऊन पोंचणें.
**ठेपराई** (स्त्री.) टापटीप, व्यवस्था.
**ठेपलणें** (क्रि.) कुरवाळणें, गोंजारणें; आशा लावून फसविणें.
**ठेपसा** (पु.) ढेपसा, मोठें ढेकळ; पेटविलेला शेणाचा ढीग.

**ठेपा** (पु.) आधार, टेका.
**ठेंबा** (पु.) आधारस्तंभ.
**ठेंवे** (न.) संकेत.
**ठेल** (वि.) पुष्कळ, रगड; (स्त्री.) विपुलता; दाटी, गर्दी.
**ठेलणें** (प्रा. क्रि.) ढकलणें.
**ठेला** राहिला, उभा राहिला; कुंठित झाला.
**ठेलाठेली** (प्रा. स्त्री.) धक्काबुक्की.
**ठेव** (स्त्री.) गुप्त द्रव्य; दुसऱ्यापाशीं सुरक्षित ठेवण्यासाठीं दिलेलें द्रव्य किंवा वस्तु; शरीराची ठेवण; ढव, पद्धति.
**ठेवण** (स्त्री.) शरीराचा बांधा.
**ठेवणा** (प्रा. वि.) आश्रित.
**ठेवणाऊ** (वि.) ठेविलेलें.
**ठेवणावळ** (स्त्री.) ठेव राखण्याबद्दलची मजुरी.
**ठेवणी** (स्त्री.) संचय, गुप्त धन; ठेवणें.
**ठेवणू** (वि.) ठेविलेलें.
**ठेवणूक** (स्त्री.) ठेव.
**ठेवणें** (क्रि.) स्थापन करणें, राखणें; (न.) ठेव, धन (भा० १४।२४३).
**ठेवरेव** (स्त्री.) ठेव, व्यवस्था.
**ठेवलेली** (स्त्री.) रखेली.
**ठेवा** (प्रा. पु.) संचय; आकार.
**ठेवाठेवी** (प्रा. स्त्री.) उठाठेव.
**ठेवारेया** (पु.) संचय.
**ठेवासाटपा** (पु.) साठा, संग्रह.
**ठेवी** (प्रा. स्त्री.) ठेव, द्रव्य.
**ठो** (पु.) लहान मुलें कपाळानें दुसऱ्याच्या कपाळावर हळूच आघात करतात तो.
**ठोक** (वि.) ठळक; घाऊक; चोख; (पु.) प्रहार, मार.
**ठोकजोशी** (पु.) ठोकळ मानानें भविष्य सांगणारा शूद्र वर्गाचा जोशी. [सोनार.
**ठोकडा** (पु.) ठोकळा; तिरस्कारार्थी–
**ठोकण** (न.) कांहींतरी खात्रीनें प्राप्ति करून देणारें काम; फायदा; देवीचा वण; झाडाचा बुंधा.
**ठोकणी**(स्त्री.) बडविण्याचें हत्यार, चोपणी.
**ठोकणें** (क्रि.) आघात करणें, बडविणें; मारणें. [अंदाज.
**ठोकताळा** (पु.) प्रतीति, अनुभव; बरोबर
**ठोकर** (हिं. स्त्री.) ठेच, अद्दल; नुकसान.
**ठोकरणें** (क्रि.) खरडपट्टी काढणें; लाथ मारणें.
**ठोक विक्री** (स्त्री.) घाऊक विक्री.
**ठोकळ** (वि.) ठळक; मुख्य; सरासरी; घाऊक.
**ठोकळा** (पु.) ओंडका, लाकडाचा तुकडा.
**ठोका** (पु.) आघात, प्रहार, धक्का; मारा; अनुभव, प्रचीति.
**ठोकारोका** (पु.) भविष्यकथन.
**ठोकेकरीण** (स्त्री.) जादूटोणा करणारी स्त्री.
**ठोक्या** (पु.) सोनार; (निंदार्थी) जार (सांकेतिक).
**ठोंगमत** (न.) पाखंड मत.
**ठोंगळ** (पु.) लाकडाचा ओंडा; धष्टपुष्ट माणूस; ढीग, रास; बुंधा.
**ठोंगाई** (स्त्री.) आडदांडपणा.
**ठोठावणें** (क्रि.) ठो ठो आवाज करणें; धक्के देणें; खडबडविणें; जोरानें सांगणें.
**ठोंब** (पु.) खुंट; धटिंगण, ब्रह्मचारी किंवा निपुत्रिक; झवका.
**ठोंबरा** (पु.) ठोसा; व्याजोक्तिपर किंवा उपहासात्मक टोला; वाईटसाईट धान्य.
**ठोंबस** (प्रा. वि.) ठोंब्या, अक्षरशत्रु.
**ठोंबा** (पु.) सोटा; अक्षरशत्रु, लठ्ठनिरंजन.
**ठोंब्या** (वि.) जडमति, मंदबुद्धीचा, अक्कलशून्य, अक्षरशत्रु.
**ठोमणा** (पु.) आघात, गुद्दा.
**ठोमणाठोसरा** (पु.) आघात.
**ठोल्या** (पु.) सडासोट; ज्याला घरदार नाहीं, उद्योगधंदा नाहीं, ज्याची पत नाहीं किंवा ज्याला अन्नाची चाड नाहीं असा ; आडदांड, अक्षरशत्रु.
**ठोसर** (वि.) स्थूल, जाड, दणगट; व्यवहारांत अनुभविक.
**ठोसरा, ठोसा** (पु.) गुद्दा.
**ठोसराई** (स्त्री.) पोकळ बढाई.
**ठोसा** (पु.) गुद्दा.
**ठ्यां करणें** (क्रि.) धूम ठोकणें.

———

## ड

**ड** मराठी व्यंजनमालेंतील तेरावें व्यंजन.
**डकणें** (क्रि.) चिकटणें.
**डकला** (पु.) नदीच्या शुष्क पात्रांत खणलेला झरा; डबकें.
**डकली** (स्त्री.) पळी.
**डकवण** (स्त्री.) गोंद वगैरे चिकट पदार्थ.
**डकविणें** (क्रि.) चिकटविणें.
**डंका** (सं. ढक्का पु.) मोठा नगारा, नौबत; प्रसिद्धि.
**डकाईत** (पु.) दरवडेखोर.
**डकार** (पु.) ढेकर.
**डंकी, डंखी** (स्त्री.) कुस्तींतल्या एका पेंचाचें नांव.
**डंकील, डंखील** (वि.) डांक लावलेलें.
**डंख** (सं. दंश पु.) दंश; द्वेष; चुना, पोहे इ० कुटण्याची लाट.
**डंखणें** (क्रि.) दंश करणें, चावणें.
**डंखीण** (सं. डाकिनी स्त्री.) डाकीण, हडळ.
**डंखील** (वि.) किडयांनीं खाल्लेलें.
**डग** (पु.) भय; भीति; शंका; कांठ; पाऊल; टांग; झडप.
**डगणें**(क्रि.)भिणें, कांपणें, डळमळणें; सुटणें; पडणें; चिकटणें. [भिणें.
**डगडगणें** (क्रि.) डगडग हलणें, कांपणें,
**डगमग** (स्त्री.) डळमळीतपणा, लटपटीतपणा, अस्थिरता. [सुटणें, घाबरणें.
**डगमगणें** (क्रि.) डळमळणें; लटलटणें; धैर्य
**डगमगां** (अ.) कांपत, हलत.
**डगर** (स्त्री.) ढाळ; उतरण; टेकडी; कडपा.
**डगर, डगरू** (प्रा. पु.) ख्याति, लौकिक.
**डंग-डांग** (न.) डोंगराळ मुलूख.
**डंगरू** (प्रा. पु.) प्रतिबंध.
**डगला** (पु.), **डगलें** (न.) कोट.
**डगळ** (वि.) ढिला; स्थूल; सढळ; नासलेलें.
**डगळणें** (क्रि.) नासणें; पडणें, कोसळून पडणें; तोडणें. [ढहाळा.
**डगळा** (पु.) पानांसहित लहानशी फांदी;
**डगा** (स्त्री.) उडी, झेप.
**डग्गा** (पु.) वाह्या; तबल्याच्या जोडीचें एक वाद्य.
**डगागणें** (क्रि.) डगडगणें.
**डंगाळ** (वि.) लांबटांग्या.
**डंगी** (स्त्री.) ढोंगी; लहान पडाव; कावड.
**डघळा** (पु.) फांदी, पानांचा झुबका.
**डचक** (स्त्री.), **डचका** (पु.) धसका, धास्ती, भीति.
**डचकणें** (क्रि.) दचकणें, भिणें.
**डचकळी** (स्त्री.) ढेकर.
**डचडचणें**(क्रि)घशांत जळजळणें, मळमळणें.
**डचमचणें** (क्रि.) हलून बाहेर पडणें.
**डचमळणें** (क्रि.) हलणें.
**डच्चू, डिच्चू** (पु.) नकार; टाळा; हकालपट्टी.
**डझन** (इं. न.) बारा.
**डंडळणें** (प्रा. क्रि.) डळमळणें; चळणें.
**डपकण** (न.) डबकें.
**डपकी** (स्त्री.), **डपकें** (न.) बुधली; पाणी साचलेली खळी.
**डफ** (फा. पु.) एक चर्मवाद्य.
**डफगाण** (पु.) डफावर गाणें म्हणणारा.
**डफघाई, डबघाई** (स्त्री.) डफावर म्हटलें जात असलेलें गाणें संपत आलें म्हणजे म्हणणारा घाईनें डफ वाजवितो यावरून समाप्तीचा काळ असा अर्थ.
**डफडी** (स्त्री.), **डफडें** (न.) लहान डफ, टिमकी.
**डंफण** (न.) डंका.
**डफरावणें** (क्रि.) कांहींतरी सांगणें.
**डफळा** (पु.) विणकामाचा एक प्रकार; एक प्रकारच्या रंगाचा.
**डंब** (सं. दंभ न.) ढोंग, रिकामा खटाटोप.
**डबका** (पु.), **डबकी** (स्त्री.), **डबकें** (न.) लहानशी पाणी साठलेली खळी.
**डबघाई** (डफ + घाई स्त्री.) डफघाई पहा. शेवटाच्या जवळजवळची म्हणजे नष्टप्राय स्थिति. **ड० स येणें**—उतरती कळा लागणें; अंत होण्याचा समय जवळ येणें.
**डबडबणें** (क्रि.) पूर्ण करणें; पडसें वगैरेनें व्यापणें; डबडब आवाज करणें.
**डबडी** (स्त्री.), **डबडें** (न.) लहान डबा, बुधली.
**डबड्या** टाकाऊ.

**डबर** (न.) घराच्या पायांत भरण्याचे दगड.
**डंबर** (सं. आडंबर न.) पटल. [खाच.
**डबरा** (पु.) खळगा; डवकें; उकिरड्याची
**डबल** (इं. वि.) दुप्पट, दुहेरी.
**डबा** (पु.) करंडा; मोठी डबी; लहानशी धातूची पेटी; लहान मुलांच्या पोटांत होणाऱ्या एका रोगाचें नांव.
**डंबरणें** (क्रि.) फुगणें; ताठ होणें.
**डंबरा, डंबारा, डंभारा** (पु.) गुबारा, फुगी.
**डबी** (हिं. स्त्री.) लहान डबा; (तेलगु डब्बी) लहान पेटी.
**डबीर** (फा. पु.) महत्त्वाच्या कागदपत्रावर सह्या करणारा राजाचा अधिकारी.
**डबोलें, डबुकलें** (न.) खजिना, द्रव्यनिधि; आयतें मिळालेलें द्रव्य.
**डब्ब** (न.) फुगवटी; ताठा.
**डब्बी** (स्त्री.) लहान पेटी.
**डंभाई** (सं. दंभ स्त्री.) दंभ; ढोंग.
**डंभारणें** (क्रि.) फुगणें.
**डंभारा** (पु.) फुगवटा. [आकाराचें एक वाद्य.
**डमरु** (सं. पु.) वाळूच्या घड्याळाच्या
**डमरुयंत्र** (न.) ऊर्ध्वपातनयंत्र; घन किंवा प्रवाही पदार्थाची वाफ करून पुनः त्याचा प्रवाही पदार्थ करण्याचें अथवा अर्क काढण्याचें यंत्र.
**डर** (हिं. पु.) भय.
**डरकण, डरकणी** (स्त्री.) गर्जना.
**डरकणें** (क्रि.) गर्जना करणें. [गर्जना.
**डरकावणी** (स्त्री.) भिवविण्यासारखी
**डरकविणें** (क्रि.) भिवविण्यासाठीं मोठ्यानें ओरडणें.
**डरकाळी, डरकी** (स्त्री.) डरकणी पहा.
**डरडरावून** (अ.) निर्धास्तपणें. **ड०निजणें**— निःशंक घोरत पडणें.
**डरणें** (हिं. क्रि.) भिणें.
**डरपोक** (हिं. वि.) भित्रा.
**डरविणें** (क्रि.) भिवविणें.
**डरांवडरांव** (पु.) बेडकाचा आवाज.
**डरावणी** (स्त्री.) भिवविण्यासाठीं मोठ्यानें ओरडणें.
**डरू** (पु.) ढेकर.
**डल्ला** (हिं. पु.) गोळा; गुप्त द्रव्य, डबोलें.
**डल्ला मारणें**—दुसऱ्याच्या द्रव्याचा अपहार करणें.
**डल्ली** (स्त्री.) खोगिराखालचें घामोळें.
**डवक** (प्रा. न.) डवकें.
**डवचणें** (क्रि.) टोचणें; त्रास देणें.
**डवडवणें** (क्रि.) घामानें भिजणें.
**डवणा** (पु.) नरोटीची केलेली पळी.
**डवरणें** (क्रि.) लोंबणें; ओझें उतरणें; भरून जाणें; सारवणें, लिप्त करणें (ज्ञा० ११।१३२); (प्रा. क्रि.) शृंगारणें; मिरविणें.
**डवरा** (पु.) झिरा; डवकें; शेतकऱ्यांचा एक विधि; डमरु, डौर; (वि.) पूर्ण; तट्ट फुगलेला.
**डवरी** (पु.) गोंधळी; डौर वाजविणारा.
**डवला** (पु.) डवणा पहा.
**डवली** (स्त्री.) करवंटीची पळी.
**डंश** (सं. दंश पु.) दंश, चावा; द्वेष, डाव.
**डंशी** (वि.) मनांत डाव धरणारा; खुनशी.
**डसका** (वि.) चावरा.
**डसणें** (क्रि.) चावणें, दंश करणें; चिकटणें.
**डहाळी** (स्त्री.) डाहळी पहा.
**डहुरा** (पु.) झिरा; डमरु, डौर.
**डहुळ** (प्रा. वि.) गढूळ.
**डहुळणें** (क्रि.) ढवळणें, घुसळणें.
**डहूळ** (वि.) डौळ पहा.
**डळमळ** (स्त्री.) अस्थिरता; अनिश्चितपणा. [होणें.
**डळमळणें** (क्रि.) हलणें; झुलणें, चंचल
**डळमळीत** (वि.) अस्थिर.
**डळा** (प्रा. पु.) रास, ढीग. [डाव, द्वेष.
**डाई** (प्रा. स्त्री.) वर्चस्व, सरशी, जीत;
**डाईक** (प्रा. वि.) पोटांत दंश धरणारा.
**डाऊ** (पु.) डाव; लग्नांत वधूवरांनीं लपविलेली सुपारी.
**डांक, डांख** (हिं. पु.) धातूच्या भांड्याचें भोक बंद करण्यासाठीं उपयोगांत आणितात तो धातूचा रस; कस्तर.
**डाक** (पु.) मोठा नगारा.
**डाक, डांक** (हिं. स्त्री.) टपाल.
**डाकघर** (हिं. न.) टपाल कचेरी.
**डांकणें** (क्रि.) सांधा जोडणें, कस्तर करणें.

**डाकबंगला** (पु.) प्रवाशांना उतरण्यासाठीं असलेली सरकारी इमारत.
**डांकलग** (वि.) डाक लावून जोडलेलें.
**डांका** (प्रा. पु.) मृताच्या बाराव्या दिवशीं करण्याचा विधि; दरवडा; दरवडेखोरांची टोळी; मोठा नगारा.
**डाका** (हिं. पु.) दरवडा.
**डाकाईत** (पु.) दरवडेखोर.
**डाकिनी** (सं. स्त्री.) स्त्रीपिशाच्च, हडळ.
**डाकील, डाकींव** (वि.) डांख लावलेलें.
**डाकुलता** (प्रा. पु.) ब्राह्मण बाप व गवळीण आई यांपासून झालेला; भविष्यवादी. [ टिमकी.
**डाकुली** (प्रा. स्त्री.) चेष्टा; चुटकी;
**डाकू** (वि.) लफंगा, लुच्चा.
**डाकोडाक** (अ.) हातोहात, त्वरेनें.
**डॉक्टर** (इं. पु.) शास्त्री, पंडित; वैद्य, चिकित्सक.
**डांख** (फा.) डांक शब्द पहा.
**डाखळ** (प्रा. स्त्री.) डाहाळी.
**डाखळ, डाखळा** (वि.) चिकाळ, चिकानें भरलेला. [ कडचा वारा.
**डाखीण** (सं. दाक्षायणी स्त्री.) दक्षिणे-
**डाग** (पु.) शाईचा वगैरे ठिपका; तापविलेल्या वस्तूचा चटका; कलंक; जिन्नस.
**डांग** (स्त्री.) केळीचें सबंध पान; काठी.
**डांग** (पु. न.) टेकडीचें शिखर; (वि.) दांडगा, आडदांड.
**डागडुजी** (फा. स्त्री.) दुरुस्ती.
**डागडूग** (स्त्री.) चंचलता, अस्थिरता.
**डागणी** (स्त्री.) डाग देण्याची लोखंडी कांब.
**डागणें** (क्रि.) डाग देणें, भाजणें, चरका देणें; सरवत्ती देणें.
**डांगर** (न.) उडदाच्या पिठांत मीठ तिखट घालून केलेला रुचकर पदार्थ; (स्त्री.) भोपळ्याचा वेल.
**डांगवी** (प्रा. वि.) प्रसिद्ध.
**डागळणें** (क्रि.) डाग लागणें; नासणें.
**डांगळा** (पु.) लहान फांदी, टहाळा.
**डांगळी** (स्त्री.) डहाळी; हातांत धरण्याची वाकडया मुठीची काठी.
**डांगा** (प्रा. स्त्री.) काठी (ज्ञा० १५।२५१).
**डागिणा, डागिना** (पु.) अलंकार.
**डागील** (वि.) डागळलेला; नासलेला.
**डांगुरटी** (स्त्री.) डांगोरा, दौंडी.
**डांगें** (प्रा. न.) झाडी.
**डांगोरा** (पु.) दौंडी, प्रसिद्धि; (प्रा.) मायाशक्ति.
**डांग्या** (पु.) पंढरीच्या विठोबाचा चोपदार; पतकीच्या हाताखालचा जकाती कारकून.
**डांग्या खोकला** (पु.) एक प्रकारचा जोराचा खोकला.
**डांचणें** (सं. दंश् क्रि.) जळजळणें, खुपणें, सलणें.
**डाचर** (वि.) लठ्ठ; खूप वाढलेलें.
**डाचाळ, डाचाड** (वि.) बेढब, प्रमाणाबाहेर मोठें.
**डाजणें** (प्रा. क्रि.) डांचणें, मनाला टोचणें.
**डांडोरा** (पु.) डांगोरा.
**डांडोसा** (पु.) केळीच्या पानाचा मधला सोट; डांगोरा.
**डाफरणें** (क्रि.) चवताळणें, चरफडणें.
**डांबणें** (क्रि.) घट्ट बांधणें, जखडणें.
**डाबर** (हिं. न.) डबकें.
**डांबर** (इं. डॅमर न.) लाकूड वगैरे कुजूं नये म्हणून त्याला लावण्याचा दगडी कोळशापासून निघणारा काळाकुट्ट व दुर्गंधयुक्त चिकट पदार्थ.
**डांबरट** (वि.) निगरगट्ट.
**डांबरणें** (क्रि.) वातानें पोट फुगणें; सुजून कठिण होणें; जड होणें.
**डांबारा** (पु.) सूज.
**डांभणें** (क्रि.) पशूला खुंटापाशीं बांधणें; खुंटी वगैरे ठोकणें.
**डांभा** (पु.) खुंटा; जोरदार पीक.
**डांभारणें** (क्रि.) खुंटयाला बांधणें; ठिकरीची फोडणी करणें.
**डांभारा** (पु.) फुगी, सूज.
**डाम(मा) डौल** (पु.) सरंजाम; थाट; ऐट, झोक, नखरा.
**डामर** (इं. डॅमर न.) डांबर पहा.
**डाय** (प्रा. पु.) द्वेष, डाव.
**डायरी** (इं. स्त्री.) रोजनिशी.

**डायरेक्टर** (इं. पु.) खात्यावरील वरिष्ठ अधिकारी; कंपनीच्या नियामक मंडळाचा सभासद; मार्गदर्शक; कर्णधार.
**डाराडूर** (वि.) गाढ.
**डाल** (स्त्री. न.) पसरट टोपली.
**डालणें** (क्रि.) रचणें; सोडून देणें; (कोंबड्या इ०) पाटीखालीं झाकणें.
**डाली** (स्त्री.) गठ्ठा; चढाओढ; फळांची कावड; पसरट पाटी; फळफळावळ इ. ची भेट; वैरभाव.
**डाव** (पु.) खेळ; खेळाची पाळी; द्वेष; मनांतला डंख; युक्ति; वेत; लाग, वेळ, प्रसंग; कवड्यांच्या खेळांत जमिनीवर ओढलेल्या रेघा; मोठी पळी. **डाव साधणें**—वैर उगविणें; जिंकणें; **डाव पडणें**—घडणें, प्राप्त होणें (ज्ञा० १३। २८७); **गेला डाव (तरी)**—निदान.
**डावकें** (न.) गुप्त धन; संचय.
**डावखुरा, डावखोरा** (वि.) डाव्या हातानें कामें करणारा.
**डावपेंच** (पु.) युक्ति, लटपट, छक्केपंजे.
**डावरणें** (क्रि.) लिप्त होणें, धमकावणें.
**डावरा** (वि.) डावखुरा; वाकड्या शिंगाचा.
**डावलणें** (क्रि.) डावें घालणें; अनादर करणें; फेंकून देणें (ज्ञा० ७।२८७); सोडणें; दुसऱ्यावर ढकलणें.
**डावली** (स्त्री.) पळी.
**डावा** (वि) डाव्या बाजूचा; अधिक जहाल. **डावा घालणें**—जातांना आपल्या डाव्या हाताच्या बाजूस येणें; **डावी घालणें**—(देवास) प्रदक्षिणा करणें; **डावी उजवी देणें**—प्रतिकूल किंवा अनुकूल उत्तर देणें; **डावें उजवें करणें**—पक्षपात करणें.
**डांस** (सं. दंश पु.) मुरकुट, मच्छर.
**डासळणें, डासाळणें** (क्रि.) डसणें.
**डाहण** (न.) गरगट, घाण पाणी.
**डाहणी** (स्त्री.) डागणी, तापविलेली सळई.
**डाहण्या** (वि.) अंवटढाण.
**डाहण्या वाघ** (पु.) चित्ता.
**डाहळ** (पु.) झाडाची काटकवळ, छाट.
**डाहळा** (पु.) ओल्या हरवऱ्याचें रोपटें.
**डाहळी** (स्त्री.) खांदी, फांदी.
**डाहारणें** (प्रा. क्रि.) प्रसिद्ध होणें.
**डाहूळ** (न.) डबकें.
**डाळ** (सं.दालि स्त्री.) दाळ, दाळिंबी; रास, गंजी. **डाळ शिजणें**—काम होणें, दाद लागणें.
**डाळ, डाळी** (प्रा. स्त्री.) डाहाळी. [ठेवणें.
**डाळणें** (क्रि.) जुळविणें, रचणें; अडकवून
**डाळप** (न.) राशीच्या रूपानें ठेविलेलें, (धान्य) [प्रारंभ.
**डाळा** (पु.) रास, चळथ; तयारीचा
**डाळिंब** (सं. दाडिम न.) दाडिम, अनार.
**डाळिंबी** (स्त्री.) द्विदल धान्याच्या दाण्याचा अर्धा भाग.
**डाळी** (स्त्री.) डांगळी; टोपली.
**डाळुक** (प्रा. स्त्री.) लहान डाहाळी.
**'डाळें** (न.) फुटाणे फोडून वेगळया वेगळ्या केलेल्या डाळिंब्या.
**डिंक** (पु.) गोंद; चिकट पदार्थ.
**डिंकदाणी** (स्त्री.) गोंद ठेवण्याचें पात्र.
**डिंकवडा** (पु.) गोंद व इतर कांहीं औषधी पदार्थ घालून केलेलें खाद्य.
**डिकेमाली, डिंकेमाली** (स्त्री.) एका औषधीचें नांव.
**डिकवणें, डिंकवणें** (क्रि.) चिकटवणें.
**डिंकशी** (स्त्री.) वृक्षाचा किंवा पानाचा अग्रभाग; कोमल अंकुर.
**डिकाळ** (वि.) चिकट, चीकयुक्त.
**डिकेरा** (वि.) चिकट.
**डिकोळी** (स्त्री.) डिखळी, ढेकूळ.
**डिक्री, डिगरी** (इं. स्त्री.) (दिवाणी कोर्टाचा) हुकूमनामा.
**डिखळ, डिखूळ** (न.), **डिखळी** (स्त्री.) गोळा; ढेकूळ.
**डिगडिग** (अ.) लहान मुलांना चालण्यास शिकवितांना म्हणण्याचा शब्द.
**डिंगर, डिंगरूं** (प्रा. पु. न.) मूल, लेंकरूं; (वि.) लाडका. [घडी घालणारा.
**डिंगरा** (पु.) पंढरपूरच्या देवासाठीं पाऊल—
**डिंगरी** (स्त्री.) मुळ्याची शेंग; मोगरी.
**डिंगरूं** (प्रा. न.) लेंकरूं; (वि.) आवडतें.

**डिगशी** डिकशी पहा. [दिलेली पदवी.
**डिग्री** (इं. स्त्री.) अंश; युनिव्हर्सिटीनें
**डिचकें** (न.) पसरट भांडें.
**डिचकोली** (स्त्री.) लहान पोट.
**डिटेक्टिव्ह** (इं. पु.) गुप्त पोलिस.
**डिंडिमा** (प्रा. पु.) नगारा, गलबला; (सं. डिंडिम).
**डिंडी** (प्रा. स्त्री.) दिंडी; छविना.
**डिफळ** (न.) ढेकूळ. [सारखें हत्यार.
**डिफळा** (पु.) ढेकळें फोडण्याचें मोगरी-
**डिंब** (प्रा. पु.) लेंकरूं; अभ्यास; उपद्रव.
**डिंबरें** (प्रा. न.) डुरकणी.
**डिंभ** (सं. न.) लेंकरूं; (वि.) मूर्ख, अज्ञान.
**डिमदारी** (स्त्री.) रणघाई; तुंबळ युद्ध.
**डिर, डिरा** (प्रा. न.) नवा अंकुर.
**डिरी** (स्त्री.) अंकुर, मुळयाची शेंग.
**डिरू** (प्रा. पु.) शेंग, अंकुर, पल्लव.
**डिंव** (प्रा. पु.) शद्ब.
**डिवणें** (प्रा. क्रि.) उपद्रव देणें; मारणें.
**डिवों** (प्रा. वि.) मारकट.
**डीक, डीकदाणी** डिंक, डिंकदाणी पहा.
**डुक(क्क)र** (पु.) शूकर, वराह.
**डुकरमुसळी, डुकरमुसांडी** (स्त्री.) डुकरा-सारखें आवेशानें धडक देऊन गिरणें.
**डुकली, डुकळी** (स्त्री.) बसल्या बसल्या लागलेली झोप; पेंगण्याची अवस्था.
**डुंखणें** (क्रि.) छाटणें. [लहानसें शेत.
**डुंग** (पु.) टेकाड; रास, ढीग; (न.)
**डुगडुगी** (क्रि.) धुगधुगी; प्रबळ इच्छा.
**डुंगा** (पु.) टेकाड.
**डुंगी** (स्त्री.) रास.
**डुचका** (वि.) डोळयाचा अधू, गजनेत्री.
**डुडुळ** (प्रा. न.) दिवाभीत, घुबड.
**डुबक** (स्त्री.) ओढाळ गुराच्या पुढल्या दोन पायांस बांधतात ती दोरी.
**डुबकणें** (क्रि.) डुंबणें, पाण्यांत खेळणें.
**डुबकळी** (स्त्री.) बुडी, डुबकी.
**डुबकी** (स्त्री.) बुडी. [पावणें.
**डुबणें** (क्रि.) बुडी मारणें, बुडणें, नाश
**डुबर** (न.) कुल्ला.
**डुबरा** (वि.) ढेरपोटया, खुजट.
**डुबी, डुबकी** (स्त्री.) बुडी.

**डुबूक** (अ.) कांठोकांठ, पूर्ण भरलेलें.
**डुमणा** (वि.) लठ्ठ व ठेंगणा.
**डुरकणी** (स्त्री.) डुरकावणी, बैलांचें ओरडणें.
**डुरडुर** (स्त्री.) बेडकाचें ओरडणें.
**डुलकणें** (क्रि.) डुलक्या घेणें.
**डुलकी** (स्त्री.) डुकली, बसल्या बसल्या येणारा झोपेचा झटका.
**डुलणें** (क्रि.) डोलणें, हलणें, हेलकावणें.
**डुळकणें** (क्रि.) ओकणें.
**डुळी** (स्त्री.) शिंक्यावरलें भांडें.
**डुळूं** (न.) लहान छिद्र.
**डूब** (हिं. पु.) बुडी, बूड; तोटा; रंगीत वस्त्रावर पुनः तसलाच रंग देणें; डोंब.
**डूल** (पु.) मुलांचें एक कर्णभूषण.
**डेकी** (स्त्री.) आधार.
**डेख** (न.) देंठ. [भांडें.
**डेग** (फा. स्त्री.) पाणी साठविण्याचें मोठें
**डेग** (स्त्री.) केळीचें सबंध पान, डांग; धीरा, आधार; (वि.) जड, मंद बुद्धीचा.
**डेगणें** (क्रि.) दमणें, थकणें.
**डेगाळणें** (क्रि.) रेंगाळणें.
**डेगी** (स्त्री.) धीरा, नेटावा; पुस्ती.
**डेचा** (पु.) डिकशी, अग्र; योग्य संधि; नेमकी जागा.
**डेंठ, डेठ** (पु.) डेख.
**डेडारी** (स्त्री.) ओकारी काढणें.
**डेडोर** (पु.) बेडूक.
**डेपो** (इं. पु.) कोठार.
**डेबरी, डेबिरी** (प्रा. वि.) मारकट.
**डेमी** (कागद) (इं. पु.) छापण्याच्या कागदाचा आकार $22\frac{1}{2}'' \times 17\frac{1}{2}''$.
**डेरका** (पु.), **डेरकी** (स्त्री.), **डेरकें** (न.) लहान डेरा; मडकें; फुगीर पोट.
**डेरा** (हिं. पु.) रांजण; मोठें पोट; देवळाचा घुमट; मोठा तंबू; चिखल असलेली जमीन. **डेरा देणें**–मुक्काम करणें.
**डेलिया** (न.) एक फूल.
**डेली** (स्त्री.) नकासगाराचें हत्यार.
**डेवणें** (क्रि.) सुस्त किंवा जड होणें.
**डेवरणें** (क्रि.) ओझें खालीं उतरणें.

**डेळमायण** (न.) शुभकार्यांतील जलकुंभ अथवा त्याचें पूजन.
**डो** (स्त्री.) डोकें, डोई.
**डोई** (स्त्री.) डोकें; दर एक माणूस; पिढी. **डोईच्या वाटेनें**— मुकाट्यानें, कुरकुर न करतां.
**डोईजड** (वि.) शिरजोर, भारी.
**डोईफोड** (वि.) कंटाळवाणें; (स्त्री.) कपाळकूट.
**डोकला** (पु.) झिरा.
**डोकसें** (न.) डोकें.
**डोकावणें** (क्रि.) मान पुढें करून पाहणें.
**डोकी** (स्त्री.), **डोकें** (न.) मस्तक, शिर, डोई; बुद्धि. **डोकें उठणें**—मस्तक दुखूं लागणें; **वर डोकें काढणें**—उदयास येणें; **डोकें खाजविणें**–विचार करणें; **डोकें देऊन बसणें**—निर्लज्जपणानें एखाद्यावर भार घालून बसणें; **डोकें फिरणें**—वेड लागणें; **डोकें मारणें**–नुकसान करणें; **डोक्यावरचें खांद्यावर येणें**—ओझें किंवा जबाबदारी कमी होणें; **डोक्यावर चढणें** —शिरजोर होणें; **डोक्यावर बसविणें**—फाजील गौरव करणें; **डोक्यावरून हात फिरविणें** –फसविणें; **डोक्यावरून पाणी जाणें** –पराकाष्ठा होणें; **डोक्यावर खापर फोडणें**–– एखाद्यावर दोष लादणें.
**डोंगर** (पु.) पहाड, घाट, भली जंगी रास.
**डोंगरकठडा** (पु.), **डोंगरकठाड–डी** (स्त्री.) **डोंगरकांठ** (पु.), **डोंगरकिनारा** (पु.) डोंगराभोंवतालचा प्रदेश.
**डोंगरकंगर** (पु.) टेकड्या.
**डोंगरदळें** (न.) झाडी वगैरे तोडून साफ केलेला डोंगराचा भाग.
**डोंगरपठार** (स्त्री.) डोंगराच्या माथ्यावरचा सपाट प्रदेश.
**डोंगरवट, डोंगराळ** (वि.) पहाडी.
**डोंगरसरी** (स्त्री.) डोंगरांची रांग.
**डोंगरी** (स्त्री.) लहान टेकडी; (वि.) डोंगरांत होणारा; डोंगरावरचा.
**डोंगळा** (पु.) मुंगळा.
**डोंगा** (प्रा. वि.) वाकडा; (पु.) लहान [नाव, डोणी.
**डोघाळणें** (क्रि.) गळयाला दोन बोटें लावून शब्द करणें (रामजोशी पृ० ६६).
**डोचकी** (स्त्री.), **डोचकें** (न.) डोकें, मस्तक.
**डोझ** (इं. पु.) औषधाचें एक वेळचें प्रमाण.
**डोडी** (प्रा. स्त्री.) पीक.
**डोण** (स्त्री.) मोटेचें पाणी पाटांत येण्याकरितां मोटेखालीं घातलेला लोखंडी अगर दगडी पन्हळ.
**डोण, डोणी** (स्त्री.) दगडाची कुंडी; झाडाचा बुंधा पोखरून केलेलें जलपात्र; कोठिंबा; लहान नाव, डोंगा.
**डोणगें** (न.) गुरांना पाणी पिण्यासाठीं केलेली लाकडाची कुंडी.
**डोणी** डोण पहा.
**डोफा** (पु.) गुडघा.
**डोब** (पु.) रंगीत वस्त्रास पुनः त्याच प्रकारचा रंग देणें; बुडी.
**डोंब** (पु.) अतिशूद्रांतली एक जात; आगीचा लोळा; मोरीचें पाणी साचविण्याचें डबकें.
**डोंबकावळा** (पु.) कावळयाची एक जात.
**डोबड** (प्रा. न.) म्हसरूं.
**डोंबरणें** (न.) झाड, वेली यांस नवीन कोंब फुटतो ती जागा.
**डोंबल, डोंबलें** (न.) डोकें (तुच्छार्थी).
**डोंबा** (प्रा. पु.) कृष्णसर्प (ज्ञा० ७।१६३).
**डोंबारी** (पु.) कोल्हाटी.
**डोंबाळा** (पु.) आगीचा लोळ.
**डोंबी** (स्त्री.) तगादा.
**डोभण, डोंभरा** (पु.) खळगा, खड्डा.
**डोमल, डोमलें** (न.) डोकें.
**डोय** (स्त्री.) डोई, डोकें.
**डोर** (प्रा. पु.) डमरु; (वि.) नादमधुर.
**डोरलीवांगी** (स्त्री.) रानवांगें.
**डोरलें** (न.) मंगळसूत्र; गुन्हा; शाबित झालेला आरोप.
**डोरी** (प्रा. वि.) सुंदर.
**डोल** (अर. पु.) पोहोरा; विस्मय; झोक; गलबताचें शीड बांधण्याची काठी; उत्तर हिंदुस्थानांतील श्रीकृष्ण व राधा यांच्या संबंधाचा एक उत्सव, दोलोत्सव.

**डोलकर** (पु.) डोली वाहणारा, भोई.
**डोलकाठी** (स्त्री.) गलबतावरील शिडाची काठी.
**डोलणें** (क्रि.) डुलणें, हलणें.
**डोलविणें** (क्रि.) हलविणें, हेलकावे देणें.
**डोला** (हिं. पु.) तावूत, ताजिया.
**डोलारा** (पु.) उंच इमारत.
**डोली** (सं. स्त्री.) पाळणा, हलका मेणा.
**डोल्हारा** (पु.) देवाचा लहानसा झोपाळा; देव्हारा.
**डोसकी** (स्त्री.), **डोसकें** (न.) डोकें.
**डोह, डोहो** (पु.) नदीच्या प्रवाहांतला खोल खळगा.
**डोहणा** (प्रा. पु.) टोमणा, विघ्न.
**डोहळा, डोहाळा** (सं. दोहद पु.) गरोदर स्त्रीची इच्छा; इच्छा.
**डोहळेजेवण** (न.) प्रथमच गर्भवती झालेल्या स्त्रीच्या अभिनंदनार्थ देण्यांत येणारी मेजवानी.
**डोहार** (प्रा. पु.) ढोर.
**डोळ** (पु.) द्विदल धान्याचा भरडा; सालासकट असलेली डाळिंवी; फोल शंका.
**डोळस** (वि.) शाबूत दृष्टीचा; खबरदार; (प्रा. वि.) सुंदर डोळ्यांचा.
**डोळा** (पु.) नेत्र, नयन; दृष्टि; छिद्र; नेत्रासारखें चिन्ह; नारळाच्या शेंडीखालचा लहान खळगा; उंसाच्या दोन पेऱ्यांच्या सांध्यावर चिकटलेला भाग; गुडघ्यावरची खळगी; माहितीचा उगम; माशावरचा खवला. **डोळा चुकविणें**—दृष्टीस न पडूं देणें; **डोळे उघडणें**—शुद्धीवर येणें, ताळ्यावर येणें; **डोळे झाकणें**—दुर्लक्ष करणें; मरणें; **डोळे थंड होणें**—समाधान वाटणें; **डोळे पांढरे करणें**—अतिशय घाबरून जाणें; मरणोन्मुख होणें; **डोळे फाटणें**—दृष्टिक्षेत्र विस्तृत होणें; आश्चर्यचकित होणें; **डोळे फिरणें**—चक्कर येणें; गर्वानें ताठणें; **डोळ्याचें पारणें फिटणें**—समाधान वाटणें; **डोळ्यांत तेल घालून पाहणें**—बारकाईनें पाहणें; **डोळ्यांत धूळ फेंकणें**—फसविणें; **डोळ्यावर कातडें ओढणें**-उपेक्षा करणें; **डोळ्यावर धूर येणें**—उन्मत्त होणें; **डोळ्याशीं डोळा न लागणें**—झोप न येणें; **डोळे भरून पाहणें**—मनाचें समाधान होईपावेतों पाहणें; **डोळा ठेवणें**—एखाद्या वस्तूच्या प्राप्तीची इच्छा करणें; **डोळा घालणें**—डोळ्यानें खूण करणें.
**डोळुला** (प्रा. पु.) डोळा (तुका० ८०७).
**डोळेझाक** (स्त्री.) उपेक्षा, दुर्लक्ष, हयगय.
**डोळेफोड** (वि.) नजरेंत लवकर भरणारा; (स्त्री.) डोळ्यास होणारा त्रास.
**डोळेभेट** (स्त्री.) दुरून भेट.
**डौंड, डौंडी** (प्रा. स्त्री.) दौंडी, डांगोरा.
**डौर** (पु.) डमरु; डमरूच्या आकाराचें एक चर्मवाद्य; तुमान; पायजमा; झगा. **डौर वाहणें**—उपहास करणें.
**डौरकार** (पु.) डौर वाजविणारा भिकारी.
**डौरण** (न.) कोळपणें.
**डौरणें** (प्रा. क्रि.) झाकणें, व्यापणें; माखलें जाणें; सजणें.
**डौरवाय** (प्रा. पु.) उपहास, थट्टा.
**डौरळा** (प्रा. वि.) भरलेला, माखलेला.
**डौरी** (पु.) डवरी, गोंधळी.
**डौल** (हिं. पु.) चांगला आकार किंवा घाट; पद्धति, रीत; आव; अवडंबर, रिकामा दिमाख, तोरा.
**डौलदार** (वि.) चांगल्या घाटाचा.
**डौली** (वि.) दिमाख दाखविण्याची हौस असलेला, थाटदार; वढाईखोर.
**डौळ** (न.) नमुना; सही किंवा शिक्का केलेला कोरा कागद किंवा पत्र.
**ड्रिल** (इं. स्त्री.) कवाईत.

——

## ढ

**ढ** मराठी व्यंजनमालेंतील चवदावें व्यंजन.
**ढ** (वि.) निरक्षर, मूर्ख.
**ढई** (स्त्री.) जोराचा यत्न; व्यासंग; फार वेळ चिकटून राहणें.
**ढंक** (वि.) फार उंच.
**ढकल** (स्त्री.) निष्काळजीपणानें करणें, उडाणटप्पूपणा.

**ढकलगुजर, ढकलगुजराण** (स्त्री.), **ढकल-गुजारा** (पु.) अडचणींत कसातरी चालविलेला निर्वाह.
**ढकलचंद** (वि.) मागचा पुढचा विचार न करतां काम करणारा.
**ढकलणें** (क्रि.) लोटणें; धक्का देणें, सरकविणें; कशीतरी कालक्रमणा करणें.
**ढकलनंदन** (पु.) आपलें काम दुसऱ्यावर ढकलणारा.
**ढकलपंचविशी** (स्त्री.) दुसऱ्यावर लोटणें.
**ढकलपंच्यायशी** (स्त्री.) उधळपट्टी.
**ढकलपट्टी** (स्त्री.) चालढकल, ढकलाढकली.
**ढकलाढकली** (स्त्री.) एकानें दुसऱ्याच्या अंगावर लोटावें, दुसऱ्यानें तिसऱ्याच्या याप्रमाणें चालणारा खेळ; निष्कारण कालातिक्रमण करणें.
**ढकलापा** (पु.) ढकलचंद पहा.
**ढकली** (स्त्री.) उतरणीवरून गाडी चालतांना गाडीचीं चाकें घसरून बैलांच्या पायांना लागू नयेत म्हणून त्या चाकांच्या पुढें आडवें लाकूड बांधतात तें; चाकांना अडवून धरणारें लाकूड.
**ढकशी** (स्त्री.) समुद्रकांठचा धक्का.
**ढका** (प्रा. पु.) धक्का, इजा.
**ढकार** (पु.) मोठा ढग; (नंदभाषेंत) हजार.
**ढकाळ** (वि.) लांबटांग्या.
**ढकाळ पार्वती** (स्त्री.) अतिशय उंच स्त्री.
**ढक्का** (प्रा. पु.) मोठी नौबत; डमरु.
**ढक्कू** (पु.) माळवा प्रांतीं—अवट वरण.
**ढग** (पु.) अभ्र, मेघ, वादळ; (प्रा. स्त्री.) उंच जागा.
**ढंग** (हिं. पु.) चाळे; मूर्खपणाचे प्रकार; चेष्टा; खेळ; दुर्व्यसन.
**ढंगड्या** (स्त्री. अने.) चेष्टा.
**ढंगधत्तुरा** (पु.) सोंगढोंग, चाळे; फसवणूक.
**ढगळ** (वि.) स्थूळ, ढोबळ; उधळ्या; (पु.) निचरा, स्राव; पातळ जुलाब.
**ढगळा** (पु.) मोठी डाहळी.
**ढगाड, ढगार** (पु.) मोठा ढग.
**ढगाळ** (वि.) मेघांनीं व्याप्त.
**ढंगी, ढंग्या** (वि.) व्यसनी, छांदिष्ट; ढोंगधत्तुरे करणारा.

**ढणढणा** (क्रि. वि.) खणखण; मोठा प्रकाश होईल असें दिव्याचें जळणें.
**ढणढणीत** (वि.) मोठा; झगझगीत (अग्नि).
**ढप** (स्त्री.) ढब पहा. [ तुकडा.
**ढपला** (पु.), **ढपली** (स्त्री.) धलपा, धलपी,
**ढपळ, ढप्पळ** (स्त्री.) फार पातळ भाजी.
**ढपळवणी** (का. न.) घाण पाणी, गरगट.
**ढपळशाई** (स्त्री.) विपुलता; उधळपट्टी; अव्यवस्थितपणा.
**ढब** (हिं. स्त्री.) रीत, चाल; ऐट, डौल.
**ढबक** (न.), **ढबका** (पु.) गोळा; ढेकूळ.
**ढबढब** (स्त्री.) अव्यवस्था.
**ढबदार** (हिं. वि.) डौलदार.
**ढबळ, ढब्बळ** (वि.) विशाळ, प्रचंड; अस्ताव्यस्त.
**ढबळशाई** ढपळशाई पहा.
**ढबू, ढब्बू** (तेलगु पु.) अर्ध्या आण्याचा डबल पैसा; (वि.) लठ्ठंभारती, अगडबंब. दिखनेमें ढब्बू चलनेमें शिवराई—दिसायला भव्य पण कर्तृत्वहीन मनुष्य.
**ढमका** (वि.) अमुक, अनिश्चित.
**ढमन्या** (वि.) षंढ, वायल्या.
**ढमकें** (न.) टिमकी.
**ढमाई** (स्त्री.) मोठ्या पोटाची मुलगी.
**ढमामा** (न.) एक वाद्य.
**ढमाल, ढमाल्या** (वि.) लठ्ठ, अगडबंब.
**ढलपा** (पु.) ढपला, तुकडा.
**ढवक** (न.) अर्धभाग.
**ढवढव** (स्त्री.) अव्यवस्था; दुर्दशा; गोंधळ.
**ढंवढाळ्या** (वि.) खटपटीलटपटी करणारा; उलाढाल्या.
**ढवसा ॐ** (न.) आहुति.
**ढवळणें** (क्रि.) हलविणें, खालीं वर करणें, घाटणें; (पोटांत) उमदळणें.
**ढवळा** (सं. धवल वि.) पांढरा; (पु.) गोंधळ, गडबड; नाश; वायकांचें गाणें, उत्सवगीत.
**ढवळाढवळ** (स्त्री.) उलाढाल, गोंधळ.
**ढवळार** (प्रा. न.) चुनेगच्ची वाडा.
**ढवा** (प्रा. पु.) हिजडा, नपुंसक (मोरो० विराट० १।१२३); साजिंदा.
**ढवाळा** (प्रा. स्त्री.) टवाळी, थट्टा, उपहास.

**ढसढसां, ढसाढसां** (अ.) आवेशानें किंवा जोरानें रडणें, किंवा पिणें.
**ढसर** (स्त्री.) चंगळ, विपुलता; उधळपट्टी.
**ढसळ, ढसाळ** (वि.) उदार, सढळ.
**ढसळणें, ढसाळणें** (क्रि.) ढासळणें; (प्रा. क्रि.) विसरणें.
**ढसासणें** (क्रि.) ढोसणें, कोंबणें; गट्ट करणें; सपाटून रडणें.
**ढळ** (पु.) निसटण्याची क्रिया; चूक.
**ढळढळ, ढळढळां** (अ.) अश्रु वाहतील अशा रीतीनें.
**ढळढळीत** (वि.) स्पष्ट; प्रत्यक्ष, दृष्टीदेखत.
**ढळणें** (क्रि.) हलणें, चलन पावणें; (चवरी इ.) उडणें.
**ढळता कांटा** सढळपणा.
**ढळपा** (पु.), **ढळपी** (स्त्री.) लाकूड, दगड, भिंतीचा गिलावा इत्यादींचा उडालेला किंवा उडविलेला खंड किंवा कळपा.
**ढांक** (न.), **ढांकुळ** (स्त्री.) फार जुना व जीर्ण वृक्ष; थाप; गप्पा; (पु.) कुस्तींतील एक डाव.
**ढांकण** (हिं. न.) झाकण.
**ढांकूळ** (वि.) ढांकळ.
**ढांग** (स्त्री.) टांग.
**ढांगळ** (वि.) फार उंच; लांबटांग्या.
**ढांगळणें** (क्रि.) थट्टेवारी उडविणें; तिरस्कारानें झुगारून देणें.
**ढांडरा** (प्रा. पु.) शोध, झाडा.
**ढांडोरा** (हिं. पु.) जाहीरनामा, डांगोरा.
**ढांढुळणें** (क्रि.) शोधणें. [फार अंवट.
**ढाण** (न.) वण; (वि.) ओलसर, सर्द;
**ढाणक** (पु.) महार, मांग वगैरे.
**ढाण्या** (वि.) ठिपकेदार; अतिशय अंवट.
**ढाप, ढापी** (स्त्री.) झाडाची फांदी.
**ढापण** (न.) झाकण.
**ढापणें** (प्रा. क्रि.) झाकणें; हलणें; लुबाडणें.
**ढापा** (पु.) मोठें कौल; जिना वंद करण्यासाठीं योजिलेली पाडण्यासारखी फळी.
**ढाल** (स्त्री.) शरीरसंरक्षणासाठीं आड धरण्याचें एक हत्यार; किल्ल्यावरचें निशाण; स्त्रीचें साहसकर्म; मंत्रप्रयोगापैकीं एक क्षुद्र साधन (दा० ३।३।४५).
**ढाल देणें**—युद्धास बोलावणें; **उलटी ढाल देणें**—वंड करणें.
**ढालकरी** (पु.) कुटुंबांतला मुख्य.
**ढालकाठी** (स्त्री.) वाहुटयाची काठी; कुटुंबांतला किंवा संस्थेतला मुख्य कर्ता पुरुष.
**ढालगज** (वि.) मूळ अर्थ—साहसकर्म करणारा; पुढें झालेला अर्थ–निष्कारण उठाठेवी करणारा व फाजील.
**ढाला** (वि.) रुंद आणि भरदार (आवाज).
**ढालाईत** (हिं. पु. ना.) ढाल बांधलेला शिपाई; स्वारींतील निशाणवाला शिपाई.
**ढालें** (प्रा. न.) मंत्रसाधन.
**ढाल्या** (वि.) ढालाईत; वाहुटेवाला; धाडशी.
**ढास** (स्त्री.) कोरडा खोकला; त्याचा उमाळा; (वि.) रुक्ष; कृश; नापीक.
**ढासण** (न.) हातघाईची वेळ किंवा जागा; आणीबाणीचा प्रसंग; पुरस्कर्ता, आधारस्तंभ.
**ढासणें** (क्रि.) खोकणें, ढास लागणें.
**ढासरा** (पु.) धक्का, धास्ती. [होणें.
**ढासळणें** (क्रि.) कोसळणें; फसणें, व्यर्थ
**ढाळ** (पु. न.) मोत्याचें तेज; उतार; रेच; रेचक; अभिषेक; रसपुट (भा० ५।८४); प्रकार, चाल; उष्णतेच्या झळा; फांदी; (अ.) सहजगत्या (दा० १९।८।९).
**ढाळक** (न.) रेचक.
**ढाळणें** (क्रि.) अभिषेक करणें, ओतणें, गाळणें, खालीं पडू देणें; (चवरी, मोरचल इ०) उडविणें; ढेकळें फोडून जमीन साफ करणें.
**ढाळढाळें, ढाळेंढाळें** (प्रा. अ.) एका डहाळीवरून दुसऱ्या डहाळीवर; हळूहळू.
**ढाळदार** (वि.) उतरती.
**ढाळा** (पु.), **ढाळी** (स्त्री.) डहाळी, फांदी.
**ढाळू** (वि.) उतरती.
**ढाळढाळी, ढाळेढाळे** (प्रा. वि.) थोडथोडें, हळूहळू.
**ढाळें** (प्रा. अ.) हळूच (ज्ञा० ६।२४७).
**ढाळया** (पु.) दवंडी देणारा.

नं०५४ वाचनालय सातारा
संग्रहलिखित

**ढिगर, ढिगार, ढिगारा** (पु.) माती, गवत, लाकडें इ० चा ढीग किंवा रास.
**ढिपळ, ढिपूळ** (न.) माती, शेण इत्यादिकांचा गोळा किंवा गोटा.
**ढिम्म वसणें** (क्रि.) मौन धरणें.
**ढिमा** (प्रा. पु.) बेट; लहान टेकडी; मुलामा (ज्ञा० १३।४७१).
**ढिलता, ढिला** (वि.) सैल, अघळपघळ; कर्तव्याकडे कमी लक्ष देणारा; विशेष चौकशी किंवा त्वरा नाहीं असा कारभार.
**ढिलाई** (स्त्री.) सुस्तपणा, मंदपणा.
**ढिसळ, ढिसाळ** (वि.) खर्चीक, सढळ हाताचा; लवकर मोडणारा किंवा फुटणारा.
**ढील** (हिं. स्त्री.) सैलपणा, कामांत कुचराई, दिरंगाई. [पाहणें.
**ढुंकणें** (क्रि.) डोकावणें; डोकें खुपसून
**ढुंकून** (अ.) ढुंगण करून; वळून. **ढुंकून न विचारणें**--पूर्ण दुर्लक्ष करणें.
**ढुंग** (न.) ढुंगण, कुल्ला.
**ढुंगण, ढुंगाण, ढुंगाड** (न.) कुल्ला. **ढुंगणास हात पोहोंचणें**--वडील माणसांचा दाब झुगारून देऊन स्वच्छंद वर्तन करणें.
**ढुंडाळणें** (क्रि.) शोधणें, धुंडाळणें.
**ढुढ्ढाचार्य** दुढ्ढाचार्य पहा.
**ढुवा** (पु.) उंच जागा, टेकडी.
**ढुमकें** (न.), **ढुमढुम** (स्त्री.) टिमकी.
**ढुमणी** (स्त्री.) धडक, थडक.
**ढुशी, ढुश्शी, ढुसकी, ढुसणी** (स्त्री.) डोक्यानें केलेला जोराचा आघात; मुसंडी.
**ढुस, ढुस्स** (अ.) अतिशय (काळा).
**ढुसकणें** (क्रि.) भोसकणें, ढोसणें.
**ढुसकी** (स्त्री.) खुपस, आघात.
**ढुसणी** (स्त्री.) ढोसणें. [देणें.
**ढुसणें** (क्रि.) खुपसणें, भोसकणें, मुसंडी
**ढुसा, ढुस्सा** (पु.) मुठीचा ठोसा, भतका, मुटका.
**ढेंक** (स्त्री.) डरकणी.
**ढेंकणी** (स्त्री.) ढेकूण धरण्यासाठीं अनेक छिद्रें पाडलेली लाकडाची फळी.

**ढेकर** (स्त्री.) पोटांतून वायु वर येऊन कंठांतून बाहेर पडतांना होणारा आवाज. **ढेकर देऊन बसणें**--परद्रव्याचा अपहार करून तें द्रव्य जिरविणें.
**ढेकळ** ढेकूळ पहा. [कुटण्याचें यंत्र.
**ढेकी** (हिं. स्त्री.) पोहे किंवा चुना
**ढेकूण** (पु.) माणसाचें रक्तशोषण करणारा एक क्षुद्र जीव; मत्कुण, खटमल.
**ढेकूळ** (न.) मातीचें डिखळ.
**ढेंग** (स्त्री.) तंगडी, पाय; फांदी.
**ढेंगमत** (न.) पाखंड मत. [जाणें.
**ढेंगलणें** (क्रि.) झपाट्यानें अंतर तोडीत
**ढेंगळ, ढेंगाळ** (वि.) लांबटांग्या.
**ढेंगा** (पु.) कुल्ला, ढुंगण.
**ढेंगोजी** (पु.) बढाईखोर, प्रतिष्ठितपणानें मिरविणारा क्षुद्र मनुष्य.
**ढेंगोमेंगो** (पु.) महारांचा गुरु.
**ढेंढळणें, ढेंढाळणें** (क्रि.) जुलाब होणें.
**ढेंढळपट्टी** (स्त्री.) जोराचा जुलाब. [धेंड.
**ढेंढें** (न.) मोठी आकृति; अवडंबर; प्रस्थ,
**ढेण्या** (पु.) लठ्ठ, पुष्ट ढेकण.
**ढेप** (स्त्री.) भेली; पेंड; ढेकूळ.
**ढेपणें** (क्रि.) रास घालणें, खचून भरणें.
**ढेपशी** (स्त्री.), **ढेपसा** (पु.) गोवरीची राखुंडी.
**ढेपळ, ढेपुळ** (न.), **ढेपळा,** (पु.) **ढेपळी** (स्त्री.) मातीचा गोळा, डिखूळ. [सांचा.
**ढेपाळें** (न.) गुळाच्या ढेपा वनविण्याचा
**ढेपुली** (स्त्री.) ढेकूळ.
**ढेप्या** (वि.) खणपटीस वसणारा, चिकट.
**ढेबर** (न.) सुटलेलें पोट, दोंद.
**ढेबरपोट्या, ढेबरा** (वि.) मोठ्या पोटाचा.
**ढेम** (प्रा. स्त्री.) टेकडी; धोंड.
**ढेमा** (पु.) नदीच्या पात्रांतली मधलीच एखादी कोरडी जागा; ढेंगूळ, उंचवटा.
**ढेर** (पु.), **ढेरकें** (न.) मोठें पोट; (स्त्री.) रास, ढीग.
**ढेरपोट्या** (वि.) ढेबरपोट्या.
**ढेरी** (स्त्री.) लहान रास. [उंबरठा.
**ढेलच-ज** (फा. स्त्री.) कमानी दरवाजा,
**ढेला** (पु.) नदींतील बेट.
**ढेली** (वि.) झिजलेलें (नाणें).

**ढेस** (वि.) निबिड; धीट.
**ढोक** (पु.) गिधाडासारखा पक्षी ; (न.) काकवी घेण्याचें लाकडी पात्र. (वि.) हलका.
**ढोंक** (पु.) जुना वठलेला वृक्ष.
**ढोकळा** (पु.) मोठा (डबल) पैसा.
**ढोंग** (न.) दांभिकपणा, सोंग, कांगावा.
**ढोंगधत्तुरा** (पु.) दांभिक माणसाच्या युक्त्या (मंत्रतंत्र इ.).
**ढोंगमत** (न.) कपटाचें मत, लबाडीचें मत.
**ढोंगा** (पु.) कुल्ला, मोठें ढुंगण.
**ढोंगी** (वि.) दांभिक, लबाड, कांगावखोर.
**ढोढी** (स्त्री.) वाटोळा आकार (ज्ञा. ८।२२).
**ढोण** (न.), **ढोणा** (पु.) लाकडाचा मोठा ओंडा.
**ढोण्या** (वि.) धष्टपुष्ट; टोणपेश्वर.
**ढोपर** (न.) गुडघा.
**ढोपरखळी** (स्त्री.) ढोपरानें हुंदडणें.
**ढोबळ** (वि.) मोठी, ठळक, ओबडधोबड.
**ढोवळा** (पु.) मोठें भोंक, खिडार.
**ढोमण** (न.) ढुंगण.
**ढोर** (न.) गाय, म्हैस इ० पशु; (पु.) कातडें रंगविणारी एक जात.
**ढोरकी** (पु.) गुराखी.
**ढोरमळी** (स्त्री.) उंसाचा रस कढवितांना प्रथम येणारी मळी.
**ढोरू** (प्रा. पु.) ढोर, बैल.
**ढोल** (फा. पु.) भेरी, नगारा, पडघम.
**ढोल, ढोली** (स्त्री.) झाडाचा पोकळ अंतर्भाग.
**ढोलक** (पु.), **ढोलकी** (स्त्री.), **ढोलकें** (न.) लहान ढोल, पडघम.
**ढोलक्या** (पु.) ढोलकें वाजविणारा.
**ढोलगें** (न.) ढोलक पहा.
**ढोलज** (स्त्री.) कमानी दरवाजा, देवडी.
**ढोलजी** (पु.) ढोलक्या; (हिं. पु.) ढोल वाजविणारा.
**ढोलधमामे** (पु.) गाजावाजा.
**ढोला** (पु.) ढोल; नुकसान; फसवणूक; (स्त्री.) कणगी.
**ढोलार** (न.) झाडाच्या मध्यांतली पोकळी; पोकळ झालेलें झाड; ढेरपोट.
**ढोली** (स्त्री.) ढोल पहा.
**ढोल्या** (वि.) ढेरपोटचा.
**ढोसकणी, ढोसणी** (स्त्री.) खुपसणें, भोसकणें, मुसांडी.
**ढोसणें** (क्रि.) खुपसणें; घटाघट पिणें.
**ढोसरा** (पु.) ठोसा, आघात.
**ढोसा** (पु.) ठोसा, प्रहार.
**ढौळ** (प्रा. पु.) डौल, आकृति.

---

## ण

**ण** मराठी व्यंजनमालेंतील पंधरावें व्यंजन. (ज्याच्या आरंभीं ण हें अक्षर आहे असे शब्दच मराठी भाषेंत नाहींत.)

---

## त

**त** मराठी व्यंजनमालेंतील सोळावें व्यंजन.
**त** (प्रा. अ.) तर.
**तइनात** (स्त्री.) तैनात.
**तई** (प्रा. अ.) तेव्हां.
**तऊर** (अर. तोर पु.) तोरा, आढ्यता; अभिमान; निर्भीडता. [पिंपळपान.
**तकट** (न.) धातूचा पत्रा, तवकडी; वर्ख;
**तकटणें** (क्रि.) आवळणें; कोंबणें.
**तकटबंदी** (स्त्री.) वेढा, कोंडमारा.
**तकटी** (स्त्री.) पिंपळपान.
**तकटून** (अ.) गच्च, आवळून. [वर्ख.
**तकटें** (न.) ताटी बसविलेली चौकट; पत्रा;
**तकत** (अ.) पर्यंत.
**तकतकणें** (क्रि.) चकाकणें, चमकणें.
**तकतकी** (स्त्री.) चकाकी, तुळतुळीतपणा.
**तकतकीत** (वि.) चकचकीत, उजळ, तुळतुळीत, मोहरेदार.
**तकदम** (अर. तकद्दुम वि.) मागील.
**तकरार** (अर. स्त्री.) हरकत; वाद, भांडण, फिर्याद.
**तकरारखोर, तकरारी** (वि.) हुजतखोर.
**तकराळ** (अर. तकरार स्त्री.) विसंगतपणा, बनावटपणा. [(स्त्री.) प्रतिज्ञालेख.
**तकरीर** (अर. पु.) आळ, खोटा दोषारोप;
**तकलादी** (अर. वि.) बनावट.

**तकलीफ** (अर. स्त्री.) तसदी.
**तकलुबी** (अर. तकल्लुवी वि.) वाईट रीतीनें घडविलेलें; हलकें; बनावट; खोटा, दिखाऊ.
**तकवा** (प्रा. पु.) विश्रांति; धीर; बळ; (अर. पु.) दम, शक्ति, ताकद.
**तकवेत कौल** (अर. पु.) तात्पुरतें आश्वासनपत्र.
**तकशीर, तकसीर** (अर. स्त्री.) अपराध.
**तकस** (पु.) इजा; चीड; दुःख.
**तकसीम** (अर. स्त्री.) विभाग, वांटणी; वर्ग, जात.
**तकाकणें** (क्रि.) चकाकणें.
**तकाकी** (स्त्री.) चकाकी, तुळतुळीतपणा.
**तकिया** तक्या पहा. [ मनाई.
**तकुबी** (अर. तोकुफी स्त्री.) तात्पुरती
**तकूब** (अर. तोकूफ अ.) तात्पुरतें बंद.
**तक्त** (फा. तख्त न.) गादी, सिंहासन.
**तक्तपोशी** (फा. स्त्री.) कर्डीपाट, पटई.
**तक्तराव** (फा. तख्तरवां पु.) नाचणारणी वगैरे फळीवर गात व नाचत असतां ती फळी गाडीवरून मिरवितात तो, फिरता तमाशा.
**तक्ता** (फा. तख्ता पु.) फळी, ताटवा; कागदाचें पान; कोष्टक, पत्रक, कागदाचा नमुना.
**तक्ताधिकारी, तख्ताधिपति** (पु.) गादीवर असलेला राजा.
**तक्ती** (स्त्री.) कागदाचा तुकडा.
**तक्या** (फा. तकिया पु.) उशी, मऊ टेकण; फकिराची राहण्याची जागा.
**तक्र** (सं. न.) ताक.
**तक्रार** तकरार पहा. [ घालणारा.
**तक्रारखोर, तक्रारी** (वि.) हुजतखोर,हुजत
**तक्रीब** (अर. स्त्री.) संबंध. [ पहा.
**तखलादी, तखलुबी** तकलादी, तकलुबी
**तखसीर** (अर. पु.) अन्याय.
**तख्त** (फा. पु.) सिंहासन.
**तख्तनशीन** (वि.) गादीवर बसलेला.
**तग** (पु.) टिकाव.
**तंग** (फा. पु.) खोगीर आवळण्याची वादी; (वि.) घट्ट, गच्च.
**तंगचाई, तंगची, टंचाई** (हिं. स्त्री.) टंचाई, कमीपणा, तूट.
**तगट** (न.) पिकांचा अंदाज.
**तगट** (प्रा. न.) भरजरी वस्त्र; पत्रा; (वि.) घट्ट बांधलेलें, टिकाऊ.
**तगटणें** (क्रि.) झटणें.
**तगडा** (वि.) धिप्पाड.
**तंगड** (न.), **तंगडी** (हिं. स्त्री.) टांग.
**तंगडणें** (क्रि.) तांगडणें; पिटाळणें.
**तगणें** (क्रि.) राहणें, टिकणें, टिकाव धरणें.
**तंगणें** (प्रा. क्रि.) थकणें, क्षीण होणें.
**तगतराव** (पु.) यात्रेंतील नाचे पोरांची गाडी. [ अवश्य जिनसा.
**तंगतोबरा** (पु.) घोड्याला लागणाऱ्या
**तंगदार** (वि.) घट्ट, आवळ.
**तगबग, तगमग** (स्त्री.) तळमळ, अशांतता.
**तगर** (पु.) मेंढा; (स्त्री.) एक फुलझाड.
**तगविणें** (क्रि.) टिकविणें.
**तगाई** (अर. तकावी स्त्री.) शेतकऱ्यांना मदतीदाखल सरकारी खजिन्यांतून दिलेली कर्जाऊ रकम.
**तगादा** (अर. तगाजा पु.) मागणीचा लकडा किंवा निकड.
**तगारी** (फा. स्त्री.) थाळा, ताट.
**तगाव** (पु.) टिकाव.
**तगिरी** (अर. स्त्री.) बडतर्फी.
**तगीर** (अ. वि.) बडतर्फ केलेला.
**तंगी** (फा. स्त्री.) तेजी, ओढ.
**तगेरी** (अर. तगिरी स्त्री.) बडतर्फी.
**तचकरपत्र** (न.) महाली कमाविसदारावर पैका घेतल्याचा मुद्दा शाबीत करून तुफानदार आल्यावर त्याची व कमाविसदार यांची रुजुवात केल्याबद्दलचें पत्र.
**तजकरनीस** (फा. तजकरनवीस पु.) सरकारी द्रव्याचा अपहार कोणी करीत आहे कीं काय याच्या शोधाच्या कामावर नेमलेला अधिकारी.
**तजकरा** (अर. पु.) पैशाची अफरातफर; जमाखर्चातली खोटी नोंद.
**तजवीज** (अर. तदबीर स्त्री.) व्यवस्था, उपायाची योजना, निकाल.

**तजाऊफ** (फा. वि.) चुकणारा; कमी; कपटी.
**तजावजा** (अर. वि.) पांगलेलें, घाबरलेलें.
**तजावत, तजाउजू** (फा. स्त्री. न.) चूक; लवाडी, कपट; न्यून.
**तजावत, तफावत** (अर. स्त्री.) फरक.
**तजेलदार** (वि.) ताजें दिसणारें, प्रफुल्लित.
**तजेला** (अर. पु.) टवटवी, तेज, कांति, पाणी.
**तट** (सं. पु.) किनारा, तीर; भांडण; पक्ष, बाजू; शेवट; निकड; कोटाची भिंत.
**तंट** (प्रा. पु.) बोभाट, दुष्कीर्ति (तुका० १२५५); (वि.) भांडखोर.
**तटका** (पु.) संबंध, भीडमुरवत. **त० तोडणें**—स्पष्टपणें सांगून निकालांत काढणें, संबंध तोडणें.
**तटणी** (स्त्री.) दाराच्या चौकटीला बसविलेली लाकडी पट्टी; हूक.
**तटणें** (क्रि.) थांबणें, अडून बसणें.
**तटतटणें** (क्रि.) तुटेपर्यंत ताणणें.
**तटतटीत** (वि.) अंगाशीं तंग बसणारा; पुरें ठांसून भरलेलें (पोट, पिशवी इ.).
**तटबंदी** (सं. फा. स्त्री.) तटाचा बंदोबस्त.
**तटस्थ** (सं. वि.) कोणत्याही पक्षास न मिळालेला, उदासीन.
**तंटा** (हिं. पु.) कज्जा, भांडण, वाद.
**तटाक, तटाग** (सं. पु.) किनारा; तीर; तळें.
**तटाटणें** (क्रि.) फार ताणलें जाणें (पोट, पिशवी.
**तटाणी** (स्त्री.) तट्टाची मादी.
**तंटाबखेडा** (हिं. पु.) वाद, भांडण.
**तटिनी** (सं. स्त्री.) नदी.
**तंटेखोर, तंटेबाज** (वि.) भांडखोर.
**तटकन्, तटकर, तटदिशीं** (अ.) झटपट, वेळ न गमावतां.
**तट्ट** (अ.) फुटेल की काय इतकें फुगलेलें.
**तट्टी** (स्त्री.) पडदा; शौचकूप.
**तट्टू** (हिं. पु. न.) घोड्याची एक जात.
**तट्टया** (पु. न.) वांबूची चटई.
**तड** (सं. तट स्त्री.) किनारा, बाजू; शेवट, अखेर; निकड; (पु.) पक्ष, भांडण.
**तडक** (अ.) प्रतिबंध न होतां; एकदम; (पु.स्त्री.) जोराचा यत्न, मोठा आवाज.
**तडकणी** (स्त्री.) गोणीला बांधलेली दोरी.
**तडकणें** (क्रि.) भेगा पडणें, चीर जाणें; व्यथा पावणें.
**तडकफडक** (वि.) त्वरित.
**तडकशीं** (अ.) ताडकन्.
**तडकसार** (वि.) त्वरित; चपळ. [मुलगी.
**तडकसावित्री** (स्त्री.) तल्लख आणि चपळ
**तडका** (पु.) कडाखा, उत्साह.
**तडकाफडकीं** (अ.) तत्काळ, फार त्वरेनें.
**तडजोड** (स्त्री.) तोडजोड पहा.
**तंडणें** (क्रि.) व्यर्थ भांडणें, त्रासून बोलणें.
**तडतड** (स्त्री.) धुसफुस, छांदिष्टपणा; जिवाला होणारा त्रास.
**तडतडणें** (क्रि.) फुटतांना करकरणें; दुखणें.
**तडतडाट** (पु.) चडफडाट.
**तडतडीत** (वि.) शुष्क.
**तडताथवड** (प्रा. अ.) तत्काळ.
**तडफ** (स्त्री.) चापल्य, कार्यशक्ति, उत्साह.
**तडवा** (प्रा. पु.) चांदवा, छत.
**तडफड** (स्त्री.), **तडफडा** (पु.) धडपड, आदळआपट, झोंबी, झटापट.
**तडफडाट** (पु.) चडफडाट, जोराची आदळआपट, मनाचा संताप.
**तडवा** (पु.) आघात; छत. [तिडीक.
**तडस** (स्त्री.) पोट फुगल्यामुळें लागणारी
**तडसणी** (स्त्री.) गोणीची दोरी.
**तडा** (पु.) चीर, भेग; अट.
**तंडा** (पु.) तांडा, समुदाय.
**तडाका, तडाखा** (पु.) कडाका; प्रहार; ठोसा; झपाटा, वेग.
**तडाग** (सं. न.) तळें, जलाशय.
**तडागणें** (क्रि.) फाटणें, फुटणें; तडतडणें.
**तडातोडी** (प्रा. स्त्री.) पृथक् भाव, भेद; ताटातूट.
**तडित्** (सं. स्त्री.) वीज.
**तडीतापडी** (पु.) तपस्वी, वैरागी; गरीब.
**तंडुल** (सं. पु.) कांडलेले तांदूळ.
**तंडेली** (स्त्री.) आडदांडपणा, दांडगाई, दंडेली. [भिल्ल
**तडवी** (पु.) बाटून मुसलमान झालेल

**तड्या** (वि.) जमिनीकडून वाहणारा (वारा); कोरडा.
**तढो** (पु.) वऱ्हाडप्रांतीं–सुताडा, झोऱ्या.
**तण** (सं. तृण न.) तृण; गवत, माजलेलें रान.
**तणतण करणें** रागानें चरफडणें.
**तणतणीत** (वि.) फार ताणलेलें.
**तणमोड** (स्त्री.) जमीन लागवडीस आणतांना प्रथम तेथील झाडें झुडपें, गवत इ० काढून जमीन साफ करतात तें; पडीत जमीन कांहीं काळपर्यंत सारा माफ करून लागवडीस देणें.
**तणवर** (पु.) जमीन भाजण्यासाठीं प्रथम तिच्यावर वाळलेल्या काड्याकुड्या घालून त्यांच्यावर गवत घालतात तें.
**तणवी** (वि.) शाकारलेलें.
**तणस** (न.) तण; माजलेलें रान.
**तणसडी** (स्त्री.) गवताची काडी; अति क्षुद्र वस्तु. [गुणणें.
**तणाणा** (पु.) तनन, गायनाचे सूर गुण-
**तणार** (सं. तृणागार पु.), **तणारा** (प्रा. स्त्री.) गवताची झोपडी.
**तणाव** (प्रा. पु.) ताणदोर; आक्रमणशक्ति.
**तणावणें** (क्रि.) पाय पसरून निजणें.
**तणावा** (अर. तणाव पु.) तंबूची ताणलेली दोरी; ताठपणा; ताण, ओढ.
**तण्हारें** (न.) गवताची झोपडी.
**तंत** (सं. तंतु पु.) दोरा, तार; त्राण, जीव, दम.
**ततबीर** (फा. स्त्री.) प्रयत्न, तजवीज.
**तंतरणें** (क्रि.) फंसविणें. [कृश, क्षीण.
**तंतार, तंतारा, तंतारीक** (वि.) बारीक;
**तंताळ** (वि.) खोडकर.
**तति** (सं. स्त्री.) रांग, समुदाय.
**तंती** (पु.) विणकर, कोष्टी. [संतति.
**तंतु** (सं. पु.) सूत, दोरा, धागा; संबंध;
**तंतुकार** (पु.) तंतुवाद्य वाजविणारा.
**तंतुवाद्य** (सं. न.) तंतूच्या तिर्यक् आंदोलनांनीं ज्यांतून सूर निघतात तें वाद्य.
**तंतुवाय** (सं. पु.) विणकरी, कोष्टी.
**तंतोतंत** (वि.) तुल्य, समान, बरोबरीचें; पूर्ण.
**तत्काळ** (अ.) लागलीच.
**तत्तामाल** (तत्त्व + माल पु.) निवडक, उत्कृष्ट भाग.
**तत्पदार्थ** (सं. पु.) परब्रह्म.
**तत्पर** (सं. वि.) तयार, तल्लीन, निमग्न.
**तत्पुरुष** (पु.) व्याकरणांतला एक समास (यांत दोन शब्दांमध्यें असणाऱ्या विभक्तिसंबंधांचा लोप होऊन ते शब्द जुळविले गेले असतात).
**तंत्र** (सं. न.) सूत्र, धागा; अधीनता; धोरण; जमा; एकावेळीं अनेक कामें करणें; जारण मारण इ.; ग्रहांच्या स्थितिगतीविषयींचें गणित; मंत्रावांचून नुसती हस्तक्रिया.
**तत्रशीं** (अ.) जवळ.
**तत्राप, तत्रापि** (अ.) तथापि.
**तंत्री** (स्त्री.) वीणा, सारंगी; तार; (हिं. पु.) व्यवस्थापक.
**तंत्रीवाद्य** (सं. न.) तारांचें वाद्य.
**तत्त्व** (सं. न.) साररूप अंश; वास्तविक स्वरूप; सत्य; पदार्थ; तात्पर्य.
**तत्त्वतः, तत्त्वतां** (अ.) खरोखर, वस्तुतः.
**तत्त्वमसि** (स्त्री.) सर्व वेदांन्ताचें सार; मूल्यवान् वस्तु; द्रव्य.
**तत्त्ववाद** (सं. पु.) ईश्वराच्या अस्तित्वाविषयींचा वाद; सत्य कीं माया या विषयींचा वाद.
**तत्त्वज्ञान** (सं. न.) यथार्थ ज्ञान, ब्रह्मज्ञान.
**तत्त्वार्थ** (सं. पु.) साररूप अंश; सत्य; प्रत्यक्ष वस्तु.
**तत्सत्** (न.) तें (ब्रह्म) खरें आहे.
**तत्सदृश** (वि.) त्याच्यासारखा.
**तत्सम** (सं. वि.) संस्कृतांतून मराठींत जसेच्या तसे आलेले (शब्द). [क्षणांत.
**तत्क्षणीं** (अ.) लागलींच, लगेच; त्या
**तथा** (स्त्री.) शंका; (अ.) त्याप्रकारें.
**तथापि** (अ.) तत्रापि, तरीदेखील.
**तथास्तु** (सं. अ.) तसें असो.
**तथ्य** (सं. न.) सत्य, तत्त्व.
**तदंत** (सं. अ.) पूर्णपणें; अगदीं.
**तदनंतर** (सं. अ.) त्यानंतर.
**तदनुषंगिक** (वि.) त्याच्या मागून येणारे.
**तदबीर** (फा. पु.) प्रयत्न; तजवीज.

**तदीय** (सं. वि.) त्याचा, तिचा.
**तदोत्तर** (सं. तदुत्तर अ.) त्यानंतर.
**तंद्रा** (सं. स्त्री.) गुंगी, तंद्री, आळस.
**तंद्रालु** (सं. वि.) आळशी.
**तंद्री** (स्त्री.) एकाग्रता.
**तधीं** (प्रा. अ.) तेव्हां.
**तन** (सं. तनु स्त्री.) शरीर; (सं. तृण) तृण; देह.
**तनई** (अर. तनाव स्त्री.) तणावा, तंबूची दोरी.
**तनका** (पु.) रागाचा झटका.
**तनखा** (फा. तनख्वाह पु.) पगार; स्वामित्व; हक्क; संबंध; वसूलपद्धति; रुप्याचें एक नाणें.
**तननं** (न.) गायनाचे सप्तस्वर गुणगुणणें; गायन. **आधीं अननं मग तन्नं**—अगोदर पोटाची सोय, मग मौजेच्या गोष्टी.
**तनतनणें** (क्रि.) तणतणणें पहा.
**तनमणि** (सं. पु.) बायकांचा एक दागिना.
**तनमनधन** (सं. न.) सर्वस्व (शरीर, मन व चीजवस्तु).
**तनय** (सं. पु.) पुत्र.
**तनया** (सं. स्त्री.) कन्या.
**तनवी** (स्त्री.) चर्यवरचा तजेला.
**तनसडी** (स्त्री.) गवताची काडी, कपर्दीक.
**तनाई** (अर. स्त्री.) तंबूची दोरी; ताणून बांधलेली दोरी; आधार.
**तनाखोरी** (फा. स्त्री.) विश्वासघात.
**तनाना** (प्रा. पु.) गाण्यांतला आलाप; चेष्टा (हरि० १५।६०).
**तनावा** (फा. पु.) ताणलेली दोरी.
**तनु** (सं. स्त्री.) शरीर; (वि.) अल्प.
**तनुज** (सं. पु.) मुलगा.
**तनुजा** (सं. स्त्री.) मुलगी.
**तनू** (सं. स्त्री.) तनु, शरीर; पथ्यपाणी.
**तन्मय** (वि.) तद्रूप, तल्लीन.
**तन्मयता** (सं. स्त्री.) तल्लीनता.
**तन्मात्र** (सं. न.) पृथ्वी, जल, इ० पंचमहाभूतांचें सूक्ष्म रूप.
**तन्वंगी** (सं. स्त्री.) नाजुक व सुंदर स्त्री.
**तन्हार** (न.) छप्पर.
**तप** (सं. न.) तपश्चर्या, चिंतन; ग्रीष्म ऋतु; बारा वर्षांची मदत; (समासांत उत्तरपदीं वि.) ताप देणारें.
**तपकिऱ्या** (वि.) तपकीर हुंगणारा.
**तपकीर** (स्त्री.) हुंगण्यासाठीं घोटून केलेलें तंबाखूचें चूर्ण.
**तपखील** (स्त्री.) तपकीर. [संतापणें.
**तपणें** (क्रि.) चकाकणें; तपश्चर्या करणें;
**तपन** (सं. पु.) सूर्य.
**तपनीय** (सं. न.) सोनें, सुवर्ण.
**तपली** (स्त्री.), **तपलें** (न.) तपेली, तपेलें.
**तपशील** (अर. पु.) समुदायांतील एकेक निराळी बाब; कच्ची हकीकत.
**तपशीलवार** (वि.) साद्यंत, कच्ची, वारीकसारीक गोष्टींसुद्धां संपूर्ण.
**तपश्चर्या** (सं. स्त्री.) तपाचें आचरण; तप करणें; देह कष्टविणें, तपस्या.
**तपस्या** (सं. स्त्री.) तपश्चर्या पहा.
**तपस्वी** (सं. पु.) तप आचरणारा; (वि.) तामसी, तापट; अज्ञान.
**तपळ** (वि.) तापट, तामसी.
**तपा** (हिं. तपुआ पु.) शेताचा तुकडा.
**तपास** (अर. पु.) शोध, चौकशी.
**तपासणी** (स्त्री.) झडती, शोध; परीक्षा.
**तपासणें** (क्रि.) परीक्षा करणें, शोधणें, झडती घेणें. [वर नेमिलेला मनुष्य.
**तपासनीस** (पु.) तपास करण्याच्या कामा-
**तपिया** (प्रा. पु.) तपस्वी; (अर. स्त्री.) ताबेदार.
**तपी** (सं. पु.) तपस्वी.
**तपीळ** (प्रा. वि.) संतापी, तापट; चलाख.
**तपें** (अ.) तर्फें. [प्रकारचें भांडें.
**तपेली** (स्त्री.), **तपेलें** (न. ना.) एक
**तपोधन** (सं. पु.) तपस्वी.
**तपोनिधि** (सं. पु.) मोठा तपस्वी.
**तपोबल** (सं. न.) तपश्चर्येनें प्राप्त झालेली अलौकिक शक्ति.
**तपोलोक** (सं. पु.) सप्त लोकांपैकीं एक.
**तपोवन** (सं. न.) तपस्व्यांची राहण्याची जागा.
**तप्त** (सं. वि.) तापलेलें.

**तप्त मुद्रा** (सं. स्त्री.) वैष्णव मुद्रा तापवून तिचा छाप स्वतःच्या अंगावर घेतात तो.
**तफरीक** (फार. पु.) फरक, फूट.
**तफशील** (अर. पु.) तपशील. [विस्तारानें.
**तफशीलवार** (अर. अ.) तपशीलवार,
**तफावत** (अर. स्त्री.) फरक, अंतर.
**तबक** (अर. न.) ताटासारखें पसरट नक्षीदार पात्र.
**तबक** (स्त्री.) विहिरीभोंवतालचा ओटा.
**तबकडी** (स्त्री.) लहान तबक, तकट.
**तबकफाड** (पु.) कुस्तींतल्या एका पेंचाचें नांव.
**तबंचा** (हिं. पु.) पिस्तुल.
**तबदील** (वि.) बदललेलें; (स्त्री.)बदली.
**तबर** (प्रा. वि.) उन्मत्त.
**तबलख्** (अर. न.) कागदाचें पुडकें; त्याला बांधलेली दोरी.
**तबलजी** (पु.) तबला वाजविणारा.
**तबल्दार** (फा. पु.) कुऱ्हाडवाला.
**तबला** (अर. पु.) दोन पडघीं निरनिराळीं असें चर्मवाद्य.
**तबली** (स्त्री.) सतारींत भोपळयाच्या वरील बाजूस बसविलेली लांकडाची फळी.
**तबा** (फा. स्त्री.) प्रभा, तेज, प्रकाश.
**तंबाकु–खु** (अर. पु. स्त्री.) तंबाखु.
**तबियत** (अर. स्त्री.) तब्येत, प्रकृति, मर्जी.
**तबियती** (वि.) लहरी, छांदिष्ठ.
**तंबी** (अर. स्त्री.) शिक्षा, धमकावणी.
**तबीब** (अर. पु. ) वैद्य.
**तंबुरा** (बंगाली–तानपुरा पु.), **तंबुरी** (अर. स्त्री.) सुराचा पुरवठा करणारें तंतुवाद्य.
**तंबू** (हिं. पु.) कापडाचें एकखांबी घर.
**तंबूर** (अर. पु.) एक चर्म वाद्य.
**तबेला** (अर. पु.) घोडशाळा.
**तंबोरा** (पु.) तंबुरा पहा.
**तब्बल** (वि.) पुरापुरा.
**तब्यत** (फा. तबियत स्त्री.) प्रकृति.
**तम** (सं. पु. न.) अंधकार; सत्त्वरजादि तीन गुणांपैकीं शेवटचा; अज्ञान; एकाद्या गुणाची उत्कटता दाखविण्यासाठीं जोडावयाचा प्रत्यय = जसें–प्रिय, प्रियतम.
**तमंचा** (हिं. तबंचा पु.) पिस्तूल.
**तमणें, तमतमणें** (प्रा. क्रि.) तळपणें; वडवडणें; अवडंवर घालणें; आवेशानें लढणें.
**तमा** (अर. स्त्री.) फिकीर, पर्वा.
**तमाकु, तमाखु** (पु. स्त्री.) तंबाखु, धूमपत्र.
**तमाखोरी, तनाखोरी** (स्त्री.) पैसे खाणें.
**तमाम** (अर. वि.) पूर्ण, सर्व, एकंदर.
**तमामी** (अर. स्त्री.) ज्यांत उभें सूत जरीचें व आडवें रेशमाचें असतें असें कापड; पूर्णता.
**तमारि** (सं. पु.) सूर्य. **त०सुत**–शनि.
**तमालपत्र** (सं. न.)मसाल्यांतला एक पदार्थ.
**तमाशा** (फा. पु.) खेळ; मौज; निलज्ज-पणाची चेष्टा. [प्रेक्षक.
**तमासगीर** (फा. पु.) तमाशा करणारा;
**तमासबिन** (फा. तमाशबिन वि.) चैनी, विलासी.
**तमिस्रा** (सं. स्त्री.) अंधारी रात्र.
**तमोगुणी** (सं. वि.) तामसी, तापट.
**तमोहर** (सं. पु.) सूर्य.
**तयार** (फा. वि.) सज्ज; पूर्ण; धष्टपुष्ट.
**तयारी** (फा. स्त्री.) सिद्धता; सामुग्री, बेगमी.
**तर** (सं. स्त्री.) होडी; नाव उतरून जाण्याजोगी लहान खाडी; (अ.) त्या अर्थीं, म्हणून. [लाकूड.
**तरई** (स्त्री.) कोष्टयाचें वस्त्र गुंडाळण्याचें
**तरकट** (न.) वेडावाकडा तर्क; दुसऱ्यावर खोटा आरोप करण्यासाठीं केलेली बनावट गोष्ट.
**तरकटी** (वि.) तरकट रचणारा.
**तरकणें** (क्रि.) तर्क करणें; ताडणें, उमजणें.
**तरकारी** (हिं. स्त्री.) भाजी.
**तरकाकडी** (स्त्री.) टरकाकडी.
**तरक्की** (फा. तरक्की स्त्री.) अभिवृद्धि, बढती, उत्कर्ष.
**तरकीब** (अर. स्त्री.) युक्ति.
**तरंग** (सं. पु.) लाट, ऊर्मि, बुडबुडा; लहर; नव्या नव्या कल्पना.

**तरंगणें** (क्रि.) वर राहणें; पोहणें; तिरणें; वाहवणें; गोंधळणें; अपेक्षा धरून बसणें.
**तरंगिणी** (सं. स्त्री.) नदी.
**तरंज** (स्त्री.) पातळ पापुद्रा किंवा थर.
**तरजुमा** (अर. तरजमा पु.) भाषांतर; संक्षेप, सारांश; एकंदर राज्याचा हिशेब.
**तरट** (न.) गोणपाट, ताटूक, पोत्याचा तुकडा; असूड, चाबूक.
**तरटें** (न.) टक्कल; गोणपाटाची पट्टी.
**तरड, तरडक** (न.), **तरडा** (पु.), **तरडें** (न.), **तरढक** (न.) ओल्या गव्हाचा कोंडा; लांवण. **तरडीं पेटणें**—रागावणें.
**तरंड** (सं. पु.) लाकडाचा ताफा; वल्हें.
**तरंडक** (सं. न.) होडी.
**तरण** (न.) कांजी; नाव, पडाव वगैरे.
**तरणा** (सं. तरुण वि.) तरुण, जवान.
**तरणाताठा** (वि.) तरुण व बळकट.
**तरणाबांड** (पु.) जोमदार व धट्टाकट्टा तरुण पुरुष.
**तरणि** (सं. पु.) सूर्य; (स्त्री.) नौका.
**तरणी** (सं. स्त्री.) नौका, नाव; (वि.) तरुण (स्त्री).
**तरणूक** (स्त्री.) तरून जाणें (अडचणींतून संकटांतून वगैरे).
**तरणें** (सं. तॄ क्रि.) पोहणें, तरंगणें; पार जाणें; मोक्षपद पावणें. [धडगत.
**तरणोपाय** (सं. पु.) सद्‌गति; बचाव,
**तरंत** (प्रा. पु.) बेडूक.
**तरतमभाव** (सं. पु.) पात्रापात्रभाव; सरस नीरस यांमधील भेदांचें ज्ञान.
**तरतरणें** (क्रि.) फुगणें, ताठणें.
**तरतरा** (पु.) पैलू पाडलेला हिरा. [जोम.
**तरतरी** (स्त्री.) चलाखी, चपलता; नवा
**तरतरीत** (वि.) चलाख, हुशार.
**तरता** (वि.) तरंगणारा, बुडण्याची भीति नसलेला; फायदेशीर.
**तरतीब** (अर. स्त्री.) तजवीज, व्यवस्था.
**तरतूद** (अर. स्त्री.) तयारी; तजवीज; बंदोबस्त; सोय.
**तरतें** (वि.) वसूल होण्यासारखें, न बुडणारें.
**तरतें–बुडतें** (प्रा. न.) लाभहानि.
**तरफ** (अर. स्त्री.) दिशा; पक्ष, बाजू; परगण्याचा भाग; तावा; उच्चालक, उत्तोलनदंड; मराठेशाहींतला सुमारें साठ गांवांचा एक राज्यविभाग.
**तरफड** (स्त्री.) तडफड, धडपड.
**तरफडणें** (क्रि.) तडफडणें पहा.
**तरफदार** (फा. पु.) पाटील, ग्रामाधिकारी.
**तरफदारी** (स्त्री.) वकीली, कैवार, पक्षपात; बाजू सावरून धरण्याचा यत्न.
**तरफबंदी** (स्त्री.) जमाबंदीचा एक विशेष प्रकार (यांत गांवच्या जमिनीचे मोठाले भाग करून एकेक भाग एकेका सबंध घराण्याला दिलेला असतो.); शेताच्या भोंवताली बांध घालणें.
**तरबूज** (फा. न.) टरबूज. [निष्णात.
**तरबेज–त–द** (अर. तरबेत वि.) निपुण,
**तरम** (पु.) जमिनीचें वर्गीकरण करणारा कामदार.
**तरमबंदी** (स्त्री.) जमिनीची वर्गवारी.
**तरमळ** तळमळ पहा.
**तरमुंडी** (प्रा. स्त्री.) जोराचा धक्का, मुसंडी. **त० देणें**—तुटून पडणें.
**तरमूळपणें** (प्रा. अ.) पूर्ण लक्ष न देतां.
**तरल** (सं. वि.) पातळ, क्षणिक, चंचल.
**तरवटणें** (क्रि.) तारवटणें, सुस्त होणें.
**तरवटा** (पु.) टाकळा.
**तरवड** (पु.) एक वनस्पति.
**तरवणी** (न.) पेज, कांजी.
**तरवार** (सं. तरवारि स्त्री.) तलवार, खड्ग, समशेर. **त० गाजविणें**—पराक्रम करणें; **त० च्या धारेवर धरणें**-किंवा **वागविणें**—अतिशय कडक शिस्तीखालीं ठेवणें. [करणारा.
**तरवारबहाद्दर** (वि.) रणांत पराक्रम
**तरस** (सं. तरक्ष न.) एक वन्य पशु.
**तरसणें** (क्रि.) थकणें, शिणणें.
**तरसाळें** (न.) कटोरा.
**तरळ** (वि.) चपळ; वद्द (आवाज); (स्त्री.) अजीर्णाची हगवण.
**तरळणें** (प्रा. क्रि.) भांवावणें; चंचल होणें.

... वाचनालय, ...

**तराई** (स्त्री.) डोंगरपायथ्याशीं असलेली झाडीची सखल जमीन.
**तराज, तराजू** (फा. स्त्री.) तागडी.
**तराठणें** (क्रि.) ताठणें. [वल्गना.
**तराठा** (पु.) मोठाल्या वढाईच्या गोष्टी,
**तरांडा** (पु.) झाडाची लांब व सरळ फांदी.
**तरांडें** (सं. तरंड न.) एक प्रकारचें मोठें तारूं; ताफा.
**तराणा** (फा. पु.) विशिष्ट प्रकारचें गीत.
**तराफा** (पु.) मोठा ताफा.
**तरारणें** (क्रि.) अतिशय फुगणें.
**तरास** (पु.) सोनाराचा तराजू.
**तराळ** (पु.) ओझें वाहणारी एक हलकी जात; महार; (वि.) सावध.
**तराळी** (प्रा. स्त्री.) धान्य पाखडतांना दाणे पसरूं नयेत म्हणून पेंढ्यांचें घातलेलें कुंपण.
**तरिका** (पु.) चाल, शिष्टाचार.
**तरिया** (प्रा. स्त्री.) नौका, तरी; खळगा.
**तरी** (फा. स्त्री.) जलमार्ग; पाणी धरणारी जमीन; नौका; (अ.) तथापि, निदान.
**तरी** (न.) कचकच, कंकर.
**तरु** (सं. पु.) वृक्ष, झाड.
**तरुण** (सं. वि.) तरणा, जवान.
**तरुणी** (सं. स्त्री.) तरणी स्त्री. [जागा.
**तरुतल** (सं. न.) झाडाच्या तळापासची
**तरोटा** (पु.) टाकळा.
**तर्क** (सं. पु.) अनुमान; सिद्धान्त; अक्कल; कल्पना; तर्कशास्त्र; (सं. न.) न्यायशास्त्र; अनुमानविद्या.
**तर्ककर्कश** (वि.) तर्कावर आधारलेलें कठोर (विवेचन). [तर्क्य
**तर्कगम्य** (सं. वि.) तर्कानें जाणण्यासारखें;
**तर्कट** (न.) कांहींतरी भलताच केलेला तर्क; कुतर्क.
**तर्कटी** (वि.) कुतर्क करणारा.
**तर्कणें** (क्रि.) अनुमान बांधणें.
**तर्कविद्या** (सं. स्त्री.) तर्कशास्त्र.
**तर्कश** (फा. पु.) बाणाचा भाता.
**तर्कशास्त्र** (सं. न.) प्रत्यक्ष, अनुमान इ० वरून एखाद्या गोष्टीचा निर्णय करण्याचें शास्त्र; शुद्धाशुद्ध अनुमानांचे किंवा युक्तिवादांचे तात्त्विक विचार करणारें शास्त्र; न्यायशास्त्र.
**तर्की** (सं. पु.) तर्कशास्त्रज्ञ.
**तर्जणें** (सं. क्रि.) गर्जणें.
**तर्जन** (सं. न.) ठपका; निंदा, दूषण.
**तर्जनी** (सं. स्त्री.) अंगठ्याजवळचें हाताचें बोट.
**तर्जुमा** (पु.) भाषांतर, अनुवाद.
**तर्णक** (सं. न.) वत्स, वासरूं.
**तर्तीब** (फा. स्त्री.) उपचार; व्यवस्था; तजवीज; युक्ति.
**तर्दद** (फा. स्त्री.) उपाय, तजवीज.
**तर्पण** (सं. न.) तृप्ति; मृतांच्या नांवानें पाणी देणें.
**तर्पिणें** (क्रि.) खुष करणें; तृप्त करणें.
**तर्मुंड** (प्रा. न.) डोकें खुपसणें; (वि.) डोकें खुपसणारा.
**तऱ्या** (पु.) होडीवाला.
**तर्र** (अ.) अगदीं पूर्ण; तट्ट फुगलेलें.
**तऱ्हा** (अर. स्त्री.) प्रकार, चाल, रीत.
तऱ्हां भरणें—नादीं लागणें.
**तऱ्हाण** (न.) घाण.
**तऱ्हीं** (प्रा. अ.) तरी.
**तऱ्हेवाईक** (वि.) विलक्षण, विचित्र.
**तल** (सं. न.) तळ, बूड; पृष्ठभाग.
**तलख** (फा. वि.) तिखट, चलाख; तामसी.
**तलखली** (स्त्री.) आग; तडफड; अशांति.
**तलखी** (फा. स्त्री.) आग, उष्णता, तलखपणा.
**तलग** (प्रा. न.) पिलूं.
**तलंगी** (स्त्री.) अंडीं घालण्याच्या वयास आलेली कोंबडी. [प्रबळ इच्छा.
**तलफ–ब** (अर. स्त्री.) तुंबलेला पगार;
**तलब** (अर. स्त्री.) पगार; मजुरी; बोलावणें; प्रबळ इच्छा; गंजिफाच्या खेळांतील एक संज्ञा.
**तलम** (फा. वि.) फार बारीक व मऊ.
**तलमसुती** (वि.) बारीक सुताचें, बारीक विणीचें.
**तलवार** तरवार पहा.
**तलाक** (अर. स्त्री.) काडीमोड.
**तलाठी** (पु.) एक गांवकामगार.
**तलातल** (सं. न.) सप्त पातालांपैकीं सहावें.

**तलाव** (हिं. तालाव पु.) मोठें तळें.
**तलावा** (हिं. पु.) फेरफटका. [तपास
**तलाश, तलास** (फा. तलाश पु.). शोध,
**तलाशी** (स्त्री.) तपासणी.
**तलुग** (प्रा. न.) संधान, लालूच.
**तल्प** (सं. न.) बिछाना.
**तल्पगी** (सं. वि.) मात्रागमनी.
**तल्पठाण** (न.) शरीराचा गुह्यभाग.
**तल्लख, तल्लाख** (स्त्री.) धमकावणीचें पत्र (अनंत फं० पृ० ४४); शपथ.
**तल्लीन** (सं. वि.) निमग्न, दंग.
**तव** (सं. वि.) तुझें. [ आवेश.
**तव** (स्त्री.) पापुद्रा, पातळ कातडें; घेरी;
**तंव** (प्रा. अ.) तोंपर्यंत, तेव्हां, तर.
**तवई** (स्त्री.) मूर्छा; संकट; मातीचें भांडें.
**तवक, तवंक, तवका, तवकु** (प्रा. पु.) त्वेष, आवेश (मोरो०भीष्म० ४।५७).
**तवकल** (अर. स्त्री. न.) ईश्वराविषयीं निष्ठा; साहसकर्म.
**तवका** (अर. पु.) शक्ति, जोर, बळ.
**तवकीर, तवकील** (सं. न.) वेळूचें किंवा गहूं, जव इ. चें सत्त्व.
**तवंग** (पु.) पाण्यावर येणारा तरंग, पापुद्रा.
**तवज्जेह, तवजे** (अर. न.) अवधान.
**तवणा** (पु.) गाळण्यासाठीं कापून ठेवलेले उंसाचे तुकडे.
**तवनी** (स्त्री.) पीडा (ज्ञा० प्र० २७).
**तवर** (अर. पु.) तोरा; वीरश्री; भर; हट्ट; तापटपणा; (अ.) पलीकडच्या बाजूला; (स्त्री.) मूर्च्छा, भोंवंड; नवा अंकुर.
**तंवर** (प्रा. अ.) तोंपर्यंत.
**तवरी** (वि.) कुरेवाज.
**तवा** (हिं. पु.) भाकरी, पोळी इ. भाजण्यासाठीं केलेलें लोखंडी पसरट वाटोळें पात्र; शेला किंवा शालजोडी यांचा कांठ व पदर यांच्यामधला भाग.
**तवाई** (फा. स्त्री.) भुर्दंड, नुकसान.
**तवाका** (अर. पु.) तकवा, शक्ति, सामर्थ्य.
**तवाजू** (अर. तवाजा स्त्री.) आदर; सभ्यपणाची वागणूक. [ वस्तु.
**तवातोबरा** (पु.) मुशाफरीच्या आवश्यक

**तवानणें** (क्रि.) तवाना होणें.
**तवाना** (फा. अ.) ताजा; नव्या दमाचा.
**तवाफ** (स्त्री.) प्रदक्षिणा (मशिदींतील).
**तवार** (अ.) पलीकडल्या बाजूला.
**तवारीख** (फा. स्त्री.) बखर.
**तवांरी** (स्त्री.) चांभाराचें एक हत्यार.
**तवेश** (अर. पु.) रागाचा झटका.
**तवेशी** (वि.) तापट; रागीट.
**तशरीफ, तश्रीफ, तसरीफ** (अर. पु.) मानाचा पोषाख किंवा वस्त्रें, मानपान.
**तशरीफ–इ–शरीफ** (अर. पु.) हुजूर.
**तष्ट** (न.) लचांड, संकट; टुमणें.
**तसदी** (अर. स्त्री.) त्रास, श्रम.
**तसनस** (अर. तहसनहस पु. स्त्री.) नाश, हानि, नासाडी.
**तसवीर** (फा. तसवीर स्त्री.) चित्र.
**तसदिक** (अर. स्त्री.) चौकशी; तपास.
**तसदिया** (पु.) तसदी; (स्त्री.) त्रास, कष्ट.
**तसनस** (पु. स्त्री.) नासाडी; धूळधाण; नाश; राखरांगोळी; हानि.
**तसबी** (अर. स्त्री.) जपाची माळ.
**तसर** (न.) शेतकऱ्यानें साऱ्याची रक्कम धान्याच्या रूपानें देण्याच्या ऐवजीं अमुक रक्कम नगदी द्यावी असा सरकारनें केलेला ठराव. [ रेशमी वस्त्र.
**तसर, टसर** (न.)• एक प्रकारचें हलकें
**तसराळें** (न.) पसरट भांडें.
**तसरीफ** तशरीफ पहा.
**तसलमात** (अर. वि.) मोघम काढलेली रक्कम; (स्त्री.) उपयोग; अधिकार.
**तसला** (वि.) तसा.
**तसलिमात** (अर. स्त्री.) वंदन; आदर.
**तसलीम** (अर. स्त्री.) आदर; सलाम.
**तसवीर** (अर. स्त्री.) तसवीर. [ बरोबर.
**तसा** (वि.) त्या प्रकारचा; (अ.) त्या-
**तसू, तसूं** (पु. ना.) दोन बोटांचें माप.
**तसूरफातो** (फा. अ.) बिनचूक.
**तस्कर** (सं. पु.) चोर.
**तस्करी** (स्त्री.) चोरी.
**तस्त** (फा. न.) रुंद तोंडाचें मोठें पिंकदाणीसारखें पसरट पात्र.
**तस्मात्** (अ.) म्हणून.

**तह** (फा. पु.) शत्रुत्व संपून मैत्री होणें; संमति; उशीचा अभ्रा.
**तहकीक** (अर. वि.) निश्चित, खात्रीचा.
**तहकुबी** (अर. तोकूफी स्त्री.) अनिश्चय; खळ; कांहीं काळापुरती बंदी.
**तहकूब** (अर. तवकूफ वि.) कांहीं काळापुरतें बंद, अनिश्चित.
**तहगिरी** (फा. तधिरी स्त्री.) वडतर्फी.
**तहत, तहद** (फा. अ.) पर्यंत. [पत्र.
**तहनामा** (फा. पु.) तहाविषयींचें करार-
**तहनाल** (फा. न.) तलवारीचें म्यान.
**तहरीर** (अर. स्त्री.) सुटका; लिखाण; वर्णन; देशपांडे, फडणीस इ० चे हक्क.
**तहवेल** (अर. तहवील स्त्री.) अठरा कारखान्यांचा समुदाय; रोकड, नगदी.
**तहशील, तहसील** (अर. स्त्री. न.) वसुली, जमावंदी.
**तहसीलदार** (फा. पु.) मामलेदार.
**तहा, तहां** (फा. अ.) तेथें.
**तहान** (स्त्री.) तृष्णा.
**तहानलाडू भूकलाडू** कांहीं वेळपर्यंत क्षुधा शांत करणारे फराळाचे पदार्थ; शिदोरी.
**तहानेला** (वि.) तृषित.
**तहाहयात** (फा. अ.) यावज्जीव, आयुष्य-भर, मरेपर्यंत.
**तळ** (सं. तल पु.) बूड, खालचा भाग; जमीन; लष्कर उतरण्याची जागा; सैन्याचा मुक्काम; गाड्या उतरण्याची जागा; जोड्याचा खालचा भाग.
**तळचो आग मस्तकास जाणें** नखशिखान्त रागानें भरणें.
**तळकट** (वि.) तळलेला.
**तळका** (पु.) लहानशी चटई, वळकुटी; फुगलेल्या पोळीचा पापुद्रा; जोड्याच्या तळाचें निघालेलें कातडें; अर्धा काप.
**तळकें** (न.) धान्याची रास कोठारांत नेऊन भरल्यानंतर जमिनीवर राहिलेलें उरलेंसुरलें धान्य.
**तळकोंकण** (न.) सह्याद्रीच्या पायथ्यापासून समुद्रापर्यंतचा दक्षिणेकडचा प्रदेश; कोंकणपट्टीचा दक्षिण भाग.
**तळखंड** (न.) जात्याची खालची तळी.
**तळखडा** (पु.) खांब ज्यांत वसवितात तो घडीव दगड.
**तळखंबा** (पु.) शूद्राचें पिशाच्च, समंध.
**तळघर** (न.) खालच्या मजल्याच्या खालीं जमिनीच्या पोटांत राहण्यासारखें केलेलें स्थळ; भुईघर.
**तळघाट** (पु.) पर्वताच्या पायथ्याजवळचा प्रदेश; सह्याद्रीच्या खालचा प्रदेश.
**तळझाडा** (पु.) साफ नाहींसें करणें; पूर्ण चौकशी; सैन्याचा तळ उठल्यानंतर त्या जागीं कांहीं वस्तु राहिली आहे कीं काय याविषयींचा शोध.
**तळण** (न.) तळण्याचा पदार्थ; तळणें.
**तळणें** (क्रि.) तेलातुपांत अग्नीच्या उष्णतेनें पक्व करणें.
**तळतळ** (स्त्री.) संताप, तळतळाट.
**तळतळणें** (क्रि.) दुसऱ्यानें अपकार केल्याबद्दल जागच्या जागींसंतापानें चरफडणें; अकस्मात् झालेल्या दुःखानें विव्हल होणें.
**तळतळाट** (पु.) शाप, संताप.
**तळप** (न.) वायकांच्या कानांतला एक अलंकार; तळण; ऊन; पाषाण; कातळ.
**तळपट** (न.) गुरांच्या किंवा माणसांच्या पायाखालीं तुडविलें गेल्या कारणानें होणारी शेताच्या पिकाची नासाडी; यावरून–सत्यानास; कुलक्षय, निर्वंश.
**तळपणें** (प्रा. क्रि.) विराजणें, शोभणें; झळकणें; चलनवलन करणें; उष्णतेनें जर्जर होणें. **अभावानें तळपणें**–गैरहजर असणें.
**तळपाय** (पु.) पावलाचा खालचा भाग.
**तळबूड** (प्रा. न.) बुंधा; तळ; जमीन.
**तळमळ** (स्त्री.) अस्वस्थता, तडफड.
**तळमळणें** (क्रि.) दुःखानें व्यथित होणें.
**तळय** (स्त्री.) लहान तळें.
**तळवट** (न.) डोंगराच्या पायथ्याजवळची सपाट जागा; कांठचा प्रदेश.
**तळवटणें** (प्रा. क्रि.) दडपणें, दाबणें.
**तळवटी** (अ.) खालीं. [पाणी.
**तळवणी** (न.) जमिनीवरचें नदीनाल्याचें
**तळवा** (पु.) तळहात; तळपाय. **त० ची आग मस्तकास जाणें**–अतिशय संतापणें.

**तळवेमार** (प्रा. पु.) तापलेल्या तव्यावर उभें करून किंवा तेलांत तळून अथवा पर्वतावरून लोटून मारण्याची शिक्षा.
**तळसणें** (क्रि.) तोडून साफ करणें.
**तळसरा** (स्त्री.) खांबाचा तळखडा.
**तळसांड** (अ.) भुईसांड.
**तळसाण** (स्त्री.) पदार्थ तळल्याचा वास.
**तळहात** (पु.) हाताचा तळवा. **त०चा फोड**—अतिप्रिय व नाजुक वस्तु.
**तळाठदार, तळाठी** (पु.) गांवच्या वसुलाचा हिशेब ठेवणारा पगारी कारकून.
**तळाव** (पु.) तलाव, तळें, लहान सरोवर.
**तळावणें** (क्रि.) उष्णतेची बाधा होणें.
**तळी** (स्त्री.) जात्याच्या दोन दगडांपैकीं कोणताहि दगड; टांकें; लूट; आग लावणें इ० आकसाचें कृत्य; खंडोबावरून नारळ, भंडार (हळद) इ० ओंवाळून उतरतात तें; दंगा; फिसाद. **तळी उचलणें**—एखादें कार्य सर्वांनीं एका विचारानें पतकरून पार पाडणें; **तळी भरणें**—एखादें कार्य करण्याला पुष्कळांनीं हातभार लावणें.
**तळीराम गार करणें**—स्वतःची इच्छा तृप्त करून घेऊन स्वस्थ बसणें; ढेकर देऊन बसणें.
**तळींव** (वि.) तळलेला.
**तळुलें** (प्रा. न.) लहान तळें.
**तळें** (सं. तल्ल न.) तलाव; सूर्य-चंद्राभोंवतालीं कधीं कधीं दिसणारें चित्रविचित्र रंगांचें खळें किंवा मोठें मंडळ; परिवेष, परिधि.
**तळौटपण** (प्रा. न.) नम्रता; नीचपणा.
**तक्षक** (पु.) पाताळांतल्या एका मुख्य नागाचें नांव.
**तक्षकर्म** (न.) कातरकाम.
**तक्षण** (सं. न.) सुतार काम.
**तक्षीम** (अर. तकसीम स्त्री.) वांटणी, फाळणी; वांटा, हिस्सा; वर्ग, जात; संघ.
**तक्षीमदार** (फा. पु.) पातीदार; वांटेकरी.
**तज्ञ** (वि.) तज्ज्ञ, माहितगार; पंडित; कुशल.

**तां** (सर्व.) त्वां. [झालेला एक अलंकार.
**ताइताळें** (न.) पुष्कळ ताइतांचा मिळून
**ताइफा** (पु.) जमाव; जात.
**ताई** (स्त्री.) बहीण.
**ताईत** (अर. तावीज पु.) मुलांच्या गळयांत घालण्याचा किंवा हातांत बांधण्याचा एक अलंकार.
**ताऊस** (पु.) मोर; एक प्रकारचें तंतुवाद्य.
**ताओ** (पु.) ताप; ताव; चीनमधील एक धर्म.
**ताक** (सं. तक्र न.) पाणी घालून घुसळलेलें दहीं. **ताकाला जाऊन भांडें लपविणें**—दुसऱ्याजवळ याचना करावयाची, पण ती सरळ रीतीनें न करतां पडद्याआडून (अप्रत्यक्ष रीतीनें) आढेवेढे घेऊन करणें; **ताकापुरतें रामायण**—आपलें काम साधण्यापुरतें आर्जव.
**ताकत, ताकद** (अर. स्त्री.) शक्ति, बळ.
**ताकपिठ्या** (वि.) तुटपुंज्या ज्ञानाचा (हरिदास, पुराणिक, व्याख्याता इ०).
**ताकपिरें** (प्रा. वि.) ताक पिणारें; घामट.
**ताकवणी** (न.) फार पाणी घातलेलें ताक.
**ताका** (पु.) ठाण, मागावरचें सबंध वस्त्र; दोरा; संबंध; थांग.
**ताकीद** (फा. स्त्री.) आज्ञा; सक्त, जरब; बजावून सांगणें.
**ताकीददार** (फार. पु.) पहारेकरी.
**ताकीदपत्र** (न.) सरकारचें आपल्या कामदारांना हुकुमपत्र, लेखी हुकूम.
**ताकूव** (पु.) पाठलाग.
**ताकोला** (वि.) अपक्व; अपूर्ण.
**ताखडा** (अर. ताक वि.) धट्टाकट्टा; हुशार.
**ताग** (पु.) अंबाडीसारखें एक झाड; त्याचा वाख.
**तागादा, तगादा** (फा. पु.) नेट; लकडा.
**तांगड** (स्त्री.) तेलाच्या रिकाम्या बुधल्याचें ओझें.
**तांगडणें** (क्रि.) पाय घट्ट बांधणें; जखडणें; कामावर पाठविणें; अतिशय मेहनत करवून घेणें; हाल करणें.
**तागडी** (का. तक्कडि स्त्री.) तराजू.
**तागा** (पु.) ठाण; दोरा; ठिकाण; पत्ता.

**तांगा** (पु.) टांगा, घोड्याची गाडी.
**तागाईत, तागायत** (फा. अ.) पर्यंत, पावेतों; (प्रा.वि.)तगण्याजोगा, टिकाऊ; (न.) कागद चिवट करण्यासाठीं त्याला खळ लावण्याचें हत्यार. [श्रेष्ठ.
**ताज** (फा. पु.) मुख्य पुरुष; (वि.)मुख्य;
**ताज–इ–हिंद** (फा. पु.) हिंदमातेचा मुकुट; एक सन्मानाची पदवी. [प्रकार.
**ताजक** (सं. न.) जातकाचा एक विशेष
**ताजगी** (फा. स्त्री.) मोठा पराक्रम.
**ताजमहाल** (फा. पु.) आग्रा येथें शहाजहान बादशहानें आपल्या राणीचें कबरस्थान म्हणून बांधलेली आणि जगांत अतिशय सुंदर म्हणून प्रसिद्ध असलेली इमारत.
**ताजवा** (पु.) तराजू, काटा.
**ताजा** (अर. पु.) मोहरमांतलें मुसलमानांचें शोकगीत; डोला; ताबूत; (वि.) नवा,टवटवीत. **ताज्या घोड्यावरच्या गोमाशा**—एखाद्याची भरभराट असेपर्यंत हांजी हांजी करणारीं नीच माणसें.
**ताजा कलम** (फा.न.) पत्र पुरें झाल्यावर विस्मरणानें राहिलेला मजकूर शेवटीं लिहितात तो; (आद्याक्षरें ता. क.).
**ताजातवाना** (वि.) प्रफुल्लित, टवटवीत; तेजस्वी घोडा.
**ताजी** (पु.) अरबी घोडा.
**ताजीम** (अर. स्त्री. ) मान, अभ्युत्थान.
**ताजूब** (अर. ताजब स्त्री.) आश्चर्य.
**ताट** (न.) भोजनाचे पदार्थ ज्यांत वाढतात तें पसरट उथळ पात्र; फांशावांचून असलेली पुतळी; गोणपाट, जोंधळा, बोरू इ० चें कांड; कुंपण. **ताटाखालचें मांजर**—पूर्णपणें आज्ञांकित मनुष्य.
**ताटंक** (सं. न.) तानवडें, एक कर्णभूषण.
**ताटकें** (सं. न.) तानवडें या नांवाचें स्त्रियांचें कर्णभूषण.
**ताटकळणें** (क्रि.) ताठलें जाणें.
**ताटकळा** (पु.), **ताटकळ, ताटकळी** (स्त्री.) ताठपणा. [बायको.
**ताटका** (सं. त्राटिका स्त्री.) जहांबाज
**ताटली** (स्त्री.) लहान ताट.
**ताटवा** (पु.) तक्ता, वाफा.
**ताटस्थ** (प्रा. वि.) तटस्थ.
**ताटस्थ्य** (सं.न.) तटस्थपणा; उदासीनता.
**ताटिका** (सं. स्त्री.) त्राटिका, उग्र स्त्री.
**ताटी** (प्रा. स्त्री.) कामटयांची चौकट किंवा मांडव; तिरडी; बांध, कुंपण; रांग; मूर्च्छा.
**ताटूक** (न.) जुन्या गोणपाटाचा तुकडा; लहान रेडा; रेडूक; जोंधळा; बाजरी इ० कांचें लहान ताट; लहान काठी; काटूक.
**ताटोळा** (पु.) केळीच्या पानांतला मधला दांडा; जोंधळयाचें ताट. [वाकणारा.
**ताठ** (वि.) घट्ट, ताठर, कडक, न
**ताठर** (वि.) ताठ, उद्धट, उर्मट.
**ताठरणें** (क्रि.) ताठ होणें, न वाकणें.
**ताठवडा** (फार. स्त्री.) ताठपणा.
**ताठा** (पु.) ताठपणा, गर्व, अहंपणा, उद्धटपणा.
**ताड** (सं. पु.) तालवृक्ष, ताडाचें झाड.
**ताडकन्–कर–दिशीं** (अ.) एकाएकीं, चटकन्, आवाज करून. [मगज.
**ताडगोळा** (पु.) ताडाच्या फळांतला
**ताडणें** (सं. क्रि.) मारणें; प्रहार करणें; तुलना करणें; अनुमानानें जाणणें; अटकळ करणें.
**ताडताड** (अ.) आवेशानें, रागानें; उंच.
**ताडन** (सं. न.) मारणें; चोपणें.
**ताडपत्र** (सं. न.) ताडाचें पान.
**ताडपत्री** (स्त्री.) लुगडयाचा एक प्रकार; रोगण लावलेलें कापड. [मारणें.
**ताडमाड उडणें** आवेशानें उंच उडया
**ताडमें** (न.) घोडें; तट्टू.
**ताडव** (न.) नाचणीचें सुकें गवत.
**तांडव** (सं. न.) अभिनयपूर्वक नृत्य; शिवनृत्य; थयथयाट.
**ताडा** (पु.) ताळा, मेळ; प्रचीति.
**तांडा** (पु.) समुदाय, टोळी.
**ताडातुडी** (अ.) अकस्मात्.
**ताडातोड** (स्त्री.) वियोग, वाताहत, ताटातूट.

**ताडातोडा** (पु.) जादूटोणा; गाण्याचें एखाददुसरें कडवें; इरवड.
**ताडामोड** (पु.) मोडतोड.
**ताडी** (स्त्री.) ताडाच्या झाडाचा रस.
**तांडी** (प्रा. स्त्री.) तांडा, समुदाय.
**तांडेल** (तेलगु पु.) नाखवा; गलबतावरचा मुख्य; बैलाच्या तांड्याचा मुख्य लमाण.
**ताण** (सं. तन् पु.) ताठपणा; ओढ; मोठा राग; फार परिश्रम; त्याचा परिणाम (थकवा, क्षीणता इ०); आग्रह; (स्त्री.) वरचढपणा; (पावसाचें) ओढून धरणें; (न.) समुद्रास येणारी भरती. **ताण देणें**—विलंब करणें; लंघन करणें.
**ताणणें** (सं. क्रि.) ओढणें, लांब करणें.
**ताणा** (पु.) उभें सूत; (गुरांचें) विजवठ.
**ताणाताण** (स्त्री.) ओढाताण; चित्ताची व्यग्रता. [ताणण्याचें साधन.
**ताणारी** (स्त्री.) मागावर घातलेला ताणा;
**ताणी** (स्त्री.) उभ्या सुताचा; ताण्याचा कांहीं भाग; तुकडा.
**तात** (सं. पु.) बाप. [तार.
**तांत** (सं. तंतु स्त्री.) धागा; आंतड्याची
**तांतड, तांतडी** (स्त्री.) घाई, जलदी, निकड.
**तांतणें** (प्रा. क्रि.) त्रास देणें.
**तातवेळ** (प्रा. स्त्री.) तीव्रता.
**तातवेळा** (प्रा. अ.) त्या उद्देशानें.
**ताता** (स्त्री.) झोप.
**तांतीं** (न.) अंडें; (पु.)मूलबाळ; आबालवृद्ध.
**तांतू** (सं. तंतु पु.) दोरा; तार; मुळासकट उपटलेल्या दूर्वा.
**तातोबा** (पु.) वयोवृद्ध पुरुषासंबंधानें योजावयाचा सन्मानाचा शब्द. [निकडीचा.
**तात्कालिक** (सं. वि.) त्या काळचा,
**तात्काळ** (सं. तत्काळ अ.) लागलीच.
**तात्पर्य** (सं. न.) भावार्थ, सारांश; हेतु, मतलब. [पर्यंतचा.
**तात्पुरता** (अ.) हंगामी, कांहीं काळा-
**तात्या** (पु.) वयानें वडील अशा पुरुषासंबंधानें योजावयाचा शब्द; एकाद्या पुरुषव्यक्तीचें नांव. [शिक्षक.
**तात्यापंतोजी** (पु.) शाळामास्तर, गांवठी
**तांत्रिक** (सं. पु.) तंत्र-शास्त्राच्या मतानें वागणारा; (न.) संक्षेपरूप कर्म; (वि.) संक्षिप्त.
**तात्त्विक** (सं. वि.) तत्त्वापुरतें; खरें.
**ताथवड** (फा. वि.) ताजें, नवें.
**तादात्म्य** (सं. न.) एकरूपता.
**तंदळा** (पु.) तांदूळ; एक प्रकारची पांढरी मासळी.
**तांदुळजा** (पु.) एक वनस्पति.
**तांदूळ** (सं. तंडुल पु.) एक धान्य; त्या आकाराचा मणि.
**तादृश** (सं. वि.) विशेषसा, अल्पहि.
**तान** (सं. स्त्री.) गायनांतील निरनिराळ्या सुरांनीं केलेला रागाचा विस्तार; आलाप; तहान, तृषा. [होणारी गाय.
**तानगाभी** (स्त्री.) लवकर लवकर गाभण
**तानमान** (सं. न.) परिस्थितीची अनुकूलता, संधि. [कर्णभूषण.
**तानवड, तानवडें** (न.) स्त्रियांचें एक
**तानुलें** (वि.) तान्हें; (न.) तान्हें मूल.
**तान्हा** (वि.) अंगावर पिणारा.
**तान्हावणें** (क्रि.) तहान लागणें.
**तान्हुला** (वि.) तान्हा.
**तान्हेपारठें** (वि.) अगदीं तान्हें व त्याच्याहून जरा अधिक वयाचीं (मुलें).
**तान्हेला** (वि.) तहान लागलेला.
**ताप** (सं.पु.)ज्वर; उष्णता; संताप, त्रास.
**तापकरी** (पु.) ज्वरानें पीडलेला.
**तापट** (वि.) कडक, तलख, तामसी, रागीट. [लहान आसूड.
**तापटणें** (न.) नागऱ्याच्या हातांतला
**तापणें** (क्रि.) गरम होणें, रागावणें.
**तापता** (फा. ताफ्ता पु.) एक रेशमी वस्त्र.
**तापतोबारा** (पु.) रागाचें बोलणें, ताशेरा.
**तापत्रय** (सं. न.) आध्यात्मिक, आधिभौतिक व आधिदैविक अशा तीन प्रकारच्या पीडा.
**तापन** (सं. पु.) सूर्य; सूर्यकांतमणि; (न.) तापविणें, पीडणें; (वि.) पीडा देणारा.
**तापविणें** (क्रि.) आंच देणें, उष्ण करणें.
**तापस, तापसी** (सं. पु.) तपस्वी.

**तापी** (सं. स्त्री.) एका नदीचें नांव.
**ताफा** (अर. पु.) समुदाय, टोळी; भोपळे एकत्र बांधून नदी उतरून जाण्याचें केलेलें साधन.
**ताव** (पु.) वळ.
**तांव** (सं. ताम्र स्त्री.) आकाशाचा सूर्योदयाच्या व सूर्यास्ताच्या वेळचा तांबडेपणा; लोखंडावरचा गंज; पिकावरचा रोग; कणिकेंतला गव्हावरचा टरफलाचा अंश. [करणारा.
**तांबट, तांबटकर** (पु.) तांब्याचें काम
**तांबड** (स्त्री.) तांबड्या मातीची जमीन.
**तांबा** (वि.) तांबूस.
**ताबडतोब** (हिं. अ.) लागलीच, सत्त्वर.
**तांबडा** (वि.) लाल.
**तांबडें फुटणें** प्रभात होणें. [रोग.
**तांबरा, तांबारा** (पु.) धान्याचा एक
**तांबली** (स्त्री.), **तांबलें** (न.) एक लहान भांडें.
**ताबा** (फा. पु.) कबजा, अम्मल.
**तांबारा** (पु.) पिकावर पडणारा एक रोग.
**तांबीळ** (स्त्री.) जिकडे तिकडे तांबडें दिसण्याचा रोग.
**ताबूत, ताबूद** (अर. पु.) डोला; ताजा.
**तांबूल** (सं. पु.) विडा.
**तांबूलश्रावणी** (स्त्री.) नुकतें लग्न झालेल्या माणसानें ग्रामदेवतेप्रीत्यर्थ गांवच्या महाजनाला किंवा देवस्की ज्याच्या हातीं असेल अशा दुसऱ्या अधिकाऱ्याला दिलेली देणगी.
**तांबूस** (वि.) तांबडसर, कांहींसा तांबडा.
**तांबें** (सं. न.) ताम्र; एक धातु.
**ताबेगहाण** (न.) ज्यांत गहाण ठेवलेली वस्तु सावकाराच्या ताब्यांत दिलेली असते तो गहाणाचा प्रकार.
**तांबजणें** (क्रि.) तांब किंवा गंज चढणें.
**ताबेदार** (फा. वि.) अधीन, बंदा.
**तांबेरा** (पु.) तांबोरा पहा.
**तांबोटी** (स्त्री.) न्हाव्याची पाण्याची वाटी; तांब्याची वाटी.
**तांबोरा** (पु.) पिकाचा एक रोग.
**तांबोळी** (सं.पु.) विड्याचीं पानें विकणारा.
**तांब्या** (पु.) कलश.
**तांब्र** (पु.) मुसलमान; यवन, इंग्रज.
**तामस, तामसी** (सं. वि.) तापट, रागीट.
**तामसी उपचार** धाडसी इलाज.
**ताम्र** (सं. न.) तांबें.
**ताम्रपट** (सं. पु.) तांब्याच्या पत्र्यावर कोरून दिलेला इनाम वगैरेबद्दलचा लेख.
**ताम्रमुखी** (वि.) लालतोंड्या.
**ताम्हण, ताम्हन** (न. ना.) संध्येच्या वगैरे वेळीं पाणी सांडण्याचें पात्र.
**तामिली** (स्त्री.) अंमलबजावणी.
**तायताळें** (न.) ताइताळें, ताइतांची माळ.
**तार** (फा. स्त्री.) तंतु; कैफ, अंमल; चित्ताची एकाग्रता; तारेनें आलेली बातमी; (प्रा. वि.) स्वच्छ, चकाकित केस.
**तारक** (सं. वि.) तारणारा.
**तारकटणें** (क्रि.) जड किंवा सुस्त होणें.
**तारकशी** (फा. वि.) धातूच्या तारेनें विणलेलें; (स्त्री.) धातूची तार काढणें; छळणें.
**तारकस** (फा. पु.) धातूची तार काढणारा.
**तारका** (सं. स्त्री.) नक्षत्र; चांदणी.
**तारकाबारका–खा** (वि.) भांबावलेला.
**तारखीपारखी** (वि.) धूर्त, हुशार, दक्ष.
**तारंगण** (न.) लहान मुलांचें ओरडणें, हातपाय आपटणें इ. क्रिया; रक्षण.
**तारटणें, तारठणें** (क्रि.) तारवटणें, जड होणें.
**तारण** (सं. न.) रक्षण; मुक्ति; गहाण ठेविलेली वस्तु.
**तारणें** (सं. क्रि.) बचावणें; मुक्ति देणें; पार पाडणें.
**तारतखाना** (फा. पु.) शौचकूप.
**तारतम्य** (सं. न.) धोरण; सारासार–विचार.
**तारता** (पु.) तारणारा.
**तारंतार** (अ.) बरोबर, तंतोतंत.
**तारतीम** (प्रा. न.) तारतम्य.
**तारदानी** (फा. स्त्री.) वीणेच्या सांगाड्यावर जेथें तारा लावतात तेथें बसविलेला हस्तिदंताचा तुकडा, घोडी.

**तारकेणी** (स्त्री.) सपीटाच्या तारा काढून त्यांचें केलेलें एक पक्वान्न.
**तारंबळ** (सं. तारावल स्त्री.) त्रेधा, धांदल, गडबड,खाण्यापिण्याची आबाळ.
**तारल्य** (सं. न.) तरळपणा, चंचळता.
**तारवट** (वि.) जहाजांतून आणिलेला; धुंद; सुस्त.
**तारा** (सं. पु. स्त्री.) चांदणी, नक्षत्र; नदी किंवा खाडी यांतील उघडी जागा; (स्त्री.) जन्म-नक्षत्रापासून कोणत्याहि चंद्र-नक्षत्रापर्यंतच्या अंतरास ९ या संख्येनें भागून येणारी संख्या; (वि.) तिरळा. **तारे तोडणें**—वेड्यासारखें भाषण करणें.
**तारांगण** (सं. न.) आकाश; वेधशाळा; उंच जागा; सज्जा; (चुकीचा पण कांहींसा रूढ अर्थ) गोंधळ, घाबरगुंडी, तारंबळ.
**ताराज** (फा. पु.) लूट. **ता० करणें**—वैराण करणें.
**ताराजोर, तारातीर** (प्रा. स्त्री.) ताटातूट, वाताहात (तुका. ३००५).
**ताराधीश** (सं. पु.) चंद्र.
**तारांबळ** (सं. तारावल स्त्री.) त्रेधा, धांदल.
**तारामंडळ** (सं. न.) नक्षत्रांचा समूह, आकाश. [पोंचविणारें यंत्र.
**तारायंत्र** (सं. न.) विजेच्या द्वारें बातमी
**तारीख** (अर. स्त्री.) महिन्यांतला दिवस.
**तारीफ** (अर. स्त्री.) प्रशंसा, स्तुति, शिफारस.
**तारुण्य** (सं. न.) तरुणावस्था, ज्वानी.
**तारुवें, तारूं** (न.) नौका, गलबत, जहाज.
**तारें** (न.) पिसें, वेड; वादळ.
**तारेंवारें** (न.) गलबताला अनुकूल किंवा प्रतिकूल अशी वाऱ्याची स्थिति; लहरीपणा, उन्माद. [मागून एक.
**तारोतार** (अ.) कांठोकांठ भरून; एका
**तारोळा** (पु.) अडथळा; दुर्दशा, दुर्मिळता; तोटा. [तर्कशास्त्रवेत्ता.
**तार्किक** (सं. वि.) तर्कशास्त्रविषयक; धूर्त;
**ताल** (सं. पु.) टाळ; ताडाचा वृक्ष; घराचा मजला; गायनांतील स्वराचा काळ किंवा मेळ; (स्त्री.) पाण्याचा बंधारा; तलाव.
**तालताल** (अ.) उंचउंच, लंबेलंबे.
**तालबद्ध** (सं. वि.) तालांत असलेलें.
**तालवर, तालवार** (फा. वि.) श्रीमंत, भाग्यवान्, सन्मान्य. [निघणारा (ध्वनि).
**तालव्य** (सं. वि.) टाळूच्या साह्यानें
**ताला** (सं. तालक पु.) कुलूप, टाळा.
**तालामाला** (पु.) संबद्धता, मेळ; सोय.
**तालीक-ख** (फा. स्त्री.) नक्कल, प्रत.
**तालीम** (अर. स्त्री.) शिक्षण, व्यायामशाळा.
**तालीमखाना** (फा. पु.) व्यायामशाळा.
**तालीवर, तालीवार, तालेदार** (फा. वि.) श्रीमंत, दैववान्.
**तालु** (सं. स्त्री.) टाळू.
**तालुका** (अर. पु.) जिल्ह्याचा एक भाग.
**ताले** (अर. ताला पु. अने.) दैव, नशीब; उत्कर्ष.
**तालेवार** (फा. वि.) दैववान्, श्रीमंत.
**तालेवारी** (स्त्री.) श्रीमंती, उत्कर्ष.
**ताव** (सं. फा. पु.) अग्निसंस्कार, आंच; पीडा; कागदाचे चार बंद. **ता०मारणें**—होईल तेवढा लाभ करून घेणें; **वर ताव देणें**—लुटणें, यथेच्छ खाणें.
**तावडणें** (क्रि.) मेहनत करविणें; जबरदस्तीनें कामास लावणें.
**तावडी** (स्त्री.) तडाखा, अधीनता.
**तावण** (फा. स्त्री.) दंड, जुलमी वर्तनाबद्दलचा भुर्दंड. [यत्न.
**तावण** (स्त्री.) एका दमांत धावण्याचा
**तावणें** (क्रि.) तापविणें, तापणें. **तावून सुलाखून निघालेला**—अतिशय तीव्र कसोटीस उतरलेला; भयंकर दिव्यांतून पार पडलेला. [तिवढें.
**तावत्** (अ.) तोंपर्यंत; (वि.) तितकें;
**तावता** (सं. वि.) तेवढ्यानें, तितक्यानें, तरीदेखील. [खिडकीची काच.
**तावदान** (फा. न.) दाराची किंवा
**तावदारणें** (क्रि.) रागावणें, कावणें.
**तावन्मात्र** (सं. अ.) तितकेंच.
**तावुळा** (प्रा. वि.) आवेशयुक्त.

**ताशा** (अर. पु.) एक चर्मवाद्य.
**ताशीव** (वि.) तासून तयार केलेला.
**ताशेकरी** (पु.) ताशा वाजविणारा.
**ताशेरा** (पु.) ताशावरची झोड. **ता० झाडणें**—खरडपट्टी काढणें.
**तास** (अर. पु.) अडीच घटकांचा किंवा साठ मिनिटांचा काळ; धातूचें मोगरीनें वाजविण्याचें घड्याळ; (सं. चाष पु.) एक पक्षी; (स्त्री.) पाळ; नदीचें पात्र; वल्हविण्याची लांब काठी.
**तासकाम** (न.) तासण्याचें काम.
**तासडपट्टी** (स्त्री.) खरडपट्टी; हजामत.
**तासणें** (सं. तक्ष् क्रि.) तोलणें; छिलणें.
**तासीर** (स्त्री.) मनाची प्रवृत्ति; तऱ्हा; बंदुकीचा भडीमार.
**तासींव, ताशींव** (वि.) तासून तयार केलेलें.
**ताहा, ताहां** तहा पहा.
**ताळ** (सं. ताल पु.) धरबंध, मर्यादा; संबद्धता; ताड; मजला. **ताळ देणें**—मदत करणें; **ताळ सोडणें**—मर्यादा उल्लंघणें.
**ताळतंत, ताळतंत्र** (सं. ताल + तंतु न.) परस्परसंगति; धरबंध; नेम.
**ताळविताळ** (प्रा. अ.) सुरबेसूर.
**ताळा** (पु.) प्रत्यय; प्रचीति; मेळ; कुलूप. **ताळयावर येणें**—नीट मार्गाला लागणें.
**ताळावाळा** (प्रा. पु.) ताळमेळ.
**ताळू** (सं. तालु पु.) टाळू.
**ताळें** (न.) दैव, भाग्य.
**ताळेबंद** (पु.) खतावणी, रोजकीर्द इ० वरून कांहीं मुदतीच्या जमाखर्चाचा तयार केलेला खर्डा.
**ति** (वि.) तीन. [त्रिकोण.
**तिकटें** (सं. त्रिकाष्ठ न.) लाकडाची तिवई;
**तिकडे** (अ.) त्या बाजूकडे.
**तिकिट** (इं. टिकेट न.) पैसे भरल्याबद्दलची चकती; परवाना. [असलेलें.
**तिकोनी** (सं. त्रिकोण वि.) तीन कोपरे
**तिक्कल** (स्त्री.) गंजिफांचीं तीन पानें अनुक्रमानें लागलेलीं जीं एका खेळाडूकडे आलेलीं तीं समुच्चयानें.
**तिक्का** (पु.) तीन चिन्हें आहेत ज्यावर असें गंजिफेचें पान.
**तिक्त** (सं. वि.) तिखट; कडू; तीव्र.
**तिख** (प्रा. वि.) तीव्र, तीक्ष्ण; अणीदार.
**तिखट** (सं. तिक्त न.) मिरच्यांची भुकटी; (वि.) तीव्र, तीक्ष्ण, दाहक. **तिखटमीठ लावून सांगणें**—मनोरंजनासाठीं एखाद्या हकीकतींत पदरचा मजकूर घुसडून खुलवून सांगणें.
**तिखार, तिखें** (न.) पोलाद.
**तिखारणें** (क्रि.) तीक्ष्ण करणें.
**तिखुळा** (पु.) लागोपाठ तीन मुली झाल्यावर त्यांच्या पाठीवर झालेला मुलगा.
**तिखुळी** (स्त्री.) लागोपाठ तीन मुलगे झाल्यावर झालेली मुलगी.
**तिखें** (न. ना.) पोलाद. [सालीं.
**तिगस्तां** (फा. अ.) गेल्याच्या मागील
**तिघई** (वि.) तीन गस्ते असलेलें घर.
**तिघस्ता** (न.) गंजिफांच्या खेळांतली एक संज्ञा.
**तिघें** (वि.) तीन जण.
**तिजणें** (क्रि.) पैसे चुकते करणें.
**तिजवर** (पु.) तिसऱ्यांदा लग्न करणारा.
**तिजा** (सं. तृतीय वि.) तिसरा.
**तिजाई** (स्त्री.) तिसरा हिस्सा. [ इत्यादि.
**तिजाईत** (वि.) तीनदां व्यालेली गाय, म्हैस
**तिजारें** (न.) दर तिसऱ्या दिवशीं येणारें हिंव. [ पेटी.
**तिजोरी** (स्त्री.) खजिना ठेवण्याची भक्कम
**तिजोरीघर** (न.) खजिन्याची खोली.
**तिटकारणें** (क्रि.) तिरस्कारणें.
**तिटकारा** (पु.) तिरस्कार; कंटाळा, वीट.
**तिटवी** (स्त्री.) टिटवी पहा.
**तिटाळी** (वि.) तीन मजली. [अग्र.
**तिटाळी** (स्त्री.) घर, वृक्ष, टेकडी इ० चें
**तिटी** (स्त्री.) मुलाच्या कपाळास लावावयाची काळी टिकली.
**तिठा** (पु.) तीन रस्ते मिळण्याची जागा.
**तिडक** तिडीक पहा.
**तिडकणें** (क्रि.) तडतडणें, तिडीक मारणें.
**तिडका** (वि.) वाकडा, वक्र; चिरडखोर.
**तिडकी** (प्रा. स्त्री.) ठिणगी.

**तिडणी** (स्त्री.) पेंच.
**तिडणूक** (स्त्री.) उगाच संतापानें बोलणें.
**तिडणें** (क्रि.) छळणें, त्रास देणें; पीडणें.
**तिडतिड** (स्त्री.) रागानें चित्तास येणारी व्यग्रता, त्रास. [चिडणें.
**तिडतिडणें** (क्रि.) तडकणें; त्रासणें;
**तिडतिडा** (वि.) वाकडा; चिरडखोर.
**तिढा** (हिं. पु.) तेढ, अढी; गुंतागुंत; तिढ्हांचा घोटाळा; अडचण.
**तिडीक** (स्त्री.) वेदना, कळ.
**तिडाळी** (स्त्री.) तीन डोळ्यांचा नारळ.
**तिढा** (वि.) बाक आलेला.
**तितउ** (सं. स्त्री.) चाळण.
**तितका** (अ.) तेवढा.
**तितपत** (अ.) तितका; तेथपर्यंत. [मसलत.
**तितंबा** (पु.) कारस्थान, कट, बंडाची
**तितर** (सं. पु.) कवडा नांवाचा पक्षी.
**तिताल** (पु.) एका तालाचें नांव. ति० उडणें—दुसऱ्यास तुच्छ लेखणें.
**तितिळिका** (प्रा. स्त्री.) चिंच.
**तितिक्षा** (सं. स्त्री.) शांति, क्षमा.
**तितुका** (वि.) तितका.
**तितुणें** (क्रि.) मागें जाणें.
**तितुर** (पु.) लहान छिद्र.
**तित्तिर** तितर पक्षी.
**तिथि** (सं. स्त्री.) महिन्याचा तिसावा भाग, दिवस.
**तिथिवृद्धि** (सं. स्त्री.) तिथीचा प्रारंभ सूर्योदयापूर्वी किंवा सूर्योदयावरोबर होऊन अंत दुसऱ्या दिवशींच्या सूर्योदया-नंतर होतो असा दिवस.
**तिथिक्षय** (सं. पु.) तिथीचा प्रारंभ व अंत सूर्योदयावांचून होतो तो दिवस.
**तिदा** (अ.) तीनदां, तीन वेळां.
**तिदी** (तीन दिन अ.) तीन दिवस. [असा.
**तिधारी** (वि.) ज्याला तीन कडा आहेत
**तिधारें** (न.) नकसगाराचें काम.
**तिनिसांज, तिनिसांजा** (सं. स्त्री.) संध्याकाळ.
**तिनीत्रिकाळ** (अ.) सकाळीं, दुपारीं व संध्याकाळीं. [असलेलें.
**तिपदरी** (वि.) तीन पदर किंवा घड्या
**तिपाई, तिपायी** (हिं. स्त्री.) तीन पायांची घडवंची.
**तिप्पट** (वि.) त्रिगुणित.
**तिफण, तिफणी** (स्त्री.), **तिफणें** (वि.) तीन फण्यांची पाभर.
**तिंब** (वि.) पूर्णपणें भिजलेला, थेंबाथेंबांनी ज्यांतून पाणी गळत आहे असा.
**तिंबणें** (क्रि.) मळणें; तुडविणें; खूप भिजविणें.
**तिमाजी नाईक** (पु.) अत्यंत चिक्कू माणूस.
**तिमाणें** (न.) बुजगावणें (तुका०२२८९).
**तिमिंगल** (पु.) एक फार मोठा मासा.
**तिमिर** (सं. न.) अंधकार; अंधत्व.
**तिमियाचा बैल** नंदीबैल.
**तिय्यम** (वि.) तिसरा.
**तिरकट** (सं. तिर्यक् वि.) तिरवा.
**तिरकटी, तिरकती** (वि.) तीन डोल-काठ्या असलेलें.
**तिरकमठा** (पु.) बाण आणि धनुष्य यांची जोडी. [माणूस.
**तिरफनशेट** (पु.) तिरव्या डोळ्यांचा
**तिरकस, तिरका** (सं. तिर्यक् वि.) वाकडा; तिरवा.
**तिरकाठी** (वि.) तीन डोलकाठ्या असलेलें.
**तिरकी** (स्त्री.) एक पै.
**तिरकू** (सं. त्रिकूट न.) मसाल्याचे अनेक पदार्थ एकत्र कुटून केलेलें मिश्रण; तिघांचें कारस्थान; तिघांची जूट.
**तिरगीमिरगीवर येणें** भांडतांभांडतां अरे तुरे करूं लागणें.
**तिरडी** (स्त्री.) प्रेत वाहून नेण्याची ताटी.
**तिरडें** (न.) गोवऱ्या भरलेली टोपली.
**तिरणें** (क्रि.) पोहणें.
**तिरतिरा, तिरतिऱ्या** (वि.) चंचल मनाचा, अस्थिर, अशान्त.
**तिरंदाज** (फा. पु.) तीर मारणारा.
**तिरंदाजी** (स्त्री.) धनुर्विद्या.
**तिरधल, तिरधेल** (स्त्री.) इजारदार किंवा कौली मक्तेदार कौलदाराला कौलानें घेतलेल्या जमिनीच्या उत्पन्नाचा तिसरा हिस्सा देतो तो. [दान.
**तिरपगडें** (न.) फाशांच्या खेळांतलें एक

**तिरपणें** (क्रि.) मुचकणें, ताठ होणें.
**तिरपा** (क्रि.) तिर्कस, तिर्यक्; आडवा.
**तिरपीट** (स्त्री.) त्रेधा, गोंधळ.
**तिरमणें** (न. अने.) शक्ति, सामर्थ्य.
**तिरमल** (पु.) नंदीबैलाला दारोदार फिरवून भीक मागणारा.
**तिरमिरी, तिरीमिरी, तिरमी** (स्त्री.) मूर्च्छा; चक्कर, भोंड.
**तिरवट** (वि.) कांहींसा तिरवा.
**तिरवड** (स्त्री.) तिरडी पहा. [पाहणारा.
**तिरवा** (वि.) काणा, तिरळा, वाकडें
**तिरशिंगराव** (पु.) दुसऱ्याशीं मिळून न राहणारा, तिरसट व चिरडखोर.
**तिरसट** (वि.) तुसडा, चिडका, तिडतिडा.
**तिरस्कार** (सं. पु.) अनादर, तिटकारा.
**तिरस्कारणें** (क्रि.) अनादर करणें; धिक्कारणें.
**तिरस्कृत** (सं. वि.) धिक्कारलेला.
**तिरस्थळींची यात्रा** काशी, प्रयाग व गया या तीन ठिकाणची यात्रा; दूर-दूरच्या व गैरसोयीच्या ठिकाणीं पांगलेलें काम.
**तिरळा** (वि.) तिरवा.
**तिराईत** (पु.) तीर मारण्यांत निष्णात.
**तिरीप** (स्त्री.) तिरपे येणारे सूर्याचे किरण.
**तिरीप** (स्त्री.) सूर्याचे किरण तिरपे येण्यानें होणारी सौम्य उष्णता; धग.[जडबुद्धि.
**तिरीम** (पु.) सौम्य प्रकाश; मंद दृष्टि;
**तिरुका** (पु.) पाव आणा.
**तिरोधान** (सं. न.) अदृश्यता, आच्छादन.
**तिरोभाव** (सं. पु.) एक राग आळवीत असतां दुसऱ्या रागाच्या स्वरानें तो झाकून टाकणें.
**तिरोहित** (सं. वि.) डोळ्याआड झालेला.
**तिर्यक्** (सं. वि.) वाकडा. [योनि.
**तिर्यग्योनि** (सं. स्त्री.) भूतपिशाच्चांची
**तिऱ्हाईत** (मल्याळी तिरायुत वि.) कोणत्याहि पक्षांत नसणारा; तटस्थ; परका.
**तिल** (सं. पु.) तीळ; अंगावरचा काळा ठिपका.
**तिलक** (सं. पु.) तिळा, श्रेष्ठ.
**तिलककामोद** (पु.) एक राग.
**तिलंग** (पु.) एक राग.
**तिलांजलि** (सं. पु.) तीळ घातलेलें पाणी; मृत माणसाला अर्पण करावयाचें तिलमिश्रित उदक. **ति० द्यावयास उठणें**—एखाद्याच्या नाशासाठीं टपून बसणें; **ति० देणें**—त्याग करणें.
**तिवई** (स्त्री.) तीन पायांची घडवंची, तिपाई.
**तिवट** (न.) पागोटें. [जागा.
**तिवठा** (पु.) तीन रस्ते मिळण्याची
**तिवडा, तिवंडा** (पु.) मळणीचा खांब; तिवई. [विभागलेलें पान.
**तिवण** (सं. त्रिपर्ण स्त्री.) तीन ठिकाणीं
**तिवणा** (वि.) तीन थानांचा. [संगम.
**तिवंधा** (पु.) अनेक गांवांच्या हद्दींचा
**तिवनें** (न.) तिवांचा समुदाय.
**तिवरा** (पु.) अभिमान. [जागा.
**तिवाटा** (पु.) तीन रस्ते एकत्र मिळण्याची
**तिवारी** (पु.) गौड ब्राह्मणांतला एक पोटभेद. [ चित्रासन.
**तिवाशा** (पु.), **तिवाशी** (स्त्री.) गादी,
**तिवाळ** (स्त्री.) तीन पंच्यांचें कापड.
**तिव्वा** (पु.) पत्त्यांत—तीन ठिपके असलेलें पान.
**तिशी** (स्त्री.) तीस वर्षांची उमर.
**तिष्टणें** (सं.क्रि.) राहणें; वाट पहात राहणें.
**तिसकूट** (स्त्री.) आपापसांतील गैरसमजूत; मूर्च्छा; डिकशी. [थानांची.
**तिसड** (स्त्री.) वारीक चौकशी; (वि.) तीन
**तिसमारखा** तिस्मारखां पहा.
**तिसरा** (वि.) क्रमानें दुसऱ्याच्या पुढचा, तीन नंबरचा. **ति० पाय**—अगदीं पूर्ण तयारी.
**तिसरेंच** (वि.) निराळें, विचित्र.
**तिसाला** (फा.वि.) तीन वर्षांनीं करण्याचा.
**तिसुती** (वि.) तीन सुतांचा वळलेला (धागा).
**तिस्मारखां** (पु.) अंगीं शूरत्व नसतां शूरत्वाचा नुसता आव आणणारा बाजीराव.
**तिस्सा** (अर. वि.) आठ.
**तिस्सां** (अर. वि.) नऊ.

**तिस्सैन** (अर. वि.) नव्वद. [ तागा.
**तिहाळ** (स्त्री.) तीन पंचे होतील येवढा
**तिहिरी, तिहेरी** (वि.) तीन पदरी, तिघट.
**तिहीसांज** (स्त्री.) तिन्हीसांज.
**तिहोत्रा** (पु.) शेंकडा तीन रुपयेव्याजाचा दर.
**तिळ** तिल पहा. **तिळीं येणें**—स्वाधीन किंवा अनुकूल होणें (तुका० ४०७८).
**तिळतिळ** (अ.) थोडाथोडा.
**तिळतिळीत** (वि.) तुळतुळीत.
**तिळपापड होणें** अतिशय संताप होणें.
**तिळप्राय** (अ.) थोडासुद्धां.
**तिळवण**(स्त्री.) मकरसंक्रान्तीच्या दिवशींची नव्या नवरीच्या तिळगुळाची मिरवणूक.
**तिळवा** (पु.) तिळांचा लाडू.
**तिळांजळी** तिलांजलि पहा. [ पानथरी.
**तिळी** (स्त्री.) लहान व पांढरे तीळ;
**तिळेल** (न.) तिळाचें तेल.
**ती** (वि.) तीन; (स्त्री.) सर्वनाम.
**तीख** (सं. तीक्ष्ण वि.) तीक्ष्ण, तिखट.
**तीज** (स्त्री.) तृतीया.
**तीट** (स्त्री.) दृष्ट लागूं नये म्हणून लहान मुलांच्या कपाळीं काजळाचा बारीक ठिपका लावतात तो. [ गुत्ता; अडचण.
**तीड** (स्त्री.) भेग; वांक, वक्रपणा, वाकण;
**तीथ** (सं. तिथि स्त्री.) तिथि.
**तीथवार** सणाचा दिवस.
**तीन** (वि.) ३ ही संख्या. [ हे तीन लोक.
**तीनताळ** (पु. अने.) स्वर्ग, मृत्यु व पाताल
**तीनतेरा** (वि.) फाकलेले, पांगलेले.
**तीनवार** (पु.) तीन आठवडे.
**तीर** (सं. पु.) बाण; चीर, भेग; (सं. न.) किनारा, कांठ.
**तीरकमठा** (पु.) धनुष्यबाण.
**तीर्थ** (सं. न.) पुण्यक्षेत्र; पादोदक.
**तीर्थगंडी, तीर्थगिंडी** (स्त्री.) तीर्थ ठेवण्याचें लहानसें भांडें.
**तीर्थप्रसाद** (सं. पु.) देवाचें किंवा साधूचें पादोदक व प्रसाद म्हणून दिलेलें फूल, फळ, रक्षा इत्यादि.
**तीर्थराज** (सं. पु.) समुद्र; प्रयागक्षेत्र.
**तीर्थरूप** (सं. वि.) आई व बाप यांस पत्रांत लिहिण्याचा मायना; बाप.
**तीर्थवटी** (सं. स्त्री.) तीर्थोदक ठेवण्याचें भांडें.
**तीर्थविधि** (सं. पु.) तीर्थाच्या ठिकाणीं क्षौर, श्राद्ध वगैरे करण्याचे विधि.
**तीर्थस्वरूप** (सं. पु.) आईबापांशिवाय इतर वडील माणसांना पत्रांत लिहिण्याचा मायना.
**तीर्थाटन** (सं. न.) तीर्थयात्रा करीत फिरणें.
**तीर्थोदक** (सं. न.) पादोदक, तीर्थ.
**तीर्थोपाध्याय** (सं. पु.) तीर्थाच्या ठिकाणीं यात्रेकरूंकडून यात्रेचे विधि यथासांग करविणारा ब्राह्मण.
**तीव्र** (सं. वि.) प्रखर, जलाल, तीक्ष्ण.
**तीसमारखा** (वि.) तिस्मारखां पहा.
**तीळ** (सं. पु.) तिल पहा. **तीळ खाऊन व्रत मोडणें**—थोड्याशा लाभासाठीं अयोग्य वर्तन करणें.
**तीळतीळ** (अ.) थोडथोडें.
**तीळगूळ** (पु.) मकरसंक्रान्तीच्या दिवशीं हिंदु लोक परस्परांना गूळ किंवा साखर यांत पाकविलेले तीळ देतात ते.
**तीक्ष्ण** (सं. वि.) प्रखर, तीव्र.
**तुई** (स्त्री.) कलाबतू, जर.
**तुक** (स्त्री.) ध्रुपदाच्या चार अवयवांची एकत्र संज्ञा.
**तुक** (प्रा. न.) महत्त्व; वजन; योग्यता.
**तुकडमोड्या** (वि.) कांहीं उद्योग-धंदा न करतां दुसऱ्याच्या जिवावर निर्वाह करणारा.
**तुकडा** (पु.) शकल, तोडलेला भाग. **पायांचे तुकडे पडणें**—चालून चालून थकणें.
**तुकडी** (स्त्री.) टोळी, विभाग.
**तुकणें** (प्रा. क्रि.) तोलणें; बरोबरी करणें; वजन करणें; मान डोलावणें.
**तुकतुकी** (स्त्री.) तेज, टवटवी, तजेला, चकाकी; हुशारी.
**तुकतुकीत** (वि.) हुशार, ताजातवाना.
**तुकमा** (फा. पु.) गुंडीचें बिरडें.
**तुकविणें** (क्रि.) डोलविणें.
**तुकाई** (स्त्री.) वजन करणें.
**तुकावणें** (क्रि.) डोलविणें.
**तुक्का** (फा. पु.) बोथट तीर; कटाक्ष; आरोप.

**तुकुमराई, तुकुंबराई** (फा. स्त्री.) तुळशीचें किंवा सब्जाचें बीं. हें उपासाला खातात.
**तुखम** (फा. न.) बीज; अंडें. [नदीचा बांध.
**तुंग** (सं. वि.) उंच; (पु.) टोळी, समुदाय;
**तुंगार** (पु.) शिवोपासकांचा एक वर्ग.
**तुच्छ** (सं. वि.) नीच, तिरस्कार्य; अल्प.
**तुज** (सं. ना.) तुला.
**तुझा** (सं. ना.) तूं या सर्व नामाची षष्ठी. **तुझिया**—तुझ्या.
**तुटक** (वि.) मधूनमधून तुटलेला; खंडित; वेगळा.
**तुटका, तुटकाळ** (वि.) तुटलेला.
**तुटणें** (सं. क्रि.) खंड पडणें; कमी होणें; बंद पडणें. **तुटून पडणें**—हल्ला करणें; नेटानें कामास लागणें.
**तुटपुंजा** (वि.) अल्प, अपूर्ण. [तूट.
**तुटवडा, तुटारा** (पु.) कमीपणा; उणीव,
**तुटसाळ** (वि.) भांडखोर.
**तुटातुटी, तुटातूट** (स्त्री.) वियोग; भंग.
**तुटार, तुटारा** (पु.) तुटवडा, कमीपणा.
**तुटारी** (स्त्री.) क्षीणता.
**तुटावणें** (क्रि.) तुटून पडणें; कोसळणें.
**तुटी** (सं. त्रुटि स्त्री.) खंड; न्यूनता, कमीपणा, तूट; सुटका.
**तुटी** (प्रा. वि.) दूरचा.
**तुटीर** (वि.) लवकर तुटणारें.
**तुडतुड्या** (वि.) तिरसट स्वभावाचा.
**तुडतुडीत** (वि.) सडपातळ.
**तुंड** (सं. न.) तोंड; शस्त्राची तीक्ष्ण धार.
**तुडविणें** (क्रि.) पायाखालीं चेंदामेंदा करणें. [घोड्यावरली नौबत.
**तुडुंब** (अ.) भरपूर, कांठोकांठ; (न.)
**तुणणें** (क्रि.) आंत सुतें भरणें; तुरपणें.
**तुणतुणें** (न.) एक तंतुवाद्य. **मोर नाचे म्हणून तुणतुणें नाचे**—मोठ्यांचें अनुकरण लहानहि करतात. पण मोठ्यांची योग्यता अंगीं नसल्यामुळें त्यांचें करणें उपहासास्पद होतें.
**तुतारी** (स्त्री.) फुंकून वाजविण्याचें एक वाद्य.
**तुती** (अर. स्त्री.) एक झाड; त्याचें फळ.
**तुंद** (सं. वि.) लठ्ठ, गुबगुबीत; गुंग; गर्वित.
**तुंदिल** (सं. वि.) लठ्ठ, ढेरपोटया.
**तुनुमुनु** (क्रि. वि.) रडतखडत.
**तुपगट, तुपट** (वि.) तुपाचा वास किंवा रुचि लागलेलें.
**तुफान** (अर. न.) समुद्राचा क्षोभ, वादळ; आरोप, बालंट; घोड्याचें उधळणें किंवा मस्ती; (वि.) मस्ती करणारा.
**तुफानखोर** (वि.) कुभांडी, बालंटया.
**तुंब** (न.) चाकाचा तुंब; मांदळा.
**तुबक** (प्रा. स्त्री.) तोंड्याची बंदूक.
**तुंबडी** (सं. स्त्री.) वाळलेल्या भोपळयाचें केलेलें भिक्षापात्र; शरिरांतलें रक्त काढण्याचें साधन. **स्वतःची तुंबडी भरणें**—स्वतःला पाहिजे तितकें पदरांत पाडून घेणें.
**तुंबडी** (स्त्री.) तंगी, टंचाई.
**तुंबणें** (क्रि.) सांचणें, जमून राहणें. [घोर.
**तुंबळ** (सं. तुमुल वि.) जोराचें; भयंकर,
**तुंबा** (सं. पु.) कडू पांढरा भोपळा; त्याचें केलेलें पात्र; चाकाचा मध्यभागाचा अवयव.
**तुंबडा, तुंबारा** (पु.) पाणी जमावें म्हणून मोरीच्या छिद्रांत घालावयाचा बोळा; बंधारा; सांचणें, तुंबणें, इ० क्रिया; फार सांचलेलें पाणी, रक्त इत्यादि.
**तुंबिनी** (सं. स्त्री.) कडू भोपळ्याचा वेल.
**तुंबी** (स्त्री.) कडू भोपळा; त्याचें केलेलें पात्र.
**तुमान** (फा. स्त्री.) पोकळ विजार, चोळणा.
**तुमार** (अर. पु.) कागदांचें भेंडोळें; ताडी विकणारा.
**तुमुल** (सं. वि.) तुंबळ, घनघोर.
**तुर** (सं. तूर्य न.) वाद्य.
**तुरक** (पु.) तुर्क, मुसलमान.
**तुरकाठी** (स्त्री.) तुरीचें पीक काढून घेतल्यावर राहिलेलें ताट. [देश.
**तुरकाण** (न.) तुराण, तुर्कस्थान, तुर्कांचा
**तुरकी चाल** (हिं. स्त्री.) जलदीनें पण जवळ जवळ पाय टाकीत चालण्याची पद्धत.
**तुरग, तुरंग, तुरंगम** (सं. पु.) घोडा.

**तुरंग** (पु.) तुरुंग पहा.
**तुरंगा** (सं. स्त्री.) घोडी.
**तुरंज** (न.) महाळुंग.
**तुरट** (सं. वि.) तुरटीच्या चवीचा.
**तुरटी** (स्त्री.) एक औषधि द्रव्य; (हिं.) फटकडी.
**तुरंत** (क्रि. वि.) लवकर.
**तुरतुर** (अ.) लवकर; पाय जमिनीला विशेषसे न टेकतां; वरवर.
**तुरतुरं फुरफुरं** (न.), **तुरतुरी** (स्त्री.) कांहीं थोडा वेळ केलेला मोठा भपका; टुरटुर. [ शिवणें.
**तुरपणें** (क्रि.) वस्त्राचा कांठ दुमडून घेऊन
**तुरपत** (अर. तुरबत स्त्री.) थडगें.
**तुरंबणें** (क्रि.) पूजणें; बांधणें; खोवणें; वाट पाहात बसविणें; अंगावर धारण करणें; हुंगणें.
**तुरबत** (अर. स्त्री.) थडगें.
**तुरंबी** (स्त्री.) डिकशी.
**तुरमण** (न.) कोंवळा काजू.
**तुरमा** (पु.) कोंव, अंकुर. [ ढकलणें.
**तुरमुंडी** (स्त्री.) मुसंडी; डोक्यानें जोरानें
**तुरवठें** (न.) खडकाळ पण उत्तम रीतीनें साफसूफ करून लागवडीस आणिलेली जमीन. [ आढळणारें; (अ.) कोठें कोठें.
**तुरळ, तुरळक** (वि.) दुर्मिळ, क्वचित्
**तुरा** (पु.) गुच्छ; मंजिरी; एक शिरोभूषण शृंगारिक लावणीचा एक प्रकार.
**तुराठी** (स्त्री.) तुरकाठी, तुरीचें ताट.
**तुरीय** (सं. वि.) चौथी. **तुरीयावस्था** (स्त्री.) ब्रह्माशीं तादात्म्य होण्याची स्थिति.
**तुरुक** (पु.) तुर्क, यवन; घोडेस्वार.
**तुरुंग** (पोर्तु. त्रोकु पु.) बंदिखाना.
**तुरुत** (सं. त्वरित अ.) त्वरित, या क्षणीं.
**तुरुतदान महापुण्य** मनांत येतांक्षणींच किंवा संधि प्राप्त होतांच केलेल्या दानानें अधिक श्रेय मिळतें.
**तुरुप** (स्त्री.) तिरीप पहा.
**तुरुष्क** (सं. पु.) तुर्कांचा देश.
**तुरूक** (पु.) घोडेस्वार.
**तुरूस** (हिं. वि.) बरोबर.
**तुरे** (सं. तूर्य न.) एक वाद्य, तुतारी.
**तुरेवाला** (पु.) तुऱ्याची लावणी म्हणणारा.
**तुर्तातूर्त** (अ.) तत्क्षणीं, आतांपुरतें.
**तुऱ्हाटी** (स्त्री.) तुराठी, तुरकाठी.
**तुलई** (स्त्री.) गादी.
**तुलक** (सं. पु.) कापूस.
**तुलग, तुलगा** (प्रा. पु.) वाद्याचा ध्वनि; प्रतिध्वनि.
**तुलंग** (पु.) घोड्याची एक चाल.
**तुलना** (सं. स्त्री.) बरोबरी; सादृश्य; वजन करणें, मेळ पाहणें.
**तुलसी** (सं. स्त्री.) तुळस. **वर तुलसीपत्र ठेवणें**—वरचा हक्क सोडणें.
**तुला** (सं. स्त्री.) तागडी, कांटा; वजन, माप; उपमा; तूळरास.
**तुलाई** (स्त्री.) तोलण्याची मजुरी.
**तुलाधार** (सं. पु.) तराजूची दांडी.
**तुलापि** (प्रा. पु.) पलंग.
**तुलापुरुष** (सं. पु.) माणसाच्या भारंभार सोन्याची केलेली प्रतिमा.
**तुलासंपात** (सं. पु.) सूर्यानें तूळ राशींत जाणें.
**तुल्य** (सं. वि.) बरोबर, समान.
**तुल्यबल** (वि.) समान सामर्थ्याचा.
**तुष** (सं. पु.) कोंडा, भूस.
**तुषार** (सं. वि.) छिटा; पाण्याचे सूक्ष्म कण; दहिंवर.
**तुष्ट** (सं. वि.) तृप्त, खुष.
**तुष्टणें** (सं. क्रि.) संतोषणें, खुष होणें.
**तुष्टि** (सं. स्त्री.) संतोष, तृप्ति.
**तुसडा** (वि.) तिरसट, हेकट.
**तुस्त** (वि.) भक्कम; सुटलेला; सुस्त.
**तुसळ** (स्त्री.) कोंडा, भूस; (वि.) कोंडा असलेले (तांदूळ).
**तुसार, तुसार धान्य** (न.) खरीपाच्या किंचित् अगोदरचें पीक (उडीद, मूग इ.).
**तुसार, तुसारा** (पु.) पावसाची बुरबुर.
**तुळई** (स्त्री.) वहाल, खांडा; तुला.
**तुळणा** (सं. स्त्री.) तुलना पहा.
**तुळणें** (क्रि.) तोलणें, वजन करणें.
**तुळतुळीत** (वि.) तजेलदार, तुकतुकीत.
**तुळवट** (पु. न.) मोठी तुळई.

**तुळशीपत्र** (सं. तुलसीपत्र न.) तुळशीच्या झाडाचें पान. **हलवायाच्या घरावर तु०**—परभारें दुसऱ्याची वस्तु तिसऱ्याला देऊन टाकणें (आईजीच्या जिवावर बाईजी उदार ही म्हण पहा.) **कानांत तुळशीपत्र घालून बसणें**—ऐकलें न ऐकलेंसें करून स्वस्थ राहणें; **वर तु० ठेवणें**—त्या वस्तूवरचा हक्क सोडणें.

**तुळशी वृंदावन** (न.) तुळशीचें रोप लावण्याकरितां उभारलेला बांधीव स्तंभ.

**तुळस** (सं. स्त्री.) तुलसी.

**तुळा** (सं. स्त्री.) तुला पहा.

**तुळाधार** (प्रा. अ.) तंतोतंत, बरोबर.

**तुळापुरुष** (पु.) तुलापुरुष पहा.

**तुळी, तुळिका, तुलिका** (स्त्री.) पलंग; बिछाना, गादी; (ज्ञा० १३।४२); तुळई.

**तूं** (सर्व.) द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम (एकवचन). **तूं मी करणें**—अरेतुरे करणें; **केलें तुकां झालें माकां**—तुझें वाईट करायला गेलों तों उलट माझेंच वाईट झालें.

**तूक** (न.) एक प्रकारचा कागदी पतंग; निष्काचा सोळावा हिस्सा; वजन; महत्त्व; कवितेचा भाग; ध्रुपद किंवा पालुपद; (पु.) बालक.

**तूट** (स्त्री.) न्यूनता; खंड; वियोग; नुकसान, तोटा. [खंडित पाऊस.

**तूटपाऊस** (पु.) मधून मधून येणारा

**तूटमिति** (स्त्री.) व्याजाच्या हिशेबाचा एक प्रकार. यांत वेळोवेळीं वसूल झालेली रक्कम मूळचें मुद्दल व व्याज यांच्या रकमेंतून वजा करून बाकीची रक्कम पुढच्या काळासाठीं मुद्दल म्हणून समजण्यांत येते.

**तूण, तूणीर** (सं. पु.) बाण ठेवण्याचा भाता.

**तूत** (अर. स्त्री.) तुतीचें झाड; (न.) त्याचें फळ.

**तूप** (न.) घृत, कढविलेलें लोणी. **तुपाच्या आशेनें उष्टें खाणें**—लाभाच्या आशेनें घाणेरडें काम करणें; **तुपाचें नख**—तुपाचा थेंब.

**तूर** (सं. तुवरी स्त्री.) एक धान्य; दोन टोकांचा खिळा. **हातावर तुरी देणें**—देखत देखत फसवून पळून जाणें.

**तूरकाठा** (स्त्री.) तुरीचें पीक काढून घेतल्यानंतर खालीं राहिलेला रोपाचा अवशेष.

**तूरबंबाळ** (पु.) अनेक वाद्यांचा एकत्र घोष.

**तूर्त, तूर्तातूर्त** (सं. त्वरित अ.) सध्यां, आतां.

**तूर्ण** (क्रि. वि.) तावडतोब.

**तूर्य** (सं. न.) तुतारी, वाद्य.

**तूल** (पु.) कापूस.

**तूलोदयामदोललहू** पत्राचा एक मायना.

**तूष्णीम्** (सं. न.) अतिशय थोडें परिमाण. (क्रि. वि.) निमूटपणें.

**तूस** (सं. तूष पु. न.) कोंडा, भूस.

**तूळ** (सं. तुला स्त्री.) तागडी; एक रास; जमिनीची लांबी; (पु.) कापूस.

**तृण** (सं. न.) गवत. **दांतीं तृ० धरणें**—दीन होणें. [सांगाडा (ज्ञा० ३।२५०).

**तृणकुटा** (प्रा. पु.) गवताचा केलेला

**तृणधान्यें** (न.अने.) नाचणी, वरी; राजगिरा, राळा इ० धान्यें.

**तृणवेटी** (प्रा. स्त्री.) गवताची दोरी.

**तृतीय** (सं. वि.) तिसरा.

**तृतीय नेत्र** (सं. पु.) शंकराचा तिसरा डोळा. **तृ० उघडणें**—अतिशय संतापणें.

**तृतीयसवन** (सं. वि.) अतिशय उच्च स्वर.

**तृतीया** (सं. स्त्री.) पंधरवड्याची तिसरी तिथि; तिसरी विभक्ति.

**तृप्त** (सं. वि.) संतुष्ट.

**तृप्ति** (सं. स्त्री.) समाधान, संतोष.

**तृषणें** (क्रि.) तहान लागणें.

**तृषा** (सं. स्त्री.) तहान.

**तृषाक्रांत** (सं. वि.) तहानेला.

**तृषार्त** (सं. वि.) तृषेनें पीडलेला, तृषाक्रांत, तहानेला.

**तृषित** (सं. वि.) तहानेला.

**तृष्णा** (सं. स्त्री.) तहान.

**तेउता** (प्रा. वि.) तसा, तेवढा, तितका.

**तेख** (सं. तीक्ष्ण पु.) रागाचा झटका.

**तेखी** (वि.) रागीट.

**तेगा** (फा. पु.) लहान वाकडी तलवार.

**तेगार** (पु.) जिंदगी, मालमत्ता; ऐट.
**तेज** (सं. न.) कांति, लकाकी, प्रकाश; कर्तृत्व, तीव्रता; सूर्यकिरण (ज्ञा. १८। ३०८).
**तेजकरी** (पु.) शिष्ट लोक.
**तेजगी** (स्त्री.) तजेला.
**तेजतत्त्व** (सं. न.) ज्ञान; ज्ञानेंद्रिय.
**तेजःपुंज** (सं. वि.) तेजस्वी, लकाकित.
**तेजस, तेजाळ** (वि.) तेजस्वी.
**तेजस्कर** (सं. वि.) चकाकित.
**तेजस्वी** (सं. वि.) तेजःपुंज; बाणेदार.
**तेजाकार** (सं. पु.) सूर्य.
**तेजाब** (पु.) आम्ल; नायट्रिक किंवा हायड्रोक्लोरिक अॅसिड.
**तेजाळ** (प्रा. वि.) तेजस्वी; भव्य.
**तेजित** (सं. वि.) धार दिलेलें; घासून चकचकित केलेलें.
**तेजी** (पु.) घोडा; (स्त्री.) भरभराट, चलती.
**तेजीमंदी** (स्त्री.) भावाचा चढउतार.
**तेजोभंग** (सं. पु.) अपमान.
**तेजोमय** (सं. वि.) प्रकाशमान; तेजस्वी.
**तेजोहानि** (सं. स्त्री.) अपमान; तेजाचा ऱ्हास.
**तेडा, तेढा** (वि.) वाकडा; आडवा.
**तेढें वाकें** (वि.) वेडें वाकडें.
**तेतीस कोटि देव** देवांचे तेहतीस वर्ग; (लोकांच्या सामान्य समजुतीप्रमाणें देवांची ३३ कोटि ही संख्या).
**तेतुला** (प्रा. वि.) तितका.
**तेथवर** (अ.) तोंपर्यंत.
**तेथें** (सं. तत्र अ.) त्या जागीं.
**तेधवां** (प्रा. अ.) तेव्हा.
**तेंबी** (स्त्री.) लहान टेकडीचा माथा.
**तेर** (स्त्री.) तिसरी नांगरणी; (पु.) मोठा रथ.
**तेरडा** (पु.) एक वनस्पति. **ते०चा रंग तीन दिवस**—थोडे दिवस भपका दाखवून एखादें कार्य थांबवणें.
**तेरवां** (अ.) दोन दिवस अगोदर किंवा परवाच्या पुढल्या दिवशीं.
**तेरस, तेरसी** (सं. त्रयोदशी स्त्री.) हिंदु महिन्याच्या कोणत्याहि पक्षांतील तेरावा दिवस.
**तेरावारा** (पु.) वाद, तंटा, भांडण.
**तेरावा** (पु.), **तेरावें** (न.) माणसाच्या मरणापासून तेराव्या दिवशीं करण्याची क्रिया.
**तेरीख** (स्त्री.) तारीख.
**तेरीज** (न.) बेरजांचे पत्रक; बोटखत.
**तेरीज जमाखर्च** (पु.) महिनेवार पत्रकावरून खजिन्याचा एकंदर वर्षाचा तयार केलेला जमाखर्च.
**तेरीमेरी** (हिं. स्त्री.) अरेतुरेचें भांडण, बोलाचाली. [अश.
**तेल** (सं. तैल न.) पदार्थांतला स्निग्ध
**तेलकट** (वि.) ओशट, स्निग्ध.
**तेलंग** (सं. तैलंग पु.) तेलंगणांतला मनुष्य.
**तेलंगण** (सं. तैलंग न.) तेलंगी लोकांचा देश.
**तेलंगभट** (पु.) तेलंगी ब्राह्मण. हे आगंतुकी करतांना फार लोचटपणा करतात त्यावरून लोचटपणानें मागणारा असा अर्थ.
**तेलंगी** (वि.) तेलंगणांतला.
**तेलघाणा** (पु.) तेल काढण्याचें यंत्र.
**तेलफळ, तेलवण** (न.), **तेलसाडी** (स्त्री.) लग्न लागण्यापूर्वी वराकडून वधूकडे जाणारी नारळ, तेल, साडी वगैरेची देणगी.
**तेलवात** (स्त्री.) दिव्यांत तेल घालणें, वाती करणें, पुसणें इ. दिवे लावण्याच्या पूर्वीची तयारी.
**तेलसर** तेलकट पहा.
**तेली** (सं. पु.) तेल काढून विकणारा.
**तेलीण** (स्त्री.) तेल्याची वायको.
**तेलीतांबोळी** (स्त्री.) हलक्या दर्जाचे अशिक्षित लोक.
**तेल्या** (वि.) तुळतुळीत रंगाचा.
**तेव** (पु.) पाझर; चिकी.
**तेवढा** (वि.) तितका.
**तेवणें** (क्रि.) जळत राहणें; पाझरणें.
**तेवीं** (प्रा. अ.) त्याप्रमाणें; तसें.
**तेव्हां** (अ.) त्याकाळीं; त्याअर्थी.

**तेव** (अर. पु.) रागाची लहर.
**तेसणा** (प्रा. वि.) तेवढा.
**तेहतीस, तेहेतीस** (वि.) ३३. [(कवितेंत).
**तैं, तई** (प्रा. अ.) तेव्हां, त्यासमयीं
**तैजस** (सं. वि.) तेजस्वी.
**तैनात** (अर. स्त्री.) लवाजमा; लष्करी हुकमत; नेमणूक; सोंपविलेली व्यवस्था.
**तैनाती फौज** स्वतःच्या खर्चानें तयार केलेली व दुसऱ्याच्या लष्करी हुकमतीखालीं दिलेली फौज.
**तैनाळ, तहनाळ** (फा. न.) म्यानाच्या खालच्या बाजूचें अडकवण.
**तैय्यार** (वि.) तयार.
**तैल** (सं. न.) तेल.
**तैलंगण** (न.) तेलंगी लोकांचा देश.
**तैलबुद्धि** (सं. स्त्री.) एखादी गोष्ट चटकन समजण्यासारखी बुद्धि.
**तैवजखर्च** (अर. पु.) पाहुण्यासाठीं पानसुपारी वगैरेचा खर्च.
**तैसा** (प्रा. वि.) तसा, त्या प्रकारचा; (अ.) त्याप्रमाणें.
**तैहून** (प्रा. अ.) तेथून, तेव्हांपासून.
**तोई** (स्त्री.) तोय, कलावतू.
**तोक** (प्रा. पु.) बालक.
**तोक** (फा. तोख पु.) गळफास.
**तोकडा** (हिं. वि.) आखुड, कमी.
**तोख** (सं. तोष पु.) संतोष; (फा. पु.) गळफास.
**तोखणें** (प्रा. क्रि.) वाखाणणें.
**तोंगल** (पु.) लोलक; श्रीमंत मनुष्य.
**तोज** (प्रा. न.) चोज, नवल.
**तोटक** (सं. न.) एका वृत्ताचें नांव; याच्या चरणांत १२ अक्षरें व स, स, स, स, असे चार गण असतात.
**तोटका** (पु.) तोडगा.
**तोटरा** (पु.) तुरट, शुष्क इ० पदार्थ खाल्ल्यानें घशाला कोरड पडून गिळण्यास होणारा प्रतिबंध.
**तोटा** (पु.) हानि, खोट, नुकसान; तूट, उणीव; कागदाच्या नळींत दारू खच्चून भरून केलेलें दारूकाम.
**तोटी** (स्त्री.) नळी, नळ; चिरकांडी.
**तोठरा** तोटरा पहा; धान्याच्या कणसाची पक्वता.
**तोड** (स्त्री.) उपाय; कल्पना; युक्ति; तोडणी; (सोंगट्यांच्या खेळांत) सोंगटी मारणें; एका बाजूनें साफ केलेला दगड; चौरस दगड; उलगडा; बरोबरी.
**तोंड** (सं. न.) मुख, चेहरा, वदन; समोरचा भाग; छिद्र; धैर्य. **तोंड आंबट करणें**—असंतोषाची मुद्रा; **तोंड उतरणें**—तोंडावरचें तेज नाहींसें होणें; **तोंड करून बोलणें**—निर्लज्जपणानें किंवा उद्धटपणानें बोलणें; **तोंड काळें करणें**—निघून जाणें; **तोंड चुकविणें**—दृष्टीस पडण्याचें टाळणें; **तोंड टाकणें**—अद्वातद्वा बोलणें; **तोंड दाबणें**—लांच वगैरे देऊन गप्प बसविणें; **तोंड दिसणें**—निर्भर्त्सना केलेली लोकांच्या नजरेस येणें; **तोंड लागणें**—सुरवात होणें; **तोंड वाजविणें**—बोलत सुटणें; **तोंड वेंगाडणें**—याचना करणें; **तोंड संभाळणें**—जपून बोलणें; **तोंडसुख घेणें**—यथेच्छ शिव्या देणें; खरडपट्टी काढणें; **तोंड सोडणें**—अद्वातद्वा बोलणें; **तोंडचें पाणी पळणें**—घाबरून जाणें, भयभीत होणें; **तोंडाचा पट्टा सुटणें**—चराचर बोलणें; **तोंडची वाफ दवडणें**—निरुपयोगी किंवा निष्फळ असें भाषण करणें; **तोंडाला पानें पुसणें**—फसविणें; **तोंडांत बोट घालणें**—आश्चर्यचकित होणें; **तोंडावर नक्षत्र पडणें**—विशेष प्रकारचा तोंडाळपणा असणें; फटदिशीं बोलण्याची खोड असणें; **तोंडाशीं तोंड देणें**-बरोबरीच्या नात्यानें बोलणें.
**तोंड ओळख** (स्त्री.) नुसतें एकमेकांनीं एकमेकांना पाहिलेलें असणें.
**तोडक** (प्रा. पु.) तट (तुका० ४४।१६); (वि.) भांडखोर.
**तोडगा** (हिं. पु.) टाणाटोणा; मंत्र; बागुलबोवा, बुजगावणें; देवी टोचणें; युक्ति.
**तोंडघशीं** (अ.) तोंड घासलें जाईल अशा प्रकारें; **तों० पाडणें**—ऐन प्रसंगीं फसविणें.

**तोंडचाटचा** (वि.) तोंडदेखलें बोलणारा.
**तोंड चुकार** (वि.) तोंड लपविणारा.
**तोंडचें हिशेब** कागदावर आंकडेमोड न करतां मनांतल्या मनांत करायचे हिशेब.
**तोडजोड** (स्त्री.) तडजोड पहा.
**तोडणी** (स्त्री.) तोडण्याची क्रिया.
**तोडणें** (क्रि.) कापणें, तुकडे करणें, छाटणें, कमी करणें; अंगावर पाजण्याचें बंद करणें; (भांडण) मिटविणें.
**तोंडदेखणें, तोंडदेखलें** (वि.) मनांत निराळेंच असतां दुसऱ्यास आवडेल अशा तऱ्हेचें मुद्दाम केलेलें (भाषण).
**तोंडपाटिलकी** (स्त्री.) स्वतः कांहीं न करतां इतरांना करण्याविषयीं हुकूमवजा गोष्ट सांगणें; वाक्चापल्य.
**तोंडपाठ** (वि.) पुस्तकाकडे न पाहतां केवळ तोंडानें म्हणतां येण्यासारखें.
**तोंडपिटी** (स्त्री.) व्यर्थ वटवट.
**तोंडमिळवणी** (स्त्री.) मेळ.
**तोडर** (पु.) एक पादभूषण. **तोडरीं घालणें**—जिंकणें, वठणीस आणणें.
**तोंडली** (स्त्री.) एक फळवेल.
**तोंडलें** (न.) तोंडलीचें फळ.
**तोंडवळा** (पु.) चर्या; मुद्रा; चेहऱ्याची ठेवण, मखवटा.
**तोंडसुख घेणें** (क्रि.) अमर्याद भाषण करणें.
**तोडा** (पु.) एक पादभूषण; प्रायः एक हजार रुपये भरलेली पिशवी; काकडा; दोरीचा तुकडा; नृत्याचा एक विशिष्ट बोल. **तोड्याची बंदूक**—तोडा पेटवून दारूला लावल्यानें उडणारी बंदूक.
**तोंडातोंडीं** (अ.) समोरासमोर; बोलण्यांत.
**तोंडाळ** (वि.) बडबड्या, दुसऱ्यावर तोंड टाकणारा. [एका रागिणीचें नांव.
**तोडी** (सं. त्रोटकी स्त्री.) गायनांतल्या
**तोंडी** (स्त्री.) वीणा व तिची उंच मान यांच्यामधला सांधा जुळविणारा लाकडाचा तुकडा; (वि.) बोलून झालेली (उदा०–तोंडीपरीक्षा, तोंडीकरार); जबानी. [सारखा पदार्थ.
**तोंडीं लावणें** (न.) तोंडास रुचि आणण्या-
**तोडींव** (वि.) तोडलेलें.

**तोंडोतोंड** (अ.) कांठापर्यंत.
**तोतया** (पु.) आपणच तो असें केवळ सादृश्यावरून सांगणारा; ठक; भोंदू.
**तोतरा** (वि.) बोलतांना लागणारा; कापरा; चोचरा.
**तोता** (हिं. पु.) पोपट. [अभ्यंगस्नान, न्हाणें.
**तो तो** (स्त्री.) लहान मुलांच्या भाषेत–
**तोदा** (फा. पु.) निशाण, नेम मारण्याचें नक्की स्थान, संधानबिंदु.
**तोप** (पु.) टोप; मोठें पातेलें.
**तोफ** (फा. तोप स्त्री.) मोठी अवजड बंदुक; उल्हाटयंत्र.
**तोफखाना** (फा. तोपख़ाना पु.) तोफा ठेवण्याचें ठिकाण; तोफांचा समुदाय.
**तोफा** (हिं. वि.) तलम, पातळ, बारीक, उत्कृष्ट (वस्त्र). [पिशवी.
**तोबरा** (हिं. पु.) घोड्यास दाणा चारण्याची
**तोबा** (पु.) अतिशय गर्दी; गर्दी कमी करण्याकरितां लोकांना मारण्यासाठीं वस्त्राला पीळ घालून केलेला जाड कोरडा; (अ.) हायहाय !
**तोबा तोबा** (अर. अ.) हायहाय ! अरेरे; इ० अर्थी.
**तोमर** (सं. र.) घुसळण्याच्या रवीसारखें लोखंडाचें एक शस्त्र.
**तोय** (सं. न.) पाणी.
**तोयद** (सं. पु.) मेघ.
**तोरड** (प्रा. पु.) तोरड, एक पादभूषण. **तोरडीं घालणें**—जिंकणें, दमन करणें.
**तोरडी** (स्त्री.) स्त्रियांचें एक पादभूषण.
**तोरण** (सं. न.) द्वार; दारावर बांधण्याची माला इ० मंगलचिन्ह.
**तोरणटका** (पु.) लग्नमंडपावरचा कर.
**तोरणभेट** (स्त्री.) लग्नावरची पट्टी किंवा कर.
**तोरणवेस** (स्त्री.) लग्न, मुंज इ० मंगलकार्यांच्या प्रसंगी घराच्या मुख्य दरवाजावर केळीचे खांब लावून कमान करतात ती.
**तोरप** (न.) आवणी न करतां भाताचें पीक घेतां यावें म्हणून भाजून तयार केलेली जमीन.

नगर वाचनालय, सातारा.



**तोरमल्ली** (स्त्री.) अपक्व हिरा.
**तोरा** (पु.) दिमाख, ऐट, डौल.
**तोरें** (न.) वनस्पति वगैरे कुजून घाण झालेल्या पाण्यानें स्नान केल्यामुळें किंवा तें पाणी प्याल्यानें अंगावर उठते ती खरूज.
**तोरेदार** (वि.) डामडौली, दिमाखखोर.
**तोल** (सं. पु.) तोलणें; वजन; माप; तुलना; काल.
**तोलणें** (क्रि.) वजन करणें; उचलून धरणें; करवणें. **तोलास तोल**—बरोबरी.
**तोलदार** (वि.) वजनदार.
**तोलदारी** (हिं. स्त्री.) वजन; प्रतिष्ठा; ईर्षा; बरोबरी; स्पर्धा, चढाओढ.
**तोलींव** (वि.) वजन केलेलें; मोजकें.
**तोंवर** (अ.) तोंपर्यंत. [खजिना.
**तोशखाना** (फा. तोशाखाना पु.) सरकारी
**तोशीस** (अर. स्त्री.) उपद्रव, घस, झीज.
**तोशेखाना** तोशखाना पहा.
**तोष** (सं. पु.) संतोष, समाधान.
**तोषक** (अर. स्त्री.) बैठक; (सं. वि.) आनंददायक.
**तोष्ट** (न.) तगादा; लकडा.
**तोषणें** (क्रि.) संतुष्ट होणें.
**तोस्तान** (न.) तगादा; लकडा.
**तोसदान** (फा. न.) बंदुकीच्या गोळ्या, दारू इ० ठेवण्याची पिशवी; पिशवी.
**तोहमत** (अर. स्त्री.) खोटा आरोप, बालंट; नुकसान; दुर्दैवाचा घाला.
**तोळंबा** (प्रा. पु.) खांब बसविण्याचें उथळें; धष्टपुष्ट शरीर; गवंड्याचा ओळंबा; लंवक; तुळई. [किंवा ९६ गुंजा).
**तोळा** (सं. पु.) एक वजन (१२ मासे
**तोळामासा** (वि.) अतिशय नाजूक; चंचल; अति अल्प कारणानें बिघडणारी.
**तौकल, तौकीर** (न.) तवकल किंवा तवकीर पहा.
**तौतूक** (अ.) नुकताच, आतांच.
**तौर** (हिं. पु.) तोरा, डौल.
**त्यक्त** (सं. वि.) सोडलेलें.
**त्यजणें** (सं. क्रि.) सोडणें.
**त्याग** (सं. पु.) सोडणें, वर्जणें; दान, गोंधळ्याची मजुरी.
**त्यागणें** (सं. क्रि.) सोडणें, टाकणें.
**त्यागी** (सं. वि.) दानशूर.
**त्याज्य** (सं. वि.) सोडण्यास योग्य.
**त्रपा** (सं. स्त्री.) लज्जा, लाज.
**त्रय** (सं. न.) त्रिकूट, त्रिवर्ग.
**त्रयस्थ** (वि.) तिऱ्हाईत.
**त्रयी** (सं. स्त्री.) तिघांचा समुदाय; बाप आजा व पणजा असे तिघे; किंवा आई आजी आणि पणजी अशा तिघी; ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद असे तीन वेद.
**त्रयी उद्धरणें** वडिलांवरून शिव्या देणें.
**त्रयी धर्म** (सं. पु.) वेदोक्त धर्म. [दिवस.
**त्रयोदशी** (सं. स्त्री.) पंधरवड्यांतला तेरावा
**त्रसरेणु** (सं. पु.) उन्हाच्या कवडशांत दिसणारा अत्यंत सूक्ष्म रजःकण.
**त्रस्त** (सं. वि.) त्रासलेला, भयभीत.
**त्रहाटणें** (प्रा. क्रि.) वाजणें; वाजविणें.
**त्रागा** (पु.) संतापाच्या भरांत स्वतःलाच दुखापत करून घेणें; डोक्यांत राख घालणें.
**त्राटिका** (स्त्री.) एक राक्षसीण; कजाग स्त्री.
**त्राण** (सं. न.) रक्षण; अतिशय जोराचा प्रयत्न; दम, शक्ति.
**त्राता** (सं. पु.) रक्षणकर्ता, वाली. [प्रतिष्ठा.
**त्राव** (प्रा. न.) रक्षण, सत्ता, आधार, बळ;
**त्रास** (सं. पु.) कंटाळा; उपद्रव; भय.
**त्रासणें** (क्रि.) कंटाळणें; भिणें.
**त्रासविणें** (क्रि.) सतावणें, छळणें. [कोंडा.
**त्रासिक** (सं. त्रासक वि.) त्रासणारा; एकल-
**त्राह (हा) टणें** (प्रा. क्रि.) वाजविणें, सिद्ध करणें; आपटणें.
**त्राहाटविणें** (प्रा. क्रि.) प्रतिष्ठेस चढविणें (तुका०४१९).
**त्राहि त्राहि** (सं. अ.) 'देवा रक्षण कर' अशा अर्थाचे भ्यालेल्याचे उद्गार.
**त्रि** (सं. वि.) तीन.
**त्रिक** (अ.) तिप्पट.
**त्रिकर्मी** (सं. वि.) ब्राह्मणांच्या षट्कर्मांपैकीं तीनच करण्याचा अधिकार असलेला.
**त्रिकांड** (वि.) तीन पेरी असलेला.

**त्रिकाल** (सं. पु.) भूत–वर्तमान–भविष्य; सकाळ–दुपार–संध्याकाळ.

**त्रिकालदर्शी** (सं. वि.) भूत–वर्तमान–भविष्य जाणणारा किंवा दाखविणारा.

**त्रिकालज्ञ** (सं. वि.) भूतवर्तमानभविष्यकाळांत घडणाऱ्या गोष्टींचें ज्ञान असलेला.

**त्रिकाळ** (सं. पु.) सकाळ, दुपार व संध्याकाळ हे तीन काळ.

**त्रिकुटी** (प्रा. स्त्री.) चोरी, चहाडी व शिंदळकी या तिहींचा समुदाय.

**त्रिकूट** (सं. न.) तिघांचा समुदाय; एक मताचे तिघे;, तीन शिखरें असलेला डोंगर.

**त्रिकोण** (सं. न.) तीन बाजू असलेली सरळ रेषाकृति.

**त्रिकोणमिति** (सं. स्त्री.) त्रिकोणाचें गणित.

**त्रिखंड** (न.) स्वर्ग, मृत्यु व पाताळ. [गुण.

**त्रिगुण** (सं. पु.) सत्त्व, रज, तम हे तीन

**त्रिघात** (सं. पु.) गणितांत–एका रकमेला तिनेंच दोनदां गुणून येणारी संख्या.

**त्रिजगत्** (सं. न.) स्वर्ग–मृत्यु–पाताळ हे तीन लोक. [१८।२३२).

**त्रिजगती** (सं. स्त्री.) त्रैलोक्य (ज्ञा०

**त्रिज्या** (सं. स्त्री.) वर्तुळाच्या मध्यबिंदूपासून परिघापर्यंतचें अंतर दाखविणारी सरळ रेषा.

**त्रिताप** (सं. पु.) आधिदैविक, आधिभौतिक व आध्यात्मिक अशी तीन प्रकारची पीडा.

**त्रिताल** (पु.) तबल्याचा एक ठेका.

**त्रिदंडी** (सं. वि.) संन्यासाचा एक प्रकार; तीन दंड धारण करणारा; शरीर, मन, व वाणी यांचें संयमन करणारा.

**त्रिदश** (पु.) देव.

**त्रिदळ** (वि.) एकाच देठावर तीन पानें लागलीं आहेत असें.

**त्रिदाघ** (प्रा. पु.) त्रिविध ताप. [क्षोभ.

**त्रिदोष** (सं. पु.) कफ, वात व पित्त यांचा

**त्रिधा** (सं. वि.) तीन प्रकारचा. [शरीर.

**त्रिधातुक** (सं. न.) कफवातपित्तात्मक

**त्रिनयन** (सं. पु.) शंकर, महादेव.

**त्रिपदा** (स्त्री.) तीन पदांचा गायत्री छंद.

**त्रिपाद** (सं. पु.) अग्नि.

**त्रिपादभूमि** (सं.स्त्री.) वामनानें बळीजवळ मागितलेली तीन पावलांइतकी जागा.

**त्रिपुटी** (सं. स्त्री.) ज्ञेय, ज्ञाता व ज्ञान हीं तीन, किंवा कर्ता, कर्म व क्रिया हीं तीन.

**त्रिपुंड्र** (सं. पु. न.) कपाळीं लावण्याचा तीन पट्ट्यांचा तिलक.

**त्रिपुर** (सं. न.) त्रिपुरासुराचीं तीन नगरें.

**त्रिपुरी पुनव** (सं. त्रिपुरी पौर्णिमा स्त्री.) कार्तिक शु० १५.

**त्रिफणा** (सं. स्त्री.) तिफणी.

**त्रिफळा** (सं. पु. स्त्री.) हिरडा, बेहडा व आवळकाठी यांचें समभाग चूर्ण; क्रिकेटमधील फलंदाजाच्या मागील तीन दांड्या. [हे तीन लोक.

**त्रिभुवन** (सं. न.) स्वर्ग, मृत्यु व पाताळ

**त्रिमिर** (सं. तिमिर न.) अंधार, तिमिर.

**त्रिमाळिक** (प्रा. न.) तीन मजली घर.

**त्रिमूर्ति** (सं. पु.) ब्रह्मा, विष्णु व महेश हे तिघे.

**त्रिरात्र** (न.) तीन दिवस व तीन रात्र एवढा अवधि.

**त्रिलोक** (पु. स्त्री.) स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. [नांव.

**त्रिवट** (सं. पु.) गायनांतल्या एका तालाचें

**त्रिवर्ग** (सं. वि.) तिघे; पुरुषार्थांपैकीं धर्म, अर्थ व काम हे तीन.

**त्रिवली** (सं.स्त्री.) ओठाला पडणाऱ्या तीन वळयांचा समुदाय. [शब्द.

**त्रिवाचा** (प्रा. स्त्री.) तीनदां उच्चारलेले

**त्रिवार** (अ.) तीनदां.

**त्रिविध** (सं. वि.) तीन प्रकारचें.

**त्रिविध ताप** (सं.पु.) आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक अशी तीन प्रकारची पीडा.

**त्रिविध नायिका** (सं. स्त्री.) मुग्धा, मध्या व प्रौढा अशा अवस्थांतली स्त्री.

**त्रिविध परीक्षा** (सं. स्त्री.) वैद्यशास्त्रांत–दर्शन, स्पर्शन व प्रश्न (म्हणजे चर्या पाहणें, नाडी पाहणें व प्रश्न विचारणें) अशी तीन प्रकारची रोग्याची परीक्षा.

**त्रिविध प्रारब्ध** (सं. न.) अनिच्छा-स्वेच्छा –परेच्छा असें तीन प्रकारचें दैव.
**त्रिविध मंगल** (सं. न.) आशीर्वाद–वस्तु-निर्देश–नमस्कार.
**त्रिविध संबंध** (सं. पु.) वाच्यवाचक, लक्ष्यलक्षक, व्यंग्यव्यंजक.
**त्रिविष्टप** (सं. न.) स्वर्ग.
**त्रिवेणी** (सं. स्त्री.) गंगा, यमुना व सरस्वती यांचा संगम होऊन झालेला प्रवाह; तीन पेडांची वेणी.
**त्रिशंकु** (सं. वि.) तीन खिळे मारलेला; धड ना इकडे ना तिकडे; (पु.) एक सूर्यवंशी राजा.
**त्रिशूळ** (सं. पु.) तीन फाळांचें शस्त्र.
**त्रिस्थळी यात्रा** (सं. स्त्री.) काशी, प्रयाग व गया या तीर्थांची यात्रा; एका माणसाला एकाच कामासाठीं अनेक ठिकाणीं जाण्याचा प्रसंग.
**त्रुटि** (सं. स्त्री.) नाश; शंका; लेश; अठरा निमेषांस लागणारा काळ.
**त्रुटित** (सं स्त्री.) अपूर्ण.
**त्रेता** (सं. स्त्री.) चार युगांपैकीं दुसरें युग.
**त्रेधा** (सं. स्त्री.) अनेक कामें एकाच वेळीं करण्यामुळें उडणारी गडबड; दुर्दशा. [तीन गुणांचा समुच्चय.
**त्रैगुण्य** (सं. न.) सत्त्व, रजस् व तम या
**त्रैराशिक** (सं. न.) आद्यांक (प्रमाण), मध्यांक (फल), अंत्यांक (इच्छांक) अशीं तीन पदें दिलीं असतां चौथें पद काढण्याची अंकगणितांतली रीत. या या चौथ्या पदाला इच्छाफळ म्हणतात.
**त्रैलोक्य** (सं. न.) स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. [नांव.
**त्रैलोक्यचिंतामणि** (सं. पु.) एका औषधाचें
**त्रैवार्षिक** (सं. वि.) तीन वर्षांनीं एकदां होणारें.
**त्रैविद्या** (सं. स्त्री.) भगवद्गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें हे तीन ग्रंथ. [उपनाटक.
**त्रोटक** (सं. वि.) संक्षिप्त, लहान, (न.)
**त्र्यंबक** (सं. पु.) शिव, शंकर.
**त्र्यंबकेश्वर** (सं. पु.) शंकर; नाशिका-जवळचें एक सुप्रसिद्ध ज्योतिर्लिंग.
**त्र्याहिक** (वि.) दोन दिवसांआड येणारा.
**त्वक्, त्वचा** (सं. स्त्री.) साल, कातडी.
**त्वदीय** (सं. वि.) तुझें.
**त्वंपद** (सं. न.) तूं (जीव) हा शब्द.
**त्वंपुरा** (सं. पु.) शंखध्वनि, बोंब.
**त्वरणें** (क्रि.) घाई करणें.
**त्वरा** (सं. स्त्री.) जलदी, घाई.
**त्वरित** (सं. अ.) जलदीनें, लवकर.
**त्वरितगामी** (सं. वि.) जलद चालणारा.
**त्वरितभाषी** (सं. वि.) जलद बोलणारा.
**त्वरेंकरीं** (प्रा. अ.) त्वरेनें.
**त्वष्ट** (न.) त्रास, लचांड.
**त्वष्टा** (सं. पु.) विश्वकर्मा. [स्फुरण.
**त्वेष** (सं. पु.) संताप; आवेश; अवसान;

———

## थ

**थ** मराठी व्यंजनमालेंतील सतरावें व्यंजन.
**थकणें** (क्रि.) दमणें; कुंठित होणें; वसूल न होतां राहणें.
**थकलें कूळ** देण्याची रक्कम देण्यास असमर्थ झालेलें किंवा दिवाळें निघालेलें कूळ.
**थकवा** (पु.) दम, श्रम.
**थकित** (प्रा. वि.) चकित झालेला.
**थक्क** (वि.) आश्चर्यकारक.
**थट** (पु. स्त्री.) दाटी, गर्दी, जमाव.
**थटकारणें** (क्रि.) थाटमाट करणें, सजविणें, शृंगारणें. [बोलणेंचालणें.
**थटणें** (क्रि.) सजणें; ऐट करणें; डौलानें
**थटी** (स्त्री.) गोशाळा.
**थट्टा** (स्त्री.) मस्करी, विनोद, चेष्टा.
**थट्टी** (स्त्री.) गोशाळा.
**थट्टेवाईक** (वि.) चेष्टेखोर [शेवट.
**थड** (सं. तट स्त्री.) नदीचें तीर, किनारा,
**थंड** (हिं. वि.) गार; सुस्त, मंद.
**थडक** (स्त्री.) आघात, ठोकर.
**थंडक** (न.) शीतलता आणणारें औषध.
**थडकणें** (क्रि.) येऊन पोचणें, आदळणें, लागणें.
**थडका** (पु.) आघात, टक्कर.
**थंडगार** (वि.) अतिशय थंड.

**थडगें** (न.) समाधि, शव पुरल्या जागीं केलेलें बांधकाम.
**थडथडणें** (क्रि.) थंडीनें कांपणें.
**थडथाद** (प्रा अ.) अलिप्तपणानें.
**थडवा** (प्रा. पु.) लहान तळें.
**थडा** (हिं. पु.) दुकानदाराची बसण्याची जागा; गादी; घाट.
**थडाड** (पु.) जोरानें लाथाडण्याची क्रिया.
**थडाथडी** (स्त्री.) थरथरी.
**थंडा** (वि.) मंद, सुस्त.
**थंडाई** (हिं. स्त्री.) शीतलता; सौम्यपणा; सुस्ती; शांतता; शीतलता आणणारें पेय.
**थंडा फराळ** (पु.) केवळ थंड पाणी पिऊन राहणें. [कमी करणें.
**थंडावणें** (क्रि.) थंड होणें, निवणें, गारठणें;
**थंडावा** (हिं. पु.) गारवा, शीतलता.
**थंडी** (स्त्री.) शीत; कांपरें
**थडी** (प्रा. स्त्री.) तीर, कूळ, मर्यादा
**थडें** (न) थडगें.
**थंडोसा** (पु.) थंडावा.
**थंतरमंतर** (सं. तंत्रमंत्र न.) जादू, तात्पुरता बंदोबस्त. [बसणें.
**थपकील** (स्त्री.) थपकन् जमिनीवर
**थपडाक, थप्पड** (स्त्री.) चापटी, चपराक.
**थप्प** (क्रि. वि.) एकदम बंद.
**थप्पडखाऊ, थप्पडवाईक** (वि.) थपडा खाणारा, निलाजरा.
**थपाटी** (स्त्री.) थापड, चापटी.
**थप्पी** (स्त्री.) लहान रास. [थाटाचा.
**थबकट, थबकडा** (वि.) चापट, बसक्या
**थबकड** (स्त्री.) थापट, चापटी.
**थबकण** (स्त्री.) थपकील पहा.
**थबकणें** (क्रि.) मध्येंच थांबणें. [गळणें.
**थबथबणें** (क्रि.) अतिशय भिजणें, टपकणें,
**थबथबीत** (वि.) अंगावरून पाणी टिपकत असलेला, ओला. [वस्तु.
**थमन** (न.) दुःख कमी होण्यासाठीं दिलेली
**थयथय** (अ.) आनंदानें, दुःखानें, अधीरपणानें (नाचणें, वागडणें इ०).
**थयथयाट** (पु.) नाचणें, मौजेनें ओरडणें इ० प्रकार; संतापाचें व्यक्त चिन्ह.
**थयथयाट** (वि.) आनंदी, मौजा मारणारा.
**थयमान** (न.) थैमान पहा.
**थर** (सं. पु.) स्तर, पडदा; ढीग; रास; पल्ला; मर्यादा; शेवट; वर्ग.
**थरकणें** (क्रि.) कंप पावणें.
**थरकन** (अ.) कांपरें भरून.
**थरकांटा** (पु.) रोमांच.
**थरकांप** (पु.) भयामुळें होणारा कंप.
**थरणें** (क्रि.) स्थिर होणें; वळावणें.
**थरणी** (स्त्री.) मातीचा चिखल व त्यावर दगड अशी भिंतीची वगैरे रचना.
**थरथर, थरथरां** (अ.) अंगावर रोमांच येऊन व कांपतकांपत.
**थरथरणें** (क्रि.) कांपणें.
**थरथराट** (पु.) भयानें सुटणारा कंप.
**थरथरी** (स्त्री.) कंप.
**थरभरें** (न.) अंबोशी नांवाची वनस्पति.
**थरविथर** (प्रा. वि.) बरेंवाईट.
**थरारणें** (क्रि.) अतिशय कांपणें.
**थरारी** (स्त्री.) थरथरी, कंप.
**थरु, थरूं** (पु.) कोयता वगैरेंची मूठ.
**थल** (सं. स्थल स्त्री.) शेतांतल्या उत्पन्नाचा हिस्सा.
**थलकरी** (पु.) जमिनीचा मालक.
**थलथलीत** (वि.) गिलगिलीत, बिळबिळीत.
**थलभरी, थलवाईक** (पु.) जमिनीचा मालक. [टोळी.
**थवा** (सं. स्तवक पु.) समाज, जमाव,
**थवीक** (स्त्री.) चतुरता, युक्ति.
**थळ** (सं. स्थल न.) उंसाचा मळा; शेत; स्थान; अवेलीवरचा खोताचा हक्क.
**थळकरी** (पु.) मिरासदार. [पत्रक.
**थळझाडा** (पु.) गांवच्या जमिनीचें नोंदणी-
**थळणें** (क्रि.) कोरणें.
**थळभरीत** (न.) एखाद्या स्थळीं माल भरणें; निर्गत मालावरील जकात.
**थळमोड** (स्त्री.) एखादे स्थळीं भरून आणलेला माल विकणें; आयात मालावरली जकात; तळ उठविणें. [मालक.
**थळवाईक** (पु.) उंसाच्या मळ्याचा
**थळवारी** (स्त्री.) शेतजमिनीचें पत्रक.
**थळाचा** चांगल्या अवलादीचा.

**थळी** (प्रा. न.) पात्र; अलंकार; वडी.
**थळीव** (वि.) पऱ्यावर कोरलेलें.
**थाऊ** (प्रा. वि.) स्पष्ट, प्रांजळ; (पु.) ठाव, ठिकाण.
**थाऊक** (प्रा. न.) भांडेंकुडें.
**थाक** (प्रा. स्त्री.) थांग, ठाव; थकवा.
**थाकणें** (क्रि.) थकणें; शोधून काढणें, थांग लावणें.
**थाकी** (स्त्री.) पद्धति, भाषणाची खुबी.
**थांग** (पु.) ठाव, अंत.
**थांगदोरा** (पु.) मुद्दा, पत्ता; सुगावा.
**थांगपत्ता** (पु.) सुगावा.
**थांगारणें** (क्रि.) व्यवस्था लावणें.
**थाट** (हिं. ठाठ पु.) डामडौल, शोभा, मौज; छपराचो चौकट; जमाव; टोळी; सात स्वरांची अशी एक विशिष्ट रचना कीं जींतून राग निर्माण होतात; (वि.) गच्च, घट्ट, भरलेला.
**थाट, थाटी** (प्रा. स्त्री.) समुदाय.
**थाटणें** (क्रि.) रचणें, मांडणें; तयार ठेवणें.
**थाटमाट, थाटमांड** (पु.) शोभिवंत दिसण्यासारखी रचना.
**थाटली** (स्त्री.) ताटली, लहान ताट.
**थाटा** (पु.) कांठ.
**थाटी** (प्रा. स्त्री.) गर्दी, जमाव; झाडी.
**थाडकन्** (न.) जोराच्या आघातापासून उत्पन्न होणाऱ्या आवाजासह.
**थाण** (न.) सलंग लांब कापड, ठाण.
**थातंबणें** (क्रि.) निसरणें, तसेंच ठेवणें.
**थातुरमातुर** थंतरमंतर पहा.
**थान** (सं. स्तन न.) स्त्रीचा स्तन; (हिं. ठाण न.) सलंग कापडाचा गठ्ठा; (सं. स्थान न.) जागा, पत्ता.
**थानपति** (सं. स्थानपति पु.) अधिकारी.
**थानमान** (पु.) आदरसत्कार; (न.) ठावठिकाणा.
**थानवा** (वि. ) अंगावर पिणारा.
**थाप** (स्त्री.) चापटी, तळहाताचा प्रहार; लाटांचा आघात; वंधारा, थोप; वसणारी छाप; गप्प, वढाईची गोष्ट; गायनवादनांतला ठेका; स्थापना.
**थापट** (स्त्री.) चापटी, थप्पड.
**थापटणें** (क्रि.) चापट मारणें, थोपटणें; (न.) कुंभाराचें मडकीं वगैरे थापडण्याचें लाकूड.
**थापटी** (स्त्री.) चापट; गोवरी; पट्टी.
**थापटींव** (वि.) थापटून केलेलें.
**थापडणें** (क्रि.) थापटणें पहा.
**थापडवाईक** (वि.) थापटचा खाणारा; निर्लज्ज; मिधा होऊन राहणारा.
**थापणें** (क्रि.) चोपून चोपून सपाट करणें, लिंपणें; गोंजारणें.
**थापणें** (सं. स्था क्रि.) स्थापणें.
**थापा** (पु.) ढेकळें फोडण्याचें किंवा लाखेच्या बांगडचा करण्याचें दांडकें; डोंगरसपाटी; गोवऱ्या.
**थापाथापी** (स्त्री.) खोटयानाटचा गोष्टी.
**थापी** (स्त्री.) करणी, गवंडयाचें एक हत्यार.
**थापी कौल** कडा तेवढचा उंच असलेलें सपाट कौल. [पाहणें.
**थांबणें** (क्रि.) थबकणें, वंद होणें; वाट
**थांबविणें** (क्रि.) थांबण्यास लावणें.
**थांबा** (पु.) गाडी थांवण्याचें ठिकाण.
**थाय** (प्रा. पु.) अहंकार. [डबकें.
**थाया** (प्रा. पु.) हट्ट, छंद; मोह; लहान
**थार** (पु.) आश्रय; मेळ; आधार; प्रमाण; (प्रा. अ.) पूर्णपणें.
**थारणें** (प्रा. क्रि.) स्थिरावणें.
**थारळें** (न.) दूध तापविण्यासाठीं जमिनींत केलेली खाच; कुंड; डबरा; थारोळें.
**थारा** (पु.) आश्रय. [बदलणें.
**थारेपालट** (स्त्री.) हवा खाण्यासाठीं जागा
**थारोळें** (न.) मोटेचें पाणी साठविण्याचा हौद; डबकें; खोच, थारळें.
**थाली** (सं. स्थाली स्त्री.) परात; थाळा; (स्त्री.) लोटी.
**थालीठावकें** (प्रा. न.) भांडींकुंडीं.
**थालीपीठ** (न.) भाजणीचा केलेला एक रुचकर पदार्थ.
**थाव** (प्रा. पु.) थांग, अंत; बळ.
**थावणें** (प्रा. क्रि.) स्थिरावणें; बळावणें.
**थावर** (न.) घमेलें; मोठी कढई.

**थावरणें** (सं. स्थावर क्रि.) स्थिरावणें, संभाळणें, सावरणें.
**थावा** (प्रा. पु.) वळ; आधिक्य.
**थावी** (प्रा. स्त्री.) तळ, ठिकाण.
**थावें** (प्रा. पु.) ठाव, थांग.
**थावो** (प्रा. पु.) ठाव, थांग.
**थाळ** (स्त्री.) पेटविण्यासाठीं केलेली गोवऱ्यांची रास; उपासानें पोटांत उठणारी आग; थारळें; घाण.
**थाळा** (सं. स्थाल पु.) मोठें ताट.
**थाळी** (सं. स्थाली स्त्री.) ताट; थारळें; दौंडी.
**थिऑसफी** (इं. स्त्री.) ब्रह्मविद्या.
**थिऑसोफिस्ट** (इं. पु.) थिऑसफी नांवाच्या विशिष्ट पंथाचा सभासद.
**थिकटें** (प्रा. वि.) व्याप्त.
**थिकणें** (प्रा. क्रि.) चरफडणें, शोक करणें.
**थिकुलें** (प्रा. वि.) थोडें लहान.
**थिगळ** (न.) ठिगळ; (वि.) सुस्त.
**थिगळी** (प्रा. स्त्री.) डाग.
**थिजणें** (क्रि.) घट्ट होणें, गोठणें; चरकणें.
**थिजें** (प्रा. अ.) सध्यां, सांप्रत.
**थिटा** (प्रा. वि.) आखुड, अरुंद; कमी, अल्प.
**थिणगी, थिपका, थिबकणें** इ. शब्दाबद्दल ठिणगी, ठिपका, ठिबकणें इत्यादि पहा.
**थित** (सं. स्थित वि.) जवळ असलेलें.
**थिता** (प्रा. अ.) व्यर्थ.
**थिपकणें** (क्रि.) ठिपकणें, थेंबथेंब गळणें.
**थिपका** (पु.) ठिपका, थेंब.
**थिबकणें** (क्रि.) थिपकणें पहा.
**थिबका** (पु.) ठिपका, थेंब.
**थिबडी** (स्त्री.) डोक्याला तेल चोळणें.
**थिबणें** (क्रि.) थेंबथेंब गळणें.
**थिएटर** (इं. न.) नाटकगृह.
**थिर** (सं. स्थिर ) स्थिर, निश्चल.
**थिराई** (स्त्री.) शांतपणा.
**थिरावणें** (क्रि.) स्थिर होणें; शांत होणें.
**थिल्लट** (वि.) सुस्त, मंद; हलकट.
**थिल्लटाई** (स्त्री.) सुस्ती, मंदता.
**थिल्लर** (वि.) चंचळ; उथळया; खिळाडू; (न.) डबकें; उथळ बुद्धि.
**थीत** (प्रा. वि.) निश्चित; व्यर्थ.
**थीर** (सं. स्थिर वि.) शांत, स्थिर, गंभीर.
**थीरथावर** (वि.) स्थिरस्थावर; निश्चित; शांत.
**थीरथीर** (प्रा. अ.) हळू हळू. **थीर म्हणणें**—त्रासणें (तुका. १४०).
**थींव** (न.) ठरविलेली जागा.
**थुईथुई** (स्त्री.) झिमझिम पाऊस.
**थुकणें, थुंकणें** (क्रि.) पिंक किंवा थुंकी बाहेर टाकणें.
**थुंकी** (स्त्री.) मुखरस, पिंकी. **थुंकी झेलणें**—निंद्य प्रकारें खुशामत करणें.
**थु थु** (स्त्री.) छीः थू; उपहास.
**थुलं** (स्त्री.) गव्हाचा सांजा.
**थुवर** (स्त्री.) थोर नांवाची वनस्पति. हीं झाडें कुंपणाला उपयुक्त असतात.
**थू** (अ.) धिक्कारार्थी शब्द; (स्त्री.) थुंकी.
**थूक** (स्त्री. न.) थुंकी.
**थू थू** (अ.) छिः थू. [ आखुड, अल्प.
**थेकुटें, थेकुडें, थेकुलें** (प्रा. वि.) लहान,
**थेट** (हिं. वि.) अस्सल, शुद्ध; (अ.) सरळ.
**थेटलशकर** (पु.) तंबू ठोकणारा.
**थेटा** (वि.) थोडा, अपूर्ण, आखुड.
**थेटें** (न.) सर्दी, पडसें.
**थेंब** (पु.) बिंदु, टिपका; (प्रा. पु.) प्रळयकाळचा मेघ. **थेंबें थेंबें तळें सांचे**—थोडें थोडें सांचतां सांचतां पुष्कळ रक्कम होते.
**थेंबटा** (प्रा. पु.) थेंब, बिंदु.
**थेंबोरा** (पु.) थेंब, बिंदु.
**थेर** (पु.) चाळे, तऱ्हा; स्त्रीच्या वेषांत नाचणारा मुलगा; माकडाचा खेळ करणारा. **थेरथेर करणें**—नांवालौकिकाची चाड न धरतां लोक नांवें ठेवतील अशा प्रकारें वागणें; नाजूकपणाचा आव घालणें; तऱ्हातऱ्हा करणें.
**थेरडा** (वि.) म्हातारा, वृद्ध.
**थेरूं** (न.) मूठ, दांडा.
**थैक** (अ.) गुराला हलतांना उच्चारण्याचा शब्द. **थैक म्हणतां ब्रह्महत्या**-क्षुद्र गोष्टीचा भयंकर परिणाम.
**थैं थैं** (अ.) आनंदानें नाचतांना होणारा आवाज.

**थैयथाट** (पु.) वेद्यांचा नाच; गडवडां लोळणें, ओरडणें इ० संतापाचा व्यक्त परिणाम.
**थैमान** (पु.) आरडाओरडा; आदळआपट.
**थैला** (हिं. पु.) पोतें, मोठी पिशवी.
**थैली** (स्त्री.) पिशवी; थोरांकडून थोरांकडे जाणारें येणारें पत्र.
**थोक** (वि.) ठोक; ठोकळ; ठळक; (पु.) कापसाच्या रेशमाच्या किंवा लोकरीच्या धाग्यांची गुंडाळी.
**थोकडें** (प्रा. वि.) लहान, अग्रें.
**थोकणें** (प्रा. क्रि.) थांबणें; गुप्त होणें; बंद होणें; लहान होणें, ठेपणें; पोचणें; थांबविणें. [अनुमान.
**थोकताळा** (पु.) कच्चा अंदाज, ठोकळ
**थोकबंद** (वि.) ठोकळ, धाऊक.
**थोकलें** (प्रा. वि.) लहान.
**थोकवणें** (प्रा. क्रि.) थांबविणें.
**थोंगणें** (प्रा. क्रि.) गाणें म्हणणें.
**थोट, थोंट** (न.) कुभांड; (पु.) ठक.
**थोटका** (वि.) हात तुटलेला, थोटा.
**थोटा** (प्रा. वि.) हात तुटलेला (मनुष्य); फांद्या व शेंडा नसलेला (वृक्ष); नीच (मोरो० कृष्णवि० ६८।३४).
**थोटापिंपळ** (पु.) ज्याला क्रयकारोरें नाहींत असा, सडेसोट. [होणें.
**थोटावणें** (प्रा. क्रि.) स्तब्ध किंवा निर्बळ
**थोटुक** (न.) खुंट, वोटूक.
**थोडका, थोडा** (सं. स्तोक वि.) अल्प.
**थोडकावणें** (क्रि.) कमी कमी होणें.
**थोडक्यांत** (अ.) संक्षिप्तपणें; लवकरच.
**थोडाथोडका** (वि.) अल्प प्रमाणाचा.
**थोड्या थोडा** (अ.) अल्प प्रमाणानें. **जीव थो० होणें**—काळजी वाटणें.
**थोडाफार, थोडाबहुत** (वि.) अल्पस्वल्प.
**थोतरी** (स्त्री.) गाल.
**थोतांड** (न.) खोटी रचलेली गोष्ट, लवाडी; पाखंड. **थो० मत**—पाखंडमत.
**थोतांडी, थोतांड्या** (वि.) थोतांड करणारा.
**थोप** (स्त्री.) विराम, विरामस्थान; बंधारा; मर्यादा; शेवट; अब्रूचें जतन.
**थोपटणें** (क्रि.) हळूहळू थापडणें.
**थोपणें** (क्रि.) थांबणें.
**थोपविणें** (क्रि.) थांबविणें.
**थोपाथोपी, थोपवाथोपवी** (स्त्री.) समजावणी करून शांतता स्थापित करणें.
**थोंब** (पु.) गुच्छ, तुरा, झबका; स्तोम, ढोंग;
**थोबाड** (न.), **थोबाडी** (स्त्री.) गाल. **थोबाड फोडणें**—थोतरींत देणें; चांगली अद्दल घडविणें.
**थोबाडणें** (क्रि.) थोबाडींत मारणें; वेत फसविणें, गोंधळ करून मोडणें.
**थोसाळणें** (क्रि.) शांत करणें, गोंजारणें.
**थोर** (सं. स्थविर वि.) मोठा, श्रेष्ठ, सन्मान्य; (प्रा. वि) पुष्कळ; (स्त्री.) थुवर पहा.
**थोरला** (वि.) मोठा, वडील.
**थोरवकी, थोरवी** (स्त्री.) मोठेपणा, श्रेष्ठता.
**थोरा, थोरी, थोरीव** (स्त्री.) मोठेपण, महत्त्व, श्रेष्ठता.
**थोराई** (स्त्री.) मोठेपण.
**थोराड** (वि.) दांडगा, वळकट; मोठा.
**थोराव** (प्रा. पु.) थोरपणाची जाणीव, अहंता. [महत्त्वास चढणें.
**थोरावणें** (क्रि.) मोठें होणें, वाढणें,
**थोरावा** (प्रा.पु.) थोरवी, महत्त्व, विस्तार.

---

## द

**द** मराठी व्यंजनमालेंतील अठरावें व्यंजन.
**द** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) देणारा.
**दऊत** (अर. दवात स्त्री.) दौत, शाई ठेवण्याचें पात्र.
**दखल** (अर. वि.) येऊन पोचलेलें, ज्ञात, श्रुत. **दखल देणें**—बातमी देणें; हात घालणें.
**दखलबाज** (फा.वि.) कागदोपत्रीं समाविष्ट.
**दखलगिरी** (अर. फा. स्त्री.) ढवळाढवळ, मध्यें पडणें.
**दख्खन** (पु.) दक्षिण हिंदुस्थान.
**दंग** (हिं. वि.) गुंग, तल्लीन, निमग्न; आश्चर्यचकित; (पु.) कुटण्याचें यंत्र, ढेकी.

**दगड** (पु.) पाषाण, धोंडा; निर्बुद्ध मनुष्य; कठोर अंतःकरणाचा मनुष्य. **दगडावरची रेघ**—पक्कें; कधीं न बदलणारें वाक्य; **द० पेक्षां वीट मऊ**—त्यांतल्या त्यांत हें बरें; **द० टाकून पहाणें**—ठाव घेणें; **दगडाची छाती**—धाडस; निष्ठुर अंतःकरण.

**दगडफोड** (वि.) फार कष्टाचें (काम); अतिशय सणसणीत (भाषण).

**दगडी** (वि.) दगडाची केलेली; खडकाळ; (स्त्री.) दगडाचें पात्र.

**दगदग** (स्त्री.) मेहनत; श्रम; त्रास.

**दगदगणें** (क्रि.) जिकिरीच्या कामामुळें बेजार होणें.

**दंगल** (हिं. पु.) दंगा करणारांचा जमाव; धांगडधिंगा; कुस्त्यांचा आखाडा.

**दगल** (स्त्री.) लबाडी, विश्वासघात.

**दगलबाज** (फा. वि.) फसव्या, कपटी, घातकी. [पणा.

**दगलबाजी** (फा. स्त्री.) विश्वासघातकी-

**दगा** (पु.) विश्वासघात; कपटकृत्यांविषयींचा संशय घेण्यास जागा; धोक्याची गुप्त जागा.

**दंगा** (हिं. पु.) गडबड; गोंधळ; उत्पात; संतापानें केलेली आदळआपट.

**दंगाधोपा, दगाफटका** (पु.) धामधूम, हुल्लड, गडबड.

**दगाबाजी** (फा. स्त्री.) विश्वासघात, कपट.

**दगावणें** (क्रि.) धोक्यांत सापडून नाश पावणें; धोका होऊन मरण पावणें.

**दगेखोर** (वि.) दगलबाज, लुच्चा, कपटी.

**दगेबाज, दगेबाजी** दगलबाज, दगलबाजी पहा.

**दग्ध** (सं. वि.) जळालेला; भ्रष्ट.

**दग्धयोग** (सं. पु.) अशुभ योग.

**दचक** (स्त्री.) भीति; मनाला बसणारा धक्का. [भिणें.

**दचकणें** (क्रि.) चमकणें; विचकणें, बुजणें;

**दचकला** (पु.) चरणाऱ्या गुराच्या दोन पायांना बांधण्याची दोरी; दुःख किंवा भीति यांच्यामुळें मनाला एकाएकीं बसणारा धक्का.

**दचकळी** (स्त्री.) लहान ढेकर.

**दचका** (पु.) मनाचा धक्का; वचक, भीति.

**दटणें** (क्रि.) भारावणें; दडपणें; जोरानें दाबणें.

**दटावणी** (स्त्री.) दरडावणी, भीति घालणें.

**दटावणें** (क्रि.) दरडावणें; भिवविणें, दहशत घालणें.

**दट्टा, दट्ट्या** (पु.) मोठें बूच; बूच; झाकण, नेट; दडपण; दहशत.

**दंड** (सं. पु.) काठी, सोटा; कोपरापासून वरचा हाताचा भाग; शासन; शिक्षा; शिक्षा म्हणून घेतलेलें द्रव्य; एक प्रकारची शिवण; एक प्रकारचा व्यायाम.

**दंड** (वि.) हट्टी; आडमुठा; आडदांड.

**दंडक** (प्रा. न.) चाल, वागणूक, वहिवाट; नियम, एका वृत्ताचें नांव.

**दंडकारण्य** (सं. न.) नर्मदा व गोदावरी यांच्या चिमटयांतील प्रदेशापासून थेट खालीं दक्षिणेस लांबपर्यंत पूर्वीच्या काळीं पसरलेलें अरण्य.

**दडग** (न.) कपारी; खडकाळ डोंगर.

**दडंगा** (पु.) आरडाओरडा; दंगा.

**दडगी, दंडगी** (स्त्री.) ज्वाळा.

**दंडगें** (प्रा. न.) सोडगा.

**दडण** (स्त्री.) दडण्याची जागा.

**दडणें** (क्रि.) लपणें; (न.) नकासगाराचें एक हत्यार.

**दंडणें** (क्रि.) शिक्षा करणें; शरिराचें दमन करणें; शोभणें.

**दडदड** (अ.) दडदड आवाज करीत (धावणें इ०).

**दडदडीत** (वि.) जाड, दणगट.

**दंडधारी** (सं. वि.) हातांत काठी असलेला.

**दंडन** (सं. न.) शिक्षा; दमन, शासन.

**दंडनीति** (सं. स्त्री.) नीतिशास्त्र; माणसानें नीतीनें कसे व्यवहार करावे तें सांगणारें शास्त्र.

**दंडनीय** (सं. वि.) शिक्षेस पात्र.

**दडपण** (न.) भार, ओझें.

**दडपणें** (क्रि.) दाबणें; चेपणें; सपाटून खाणें; जुलूम करणें.

**दडपशाही** (स्त्री.) सत्तेचा गैरवाजवी फायदा घेऊन गरिबांच्या सुखावर गदा आणणारी व्यवस्था; जुलूम; अन्यायानें एखादी चळवळ दावून टाकणें.
**दडपश्चमे** (अ.) खरी माहिती नसली तर आयत्यावेळीं सुचेल तें कांहींतरी सांगून वेळ मारून नेणें.
**दडपा** (पु.) वजन; रास, ढीग.
**दंडपाणी** (सं. वि.) दंडधारी; (पु.) शिव.
**दडपादडपी** (स्त्री.) दावून टाकण्याची सर्वत्र चाललेली क्रिया. [ दडपणारा.
**दडप्या** (वि.) दडपश्चमे करणारा,
**दंडपुरई, दंडफुरई, दंडफुरोई** (स्त्री.) दंड, मालाची जप्ती इ०
**दंडफुगडी** (स्त्री.) परस्परांच्या दंडांना धरून फुगडी खेळण्याचा एक प्रकार.
**दडबडाविणें** (क्रि.) खरडपट्टी काढणें; धाक घालणें.
**दंडयोजना** (स्त्री.) एकादी गोष्ट घडवून आणण्याकरतां योजिलेलें सक्तीचें साधन.
**दंडवत** (न.) साष्टांग नमस्कार; शूद्रांनीं पत्रांत नमस्कार लिहिण्याची विशेष संज्ञा. [ लवकर.
**दडवादडवी** (क्रि. वि.) लगवगा; झराझर;
**दडविणें** (क्रि.) लपविणें, छपविणें; गुप्त ठेवणें. [ घट्ट.
**दडस** (वि.) मजबूत; टिकाऊ; जाड व
**दंडसरी** (स्त्री.) चरी, खोल खणीत नेलेली रांग. [ अर्धवट स्नान.
**दंडस्नान** (सं. न.) घाईघाईनें केलेलें
**दंडळणें** (प्रा. क्रि.) कळमळणें.
**दडा** (पु.) चेंडू; छिद्रांत बसलेली प्रतिबंधक वस्तु; दट्टया; आश्वासन; लपून बसणें.
**दडा** (पु.) पेंढार; पेंढाऱ्यांची टोळी.
**दंडा** (पु.) डोंगराचा पुढें आलेला निमुळता भाग; लांब मोठी काठी.
**दंडाईत** (वि.) दांडगा; आडदांड.
**दडाडा, दडादड** (अ.) धावतांना जोरानें पाय वाजवीत. [ मारामारी.
**दंडादंडी** (स्त्री.) मारामारी; काठयांची
**दडादडी** (स्त्री.) लपून बसण्याचा सपाटा.

**दंडायमान** (वि.) मध्यें पडलेला; आडवा पडलेला किंवा असलेला.
**दंडार** (न.) ललित. [ मजबूत; जाड.
**दंडारणा** (पु.) सोटा, वडगा; (वि.) मोठा,
**दंडासन** (सं. न.) पाय ताणून निजणें.
**दंडित** (सं. वि.) शिक्षा केलेला.
**दंडिता** (पु.) शिक्षा करणारा.
**दडी देणें** लपून बसणें.
**दंडी** (सं. पु.) संन्यासी; द्वारपाल.
**दंडुका** (पु.) सोटा, वडगा.
**दंडुकेशाही** (स्त्री.) मारहाण किंवा जुलम करून अंमल गाजविण्याची पद्धति.
**दंडुक्या** (वि.) मार देणारा, दांडगा, जबरदस्त. [ सामर्थ्याचा दुरुपयोग.
**दंडेली** (स्त्री.) दांडगाई, जबरदस्ती; अन्याय;
**दणकट** (वि.) मजबूत, कणखर.
**दणका** (पु.) ठोसा, घाव; गडवड; दंगा.
**दणगट** (वि.) मजबूत. [ १।२७).
**दणगें** (प्रा. न.) कडकडाट (मोरो० कृष्ण०
**दणदणणें** (क्रि.) मोठा आवाज करणें; हदरणें. [सारखा होणारा आवाज.
**दणदणाट** (पु.) दणदण असा मोठा व एक-
**दणदणीत** (वि.) दणाणून सोडणारें; गडबडीनें युक्त; थाटाचें; उग्र, तीव्र.
**दणाणणें** (क्रि.) भयभीत होणें; गडबडणें.
**दणाणा** (पु.) पायांचा मोठा आवाज; वचक, भीति, दरारा. [करीत.
**दणादण** (अ.) पायांनीं मोठा आवाज
**दणावणें** (क्रि.) दबणें, नम्र होणें.
**दंत** (सं. पु.) दांत, सुळा; पर्वताचें शिखर.
**दंतकथा** (स्त्री.) तोंडातोंडीं चालत आलेली गोष्ट.
**दंतधावन** (सं. न.) दांत घासणें.
**दंतवैद्य** (सं. पु.) दांतासंबंधाचे रोग बरे करणारा किंवा नवे दांत बसविणारा वैद्य.
**दंतावळ** (प्रा. पु.) हत्ती. [दांतांची कवळी.
**दंतपंक्ति** (सं. स्त्री.) दांतांची रांग;
**दंतस्थान** ( सं. न.) व्याकरणांत लृ, त, थ, द, ध, न, ल आणि स या वर्णांचे उच्चार मुखाच्या ज्या स्थानापासून (दांतापासून) निघतात तें स्थान.

**दंताळा** (वि.) पुढें दांत असलेला.
**दंताळें** (न.) बीं पेरल्यानंतर वर माती लोटण्यासाठीं लांब दांतें असलेलें आऊत.
**दंती** (सं. पु.) हत्ती.
**दंतुर** (वि.) दंताळा पहा.
**दत्त** (सं. पु.) दिलेलें; दत्तक; (पु.) दत्तात्रेय; (न.) दैव; काम, धंदा. **दत्त म्हणून उभें**—अकल्पित रीतीनें येऊन उपस्थित झालेलें. [दत्तात्रेय.
**दत्त अवधूत** (वि.) उघडावंब; (पु.)
**दत्तक** (सं. वि.) पुत्रत्वाच्या रूपानें एखाद्याच्या मांडीवर दिलेला.
**दत्तजयंती** (सं. स्त्री.) मार्गशीर्ष शु० १५.
**दत्तपत्र** (सं. न.) दत्तक दिल्यासंबंधाचा दस्तऐवज. [विधि.
**दत्तविधान** (सं. न.) दत्तक घेण्याचा
**दत्तात्रय** (सं. दत्तात्रेय पु.) अत्रि ऋषीपासून अनसूयेच्या पोटीं झालेला ब्रह्मा, विष्णु व शंकर या देवांचा अवतार.
**दंत्य** (सं. वि.) दांतांच्या साह्यानें निघणारा (वर्णोच्चार).
**दंद** (प्रा. न. सं. द्वंद्व) द्वैतभाव; बाहुयुद्ध.
**दंदशूक** (सं. पु.) साप. [तोटा.
**ददात, दधात** (स्त्री.) वाण; उणीव;
**दंदिया** (प्रा. पु.) योद्धा.
**दंदी** (प्रा. पु.) वादी; द्वेषी.
**दद्रु** (सं. पु.) दाद नांवाचा त्वचारोग.
**दधि** (सं. न.) दहीं.
**दनुज** (सं. पु.) दानव, दैत्य, असुर.
**दन्ना** (वि.) दणाणलेला; गडवडीचा.
**दपटणें** (कि.) कोंबणें; दामटणें; धमकी देणें; जबरी करणें; गिळंकृत करणें.
**दपटगिरी** (फा. स्त्री.) जबरदस्ती, जुलूम.
**दपटशा, दपटशाही**(पु.) तंबी, धमकावणी, धाक.
**दंपती** (सं. पु.) नवराबायको.
**दप्तर** (अर. दफ्तर न.) कागदपत्र वगैरे; मुलांची पाटी, पुस्तकें इ० ठेवण्याची पिशवी.
**दप्तरदार** (फा. पु.) कचेरीच्या कागदपत्रांवरचा मुख्य अंमलदार.
**दफन** (अर. न.) प्रेत पुरण्याची क्रिया.
**दफा** (स्त्री.) कलम; अमुक वेळां असें दाखविणारा प्रत्यय.
**दफातें** (अर. न.) नोंदवही; हरएक गोष्टीची नोंद ठेवण्याची वही.
**दफाते** (अर. न.) सनदापत्रें नोंदण्याचें सदर; (वि.) इतर. [वन.
**दफीना** (अर. पु.) पुरलेलें द्रव्य, गुप्त
**दफे** (न.) प्रतिकार; शिक्षा; हटवणूक; अडवणूक. **द०करणें**—हाकलून देणें.
**दफेदार** (फा. पु.) स्वारांच्या पलटणींतला एक हुद्देदार; शिपायांवरचा अधिकारी.
**दफेरफे** (अर. दफारफा स्त्री.) कर्जाची फेड; सफाई.
**दफ्तर** (अर. न.) दप्तर पहा; कचेरी.
**दफ्तरखाना** (फा. पु.) कचेरी.
**दफ्तरबंद** (पु.) दप्तरांतले कागद नीट व्यवस्थेनें ठेवण्याचें काम ज्याचें असतें तो हलका अधिकारी.
**दफ्ती** (स्त्री.) पुष्टिपत्र. [नम्र होणें.
**दबकणें** (क्रि.) थांबणें; भिणें, स्तब्ध राहणें;
**दबकावणी** (स्त्री.) धमकी, भीति घालणें.
**दबकावणें** (क्रि.) धमकी देणें; भीति दाखविणें.
**दबडका, दबडगा, दबडघा** (पु.) गर्दी; पाहुणे वगैरे मंडळीचें वारंवार येणें-जाणें.
**दबडा** (पु.), **दबडें** (न.) तेल तूप इ० पातळ पदार्थ ठेवण्याची बुधली.
**दबणें** (क्रि.) दावले जाणें; भिणें; लपणें.
**दबदबा** (पु.) भय; दरारा; इभ्रत.
**दबदबीत** (वि.) मऊ, विलबिलीत; खूप भरलेलें; भिजून मऊ झालेली (जमीन, माती इत्यादि.)
**दबविणें** (क्रि.) दाबणें; धमकावणें.
**दबा** (पु.) आड लपून बसणें.
**दबाव** (हिं. पु.) धमकी; दडपादडपी; आदरयुक्त भीति.
**दबीर** (फा. पु.) डबीर, राजाचा चिटणीस.
**दबेल** (वि.) दबकून राहणारा; मिंधा, ओशाळा; भिडस्त.
**दब्ब** (अ.) फार भरल्यासारखें.
**दंभ** (सं. पु.) ढोंग, सोंग. [सारवान.
**दंभाशी, दंभासी** (पु.) उंट हाकणारा

**दंभी** (सं. वि.) ढोंगी, दांभिक; पोकळ.
**दम** (सं. पु.) इंद्रियनिग्रह; हिंमत, जोर; शक्ति; श्वास कोंडून धरण्याची शक्ति; झुरका. **दम खाणें**—विश्रांति घेणें; **दम धरणें**—थांबणें; **दम छाटणें**—श्वास कोंडून धरणें; **दम देणें** किंवा **भरणें**—धमकी देणें.
**दमछाट** (पु.) श्वास कोंडून धरण्याची शक्ति. **द० गोळा**—स्फोटक द्रव्य भरलेला गोळा, बाँब गोळा ; **द० तोफ**—दमछाट गोळा उडविण्याचें यंत्र किंवा उखळी.
**दमट** (वि.) आंबट ओलें; ओलसर.
**दमटणें** (क्रि.) ओलसर होणें.
**दमडी** (सं. द्रम्म स्त्री.) पैशाचा चौथा भाग. **दीड द० चा**—क्षुद्र, हलका.
**दमणें** (क्रि.) थकणें; भागणें.
**दमदमा** (अर. पु.) नौबत; तोफखाना.
**दमदमाट** (पु.) नगाऱ्याचा मोठा दुमदुम् आवाज; उग्र आणि मधुर सुवासाचा प्रसार.
**दमदार** (वि.) उत्साही; धीराचा; निश्चयाचा; दीर्घोद्योगी; द्रव्याची ऊब असलेला; दणगट, मजबूत.
**दमदिलासा** (हिं. पु.) धाकदपटशा.
**दमन** (सं. न.) संयमन; दाबून टाकणें, खोड मोडणें, रग जिरविणें; गाडीचा टप. (वि.) जिंकणारा.
**दमविणें** (क्रि.) जिंकणें, थकविणें.
**दमसर** (वि.) ओलसर, दमट.
**दमसूट** (अ.) प्रभातसमयीं.
**दमा** (पु.) श्वास रोग.
**दमादमानें** (अ.) सावकाश, थांबून, शांतपणानें.
**दमान** (फा. दामन न.) नौकानयन शास्त्रांत—शिडाचा दोरखंड; वाऱ्यासमोरची बाजू.
**दमाना** (फा. जमाना पु.) काळ.
**दमामा** (फा. पु.) मोठा नगारा; एक प्रकारची तोफ; कडाबीन.
**दमेकरी** (पु.) श्वासरोगानें पीडलेला.
**दया** (सं. स्त्री.) कृपा, मेहरबानगी.
**दयामय, दयावंत, दयावान्** (वि.) कृपाळु, दयाशील. [पाझर फुटलेला.
**दयार्द्र** (सं. वि.) अंतःकरणाला दयेचा
**दयाहीन** (सं. वि.) निर्दय, निष्ठुर.
**दयित** (सं. वि.) प्रिय.
**दयिता** (स्त्री.) प्रिय स्त्री.
**दर** (पु.) भाव; निरख; ठरीव प्रमाण; (स्त्री.) दरी; (सं. न.) भय; (फा. अ.) प्रत्येक; (सं. पु.) खांब; पुरण्यासाठीं केलेला खळगा; कांठ; किनारा; शंख.
**दरक** (अर. पु.) श्रेष्ठ अधिकार किंवा हुद्दा; आदरयुक्त भीति.
**दरकदार, दरखदार** (फा. पु.) वंशपरंपरागत मोठा सरकारी हुद्देदार. मराठेशाहींत हा शब्द पुढील आठ कामदारांना लावीत—१ कारभारी किंवा दिवाण; २ मुजुमदार; ३ फडणवीस; ४ सबनीस किंवा दप्तरदार; ५ कारखानीस; ६ चिटणीस; ७ जमादार; ८ पोतनीस.
**दरकपट्टी, दरखपट्टी** (स्त्री.) दरकदारावरचा कर; देशमुख देशपांडे वगैरेंच्या जमिनीवर दहा वर्षांनीं घेण्याचा एका वर्षाच्या उत्पन्नाइतका सरकारी कर.
**दरकार** (फा. स्त्री.) जरुरी; पर्वा.
**दर्किनार** (फा. अ.) बाजूस; एकीकडे.
**दरकुट, दरकुटा** (प्रा. स्त्री.) दरी.
**दरकुटें** (अर. अ. न.) दरक अथवा सरदारी यांबद्दल निंदाव्यंजक शब्द (देवनाथ पृ० ५६५).
**दरकूट** (प्रा. न.) दरें खोरें. [अर्ज.
**दरखास्त** (फा. दरख्वास्त स्त्री.) फिर्याद,
**दरखोती** (स्त्री.) करार; मक्ता.
**दरगा** (फा. दर्गाह पु.) मुसलमानांचें पवित्र स्थान.
**दरगाह** (फा. पु.) दरबार, हुजुर.
**दरगुजल** (हिं. स्त्री.) चालढकल.
**दरगुदर** (फा. पु.) कानाडोळा, क्षमा.
**दरज** (फा. दर्ज स्त्री.) भेग, चीर, फट.
**दरजगिरी** (फा. स्त्री.) चुन्याच्या भिंतींतल्या भेगा भरून काढणें.

**दरजी, दर्जी** (फा. पु.) कपडे शिवणारा; शिंपी.
**दरड** (स्त्री. न.) कड; नदीचें उंच तीर; डोंगराची तुटलेली बाजू.
**दरडाई, दरडावणी** (स्त्री.) धमकावणी.
**दरडाविणें** (क्रि.) धाक दाखविण्यासाठीं मोठ्यानें बोलणें. [ मर्म.
**दरद** (फा. दर्द पु. स्त्री.) रोग; काळजी;
**दरदगिरी** (स्त्री.) दरजगिरी पहा.
**दरदरणें** (क्रि.) फसफसणें; सपाटून घाम सुटणें. [ बाहेर आलेला.
**दरदरा, दरदरून** (अ.) फुटून जोरानें
**दरदाम** (पु.) भाव, किंमत.
**दरदी** (फा. वि.) काळजी घेणारा; माहितगार; मर्मज्ञ.
**दरबंदी** (स्त्री.) पिकांची आणेवारी; गांवाच्या वसुलाचें पत्रक.
**दरबार** (फा. पु.) राजसभा; सभाजन; गुजराथ व सौराष्ट्र यांमध्यें सरंजामशाहीतील एक मानाचें उपपद (सरदार).
**दरबारी** (फा. पु.) राजसभेंतला मनुष्य; (वि.) विशेष शिष्टाचाराचें.
**दरबारी कानडा** (पु.) एक राग.
**दरमहा** (फा. दरमाहा अ.) प्रत्येक महिन्यास; (वि.) मासिक.
**दरम्यान, दरमियान** (अ.) मध्यंतरीं; (पु.) मध्यस्थ, जमीन.
**दरवडा** (पु.) अनेकजणांमिळून केलेली धिटाईची चोरी; डाका. [ घालणारा.
**दरवडेकरी, दरवडेखोर** (पु.) दरवडा
**दरवळणें** (क्रि.) वास पसरणें.
**दरवाजा** (फा. पु.) दार, द्वार.
**दरवेश–शी** (फा. दरवेश पु.) फकीर; फिरता भिक्षेकरी; अस्वल इ० प्राण्यांच्या तमाशावर पोट भरणारा.
**दरसदे–द्दे** (फा. अ.) दर शेंकडा.
**दरा** (सं. पु. स्त्री.) पर्वतामधलें खोरें; पोट.
**दराखोरा** (पु.) डोंगरांतली अडचणींची जागा.
**दराज** (स्त्री.) लाकूड साफ करण्याचें यंत्र.
**दराठा** (पु.) आवेशयुक्त किंवा धमकावणीची भाषा.
**दरारा** (पु.) भीति, धास्ती, जरब.
**दरिद्र** (सं. दारिद्र्य न.) गरीबी.
**दरिद्रनाम संवत्सरे** (सं.) दरिद्रावस्था.
**दरिद्री** (सं. वि.) गरीब; क्षुद्र; कृपण.
**दरी** (स्त्री.) लहान दरा, खोरें; सतरंजी; भातशेतीच्या बांधानजीकचा केरकचरा.
**दरुणी (नी) महाल** (न.) विशेष अर्थ—सातारकर महाराजांच्या राहण्यास वस्त्रें, अलंकार, गांव, जमिनी, मोकासे, किंवा रोख पैसा दिलेला खर्ची लिहिण्याचें मराठी दप्तरांतलें सदर.
**दरुणी, दरुनी, दरुनीमहाल** (हिं. पु.) अंतःपुर.
**दरुवंकी** (फा. पु.) द्वारपाल.
**दरुशन** (सं. दर्शन न.) दर्शन; पाहणें.
**दरेमार** (प्रा. पु.) दरींत लोटून मारणें (दासबोध ३।७।६३).
**दरेस** (इं. ड्रेस पु.) पोशाख.
**दरोग** (फा. वि.) खोटा; बनावट.
**दरोगा** (फा. पु.) मजुरांवर देखरेख करणारा.
**दरोडा** (पु.) दरवडा पहा.
**दरोडेखोर** (पु.) दरोडा घालणाऱ्या टोळीपैकीं प्रत्येक. [ सर्व.
**दरोबस्त** (फा. अ.) एकूण एक; झाडून
**दर्ज** (फा. स्त्री.) चीर, भेग; फरक; (अ.) दाखल. [ बुजविणें.
**दर्जगिरी** (फा. स्त्री.) भिंतींतल्या भेगा
**दर्जा** (अर. पु.) अधिकार, योग्यता; पदवी.
**दर्जी** (फा. पु.) शिंपी.
**दर्द, दर्दी, दर्बार** इत्यादि शब्दांसाठीं दरद, दरदी, दरबार इत्यादि शब्द पहा.
**दर्दुर** (सं. पु.) बेडूक; मेघ.
**दर्प** (सं. पु.) गर्व; धाडस; उग्र वास; दरारा.
**दर्पण** (सं. पु.) आरसा.
**दर्पोक्ति** (स्त्री.) गर्विष्ठ भाषा.
**दर्भ** (सं. पु.) एक प्रकारचें गवत.
**दर्भ्या** (पु.) कारटा; दुर्दैवी प्राणी.
**दर्या, दर्याव** (फा. दर्या पु.) समुद्र, नदी; जलाशय. **दर्यास खसखस**—खिजगणतींत न येणारा.

**दर्याफ्त, दर्यापत, दर्याफ्ती** (फा. स्त्री.) चौकशी; विचार.

**दर्यावर्दी** (फा. पु.) खलाशी, नावाडी.

**दर्श** (सं. पु. न.) अमावास्या; त्या दिवशींचें श्राद्ध.

**दर्शक** (सं. वि.) दाखविणारें; (न.) चिन्ह, लक्षण. **द० सर्वनाम**—(व्याक०) अमुक वस्तु जवळ किंवा दूर आहे तें दाखविणारें सर्वनाम.

**दर्शन** (सं. न.) अवलोकन ; तत्त्वज्ञान; पुढचा भाग; ठळक सहा दर्शनांचीं नांवें :—सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा व उत्तरमीमांसा (वेदांत); याशिवाय बौद्ध, जैन इत्यादि मतांच्या ग्रंथांचाही समावेश दर्शन शब्दांत करण्यांत येतो.

**दर्शनपट्टी** (स्त्री.) शोभेसाठीं दाराच्या वर बसविलेली नक्षीदार लाकडाची पट्टी.

**दर्शनानुशासन शास्त्र** (सं. न.) प्रकाशशास्त्र.

**दर्शनी** (सं. वि.) बाहेरचें; दिखाऊ. **द० हुंडी**—हुंडी पाहतांच तिची रक्कम दिली पाहिजे अशी हुंडी; **द० अंग**—शोभिवंत बाजू.

**दर्शनीय** (सं. वि.) पाहण्यालायक, प्रेक्षणीय.

**दर्शनेंद्रिय** (सं. न.) नेत्र, डोळा.

**दर्शयिता** (सं. वि.) दाखविणारा.

**दर्शविणें** (क्रि.) दाखविणें; सूचित करणें.

**दर्शी** (सं. वि.) पाहणारा; दाखविणारा.

**दल** (सं. पु.) पान; दळ; अर्धा भाग; सैन्य.

**दलणें** (प्रा. क्रि.) द्वेष करणें.

**दलदल** (हि. स्त्री.) रुपण, रेवण, चिखलाची किंवा पाणथळ जमीन.

**दलन** (सं. न.) दळणें, चुराडा करणें.

**दलबादल** (हिं. न.) प्रचंड सेनासमूह; (वि.) प्रचंड.

**दलभद्रचा** (वि.) बुळकट; दुर्दैवी.

**दलभार** (सं. पु.) सर्व सैन्य; बळ, शक्ति.

**दलान** (फा. न.) दिवाणखाना.

**दलामालकी** (स्त्री.) फाजीलपणाची लुडबुड; बारीकसारीक त्रास.

**दलाल** (अर. पु.) मध्यस्थ, अडत्या.

**दलाली** (अर. स्त्री.) दलालाचा धंदा; त्याची मजुरी.

**दलित** (सं. वि.) तुडविलेलें; चुरडलेलें; मोडलेलें; (इं.) डिप्रेस्ड क्लासेस यास प्रतिशब्द.

**दव** (सं. पु.) वणवा, दावानल; अरण्य, वन.

**दंव** (न.) हिम, तुषार, दहिंवर.

**दवड** (स्त्री.) धाव, दौड.

**दवडणें** (क्रि.) धावणें; पळणें; सोडणें.

**दवडादवडी** (प्रा. स्त्री.) धावपळ.

**दवंडी** (स्त्री.) दौंडी; डांगोरा, प्रसिद्धि.

**दवणा** (सं. दमनक पु.) एक सुवासिक वनस्पति.

**दवणा, दवा** (पु.) गुरांचा दलाल; नायकीणींच्या पाठीमागें वाद्यें वाजविणारा.

**दवणें** (न.) गांडूळ.

**दवदव** (स्त्री.) दगदग; परिश्रम.

**दवलत** दौलत पहा.

**दवा** (अर. स्त्री.) औषध.

**दवाखाना** (फा. पु.) औषधालय.

**दवाग्नि** (सं. पु.) वणवा.

**दवादवी** (फा. पु.) आचारी.

**दवासन** (फा. न.) घोड्याच्या गळयास बांधावयाची दोरी.

**दंश** (सं. डंख पु.) चावा; नांगी मारणें.

**दश** (सं. वि.) दहा.

**दशक** (सं. न.) दहांचा समुदाय.

**दंशक** (वि.) डसणारा.

**दशकंठ, दशकंधर** (सं. पु.) रावण.

**दशकु** (पु.) आवरणाग्नि.

**दशग्रंथी** (सं. वि.) ऋग्वेदाचे दहा ग्रंथ (म्हणजे संहिता, ब्राह्मण, आरण्यक, शिक्षा, कल्प, व्याकरण, निघंटु, निरुक्त, छंद व ज्योतिष हे) पढलेला, पढीक.

**दशग्रीव** (सं. पु.) रावण.

**दशदानें** (सं. न. अने.) गाय, जमीन, तीळ, सोनें, तूप, वस्त्र, धान्य, गूळ, मीठ व घर यांचें दान.

**दशदिशा** (सं. स्त्री.) पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या चार मुख्य दिशा, ईशान्य, आग्नेय, नैर्ऋत्य व वायव्य या चार उपदिशा, व ऊर्ध्व आणि अधोदिशा मिळून दहा दिशा.

**दशदिशा** (अ.) सर्व बाजूंस.
**दशन** (सं. पु.) दांत.
**दंशन** (सं. न.) दंश करणें. [ देवी.
**दशभुजी** (सं. स्त्री.) दहा भुजांची दुर्गा-
**दशम** (सं. वि.) दहावा.
**दशमग्रह** (सं. पु.) विनोदानें—जावई.
**दशम द्वार** (सं. न.) ब्रह्मरंध्र.
**दशमी** (सं. स्त्री.) दहावी तिथि; दुधांत पीठ भिजवून केलेली पोळी; (वि.) दहावी.
**दशमुख** (सं. पु.) रावण. [ मुळया.
**दशमूळ** (सं. दशमूल न.) दहा वनस्पतींच्या
**दशमौळी** (सं. दशमौली पु.) रावण.
**दशहरा** (पु.) दशाहारा पहा.
**दशा** (सं. स्त्री.) स्थिति, अवस्था; वस्त्राच्या टोकाचीं सुतें; मनुष्याला सुखदुःख-दायक जन्मकालीन ग्रहांची स्थिति.
**दशानन** (सं. पु.) रावण.
**दशावतार** (सं. पु.) मत्स्य, कच्छ, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध व कलंकी हे विष्णूचे दहा अवतार.
**दशावतारी गंजिफा** ज्यांत विष्णूच्या दशावतारांचीं चित्रें किंवा चिन्हें काढलीं असतात अशा प्रकारच्या खेळण्याच्या गंजिफा.
**दशांश** (सं. पु.) दहावा हिस्सा.
**दशांश अपूर्णांक** (अंकगणितांत) दहा किंवा त्याचा कोणतातरी घात ज्या अपूर्णांकाचा छेद असतो तो.
**दशांश चिन्ह** (सं. न.) अमुक संख्या दशांश अपूर्णांक आहे हें दाखविण्या-साठीं त्या अपूर्णांकाच्या मागें केलेलें (·) असें चिन्ह.
**दशाश्व** (सं. पु.) चंद्र.
**दशाश्वमेध** (सं. पु.) श्रीक्षेत्र काशी येथील एक तीर्थ. [ काळ.
**दशाह** (सं. पु.) सुतकाच्या दहा दिवसांचा
**दशाहारा** (सं. पु.) ज्येष्ठ शु. १ पासून दहा दिवस होणारा गंगोत्सव.
**दशाक्षय** (सं. पु.) नवग्रहांच्या दशेची समाप्ति.
**शी** (सं. दशा स्त्री.) वस्त्राचीं न विण-लेलीं शेवटचीं सुतें; दशा; दहा दिवस सुतक धरावें असा संबंध.
**दंशी** (सं. वि.) मनांत द्वेष धरणारा.
**दशेंद्रियें** (सं. न. अने.) पांच ज्ञानेंद्रियें (डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा) आणि पांच कर्मेंद्रियें (हात, पाय, वाणी, गुद व उपस्थ) मिळून होणारीं दहा इंद्रियें.
**दस** (सं. दश वि.) दहा.
**दसक** (सं. दशक न.) दहांचा गट किंवा समुदाय; समाप्ति. [ निशाणी.
**दसकत** (हिं. दस्तखत न.) हस्ताक्षर; सही;
**दसडी** (स्त्री.) वस्त्राची दशी.
**दसनहाण** (न.) विवाहानंतर दहाव्या दिवशीं वधूवरांस एकत्र स्नान घालतात तें.
**दसनामा** (पु.) पंचांमार्फत चौकशी.
**दसपिंड** (सं. दशपिंड पु.) मृताला मरणा-पासून दहा दिवसपर्यंत रोज पिंड देतात ते.
**दसप्यादा** (पु.) फाशांच्या खेळांत दोन फाशांवर प्रत्येकीं ५ व एकावर १ असें दान येतें तें.
**दसरंग** (पु.) कुस्तींतला एक डाव. [दशमी).
**दसरा** (पु.) आश्विन शु. १० (विजया-
**दसरात पंचरात** (स्त्री.) एक प्रकारचें दिव्य (यांत फिर्याद दिल्यानंतर दहापांच दिवसांत फिर्यादीचीं मुलें किंवा गुरें ढोरें मेलीं तर त्याची फिर्याद खोटी, व न मेलीं तर खरी समजून चौकशी कर-ण्यांत येई).
**दसाडें** (न.) जाडेंभरडें कापड.
**दसोडी** (स्त्री.) वस्त्राची दशी.
**दस्कला** (अर. पु.) चामड्याचा बंद.
**दस्त** (फा. पु. न.) सत्ता; अधिकार; हात; सारा; जुलाब; शेला, दुपेटा; कैद. **दस्त करणें**—जिवंत धरणें.
**दस्तअमल** (अर. पु.) गांवचा वसूल.
**दस्तऐवज** (फा. दस्तआवेज पु.) लेख, हातचा कागद. [ करण्याविषयींचें पत्र.
**दस्तक** (फा. न.) परवाना; जकात माफ
**दस्तखत** (फा. स्त्री.) सही, निशाणी.
**दस्तगिरी** (फा. स्त्री.) मदत.

**दस्तन** (फा. स्त्री.) मराठयांच्या फौजेंत ११ शिपायांची एक कुंपीन, १०० कुंपिनींची एक पलटण, ११ पलटणींचा एक कंपू व ११ कंपूंची एक दस्तन होत असे.
**दस्तनी** (फा. स्त्री.) मुठीची दोरी.
**दस्तपंजा** (फा. पु.) अभयहस्त.
**दस्तपाशी, दस्तपेशी** (फा. पु.) हस्तस्पर्श.
**दस्तमाल** (फा. पु.) भुजवस्त्र.
**दस्ताकी** (फा. स्त्री.) शिलक. [ रुमाल.
**दस्तरुमाल** (फा. पु.) खिशांत ठेवण्याचा
**दस्ता** (फा. पु.) २४ कागदांची गड्डी; बंदुकीच्या मागचा भाग; वत्ता; सैन्याची तुकडी.
**दस्ताना** (फा. पु.) धनुष्याच्या दोरीचा आघात हातास लागूं नये म्हणून हातांत घालावयाचा लोखंडी हातमोजा.
**दस्तार** (फा. स्त्री.) पागोटें.
**दस्तावेज** दस्तऐवज पहा.
**दस्ती** (फा. स्त्री.) चाल; पद्धत; ऐट; लक्षण; कुस्तीच्या प्रारंभींची सलामी; दसऱ्याचा नजराणा; (वि.) कर बसविण्यास पात्र.
**दस्तुर** (फ़ा. पु.) पारशी लोकांतला मोठा धर्मशास्त्रज्ञ; वहिवाट, नियम.
**दस्तूर** (अर. पु. न.) लिहिणाराची निशाणी; सही; लेख; रीत; वहिवाट; नियम; कर.
**दस्तूरखुद** स्वतःच्या हातचें लिहिलेलें.
**दस्तुरी** (स्त्री.) मजुरांना काम मिळवून देण्याबद्दल घेतलेली अडत; कर; जकात; रस्तापट्टी; नाकेंपट्टी; ओझें; सामानसुमान.
**दस्तेकरी** (फा. पु.) विड्यांचीं पानें संभाळून वागविणारा नोकर.
**दस्तैवज** (फा. पु.) प्रमाणपत्र; हक्कपत्र.
**दहक** (सं. दशक पु.) शें० १० चा दर; दहावा हिस्सा.
**दहन** (सं. न.) अग्निसंस्कार; जाळणें.
**दहनीय** (सं. वि.) जाळण्यास योग्य.
**दहं** (सं. दश पु.) संख्येच्या मांडणींत उजवीकडून डावीकडे दुसरें स्थान.
**दहूल, दहल्या** (पु.) पत्त्यांतलें दहा ठिपक्यांचें पान.
**दहशत** (फा. स्त्री.) धास्ती, भीति; धाक.
**दहशतवाद** (पु.) हिंसात्मक मार्गानें सत्ता मिळविण्याचा पंथ.
**दहा** (सं. दश वि.) १०. [ रागीट.
**दहाट** (वि.) तल्लख, चपळ; उत्साही; तापट;
**दहिवर** (न.) दंव, हिम.
**दहिवरणें** (क्रि.) दंवाच्या थेंबांनीं भरून जाणें.
**दहीं** (सं. न.) विरजलेलें दूध; दधि. **दहीं खाऊं कीं मही खाऊं**–मनाची संदिग्धावस्था.
**दहींकाला** (पु.) उत्सवाचे अखेरचे दिवशीं मातीच्या हंडींत दहीं व जोंधळयाच्या लाह्या घालून ती हंडी टांगतात व मग ती फोडून त्यांतला हातीं लागलेला भाग देवाचा प्रसाद म्हणून खातात तो.
**दळ** (सं. न.) अर्धा भाग; पान; सैन्य; ओंव्याची पूड; गीर; जाडी. [ नांव.
**दळखुंट** (पु.) हातमागाच्या एका भागाचें
**दळण** (न.) दळण्यासाठीं घातलेलें धान्य; दळण्याची क्रिया; रेंगाळत केलें जाणारें काम; (प्रा.) आचरण (तुका० १६०); परिचय; समागम.
**दळणकांडण** (न.) घरगुती कामें.
**दळणवळण** (न.) व्यवहार, परिचय; जाणेंयेणें.
**दळदार** (वि.) जाड; सत्वांशयुक्त.
**दळप** (न.) दळण; दळणवळण; दळण्याबद्दलची मजुरी.
**दळभद्र्या** (वि.) भित्रा; दुर्दैवी. [ पायदळ.
**दळभार** (सं. दलभार पु.) सैन्य; शक्ति,
**दळवट, दळवटा** (प्रा. पु.) समुदाय; वरदळ; पुष्कळांशीं संबंध (दा० १९।१०।७).
**दळवी, दळवयी, दळवै** (प्रा. पु.) सेनापति (दासो० गीता० १।३३५).
**दळवाडें** (प्रा. न.) समुदाय, सैन्य (ज्ञा० ५।७८); मोठी शिळा (ज्ञा० १८।३७); स्वरूप; आकार (ज्ञा० १३।२१३).
**दळा** (पु.) जमिनीचा तुकडा.
**दळिद्र** (न.) दारिद्र्य.

**दळिया** (पु.) गव्हाचा रवा, तूप, साखर इ० घालून केलेले लाडू.
**दळुबाई** (स्त्री.) रडद्या; भित्रा.
**दळें** (प्रा. न.) तलवारीचें म्यान.
**दळ्या** (वि.) रडद्या; कामास सर्वथा अपात्र; (पु.) दळिया पहा.
**दक्ष** (सं. वि.) हुशार, सावध; योग्य; (पु.) पार्वतीचा बाप.
**दक्षिण** (सं. वि.) उजवा; हुशार; उदार; अनुकूल; (स्त्री.) दक्षिण दिशा. **दक्षिण दरवाजा**—यमलोकाचें द्वार; तुरुंग.
**दक्षिणा** (सं. स्त्री.) ब्राह्मणास दिलेलें द्रव्य.
**दक्षिणाचार** (सं. पु.) शाक्तांचा एक संप्रदाय.
**दक्षिणापथ** (सं. न.) दक्षिण देश, दख्खन.
**दक्षिणायन** (सं. न.) कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांतीपर्यंतचा काळ; विषुववरेषे-पासून दक्षिणेकडे सूर्याचें जाणें.
**दक्षिणावर्त शंख** (सं. पु.) ज्याचें वळण दक्षिणाकृति असून शरीरावर भोंवरे आहेत असा शंख.
**दा, दां** आवृत्ति दाखविणारा प्रत्यय. जसें हजारदां, कितीदां इ०; दादा याचा संक्षेप. जसें :—केशवदा—केशवदादा.
**दाइमी** (स्त्री.) कायमची देणगी.
**दाई** (हिं. दाई फा. दाया स्त्री.) उपमाता, प्रसूतिसमयीं बाळंतिणीची सुटका करणारी कुशल स्त्री.
**दाईज** (सं. दायाद पु.) नात्यागोत्याचा मनुष्य; वारसाचा हक्क असलेला; अशुभ चिंतणारा; मत्सरी मनुष्य.
**दाईम** (अर. वि.) कायमचें, सतत चालणारें.
**दाऊदखानी** (वि.) एक प्रकारचा गहूं; एक विशिष्ट प्रकारचा हार; माळ.
**दाखल** (अर. वि.) येऊन पोंचलेला; (अ.) बद्दल, ऐवजीं; सारखा.
**दाखला** (पु.) उदाहरण; प्रत्यक्ष अनुभव; पुरावा, सर्टिफिकीट. [ समजावून देणें.
**दाखविणें** (क्रि.) प्रत्ययास आणणें;
**दांग** (न.) वन, अरण्य; डोंगराळ प्रदेश.
**दांगट** (न.) डोंगरांतील चोरवाट; (पु.) एक जात.
**दाग** (प्रा. पु.) दहन.
**दागदार** (पु.) मस्त हत्तीजवळ घोडा नेणारा स्वार.
**दागडुजी** (स्त्री.) डागडुजी पहा.
**दागिना** (पु.) डागिना पहा.
**दांगा** (प्रा. पु.) नूतन पल्लव.
**दांगाणा** (प्रा. न.) अरण्य.
**दाघ** (प्रा. पु.) दाह.
**दाजी** (पु.) एकाद्याच्या नांवापुढें जोडा-वयाचा आदरवाचक शब्द. जसें—शंकरदाजी; वडील दीर. [२१३३).
**दाट** (वि.) घट्ट; घन; (अ.) वळेंच. (तुका०
**दाटका** (वि.) थोडा.
**दाटणी** (प्रा. स्त्री.) गर्दी; दडपण.
**दाटणें** (क्रि.) घट्ट होणें; गर्दी करणें; भरून येणें; रागें भरणें; दाबणें; अडकविणें.
**दाटा** (फा. पु.) भीति दाखविणें.
**दाटी** (स्त्री.) गर्दी; भीड; खेंच.
**दाटुगें** (प्रा. वि.) दांडगें; मोठें.
**दाटून** (अ.) मुद्दाम; वळेंच; आग्रहानें.
**दाठरणें** (क्रि.) घट्ट किंवा निबर होणें.
**दांड** (सं. पु.) लांब काठी; ताठरपणा; एकेक मोतीं; (वि.) दांडगा; माजोरी.
**दांडका** (पु.) दांडकें; (न.) दांडू; सोडगा.
**दांडगा** (वि.) वळकट; उमट. [ चेष्टा.
**दांडगाई** (स्त्री.) मस्ती; दांडगेपणाच्या
**दांडगेला** (वि.) कांहींसा दांडगा.
**दांडदपट** (स्त्री.) धाकदपटशा.
**दांडपट्टा** (पु.) मर्दुमकीचा एक खेळ.
**दांडमेंड** (स्त्री.) हद्द, सीमा.
**दांडळ** (स्त्री.) चाळ, वराक.
**दांडळणें** (क्रि.) युक्तीनें फसविणें.
**दांडा** (पु.) यंत्र फिरविण्यासाठीं मूठ बसविलेली काठी; सोडगा; पाट वगैरेचें पाणी जमिनींत जिरूं नये म्हणून जमि-नीपासून केलेली उंच बंदिस्त; पाठीचा कणा.
**दांडाईत** (वि.) आडदांड, दांडगा.
**दांडापेंडोळा** (पु.) ओळख, परिचय.
**दांडारा** (पु.) पाठीचा कणा; पानाचा मधला दांडा; नाकाचा दांडा.

**दांडी**(प्रा. स्त्री.) पुच्छ (विठ्ठल-सीता- स्व० ६।१६); वीणा.
**दांडी** (स्त्रीं.) काठी; पालखीच्या वर वाकविलेली व मागें आणि पुढें सरळ अशा आकृतीची काठी असते ती; वासा; सोट; पैशावरची सरळ रेघ; समुद्रांत गेलेली जमिनीची अरुंद पट्टी; मोठी व लांबवर पसरलेली लाट.
**दांडू** (पु.) विटीदांडूच्या खेळांत विटी उडविण्याची काठी.
**दांडूक** (न.) लहान सोटा.
**दांडेकरी** (पु.) दांडा हातीं धरणारा, महार.
**दांडे पूर्णिमा** (स्त्री.) होळीचा दांडा पुरतात तो दिवस, माघ शु० १५.
**दांडोरा** (पु.) दौंडी, डंका.
**दांडोली** (स्त्री.) दौंडी.
**दांडोळ, दांडोळी** (स्त्री.) ओळ; रांग.
**दांडोळा** (पु.) पानाचा मधला दांडा.
**दाढ** (सं. दाढा स्त्री.) दांताच्या कवळींतले शेवटचे मोठे दांत; भाजलेली जमीन; त्या जमिनींत होणारें भाताचें रोप.
**दाढरणें** (क्रि.) फळ, गळूं इ० न पिकतां टणक होणें.
**दाढा** (प्रा. वि.) धीट; पराक्रमी.
**दाढी** (सं. स्त्री.) हनुवटीवरचे केस. **दाढी धरणें**—विनवणी करणें.
**दाणा** (पु.) धान्य; धान्याचा कण; त्यासारखी आकृति; एकेक मोतीं; उत्तम गुणवान् पुरुष.
**दाणागोटा** (पु.) धान्य वगैरे.
**दाणादाण** (स्त्री.) पांगापांग; वाताहत पांगणी. [ नष्ट
**दाणादीन** (प्रा. वि.) धुळधाण झालेला,
**दाणापाणी** (न.) निर्वाहाचें साधन; पोट भरणें.
**दाणी** (पु.) धान्यावरील कर वसूल करणारा अधिकारी; सळई; पात्र; उपकरण; आलय या अर्थाचा फारसी प्रत्यय. उदा० अत्तरदाणी, गुलाबदाणी.
**दाणेआळी** (स्त्री.) धान्याच्या दुकानांची पट्टी.
**दाणकरी** (पु.) मराठ्यांच्या सैन्यात घोड्यांच्या पागेला दाणा पुरविणारा अधिकारी.
**दाणेदार** (वि.) कणीदार.
**दांत** (सं. पु.) दंत. **दांत किटविणें**—अतिशय याचना करणें; **दांत काढणें,** किंवा **दाखविणें**—उपहासबुद्धीनें हंसणें; **दांत कोरून पोट भरणें**—बारीकसारीक गोष्टींत देखील काटकसर करणें; **दांत खाणें**—द्वेषबुद्धि धरणें; **दांत ठेवणें, बाळगणें** किंवा **राखणें**—द्वेष करणें; **दांत पडणें**—फजिती होणें; **दांत पाडणें**—रग जिरविणें, फजिती करणें; **दांताच्या कण्या करणें**—वारंवार बोलून बोलून थकणें; बोलण्याची शिकस्त करणें; **दांतांस दांत लावून बसणें**—उपास करणें, कांहीं न खाणें; **दांतीं तृण धरणें**—नम्र होऊन शरण जाणें; **खाण्याचे दांत वेगळे, दाखवावयाचे दांत वेगळे**—दांभिकता, कपट.
**दात** (पु.) दंश; द्वेष.
**दांतकसळ, दांतकसळी, दांतकसाळी** (प्रा. स्त्री.) दांत खाणें; शिव्याशाप देणें; अनिष्टसूचक भाषण (तुका० १९४१).
**दांतखिळी, दांतखीळ** (स्त्री.) **बसणें** तोंड उघडतां न येणें.
**दांतरखिंड** (स्त्री.) मधलेच कांहीं दांत पडल्यानें होणारी खिंड.
**दांतरा** (सं. दंतुर वि.) दांत पुढें असलेला.
**दांतरी** (स्त्री.) म्हातारपणीं उगवलेला दांत; मधूनमधून दांते मोडलेली फणी.
**दांतवण** (न.) दांत घांसण्याची काडी किंवा चूर्ण, दंतमंजन.
**दांतवलें** (प्रा. वि.) दांतांचें केलेलें, हस्तिदंती; (न.) एक हस्तिदंती अलंकार.
**दांतळी** (स्त्री.) शिंकाळी.
**दाता** (सं. वि.) देणारा; उदार; दानशील.
**दांता** (पु.) दांताच्या आकाराचा यंत्राचा भाग. [ तिरस्कारार्थी
**दांताड** (न.) दांतांचा समुदाय; उदार-
**दातार** (वि.) दाता, धनी. [ बसविणें.
**दांताविणें** (क्रि.) दांतओठ चावणें; दांते

**दांताळ** (वि.) पुढें दांत आलेला.
**दांताळपुरी** (स्त्री.) दांत, दंतपंक्ति.
**दांताळा** (सं. दंतावलि स्त्री.) दंतपंक्ति.
**दांताळें** (न.) फणीसारखें दांतें असलेलें शेतकीचें एक आऊत.
**दांतिरें** (प्रा. वि.) दांताळ. [ दांत.
**दांतरडी** (स्त्री.) दांत; नवा निघालेला
**दातृत्व** (सं. न.) उदारपणा; दानशूरता.
**दांतोरी** (प्रा. स्त्री.) दांत.
**दांतोरें** (प्रा. न.) दांताडें; दांत.
**दाथर** (प्रा. स्त्री. न.) मोदक उकडतेवेळीं भांड्यांत गवत वगैरेची भर घालतात ती; उकाडा.
**दाथरी** (स्त्री.) आच्छादन (दादरा पहा).
**दाद** (फा. स्त्री.) तक्रार, न्याय; (सं. दद्रु स्त्री.) एक त्वग्रोग. [ऐकण्याच्या जागा.
**दादमहाल** (फा. पु.) लोकांच्या तक्रारी
**दादर** (पु.) लाकडी जिना; जिन्याच्या वरचें (जिना बंद करण्याचें) दार; (न.) गजकर्ण; शरिरावर उठणारा दाट पुरळ.
**दादरा** (पु.) भांड्याचें तोंड बंद करण्यासाठीं बांधलेलें वस्त्र; गायनांतला एक ताल.
**दादला, दादुला** (पु.) नवरा.
**दादा** (पु.) वडील भाऊ किंवा कोणीहि मोठा मनुष्य यांजविषयीं आदरयुक्त संज्ञा. [ आर्जव करणें.
**दादापुता दादाबाबा करणें** गोड बोलणें;
**दादुला** (पु.) नवरा, दादला.
**दादूपंथी** (पु.) दादू नांवाच्या साधूच्या शिष्यसंप्रदायांतला.
**दान** (सं. न.) देणें; धर्मार्थ देणें; खेळांत पडलेला डाव; हत्तीचा मद.
**दानत** (अर. स्त्री.) शील, सद्वर्तन; उदारता.
**दानधर्म** (सं. पु.) धर्मकृत्य; परोपकारार्थ केलेला द्रव्यव्यय.
**दानपत्र** (सं. न.) देणगीपत्र; देणगीखत.
**दानव** (सं. पु.) असुर; दैत्य. [ उत्साही.
**दानवीर–शूर** (सं. वि.) दानाच्या कामीं
**दानशील** (सं. वि.) दान–धर्माकडे प्रवृत्ति असलेला.
**दानशूर** (सं. वि.) दानधर्म करण्यांत सढळ.
**दाना** (वि.) शहाणा; सूज्ञ; चतुर.
**दानाई** (स्त्री.) अक्कल; शहाणपणा; सूज्ञपणा.
**दानाध्यक्ष** (सं. वि.) दानधर्म खात्यावरील मुख्य अधिकारी.
**दानी** (सं. वि.) देणारा, उदार.
**दापणें** (प्रा. क्रि.) दटावणें; दावणें (वामन-राधाविलास ४); देवविणें.
**दांपत्य** (सं. न.) पतिपत्नीसंबंध; जोडपें.
**दापित** (वि.) शिक्षा दिलेला.
**दाब** (हिं. पु.) दडपण; वजन; दवकावणी; धाक; रुबाब; कमरपट्टा (मोरो० कृष्ण० ३।६).
**दाबणें** (क्रि.) दडपणें; धमकावणें; गुप्त ठेवणें; गिळंकृत किंवा गट्ट करणें.
**दाबखीळ** (स्त्री.) चाप; जी दाबली असतां दार वगैरे उघडतें किंवा लागतें अशी खुंटी. [ करवून घेणें.
**दांबडणें** (क्रि.) दामटणें, सक्त मेहनत
**दाबदडप** (स्त्री.) धमकावण्या, दंडेली इ० उपायांनीं एखाद्याला दडपून टाकण्याचा यत्न. [ दाबून टाकणें.
**दाबदुबी** (स्त्री.) सामदामादि उपायांनीं
**दाबाडणें** (क्रि.) दाबणें; छपविणें; धमकावणें.
**दाबेखीळ** (स्त्री.) दाबखीळ पहा.
**दाभण** (पु.) मोठी सुई.
**दाभणकांठी** (वि.) दाभणासारख्या अरुंद किनारीचें (धोतर).
**दांभाड** (न.) जबडा.
**दांभिक** (सं. वि.) ढोंगी.
**दांभोटा** (फा. पु.) घोड्याच्या पायाच्या घोट्यावरील आच्छादन.
**दाम** (हिं. पु.) पैसा; किंमत; आण्याचा तिसावा हिस्सा; (सं. न.) दावें; पुष्पमाला.
**दामचुंबक, दामजोड, दामजोड्या** (पु.) कृपणपणा करून पैशाशीं पैसा जोडणारा. [ अंधारी, झापड.
**दामट** (वि.) दमट, ओलसर; (स्त्री.)
**दामटणें** (क्रि.) वेगानें हाकलणें; वापरणें.

**दामटी** (स्त्री.) लहान पातळ भाकर; गोवरी; चपटा पैसा; चापट वस्तु.
**दामदुप्पट** (स्त्री.) व्याजासहित झालेली मूळ भांडवलाच्या दुप्पट रक्कम.
**दामनगीर** (फा. पु.) दावेदार, हक्कदार.
**दामाजीपंत** (पु.) पैसा.
**दामाशाई** (हिं. स्त्री.) बुडत्या कुळाच्या सावकाराला त्यांच्या कर्जाच्या मानानें कमजास्त रकमेची वांटणी मिळते ती.
**दामिनी** (सं. स्त्री.) विद्युत्.
**दामी** (हिं. स्त्री.) कराची आकारणी.
**दामोका** (प्रा. पु.) बाभळीच्या शेंगेंतला दाणा; पैसा (भा० ५।१५९).
**दामोदर** (प्रा. न.) रत्नखचित मंदिर (राम० २०।१२); (वि.) गर्भश्रीमंत.
**दामोदर** (सं. पु.) श्रीकृष्ण. [ मिळकत.
**दाय** (सं. पु.) वारसांना वांटून द्यावयाची
**दायक** (सं. वि.) देणारा.
**दायभाग** (सं. पु.) मृत माणसाच्या जिंदगीची वारसांत वांटणी.
**दायरा** (अर. पु.) एक वाद्य; मुसलमानांची स्मशानभूमि.
**दायाद** (सं. पु.) वारस; भाऊबंद; वांटेकरी.
**दायी** (वि. समासांत उत्तरपदीं) देणारें.
**दार** (न.) द्वार; (वि.) ऐपतवाला; (पु.) भार्या.
**दारकस** (न.) कुसूं.
**दारग्रहण** (न.), **दारपरिग्रह** (पु.) विवाह.
**दारफळणी** (स्त्री.) ओसाड घर; दाराला कुलूप लागणें; दिवाळें वाजणें; सत्यानाश; निर्वंश.
**दारमदार** (पु.) करार.
**दारवंट** (प्रा. पु.) वेस; उंबरठा.
**दारवटा-वठा-वंठा** (पु.) उंबरठा; त्याच्या जवळची किंवा खालची जमीन; दारावरचा माथा; कपाळपट्टी.
**दारवठेकारू** (प्रा. वि.) उंबरठा झिजविणारा.
**दाया** (हिं. पु.) दावा; वैर.
**दारशिणा** (सं. दंतशाण पु.) दंतमंजन.
**दारा** (सं. स्त्री.) बायको, पत्नी.
**दारासुत** (सं. पु.) स्त्रीसुत.
**वाराढच** (प्रा. न.) दृढपणा.
**दारिवठा** (प्रा. पु.) दरवाजा.
**दारिद्र्य** (सं. न.) गरीबी.
**दारु** (सं. पु.) काष्ठ, लाकूड.
**दारुकायंत्र** (प्रा. न.) लाकडाची बाहुली.
**दारुड्या** (वि.) अतिशय दारू पिणारा.
**दारुण** (सं. वि.) भयंकर, घोर.
**दारू** (फा. स्त्री.) मद्य, सुरा; औषध; बंदुकीची वगैरे बारुद.
**दारूकाम** (न.) दारू आंत घालून बनविलेल्या नळे, चंद्रज्योती, बाण इ० वस्तु.
**दारूगोळा** (पु.) युद्धांत उपयोगीं पडणारें दारू, तोफेचे गोळे इ० सामान.
**दारूबंदी** (स्त्री.) दारू पिण्याविषयीं सरकारची मनाई.
**दारूबाज** (हिं. वि.) मद्यपी.
**दार्ढ्य** (सं. न.) दृढता; खंबीरपणा.
**दारें** (न.) लहान छिद्र.
**दार्शनिक** (सं. पु.) दर्शनशास्त्रज्ञ; (वि.) दर्शनविषयक. [ किनार.
**दाल** (फा. पु.) रेशमीकांठ, मगजी;
**दालचिनी** (स्त्री.) एक औषध.
**दालन** (फा. दालान न.) सोपा; (न.) उंसाच्या चरकाचें वरचें तकट.
**दाली** (स्त्री.) पडदळें; तलवार ज्यांत ठेवतात तो कमरपट्टा. [ रान.
**दाव** (सं. पु.) अरण्य; वणवा लागलेलें
**दांव** (पु.) फणसाचा देठ.
**दावण** (सं. दामिनी स्त्री.) गुरें बांधण्याची लांब दोरी; रांग;. ओळ.
**दावणा** (प्रा. वि.) दाखविणारा.
**दावणें** (क्रि.) दाखविणें. [ खुंटी.
**दावफुट** (स्त्री.) आंसाशीं गाडी जोडणारी
**दावल** (स्त्री.) ढोंग.
**दावली** (स्त्री.) वासरूं इ० बांधावयाचें लहान दावें. [ हक्क.
**दावा** (अर. पु.) द्वेष; शत्रुत्व; फिर्याद;
**दावाग्नि-नल-नळ** (सं. पु.) वणवा.
**दाविणें** (क्रि.) दाखविणें; पहाणें.
**दावें** (सं. दामन न.) गुरांच्या गळ्यांत बांधण्याची दोरी; कच्चा फणस.
**दावेकरी-खोर-दार** (पु.) शत्रु; हक्क सांगणारा.

**दावेदारी** (स्त्री.) शत्रुत्व; हक्क.
**दार्शनिक** (पु.) तत्त्वज्ञानी; (वि.) दर्शन-विषयक.
**दाशा** (पु.) पातळ भिंतीला मजबुती आणण्यासाठीं मधून मधून तीन × अशीं लाकडें चिणतात तीं; घर बांधतांना भिंतीच्या बाहेर गवंडी वगैरे लोकांना उभें राहतां यावें म्हणून बांधलेल्या माचीला आधार म्हणून असलेले लांब लांब लाकडी गोल भिंतीला भोंकें पाडून त्यांत बसवितात, व काम झाल्यावर काढून टाकतात ते.
**दाशिरूं** (न.) बटीक, दासी.
**दाष्ट** (वि.) खट्याळ, खाष्ट; दुष्ट.
**दास** (सं. पु.) सेवक; गुलाम; शूद्र.
**दासट** (वि.) दाहक; नाशक; कष्टदायक.
**दासटपणा** (न.) दास्य, सेवा.
**दासटें** (प्रा. वि.) दाहक.
**दासटेपणा** (प्रा. न.) उद्धटपणा.
**दासानुदास** (सं. पु.) चाकराचा चाकर.
**दासी** (सं. स्त्री.) कुळंबीण, सेविका.
**दासीपुत्र** (पु.) अनौरस संतति.
**दास्त** (फा. निगादास्त स्त्री.) काळजीपूर्वक रक्षण.
**दास्तान** (फा. न.) कोठी, धान्याचें कोठार; मालाची वखार; संचय.
**दास्ताना** (पु.) लाठी खेळांतला कोपरापर्यंत बांधावयाचा चामडी पट्टा.
**दास्तानदार** (फा. पु.) कोठीवरचा मनुष्य.
**दास्य** (सं. न.) चाकरी, गुलामगिरी.
**दाह** (सं. पु.) आग, भडका.
**दाहक** (सं. वि.) जाळणारा.
**दाहट** (वि.) धीट, धाडसी.
**दाहणें** (सं. दह् क्रि.) जाळणें.
**दाहिजा** (पु.) दहा शिपायांची टोळी; सार्वजनिक जमीन.
**दाहीदुराई** (स्त्री.) अंमल. [ व्याजाचा दर.
**दाहोतरा, दाहोत्रा** (पु.) शें. १० टक्के
**दाह्य** (सं. वि.) पेट घेणारें.
**दाळ** (सं. दल स्त्री.) डाळ, द्विदल धान्य.
**दाळपीठ** (न.), **दाळरोटी** (स्त्री.) साधें जेवण.
**दाळिंब** (सं. दाडिम न.) डाळिंब.
**दाळें** (न.) डाळें, डाळया.
**दाक्षिणात्य** (सं. वि.) दक्षिणचा.
**दाक्षिण्य** (सं. न.) हुशारी; कुशलता.
**दिक्** (सं. स्त्री.) दिशा.
**दिक** (प्रा. स्त्री.) मर्यादा (तुका० २५३९).
**दिक्क** (अर. वि.) खिन्न; चकित; आजारी.
**दिक्कत** (अर. स्त्री.) संशय, शंका; तंगी, टंचाई.
**दिक्काल** (सं. पु.) दिशा आणि काल.
**दिक्पाल** (सं. पु.) दहा दिशांच्या संरक्षक देवता; त्यांचीं नांवें—इंद्र, अग्नि, यम, निर्ऋति, वरुण, वायु, सोम, ईशान, ब्रह्मा, अनंत. [ दिसणारें.
**दिखाऊ** (वि.) बाहेरून तेवढें सुरेख
**दिगंत** (सं. पु.) दिशेच्या अंतिम टोकापर्यंतचा प्रदेश.
**दिगंतर** (सं. न.) अन्य दिशा; सर्व प्रदेश. **दिगंतरीं जाणें**—सर्व पृथ्वीवर पसरणें.
**दिगंबर** (सं. वि.) नग्न.
**दिगर** (फा. अ.) शिवाय, आणखी; नंतर.
**दिगरजान** (वि.) जिवश्चकंठश्च; जानी.
**दिग्गज** (सं. पु.) प्रत्येक दिशेच्या अंतीं असलेला एकेक हत्ती. हे आठ आहेत. त्यांचीं नांवें—ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, पुष्पदंत, सार्वभौम व सुप्रतीक.
**दिग्दर्शन** (सं. न.) दिशा किंवा सामान्य स्वरूप दाखविणें; सामान्य निरूपण; मासला; चुणूक; नाट्य अथवा चित्रपट यांची योजना व तिची अंमलबजावणी.
**दिग्विजय** (सं. पु.) सैन्यबलानें किंवा विद्येनें चारी दिशांस जिंकणें.
**दिग्विजयी** (सं. वि.) सर्व पृथ्वीला जिंकणारा; वेडेचार करणारा; स्वच्छंदी; व्यसनी.
**दिघडा** (प्रा. वि.) दीर्घ, उंच.
**दिघत** (फा. अ.) नंतर.
**दिङ्निर्णययंत्र** (सं. न.) ज्याच्या द्वारें दिशा ओळखतां येतात असें यंत्र; याला इंग्रजींत (खलाशांचा कंपास—Mariner's Compass) म्हणतात.

**दिङ्मंडल** (सं. न.) दिशाचक्र.
**दिठा** (प्रा. पु.) द्रष्टा, आत्मा.
**दिठावणें** (प्रा. क्रि.) दृष्ट लागून नासणें.
**दिठिवणें** (क्रि.) पाहणें.
**दिठिवा, दिठीवा** (पु.) कृपादृष्टि.
**दिठी** (प्रा. स्त्री.) दृष्टि.
**दिठोणा** (प्रा. पु.) तीळ.
**दिड** (न.) कापडाचा गठ्ठा; उकडलेलें एक पक्वान्न; खांब; खुंट; (पु. न.) कुळवाचा लाकडी ओंडका.
**दिडका** (वि.) दीडपदरी.
**दिडकी** (स्त्री.) पैसा.
**दिंडी** (स्त्री.) दरवाज्याची खिडकी; एक वाद्य; एक छंद; छविना; भजनी मेळा.
**दिंडीगाण** (पु.) दिंडी नांवाच्या वाद्याच्या सुरांत पदें गात भिक्षा मागणाऱ्या साधूंचा एक संप्रदाय.
**दिढी** (स्त्री.) दीडपट.
**दिढीकाढी** (स्त्री.) पुढें शेत पिकल्यावर शेतकऱ्यानें दीडपट धान्य यावें अशा करारावर त्याला सावकारानें धान्याच्या रूपानें कर्ज देणें.
**दिदार** (फा. वि.) देखणा.
**दिधणें** (प्रा. क्रि.) देणें.
**दिन** (सं. पु.) दिवस.
**दिनकर** (सं. पु.) सूर्य. [ नित्याचा खर्च.
**दिनचर्या** (सं. न.) नित्याची राहणी;
**दिनदर्शक** (न.) कॅलेंडर.
**दिनमणि** (सं. पु.) सूर्य. [ स्थिति; काळवेळ.
**दिनमान** (सं. न.) दिवसाची लांबी; परि-
**दिनार** (पु.) एक जुनें नाणें.
**दिनावधि** (सं. पु.) विलंब, उशीर.
**दिन्हणें** (प्रा. क्रि.) देणें.
**दिपडें** (वि.) तेजस्वी; सतेज.
**दिपणें** (सं. क्रि.) चक्क होणें; अंधेरी येणें.
**दिपत** (स्त्री.) दीपवात, दिवाबत्ती.
**दिपत्कार** (वि.) उजेड करणारा.
**दिपवाळी** (सं. स्त्री.) दिवाळी.
**दिपुष्ट** (न.) दिवा विझविल्यानंतर त्यांत राहिलेलें तेल.
**दिपुष्टाण** (न.) मालविलेल्या दिव्याच्या वातीपासून निघणारा दुर्गंध.



**दिमत** दिम्मत पहा.
**दिमाख** (अर. दिमाघ पु.) तोरा; डौल.
**दिम्मत** (अर. स्त्री.) हवाला; जिम्मा; निसबत.
**दिय** (प्रा. पु.) दिवस.
**दिरंग** (फा. पु.), **दिरंगाई** (स्त्री.) उशीर, लांबण, विलंब.
**दिरगतरान** (इं. डायरेक्टर पु. अने.) ईस्ट इंडिया कंपनीचे डायरेक्टर किंवा नियामक अशा अर्थी मराठ्यांनीं कागदो-पत्रीं वापरलेला शब्द.
**दिरसाल** (अर. वि.) पाठविलेलें.
**दिल** (फा. पु. न.) मन, अंतःकरण.
**दिलखुलास** (हिं. पु.) मनाचा मोकळेपणा.
**दिलखुशी** (फा. स्त्री.) संतोष; चित्ताची प्रसन्नता.
**दिलखेचक** (वि.) अंतःकरण खेचणारा.
**दिलगिरी** (फा. स्त्री.) खेद; मनाची खिन्नता.
**दिलगीर** (वि.) खिन्न.
**दिलदार** (वि.) मनमिळाऊ, उदार.
**दिलदिलासा** (फा. पु.) आश्वासन; उत्तेजन.
**दिलपाक** (वि.) शुद्ध हृदयाचा.
**दिलभर** (हिं. अ.) मनाची तृप्ति होईपर्यंत; (वि.) प्रियकर.
**दिलवर** (वि.) शूर; धाडशी.
**दिलशादी** (फा. वि.) खुषी.
**दिलहवाली** (फा. स्त्री.) मनाची अस्वस्थता.
**दिलासा** (हिं. पु.) उत्तेजन, आश्वासन.
**दिलेर** (फा. पु.) धारिष्टवान्, धाडसी, धैर्यशील.
**दिलेरी** (हिं. वि.) धारिष्टाची; पराक्रमाची.
**दिलोजान** (फा. न.) अंतःकरण, मन.
**दिवटा** (सं. दीप पु.) पेटविलेला काकडा; मशाल; मशाल धरणारा; कुळाला कलंक लावणारा; (प्रा. पु.) भविष्य सांगणारा जोशी.
**दिवटी** (सं. दीपिका स्त्री.) लहान मशाल.
**दिवठाण** (सं. दीपस्थान न.) घरांतली दिवा लावण्याची जागा.
**दिवड** (पु. न.) निर्विष सर्पाची एक जात.
**दिवली** (स्त्री.) लहान दिवा, पणती; तेल काढण्याची उभ्या दांड्याची पळी.

**दिवस** (पु.) सूर्योदयापासून पुनः सूर्योदयापर्यंतचा चोवीस तासांचा काळ; मृताची उत्तरक्रिया; सूर्य.
**दिवसगत** (स्त्री.) विलंब; उशीर.
**दिवसळई, दिवसळी** (स्त्री.) दिवा लावण्याची काडी.
**दिवसाढवळया** (अ.) भर दिवसा; ढळढळीत दिवस असता. [ खर्च.
**दिवसादिवाळी** (स्त्री.) उधळपट्टीचा निरर्थक
**दिवसानदिवस, दिवसेंदिवस** (अ.) उत्तरोत्तर.
**दिवा** (पु.) दीप; (अ.) दिवसा. **दिव्याखालीं अंधार**—चांगल्या गोष्टींतच पुष्कळ वेळां ठळक दोष असतात; **दिवे लावणें**—(उपरोधिक) महत्कृत्य करणें.
**दिवाण** (फा. पु.) बादशाही दरबार.
**दिवाण, दिवाणजी** (फा. पु.) मंत्री; मुख्य कारभारी.
**दिवाणखाना** (फा. पु.) मोठें मुख्य दालन.
**दिवाणगिरी** (स्त्री.) दिवाणाचें काम.
**दिवाणवाडा** (फा. पु.) राजमंदिर.
**दिवाणा–ना** (फा. वि.) वेडा; मूर्ख.
**दिवाणी** (फा. वि.) देणें घेणें, हक्क इ० संबंधीं.
**दिवातें** (न.) शेतावरच्या मजुरांच्या बरोबरची त्यांची न्याहारी.
**दिवान्ध** (पु.) घुबड; दिवसां ज्याला दिसत नाहीं असा कोणताही प्राणी.
**दिवाभीत** (न.) घुबड.
**दिवार, दिवाल** (फा. स्त्री.) भिंत.
**दिवालगिरी** (हिं. स्त्री.) वालशीट किंवा दिवा भिंतीला लावण्यासाठीं भिंतींतल्या खांबाला लावलेला आकडा.
**दिवाळ** (हिं. स्त्री.) भिंत.
**दिवाळखोर** (वि.) उधळया.
**दिवाळसण** (पु.) लग्नानंतरच्या पहिल्या दिवाळीसाठीं जावई व त्याच्या घरची मंडळी बोलावून त्यांना मुलीच्या बापानें मेजवान्या, पोशाख, देणग्या इ० देणें.
**दिवाळी** (स्त्री.) दिपवाळी; आश्विन व. १२ पासून कार्तिक शु० २ पर्यंतचे सणाचे दिवस. [ देणें.
**दिवाळें** (न.) नादारी; भागोरें; लोकांचें

**दिवाळया घोडा** मोठा व देखणा घोडा.
**दिवि, दिवी** (सं. दीप स्त्री.) दिवा (अमृ० ६।९५).
**दिवेलावणी** (स्त्री.) उजाड मुलूख वसविणें. **दि० कौल** —उजाड मुलूख वसविणारास सरकारचे कर कांहीं मुदतीपर्यंत माफ करण्यांत येतील असा सरकारनें करून दिलेला करारनामा. **दि० ची वेळ** संध्याकाळ.
**दिवेलावणें** (न.) पणथी, पसरट आकाराचा तेलवात केलेला उघडा दिवा.
**दिवो** (प्रा. पु.) दिवस (अमृ० १।४३).
**दिव्य** (सं. वि.) स्वर्गीय; लोकोत्तर; (न.) कसोटी; परीक्षेची वेळ, कठीण प्रसंग; दिव्य करण्याचे प्रकार :— तुला, अग्निस्पर्श, जलमज्जन, विषप्राशन, तीर्थप्राशन, तंडुलसेवन, तप्तमाष, फाळ, धर्माधर्म, तुलसीपत्रधारण इ.
**दिव्यदृष्टि** (सं. स्त्री.) अलौकिक किंवा ईश्वरी शक्ति असलेली दृष्टि.
**दिव्यज्ञान** (सं. न.) स्वर्गीय, ईश्वरी किंवा अतींद्रिय ज्ञान.
**दिव्या उजेडीं** (अ.) दिव्याच्या प्रकाशांत.
**दिव्याची आवस** आषाढ व. ३०; दिव्यांची पूजा करण्याचा दिवस.
**दिशा** (सं. स्त्री.) हगवण, आमांश (दा० ३।६।२७).
**दिशा** (सं. स्त्री.) बाजू; दिक्. **चारी दिशा मोकळया होणें**—वाटेल तिकडे जाण्याला मोकळीक मिळणें; **दिशेस जाणें**—शौचास जाणें; **दिशा फाकणें** –प्रभात होणें.
**दिशाभूल** (स्त्री.) दिशा न ओळखतां येणें, कोणीकडे जावयाचें याविषयीं भ्रमांत पडणें.
**दिशीं** (अ.) दिवस असतांना, दिवसाउजेडीं.
**दिस, दीस** (प्रा. पु.) दिवस.
**दिसंदिस** (प्रा. अ.) दिवसेंदिवस.
**दिसां** (क्रि. वि.) दिवसां.
**दिसेंदिसें** (प्रा. अ.) रोजच्या रोज.
**दिसोड** (अ.) दिवसभर.
**दिह** (पु.) दिवसा (अमृ० ५।४५); गांव

**दिहात, देहात, देहें** (हिं. न.) गांव; गांवांचा समुदाय.
**दिहाती जमा** (स्त्री.) गांवची जमाबंदी.
**दी** (पु.) दिवस.
**दीठ** (प्रा. स्त्री.) दृष्टि, नजर.
**दीड** (वि.) एक आणि अर्धा मिळून. **दीड कानाचा**—बहिरा; **दीड डोळ्याचा**—आंधळा; **दीडशहाणा** ——मूर्ख; **दीड-दमडीचा**——क्षुद्र, हलकट; **दीड दांडी** ——खोटा तराजू.
**दीदार** (न.) तुफान.
**दीन** (सं. वि.) नम्र, गरीब; (अर. पु.) इस्लाम धर्म; युद्धांत लढणारांना आवेश आणणारा मुसलमानांचा जयध्वनि.
**दीनदुनिया** (अर. स्त्री.) जग, लोक.
**दीनवाणा** (वि.) करुणा उत्पन्न करणारा; नम्र, करुणपर.
**दीनहत्यारा** (वि.) गरिबांवर शस्त्र उचलणारा; गरिबांना मारणारा.
**दीप** (सं. पु.) दिवा.
**दीपक** (सं. पु.) दिवा; गायनांतल्या एका रागाचें नांव. [ राग.
**दीपकल्याण** (सं. पु.) गायनांतला एक
**दीपगृह** (सं. न.) समुद्रांतल्या खडकाळ जागांची सूचना आगबोटीवरील तांडेलास देण्यासाठीं समुद्रांत बांधलेल्या उंच मनोऱ्यावर रात्रीं तेजस्वी दिवा लावतात तें गृह.
**दीपन** (सं. न.) उत्तेजित करणें; चेतविणें.
**दीपमाळ** (सं. स्त्री.) उत्सवप्रसंगीं दिवे लावण्यासाठीं मंदिरासमोर एक स्तंभ उभारलेला असतो तो.
**दीपस्तंभ** दीपगृह पहा.
**दीपावली** (सं. स्त्री.) दिव्यांची रांग; दिवाळीचे सणाचे दिवस.
**दीपिका** (सं. स्त्री.) दिवटी.
**दीपी** (प्रा. पु.) समुद्र.
**दीप्त** (सं. वि.) प्रज्वलित केलेला; उज्ज्वल.
**दीप्ति** (सं. स्त्री.) प्रकाश, तेज, कांति.
**दीर** (सं. देवर पु.) नवऱ्याचा भाऊ.
**दीर्घ** (सं. वि.) लांब; मोठा.
**दीर्घद्वेषी** (सं. वि.) फार काळपर्यंत मनांत दंश ठेवून सूड उगविण्याची संधि पाहणारा.
**दीर्घसूत्री** (सं. वि.) विलंबी. [ जगणारा.
**दीर्घायु** (सं. वि.) चिरायु, पुष्कळ दिवस
**दीर्घिका** (सं. स्त्री.) मोठें तळें; पायऱ्यांची विहीर; पुष्करिणी.
**दीर्ण** (वि.) फाटलेलें.
**दीस** (प्रा. पु.) दिवस.
**दीक्षा** (सं. स्त्री.) एकाद्या व्रताचा उपदेश; शिक्षण; नियमांचा स्वीकार; आचरणाची रीत.
**दीक्षित** (सं. पु.) ज्यानें यज्ञ केला आहे तो, व त्याची संतति; प्रवीण, हुशार.
**दु** (समासांत वि.) दोन.
**दुआब, दोआब** (फा. पु.) दोन नद्यांच्या चिमटयांतला प्रदेश.
**दुआळी** (प्रा. स्त्री.) पीडा; क्लेश.
**दुई** (स्त्री.) दुही, द्वैत, भांडण.
**दुकटा** (वि.) दुसरा, जोडीदार.
**दुकलमी** (वि.) दोन माणसांनीं लिहिलेलें; दोन कलमें असलेलें.
**दुकळ** (सं. दुष्काळ पु.) अभाव, दुकाळ.
**दुकळणें, दुकळावणें** (प्रा.क्रि.) बुभुक्षित होणें (तुका० ६०८).
**दुकाटी** (वि. दोन कांटयांचें.
**दुकान** (फा. स्त्री. न.) विक्रीची जागा; कारखाना; प्रदर्शन.
**दुकानदार** (फा. पु.) दुकान मांडणारा.
**दुकानदारी** (फा. स्त्री.) व्यापाराचा धंदा.
**दुकाना** (वि.) उचलावयाला दोन कडया असलेलें (भांडें); दोन दारू पेटविण्याचीं भोकें जिला अशी (बंदूक).
**दुकाळ** (सं. पु.) दुष्काळ.
**दुकाळणें** (क्रि.) महाग होणें.
**दुकूल** (सं. न.) रेशमी वस्त्र; उंची वस्त्र.
**दुक्कल** (स्त्री.) गंजिफाच्या डावांत एका खालच्या एक बंदांची लागलेली रांग; द्वय, जोडी.
**दुःख** (सं. न.) दुःसह अनुभव, वेदना, यातना, रोग, त्रास इ० **दुःख वेशीस बांधणें**——जगाला दुःख कळविणें.
**दुखंड** (वि.) दोन भागांत विभागलेलें.

**दुखणाईत, दुखणारू, दुखणेकरी** (वि.) आजारी, विमार.
**दुखणें** (न.) आजार; (क्रि.) वेदना होणें.
**दुखणेकरी** (पु.) आजारी मनुष्य.
**दुखणेंवाहणें** (न.) आजार.
**दुखरा** (वि.) दुखणारा; नाजूक.
**दुखवटा** (पु.) अशौच, सूतक; मृताच्या पुत्रादिकांस देण्याचीं वस्त्रें वगैरे; शोकप्रदर्शन.
**दुखवणें, दुखावणें** (क्रि.) व्यथित होणें, इजा होणें. [ जखम.
**दुखापत** (सं. दुःख + आपत् स्त्री.) इजा,
**दुखांबी** (वि.) दोन खांबांच्या आधारावर रचलेलें किंवा उभारलेलें (घर, तंबू इ.)
**दुःखित** (सं. वि.) दुःख पावलेला; खिन्न.
**दुःखी** (वि.) दुःख भोगणारा.
**दुखोटा** दुखवटा पहा.
**दुगदुगी** (हिं. स्त्री.) धुगधुगी, मरणोन्मुख अवस्था (होना० पृ. ११५)
**दुगन** (स्त्री.) नेहमीं धृपद गाण्यास जो काळ लागावयाचा त्याच्या अर्ध्या काळांत तें म्हणणें.
**दुगला–ळा** (वि.) अतिदुर्बळ; रोड, कृश; ठेंगणा; अशाश्वत; नश्वर. [ संज्ञा.
**दुगस्त** (न.) गंजिफांच्या खेळांतली एक
**दुगस्ता** (अ.) गतवर्षीं, गुदस्ता.
**दुगाणी** (स्त्री.) एक तांब्याचें नाणें; २ पै; पशूचे मागील दोन पाय. **दुगाण्या झाडणें**—लाथा मारणें.
**दुगुलें, दुगुळें** (प्रा. वि.) अति दुर्बळ.
**दुग्ध** (सं. न.) दूध.
**दुग्धा** (सं. द्विधा स्त्री.) शंका, अनिश्चितता, भ्रम, भ्रांति.
**दुघई** (वि.) दोन गस्त्यांचें, दुसोपी. [संज्ञा.
**दुघस्त** (न.) गंजिफांच्या खेळांतील एक
**दुचमळणें** (क्रि.) हलविणें; हलणें.
**दुचणी** (प्रा. वि.) दोन खणांचें.
**दुचाळा** (प्रा. पु.) कातर, आडकित्ता; कचाटी; अडचण.
**दुचित्त** (वि.) खिन्न मनाचा.
**दुजा** (वि.) दुसरा, आणखी; भिन्न.
**दुजाई–यी** (पु.) शत्रु; वैरी.
**दुजारा** (वि.) दोन दिवसांनीं येणारा (ताप).
**दुजें** (प्रा. वि.) दुसरें; (न.) द्वैत.
**दुजोरा** (पु.) पाठबळ; बुद्धिबळाच्या खेळांतली एक संज्ञा. [ अनिश्चित.
**दुटप्पी** (वि.) दोन अर्थ करतां येतील असें;
**दुटा** (फा. वि.) ठेंगू, खुजा.
**दुटी** (प्रा. वि.) दुहेरी.
**दुटें** (न.) गवंड्याची मापण्याची दोरी; नमुना; नियम; गोणी; दुमडलेला कागद.
**दुट्टा** (वि.) दुंडा, दुमडलेला.
**दुंड** (न.) खुंट; उंच मनुष्य.
**दुडकी** (वि.) दुडदुडु किंवा तुरुतुरु चालणें.
**दुडदुड–दुडा** (क्रि. वि.) तुरुतुरु चालणें; लगबग.
**दुंडा** (पु.) मध्यें घडी घातलेला; डवल (सुईतला दोरा); **दु०पैसा**—दोनपैशांचें नाणें. [ जोडी.
**दुडा** (प्रा. स्त्री.) कळशी व घागर यांची
**दुंडी** (हिं. स्त्री.) गडबड; अंधेर.
**दुडू, दुड्डु** (फा. पु.) पैसा; जिंदगी.
**दुढ्ढा** (का. दुड्डु = दोन) सोंगट्यांच्या खेळांत दोनाचें पडलेलें दान; दोन रुपये दक्षिणा.
**दुढ्ढाचार्य** (पु.) (निंदेनें) शेकोजी, महाविद्वान्, पंडित, प्रतिष्ठित.
**दुणणें** (क्रि.) घडी घालणें; दुप्पट करणें.
**दुणता** (वि.) दुघडी, दोन घड्या घातलेला.
**दुणवटणें, दुणावटणें** (प्रा. क्रि.) दुप्पट होणें.
**दुणा-णी-णें** (वि.) दुप्पट.
**दुणावणें** (क्रि.) दुप्पट होणें.
**दुतणें** (क्रि.) घडी घालणें.
**दुतर्फा** (अ.) दोन्ही बाजूंस.
**दुतर्फी** (वि.) दोन्ही पक्षांचा.
**दुता** (पु.) शस्त्राचें आच्छादन.
**दुताडा** (पु.) (तिरस्कारार्थीं) सावकारानें देणेकऱ्याकडे तगाद्यासाठीं पाठविलेला उद्धट मनुष्य. [ पोस.
**दुतु** (हिं. पु.) उरस्त्राण, अंगरखा; पलंग-
**दुतोंडें** (न.) दोन तोंडांचा सरपटणारा एक जीव. [ निराळेंच बोलणारा.
**दुतोंड्या** (वि.) एकदां एक व दुसऱ्यांदा

**दुथडी** (वि.) दोन्ही तीरांस व्यापणारी; (प्रा. स्त्री.) नदी.
**दुंदुभि** (सं. पु.) नगारा, नौबत.
**दुधड** (प्रा. वि.) दुभंग; अस्पष्ट; वाईट.
**दुधाणी** (प्रा. स्त्री.) दूध तापविण्याचें भांडें; एक वनस्पति.
**दुधा भोपळा** (पु.) एक फळभाजी.
**दुधाळ, दुधाळू** (वि.) पुष्कळ दूध देणारी.
**दुध्या** (पु.) पांढरा किंवा मुग्या भोपळा.
**दुधू** (न.) लहान मुलांच्या भाषेंत—दूध.
**दुनवणी** (प्रा. स्त्री.) पुन: नांगरणें, आडवें नांगरणें (तुका० ११४७).
**दुनिया** (फा. स्त्री.) जग, पृथ्वी.
**दुनियादारी** (स्त्री.) ऐहिक व्यवहार.
**दुपकी** (स्त्री.) ओढाळ जनावराच्या दोन पायांना बांधलेली दोरी.
**दुपटा, दुपट्टा** (पु.) उपवस्त्र. [ वस्त्र.
**दुपटें** (न.) लहान मुलास गुंढाळून घेण्याचें
**दुपती, दुभती** (स्त्री.) दूध देणारी गाय.
**दुपतें, दुभतें** (न.) दूध देणारें गाय, म्हैस वगैरे जनावर; गाय, म्हैस वगैरेंचें दूध; दुधाला विरजण लावणें, ताक करणें इ. काम.
**दुपांडीं** (प्रा. अ.) दोन पायांनीं.
**दुपार** (स्त्री.) दोन प्रहरची वेळ. [ साखर.
**दुपेटा** (हिं. पु.) शेला; एक प्रकारची.
**दुप्पट** (वि.) दुगुणी, डबल.
**दुपट्टा** (फा. पु.) शेला, उपवस्त्र.
**दुफळी** (स्त्री.) दोन पक्ष; भांडण.
**दुबक** (स्त्री.) गुराचे दोन पाय बांधणें; विटीदांडूच्या खेळांत विटीला लगावलेला दुसरा टोला.
**दुबका** (पु.) ठोसा, बुदका.
**दुबंधी** (प्रा. वि.) दुरंगीं (लुगडें).
**दुंबर** (पु.) एका खेळाचें नांव.
**दुबळवाडी** (प्रा. स्त्री.) दैन्य.
**दुबळा** (सं. वि.) दुर्बळ, अशक्त, रोड, दरिद्री; गुजराथेमधील एक जात.
**दुबार, दुबारा** (अ.) दोनदां.
**दुबेरजी** (वि.) तीच रकम हिशोबांत दोनदां (एकदां जमेकडे व दुसऱ्यांदा खर्चाकडे) लिहिलेली.
**दुबेळकें** (न.) शेंड्यास दोन फांटे असणारी काठी.
**दुबोल्या** (वि.) अस्थिर विचाराचा; ज्याचें मन हेलकावे खातें असा; फायद्यासाठीं स्वपक्ष सोडून परपक्षास मिळणारा.
**दुभणी** (स्त्री.) पान्हा.
**दुभणें** (क्रि.) पान्हा सोडणें, दूध देणें.
**दुभती** (वि.) दूध देत असलेली.
**दुभतें** (न.) दूध, दहीं वगैरे; त्यांची व्यवस्था.
**दुभरंवसा, दुभरोसा** (पु.) साशंक वृत्ति, शंकितपणा, संदिग्धता.
**दुभाग** (वि.) दोन भागांत विभागलेली.
**दुभांग** (वि.) मध्यें अडथळा आल्यामुळें ज्याचे दोन भाग दोन बाजूस सरले आहेत असा.
**दुभागणें** (क्रि.) दोन हिस्से करणें.
**दुभाव** (पु.) दुजा किंवा परका भाग.
**दुभाषी, दुभाष्या** (पु.) दोन भाषा समजणारा; भाषांतर करून सांगणारा.
**दुभास** (पु.) अज्ञान; गैरसमज.
**दुम** (फा. वि.) मध्यम.
**दुम करणें** धूम ठोकणें (तुका० १४८).
**दुमची** (फा. स्त्री.) लेंडी; घोड्याच्या शेपटींतून घ्यावयाची दोरी; लाथ; निकड.
**दुमजली** (वि.) दोन मजल्यांचें (घर).
**दुमड** (स्त्री.) घडी, सुरकुती, चुणी.
**दुमडणें** (क्रि.) घडी पाडणें. [ लाथ.
**दुमणी** (स्त्री.) घोड्याची मागच्या पायाची
**दुमता** (वि.) दुमडलेला, घडी पाडलेला.
**दुमदुमणें** (क्रि.) घुमणें, गाजणें.
**दुमदुमीत** (वि.) फुगलेलें, तडस्स भरलेलें.
**दुमालपत्र** (फा. सं. न.) नवा अंमलदार आला म्हणजे तो मार्जी अंमलदारापासून इनामी वगैरे जाबसाल लिहून घेत असे तें.
**दुमाला** (फा. पु.) दुजोरा; मागली बाजू (तुका० ७३); शब्दच्छल (जुना दा० ३।५९); (वि.) दोघांच्या मालकीचा; खंडासंबंधानें जे सरकारचे हक्क आहेत तितक्यापुरता कोणा माणसाच्या मालकीस दिलेला.

**दुमेळावा** (प्रा. पु.) दुर्योग, अडचण.
**दुमोळी** (वि.) दोन पाख्यांचें छप्पर; असें छप्पर असलेलें घर. [गौण; मध्यम.
**दुय्यम** (फा. दूम वि.) दुसऱ्या प्रतीचा;
**दुरकी** दुडकी पहा.
**दुरंगी** (वि.) एका बाजूला एक रंग व दुसऱ्या बाजूला निराळा रंग असा.
**दुरगूस** धुडगूस पहा.
**दुरडी** (स्त्री.) बुरुडी टोपली.
**दुरणें** (क्रि.) दूर करणें.
**दुरंत** (सं. वि.) अमर्याद; अपार.
**दुरतिक्रम**, (सं. वि.) ओलांडून जाण्यास कठिण, दुस्तर, असाध्य.
**दुरंदेशा** (फा. पु.) दूरदृष्टि; पुढची तरतूद.
**दुरंदेशी** (फा. दूरदेशा वि.) दूर दृष्टीचा, धूर्त.
**दुरधिगम्य** (सं. वि.) दुर्गम्य, दुर्ज्ञेय, दुष्प्राप्य.
**दुरबीन, दुरभीण** (फा. स्त्री.) दूरचा पदार्थ पाहण्याचें यंत्र.
**दुरविचार** (अ.) फार दूर.
**दुरशी, दुरशिवत** (स्त्री.) विटाळशी.
**दुरस्त** दुरुस्त पहा. [ १।२००).
**दुरळ** (प्रा. वि.) खडतर, कडक (हरि०
**दुरा** (वि.) दुप्पट; (पु.) नवी खणलेली विहीर. [ अभिलाष.
**दुराकांक्षा** (सं. स्त्री.) दुष्प्राप्य वस्तूचा
**दुराग्रह** (सं. पु.) हट्ट.
**दुराग्रही** (सं. वि.) हट्टी.
**दुराचरण** (सं. न.), **दुराचार** (सं. पु.) वाईट वर्तन. [ वर्तनाचा.
**दुराचरणी, दुराचारी** (सं. वि.) वाईट
**दुरात्मा** (वि.) दुष्ट बुद्धीचा; खट.
**दुरापास्त** (सं. दूरापास्त वि.) कठिण, असंभवनीय.
**दुरावणें** (क्रि.) दूर जाणें.
**दुरावा** (पु.) दूरपणा, अंतर; दूर देशीं भोगावे लागणारे कष्ट. [आशा.
**दुराशा** (सं. स्त्री.) दुष्ट वासना, व्यर्थ
**दुरासद** (सं. वि.) कष्टानें प्राप्त होण्यासारखें; दुःसह.
**दुराही** (फा. स्त्री.) द्वाही, शपथ.
**दुरिकें** (वि.) दूरचें; लांब.
**दुरित** (सं. न.) पाप.
**दुरीं** (प्रा. अ.) दूर.
**दुरीग** (न.) दुर्ग; किल्ला; तट.
**दुरील** (वि.) दूरचा.
**दुरुक्ति** (सं. स्त्री.) दुर्भाषण.
**दुरुत्तर** (सं. न.) अपमानकारक किंवा उमेटपणाचें उत्तर.
**दुरुस्त** (फा. वि.) बरोबर, योग्य, नीट.
**दुरोखी** (वि.) दुटप्पी; दोहों बाजूंनीं रंगांचे छाप उठविलेलें (वस्त्र).
**दुर्ग** (सं. पु.) किल्ला.
**दुर्गति** (सं. स्त्री.) दुर्दशा, वाईट स्थिति.
**दुर्गंध** (पु.), **दुर्गंधि** (स्त्री.) घाण.
**दुर्गम** (वि.) जाण्यास कठिण; अगम्य.
**दुर्गयंत्र** (सं. न.) किल्ल्याच्या रक्षणार्थ ठेविलेल्या तोफा.
**दुर्गा** (सं. स्त्री.) पार्वती; (पु.) गायनशास्त्रांतील एक राग.
**दुर्गुण** (सं. पु.) वाईट गुण.
**दुर्गुणी** (सं. वि.) वाईट गुणांचा.
**दुर्घट** (सं. वि.) कष्टानें घडून येणारें.
**दुर्घटना** (सं. स्त्री.) अशुभ गोष्ट घडणें; आकस्मिक प्राप्त झालेलें संकट.
**दुर्जन** (सं. पु.) वाईट मनुष्य.
**दुर्दम्य** (वि.) दमन करण्यास कठिण; अत्यंत अवघड.
**दुर्दशा** (सं. स्त्री.) वाईट स्थिति.
**दुर्दिन** (सं. न.) वाईट दिवस; अभ्राच्छादित दिवस; वृष्टि.
**दुर्दैव** (सं. न.) कमनशीब. [ कठिण.
**दुर्धर** (सं. वि.) असह्य, धारण करण्यास
**दुर्निवार** (सं. वि.) निवारण्यास कठिण.
**दुर्बल, दुर्बळ** (सं. वि.) अशक्त.
**दुर्बीण** (फा. स्त्री.) दूरची वस्तु दाखविणारें यंत्र. [ बुद्धीचा.
**दुर्बुद्धि** (सं. स्त्री.) दुष्ट बुद्धि; (वि.) दुष्ट
**दुर्बोध** (सं. वि.) समजण्यास कठिण.
**दुर्भंग** (सं. वि.) दुर्दैवी; कुरूप.
**दुर्भर** (सं. न.) पोट; (वि.) कष्टानें भरतां येतें असें.
**दुर्भाग्य** (सं. न.) दुर्दैव, कमनशीब.
**दुर्भिक्ष** (सं. न.) दुष्काळ.

**दुर्भेद्य** (सं. वि.) फोडण्यास कठिण.
**दुर्मति** (सं. स्त्री.) दुर्बुद्धि.
**दुर्मद** (सं. वि.) उन्मत्त; उग्र; हेकट.
**दुर्मरण** (सं. न.) अपघातानें आलेलें मरण; हालअपेष्टा होऊन आलेलें मरण.
**दुर्मिळ** (सं. वि.) दुर्लभ.
**दुर्मुख, दुर्मुखला** (वि.) खट्ट, कुरठा, तुसडा, आंवट तोंडाचा.
**दुर्मुखणें** (क्रि.) खिन्न किंवा हिरमुष्टें होणें.
**दुर्लभ** (सं.वि.) दुष्प्राप्य, मोठ्या कष्टानें मिळण्यासारखें, विरळ.
**दुर्लक्ष** (सं. न.) हयगय, निष्काळजीपणा.
**दुर्लक्षण** (सं. न.) अशुभ चिन्ह; दोष, खोड. [ वैगुण्ययुक्त.
**दुर्लक्षणी** (सं. वि.) दुर्वर्तनी, दुराचारी;
**दुर्लौकिक** (सं. पु.) बेअब्रू, दुष्कीर्ति.
**दुर्वच** (सं. न.) निंदावाक्य.
**दुर्वा** (स्त्री.) एक प्रकारचें पवित्र गवत.
**दुर्वाड** (प्रा. वि.) अति मोठें, कठिण.
**दुर्वार** (सं. वि.) टाळण्यास किंवा अडविण्यास कठिण.
**दुर्वास** (पु.) एका ऋषीचें नांव; शीघ्रकोपी.
**दुर्वासना** (सं. स्त्री.) वाईट इच्छा.
**दुर्विदग्ध** (सं. वि.) विद्येंत न मुरलेला तथापि ठासून सांगणारा.
**दुर्विपाक** (सं. पु.) वाईट परिणाम.
**दुर्वृत्त** (सं. वि.) दुर्वर्तनी, दुराचारी.
**दुर्व्यसन** (सं. न.) दुराचरणाची संवय.
**दुर्व्यसनी** (सं. वि.) वाईट संवयीचा.
**दुऱ्हा** (प्रा. अ.) दूर.
**दुऱ्हाटी** (स्त्री.) लांब पल्ल्याची बंदुक.
**दुर्ज्ञेय** (सं. वि.) समजण्यास कठिण, गहन.
**दुलई** (स्त्री.) पातळ रजई किंवा लेप.
**दुलंगी** (प्रा. वि.) वरचेवर रंग पालटणारा; खोटा; (स्त्री.) दुरेघी, =अशी खूण; (पु.) कुस्तींतल्या एका पेंचाचें नांव.
**दुलदुलीत** (वि.) लठ्ठ, पुष्ट.
**दुलदुलें** (प्रा. न.) घोड्याचा एक अलंकार.
**दुलहन** (हिं. स्त्री.) वधू.
**दुला** (फा. दुलाहा =नवरा मुलगा पु.) हसन हा लग्नाच्या आदल्या रात्रीं (कत्तलच्या रात्रीं) मारला गेला, म्हणून मुसलमान लोक मोहरमच्या नवव्या तारखेस रात्रीं त्याच्या मृत्यूचा शोक करीत गांवांत हिंडतात, त्यावेळीं ते उच्चारतात तो शब्द.
**दुलाथ्या** (अ. स्त्री.) दुगाण्या, लाथा.
**दुलाब** (स्त्री.) भिंतींतलें फरताळ.
**दुलावा** (पु.) आगलाव्या.
**दुल्लड** (स्त्री.) स्त्रियांचें एक कंठभूषण.
**दुल्लडी** (प्रा. वि.) दोन पदरी.
**दुल्ला** दुला पहा.
**दुवक्तां, दुवखतां** (अ.) दोन वेळ.
**दुवल** (फा.) षोडशांश हीन.
**दुवा** ( अर. दुआ पु.) आशीर्वाद; सांखळीचा अवयव.
**दुवाई** (फा. स्त्री.) भेद.
**दुवाड** (प्रा. वि.) द्वाड; कठिण, दुर्घट.
**दुवारें** (न.) दोनदां कांडलेले तांदूळ.
**दुवाळ** (स्त्री.) दोन पंचे (एकत्र जोडलेले).
**दुवाळी** (प्रा. स्त्री.) द्वैत, जोड; पीडा (ज्ञा० १३।६६७). [व्यालेली.
**दुवेत** (न.) गर्भस्राव; (वि.) दोनदां
**दुवेळां, दुवेळीं** (अ.) दोन वेळां; दोन्ही वेळां. [ ठिपक्यांचें पान.
**दुव्वा** (पु.) पत्त्यांच्या खेळांतलें दोन
**दुशमन** (फा. दुश्मन् पु.) शत्रु.
**दुशमनकी, दुश्मनगिरी, दुशमनी** (स्त्री.) शत्रुत्व.
**दुशाला** (हिं. पु.) शालजोडी.
**दुश्चित** (प्रा. वि.) खिन्न.
**दुश्चित** (न.) वाईट कृत्य. [ शकुन.
**दुश्चिन्ह** (सं. न.) वाईट लक्षण; अप-
**दुःशाप** (सं. पु.) भयंकर शाप.
**दुःशील** (सं. वि.) वाईट स्वभावाचा.
**दुष्कर** (सं. वि.) करण्यास कठिण.
**दुष्कर्म** (सं. न.) पापकृत्य; दुष्टपणाचें कृत्य. [ पापी.
**दुष्कर्मा** (सं. पु.) दुष्टकृत्य करणारा;
**दुष्काळ** (सं. पु.) आपत्तीचा काळ; अतिवृष्टि; अनावृष्टि; टोळधाड; धान्यादिकांची महर्घता.
**दुष्कीर्ति** (सं. स्त्री.) अपकीर्ति.
**दुष्कृत**, (न.) **दुष्कृति** (स्त्री.) पापकर्म

**दुष्ट** (सं. वि.) वाईट; दुराचरणी.
**दुष्टाई** (स्त्री.) दुष्टपणा.
**दुष्टात्मा** (सं. वि.) दुष्ट अंतःकरणाचा.
**दुष्प्राप्य** (सं. वि.) मोठ्या कष्टानें मिळण्यासारखें, दुर्मिळ.
**दुष्मान्** (फा. दुष्मन् पु.) शत्रु.
**दुस** (प्रा. पु.) प्रमेय, वस्त्र, वेष्टन; तंत्रू.
**दुःसंग** (सं. पु.) वाईट संगत. [भांडण,
**दुसग, दुसगाई** (सं. दुःसंग स्त्री.) वाद, तंटा,
**दुसड, दुसडी** (वि.) दोनदां कांडलेले (तांदूळ); दोन आंचळांची गाय, म्हैस.
**दुसरणी** (अ.) पुनः दुसऱ्यांदा.
**दुसरा** (वि.) क्रमानें पहिल्याच्या पुढचा; अन्य; भिन्न; (प्रा. पु.) दोन सरांचा हार; (ज्ञा० १५।४१९)
**दुसवास** (पु.) हेवा, मत्सर; वाईट संगत.
**दुसाला** (वि.) दोन वर्षांचा (हिशेब, वसूल, उत्पन्न).
**दुःसह** (सं. वि.) सहन करण्यास कठिण. असह्य.
**दुःसाध्य** (सं. वि.) मोठ्या कष्टानें साधण्यासारखें.
**दुसोटा** (पु.) नुकत्याच काढून घेतलेल्या पिकाच्या जमिनींत लगेच पुनः घेतलेलें पीक.
**दुस्तर** (सं. वि.) पार जाण्यास अवघड.
**दुस्ता** (पु.) विणलेल्या कापडाच्या ताग्यांत मध्येंच एकादे ठिकाणीं विरळ वीण असते ती जागा.
**दुस्मन, दुस्मनकी, दुस्मनगिरी** दुशमन, दुशमनकी, दुशमनगिरी पहा.
**दुहजबी** (वि.) दोन कामास येणारा.
**दुहणें** (सं. दुह्. क्रि.) दूध काढणें; दूध देणें.
**दुहारणी** (स्त्री.) उजळणी; दुसऱ्यांदा केलेलें तेंच काम.
**दुहिता** (सं. स्त्री.) मुलगी.
**दुहिरी** (वि.) डबल, दुपदरी.
**दुही** (स्त्री.) बेकी, द्वंद्व; भांडण.
**दुहेरी** (वि.) दुपदरी, दोन प्रकारचा.
**दुहोतरा, दुहोत्रा** (पु.) दरमहा दरशेंकडा २ टक्के व्याजाचा दर.
**दूड** (स्त्री.) दोन गळेसर; दुडी पहा.

**दूण** (स्त्री.) दुप्पट; मुरड; घडी; दुसरी नांगरणी.
**दूत** (सं. पु.) निरोप्या, जासूद.
**दूतिका, दूती** (सं. स्त्री.) निरोपाची ने आण करणारी स्त्री.
**दूध** (सं. दुग्ध न.) दूध; रस; चीक. **दु० चे दांत**—बाळपणाचे कोंवळे दांत.
**दूधखुळा** (वि.) भोळसर, मेषपात्र.
**दूधदुभतें** (न.) दूध, दहीं, ताक वगैरे.
**दूम** (फा. वि.) दुय्यम; (न.) शेपूट.
**दूर** (अ.) लांब, पुष्कळ अंतरावर.
**दूरगामी** (वि.) दूरवर पोचणारा.
**दूरतः** (सं. अ.) दुरून. [पाहणारा.
**दूरदर्शी, दूरदृष्टि** (सं. वि.) दूरवर
**दूरवर** (अ.) दूरपर्यंत, लांबवर.
**दूरशी** (प्रा. वि.) रजस्वला, विटाळशी.
**दूरश्रवणयंत्र** (न.) टेलिफोन.
**दूरी** (प्रा. अ.) दूर.
**दूरीकरण** (सं. न.) दूर करणें.
**दूर्वा** (सं. स्त्री.) हरळी.
**दूषक** (सं. वि.) दोष लावणारा, निंदक.
**दूषण** (सं. न.) दोष, ठपका.
**दूषणें** (क्रि.) विघडविणें; कलंकित करणें, वट्टा लावणें; अपवित्र किंवा भ्रष्ट करणें; नांवें ठेवणें.
**दूषणीय** (सं. वि.) निंद्य, दोषास पात्र.
**दूषित** (सं. वि.) बिघडलेलें; कलुषित.
**दूष्य** (प्रा. पु.) तंबू (विठ्ठल–रुक्मिणी० ७।५); (सं. वि.) दूषणीय.
**दूस** (प्रा. पु.) वस्त्र; तंबू; प्रमेय.
**दृक्–ग्** (सं. स्त्री.) दृष्टि. [पुरावा.
**दृक्प्रत्यय** (सं. पु.) प्रत्यक्ष पाहिल्याचा
**दृक्शर** (पु.) नयनबाण.
**दृग्गोचर** (सं. वि.) दिसणारें दृश्य. [पाहणें.
**दृक्पात** (सं. पु.) दृष्टिक्षेप, नजर टाकणें,
**दृढ** (सं. वि.) पक्कें, घट्ट; (अ.) निश्चयपूर्वक.
**दृढप्रतिज्ञ** (सं. वि.) निश्चयी, कितीहि संकटें आलीं तरी केलेला संकल्प शिथिल न होऊं देणारा.
**दृढभाजक** (सं. पु.) खालीं बाकी उरूं न देतां एखाद्या संख्येला पूर्णपणें भागणारी दुसरी संख्या.

**दृढमुष्टि** (सं. वि.) कृपण.
**दृढावणें** (क्रि.) पक्कें होणें.
**दृढावो** (प्रा. पु.) दृढपणा.
**दृढिवा** (प्रा. पु.) दृढपणा.
**दृप्त** (सं. वि.) गर्वानें ताठलेला.
**दृश्य** (सं. वि.) दिसण्याजोगें; बाहेरचें.
**दृश्यकाव्य** (सं. न.) संस्कृत साहित्यशास्त्रकारांनीं दृश्यकाव्य व श्राव्यकाव्य असे काव्याचे दोन वर्ग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या वर्गातलें म्हणजे ज्याचा अनुभव नटनटी इ० नीं रंगभूमीवर हावभावादिकांनीं केलेल्या प्रयोगावरून घेतां येतो तें, नाटक.
**दृश्यमान** (वि.) दिसणारें. [ नजर; दृष्टि.
**दृष्ट** (सं. वि.) पाहिलेलें; (स्त्री.) वाईट
**दृष्टमणि** (सं. दृष्टि पु.) लेकराला दृष्ट न लागावी म्हणून त्याच्या गळयांत बांधावयाचा काळा मणि.
**दृष्टस्वप्न** (न.) दुष्ट स्वप्न; भयसूचक.
**दृष्टांत** (सं. पु.) दाखला, उदाहरण.
**दृष्टांतालंकार** (सं. पु.) एखादा विशेष प्रकृतार्थ मनांत येण्याकरितां विशेष अप्रकृतार्थाचें उदाहरण दिलें असते तो.
**दृष्टादृष्ट** (सं. स्त्री.) नजरानजर.
**दृष्टचा** (क्रि. वि.) नजरेनें.
**दृष्टावणें, दृष्टाळणें** (क्रि.) नजर लागणें, नजर बाधणें.
**दृष्टावा** (पु.) स्वप्नांत होणारें देवतेचें दर्शन; अनुभव; अवलोकन. [ असा.
**दृष्टाळा** (वि.) ज्याची दृष्ट लागते
**दृष्टि** (सं. स्त्री.) नजर; डोळा; चर्या. **दृष्टिआड सृष्टि**—आपल्या देखत जें घडत नाहीं त्याबद्दल आपण कांहीं करूं शकत नाहीं; **दृष्टि काढणें**—मंत्रतंत्रादि उपायांनीं दुसऱ्याच्या वाईट नजरेचा प्रभाव नाहींसा करणें; **दृ० घालणें**—डोळयांनीं खुणा करणें; पाहणें; **दृष्टीखालून घालणें**—पाहणें; **दृष्टीस (दृष्टीं) पडणें**—पाहिलें जाणें; **दृ० फाकणें (फाटणें)**—माणसाच्या आकांक्षा वगैरेची मर्यादा विस्तृत होणें; **दृ० मरणें**— अतिपरिचयाचें होणें; **दृष्टीस पाडणें**—दाखविणें; **दृ० चा पापी**—मत्सरी, हेवेखोर. [ पडलेलें.
**दृष्टिगोचर** (सं. वि.) पाहतां येणारें, दृष्टीस
**दृष्टिपात** (सं. पु.) अवलोकन.
**दृष्टिभेट** (स्त्री.) परस्परांनीं परस्परांना डोळयांनीं नुसतें पाहणें.
**दृष्टिविक्षेप** (सं. पु.) नेत्रकटाक्ष.
**दृष्टिविज्ञान** (सं. न.) प्रकाश व दर्शन या विषयींचें शास्त्र.
**दृष्टोत्पत्ति** (सं. स्त्री.) अनुभव; उघडकी.
**देऊळ** (सं. देवालय न.) देवमंदिर.
**देऊळवाडा** (पु.) देवळाच्या आवाराच्या आंतली जागा.
**देकार** (पु.) दक्षिणा, धर्मादाय, देणगी.
**देख** (प्रा. स्त्री.) रीत, चाल; दृष्टि.
**देखणा** (वि.) सुरेख, सुस्वरूप; (प्रा.) पाहणारा.
**देखणाऊ** (त्रि.) दिखाऊ, शोभेचें.
**देखणें** (क्रि.) पाहणें; (न.) दृष्टि (दासो० गीता० १।३३३ ); जमिनींत पुरलेलें गुप्त धन.
**देखत** (अ.) समक्ष, पाहत असतां.
**देखतपत्र** (अ.) पत्र पाहतांच.
**देखतां** (अ.) समक्ष, पाहत असतां.
**देखरेख** (स्त्री.) पाहणी, नजर, चौकशी.
**देखाऊ, दिखाऊ** (वि.) दिसण्यांत भपकेदार पण खरोखरी भिकार किंवा नादान.
**देखावा** (पु.) दृष्टीखालचा प्रदेश; प्रदर्शन; प्रेक्षणीय चित्र; तमाशा; भासवणूक; सोंग.
**देखी** (प्रा. स्त्री.) दृष्टि, अवलोकन; बाह्यांग बाह्यांग (तुका० १५४१); चाल; वळण (ज्ञा० ३।१५४); गुरुदीक्षा (ज्ञा० १५।४२४).
**देखील, देखून** (अ.) सुद्धां.
**देखींव** (वि.) प्रत्यक्ष पाहिलेली (गोष्ट, वस्तु वगैरे). [ पाहतां पाहतां.
**देखोदेखीं, देखोवेखीं** (अ.) चढाओढीनें;
**देग** (फा. स्त्री.) धातूचें मोठें भांडें.
**देघे** (स्त्री.) देणें घेणें, पैशाचा व्यवहार.
**देज** (न.) शूद्रांत वराकडून वधूच्या बापाला पैसा देण्यांत येतो तो.

**देटुगी** (प्रा. वि.) ठसठशीत.
**देठ** (पु.) कोंब; कांड; ज्याला फूल किंवा फळ धरतें तो भाग; आधार, जोर, बळ.
**देठी** (स्त्री.) कांहीं वनस्पतींच्या देठापासून केलेलें खाद्य.
**देणगी** (स्त्री.) खूष होऊन दिलेली वस्तु.
**देणावळ** (स्त्री.) मजुरीचे पैसे.
**देणी** (स्त्री.) गंजिफाच्या खेळांत—राजा न येतां आलेला नुसता वजीर; त्यामुळें प्राप्त झालेलें राजावाल्या इसमाचें देणें.
**देणें** (क्रि.) दुसऱ्याच्या स्वाधीन करणें; (न.) ऋण, कर्ज.
**देणेंकरी** (पु.) कर्जदार.
**देणेंघेणें** (न.) पैशाचा व्यवहार.
**देता** (सं. दाता पु.) देणारा, उदार.
**देदीप्यमान** (सं. वि.) तेजस्वी; चकाकणारा.
**देय** (सं. वि.) देण्यास योग्य.
**देर** (हिं. स्त्री.) विलंब, उशीर.
**देव** (सं. पु.) ईश्वर, देवता; राजा. **देव देव्हाऱ्यांत नसणें**—मन स्वस्थ नसणें; **देव पावला**—जें पाहिजे होतें तें मिळालें; **देवापुढचा**— शंख.
**देवक** (सं. न.) लग्न, मुंज इ० कार्याचे सिद्धयर्थ स्थापिलेली देवता.
**देवकळा** (सं. स्त्री.) देवाचें तेज; देवासारखी थोर पदवी. [ एक प्रकार.
**देवकापशी** (स्त्री.) कापसाच्या झाडाचा
**देवकार्य** (सं. न.) देवपूजा इ. धार्मिक कृत्य.
**देवकी** (वि.) देवानें केलेलें; (स्त्री.) श्रीकृष्णाची आई. **दे० नन्दन**—श्रीकृष्ण.
**देव-गण** (सं. पु.) जन्म–नक्षत्राच्या अनुरोधानें देव, मनुष्य आणि राक्षस असे माणसांचे तीन वर्ग ज्योतिःशास्त्रानें ठरविले आहेत, त्यांपैकीं पहिला.
**देवगिरी** (सं. पु.) दक्षिणेंतली यादवराजघराण्याची राजधानी (दौलताबाद).
**देवघर** (सं. देवगृह न.) घरांतल्या ज्या खोलींत देवाची मूर्ति पूजेसाठीं बसविली असते ती खोली.
**देवघेव** (स्त्री.) देण्याघेण्याचा व्यवहार.
**देवचार** (सं. पु.) पिशाच्चविशेष.
**देवजन** (सं. पु.) देवमंदिरांतला सेवक; सेवेकरी.
**देवजी धसाडा** (पु.) माकडाच्या खेळांत माकडाचा पोशाख घालून बसविलेला नरमाकड; लक्षणेनें—कुरूप व दांडगा मनुष्य. [ माणस.
**देवझाड** (न.) देव अंगांत संचरलेलें
**देवट** (प्रा. वि.) अधिक. [ परंपरा.
**देवड** (स्त्री.) एकामागून एक अशी सारखी
**देवडमार** (पु.) तोफा, बंदुकी इ० नीं केलेला भडिमार. [ चाकी.
**देवडांगर** (पु.) भोपळयाची एक जात,
**देवडी** (सं. देहली स्त्री.) चौकी, पाहरेवाल्यांची जागा.
देवढी, **देवढें** (प्रा. वि.) अधिक (ज्ञा० १५।१००); वाकडी; मोठी; पुष्कळ (ना० ७५५); एकाशीं एक लागलेली (स्वा० दि० ९।४।४८).
**देवत** (सं. न.) दैवत पहा.
**देवतरु** (सं. पु.) औदुंबर; कल्पवृक्ष; पारिजातक; कोणताहि पवित्र वृक्ष.
**देवता** (स्त्री.) देव.
**देवतार्चन** (सं. न.) देवपूजा. [ लागलेला.
**देवताळा** (वि.) देवाच्या पूजेचें वेड
**देवताळें** (न.) निंदार्थी—देवपूजेचें अवडंबर; देवांचा समूह. [लाकडाचें केलेलें.
**देवदारी** (वि.) देवद्वार नांवाच्या हलक्या
**देवदासी** (सं. स्त्री.) देवापुढें नाचण्यासाठीं ठेविलेली नर्तिका.
**देवळी** (स्त्री.) कोनाडा. [ लाकूड.
**देवदारु** (सं. पु.) देवद्वार नांवाचें हलकें
**देवदूत** (सं. पु.) देवाचा दूत.
**देवदेव** (पु.) देवाचें पूजन, अनुष्ठान वगैरे.
**देवदेवक** देवक पहा.
**देवदेव्हारे** (पु. अने.) देवाची पूजा, नवस, व्रतें इ० करणें; साधूंच्या नादीं लागणें; प्रार्थना इ० नानाप्रकारच्या धार्मिक गणल्या गेलेल्या गोष्टी. [ जात.
**देवद्वार** (सं. पु.) लाकडाची एक हलकी
**देवधर्म** (सं. पु.) देवपूजा, जप इ० देवासंबंधाचीं कृत्यें. **देवा–धर्माचा**–पिशाच्चाच्या प्रभावामुळें झालेला (रोग).

**देवनळ** (पु.) ब्रोरू.
**देवनागरी** (सं. स्त्री.) बाळबोध लिपि.
**देवपाट** (प्रा. न.) देवाचें रूप.
**देवपिसा** (वि.) देवधर्माचें वेड लागलेला.
**देवपूजा** (सं. स्त्री.) देवाच्या मूर्तींची पूजा.
**देवप्रतिष्ठा** (सं. स्त्री.) देवाच्या मूर्तीची स्थापना.
**देवब्राह्मण** (सं. पु.) यात्रेहून परत आल्यानंतर करावयाचें मावंद; ब्राह्मणभोजन.
**देवभोळा** (वि.) भाविक व सात्त्विक.
**देवमण, देवमणि** (प्रा. पु.) घोड्याच्या गळ्याच्या खळगीवर असलेलें शुभचिन्हात्मक केसांचें वेटाळें. [मनुष्य.
**देवमाणूस** (न.) साधा, गरीब, निरुपद्रवी
**देवयज्ञ** (सं. पु.) पंच–महायज्ञांपैकीं एक; वैश्वदेव.
**देवर** (सं. पु.) दीर.
**देवरुषि** (पु.) पंचाक्षरी, मांत्रिक, अंगारा धुपारा करणारा. [ऋषि.
**देवर्षि** (सं. पु.) देवतुल्य किंवा देव असून
**देवल, देवलक** (प्रा. पु.) पुजारी (भा० ११।१३०८). [करणारा.
**देवलंड** (पु.) देवाचें भजन पूजन न
**देवलसी** (वि.) देवाचें वेड लागलेला.
**देवलोक** (सं. पु.) स्वर्ग.
**देववाणी** (सं. स्त्री.) आकाशवाणी.
**देवसू** (वि.)·देवाला अर्पण केलेली (जमीन).
**देवस्की** (स्त्री.) देवाला नवस, अंगारा, धुपारा इ० कृत्यें; देवाला प्रश्न विचारणें.
**देवस्थान** (सं. न.) पवित्र स्थान, देवमंदिर; त्याच्या खर्चासाठीं दिलेलें उत्पन्न वगैरे.
**देवस्व** (सं. न.) देवाला अर्पण केलेली वस्तु, इनाम, इ०.
**देवळ** (सं. देवालय न.) देऊळ, देवमंदिर.
**देवळक** (प्रा. पु.) देवापुढच्या पैशावर निर्वाह करणारा; पुजारी (स्वा० दि० ६।५।३५).
**देवळी** (स्त्री.) भिंतींतला कोनाडा; खास देवासाठीं केलेलें (त्यांत पुजाऱ्यानें सुद्धां उभें राहतां कामा नये) असें लहान मंदिर.
**देवाईल, देवाईलें** (प्रा. न.) देऊळ.
**देवांगण** (स्त्री.) शपथ.
**देवांगना** (सं. स्त्री.) अप्सरा.
**देवाणघेवाण** (न.) द्यावें व त्याचा मोबदला घ्यावा असा व्यवहार; तडजोड.
**देवाधिदेव** (सं. पु.) महादेव.
**देवाधीन होणें** मरणें.
**देवारणें** (न.) रस्त्यावर मैलामैलाच्या अंतरावर दगड पुरला असतो तो; डोक्यावरचें ओझें उतरण्याची उंच जागा.
**देवालय** (सं. न.) देऊळ, देवमंदिर.
**देवाला** (पु.) देव्हारा.
**देवालेवा** (हिं. देनालेना पु.) रकमा उसन्या देणें व घेणें; व्यवहार; देवघेव.
**देवाज्ञा** (सं. स्त्री.) मरण.
**देवी** (स्त्री.) जगदंबा, देवता; एक सांसर्गिक रोग. **देवी काढणें**—देवीच्या रोगाची गोस्तनापासून काढलेली लस अंगांत टोंचणें; **देवी जागविणें**–रात्रीं देवीपाशीं जागरण करीत बसणें.
**देव्हडा** (प्रा. वि.) वाकडा, मोठा.
**देव्हारा** (हिं. पु.) देव ठेवण्यासाठीं केलेलें सुशोभित गृह; (स्त्री.) देव अंगांत येतो असें ढोंग करणारी स्त्री (भा० १०।५७०).
**देव्हारे माजणें** प्रतिष्ठा होणें.
**देव्हारें** (न.) पूजेचें अवडंबर; ढोंग; प्रतिष्ठा; स्तोम.
**देवो** (प्रा. पु.) दिवस. [प्रांत.
**देश** (सं. पु.) मुलूख; पश्चिम घाटावरचा
**देशक** (सं. पु.) देसाई.
**देशकालवर्तमान** (सं. न.) देशाची सांप्रतची स्थिति; परिस्थितीचें स्वरूप.
**देशकालज्ञ** (सं. वि.) परिस्थिति पूर्णपणें ओळखणारा.
**देशधडी** (स्त्री.) देशोदेशीं भीक मागत जाण्याची स्थिति; वाताहत; (अ.) देशपार.
**देशपांड्या** (पु.) महालाच्या देशमुखाच्या हाताखालचा एक अधिकारी.
**देशमुख** (पु.) महालाचा मुख्य अधिकारी.
**देशमुखी** (स्त्री.) देशमुखाचें काम; त्याचा हक्क.

**देशलेखक** (प्रा. पु.) कुळकर्णी.
**देशवटी** (प्रा. अ.) देशपार.
**देशवळ** (वि.) प्राकृत, प्रवृत्तिरूप (विवे० पू० ३।४). [एक भेद.
**देशस्थ** (सं. वि.) महाराष्ट्रीय ब्राह्मणांतला
**देशाचार** (सं. पु.) देशांतली रूढि.
**देशाटन** (सं. न.) देशोदेशाचा प्रवास. [जाणें.
**देशांतर** (सं. न.) परका देश; दुसऱ्या देशीं
**देशावर** (प्रा. न.) भिक्षाटन.
**देशिक** (सं. पु.) गुरु, मार्गदर्शक (मोरो० कृष्ण० ४५।६८); पथिक, वाटसरू.
**देशी** (वि.) स्वदेशांत झालेलें; (स्त्री.) देश भाषा.
**देशी शब्द** ज्यांचें मूळ संस्कृत भाषेंत सांपडत नाहीं असे शब्द.
**देशोधडीं** देशधडी पहा.
**देस** (पु.) गायनांतला एक राग.
**देसक** (पु.) एक वतनदार अधिकारी.
**देसधूळ** (स्त्री.) अतिशय दारिद्र्य.
**देसवट** (वि.) देशावरचा.
**देसवटा** (प्रा. पु.) प्रदेश (मोरो० वन० १०।७०); देशाटन. [देशमुख.
**देसाई** (पु.) परगण्याचा मुख्य अधिकारी;
**देह** (सं. पु.) शरीर, दिवस (तुका० २०९३); (फा. पु.) गांव.
**देहझाडा** देहेझाडा पहा.
**देहत्याग** (सं. पु.) मृत्यु.
**देहंदगी** (फा. स्त्री.) दातृत्व; देणगी.
**देहदंड** (सं. पु.) शरिराला कष्ट; शारीरिक शिक्षा. [सहज कर्म.
**देहधर्म** (सं. पु.) देहाचें आहारनिद्रादि
**देह धारणा** (स्त्री.) निर्वाह, जीवन.
**देहनगी** (हिं. स्त्री.) देणगी.
**देहपात** (सं. पु.) शरिराचा नाश, मृत्यु.
**देहभान** (सं. पु.) शरिराविषयींची शुद्धि.
**देहयात्रा** (सं. स्त्री.) देहाचें पोषण.
**देहली** (सं. स्त्री.) उंबरठा.
**देहाडा** (प्रा. पु.) देह, देहाचा व्यापार.
**देहांत** (सं. पु.) मृत्यु, देहाचा नाश.
**देहान्त प्रायश्चित्त** (सं. न.) मरण येई इतकी कडक शिक्षा.
**देहात्मवादी** (सं. पु.) शरीर हाच आत्मा, याहून निराळा आत्मा नाहीं, असें चार्वाकासारखें मत धारण करणारा.
**देहाय** (अ.) गांवगन्ना, गांवागांवास.
**देहावसान** (सं. न.) मरण.
**देही** (सं. पु.) शरीर धारण करणारा.
**देहुडा** (प्रा. वि.) वाकडा; पायावर पाय ठेवून म्ह० दीड पायावर उभा; (पु.) चवडा. [गच्ची.
**देहुडी** (हिं. स्त्री.) देवडी; तिजवरची
**देहे झाडा** (फा. पु.) गांवचें नोंदणीपत्रक.
**दैत्य** (सं. पु.) राक्षस.
**दैत्यगुरु** (सं. पु.) शुक्राचार्य.
**दैदीप्यमान** (सं. देदीप्यमान वि.) प्रकाशणारा, चकचकीत.
**दैन** (सं. न.) दीनता.
**दैनंदिन** (वि.) रोजची. [प्रार्थना करणारा.
**दैनभाक्या** (वि.) करुणा आणण्यासारखी
**दैना** (सं. स्त्री.) दैन्य; दुर्दशा, अपेष्टा.
**दैनिक** (सं. वि.) रोजचें; (न.) रोजचें वर्तमानपत्र.
**दैन्य** (सं. न.) दीन स्थिति.
**दैन्यदशा** (सं. स्त्री.) दारिद्र्याचावस्था.
**दैर्घ्य** (सं. न.) लांबी.
**दैव** (सं. न.) नशीब. **दैव काढणें**— उत्कर्ष पावणें; **दैवानें हात देणें**—दैव अनुकूल होणें; **दैवावर हवाला**— नशीब करील तें करील असें म्हणून सगळा भार अदृष्टावर टाकून बसणें.
**दैवगति** (सं. स्त्री.) नशिबाचे खेळ. [गोष्ट.
**दैवघटना** (सं. स्त्री.) अकल्पित घडणारी
**दैवणें** (प्रा. क्रि.) दैववान् निघणें.
**दैवत** (सं. न.) देवता. [ती स्थिति.
**दैवदशा** (सं. स्त्री.) नशिबीं लिहिली असेल
**दैवयोग** (सं. पु.) दैवाची घटना; यदृच्छा.
**दैववशात्** (अ.) प्रारब्धयोगेंकरून.
**दैववान्** (सं. वि.) भाग्यवान्, चांगल्या नशिबाचा.
**दैवहीन** (सं. वि.) दुर्दैवी.
**दैवज्ञ** (सं. पु.) जोशी; ग्रहांच्या स्थितीवरून भविष्य कथन करणारा.
**दैवाथिल** (प्रा. वि.) दैवाचा आश्रय करणारे (भक्तलीला० १६।१४७).

[library stamp]

**दैविक** (सं. वि.) देवानें केलेलें; (न.) नशीव, भाग्य.
**दैवी** (सं. स्त्री.) मंत्र, तंत्र, प्रार्थना इ०कांनीं रोगइ० वर उपचार करण्याचा प्रकार; **दै० संपत्ति**––देवापासून प्राप्त झालेली अर्थात श्रेष्ठ प्रतीची संपत्ति. (दया, न्यायबुद्धि. करुणा, इ० गुण).
**दैशिक** (सं. वि.) देशी; स्थानिक.
**दैहिक** (सं. वि.) शरिरासंबंधाचें, शारीरिक.
**दोकडा** (न.) दुगाणी; कच्च्याचा १० वा हिस्सा; मोत्यांच्या वजनांत चवाचा शतांश.
**दोख** (सं. दोष पु. ) ठपका, न्यून, दोष.
**दोगला** (वि.) मिश्र जातीचा.
**दोग्धा** (सं. पु.) दूध काढणारा.
**दोघ** (प्रा. वि.) दोन.
**दोघुले** (प्रा. वि.) दोन.
**दोघुलेपण** (प्रा. न.) दोघांमधील प्रेम (अमृ० १।६); द्वैत.
**दोडका** (पु.) एक फळभाजी.
**दोड, दोडा** (प्रा. वि.) द्वाड; (पु.) कापसाचें बोंड; वेलदोडा. [ टाकें.
**दोण** (स्त्री.) गुराकरितां कोटिंबा, पाण्याचें
**दोणगें** (न.) लहान दोण.
**दोणा** (पु.) द्रोण.
**दोणी** (प्रा. स्त्री.) होडगें.
**दोतुकी, दोतूक** (वि.) गायनांत ज्याला अस्ताई व अंतरा हीं आहेत, पण आभोग नाहीं असें दोन अवयवांचें ध्रुपद.
**दोंद** (न.) सुटलेलें पोट, मेद. [ पोटाचा.
**दोंदाळ, दोंदील, दोंदी** (वि.) मोठ्या
**दोंदें येणें** तृप्ति होणें.
**दोन** (वि.) २. **दोन दिवस**––थोडा काळ; **दोन दिवसांचा**– अल्पकाळ टिकणारा.
**दोनप्रहर** (पु.) दुपार. **दो०ची काळजी**–– पोटापाण्याची चिंता.
**दोन्ही सांज** (अ.) सकाळीं व संध्याकाळीं.
**दोमदोम करीत फिरणें** भिक्षा मागत फिरणें.
**दोर** (पु.) जाड दोरी.
**दोरक** (सं. पु.) दोरा; दोरखंड.
**दोरकस** (पु.) जाड दोर.
**दोरखंड** (पु.) खूप जाड दोर.
**दोरणी** (स्त्री.) दोरी.
**दोरधा** (पु.) एक प्रकारचें पट्ट्यापट्ट्याचें कापड; तडा, चीर, भेग. [ चीर; झरा.
**दोरा** (सं. दोरक पु.) धागा, दोरी; संबंध;
**दोरी** (स्त्री.) बारीक दोरा. **दोरी सैल सोडणें**––नियम ढिला करणें, स्वतंत्रता देणें.
**दोरीसूत** (अ.) सरळ रेषेंत.
**दोर्दंड** (सं. पु.) बाहु, भुजा.
**दोलयात्रा** (सं. स्त्री.) श्रीकृष्णाची मूर्ति चौपाळयावर बसवून तिची मिरवणूक काढण्याची उत्तर हिंदुस्थानांतली रूढि.
**दोला** (सं. पु.) झोपाळा, झुला.
**दोलायमान** (सं. वि.) झोके खाणारा; डळमळीत. [ किंवा आधिक्य.
**दोष** (सं. पु.) चूक, अपराध, कमीपणा
**दोषदृष्टि, दोषैकदृष्टि** (सं. स्त्री.) दोष तेवढे नेमके शोधून काढणारी दृष्टि; छिद्रान्वेषणबुद्धि; (वि.) दोष तेवढे पाहणारा.
**दोषा** (प्रा. स्त्री.) रात्र.
**दोषारोप** (सं. पु.) ठपका.
**दोषी** (सं. वि.) अपराधी, गुन्हेगार.
**दोस्त, दोस्तदार** (फा. पु.) मित्र.
**दोस्तदारी** (फा. स्त्री.) मैत्री.
**दोह** (पु.) दूध काढणें.
**दोहद** (सं. पु.) डोहाळा.
**दोहन** (सं. न.) दूध काढणें.
**दोहरा** (पु.) हिंदुस्थानी भाषेंतला एक छंद.
**दोहवा** (पु.) दूधदुभतें.
**दोहाला** (पु.) धार काढणें.
**दोहींसांज** दोन्ही सांज पहा.
**दोहो जिवांचा निवाडा** सुखप्रसूति.
**दोहोत्रा** (पु.) दरमहा दर शेंकडा २ प्रमाणें व्याजाचा दर.
**दौड** (हिं. स्त्री.) धावपळ.
**दौडणें** (क्रि.) पळणें, धावणें.
**दौंडी** (स्त्री.) दवंडी, दांडोरा.
**दौत** (अर. दवात स्त्री.) शाईचें पात्र.
**दौत्य** (सं. न.) दूताचें किंवा जासुदाचें काम.
**दौरात्म्य** (सं. न.) दुष्टपणा.
**दौरा** (हिं. पु.) फिरती.

**दौर्जन्य** (सं. न.) दुष्टपणा, दुर्जनता.
**दौर्बल्य** (सं. न.) दुबळेपणा, अशक्तपणा.
**दौर्भाग्य** (सं. न.) दुर्दैवीपणा, दुर्दैव.
**दौर्मनस्य** (सं. न.) दुर्भावना; मनःक्षोभ, उद्वेग.
**दौर्हृद** (सं. न.) गर्भ; डोहाळा; वैरभाव.
**दौलत** (अर. स्त्री.) संपत्ति; संस्थान; राज्य. **दौ० चा खांब**—राज्याचा मुख्य आधार.
**दौलत ज्यादा** (अर. स्त्री.) तुझा उत्कर्ष होवो असा आशीर्वाद; भरभराट; उत्कर्ष; नाच्यापोऱ्याला तमाशा झाल्यानंतर कोणी श्रीमंत व रंगेल मनुष्य त्या पोराला आपल्या मांडीवर बसवून देणगी देतो ते.
**दौलतदार, दौलतवान्** (वि.) श्रीमंत.
**दौलतबंकी** (फा. पु.) मुख्य दरवाजावरील रक्षक.
**दौलतबंद** (फा. वि.) श्रीमंत.
**दौहित्र** (सं. पु.) मुलीचा मुलगा ; (न.) त्यानें करावयाचें मातामहश्राद्ध.
**द्यानत** (फा. स्त्री.) शुद्ध वासना.
**द्यावापृथिवी** (सं. स्त्री.) स्वर्ग व पृथ्वी.
**द्याहा** (प्रा. अ.) दिवसां, दुपारीं.
**द्यु** (सं. न.) आकाश; स्वर्ग; दिवस.
**द्युति** (सं. स्त्री.) प्रकाश.
**द्युमणि** (सं. पु.) सूर्य.
**द्यूत** (सं. न.) जुगार.
**द्यूतकार** (सं. पु.) जुगारी.
**द्योतक** (वि.) दाखविणारें; (न.) चिन्ह.
**द्योतणें** (क्रि.) प्रकाशणें.
**द्रव** (सं. पु.) रस; पाझर; आर्द्रता.
**द्रवणें** (क्रि.) वितळणें; पाझरणें, मृदु होणें.
**द्रविड** (सं. पु.) एक देश.
**द्रवीभवन** (सं. न.) वितळणें.
**द्रव्य** (सं. न.) धन, दौलत; पदार्थ; मूलतत्त्व.
**द्रव्यवान्** (सं. वि.) श्रीमंत, पैसेवाला.
**द्रव्यशाली** (सं. वि.) श्रीमंत.
**द्रव्यहीन** (सं. वि.) गरीब.
**द्रव्येषणा** (सं. स्त्री.) द्रव्य मिळावें अशी [ इच्छा.
**द्रष्टव्य** (सं. वि.) पाहण्यास योग्य.
**द्रष्टा** (सं. वि.) पाहणारा.
**द्राख** (स्त्री.) द्राक्ष.
**द्रावा** (पु.), **द्रावें** (न.), **द्राभा** (पु.), **द्राभें** (न.) घाणपाणी; गरगट; ढपळवणी.
**द्राव** (सं. पु.) विरघळणें.
**द्रावक** (सं. वि.) विरघळण्यास लावणारा.
**द्रावण** (सं. न.) विरघळण्यास लावणारें द्रव्य.
**द्राविड** (सं. पु.) द्रविड देशांतला मनुष्य.
**द्राविडी प्राणायाम** (पु.) एकादी गोष्ट करण्याचा मुद्दाम स्वीकारलेला वक्र मार्ग; लांबचा व कंटाळवाणा प्रवास.
**द्राव्य** (सं. वि.) विरघळणारें.
**द्राष्ट** (सं. दाष्ट वि.) खाष्ट, तुसडा.
**द्राक्ष** (सं. द्राक्षा न.) अंगूर.
**द्राक्षा** (सं. स्त्री.) द्राक्षाचा वेल; द्राक्ष.
**द्राक्षापाक** (सं. पु.) द्राक्षाचा केलेला एक औषधी पाक; द्राक्षाचा रस जसा पारदर्शक व स्वच्छ असतो त्याप्रमाणें ज्याचा अर्थ स्पष्ट व असंदिग्ध आहे अशा प्रकारची लेख-रचना किंवा भाषण.
**द्राक्षासव** (सं. पु.) द्राक्षाचें मद्य.
**द्रु** (सं. पु.) वृक्ष, झाड.
**द्रुत** (सं. वि.) शीघ्र.
**द्रुतगामी** (सं. वि.) शीघ्रगति, चपळ.
**द्रुतविलंबित** (सं. न.) छंदःशास्त्रांतलें एक वृत्त. याच्या चरणांत १२ अक्षरें व न, भ, र, हे चार गण असतात.
**द्रुति** (सं. स्त्री.) द्रवणें; पळून जाणें; (प्रा.) मकरंद; सुवास (ज्ञा० १८।२७६).
**द्रुम** (सं. पु.) वृक्ष, झाड.
**द्रोण** (पु.) वाटीसारखें पानाचें केलेलें पात्र; होडग्याच्या आकाराचें पात्र.
**द्रोणी** (सं. स्त्री.) कढई, डोणी पहा.
**द्रोह** (सं. पु.) द्वेष, विश्वासघात.
**द्वंद्व** (सं. न.) जोडी; जोडपें; भांडण;
**द्वंद्वयुद्ध** (सं. न.) मल्लयुद्ध; कुस्ती; [ कुस्ती. दोघांचें युद्ध.
**द्वय** (सं. न.) जोडी.
**द्वाड** (वि.) दुष्ट, व्रात्य, खोडकर.
**द्वाडवाणा** (वि.) नीच, तिरस्कारार्ह.
**द्वादश** (वि.) बारा, बारावा.
**द्वादशी** (सं. स्त्री.) पंधरवड्यांतला बारावा दिवस.
**द्वापर** (सं. पु.) चार युगांपैकीं तिसरें.

नगर वाचनालय सातारा
संग्रह विभाग

**द्वामोशायन** (सं. द्वामुष्यायण पु.) गुरूच्या आज्ञेनें दुसऱ्याच्या वायकोच्या ठायीं उत्पन्न केलेला पुत्र; द्विगोत्री; द्विधाभाग.
**द्वार** (सं. न.) दार, दरवाजा; साधन.
**द्वारकेचें लेणें** श्रीकृष्ण.
**द्वारपाल** (सं. पु.) देवडीवरचा शिपाई.
**द्वाररक्षक** (पु.) पहारा करणारा.
**द्वारा** (सं. द्वार अ.) मार्फत, कडून, मध्यस्थीनें.
**द्वारावती** (सं. स्त्री.) द्वारका; गोपीचंदन.
**द्वाही** (हिं. दुहाई स्त्री.) शपथ; दांडोरा, दौंडी; जाहीरनामा.
**द्विगुण** (सं. वि.) दुप्पट.
**द्विघात** (सं. पु.) संख्येचा वर्ग. [ दांत.
**द्विज** (सं. पु.) ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य; पक्षी;
**द्विजिव्ह** (सं. वि.) दोन जिभांचा (सर्प); दुटप्पी; लवाड; चहाडखोर.
**द्वितीय** (सं. वि.) दुसरा.
**द्वितीय संबंध** (सं. पु.) दुसरें लग्न.
**द्वितीया** (सं. स्त्री.) पंधरवडयाचा दुसरा दिवस; द्वितीया विभक्ति.
**द्वित्त** (वि.) अक्षर दोनदां येऊन होणारें संयुक्त (अक्षर).
**द्वित्व** (सं. न.) युग्म, जोडी; दोनदां प्रयोग किंवा उच्चार.
**द्विदल** (सं. वि.) दोन दळांचें.
**द्विदल राज्यपद्धति** दोघांच्या हातांत जेथें सत्ता विभागली आहे अशी राज्यपद्धति.
**द्विधा** (सं. वि.) दुभंग; डळमळीत; (अ.) दोन प्रकारचें.
**द्विपद, द्विपाद** (सं. वि.) दोन पायांचा.
**द्विरुक्ति** (सं. स्त्री.) पुनरुच्चार.
**द्विरेफ** (सं. पु.) भ्रमर.
**द्विरेफक** (प्रा. पु.) भ्रमर.
**द्वीप** (सं. न.) बेट.
**द्वीपकल्प** (सं. न.) तीन बाजूंनीं पाण्यानें वेष्टित व एका बाजूनें जमिनीशीं जोडलेला असा प्रदेश.
**द्वेष** (सं. पु.) शत्रुत्व, मत्सर, दावा.
**द्वेष्टा** (सं. पु.) द्वेष करणारा.
**द्वैत** (सं. न.) भेदभाव; जोडी; देव व जीव निरनिराळे मानणें; एका वनाचें नांव.
**द्वैतभाव** (सं. पु.) मनाचा अनिश्चितपणा; भिन्न भाव; जीव व शिव (देव) यांच्यांत भिन्नता मानण्याची बुद्धि.
**द्वैधीभाव** (सं. पु.) द्विधामत; दुफळी.
**द्वैपायन** (सं पु.) श्रीवेदव्यास.
**द्व्यर्थी** (सं. वि.) ज्याला दोन अर्थ आहेत असा; दुटप्पी.
**द्व्यामुष्यायण** (पु.) मुंज झाल्यावर दत्तक गेलेला मुलगा; दोन बापांचा मुलगा; संशयित गोष्ट.

---

## ध

**ध** मराठी व्यंजनमालेंतील एकोणिसावें व्यंजन.
**ध** ध हें अक्षर; **ध चा मा करणें**— दगलबाजीनें शब्दांत फार महत्त्वाचा फरक करणें. (पूर्वी पेशवाईच्या काळांत राघोबादादा पेशवे यांची स्त्री आनंदीबाई हिच्या मनांत नारायणराव पेशवे यास ठार मारवून पेशवेपद आपल्या पतीला मिळवून द्यावें असा दुष्ट विचार येऊन तिनें युक्तीनें गारद्यांकडून नारायणरावास धरविण्याविषयींचा हुकूम राघोबादादाकडून मिळविला, आणि मग त्या हुकुमांतले 'धरावें' या शब्दांतल्या 'ध' या अक्षराच्या जागीं 'मा' हें अक्षर कोणाकडून लिहविलें. त्यामुळें नारायणराव धरला जाण्याच्या ऐवजीं मारला गेला. या महत्त्वाच्या ऐतिहासिक घटनेवरून हा वाक्संप्रदाय प्रचारांत आला आहे).
**धक** (स्त्री.) आंच, उष्णता, धग.
**धकटा** (वि.) धाकटा.
**धकटी** (स्त्री.), **धकटें** (न.) आगटी.
**धकणें** (क्रि.) निभावून जाणें.
**धकधक** (स्त्री.) धडधड.
**धकविणें** (क्रि.) निभावून नेणें.
**धका, धक्का** (पु.) ढका, हिसका, आघात; पाण्याचा आघात सहन करण्याजोगी बांधलेली भिंत.

[stamp]

**धकाधक, धकाधकी** (स्त्री.) धक्काबुक्की, खेचाखेची; झोंबी. **ध० चा मामला**—ज्यांत दुसऱ्याला चार धक्के देण्याचा किंवा त्याच्याकडून मिळालेले खाण्याचा प्रसंग यावयाचा असें काम; शांततेनें, जिवास कष्ट न होतां किंवा दुसऱ्याशीं भांडण्याचा प्रसंग आल्याशिवाय न होणारें काम.
**धकाबुकी** (स्त्री.) कोणाला धक्के मिळतात व कोणाला मार मिळतो असा गोंधळ.
**धकाविणें** (क्रि.) धक्का देणें, ढकलणें.
**धकी, धक्की** (स्त्री.) गचांडी.
**धकीबुकी** (स्त्री.) धकाबुकी पहा.
**धक्कड** (वि.) धष्टपुष्ट.
**धक्का** (पु.) धका पहा.
**धक्काबुक्की** धकाबुकी पहा.
**धग** (स्त्री.) आंच, दाह, उष्णता.
**धगड** (पु.) प्रियकर, यार; नवरा; सर्वांनीं ज्यापुढें हार खावी असा मनुष्य.
**धगडी** (स्त्री.) रखेल स्त्री.
**धगडे** (पु. अने.) खोडया.
**धगधगणें** (क्रि.) प्रज्वलित होणें; तापणें.
**धगधगीत** (वि.) रसरशीत, झळझळीत, तेजःपुंज.
**धगावणें** (क्रि.) आंच लागणें.
**धगी** (प्रा. स्त्री.) उष्णता; आंच.
**धगें** (न.) आगटी.
**धचोट, धश्चोट** (वि.) दांडगेश्वर, उद्धट.
**धज** (हि. स्त्री.) डौल, ऐट; नीटनेटकी आकृति. **धज देणें**—काम करण्यास पुढें होणें; **धज मारणें**—गर्दीतून पुढें येणें. [ निशाण.
**धज** (सं. ध्वज पु.), **धजा** (स्त्री.) झेंडा,
**धजणें** (क्रि.) धाडस करणें, धैर्य धरून पुढें होणें.
**धजदार** (वि.) ठळक, मोठा, भव्य; उदार अंतःकरणाचा; धीट; धाडसी; मोठें धाडसाचें चांगलें कृत्य करण्याच्या कामीं ज्याचें पाऊल पुढें आहे असा.
**धजावणें** (क्रि.) धजणें पहा.
**धट** (पु.) वजन करण्याचा टांगलेला कांटा; टेकण; मोजणीपत्रकांतला तपशील; (प्रा. पु.) निश्चय; (वि.) दांडगा, धीट; (अ.) सरळपणानें.
**धटकुला** (वि.) धीट.
**धटाई** (स्त्री.) धैर्य, धाडस, धट्टपणा.
**धटिंग, धटिंगण, धटांगण, धटुकला** (वि.) धष्टपुष्ट; धीट; दांडगेश्वर; आडदांड; धिप्पाड; भीडमुरवत न धरणारा.
**धटी** (सं. पु.) शंकर.
**धटी, धट्टी** (प्रा. स्त्री.) मूल्यवान् रेशमी वस्त्र; धोतराच्या पदराची जाडी.
**धटु** (प्रा. वि.) धटिंगण.
**धट्ट** (वि.) धीट; दांडगा.
**धट्टाकट्टा** (वि.) निरोगी व बळकट.
**धड** (न.) मुंडक्याशिवाय शरीर; (वि.) चांगलें, सबंध; (अ.) उघड, पुरतेपणीं.
**धड** (स्त्री.) बाजू; कांठ.
**धडक** (स्त्री.) धास्ती, भीति; ठोकर, जोराचा धक्का; टक्कर.
**धडकणें** (क्रि.) थडकणें, येऊन पोंचणें; भडकणें, फार तापणें; धडधडणें; (बंदूक) जोरानें उडणें.
**धडकफडक** (वि.) स्पष्ट बोलणारा; सरळ; एकदम काम करून टाकणारा; अकृत्रिमपणाचें (वर्तन). [ धास्ती, धडक.
**धडका** (वि.) धड, सबंध, पूर्ण; (पु.) धक्का;
**धडकावणें** (क्रि.) निर्भयपणें बोलणें; निर्धास्तपणें करणें.
**धडकी** (स्त्री.) धास्ती. **धडकी भरणें**—फार भीति वाटल्यानें ऊर धडधडूं लागणें.
**धडंग** (वि.) मजबूत, घटमूट; (अ.) जोरानें. [ स्थिति.
**धडगत** (स्त्री.) आशा वाटण्यासारखी
**धडणी** (हि. स्त्री.) काढणी.
**धडधडणें** (क्रि.) छातीचें उडणें; पडणें; धडधडत खालीं येणें.
**धडधडाट** (पु.) मोठी गर्जना.
**धडधडीत** (अ.) उघडउघड, स्पष्टपणें.
**धडधाकट, धडधाकड** (वि.) धट्टाकट्टा, खणखणीत.

**घडधोप, घडघोपट** (वि.) खणखणीत; शाबूत; धष्टपुष्ट.
**घड ना गोडाचा** (वि.) निरुपयोगी; नापसंत; अनिश्चित.
**घडपड** (स्त्री.) खटाटोप, परिश्रम, खटपट.
**घडपडणें** (क्रि.) तडफडणें; आदळ-आपट करणें; जोरानें खटपट करणें.
**घडपा** (पु.) जुन्या लुगड्याचा किंवा कपड्याचा फाडून काढलेला तुकडा.
**घपफड** घडपड पहा.
**घडफडणें** (क्रि.) अव्यवस्थित रीतीनें पडणें.
**घडफुडीं** (अ.) खरोखर.
**घडफुडें** (प्रा. वि.) खरें (ज्ञा० ९।२४१).
**घडफुला** (प्रा. वि.) पूर्ण; प्रदीप्त; खरा; कुशल; पोकळ; निश्चयात्मक; (अ.) सत्वर (भा० ५।९५).
**घडवई** (पु.) बाजारांत येणारा माल तोलण्याच्या कामावरील अधिकारी.
**घडवता** (प्रा. वि.) निधडा, निर्भय.
**घडवती** (स्त्री.) धडोती पहा.
**घडशी** (स्त्री.) टक्कर.
**घडसा** (वि.) वैगुण्यरहित.
**धडा** (पु.) पाठ; उदाहरण; कांहीं शेराचें माप किंवा वजन; निश्चय; टोळी; रिवाज, वहिवाट (तुका० ६३९). **धडा घेणें**—शिकणें.
**धडाका** (पु.) सपाटा, तडाका, झपाटा.
**धडाडणें** (क्रि.) मोठा आवाज करून पडणें; (काळीज) जोरानें उडणें; चीर पडणें; भडकणें.
**घडाडी** (स्त्री.) धैर्य; नेट; अखंडित क्रम; उत्साहपूर्वक यत्न.
**धडाधड, धडाधडां** (अ.) जोराजोरानें; झपाट्यानें. सोसाट्यानें.
**धडाधोंगडा** (वि.) जाडाभरडा, टिकाऊ.
**धडाळी** (स्त्री.) हगवण.
**धोंडग** (वि.) धटिंग, धटिंगण.
**धोंडगण** (वि.) धटिंग पहा.
**घडी** (स्त्री.) एक अनिश्चित वजन; रास; रेशीम, जरतार, इ० चा काठ; पडवी; वजनाचा काटा.
**घडीपगडी** (स्त्री.) कपडालत्ता, पोषाख.

**घडूत** (प्रा. वि.) शोभिवंत; (न.) धडोतीचें वस्त्र.
**घडेवांटप** (न.) एकत्र कुटुंबांतील जमिनीची फाळणी.
**घडोत** (न.) धडवत.
**घडोती** (धट + ओत स्त्री.) नेहमीं वापरण्याचा कपडा; नेहमींचा वापर; (वि.) मजबूत, टिकाऊ.
**घडोतें** (प्रा. वि.) सुशोभित; (न.) धड वस्त्र.
**धड्ड** (वि.) ठोंब्या.
**धण** (सं. धन स्त्री.) एकाचें नुकसान किंवा नाश होऊन त्यामुळें दुसऱ्यास अकल्पित होणारा फायदा; इच्छा.
**धणंगणें** (क्रि.) ताव मारणें.
**धणा, धना** (पु.) कोथिंबिरीचें बीज.
**धणी** (प्रा. स्त्री.) इच्छा; विपुलता; (पु.) धनी, स्वामी; मालक. [होईपर्यंत.
**धणीवरी** (प्रा. अ.) पोटभर; तृप्ति
**धणू** (सं. धनु पु.) धनुष्य. [डागडुजी.
**धंतरमंतर** (न.) जादूटोणा; तात्पुरती
**धताल, धताल्या, धत्ताल, धत्ताल्या** मनांतली गोष्ट वेलाशक बोलून जाणारा; हवीं तशीं वचनें अविचारानें देणारा; धोताल. [वचनांचा सुकाळ.
**धताली** (स्त्री.) अविचारानें बोलणें;
**धतुरा, धत्तुरा** (सं. धत्तूर पु.) अंगठा; फसवणूक, धूर्तता.
**धत्तुर** (सं. पु.) धोत्रा.
**धत्त्या** (पु.) बोजा; भार.
**धंदधंद** (प्रा. पु.) ढंग.
**धंदरणें** (क्रि.) पोकळ वचनें देऊन फसविणें.
**धंदरा, धंदऱ्या** (वि.) गडबड्या; धांदल्या.
**धंदा** (हिं. पु.) उद्योग; रोजगार, काम, वृत्ति.
**धंदेवाईक** (वि.) रोजगार करणारा; धंद्यांत पडलेला.
**धन** (सं. न.) द्रव्य, संपत्ति; गणितांतलें + हें चिन्ह; (सं. धनुस् पु.) धनुष्य; (स्त्री.) धन, रास. **धन करणें**—आयतें मिळवून देणें.
**धनकट, धणकट** (वि.) मजबूत, दणगट.
**धनकुबेर** (सं. पु.) अतिशय श्रीमंत मनुष्य.

**धनकुली** (सं. धनुस् स्त्री.) लहान धनुष्य.
**धनको** (पु.) सावकार, ऋण देणारा.
**धनगर** (पु.) मेंढ्या पाळणारा, एका जातीचें नांव.
**धनगाडा, धनगाढा** (प्रा. वि.) श्रीमंत.
**धनंजय** (सं. पु.) अर्जुन, अग्नि.
**धनत्तर** (सं. धनवत्तर वि.) श्रीमंत, हुशार; प्रचंड; प्रशस्त; समर्थ.
**धनतेरस, धनत्रयोदशी** (स्त्री.) आश्विन व० १३.
**धनद** (सं. पु.) कुबेर.
**धनदौलत** (सं. अर. स्त्री.) संपत्ति.
**धनधान्य** (सं. न.) संपत्ति व धान्य; सुस्थिति.
**धनपिसा** (वि.) पैसा मिळविण्याच्या नादीं लागलेला; पैशाचा मनस्वी लोभी.
**धनमत्त, धनमस्त** (वि.) द्रव्यामुळें उन्मत्त झालेला.
**धनरेषा** (सं. स्त्री.) सामुद्रिकांत-एखाद्याला धन किती मिळेल तें दर्शविणारी तळहातावरची रेषा. **धनरेषा उमटणें**—अकल्पित रीतीनें द्रव्यप्राप्ति होऊं लागणें.
**धनलोभी** (सं. वि.) संपत्ति मिळण्याची प्रबळ इच्छा मनांत बाळगणारा.
**धनवडी** (वि.) धनवड नांवाची लुगडयाची पेठ आहे तेथलें. [होईपर्यंत.
**धनवर, धनवरी** (प्रा. अ.) यथेच्छ, तृप्ति
**धनवान्** (सं. वि.) श्रीमंत, धनशाली.
**धना** (सं. धान्न पु.) धणा पहा.
**धनाढ्य** (सं. वि.) श्रीमंत.
**धनात्यय** (सं. पु.) द्रव्यक्षय; द्रव्यनाश.
**धनांध** (वि.) पैशाचा धूर डोळयांवर आलेला.
**धनाध्यक्ष** (सं. पु.) खजीनदार.
**धनाश्री** (सं. स्त्री.) एका रागाचें नांव.
**धनासा** (सं. वि.) श्रीमंत.
**धनिक** (सं. स्त्री.) धनाढ्य, संपत्तिमान.
**धनिष्ठा** (सं. स्त्री.) तेविसावें नक्षत्र.
**धनी** (सं. पु.) मालक; धनवान् मनुष्य.
**धनीजोग** (वि.) घेणाराच्या नांवाची (हुंडी); ज्याच्या नांवाची हुंडी असेल त्यालाच तिची रक्कम मिळावयाची अशी (हुंडी). [यजमानीण.
**धनीण** (सं. धनिनी स्त्री.) मालकीण,
**धनु** (सं. न.) धनुष्य, धनरास.
**धनुकणें** (क्रि.) पिंजणें. [लहानसा कमठा.
**धनुकली** (हिं. स्त्री.) कापूस पिंजण्याचा
**धनुर्धर, धनुर्धारी** (सं. वि.) हातीं धनुष्य धारण करणारा.
**धनुर्मास** (सं. पु.) धन-राशींत सूर्य असतो तो काल. या मुदतींत सूर्योदय होतांच त्याला नैवेद्य अर्पण करण्याची चाल आहे.
**धनुर्वाड** (प्रा. वि.) धनुर्विद्यानिपुण.
**धनुर्वात** (सं. पु.) ज्याच्या योगानें माणसाचें शरीर धनुष्यासारखें वाकडें होतें असा एक रोग.
**धनुर्विद्या** (सं. स्त्री.) तिरंदाजी.
**धनुवर** (पु.) धनुर्धर (अनंत० पृ० ३८).
**धनुष्कोटि** (सं. स्त्री.) धनुष्याचें टोक.
**धनुष्य** (सं. न.) धनु, कमठा.
**धने** (पु.) कोथींबिरीचें बीं.
**धनेश्वर** (सं. वि.) श्रीमंत; (पु.) कुबेर.
**धनेश्वरी** (सं. स्त्री.) एक रागिणी.
**धन्नाशेट** (पु.) व्याजोक्तीनें—मोठा श्रीमंत मनुष्य.
**धन्य** (सं. वि.) पुण्यवान्, कृतकृत्य झालेला; (स्त्री.) कृतकृत्यता; जन्माचें सार्थक.
**धन्यवाद** (सं. पु.) स्तुति; आभार.
**धन्वंतरि** (सं.वि.) देवांचा वैद्य; उत्तम वैद्य.
**धन्वी** (सं. वि.) धनुर्धारी. [करून.
**धपकन्** (अ.) 'धप्' असा पडण्याचा आवाज
**धपका** (पु.) धप्पा, पोकळ थापटी.
**धपकाविणें** (क्रि.) धप्पा मारणें.
**धपला** (पु.), **धपली** (स्त्री.) साल, ढलपा, तुकडा.
**धपाटा** (पु.) पोकळ चापट, धपका. शरिराचा **ध० वळणें**—क्षीण होणें, रोडावणें.
**धपेला** (पु.) जबर मेहनतीचें काम.
**धप्प** (स्त्री. न.) धप्पा, पोकळ प्रहार; मोठी धलपी.
**धप्पा** (पु.) धपा पहा.
**धप्पाधप्पी** (स्त्री.) धक्काबुक्की.

**धवकणें** (क्रि.) रट्टे लगावणें. [धांदल.
**धवडगाशा** (पु.) एकसारखी गर्दी, कामाची
**धवडूल** (वि.) लठ्ठ; धिप्पाड; अवाढव्य.
**धवधवा** (पु.) उंच जागेवरून खालीं जोरानें पडणारा पाण्याचा प्रवाह.
**धवधवीत** (क्रि. वि.) स्वच्छ (गोरा).
**धवाधव, धबाधवा** (अ.) एकामागून एक सारखे रट्टे देत; जोरानें आवाज करीत (खालीं पडणें).
**धवाधवी** (स्त्री.) एकमेकांनीं एकमेकांना चेंडू फेकून मारावयाचा असा मुलांचा एक खेळ.
**धवाबा** (प्रा. पु.) धवधवा; (अ.) धवाधव.
**धमक** (हिं. स्त्री.) हिंमत; शक्ति; धग-धग; उग्र वास; ठसण.
**धमकट** (प्रा. वि.) दांडगा; वळकट.
**धमकणें** (क्रि.) रट्टे मारणें.
**धमका** (पु.) ठोसा; पाऊस थांबल्या-नंतरचा उकाडा.
**धमकावणी** (स्त्री.) भीति; धमकी; धास्ती.
**धमकी** (हिं. स्त्री.) दवकावणी; दहशत.
**धमणी** (स्त्री.) वर आच्छादन असलेली बैलगाडी.
**धमधमा** (फा. पु.) उंचवटयाची जागा; लहान बुरूज; टेहळणीची जागा; तोफखाना.
**धमधमीत** (क्रि. वि.) धमक (पिवळा).
**धमनी** (सं. स्त्री.) फुंकणी; रक्तवाहिनी; शीर.
**धमाधमी** (स्त्री.) मुलांचा एक प्रकारचा चेंडूचा खेळ; धडपड; मारामारी.
**धमामा** (फा. स्त्री.) नोबत; चिखल; तिंबलेली कणिक; उंच ओटा; गच्ची.
**धमाल** (प्रा. वि.) मोठा, अगडबंब.
**धमासा** (पु.) एक कांटेरी वनस्पति.
**धम्पक लाडू** (पु.) रट्टे, धपके.
**धर** (सं. धृ पु.) पकड; आधार; संय-मनशक्ति; पूर्वापरसंगति; (समासांत उत्तरपदीं वि.) धरणारा, धारण कर-णारा.
**धरण** (सं. न.) बांध, बंधारा; पाव होन (सुमारें ९ आणे).
**धरणकरी** (पु.) धरणें धरून बसणारा.
**धरणी** (सं. स्त्री.) पृथ्वी; सरणी, पद्धति; पकडण्यासाठीं आलेली मंडळी.
**धरणीकंप** (सं. पु.) भूकंप.
**धरणीतल** (सं. न.) भूपृष्ठ.
**धरणीधर** (सं. पु.) पर्वत.
**धरणें** (क्रि.) पकडणें; स्मरणांत ठेवणें; (प्रा.) थांबणें; (न.) सक्त तगादा; पैसे हातीं पडेपर्यंत माणसाच्या दारांत बसून राहणें.
**धरणेकरी, धरणेदार** (पु.) दाराशीं धरणें घेऊन बसलेला मनुष्य.
**धरणेपारणें** (न.) एक दिवस जेवण आणि एक दिवस उपास याप्रमाणें क्रमानें करण्याचें व्रत. [चाल.
**धरती** (सं. धरित्री स्त्री.) पृथ्वी; पद्धति,
**धरधरणें, धरधरावणें** (क्रि.) प्रकृति सुधारणें, उत्साह वाटणें; टिकाव धरणें.
**धरनेम** (पु.) संबद्धता, निश्चितता.
**धरपकड** (स्त्री.) याला धर, त्याला पकड अशी धामधूम.
**धरपकडीचा व्यवहार** गुंतविणारा किंवा जाळयांत अडकविणारा व्यवहार.
**धरफड, धरफडणें, धरफडाट** इत्यादि बद्दल धडफड इ० शब्द पहा.
**धरबंद** (पु.) नियम, कायदा; मर्यादा.
**धरमधक्का** (पु.) व्यर्थ खटाटोप, निष्फळ परिश्रम; विनाकारण नुकसान. **ध० बसणें**--कार्यसिद्धि न होतां निष्कारण कष्ट होणें.
**धरमेळ** (पु.) संबद्धता. [पाणी.
**धरवणी** (प्रा. न.) पावसाचें धरून ठेवलेलें
**धरसवर** (स्त्री.) गृहव्यवस्था; आतिथ्य; व्यवस्था.
**धरसांड** (स्त्री.) अनिश्चितपणा, डळमळीतपणा.
**धरसोड** (स्त्री.) कांहीं बाबतींत आग्रह धरणें व कांहीं बाबतींत मुद्दा सोडणें असा अनिश्चित प्रकार; डळमळीतपणा.
**धरा, धरित्री** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**धरातल** (सं. न.) भूपृष्ठ.
**धराधर** (सं. पु.) पर्वत; शेष.

**धराधर, धराधरी** (स्त्री.) धरपकड; पकडण्याचा सपाटा.
**धराधीश** (सं. पु.) पृथ्वीपति, राजा.
**धरालोक** (सं. पु.) भूलोक.
**धरित्री** (सं. स्त्री.) पृथ्वी. [पाटचांत).
**धरी** (वि.) धरणारा, अडविणारा (आटचा-
**धरू** (पु.) निग्रह; चांभारी हत्यारांची मूठ.
**धरून** (अ.) पासून; सकट.
**धर्ता** (सं. पु.) धरणारा; टेका देणारा.
**धर्म** (सं. पु.) शास्त्रविहित कर्म; दान; गुण; कर्तव्य; न्याय. **धर्म करतां कर्म उभें राहणें**—एकाद्याचें बरें करीत असतां स्वतःवरच संकट येणें; **धर्मावर सोमवार**—कांहीं न वेचतां फुकट पुण्य किंवा मोठेपणा मिळविणें; **धर्मास येणें**—मर्जीस वाटणें.
**धर्मकार्य, धर्मकृत्य** (सं. न.) पुण्य जोडणारें किंवा परोपकाराचें काम.
**धर्मखातें** (न.) धर्मादाय इ० चा हिशोब ठेवणारें खातें.
**धर्मतः** (सं. अ.) न्यायानें.
**धर्मदान** (सं. न.) परोपकारासाठीं किंवा भिक्षा म्हणून देणें. [ गाय; हरळी.
**धर्मधेनु** (सं. स्त्री.) धर्माची सोडलेली
**धर्मध्वजी** (सं. पु.) दांभिक मनुष्य.
**धर्मपत्नी** (सं. स्त्री.) विवाहित स्त्री.
**धर्मपर** (सं. वि.) धर्मनिष्ठ, सदाचारसंपन्न; धर्मविषयक.
**धर्मपिंड** (सं. पु.) निपुत्रिकास तिऱ्हाइतानें श्राद्धाचे वेळीं दिलेला पिंड.
**धर्मपुत्र** (सं. न.) निपुत्रिकाची मरणोत्तर क्रिया पुत्रवत् करणारा.
**धर्मबंधु** (सं. पु.) भाऊ म्हणून मानलेला; एकाच धर्मपंथाचे दोघे.
**धर्ममार्ग** (सं. पु.) पुण्य जोडणारा मार्ग.
**धर्मयुद्ध** (सं. न.) न्यायानें किंवा यथाशास्त्र चालणारें युद्ध.
**धर्मराज** (सं. पु.) यम; युधिष्ठिर.
**धर्मराज्य** (सं. न.) न्यायाचें राज्य.
**धर्मलंड** (स्त्री.) धर्माची हेळसांड करणारा; धर्माविषयीं अनादर दाखविणारा, नास्तिक.
**धर्मशास्त्र** (सं. न.) धर्मासंबंधाचे प्रमाणभूत ग्रंथ.
**धर्मशाळा** (सं. धर्मशाला स्त्री.) पांथस्थांस उतरण्यासाठीं धर्मार्थ बांधलेली इमारत.
**धर्मशिळा** (सं. धर्मशिला स्त्री.) सती जाणारी स्त्री. चितेंत प्रवेश करण्यापूर्वी स्वर्गलोकाची पायरी म्हणून ज्यावर पाय ठेवी तो दगड.
**धर्मशील, धर्मशीळ** (सं. वि.) धर्मनिष्ठ वर्तन ठेवणारा.
**धर्मसभा** (सं. स्त्री.) मय नांवाच्या दैत्यानें धर्मराज युधिष्ठिर याच्यासाठीं मोठ्या कुशलतेनें बांधलेली अवर्णनीय सभा; मयसभा; न्यायमंदिर.
**धर्मसंस्थापना** (सं. स्त्री.) जगांत वर्तणारा अन्याय दूर करून त्या जागीं धर्म व न्याय यांची प्रतिष्ठा स्थापन करणें; नवा धर्म प्रचारांत आणणें.
**धर्मज्ञ** (सं. वि.) धर्मशास्त्रांतला किंवा न्यायांतला निष्णात.
**धर्माचा काटा** सोनें वगैरे विकणारांनीं माल बरोबर तोलून दिला आहे अशाविषयीं गिऱ्हाईकांची खात्री पटविण्यासाठीं बाजारांत एक काटा स्थापन करण्यांत येतो व तेथें अगदीं थोडी फी ठेवून तो माल बरोबर तोलून देतात, तो काटा. या काटचाचें उत्पन्न धर्मकृत्याकडे देण्यांत येतें, म्हणून याला धर्माचा काटा म्हणतात.
**धर्मांतर** (सं. पु.) अन्य धर्माचा स्वीकार.
**धर्मात्मा** (पु.) उदार पुरुष.
**धर्मादाऊ** (पु.) धर्मादाय. [ दानधर्म.
**धर्मादाय, धर्मादाव** (पु.) धर्मार्थ दान,
**धर्माधर्मी** (अ.) धर्मादाय म्हणून दिलेल्या रकमेवर; फुकटफाकटी.
**धर्माधिकारी** (सं. पु.) धर्मविषयक तंटे तोडणारा अधिकारी.
**धर्मार्थ** (अ.) दान म्हणून (दिलेलें).
**धर्मासन** (सं. न.) न्यायदेवतेचें अधिष्ठान.
**धर्मिष्ठ** (सं. वि.) पुण्यशील, न्यायी, धर्मात्मा, कडकडीत धर्माचरण ठेवणारा.

**धर्मी** (सं. वि.) पुण्यशीळ, न्यायी; गुण-धर्मविशिष्ट; उदार.
**धर्मेकरू** (प्रा. पु.) धर्माचरण करणारा.
**धर्षण** (सं. न.) दांडगाई.
**धलपठ** (न.), **धलपा** (पु.), **धलपी** (स्त्री.) ढलपी पहा.
**धव** (सं. पु.) पति, नवरा.
**धवताल** धोताल पहा.
**धवल** (सं. वि.) पांढरा; ढवळा.
**धवलार, धवळार** (सं. धवलागार न.) चुनेगच्ची वाडा, हवेली (तुका० २०४७).
**धवशा** धोशा पहा.
**धवळ** (प्रा. न.) घराला चुना देणें; मंगलोत्सवाचा प्रारंभ (एक० पृ. ६५०।१७१८).
**धवळणें** (प्रा. क्रि.) शुभ्र किंवा प्रकाशित होणें.
**धवळार** (न.) धवलार पहा.
**धवा** (सं. धवल वि.) शुभ्र.
**धशा** (वि.) आडदांड, दांडगा; निष्काळजीपणाचें.
**धश्चोट** (वि.) दांडगा, अडाणी, पशुतुल्य.
**धष्टपुष्ट** (वि.) लठ्ठ आणि मजबूत.
**धस** (पु.) खिळा; खुंट; बारीक अग्र; कुसळ; अविचारी; धटिंगण; जोराचा हल्ला; मनाला बसलेला दुःखाचा किंवा भीतीचा अकल्पित धक्का; उतरण.
**धसकट** (न.) धस, कुसळ; खिळ्याचें अग्र; (वि.) जाड, स्थूल.
**धसकणें** (क्रि.) दांडगाईनें ओढणें; जोरानें शिरणें; फाडणें; कडाडून मोडणें.
**धसकनंदन** (पु.) आडदांड मनुष्य.
**धसकफसक** (स्त्री.) जोराची क्रिया, दांडगाई.
**धसका** (पु.) भीतीचा धक्का.
**धसकावणें** (क्रि.) धजणें.
**धसणें** (प्रा. क्रि.) घुसणें.
**धसधस** (स्त्री.) छातीची धडधड.
**धसदार** (वि.) धजदार.
**धसमुसळा** (वि.) धश्चोट.
**धसरड** (स्त्री.) उतरण.
**धसाड** (वि.) जाड; स्थूल.
**धसाडा** (पु.) खुंट; सुळा; शल्य; बुंधा.
**धसाधस** (अ.) धडाधड, धडधडां.
**धसाफसा** (अ.) घाईघाईनें; निष्काळजीपणानें.
**धसाळ** (प्रा. वि.) विसराळू; अविचारी; मोठें; अनुचित (ज्ञा० १८।७५१).
**धसाळू** (प्रा. वि.) अविचारी, अरसिक (ज्ञा० ११।६१०).
**धस्स** (अ.) आघात होतांना होणारा [आवाज.
**धा** (सं. अ.) प्रकारें, वेळां; दहा.
**धाऊ** (पु. स्त्री.) एक प्रकारचा मऊ दगड
**धाक** (पु.) भय, दरारा, जरब.
**धाकटा** (वि.) वयानें लहान; ठेंगणा.
**धाकड** (सं. द्राघिष्ट वि.) अतिदीर्घ; धिप्पाड.
**धाकड, धाकडधोकड** (वि.) जाड, धिप्पाड, ओबडधोबड, स्थूल; भित्रा.
**धाकणें** (क्रि.) भिणें (वामन जयद्रथवध० २१). [शंका.
**धाकधूक, धाकधुकी** (स्त्री.) थोडीशी भीति;
**धाकला** (प्रा.) धाकटा.
**धाकुटा** (वि.) धिप्पाड, धाकटा, ठेंगणा; कमी प्रतीचा.
**धाकुला** (प्रा. वि.) धाकटा.
**धांगड** (स्त्री.) दांडगी, स्वच्छंदी स्त्री; (वि.) जाडेंभरडें, ओबडधोबड; धष्टपुष्ट.
**धांगडणें** (क्रि.) धुमाकूळ घालणें.
**धांगडधिंगड** (वि.) ओबडधोबड.
**धांगडधिंगा** (हिं. पु.) ज्यास ताळतंत्र नाहीं असा दांडगाईचा नाच; धुमाकूळ.
**धांगडा, धांगडो, धांगला** (पु.) धुमाकूळ; आरडाओरड, आक्रोश; गडबड; जोराचें भांडण.
**धांगडी** (प्रा. वि.) दांडगी.
**धागधूग, धागधुगी** धाकधूक पहा.
**धागा** (हिं. पु.) दोरा.
**धागादोरा** (पु.) संबंध.
**धांगोडा** (पु.) चार चौघांत फजिती, फटफजिती.
**धाट** (न.) रानटी गांव; (स्त्री.) हल्ला.
**धाटण–णी** (स्त्री.) पद्धति, शैली, ढब.
**धाटा** (पु.) पंचा; डोक्यास गुंडाळण्याचें वस्त्र (तुका० ३१७३).

**धाटामोटा** (वि.) लठ्ठ, धष्टपुष्ट; धड-धाकट; आडदांड; ओवडधोवड.
**धाटी** (स्त्री.) धाटणी, रीत, पद्धति; फास; (प्रा. स्त्री.) धाड, दरवडा.
**धाटें** (प्रा. वि.) धट्टेंकुट्टें.
**धाड, धाडी** (हिं. स्त्री.), **धाडा** (पु.) अकस्मात् केलेला हल्ला; परचक्र; आकस्मिक संकट; टोळी.
**धाडकन्, धाडदिशीं** (अ.) धाड असा आवाज करून, जोरानें.
**धाडणें** (क्रि.) पाठविणें.
**धाडधाड** (अ.) एकामागून एक 'धाडधाड' असा आवाज करीत.
**धाडशी** (वि.) साहसी, छातीचा.
**धाडस** (न.) साहस, छाती, धारिष्ट.
**धांडळ, धांडाळ** (वि.) लांब; जाड; ओवडधोवड.
**धाडा** (प्रा. पु.) धाड; हल्ला; दरोडा.
**धांडाळी** (स्त्री.) हगवण.
**धाडी** (स्त्री.) हल्ला; तट्टी; (हिं. पु.) मुसलमानांच्या फौजेबरोबर किंवा मिरवणुकीबरोबर गात जाणारे गवई.
**धांडुळणें, धांडोळणें** (क्रि.) बारकाईनें शोधणें, धुंडाळणें.
**धांडोडा, धांडोरा** (सं. डिंडिम पु.), **धांडोरें** (न.) दवंडी, जाहिरनामा.
**धांडोळा** (प्रा. पु.) शोध (अमृता० ७।७); दवंडी. [ ७।१०१).
**धाणी** (प्रा. स्त्री.) नाश (शुभा० उद्योग०
**धाणें** (क्रि.) तृप्त होणें.
**धात** (सं. धातु स्त्री.) वीर्य.
**धात** (प्रा. स्त्री.) कल्पित गोष्ट.
**धाता, धात्रा** (सं. पु.) ब्रह्मदेव; निर्माता.
**धाती** (प्रा. स्त्री.) प्रकार, मत.
**धातु** (सं. स्त्री.) वीर्य, रेत; (पु.) क्रियापदाचें मूळ रूप; सोनेंरुपें इ० खनिज पदार्थ; मूलभूत द्रव्य; शरिरांतल्या सप्त धातूंचीं नांवें :—रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा व शुक्र. [विषयक ग्रंथ.
**धातुपाठ** (सं. पु.) पाणिनीप्रणीत धात्वर्थ-
**धातुवर्धक** (सं. वि.) वीर्य वाढविणारें; पौष्टिक.
**धातुवाद** (पु.) किमया.
**धातुविद्या** (सं. स्त्री.) सोनें, रुपें इ० धातूंचे गुणधर्म; प्राप्तिस्थान इ० ची माहिती.
**धातुसाधित** (सं. वि.) व्याकरणांत—धातूपासून बनलेलें.
**धातुस्तंभक** (सं. वि.) स्त्रीसंगाच्या वेळीं रेताचा प्रवाह थांबविणारें.
**धात्रा** (पु.) ब्रह्मदेव.
**धात्री** (सं. स्त्री.) पृथ्वी; दाई; आवळकठी.
**धांद** (स्त्री.) कापडाची चिंधी, धांदोटी.
**धादशीं** (प्रा. अ.) जबरीनें.
**धादरणें** (क्रि.) भिणें; गोंधळणें; घाबरणें.
**धांदल, धांदलपट्टी** (हिं. स्त्री.) लगबग; व्यग्रता; गोंधळ.
**धांदल्या** (वि.) गडबडया.
**धांदा** (प्रा. पु.) दोरा; धंदा; चुरा.
**धादांत** (वि.) धडधडीत; (पु.) स्वतःचा अनुभव; त्यावरून ठरविलेला सिद्धान्त.
**धादांती** (पु.) शास्त्रवचनावर भिस्त ठेवणारा; बुद्धिप्रामाण्यवादी.
**धादावणें** (क्रि.) एखाद्या वस्तूच्या प्राप्तीविषयीं अतिशय उत्सुक होणें.
**धांदी, धांदोटी** (स्त्री.) चिंधी.
**धाधावणें** (क्रि.) खाखा सुटणें, लोभ सुटणें.
**धाधोटा** (पु.) वाऱ्याचा सोसाटा, वाऱ्याचा झोत.
**धान** (सं. न.) साळी.
**धानी** (स्त्री.) फुंकणी; (पु.) एक राग.
**धानोरी** (स्त्री.) धान्यविषयक. [ हरबरा इ.
**धान्य** (सं. न.) ज्वारी, तांदूळ, गहूं, मूग,
**धान्यफराळ** (पु.) उपासाच्या दिवशीं भाजलेल्या धान्याच्या पदार्थावर केलेला निर्वाह.
**धान्यपंचक** (सं. न.) गहूं, जव, तांदूळ, तीळ व मूग हीं पांच धान्यें.
**धाप** (हिं. स्त्री.) श्वासोच्छ्वासाची त्वरित गति; श्वासरोग; दमा; धग, उष्णता.
**धांप—क** (स्त्री.) द्विदल धान्याच्या दळयाचा अर्धा भाग.
**धापकरी, धापकरू** (पु.) दम्यानें व्यथित मनुष्य, दमेकरी.

**धापट** (वि.) खरखीत; निर्जल; नापीक (जमीन); (स्त्री.) सरड्याच्या जातीचा प्राणी; (न.) भाताचा भुसा; (स्त्री.) भोंवरा न फिरता राहण्याची स्थिति.
**धापटणेकरी** (प्रा. पु.) अंग रगडणारा.
**धापटी** (स्त्री.) दामटी. [ भातशेत.
**धापड** (वि.) उखार शेत; विशेषत:
**धापणें** (क्रि.) धापा टाकणें; तृप्त होणें.
**धापलणें** (क्रि.) धापा टाकणें; जोरानें श्वासोच्छ्वास करणें.
**धापा** (पु.) थापट कौल. [ विणें.
**धापा करणें** सत्यानाश करणें; विघड-
**धापाळू, धाप्या** (वि.) दमेकरी.
**धापेकरी** (पु.) दमेकरी.
**धावटी** (स्त्री.) दामटी, धामटी.
**धावडधिंगा** धांगडधिंगा पहा.
**धांबडें** (न.) धावें पहा. [ भरडें वस्त्र.
**धावळ, धाबळी** (स्त्री.) लोकरीचें जाडें-
**धावें, धावडें** (न.) घरावरचें मातीच्या पेंडाचें आच्छादन. **धा० दणाणणें**— घावरणें; भिणें; **धा० वर बसविणें**— न जुमानणें, उल्लंघणें, दुसऱ्याचें लुबाडून घेणें. [ असलेलें घर.
**धावेघर** (न.) छपराच्या ऐवजीं धावें
**धाम** (सं. न.) घर; शरीर; तेज; (स्त्री.) तापाची सांथ; अनेकास एखाद्या गोष्टीचा एकदम लागलेला नाद.
**धामण** (स्त्री.) एक सरपटणारा घातुक प्राणी; (पु.) मासा; वृक्षविशेष.
**धामधूम** (स्त्री.) आरडाओरड, गडबड; दंगा, बखेडा. [ सपाटा.
**धामा** (पु.) अति उत्कट इच्छा; मागण्याचा
**धामोडा** (पु.) धावडा नांवाचें लाकूड (भा० ३०।३४). [ व्यंजक शब्द.
**धाम्या** (वि.) माध्यंदिनाविषयीं निंदा-
**धाय** (स्त्री.) हंबरडा; मोठ्यानें रडणें; धास्ती; समाधान; दाई.
**धाय, धाया** (प्रा. स्त्री.) हृदय.
**धायटी** (स्त्री.) एक झाड.
**धायरी** (स्त्री.) एक झाड.
**धायरूं** (न.) गुरांना होणारा एक रोग.
**धाया** (प्रा. स्त्री.) धात्री, दाई.

**धार** (सं. स्त्री.) बारीक प्रवाह; हत्याराची कापण्याची बाजू; तिची तीक्ष्णता; दोहन. **धार काढणें**— गायी-म्हशीचें दूध काढणें; **धारेवर धरणें**—अतिशय धाकांत ठेवणें, शिक्षेची जबरदस्त भीति दाखविणें; फार कडक शिस्तीनें वागविणें; **धार फुटणें**—दूध देऊं लागणें.
**धारक** (प्रा. पु.) युद्ध (अमृ० ७।४); धाक (दा० २।१।५७).
**धारकरी** (पु.) तरवारबहाद्दर, योद्धा.
**धारकशीं धरणें** छळणें, तीव्र कसोटीला लावणें.
**धारकें** (न.) बैलाला कह्यांत ठेवण्यासाठी त्याच्या शिंगांभोंवतीं बांधलेली दोरी. **धारकीं धरणें**—कडक शिस्तीनें वागविणें.
**धारजणा, धारजिणा** (वि.) मंगलकारक; अनुकूल.
**धारजणें, धारजिणें** (न.) अनुकूलता.
**धारण** (स्त्री.) धान्याचे दर, निरख; (सं. न.) स्वीकार, अंगावर घेणें; (पु.) घुसळखांब. **(जमीन) धारण करणें**— कायदेशीर रीतीनें जमिनीचा कबजा असणें.
**धारणपारण, धारणेंपारणें** (न.) धरणें-पारणें पहा.
**धारणा** (सं. स्त्री.) बुद्धीची ग्रहणशक्ति; स्मरणशक्ति; स्थिरता; निश्चितपणा; धैर्य; पद्धति; चाल.
**धारणू** (प्रा. न.) वाळलेलें लाकूड.
**धारबंदी** (स्त्री.) संबद्धता; शस्त्राच्या धारेचें कांहीं चालूं नये अशा प्रकारचा मंत्रप्रभाव.
**धारबोळ** (अ.) कांठोकांठ.
**धारबोळ, धारमेर** (पु.) संबद्धता.
**धारयिता** (सं. वि.) धारणकर्ता.
**धारयित्री** (सं. वि.) धारण करणारी; (स्त्री.) पृथ्वी.
**धारवणी** (न.) धारोष्णांत घातलेलें पाणी, पाण्याचा प्रवाह.
**धारवसा** (प्रा. पु.) प्रवाह.
**धारवाडी काटा** बिनचूक तोल; चोख व्यवहार; तंतोतंत न्याय.

**धारशींव** (स्त्री.) नदीच्या प्रवाहानें ठरलेली दोन गांवांच्या किंवा शेतांच्या मधली सीमा, हद्द. [६।४७४).
**धारसा** (प्रा. पु.) लोकरूढि, प्रवाह (ज्ञा०
**धारा** (पु.) जमिनीचा सारा; ठराविक पद्धति, रूढि, रिवाज; शस्त्राची धार; नदीचा प्रवाह; दर; भाव; संतति; (वि.) लहान.
**धारागिरी** (प्रा. पु.) वेरूळ.
**धारागृह** (सं. न.) हजारी कारंजें किंवा फवारा असलेलें स्नानगृह.
**धाराणें** (न.) गवाक्ष, धारें.
**धारातीर्थ** (सं. न.) रणांगण, समरभूमि.
**धाराधर** (सं. पु.) मेघ, ढग.
**धारापिंडोळा** (पु.) वहिवाटींतला नियम; रूढि, वहिवाट; सोयरीक.
**धारावाहिक** (सं. वि.) क्रमागत.
**धारावाहिक वृद्धि** (सं. स्त्री.) अनुशीलन अथवा एकाग्रचित्तानें अभ्यास करण्याची वृद्धि.
**धारिडी** (सं. वि.) धारण करणारी.
**धारिया** (पु.) तीक्ष्ण कोयता लावलेला वांत्रू; गवत निंदण्याचें एक औत.
**धारिष्ट** (सं. न.) धाडस, धीटपणा.
**धारिष्टवान्** (सं. वि.) धाडसी, धैर्यवान्.
**धारी** (स्त्री.) किनार, कोर; (सं. वि.) धारण करणारा.
**धारीदार** (वि.) कांठ असलेलें, कांठाचें.
**धारें** (न.) धूर जाण्यासाठीं किंवा उजेड येण्यासाठीं छपरांत ठेविलेलें छिद्र; गवाक्ष.
**धारें** (प्रा. वि.) कमी; लहान.
**धारेकरी** (पु.) धान्यानें जमीन घेणारा; इजारदार; कूळ; जोंपर्यंत मनुष्य साऱ्याची रक्कम विनचूक भरीत असतो तोंपर्यंत त्याच्याकडची जमीन काढून घेतां येत नाहीं असें कायमचें कूळ.
**धारेपेंडोळें** धारापिंडोळा पहा.
**धारेबंदी** (वि.) ठराविक धान्यानें घेतलेली (जमीन); (स्त्री.) धारा ठरविणें.
**धारेंमाप** (न.) साऱ्याबद्दल धान्य मोजून घेण्याचें सरकारी माप.

**धारोधार** (अ.) कांठोकांठ.
**धारोष्ण** (न.) धार काढल्याबरोबर घेण्याचें ताजें दूध. [धर्मात्मा.
**धार्मिक** (सं. वि.) धर्मनिष्ठ, पुण्यवान्,
**धार्ष्ट्य** (सं. न.) धीटपणा, उद्धटपणा.
**धाला** (वि.) तृप्त, संतुष्ट. [सुखवस्तु.
**धालाधाकटा** (वि.) लहान पण चांगला;
**धालेपण** (प्रा. न.) तृप्ति (विवे०पू० १।१०).
**धालेपणा** (प्रा. पु.) तृप्ति.
**धाव, धांव** (स्त्री.) पळणें; गाडीच्या चाकाभोंवतीं बसविलेली लोखंडाची पट्टी; मोटेच्या बैलास चालावा लागणारा प्रदेश; मजल; मर्यादा; आश्रयस्थान.
**धांवकारू** (प्रा. पु.) पाठीराखा.
**धावड** (स्त्री.) धावण, धाव.
**धावडणें, धावंडणें** (प्रा. क्रि.) धावविणें.
**धावडा** (पु.) एक वृक्ष.
**धावडी** (वि.) लोखंडी.
**धावण** (स्त्री.) धाव.
**धावणी** (प्रा. स्त्री.) पाठलाग; गजर.
**धावणी धुदणी** (स्त्री.) धावपळ.
**धावणें** (क्रि.) पळणें; (प्रा. न.) गस्त; रक्षण; साह्य.
**धावतादोरा, धावदोरा, धावरादोरा** (स्त्री.) सरळ कच्ची शिवण.
**धावता धोटा** (पु.) मागावर आडवीं सुतें घालीत डावी—उजवीकडे त्वरेनें फिरत जाणारा धोटा.
**धावती नजर** (स्त्री.) घाईघाईनें फिरविलेली दृष्टि. [ वहातें पाणी.
**धावतें पाणी** (न.) साचलेलें नव्हे असें
**धावदवड** (स्त्री.) धावपळ.
**धावधूप** (स्त्री.) यातायात, कष्ट.
**धावन** (सं. न.) पळणें, धुणें.
**धावय** (पु.) सापाची एक जात.
**धावरा** (वि.) चपळ, त्वरित गतीचा.
**धावरें** (न.) एक प्रकारची लवकर वाढत जाणारी पुळी; खोकडाचें बीळ.
**धांवा, धावा** (पु.) संकटसमयीं मदतीस येण्याविषयीं केलेली प्रार्थना.
**धावाकरा** (पु.) देवाचा धावा करणार

**धावाडा** (पु.) धाव.
**धावाधावा** (स्त्री.) धावपळ, गडबड.
**धाविन्नणें** (प्रा. क्रि.) धांवणें.
**धावें** (न.) भिंतीला चोरानें पाडलेलें भोंक.
**धासरा** (पु.) धास्ती, दहशत. [ दहशत.
**धास्त, धास्ती** (अर. धास्त स्त्री.) भय,
**धिक्** (अ.) थूः, छिः.
**धिक्कार** (सं. पु.) तिरस्कार, निषेध.
**धिंग** (वि.) उधळ्या; दुराचारी; संतुष्ट; (प्रा. पु.) कीर्तनभजनादिकांचा गजर.
**धिंगड, धिंगाड** (वि.) फारच उंच.
**धिंगडणें** (क्रि.) उड्या वगैरे मारणें; धिंगामस्ती करणें.
**धिंगा, धिंगाडा, धिंगाणा** (हिं. पु.) दांडगाई, मस्ती, नाचणें, उड्या मारणें इ०
**धिंगाई** (स्त्री.) उधळपट्टी.
**धिंगाडा, धिंगाणा** (पु.) धिंगा पहा.
**धिंगामस्ती** (हिं. स्त्री.) दांडगाई.
**धिटाई** (हिं. स्त्री.) धीटपणा, उद्धटपणा.
**धिटावा** (प्रा. पु.) धीटपणा.
**धिटीव** (प्रा. स्त्री.) धीटपणा.
**धिट्ट** (वि.) धीट, उद्धट.
**धिंड** (स्त्री.) अप्रतिष्ठेची मिरवणूक.
**धिंडका** (स्त्री.) त्रासदायक मनुष्य.
**धिंडवडा** (हिं. धिंडोडा पु.) कुकर्माचा बोभाटा; अप्रतिष्ठा.
**धिंडावणें** (क्रि.) रागानें बोलण्यांत 'फिरणें' 'भटकणें' या अर्थानें हा शब्द वापरतात.
**धिंडी** (स्त्री.) धिंड.
**धिंद** (प्रा. स्त्री.) धिंडवडा, फजिती.
**धिपाड, धिप्पाड** (वि.) फार उंच आणि भव्य.
**धिंबडी, धिबडी** (स्त्री.) गर्दी, दाटी.
**धिंबडी** (स्त्री.) चंगळ, विपुलता.
**धिमा, धिम्मा** (सं. स्तिमित, हिं. धिमा वि.) मंद, शांत, सुस्त. [सौम्यता.
**धिमाई** (हिं. स्त्री.) धिमेपणा; सुस्ती; ढिलाई;
**धिया** (पु.) धैर्य, शौर्य; दृढता; धाडस.
**धिरडें** (न.) एक प्रकारचें सच्छिद्र खाद्य.
**धिरणें** (क्रि.) धीर धरणें; थांबणें.
**धिरा** (पु.) आधार, टेका; उत्तेजन.
**धिराई** (स्त्री.) धिम्मेपणा.
**धिरासा** (पु.) धिरा, टेकू; धैर्य, आश्वासन.
**धिरेधिरे** (अ.) हळूहळू.
**धिवसा** (प्रा. पु.) भीति; प्रबळ इच्छा.
**धी** (सं. स्त्री.) बुद्धि, मन.
**धीट** (वि.) धैर्यवान्; धिटुकला; उर्मट.
**धीड** (स्त्री.) धाड, झुंड.
**धीमान्** (सं. वि.) बुद्धिमान्.
**धीर** (सं. पु.) धैर्य; दृढता, सोशीकपणा; दम; आधार; आश्रय; (वि.) सोशीक; सहनशील; शांत.
**धीरोदात्त** (सं. वि.) साहित्यशास्त्रांत वर्णिलेले धीरोदात्त, धीरप्रशांत, धीरललित व धीरोद्धत या चार प्रकारच्या नायकांपैकीं पहिला प्रकार. धीरोदात्त नायक आत्मश्लाघाशून्य, हर्षशोकादिकांनीं अविकृत, विनयी व प्रतिज्ञापालन करणारा असतो.
**धीरोद्धत** (सं. वि.) एक प्रकारचा नायक. हा मायावी, उद्धत, चंचल, गर्विष्ठ व आत्मश्लाघा करणारा असतो.
**धीवट** (वि.) पक्का, खंबीर.
**धीवर** (सं. पु.) मासे धरणारा कोळी.
**धीशक्ति** (सं. स्त्री.) बुद्धिमत्ता, बुद्धिप्रभाव.
**धुई** (स्त्री.). **धुकट** (न.) धुकें.
**धुकटी** (स्त्री.) धुरी; धुरी देणें.
**धुकाटें, धुकें** (न.) धुई, मुऱ्हें.
**धुगधुग, धुगधुगी** (स्त्री.) किंचित् प्राणांश; गळ्यावरची खळी.
**धुडका** (पु.), **धुडकी** (स्त्री.) चिंधी.
**धुडकावणी** (स्त्री.) अवज्ञापूर्वक त्याग; तिरस्कारयुक्त त्याग.
**धुडकावणें** (क्रि.) तिरस्कारानें वागविणें; टर उडविणें.
**धुडकूस** धुडगूस पहा.
**धुडगा** (पु.) वस्त्राची चिंधी; धास्ती; दुर्दशा; ध्यास (तुका० २७१०).
**धुडगूस** (पु.) धुमाकूळ, दांडगाई.
**धुंडणी** (स्त्री.) शोध, तपास.
**धुंडणें** (क्रि.) शोधणें.
**धुंडावणें** (प्रा. क्रि.) हुसकून लावणें.
**धुंडाळणें** (क्रि.) धुंडणें, शोधणें.
**धुणावळ** (स्त्री.) धुण्याबद्दल मजुरी.

**धुणी** (स्त्री.) चिरगुटें धुण्याची जागा; गोसावी, वैरागी वगैरे लोकांची आगटी.
**धुणें** (क्रि.) पाण्यानें स्वच्छ करणें; (न.) धुवावयाचे कपडे वगैरे.
**धुतकारणें** (क्रि.) झिडकारणें, नाक मुरडणें.
**धुतलेला विस्तव** कोळशासारखा काळा मनुष्य. [ दांडगा मनुष्य.
**धुताडा** (पु.) अवधूत, धाणेरडा गोसावी;
**धुतारणें** (क्रि.) धूर्तपणानें ठकविणें.
**धुतारा** (प्रा. पु.) भोंदू, ठक.
**धुतीपुती** (स्त्री.) स्वतःचीं आंतडीं धुण्याची क्रिया. [ उपहास, टर.
**धुत्कार** (सं. धूत्कार पु.) फुस्फुस् आवाज;
**धुत्या** (पु.) अकल्पित येणारा मनुष्य.
**धुंद** (हिं. धुंध वि.) मंद दृष्टीचा; बेशुद्ध; गुंग; उन्मत्त.
**धुंदर** (पु.) काजवा.
**धुंदावी, धुंदाधुंदी** (स्त्री.), **धुंदावें** (न.) धुंदावा; (पु.) गोंधळ, अव्यवस्था.
**धुंदाट** (वि.) सरळ; उग्र; (पु.) वावटळ.
**धुंदावा** (पु.) अंदाज, अनुमान.
**धुंदी** (हिं. स्त्री.) निशा, अंमल; उन्माद.
**धुंदुर्मास** धनुर्मास पहा.
**धुंदुवात** (प्रा.) वातावरणांतली खळवळ; धुडगुस. [ प्रभात.
**धुंदूक, धुंदूकधुंदूक** (अ.) अस्पष्ट; (स्त्री.)
**धुधाट** (वि.) मोठा आवाज करणारा.
**धुधाटी** (पु.) वाऱ्याचा झोत; सोसाटयाचा प्रवाह.
**धुधुका** (पु.) धुक्याची रांग.
**धुंधुरु** (प्रा. पु.) काजवा (ज्ञा० ९।९).
**धुन** (सं. ध्वनि स्त्री.) नाद, आवाज.
**धुनक, धुनूक** (स्त्री.) छटा, लकेर, छाया.
**धुनकणें** (क्रि.) पिंजणें; प्रभात होणें; वातमी पसरणें.
**धुनी** (हिं. स्त्री.) गोवऱ्याची आगटी.
**धुनी** (सं. स्त्री.) नदी.
**धुपट** (वि.) धुऊन कोरेपणा गेलेलें.
**धुपटणें, धुपाटणें** (न.) धूपपात्र.
**धुपणी** (स्त्री.) एक स्त्री-रोग.
**धुपणें** (क्रि.) धुतलें जाणें; क्षीण होणें; धमसणें.
**धुपविणें** (क्रि.) धूप देणें; सुगंधि धुरांत धरणें.
**धुपांगार** (पु.) निखारा; जळून रक्षा झालेले तांदूळ.
**धुपाटणें** धुपटणें पहा. [ ओवाळणें.
**धुपारती** (स्त्री.) धूपपात्रानें देवाला
**धुपेल** (न.) ऊद, धूप इत्यादिपासून काढलेलें तेल.
**धुमकणें** (क्रि.) वडविणें.
**धुमका** (पु.) बुक्का, ठोसा.
**धुमकूस** (पु.) धुडगूस, धुमाकूळ.
**धुमट** (स्त्री.) धामधूम, धिंगा; विपुलता.
**धुमड** (स्त्री.) धुमट पहा. [आरडाओरड.
**धुमधाम** (हिं. स्त्री.) गडबड; चळवळ;
**धुमशा** (पु.) धांगडधिंगा.
**धुमशान, धुमश्चक्री** (हिं. स्त्री.) झिंबड, दांडगाई; फाजील विपुलता.
**धुमस** (पु.) उभ्या दांड्याची चोपणी.
**धुमसणें** (क्रि.) गुधडणें, खुंदळणें; आंतल्या आंत पेटणें.
**धुमा** (पु.) अनेक वाद्यांचा मिश्र ध्वनि; चोर, गुरें वगैरेंनीं केलेली शेत, गांव इत्यादिकांची दुर्दशा; सैन्य, जमा झालेले लोक इ० ची दाणादाण किंवा पळापळ.
**धुमाकस** (स्त्री.) नौका.
**धुमाकूळ** (पु. स्त्री.) धुडगूस; धुमकूस.
**धुमाड, धुमाडू** (प्रा. पु.) धुमाकूळ; गजर, नाद; उत्कर्ष.
**धुमाधार** (वि.) मुसळधार (पाऊस).
**धुमारा** (पु.) झाडाला नवी फुटलेली जोरदार फांदी; धुमाडा.
**धुमाळा** (स्त्री.) गोंधळ; झिंबड; अंदाधुंदी; धुडगुस.
**धुमाळी** (स्त्री.) गडबड, गोंधळ; शत्रु, दरवडेखोर इ०चा जोराचा हल्ला, किंवा असा हल्ला झाल्यानें गांवकऱ्यांची होणारी दाणादाण; उधळपट्टीचा किंवा बेताल खर्चाचा कारभार; एका तालाचें नांव.
**धुमी** धुनी पहा.
**धुमें** (न.) धुकें, अस्पष्टपणा.

**धुर** (पु.) गांवाची अथवा शेताची सीमा; सेनापति.
**धुरकट** (वि.) धराच्या रंगाचें.
**धुरकटणें** (क्रि.) धुरानें खराब होणें.
**धुरतणें** (क्रि.) धुरामुळें खराब होणें.
**धुरतावा** (पु.) धूर्तपणा.
**धुरंदळ** (न.) धुराचा लोट.
**धुरंधर** (सं. वि.) कार्याचा मुख्य भार घेणारा; मोहरक्या; कुशल.
**धुरधुर** (प्रा. अ.) पुढेंपुढें.
**धुरपणें** (क्रि.) धुरकटणें; धूर उत्पन्न करणें.
**धुरमार** (पु.) धुरी देणें.
**धुरवड** (स्त्री.) धूर होणें.
**धुरवडा** (पु.) धुळीचा लोट.
**धुरवळा** (पु.) धुरवडा (भा० ३।४०१).
**धुरसणें** (प्रा. क्रि.) अग्रभागीं ठेवणें.
**धुरसा** (प्रा. पु.) अग्रभाग.
**धुरळणें** (क्रि.) धुरळा बसणें; भुरभुरणें.
**धुरळा, धुराळा, धुरोळा** (पु.) धूळ, माती, केरकचरा.
**धुरा** (प्रा. वि.) श्रेष्ठ; अढळ (तुका० ३८२०); (सं. धुरा स्त्री.) अग्रभाग.
**धुराटी, धुराडी** (स्त्री.) धुराचा लोट.
**धुराडें** (न.) धूर जाण्यासाठीं ठेविलेली वाट. [ धुकटी.
**धुरी** (प्रा. स्त्री.) भार, अग्रभाग; धूर,
**धुरी** (स्त्री.) बैल इ० च्या मानेवरचें जूं; धुपविणें. [ (वि.) अग्रगण्य.
**धुरीण** (सं. पु.) पुढारी, नाईक; नेता;
**धुरु** (प्रा. पु.) ध्रुवनक्षत्र, ध्रुव (उत्तानपादराजाचा मुलगा.)
**धुरें** (प्रा. अ.) प्रथम, पुढें.
**धुरें** (प्रा. वि.) धूर करणारें (लाकूड) (तुका० ३८२६).
**धुरेकरी** (पु.) हाकणारा.
**धुरोडा, धुरोळा** (पु.) हवेंत उडणारी धूळ.
**धुरोळें** (न.) धुराडें, धूर वर जाण्यासाठीं ठेविलेलें गवाक्ष.
**धुर्य** (सं. वि.) अग्रेसर, पुढारी; धुरंधर.
**धुलाई** (हिं. स्त्री.) धुणावळ.
**धुवट** (वि.) धुतलेला. [ न उवडलेला.
**धुवट घडीचा** (वि.) धुतल्यानंतर घडी
**धुवण** (स्त्री.) तांदूळ धुतलेलें पाणी.
**धुंवरी** (स्त्री.) धूर निघणारी शेगडी; जाळ; धूर.
**धुंवा, घुंवा, धुव्वा** (सं. धूम पु.) दाणादाण; फडशा, धुळधाण; (वि.) स्वच्छ.
**धुवाधार** (स्त्री.) जोरानें पडणारा प्रवाह.
**धुशर** (प्रा. पु.) कपाळीं लावण्याचा बुक्का.
**धुसधुसणें** (क्रि.) स्फुंदणें, फुसफुसणें.
**धुसफुस, धुसमुस** (क्रि.) मनांतल्या मनांत चरफडणें.
**धुसमुसणें** (क्रि.) कुरकुरणें, चरफडणें.
**धुळकट** (वि.) धुळीनें भरलेलें, मातकट.
**धुळपट** (स्त्री.) दुर्दशा; फजिती; पराभव.
**धुळवट** (वि.) मातीनें भरलेलें.
**धुळवड, धुळवाड** (स्त्री.) फाल्गुन व० १. या दिवशीं मुलें रस्त्यांत एकमेकांच्या अंगावर धूळ, चिखल वगैरे टाकतात.
**धुळवरा** (पु.) धूळ, धुळोरा.
**धुळाक्षर** (न.) लाकडाच्या फळीवर धूळ पसरून त्यावर कांबटीच्या लेखणीनें काढलेलीं धुळाक्षरें; यावरून मूळाक्षरें हा अर्थ.
**धूं** (प्रा. पु.) धूर.
**धूड** (न.) अवजड शरीर, धेंड.
**धूण** (न.) धुवण पहा.
**धूर** (प्रा. पु.) नायक, पुढारी.
**धूत** (सं. वि.) धुतलेलें, स्वच्छ.
**धूतवस्त्र** (सं. न.) धुतलेलें नेसावयाचें किंवा पांघरावयाचें वस्त्र.
**धूत्कार** (पु.) फुस् असा शब्द.
**धून** (सं. ध्वनि स्त्री.) झाक, छटा; एकसारखा घुमणारा आवाज.
**धूप** (सं. पु.) सुगंधि धूर सोडणारा पदार्थ; **धूप दाखविणें** प्रत्यक्ष कांहीं न देतां नुसतें आशेला लावणें.
**धूपकाडी** (स्त्री.) उदबत्ती.
**धूपारती** धुपारती पहा.
**धूम** (स्त्री.) धूर; पळ; शर्यत; रेलचेल; तोफांची गर्जना; (अ.) अतिशय; जोरानें.
**धूमकेतु** (सं.पु.) शेंडे नक्षत्र.

**धूमधडक** (अ.) धिटाईनें, सपाटयानें, सपाटयासरशीं.
**धूमधडाका** (पु.) रगडा, सपाटा.
**धूमयोनि** (सं. पु.) मेघ, अग्नि.
**धूमश** (सं. वि.) धुरकट रंगाचा.
**धूमाकुळ** (पु.) धुराचा समुदाय; गोंधळ; गडवड. [पितृलोकाचा मार्ग.
**धूमादिमार्ग** (सं. पु.) दक्षिणायनमार्ग;
**धूम्र** (सं. पु.) धूर; (वि.) धुरकट.
**धूम्रदीप** (पु.) किट्सनचा दिवा.
**धूम्रपत्र** (सं. न.) तंबाखूचें पान.
**धूम्रपान** (सं. न.) धूर पोटांत घेणें; विडी, हुक्का, सिगारेट, चिलीम इ० ओढणें.
**धूर** (पु.) धूम्र; (सं. धुर स्त्री.) गाडीचा अग्रभाग; धुंदी.
**धूरकरी** (पु.) गाडी हाकणारा, गाडीवान.
**धूरचाकी** (स्त्री.) मोटर.
**धूर्जटि** (सं. पु.) शंकर.
**धूर्त** (सं. वि.) हुशार, चतुर; दुसऱ्याचें इंगित ओळखणारा; दूरदर्शी.
**धूर्तता** (सं. स्त्री.) लवाडी, कावेबाजपणा.
**धूर्ताई** (स्त्री.), **धूर्तावा** (पु.) धूर्तपणा, कावेबाजपणा; कावा.
**धूलि** (सं. स्त्री.) धूळ.
**धूलिवंदन** (सं. न.) धुळवड खेळणें. धुळवडीच्या दिवशीं (फाल्गुन व. १ च्या रोजीं) परस्परांच्या अंगावर धूळ, चिखल इ० टाकणें.
**धूस** (पु.) वाळूच्या गोण्यांचा तट.
**धूसर** (सं. वि.) भुरा, धुराच्या रंगाचा.
**धूळ** (सं. स्त्री.) बारीक माती, धूलि. **धूळ चारणें**—मातींत लोळविणें, चीत करणें.
**धूळधाण** (स्त्री.) दुर्दशा; गोंधळ; नाश.
**धूळभेट** (स्त्री.) पायाची धूळ झाडण्यापुरती म्हणजे अल्पकालीन भेट; उभ्या उभ्या जाऊन येणें.
**धूळवाफ** (स्त्री.) पाऊस पडून जमिनींत ओलावा येण्यापूर्वीच त्या जमिनींत पेरणी करणें.
**धृत** (सं. वि.) धरलेलें.
**धृतराष्ट्र** (सं. पु.) जन्मांध; कौरवांचा पिता.
**धृतव्रत** (सं. वि.) व्रतधारी.
**धृतात्मा** (सं. वि.) धीर चित्ताचा, आत्मतत्त्वज्ञ.
**धृति** (सं. स्त्री.) धैर्य, दृढता.
**धृपद** (न.) एक प्रकारचें गीत. अस्तायी, अंतरा, संचारी व आभोग हे त्याचे चार अवयव होत. देवलीला, राजकीर्ति युद्ध इ० चें वर्णन या गीतांत असतें.
**धृव** (सं. ध्रुव वि.) स्थिर, निश्चित; नित्य.
**धृष्ट** (पु.) उद्धट.
**धेड** (पु.) अतिशूद्रांतली एक जात.
**धेंड** (न.) विशाल, राक्षसी आकाराचा पुरुष; मोठा, कीर्तिमान्, विद्वान् मनुष्य.
**धेडगुजरी** (स्त्री.) कांहीं शब्द एका भाषेंतले व कांहीं भिन्न भाषेंतले असे घालून केलेली रचना. [भांडण इ.
**धेडवाडी** (पु.) धेड लोकांची वस्ती; गोंधळ,
**धेडसुगी** (स्त्री.) थोडा काळपर्यंत टिकणारी अतिशय स्वस्ताई.
**धेंडसें** (न.) एक लहान फळ.
**धेंडा** (न.) नवऱ्यामुलावरोवर त्याच्या सासुरवाडीस पाठराखणा म्हणून गेलेला.
**धेंडा** (अर. ढेंढा पु.) लग्नांत झाल झाल्यानंतर वधू गृहप्रवेश करते तेव्हां नवरा व नवरी या दोघांनाही खांद्यावर घेऊन नाचणारा; दोंडी.
**धेडाळणें** (क्रि.) पातळ मळ गुदद्वारावाटें वारंवार पडत असल्यानें जर्जर होणें.
**धेंडी** (स्त्री.) तानवड या नांवाचें कर्णभूषण.
**धेंडें** (प्रा. न.) मोठा समुदाय ( ज्ञा० १८।८३५). [१०।५६७).
**धेंडेवाळी** (प्रा. स्त्री.) कोलीत (भा०
**धेंडोळी** (स्त्री.) बलिप्रतिपदेच्या दिवशीं गुराखी गवताची पेंडी पेटवून तिनें गाईवांसरांना ओवाळतात तें.
**धेनु** (सं. स्त्री.) गाय. [दृढता.
**धैर्य** (सं.न.) धीटपणा; सहनशीलता, शांति;
**धैर्यवान्** (सं. वि.) धीट, निश्चयी.
**धैर्यशाली** (सं. वि.) धैर्यवान्.
**धैवत** (सं.पु.) गायनांतल्या स्वरसप्तकांतला सहावा स्वर (ध.)
**धों धों** (उद्‌गार अ) एक विशिष्ट आवाज.
**धोक** (वि.) मोठा, मजबूत.

**धोकटी** (स्त्री.) न्हाव्याची वस्तरे, वाटी वगैरे सामान ठेवण्याची पिशवी ; पिशवी; (प्रा.) शरीर.
**धोकड** (प्रा. वि.) बलवान.
**धोकडा** (हिं. पु.) लठ्ठंभारती.
**धोका** (हिं. धोखा पु.) अनिष्ट प्राप्त होण्याची भीतिकारक संभावना ; धाक; नुकसान.
**धोकुटें** (प्रा. न.) पोर.
**धोंगटी** धोकटी पहा. [ स्थूळ.
**धोंगडं, धोंगडा** (वि.) जाडेंभरडें (कापड) ;
**धोंगडें** (न.) जाडेंभरडें वस्त्र.
**घोटणें** (क्रि.) मोठमोठ्या घोटांनीं पिणें.
**घोटा** (पु.), **धोटें** (स्त्री.) विरकांडें.
**घोड** (वि.) निबर.
**धोंड** (स्त्री.) मोठा धोंडा; (व्यापारांत) तोटा; मोठी आपत्ति; मोठी काळजी.
**घोटधोपट** (स्त्री.) मारहाण.
**धोंडफोड्या** (पु.) पाथरवट.
**धोंडभट्टी** (स्त्री.) स्नान न करतां स्नान केलें आहे असें भासविण्याकरितां कपाळीं गंध, भस्माचा पट्टा वगैरे लावणें.
**धोंडमास** (पु.) अधिकमास.
**धोंडा** (पु.) दगड, अधिक मास; आंत पुरण घालून केलेलें एक विशेष प्रकारचें खाद्य. [ युक्त.
**धोंडाळ** (वि.) खडकाळ; दगड गोटे इ० नीं
**धोंडी** (प्रा. स्त्री.) धोंड, मोठी अडचण.
**धोण** (न.) लाकडाची मोठी गांठ, ढोण.
**धोणका, धोणा, धोण्या** (वि.) आडदांड; अक्षरशत्रु.
**धोण्या** (पु.) वानरांच्या टोळीचा नायक.
**धोत** (पु.) ओघ, प्रवाह; लोट; ओंजळ.
**धोतर** (सं. धौत्र न.) पुरुषांचें नेसण्याचें वस्त्र. [सणंग.
**धोतरजोडा** (पु.) दोन धोतरांचें एक
**धोतरबडव्या** (पु.) धोतरें धुणारा.
**धोतरा** (सं. धत्तूर पु.) एक फुलझाड; (वि.) वेडा.
**धोताल** (वि.) उधळ्या, अनियंत्रित.
**धोदरणें** (क्रि.) फुगणें.
**धोदराट** (पु.) फुगवटा; मोठा जाळ.

**धोंदा, धोंधा** (पु.) वर्षाव.
**धोधा** (पु.) धबधबा.
**धोधाट--णा** (पु.) पाण्याचा धो धो वाहणारा प्रवाह.
**धोधाणी** (स्त्री.) धबधबा.
**धोधावणें** (क्रि.) कोसळून पडणें.
**धोधो** (अ.) मोठा आवाज करीत.
**धोप** (हिं. स्त्री.) लांब व सरळ तलवार; तिचा आघात.
**धोपट** (वि.) सरळ, उघड.
**धोपटणें** (क्रि.) सडकून काढणें.
**धोपटमार्ग** (पु.) सरळ रस्ता; लोकांच्या रहदारीचा मार्ग. [ व्यवहाराचा.
**धोपटमार्गी** (वि.) सरळ, साधा; सरळ
**धोपटी** (स्त्री.) न्हाव्याची चामडी पेटी; पडगी.
**धोपणें** (क्रि.) थकणें, तृषाक्रान्त होणें.
**धोपाटी** (स्त्री.) जोराचा काठीचा मार.
**धोबड** (वि.) जाडेंभरडें; बेढब; बोजड.
**धोबी** (पु.) परीट.
**धोबीण** (स्त्री.) परटीण.
**धोम्या** (पु.) धोतरबडव्या; शागीर्द.
**धोरडा** (पु.) चिंधोटी.
**धोरण** (सं. न.) तर्क, अटकळ; लक्ष; कल; पद्धत, चाल, वागणूक; संधान; (प्रा. न.) हमरस्ता, राजमार्ग.
**धोरणी** (वि.) धूर्त; हुशार; दूरदृष्टि; तर्कानें चटकन् जाणणारा; संधानी.
**धोरणें** (ग्रा. न.) कामातुराचें दृढालिंगन; मैथुन.
**धोरवट, धोरवटा** (पु.) धोरण.
**धोरें** (न.) धुराडें; धारें.
**धोवट** (प्रा. क्रि.) बळवान्; निर्दोष.
**धोशा** (हिं. धोंस, धोसा पु.) मोठी नौबत; मोठा आवाज; प्रसिद्धि; नेटाचा प्रयत्न; ध्यास; भीति.
**धोसरा** (पु.) धक्का. **धो०बसणें**-- कंबर खचणें.
**धौत** (वि.) धुतलेला. (प्रभा० पृ. १६९)
**धौति** (सं. वि.) शरिरांतील शुद्धि.
**धौतांबर** (न.) धूतवस्त्र; स्वच्छ चादर.
**ध्याणें** (क्रि.) चिंतणें.

**ध्यात** (वि.) चिंतिलेलें.
**ध्यातव्य** (सं. वि.) ध्यान करण्यास योग्य.
**ध्याता** (सं. पु.) ध्यान करणारा.
**ध्यादिवसां** (क्रि. वि.) भरदिवसां.
**ध्यान** (सं. न.) एकाग्र चिंतन; मन; लक्ष; स्मरण; शुद्धि; पसंती; आकृति, स्वरूप; वेडसर स्वरूप. **ध्यानींमनीं नसणें**—अगदींच कल्पनासुद्धां नसणें.
**ध्यानधारणा** (सं. स्त्री.) चिंतन.
**ध्यानमुद्रा** (सं. स्त्री.) देवाचें ध्यान करतांना बसण्याची विशिष्ट पद्धति.
**ध्यानयोग** (सं. पु.) चिंतनाच्या द्वारें ध्येयाशीं होणारें संमेलन.
**ध्यानस्थ** (सं. वि.) चिंतनांत निमग्न.
**ध्यास** (सं. पु.) एकसारखें सतत; चिंतन, अतिशय उत्कट इच्छा; चाळा.
**ध्येय** (सं. न.) ध्यानाचा विषय; चिंतनीय वस्तु; अंतिम हेतु.
**ध्रुपद** (सं. न.) धृपद पहा.
**ध्रुपद्या** (पु.) हरिदासाच्या मागें कीर्तनाच्या वेळीं उभा राहणारा व गाऊन साथ करणारा मदतनीस.
**ध्रुव** (सं. पु.) पृथ्वीच्या उत्तरेचा अचल तारा; (वि.) अचल; निश्चल.
**ध्रुवपद** (सं. न.) अढळपद.
**ध्वज** (पु.), **ध्वजा** (सं. स्त्री.) निशाण, पताका. **ध्वज लावणें**—पराक्रम किंवा शतकृत्य करणें.
**ध्वजारोपण** (सं. न.) गुढी उभारणें.
**ध्वनि** (सं. पु.) नाद; व्यंग्यार्थ.
**ध्वनिकाव्य** (सं. न.) ज्यांत ध्वनि म्हणजे व्यंग्यार्थ प्रधान असतो असें अर्थात् उत्कृष्ट काव्य.
**ध्वनित** (सं. वि.) ध्वनीनें ज्ञापित; सूचित; (प्रा.) अस्पष्ट, गुप्त.
**ध्वनिशास्त्र** (सं. न.) ध्वनीविषयीं आणि स्थितिस्थापक पदार्थांच्या कंपनाविषयींचें शास्त्र.
**ध्वनिक्षेपक** (पु. ) बोलणाराचा आवाज मोठा करून लांब पसरविणारें यंत्र. (लाऊड स्पीकर.)
**ध्वंस** (सं. पु.) नाश.
**ध्वस्त** (सं. वि.) नष्ट केलेलें किंवा झालेलें; लुप्त; नष्ट.
**ध्वांत** (सं. पु.) काळोख, निबिड अंधकार.
**ध्वान** (पु.) ध्वनि.
**ध्वांक्ष** (सं. पु.) कावळा; एकाक्ष.

---

## न

**न** मराठी व्यंजनमालेंतील विसावें व्यंजन.
**न** (अ.) नकारार्थी, किंवा विपरीत अर्थानें.
**नई** (सं. नदी स्त्री.) नदी.
**नऊ** (वि.) ९. [नाकाचा.
**नकटा** (हिं. वि.) अपुऱ्या किंवा चपटया
**नकल, नक्कल** (अर. स्त्री.) प्रत; अनुकरण; गमतीची गोष्ट.
**नकलनवीस** (फा. पु.) प्रत करणारा.
**नकली** (वि.) दिखाऊ, बनावट, खोटा.
**नकल्या** (वि.) नक्कल करणारा; विदूषक; मौजेच्या गोष्टी सांगणारा.
**नकशा** (अर. पु.) चित्र, नकाशा; नमुना; कारागिरीचें काम; ईर्ष्येनें केलेलें काम; तोरा, नखरा. [ इ०बारीक काम.
**नकशी** (अर. स्त्री.) नकसगिरी; वेलबुटी
**नकशीदार** (फा. वि.) नक्षीदार; जाळया, चित्रें, वेलबुट्टी वगैरे खोदलेलें (काम).
**नकसगिरी** (स्त्री.) नक्षीकाम, नक्षी काढण्याचें कौशल्य.
**नकसणें** (क्रि.) खोदणें, कोरणें.
**नका** (अ.) निषेधार्थी.
**नकार** (पु.) नाहीं म्हणणें.
**नकारणें** (क्रि.) नाकारणें. [ कपटी.
**नकाल** (फा. वि. ) नाटकी, ढोंगी,
**नकाशा** (अर. नकशा पु.) चित्र, स्थळांचें चित्र.
**नकाशानवीस** (अर. पु.) नकाशे तयार करणारा. [ कोरींव शोभिवंत काम.
**नकासकाम** (अर. न.) खोदींव किंवा
**नकासणें** (क्रि.) कोरणें, खोदणें.
**नकासगार** (पु.) धातूवर नक्षीकाम करणारा.
**नकिंचन** (सं. वि.) दरिद्री. [ बरोबर.
**नकी, नक्की** (अर. नकी वि.) निश्चित,

**नकीब, नकीबदार** (अर. पु.) परिचय करून देणारा राजाजवळचा अधिकारी.
**नकील** (हिं. स्त्री.) उंटाच्या नाकांतील कडी (जींत त्याच्या लगामाची दोरी अडकविली असते).
**नकुल** (सं. न.) मुंगूस.
**नकुय** (वि.) क्षुद्र.
**नको** (अ.) जरूर नाहीं.
**नक्कल** (न.) प्रत; अनुकरण; निर्वंश.
**नक्का** (पु.) नाक, नक्षा, तोरा, ऐट.
**नक्को** नको पहा.
**नक्त** (सं. न. अ.) रात्र; दिवसभर उपोषण व रात्रीस भोजन करण्याचें व्रत.
**नक्त** (अर. नक्द न.) नगद, रोकड नाणें.
**नक्तभोजी** (सं. वि.) दिवसा उपोषण करून रात्रीं जेवणारा.
**नक्तेल** (न.) टर्पेंटाईन (तेल.)
**नक्र** (सं. पु.) मगर, सुसर. [खोदकाम.
**नक्शी** (स्त्री.) वेलबुट्टी; शिल्पकाम;
**नख** (सं. न.) बोटाच्या अग्र-भागावरचें हाड.
**नखभर** (अ.) नखावर मावण्याइतकें; थोडें.
**नखरा** (फा. पु.) चित्ताकर्षणासाठीं केलेला खोटा हावभाव; विभ्रम; ऐट, मिजास, गमजा.
**नखरेबाज** (वि.) नखरा करणारा.
**नखरूड** (न.) नखाजवळची सूज.
**नखला** (पु.) गव्हल्यासारखा पण नख टोचून केलेला खिरींत घालण्याचा पदार्थ; एक सुगंधि द्रव्य.
**नखशिखांत** (अ.) सर्व शरीरभर. [जिभाळी.
**नखसूं** (न.) नखें काढण्याचें हत्यार नराणी;
**नखी** (स्त्री.) तारेचें वाद्य वाजवितांना बोटाला घालण्याचें टोपण; गुरांचें नख, खुरकी; टांकी; आश्रय, आधार; निश्चय; (वि.) नखें असलेला प्राणी.
**नखुरडें** (न.) नखांत होणारा एक रोग.
**नखुलणें** (क्रि.) नख लावणें; तोडणें.
**नखुली** (स्त्री.) मुलींचा एक खेळ.
**नखोडा** (पु.) नकासगाराचें हत्यार.
**नखोरा** (पु.) नखानें काढलेला ओरखडा.
**नख्त** (न.) ठोक.

**नग** (सं. पु.) दागिना; वस्तु; रकम; पर्वत.
**नगज** (सं. पु.) हत्ती (देवनाथ पृ. ३६८).
**नगद** (अर. नक्द न.) रोकड नाणें; (वि.) निवडक, छानदार. **न० विक्री** — रोखीनें विकणें; **न० माल**—तयार माल; **न० आंबे**—निवडक आंबे.
**नगदी** (अर. स्त्री.) रोकड; (वि.) पैशा-संबंधीं. [हिशेब ठेवणारा कारकून.
**नगदी कारकून** (पु.) रोखीच्या व्यवहाराचा
**नगनगोटा** (पु.), **नगनगोटें** (न.) जवाहीर, दागिने वगैरे.
**नगर** (सं. न.) शहर.
**नगरपाल** (सं. पु.) पोलिस; कोतवाल.
**नगरपालिका** (स्त्री.) स्थानिक स्वराज्य संस्था; म्युनिसिपालिटी. **महानगर-पालिका**—मोठ्या शहराची नगर-पालिका (कार्पोरेशन).
**नगरपिता** (पु.) नगरपालिकेचा सभासद;
**नगराध्यक्ष** (पु.) नगरपालिकेचा-अध्यक्ष.
**नगर-प्रदक्षिणा** (सं. स्त्री.) देवाच्या मूर्तीची शहराभोंवताली काढलेली मिरवणूक. [मारणारी बायको.
**नगरभवानी** (सं. स्त्री.) गांवभर भटक्या
**नगरी** (सं. स्त्री.) लहान शहर; (वि.) अहमदनगरचा. [दि० २।१।६०).
**नगवज** (प्रा. न.) अलंकार वगैरे (स्वा०
**नंग** (पु.) प्रतिष्ठा; नांवलौकिक.
**नंगी** (सं. नग्न वि.) नग्न, उघडा; दरिद्री.
**नगाधिप, नगाधिराज** (सं. पु.) हिमालय पर्वत.
**नंगा नाच** अनियंत्रित, अश्लाघ्य वर्तन.
**नगारखाना** (फा. पु.) नगारे वगैरे ठेव-ण्याचें ठिकाण. [वाजविणारा.
**नगारची, नगारजी** (हिं. पु.) नगारा
**नगारा** (अर. पु.) डंगा, नौबत.
**नगिना** (फा. पु.) रत्न; उत्कृष्ट वस्तु.
**नंगी समशेर** नागवी तलवार; सुंदर, चपळ स्त्री.
**नगो** (अ.) नको.
**नगोटा** (पु.), **नगोटें** (न.) किरकोळ.
**नग्न** (सं. वि.) वस्त्रहीन, नागवा. [मुलगी.
**नग्निका** (सं. स्त्री.) वयांत न आलेली

**नच–चि** (अ.) नाहीं.
**नजन** (सं. नयन पु.) डोळा, नेत्र.
**नजर** (अर. स्त्री.) दृष्टि; भेट; बक्षीस.
**नजरगहाण** (न.) गहाण ठेवलेली वस्तु सावकाराच्या ताब्यांत नसून कर्ज घेणाऱ्याच्यापाशींच असते असा गहाणाचा प्रकार.
**नजरगुजारा** (फा. पु.) दृष्टादृष्ट, भेट.
**नजरनजराणा** (अर. फा. पु.) वरिष्ठांना सादर अर्पण केलेल्या वस्तु.
**नजरनियाज** (अर. पु.) नजराणा.
**नजरबंदी** (फा. स्त्री.) हातचलाखी; पाहऱ्याखालीं ठेवणें. [ समोरची बाग.
**नजरबाग** (अर. फा. पु. स्त्री.) घराच्या
**नजरमुबारक** (अर. स्त्री.) भेटीचा नजराणा.
**नजराणा** (फा. पु.) वरिष्ठांस भेट म्हणून दिलेली वस्तु.
**नजरानजर** (स्त्री.) परस्परदृष्टिव्यवहार.
**नजाकत** (अर. स्त्री.) सुबकपणा.
**नजीक, नजदीक** (फा. अ.) जवळ, समीप.
**नट** (सं. वि.) लवाड; उनाड; (पु.) सोंग घेणारा; वेषधर; नाचणारा; गायनांतला एक राग.
**नटखट** (वि.) लुच्चा, सोदा.
**नटंग, नटंगें** (न.) गुडघा.
**नटणें** (क्रि.) शृंगारणें; वेष घेणें; नाकबूल जाणें. [महदनु०).
**नटतिया** (प्रा. पु.) नाटककार (सोहि०
**नटनर्तक** (सं. पु.) सोंगाडे आणि नाचणारे.
**नटनागर** (वि.) नटून सजून गांवभर हिंडणारा (प्रभा० पृ. १४१).
**नटनाच** (प्रा. न.) उल्लास; प्रेमानें नाचणें (ज्ञा० ९।१९७); उत्कर्ष; प्रताप.
**नटनाटकी** (सं. पु.) नानाप्रकारचे चमत्कारिक खेळ करून दाखविणारा; परमेश्वर.
**नटभोगरा** (पु.) नटणारा मनुष्य.
**नटवर** (सं. पु.) नटांत श्रेष्ठ, परमेश्वर.
**नटवा** (वि.) नटणारा, मुरडणारा; सोंगाडचा; नाच्या. (पु.) डोंबारी जात.
**नटविणें** (क्रि.) शोभविणें.
**नटी** (सं. स्त्री.) सूत्रधाराची बायको; नाचणारी स्त्री.
**नटूनथटून** (अ.) दिमाखानें, डौलानें.
**नटेश, नटेश्वर** (सं. पु.) परमेश्वर.
**नट्टापट्टा** (पु.) नटणें; मुरडणें.
**नठारा** (वि.) निरुपयोगी, वाईट.
**नठ्याळ** (वि.) नष्ट, द्वाड.
**नड** (स्त्री.) अडचण, त्रास.
**नडगी–गे** (स्त्री. न.) पायाची नळी.
**नडगें, नटघें** (न.) अस्वल.
**नडणें** (क्रि.) प्रतिबंध होणें; कुंठित होणें.
**नडनाच** (प्रा. पु.) मिष; उत्कर्ष.
**नडविणें** (क्रि.) अडथळा करणें; दुखापत करणें.
**नडाव** (पु.) अडचण, प्रतिबंध; त्रास.
**नणद, नणंद** (सं. ननांदृ स्त्री.) नवऱ्याची बहीण. [ नवरा.
**नणंदा, नणदया, नणदोई** (पु.) नणंदेचा
**नणदुली, नणदोली, नंदा** (स्त्री.) नणंद.
**नत** (सं. वि.) नम्र, वाकलेला; (सं. पु.) ज्योतिःशास्त्रांत–खमध्यापासून ग्रहापर्यंतचें अंतर.
**नतद्रक्ष, नतद्रष्ट** (वि.) अति कृपण, खाष्ट.
**नतनाडिका** (सं. स्त्री.) ज्योतिःशास्त्रांत–मध्यान्हानंतर व मध्यरात्रीपूर्वीची जन्मघटिका.
**नंतर** (सं. अनंतरम् अ.) मग.
**नति** (सं. स्त्री.) नमन; नम्रता.
**नतिजा** (फा. पु.) फळ, परिणाम.
**नत्र** (फा. पु.) नायट्रोजन.
**नथ** (कानडी–नत्तु स्त्री.) स्त्रियांच्या नाकांतला एक दागिना.
**नथडा** (पु.) मोठी नथ.
**नथणी** (स्त्री.) नथ; वेसण; कुलपासारखें अडकविलेलें लोखंडाचें वेटोळें. [मुलगा.
**नथ्या** (सं. नस्तितः पु.) नाक टोचलेला
**नद** (सं. पु.) मोठी नदी.
**नंद** (पु.) दलाल; केवळ मूर्ख; गर्व; आढ्यता; कृष्णाचा धर्मपिता.
**नंदक** (सं. वि.) सुखदायक; कुलपालक; (पु.) विष्णूचा खड्ग; नांदुरकीचें झाड.

वाचनालय सातारा

**नंदन** (सं. पु.) मुलगा; (न.) इंद्राचें नंदनवन; आनंदविणें. [ चूर्ण.
**नंदपुडी** (प्रा.न.) अनेक औषधांचें केलेलें
**नंदभाषा** (स्त्री.) दलालांची गुप्त भाषा. या भाषेंतल्या दलालीच्या दरासंबंधाच्या कित्येक संज्ञा अशा आहेत:—भुरका १ रुपया; ढोकळा १ पैसा; केवली १, अवारू २, उधानू ३, पोकू ४, मुळू ५, शेली ६, पवित्रू ७, मंगी ८, तेवसू किंवा लेवनू ९, अंगुळू १०, एकडू ११, रेघी १२, ठेपरू १३, चोपडू १४, तळी १५, त्रिटी १००, ढकार १०००, फाटा १ आणा.
**नदर** (स्त्री.) नजर.
**नंदा** (सं.स्त्री.) शुक्ल पक्षांतली प्रतिपदा, षष्ठी व एकादशी; नणंद.
**नंदादीप** (पु.) देवापुढें अहोरात्र जळत राहणारा दिवा.
**नंदिकेश्वर** (सं. पु.) शिवाचें वाहन, नंदी.
**नंदिनी** (सं. स्त्री.) मुलगी; (स्त्री.) कामधेनूची मुलगी. [ नदी.
**नदी** (सं. स्त्री.) पाण्याचा मोठा प्रवाह,
**नंदी** (सं. पु.) शंकराचें वाहन; बैल; मूर्ख; टोणपा.
**नंदीबैल** (पु.) संकेताप्रमाणें हालचाल करण्यास शिकविलेला बैल; मूर्ख, टोणपा.
**नंदुली** (स्त्री.) नणंद.
**न देवाय न धर्माय** देवाच्या कार्यासाठीं नव्हे व धर्मकार्यासाठींहि नव्हे असा अनाठायीं निष्कारण झालेला खर्च किंवा श्रम.
**नंद्या** (पु.) नंद पहा; (वि.) मूर्ख.
**नन्नाचा पाढा वाचणें** प्रत्येक गोष्टीला नकाराचें उत्तर देणें.
**नपुंसक** (सं. पु.) गांडू, षंढ, हिजडा; पराक्रमहीन; (व्याकरणांत) तृतीय लिंग.
**नपूर** (स्त्री.) अपुरेपणा; उणेपणा, तोकडेपणा.
**नप्ता** (सं. पु.) नातू.
**नप्त्री** (सं. स्त्री.) नात. [ नग.
**नफर** (अर. पु.) हलका नोकर, गडी;
**नफरत** (फा. पु.) तिरस्कार.
**नफा** (अर. पु.) फायदा, प्राप्ति.
**नफातोटा** (पु.) अंकगणितांत—जेव्हां खरेदीपेक्षां विक्री मोठी असते तेव्हां त्या दोहोंच्या पैशांच्या अंतरास नफा व जेव्हां विक्री लहान असते तेव्हां त्यांच्या अंतरास तोटा म्हणतात.
**नफेबाजी** (फा. स्त्री.) मिळेल तेवढा ज्यास्त नफा मिळविण्याची लागलेली खोड.
**नफेरी** (फा. स्त्री.) पढघम.
**नंबर** (इं. पु.) अनुक्रमसंख्या; संख्या.
**नबळा** (वि.) नेभळा, दुर्बळ.
**नबाश** (अर. पु.) अलंकार. [१।२९).
**नबोलणें** (प्रा. न.) अनिर्वचनीय वस्तु (भा०
**नभ** (सं. न.) आकाश; मेघ.
**नभस्तल** (सं. न.) आकाश.
**न भूतो न भविष्यति** पूर्वी कधीं झाली नाहीं व पुढें होणार नाहीं अशी अलौकिक गोष्ट.
**नभोमंडल** (सं. न.) आकाश.
**नभोवाणी** (स्त्री.) आकाशवाणी; रेडिओ.
**नमणें** (सं. क्रि.) वाकणें; वंदन करणें.
**नमता** (वि.) वाकलेला, कमी झालेला.
**नमतें** (न.) पड; माघार; विनयवृत्ति; सौम्य वर्तन.
**नमदा** (फा. पु.) गादी. [गीत.
**नमन** (सं. न.) वाकणें; वंदन; वंदनाचें
**नमविणें** (क्रि.) वाकविणें; वठणीस आणणें.
**नमस्कार** (सं. पु.) हात जोडणें, वंदन. न० णें (क्रि.) वंदन करणें.
**नमस्ते** (स्त्री.) तुला नमस्कार असो.
**नमाज** (फा. स्त्री.) मुसलमानांतली देवाची प्रार्थना; भार; संकट.
**नमुना** (फा. पु.) मासला; नक्कल.
**नमूजी** (फा. पु.) ज्योतिषी.
**नमूद** (फा. नमुदा वि. ) दाखल, रुजू.
**नमा** (अ.) नमन करतों, नमस्कार इ०अर्थी.
**नमोनमः** (अ.) नमस्कार.
**नमोनारायण** (सं. पु.) गोसावी लोकांनीं परस्परांना करण्याचा नमस्कार.
**नम्र** (सं. वि.) वाकलेला; गरीब.

**नम्रता** (सं. स्त्री.) विनय.
**नय** (सं. पु.) नीति; न्याय.
**नयन** (सं. पु.) डोळा; (न.) नेणें.
**नयनवेटी** (प्रा. स्त्री.) डोळयांतली बाहुली (देवनाथ पृ० ५२२).
**नर** (सं. पु.) मनुष्य; सर्व जातींचे पुरुष; घोडा; अर्जुन; एक प्रकारचा खिळा.
**नरक** (सं. पु.) विष्ठा; यमलोकींची यातनाप्रद जागा.
**नरककुंड** (सं. न.) नरकलोकीं पाप्यांना शिक्षा करण्यासाठीं ८६ कुंडें आहेत अशी जुन्या लोकांची समजूत आहे; या कुंडांपैकीं एखादें.
**नरकचतुर्दशी** (सं. स्त्री.) आश्विन व० १४.
**नरकपाल** (सं. न.) माणसाच्या डोक्याची कवटी.
**नरकाड** (न.), **नरकोडी** (स्त्री.) गुखाडी (तुका० २४१३).
**नरकेसरी** (सं. पु.) नरसिंह.
**नरटी** (स्त्री.) करटी; करवंटी.
**नरडी** (स्त्री.), **नरडें** (न.) गळा. **न० चा घोट घेणें**—मारून रक्त पिणें.
**नरणी, नराणी** (स्त्री.) नख काढण्याचें न्हाव्याचें हत्यार.
**नरद** (स्त्री.) सोंगटी.
**नरनारायण** (सं. पु.) विष्णूच्या वंशापासून उत्पन्न झालेले दोन ऋषी; यांचेच अवतार पुढें अर्जुन व श्रीकृष्ण हे झाले अशी पुराणांतरीं कथा आहे.
**नरपति** (सं. पु.) राजा. [मनुष्य; नराधम.
**नरपशु** (सं. पु.) पशुतुल्य आचरण करणारा
**नरम** (फा. वि.) मऊ, सौम्य.
**नरमणें** (क्रि.) कमी होणें, सौम्य होणें.
**नरमाई** (हिं. स्त्री.) सौम्यपणा, मऊपणा.
**नरमादी** (फा. स्त्री.) पुरुष व स्त्री; मोठें व लहान; श्रेष्ठ व कनिष्ठ.
**नरमावणें** (फा. क्रि.) नरम होणें; कमी जोराचा होणें; मंदावणें.
**नरमिना** (फा. पु.) रेशमी वस्त्रें. [यज्ञ.
**नरमेध** (सं. पु.) नरमांसाचें हवन करण्याचा
**नरवटी** (स्त्री.) माणसाच्या डोक्याची करटी; नरोटी.
**नरवा** (स्त्री.) घाण्यांतून गाळलेलें तेल जेथें पडतें ती खांच.
**नरसाळें** (न.) नाळचें, गळणी, नसराळें.
**नरसिंह** (सं. पु.) विष्णूच्या दहा अवतारांपैकीं चौथा; उग्र व पराक्रमी मनुष्य. **न० जयंती** —वैशाख शु० १४.
**नरसें** (न.) हेकडपणा.
**नरसोबा** (पु.) नरसिंह.
**नरहर देवाची पालखी** ज्या कामासाठीं विशेष माणसांची योजना झालेली नसते, हवें त्यानें येऊन हातभार लावावा अशी गोष्ट असते, तें, अर्थात् अव्यवस्थित काम.
**नरहरि** (सं. पु.) नरसिंह. [हत्यार.
**नराणी** (स्त्री.) नखें काढण्याचें न्हाव्याचें
**नरी** (हिं.स्त्री.) बकऱ्याचें कमावलेलें कातडें.
**नरेंद्र** (सं. पु.) राजा.
**नरोटी** (स्त्री.) कवटी; आंतलें खोबरें काढून घेतल्यावर नारळाचें जें कवच राहतें तें.
**नरोत्तम** (सं. पु.) पुरुषोत्तम, नारायण.
**नरो वा कुंजरो वा** विचारलेल्या गोष्टीविषयींचें पूर्ण अज्ञान दर्शविणारें किंवा संदिग्ध उत्तर.
**नर्तक** (सं. वि.) नाचणारा.
**नर्तकी** (सं. स्त्री. वि.) नाचणारी.
**नर्तन** (सं. न.) नाचणें; नाच.
**नर्म** (न.) खेळ; क्रीडा.
**नर्मसचिव** (पु.) खुषमस्कऱ्या.
**नर्मदा** (स्त्री.) नदीचें नांव.
**नर्मीना** (फा. पु.) रेशमी कापड.
**नर्स** (इं. स्त्री.) मुलांना संभाळण्यासाठीं ठेविलेली बाई; दाई; रुग्णपरिचारिका.
**नल, नळ, देवनळ** (पु.) निषध देशचा राजा (दमयंतीचा पति.).
**नलगे** (क्रि.) नको.
**नलिका** (सं. स्त्री.) नळी.
**नलिन** (सं. पु. न.) कमळ. [कमलपूर्ण तळें.
**नलिनी** (सं. स्त्री.) कमळांचा समूह;
**नव** (सं. वि.) नऊ; नवीन. [आणिलेली.
**नवकोर्द** (वि.) नवीनच लागवडीस
**नवकोट नारायण** अतिशय श्रीमंत मनुष्य

**नवखा** (वि.) नवा, अनभ्यस्त.
**नवगजी** (पु.) दिवाणखाना.
**नवग्रह** (सं. पु.) सूर्य, चंद्र, मंगळ, बुध, बृहस्पति, शुक्र, शनि, राहु व केतु.
**नवघड** (स्त्री.) कावड, ओझें वाहण्याची दांडी.
**नवजीवन** (सं. न.) पुनर्जन्म, चरित्राचें पालटलेलें स्वरूप. [प्रकार.
**नवज्वर** (सं. पु.) दूषित ज्वराचा एक
**नवट** (वि.) नवीन. [अलीकडे.
**नवतर, नवेतर** (वि.) अलीकडील; (अ.)
**नवती** (स्त्री.) तरुणी; तारुण्याचा भर; नवी पालवी.
**नत्वर** (सं. न.) नवीनता, नवेपणा.
**नवथर** (वि.) अलीकडचा, ताजा.
**नवनवता** (स्त्री.) तारुण्याचा पूर्वभाग.
**नव नाग** (सं. पु.) पुराणांतले सुप्रसिद्ध नऊ नाग. त्यांचीं नांवें–अनंत, वासुकि, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृत-राष्ट्र, तक्षक आणि कालिय.
**नवनिधि** (सं. पु.) कुबेराचे नऊ खजिने. त्यांचीं नांवें—पद्म, महापद्म, शंख, मकर, कच्छप, मुकुंद, नंद, नील आणि खर्व.
**नवनीत** (सं. न.) लोणी.
**नवम** (वि.) नववें. [दिवस.
**नवमी** (स्त्री.) पंधरवडयांतला नववा
**नवरंगडा** (प्रा. वि.) नित्य नवा रंग करणारा (भा० १२।९७).
**नवरत्नें** (सं. न. अने.) नऊ रत्नें. त्यांचीं नांवें–हिरा, माणिक, मोती, गोमेद, इंद्रनील, पाच, प्रवाल, पुष्कराज आणि वैदूर्य.
**नवरदेव** (पु.) नवरा मुलगा, वर.
**नवरस** (सं. पु. अने.) अलंकारशास्त्रांत वर्णिलेले नऊ रस. त्यांचीं नांवें–शृंगार, वीर, हास्य, करुण, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्‌भुत आणि शांत.
**नवरा** (सं. नववर पु.) पति; मर्द गडी.
**नवरात्र** (सं. न.) नऊ अहोरात्र; त्या दिवसांत करण्याचा देवाचा उत्सव.
**नवरी** (स्त्री.) विवाहयोग्य मुलगी, वधू.
**नवरोज** (फा. पु.) नव्या वर्षाचा पहिला दिवस. [नवी गोष्ट.
**नवल** (सं. नव न.) आश्चर्य, चमत्कार;
**नवल–कथा** (गुज. स्त्री.) कादंबरी, अद्‌भुत गोष्ट.
**नवलपणा** (न.) नवेपण, कौतुक.
**नवलपरी** (स्त्री.) एक प्रकारचें खणाळें; (प्रा.) आश्चर्य; (अ.) आश्चर्यकारक रीतीनें.
**नवलक्षणें** (न. अने.) आचार, विनय, विद्या, प्रतिष्ठा, तीर्थदर्शन, निष्ठा, वेद-पाठ, तपस्या व दान हीं ब्राह्मणांचीं नऊ चिन्हें. [पिशाच्च.
**नवलाई** (स्त्री.) अलौकिक गोष्ट; एक
**नवलाखा, नवलाख्या** (वि.) अतिशय श्रीमंत.
**नवलार** (न.). नवल.
**नवलाव, नवलावो** (पु.) नवल, आश्चर्य.
**नवली** (स्त्री.) टवटवी, तजेला. [मुलगी.
**नववधू** (सं. स्त्री.) नुकतेंच लग्न झालेली
**नवविधा भक्ति** श्रवण, कीर्तन, स्मरण पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन या नऊ रूपांनीं केलेली भक्ति.
**नवशा** (वि.) नवस करणारा.
**नवशिका, नवशीक** (वि.) नुकताच शिकूं लागलेला.
**नवस** (सं. नमसित पु.) कार्यसिद्धीसाठीं देवाची प्रार्थना व तें सिद्ध झाल्यावर कांहीं वस्तु अर्पण करण्याची प्रतिज्ञा.
**नवसणें** (क्रि.) कार्यसिद्धि झाल्यावर देवाला अमुक देईन अशी प्रतिज्ञा करणें.
**नवसर** (वि.) नवीन, अलीकडचा, नवथर.
**नवसागर** (पु.) एक खनिज द्रव्य.
**नवसुती** (स्त्री.) नऊ दोऱ्यांना पीळ देऊन केलेलें जानवें.
**नवा** (वि.) नवीन. **नव्याचे नऊ दिवस**— जोंपर्यंत वस्तु नवी असते तोंपर्यंत तिची मौज. [नवल; नवीनपणा.
**नवाई** (स्त्री.) नवीन असामान्य गोष्ट;
**नवाज** (फा. वि.) कनवाळू.
**नवाजखानी** (वि.) तीक्ष्ण धारेचें.

**नवाजणी, नवाजणूक** (फा. स्त्री.) स्तुति.
**नवाजणें** (फा. क्रि.) स्तुति करणें.
**नवाजस, नवाजीस** (फा. स्त्री.) स्तुति.
**नवाजिक** (वि.) अपूर्व (रामजोशी पृ. २५).
**नवाजी** (हिं. स्त्री.) स्तुति (वामन०पार्थभाग्य० २).
**नवाट** (प्रा. वि.) कोरा करकरीत.
**नवाब** (अर. पु.) वडा सरदार. [ पट्टी.
**नवार** (हिं. स्त्री.) पलंग विणण्याची सुती
**नवाळी, नव्हाळी** (प्रा. स्त्री.) अपूर्वता, नवल (राम० १३।५४); तारुण्याचा भर; प्राप्ति (भा० ३।३४७); इच्छा (ना० ८००); गोडी (भा०२८।२२२); हंगामांतला फळांचा पहिला बहर.
**नवीन** (सं. वि.) नवा.
**नवी नवती** तारुण्याचा भर, ऐन ज्वानी.
**नवी नवाळी, नवी नवलाई** (स्त्री.) नवान्न; नवें धान्य; नवीन चांगली वस्तु.
**नवें** (सं. नव वि.) नवीन, ताजें.
**नवेतर** (अ.) नव्यानें; अलीकडे; (वि.) अलीकडचें.
**नवोढा** (सं. स्त्री.) नववधू.
**नव्यानें** (अ.) प्रथमच. [ बहुतेक.
**नव्याण्णव** (वि.) ९९ **न०. हिश्शांनीं—**
**नव्हांड** (स्त्री.) अभाव. [ पहा.
**नव्हाळी** (स्त्री.) गोडी; कौतुक; नवाळी
**नशा** (अर. स्त्री.) धुंदी, गुंगी, कैफ.
**नशाखोर** (फा. वि.) अंमली पदार्थांचें सेवन करणारा.
**नशीन** (फा. वि.) आरूढ.
**नशिहत, नश्यत** (अर. नसहित स्त्री.) सल्ला; तंबी; शिक्षा.
**नशीब** (अर. न.) दैव. **न० चे ताले—** दैवाचे खेळ.
**नशीबवान्** (वि.) भाग्यवंत, थोर नशिवाचा.
**नश्वर** (सं. वि.) नाशिवंत. [स्वभावाचा.
**नष्ट** (सं. वि.) नाश पावलेला; दुष्ट
**नष्टचर्य** (सं. न.) दुर्दैव.
**नष्टाई** (स्त्री.) हरामखोरपणा, दुष्टपणा.
**नस** (अर. स्त्री.) शीर; स्नायु; (सं. नस्य) तपकीर.
**नसणें** (क्रि.) न असणें; अभाव असणें.
**नसतें** (प्रा. अ.) वांचून.
**नसता** (वि.) नसणारा, अनवश्यक; दरिद्री.
**नसनखवडा** (वि.) माणूसघाणा; मत्सरी.
**नसरतें** (प्रा.वि.) निंद्य, हीन (भा० ४।१२५).
**नसराणा, नसराणी** (अर. वि.) मूळ अर्थ—ख्रिस्ती; रूढ अर्थ—लुच्चा, सोदा.
**नसीयत** (स्त्री.) शिक्षा.
**नसीब, नशीब** (अर. न.) दैव.
**नसेत** (अर. नसिहत स्त्री.) शिक्षा.
**नस्कुटा** (वि.) कृश, रोडका.
**नस्तर** (फा. न.) टोकाला तिरकी धार असलेली बारीक लोखंडी सळई; शस्त्रक्रियेचा चाकू.
**नस्य** (सं. वि.) नाकांत घालण्याचें किंवा नाकानें ओढण्याचें (औषध इ.); (न.) तपकीर.
**नहक, नाहक** (अ.) अन्यायानें; विनाकारण, उगीच्या उगीच. [ मोरी.
**नहर** (अर.पु.) पाण्याचा नळ, कालवा; हौद;
**नहला, नहल्या** (पु.) गिलावा करण्याची गवंड्याची लहान करणी.
**नहलू, नहिल्या** (पु.) पत्त्याच्या खेळांतलें नऊ ठिपक्यांचें पान.
**नहाण** (सं. स्नान) रजोदर्शन, ऋतुप्राप्ति; स्नान.
**नहाणी** (स्त्री.) स्नानगृह.
**नहाणें** (क्रि.) स्नान करणें.
**नहिना** (प्रा. पु.) नेत्र, नयन.
**नही** (प्रा. स्त्री.) नदी.
**नळ** (सं. नल पु.) मोठा नळा, पन्हळी; पोटांतलें मोठें आंतडें; देठ; निषध देशाचा एक राजा; एक वानरसेनापति.
**नळकंडें, नळकांडें** (न.) नळी.
**नळकुटी** (स्त्री.) लहान नळी.
**नळगूत, नळगूद, नाळगूत** (न.) जलोदराच्या वर्गातला एक रोग (शोथ.).
**नळणी** (सं. नलिनी स्त्री.) कमलिनी.
**नळनळी** (स्त्री.) तुळतुळीतपणा.
**नळपट** (न.) लहान नळी, नळाचा तुकडा.
**नळपट्या** (वि.) बेंबीच्या खालीं धोतर नेसलेला.

अमर वाचनालय, सातारा



**नळवडी** (स्त्री.) मोरी, नळांडी.

**नळवाट** (स्त्री.), **नळवात, नळवायु** (पु.) पोटांतलीं आंतडीं हलकीं होऊन त्यांत गुवारा धरतो असा एक शरीरविकार.

**नळा** (पु.) गोल कोल; मृत्तिकापात्रांत दारू भरून केलेला आतपबाजीचा एक प्रकार; तेल ठेवण्यासाठीं केलेलें वेळूचें पात्र. **गाड्याबरोबर न० ची यात्रा**—मुख्य गोष्टीबरोबर आनुषंगिक गोष्टी-लाहि तशीच स्थिति प्राप्त होणें.

**नळांडी** (स्त्री.) मोरी; चाकोरी; अरुंद खिंड.

**नळी** (स्त्री.) बारीक नळा; नळकांड; बंदूक.

**नक्ष** (अर. नक्श पु.) छाप, वर्चस्व.

**नक्षत्र** (सं. न.) क्रांति—वृत्ताच्या २७ विभागांपैकीं प्रत्येक; म्हणजे १३ अंश व २० कला इतकें अंतर चालण्यास चंद्रास लागणारा काळ; तारा; चांदणी. **हातावर न० पडणें**—चोरी करण्याची संवय लागणें; **पायांवर न० पडणें**—भटकत फिरणें; **तोंडावर न० पडणें**—सारखी वटवट करणें.

**नक्षत्रमाळा** (स्त्री.) सत्तावीस मोत्यांचा हार; लग्न वगैरे समारंभाच्या मिरवणुकींत एका उंच काठीला कागद, पितळपान इ० च्या फुल्या कातरून केलेल्या माळा लावून सर्वांच्या पुढें मिरवीत नेतात ती.

**नक्षा** (फा. पु.) कीर्ति; ताण, वरचढ.

**नक्षी** (स्त्री.) वेलबुटी; चित्रविचित्र काम.

**नक्षीदार** (वि.) नक्षीचें काम केलेलें.

**ना** (स्त्री.) नकार; मनाई; असंमति; (प्रा.) किंवा, अथवा; कीं; परंतु.

**नाइलाज** (पु.) निरुपाय; (वि.) लाचार.

**नाईक** (सं. नायक पु.) मुख्य; नायक; ब्राह्मण; सराफ.

**नाईब, नायब** (अर. पु.) मुख्याच्या वतीनें किंवा तर्फेनें काम पाहणारा अधिकारी.

**नाऊ** (पु.) न्हावी.

**नाक** (सं. नासिका न.) घ्राणेंद्रिय; अग्र-भाग; अंकुर फुटण्याचें ठिकाण; अब्रू; नायक; (पु.) स्वर्गलोक. **नाक कापणें**—गर्व उतरणें; **नाक खालीं होणें**—गर्व नाहींसा होणें; **नाक घासणें**—नम्र होणें; **नाक मुरडणें**—नापसंती दर्शविणें; **नाक ठेंचणें**—शिक्षा करणें; **नाक धरून बसणें**—जप करणें; **नाक वर करून**—तोऱ्यानें; **नाकांत काड्या घालणें**—कुरापत काढणें; **आपलें नाक कापून दुसऱ्याला अपशकुन करणें**—दुसऱ्याचें वाईट व्हावें यासाठीं अगोदर स्वतःचेंच वाईट करून घेणें; **नाकचा (नाकाचा) बाल**—अत्यंत प्रीतींतला; **नाकावर वाट करणें**—विरोधास न जुमानतां काम करणें; **नाकावर राग असणें**—लवकर चिडणें.

**नागझरी** (स्त्री.) घाण पाण्याचा काढून दिलेला ओढा. [प्राणी.

**नाकतोडा** (पु.) टोळाच्या जातीचा एक

**नाकदुरई** (स्त्री.) पश्चात्ताप—प्रदर्शनार्थ नाक घासणें; अतिशय नम्रपणाची विनवणी. [ एकेक नळी.

**नाकपुडी** (सं. नासापुट स्त्री.) नाकाची

**नाकबूल** (फा. वि.) असंमत.

**नाकशिकणी** (स्त्री.) जिचा वास घेतला असतां शिंकांवर शिंका येतात अशी एक वनस्पति.

**नाकसूर** (सं. नागस्वर पु. न.) साप खेळविणाऱ्या गारुड्याची पिपाणी; नाकांतून बाहेर पडणारी हवा.

**नाकर्दी** (फा. स्त्री.) लागवडीस न आलेली जमीन.

**नाकस्ता** (अर. नाकस पु.) नुकसान; उणेपणा; घाबरगुंडी.

**नाका** (हिं. पु.) रस्त्याचा शेवट; अनेक रस्ते एकत्र होण्याचें ठिकाण; जकातीचें ठाणें.

**नाकाडोळ्याचा वैद्य** वैदू.

**नाकाटी** (स्त्री.) रग जिरविणें; गर्व उतरणें.

**नाकाड** (न.) मोठें नाक.

**नाकार** (पु.), **नाकारणी** (स्त्री.) अस्वीकार, नाकबुली. [ करणें.

**नाकारणें** (क्रि.) नको म्हणणें; अस्वीकार

**नाकारा** (प्रा. वि.) निकृष्ट, निरुपयोगी.
**नाकोर्द** (फा. स्त्री.) लागवडीस न येण्यासारखी जमीन. [ येण्यासारखी.
**नाकोर्दसार** (फा. वि.) लागवडीस न
**नाकोल** (वि.) लांब व सरळ नाकाचा.
**नाकुवत** (हिं. वि.) अशक्त, दुबळा.
**नाकुस्ती** (स्त्री.) नाक मुरडणें.
**नाकें** (न.) नाका पहा; टोक, अखेरचा भाग; वळण. [ करणारा.
**नाकेदार** (पु.) नाक्यावर जकात वसूल
**नाकेबंदी** (हिं. स्त्री.) येण्याजाण्याच्या वाटांचा बंदोबस्त.
**नाकेल, नाकेला** (वि.) लांब नाकाचा.
**नाखवा, नाखोदा** (फा. पु.) तांडेल; जहाजावरचा मुख्य नावाडी.
**नाखळ** (वि.) दुष्ट, खोडकर, त्रासदायक.
**नाखुष** (फा. वि.) नाराज; असंतुष्ट.
**नाग** (सं. पु.) विषारी सर्प; हत्ती; वचनाग; (ज्योति०)—दहावें करण.
**नाकटा, नागडा** (सं. नग्न वि.) नग्न, उघडा. [ नांगी.
**नांगडा** (पु.), **नांगडी** (स्त्री.) विंचवाची
**नागदिवाळी** (स्त्री.) मार्गशीर्ष शु० ५.
**नागपंचमी** (स्त्री.) श्रावण शु० ५.
**नागपाश** (सं. पु.) वरुणाचा पाश; वर्तुळाकार बंधन.
**नागफणी** (सं. स्त्री.) एक कांटेरी वनस्पति.
**नागबंद** (पु.) कटिभूषण.
**नागबंध** (सं. पु.) दृढ पाश; कमरेचें धोतर सुटूं नये म्हणून खोवण्याची सुपारी, सांगटी इ०.
**नागबळ, नागबळी** (पु.) स्वतःच्या किंवा पूर्वजाच्या हातून नाग मारला गेल्याबद्दल शांत्यर्थ नागाची पूजा करतात ती.
**नागमोडी** (वि.) सर्पाच्या गतीप्रमाणें वळणें घेऊन गेलेला.
**नागर, नागरु** (प्रा. वि.) सुंदर; शहाणा; चांगला; गुजराथी ब्राह्मणांतला एक भेद.
**नांगर** (सं. लांगल पु.) शेतीची जमीन उकरण्याचें एक औत; गलबत स्थिर करण्यासाठीं पाण्यांत टाकण्याचा आकडा.
**नांगरकी** (स्त्री.) नांगरणें.
**नांगरचुडा** (प्रा. पु.) बांगडी.
**नांगरट** (वि.) नांगरलेली.
**नांगरणी** (स्त्री.) जमीन नांगरणें; नांगर टाकून गलबत थांबविणें.
**नागरफणी** (स्त्री.) स्त्रियांच्या डोक्यांतील अलंकार.
**नागरमोथा** (सं. नागर मुस्तक पु.) एक सुवासिक वनस्पति. [ जमीन.
**नांगरवट, नांगरठी** (स्त्री.) नांगरलेली
**नागरी** (वि.) नगरासंबंधीं देवनागरी.
**नागरिक** (सं. पु.) नगरवासी.
**नांगऱ्या** (पु.) नांगरास लावलेला (बैल इ०); अडाणी मनुष्य.
**नागला** (वि.) श्रीमंत (तुका० ४०५९); (पु.) एक धान्य.
**नागवण** (स्त्री.) दरोडा (विवे० पू० १।१८); द्रव्यापहारामुळें होणारी दुर्दशा.
**नागवणूक** (स्त्री.) द्रव्यापहार; लुटलें जाणें.
**नागवणें** (प्रा. क्रि.) अनावर होणें (तुका० १७६२; ज्ञा० ११।२७).
**नागवणें** (न.) लूट.
**नागवा** (वि.) नग्न, नागडा. **नागवा पाऊस**—सूर्यप्रकाश असतांना पडणारा पाऊस; **ना० कोल्हें भेटणें**—अकल्पित लाभ होणें; **नागवें नाचणें**—स्वैरपणें वागणें.
**नागवी** (प्रा. स्त्री.) सर्पाची मादी.
**नागवें** (न.) उणेपणा, उघडा भाग.
**नागवें उघडें** (न.) नग्न केलेल्या म्हणजे स्पष्टपणें उघडकीस आणिलेल्या गोष्टी.
**नागवेल** (सं. नागवल्ली स्त्री.) विड्याच्या पानांची वेल.
**नागसर, नागसरी** (स्त्री.) नागास मोहित करणारी पुंगी,
**नागा** (फा. पु.) खंड, खाडा; (वि.) नग्न.
**नांगाडा** (पु.) मोठी नांगी.
**नागारी** (सं. नाग + अरि पु.) गारुडी.
**नांगी** (स्त्री.) विंचवाचा दंश करण्याचा कांटा. **नांगी टाकणें**—हातपाय गाळणें, हतवीर्य होणें.

**नागीण** (सं. नागिणी स्त्री.) स्त्रीजातीय नाग.

**नागेशवळ** (स्त्री.) कलगीची लावणी म्हणणारा शाहिरांचा वर्ग.

**नांगोडा** (पु.) नांगी.

**नागोबा** (पु.) नाग. **आयत्या पिठावर ना०**—दुसऱ्याला बाजूला सारून त्यानें केलेल्या श्रमाच्या फळाचा आयता उपभोग घेणारा. [ २१।५३४).

**नागोवा** (सं. नृत्य पु.) नाचणें, नर्तन. (भा.

**नांगोरा** (पु.) नांगर.

**नाच** (पु.) नर्तन.

**नाचकंड** (न.) नखें काढण्याच्या हत्यारांचा झुबका.

**नाचकें** (न.) लहानसें छिद्र.

**नाचक्की** (स्त्री.) अप्रतिष्ठा, मानहानि.

**नाचण** (स्त्री.) नखरेबाज स्त्री.

**नाचणा, नाचणू** (पु.) नर्तक. [ धान्य.

**नाचणा** (पु.), **नाचणी** (स्त्री.) एक हलकें

**नाचणें** (सं. नृत क्रि.) नृत्य करणें. **नाचतां येईना अंगण वाकडें**—स्वतःस एखादें काम चांगलें करतां आलें नाहीं म्हणजे आपला उणेपणा झाकण्यासाठीं साधनसामुग्रीला दोष लावणें. [चाळे करणारा.

**नाचरा** (वि.) (वाईट अर्थानें) नाचणारा;

**नाचा, नाच्या पोऱ्या** (पु.) स्त्रीवेष घेऊन नाचणारा पोरगा.

**नाचविणें** (क्रि.) नाचण्यास लावणें; वारवार स्थलांतर करणें. [ मुलगा.

**नाचापोऱ्या** (पु.) स्त्रीवेषधारी नर्तक

**नाचार** (वि.) लाचार, निरुपाय.

**नाचीज** (फा. वि.) निष्फळ. [ पणा.

**नाजकाई** (स्त्री.) नाजूकपणा; विचक्षण-

**नाजरी बाजार** (पु.) मीनाबाजार.

**नाजीर** (अर. पु.) न्यायाधिशाच्या हाताखालचा एक अधिकारी.

**नाजीव** (अर. न.) पायदळ पलटण.

**नाजूक** (फा. वि.) कोमल, सुकुमार; गुप्त; कुशलतेचें. [ एक अधिकारी.

**नाझर** (अर. नाजिर पु.) दिवाणी कोर्टाचा

**नाजल** (अर. वि.) अवतरणारा.

**नाट** (न.) पांच कवड्यांचा एक खेळ; अपशकुन; नड, अडचण; (पु.) आकार, ठावठिकाण; (वि.) दिवाळखोर; नादार; लुच्चा; (स्त्री.) लाकडाची तुळई; नृत्य; एक हलकी जात. **नाट जाणें**—नाकबूल होणें.

**नाटक** (सं. न.) दृश्यकाव्य; सोंग घेऊन करण्याचा खेळ; (पु.) नाटकी.

**नाटकशाळा, नाटकसाळ** (सं. नाटकशाला स्त्री.) नाटकगृह; नर्तकी; वेश्या.

**नाटकी** (पु.) नट; ढोंगी; बहुरूपी; (वि.) दिखाऊ, खोटा. [ भरलेलें (पत्र इ०).

**नाटपेड** (इं. नॉटपेड वि.)अगोदर हंशील न

**नाटखाट** (पु.) दोष, कलंक.

**नाटिकर** (पु.) वसुली खात्याचा शिपाई.

**नाटिका** (सं. स्त्री.) क्षुद्र नाटक; नर्तकी.

**नाटीकार** (पु.) बहुरूपी; नट (स्वा० दि० ८।२७४); दास (भाग० २९।२९२).

**नाटेवार** (पु.) नाटिकर पहा.

**नाट्य** (सं. न.) नृत्य; गीत; वाद्यकला; हावभाव; नटवेष.

**नाट्यछटा** (स्त्री.) आत्मगत भाषणाचा एक साहित्यप्रकार. [ नाटकगृह.

**नाट्यमंदिर** (सं. न.),**नाट्यशाला** (स्त्री.)

**नाठवण** (स्त्री.) नाणें-विक्रीची जागा.

**नाठाळ** (वि.) खोडसाळ, दुष्ट, खटचाळ.

**नाठी** (वि.) निरुपयोगी, वाईट.

**नाड** (सं. स्त्री.) शीर, नाडी; अडचण; फसवणूक; (ज्योति०)–नाडी (घटका).

**नाडक** (प्रा. वि.) नाडणारा.

**नाडकरणी, नाडकर्णी** (पु.). जिल्ह्याचा पिढीजाद हिशेबी कामगार.

**नाडगौंड** (पु.) नाडगौडा याचा हक्क (एकंदर चौथाईंत शें. ३ इतका भाग.)

**नाडगौडा** (फा. पु.) देशमुखासारखा एक अधिकारी.

**नाडणूक** (स्त्री.) लूट; फसवणूक; दुर्दशा.

**नाडणें** (क्रि.) नागवणें; फसविणें.

**नाडबंद** (वि.) ब्रम्हचर्यानें राहणारा.

**नाडबंदी** (स्त्री.) ब्रम्हचर्य.

**नाडर** (प्रा. पु.) थिल्लर.

**नाडा** (पु.) जाड दोरखंड, चऱ्हाट; मंतरलेला दोरा; प्रसादाचा गंडा.

**नाडापुडी** (स्त्री.) देवाला वाहण्याचा रंगीत दोरा व त्याला बांधलेली अबीर, गुलाल इ. ची पुडी. [टांचा काळ, घटका.
**नाडी** (सं. स्त्री.) शीर; फीत; ३४ मिनि-
**नाडीचक्र** (सं. न.) नाभीपाशीं मिळणाऱ्या नाड्यांचें वर्तुळ.
**नाडीपरीक्षा** (सं. स्त्री.) हाताची नाडी पाहून रोग ओळखणें.
**नाडीबंद** (प्रा. वि.) ब्रम्हचर्यानें राहणारा.
**नाडीमंडल** (सं. न.) ज्योतिःशास्त्रांत–विषुववृत्त, भूमध्यरेषा.
**नाड्, नाडू** (प्रा. पु.) नाश, घात; हानि.
**नाडेकरी** (पु.) दोरखंडावर नाचणारा; डोंबारी.
**नाणक** (सं. न.) नाणें.
**नाणवठा** (पु.) नाणेविक्रीची जागा. [तुकडे.
**नाणें** (न.) पैसा म्हणून चालणारे धातूचे
**नाणवटी** (पु.) सराफ, सराफाचा धंदा.
**नात** (स्त्री.) मुलाची अथवा मुलीची मुलगी.
**नातक** (प्रा. पु.) नाडीमार्ग.
**नातरी** (प्रा. अ.) नाहींतर; कोंव; कांठ.
**नातरूं, नातोंड, नातुंड, नातवंड** (न.) नातवंड.
**नातलग** (पु.) आप्त, सोयरा, नात्याचा माणूस. [मुलीचें मूल.
**नातवंड** (सं. नप्त् न.) मुलाचें अथवा
**नातवान** (अर. वि.) दुर्बळ, अशक्त.
**नातवानी** (अर. स्त्री.) दुर्बळता; गरिबी.
**नातसून** (स्त्री.) नातवाची बायको.
**नातळणें** (क्रि.) कवितेंत–स्पर्श करणें.
**नाताळ** (पोर्तु. पु.) येशु ख्रिस्ताचा जन्म-दिनोत्सव.
**नातुडणें** (क्रि.) कवितेंत–स्पर्श न करणें.
**नातू** (सं. नप्तृ पु.) मुलाचा किंवा मुलीचा मुलगा. [सोयरीक.
**नातें, नातेंगोतें, नातेंपातें** (न.) संबंध,
**नाते** (प्रा. अ.) नाहींतर; नातर. [नातलग,
**नातेदार, नातेवाईक** (पु.) आप्त, सोयरा.
**नाथ** (सं. पु.) स्वामी, पति; गोसाव्यांचा एक पंथ; (स्त्री.) बैलाच्या नाकांतली वेसण.
**नाथणें** (प्रा. क्रि.) आकर्षणें; नसणें; पीडा देणें (तुका० २०४१); वेसण घालणें.
**नाथि** (प्रा. क्रि.) नाहीं. [५५२).
**नाथिला** (प्रा. वि.) लटका, वाईट (ना०
**नाद** (स्त्री.) मोठा रांजण; (सं. पु.) ध्वनि; छंद; (प्रा.) श्रवणसुख.
**नांद** (स्त्री.) घाण्याजवळ रस पडण्या-साठीं जमिनींत पुरलेलें मांदाण.
**नांद** (स्त्री.) उंसाच्या चरकांतील रस सांठविण्यासाठीं ठेविलेलें बुडाला निमु-ळतें व वर रुंद असें जमिनींत गाड-लेलें भांडें.
**नांदणूक** (सं. नंद् स्त्री.) राहणें; ठिकाव.
**नांदणें** (क्रि.) राहणें, सुखानें वसति करणें; दीर्घकाळ टिकणें; पटणें, जुळणें.
**नांदतें घर** (न.) ज्यांत पुष्कळ माणसें सुखा-समाधानानें एकत्र राहतात असें घर.
**नादब्रह्म** (सं. न.) उपासकांच्या भजनाचा व वाद्यांचा गजर; सुस्वर गायन.
**नादर** (अर. वि.) दुर्मिळ; अमोलिक; आश्चर्यकारक; उत्कृष्ट; गंजिफांतील हलकें पान.
**नांदरुकी** (स्त्री.) एका जातीचें झाड.
**नादलुब्ध** (सं. वि.) नादानें मोहित झालेला किंवा होणारा.
**नांदवट** (स्त्री.) वसति, वास, राहणें.
**नादान** (फा. वि.) निर्बळ; अज्ञान.
**नादार** (फा. वि.) कर्ज फेडण्यास असमर्थ; गरीब. [कंगालपणा.
**नादारी** (फा. स्त्री.) दिवाळें, दारफळणी,
**नादावणें** (क्रि.) फाटणें, स्फोट होणें; नादीं लागणें; दुष्कीर्ति होणें.
**नादाळ** (वि.) नादी, छांदिष्ट.
**नादाळी** (स्त्री.) प्रचंड नाद; गर्जना.
**नादिष्ट, नादी** (वि.) छांदिष्ट.
**नादी** (स्त्री.) गायनांतील सप्तस्वर.
**नांदी** (सं. स्त्री.) नाटकाच्या आरंभींचें मंगलाचरण; समृद्धि.
**नांदीमुख, नांदीश्राद्ध** (सं. न.) मंगल-कार्याच्या आरंभीं करावयाचें श्राद्ध.
**नांद्या** (पु.) नंदीबैल; मूर्ख.
**नांद्याचा बैल** घाण्याचा बैल.

**नान** (स्त्री.) अन्न.
**नानक** (पु.) शीख धर्माचा संस्थापक.
**नान्‌कटाई** (स्त्री.) मैद्यापासून बनविलेली एक मिठाई.
**नानापरवेशी** (फा. स्त्री.) लढाईत मेले-ल्यांचा वंश नसल्यास बायकोच्या निर्वाहापुरती सरकारनें करून दिलेली नेमणूक.
**ना ना** (प्रा. अ.) नाहींतर; किंवा.
**नाना** (सं. वि.) अनेक; (प्रा.अ.)नातरी; (पु.) माणसाचें एक टोपण नांव.
**नानावटी** (पु.) नाणेवटी; सराफ.
**नानावाडें** (प्रा. अ.) पुष्कळदां.
**नानाविध** (वि.) अनेक प्रकारचें.
**नानू** (स्त्री. न.) टंगळमंगळ, कांकू.
**नाप** (न.) माप.
**नापत** (स्त्री.) बाजारांत पत्त किंवा साख नसणें; (वि.) साख नसलेला.
**नापसंत** (फा. नापसंत वि.) पसंत नसलेला.
**नापाक** (फा. वि.) अपवित्र तिरस्करणीय.
**नापातेरा** (पु.) नापत.
**नापास** (वि.) रद्द; परीक्षा न उतरलेला.
**नापिक, नापित** (पु.) न्हावी.
**नापूस** (स्त्री.) कोणी विचारीना अशी दुःस्थिति; नापत.
**नापेर** (स्त्री. न.) न पेरलेलें शेत.
**नापेरा** (पु.), **नापेरी** (स्त्री.) शेतांत धान्याचा पेरा न करणें. [८।२५८).
**नाप्लवणें** (प्रा. क्रि.) न बुडणें (ज्ञा०
**नाफरमानी** (फा. वि.) लाल, तांबडा, गुलाबी (होना० पृ. १०३).
**नाफेर** (पु.) बदल न करणें.
**नाबद** (फा.स्त्री.) साखर; खडीसाखर; (वि.) अयोग्य; अपुरा; नालायक.
**नाबदार** (प्रा. पु.) खडीसाखरेचा ढीग.
**नाबालिक** (फा. नाबालिग वि.) वयांत न आलेली; (न.) मूल.
**नाबूद** (फा. वि.) नष्ट झालेला.
**नाभ, नाभा** (सं. नाभि पु.) गाडीच्या चाकाचा तुंबा.
**नाभि** (सं. स्त्री.) बेंबी. [बेंबी.
**नाभिकमल** (सं. न.) कमलाप्रमाणें सुंदर
**नाभिकार** (प्रा. पु.) अभय (रामीराम० भक्ति० ४५।२७).
**नाम** (सं.न.) नांव; (व्याक०) वस्तु-मात्राचें नांव; (पु.) गंधाचा टिळा; त्याचा ठसा.
**नामकरण** (सं. न.) मुलाचें नांव ठेवण्याचा विधि.
**नामजात, नामजाद** (फा.वि.) लौकिकवान्.
**नामजादी** (फा. स्त्री.) शौर्याचें कृत्य; नांव-लौकिक.
**नामजोग** (गुज. वि.) हुंडींत ज्या माण-साचें नांव व वर्णन लिहिलें असेल त्याच्यापासून ओळखपाळख न घेतां हुंडीची रक्कम त्याला देतां येईल अशा प्रकारची (हुंडी).
**नामता** (सं. स्त्री.) कीर्ति (वामन० विराट. ५७)
**नामदार** (फा. वि.) सुप्रसिद्ध; कौंसिल ऑफ स्टेटच्या सभासदाचा हुद्दा.
**नामदेव** (पु.) शिंपी; या जातींत झालेल्या नामदेव नांवाच्या सुप्रसिद्ध संत पुरुषाच्या नांवावरून सगळ्या शिंपी जातीला हें औपचारिक नांव मिळालें आहे.
**नामधातु** (सं. पु.) नामापासून बनलेला धातु.
**नामधारक** (सं. वि.) नांवाचा; देवाचें नाम स्मरण करून मोक्ष मिळवूं पाहणारा; सुप्रसिद्ध; स्वतःचें नांव गाजविणारा.
**नामधारी** (सं. वि.) केवळ नांवाचा.
**नामधेय** (सं. न.) नांव; (वि.) नांवाचा.
**नामनिर्देश** (सं. पु.) नांवाचा उल्लेख.
**नाममंत्र** (सं. पु.) देवाच्या नांवाचा जप.
**नामर्द** (फा. वि.) अशक्त; भित्रा.
**नामर्दी** (फा. स्त्री.) भ्याडपणा, भित्रेपणा.
**नामशेष** (सं. वि.) ज्याचें नुसतें नांव उरलें आहे असा; मृत.
**नामस्मरण**(सं.न.)देवाच्या नांवाचा उच्चार किंवा स्मरण.
**नामा** (वि.)नांवाचा; (पु.) पत्र; खलिता.
**नामांकित** (सं. वि.) प्रख्यात, प्रसिद्ध.
**नामाथणें** (प्रा. क्रि.) प्रसिद्धीस येणें, नांव घेणें (मुक्ते० रामा० ६।४२८).
**नामाभिधान** (सं. न.) नांव.

**नामावलि, नामावळ, नामावळी** (सं. नामावलि स्त्री.) नांवांची यादी.
**नामी** (वि.) उत्कृष्ट, चांगला; प्रसिद्ध, नामजाद.
**नामुष्की** (फा. स्त्री.) कमीपणा; बेइज्जत.
**नामोश** (अर. पु.), **नामोशी** (स्त्री.) अपकीर्ति, नाचक्की.
**नामोहरम** (हिं. वि.) नष्ट; पराभूत.
**नायक** (सं. पु.) मुख्य, पुढारी; सूत्रधार; नाटकांतले मुख्य पुरुषपात्र; ग्रंथांतला प्रधान वर्णनीय पुरुष; साहित्यशास्त्रांत धीरोदात्त, धीरप्रशांत, धीरललित व धीरोद्धत असे चार प्रकारचे नायक सांगितले आहेत.
**नायकवडा, नायकवाडी** (फा. पु.) पायदळांतील नाईक; रामोशांचा किंवा महारांचा नाईक; जासूद.
**नायकी** (प्रा. स्त्री.) मालकी, स्वामित्व; नाइकाची जागा.
**नायकीण** (सं. स्त्री.) नायकाची बायको; कलावंतीण.
**नायटा** (पु.) त्वचेचा एग रोग.
**नायनाट** (पु.) संपूर्ण नाश.
**नायब** (अर. पु.) दुय्यम; गुमास्ता.
**नायब–मुनायबी** (फा. स्त्री.) वकील मुतलकीची गुमास्तेगिरी.
**नायिका** (सं.स्त्री.) पुढारपणा घेणारी स्त्री; नाटकांतलें मुख्य स्त्रीपात्र; ग्रंथांतली प्रधान वर्णनीय स्त्री; साहित्यशास्त्रांत स्वीया, परकीया व सामान्या अशा तीन प्रकारच्या नायिका वर्णिल्या आहेत.
**नार, नारी** (स्त्री.) स्त्री.
**नारकत** (स्त्री.) विड्याचीं पानें तोडण्याचें एक वाकडें हत्यार.
**नारंग, नारंगी** (स्त्री.) एक फळझाड.
**नारद** (प्रा. वि.) दुर्मिळ, सुंदर (देव नाथ० पृ. २८९); (सं. पु.) नारदमुनि; कळलाव्या.
**नारसिंह** नरसिंह पहा.
**नारळ** (सं. नारिकेल पु.) माड; त्याचें फळ. **नारळ हातीं देणें**—निरोप देणें. **नारळाची आई** करवंटी; भिक्षापात्र.
**नारळी पौर्णिमा** श्रावण शु. १५.
**नारळी पदर** (पु.) कित्येक वस्त्राच्या पदरावर किंवा पागोट्याच्या जरावर नारळाच्या वृक्षांच्या चित्रांची नक्षी केलेली असते असा पदर.
**नारा** (पु.) स्त्री वेषधारी मुलगा; पति.
**नाराच, नाराज** (सं. नाराच पु.) बाण.
**नाराज** (फा. वि.) नाखुष.
**नाराजी** (स्त्री.) नाखुषी, असंतुष्टपणा.
**नारणूक** ( प्रा. स्त्री. ) असमाधान (ज्ञा० १६।९२)
**नारायण** (सं. पु.) विष्णु; कोणी मनुष्य (उदा० अडला नारायण पहा). **थोरला ना०**—रुपया; **धाकटा ना०**—पैसा.
**नारायण तेल** (न.) एक वातहारक औषधि तेल.
**नारिकेल** (सं. पु.) नारळ.
**नारिकेलपाक** (सं. पु.) नारळांतलें खोबरें किसून तें साखरेच्या पाकांत घालून केलेलें एक मिष्ट खाद्य; साहित्यशास्त्रांत–ज्यांतला गूढ अर्थ उकलण्यास बराच परिश्रम पडतो अशा प्रकारचा लेख किंवा रचना.
**नारिंग** (सं. न.) संत्रें.
**नारी** (सं. स्त्री.) स्त्री.
**नारू** (हिं. पु.) माणसाच्या त्वचेंत शिरणारा एक जंतु; अलुतेदार.
**नारूकारू** (पु. अने.) अलुतेबलुते.
**नान्या** (पु.) कोणी मनुष्य.
**नाल** (अर. पु.) घोड्याच्या किंवा जोड्याच्या टांचेला बसविलेला अर्धचंद्रकार लोखंडाचा तुकडा; (सं. न.) कमळाचा देठ; नाळ; विटीदांडूच्या खेळांतली एक संज्ञा; नारळ.
**नालकी** (हिं. स्त्री.) एक प्रकारची पालखी.
**नालबंद** (फा. पु.) नाल मारणारा.
**नालबंदी** (अ. स्त्री.) घोड्यास नाल मारणें; घोडस्वारांना मोहिमेवर पाठवितांना त्यांच्या पगारापैकीं आगाऊ दिलेली रक्कम.
**नालमेख** (अर. स्त्री.) नालबंदी वगैरे (घोड्याच्या संबंधाचा खर्च).

**नालसाहेब** (पु.) पंजा; मोहरमांत एका उंच काठीला वर पंजा बांधून व त्याला पुष्पमाळा वगैरे घालून गांवांतून मिरवीत नेतात. ही काठी हातीं धरणाराच्या अंगांत दैवी संचार होतो असें समजतात. याला भाविक लोक नालसाहेब म्हणतात.
**नालस्ती** (फा. नालिश स्त्री.) निंदा; तक्रार.
**नाला** (पु.) ओढा; मोरी.
**नालायक** (फा. वि.) अपात्र.
**नालिका, नाली** (सं. स्त्री.) नळकांडी; मोरी; शीर; घटका.
**नालिश** (फा. स्त्री.) तक्रार, फिर्याद.
**नालीक** (सं. स्त्री.) आग्नेयास्त्र, बंदूक.
**नालुंगा** (वि.) शूर, बहादर.
**नाव** (सं. स्त्री.) नौका; झोऱ्या, सुताडा.
**नांव** (सं. नाम न.) नाम; कीर्ति. **नांवें ठेवणें**—दोष लावून नाक मुरडणें; **ज्याचें नांव तें**—अगदीं नाहीं; **–च्या नांवानें पूज्य**—चा पूर्ण अभाव.
**नावकरी** (पु.) नावाडी. [करणें.
**नांवखारणें** (क्रि.) नांव घेऊन निर्देश
**नावड** (स्त्री.) अरुचि, अप्रीति.
**नावडता** (वि.) अप्रिय.
**नावडसू** (प्रा. पु.)अप्रीति (ज्ञा०प्र. १९७).
**नांवनिशाण** (फा. न.) कांहीं एक चिन्ह.
**नांवनिशी** (फा नामनवीसी स्त्री.) नांवांची यादी.
**नावभर** (प्रा. अ.) क्षणभर.
**नांवरस, नांवरास** (सं. नाम + राशि स्त्री.) जन्मपत्रिकेवरून मुलाला दिलेलें नांव.
**नांवरूप** (सं. न.) कीर्ति, लौकिक; ख्याति; व्यक्तिपण. **नां० स येणें**—कीर्ति मिळविणें. [नकार
**नावली** (स्त्री.) नन्नाचा पाढा, सदोदित
**नांवलौकिक** (पु.) प्रसिद्धि.
**नांवसकी** (स्त्री.) कीर्ति; लौकिक.
**नांवाजणी** (स्त्री.) प्रशंसा.
**नांवाजणें** (क्रि.) तारीफ करणें.
**नांवाजी** (प्रा. स्त्री.) प्रसिद्धि.
**नावाडी, नावाड्या** (पु.) नाव चालविणारा.
**नावाणिगा** (प्रा. वि.) नामांकित (भा० १३।१७६).
**नावणें** (प्रा. न.) कीर्ति (सोहि०महदनु०).
**नावाथणें** (प्रा. क्रि.) नांवाजलें जाणें.
**नावा नावा, नावें नावें** (प्रा. अ.) वारंवार.
**नावानिगें** (प्रा. वि.) नामांकित.
**नांवानिराळा** (वि.) अलिप्त, अलग.
**नाविक** (सं. पु.) नावाडी. [खर्चाचें सदर.
**नांवें** (अ.) नांवानें; जमाखर्चाच्या वहींतलें
**नावेक** (प्रा. अ.) क्षणभर; थोडेंसें.
**नांवें नांवें** (प्रा. अ.) क्षणोक्षणीं; (ज्ञा० १७।२१०).
**नावेकरी** (पु.) नावाडी.
**नांवो–हो** (पु.) नवरा; पति.
**नाव्य** (सं. वि.) होडी, गलबत इ० जलयानांनीं ओलांडतां येईल अशी (नदी, खाडी वगैरे).
**नाश** (सं. पु.) विध्वंस, नास.
**नाशक** (सं. वि.) नाश करणारें. [विणें.
**नाशणें** (प्रा. क्रि.) विध्वंस करणें; विघड-
**नाशवंत** (सं. वि.) नाश पावणारें.
**नाशह** (फा. पु.) बुद्धिबळांत–राजाला शहांतून काढणें.
**नाशा** (वि.) नासाडी करणारा; धूळधाण्या; खोडकर.
**नाशाब** (व.) अजाण; वयांत न आलेला.
**नाशिनी** (सं. वि.) नाश करणारी.
**नाशिवंत** (वि.) नाश पावणारें. [करणारा.
**नाशी** (समासांत उत्तरपदीं वि.) नाश
**नाश्टा–स्ता** (फा. पु.) प्रातःकालचें भोजन; न्याहारी.
**नास** (सं. नाश पु.) नासाडी, खरावी, नुकसान; (सं. नस्य स्त्री.) तपकीर.
**नासकवणी** (प्रा. न.) कुजकें पाणी.
**नासका** (वि.) नासणारा, नासलेला.
**नासडा** (पु.) पूर्ण नाश.
**नासणें** (क्रि.) विघडणें; नाश करणें.
**नासधूस** (स्त्री.) नासाडी; खरावी.
**नासपात** (फा. नासपाती स्त्री.) एका फळाचें नांव.
**नासरा** (वि.) नासाडी करणारा.
**नासरी** (प्रा. स्त्री.) अर्धी दमडी.

**नासवणी** (न.) पिकाची खरावी करणारा पाऊस; घाणेरडें पाणी.
**नासा** (सं. स्त्री.) नाक; दाराचा वरचा माथा; कपाळपट्टी.
**नासाड, नासाडी** (सं. नाश स्त्री.) खरावी, नासधूस.
**नासापुट, नासारंध्र** (सं. न.) नाकपुडी.
**नासिक** (सं. नासिका न.) नाक.
**नासिका** (सं. स्त्री.) नाक.
**नासिकाचूर्ण** (न.) तपकीर.
**नासूर** (अर. पु.) नाकाचा व डोळ्याचा एक रोग. [मानणारा.
**नास्तिक** (सं. पु.) ईश्वर व परलोक न
**नास्तिकपणा, नास्तिक्य** (सं. न.) नास्तिकपणा; नास्तिक मत.
**नास्तिकवाद** (सं. पु.) प्राप्तीचा अभाव (ज्ञा० १६।४५१); नास्तिकांचें मत.
**नास्तिपक्ष** (सं. पु.) नाहीं म्हणणारांची वाजू; निकृष्ट प्रतीचा मार्ग.
**नाह** (प्रा. पु.) नाथ.
**नाहक** (फा. अ.) विनाकारण; अन्यायानें.
**नाहडा** (प्रा. पु.) लूट, नाश.
**नाहणणें** (क्रि.) न्हाऊं घालणें.
**नाहाणवली, नाहणुली** (सं. स्नान + वाला स्त्री.) नहाण आलेली मुलगी.
**नाहणी** (स्त्री.) स्नानाचें सांडपाणी सांठविण्यासाठीं केलेली खांच, मोरी.
**नाहणें** (क्रि.) स्नान करणें.
**नाहतीधुती**(वि.) नहाण येऊन प्रौढ झालेली.
**नाहवी** (स्त्री.) नुकसान, खरावी. [नापित.
**नाहवी, नाहावी, न्हावी** (पु.) हजाम,
**नाहीं तेंच** (वि.) भलंभलतें.
**नाहींपक्षीं** (अ.) नाहीपेक्षां; गौणपक्ष म्हणून, निदान.
**नाहू** (पु.) न्हावी.
**नाहो** (सं. नाथ पु.) नाथ.
**नाळ** (सं. पु.) घोड्याच्या पाठीस पडलेलें क्षत; गलबताचा पुढचा भाग; तोफ; कमळाचा देंठ; जरायुज प्राणी जन्मतो तेव्हां त्याच्या नाभीस जोडून असलेला चर्मतंतू.
**नाळक** (प्रा. न.) नळी.
**नाळकें** (न.) मोडीचें धातूचें भांडें.
**नाळगूद** (न.) एका रोगाचें नांव.
**नाळचें** (न.) नसराळें.
**नाळीक** (न.) नाळकें पहा.
**नाक्षत्रमास** (सं. न.) एका ताऱ्याजवळ एकदां चंद्र दिसल्यापासून पुनः तेथें तो येईपर्यंत सरासरीनें जो काळ लागतो तो.
**नि** (प्रा. अ.)आणि; (सं. उपसर्ग); (अ.) लुप्त, नष्ट, उदा० निकोप, निकामी.
**निआव्हणें** (प्रा. क्रि.) निर्वाह करणें.
**निउटकें** (न.) शेराच्या वत्तिसाव्या अंशायेवढें माप.
**निउता** (प्रा. अ.) अलीकडे.
**निउल** (न.) नवल (तुका० ५०५).
**निकट** (स्त्री.) निकड, लकडा, जरुरी.
**निकट** (सं. अ.) जवळ.
**निकटणें** (क्रि.) निघून जाणें; जवळ येणें.
**निकटवर्ती** (सं. वि.) जवळचा.
**निकटीं** (अ.) जवळ.
**निकड** (स्त्री.) लकडा, जरुरी.
**निकण** (न.) दुसऱ्यांदां किंवा तिसऱ्यांदां मळलेलीं कणसें; पोकळ कणसें.
**निकता** (प्रा. अ.) नुकता, अलीकडेस.
**निकती** (स्त्री.) सोनाराचा वजन करण्याचा सूक्ष्म काटा.
**निकस**(वि.) कस नसलेलें. [प्रसंगः आवेश.
**निकसर**(सं. पु.)ढीग, समूह; आणीबाणीचा
**निकर** (सं. पु.) अनर्थ; हट्ट; त्रागा; सतावणूक; अतिरेक; समुदाय; पराकाष्ठा; जोर. [पृ० २८).
**निकरट** (वि.)निगरगट्ट, कठोर (होना०
**निकरणें** (क्रि.) निरपणें, निपटणें.
**निकरा** (प्रा. वि.) निरर्थक.
**निकरी** (वि.) हट्टी, संतापी.
**निकरून** (अ.) निक्षून. [निकर; ग्लानि.
**निकर्ष** (सं. पु.) अतिशयपणा; मनस्वी हट्ट;
**निकला, निकल्हा** (वि.) कल्हई नसलेलें (भांडें.)
**निकवडा** (प्रा. वि.) निष्कांचन.
**निकशी, निकसो** (प्रा. स्त्री.) जिकीर; (वि.) कस नसलेलें.

**निकष** (सं. पु.) कसोटी.
**निकलंक, निष्कलंक** (सं. वि.) ज्याला डाग नाहीं असा (पदार्थ); पापरहित (माणूस); शुद्ध, स्वच्छ.
**निका** (प्रा. वि.) खरा योग्य (एक० १०६२); साफ; स्पष्ट; निर्भेळ, शुद्ध.
**निका** (अर. वि.) शुद्ध, पवित्र; चांगला; बरोबर; (अ.) निश्चयपूर्वक; (अर. पु.) मुसलमानांतलें हलक्या प्रतीचें लग्न.
**निष्कांचन** (सं. वि.) दरिद्री.
**निकाढा** (सं. निष्कर्ष पु.) काढयांतल्या चोथ्याचा पुन: केलेला काढा.
**निकाम्** (प्रा. अ.) अत्यंत (वामन० जयद्रथवध २२).
**निष्काम** (सं. वि.) निष्काम, निरिच्छ.
**निकामी** (प्रा. वि.) खडकाळ. [मानहानि.
**निकार** (सं. निकर पु.) पराकाष्ठेची
**निकाल** (हिं. पु.) उलगडा, निर्णय; शेवट, परिणाम.
**निकास** (सं. निष्कासन पु.) बाहेर पाठविणें, बाहेर घालविणें.
**निकासू** (स्त्री.) निर्गत मालावरची जकात.
**निष्काळजी** (वि.) काळजी न बाळगणारा; निश्चिंत; अव्यवस्थित.
**निकाळू** (वि.) जेथून मालाची निर्गत होते असें (बंदर).
**निकी** (प्रा. स्त्री.) चांगुलपणा.
**निकुंज** (सं. पु.) दाट झाडी, कुंज.
**निकुर** (प्रा. पु.) निश्चय; खरवड.
**निकुरणें** (क्रि.) खरवडून काढणें.
**निकुरा** (प्रा.वि.) कठोर (नाम० ३८५).
**निकृतणें** (क्रि.) कातणें; तोडणें; खुडणें; ठार मारणें. [हत्यार; कत्तल.
**निकृंतन** (सं. न.) कापणें; कापण्याचें
**निकृति** (सं. निष्कृति स्त्री.) निरसन.
**निकृष्ट** (सं. वि.) हलकें, हलक्या प्रतीचें.
**निकें** (प्रा. वि.) नेटकें, चांगलें; बरें (वा० ४७६३); (न.) हित; खरें रूप.
**निकेतन** (सं. न.) निवासस्थान.
**निकोचा**(पु.)एक प्रकारचा लोखंडी खिळा.
**निकोप** (वि.) निर्दोष; रोगमुक्त; धट्टाकट्टा.
**निक्रंदन** निकृंतन पहा.

**निखंड, निखंद** (पु.) निषेध (दा०२।२।१२).
**निखंडणें** (प्रा. क्रि.) निषेध किंवा तिरस्कार करणें (स्वा०दि० १।१।२१); निंदणें (वामन–कात्यायनी० ८१).
**निखर** (प्रा. वि.) मृदु (भा०११।१०३३).
**निखरड** (वि.) नापीक.
**निखरणीचे दिवस** निरभ्र दिवस; उन्हाळा.
**निखरणें** (क्रि.) खरडणें; स्वच्छ होणें.
**निखराड** (वि.) जलरहित, शुष्क (विहीर, तळें, ओढा).
**निखर्व** (सं. न.) शंभर अब्ज संख्या.
**निखळ** (प्रा. वि.) शुद्ध, निःशेष, सर्व; (न.) गोळा; शुद्ध ब्रह्म (ज्ञा० १५। ४४९). [उखळणें.
**निखळणें** (क्रि.) मोकळा होणें, सुटणें;
**निखाडू** (वि.) दाढीचे केस नसलेला.
**निखार** (स्त्री.) अतिशय ओहोटी; (वि.) निरभ्र; खारविरहित.
**निखारणें** (क्रि.) समूळ नाहींसें होणें; (अग्नि) प्रज्वलित होणें.
**निखारा** (पु.) विस्तव; इंगळ, अंगार; निरभ्रता. [अगदीं.
**निखालस** (हिं. वि.) निर्भेळ, शुद्ध, स्पष्ट;
**निखालसता** (स्त्री.) खात्री.
**निखिल** (सं. वि.) सर्व.
**निखूखळ** (वि.) शुद्ध, निर्भेळ.
**निगड** (सं. पु.) पायांतली बेडी.
**निगड, निगडी, निर्गुडी** (सं. स्त्री.) एक झुडुप.
**निगडित** (सं. वि.) बद्ध, जखडलेलें.
**निगता** (प्रा. अ.) नुकताच (मोरो० भीष्म० ४।२३).
**निगदणें** (प्रा. क्रि.) बोलणें (अमृ०५।२१).
**निगद, निगदु** (प्रा. पु.) सेवानिर्धाराची शपथ (ज्ञा० ८।१२४).
**निगम** (सं. पु.) वेद; ईश्वर; परिणाम; सुटका (नाम० १९०).
**निगमन** (सं. न.) निष्कर्ष; न्यायशास्त्राचा एक भाग.
**निगमशास्त्र** (सं. न.) वेदान्तशास्त्र.
**निगरगट** (वि.) निढावलेला, बेशरम.
**निगरण** (सं. न.) गिळणें.

**निगराणी** (स्त्री.) निग्राणी; मशागत; जपणूक.
**निगर्वी** (सं. वि.) गर्वरहित.
**निगळ** (न.) घरावर छप्पर घालतांना जिची पूजा करावी लागते अशी एक देवता; (वि.) न गळणारें.
**निगा** (फा. निगाह स्त्री.) जतन, काळजी.
**निगा़वा** (प्रा. पु.) सुटका; निघणें.
**निगाळ** (पु.) दुसऱ्यांदां गाळलेलें चूर्ण.
**निगीर्ण** (सं. वि.) खाल्लेला; गिळलेला; व्यापलेला; झाकलेला.
**निगुता, निगुती** (प्रा. वि.) निभ्रांत, यथार्थ (ज्ञा० प्र० ५४); (स्त्री.) युक्ति, सावधानता.
**निगुरा** (वि.) गुरुहीन; पोरकें.
**निगूढ** (सं. वि.) अतिशय खोल किंवा गूढ.
**निगूत** (अ.) अलीकडे; (स्त्री.) युक्ति; जतन. [संयमित.
**निगृहीत** (सं. वि.) निर्बंध घातलेलें,
**निगोड** (वि.) कमी गोड, फिकें.
**निगोळी** (स्त्री.) पागोळी. [नियम; निश्चय.
**निग्रह** (सं. पु.) अटकाव; ताब्यांत ठेवणें;
**निग्रहानुग्रह** (सं. पु.) एखाद्याला दंड करणें किंवा त्याच्यावर कृपा करणें.
**निग्रही** (वि.) दृढनिश्चयी.
**निघंट–टु** (सं. पु.) वेदांतील शब्दांचा कोश; शब्दकोश.
**निघड** (क्रि. वि.) लागोपाठ.
**निघणें** (सं. निर्गम् क्रि.) जाण्यास तयार होणें; सुटणें; उत्पन्न होणें; निपजणें; वनणें. [जाऊन होणारें पीठ.
**निघळ** (पु. स्त्री.) जात्यांत दाणे दळले
**निघळणें** (क्रि.) जात्यांतून पीठ होऊन बाहेर पडणें. [जतन, काळजी.
**निघा, निघादास्त** (फा. स्त्री.) निगा,
**निघोट** (प्रा. वि.) दाट; परिपूर्ण; धोपट; सरळ; एकवट.
**निघोर, निघोरी** (वि.) निःशंक, निर्धास्त.
**निच** (सं. नित्य अ.) सदोदित.
**निंच, निंचा** (वि.) ठेंगणा; हलक्या प्रतीचा.
**निचकणें** (क्रि.) निखळणें.
**निचरणें** (क्रि.) झरणें, पाझरणें, द्रवणें.
**निचरा** (पु.) पाझर, निर्यास; स्वेद.
**निचव** (वि.) रुचिहीन, वेचव.
**निचळ** (प्रा. वि.) निश्चळ, स्तब्ध.
**निचाड** (प्रा. वि.) निष्काम (ज्ञा० २।२८१); निर्लज्ज.
**निचाडणें** (प्रा. क्रि.) बेपरवाईनें वागणें (भा० १२।१७५). [निष्काळजी.
**निचिंत** (सं. निश्चित वि.) बेफिकीर,
**निचूळ** (सं. निचुल पु.) फणस.
**निचेत, निचेतन** (सं. निश्चेतन वि.) निश्चेष्ट, चलनवलनरहित.
**निचेष्ट, निचेष्टित** (सं. निश्चेष्ट वि.) बेशुद्ध, हालचालरहित. [अत्यंत.
**निज** (सं. वि.) आपलें, स्वतःचें; (प्रा.)
**निजढाळ** (प्रा. पु.) स्वाभाविक गति.
**निजणें** (सं. निद्रा क्रि.) झोपणें; संभोग करणें.
**निजधाम** (सं. न.) स्वतःचें वसतिस्थान. नि० स जाणें––स्वर्गास जाणें.
**निजध्यास** (सं. निदिध्यास पु.) सतत चिंतन; एकाग्रता.
**निजलोट** (प्रा. पु.) प्रत्यक्ष लाट.
**निजविणें** (क्रि.) निजावयास लावणें; आडवें ठेवणें.
**निजसार** (प्रा. पु.) मुख्य उद्देश.
**निजसुरा** (वि.) अर्धवट झोपेंत असलेला.
**निजानीज** (स्त्री.) मंडळीचें निजणें.
**निजाळू** (सं. निद्रालु वि.) झोपाळू.
**निजोखमी** (वि.) ज्यांत बूड येण्याचा किंवा ठोकर बसण्याचा संभव नाहीं असा (व्यवहार, व्यापार).
**निजोर** (वि.) दुर्बळ, निराधार.
**निझर, निर्झर** (पु.) झरा, निर्झर.
**निझरणें** (क्रि.) पाझरणें.
**निटस** (वि.) नीटनेटका.
**निटावणें** (क्रि.) सुधारणें, नीट करणें.
**निटावा** (पु.) सरळपणा; नेट, आधार, धिरा, पाठिंवा.
**निटाळा** (पु.) अति कडक उन्हाळा.
**निटिल** (सं. न.) कपाळ.
**निटोपा** (पु.) सरळपणा; योग्यपणा.
**निठवें** (न.) अर्ध्या शेराचें माप.

**निडर** (वि.) निर्भय.
**निडल** (वि.) निर्भय.
**निडळ** (सं. निटिल न.) कपाळ; नळी.
**निडिल** (सं. निटिल न.) कपाळ.
**निडाकी** (वि.) ज्याला डांक लाविलेला नाहीं असा (डागिना, पात्र इ०).
**निडोळ** (वि.) जींत मुळींच डोळ नाहीं अशी (डाळ). [पक्वदशा.
**निडार** (प्रा. वि.) निवडक; (न.) कपाळ;
**निडारणें** (क्रि.) परिपक्व होणें; थक्क होणें.
**निडारलेपण** (प्रा. न.) पक्वता.
**निढळ** (सं. निटिल न.) कपाळ; (वि.) दुर्दैवी; निराधार; डळमळीत (भा० ३।२४३). **निढळाच्या घामाचा**—स्वतः अंगमेहनतीनें मिळविलेला.
**निढळवाणी** (प्रा. वि.) निराश्रित (कथासारा० १।१५७).
**निढाळ** (प्रा. पु.) केवळ.
**निर्णय** (पु.) निकाल.
**निर्णायक** (वि.) शेवट करणारें; ठाम.
**नित** (सं. नित्य अ.) नेहमीं; (सं. नीति स्त्री.) नीति. [अष्टमांश भाग.
**नितकोर** (वि.) भाकरी, पोळी इ० चा एक
**नितंब** (सं. पु.) स्त्रीचा कुल्ला, ढुंगण.
**नितंबिनी** (सं.स्त्री.) प्रशस्त नितंबाची स्त्री.
**नितरणें** (क्रि.) पदार्थांतून जलाचा अंश गळून किंवा पाझरून जाणें.
**नितराम्** (अ.) अगदीं पूर्णपणें.
**नितळ** (वि.) स्वच्छ; गुळगुळीत, चकाकित (यथार्थदी० ४।६५१).
**नितंबु** (सं. नितंब पु.) खालचा भाग; पाताळ लोक (ज्ञा० १४।१०४).
**नितान्त** (सं. वि.) अतिशय.
**नित्य** (सं. वि.) शाश्वत; (अ.) प्रतिदिवशीं, नेहमीं.
**नित्यशः** (अ.) रोज; नेहमीं, सतत.
**नियरणें** (क्रि.) थेंब थेंब गळणें.
**नियळ** (वि.) स्वच्छ; शुद्ध; ज्यांत गदळ किंवा केरकचरा नाहीं असा.
**नियळणें** (क्रि.) गळणें, टिबकणें; थेंबाथेंबानें जलांश काढून टाकणें.
**नियळा** (पु.) नियळून जमलेला जलांश.

**निद** (सं. निद्रा स्त्री.) झोप.
**निदसुरें** (न.) अज्ञान.
**निंदक** (सं. वि.) निंदा करणारा.
**निंदण** (प्रा. न.) शेतांतलें अडगवत.
**निंदणी** (स्त्री.) वेणणी, कोळपणें.
**निंदणें** (क्रि.) निंदा करणें; पेरलेल्या शेतांतलें तृणादिक काढून टाकणें.
**निदणें** (प्रा. क्रि.) निजणें.
**निंदनीय** (सं. वि.) निंदेस पात्र; निंद्य.
**निदर्शन** (सं. न.) पाहणें; दाखविणें; नजर, अनुभव; उदाहरण; एखादें मत प्रदर्शित करण्याकरितां नेलेला मोर्चा.
**निदसुरा** (प्रा. वि.) निद्रिस्त; निसुर.
**निदळ** (प्रा. वि.) विनगिलाव्याची.
**निंदा** (सं. स्त्री.) दोषवर्णन; निर्भर्त्सना, कुटाळी.
**निदाघ** (प्रा. वि.) निरर्थक; (पु.) चिंता.
**निदाघ** (सं. पु.) उष्णता; घाम; उष्णकाळ; दाह.
**निदान** (सं. न.) मूळ कारण; शेवट; निकृष्ट संख्या किंवा परिमाण; रोगपरीक्षा; (अ.) किमान पक्षीं.
**निदारपण** (प्रा. न.) दरिद्रीपण (ज्ञा० १३।७९६).
**निदानपक्ष, निदानपक्षीं** (अ.) कमींत कमी; अखेरची गोष्ट म्हणून.
**निदारुण** (सं. वि.) घनघोर; भयंकर.
**निदावेपत्र** (न.) हक्क सोडल्याबद्दलचें पत्र.
**निदिध्यास** (सं. न.) निजध्यास पहा.
**निंदेजणें** (प्रा. क्रि.) निंदा करणें (चांग० पास० ६५).
**निदेलें, निदैलें** (प्रा. वि.) निजलेलें.
**निदेश** (सं. पु.) आज्ञा; दाखविणें.
**निदैव** (प्रा. वि.) दुर्दैवी.
**निंद्य** (सं. वि.) निंदेस पात्र.
**निद्रा** (सं. स्त्री.) झोप.
**निद्रालु** (सं. वि.) झोपाळू.
**निद्रित, निद्रिस्त, निद्रिस्थ** (सं. निद्रित वि.) झोपलेला.
**निध** (सं. निधि पु.) भांडार.
**निधड** (प्रा. वि.) पराक्रमी.
**निधडक** (अ.) धिटाईनें, बेलाशक.

**निधडा** (वि.) निःशंक, पराक्रमी; धिटाईचा.
**निधन** (सं. न.) मृत्यु.
**निधनी** (सं. निर्धन वि.) गरीब, दरिद्री.
**निधा** (प्रा. पु.) त्रास (विठ्ठल०सीता० स्वयं० ४।४९); प्रतिध्वनि (भावार्थ० ११।१८।११०).
**निधाई** (प्रा. स्त्री.) खटपट; दगदग; गडबड; अवडंबर, भपका; (वि.) धन्य; कृतकृत्य; नामांकित (तुका० ३०२२).
**निधान** (सं. न.) खजिना, निधि, ठेवा.
**निधि** (सं. पु.) खजिना, ठेवा; खाण.
**निधिनिक्षेप** (सं. पु.) खाणी व पुरलेलें द्रव्य.
**निधीय** (प्रा. न.) परिभ्रमण.
**निधोट** (सं. निधूति वि.) अतिशय शुद्ध किंवा स्वच्छ; अतिशय गरीब.
**निनाद** (पु.) मोठा नाद.
**निनांव** (पु.) एक पक्वान्न.
**निनावा** ( पु. ) दोषरहितपणाविषयींची खात्री.
**निनांवी** (वि.) विननांवाचें.
**निपचित, निपचेत** (सं. निश्चेतन वि.) निश्चेत, निश्चेष्ट.
**निपज** (स्त्री.) उत्पन्न, प्राप्ति.
**निपजणें** (क्रि.) जन्मणें, उत्पन्न होणें.
**निपट** (वि.) अगदीं, सर्वस्वीं. [५।५३).
**निपटण** (प्रा. न.) निःशेषपण (अमृ०
**निपटणें** (क्रि.) खरवडून काढणें; (प्रा.) नाहींसा करणें; (अ.) केवळ, मात्र.
**निपट निरंजन** मूळ अर्थ—पूर्णपणें पवित्र, मायेपासून अलिप्त असा ज्ञानी व साधुवृत्ति पुरुष; पुढें—पक्का सोदा, अट्टल लुच्चा; दिवाळखोर असा अर्थ झाला.
**निपटारा** (वि.) अप्रयोजक; निर्लज्ज; हीन, निकृष्ट.
**निपटीशिपटी** (स्त्री.) उरलें सुरलें अन्न.
**निपटें** (न.) अदपावाचें माप.
**निपणजा** (पु.) आजाचा आजा.
**निपणतू** (पु.) नातवाचा नातू.
**निपताळा** (वि.) मानहानि पावलेला; गुन्ह्यांत अडकलेला; लिप्ताळा; (पु.) निपटून काढलेला पातळ द्रव्याचा अंश.
**निपराद, निपराध, निपराधी** (प्रा. वि.) दुष्ट, नीच (तुका० १३०३).
**निपराळ** (वि.) रुक्ष, शुष्क. [ उपटणें.
**निपसणें** (क्रि.) उपसणें; बाहेर काढणें;
**निपाणी** (वि.) निर्जल; पावसाच्या किंवा विहिरीच्या पाण्यांवांचून होणारें; (वि.) चपलांची एक जात.
**निपात** (न.) व्याकरणांतलें 'च' सारखें अव्यय; नियमानें सिद्ध न झालेला शब्द.
**निःपात** (सं. पु.) नायनाट, संपूर्ण नाश.
**निपातणें** (क्रि.) मरणें.
**निपाळ** (वि.) रुक्ष, शुष्क.
**निपुण** (सं. वि.) निष्णात, कुशल.
**निपुत्रिक** (सं. वि.) पुत्रहीन.
**निपूर** (स्त्री.) अपुरेपणा.
**निपोटी** (वि.) वेतनाखेरीज पोट-खर्च वेगळा मिळणार नाहीं अशी करारबंदीची (नोकरी).
**निफजणें** (प्रा. क्रि.) निपजणें, उत्पन्न होणें; तयार होणें; सांग होणें.
**निफाळी** (वि.) फाळ नसलेला.
**निंब** (सं. पु.) लिंबाचें झाड.
**निबंध** (सं. पु.) नियमबद्ध रचना; लेखी विषयविवेचन.
**निबद्ध** (वि.) घट्ट बांधलेलें.
**निबर** (सं. निर्भर वि.) जून, कडक; (प्रा.) वृद्ध; (न.) सूर्याची उष्णता; ऊन.
**निबरट** (वि.) जून व टणक.
**निबरढोण** (वि.) अतिशय टणक.
**निबरु** (प्रा. वि.) निरर्थक.
**निंबलोण** (न.) दृष्ट काढण्यासाठीं कडू निंबाचीं पानें, मीठ इ० पदार्थ ओवाळून टाकणें. [ मऊ.
**निबळ** (सं. निर्बल वि.) दुबळा , सौम्य,
**निबाप्या** (वि.) ज्याच्या बापाचा पत्ता नाहीं असा; गवशा पोरगा.
**निबिड** (सं. वि.) घनदाट, गर्द.
**निंबू** (न.) लिंबू.
**निंबूर** (पु.) बाजरीचें कणीस.
**निंबोटी** (स्त्री.) अर्धे लिंबू, साखर वगैरे खदखदून तयार केलेलें औषध. [फळ.
**निंबोणी** (स्त्री.) कडू निंबाचें झाड; त्याचें

**निबोली** (वि.) करार किंवा वोली करून न ठरवलेली.
**निब्बर** निबर पहा.
**निभणें** (सं. निर्वह् क्रि.) संकटांतून पार पडणें, वचावणें, जगणें.
**निभाव** (पु.) निर्वाह; निभावणी, टिकाव.
**निभावणी, निभावणूक** (स्त्री.) निर्वाह; वचाव, संकटांतून पार पडणें.
**निभ्रांत** (वि.) निःशंक; (अ.) निःसंशय.
**निम** (वि.) अर्धा, निम्मा.
**निमक** (प्रा. न.) मीठ.
**निमकहराम** (फा. वि.) कृतघ्न.
**निमकहलाल** (फा. वि.) कृतज्ञ.
**निमकी** (स्त्री.) एक पासून शंभर पर्यंतच्या संख्यांच्या निमपटी पाठ करण्याचे पाढे.
**निमखाई** (स्त्री.) शेतांत होणाऱ्या उत्पन्नाचा अर्धा हिस्सा; अर्धा हिस्सा.
**निमगोरा** (वि.) अर्धवट गोरा.
**निमगोल** (वि.) अर्धवर्तुळाकार.
**निमग्न** (सं. वि.) गर्क, तल्लीन, बुडालेला.
**निमचा** (फा. पु.) छोटी वाकडी व रुंद पात्याची तलवार.
**निमज्जन** (सं. न.) बुडी मारणें.
**निमणें** (प्रा. क्रि.) बंद होणें, संपणें; कमी होणें; शांत होणें.
**निमटणें** (प्रा. क्रि.) मिटून घेणें (भा० १५।१४); निर्मूल करणें.
**निमणें** (प्रा. क्रि.) लय पावणें; मरणें.
**निमताजीम** (स्त्री.) एखाद्याच्या स्वागतार्थ किंवा त्याला निरोप देतांना अर्धवट उठण्याचा मान.
**निमताना** (फा. पु.) पिकाची तपासणी करून तें किती येईल याचा अंदाज करणें.
**निमती** (स्त्री.) अधेली; आठ आणे.
**निमंत्रण** (सं. न.) आमंत्रण, बोलावणें.
**निमंत्रणें** (क्रि.) बोलावणें.
**निमंत्रित** (सं. वि.) बोलाविलेला.
**निमथल** (स्त्री.) शेताचें अर्धे उत्पन्न; शेताच्या उत्पन्नाची शेतकरी व शेताचा मालक यांच्यामध्यें सारखी वांटणी.
**निमथा** (प्रा. पु.) मस्तक, माथा.
**निमपट** (स्त्री.) अर्धा भाग.

२२

**निमशाई** (स्त्री.) अर्धा भाग; अर्धेल.
**निमा** (फा. पु.) एक प्रकारचा पायघोळ अंगरखा; (वि.) अर्धा.
**निमाई** (स्त्री.) निमखाई पहा.
**निमाज** नमाज पहा.
**निमाणा** (फा. पु.) एकंदर उत्पन्नावर अर्धा आणा याप्रमाणें घेतलेला जादा सारा. [ २२८९).
**निमाणें** (प्रा. न.) बुजगावणें (तुका०
**निमांलेपण** (प्रा. न.) शांति, स्तब्धता, मौन.
**निमासुर** (प्रा. वि.) सुरेख, तरुण (वेणासीता० ४।५६).
**निमाळ** (प्रा. वि.) अडचणीचें; (पु.) माळरान (ज्ञा० १६।४४१).
**निमिख** (पु.) निमीष.
**निमित्त** (सं. न.) कारण, उद्देश, हेतु; सबब; सोंग; (अ.) साठीं, मुळें. **नि० चा धनी**—कांहीं अपराध न करतां निष्कारण यश किंवा अपयश घेणारा.
**निमित्तखोर** (वि.) सबबी सांगणारा; खोड काढण्याची संधि पाहणारा. [काळ.
**निमिष** (सं. न.) पापणी लवण्यास लागणारा
**निमीलन** (न.) मिटणें.
**निमुळता** (वि.) क्रमानें उतरता, चिंचोळा.
**निमिष्य** (सं. निमिष न.) क्षण.
**निमुटणें** (प्रा. क्रि.) लय पावणें, झाकणें (ज्ञा० ११।२३४).
**निमूट** (वि.) स्वस्थ; शांत; कांहीं हालचाल, गडबड किंवा बडबड न करतां बसलेला. **नि०पणें** (अ.)—स्वस्थपणानें; शांतपणानें. [ दोष नाहीं असा.
**निमूर** (वि.) तडा, नरमपणा इत्यादि
**निमे** (वि.) अर्धे.
**निमेशिमे** (अ.) सुमारें अर्धे.
**निमेष** (सं. न.) क्षण. [ बहुमोल.
**निमोलें** (प्रा. वि.) फुकट मिळणारें;
**विमोळता** (वि.) निमुळता पहा.
**निम्न** (सं. वि.) खोल.
**निम्नोन्नत** (वि.) उंचसखल.
**निम्नगा** (सं. स्त्री.) नदी.
**नियत** (सं. क्रि.) निश्चित; (अ.) निरंतर; (अर. स्त्री.) दानत, शील; वृद्धि.

**नियतकालिक** ठराविक वेळीं प्रसिद्ध होणारें (मासिक, त्रैमासिक इ).
**नियंता** (सं. वि.) नियमन करणारा.
**नियतात्मा** (सं. वि.) संयतचित्त. [ मृत्यु.
**नियति** (सं. स्त्री.) नियम, अदृष्ट, दैव;
**नियंत्रण** (न.) निर्बंध; नियमन; पद्धतशीर वांटपाची योजना.
**नियंत्रणा** (सं. स्त्री.) संयमन; नियमन.
**नियंत्रित** (सं. वि.) संयत, नियमित.
**नियम** (सं. पु.) कायदा; वहिवाट, चाल; ठराविक पद्धति; करार, ठराव.
**नियमणें** (क्रि.) निग्रह करणें.
**नियमन** (सं. न.) शासन, निग्रह.
**नियमनिष्ठ** (सं. वि.) कडकडीतपणानें नियम पाळणारा.
**नियमित** (सं. वि.) ठराविक.
**नियमी** (वि.) नियमशील, नेम पाळणारा.
**नियामक** (सं. पु.) नियंता. **नियामकमंडळ** (न.)–संस्थेच्या कारभारावर देखरेख करणारें मण्डळ.
**नियामत** (हि. स्त्री.) दया; बरकत.
**नियुक्त** (सं. वि.) नेमलेला, योजलेला.
**नियुत** (सं. न.) दशलक्ष; लक्ष.
**नियोग** (सं. पु.) आज्ञा; नेमून दिलेलें काम; वंश खुंटू नये म्हणून दुसऱ्याकडून करविलेली प्रजोत्पत्ति.
**नियोजन** (सं. न.) नेमणूक; अर्थ किंवा इतर विषयांत कांहीं योजनाबद्ध उपक्रम करणें.
**निर** (सं. अ.) नकार, त्याग, निषेध वगैरे अर्थ दर्शविणारें अव्यय. [ पूर्णपणें.
**निरंकार** (सं. निराकार अ.) अगदीं,
**निरंकुश** (सं. वि.) बेताल, स्वच्छंदी.
**निरख** (फा. पु.) बाजारभाव.
**निरखड** (वि.) रखरखीत, रुक्ष.
**निरखणें** (क्रि.) बारकाईनें पहाणें.
**निरगांठ, निर्गांठ** (स्त्री.) दोरी, सुतळी, नाडी इ. ची पक्की गांठ.
**निरंजन** (सं. न.) परब्रह्म; विद्या; आरती ओवाळण्याचें पात्र (नीरांजन); उजाड प्रदेश; एकांत स्थळ; (वि.) निर्विकल्प, शुद्ध, सर्वज्ञ.

**निरंजनी** (पु.) गोसाव्यांचा एक संप्रदाय.
**निरडणें** (क्रि.) खरडणें.
**निरढणें, निरढविणें** (क्रि.) निगरगट्ट होणें.
**निरण** (न.) ओटीपोट.
**निरत** (सं. वि.) अनुरक्त; तत्पर.
**निरंतर** (सं. अ.) सतत, अव्याहत.
**निरतिशय** (सं. वि.) अद्वितीय; अतोनात.
**निरपणें**(न.)ताटांतलें निपटून चिपटून खाणें.
**निरपणें** (क्रि.) निपटणें; काढून टाकणें; खेचणें; (तलवार) उपसणें.
**निरपत्रप** (सं. वि.) निर्लज्ज.
**निरपराध** (सं. वि.) निर्दोष.
**निरपेक्ष** (सं. वि.) निरिच्छ; निःस्वार्थी.
**निरपेक्षता** (सं. स्त्री.) निरिच्छपणा; निःस्वार्थता; पक्षपातशून्यता.
**निरबुजणें** (क्रि.) बुजणें; मिटणें.
**निरभ्र** (सं. वि.) स्वच्छ.
**निरभिमान** (वि.) गर्वरहित; ज्याला ताठा नाहीं असा; साधा, नम्र.
**निरय** (सं. पु.) नरक.
**निरयण, निरयन** (सं. न.) ग्रहांचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत न घेणें. **नि० पंचांग** (न.) अयनगति हिशेबांत न घेतां ग्रहलाघवादि ग्रंथांवरून तयार केलेलें पंचांग.
**निरर्गल** (सं. वि.) बेताल; स्वैर.
**निरर्थक** (सं. वि.) व्यर्थ, निष्फळ.
**निरलस** (सं. वि.) आलस्यहीन, उद्योगी.
**निरवकाश** (सं. वि.) निबिड.
**निरवडी** (प्रा. स्त्री.) निग्रह; चातुर्य; सावधानता; युक्ति.
**निरवणें** (प्रा. क्रि.) स्वाधीन करणें; समर्पणें (कथासारा० १२।२११); निर्वाह करणें.
**निरवधि** (सं. वि.) अमर्याद, सतत.
**निरवलंब** (सं. वि.) आधार नसलेला.
**निरवानिरव** (स्त्री.) प्रवासाला निघतांना किंवा मरतांना करतात ती सर्व गोष्टींची नीट व्यवस्था.
**निरविणें** (प्रा. क्रि.) पाठविणें, निरोप देणें (ज्ञा० १८।५५२); आपलें कार्य दुसऱ्यावर सोपविणें.

**निरशन** (सं. न.) उपवास.
**निरशी, निरसी** (वि.) पाणी किंवा कच्चें (न तापविलेलें) दूध न घातलेली; (स्त्री.) बेचवपणा.
**निरस** (सं. निरस वि.) बेचव. [होणें.
**निरसणें** (सं. निरसनम् क्रि.) दूर करणें, नष्ट
**निरसन** (सं. न.) परिहार; दूर करणें.
**निरसी** (स्त्री.) सरशीच्या उलट म्हणजे गौणपणा.
**निरसें** (वि.) पाणी घातलें नाहीं किंवा तापविलेलें नाहीं असें (दूध).
**निरस्त** (सं. वि.) दूर फेकून दिलेला; खंडित; जिंकलेला; नष्ट केलेला (अज्ञान, गैरसमज इ०).
**निरहंकार** (सं. पु.) अहंभावाचा किंवा गर्वाचा अभाव.
**निरहर** (प्रा. न.) बुद्धिबळांतलें मोहरें (ज्ञा० १८।१७०).
**निरक्षर** (वि.) अशिक्षित, अविद्वान्.
**निरा, निरां** (प्रा. अ.) अगदीं, केवळ; एक प्रकारचें पांढरें गवत; ताडाच्या झाडापासून निघालेला ताजा रस.
**निराकरण** (सं. न.) खंडण; निवारण.
**निराकरणें** (प्रा. क्रि.) निषेध करणें.
**निराकार** (सं. वि.) आकारहीन, निरवयव; (पु.) परमेश्वर, परब्रह्म.
**निराकांक्ष** (सं. वि.) निरिच्छ.
**निराकृत** (सं. वि.) निरस्त पहा.
**निराचार** (वि.) आचार न पाळणारा.
**निरांजन** (सं. निरंजन न.) आरती ओवाळण्याचें पात्र.
**निराट** (वि.) उघडें, छायाशून्य.
**निराधार** (सं. वि.) आश्रयरहित; अप्रमाण.
**निरानिपटा** (पु.) निपटून चिपटून साफ करणें; सफाई.
**निरामय** (सं. वि.) निरोगी.
**निरामिष** (सं. वि.) मांसविरहित.
**निरालंब** (सं. न.) आकाश (भावार्थ० युद्ध० २९।७९).
**निरालय** (वि.) अविनाशी.
**निराश** (सं. वि.) आशारहित.
**निराशा** (सं. स्त्री.) आशाभंग.
**निराश्रित** (सं. वि.) आश्रयहीन.
**निरास** (सं. पु.) निरसन.
**निराहार** (सं. पु.) उपवास, फराळ.
**निराळ** (सं. निरालय पु. न.) आकाश; निराकार स्वरूप; निराश्रय.
**निराळें** (वि.) भिन्न, वेगळें.
**निरिखणें** (सं. निरीक्ष् क्रि.) पाहणें.
**निरिच्छ** (सं. वि.) इच्छाहीन. [रहित.
**निरिंद्रिय** (सं. वि.) हस्तापादादि इंद्रिय-
**निरी** (स्त्री.) वस्त्राची चुणी.
**निरीम** निलीम पहा. [न मानणारा.
**निरीश्वरवादी** (सं. वि.) ईश्वराचें अस्तित्व
**निरीक्षण** (सं. न.) बारकाईनें पाहणें; न्याहाळणें; परीक्षा; विचार.
**निरीक्षणें** (क्रि.) बारकाईनें पाहणें.
**निरुक्त** (सं. न.) एक वेदांगग्रंथ; वेदांतल्या कठिण शब्दांचा व्याख्याकोश.
**निरुक्ति** (प्रा. स्त्री.) प्राप्ति; विचारणा; निश्चय; युक्ति; रीत.
**निरुतें** (प्रा. वि.) खरें; शुद्ध; (न.) खरेपण; निश्चय; (अ.) खरोखर, खात्रीनें.
**निरुती** (स्त्री.) प्राप्ती; निश्चय; निर्णय.
**निरुत्तर** (सं. वि.) उत्तर देण्यास असमर्थ; स्तब्ध.
**निरुत्साह** (सं. वि.) उत्साहशून्य.
**निरुंद** (वि.) अरुंद.
**निरुद्ध** (वि.) बांधलेला.
**निरुद्योगी** (सं. वि.) रिकामा, व्यवसायहीन.
**निरुपचार** (क्रि. वि.) कारणाशिवाय.
**निरुपम** (सं. वि.) ज्याला कशाचीही उपमा देतां येत नाहीं असें. [देणारा.
**निरुपद्रवी** (सं. वि.) गरीब, त्रास न
**निरुपयोगी** (वि.) ज्याचा उपयोग होत नाहीं असा; व्यर्थ; निष्फळ.
**निरुपहित** (वि.) उपाधिरहित.
**निरुपाय** (सं. वि.) नाइलाज.
**निरुपाधि** (सं. वि.) त्रासरहित.
**निरू** (प्रा. वि.) शुद्ध, निर्भेळ.
**निरूढी** (सं. स्त्री.) लोकाचार.
**निरूपण** (सं. न.) विवेचन, व्याख्यान.
**निरूपिणें** (सं. क्रि.) सांगणें.

निर्ऋती (सं. स्त्री.) नाश; विपत्ति.
निरें (प्रा. वि.) शुद्ध.
निरेक्षणें (क्रि.) बारकाईनें पाहणें.
निरोगी (सं. नीरोग वि.) रोगरहित; धट्टाकट्टा.
निरोध (सं. पु.) प्रतिबंध, नियमन.[ करणें.
निरोधणें (सं. निरोधनम् क्रि.) नियमन
निरोप (पु.) संदेश; मजकूर; जाण्याविषयीं आज्ञा. [ निरोपावरून.
निरोपानिरोपीं (अ.) नुसत्या तोंडीं
निरोप्या (पु.) निरोप पोंचविण्याचें काम करणारा.
निर्गत (सं. निर्गति स्त्री.) यश; आनंददायक निकाल; बाहेर गेलेला माल.
निर्गम (सं. पु.) निकाल, निर्णय.
निर्गांठ (सं. निर्ग्रंथि स्त्री.) गच्च बसलेली न सुटणारी गांठ.
निर्गुण (सं. वि.) गुणहीन, गुणातीत; सत्त्वरजस्तमादि गुणरहित (परमात्मा).
निर्ग्रंथ (पु.) नास्तिक; एकपंथ.
निर्घृण (सं. वि.) निष्ठुर, निर्दय.
निर्घोर (वि.) निष्काळजी, बेफिकीर.
निर्घोष (सं. पु.) ध्वनि.
निर्जन (सं. वि.) ओसाड.
निर्जर (सं. वि.) जराहीन; (पु.) देव.
निर्जल (सं. वि.) जलरहित; ज्यांत पाणीसुद्धां प्यावयाचें नाहीं असा (उपास).
निर्जळी एकादशी (स्त्री.) ज्येष्ठ शु० ११.
निर्जीव (सं. वि.) अचेतन; प्राणविरहित, निःसत्त्व.
निर्झर (सं. पु.) झरा.
निर्ढावणें (क्रि.) सहन करण्याची संवय होणें; (मडकें) पाझरावयाचें थांबणें; वहिवाटीमुळें अधिक उपयुक्त होणें.
निर्णय (सं.पु.) निकाल; निश्चय; सिद्धांत.
निर्णायक (सं. वि.) सिद्धांत ठरविणारें.
निर्णीत (सं. वि.) ज्याचा निकाल लाविलेला आहे असा.
निर्णें (सं. निर्णय पु.) निर्णय.
निर्दय (सं. वि.) कठोर, निष्ठुर, दयाहीन.
निर्दलन, निर्दळण, निर्दाळण (सं. न.) नायनाट, संपूर्ण नाश.
निर्दिष्ट (सं. वि.) सांगितलेलें, दाखविलेलें.
निर्देश (सं. पु.) दाखविणें, आज्ञा; वर्णन; उल्लेख.
निर्दैव (सं. वि.) दुर्दैवी.
निर्दोष (सं. वि.) अव्यंग, दोषरहित.
निर्दोषी (सं. वि.) निरपराधी.
निर्द्वंद्व (न.) भांडणाचा अभाव; जग आणि ईश्वर एक आहेत असा भाव.
निर्धन (सं. वि.) दरिद्री.
निर्धार (सं. पु.) निश्चय; नियम.
निर्धारणें (सं. क्रि.) निश्चित करणें.
निर्धास्त (सं. नि + अर् धास्त वि.) बिनधोक, निर्भय; स्वस्थ.
निर्धोक (वि.) भयरहित.
निर्धूत (वि.) नागवलेला; धुतलेला.
निर्नायक (वि.) नेता नसलेला (देश, समुदाय इत्यादि).
निर्पुस (प्रा. वि.) खरपूस.
निर्बंध (सं. पु.) मर्यादा; आग्रह.
निर्बळ (सं. वि.) शक्तिहीन.
निर्बुज (प्रा.वि.) मंद; लठ्ठ; ध्यानभ्रष्ट.
निर्बुजणें (प्रा. क्रि.) कंटाळणें (हरि० १०।२१४); अडखळणें; घाबरणें; दिपणें (दा० २।१।१८).
निर्बुद्ध (वि.) मूर्ख.
निर्भय (सं. वि.) भयरहित, धीट; सुरक्षित.
निर्भर (सं. वि.) पूर्ण, गाढ, अतिशय; (पु.) विश्वास.
निर्भर्त्सणें (क्रि.) निंदणें, तिरस्कार करणें.
निर्भर्त्सना (सं. स्त्री.) उपहास, निंदा.
निर्भीक (सं. वि.) भयशून्य, साहसी.
निर्भीड (वि.) बेमुरवत, निःस्पृह.
निर्भेद्य (सं. वि.) ज्याचा भेद होऊं शकत नाहीं असें.
निर्भेळ (वि.) बिनमिसळीचें; शुद्ध.
निरभ्रांत (सं. वि.) खात्रीचें, निःशंक.
निर्मनुष्य (सं. वि.) निर्जन (अरण्य, देश, गांव इ०)
निर्मळ (सं. वि.) स्वच्छ.
निर्माण (सं. वि.) उत्पन्न केलेलें.
निर्माल्य (सं. पु.) देवाला वाहिलेलीं फुलें इ.; तेजोहीन मनुष्य किंवा वस्तु.

**निर्मिणें** (सं. क्रि.) उत्पन्न करणें.
**निर्मित** (सं. वि.) उत्पन्न केलेलें.
**निर्मूल, निर्मूळ** (सं. वि.) मुळें पाळें यांसह नष्ट झालेला; आधारहीन.
**निर्मूलन** (सं. न.) समूळ उच्छेद.
**निर्याण** (सं. न.) बाहेर पडणें; मोक्ष.
**निर्यास** (सं. पु.) डिंक, चीक; सार, काढा.
**निर्लज्ज** (सं. वि.) बेशरम.
**निर्लेप** (सं. वि.) खरकटयाचा स्पर्श नसलेला; अलिप्त, शुद्ध, शुचिर्भूत.
**निर्वच, निर्वचु** (प्रा. पु.) निश्चय, सिद्धांत (ज्ञा० १६।११२). [करणें.
**निर्वचणें** (प्रा. क्रि.) निश्चय करणें; वर्णन
**निर्वंश** (सं. पु.) कुलक्षय, निसंतान.
**निर्वाच्य** (सं. वि.) सांगण्याजोगें.
**निर्वाण** (प्रा. वि.) कठिण; पराकाष्ठेचा (ज्ञा० १६।३३९); (पु.) अनर्थ; मृत्यु; मोक्ष; निरुपायस्थिति; प्रतिज्ञा (भावार्थ० २।७।१३३).
**निर्वात** (सं. वि.) वायुरहित, निवाऱ्याचें.
**निर्वाप** (सं. पु.) पितरांना दान; दान.
**निर्वासन** (सं. न.) हद्दपारी.
**निर्वासित** (वि.) आश्रयासाठीं आलेला.
**निर्वाह** (सं. पु.) उपजीविका, गुजारा; संरक्षण; कार्यसिद्धि; खरें करून दाखविणें; वर्तणूक; व्यवस्था; रीत; स्थिति.
**निर्वाळणें** (प्रा. क्रि.) निर्मळ करणें, पूर्ण करणें (भा० २८।२३).
**निर्वाळा** (प्रा. पु.) खातरजमा; निवाडा; शुद्धता; निर्धास्तपणा; निश्चय (तुका० ३६८०).
**निर्वाळिलें** (प्रा. वि.) निवडक, शुद्ध.
**निर्विकल्प** (सं. वि.) भेदरहित; विशेषण–विशेष्य किंवा ज्ञान–ज्ञेय इ. मधील भेद न जाणणारा; एकाग्र.
**निर्विकार** (सं. वि.) विकारशून्य; उदासीन.
**निर्विघ्नपणें** (अ.) कांहीं संकट न येतां.
**निर्विवाद** (सं. वि.) बिनतक्रार, निःसंशय.
**निर्विष** (सं. वि.) विषहीन. [हीन.
**निर्वीर्य** (सं. वि.) वीर्य नसलेलें; पराक्रम-
**निर्वीर** (सं. वि.) वीरशून्य.
**निर्वृत्ति** (सं. स्त्री.) सिद्धि; समाप्ति.
**निर्वेद** (पु.) शिसारी, वैराग्य.
**निर्वेध** (सं. वि.) निश्चित; बेफिकीर.
**निर्व्यसनी** (सं. वि.) कोणतेंहि व्यसन नसलेला.
**निर्व्याज** (सं. वि.) निष्कपट, सरळ.
**निलय** (न.) जागा; स्थान.
**निलंघणें** (प्रा. क्रि.) थकणें; कंटाळणें.
**निलाग** (प्रा. वि.) निरुपयोगी (भा० ५।१८१); (अ.) पूर्णपणें.
**निलागी** (वि.) कीड न लागलेलें.
**निलाजरा** (वि.) निर्लज्ज, बेशरम.
**निलाम** (हिं. पु.) लिलांव.
**निलीम** (न.) तोल संभाळण्याकरितां गलबतांत घातलेला भार.
**निवटणें** (प्रा. क्रि.) वध करणें; मरणें; निघणें; सुधारणें; स्वच्छ करणें; शोधणें; निवडणें (मुक्ते० रामा० ६।३८६).
**निवड** (स्त्री.) पसंती; अप्रीति, नावड.
**निवडक** (वि.) शेलकी; पसंत केलेली; वेचक.
**निवडणें** (प्रा. क्रि.) पसंत करणें; वेगळें करणें; निश्चय करणें (ज्ञा० १५।३८४).
**निवडणूक** (स्त्री.) पसंत करण्याची क्रिया; पसंती. [ २६३).
**निवडला** (प्रा. वि.) कसलेला (रं० यो०
**निवडुंग** (पु. न.) एक कांटेरी वनस्पति.
**निवण** (प्रा. स्त्री.) बूड (भा० ६।२५७); पदार्थ निवत ठेवण्याची जागा.
**निवणें** (न.) घट ठेवण्यासाठीं त्याखालीं घालावयाचें गवताचें वेटोळें (मोरो० कृष्ण ३८।३४).
**निवणें** (सं. क्रि.) थंड होणें, शांत होणें.
**निवंता** (स्त्री.) न्यूनता, उणेपणा (होना० पृ० १४६). [ घालविणें.
**निवर्तविणें** (प्रा. क्रि.) सोडून देणें,
**निवर्तणें** (सं. निवृत् क्रि.) मरणें; परतणें.
**निववणें** (प्रा. क्रि.) शांत करणें; थंड करणें.
**निवळ** (स्त्री.) पातळ पदार्थांतला जडांश खालीं बसून वर राहिलेला द्रवांश; (अ.) केवळ; निःसंशय; (वि.) स्पष्ट, शुद्ध-

**निवळणें** (प्रा. क्रि.) स्पष्ट होणें; शुद्ध होणें.
**निवळी** (स्त्री.) निवळ पहा.
**निवाड, निवाडु** (प्रा. पु.) रूप; हौस; निर्णय; (अ.) अखेर; खरोखर.
**निवाडा** (पु.) निर्णय, निकाल, फैसला.
**निवाडा पोवाडा** (पु.) संकटांतून मुक्तता; सुखरूपपणें झालेलें वाळंतपण.
**निवाणें** (न.) नाश; खराबी. [ शांत.
**निवांत** ( सं. निर्वात वि. ) उपद्रवरहित;
**निवांतणें** (न.) उंदराच्या विषाची बाधा.
**निवांतां** (प्रा. अ.) मुकाट्यानें.
**निवारक** (सं. वि.) दूर करणारा.
**निवारण** (सं. न.) दूर करणें.
**निवारशी** (वि.) विनवारशी.
**निवारस माल** (पु.) विनवारशी माल.
**निवारा** (पु.) निर्वात स्थळ; आश्रय.
**निवार्य** (सं. वि.) निवारण्याजोगा.
**निवास** (सं. पु.) राहणें; स्थान, गृह.
**निवासी** (सं. वि.) रहिवासी. [ स्थिर.
**निविष्ट** (सं. वि.) प्रविष्ट; प्राप्त; निपुण;
**निवृत्त** (वि.) मागें परतलेला; थांबलेला.
**निवृत्ति** (सं. स्त्री.) माघार घेणें; निरास; वैराग्य; मोक्ष.
**निवेदक** (वि.) सांगणारा (नभोवाणी-वरून किंवा दूरध्वनिक्षेपकांवरून इ०).
**निवेदणें** (क्रि.) सांगणें, कथन करणें; अर्पिणें. [ करणें.
**निवेदन** (सं. न.) कथन; वाहणें, अर्पण
**निवेद्य, नैवेद्य** (सं. पु.) आराध्य देवतेस अर्पिलेलें किंवा अर्पावयाचें अन्न किंवा खाद्य वस्तु.
**निवेश** (सं. पु.) प्रवेश; निपुणता; युद्ध.
**निःशंक** (सं. वि.) शंकाहीन, विनधोक.
**निःशंकपणें** (अ.) शंका न बाळगतां; निर्धास्तपणानें.
**निशब्द** (सं. वि.) शब्दरहित; (न.) ब्रह्म.
**निशा** (सं. स्त्री.) रात्र; (अर. स्त्री.) खात्री; कैफ.
**निशाकर** (सं. पु.) चंद्र. [चोर इ.
**निशाचर** (सं. पु.) रात्रीं फिरणारा; राक्षस;
**निशाण** (फा. न.) झेंडा; नेम; चिन्ह; खूण; रणभेरी (ज्ञा० ११३२) (रु० १८।२७९).
**निशाण बरदार** (पु.) निशाण धरणारा.
**निशाणा** (सं. पु.) धार लावण्याचें चाक.
**निशाणी** (फा. स्त्री.) चिन्ह; खूण.
**निशांत** (सं. पु.) रात्रीचा अखेरचा प्रहर.
**निशापति** (सं. पु.) चंद्र.
**निशापाणी** (न.) मादक पदार्थाचें सेवन.
**निशापाती** (स्त्री.) ज्ञातरजमा.
**निशापाळ** (पु.) चंद्र. [सेवन करणारा.
**निशाबाज** (अ. फा. वि.) मादक पदार्थाचें
**निशि–शी** (स्त्री.) रात्र.
**निशिगंध** (पु.) गुलछबू.
**निशित** (सं. वि.) तीक्ष्ण.
**निशिदिनीं** (अ.) अहोरात्र. [ रात्र.
**निशी** (प्रा. स्त्री.) सीमा (अमृ० २।५७);
**निशीं** (अ.) सह, बरोबर.
**निशीण** (सं. निःश्रेणी स्त्री.) शिडी.
**निशीथ** (सं. पु.) मध्यरात्र.
**निःशेख** (सं. अ. वि.) संपूर्ण, समूळ.
**निशेदार** (पु.) जामीन राहणारा; कैफ करणारा.
**निःशेष** (सं. वि.) संपूर्ण. [ (तुका० १७५०).
**निश्चक्र** (प्रा. न.) कडकडीत उपवास
**निश्चय** (सं. वि.) ठराव, नेम; ठाम मत, सिद्धांत. [ स्थिर.
**निश्चल, निश्चळ** (सं. वि.) चलनरहित,
**निश्चित** (वि.) ठरलेलें; नक्की झालेलें.
**निश्चिंत** (वि.) चिंतारहित; स्वस्थ.
**निश्चेष्ट** (सं. वि.) निर्व्यापार, स्तब्ध.
**निश्चेतन** (सं. वि.) निश्चेष्ट.
**निःश्रेणी** (सं. स्त्री.) शिडी (भा० ६।१०४).
**निश्वसित** (सं. न.) नाकपुड्यांतून बाहेर पडणारा वायु.
**निःश्वास** (सं. पु.) उच्छ्वास; वेद.
**निषाद** (सं. पु.) सप्तसुरांतला एक सूर; एक जात; कोळी, पारधी ही जात.
**निषिद्ध** (सं. वि.) वर्ज्य, अविहित.
**निषेध** (सं. पु.) मनाई, बंदी; नकार.
**निष्क** (सं. पु.) सोन्याचें नाणें; मोहोर; दीनार; १०८ मासे भार सोनें; सोनें; चार मासे वजन.

**निष्कंटक** (सं. वि.) कांटे नसलेला; निर्धास्त.
**निष्कपट** (वि.)ज्यांत किंवा ज्याचे ठायीं कपट नाहीं असा (व्यवहार, माणूस).
**निष्कर्ष** (सं. पु.) सिद्धांत; सार, तात्पर्य.
**निष्कलंक** (सं. वि.) निर्मळ, कलंकरहित.
**निष्कांचन** (सं. वि.) निर्धन, कफल्लक.
**निष्काम** (सं. वि.) फलेच्छाविरहित.
**निष्कारण** (सं. अ.) कारणावांचून, व्यर्थ.
**निष्कृति** (सं. स्त्री.) प्रायश्चित्त; फंड.
**निष्क्रमण** (सं. न.) वहिर्गमन.
**निष्टंक** (प्रा. पु.) ग्रंथ; सिद्धांत; (वि.) निष्णात; स्पष्ट.
**निष्ठ** (वि.) राहिलेला; राहणारा; युक्त; विशिष्ट; वाहिलेला.
**निष्ठा** (सं. स्त्री.) दृढभक्ति; श्रद्धा; विश्वास; निश्चय; सिद्धांत.
**निष्ठुर** (सं. वि.) कठोर, कडक.
**निष्णा** (सं. शाण स्त्री.) धार लावण्याचा दगड, निसणा.
**निष्णात** (सं. वि.) प्रवीण, निपुण. [पक्व.
**निष्पन्न** (सं. वि.) उत्पन्न; ज्ञाता, निपुण,
**निष्पत्ति** (सं.स्त्री.)उत्पत्ति; परिपाक,पूर्णता.
**निःपक्षपात, निष्पक्षपात** (सं. पु.) भीडभाड न धरतां किंवा एका पक्षाचा कैवार न घेतां समबुद्धि ठेवणें.
**निष्पक्षपाती** (वि.)समदृष्टीचा. [उत्पादन.
**निष्पादन** (सं. न.) घडवून आणणें;
**निष्पाप** (सं. वि.) पापशून्य, पापहीन.
**निष्प्रभ** (सं. वि.) तेजोहीन.
**निष्प्रयोजन** (सं. वि.) निष्कारण.
**निष्फ** (वि.) अर्ध.
**निष्फल, निष्फळ** (वि.) विफल.
**निःसंग** (सं. वि.) विरक्त; लोकरीति सोडलेला.
**निसंगळ** (वि.) निर्लज्ज (दा. २।३।१८).
**निसटणें** (क्रि.) अडचणींतून हळूच बाहेर पडणें; घसरणें; डोळा चुकवून पळणें.
**निसण** (प्रा. स्त्री.) शिडी.
**निसणा** (पु.) धार लावण्याचें चाक.
**निसणें** (क्रि.) निवडणें; (सं. निस्तुष्) सोलणें; साफ करणें.
**निसत** (वि.) निर्लज्ज; भ्रष्ट; व्यसनी.
**निसता** (वि.) नुसता, साधा; उघडा.
**निसंतान** (सं. न.) कुलक्षय.
**निःसत्त्व** (सं. वि.) वलहीन, तेजोहीन.
**निःसंदेह,निस्संदिग्ध** (वि.)संदेह नसलेला; संशयरहित.
**निसपटणें** (क्रि.) निसटणें, ढळणें.
**निसबत** (अर. स्त्री.) हवाला, मार्फत.
**निसरगांठ** (स्त्री.) लवकर सुटणारी गांठ; सुरगांठ.
**निसरड, निसरंड, निसरडा** (वि.) बुळबुळीत.
**निसरडें** (न.) बुळबुळीत जागा.
**निसरणें** (क्रि.) घसरणें. [खेळ.
**निसरभोंवडी** (प्रा. पु.) मुलांचा एक
**निसरवा** (पु.) पंचांग सांगून दारोदारीं मिळविलेलें धान्य.
**निसरसांड** (स्त्री.) विस्मरण. [जागा.
**निसराड** (स्त्री.) निसरडें, बुळबुळीत
**निसर्ग** (सं. पु.) सृष्टि; स्वभाव, प्रकृति.
**निसवणें** (क्रि.) कणीक वाहेर टाकणें; दुष्कर्माविषयीं निर्लज्ज होणें.
**निःसंशय** (सं. वि.) ज्याच्यासंबंधानें संशय उरला नाहीं असा; (अ.) खात्रीनें; खचित.
**निसळ** (प्रा. वि.) निर्दोष.
**निसळण** (स्त्री.) जडयाचें एक हत्यार.
**निसळणी** (स्त्री.) गोठ गोल करण्याचें हत्यार. [देणें.
**निसळणें** (क्रि.) झिलई किंवा तकाकी
**निसळें** (प्रा. वि.) पाजळलेलें (शस्त्र).
**निसाणु** (प्रा. पु.) नगारा.
**निसासणें** (क्रि.) धापा टाकणें.
**निसुक** (प्रा. वि.) शुष्क.
**निसुग** (प्रा. वि.) आळशी; निर्लज्ज; कोडगा (तुका. ४२७३; ना. २१०७)
**निसुगाई** (प्रा. स्त्री.) निरुद्योगीपणा; आळस.
**निसुर, निसूर** (प्रा. वि.) निःसंशय, वेफिकीर; निर्दय; निर्लज्ज; गाढ.
**निसुरता** (वि.) निसटता; चाटून (स्पर्श करून) जाणारा.

**निसूक, निसूग** (वि.) थेट, सरळ; निर्लज्ज.
**निस्कारणें** (क्रि.) तिरस्कारानें धुडकावून लावणें. [ सिद्धि-
**निस्तरण** (सं. न.) पार पाडणें; उपाय;
**निस्तरणें** (क्रि.) पार पडणें; चुक्या सुधारणें; दुष्कर्माचीं फळें भोगणें. [फेड.
**निस्तार** (सं. पु.), **निस्तारण** (न.) सुटका,
**निस्तारणें** (क्रि.) चूक सुधारणें, पुनः काळजीपूर्वक करणें इत्यादि उपायांनीं कामाला पूर्णता आणणें.
**निस्तूक** (अ.) केवळ, अगदीं, बिलकूल.
**निस्तेज** (सं. वि.) तेजोहीन, फिका, दुर्बळ. [ पडणें.
**निस्तेजण** (क्रि.) निस्तेज होणें, फिकें
**निस्तेजस्क** (सं. वि.) निस्तेज, तेजोहीन.
**निस्त्याला, निस्त्यास** (अ.) तोंडीं लावायाला.
**निस्पंद** (सं. वि.) निश्चल.
**निस्यंद** (सं. पु.) रस, प्रवाह.
**निस्साण** (प्रा. न.) रणवाद्य.
**निस्सीम** (वि.) अमर्याद.
**निहनन** (सं. न.) वध, ठार मारणें.
**निःस्पृह** (सं. वि.) निरिच्छ, निर्भीड.
**निःसंग** (सं. वि.) निःस्पृह; ज्याला स्वार्थबुद्धि नाहीं असा; विरक्त; एकलकोंडा; निर्लज्ज.
**निहाय** (अर. निहाया अ.) प्रत्येकीं.
**निहाळणें** (क्रि.) वारकाईनें पाहणें.
**निहित** (सं. वि.) ठेविलेलें. [ येणें.
**निळंगणें** (क्रि.) गळून जाणें, ग्लानि
**निळंगळी, निळंगी** (स्त्री.) ग्लानि.
**निळवा** (पु.) एक जातीचा जोंधळा.
**निळवें** (न.) अर्धे कोळवें; छटाकाचें माप.
**निळा** (सं. नील वि.) अस्मानी.
**निळें** (न.) हिरवें गवत; धान्य; हिरवेपणा.
**निक्षिप्त** (वि.) गहाण ठेवलेला; फेकून दिलेला.
**निक्षी** (स्त्री.) कडकपणा, सक्तपणा.
**निखूण, निक्षूण** (अ.) वजावून, इडसून खडसून, स्पष्टपणें.
**निक्षेप** (सं. पु.) पुरून ठेविलेलें द्रव्य.
**निक्षेपणें** (क्रि.) फेकणें; ठेवणें.

**नी** (अ.) आणि.
**नीकुरा** (प्रा. पु.) सेवक (ना. १९८०).
**नीच** (सं. वि.) हलकें, कमी; अधम; खालीं; (अ.) नित्य.
**नीचगा** (सं. स्त्री.) नदी.
**नीचग्रह** (सं. पु.) ग्रहाच्या उच्च स्थानापासून सातवी रास; नीच राशींत असलेला ग्रह. [पर्व २।५०).
**नीची** (प्रा. अ.) खालीं (वामन-विराट-
**नीज** (सं. निद्रा स्त्री.) निद्रा, झोप.
**नीट** (वि.) सरळ, थेट, बरोबर. [सारखा.
**नीटनेटका** (वि.) यथायोग्य; शोभण्या-
**नीड** (सं. न.) पक्ष्याचें घरटें; रथांतील बैठक. [ (स्त्री.) नीति.
**नीत** (प्रा. वि.) योग्य (तुका. १७५१);
**नीति** (सं. स्त्री.) न्याय; शिष्टाचार; वर्तन; व्यवस्था.
**नीतिभेद** (सं. पु.) सांप्रदायिक अर्थ-अर्थशास्त्र; वैशेषिक दर्शन (ज्ञा. १।११).
**नीतिमान्** (सं. वि.) सदाचरणी, न्यायी.
**नीद** (सं. निद्रा स्त्री.) निद्रा, झोप.
**नीध** (सं. निधि पु.) भाण्डार.
**नीम** (पु.) भूत, पिशाच्च, इ० कांस द्यावयाचा नियमित बळी.
**नीर** (सं. न.) पाणी; (पु.) जाळें; परिणाम, निकाल.
**नीरज** (सं. न.) कमळ.
**नीरद** (सं. पु.) मेघ.
**नीरव** (सं. वि.) निःशब्द.
**नीरस** (सं. वि.) बेचव, शुष्क. [पात्र.
**नीरांजन** (सं. न.) ओवाळण्याचें दीप-
**नील (ळ)** (सं. पु.) शनि नांवाचें रत्न; एक रंग; तो रंग जिच्यापासून काढतां येतो ती वनस्पति; रामायणप्रसिद्ध एक वानर. **नीळ नाचणें**—खोटी बातमी उठविणें.
**नीलकंठ** (सं. पु.) शिव, महादेव.
**नीलगाय** (स्त्री.) हरिणाची एक जात.
**नीलांबरी** (स्त्री.) गाण्यांतली एक रागिणी.
**नीलिमा** (सं. पु.) निळा रंग.
**नीली** (सं. स्त्री.) नीळ. [ गांठ.
**नीवी** (सं. स्त्री.) कमरेचें वस्त्र, निरीवरची

**नीस** (प्रा. स्त्री.) निवड, छाननी; सार (तुका. ३००८); (अ.) अगदीं.
**नीसी** (सं. निशा स्त्री.) रात्र.
**नीसुगा** (प्रा.वि.) आळशी (ना. १३६०).
**नीळ** (स्त्री.) नील पहा.
**नीळरांप** (स्त्री.) निराधार गप्प.
**नीळवट** (स्त्री.) हिरवेंचार कुरण;हिरवेंचार गवत; (वि.) निळसर, कांहींसें निळया रंगाचें.
**नु** (अ.) एक आदरार्थी अव्यय—शंका प्रदर्शित करण्यासाठीं, उदा. बावानु, काकानु. [ (अ.) आतांच.
**नुकता, नुक्ता** (वि.) आतांच घडलेला;
**नुकसान** (अर. न.) नुकसानी; (स्त्री.) तोटा, हानि. [ (भा.११।१०७१).
**नुगंडणें** (प्रा. क्रि.) न उद्धरणें, न सुटणें
**नुगवे** न कळे.
**नुगी, नुनी** (स्त्री.) लहान मुलाचें इंद्रिय.
**नुथड** (प्रा. न.) नथ (भा. १३।२२१).
**नुधवणें** (क्रि.) न उचलणें (तुका. ३९७७).
**नुनू** (स्त्री.) झोप.
**नुपकर** (प्रा. वि.) असमर्थ.
**नुपुरतें** (प्रा. वि.) विपयासक्त.
**नुपुरे** (प्रा. क्रि.) न पुरे.
**नुपेक्षणें** (क्रि.) उपेक्षा न करणें.
**नुमगणें** (क्रि.) न कळणें, न उलगडणें.
**नुरणें** (क्रि.) न उरणें. [ १३।२०३).
**नुमसणें** (प्रा. क्रि.) न सांगणें (ज्ञा०
**नुरोधी** (प्रा. वि.) बाधक.
**नुसता, नुस्ता** (वि.) शुद्ध, केवळ, फक्त.
**नुसदें, नुसधें, नुसुधें** (प्रा. अ.) केवळ, नुसतें.
**नूतन** (वि.) नवीन.
**नूपुर** (सं. पु. न.) वाळा, तोरड्या, पैंजण.
**नूर** (अर. पु.) तेज, रूप.
**नृत्य** (सं. न.) नाच.
**नृप, नृपति, नृपाळ** (सं. पु.) राजा.
**नृशंस** (सं. वि.) दुष्ट, घातुक; निंद्य.
**नृसिंह** नरसिंह पहा. [नेणें, आणणें.
**ने आण** (स्त्री.) पदार्थ इकडून तिकडे
**नेक** (फा.वि.) प्रामाणिक; सरळ; चांगला.
**नेकजात** (फा. वि.) प्रतिज्ञा पाळणारा.
**नेक नामदार** (फा. वि.) खरा नांव राखणारा; प्रामाणिक आणि कीर्तिमान्; गव्हर्नर साहेबांचा आणि कौन्सिलरांचा किताब. [ वर्तणूक.
**नेकराह** (फा. स्त्री.) सरळ राहणी किंवा
**नेकी** (फा. स्त्री.) सरळपणा, प्रामाणिकता चिकाटी.
**नेकीवादी** (फा. नेकीवादी स्त्री.) भलाई बुराई, बऱ्यावाईटाचा निर्णय.
**नेघणें** (प्रा. क्रि.) न घेणें.
**नेचा** (फा. पु.) हुक्क्याची नळी; (पु.स्त्री.)एक फुलें न येणारी वनस्पती.
**नेट** (पु.)बळ; दम; भार; वजन; तगादा, निकड.
**नेटक** (प्रा. वि.) उत्सुक.
**नेटका** (वि.) सुंदर; प्रमाणशीर; बरोबर.
**नेटणें** (क्रि.) जोरानें ढकलणें; जवळ येऊन ठेपणें.
**नेटपाटें** (प्रा. अ.) हातोहातीं.
**नेटावा** (पु.) आधार, ठेका, जोर.
**नेटिव** (इं. वि.) देशी, देशचा (मूळ इंग्रजी शब्द तिरस्कारव्यंजक मानला जातो).
**नेटो** (प्रा. वि.) परिपूर्ण.
**नेटुगी** (प्रा. वि.) नीट, बांधेसूद.
**नेटेंपाटें, नेटेंबोटें** (प्रा. अ.) बळजबरीनें; खरोखर जवळ; हातोहातीं; लवकर.
**नेडें, नेढें** (न.) सुई, कुदळी इ. ला ठेवलेलें छिद्र.
**नेणणें** (क्रि.) न जाणणें.
**नेणतपण** (प्रा. न.) अज्ञानावस्था.
**नेणता** (वि.) अज्ञान.
**नेणीव** (प्रा.स्त्री.) अज्ञान. [१०।४४).
**नेणु** (प्रा. वि.) नेणता, अज्ञान (रं० यो०
**नेणें** (क्रि.) कांहीं वस्तु एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणीं घेऊन जाणें किंवा पोचविणें. [ पणा.
**नेत** (स्त्री.) सचोटी; साखी; प्रामाणिक-
**नेता** (सं. पु.) पुढारी.
**नेति** (अ.) नाहीं.
**नेतृत्व** (सं. नै.) पुढारीपणा.
**नेत्र** (सं. पु. न.) डोळा.

**नेत्रपल्लव** (सं. पु.) डोळ्याचें पातें.
**नेत्रपल्लवी** (स्त्री.) डोळ्याच्या खुणांची सांकेतिक भाषा.
**नेत्री** (सं. स्त्री.) नायिका, पुढारी स्त्री.
**नेदणें** (प्रा. क्रि.) न देणें.
**नेदावें** (प्रा. क्रि.) न द्यावें.
**नेदी** (प्रा. क्रि.) देत नाहीं.
**नेदु** न देऊं.
**नेनी** (प्रा. क्रि.) न नेई.
**नेपती** (स्त्री.) एक झाड.
**नेपतें** (न.) नेपतीचें फळ.
**नेपच्यून** (इं. पु.) वरुण.
**नेपथ्य** (सं. न.) नाटकांतला पडदा; वेष.
**नेपाल–ळ** (पु.) एक सारक वनस्पति; एक देश; गुळगुळीत; बंदुकीच्या नळीवर तोटी बसविण्याची जागा.
**नेपाळणें** (क्रि.) गुळगुळीत करणें; शांतपणें वाहणें.
**नेपाळा** (प्रा. पु.) चूळ.
**नेपुर** (प्रा. न.) नूपुर, पैंजण.
**नेफा** (फा. पु.) चोळण्यांत नाडी घालण्यासाठीं ठेवलेली जागा. [ढिला.
**नेभळभट, नेभळा** (सं. निर्बल वि.) सैल,
**नेम** (सं. नियम पु.) नियम, व्रत; शिस्त; खूण, लक्ष्य; खांव पुरण्यासाठीं केलेला खळगा. [बरोबर, सरळ.
**नेमका** (वि.) बरोबर तोच; (अ.)
**नेमणूक** (स्त्री.) कामावर योजना; ठराविक वेतन; असामी. [नियमन करणें.
**नेमणें** (क्रि.) योजना करणें, ठरवून देणें;
**नेमधर्म** (पु.) धार्मिक कृत्यें व अकृत्यें यांविषयींचे नियम.
**नेमनिष्ठ** (वि.) नियमनिष्ठ पहा. [गाडणें.
**नेमविणें** (क्रि.) जमिनींत पक्का बसविणें,
**नेमस्त** (वि.) नेमका, बरोबर (मुक्ते० वन० २।८१); वेताचा, मर्यादेंतला; मध्यम; मवाळ, स्वतःस प्रागतिक म्हणविणारा; (अ.) निश्चित.
**नेमळ, नेमाळ्या** (वि.) नेमनिष्ठ.
**नेमानेम** (पु.) ईश्वरी योजना, ब्रह्मलिखित.
**नेमोत्तरपत्र** (न.) निरोप घेऊन गेल्याबद्दल लिहून दिलेलें पत्र.
**नेर** (न.) नदीचें खोरें या अर्थी येणारा प्रत्यय (जसें० जामनेर, पारनेर).
**नेरवा, नेरा** (पु.) सोनाराच्या दुकानांतली झळ असलेली राख. [दिवशीं.
**नेरवां** (अ.) नवव्या किंवा पांचव्या
**नेवता** (सं. निमंत्रण न.) निमंत्रण.
**नेवर** (पु. न.) घोड्याच्या पायाच्या घोटयाची खीळ; घोटे एकमेकांवर घासं नयेत म्हणून त्यांचेवर गादी बांधतात ती.
**नेवार** (न.) तळयाच्या कांठीं किंवा डोंगरांत आपोआप उगवणारें भात.
**नेवरी** (प्रा. वि.) पांढरा (तुका० ११६); (स्त्री.) करंजी.
**नेवारणें** (प्रा. न.) तिरस्कार; नाश; पराभव.
**नेवाळ–ळी** (स्त्री.) रानमोगरी; जाईच्या जातीचें फूल.
**नेवेद्य** (पु.) देवाला अर्पण करण्याचा पदार्थ.
**नेशीव** (वि.) नित्याच्या नेसण्यांत असलेलें (वस्त्र).
**नेसणें** (क्रि.) कमरेपासून खालीं विशिष्ट प्रकारें वस्त्र गुंडाळणें; (न.) नेसलेलें वस्त्र.
**नेस्तनाबूद** (फा. वि.) नष्ट.
**नेहट** (प्रा. न.) लक्ष, चित्त.
**नेहटणें** (प्रा. क्रि.) नेटणें, घुसडणें; आदळणें (र० यो० ७।३४); लक्ष लावून पाहणें.
**नेहटीं** (प्रा. अ.) नेटानें; लक्षपूर्वक, निश्चयानें जवळ (स्वा० दि० १।३।३८).
**नेहमीं** (अ.) सदा, सर्वदा.
**नेहार** (स्त्री.) न्याहाळणें.
**नेहारा** (वि.) धीमा; थंडा.
**नै** (प्रा. स्त्री.) नदी (ज्ञा० १८।२७१).
**नैतिक** (सं. वि.) नीतिविषयक.
**नैत्यिक** (सं. न.) नित्यकृत्य.
**नैन** (न.) नयन; डोळा. [हातखंडा.
**नैपुण्य** (सं. न.) पटुत्व, निष्णातपणा,
**नैमित्तिक** (सं. न.) कांहीं विशेष कारण घडल्यामुळें करावें लागणारें कृत्य.
**नैय्यायिक** (सं. वि.) न्यायशास्त्र जाणणारा.
**नैराश्य** (सं. न.) आशाशून्यता.
**नैवेद्य** (सं. पु.) देवास अर्पावयाचें द्रव्य.
**नैष्कर्म्य** (सं. न.) सर्वकर्मपरित्याग.
**नैश्वर** (सं. नश्वर वि.) नाशिवंत.

कूपर ग्रामोफोन, ...



**नैषध** (सं. वि.) निषध देशासंबंधाचा; (पु.) नल राजा.
**नैष्ठिक ब्रह्मचारी** आजन्म गुरुगृहीं राहून ब्रह्मचाऱ्याचा धर्म कडकडीतपणें पाळणारा.
**नैसर्गिक** (सं. वि.)स्वाभाविक, प्रकृतिसिद्ध.
**नो** (प्रा. अ.) न.
**नोक** (फा. स्त्री.) अग्र, अणी; ऐट; खुबी.
**नोकझोक** (हि. स्त्री.) व्यंग्योक्ति; ऐट.
**नोकदार** (फा. वि.) अणकुचीदार.
**नोकणें** (प्रा. क्रि.) टोचणें; दुःख देणें, छळणें (ज्ञा० ६।३२४); पराभव करणें (ज्ञा० १२।८४); लपविणें (स्वा० दि० ७।५।९१).
**नोकरशाही** (हि. स्त्री.) शिरजोर अधिकारी वर्ग; त्यांचें प्राबल्य असणारी राज्यव्यवस्था.
**नोकल** (प्रा. स्त्री.) चुकवाचुकव. [अपमान.
**नोकिलेपण** (प्रा. न.) छळ; पराभव;
**नोकी** (स्त्री.) पराभव.
**नोकुणें** (प्रा. क्रि.) चुकविणें (ज्ञा० १२।८४).
**नोट** (इं. स्त्री.) चिठ्ठी; कागदी नाणें.
**नोटपेपर** (इं. पु.) पत्र लिहिण्याचा कागद.
**नोटिस** (इं. स्त्री.) सूचना; जाहिरात; लक्ष.
**नोडगा** (वि.) आडदांड.
**नोंद** (स्त्री.) टाचण; वहींत लिहून ठेवणें.
**नोंदणी** (स्त्री.) वहींत लिहून ठेवण्याचें काम.
**नोंदणें** (क्रि.) वहींत लिहून ठेवणें.
**नोबत, नोबद** (स्त्री.) नौबत पहा.
**नोवती** (फा. पु.) गजपालक.
**नोमडे** (प्रा. क्रि.) न मोडे.
**नोहे** (प्रा. क्रि.) न आहे.
**नोर** (पु.) गलबताचें भाडें.
**नोवरा** (पु.) नवरा.
**नोवरी** (स्त्री.) नवरी. [ महिना.
**नोव्हेंबर** (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा अकरावा
**नौ, नौका** (सं. स्त्री.) नाव.
**नौकाखातें** (न.) आरमार खातें.
**नौकादल** (न.) आरमार.
**नौकानयनशास्त्र** (सं. न.) नावाड्याची विद्या; नाविक विद्या. [ जलक्रीडा.
**नौकाविहार** (सं. स्त्री.) नावेंतून करण्याची
**नौगजी** (फा. पु.) राजमंडप.
**नौती** (सं. नव स्त्री.) तारुण्य.
**नौबत, नौबद** (अर. नोबत स्त्री.) डंका, मोठा नगारा.
**नौसेतु** (सं. पु.) नावांचा पूल.
**नौसेना, नौसैन्य** (सं. न.) समुद्रांत लढणारें सैन्य. [ शिपाई.
**नौसेनिक** (सं. पु.) समुद्रांत लढणारा
**न्यसणें** (सं. न्यास क्रि.) ठेवणें.
**न्यहार** (वि.) गुळगुळीत; साफ.
**न्यहाल** (फा. निहाल वि.) उच्च पदवीला चढविलेला; कृपेंतला.
**न्यहाळणें** (सं. क्रि.) बारकाईनें पाहणें.
**न्यात, न्याती** (सं. ज्ञाति स्त्री.) जात.
**न्याबती** (अर. निआमत वि.) चैनीखातर केलेला.
**न्याय** (सं. पु.) इनसाफ, तर्कशास्त्र; पद्धत; दृष्टान्त; म्हण; संस्कृत भाषेंतले जे कित्येक ठळक न्याय मराठींत प्रचारांत आले आहेत, त्यांपैकीं कित्येकांचीं नावें —अंधपरंपरान्याय, अंधहस्तिन्याय, काकतालीयन्याय, गतानुगतिकन्याय, मंडूकप्लुतिन्याय, बीजांकुरन्याय, स्थविरलगुडन्याय इ०

**अंधपरंपरान्याय**—जसें आंधळ्यांच्या मालिकेंत पुढचा मनुष्य जिकडे जाईल त्याच्या मागचा मनुष्य जावयाचा हें ठरलेलें आहे त्याप्रमाणें स्वतःला विचार करण्याची शक्ति असतांहि तो न करतां दुसरा मनुष्य नेईल त्याच्या मागोमाग डोळे झाकून लोक जातात. याला अंध० न्याय म्हणतात.

**अंधहस्तिन्याय**—कांहीं जन्मान्ध हत्तीचें अंग चाचपून पाहून त्याचें वर्णन करूं लागले. ज्यानें पाय चाचपले तो म्हणाला, 'हत्ती हा प्राणी खांबासारखा गोल व उंच आहे.' ज्यानें कान चाचपले तो म्हणाला, 'छेः ! त्याचा आकार सुपासारखा आहे.' तिसऱ्यानें सोंड चाचपली होती तो म्हणाला कीं दोघेंहि चुकले, हत्तीचा आकार सर्पासारखा आहे. याप्रमाणें त्या प्राण्याच्या अंगाचा

एकेक भाग घेऊन प्रत्येकानें केलेलें वर्णन तेवढ्यापुरतें बरोबर असलें तरी तें एकंदर प्राण्याचें वर्णन नव्हे. अज्ञ लोकहि याप्रमाणेंच विषयाच्या एकाच अंशाकडे पाहून हट्टानें आपलें मत प्रतिपादित असतात.

**काकतालीयन्याय**—ताडाच्या झाडावर एक मोठें फळ पिकलें होतें. त्या झाडा वर एक कावळा जाऊन बसायला व तें फळ खालीं पडण्याला एक गांठ पडली. त्यावरून मूर्ख होते ते म्हणूं लागले कीं कावळ्यानेंच तें फळ तोडून खालीं टाकलें. सारांश, खऱ्या कारणाचा शोध न करतां केवळ समान कालीं घडलेल्या गोष्टींमध्यें कार्यकारणसंबंध जुळवूं पाहणें हा वेडेपणा आहे.

**गतानुगतिकन्याय**—एक वृद्ध ब्राह्मण वैश्वदेव करीत असतां नेसलेल्या आखूड धावळीचा काष्टा सुटला. त्याच्या मुलानें हें पाहून ध्यानांत ठेविलें. त्याला वाटलें कीं वैश्वदेव करतांना काष्टा सोडण्याची रीतच आहे. म्हणून तोहि वैश्वदेव करतांना काष्टा सोडूं लागला ! सारांश, लोक केवळ दुसऱ्याचें अनुकरण करणारे असतात. आपण अमुक गोष्ट अशी कां करतों तें त्यांचें त्यानाच कळत नसतें.

**कूपयंत्रघटिकान्याय**—म्हणजे राहाटगाडग्याच्या पोहऱ्यांची सदोदित पालटणारी स्थिति. राहाटगाडगें फिरूं लागलें म्हणजे रिकामे पोहरे खालून पाण्यानें भरून वर येतात. त्यांतलें पाणी ओतलें जातें व ते रिकामे होऊन पुनः खालीं जातात, आणि पुनः भरून वर येतात. अशीच माणसांची स्थिति सदोदित पालटली जात असते.

**घुणाक्षरन्याय**—किड्यानें कोरलेल्या लांकडावरच्या चित्रविचित्र आकृतींत एखाद्यावेळीं एकाद्या अक्षराचें साम्य सहजगत्या आढळून आलें तर ती केवळ यदृच्छेची किंवा योगायोगाची गोष्ट म्हणावयाची.

**दंडापूपन्याय**—एका काठीला पोळी बांधून ठेविली होती. ती काठी उंदरानें खाल्ली असें जर एकाद्यानें म्हटलें तर तें मान्य करण्यापूर्वी काठीला बांधलेली पोळीहि उंदरानें खाल्ली ही गोष्ट कबूल करावी लागते. कारण, त्या दोन्ही गोष्टी संबद्ध आहेत; व उंदरानें काठी खाण्यापेक्षां पोळी खाणें ज्यास्त संभवनीयहि आहे. सारांश, दुष्कर गोष्टीची संभवनीयता स्वीकारण्यापूर्वी तिच्याशीं संबद्ध अशी सुकर गोष्ट जी असेल तिची संभवनीयता अगोदर मानावी लागते.

**मंडूकप्लुतिन्याय**—मंडूक म्ह. बेडूक आणि प्लुति म्ह. उडी मारीत जाणें. बेडकाप्रमाणें उड्या मारीत मारीत (म्हणजे मधला कांहीं भाग गाळून) भराभर केलेल्या कामाला मं० म्हणतात.

**बीजांकुरन्याय**—म्हणजे जसें बीज पेरावें तसा अंकुर फुटतो. जसें पेरावें तसें उगवतें. याला दुसराहि एक अर्थ आहे. बीज आधीं कीं अंकुर आधीं हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. कारण बीजापासून पुढें अंकुर ही गोष्ट खरी असली तरी त्या अंकुराला पुढें फळें येऊन त्यांतच बीज निर्माण होत असतें हेंहि तितकेंच खरें आहे. सारांश, परस्पराला परस्पर कारण अशा रीतीनें परस्पराशीं संबद्ध असलेल्या दोन गोष्टींची कालानुपूर्वता ठरवितां येत नाहीं.

**स्थविरलगुडन्याय**—स्थविर म्हणजे वृद्ध माणूस. त्यानें फेकलेली काठी नेमक्या जागीं जाऊन पडेलच असा नेम नसतो; कदाचित् पडेल कदाचित् पडणार नाहीं. त्याप्रमाणें कार्यसिद्धि अमुक उपायानें होईलच असें निश्चयानें म्हणतां येत नाहीं; अशा प्रसंगीं हा न्याय लावतात. व्यवहारांतल्या अनुभवसिद्ध गोष्टींचें विवेचन करणारे असे शेकडों न्याय संस्कृत भाषेंत आहेत. मराठी भाषेंतल्या कित्येक म्हणींचाहि न्यायासारखा उपयोग करतात. उदा०—'गाड्यावर नाव, नावेवर गाडा, ' ' पुढच्यास ठेच,

मागचा शहाणा,' 'हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे ? ' इत्यादि.
**न्यायमनमुना** (सं. अर. पु.) चौकशी.
**न्यायमंदिर, न्यायसभा** (सं. न.) रयतेला जेथें न्याय देण्यांत येतो तें स्थळ, कोर्ट.
**न्यायाधीश** (पु.) न्याय देणारा अधिकारी.
**न्यायशास्त्र** (सं. न.) तर्कशास्त्र.
**न्यायसंगत** (सं. वि.) न्यायास धरून असलेलें. [ बसण्याची जागा.
**न्यायासन** (सं. न.) न्यायाधिशाची
**न्याय्य** (सं. वि.) न्यायसंगत, न्यायाचें.
**न्यारा** (प्रा. वि.) निराळा.
**न्यास** (सं. पु.) ठेव, गहाण; छाप; त्याग; मंत्रांनीं देवाच्या मूर्तीच्या अवयवांवर देवत्वाची स्थापना करणें; सोपविणें.
**न्याहार** (प्रा. स्त्री.) दृष्टि (भा० ६।५९).
**न्याहारणें** (प्रा. क्रि.) न्याहाळणें (भा० १।२४।६८). [ फराळ.
**न्याहारी** (फा. निहारी स्त्री.) सकाळचा
**न्याहारू** (प्रा. पु.) कटाक्ष.
**न्याहाली** (प्रा. स्त्री.) परांची गादी (कथासारा० २२।६९).
**न्याह्याळणें** (क्रि.) निरखणें.
**न्यून** (सं. वि.) उणें, कमी; (न.) उणीव.
**न्यूनगंड** (पु.) आपण कांहीं कमी आहों अशी वृत्ति.
**न्यूनता** (सं. स्त्री.) उणीव, कमीपणा.
**न्यूमोनिया** (इं. पु.) फुप्फुसज्वर.
**न्हाणी** (स्त्री.) स्नानगृह.
**न्हाणें** (क्रि.) स्नान करणें.
**न्हावी** (पु.) हजाम, नापित.

---

## प

**प** मराठी व्यंजनमालेंतील एकविसावें व्यंजन
**प** (समासांत उत्तरपदीं वि.) पाळणारा; पिणारा. [ वगैरे खेळणारा.
**पइलवान** (पु.) पहिलवान; कुस्त्या, दांडपट्टा
**पईज** (स्त्री.) पैज.
**पंक** (प्रा. पु.) आश्रय; पद. [ केलेला पाक.
**पंक** (सं. पु.) चिखल; साखर, गुळ इत्यादींचा
**पंकज** (सं. न.) कमळ.
**पकड** (हिं. स्त्री.) एका पेचाचें नांव; प्रतिपक्ष्याला ज्याचा फायदा मिळेल असा भाषणांतला दोष; युक्ति; चिमटा; घट्ट धरून ठेवण्याचें हत्यार.
**पकडणें** (क्रि.) धरणें.
**पकडसमन्स** (हिं. इं. न.) निकडीचा हुकूम; पकडण्याविषयींचा हुकूम.
**पकोडा–डी** (पु. स्त्री.) भजें.
**पक्का** (सं. पक्व वि.) पिकलेला; भाजलेला; दृढ; पुरा; टिकाऊ.
**पंक्ति** (सं. स्त्री.) ओळ, रेघ; संगति.
**पंक्तिपठाण, पंक्तिबारगीर** (सं. हिं. पु.) भोजनभाऊ.
**पंक्तिप्रपंच** (सं. पु.) पंक्तींत वाढतांना केलेला पक्षपात; पंक्तिभेद.
**पंक्तिभेद** (सं. पु.) पंक्तिप्रपंच पहा.
**पक्व** (सं. वि.) पिकलेला ; प्रौढ; परिणत.
**पक्वान्न** (सं. न.) मिष्टान्न; उंची अन्न.
**पक्वाशय** (सं. न.) कोठा; पोट; अन्न पचण्याची जागा.
**पंख** (सं. पक्ष पु.) पक्ष, पीस; वर्ग.
**पखरडा** (पु.) पसारा, अव्यवस्था.
**पखरणें** (क्रि.) अस्ताव्यस्त रीतीनें पसरणें, उधळणें. [ क्रिया.
**पखरणी** (स्त्री.) विस्कळित करण्याची
**पखवाज** (हिं. पु.) मृदंग, तबला. [ साधन.
**पंखा** (सं. पक्ष पु.) विंझणा, वारा घेण्याचें
**पखाल** (सं. पयस् + खल्ल स्त्री.) पाणी आणण्याची चामड्याची मोठी गोणी.
**पंखेरू** (न.) पाखरूं, पक्षी.
**पग** (सं. पद न.) पाऊल; पावलाची खूण; मूलतत्त्व; बुद्धिबळाच्या पटांतलें घर.
**पगडबंद** (हिं. पु.) पागोटें बांधणारा.
**पगडा** (पु.) फाशावरचें चिन्ह; वर्चस्व.
**पगडी** (हिं. स्त्री.) लहान किंवा शिवलेलें पागोटें.
**पगडी फिरविणें** मत बदलणें.
**पंगत** (सं. पंक्ति स्त्री.) रांग, ओळ, भोजन.
**पगदस्ती** (फा. वि.) बुद्धिबळाच्या खेळांतली एक संज्ञा; कायम, न बदलणारें; सावधगिरीचें. प० धरणें—बोलण्यांत पकडणें.

**पगार** (पोर्तु. पागार पु.) मुशाहिरा; वेतन.
**पगार** (पु.) एक प्रकारची होडी.
**पंगिस्त** (प्रा. वि.) परावीन; पायानें अधू किंवा लंगडा. [ निराधार.
**पंगु** (सं. वि.) पांगळा; लंगडा; असमर्थ;
**पग्या** (पु. स्त्री.) सोन्याची लगड पाडण्यासाठीं असलेली लोखंडी पळी.
**पंघणें** (क्रि.) पेंगणें.
**पघळ** (वि.) विस्तृत, पाल्हाळिक.
**पघळणें** (क्रि.) वितळणें, पसरणें.
**पघा** (स्त्री.) सांचा, रस ओतण्याचें पात्र.
**पचकी** (स्त्री.) दमडीच्या किंमतीचें नाणें.
**पंच** (सं. वि.) पांच; (पु.) लवाद; तंटा तोडण्यासाठीं उभय पक्षांनीं मान्य केलेले लोक. [ समुदाय.
**पंचक** (सं. न.), **पंचकडी** (स्त्री.) पांचांचा
**पंचकल्याणी** (सं. वि.) ज्याच्या अंगावर पांच शुभ चिन्हें आहेत असा.
**पंचकोश** (सं. पु.) अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय अशीं देहाचीं पांच आवरणें.
**पंचक्रोशी** (सं. स्त्री.) क्षेत्राच्या भोंवतालची पांच कोस जमीन; पांच कोसांच्या आंतील भोंवतालचीं गांवें.
**पंचखाद्य** (अने.) ख हें अक्षर ज्यांच्या आरंभीं आहे अशा खाण्याच्या पांच वस्तु (खारीक, खोबरें, खसखस, खिसमीस आणि खडीसाखर);
**पचंग** (स्त्री.) कास मारणें.
**पंचगव्य** (सं. न.) गाईचें दूध, दहीं, तूप, मूत्र व शेण यांचें मिश्रण. [ न येणें.
**पचणें** (सं. क्रि.) जिरणें; उघडकीस
**पंचतत्त्वें** (सं. न.) पांच मुख्य तत्त्वें— पृथ्वी, आप्, तेज, वायु व आकाश.
**पंचत्व** (सं. न.) देहांतील पांच तत्त्वें निरनिराळीं होणें; मरण.
**पंचद्रविड** (सं. पु.) ब्राह्मणांतले पांच प्रकार—तैलंग, द्राविड, कर्नाटकी, महाराष्ट्रीय व कोंकणी.
**पचन** (सं. न.) जिरणें, परिपाक.
**पंचपंच उषःकाल** (सं. पु.) सूर्योदयापूर्वीचा पांच घटकांचा काळ.
**पचपचीत** (वि.) वेचव, नीरस.
**पंचपात्र** (सं. न.), **पंचपात्री** (स्त्री.) पाण्याचें भांडें.
**पंचपाळें** (न.) देवपूजेचें किंवा मसाल्याचें साहित्य ठेवण्याचें पांच खणांचें पात्र.
**पंचप्राण** (सं. पु.) प्राण, अपान, व्यान, उदान आणि समान, असे पांच प्राण; अतिशय प्रियकर वस्तु.
**पचंबा** (पु.) दर श्रावण्या सोमवारीं शाहीर लोक लावण्या, पोवाडे इ० म्हणून समारंभ करतात तो.
**पंचबाण** (सं. पु.) मदन.
**पंचभेळ** (स्त्री.) अनेक पदार्थांचें मिश्रण.
**पंचम** (सं. पु.) गाण्यांतला पांचवा स्वर; तंबाखू; (वि.) पांचवा.
**पंचमहापातकें** (न.) ब्रह्महत्या, चोरी, मद्यपान, व्यभिचार व हीं चार पातकें करणारांशीं संगत ठेवणें, अशीं पांच महापातकें. [ आकाश.
**पंचमहाभूतें** पृथ्वी, आप्, तेज, वायु व
**पंचमहायज्ञ** (सं. पु.) देवयज्ञ, भूतयज्ञ, ऋषियज्ञ, पितृयज्ञ व मनुष्ययज्ञ.
**पंचमालाप** (सं. पु.) कोकिळेचा स्वर.
**पंचमी** (सं. स्त्री.) पांचवी तिथि; (व्या.) पांचवी विभक्ति.
**पंचरसी** (सं. वि.) पांच धातूंच्या मिश्रणाचें.
**पंचराशिक** (सं. न.) बहुराशिक (संयुक्त प्रमाणांतील चार पदांपैकीं संयुक्त गुणोत्तरांतील दोन पदें आणि साध्या गुणोत्तरांतील एक पद हीं दिलीं असतां साध्या गुणोत्तरांतील दुसरें पद काढण्याची रीत). [ बिडलोण, संचळ.
**पंचलवणें** (न.) मीठ, बांगडखार, सैंधव,
**पंचवकार** (पु.) विद्या, वपु, वाचा, वस्त्र आणि विभव हे ' व ' नें प्रारंभ होणारे पांच शब्द.
**पचविणें** (क्रि.) शिजविणें; पचन करणें.
**पंचविशी** (स्त्री.) पंचवीस वर्षांचें वय.
**पंचवेउळी** (प्रा. ना.) पांच नांग्यांची इंगळी.
**पंचहत्यारी** (पु.) ढाल, तलवार, तीरकमान, बंदूक व भाला हीं पांच हत्यारें धारण करणारा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


**पंचा** (पु.) लहान अर्धे धोतर.
**पंचाईत** (हि. पंचायत स्त्री.) पंच; पंचा-मार्फत चौकशी; अडचण; उठाठेव.
**पचांग** (न.) कास मारणें.
**पंचांग** (सं. न.) तिथि, वार, नक्षत्र,योग व करण यांचें पत्रक.
**पंचांगुळें** (न.) लहान मुलांच्या हाताच्या बोटांत घालण्याचा एक अलंकार; (वि.) पांच अंगें असलेलें.
**पंचाग्निसाधन** (सं. न.) चार बाजूस चार अग्नि व वर सूर्य अशा स्थितींत केलेलें तप.
**पंचानन** (सं. पु.) सिंह.
**पंचामृत** (सं.) दूध, दहीं, तूप, मध व साखर यांचें मिश्रण; अनेक रुचकर पदार्थांच्या मिश्रणानें तयार केलेलें तोंडीलावणें.
**पंचायत** (स्त्री.)पंच; पंचामार्फत चौकशी.
**पंचायतन** (सं. न.) पांच देवतांचा समुदाय; एकचित्त असे पांचजण.
**पंचारती** (सं. स्त्री.) पांच दिवे तवकांत ठेवून ओवाळणें.
**पंचाळ** (पु.) एक जात (सुवर्णकार).
**पंचाक्षरी** (सं. पु.) मांत्रिक; भूतबाधा नाहींशी करणारा. [मिश्रण.
**पंचीकरण** (सं. न.) पंचमहाभूतांचें विशिष्ट
**पंचेंद्रियें** (न. अने.) डोळे, कान, नाक, वाचा व त्वचा हीं पांच ज्ञानप्राप्तीचीं साधनें. [पोपट).
**पंची, पंछी** (हिं. पु.) पक्षी, (विशेषत:
**पंचू** (पु.) पक्षी; (वि.) चतुर.
**पच्ची** (स्त्री.) पाणउतारा; फजिती.
**पछाडणें** (क्रि.) कुस्तींत पाडणें; जिंकणें; पकडणें; गाठणें; पिच्छा पुरविणें.
**पंज** (पु.) झाळण्याच्या कामात उपयोगी पडणारी एक पूड.
**पंजर** (सं. न.) पिंजरा; सांगाडा.
**पंजा** (फा. पु.) पांच ठिपक्यांचें पत्त्याचें पान; पसरलेला हात; वाघ वगैरे प्राण्यांचीं नखें; पांच पवित्र पुरुष दर्शविणारा मुसलमान लोकांचा एक लोखंडाचा हात.
**पंजो** (पु.) नेसण्याचा पंचा; (वि.) पणजी.
**पंजामंजा** (पु.) कलगीतुऱ्याचीं गाणीं.
**पट** (सं. पु.) वस्त्र; सोंगट्या, बुद्धिबळें इ० ज्यावर मांडतात तें विशिष्ट प्रकारचें वस्त्र; यादी; तक्ता; पडदा; (स्त्री.) गुण (उदा० पांचपट—पांच-गुणी).
**पटई** (हिं. स्त्री.) कडीपाट; तक्तपोशी.
**पटकथा** (स्त्री.) चित्रपटाची लिहिलेली गोष्ट.
**पटकणें** (हिं. क्रि.) पाडणें.
**पटकन्** (अ.) त्वरेनें.
**पटका** (सं. पट्ट पु.)फेटा; निशाण; ध्वज.
**पटकावणें** (क्रि.) पटकन् मिळविणें.
**पटकी** (स्त्री.) महामारी; वाखा.
**पटकुरें, पटकूर, पटकुळ** (सं. पट न.) वस्त्राचा तुकडा.
**पटकोडगा** (वि.) निगरगट्ट; निलाजरा.
**पटकोंडगें** (न.) निजविलें असतां चटकन् उठून बसणारें बाहुलें.
**पटंगा** (प्रा. पु.) आश्रय (तुका० २९९६).
**पटणी** (स्त्री.) हलके तांदूळ. [होणें.
**पटण** (क्रि.)जुळणें; पसंत होणें; स्वीकार
**पटपट** (अ.) लवकर.
**पटरी** (स्त्री.) फळी. [समूह.
**पटल, पटळ** (सं. न.) पडदा; आच्छादन;
**पटवर्धन** (पु.) एक आडनांव; (वि.) घोड्याचा एक प्रकार.
**पटवा** (पु.) दागिने पटविण्याचें काम कर-णारा कारागीर.
**पटवारी** (पु.) कुळकर्णी. [स्वीकारणें.
**पटविणें** (क्रि.) घट्ट ओवणें; (हुंडी)
**पटवेकरी** (पु.) गांठण्याचें काम करणारा.
**पटाईत** (सं. पट्टायत पु.) पट्टा खेळ-णारा; वाघाची एक जात; (वि.) तरबेज , निष्णात.
**पटांगण** (सं. न.) मैदान.
**पटापट, पटापटा** (अ.) त्वरेनें; चटकन्.
**पटाशी** (स्त्री.) मोठें किंकरें.
**पटी** (सं. पट स्त्री.) वस्त्र; (स्त्री.) खिडक्यांस तावदानें बसविण्याचें लुकण.

**पटु** (सं. वि.) कुशल; निष्णात.
**पटू** (सं. पट पु.) वस्त्र. [कापड.
**पट्ट** (सं. न.) रेशमी वस्त्र; तलम रंगीत
**पट्टण, पत्तन** (सं. न.) शहर, नगर.
**पट्टराणी** (सं. पट्टराज्ञी स्त्री.) मुख्य किंवा अभिषिक्त राणी.
**पट्टशिष्य** (सं. पु.) मुख्य शिष्य.
**पट्टा** (सं. पट पु.) एक प्रकारची लांब दुधारी तलवार; ज्ञाड रेघ; कमरबंद; कौलनामा. [निष्णात.
**पट्टाईत** (पु.) पट्टा खेळणारा; पटाईत;
**पट्टी** (सं. पट्ट स्त्री.) अरुंद व लांबट तुकडा; कर; वर्गणी; दुमड; चुणी; विडा; किनार; रांग.
**पट्टीचा** (वि.) विद्वान्; निष्णात.
**पट्टीपछोडी, पट्टीपासोडी** (स्त्री.) एक कर.
**पट्टू** (सं. पट्ट पु.) लोकरीचें वस्त्र.
**पट्टेवाला** (हिं. पु.) शिपाई.
**पठडा** (वि.) धष्टपुष्ट; पसरट; फताडा.
**पठडी** (वि.) शैली, परंपरा.
**पठण, पठन** (सं. न.) वाचणें; पाठ म्हणणें.
**पठाड** (स्त्री.) खूप रुंद पाठ; बैलावरचें खोगीर.
**पठाडी गोन** ढोबळ चूक; मोठा दोष.
**पठाण** (न.) रुंद व चपटें कौल; (पु.) मुसलमानांतली एक जात.
**पठार, पठारा** (सं. पृष्ठ पु.) पर्वतावरचा सपाट देश; नावेचा तळ; बैलाचा तंग; तयारी.
**पठावा** (प्रा. पु.) पाठबळ; मदत.
**पाठिंगा** (पु.) पाठिंबा; मदत करणारा; आधार. [बहाद्दर.
**पठ्ठा, पठ्ठ्या** (वि.) धष्टपुष्ट व बळकट;
**पड** (स्त्री.) झाडावरून आपोआप गळून पडलेलें फळ; माघार; दुर्दैव; पडीत जमीन; शिधा, अन्नसामुग्री.
**पडकणें** (प्रा. क्रि.) सवकणें. [रिकामें.
**पडकर** (वि.) पडकें; उपयोगांत न आणलेलें;
**पडकें** (वि.) पडावयास झालेलें.
**पडकेल** (पु.) आपलीं माणसें; बैल किंवा अंगमेहनत इ० च्या योगानें दुसऱ्या शेतकऱ्यास मदत करणारा शेतकरी.
**पडकेस** (पु.) पापणीच्या खालीं अंतर्भागीं उगवणारे केस.
**पडकोट** (पु.) किल्ल्याच्या बाहेरील तट.
**पडखळण** (प्रा. न.) पायांतलीं जोडवीं निसटून जाऊं नयेत म्हणून चांदीचें वेढें त्यांना लागून घालतात तें; कानाचें भोंक बुजूं नये म्हणून त्यांत घालायचें हलकें तारेचें वेढें.
**पडखळणें** (प्रा. क्रि.) आदळणें; उठावणें.
**पडंग** (वि.) पडिक.
**पडगा, पडघा** (पु.) काष्ठपात्र; एक वाद्य.
**पडगादी** (प्रा. स्त्री.) गालीचा.
**पडवी** (स्त्री.) खांबाचा तळखडा; धातूचा रस ओतण्याचा सांचा; घराचे पाठीमागील तळमजल्याचा भाग. [भाग.
**पडगें, पडघें** (न.) नगाऱ्याचा धातुमय
**पडघण** (स्त्री.) सोन्याचा रस ओतून कांडी करण्याचें ओतवण.
**पडघम** (न.) चर्मवाद्य.
**पडघर** (न.) उजाड झालेलें घर.
**पडघा** (पु.) लाकडाचा वाडगा.
**पडघाणीयें** (प्रा. स्त्री.) कळसाची बैठक; मध्यवर्टेची जागा.
**पडघी** (स्त्री.) पेल्याची बैठक; पेंदी.
**पडघें** (न.) नगाऱ्याचें धातुमय पात्र.
**पडछाया** (सं. प्रतिच्छाया स्त्री.) प्रतिबिंब. [एक मांसपिंड.
**पडजीभ** (स्त्री.) जिव्हामूलावर लोंबणारा
**पडझड** (स्त्री.) मोडतोड.
**पडण** (न.) हंगाम; जमण्याची ठराविक जागा; विश्रांतिस्थान; भूषण.
**पडणें** (क्रि.) आधार तुटून खालीं येणें; निजणें; थांबणें; असणें; किंमत द्यावी लागणें.
**पडतन** (न.) जमिनीची पट्टी.
**पडताळणें** (क्रि.) मेळ पाहणें.
**पडताळा** (पु.) मेळ; जप; प्रयोग.
**पडती** (स्त्री.) अपकर्ष; उतरती कळा.
**पडथळ** (सं. परस्थल न.) अंगांत येणाऱ्या निरनिराळया देवतांकडून किंवा पिशाच्चांकडून येणाऱ्या उत्तराचा पडताळा पाहणें.

**पडद** (स्त्री.) ढेपाळयाला गूळ चिकटूं नये म्हणून आंत घातलेलें फडकें.
**पडदणी** (स्त्री.) स्नानाच्या वेळीं नेसायचें बायकांचें लहानसें वस्त्र.
**पडदपोशी** (फा. स्त्री.) पडदा, गौप्य.
**पडदळ** (न.) गांवीं जातांना बरोबर नेण्याचें सामान. [ पट्टा.
**पडदळा** (प्रा. पु.) तरवार अडकविण्याचा
**पडदा** (फा. पु.) आड केलेलें वस्त्र; दृष्टीवर येणारा पापुद्रा; आळा, मर्यादा, निर्बंध; सतारींत स्वरांच्या जागा मुकर करण्यासाठीं तातीनें बांधलेल्या धातूच्या वाकविलेल्या सळया.
**पडदा** (स्त्री.) लहान भिंत, कूड, चांदई.
**पडदासी** (प्रा. स्त्री.) दासीची दासी.
**पडनांव** (न.) टोपणनांव, व्यावहारिक नांव.
**पडव** (प्रा.स्त्री.) बरोबरी; शोभा; शृंगार; आवरण;प्रतिष्ठा(मोरो०वन० ७।२०३); (न.) अतिशयोक्तीची स्तुति; उसना आणिलेला आविर्भाव.
**पडवणें** (प्रा. क्रि.) शृंगारणें.
**पडपावणी, पडपणी** (स्त्री.) न्हाव्याचा वार्षिक तनखा.
**पडपेंठ** (स्त्री.) संपूर्ण हकीकत. [ भिंत.
**पडभिंत** (स्त्री.) बाहेरची आणखी एक
**पडभोजन** (न.) लग्नांत वरपक्षाकडून वधूपक्षाच्या मंडळीस देण्यांत येणारी मेजवानी.
**पडम** (न.) गोणपाट. [अधिकार.
**पडलें पान** (न.) गांवासंबंधाचा सर्व
**पडवळ** (सं. न.) एक फळभाजी.
**पडवी** (स्त्री.) ओसरी.
**पडशाळा** (स्त्री.) उतारूंसाठीं देवालया-लगत बांधलेली धर्मशाळा.
**पडशी** (स्त्री.) कंठाळ; दोन बाजूस तोंडें असून मध्यें जोडलेली पिशवी.
**पडसर** (वि.) पडकें झालेलें; ओसाड.
**पडसाई** (प्रा. पु.) झाळवेपण.
**पडसाद** (सं. प्रतिशब्द पु.) प्रतिध्वनि.
**पडसार** (वि.) उजाड किंवा पडीत (जमीन).
**पडसाळ** (स्त्री.) पडशाळा.
**पडसें** (न.) सर्दीमुळें नाकांतून पाणी गळणें.

**पडळ** (सं. पटल न.) पडदा.
**पडळी** (स्त्री.) जमाव, समुदाय.
**पडाव** (पु.) सैन्याचा तळ; होडी, नाव.
**पडासणें** (प्रा. क्रि.) उलगडा करणें.
**पडाळ, पडळ** (सं. परालय स्त्री.) शेतांतली झोपडी.
**पडिकर** (प्रा. वि.) डोळस; सुंदर.
**पडिकार** (सं. प्रतिकार पु.) उपाय.
**पडिघणें** (प्रा. क्रि.) धरणें.
**पडिघा** (प्रा. पु.) तस्त, पीकदाणी.
**पडिघाइणें** (प्रा. क्रि.) बोलणें; दावणें; धरणें. [ आदळणें.
**पडिघातणें** (प्रा. क्रि.) स्वाधीन करणें;
**पडिघापणें** (प्रा. क्रि.) व्यापणें.
**पंडित** (सं. पु.) विद्वान्. [समजणारा.
**पंडितंमन्य** (वि.) स्वतःस मोठा विद्वान्
**पंडितराव** (पु.) शिवाजीमहाराजांच्या अष्टप्रधानांपैकीं एक.
**पडिताळा** (प्रा. पु.) अनुभव, प्रतीति.
**पडिपा** (प्रा. स्त्री.) शोभा.
**पडिपाड** (प्रा. पु.) बरोबरी, तुलना; युक्ति; थोरवी; व्याप्ति.
**पडिपाडें** (प्रा.अ.) सारखें (अमृ० ७।२८८); (वि.) सारखें.
**पडिभरू, पडिभारू** (प्रा. पु.) अधिक-पण; सोवती (ज्ञा० १२।३७); (वि.) श्रेष्ठ (दा० १।७।६).
**पडिभार, बडिवार** (पु.) वैभव, थोरवी; मोठेपणा; वढाई. [ ९।२१).
**पडियंत** (प्रा.स्त्री.) प्रतिष्ठा (शुभा० उद्योग०
**पडियावो** (प्रा. पु.) आवड.
**पडिसा** (प्रा. पु.) पडसाद.
**पडिसाई** (सं. प्रतिच्छाया स्त्री.) पडसावली.
**पडी** (स्त्री.) पड; माघार. [जागा.
**पडीक, पडीत** (वि.) रिकामी पडलेली
**पडें** (न.) जनावराचें प्रेत.
**पडोशी-सी** (पु.) शेजारी.
**पडोसा** (हिं. पु.) शेजार; पडताळा.
**पड्या** (प्रा. वि.) नम्र; सुस्त; मंद.
**पंड्या** (पु.) एक जातीचा ऊंस; उत्तर हिंदुस्थानांतील एक ब्राह्मणाची जात किंवा त्या जातीचा इसम.

**पडयाल** (अ.) पलीकडे.
**पंड्यारोग** (पु.) पंडुरोग.
**पढणें** (सं. पठ् क्रि.) शिकणें.
**पढतमूर्ख** (वि.) शिकलेला असून व्यवहारज्ञानशून्य.
**पंढरी** (स्त्री.) पंढरपूर.
**पढळ** (न.) टाळ. [ करणारा वैद्य.
**पढिकर** (प्रा. पु.) सहाय्यक; रोग बरे
**पढियंता** (प्रा. वि.) लाडका, प्रिय.
**पढियावो** (प्रा. पु.) आवड (ज्ञा० ९।७).
**पढियासणें** (प्रा. क्रि.) भासणें.
**पढियें** (प्रा. वि.) आवडतें.
**पढियेणें** (प्रा. वि.) आवडतें.
**पढीक** (वि.) पढलेला, शिकलेला.
**पण** (सं. पु.) पैज, प्रतिज्ञा; पैजेची रक्कम; ज्वानी; (अ.) परंतु. [ कणीस.
**पणंज, पणजें** (न.) पोकळ दाणा किंवा
**पणजा** (सं. प्रार्य्यक पु.) आजाचा बाप.
**पणजोळ** (न.) बापाचें किंवा आईचें आजोळ. [ मूल.
**पणतवंड** (न.) नातवाचें किंवा नातीचें
**पणती** (स्त्री.) मातीची दिवली; नातवाची किंवा नातीची मुलगी. [ मुलगा.
**पणतू** (पु.) नातवाचा किंवा नातीचा
**पणंद** (न.) पणंज पहा.
**पणपणें** (क्रि.) बद्धमूल होणें, जोरानें वाढणें; भरभराटणें.
**पणवानक** (सं. पणव + आनक. पु.) मृदंग.
**पणस** (न.) फणस.
**पणासणें** (प्रा. क्रि.) रचणें.
**पणित** (वि.) शब्द दिलेला.
**पणीत** (न.) सोनाराचें हत्यार.
**पण्य** (सं. वि.) विकावयाचें.
**पण्यांगना** (सं. स्त्री.) वेश्या.
**पत** (स्त्री.) सचोटीविषयींचा दुसऱ्याचा विश्वास; वजन; अब्रू.
**पंत** (सं. पंडित पु.) अष्ट प्रधानांतला प्रत्येक; गृहस्थधर्मी ब्राह्मण.
**पतकर** (पु.) अंगीकार, स्वीकार.
**पतकरणें** (क्रि.) स्वीकारणें; अंगावर घेणें; परवडणें.
**पतकी** (पु.) पथकावरचा मुख्य अधिकारी.
**पतंग** (सं. पु.) दिव्यावर झडप घालणारा एक क्षुद्र जीव; वावडी; पक्षी; सूर्य.
**पतंगी** (स्त्री.) पाण्यांत उडी टाकण्याचा एक प्रकार. **पतंगी बाळी**—कानांतील एक प्रकारची बाळी.
**पतन** (सं. न.) पडणें; नाश.
**पतपेढी** (स्त्री.) लोकांनीं आपापसांत संयुक्त भांडवलावर काढलेलें सावकारी दुकान.
**पंतप्रधान** (सं. पु.) पेशवा.
**पतर** (न.) लाकडाचें अथवा भोपळ्याचें भिक्षापात्र (एक० ३९३३).
**पतवंड** (न.) नातवाचें किंवा नातीचें मूल.
**पतळी** (स्त्री.) सोनें, लोखंड इ. धातु तोडण्याचें एक पोलादी हत्यार; छत्री.
**पताक, पताका** (सं. स्त्री.) निशाण, लहान ध्वज.
**पति** (सं. पु.) धनी, स्वामी; नवरा.
**पतिकर** (सं. प्रतिकार पु.) उपाय; अनुभव.
**पतिंगा** (पु.) मोठें वल्हें; वल्ह्याचा दांडा.
**पतित** (सं. वि.) भ्रष्ट; दुराचारी.
**पतितपरावर्तन** (सं. न.) धर्मभ्रष्ट झालेल्यांना परत पूर्वींच्या धर्मांत घेणें.
**पतितपावन** (सं. पु.) पतितांचा उद्धारकर्ता (परमेश्वर).
**पतिव्रता** (सं. स्त्री.) सती, साध्वी.
**पतेमारी** (स्त्री.) जलद चालीचें गलबत.
**पंतोजी** (पु.) शिक्षक.
**पत्तन** (सं. न.) नगर; शहर.
**पत्ता** (हिं. पता पु.) ठाव, ठिकाण; पान.
**पत्ति** (सं. न.) एक हत्ती, एक रथ, तीन घोडे व पांच पायदळ शिपाई.
**पत्थर** (सं. प्रस्तर पु.) धोंडा, दगड.
**पत्नी** (सं. स्त्री.) लग्नाची स्त्री, भार्या, बायको.
**पत्य** (प्रा. स्त्री.) पत, सचोटी.
**पत्र** (सं. न.) पान; चिठ्ठी.
**पत्रकार** (पु.) वृत्तपत्राचा व्यवसाय करणारा.
**पत्रपांडित्य** (न.) वृत्तपत्र-व्यवसाय.
**पत्रक** (सं. न.) टाचण, तक्ता.
**पत्रदर्शनीं** (अ.) पत्र पाहतांच.
**पत्रा** (पु.) धातूचा पातळ सपाट तुकडा.

**पत्राज, पत्रास** (स्त्री.) मिजास, डौल, दिमाख.
**पत्रावळी** (सं. पत्रावलि स्त्री.) झाडाचीं पानें चोयीनें टाचून केलेलें पात्र.
**पत्रासिणें** (प्रा. क्रि.) शृंगारणें; रचणें.
**पत्रिका** (सं. स्त्री.) लहान पत्र; जन्मपत्रिका.
**पत्री** (सं. स्त्री.) निरनिराळ्या झाडांच्या पानांचा समूह; जायपत्री.
**पंथ** (सं. पथ पु.) मार्ग; संप्रदाय.
**पथ** (सं. पु.) मार्ग. [ टोळी.
**पथक** (सं. पतक न.) शंभर घोडेस्वारांची
**पथकर** (पु.) कामाचा स्वीकार.
**पथकेलष्कर** (न.) सरंजामी सरदार व शिलेदार शिपाई वगैरे लोकांची नेमणूक नोंदण्याचें सदर.
**पथारी** (हि. स्त्री.) अंथरूण, बैठक.
**पथिक** (सं. पु.) वाटसरू.
**पथ्य** (सं. वि.) हितकारक; (न.) दुखणेकऱ्यांस हितकारक असें नियमित खाद्य. **पथ्यावर पडणें**—फायदेशीर होणें.
**पथ्यकर** (सं. वि.) हितकारक.
**पद** (सं. न.) पाऊल, अधिकार; शब्द; कवितेचा एक प्रकार; वर्गमूळ, घनमूळ.
**पदक** (सं.न.) एक कंठभूषण; बिल्ला; साखरेच्या गांठीचा प्रत्येक भाग. [झालेला.
**पदच्युत** (सं. वि.) अधिकारपदापासून भ्रष्ट
**पदन्यास** (पु.) डौलदार पाऊल टाकणें.
**पदलालित्य** (सं. न.) वाक्यांतलें पदरचनेचें सौंदर्य.
**पदर** (सं. पल्लव पु.) वस्त्राचा शेवट; आश्रय; स्वतःचा संग्रह; रजोदर्शन; अंतर. **पदर पसरणें**—फार काकळूत करणें; **प० मोड करणें**—पूर्वी मिळवून ठेविल्यापैकीं खर्च करणें; **प० ला खार लागणें**—नुकसान सोसावें लागणें; **पदरीं पडणें**—मिळणें.
**पदवी** (सं. स्त्री.) पद, अधिकार, मरातब; नांवापुढचें उपपद.
**पदाति** (सं. पु.) पायदळांतला शिपाई.
**पदार्थ** (सं.पु.) वस्तु, जिन्नस; पदाचा अर्थ.
**पदोपदीं** (अ.) क्षणोक्षणीं, वारंवार.
**पद्धत, पद्धति** (सं. स्त्री.) रीत, मार्ग.
**पद्धतवार** (अ.) योग्य पद्धतीनें.
**पद्धति** (सं. स्त्री.) रीत, मार्ग, पद्धत.
**पद्म** (सं. न.) कमळ; नागाच्या फणीवरचा दहांचा आंकडा; अब्ज किंवा शंभर कोटि.
**पद्मनाभ** (सं. पु.) विष्णु.
**पद्मनाल** (सं. न.) कमलाचे तंतु.
**पद्मयोनि** (सं. न.) ब्रह्मदेव.
**पद्मराग** (सं. न.) माणिक, लाल.
**पद्मरेखा** (सं. स्त्री.) तळहातावरची द्रव्यसूचक रेघ.
**पद्मा** (सं. स्त्री.) लक्ष्मी.
**पद्माकर** (सं. न.) ज्यांत कमळें उत्पन्न होतात असें मोठें सरोवर; कमळांचा समुदाय.
**पद्मासन** (सं. न.) ध्यान करतांना बसण्याची एक विशिष्ट पद्धति (डावा पाय उजव्या मांडीवर ठेवून बसणें).
**पद्मिनी** (सं. स्त्री.) कमळीण; कमळयुक्त तळें; स्त्रियांच्या चार जातींपैकीं एक.
**पद्य** (सं. न.) ज्याला पाद किंवा चरण आहेत अशी छंदोबद्ध रचना; पद.
**पंधरवडा** (पु.) पंधरा दिवसांचा समुदाय.
**पंधरें** (प्रा. न.) सोनें (ज्ञा० ८।३८).
**पनवेल–ळ** (स्त्री.पु.) एक प्रकारचा तांदुळ.
**पनस** (सं. पु.) फणस.
**पनसाळ** (पु.) जडवाचें हत्यार.
**पनाळ** (पु.) पन्हळ पहा.
**पनीर, पनेर, पनेरी** (फा. पनीर स्त्री.) विरजलेल्या दुधांतलें पाणी काढून टाकून व मीठ वगैरे घालून केलेलें एक घट्ट खाद्य.
**पन्नग** (सं. पु.) सर्प.
**पन्ना** (पु.) एक रत्न.
**पन्नास** (प्रा. पु.) बंदोबस्त (भाग० २२। २९३); (वि.) शंभरांच्या निम्मी संख्या.
**पन्नासणें** (प्रा. क्रि.) बंदोबस्त करणें.
**पन्नीर** (न.) गुलाबपाणी.
**पन्हळ** (सं. प्रणालि पु.) पाणी जाण्यासाठीं काढून दिलेला मार्ग; नळ.
**पन्हा** (फा. पु.) रुंदी.
**पन्हाळी** (स्त्री.) नळी; चर.

**पन्हाळी** (स्त्री.) सोनाराचें मणि करण्याचें हत्यार.

**पन्हाळी कौल** (न.) दोन बाजूंस थोडया उंच कडा असलेलें चपटें कौल.

**पन्हें** (सं. पानक न.) कैरीच्या आंबट पाण्यांत गूळ किंवा साखर घालून केलेलें पेय.

**पन्हेरी** (स्त्री.) पाणपोई.

**पंप** (पु.) हवा किंवा द्रव भरण्याचें साधन.

**पपई** (वि. पपैया स्त्री.) एक फळ.

**पपनस** (अमेरि. पॉंपेलमूस न.) लिंबाच्या जातीचें एक फळ.

**पपेटी** (स्त्री.) पारशी लोकांचा नव्या वर्षाचा पहिला दिवस.

**पय** (न.) पाणी; दूध.

**पयदरपय** (हिं. अ.) पावलोंपावलीं.

**पयस्विनी** (सं. स्त्री.) दुभती गाय किंवा म्हैस; नदी.

**पयोधर** (सं. पु.) स्त्रीचा स्तन; मेघ.

**पयोधि** (सं. पु.) समुद्र.

**पर** (सं. वि.) श्रेष्ठ; इतर; परका; नंतरचा; थोर; अपूर्व; (समासांत उत्तरपदीं असतां) एखाद्या गोष्टीस वाहिलेला; अधीन; जसें:—भक्तिपर; (पु.) शत्रु; (फा. न.) पीस. पराचा कावळा करणें—अतिशय फुगवून सांगणें.

**परकर** (सं. परिकर पु.) मुलीचा घागरा.

**परकळा** (फा. परकाला पु.) एक प्रकारचें वस्त्र; चिंधी; दुर्दशा; गव्हला; शेवई.

**परका, परकी** (सं. परकीय वि.) अन्य, दुसरा.

**परकाई** (स्त्री.) परकेपणा; नवलाई.

**परकायाप्रवेश** (सं. पु.) योगसाधनाच्या द्वारें दुसऱ्याच्या देहांत शिरण्याची विद्या.

**परकाळा** (पु.), **परकाळें** (फा. न.) परकळा पहा.

**परकी** (वि.) दुसरा; परदेशचा; अनोळखी.

**परकीय** (सं. वि.) दुसऱ्याचें; दुसऱ्या देशचें.

**परकोट** (सं. पु.) पडकोट पहा.

**परकोर** (सं. परिकर पु.) परकर.

**परखंडा** (पु.) ज्याचें अग्र छाटलें आहे असें केळीचें पान. [ भाग; भानगड.

**परगणा** (फा. पु.) देशाचा एक मोठा

**परगुणें** (प्रा. न.) पक्वान्न (ज्ञा० १४।२१६).

**परघर** (न.) दुसऱ्याचें घर; व्यभिचार; दुसऱ्याच्या घरीं राहणें. [ अंमल.

**परचक्र** (सं. न.) शत्रूची स्वारी; परकीय

**परचुरण** (सं. परि + चूर्ण वि.) किरकोळ.

**परज** (पु.) तलवारीची किंवा ढालेची मूठ; गायनांतला एक राग.

**परजणें** (क्रि.) (हत्यार) फिरविणें; धार लावणें.

**परटीण** (स्त्री.) धोब्याची बायको.

**परड** (इं. परेड स्त्री.) फौजेची कवाईत किंवा पाहणी.

**परडी** (स्त्री.) टोपरी; करंडी.

**परडें** (न.) तराजूचें पारडें; घराचें परसूं.

**परणणें** (सं. परि + नी क्रि.) विवाह करणें.

**परत** (अ.) उलटा; फिरून, पुनः.

**परतणें, परतन** (क्रि.) परत येणें; उलटणें; फिरणें; तव्यावर इकडचें तिकडे करणें; (न.) जमिनीची लहानशी पट्टी.

**परतंत्र** (सं. वि.) दुसऱ्याच्या अधीन.

**परता** (वि.) पलीकडचा; (अ.) पलीकडे; पेक्षां; शिवाय.

**परती** (प्रा. स्त्री.) उपरति; विरक्तता.

**परंतु** (अ.) पण.

**परतें** (प्रा. अ.) पलीकडे; परत.

**परत्या** (प्रा. अ.) माघारा.

**परतभाव** (पु.) प्रताप; सामर्थ्य.

**परत्वें** (अ.) अनुरोधानें; मुळें.

**परत्र** (क्रि. वि.) नाहींतर; अन्यत्र.

**परदरबार** (न.) पेशव्यांच्या बरोबरीच्या राजांस किंवा त्यांच्या वकिलांस वगैरे पेशव्यांकडून दिलेल्या नेमणुका; जवाहीर, कापड वगैरे नोंदण्याचें हिशेबाचें सदर.

**परदार** (सं. परदारा स्त्री.) परस्त्री.

**परदारागमन** (सं. न.) परस्त्रीशीं व्यभिचार.

**परदेशी** (वि.) दुसऱ्या देशचा; (पु.) पुरभय्या.

**परनिष्ठ** (सं. वि.) सत्यवादी.

नगर वाचनालय, सातारा.

**परंपरा** (सं. स्त्री.) ओळ, क्रम; मालिका.
**परंपरागत** (सं. वि.) पूर्वीपासून सारखा चालत आलेला.
**परपार** (सं. पु.) पलीकडचें तीर.
**परपेंठ** (स्त्री.) एक हुंडी गहाळ झाली असतां दुसरी देतात तिला पेंठ म्हणतात. तीहि गहाळ झाली असतां जी तिसरी देतात ती; (वि.) परदेशांतून आलेला, परका. [ जमीन.
**परंपोक** (तेलगु स्त्री.) लागवड न झालेली
**परब** (सं.पर्व न.) कारवाराकडे–सण; रत्न; चपटा हिरा. [ स्वरूप.
**परब्रह्म** (न.) परमेश्वराचें निराकार असें
**परभारा, परभारें** (सं. पर + वहिः अ.) बाहेरच्या बाहेर; अन्यद्वारें; परस्पर.
**परभारा** (पु.) जमीन धारण करणारा-कडून इनामदार परस्पर ठराविक घुगरी (हक्क) घेत तो; ऐन जिनसी इनाम.
**परभारें** (न.) वराला दिलेल्या रकमांच्या तपशिलाचें सदर. [जातीचें नांव; प्रभु.
**परभू** (सं. प्रभु पु.) क्षत्रियांपैकीं एका
**परम** (सं. वि.) उत्कृष्ट; अत्युच्च; (अ.) अतिशय. [ क्रिया.
**परमणी** (स्त्री.) कुंच्यानें सुतें साफ करण्याची
**परमवीरचक्र** (न.) अतिशय मोठ्या परा-क्रमाकरितां भारत सरकारनें दिलेलें पदक.
**परमहंस** (सं. पु.) संन्याशांतला एक भेद; परमेश्वर.
**परमा** (सं. प्रमेह पु.) एक रोग.
**परमाणु** (सं. पु.) अति सूक्ष्म अंश.
**परमात्मा** (सं. पु.) परब्रह्म. [ परमेश्वर.
**परमानंद** (सं. पु.) अतिशय आनंद;
**परमार** (सं. पु.) शत्रूचा उच्छेद करणारा; पवार.
**परमार्थ** (सं. पु.) मोक्ष; सद्गति.
**परमीत** (स्त्री. न.) मोजमाप; परिमाण; सीमा; मर्यादा.
**परमेश्वर** (सं. पु.) सर्वशक्तिमान् ईश्वर.
**परमेश्वरी** (स्त्री.) वचनचिठ्ठी; रोखा.
**परयेळ** (प्रा. न.) परळ.
**परलमिंट** (इं. पार्लमेंट न.) इंग्लंडच्या पार्लमेंट सभेबद्दल मराठी कागदपत्रां-तून हा शब्द वापरलेला आढळतो.
**परवचा** (सं. परवाचा पु.) तोंडानें म्हटलेली उजळणी.
**परवंट, परवंटा** (पु.) पदर न काढतां साडी नेसण्याची पद्धति; कमरेभोंवतीं गुंडाळण्याचा पदर.
**परवंटा** (प्रा. पु.) वरवंटा.
**परवड, परवडी** (स्त्री.) दुर्दशा; थर; परवाचा; भोजनांतले भाजी, लोणचें इ. रुचकर पदार्थ; (प्रा.) उपचार; आवड; समृद्धि.
**परवडणें** (क्रि.) पुरवणें, फायदेशीर होणें.
**परवडी** (प्रा.अ.) पुनः; (स्त्री.) परवड, सुकाळ(एक० ३३८९); प्रकार; चातुर्य, आनंद(रं० यो० ७१४६). प० करणें— हरतऱ्हेनें त्रास देणें.
**परवर** (न.) एक फळ; घराची जमीन; खळयांतील रास काढून घेतल्यावर राहिलेलें धान्य; पाण्याचा पाट; विहिरीभोंवतीं बांधलेला दगडाचा बांध.
**परवर्दिगार-परवर** (फा. पु.) पोशिंदा, पालनकर्ता.
**परवरीस, परवरशी** (फा. परवर्श स्त्री.) पोषण.
**परवा, पर्वा** (फा. स्त्री.) काळजी; धाक.
**परवां** (सं. पर + वासर अ.) मागें किंवा पुढें एक दिवस आड जाऊन.
**परवाचा** (पु.) परवचा पहा.
**परवाना** (फा.पु.) हुकूम; पास; (हिं. पु.) पतंग.
**परवानगी** (फा. स्त्री.) मोकळीक.
**परवारी** (पु.) गांवचा वाटाड्या; महार.
**परवेशी** परवरीस पहा.
**परशु** (सं. पु.) कुऱ्हाड.
**परस, परसूं** (न.) घराच्या मागची आवार घातलेली खुली जागा.
**परसणें** (प्रा. क्रि.) ऐकणें. [ १९–७).
**परसा** (प्रा. स्त्री.) आगटी (मोरो०द्रोण०
**परसाकडेस लागणें** शौचास लागणें.
**परस्पर** (सं. वि.) एकमेक; (अ.) परभारां.

**परस्मैपद** (न.) संस्कृत धातु ज्या दोन प्रयोगांत चालतात त्यांपैकीं एक. (दुसरा आत्मनेपद).
**परस्मैपदी** (वि.) वस्तुनिष्ठ दृष्टीनें केलेलें.
**परस्व** (सं. न.) दुसऱ्याचें धन.
**परळ** (न.) मातीचें उथळ पात्र.
**परा, पराभक्ति** (स्त्री.) वाचेच्या चार अवस्थेपैकीं पहिली; श्रेष्ठ भक्ति.
**पराई** (सं. परार्थ स्त्री.) तारुण्य आणि वार्धक्य यांतलें प्रत्येक; परकेपणा; तारुण्य व पोक्त वय;आयुष्याचा उत्तरार्ध.
**पराकाष्ठा** (सं. स्त्री.) शेवटची हद्द; अतिशयपणा.
**पराक्रम** (सं. पु.) बहादुरी; शौर्य; सामर्थ्य.
**पराक्रमी** (सं. वि.) शूर; सामर्थ्यवान्.
**पराग** (सं. पु.) पुष्पांतले रजःकण.
**परागंदा** (फा. वि. अ.) फरारी; देश सोडून पळून गेलेला. [विन्मुख.
**पराङ्मुख** (सं. वि.) तोंड फिरविलेला;
**परांची** (स्त्री.) माळा; माचोळी; पालख.
**पराजय** (सं. पु.) अपजय; पराभव.
**पराजित** (सं. वि.) पराभव पावलेला.
**पराड, पराडी** (स्त्री.) पहाडांची रांग.
**पराणी** (स्त्री.) टोचणी; नेट. [पात्र.
**परात** (स्त्री.) धातूचें मोठें वर्तुळाकार उथळ
**परात्पर** (सं. वि.) सर्वश्रेष्ठ.
**पराधीन** (सं. वि.) परतंत्र.
**परान्न** (सं. न.) दुसऱ्याच्या घरचें अन्न.
**पराब** (स्त्री.) सणाच्या दिवशीं द्यावयाची देणगी.
**पराभव** (सं. पु.) पराजय; मोड.
**परामर्श, परामर्ष** (सं. पु.) विचारपूस; समाचार.
**परायण** (सं. वि.) तत्पर; तल्लीन.
**परायधन** (न.) दुसऱ्याचें धन.
**पराय–या** (वि.) तिऱ्हाईत; परका.
**परार्यो** (स्त्री.) मानवी आयुष्याचे दोन भाग.
**परार्ध** (सं. न.) उत्तरार्ध; एकाच्या आंकड्यावर १७ शून्यें इतकी संख्या.
**परावर्तन** (सं. न.) मागें फिरणें.
**परावा** (वि.) परका. [फिरलेला.
**परावृत्त** (सं. वि.) पराङ्मुख; मागें

**पराशवपुत्र** (पु.) रखेलीपासून झालेला पुत्र.
**पराळ** (सं. पलाल पु.) भाताचा पेंढा; परळ.
**परि** (प्रा. अ.) परंतु; आणि.
**परिआळोच** (सं. परि + आलुच् स्त्री.) पर्यालोचन.
**परिकर** (प्रा. वि.) चांगलें; सुंदर; कठिण; (पु.) विस्तार (र० यो० ८।२२२); जिन्दगी (यथार्थ० २।११३७).
**परिकर्म** (न.) प्रारंभीचें, आनुषंगिक काम.
**परिक्रमण** (सं. न.) प्रदक्षिणा.
**परिखा** (सं. स्त्री.) चर; खंदक.
**परिगणना** (सं. स्त्री.) मोजदाद.
**परिगुण** (प्रा. पु.) सग; पाहुणचार.
**परिग्रह** (सं. पु.) दान; इनाम. [परिच्छेद.
**पॅरिग्राफ** (इं. पु.) कलम; लेखखंड; लेख-
**परिघ** (सं. पु.) वर्तुळाची मर्यादा दाखविणारी वक्ररेषा; घेर; कुंपण.
**परिचय** (सं. पु.) ओळख.
**परिचर्या** (सं. स्त्री.) सेवा.
**परिचार** (सं.पु.) प्रचार (तुका०२४५६).
**परिचारक** (सं. पु.) सेवक.
**परिचारिका** (स्त्री.) दासी.
**परिचित** (सं. वि.) ओळखीचा.
**परिच्छिन्न** (सं. वि.) तोडलेला; मापलेला; (अ.) निक्षून; अगदीं.
**परिच्छेद** (सं. पु.) भाग; सीमा.
**परिजन** (सं. पु.) चाकर.
**परिणत** (सं. वि.) पक्व; प्रौढ.
**परिणति** (सं. स्त्री.) वाढ; विकास; परिणाम, शेवट, समाप्ति; वार्धक्य, उतारवय; पचन. [परिपक्व होणें.
**परिणमणें** (सं. परि + नम् क्रि.) पालटणें;
**परिणय** (सं. पु.) विवाह.
**परिणाम** (सं. पु.) शेवट; फलप्राप्ति; गत्यंतर; रूपांतर.
**परिणामशूळ** (सं. पु.) अन्नाच्या अपचनामुळें पोटांत होणाऱ्या वेदना.
**परिणीत** (सं. वि.) लग्न झालेला.
**परितोख** (सं. परितोष पु.) संतोष.
**परितोष** (सं. पु.) आनंद; संतोष.
**परित्याग** (सं. पु.) सर्वथा त्याग.
**परित्राण** (सं. न.) रक्षण.

**परिंद** (वि.) हुशार; निष्णात.
**परिधान** (सं. न.) वस्त्र; पांघरणें.
**परिधि** (सं. पु.) परिघ; सूर्यचंद्राचें खळें.
**परिनाळिका** (सं. प्रणालिका स्त्री.) क्रम; परंपरा; लांबलचक कंटाळवाणी गोष्ट.
**परिपक्व** (सं. वि.) पूर्णपणें पक्व; प्रौढ.
**परिपत्रक** (न.) सभासदांत फिरवावयाचें पत्रक (सर्क्युलर).
**परिपाक** (सं. पु.) परिणाम; विकास.
**परिपाटी** (सं. स्त्री.) रीत; अनुक्रम.
**परिपाठ** (सं. पु.) चाल वहिवाट.
**परिपालन** (सं.न.) रक्षण; पालनपोषण; संगोपन; (चाल, व्रत इत्यादींचें) अवलंबन, अनुसरण.
**परिपुष्ट** (सं. वि.) पुरा पोसलेला.
**परिप्लुत** (सं. वि.) ग्रस्त; व्याप्त; ठासून भरलेला.
**परिपूर्ण** (सं. वि.) भरलेलें; तृप्त.
**परिपेसी** (प्रा. स्त्री.) व्यापकता (सोहि० महदनु०).
**परिभाषा** (सं. स्त्री.) शास्त्रीय ग्रंथांतल्या विशेष अर्थाच्या शब्दांची सूचि.
**परिभ्रमण** (सं. न.) भटकणें.
**परिभ्रमणें** (क्रि.) भटकणें.
**परिमळ** (सं. परिमल पु.) सुगंध.
**परिमाण** (सं. न.) माप; संख्या.
**परिमार्जन** (सं. न.) प्रक्षालन; निरसन.
**परिमित** (सं. वि.) मोजकें. [होणें.
**परियवसणें** (सं. पर्यवसान क्रि.) शेवट
**परियसणें** (प्रा. क्रि.) ऐकणें.
**परिया** (प्रा. पु.) झोका (ज्ञा० १२।५; तुका० २४८५); नाला; ओढा.
**परियाळ** (प्रा. न.) ताट (मुक्ते० आदि० ४२।६१).
**परियाळें** (प्रा. न.) खाण्याचे पदार्थ.
**परिरंभ** (सं. पु.) आलिंगन.
**परिवडणें** (प्रा. क्रि.) प्रकार करणें.
**परिवर** (प्रा. न.) घर; गुप्त स्थान; प्रकार.
**परिवर्तन** (सं. न.) चक्राकार फिरणें; फेड, मोबदला.
**परिवर्तनवादी** (पु.) मनुष्याचें मन बदलून सुधारणा करूं इच्छिणारा.
**परिवसणें** (प्रा. क्रि.) स्पर्श करणें.
**परिवाण** (न.) भाषा; शब्द; बोलणें.
**परिवार** (सं. पु.) आश्रितजन; लवाजमा; खटला; विस्तार. [विस्तारणें.
**परिवारणें** (सं. परि + वृ क्रि.) वेढणें;
**परिवेश** (सं. पु.) वेष्टन; वस्त्र.
**परिवेष** (सं. पु.) चंद्रसूर्याभोंवतालचें खळें; अन्न वाढणें; तेजाचें मंडळ; परिघ; बिंब.
**परिव्राज** (सं. पु.) संन्यासी.
**परिशिष्ट** (सं. वि.) उरलेला; जोड; पुस्ती.
**परिशीलन** (सं. न.) अभ्यास.
**परिश्रम** (सं. पु.) कष्ट, मेहनत.
**परिश्री** (सं. पु.) परसू.
**परिषद्** (सं. स्त्री.) सभा, मंडळी.
**परिष्कार** (पु.) समर्थन; उजळा देणें.
**परिष्वंग** (पु.) आलिंगन.
**परिस** (सं. स्पर्श पु.) स्पर्शमणि, लोखंडाचें सोनें करणारा दगड.
**परिसणें** (क्रि.) ऐकणें.
**परिसर** (पु.) जवळचा प्रदेश; भाग.
**परिस्तरण** (न.) यज्ञ-यागाच्या अग्नी-भोंवतीं चारी बाजूंस दर्भ टाकणें.
**परिसोय** (स्त्री.) संबंध (तुका० २६७९).
**परिस्थिति** (सं. स्त्री.) भोंवतालची स्थिति, वातावरण.
**परिस्फोट** (सं. पु.) उघडकी, स्पष्टता.
**परिहार** (सं. पु.) दूरीकरण, निरसन.
**परिहास** (पु.) थट्टा; विनोद.
**परिज्ञान** (सं. न.) पूर्ण ज्ञान. [परंतु.
**परी** (स्त्री.) प्रकार, रीत; (अ.) प्रमाणें;
**परी** (फा. स्त्री.) पंख असलेली काल्पनिक स्त्री.
**परीस्थान** (न.) पऱ्यांचें राहण्याचें ठिकाण.
**परीकाळ** (प्रा. पु.) विलंब, उशीर.
**परीघ** (पु.) परिघ पहा; स्तंभ.
**परीट** (पु.) धोबी. **प० घडी** (स्त्री.) धोब्याकडून नुकतेंच धुऊन आलेलें व अजून न वापरलेलें वस्त्र.
**परीस** (सं. स्पर्श पु.) स्पर्शानें लोखंडाचें सोनें करणारा दगड, स्पर्शमणि; (अ.) पेक्षां.

**परीक्षक** (सं. पु.) तपासणी करणारा, पारखी.
**परीक्षण** (सं. न.) तपासणी, पर्यालोचन.
**परीक्षणें** (सं. परीक्ष् क्रि.) तपासणें; कसोटीला लावणें; निरखून पाहणें.
**परीक्षा** (सं. स्त्री.) पारख, तपासणी; कसोटी, दिव्य.
**परीक्षावंत** (वि.) पारख असलेला.
**परीक्षित** (सं. वि.) परीक्षेंत किंवा कसोटीस उतरलेला.
**परुष** (सं. वि.) कठोर, निर्दय.
**परुषाम्ल** (न.) एक ज्वालाग्राही व रंगोपयुक्त पदार्थ; पिक्रिक ॲसिड.
**परूस** (न.) परसूं पहा.
**परेशान** (फा. वि.) चिन्तातुर; हैराण.
**परेशानी** (फा. स्त्री.) संकट. [ उपकार.
**परोपकार** (सं. पु.) दुसऱ्यावर केलेला
**परोपरी** (पु.) आजूबाजूचा प्रदेश.
**परोक्ष** (सं. अ.) डोळ्याआड.
**परोपरीनें** (अ.) नानाप्रकारें.
**परौतें** (प्रा. अ.) पलीकडे, वेगळें.
**पर्जन्य** (सं. पु.) पाऊस.
**पर्ण** (न.) पान. [ केलेली झोपडी.
**पर्णकुटी** (सं. स्त्री.) गवत, पानें इ० ची
**पर्णणें** (सं. परि + नी क्रि.) वरणें.
**पर्यंक** (सं. पु.) पलंग.
**पर्यटण** (सं. न.) फिरणें, प्रवास.
**पर्यंत** (अ.) पावेतों. [ परिणाम.
**पर्यवसान** (सं. न.) अंत, अखेर, शेवट,
**पर्या** (पु.) ओढा, नाला, ओहोळ.
**पर्याय** (सं. पु.) प्रतिशब्द, एका अर्थाचे शब्द; प्रकार; चाल.
**पर्यालोच** (सं. पर्यालोचन न.) विचार.
**पर्यावो** (प्रा. पु.) पर्याय.
**पर्युषित** (वि.) शिळा, पारोसा.
**पर्युक्षण** (न.) अग्नीच्या भोंवतीं पाणी शिंपडणें.
**पर्व** (सं. न.) पर्वणी, पुण्यकाळ; सणाचा दिवस;सांधा, पेरे, कांड; महाभारताच्या मुख्य १८ भागांपैकीं प्रत्येक.
**पर्वकाळ** (सं. पु.) पुण्यकाळ; (प्रा.) विपुलता; बहार; उत्कर्षाचा काळ.
**पर्वणी** (सं. स्त्री.) पर्वदिन, पर्वकाळ; सुसंधि.
**पर्वत** (सं. पु.) मोठी डोंगरांची रांग. (प्रा. पु.) देणें घेणें (दा० २।१।६३).
**पऱ्हा** (प्रा. अ.) पलीकडे, दूर; (स्त्री.) पावसाचें पाणी वाहून जाण्यासाठीं खणलेली चरी.
**पऱ्हाटी** (स्त्री.) कापसाचें झाड.
**पऱ्हेज** (फा. न.) पथ्य.
**पलख** (फा. पलक न.) निमिष, क्षण.
**पलंग** (सं. पर्यंक पु.) मंचक, माचा.
**पलंगडी** (स्त्री.) लहान पलंग.
**पलंगपोस** (फा. पलंगपोश पु.) चादर.
**पलट–टी** (स्त्री.) उलथ, कलथी.
**पलटण** (इं. बटालियन स्त्री.) तीनशेंपासून हजारपर्यंत पायदळाची तुकडी; रांग.
**पलटा** (पु.) एक जंबियाचा डाव.
**पलतड** (न.) पलीकडचें तीर.
**पलाट** (प्रा. अ.) पलीकडे.
**पलाटण** (सं. पर्यटन न.) भ्रमण.
**पलाटणें** (न.) न्हाव्याच्या वस्तऱ्याची धार साफ करण्याचें चामडें, चटपट.
**पलांटी** (स्त्री.) फेरी, वदल.
**पलांडु** (सं. पु.) कांदा.
**पलाण** (सं. पल्याण न.) खोगीर, आच्छादन.
**पलाणणें** (क्रि.) खोगीर चढविणें; हाताखालीं आणणें.
**पलायन** (सं. न.) पळ.
**पलायनवाद** (पु.) जीवन किंवा संग्राम यांपासून पळून जाण्याची वृत्ति.
**पलायमान** (वि.) पळणारा.
**पलाश** (सं. पु.) पळस.
**पलित** (सं. वि.) वृद्ध.
**पलिता** (फा. पु.) हिलाल, दिवटी; तोफ डागण्याचा तोडा; फेर; सरवत्ती.
**पलिती** (स्त्री.) पलिता, सरवत्ती.
**पलिस्तर** (इं. ब्लिस्टर न.) फोड आणणारें औषध; लिंपण.
**पलीकडे** (अ.) दुसऱ्या वाजूस.
**पल्याड** (प्रा. अ.) त्या पार.
**पल्याण** (सं. न.) खोगीर, जीन.
**पल्लव** (सं. पु.) पालवी, पदर.

**पल्लवसडक** (प्रा. स्त्री.) पदराची दशी (ज्ञा० १।९).
**पल्लवित** (सं. वि.) विस्तृत.
**पल्ला** (पु.) तीस पायल्यांचें माप; (फा. पु.) लांबी; विस्तार; मुदत; अंतर; आटोका; वुट्टीदार कांठ.
**पल्ली** (सं. स्त्री.) खेडेगांव.
**पल्लेदार** (फा. वि.) लांब पल्ल्याची; छानदार पदर असलेलें.
**पल्वल** (न.) डबकें.
**पवणें** (प्रा. क्रि.) पावणें, पोंचणें.
**पवन** (सं. पु.) वायु. [ फिरणारें यंत्र.
**पवनचक्की** (स्त्री.) वाऱ्याच्या शक्तीनें
**पवबारा** (हिं. पव१ + बारा) फाशाच्या खेळांतलें एक दान; पलायन.
**पवमान** (सं. पु.) वायु; सोमयज्ञांतलें एक स्तोत्र.
**पवली** (प्रा. स्त्री.) राजमार्ग.
**पवळ** (प्रा. पु.) पल्लव, पानें (नाम० गा० ६५); होडगें.
**पवळें** (सं. प्रवाल न.) पोवळें.
**पवाड, पवाडु** (प्रा. पु.) मोठेपणा; कीर्ति; विस्तार (ज्ञा० ६।४७१); अवकाश (ज्ञा० ११२९८); इच्छा (ज्ञा० ८। २६४); ठिकाण.
**पवाडणें** (प्रा. क्रि.) स्तुति करणें; शिरणें (ज्ञा० यो० १०।४२; दा० १।४।२).
**पवाडा** (प्रा. पु.) विस्तार; महत्त्व; इच्छा; पराक्रम; पराक्रमाचें वर्णन.
**पवाडे गाणें** स्तुति करणें. [७।१३८).
**पवाडु** (प्रा. पु.) ठाव, अवकाश (ज्ञा०
**पवि** (सं. पु.) इंद्राचें वज्र.
**पवित्र** (सं. वि.) शुद्ध, निर्मळ; (न.) जानवें; वरण. [अंगठी.
**पवित्रक** (सं. न.) दर्भांची किंवा सोन्याची
**पवित्रा** (पु.) कुस्तींत तयारीनें उभें राहण्याचा प्रकार; दस्ती.
**पवित्री** (स्त्री.) पवित्रक.
**पवे** (प्रा.) पावे. [ डोह.
**पव्हणा** (प्रा. पु.) पोहण्याजोगा पाण्याचा
**पव्हणी** (प्रा. स्त्री.) नौका.
**पव्हणें** (प्रा. क्रि.) पोहणें.
**पव्हे** (प्रा. स्त्री.) पाणपोई.
**पशम** (न.) लोकर.
**पशमीना** (अर. पु.) लोकरीचें वस्त्र.
**पशु** (सं. पु.) जनावर.
**पशुपति** (सं. पु.) शिव. [ उमटणारी वाणी.
**पश्यन्ती** (सं. स्त्री.) नाभीमध्यें किंचित्
**पश्चात्** (सं. अ.) नंतर; पाठीमागें.
**पश्चात्ताप** (सं. पु.) पस्तावा; अनुताप.
**पश्चिम** (सं.स्त्री.) मावळत, सूर्य मावळण्याची दिशा.
**पश्चिमद्वार** (सं. न.) मागचें दार; वृहती.
**पष्ट** (सं. स्पष्ट वि.) उघड.
**पसंत** (फा. पसंद वि.) मान्य, कबूल.
**पसर** (सं. प्रसर पु.) पसारा, विस्तार; (प्रा.) इच्छा.
**पसरट** (वि.) पसरलेलें; उथळ.
**पसरणी** (स्त्री.) विस्तार; पसारा.
**पसरणें** (क्रि.) विस्तारणें; निजणें.
**पसरा, पसरू** (प्रा. पु.) दुकान (तुका० ६१६); पाल्हाळ.
**पसवणें** (क्रि.) प्रसूत होणें; बाहेर टाकणें.
**पसा** (सं. प्रसृति पु.) अर्धी ओंजळ; खोंगा.
**पसाय** (सं. प्रसाद पु.) प्रसाद.
**पसार** (सं. प्रसार पु.) विस्तार; (वि.) गेलेला. [ गोंधळ; वाणसवदा.
**पसारा** (सं. प्रसार पु.) पसरलेल्या वस्तु;
**पसारी** (पु.) वाणी, भुसारी, किराण्या जिनसांचा दुकानदार.
**पसाव, पसावो** (प्रा. पु.) प्रसाद; उपकार.
**पसि** (प्रा. अ.) पेक्षां.
**पस्तावणें** (क्रि.) पश्चात्ताप पावणें.
**पस्ताव** (सं. पश्चात्ताप पु.), **पस्तावणी** (स्त्री.), **पस्तावा** (पु.) पश्चात्ताप.
**पहाट** (सं. प्रातः + तट स्त्री.) प्रभात.
**पहाड** (पु.) डोंगर. [ आवाज.
**पहाडी आवाज** फार उंच व खणखणीत
**पहार** (सं. प्रहार स्त्री.) लोखंडाची भली जाड कांब.
**पहारा** (सं. प्रहर पु.) चौकी, रखवाली.
**पहारेकरी** (पु.) पाहऱ्यावरचे शिपाई.
**पहाळ** (न.) मोठी रांग. [ आळें.
**पहाळी** (स्त्री.) पावसाची सर; ओहळ;

**पहिलटकरीण, पहिलार** (स्त्री.) पहिल्यानेंच प्रसूत झालेली.
**पहिलवान** (हिं. पु.) मल्ल.
**पहिला** (वि.) प्रथम.
**पहिलील** (वि.) पहिला.
**पहीत** (प्रा. न.) वरण.
**पहीपाहुणा** (पु.) आला गेला मनुष्य.
**पहुंची** (हिं. स्त्री.) पुरुषांच्या मनगटांतला एक दागिना, पोंची. [ निजणें.
**पहुडणें** (कानडी क्रि.) आरोहण करणें;
**पहुडु** (प्रा. स्त्री.) निद्रा.
**पहुरणी** (प्रा. स्त्री.) विईपर्यंत दूध देणारी गाय किंवा म्हैस(ज्ञा० १७।२४७–४८); ओढाळ गुरूं. [अंश; (पु.) पळणें.
**पळ** (सं. पल न.) क्षण, घटिकेचा साठावा
**पळंज** (न.) हलकें धान्य.
**पळणें** (क्रि.) धावणें.
**पळता** (वि.) पळणारा, चंचल; अस्थिर.
**पळपणें** (क्रि.) पेटणें; जळणें.
**पळपळीत** (वि.) निःसत्त्व; **ढिला.**
**पळपुटा** (वि.) पळून जाणारा.
**पळवा** (पु.) वाळवून ठेवलेली पालेभाजी.
**पळवाढा, पळीवाढा** (वि.) पळीनें वाढतां येण्यासारखा किंवा इतका पातळ.
**पळवाट** (स्त्री.) पळून जाण्याची सोय.
**पळविणें** (क्रि.) पळण्यास लाविणें; एखादी वस्तु घेऊन पळून जाणें.
**पळस** (सं. पलाश पु.) एक वृक्ष. **पळसाला पानें तीनच**—कोठेंहि गेलें तरी मनुष्यस्वभाव सारखाच. [ एक विधि.
**पळसुला** (पु.) मुंजीच्या वेळीं करण्याचा
**पळहाटी, पळाटी** (स्त्री.), **पळहें** (न.) कापसाचें झाड.
**पळा** (पु.) मोठी पळी.
**पळी** (पु.) दर्वी.
**पळोपळीसें करणें** त्रासवून सोडणें.
**पळें** (न.) पळीचें तोंड. [ तट; बाजू.
**पक्ष** (सं.पु.) पंधरवडा; महालयश्राद्ध; पंख;
**पक्षकार** (पु.) न्यायाच्या कचेरींत भांडणारे (वादी व प्रतिवादी).
**पक्षघात** (सं. पु.) अंगाचा कांहीं भाग चेतनाशून्य होणें; एक रोग.
**पक्षपात** (सं. पु.) एका पक्षाकडे मनाचा ओढा; कैवार.
**पक्षांतर** (पु.) दुसरा पक्ष. [प्राणी.
**पक्षी** (सं. पु.) पांखरूं; पंखांनीं उडणारा
**पक्षीं** (अ.) विकल्पेंकरून; पक्षां.
**पा, पां** (प्रा. अ.) वा (संबोधनार्थी); पादपूरणार्थक शब्द.
**पाइक, पाइकु, पाईक** (सं. पादिक पु.) चाकर; पायदळाचा शिपाई.
**पाइकी** (प्रा. स्त्री.) सेवा.
**पाइतन, पायतन** (सं. पादत्राण न.) जोडा.
**पाईंड** (न.) एक इंचाच्या चतुर्थांशाइतकें लांबीरुंदी मोजण्याचें माप.
**पाईण, पाईन** (पु. न.)पांच पडतन, किंवा तीस चौरस विघे; लांबीचें माप (एक चतुर्थांश इंच).
**पाईत** (न.) पायथा.
**पाउखणें** (प्रा. क्रि.) वाट पाहणें.
**पाउटी** (प्रा. स्त्री.) पायरी.
**पाउड** (प्रा. पु.), **पाउडी** (स्त्री.) पैसासुपारी (ज्ञा० १८।४६; एक० ३६८९).
**पाउडें** (प्रा. वि.) माघारलेलें (भाग० ७। २०१).
**पाउणकी** (स्त्री.) एक पावणें पावणें पासून शंभर पावणें पाऊणशेंपर्यंतचे पाढे.
**पाउणेआठ** (वि.) नपुंसक.
**पाउलवा** (पु.) पावलाची खूण.
**पाउवा** (प्रा. स्त्री.) पादुका.
**पाऊंड** (पु.) पाऊल.
**पाऊण** (वि.) तीन चतुर्थांश.
**पाऊल** (न.) पायाच्या घोट्याखालचा भाग; दोन पावलांतलें अंतर; पायाची उमटलेली खूण; चालण्याचा वेग. **पुढें पा०**— सर्वांच्या अगोदर तयारी; **वाकडें पा०पडणें**–अनीतीचें कृत्य हातून घडणें; **पावलें ओळखणें**—स्वभाव जाणणें; **पा०वर पाऊल ठेवून चालणें**— अनुकरण करणें.
**पाऊलबुद्धि** (स्त्री.) क्षणिक बुद्धि; **चंचलता;** छांदिष्टपणा.
**पाऊलवाट** (स्त्री.) फक्त माणसाला पायीं जातां येईल येवढी अरुंद वाट.

...वाचनालय, सातारा

**पाऊस** (सं. प्रावृष पु.) पर्जन्य.
**पाऊसपाणी** (न.) पर्जन्यमान वगैरे.
**पाक** (सं. पु.) पक्वता; पचन; चाचणी; रांधा; शिजविलेलें अन्न; (फा. वि.) पवित्र.
**पाकड** (पु.) एक उपधान्य.
**पाकडी** (स्त्री.) मोहोळांतली मधमाश्यांची राहण्याची जागा.
**पाकनिष्पत्ति** (सं. स्त्री.) स्वयंपाक.
**पाकशाळा** (सं. स्त्री.) स्वयंपाकघर.
**पाकळी** (स्त्री.) पुष्पाचें दळ; लसूण, संत्रें वगैरेसारख्या वस्तूंचा एकेक अलग भाग.
**पाकिस्तान** (फा. न.) पवित्र देश (मुसलमानांच्या मतें); खण्डित भारताचा अलग झालेला इस्लामप्रधान भाग; इस्लामी राष्ट्र.
**पाकीट** (इं. पॅकेट न.) लिफाफा; पिशवी; (इं. पॉकेट न.) खिसा.
**पाकुळणें, पाकोळणें** (क्रि.) द्रवणें; ढिलें पडणें; विस्कळित होणें. [ वाघूळ.
**पाकोळी** (स्त्री.) एक लहानसा पक्षी;
**पांक्त** (सं. वि.) पंगतींत बसण्यास पात्र.
**पाख** (अर. पाक वि.) शुद्ध (तुका० ३५५३).
**पांख** (सं. पक्ष पु.) पंख; छपराचें पाखें.
**पाखंड** (सं. न.) नास्तिकता; धर्मविरुद्ध मत. [ वेगळे करणें.
**पाखडणें** (क्रि.) सुपानें धान्याचे दाणे
**पाखंडी** (वि.) नास्तिक मताचा; धर्मलंड.
**पाखर** (स्त्री.) छाया; आच्छादन; कृपा; स्तन; घोड्याची किंवा हत्तीची झूल; (प्रा. वि.) कृपाळू.
**पाखरणें** (प्रा. क्रि.) पसरणें.
**पाखरा** (प्रा.) पाखर पहा. [ सुंदर स्त्री.
**पांखरूं** (न.) लहान पक्षी; लक्षणेनें—
**पाखळणी** (स्त्री.) शेतकऱ्यांची मेजवानी.
**पाख** (पु.), **पाखें** (न.) चोळीची एक बाजू; छपराची एक बाजू.
**पाखांड** (सं. पाषंड पु.) वितंडवाद.
**पाखा** (ख) **डी** (स्त्री.) चिरेबंदी अरुंद वाट; पाख्याच्या कडेचें आडवें लाकूड; गांवांतली आळी; पडवी.
**पाखाणणें** (प्रा. क्रि.) उडणें; आक्रमणें.
**पाखाळणी** (सं. प्रक्षालन स्त्री.) देवाच्या मूर्तीस स्नान घालण्याचा समारंभ; हंगामानंतरची शेतकऱ्यांची मेजवानी.
**पाखाळणें** (सं. प्रक्षालन क्रि.) धुणें.
**पाखाळा** (प्रा. पु.) स्वच्छपणा.
**पाखाळी** (प्रा. स्त्री.) शुद्धपण.
**पाखाळीव** (प्रा. वि.) शुद्ध.
**पाखें** (सं. पक्ष न.) छपराची एक बाजू.
**पांखोवा** (प्रा. पु.) पंख (भा० ७।४६५).
**पांग** (पु.) उत्कट इच्छा; गरज; काळजी; पंगूपणा; हीनत्व; पराधीनता; ओशाळगत. **पांग फडणें**—चिंता दूर करणें; मनोरथ सफल करणें.
**पाग** (पोर्तु. पु.) पगार; होडीस बांधलेला नाडा; वेसण; शेला (वेणा० सीता० ९।११).
**पांगडा** (प्रा. पु.) पराधीनपणा; ममत्व (भा.२५।७२).
**पागडी** (स्त्री.) भाड्यानें घर वगैरे घेतांना दिलेला बेकायदेशीर पैसा.
**पांगणें** (क्रि.) विस्कळित होणें; पसरणें; वश होणें (भा. १९।५६).
**पागनीस** (फा. पु.) पागेवरचा अधिकारी.
**पागल** (हिं. वि.) वेडा; उल्लू.
**पांगविणें** (प्रा. क्रि.) दुर्बळ करणें (तुका० ८८).
**पांगळा** (सं. पंगु वि.) लुला; लंगडा.
**पागा** (हिं. स्त्री.) घोडशाळा; घोडेस्वारांची टोळी.
**पागी** (पु.) मासे पकडणारा कोळी.
**पांगापांग** (स्त्री.) फुटाफूट, दाणादाण.
**पागार** (पु.) धान्याचें बीज पेरण्याचें एक लाकडी औत.
**पांगा** (वि.) पांगळा.
**पांगारा** (पु.) एका झाडाचें नांव.
**पांगिला** (वि.) अंकित; ओशाळा.
**पांगिलें** (वि.) चिकटलेलें.
**पांगी** (प्रा. स्त्री.) ओशाळगत.
**पांगुतणें** (प्रा. क्रि.) आच्छादणें.
**पांगुरविणें** (क्रि.) लपविणें.
**पांगुळणें** (प्रा. क्रि.) थोटावणें (नाम० गा० ९); लीन होणें.

**पांगूळ** (सं. पंगु वि.) पांगळा; (पु.) पहाटे येणारा भिक्षेकरी.

**पांगूळगाडा** (पु.) पांगळ्या मुलास चालण्यास शिकविण्यासाठीं केलेला एक विशेष प्रकारचा तीन चाकी गाडा.

**पागोटें** (न.) पुरुषांचें डोकीस बांधावयाचें वस्त्र, पगडी. **पा० गमावणें**—अपमान करून घेणें; ठोकर खाणें; **पा०घेणें**—फसविणें; **पा. ची लाज धरणें**—लौकिकास जपणें; **पा० संभाळणें**—स्वतःच्या सुरक्षितपणाची खबरदारी घेणें; **पा० चा धनी**—पतीचा माणूस.

**पागोडा** (पु.) ब्रह्मी देऊळ.

**पागोरा, पांगोरा** (प्रा. पु.) झाडांचीं बारीक मुळें (दा० ९।६।४६); पात; काडी; सूक्ष्म भाग; गोफण (हरिवि० १४।२७४).

**पागोळा–ळी** (पाघळणें + ओळ स्त्री.) छपरावरच्या पाण्याची धार जेथून पडते ती जागा; तेथून पडणारी पाण्याची धार; वळचण.

**पाग्या** (पु.) पागेवरचा अधिकारी.

**पांघरणें, पांघरविणें** (क्रि.) आच्छादणें, अंगावर घेणें.

**पांघरूण**(न.)प्रावरण, वस्त्र. **पां० घालणें**—झाकणें.

**पाघळ** (पु.) द्रव.

**पाघळणें** (सं. प्रगलन क्रि.) द्रव सुटणें; गळणें. **जीभ पा०**—न बोलावयाच्या गोष्टी बोलण्याच्या ओघांत बोलून जाणें.

**पाच** (न.) एक रत्न.

**पांच** (सं. पंच) ५. **पांचावर धारण बसणें**—अत्यंत भयभीत होणें; **पांचामुखीं परमेश्वर**—चार शिष्ट लोक म्हणतील तें खरें.

**पाचक** (सं. वि.) पचविणारें.

**पाचकळ** (वि.) चावट, वात्रट.

**पांचकें** (प्रा. न.) हिणकस सोनें.

**पाचंग** (न.) पासोडी बांधण्याची किंवा धोतर नेसण्याची एक विशिष्ट तऱ्हा.

**पांचजन्य** (सं. पु.) विष्णूचें शंखवाद्य. **पां०करणें**–बोंब मारणें.

**पाचट** (न.) चिपाड; पाचर.

**पांचट** (वि.) फाजील; वात्रट; फिकें.

**पाचन** (सं. न.) पचविणें; जठराग्नि.

**पांच पिसें** (प्रा. न.) वेड, भ्रांति.

**पांचपाट** (पु.) एखाद्याची धिंड काढतांना त्याच्या डोक्यावरच्या केसांचे पांच पट्टे काढीत ते.

**पाचपेंच** (पु.) डावपेच, छक्केपंजे.

**पाचर**(स्त्री. न.)खुंटा वगैरे घट्ट बसविण्याकरितां किंवा लाकूड चिरण्याकरितां मारलेली ढलपी किंवा खुंटी. **पा० मारणें**—विघ्न आणणें. [ण्याची जागा.

**पांचवटा** (प्रा. पु.) पांच वाटा एकत्र मिळ-

**पांचवणें** (प्रा. क्रि.) दृष्ट होणें.

**पांचवा** (पु.) दुखणें बरें होत आलें असतां जरा बाहेर फिरल्यानें तें उलटतें तेव्हां दृष्ट लागली अशी समजूत होते ती; दृष्टीचा उतार म्हणून गळयांत बांधलेला मणि; (वि.) पंचम.

**पांचवी** (सं. पंचमी स्त्री.) प्रसूतीच्या पांचव्या दिवशीं कांहीं विशिष्ट देवतेची पूजा करतात ती; सदर देवता.

**पाचार** (स्त्री.) पाचर.

**पाचार** (सं. प्राचारण पु.) पाचारणें.

**पाचारण** (न.) आमंत्रण.

**पाचरणें** (क्रि.) बोलावणें.

**पाचाव, पांचावा** (पु.) पांचवा पहा.

**पांचाळ** (सं. वि.) वडवड्या, मूर्ख.

**पांचाल** (पु.) पंजाब.

**पांचाली** (स्त्री.) द्रौपदी. [ १०११).

**पाचिक** (प्रा. वि.) हिणकस (ज्ञा० १३।

**पांचीव** (न.) पशूंचें मूत्र. [ एकेक गट.

**पाचुंदा** (पु.) पंचकडी, पांच पेंढ्यांचा

**पाचू** (स्त्री.) एक रत्न.

**पांचेपालव** (सं.पंचपल्लव पु.) पंचपल्लव; पंचप्रमाण; अंतःकरणपंचक. [ पातेरा.

**पाचोळा, पांचोरा** (पु.) पानांचा समुदाय;

**पाच्छाई** (स्त्री.) पादशाही पहा.

**पाज** (पोर्तु. पासो स्त्री.) डोंगरांतली वाट.

**पाजण, पांजण** (स्त्री. न.) कोऱ्या कापडाला लावतात ती खळ. [ खळ.

**पाजणी, पांजणी** (स्त्री.) खळ लावणें;

**पाजणें** (क्रि.) पिण्यास लावणें; धार तीक्ष्ण करणें; ठकविणें.
**पांजरण** (सं. पंजर न.) छपराला वाशांच्या वर व कौलांच्या खालीं पानें, गवत वगैरे आंथरतात तें.
**पांजरणें** (प्रा. क्रि.) पिंजारणें, पसरणें.
**पांजरपोळ** (पु.) म्हाताऱ्या किंवा लंगड्या-लुळ्या गुरांना पाळण्याचें स्थान.
**पांजरा** (सं. पंजर पु.) सापळा.
**पाजळणें** (सं. प्रज्वलन क्रि.) प्रदीप्त करणें; तीक्ष्ण करणें.
**पांजळी** (प्रा. स्त्री.) दिव्याची ज्योत.
**पांजो** (प्रा. स्त्री.) टोक, अग्र; पिशाच्चांची शांति; कोडें; पंचांग. [ निलाजरा.
**पाजी** (हिं. वि.) हलकट, असभ्य; भ्याड;
**पाझर** (पु.) झरा, द्रव; दयार्द्रता.
**पांझर–रा** (पु.) पिंजरा.
**पांझरट** (न.) कागदाची जाळी.
**पाझरणें** (क्रि.) झिरपणें.
**पाट** (सं. पट्ट पु.) मुख्य मान (भाग० २।६४५); पदवी (ज्ञा०१२।८४); पाण्याचा फाटा, लहान कालवा; विधवेचा विवाह; दुसरा नवरा करणें; हजामतीच्या वेळीं डोक्याच्या केसांचा काढलेला पट्टा; बसण्याची फळी; खांबाच्या वर व तुळईच्या खालीं असतो तो लाकडाचा तुकडा; (न.) रेशीम.
**पाटकर, पाटकरीण** (स्त्री.) दुसरें लग्न करणारी स्त्री.
**पाटंगण** (न.) पटांगण.
**पाटगा** (पु.) वाफा; चिरा, पाट.
**पाटगें** (न.) अरुंद वस्त्र.
**पाटण** (सं. पट्टण न.) शहर.
**पाटणी** (प्रा. स्त्री.) नगरी; तक्तपोशी; लाकडाचें छत; कडीपाट.
**पाटथर** (पु.) जोत्याच्या अगदीं वरचा थर.
**पाट बांधणें** (प्रा.) पट्टाभिषेक करणें (ज्ञा० १५।९).
**पाटल** (सं. वि.) तांबूस, गुलाबी.
**पाटली** (स्त्री.) स्त्रियांचें एक हस्तभूषण.
**पाटलें** (न.) जम, वस्तान.
**पाटीदार** (पु.) पाटील (गुजराथेंतील).
**पाटलूण, पाटलोण** (इं. पॅटॅलून स्त्री.) एक प्रकारची विजार.
**पाटव** (सं. न.) पटुत्व, कौशल्य.
**पाटवडी** (स्त्री.) चण्याच्या पिठाची केलेली वडी, पातवडी.
**पाटवण, पाटवड** (न.) पाण्याचा लहान पाट.
**पाटस्थळ** (न.) पाटाच्या पाण्यानें भिजणारी जमीन.
**पाटा** (सं. पट्ट पु.) चटणी वगैरे वाटण्याची शिळा; होडीचा नांगर; चाकाचा घेर ज्या तुकड्यांमिळून झालेला असतो त्यांतला प्रत्येक; दहा तिफणीइतका जमिनीचा भाग.
**पाटाव** (सं. पट्ट न.) चित्रविचित्र नक्षीचें रेशमी वस्त्र. [ हक्क.
**पाटिलकी** (स्त्री.) पाटलाचें काम किंवा
**पाटी** (स्त्री.) टोपली; लिहिण्याची फळी, स्लेट; आटयापाटयांच्या खेळांत खेळण्याच्या जागीं पाडलेल्या रेघांपैकीं प्रत्येक.
**पाटीर** (न.) चंदन. [ अधिकारी.
**पाटील** (हिं. पटेल पु.) गांवचा मुख्य
**पाटु** (वि.) श्रेष्ठ.
**पाटुबंध** (प्रा. पु.) पट्टाभिषेक.
**पाटोरी** (प्रा. स्त्री.) पोट (तुका० ५६८).
**पाटोवाटीं** (प्रा. अ.) आपापल्यापरी.
**पाटोला, पाटोळी** (प्रा. पु.) रेशमी वस्त्र.
**पाठ** (सं. पु.) धडा; वहिवाट; नियम; आवृत्ति, पुनः पुनः म्हणणें; (स्त्री.) पार्श्वभाग, कंबरेपासून मानेपर्यंतचा शरिराचा मागचा भाग; (अ.) मुखोद्गत. **पाठची बहीण किंवा भाऊ**—एकाद्याच्या पाठीवर (मागाहून) झालेलें भावंड; **पाठ थोपटणें**—शाबासकी देणें; **पाठ भुईला लागणें**—चीत होणें; **पाठ देणें**—शत्रूला भिऊन पळ काढणें; मुकाट्यानें सहन करणें; **पाठ दाखविणें**—समोरून पळून जाणें; **पाठ राखणें**—मदत करणें; **पाठीचें साल जाणें**—अतिशय नुकसान सोसावें लागणें; **पाठीला असणें**—रक्षण करण्यास सिद्ध असणें; **पाठीस लागणें**—पिच्छा पुरविणें; **पाठीशीं घालणें**—आश्रय देणें.

**पाठक** (सं. पु.) अध्यापक, पुराणिक.
**पाठकुळी** (अ.) पाठीवर.
**पाठकोरा** (वि.) एका बाजूनें लिहिलेला.
**पाठगा** (वि.) पाठीवर स्वारी घेण्यास शिकविलेला (पशु).
**पाठण** (न.) चोळीची पाठ.
**पाठपुरावा** (पु.) मदत; साह्य.
**पाठबळ** (न.) मदत; साह्य.
**पाठमोरा** (अ.) पाठीकडून.
**पाठ्य** (न.) पाठ करण्याचें; क्रमिक (पुस्तक इ०).
**पाठराखण** (स्त्री.) लग्न झाल्याबरोबर मुलीच्या बरोबर सोबत म्हणून तिच्या सासरीं जाणारें माणूस; साह्यकर्ती.
**पाठरिघावा** (पु.) पाठबळ; साह्य.
**पाठलाग** (पु.) पाठोपाठ जाणें; तपास.
**पाठवणी, पाठवणूक** (स्त्री.) बोळवण; निरोप देणें.
**पाठवळ** (न.) ओझ्याचें जनावर.
**पाठविणें** (क्रि.) धाडणें.
**पाठशक्ति** (सं. स्त्री.) स्मरणशक्ति.
**पाठशाळा** (सं. स्त्री.) विद्यालय; शिकण्याची जागा; शाळा.
**पाठसरीं** (अ.) मागच्या बाजूस. [ यादी.
**पाठा** (प्रा. पु.) विस्तृत माहिती; सविस्तर
**पाठाड, पाठाण, पाठ** (न.) लांबरुंद पाठ.
**पाठांतर** (सं. न.) दुसऱ्या पोथींत असलेले निराळे शब्द; पाठ केलेला ग्रंथाचा भाग.
**पाठार** (प्रा. पु. न.) पाठबळ; आश्रय.
**पाठाळ** (न.) ओझ्याचें जनावर. [ कर्ता.
**पाठिंगा, पाठिंबा** (पु.) पाठबळ; साह्य-
**पाठीं** (अ.) मागून, नंतर.
**पाठुंगळीं** (अ.) पाठीवर.
**पाठेळ** (प्रा. न.) ओझ्याचें जनावर.
**पाठोपाठ** (अ.) मागोमाग; लागलीच.
**पाठोवाटा, पाठोवाटी** (प्रा. अ.) पाठोपाठ.
**पाड** (पु.) निरख; वृक्षावरचें पिकूं लागलेलें फळ.
**पाड** (प्रा. पु.) थोरवी (ज्ञा० १७।१२); मोल (भा० ५।१०१); सादृश्य; परिणाम; डोंगर; पहाड, जंगल; (अ.) पलीकडे.
**पांड** (पु.) विघ्याचा विसावा अंश.
**पाडकुळा** (वि.) वयानें मोठा असून कोंवळा.
**पाडणें** (क्रि.) खालीं येईल असें करणें; (भोंक, विहीर, रुपये, कोष्टक इ.) करणें.
**पाडथळ** (न.) पाटस्थळ पहा. [ चन्हाट.
**पाडसारु** (प्रा. पु.) दोरखंड, जाड दोर,
**पांडव** (पु.) पंडूचा वंशज, विशेषतः पण्डुराजाचीं पांच मुलें.
**पांडवकृत्य** (सं. न.) लेणें; डोंगरांत खडकावर कोरलेल्या मूर्ति वगैरे.
**पाडवा** (सं. प्रतिपदा पु.) प्रतिपदा; वर्षप्रतिपदा. [ लहान मूल.
**पाडस** (न.) हरिणाचें बच्चें; वासरूं;
**पाडसें** (प्रा. न.) पात्र (भावार्थ० १।४५०५).
**पाडा** (प्रा. पु.) खोंड; गोऱ्हा; शेतकऱ्याची झोपडी; खोपटें; उजळणीचा पाठ; अक्षरांचा धडा (क, का, कि, की, इ०); लांबलचक गोष्ट; गांवाचा भाग; पेठ; रोपटें.
**पाडा पेटविणें** बैलाला नांगर ओढण्याचें शिक्षण देणें.
**पांडा** (पु.) वाघाचें बच्चें.
**पाडाउ** (प्रा. पु.) स्वसत्ताधीन करणारा (अमृ० २।५).
**पाडाव** (पु.) पराभव; लढाईंत जिवंत धरलेले लोक. [भाषणचातुर्य.
**पांडित्य** (सं. न.) विद्वत्ता; नैपुण्य;
**पाडी** (स्त्री.) डोंगर; टेकाड; गोजी; कालवड.
**पांडु, पांडुर** (सं. वि.) पांढरें; फिकें.
**पांडुरोग** (सं. पु.) एक रोग.
**पाडें** (प्रा. अ.) प्रमाणें; (न.) वासरूं.
**पाडेजणें** (प्रा. क्रि.) विस्तारणें.
**पाडेवार, पांडेवार** (प्रा. पु.) महार (तुका० १२८२९).
**पांड्या** (पु.) मोठा वाद; कुळकर्णी.
**पाढऊ** (प्रा. पु.) संग्रह.
**पांढर** (स्त्री.) ग्रामदेवता; गांवाच्या हद्दींतील जमीन; गांवांतले लोक; पांढरी माती.
**पांढरगणा** (पु.) बारा बलुते.

नगर वाचनालय, सातारा.



**पांढरपेशा** (पु.) अंगमेहनतीचीं कामें न करणाऱ्या लोकांचा वर्ग; लेखकवर्ग.

**पांढरा** (सं. पांडुर वि.) सफेत; शुभ्र. **पां०वर काळें करणें**—लिहिणें; **पां० पायाची** —अपशकुनी.

**पांढरी** (स्त्री.) गांवठाण, जिच्यावर मनुष्यें घरेंदारें करून नांदतात ती (जमीन).

**पाढा** (सं. पाठ पु.) घडा; उजळणींतलें दशक.

**पाढाउ** (प्रा. वि.) बोधक; (पु.) मार्गदर्शक, वाटाड्या (अमृ० २।५).

**पांढुरका** (वि.) कांहींसा पांढरा.

**पाणउतार** (पु.) नदींतून जातां येतें अशी जागा; पाणी ओसरणें.

**पाणउतारा** (पु.) मानखंडना.

**पाणक्या** (पु.) पाणी भरणारा.

**पाणचक्की** (स्त्री.) पाण्याच्या जोरानें फिरणारी चक्की.

**पाणचट** (वि.) बेचव; शुष्क; वाष्कळ.

**पाणचोर** (प्रा. पु.) गारोड्याजवळचें एक पात्र (तुका० २०२८).

**पाणजांवई** (पु.) थट्टेनें—जांवयाचा भाऊ.

**पाणढाळ** (पु.) पाणी जाण्यासाठीं दिलेला उंच उतार.

**पाणथरी** (स्त्री.) पोटांतली चीप (एक रोग).

**पाणथळ** (स्त्री.) पुष्कळ ओलावा असलेली जमीन; पाटाचें पाणी मिळण्याची सोय असलेली जमीन.

**पाणद, पाणंद, पाणंदी, पाणंधी** (स्त्री.) गांवांतून किंवा शेतांतून जाणारी लहान वाट.

**पाणपिशी** (स्त्री.) पर्जन्यातिशयामुळें भरलेलें धान्याचें कणीस.

**पाणपिसें** (प्रा. न.) भ्रमिष्टपणा.

**पाणपोई** (स्त्री.) पांथस्थांना पाणी पाजण्यासाठीं केलेली सोय.

**पाणबुडा** (प्रा. पु.) मासे धरणारा कोळी; पाण्यांत बुडी मारून तळाशीं गेलेल्या वस्तु वर काढणारा; मोत्यें काढणारा.

**पाणबुडी** (स्त्री.) पाण्याच्या पृष्ठभागाखालीं चालणारी नौका.

**पाणलोट** (पु.) पाणी ओघळून जाईल असा उतार; टेकडीच्या किंवा डोंगराच्या उतरत्या कडा; पाण्याचा प्रवाह.

**पाणवठा, पाणवडा, पाणवथा** (पु.) पाण्याची जागा.

**पाणवळ** (वि.) पावसाळ्यानंतर कांहीं काळपर्यंत ओलावा धरून ठेवणारी (जमीन.)

**पाणशेंग** (स्त्री.) थट्टेनें—मासळी.

**पाणसळ, पाणसाळ** (न.) साधनी.

**पाणाडी, पाणाड्या** (पु.) पाणी शोधून काढणारा.

**पाणि** (सं. पु.) हस्त; हात.

**पाणिग्रहण** (सं. न.) विवाहधर्मानें स्त्रीचा स्वीकार करणें.

**पाणिटाळ** (प्रा. पु.) पायउतार.

**पाणियडें, पाणियाडें** (प्रा. न.) पाण्याचा साठा (भावार्थ० ११।७८); तळें.

**पाणिवळ** (न.) पाण्यांतला कचरा.

**पाणी** (सं. पानीयम् न.) जल; उदक; पाऊस; शस्त्राची धार; धमक; वीर्य; तेज, चकाकी; टवटवी; मुलामा; अब्रू. **अंगाचें (किंवा रक्ताचें) पाणी करणें**—अति श्रम करणें; **खोल पा० त शिरणें** फार मन घालणें; बारकाईनें पाहणें; आंवाक्याबाहेर जाणें;-- **वर पाणी सोडणें** – दान करणें; आशा सोडणें; **पाणी देणें**—मृताला तिलांजलि देणें; **वर पाणी पडणें**—फुकट जाणें; **पाणी पाजणें**–शेरास सवाशेर भेटणें; **पाणी पाणी करणें**—दमणें; दमविणें; **पाणी मुरणें**—दोषाला जागा असणें; **पा०त पाहणें**—द्वेष करणें.

**पाणीटाळ, पाणीटाळू** (प्रा. पु.) ओहोटी.

**पाणीदार** (वि.) तेजस्वी; सतेज.

**पाणीवणें** (प्रा. क्रि.) पळणें.

**पाणीवाळ** (प्रा. पु.) पाण्यांतला मळ.

**पाणोटा, पाणोठा, पाणोथा** (पु.) पाण्याची जागा.

**पाणोवाणी** (प्रा. अ.) पाठोपाठ (तुका० १४९२).

**पात** (सं. पु.) पतन; पडणें; नाश; प्रहार; राहु; १७ वा योग; (सं. पत्र न.) पान; पापणीचे केस; कुऱ्हाडीचें दांडा घालण्याचें तोंड.

**पात, पांत** (सं. पंक्ति स्त्री.) ओळ, रेघ.
**पातक** (सं. न.) पाप; अधर्म; दोष.
**पातकी** (सं. पु.) पापी, अपराधी.
**पातंजलयोग** (प्रा. क्रि.) पतंजली नांवाच्या ऋषीनें काढलेली योगपद्धति.
**पातडें** (न.) पंचांग; चोपडें.
**पातणें** (प्रा. क्रि.) येऊन पोंचणें.
**पातन** (न.) एक रासायनिक क्रिया.
**पातवडा** (पु.) पापुद्रा.
**पातवडी** पाटवडी पहा.
**पातलेतणें** (पु.) कळणें.
**पातळ** (वि.) द्रवयुक्त; जाडीला कमी; किडकिडीत; विरळ.
**पातळी** (स्त्री.) भूमितिशास्त्रांत—ज्याला लांबी व रुंदी मात्र आहेत तें पृष्ठ किंवा क्षेत्र. [ लोक.
**पाताल, पाताळ** (सं. न.) पृथ्वीच्या खालचा
**पाताळयंत्री** (सं. वि.) कारस्थानी, खोल मसलत करणारा.
**पातिकर** (प्रा. पु.) वांटेदार, हिस्सेदार.
**पातिव्रत्य** (सं. न.) पतिव्रताधर्म.
**पांती** (प्रा. स्त्री.) पंक्ति, पंगत (भा० ६। ३५८).
**पातु** (स्त्री. न.) ब्राह्मणास दिलेली दक्षिणा.
**पाती** (स्त्री.) अंश; हिस्सा; डाकाचा पत्रा; पान; पात; कापसाच्या झाडाचें फूल.
**पांतीकर** (प्रा. पु.) पंक्तीचा जेवणारा; हिस्सेदार; सोबती.
**पातीदार** (पु.) हिस्सेदार, भागीदार.
**पातें** (न.) पाण्याचा शितोडा (सोहि० पूर्णाक्षरी); पापणी. [ ३३०८).
**पातेजणें** (प्रा. क्रि.) विश्वासणें (तुका०
**पातेरा** (प्रा. पु.) कचरा, पाचोळा; पत; आश्रय (नाम. ५७०).
**पातेली** (स्त्री.) बोघणी.
**पातेलें** (न.) बोघणें.
**पातोंडा** (पु.) पापुद्रा. [ (स्त्री.) सांथ.
**पातोळी** (वि.) जिभ चुरचुरु चालवणारी;
**पात्यविणें** (प्रा. क्रि.) सोपविणें.
**पात्र** (सं. न.) भांडें; पान; नदीची रुंदी; योग्य स्थळ; नाटकांतलें सोंग; वेश्या.
**पात्रा** (स्त्री.) नर्तकी.
**पाथ** (स्त्री.) पिकाच्या दोन रांगांतील जागा.
**पांथ** (सं. पु.) वाटसरू.
**पाथर** (पु.) दगड.
**पाथरणें** (क्रि.) पसरणें; अंथरणें.
**पाथरवट** (पु.) दगडाचें काम करणारा; शिलावट.
**पाथरा** (प्रा. वि.) पालथा (नाम० ३९३); (पु.) वाळत घातलेल्या पानांची रांग.
**पांथरी** (स्त्री.) प्लीहा.
**पांथस्थ** (सं. पंथस्थ पु.) वाटसरू.
**पांथी** (प्रा. स्त्री.) समुदाय; पाती, हिस्सा; मार्ग; पंक्ति.
**पाथेय** (सं. न.) शिदोरी; प्रवाससामुग्री.
**पाद** (सं. पु.) चरण; एकेक भाग; चतुर्थांश; वर्तुळाचा चतुर्थांश.
**पादचारी** (सं. वि.) पायीं चालणारा.
**पादडणें** (क्रि.) सपाटून काम घेणें.
**पादडा** (पु.) अतिश्रम; थकवा. [ सोडणें.
**पादणें** (सं. पर्दन् क्रि.) अपानवायु
**पादत्राण** (सं. न.) जोडा; पायतण.
**पादप** (सं. पु.) वृक्ष.
**पादपूजा** (सं. स्त्री.) मोठ्या यज्ञांत श्रेष्ठ मानल्या जाणाऱ्या व्यक्तींचा केलेला सन्मानविधि; आचार्यादि श्रेष्ठ व्यक्तींचा पूजाविधि; खरडपट्टी.
**पादपूरण** (सं. न.) वाक्याची किंवा श्लोकाच्या चरणाची भरती. [ पिंगळ.
**पादरा** (वि.) पादणारा; दुबळ; (पु.)
**पादशाहा** (फा. पु.) बादशहा; मुसलमान राजा.
**पादशाही** (फा. वि.) बादशहानें दिलेली; बादशहास शोभेशी; थोर; भव्य; (स्त्री.) बादशहाचा अंमल.
**पादसेवन** (सं. स्त्री.) चरणसेवा (नवविधाभक्तींपैकीं एक प्रकार).
**पादाक्रांत** (सं. वि.) पराक्रमानें हस्तगत केलेला.
**पांदी, पांधी, पांद** (प्रा. स्त्री.) लहान वाट.
**पादुका** (सं. स्त्री.) खडावा; पायांची प्रतिमा.
**पादेलोण** (न.) एक क्षार.
**पादोदक** (सं. न.) चरणाचें तीर्थ.

[library stamp], सातारा.



**पादोदर** (सं. पु.) सर्प.
**पाद्य** (सं. न.) पाय धुण्याचें पाणी; देवास स्नानाच्या वेळीं गंध, अक्षता, फुलें, पाणी वगैरे अर्पण करतात तें.
**पाद्री** (पोर्तु. पाद्रि पु.) ख्रिस्तधर्म-प्रचारक.
**पाधाणी, पाधानी** (प्रा. वि.) अजागळ; अडाणी (तुका० ३२५).
**पान** (सं. पर्ण न.) पत्र; पत्रा; धोतर-जोड्यांतलें एक धोतर; पत्ता; शस्त्राचा मुठीशिवाय भाग; पाकळी; सर्प; विडा; जेवण्याचें पात्र; घराच्या पागोळीचें लाकूड; पिणें; प्राशन. **पान पुजणें**—पानावर थोडेसें वाढणें; **पान न हालणें**—यत्किंचितहि कार्य न होणें; **पानावर पान टाकणें**—खरी गोष्ट दाबून ठेवणें; **तोंडाला पानें पुसणें**—फसविणें.
**पानक** (प्रा. पु.) सर्प, पन्नग; (सं. न.) सरवत, पेय.
**पानकळा** (पु.) पावसाळा.
**पानचक्की, पानचट, पानडाळ, पानथरी, पानथळ** इ० शब्दांबद्दल पाणचक्की इत्यादि शब्द पहा.
**पानगा** (पु.), **पानगी** (स्त्री.) पानाला पीठ लावून निखाऱ्यावर भाजलेली भाकरी.
**पानट** (न.) कागदाचें चिठोरें.
**पानडी** (स्त्री.) पदक.
**पानद, पानंद, पानंध** (स्त्री.) पाणंद शब्द पहा. [ठेवण्याचा डबा.
**पानदान** (न.) विड्याचीं पानें वगैरे
**पानपणें** (प्रा. क्रि.) जखम भरून येणें.
**पानपिसा** (प्रा. वि.) अति उत्सुक; वेडा.
**पानपुड** (न.) विड्याचीं पानें ठेवण्यासाठीं केलेला धातूचा किंवा वुरुडी डबा.
**पानमळा** (पु.) विड्याच्या पानांचा मळा.
**पानवटा, पानवडा** (प्रा. पु.), **पानवडें** (न.) जलाशय; धुण्याची किंवा आंघोळ करण्याची जागा.
**पानवाहलेत** एका हक्काचें नांव.
**पानसडें** (न.) विड्याचें साहित्य ठेवण्याची बटवी; चंची.
**पानसत्र** (सं. न.) पाणपोई.

**पानसरा** (प्रा. वि.) आडवा (तुका० ३८९).
**पानसळ** (स्त्री.) सपाटी पाहण्याचें यंत्र; साधनी.
**पानसांखळी** (स्त्री.) पानवार विषयसूचि.
**पानसुपारी** (स्त्री.) विड्याचें साहित्य; बोलावून सन्मान करण्याचा समारंभ; लाच म्हणून दिलेलें द्रव्य.
**पानेड** (प्रा. न.) सरोवर; जलाशय; पाचड.
**पानेडी** (प्रा. स्त्री.) खांदी (तुका० ३७३५).
**पान्हा** (सं. प्रस्नव पु.) प्रेमातिशयानें मातेच्या स्तनांतून जोरानें दूध बाहेर पडतें तें; दयेनें अंतःकरणास येणारा कळवळा.
**पान्हेरी** (स्त्री.) पोई (तुका० ४५०).
**पाप** (सं. न.) पातक; कुडाभाव.
**पापग्रह** (सं. पु.) मंगळ, शनि इत्यादि अशुभ मानलेले ग्रह.
**पापड** (सं. पर्पट पु.) उडीद वगैरेच्या पिठाची पातळ चकती.
**पापडी** (स्त्री.) लहान पापड; तांदुळाच्या पिठाचा खमंग पदार्थ. [वरचें कातडें.
**पापणी** (स्त्री.) डोळ्याचे केस; डोळ्या-
**पापर, पापरा, पापरी** (प्रा. स्त्री.) लाथ.
**पापा** (पु.) लहान मुलाचा मुका; बापाबद्दल शब्द.
**पापिष्ठ** (सं. वि.) पापी; दुष्ट.
**पापी** (सं. वि.) पातकी; पापयुक्त.
**पापुदरा, पापुद्रा** (पु. न.) पातळ त्वचा; पापडी. [मनुष्य.
**पाप्याचा पितर** (न.) अतिशय दुर्बल व क्षीण
**पांबरी, पामरी** (स्त्री.) लहान मुलांचें रेशमी वस्त्र.
**पाबळ** (प्रा. पु.) झरा; तीर; (वि.) तुच्छ
**पाबळा** (प्रा. वि.) पामर. [तुच्छ.
**पाबळी, पाबळें** (प्रा. वि.) नाशिवंत,
**पाभर** (स्त्री.) शेतांत बीं पेरण्याचें आऊत.
**पाभरी** (प्रा. स्त्री.) पेरणी.
**पाय** (सं. पाद पु.) चरण; खूर; भाग. **पाय धरणें**—आश्रय करणें, विनवणी करणें; **पाय काढणें**—बाहेर निघणें; **पोटावर पाय देणें**—उत्पन्न बुडविणें; **पाय मोडणें**—उत्साहभंग होणें; **पाय**

**मोकळे करणें**– फेरफटका करणें; **पाय फुटणें**–पाय भेगाळणें; वस्तु चोरीस जाणें; **पाय वाहणें**-मनाचा कल होणें; **पायां पडणें**-याचना करणें; नमस्कार घालणें; **पायास भोवरा असणें**– सदोदित भटकत राहणें.

**पायउतार** (पु.) नदींतून पायांनीं चालत जाण्यासारखी वाट.

**पायका** (पु.) टाइपाच्या एका जातीचें नांव.

**पायकी** (प्रा. स्त्री.) चाकरी.

**पायखाना** (फा. पु.) शौचकूप.

**पायखोळ** (प्रा. स्त्री.) लाथ. [बाजू.

**पायगत** (स्त्री.) बिछान्याची पायाकडची

**पायगुण** (पु.) एकाद्याचें येणें व त्यानंतर लगेच कांहीं बऱ्यावाईट गोष्टी घडणें यांच्यामध्यें जोडण्यांत येणारा काल्पनिक कार्यकारणसंबंध.

**पायघड्या** (स्त्री. अने.) लग्नासारख्या प्रसंगीं वरपक्षाकडील बायकांच्या मिरवणुकींत त्यांच्या रस्त्यावर आंथरलेलीं वस्त्रें.

**पायघोळ** (वि.) पायापर्यंत पोंचेसा.

**पायचाकी** (स्त्री.) दुचाकी; सायकल.

**पायचीत** (न.) पायाला चेंडू लागून बाद होणें (क्रिकेटमध्यें). [चोळणा.

**पायजमा** (फा. पायजामा पु.) विजार,

**पायटा** (पु.) **पायठण, पायठणी** (स्त्री.) पायरी; पायवाट; वहिवाट.

**पायंडा** (पु.) प्रारंभ; झाडावर चढतांना पाय ठेवण्यासाठीं झाडाला केलेली लहानशी खोवण.

**पायंडी** (स्त्री.) पायरी.

**पायतरें** (प्रा. न.) पायरी (ज्ञा. ८।२२२).

**पायताण, पायतान** (सं. पादत्राण न.) जोडा, वहाण.

**पायतें, पायतर** (न.), **पायतरा, पायता** (पु.), **पायथर** (न.), **पायथा** (पु.) बिछान्याची अगर डोंगराची पायाकडची बाजू. [फौज.

**पायदळ** (न.) प्यादा; पायांनीं चालणारी

**पायधरणी** (स्त्री.) पायां पडणें; अतिशय नम्रतेची विनवणी.

**पायधूळ झाडणें** आगमन करणें, भेट देणें.

**पायपिटी, पायपीट** (स्त्री.) चालण्याचे श्रम.

**पायपुसणें** (न.) पाय पुसण्यासाठीं दाराशीं ठेविलेली काथ्याची जाड गादी.

**पायपोस** (फा. पापोस पु.) जोडा. कोणाचा पा० कोणाच्या पायांत नसणें–सर्व गोंधळ असणें.

**पायपोसी** (पु.) एका हक्काचें नांव.

**पायबंद** (फा. पु.) घोड्याचे मागील पाय बांधावयाची दोरी.

**पायमल्ली, पायमाली** (फा. पायमाली स्त्री.) नासाडी; अवहेलना.

**पायमांडा** (प्रा. स्त्री.) पायघड्या.

**पायमांडें** (न.) उत्साहभंग करणारी गोष्ट.

**पायरव** (प्रा. पु.) चाहूल; रस्ता; वहिवाट; दळणवळण; (स्त्री.) दृष्ट.

**पायरी** (स्त्री.) पायंड; योग्यता, दर्जा; आंब्याची एक जात. **पा० स पाय लावणें**–बरोबरी करूं पाहणें.

**पायरीक** (प्रा. पु.) कनिष्ठ जातीचा; अतिशूद्र (तुका. १३०५).

**पायली** (स्त्री.) चार शेरांचें माप. **पा० चे पंधरा**–क्षुद्र किंमतीची.

**पायवणी** (प्रा. न.) चरणतीर्थ.

**पायस** (सं. न.) खीर; दूध.

**पायसूट** (वि.) चपळ.

**पायळा** (पु.) लहान कोयता.

**पाया** (पु.) घर वगैरे बांधण्यापूर्वी जमीन खणून तींत दगड वगैरे घालून केलेली बंदिस्थ जागा; प्रारंभ.

**पायातळीं घालणें** इमारतीच्या पायामध्यें जिवंत मनुष्य घालणें; सपशेल मारणें.

**पायाळू** (वि.) पायाकडून जन्मलेला.

**पायेचा सरदार** (पु.) पायदळावरचा अधिकारी.

**पायिक** (पु.) पायदळांतील शिपाई.

**पायी** (स्त्री.) राहुटीच्या तानव्यावरचा हातभर लांबीचा अंश; राहुटीच्या आंत पाणी यऊं नये म्हणून खणतात तो चर.

**पार** (सं. पु.) अंत; पलीकडचें तीर; वृक्षाच्या बुंध्यासभोंवारचा कडा; नदीचा पायउतार; (अ.) पलीकडे.
**पारका** (प्रा. पु.) शत्रु.
**पारख** (सं. परीक्षा स्त्री.) परीक्षा; ज्ञान.
**पारखणें** (सं. परीक्ष् क्रि.) परीक्षा करणें; तपासणें.
**पारखा** (वि.) परका, अपरिचित; विचित्र.
**पारखी** (प्रा. पु.) परीक्षक; मर्मज्ञ.
**पारंगत** (वि.) निष्णात.
**पारगा–गी** (स्त्री.) सकाळीं किंवा दुपारीं कामावर जाण्याची वेळ.
**पारचा** (फा. पर्चा पु.) तुकडा, वस्त्र.
**पारज** (सं. पारद पु.) पारा.
**पारजा, पुरजा** (पु.) कागदपत्र, चिठोरें.
**पारठा** (प्रा. वि.) पोक्त, पक्व.
**पारडी** (स्त्री.) रेडी.
**पारडूं** (न.) म्हशीचें रेडकूं.
**पारडें** (न.) तराजूची एक बाजू.
**पारणा, पारणी** (प्रा. स्त्री.), **पारणें** (न.) उपास सोडणें; समाधान.
**पारतंत्र्य** (सं. न.) परवशता, परावलंबन.
**पारत्रिक** (सं. वि.) परलोकसंबधीं.
**पारद** (सं. पु.) पारा.
**पारदर्शक** (वि.) प्रकाश पलीकडे जाऊं [ देणारा.
**पारध** (स्त्री.) शिकार.
**पारधी** (प्रा. पु.) शिकारी.
**पारपत्य** (न.) शिक्षा; दंड.
**पारंपर्य** (न.) परंपरा; एकसारखा क्रम.
**पारंबी** (स्त्री.) वडासारख्या झाडांचीं खालीं लोंबणारीं मुळें.
**पारमार्थिक** (सं. वि.) अध्यात्मविषयक.
**पारलौकिक** (सं. वि.) परलोकाविषयींचें.
**पारवसा** (वि.) पारोसा.
**पारवा** (पु.) पारावत; कबुतराची एक जात; (वि.) त्याच्या रंगाचा.
**पारशी** (स. पारसिक पु.) इराण देशांतला अग्निपूजक.
**पार्श्वसंगीत** (न.) गाण्याकरितां वाद्यांची व सुरांची मागून दिलेली साथ.
**पारसनीस** (फा. फारसीनवीस पु.) फारशी पत्रव्यवहार करणारा चिटणीस.
**पारा** (सं. पारद पु.) एक पातळ खनिज पदार्थ.
**पारायण** (सं. न.) साद्यंत वाचन.
**पारावार** (सं. पु.) मर्यादा; अंत; समुद्र.
**पारिजात, पारिजातक** (सं. पु.) प्राजक्त; (प्रा. न.) वैदिक मंत्र (ज्ञा. १८।१६८१).
**पारिजे** (सं. पारद न.) पारा.
**पारितोषिक** (सं. न.) बक्षीस; देणगी.
**पारिपत्य** (सं. न.) दंड; शिक्षा.
**पारिपार्श्वक** (पु.) नाटकांतील सूत्रधाराचा साहाय्यक.
**पारिभाषिक** (वि.) शास्त्रीय, शास्त्रांत योजावयाचा (शब्द).
**पारियात्र** (सं. पु.) पर्वत.
**पारियेणें** (प्रा. क्रि.) ऐकणें.
**पारिसा** (प्रा. वि.) पारोसा; स्नान न केलेला.
**पारी** (प्रा. स्त्री.) आच्छादन; धान्यावर पडणारी कीड.
**पारीण** (वि.) पारंगत; माहितगार; तज्ज्ञ.
**पारु** (प्रा. पु.) पार; तीर; अंत.
**पारुखणें** (प्रा. क्रि.) स्पर्शणें.
**पारुण** (प्रा. वि.) पारखा.
**पारुषण** (प्रा. न.) माघारें फिरणें.
**पारुषणा** (प्रा. वि.) फिका; निस्तेज.
**पारुषणें** (प्रा. न.) कुंठित होणें; सुटणें; नष्ट होणें.
**पारुष्य** (सं. न.) कठिणपणा; टणकपणा; भाषणाचा कठोरपणा; टोमणा; निंदा.
**पारेठा** (वि.) पारठा पहा.
**पारोसा** (सं. पर्युषित वि.) स्नान न केलेला; शिळा.
**पार्ट** (इं. पु.) नाटकांतली भूमिका.
**पार्टी** (इं. पु.) नाटकांत भूमिका घेणारा.
**पार्थ** (सं. पु.) पृथेचा मुलगा, अर्जुन.
**पार्थक्य** (सं. न.) भिन्नपणा.
**पार्थिव** (सं. न.) पूजेसाठीं केलेलें मृत्तिकेचें लिंग; (पु.) राजा; (वि.) पृथ्वीवरील.
**पार्वण** (सं. न.) पर्वकाळचें पितृश्राद्ध.
**पार्वती** (सं. स्त्री.) शिवाची पत्नी.
**पार्श्व** (वि.) बाजूचा; (न.) बाजू.
**पार्षद** (पु.) सेवक; चाकर.

**पार्सल** (इं. न.) गठ्ठा; एका गांवाहून दुसऱ्या गांवाला पोष्टानें पाठवावयाचा गठ्ठा.
**पाऱ्हेरा** (प्रा. पु.) संगत (तुका० ८८७).
**पाल** (न.) वस्त्राची छाया; लढाऊ गलबताचा एक प्रकार; पालनकर्ता; (सं. पल्ली स्त्री.) एक क्षुद्र जंतु; (न.) उघड्या जागेंत तंबूच्या कापडासारखें उभारलेलें दुकान.
**पालऊ** (प्रा. पु.) पल्लवी; पदर.
**पालक** (सं. पु.) पालनकर्ता.
**पालख** (प्रा. पु.) पाळणा. [एक यान.
**पालखी** (प्रा. स्त्री.) शिबिका; डोलीसारखें
**पालखीपदस्थ** (पु.) पालखींत बसण्याचा अधिकार मिळालेला.
**पालट** (पु.) बदला; (अ.) बद्दल.
**पालटणें** (क्रि.) बदलणें.
**पालटवाणें** (न.) खाण्यापिण्यांत बदल.
**पालटें** (न.) धान्य साठविण्यासाठीं तट्ट्या, चट्ट्या इत्यादि उभारून करतात तें वारदान; कणगा.
**पालती** (प्रा. पु.) भाव.
**पालथा** (वि.) खालीं तोंड केलेला. **पा० घागरीवर पाणी**–निष्फळ उपदेश.
**पालन** (सं. न.) रक्षण.
**पालभारा** (पु.) झाडांचा पाला गांवांत आणिल्याबद्दल त्याच्या ओझ्यावर घेण्यांत येणारी जकात.
**पालव** (सं. पल्लव पु.) पदर.
**पालवण** (न.) झाडाला फुटलेले नवे अंकुर किंवा कोंवळीं पानें.
**पालवणें** (क्रि.) पदर घालणें; झाकणें; पालवी फुटणें; विस्तार करणें; प्रकट करणें; पदराच्या वाऱ्यानें दिवा मालविणें.
**पालवणी** (न.) दुखण्यांतून उठलेल्या मनुष्यास प्रथम स्नान घालण्यासाठीं औषधी कडुलिंब इत्यादि घालून तापविलेलें पाणी.
**पालविणें** (प्रा. क्रि.) खुणावणें.
**पालवी** (सं. पल्लव स्त्री.) अंकुर; पानें; हाकेस उत्तर (तुका० ५१७).
**पालवें** (प्रा. न.) लुगड्याचा पदर.
**पाला** (सं. पल्लव पु.) पानें; पाचोळा.
**पालाण** (सं. पल्याण पु.) खोगीर; आच्छादन.
**पालाणणें** (प्रा. क्रि.) सज्ज करणें (विठ्ठल० रुक्मिणी० ५।३७).
**पालाण पडणें** वर्चस्व मिळविणें (स्वा० दि० ९।१।७५).
**पालाणविणें** (प्रा. क्रि.) तरंगण्यास लावणें (मुक्ते० रामा० १।४५).
**पालालणें** (प्रा. क्रि.) ओलांडणें.
**पालाश** (सं. वि.) पळसाचा.
**पालाशविधि** (पु.) एखाद्या माणसाचा मरेपर्यंत शोध न लागल्यास व तो मेला असें पक्कें समजल्यानंतर, त्याचें प्रेत किंवा अस्थि सांपडत नसल्यास त्याचा पळसाच्या पानाचा पुतळा करून त्याचें और्ध्वदेहिक करण्याची क्रिया.
**पालिंग** (प्रा. पु.) समुदाय.
**पालिंगन, पालेंगण** (प्रा. न.) समुदाय, पंक्ति (ज्ञा. ११।२०३).
**पालित** (वि.) संगोपन केलेला; सांभाळलेला. [३६३).
**पालिचण** (प्रा. न.) पर्णकुटि (ज्ञा०२।
**पालि–ली** (सं. स्त्री.) कानाची पाळ; परिघ; एक भाषा (बौद्ध ग्रंथ या भाषेंत आहेत). [पदांतला भाग.
**पालुपद** (न.) ध्रुपद, वारंवार म्हणण्याचा
**पालें** (न.) गवत, झाडांचीं पानें इत्यादिकांचा समुदाय; धान्य साठविण्याकरितां केलेलें काटक्यांचें वारदान.
**पालेखाईर** (प्रा. वि.) झाडाचा पाला खाणारा (रामवि० २५।६२).
**पालेजणें** (प्रा. क्रि.) पालवी फुटणें; सचेतन करणें. [२।३६३).
**पालेवन** (प्रा. न.) पर्णकुटी (ज्ञा.)
**पालोवेली** (प्रा. स्त्री.) विस्तार.
**पाल्हविणें** (प्रा. क्रि.) पेरणें. [करणें.
**पाल्हावणें** (प्रा. क्रि.) विस्तारणें; प्रगट
**पाल्हाण** (प्रा. पु.) वेढा; हत्ती, उंट इ. च्या पाठीवर घालावयाचें एक प्रकारचें खोगीर.

**पाल्हाणणें** (क्रि.) पाल्हाण घालून सजविणें; सज्ज करणें; सिद्ध करणें.
**पाल्हाळ** (सं. पल्लव पु.) विस्तार.
**पाल्हेजणें** (प्रा. क्रि.) प्रफुल्लित होणें; विस्तारणें (मुक्ता० आदि० २२।८२).
• **पाय** (प्रा.पु.) पाय; चतुर्थांश; (पोर्तु. पाव पु.) रोटी.
**पावक** (सं. पु.) अग्नि.
**पावका** (पु.) शिडीच्या पायरीचीं लाकडें; घडवंचीं वगैरेचा पाय; झाडावर चढण्यास अगर विहिरींत उतरण्याकरितां पाडलेल्या खाचा.
**पावकें** (न.) चतुर्थांश; एक चतुर्थांशानें वाढत जाणारी प्रत्येक संख्या.
**पावजी** (पु.) मीठ पिकविणारा व्यापारी.
**पावटणी, पावठणी** (स्त्री.) पायरी, पदचिन्ह.
**पावटा** (पु.) धातूची तार ओढण्याचा रहाट; एक प्रकारचें धान्य (वरणा).
**पांवडा** (प्रा.) विहिरींत उतरण्यासाठीं किंवा झाडावर चढण्यासाठीं पाडलेल्या खाचा.
**पांवडें** (प्रा. न.) मानभावी पंथाचे लोक आकड्यासारखा वाकलेला दंड हातांत घेतात तो; कटोरा; खोरें; (वि.) पागळें (दा०३।६।४१).
**पावणें** (सं. प्राप् क्रि.) पोचणें; मिळणें; समर्थ होणें; शक्य असणें.
**पावणे आठ** (वि.) नपुंसक.
**पावता** (वि.) पोचता.
**पावती** (स्त्री.) पोच मिळाल्याबद्दलचा लेख.
**पावन** (सं. वि.) शुद्ध, निर्दोष.
**पावय** (स्त्री.) मधुर वाणी, गोड शब्द.
**पांवरी** (स्त्री.) लहान पांवा ; मुरली.
**पावला** (पु.), **पावली** (स्त्री.) चार आण्याचें नाणें.
**पावशा** (पु.) चातक पक्षी.
**पावसाळा** (पु.) पर्जन्यकाळ.
**पांवा** (पु.) वेणु; अलगुजा.
**पावित्र्य** (न.) पवित्रपणा; शुचिता.
**पावेतों** (अ.) पर्यंत.
**पावो** (पु.) पाय, चरण.
**पावोन** (प्रा. अ.) पासून.
**पावों सरणें** कळून येणें; वाटूं लागणें.
**पाश** (सं. पु.) फास, फासा.
**पाशीं** (सं. पार्श्व अ.) जवळ, समीप.
**पाशुपत** (पु.) भैरवाचे उपासक; (न.) शंकराच्या प्रसादानें मिळणारें एक अस्त्र.
**पाशुला** (प्रा. स्त्री.) माती.
**पाशेरी** (स्त्री.) पांच शेरी माप.
**पाश्चात्य** (वि.) पश्चिम खंडांतील; पश्चिमेकडील. [ मत.
**पाषंड** (सं. पु.) नास्तिक; (न.) नास्तिक
**पाषाण** (सं. पु.) दगड, धोंडा. **पा० हृदयी** (वि.) निष्ठुर मनाचा.
**पाष्टा** (प्रा. पु.) सुताची गुंडी.
**पास** (सं. अ. ) जवळ; (न.) कुळवाचें पातें; कुळव; (इं. वि.) उत्तीर्ण; (इं. पु.) परवाना, तिकिट; (स्त्री.) दुजोरा.
**पासंग** (प्रा. पु.) तराजूच्या तोलांतला विषमपणा; तो विषमपणा काढून टाकण्यासाठीं एका पारड्यांत घातलेलें वजन. **पा० स न पुरणें**–अगदीं थोडा किंवा कमी योग्यतेचा असणें.
**पासरी** (स्त्री.) पांच शेरांचें वजन.
**पासलणें** (क्रि.) आडवें होणें, निजणें.
**पासला** (वि.) जमिनीवर आडवा पडलेला.
**पासवण** (स्त्री.), **पासवणें** (प्रा. क्रि.) मागें पाहणें (ज्ञा० १३।४९६).
**पासवा** (पु.) वस्त्राचा पदर; नदीचा फाटा.
**पासाव** (प्रा. अ.) पासून; पेक्षां.
**पासावणें** (प्रा. क्रि.) जवळ होणें.
**पांसाळी** (स्त्री.) धुळीचा लोट.
**पासिक** (सं. पाश पु.) फास.
**पासून** (अ.) जवळून, कडून; नंतर, पुढें.
**पासोडा** (पु.) मोठी पासोडी; सुताडा.
**पासोडी** (स्त्री.) झापड (मोरो० द्रोण ९।३१); जोड; दुहेरी जाड वस्त्र; सारा माफ असलेली पाटलाला दिलेली जमीन.
**पांसोळी, फांसोळी** (स्त्री.) बरगडी.
**पांसू** (पु.) धूळ; माती.
**पासून** (अ.) विहित काळानंतर.

**पासौनी** (प्रा. अ.) पेक्षां. [ चौकशी.
**पास्तपुस्त** (हि. पाछपुछ स्त्री.) विचारपूस,
**पास्तर** (स्त्री.) पाचर पहा.
**पाहडी** (स्त्री.) पालखी वाहून नेणाऱ्या लोकांची टोळी; जमाव.
**पाहणी** (स्त्री.) परीक्षा, देखरेख.
**पाहणें** (क्रि.) बघणें, अवलोकणें.
**पाहाणा** (प्रा. वि.) सुंदर.
**पाहाण्या** (पु.) हरवलेली वस्तु अमुक दिशेकडे गेली आहे, अमुक स्थळीं आहे, हें मंत्रविद्येनें सांगू शकतो तो; अमुक ठिकाणीं खणलें असतां पाणी लागेल किंवा न लागेल हें जो कांहीं अडाख्यावरून किंवा शास्त्रावरून सांगू शकतो तो.
**पाहाणें** (प्रा. क्रि.) उजाडणें, प्रकाशणें.
**पाहात** (प्रा. स्त्री.) प्रभात, पहाट, पाहालें.
**पाहाती** (प्रा. वि.) प्रकाश पाडणारी.
**पाहालणें, पाहाळणें** (प्रा. क्रि.) उजाडणें (ज्ञा० ५।३१).
**पाहालें** (प्रा. न.) उजेड; प्रकाश; (स्वा.दि. १।२५२).
**पाहाळ** (प्रा. पु.) विस्तार, पाल्हाळ.
**पाहिजे** (क्रि.) इष्ट ; हवें.
**पाहुडा** (प्रा. पु.) पाऊल. **पा० पावणें**— मागें पाऊल घेणें.
**पाहुणचार** (पु.) आदरातिथ्य.
**पाहुणा** (सं. प्राघुर्ण पु.) गांवाहून आपल्या घरीं आलेला मनुष्य; अतिथि.
**पाहुणें** (न.) उखळ; (वि.) अल्पकाळ टिकणारें.
**पाहुणेर, पाहुणेरें** (प्रा. स्त्री.) आतिथ्य.
**पाहे** (प्रा. स्त्री.) पाहाट; (अ.) उद्यां.
**पाहेणें** (प्रा. क्रि.) प्रवेशणें.
**पाळ** (सं. पालि स्त्री.) कांठचा प्रदेश; पाळें; वंधारा; जात्याचें टवळें; टोक; कानाची कड; मूळ; (पु.) समूह (शिवलीला० १३।७).
**पाळक** (पु.) मेंढपाळ; धार्मिक मण्डळाची सेवा करणारा (ख्रिस्ती).
**पाळणा** (पु.) लहान मुलाचा झोपाळा; एक प्रकारचें निद्रागीत.
**पाळणूक** (स्त्री.) पाळणें, राखणें; वाळगणें; करमाफी. [ आचरणें.
**पाळणें** (सं. पालन्. क्रि.) राखणें, वाळगणें,
**पाळत, पाळती, पाळथ** (स्त्री.) पाहरा; गुप्त शोध; टेहळणी; चोरबातमी; रक्षण; जतन.
**पाळंद** (स्त्री.) शेतांतील दाट; घाटी.
**पाळा** (प्रा.पु.) वेढा, गरका; समुदाय, टोळी.
**पाळिगण** (प्रा.पु.) समदाय (भा० ५।११६).
**पाळिगण** (प्रा. पु.) सांठवण.
**पाळिगा** (प्रा. पु.) थवा.
**पाळिजणें** (प्रा. क्रि.) फाकणें.
**पाळी** (प्रा. स्त्री.) नांगराचा अथवा कुळवाचा फेरा (तुका० ११४७); फेरी; क्रम; समूह (राम० ११।५६).
**पाळींव** (वि.) पाळलेला; माणसाळलेला.
**पाळुं** (न.) जात्याच्या तोंडाची उंच कड.
**पाळें** (प्रा. न.) समुदाय; काष्ठपात्र.
**पाळेगार** (पु.) वंडखोर; वंडखोरांचा सरदार.
**पाक्षिक** (सं. वि.) पंधरवड्याचें.
**पिंक** (स्त्री.) थुंकी; चूळ.
**पिक** (सं. पु.) कोकिळ पक्षी.
**पिकणें** (सं. पच् क्रि.) पक्व होणें; उत्पन्न होणें; चंगळ होणें. [ टिकाव, कुदळी.
**पिकंदर** (पो. पिकाडीरा न.) पिकाव,
**पिकदाणी, पिकदानी** (हिं. पीकदान स्त्री.) थुंकण्याचें पात्र.
**पिकलें** (न.) पिकाचा हंगाम.
**पिकलें पान** (न.) अतिशय वृद्ध मनुष्य.
**पिकविणें** (क्रि.) पिकेलसें करणें, पिकण्यास लावणें; उत्पन्न करणें; (कंडी) पसरविणें.
**पिका** (वि.) पिकलेला.
**पिकाऊ** (वि.) सुपीक; पिकण्यास झालेला.
**पिंकाणी** (स्त्री.) पानाची वगैरे सुरळी करून मुलें वाजवितात ती.
**पिकाव** (पोर्तु. पिकाडीरा न.) टिकाव, कुदळी, पिकंदर.
**पिंकी** (स्त्री.) थुंकी. [ येणें.
**पिकुटणें** (क्रि.) फिकें होणें, पिंवळसर रंग
**पिंगट** (सं. पिंग वि.) पिंवळसर.

नगर वाचनालय, सातारा.



**पिंगला** (सं. स्त्री.) एक नाडी.
**पिंगला, पिंगूळ** (सं. पिंगलिका पु.) घाणेरडा वायु सोडणारा एक किडा; एक पक्षी.
**पिंगळा** (सं. पिंगल वि.) पिंगट रंगाचा; (पु.) कुडमुड्या जोशी.
**पिंगळी** (स्त्री.) वाचा, वाणी.
**पिंगा** (पु.) मुलींचा एक खेळ.
**पिंगाक्षी** (पु.) वानर; माकड.
**पिघळणें** (क्रि.) पघळणें, वितळणें.
**पिचकट, पिचका** (वि.) चीर पडलेला; ज्याच्या डोळ्याच्या काचेला चीर पडली आहे असा; मिचमिचा.
**पिचकारी, पिचनळी** (स्त्री.) मागच्या दावानें आंतलें पाणी उडतें अशी नळी.
**पिचडी** (प्रा. स्त्री.) थुंकी.
**पिचणें** (क्रि.) चीर जाणें, फुटणें.
**पिचपिचणें** (क्रि.)वरचेवर उघडझांप करणें.
**पिचपिचीत** (वि.) बारीक डोळ्यांचा; लुकलुका. [ बांधलेले दंड.
**पिचुंड्या** (स्त्री.अने.) पाठीमागें हात वळवून
**पिच्छ** (सं. न.) पक्ष्याचें पीस.
**पिच्छा** (सं. पिच्छ पु.) पाठीकडचा भाग; पाठ. **पि० घेणें, पि० पुरविणें**— सारखें मागें लागणें.
**पिछवाडा** (हिं. पु.) घराची मागची बाजू.
**पिछाडी** (स्त्री.) मागील पाय; पायबंद; मागील बाजू; सैन्याच्या मागील विभाग.
**पिछोडा** (प्रा. पु.) मागले बाजूस हात बांधण्याची शिक्षा (दा० ३।७।६७).
**पिंजणें** (सं. पिंज् क्रि.) फाडणें; विंचरणें, मोकळें करणें. [ सापळा.
**पिंजर** (स्त्री.) कोरडें कुंकू; (सं.न.) पिंजरा,
**पिंजरा** (सं. पंजर पु.) पांजरा; सापळा.
**पिंजरापोळ** पांजरपोळ पहा.
**पिंजरी** (स्त्री.) पिंजरा.
**पिंजारणें** (क्रि.) पिंजणें, मोकळें करणें; पसरणें, फुलविणें.
**पिंजारी** (स्त्री.) पालखीवरचें सुशोभित आच्छादन; गाडीचें आच्छादन; छत (ज्ञा०९।१२५); उटी (ज्ञा० ११। २२३).

**पिंजारी** (पु.) कापूस किंवा लोकर पिंजणारा.
**पिटकुलें, पिटकें** (न.) लहान पिलूं.
**पिटणें** (सं. पीड् क्रि.) चेंचणें, झोडपणें; पळण्यास लावणें; वाजविणें.
**पिट्टा** (पु.)भुसा.**पि० पाडणें**—निकाल लावणें.
**पिटाळणें** (क्रि.) पळावयास लावणें.
**पिटपिट** (स्त्री.) त्रास, कटकट.
**पिठलें** (न.) बेसन, झुणका.
**पिठा** (पु.) दारूचा गुत्ता; भरडा.
**पिठावें** (प्रा. न.) निंदा. [ रवा.
**पिठी** (स्त्री.) तांदुळाचें बारीक पीठ; बारीक
**पिठुळणें** (क्रि.) गाभुळणें; पाडास येणें.
**पिठूर** (वि.) पिठासारखें अति स्वच्छ चांदणें.
**पिठूळ** (वि.) पिठासारखें मऊ; बेचव.
**पिठोरी** (पु.) श्रावण व० ३० च्या दिवशीं चौसष्ट योगिनींच्या आकृति काढून करावयाची पूजा वगैरे व्रत.
**पिठोरी अमावास्या** (स्त्री.) श्रावण व. ३०.
**पिठ्या** (वि.) भुसभुशीत, ढिसूळ.
**पिंड** (सं. पु.) गोळा; श्राद्धांत पितरांस देण्यांत येणारा भाताचा गोळा; देह. **पिंडीं तें ब्रह्मांडीं**—स्वतःवरून जगाचें स्वरूप ओळखावें.
**पिंडदान** (सं. न.) श्राद्धांत पितरांस पिंड देणें.
**पिंढरी** (स्त्री.) पायाची पोटरी; धान्याच्या कणसाचा फुगीरपणा; दाण्यांनीं ठासून भरलेलें कणीस; व्यायामानें जाडी झालेले दंड, पोटऱ्या इ०; प्रत्येक किंवा त्यावर बुक्की मारली असतां कांहीं वेळ उठतो तो गट्टू.
**पिंडी** (प्रा. स्त्री.) पुरचंडी, गोळा; वाण; शिवलिंग.
**पिढा** (पु.) आसन, खुर्ची.
**पिढी** (पु. पीठिका स्त्री.) कुळी; वंश-परंपरेंतली एकेक पायरी.
**पिढीजाद** (फा. वि.) कुलीन; (अ.) वंशपरंपरेनें.
**पिढीपेस्तर** (अ.) पिढ्यानुपिढ्या; वंश-परंपरा.

**पिढें** (सं. पीठ न.) बसण्याची चौकी; तुळईच्या खालीं खांबाच्या अग्रावरचें आडवें लाकूड; सुताच्या राहाटाखालचें लाकूड. [ घेणें, गिळणें, जिरविणें.
**पिणें** (सं. पात् क्रि.) प्राशन करणें; शोषून
**पितर** (सं. पितृ पु.) पूर्वज; महालयश्राद्ध.
**पितळ** (सं. पित्तल न.) एक पिंवळी मिश्र धातु. **पि० पान**—पितळेचा अतिशय पातळ पत्रा. [पितळेचें.
**पितळी** (स्त्री.) लहान परात; (वि.)
**पिता** (सं. पु.) बाप.
**पितांबर** पीतांबर पहा. [ब्रह्मदेव.
**पितामह** (सं. पु.) बापाचा बाप, आजा;
**पितामही** (सं. स्त्री.) बापाची आई, आजी.
**पितृ** (सं. पु.) बाप.
**पितृप** (सं. पु.) यम.
**पितृपक्ष** (सं. पु.) भाद्रपदांतील कृष्णपक्ष.
**पितृयज्ञ** (सं. पु.) पंचमहायज्ञांपैकीं एक; पितृश्राद्ध; तर्पण.
**पितृलंड** (प्रा. पु.) पितरांचें श्राद्ध वगैरे न करणारा.
**पितृवन** (सं. न.) स्मशानभूमि.
**पितृव्य** (सं. पु.) चुलता.
**पित्त** (सं. न.) यकृताच्या योगानें रक्तांतून निघणारा आणि अन्नपचनास साह्य करणारा एक पिवळा रस; एक शरीरदोष. **पित्त खवळणें**—संतापणें.
**पित्तशामक** (सं. क्रि.) पित्त शमविणारें.
**पित्ताशय** (सं. न.) शरिरांतील पित्ताची पिशवी.
**पित्त्या** (पु.) खेळांतला पोटगडी.
**पिधान** (सं. न.) आच्छादन; ज्योतिषांत—आकाशस्थ ज्योतींचें दुसऱ्यांस आच्छादणें.
**पिनस** (पु.) नाकाचा एक रोग.
**पिनाक** (सं. न.) शिवधनुष्य. **पि० पाणी** (पु.) श्रीशंकर.
**पिन्हा** (पु.) पिच्छा; पाठलाग.
**पिंप** (न.) पीप, टीप.
**पिंपरूं, पिंपरें, पिंर** (प्रा. न.) पिंपळाचें झाड किंवा फळ.
**पिंपळ** (सं. पिप्पल पु.) अश्वत्थ; वृक्ष.
**पिपलिका, पिपीलिका** (सं. पिपीलिका स्त्री.) मुंगी.
**पिंपळपान, पिंपळवन** (न.) मुलाच्या कपाळावर बांधावयाचें पदक.
**पिंपळी** (स्त्री.) एक औषधोपयोगी फळ किंवा त्याची वेल; पानवेलीची शेंग; बायकांच्या नथेमधील किंवा कानांतील बुगडी इ. मधील लोंबतें मोतीं.
**पिपाणी, पिंपारी, पिंपोजी, पिपाणी** (स्त्री.) पुंगी.
**पिपाशा** (सं. पिपासा स्त्री.) तृष्णा.
**पिपासा** (सं. स्त्री.) तृष्णा, तहान.
**पिपीलिका** (स्त्री.) लहान, तांबड्या रंगाची मुंगी.
**पियूष** (सं. पीयूष न.) अमृत.
**पिर** (स्त्री.) बशी.
**पिरगळणें, पिरगाळणें** (क्रि.) मुरगाळणें, मुरडणें; पीळ भरणें. [ क्रिया.
**पिरगळा, पिरगाळा** (पु.) मुरगाळण्याची
**पिरपिर** (स्त्री.) कटकट.
**पिरपिरा**—**ऱ्या** (वि.) किरकिर करणारा; त्रास देणारा.
**पिरी** (स्त्री.) वार्धक्य; म्हातारपण.
**पिलंगणें** (प्रा. क्रि.) लपत लपत जाणें (हरि० २४।६८); पकडूं पहाणें (एक० २७३).
**पिलंडा** (पु.) गुंडाळी.
**पिलूं, पिल्लूं** (न.) बच्चा, बालक.
**पिलू** (पु.) गायनांतला एक राग.
**पिवडी** (स्त्री.) पिंवळी माती.
**पिंवळट, पिंवळसर** (वि.) कांहींसा पिंवळा.
**पिंवळा** (सं. पीत वि.) पीतवर्ण; (प्रा. पु.) पीतांबर.
**पिशवी** (स्त्री.) थैली, कोथळी.
**पिशाच** (सं. पु. न.) भूत, समंध इ०; अघोरी, साहसी मनुष्य. **पि० च्या हातीं कोलीत**—अगोदरच खोड्या करण्याचा स्वभाव आणि त्यांत उत्तेजनाची भर.
**पिशाचबाधा** (सं. स्त्री.) भुतानें झपाटणें.
**पिशाचलिपी** (सं. स्त्री.) मोडी लिपी.
**पिशित** (सं. न.) मांस.

**पिशुन** (सं. वि.) चहाडखोर, दुष्ट.
**पिष्ट** (सं. वि.) मळलेलें; तिंबलेलें (पीठ); (न.) पीठ; चूर्ण; पिष्टपेषण (न.) दळलेलें पुन्हां दळणें; व्यर्थ पुनरुक्ति, चर्वितचर्वण.
**पिसटणें, पिसाटणें** (क्रि.) पिसळणें; पिशाच्चबाधा होणें.
**पिसणें** (सं. पिष् क्रि.) दळणें; वांटणें.
**पिसळणें, पिसाळणें** (क्रि.) वेडें होणें, खवळणें. [ कापूस.
**पिसा** (वि.) वेड लागलेला; (ग्रा. पु.)
**पिसाट** (प्रा. न.) पिशाच; वेडा मनुष्य; वेड.
**पिसाटीक** (वि.) वेड लागलेला; खोडकर; पिशाचासारखा.
**पिसाब** (फा. पु.) लघवी.
**पिसारणें** (क्रि.) पक्ष्यानें पंख ताठ करणें; मांजरानें शेपटीचे केस ताठ करून ती जाडी करणें.
**पिसारा** (पु.) उभारलेले पंख.
**पिसाळें–ळा** (न.) वेड.
**पिसुडणें** (क्रि.) उपटणें, तोडणें (केश, पंख, पानें; खांद्या, पाकळ्या इ०).
**पिसुंडी, पिसुरडी** (स्त्री.) पोयीची वरची साल. [ क्षुद्र जीव.
**पिसुवा, पिसू** (स्त्री.) दंश करणारा एक
**पिसें** (न.) वेड.
**पिस्ता** (फा. पु.) एक फळ.
**पिस्तूल** (इं. पिस्टोल न.) खिशांत ठेवण्यासारखी लहान बंदूक.
**पिस्वाद, पेशवाज** (पु.) नृत्याचे प्रसंगीं घालण्याचा वेश्यांचा झगा.
**पिहा** (सं. प्लीहा स्त्री.) पानथरी.
**पिहू** (पु.) केकाध्वनि; कोकिळेचा शब्द.
**पिळकणें** (क्रि.) लहानसा जुलाब होणें.
**पिळणें** (पीड् क्रि.) मुरडणें, पीळ घालणें; दूध काढणें.
**पिळपिळीत** (वि.) निःसत्त्व, वेचव.
**पिळवटणें** (क्रि.) पीळ पडणें; व्यथित होणें.
**पिळा** (पु.) पीळ; वस्त्राची घडी; घोड्याचा रोग; वळ.
**पी** (समासांत अंत्यपदीं पु.) पिणारा.
**पीक** (न.) उत्पन्न झालेलें धान्य इ०; थुंकी; (पु.) जखमेंतून येणारा द्रव पदार्थ.
**पीकदाणी** (फा. पीकदान स्त्री.) थुंकी टाकण्याचें पात्र.
**पीकपाणी** (न.) पाऊस, पिकांची स्थिति इ.
**पीछेहाट** (हिं. स्त्री.) माघार; मागें हटणें.
**पीटिका** (स्त्री.) पुळी, लहान फोड. [ चूर्ण.
**पीठ** (सं. पिष्ट न.) दळलेलें धान्य; चुरा;
**पीठ** (सं. न.) आसन; मुख्य स्थान.
**पीठा** (पु.) बखार; दारूचें दुकान.
**पीठवण** (सं. पृष्ठिपर्णी स्त्री.) कोडावरचें एक औषध.
**पीठिका** (सं. स्त्री.) कुळपरंपरा; पाया.
**पीडणें** (सं. पीड् क्रि.) त्रासणें; त्रासविणें; दुःख देणें.
**पीडव** (न.) त्रास; पीडा.
**पीडा** (सं. स्त्री.) दुःख, त्रास.
**पीडित** (सं. वि.) त्रासलेला, गांजलेला.
**पीत** (सं. वि.) पिवळें; प्यालेलें; (पु.) दिवा; ज्योत. [ रेशमी वस्त्र.
**पीतांबर** (सं. पु.) नेसावयाचें उंची
**पीन** (सं. वि.) पुष्ट, मांसल.
**पीप** (पोर्तु पिपा न.) पाणी भरण्याचें मोठें लांकडाचें किंवा धातूचें पात्र.
**पीयूष** (सं. न.) अमृत; गाईचें दूध.
**पीर** (फा. पु.) मुसलमान साधु; वस्ताद.
**पील** (न.) कुत्रीं, मांजरें, कोंवडी, राघू, इ. चे बच्चे; (फा. पु.) हत्ती.
**पीलखाना** (फा. पु.) गजशाला.
**पीलु** (सं. पु.) परमाणु; हत्ती.
**पीस** (सं. पिच्छ न.) पीस. **पिसाचा कावळा करणें**–अतिशयोक्ति करणें.
**पीळ** (पु.) मुरड; ताठा, मगरुरी. **सुंभ जळेल पण पीळ जळत नाहीं**— हट्टी माणसाचें नुकसान झालें तरी त्याचा ताठा जात नाही. [ मजबूत.
**पीळदार** (वि.) चांगलें पिळलेलें, कसलेलें;
**पुं** (वि.) पुरुषवाचक पद.
**पुआळणें** (क्रि.) पुआनें भरणें.
**पुकार, पुकारा** (पु.) हाकाटी; प्रसिद्धि.
**पुकारणें** (क्रि.) हाक मारणें, मोठा आवाज करणें.

**पुंख** (सं. न.) पिसें लावलेलें बाणाचें अग्र; पुच्छ, पिसारा.
**पुखा, पुख्खा** (पु.) यथेच्छ जेवण.
**पुंगळ** (प्रा. पु.) पिंगळ.
**पुंगळी** (स्त्री.) कागदाची सुरळी, नळी, वळकटी. [ वाद्य.
**पुंगी** (स्त्री.) वाजणारी नळी; गारुड्याचें
**पुच्छ** (सं. न.) शेपूट, शेपटी. [ हलका.
**पुचट, पुचाट, पोचट** (वि.) पोचट, दुर्बल,
**पुंज** (सं. पु.) झुबका; ढीग; समुदाय.
**पुंजका** (सं. पुंज पु.) झुबका, रास.
**पुजणें** (क्रि.) पूजा करणें.
**पुजा** (सं. पूजा स्त्री.) अर्चा, आराधना.
**पुंजा** (सं. पुंज पु.) घाणेरड्या वस्तूंचा ढीग; सूत. [मनुष्य.
**पुजारी** (पु.) पूजा करणारा ठराविक
**पुंजाळ** (प्रा. पु.) ढीग, रास; मळा.
**पुंजाळणें** (प्रा. क्रि.) प्रज्वलित करणें अथवा होणें; गोळा होणें.
**पुंजी** (सं. पुंज स्त्री.) भांडवल.
**पुट** (सं. न.) घडी, द्रोण; आच्छादन; लेप; पातळ थर. [ फोड.
**पुटकुळी** (सं. स्फोटकलिका स्त्री.) लहानसा
**पुटपाक** (सं. पु.) वैद्यकांत—सभोंवार पानें घालून व वर माती लावून भाजणें.
**पुटपुटणें** (क्रि.) तोंडांतले तोंडांत अस्पष्ट बोलणें. [ दिलेला.
**पुटी** (वि.) औषध, रस इत्यादींचीं पुटें
**पुठांवळा** (प्रा. वि.) वाकडा.
**पुठ्ठा** (सं. पृष्ठ पु.) नितंबभाग, कुल्ला; जाड आच्छादन, मलपृष्ठ; मंडळी.
**पुंड** (वि.) बंडखोर, दांडगा, गांवगुंड; (प्रा.) अप्रामाणिक; उलाढाल्या.
**पुडका** (सं. पुट पु.), **पुडकें** (न.) पुडा, लहान गठ्ठा.
**पुंडरीक** (सं.न.)श्वेत कमळ; एक दिग्गज.
**पुडवटी** (स्त्री.) लहान पुडी.
**पुडसावणें** (प्रा. क्रि.) धमकावणें.
**पुडा** (सं. पुट पु.) पुडकें.
**पुंडा** (पु.) तांवडा ऊस.
**पुंडाई** (स्त्री.), **पुंडावा** (पु.) बंडखोरपणा, उपद्रव, लुटारूपणा.
**पुडी** (स्त्री.) लहान पुडा; संन्याशाचें जेवण; जेवण.
**पुंड्र** (सं. पु.) कपाळीं लावलेला चंदनाचा टिळा.
**पुढचा** (वि.) अगोदरचा; पुढें जागारा.
**पुढत, पुढतीं** (प्रा. अ.) पुनः पुनः
**पुढतीं** (प्रा. अ.) पुनः; पुढें.
**पुढा** (पु.) पुढचा भाग.
**पुढां** (प्रा. अ.) पुढें.
**पुढाकार** (पु.) पुढारीपणा, अग्रेसरत्व.
**पुढार** (पु.) बोल; वचन.
**पुढारणें** (प्रा. क्रि.) पुढें होणें; पुढें करणें (ज्ञा० १८।३०३); बोलणें; कबूल करणें ( ज्ञा. १८।२।९).
**पुढाईत, पुढाकारी, पुढारी** (प्रा. वि.) पुढील(ज्ञा० १।२७५); (पु.) नायक, नेता.
**पुढारा** (प्रा. अ.) पुढें.
**पुढारी, पुढाकारी, पुढाईत** (पु.) नेता; अग्रणी; म्होरक्या.
**पुढासणें** (प्रा. क्रि.) पुढें घालणें.
**पुढील** (प्रा. वि.) अन्य (अमृ० ४।३८); नंतरचें; पुढचें.
**पुढून** (अ.) पुढील बाजूनें.
**पुढें** (अ.) अग्रभागीं; समोर; नंतर. **पुढें पुढें करणें**—खुशामत करणें.
**पुढोसा** (पु.) पुढचा भाग.
**पुढ्यांत** (अ.) समोर; पुढें.
**पुणती** (प्रा. अ.) पुनः
**पुणी** (स्त्री.) पिंजलेल्या कापसाची वळी.
**पुणेरी** (वि.) पुण्याचें.
**पुण्य** (सं. वि.) पवित्र; पुण्यवान्; सुंदर; (न.) उत्तम आचरणाचें फळ; सत्कृत्य.
**पुण्यतिथि** (सं. स्त्री.) सत्पुरुषाची प्रतिवार्षिक मृत्युतिथि.
**पुण्यभूमि** (सं. स्त्री.) आर्यावर्त.
**पुण्यलोक** (सं. पु.) स्वर्गलोक.
**पुण्यवान्** (सं. वि.) पुण्याचरण केलेला; भाग्यवान्.
**पुण्यश्लोक** (सं. पु.) सुकीर्तिमान्.
**पुण्यक्षेत्र** (सं. न.) पवित्र स्थान.
**पुण्याई** (सं. पुण्य स्त्री.) पुण्याचा संचय.

**पुण्याहवाचन** (सं. न.) विवाहादि मंगल-कार्यांतलें प्रारंभींचें कर्म.
**पुतणी** (स्त्री.) पुरुषाच्या भावाची मुलगी; स्त्रीच्या दिराची मुलगी.
**पुतण्या** (पु.) पुरुषाच्या भावाचा मुलगा; स्त्रीच्या दिराचा मुलगा.
**पुतळा** (सं. पुत्तल पु.) प्रतिमा, बाहुलें.
**पुतळी** (सं. पुत्तली स्त्री.) स्त्रीचें बाहुलें; पूर्वीचें सोन्याचें एक नाणें.
**पुतळीघर** (न.) कापडाची गिरणी.
**पुती** (समासांत वि.) संतान असलेली. एकपुती—एक मूल असलेली, **दुपुती**—दोन मुलें असलेली.
**पुत्र** (सं. पु.) मुलगा.
**पुत्रधर्म** (सं. पु.) पुत्राचें कर्तव्य.
**पुत्रवती, पुत्रवंती** (सं. स्त्री. वि.) मुलें असलेली.
**पुत्रावण** (सं. न.) सोळा संस्कारांपैकीं एक.
**पुत्रिका, पुत्री** (स्त्री.) मुलगी; बाहुली.
**पुदडणें** (क्रि.) गुधडणें, खराब करणें.
**पुदिना** (फा. पु.) एक गंधयुक्त वनस्पति.
**पुनः** (सं. अ.) फिरून, दुसऱ्यांदा.
**पुनःपुनः** (सं. अ.) वारंवार, वरचेवर.
**पुनरपि** (सं. अ.) पुन्हाहि.
**पुनरावृत्ति** (सं. स्त्री.) उजळणी; पुनः तसेंच घडणें, बोलणें, छापणें इ.
**पुनरुक्ति** (सं. स्त्री.) पुनः उच्चार.
**पुनर्जन्म** (सं. पु. न.) दुसरा जन्म; मृत्य-सारख्या महत्संकटांतून झालेला बचाव.
**पुनर्वसु** (सं. पु.) सातवें नक्षत्र. [पौर्णिमा.
**पुनव, पुनाव, पुनीव** (सं. पूर्णिमा स्त्री.)
**पुनश्च** (सं. अ.) पुनः
**पुनीत** (सं. वि.) शुद्ध झालेला.
**पुन्नाग** (सं. पु.) नागचाफा; उंडीण.
**पुन्हा** (सं. पुनः अ.) फिरून, आणखी एकदां.
**पुमर्थ** (पु.) मनुष्याच्या इहलोकींच्या वास्तव्याचें ध्येय.
**पुमान्** (पु.) पुरुष. [अंतर्भाग.
**पुर** (सं. न.) नगर, शहर; किल्ला; घर;
**पुरकी** (स्त्री.) मिटलेल्या ओठांतून पुर-पुर असा निघणारा आवाज.
**पुरख** (पु.) जुना माणूस; वयस्क, थोर.
**पुरखांब** (पु.) जमिनींत पुरलेला खांब.
**पुरचुंडी** (स्त्री.) अगदीं लहान गाठोडी.
**पुरंजन** (पु.) आत्मा. [कपटा.
**पुरजा** (फा. पु.), **पुरजें** (न.) कागदाचा
**पुरजा** (ते. पु.) कागद; चिठ्ठी, कर्जरोखा.
**पुरण** (सं. पूरण न.) पोळया, मोदक इ० पदार्थांत आंत सारण भरलेलें असतें तें; सोन्याच्या पाटल्या वगैरे पोकळ दागिन्यांत तांब्यासारखी हलकी धातु भरतात ती; भर.
**पुरणें** (प्रा. क्रि.) पूर्ण होणें; वेताचा होणें; बंद होणें; संपणें; गाडणें.
**पुरता** (प्रा. वि.) पुरेसा; पूर्ण; निष्णात.
**पुरंदर** (सं. पु.) इंद्र; महाराष्ट्रांतील एक किल्ला.
**पुरंदरी** (सं. स्त्री.) विलासी स्त्री.
**पुरपुराट** (पु.) विपुलता. [मनुष्य.
**पुरभय्या** (हिं. पु.) परदेशी; पूर्वदेशचा
**पुरवठा** (पु.) समृद्धि; पुरेसा संचय; पाठबळ; भर; बायकांच्या गाण्यांचा भेंडा लावण्यासारखा एक प्रकार.
**पुरवणी** (स्त्री.) जोड; भर; पुराव्यानें सिद्ध करून दाखविणें; मोत्यांची माळ.
**पुरवणें** (क्रि.) मान्य होणें; पतकरणें; व्यापणें; पुरेल अशा बेतानें खर्च करणें.
**पुरविणें** (क्रि.) पुरवठा करणें; पुरेसें होणें; पूर्ण करणें. [दाखविणें.
**पुरवार** (स्त्री.) पुराव्यानें खरें करून
**पुरशीस** (फा. पुरसीश स्त्री.) चौकशी; चौकशी करून लिहिलेला कागद.
**पुरश्चरण** (सं. न.) ठराविक मंत्रजप.
**पुरस्करणें** (सं. क्रि.) सावध करणें.
**पुरस्कर्ता** (सं. पु.) उत्तेजन देणारा.
**पुरस्कार** (सं. पु.) पुढाकार; सन्मान; साह्य; बक्षीस.
**पुरःसर** (सं. वि.) मुख्य पुढारी; (समासांत अ.) पूर्वक. [समुदाय.
**पुरळ** (न.) बारीक बारीक पुटकुळयांचा
**पुरा** (सं. पूर वि.) पूर्ण; निष्णात; पक्का; (अ.) पूर्णपणें; (सं. पुर पु.) शहराची पेठ; भाग.

**पुराण** (सं. वि.) जुनें; (न.) प्राचीन इतिहासपर व चरित्रपर गोष्ट; (पुराणें अठरा आहेत त्यांचीं नांवें—ब्रह्म, पद्म, विष्णु, शिव, लिंग, गरुड, नारद, भागवत, अग्नि, स्कंद, भविष्य, ब्रह्मवैवर्त, मार्कंडेय, वामन, वाराह, मत्स्य, कूर्म आणि ब्रह्मांड). पु० तलीं वांगीं पुराणांत–उपदेश नुसता ऐकावा, करतांना हवें तें करावें.
**पुराणपुरुष** (सं. पु.) परमेश्वर.
**पुराणा** (वि.) जुना.
**पुराणिक** (सं. पौराणिक पु.) पुराण वाचून अर्थ सांगणारा.
**पुराणोक्त** (सं. वि.) ज्यांना वेदमंत्राचा अधिकार नाहीं अशांसाठीं पुराणांतल्या वचनांच्या आधारें केलेलें.
**पुरातन** (सं. वि.) जुना; प्राचीन.
**पुराव, पुरावा** (पोर्तु. प्रोहा पु.) पुरवठा (मोरो० द्रोण० १२–१३); पुरवणी; प्रमाण; आधार.
**पुरी** (सं. स्त्री.) नगरी; लहान शहर; तळलेलें एक पक्वान्न; (पु.) गोसा-व्यांचा एक संप्रदाय.
**पुरीष** (सं. न.) विष्ठा.
**पुरुष** (सं. पु.) नर; वाप्या; साडेतीन हात उंचीचें प्रमाण.
**पुरुषत्व** (सं. न.) वीर्य; सामर्थ्य; शक्ति.
**पुरुषवाचक** (सं. वि.) व्याकरणांत—सर्वनामांचा एक प्रकार.
**पुरुषार्थ** (सं. पु.) धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार साध्य वस्तु; प्रयत्न; पराक्रम.
**पुरुषोत्तम** (सं. पु.) पुरुषांत श्रेष्ठ; विष्णु. पु० मास–अधिकाचा महिना.
**पुरूळ** (न.) पुरळ.
**पुरें** (अ.) बस्स. पुरें पुरें करणें–त्रासून [सोडणें.
**पुरोडाश** (सं. न.) हविर्द्रव्य.
**पुरोधा** (पु.) उपाध्याय; पुरोहित.
**पुरोगामी** (पु.) व्यवस्थापक; देखरेख करणारा; पुढारी; (वि.) प्रगतिपर.
**पुरोभाग** (सं. वि.) फाजील; लुडबुड्या; मत्सरी; दोष हुडकणारा.
**पुरोहित** (सं. पु.) उपाध्याय.
**पुलक** (सं. पु.) रोमांच. [(अंग).
**पुलकित** (सं. वि.) रोमांच उभे राहिलेलें
**पुलावा** (फा. पु.) एक मुसलमानी पक्वान्न; मांसमिश्रित मसालेदार भात.
**पुल्लिंग** (न.) ज्या लिंगामुळें प्राणिवाचक अथवा अप्राणिवाचक पदार्थांच्या पुरुषत्वाचा बोध होतो तें लिंग.
**पुलिंद** (पु.) भिल्ल; रानटी मनुष्य; अशुद्ध किंवा बीभत्स बोलणारा.
**पुलिन** (सं. न.) वाळवंट.
**पुष्कर** (सं. न.) निळें कमळ; तळें; हत्तीच्या सोंडेचें अग्र; अजमेराजवळचें एक तीर्थ.
**पुष्कल, पुष्कळ** (वि.) संख्येनें किंवा परिमाणानें मोठा.
**पुष्कराज** (सं. पु.) एक रत्न.
**पुष्करिणी** (सं. स्त्री.) तळें.
**पुष्ट** (सं. वि.) पोसलेला; लठ्ठ.
**पुष्टि** (सं. स्त्री.) पुष्टता; लठ्ठपणा; दुजोरा. **पुष्टिमार्ग**––परमेश्वराच्या अनुग्रहाचा मार्ग (वल्लभपंथी).
**पुष्टिपत्र** (सं.न.) पुठ्ठा; लिहितांना कागदा-खालीं घेतलेला आधार.
**पुष्टीकरण** (सं. न.) दृढ करणें; दुजोरा.
**पुष्प** (सं. न.) फूल; स्त्रीरज.
**पुष्पक** (सं. न.) कुबेराचें विमान.
**पुष्पवती** (स्त्री.) विटाळशी स्त्री.; रजस्वला.
**पुष्पवाटिका, पुष्पवाटी** (स्त्री.) फुलबाग.
**पुष्पांजलि** (सं. स्त्री.) पूजेच्या शेवटीं दोन्ही हातांच्या ओंजळीत फुलें घेऊन देवास वाहतात ती.
**पुष्पित** (सं. वि.) फुलें आलेलें झाड; रजस्वला.
**पुष्य** (सं. न.) आठवें नक्षत्र.
**पुस, पुंस** (सं. पुच्छ न.) पुच्छ; शेपूट (तुका० १२३६); (पु.) पुरुष.
**पुसकटणें** (क्रि.) अस्पष्ट होणें.
**पुसकट, पुसका** (वि.) अस्पष्ट; अर्धवट पुसून गेलेलें.
**पुसता** (वि.) विचारणारा; चौकशी कर-णारा; जबाबदार धरणारा; शास्ता.

**पुसणें** (क्रि.) विचारणें; समाचार घेणें; कोरडें करणें; मळ काढणें; (न.) पुसण्याचें वस्त्र.
**पुंसवन** (न.) सोळा संस्कारांपैकीं एक.
**पुंसा** (प्रा. पु.) पक्षी; पोपट.
**पुसाटी** (सं. पुच्छ स्त्री.) शेपटी.
**पुसी** (सं. पुच्छ स्त्री.) प्रश्न; शंका.
**पुस्तक** (सं. न.) चोपडी; लहान ग्रंथ.
**पुस्तदरपुस्त** (फा. अ.) पिढयान्‌पिढया.
**पुस्तपन्हा** (फा. पु.) पाठराखण; मदत.
**पुस्तपास, पुसतपास** (पु.) शोध; चौकशी; विचारपूस.
**पुस्ती** (सं. पृष्ठ स्त्री.) ठिगळ; पुरवणी; पाठवळ; अक्षरांचा नमुना.
**पुस्तु** (स्त्री.) पठाणी लोकांची भाषा.
**पुंस्त्व** (न.) पुरुषत्व; सामर्थ्य, शौर्य.
**पुळकणें** (क्रि.) थोडें व पातळ शौचास होणें.
**पुळका** (पु.) उमाळा.
**पुळण** (न. स्त्री.) वाळवंट.
**पुळपुळीत** (वि.) बेचव; निःसत्व.
**पुळा** (हिं. पु.) मोठी पेंडी.
**पुळिका** (प्रा. स्त्री.) काजळ.
**पुळी** (सं. पुलिका स्त्री.) पुटकुळी.
**पू** (सं. पूय पु.) दूषित रक्त; डोळयाचा गू.
**पूगीफल** (सं. न.) सुपारी.
**पूज** (न.) शून्य; अनुस्वार.
**पूजक** (सं. वि.) पूजा करणारा.
**पूजन** (सं. न.) पूजा; अर्चा. [खरडपट्टी.
**पूजा** (सं. स्त्री.) अर्चा; पूजेची सामग्री;
**पूजापात्र** (सं.न.) पूजेचें साहित्य ठेवण्याचें पात्र. [वंदनीय; (न.) शून्य.
**पूज्य** (सं. वि.) पूजा करण्यास योग्य;
**पूट** (सं. पुट न.) लेप.
**पूड** (स्त्री.) चूर्ण; भुकटी; नगारा; मृदंग इ० चें चर्मबद्ध तोंड; खण; घडी.
**पूत** (सं.पुत्र पु.) मुलगा; (सं.वि.) शुद्ध.
**पूतना** (सं. स्त्री.) कंसाची अनुचर राक्षसी; **पू० मावशी** (स्त्री.) द्वाड आणि त्रासदायक स्त्री.
**पूय** (सं. पु.) पू. [ (वि.) पूर्ण.
**पूर** (सं. पुर पु.) लोंढा; वृद्धि; शहर;
**पूरक** (सं. वि.) पूर्ण करणारें; (न.) योगशास्त्रांत—श्वास आंत घेणें.
**पूरण** (सं. न.) पुरण; भर.
**पूरणिका, पूरणी** (सं. स्त्री.) भरती.
**पूरित** (सं. वि.) भरलेलें; तृप्त.
**पूर्ण** (सं. वि.) सगळें; भरलेलें शेवटास गेलेलें.
**पूर्णचंद्रोदय** (सं.पु.) एक औषधि मात्रा.
**पूर्णाहुति** (सं. स्त्री.) यज्ञाच्या शेवटीं सर्व देवतांना देतात ती आहुति; भयंकर कत्तल.
**पूर्णिमा** (सं. स्त्री.) पौर्णिमा.
**पूर्त** (सं. वि.) पूर्ण; तृप्त.
**पूर्ति** (सं. स्त्री.) पूर्णता; तृप्ति.
**पूर्तता** (स्त्री.) परिपूर्णता.
**पूर्भय्या** (पु.) उत्तर हिंदुस्थानांतील एक जाति किंवा त्या जातीचा इसम.
**पूर्वोक्त** (वि.) प्रथम सांगितलेलें.
**पूर्व** (वि.) पहिला; प्राचीन; (स्त्री.) सूर्य उगवण्याची दिशा; उगवत. **पू० चा सूर्य पश्चिमेस उगवणें**—अशक्य गोष्ट घडून येणें.
**पूर्या** (पु.) एक राग.
**पूर्वज** (सं. पु.) वाडवडील.
**पूर्वधान्यें** खरिपाचीं पिकें.
**पूर्वपक्ष** (सं. पु.) पूर्वभाग; महिन्याचा शुद्ध पंधरवडा; वादांत एका पक्षानें केलेल्या आपल्या मताची मांडणी.
**पूर्वपद** (सं. न.) समासांतलें पहिलें पद; पूर्वीची स्थिति; हरदासाच्या कथेला ज्या वचनापासून आरंभ होतो तें वचन. **पू० वर येणें**—मध्यंतरीं केलेले श्रम फुकट जाऊन पुनः पूर्वीची स्थिति प्राप्त होणें.
**पूर्वपीठिका** (सं. स्त्री.) पूर्वीचा इत्थंभूत वृत्तान्त.
**पूर्ववत्** (अ.) पूर्वीच्या प्रमाणें.
**पूर्वा** (सं. स्त्री.) अकरावें नक्षत्र.
**पूर्वापार** (सं. पूर्वापर अ.) पूर्वीपासून.
**पूर्वार्ध** (सं. पु.) पहिला अर्धा भाग.
**पूर्वान्ह** (सं. पु.) दुपारच्या अगोदरच्या सहा घटका.

**पूर्वी** (अ.) मागें, आरंभी. [मार्ग.
**पूल** (फा. पु.) जलाशय उल्लंघून जाण्याचा
**पूस** (पु. वायकांच्या भाषेंत) पौष.
**पूंस** (सं. पुच्छ न.) पुच्छ.
**पृच्छक** (सं. वि.) विचारणारा.
**पृच्छा** (सं. स्त्री.) प्रश्न; विचारपूस.
**पृतना** (सं. स्त्री.) फौज; सैन्य; सैन्याचा एक तृतीयांश भाग.
**पृथक्** (सं.वि.) निराळा; (अ.) निरनिराळें.
**पृथक्करण** (सं. न.) निरनिराळें काढणें.
**पृथा** (प्रा.स्त्री.) प्रतीति (अमृ० ४।२६); कुंतीचें नांव.
**पृथिवी, पृथ्वी** (सं. स्त्री.) भूलोक.
**पृथु** (सं. वि.) स्थूल; मोठें.
**पृथुक** (सं. पु.) पोहे.
**पृथ्वी** (सं. स्त्री.) भूमि; जग; एका वृत्ताचें नांव (याच्या चरणांत १७ अक्षरें व ज, स, ज, स, य हे गण आणि शेवटीं लघुगुरु हीं अक्षरें क्रमानें असतात.)
**पृष्ठ** (सं.न.) पाठ; मागची बाजू; वरची बाजू; पुस्तकाचें पान.
**पृष्ठफळ** (सं. न.) भरीव पदार्थांच्या वरील भागाचें क्षेत्रफळ.
**पें** (प्रा. अ.) कडे; जवळ. [ सांधा.
**पेकट, पेंकट, पेकाड, पेगट** (न.) कमरेचा
**पेखणध** (प्रा. न.) कल्पित गोष्ट; कथा; भूषण; व्यर्थ डौल (दा० ३।६।२०); काथ्याकूट.
**पेखणें** (सं. प्रेषण क्रि.) चूर्ण होणें.
**पेंग** (स्त्री.) डुकली. [लंगडणें.
**पेंगणें** (क्रि.) डुकल्या घेणें; अशक्त होणें;
**पेगम, पेगाम, पैगाम** (फा. पेगाम पु.) निरोप; संधान; साखळीचा दुवा; पल्ला.
**पेगंबर, पैगंबर** (फा. पु.) स्वर्गाहून निरोप आणणारा.
**पेंगुळणें** (क्रि.) निःसत्व होणें; गळणें.
**पेच, पेंच** (फा. पु.) पागोट्याचे पीळ; मल्लयुद्धांतील डाव; अडचण; संकट; स्क्रू.
**पेचक** (स्त्री. न.) पितळेची तार.
**पेचपाच** (पु.) छक्केपंजे; युक्त्या.
**पेचप्रसंग** (पु.) जीवनांत (विशेषत: राजकारणांत) निर्माण होणारी समस्या किंवा पेंच.
**पेचाटी, पेंचाटी** (स्त्री.) अडचण; कचाटी.
**पेज** (सं. पेय स्त्री.) भातावरचें काढून घेतलेलें पाणी; कण्हेरी; कांजी.
**पेजेंजायें** (न.) गाय व्याल्यावर दोन गोष्टी—दूध व वांसरू—मिळतात. पहिलीला पेजें व दुसरीला जायें म्हणतात.
**पेट** (पु.) बंदुकींत भरलेली दारू; बंदुकीचा भार; पेटणें; जळूं लागणें; भडका.
**पेटका** (पु.) झटका; आंचका; स्नायूंत उठणारा गोळा.
**पेटणें** (क्रि.) आग लागणें; चेतणें; भडकणें.
**पेटवण** (स्त्री.) अग्नि प्रज्वलित करण्यास लागणारें गवत, झिलप्या वगैरे.
**पेटवणी** (प्रा. स्त्री.) चेतवणी.
**पेटविणें** (क्रि.) चेतविणें.
**पेटा** (सं. पेट पु.) पोटभाग; सिंहाचा बच्चा; ओझें; तालुक्याच्या दोन विभागांतला एक (यांत सुमारें शंभर गांवें असतात.)
**पेटारा** (सं. पेट पु.) पेटीसारखा मोठा करंडा.
**पेटारी** (स्त्री.) माती ओढण्याचें एक औत.
**पेटी** (सं. स्त्री.) संदूक; लहान पेटारा; फटाक्यांची गुंफलेली रांग किंवा माळ; स्त्रियांचा एक दागिना; सांगड, चिलखत (तुका० ४३४६).
**पेटीवाला** (पु.) हार्मोनियमची पेटी वाजविणारा.
**पेटें** (प्रा. न.) नदींतून तरण्याकरितां घेतलेलें भोपळा वगैरे साधन; सांगड; जोडी (ज्ञा० १३।२९). [ मुळें.
**पेटें** (गुज.अ.) देण्याची अंशतः फेड म्हणून;
**पेठ, पेंठ** (स्त्री.) बाजार; दुकानांची ओळ; शहराचा भाग; बाजारभावाची बातमी; गुप्त बातमी.
**पेठपाड** (पु.) पेठेंतला बाजारभाव.
**पेठवणी** (प्रा.स्त्री.) विदागी (तुका० ४२०).
**पेठा** (पु.) कोहळेपाक; सांगड.
**पेड** (हिं. न.) वृक्ष; वृक्षाचें खोड; वृक्षाचा घेर; (पु.) दोरी, वेणी इ. चा पदर.

**पेंड** (सं. पिण्याक स्त्री.) तेल काढल्यानंतर राहिलेला चोथा; खोळ; खळ; ढेप; नारळांचा घोस; बिगार; घराचे पाटणीवरचा किंवा ओमणावरचा चिखलाचा दाट लेप; मातीचा लेप.
**पेंडका** (पु.), **पेंडकी** (स्त्री.), **पेंडकें** (न.) गवत, कडवा इ. चा भारा, ओझें.
**पेंडखजूर** (पु.) ओला खजूर.
**पेंडवळा** (पु.), **पेंडवळें** (न.) मर्यादा नाम० ७७६); ओलावा; बांध; दोन शेतांची मर्यादा दाखविणारी खूण.
**पेंडळी** (प्रा. स्त्री.) पुष्टता.
**पेंडुक, पेंडुकें** (प्रा. न.) वोळा, रास.
**पेंडा** (पु.) ओल्या गवताचा भारा; भाताचें काड; विस्तव कायम ठेवण्यासाठीं चुलींत ठेवलेला शेणाचा गोळा.
**पेंडें** (न.) मोत्यांच्या सरांची माळ; विरडें; मंडळी; टोळी. [ गठ्ठा.
**पेंडी** (स्त्री.) सणंग; मालाचा बांधलेला
**पेंडोळा** (पु.), **पेंडोळें** (न.) गुंडाळी; सीमेवरचा बांध; रूढि.
**पेंढ** (पु.) बुंधा; दोरीचा किंवा वेणीचा एक पदर; जात्याची तळी; (न.) नारळाचें किंवा सुपारीचें झाड.
**पेढा** (पु.) खव्यांत साखर घालून केलेल्या मोठ्या चापट गोळया.
**पेंढा** (पु.) भाताच्या काडया; जोंधळयापासून काढलेली दारू.
**पेंढार** (न.), **पेंढारी** (पु.) लुटारूंचा समुदाय.
**पेंढारी** (पु.) लुटारू.
**पेंढी** (स्त्री.) पुळा, जुडी. **पें० काडी** (स्त्री.) कुणब्याकडून पिकाचा वांटा घेण्याचा बलुत्याचा हक्क.
**पेढी** (स्त्री.) सराफाचें दुकान.
**पेणा** (पु.), **पेणें** (न.) मुक्काम, टप्पा.
**पेणावणें** (प्रा. क्रि.) उठवणीस येणें.
**पेणी** (प्रा. स्त्री.) गति.
**पेणें** (प्रा. न.) प्रयाण; प्रवासांतला मुक्काम.
**पेंद** (न.) तुरा, गुच्छ.
**पेंदली** (स्त्री.) वेटाळें.
**पेंदळी** (प्रा. स्त्री.) त्वचा.
**पेंदी, पेंधी** (स्त्री.) प्याद्याची बैठक.
**पेद्रू** (पोर्तु. पेद्रो वि.) दुर्बळ, कमकुवत.
**पेंधा** (प्रा. वि.) पांगळा, मोडका; (पु.) गोळा.
**पेन** (इं. स्त्री. न.) लेखणी.
**पेन्शन्** (इं. न.) ठराविक मुदतीपर्यंत चाकरी केल्यानंतर मिळणारा बैठा पगार.
**पेनसिल** (इं. स्त्री.) दगडी पाटीवर लिहावयाची दगडी कांडी; शिसपेन्सिल.
**पेपर** (इं. पु.) कागद; प्रश्नपत्रक; वर्तमानपत्र. [घालून केलेली मिठाई.
**पेपरमिंट** (इं. न.) पुदिन्याचा अर्क; तो
**पेपाणी** (स्त्री.), **पेपरें** (न.) वाजविण्याची पोंगळी किंवा नळी.
**पेय** (सं. न.) पिण्याचा पदार्थ; (वि.) पिण्यास योग्य.
**पेर, पेरकें** (सं. पर्व न.) कांडें.
**पेरणी** (स्त्री.), **पेरा** (पु.) बीजारोपण; बीं पेरणें.
**पेरण** (सं. प्रकिरण क्रि.) जमिनींत टाकणें; लावणें; अधिक प्राप्तीच्या इच्छेनें अनेकांना देणें.
**पेरा** (पु.) एका बाजूनें चापट व दुसऱ्या बाजूनें अर्ध मण्याकृति अशी तार.
**पेरू** (पु.) एक फळ, जांब. [ एक रोग.
**पेरें** (सं. पर्व न.) कांड; बोटाला होणारा
**पेलकट** (न.) निंदा, वृथा आरोप, आळ.
**पेलणें** (प्रा.क्रि.) पोहणें; तोलणें (ज्ञा० ७। १०१); लोटणें (रुक्मि० १०।४३); झेपणें. [पटाईत.
**पेलवान्, पहिलवान** (पु.) कुस्ती करण्यांत
**पेला** (फा. प्याला पु.) प्याला.
**पेलाव** (पु.) शरिराचा तोल.
**पेलिणें** (प्रा. क्रि.) पोसणें (भा० १।८).
**पेली** (प्रा. स्त्री.) ओली साल (ज्ञा० १५। १२९); उत्पत्ति.
**पेव, पेंव** (न.) धान्य साठविण्याचें तळघर. **पेव फुटणें**—भराभर बाहेर पडणें, गोळा होणें. **पे०बूड** (स्त्री.) पेव उपसून धान्य काढतांना गांवचा कुळकर्णी व महार यांना फी म्हणून द्यावी लागणारी रक्कम.

**पेवडी** (स्त्री.) पिंवळा रंग.
**पॅवदी** (स्त्री.) झाडाचें कलम बांधणें.
**पेश** (फा. पु.) झगा. **पेश करणें** (क्रि.) सादर करणें.
**पेशकवाज, पेषकवाज** (फा. न.) कट्यार.
**पेशकश–शी** (फा. पु.) सनद किंवा मान वंशपरंपरेनें मिळाला असतां त्याबद्दल सरकारांत भरावी लागते ती रक्कम.
**पेशकळी, पेषकळी** (स्त्री.) अंगरख्यास पुढच्या अंगास लाविलेला त्रिकोणाकृति तुकडा.
**पेशगी** (हिं. स्त्री.) अगाऊ दिलेली रक्कम.
**पेशजी** (फा. पेश अ.) पूर्वी, मागें.
**पेशबंद** (फा. पु.) खोगीर न सरकण्याकरितां बांधण्याचा पट्टा.
**पेशमान** (फा. वि.) कष्टी, दिलगीर.
**पेशल** (वि.) कोमल.
**पेशवा** (फा. पु.) मुख्य प्रधान; साताऱ्च्या छत्रपतीचे मुख्य प्रधान; पंतप्रधान.
**पेशवाई** (हिं. स्त्री.) स्वागत; पेशव्यांचा अंमल, पदवी किंवा कारकीर्द.
**पेशा** (फा. पु.) धंदा; बाणा; खातें.
**पेशाब, पेसाब** (पु.) लघवी.
**पेषण** (सं. न.) दळणें.
**पेसणें** (सं. प्रेष् क्रि.) पिशाचांचा संचार करणें; फोडी करणें.
**पेसपाड** (प्रा.स्त्री.)ताळतंत्र(तुका० २८५९).
**पेस्तर** (फा. वि.) पुढील.
**पेह** (प्रा. पु.) पोटफुगीचा रोग.
**पेहरण, पेहरणें** (फा. न.) सद्रा, कुडतें.
**पेहेरणें** (क्रि.) पांघरणें; अंगांत घालणें.
**पेहेराव** (हिं.पु.)पोषाख; पोषाखाची तऱ्हा.
**पेहें** (सं. पेय न.) पेय पदार्थ (ना० १५).
**पेक्षां** (अ.) तुलनेनें अधिक; त्या अर्थी.
**पै** (स्त्री.) आण्याचा बारावा अंश; अर्धी.
**पैं** (प्रा. अ.) पादपूरणार्थ अव्यय.
**पैक, पैकु** (प्रा. पु.) समुदाय.
**पैका** (पु.) रुक्याचा चवथा अंश; द्रव्य.
**पैकीं** (अ.) आंतलें; मधून.
**पैखणें** (सं. प्रेक्षक क्रि.) वाट पहाणें.
**पैगम, पैगंबर** महमदी धर्माचा संस्थापक महमद.
**पैगाम** (अर. पेगम पु.) निरोप.
**पैज** (स्त्री.) प्रतिज्ञा, करार. **पैजेचा विडा**—एखादें बिकट काम करण्यास कोण धजतो हें पाहण्यासाठीं दरबारांत विडा मांडीत, व ज्याची छाती असेल त्यानें तो उचलावा अशी आज्ञा असे. यावरून असा विडा उचलणें म्हणजे अवघड काम करण्याची प्रतिज्ञा करणें.
**पैंजण** (न.) नूपुर.
**पैजार** (फा. स्त्री.) जोडा.
**पैठणी** (स्त्री.) रेशमी लुगडें (हें पैठण येथें उत्तम काढीत असत).
**पैठणी** आदर वाह्यात्कारी किंवा वरवरचा आदर. [प्रविष्ट होणें.
**पैठ, पैठा** (प्रा.पु.)परिपाठ; पस्ताव; मार्ग;
**पैठणें** (प्रा. क्रि.) बसणें, प्रविष्ट होणें.
**पैण** (प्रा. स्त्री.) पैज, करार; (न.) गवत; गवताच्या साऱ्याच्या ऐवजीं रोख पैशाच्या रूपानें शेतकरी सरकारास पट्टी देत असे ती.
**पैदर्पै** (अ.) दर दिवशीं.
**पैदा** (फा. वि.) संपादित, मिळविलेलें.
**पैदागिरी** (हिं. स्त्री.) बलात्कारानें घेतलेलें धन. [उत्पत्ति, उपज.
**पैदास्त** (फा. स्त्री.) मिळकत, फायदा;
**पैमाश, पैमाशी, पैमाष** (फा. स्त्री.) जमिनीची मोजणी.
**पैरण** (स्त्री.) अंगरखा, सदरा.
**पैरव, पैरवी** (फा. स्त्री.) जाणेंयेणें; दळणवळण; संबंध; वाटाघाट, चर्चा.
**पैरा** (पु.) मजूर, हंगाम.
**पैल** (प्रा. अ.) पलीकडे; (वि.) पलीकडचा.
**पैलथडी** (स्त्री.) पलीकडचें तीर.
**पैलपार** (प्रा. अ.) पलीकडे.
**पैलवान** (पु.) पहिलवान, मल्ल.
**पैलाड** (प्रा. अ.) पलीकडे; (स्त्री.) पलीकडचें तीर. [वरच्या आकृति.
**पैलू** (फा. पहलू पु.) बाजू, कोन; रत्ना-
**पैलदार** (वि.) पैलू पाडलेलें (रत्न).
**पैवस्ती** (फा. पैवस्त स्त्री.) पोंच; पत्र दाखल झाल्याची मिति अगर तारीख; संबंध; वसती, राहणें.

**पैशाच विवाह** (सं.) जबरदस्तीचा किंवा मुलीला पळवून नेऊन केलेला विवाह.
**पैशुन्य** (सं. न.) चहाडी, ठकबाजी.
**पैस** (सं. प्रसार स्त्री.) मोकळी जागा; प्रसार; मार्ग; पाऊल; (वि.) प्रशस्त.
**पैसणें** (प्रा. क्रि.) मरून जाणें, पसरणें.
**पैसा** (पु.) एक तांब्याचें नाणें; पैका; द्रव्यसंचय.
**पैसार** (प्रा. पु.) अवकाश; प्रसार; मार्ग.
**पैसावणें** (प्रा. क्रि.) फाकणें, विस्तारणें.
**पैसाळू** (पु.) आयात माल (निकाळू–निर्गतमाल) किंवा त्याचें बंदर.
**पैसू** (पु.) अवकाश.
**पैसें** (प्रा. अ.) बळानें, योगानें.
**पैसेकरी** (वि.) श्रीमंत, पैसेवाला.
**पोई** (स्त्री.) पोय पहा.
**पोंक** (न.) पोंग, कुबड.
**पोंकटा** (पु.) कोवळा नारळ. **पोकटी** (स्त्री.)–कोवळी सुपारी. [व्यर्थ, फोल.
**पोकळ** (वि.) रिकामा, शून्य; सैल, ढिला;
**पोकळसूत्री** (वि.) अव्यवस्थित.
**पोकळिस्त** (वि.) अनिश्चित. [ढिलेपणा.
**पोकळी** (स्त्री.) पोकळ जागा; अवकाश;
**पोकू** (वि.) दलालांच्या भाषेंत–चार.
**पोक्त** (फा. पुख़्त वि.) प्रौढ; निष्णात.
**पोखणें** (न.) पोषण किंवा लालनपालन.
**पोखार** (सं. पुष्कर पु.) मोठा तलाव.
**पोखरण, पोखरणा** (सं. पुष्करिणी स्त्री.) तळें.
**पोंग** (न.) कुबड, पोंक.
**पोगडा, पोंगडा** (सं. पोगंड पु.) १६ वर्षे वयापर्यंतचा मुलगा; तरुण मनुष्य.
**पोगर, पोगरा** (पु.) भोकें पाडावयाचा पोलादी खिळा.
**पोंगा–ग्या** (वि.) कुबड असलेला; पोंक्या.
**पोंगाडा** (पु.) एक वाद्यविशेष.
**पोगी** (सं. पूग स्त्री.) कोंब; गलवतावरचें त्रिकोणाकृति निशाण.
**पोंच** (पु.) दूरदृष्टि; शहाणपणा; पोंचल्याबद्दलचा लेख. [निःसत्त्व.
**पोचट** (वि.) खळगा पडलेला; पोकळ;
**पोचा** (पु.) भांड्याचा खळगा.

२५

**पोची** (फा. पहुँची स्त्री.) मनगट; पुरुषाच्या मनगटाचा एक अलंकार.
**पोचंडी, पोचुंडी, पुरचुंडी** (स्त्री.) लहानशी गाठोडी, गठडी.
**पोट** (सं. न.) उदर, कोठा; गर्भ; पोकळी; अंतरंग. **पोटचें पाडणें**––गर्भपात करणें; **पोटचा गोळा**––मूल; **पोट जाळणें**––उदरनिर्वाहार्थ वाईट काम करणें; **पोटांत घालणें**––क्षमा करणें; **पोटावारीं**––फक्त जेवण घेऊन; **पोटांत ठेवणें**––गुप्त ठेवणें; **पोटांत शिरणें**––विश्वास संपादन करणें; **पोटावर मारणें**–उदरनिर्वाहाच्या साधनांत खंड पाडणें; **पोटांत दुखणें**–मत्सर वाटणें; **पोट बांधून**–पगार न मागतां.
**पोटकरपी** (वि.) पोटजाळी (स्त्रियांच्या भाषेंतली एक शिवी).
**पोटकुळी** (स्त्री.) कनवटी; कडोसी.
**पोटखर्च** (पु.) खाण्यापिण्याचा खर्च.
**पोटखर्ची** (स्त्री.) खाण्यापिण्यासाठीं घेतलेले पैसे. [निर्वाहाचें साधन.
**पोटगी** (स्त्री.), **पोटगें** (न.) पोटखर्ची;
**पोटचा** (वि.) औरस; स्वतःचा.
**पोटझाकणी** (स्त्री.), **पोटझाकणें** (न.) लग्नांत वराच्या आईकडून वधूच्या आईला लुगडें देण्यांत येतें तें.
**पोटतिडीक** (स्त्री.) कळकळ.
**पोटदुखी** (स्त्री.) पोटशुळाची व्यथा; मत्सर; हेवा.
**पोटपूजा** (स्त्री.) खाणेंपिणें; लांच.
**पोटभर** (अ.) पोटभरेपर्यंत, तृप्ति होईपर्यंत.
**पोटभरू** (पु.) पोटार्थी; पोट भरण्यासाठीं उद्योग करणारा; नुसता पोट भरणारा.
**पोटबाबू** (पु.) पोटाला मिळालें म्हणजे बाकीच्या गोष्टींविषयीं बेफिकीर असणारा.
**पोटभऱ्या** (वि.) खादाड.
**पोटरा** (पु.) चांगलें भरलेलें कणीस.
**पोटरी** (स्त्री.) पायाच्या नळीच्या मागचा मांसल भाग.
**पोटवाडक** (प्रा. वि.) पोटभरू.

**पोटस्त, पोटस्थ** (न.) प्राप्तीचें अप्रत्यक्ष किंवा गौण साधन.
**पोटळणें** (प्रा. क्रि.) प्रफुल्लित होणें.
**पोटळा** (पु.) पोटांतलीं आंतडीं.
**पोटळी** (स्त्री.) मोटळी; गाठोडी.
**पोटा** (पु.) गव्हाचा एक प्रकार; (स्त्री.) दाढीमिशी असलेली स्त्री.
**पोटार्थी** (पु.) केवळ पोट भरण्यासाठीं उद्योग किंवा नोकरी करणारा; पगार न घेतां नुसत्या जेवणावारी राहणारा नोकर.
**पोटाळणें** (प्रा. क्रि.) पोसणें; मिठी मारणें; गाभण होणें; धान्याच्या कणसांत दाणा भरणें.
**पोटाळा** (प्रा. पु.) पोटांतलीं आंतडीं घाव लागून बाहेर येणें; (वि.) वाटोळा.
**पोटारी** (वि.) अधाशी.
**पोटीं** (अ.) अंतर्भूत.
**पोटाशी, पोटिशी** (वि.) गरोदर.
**पोंढ, पोंढा** (पु.) विहिरींतून काढलेलें पांणी साठविण्याचा हौद; भाताच्या राशीवर कालवण घेण्यासाठीं केलेली खळी; खळी.
**पोंढी** (स्त्री.) लहान खळगा; खळी.
**पोंढें** (न.) भाताचें खाचर.
**पोत** (सं. पुत्र पु.) बालक; (फा. पु.) पेटविलेला काकडा; मशाल; हत्याराचें अग्र; (हिं. न.) विणकर; विणकामाची सफाई; (स्त्री.) काचेच्या बारीक बारीक मण्यांचा समुदाय; (सं. पु.) नौका.
**पोतडी** (स्त्री.) पिशवी; बटवा.
**पोतंडी** (स्त्री.) पुरचुंडी. [पारखणारा.
**पोतदार** (फा. पु.) द्रव्यपरीक्षक; नाणीं
**पोतदारी** (स्त्री.) पोतदाराचें काम.
**पोतनीस** (फा. पु.) खजीनदार.
**पोतरा** (वि.) पोरका.
**पोतराज** (पु.) शेंदूर फासून लहंगा नेसून मरीआईच्या नांवानें भीक मागणारा महार किंवा मांग.
**पोतवड जमीन** (स्त्री.) नुकतीच लागवडीस येत चाललेली जमीन.
**पोतां** (गुज. अ.) स्वतः.
**पोतास** (प्रा. पु.) कापूर.
**पोती** (सं. पुत्री स्त्री.) मुलगी.
**पोतें**(फा. पोता न.)थैला; सरकारी खजिना.
**पोतेचाल** (स्त्री.) चालू नाणें. [फडका.
**पोतेरें** (न.) सारवणं; सारवण घालण्याचा
**पोंथ** (पु. न.) सूत घालून वाहविण्याचें क्षत; सूत्रण. [सुस्त मनुष्य.
**पोंथा** (पु.) शेणाचा किंवा विष्ठेचा पोहो;
**पोथी** (स्त्री.) पुस्तक; वही.
**पोंद** (न.) बूड; तळ.
**पोंदाडा** (पु.) पोचा; खळगा.
**पोंधा** (पु.) नांगराचा एक भाग.
**पोपट** (पु.) राघू, शुक, कीर; कडवे वाल.
**पोपटपंची, पोपटी विद्या** (स्त्री.) अर्थज्ञानावांचून केवळ शब्दोच्चार; केवळ शब्दज्ञान.
**पोपटी** (वि.) पोपटाच्या रंगाचा.
**पोपडा**(पु.) उखिरवळी; सुटलेला पापुद्रा.
**पोपती** (स्त्री.) मागावर सूत ताणून बसविण्यापूर्वीं कुंच्यानें तें साफ करण्याची क्रिया; कित्येक सांदणीलाहि ही संज्ञा देतात.
**पोपनस, पोपनीस** (न.) जाड सालीचें लिंबाच्या वर्गांतील एक फळ; या फळाचें झाड.
**पोपथ, पोपया, पोपई** (हिं. पेपैया स्त्री.) पपई.
**पोपली, पोपी** (स्त्री.) लहान मुलांसाठीं दूध घालून केलेली बारीक पिठाची चांदकी.
**पोपेरें** (न.) पानाची केलेली पिपाणी.
**पोफळ** (प्रा. न.) ओली सुपारी. **पो० घालणें**—पैज मारणें (ज्ञा० १३२०).
**पोफळी** (वि.) मोठ्या चौकड्यांचें.
**पोबारा** (पु.) सोंगट्याच्या खेळांत—दोन फाशांवर सहा सहा ठिपके व एकावर एक मिळून तेरा ठिपके येणें. **पोबारा करणें**—पळून जाणें.
**पोंभाळणें** (प्रा.क्रि.) चोळणें (तुका० १३१).
**पोम** (न.) ढोंग; दंभ; स्तोम. **पोम फुटणें**—ढोंग उघडकीला येणें.

**पोय, पोयें** (स्त्री.) पोंगी; नारळाचा कोंव; पोई.

**पोयाड** (न.) नदीकडे सखल झालेली जागा; लहान खाडी. [ मोहोळ.

**पोयें** (न.) झाडाच्या ढोलींत लागलेलें

**पोर** (न.) मूल; बच्चा.

**पोरकट** (वि.) पोराला शोभणारें.

**पोरका** (वि.) आईबापावांचून असलेला.

**पोरकिडा** (पु.) धान्याला लागणारी एक कीड. [ येणारी गोष्ट.

**पोरखेळ** (पु.)मुलांचा खेळ; सहज करतां

**पोरगळ** (वि.) पोरकट.

**पोरगा** (पु.) मुलगा.

**पोरगी** (स्त्री.) मुलगी.

**पोरगें** (न.) मूल.

**पोरचेष्टा** (स्त्री.) पोरखेळ ( नाचणें वागडणें इ.).

**पोरटा–टी–टें** (पु. स्त्री. न.) पोरगा–पोरगी–पोरगें(तुका० १७४२);कारटा; द्वाड मुलगा.

**पोरबुद्धि** (स्त्री.) अपक्व बुद्धि.

**पोरवडा, पोरवाडा** (पु.) घरांत प्रौढ मनुष्य नसल्यामुळें होणारी अव्यवस्था; पोरांचा सुळसुळाट; मुलांचा पुष्कळ भरणा असलेलें कुटुंब.

**पोरसौदा** (वि.) पोरवय; मुलासारखा.

**पोरांडें** (सं. पुत्ररंड वि.) पोरें व बायका मात्र आहेत असें.

**पोरासोरी** (अ.) पोरांमध्यें; पोरांकडून.

**पोरेंसोरें** (न. अने. व.) मुलें लेकरें.

**पोर्टर** (इं. पु.) हमाल.

**पोल, पोलवट, पोलट** (न.) पोकळ नळी.

**पोलकें** (न.) स्त्रियांच्या अंगांतील एक चोळीवजा वस्त्र.

**पोला** (वि.) रिकामें.

**पोलाद** (फा. न.) कार्बन घालून कठिण व लवचीक केलेलें लोखंड; तिखें.

**पोलिस्त** (स्त्री.) लागवड केलेली जमीन.

**पोलिटिकल** (इं. वि.) राजकारणी; धूर्त.

**पोलिस** (इं. पु.) स्थानिक बंदोबस्ता-करितां ठेविलेला शिपाई; बंदोबस्ताचें खातें.

**पोल्हार** (न.),**पोल्हारा** (फा. पु.) पैंजण (अनंतफंदी पृ०८०); पायाच्या बोटांत घालण्याचें बायकांचें एक भूषण.

**पोव** (पु.) पोहो; शेणाचा किंवा विष्ठेचा ढीग.

**पोवई** (स्त्री.) धर्मार्थ पाणपोई.

**पोवतें** (सं. पवित्र न.) देवाला वाहण्याचे सुताचे धागे; जानवें; गंडा.

**पोवळ, पोवळी** (प्रा. स्त्री.) देवळाच्या भोवतालची भिंत (हरि०३०।१३००); कुंपण; आवार.

**पोवळा** (वि.) पोवळयाच्या रंगाचा.

**पोवळें** (सं. प्रवाल न.) प्रवाल.

**पोवा, पोंबा** (पु.) पावा, वेळूची पिपाणी; यात्रेकरूंचा जमाव.

**पोवाडा** (पु.) पवाडा पहा.

**पोशा** (सं. पुष् वि.) पोसलेला, खाऊन स्वस्थ बसणारा.

**पोशाक, पोशाख, पोषाख** (फा. पोशाक पु.) पेहराव.

**पोशाकी, पोशाखी, पोषाखी** (फा. वि.) मिजासी, डामडौली.

**पोशिंदा** (फा. पु.) पालनकर्ता.

**पोषक** (सं. वि.)पुष्टि देणारें. [ भक्ष्य.

**पोषण** (सं. न.) संभाळणें, पोसणें; बढती;

**पोषणें** (क्रि.) पोसणें, खाऊंपिऊं घालणें; संभाळ करणें.

**पोषाख** (पु.) पोशाक पहा.

**पोष्ट** (इं. पोस्ट न.) टपाल ऑफिस; टपाल.

**पोष्य** (सं. वि.) ज्याचें पोषण करावयास पाहिजे असे (पुत्र, कन्या इ.)

**पोस** (सं. पीयूष पु.) खरवस. **चांदण्याचा पोस** –नुकतें पडूं लागलेलें चांदणें.

**पोसणा** (सं.पुष् वि.) पोसलेला, पाळलेला.

**पोसणें** (क्रि.) पोषणें पहा.

**पोस्त** ( सं. पुष्टि न. ) नोकराचाकरांस सणावारीं देण्याचें इनाम.

**पोहचणें** (हिं. क्रि.) पोंचणें; प्राप्त होणें.

**पोहची** (हिं. स्त्री.) पुरुषाच्या मनगटास बांधण्याचा एक अलंकार.

**पोहटा** (पु.) पूर; पोहो. [ शाखा.

**पोहटी** (स्त्री.) लहान पोहो; खाडीची

**पोहणी** (प्रा. क्रि.) पोहो; पोहण्याजोगी खोल नदी; घाण, दुर्गंधि.
**पोहणें** (क्रि.) तरणें, पेंवणें, तिरणें.
**पोहरा** (पु.) विहिरींतून पाणी काढण्याचें विशेष प्रकारचें भांडें.
**पोहा** (पु.) मेळा, थवा; शिजवून कुटून चपटा केलेला भाताचा दाणा.
**पोहिटी** पोहटी पहा.
**पोहे** (प्रा. स्त्री.) पोई.
**पोहो** (पु.) विष्टेची रास.
**पोहोंचणें** (क्रि.) पोंचणें.
**पोळ** (पु.) पितरांच्या नांवानें सोडलेला खोंड; वसु; वृथापुष्ट मनुष्य; (गुज. पु.) आळी, बोळ.
**पोळणें** (क्रि.) भाजणें, चटका लागणें; नुकसान सोसावें लागणें; दुःखानें व्यथित होणें.
**पोळपाट** (पु.) पोळी लाटण्याची फळी.
**पोळा** (पु.) श्रावण व. ३० किंवा भाद्रपद व. ३० च्या दिवशीं बैलास शृंगारतात, पूजाअर्चा करतात, व थाटानें मिरवितात, तो उत्सव.
**पोळी** (स्त्री.) गव्हाच्या कणिकेची लाटून केलेली भाकरी. **पोळी पडणें**—(प्रा.) दग्ध होणें; **पोळी पिकणें**—चैन होणें; **आपल्या पोळीवर तूप ओढणें**—अप्पलपोटेपणा करणें.
**पोळें** (न.) मधमाशांचें मध साठविण्याचें घर; मधुकोश. [याच्यामधली स्थिति.
**पौगंड** (सं. पु.) बाल्यावस्था व तारुण्य
**पौंड** (पु.) एक इंग्रजी सुवर्णनाणें.
**पौंची** (स्त्री.) पोहची पहा.
**पौढणें** (प्रा. क्रि.) पहुडणें, निजणें.
**पौत्र** (सं. पु.) मुलाचा मुलगा, नातू.
**पौत्री** (सं. स्त्री.) मुलाची मुलगी, नात.
**पौंध्या** (क्रि. वि.) निष्फळ; व्यर्थ.
**पौनःपुन्य** (न.) पुनरावृत्ति.
**पौनर्भव** (पु.) दोन वेळां लग्न झालेल्या स्त्रीचा मुलगा.
**पौर** (वि.) पुरवासी; नागरिक.
**पौरस्त्य** (सं. वि.) पूर्वेकडील, प्राच्य.
**पौराणिक** (पु.) पुराणासंबंधीं.
**पौरुष** (सं. न.) पराक्रम.
**पौरुषेय** (सं. वि.) मानवकृत; मनुष्यसंबंधीं.
**पौरोहित्य** (न.) पुरोहिताचें काम.
**पौर्णिमा, पौर्णिमासी** (सं. स्त्री.) शुद्ध पक्षांतला शेवटचा दिवस, पुनव.
**पौर्वापर्य** (सं. न.) मागच्या पुढच्यांतला परस्परसंबंध.
**पौष** (सं. पु.) हिंदु वर्षाचा दहावा महिना.
**पौष्टिक** (सं. वि.) पुष्टि देणारें.
**पौळी** (प्रा. स्त्री.) पोई; मूढ दशा; आवार; भिंत(मुक्ते०वन० १५।१५५).
**प्याजी** (हिं. वि.) कांद्याच्या रंगासारखें किंचित् गुलाबी रंगाचें.
**प्यादा** (फा. पु.) पायदळांतला शिपाई. **प्याद्याचा फर्जी होणें**—हलका मनुष्य मोठ्या पदवीस चढणें.
**प्यादी** (फा. स्त्री.) प्यादेमात पहा.
**प्यादें** (फा. न.) मोहरीं खेरीज करून इतर कोणतेंही बुदवळ.
**प्यादेमात** (फा. स्त्री.) बुद्धिबळाच्या राजाला हालचाल करतां न आल्यामुळें तो अडकून पडतो व त्यामुळें खेळ संपतो अशी स्थिति, पराभव.
**प्यार, प्यारा** (हि. वि.) प्रिय.
**प्यार** (स्त्री.) प्रीतिपात्र.
**प्यारा, प्यारिग्राफ** (इं. पु.) लेखपरिच्छेद, लेखांतला तोडलेला भाग.
**प्याला** (फा. पु.) पेला.
**प्यास** (हि. स्त्री.) तहान.
**प्याहा** (सं. प्लीहा पु.) पानथरी.
**प्रकट** (सं. वि.) उघड, स्पष्ट. [येणें.
**प्रकटणें** (क्रि.) गुप्त स्थिति टाकून बाहेर
**प्रकटित** (सं. वि.) जाहीर किंवा स्पष्ट केलेला.
**प्रकंपन** (सं. न.) वायु.
**प्रकर** (सं. पु.) समुदाय.
**प्रकरण** (सं. न.) अध्याय, भाग; परिच्छेद; वाद; विषय, गोष्ट; कागदपत्र; प्रस्थ, धेंड.
**प्रकर्ष** (सं. पु.) उत्कर्ष, श्रेष्ठता, आधिक्य.
**प्रकांड** (सं. वि.) उत्कृष्ट; विशाळ.
**प्रकाम** (सं. वि.) अतिशय, पुष्कळ.

**प्रकार** (सं. पु.) तऱ्हा; भेद; रीत; वर्तणूक.
**प्रकाश** (सं. पु.) उजेड; (प्रा.) ज्ञान.
**प्रकाशक** (सं. पु.) जाहिर करणारा; प्रसिद्धिकर्ता.
**प्रकाशणें** (क्रि.) उजेड देणें, प्रसिद्धीस किंवा उघडकीस आणणें.
**प्रकाशमान** (सं. वि.) चकचकीत, तेजस्वी.
**प्रकाशित** (सं. वि.) प्रसिद्ध किंवा प्रकट केलेला.
**प्रक्रिया** (स्त्री.) रीति; पद्धति.
**प्रकीर्ण** (सं. वि.) विखुरलेलें, विविध.
**प्रकृत** (सं. वि.) चालू, प्रस्तुत; (सं. प्रकृति स्त्री.) तब्येत, स्वभाव.
**प्रकृति** (सं. स्त्री.) मूळ धर्म, मूळ स्वभाव; माया; शब्दाचें मूळरूप; मूळ कारण; तब्येत; प्रजा; प्रधानमंडळ.
**प्रकृष्ट** (सं. वि.) उत्कृष्ट; श्रेष्ठ.
**प्रकोप** (सं. पु.) क्षोभ; दंगा. [भाग.
**प्रकोष्ट** (सं. पु.) कोपराखालचा हाताचा
**प्रखर** (सं. वि.) अति उष्ण; तीक्ष्ण.
**प्रख्यात** (सं. वि.) प्रसिद्ध.
**प्रख्याति** (सं. स्त्री.) प्रसिद्धि, कीर्ति. [पहा.
**प्रगट, प्रगटणें** यांबद्दल प्रकट, प्रकटणें
**प्रगणा** (पु.) परगणा पहा.
**प्रगल्भ** (सं. वि.) प्रौढ; धीट; शहाणा.
**प्रगति** (स्त्री.) सुधारणा; उत्कर्ष.
**प्रगमनशील** (सं. वि.) सुधारणाप्रिय; प्रगतिप्रिय.
**प्रघात** (सं. पु.) वहिवाट, चाल.
**प्रचंड** (सं. वि.) विशाल; फार मोठा.
**प्रचलित** (सं. वि.) चालू किंवा रूढ (नाणें, भाषा, शब्द, आचार, वाद इ.).
**प्रचार** (सं. पु.) प्रघात, चाल.
**प्रचारक** (सं. पु.) प्रचार करणारा; माहिती सांगत फिरणारा.
**प्रचीत, प्रचीति** (सं. प्रतीति स्त्री.) विश्वास; खात्री; अनुभव.
**प्रचुर** (सं. वि.) पुष्कळ; विपुल.
**प्रच्छन्न** (सं. वि.) अप्रकट; गूढ; गुप्त.
**च्छादन** (सं. न.) झाकणें; आवरण.
**जा** (सं. स्त्री.) संतति; रयत; लोक.

**प्रजापति** (सं. पु.) ब्रह्मदेव; राजा.
**प्रज्वलन** (सं. न.) पेटणें; पेटविणें.
**प्रज्वलित** (सं. वि.) प्रदीप्त.
**प्रणणें** (सं. परि + नी क्रि.) विवाह करणें.
**प्रणत** (सं. वि.) नम्र.
**प्रणति** (सं. स्त्री.) नमस्कार; नम्रता.
**प्रणय** (सं. न.) प्रेम. [लटका राग.
**प्रणयकोप** (सं. पु.) नवराबायकोमधला
**प्रणव** (सं. पु.) ओंकार.
**प्रणाम** (सं. पु.) नमस्कार; वंदन.
**प्रणालिका, प्रणाली** (सं. स्त्री.) परंपरा; नळ, पन्हळ.
**प्रणिधान** (सं. न. ) ध्यान, चिंतन.
**प्रणिपात** (सं. न.) नमस्कार; वंदन.
**प्रणीत** (सं. वि.) रचिलेलें.
**प्रत** (स्त्री.) नक्कल, प्रतिलेख; अनुकरण; मासला; वर्ग; (अ.) स-ला-तें.
**प्रतवंदी** (स्त्री.) गुणावरून जमिनीचें वर्गीकरण करणें.
**प्रतान** (पु.) वेल; लता.
**प्रताप** (सं. पु.) पराक्रम; सामर्थ्य; गुण; अर्धा होन किंमतीचें नाणें.
**प्रतारणा** (सं. स्त्री.) फसवणूक, लबाडी.
**प्रति** (सं. स्त्री.) प्रत; (अ.) प्रत्येकीं.
**प्रतिकार** (सं. पु.) उपाय; इलाज; विरोध.
**प्रतिकुंचक** (प्रा. वि.) प्रतिकूळ (दा० १९।६।५).
**प्रतिकूळ** (सं. वि.) विरुद्ध, उलट.
**प्रतिकृति** (सं. स्त्री.) नक्कल; प्रतिबिंब; सूड.
**प्रतिक्रान्ति** (स्त्री.) क्रान्तिविरोधी चळवळ.
**प्रतिक्रिया** (सं. स्त्री.) निवारण; फेड; इलाज, उपचार.
**प्रतिग्रह** (सं. पु.) देणगीचा स्वीकार.
**प्रतिद्वंद्वी** (वि.) प्रतिस्पर्धी; विरुद्ध जाणारा.
**प्रतिदिनीं** (अ.) रोजच्या रोज.
**प्रतिध्वनि** (सं. पु. ) पडसाद.
**प्रतिनिधि** (सं. पु.) मुखत्यार.
**प्रतिपत्ति** (सं. स्त्री.) ग्रंथरचना; आदर; मेजवानी (ज्ञा० ६।२२); विधिविधान (ज्ञा. १६।३०।३०४). [तिथि.
**प्रतिपदा** (सं. स्त्री.) पंधरवड्यांतली पहिली

**प्रतिपदीं** (अ.) पावलोपावलीं; क्षणोक्षणीं.
**प्रतिपक्ष** (सं. पु.) प्रतिस्पर्धी; विरुद्ध पक्ष; शत्रु. [ सिद्ध करणें; बोलणें; सांगणें.
**प्रतिपादणें** (सं. प्रतिपद् कि.) प्रमाणानें
**प्रतिपादन** (सं. न.) दोषाचें निरसन करून स्वमताची स्थापना करणें.
**प्रतिपाळ** (सं. पु.) संरक्षण; आचरण.
**प्रतिबंध** (सं. पु.) विरोध; अडथळा.
**प्रतिबिंब** (सं. न.) पडछाया.
**प्रतिभट** (पु.) बरोबरी करणारा माणूस; प्रतियोद्धा.
**प्रतिभा** (सं. स्त्री.) चेहरा, स्वरूप; तेज, प्रकाश; बुद्धि; स्फूर्ति; कवीची दिव्य दृष्टि.
**प्रतिमा** (सं.स्त्री.) सादृश्य; मूर्ति; नक्कल.
**प्रतिमान** (न.) लेखकाच्या कल्पनासृष्टींत वावरणारें पात्र.
**प्रतियोगी** (सं. पु.) प्रतिपक्षी, शत्रु.
**प्रतिलोम** (सं. वि.) उलटा; विपरीत. **प्र० विवाह** (सं. पु.)–उच्च वर्णाच्या स्त्रीचा हलक्या वर्णाच्या पुरुषाशीं झालेला विवाह.
**प्रतिवचन**, **प्रतिवाद** (सं. पु.) आक्षेपास उत्तर.
**प्रतिवादी** (सं. पु.) प्रतिपक्षी; आरोपी.
**प्रतिवृत्त** (न.) अहवाल.
**प्रतिशब्द** (सं. पु.) प्रतिध्वनि.
**प्रतिषेध** (सं. पु.) निवारण.
**प्रतिष्ठणें** (सं. प्रस्था कि.) स्थापणें; राहणें.
**प्रतिष्ठा** (सं. स्त्री.) मान; डौल; स्थापना. स्थिति.
**प्रतिष्ठापना** (स्त्री.) अधिष्ठान वसविणें.
**प्रतिष्ठित** (सं. वि.) स्थिर; निश्चित; संभावित. [सामनेवाला.
**प्रतिस्पर्धी** (सं. पु.) चढाओढ करणारा;
**प्रतिसहकारिता** (स्त्री.) दुसरा जसें वागेल तसें वागणें.
**प्रतिसाद** (पु.) प्रेमिकाच्या भावनेला प्रिय व्यक्तीनें दिलेला अनुकूल उद्गार.
**प्रतिहत** (वि.) मार खाल्लेला; निराश झालेला. [ सिद्धांत.
**प्रतिज्ञा** (सं. स्त्री.) पण; वचन; निश्चय;

**प्रतीक** (न.) चिन्ह.
**प्रतीची** (सं. स्त्री.) पश्चिम. [प्रचीति.
**प्रतीति**(सं.स्त्री.)अनुभव; विश्वास; खात्री;
**प्रतीप** (सं. पु.) एक अलंकार (यांत प्रसिद्ध उपमानाला प्रसिद्ध उपमेयाची उपमा दिली असते.).
**प्रतीक्षा** (सं. स्त्री.) वाट पाहणें.
**प्रतोद** (सं. पु.) चाबूक; कोरडा; कायदे मंडळांत पक्षाचें कामकाज पाहण्याकरितां नेमलेला धुरीण.
**प्रत्यक्** (वि.)पुढचा.**प्र० ज्योति** (स्त्री.)– आत्मप्रकाश.
**प्रत्यगात्मा** (सं. पु.) ब्रह्म; कूटस्थ.
**प्रत्यंचा** (सं. स्त्री.) धनुष्याची दोरी.
**प्रत्यंतदेशगमन** (सं. न.) समुद्रपारच्या प्रदेशास जाणें.
**प्रत्यंतर** (सं. न.) अनुभव; उदाहरण.
**प्रत्यय** (सं. पु.) प्रचीति; अनुभव; व्याकरणांत–नाम व धातु यांना जोडून येणारें अक्षर.
**प्रत्यवाय** (सं. पु.) हरकत; दोष; नुकसान.
**प्रत्यहीं** (क्रि. वि.) दररोज, प्रतिदिवशीं.
**प्रत्यक्ष** (सं. वि.) दिसणारें; साक्षात्; समक्ष.
**प्रत्याख्यान** (न.) इनकार; मनाई.
**प्रत्याघात** (पु.) प्रतिक्रिया; उलट प्रहार.
**प्रत्याहार** (सं. पु.) इंद्रियांची अंतर्मुखता.
**प्रत्युत्तर** (सं.न.) जाबास जाब; उलट उत्तर.
**प्रत्युपकार** (सं. पु.) उपकाराची फेड.
**प्रत्यूष** (न.) पहांट, प्रातःकाल.
**प्रत्यूह** (सं. पु.) विघ्न.
**प्रत्येक**(सं. वि.)दरएक; एकेक. [आरंभीं.
**प्रथम** (सं. वि.) पहिला; पूर्वीचा; (अ.)
**प्रथमतः** (सं. वि.) पहिल्यानें; आरंभीं.
**प्रथमपुरुष** (सं. पु.) मराठी व्याकरणांत—बोलणारा स्वतः (मी किंवा आम्ही).
**प्रथमा** (सं. स्त्री.) व्याकरणांत – पहिली विभक्ति.
**प्रथा** (सं. स्त्री.) चाल; रूढि; प्रख्याति; स्थिति; वृद्धि (ज्ञा० १८।५७४); अनुभव (ज्ञा०१८।१०।१८).

**प्रथित** (सं. वि.) प्रसिद्ध; कीर्तिमान.
**प्रद** (सं. समासान्तीं वि.) देणारें.
**प्रदर** (सं. पु.) धुपणी, स्त्रियांचा एक रोग.
**प्रदर्शक** (सं. वि.) दाखविणारा.
**प्रदर्शन** (सं. न.) देखावा; तमाशा; दाखविणें.
**प्रदक्षिणा** (सं. स्त्री.) एकाद्या मूर्तीला आपल्या उजव्या हाताकडे करून त्याच्या भोवताली घातलेली फेरी.
**प्रदान** (सं. न.) देणें; देणगी.
**प्रदीप** (सं. पु.) दिवा.
**प्रदीप्त** (सं. वि.) उज्ज्वल.
**प्रदोष** (सं. पु.) सूर्यास्तानंतरच्या दोन घटिका; एक व्रत.
**प्रदेश** (सं. पु.) जागा; प्रान्त.
**प्रधान** (सं. पु.) मंत्री; (वि.) श्रेष्ठ.
**प्रपंच** (सं. पु.) विस्तार; पाल्हाळ; माया; भ्रम; अविद्या; जग; संसार; खटला.
**प्रपा** (सं. स्त्री.) पाणपोई.
**प्रपादणें** (सं. प्रतिपादन क्रि.) सिद्ध करणें; वजावून सांगणें.
**प्रपात** (पु.) धबधबा. [सारा०२२।९४).
**प्रपासन** (प्रा. न.) पाणपोई (कथा-
**प्रपिता** (सं. पु.) बापाचा बाप (आजा).
**प्रपितामह** (सं. पु.) बापाच्या बापाचा बाप (पणजा).
**प्रपौत्र** (सं.पु.) नातवाचा मुलगा; पणतू.
**प्रपौत्री** (सं. स्त्री.) नातवाची मुलगी.
**प्रफुल्ल, प्रफुल्लित** (सं. वि.) उमललेलें, विकसित; आनंदित.
**प्रबंध** (सं. पु.) अखंडपणा; नाटक, काव्य इ० ची रचना; कल्पित गोष्ट; पदवी-साठीं विद्यापीठास सादर केलेला विस्तृत निबंध; सिद्धान्त.
**प्रबळ** (सं. वि.) फार शक्तिमान्; बलिष्ठ.
**प्रबुद्ध** (सं. वि.) प्रौढ; हुशार; विद्वान्.
**प्रबोध** (सं. पु.) जागृति; यथार्थ ज्ञान.
**प्रबोधन** (सं. न.) जागें करणें; शिकविणें.
**प्रबोधिनी** (सं. स्त्री.) विष्णूचा जागें होण्याचा दिवस (कार्तिक शु. ११).
**प्रभंजन** (सं. पु.) सोसाट्याचा वारा.
**प्रभव** (सं. पु.) उत्पत्ति; मूळ कारण; पराक्रम; (प्रा.) सुखदुःख. [छाया.
**प्रभा** (सं. स्त्री.) तेज; कीर्ति; प्रकाश;
**प्रभाकर** (सं. पु.) सूर्य.
**प्रभागजाति अपूर्णांक** (सं. पु.) अंक-गणितांत—ज्यांत अपूर्णांकाचे अपूर्णांक असतात ते अपूर्णांक.
**प्रभात** (सं. स्त्री.) पहांट. [ऐश्वर्य.
**प्रभाव** (सं. पु.) तेज; सामर्थ्य; पराक्रम;
**प्रभावळ** (सं. स्त्री.) मूर्तीच्या पाठीचें टेंकण; मोठ्यांच्या सभोंवार नेहमीं असणारे लोक. [जात (परभू).
**प्रभु** (सं. पु.) धनी; स्वामी; राजा; एक
**प्रभूत** (वि.) पुष्कळ, विपुल.
**प्रभृति** (अ.) इत्यादि; पासून.
**प्रमत्त** (सं. वि.) गाफील; धुंद.
**प्रमथनाथ** (सं. पु.) शंकर.
**प्रमा** (सं. स्त्री.) प्रमाण (अमृत० ६।४१).
**प्रमदा** (सं. स्त्री.) तरुण सुंदर स्त्री.
**प्रमाण** (सं. न.) माप; परिमाण; मर्यादा; निश्चय; साक्ष; पुरावा; प्रत्यंतर; आधार; गणितांत—त्रैराशिकांतली पहिली संख्या; (वि.) खरें; न्याय.
**प्रमाणसूत्र** (सं. न.) लग्नाच्या वेळीं वधू व वर यांच्या उंची ज्यानें मोजतात तें सूत.
**प्रमाणिका** (सं. स्त्री.) एक समवृत्त (याच्या चरणांत आठ अक्षरें व ज, र, हे दोन गण व त्याच्या पुढें एक लघु व त्यानंतर एक गुरु अक्षर असतें).
**प्रमाणें** (अ.) सारखें.
**प्रमाथी** (पु.) साठ संवत्सरांपैकीं एक; (वि.) सामर्थ्यवान्.
**प्रमाद** (सं. पु.) चूक; अपराध.
**प्रमुख** (सं. वि.) मुख्य; श्रेष्ठ.
**प्रमेय** (सं. न.) सिद्ध करण्याची गोष्ट.
**प्रमेह** (सं. पु.) परमा.
**प्रमोद** (सं. पु.) आनंद.
**प्रयत्न** (सं. पु.) दीर्घोद्योग; श्रम.
**प्रयाग** (सं. पु.) संगम; गंगायमुनांच्या संगमाचें स्थान (अलाहाबाद).
**प्रयागवळ** (पु.) प्रयाग क्षेत्राचा तीर्थो-पाध्याय.
**प्रयाण** (सं. न.) गमन; जाणें.

**प्रयास'** (सं. पु.) कष्ट; श्रम.
**प्रयुत** (सं. न.) दहा लक्ष.
**प्रयुक्ति** (स्त्री.) परिणाम; शेवट.
**प्रयोग** (सं. पु.) योजना; रीत; पद्धत; अनुष्ठान; प्रत्यक्ष क्रिया; व्याकरणांत —वाक्यांतील कियापदाचा त्याच्या कर्त्याशीं किंवा कर्माशीं पुरुष, लिंग व वचन यांच्या बाबतींत जो अन्वय होतो तो; नाटकाचा खेळ रंगभूमीवर करून दाखविणें.
**प्रयोगसिद्ध** (न.) प्रयोगानें सिद्ध होणारें किंवा झालेलें. [ प्रेरक.
**प्रयोजक** (सं. वि.) कार्य प्रवर्तक; करविता;
**प्रयोजणें** (सं. प्रयुज् क्रि.) वापरणें.
**प्रयोजन** (सं. न.) कारण; निमित्त; साधन; जरुरी; जेवणावळ.
**प्ररोह** (सं. पु.) उदय.
**प्रलय, प्रळय** (सं. पु.) संहार; नाश.
**प्रलाप** (सं. पु.) बडबड; व्यर्थ भाषण.
**प्रलोभन** (सं. न.) फूस; आमिष.
**प्रवक्ता** (पु.) भविष्यवादी; देवाच्या संदेशावर भाष्य करणारा.
**प्रवचन** (सं. न.) विवरण; व्याख्यान.
**प्रवण** (सं. वि.) उतरता; सखल; आसक्त.
**प्रवर** (सं. वि.) उत्कृष्ट; श्रेष्ठ; (पु.) गोत्रांतले मुख्य पूर्वज.
**प्रवर्त** (सं. पु.) व्यवहार. [ उत्पादक.
**प्रवर्तक** (सं. वि.) उत्तेजन देणारा; (पु.)
**प्रवर्तणें** (सं. प्रवृत् क्रि.) आरंभणें; उद्युक्त होणें; चाल पडणें; जाणें.
**प्रवर्तन** (सं. न.) वागणूक.
**प्रवसर** (प्रा. पु.) मोह.
**प्रवाद** (सं. पु.) लोकवार्ता; वदंता.
**प्रवाल, प्रवाळ** (सं. पु.) पोंवळें.
**प्रवास** (सं. पु.) देशाटन; परदेशसंचार.
**प्रवासी** (सं. पु.) मुशाफर; पांथस्थ.
**प्रवाह** (सं. पु.) ओघ; वाहणें; अखंडपणा.
**प्रवाहण** (प्रा. न.) होडी; नाव (ज्ञा० १८।७०५).
**प्रवाळ** (सं. प्रवाल न.) पोंवळें.
**प्रविष्ट** (सं. वि.) शिरलेला; निमग्न.
**प्रविष्टर** (वि.) सरकारांत नोंदलेला.
**प्रवीण** (सं. वि.) निष्णात; पारंगत, निपुण.
**प्रवृत्त** (सं. वि.) तयार; उद्युक्त.
**प्रवृत्ति** (सं. स्त्री.) कल; ओढा; प्रघात; गति; बातमी. [ मार्ग.
**प्रवृत्तिमार्ग** (सं. पु.) प्रापंचिक व्यवहाराचा
**प्रवेश** (सं. पु.) शिरकाव; रिघाव; दार; नाटकाचा एक पोटभाग.
**प्रवेशणें** (सं. प्रविश् क्रि.) शिरणें; घुसणें.
**प्रवेशपरीक्षा** (सं. स्त्री.) प्रवेश करण्याच्या पात्रतेची कसोटी; मॅट्रिक्युलेशन परीक्षा.
**प्रशम** (सं. पु.) शांति; विश्राम; सांत्वन.
**प्रशमन** (सं. न.) सांत्वन.
**प्रशंसक** (सं. पु.) स्तुति करणारा.
**प्रशंसणें** (सं. प्रशंस् क्रि.) स्तुति करणें.
**प्रशंसनीय** (सं. वि.) स्तुत्य.
**प्रशंसा** (सं. स्त्री.) स्तुति; तारीफ; वाहवा.
**प्रशस्त** (सं. वि.) ऐसपैस; विस्तीर्ण.
**प्रशस्ति** (स्त्री.) स्तुति.
**प्रशान्त** (सं. वि.) शांत; थंड; बंद पडलेलें; मृत. **प्रशान्तसागर** (पु.)–पॅसिफिक महासागर.
**प्रशासक** (पु.) राज्यकारभारासाठीं नेमलेला अधिकारी. [शकुन.
**प्रश्न** (सं. पु.) पृच्छा; विचारपूस; सवाल;
**प्रश्नणें** (क्रि.) विचारणें.
**प्रश्नालंकार** (सं. पु.) वाहेरून वाक्य प्रश्नासारखें दिसतें; पण वस्तुतः वक्त्यास त्या गोष्टीचा पक्का निश्चय असतो, अशा ठिकाणीं होणारा अलंकार.
**प्रसंग** (सं. पु.) संबंध; गांठ; चर्चेचा विषय; काळ; संकट; आपत्ति.
**प्रसंगवशात्** (अ.) कदाचित्. [ सुचणें.
**प्रसंगावधान** (सं. पु.) योग्य वेळीं युक्ति
**प्रसंगोपात** (सं. प्रसंगोपात्त अ.) योग्य वेळीं; प्रसंगाच्या ओघांत.
**प्रसन्न** (सं. वि.) संतुष्ट; आनंदी; प्रफुल्लित; संतोष देणारें.
**प्रसर** (सं. पु.) विस्तार; फैलाव; प्रसार.
**प्रसरण** (सं. न.) विस्तार; पसरणें.
**प्रसव** (सं. पु.) प्रसूति; जन्म.

**प्रसवणें** (सं. प्रसू क्रि.) जन्म देणें; उत्पन्न होणें.
**प्रसवती** (प्रा. स्त्री.) माता; (वि.) उत्पन्न होणारी (ज्ञा० ४।२६).
**प्रसाद** (सं. पु.) देऊळ (ज्ञा० यो० ७।१९); कृपा; अनुग्रह; देव, गुरु, साधु इ० नीं संतुष्ट होऊन दिलेला पदार्थ; देवाला अर्पिलेल्या अन्नाचा शेष; कौल; साक्षात्कार; स्पष्टार्थता; सुबोधता.
**प्रसाधन** (सं. न.) सौंदर्यवर्धनासाठीं चेहरा व शरीर यांची सजावट करणें.
**प्रसार** (सं. पु.) विस्तार; पसारा.
**प्रसिद्ध** (सं. वि.) विख्यात; जाहिर.
**प्रसिद्धि** (सं. स्त्री.) ख्याति, कीर्ति.
**प्रसूत** (सं. वि.) बाळंत, प्रसवणारी.
**प्रसूति** (सं. स्त्री.) प्रसवणें; जन्म.
**प्रसूतिका** (सं. स्त्री.) बाळंतीण.
**प्रसृत** (सं. वि.) पसरलेलें.
**प्रस्तर** (पु.) खडक.
**प्रस्तार** (सं. पु.) प्रसार, विस्तार.
**प्रस्ताव** (सं. पु.) आरंभ, प्रस्तावना; पश्चात्ताप, पस्तावा (दा. १।१।३३); प्रसंग, गोष्ट (अमृ० ७।७); (हिं. पु.) ठराव. [ पूर्वसूचना.
**प्रस्तावना** (सं. स्त्री.) उपोद्घात; आरंभ;
**प्रस्तु** (प्रा. पु.) प्रस्थ, स्तोम.
**प्रस्तुत** (सं. वि.) घडलेलें, चालू; वर्णिलेलें.
**प्रस्थ** (सं. न.) थेंड, प्रकरण; शेराचें माप; ढोंग, स्तोम. **प्रस्थ माजविणें**–नसतें महत्त्व देणें.
**प्रस्थान** (सं. न.) प्रवासास निघणें; निघण्याच्या पूर्वी सुमुहूर्तावर तांदूळ, हळकुंड इ. वस्तु अन्य स्थळीं ठेवून जातांना त्या बरोबर नेतात तें.
**प्रस्थानत्रय** (सं. न.), **प्रस्थानत्रयी** (सं. स्त्री.) गीता, उपनिषदें व ब्रह्मसूत्रें हीं तीन.
**प्रस्थापना** (सं. स्त्री.) स्थापना.
**प्रस्थापित** (सं. वि.) स्थापिलेलें.
**प्रस्रव** (सं. पु.) पाझर, प्रवाह, धार.
**प्रस्राव** (सं. पु.) पाझर; मूत्र.
**प्रहर** (सं. पु.) तीन तास.
**प्रहर्षण** (सं. पु.) एका अर्थालंकाराचें नांव (जेथें यत्न केल्यावांचून कार्यसिद्धि होणें, किंवा इच्छितार्थापेक्षां अधिक अर्थाचा लाभ होणें इत्यादिक वर्णन केलें असतें तेथें हा अलंकार होतो.)
**प्रहर्षिणी** (सं. स्त्री.) एक वृत्त; याच्या चरणांत १३ अक्षरें व म, न, ज, र हे चार गण व शेवटचें अक्षर गुरु असतें.
**प्रहसन** (सं. न.) मोठा हंशा; फार्स; हास्यप्रधान रूपक.
**प्रहार** (सं. पु.) ताडन, आघात, तडाखा.
**प्रहास** (पु.) मोठा हंशा; रंगेलपणा; उपहास.
**प्रळय** (सं. प्रलय पु.) संहार, नाश.
**प्रक्षालन** (सं. न.) धुणें.
**प्रक्षाळणें** (सं. प्रक्षालन क्रि.) धुणें.
**प्रक्षिप्त** (सं. वि.) घुसडलेलें.
**प्रक्षोभ** (सं. पु.) खळबळ.
**प्रज्ञा** (सं. स्त्री.) बुद्धि, विचारशक्ति.
**प्रज्ञाचक्षु** (सं. वि.) जन्मान्ध.
**प्राक्** (क्रि. वि.) पूर्वी, अगोदर.
**प्राकार** (सं. पु.) कुंपण; तट.
**प्राकृत** (सं. वि.) स्वभावसिद्ध; बालभाषेंतलें; जुनी मराठी; अडाणी; हलकें. [ चर्मचक्षु.
**प्राकृतदृष्टि** (सं. स्त्री.) लौकिक दृष्टि;
**प्राकृत हेदरें** (वि.) गयाळ.
**प्राक्तन** (सं. न.) दैव; नशीब.
**प्रागतिक** (वि.) ज्याची प्रगति होत आहे असा. **प्रागतिकपक्ष** (पु.)–मवाळ पक्ष.
**प्राचार्य** (पु.) महाविद्यालयाचा प्रमुख (इं. प्रिन्सिपॉल)
**प्राची** (सं. स्त्री.) पूर्वदिशा.
**प्राचीन** (प्रा. न.) पूर्वकर्म; दैव (तुका० ४२२७); (वि.) जुनें, पुरातन काळचें.
**प्राचुर्य** (सं. न.) बाहुल्य, विपुलता.
**प्राच्य** (सं. वि.) पूर्वेकडील.
**प्रांजल–ळ** (सं. वि.) प्रामाणिक, सरळ, सुगम; स्वाधीन (भक्तलीला० ४।१८५.)
**प्राज्य** (सं. वि.) पुष्कळ; वृद्धिगत.
**प्राजापत्य** (सं. पु.) विवाहाच्या आठ प्रकारांपैकीं एक.

**प्राण** (सं. पु.) जीव; हृदयस्थ वायु; अत्यंत प्रिय वस्तु.
**प्राणघेणा** (वि.) अतिशय लोचट; अतिशय कष्टप्रद.
**प्राणदान** (सं. न.) एकाद्याला जिवावरल्या संकटांतून सोडविणें.
**प्राणधारण** (सं. न.) जिवंत राहणें.
**प्राणनाथ, प्राणपति** (सं. पु.) पति, नवरा.
**प्राणप्रतिष्ठा** (सं. स्त्री.) मंत्रादिकांनीं मूर्तींत प्राणाची स्थापना करण्याचा विधि.
**प्राणमय कोश** (सं. पु.) आत्म्याच्या पंचकोशांपैकीं एक.
**प्राणयात्रा** (सं. स्त्री.) चरितार्थ.
**प्राणविसावा** (पु.) प्राणांचें विश्रांतिस्थान; जिवाला समाधान देणारा; पति.
**प्राणांतिक** (सं. वि.) घातक, भयप्रद; प्राण घेणारी; अतिसंकटमय. [ निरोध.
**प्राणायाम** (सं. पु.) श्वासाच्या गतीचा
**प्राणाशीं गांठ** प्राण धोक्यांत पडणें.
**प्राणिज** (सं. वि.) प्राण्यापासून उत्पन्न झालेलें.
**प्राणि-विज्ञान** (न.) प्राण्याविषयींचें शास्त्र.
**प्राणी** (सं. पु.) जीव, जंतु.
**प्राणोत्क्रमण** (सं. पु.) प्राण निघून जाणें.
**प्रांत** (पु.) देशाचा मोठा विभाग; इलाखा; प्रदेश; परिणाम; समूह; कड; सीमा.
**प्रांत** (सं. पु.) जिल्ह्यांतले तीनचार तालुके मिळून मुलकी कामासाठीं केलेला जिल्ह्याचा पोटविभाग; त्यावरचा अधिकारी.
**प्रांतीं** (प्रा. स्त्री.) शेवट, समाप्ति.
**प्रातः** (सं. अ.) पहाटेस.
**प्रातःकाळ** (सं. पु.) पहाट, सकाळ.
**प्रातर्विधि** (सं. पु.) शौच मुखमार्जन, स्नान इ. सकाळीं आटोपण्याच्या गोष्टी.
**प्रातःस्मरण** (सं. न.) पहाटेस देवाचें नांव घेणें.
**प्रात्यक्षिक** (न.) प्रयोग.
**प्राथमिक** (सं. वि.) आरंभींचें.
**प्रादेश** (पु.) वीत; टीच.
**प्रादेशिक** (वि.) विशिष्ट प्रदेशासंबंधीं.
**प्रादुर्भाव** (सं. पु.) दृग्गोचर होणें; उत्पत्ति; आरंभ.
**प्रादुर्भूत** (सं. वि.) दृग्गोचर झालेला.
**प्राधान्य** (सं. न.) महत्त्व, वर्चस्व.
**प्राध्यापक** (पु.) महाविद्यालय किंवा विद्यापीठ यांतील प्राध्यापक (इं. प्रोफेसर).
**प्रापंचिक** (सं. वि.) प्रपंचविषयक; (पु.) संसारी, कुटुंबवत्सल.
**प्रापण** (न.) देणें; नेणें.
**प्राप्त** (सं. वि.) मिळालेलें; अवश्य; (स्त्री.) मिळकत.
**प्राप्ति** (सं. स्त्री.) मिळकत; लाभ.
**प्राप्य** (सं. वि.) लायक; संपादनीय.
**प्राबल्य** (सं. न.) प्रबळता; वर्चस्व.
**प्रामाणिक** (सं. वि.) सच्चा, विश्वसनीय.
**प्रामाण्य** (सं. न.) सत्यता; सप्रमाणता; आधार; विश्वसनीयता.
**प्रॉमिसरी नोट** (इं.) सरकारला कर्ज काढण्याची जरूरी लागते तेव्हां कांहीं ठराविक व्याज देण्याचें वचन देऊन जे दस्तऐवज विकतात ते.
**प्राय** (सं. समासाच्या उत्तरपदांत वि.) सारखा, बहुतेक. जसें:—अशक्यप्राय, मृतप्राय इ. [ बहुतांशीं.
**प्रायः, प्रायसा** (सं. अ.) बहुतकरून,
**प्रायश्चित्त** (सं. न.) पापक्षालनार्थ करावयाचें विधियुक्तकर्म; दंड; परिमार्जन.
**प्रायोपवेशन** (सं. न.) मरेपर्यंत उपोषण.
**प्रारब्ध** (सं. न.) नशीब; दैव; (वि.) आरंभिलेलें.
**प्रारंभ** (सं. पु.) आरंभ; सुरुवात.
**प्रारंभणें** (सं. प्रारभ् क्रि.) सुरू करणें.
**प्रार्थणें** (सं. प्रार्थ् क्रि.) विनवणें.
**प्रार्थना** (सं. स्त्री.) विनंति; याचना.
**प्रालब्ध** (सं. प्रारब्ध न.) नशीब.
**प्रावरण** (सं. न.) पांघरूण.
**प्रावीण्य** (सं. न.) नैपुण्य; दक्षता.
**प्रावृष्,प्रावृट्** (सं. स्त्री.) पावसाळा, बरसात.
**प्राशणें** (सं. प्राश् क्रि.) पिणें.
**प्राशन** (सं.न.) पिणें. [ यो० १।१५६).
**प्राश्निक** (सं. पु.) अध्यक्ष; ज्योतिषी (ज्ञा०

**प्रास** (सं. पु.) एक शब्दालंकार (यांत त्याच त्या अक्षरांची पुनरावृत्ति होते).
**प्रासंगिक** (सं. वि.) समयोचित; प्रसंगानें प्राप्त.
**प्रासाद** (सं.पु.) देवालय; मंदिर, राजवाडा.
**प्रासादिक** (सं. वि.) थोरांच्या कृपेनें मिळालेलें; प्रेमळ.
**प्रास्ताविक** (सं. वि.) प्रस्तावनारूप.
**प्राज्ञ** (सं. वि.) शहाणा; हुशार; विद्वान्.
**प्राज्ञा** (सं. स्त्री.) मगदूर; सामर्थ्य.
**प्रिय, प्रियकर** (सं. त्रि.) आवडतें, सुखकर; (पु.) पति; कांत.
**प्रियंवदा** (सं. स्त्री.) हें एक वृत्त आहे. याच्या चरणांत १२ अक्षरें व न, भ, ज, र हे चार गण असतात; (वि.) गोड बोलणाली.
**प्रिया** (सं. वि.) आवडती; (स्त्री.) स्त्री.
**प्रिन्सिपॉल** (इं पु.) मुख्याध्यापक; मुख्य.
**प्रीत** (सं. वि.) संतुष्ट; (सं. प्रीति स्त्री.) प्रेम; आवड.
**प्रीति** (सं. स्त्री.) प्रेम; आवड; मर्जी.
**प्रीतिविवाह** (सं. पु.) वधूवरांच्या पत्रिका वगैरे न पाहतां त्यांचीं एकमेकांचीं मनें जुळून होणारा विवाह.
**प्रीत्यर्थ** (अ.) साठीं, करितां; मुळें.
**प्रेत** (न.) शव; मुडदा.
**प्रेम** (सं. न.) प्रीति; स्नेह.
**प्रेमळ** (सं. वि.) प्रेमयुक्त. [मनुष्य.
**प्रेमा** (सं. पु.) प्रेम; प्रेमाचा विषय; प्रिय
**प्रेय** (न.) इंद्रियांस प्रिय असें ऐहिक सुख.
**प्रेरक** (सं. वि.) प्रेरणा करणारा; स्फूर्ति देणारा.
**प्रेरणा** (सं. स्त्री.) उत्तेजन; स्फूर्ति.
**प्रेरणें** (क्रि.) पाठविणें; फेकणें; वळविणें (दृष्टि).
**प्रेरित** (सं. वि.) उत्तेजित.
**प्रेष** (सं. पु.) जासूद.
**प्रेषण** (सं. प्रेष् क्रि.) पाठविणें.
**प्रेक्षक** (सं. पु.) पाहणारा.
**प्रेक्षण** (न. स्त्री.) पाहणें, अवलोकन.
**प्रेक्षणीय** (सं. वि.) पाहाण्यालायक; अवश्य पाहिलें पाहिजे असें.
**प्रेक्षणें** (क्रि.) पाहणें.
**प्रोफेसर** (इं. पु.) एखाद्या शास्त्रांतला निष्णात; उच्च विद्यालयांतला अध्यापक.
**प्रोक्त** (सं. वि.) बोललेलें.
**प्रोत्साहन** (सं. न.) उत्तेजन; प्रवर्तन.
**प्रोक्षण** (सं. न.) शिंपडणें.
**प्रौढ** (सं. वि.) पोक्त; वयोवृद्ध; धीट.
**प्रौढप्रताप** (सं.वि.) सामर्थ्यवान्; पराक्रमी.
**प्रौढी** (सं. न.) थोरवी, महिमा (विवे० पृ०२।२५); मोठी कीर्ति (राम० ३८।६८); गर्व; अहंता; प्रतिष्ठा.
**प्लव** (पु.) नाव; नौका.
**प्लवग, प्लवंग, प्लवंगम** (सं. पु.) वानर.
**प्लाटफार्म** (इं. पु.) कट्टा, धक्का, ओटा.
**प्लीहा** (सं. स्त्री.) पानथरी.
**प्लुत** (सं. ) तीन मात्रांचा स्वर.
**प्लुति** (सं. स्त्री.) उडी.
**प्लेग** (इं. पु.) रोगाची सांथ; ग्रंथिज्वर.

——

## फ

**फ** मराठी वर्णमालेंतील बाविसावें व्यंजन.
**फकडी** (स्त्री.) फुलवरा; पाकळ्यांची रांग; (वि.) द्राक्षाची एक जात.
**फकत, फकस्त** (अर. फकत् अ.) फक्त; केवळ.
**फका, फक्का** (पु.) मोठी फक्की.
**फक्कड** (सं. पक्क वि.) छान; चैनी.
**फकांडी** (स्त्री.) बडबड; (वि.) बडबड्या.
**फकाणा, फकांदा** (पु.) फका.
**फकिका, फक्किका** (सं. स्त्री.) चर्चेचा विषय; पूर्वपक्ष; पूर्वग्रह; फसवणूक; सिद्धान्ताभास.
**फकी, फक्की** (स्त्री.) चूर्णाचा घास; चूर्ण.
**फकीर** (फा. पु.) विरक्त; सोटभैरव. फ०फुकारा (फा. पु.) गोरगरीब.
**फकीरी** (स्त्री.) भिक्षा; नाडा; (वि.) फकिराचें. [भिक्षावृत्ति.
**फकीरी बाणा** (पु.) निःसंग वृत्ति;
**फॅक्टरी** (इं. स्त्री.) कारखाना.
**फक्त** (अर. फकत् अ.) केवळ.

**फजर** (अर. अ.) उद्यां सकाळीं. [ रायतें.
**फजिता** (पु.) फजिती; आंब्याचें पातळ.
**फजिती** (अर. फजीत स्त्री.) पच्ची, पचडा.
**फजीतखोर** (वि.) वारंवार फजिती करून घेणारा.
**फज्जा** (पु.) फजिती.
**फजल** (अर. स्त्री.) कृपा.
**फट** (स्त्री.) भेग, चीर.
**फटक** (क्रि. वि.) आधिक्य किंवा अतिशयत्व दाखविण्याच्या दृष्टीनें योजतात. जसें-पांढराफटक.
**फटकडी, फटकी** (स्त्री.) तुरटी.
**फटकडी** (स्त्री.) व्रणचुणीत, नखरेबाज स्त्री; लहान फटाका; तोफ.
**फटकणें** (क्रि.) पाखडणें.
**फटकर** (न.) फाटकें कांबळें, किंवा चिरगूट; चिंधी; वस्त्राचा वाभाडा.
**फटकळ** (वि.) स्पष्टवक्ता; अविचारानें दुर्भाषण करणारा; वाईट; दुर्घटना; अशुभ गोष्ट घडून येणें.
**फटका** (पु.) प्रहार; तडाखा; एक प्रकारचें आवेशयुक्त गाणें.
**फटकारणें** (क्रि.) झटकन् करून टाकणें.
**फटकारा** (पु.) फटका.
**फटकाळ** (वि.) फटकळ; चोरटा; दुष्ट; नीच (मोरो० वन० ११।३८); व्यर्थ.
**फटकी** (सं. स्फाटिका स्त्री.) तुरटी.
**फटकून** (अ.) वेगळेपणानें दूर राहून.
**फटफजिती** (स्त्री.) पुरी फजिती, बोऱ्या.
**फटफटणें** (क्रि.) उजाडणें.
**फटफटी** (स्त्री.) मोटारसायकल.
**फटफटीत** (वि.) निस्तेज; पांढरें चक्क.
**फटमर** (प्रा. वि.) भित्रा; फजीतखोर; भित्रेपणाचें; अब्रूला कलंक लावणारें.
**फटरांड, फटलंडी** (स्त्री.) हलकट वेश्या.
**फटवण** (स्त्री.) लबाडी; फसवणूक.
**फटविणें** (प्रा. क्रि.) फसविणें (तुका० ९६५).
**फटाकडा, फटाका** (पु.) दारू भरलेली नळी; (वि.) फक्कड, छानदार.
**फटिंग** (पु.) झोटिंग; सोटभैरव.
**फड** (हिं. पु.) कचेरीची जागा. ताफा; शेत; मळा; संधि; मजलस.
**फंड** (इं. पु.) द्रव्यनिधि.
**फंडगुंडी** (स्त्री.) सार्वजनिक फंडांत पैसे मारून गबर होण्याची कारवाई.
**फडकणें** (क्रि.) झोकांत येणें; फडफडणें.
**फडका** (पु.) वस्त्राचा तुकडा.
**फडकी** (स्त्री.) लहान मुलीचें पांघरावयाचें पितांबरासारखें उंची वस्त्र.
**फडकें** (न.) लहान फडका; चिंधी.
**फडणीस** फडणवीस पहा.
**फडताळ, फडताळ** (न.) भिंतींत वसविलेलें कपाट.
**फडतूस** (वि.) टाकाऊ; गचाळ.
**फडणवीस, फडणीस** (हिं. पु.) सरकारी दप्तराचा मुख्य अधिकारी; हिशोबी खात्यावरचा अंमलदार.
**फडतूस** (स्त्री.) उघड चौकशी.
**फडफड** (प्रा. स्त्री.) फजिती; घोटाळा.
**फडफडाट** (पु.) मोठा भडिमार.
**फडफडणें** (क्रि.) फडफड वाजणें.
**फडफडीत** (वि.) ज्याचीं शितें टणक आणि एकमेकांना न चिकटलेलीं आहेत असा (भात).
**फडफरमाश–स** (फा. स्त्री.) राजाज्ञेनें गांवकऱ्यांनीं राजाला किंवा सरकारी अधिकाऱ्यांना लावलेली डाली; वेठ; जुलमाचें काम.
**फडशा** (हिं. पु.) निकाल, नाश.
**फडा, फडी** (सं. फटा स्त्री.) सर्पाची फणा; नागफणीचें पान.
**फडी** (प्रा. स्त्री.) निकाल, खुलासा.
**फडें** (न.) गोफणीची वादी.
**फण** (पु.) दांताळें; फणा.
**फणका, फणकारा** (पु.) रागाचा झटका; संताप; आग; नागीचा प्रहार.
**फणगडा** (पु.) फाटा; उपस्थित केलेली अडचण.
**फणफणणें** (क्रि.) संतप्त होणें; प्रखर होणें.
**फणफणीत** (वि.) अतिशय संतप्त.
**फणस** (सं. पनस पु.) एक मोठें फळ.
**फणा** (सं. फण स्त्री.) फडा; केळयांचा समुदाय. [फडा; केळयांचा समुदाय.
**फणी** (सं.पु.) सर्प; (स्त्री.) विंचरी, कंगवा;

... वाचनालय सातारा
संगणकीकृत



**फणेरें** (न.) वेणीफणी करण्याचें साहित्य ठेवण्याचा झोळणा.
**फतऱ्या** (वि.) कपाशीच्या गाडीचें वजन करतांना वजनदार फत्तर उचलण्यासाठीं ठेवलेला नोकर.
**फतवा** (हि. पु.) निर्णयपत्र; एकाद्या वादग्रस्त मुद्द्यासंबंधानें मुसलमान पंडितानें दिलेला लेखी निकाल.
**फताडा** (वि.) फार रुंद; पसरट.
**फते, फत्ते** (अर. स्त्री.) विजय; यशस्विता.
**फतेमारी** (हिं. पातीमारी स्त्री.) लहान गलबत.
**फत्तर** (हिं. पत्थर पु.) धोंडा; दगड.
**फत्तेनामा** (अर. फतेहनामा पु.) विजयाची वार्ता कळविणारें पत्र.
**फदफदणें** (क्रि.) खदखदणें; फसफसणें.
**फंद** (हिं. पु.) कारस्थान; छंद; व्यसन; नाद. [बाजी वगैरे.
**फंदफितूर** (पु.) बंड; कारस्थान; दगल-
**फंदी** (वि.) नादी, छांदिष्ट, व्यसनी.
**फदूल** (वि.) फोपसा.
**फद्या** (पु.) चार पै (मुंबईंत).
**फनगडा** (पु.) फाटा. [ फडशा.
**फना, फन्ना** (अर. फनीआ पु.) सत्यानाश,
**फर, फरा**(स्त्री.) खवाटयाचें हाड; खवाटा.
**फरक** (अर. पु.) अंतर, फेर.
**फरकटणें** (क्रि.) ढुंगण घाशीत जाणें; सपाटयानें लिहिणें.
**फरकटा, फरगडा** (पु.) फाटा.
**फरकंड** (स्त्री.) फरपटत नेल्याचें किंवा गेल्याचें चिन्ह. [ फरकंड.
**फरकंडा** (स्त्री.) चिंधी, अडचण, संकट;
**फरकणें** (क्रि.) बाजूला होणें; वाट देणें, फिरणें.
**फरगडा** (पु.) लपेटी, अक्षराचा फाटा; चिरखाडणें; उपस्थित केलेली अडचण.
**फरगाद** (फ्रेंच फरेगेट न.) एक प्रकारचें लढाऊ जहाज.
**फरगूड** (न.) कापडांतली उरलेली चिंधी.
**फरडा** (वि.) पटाईत, निष्णात.
**फरडुकें, फरडूक** (न.) गमतीचा चुटका; म्हण; आख्यायिका; दृष्टान्त.
**फरताळ** (न.) फडताळ पहा. [शाल).
**फरद** (अर. पु.) एकेरी वस्त्र (विशेषतः
**फरदा** (अर. फरद पु.) दाराची एक फळी.
**फरपट** (स्त्री.) घसडत नेल्याची खूण; क्रम; परंपरा.
**फरपटणें** (क्रि.) घसडत चालणें.
**फरपटा** (पु.) रेघ, खूण. [ घसडत.
**फरफरा** (अ.) फरफर आवाज करीत;
**फरमान, फरमाना** (फा. पु.) राजाज्ञा; आज्ञापत्र.
**फरमावणें** (क्रि.) आज्ञा करणें.
**फरमाशी** (फा. वि.) नमुन्यासाठीं मुद्दाम काढलेलें; मागणी.
**फरमास** (फा. फरमाइश पु.) मागणी; नजराणा.
**फरमासी** (हिं. वि.) उत्कृष्ट; (स्त्री.) नजर, अधिकाऱ्यास देणगी.
**फरश, फरस** (सं. परशु पु.) कुऱ्हाडी-सारखें शस्त्र.
**फरशी** (अर. फरश स्त्री.) दगडी चीप; दगडी चिपांनीं केलेली फरसबंदी; (सं. परशु स्त्री.) कुऱ्हाड.
**फरसबंदी** (फा. स्त्री.) चिरेबंदी.
**फरसाळ** (प्रा. वि.) भिन्न स्वादाचें.
**फरा** (सं. फलक पु.) खवाटा; तंगडी; धान्याचें एक माप; पिंपळवन; कळप, सैन्याची रांग.
**फराकी** (स्त्री.) खोगिरांतली गादी.
**फराट** (पु.) जमिनींत बीं पेरल्यानंतर ती जागा मातीनें झाकून टाकणारें औत.
**फरांटा** (पु.) फाटा, फरगडा.
**फरारा** (पु.) पताका, निशाण; त्याचें वस्त्र.
**फरारी** (अर. फरार वि.) परागंदा, पळून गेलेला; (प्रा. स्त्री.) थोरपण, अंतः-करणाची ओढ; गर्व; आभास.
**फराशीस, फरांसीस** (फ्रेंच फरांशाई पु.) फ्रेंच मनुष्य.
**फरास** (अर. फराश पु.) बिछाईत घालणारा.
**फरासखाना** (फा. पु.) राहुटया डेरे वगैरे ठेवण्याचें स्थळ. [अल्पाशन.
**फराळ** (सं. फलाहार पु.) अल्पाहार,

**फरी** (स्त्री.) ढालीसारखें स्वसंरक्षणाचें एक साधन.
**फरीद** (अर. फर्द पु.) एकटा; सडा; (इं. फरीड वि.) पहाऱ्याच्या कामावरून मोकळा झालेला.
**फरें** (न.) खांद्याचें हाड; मांडीचें हाड.
**फरेब** (फा. पु.) कपट; लुच्चेगिरी.
**फरेंमरें** (न.) नऊ खड्यांचा खेळ.
**फरोक्त** (फा. फरोकृत वि.) विकलेलें.
**फरोड** (पु.) पसारा.
**फर्गोल** (फा. पु.) रुंदार पायघोळ अंगरखा.
**फर्ज** (फा. पु.) कर्तव्य.
**फर्जंद** (फा. पु.) प्रिय पुत्र. [ वजीर.
**फर्जी** (फा. पु.) बुद्धिबळाच्या खेळांतला
**फर्द, फर्मास** फरद, फरमास पहा.
**फर्नांदीस** (पोर्तु. पु.) आंब्याची एक जात.
**फर्मा** (फा.पु.) नमुना; (इं.पु.) आकृति; रचना; छापखान्यांत छापण्यासाठीं खिळे वगैरे जोडून व गच्च बांधून तयार ठेवलेलीं मजकुराचीं पृष्ठें.
**फर्लो** (इं. स्त्री.) कांहीं वर्षें नोकरी केल्यानंतर मिळणारी सवलतीची रजा.
**फल** (सं. न.) फळ; शेवट; परिणाम; नांगराचा फाळ; शस्त्राचें अग्र.
**फलकट** (न.) पोकळ दाणा; (वि.) वायफळ. [ उडी.
**फलंग, फलांग** (हिं. स्त्री.) टांग; ढांग;
**फलंदाज** (पु.) त्रिफळाजवळ उभा राहून चेंडू मारणारा क्रिकेटमधील खेळाडू.
**फलज्योतिष** (सं. न.) ग्रहांच्या परिस्थितीचा मनुष्याच्या स्थितीवर अमुक परिणाम व्हावयाचा असे सिद्धान्त ज्यांत असतात तें शास्त्र.
**फलद, फलद्रूप, फलप्रद** (सं. वि.) सफळ; परिणामकारक.
**फलप्रदान** (सं. न.) फळ देणें; लग्नांत वाङ्‌निश्चयाच्या वेळीं वराचा बाप वधूच्या ओटींत नारळ घालतो तो विधि.
**फलश्रुति** (सं. स्त्री.) एखाद्या कर्माचें किंवा व्रताचरणाचें फल सांगणारा ग्रंथभाग.
**फलशोभन** (न.) गर्भादान विधि.
**फलाटिण, फलानेल** (इं. फ्लॅनेल स्त्री.) लोकरीचें मऊ वस्त्र.
**फलाणा** (फा. सर्व.) अमका.
**फलाहार** (सं. पु.) फराळ.
**फलित** (सं. वि.) सिद्धीस गेलेला; निष्पन्न; (न.) ध्वनितार्थ.
**फलितार्थ** (सं. पु.) गर्भितार्थ; ध्वनि.
**फल्गु** (सं. वि.) निःसत्त्व; क्षुद्र; तुच्छ.
**फवारा** (अर. पु.) हजारी कारंजें; त्यांतून उडणारें पाणी.
**फॅशन** (इं. स्त्री.) नवा ढंग; नवी चाल.
**फशीं पडणें** फसून संकटावस्थेंत पडणें.
**फसकटणें** (क्रि.) फिसकटणें; विसकटणें.
**फसकल** (स्त्री.) प्रशस्त मांडी.
**फसकी** (हिं. स्त्री.) मूठभर दाणे; कामगार लोक दुकानदारापासून, किंवा पंतोजी मुलापासून हक्क म्हणून कांहीं धान्य, भाजीपाला वगैरे घेत तें.
**फसगत** (स्त्री.) फशीं पडलेल्याची स्थिति; फजिती.
**फसणूक** (स्त्री.) गुंतून पडणें. [ जाणें.
**फसणें** (क्रि.) अडकणें; रुतणें; फसविलें
**फसफसणें** (क्रि.) फसफस आवाज होणें; अंबून फुगणें; फेस येणें.
**फसमामला** (पु.) तोटयाचा किंवा बुडीचा कारभार, व्यापार.
**फसल** (अर. स्त्री.) हंगाम, हंगामाची वेळ; जनावरें, मुलें इत्यादिकांना देतात तें पुष्टिकारक अन्न किंवा खाद्य.
**फसली साल** (न.) एका शकाचें नांव. हा इ. स. च्या मागें ५९० वर्षें आहे. मृगारंभापासून याची सुरुवात होते.
**फसवणूक** (स्त्री.) ठकबाजी.
**फसविणें** (क्रि.) ठकविणें.
**फसव्या** (पु.) लुच्चा, भामटा.
**फसाव** (पु.) फसगत.
**फस्त** (फा. वि.) ओसाड; नष्ट.
**फळ** (सं. न.) फल पहा.
**फळकट** (प्रा. वि.) हलकें; निःसत्त्व.
**फळकवणी** (स्त्री.) पाण्यासारखा पातळ पदार्थ.

**फळगट** (प्रा. वि.) अव्यवस्थित.
**फळणें** (क्रि.) फळास येणें; फायदेशीर होणें; गाभण होणें.
**फळफळणें** (क्रि.) फार मुतणें, जोरानें बाहेर येणें; उदयास येणें.
**फळफळाट** (पु.) उत्कर्ष; विपुलता.
**फळफळावळ** (स्त्री.) पुष्कळ जातींचीं फळें.
**फळशोभन** (सं. न.) ऋतुशांतीचा विधि.
**फळा** (पु.) नांगराचा फाळ; मोठा तक्ता.
**फळादेश** (सं. पु.) फलप्राप्ति; फायदा; लाभ.
**फळी** (स्त्री.) लहान तक्ता; पक्ष; पंक्ति; रांग; खेळ; युद्ध. **फळी घेणें**—युद्धास सिद्ध होणें (वामन० विराट० ७।८).
**फळें** (प्रा. न.) शस्त्राचें पातें.
**फाईल** (इं. न.) मिसल; फेरिस्त.
**फाक, फांक** (स्त्री.) आंवट तुकडा; फोड; (प्रा. स्त्री.) अंतर; प्रतिबंध.
**फाकट, फाटक** (न.) आवार, बाग, परसूं इ. चें फारसें बळकट नसणारें दार.
**फाकटणें** (क्रि.) लागणें; पसरणें.
**फाकडा** (वि.) हुशार; ऐटबाज; पाणीदार.
**फाकणें** फाकटणें पहा.
**फाका** (पु.) फका; उपवास.
**फांकाफांक** (स्त्री.) गोळा झालेल्यांची (माणसें, गुरें वगैरेंची) ताटातूट.
**फाकेसीर** (हिं. वि.) उपाशी.
**फाग** (पु.) फाल्गुन; होळीच्या दिवसांत म्हणावयाचीं बीभत्स गाणीं.
**फाजल** (अर. वि.) विद्वान्; शहाणा.
**फांज, फांद** (स्त्री.) तट; गांवाच्या भोंवतालची भिंत. [अडचण; प्रतिबंध.
**फांजी** (फा. स्त्री.) नगरकोट; गांवकुसूं;
**फाजील** (अर. फाजल वि.) वाजवीहून अधिक; अतिप्रसंग करणारा.
**फांट** (पु.) भिन्नपणा; विरोध; हरकत; दोष; काढा. [झापा.
**फाटक** (न.) जुनेर; (हिं. न.) कवाड;
**फाटका** (वि.) फाटलेला; क्षीण. **फा० अंगाचा**—सडपातळ.
**फाटणें** (क्रि.) चिरणें, भिन्न होणें.
**फाटा, फांटा** (पु.) फांदी; शाखा; खोडावयाच्या मजकुरांतून आलेली रेघ; रजा देणें; सोडणें; आडरान; वहकणें; लाकडें, सर्पण; बडबड. **फा० देणें**—सोडणें; **फा० फुटणें**—एकांतून दुसरेंच उत्पन्न होणें; **फाटे फोडणें**—अडचणी उत्पन्न करणें; **फाटा भरणें**—बडबडणें.
**फाटाफूट** (स्त्री.) वाताहत; ताटातूट.
**फाटी** (स्त्री.) लाकडें; सर्पण.
**फाटोवाड** (प्रा. पु.) मोठेपणा; (वि.) पुष्कळ, स्पष्ट.
**फाड** (स्त्री.) भंग; चीर.
**फाडकन्** (अ.) ताडकन्.
**फाडण** (क्रि.) चिरणें; (डोळे) वटारणें.
**फाडा** (पु.) पाढा. [दगड.
**फाडी** (स्त्री.) एका बाजूनें घडविलेला
**फाडावाडें** (प्रा. न.) मोठेपणा; स्पष्टपणा; (वि.) पुष्कळ; स्पष्ट.
**फाडीवाडी, फाडोवाडें** (प्रा. अ.) स्पष्टपणें; पुष्कळ.
**फाणस, फाणूस** (फा. फाणुस पु.) कंदील.
**फात्या** (अर स्त्री.अने.) मृतांच्या प्रार्थना; अर्थशून्य वाचाळता. **फात्या मारणें**—दुसऱ्याची जिन्नस सढळ हातानें देणें.
**फांद** (स्त्री.) फांदी; खांदी, शाखा; तट.
**फांदडणें** (क्रि.) चिरणें; फाडणें.
**फांदणें** (क्रि.) उडी मारणें; उधळणें.
**फांदा** (पु.) अडचण; अडथळा.
**फांदाफांद** (स्त्री.) फाटाफूट; दाणादाण; पांगापांग.
**फांदी** (स्त्री.) शाखा; खांदी.
**फांदोरी** (स्त्री.) लहान फांदी.
**फापडणें** (प्रा. क्रि.) पाखडणें.
**फापर** (न.) क्षत; मोठी जखम.
**फापरा** (वि.) तोतरा.
**फांपाइणें** (प्रा. क्रि.) वाढणें. [होणें.
**फापावणें** (प्रा. क्रि.) विस्तारणें; लठ्ठ
**फांफाइणें** (प्रा. क्रि.) फोफावणें.
**फां फूं** (न.) मंत्रतंत्र.
**फाम** (अर. स्त्री.) चित्ताची स्थिरता.
**फायदा** (अर. पु.) किफायत; नफा; लाभ.
**फार** (वि.) पुष्कळ; (प्रा. वि.) प्रकाशित, उघड (ज्ञा० १५३।११).

**फारकत, फारखत** (अर. फारग खत स्त्री.) ऋणमुक्तिपत्र; हक्क सोडल्या-बद्दलचा लेख; सोडचिठ्ठी.
**फारगत** (पोर्तु. फरीगट न.) एक प्रकारचें जहाज.
**फारमानबाडी** (फा. फरमाबरदारी स्त्री.) हुकुमाला मान देणें.
**फारशी** (सं. पारसिक पु.) इराण देशाचा रहिवासी; (स्त्री.) त्याची भाषा.
**फारसनीस** (फार. पु.) फारशींतील पत्र-व्यवहार चालविणारा अंमलदार किंवा कारकून.
**फॉरेस्ट** (इं. न.) अरण्य; जंगल.
**फारोळा** (पु.) चिंधी. [टोपण.
**फारोळें** (न.) पाभरीच्या दांत्याचें लोखंडी
**फार्स** (इं. पु.) प्रहसन; चुटका.
**फालतू** (हिं. वि.) ज्यास्त; शिल्लक.
**फालस** (इं. फॉल्स न.) खोटें मोतीं.
**फालें** (अ.) कारवाराकडे—उद्यां.
**फाल्गुन** (सं. पु.) हिंदुवर्षाचा बारावा महिना; अर्जुन. **फा० वाद्य**—बोंब.
**फाव** (प्रा. पु.) अवकाश; लाभ.
**फावडें** (न.) खोरें. **फा०नें पैसा ओढणें**—अतिशय द्रव्यप्राप्ति करणें.
**फावणें** (क्रि.) मिळणें; सवड सापडणें; साधणें; सफळ होणें; समजणें; चालणें.
**फावती** (स्त्री.) फुरसत.
**फावल** (प्रा. पु.) सुस्वाद.
**फाया** (पु.) अत्तराचा बोळा. [शिक्षा.
**फाशी** (सं. पाश स्त्री.) फासावर चढण्याची
**फास, फांस** (सं. पाश पु.) पाश; जमीन उकरण्याकरितां कुळवाला बसविलेली लोखंडी पट्टी.
**फासणी** (स्त्री.) घाय; चीर.
**फासकी** (स्त्री.) पाश; जाळें.
**फासटणें** (क्रि.) फासणें.
**फासडा** (पु.) गुंतागुंत; गांठ.
**फासणी** (स्त्री.) शस्त्रानें केलेला सूक्ष्म छेद.
**फासणें** (क्रि.) चोळणें; लावणें; वासणें.
**फासळी** (स्त्री.) बरगडीचीं हाडें.
**फासा** (सं. पाशक पु.) पाश; पकड; आकडा अडकविण्यासाठीं ठेवलेलें छिद्र; खेळांत दान टाकण्याच्या तीन हस्तिदंती तुकड्यांपैकीं प्रत्येक.
**फासाटणें** (क्रि.) चोळणें; फसविणें.
**फासाटी** (स्त्री.) फास.
**फासाडणें** (क्रि.) अडकविणें; फसविणें.
**फांसु** (न.) नदीचा फाटा; खाडी.
**फासेपारधी** (पु.) पशु व पक्षी यांना जाळ्यांत अडकवून धरणारा; दुसऱ्यास कपटानें पेंचांत धरणारा.
**फांसोटी** (स्त्री.) फास; पाश.
**फाळ** (पु.) नांगराच्या शेवटास लावा-वयाचें लोखंडी पातें; (प्रा.) तुकडा.
**फाळका** (पु.) पानाचा मोठा तुकडा.
**फाळणी** (स्त्री.) वांटणी; शेतसाऱ्याची रक्कम ठरविणें.
**फाळणें** (क्रि.) वांटणी करणें; फाडणें.
**फाळा** (पु.) चिंधी; तुकडा; वर्गणी; कर; वांटा. [पट्टी.
**फाळी** (स्त्री.) जमिनीचा लांबट भाग;
**फाळोरा** (पु.) फाळोरें; (न.) पाभरीच्या दांत्यांचें लोखंडी टोपण.
**फिकट** (वि.) पिकुटलेला; बेचव.
**फिकर, फिकीर** (अर. फिक्र स्त्री.) काळजी; अर्ज; विनवणी. **फि०मंद**—चिंताक्रान्त.
**फिका, फिक्का** (हिं. फिका वि.) मंद; हलका; बेचव; निस्तेज; दुर्बळ.
**फिगारणें** (क्रि.) फेंकणें.
**फिट** (पु.) विटीदांडूच्या खेळांतला दांडू.
**फिटणें** (क्रि.) सुटणें; निरसन होणें; (ऋण) दिलें जाणें; फेड होणें; क्षीण होणें; संपणें; नाहींसें होणें.
**फिटंफाट** (स्त्री.) देणेंघेणें बरोबर; निःशेषता.
**फिटी** (स्त्री.) भोंक बुजविणारी खुंटी; पाचर; विटी. [विरुद्ध बाजूला मिळणें.
**फितणें** (क्रि.) दगलबाजीनें किंवा फसून
**फितवा** (फा. पु.) भेद; फंदफितूर.
**फितविणें** (क्रि.) अनुकूल करून घेणें.
**फितुरी** (स्त्री.), **फितूर** (अर. पु.) दगलबाजी. [अर्पण केलेला.
**फिदा** (अर. वि.) आशक; अनुरक्त;
**फिदाई** (स्त्री.) अनुरक्तता; आसक्ति.
**फिदारणें** (क्रि.) विस्तारणें; पिंजारणें.

**फिनाईल** (इं. न.) एक दुर्गंधनाशक द्रव्य.
**फिरक** (पु.) गाण्यांतला कंप.
**फिरकणें** (क्रि.) संचार करणें; फिरणें.
**फिरकंडा** (पु.), **फिरकंडी** (स्त्री.) चक्कर; भोंवरा; घोटाळा.
**फिरकी** (स्त्री.) फिरक (गाण्यांत घेतलेला कंप); गरका; मळसूत्र; चक्री.
**फिरंग** (प्रा. स्त्री.) तरवार.
**फिरंगाण** (न.) फिरंगी लोकांचा मुलुख.
**फिरंगी** (फा. पु.) सामान्यतः युरोपियन; विशेषतः पोर्तुगीज; (स्त्री.) तलवार (तुका० २९१५).
**फिरणें** (क्रि.) मंडलाकार गतीनें चालणें; चालणें; दिशा बदलणें; हिंडणें.
**फिरती** (स्त्री.) पर्यटन; दौरा.
**फिरवान**(वि.) उमटलेलें(अनंतफंदी पृ.६९).
**फिरवाफिरव** (स्त्री.) इकडचें तिकडे वगैरे फेरफार.
**फिरविणें** (क्रि.) हिंडविणें; फेरफार करणें.
**फिरस्ता, फिरिस्ता** (फा. पु.) प्रवासी; यात्रेकरू.
**फिरून** (अ.) पुनः.
**फिर्याद** (फा. स्त्री.) तक्रार.
**फिलफौर** (फा.फेलफौरन् अ.) तावडतोब; लवकर.
**फिल्टर** (इं. न.) गाळणी.
**फिसकटणें** (क्रि.) मोडणें; विसकटणें.
**फिसाद** (अर. स्त्री.) बंड; दंगाधोपा.
**फी** (इं. स्त्री.) दस्तुरी; मेहनताना; मोबदला; हक्क; पारितोषिक; कामाबद्दलची ठराविक रक्कम; शिकण्याबद्दल लागणारी रक्कम.
**फीट** (स्त्री.) फेड; अपस्माराचा झटका.
**फीत** (पोर्तु. फिता स्त्री.) मगजी लेस.
**फीलखाना** (फा. पिलखाना पु.) गजशाला.
**फुई** (हि. स्त्री.) आत; आत्या; (प्रा. पु.) तुषार; शिंतोडा.
**फुकट** (अ.) मोबदला किंवा किंमत यावांचून; व्यर्थ; मुफत. **फु०शाई** (वि.)—फुकट जाणारें; मोफत.
**फुकटफाकट** (अ.) उगाच; निष्कारण; कांहीं द्यावें न लागतां.



**फुकट्या** (वि.) मोफत घेणारा.
**फुंकणी** (स्त्री.) विस्तव फुलविण्याकरितां फुंकण्याची नळी.
**फुंकणें** (क्रि.) तोंडानें वारा घालणें; वारा भरणें; वाजविणें; विकणें.
**फुंकर, फुंकारा** (पु.) फुंक; तोंडानें घातलेला वारा.
**फुका, फुकां** (अ.) फुकट; व्यर्थ.
**फुकी** (स्त्री.) एकीबेकीच्या खेळांत रिकामी मूठ वळून ओळखण्यास सांगतात ती.
**फुंग** (प्रा. पु.) फुगारा; अभिमान.
**फुगट** (वि.) फुगीर.
**फुगटणें** (क्रि.) रागानें किंवा गर्वानें फुगणें.
**फुगडी** (स्त्री.) मुलींचा एक खेळ.
**फुगणें** (क्रि.) स्थूल होणें; वाढणें; रुसणें.
**फुगवटा** (पु.), **फुगवटी** (स्त्री.) सूज; उंच झालेला भाग.
**फुगवणी** (स्त्री.) अतिशयोक्ति. [ करणें.
**फुगविणें** (क्रि.) स्थूल करणें; जास्त दिसेसें
**फुगा** (पु.) फुगवून स्थूल केलेला कागद वगैरेचा आकार; बुडबुडा; (प्रा. पु.) अभिमान; खोटें मोतीं. [ ताठा.
**फुगारा** (पु.) फोड; सूज; फुगलेला भाग;
**फुगीर** (वि.) फुगलेला; सुजलेला; उंच झालेला.
**फुगु** (प्रा. पु.) फुगवटा.
**फुगें** (न.) पाण्यांतला भोंवरा; देवीचा फोड. [ सूज.
**फुगोटी, फुगोशी** (स्त्री.) फुगीर भाग;
**फुंज** (पु.) अभिमान; ताठा.
**फुंजणें** (सं.स्फुंज् क्रि.)स्फुंदणें; गर्वानें ताठणें.
**फुटकर, फुटकळ** (वि.) तुटक; बारीक सारीक; किरकोळ.
**फुटका** (वि.) फुटलेला.
**फुटकुळी** (स्त्री.) पुळी; लहान फोड.
**फुटक्या कपाळाचा** दुर्दैवी.
**फुटक्या तिनिसांजा**(अ.) ऐन संध्याकाळच्या वेळीं.
**फुटणें** (सं. स्फुट् क्रि.) तुकडे होणें; बाहेर येणें; विस्कळित होणें; चीर पडणें; (डोळे) अंध होणें; (कान) बहिरे होणें; तरफडणें; दूर होणें.

**फुटाणा** (पु.) भाजलेला हरभरा; चपळ; तरतरीत हुशार मुलगा.
**फुटाफूट** (स्त्री.) तुटातूट; भेद.
**फुटाळू** (वि.) सहज फुटणारें.
**फुटी** (प्रा. स्त्री.)तेज; विकास (ज्ञा०११। २०४). [ पडलेलें.
**फुटीर** (वि.) लवकर फुटणारें; चीर
**फुडी, फुडें** (प्रा. वि.) खरें; बरें; (अ.) पुढें; निश्चयपूर्वक.
**फुणगा** (सं. स्फुलिंग पु.) **फुणगी** (स्त्री.) ठिणगी.
**फुणफुण** (स्त्री.) चुरचुर, आग.
**फुतु** (पु.) स्फुलिंग.
**फुंद** (सं. स्फुंदन पु.) हुंदका; (वि.) गर्वानें ताठलेला; (पु.) गर्व. [गोंडा.
**फुंदणा, फुन्ना** (फा. फुंदना पु.) झुबका;
**फुंदणें** (प्रा. क्रि.) उसासे टाकणें.
**फुनगा** (स्त्री.) ठिणगी.
**फुन्नेदार** (वि.) झुपकेदार.
**फुपाटा** (पु.) धगधगीत राख किंवा धूळ.
**फुप्फुस** (सं. न.) शरिरांतलें श्वासयंत्र.
**फुंफाट** (प्रा. पु.) फो फो शब्द.
**फुफाटणें** (प्रा. क्रि.) ओरडणें.
**फुफारा** (प्रा. पु.) फूत्कार.
**फुफु करणें** थट्टेनें उडवून देणें.
**फुरकट, फुरकुट, फुरगूट** (पु. न.) रुसवा.
**फुरकणें, फुरंगटणें** (क्रि.) रुसणें; फुगणें.
**फुरका** (पु.),**फुरकी** (स्त्री.) ओरडतांना होणारा आवाज.
**फुरताई** (स्त्री.) जलदी; घाई.
**फुरफुरणें** (क्रि.) स्फुरण पावणें.
**फुरसत** (अर. स्त्री.) रिकामपण; सवड.
**फुरसें** (न.) एक विषारी सर्प.
**फुलका** (पु. स्त्री.) लहान चपाती.
**फुलणें** (सं. फुल्ल क्रि.) विकासणें, उमलणें; फुलें येणें.
**फुलदाणी** (स्त्री). फुलें ठेवण्याचें भाण्डें.
**फुलधर** (प्रा. पु.) माळी.
**फुलपात्र** (न.) पाणी पिण्याचें एक प्रकारचें लहान भांडें; रामपात्र.
**फुलबडी** (स्त्री.) झाडावरून कच्ची काढून शिजवून वाळविलेली सुपारी.
**फुलबाजी** (स्त्री.) कागदाच्या नळींत दारू भरून ती पेटविली असतां फुलें गळतात असें दारूकाम.
**फुलवणी** (प्रा. स्त्री.) प्रफुल्लितपणा.
**फुलवरा** (पु.) पुष्पसमुदाय; पुष्पमाला.
**फुलसर** (प्रा. पु.) फुलांचा हार.
**फुलारी** (पु.) माळी, बागवान.
**फुलावणी** (स्त्री.) प्रफुल्लितपणा.
**फुलिका** (प्रा. स्त्री.) टिकली; चमक; विकास.
**फुलिंग** (सं. स्फुलिंग न.) ठिणगी.
**फुलिस्केप** (इं. पु.) एक प्रकारचा कागद.
**फुली** (स्त्री.) लहान फुलासारखी आकृति; (प्रा.)फुलण्याचा भर; कळी. [अत्तर.
**फुलेल** (न.) सुगंधित केलेलें तिळांचें तेल;
**फुलेलें** (प्रा. वि.) फुलाचें.
**फुलोडी** (स्त्री.) फूलपांखराप्रमाणें चंचल स्त्री (प्रभा० पृ० ९३).
**फुलोरा, फुलौरा** (प्रा. पु.) पुष्पगुच्छ.
**फुल्लोर** (प्रा. न.) पुष्प (मुक्ते० आदि० १८।३). [ प्रौढी.
**फुशारकी, फुशारी** (हि. स्त्री.) वढाई,
**फुशारणें** (क्रि.) शेफारणें; बढाया मारणें.
**फुसकट** (न.) कोंडा; भूस. **फु० पाडणें**– दुर्दशा करणें; रग जिरविणें.
**फुसका** (वि.) निःसत्त्व; पोकळ.
**फुसकारणें** (क्रि.) फूत्कार करणें.
**फुसकारा** (पु.) फूत्कार.
**फुसकी, फुसकुली** (स्त्री.) हळूच सोडलेला अपानवायु; अडून केलेलें कुत्सित भाषण.
**फुसडी** (स्त्री.) चाबकाची दोरी; झिलपी.
**फुसफुस** (स्त्री.) आंतल्या आंत चरफडणें; कानगोष्ट. [ करून घेणें.
**फुसलावणी**(स्त्री.)लालूच दाखवून स्ववश
**फुलिका** (प्रा. स्त्री.) टिकली; चमक.
**फू–फू** (स्त्री.) फूत्कार; रागाचा सुस्कारा.
**फूग** (स्त्री.) सूज; फुगवटा.
**फू करणें** फुंकरासरशीं उडवून देणें.
**फूट** (स्त्री.) चीर; भेग; भेद; बेबनाव; परिस्फुटता; झाडावरून पडून फुटलेलें फळ; पालवी; (इं. पु.) बारा इंचांचें एक माप.

**फूटतूट** (स्त्री.) मोडतोड.
**फूत्कार** (सं. पु.) रागाचा आवेशयुक्त सुसकारा.
**फूल** (सं. फुल्ल न.) पुष्प; पुष्पाकृति; ठिणगी, ठिपका; स्फटिक; गर्भाशय; घनस्वरूपांतून प्रवाहरूप न होतां एकदम वायुरूपांत गेलेले पदार्थ.
**फूलपाखरूं** (न.) पतंग.
**फूलवात** (स्त्री.) देवापुढें तुपांत जाळण्यासाठीं केलेली रुंद वठकोची उभी वात.
**फूस** (स्त्री.) आंतून मदत, उत्तेजन; संधि; सवड.
**फॅ** (अ.) तिरस्कारार्थी अव्यय.
**फेक** (स्त्री.) भाला वगैरे शस्त्र फेकण्याची क्रिया.
**फेकणें** (क्रि.) झुगारणें; दुरून टाकणें.
**फेंगडा** (वि.) पाय फाकून चालणारा.
**फेटा, फेंटा** (हिं. पु.) पटका.
**फेटाळणें** (क्रि.) धुडकावणें, हातून पाडणें.
**फेड** (स्त्री.) देऊन टाकणें.
**फेडणें** (क्रि.) सोडणें; देणें; (ग्रा.) दूर करणें; उघड करणें.
**फेण** (सं. फेन पु.) फेस.
**फेणणें** (क्रि.) फेस आणणें.
**फेणी** (स्त्री.) एक पक्वान्न; पापडी.
**फेंदरा** (वि.) चपटचा किंवा वसक्या नाकाचा.
**फेन** (सं. न.) पाणी दूध इत्यादिकांवरचा फेस; समुद्रफेस; गुळाचा राव.
**फेंपरा** (वि.) रुंद नाकाचा.
**फेंपरें** (न.) अपस्मार रोग.
**फेंपाणा** (वि.) चपटचा व मोठ्या नाकाचा.
**फेंफें** (स्त्री.) त्रेधा, तिरपीट.
**फेर** (पु.) अंतर, फरक; घेर; वाक; वळण; स्वरनियमन—शक्ति; (अ.) पुनः.
**फेरफटका** (पु.) चक्कर; फिरणें.
**फेरफार** (पु.) फेरबदल, दुरुस्ती.
**फेरा** (पु.) चक्कर, प्रदक्षिणा, वर्तुलाकृति मार्ग; पुनरागमन.
**फेरिस्त** (फा. न.) यादी.
**फेरिस्ता** (फा. पु.) देवदूत; पैगंबर; एक सुप्रसिद्ध फारशी इतिहासकार.
**फेरी** (स्त्री.) चक्कर, प्रदक्षिणा; चक्राकार गति. [दारोदार हिंडणारा.
**फेरीवाला** (पु.) विक्रीचा माल घेऊन
**फेल** (न.) पोंचट सोंग; (इं. वि.) नापास.
**फेस** (पु.) फेन पहा.
**फेसाळ** (वि.) फेस आलेलें.
**फैज** (अर. पु.) कृपा. [गाडी.
**फैटण** (स्त्री.) एक प्रकारची चार चाकांची
**फैर** (स्त्री.) अस्त्रांचा सारखा मारा.
**फैल** (अर. स्त्री.) काम, कृत्य; दंगा; **फै० वर घेणें**—कसून तपासणी करणें.
**फैल जामीन** (अर. पु.) जातमुचलका; शांततेनें वागण्याचा जामीन.
**फैलाव, फैलावा** (हिं. पु.) प्रसार.
**फैलावणें** (क्रि.) पसरणें.
**फैलाविणें** (क्रि.) पसरविणें.
**फैसल** (स्त्री.), **फैसला** (अर. पु.) निकाल, निवाडा. [ढाळ, जुलाब.
**फोक** (पु.) सरळ ओली खांदी; कोंब;
**फोकणी** (स्त्री.) पेरणी; बीं पसरून टाकणें.
**फोकरणें** (ग्रा. क्रि.) प्रकट करणें; वर्णन करणें.
**फोकाटी** (स्त्री.) लहान फोक; शिपटी.
**फोख्त** (फार. फरोखत वि.) विकलेलें.
**फोगी** (स्त्री.) त्रिकोणाकृति शीड.
**फोटो, फोटोग्राफ** (इं. पु.) सूर्यप्रकाशाच्या साहाय्यानें कॅमेरा नांवाच्या यंत्रानें काढलेलें चित्र.
**फोड** (सं. स्फोट पु.) गळूं, उठाणूं, बेंड; (स्त्री.) फाक, चीर; परिस्फोट.
**फोडणी** (स्त्री.) अन्नास स्वाद लागण्यासाठीं त्याला केलेला एक संस्कार; त्यास लागणाऱ्या साहित्याची सिद्धता; (ग्रा.) विडा (मुक्तें० मूर्खाचीं लक्षणें).
**फोडणें** (क्रि.) मोडणें, चिरणें, तुकडे करणें; परिस्फोट करणें, स्पष्ट करणें.
**फोडसें** (ग्रा. न.) फुरसें.
**फोडाळ** (वि.) फोडांनीं, पुळ्यांनीं भरलेलें.
**फोडीव** (वि.) फोडलेलें; तुकडे केलेलें.
**फोतर** (न.) सालपट.
**फोनोग्राफ** (इं. पु.) बोलणाराच्या ध्वनीसारखा हुबेहूब ध्वनि काढणारें यंत्र.
**फोपशा, फोपसा** (वि.) स्थूल; पोकळ.

**फोपाटा** (पु.) गरम राख. [ टाकणें.
**फोपाटणें** (प्रा. क्रि.) श्वासोच्छ्वास
**फोफावणें** (क्रि.) जोरानें वाढणें; रागावणें.
**फोल** (न.) पोकळ दाणा; टरफल; (वि.) कोरडा, शुष्क; व्यर्थ; असत्य.
**फोलकट** (प्रा. वि.) व्यर्थ.
**फोलणें** (क्रि.) टरफल काढणें.
**फोस, फोसें** (प्रा. वि.) फोल, पोकळ.
**फौकारणें** (प्रा. क्रि.) कीर्ति सांगणें.
**फौज** (अर. स्त्री.) सेना, सैन्य.
**फौजदार** (पु.) एक पोलिस अधिकारी.
**फौजदारी** (वि.) गुन्ह्यासंबंधीं; (स्त्री.) गुन्ह्यासंबंधाचा खटला. [वगैरे.
**फौजफांटा** (पु.) फौज, तोफखाना, शिबंदी.
**फौजसरंजाम** (पु.) फौजेच्या खर्चासाठीं दिलेली नेमणूक.
**फौरन** (स्त्री.) जरुरीचा हुकूम; (क्रि. वि.) सत्वर.
**फ्यां फ्यां** फें फें पहा.
**फ्रेंच** (वि.) फरान्समधील लोकाविषयीं.
**फ्रेंचकट** (इं. पु.) नाकाच्या रुंदीइतका मिशीचा आकार ठेवणें.

——

## ब

**ब** मराठी वर्णमालेंतील तेविसावें व्यंजन.
**ब, बई** (स्त्री.) आई. [ गप्प.
**बक** (सं. पु.) बगळा; अर्भक; (स्त्री.)
**बंक** (प्रा. स्त्री.) चौकी.
**बँक** (इं. स्त्री.) पेढी. [ द्रव्याचा घास.
**बकणा** (पु.), **बकणी** (स्त्री.) शुष्क खाद्य—
**बकणें** (क्रि.) तोंडास येईल तें बोलणें.
**बकतणें** (प्रा. क्रि.) राहणें.
**बकतर** (फा. न.) लोखंडाचें चिलखत.
**बकंदी** (स्त्री.) बुक्की.
**बकध्यान** (सं. न.) ध्यान करण्याच्या मिषानें प्राप्तीसाठीं टपून बसणें; ढोंग.
**बकध्यानी** (वि.) ढोंगी, दांभिक.
**बकबक** (स्त्री.) वटवट, बडबड.
**बकबका** (अ.) अधाशीपणानें.
**बकमार, बकमाल** (स्त्री.) मोठ्या तोंडाची लहान बंदूक.

**बकर–ईद, बकरीद** (स्त्री.) मुसलमानांचा एक सण.
**बकरकुदी** (स्त्री.) पट्टयाचा एक हात; पाण्यांत उडी मारण्याचा एक प्रकार.
**बकरा** (सं. बर्कर पु.) बोकड.
**बकरी** (स्त्री.) शेळी.
**बकरूं, बकरें** (न.) बकरीचें पिलूं.
**बकल** (न.) पट्टयाची कडी.
**बकवा** (हिं. पु. स्त्री.) बडबड.
**बकवादी** (सं. वि.) बडबड्या.
**बकस** (फा. बरअकस स्त्री.) द्वेष.
**बंका** (पु. स्त्री.) पहारेकऱ्यांची रांग.
**बंकाईत** (पु.) राजाच्या तंबूभोंवतालचे पहारेकरी.
**बकाट** (न.) खवाटा.
**बकाणा** (पु.) बोकणा; मोठा घास.
**बकांदा** (पु.), **बकांदी** (स्त्री.) गुद्दा, मुष्टिमोदक.
**बकाल** (अर. पु.) किराणा जिनसांचा व्यापारी; उदमी, दुकानदार.
**बकाली** (वि.) दुकानदारीसंबंधीं; गचाळ, अव्यवस्थित; (स्त्री.) दुकानदारी.
**बकासुर** (सं. पु.) एक राक्षस; अतिशय खादाड मनुष्य.
**बकुळ–ळी** (सं. पु. स्त्री.) एक फुलझाड.
**बख** (पु. स्त्री.) कूस, बाजू.
**बखत, बख्त-बखत** (अर. पु.) नशीब; वेळ; संधि, योग्य वेळ.
**बखतर** (फा. बक्तर न.) लहान लोखंडी कड्यांचें चिलखत.
**बखर** (स्त्री.) गद्य-इतिहास; चरित्र.
**बखल** (न.) फुटकें भांडें; छिलपी; खोलगट जागा.
**बखळ** (स्त्री.) पडक्या घराची मोकळी जागा; रिकामी उघडी जागा.
**बख्खळ** (वि.) पुष्कळ; विपुल.
**बखा** (अर. स्त्री.) प्रतिष्ठा, महत्त्व.
**बखाडी** बख पहा.
**बखेडा** (हिं. पु.) वाद, भांडण, कटकट.
**बखोटा** (पु.) खांद्याचा सांधा.
**बख्शी-षी** (फा. पु.) सेनापति.
**बग** (प्रा. स्त्री.) बगल, बाजू.

**बगड** (स्त्री.) करड, असडीक तांदूळ; भाताचा कोंडा. [ जवळचा भाग.
**बगड** (न.), **बगडा** (पु.) पाठीचा कमरे-
**बगडा** (प्रा. वि.) सुंदर, देखणा.
**बगर** (फा. अ.) खेरीज, शिवाय, वांचून.
**बगल** (फा. स्त्री.) काख; अंगरख्याला काखेंत लावण्याचा कापडाचा तुकडा; बाजू. **ब०तून काढणें**—बनावट गोष्ट करणें.
**बगलबच्चा** (पु.) सर्वस्वीं दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा; दुसऱ्याचा हस्तक.
**बंगला** (हिं. पु.) टुमदार व चारी बाजूंनीं मोकळें असलेलें घर.
**बगलांट** (न.) बालंट, आळ, वृथारोप.
**बगली** (स्त्री.) मुद्‌गल फिरविण्याचा एक प्रकार. [अंकित, हाताखालचा.
**बगल्या**(पु.) दुसऱ्याचा हस्तक, बगलबच्चा,
**बगवें** (न.) लाकडाची लहान पेटी.
**बगळा** (सं. वक पु.) एक पक्षी,
**बगा** (प्रा. पु.) देखावा; आकार; मार्ग; पक्ष; संबंध.
**बगाड** (प्रा. पु.) नवसाचा गळ.
**बंगाली** (वि.) बंगाल प्रांतांतला. [माळा.
**बंगालें** (न.) लांब व मोठें वांगें; नक्षत्र-
**बंगाळी** (स्त्री.) शूद्रांमध्यें विवाहाच्या वरातीच्या मिरवणुकीपुढें उंच काठीच्या वरच्या टोकापासून खालीं सोडलेलें पागोटें मिरवितात तें.
**बगी** (प्रा. स्त्री.) आकृति; चारचाकी गाडी.
**बंगी** (हिं. वहंगी स्त्री.) सामान वाहण्याची कावड; पुडकें.
**बगीचा** (फा. पु.) बाग.
**बगुणें** ( न.) मोठ्या तोंडाचें भांडें.
**बगें** (प्रा. न.) संबंध; आकार; लूट; हावरेपणा (सोहि० महदनु०).
**बगें** (प्रा. अ.) योगें. [फुटतात तो भाग.
**बगोटा** (पु.) बाहुवटा, धडाला जेथून हात
**बगोटी** (स्त्री.), **बगोटें** (न.) नरडें.
**बघणें** (क्रि.) पाहणें.
**बघार, बघारणी** (हिं. स्त्री.) फोडणी.
**बचक, बचकण** (स्त्री.), **बचका** (पु.) राशीतून धान्य, लाह्या वगैरे पदार्थ घेण्यासाठीं केलेला पालथा कमलाकार हात.
**बचकणा** (वि.) लहान.
**बचकणी** (स्त्री.) लहान मुलाचा धोतरजोडा; मद्याचा शिसा.
**बचडा** (फा. बच्चा पु.), **बचडी** (स्त्री.), **बचडें** (न.) मूल, पिल्लूं.
**बचत** (स्त्री.) शिल्लक.
**बचनाग** (पु.) एक विषारी कंद.
**बचबच, बचबचपुरी** (स्त्री.) गोंधळ, अव्यवस्था. [(तुका० २३७१).
**बचमंगळ**(स्त्री.) घाण, हास्यास्पद अवस्था
**बचबचीत** (वि.) गिरगिरीत.
**बचळी** (स्त्री.) पशूच्या तोंडाचा जबडा.
**बचाव** (हिं. पु.) संरक्षण.
**बचावणी** (स्त्री.) रक्षण; बचाव.
**बचावणें** (क्रि.) वांचणें; सुरक्षित राहणें.
**बचाळी** (स्त्री.) जबडा.
**बचेरी** (स्त्री.) पच्ची; मानखंडना.
**बचेळी** (स्त्री.) बचळी पहा.
**बच्चा** (फा. पु.) मूल; पिल्लूं.
**बच्चाजी, बच्चाराम, बच्चंजी** (पु.) रागाच्या किंवा धमकावणी देण्याच्या भाषेंत—राजश्री.
**बछडा–डी–डें** (पु. स्त्री. न.) मूल; पिल्लूं; वासरूं.
**बछेरी** (स्त्री.) फजिती, दुर्दशा.
**बंजर** (वि.) झाडेंझुडपें वाढलेली.
**बजरंगबली** (सं.वज्रांगबली पु.) हनुमान्.
**बजरबट्टू** (सं. वज्रवट्टु पु. ) एक वृक्ष; त्याचें फल; हनुमान; ठेंगणा व चलाख मुलगा.
**बजरा** (पु.) एक प्रकारची होडी.
**बजवय्या** (हिं. पु.) वाद्य वाजविणारा.
**बजाख, बजाग** (हिं. बजाक—सर्प पु.) तामसी मनुष्य. [भांडखोर.
**बजागी** (वि.) हट्टी; तापट; तामसी,
**बजाज** (अर. पु.) कापडाचा दुकानदार.
**बजाजी** (वि.) दिखाऊ; डामडौली.
**बजार** (पु.) जिरें, लसूण, मीठ इत्यादि पदार्थ तेलांत तळून त्यांचा वाटलेला ओला मसाला.

**बजावणी** (हिं. स्त्री.) अमलांत आणणें; ताकीद.

**बजावर्द** (फा. वजा आवर्दा) सा. न. विज्ञापना विशेष अशा अर्थाचा फारशी तऱ्हेचा मायना. [खडसून सांगणें.

**बजाविणें** (क्रि.) हुकुमाप्रमाणें करणें; हुडसून

**बजाहां** (फा. बजा अ.) स्वस्त.

**बजिनस** (फा. अ.) हटकून, मुद्दाम, धडधडीत; उघड उघड; (वि.) खरें; प्रत्यक्ष; स्वत:चा.

**बजीद होणें** (फा. बाजद) आग्रह करणें.

**बजट** (इं. न.) पुढें होणाऱ्या जमाखर्चाचें अंदाजपत्रक.

**बट** (पु. न.) ठेंगणा घोडा; तट्टू; (स्त्री.) अनेक केस किंवा तंतू यांचा समुदाय; जटा; पाथरवटाच्या सुतकीची पोलादी अणी; (वि.) ठेंगणा पण भरलेला.

**बटई** (स्त्री.) शेतीच्या संबंधाची पाती.

**बटकरूं, बटकुरूं, बटकुरें** (न.) निंद्यार्थी- बटकी; बटकीशी संभोग करणारा.

**बटबटीत** (वि.) मोठाले व विद्रूप (डोळे).

**बटलर, बुटलेर** (इं. बटलर पु.) साहेब लोकांच्या खाण्यापिण्याची व्यवस्था ठेवणारा नोकर.

**बटऱ्या, बटकुऱ्या, बटकुरा** (पु.) दासीशीं जारकर्म करणारा.

**बटछपाई** (हिं. स्त्री.) वजनें मापें बरोबर आहेत असें कळण्यासाठीं त्यावर सरकारी अंमलदाराकडून छाप मारण्यांत येतो तें; त्याबद्दल द्यावें लागणारें द्रव्य.

**बटण** (इं. बटन न.) कांचेची, लाकडाची, शिंपाची वगैरे गुंडी.

**बटणावळ** (स्त्री.) बट्टा.

**बटवडा** (हिं. पु.) वांटणी.

**बटवडेपत्र** (न.) वांटणीपत्र.

**बटवा** (हिं. पु.), **बटवी** (स्त्री.) पुडांची पिशवी.

**बटवारा** (पु.) फाळणी.

**बटवाळ** (प्रा. वि.) भ्रष्ट; अनाचारी.

**बटविणें** (क्रि.) एक जातीचें नाणें देऊन त्याच जातीचें पण हलक्या भारी किंमतीचें नाणें बट्टा देऊन घेणें.

**बटवेणी** (स्त्री.) डोक्याच्या बाजूंच्या केसांची घातलेली वेणी.

**बटाई** (हिं. स्त्री.) बटाव; बटणावळ; अर्धे उत्पन्न कुळानें ठेवून बाकीचें अर्ध सरकारास द्यावें असा ठराव.

**बटांगा** (पु.) मणि करण्यासाठीं सोनारानें त्याचे केलेले अर्धाले भाग.

**बटाटा** (स्पॅ. अमे. पु.) एक कंद.

**बटाव** (हिं. पु.) हुंडणावळ; बट्टा; (वि.) स्वैर; दुराचारी; बटाऊ.

**बटिकरी, बटीक** (स्त्री.) कुणबीण; दासी; व्यभिचारिणी. [ब्रह्मचारी.

**बटु, बटुक** (सं. पु.) लहान मुलगा;

**बट्टा** (हिं. पु.) बटाव; वर्तावळा; कलंक; (पु.) कापडाचा लहानसा तुकडा.

**बट्टी** (हिं. स्त्री.) वडी.

**बट्टेबाज** (वि.) लच्चा; सोदा; दुराचरणी.

**बठ्ठ** (वि.) मंद, मठ्ठ, सुस्त.

**बँड** (इं. पु.) एक इंग्रजी वाद्य; वाद्यसमूह.

**बंड** (फा. न.) दंगा; बंदा; खूळ; ढोंग; तोतया; (प्रा.) आघात; (वि.) आडदांड.

**बंडखोर** (वि.) दंगेखोर.

**बडगा** (पु.) टोणपा; सोटा.

**बडतर्फ, बडतर्फी** वरतरफ वरतरफी पहा.

**बडती, बढती** (स्त्री.) पगारांत वाढ; वैभव, भरभराट.

**बडबड** (स्त्री.) वटवट, फोल बोलणें.

**बडबडणें** (क्रि.) व्यर्थ भाषण करणें.

**बडंबा** (प्रा. पु.) बडबड, कोलाहल.

**बडमी** (स्त्री.) लहान गंजी.

**बंडल** (इं. न.) गाठोडें; मोटळी.

**बडवणें** (क्रि.) चोपणें; ठोकणें; ठेचणें; (न.) बडवण्याचा सोटा. [पुजारी.

**बडवा** (पु.) पंढरपूरच्या विठोबाचा ब्राह्मण

**बडा** (हिं. वि.) मोठा.

**बंडाई, बंडाळी** (स्त्री.) पुंडाई.

**बडिया, बडियाना, बढिनाग** (प्रा. पु.) कवड्या साप (ज्ञा० ७।१७३).

**बडिवार, बडिवाळ** (प्रा. पु.) प्रतिष्ठा; मोठेपणा; कीर्ति.

**बंडी** (तेलगू स्त्री.) सामानाची गाडी.

**बंडी** (हिं. स्त्री.) अंगांत घालण्याचा एक बंददार कपडा; मोठी लांबी गाडी.

**बडीशेप, बडीशोप** (हिं. बडीशोफ स्त्री.) एक औषध. [ दाराची ललकारी.

**बडेजाव** (हिं. पु.) प्रतिष्ठा; मान; चोप-

**बंडेफरोशी** (फा. वि.) वंडखोर.

**बढई** (हिं. पु.) सुतार.

**बढती** (हिं. स्त्री.) अभिवृद्धि; चढती कळा, वाढ.

**बढाई** (हिं. स्त्री.) प्रौढी; फुशारकी.

**बढाई** (का. बडिगे पु.) सुतार; (स. वर्धकि स्त्री.) आत्मस्तुति; पोकळ प्रशंसा.

**बढाईखोर** (वि.) स्वतःची नसती प्रौढी सांगणारा. [ उरलेलें तेल.

**बढेल** (वडा + तेल न.) वडे घारगे इ० तळून

**बणगी** (का. स्त्री.) लहान गंजी.

**बणवी** (प्रा. पु.) वणवा.

**बत** (प्रा. पु.) खेद; (न.) ऊन.

**बताडा** (वि.) विशाळ; फार मोठा.

**बताणा** (पु.) पागोट्याच्या आंतलें लहान पागोटें; (वि.) प्रचंड; अतिशय.

**बतावणी** (स्त्री.) सोंगाच्या अनुरूप वर्तन; ढोंग; थाप; वजावून सांगितलेली गोष्ट.

**बतावणें** (हिं. क्रि.) दाखविणें; धमकी देणें.

**बतेला** (पोर्तु. बाँटिला पु.) गलबत (पन्नासपासून पांचशें खंडीपर्यंत वजन वाहून नेणारें जहाज.)

**बत्ता** (पु.) मोठें तपेलें; दस्ता; कुटण्याचें साधन.

**बत्तासा** (पु.) साखरेचा फुगा.

**बत्तिशी** (स्त्री.) दांताची कवळी; भाषण; वायकांचें एक व्रत. **ब० दाखविणें**—हंसणें; **ब० रंगविणें**—जोरानें थोवाडांत मारणें.

**बत्तिसा** (पु.) पुष्कळ पदार्थांचें मिश्रण.

**बत्ती** (हिं. स्त्री.) वात; दिवा; अरुंद पागोटें. **बत्ती देणें**—पेटविणें.

**बत्तीसगुणी, बत्तीसलक्षणी** (वि.) सर्वगुणसंपन्न.

**बंद** (वि.) मना; निषिद्ध; लावून घेतलेले (दार, खिडकी इ०); अडविलेला; (पु.) बांधण्यासाठीं दोरीचा तुकडा; कसा; नियम; कागदाचा ताव; (हिं. स्त्री.) भरती.

**बद** (न.) गर्मीमुळें होणारें उठाणूं; गोट्यांच्या खेळांत गोटी टाकण्यासाठीं केलेली लहानशी खाच; (वि.) वाईट.

**बदक** (अर. पु. न.) पाणकोंबडा, कलहंस.

**बदकर्म** (न.) व्यभिचार; दुष्कर्म.

**बदका** (पु.) ठोसा; गुद्दा.

**बदखल** (न.) फतकल; खोलवटा; बूड.

**बदख्याली** (वि.) जारकर्मी; दुराचारी.

**बंदगी, बंदकी** (फा. स्त्री.) गुलामगिरी; सलाम; नमस्कार; चाकरी.

**बंदगी** (हिं. स्त्री.) चाकरी; दास्य; नमस्कार. [ माती इ०; पू.

**बदगें** (न.) धान्यांतला केरकचरा; खडा,

**बदडणें** (क्रि.) चोपणें, मारणें.

**बदनक्षा** (फा. पु.) मानखंडना.

**बदनामी** (हिं. स्त्री.) दुर्लौकिक.

**बदफैली** (फा. स्त्री.) दुर्वर्तन; दुर्व्यसन; (वि.) दुर्वर्तनी.

**बदबदां** (अ.) धपाधप; पटापट.

**बदमस्त** (फा. वि.) गर्वानें धुंद, पराकाष्ठेचा उन्मत्त.

**बदमस्ती** (स्त्री.) दुष्ट हेतूनें केलेली दांडगाई.

**बदमामला** (फा. पु.) गोंधळ, दांडगाई.

**बदमाष** (फा. बदम आश वि.) दुराचरणी.

**बदर** (प्रा. वि.) अजीर्ण करणारें; (न.) बोर. [ समुद्रकाठचें ठिकाण.

**बंदर** (फा. न.) वानर; जहाजे लावण्याचें

**बदरा** (हिं. पु.) एक प्रकारचें गलबत; घोड्यावरची गोणी.

**बदरी** (सं. स्त्री.) बोरीचें झाड.

**बदल** (अर. पु.) फेर, फरक, अंतर.

**बदलणें** (क्रि.) फिरविणें; फेरफार करणें, एक सोडून दुसरें घेणें.

**बदलमुशारा** (अर. बदलमुशाहरा पु.) ठराविक पगार.

**बदला** (अर. बदल पु.) एकाच्या ऐवजीं दुसरें घेणें; फेंड; उट्टें; (अ.) बद्दल, जागीं.

**बदलाम** (हिं. न.) दुष्कीर्ति.

**बदली** (हिं. स्त्री.) मोबदला; दुसऱ्या ठिकाणीं नेमणूक; एकाबद्दल दुसरा दिलेला मनुष्य.
**बदलौकिक** (पु.) दुष्कीर्ति.
**बदसूर** (वि.) बेसूर.
**बदसूरत** (फा. वि.) कुरूप.
**बंदा** (फा. पु.) गुलाम, उपकारबद्ध; (वि.) अखंड.
**बदाडणें** (क्रि.) चोपणें, मारणें.
**बदाबदी** (स्त्री.) चेंडूचा एक खेळ.
**बदाम** (फा. बादाम पु.) एक फळ.
**बंदिखाना, बंदिशाळा** (स्त्री.) तुरुंग.
**बंदिवान्** (सं. पु.) कैदी.
**बंदिस्त** (फा. वि.) बांधलेलें; नियमित; ब्रह्मचारी; (स्त्री.) इमारत; बांधकाम.
**बंदिस्ती** (वि.) मजबूत, भरीव; नियमित; (स्त्री.) सुव्यवस्था; ठराविक नेमणूक.
**बंदी** (फा. स्त्री.) बंधन; मनाई, निषेध; (सं. पु.) स्तुतिपाठक; (हिं. स्त्री.) करार; वांटणी; ठराविक नेमणूक; रतीब.
**बंदीखाना, बंदीशाळा, बंदीवान** बंदिखाना व बंदिवान् शब्द पहा.
**बदू** (पु.) गोट्याच्या खेळांतील खाच.
**बंदूक** (तु. स्त्री.) नळी; यंत्र; बंदूक.
**बंदेज, बंधेज** (न.) वीर्यस्तंभक औषध; स्त्रीसंभोग न करणारा किंवा तो करण्यांत मित.
**बंदोबस्त** (फा. पु.) **बंदोबस्ती** (स्त्री.) व्यवस्था, तजवीज, निकाल.
**बद्द** (वि.) न वाजणारा; (अ.) पुरा, पूर्ण.
**बद्दल** (अ.) ऐवजीं. **ब०मुशाहिरा** (अर. हिं. पु.)–नोकरांच्या पगाराबाबतची रक्कम.
**बद्दु** (फा. वि.) डागलेलें; वाईट.
**बद्ध** (सं. वि.) बांधलेला; अडकलेला.
**बद्धक, बद्धकोष्ट** (सं. न.) मलावरोध; शौचास साफ न होणें.
**बद्धमुष्टि** (सं. वि.) मूठ मिटलेला, कृपण.
**बद्धमूल** (सं. वि.) मुळें खोल गेलेला, पक्का.
**बंध** (सं. पु.) नियम, कायदा, बंधन.
**बंधक** (सं. न.) गहाण; (वि.) बाध आणणारें.

**बंधकी** (सं. स्त्री.) दासी. [जुमानणें.
**बधणें** (क्रि.) वश किंवा अनुकूल होणें;
**बंधन** (सं. न.) बांधणें; निर्बंध, बंधारण.
**बंधाटी** (स्त्री.) दोरी; तट्टी.
**बंधारण** (न.) नियम, मर्यादा.
**बंधारा** (पु.) बांध, धरण. [जड.
**बधिर** (सं. वि.) बहिरा, संवेदनशून्य,
**बंधु** (सं. पु.) भाऊ, बांधव, आप्त.
**बंधुजन, बंधुवर्ग** (सं. पु.) नात्यांचीं माणसें.
**बंधेज** (न.) ब्रह्मचर्य; (पु.) आळा; धरबंद.
**बन** (सं. वन न.) वन, झाडी, जंगल; पाणी (मोरो० मंत्र भाग० ११।११५).
**बनकर** (प्रा. पु.) माळी.
**बनकरी** (प्रा. पु.) लाकूडतोड्या.
**बनजर** (न.) झाडें झुडपें वाढलेली जमीन; माळजमीन.
**बनजार, बनजारी, बनजारा** (हिं. पु.) बैलांच्या पाठीवर धान्य, मीठ इत्यादि लादून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेऊन विकणाऱ्या लोकांची जात किंवा त्या जातीचा इसम.
**बनणें** (क्रि.) होणें; अनुकूलता असणें; फुरसत मिळणें; (भांडण वगैरे) जुंपणें; पेटणें; धष्टपुष्ट होणें; सिद्ध होणें.
**बनविणें** (क्रि.) तयार करणें. [वस्त्र.
**बनात** (हिं. स्त्री.) एक प्रकारचें लोकरीचें
**बनाव** (पु.) सुघटितपणा, ऐक्य. [कृत्रिम.
**बनावट** (हिं. स्त्री.) रचना; घटना; (वि.)
**बनियन्, बन्यान** (पु.) जाकीट; गंजीफ्रॉक.
**बनोट** (हिं. स्त्री.) अलंकारिक रचना; व्यवस्था.
**बंपर** (इं. पु.) पाणी पिण्याचा पेला.
**बंब** (पोर्तु. पांपा पु.) पाणी उंच चढविण्याचें यंत्र; (वि.) लठ्ठ; (अ). काठोकाठ.
**बंबाळ** (वि.) प्रचंड; व्याप्त; (पु.) समुदाय; मोठा नाद. [चैन; उधळपट्टी.
**बंबाळी** (स्त्री.) विशालता; विपुलता;
**बबी** (पु. स्त्री.) लहान मुलगा-गी.
**बंब्या** (वि.) धष्टपुष्ट पण अशिक्षित; (पु.) पोत्यांतील धान्य नमुन्यासाठीं बाहेर काढण्याकरितां वापरण्याचें साधन

**बंभर** (सं. पु.) भ्रमर. [ लोट, लोळ.
**बंभाळ** (प्रा. पु.) ध्वनि; लखलखाट; झोत,
**बंम्हादेव** (सं. ब्रह्म + महादेव पु.) गोसावी लोकांचा नामघोष.
**बभ्रा** (पु.) बोभाट, प्रसिद्धि; स्फोट.
**बयतें** (न.) वलुतें.
**बमुजीब** (फा. अ.) प्रमाणें, अनुसार.
**बया** (पु.) एक पक्षी; (स्त्री.) बाई, धिडका, आकाबाई.
**बयाणा** (अर. पु.) विसार; (फा. बयान पु.) वृत्तान्तकथन; सबब.
**बयान-ण** (अर. पु.) विस्तार; तपशील.
**बर** (पु. स्त्री.) पू. [होडी.
**बरकणी** (पोर्तु. बरक्विन्हा. स्त्री.) लहान
**बरकत** (अर. स्त्री.) लाभ; प्राप्ति; यशस्विता; भाग्य.
**बरकता** (पोर्तु. बर्क्वेटा स्त्री.) क्रीडानौका.
**बरकंदाज** (फा. पु.) बंदूकीनें उत्तम नेम मारणारा. [स्पर्धा, द्वेष; मत्सर.
**बरकशी, बसकस** (फा. स्त्री.) चुरस;
**बरका** (वि.) मऊ फणस; फणसाची एक जात. [नौका.
**बरकीण** (पोर्तु. बर्क्विन्हा स्त्री.) क्रीडा-
**बरखास्त** (फा. बरखवास्त वि.) विसर्जित; सभेतून उठलेली मंडळी.
**बरग** (प्रा. न.) ज्वारी, बाजरी, नाचणी इ. चें बीज.
**बरगडी** (स्त्री.) फासळी.
**बरगळ** (वि.) विरळ विणीचें.
**बरगळलें** (वि.) भुकेलें.
**बरगळेल** (वि.) अतिशय अधीर, उतावळा.
**बरगा** (हिं. पु.) वांसा; सोट; तुळई.
**बरची** (हिं. बरछी स्त्री.) भाल्यासारखें एक शस्त्र.
**बरज** (न.) बरग पहा.
**बरट, बरटा** (प्रा. पु.), **बरटी** (स्त्री.) चिखल (ज्ञा० ८७।८८).
**बरड** (स्त्री.) माळजमीन.
**बरडा** (पु.) जून पोफळाची शिजवून वाळविलेली सुपारी.
**बरडी** (स्त्री.) माळजमीन; वाळवून तयार केलेली सुपारी.

**बरणी** (स्त्री.) चिनी मातीचें उभट भांडें.
**बरतरफ** (फा. वि.) कामावरून काढलेला.
**बरतरफी** (फा. स्त्री.) चाकरीवरून काढून टाकणें.
**बरदास्त** (फा. स्त्री.) पाहुणचार; सत्कार.
**बरफ, बर्फ** (फा. न.) नैसर्गिक हिम; कृत्रिम उपायानें गोठविलेलें पाणी, बर्फ.
**बरफी** (स्त्री.) एक प्रकारची मिठाई.
**बरबट** (प्रा. न.) चिखल; रायतें; मांसाचा रस्सा.
**बरबटणें** (क्रि.) चिखल इ. नें हात भरणें.
**बरबडें** (न.) गवत (अनंत० २९.).
**बरबाद** (फा. वि.) नाश पावलेला, नष्ट.
**बरमा** (हिं. पु.) सामता.
**बरलेख** (फा. अ.) लिहिल्याप्रमाणें.
**बरव** (प्रा. स्त्री.) शोभा (भा० १४।२५७).
**बरवंट, बरवटा, बरवंटा** (वि.) सुंदर; गोजिरवाणा.
**बरवंटा** (स्त्री.) पतिव्रता.
**बरवणें** (प्रा. क्रि.) शोभणें.
**बरवा** (प्रा. वि.) सुंदर; छानदार.
**बरसात** (हिं. स्त्री.) पावसाळा, पाऊस.
**बरहक्क** (अ.) बरोबर रीतीनें; न्यायानें.
**बरहुकूम** (फा. अ.) हुकुमाप्रमाणें.
**बरळ** (प्रा. स्त्री.) असंबद्ध भाषण; (वि.) बरळणारा; भ्रमिष्ट; (न.) विरळ विणीचें कापड; भरडलेलें धान्य; जाडेंभरडें.
**बरळणें** (क्रि.) असंबद्ध भाषण करणें.
**बरा** (सं. वरम् वि.) चांगला; योग्य; पुष्कळ.
**बराक** (इं. बॅरॅक स्त्री.) चाळ; खोल्यांची रांग.
**बराडी** (प्रा. वि.) खादाड, अधाशी, आशाळभूत.
**बरात, वरात** (फा. पु.) खजिन्यांतील पैशाची मागणी, विवाह विधीनंतर नवरा-नवरी यांची नवऱ्याच्या घराकडे मिरवणूक.
**बराबर** (फा. वि.) समान; तंतोतंत; सह; बरोबर.
**बराबरी** (फा. स्त्री.) तुलना; बरोबरी.

**बरामद** (फा. स्त्री.) निर्गत मालावरची जकात.
**बराय** (फा. अ.) साठीं, करितां.
**बरास** (न.) शंभर चौरस फूट जागा; खडी वगैरे मोजण्याचें एक साधन(मांप).
**बरीक** (अ.) मात्र, तेवढा.
**बरू** (पु.) बोरू. [चांगलें, योग्य; होय.
**बरें** (सं. वरम् न.) कल्याण, हित; (अ.)
**बरोबर** (फा. वि.) समान, सह.
**बरोबरी** (फा. स्त्री.) सारखेपणा; तुलना.
**बर्फ, बर्फी, बर्सात** बरफ, बरफी, बरसात पहा.
**बर्हि** (सं. पु.) मोर.
**बल** (सं. न.) शक्ति, बळ; सैन्य.
**बलक** (पु.) मगज, गीर.
**बलकी** (स्त्री.) खांबावरची खोवण.
**बलकुबल** (सं. स्त्री.) संकटाची वेळ; परीक्षेची वेळ; (अं.) अडचणीच्या वेळीं. [कसपट (दा७ ३।६।१८).
**बलंगी** (ग्रा. न.) बाजरीच्या निबुराचें
**बलछडा** (पु.) लाकडाचा लांब वासा; भाल्याची काठी; भाला.
**बलटा** (पु.) बळ; शक्ति.
**बलब** (पु.) बलक पहा.
**बलबल, बलबलपुरी** (स्त्री.) अव्यवस्था, गोंधळ; अंधेरनगरी.
**बलवत्तर** (सं. वि.) फार बलाढ्य.
**बलवा** (हिं. पु.) ओरड, गोंधळ.
**बलवान्** (सं. वि.) बलाढ्य, बळकट.
**बलहा** (सं. पु.) इंद्र.
**बला** (स्त्री.) भिस्त; आधार.
**बलाई** (स्त्री.) इडापिडा.
**बलांट, बलाट** (पु.) बालंट, आळ.
**बलाढ्य** (सं. पु.) शक्तिमान्, सामर्थ्यवान्.
**बलाणी** (स्त्री.) देवळाच्या गाभाऱ्याच्या किंवा सभामंडपाच्या भिंतीला लागून असलेला ओटा.
**बलात्कार** (सं. पु.) बळजबरी; जुलूम.
**बलाबल** (सं. न.) आपल्या व विरुद्ध पक्षाच्या बळांची तुलना; शक्ति; बळ.
**बलाय** (अर. बला स्त्री.) इडापिडा.
**बलि** (सं. पु.) बळी.
**बलिप्रतिपदा** (सं. स्त्री.) कार्तिक शु. १.
**बलिष्ठ** (सं. वि.) अतिशय बलवान्.
**बलिहरण** (सं. न.) भूतयज्ञ, बळीहरण.
**बली, बळी** (सं. वि.) बलाढ्य, पराक्रमी.
**बलीवर्द** (सं. पु.) बैल.
**बलुतें** (न.) गांवच्या वतनदारांना शेतावर त्यांच्या हक्काबद्दल धान्य वगैरे द्यावयाचें तें.
**बलुतेदार, बलुता, बलुत्या** (पु.) गांवचे वतनदार. हे बारा असत. त्यांचीं नांवें :—सुतार, लोहार, महार, मांग, कुंभार, चांभार, परीट, न्हावी, भट, मुलाणा, गुरव आणि कोळी.
**बलौता** (ग्रा. पु.) बलुतदार. [ शस्त्र.
**बल्लम** (हिं. पु.) आखूड भाल्यासारखें एक
**बल्लव** (सं. पु.) गोपाळ, गवळी (वामन-नामसुधा० १।१६); आचारी.
**बल्हारी** (स्त्री.) सामर्थ्य; मोठेपणा.
**बवजूद** (फा. अ.) शिवाय.
**बशर्त** (फा. अ.) पराकाष्ठेचा प्रयत्न करून.
**बशा** (पु.) मालकाच्या गैरहजेरीत घराची राखण करण्यासाठीं ठेविलेला महार.
**बशी** (पोर्तु. बासिय स्त्री.) लहान ताटली-सारखें पसरट भांडें.
**बस** (फा. अ.) पुरे; (पु.) जम; दृढता; निश्चितपणा; (इं. स्त्री.) उतारूंसाठीं असलेली मोटार.
**बसक –की** (स्त्री.) बैठक; अडणी; बूड; बिछाईत; बाजारांत दुकान मांडण्या-बद्दलची पट्टी.
**बसकट** (वि.) बैठा; आडव्या घाटाचा.
**बसकण** (स्त्री.) बूड; बसणें.
**बसकर** (न.) बैठक; बसावयाकरितां आंथरण्याचें वस्त्र (रुजामा, सतरंजी वगैरे). [ बसकट
**बसकल** (स्त्री.) बसण्याला फुरसत; (वि.)
**बसका** (वि.) बसकट; (स्त्री.) बैठक.
**बसकी** (स्त्री.) विटीदांडूच्या खेळांतली एक संज्ञा; बूड; बैठक; आसन.
**बसकूर** (न. स्त्री.) आसन; बैठक.
**बसकोळी** (ग्रा. स्त्री.) मातीची घागर.
**बसणी** (स्त्री.) बैठक; बसणें.

**बसणें** (सं. वस् क्रि.) बैठक मारणें; ऱ्हास किंवा अपकर्ष होणें; आरंभ करणें; प्रमाण ठरणें; (न.) बैठक, बसण्यासाठीं अंथरलेलें वस्त्र, चटई इ०.
**बसंत** (सं. वसंत पु.) वसंत ऋतु; गायनांतल्या एका रागाचें नांव. [काचाचें.
**बसंती** (वि.) केशरी रंगाच्या शिड-
**बसव** (पु.) लिंगायत धर्माचा मुख्य उत्पादक.
**बसवंत** (प्रा. न.) उपास्य दैवत.
**बसुला** (पु.), **बसुली** (स्त्री.) सुताराचें एक हत्यार. [दि० ४।२।२२).
**बस्त** (प्रा. पु.) बकरा; बोकड (स्वा०
**बस्तन, बस्तान** (फा. बस्तन पु.) ठाण; दिंड; (न.) बंदोबस्त; बस, जम.
**बस्ता** (फा. पु.) गठ्ठा; मोटाळें, गांठोडें; दप्तर.
**बस्ति** (सं. पु.) मूत्राशय; गुदद्वारांत पिचकारीनें पाणी सोडून मलोत्सर्ग करविणें.
**बस्ती** (स्त्री.) जैनमंदिर.
**बस्वण** (प्रा. पु.) बैल (तुका० ३५८४).
**बहकणें** (क्रि.) बरळणें; बाहवणें, भलत्याच मार्गाला लागणें; मनस्वी चढणें; फाकणें.
**बहकाविणें** (क्रि.) भलतीकडे नेणें; भटक्या मारण्यास लावणें; घाबरविणें.
**बहंगी** (हिं. स्त्री.) कावड; कावडींतून नेण्याचें ओझें.
**बहर** (फा. पु.) हंगाम, विपुलता; भर; पराकाष्ठेची मौज अथवा रंग.
**बहवस** (वि.) स्वच्छंदी, स्वैर.
**बहल** (सं. बहुल वि.) विपुल; विस्तीर्ण.
**बहाई पंथ** (पु.) एक मुसलमानी धर्मपंथ.
**बहाड** (स्त्री.) समुद्रकाठची खारी जमीन; भरती. [सबब.
**बहाणा** (फा. पु.) मिष; ढोंग; खोटी
**बहाणें** (प्रा. क्रि.) बोलावणें.
**बहादर, बहाद्दर, बहादुर** (फा. बहादर वि.) धैर्यवान्, शूर, हुशार.
**बहादरी** (फा. स्त्री.) पराक्रम, शौर्य. [नांव.
**बहार** (फा. स्त्री.) मौज; रंग; एका रागाचें
**बहाल** (न.) तुळई; (फा. वि.) खुष; पुनः कामास लाविलेला; क्षमा केलेला. **ब० करणें**—कृपावंत होऊन देणें.
**बहाळी** (प्रा. स्त्री.) साजुकपणा, विपुलता, समृद्धि.
**बहिः** (सं. अ.) बाहेर, बाहेरून, पृथक्.
**बहिरंग** (सं. न.) बाह्य स्वरूप.
**बहिरंगोपासन** (सं. न.) कर्मभक्ति.
**बहिरट** (सं. बधिरक वि.) कांहींसा बहिरा.
**बहिरवसा** (पु.) बाहेरची (भूतपिशाचाची) बाधा.
**बहिरा** (सं. बधिर वि.) ज्याला कानानें मुळींच ऐकू येत नाहीं किंवा कमी येतें असा.
**बहिरी** (स्त्री.) सुनबहिरी नांवाचा रोग.
**बहिरी ससाणा** (पु.) एक पक्षी.
**बहिरोबा** (पु.) भैरव देवता; बहिरा मनुष्य.
**बहिर्दिशेस जाणें** शौचास जाणें.
**बहिर्बणगें** (हि. न.) बाजारबुणगें.
**बहिर्मुख** (सं. वि.) इहलोकच्या विषयांत गुंतलेला; विषयावर दृष्टि राखणारा.
**बहिर्लापिका** (सं. स्त्री.) ज्याच्या अर्थपूरणासाठीं बाहेरचें पद वगैरे घ्यावें लागतें अशी कूट कविता.
**बहिर्व्यसन** (सं. न.) रंडीबाजी.
**बहिष्कार** (सं. पु.) वाळींत टाकणें.
**बहिष्कृत** (सं. वि.) वाळींत टाकलेला.
**बहिश्चर** (सं. वि.) बाहेर फिरणारा.
**बहीण** (सं. भगिनी स्त्री.) भगिनी.
**बहीर** (स्त्री.) आघाडीचें सैन्य; विनी.
**बहीरवासु** (प्रा. न.) बहिर्वस्त्र.
**बहु** (सं. वि.) पुष्कळ; (हिं. स्त्री.) सूनबाई.
**बहुचक** (सं. बहुवाचक वि.) वाचाळ, चावट.
**बहुड** (प्रा. पु.) कृपादृष्टीचा वर्षाव.
**बहुडणें** (क्रि.) मागें फिरणें; उडणें.
**बहुडविणें** (प्रा. क्रि.) परत पाठविणें (तुका० ४४).
**बहुडा** (प्रा. पु.) निरोप; वर्षाव (ज्ञा० ११।६७०१; तुका० ४९८).
**बहुत** (सं. बहु वि.) पुष्कळ, अनेक.
**बहुतावें** (न.) पुष्कळांचा संबंध.
**बहुतेक** (वि.) पुष्कळसें; (अ.) बहुतकरून, पुष्कळ अंशीं.

**बहुधा**(अ.) अनेक प्रकारें; बहुतेक, बहुतांशी.
**बहुभाष, बहुभाषी** (सं. वि.) बोलका.
**बहुमत** (सं. न.) अधिक लोकांचें मत.
**बहुमूल्य, बहुमोली** (वि.) किंमतवान्.
**बहुरणी** (प्रा. स्त्री.) गाभणें जनावर.
**बहुराशिक** (न.) संयुक्त गुणोत्तर व साधें गुणोत्तर यांचें समीकरण.
**बहुरूपी** (सं. पु.) नाना प्रकारचीं सोंगें आणून उपजीविका करणारा.
**बहुल** (सं. पु.) वद्यपक्ष; कृष्णपक्ष.
**बहुली** (प्रा. वि.) सुंदर.
**बहुलें** (न.) बोहलें; लग्नमुंजीच्या वेळेस घालतात ती वेदी. [ वचन.
**बहुवचन** (सं. न.) व्याकरणांत अनेक-
**बहुवस** (स्त्री.) वेश्या; (प्रा. वि.) बहुत, पुष्कळ; सर्वज्ञ; बोलका; नानाविध; (अ.) फार.
**बहुवसपण** (न.) सर्वज्ञत्व.
**बहुवाडें, बहुवार** (प्रा. अ.) पुष्कळदां.
**बहुविध** (सं. वि.) पुष्कळ प्रकारचा.
**बहुव्रीहि** (सं. पु.) व्याकरणांत ज्या समासांतील कोणतेंहि पद प्रधान नसून सर्व सामासिक शब्द त्या पदाहून भिन्न अशा नामाचें विशेषण असतो तो समास.
**बहुवें** (प्रा. अ.) पुष्कळ.
**बहुशः** (सं. अ.) बहुतकरून.
**बहुश्रुत** (सं. वि.) पुष्कळ गोष्टींची थोड-थोडी माहिती असलेला.
**बहुसंख्य** (वि.) जास्तींतजास्त.
**बहुसाल, बहुसाळ** (अ.) पुष्कळ, वारंवार.
**बहुळ** (सं. बहुल वि.) असंख्य; कृष्णपक्ष.
**बहुळणें** (क्रि.) व्याकुळ होणें.
**बहेदा, बंदा** (पु.) बंड, गोंधळ.
**बळ** (सं. बल न.) बल पहा; बळि; देवाला अर्पिलेली वस्तु.
**बळई** (हिं. पु.) गांवाच्या सीमा दुरुस्त करणें, गांवाला सर्पण पुरविणें इत्यादि कामें करणारा महार.
**बळकट** (वि.) मजबूत, जोरदार.
**बळकटी** (स्त्री.) मजबुती, दृढता.
**बळकटून** (अ.) गच्च, आवळून.
**बळकावणें** (क्रि.) बलात्कारानें घेणें; (वस्तु) उपटणें; दाबून ठेवणें. [ जुलूम.
**बळजबरी, बळजोरी** (स्त्री.) बलात्कार,
**बळत, बळद** (न.) भिंतींत ठेवलेली पोकळ जागा; जमिनींतली पोकळ जागा; अडगळ ठेवण्याची जागा.
**बळवंड** (प्रा. वि.) दांडगा.
**बळभद्र** (सं. पु.) दळभद्रचा; रांडचा.
**बळरय** (प्रा. न.) दुबळेपणा (तुका० १८०२).
**बळवंत, बळवान्** (सं. वि.) शक्तिमान्, समर्थ.
**बलवत्तर** (सं. वि.) मजबूत, बळवान्.
**बळस, बळसें** (पु. न.) नाका-तोंडांतून निघणारा फेस; तवंग किंवा मळ.
**बळाढ्य, बळात्कार, बळिष्ठ** बलाढ्य, बलात्कार, बलिष्ठ पहा.
**बळावणें** (क्रि.) ज्यास्त जोरदार होणें.
**बळावळ** (स्त्री.) विपुलता, जोर, शक्ति.
**बळास येणें** हमरी तुमरीवर येणें (विवे० पू० १।१६६).
**बळाहक** (सं. बलाहक पु.) मेघ, ढग.
**बळिभद्र** (सं. पु.) कपाळकरंटा, रांडचा.
**बळिया** (प्रा. वि.) बलाढ्य (तुका० १५६८); (पु.) बलवान् मनुष्य; (अ.) दृढपणानें.
**बळियाढा** (प्रा. वि.) सामर्थ्यवान् (तुका० २३१३); बलाढ्य.
**बळी** (सं. पु.) आहुती; देवास अर्पण केलेला पशु, वगैरे; बळवान् पुरुष; (पु.) एक प्रसिद्ध दानशूर राजा; दलदलींत राहणारा एक पक्षी; (स्त्री.) रेशमाची पट्टी.
**बळीकरण** (न.) बळकट (निरोगी) करणें (ज्ञा० १६।१४०).
**बळिहरण** (सं. बलिहरण न.) भूतयज्ञ.
**ब० घालणें**—चिताड करून ठेवणें.
**बळेंच** (क्रि.) मुद्दाम, दाटून, जबरदस्तीनें.
**बक्षिशी, बक्षिसी** (स्त्री.) इनाम, बक्षीस.
**बक्षी** (फा. बख़्शी पु.) सेनापति, सेनाध्यक्ष; सैन्यांतला शिपायांच्या पगाराचा हिशेब ठेवून तो वांटणारा अधिकारी.

**बक्षीस** (फा. बख़शिस न.) इनाम, देणगी.
**ब्रह्मगिऱ्हो** (प्रा. पु.) ब्रह्मराक्षस.
**बा** (पु.) बाप, पिता; (अ.) अरे.
**बाइक्या** (वि.) रांडयाराघोजी, बाइल्या.
**बाइणी** (प्रा. स्त्री.) वायदा.
**बाई** (स्त्री.) प्रौढ स्त्री; सामान्यतः स्त्रियांच्या नांवापुढें आदरार्थी लावण्याचा शब्द; वडील जावेस उद्देशून योजण्याचा शब्द.
**बाईल** (स्त्री.) लग्नाची बायको.
**बाईलखाद्या** (पु.) ज्याच्या बायका एकीमागून एक मरत आल्या आहेत, असा पुरुष.
**बाईलबुद्धि** (स्त्री.) बायकांची समजूत किंवा शहाणपण; बायकांचे विचार; कोते, अपक्व विचार.
**बाईलबुद्ध्या** (वि.) बायकोच्या विचाराप्रमाणें मुकाट्यानें चालणारा.
**बाईलवेडा** (पु.) स्त्रीलंपट मनुष्य.
**बाईस** (अर. स्त्री.) कारण.
**बाउला** (प्री. पु.) पुतळा.
**बाऊ** (पु.) भय वाटण्यासारखी वस्तु; भय. **बाऊ करणें**–क्षुद्र गोष्टीचें नसतें महत्त्व सांगून भय दाखविणें.
**बाऊट** (स्त्री.) छाया, सावली.
**बाऊल** (पु.) रान मांजर.
**बाऊस** (न.) खांदा, बाहुवटा.
**बाऊळ** (स्त्री.) खडकावरची तथापि ओली भात पेरण्यासारखी जमीन; नदीकांठची जमीन.
**बांक** (पोर्तु. बॅंको) बसण्याची लांब व ठेंगणी चौकी.
**बाक** (सं. वक्र पु.) वक्रता, मनांतली [ तेढ; चूक.
**बांकडा** (वि.) धाडसी.
**बांकदार** (वि.) वाकलेला.
**बाकबूक** (न. स्त्री.) येऊन ठेपलेलें संकट, पंचाईत इ. मुळें मनाला वाटणारी अस्वस्थता. [ ६।३।९).
**बाकस** (स्त्री.) चोइटी, चिपाड (दा०
**बांका, बाका** (हिं. वि.) धाडसी, शूर.
**बाका** (पु.) कर्णा नांवाचें वाद्य.
**बांकाईत** (पु.) कर्णा वाजविणारा.
**बाकाबाकी** (स्त्री.) भांडण, तंटा; बोलाचाल.
**बाकी** (अर. स्त्री.) शिल्लक, शेष. **बा० ठेवणें**–मर्यादेंत असणें; **बाकी थकणें**–लोकांकडचें येणें तुंबणें; **बा० पूज्य करणें**–सर्व रक्कम फेडणें.
**बांकुटणें** (क्रि.) कोमेजणें, वाळणें.
**बाकेराव** (पु.) बढाईखोर मनुष्य.
**बाखर** (पु.) करंज्या, साटोऱ्या इ. मध्यें घालण्याचें सारण.
**बाग** (फा. पु. स्त्री.) बगीचा, उपवन; (न.) लवण, वक्रता, मार्ग; (स्त्री.) लगामाची दोरी.
**बांग** (फा. स्त्री.) कोंबड्याचा पहाटेचा शब्द; निमाजासाठीं केलेला पुकार.
**बागट** (वि.) किंचित् वक्र.
**बागडणें** (क्रि.) आनंदानें नाचणें, उड्या मारणें.
**बागडा** (वि.) खेळकर, नाचणारा; उड्या मारणारा.
**बागडी** (स्त्री.) चेष्टा, खेळ; (पु.) माकडाचे खेळ करणारा.
**बांगडी** (स्त्री.) चुडा; बायकांनीं हातांत घालण्याचें सोन्याचें किंवा काचेचें कडें. **बांगड्या भरणें**–नामर्दपणा दाखविणें; **बां० वाढवणें**—बांगडी फुटणें.
**बागदार** (फा. स्त्री.) गुप्ती.
**बागबगीचा** (हिं. पु.) फुलबाग, मळा.
**बांगर** (पु.) सांड, पोळ.
**बांगरसट** (स्त्री.) चंपाषष्ठी.
**बांगराळें** (न.) बांगडीला वर्तुळाचा आकार देणारा लाकडाचा लहान ठोकळा.
**बागवान** (फा. पु.) माळी; बागेचें काम करणारा.
**बागा** (प्रा. पु.) आकार; मार्ग (अमृ० ७।८०); संबंध (ज्ञा० १५।३३८).
**बागाईत** (फा. स्त्री.) पाटस्थळ; पाण्यावर केलेला भाजीपाला, फळें वगैरे.
**बागी** (प्रा. स्त्री.) वळण, वाक.
**बागी** (हिं. वि.) बंडखोर.
**बागीबळ** (प्रा. न.) कंप (ज्ञा० १६।७५७).
**बागु** (प्रा. स्त्री.) वाट; भाग.
**बागुरडा** (पु.) झुरळ.

**बागुल, बागुलबोवा** (पु.) मुलांना भय दाखविण्यासाठीं उभा केलेला पुतळा, किंवा आणिलेलें सोंग.
**बागेसरी** (सं. व्याघ्रेश्वरी स्त्री.) गायनांतला एक राग; सोनाराची शेगडी.
**बाघोडा** (प्रा. पु.) मुलांचा एक खेळ.
**बाच, बांच** (पु.) भयाची धडकी, भीति; दरारा.
**बाचकणें** (क्रि.) विचकणें, धावरणें.
**बाचकुटणें** (क्रि.) नासणें, कुजणें, भडकणें.
**बाचणें** (सं. वच् क्रि.) भांडणें, आरडाओरड करणें.
**बाचरट, बाचरठ** (वि.) बडबड्या.
**बांचळणें, बावचळणें** (क्रि.) भ्रान्तिष्टासारखें वागणें; भ्रांत होणें; काय करावें हें सुचत नाहींसें होणें; वाईट मार्गाला लागणें; व्यसनासक्त होणें; झोपेंत किंवा रागाच्या लहरींत बडबडणें.
**बाचाबाची** (स्त्री.) भांडण, उत्तर-प्रत्युत्तर.
**बाचोट** (न.) कुपथ्य; कुपथ्याचा दुष्परिणाम; दृष्टीची मंदता; (वि.) बेचव; नीरस.
**बाज** (स्त्री.) खाट, खाटलें; (पु.) भय (अनंत २४); वचक; फळाफुलांचा वहार; (पु.) बहिरी ससाणा; पीक.
**बाज** (फार. वि.) आसक्त.
**बाजगीर** (फा. पु.) कराची वसुली करणारा.
**बाजट** (न.) लहान खाट, पलंगडी.
**बाजणें** (क्रि.) झाडास लागणें; पीक येणें.
**बाजत, बाजद** (फा. अ.) आणखी; शिवाय.
**बाजरा** (हिं. पु.), **बाजरी** (स्त्री.) एक धान्य.
**बाजलें** (न.) बाज; खाट.
**बाजवट** (न.) बाजलें; बाजेची दोरी; बाजूबंद; चौरंग; (वि.) खूप फळें देणारें.
**बाजा** (सं. वाद्य पु.) वाद्य. **बाजा करणें**—रडणें. [ (तुका० १९३५).
**बाजागिरी** (प्रा. स्त्री.) नजरबंदी; गारुड
**बाजांगूळ** (न.) बांडगूळ.
**बाजार** (फा. पु.) हाट; मंडई; अव्यवस्था गोंधळ. **गेला बा० तरी**—किमान पक्षीं; निदान; **बा० च्या भाकरी भाजणें**—नुसत्या उठाठेवी करणें.
**बाजारगप्प** (स्त्री.) निराधार बातमी.
**बाजारफसगी** (का. स्त्री.) पेशवाईत बाजारांत विक्रीसाठीं येणाऱ्या मालावर सरकारी पट्टी बसविली जात असे ती.
**बाजारबसवी** (स्त्री.) कसबीण; वेश्या.
**बाजारबुणगें** (फा. न.) फौजेबरोबर असणारीं अवांतर माणसें.
**बाजिंदा** (फा. वि.) हुशार; लुच्चा; धूर्त.
**बाजी** (फा. स्त्री.) खेळाची समाप्ति; डाव; बाजू; संकट.
**बाजीगर, बाजीगार** (फा. पु.) गारुडी.
**बाजीगरी** (प्रा. स्त्री.) नजरबंदी, हातचलाखी; गारुडी विद्या (दा० ११।४।१२).
**बाजीराई, बाजीरावी** (स्त्री.) दुसऱ्या बाजीराव पेशव्याप्रमाणें थाटमाट आणि विलास.
**बाजू** (फा. स्त्री.) कड; पक्ष. **बाजू राखणें**—अब्रू किंवा नांव राखणें.
**बाजूबंद** (फा. पु.) दंडांतील दागिना, बाहुमणि. [ किरकोळ, कांहीं.
**बाजे** (हिं. वि.) इतर, अवांतर, ज्यादा
**बाजेगरी, बाजेगिरी** (हिं. वि.) पोकळ, रिकामा; (स्त्री.) फसवणूक, इंद्रजाल.
**बाझ** (पु.) फळें, फुलें इत्यादींचा बहर.
**बाट** (वि.) लुच्चा; दांडगा; बाटगा; (पु.) बट्टा; अपवित्रपणा, कलंक; एका जातीचा मासा.
**बाटगा** (वि.) बाटलेला, भ्रष्ट.
**बाटणें** (क्रि.) धर्मभ्रष्ट होणें.
**बाटली** (इं. बॉटल स्त्री.) शिसा.
**बाटवडा** (पु.) भ्रष्टाकार; विटाळ.
**बाटविणें** (क्रि.) धर्मभ्रष्ट करणें; अमंगलता आणणें.
**बाटी** (स्त्री.) आरोळी; गाकर.
**बाटूक** (न.) जोंधळ्याचें ओलें ताट.
**बाटचा** (वि.) धर्मभ्रष्ट झालेला.
**बाठ** (स्त्री.) आंब्याची कोय.
**बांठ** (स्त्री.) रांजण.
**बाठा, बाठाळ, बाठळ** (वि.) ज्याची कोय पक्की झाली आहे असा.
**बाठा, बांठा** (पु.) आंब्याची कोय; ठेंगूळ; जटा; गांठ.

नगर वाचनालय सातारा संगणकीकृत

**बाठी** (स्त्री.) कोय. [ शरीर.
**बाठूक** (न.) ठेंगूपणा; बळकट कसलेलें
**बाड** (न.) टाचणांची वही; तंबूभोंवतालची कनाथ; पडदा; (स्त्री.) शस्त्राची धार; गप्प; (वि.) धूर्त, लबाड.
**बांड** (पु.) तरुण; सूतकांटी हलके लुगडें; कणसावांचून जोंधळ्याचें ताट; वाटोळे जळाऊ लाकडाचे तुकडे. [भ्रष्ट.
**बाडगा**(वि.) उर्मट; अत्याचारी; शिरजोर;
**बाडगी** (स्त्री.) स्वयंपाकाच्या उपयोगाचें ताटाच्या आकाराचें मातीचें भाण्डें.
**बांडगूळ** (न.) वांदें; एका झाडावर वाढलेलें दुसरें लहान झुडूप.
**बाडबिछाना, बाडबिछाद** (हिं. पु.) एकंदर सगळें सामान.
**बाडस** (फा. पु.) खांबाचा टेकू.
**बांडा** (वि.) भूमिका एका रंगाची व वरचे पट्टे निराळ्या रंगाचे अशा प्रकारचा पशु किंवा कपडा.
**बाडी** (प्रा. स्त्री.) पडींत जमीन.
**बांडेलें** (प्रा. वि.) कणसें न आलेलें.
**बाढ** (प्रा. वि.) दृढ; पुष्कळ.
**बाण** (सं. पु.) तीर; नर्मदेंतला गोटा; अग्निनलिका; गलबताची वरची कड.
**बाणणें** (क्रि.) ठसणें; प्रवेशणें; घालणें; बाणा बाळगणें; शोभणें (भा० १।३४५).
**बाणा** (पु.) प्रतिज्ञा; अभिमान; एक (वीणकामांत) आडवें सूत.
**बाणाईत** (हि. पु.) बाणवाला; बाणा बाळगणारा; (प्रा. स्त्री.) बाण.
**बाणी** (सं. वाणी स्त्री.) गायनांतल्या गाण्याच्या निरनिराळ्या पद्धति; निकराचा प्रसंग; जन्मस्वभाव.
**बाणेदार** (वि.) अभिमान राखणारा.
**बात, बातचीत** (हिं. स्त्री.) गोष्ट, गप्प.
**बातनी, बातमी** (स्त्री.) खबर, वार्ता.
**बातमीदार** (पु.) बातमी देणारा.
**बातल** (अर. वि.) पोकळ; निराधार.
**बातुला** (सं. वातुल वि.) खोटें.
**बातेरी** (इं. ब्याटरी स्त्री.) तोफखाना; वीज उत्पन्न करण्याचा पात्रसंचय.
**बातेखानी** (वि.) थापेबाज.
**बातेला**(इं. फ्लॉटिला पु.) लहानसें आरमार.
**बाद** (अर. अ.) काढून टाकिलेला; (पु.) वायु; (अ.) नंतर.
**बादणें** (क्रि.) वजा करणें; वगळणें.
**बादपडावला** (पु.) खूणखाण, चिन्ह.
**बांदबंदस्ती**(स्त्री.)बांध, कुंपण वगैरे घालणें.
**बादरायण** (पु.)व्यास. **बा०संबंध** (पु.)–अति लांबचा संबंध. [ जवळचा प्रदेश.
**बांदरी** (स्त्री.) सह्याद्रीच्या पायथ्या-
**बादल** (फा. पु.) अभ्रपटल, ढग.
**बादला** (हिं. पु.) कलाबतू करण्यासाठीं काढलेली चांदीसोन्याची वारीक तार.
**बांदवडी, बंदिवाडी** (प्रा. स्त्री.)बंदिखाना; अधीनता; (अ.) अधीन.
**बादशहा** (फा. पु.) राजाधिराज.
**बांदी** (फा. स्त्री.) दासी.
**बांदी** (प्रा. स्त्री.) दुष्टपणा; दुष्ट विचार.
**बांदोडी** (प्रा. स्त्री.) बंदिवास, अधीनता.
**बांध** (पु.) बंधारा; उंच केलेली शेताची मर्यादा.
**बाध** (सं. पु.) हरकत, प्रत्यवाय, प्रतिबंध.
**बाधक** (सं. वि.) जाचणारें, प्रतिकूळ.
**बांधणावळ**(स्त्री.) बांधण्याबद्दलची मजुरी; बांधणी. [बांधण्याची क्रिया.
**बांधणी** (स्त्री.) बांधण्याची तऱ्हा;
**बांधणें** (प्रा. क्रि.) अडचण करणें; निरसणें (अमृ० ७।३०); दुःख देणें; अपकारक करणें.
**बाधणें** (क्रि.) अपकार होणें; न पचणें.
**बांधणें** (न.) पाण्याला घातलेला बंधारा.
**बांधणें** (क्रि.) रचणें; तयार करणें; एकत्रित करणें; न सुटेल असें करणें.
**बांधव** (सं. पु.) भाऊबंद; सोयरे.
**बांधवाडी** (प्रा. स्त्री.) बंधन.
**बांधा** (पु.) आकार; ठेवण; ढेप.
**बाधा** (सं. स्त्री.) विकार, पीडा; दुःख; (प्रा. स्त्री.) निरास.
**बांधाटी** (स्त्री.) ओंबण वगैरेस बळकटी आणण्यासाठीं त्यास मध्यें मध्यें बांधिलेल्या उभ्या काठ्या. [ तयारी.
**बांधाबांध** (स्त्री.)आवराआवर; प्रवासाची

[library stamp, illegible]



**बांधारा** (प्रा. पु.) पाट; बांध.
**बाधारी** (पु.) डोंगरावरचा प्रदेश; बंधन.
**बांधी** (प्रा. स्त्री.) बंधन; नियम.
**बांधीव** (वि.) मुद्दाम बांधलेला; पक्का;
**बांधेसूद** (वि.) यथाशास्त्र बांध्याचा; रेखीव बांध्याचा.
**बाप** (प्रा. वि.) मोठा.
**बाप** (सं. वप्तृ पु.) पिता, वडील. **बा० स बाप न म्हणणारा**–भीडमुरवत न धरणारा; खडखडीत स्वभावाचा; **बापजन्मीं**–सबंध आयुष्यांत.
**बापजादे** (पु.) वाडवडील.
**बापडा** (वि.) बिचारा; गरीब.
**बापया** (प्रा. पु.) चातक पक्षी. [ संपत्ति.
**बापरोटी, बापुति** (स्त्री.) वडिलोपार्जित
**बापशेटीची पेंड** हवी त्यानें हवी तितकी न्यावी अशी वस्तु.
**बापिया, बापू, बप्पा** (प्रा. पु.) चातक (ज्ञा० १०।१८३). [ हव्यकव्य.
**बापिक** (प्रा. वि.) कुलपरंपरागत; (न.)
**बापु** (प्रा. वि.) मोठा.
**बापुडा** (वि.) बापडा; अनाथ; दीन.
**बापेया** (प्रा. पु.) चातक पक्षी.
**बापूस** (पु.) (कोंकणी) बाप; पिता.
**बापोती** (पु.) वडिलार्जित संपत्ति.
**बाप्तिस्मा** (इं. पु.) ख्रिस्ती धर्माची दीक्षा.
**बाप्या** (पु.) बाप होण्याच्या वयाचा; प्रौढ मनुष्य.
**बाफोर, बाफोर, बाफर, बाफर** (पोर्तु. पु.) वाफेनें चालणारी लहान आगबोट.
**बाफ्ता** (पु.) एक प्रकारचें रेशमी कापड;
**बाफळी** (स्त्री.) एक जंगली वनस्पति; तिचें बीज.
**बाब** (अर. स्त्री.) रकम; कलम; काम; कर.
**बांब** (इं. पु.) भयंकर स्फोटक द्रव्य घातलेला गोळा.
**बांबट** (स्त्री.) पावसाळी हवा.
**बाबडें** (प्रा. वि.) भाजलेलें, ज्यास अंकुर फुटत नाहींत असें (भा० २१।३१२).
**बाबत** (फा. स्त्री.) बाब; कलम; खर्चाचा कच्चा हिशेब; (अ.) मुळें; साठीं.
**बाबर, बांबर** (न.) दलदल.

**बाबर** (वि.) चिरमुटलेलें; विस्कळित झालेलें.
**बाबरझोटी** (प्रा. स्त्री.) अस्ताव्यस्त, मोकळे सुटलेले लांब केस.
**बाबरहोट** (सं. वर्बरोष्ठ पु.) जाड ओठ.
**बाबरी** (स्त्री.) अस्ताव्यस्त मोकळे सुटलेले केस.
**बाबला** (वि.) लाडका. [ (ज्ञा० १५।१०१).
**बाबळ, बांबळ** (प्रा. ना.) आधिक्य
**बाबळेजणें, बाबळेंजणें, बांबळेजणें** (प्रा. क्रि.) विस्तारणें (ज्ञा० १५।१८५).
**बाबा** (पु.) बाप, वडील भाऊ इ० विषयींची सन्मानप्रदर्शक संज्ञा. **बाबापुता करणें**––लाडीगोडी करणें.
**बाबा वाक्य** वाडवडिलांचें मत.
**बाबी** (स्त्री.) लाडक्या मुलीची संज्ञा.
**बाबीन** (इं. स्त्री.) सूत गुंडाळण्याची लाकडी किंवा लोखंडी पोकळ कांडी.
**बांबुटणें** (क्रि.) आंबा इ० फळें न पिकतां पिवळीं होणें.
**बाबुळ, बांबुळी** (प्रा. स्त्री.) शेवाळ.
**बाबू** (पु.) मुलाचें एक टोपण नांव; कोणी बंगाली गृहस्थ; भावला.
**बांबू** (पु.) वेळू. [ चालणारी नौका.
**बांबोट** (पोर्तु. बेंबोट स्त्री.) उथळ पाण्यांत
**बाब्या** (पु.) लाडका मुलगा.
**बाभळ, बाभूळ** (सं. बब्बुल स्त्री.) एक कांटेरी वृक्ष.
**बाम** (पु.) एक प्रकारचा मासा; (स्त्री.) दुखऱ्या भागावर चोळण्याचें मलम.
**बायकी** (वि.) बायकांसंबंधाचें; बायकांस शोभणारें.
**बायको** (स्त्री.) स्वतःची स्त्री अथवा पत्नी.
**बायक्या** (वि.) बायकांत बसणारा, बायल्या; नामर्द.
**बायणी** (प्रा. स्त्री.) वायदा.
**बायबल** (न.) ख्रिस्ती लोकांचा धर्मग्रंथ.
**बायरावणें** (प्रा. क्रि.) वेगळें करणें.
**बायल्या** (वि.) बायकोच्या हुकुमांत असलेला; बाईलबुद्धि; बायक्या.
**बायसिकल** (इं. स्त्री.) पायानें चालविण्याची दुचाकी गाडी.

**बाया** (पु.) ज्याला शाई लावलेली नसते तें तबल्याचें अंग. [ वहर; नोंद.
**बार** (पु.) बंदुकीची दारू; मोठा आवाज;
**वार** (प्रा. पु.) घोष; नाद; हव्यास (तुका० १५०); (पु.) पायदळ; खेळाचें साधन.
**बार उडविणें** अकल्पित रीतीनें काम फत्ते करणें; **बार भरणें**—पढवून ठेवणें.
**बारकस** (फा. बारकश न.) व्यापारी मालाचें जहाज; (वि.) बारीक, नाजूक.
**बारका** (वि.) बारीक. [ पणा.
**बारकाई** (फा. स्त्री.) सूक्ष्म दृष्टि; बारीक-
**बारकावणें** (क्रि.) कृश होणें.
**बारकावा** (पु.) बारकाई; चौकसपणा.
**बारकें** (न.) बारांचा समुदाय, डझन.
**बारंगपाटी** (स्त्री.) आट्यापाट्याच्या खेळांतील मधली पाटी, सूरपाटी.
**बारगळ** (वि.) स्वच्छंदी, उनाड, अनियंत्रित. [ भ्रष्ट होणें; निकामा होणें.
**बारगळणें** (क्रि.) स्वच्छंदीपणानें वागणें;
**बारगीर** (प्रा. वि.) दुसऱ्याचें मागून आणलेलें (तुका० ३६८४).
**बारगीर** (फा. पु.) घोडेस्वार.
**बारडी** (स्त्री.) धुसळखांबाची दोरी.
**बारणें** (प्रा. क्रि.) थांबणें (स्वा० दि० ६।२।१९); ओझें घालणें.
**बारदान** (फा. न.) माल ज्यांत भरतात तें (पेटी, पोतें, बुधला इ०); मालाच्या गट्ठ्यावरील वस्त्र; माल; ओझें.
**बारदार** (फा. पु.) ओझें वाहून नेणारा.
**बारदेश** (पु.) गोव्याकडील प्रांत.
**बारनिशी** (फा. स्त्री.) नोंद; टिपण.
**बारनीस** (फा. पु.) सरकारी कागदांच्या नोंदी करणारा कारकून.
**बारबंड, बारबंडा** (वि.) उनाड.
**बारबंडी** (स्त्री.) ज्याला बांधण्यासाठीं बारा बंद किंवा कसे लावले आहेत असा अंगांत घालण्याचा एक कपडा.
**बारबार** (हिं. अ.) वारंवार, पुनःपुनः.
**बारभाई** (स्त्री.) अनेकांच्या हातीं असलेली सत्ता; अव्यवस्था. **बा० ची खेती**—गोंधळ.

**बारमहा** (अ.) वर्षभर, सतत.
**बारमाशी** (वि.) वर्षाच्या सगळया महिन्यांत उत्पन्न होणारें.
**बारव** (स्त्री.) पायविहीर.
**बारस** (स्त्री.) द्वादशी; पाऊस.
**बारसें** (न.) मुलाच्या जन्मापासून बाराव्या दिवशीं होणारा त्याचा नामकरणविधि.
**बा० स जेवलेला**—जबरदस्त; सरस.
**बारा** (अर. पु.) दरबारच्या वगैरे जागेंत केलेली बिछाईत; एक संख्या.
**बाराकशी** (स्त्री.) बारबंडी पहा.
**बाराखडी** (स्त्री.) व्यंजनापासून बारा स्वरांच्या मिलाफानें तयार होणाऱ्या अक्षरांची मालिका.
**बारा ज्योतिर्लिंगें**—सोरटी सोमनाथ, महाकाल (उज्जनी), वदरीकेदार, काशीविश्वेश्वर, ओंकारेश्वर, त्र्यंबकेश्वर, वेरूळचा घृष्णेश्वर, अवढ्या-नागनाथ, वैजनाथ (परळी), भीमाशंकर, मल्लिकार्जुन व रामेश्वर हीं शंकराचीं बारा मुख्य स्थानें.
**बारा-तेरा** (पु.) असंबद्धता.
**बाराद्वारी** (हिं. बारादरी स्त्री.) एक प्रकारचा डेरा; उन्हाळयांत राहण्याचा हवाशीर बंगला. [ बोलणें.
**बारा-पंधरा करणें** धरसोडीचें बोलणें
**बारा पिंपळांवरचा मुंजा** भटक्या.
**बारा बंदराचें पाणी प्यालेला** अनुभविक किंवा चवचाल माणूस.
**बारावा बृहस्पति** वैर.
**बारा महाल** पूर्वीच्या राज्याचे खाजगी बारा महाल अथवा खातीं असत. त्यांचीं नांवें—पोतें, कोठी, पागा, दरजी, टंकसाळ, सौदागिरी, इमारत, हवेली, पालखी, थट्टी, चौबिना आणि शरी.
**बारा महिने तेरा काळ** सदोदित, नेहमीं.
**बारा वाजविणें** समाप्त होणें.
**बारावा** (पु.) माणसाच्या मृत्यूच्या बाराव्या दिवसाचें श्राद्ध.
**बारावळी** (प्रा. पु.) बारशाचा समारंभ (भा० १२।६०२) [ चंद्राची कळा.
**बारा-सोळा** (प्रा. स्त्री.) सूर्याची किंवा

**बारी** (प्रा. पु.) छत्र धरणारा (भा० १२।५६०); (स्त्री.) पाळी.
**बारी** (स्त्री.) डोंगर, झाडी यांच्या आश्रयामुळें जेथें चोर, व्याघ्र वगैरे असण्याचा संभव ती जागा; (हिं. स्त्री.) खिडकी, जाळी; (पु.) विड्याचीं पानें विकणारा; तांबोळी.
**बारीक** (वि.) सूक्ष्म; पातळ; गूढ.
**बारीकनिरीक, बारीकसारीक** (वि.) किरकोळ.
**बारीकराव** (पु.) सडपातळ कृश मनुष्य.
**बारीश** (फा. स्त्री.) पाऊस; वृष्टि.
**बाल** (सं. न.) अर्भक; अज्ञान मूल.
**बाल** (हिं. पु.) केस. **बालंबाल खुष होणें**—अतिशय प्रसन्न होणें.
**बालक** (सं. पु. न.) मूल, मुलगा. **बालक मंदिर** (न.)—मांटेसरी पद्धतीची पूर्व प्राथमिक शाळा.
**बालकुचल** (फा. पु.) संकटाचा प्रसंग; युद्धाचा प्रसंग.
**बालंट** (न.) खोटा आरोप, आळ.
**बालदार** (वि.)पीळदार(होना० पृ० १५३).
**बालदी** (स्त्री.) पोहरा.
**बालपरवेशी** (फा. बालपरवरिश स्त्री.) लढाईत पडलेल्यांच्या कुटुंबास दिलेला पगार, वर्षासन वगैरे.
**बालपेंच** (पु.) एक कठीण पेंच.
**बालंबाल** खात्री पूर्ण खात्री.
**बालबोध** (सं. स्त्री.) देवनागरी लिपि; (वि.) फार सोपें; मुलांना समजण्यासारखें.
**बालभाषा** (सं. स्त्री.) संस्कृताचे अपभ्रंश होऊन झालेली भाषा. [ मित्र.
**बालमित्र** (सं. पु.) लहानपणापासूनचा
**बालवीर** (पु.) बॉयस्काऊट; एका सेवापरायण समाजसंस्थेचा घटक.
**बाला** (सं. स्त्री.) पांचव्या वर्षापासून सोळा वर्षांच्या आंतल्या वयाची मुलगी.
**बालाग्र** (अ.) यत्किंचितहि.
**बालार्क** (सं. पु.) नुकता उगवलेला सूर्य; त्याचें कोंवळें ऊन.
**बालिका** (सं. स्त्री.) मुलगी.
**बालिश** (सं. वि.) पोरकट; मूर्ख.
**बालिस्त** (प्रा. न.) तक्क्या, उशी (तुका० १२८७).
**बालिस्टर** (पु.) कायदेपंडित.
**बालेकिल्ला** (फा. बालाई किला पु.) पहाडी किल्ल्याचा सर्वांत वरचा भाग.
**बालेघाट**(पु.) घाटमाथा; घाटावरील प्रदेश.
**बालोबाल** (अ.) बालंबाल, पूर्ण.
**बालोद्यानशाळा** (स्त्री.) किंडर गार्टन पद्धतीची शाळा.
**बाल्य** (सं. न.) बालपण. [ मजूर.
**बाल्या** (पु.) झगडी; पोवारा; कोंकणी
**बाव** (स्त्री.) मोठ्या तोंडाची विहीर.
**बावखंड, बावखड** (न.), **बावखडा** (पु.) खाद्याच्या वरचा भाग.
**बावचळणें** (क्रि.) घाबरणें, वेडें होणें.
**बावटा** (पु.) ध्वज, बाहुटा, झेंडा.
**बावडा** (पु.) ढेकूण.
**बावडी** (स्त्री.) मोठी विहीर. [(सोनें).
**बावनकशी** (वि.) अतिशय शुद्ध व उत्तम
**बावनकस** (प्रा. न.) उत्तम सोनें.
**बावनचंदन** (प्रा. न.) मैलागरू चंदन.
**बावना** (प्रा. वि.) बावनकशी; अतिशय उत्तम चंदन.
**बावबंदी** (क्रि. वि.) स्वच्छंदानें; (स्त्री.) स्वच्छंदीपणा; वेतालपणा.
**बावरणें** (क्रि.) बावरणें, गोंधळणें.
**बावरा** (वि.) घाबरलेला; गोंधळलेला.
**बावलें** (न.) बाहुलें.
**बावसा** (पु.) भय, दचका.
**बावळा** (वि.) दिसण्यांत वेडसर.
**बावळें** (न.) छाया, सावली.
**बावा, बावाजी** (पु.) बोवा, जोगी, तपस्वी.
**बावी** (स्त्री.) विहीर, बावडी.
**बावेकरी** (पु.) सुकाण्या.
**बाशिंग** (सं. भालशृंग न.) विवाहाच्या वेळीं कित्येक जातींत वधू आणि वर यांच्या कपाळावर एक भूषण बांधतात तें. **उतावळा नवरा आणि गुडघ्यास बा०**—विलक्षण उतावळेपणा; **बाशिंगबळ** (न.)—एकाद्याचा विवाह होण्यास लागणारी दैवाची अनुकूलता.

... ग्रंथालय, सातारा.

**बाशिंग** (पु.) कलगी (लावणी) म्हणणारा. [(प्रा. वि.) खोटा.
**बाष्कळ** (वि.) चावट, ताळतंत्र नसलेला;
**बाष्ट** (प्रा. वि.) ओशट.
**बाष्प** (सं. पु.) अश्रु; वाफ.
**बांस** (पु.) कळक.
**बासट** (वि.) परस्परविरोधी; अपायकारक; (प्रा. वि.) ओशट; (प्रा. न.) मिश्रण (स्वा० दि० १२–२–५७).
**बासटणें** (प्रा. क्रि.) माखणें.
**बासटें** (प्रा. न.) विष. [वर्ची.
**बांसडा** (पु.) वांबू, वेळू, कळक; भाला,
**बासन** (न.) गांठोडें बांधण्याचा रुमाल; गांठोडें; भांडें. [वैरा; अमर्यादित.
**बासर** (प्रा. वि.) भटक्या, स्वच्छंदी; सैरा-
**बांसरी, बासुरी** (हिं. स्त्री.) मुरली, पावा, अलगुजा.
**बासा, बासी** (वि.) शिळा.
**बासुंदी, बासोंदी, बासुदी** (स्त्री.) दूध आटवून व त्यांत साखर व मसाला घालून केलेलें खाद्य. [बोलावणें.
**बाहणें, बाहाणें** (प्रा. क्रि.) हांक मारणें;
**बाहादुर** (वि.) शूर.
**बाहला** (पु.) दूध काढण्याच्या वेळीं गाईचे पाय बांधण्याची दोरी.
**बाहाळ** (पु.) विस्तार (ज्ञा० १३।१८०); (स्त्री.) धोतर किंवा पासोडी शरिराभोंवतीं गुंडाळून राहिलेला पदर डाव्या खांद्यावर टाकतात तें.
**बाहाळी, बाहिळी** (प्रा. स्त्री.) महत्त्व; साजुकपणा; अतिशयितता.
**बाहिर, बाहीर** (अ.) बाहेर.
**बाहिरी** (प्रा. स्त्री.) व्यभिचारिणी स्त्री.
**बाही** (सं. बाहु स्त्री.) सबंध हात; अंगरख्याचा हात; अस्तनी; दाराच्या चौकटीचे दोन बाजूंचे दोन उभे खांब.
**बाहु** (सं. पु.) भुज, दंड.
**बाहुटा** (हिं. पु.) बाहुमूलापासून कोपरापर्यंतचा हाताचा भाग; स्त्रियांचें एक बाहुभूषण; (हिं. पु.) झेंडा, निशाण.
**बाहुटी** (प्रा. स्त्री.) बाहु.
**बाहुनेह** (प्रा. पु.) पाहुणचार.
**बाहुयुद्ध** (सं. न.) मल्लयुद्ध, कुस्ती.
**बाहुला** (पु.), **बाहुली** (स्त्री.), **बाहुलें** (न.) पुतळा, भावलें; लग्नांतील बोहलें.
**बाहुल्य** (सं. न.) विपुलता, समृद्धि.
**बाहुवट** (न.) हात.
**बाहे** (सं. पु.) बाहु, हात.
**बाहेर** (अ.) अंतःप्रदेशाहून इतर स्थळीं; शिवाय, वेगळा.
**बाहेरख्याली** (वि.) छिनाल; रंडीबाज.
**बाहेरबट्टा** (पु.) नाण्याची देवघेव करतांना मिळालेला फायदा. (याच्या उलट–आंतबट्टा = नुकसान).
**बाहेरबाधा** (स्त्री.) पिशाचबाधा.
**बाहेरमुदी** (प्रा. स्त्री.) बाह्यशोभा, देखावा, बहिरंग.
**बाहेरला** (वि.) पृष्ठभागावरला, बाहेरचा; (पु.) महार; मांग; भंगी.
**बाहेरचा** (पु.) भंगी; (वि.) बाहेरील.
**बाहेरसवडी** (प्रा. अ.) बाह्यतः, वरपांगी.
**बाहेरील** (वि.) बाहेरचा.
**बाहो** (पु.) बाहु, हात. [विषय; इंद्रियें.
**बाह्य** (सं. वि.) बाहेरील; (प्रा. पु.)
**बाह्यखारी** (प्रा. स्त्री.) बटकी, दासी.
**बाह्यवट** (प्रा. न.) बाहुभूषण.
**बाह्यवटें** (प्रा. अ.) बाह्यात्कारी.
**बाह्या** (प्रा. पु.) बाहू.
**बाह्यात्कारी** (सं. अ.) बाहेरून दिसायला.
**बाह्योपचार** (सं. पु.) पोटांत न घेतां शरिराला चोळण्याचें वगैरे औषध.
**बाळ, बाळक** (सं. न.) मूल. [औषध.
**बाळकडू** (न.) लहान मुलास देण्याचें एक
**बाळकें** (प्रा. न.) छाया, प्रतिबिंब.
**बाळगणा** (पु.) लहान मुलांना संभाळणारा.
**बाळगणें** (क्रि.) राखणें, ठेवणें, संभाळणें.
**बाळगोपाळ** (पु. अने.) लहानमोठीं मुलें.
**बाळंत** (वि.) नुकती प्रसूत झालेली.
**बाळंतपण** (न.) प्रसूति; बाळबाळंतिणीची चाकरी; एखादें कार्य होऊन गेल्यावर करावयाची व्यवस्था.
**बाळंतीण** (स्त्री.) बाळंत झालेली स्त्री.
**बाळंतें, बाळवतें** (न.) बाळंतिणीच्या मुलाचीं व तिचीं वस्त्रें वगैरे.

**बाळभोग** (सं. पु.) प्रातःकाळचीं पूजा झाल्यानंतर देवाला अर्पण केलेला उपाहार; लहान मुलांचा सकाळचा फराळ.
**बाळभुकी** (स्त्री.) चिवडा वगैरे खातांना वानगी म्हणून जो एखादा घास राखून ठेवतात व तो न ठेविल्यास त्याबद्दल दंड म्हणून मंडळीला सहल द्यावी लागते तीं.
**बाळवतें** (न.) वाळंतें पहा. [ फराळ.
**बाळवाटी** (स्त्री.) मुलांचा सकाळचा
**बाळसंतोष** (पु.) जुनीं वस्त्रें मागणारी भिकाऱ्यांची एक जात.
**बाळसें** (न.) मूल साधारणतः एक वर्षाचें होईपर्यंत त्याच्या अंगावर जी पुष्टता दिसते ती.
**बाळहिरडा** (पु.) एक औषधी फळ.
**बाळसेदार** (वि.) गुटगुटीत, पुष्ट; गोंडस.
**बाळा** (स्त्री.) तरुण स्त्री; वैलाला लडिवाळपणानें किंवा प्रेमानें लावण्यांत येणारा शब्द.
**बाळाबगुळा** (प्रा. स्त्री.) क्षुद्र देवता.
**बाळी** (स्त्री.) एक कर्णभूषण.
**बाळी** (प्रा. स्त्री.) कन्या.
**बाळे भोळे** (वि.) अज्ञ आणि भोळसर (भा० ३।२२४).
**बिक** (प्रा. न.) तेज, शोभा; वळ.
**बिकट** (सं. विकट वि.) कठिण, अवघड.
**बिकण** (स्त्री.) कारवाराकडे--आठोळी.
**बिकमल** (फा. बकलम न.) कारकुनानें लिहिलेल्या पत्रावर शेवटीं स्वतः यजमान जीं चार अक्षरें लिहितो तीं किंवा त्याची सही. [ गुप्त गोष्ट.
**बिंग** (सं. व्यंग न.) व्यंग, न्यून; गुह्य,
**बिगर** (फा. बगर अ.) शिवाय, वांचून.
**बिगर इयत्ता** (स्त्री.) उजळणी शिकणाऱ्या मुलांचा वर्ग.
**बिगार** (हिं. स्त्री.) वेठ, मोल न घेतां करावें लागणारें सरकारचें काम; जुलमानें किंवा अनास्थेनें केलेलें काम.
**बिगारी** (पु.) वेठीस धरलेला माणूस.
**बिगीबिगी** (क्रि. वि.) लवकर लवकर.
**बिंगा** (सं. वि.) व्यंगयुक्त, उणा, अपूर्ण.
**बिंगें** (न.) बिंगा पहा.
**बिघडणें** (क्रि.) नासणें, खराब होणें; बेबनाव होणें.
**बिघा** (सं. विग्रह पु.) जमीन मोजण्याचें एक माप (२० पांड किंवा ४०० चौरस काठ्या). [ वितुष्ट; बेबनाव.
**बिघाड** (सं. विग्रह पु.) खराबी, नाश;
**बिचकणें** (क्रि.) दचकणें, घाबरणें.
**बिचका** (वि.) बिचकणारा.
**बिचकावणें** (क्रि.) भिवविणें, घाबरविणें.
**बिचल** (हिं. स्त्री.) बिघाड; माघार.
**बिचवा** (हिं. पु.) विंचवाच्या आकाराची वाकडी कट्यार.
**बिचारा** (फा. वि.) बापडा, गरीब.
**बिचोबा** (फा. बेचोबा पु.) खांबावांचून असलेला लहान डेरा.
**बिछाईत, बिछायत** (अर. स्त्री.) बसण्यासाठीं जमिनीवर अंथरलेलें वस्त्र वगैरे; बैठक; अडतीवर माल आणून विकणारा.
**बिछाना** (हिं. पु.) शय्या, अंथरूण.
**बिछावणें** (हिं. क्रि.) आंथरणें.
**बिजन** (सं. विजन स्त्री.) कत्तल, नाश.
**बिजली** (हिं. स्त्री.) वीज, विद्युत्.
**बिजवड** (न.) बीज; अवलाद; पीक कापल्यानंतर पुनः लागलीच त्या जमिनींत बीं पेरणें.
**बिजवर** (बिजा + वर पु.) दुसऱ्यांदा लग्न करणारा पुरुष.
**बिजवरा** (पु.) मुलांच्या कपाळावर घालावयाचा एक अलंकार. [ दुजाईत.
**बिजाईत** (गुज. वि.) दोनदां व्यालेली;
**बिजागरी** (स्त्री.), **बिजागरें** (न.) सांधेपट्टी; पेटीचें झाकण उघडतां व लावतां यावें म्हणून केलेली सोय.
**बिजावळी** (प्रा. स्त्री.) भेद, भिन्नता.
**बिजिक** (इं. न. दोघांनीं, तिघांनीं, किंवा चौघांनीं खेळण्याचा पत्त्यांचा एक विशिष्ट प्रकारचा इंग्रजी खेळ.
**बिजें** (न.) आगमन; येणें; (वि.) दुसरें.
**बिटका** (वि.) बुटका, लहान आकाराचा.
**बिटारणें** (क्रि.) खोडकर किंवा व्रात्य होणें; बिघडणें, नासणें.

वाचनालय

**बिटोरी** (स्त्री.) वाऱ्याचें लहान कणीस; दारूचा लहान तोटा किंवा बाण; लहान विटी. [ (अनंत० ६८).
**बिट्टा वासणें हगणें**; भीतीनें गाळण उडणें.
**बिंडका** (पु.), **बिंडकें** (न.) पुडकें.
**बिडती** (स्त्री.) अडचण, संकट. [ कैवारी.
**बिडवई** (प्रा. पु.) हितकर्ता, तारक,
**बिडा** (हिं. पु.) विडें, वेटोळें, भेंडोळें.
**बिडार** (न.) बिऱ्हाड.
**बिडाळ** (सं. विडाल न.) मांजर.
**बिडाळक** (सं. विडालक न.) मांजर.
**बिडी** (स्त्री.) शृंखळा, पाश; तंबाखूनें भरलेली पानाची केलेली नळी.
**बिडीस** (प्रा. न.) आमिष.
**बिडोळें** (न.) विडा, गुंडाळी.
**बिडोज** (सं. पु.) इंद्र.
**बिढार** (न.) बिऱ्हाड, घर.
**बितणें** (क्रि.) येऊन पोंचणें, गुदरणें.
**बितपशील** (फा. अ.) तपशीलवार.
**बित्त, बित्तीम** (अर. वि.) खरी, बिनचूक, खात्रीलायक. [ बिघडणें.
**बिथरणें** (क्रि.) प्रतिकूल होणें, उलटणें,
**बिंद** (सं. बिंदु पु.) थेंब.
**बिंदडी** (स्त्री.) गांठोडें, पेंढी.
**बिंदली** (स्त्री.), **बिंदलें** (न.) लहान मुलाच्या हातांतली पाटली.
**बिदवा** (पु.) घराच्या धाव्यावर पसरण्याची माती.
**बिदा** (अर. वि.) पाठविलेला.
**बिदा करणें** निरोप देणें; काढून टाकणें.
**बिदाई, बिदागी** (अर. स्त्री.) पाठवणी; पाठवणी करतांना दिलेली देणगी; देणगी; पारितोषिक. [ तारीख.
**बिदानद** (फा. अ.) पत्र पाठविल्याची
**बिदी** (स्त्री.) गल्ली.
**बिंदी, बिंदावनी, बिनी** (स्त्री.) स्त्रियांच्या कपाळावरचा अलंकार.
**बिंदु** (सं. पु.) थेंब; ठिपका; ज्याचे भाग करतां येत नाहींत व स्थिति असून लांबी रुंदी नाहीं तो.
**बिंदुकली** (स्त्री.), **बिंदुकलें** (न.) बिंदु, थेंब; चंद्रबिंदु.
**बिंदुली** (स्त्री.) चंद्रबिंदु.
**बिंदुलें** (प्रा. न.) कंकण; बिंदु; शून्य.
**बिंद्र** (सं. न.) राजचिन्ह; चिन्ह.
**बिन** (अर. पु.) पुत्र; (अ.) विना; शिवाय.
**बिनतोड** (स्त्री.) सोंगट्यांच्या खेळांतील हार; (वि.) बरोबर लागू पडणारें, बिनचूक.
**बिनधोक** (अ.) निर्धास्तपणें.
**बिनभाड्याचें घर** तुरुंग.
**बिनमोजबी** (वि.) ज्याबद्दल हिशोब द्यावा लागत नाहीं असें; बेजबाबदार.
**बिनशर्त** (फा. बिलाशरत अ.) कांहीं अट न घालतां.
**बिनसणें** (सं. वि + नश् क्रि.) बिघडणें.
**बिनाख्ती** (फा. स्त्री.) बारकाईची पाहणी; तपासणी; अंदाज.
**बिनामी, बेनामी** (हिं. वि.) खोटें, बनावट; दुसऱ्याच्या नांवावर केलेला (व्यवहार).
**बिनी** (फा. बिनी—नाक स्त्री.) सैन्याची आघाडी; पागोट्याचें केळें; दाराच्या चौकटीचा वरचा भाग.
**बिनीवाला** (फा. पु.) सैन्याच्या आघाडीवरील अंमलदार.
**बिंब** (सं. न.) सूर्यचंद्रादिकांचें मंडल; मंडल; प्रतिबिंब; पिकलेलें तोंडलें.
**बिबट** (न.) बिब्बा; बिब्यासारखा काळा डाग.
**बिबटा** (वि.) अंगावर ठिपके असलेला (वाघ). [ ओली जमीन; खत.
**बिबड** (प्रा. स्त्री.) बिवड; नीट केलेली
**बिंबणें** (क्रि.) ठसणें, उतरणें.
**बिंबफळ** (सं. न.) पिकलेलें तोंडलें.
**बिबळा** (पु.) एक झाड; अंगावर ठिपके असलेला वाघ.
**बिबा, बिब्बा, बिबवा** (सं. भल्लातक, पु.) भिलावा. **बि० घालणें**—अडचणी उपस्थित करणें, विघडविणें.
**बिंबाधरा** (वि.) पिकलेल्या तोंडल्याप्रमाणें लाल ओठ असणारी.
**बिबी** (स्त्री.) कुलीन मुसलमान स्त्री.
**बिंबीफळ** (न.) बिंबफळ पहा.
**बिमार** (वि.) आजारी.

**बिभास** (सं. विभास पु.) गायनांतला एक राग.
**बिभूत**(स्त्री.)भस्म; शेण लाकूड इ०ची राख.
**बियाणें** (न.) बीज, बीं.
**बिरकांडी** (स्त्री.) विणकऱ्याचा धोटा.
**बिरखुंड, बिरखंडें** (न.) गाभा, भेंड.
**बिरजुमाल** (स्त्री.) एकत्र, समाईक असअसलेली मालमत्ता.
**बिरडी** (स्त्री.) सोलीव पावटा किंवा वाल.
**बिरडी** (प्रा. स्त्री.) दोरी (हरि० ७।१८४).
**बिरडें** (न.) गुंडी घालण्यासाठीं केलेलें भोंक; गांठ; कोडें; समूह; थवा.
**बिरबल** (पु.) चतुर मनुष्य.
**बिराणा** (वीर राणा पु.) वीर पुरुष.
**बिरादर** (हि. पु.) बंधुजन.
**बिरादरी** (हि. स्त्री.) बंधुभाव.
**बिरार** (प्रा. पु.) विकार.
**बिरीद** (सं. ब्री न.) बाहुभूषण; बाणा, ब्रीद.
**बिरुद** (सं. न.) श्रेष्ठत्वाचें चिन्ह म्हणून गंडा (दोरा) बांधतात तो; चिन्ह; ब्रीद, बाणा.
**बिरुदवंत** (प्रा. वि.) यशस्वी.
**बिरुदाइत** (प्रा. पु.) प्रतिज्ञा करून निघालेलें; बाणा बाळगणारा (भा० ४।८०).
**बिरुदावलि** (सं. स्त्री.) बिरुदांची माळ.
**बिऱ्हाड** (न.) भाड्यानें राहणें; थोड्या दिवसांसाठीं दिलेलें ठाणें; भाड्यानें दुसऱ्यांच्या घरांत राहणारें कुटुंब; त्याचें सामानसुमान. **विचवाचें बि०पाठीवर—** फारसें लटांबर जवळ नसणें.
**बिऱ्हाडकरी, बिऱ्हाडकरू** (पु.) भाड्यानें राहणारा.
**बिल** (इं. न.) विकलेल्या जिनसांची किंवा केलेल्या कामाबद्दलची यादी व त्याबद्दलच्या पैशाची मागणी; कायद्याचा मसुदा; (सं. न.) भोक; उंदीर, घूस इ. राहण्याचें ठिकाण
**बिलकुल** (अर. अ.) अगदीं, मुळींच.
**बिलग** (वि.) वेगळा; पृथक् असलेला; विलग.
**बिलगणें** (हिं. क्रि.) चिकटणें.
**बिलंद, बिलंदर** (फा. वि.) पक्का, अट्टल; ठकबाज.
**बिलंदी** (फा. स्त्री.) गायनांतला ताल.
**बिलफैल** (अ.) अगदीं.
**बिलबिलीत** (वि.) मऊ, बिळबिळीत.
**बिलवर** (फा. बिलोर पु.) एका उच्च प्रतीच्या काचेची बांगडी.
**बिला** (अर. अ.) विना, वांचून; जसें बिलाहरकत—हरकतीवांचून.
**बिलाकुसूर** (अ.) चुकीवांचून, बिनचूक.
**बिलामत** (फा. स्त्री.) खोटा आळ, आरोप, कुभांड.
**बिलावर** (पु. स्त्री.) गायनांतला एक राग.
**बिलावल** (पु. स्त्री.) एका रागाचें नांव. **बि० थाट**—हल्लीं प्रचारांतला सात शुद्ध स्वरांचा थाट.
**बिलोर** (फा. न.) उंची काच, स्फटिक.
**बिलोरी** (वि.) काचेचें.
**बिल्ला** (पु.) पदक; चपरास.
**बिल्ली** (हिं. स्त्री.) भाटी; मांजर.
**बिल्व** (सं. पु.) बेलाचें झाड. **बिल्वपत्र—** बेलाचें तीनपानी दल.
**बिवड** (पु.) कोंब; पूर्वीं काढून घेतलेलें पीक (ज्ञा० ९।५३३); बीजपोषक जमीन.
**बिवलकरी वळण** अक्षराचें साधें गोंडस वळण; यावरून साध्या वर्तनाचें बाळबोध वळण असा अर्थ झाला.
**बिशात, बिशाद** (हिं. स्त्री.) मालमत्ता; महत्त्व; प्राज्ञा; किंमत.
**बिशी** (स्त्री.) खर्च सारखा वांटून घेऊन एकत्र जेवणाऱ्या लोकांचें मंडळ.
**बिस** (सं. न.) कमळाचा देठ.
**बिसतंतु** (सं. पु.) कमळाच्या देठांतले धागे.
**बिसनी**(सं. व्यसनी वि.) हलकट, दुराचारी.
**बिसाट** (प्रा. वि.) सामान्य; अनियमित.
**बिसाटणें** (प्रा. क्रि.) पसरणें; फाकणें (ज्ञा० १८।६२४).
**बिसाद** (हिं. स्त्री.) सर्वस्व.
**बिसिनी** (सं. स्त्री.) कमलिनी.
**बिस्कुट** (इं. न.) गव्हाच्या कणकीचें केलेलें एक खाद्य. [ वयाची जिन्नस.
**बिस्तरा** (पु.) सतरंजी, गादी, इ. आंथरा-

नगर वाचनालय, सातारा.

**बिहणें** (प्रा. क्रि.) भिणें.
**बिहाग** (पु.) गायनांतला एक राग.
**बिहांवा** (पु.), **बिहांवी** (स्त्री.) मिठांत मुरलेला आंवा.
**बिहावा** (प्रा. पु.) भीति.
**बिहिती** (सं. भीति स्त्री.) भीति.
**बिहो** (प्रा. पु.) भय (एक० ९७३).
**बीं** (सं. वीज स्त्री. न.) बीज.
**बीक** (प्रा. न.) आवड (ज्ञा० ६।१५); शोभा (ज्ञा० १३।७००;) तेज (अमृ० २।६); तीव्रता.
**बीज** (सं. न.) मूलभूत कारण; संतति; गूढतत्त्व; (स्त्री.) द्वितीया.
**बीजक** (सं. न.) मालाची किमतीसह यादी, टाचण.
**बीजगणित** (सं. न.) वर्णांच्या साह्यानें करावयाचें गणित; अव्यक्त गणित.
**बीजांकुरन्याय** (पु.) जसें पेरावें तसें उगवतें, जसें कर्म तसें फळ.
**बीजावळी** (प्रा. पु.) भिन्नता.
**बीजाक्षर** (सं. न.) मूळाक्षर; मंत्राक्षर.
**बीजें करणें** (प्रा. क्रि.) जाणें.
**बीड** (न.) ओतीव लोखंड; ओझ्याच्या गाडीची दोरी; नमुना.
**बीन** (सं. वीणा पु.) एक तंतुवाद्य.
**बीं बियाणें, बीं बिरवण, बीं बेणें** (न.) रोपें लावण्यासाठीं राखून ठेवलेलें बीं, मूळ इ.
**बींबूड** (स्त्री. न.) पीक बुडणें; कुळक्षय.
**बींबुड, बोंबुडी** (प्रा. स्त्री.) उच्छेद, निर्बीजत्व (तुका० १४६६).
**बीभत्स** (सं. पु.) नवरसांपकीं एक रस; (वि.) किळस आणणारें; अभद्र.
**बीभरण** (स्त्री.) पेरणी.
**बीर** (सं. वीर पु.) पिशाचाचा एक [प्रकार.
**बीरभाटीव** (प्रा. पु.) वीररस.
**बीरमंत्र** (सं. पु.) वीर वश करून घेण्याचा मंत्र.
**बीळ** (सं. विल न.) उंदीर वगैरेंचें राहण्याचें [ठिकाण, भोक.
**बुक** (इं. न.) पुस्तक.
**बुकटी** (स्त्री.) पूड, चूर्ण.
**बुकणा** (पु.) तोंडभर घास.
**बुकणी** (स्त्री.) पूड, चूर्ण.
**बुकलणें** (क्रि.) बुक्क्यांनीं मारणें.
**बुकसेलर** (इं. पु.) पुस्तकें विकण्याचा धंदा करणारा.
**बुका, बुक्का** (पु.) एक सुवासिक पूड; गुद्दा, ठोसा.
**बुकांदा** (पु.), **बुकांदी** (स्त्री.) गुद्दा.
**बुकालणें** (प्रा. क्रि.) बुक्क्यांनीं मारणें.
**बुकी, बुक्की** (स्त्री.) गुद्दा, हाताची मूठ.
**बुकी** (स्त्री.) पूड.
**बुगडी** (स्त्री.) स्त्रियांचें एक कर्णभूषण.
**बुचकणें** (क्रि.) बिचकणें; लुटणें.
**बुचकरणें** (क्रि.) नखांनीं ओरबाडणें.
**बुचकरा** (पु.) ओरखडा.
**बुचकलणें** (क्रि.) बुडवून बाहेर काढणें; भ्रमांत पडणें; (प्रा.) निमग्न होणें.
**बुचकळा** (पु.) गोंधळ; भ्रम, संशय.
**बुचकळी, बुचकुळी** (स्त्री.) बुडी.
**बुचका** (पु.), **बुचकुली** (स्त्री.) मूठ; लहान पसा; (वि.) चहाड.
**बुचटणें** (क्रि.) तोंड बंद करणें.
**बुचडा** (पु.) खोपा.
**बुचबुचणें** (क्रि.) डोक्यांत उवा वगैरे फार होऊन त्यांनीं चलनवलन करणें.
**बुचबुचाट** (पु.) गर्दी.
**बुचा** (प्रा. वि.) नागवा, हलकट (तुका० [३०६५).
**बुचा कारभार** अधिकार नसतां एखाद्या कामांत हात घालणें.
**बुचाडणें** (क्रि.) लुवाडणें.
**बुच्चा** (वि.) बुचा पहा.
**बुच्या** (प्रा. वि.) निर्लज्ज.
**बुजगावणें** (न.) पक्षुपक्ष्यांना भिवविण्यासाठीं उभें केलेलें बाहुलें; पोकळ भीति दाखविणारी वस्तु; (क्रि.) भीति दाखविणें.
**बुजट, बुजरा** (वि.) सहज घाबरणारा.
**बुजणें** (क्रि.) घाबरणें; छिद्र बंद होणें.
**बुजरी** (प्रा. स्त्री.) बुजणें (मुक्ते० रामा० ११९९).
**बुजविणें** (क्रि.) भरून काढणें, बंद करणें.
**बुजविणें** (क्रि.) समजावणें.
**बुजू** (पु.) बूच.

**बुझणें**(प्रा.क्रि.) समजणें (विवे० पू०२।३); निघणें (विठ्ठल-सीता० स्व० १५४); बंद होणें, भरून येणें (ज्ञा० ११।४८८).
**बुझावणी** (प्रा. स्त्री.) समजावणी; एकवाक्यता (ज्ञा. १३।१६८).
**बुझावणें** (प्रा. क्रि.) समजावणें, ऐक्य.
**बुटकणा, बुटका** (वि. ) ठेंगू; आखूड.
**बुटकुली** (स्त्री.) लहान तपेली.
**बुटकुळी** (स्त्री.) बुडी, डुबकी.
**बुटगणा** (वि.) ठेंगू.
**बुटणें** (न.) बूच, झाकण. [कोठवळा.
**बुटणेर** (इं. पु.) युरोपियनांच्या घरचा
**बुटबुट** (प्रा. स्त्री.) कानांत सांगितलेला (गुरुमंत्र).
**बुटबुटा** (प्रा. अ.) पुटपुटत.
**बुटबेंगण** (वि.) ठेंगू.
**बुटा** (पु.) नक्षीकाम.
**बुटी** (स्त्री.) औषधि, वनस्पति; गुप्त औषधि; फडक्यावर फुलें, वेली वगैरे काढतात ती नक्षी; टोपली; भांगेचा घोटा.
**बुटी देणें** चोरून उत्तेजन देणें.
**बुटीदार, बुटेदार** (वि.) वेलबुटी वगैरे चित्रें काढलेला.
**बुटकणा—ला** (वि.) बुटका, ठेंगणा.
**बुटें** (न.) गाडीच्या आसावरची फळी.
**बुटेखीळ** (स्त्री.) गाडीचें बुटें व कणा यांना जोडणारी खीळ.
**बुट्टा** (वि.) ठेंगणा; (पु.) ठिपका.
**बुट्टीदार** (वि.) ज्यावर वेलबुट्टी वगैरे नक्षी काढली आहे असें.
**बुंठण** (न.), **बुंठा** (पु.) बुंधा, खुंट.
**बुडकणें** (क्रि.) पाण्यांत बुड्या मारणें.
**बुडकली** (स्त्री.) बुडी.
**बुडकी** (स्त्री.)नदीच्या कांठीं पाणी साचण्यासाठीं केलेली खाच; बुडी.
**बुडकुली** (स्त्री.), **बुडकुलें** (न.) लहान तपेली, तामलें. [मुळाकडचा भाग.
**बुडखा** (पु.) झाडाच्या खालचें अग्र;
**बुडण** (स्त्री.) बुडण्याची जागा; नुकसान, तोटा.
**बुडणूक** (स्त्री.) बुडणें; नुकसानी.
**बुडणें** (क्रि.)जाणें; व्याप्त होणें; तोटा येणें.
**बुडता** (वि.) बुडणारा; ऱ्हास पावत चाललेला. **बु० चा पाय खोलांत**—विपत्ति यावयाची असली कीं माणसाची वाईट गोष्टींकडे अधिक प्रवृत्ति होते.
**बुडता काळ** (पु.) ऱ्हासकाळ.
**बुडता पाया** (पु.) ऱ्हासाचा आरंभ.
**बुडबुड** (स्त्री.) तोंडाची पुटपुट.
**बुडबुडणें** (क्रि.) पुटपुटणें.
**बुडबुडा**(सं. बुद्बुद पु.) पाण्याचा फुगा.
**बुडवणा** (वि.) बुडविणारा. [फसविणें.
**बुडवणी, बुडवणूक** (स्त्री.) बुडविणें;
**बुडविणें** (क्रि.) बुडण्यास लावणें; आंत घालणें; नाश करणें; घालविणें.
**बुडव्या**( वि.) बुडविणारा. [वृक्ष.
**बुडसळ** (प्रा. पु.) पानें झडून वाळलेला
**बुडस्थळ** (न.) घाडसाचें, धोक्याचें, नुकसानीस कारण होण्यासारखें काम; नुकसान, नाश.
**बुडी**(स्त्री.)बुद्धिपुरःस्सर पाण्यांत शिरणें, बुटकुळी; कांहीं काळ देशांतरीं जाऊन राहणें.
**बुंडी** (वि.) कडवा; दुष्ट.
**बुडीत** (वि.) नुकसानीचें. **बु० खर्च**—ज्याचा मोबदला मिळावयाचा नाहीं असा खर्च; **बु० खातें**—नुकसान खातें.
**बुडीद** (न.) लंवक; ओळंबा.
**बुडील** (वि.) बुडाकडचा, खालचा.
**बुडूख** (न.) बुंधा; मुळखंड, बुडखा.
**बुढढा** (वि.) म्हातारा; वयस्क.
**बुढी** (स्त्री.) भाल्याचा बुंधा.
**बुणगा** (वि.) लहान, ठेंगू.
**बुणगी** (स्त्री.) बाजरीचें बोंड; टोपण.
**बुणगें** (न.) सैन्याबरोबरचे अवांतर लोक.
**बुत** (फा. पु.) मूर्ति. **बु०परस्त** (वि.)—मूर्तिपूजक; **बु०फरोश** (वि.)—मूर्तीचा विक्रय करणारा; **बु०शिकन्** (वि.)—मूर्तिभंजक. [पदर.
**बुत**(पु. स्त्री.) आच्छादन, घुमट, पडदा;
**बुतका** (पु.) गुद्दा, ठोसा.
**बुतारा** (पु.), **बुतारी** (स्त्री.) केरसुणी.
**बुंथ** (पु.), **बुंथी** (स्त्री.) घुंगट.

**बुथड** (प्रा. न.) बुंगट.
**बुथारी** (स्त्री.) झाडणी, केरसुणी.
**बुथी** (प्रा. पु.) घुंगट, बुरखा.
**बुंद** (न.) बूड, तळ; (हिं. पु.) कॉफीच्या झाडाचें फळ; (सं. विंदु पु.) थेंब; (वि.) सुरेख; अतिशय अप्रतिम.
**बुंदकडा, बुंदखडा** (वि.) सुंदर, देखणा.
**बुदकणें** (क्रि.) गुद्दे मारणें.
**बुदका** (पु.) बुतका, गुद्दा, ठोसा.
**बुंदका** (पु.) थेंब; ठिपका;. (वि.) लहान.
**बुंदकी** (स्त्री.) लहान ठिपका.
**बुदगुली** (प्रा. वि.) लहान. [ मोहरें.
**बुदबळ** (सं. बुद्धिबल न.) एक खेळ; त्यांतलें
**बुदला** (पु.), **बुदली** (स्त्री.), **बुदलें** (न.) बुधला, बुधली, बुधलें पहा.
**बुंदी** (स्त्री.) एक पक्वान्न.
**बुंदेला** (पु.) बुंदेलखंडाचा रहिवासी.
**बुद्बुद** (सं. पु.) बुडबुडा; (स्त्री.) बुडबुड येण्यासारखी स्थिति.
**बुद्दा** (पु.) शक्तिपात; (अ.) संख्या, नग.
**बुद्ध** (सं. वि.) ज्ञाता; जागृत झालेला; विष्णूचा नववा अवतार.
**बुद्धि** (सं. स्त्री.) ज्ञानशक्ति, मति; धारणाशक्ति; जाणीव; निश्चयरूप अंतःकरणवृत्ति. **बु० फाकणें**—डोक्यांत गोंधळ उडणें; **आधीं बु० जाते मग भांडवल जातें**—आधीं मनुष्य चुकतो तेव्हां पुढें त्याचा नाश होतो.
**बुद्धिगम्य** (सं. वि.) बुद्धीनें जाणतां येण्याजोगें.
**बुद्धिग्राह्य** (सं. वि.) बुद्धीला ग्रहण करतां येण्यासारखा. [ पणा.
**बुद्धिचापल्य** (सं. न.) बुद्धीचा तरतरीत-
**बुद्धिपुरःस्सर, बुद्धिपूर्वक** (अ.) मुद्दाम; जाणूनबुजून. [ बळ पहा.
**बुद्धिबळ** (सं. न.) बुद्धीचीशक्ति; बुद-
**बुद्धिभेद** (सं. पु.) विचारांत बदल.
**बुद्धिभ्रंश** (सं. पु.) भ्रम.
**बुद्धिमांद्य** (सं. न.) बुद्धीचा जडपणा.
**बुद्धिमान्** (सं. वि.) तीव्र बुद्धीचा, हुशार, तरतरीत.
**बुद्धिवाद** (सं. पु.) उपदेश, सल्ला.
**बुद्धिवादी** (सं. वि.) बुद्धि हीच ज्याच्या कामाची प्रेरणा आहे असा.
**बुद्धीचा खंदक** पुरा मूर्ख.
**बुद्धया** (अ.) मुद्दाम, जाणूनबुजून.
**बुद्धख** (फा. बुजुर्ग वि.) बुद्धीनें व अनुभवानें प्रौढ; एकाच नांवाच्या दोन गांवांत जें मोठें असेल तें.
**बुद्रुक-ख** (फा. बुजुर्ग वि.) पूज्य, सन्मान्य; वडील; पोक्त; एकाच नांवाच्या दोन गांवांपैकीं जें अधिक मोठें असेल तें. (लहान गांवाला 'खुर्द' म्हणतात).
**बुध** (सं. पु.) एक ग्रह; (वि.) शहाणा, पंडित.
**बुंध, बुंधा** (पु.) बुडूख, पायथा.
**बुधला** (पु.), **बुधली** (स्त्री.), **बुधलें** (न.) चर्मपात्र, कुपी.
**बुधवार** (पु.) सौम्यवासर.
**बुधा** बुंध पहा.
**बुनणें** (हिं. क्रि.) विणणें.
**बुनादि, बुनादी** (अ.) अनादि काळापासून; (पु.) मूळ स्वभाव (तुका० २३४८); अनादि काळ; (स्त्री.) मूळ हकीकत.
**बुनियाद, बुन्याद** (फा. स्त्री.) मूळ अर्थ—पाया; शक्ति; जोर; वजन, प्रभाव; भांडवल; (वि.) जुना.
**बुबळ, बुबुळ** (न.) नेत्रांतल्या मांसगोलकावरचा काळा भाग. [ आवाज.
**बुभुःकार** (सं. पु.) वानरांच्या ओरडण्याचा
**बुभुक्षा** (सं. स्त्री.) भूक, खाण्याची इच्छा
**बुभुक्षित** (सं. वि.) भुकेला, हपापलेला, गरजू.
**बुर** (प्रा. वि.) घामट.
**बुरका, बुरखा** (अर. पु.) तोंडावरचा पडदा किंवा पदर, आच्छादन. [कणीस.
**बुरखुंड** (न.) दाणे काढून घेतलेलें मक्याचें
**बुरग** (प्रा. न.) एक वाद्य.
**बुरंगट, बुरंगुट, बुरंगळ, बुरंगें** (न.) बारीक पाऊस, बुरबुर.
**बुरगुंडा** (तेलगू पु.), **बुरगुंडी** (स्त्री.), **बुरगुंडें** (न.) मुलगा, मुलगी, मुलगें.
**बुरजी** (फा. बुर्द स्त्री.) बुद्धिबळाच्या खेळांत एका पक्षानें दुसऱ्या पक्षाचीं सगळीं मोहरीं मारणें.

**बुरट, बुरंट, बुरंटं** (न.) दाट तृण व झाडें झाडपें असलेलें स्थळ. [ किंवा म्हैस).
**बुरट** (वि.) खुरटी, थोडें दूध देणारी (गाय
**बुरटणें** (क्रि.) बुरसणें, बुरशी येणें.
**बुरटा चोर** (पु.) उचल्या, भट्टेचोर.
**बुरडी** (वि.) बुरुडानें केलेली; (स्त्री.) टोपली. [ केलेलें लोकरीचें वस्त्र.
**बुरणूस** (न.) न विणतां केवळ दाबून
**बुरबुर** (न.) पावसाची थुईथुई; कुरकुर.
**बुरबुरणें** (क्रि.) पाण्याचे तुषार पडणें; फार हळू अस्पष्ट बोलणें.
**बुरबुरी** (प्रा. स्त्री.) पुटपुट (तुका० ३१९). बारीक पाऊस;
**बुरशी** (स्त्री.) बुरा; केनशी, घाण.
**बुरशेल** (वि.) बुरसलेलें.
**बुरसणें** (क्रि.) बुरा येणें.
**बुरसा** (पु.) बुरशी, केनशी, केनी, भुरी, घाण; (वि.) घाणेरडा.
**बुरा** (पु.) बुरसा पहा. [छिद्र; फजिती.
**बुराख** (फा. पु.) मोत्याचें छिद्र; लहान
**बुरांड** (सं. वृहदंड पु.) अंडवृद्धि.
**बुरु** (प्रा. वि.) वाईट; कृतघ्न.
**बुरुंगड, बुरुंगूड** (न.) झिमझिम पाऊस.
**बुरुंजी** (स्त्री.) खुरटलेली बाजरी.
**बुरूज** (फा. पु.) कोटाच्या तटबंदींत जागजागीं केलेली वर्तुळाकार बंदिस्त.
**बुरुड, बुरड** (पु.) कळकाच्या कामट्या वगैरे काढून त्यांच्या सूप, टोपल्या वगैरे जिनसा करणारा.
**बुरूस** (पु.) डोळ्याचा गू.
**बुरें** (हिं. वि.) वाईट.
**बुरेंपण** (हिं. न.) वाईटपणा; जबरदस्ती.
**बुरेहाल** (अर. हिं. पु. अने.) दुर्दशा.
**बुलंगा** (फा. पु.) सैन्यसंभार. [ पक्षी.
**बुलबुल** (फा. पु.) एक अतिशय बोलका
**बुलंद** (फा. वि.) उंच; भव्य.
**बुलहाळ** (हिं. पु.) बुरेहाल; दुर्दशा (प्रभा० पृ० १५९).
**बुलाख** (हिं. पु.) नाकाच्या मधल्या पडद्याला भोक पाडून घालण्याचा एकाच मोत्याचा नथेसारखा अलंकार.
**बुवा** (पु.) बावा, बोवा, सन्मानार्थक नांव.
**बुळकट** (वि.) वेडसर, दुर्बळ.
**बुळकंडी, बुळकांडी** (स्त्री.) हगवण.
**बुळबुळ** (स्त्री.) स्निग्धता, ओशटपणा.
**बुळबुळीत** (वि.) चिकट, चिकण, निसरडें; निःसत्त्व; बेचव.
**बुळा** (वि.) नामर्द, षंढ.
**बू** (पु.) लहान मुलांच्या भाषेंत–बुवाजी, राक्षस, भयंकर प्राणी; दूध; पोकळ दिमाख.
**बूच** (पु. न.) गुडदी, बुटणें.
**बूज** (हिं. स्त्री.) मान्यता; गंजिफांच्या खेळांत लागलेलीं पानें; समजूत.
**बूट** (पु.) भांगेचा तुरा; नक्षी, वेलबुटी; जरीचे बुंद; टूम; नवी कल्पना; पायांत घालण्याचा इंग्रजी तऱ्हेचा चढाऊ जोडा. (स्त्री.) नुकसान.
**बूड** (स्त्री.) तोटा; (न.) तळ. **बूड टेकणें**–बसणें.
**बूंद** (सं. विंदु पु.) थेंब.
**बूर** (पु.) भुस्सा (तुका. १७०७); ग्लानि.
**बृहत्** (सं. वि.) मोठा.
**बृहती** (स्त्री.) गुदद्वार.
**बृहस्पतवार** (पु.) गुरुवार.
**बृहस्पति** (सं. पु.) एक प्रमुख ग्रह; उत्तम वक्ता, देवांचा गुरु.
**बे** (हिं. वि.) दोन; (अ.) नकार; वन.ांचू
**बेअदबी** (फा. स्त्री.) अपमान.
**बेअब्रु** (फा. स्त्री.) दुर्लौकिक.
**बेइज्जत** (स्त्री.) अप्रतिष्ठा.
**बेइतबार** (पु.) गैरविश्वास.
**बेइतल्ला** (वि.) गैरमाहित.
**बेइनसाफ** (वि.) अन्यायाचा.
**बेइमान** (फा. वि.) कृतघ्न, अप्रामाणिक.
**बेइलाज** (फा. वि.) निरुपाय. [ बेधडक.
**बेउजुर** (फा. अ.) कांहीं सबब न सांगतां,
**बेक** (न.) विरोध, निषेध.
**बेकस** (वि.) निःसत्त्व, कमजोर, बेचव.
**बेकानून** (फा. वि.) कायद्याचा भंग करून केलेलें, बेकायदेशीर. [असलेलें.
**बेकायदा** (फा. वि.) नियमाला सोडून
**बेकार** (फा. वि.) निरुद्योगी, रिकामा.
**बेकारी** (फा. स्त्री.) रिकामपण, निरुद्योगिता.

... वाचनालय, ...



**बेकी** (स्त्री.) एकी-बेकीच्या खेळांत—संख्या, दुही; तंटा.
**बेकुबी** (फा. बेवकुफी स्त्री.) मूर्खपणा, गाढवपणा.
**बेकूब** (फा. बेवकूफ वि.) मूर्ख, वेडगळ.
**बेकैद** (फा. वि.) अनियंत्रित; (अ.) स्वैरपणानें.
**बेखर्ची** (फा. वि.) फुकटफाकट; कृपण.
**बेग** (हिं. स्त्री.) लगाम; नियंत्रित सत्ता.
**बेगड** (पु.) टिनचा अतिशय पातळ रंगविलेला पत्रा.
**बेगडा** (प्रा. पु.) सोबती.
**बेगडी** (वि.) बेगड लाविलेलें; दिखाऊ.
**बेगम** (फा. स्त्री.) अविवाहित स्त्री; सन्मान्य स्त्री. [ निश्चितपणा.
**बेगमी** (हिं. स्त्री.) पुरवठा; संग्रह;
**बेगार** (हिं. स्त्री.) सरकारी अधिकाऱ्यांनीं मजुरांना पकडून नेऊन मजुरी न देतां त्यांच्याकडून काम करवून घेणें.
**बेगारी** (पु.) बेगारीसाठीं धरलेला मजूर.
**बेगीं, बेगीन, बेगीनें, बेगून, बेगें** (अ.) त्वरेनें, झटपट, वेगानें.
**बेगुमान** (वि.) बेपर्वा; गर्विष्ठ; उन्मत्त.
**बेगें** (प्रा. न.) खिडकी; गवाक्ष (ज्ञा० ६।२७९). [ (ज्ञा० १५।१०३.)
**बेंच** (प्रा. न.) पानाच्या आंतलें पान
**बेंच** (इं. न.) बसण्याचें बाक; न्यायाधिशांचें मंडळ, न्यायासन.
**बेचक, बेचकी, बेचकळी** (स्त्री.) बेळकी, दोन बोटांमधलें अंतर.
**बेंचक** (प्रा. न.)जुंबाड (ज्ञा० १५।९३).
**बेंचणें, बेचन** (हिं. न.) विक्री. **बे०पत्र** विक्रीखत.
**बेचरक** (अ.) निर्भीडपणें; बेधडक.
**बेंचरणें** (क्रि.)प्रसरणें, अस्ताव्यस्त होणें.
**बेचव** (वि.) रुचिहीन. [ ५।२४०).
**बेचळ, बेचाड** (प्रा. न.) जुंबाड (दा०
**बेचिराख** (फा. बेचिराग वि.) उजाड, वस्तीरहित.
**बेचोबा** (फा. पु.) खांबावांचून असलेला लहान तंबू.
**बेछूट** (वि.) बेपर्वा.

**बेजबाबदार** (वि.) बिनमोसबी; स्वतःवरची जोखीम न ओळखणारा.
**बेजबाबी** (वि.) उद्धट, उर्मट.
**बेजरब** (फा. अ.) निर्भयपणें; त्वरित; कांकूं न करतां.
**बेजबी** (वि.) व्यर्थ.
**बेजार** (फा. वि.) हैराण; दुखणाईत.
**बेजा** (फा. वि.) उधळपट्टीचा, फाजील; अमर्याद; (हिं. वि.) अयोग्य, अकालीन.
**बेजें** (प्रा. न.) युक्ति.
**बेट** (न.) चाहोंकडून पाण्यानें वेष्टिलेला प्रदेश; केळ, वेळू इ. च्या झाडांचा समुदाय; जूट. **बेटीं लावणें**—निश्चित स्वरूप येणें.
**बेटका** (पु.) मळलेला गहूं किंवा जोंधळा.
**बेटकुळी** (स्त्री.) बेडकी; दंड व मांड्या यांच्यांतल्या स्नायूमध्यें उठणारा गोळा.
**बेटणी** (स्त्री.) ठसा.उमटविण्याची क्रिया; सोनाराची अवटी.
**बेटणें** (क्रि.) पत्रा, दागिना इ. वर छाप किंवा ठसा उमटविणें.
**बेटा** (हिं. पु.) मुलगा; (वि.) बाळ.
**बेटाड** (न.), **बेट** (तुच्छार्थी न.) मुळ्यांचें जुंबाड; एकान्त उंचवट्याची जागा; टोळी, संघ, जमाव.
**बेटी** (स्त्री.) मुलगी.
**बेटी व्यवहार** (पु.) सोयरिक.
**बेंड** (न.) उठाणूं; मोठी बेंबी; गुप्त गोष्ट.
**बेडका** (पु.) खाकरा.
**बेडकी** (स्त्री.) बेटकुळी पहा.
**बेडकुळी, बेंडकुळी** (स्त्री.) बेडकी
**बेडर** (वि.) न भिणारा; (न.) ड्रेडनॉट नांवाचें जंगी लढाऊ जहाज.
**बेडा** (प्रा. पु.) असोली सुपारी.
**बेंडा** (पु.) दर्यावर्दी, खलाशी. [ फुगणें.
**बेंडाळणें** (क्रि.) बेंड उठणें, फुगवटा येणें;
**बेडी** (हिं. स्त्री.) शृंखला; बंधन.
**बेंडू** (वि.) ठेंगणा पण धष्टपुष्ट (माणूस किंवा जनावर.)
**बेडूक** (पु.) मंडूक; बेडका.
**बेडें** (न.) गाईचा गोठा; बेळें.
**बेडौल** (हिं. वि.) बेढब.

**बेढंग** (हिं. वि.) दुराचरणी, व्यसनी.
**बेढब** (हिं. वि.) बेडौल, ढवळशाही. [काम.
**बेणणी** (स्त्री.) शेतांतलें गवत काढण्याचें
**बेणबाजा** (इं. बँड सं. वाद्य पु.) इंग्रजी तऱ्हेचें एक वाद्य.
**बेणा** (वि.) उघडा, दिसूं लागलेला.
**बेणारी** (पु.) पंढरीच्या विठोबाच्या पूजेच्या वेळीं मंत्र म्हणून कलशपूजा घेणारा.
**बेणें** (न.) वियाणें.
**बेत** (हिं. पु.) हेतु; योजना; मसलत.
**बेतणें** (हिं. क्रि.) कपड्यासाठीं अंगाचें माप घेणें; (प्रसंग) येऊन पोंचणें.
**बेतबात** (पु.) व्यवस्था.
**बेतवार** (अ.) पद्धतशीरपणें, नेमस्तपणानें.
**बेताल** (वि.) गायनांत-तालाला सोडून असलेलें; अमर्याद; अनियंत्रित, स्वैर.
**बेथु, बेथू** (प्रा. वि.) दांडगा.
**बेथूड** (वि.) कुरूप.
**बेंद** (स्त्री.) दलदल.
**बेदड-डा** (पु.) लुटारू, चोर.
**बेदम** (हिं. अ.) दम कोंडला जाईपर्यंत.
**बेंदर-री** (स्त्री.) एक झुपकेदार गवत.
**बेदरद** (हिं. वि.) बेफिकीर, मागेंपुढें न पाहणारा.
**बेंदाड** (न.) दलदलीची जागा.
**बेदाणा** (फा. पु.) किसमिस; सुकें द्राक्ष.
**बेदाद** (फा. स्त्री.) बेबंदशाही.
**बेदावा** (फा. स्त्री.) सोडचिठ्ठी; हक्क सोडून देणें.
**बेदिक्कत** (फा. अ.) बेलाशक, बिनहरकत.
**बेदिल** (फा. वि.) दुःखी, कष्टी. [बेबनाव.
**बेदिरी** (स्त्री.) उत्साहहीनता, अंतःकरणाचा
**बेदुवा** (अर. बदुआ स्त्री.) अवकृपा.
**बेंदू** (पु.) मेंदू; मगज; फळांतला गीर.
**बेंदूर** (पु.) पोळा; बैलांचें प्रदर्शन करण्याचा सण.
**बेधडक** (हिं. अ.) बिनधोक; निर्धास्तपणें.
**बेना** (प्रा. पु.) बयाणा; (वि.) उघड, स्पष्ट (तुका० २६७).
**बेनेइस्रायल** (पु.) मुम्बई प्रांतांतील ज्यूधर्मी जात.
**बेपरवा** (फा. स्त्री.) निष्काळजी.
**बेपार** (सं. व्यापार पु.) व्यापार उदीम.
**बेपारी** (हिं. पु.) व्यापारी, दुकानदार.
**बेफंदी** (वि.) व्यसनी, दुराचरणी, स्वच्छंदी.
**बेफाम** (फा. वि.) बेसावध, तुफान.
**बेफिकीर** (फा. वि.) निष्काळजी.
**बेंबट** (न.) मोठी बेंबी.
**बेबंद** (फा. वि.) अव्यवस्थित, अराजक.
**बेबंदशाही** (फा. स्त्री.) मोगलाई, अव्यवस्था.
**बेबळ, बेंबळ, बेंबळें** (प्रा. वि.) ढिलें, क्षीण (ज्ञा० १।२१५; तुका० ३२८०).
**बेबाक** (वि.) निःशेष, पूर्ण.
**बेंबारा** (पु.) स्फोट, उघडकीस येणें.
**बेंबी** (स्त्री.) नाभि. बें० च्या देठापासून–अगदीं अंतःकरणापासून.
**बेबुद** (फा. बाबुद पु.) अभाव, नाबूद.
**बेभरंवसा, बेभरोसा** (पु.) अविश्वास.
**बेमान** (फा. बइमान वि.) कृतघ्न.
**बेमार** (फा. वि.) आजारी; माऱ्याचें जेथें चालत नाहीं असा; मजबूत; विपुल.
**बेमारी** (स्त्री.) आजार; दुखणें. [जोगें.
**बेमालूम** (अर. वि.) माहीत न होण्या-
**बेमुरवत** (फा. वि.) निर्भीड.
**बेरकट** (न.) ओशट पदार्थांतला मळ.
**बेरकट** (वि.) बहिरट.
**बेरंग** (फा. पु.) खराबी, मौजचा भंग.
**बेर** (स्त्री.) शेताची आडवी नांगरणी.
**बेरका–की** (वि.) लुच्चा; धूर्त; मिश्र बीजाचा.
**बेरड** (पु.) रामोशी; (स्त्री.) गोंधळ, मिश्रण, गोलंकार. [ (तुका० ४०४४).
**बेरसा** (प्रा. वि.) दांडगा, विचारशून्य
**बेरी** (स्त्री.) ओशट पदार्थांतला मळ, बेरकट; गुळाची मळी; एक प्रकारचें इंग्रजी फळ.
**बेरीज** (स्त्री.) अंकगणितांत—दोन किंवा अधिक सजातीय संख्या एकत्र करून आलेली संख्या.
**बेरोजगारी** (वि.) कामधंदा नसलेला.
**बेल** (सं. बिल्व पु.) बिल्ववृक्ष; त्याचीं दळें; त्याचें फळ. [एकीकडे.
**बेलगामी** (फा. वि.) अनियंत्रित; (अ.)

**बेलटी** (स्त्री.) टाळकें.
**बेलदार** (फा. पु.) पाथरवट; निवळ मातीच्या भिंती वगैरे बांधणारा कामकरी.
**बेलपत्र** (सं. बिल्वपत्र न.) बेलाचें पान. **वस्तूवर बे० ठेवणें**–वस्तूवरचा हक्क सोडणें.
**बेलभंडार** (पु.) शपथ, आणभाक.[४२४).
**बेलवटी** (प्रा. स्त्री.) कुंपण (भाग० ९।
**बेलवल** (स्त्री.) उंचवटयावरील जमीन.
**बेलवात** (स्त्री.) तीन सुतांना पीळ घालून केलेली वात.
**बेला** (पु.) नारळ किंवा बेलफळ आंतून कोरून तयार केलेलें पात्र.
**बेलाग** (वि.) दुःसाध्य; निरुपाय.
**बेलाशक** (अर. अ.) बेधडक; निःशंकपणें.
**बेलिफ** (इं. पु.) नाझराच्या हाताखालचा एक कामगार; समन्स लावणारा व बजावणारा शिपाई किंवा कारकून.
**बेलिया** (हिं. पु.) एक सुगंधि पुष्प; त्याचें अत्तर.
**बेली** (स्त्री.) करवंटी, नरोटी; तांबडया व काळसर सुताच्या चौकटी असलेलें लुगडें. [पैशाची थैली.
**बेलें** (फा. बेला न.) धर्मार्थ काढलेल्या
**बेल्ही** (स्त्री.) कोळपें.
**बेल्हें** (न.) नांगराचा तास.
**बेवकुबी** (फा. स्त्री.) मूर्खपणा.
**बेवकूब** (फा. बेवकूफ वि.) मूर्ख.
**बेवड** (स्त्री.) बीजांची भेसळ; दुसऱ्या धान्याबरोबर त्याच जागीं पेरलेलें उपधान्य.
**बेवडा** (पु.) एक मादक द्रव्य. [दिक्कत.
**बेवसवसा** (फा. अ.) निर्भीडपणें; बिन-
**बेवाडें** (न.) घराचा मजला, माडी.
**बेवारशी** (फा. वि.) ज्यावर कोणाचा वारसा किंवा हक्क नाहीं तो.
**बेवार** (हिं. पु.) देण्याघेण्याचा उलगडा.
**बेवीस** (वि.) बावीस.
**बेश** (फा. वि.) चांगलें, योग्य.
**बेशक** (अ.) बेलाशक; निःसंशय.
**बेशमी** (अ.) नांवानें.
**बेशरम, बेश्रम** (फा. वि.) निर्लज्ज.
**बेशिस्त** (फा. वि.) गैरशिस्त; अव्यवस्थित. [रहित, जड.
**बेशुद्ध** (वि.) धुंद, अचेतन, शुद्ध-बुद्ध-
**बेसक** (प्रा. न.) स्थान, बैठक. [पक्वान्न.
**बेसन** (न.) हरभऱ्याचें पीठ; पिठलें; एक
**बेसर** (प्रा. स्त्री.) नथ; नाकांतली चमकी.
**बेसावध** (वि.) गैरसावध, बेशुद्ध.
**बेसुमार** (फा. बेशुमार वि.) अमर्याद.
**बेसूर** (वि.) बदसूर. [खोल भेग.
**बेहड** (स्त्री.) नाल्याच्या प्रवाहानें झालेली
**बेहडा** (सं. बिभीतक पु.) एक औषधि फळ व त्याचें झाड.
**बेहडा, बेहाडा** (हिं. पु.) खात्यांतले नोकरचाकर, त्यांचा पगार, हुद्दा इ० बद्दलचें तपशीलवार पत्रक.
**बेहत्तनमाल** (अर. पु.) बिनवारसी म्हणून सरकारांत जमा झालेला माल.
**बेहद** (फा. वि.) अमर्याद, अतिशय.
**बेहबुदा** (फा. स्त्री.) भरभराटीची स्थिति; चांगली निगा.
**बेहरस** (फा. वि.) गोंधळलेला; साशंक.
**बेहळा** (पु.) पुंजका, जुडी, झुपका.
**बेहाय** (क्रि. वि.) अतिशय; फार; पुष्कळ.
**बेहाळ** (वि.) शिवराळ; अश्लील.
**बेहुरमत** (फा. वि.) पत घालवून बसलेला.
**बेहेड** (न.) दरी; पाण्याच्या प्रवाहानें पडलेली खळगी.
**बेहेडा** (पु.) बेहडा पहा.
**बेहेत्तर** (फा. बेहतर वि.) ज्यास्त चांगलें.
**बेहेदा** (फा. पु.) बैदा, गोंधळ; बंड.
**बेहोश, बेहोष** (फा. वि.) बेशुद्ध.
**बेळ** (न.) बांबूची काढलेली पातळ चिफळी. [ बेफांटा.
**बेळकें** (न.) झाडाच्या फांद्यांचा चिमटा;
**बेळें** (न.) माणसाला जातां येतां येईल पण गुरांना नाहीं अशा प्रकारची रस्त्याची वगैरे अडवणूक; कुंपणाचा आडा; बेळकें (ज्ञा० १४।५१); काकपद.
**बेळेंबोळें** (न.) लिंगाइतांत–गूळ व भात.
**बैंगण–न** (हिं. न.) वांगें, बैंगणी; (वि.) वांग्याच्या रंगाचें (लुगडें).

**बैंगणी** (हिं. वि.) वांग्यासारख्या रंगाचें.
**बैठक** (हि. स्त्री.) बिछाईत; वसून गाणें; उठवशी; सभा; एकत्र बसणें.
**बैठा** (प्रा. वि.) बसलेला, बसकट.
**बैठा पगार** (वि.) चाकरीशिवाय मिळणारा पगार; पेन्शन.
**बैठा रोजगार** ज्यासाठीं घर किंवा गांव सोडावें लागत नाहीं असा रोजगार.
**बैतनमाल** वेहतनमाल पहा.
**बैतें** (न.) वलुतें.
**बैद** (हिं. पु.) लुटारू. [ तंटा.
**बैदा** (हिं. पु.) दंगा, फंदफितूर, भानगड,
**बैदुल** (पु.) खेळण्याची गोटी.
**बैरक** (अर. स्त्री.) निशाण; झेंडा; एका निशाणाखाली गोळा केलेलें सैन्य.
**बैरागी** (पु.) विरक्त पुरुष, गोसावी.
**बैल** (पु.) खोंड, वृषभ, वसू. [कष्टाचें काम.
**बैलपाळणा** (पु.) त्रासदायक कंटाळवाणें
**बैला** (पु.) डोक्यावरचा गवताचा वगैरे भारा टेकण्यासाठीं केलेली व्यवस्था; काठ्यांचें ओझें नेण्यासाठीं केलेलें लाकडाचें साधन; तिफणीची दोरी. [ सत्कार.
**बैसक, बैसकार** (स्त्री.) बिछाईत; बैठक;
**बैसणी** (प्रा. स्त्री.) बैठक. [ बसणें.
**बैसणें** (प्रा. न.) बैठक, आसन; (क्रि.)
**बैसतखेवो** बसल्याबरोबर.
**बोई** (स्त्री.) लसणाची पाकळी; लिंबाची फोड; दह्याची कवडी.
**बोकड** (पु.) बकरा. [ घास, बकाणा.
**बोकणा** (पु.),**बोकणी** (स्त्री.) मोठा तोंडभर
**बोकंदळ** (पु.) धिंगाणा, धुडगूस, धुमश्चक्री; (वि.) धष्टपुष्ट, अगडबंब.
**बोकमार** (फा. न.) मोठें पिस्तुल.
**बोकलणें, बोकळणें** (क्रि.) इकडे तिकडे भटकणें; धिंगाणा घालणें; माजणें; प्रस्थ वाढणें; सपाटून खाणें.
**बोकसा-सें** (पु.न.) गांठोडें, ओझें, गठ्ठा;
**बोका** (पु.) मांजरांतला नर; गलेलठ्ठ. खाऊन माजलेला.
**बोकांडी** (स्त्री.), **बोखांडें** (न.) मानगुटी.
**बोकाणा, बोकांदा** (पु.) मोठा घास.
**बोकाळणें** (क्रि.) माजणें, नाचणें, वागडणें.
**बोकेसंन्याशी** (पु.) दांभिक संन्यासी.
**बोंखरी, बोखी** (स्त्री.) नूतन अंकुर.
**बोखारा** (पु.) बुरखा.
**बोगदा** (पोर्तु० आवोगदा फा. बगाद पु.) भितीतलें खिंडार; तळघर; भोंक; डोंगरांतून आरपार गेलेला रस्ता.
**बोंगा** (पु.) निऱ्यांचा उंचवटा; पोटाचें डेरकें. **अंगापेक्षां बोंगा मोठा**—वस्तुस्थितीपेक्षां अवडंबरच मोठें.
**बोंगा, बोंगाडा** (वि.) धष्टपुष्ट, मोठा; स्थूल; मंद, मंदबुद्धि, वेडसर. [ नु० ).
**बोगारणी** (प्रा.स्त्री.) फोडणी (सोहि० महद-
**बोगोणी, बोगणी, बोघणी, बोघोणी** (स्त्री.), **बोंघणें, बोघोणें, बोंघोणें** (न.) एक प्रकारचें भांडें.
**बोंच** (न.) कांटा इ. टोंचल्यामुळें झालेली जखम किंवा पडलेलें भोंक.
**बोचक** (सं. बहुवाचक वि.) वडवडया.
**बोचकडा, बोचकुरा, बोचकाडा, बोचकारा** (पु.) ओरखडा.
**बोचकणें** (क्रि.) टोंचणें, बोचणें.
**बोचका** (पु.) लचका, तुकडा.
**बोचका** (पु.), **बोचकें** (न.) गाठोडें.
**बोचकारणें** (क्रि.) ओरखडणें.
**बोचखिंड** (स्त्री.) दांतांतली खिंड.
**बोचणी** (स्त्री.) टोंचणी.
**बोचणें** (क्रि.) टोंचणें; क्षत करणें. [पडलेला.
**बोचरडा, बोचरा, बोथरा** (वि.) दांत
**बोचा** (पु.) गुदद्वार.
**बोचिरें** (प्रा. वि.) दंतहीन.
**बोचेरा** (वि.) तीक्ष्ण अग्राचा.
**बोज** (हिं. पु.) वजन, महत्त्व, प्रतिष्ठा.
**बोजड** (वि.) अवजड, बेतावाहेरचें.
**बोजवार** (पु.) लोणच्याचा मसाला.
**बोजवारा** (पु.) वजन नाहींसें होणें; दुर्दशा, गोंधळ.
**बोजा** (हिं. पु.) ओझें ; मद्य.
**बोट** (न.) अंगुळ; आगबोट. **बोटें मोडणें**—जागच्या जागीं चरफडणें; **बोटावर नाचविणें**—हवें तसें खेळविणें, पूर्णपणें ताब्यांत ठेवणें; **बोट शिरकणें**—चंचुप्रवेश होणं.

**बोटका** (वि.) बुटका, ठेंगणा; बोथट.
**बोटखत** (न.) हिशेबांत निरनिराळ्या खात्यांचें केलेलें एक पत्रक.
**बोटधारी** (न.) बोटभर किंवा अरुंद कांठाचें वस्त्र.
**बोटवा** (पु.) गव्हला.
**बोटवात** (स्त्री.) एक प्रकारची देवापुढें जाळण्याची वात.
**बोटूक** (न.) आंखुड चिंच; एक चिंचोका असलेल्या प्रमाणाचा चिंचेचा तुकडा.
**बोटचेपा** (वि.) बोटानें सहज चेपतां येईल असा, (भात, फळ इ.); अगदीं थोडया श्रमानें शेवटास जाईल इतक्या पल्ल्यापर्यंत आणून ठेविलेलें (काम, व्यवहार इ.).
**बोड** (न.) डोकें; टाळकें.
**बोंड** (न.) बीजकोश, अग्रभाग; भजें.
**बोडका** (वि.) उघडया डोक्याचा.
**बोडकादेवी** (प्रा. स्त्री.) विधवा (तुका० ४०३५).
**बोडकी** (स्त्री.) केशवपन केलेली विधवा.
**बोडकें** (न.) डोकें.
**बोडण** (न.) दूध, दहीं, वडे, भात, मध इ० पदार्थांचें मिश्रण; चार सवाष्णी व एक कुमारिका यांनीं एकत्र बसून करावयाचें असें एक नैमित्तिक कृत्य; मोटणें.
**बोडणें** (क्रि.) मुंडणें; वपन करणें; ठकवून लुटणें; वाक्ताडन करणें.
**बोडंती** (स्त्री.) हजामत, खरडपट्टी.
**बोडद** (इ. बोर्ड न.) जहाजाची किंवा बोटीची बाजू.
**बोंडलें** (न.) लहान मुलास दूध पाजण्याचें विशिष्ट आकाराचें लहान पात्र.
**बोडा** (पु.) (अशिष्ट) पुरुषाचें जननेंद्रिय.
**बोंडा** (पु.), **बोंड** (स्त्री.) पाण्यांत मारलेली बुडी.
**बोंडी, बोंडशी** (स्त्री.) अग्रभाग.
**बोण** (न.) गव्हाची शिजविलेली कणिक मोरो० मंत्रभाग० ४।११७).
**बोंथ** (स्त्री.) बुरखा; तोंडावरचा पदर.
**बोथट** (वि.) धार बसलेलें.
**बोथटणें** (क्रि.) धार बसणें.
**बोथरखिंड** (स्त्री.) दांताच्या ओळींत पडलेली खिंड.
**बोथरणें** (क्रि.) झोपेंत बरळणें (मुक्ते० रामा० ६।१५८); गर्जणें.
**बोथरा** (वि.) दांत पडलेला, बोचरा.
**बोथलें** (न.) सासरीं जाण्यास निघालेल्या मुलीबरोबर दिलेल्या वस्तूंचें बोचकें.
**बोथाटी** (स्त्री.) काठीच्या दोन्ही टोकांस चिंध्याचे गोळे बांधून ती काठी फिरविण्याचा खेळ.
**बोथारा** (पु.), **बोथारी** (स्त्री.) बुरखा, तोंडावरचा पडदा. [ बुंथी, बुरखा.
**बोंथी** (स्त्री.) टोक; चितार्‍याची कुंचली;
**बोद** (वि.) बेचव, नीरस; मंद.
**बोंदर** (न.) जीर्ण वस्त्र.
**बोंदरा** (वि.) निष्काळजी, गचाळ.
**बोंदरी** (स्त्री.) तरटाची मोठी पिशवी.
**बोध** (सं. पु.) उपदेश; ज्ञान; (प्रा.) ब्रह्म; मार्ग.
**बोधक** (सं. पु.) समजावून सांगणारा; जागृति करणारा. [कोंडा.
**बोधणें** (न.) मूग, उडीद, मटकी यांचा
**बोधणें** (क्रि.) जाणणें, समजावणें; उपदेश करणें.
**बोधन** (सं. न.) उपदेश करणें; जागृति.
**बोधपर** (सं. वि.) उपदेश करणारें.
**बोधला** (पु.) लठ्ठ आणि थिलथिलीत अंगाचा ठेंगणा माणूस.
**बोधा** (प्रा. पु.) उपदेश; मार्ग.
**बोधावा** (पु.) शुभवर्तमान(एक० ३१८१).
**बोधिनी** (सं. स्त्री.) बोध करून देणारी; समजावून देणारी; विष्णूच्या जागृतीचा दिवस (कार्तिक शु. ११).
**बोनस** (पु.) बक्षीस; बक्षीस म्हणून दिलेली जास्त रक्कम.
**[बो]नें** (न.) नैवेद्य, अन्न; मृदंगाला लावण्याचा कणकेचा गोळा.
**[बो]ंब** (स्त्री.)तोंड व हात यांनीं करण्याचा शंखध्वनि; हाकाटी.
**[बो]नटा** (पु.) बोकणा.
**[बो]बडकांदा** (वि.) बोबडा.

**बोबडा** (वि.) अस्पष्ट उच्चार करणारा.
**बोंबडा** (पु.) वुडवुडा.
**बोबडी** (स्त्री.) अस्पष्ट वाणी. **बो० वळणें**--भयानें जीभ आखडल्यामुळें तोंडांतून स्पष्टोच्चार न निघणें.
**बोंबणें** (प्रा. क्रि.) बुजवून टाकणें, लिपणें.
**बोंबलणें** (क्रि.) बोंब मारणें; कार्य फसणें.
**बोंबलपट्टी** (स्त्री.) मोठी ओरड.
**बोंबल्या** (वि.) बोंबलणारा; आरडाओरड करणारा.
**बोंबल्या गणेश** (पु.) वाचाळ, बटवटचा; गुप्त गोष्ट फोडणारा; रड्या; अभद्र-भाषी.
**बोंबळ** (न.) डोळ्यांतलें बुबुळ.
**बोंबळी** (फा. स्त्री.) बोंब (तुका० २२८९).
**बोंबाणें** (प्रा. क्रि.) मोठ्यानें बोलणें; हाक मारणें. [ आरडाओरड.
**बोंबाबोंब** (स्त्री.) भयंकर हाकाटी,
**बोंबाळ** (पु.) गोंवळ, चळवळ; (वि.) बंबाळ, रक्ताळलेला. [ मासा.
**बोंबील** (पोर्तु. बॉमेल पु.) वाळविलेला
**बोभाइणें** (प्रा. क्रि.) मोठ्यानें हाक मारणें; ओरडणें.
**बोभाट, बोभाटा** (पु.) कागाळी, गवगवा; (प्रा.) व्याख्यान, गांवगुंडकी.
**बोभाटणें** (क्रि.) बोभाट करणें, वाजणें (दा० १।२।२३).
**बोभाणें** (क्रि.) मोठ्यानें बोलावणें.
**बोभावणें** (क्रि.) घुबडानें किंवा कोल्हयानें आवाज करणें.
**बोम** (पु.) पोत्यांतला धान्याचा मासला काढण्याचा टोकदार लांबट चमचा.
**बोय** (फा. वा. स्त्री.) वास, गंध; दहीं; लसणाची किंवा नारिंगाची पाकळी.
**बोयारा** (इं. बोई पु.) समुद्रांत खडकाची किंवा धोक्याची जागा दाखविण्यासाठीं ठेवलेलें तरतें.
**बोर** (सं. बदरी न.) एक फळ.
**बोरकूट** (न.) बोराच्या वाळलेल्या फळाची भुकटी.
**बोरपी, बोरीप** (पु.) बहुरूपी.
**बोरबार-रा** (प्रा. पु.) खटपट.
**बोरशी-सी** (स्त्री.) बुरा; दांतावरील घाण.
**बोरा, बोऱ्या** (हिं. पु.) बारदान.
**बोरांटी** (प्रा. स्त्री.) बोरींचे कांटे.
**बोंरिया** (प्रा. पु.) बोऱ्या (शिंदी, ताड इ.च्या पात्यांची आंथरी). [ चटई.
**बोरी** (स्त्री.) लांब पिशवी; बोराचें झाड;
**बोरू** (पु.) बरू.
**बोर्ड** (इं. पु.) फळा; सभा; मंडळ.
**बोर्डिंग** (इं. न.) भोजनवसतिगृह.
**बोऱ्या** (पु.) शिंदीच्या पानांची अंथरी; कणगी. **बोऱ्या उडणें**–फजिती होणें.
**बोल** (पु.) शब्द, वाणी; तोंडच्या गप्पा; दोषारोप; सतारीच्या तारेवर प्रहार केल्यानें निघणारा नाद. **बोल ठेवणें**–दोष लावणें; **बोलांत बोल नसणें**–बोलण्यांत मेळ नसणें.
**बोलका, बोलगाडा, बोलघेवडा** (वि.) वाचाळ, बटबट करणारा.
**बोलणें** (क्रि.) शब्द उच्चारणें; रागें भरणें.
**बोलणें चालणें** (न.) संभाषण, व्यवहार, दळणवळण.
**बोलता** (प्रा. वि.) बोलणारा.
**बोलती** (प्रा. स्त्री.) वाणी (ज्ञा० यो० १।५४)
**बोलपट** (पु.) ध्वनियुक्त चित्रपट.
**बोलबाला** (हिं. पु. स्त्री.) उत्कर्ष, भरभराट; विजय.
**बोलभांड** (वि.) आवेशानें बोलण्याच्या व भांडण्याच्या कामांत पटाईत.
**बोलभाक** (पु.) वचन; शपथ; करार.
**बोलविणें, बोलाविणें** (क्रि.) हाक मारणें; (न.) निमंत्रण.
**बोलवा** (पु.) वदंता.
**बोलशेव्हिक** (इं. पु.) रशियांतील अत्यंत जहाल प्रतीच्या क्रान्तिकारक वर्गांतला मनुष्य; बहुमतवाला पक्ष.
**बोलाचाल, बोलाचाली** (स्त्री.) भाषण; वाद; भांडण. **बोलाफुलास गांठ पडणें**–खरोखर कार्यकारणसंबंध नसतां केवळ यदृच्छेनें तसा संबंध दाखविणाऱ्या दोन गोष्टी एकाच वेळीं घडणें.
**बोलिंगड** (प्रा. वि.) बोलका.
**बोली** (स्त्री.) भाषा; करार; वचन.

**बोलू** (प्रा. पु.) बोल, शब्द.
**बोलून चालून** (अ.) उघड उघड; मुद्दाम.
**बोवण, बोवणें** (न.) मृदंगाला लावण्याचा कणकेचा गोळा.
**बोवलें** (प्रा. न.) बोहलें.
**बोंवा** (पु.) लसणाची पाकळी.
**बोवा** (पु.) बावा, बुवा.
**बोस** (पु.) मनांतल्या मनांत कुढणें; द्वेष.
**बोहचक** (सं. बहुवाचक वि.) वाचाळ.
**बोहणी, बोहनी** (सं. भवानी स्त्री.) पहिली रोखीची विक्री. [ ८५७).
**बोहरणें** (प्रा. क्रि.) नाश पावणें. (एक०
**बोहरणी** (स्त्री.) केरसुणी.
**बोहरी, बोहिरी** (प्रा. पु.) नाश (तुका० १०५३); वणवा; अग्नि (ज्ञा०१८।५५५); भस्म (भा० ५।४८१).
**बोहरा, बोहरी** (पु.) स्टेशनरी सामान, लोखंडी सामान इ. विकणारी मुसलमानांची एक जात.
**बोहली, बोहिली** (प्रा. स्त्री.) बोली, शब्द (ज्ञा० ९।२१५).
**बोहलें** (न.) बहुलें पहा.
**बोहारीण** (स्त्री.) दारावर जुनीं वस्त्रें घेऊन त्यांवर नवीं भांडीं देणारी बाई.
**बोळ** (प्रा. पु.) एक अलंकार (रं०यो० ८।१६८); एक औषध; अरुंद गल्ली; (वि.) तांबडा (मोरो० कृष्ण० ३२।८).
**बोळकें, बोळकूल** (न.) मातीचें लहान पात्र. **तोंडाचें बोळकें होणें**—सगळे दांत पडणें.
**बोळणें** (क्रि.) दाट होणें; स्मरण नाहींसें होणें; बोथटणें; (भोंक) मोठें होणें.
**बोळंबोळ** (अ.) कांठोकांठ.
**बोळवण-णी** (स्त्री.) पाठवणी; बिदागी.
**बोळा** (पु.) चिरगुटाची गुंडाळी. **बोळा फिरविणें**—पुसून काढणें.
**बोळावणें** (क्रि.) पोहोचविण्यास जाणें; पाठविणें; नाहींसें करणें.
**बोळावा** (प्रा. पु.) पोचविण्यासाठीं बरोबर आलेलीं माणसें; सोबती; लवाजमा (तुका० १२६६); बोळवणी; बिदागी.
**बोळी** (स्त्री.) बोळकें.

**बौटें** (प्रा. वि.) फार, पुष्कळ.
**बौढणें** (प्रा. क्रि.) लयास जाणें (अमृ० (९।२८).
**बौद्ध** (वि.) बुद्धधर्मी.
**बौहडा** (प्रा. स्त्री.) वृष्टि (ज्ञा०११।६७०).
**बौहे** (प्रा. वि.) पुष्कळ.
**ब्याद, ब्याध** (सं. व्याधि स्त्री.) पीडा; त्रासदायक गोष्ट; व्रात्य माणूस.
**ब्यारिस्टर** (इं. पु.) अव्वल प्रतीचा सनदी वकील.
**ब्याहाडा** (पु.) एक औषधी फळ.
**ब्युराक्रसी** (इं. स्त्री.) शिरजोर अधिकारीवर्ग; नोकरशाही.
**ब्र** (पु.) चकार शब्द, अवाक्षर.
**ब्रश** (इं. पु.) कुंचला-ली.
**ब्रह्म** (सं.न.) ईश्वर; परमात्मा.
**ब्रस्पतवार** (पु.) गुरुवार.
**ब्रह्मकटाह** (सं. पु.) ब्रह्मांड. [ कर्तव्यें.
**ब्रह्मकर्म** (सं. न.) ब्राह्मणांचीं धार्मिक
**ब्रह्मगांठ** (सं. ब्रह्मग्रंथि स्त्री.) अतिशय घोटाळ्याची गाठ; नेमानेम; जानव्याची गाठ.
**ब्रह्मगोळ** (सं. पु.) ब्रह्मांड.
**ब्रह्मग्रह** (सं. पु.) ब्रह्मराक्षस. [ घोटाळा.
**ब्रह्मघोळ** (प्रा. पु.) वर्णसंकर. अत्यंत
**ब्रह्मचर्य** (सं. न.) चार आश्रमांपैकीं पहिला; स्त्रीसंग न करण्याचें व्रत.
**ब्रह्मचारी** (सं. पु.) अविवाहित मनुष्य; विवाहित असून इंद्रियदमन करून राहणारा; सोडमुंज न झालेला ब्राह्मण.
**ब्रह्मटाळी** (स्त्री.) योगाचा एक प्रकार; रेंगाळलेलें काम. [तेजस्विता.
**ब्रह्मतेज** (सं. न.) ब्राह्मणाच्या अंगची
**ब्रह्मदेव** (सं.पु.) ब्रह्मा; त्रिमूर्तींपैकीं पहिला.
**ब्रह्मद्रोह** (सं. पु.) ब्राह्मणांचा द्वेष.
**ब्रह्मनंदिनी** (सं. स्त्री.) सरस्वती. [स्थान.
**ब्रह्मपद** (सं. न.) अतिशय उच्च पद किंवा
**ब्रह्मबंधु** (सं. पु.) भ्रष्ट ब्राह्मण.
**ब्रह्मयज्ञ** (सं. पु.) वेदाध्ययन; ऋषि-यज्ञ.
**ब्रह्मरंध्र** (सं. न.) तालुस्थानचें छिद्र.
**ब्रह्मराक्षस** (सं. पु.) पिशाच झालेला विद्वान् ब्राह्मण.

**ब्रह्मरेखा, ब्रह्मरेषा**(स्त्री), **ब्रह्मलिखित** (न.), **ब्रह्मलेख** (पु.) दैवीं लिहिलेली कधीं न टळणारी गोष्ट.
**ब्रह्मर्षि** (सं. पु.) ब्राह्मण असून ऋषि.
**ब्रह्मलोक** (सं. पु.) सत्यलोक.
**ब्रह्मवीणा** (सं. पु.) एक प्रकारचें वीणावाद्य.
**ब्रह्मवृंद** (सं. पु.) ब्राह्मणांचा समुदाय, ब्राह्मणांची सभा.
**ब्रह्मसमंध** (पु.) ब्राह्मणाचें पिशाच.
**ब्रह्मसाक्षात्कार** (सं. पु.) ब्रह्मदर्शन; ब्रह्मप्राप्ति. [ सुधारक पंथ.
**ब्रह्मसमाज** (पु.) वंगाल्यांतील एक समाज
**ब्रह्मसूत्र** (सं. न.) यज्ञोपवीत. [ कर्ज;
**ब्रह्मस्व** (सं. न.) ब्राह्मणाची मालमत्ता;
**ब्रह्महत्या** (सं. स्त्री.) ब्राह्मणाचा वध.
**ब्रह्मज्ञान** (सं. न.) ब्रह्मविषयक ज्ञान; शहाणपणाच्या गोष्टी.
**ब्रह्मा** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**ब्रह्मांड** (सं. न.) विश्व.
**ब्रह्मानंद** (सं. पु.) ब्रह्मप्राप्तीपासून होणारा आनंद; अतिशय आनंद. **ब्रह्मानंदीं टाळी लागणें**—सच्चिदानंदस्वरूपांत तल्लीन होणें.
**ब्रह्मी** (सं. स्त्री.) एक औषधि वनस्पति.
**ब्राह्म** (सं. पु.) ब्रह्मसमाज नांवाच्या पंथांतला मनुष्य.
**ब्राह्मण** (सं. पु.) ब्राह्मण, द्विज, विप्र. **ब्रा० घालणें**—ब्राह्मणांस भोजन देणें.
**ब्राह्मणज़न** (सं. पु.) पाणक्या किंवा धोतरबडव्या ब्राह्मण.
**ब्राह्मणभोजन, ब्राह्मणसंतर्पण** (सं. न.) ब्राह्मणांस केलेलें अन्नदान.
**ब्राह्मणाऊ** (वि.) ब्राह्मणांच्या तऱ्हेचा.
**ब्राह्मणी** (स्त्री.) ब्राह्मण स्त्री; (वि.) ब्राह्मणाची. [ ब्राह्मणपणा.
**ब्राह्मण्य** (सं. न.) ब्राह्मणांचा समुदाय;
**ब्राह्ममुहूर्त** (सं. पु.) पहाटेच्या चार घटका रात्रीपासून दोन घटका रात्रीपर्यंतचा काळ.
**ब्राह्मविवाह** (सं. पु.) विद्वान् वरास अलंकृत कन्यादान करण्याची विवाहपद्धति.
**ब्राम्ही** (स्त्री.) एक औषधी वनस्पति; मनाची एक परमोच्च अवस्था.
**ब्रीद** (सं. न.) प्रतिज्ञा; शील; बाणा; विवक्षित गोष्टीच्या बाण्याचें दर्शक चिन्ह; बिल्ला, पदक, कडें वगैरे.
**ब्रेक** (इं. पु.) गाडी थांबविण्याचें साधन; अडकण.
**ब्रेड** (इं. स्त्री.) पाव.
**ब्लँकेट** (न.) गरम पांघरूण; घोंगडी.
**ब्लाऊज** (पु.) एक प्रकारचें पोलकें.
**ब्लॉक** (पु.) जागा; लाकडाचा ओंडा; चित्राचा ठसा.
**ब्रूस** (इं. ब्रश पु.) कुंचा; कुंचली.

---

# भ

भ मराठी व्यंजनमालेंतील चोविसावें व्यंजन.
**भ** (सं. न.) नक्षत्र; राशि.
**भक** (सं. भक्ष पु. न.) पिशाचाला अर्पण केलेलें अन्न; बळि.
**भकणें** (क्रि.) बहकणें.
**भकभक** (स्त्री.) भूक; आग; वखवख.
**भकाट** (सं. भग न.) पोटाची खळगी.
**भकाटी** (स्त्री.) पोटाची खळगी; (प्रा. स्त्री.) निंदा.
**भकांडा** (पु.), **भकांडी** (स्त्री.) झोकांडी.
**भकाद, भकांद, भकांध** (प्रा. स्त्री.) बहकावण (दा० ५।२।५७).
**भकाविणें**(क्रि.) भलतीकडे नेणें; गोंधळविणें.
**भकास** (वि.) उजाड, उदास.
**भक्कम** (वि.) मजबूत; पुष्कळ.
**भक्त** (सं. पु.) निष्ठावंत उपासक; भात.
**भक्तवत्सल** (सं. वि.) भक्तावर अति प्रेम करणारा.
**भक्ति** (सं. स्त्री.) निष्ठा; श्रद्धा; आवड.
**भक्तिमान्** (सं. पु.) श्रद्धायुक्त.
**भक्तिमार्ग** (सं. वि.) देवाच्या भक्तीच्या द्वारें मोक्षसाधन घडतें असें मत; त्या मताचा संप्रदाय.
**भक्तियोग** (सं. पु.) उपासना.
**भक्तीण** (सं. स्त्री.) भक्ति करणारी स्त्री.

**भग** (सं. न.) क्षत; छिद्र; ऐश्वर्य; स्त्रियांचें उपस्थ. [ (स्त्री.) भांग.
**भंग**(सं. पु.) तरंग;लाट;नाश; मोड; अपाय;
**भंगट, भंगड** (वि.) भांग पिणारा.
**भगण** (सं. पु.) नक्षत्रसमुदाय.
**भंगणी** (प्रा. स्त्री.) धैर्यभंग.
**भंगणें** (क्रि.) मोडणें; छिन्न होणें, नाशविणें.
**भगंदर** (सं. पु.) एक रोग.
**भगत** (सं. भक्त पु.) आराधी, उपासक.
**भगदड, भगदळ, भगदाड** (न.) मोठें भोक; खिंड.
**भगदेव** (सं. पु.) वाहेरख्याली मनुष्य.
**भगभग** (स्त्री.) आग, दाह; पीडा.
**भगभगाट** (पु.) फार व सतत चाललेली भगभग किंवा आग. [ करणारा.
**भगभगीत** (वि.) उष्ण; तिखट; दाह
**भगभाग्य** (सं. न.) भांडखाऊपणानें मिळविलेलें द्रव्य किंवा वैभव.
**भगर** (स्त्री.) वऱ्यांचे तांदूळ.
**भगरा** (पु.) कोरडा चुरा.
**भगराळा** (पु.) चुरा.
**भगल** (हिं. स्त्री. न.) ढोंग (तुका० २८९१); थट्टा; उपहास.
**भगली** (प्रा. पु.) दांभिक; खुषमस्कऱ्या.
**भगवंत** (सं. भगवत् पु.) ईश्वर; अलौकिक सामर्थ्यवान् पुरुष.
**भगवती** (सं. स्त्री.) देवी; तांबड्या मिरच्यांची पूड.
**भगवा** (वि.) कावेच्या रंगाचा. **भ० झेंडा**—पेशव्यांचें निशाण.
**भगवान्** (सं. पु.) ईश्वर; (वि.) षड्गुणैश्वर्यसंपन्न.
**भगवृत्ति** (सं. न.) वेश्येचा धंदा.
**भंगसाळ** (स्त्री.) भयाण वाडा; देवळाचा गाभारा व सभामंडप यांच्या मधला प्रदेश; रुंद भेग. [ खिंडार.
**भगळ, भगळी, भगाड** (स्त्री.) भेग, चीर,
**भगास** (वि.) उजाड, उध्वस्त.
**भगिनी** (सं. स्त्री.) बहीण.
**भंगी** (सं. स्त्री.) रीति, प्रकार; (पु.) मेहेतर, झाडूवाला; (वि.) भंगट.
**भगीरथ प्रयत्न** यत्नाची पराकाष्ठा.
**भंगुर** (सं. वि.) नाश पावणारें.
**भगेंद्र** (सं. भगंदर न.) भगंदर रोगाचें पडणारें क्षत. [ विकणारा.
**भंगेरा, भंगेरी** (पु.) भांग तयार करून
**भग्न** (सं. वि.) मोडलेलें; नष्ट; पराभूत.
**भचक्र** (सं. न.) नक्षत्रमंडळ, राशि-मंडळ.
**भजक** (सं. पु.) भक्त, उपासक, सेवक.
**भंजक** (सं. पु.) नाशकर्ता. [ वेणें.
**भजणें** (क्रि.) पूजा किंवा भक्ति करणें,
**भजन** (सं. न.) सेवा, पूजा; नामस्मरण.
**भंजन** (सं. न.) विध्वंस; पराजय; तीव्रता नाहींशी करणारी वस्तु.
**भजनी** (वि.) भजन करणारा, भाविक.
**भजें** (न.) बोंड; तळलेलें हरभऱ्यांच्या पिठाचें ग्चकर खाद्य.
**भट** (सं. पु.) योद्धा; भटजी. **तुझ्या कामांत भट पडो**—हिंदुस्थानी भाषेंत—भट—भट्टी; अर्थात् जाळून नाश करणारी; यावरून भट पडो – नाश होवो असा अर्थ.
**भटकणें** (क्रि.) रिकामें हिंडणें, फिरणें.
**भटक्या** (वि.) भटकणारा, अस्थिर.
**भटजी** (पु.) भिक्षुक ब्राह्मणाविषयीं सन्मानार्थक शब्द. [ हॉटेल.
**भटारखाना** (हिं. भटियारखाना) खाणावळ,
**भटारी** (पु.) भटारखाना ठेवणारा.
**भटूर** (न.) तांबें, जस्त इ. च्या मिश्रणाचा एक धातु. (या धातूच्या पात्राला भटोरें म्हणतात).
**भट्ट** (सं. पु.) विद्वान् भिक्षुक ब्राह्मण.
**भट्टी** (हिं. भट्टा स्त्री.) अग्निसंस्कार करण्याची जागा; दारूचा कारखाना; रचना; पद्धति; काम.
**भंड** (न.) फजिती; कुभांड; (पु.) नट; (वि.) भांडखोर, थट्टेखोर, लबाड.
**भंडउभंड** (प्रा. न.) बडबड, पोकळ वल्गना (दा. २।१।२७). [ तेजस्वी.
**भडक** (हिं. स्त्री.) आग, चमक; (वि.)
**भडकणें** (क्रि.) मोठ्या जोरानें पेट घेणें; रागानें उचल खाणें; भटकणें; उधळणें.
**भडकदार** (वि.) तेजस्वी, चकचकित, डोळ्यांत भरण्यासारखें.

**भडका** (पु.) मोठी आग; दाह.
**भडकावणें** (क्रि.) तोंडांत मारणें.
**भडंग** (हिं. वि.) उदार; उधळ्या.
**भडंगभिकारी** (पु.) भिकाऱ्यांचा वर्ग किंवा समुदाय.
**भडंगळ** (वि.) भयाण, प्रचंड.
**भंडपुराण** (सं. न.) चऱ्हाट, वडवड.
**भडभडणें** (क्रि.) प्रवाह सुटणें.
**भडभडा** (अ.) विपुलतेनें; त्वरेनें.
**भडभडाट** (पु.) अग्नीचा डोंबाळा; गर्जना; गोंधळ.
**भडभड्या** (वि.) मनास येईल तें विचार न करतां बोलून टाकणारा.
**भडभुंज्या** (हिं. भडभुंजा पु.) चुरमुरे इ. भाजके पदार्थ विकणारा.
**भंडमा** (स्त्री.), **भंडवडा, भंडवाडा** (पु.) धिंडवडा, फजिती.
**भडवा** (हिं. पु.) कसबीण, वेश्या इ. चा साजिंदा; समर्थाचा वगल्या; कुटण्या.
**भडस** (न.), **भडसा** (पु.) हलकें भुरं जळून जाणारें जळण; पूर; लोट; महत्व; वाढ.
**भडसा** (प्रा. स्त्री.) उत्कट इच्छा.
**भडसें** (प्रा. न.) थोरपण, आधिक्य; उत्कर्ष. [पणा (तुका० २८९२).
**भडाई** (प्रा.स्त्री.) भांडण, अपकीर्ति; दलाल-
**भडाग्नि** (सं. पु.) प्रेतास दिलेला मंत्र-विरहित अग्नि.
**भडाड** (प्रा. पु.) भडका (ज्ञा. ११।३०४).
**भंडार** (सं. भांडार न.) खजिना; (पु.) हळदीची पूड.
**भंडारखाना** (फा. पु.) कोशागार, खजिना.
**भंडार भरपूर** (अ.) तुमचा खजिना सदोदित भरलेला असो असा आशीर्वाद.
**भंडारा** सर्वांनीं एकत्र देवाचा प्रसाद घेण्याचा समारंभ.
**भंडारी** (पु.) ताडी, माडी, वगैरे काढून विकणारा; लहान फडताळ; भंडार ठेवण्याची पिशवी.
**भंडावणें** (क्रि.) सळो कीं पळो करून सोडणें, अतिशय त्रास देणें.
**भंडावा** (पु.) फजिती.
**भडिमा** (प्रा. पु.) दंभ (भाग० ३।३८८).
**भडिमार** (पु.) एकसारखा मारा, हल्ला.
**भंडी** (स्त्री.) फजिती; फसवणूक (एक० २१३५); अंत्याक्षरी कविता म्हणण्याचा खेळ.
**भडोड** (प्रा. पु.) अन्न
**भणका** (पु.) माशांचा घोळका; त्यांचा घुमणारा नाद; गोंधळयुक्त नाद.
**भणक्या** (स्त्री. अने.) भणभण, सारखें फिरत राहणें; रिकामें भटकणें.
**भणग, भणंग** (हिं. भडंग पु.) दरिद्री, ओसाड जागा.
**भणदें** (प्रा. न.) डोक्यावर खापरांत घेतलेला विस्तव; पोत, मशाल (तुका० २७२).
**भणभण** (स्त्री.) सोसाट्याचा वारा; त्याचा आवाज; लखलखाट (तुका० २३७४); ओसाडी; (वि.) ओसाड.
**भणभणणें** (क्रि.) भणभण असा आवाज होणें; कपाळ उठणें; उजाडणें.
**भणभणाट** (पु.) मोठा भणभण असा घुमणारा आवाज; उजाडपणा; उध्वस्तता.
**भणभणीत** (वि.) ओकें, शून्यवत्; प्रकाशित. [१५।२७).
**भणाण** (प्रा. पु.) नाश (मोरो० द्रोण०
**भणित** (सं. वि.) म्हटलेलें, उच्चारलेलें.
**भत्तका, भदका** (पु.) गुद्दा; बोळा.
**भत्ता** (हिं. भता पु.) पगाराशिवाय मिळणारी रोजी, खेरीज मुशाहिरा; निकृष्ट प्रतीचें खाणें; डाळे, चुरमुरे इ० एकत्र केलेलें खाद्य.
**भदभद** (स्त्री.) फुटक्या भांड्याचा आवाज.
**भदाड** (न.) खिडार; मातीचीं भांडीं.
**भदाडें** (न.) तोंड फुटलेलें मडकें.
**भदुला** (वि.) अगडबंब.
**भदें** (न.) आंत अग्नि असलेलें खापर; फुटकें भांडें; वद्द आवाजाचें वाद्य; दुर्दशाग्रस्त माणसाची अवस्था. **तोंडाचें भदें करणें**—शिवीगाळ करणें.
**भद्र** (सं. न.) कल्याण, देवळाचा सभामंडप; सिंहासन; (वि.) मंगलकारक.

**भद्रंकर, भद्रकरी** (सं. वि.) शुभ, कल्याण-कारक.
**भद्रंकरण** (सं. न.) भादरणें, हजामत; शिवीगाळ.
**भद्रकाळी** (सं. स्त्री.) दुर्गा.
**भद्रजाति** (सं. पु.) उत्तमलक्षणी हत्ती (भा० ११।५४२); उत्तम घोडा.
**भद्रा** (सं. स्त्री.) ज्योतिषांत अकरा करणांपैकीं सातवें; शुक्ल पक्षाची द्वितीया, सप्तमी व द्वादशी.
**भद्रासन** (सं. न.) सिंहासन; एक योगासन.
**भद्र्या** (वि.) दुर्दैवी; करंटा.
**भनभन** (प्रा. स्त्री.) भगभग. [ ७।१७७).
**भनाना** (प्रा.पु.) हाहाकार; (वामन-विराट०
**भंपक** (पु.) उचल्या; गांवढळ.
**भपका, भबका** (पु.) थाटमाट; वासाचा लोट; अग्नीच्या ज्वाळा; तिखटाचे वगैरे कण उडून हवेंत मिसळणें; अत्तर काढण्याचें यंत्र.
**भप (ब) कारा** (पु.) आकस्मिक जोराची झळ; सुगंधाचा नाकातोंडांत शिरणारा लोट.
**भपुरा** (पु.) सूज; फुगवटा.
**भबकणें** (क्रि.) झपाट्यानें वाहून पसरणें; जोरानें येणें; गर्जना करणें.
**भबकी** (स्त्री.) फुंकारा, सुस्कारा; बढाई; फूस; किंमतींत एकदम केलेली वाढ; भुमका; वदंता.
**भंबाडा** (स्त्री.) उधळपट्टी.
**भंभाळा** (वि.) मोटा; प्रशस्त; जड, प्रचंड.
**भंबेरी** (स्त्री.) बचेरी, फजिती.
**भंबोनाथ** (पु.) टोणपा, मूर्ख.
**भभकार** (प्रा. पु.) गर्जना.
**भय** (सं. न.) भीति, धास्ती.
**भयंकर** (सं. वि.) भीतिप्रद.
**भयभीत** (सं. वि.) भ्यालेला, भीतीनें घाबरलेला.
**भयाण** (वि.) उजाडीमुळें भय वाटण्या-सारखें, घोर.
**भयानक** (सं. वि.) भयंकर; (पु.) नव-रसांपैकीं एक.
**भयावह** (सं. वि.) धोक्याचें, भयप्रद.
**भयासुर** (प्रा. वि.) भयंकर, भेसूर.
**भय्यन, भय्या** (हि. पु.) पूर्वदेशी, पुरभय्या.
**भर** (प्रा. स्त्री.) आवड (ज्ञा० ३।१६९).
**भर** (सं. पु.) बहर; उत्तेजन; उणीव भरून काढणारी गोष्ट; भरती; जोर. **भर करणें**—देऊन टाकणें; **भरीं भरणें**—नादीं लागणें; **भरीस पडणें**—अभिमानास पेटणें.
**भरउमर** (स्त्री.) भरणें व उपसण; मिळ-विणें आणि खर्चणें; दुसऱ्यावर आपली छाप बसविणें.
**भरकटणें** (क्रि.) खरडणें.
**भरकन्** (अ.) चटदिशीं, पटकन्.
**भरकाड, भरकांड** (न.) गवत, झिलप्या वगैरे भुरकन् जळणारें जळण.
**भरकाड जमीन** (स्त्री.) लवकर शुष्क होणारी जमीन.
**भरकांडा** (पु.) चक्कर; फेरी; गुंफा.
**भरगच्ची** (वि.) कलावतूचें (वस्त्र); विपुल; गच्च भरलेलें.
**भरगत** (स्त्री.) भरलेपणा; ओझें.
**भरगोणी** (स्त्री.) पूर्ण भरलेली गोणी—जिच्यावर भरपूर जकात द्यावी लागते ती.
**भरगोळा** (पु.) तोफेचा गोळा किंवा बंदु-कीची गोळी जाऊन पडेल इतकें अंतर.
**भरचक्का** (वि.) भरपूर, आकंठ.
**भरचंदी** (स्त्री.) घोड्याला द्यावयाचा तितका भरपूर दाणा; कोणत्याही पदार्थाचें इष्ट तितकें भरपूर प्रमाण.
**भरचौक** (स्त्री.) घोड्याची अत्यंत जलदीची चाल.
**भरजरी** (वि.) सर्वस्वीं ज़रीचें; भरगच्ची.
**भरज्वानी** (फा. भरजवानी स्त्री.) ऐन तारुण्य.
**भरड** (स्त्री.) भरडलेली डाळ; साळी भरडून केलेले तांदूळ; (वि.) जाड.
**भरडणें** (क्रि.) जाड दळणें.
**भरडा** (पु.) कळणा, जाड दळण; जाड दळलेले तांदूळ व डाळ यांचें मिश्रण.
**भरण** (सं. न.) पोषण; भरती; भर; भर-ण्याची वस्तु; (स्त्री.) घागर.
**भरण** (प्रा. न.) आयुष्य.

**भरणा** (प्रा. पु. स्त्री.) दूध काढण्याचें भांडें (हरि० ८।१०५); (पु.) जमाव, संग्रह; पूर्णता; खजिन्यांत वगैरे नेऊन देणें; कराची पूर्ण आकारणी.

**भरणी** (स्त्री.)भर; दुसरें नक्षत्र; श्राद्धाचा एक प्रकार; वस्ती.

**भरणें** (न.) खांब व पिढें यांच्यांत वसविलेला लाकडाचा तुकडा; (क्रि.) भर करणें; घालणें; पूर्ण होणें.

**भरत** (न.) एक मिश्र धातु; (पु.) एक प्राचीन राजा; रामाचा भाऊ.

**भरतखंड** (सं. न.) भारतवर्ष, हिन्दुस्थान.

**भरतकाम** (न.) कापडावर नक्षी; कशिदा काढण्याची कला; जीगचें काम.

**भरतवाक्य** (न.) नाटकांतील शेवटचें पद.

**भरतशास्त्र** (न.) नाट्यशास्त्र.

**भरताड** (स्त्री.) मालानें भरून आलेल्या गाड्यांची खेप; भरून येणें.

**भरती** (स्त्री.) समुद्राच्या पाण्याची वाढ; भरभराट; वृद्धि; पूर्णता; सदस्यांची नोंद. जसें, सैन्यभरती—सैन्यांत माणसें नोंदणें.

**भरतूक** (न.) ओझें; भरताड; ओझें वाहून नेण्यावद्दलचें भाडें.

**भरतें** (न.) पूर्णता, पूर्तता; उमाळा.

**भरदार** (वि.) गच्च भरलेलें.

**भरदौड** (अ.) धावण्याच्या पूर्ण वेगानें.

**भरद्वाज** (सं. पु.) एक पक्षी, एक ऋषि.

**भरधाव** (अ.) पूर्ण वेगानें.

**भरनवती** (स्त्री.) ऐन तारुण्य.

**भरपाई** (स्त्री.) भरणा; पोंच, पावती.

**भरपूड** (स्त्री.) फुटलेल्या फोडावर उघडी राहिल्यानें येणारी पातळ त्वचा.

**भरपूर** (हि. वि.) पुष्कळ, रगड, विपुल.

**भरभक्कम** (वि.) विपुल; गच्च भरलेलें.

**भरभर, भरभरा** (अ.) त्वरेनें.

**भरभरणें** (प्रा. क्रि.) चेतणें (मोरो० उद्यो० ८।७१); भरभराट होणें.

**भरभराट** (स्त्री.) उत्कर्ष; चलती.

**भरभरीत** (वि.) रखरखीत, भरड.

**भरमजलस, भरमजलास** (स्त्री.) भर कचेरी; जींत सर्व शिष्ट हजर आहेत अशी कचेरी किंवा दरबार.

**भरंमसाट** (अ.) अविचारानें, भेदाभेद न करितां; (वि.) अमर्याद.

**भररट्टा** (वि.) पक्का; तव्वल. [मार्ग.

**भररस्ता** (पु.) वाहता रस्ता; रहदारीचा

**भरला, भारला** (वि.) पतदार; अब्रूदार; भरभराटीचा.

**भरलें धरणें** देवाला कौल लाविला असतां त्यानें उजवी किंवा डावी कांहीं न देणें.

**भरवणी** (स्त्री.) अन्नप्राशनाचा संस्कार.

**भरवणें** (क्रि.) तोंडांत घांस देणें; जेवूं घालणें.

**भरवसा, भरंवसा** (हि. भरोसा पु.) विश्वास. भ० चें कूळ—खात्रीचा मनुष्य; दृढभाव; भ० म्हशीस टोणगा—जो काम करील अशी पूर्ण खात्री त्याच्याच कडून निराशा होणें. [वसूल.

**भरवसूल** (पु.) गांव, प्रांत इ० चा पूर्ण

**भरवाड**(स्त्री.पु.) एक धनगरासारखी जात.

**भरा** (प्रा. पु.) एकशें साठ पायल्यांचें मांत.

**भराका** (पु.) झपाटा. [करणें.

**भराटणें** (क्रि.) घाईघाईनें उरकणें, त्वरेनें

**भराटा** (पु.) झपाटा; अतिशय विपुलता.

**भराड** (न.) डौर वाजवून व नाचवून केलेलें एक प्रकारचें कीर्तन.

**भराडा—डी** (पु.) डौर वाजवून कीर्तन करणारा; पुजारी.

**भराभर, भरभरा** (अ.) झपाट्यानें.

**भरारणें** (क्रि.) भरभरणें. [किंवा दूर जाणें.

**भरारी** (स्त्री.) उड्डाण, अति त्वरेनें उंच

**भराव** (पु.) खाच बुजविण्यासाठीं आंत टाकलेली भर.

**भरावण, भरावळ** (स्त्री.) जमीन भाजण्यासाठीं तिच्यावर पसरलेलें गवत, काड्या, केरकचरा इ.

**भरावरी** (प्रा. अ.) वरचेवर, वारंवार.

**भरितें** (प्रा. न.) भरती.

**भरिभार** (पु.) पूर्ण भरंवसा.

**भरीत** (न.) गाडी इ० भरण्याइतकें ओझें; एक प्रकारचें रायतें.

**भरीव** (वि.) भरलेलें, घट्ट.

**भरू** (प्रा. स्त्री.) आवड (ज्ञा० ३।१६९)

नगर वाचनालय सातारा
संग्रहातील ग्रंथ

**भरें** (प्रा. न.) माप (ज्ञा० ९।४९६).
**भरोभरी** (स्त्री.) भरती, पूर्णता, पूर्ण बरोबरी.
**भरोवरी** (प्रा. स्त्री.) श्रम, सायास (तुका० २०९१, दा० १।२।२१); सामुग्री (ज्ञा० १८।८५५); आवड (ज्ञा० यो० ६।१२५); गर्दी (विवे० पू० ४।६०). [आश्वासन.
**भरोसा** (हिं. पु.) भरंवसा, विश्वास;
**भर्ग** (सं. पु.) महादेव.
**भर्जणें** (क्रि.) भाजणें.
**भर्ता** (सं. पु.) पति; भ्रतार.
**भर्त्सणें** (सं. भर्त्सन न.), **भर्त्सना** (स्त्री.) निंदा, धिक्कार; धमकी.
**भर्म** (सं. न.) सोनें.
**भलता** (वि.) कोणीहि, अविवक्षित; संबंध नसलेला.
**भलतासलता** (वि.) कोणता तरी; अयोग्य.
**भलतें, उतें** (प्रा. अ.) पाहिजे तसें (ज्ञा० १६।२८८).
**भलतेएके** कोणीतरी.
**भलते तुकें** (प्रा. अ.) पाहिजे तितकें, कितीही (ज्ञा० १८।८६२).
**भलतेथ** (प्रा. अ.) पाहिजे तेथें.
**भलतेथें** (प्रा. अ.) भलत्या ठिकाणीं (तुका० २४१३).
**भलतेव्हां** (प्रा. अ.) पाहिजे तेव्हां.
**भलतेवढी** (प्रा. वि.) पाहिजे तेवढी.
**भलतेसणा** (प्रा. वि.) कोणताही; पाहिजे तेवढा (ज्ञा० १६।७९).
**भलपणें** (प्रा. क्रि.) हालणें. [सुस्वभावी.
**भला** (सं. भद्र वि.) चांगला, बरा,
**भलाइकी, भलाई** (स्त्री.) चांगुलपणा.
**भलाई-बुराई** (हिं. स्त्री.) बरेवाईटपणा.
**भलांडें** (न.) गोंधळ्याच्या हातांतलें आंत विस्तव घातलेलें अर्धें खापर.
**भलावण** (गुज. भलामण स्त्री.) शिफारसपत्र; वरात-चिठ्ठी; चेक. [फळ.
**भल्लातक** (पु. न.) बिब्याचें झाड व त्याचें
**भलीभलाई** (हिं. स्त्री.) चांगुलपणा; सुस्वभाव; नांवलौकिक; कुशल समाचार.
**भलें** (अ.) चांगलें; वाहवा! खूप!
**भलेरी** (स्त्री.) कष्टाचें काम हलकें जावें म्हणून कामकरी लोक 'भले रे दादा' अशा अर्थाचे किंवा दुसरे कांहीं शब्द परस्परांना उत्तेजन देण्यासाठीं उच्चारतात ते; कष्टाचें काम; अवास्तविक स्तुति.
**भलोबा** (सं. पु.) चांगला मनुष्य.
**भल्ल** (सं. पु.) भाल्याचें किंवा बाणाचें अग्र.
**भल्लुक, भल्लूक** (सं. पु.) अस्वल.
**भव** (सं. पु.) संसार; जन्म, उत्पत्ति; अस्तित्व; महादेव.
**भंव** (सं. भ्रम न.) भ्रमण, जन्ममरण.
**भंवई** (सं. भ्रू स्त्री.) भुंवई; **भं० उचलणें**—रागानें पाहणें.
**भवंडणें** (प्रा. क्रि.) गरगर फिरविणें.
**भवंड-डी** (स्त्री.) भोवंड, चक्कर, मूर्च्छा.
**भवंडा** (पु.) गरका.
**भंवणें** (सं. भ्रम् क्रि.) फिरणें. [सभोंवतीं.
**भंवता, भंवताला, भंवतालीं** (अ.)
**भवति न भवति** (सं. स्त्री.) चर्चा, वाद.
**भवतीं, भंवतें** (अ.) सभोंवतीं.
**भवन** (सं. न.) गृह; होणें.
**भवभंजन** (सं. वि.) संसाराचा मोह तोडणारा.
**भवभव** (स्त्री.) भगभग, कंप.
**भवमोचन** (सं. वि.) संसारांतून सोडविणारा; (न.) मुक्ति.
**भवय्या** (पु.) गुजराथेंतील नट व नर्तक.
**भवर** (स्त्री.) मजा; (पु.) भुंगा; भ्रमर.
**भंवरा** (सं. भ्रमर पु.) भ्रमर; गरगर फिरणारा मुलांचा अणीदार लाकडी चेंडू.
**भंवरी** (स्त्री.) भ्रमण; भ्रमरी.
**भवानी** (सं. स्त्री.) देवी, पार्वती; बोहनी
**भवितव्य** (सं. न.) होणारें; नशीब.
**भविन्नणें** (प्रा. क्रि.) होणें.
**भविष्य** (सं. न.) पुढें होणारी गोष्ट; तिच्याविषयीं अगोदर करून ठेवलेलें कथन; (पु.) पुढें येणारा काळ.
**भविष्यवादी** (सं. पु.) पुढें काय होईल तें सांगणारा; अतिदूरदृष्टि पुरुष.
**भविष्योत्तर** (सं. न.) पुढें होणाऱ्या गोष्टीचें अगोदर कथन.
**भवृत्त** (सं. न.) क्रान्तिवृत्त.

[stamp]



**भवें** (प्रा. न.) भ्रमण, जन्ममरण. [कल्याण.
**भव्य** (सं. वि.) प्रशस्त, टोलेजंग; भविष्य;
**भसकटणें** (क्रि.) भोसकणें; घुसडणें.
**भसका** (पु.) भोक.
**भसकापुरी** (स्त्री.) शुष्क तपकीर; तांवडचा मिरच्यांची पूड.
**भसडा** (वि.) जाडा, स्थूल.
**भसभशीत** (वि.) कोरडें, शुष्क, भरभरीत.
**भसरा** (पु.) प्राणायामाचा एक प्रकार.
**भसरें** (न.) हगवण (विशेषतः अपचनापासून होणारी).
**भसाडा** (वि.) जाडा, स्थूल.
**भसाळ** (वि.) प्रचंड, फार स्थूल; वेढव.
**भसित** (सं. न.) भस्म.
**भस्म** (सं. न.) राख, रक्षा, विभूति.
**भस्मणें** (क्रि.) जाळून राख करणें.
**भस्मरोग** (पु.) जेवढें खावें तेवढें भस्म व्हावें, पण अंगीं लागूं नये असा रोग.
**भस्मसात् करणें** जाळून राख करणें.
**भस्मासुर** (सं. पु.) सर्वांस जाळून टाकण्याची शक्ति असलेला एक दैत्य; विध्वंस करणारा; अतिशय खादाड.
**भस्त्रा** (सं. भस्त्रा पु.) भाता; भसरा पहा.
**भळ** (स्त्री.) भेग, चीर.
**भळंद, भळंदें** (न.) भदें पहा.
**भळभळणें** (क्रि.) जोरानें वाहूं लागणें.
**भळू** (वि.) भोळसर, अजागळ.
**भक्ष** (सं. भक्ष्य न.) खाद्य.
**भक्षक** (सं. वि.) खाणारा.
**भक्षण** (सं. न.) खाण्याची क्रिया; अन्न.
**भक्षणें** (क्रि.) खाणें. [अन्न, खाद्य.
**भक्ष्य** (सं. वि.) खाण्यास योग्य; (न.)
**भा** (सं. स्त्री.) शोभा; तेज; प्रभा.
**भाई** (हिं. पु.) भाऊ; साम्यवादी पंथाची निदर्शक पदवी. **भाईचारा** (पु.)– सख्यभाव; **भाईबंद** (पु.)–भाऊबंद.
**भाऊ** (सं. भ्रातृ पु.) बंधु. **भा० गर्दी** (स्त्री.)– पानिपत येथें सदाशिवरावभाऊ यांनीं घनघोर युद्ध केलें. त्यावरून अतिशय निकराचें युद्ध हा अर्थ.
**भाऊबंद** (पु.) नातेवाईक. [वितुष्ट.
**भाऊबंदकी** (स्त्री.) भाऊपणा; भावांभावांतलें
**भाऊबीज** (सं. भ्रातृद्वितीया स्त्री.) कार्तिक शु० २ (या दिवशीं बहीण भावाला मेजवानी देते व ओवाळते).
**भाऊबळ** (स्त्री.) भाऊबंदाच्या क्रमानें वतनाचा प्राप्त होणारा भोगवटा.
**भाओजी** (पु.) दीर.
**भाक** (सं. भाषा स्त्री.) भाषण; वतन; खात्री, आश्वासन; करार; नवस फेडीन अशी खात्री करण्यासाठीं देवापाशीं ठेवलेली वस्तु.
**भाकड** (वि.) दूध देईनाशी झालेली (गाय, म्हैस इ.); निरर्थक.
**भाकडकथा** (स्त्री.) रिकामी, पोकळ, असंबद्ध गोष्ट. [कथन.
**भाकणूक** (स्त्री.) कौल, शकुन, भविष्य-
**भाकणें** (सं. भाष् स्त्री.) भविष्य सांगणें; अभिवचन देणें; (प्रा.) उच्चारणें.
**भाकबहिण** (स्त्री.) भाक पहा.
**भाकर** (स्त्री.) भाकरी, रोटी.
**भाकरीचा खेळ** या खेळांत पातळ चिपा पाण्याच्या सपाटीवरून अशा खुबीनें फेकावयाच्या असतात कीं त्या पाण्याच्या पृष्ठभागाला ठिकठिकाणीं स्पर्श करून पुनः उडून टप्पा खातखात जातील.
**भाकीत** (न.) भविष्य. [वचन.
**भाख, भाखा** (सं. भाषा स्त्री.) भाषा,
**भाग** (सं. पु.) अंश, हिस्सा, वांटा; दैव; भागाकाराचें फळ; (प्रा. पु.) थकवा, शीण; (प्रा. अ.) करितां, पुरतें.
**भांग** (सं. भंग स्त्री.) एक कैफी पदार्थ; घोटा; (पु.) केस दोन बाजूस विभागल्यावर त्यांच्यामध्यें पडणारी रेषा; ओहोटी; मुलींचा एक खेळ. **भांगेंत तुळस**—वाईट आईबापांच्या पोटीं चांगली संतति.
**भांगट** (वि.) भंगट, भांग पिण्याचें व्यसन लागलेला.
**भांगटणें** (प्रा. क्रि.) भंग पावणें.
**भांगणी** (स्त्री.) विभागणी; वीं न पेरलेली अशी शेतांतली पट्टी.
**भांगणें** (क्रि.) भंगणें, फुटणें.

[stamp] वाचनालय

**भागणें** (क्रि.) एका संख्येचे दुसऱ्या संख्ये-येवढे भाग पाडणें; थकणें, दमणें; निर्वाह होणें; चालणें.
**भागतीभुगती**(स्त्री.)दैवानें दिलेलें सुखदुःख.
**भागन** (सं. न.) राशिचक्र, मोठ्या वर्तुळाचा परिघ; राशिचक्रांतून जाण्यास लागणारा काळ.
**भांगपट्टी** (स्त्री.) वेणीफणी.
**भांगलणी** (स्त्री.) शेताची वेणणी.
**भागलीक** (स्त्री.), **भागवटा** (पु.) थकवा.
**भांगलीला** (स्त्री.) मुंडावळ.
**भागवत** (सं. वि.) भगवंतविषयक; भगवद्भक्त; (पु.) विष्णुभक्त; (न.) अठरा पुराणांपैकीं एक.
**भांगवळ** (स्त्री.) भांगोळी पहा.
**भागविणें** (क्रि.) दमविणें; चालविणें; निर्वाह करणें.
**भांगसळ** (स्त्री.) भांग पाडण्यासाठीं केलेली चांदीची सळई किंवा काडी.
**भांगा** (पु.) शेत, शेताचा भाग.
**भांगा फिटणें** वांट्यास जाणें.
**भागाकार** (सं. पु.) अंकगणितांत—संख्येचे कांहीं नियमित प्रमाणानें भाग पाडण्याची क्रिया; तिचें फळ.
**भागानगर** (न.) दक्षिण हैद्राबाद. **भा० स जाणें** पळून जाणें.
**भागाभाग** (प्रा. स्त्री.) वियोग; ताटातूट; पळापळ; धडपड; यातायात.
**भांगार, भांगारें** (प्रा. न.) सोनें; द्रव्य.
**भागिनेय** (सं. पु.) भाचा.
**भागिनेयी** (स्त्री.) भाची.
**भागी** (सं. स्त्री.) सरकत; (पु.) वांटेकरी.
**भागीदार, भागीन** (पु.) वांटेकरी.
**भागीरथी** (सं. स्त्री.) गंगा.
**भागूबाई** (स्त्री.) भित्रा पुरुष.
**भागेली** (पु.) भागीदार.
**भांगोरें** (न.) दिवाळें; बनावट गोष्ट.
**भांगोळी** (स्त्री.) बाजूचा लहान भांग.
**भाग्य** (सं. न.) दैव; ऐश्वर्य. [पुण्यात्मा.
**भाग्यपुरुष** (सं. पु.) भाग्यवान् मनुष्य;
**भाग्यवंत, भाग्यशाली, भाग्यवान्** (सं. वि.) दैववान्.
**भाग्यहीन** (सं. वि.) दुर्दैवी.
**भांग्या** (वि.) भांगट.
**भाग्योदय** (सं. पु.) उत्कर्षाचा काल.
**भाचर** (स्त्री.) भट्टी.
**भाचा** (पु.) बहिणीचा मुलगा; एखाद्या स्त्रीच्या भावाचा मुलगा. **भाची**—बहिणीची मुलगी.
**भाचेजांवई** (पु.) भाचीचा नवरा.
**भाचेसून** (स्त्री.) भाच्याची बायको.
**भाज, भाजा** (सं. भार्या स्त्री.) स्त्री, पत्नी.
**भाजक** (सं. पु.) भागणारी संख्या.
**भाजकट** (वि.) किंचित् भाजलेलें; भाजक्या वासाचें.
**भाजका** (वि.) भाजलेला.
**भांजगड** भानगड पहा.
**भाजणी** (स्त्री.) पांचचार धान्यें एकत्र भाजून केलेलें पीठ; भाजण्याची क्रिया; जमीन भाजणें.
**भांजणी** (सं. भंजन स्त्री.) अंकगणितांत—परिमाणाच्या संख्येस दुसऱ्या सजातीय परिमाणाच्या संख्येचें रूप देण्याची कृति.
**भाजणें** (क्रि.) पक्व करणें; शेकणें; पोळणें; (न.) धान्य भाजण्याचें खापर.
**भांजणें** (प्रा. क्रि.) विष उतरणें; शमणें.
**भाजन** (सं. न.) पात्र; भांडें.
**भाजपी** (पु.) धान्य भाजणारा.
**भाजपोळ** (स्त्री.) लूट करतांना घराला आग लावणें वगैरे प्रकार.
**भाजवट** (स्त्री.) बीं पेरण्यापूर्वीं जमीन भाजण्याची क्रिया; (वि.) भाजलेली; भाजावयास पाहिजे अशी (जमीन).
**भाजा** (सं. भार्या स्त्री.) पत्नी.
**भाजाणा** (पु.) भाजलेला दाणा.
**भाजावळ** (स्त्री.) भाजलेली जमीन.
**भांजिलीखांजिली** (प्रा. स्त्री.) क्षयवृद्धि (तुका० ७०७).
**भाजी** (स्त्री.) शाक; चोळामोळा; निसर्गानें मेलेल्या जनावराचें मांस.
**भाजीपाला** (पु.) सामान्यतः भाजी.
**भाजीभाकर** साधें जेवण.
**भाज्य** (सं. न.) अंकगणितांत—जिला भागावयाचें ती संख्या.

**भाट** (पु.) स्तुतिपाठक; (स्त्री.) ओहोटीच्या वेळीं उघडी पडणारी समुद्रांतली जागा; उंसाच्या लागवडीची जमीन; उखर जमीन (ज्ञा० १३।४५).
**भाटक** (सं. न.) भाडें, मजुरी.
**भाटणें** (प्रा. क्रि.) वाजविणें (मुक्ते० रामा० ४।६३).
**भाटलें** (न.) ऊंस लावण्यासाठीं तयार केलेली जमीन.
**भाटवळ** (स्त्री.) भाट जमीन; पुष्कळ असलेली जागा. [ (तुका० २१९३).
**भाटवोळांपणा** (प्रा. पु.) व्यर्थ वडवड
**भाटिव** (स्त्री.) स्तुति.
**भाटी** (स्त्री.) मांजरी; नदीच्या पात्रांत उघडी पडलेली जागा; नदीच्या किंवा खाडीच्या कांठची सुपीक जमीन; दारू गाळण्याचें यंत्र.
**भाटया** (पु.) गुजराथ्यांतली एक जात.
**भाड** (सं. भाटक स्त्री.) दलाली; कुंटणपणानें मिळालेलें द्रव्य. [करणारा.
**भांड** (सं. पु.) नाटक, तमाशा वगैरे
**भांड** (सं. न.) भांडें, मडकें; (स्त्री.) तोफ.
**भांडकुदळ** (वि.) भांडखोर.
**भाडखाऊ** (पु.) घरच्या स्त्रियांच्या वेश्यापणावर निर्वाह करणारा.
**भांडखोर, भांडगा** (वि.) कलह करणारा.
**भांडण** (न.) कलह, तंटा.
**भांडणें** (स्त्री.) तंटा करणें.
**भाडभोड** (स्त्री.) मुरवत.
**भांडवल** (न.) पुंजी; व्यापारांत घातलेला पैसा. **भा० दार**(पु.)–पैसेवाला;पुंजीपति; **भा० शाही** (स्त्री.)—भांडवलवाल्यांचें वर्चस्व.
**भाडवी** (प्रा. वि.) भाडोत्री.
**भाडळी मत** (न.) सहदेवाची स्त्री भाडळी हिनें काढलेली फलज्योतिषाची एक पद्धति.
**भांडागार** (सं. न.), **भांडार** (न.), **भांडारखाना** (हिं. पु.), **भांडारगृह** (सं. न.) खजिना, द्रव्यसंग्रहस्थान.
**भांडारी** (सं. पु.) खजीनदार.
**भांडावणें** (प्रा. क्रि.) वंद होणें.
**भांडावा** (पु.) योद्धा.
**भांडाळ, भांडुका** (वि.) भांडखोर.
**भांडें** (सं. भांड न.) पात्र, वासन, प्रसूतीच्या वेळीं निघणारी वार; तोफ (दा० ३।७।७२).
**भाडें** (सं. भाटक न.) दुसऱ्याच्या पदार्थाच्या उपभोगावद्दल त्यास द्यावयाचें द्रव्य.
**भाडेकरी** (पु.) भाड्यानें घेणारा.
**भाडोत्री** (पु.) पैसे घेऊन काम करणारा.
**भाण** (सं. पु. न.) नाटकासारखा काव्याचा एक प्रकार; भांडें; कारवारकडे–हांडा.
**भाणवस** (स्त्री.), **भाणवसा, भानवसा** (पु.) उतरंड लावण्याची जागा; उतरंड घर.
**भाणशिरें** (न.) कारवाराकडे–भाताची पेज काढते वेळीं भांड्याच्या तोंडावर बांधतात तें फडकें.
**भाणस** (पु.) कांहीं जातींत लग्नाच्या वेळीं नवऱ्यामुलीच्या बापाकडून नवऱ्यामुलाकडे सामान्यतः पंचवीस मंडळी पाठविण्यांत येतात ती.
**भाणा** (सं. भगिनी स्त्री.) वहीण.
**भाणें** (प्रा. न.) ताट; (क्रि.) जेवणें.
**भात** (न.) टरफलासह तांदूळ; साळी; (पु.) शिजवलेले तांदूळ; (स्त्री.) पत, नांव; प्रकार; तऱ्हा. [खेळ.
**भातकुली** (स्त्री.) मुलींचा स्वैंपाकाचा
**भातकुलें, भातकूल, भातुकें** (न.) भातुकलीचा (अर्थात् थोडा) पदार्थ.
**भातजमीन** (स्त्री.) भाताच्या पिकास योग्य जमीन. [पिशवी, भाता.
**भातड** (न.), **भातडा** (पु.) वाण ठेवण्याची
**भातडी** (स्त्री.) लहान भाता.
**भातण, भातेण** (भात + तृण न.) भाताच्या काड्या.
**भातभोंकण्या** (वि.) नुसता भात खाणारा; रिकामटेकडा.
**भाता** (सं. भस्त्रा पु.) वारा भरण्याची कातड्याची पिशवी; वाण ठेवण्याची पिशवी; शरासन.
**भातारु** (सं. भर्तृ पु.) भ्रतार.
**भाती** (प्रा. स्त्री.) वारा घालण्याचा भाता.
**भांतीभांतीं** (अ.) नानाप्रकारें.
**भातुक, भातुकें** (प्रा. न.) खाद्य, खाऊ.

**भातुकली, भातकुलें** भातकुली, भातकुलें पहा.

**भातें** (हिं भाता न.) वतन, भत्ता; एक औषध; (प्रा. न.) भरती; मजुरी, खाऊ. [ भाता.

**भातोटा, भात्या** (पु.) वारा घालण्याचा

**भातोडी** (स्त्री.) बाण ठेवण्याचा लहान भाता.

**भादरणें** (सं. भद्राकरण क्रि.) केस काढणें.

**भादरपट्टी** (स्त्री.) हजामत; तासरपट्टी, खरड.

**भादवड** (स्त्री.) भाद्रपद महिना.

**भादवा, भाद्रपद** (सं. भाद्रपद पु.) हिंदु वर्षाचा सहावा महिना.

**भादवी** (वि.) भाद्रपद महिन्यांतलें (पीक).

**भादा, भाद्या** (वि.) अंड बडविलेला, खच्ची केलेला. [ (ज्ञा० १३।६३८).

**भांदी** (प्रा. वि.) नीटनेटकी, चांगली

**भान** (सं.न.) चैतन्य, शुद्धि; अंतःकरणाची जागृत स्थिति, स्मृति, आठवण; लक्ष.

**भान** (सं. भानु पु.) सूर्य. [ कारण.

**भानगड** (स्त्री.) गोंधळ, घोटाळा; तंटचास

**भानवस** (स्त्री.), **भानवसा** (पु.) चुली-मागचा ओटा; भांडें नीट बसावें म्हणून त्याभोंवतीं केलेलें मातीचें आळें.

**भाना** (पु.) द्रव्याचा हुंडा.

**भानामती** (स्त्री.) जादू, हातचलाखी.

**भानु** (सं. पु.) सूर्य. **भानुनंदन** (सं. पु.)—सूर्यपुत्र, कर्ण; शनि. **भानुवासर** (सं. पु.)—रविवार.

**भाने** (प्रा. न.) उरलेलें अन्न.

**भांब** (प्रा. स्त्री.) शोभा, सौंदर्य; आभास; मोठी विहीर; (वि.) पोकळ.

**भांबडभूत, भांबरभूत** (प्रा. न.) पिसाट, वेडसर मनुष्य.

**भाबडा** (वि.) भोळा, साधासिधा.

**भांबा**(प्रा. पु.)विकार (विवे० पू० ७।११५).

**भांबावणें** (क्रि.) घाबरणें, भ्रम पावणें.

**भांभ** (प्रा.) शोभा, आभास, भ्रांति (ज्ञा० यो० २।१८)

**भांभळ, भांभळया** (वि.) विसराळू, अव्यवस्थित.

**भाम** (पु.) मेहुणा; (स्त्री.) चार मोटांची विहीर; स्मरण.

**भामटा** (पु.) उचल्या; भुरटेचोर.

**भामा** (स्त्री.) बायको; स्त्री. **सत्यभामा**—कृष्णाची एक राणी.

**भामिनी** (सं. स्त्री.) रागीट स्त्री.

**भाय** (स्त्री.) शाखा, फांदी.

**भार** (सं. पु.) ओझें, वजन; समुदाय; ८००० तोळे; ज्यास्ती पीक; (वि.) वजनाचें.

**भारकस** (फा. पु. न.) जनावराच्या पाठी-वर ओझें कसून बांधण्याचा सोल.

**भारजा** (सं. भार्या स्त्री.) स्त्री.

**भारणी** (स्त्री.) भुरळ पाडणारी; भूल; वशीकरण; मंत्र.

**भारणें** (क्रि.) मंत्र घालणें; मंत्रानें मोहित करणें; वश करून ठेवणें.

**भारणें** (प्रा.क्रि.) जड होणें (ज्ञा० १४।९१).

**भारत** (सं. पु.) हिंदुस्थान; (न.) महा-भारत; मोठी गोष्ट. [ गोसावी.

**भारती** (सं. स्त्री.) सरस्वती; वाणी;

**भारतीय** (सं. वि.) हिंदुस्थानचा. **भा० वीर**—महाभारतांत वर्णिलेल्या सारखा शूर योद्धा. [ दार, महत्त्वाचें.

**भारदस्त, भारदार** (सं.फा.वि.) जड, वजन-

**भारदारी** (वि.) ओझ्याचा.

**भारद्वाज** (सं. पु.) एक पक्षी (कुकुटकुंभा); एक ऋषि.

**भारंभार** (वि.) सारख्या वजनाचें. [हमाल.

**भारवाहक** (सं. वि.) ओझें वाहणारा;

**भारशिंग** (न.) सांबराचें शिंग.

**भारा** (पु.) ओझें, पेंढी.

**भारावणें** (क्रि.) जड होणें.

**भारी** (स्त्री.) लाकडांची मोळी; (वि.) अधिक जड; पुष्कळ; बहुमोल. [कथा.

**भारूड** (न.) लांबच लांब व गुंतागुंतीची

**भारोंभार** (अ.) भारंभार.

**भार्गव** (सं. पु.) परशुराम.

**भार्या** (सं. स्त्री.) पत्नी.

**भाल** (सं. भल्ल स्त्री.) भाल्याचें अग्र किंवा फळ; (न.) कपाळ.

**भाल** (स्त्री.) शपथ.

**भालदार** (पु.) वेत्रधारी; राजाजवळचा छडीदार सेवक.
**भालदोरी** (स्त्री.) मंतरलेला गंडा.
**भाला** (सं. भल्ल पु.) एक शस्त्र; भाल्याच्या लांबीइतकें अंतर. **भाला घालणें**—दूध काढतांना दोरीनें गाईचे पाय बांधणें.
**भाली** (प्रा. पु.) बाण.
**भालुंड** (न.) दुतोंडें.
**भालू, भालूकें** (सं. मल्लुक स्त्री.) अस्वल.
**भालू** (स्त्री.) कोल्ही. [शिपाई.
**भालेकरी** (पु.) भाला धारण करणारे
**भालेराई** (स्त्री.) पुंडाई.
**भाव** (सं. पु.) मन, अंतःकरण; अभिप्राय; अंतःकरणाची स्थिति; मनोवृत्ति; निष्ठा, भक्ति; अर्थ, आशय, हेतु; धर्म, गुण; चेष्टा, हावभाव; जन्म, अस्तित्व; दर; भाऊ; माया, कपट; (वि.) मिथ्या.
**भावकुंडली** (सं. स्त्री.) फलज्योतिषांत—तनु, धन इ. जे बारा विषय त्यांच्या लग्नकुंडलीवरून विचार करण्यासाठीं बारा राशि मांडण्याचा प्रकार.
**भावकी** (स्त्री.) भाऊपण, बंधुत्व.
**भावचलित** (वि.) दुसऱ्या भावांत गेलेला (सूर्य किंवा ग्रह).
**भावजई, भावजय** (सं. भ्रातृजाया स्त्री.) भावाची बायको.
**भावंडें** (न.) एका आईबापाचीं मुलें.
**भावणें** (सं. भाव क्रि.) मानणें; विचार करणें; कल्पणें; वाटणें; मानवणें; आवडणें; इच्छिणें.
**भावना** (सं. स्त्री.) कल्पना; निष्ठा; चिंतन; रोगाचा उद्‌भव; स्वभाव, प्रकृति.
**भावभक्ति, भावभगत** (स्त्री.) मनःपूर्वक भक्ति; बाजारगप्प; चलती, भरभराट.
**भावमूलक** (वि.) भावनेंतून प्रगट झालेलें.
**भावली** (स्त्री.), **भावलें** (न.) बाहुली, बाहुलें पहा.
**भाववाचक नाम** (सं. न.) व्याकरणांत, प्राणी अथवा पदार्थ यांच्या धर्माचा म्हणजे गुणाचा बोध करून देणारें नाम.

**भावसदा** (प्रा. पु.) आश्रय.
**भावसा** (प्रा. न.) वडील दीर.
**भावा** (पु.) वडील दीर.
**भावाभाव** (सं. ना.) खरेंखोटें, चैतन्य आणि जड. [खरोखर.
**भावार्थ** (सं. पु.) तात्पर्य, सारांश; (अ.)
**भावार्थी** (सं. वि.) भोळा, भाविक.
**भाविक** (सं. वि.) श्रद्धायुक्त, निष्ठावंत.
**भाविकणें** (प्रा. क्रि.) मोल पावणें (तुका० २०४७).
**भाविला** (प्रा. वि.) संस्कार केलेला.
**भावी** (सं. वि.) होणारा.
**भावीण** (स्त्री.) देवीच्या सेवेला स्वतःला अर्पण करणारी स्त्री; देवदासी.
**भावुक** (वि.) भक्तियुक्त, निष्ठावंत.
**भावेंचाड** (स्त्री.) अंतःकरणपूर्वक प्रेम.
**भावेस** (पु.) दीर. [(ज्ञा० १०।१४१).
**भावो** (प्रा. पु.) भाव शब्द पहा; आत्मा
**भावोजी** (पु.) दीर; बहिणीचा नवरा.
**भावो सरलें** वाट लागलें.
**भाव्य** (न.) भविष्य, दैव.
**भाव्या** (न.) भविष्य, दैव. [७।५६०).
**भाव्या** (प्रा. स्त्री. अने.) जावा (भा०
**भाष** (सं. भाषा स्त्री.) भाक, वचन, आश्वासन; प्रतिज्ञा; करार; (पु.) भास; मनावरचा ठसा; बोली.
**भाषण** (सं. न.) बोलणें, व्याख्यान.
**भाषा** (सं. स्त्री.) मनांतल्या कल्पना शब्दांच्या द्वारें बाहेर प्रकटण्याचें साधन; बोली; व्याख्यान.
**भाषांतर** (सं. न.) तर्जुमा; छाया.
**भाषावार** (क्रि. वि.) एक भाषा हा एक घटक असें कल्पून (केलेली व्यवस्था, प्रांतरचना इ.).
**भाषित** (सं. वि.) बोललेलें; (न.) वचन; वाक्य. [बोलणारा.
**भाषी** (सं. समासांत उत्तरपदीं (वि.)
**भाष्टाण** (स्त्री.) भाजलेल्या पदार्थाची घाण.
**भाष्य** (सं. न.) (सूत्रग्रंथावरील) व्याख्या, टीका, विवरण.
**भाष्यकार** (सं. पु.) व्याख्याकर्ता (विशेषतः श्रीशंकराचार्य).

**भास** (सं. पु.) अनिश्चित ज्ञान; भ्रांति, शंका; बाह्य सादृश्य; रीत; अभ्यास (मोह्नि०अद्वया० ३); (पु.) निळया रंगांचा पक्षिविशेष; एक प्राचीन नाटककार.
**भासणें** (क्रि.) वाटणें, शंका येणें; समजणें.
**भासमान** (सं. वि.) जाणवूं लागलेलें; भासणारें.
**भांसळ** (स्त्री. न.) कांडलेले तांदूळ.
**भास्कर** (सं. पु.) सूर्य, रवि.
**भास्वत्** (पु.) सूर्य.
**भास्वर** (सं. वि.) तेजस्वी.
**भाळ** (सं. भाल न.) कपाळ.
**भाळणें** (क्रि.) भुलणें, मोहित किंवा वश होणें; फिदा होणें.
**भाळपत्र** (सं. भाल + पत्र न.) दिव्य करण्यासाठीं राजी झाल्याबद्दलचा शेरा ज्या कागदाच्या माथ्यावर लिहितात तो कागद.
**भाळाभोळा** (वि.) भावडा.
**भाळी** (स्त्री.) कांबट्यांची चौकट.
**भिकट** (वि.) भेकडा, भित्रा.
**भिकणी** (स्त्री.) ढेकणांस बसण्यासाठीं भोक ठेवलेली लाकडाची पट्टी; ढेकणी.
**भिकणें** (न.) भीक, भिक्षा; दक्षिणा; बलुतेदाराला द्यावयाचें धान्य.
**भिकबाळी** (स्त्री.) पुरुषांनीं कानांत घालावयाचा मोत्यांचा दागिना.
**भिकार** (न.) भिकाऱ्यांची गर्दी किंवा समुदाय; (वि.) भिकारडी; तुच्छ.
**भिकारखोड** (स्त्री.), **भिकारचाळा** (पु.), **भिकारचेष्टा** (स्त्री.)भिकारपणाचें ढंग.
**भिकारचोट** (वि.) दरिद्री, तुच्छ, कंजुष.
**भिकारडा** (पु.) तुच्छार्थी-भिकारी.
**भिकारणें** (क्रि.) भिकारी होणें.
**भिकारलाड** (पु.) मुलाला विघडविण्यासारखे लाड.
**भिकारवाडा** (पु.)भिकाऱ्यांची राहण्याची जागा; भिकाऱ्यांचा समुदाय.
**भिकारी** (पु.) भीक मागून पोट भरणारा; (वि.) तुच्छ, क्षुद्र.
**भिकुटणें** (क्रि.) झाडाचीं पानें ओरबाडणें.
**भिकूट** (वि.) भित्रा, भ्याड.
**भिकूण** (पु.) ढेकूण.
**भिकेसवता** (प्रा.पु.) भिकारी. [अभ्रक.
**भिंग** (न.)सपाट काच; आरसा; (प्रा.न.)
**भिंगरी** (स्त्री.) गरगर फिरणारें लहान मुलांचें एक खेळणें; वाटोळा लहान तुकडा.
**भिंगारणें** (क्रि.) झुगारणें. [ १३।१८३).
**भिंगार** (प्रा. न.)कंदील; तावदान (ज्ञा०
**भिंगारा** (पु.) गरगर फिरणें; एक खेळ; भिंगांचें घर; कंदील.
**भिंगुरटी** (प्रा. स्त्री.) भ्रमरी. [ उदास.
**भिंगूळ, भिंगुळवाणें** (प्रा. वि.) भयंकर
**भिंगुलें** (न.) आरसा, काच.
**भिंगोरी** (स्त्री.) भिंगरी, भोवरा.
**भिजकट, भिजका, भिजट** (वि.) कांहींसा भिजलेला.
**भिजण** (स्त्री.) भिजत घातलेली डाळ.
**भिजणें** (क्रि.) ओलें होणें. **भिजत कांबळें (घोंगडें)** — निकालास न लागतां लांबणीवर पडलेलें काम.
**भिजपाऊस** (पु.) जमिनींत चांगला मुरेल असा पाऊस.
**भिजविणें** (क्रि.) ओलें करणें. **हात भिजविणें**—लाच देणें; **हात भिजणें**— जेवण्याचा प्रसंग येणें.
**भिजाणा** (पु.) भिजलेला दाणा; उसळ.
**भिड** (न.) टोळी, समुदाय.
**भिडणें** (क्रि.) येऊन पोचणें; स्पर्शणें; झगडणें; भेटणें; खुपसणें.
**भिडतू, भिडू** (पु.) खेळांतील जोडीदार.
**भिडस्त** (वि.) संकोच धरणारा, लाजाळू.
**भिडा** (प्रा. पु.) भिडस्त मनुष्य.
**भिंडी** (स्त्री.) गोफण.
**भिंडीपाळ, भिंडीमाळ** (पु.) गोफणीचा दगड (मुक्ते० रामा०. ४।५१).
**भिणें** (सं. भी क्रि.) भीति वाटणें.
**भिंत** (सं. भित्ति स्त्री.) दिवाल.
**भितर-री** (क्रि.वि.) आंतल्या बाजूस; आंत.
**भितरसवाई** (स्त्री.) नफ्याची अपेक्षा असतां आलेलें नुकसान.
**भितरा, भिता, भित्रा** (वि.) भ्याड, भिणारा.

**भितरीं** (अ.) आंत. [ ओंडके.
**भितळा** (पु.) फोडलेलें सर्पण; लाकडाचे
**भितळें** (प्रा. न.) कोलीत [ हरि० १४।१३२). [ किंवा लहान भित.
**भिताड** (स्त्री.) पडकी, आच्छादनविरहित
**भित्तिचित्र** (न.) भिंतीवर शोभेसाठीं काढलेलें चित्र (अजंठा हा याचा उत्कृष्ट नमुना).
**भित्तिपत्रिका** (स्त्री.) भिंतीवर लावण्याकरिता केलेलें मोठें चित्र अथवा जाहिरात.
**भिदुर** (सं. वि.) मोडणारें; ठिसूळ; (न.) वज्र. [ २।४।६१).
**भितें** (प्रा. न.) लाकूड (स्वा. दि०)
**भिनणें, भिदणें** (सं. भिद् क्रि.) आंत शिरून व्यापणें; ठसणें. [ लेला.
**भिन्न** (सं. वि.) निराळा; फुटका; तोड-
**भिभिस्त** (वि.) भेकड; भित्रा.
**भिमथडी** (स्त्री.) भीमा नदीच्या कांठच्या प्रदेश. [ चक्कर; फिरकी, झोकांडी.
**भिरकंडा** (पु.), **भिरकंडी, भिरकांडी** (स्त्री.)
**भिरकांडें** (न.) रागाच्या आवेशामुळें आलेली चक्कर; डोळे फिरणें.
**भिरकावणें** (क्रि.) झुगारणें.
**भिरकुटी** (स्त्री.) लिहिण्यांतली लपेटी.
**भिरकुंड, भिरकुड, भिरकूट** (न.) वोरूंतला गोर. [ झोट, चक्कर.
**भिरकें** (न.) रागाचा झपाटा; भूतबाधा;
**भिरड, भिरंड** (न.) रागाचा झटका.
**भिरडभुंगा** (प्रा. पु.) कीड; वाळवी (रामजोशी पृ. ९०).
**भिरडी** (स्त्री.) रागाचा झटका; खरडपट्टी; रातवीचें वीं.
**भिरभिरणें** (क्रि.) फिरणें, तिरमिरी येणें.
**भिरभिरी** (स्त्री.) भोवंड, चक्कर. [ चक्र.
**भिरभिरें** (न.) वाऱ्यानें फिरणारें कागदाचें
**भिररेवडी** (स्त्री.) फजिती, दुर्दशा.
**भिरूड** (प्रा. न.) कीड (विवे०पू०७।११५).
**भिलावा** (सं. भल्लातक पु.) बिब्बा.
**भिल्ल** (सं. पु.) एक रानटी जात.
**भिल्लटी, भिल्लणी** (स्त्री.) भिल्लीण.
**भिल्लाची हट्टी** भिल्लाची वस्ती किंवा राहण्याची जागा.
**भिल्लाण** (पु.) भिल्लांचा देश.
**भिल्लावणें** (प्रा. क्रि.) भिजविणें.
**भिल्लिणी** (स्त्री.) भिल्लीण.
**भिंवई** (सं. भ्रूवर्तिका स्त्री.) भोंवई; भुंवई.
**भिवविणें** (क्रि.) भिण्यास लावणें, भय दाखविणें. [ वलय.
**भिशी** (गुज. स्त्री.) खाणावळ; जेवण्याचा
**भिसळ** (सं. मिश्रण स्त्री.) मिसळ, मिश्रण.
**भिस** (प्रा. पु.) केश (मुक्ते० रामा० ६।१२३).
**भिसाळ** (वि.) केसाळ.
**भिसे** (सं. भिषक् पु.) वैद्य.
**भिसें** (सं. बिस न.) कमळाचा देठ.
**भिस्त** (स्त्री.) विश्वासस्थान, आधार, आश्रय. [ पाणक्या.
**भिस्ती** (फा. पु.) मुसलमान जातीचा
**भिस्मिल्ला** (अर. बिस्मिल्ला पु.) मूळ अर्थ-ईश्वराच्या प्रार्थनेचा आरंभ; रूढ अर्थ-एककार, गोंधळ.
**भिक्षणें** (सं. भिक्ष क्रि.) भिक्षा मागणें.
**भिक्षा** (सं. स्त्री.) भीक, याचना; दान.
**भिक्षाळ, भिक्षावळ** (स्त्री.) मुंजींत ब्रह्मचाऱ्यानें मागितलेली भिक्षा.
**भिक्षु** (सं. पु.) भिक्षा मागून राहणारा; ब्रह्मचारी, संन्यासी.
**भिक्षुक** (सं. पु.) याज्ञिकीवर निर्वाह करणारा ब्राह्मण.
**भिक्षुकी** (स्त्री.) भिक्षुकाची वृत्ति; याचकवृत्ति.
**भिक्षेकरी** (पु.) भिकारी.
**भिक्षेश्वरी** (सं. स्त्री.) भीक. **भि० किंवा लक्षेश्वरी**—भीक मागणारा किंवा अतिशय श्रीमंत या दोघांची चंगळ असते.
**भी** (स्त्री.) भीति; भय.
**भीक** (सं. भिक्षा स्त्री.) भिक्षा (निंदार्थी). **भीक लागणें**—दरिद्रावस्था येणें; **भिकेचे डोहाळे**—पुढें येणाऱ्या दुःस्थितिनुरूप होणाऱ्या दुर्वासना; **भीक घालणें**—दाद देणें; मोजणें.
**भीकपायली** (स्त्री.) महारास गांवकऱ्याकडून दिलें जाणारें धान्य.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**भीकबाळी** (स्त्री.) पुरुषांच्या कानांतला मोत्यांचा एक दागिना.
**भीज** (स्त्री.) भिजणें.
**भीड** (स्त्री.) संकोच; दुसऱ्याचा मनोभंग न करण्याविषयीं जपणूक; आग्रह, वशिला; दाटी, गर्दी; लोकलज्जा. **भीड न तुटणें**–मनांत नसतांहि दुसऱ्याच्या आग्रहाला बळी पडणें; **भीड भिकेची बहीण**–दुसऱ्याचा मनोभंग न व्हावा म्हणून मनुष्य त्याची विनंति मान्य करूं लागला म्हणजे तो लवकरच भिकेला लागावयाचा; **भीड न चेपणें**–परिचयाच्या योगानें मनांतली भीति नाहींशी होणें.
**भीडकर, भीडसर, भीडसारू, भीडसाळू** (वि.) भिडस्त, दुसऱ्याची भीड ठेवणारा.
**भीडका** (प्रा. पु.) अस्त्रविशेष.
**भीडभाड, भीडमर्यादा, भीडमुर्वत** (स्त्री.) संकोच, मुर्वत, पर्वा, भीड.
**भीडसर, भीडसाळू** भीडकर पहा.
**भीत** (सं. वि.) भ्यालेला.
**भीतरीं** (प्रा. अ.) आंत.
**भीति** (सं. स्त्री.) भय, धास्ती.
**भीम** (सं. वि.) भयंकर; (पु.) पांच पांडवांपैकीं दुसरा; अतिशय बळवान् मनुष्य.
**भीमरात्र, भीमरात्री** (सं. स्त्री.) माणसाच्या वयाच्या ७७ व्या वर्षाच्या ७ व्या महिन्याची ७ वी रात्र.
**भीरु** (सं. वि.) भित्रा.
**भीरू** (सं. स्त्री.) स्त्री.
**भीलवण** (न.) भिल्लांचा मुलुख.
**भीश, भीस** (वि.) केसाळ (रामदास युद्ध० ६३).
**भीषण** (सं. वि.) भयंकर. [पावणारें वचन.
**भीष्मप्रतिज्ञा** (सं. स्त्री.) कधीं भंग न
**भीष्माष्टमी** (सं. स्त्री.) माघ शु० ८ (भीष्माचार्यांच्या पुण्यतिथीचा दिवस).
**भुई** (सं. भू स्त्री.) भूमि, जमीन; बांधा; ठेवण.
**भुईचाफा–पा** (पु.) एक फुलझाड.
**भुईकोट** (पु.) जमिनीवरचा किल्ला.
**भुईघर** (न.) तळघर.
**भुईनळा** (पु.) दारूनें भरलेलें मातीचें वोळकें; हें भुईवर ठेवून त्यास वत्ती दिली म्हणजे दारूच्या ठिणग्या कारंज्यासारख्या जोरानें वर उडतात.
**भुईपारणें** (न.) पानावर अन्न न वाढतां भुईवरच वाढून जेवण्याचें व्रत.
**भुईभाटलें** (न.) वरकस जमीन.
**भुईभाडें** (न.) इमारत बांधलेल्या जमिनीबद्दलचें भाडें.
**भुईमूग** (पु.) जमिनीच्या पोटांत ज्याला शेंगा लागतात असें एक पीक.
**भुईशेंग** (स्त्री.) भुईमुगाची शेंग. [लागून.
**भुईसर** (अ.) जमिनीच्या पृष्ठभागाला
**भुईसरपट** (अ.) जमिनीसरसा.
**भुईसांड** (अ.) जमिनीपासून थोडें वर.
**भुक्** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) खाणारा, भोगणारा.
**भुकटा** (पु.), **भुकटी, भुकणी, भुकी** (स्त्री.) पूड.
**भुकड, भुक्कड** (वि.) बुभुक्षित; निरुद्योगी.
**भुंकण** (प्रा. न.) कुत्रें (स्वा० दि० २।४।५१)
**भुकणी** (स्त्री.) पूड.
**भुंकणें** (सं. बुक्कन क्रि.) कुत्र्याचें ओरडणें.
**भुका** (पु.) बुका; एक काळी सुगंधी पूड; (वि.) भुकेलेला.
**भुकार** (न.) कुंभाराचें फिरतें चाक.
**भुकाळू** (वि.) ज्याला वारंवार भूक लागते तो, भुकेला.
**भुकिस्त** (सं. वि.) भुकेला, क्षुधित.
**भुकी** (वि.) थोडीशी भूक राखून जेवणारा.
**भुकेजणें** (क्रि.) भूक लागणें; खाण्याची इच्छा होणें. [अतिशय उत्सुक.
**भुकेला** (वि.) क्षुधित; प्राप्तीविषयीं
**भुकेबंगाल** (हिं. भुकेकंगाल वि.) दरिद्री.
**भुकेणें** (क्रि.) उत्कट इच्छा करणें.
**भुक्कड** भुकड पहा.
**भुक्त** (सं. वि.) खाल्लेला; गेलेला.
**भुक्ति** (सं. स्त्री.) जेवण; भोगवटा.
**भुगराळा, भुगा** (पु.), **भुगी** (स्त्री.) चुरा, चूर्ण, पीठ.
**भुंगा** (सं. भृंग पु.) भ्रमर; झेंगट; भ्रमण.
**भुगा** (पु.), **भुगी** (स्त्री.) पूड.

भुगाळ (वि.) भुगा झालेला.
भुगी (स्त्री.) पूड.
भुज (सं. पु.) दंड, बाहु, हात; भूमितींत काटकोन त्रिकोणांत कर्ण व कोटि यांच्याशिवाय राहिलेली तिसरी बाजू.
भुजक्कड (पु.) दांडगा; भव्य.
भुजंग, भुजंगम (सं. पु.) सर्प; जार.
भुजंगप्रयात (सं. न.) एक वृत्त—याच्या चरणांत १२ अक्षरें असून य, य, य, य, असे चार गण असतात.
भुंजणें (सं. भुंज् क्रि.) उपभोग घेणें.
भुजदंड (सं. पु.) दंड; बाहु.
भुजपत्र (सं. भूर्जपत्र न.) भूर्ज वृक्षाची अंतर्साल; झिरझिरीत कागद किंवा कापड. [ सांधा.
भुजवट (न.), भुजवटा (पु.) खांद्याचा
भुजा (सं. स्त्री.) सबंध हात, बाहु.
भुंजाड (वि.) भाजलेलें.
भुजांतर (सं. न.) वक्षःस्थल, छाती.
भुजारी, भुंजारी (पु.) भडभुंजा.
भुंजिजणें (सं. भुंज् क्रि.) भोगणें.
भुटा, भुट्टा (हिं. पु.) कणीस; मक्याचें कणीस. [ घडामोड.
भुटाटकी (प्रा. स्त्री.) भूत; खटपट;
भुट्टेचोर (पु.) भामटा, उचल्या.
भुडकी (स्त्री.) नदीच्या कांठाशीं खोदलेली विहीर किंवा खाच. [ स्नान.
भुडभुडगंगा (स्त्री.) घाईघाईनें केलेलें
भुंडा (वि.) शिंगें, शेंडी किंवा अग्र नसलेला.
भुणभूण (स्त्री.) त्रास; तगादा.
भुतणें (प्रा. क्रि.) भुलणें (ज्ञा० १७। २९६); होणें; अनुभवणें (ज्ञा०५।४७).
भुता, भुत्या (पु.) देवीचा उपासक.
भुताटकी (स्त्री.) भुतांचा व्यवहार, चेष्टा इ. [ प्रमाणें चाळे करणें.
भुताटणें (क्रि.) भूत अंगांत संचारल्या-
भुतारा–री, भुतेरा (पु.) पंचाक्षरी.
भुतावळ, भुताळ (सं. भूतावलि न.) पिशाचांचा समुदाय; हलकट लोकांची टोळी; फटाके वगैरे दारूकाम एकदम पुष्कळ सोडणें. [ सोडणें.
भुतावळें (न.) पुष्कळ दारूकाम एकदम
भुतावें (न.) वटण.
भुती (स्त्री.) पडदानशीन स्त्रियांचें अंग झाकून घेण्याचें वस्त्र.
भुतोंडी (प्रा. पु.) भूतावलि.
भुत्या (पु.) देवीचा उपासक.
भुदगा (पु) जळून रक्षा झालेलें अन्न; भुगा; राख.
भुनास (पु.) हत्ती बांधण्याचा खांब.
भुपकार (पु.) वानरांचा 'भुप' असा शब्द. [या रागिणीत रचलेलें पद्य.
भुपाळी (सं. स्त्री.) गायनांतील एक रागिणी;
भुभुःकार (पु.) वानरांचा शब्द.
भुभुसणें (प्रा. क्रि.) उदयास येणें.
भुभुक्षा (सं. स्त्री.) भूक, क्षुधा.
भुमका, भुमकी (स्त्री.) गप्प; बातमी.
भुम्या (पु.) जागेचा माहितगार; जुना रहिवासी.
भुमखाना (पु.) टोळ, मुंग्या वगैरे नाशकारक प्राण्यांचा समुदाय. [ वारुळ.
भुयार (हिं. भुयार न.) भुईघर; विवर;
भुयाळ (प्रा. पु.) वाटाड्या.
भुयेर (प्रा. न.) भुयार, तळघर.
भुरकट, भुरका, भुरा (वि.) पांढुरका.
भुरकट (वि.) नापीक (जमीन).
भुरकणें (क्रि.) तोंडानें शोषून घेणें; (न.) अतिशय कोंवळा नारळ.
भुरका (पु.), भुरकी (स्त्री.) भुरकण्याची क्रिया; पूड; रुपया; (वि.) भस्मी किंवा धुरकट रंगाचा.
भुरकाड (वि.) शुष्क. [ काडी.
भुरकाडी–ळी (स्त्री.) वाळून शुष्क झालेली
भुरकी (स्त्री.) घोड्याची झूल; पालखी–वरचा किंवा गाडीवरचा टप अथवा पडदा. [ गाडी.
भुरकी गाडी टपाची किंवा पड्याची
भुरकूट (न.) भुर्रर जळून जाणारें लाकूड.
भुरटा (वि.) उडाणटप्पू.
भुरदंड (पु.) आपल्या हातून घडलेल्या नुकसानीची भरपाई करावी लागणें.
भुरभुरणें (क्रि.) पूड वगैरे हलक्या हातानें थोडथोडी पसरून टाकणें.
भुरभुरा (प्रा. स्त्री.) भेसळ.

भुररें (प्रा. न.) कौटाळ, चेटुक; भुरळ (दा० २।३।२१); वारें (विवे० पृ० २।७३).
भुररेकरी (प्रा. वि.) भुरळ पाडणारा.
भुरली (स्त्री.) फजिती.
भुरवणी (स्त्री.) गवंड्याची लहान करणी.
भुरवणें (न.) गवंड्याची मोठी करणी.
भुरसी (स्त्री.) दक्षणा.
भुरळ (स्त्री.) मोहिनी, मोह, भ्रम.
भुरळणें (क्रि.) भोक, अक्षर इत्यादि मोठें करणें; मोहित होणें; फसलें जाणें.
भुरळें (न.) भुरळ.
भुरा (पु.) कोहळा; (वि.) भुरक्या रंगाचा.
भुराडा (पु.) नाश; कामाची गर्दी.
भुरी (स्त्री.) राख, भस्म; उटी.
भुरुभुरु (अ.) भराभर.
भुरेरे (न.) वेड, पिसें. [होणें.
भुलणें (क्रि.) बेशुद्ध होणें; विसरणें; लुब्ध
भुलथाप (स्त्री.) भरंवसा वाटण्याकरितां मारलेली गप्प.
भुलवण (स्त्री.) भूल; थाप; भुरळ.
भुलविणें (क्रि.) चुकविणें; वेड लावणें.
भुलाई (स्त्री.) फसवणूक.
भुली (प्रा. स्त्री.) धुंदी, गुंगी; भुरळ, मोह.
भुलोबा (पु.) शेतांत पाखरासाठीं उभें केलेलें बुजगावणें.
भुंवई (सं. भ्रुवर्तिका स्त्री.) भिंवई, भंवई.
भुवन (सं. न.) लोक, जग; गृह;
भुवर्लोक (सं.पु.) पृथ्वीच्या वर व सूर्याच्या खालीं असा सिद्ध व ऋषि यांचा राहण्याचा लोक.
भुसकट, भुसकूट (न.) भूस, भुसा, काष्ठ-चूर्ण. भु० पाडणें–बेजार करणें.
भुसडा (पु.) चुराडा, पीठ. [नसलेली.
भुसभुशीत (वि.) ठिसूळ, चिकटपणा
भुसा (सं. बुस पु.) भूस, तूस..
भुसार (न.) धान्य वगैरे.
भुसारपेठ (स्त्री.) धान्यांचा बाजार; भुसार मालाचीं दुकानें.
भुसारी (पु.) धान्याचा दुकानदार, दाणेवाला.
भुसारें (न.) भुसाची रास.
सें (न.) झिमझिम पाऊस; धुकें.

भुळभुळा-ळ (क्रि. वि.) पाणी, धान्य, अश्रु इ. गळतांना होणारा आवाज.
भू (सं. स्त्री.) पृथ्वी.
भूक (सं. बुभुक्षा स्त्री.) खाण्याची इच्छा.
भूकंप (सं. पु.) धरणीकंप.
भूकलाडू (पु.) फराळाचें; शिदोरी.
भूकबळी (वि.) उपासमारीनें मेलेला.
भूगर्भ (न.) पृथ्वीच्या पोटांतील भाग.
भूगोल (सं. पु.) पृथ्वीरूप गोल; पृथ्वी-वरील देशांची माहिती, भूवर्णन.
भूचर (सं. वि.) जमिनीवर फिरणारें.
भूचरी (सं. स्त्री.) चार योगमुद्रांपैकीं एक.
भूत (सं. न.) प्राणी, पिशाच; गतकाल; आदितत्त्व; सोंगट्यांच्या खेळांत एकदां मारली गेली असून पुनः बसलेली सोंगटी; (वि.) झालेलें, मागचें.
भूतखाना (पु.) भुतावळा, भुतांचा समुदाय; भूतचेष्टा. [(परमेश्वर).
भूतात्मा (सं. पु.) प्राणिमात्रांचा आत्मा;
भूतेंखेतें (न. अनें.) भुतें, पिशाचें, हडळी, समंध इ. [चमत्कार.
भूतचेष्टा (स्त्री.) पिशाचाचा खेळ,
भूतणें (प्रा. क्रि.) भुलणें.
भूतदया (सं.स्त्री.) प्राणिमात्राविषयीं दया.
भूतपूर्व (सं. वि.) कधीं मागच्या काळांत झालेला.
भूतबाधा (सं. स्त्री.) भुताची पीडा.
भूतयज्ञ (सं. न.) पंचमहायज्ञांपैकीं तिसरा म्हणजे ब्रह्मयज्ञ.
भूतलें (प्रा. वि.) मागचें.
भूतवेळ (स्त्री.) भुतांची संचार करण्याची वेळ (दुपार, संध्याकाळ, मध्यरात्र).
भूतसंचार (सं.पु.) भूतबाधा, अंगांत भूत येणें.
भूतात्मा (सं. पु.) देह, शरीर.
भूताटकी (स्त्री.) चेटूक.
भूतावळ (स्त्री.) (तिरस्कारार्थी) स्वार्था-करितां किंवा त्रास देण्याकरितां उठ-वलेलीं माणसें.
भूतोंडी (पु.) भूतबळी.
भूदान (न.) जमिनीचें दान.
भूदानयज्ञ (पु.) समान वाटपासाठीं जमीन देण्याची चळवळ.

**भूदास** (पु.) जमीनदाराचा नोकर.
**भूदेव** (सं. पु.) ब्राह्मण.
**भूधर** (सं. पु.) पर्वत; शेष नामक सर्प.
**भूप** (सं. पु.) राजा; भूपकल्याण राग.
**भूपकल्याण** (सं.पु.)गायनांतला एक राग.
**भूपट्टा** (पु.) दोन भूप्रदेशांना जोडणारा जमिनीचा तुकडा (इं. कॉरिडर).
**भूपति, भूपाल, भूपाळ** (सं. पु.) राजा.
**भूपाळी** (स्त्री.) देवास जागें करण्यासाठीं सकाळीं म्हणावयाचें पद्य.
**भूपृष्ठ** (सं. न.) पृथ्वीचें वरचें तळ.
**भूभुजेंद्र** (सं. पु.) सार्वभौम राजा, राजाधिराज.
**भूम** (न.) मुंग्यांचें वारुळ.
**भूमि** (सं. स्त्री.) पृथ्वी, जमीन; पाया.
**भूमिका** (सं. स्त्री.) सोंग, नटाचा वेष; रंगभूमि; जागा.
**भूमिगत**(वि.) कायद्याच्या कचाटयांतून सुटण्यासाठीं गुप्त झालेला.
**भूमिति** (सं. स्त्री.) जमिनीची मापणी.
**भूमितिश्रेढी** (सं.स्त्री.) अंकगणितांत–जींत कांहीं एका विवक्षित पटीनें संख्या वाढतात किंवा कमी होतात ती पंक्ति.
**भूमिधर** (सं. पु.) पर्वत.
**भूमिया** (पु.) जमिनीचा मालक; गांवचा मुख्य पाटील; भिल्ल जातीचा वाटाड्या.
**भूम्या** (पु.) गांवचा फार जुना रहिवासी.
**भूय** (सं. भू स्त्री.) जमीन, भुई.
**भूयसी** (सं. स्त्री.) धार्मिक समारंभाच्या अखेरीस ब्राह्मणांना वांटावयाची दक्षिणा.
**भूर** (स्त्री.) डोळ्यांत बुबुळावर येणारा पातळ पांढरा पडदा.
**भूरुह** (सं. पु.) वृक्ष.
**भूर्जपत्र** (सं. न.) भूर्ज नांवाच्या वृक्षाची अंतर्साल; अगदीं झिरझिरीत झालेलें वस्त्र.
**भूल** (हिं. स्त्री.) चूक; विस्मरण; भ्रम.
**भूलथाप** (स्त्री.) फसवणूक.
**भूलोक** (सं. पु.) इहलोक, पृथ्वी.
**भूवैकुंठ** (सं. पु.) श्रीक्षेत्र पंढरपूर.
**भूशलाका, भूशिर** (सं. स्त्री.) जमिनीचें समुद्रांत गेलेलें टोक.
**भूषण** (सं.न.) दागिना, अलंकार, शोभा.
**भूषविणें** (क्रि.) शोभा आणणें.
**भूषा** (सं. स्त्री.) भूषण.
**भूषावें** (प्रा. न.) भूषण.
**भूषित** (सं. वि.) अलंकृत, शोभविलेलें.
**भूस** (सं. बुस न.) भुसकट, तूस; धान्याविषयीं सामान्य संज्ञा.
**भूसुत** (पु.) शेतकरी.
**भूसेना** (स्त्री.) रचनात्मक कार्यासाठीं उभारलेली स्वयंसेवक संघटना.
**भृकुटी** (सं. स्त्री.) भिवई. **भृ० भंग**–रागाची दृष्टि; भिवया चढवून पाहणें.
**भृंग** (सं. पु.) भ्रमर, भुंगा.
**भृंगा, भृंगी** (सं. स्त्री.) भांग.
**भृंगी** (सं. पु.) एक शिवगण.
**भृगु** (पु.) शुक्र; पर्वताचा तुटलेला कडा.
**भृगुवार** (सं. भृगुवासर पु.) शुक्रवार.
**भृत्य** (सं.) चाकर.
**भृत्या** (सं. स्त्री.) मजुरी; पोषण.
**भे** (सं. भय न.) भय, भीति.
**भेउर, भेउरें** (न.) भीति.
**भेक** (सं. पु.) बेडूक.
**भेक** (स्त्री.) चीर, फाक.
**भेकट, भेकड, भेकूड** (वि.) भित्रा.
**भेकणा** (प्रा. वि.) भेसूर, कुरूप.
**भेकणें** (क्रि.)चिरणें; फाळ काढणें; रडणें.
**भेकर, भेकरें** (न.) हरिणाची एक लहानशी जात.
**भेंकाड** (न.) भोकाड; वासलेलें तोंड.
**भेग** (स्त्री.) चीर; फट.
**भेंगर, भगळी, भेग** (स्त्री.) चीर, फट.
**भेगलणें** (क्रि.) उलणें, चीर पडणें.
**भेंगळी** (स्त्री.) चीर, फट.
**भेंजूड, भेंझूड** (वि.) भित्रा, लाजाळू.
**भेट** (स्त्री.) गांठ; आलिंगन; मोठ्यास नजर केलेली किंवा अर्पिलेली वस्तु; देणगी. [ आलिंगणें.
**भेटणें** (क्रि.) गांठ घेणें, मुलाखत करणें;
**भेटबकरा** (पु.) गांवच्या अधिकाऱ्यांनीं राजास भेटीच्या वेळीं करावयाची बकऱ्याची नजर.
**भेटविणें** (क्रि.) भेट करून देणें.

... वाचनालय, सातारा.



**भेटी** (प्रा. स्त्री.) मुलाखत, गांठ.
**भेड** (प्रा. वि.) भित्रा, भेकड; (न.) भय (अम० १।६).
**भेंड** (पु. न.) भुरकुंड; एक हलका निःसत्त्व पदार्थ; पोकळ झाड.
**भेडणें** (प्रा. क्रि.) खेळांतल्या एका पक्षाचा पुढारी होणें (तुका० १७१).
**भेडती, भेडतू, भेडू** (पु.) खेळांतल्या एका पक्षाचा नायक; भिडू. [घाबरट.
**भेडसर, भेडसार, भेडसारू** (वि.) भित्रा,
**भेडसावणें** (क्रि.) भिवविणें; (न.) वुजगावणें. [रास.
**भेंडा** (पु.) मातीचें ढेकूळ; कच्ची वीट;
**भेंडी** (स्त्री.) एक फळभाजी.
**भेडुका** (वि.) भयभीत.
**भेडू** (पु.) भेडती पहा.
**भेंडोळा** (पु.), **भेंडोळें** (न.) गुंडाळी.
**भेण** (प्रा. न.) भय.
**भेणें** (क्रि.) भिणें.
**भेणेंभाव** (पु.) भीतिजन्य ईश्वरभक्ति.
**भेत** (स्त्री. न.) चीर, फाक, फोड.
**भेतळ, भेतळा, भेताळा** (पु.) फोडलेलें सर्पण.
**भेतळा** (पु.) मोठी भेग.
**भेद** (सं. पु.) गट्टी फोडणें; फितूर, भिन्नता, दुजाभाव; अलग होणें; प्रकार; गुप्त वातमी.
**भेदक** (सं. वि.) भेद करणारें.
**भेदड** (वि.) भितरा.
**भेदणें** (क्रि.) छेदणें; फोडणें.
**भेदभाव** (पु.) भिन्नत्वाची बुद्धि.
**भेदरणें** (क्रि.) भीतीनें घावरणें.
**भेदरा** (प्रा. पु.) भय, धास्ती.
**भेदाभेद** (सं. पु.) भिन्नभाव, भेदभाव; भिन्नता. [जाणणारा.
**भेदी, भेद्या** (वि.) गुह्य किंवा मर्म
**भेद्य** (सं. वि.) फोडण्यासारखा.
**भेनेभक्ति** (स्त्री.) भयजन्य भक्ति.
**भेर, भेरी** (सं. भेरी स्त्री.) मोठा नगारा, नौवत; चीर, भेरी, भेग, फट.
**भेरकट** (वि.) वहिरट.
**भेरड** (न.) डोळयाचा गू.
**भेंरड, भेंरूड** (न.) झाडावरची किंवा फळावरची एक कीड.
**भेरी** (सं. स्त्री.) नौवत. [भेली.
**भेल** (स्त्री.) मिसळ; मिश्रण; गुळाची
**भेलकंड** (न.), **भेलकंडा** (पु.), **भेलकंडी** (स्त्री.) झोकांडी, झेंप.
**भेलण** (न.) मिश्रण, भेळ.
**भेला** (पु.) ढेप, रास, गोळा.
**भेली** (स्त्री.) गुळाची ढेप.
**भेंव, भेव** (प्रा. स्त्री.) भीति.
**भेंश–ष–स** (सं. वेष पु.) पोषाख; सोंग.
**भेषज** (सं. न.) औषध.
**भेषजी** (पु.) औषधें विकणारा.
**भेसर** (वि.) भित्रा, भेकड.
**भेसळ** (स्त्री.) मिश्रण, भेळ.
**भेसूड** (वि.) भित्रा.
**भेसूर** (वि.) भयंकर.
**भेळ** (स्त्री.) भेसळ, मिसळ.
**भेळा** (पु.) भेला; गुंडाळयांची माळ.
**भैदवी** (प्रा. स्त्री.) कृपा.
**भैरव** (सं. पु.) शिवाचा एक अवतार; स्त्रियांचें एक कर्णभूषण; गायनांतला एक राग; (वि.) भयंकर.
**भैरवी** (स्त्री.) एक रागिणी; दुर्गा.
**भैरोबा** (पु.) भैरव; बहिरोबा; वहिरा मनुष्य.
**भोई** (पु.) पालखी मेणा वगैरे वाहणारा, डोलकर; कोळी.
**भोई** (सं. भू स्त्री.) भुई, जमीन.
**भोईखाना** (हिं. पु.) पालख्या, मेणे इ. ठेवण्याची जागा.
**भोंई** (सं. भ्रू स्त्री.) भुंवई.
**भोंक, भोक** (सं. भूक न.) छिद्र, पोकळपणा; मोठ्यानें ओरडणें.
**भोंक** (न.) भुंकणें, टाहो, गर्जना.
**भोंकण** (न.) एकाएकीं मोठ्यानें रडणें.
**भोंकणें** (न.) कुत्र्याचें रडणें.
**भोकर** (न.) चिकट रसानें युक्त एक फळ; स्त्रियांचें एक कर्णभूषण.
**भोकरडोळया** (वि.) वटबटीत डोळयांचा.
**भोकरबाळी** (स्त्री.) स्त्रियांचें एक कर्णभूषण.
**भोकसा** (पु.), **भोकसें** (न.) मोठें भोक.

**भोकसा** (प्रा. पु.) आंत पेंढा भरून उभें केलेलें जनावर इत्यादि(ज्ञा० १६।३८६.)
**भोका** (पु.) बोका, मांजरांतला नर.
**भोकाड, भोंकाड, भोकार, भोंकार** (न.) वासलेलें तोंड.
**भोक्तव्य** (सं. न.) सुखदु:खादि भोग.
**भोक्ता** (सं. वि.) उपभोग घेणारा, पुष्कळ जेवणारा.; गुणज्ञ, मार्मिक.
**भोक्तव्य** (सं. न.) जें भोगावयाचें तें, भोग; नशीब.
**भोग** (सं. पु.) विषय; सुखदु:खादिकांचा अनुभव; त्या अनुभवाचें फळ; मैथुन-सुख; आकाशांतील रेखांश.
**भोंग** (प्रा. पु.) पंखाचा किडा (दा० १।१०।५५); [सोसणें; उपयोग करणें.
**भोगणें** (क्रि.) सुखदु:खाचा अनुभव घेणें;
**भोगमूर्ति** (सं. स्त्री.) सामान्य उत्सवांत मिरविण्याची देवाची मूर्ति; कारखा-न्याचा खरा चालक. [ कबजा.
**भोगवटा** (पु.) उपभोग, वापर, वहिवाट;
**भोगवती** (सं. स्त्री.) पाताळगंगा.
**भोगविडा** (पु.) संक्रान्तीच्या दिवशीं वायका ब्राह्मणाला किंवा सवाष्णीला उत्तम मसालेदार विडा करून देतात तो.
**भोंगळ** (स्त्री.), **भोंगळा** (पु.) तुतारी, पिपाणी; (वि.) ढिला, पोकळ.
**भोंगळजमाखर्च, भोंगळरकम**—केवळ दाखविण्यापुरता सरासरी अव्यवस्थित-पणें ठेविलेला जमाखर्च किंवा दर्शनी रक्कम; निश्चित नव्हे अशी रक्कम.
**भोंगळसुती, भोंगळसूत्री** (वि.) अव्यवस्थित, ढिलाईचा.
**भोंगळी** (स्त्री.) वेळा.
**भोंगा** (पु.) कारखान्याची शिट्टी.
**भोगावती** (स्त्री.) पाताळगंगा.
**भोगी** (सं. वि.) भोक्ता, हौशी; (पु.) सर्प; (स्त्री.) मकर-संक्रान्तीच्या अगो-दरचा दिवस.
**भोग्य** (सं. वि.) भोगण्यास योग्य.
**भोग्या, भोज्या** (पु.) आंधळी कोशिंबीर, लपंडाव वगैरे खेळांत दुसऱ्याचे डोळे झाकणारा.

**भोज** (सं. न.) भोजन, जेवण (तुका० ३०९०); आवड (ज्ञा० ९।२०६); संतोष; प्रीति (ना० २११६); राज्य (ज्ञा० १०।२०); मोल, मोठेपण (भाग० १।२६); गर्व (भा० १।२७); (पु.) एक प्राचीन राजा.
**भोजन** (सं. न.) जेवण; खाणें. भो०भाऊ—कांहीं काम न करतां केवळ जेवणासाठीं गोळा झालेले.
**भोजपत्र** (सं. भूर्जपत्र नं.) भूर्जपत्र.
**भोजी** (सं. समासांत उत्तरपदीं वि.). खाणारा. [आदि० २४।५८).
**भोजें** (प्रा.न.) भोजन, खाणेंपिणें. मुक्ते०
**भोज्य** (सं.न.) खाण्याजोगी वस्तु; (वि.) खाण्याजोगें.
**भोंड** (न.) जोंधळा, बाजरी वगैरे धान्यांचें टरफल; (स्त्री.) भोवंड, चक्कर.
**भोंडें** (न.) बुसकट, फोल.
**भोंडला** (पु.) आश्विनाच्या महिन्यांत मुली भिंतीवर चित्रें काढून त्यांच्यापुढें गाणीं म्हणतात तें.
**भोंडा** (वि.) जीर्ण, वृद्ध.
**भोंडभारूड** (न.) अडचण; संकट.
**भोंत** (पु.) धान्य भरण्याचा मोठा थैला; मशाल, केतकीचे तंतु; त्वचा काढल्या-मुळें बाहेर दिसणारा मांसपिंड.
**भोंता, भोंताली, भोंतीं** इ. बद्दल भोंवता, भोंवताली, भोंवतीं हे शब्द पहा.
**भोंदगिऱ्हा** (पु.) समंध; लचांड; त्रास.
**भोंदणें** (क्रि.) भुलथापीनें किंवा कपटानें वश करणें.
**भोंदू** (वि.) दांभिक, ढोंगी.
**भोपळदेवता** (स्त्री.) भटक्या मारणारी स्त्री.
**भोपळसुती** (वि.)अव्यवस्थित, ओवडधोबड.
**भोपळा** (पु.) एक फळ; तुंबा, कमंडलु; वीण्याचा खालचा फुगीर भाग ज्याचा केला असतो तो. **भ्रमाचा भोपळा फुटणें**—एखाद्या गोष्टींत कांहीं राम असेल अशी मनाची समजूत कांहीं कारणानें त्या वस्तूचें खरें स्वरूप उघड-कीस येऊन दूर होणें; **भोपळयायेवढें शून्य**—अत्यंत अभाव.

**भोपळी** (स्त्री.) भोपळ्याचा वेल.
**भोपळ्या रोग** मेदोवृद्धि, फोपसेपणा.
**भोपी, भोप्या** (पु.) देवीचा पुजारी.
**भोंबा** (पु.) वागुलबोवा. **भोंबा भरून सांगणें**—फुगवून सांगणें.
**भोंबारा** (पु.) खरज सुराचें एक वाद्य. **भों० वाजविणें**—जाहिर करणें.
**भोभो** (अ.) कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज.
**भोम** (सं. भूमि न.) वारूळ; (पु.) लग्नासंबंधी मेजवानी.
**भोमवार** (सं. पु.) मंगळवार.
**भोमाड** (न.) मुंग्यांचें मोठें वारूळ.
**भोय** (स्त्री.) भूमि, भुई, जमीन.
**भोवरें** (न.) उंसाच्या गुऱ्हाळांत चुलवणाखालीं राखेसाठीं केलेली खाच.
**भोयार** (न.) भुयार, तळघर; विवर.
**भोये** (प्रा. स्त्री.) भुई, जमीन.
**भोर** (वि.) काळया रंगाचें आधिक्य दर्शविण्यासाठीं योजावयाचा शब्द. जसें—काळाभोर.
**भोरंडी** (स्त्री.) क्रौंचपक्षी; तारेची अंगठी.
**भोरपी** (पु.) बहुरूपी; डोंबारी.
**भोरा** (वि.) पांढुरका; (पु.) भोंवरा.
**भोरी** (न.) तमाशा; (प्रा. स्त्री.) उटी.
**भोरीप** (न.)नाना प्रकारचे नाच, तमाशे, प्रदर्शनें, नाटकें इत्यादि.
**भोंवई** (स्त्री.) भिवई.
**भोवंड, भोवंडी** (स्त्री.) चक्कर, भोवळ.
**भोवांडणें** (क्रि.) चक्कर मारणें, फिरणें; फिरावयास लावणें; हाकून देणें.
**भोवणी, भोवनी** (स्त्री.) भ्रमण.
**भोंवणें** (सं. भ्रमण क्रि.) चक्कर येणें, फिरणें; ग्रासणें; छळणें, त्रास देणें.
**भोंवता, भोंवतीं, भोंवताला, भोंवतें** (सं. भ्रमत् अ.) सभोंवार, आसमंतात्.
**भोवनी** (सं. भवानी स्त्री.) आरंभ, चिन्ह; शकुन; भ्रमण, फेरा.
**भोंवरा** (सं. भ्रम पु.) भुंगा; भुंग्याच्या आकाराचा स्त्रियांचा एक अलंकार.
**भोंवरकडी** (स्त्री.)भोरखिळा; फिरती कडी.
**भोंवरजाळी** (स्त्री.) भोवऱ्याची दोरी.
**भोंवरपाशीं** (अ.) जवळपास.
**भोंवरा** (सं. भ्रमर पु.)वाटोळें फिरणारा; मुलांचें गरगर फिरणारें एक खेळणें आवर्त; पाण्याचें मंडलाकार भ्रमण केसांची मंडलाकार रचना; शेंडीचा घेरा; धुळीची खळी. **भोंवऱ्यांत सांपडणें**—कचाटयांत गुरफटलें जाणें;**पायाला** (किंवा **पायावर**) **भो० असणें**—सारखें फिरत राहणें.
**भोवरी** (स्त्री.) बुगडी (तुका०१९३५).
**भोंवरी** (स्त्री.) एक वनस्पति; कांटा मोडल्या जागीं वाढणारें कातडें; गिरकी.
**भोंवलें** (न.) बहुलें पहा.
**भोंवळ**(स्त्री.)भोंवंड, चक्कर. [फजीतवाडा.
**भोवाडा** (पु.) मंडल; होळींतलें सोंग;
**भोवाडा-पोवाडा** (पु.) धिंड, फजीतवाडा.
**भोंवार** (स्त्री.) पाण्याच्या वैलाचें फिरणें; वाटोळा मार्ग.
**भोंस** (पु.) बोरू.
**भोंसकट, भोंसकटें** (न.) मोठें भोंक, खिंड.
**भोंसकणें** (क्रि.) खुपसणें; शिरकविणें.
**भोसका** (पु.) भगदाड, मोठें भोंक.
**भोसडणें** (क्रि.) खरडपट्टी काढणें.
**भोसडपट्टी** (स्त्री.) खरडपट्टी.
**भोंळ** (स्त्री.) भोंवळ, भोवंड, चक्कर.
**भोळवट, भोळसर** (वि.) साधाभोळा.
**भोळसाविणें** (क्रि.) ठकविणें.
**भोळा, भोळाभाळा** (वि.) निष्कपट, दुसऱ्यावर विश्वास ठेवणारा.
**भोळानाथ, भोळाशंकर, भोळासांब** (पु.) अतिशय भोळा मनुष्य.
**भोळाभाव** (पु.) साधेपणा, निष्कपटीपणा.
**भोळाभासा** (वि.) विसराळू; (पु.) चूक; चूकभूल; हयगय; दुर्लक्ष.
**भोळीव** (स्त्री.) भोळेपणा.
**भोळें** (न.) नजरचूक; भोळेपणानें गमावलेलें किंवा मिळविलेलें द्रव्य; मोहिनी.
**भौतिक** (सं. वि.) पंचभूतविषयक; पिशाचसंबंधीं.
**भौम** (न.) लबाडीनें दागिन्यांतलें सोनें काढून घेऊन त्या जागीं भरलेला दुसरा जड पदार्थ; (वि.) भूमीसंबंधीं; (पु.) मंगळ.

**भौमवार** (सं. पु.) मंगळवार.
**भ्या** (न.) भय; भीति.
**भ्याट, भ्याड** (वि.) भित्रा, भेकड.
**भ्यासूर** (प्रा. वि.) भेसूर, भयप्रद.
**भ्रतार** (सं. पु.) पति, नवरा.
**भ्रम** (सं. पु.) विपरीत ज्ञान; भ्रांति; शंका; पाण्याचा भोंवरा; मंडलाकार गति. **भ्र० चा भोपळा फुटणें**—एखादी गोष्ट महत्त्वाची वाटत असतां तिचें खरें स्वरूप प्रकट होऊन तो भ्रम दूर होणें. [ भ्रांति पावणें.
**भ्रमण** (सं. न.) फिरणें, चक्राकार चलन;
**भ्रमणें** (क्रि.) चक्राकार फिरणें, भटकणें; भलत्याच मार्गानें जाणें, चुकणें.
**भ्रमंती** (सं. स्त्री.) भ्रमण. [ मंडलाकृति.
**भ्रमर** (सं. पु.) भोंवरा, भुंगा; केसांची
**भ्रमरपडळ** (सं. भ्रमरपटल न.) भ्रमरांचा समुदाय. [ १४।६१).
**भ्रमरमंचक** (प्रा. पु.) छपरपलंग (राम०
**भ्रमिष्ठ** (सं. वि.) वेडा, भ्रम झालेला, खुळा.
**भ्रंश** (सं. पु.) पडणें, गळणें, चळ, वेड, खूळ. [ सुटलेला, अपवित्र झालेला.
**भ्रष्ट** (सं. वि.) भाजलेला; पडलेला,
**भ्रष्टणें** (क्रि.) पतित होणें, गोंधळणें, चळणें. [ अमंगलपणा.
**भ्रष्टाकार** (सं. पु.) अपवित्रता; अस्वच्छता,
**भ्रष्टाचार** (सं. पु.) शास्त्रविहित आचारास सोडून असलेलें वर्तन; अनाचार.
**भ्रांत** (सं. वि.) चुकलेला; भ्रमिष्ठ; (स्त्री.) भ्रांति, शंका.
**भ्राता** (सं. पु.) भाऊ.
**भ्रांति** (सं. स्त्री.) भ्रमण; मिथ्या ज्ञान; चूक, भूल; गोंवळ; संशय.
**भ्रांतिकर** (सं. वि.) शंकास्पद, संशयित.
**भ्रांतिखोर** (वि.) शंकेखोर, संशयी.
**भ्रांतिष्ठ** (सं. वि.) भ्रमिष्ठ; ज्या त्या गोष्टीविषयीं शंका घेणारा.
**भ्रातृत्व** (सं. न.) बंधुता.
**भ्रामक** (सं. वि.) भ्रमोत्पादक, घोटाळ्यांत पाडणारें; (प्रा. पु.) लोहचुंबक.
**भ्रुकुटी** (सं. स्त्री.) भिवई. **भ्रू० भंग** (पु.)—रागानें भिवया चढविणें.
**भ्रू** (सं. स्त्री.) भिवई. **उच्च भ्रू** (वि.)—तालेवार, अहंकारी. (इं. हायब्रौ).
**भ्रूण** (सं. पु.) गर्भ; गर्भावस्थेंतलें बालक.
**भ्रूणहत्या** (सं. स्त्री.) गर्भपात, गर्भस्थ प्राण्याची हिंसा.
**भ्रूलता** (सं. स्त्री.) भिवई.
**भ्रूसंकेत** (पु.) नेत्रसंकेत.

---

## म

**म** मराठी व्यंजन-मालेंतील चोविसावें व्यंजन. [ सौम्य.
**मऊ** (सं. मृदु वि.) नरम, गुळगुळीत,
**मकडी** (सं. मर्कटी स्त्री.) वानरी. **लकडीवांचून म० वळत नाहीं**—मूर्ख मनुष्य मारावांचून वठणीवर येत नाहीं.
**मकतळ** (न.) जाडेंभरडें विटणाऱ्या रंगाचें वस्त्र.
**मकबरा** (अर. पु.) समाधिस्थळ, कबर.
**मकर** (सं. पु.) नक्र, सुसर; दहावी रास; (अर. न.) कपट, ढोंग; युक्ति.
**मकरकुंडल** (सं. न.) एक कर्णभूषण.
**मकरंद** (सं. पु.) पुष्परस.
**मकरध्वज** (सं. पु.) महादेव; मदन.
**मकरबिबी** (स्त्री.) एक प्रकारची तोफ.
**मकरवृत्त** (सं. न.) पृथ्वीचा दक्षिण ध्रुव सूर्याकडे पूर्णपणें वळला म्हणजे २३॥ दक्षिण अंशापर्यंत सूर्यकिरण लंबरूप पडतात; या अंशावरून जाणारें जें अक्षवृत्त तें.
**मकरसंक्रमण** (सं. न.), **मकरसंक्रान्त** (स्त्री.) सूर्याचें मकरराशीस जाणें.
**मकराणी** (पु.) एका जातीचें नांव.
**मकरालय** (सं. पु.) समुद्र.
**मकरी** (वि.) कपटी, दांभिक, युक्तिबाज.
**मकसूद** मखसूद पहा.
**मका** (पु.) मकई.
**मकाण, मकान** (अर. न.) घर, वस्तीची जागा; पल्ला, व्याप.
**मकाणा** (पु.) मक्याचा दाणा; कमळाचें बीं.
**मकारपंचक** (सं. न.) मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन हीं पांच.

**मक्ता** (अर. पु.) ठेका, उक्तें काम.
**मक्तेकरी, मक्तेदार** (पु.) ठेकेदार, कंत्राटदार.
**मख** (सं. पु.) यज्ञ.
**मखतूल** (पु.) रेशमाची कांकरी.
**मखदूर** (अर. पु.) जोर, शक्ति, सामर्थ्य.
**मखमल, मखमाल, मखमूल** (अर. मखमल स्त्री.) अतिशय मृदु असें एक प्रकारचें वस्त्र.
**मखर** (न.) जाळयांच्या सुशोभित ताटचा लावून केलेली जागा; (प्रा.) रमणीय स्थान.
**मखलासी -शी** (फा. मखलसी स्त्री.) मंजुरी; मान्यतेचा शेरा; वादाचा निर्णय; टीका, भाष्य.
**मखसूद** (फा. पु.) अभिप्राय.
**मख्ख** (वि.) आंतल्या गाठीचा.
**मख्खी** (सं. मक्षिका स्त्री.) खुबी, मर्म.
**मग** (अ.) नंतर; पुढें, लवकर; त्या अर्थी.
**मगज** (फा. पु.) गीर; सार; अस्थींतला मृदु अंश; मेंदू; महत्त्व (दास० ११।१०।२३).
**मगजी** (फा. स्त्री.) कोर, कंगोरा, कांठ.
**मगदूर** (अर. मकदूर पु.) ताकद, सामर्थ्य.
**मगन** (सं. मग्न वि.) चूर, दंग, मग्न.
**मगमगीत** (वि.) घमघमीत.
**मगर** (सं. मकर पु.) नक्र, सुसर.
**मगरमस्त** (वि.) झिंगलेला; उन्मत्त.
**मगरमिठी** (स्त्री.) अतिशय घट्ट, न सुटणारी मिठी.
**मगरी** (स्त्री.) छपराची कड.
**मगरुरी** (फा. स्त्री.) गर्विष्ठपणा.
**मगरूर** (अर. वि.) गर्विष्ठ.
**मंगल** (सं. वि.) शुभ; (न.) सुदैव; कल्याण; शुभ कार्यारंभीं म्हणावयाचा ईश्वरस्तुतिपर श्लोक, नामस्मरण; (पु.) मंगळ.
**मंगलकार्य** (सं. न.) लग्न, मुंज, इ० आनंदो-[त्सवाचें कार्य.
**मंगलसूत्र** (सं. न.) स्त्रियांच्या गळयांतलें सौभाग्यसूत्र.
**मंगलस्नान** (सं. न.) अभ्यंगस्नान.
**मंगलागौरी** (सं. स्त्री.) पार्वती. **मं०व्रत** —विवाहित मुलींनीं विवाहकालापासून पांच वर्षेपर्यंत दर वर्षी श्रावणांतल्या मंगळवारीं आचरण्याचें व्रत.
**मंगलाचरण** (सं. पु.) कार्यारंभींची ईश्वरस्तुति. **मं० करणें**—आरंभ करणें.
**मंगलाष्टक** (सं. न.) लग्न, मुंज इ० लावतेसमयीं म्हणण्याचीं पद्यें.
**मंगलाक्षता** (स्त्री.) आशीर्वाद म्हणून ब्राह्मणांनीं अंगावर टाकलेले कुंकुममिश्रित तांदूळ.
**मंगळ** मंगल पहा.
**मंगळतुरें** (सं. न.) मंगल वाद्यें.
**मंगळमूर्ति** (सं. पु.) गणपति.
**मंगळवार** (पु.) सोमवारच्या पुढचा दिवस; भौमवार.
**मंगळागौर** (सं. मंगलागौरी स्त्री.) पार्वती; मंगलागौरीव्रत पहा.
**मंगळारती** (सं. स्त्री.) देवपूजेच्या समाप्तीच्या अगोदर तबकांत दिवा ठेवून तें तबक हातांत घेऊन तोंडानें आरती म्हणत देवाच्या तोंडाभोंवतीं तबक फिरविणें.
**मंगो, मंगू** (स्त्री.) मांजराचें लाडकें नांव.
**मग्न** (सं. वि.) तल्लीन, दंग, चूर.
**मघईचें पान** (सं. मगध न.) विडयाच्या पानाची एक उत्तम जात.
**मघमघीत** (प्रा. वि.) घमघमीत, खमंग.
**मघवा** (सं. पु.) इन्द्र.
**मघा** (सं. स्त्री.) एक नक्षत्र.
**मघां, मघांशीं** (अ.) थोडया वेळापूर्वी.
**मंचक** (सं. पु.) पलंग, माचा, झोपाळा.
**मचणें** (क्रि.) माजणें; जमणें.
**मचमच** (स्त्री.) खातांना होणारा तोंडाचा आवाज.
**मचमचीत** (वि.) बेचव, निःसत्त्व.
**मचवा** (पु.) होडी.
**मचविणें** (क्रि.) करणें; उपस्थित करणें.
**मंची** (सं. मंचक स्त्री.) कुंभाराचें विटा. माती वगैरे वाहून नेण्याचें साधन.
**मचूळ** (वि.) बेचव, निःसत्त्व.
**मच्छ** (सं. मत्स्य पु.) मासा.
**मच्छर** (सं. मत्सरा न.) डास, चिलट इ०

**मच्छरदाणी** (हिं. मच्छरदान स्त्री.) डास, ढेकूण इ० च्या निवारणार्थ निजण्यासाठीं केलेली कापडाची खोली. [ धीवर.
**मच्छीमार** (हिं. पु.) मासे मारणारा;
**मजकूर** (अर. वि.) पूर्वी सांगितलेला, सध्यांचा, वर्तमान; (पु.) हकीकत; पत्रांतलें वर्तमान. [ करण्याची पूड.
**मंजन** (सं. न.) दांतांचें औषध; स्वच्छ
**मजनू** (वि.) प्रेम वेडा; (पु.) एक विख्यात प्रेमिक.
**मजबुती** (फा. स्त्री.) दृढता, वळकटी.
**मजबूत** (अर. वि.) वळकट, दृढ, घट्ट.
**मजबूर** (अर. वि.) लाचार; निराश्रित; जुलुमास वळी पडलेला.
**मजमू** (अर. स्त्री.), **मजमूवारी** (फा. स्त्री.) वसुलीचें काम.
**मजमूवार** (फा. पु.) सर्व दस्तऐवजांवर व हिशेबांवर मोर्तब करणारा अधिकारी; वसुली कामदार.
**मजमून** (अर. पु. न.) पत्रांतला मजकूर.
**मजरा** (अर. पु.) गांवाचींच पण गांवापासून जरा दूर असलेलीं घरें; मुजरा.
**मंजरी** (सं. स्त्री.) मोहोर, मंजिरी, तुरा, केसर; डिकशी; पुस्तकाचा मार्गदर्शक.
**मजरें** (न.) खेडेगांव.
**मजल** (अर. स्त्री.) एका दिवसांत साधारणपणें आक्रमिला जाणारा रस्ता; एका खेपेस पूर्ण केलेला प्रवासाचा भाग; प्रवासाचा शेवटचा भाग; पायरी, पल्ला; पोंच.
**मजलदरमजल** (अ.) मजल करीत करीत.
**मजलस** (अर. मजलिस स्त्री.) राजसभा; मजालस पहा.
**मजला** (हिं. पु.) माळ, माडी; थर.
**मजा** (फा. स्त्री.) गंमत, मौज.
**मंजा** (पु.) स्त्रीचीं आर्जवें पुरुष करीत आहे अशा मजकुराची लावणी; कलगी; याच्या उलट पंजा.
**मजाल** (अर. स्त्री.) ताकद, सामर्थ्य.
**मजालस** (अर. मजलस स्त्री.) राजसभा, सभा; गाण्यावजावण्यासाठीं जमलेली मंडळी; जलसा.

**मंजिरी** मंजरी पहा.
**मॅजिस्ट्रेट** (इं. पु.) फौजदारी खटले चालविणारा एक अधिकारी.
**मजीत्–द्** (हिं. वि.) मंद, फिकट.
**मंजु** (सं. वि.) मंजुळ, कोमळ.
**मजुमु** (स्त्री.) जमाखर्जाचे दस्तऐवज ठेवण्याचें काम (तुका० १८९०).
**मजुरा** (प्रा. पु.) मुजरा; प्रणाम.
**मजुरी** (फा. स्त्री.) रोजमुरा; कावाडकाम.
**मंजुल, मंजुळ** (सं. वि.) कानास गोड लागणारा.
**मजूर** (फा. पु.) कावाडकष्ट करणारा.
**मंजूर** (अर. वि.) कबूल, पसंत.
**मजूरदार** (फा. पु.) मजूर.
**मजूरा** (अर. अ.) वजा.
**मंजूषा** (सं. स्त्री.) पेटी.
**मजेदार** (फा. वि.) गमतीचा.
**मज्जन** (सं. न.) स्नान; बुडणें; बुडविणें.
**मज्जा** (सं. स्त्री.) मेंदू, मगज, गीर; सत्त्व.
**मज्जाव** (हिं. पु.) मनाई, प्रतिबिंब.
**मंज्या** (पु.) खेळण्याची गोटी.
**मटकणें, मटकावणें** (क्रि.) पकडून खाऊन टाकणें.
**मटकन्, मटकर, मटदिशीं** (अ.) पटदिशीं, मुकाटयानें.
**मटका** (स्त्री.) एक कडधान्य; (पु.) कंवर.
**मटगा** (वि.) आखुड.
**मटन** (इं. न.) सागोती; बोकडाचें मांस.
**मटमटां** (अ.) खातांना तोंडानें मटमट आवाज करीत.
**मट्ट** (वि.) स्तब्ध.
**मट्ट्यास येणें** थकणें.
**मटार** (पु.) मठार पहा.
**मठ** (सं. पु.) संन्यासी, वैरागी इ० चें राहण्याचें स्थान; आश्रम.
**मठ** (सं. मकुष्टक पु.) एक कडधान्य, मटकी.
**मठा** (सं. मंथ् पु.) लोणी न काढलेलें दाट ताक.
**मठार** (पु.) पांढरा वाटाणा.
**मठारणी** (स्त्री.) सोनाराचें सांखळया वगैरे साफ करण्याचें हत्यार.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



**मठारणें, मठाळणें** (क्रि.) धातूच्या नव्या भांड्याचे पोचे काढणें; गोंजारणें; जखम वरी होत येणें; कामाला दुसऱ्याचें मन वळविणें. [२४५०).
**मठारा** (प्रा. पु.) ढोंगी साधु (तुका०
**मठिका, मठी** (सं. स्त्री.) लहान मठ.
**मठ्ठ** (सं. मृष्ठ वि.) मंद, सुस्त.
**मठ्ठा** (सं. मंथ् पु.) मठा पहा.
**मंड** (सं. पु.) पेज; मद्य; सार.
**मंडई** (हिं. मंडी स्त्री.) भाजीपाल्याच्या ठोक विक्रीचा बाजार.
**मंडक** (सं. पु.) मांडा (खाद्यविशेष).
**मडकें** (सं. मणिक न.) मातीचें भांडें; गाडगें; **म० तली वख**—अल्प प्रमाण; स्वल्प संग्रह.
**मडगा** (पु.), **मडगें** (न.) नरडें. [समर्थन.
**मंडण, मंडन** (न.) भूषण, अलंकार;
**मंडप** (सं. पु.) मांडव.
**मंडपी** (स्त्री.) लहान मांडव.
**मडमडणें** (क्रि.) येणाऱ्या तापाचीं किंवा दुखण्याचीं पूर्वचिन्हें होणें, अंग कसकसणें.
**मंडल, मंडळ** (सं. न.) वर्तुळ, चक्र; चक्राकार प्रदेश; समुदाय; बिंब; भोंवतालचा प्रांत; भोंवतालचे राजे; देवास नैवेद्य दाखवितांना ताटाखालीं पाण्याची काढलेली आकृति; बेचाळीस दिवसांची मुदत.
**मंडलाकार** (वि.) चक्राकार; सर्व समान दर्जाचे आहेत अशी (परिषद्).[कंपनी.
**मंडली, मंडळी** (स्त्री.) लोकांचा जमाव;
**मंडाई, मंडावण** (हिं. स्त्री.) मनोती.
**मंडावळ** (स्त्री.) मुंडावळ पहा.
**मंडित** (सं. वि.) अलंकृत, सुशोभित.
**मंडूक** (सं. पु.) बेडूक. **मं० प्लुति**—बेडकाची उडी; मधला कांहीं भाग गाळून एकदम पुढच्या भागावर जाणें.
**मंडूर** (पु.) लोखंडाचा जंग; त्यापासून केलेलें औषध.
**मडें, मढें** (न.) प्रेत, शव.
**मंडोळी** (स्त्री.) मुंडावळ पहा.
**मड्डुक** (प्रा. न.) मडकें (वामन०हरिविलास ५९).
**मढ** (प्रा. पु.) कळी, अंकुर (ज्ञा० १८। ४६२;) घट (ज्ञा० ११।३०४).
**मढगा** (सं. मठ पु.) मठ, आश्रम, घर (दा० ५।९।३९).
**मढणें, मढविणें** (क्रि.) आच्छादणें, थर देणें; अस्तर घालणें. [गोड.
**मढु** (प्रा.पु.) अंकुर, कळी; (सं. मधु वि.)
**मढें** (सं. मृत न.) प्रेत; शव. **मढ्याच्या टाळूवरचें लोणी खाणारा**—अतिशय नीच व लोभी मनुष्य.
**मण** (सं. मान पु.) एक वजन किंवा माप (हें निरनिराळ्या प्रांतांत निरनिराळें आहे).
**मणका** (सं. मणि पु.) मणाचें माप, किंवा मणभर वजनाचा दगड; मोठा मणि; पाठीच्या हाडांची गांठ. [दगडाचें वजन.
**मणकी** (स्त्री.) मणाचें धातूचें किंवा
**मणखुरा** (पु.) मणि करण्याची सोनाराची ऐरण. [सांधा.
**मणगट** (सं. मणि न.) मणिबंध, पंज्याचा
**मणगटी** (स्त्री.) लहान मुलांच्या मणगटांत घालण्याचा एक अलंकार.
**मणदोरा** (पु.) जो ओढला असतां वटवीचें तोंड उघडतें किंवा मिटतें अथवा पडदा सरतो तो धावता दोरा.
**मणि** (सं. पु.) रत्न; खडा; माळेंत ओंवण्यासारखा गोलक.
**मणिक** (सं. न.) मडकें, डेरा (मोरो० कृष्ण० २।२०).
**मणिकर्णिका** (सं. स्त्री.) श्रीक्षेत्र काशी येथील पुण्यतीर्थ; एका विशिष्ट आकाराचें जलपात्र.
**मणिकार** (सं. पु.) मण्यार पहा.
**मणिपुरी** (वि.) मणिपुर सांप्रदायाचें नृत्य.
**मणिबंध** (सं. पु.) मणगट; एक वृत्त (याच्या चरणांत ९ अक्षरें व भ, म, स हे गण असतात).
**मणियार** (पु.) लोखंडाचा व्यापारी.
**मणी** मणि पहा.
**मणेर, मणेरी, मण्यार** (सं. मणिकार पु.) बांगड्या, मणि वगैरे करणारा अथवा विकणारा; सर्पाची एक जात.

**मत्** (सं. समासांत वि.) माझें.
**मत** (सं. न.) अभिप्राय, मनांतला निश्चित भाव; वादांतला पक्ष; पंथ; सल्ला. **मतदान** (न.)—मत देणें; **मताधिकार** (पु.)—मत देण्याची लायकी. **मत–पत्रिका** (स्त्री.)—ज्यावर मत नोंदवायचें तो कागद.
**मतंग, मतंगज** (सं. पु.) हत्ती. [ युक्त.
**मंत** (सं. मत् समासांत उत्तरपदीं वि.)
**मतमतांतर** (न.) भिन्नभिन्न मतें.
**मंतरणें** (सं. मंत्र् क्रि.) मंत्रानें भारणें; वश करून घेणें.
**मतलई** (अर. स्त्री.) पहाटे चार वाजल्यापासून सकाळीं नऊ वाजेपर्यंत जमिनीकडून समुद्राकडे वाहणारा वारा.
**मतलब** (अर. पु.) आशय, हेतु; तात्पर्य.
**मतलबी** (हिं. वि.) स्वार्थसाधु.
**मतवादी** (सं. वि.) स्वतःच्या मतांविषयीं दुराग्रही.
**मतवाला** (पु.), **मतवाली** (स्त्री. वि.) हुशार; उन्मत्त.
**मति** (सं. स्त्री.) बुद्धि; मन; अंतःकरण; विचार; हेतु.
**मतिमंद** (सं. वि.) जड बुद्धीचा.
**मतिमान्** (सं. वि.) बुद्धिमान्, धूर्त.
**मंतु** (सं. पु.) अपराध.
**मतोळा** (प्रा. पु.) गोंधळ, घोटाळा, नुकसान (तुका० २६३५).
**मत्कुण** (सं. पु.) ढेकूण.
**मत्त** (सं. वि.) धुंद, माजलेला; (सं. मत न.) मत, अभिप्राय.
**मत्तमयूरी** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव. यांत प्रत्येक चरणांत तेरा अक्षरें व म, त, य, स हे गण असून अंतीं गुरु अक्षर असतें.
**मत्ता** (अर. मताआ स्त्री.) द्रव्य, संपत्ति, मिळकत. [ (१०।२२६).
**मत्तांग** (प्रा. पु.) हत्ती (स्वा० दि०
**मंत्र** (सं. पु.) वेदविभाग; ऋषिप्रणीत गूढशक्तियुक्त वाक्य; जप करण्याची अक्षरें; विचार, मसलत; गुप्त गोष्ट.
**मंत्रजागर** (पु.) अनेक ब्राह्मणांनीं एकत्र जमून मोठ्याओरडीनें वेदमंत्र म्हणणें.
**मंत्रतंत्र** (सं. पु.) जादूटोणा, जपजाप्य, छो छूं.
**मंत्रपुष्पांजळी** (स्त्री.) देवाच्या आरतीनंतर समंत्रक पुष्पांची ओंजळी देवास वाहणें. [अनुभव पहाणें.
**मंत्रप्रयोग** (सं. पु.) जादूटोणा; मंत्राचा
**मंत्रसाधन** (सं. न.) मंत्रशास्त्रांतले सर्व विधि व नियम पाळून मंत्राचा उपयोग करण्याची शक्ति.
**मंत्राग्नि** (सं. पु.) मंत्रपूर्वक प्रेताचें दहन.
**मंत्राक्षता** (सं. स्त्री.) मंत्रानें पवित्र केलेले किंवा मंतरलेले तांदूळ.
**मंत्री** (सं. पु.) सचिव, प्रधान; मांत्रिक.
**मत्सर** (सं. पु.) द्वेष, हेवा.
**मत्स्य** (सं. पु.) मासा; विष्णूचा पहिला अवतार; दोन वर्तुळांच्या परस्पर छेदण्यानें होणारी दीर्घ वर्तुळाकृति.
**मत्स्यावतार** (सं. पु.) विष्णूच्या दहा अवतारांपैकीं पहिला.
**मत्स्याहारि** (सं. वि.) मासे खाणारा.
**मंथणी-नी** (सं. स्त्री.) सोनाराचें मणि करण्याचें हत्यार; रवी; घुसळणी.
**मथणें, मंथणें** (सं. मंथन क्रि.) घुसळणें; चर्चा करणें; अनुकूल करून घेणें; (प्रा.) ठार मारणें;
**मथन, मंथन** (सं. न.) घुसळणें; चर्चा, वध; जखमी करणें.
**मथनसार** (सं. पु.) चंद्र.
**मंथरी** (स्त्री.) घुसळतांना रवीभोंवतीं गुंडाळलेली दोरी.
**मथळा, मथाळा** (पु.) डोकें; लेखाचें नांव; हुंडी देणारा हुंडीवर 'श्री' या अक्षराखालीं सही करतो ती.
**मंथा** (पु.) मडक्यांना छिलई देण्यासाठीं कुंभार ज्याचा उपयोग करतात तो काचेचा मणि.
**मथित** (स्त्री.) कापडास ताण देण्याचें एक उपकरण.
**मथितार्थ** (सं. पु.) वादाचा निष्कर्ष, तात्पर्य.
**मंद** (सं. पु.) शनि; (वि.) जड, आळशी, सुस्त; अंधुक, स्वल्प.

**मद** (सं. पु.) उन्मत्तपणा; माजलेल्या हत्तीच्या गंडस्थळांतून निघणारा स्राव; पुष्परस; मद्य; चेष्टा.**मदगज** (सं.पु.)–उन्मत्त हत्ती.

**मंदगति** (वि.) सावकाश काम करणारा; विशेष वेगानें चेण्डू न टाकणारा (गोलंदाज).

**मंदर, मदड** (वि.) मंद, सुस्त.

**मदत** (अर. स्त्री.) साह्य, एक प्रकारचा कैफी पदार्थ.

**मदतगार, मदतनीस** (अर. पु.)सहायक; असिस्टंट.

**मदन** (सं. पु.) काम; स्त्री–संभोगा–विषयींची इच्छा; (सं.मर्दन न.) एकदां मळलेलें धान्य. **मदनाचा पुतळा** (पु.)–अत्यंत सुंदर मनुष्य; **मदनाची छडी** (स्त्री.)–अत्यंत सुंदर स्त्री; **मदनांतक, मदनारी** (सं. पु.)–शंकर.

**मदनायक** (सं. मध्यनायक पु.) माळेंतला मधला मणि.

**मंदभाग्य** (सं. वि.) दुर्दैवी.

**मंदबुद्धि** (सं. वि.) जड बुद्धीचा

**मंदर, मंदराचल** (सं. पु.) एक पर्वत.

**मंदरास** (स्त्री.) मद्रास.

**मदलस** (फा. मजलिस स्त्री.) वैठक, सभा (राम० ३६।५६).

**मदलसा** (प्रा. स्त्री.) पुतळी (हरि० २९।७१); (पु.) मंडपाच्या किंवा छताच्या शिखराचा मध्यभाग.

**मंदवार, मंदवासर** (सं. पु.) शनिवार.

**मंदवेळ** (स्त्री.) विशेष शुभ नसलेली वेळ.

**मदवी** (प्रा.स्त्री.)वस्त्र (ज्ञा० १८।६९०).

**मंदाई** (स्त्री.) सुस्तपणा; स्वस्ताई. [गंगा.

**मंदाकिनी** (सं. स्त्री.) भागीरथी, स्वर्गींतली

**मंदाक्रान्ता** (सं. स्त्री.)एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १७ अक्षरें व म, भ, न, त, त, हे गण व दोन गुरु अक्षरें असतात.

**मदाड** मदड पहा.

**मदान्ध** (सं.वि.)सत्ता, द्रव्य इ०च्या गर्वानें ज्याचा विचार नष्ट झाला आहे असा; उन्मत्त.

**मदार** (अर. स्त्री.) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त; मुसलमानाचें थडगें (तुका० २३७३); मुख्य आधार; केंद्र.

**मंदार** (सं. पु.) पांढऱ्या रुईचें झाड; एक पर्वत.

**मंदारमाला** (सं. स्त्री.) एक वृत्त. याच्या चरणांत २२ अक्षरें व सात वेळां त गण असून शेवटीं गुरु अक्षर असतें.

**मदारी** (हिं. पु.) माकडाचा तमाशा कर–णारा; जादूगार, डोंबारी.

**मदालसा** (सं. स्त्री.) मस्त स्त्री.

**मदारुल महाम** (प्रा. पु.) सत्तेचें मुख्य केंद्र; मुख्य प्रधान; नाना फडणिसांना हा किताब होता.

**मंदावणें** (क्रि.) आळसावणें, रेंगाळणें.

**मंदावा** (पु.) मंदपणा; सुस्ताई, आळस.

**मदिणी** (प्रा. स्त्री.) हत्तीण.

**मंदिर** (सं. न.) देवालय; गृह.

**मदिर** (वि.) धुंद करणारें.

**मदिरा** (सं. स्त्री.) मद्य, दारू.

**मंदी** (सं. मंद स्त्री.) मंदाई पहा.

**मदीय** (सं. वि.) माझा.

**मंदील** (पु. न.) जरीचें पागोटें; मुकुट.

**मदोत्कट** (सं. वि.) मदस्राव होत असलेला (हत्ती).

**मंदोदरी** (स्त्री.) वेडकी; रावणाच्या बायकोचें नांव.

**मंदोसरी** (स्त्री.)आमटी; फोडणीचें वरण.

**मंदोसा** (पु.)दोराच्या चौकटीच्या सांध्यांत वसविलेला लाकडाचा चौरस तुकडा.

**मद्य** (सं. न.) मदिरा, दारू.

**मद्यपान** (सं. न.) दारू पिणें.

**मद्यपी** (सं. पु.) दारू पिणारा; दारुड्या.

**मंद्र** (पु.) नाभिस्थानचा गंभीर नाद; एक नाद. **मं०सप्तक** (न.)–मंद्रनादयुक्त सात स्वरांचा समुदाय.

**मद्राशी-सी** (वि.) मद्रास प्रांतासंबंधीं.

**मध** (सं. मधु पु.) मधमाशांनीं जमवि–लेला पुष्परस; मकरंद. **मधाचें बोट लावणें**–लालूच किंवा आशा दाखविणें.

**मधकांडें** (न.) उंसाचा मध्यभाग.

**मधघर** (न.) माझघर; घराचा मधला भाग किंवा दालन.

**मधल्यामध्यें** (अ.) उगीच, अधिकार नसतां.
**मधपोळें** (न.) मधमाशा जेथें मध साठवितात तें घर.
**मधलंड** (वि.) मध्यम; मधला; धड इकडे नाहीं किंवा तिकडे नाहीं असा.
**मधला** (वि.) मध्यावरचा.
**मधलाटी, मधलाठी** (स्त्री.) देश व कोंकण यांच्या मधला प्रदेश.
**मधाळ** (वि.) मधानें किंवा गोड रसानें युक्त.
**मधीं** (अ.) मध्यें, आंत.
**मधोल** (वि.) मध्यावरचा; आंतला.
**मधु** (सं. न.) मध, पुष्परस; चैत्राचा महिना; वसंतऋतु; (वि.) गोड.
**मधुकर** (सं. पु.) भ्रमर.
**मधुकरी** (सं. स्त्री.) भ्रमरी; शिजलेल्या अन्नाची भिक्षा; (पु.) तशी भिक्षा मागणारा ब्राह्मण.
**मधुकुल्या** (सं. स्त्री. अने.) मधाची नदी; पक्वान्नांची रेलचेल.
**मधुक्रिया** (सं. स्त्री.) माधुकरी, ओली भिक्षा (स्वा० दि० ५।५।१५).
**मधुचंद्र** (पु.) इंग्रजी "हनिमून"; म्हणजे गर्भादान.
**मधुप** (सं. पु.) भ्रमर, मद्यपी.
**मधुपर्क** (सं. पु.) आतिथ्यविधि; विवाहसमयीं नवरा मुलगा दाराशीं आला असतां किंवा तसाच कोणी सन्मान्य शिष्ट घरीं आला असतां यजमान त्याचे पाय धुऊन त्याची पूजा करतात तो विधि.
**मधुमक्षिका** (सं. स्त्री.) मधमाशी. **म० चें व्रत**—कोणत्याहि ठिकाणीं जेवढें चांगलें आढळेल तेवढें घेणें.
**मधुमेह** (सं. पु.) मूत्रसंबंधीं एक रोग.
**मधुर** (सं. वि.) गोड.
**मधुरा** (सं. वि.) ज्वरविशेष.
**मधुव** (प्रा. पु.) मधमाशी.
**मधुसुढाळी** (स्त्री.) मधुधारा.
**मधून** (अ.) मध्यापासून; आंतून.—**च्या मधून विस्तव न जाणें**—दोघांमध्यें वैमनस्य असणें.
**मधें** (अ.) मध्यें.
**मधोमध** (अ.) मध्यभागीं.
**मध्य** (सं. पु.) मधला भाग, गर्भ; कंबर.
**मध्यंतरीं** (अ.) मधल्या काळांत किंवा अवकाशांत.
**मध्यंदिन** (पु.) यजुर्वेदी वाजसनेयी शाखेचा [ ब्राह्मण.
**मध्यनाडी** (सं. स्त्री.) माणसाच्या शरिरांत कफनाडी, पित्तनाडी व वातनाडी या जशा वैद्यशास्त्रानें तीन नाड्या मानिल्या आहेत, त्याप्रमाणें ज्योतिःशास्त्रानें चंद्राच्या मार्गांत तीन नक्षत्रपुंज मानिले आहेत. प्रत्येक पुंजांत ९ नक्षत्रें असून या ३ पुंजांना अनुक्रमें आदिनाडी, मध्यनाडी व अंत्यनाडी अशीं नांवें दिलीं आहेत. त्यांपैकीं दुसरी नाडी.
**मध्यम** (सं. वि.) मधला; साधारण; (पु.) गायनांतल्या सप्त स्वरांपैकीं चौथा.
**मध्यमा** (सं. स्त्री.) परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी हे जे वाणीचे चार भेद त्यांतील तिसरा प्रकार. [ मध्यस्थ.
**मध्यवर्ति** (सं. वि.) मधोमध असणारा;
**मध्यस्थ** (सं. वि.) मध्यें असणारा; (पु.) दलाल; कुटण्या; तिऱ्हाईतपणानें निर्णय करणारा. [म्हणजे दुसरी रास.
**मध्यांक** (सं. पु.) त्रैराशिकांतली मधली
**मध्यानरात्र** (स्त्री.) रात्रीचे बारा वाजण्याचा समय. [ जेवणाची वेळ.
**मध्यान्ह** (सं. पु.) मध्यान्हकाळ; दुपार;
**मध्यें** आंत, ठायीं, अंगीं.
**मध्येंमध्यें** (अ.) मधून मधून; मध्यंतरीं कांहीं अवकाश टाकून.
**मध्व** (सं. पु.) वैष्णवांतला एक संप्रदाय.
**मन** (सं. न.) सुखदुःख जाणणारें इंद्रिय; सदसद्विवेकबुद्धि; कल्पना; ध्यान. **मनास येणें**—आवडणें; **मनांतून उतरणें**—नावडता होणें; **मन घालणें**—एकाद्या गोष्टीवर मनाची एकाग्रता करणें; **मन उडणें**—वीट येणें; आवडेनासें होणें; **मन पाहणें**—मनाचा कल कोणीकडे आहे तें पाहणें; **मन बसणें**—मन आसक्त होणें; **मन मोडणें**—इच्छेच्या विरुद्ध जाणें; **मनांत मांडे खाणें**—मनोराज्य

करणें; **मनानें घेणें**—ग्रह होणें; **मनःपूतं समाचरेत्**—मनाला योग्य वाटेल तें करावें; **मनांतल्या मनांत जळणें**—आंतल्या आंत जळफळणें; **मनावर घेणें**—कामाविषयीं मनाला अगत्य वाटणें.

**मनःकल्पित** (सं. वि.) काल्पनिक.

**मनकवडा** (पु.) दुसऱ्याच्या मनांतले विचार ओळखणारा.

**मनकामना** (सं. मनःकामना स्त्री.) मनांतली [ इच्छा.

**मनखुरा** (पु.) सोन्याच्या बांगड्या, विलोरी सल्ले यांना पैलू पाडण्याचें हत्यार.

**मनगट, मगनटी** मणगट, मणगटी पहा.

**मनणें** (प्रा. क्रि.) मानणें.

**मनधरणी** (स्त्री.) आर्जव, खुशामत.

**मनन** (सं. न.) चिंतन, व्यास.

**मनःपूत** (सं. वि.) मनाला शुद्ध वाटलेलें.

**मनःपूर्वक** (सं. अ.) मनापासून.

**मनमिळाऊ** (वि.) सर्वांशीं मिळून गोडीनें राहणारा.

**मनमुराद** (सं. मनस् अर. मुराद वि.) यथेच्छ; विपुल.

**मनमोहन** (सं. वि.) मनाला भुरळ पाड- [ णारें, रमणीय.

**मनलज्जा** (सं. स्त्री.) जाणूनबुजून एखादें वाईट कृत्य करतांना माणसाच्या मनाला वाटणारा स्वाभाविक संकोच; मनोदेवतेची टोचणी.

**मनवणें** (प्रा. क्रि.) मान्य होणें, मानलें [ जाणें.

**मनशा** (सं. मनीषा स्त्री.) इच्छा.

**मनसब** (अर. पु.) स्वारांवरची हुद्द्याची एक जागा.

**मनसबदार** (पु.) मनसब धारण करणारा.

**मनसा** (स्त्री.) मनशा, इच्छा.

**मनसाराम** (पु.) विनोदानें मनाला दिलेली संज्ञा.

**मनसुफी** (अर. स्त्री.) न्याय.

**मनसुबा** (अर.पु.) मनोगत, बेत, विचार; (स्त्री.) किरकोळ दाव्यांची चौकशी; पंचायतीमार्फत चौकशी; मसलत.

**मनसु** (अर. स्त्री.) पंचायतीची चौकशी व निकाल.

**मनसूर** (हिं. स्त्री.) सनद, राजपत्र.

**मनसोक्त** (सं. अ.) यथेच्छ, स्वैर.

**मनस्या** (सं. मनीषा स्त्री.) इच्छा.

**मनस्वी** (सं. वि.) मन स्वाधीन असलेला; स्वैरवर्तनाचा; अमर्याद.

**मना** (अर. वि.) बंद केलेलें, निषिद्ध; (स्त्री.) हरकत. **मनाचिठ्ठी**—तगादा; निषेधपत्र.

**मनाई** (स्त्री.) बंदी, निषेध.

**मनावणी** (स्त्री.) मन वळविणें.

**मनाक** (प्रा. अ.) क्षणभर.

**मनी** (स्त्री.) मांजरी.

**मनीषा** (सं. स्त्री.) इच्छा, हेतु.

**मनु** (सं. पु.) चौदा कालाधिकाऱ्यांपैकीं प्रत्येक, काळ.

**मनुक** (अर. स्त्री.) वाळविलेलें द्राक्ष.

**मनुज** (सं. पु.) मनुष्य, मानव.

**मनुष्य** (सं. पु.) माणूस; धीराचा किंवा कर्तृत्ववान् पुरुष.

**मनुष्यगण** (सं. पु.) माणसांच्या स्वभावावर, स्थितीवर व एकंदर दैवगतीवर नक्षत्रांचे जे बरे वाईट परिणाम घडतात त्यांवरून त्यांचे तीन वर्ग (देवगण, मनुष्यगण व राक्षसगण) करण्यांत आले आहेत. ह्यांपैकीं दुसरा वर्ग.

**मनुष्यलोक** (सं. पु.) पृथ्वी.

**मॅनेजर** (इं. पु.) व्यवस्थापक.

**मनेरा** (प्रा. पु.) मन; तगादा (तुका० १२८).

**मनेरी** (प्रा. वि.) मनरूपी (तुका० २३३).

**मनोगत** (सं. न.) मनांतला गुप्त हेतु किंवा अर्थ, विचार.

**मनोज** (सं. पु.) मदन.

**मनोजव** (सं. वि.) मनाच्या गतीनें अर्थात् फार त्वरेनें जाणारा.

**मनोती** (हिं. स्त्री.) व्याजाबद्दल प्रथम कापून घेतलेली रक्कम.

**मनोदय** (सं. पु.) हेतु, विचार, आशय.

**मनोभव** (सं. पु.) मदन.

**मनोभाव** (सं. पु.) हेतु, भक्ति, श्रद्धा.

**मनोभिराम** (सं. वि.) चित्ताकर्षक; आनंददायक.

**मनोमय** (सं. वि.) मानसिक, काल्पनिक, अंतःकरणांतली. **म० कोश** (पु.)– आत्म्याच्या पंचकोशांपैकीं तिसरा.
**मनोरंजक** (सं. वि.) मनाला रमविणारें.
**मनोरंजन** (सं. न.) करमणूक.
**मनोरथ** (सं. पु.) इच्छा, बेत, हेतु.
**मनोरम** (सं. वि.) आनंददायक, मोहक.
**मनोरा** (अर. मिनार पु.) कळस; उंच पोकळ स्तंभ. [ कल्पनातरंग.
**मनोराज्य** (सं.न.) भावी उत्कर्षाविषयींचे
**मनोवगाहन** (न.) मनांतील गूढ व्यापारांचा शोध करणें.
**मनोविकार** (सं. पु.) कामक्रोधादि कारणांमुळें मनाच्या स्थितींत होणारा पालट; मनोवृत्ति.
**मनोविश्लेषण** (न.) मानसिक व्यापारांची चिकित्सा. [ मनाचा व्यापार.
**मनोवृत्ति** (सं. स्त्री.) चित्तवृत्ति, स्वभाव;
**मनोहर** (सं. वि.) चित्ताकर्षक; (पु.) व्यंकटेशाचा प्रसाद.
**मनोहारि, मनोज्ञ** (सं. वि.) चित्ताकर्षक.
**मनोरें** (प्रा. न.) मनाची इच्छा.
**मनोनि** (अ.) मनांतून, मनापासून.
**मन्मथ** (सं. पु.) मदन, काम.
**मन्यु** (सं. पु.) राग.
**मन्वंतर** (सं. न.) दुसरा मनु; ३०,६७, २०,००० वर्षें; बदललेला काळ; सत्तेचा काळ.
**मपितला** (प्रा. वि.) मोजका.
**मम** (सं. वि.) माझा.
**ममता** (सं. स्त्री.), **ममत्व** (न.) माया, प्रेम.
**ममतालु, ममताळू** (सं. वि.) मायाळु.
**ममलकतमदार** (फा. पु.) बादशाहीचा आधारस्तंभ (हा एक किताब आहे.).
**मय** (हा शब्द एखाद्या नामाला जोडून त्याच्या पुढें येतो तेव्हां वि.) पूर्ण; —चा केलेला इत्यादि; जसें–सुवर्णमय; जलमय; एक प्राचीन कारागीर.
**मयंक** (पु.) सूर्य; चंद्र.
**मयत** (अर. वि.) मेलेला.
**मया** (अर. वि.) शंभर.
**मयातैन** (अर. वि.) दोनशें.
**मयाळ** (प्रा. वि.) मवाळ. मायाळू.
**मयूख** (सं. पु.) प्रकाश, किरण.
**मयूर** (सं. पु.) मोर; तुरा.
**मयूरवी, मयूरी** (सं. स्त्री.) लांडोर, मोराची मादी.
**मयूरासन** (न.) एक योगासन; शहाजहाननें तयार केलेलें सिंहासन.
**मयोरवेटी** (प्रा. स्त्री.) मयूरपुच्छ.
**मर** (स्त्री.) नाश पावलेला भाग; मरण्याची स्थिति; मरणोन्मुख अवस्था.
**मरकत, मरगज** (पु.) पाच नांवाचें रत्न.
**मरगळ** (स्त्री.) थकवा, ग्लानि.
**मरगळा, मरीगळा** (प्रा.पु.) मूर्ति, पुतळा (भा० ४।२४९) [ फेंपरें.
**मरगी** (सं. मरक स्त्री.) महामारी; मिरगी,
**मरगत** (स्त्री.) मृत्युगति; मरणावस्था; दैवाची परमावधि.
**मरज** (प्रा. पु. न.) मरकत पहा.
**मरण** (सं. न.) मृत्यु; महत्संकट.
**मरणें** (सं. क्रि.) मृत्यु पावणें; नाहींसें होणें; अतिशय परिश्रम करणें.
**मरणोन्मुख** (सं. वि.) मरायला टेकलेला.
**मरतबा** (अर. पु.) दर्जा, पदवी, योग्यता.
**मरतमढें** (न.) मरतुकडा, अतिशय अशक्त मनुष्य.
**मरता** (वि.) मरणारा; मरूं घातलेला; मरणोन्मुख; मरावयास टेकलेला.
**मरतोक** (सं. मृतक न.) मृताची क्रिया.
**मरतुकडा** (वि.) अतिशय क्षीण व कृश.
**मरद** (फा. मर्द पु.) पुरुष, मर्द.
**मरदणें** (सं. मृद् क्रि.) चोळणें.
**मरफा** (फा. पु.) एक वाद्य; नगारा.
**मरफेकरी** (पु.) मरफा वाजविणारा.
**मरमर** (स्त्री.) कुरकुर (भावार्थ रामा० २।४।४०); उपहास.
**मरवड** (स्त्री.) मरणांतिक अवस्था.
**मरवडा** (पु.) मरणाची छाया.
**मरवा** (पु.) एक सुगंधी वनस्पति.
**मरशा** (अर. पु.) शोकगीत. [ माजी.
**मरहूम** (अर. वि.) मृत; कैलासवासी;
**मरळ** (स्त्री.) मरगळ, ज्वरांश.
**मरळा** (वि.) अतिशय थकलेली.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**मराठ** (प्रा. वि.) स्पष्ट, सोपें.
**मराठमोळा** (पु.) पडदा, बुरखा; मराठे लोकांच्या चालीरीति.
**मराठा** (सं. महारथी पु.) महाराष्ट्रांतला रहिवासी; महाराष्ट्रांतली एक विशेष क्षत्रिय जात.
**मराठी** (सं. महाराष्ट्री स्त्री.) महाराष्ट्रांतली भाषा; (वि.) मराठ्यांची.
**मरातब** (अर. पु. स्त्री.) पदवी, उच्च दर्जा.
**मरामत** (अर. मरम्मत स्त्री.) डागडुजी, सांभाळ, निगा.
**मराळ** (सं. मराल. पु.) हंस.
**मराळिका** (सं. स्त्री.) देवी. [ मूर्ति.
**मरिगळा** (प्रा. स्त्री.) आकृति, आकार,
**मरी** (सं. मरिका स्त्री.) रोगाची सांथ; मरणदशा.
**मरु** (सं. पु.) वाळवंट; मारवाड देश.
**मरुत्** (सं. पु.) वायु.
**मरोडा** (हिं. पु.) मुरडा.
**मर्कट** (सं. पु. न.) माकड.
**मर्गळ** (वि.) अडाणी. [ कृपा.
**मर्जी** (अर. स्त्री.) खुषी; अंतःकरणवृत्ति;
**मर्त्य** (सं. वि.) मृत्यूस पात्र; (पु.) मनुष्य.
**मर्द** (फा. पु.) पुरुष; (वि.) शूर, धैर्यवान्.
**मर्दणें** (सं. मृद् क्रि.) चोळणें; मारणें.
**मर्दन** (सं.न.) अंग रगडणें, चोळणें; नाश.
**मर्दन्या** (पु.) अंग रगडणारा.
**मर्दा, मर्दाना** (फा. वि.) धीट, शूर.
**मर्दानगी** (फा. स्त्री.) मर्दुमकी; शौर्य.
**मर्दानी** (फा. वि.) पुरुषास शोभणारा.
**मर्दामर्दी** (फा. वि.) पुरुषास शोभणारा; (स्त्री.) पौरुष, शौर्य, पराक्रम.
**मर्दी, मर्दुमकी, मर्दुमी** (फा. स्त्री.) पराक्रम, शौर्याचें कृत्य.
**मर्फा** (फा. पु.) लहान टिमकी, नगारा.
**मर्म** (सं. न.) नाजूक भाग; जिव्हाळी; गूढ तत्त्व, रहस्य; तात्पर्य.
**मर्मण** (प्रा. वि.) मर्मज्ञ.
**मर्मभेद** (सं.पु.) जिव्हाळी झालेली जखम; एखाद्याच्या रहस्याचा स्फोट.
**मर्मर** (फा. पु.) संगमरवरी दगड.
**मर्मरी** (वि.) संगमरवरी; आरसपानी.
**मर्मज्ञ** (सं. पु.) खुबी जाणणारा.
**मर्मी** (सं. वि.) मर्मज्ञ; मर्मभेदी.
**मर्यादशील** (सं. वि.) विनीत; अदबशीर.
**मर्यादा** (सं. स्त्री.) सीमा, हद्द; विनय; नियम.
**मऱ्हाटा, मऱ्हाठी, मऱ्हाठमोळा** मराठा, मराठी, मराठमोळा पहा.
**मऱ्हाटें** (प्रा. वि.) प्राकृत; स्पष्ट; (अ.) सुलभ रीतीनें.
**मल, मळ** (सं. पु.) घाण; विष्ठा.
**मलई** (हिं. स्त्री.) साय.
**मलखांब** (पु.) अंगांत चपळता येण्यासाठीं कसरत करण्याकरितां तालमींत पुरलेला वाटोळा खांब. [ दरवेश.
**मलंग** (प्रा. पु.) फकिरांचा एक पंथ;
**मलद्वार** (सं. न.) ज्या वाटें विष्ठा पडते तो शरिराचा भाग; गुदद्वार.
**मलपणें** (क्रि.) डुलत चालणें.
**मलपृष्ठ** (सं. न.) पुस्तकाचें आरंभीचें पान.
**मलम** (फा. मलहम न.) जखमेवर लावण्याचें स्निग्ध औषध.
**मलमल** (हिं. स्त्री.) तलम सुताचें कापड.
**मलमा** (पु.) पडक्या घराचें सामान.
**मलमास** (सं. पु.) अधिक मास.
**मलय** (सं. पु.) एक पर्वत.
**मलयागर, मलयागीर** (सं.मलय अगरु पु.) उत्कृष्ट चंदन.
**मलवस्त्र** (सं. न.) केरकचऱ्यापासून रक्षण करण्यासाठीं वर घातलेलें वस्त्र.
**मलविसर्ग, मलविसर्जन** (सं. न.), **मलशुद्धि** (सं. स्त्री.) पोटांतल्या मळाचा झाडा.
**मलसूत्र** (सं. न.) मळसूत्र पहा.
**मलाड** (न.) मावळ प्रांत.
**मलावरोध, मलावष्टंभ** (सं. पु.) शौचास साफ न होणें.
**मलिका** (अर. स्त्री.) राणी.
**मलिदा** (फा. मलिदा पु.) दूध, साखर लोणी इ. घालून केलेलें पक्वान्न; चुरा; तिंबलेली कणिक.
**मलिण, मलिन** (सं. वि.) घाणेरडा; मळलेला; अस्पष्ट.

**मलीक** (अर. पु.) राजा.
**मलूल** (अर. वि.) उदास; खिन्न.
**मलेरिया** (पु.) मुदतीचा हिंवताप; कर्दमोत्थित ज्वर.
**मल्ल** (सं. पु.) पहिलवान; जेठी.
**मल्लई** (स्त्री.) दांडगाई, गोंधळ.
**मल्लक्रीडा** (सं. स्त्री.) मल्लाची कुस्ती.
**मल्लयुद्ध** (सं. न.) कुस्ती, बाहुयुद्ध.
**मल्लारि, मल्हार, मल्हारि** (सं. मल्ल + अरि पु.) खंडोबा.
**मल्लिका** (सं. स्त्री.) जाई; मोगरा.
**मल्लिकार्जुन** (सं. पु.) बारा ज्योतिर्लिंगांतलें एक.
**मल्ली** (प्रा. वि.) समर्थ.
**मल्लीनाथ** (पु.) एक प्रसिद्ध संस्कृत टीकाकार. **मल्लीनाथी** (स्त्री.)—एखाद्या गोष्टीवर केलेली खोचदार टीका किंवा संपादणी.
**मल्हार** (सं. मल्लारि पु.) खंडोबा; गायनांतला एक राग; योग.
**मवणी** (प्रा. स्त्री.) गणना.
**मवणें** (प्रा. स्त्री.) मोजणें; मावणें.
**मवसर** (पु.) धन; वित्त.
**मवाई** (स्त्री.) मऊपणा, मृदुता.
**मवाग** (स्त्री.) मंदाग्नि. [ तूप इ०
**मवागा, मवारी**(स्त्री.)स्निग्ध पदार्थ; लोणी
**मवाज (जी) न** (पु.) मशिदीची बांग पुकारणारा.
**मवाली** (वि.) गुंड.
**मवाशी, मवासी** (अर. पु.) लुटारू.
**मवास** (अर. पु.) लुटारू, लुटारूंची झुंड; तिचा नायक.
**मवाळ** (सं. मृदु वि.) मृदु; सहज वश करून घेतां येणारा.
**मवाळी** (स्त्री.) मृदुपणा, सौम्यता.
**मविता** (प्रा. पु.) मोजणारा.
**मविलें** (प्रा. वि.) मोजलेलें.
**मशक** (सं. न.) चिलट.
**मशगुल** (अर. वि.) निमग्न; दंग.
**मशरू** (अर. स्त्री.) गजनीचें कापड.
**मशाकत, मशागत** (अर. मशाकत स्त्री.) मेहनत, श्रम.
**मशारनिल्हे** (अर. मशारा अलिहा वि.) वर सांगितलेलें; इसम; मजकूर.
**मशाल** (अर. स्त्री.) काठीभोंवतीं चिंध्या गुंडाळून केलेली दिवटी. [ धरणारा.
**मशालची, मशालजी** (फा. पु.) मशाल
**मशीद** (अर.मसजिद स्त्री.) मुसलमानांचें प्रार्थनामंदिर. [ काजळ, अंजन.
**मशी, मशेरी, मषी** (सं. स्त्री.) शाई;
**मशायक** (अर. पु.) धर्मशास्त्रज्ञ. [ पदवी.
**मश्रूक अनाम** (अर. पु.) एक सन्मानाची
**मस** (सं. मषी न.) काजळ; (पु.) शरिरावरचा काळा डाग; चामखीळ; (क्रि. वि.) पुष्कळ.
**मसक** (फा. स्त्री.) पाणी वाहण्याची कातड्याची पिशवी; पोट.
**मसक** (सं. मशक न.) मशक, चिलट.
**मसकणें** (क्रि.) तुकडा किंवा चुरा होणें.
**मसण** (सं. श्मशान न.) प्रेतें जाळण्याची किंवा पुरण्याची जागा; स्मशान.
**मसणवटी** (सं. श्मशानवटी स्त्री.) स्मशानभूमि. [ शब्द.
**मसणा** (वि.)फलाणा,रागाचा संबोधनार्थक
**मसंदळणें** (क्रि.) तिंबणें, तुडविणें.
**मसनद** (फा. स्त्री.) गादी, तख्त. [ केलेली.
**मसम** (अर. वि.) ठरविलेली, पक्की
**मसरू** मशरू पहा.
**मसलत** (अर.स्त्री.)विचार, सल्ला, योजना.
**मसलतदार** (फा. पु.) मंत्री, सल्ला देणारा.
**मसलंद** (स्त्री.) अंबारीचा मध्यभाग.
**मसाण** (सं. श्मशान न.) मसण पहा.
**मसाद** (अर. स्त्री.) जमिनीची मोजणी.
**मसाला** (अर. पु.) अनेक पदार्थांचें सुवासिक मिश्रण; साहित्य; सरकारी अधिकाऱ्यांचें बोलावणें; समन्स; दंड.
**मसिहा** (हिब्रु पु.) तारणारा; ख्रिस्त; (वि.) इसवी.
**मसी** (प्रा. स्त्री.) शाई.
**मसीपत्र** (प्रा. न.) कागद.
**मसुदा** (अर. मस्विदा पु.) खर्डा.
**मसुरा** (पु.) भिंतींत धान्य साठविण्यासाठीं ठेविलेली पोकळ जागा.
**मसूर** (सं.स्त्री.) एक धान्य; (पु.) दंड-

**मसूरिका, मसूरी** (सं. स्त्री.) देवीचा रोग.
**मसैर**(प्रा.न.)अंधार; काजळ(ज्ञा०५।८३).
**मस्करी** (सं.स्त्री.) थट्टा. **म०ची कुस्करी** —थट्टेचा भयंकर परिणाम. [ विपुल.
**मस्त** (फा. वि.) धुंद; ताठलेला, लठ्ठ;
**मस्तक** (सं. पु. न.) डोकें, शिर. **म० ठेंगणें करणें**—नम्रतेनें वागणें; **म०पट्टी** —खिडकीच्या किंवा दाराच्या चौकटीची वरची पट्टी.
**मस्तवाल** (फा. वि.) गर्विष्ठ, माजलेला.
**मस्तिष्क** (फा. पु.) मेंदू.
**मस्ती** (फा. स्त्री.) माज; गुर्मी; हत्तीच्या गंडस्थळाचा स्राव. [ बंदी.
**महकुबी** (अर. महकूफ स्त्री.) तहकुबी,
**महकूब** (अर. महकूफ वि.) तात्पुरतें किंवा कायमचें बंद.
**महजब** (पु.) धर्मपंथ.
**महजर** (अर. पु.) करारपत्र (तुका० ३३९७); सनदपत्र, हुकूमनामा.
**महत्** (सं. वि.) मोठें.
**महंत** (सं. महत् पु.) गोसाव्यांचा नायक; श्रेष्ठ प्रतीचा साधु. [ मंडप.
**महतापीचा मंडप** वर चांदणी घातलेला
**महताब** (फा. स्त्री.) चंद्रज्योत.
**महती** (सं. स्त्री.) मोठेपणा.
**महत्त्व** (सं. न.) मोठेपणा. [ वस्त्र.
**महदुमी** (फा. स्त्री.) विशेष प्रकारचें एक
**महदूद** (अर. वि.) निश्चित मर्यादेंतला.
**महमुदी** (फा. स्त्री.) उच्च प्रतीचें सुती कापड. [ महागाई.
**महर्गता, महर्घता** (सं. महार्घता स्त्री.)
**महर्लोक** (सं. पु.) आकाशस्थ ज्योतींचें वसतिस्थान.
**महर्षि** (सं. पु.) श्रेष्ठ प्रतीचा ऋषि.
**महल्ला** (अर. मोहल्ला पु.) पेठ, पुरा.
**महशूर** (अर. मशहूर वि.) प्रसिद्ध.
**महसरा** (हिं. पु.) वेढा; जमाव.
**महसूल** (अर. पु.) धारा, जमाबंदी, वसूल.
**महा** (सं. महत् वि.) मोठा, महान्.
**महाकाल–ळ** (सं. पु.) शिव.
**महाकाली** (सं.स्त्री.) पार्वती; प्रचंड तोफ.

**महाकाव्य** (सं. न.) अठरांहून अधिक सर्ग असलेलें काव्य. [ किंवा मोलाचा.
**महाग** (सं. महार्घ वि.) ज्यास्त भावाचा
**महागणें** (क्रि.) महाग होणें.
**महागरा** (वि.) महाग विकणारा.
**महागाई** (स्त्री.) महार्घता; थोडेपणा; महार्घतेमुळें नोकरांना देण्याचा विशेष भत्ता.
**महागिरी** (स्त्री.) मालाचें तारूं.
**महाजन** (सं. पु.) गांवांतला शिष्ट मनुष्य; व्यापारी; सावकार. [ हाकणारा.
**महात-द** (हिं. महावत पु.) हत्तीला
**महात्मा** (सं. पु.) औदार्य, धैर्य इ० गुणांनीं युक्त पुरुष.
**महादशा** (सं. स्त्री.) मनुष्याच्या दैवगतीवर पडणारा त्याच्या पत्रिकेंतल्या मुख्य ग्रहाचा प्रभाव. [ एक भाग.
**महादेव** (सं.पु.) शिव; विणकराच्या फणीचा
**महाद्वार** (सं.न.) मंदिराचा मुख्य दरवाजा.
**महाद्वीप** (सं. न.) खंड.
**महान्** (सं. वि.) मोठा.
**महानस** (सं. पु.) स्वैंपाकघर.
**महानिद्रा** (स्त्री.) मरण.
**महानुभाव** (सं.वि.) उदार, श्रेष्ठ, महात्मा; (पु.) कृष्ण उपासकांचा एक विशिष्ट पंथ.
**महानैवेद्य**(सं.पु.) शिजविलेल्या अन्नाचें ताट वाढून देवाला नैवेद्य दाखवितात तो.
**महाप्राण** (सं. वि.) ज्या व्यंजनाच्या उच्चारांत हकाराचा ध्वनि विशेषेंकरून असतो तें. [ नारळ, फणस इत्यादि.
**महाफळ** (सं.न.) मोठें किंवा उत्कृष्ट फळ;
**महाभारत** (सं. न.) व्यासकृत कौरव-पांडवांचा काव्यमय इतिहास.
**महामति** (सं. वि.) उदार, महात्मा.
**महामाया** (सं.स्त्री.) आदिमाया (पार्वती); कजाग बायको. [ पाड श्रम.
**महामारी** (स्त्री.) वाखा, पटकी; जिवा-
**महामुरी** (फा. स्त्री.) विपुलता.
**महामूर** (अर. वि.) पुष्कळ, विपुल.
**महायंत्र** (प्रा. न.) तोफ.
**महायात्रा** (सं. स्त्री.) काशीयात्रा.

**महार** (सं.) परवारी; एक अंत्यज जाति.
**महारकी** (स्त्री.) महाराचें काम; हलकें आणि कष्टाचें काम.
**महारथी** (सं. पु.) मोठा योद्धा.
**महारवडा, महारवाडा** (पु.) महार लोकांची राहण्याची जागा; सोंवळया-ओंवळयासंबंधानें भयंकर अव्यवस्था.
**महाराज** (सं. पु.) राजाधिराज, सम्राट्.
**महाराष्ट्र** (सं. पु.) मराठे लोकांचा देश.
**महारोग** (सं. पु.) रक्तपिती.
**महार्णव** (सं. पु.) महासागर.
**महाल** (प्रा. पु.) सोयरिक जुळविणारा मध्यस्थ (सोहि० पूर्णाक्षरी). [ गृह.
**महाल** (अर. पु.) मंदिर; जिल्हा; क्रीडा-
**महालकरी** (पु.) महालावरचा अधिकारी.
**महालय** (सं. पु.) आश्रयस्थान; मंदिर; पितृपक्षांतलें श्राद्ध.
**महाली** (पु.) न्हावी; [ हाकणारा.
**महावत** (हिं. पु.) माहूत, महात, हत्ती
**महावस्त्र** (सं. न.) उंची वस्त्र, शालजोडी.
**महावार** (हिं. अ.) महिन्याच्या महिन्यास.
**महावाक्य** (सं. न.) गायत्री मंत्र.
**महावीर** (पु.) जैन धर्माचा संस्थापक; **म०चक्र**(न.)-भारत सरकारकडून विशेष पराक्रमाकरितां मिळणारें पदक.
**महाशय** (सं. पु.) थोर पुरुष.
**महाशिवरात्र** (सं. स्त्री.) माघ व. १४.
**महास्मशान** (सं. न.) श्रीकाशी-क्षेत्र.
**महाळ** (सं. महालय पु.) महालय पहा.
**महाळुंग** (सं. मातुलुंग न.) लिंबाच्या जातीचें मोठें फळ.
**महिख** (सं. महिष पु.) म्हैस, रेडा.
**महिनमहाल, महिनेमहाल** (फा. अ.) महिन्याच्या महिन्यास.
**महिना** (फा. पु.) मास; महिन्याचा पगार.
**महिमा** (सं. पु.) मोठेपणा; थोरवी.
**महिमान** (सं. महिमा न.) थोरवी; (फा. मेहमान पु.) पाहुणा.
**महिरक** (प्रा. न.) इंद्रिय. [ कमान.
**महिरप, महिराप** (अर. मेहराप स्त्री.)
**महिला** (सं. स्त्री.) स्त्री; मादी.
**महिष** (सं. पु.) रेडा.
**महिषी** (सं. स्त्री.) म्हैस; पट्टराणी.
**मही** (सं. स्त्री.) पृथ्वी. [ नांवाचा सर्प.
**महीधर, महीध्र** (सं. पु.) पर्वत; शेष
**महीपाल –ळ** (सं. पु.) राजा.
**महुडा** (प्रा. पु.) मेघ.
**महुर, महूर** (प्रा. वि.) मधुर; (पु.) मोहर (तुका० १२९०).
**महुरी** (प्रा. स्त्री.) राई, मोहरी.
**महेश, महेश्वर** (सं. पु.) शिव.
**महोदय** (सं. पु.) एक मोठें पर्व.
**मळ** (सं. मल न.) घाण, विष्ठा.
**मळई** (स्त्री.) पावसानें किंवा नदीच्या प्रवाहानें वाहून आणिलेला गाळ; त्यावरची बागाईत.
**मळकट** (प्रा. न.) पडदा (भा० ४।२५२); पाप; (वि.) मलिन; घाणेरडें.
**मळकटा** (प्रा. पु.) लेप (भा० ६।९०).
**मळका** (वि.) घाणेरडा. [ जमीन.
**मळकी** (स्त्री.) गाळ साठून तयार झालेली
**मळकोरा, मळखोरा** (हिं. मैलखोर वि.) मळकट रंगाचा.
**मळगावणें** (क्रि.) वापरण्यानें झिजणें; गुळगुळीत होणें; अंगवळणीं पडणें.
**मळगी, मळघी** (स्त्री.) बाजारांतली कायमची दुकानें. [ दाणे वेगळे काढणें.
**मळणी** (स्त्री.) धान्याचीं कणसें तुडवून
**मळणें** (क्रि.) मलिन होणें; चोळणें, रगडणें; कणसांतले दाणे वेगळे करणें.
**मळभ** (न.), **मळभी** (स्त्री.) अभ्र, ढग.
**मळमळ** (स्त्री.) वांति होईलसें वाटणें; उमासा.
**मळमळणें** (क्रि.) उमदळणें.
**मळमळीत** (वि.) वेचव, सौम्य.
**मळवट** (पु.) कपाळभर लावलेलें कुंकू; न भाजलेलें मडकें. [मळकुटी.
**मळवटी** (स्त्री.) अंगावरच्या मळाची वळी;
**मळविणें** (क्रि.) मलिन करणें; घाण करणें.
**मळसूत्र** (न.) स्क्रू; पेंच. [दुपिकी जमीन.
**मळा** (पु.) शाकभाजी पिकविण्याचें शेत;
**मळी** (स्त्री.) मळाची वळकटी; पाक करतांना साखरेंतून निघालेला मळ; माळजमीन.

**मळीण** (सं. मलिन वि.) घाणेरडा; गंजलेला.
**मळेकरी** (पु.) मळ्याची मशागत करणारा.
**मक्षिका** (सं. स्त्री.) माशी.
**मक्षिकापात** (सं. पु.) अडचण, विघ्न, अपशकुन.
**मा** (प्रा. अ.) मग; तर मग.
**मा** (सं. स्त्री.) आई, लक्ष्मी.
**माई** (सं. मातृ स्त्री.) आई किंवा वहीण यांचें टोपणनांव.
**माउली** (स्त्री.) आई; कोणीहि भली स्त्री.
**माऊ** (स्त्री.) मांजर; आईचा स्तन.
**माऊ** (स्त्री.) फोड वगैरेंचा राहिलेला वण.
**माऊसबहीण** (स्त्री.) मावशीची मुलगी.
**माऊतभाऊ** (पु.) मावशीचा मुलगा.
**माकड** (सं. मर्कट पु. न.) मर्कट.
**माकडमेवा** (पु.) विड्याचीं पानें; भुई-मुगाच्या शेंगा; ऊंस, खरबुजें, फळ-फळावळ इ. जिन्नस.
**माकडहाड** (न.) पाठीच्या कण्याचा शेवट.
**माकण** (स्त्री.) बैलाच्या पाठीवर पाणी आणण्यासाठीं घागरी ठेवण्याकरितां केलेली लाकडी बैठक.
**माकत्यान** (अ.) पुन्हा.
**माकंद** (सं. पु.) आम्रवृक्ष.
**माका** (सं. मार्कव पु.) एक वनस्पति.
**माकुलवाणा, माकुला** (वि.) चिमुकला आणि गोजिरवाणा.
**माकूल** (वि.) शहाणा; जाणता; खूप; जोरदार; मानास पात्र; पसंत; रास्त; न्यायाचें; उदार.
**माकोडा** (प्रा. पु.) मुंगळा.
**माखण** (सं. मक्षण न.) लोणी; चोपडण्याचा स्निग्ध पदार्थ.
**माखणें** (सं. म्रक्ष् क्रि.) चोपडणें; भरणें.
**माग** (सं. मार्ग पु.) वस्त्र विणण्याचें यंत्र; शोध, तपास; चिन्ह; थांग; पाण्यास जाण्यासाठीं करून दिलेला मार्ग.
**मांग** (सं. मातंग पु.) वध करण्याचें काम करणारा. **अंगांत मांग शिरणें**—त्वेष चढणें.
**मागणी** (सं. मार्ग स्त्री.) लग्नासाठीं वधूपक्षाजवळ वरपक्षानें मुलीला मागणें; याचना.
**मागणें** (सं. मार्ग क्रि.) द्या म्हणणें, विचारणें, याचना करणें. [ थांग.
**मागमूस, मागमोस** (पु.) मुद्दा, पत्ता, माग,
**मागर** (न.) कोठार.
**मागरा** (सं. मार्ग वि.) पाहिली वस्तु मागणारा.
**मागलट** (स्त्री.) माघार, मागें पडणें, पूर्णावस्था. **मा० वर टाकणें**—लांवणीवर टाकणें.
**मागला** (वि.) मागचा, मागील.
**मांगलिक** (सं. न.) मंगलकार्य.
**मांगल्य** (सं. न.) मंगल कार्य; सुदैव, कल्याण.
**मागस** (वि.) मागून येणारा.
**मागसणें** (क्रि.) मागें राहणें.
**मांगहृदयी** (वि.) निष्ठुर अंतःकरणाचा.
**मांगळी, मांगोळी** (प्रा. स्त्री.) थोरल्या दिवाळीच्या दिवशीं मांग लोक मोळाच्या वेटाचें वेटोळें करून चावडीवर ठेवतात तें (ज्ञा० १३।६५०).
**मागा** (अ.) मागें, पूर्वी.
**मागाडा** (प्रा. अ.) मार्ग (ज्ञा०प्र०१३१).
**मागावा** (पु.), **मागावें** (न.) मार्ग, चाल.
**मागाहून** (अ.) नंतर.
**मागी** (प्रा. स्त्री.) शोध (भा०१२।३४६); संबंध, संदर्भ (भा० ११।६९१).
**मागील** (वि.) मागचा.
**मागुतमागुता** (प्रा. अ.) पुनः पुनः.
**मागुता** (अ.) पुनः, फिरून.
**मागुते** (प्रा. वि.) मागील, पुनः.
**मागून** (अ.) नंतर, मागोमाग.
**मागें** (अ.) पूर्वी, अगोदर; पाठीकडल्या बाजूस.
**मागेंपुढें** (अ.) आणखी एखाद्या वेळेस; पुढच्या किंवा मागच्या बाजूस. **मा० करणें**—माघार घेऊं लागणें; **त्याला मा० कोणी नाहीं**—वडील माणूस किंवा संतति नाहीं.
**मागोमाग** (अ.) पाठोपाठ; नंतर, लागलीच.
**मागोवा** (पु.) शोध.

**माग्या, मागरा** (पु.) जें दिसेल तें हावरे-पणानें मागत सुटणारा; फार वेळां लोकांच्यापाशीं पदार्थ मागण्याची ज्याला चटक किंवा खोड लागली आहे तो.
**मांगोळी** मांगळी पहा.
**माघ** (सं.पु.) हिंदु वर्षाचा अकरावा महिना; एक प्राचीन महाकवी.
**माघवटा** (पु.), **माघस्नान** (सं.न.) पौष शु. १५ पासून माघ शु. १५ पर्यंत रोज प्रातःकाळीं स्नान करण्याचा नियम.
**माघां** (प्रा. अ.) मागें. [ मागें सरणें.
**माघार** (सं. मार्ग स्त्री.) मागें पाऊल;
**माघारणें** (प्रा. क्रि.) मागें टाकणें.
**माघारपणा** (न.) मुलीचें सासरहून माहेरीं किंवा माहेरहून सासरीं जाणें.
**माघारा** (अ.) परत. [ मार्ग.
**माघु, माघू, माघोबा** (प्रा. पु.) माग;
**माघुता** (प्रा. अ.) मागें.
**माघोवा, मागोवा** (प्रा. पु.) माग, पत्ता.
**माघोडा** (प्रा. अ.) मागोमाग.
**माघोतें** (प्रा. अ.) मागें, पुनः.
**माच** (सं. मंच पु.) माचा; पेंढा, गवत इ. ठेवण्यासाठीं घातलेला मंडप; आश्रय.
**माचण** (स्त्री.) शीड फिरविण्याचा प्रकार.
**माचा, माचाव** (सं. मंच पु.) पलंग, पलंगाचा खूर.
**माचाळ** (न.) शेताच्या राखणीसाठीं शेतांत किंवा झाडावर बसण्याकरितां केलेली जागा.
**माची** (सं. मंच स्त्री.) किल्ल्यासभोंवतालची जमीन; डोंगरावरची सपाट जमीन; माच.
**माचूळ** (वि.) मचुळ, बेचव.
**माचोडा** (पु.) पेंढी.
**माचोळी** (स्त्री.) घडवंची.
**माज** (सं. मध्य पु.) कंबर; मद, कैफ, मस्ती; पशूंची गर्भाधानयोग्यता; वृद्धि (ना० १४।४६). [ भाग.
**माजघर** (सं. मध्यगृह न.) घराचा मध्य-
**माजण, मांजण** (सं.मार्जन) मूर्तीला तेल, शेंदूर इ. पदार्थ चोपडणें.
**माजणें** (क्रि.) उन्मत्त होणें; मर्यादेबाहेर पुष्ट होणें; फोफावणें.
**माजपटा** (प्रा. पु.) कमरपट्टा.
**माजर, मांजर** (सं. मार्जार न.) मांजर.
**मांजरपाट** (पु.) जाडया भरडया कापडाची एक जात.
**माजरा** (वि.) मादक, कैफ आणणारा.
**मांजरी** (स्त्री.) मांजराची मादी, भाटी; खाकेंत होणारी पुटकुळी; घुसळखांबाच्या दोऱ्या; चटई.
**मांजरें, मांदिरें** (प्रा. न.) रवी अडकवण्यासाठीं खांबाला बांधलेल्या दोऱ्यांचा फास (भा० २९।१६६).
**माजवण** (प्रा. न.) उन्मत्तपण; मादक द्रव्य; अधिकता. [ करणें.
**माजविणें** (क्रि.) उन्माद आणणें; ज्यास्त
**माजवी** (स्त्री.) टेकडीच्या उतरणीवर बांधलेली माची.
**माजा** (फा. माचू न.) मायफळ.
**मांजा** (हिं. पु.) मेण, तेल, अंड्याचा बलक आणि कांचेची पूड यांचें दाट मिश्रण. हें पतंगाच्या दोरीला लावतात.
**माजा** (प्रा. वि.) माझा.
**माजिटा** (प्रा. पु.) उत्कर्ष.
**माजिठें** (सं. माजिष्ठ न.) तांबडें वस्त्र.
**माजिरा** (प्रा. वि.) उन्मत्त, माजरा.
**माजिरें** (प्रा. न.) धुंदी.
**माजिला** (प्रा. वि.) मधला.
**माजिवटा** (पु.) उन्माद; मरण.
**माजिवटें, माजिवडें** (अ.) मध्यें, आंत.
**माजिवडा** (प्रा. वि.) मध्याचा आश्रय करून राहणारा; (अ.) मध्यें.
**माजिवडें** (प्रा. वि.) मस्त; (अ.) मध्यें.
**माजी** (अर. वि.) पूर्वीचें, गत.
**माजीं** (अ.) मध्यें. [ मस्ती, माज.
**माजु** (सं. मध्य) मध्यभाग, कंबर;
**माजुम** (अर. पु.) भांगेचा केलेला एक मादक पदार्थ. [(वि.) उन्मत्त, गर्विष्ठ.
**माजुरकी, माजुरी** (स्त्री.) उन्मत्तपणा;
**माजोरा, माजोरी** (वि.) उन्मत्त, गर्विष्ठ.
**माझारी** (अ.) आंत, मध्यें.
**माटकुला** (वि.) लहान.

**माटमुट**(अ.)घाबरलेल्या मनाच्या स्थितीचा निदर्शक शब्द.

**माटुळणें** (स्त्री.) खुटणें.

**माठ** (पु.) एक वनस्पति; राजण;(वि.) सपाट, किंचित् उतरती; मठ्ठ.

**माठणें, माठरणें, माठळणें** (क्रि.) (जखम) भरून येणें; गुळगुळीत करणें; बोथटणें; मंदावणें; उग्रता कमी करणें.

**माठलें** (न.) पळीचें तोंड; समईचें टवळें.

**माठा, माठ्या** (वि.) ठोंब्या.

**माड** (पु.) नारळाचें झाड.

**मांड** (पु.) मांडणी, रचना; पसारा; गायनांतला एक राग; (स्त्री.) घोडेस्वाराची टोळी. **मांड माडणें**—घोड्यावर चांगलें बसतां येणें.

**मांडचोळणा** (पु.) केवळ मांडी झाकणारा किंवा गुडघ्यापर्यंत पोंचणारा चोळणा.

**मांडगें** (न.) डाळ, तांदूळ एकत्र शिजवून तयार केलेली खिचडी.

**मांडणी** (स्त्री.) रचना.

**मांडणें** (सं. मंडन क्रि.) वस्तु योग्य स्थानीं ठेवणें; आरंभणें; लिहिणें; (दुकान) स्थापन करणें, उघडणें; (प्रा.) व्यापणें, विस्तार होणें. [ करार.

**मांडपत्र** (न.) दत्तक घेण्याविषयीं लेखी

**मांडलिक** (सं. पु.) सार्वभौमाच्या ताब्यांतला राजा; संस्थानिक. [ १८।७०४).

**मांडली** (प्रा. स्त्री.) मंडण, रचना (ज्ञा०

**मांडव** (सं. मंडप पु.) मंडप.

**मांडवपरतणी** (स्त्री.),**–णें** (न.) लग्नसमारंभांतली वधूपक्षाकडची वरपक्षाला अखेरची मेजवानी. [ वद्य ३०.

**मांडवस, मांडवआवस** (स्त्री.) फाल्गुन

**मांडवी** (सं. मंडप स्त्री.) लहान मांडव, मंडपी; बंदरावर माल ठेवण्याचें घर.

**मांडा** (सं. मंडक पु.) गव्हाचें अतिशय पातळ पापुद्र्याचें पक्वान्न.

**माडी** (स्त्री.) माडाच्या पोईपासून काढलेलें मद्य; मजला; अळवाचें लांब मूळ.

**मांडी** (स्त्री.) जांघ; बैठक. **मांडीवर देणें**—दत्तक देणें;**मांडीवर मांडी टाकून बसणें**—कांहीं न करतां आळसानें बसणें.

**माडू** (पु.) हरिणाच्या दोन शिंगांच्या अग्राला पोलादाचीं तीक्ष्ण पातीं बसविलेलें हत्यार.

**मांडेबांध** (प्रा. पु.) प्रभाव, तेज.

**मांडोबा** (प्रा. पु.) मांडणी, विस्तार.

**माढण, माढाण** (न.) मीठ वगैरे ठेवण्याचें लाकडाचें पाळें.

**माण** (स्त्री.) मानेवरची सूज; चिकणमाती; रुंद तोंडाचें मडकें; थर; मणी पहा.

**माणवक** (सं. न.) एक समवृत्त. याच्या चरणांत ८ अक्षरें व भ, त, हे गण असून शेवटीं अनुक्रमें लघु गुरु अक्षरें असतात.

**माणसळणें, माणसाळणें** (क्रि.) माणसाच्या संवयीचें करणें किंवा होणें; क्रूरपणा टाकून गरीब होणें. [ नांद.

**माणा** (प्रा. पु.) उंसाचा रस काढण्याची

**माणिक्य** (सं. न.) माणिक.

**माणी** (स्त्री.) मायणी; काठीला खालीं बसवितात ती शेंबी. [ रत्न.

**माणीक** (सं.माणिक्य न.) लाल नांवाचें

**माणुसकी** (सं. मनुष्य स्त्री.) मनुष्यपणा; माणसाच्या रीतिभाती व थोरपणा.

**माणूस** (सं. मनुष्य पु. न.) मनुष्य.

**माणूसघाण्या** (वि.) माणसाचा कंटाळा करणारा.

**माणें** (क्रि.) मावणें, समावणें.

**मात** (फा. स्त्री.) बुद्धिबळाच्या खेळांत शत्रूच्या राजाचा हत्ती, घोडा इ० नीं प्रतिबंध केला असतां होणारा डाव;खबर गोष्ट; चमत्कार; विपुलता; थाट. **मात करणें**—बुद्धिकौशल्यानें प्रतिपक्षाला जिंकणें; लोकोत्तर कृत्य करणें.

**मातक्यान** (अ.) पुनः, आणिक; आणखी.

**मातंग** (सं. पु.) हत्ती; मांग.

**मातगा** (वि.) लवकर माजणारा; गर्विष्ठ.

**मातट, मातड, मातळ** (वि.) मातीशीं मिश्रित.

**मातणें** (क्रि.) माजणें, उन्मत्त होणें.

**मातबर, मातब्बर** (अर. वि.) सन्मान्य; श्रीमान्, मोठा.

**मातबरी** (स्त्री.) प्रतिष्ठा, महत्त्व.

**मातम–मी** (फा.अर.न.स्त्री.) शोक; दुःख.
**मातमपुरशी** (फा. स्त्री.) दुखवटा.
**माता** (सं. स्त्री.) आई; देवी.
**मातापितरें** आईबाप.
**मातामह** (सं. पु.) आईचा बाप.
**मातामही** (सं. स्त्री.) आईची आई.
**मातियेडे** (प्रा. पु.) मातकाम करणारे (भावार्थ० २।१५।३).
**माती** (सं. मृत्तिका स्त्री.) धूळ; दुर्दशा; निसर्गानें मेलेल्या जनावराचें मांस.
**मातीचे कुल्ले** खरें प्रेम नसतां प्रेमाचा आणिलेला नुसता आविर्भाव.
**मातुल** (सं. पु.) मामा.
**मातुलुंग, मातुलिंग** (पु.) महाळुंगाचें झाड; (न.) महाळुंगाचें फळ.
**मातुश्री** (सं. मातुःश्री स्त्री.) आई.
**मातृ** (सं. स्त्री.) आई; माता.
**मातृका** (सं.स्त्री.) अपासून क्षपर्यंतचे वर्ण; ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी, चामुंडा व चर्चिका या आठ देवता.
**मातृत्व** (सं. न.) आईपणा.
**मातृभोजन** (सं. न.) मुंजीच्या दिवशीं मुलानें आईच्या ताटांत जेवण्याचा समारंभ.
**मातेरा** (पु.), **मातेरें** (न.) केरकचरा-मिश्रित धान्य; खरावी, दुर्दशा; घाण.
**मातोश्री** (सं. मातृश्री स्त्री.) आई. [सर्व.
**मात्र** (सं. अ.) फक्त, केवळ; यच्चयावत्
**मात्रा** (सं. स्त्री.) ऱ्हस्व स्वर उच्चारण्यास लागणारा काळ; माप, परिमाण, इयत्ता; रसायन; अक्षराच्या डोक्यावरची तिरकस रेघ; वर्चस्व; चीजवस्त; इंद्रियाचे विषय.
**मात्रागमनी** (सं. मातृगमनी वि.) मादरचोद, लबाड.
**मांत्रिक** (सं. पु.) मंत्रज्ञ, जादुगार.
**मात्सर्य** (सं. न.) हेवा.
**माथण, माथणी** (सं. मंथ स्त्री.) दही घुसळण्याचा रुंद तोंडाचा डेरा.
**माथवीय** (प्रा. न.) डेऱ्यांतील पाणी.
**माथला, माथवा** (पु.) पळीचें टवळें किंवा तोंड; घुसळण्याच्या रवीचा फुगीर भाग.
**माथा** (सं. मस्तक पु.) मस्तक; कपाळ; घुसळण्याच्या रवीचा फुगीर भाग; डोंगराचें शिखर. **उजळता माथा होणें**–आलेला अपवाद दूर होणें. [पहा.
**माथाकूट, माथेकूट** (स्त्री. न.) माथेफोड
**माथुला** (पु.) लहान रवी.
**माथुलिया** (स्त्री.), **माथलें** (प्रा. न.) डोक्यावरलें मडकें (तुका० ३३८३).
**माथें** (सं. मस्तक न.) मस्तक, शिर.
**माथेफिरू** (पु.) संतापी, अविचारानें भलतेंच कृत्य करणारा; भ्रमिष्ट.
**माथेफोड** (स्त्री.) दुसऱ्याच्या डोक्यांत शिरविण्याचें फार कष्टाचें काम.
**मांद** (पु.) माज, उन्माद, गर्व.
**मांद** (स्त्री.) धान्याची रास; मांदण पहा.
**मादक** (सं. वि.) कैफी, अमली.
**मादगा** (वि.) लवकर गर्वानें ताठणारा.
**मांदगी** (फा. स्त्री.) थकवा; दुखणें.
**मांदण** (स्त्री. न.) मोठ्या तोंडाचा डेरा.
**मांदणें** (सं. मृद् क्रि.) भांडें घासणें; माजणें.
**मादर** (फा. स्त्री.) आई.
**मादरचोद** (वि.) मात्रागमनी, नीच.
**मादरपाट** (तामिळ–मद्रपल्लम न.) मांजरपाट पहा. [चटई.
**मांदरी** (स्त्री.) शिंधीची किंवा मोळाची
**मादवान** (फा. स्त्री.) मोठी चांगली घोडी.
**मादवी** (प्रा. स्त्री.) वस्त्र.
**मादसाट** (पु.) मांजरपाट.
**मांदळ, मांदळा** (सं. मंडल पु.) मोठा मृदंग (मोरो० मंत्रभा० ४।१।१७); गाडीच्या चाकाचा तुंबा.
**मांदाळ** (प्रा. पु.) मृदंग.
**मादळी** (सं. मंडळ स्त्री.) डफ; डफाचें कडें; (प्रा.) मंडळी.
**मादा** (स्त्री.) मादी.
**मांदा** (फा. वि.) थकलेला, आजारी.
**मांदार** (सं. मंदार पु.) पांढरी रुई.
**मादिका** (प्रा. स्त्री.) मादी.
**मांदियाळी** (स्त्री.), **मांदियाळें** (न.) समुदाय (भा० ५।१५४).

**मांदिरें** (न.) मांजरें पहा. [जाति.
**मादी** (फा. स्त्री.) पशुपक्ष्यांतील स्त्री–
**मांदी** (प्रा. स्त्री.) मंडळी; समुदाय; पेटी.
**मादुरी, मांदुरी** (प्रा. पु.) चाबुकस्वार.
**मांदुस, मांदूस** (स्त्री.) पेटी; तिजोरी.
**मांदुसी** (प्रा. पु.) पिंजरा.
**मांदुळणें** (प्रा. क्रि.) खुंटणें.
**मांद** (सं. मेदस् न.) चरबी.
**मांदे** (प्रा. न.) एकत्रपण. [ मांडव.
**मांदोडा** (प्रा. पु.) फळांचा घड; समुदाय;
**मांदोडी** (प्रा. पु.) मांडव. [ १८।१४).
**मांदोळा** (प्रा. पु.) समुदाय, ( मुक्ते० वन०
**मांद्य** (सं. न.) शिथिलता, मंदपणा; अंधुकता; सौम्यता.
**माधव** (सं. पु.) विष्णु; वसंत ऋतु.
**माधवी** (सं. पु.) दशावताराच्या खेळांतलें विदूषकासारखें हास्यरसोत्पादक सोंग; (प्रा.) वसंत ऋतु; (स्त्री.) मधाची केलेली मदिरा. [ २।४४).
**मांधा** (प्रा. पु.) समुदाय (मुक्ते० रामा०
**माधुकरी** (सं. स्त्री.) अनेक ठिकाणची भिक्षा; (पु.) शिजल्या अन्नाची भिक्षा मागणारा. [ गोडी.
**माधुरी** (सं. स्त्री.) वाचा; मधुरपणा,
**माधुर्य** (सं. न.) गोडी.
**माध्यंजन** (सं. माध्यंदिन पु.) ब्राह्मणांतला एक पोटभेद.
**माध्यम** (सं. न.) द्वार; साधन.
**माध्यान्ह** (सं. मध्यान्ह स्त्री.) दुपार. **माध्यान्हीं येणें**—निश्चयास येणें.
**माध्व** (सं. पु.) मध्वसंप्रदायी.
**माध्वी** (सं. स्त्री.) मदिरा.
**मान** (सं. पु.) आदर, सत्कार; अहंता, गर्व, डौल; (सं. मन्या स्त्री.) गळ्याचा मागचा भाग; (न.) प्रमाण. **मान कापणें**—विश्वासघात करणें; **मान डोलविणें**—पसंती दर्शविणें; **मान वर करणें**—दिमाख दाखविणें; उत्कर्ष पावणें; **मान अडकणें**—पेंचांत सांपडणें; **मान खालीं घालणें**—लज्जित होणें.
**मानकरी** (पु.) सत्कार घेण्याचा हक्क असलेला.
**मानखंडना** (सं. स्त्री.) अपमान, अवमान.
**मानखोडा** (पु.) ओढाळ पशूची मान व पुढचे पाय जिनें बांधितात ती दोरी.
**मानगटी** (स्त्री.) बोकांडी, मान.
**मानचित्र** (न.) इमारतीच्या योजनेचा आराखडा किंवा नकाशा.
**मानट** (स्त्री.) नापीक जमीन.
**मानणक** (स्त्री.) नवस.
**मानणें** (क्रि.) मान देणें; गणणें; लेखणें; सुखावह होणें; समजणें; आवडणें, नवस करणें.
**मानदंड** (सं. पु.) मोजण्याचा गज.
**मानद्रव्य, मानवेतन** (न.) समाजसेवा किंवा तशा प्रकारच्या कामाबद्दल मिळणारें अल्प वेतन.
**माननीय** (सं. वि.) पूज्य, मेहेरबान.
**मानपत्र** (न.) मान्यता करणारा लेख.
**मानपान** (पु.) आदरसत्कार.
**मानभंग** (सं. न.) मानखंडना.
**मानभाव** (पु.) कृष्णभक्तांचा एक संप्रदाय; (वि.) मनांत कपट ठेवून बाहेरून गोड बोलणारा.
**मानभावी कावा** कपटाचे डावपेंच.
**मानमान्यता** (सं. स्त्री.) आदरसत्कार, पूज्यता इत्यादि.
**मानमोहर** (पु.) मानपत्र.
**मानव** (सं. पु.) मनुष्य.
**मानवता** (स्त्री.) जगांतील लोक; माणुसकी.
**मानवंदना** (स्त्री.) सन्माननीय व्यक्तीला द्यावयाची लष्करी थाटाची सलामी.
**मानवणें** (क्रि.) मान्य होणें; मान डोलविणें; संमति देणें; सुखावह होणें.
**मानवी** (वि.) मनुष्यसंबंधीं, मनुष्यानें केलेलें.
**मानस** (सं. मानस न.) मन, चित्त; विचार; हेतु; हिमालय पर्वतावरील एक सरोवर; (वि.) मानासंबंधाचें.
**मानसपुत्र** (सं. पु.) इच्छामात्रेंकरून निर्माण केलेला पुत्र; पुत्र मानलेल्याप्रमाणें अत्यंत प्रिय मनुष्य.
**मानसपूजा** (सं. स्त्री.) मनानें केलेली पूजा.
**मानसमंथन** (न.) मनोव्यापारांचा शोध व त्याचें शास्त्र.

**मानसरुग्णता** (स्त्री.) मनोविकृति.
**मानसिक** (सं. वि.) मनासंबंधाचें (न.) नवस.
**मानहानि** (सं. स्त्री.) मानखंडना, अवमान.
**माना, मायना** (अर. पु.) ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें त्याला गौरवून लिहिण्याचा संप्रदाय; पत्रांतला मजकूर. **मानाचें पान**—सन्मानार्थ दिलेली कितीही क्षुद्र वस्तु.
**मानाविणें** (क्रि.) मान देणें.
**मानिणें** (क्रि.) धावत येणें.
**मानिनी** (सं. स्त्री.) मानी स्त्री. [मनाचा.
**मानी** (वि.) बाणेदार, स्वाभिमानी, थोर
**मानी** (स्त्री.) जात्याच्या वरच्या तळीच्या मधोमध तोंडाला घर्षणानें झिजूं नये म्हणून वसविलेली लोखंडाची वाटोळी चकती; (वि.) अभिमानी; घमेंडखोर.
**मानुष** (सं. पु.) मनुष्य. **मानुषी** (स्त्री.) स्त्री.
**मांने** (प्रा. अ.) बरोबर. [ अग्र.
**मानेचा कांटा** पाठीच्या कण्याचें वरचें
**मान्य** (सं. वि.) मानास पात्र; कबूल.
**मान्यता** (सं. स्त्री.) मान; योग्यता; कबुली; पत.
**मान्ना** (हिब्रु पु.) देवानें भक्ताला दिलेलें अन्न (इस्राइल). [ गणती.
**माप** (न.) इयत्ता, प्रमाण; वजन, तोल;
**मापटें** (न.) अर्ध्या शेराचें माप. [ घेणें.
**मापणें** (क्रि.) मोजणें, तोल करणें, मेज
**मापन** (सं. न.) माप घेणें.
**मापारकी** (स्त्री.) मापाऱ्याचा धंदा.
**मापारी** (प्रा. पु.) मापणारा. [ मोजलेलें.
**मापी** (वि.) मापानें मोजण्यासारखें किंवा
**माफ** (अर. वि.) क्षमा केलेला. [मध्यम.
**माफक** (अर. वि.) बेताचा, योग्य;
**माफजत** (अर. माफ स्त्री.) क्षमा; सूट.
**माफा** (अर. पु.) स्त्रियांच्या प्रवासाचा मेणा.
**माफी** (अर. माफ स्त्री.) काळजी, बंदोबस्त, व्यवस्था, सुरक्षितपणा.
**माफी जमीन** साऱ्याची सूट मिळालेली जमीन. [ खबरदारी.
**माबजत** (अर. स्त्री.) मजबुती; रक्षणाची
**माभळभट** (पु.) पोकळ धोतर नेसलेला; बावळट.

**मामंजी** (मामाजी पु.) सासरा.
**मामलत** (अर. स्त्री.), **मामला** (पु.) तालुक्याचें वसुलाचें काम; महत्त्व.
**मामलतदार** (फा. पु.) तालुक्याच्या जमाबंदीचा वसूल घेणारा अधिकारी.
**मामा** (सं. मामक पु.) आईचा भाऊ; सासऱ्याविषयीं आदरयुक्त संज्ञा. **कामापुरता मामा**—काम साधून घेण्यापुरतें एखाद्याला मान देऊन तें झाल्यावरोबर त्याची ओळखसुद्धां विसरण्याइतका कृतघ्नपणा.
**मामिस, मामीस** (प्रा. स्त्री.) मामी; सासू.
**मामी** (स्त्री.) मामाची बायको; सूचि संज्ञा.
**मामुरी** (फा. स्त्री.) आबादी; वस्ती.
**मामू** (पु.) आईचा स्तन.
**मामूल** (अर. पु.) वहिवाट, चाल, दस्तुर.
**मामेबहीण** (स्त्री.) मामाची मुलगी.
**मामेभाऊ** (पु.) मामाचा मुलगा.
**मामेसासरा** (पु.) नवऱ्याचा किंवा बायकोचा मामा. [कोची मामी.
**मामेसासू** (स्त्री.) नवऱ्याची किंवा बाय-
**माय** (सं. मा किंवा मातृ स्त्री.) आई. **मायदेश**—जन्मभूमि; **मायभाषा**—स्वतःची भाषा; **मायेचा पूत**—विलक्षण पराक्रमी मनुष्य; **मायपोट**—बरें वाईट सर्व जेथें साठविलें जातें तें.
**मायथळ** जन्मभूमि.
**मायणी** (स्त्री.) मुसळ; जात्याचें पाळें इत्यादींना बसविलेलें लोखंडाचें कडें.
**मायंदळ** (प्रा. वि.) पुष्कळ (देवनाथ पृ० १४८).
**मायदळ** (प्रा. पु.) मृदंग.
**मायना** माना पहा.
**मायफळ** (न.) एक औषधी फळ.
**मायराणी** (प्रा. स्त्री.) पिशाची.
**मायवणी** (प्रा. स्त्री.) कुलीन स्त्री.
**माया** (सं. स्त्री.) अविद्या; भ्रम, फसवणूक, भुरळ; ईश्वरी शक्ति; दया, करुणा; द्रव्य; (फा. स्त्री.) कोरी सोडलेली जागा; समास. **मायाचक्र**—लटका ऐहिक संसार; **मायाजाल, मायापाश, मायाव्यापार** (न.)—भ्रमानें उत्पन्न केलेलें बंधन.

**मायावी** (प्रा. वि.) मायेचा, खोटा, कपटी, ढोंगी.
**मायाळु** (वि.) ममताळु, दयाळु; (पु.) जादूगार. [ प्रपंच.
**मायिक** (सं. वि.) मायेनें रचिलेला, लटका
**मायेक** (प्रा. वि.) मायावी, खोटें (तुका० २०४७).
**मार** (पु.) चोप, ताडण; भडिमार; गर्दी; माग; मदन; विपुलता; (अ.) आवेशानें.
**मारक** (सं. वि.) मारणारा, प्रतिस्पर्धी.
**मारकट, मारका** (वि.) मारण्याची खोड असलेला.
**मारकूट** (स्त्री.) ताडन, मार.
**मारखाऊ** (वि.) नेहमी मार खाणारा.
**मारग** (सं. मार्ग पु.) मार्ग, वाट; **मा०मळणें** (पु.)-मंगलकार्यानंतर गांवाबाहेर जाऊन कुलदेवतेला अर्पण करावयाचा नैवेद्य.
**मारगिरी** (फा. स्त्री.) जोराचा मारा करण्याचें कौशल्य.
**मारझोड** (स्त्री.) ताडण, चोप.
**मारण** (सं. न. ) वध, हिंसा; शत्रूच्या नाशार्थ योजिलेला मंत्र, जादू इत्यादि.
**मारणी** (स्त्री.) वेग; आघात, मारा, हल्ला.
**मारणें** (क्रि.) चोपणें, प्रहार करणें; जीव घेणें; हिसकावून घेणें इत्यादि.
**मारता** (वि.) मारणारा.
**मारपीट** (स्त्री.) मारहाण, मार.
**मारफत** (अर. मारफत अ.) निसबत, कडून; मध्यस्थीनें.
**मारवाडी** (सं. मरु पु.) मारवाड देशांतील लोक; कृपण; व्यवहारदक्ष.
**मारवेल-ळ** (पु. स्त्री.) समुद्रकांठीं उगवणारी वनस्पति.
**मारहाण** (स्त्री.) मार, जखम इत्यादि.
**मारा** (पु.) हल्ला, भडिमार; हल्ला करण्यास सोयीची जागा; सपाट.
**माराकुटी** मारकूट, मारपीट.
**माराणु** (प्रा. पु.) विष्णु, कृष्ण, राम.
**मारामार** (स्त्री.) मारामारी; अतिशय प्रयत्न; गर्दी; पंचाईत, अडचण.
**मारामारी** (स्त्री.) एकमेकांस मारणें.
**मारुत** (सं. पु.) वायु.
**मारुति** (सं. पु.) वायुपुत्र हनुमान्.
**मारू** (वि.) छानदार, मोहक, नखरेबाज.
**मारून** (अ.) विपुलता, आवेश, गर्दी इत्यादि अर्थाचें अव्यय.
**मारून मुटकून** जबरदस्तीनें, जुलमानें.
**मारू मिति** (स्त्री.) एका महिन्याच्या पौर्णिमेपासून पुढच्या महिन्याच्या पौर्णिमेपर्यंत महिना समजण्याची उत्तर हिंदुस्थानांतली रीति, व या पद्धतीनें केलेले मारवाड्याचे हिशेब. [ आवेशानें.
**मारे** (अ.) वाक्यालंकारार्थी अव्यय;
**मारेकरी** (पु.) दग्यानें ठार मारणारा.
**मार्क** (सं. पु.) गुण; खूण.
**मार्कंडेय** (सं. पु.) एक ऋषि. **मा०** चें आयुष्य—दीर्घायुष्य.
**मार्केट** (इं. न.) बाजार.
**मार्ग** (सं. पु.) रस्ता; वाट; रीत.
**मार्गक्रमण** (सं. न.) वाट चालणें.
**मार्गघ्न** (सं. पु.) वाटमाऱ्या.
**मार्गण** (सं. पु.) बाण.
**मार्गत्रय** (सं. न.) ज्ञान, कर्म आणि भक्ति हे मोक्षप्राप्तीचे तीन मार्ग.
**मार्गप्रतीक्षा** (सं. स्त्री.) वाट पाहणें.
**मार्गशीर्ष** (सं. पु.) हिंदु वर्षाचा आठवा महिना.
**मार्गस्थ** (सं. पु.) वाटसरू, प्रवासी.
**मार्च** (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा तिसरा महिना; सैन्याचें कूच; संचलन.
**मार्जन** (सं. न.) सिंचन, शिंपडणें.
**मार्जनी** (सं. स्त्री.) केरसुणी.
**मार्जार** (सं. पु. न.) मांजर.
**मार्तंड** (सं. पु.) सूर्य; खंडोबा.
**मार्दव** (सं. न.) मृदुता, कोमलता, सौम्यपणा.
**मार्फत** (अर. स्त्री.) निसबत; द्वारें.
**मार्मिक** (सं. वि.) मर्मज्ञ; खुबीदार.
**माल** (अर. पु.) किमतीची वस्तु; जिन्नस; परिणाम; शेवट.
**मालक** (अर. पु.) धनी.
**मालकंस** (सं. पु.) गायनांतला एक राग.
**मालकी** (स्त्री.) धनीपणा.
**मालगुजार** (पु.) जमीनदार; सरकारचा सारा वसूल करून देणारा.

**मालचाटचा** (पु.) शाळेंतला उपगुरु.
**मालजादी** (हिं. स्त्री.) रांड, वेश्या.
**मालण–न** (सं. मालिनी स्त्री.) अतिशय सुंदर स्त्री.
**मालती** (सं. स्त्री.) एक वेल; तिचें पुष्प; गव्हल्यासारखा खिरींतघालण्याचा;एक पदार्थ; एक वृत्त–याच्या चरणांत १२ अक्षरें व न, ज, ज, र हे गण असतात.
**मालपुवा** (प्रा. पु.) एक पक्वान्न.
**मालमत्ता** (अर. मालमता स्त्री.) सर्व धनदौलत.
**मालमसाला** (पु.) इमारती वगैरे कामासाठीं लागणारें सगळें सामान.
**मालमिळकत** (अर. स्त्री.) सर्व स्थावर-जंगम जिंदगी.
**मालमुद्दल** (पु.) जितका पैसा खर्च झाला असेल तितक्या किंमतीची वस्तु; (अ.) नफा न घेतां मूळ किंमतीस.
**मालव** (सं. पु.) माळवा प्रांत; एका रागाचें नांव.
**मालवणें** (क्रि.) विझणें, जाणें (दिवा).
**मालविणें** (क्रि.) फुंकणें, विझविणें.
**माला** (सं. स्त्री.) हार, माळ; रांग.
**माला** (स्त्री.) पांढरी चिकण माती.
**मालातिणें** (प्रा. क्रि.) अंगीकारणें.
**मालाथणें** (प्रा. क्रि.) निस्तेज होणें.
**मालादंड** (सं. पु.) पुष्पहार (ज्ञा. ११।२२०).
**मालिनी** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव, या वृत्तांत १५ अक्षरें व न, न, म, य, य, असे गण असतात; स्त्रीजातींपैकीं एक प्रकार.
**मालिनीवसंत** (सं. पु.) एक औषधी मात्रा.
**मालिन्य** (सं. न.) मलिनपणा; घामटपणा.
**मालिस्त** (न.) कुटणें, ठेचणें; (स्त्री.) लागवडीस आणिलेली जमीन.
**माली** (पु.) न्हावी; (वि.) वसुलासंबंधीं.
**मालीक** (अर. पु.) मालक, धनी.
**मालीम** (अर. पु.) गलबतावरचा एक अधिकारी. [ माल-मिळकत.
**मालीयेत, मालियत** (स्त्री.) जिंदगी;
**मालिश–स** (फा. स्त्री.) अंग रगडणें, चोळणें.
**मालुमाती** (वि.) बनावट (दस्त ऐवज).
**मालू** (स्त्री.) पांढरी चिकणमाती.
**मालूम** (अर. वि.) ज्ञान; ठाऊक.
**मालूमत, मालूमात** (अर. स्त्री.) कच्ची हकीकत.
**मालें** (प्रा. न.) राब; काकवी; गुळाची ढेप; लोणी, खवा इ. चा गोळा; एक प्रकारचा मऊ दगड.
**माले** (न.) गळयांत नांगर बांधून भिक्षा मागणें; भिक्षा (ज्ञा० १४।३१).
**मालेकरी** (पु.) माले मागणारा.
**मालोवाली** (प्रा. अ.) चोहींकडून.
**माल्य** (सं. न.) फूल, हार.
**माल्हात** (प्रा. पु.) अंगीकार.
**माल्हातणें** (प्रा. क्रि.) स्वाधीन होणें; आश्रय करणें (ज्ञा० १३।२५३)
**माव** (सं. माया स्त्री.) कपट; जादू; खोटेपणा, भ्रम; वण.
**मावजत** (फा. स्त्री.) मावजत पहा.
**मावडी** (सं. स्त्री.) लाकडाचा पळा.
**मावणें** (सं. मा क्रि.) समावेश होणें.
**मांवदें, मावधें** (न.) यात्रा करून घरीं आल्यावर करावयाचें देवब्राह्मणाचें संतर्पण. [ प्रेमळ, धर्मशील स्त्री.
**मावली** (सं. मा स्त्री.) आई; गरीब,
**मावशी** (स्त्री.) आईची बहीण.
**मावसबहीण** (स्त्री.) मावशीची मुलगी.
**मावसभाऊ** (पु.) मावशीचा मुलगा.
**मावसा** (पु.) मावशीचा नवरा.
**मांवसाळें** (न.) मिरवणूक.
**मावळ** (न.) महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील हद्दीचा व सह्याद्रि पर्वताच्या पूर्वेकडचा प्रदेश. [ कडचा वारा.
**मावळण** (स्त्री.) आत; मामी; पश्चिमे-
**मावळणें** (क्रि.) अस्तास जाणें; अदृश्य होणें; मालवणें.
**मावळत, मावळती** (स्त्री.) सूर्य मावळण्याची अर्थात् पश्चिम दिशा.
**मावळा** (पु.) मावळ प्रदेशांतला; मामा.
**मावा** (हिं. पु.) खवा.
**मावा** (सं. माया पु.) चित्ताकर्षकता, मोहिनी (भा० ३।२९).

**माविक** (सं. मायिक वि.) मायावी, भ्रामक.
**माशी** (सं. मक्षिका स्त्री.) मक्षिका; नेम धरण्यास उपयोगी असें बंदुकीच्या तोंडावरचें चिन्ह. **माशा मारीत बसणें**—निरुद्योगी बसणें; **माशी शिंकणें**—विघ्न येणें; **माशी लागणें**—मळमळणें.
**माशुकडा** (वि.) सुंदर. [रंडी, रखेली.
**माशूक** (अर. स्त्री.) प्यारी, रमणी,
**माष** (सं. पु.) उडीद; पांच, आठ किंवा दहा रती वजन.
**मास** (सं. पु.) महिना. [एक; मासकण.
**मांस** (सं. न.) शरिरांतल्या सप्तधातूंपैकीं
**मासकंड, मांसकण** (न.) मांसाचा गोळा.
**मासनहाण** (न.) लग्न होऊन ज्या दिवशीं एक महिना पुरा होतो त्या दिवशीं नवरानवरीस एकत्र स्नान घालतात तें.
**मासपक्ष** (सं. पु.) महिना पंधरा दिवस.
**मासमच्छर** (न.) मांस वगैरे.
**मांसल** (सं. वि.) मांसानें पूर्ण; पुष्ट.
**मासला** (अर. पु.) नमुना, तऱ्हा.
**मासलेदार, मासलेवाईक** (वि.) नमुन्यास घेण्यासारखा; छान; विचित्र.
**मासळी** (स्त्री.) लहान मासा; (समुच्चयानें) मासे.
**मासा** (सं. मत्स्य पु.) मत्स्य; आठ गुंजांचें वजन. **जळांत राहून माशांशीं वैर**—परिस्थितीशीं विरुद्ध वर्तन; **मा॰चें जाळें**—झिरझिरीत वस्त्र; **माशानें गिळलेलें माणिक**—पुनः परत न मिळणारी वस्तु.
**मासिक** (वि.) दर महिन्याचें; (न.) प्रतिमासीं निघणारें पुस्तक; दरमहा वेतन; दर महिन्याचें श्राद्ध.
**मासेवळण** (न.) त्रेधा, गाळण, गडबड.
**मासोळी** (स्त्री.) मासळी; स्त्रियांचें माशाच्या आकाराचें पादभूषण.
**मास्तर** (इं. पु.) शिक्षक.
**माह** (पु.) महिना, मास.
**माहात्म्य** (सं. न.) महिमा; मोठेपणा.
**माहितगार** (फा. वि.) माहिती असलेला; वाकबगार.
**माहिती** (स्त्री.) परिचय; ज्ञान.
**माहिना** (हिं. पु.) दरमहाची नेमणूक.
**माहियेरें** (प्रा. वि.) मायेचें, माहेरचें (तुका॰ ६१४).
**माही** (वि.) माघ महिन्यांतली.
**माही** (प्रा. स्त्री.) छत्र; (पु.) मत्स्य वगैरे सन्मानदर्शक चिन्ह, मकरध्वज; उंच छत्री.
**माहीत** (वि.) ज्ञात, ठाऊक.
**माहीदार** (वि.) माही धरणारा, छत्रधर.
**माहीमरातब** (फा.पु.) मोंगल बादशहाकडून महादजी शिंद्यांनीं पेशव्यांसाठीं आणिलेलीं सन्मानचिन्हें.
**माहुटी** (स्त्री.), **माहुटीचें पान** (न.) छपराच्या वाशांचीं खालचीं टोकें ज्यांत बसविलीं असतात ती आडवी लाकडाची पट्टी.
**माहुरी** (प्रा. पु.) चाबुकस्वार.
**माहुटी** (स्त्री.) घराच्या पागोळीच्या खालीं वाशाला मारलेली आडवी फळी.
**माहुरें** (न.) विक्रीसाठीं मांडलेले मासे.
**माहुत** (हिं. महावत पु.) हत्तीचा रक्षक.
**माहे** ( फा. माह पु.) महिना.
**माहे गुदस्त** (फा. माह गुदस्त पु.) गेला महिना.
**माहेर, माहेरघर** (सं. मातृगृह न.) मुलीच्या बापाचें घर; आश्रयस्थान.
**माहेरवाट** (स्त्री.) स्त्रियांच्या केसांचा उजवीकडे काढलेला भांग (डावीकडच्या भांगाला सासूरवाट म्हणतात).
**माहेरवाशीण** (स्त्री.) माहेरीं आलेली स्त्री.
**माहेरवास** (पु.) विवाहित स्त्रीचें माहेरीं राहणें.
**माहेवणी** (प्रा. स्त्री.) गरोदर स्त्री (ज्ञा॰ १८।८६६); कुलीन स्त्री (ज्ञा॰ १६।१४४).
**माहेवारी** (स्त्री.) महिन्याची नेमणूक.
**माहो** (पु.) माघ मास.
**माळ** (प्रा. वि.) ओसाड.
**माळ** (सं. माला स्त्री.) हार; पाळण्यांची रांग; रांग; नवरात्रांतला दिवस. **माळ घालणें**—वरणें; पसंत करणें.

**माळ** (पु.) खडकाळ किंवा मुरुमाची जमीन; माळा; माडी.
**माळका** (सं. मालिका स्त्री.) ओळ, रांग.
**माळजमीन** (स्त्री.), **माळरान** (न.) टेकडीच्या उंचवटयाची खडकाळ जागा.
**माळया** (प्रा. स्त्री.) रात्र, काकवी.
**माळवद** (वि.) पुष्कळ माळजमीन असलेला प्रदेश.
**माळवद** (न.) धावें, माळा. [प्रांतांतला.
**माळवी** (सं. मालवीय वि.) माळवा
**माळवें** (न.) मळयांत उत्पन्न होणारे पदार्थ.
**माळसात** (स्त्री.) भाजीपाल्याचा बाजार.
**माळा** (पु.) घराच्या तुळईवर आडव्या काठ्या घालून छपराखालीं काढलेली ठेंगणी माडी; शेत राखण्यासाठीं केलेला माळा. **मा० वरचा धोंडा**— न बदलणारा करार.
**माळिया** (प्रा. वि.) आडव्या.
**माळी** (सं. माली पु.) बगीचा, माळा वगैरेंचें काम करणारा.
**माळी** (प्रा. स्त्री.) झाडाची आडवी फांदी; डोंगर पठार; खाण.
**माळीण** (स्त्री.) माळयाची बायको; नाकांत होणारी पुटकुळी.
**माळू** (पु.) मृदंगाच्या तोंडाभोंवतालचें कातड्याचें कडें किंवा वादी.
**माळोंचा** (पु.) माळा.
**माळोद** (न.) माळवदें पहा.
**माळोमाळ** (वि.) रानोमाळ.
**माळोवाळीं** (प्रा. अ.) बहुत करून; एकावर एक माळ लागल्यावर (ज्ञा० १५।१९८).
**माळया** (प्रा. स्त्री.) रात्र; काकवी.
**माक्षिक** (सं. न.) एक खनिज पदार्थ; मध.
**मिआ–आं** (सं. न.) मी; म्यां.
**मिचकट** (वि.) घाणेरडें.
**मिचकणें, मिचकावणें** (क्रि.) त्वरेनें डोळे मिटणें व उघडणें.
**मिचका** (वि.) मिचमिच डोळयांचा.
**मिचमिच** (स्त्री.) मिटका; डोळयांची उघडझांक; जाभाडयाची त्वरित उघडझांक.
**मिजागरें** (न.) बिजागरी.
**मिजाण** (फा. स्त्री.) तब्येत; प्रकृति, चोखंदळपणा, लहर.
**मिजासखोर, मिजासी** (फा. वि.) नाजुक प्रकृतीचा, तब्येती, लहरी.
**मिटका** (पु.) चिकटणें; मिठी.
**मिटकी** (स्त्री.) एकमेकांस चिकटलेले ओठ उघडतांना होणारा आवाज. **मिटक्या मारणें**—प्रेमानें गोडी चाखणें; आशा धरून बसणें.
**मिटणें** (क्रि.) बंद होणें, जुळविणें.
**मिट्टी** (सं. स्त्री.) डाव्या किंवा उजव्या मुठीवरून विटी वर उडवून दांडूनें तिला टोला मारण्याची क्रिया; (हिं. स्त्री.) माती.
**मिठण** (न.) गर्दी.
**मिठवणी** (स्त्री.) मिठाचें पाणी.
**मिठा** (सं. मिष्ट वि.) गोड. [पदार्थ.
**मिठाई**(हिं. स्त्री.)पेढे, बर्फी, इत्यादि मिष्ट
**मिठागर** (मीठ + आकर न.) मीठ पिकण्याची जागा. [विणारा.
**मिठा ठक** (पु.) गोडगोड बोलून फस-
**मिठाण** (न.) गर्दी.
**मिठाणा** (पु.) खारी डाळ; [(प्रा.) ऐक्य.
**मिठी** (स्त्री.) शिसारी, वीट; दृढालिंगन;
**मिठी** (प्रा. स्त्री.) आवड, छंद (भा० २१।९३१); ऐक्य, लीनता (ज्ञा० १५।५१४); आलिंगन; गोड पदार्थ वारंवार खाण्यांत आल्यानें उत्पन्न होणारी अरुचि; संकोच; उत्कट इच्छा; मिठी. **मिठी देणें**—बंद होणें (ज्ञा० १८।७३५).
**मिठाक्षर** (न.) गोड शब्द (प्रभा० लावण्या पृ० ८६).
**मिडकणें** (तेलगु क्रि.) धावणें; आशाळवाणें होणें (दा० ३।५।७).
**मिडकलें** (प्रा. वि.) क्षुधाक्रान्त.
**मिडगण, मिडोगण** (प्रा. स्त्री.) स्तुति (ज्ञा० १३।३२०).
**मिडगणें** (प्रा. न.) फराळ.
**मिणधा** (प्रा. वि.) मिंधा, ओशाळा.
**मिणमिण** (अ.) मंदपणें.

**मिणमिणा** (वि.) मंद,सुस्त; मनांत कुढणारा.
**मिणमिणीत** (वि.) मंदपणें जळणारा.
**मित** (सं. वि.) मोजका.
**मित भाषण** (सं. न.) स्वल्प किंवा मोजक्या शब्दांत बोलणें.
**मितभाषी** (वि.) मोजके शब्द बोलणारा.
**मितला** (प्रा. वि.) परिमित. [ कसर.
**मितव्यय** (सं. पु.) मोजका खर्च, काट-
**मितव्ययी** (सं. वि.) काटकसरीनें खर्च करणारा.
**मिताक्षरी** (सं. स्त्री.) एक सांकेतिक भाषा (हींत अ, ख, घ, च, त, य, र, ल, ह, ळ या वर्णांबद्दल अनुक्रमें क, ग, ङ, ट, प, श, ष, स, व, क्ष. हे वर्ण येतात व असाच उलटहि प्रकार घडतो). [ व्याज, तिथि; (अ.) हळू.
**मिति** (सं. स्त्री.) गणना; माप, प्रमाण,
**मित्र** (सं. न.) स्नेही; (पु.) सूर्य.
**मित्रपत्र** (सं. न.) अबदागीर (राम० वि० २६।५५).
**मित्रवार, मित्रवासर** (सं. पु.) रविवार.
**मिथणें** (क्रि.) एकमत करणें; जुळणें.
**मिथुन** (सं. न.) जोडपें; एकी; तिसरी रास.
**मिथ्या** (अ.) खोटें. [ येणारें दूषण.
**मिथ्याचार** (सं. पु.) वृत्ति आणि शारीरिक क्रिया यांत मेळ नसणें.
**मिथ्यापवाद** (सं. पु.) निष्कारण देण्यांत
**मिथ्यारोप** (सं. पु.) खोटा आळ.
**मिंधा, मिनधा** (वि.) ओशाळा, दबेल; पूर्वीच्या बाळंतपणानंतर विटाळशी न होतां पुन: गर्भार झालेल्या स्त्रीची संतति. [ प्राप्त होणें.
**मिनणें** (प्रा. क्रि.) एकत्र होणें; भेटणें;
**मिनत, मिनतवारी, मिनती** (फा. स्त्री.) आर्जव.
**मिनमेख** (अ.) बिनशर्त.
**मिनह्** (अर. मिनह अ.) मागें सांगितलेल्या महिन्याच्या; वर सांगितलेल्या. [ वजा.
**मिना** (का. पु.) काचेचा मुलामा; (अ)
**मिनिट** (इं. न.) तासाचा साठावा भाग; टिपण. [ करणें.
**मिनेगारी** (फा. मिनाकारी स्त्री.) मिना
**मिया** (हिं. पु.) मुसलमान गृहस्थ.
**मियादी** (फा. वि.) मुदतीची; कांहीं शर्तीवर दिलेली.
**मिरकूट** (न.) मिऱ्यांची पूड.
**मिरगी** (हिं. स्त्री.) फेंफरें; घेरी.
**मिरगुड, मिरगुडें** (प्रा. न.) चटणी; मिरपूड.
**मिरची** (सं. मरिच स्त्री.) तिखट जिचें करतात ती शेंग. **मिरच्या लागणें**—झोंबणें; चडफडाट होणें.
**मिरधा** (हिं. पु.) भालेकऱ्यांचा नाईक; जासुदांचा नाईक.
**मिरपूड** (स्त्री.) मिऱ्यांची पूड. **अन्नसत्रीं जेवणें मि० मागणें**—दुसऱ्याच्या औदार्यावर राहून चोचले करणें.
**मिरमुटणें** (स्त्री.) खुरटणें, वाढ खुंटणें; खुंटणें; भग्नोत्साह होणें; रुसणें.
**मिरपुटला** (पु.) लहान पण खोड्या करणारा मुलगा.
**मिरवण, मिरवणी, मिरवणूक** (स्त्री.) थाटानें मिरवत जाणें.
**मिरवणें** (क्रि.) डौलानें फिरणें; (प्रा.) शोभणें; बोलणें; क्रीडा करणें. [ फिरणें.
**मिरवा मिरवणें** डौलानें दिमाख दाखवीत
**मिरविणें** (क्रि.) थाटानें मिरवीत नेणें.
**मिराशी** (अर. पु.) वतनदार.
**मिरास, मिरासी** (अर. स्त्री.) वतनदार.
**मिरी** (स्त्री.) निरी, चुणी.
**मिरें** (न.) एक लहान तिखट पदार्थ.
**मिलांड** (प्रा. न.) वीड. [ मिश्रण.
**मिलाफ** (फा. पु. स्त्री.) भेट; ऐक्य;
**मिलिंद** (सं. पु.) काळा भ्रमर.
**मिलिंदायमान** (सं. वि.) आसक्त; लीन.
**मिशनरी** (इं. पु.) प्रचारक; ख्रिस्ती धर्मप्रचारक.
**मिशाळ** (वि.) मोठ्या मिशांचा.
**मिशी** (स्त्री.) वरच्या ओठावरचे केस; दंतमंजन; वेश्यापणाचा प्रथमचा समारंभ. **मिशा खालीं होणें**—फजिती होणें, नक्षा उतरणें; **मिशा उतरणें**—फजिती करणें; **मिशांवर ताव देणें**—ऐट किंवा तोरा करणें.
**मिश्र** (सं. मिश्रित वि.) मिसळलेले.

**मिश्रण** (सं. न.) मिसळ; मिश्र झालेला पदार्थ.
**मिश्री** (हिं. मिस्त्री स्त्री.) खडीसाखर; काळें दंतमंजन. **सफेत मिश्री** (स्त्री.)– एक औषधी मूळ. **सालंमिश्री** (स्त्री.)– औषधी वनस्पति.
**मिष** (सं. न.) ढोंग; निमित्त.
**मिष्ट** (सं. वि.) गोड.
**मिष्टभाषणी** (सं. वि.) गोडबोल्या.
**मिष्टान्न** (सं. न.) गोडधोड; पक्वान्न.
**मिस, मिष** (सं. मिष न.) ढोंग; निमित्त, सबब.
**मिसक, मिसकटें** (प्रा. न.) निमित्त (ज्ञा० १५।४०३); रूप, आकार (ज्ञा० १७।८; १५।४८४).
**मिसकरा** (वि.) ढोंगी.
**मिसकीन, मिसकील** (अर. वि.) वाहेरून दिसण्यांत गरीब पण पोटांतून लवाड.
**मिसखोर** (वि.) ढोंगी, तोतया.
**मिसमिशीत** (वि.) नरम, विसविशीत.
**मिसर** (पु.) ईजिप्त देश.
**मिसरूड** (न.) नुकत्या फुटलेल्या मिशा.
**मिसल** (अर. स्त्री.) समाजांतली योग्य जागा; तजवीज; प्रकरण.
**मिसलदारी** (स्त्री.) योग्यतेनुरूप व्यवस्था,
**मिसळ** (सं. मिश्रण स्त्री.) भेळ, मिश्रण; सख्य.
**मिसळणें** (क्रि.) मिश्रण होणें, एकत्र होणें.
**मिसाल** (स्त्री.) हुकुमनामा; आज्ञापत्र.
**मिस्त** (न.) मिसरूड पहा.
**मिस्सी** (सं. मषी स्त्री.) दंतमंजन.
**मिळकत, मिळखत** (स्त्री.) द्रव्य, प्राप्ति.
**मिळणी** (सं. मेलन स्त्री.) संसर्ग, संबंध; भेट. [ जुळणें; एकचित्त होणें.
**मिळणें** (क्रि.) प्राप्त होणें; एकत्र होणें;
**मिळता** (वि.) जुळता; मिळणारा.
**मिळताव** (पु.) प्राप्ति, मिळकत.
**मिळमिळीत** (वि.) बेचव.
**मिळवणी** (स्त्री.) दुसऱ्यांत मिळविलेला पदार्थ; अंकगणितांत दोन किंवा अधिक सजातीय संख्या एकत्र करण्याची कृति.
**मिळवणें** (क्रि.) एकांत दुसरें घालणें.
**मिळविणें** (क्रि.) प्राप्त करून घेणें; संपादणें.
**मिळाऊ** (वि.) मिळविणारा, कमाई करणारा.
**मिळून** (अ.) एकंदरींत; एकत्र.
**मी** (सर्व.) बोलणारा स्वतः. **मी म्हणणें**— जोरांत असणें; **मी मी म्हणणारा**— स्वतःच्या कर्तृत्वाविषयीं अभिमान बाळगणारा.
**मीट** (स्त्री.) मिटलेली स्थिति.
**मीटर** (इं. पु.) मापनयंत्र.
**मीठ** (सं. मिष्ट न.) लवण; क्षार.
**मीठभाकर** गरिबीचें जेवण.
**मीठ-मोहऱ्या** (स्त्री. अने.) दृष्ट काढण्याचें साहित्य. **मी० ओवाळणें**–दृष्ट काढणें.
**मीठागर** (न.) मीठ तयार करण्याची जागा.
**मीन** (सं. पु.) मत्स्य; बारावी रास.
**मीनकेतन** (सं. पु.) मदन.
**मीनणें** (क्रि.) एकत्र होणें.
**मीना** (फा. पु.) निळा रंग; नीलमणी; स्वर्ग. **मीनाबाजार**(पु.)–वस्तूंचें प्रदर्शन.
**मीनाक्षी** (सं. स्त्री.) मत्स्याप्रमाणें चमकदार डोळे असलेली स्त्री; दक्षिण हिंदुस्थानांतील प्रसिद्ध देवता.
**मीपणा** (पु.) अहंता, गर्व.
**मीमांसा** (सं. स्त्री.) षड्दर्शनांपैकीं एक; खोल विचार; चिकित्सा.
**मीर** (फा. पु.) अमीर, सरदार. [ ग्रहण.
**मीलन** (सं. न.) भेट; मिश्रण; खग्रास
**मीस** (सं. मिष न.) निमित्त; ढोंग.
**मीळ** (स्त्री. ) लाभ, प्राप्ति, मिळकत.
**मीळजोड** (स्त्री.) तडजोड.
**मुकटा** (पु.) नेसावयाचें हलकें रेशमी वस्त्र.
**मुकणा** (पु. ) भिजत घातल्यानें मऊ न होणारा धान्याचा दाणा. **मु० हत्ती**— बिनसुळयाचा हत्ती.
**मुकणें** (क्रि.) अंतरणें; हानि पावणें.
**मुकदमा** (अर. पु.) खटला; काम; प्रकरण.
**मुकद्दम** (अर. मुकदम पु.) मजुरांवर देखरेख करणारा; मुकादम.
**मुकद्दमा** (अर. मुकदमा पु.) खटला; काम.
**मुकद्दर** (अर. वि.) नियुक्त; नियोजित.
**मुकरर** (अर. वि.) निश्चित; नेमलेला.

**मुकशी** (स्त्री.) अग्र, टोक.
**मुकळित** (प्रा. वि.) स्पष्ट, संक्षिप्त.
**मुका** (सं. मूक वि.) बोलतां न येणारा; (पु.) चुंबन.
**मुका नारळ** कोंवळा असल्यानें न वाजणारा नारळ; **मुकें गळू**—तोंड न पडलेलें गळूं; **मुकें फूल** —पुरतें न उमललेलें फूल; **मुकें यंत्र**—आवाज न करणारें यंत्र; **मुका गोंवर**—ज्यांत पुरळ येत नाहीं असा गोंवर; **मुका मुलगा होणें**—स्त्री ऋतुमती होणें.
**मुकाटयानें** (अ.) गपचिप. [टणक दाणा.
**मुकाणा** (पु.) भिजविल्यानें न फुगणारा
**मुकादम** मुकद्दम पहा.
**मुकावला** (अर. पु.) गांठ, लढाई; पडताळा; मासला.
**मुकाम, मुक्काम** (फा. पु.) अवस्थान; थोडा वेळ राहणें; कांहीं काळ कुंठितावस्था.
**मुकसाई** (पु.) मोकाशी.
**मुकुट** (सं. पु.) किरीट, टोप.
**मुकुटमणि** (सं. पु.) अग्रगण्य; नायक.
**मुकुटाभरण** (सं. पु.) राज्याभिषेक.
**मुकुर** (सं. पु.) आरसा; दर्पण.
**मुकुल** (सं. पु.) कळी; (प्रा.न.) कमळ पुष्प.
**मुकुलित** (सं. वि.) मिटलेलें; संक्षिप्त (ज्ञा० २।५३०)
**मुकुळणें** (प्रा.वि.) बंद ठेवणें.
**मुकेस** (फा. मुकेस पु.) सोन्याचांदीची बारीक तार.
**मुक्त** (सं. वि.) सुटलेला; मोकळा; (सं. मुक्ता न.) मोतीं.
**मुक्तक्रिया** (स्त्री.) वेदाधाररहित क्रिया.
**मुक्तकैवल्य** (सं. न.) ज्ञानाची ऐक्यस्थिति (ज्ञा० १६।१३).
**मुक्तद्वार** (सं. न.) कोणासहि जेथें जाण्यास प्रतिबंध नाहीं असा भोजनसमारंभ ; हवें त्यानें जावें असें ठिकाण.
**मुक्तमुठी** (प्रा. स्त्री.) सर्वत्र चालणारें नाणें (ज्ञा० १८।२७).
**मुक्तलग** (प्रा. वि.) मोत्यें लाविलेलें.
**मुक्तसर** जे आज हक्कदार किंवा गांवकामगार नाहींत असे अत्यंत जुने वतनदार.
**मुक्ता** (सं. स्त्री.) मोतीं; (अ.) तोंडीं; (वि.) पुष्कळ.
**मुक्ताफळ** (सं. न.) मोतीं; सुंदर अक्षर; हास्यास्पद उद्गार.
**मुक्ताभरण** (न.) एक विधि; संस्कार.
**मुक्ति** (सं. स्त्री.) मोक्ष.
**मुक्ति फौज** (स्त्री.) एक सेवापरायण अंतरराष्ट्रीय स्वयंसेवक संघटना. (साल्व्हेशन आर्मी).
**मुक्तिसेना** (स्त्री.) देशाला पारतंत्र्यांतून किंवा हुकूमशाहीतून मुक्त करणारी फौज.
**मुख** (सं.वि.) तोंड; चेहरा; द्वार; अग्रभाग.
**मुखक** (प्रा.पु.) उंदीर (स्वा०दि० २।४।४९).
**मुखचर्या** (सं. स्त्री.) तोंडावरचें तेज.
**मुखंड** (पु.) म्होरक्या, पुढारी; नायक.
**मुखडा** (पु.) चेहरा. [अधिकार दिलेला.
**मुखत्यार** (अर. पु.) प्रतिनिधि, संपूर्ण
**मुखदुर्बळ** (सं. वि.) बोलण्याचा कंटाळा असलेला, मितभाषी.
**मुखपत्र** (न.) एखाद्या संस्थेचें किंवा पक्षाचें प्रमुख प्रचार–पत्र. [घाबरविणें.
**मुखभंजन** (सं.न.) नक्षी उतरणें; लाजविणें.
**मुखमार्जन** (सं. न.) तोंड धुणें.
**मुखर** (सं. वि.) तोंडाळ, फटकळ, बडबडया. **मुखर वाचन**-मोठयानें वाचन.
**मुखरण, मुखरीय** (वि.) मुख्य.
**मुखरस** (सं. पु.) लाळ; थुंकी. **मु० पाघळणें**—दुर्भाषण करणें. [कीर्ति.
**मुखराग** (सं. पु.) तोंडावरचा तजेला किंवा
**मुखरोण** (वि.) मुख्य.
**मुखवटा** (पु.) तोंडवळा; मुखाची प्रतिमा.
**मुखवटी** (प्रा. स्त्री.) तोंडांत मावण्याइतकें प्रमाण (नाम० ५१६).
**मुखवस्त्र** (सं. न.) पूजा, नैवेद्य वगैरे झाल्यावर देव वामकुक्षि करतात तेव्हां त्यांच्या मूर्तीच्या तोंडावर घालतात तें वस्त्र.
**मुखशुद्धि** (सं. स्त्री.) जेवण झाल्यानंतर तोंड साफ करण्यासाठीं खाण्याचा जिन्नस (सुपारी).
**मुखश्री** (सं. स्त्री.) मुखचर्या.

**मुखस्तंभ** (सं. मूकस्तंभ वि.) घुम्या, न बोलणारा.
**मुखळ** (न.) मुसळ.
**मुखा** (पु.) हातोड्याचें पसरट तोंड.
**मुखी** (स्त्री.) छिद्र, भोक.
**मुखोटा** मुखवटा पहा.
**मुखोद्गत** (सं. वि.) तोंडपाठ.
**मुख्य** (सं. वि.) प्रमुख.
**मुग** (सं. मूक न.) मूग. **मुग आरोगणें**—मूग गिळणें(मौन धरणें)(ज्ञा० १४।११).
**मुगटा, मुगुटा** मुकटा, मुकुटा पहा.
**मुगदमी** (स्त्री.) हलकी साखर.
**मुगदळ** (न.) मुगाच्या पिठाचे लाडू.
**मुगवा** (पु.) बायकांचें एक प्रकारचें वस्त्र; दुध्या भोपळा.
**मुंगळा** (पु.) डोंगळा; **मुं० लागणें**—उतावीळ होणें; चेव येणें.
**मुंगा** (पु.) घोड्याचे नाकाचा शेंडा (हरि० १४।६४); बैलगाडीच्या मागील बाजूस बांधलेली दोरीचा कठडा; इच्छा; गर्विष्ठपणाच्या चेष्टा.
**मुगाभोपळा** (पु.) दुध्या.
**मुगारा** (पु.) नुकता फुटलेला कोंब.
**मुंगारी** (का. स्त्री.) खरिपाचें पीक (हिंगारी हें रब्बीचें पीक.)
**मुंगी** (स्त्री.) एक लहान जीव; पिपीलिका.
**मुगीमुग** (स्त्री.) स्तब्धता.
**मुगुतें** (प्रा. न.) मुक्ति.
**मुंगूस** (न.) सर्पाला मारणारें भुरक्या रंगाचें लांब शेपटीचें एक केसाळ जनावर. [ मूर्ख.
**मुग्ध** (सं. वि.) संदिग्ध; अस्पष्ट; सुंदर;
**मुग्धा** (सं. स्त्री.) सोळा वर्षांच्या आंतली स्त्री. [ प्रकार.
**मुचोसी** (स्त्री.) लढाऊ गलबताचा एक
**मुचलका** (हिं. पु.) करारपत्र, जामीनकी.
**मुंज** (सं. पु.) एक प्रकारचें गवत; त्याचें कटिसूत्र; (स्त्री.) उपनयनसंस्कार.
**मुजमू** मजमू पहा.
**मुजरत—द** (फा. अ.) केवळ; फक्त; निश्चयपूर्वक; तावडतोब, मुद्दाम.
**मुजरा** (अर. पु.) वंदन; नेम; (फा. मजरा वि.) वजा, काढून टाकलेला.
**मुजाका, मुजाख** (अर. पु.) पर्वा, प्रतिष्ठा, किंमत.
**मुजाफत** (वि.) परस्थ; दुसऱ्या ठिकाणचा.
**मुजाफत खर्च** (फा. पु.) देणगी खर्च; परस्थलव्यय; विशेष खर्च.
**मुजारत** (अर. स्त्री.) शिष्टाचार; मागें राखून ठेविलेली गोष्ट.
**मुजावर** (अर. पु.) मशिदीची झाडलोट करणारा सेवेकरी.
**मुजाहीम** (अर. पु.) अडथळा.
**मुजुमदार** मजमू पहा.
**मुजोर** (का. वि.) हेकेखोर, वाचाळ.
**मुजोरी** (फा. स्त्री.) वडवड.
**मुंज्या, मुंजा** (पु.) मुंजीला योग्य झालेला; मुंज झालेला पण सोडमुंज न झालेला;सोडमुंज होण्याच्या पूर्वी मरून भूत झालेला.
**मुटकणें** (क्रि.) बुक्क्या मारणें.
**मुटकळणें** (क्रि.) मुटकळें करणें; चोपणें.
**मुटकळा** (पु.) मुठीत मावेल इतका पिठाचा गोळा.
**मुटका** (पु.) बुक्की.
**मुटकें** (न.) बुक्की; पेटका.
**मुटला** (पु.) साधारणतः सहा शेराची गुळाची ढेप.
**मुट्ट** (अ.) मुकाट्यानें.
**मुटा** (पु.) इस्लाम कायद्यांतील मुदतीचें लग्न.
**मुठळी** (स्त्री.) मुठींत धरून हलविणें; मूठ.
**मुठा** (पु.) पाणी भरण्याचें पखालीचें तोंड.
**मुठाण** (न.) संघ, टोळी; चांडाळचौकडी.
**मुठाळणें** (प्रा. क्रि.) हातीं धरणें.
**मुठाळा** (वि.) वाटोळा, टोक नसलेला.
**मुठाळी, मुठेळें** (वि.) केळयाची एक जात.
**मुंड** (तेलगु मुडु = तीन वि.) विटीदांडूच्या खेळांत विटीचें अंतर मोजतांना ३ च्या आंकड्याबद्दल योजिलेली संज्ञा.
**मुंड** (सं. न.) मुंडकें, मस्तक; (पु. न.) सारा, भाडें किंवा व्याज म्हणून दिलेलें धान्य किंवा पैका. **मुंड मुंडावणें**—एखाद्या कार्याला वाहून घेणें.

वाचनालय

**मुंडकें** (न.) शिर, डोकें. [मूठ.
**मुडका** (पु.) मूठभर धान्य; केरसुणीची
**मुडमुशी** (स्त्री.) अंगाचें गांठोडें; अंगाचा संकोच.
**मुंडण** (न.) मुंडणें; (क्रि.) हजामत करणें; गुरूपदेश देणें; ठकवून द्रव्य काढणें.
**मुडतर** (प्रा.न.) दैन्य, दुःख (तुका० १९६८).
**मुडताळणें** (प्रा. क्रि.) मुरडणें, मागें वळणें (तुका० २२८५); वाकणें.
**मुंडती** (स्त्री.) खरडपट्टी.
**मुडदा** (फा. मुर्दा पु.) प्रेत.
**मुडदार** (फा. मुरदार वि.) अपवित्र (मुसलमानी धर्मशास्त्रांत या शब्दाचा अर्थ आपोआप मेलेलें किंवा यथाशास्त्र न कापलेलें अतएव अपवित्र व खाण्यास अपात्र असा आहे.); मृतप्राय; हरामाचें; हलकें. **मुडदेफरास** (फा. मुरदाफराश पु.)–मुर्दा वाहून नेणारा, प्रेतवाहक.
**मुडदूस** (पु.) लहान मुलांना होणारा एक रोग. [चौलसंस्कार.
**मुंडन** (सं. न.) हजामत; हजामपट्टी;
**मुंडनपर्वणी** (स्त्री.) हजामत करविण्यास योग्य दिवस; सुटीचा दिवस.
**मुंडप, मुडुप** (सं. पु. न.) मुकुट, शिरताज; पागोटें. [लागण्याइतकी गर्दी.
**मुंडपघसणी** (प्रा. स्त्री.) डोक्याशीं डोकें
**मुडपा** (पु.), **मुडपी** (स्त्री.) घडी.
**मुंडपी** (प्रा. पु.) जटाधारी.
**मुंडबंदी** (स्त्री.) कासबंदी पद्धति.
**मुंडमाळा** (सं. स्त्री.) मेलेल्या माणसांच्या डोक्यांच्या कवच्यांची माळ.
**मुंडवण** (स्त्री.) फसवणूक; मोहिनी; खरडपट्टी.
**मुंडमुंड** (पु.) हलकट लोक.
**मुंडा** (पु.) कणगा; तोंड फुटलेलें भांडें किंवा मडकें; (वि.) पेंढा भरलेला.
**मुंडा** (पु.) डेरा, रांजण; हिजड्याचा सोबती.
**मुंडावळ** (स्त्री.) वधूवरांच्या किंवा मुंजा-मुलाच्या डोक्याला ⌐¬ आकृतीची माळ बांधतात ती.

**मुंडविणें** (क्रि.) हजामत करणें, डोकें तासणें.
**मुंडासा** (पु.), **मुंडासें** (हिं. मुंडासा न.) पागोटें.
**मुडी** (गुज. स्त्री.) पुंजी, भांडवल.
**मुंडी** (सं. मुंड स्त्री.) डोकें; (पु.) संन्यासी. **चारी मुंड्या चीत होणें**–दोन खांदे व दोन कमरेचे खवाटे या चार मुंड्या जमिनीला लागणें; पूर्ण पराभव होणें.
**मुंडेरी** मुंढेरी पहा. [वळविलेला.
**मुंढारा** (वि.) शिंगें आंतल्या बाजूस
**मुंढरी** मुंढेरी पहा.
**मुंढा** (वि.) शिंगें आंत वळविलेला; मुळींच शिंगें नसलेला; शिखराचा भाग छाट-लेला; साधा; (पु.) खांद्याचा गोल. **मुंढा हात**–कोपरापासून वळविलेल्या हाताची मुठीच्या टोकापर्यंतची लांबी.
**मुढामाकोजी** (वि.) पोकळ अभिमानी; वढाईखोर.
**मुंढारणें** (क्रि.) परत फिरणें.
**मुंढी** (स्त्री.) डोकें; मुंडी. **मुंडी मुरगा-ळणें**–एखाद्याचा सर्वतोपरी नाश करणें; **मुंढी फिरवणें**–नापसंती दर्शवणें.
**मुंढेरी** (हिं. स्त्री.) पावसाचें पाणी भिंतींत मुरूं नये म्हणून पाणढाळ येण्यासाठीं उतरता केलेला भाग; वरवंडी, वरंडी.
**मुंढ्या** (पु.) मुसलमान हिजड्यांचा गुरु.
**मुतट** (वि.) मूत्राची दुर्गंधी असलेलें.
**मुतणें** (क्रि.) मूत्रविसर्जन करणें.
**मुतपाक, मुतबक, मुतबखखाना, मुतबख** (अर. मुतबख पु.) स्वैंपाकघर.
**मुतरा** (वि.) वारंवार मुतणारा.
**मुतरी** (स्त्री.) मुतण्याची जागा, मोरी.
**मुतवणी** (न.) मूत्र; कोंबट पाणी.
**मुत्सद्दी** (अर. मुत्सद्दी पु.) राजकारणी, धोरणी, कारस्थानी.
**मुत्सद्दीगिरी** (फा. स्त्री.) मुत्सद्दीपणा, राजकारणचातुर्य, धूर्तता.
**मुताट** (स्त्री.) पागेमध्यें घोड्याच्या मुताचें पाणी साठण्यासाठीं केलेला खड्डा.
**मुताबिक** (अर. अ.) अनुसरून, प्रमाणें.

**मुतारी** (स्त्री.) मुतण्याची जागा, मोरी.
**मुतालकी** (स्त्री.) मुतालिकाचें काम; किंवा पदवी. [दरकदारांपैकीं एक.
**मुतालीक** (अर. पु.) उपमंत्री, आठ
**मुती** (स्त्री.) रूढि; चाल; लववी.
**मुद्गल** (सं. मुद्गर पु.) पेलण्याची लाकडाची जोडी.
**मुदण-णी** (स्त्री.) ।भरडें, भोक, छिद्र.
**मुदणें** (क्रि.) भोक बुजविणें. [मर्यादा.
**मुदत, मुद्दत** (अर. स्त्री.) अवधि, काल-
**मुदतवंदी** (फा. स्त्री.) मुदत करणें.
**मुदबख** (अर. पु.) पाकशाला, स्वैंपाकघर.
**मुदल, मुद्दल** (सं. मूल्य न.) भांडवल कर्जाऊ दिलेली रक्कम. [घेतां.
**मुदलाभुदल** (अ.) व्याज किंवा नफा न
**मुदलीं** (अ.) मुळींच.
**मुद्दल** मुदल पहा. [करणारा.
**मुदाईम** (फा. पु.) खटल्यांत पुरावे गोळा
**मुद्दा** (अर. पु.) वाव; पुरावा, प्रमाण; मतलब; चिन्ह; सूचना; तात्पर्य.
**मुद्दापत्ता** (पु.) पुरावा, साक्ष, आधार; थांग, मागमूस. [वळेंच;हेतुपुरःसर.
**मुद्दाम** (अर. मुदाम अ.) विशेष करून;
**मुद्देमाल**(पु.) मूळ ऐवज.
**मुद्देसूद** (वि.) प्रमाणशुद्ध; संगतवार.
**मुदित** (सं. वि.) हर्षभरित; आनंदित; प्रसन्न.
**मुदी** (प्रा. स्त्री.) अंगठी.
**मुद्रक** (सं. पु.) छापणारा; छाप मारणारा.
**मुद्रण** (सं. न.) छापणें.
**मुद्रण स्वातंत्र्य** (न.) आपल्या मतानुरूप मजकूर छापून प्रसिद्ध करण्याचा व्यक्तीचा अधिकार.
**मुद्रणालय**(न.) छापखाना. [(पृ. ११०).
**मुद्रस** (सं. पु.) आनंदरस (रामजोशी
**मुद्रा** (सं.स्त्री.) चर्या; छाप; शिक्का; नाणें.
**मुद्रिका** (सं. स्त्री.) अंगठी.
**मुद्रित** (सं. वि.) छापलेलें; मिटलेलें, वंद केलेलें; (न.) छापलेला कच्चा खरडा, प्रूफ.
**मुधणें** (क्रि.) भोंक बुजविणें. [पृ. ८८).
**मुधा** (प्रा. अ.) व्यर्थ (रामजोशी

**मुवाळ** (क्रि.) कुरळे (केस).
**मुनशी** (फा. पु.) फारशी जाणणारा चिटणीस; अरबी, फारशी इत्यादि भाषांचा शिक्षक.
**मुनसफ, मुनसिफ** (अर. पु.) खालच्या दिवाणी कोर्टातला न्यायाधीश.
**मुनाफा** (हि. पु.) नफा, फायदा.
**मुनासब** (अर. मुनासिब वि.) योग्य, रास्त.
**मुनि** (सं. पु.) ऋषि, यति, तपस्वी.
**मुनीम** (अर. मुनीब पु.) गुमास्ता, अडत्या.
**मुफत** (फा. मुफ्त वि.) फुकट, धर्मार्थ.
**मुफाइजा** (अर.पु.) कृपापत्र; इनामतनामा.
**मुफ्ती** (पु.) न्यायाधीश; साधा पोषाख.
**मुबदला, मुबादला** (पु.) मोबदला पहा.
**मुबर, मुमर, मुमीर, मुमूर** (पु.) फुपाटा.
**मुबलक, मुबलख, मुबलग** (अर. मुबलग वि.) पुष्कळ; विपुल. [परवानगी.
**मुबा, मुभा** (अर. मुबाआ स्त्री.) मोकळीक;
**मुबादला** (फा. पु.) मोबदला.
**मुबारक** (अर. पु.) संतोष, इनाम; (वि.) मंगलदायी; सुखी.
**मुम्ताझ** (अर. वि.) प्रख्यात; विभूषित.
**मुमीर** (पु.) फुपाटा.
**मुमुक्षा** (सं. स्त्री.) मोक्षप्राप्तीची इच्छा.
**मुमुक्षु** (सं. पु.) मोक्षाची इच्छा करणारा.
**मुमूर्षा** (सं. स्त्री.) मरणांतिक अवस्था.
**मुयधोंडा** (पु.) गांवाची हद्द दाखविण्यासाठीं पुरलेला दगड.
**मुरकट** (न.) मुरकूट; चिलट.
**मुरकणें** (क्रि.) मनांतून करावयाचें असतां बाह्यात्कारीं विपरीत भासवून मुरडणें.
**मुरका** (पु.) नखरा, अंग मुरडणें.
**मुरक्का** (अर. पु.) चित्रांचें किंवा नकाशांचें बांधलेलें पुस्तक.
**मुरकी** (स्त्री.) कानांतली वाळी; तंतुवाद्यावर तीन स्वरांपासून उत्पन्न केलेला मिश्र स्वर.
**मुरकुंडी** (स्त्री.) शरिराचें संकोचन. **मुरकुंड्या पडणें** —उड्या पडणें, गर्दी होणें; **मु० वळणें**—देहभान नाहींसें होऊन पडणें.
**मुरकूट** (न.) चिलट, डांस.

**मुरगळणें, मुरगाळणें** (क्रि.) पिळवटून वाकडें करणें.

**मुरगळा** (पु.) पीळ देऊन वाकडा केलेला भाग.

**मुरगी** (फा. स्त्री.) कोंबडी.

**मुरड** (स्त्री.) दुमड, वस्त्राचे दोन्ही पदर गुंडाळून घातलेली शिवण.

**मुरडकानवला** (पु.) काठ वळविलेला कानवला. **मु० खाणें**—मुलगा गांवास जाऊं लागला असतां त्यानें लवकर सुखरूप परत यावें म्हणून जातांना त्याला मु० खाण्यास देण्याची जुनी चाल आहे. त्यावरून मु० खाणें म्हणजे लवकर परत येणें असा अर्थ.

**मुरडणें** (क्रि.) वळणें, फिरणें, वळविणें, वाकडें करणें.

**मुरडा** (पु.) पिरगळा, लचक.

**मुरडाण** (न.) वाकडी तिकडी किंवा वळणाची जमीन; नांगराची खेप.

**मुरडींव** (प्रा. वि.) नागमोडी, पीळदार.

**मुरणें** (क्रि.) पाणी इ० जिरणें; रस आंत शिरणें; तृप्त होणें; संवय होणें.

**मुरदंगपाटी** (स्त्री.) आटयापाटयांतली मधली मोठी उभी रेघ.

**मुरदंग्या** (पु.) मुरदंगपाटीवर फिरत राहून दोन्ही बाजूंच्या विरुद्ध पक्षाच्या गड्यांना मारण्याचा प्रयत्न करणारा खेळाडू.

**मुरदा** (पु.) मुडदा, प्रेत.

**मुरदाड** मुरदार पहा.

**मुरदंग्या** आटयापाटयांच्या खेळांत मुरदंग पाटीवर फिरते राहून दोन्ही बाजूंच्या खेळाडूंना शिवण्याचें ज्याचें काम असतें तो.

**मुरब्बा, मुरंबा** (अर. पु.) साखरेच्या पाकांत मुरविलेला आंबा वगैरे.

**मुरब्बी** (अर. पु.) आश्रयदाता; अधिकारी; माहितगार व कर्तृत्ववान् पुरुष; अनुभविलेला.

**मुरमाड** (न.) मुरुमाचा खडक.

**मुरमुरा** (पु.) तांदुळाची लाही; चुरमुरा.

**मुरमुशी** (स्त्री.) ताप येण्याच्या अगोदर किंवा येऊन गेल्यानंतर वाटणारी ग्लानि; अंगाचा संकोच करून पडावेसें वाटणें.

**मुरमुसणें** (क्रि.) ग्लानि येणें; मुखचर्या पालटणें.

**मुरली** (सं. स्त्री.) अलगुज, पावा.

**मुरलीधर** (सं. पु.) श्रीकृष्ण.

**मुरवण** (न.) विरजण; एखाद्याचा गर्व उतरण्यासारखी गोष्ट; पैशाची अफरातफर केलेली झाकण्यासाठीं सांगितलेली खोटी सबब; अफरातफर; गिळंकृत केलेलें द्रव्य; आंब्याच्या अढींतलें गवत; उग्रता कमी करण्यासाठीं घातलेलें द्रव्य.

**मुरवणें** (क्रि.) जिरविणें.

**मुरवत** (अर. स्त्री.) भीड, संकोच, पर्वा.

**मुरविणें** (क्रि.) शोषून घेणें, जिरविणें; गिळंकृत करणें.

**मुरखंडी** (स्त्री.) मूर्च्छा, घेरी.

**मुरळी** (स्त्री.) खंडोबाला अर्पण केलेली स्त्री; विळी.

**मुराद** (अर. वि.) विपुल; (स्त्री.) इच्छा.

**मुरांबा** मुरब्बा पहा.

**मुरीद** (फा. पु.) शिष्य.

**मुरूम** (पु.) घट्ट मातीचे खडे; तारुण्यांत तोंडावर उठणारें पुरळ.

**मुरळी** (स्त्री.) विळी.

**मुराद** (अर. स्त्री.) पुष्कळ; विपुल.

**मुर्दा** (हिं. पु.) प्रेत.

**मुर्दफरास** (हिं. पु.) प्रेत ओढून नेणारा.

**मुऱ्हारी, मुऱ्हाळी** (सं. मुरारि पु.) श्रीविष्णु; नवऱ्यामुलीचा भाऊ.

**मुऱ्हाळी** (प्रा. स्त्री.) पाचारण, बोलावणें (तुका० १९५१). [ प्रदेश.

**मुऱ्हें** (न.) धुकें; सह्याद्रि पर्वताजवळचा

**मुलकणें** (क्रि.) हळूच हंसणें.

**मुलकी** (वि.) मुलखासंबंधीं; वसुलासंबंधीं. **मु० बाकी** (स्त्री.)—गांवगन्नाकडून येण्याचा वसूल; परप्रांतांतील नसलेलें; स्थानिक.

**मुलकीबाकी निसबत** लोकांकडून येण्याचा वसूल.

**मुलखानिराळी** सर्वांहून भिन्न; कोठेंही न आढळणारी; चमत्कारिक.

**मुलगा** (पु.) पुत्र, छोकरा.
**मुलगी** (स्त्री.) कन्या, छोकरी. **मु० उजविणें**—मुलीचें लग्न करून देऊन तिच्या ऋणांतून मुक्त होणें.
**मुलतानी** (स्त्री.) एक रागिणी.
**मुलना, मुलाणा** (अर. मौलाना पु.) मुसलमान धर्मशास्त्रवेत्ता; शिक्षक.
**मुलाईम** (अर. वि.) मृदु, नाजुक.
**मुलाखत** (अर. मुलाकात स्त्री.) भेट.
**मुलाजमात, मुलाजमत** (फा. स्त्री.) तत्परता, चाकरी; काम, कर्तव्य सलामी, हजर होणें. [मान; क्षमा.
**मुलाजा** (अर. मुलाहिजा पु.) पर्वा;
**मुलाणा, मुलाना** (अर. मौलाना पु.) मुसलमान धर्मशास्त्रज्ञ, मुल्ला.
**मुलामा** (अर. पु.) एका धातूच्या पदार्थावर दुसऱ्या धातूच्या रसाचा दिलेला पातळ थर. [पृ० १६५.
**मुलायम** (अर. वि.) मऊ, सुंदर (होना०
**मुलुकगिरी, मलुखगिरी** (फा. स्त्री.) देश जिंकण्याचें काम; स्वारी.
**मुलूख** (अर. मुल्क पु.) प्रांत, देश.
**मुलूखमैदान** (अर. मुल्कमैदान न.) सपाट प्रांत; (स्त्री.) विजापूरची सुप्रसिद्ध प्रचंड तोफ; तोंडाळ वायको.
**मुलेंमाणसें** (न. अने.) सगळें कुटुंब.
**मुल्ला** (फा. पु.) मुसलमानांचा धर्माध्यक्ष.
**मुशकस** (फा. वि.) ठरविलेला, मुक्रर, निश्चित. [अडचण.
**मुशकील** (फा. मुश्कल वि.) कठिण; (स्त्री.)
**मुशाफर** (अर. मुशाफिर पु.) वाटसरू; प्रवासी.
**मुशाफरी** (अर. स्त्री.) प्रवास.
**मुशारपण** (न.) मजुरी. [पगार.
**मुशाहिरा, मुशारा** (अर. मुशाहरा पु.)
**मुशीर** (फा. पु.) सल्लागार; मंत्री.
**मुश्रिफ** (फा. पु.) तपासनीस.
**मुश्रीफ** (अर. पु.) फाजील खर्च.
**मुष्क** (फा. पु.) कस्तूरी. [१।१८३).
**मुष्कर**(वि.) मोठ्या अंडाचा, लठ्ठ(यथार्थ०
**मुष्कहीना** (पु.) एका अत्तराचें नांव.
**मुष्टि** (सं. स्त्री.) मूठ; बुक्की.
**मुष्टिघात** (सं. पु.) मुठीचा तडाखा, गुद्दा.
**मुष्टिप्रयोग** (सं. पु.) गुद्दा मारणें; मूठ मारणें (जारणमारणांतली एक क्रिया).
**मुष्टिमंथन** (सं. न.) मुठळ्या मारणें.
**मुष्टिमोदक** (पु.) गुद्दा, ठोसा.
**मुसकट, मुसकड** (न.) तोंड.
**मुसकणें** (क्रि.) तोंड आच्छादणें.
**मुसकटणें** (क्रि.) तोंडांत मारणें; मुसकणें.
**मुस्कटदाबी** (स्त्री.) एखाद्याला बोलूं किंवा खाऊं न देण्यासाठीं त्याचें तोंड दाबणें.
**मुसकें** (न.) खाण्यास प्रतिबंध करणारी गुरांच्या तोंडास बांधिलेली जाळी; तोंड.
**मुसक्या बांधणें** मागें आवळून हात बांधणें.
**मुसडा** (पु.) जोराचा मोठा प्रवाह.
**मुसंडी, मुसांडी** (स्त्री.) जोरानें गर्दीत शिरतांना होणारा शरिराचा आकार.
**मुसमुशीत** (वि.) भर ज्वानीचें तेज असलेली.
**मुसमुस** (स्त्री.) स्फुंदन.
**मुसमुसणें** (क्रि.) तारुण्याच्या भरांत असणें; स्फुंदणें, क्रोध दाबून ठेवणें.
**मुसलमान** (अर. पु.) इस्लाम धर्माचा मनुष्य. [चित्रकार.
**मुसवर मुसव्वर** (फा. मुसव्विर पु.) चितारी,
**मुसळ** (सं. मुसल न.) कांडणी गदा, सोटा. **मु० ला अंकुर कुटणें**—अशक्य वाटणारी गोष्ट घडून येणें; **सगळेंच मुसळ केरांत**—अत्यंत महत्त्वाच्या गोष्टीकडे झालेलें दुर्लक्ष.
**मुसळकंद** (पु.) धटिंगण, ठोंब्या.
**मुसळदेवता** (स्त्री.) धीट, आडदांड स्त्री.
**मुसळधार पाऊस** अतिशय जोराचा पाऊस.
**मुसळी** (स्त्री.) लहान मुसळ; (सं. मुसली स्त्री.) एक औषधी वनस्पति; धक्का; मुसंडी.
**मुसळेश्वर** (पु.) धटिंगण.
**मुसळ्या** (वि.) धटिंगण.
**मुसांडी** मुसंडी पहा. [प्रवासी.
**मुसाफर** (अर. मुशाफिर पु.) पांथस्थ,
**मुसावणें** (प्रा. क्रि.) मूर्त रूपानें दिसणें; निमग्न होणें, रमणें (भा० २८।२३१); फुगणें; व्यापणें.

**मुसाहेब** (अर. मुसाहिब पु.) सोबती; मुखत्यार.
**मुसें येणें** (क्रि.) रूपाला येणें.
**मुसम** (अर. मोसम पु.) मोसम, हंगाम; (वि.) निश्चित. [ रक्कम.
**मुस्तकवाल** (अर. पु.) पुढें मिळणारी
**मुस्तकीम** (अर. वि.) कायम.
**मुस्ता** (सं. पु.) नागरमोथा.
**मुस्तैद** (अर. वि.) तयार, सज्ज.
**मुस्तैदी** (अर. स्त्री.) तयारी; मुहूर्त; (सं. पु.) दोन घटकांचा काळ; शुभ काळ; कार्याचा आरंभ.
**मुहुर्मुहुः** (सं. क्रि. वि.) वारंवार; पुन्हां पुन्हां.
**मुहूर्त** (सं. पु.) दोन घटकांचा काळ; शुभ वेळा.
**मुहूर्तमेढ** (स्त्री.) लग्नकार्याकरितां मांडव घालतांना मुहूर्तावर रोविलेला पहिला स्तंभ.
**मुळकंड** (सं. मूल कंद न.) मूळ.
**मुळगुळीत** (वि.) बेचव, पुळपुळीत.
**मुळवणी** (स्त्री.) बोळवण.
**मुळव्याध–धी** (स्त्री.) गुदाला होणारा एक उष्णतेचा रोग. [ भाजी.
**मुळा** (सं. मूलक पु.) एक प्रकारची
**मुळावणें** (क्रि.) वद्धमूल होणें; रुजणें.
**मुळिक** (प्रा. वि.) पहिलें; मूळचें.
**मुळी** (सं. मूल स्त्री.) मूळ, जडी.
**मुळीं** (अ.) अगदीं; प्रथमतः.
**मुळूमुळू** (अ.) आंतल्याआंत; बाहेर पडूं न देतां (रडणें).
**मुळें** (अ.) कारणानें, म्हणून.
**मुळहारी, मुराळी** (प्रा. पु.) मूळ पाठविलेलें माणूस (वेणा० सी० ३।१; तुका० १७.)
**मुळी** (स्त्री.) लहान मूळ; पाळ.
**मुळ्या** (पु.) काष्ठौषधी विकणारा; ग्रामज्योतिषी.
**मुक्ष** (प्रा. वि.) मुख्य (मुक्ते० रामा० ६।११९).
**मुक्षद, मुक्षद** (सं. मुखशुद्धि स्त्री.) जेवण झाल्यानंतर तोंड साफ करण्यासाठीं खाण्याचे सुपारी, लवंग इ० पदार्थ.

**मूक** (सं. वि.) मुका; वाचा नसलेला.
**मूग** (सं. मुद्ग पु.) एक द्विदल धान्य. **मूग गिळणें**— अपमान वगैरे सोसून मुकाट्यानें वसणें.
**मूठ** (पु.) बैलावरचें खोगीर.
**मूठ** (सं. मुष्टि स्त्री.) हाताच्या पंजाचा विशिष्ट आकार; मुष्टि; बुक्की; जमाव; मंत्रप्रयोग, धरण्याचा दांडा. **झाकल्या मुठीनें**—गुप्तपणें; **मूठ दाबणें** लाच देणें; **मुठींत असणें**—पूर्ण कह्यांत असणें; **मूठ मारणें**—दुसऱ्यास मारण्यासाठीं जादू इत्यादि करणें.
**मुठमर्दाई** (स्त्री.) अन्यायानें व जबरदस्तीनें घेणें. [ पुरणें.
**मूठमाती देणें** (स्त्री.) प्रेत जमिनींत
**मूठवळी** (प्रा. पु. स्त्री. न.) बैलाच्या पाठीवरचें खोगीर (मोरो० द्रोण० १२।१६९).
**मूढ** (सं. वि.) मूर्ख, अडाणी.
**मूढमति** (सं. वि.) मंद बुद्धीचा; जड.
**मूत** (सं. मूत्र न.) मूत्र.
**मूतखडा** (सं. मूत्रकृच्छ्र पु.) मूत्रास प्रतिबंध होतो असा एक रोग.
**मूतसळई** (सं. मूत्रशलाका स्त्री.) मूत्र कोंडलें असतां तें काढण्यासाठीं शरिरांत घालण्याची शस्त्रवैद्याची सळई.
**मूत्र** (सं. न.) मूत.
**मूत्रकृच्छ्र** (सं. न.) थेंब थेंब लघ्वी होऊन दुखतें असा रोग; उन्हाळी.
**मूत्राशय** (सं. पु.) मूत्राचा कोठा.
**मूद** (स्त्री.) भाताच्या गोळ्याला ओगराळ्यानें दिलेला विशिष्ट आकार; स्त्रियांचें एक केशभूषण.
**मूर** (स्त्री.) छिद्र; सच्छिद्रता; गळतीमुळें होणारें नुकसान; तुपाची बेरी; तूट; नुकसान; अवकाश, जागा; भेग; (न.) दैव.
**मूर्ख** (सं. वि.) मूढ; अज्ञानी.
**मूर्च्छना** (सं. स्त्री.) गायनांतल्या प्रत्येक दोन स्वरांमधले तीन सूक्ष्म स्वरांश; घेरी; मूर्च्छा.
**मूर्च्छा** (सं. स्त्री.) चक्कर, घेरी.
**मूर्च्छागत** (सं. वि.) मूर्च्छित.

**मूर्त** (सं. वि.) मूर्तिमंत, साक्षात्; (स्त्री.) मूर्ति, प्रतिमा.
**मूर्ति** (स्त्री.) प्रतिमा.
**मूर्तिमंत, मूर्तिमान्** (सं. वि.) साक्षात्.
**मूर्धन्य** (सं. वि.) मस्तकांतून ज्यांचा उच्चार होतो ते वर्ण (ऋ, ॠ, टवर्ग, र आणि ष).
**मूर्धा, मूर्धान** (स्त्री. न.) डोकें, शिर.
**मूल** (सं. न.) मूळ उत्पत्तिस्थान; बालक.
**मूलक** (सं. वि. समासान्तीं) त्यामुळें झालेलें.
**मूलाधार** (सं. पु.) मूळ, पाया.
**मूल्य** (सं. न.) मोल, किंमत.
**मूल्यवान्** (सं. वि.) मोठ्या किंमतीचा.
**मूलोद्योग** (पु.) जीवनाला अत्यावश्यक असणारा व्यवसाय. मू० शिक्षण (न.)— जीवन शिक्षण; वर्धा शिक्षण पद्धति.
**मूषक** (सं. पु.) उंदीर.
**मूस** (सं. मूष स्त्री.) सोनें चांदी आटविण्याचें पात्र; आटणी; सांचा; योजना; मसलत; मार्ग, घडण; रचना.
**मूसमारा** (पु.) पत्ता; चिन्ह; अवशेष.
**मूळ** (सं. मूल न.) मुळी, पाळ; उत्पत्तिस्थान, आधार; आरंभ; मूलग्रंथ; सासरीं गेलेल्या मुलीला जाणारें माहेरचें बोलावणें; (अ.) खालीं; मूलतः; मुसळ.
**मूळखंड** (न.) मुळाचा तुकडा, मूळ.
**मूळग्रंथ** (पु.) आधारभूत ग्रंथ; आधार.
**मूळचिठ्ठी** (स्त्री.) आमंत्रणपत्रिका.
**मूळडाळ** (प्रा. न.) मूळपाळ (तुका० १३६३).
**मूळद्रव्य, मूळधन** (न.) भांडवल.
**मूळपीठ** (न.) मूळचें स्थान.
**मूळपीठिका** (सं. स्त्री.) आदिकारण; प्रारंभ; साग्र वृत्तान्त.
**मूळपुरुष** (पु.) आद्य पूर्वज; कुलाध्यक्ष.
**मूळबंद, मूळबांध** (पु.) शेतांत पाणी अडविण्यासाठीं घातलेला बंधारा.
**मूळवणें** (प्रा. क्रि.) घालवणें; (न.) उन्मूलन.
**मूळव्याध, मूळव्याधि** (सं. मूलव्याधि स्त्री.) एक गुदरोग.
**मूळस्तंभ** (सं. पु.) मुहूर्तमेढ.
**मूळस्वभाव** (सं. पु.) जन्मस्वभाव.
**मूळहारी** (प्रा. पु.) मूळ गेलेला मनुष्य.
**मृग** (सं. पु.) हरिण; पशु; पांचवें नक्षत्र; त्या नक्षत्राचा पाऊस.
**मृगछाला** (प्रा. पु.) मृगाजिन.
**मृगजळ** (सं. न.) सूर्यकिरणांच्या परिवर्तनानें वाळवंटासारख्या ठिकाणीं होणारा जलाचा भास.
**मृगजळस्नान** (सं. न.) अशक्य गोष्ट.
**मृगनाभि, मृगमद** (सं. पु.) कस्तूरी.
**मृगनेत्री, मृगनयना, मृगलोचनी** (सं. स्त्री.) सुंदर डोळ्यांची स्त्री.
**मृगया** (सं. स्त्री.) शिकार.
**मृगराज** (सं. पु.) सिंह.
**मृगलांछन** (सं. पु.) चंद्र.
**मृगशीतलाई, मृगशीतली** (स्त्री.) मृगाच्या पावसानें हवेंत आलेला थंडावा.
**मृगशीर्ष** (सं. न.) पांचवें नक्षत्र. यास लोकभाषेंत 'खाटलें वाजलें' म्हणतात.
**मृगांबु** (सं. न.) मृगजळ (ज्ञा० १६।२२८).
**मृगासन** (सं. न.) बसावयाचें हरिणाचें कातडें.
**मृगी** (सं. स्त्री.) हरिणी.
**मृगेंद्र** (सं. पु.) सिंह.
**मृड** (सं. पु.) शिव.
**मृडानी** (सं. स्त्री.) पार्वती.
**मृणाल** (सं. पु. न.) कमळाचा देठ.
**मृण्मय** (सं. वि.) मातीचें केलेलें.
**मृत** (सं. वि.) मेलेला. [ मृताची क्रिया.
**मृतक** (सं. न.) अशौच; सुतक; प्रेत;
**मृतदिन** (सं. पु.) मृत्युतिथि.
**मृतपत्र** (सं. न.) मृत्युपत्र.
**मृतप्राय** (सं. वि.) मेल्यासारखा.
**मृतशय्या** (सं. स्त्री.) मृत माणसाप्रीत्यर्थ ब्राम्हणास शय्या दान करतात ती.
**मृतसंजीवनी** (सं. स्त्री.) मेलेल्यास पुनः जिवंत करणारा मंत्र.
**मृतस्नान** (सं. न.) प्रेतयात्रेला जाणारे शुद्धीसाठीं करतात तें स्नान.
**मृताशौच** (सं. न.) सुतक.
**मृति** (सं. स्त्री.) मरण, मृत्यु.
**मृतें** (प्रा. न.) माती (अमृ० ३।५).
**मृत्तिका** (सं. स्त्री.) माती.

नगर वाचनालय सातारा संगणकीकृत



मृत्यंग (सं. न.) शरिराच्या ज्या भागावर आघात केला असतां तत्काळ मरण येतें असा भाग.
मृत्पिंड (सं. पु.) मातीचा गोळा.
मृत्यु (सं. पु.) मरण; यम.
मृत्युंजय (सं. पु.) शंकर.
मृत्युपत्र (सं. न.) मरणसमयीं जिंदगीच्या व्यवस्थेसंबंधानें केलेला लेख.
मृत्युपंथ (सं. पु.) मरणाची वाट.
मृत्युयोग (सं. पु.) एखाद्या विशिष्ट नक्षत्राचें विशिष्ट वारीं येणें (उदाहरणार्थ:–अनुराधा नक्षत्राचें रविवारीं येणें).
मृत्युलोक (सं. पु.) पृथ्वी, भूलोक.
मृदंग (सं. पु.) पखवाज.
मृदंग्या (पु.) पखवाजी.
मृदु, मृदुल (सं. वि.) मऊ, नरम.
मृदुळी, मृदाळी (प्रा.स्त्री.) मऊ, गिरदी (रुक्मि० १५।४०).
मृन्मय (सं. वि.) मृण्मय पहा.
मृषा (सं. वि.) खोटें.
में (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा पांचवा महिना.
मेकड, मेकण (न.) कानांतला मळ.
मेकुड (न.) वाळलेला व नाकपुडींत चिकटलेला शेंबूड.
मेख (फा. स्त्री.) खुंटी. **तुकाराम बोवाची मेख**—न सुटणारें कोडें.
मेखबू, मेखसू (हिं. पु.) मोठी मेख; मेख ठोकण्याची मोगरी.
मेखला (सं. स्त्री.) कमरपट्टा, कटिसूत्र; बाह्यांवाचून कफनी.
मेखस, मेखसू (न.) मोठी मेख, मोठा व लांब खिळा. [ १५।२४१).
मेखळणें (क्रि.) घट्ट बांधणें ( ज्ञा०
मेखळा (स्त्री.) मेखला पहा.
मेखाटणोस (मेखाटीस) बसणें हट्ट धरणें किंवा धरून बसणें; पुरता पिच्छा पुरविणें.
मेखाटणें (क्रि.) खिळून टाकणें; चोपणें.
मेखाटी (स्त्री.) मेख, खुंटी. [ खंबीर.
मेख्या (वि.) वस्ताद, पुरून उरणारा;
मेंग (स्त्री.) सर्पाची कांत.

मेंगा, मेंग्या (वि.) नेभळट.
मेंगावणें (क्रि.) भिऊन माघार घेणें.
मेघ (सं. पु.) ढग, अभ्र. [ घुमट.
मेघडंबर (सं. मेघाडंबर पु.) ढगांचें छत;
मेघडंबरी (स्त्री.) घुमट, उंच छत्री; छत.
मेघनाद (पु.) रावणाचा मुलगा (इंद्रजित्); मेघांचा कडकडाट.
मेघपटल (सं. पु.) ढगांचें आवरण.
मेघमंडल (सं. न.) मेघांचा समुदाय..
मेघमल्हार (सं. पु.) गायनांतला एक राग.
मेघश्याम (सं. वि.) ढगासारखा काळा.
मेघोडा, मेघौडा (पु.), मेघौडें (न.) ढगांचा समुदाय (ज्ञा० ११।१९४).
मेचक (वि.) काळा (मोरो० मंत्रभा० १०।३१४).
मेचणें (क्रि.) भिऊन माघार घेणें, दाद देणें; माप घेणें (ज्ञा० १४।२४७).
मेचु (प्रा. स्त्री.) प्रीति (ज्ञा० १५।१२५).
मेज (फा. न.) टेबल; माप.
मेजणें (क्रि.) मोजणें.
मेजदात, **मेजदाद, मेजदास्त** मोजदाद, मोजदास्त पहा.
मेजर (इं. वि.) एक लष्करी हुद्दा.
मेजवानगी (फा. स्त्री.) स्वागतखर्च; आतिथ्य, पाहुणचार.
मेजवानी (फा. मेजवानी स्त्री.) मोठ्यास दिलेलें थाटामाटाचें भोजन. [ हत्यार.
मेजोटी (स्त्री.) माप घेण्याचें सोनाराचें
मेट, मेटें (फा. पु.) चौकी, पहारा, गस्त; पाहऱ्याची जागा; गुडघ्याचा सांधा; ढोपर; अवसान; (सावंतवाडीकडे) लग्नांतला एक सोहळा (गृहप्रवेशाच्या वेळीं वराच्या बहिणीनें दार आडवून धरणें); (अ.) अतिशय काळोख. **मेट पडणें**—हातपाय गाळणें; **मेटें घालणें**—रडकुंडीस येणें;गुडघ्यांत डोकें खुपसणें. [ नाक्यावरील चौकीदार.
मेटकरी (पु.) किल्ल्याच्या भोंवतालच्या
मेटका (पु.) मेडका पहा.
मेटाकुटी, मेटाखुटी (स्त्री.) ढोपर टेकून बसण्याची रीत; महत्प्रयास. **मे० स येणें**—शिकस्त करून कंटाळणें.

[library stamp, illegible]

**मेटींव** (वि.) टांकी दिलेला (धोंडा, चिरा इत्यादि). [ ६।८७).
**मेटेकरी**(प्रा. पु.) रखवालदार(रं० यो०
**मेंड** (हिं. पु.) उंच केलेली कड; धार; शेताची हद्द; (स्त्री.) तरंग, लहर; वादनांत नाजूक रीतीनें उत्पन्न केलेली स्वराची वक्रता.
**मेडका** (पु.),**मेंडकी** (स्त्री.) व्यायामानें स्नायूचें फुगणें; वळ; पेटका, वेटकुळी; मेषपाल.
**मेंडका–क्या, मेंडपाळ** (वि.) मेंढरें राखणारा; धनगर. [ किंवा प्राणी.
**मेंडगुळ**(न.)बांडगूळ, परोपजीवी वनस्पति
**मेडजोगी** (पु.) खणपटचा, डोईफोडचा.
**मेडा** (प्रा. पु.) मेंढा.
**मेंडा** (हिं. मेंड स्त्री.) हद्द, मर्यादा.
**मेढ** (स्त्री.) दुवेळकें असलेलें लाकूड; आधारस्तंभ; दोरीचा पीळ.
**मेंढ** (स्त्री.) सीमा.
**मेंढक्या** (वि.) मेंढपाळ.
**मेंढकी** (स्त्री.), **मेंढकें** (न.) मेढ पहा.
**मेंढपाळ** (पु.) मेंढ्या चारणारा.
**मेंडरी** (स्त्री.) मेंधला पहा.
**मेंढरूं** (न.) मेंढीचें पिलूं.
**मेंढवाडा**(पु.) मेंढरांना कोंडण्याची जागा.
**मेढा** (पु.) दुवेळका खांब; पाठिंबा; गुंता–गुंत; त्रिशूळ; ढाल; धनुष्य; कुंपण.
**मेंढा** (सं. मेष पु.) मेष, एडका.
**मेढी** (स्त्री.) लहान मेढ.
**मेंढी** (स्त्री.) मेंढ्याची मादी.
**मेढेकरी** (पु.) आधारस्तंभ. [लकडकोट.
**मेढेकोट**(पु.)लाकडाचा केलेला मजबूत तट;
**मेढेजोशी** (पु.) मेढेमताचा किंवा गांवचा वतनदार जोशी.
**मेढेमत** (पु.) ध्रुवाच्या ताऱ्यावरून बसविलेलें एक ज्योतिष मत.
**मेढ्या** (पु.)मेढेकरी; आधारस्तंभ.
**मेढ्र** (सं. न.) शिस्न; मेंढा.
**मेण** (न.) मधाच्या पोळयांतला चिकट पदार्थ; तेलाची वेरी; तरवारीचें म्यान. **एका मेण्यांत दोन सुऱ्या राहात नाहींत**—दोघे सामर्थ्यवान् पुरुष भांडण न करतां शांततेनें एकत्र राहूं शकत नाहींत; **मेण काढणें**—खूप चोपणें, मारणें.
**मेणकट** (वि.) मेणचट, ओशट.
**मेणकापड** (न.) मेण लाविलेलें कापड.
**मेणघुणा** (वि.) आंतल्या गाठीचा.
**मेणचट** (वि.) चिकट; कण्या न पडलेलें (तूप); मंद, सुस्त, निःसत्त्व; कृपण.
**मेणबत्ती** (स्त्री.) मेणानें मढविलेली वात.
**मेणबाजार** (पु.) रोजच्या रोज दुकानासाठीं पाल लावायचें व रोजच्या रोज काढायचें असे करणारे दुकानदार जेथें आहेत तो बाजार.
**मेणा** (फा. पु.) डोलीसारखें एक वाहन.
**मेणोलें** (वि.) मेण, तेलाची वेरी व राख यांनीं सारविलेलें टोपलें इ.
**मेतकूट** (न.) तांदूळ व कांहीं डाळी यांचें दळलेलें रुचकर मिश्रण; मेळ, एकी, दृढ मैत्री.
**मेथी** (स्त्री.) एक भाजी.
**मेथोडा** (पु.) मेथ्यांचा लाडू.
**मेद** (सं. न.) चरबी. [ लठ्ठपणा.
**मेंदगी** (फा. मांदगी स्त्री.) थकवा, शीण,
**मेंदट** (वि.) मेणचट.
**मेदस्वी** (सं. वि.) लठ्ठ, फोपसा.
**मेदिनी** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**मेंदी** (सं. मेंधी स्त्री.) मुलींचे हातपाय रंगविण्याची एक वनस्पति.
**मेदु** (पु.) गोष्ट. [ जाल.
**मेंदू** (सं. मेदस पु.) मगज; ज्ञान-तंतु-
**मेदूर** (वि.) घट्ट व चिकट.
**मेदोवृद्धि**(सं. स्त्री.)अंगांत चरबी वाढणें; फोपसेपणा; लठ्ठपणा.
**मेध** (सं. पु.) यज्ञपशु, आहुति, बळी.
**मेंधला** (पु.) वास्तुशास्त्रांत—दाराच्या चौकटीचो मढरी आणि घोडा. [ शक्ति.
**मेधा** (सं. स्त्री.) बुद्धीची तीव्रता, धारणा-
**मेधावी** (सं. वि.) कुशाग्र बुद्धीचा.
**मेधाविनी** (स्त्री.) कुशाग्रबुद्धीची.
**मेंधी**(सं. स्त्री.) मेंदी पहा.
**मेध्य** (सं. वि.) पवित्र.
**मेंबर** (इं. पु.) सभासद.
**मेम** (इं. मॅडम स्त्री.) मडम.

**मेमटा** (वि.) दिसण्यांत साळसूद पण आंतून दुष्ट.
**मेमण** (पु.) मुसलमान जातीचा विणकरी, मोमीन. [ (प्रा. पु.) समय.
**मेर** (सं. मीर स्त्री.) शेताची कड; तीर;
**मेरु** (सं. पु.) एक पर्वत; माळेंतला मध्यवर्ती मोठा मणि; गुडगुडीचा चिलीम ठेवण्याचा दांडा.
**मेल** (इं. स्त्री.) टपालगाडी; टपाल; (पु.) संगीत साज.
**मेलकार** (फा. पु.) शस्त्रविद्येचा शिक्षक.
**मेलन** (न.) मीलन; एकीकरण.
**मेला** (सं. पु.) मेळा, यात्रा; शस्त्रविद्येचें शिक्षण; (वि.) मेलेला.
**मेलें अन्न** स्वतःच्या श्रमानें न मिळविलेलें पण दुसऱ्याच्या मेहेरबानीनें किंवा लज्जास्पद मार्गानें मिळालेलें अन्न.
**मेल्या** आईचें दूध प्यालेला मेषपात्र.
**मेल्यापेक्षां मेला होणें** अतिशय खजिल होणें.
**मेल्हारें** (प्रा. न.) संयोग (अमृ० २।५२).
**मेवा** (फा. पु.) फळफळावळ. **मे०फरोस**— फळफळावळ विकणारा.
**मेवाती** (हिं. पु.) लुटारू. [ पेढे, वर्फी इ०
**मेवामिठाई** (स्त्री.) फळफळावळ आणि
**मेव्हणा, मेव्हणी** मेहुणा, मेहुणी पहा.
**मेष** (सं. पु.) मेंढा.
**मेषपात्र** (सं. वि.) खुळचट, दुर्बळ.
**मेषसंपात** (सं. पु.) मेषराशींत सूर्याचा प्रवेश.
**मेषोन्मेष** (सं. पु.) डोळ्याची उघडझाप.
**मेसको** (प्रा. स्त्री.) एक क्षुद्र देवता.
**मेसमेरिझम** (इं. पु.) मोहिनी विद्या.
**मेसाई, मेसादेवी** (प्रा. स्त्री.) एक क्षुद्र देवता.
**मेस्तक** (न.) हिशेबाची कोष्टकें वगैरे लिहिलेली वही; व्यवहारचोपडी; लेखनपद्धति.
**मेस्तर** (न.) नवला, गवंड्याचें एक हत्यार.
**मेस्तरी, मेस्त्री** (पोर्तु० मेस्त्री पु.) कारागीर.
**मेह** (सं. पु.) मूत्ररोग; मेंढा.
**मेहतर, म्हेतर** (पु.) झाडू, भंगी; घडा; रांजण; नाशिकाकडे—भिल्लांचा जातपाटील.
**मेहंदळ** (वि.) पुष्कळ.
**मेहंदी** (अर. स्त्री.) मेंदी पहा. [मजुरी.
**मेहनत** (अर. स्त्री.) श्रम, प्रयास;
**मेहनताना** (अर. पु.) मेहनतीचा मोबदला, मजुरी.
**मेहनती** (वि.) खटपटी, कष्टाळू.
**मेहमान** (फा. पु.) ज्याची वंशपरंपरागत जमीन घरदार, हक्कसंबंध इ०कांहीं एक गांवांत नाहीं असा उपरी गांवकरी; अतिथि, पाहुणा.
**मेहमानी** (फा. स्त्री.) आतिथ्य.
**मेहर** (फा. स्त्री.) कृपा, दया; (पु.) सूर्य (देवनाथ पृ० २५५).
**मेहरणें** (क्रि.) बधिर होणें.
**मेहरनजर** (स्त्री.) कृपादृष्टि.
**मेहरप** मेहराब पहा
**मेहेरबान** (फा. वि.) कृपाळू; अधिकाऱ्यांविषयीं अर्जदारानें लिहिण्याची संज्ञा.
**मेहेरबानी** (फा. स्त्री.) कृपा; संज्ञा.
**मेहराप, मेहरप, मेहराब** (अर.) मेहराब स्त्री.) कमान; भिंत; मखर; मशिदींत पश्चिम दिशेस असणारी पवित्र देवळी.
**मेहरी** (स्त्री.) बधिरपणा.
**मेहुडा, मेहू** (प्रा. पु.) मेघ. [ नवरा.
**मेहुणा** (पु.) वायकोचा भाऊ; बहिणीचा
**मेहुणी** (स्त्री.) वायकोची वहीण.
**मेहुला** (प्रा. पु.) मेघ. [बायको.
**मेहूण** (सं. मिथुन न.) दांपत्य; नवरा-
**मेहू, मेहो** (सं. मेघ पु.) मेघ (मुक्ते० रामा० ६।२७१).
**मेळ** (सं. मेल पु.) जम; एकी; मिलाफ; वाजंत्र्यांचा ताफा; हिशोबाचा ताळा; योग; संयोग; प्राप्ति. [ ३६७).
**मेळवण** (प्रा. न.) समूह (भा० १४।
**मेळा, मेळाप, मेळावा** (सं. मेल पु.) समुदाय, समूह, यात्रा. [ समेट.
**मेळापकु, मेळापाक** (प्रा. पु.) मिलाफ,
**मेळावा** (प्रा. पु.) समुदाय.

**मेळीकार** (पु. स्त्री.) भेट.
**मेळु** (प्रा. पु.) मेळ, भेट, संयोग.
**मेळेकरी** (पु.) गांवचा एक पिढीजाद कामदार.
**मेळेदार** (पु.) पंचायतीपैकीं एक इसम.
**मैत** (वि.) मयत, मेलेला.
**मैत्र** (सं. पु.) सखा, स्नेही. [पोटभेद.
**मैत्राणी, मैत्रायणी** (पु.) ब्राह्मणांचा एक
**मैत्रिकी,मैत्री** (सं. स्त्री.) सख्य, मित्रत्व.
**मैत्रीण** (स्त्री.) सोबतीण.
**मैथिली** (स्त्री.) सीता.
**मैथुन** (सं.न.) स्त्री-पुरुष-संयोग, संभोग; मिलाफ.
**मैंद** (सं. महेंद्र वि.) बुद्धिमंद, जड, सुस्त; घातकी; ढोंगी; (पु.) कुळव.
**मैदा** (हिं. पु.) सपीट, गव्हाचें बारीक पीठ.
**मैदान** (फा. स्त्री.) उघडी व सपाट विस्तीर्ण जागा.
**मैंदावें** (प्रा. न.) मैंदपण; घातकीपणा.
**मैना** (हिं. स्त्री.) एक पक्षी.
**मैफल** (अर. स्त्री.) मजलस.
**मैयत** (अर. मयत वि.) मेलेला.
**मैया** (अर. वि.) शंभर.
**मैयातैन** (अर. वि.) दोनशें.
**मैरालभाऊ** (पु.) दणकट आणि भक्कम बांध्याचा माणूस.
**मैल** (इं. पु.) अर्धा कोस.
**मैलखोर** (वि.) मळकट रंगाचा.
**मैला** (पु.) नरक.
**मैलागर** (सं. पु.) चंदनाची बाग.
**मैलागिरीचंदन** (न.) उत्कृष्ट चंदन.
**मैस** (प्रा. स्त्री.) काजळ (भक्तलीला० १।६५).
**मैळ** (प्रा. वि.) मलिन; (पु. न.) घाण.
**मैळणें** (प्रा. स्त्री.) मलिन होणें; (भा० २६।३६). [वार्षिक नेमणूक.
**मोईन** (अर. स्त्री.) निश्चितपणा; ठराविक
**मोईनजाबता** (पु.) पगारविषयींचें करार-पत्र; वांटणीपत्रक; नेमणूक.
**मोकाबला** मुकाबला पहा. [सोडणें.
**मोकलणें** (प्रा. क्रि.) पाठविणें, मोकळा
**मोकळ** (स्त्री.) मोकळा कडबा वगैरे.
**मोकळवादी** (प्रा. स्त्री.) मोकळीक. **मोकळवादी होणें**—सैरावैरां धावूं लागणें.
**मोकळा** (वि.) सुटलेला, रिकामा. **मो० चाकळा** (वि.)—अनियंत्रित, सुटा.
**मोकळी** (प्रा. स्त्री.) स्वच्छंदीपणा; मत-भेद (ज्ञा० १७।२६).
**मोकळीक** (स्त्री.) परवानगी; सुटका.
**मोकळें** (प्रा. न.) मोकळेंपण (ज्ञा० १८।८६८).
**मोकळें रान** (न.) पूर्ण स्वातंत्र्य; सदर परवानगी; ऐसपैस जागा.
**मोका** (पु.) संधि; प्रसंग.
**मोकाट** (प्रा. वि.) द्वाड, दांडगा, स्वच्छंदी.
**मोकाटु** (प्रा. वि.) मोकळा.
**मोकादम** (पु.) मुकादम पहा.
**मोकार** (वि.) रिकामा; सुटा; (न.) ऐन खर्च.
**मोकाशी** (पु.) मोकसदार, इनामदार, खोत.
**मोकासा** (अर. पु.) लष्करी नोकरी करण्याच्या शर्तीनें किंवा इनाम म्हणून दिलेली जमीन किंवा गांवखोती.
**मोकाळ** (वि.) मोकळा, भटक्या.
**मोंख** (पु.) खोबरें; सुपारींतलें खोबरें; एरंडींतला मगज.
**मोखर, मोखार** (वि.) मऊ, वाढता.
**मोंग** (पु.) कोंब, अंकुर.
**मोगर** (प्रा. न.) पायदळ (ज्ञा० ११। ३९५, रुक्मि० ५।२६).
**मोगर** (सं. मुद्गर पु.) हातोडा; लहान गांठ; झुबका; चोपणी.
**मोगरा** (सं. मुद्गर पु.) एक सुवासिक फुलझाड; लाकडी हातोडा, चोपणी; झेंगट वाजविण्याचा ठोकळा.
**मोगरी** (स्त्री.) लाकडी हातोडा.
**मोगल** (फा. पु.) तार्तरीहून आलेली मुसलमानांची एक जात. [शाही.
**मोगलाई** (स्त्री.) मोगलांचें राज्य, बेबंद-
**मोगलाण** (न.) मोगलांचा किंवा त्यांच्या ताब्यांतला देश; मोगलांचें बंड.
**मोगा** (पु.) कित्येक नारळाच्या आंत कोंब वाढलेला असतो तो.
**मोगारा** (पु.) कोंब, अंकुर.

**मोघ** (सं. वि.) व्यर्थ, निष्फळ.
**मोघड** (स्त्री.) बिनफणांची लहान पाभर.
**मोंघणी** (स्त्री.) जोंधळा, बाजरी वगैरे मध्यें तूर, हरवरा इ०ची पेरणी. [अनामत.
**मोघम** (अर. वि.) संदिग्ध, अस्पष्ट;
**मोघल** (फा. न.) डेन्याचें मागील दार.
**मोघा** (पु.) उभट रुंद तोंडाचें व अरुंद मानेचें भांडें.
**मोघारणें** (न.) नकासगाराचें हत्यार.
**मोघें** (न.) जोंधळा, बाजरी, गहूं यांच्यांत पेरलेला हरभरा किंवा तूर. [णारा.
**मोचक** (सं. वि.) मुक्तता करणारा, सोडवि-
**मोचड** (प्रा. पु.) जोडा.
**मोचडी** (स्त्री.) नाजूक जोडा.
**मोचणें** (सं. मुच् स्त्री.) मोकळें करणें.
**मोचन** (सं. न.) मुक्तता, सुटका.
**मोचा** (हिं. पु.) मोजा; जोडा.
**मोची** (हिं. पु.) जोडे शिवणारा.
**मोच्छाव, मोच्छाह** (सं. महोत्सव पु.) मोठा उत्सव.
**मोज** (न.) माप.
**मोजका** (वि.) मोजलेला, नेमका, निवडक.
**मोजणी** (स्त्री.) मोजण्याची क्रिया; पैमाष.
**मोजणें** (क्रि.) गणती करणें; मापणें.
**मोजदाद, मोजदास्त** (अर. मोजदाद स्त्री.) मापन, मोजणी.
**मोजवटी** (स्त्री.) सोनाराचा ठसा.
**मोजवा** (फा. मोसबा पु.) मोजकी संख्या, हिशेब. [आच्छादन.
**मोजा** (फा. पु.) हाताचें किंवा पायाचें
**मोजिब** (अर. बमुजिब अ.) प्रमाण.
**मोट** (प्रा. स्त्री.) मोटकुळें, गाठोडें (तुका० २७१७); वाट.
**मोट** (स्त्री.) विहिरींतून पाणी काढण्याचें मोठें पात्र; मोठें ओझें. **मोट बांधणें**—एखाद्यास त्याच्या मर्जीविरुद्ध करावयास लावणें; एखाद्या वस्तूचा गोळा करणें.
**मोटकळें** (न.) गाठोडें.
**मोटका** (वि.) निपुण, निष्णात.
**मोटकुळी** (स्त्री.) गाठोडी.
**मोटकुळी उडी** (स्त्री.) पाण्यांत उडी टाकतांना हवेंत असतांच स्वतःचे पाय धरून (अर्थात् शरिराचें गाठोडें करून) खालीं उतरणें. [मोजकें.
**मोटकें** (प्रा. वि.) थोडें; सूक्ष्म; नीट;
**मोटन** (सं. न.) बोडण.
**मोटला–ळा** (पु.), **मोटली–ळी** (स्त्री.), **मोटलें–ळें** (न.), **मोटचाळें** (प्रा. न.) गाठोडें. [चौकट.
**मोटवण** (न.) मोटेकरितां उभारलेली
**मोटस्थळ** (न.) मोटेच्या पाण्यानें भिजणारी जमीन.
**मोटळी** (स्त्री.) लहान गाठोडी.
**मोटळें** (प्रा. न.) गाठोडें.
**मोटाड** (वि.) फार मोठा. [दणगट.
**मोटाधाटा** (वि.) मोठा, मजबूत, जाड,
**मोठा** (वि.) थोर; अधिक; भारी; स्थूल.
**मोठ्यानें** (अ.) मोठा शब्द करून; मोठ्या आवाजानें.
**मोड** (पु.) पराजय; अंकुर; रीत; वळण; आकार; सळ; मोडकीं फुटकीं धातूंचीं भांडीं; मोठा पूर; लहान नाणीं; रेजगी; जडत्व; ताठपणा.
**मोडकळ** (प्रा. वि.) अतिशय जड (मोरो० वन० १२।१५९); क्षीण; दाणादाण झालेलें; मोडलेलें.
**मोडकळणें, मोडकळीस येणें** पडल्यासारखें होणें; क्षीण होणें, थकणें.
**मोडका** (वि.) मोडलेला.
**मोडकातोडका** (वि.) मोडण्यास झालेला, मोडकळीस आलेला.
**मोडकी** (स्त्री.) मोड; हरकत; पराभव; मोडल्याबद्दलचें अपेश. [पद्धति.
**मोडणी** (स्त्री.) मोडण्याची क्रिया; मांडणी;
**मोडणें** (क्रि.) तोडणें; तुटणें; भग्न करणें; उल्लंघन करणें; पराजय करणें; नाहींसें करणें; समाविष्ट असणें.
**मोडता घालणें** (पु.) अडथळा करणें; खो घालणें.
**मोडती** (स्त्री.) मनाई, बंदी, अडचण.
**मोडतोड** (स्त्री.) मोडलेलें तुटलेलें सामान; त्याची दुरुस्ती.
**मोडशी** (स्त्री.) अजीर्ण, अपचन. **मो० जिरविणें**—खोड मोडणें.

**मोडा** (पु.) अडथळा, हरकत, प्रतिबंध; खुलासा करणारा (सोहि० महदनु०).
**मोडावणें** (क्रि.) मोड (अंकुर) फुटणें.
**मोडिक** (प्रा. वि.) कुत्सित.
**मोडी** (प्रा. स्त्री.) नटणें, सजणें, शृंगार.
**मोडी** (स्त्री.) जलद लिहिण्यासाठीं वर्ण मोडून लिहिण्याची प्रचारांत आलेली पद्धति; (प्रा.) आकार; मुरमाची पुटकुळी; शृंगार.
**मोडीव** (वि.) घडी करतां येण्याजोगा.
**मोडया** (वि.) मोडणारा.
**मोढ** (पु.) अंकुर, कोंब.
**मोढा** (पु.) ओहोळ, ओघळ; खोरें.
**मोत** (स्त्री.) मृत्यु; स्मशानयात्रा.[२२१)
**मोतड** (प्रा. वि.) खटाटोप (मा० १३।
**मोतदार, मोतद्दार** (फा. मोतादद्दार पु.) घोडा संभाळणारा.
**मोताद** (अर. मोहताद स्त्री.) ठराविक परिमाण किंवा माप; इयत्ता; (वि.) अल्प प्रमाणांत ज्याला मिळतें तो.
**मोतादी** (वि.) बेताचें, जितक्यास तितकें.
**मोतिया** (पु.) मोत्याचा रंग.
**मोतिलग** (प्रा. वि.) मोत्यें लाविलेला.
**मोतीं** (सं. मौक्तिक न.) समुद्रांत शिंपेंत सांपडणारें रत्न. नाकापेक्षां मोतीं जड—मुख्य वस्तूपेक्षां गौण गोष्टीचेंच अधिक माहात्म्य.
**मोतीचूर** (हिं. पु.) बारीक कळयाची बुंदी; लाडवाचा एक प्रकार.
**मोतीदाणा** (पु.) मोत्याच्या दाण्यासारखा सुंदर मनुष्य.
**मोतीबिंदु** (पु.) वडसासारखा लहान ठिपका नेत्राच्या बुबुळावर ज्यांत येतो असा नेत्ररोग.
**मोत्यांचा भांग** (पु.) केसांच्या भांगांत घालावयाचा स्त्रियांचा एक मोत्यांचा दागिना.
**मोत्या** (पु.) कुत्रा; मुलाचें शिश्न.
**मोत्साव** (सं. महोत्सव पु.) मोठा उत्सव.
**मोद** (सं. पु.) आनंद.
**मोदक** (सं.पु.) एक उकडलेलें मिष्टान्न; (वि.) आनंद देणारें.
**मोदणें** (सं. मुद् क्रि.) आनंदणें.
**मोदळा** (प्रा. पु.) मुद्गल; वासरानें दूध पिऊं नये म्हणून त्याच्या तोंडाला बांधावयाची पिशवी; गोळा; भारा; ओझें; (वि.) लठ्ठ; फार. [दुकानदार.
**मोदी** (हिं. पु.) कोठावळा; धान्याचा
**मोदीखाना** (हिं. पु.) लष्कराच्या धान्याची कोठी.
**मोधळा** (पु.) धष्टपुष्ट पण आळशी मनुष्य; धान्यतृणाचें ओझें; घरावरचीं कवलें घसरूं नयेत म्हणून त्याच्याखालीं घातलेल्या लांबलांब झिऱ्यांच्या जुड्या; मोदळा, भारा.
**मोधा** (वि.) मुग्ध; स्तब्ध.
**मोधागोळा** (पु.) जड गोळा.
**मोनजात** (स्त्री.) मुकें जनावर. [मुका.
**मोनवा** (पु.) केळीचा नवा कळवा; (वि.)
**मोना** (पु.) केळीच्या पानाचें अग्र; (वि.) मुका.
**मोनें** (प्रा. वि.) थोर.
**मोप** (वि.) पुष्कळ; (न.) कच्ची वीट.
**मोप, मोपाड, मोपार** (न.) डोंगराचें शिखर; भूशिर; तुळईचें अग्र.
**मोपणें** (क्रि.) मोजणें. [साचा.
**मोपाळें** (न.) विटाळें, वीट करण्याचा
**मोपें** (न.) मोठी कच्ची वीट.
**मोबदला** (अर. मोबादला पु.) एक वस्तु देऊन तिच्या ऐवजीं दुसरी वस्तु घेणें; (अ.) बद्दल.
**मोबलक** मुबलक पहा.
**मोमा** (मा. भा.) मुका.
**मोमीन** (अर. पु.) मेमन पहा.
**मोर** (सं. मयूर पु.) एक सुंदर पक्षी.
**मोरकी** (स्त्री.) मोहरकी, लगाम.
**मोरकुंचा** (पु.) मोरचेल.
**मोरचंग** (पु.) दातांत धरून वाजविण्याचें एक वाद्य.
**मोरचल** (हिं. मोरछल न.) मोराच्या पिसांचा कुंचा.
**मोरचा** (फा. पु.) लकडकोट; तोफा; तोफांचा मारा; जंग; आरशाचा पारा निघून पडलेला उघडा भाग.

**मोरचूद** (हिं. मोरथुथिया पु. न.) एक विषारी खनिज पदार्थ.
**मोरचेबंदी** (स्त्री.) संरक्षक तट उभारणें; तोफा लावणें.
**मोरवेल** मोरछळ पहा.
**मोरणी** (स्त्री.) स्त्रियांच्या नाकांतला एक अलंकार.
**मोरणें** (प्रा. क्रि.) ऐकणें.
**मोरपीस** (न.) मयूरपुच्छ.
**मोरब** (फा. पु.) चाटण.
**मोरवा** (पु.) मातीचा, धातूचा लोटा; तुळईवर असलेला आखुड खांब; खांबाखालीं दिलेला तळवडा.
**मोरस साखर** मॉरिशस बेटांतून आलेली साखर.
**मोरा** (प्रा. वि.) कबरा, करड्या रंगाचा.
**मोरांबा** मुरब्बा पहा. [ खांबोटी.
**मोरावा** (पु.) इमारतकामांत—कैंची;
**मोरी** (स्त्री.) घरांतलें सांडपाणी काढून देण्याची वाट; नाहणी; खाळ.
**मोर्चा** (पु.) मोरचा पहा.
**मोर्चा नेणें** (क्रि.) जमावानें गाऱ्हाण्याची दाद मागण्याकरितां जाणें.
**मोर्तब** (अर. न.) 'मोर्तबसूद' अशीं अक्षरें कोरलेला ठसा. **मो० बर्दार**—मोर्तब संभाळणारा.
**मोर्तबसूद** मोर्तबावर 'मोर्तबसूद' अशीं अक्षरें कोरलेलीं असतात; यांचा अर्थ 'असा हुकूम देण्यांत येत आहे' असा आहे.
**मोल** (सं. मूल्य न.) किंमत.
**मोलकरी** (पु.) मजूर, कामकरी.
**मोलमजुरी** (स्त्री.) मजुरी; मजुरीचें काम; त्याबद्दलचें द्रव्य.
**मोलामहागाचा** किंमतवान्.
**मोलारी** (पु.) पुरुष मजूर.
**मोलारीण** (स्त्री.) स्त्री मजूर.
**मोवणें** (प्रा. क्रि.) मापणें (तुका० २०। १८); (न.) मनन. [ एक रोग.
**मोंवा** (पु.) धान्य व भाजीपाला यांचा
**मोवाळ** (प्रा. वि.) मृदु, मवाळ. [ येणें.
**मोवाळणें** (प्रा. क्रि.) मृदु होणें; वठणीस
**मोवाळें** (न.) वासराच्या तोंडाला घालण्याचें मुसकें.
**मोस** (पु.) पत्ता, सूचक चिन्ह; कपट.
**मोसबा** (अर. पु.) हिशेबपत्रक.
**मोसंबी** (स्त्री.) नारिंगाच्या जातीचें एक फळ. [ ऋतु.
**मोसम** (अर. पु.) योग्य काळ; हंगाम;
**मोह** (सं. पु.) मूर्च्छा; प्रेम; माया; प्रेमाचा अतिरेक. **मो० पाश** (पु.)— संसाराचें जाळें.
**मोहम** (सं. पु.) ममता; माया; मतिभ्रम; अज्ञान. [ चित्ताकर्षक.
**मोहक** (सं. वि.) मोह उत्पन्न करणारें,
**मोहग** (वि.) मोघम.
**मोहटळ** (न.) गुरांसाठीं चरण्याचें कुरण.
**मोहटी** (स्त्री.) माहुटी; मोहाच्या झाडाचें फळ; छपराचें अग्र.
**मोहणें** (क्रि.) भुलणें; भुलविणें; वश करून घेणें; वश होणें.
**मोहतर, मोहतुर** (सं. मुहूर्त पु.) शूद्र जातीच्या स्त्रीचा पाट.
**मोहतरफा** (फा. पु.) दुकानदार व कारागीर यांच्यावरील कर.
**मोहदाद** (फा. वि.) माफक, मोजकें.
**मोहन** (सं. वि.) मोहून टाकणारें; (न.) मतिभ्रम; भुरळ; कणिक वगैरे पदार्थांत मृदुत्वासाठीं घातलेलें तूप किंवा तेल.
**मोहनभोग** (सं. पु.) एक पक्वान्न.
**मोहनमाळ** (सं. स्त्री.) गळयांत घातली असतां बेंबीपर्यंत लोंबणारी सोन्याची माळ. [ मोह पाडणारी स्त्री.
**मोहना, मोहिनी** (सं. मोहिनी स्त्री.) भूल;
**मोहनिद्रावाद** (पु.) झोपेनें रोग बरे करण्याची पद्धति.
**मोहबत** (अर. महबत स्त्री.) कृपा, मुरवत.
**मोहमुदी** (अर. स्त्री.) उंची सुती वस्त्र.
**मोहर** (फा. पु.) आम्रवृक्षाची मंजरी; (स्त्री.) मोहोरें (सोन्याचें नाणें); शिक्का; छाप; अग्रभाग; सैन्याची आघाडी; बाजू; दिशा; माग; अंकुर; लक्ष.

**मोहरकाडा** (प्रा. पु.) अग्रेसर (सोहि० महदनु०).
**मोहरकी** (स्त्री.) बैल, गाय, म्हैस इ० जनावरांच्या तोंडाला बांधावयाची कांहीं विशेष आकाराची दोरी.
**मोहरक्या** (पु.) अग्रेसर, म्होरपी, पुढारी.
**मोहरणें** (क्रि.) वृक्षास मोहर येणें; पुढें होऊन शिरणें; पुढें जाणें; पावा वाजविणें; मोहित करणें; गोंजारणें (तुका० २१३०); फेरफार होणें (ज्ञा० ६।१९१) प्रफुल्लित होणें; प्राप्त होणें.
**मोहरपी** (पु.) पुढारी, अग्रेसर. [बंद.
**मोहरबंद** (वि.) वर मोहर केलेलें; पक्कें
**मोहरम** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा पहिला महिना; ताबुताचे दिवस.
**मोहरा** (फा. पु.) सर्पाच्या मस्तकांतला मणि; मार्ग; मृदंगाची गत; चेहरा; अग्रभाग; सैन्याची आघाडी; बुद्धिबळांत राजा किंवा प्यादें यांशिवाय बाकीचीं बुदबुळें; उत्कृष्ट मनुष्य; कागदाला चिकणाई आणण्यासाठीं घोटण्याची मोठी कवडी; कागदाच्या पानांत मधोमध काढलेली आकृति किंवा छाप.
**मोहरी** (स्त्री.) राई; पुंगी; मुरली (राम (वि० २५।१४३; तुका० २३८९).
**मोहरीर** (अर. पु.) देशपांड्याचा गुमास्ता.
**मोहरील** (वि. ) पुढचा, अग्रभागचा.
**मोहरून** (अ.) पुढून.
**मोहरें** (न.) बुद्धिबळांतला 'मोहरा' पहा; (अ.) पुढें, समोर (ज्ञा० १८।५८४).
**मोहरें घालणें** गोंजारणें (तुका० २१३४).
**मोहरेदार** (वि.) गुळगुळीत व चकाकित.
**मोहल्ला** (अर. पु.) व्यूह; शहराचा भाग; गल्ली.
**मोहसबा** (अर. पु.) मोसबा पहा.
**मोहसल्ली** (हि. पु.) महसुलाबद्दल तगादा करणारा शिपाई.
**मोहळ, मोहोळ** (न.) मधमाशांचें पोळें.
**मोहळ, मोहळें** (न.), **मोहळा, मोहाळा** (पु.) वासराच्या तोंडाला घातलेली मुसकी.
**मोहा** (पु.) महुडा.
**मोहाचा नारळ** उत्कृष्ट प्रतीचा नारळ.
**मोहाथिणें** (प्रा. क्रि.) मोहित होणें.
**मोहाळणें** (प्रा. क्रि.) मोह पावणें.
**मोहाळी** (प्रा. न.) घोड्याची लगाम (रुक्मि० ८।१५).
**मोहाळें** (प्रा. न.) सकलादीचें आच्छादन.
**मोहित** (सं. वि.) मोह पावलेला, लुब्ध.
**मोहिमी** मोहिनी पहा.
**मोहिरा** (प्रा. पु.) अग्रभाग.
**मोहिरें** (प्रा. न.) साहित्य; सामग्री.
**मोहीम** (अर. स्त्री.) लष्कराची स्वारी.
**मोहीमशीर** (वि.) वारंवार स्वाऱ्या करणारा.
**मोहोतरफा** मोहतरफा पहा.
**मोळ** (पु.) छपराचें पाखें; पाख्याचा ढाळ; गवताची एक जात.
**मोळा** (पु.) रीत, संवय, चाल; खिळा.
**मोळी** (स्त्री.) लाकडांचा भारा; गाठोडें; शरीर. **मो० बुचकळणें** — जलदीनें स्नान करणें. [निर्वाह करणारा.
**मोळीविक्या** (पु.) लाकडांची मोळी विकून
**मोळें** (न.) मोहळें पहा. [सुटका.
**मोक्ष** (सं. पु.) मुक्ति; ब्रह्मस्वरूपता;
**मोक्षपद** (सं. न.) जन्म-मरणापासून मुक्त होण्याची पात्रता; श्रेष्ठपद; ब्रह्मत्व; फार मोठें बक्षीस.
**मौआळ** (प्रा. वि.) मऊ, कोमल, मवाळ.
**मौक्तिक** (सं. न.) मोतीं.
**मौज** (अर. स्त्री.) मजा, गंमत, चैन.
**मौजा** (अर. पु. ), **मौजे** (न.) गांव, मुक्काम.
**मौजाळा** (वि.) गमती, खेळकर.
**मौंजी** (सं. स्त्री.) मुंज नांवाचें कटिसूत्र.
**मौंजीबंधन** (सं. न.) उपनयन, मुंज.
**मौजूद** (अर. वि.) हजर, तयार.
**मौजे** (अर. न.) गांव, मुक्काम. [संकट.
**मौत** (सं. मुक्ति अर. मोत पु.) मृत्यु,
**मौन** (सं. न.) स्तब्धता, न बोलणें.
**मौनव्रत** (सं. न.) कांहीं मुदतीपर्यंत न बोलण्याचा नेम.
**मौनावणें** (प्रा. क्रि.) स्तब्ध होणें. [मनुष्य.
**मौनी** (सं. पु.) स्तब्ध, मौनव्रत घेतलेला

**मौलवी** (अर. पु.) मुसलमानी धर्मशास्त्र जाणणारा पंडित.
**मौला** (अर. पु.) परमेश्वर; मालक.
**मौलाना** (अर. पु.) मुसलमान धर्मशास्त्रवेत्ता, शिक्षक; मुल्ला; मुसलमानांचा उपाध्याय.
**मौली** (सं. पु.) मस्तक.
**मौल्य** (सं. न.) किंमत.
**मौसर** (स्त्री.) ऐपत, सामर्थ्य.
**मौळ** मौली पहा. [(ज्ञा० १८।६५८).
**मौळा** (प्रा. पु.) फळावरील कांटा
**म्यां** (सर्वनाम) मी; मी ची तृतीया.
**म्याजिस्ट्रेट** (इं. पु.) फौजदारी खटल्यांची चौकशी करणारा कनिष्ठ प्रतीचा कामदार.
**म्यान** (फा. न.) तरवारीचें घर. [वाहन.
**म्याना** (फा. पु.) पालखीसारखें एक
**म्युनिसिपालिटी** (इं. स्त्री.) नगरपालिका.
**म्लान** (सं. वि.) कोमेजलेला, खिन्न.
**म्लेच्छ, म्लेंच्छ** (सं. पु.) यवन; हिंदुव्यक्तिरिक्त अन्य धर्मी.
**म्हटलें तेव्हां** (अ.) केव्हांहि.
**म्हण** (स्त्री.) प्रचलित बोधपर वाक्य.
**म्हणजे** (अ.) अन्य शब्दांनीं सांगावयाचें तर; किंवा; याचा अर्थ.
**म्हणणें** (क्रि.) बोलणें, उच्चारणें; पडणें.
**म्हणपणें** (प्रा. क्रि.) म्हटलें जाणें.
**म्हणम्हणो** (प्रा. अ.) म्हणून म्हणून.
**म्हणविणें** (क्रि.) दुसऱ्यांकडून म्हटलें जाणें; म्हणतील असें करणें.
**म्हणियागत** (प्रा. न.) भाषण (स्वा० दि० १२।४।७९); (वि.) आज्ञाधारक (ज्ञा० ९।२८४).
**म्हणियारा** (प्रा. पु.) सेवक किंवा दूत म्हणविणारा (ज्ञा० ९।३२४).
**म्हणियें** (प्रा. न.) काम (ज्ञा० १३।४३९); आज्ञा (ज्ञा० १७।२०३); (वि.) आज्ञाधारक (ज्ञा० ३।९९).
**म्हणून, म्हणोन** (अ.) यासाठीं, यामुळें.
**म्हसण** (प्रा. न.) स्मशान.
**म्हशा** (सं. महिष पु.) रेडा; हल्या; रेड्यासारखा धष्टपुष्ट पण मतिमंद.
**म्हशासुर** (सं. महिषासुर पु.) देवीनें मारलेला एक दैत्य; म्हसोबा.
**म्हातारचळ** (पु.) म्हातारपणीं बुद्धीस होणारी विकृति.
**म्हातारा** (सं. महत्तर वि.) वृद्ध, जरठ.
**म्हातारी** (स्त्री.) वृद्ध स्त्री; वृद्ध आई; रुईच्या फळांतला तंतुसमुदाय.
**म्हावरें** (न.) घवाड; मासा; मासळी.
**म्हाळसा** (स्त्री.) खंडोबाची स्त्री; कुंकवाचा मोठा टिळा लावणारी, धष्टपुष्ट आणि अव्यवस्थित राहणारी भांडकुदळ स्त्री.
**म्हाळसाकांत** (पु.) खंडोबा.
**म्हैस** (सं. महिष स्त्री.) महिषी, रेड्याची मादी.
**म्हैसा** (पु.) रेडा.
**म्हैसमंगळ** (वि.) मऊ. [२३२२).
**म्हैसिक** (वि.) म्हशीचा (नाम०

---

## य

**य** मराठी व्यंजनमालेंतील सव्विसावें व्यंजन.
**यःकश्चित** (न. वि.) क्षुद्र.
**यकृत्** (सं. पु.) पित्ताशय.
**यच्चयावत्** (सं. अ.) सर्व; झाडून; सगळे.
**यच्चावत्** यच्चयावत् पहा. [पूजणें.
**यजणें** (सं. यज् क्रि.) होमहवन करणें;
**यजन** (सं. न.) होमहवन.
**यजमान** (सं. पु.) यज्ञकर्म करणारा, धनी; मालक; नवरा.
**यजमानकृत्य** (सं. न.) यजमानाच्या घरीं करावयाचें धर्मकृत्य. [मालकीण.
**यजमानीण** (सं. स्त्री.) यजमानाची स्त्री;
**यजितपत्र** (सं. अजितपत्र न.) आपण हरलों व प्रतिस्पर्ध्यानें जिंकलें अशा कबुलीचें पत्र.
**यजुर्वेद** (सं. पु.) चार वेदांपैकीं दुसरा.
**यजुर्वेदी** (सं. पु.) ब्राह्मणांपैकीं एक पोटभेद, मध्यंदिन.
**यजू** (सं. यजुस् पु.) यजुर्वेदी ब्राह्मण.
**यटक** (स्त्री. न.) खुबी; मर्म.
**यडताळा** (न.) घोटाळा; अडचण.
**यंता** (सं. पु.) नियमन करणारा.

**यति** (सं. पु.) संन्यासी, भिक्षु; पद्याच्या चरणांत थांबण्याची जागा; अक्षरावरचें अवसान.
**यत्किंचित्** (सं. अ.) थोडासुद्धां.
**यत्न** (सं. पु.) प्रयत्न, उद्योग, खटपट.
**यत्नवादी** (सं. पु.) माणसाचें सुखदुःख, उत्कर्षापकर्ष इ० गोष्टी त्याच्या दैवावर अवलंबून नसून यत्नावर आहेत असें समजणारा.
**यत्नवान्** (सं. वि.) खटपटी, उद्योगशील.
**यत्नसिद्ध** (सं. वि.) प्रयत्नानें साधलेला.
**यत्र** (सं. अ.) जेथें.
**यंत्र** (सं. न.) कळ, साधन; हत्यार; तोफ; जादू; गूढ कोष्टक; वाद्य (तुका० २४).
**यंत्रशास्त्र** (सं. न.) पदार्थाच्या स्थिरावस्थेचें व गमनावस्थेचें विवेचन करणारें शास्त्र.
**यंत्री, यंत्रज्ञ** (वि.) यंत्र चालविणारा; यंत्रविशारद.
**यथा** (अ.) जसा—सें, ज्याप्रमाणें.
**यथाकथंचित्**(सं. अ.) कसा तरी; कदाचित्.
**यथाकाळीं** (अ.) योग्य वेळीं. [क्रमानुरूप.
**यथाक्रम, यथाक्रमानें** (सं. अ.) क्रमवार,
**यथातथा** (सं. अ.) कसा तरी, कष्टानें.
**यथातथ्य** (सं. अ.) जसें असेल तसें, खरें.
**यथानशक्ति, यथानशक्त्या** (सं. यथानु शक्ति अ.) शक्तीप्रमाणें. [ ३।७४९).
**यथानिगुती** (प्रा. अ.) यथार्थत्वानें (भा०
**यथानुक्रम** (सं. अ.) अनुक्रमानें.
**यथान्याय** (सं. अ.) न्यायास धरून.
**यथामति** (सं. अ.) आपल्या बुद्धीप्रमाणें.
**यथायथा** (सं. अ.) जसजसें. [ तसें.
**यथायुक्त, यथायोग्य**(सं. वि.) जसें असावें
**यथारीत** (अ.) रीतीप्रमाणें.
**यथार्थ** (सं. वि.) बरोबर.
**यथावकाश** (सं. अ.) सवडीप्रमाणें.
**यथाविधि** (सं. अ.) नियमानुसार.
**यथाशक्ति** (सं. अ.) आपल्या शक्तीप्रमाणें.
**यथाशास्त्र** (सं. अ.) शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें.
**यथासांग** (सं. अ.) पूर्णपणें, कांहीं न्यून न ठेवतां. [पूर्णपणें.
**यथास्थित** (सं. अ.) यथेच्छ, बरोबर,

**यथेच्छ** (सं. अ.) मन मानेल तसें; विपुल.
**यथेष्ट** (सं. वि.) यथेच्छ.
**यथोचित** (सं. वि.) योग्य दिसेल तसें.
**यंदां** (अ.) या वर्षी.
**यदाकदाचित्** (सं. वि.) जरकरतां; जर.
**यदृच्छा** (सं. स्त्री.) स्वच्छंदीपणा; सहजगति.
**यदृच्छालाभ** (सं. पु.) अनायासें किंवा आकस्मिक रीतीनें घडलेला लाभ.
**यद्यपि** (सं. अ.) जरी.
**यःपलाय** (सं. यःपलायति न.) पळून जाणें.
**यम** (सं. पु.) कृतांत, काळ, यमधर्म; कर्दनकाळ; इंद्रियनिग्रह; (वि.) जुळें.
**यमक** (सं. न.) एक शब्दालंकार (कवितेच्या एका चरणांत जीं अक्षरें ज्या क्रमानें संनिध असतील त्याच क्रमानें दुसऱ्या चरणांत त्यांची आवृत्ति होणें).
**यमघंट** (पु.) ज्योतिषांत—एक प्रकारचा योग (उदा० द्वितीयेच्या दिवशीं रविवार येणें किंवा शुद्ध तृतीयेला शुक्रवार येणें वगैरे.)
**यमदंड** (सं. पु.) पापीजनांना यमाकडून करण्यांत येणारी शिक्षा.
**यमदिशा** (सं. स्त्री.) दक्षिणदिशा.
**यमदूत** (सं. पु.) माणसाचा प्राण हरण करून नेणारे यमधर्माचे दूत; निष्ठुर अंतःकरणाचा मनुष्य. [भाऊबीज.
**यमद्वितीया** (सं. स्त्री.) कार्तिक शु०२,
**यमधर्म** (सं. पु.) यम.
**यमन** (सं. पु.) गायनांतल्या कल्याण रागाचा एक प्रकार; (न.) नियमन; निग्रह.
**यमनियम** (सं. पु.) आत्मसंयमनासाठीं करावयाचीं कृत्यें (व्रतें, इत्यादि).
**यमपाश** (सं. पु.) मनुष्याचे प्राण काढून नेण्यासाठीं यम टाकतो तो पाश.
**यमपुरी** (सं.स्त्री.) यमाची नगरी; यातनांचें आगर; तुरुंग. **य० स पाठविणें**—ठार मारणें.
**यमयातना** (सं. स्त्री.) यमाकडून करण्यांत येणाऱ्या पापीजनांच्या यातना; भयंकर हाल किंवा दुःख.

**यमल** (सं. वि.) जावळा.
**यमलोक** (सं. पु.) दुष्टांना यम जेथें शिक्षा करतो तें स्थान. **य० ची वाट धरणें**–मरणें.
**यमाजीपंत, यमाजीभास्कर** (पु.) मृत्यु, यम. **य० चें बोलावणें**–मृत्यु.
**यमी** (सं. वि.) संयमन करणारा.
**यमुना** (सं. स्त्री.) भागीरथीस मिळणारी एक मोठी नदी; यमाची बहीण.
**यलम्मा** (का. स्त्री.) रेणुका (परशुरामाची आई).
**यव** (सं. पु.) जव, सातू; हाताच्या बोटावरचें यवाच्या आकाराचें चिन्ह.
**यवन** (सं. पु.) म्लेंच्छ, मुसलमान.
**यवनी** (सं.स्त्री.) यवन-स्त्री; (वि.) यवनाची.
**यवस** (सं. न.) तृण, चारा.
**यवक्षार** (सं. पु.) जवखार.
**यवोदक** (सं. न.) श्राद्धाच्या वेळीं अर्पण करतात तें जवमिश्रित पाणी.
**यश** (सं.न.) जय; कीर्ति; दैवाची अनुकूलता.
**यशवंत** (वि.) विजयी, कीर्तिमान, दैववान.
**यशस्कर** (सं. वि.) यश देणारें.
**यशस्वान्, यशस्वी** (सं. वि.) जयी; सफळ; कीर्तिमान्; यश देणारा.
**यशोधन** (न.) यशरूपी धन.
**यष्टि, यष्टिका** (सं. स्त्री.) काठी.
**यहुदी** (पु.) इस्त्रायल जातीचा मनुष्य.
**यळिल** (प्रा. वि.) निष्फळ.
**यळकोट** (न.) तट असलेली जागा; खंडोबाचा जयजयकार करतांना म्हणावयाचा शब्द. [ सेवक.
**यक्ष** (सं. पु.) एक देवयोनि; कुबेराचा
**यक्षधन** (सं. न.) पुरून ठेविलेलें द्रव्य.
**यक्षिणी** (सं. स्त्री.) यक्षस्त्री. **य० ची कांडी फिरणें**–अकल्पित रीतीनें स्थिति पालटणें.
**यक्ष्मा** (सं. पु.) क्षयरोग.
**यज्ञ** (सं. पु.) याग, होम, धर्मकृत्य.
**यज्ञकंकण** (सं. न.) यज्ञ करण्याच्या वेळीं यजमानानें हातांत बांधण्याचें कांकण.
**यज्ञकुंड** (सं. न.) यज्ञाच्या वेळीं होमांत आहुति टाकण्यासाठीं केलेली खोल जागा.

**यज्ञनारायण** (सं. पु.) अग्निदेवता.
**यज्ञपशु** (सं. पु.) यज्ञांत बळी म्हणून अर्पण करण्याचा पशु.
**यज्ञमुख** (सं. पु.) अग्नि.
**यज्ञयाग** (सं. पु.) यज्ञ, होम इत्यादि.
**यज्ञवृक्ष** (सं. पु.) यज्ञाला ज्यांचें लाकूड उपयोगीं पडतें असे वृक्ष. (पिंपळ, पळस, औदुंबर, रुई, शमी, खैर व आघाडा.) [ जागा.
**यज्ञशाला** (सं. स्त्री.) यज्ञ करण्याची ठराविक
**यज्ञसूकर** (सं.पु.) वराहावतार.
**यज्ञोपवीत** (सं. न.) जानवें.
**या** (फा. अ.) किंवा, अथवा. [ मिश्रण.
**याकुती** (हिं. स्त्री.) एक प्रकारचें भांगेचें
**याकूत** (अर. पु.) जांभळया रंगाचा एक मूल्यवान् काचमणि.
**याग** (सं. पु.) यज्ञ; पूजा.
**यागी** (वि.) यज्ञ करणारा; यजमान; संतप्त; दुःखी. [ आलेला.
**याचक** (सं. पु.) भिकारी; मागण्यास
**याचणें** (क्रि.) मागणें, भिक्षा मागणें.
**याचना** (सं. स्त्री.) मागणें; भिक्षा; अर्ज.
**यांचा** (सं. स्त्री.) याचना.
**याजक, याजी** (सं. पु.) यज्ञकर्ता; यज्ञकर्म चालविणारा उपाध्याय.
**याजन** (सं. न.) द्रव्यलाभासाठीं दुसऱ्याकडे यज्ञक्रिया वगैरे चालविणें.
**याजुष** (सं वि.) यजुर्वेदांत सांगितलेला विधि इत्यादि.
**यात, याती** (सं. जाति स्त्री.) वर्ग, जात, भेद.
**यातना** (सं. स्त्री.) तीव्र दुःख, वेदना; त्रास; कष्ट. [ भानगड.
**यातायात** (सं. स्त्री.) येरझार, खेप, त्रास;
**यातायाती** (सं. जाति स्त्री.) जातिभेद.
**याती** (स्त्री.) ज्ञाति, जात.
**यातु, यातुधान** (सं. पु.) राक्षस.
**यात्रा** (सं. स्त्री.) जत्रा; देशांतरास गमन; प्रवास; यात्रेकरूंचा समूह. [ निघालेला.
**यात्रेकरी, यात्रेकरू, यात्री** (पु.) यात्रेसाठीं
**याथातथ्य** (सं. न.) सत्य, खरेपणा.
**याथार्थ्य** (सं. न.) सत्य, उचितपणा, औचित्य.

**याद** (फा. स्त्री.) आठवण; स्मरण, यादी, फेरिस्त; (सं. यादस् न.) जलचर.
**यादगारी, यादगिरी** (फा. स्त्री.) स्मरण; स्मारक. [ कृष्णाचें कुल.
**यादव** (पु.) यदूचा वंशज; एक राष्ट्र;
**यादवी** (सं. स्त्री.) आपापसांतला कलह.
**यादी** (फा. स्त्री.) फेरिस्त, याद, अर्जी; संस्थानिकांनीं हुजुरास केलेला अर्ज.
**यादृश** (सं. वि.) जसा; ज्याप्रमाणें.
**यादृच्छिक** (वि.) सहज घडणारें.
**यान** (सं. न.) गमन; वाहन.
**याम** (सं. पु.) प्रहर.
**यामिनी** (सं. स्त्री.) रात्र.
**याम्योत्तर** (सं. वि.) दक्षिणोत्तर.
**यार** (फा. पु.) मित्र, स्नेही, जार.
**यारदी** (पु.) देशपांड्यांचा गुमास्ता.
**यारी** (फा. स्त्री.) दोस्ती, स्नेह; मदत; ओझें उचलण्याचें यंत्र.
**यार्ड** (इं. पु.) तीन फुटांचें माप, वार; आवार.
**यावच्चंद्रदिवाकरौ** (क्रि. वि.) चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत; चिरकाल; अनंतकालपर्यंत.
**यावज्जीव** (सं अ.) जिवन्त असे पर्यन्त.
**यावत्तावत्** (सं. अ.) वेताचें.
**यावनाल** (सं. पु.) जोंधळ्याचा दाणा.
**यावनी** (सं. वि.) यवनांची; (स्त्री.) यवन स्त्री.
**यावा** (पु.) उदय; प्राप्ति (तुका० ४४४१); वैयं (दा० २।२।३१); आगमन (कथा० ३।५१); आवेग (जु० दा० ९।२६).
**याज्ञिक** (सं. पु.) अग्निहोत्री; लग्न, मुंज, इत्यादि धर्मकृत्यें चालविण्याचें अनुष्ठान जाणणारा ब्राह्मण.
**युक्त** (सं. वि.) जोडलेला, सहित; योग्य.
**युक्तायुक्त** (सं. वि.) योग्यायोग्य.
**युक्ताहारी** (सं. वि.) खाण्यांत संयमन ठेवणारा.
**युक्ति** (सं. स्त्री.) खुबी, शकल; औचित्य, विवेक; कळ; अटकळ; कल्पना.
**युक्तिप्रयुक्ति** (सं. स्त्री.) नानाप्रकारच्या युक्त्या; बरेवाईट उपाय.
**युक्तिबाज, युक्तिमान्, युक्तिवंत, युक्तिवान्** (वि.) युक्त्या जाणणारा व त्या लढविणारा.
**युग** (सं. न.) कृत, त्रेत, द्वापर आणि कलि हे कालाचे चार मोठाले विभाग; मोठा कालविभाग, जोडी; जोखड.
**युगत, युगूत** (सं. युक्ति स्त्री.) युक्ति, खुबी.
**युगप्रवर्तक, युगकर्ता** (वि.) युग निर्माण करणारा.
**युगधर्म** (सं. पु.) कांहीं विशिष्ट काळास उचित असें विशिष्ट कर्तव्य.
**युगुल** (सं. न.) जोडी, द्वय.
**युग्म** (सं. न.) जोडी.
**युत** (सं. वि.) जोडलेला, संबद्ध.
**युति** (सं. स्त्री.) चल ग्रहाचें एका दक्षिणोत्तर रेषेंत येणें; बेराज.
**युद्ध** (सं. न.) लढाई, झुंज.
**युद्धकंदन** (सं. न.) युद्धांत होणारी कत्तल.
**युद्धखोर** (वि). लढाईसाठीं हपापलेला.
**युधिष्ठिर** (पु.) पांडवांचा मोठा भाऊ; युध्दांत शांत राहणारा मनुष्य.
**युनानी** (फा. वि.) मुसलमानी वैद्यकासंबंधी; यवनी.
**युनिव्हर्सिटी** (इं. स्त्री.) विद्यापीठ, विश्वविद्यालय.
**युरेजन** (वि.) हिंदी स्त्री व युरोपिअन मनुष्य यांच्या संबंधापासून झालेला.
**युरेनस** (इं. पु.) ज्योतिषशास्त्रांत–प्रजापति नांवाचा ग्रह. [ संघ.
**युवक** (पु.) तरुण; **यु० संघ** (पु.) तरुणांचा
**युवति, युवती** (सं. स्त्री.) तरुण स्त्री.
**युवराज** (सं. पु.) गादीचा वारस; ज्येष्ठ राजपुत्र; राजाच्या आज्ञेनें राज्यकारभार पाहणारा त्याचा पुत्र.
**युवा** (सं. पु.) तरुण पुरुष. [आपण.
**युष्मादिक** (सं. युष्मदादि सर्व.) तुम्ही;
**यूथ** (सं. पु.) कळप, समूह.
**यूनान** (वि.) ग्रीस देश.
**यूप** (सं. पु.) स्तंभ, यज्ञस्तंभ.
**यूरोपीअन** (वि.) युरोप खंडांतील.
**यू यू** (अ.) कुत्र्याला बोलावण्याचा शब्द.
**येउतें** (प्रा. वि.) येवढें; इतकें; (अ.) येथें.

**येऊनजाऊन** (अ.) फारतर; येवढेंच; अखेर; मधून मधून यावें जावें अशा-प्रकारें.
**येक** (प्रा. वि.) एक; कित्येक.
**येकट** (प्रा. वि.) एकटा.
**येकजरा** (अ.) विलकुल, थोडेंसेंहि.
**येकतुकें** (वि.) सारखें,समान (ज्ञा०७।२५).
**येकंदरें** (प्रा. वि.) एकाकार(ज्ञा०५।१५१).
**येकवगी**(सं.अ.)एक पक्षी(ज्ञा० ११।४०४).
**येकमुख** (प्रा.अ.) समोर (भा०१।१५१).
**येकमोहरें** (प्रा. अ.) एकत्र.
**येकरस** (प्रा. न.) ब्रह्म.
**येकवळा** (प्रा. पु.) ऐक्य, संमीलन.
**येकविद** (प्रा. पु.) एकसराचा हार.
**येकसरें** (प्रा. अ.) एकदम, एकटें.
**येकसला** (प्रा. अ.) एकदम.
**येकाढयता**(प्रा. स्त्री.)एकदेशित्व; अपूर्णता.
**येकांतर** (प्रा. अ.) एक दिवसाआड.
**येकायतनु** (प्रा. न.) ब्रह्म.
**येकावळी** (स्त्री.) एकेरी हार.
**येकायेकी** (प्रा. वि.) एकटा, निःसंग; (अ.) एकाएकीं.
**येकुणा** (प्रा. वि.) दीडदुमता.
**येजा** (स्त्री.) निष्कारण खेप; येणें जाणें.
**येजितखत** (न.) अजितपत्र.
**येणी** (स्त्री.) गंजिफाच्या खेळांत राजाचें पान जवळ असलेल्याचा हक्क.
**येणें** (क्रि.) आगमन करणें; प्राप्त होणें; अवगत होणें, जाणणें.
**येणें** (न.) यावयाची रक्कम, ऋण.
**येणेंकडून, येणेंप्रमाणें** (क्रि.वि.) यामुळें; या कारणानें.
**येणेंजाणें** (न.) भेट; वरोव्याचा संबंध; [व्यवहार.
**येणें नांवें** (प्रा. अ.) यामुळें.
**येणें प्रमाणें** (क्रि. वि.) ह्याप्रमाणें.
**येता जाता** (अ.) सर्वदा. [काळ.
**येता पाय** (पु.) प्राप्तीचा किंवा अनुकूल
**येतुला** (प्रा. वि.) इतका; (अ.) येथें.
**येथें** (अ.) या ठिकाणीं.
**येदवा, येव्हवा** (प्रा. अ.) एव्हां, या वेळीं.
**येन** (स्त्री.) वांग; जननाचा मोसम; जपानी नाणें.
**येर** (प्रा. वि.) दुसरा; तो.
**येरझार** (स्त्री.) खेप.
**येरयेर** (प्रा. वि.) परस्पर; एकमेक.
**येरयेरा** (अ.) परस्परांना.
**येरली** (स्त्री.) धान्याची कणगी.
**येरवां** (अ.) परवां, तेरवां.
**येरिका** (प्रा. स्त्री.) लव्हाळा (भा० १। ३८१).
**येरीमोहर** (प्रा. वि.) उलटें.
**येरु** (प्रा. वि.) तो, अन्य.
**येलगार** (पु.) निकराचा हल्ला.
**येलची** (तु. पु.) वकील; प्रतिनिधि; एक प्रकारचें फळ.
**येवा** (पु.) येणें; प्राप्ति; योग्यता, शोभा.
**येवाजावा** (पु.) येणें जाणें.
**येवादेवी** (स्त्री.) जमा व खर्च; व्यवहार.
**येश, येशवंत, येशस्मान्, येशस्वी** यावद्दल अनुक्रमें यश, यशवंत, यशस्मान्, यशस्वी शब्द पहा.
**येसणें** (प्रा. वि.) येवढें, असें.
**येसपार** (प्रा. पु.) ठावठिकाण, पत्ता.
**येसवा** (सं. वेश्या स्त्री.) वेश्या.
**येसान** (अर. एहसान न.) कृपा; उपकार.
**येळाइतु** (प्रा. पु.) कैवारी, साह्यकर्ता.
**योग** (सं. पु.) मिलाफ, संयोग; संबंध; प्रसंग; काळ; ध्यान; चित्ताची एकाग्रता; कार्यकुशलता; चंद्रसूर्यांच्या गतींची वेरीज; १३ अंश २० कला होण्यास लागणारा काळ; ग्रहांची युति.
**योगधर्म** (सं. पु.) योग्याच्या अंगीं अवश्य लागणारे गुण (अहिंसा, सत्य, अस्तेय, तप, स्वाध्याय, शांति, दया इत्यादि).
**योगनिद्रा** (सं. स्त्री.) समाधि.
**योगभ्रष्ट** (सं. वि.) योगसाधनांत कांहीं प्रत्यवाय घडल्यामुळें पुनर्जन्म पावलेला.
**योगमाया** (सं. स्त्री.) ईश्वराची मायारूप शक्ति.
**योगरूढ** (सं. वि.) ज्यांचा व्युत्पत्तीनें प्राप्त अर्थ व रूढ अर्थ हे जुळतात असा (शब्द).
**योगशास्त्र** (सं. न.) चित्ताची एकाग्रता करण्याच्या साधनासंबंधाचें शास्त्र.

**योगक्षेम** (सं. पु.) ज्या वस्तु नाहींत त्या संपादणें व आहेत त्यांचें जतन करणें; निर्वाह. [ गोष्ट.
**योगायोग** (सं. पु.) सहजगत्या घडलेली
**योगारूढ** (वि.) योग साध्य झालेला.
**योगिनी** (सं. स्त्री.) जोगीण.
**योगी** (सं.पु.) जोगी, योगसाधन करणारा.
**योगीराजगुग्गुळ** (पु.) एका औषधाचें नांव.
**योगेश्वर** (सं. पु.) श्रेष्ठ योगी.
**योग्य** (सं. वि.) उचित, लायक.
**योजक** (सं. वि.) योजना करणारा.
**योजणें** (सं. युज् क्रि.) नेमणें; जोडणें; संकल्प करणें.
**योजन** (सं. न.) चार कोस; योजना, वेत.
**योजना** (सं. स्त्री.) कल्पना; संकल्प; युक्ति; नेमणूक.
**योजनावद्ध** (वि.) माहिती व आंकडे यांच्या आधारें संकल्पिलेला (आर्थिक कार्यक्रम इ.).
**योध** (पु.) योध्दा; वीर.
**योद्धा** (सं. पु.) लढवय्या, वीर.
**योनि** (सं.स्त्री.) स्त्रीचें जननेंद्रिय; उत्पत्ति-कारण; जाति, वर्ग.
**योषा** (सं. स्त्री.) स्त्री.
**यौगिक** (वि.) प्राकृतिक.
**यौवन** (सं. न.) तारुण्य.
**यौवराज्य** (सं. न.) युवराजाचें पद किंवा त्याचा अधिकार.

---

## र

**र** मराठी व्यंजनमालेंतील सत्ताविसावें व्यंजन.
**र** (स्त्री.) रड. **रचा पाढा वाचणें**—रडगाणें सांगणें; दुबळेपणा दाखविणें.
**रईस** (पु.) सरदार; जहागीरदार.
**रंक** (सं. पु.) भिकारी; गरीब.
**रकटा** (पु.) अगवळ; करगोटा.
**रकटें** (न.) जुनें फाटकें वस्त्र; लकतरें.
**रकबा** (अर. पु.) गावाखालची जमीन.
**रकम, रक्कम** (अर. स्त्री.) ऐवज; द्रव्य—संख्या; कलम; चीजवस्त.
**रकमबंद, रकमवार** (अ.) एकेक बाब घेऊन.
**रकमाला** (पु.) जिनसांची यादी.
**रकमी** (वि.) निश्चित. [ कॉलम.
**रकाना** (फा. पु.) कागदाचा चतुर्थांश; स्तंभ,
**रकार** (पु.) रडगाणें.
**रक्त** (सं. न.) रुधिर; (वि.) तांबडें; आसक्त. **र० चें पाणी करणें**—अतिशय परिश्रम करणें; **रक्तशून्य क्रांति**—अहिंसात्मक मार्गानें होणारें सत्तान्तर.
**रक्तचंदन** (सं. न.) तांबड्या रंगाचें चंदन.
**रक्तदान** (न.) क्षीण व रोगी माणसास निरोगी माणसाचें रक्त देणें.
**रक्तपात** (सं. पु.) रक्त सांडणें.
**रक्तपिती** (सं. रक्तपित्त स्त्री.) महारोग.
**रक्तबंबाळ** (वि.) रक्तानें भरलेला किंवा माखलेला; अंगांतून अतिशय रक्त वाहत असलेला. [राक्षस.
**रक्तबीज** (सं. पु.) ढेकूण, डांबिव;
**रक्तवुंद** (प्रा. पु.) राक्षस.
**रक्तरोडा** (पु.) एक वनस्पति.
**रक्तवर्ण** (सं. वि.) तांबड्या रंगाचें.
**रक्तवान्** (सं. पु.) शाई विकून पोट भरणारा; श्रीमंताच्या घरीं द्रोणपत्रावळी, शाई इ० च्या कामावर ठेविलेला मनुष्य.
**रक्तवाहिनी** (सं. स्त्री.) जीतून रक्त वाहत असतें ती शरिरांतली शीर.
**रक्तशोषण** (सं. न.) अंगांतलें रक्त कमी करून कृश करणें; लोकांकडून त्यांच्या शक्तीबाहेर पैसे उकळणें.
**रक्तस्राव** (सं. पु.) रक्त गळणें.
**रक्तांबर** (सं. पु.) भगवें, तांबडें वस्त्र.
**रक्तावणें, रक्ताळणें** (क्रि.) रक्त वाहणें, रक्तबंबाळ होणें.
**रक्तावरोध** (सं. पु.) रक्ताचें अभिसरण होण्याचें थांबणें; रक्ताचा विशिष्ट जागीं संचय होणें.
**रक्ताक्ष** (सं.वि.) तांबड्यालाल डोळ्यांचा.
**रक्ताशय** (सं. पु.) शरिरांतली रक्त-संचयाची जागा; हृदय.
**रक्ति** (सं. स्त्री.) अनुराग, रंग.

नगर वाचनालय, सातारा

**रक्तिमा** (सं. पु.) तांबडेपणा.
**रक्तोत्पल** (सं. न.) तांबडें कमळ.
**रखडणें** (क्रि.) कष्टांत दिवस काढणें; खितपत पडणें. [ भकभक.
**रखरख** (सं. रुक्ष स्त्री.) शुष्कता, आग,
**रखरखाट** (पु.) अतिशय रुक्षता; अतिशय भूक.
**रखरखीत** (सं. रुक्ष वि.) रुक्ष.
**रखरखणें** (क्रि.) रुक्ष होणें; प्रदीप्त होणें.
**रखवालदार** (पु.) रक्षक, राखण करणारा.
**रखवाली** (हिं. स्त्री.) राखण.
**रखेली** (स्त्री.) राख, वेश्या म्हणून वाळगलेली स्त्री.
**रग** (फा. स्त्री.) ताठा; गुर्मी; कळ; स्नायु; जोर; (इं. पु.) उबदार पांघरूण. **रग जिरविणें**—खोडकी मोडणें.
**रंग** (सं. पु.) वर्ण, रंगविण्याचें द्रव्य; मजा, शोभा; सभामंडप; समाज; स्वरूप; अंदाज. **रंगास (रंगारूपास) येणें**—थोडीशी उत्कर्षावस्था येणें; खुलून दिसणें, विकास पावणें.
**रंग** समासांत स्त्रीच्या नांवापुढें असतां तिचा पति असा अर्थ होतो.
**रगटा, रगटें** रकटा, रकटें पहा.
**रगड** (स्त्री.) विपुलता, चंगळ; (वि.) पुष्कळ. [चोळणें.
**रगडणें** (क्रि.) चिरडणें, दडपणें, जोरानें
**रगडपट्टी** (स्त्री.) विपुलता, चंगळ; घाईनें पुष्कळ काम उरकणें. [ काम.
**रगडमल्ली** (स्त्री.) आडदांडपणानें केलेलें
**रगडा** (पु.) दाटी, गर्दी; नाश.
**रंगडाव** (पु.) पत्त्यांच्या खेळांतला एक प्रकार.
**रंगडी, रंगडीढंगडी** (स्त्री.) युक्ति, डावपेंच.
**रगडून** (अ.) खूप, पुष्कळ.
**रगड्या** (वि.) आडदांड.
**रंगढंग** (पु.) युक्ति; स्वरूप.
**रंगण** (सं. रंगांगण न.) मंडळ, वर्तुळाकार प्रदेश; चक्कर; सभा.
**रंगणांत येणें** शत्रूशीं लढण्यासाठीं सरसावणें; आखाड्यांत उतरणें.
**रंगणावळ** (स्त्री.) रंगविण्यावद्दलची मजुरी.
**रंगणें** (सं. रञ्ज् क्रि.) रंग येणें; सोंग घेणें; रमणें.
**रगत** (न.) रक्त.
**रगदार** (न.) जोरदार, पाणीदार.
**रंगदार** (वि.) चांगल्या रंगाचें; रंगीत.
**रंगदेवता** (सं. स्त्री.) नाटकें, मजलसी वगैरेंची अधिष्ठात्री देवता.
**रंगनाथ** (सं. पु.) कृष्ण.
**रंगपंचमी** (सं. स्त्री.) फाल्गुन व० ५ (रंग खेळण्याचा दिवस).
**रंगबहार** (पु.) गाणें वगैरे करमणुकीपासून खूप मौज वाटणें; पिकांची रेलचेल झाल्यामुळें मन प्रसन्न होणें.
**रंगबा** रकबा पहा.
**रंगबाजी** (स्त्री.) पत्त्यांच्या खेळांतला एक प्रकार. [रंगांगण.
**रंगभूमि** (सं. स्त्री.) नाट्यगृह; आखाडा;
**रंगमंडप** (सं. पु.) कुस्त्या वगैरे खेळासाठीं घातलेला मांडव.
**रंगमहाल** (फा. पु.) विलासमंदिर.
**रंगमाळ** (सं. रंगमाला स्त्री.) लग्न वगैरे संबंधाच्या मिरवणुकीपुढची नक्षत्रमाळा. [ पृ० १२१).
**रंगमाळा** (स्त्री.) रांगोळीचीं चित्रें (ना०
**रंगमूर्ति** (सं. स्त्री.) ज्याच्या हजर राहण्यानें मजलसीला रंग चढेल असा मनुष्य; श्रीकृष्णाची मूर्ति.
**रंगमोड** (स्त्री.) रंगभंग; ऐन भरांत खेळ आला असतां विरस होणें.
**रंगराग** (पु.) रागरंग पहा. [ होणारा.
**रंगरूट** (इं. रिक्रूट पु.) सैन्यांत नवीन भरती
**रंगरूप** (सं.न.) बाह्य स्वरूप. **रं० स येणें**—चांगल्या स्थितीस किंवा पूर्णतेस येणें.
**रंगरोगण** (न.) तेलिया रंग.
**रंगवणी** (न.) रंगाचें पाणी.
**रंगवल्ली** (सं. स्त्री.) रांगोळीचें चित्र.
**रंगविणें** (क्रि.) रंग देणें; शोभिवंत करणें; तोंडांत मारणें. **तोंड रंगविणें**—विडा खाणें; थोवाडांत मारणें.
**रंगशाला** (सं. स्त्री.) नाटकगृह—विशेषत: जेथें नाटकांतलीं पात्रें रंगवितात ती जागा.

**रंगशिला** (सं. स्त्री.), **रंगशीळ** (स्त्री.) देवाच्या मूर्तीपुढची मोठी शिळा.
**रंगाई** (हिं. स्त्री.), रंगगावळ, रंगविण्याबद्दलची मजुरी.
**रंगांगण** (सं. न.) सर्कस, कुस्त्या, खेळ इ० करून दाखविण्यास योग्य स्थळ.
**रगाडा** (पु.), **रगाडी** (स्त्री.) गर्दी; उसाचा रस काढण्याचा चरक.
**रंगाथिलें** (प्रा. वि.) रंगविलेलें. [करणारा.
**रंगारी** (सं. रञ्ज् पु.) रंगविण्याचा धंदा
**रंगालय** (सं. न.) नाटयशाला.
**रंगावृत्ति** (स्त्री.) प्रयोगासाठीं बदलून लिहिलेली मूळ नाटकाची आवृत्ति.
**रंगिला** (वि.) रंगेल, ख्यालीखुशाली.
**रंगीत** (वि.) रंग लावलेला.
**रंगीन** (वि.) रंगविलेलें.
**रंगीबेरंगी** (वि.) अनेक रंगांचा.
**रगेल** (वि.) ताठलेला; गर्विष्ठ.
**रंगेल** (वि.) आनंदी; रसिक.
**रग्या** (वि.) रगदार; रगेल.
**रघत** (सं. रक्त न.) रक्त.
**रच** (पु.) ढीग; रचण्याची क्रिया.
**रचणी, रचणूक** (सं. रचना स्त्री.) रचना.
**रचणें** (सं. रच् क्रि.) ढीग करणें; मांडणें; जुळविणें. [योजना.
**रचना** (सं. स्त्री.) जुळवणी, व्यवस्था,
**रचयिता** (सं. वि.) रचना करणारा.
**रचलें** (प्रा. स्त्री.) रचना (ज्ञा० १८।८१५).
**रचाई** (स्त्री.) व्यवस्थेनें ठेवणें, रास घालणें इत्यादि कामाबद्दलचा खर्च.
**रचित** (सं. वि.) रचलेलें, जुळविलेलें, मांडलेलें.
**रज** (सं. पु. न.) सत्त्व, रज, तम या तीन गुणांपैकीं मधला रजोगुण पहा; पुष्पपराग; धूळ; कण; स्त्रियांचा विटाळ; आर्तव. **रजाचा गज करणें**—अतिशयोक्ति करणें.
**रंज** (फा. पु.) नाखुषी; खेद.
**रजई** (फा. रजाई स्त्री.) दुलई, लेप.
**रजक** (सं. पु.) धोबी.
**रंजक** (सं. वि.) करमणूक करणारें; (हिं. स्त्री.) बंदुकीच्या कान्यावर घातलेली दारू. **रं० पिणें**—कान्यावरची दारू मात्र जळून बार न उडणें. [ण्याची दारू.
**रंजकीची दारू** बंदुकीच्या कान्यावर घाल-
**रजःकण** (सं. पु.) धुळीचे कण. [होणें.
**रंजणें** (क्रि.) आनंदित होणें; मोहित
**रजत** (सं. न.) रुपें, चांदी.
**रजतपट** (पु.) चित्रपट ज्यावर दाखविला जातो तो शुभ्र पडदा.
**रजतवणी** (प्रा. स्त्री.) रुपेरी मुलामा.
**रंजन** (सं. न.) करमणूक, मौज.
**रजनी** (सं. स्त्री.) रात्र.
**रजनीचर** (सं. पु.) रात्रीं फिरणारा (राक्षस, चोर, घुबड इत्यादि).
**रजनीकर** (सं. पु.) चंद्र.
**रजनीमुख** (सं. न.) प्रदोष; संध्याकाळ.
**रजपज** (स्त्री.) मोजकेपणा, मितता.
**रजपूत** (सं. राजपुत्र पु.) एक जात.
**रजब** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा सातवा महिना. [१२३२).
**रजरेण** (पु.) धुळीचा कण (तुका०
**रंजलेगांजलें** (वि.) त्रासलेलें, पीडलेलें.
**रंजवण** (प्रा. वि.) मनाचें रंजन करणारें; (स्त्री.) करमणूक.
**रजस्वला** (सं. स्त्री.) विटाळशी, ऋतुमती.
**रजा** (अर. स्त्री.) सुटी, परवानगी; नोकरीवरून दूर करणें.
**रजाई** (फा. स्त्री.) लेप; आंत कापूस भरलेलें ऊबदार जाड पांघरूण.
**रजातलबेंत राहणें** हुकमतींत किंवा आज्ञेंत राहणें; हुकूम पाळण्यास तत्पर राहणें.
**रजावंती, रजावंदी** (हिं. फा. रजावंती स्त्री.) मर्जी, संमति, परवानगी.
**रजावंतीनें** खुषीनें, संमतीनें.
**रंजित** (वि.) आनंदित; प्रसन्न. [नोंदणें.
**रजिस्टर** (इं. न.) नोंदवही. **र० करणें**—
**रंजी** (स्त्री.) वैताग; कंटाळा; त्रास.
**रंजीस** (फा. वि.) त्रासलेला, खिन्न. **रं० येणें** —मट्टचास येणें.
**रजोगुण** (सं. पु.) सत्त्व, रज, तम या तीन गुणांपैकीं दुसरा; कामक्रोधादि मनोविकार या गुणाच्या प्राबल्यानें उत्पन्न होतात.

**रजोगुणी**(सं. वि.) ज्यामध्यें रजोगुण प्रधान आहे तो.
**रजोदर्शन** (सं. न.) ऋतुप्राप्ति, न्हाण.
**रज्जव** रजव पहा.
**रज्जु** (सं. पु.) दोरी.
**रटणें** (क्रि.) रडणें; टकळी लावणें, घोकणें.
**र ट फ करणें** अडखळत वाचणें.
**रटमट** (प्रा. स्त्री.) हुरहुर.
**रटरट** (स्त्री.) पाणी उकळत असतां होणारा आवाज. [ जाड.
**रटाल्या, रटेल** (वि.) धष्टपुष्ट, अगडबंब;
**रट्ट, रठ** (पु.) रोठ, जाड भाकरी; ओबड-धोबड काम.
**रट्टा** (पु.) टोला, तडाखा; कामाची गर्दी.
**रठ, रंठ** (वि.) कठिण, कडक; सोशिक; राठ.
**रड** (सं. रट स्त्री.) रडगाणें, रर.
**रडकथा, रडकहाणी**(स्त्री.) दुःखाची गोष्ट.
**रडका** (वि.) रडणारा, रडचा. [विधुर.
**रंडका**(पु.) उघडा; गरीब, निरुपयोगी;
**रंडकी, रंडकीमुंडकी** (स्त्री.) विधवा.
**रडकी सुरत** नेहमी रडकी मुद्रा; रडकी मुद्रा धारण करणारा; रडचा.
**रडकुंडीस येणें** रडण्याच्या बेतांत येणें.
**रडगाणें** (वि.) रडकथा, दुःखाची गोष्ट.
**रडगाऱ्हाणें** (न.) रडकथा, रडगाणें.
**रंडगोलक** (पु.) गोलक नांवाचा वर्ग व त्यांतील व्यक्ति.
**रडणें** (सं. रुद् क्रि.) शोक करणें.
**रडतखडत** निर्जीवपणें, निःसत्त्व रीतीनें, कष्टानें, मंदपणानें.
**रडतघोडें** (न.) रडता मनुष्य, उत्साह किंवा धमक नसलेला.
**रडतराऊत** (पु.) रडचा मनुष्य. **र० घोड्यावर बसविणें** – ज्याला ज्या गोष्टीची हौस नाहीं त्याला ती गोष्ट करावयास लावणें.
**रडता** (वि.) रडणारा, रडका.
**रडतोंड्या** (वि.) मेषपात्र.
**रडवा** (वि.) रडका; दुःखी, खिन्न, कष्टी.
**रडविणें** (वि.) रडावयास लावणें.
**रंडा** (स्त्री.) विधवा. [खराब गाणें.
**रंडागीत** (सं. न.) विधवेच्या शोकासारखें
**रडारड** (स्त्री.) अनेकांचें एकदम रडणें.
**रडरोई, रडारोवी** (प्रा. स्त्री.) मोठा आक्रोश, आरडाओरडा(तुका० ३६९८).
**रडी, रड्डी** (स्त्री.) खेळांत चिडणें किंवा खोटें खेळणें.
**रंडी** (सं. रंडा स्त्री.) वेश्या; कसबीण.
**रंडीबाज** (वि.) बाहेरख्याली.
**रंडीबाजी** (स्त्री.) बाहेरख्यालीपणा.
**रडीवाल** (प्रा. वि.) चिरडीस जाणारा.
**रडू, रडें** (न.) रडणें. [फसवणूक.
**रड्डी** (स्त्री.) रडणें; चीड, खेळांतली
**रड्या** (वि.) सर्वदा रडणारा; उत्साह-हीन; मंदगतीनें चालणारा. [मैदान.
**रण** (सं. पु. न.) युद्धभूमि; युद्ध; वाळूचें
**रणकंदन** (न.), **रणखंदाळी** (स्त्री.) तुंबळ युद्ध, दाणादाण, नाश.
**रणकुदळ** (वि.) भांडखोर. [ कत्तल.
**रणखंदळ** (स्त्री. न.) दाणादाण; नाश,
**रणखुदळ** (सं. रणकृंतन न.) रणकंदन; जंगी युद्ध.
**रणगंभीर** (सं. वि.) युद्धाच्या वेळीं न डगमगणारा; धीराचा; (पु.) लढाईंत तोफा किंवा जंगी युद्ध.
**रणगाडा** (पु.) लढाईंत तोफा किंवा दारूगोळा वाहून नेणारा गाडा.
**रणझुंजार** (पु.) पराक्रमी; शूर. [प्रयत्न.
**रणघाई** (स्त्री.) जोराचा, घाईचा व नेटाचा
**रणघाल्या** (वि.) ऐन वेळीं अवसान सोड-णारा; अवसानघातकी.
**रणढोल** (पु.) युद्धांतली नौबत.
**रणतुंबळ** (न.) घनघोर युद्ध.
**रणतुरा** (पु.) युद्धांत विजयी झाल्याचें चिन्ह म्हणून पागोट्यांत खोचण्याचा तुरा.
**रणतूर्य** (सं. न.) रणवाद्य.
**रणधीर** (सं. वि.) रणगंभीर पहा.
**रणधुमाळी** (स्त्री.) युद्धाची गडबड, युद्धांतला धुमाकूळ.
**रणनवरा** (पु.) शूर व उत्साही वीर.
**रणफंदी** (पु.) लढवय्या (होना० पृ० १८७).
**रणभूमि** (सं. स्त्री.) युद्धस्थल.
**रणभेरी** (सं. स्त्री.) युद्धप्रसंगीं वाजणारा डंका.

**रणमंडळ** (सं. न.) एक प्रकारचा व्यूह; रणभूमि.
**रणमर्द** (वि.) शूर.
**रणमोहरें** (न.) रणवाद्य.
**रणरंग** (सं. पु.) युद्धाचें भीषण स्वरूप.
**रणरण**(स्त्री.) मध्यान्हींची भयंकर उष्णता.
**रणरणणें** (क्रि.) अतिशय उष्णता वाटणें, उकडणें; तप्त होणें.
**रणवटी** (प्रा. स्त्री.) रणांगण (वामन-विराट० ७।११). [ वाद्य.
**रणवाद्य** (सं. न.) युद्धप्रसंगीं वाजविण्याचें
**रणशिंग** (सं. रणशृंग न.) रणाच्या वेळीं योद्धयांना बोलावण्यासाठीं वाजवितात तें शिंग. [ वीर.
**रणशूर** (सं. वि.) युद्धांत माघार न घेणारा
**रणशौंड** (सं. वि.) युद्धकलानिपुण; विक्रमशाली.
**रणसज्जा** (सं. स्त्री.) युद्धकाळचा पोशाख; समरशोभा.
**रणस्तंभ** (सं. पु.) युद्धाच्या वेळीं दोन्ही पक्षांच्या सैन्यांच्या सीमेवर उभारतात तो स्तंभ.
**रणक्षेत्र** (सं. न.) रणभूमि.
**रणांगण** (सं. न.) युद्धभूमि.
**रत** (सं. वि.) अनुरक्त, रममाण, निमग्न; (न.) मैथुन.
**रतणें** (प्रा. वि.) रमणें; संभोगणें.
**रतन** (सं. रत्न न.) रत्न.
**रतनबाव** (स्त्री.) पाण्याच्या प्रवाहाचें आणिलेलें पाणी; पाणी साचविण्यासाठीं खोदलेली खाच.
**रतल** (अर. पु.) अर्ध्या शेराचें वजन.
**रताळी** (स्त्री.), **रताळू**, **रताळें** (न.) एक कंद.
**रति** (स्त्री.) मदनाची स्त्री; प्रीति; आसक्ति; क्रीडा, मथुन; सद्दी; नशीब.
**रतिवंत** (वि.) भाग्यशाली, दैववान्.
**रतिसुख** (सं. न.) संभोगजन्य सुख.
**रती** (सं. रक्तिका स्त्री.) हिरे, मोत्यें वजन करण्याचें एक वजन; दैवदशा.
**रतीब** (अर. रतब पु.) खुराक; उकाडा; नेमलेलें खाणें देणें इत्यादि.

**रत्तल** रतल पहा.
**रत्न** (सं. न.) मणि; मोलवान् वस्तु.
**रत्नखचित** (सं. वि.), **रत्नजडित** (वि.) हिरे माणकें इ० रत्नें वसविलेलें; जडावाचें.
**रत्नत्रय, रत्नत्रितय** (सं. न.) जैन धर्मीतलीं सम्यकदृष्टि, सम्यकज्ञान् व सम्यक्चारित्र्य हीं तीन अमोलिक तत्त्वें.
**रत्नदीप** (सं. पु.) दिव्यासारखा लखलखीत प्रकाश देणारें रत्न.
**रत्नपारखी** (वि.) रत्नाची परीक्षा करणारा.
**रत्नसानु** (सं. पु.) सुमेरु पर्वत.
**रत्नाकर** (सं. पु.) रत्नांची खाण; समुद्र.
**रत्नाभरण** (सं. न.) जडावाचे अलंकार.
**रत्नी** (स्त्री.) माकडाच्या तमाशांत माकडीला दिलेली संज्ञा.
**रथ** (सं. पु.) गाडी, वाहन.
**रथ्या** (सं. स्त्री.) हमरस्ता; राजमार्ग.
**रथसप्तमी** (सं. स्त्री.) माघ शु. ७.
**रथी** (स. पु.) रथांत बसून लढणारावीर.
**रथोत्सव** (सं. पु.) देवाची मूर्ति रथांत बसवून तिची थाटानें मिरवणूक काढण्याचा ठराविक समारंभ.
**रथोत्साह** (सं. पु.) रथोत्सव पहा.
**रथोद्धता** (सं. स्त्री.) एक वृत्त. याच्या चरणांत ११ अक्षरें व र, न, र, हे गण असून शेवटीं लघु व गुरु अशीं दोन अक्षरें असतात.
**रद, रदन** (सं..पु.) दांत.
**रद** (वि.) नामंजूर, काढून टाकलेलें, रद्द.
**रदकर्जी** (फा. स्त्री.) कर्जाची फेड.
**रदन** (सं. पु.) दांत.
**रदबदल, रदबदली** (स्त्री.) एखाद्या गुन्हेगाराच्या वतीनें घातलेली भीड.
**रद्द, रद्दबातल** (अर. रद वि.) निरुपयोगी झालेला, काढून टाकलेला.
**रद्दा** (पु.) माती, शेण इ० चा तुडवून तयार केलेला गारा किंवा चिखल.
**रद्दी** (स्त्री.) निरुपयोगी झालेल्या कागदांचा समुदाय; (वि.) रद्द.
**रंध** (पु. स्त्री.) पू; लस.
**रंधणें** (क्रि.) रंधा फिरविणें; कीस काढणें.

**रंधन** (सं. न.) स्वैंपाक करणें, शिजविणें, रांधणें. [ रडकुंडीस आणणें.
**रंधवणें, रधविणें** (क्रि.) त्रास देणें;
**रंधा** (फा. पु.) लाकूड साफ करण्याचें हत्यार. [ करण्याचें हत्यार.
**रंधागोल** (पु.) लाकडाची कड गोल
**रंधागोलची** (स्त्री.) गोल वस्तु किंवा लाकडाची कड रंध्यानें साफ करणें.
**रंध्र** (सं. न.) छिद्र; न्यून, दोष.
**रंध्रान्वेषण** (सं. पु.) न्यून पाहणें.
**रंध्रान्वेषी** (सं. पु.) न्यून पाहणारा.
**रपका** (पु.) चापट; मऊ पदार्थाचा आघात. [ बलात्कार करणें; रगडणें.
**रपाटणें** (क्रि.) त्वरेनें करून टाकणें;
**रपाटा** (पु.) तडाखा, सपाटा.
**रपाटून** (अ.) रगडून, सपाटून.
**रपारपी** (स्त्री.) चेंडू पाठींत मारून खेळावयाचा खेळ. [ घसरती जागा.
**रपेट** (हिं. स्त्री.) व्यायाम; सहल;
**रपोट** (इं. पु.) अहवाल; वृत्तान्त.
**रफरफ** (स्त्री.) अत्यंत अव्यवस्था; नाश.
**रफा** (अर. पु.) चिवडा; विचका.
**रफाकत, रफीकत** (अर. स्त्री.) स्नेह; मैत्री.
**रफातफा, रफादफा** (अर. स्त्री.) चिवडा-चिवड, गोंधळ, खिचडी.
**रफायत, रफाहियत** (अर. स्त्री.) भरभराट.
**रफिक, रफी** (अर. पु.) स्नेही, मित्र.
**रफू** (फा. पु. स्त्री.) वस्त्राचें छिद्र बुज-विण्यासाठीं त्यांत तुणलेलें सूत; रेशीम किंवा लोकर.
**रफूगार** (फा. रफूगर पु.) रफू करणारा.
**रफूत** (अर. पु.) व्यासंग, संवय.
**रफ्त** (अर. पु.) चाल; रीत.
**रब** (फा. स्त्री.) चाल; रीत; प्रभू.
**रबका** (पु.) रपाटा.
**रबडगा** (पु.) कामाची गर्दी.
**रबडा** (पु.) चिखल, गारा.
**रबडी** (स्त्री.) आटविलेलें दूध, बासुंदी.
**रबर** (इं. न.) एक प्रकारच्या झाडाच्या चिकापासून होणारा स्थितिस्थापकत्व-गुणविशिष्ट पदार्थ. [ डौल.
**रबाब** (अर. रुआब पु.) दरारा, थोरपणा,

**रब्बा** (पु.) अफू तयार करतांना बाहेर येणारा पदार्थ.
**रबिलाखर** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा चौथा महिना. [ तिसरा महिना.
**रबिलावल** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा
**रबी, रब्बी** (अर. न.) गहूं, शाळू इ० मागाहूनचीं पिकें.
**रबूक** (वि.) विशाल, विपुल. [ व्यासंग.
**रबेता** (अर. रफ्त पु.) राबता, संवय,
**रंभा** (सं. स्त्री.) स्वर्गीची एक अप्सरा; केळीचा गाभा; (पु). कातडें कापण्याचें हत्यार; गवत काढण्याचें खुरपें.
**रंभानंदन** (प्रा. पु.) कापूर (राम० १४।१७६).
**रंभापुतळी** (स्त्री.) खुरपें. [ नववा महिना.
**रमजान** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा
**रमढोल** (वि.) विशाल, प्रचंड. [पुरुष; पति.
**रमण** (सं. पु.) रममाण होणें; उपभोक्ता
**रमणा** (पु.) चोहोंबाजूनीं आवृत क्रीडा-स्थान; दक्षिणा वांटण्याची जागा; कोंडी.
**रमणी** (सं. स्त्री.) स्त्री, सुंदरी.
**रमणीक, रमणीय** (सं. वि.) आनंददायक.
**रमणीयता** (सं. स्त्री.) मनोहरत्व. [ रंजन.
**रमणूक** (स्त्री.) चैनीखातर फिरणें, मनो-
**रमणें** (क्रि.) आसक्त होणें; खेळणें, उप-भोग घेणें; रंगाळणें.
**रमता राम** फिरस्ता, गोसावी.
**रममाण** (सं. वि.) रमणारा, आसक्त.
**रमराट** (सं. रामराष्ट्र न.) प्रचंड रास; खरकटें वगैरेचा ढीग.
**रमल** (अर. न.) रेतीवर किंवा कागदावर काढलेल्या रेघांवरून अथवा फाशां-वरून शकुन पाहण्याची विद्या.
**रमविणें** (क्रि.) रंजन करणें; रंजविणें.
**रमा** (सं. स्त्री.) लक्ष्मी; शोभा.
**रमाकांत, रमानाथ, रमानायक, रमापति** (सं. पु.) श्रीविष्णु.
**रमात करणें** (क्रि.) यद्दृवारी घालविणें.
**रमारम, रमारमी** (स्त्री.) बेतास बेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी.
**रमी** (इं. स्त्री.) तीन तीन पानांचा क्रम लावून खेळण्याचा पत्त्यांचा खेळ.

**रमुजी** (अर. रमूज वि.) विनोदी, गमती.
**रमूज** (अर. स्त्री.) गंमत, विनोद.
**रम्य** (सं. वि.) रमणीय, सुंदर.
**रय** (सं. पु.) वेग.
**रयत** (अर. स्त्री.) प्रजा; शेतकरी.
**रयतवारी** (स्त्री.) प्रत्येक कुळाशीं साऱ्याविषयींचा निरनिराळा करार करण्याची पद्धति. [ सरकारी कर.
**रयतावा** (पु.) प्रजा; कुळें; कुळावरचा
**रया** (स्त्री.) किंमत, योग्यता, गुण (तुका० २२८९); मान.
**रयात** (स्त्री. अने.) रयत, शेतकरी.
**रयात**(अर. स्त्री.)क्षमा; माफी, सूट; देणगी.
**रयाळ** (स्पॅ. रियल पु.) एक चांदीचें नाणें.
**रर** (स्त्री.) रडगाणें. [ ओळ; रीघ.
**रव** (सं. पु.) स्वर; नाद; कीर्ति; रांग;
**रवका** (पु.) गोळा. [ गडवड.
**रवखंदळ** (स्त्री. न.) मानहानि; कत्तल;
**रवण** (स्त्री. न.) ओळ, रांग.
**रवंथ**(सं. रोमंथ पु. न.)आपलें खाद्य सरासरी चावून गिळल्यानंतर पुनः तें तोंडांत आणून चघळीत बसण्याचा पशूंचा व्यापार.
**रवंदळ, रवंदळी** (स्त्री.), **रवंदळा** (पु.) तुडविलें जाणें; चुराडा,नाश, दाणादाण.
**रवंदळणें** (क्रि.) तुडविणें, घुसळणें.
**रवंदा** (पु.) वाळलेला पाचोळा.
**रवरव** (स्त्री.) वारीक झणझण; (अ.) गर्दी करून, पुष्कळ.
**रवरव किडे** किड्यांचा वुजका.
**रवळणें** (न.) सोनाराचा एक ठसा.
**रवळिया** (प्रा. स्त्री.) एक क्षुद्र दैवत.
**रवा** (पु.) वारीक सांजा; दाणेदार पीठ; कण; दाणा; खडा; रंगविलेलें हळकुंड.
**रवा काढणें**—दिव्य करून तापलेल्या तेलांत हात घालून धातूचा तुकडा काढणें.
**रवानगी** (फा. स्त्री.) पाठवणी.
**रवानगीचिठ्ठी** (स्त्री.) परवानगी.
**रवाना** (फा. अ.) मार्गस्थ, निघालेला; (पु.) परवाना.
**रवासुदगी** (फा. रवासुद स्त्री.)सरकाराशीं झालेले करार वगैरे दस्तऐवज.
**रवाळ** (वि.) दाणदार. [ हत्यार.
**रवाळें, रवाळणें** (न.) सोनाराचें एक
**रवि** (सं. पु.) सूर्य; रुईचें झाड.
**रविमंडळ** (सं. न.) सूर्याचें विंब.
**रविवार** (सं. पु.) आदितवार.
**रविवासर** (सं. पु.) रविवार.
**रविसंक्रमण** (सं. न.) सूर्याचें कोणत्याही राशींतून विशेषतः मकरराशींतून जाणें.
**रवी**(स्त्री.) दहीं घुसळण्याचें काष्ठ-यंत्र; गुन्हाळावरील अकरा माणसांचा समूह.
**रवेस** (फा. रवेश स्त्री.) रीत, पद्धत.
**रशना** (सं. स्त्री.) दोरी; कमरपट्टा.
**रश्मि** (सं. पु.) प्रकाश, किरण.
**रश्शी** (सं. रश्मी स्त्री.) दोरी.
**रश्शीखेंच** (हिं. पु.) 'टग ऑफ वॉर' या नांवाचा इंग्रजी खेळ; दोरखेंची.
**रशेला** (हिं. रसीला वि.) रसभरित.
**रस** (सं. पु.) द्रव पदार्थ; रुचि, चव; जीभ; प्रीति; गोडी; अंतःकरणवृत्तीचें उत्कट होणें; शृंगार, वीर, करुण, हास्य, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्भुत व शांत हे नऊ रस; पारा; गंधक; पाणी.
**रसकस** (प्रा. स्त्री.) रसज्ञता (भा० १०।५३८); भांडण; कौमार्याचा वहार; ताप चढण्यापूर्वी अंगावर येणारे शहारे.
**रसकसणें** (क्रि.) तापाचीं पूर्वचिन्हें वाटू लागणें.
**रसकापूर** (पु.) एक औषध.
**रसग्रहण** (न.) रसाचा आस्वाद घेणें.
**रसघस** (स्त्री.) घासाघीस, जिकीर; भांडण.
**रसडी** (फा. स्त्री.) दोरी.
**रसद** (फा. स्त्री.) सैन्यासाठीं दाणा गल्ला वगैरे; गांवच्या वसुलाचा सरकारांत भरणा; (सं. पु.) मेघ.
**रसना** (सं. स्त्री.) जीभ; चव. [ इंद्रिय.
**रसनेंद्रिय** (सं. न.) जीभ; चव घेण्याचें
**रसपूजा** (सं. स्त्री.) औषधाबद्दलची किंमत (भा० ११।१०४५); वैद्याची फी.
**रसभरित** (सं. वि.) रसानें भरलेलें, चटकदार.
**रसभरू** (वि.) रसाळ.

नगर वाचनालय, सातार



**रसरंग** (पु.) मकरसंक्रान्तीच्या दिवशींचें बायकांचें हळदकुंकू.
**रसरशीत** (वि.) प्रज्वलित, तापलेलें.
**रसरसणें** (क्रि.) रसानें भरलेलें असणें; तापणें; ज्वानींत येणें; आवेशांत येणें.
**रसवंती** (सं. स्त्री.) वाणी.
**रसविक्रय** (सं. पु.) दहीं, लोणी, तूप, मीठ इत्यादि पदार्थांची विक्री.
**रससिंदूर** (सं. पु.) पारा, गंधक व नवसागर यांचें रसायन.
**रससोय** (स्त्री.) स्वयंपाक (अमृ० ५।४३).
**रसज्ञ** (सं. वि.) रसिक, मर्मज्ञ.
**रसा** (पु.) पुष्कळ रस असलेली भाजी; (सं. स्त्री. ) पृथ्वी.
**रसातळ** (सं. न.) पाताळ. **रसातळास किंवा रसातळीं जाणें**—बुडणें, नाश पावणें.
**रसानगी** (फा. वि.) जासुदाच्या हातीं पाठविलेलें.
**रसाधिपति** (सं. पु.) वरुण.
**रसायण, रसायन** (सं. न.) जरा व व्याधि दूर करणारें औषध; भस्म केलेल्या धातूची मात्रा.
**रसायनविज्ञान** (न.) रसायन शास्त्र.
**रसायनाकर्षण** (सं. न.) दोन अथवा अधिक तत्त्वांस एकत्र करून नवीन पदार्थ उत्पन्न करणारी व त्या नव्या पदार्थांतल्या तत्त्वांस पुन: निराळें होऊं न देणारी शक्ति.
**रसाल, रसाळ** (सं. वि.) रसभरित, चवदार, गमतीचें.
**रसिक** (सं. पु.) चवदार; मर्मज्ञ, सहृदय.
**रसिकरसोला** (वि.) रसाचा खरा खरा भोक्ता; इष्कबाज.
**रसीद** (इं. रिसीट स्त्री.) पावती.
**रसूम** (अर.पु.) जिल्हाधिकाऱ्यांचा हक्क; फी; कमिशन.
**रसूल** (अर. पु.) प्रेषित; पैगम्बर.
**रसोई** (फा. स्त्री.) स्वैंपाक.
**रस्त** रसद पहा.
**रस्ता** (फा. पु.) मार्ग, वाट.
**रस्तेबंदी** (स्त्री.) रस्ते करण्याचें किंवा त्यांच्या दुरुस्तीचें काम.
**रस्तोरस्तीं** (अ.) प्रत्येक रस्त्यावर.
**रस्सा** (हिं. पु.) दोरखंड; रसा पहा.
**रस्सी** (हिं. स्त्री.) दोरी.
**रहणी** (स्त्री.) रहाणी; वर्तन; फेरफटका; कामाची पद्धत. [ वहिवाट.
**रहदारी** (फा. स्त्री.) येण्याजाण्याची
**रहंवर** (प्रा. पु.) रथ (रुक्मि० १०।४१).
**रहवास** (पु.) दळणवळण; वस्ती; व्यवहार; रिवाज.
**रहसाळी** (स्त्री.) रहस्य, दृढ मैत्री.
**रह:स्थान** (सं. न.) गुप्त जागा; एकांत जागा. [भाव; विनोद.
**रहस्य** (सं. न.) मर्म, खुबी; गूढ; सख्य-
**रहस्यकथा** (स्त्री.) गुप्त हेरांच्या साहसकृत्यांनीं किंवा अद्‌भुत घटनांनीं भरलेली गोष्ट.
**रहस्यभेद** (सं. पु.) गुप्त गोष्ट फोडणें, तिची माहिती करून देणें.
**रहस्योद्‌ग्राही** (सं. वि.) साहित्याचें सौंदर्य व मर्म प्रगट करून देणारी (टीका).
**रहा** (फा. स्त्री.) तऱ्हा, रीत.
**रहाट** (सं. अरघट्ट पु.) पाणी काढण्याचें, सूत काढण्याचें इ० चक्रयंत्र; चिखल.
**रहाटगाडगें** (न.) ज्याला जलपात्रांची माळ लाविलेली असते व तीं जलपात्रें क्रमानें भरून वर येतात व रिकामीं होऊन खालीं जातात अशा प्रकारचा रहाट. [ अंगवळणीं पडणें.
**रहाटणें** (क्रि.) अभ्यास किंवा संवय होणें,
**रहाटपाळणा** (पु.) यात्रेंत चार पाळणे बांधलेलें फिरतें चक्र उभारतात तें.
**रहाटी** (सं. अरघट्ट स्त्री.) पायानें चालविण्याचा लहान रहाट; अंबराई; प्रघात; राहणी; चिखलाचें डबकें; चिखल.
**रहाड, रहाडी** (स्त्री.) पातळ चिखल.
**रहाडा** (पु.) रगाडा, गर्दी, गडबड.
**रहाण** (न.) अंगांत देव किंवा पिशाच आणणें; घोळ, गोंधळ. [ तऱ्हा.
**रहाणी** (स्त्री.) चाल, वागणूक, राहण्याची

**रहाणें** (क्रि.) राहणें पहा.
**रहावास्त** (फा. वि.) योग्य, सरळ,रास्त.
**रहाळ** (स्त्री.) प्रांत; प्रदेश.
**रहाळ** (पु. स्त्री.), **रहाळी** (स्त्री.) घरोवा, दाट परिचय; गर्दी; दाटी; प्रांत; प्रदेश.
**रहाळणें** (क्रि.) परिचय होणें; संवय होणें.
**रहाळसहाळ, रहाळसाळ** (वि.) खुल्या दिलाचा, मोकळा.
**रहित** (सं. वि.) वर्जित, शून्य.
**रहिवास** (पु.) राहणें, वसति; सहवास.
**रहिवासणें** (क्रि.) राहणें, स्थिर होणें.
**रहिवासी** (पु.) राहणारा, स्थायिक.
**रही** (स्त्री.) रव, रांग, ओळ, पादरज (अनंत ५९).
**रहीत** (वि.) बाकी, अवशिष्ट; न करण्याचें.
**रहीम** (फा. पु.) कृपावंत; परमेश्वर.
**रळपळ, रळफळ** (प्रा. स्त्री.) गोंधळ; थट्टा, भांडण.
**रळि, रळिया, रळी** (स्त्री.) लडिवाळपणानें धरलेला हट्ट; (प्रा.) विनोद; व्यंग्योक्ति.
**रक्षक** (सं. पु.) रक्षणकर्ता.
**रक्षण** (सं. न.) राखणें, सांभाळ.
**रक्षणीय** (सं. वि.) रक्षण करण्यास पात्र.
**रक्षणें** (क्रि.) राखणें, संभाळणें.
**रक्षा** (सं. स्त्री.) सांभाळ, राखी, राख; रखेली; ठेवलेली स्त्री.
**रक्षापुत्र** (पु.) दासीपुत्र.
**रक्षाबंधन**(सं. न.)राखी-पौर्णिमेच्या दिवशीं हातांत राखी बांधावयाची क्रिया.
**राई** (सं. राजि स्त्री.) झाडी; (सं. राजिका स्त्री.)मोहरी;राधा. **राईचा पर्वत करणें**–फुगवून सांगणें, अतिशयोक्ति करणें.
**राउटी** (स्त्री.) राहुटी.
**राउळ, राऊळ** (प्रा. पु.) देव, राजा; पहाटे मोठा त्रिशूळ घेऊन दोहरा म्हणत भीक मागणारा भिकारी; (न.) राजमंदिर; देऊळ.
**राऊ** (पु.) राजा.
**राऊत** (पु.) घोडेस्वार.
**राओ** (पु.) राजा.

**राकट** (वि.) बळकट, कणखर.
**राका** (सं. स्त्री.) पूर्णिमा.
**राकेल** (इं. रॉक-ऑईल न.) खनिज तेल.
**राख** (सं. रक्षा स्त्री.) भस्म, राखुंडी; बाळगलेली वेश्या.
**राखडी** (स्त्री.) स्त्रियांचें एक केशभूषण.
**राखण** (सं. रक्षण स्त्री.) पहारा; पिशाचाचा बंदोबस्त; राखणावळ.
**राखणदार, राखणा, राखणाईत** (पु.) पहारेकरी; गुरें राखणारा. [संभाळणें.
**राखणें** (सं. रक्ष् क्रि.) रक्षण करणें;
**राख-रांगोळी** (स्त्री.) जाळून पोळून केलेला सत्यानास. [पत.
**राखले** (गुज. स्त्री.)हुंडी विकत घेणाराची
**राखवड, राखवडा** (स्त्री.) राखेचा ढीग. [राख.
**राखाड, राखाडी** (स्त्री.) राखेचा ढीग,
**राखी** (स्त्री.) श्रावण शु० १५ च्या दिवशीं हातांत बांधतात तो रेशमाचा सालंकृत दोरा. [शु०१५.
**राखीपुनव, राखी पौर्णिमा** (स्त्री.) श्रावण
**राखुंडा** (पु.) राखेचा ढीग; जन्मतः वरचा ओठ चिरलेला मनुष्य.
**राखुंडी** (स्त्री.)गोवरीच्या राखेचा ढेपसा.
**राखोटी** (स्त्री.) राख.
**राखोंडें** (प्रा. वि.) ओठतुटकें.
**राखोळा** (पु.) पाठराखणा.
**राख्या** (पु.) स्त्रीनें ठेविलेला यार.
**राग** (सं. पु.) संताप, क्रोध; प्रीति; तांबडा रंग; स्वरांची विशेष प्रकारची रचना. [मुख्य रागः—श्री, वसंत, भैरव; पंचम, मेघ-मल्हार, व नटनारायण; यांशिवाय इतरहि पुष्कळ राग गायनावरील ग्रंथांत सांगितले आहेत. त्यांतील ठळक नांवें—विभास, खट, सारंग, कल्याण, बिहाग, केदार, कानडा, कालिंगडा, देस, बसंत, मल्हार, मालकंस, खमाज, ललत, शंकराभरण इ०.]
**रांग** (स्त्री.) ओळ; समान दर्जा.
**रांगडा** (प्रा. वि.) अडाणी; (पु.) माळव्यांतला रहिवाशी.
**रांगण** (न.) कुंभाराच्या भट्टींतली राख.

**रांगणें** (सं. रिंग् क्रि.) हात व गुडघे टेकून चालणें.

**रागमाला, रागमालिका** (सं. स्त्री.) निरनिराळया रागांत म्हणतां येण्यासारखें पद्य; एक वाद्य.

**रागरंग** (पु.) बरेंवाईट स्वरूप.

**रागवागा** (प्रा. स्त्री.) घोड्याला चाल शिकविण्यासाठीं बांधलेले दोर (भा० २०।२१६).

**रागावणें** (क्रि.) संतापणें, क्रोध येणें.

**रागिणी** (सं. स्त्री.) अनुरक्त स्त्री; गायनांतले मिश्र किंवा पोटराग. [गायनशास्त्रांत अनेक रागिण्यांचीं नांवें दिलीं आहेत. त्यांतील मुख्यः—— आसावरी, धनाश्री, मुलतानी, रामकली, गौडी, काफी, वागेसरी, झिंझोटी, तोडी, वहिरवी इत्यादि.

**रागिष्ठ** (वि.) कोपिष्ठ, संतापी, तामसी.

**रागी** (सं. वि.) आसक्त.

**रागी** (सं. स्त्री.) नाचणी नांवाचें धान्य.

**रागीट** (वि.) संतापी, तामसी.

**रागीसांडी** (प्रा. वि.) विषयासक्त.

**रागेजणें** (प्रा. क्रि.) रागावणें.

**रांगोळी** (सं. रंगवल्लिका स्त्री.) शिरगोळ्याची पूड; तिनें काढलेलें चित्र.

**रांगोळें** (न.) रांगोळी काढण्याचें सच्छिद्र नलिकायंत्र.

**राघव** (सं. पु.) रघूच्या वंशांत जन्मलेला—विशेषतः श्रीरामचंद्र. **रा०दास लाडू** (पु.) —— खवा; साखर, रवा इत्यादींचा तयार केलेला लाडू.

**राघावली** (स्त्री.) घोड्याच्या पाठीवरची जाळीदार झालर.

**राघू** (पु.) पोपट, तोता.

**राघोडा** (पु.) कर्जाऊ घेतलेल्या रकमेंवर व्याज म्हणून हंगामावर देऊं केलेलें धान्य.

**राज** (पु.) गवंडी; बेलदार.

**राजकारण** (सं. न.) राज्यासंबंधाचे प्रश्न किंवा गुप्त मसलत.

**राजकारणी** (वि.) मुत्सद्दी, मसलतींत कुशल.

**राजकारस्थान**(न.)राजकारणी मसलती व०

**राजकी** (स्त्री.) राजाच्या जुलूम. [विषयक.

**राजकीय** (सं. वि.) राजासंबंधीं, राज्य—

**राजकुल** (सं. न.) राजघराणें, राजवंश.

**राजगिरा** (पु.) एक तृण व त्याचें बीं.

**राजचिन्ह** (सं. न.) राजाचें छत्रचामर इत्यादि वैभव; शिक्का.

**रांजण** (पु.) डेरा. [झालेला फोड.

**रांजणवाडी** (स्त्री.) डोळयाच्या पापणीला

**राजणें** (क्रि.) शोभणें; प्रकाशणें.

**राजत्व** (सं. न.) राजपद, राजाधिकार.

**राजद्वार** (सं. न.) राजाची न्यायसभा; राजवाड्याचें दार. [नगरी.

**राजधानी** (सं. स्त्री.) राजाची राहण्याची

**राजनीति** (सं. स्त्री.) राजव्यवहारशास्त्र.

**राजन्य** (सं. पु.) क्षत्रिय. [लोकसभा.

**राज्यपरिषद** (स्त्री.) भारताची वरिष्ठ

**राजप्रमुख** (पु.) विलीनीकृत संस्थानें मिळून झालेल्या घटक राज्याचा राजवंशीय प्रमुख. [घराण्यांतला.

**राजबनसी** (सं. राजवंशी वि.) राज-

**राजबिंडा** (पु.) सुंदर व तेजस्वी मनुष्य.

**राजबिंदी** (प्रा. स्त्री.) राजमार्ग.

**राजभवन** (न.) राष्ट्रपति किंवा राज्यपाल यांचें राहण्याचें ठिकाण

**राजभोग** (सं. पु.) सरकारचा हक्क.

**राजमान्य** (सं. वि.) राजानें मान देण्यासारखा. [रस्ता.

**राजमार्ग** (सं. पु.) मोठा रुंद व रहदारीचा

**राजमुद्रा** (सं. स्त्री.) राजाचें शिक्कामोर्तब; राजाच्या छापाचें नाणें.

**राजयक्ष्मा** (सं. पु.) क्षयरोग.

**राजयोग** (सं. पु.) राज्य मिळवून देणारा पत्रिकेंतला ग्रहयोग; प्राणनिरोध वगैरे न करतां भगवद्रूपीं चित्ताची एकाग्रता करण्याचा एक उपाय.

**राजराजेश्वर** (सं. पु.) सम्राट्, बादशहा.

**राजराणी** (स्त्री.) पट्टराणी. [पणें.

**राजरोस** (सं. राजा + फा. रोशनअ.)उघड-

**राजर्षि** (सं. पु.) तपस्वी क्षत्रिय.

**राजवर्खी बांगडी** (स्त्री.) एक प्रकारची चकचकीत नक्षीदार बांगडी.

**राजवटा** (पु.) राजवट, राजवटी (स्त्री.) कारकीर्द.
**राजवळ, राजावळी** (प्रा. स्त्री.) राजाचा शिक्का (ज्ञा० १७।३२२).
**राजवाडा** (सं. राजवाटी पु.) राजमंदिर.
**राजविद्या** (स्त्री.) श्रेष्ठविद्या. [भोगणारा.
**राजविलासी** (सं. वि.) राजासारखीं सुखें
**राजवैद्य** (सं. पु.) उत्तम वैद्य.
**राजशासन** (सं. न.) राजाची आज्ञा.
**राजश्रिया विराजित** (सं. वि.) राजाच्या वैभवानें अलंकृत; पत्राचा मायना.
**राजस** (वि.) सुकुमार असून सुंदर; रजोगुणी.
**राजसभा** (सं. स्त्री.) दरबार.
**राजसी** (सं. वि.) राजकीय थाटाचें; रजोगुणयुक्त. [करावयाचा यज्ञ.
**राजसूय** (सं. पु.) सार्वभौम राजानें
**राजहंस** (सं. पु.) चोंच आणि पाय तांबडे व वर्ण पांढरा असा व दूध व पाणी एकत्र केलीं असतां त्यांतून दूध तेवढें काढण्याची शक्ति असलेला एक पक्षी; लावण्यांतला नायक.
**राजा** (सं. पु.) नृप, नृपति, भूप; समासोत्तर पदांत 'राज' असें होतें; त्याच अर्थ श्रेष्ठ. [चौक.
**राजांगण** (सं. न.) राजवाड्यासमोरचा
**राजांगणें** (न.) चोहोंबाजूंनीं इमारती असून मध्यें असलेली विस्तीर्ण उघडी जागा; मोठा चौक.
**राजाधिराज** (सं. पु.) अनेक मांडलिकांवरचा मुख्य राजा.
**राजावर्त** (सं. पु.) हलका हिरा.
**राजावळ** (स्त्री.) तांदुळाची एक जात; तांबड्या रंगाच्या लुगड्याचा एक प्रकार; वर्षाचा अधिपति कोणता ग्रह आहे तें ज्यांत सांगितलेलें असतें तो पंचांगांतला आधींचा भाग.
**राजी** (सं. राजि स्त्री.) ओळ, पंक्ति; (अर. वि.) खुष; कबूल.
**राजीक** (न.) राजाचा जुलूम.
**राजीनामा** (फा. पु.) कबुली पत्र; नोकरी सोडण्याविषयींचें पत्र.
**राजीबेराजी, राजीकबेराजीक** (स्त्री.) एक राजा गादीवरून दूर झाल्यापासून दुसरा येईपर्यंतचा मध्यंतरींचा काळ.
**राजीरजावंतीनें** संमतीनें, परवानगीनें.
**राजीव** (सं. न.) कमळ; (पु.) पति; प्रियकर. **रा०नयन, रा०लोचन, राजीवाक्ष** (सं. वि.)——कमलनेत्र.
**राजीवनयना** (सं. स्त्री.) सुंदर स्त्री.
**राजू** (सं. रज्जु स्त्री.) दोरी.
**राजेन्द्र** (सं. पु.) राजश्रेष्ठ, राजाधिराज.
**राजेरजवाडे** (पु. अने.) राजे, संस्थानिक, सरदार इत्यादि.
**राजाळें** (न.) केळयाची एक जात.
**राजोटचा** (पु.) कुटुंबांतील कर्ता पुरुष; घरांतील मुख्य कारभारी.
**राज्य** (सं. न.) सत्तेखालचा देश.
**राज्यक्रान्ति** (सं. स्त्री.) राज्याधिकाऱ्यांत व राज्यपद्धतींत जबरदस्तीनें घडवून आणलेली उलथापालथ.
**राज्यघटना** (स्त्री.) राज्याच्या व्यवस्थेसंबंधीं मूलभूत कायद्याची रचना; राज्यशासनाची नियमावलि.
**राज्यपाल** (पु.) भारतांतील घटक प्रांताचा प्रमुख (गव्हर्नर).
**राज्यभार** (सं. पु.) राज्याचा कारभार करण्याची जबाबदारी.
**राज्यांग** (सं. न.) राजा, अमात्य, मित्र, कोश, दुर्ग, राष्ट्र व बल हीं राज्याचीं मुख्य अंगें.
**राज्याभिषेक** (सं. पु.) राजा गादीवर येण्याच्या वेळीं होणारा धार्मिक विधि.
**राज्योपचार** (सं. पु.) सरकारी अधिकाऱ्याचें कृत्य. [कर्कश.
**राठ** (वि.) टणक, दांडगा, रखरखीत,
**राड** (स्त्री.) होळीची खाच; चिखल.
**रांड** (सं. स्त्री.) रंडकी; वेश्या; विधवा.
**रांडका** (पु.) विधुर.
**रांडकाम** (न.) बायकी काम.
**रांडकारभार** (पु.) बायकी कारभार; वेडेपणाचें कृत्य.
**रांडकी** (स्त्री.) विधवा.
**रांडपण** (पु.) वैधव्य.

१५६६ वाचनालय सातारा
अंगणापकीकरण

**रांडपिसा** (वि.) रंडीबाज.
**रांडपोर** (न.) गांवांतल्या बायकापोरें-सुद्धां सर्व लोक; दासीपुत्र.
**रांडबाज** (वि.) रंडीबाज, बाहेरख्याली.
**रांडबाजी** (स्त्री.) बाहेरख्यालीपणा.
**रांडमाणूस** (न.) दुर्बळ स्त्री; भित्रा मनुष्य.
**रांडरळी** (स्त्री.) विधवा.
**रांडरूं** (न.) तिरस्कारानें—विधवा स्त्री.
**रांडरोटी** (स्त्री.) लढाईत पडलेल्या माणसाच्या बायकोस निर्वाहाकरितां दिलेली जमीन.
**रांडलेक** (पु.) रंडापुत्र.
**रांडव** (वि.) मृतपत्नीक, विधुर.
**रांडवडा** (प्रा. पु.) शिवीगाळ (तुका० ३२६५).
**रांडवणें** (प्रा. क्रि.) विधवा होणें.
**रांडवला** (पु.) बायकोच्या शिव्या.
**रांडवांटा** (पु.) वैधव्य.
**रांडसांड** (स्त्री.) विधवा.
**राडा** (पु.) पसारा, कामाची गर्दी; पुष्कळ चिखल; आकांत. [प्रतीचे लोक.
**रांडपोरें** (न. अनें.) समाजांतले हलक्या
**राडी** (प्रा. स्त्री.) धगधगीत निखाऱ्याची खाई (दा० ३।३।४१); चिखल (ज्ञा० १७।१६०).
**राडीवेडी** (प्रा. स्त्री.) धगधगीत निखाऱ्याची खाई.
**राडोळी, रांडोळी** (प्रा. स्त्री.) उपहास (भा० १।३३५); मारामारी, कत्तल (रुक्मि० ६।९); क्रीडा.
**रांड्या, रांड्याराघोजी** (पु.) सर्वदा बायकांत वागणारा; बाईलवुद्ध्या.
**राणवसा** राणीवसा पहा.
**राणसोरू** (पु.) रानडुक्कर (भा० ५।१६७).
**राण्या** (हिं. पु.) राजा; मुख्य.
**राणी** (सं. राज्ञी स्त्री.) राजाची स्त्री.
**राणीराऊत** (पु.), **राणीरउताणी** (स्त्री.) श्रीमंत व दरिद्री हा भेद; श्रीमंती.
**राणीव** (प्रा. स्त्री.) राज्य (मुक्ते० रामा० २।१३); राज्यसुख (एक० १४८८).
**राणीवसा** (पु.) अंतःपुर.

**राणीवो** (प्रा. स्त्री.) राज्य, समृद्धि.
**रात** (सं. रात्रि स्त्री.) रात्र; **रातकिडा** (पु.) रात्रीं किर्र आवाज करणारा एक किडा.
**रातणें** (क्रि.) रममाण होणें.
**रातनबाव** (स्त्री.) रतनबाव पहा.
**रातब** (पु.) रतीब.
**रातबिरात** (स्त्री.) वेळप्रसंग; (अ.) रात्रींबेरात्रीं. [झाड; त्याचें फळ.
**रातंबी** (सं. रक्ताम्र स्त्री.) अमसुलाचें
**रातंबेल** (न.) अमसुलाचें तेल.
**रातवा** (पु.) रात्र; रात्रींचा पाऊस; घोड्याला रात्रीं बाहेर काढणें.
**राता** (वि.) तांबूस रंगाचा.
**रातांधळा** (वि.) ज्याला रात्रीं मुळींच दिसत नाहीं असा.
**रातांधळें** (न.) रात्रीं न दिसावें असा रोग.
**रातावणें** (क्रि.) रात्र होणें.
**राताळूं, राताळें** (न.) एक कंद.
**रातिवळा** (पु.) गुरांच्या पुढें रात्रीं टाकिलेली वैरण.
**राती** (सं. रात्रि स्त्री.) रात्र; अंधार.
**रातीदेवो, रात्रिदेवो** (प्रा. अ.) रात्रंदिवस. [कमळ.
**रातोत्पळ** (सं. रक्तोत्पल न.) तांबडें
**रातोरात** (अ.) रात्रींच्या रात्रींत.
**रात्र, रात्रि** (सं. रात्रि स्त्री.) सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतचा काळ.
**रात्रंदिवस** (अ.) अहोरात्र.
**रात्रि** (सं. स्त्री.) रात्र.
**रात्रिंचर** (सं. पु.) राक्षस, चोर.
**रात्रौ** (अ.) रात्रीं.
**रांधण** (स्त्री.) स्वैंपाक.
**रांधणें** (सं. रंध् क्रि.) शिजविणें, स्वैंपाक करणें; (न.) भाजण्याचें खापर.
**रांधतें घर** स्वैंपाकघर.
**रांधप** (न.) रांधणें; रांधलेले पदार्थ.
**रांधपी** (पु.) स्वैंपाकी.
**रांधवणी** (प्रा. न.) स्वैंपाकांतलें पाणी.
**रांधा** (पु.) शिजवून केलेलें मिश्रण किंवा पाक.
**राधेय** (सं. पु.) राधापुत्र कर्ण.

**रान** ( सं. अरण्य न. ) जंगल, वन. **रान खवळणें**—रागानें किंवा भुकेनें क्षुब्ध होणें; **रान घेणें**—रानांत पळून जाणें; **रिकाम्या रानीं**—कामावांचून.

**रानआंबा, रानकेळी, रानकोंबडा, रानजेवण** इ० शेंकडों शब्दांत रान याचा अर्थ रानांत राहणारें किंवा होणारें असा केला म्हणजे बरोबर अर्थ कळतो. [ रानटी.

**रानट, रानकट, रानवट** (वि.) गांवढळ,

**रानटी** (वि.) जंगली; रीतभात नसलेला, अडाणी.

**रानदांडगा** (पु.) आडदांड; रानटी.

**रानवट** (वि.) रानटी, जंगली, वन्य.

**रानवा** (पु.) लागवडीस न आणलेली पडीत जमीन; जंगल, रान.

**रानशेणी** (स्त्री.) रानांत पडलेलें गाई-म्हशींचें शेण.

**रानसोरु** (प्रा. पु.) रानडुकर.

**रानोमाळ** (अ.) चोहोंकडे पसरलेलें.

**रानोरान** (अ.) जंगलांतून सर्वत्र.

**राप, रांप** (पु.) तुरटपणा. **रापेचा पाऊस**—एकसारखी सतत वृष्टि.

**रांपणें** (क्रि.) भिजूं देणें; काळें पडणें; व्यापणें; अभ्यास होणें; चांचपून पाहणें.

**रांफ** (स्त्री.) राप पहा.

**राब**(स्त्री.) काकवीपेक्षां दाट उंसाचा रांधा (मळी);जमीन भाजणें;जमीन भाजण्यास लागणारें गवत, काडया इ०; तूप किंवा तेल यांच्यांतली बेरी इ०.

**राब** (प्रा पु.) रीत; स्वभाव; आटोकाट श्रम.

**राबड** (स्त्री.) श्रम, कष्ट. [ पातळ गूळ.

**राबडी** (स्त्री.) आटींव दूध, बासुंदी;

**राबणें** (क्रि.) अति श्रम करणें; खपणें; मळली जाणें; संवयीचें होणें.

**राबता** (अर. रफ्त पु.) अभ्यास, संवय; येणारा जाणारांची गर्दी; महाराकडून हक्कानें घेण्यांत येणारें सरकारी काम; किंवा त्या कामाच्या मोबदल्यांत घेण्यांत येणारा पैसा.

**रांबाड** (वि.) भटक्या, स्वच्छंदी, उनाड.

**रांबाडकी** (स्त्री.) उनाडकी.

**राम** (सं.पु.) श्रीरामचंद्र; सामर्थ्य; तथ्य; जीव. **राम म्हणणें**—मरणें; **रामाचें नांव**—अत्यंत अभाव. [ (वस्त्र).

**रामकाठी** (वि.) पांढरें रेशमी कांठ असलेलें

**रामगोळा** (पु.) ताकांत भिजविलेल्या लाह्यांच्या पिठाचा गोळा. [चैत्र शु. ९.

**रामजयंती** (सं. स्त्री.) रामजन्मोत्सव;

**रामटोला** (पु.) विटीदांडूच्या खेळांत खेळणारानें मारलेला पहिला टोला; जोराचा टोला किंवा प्रहार.

**रामठ** (पु.) हिंग.

**रामदासी** (पु.) श्रीसमर्थ रामदास यांनीं स्थापिलेल्या संप्रदायांतला मनुष्य.

**रामनवमी** (सं. स्त्री.) चैत्र शु० ९.

**रामपहारा** (सं. रामप्रहर पु.) सूर्योदयापासून पहिले तीन तास.

**रामपात्र** (सं. न.) कांहीं एका विशिष्ट आकाराचें पाणी पिण्याचें लहान भांडें.

**रामबाण** (वि.) कधीं न चुकणारें, अचूक गुणकारी. [गर्दी.

**रामरगडा, रामरगाडी** (पु.) अतिशय

**रामरट्टा** (पु.) मोठा टोला; अतिशय गर्दी.

**रामरस** (प्रा. पु.) मीठ.

**रामरक्षा** (सं. स्त्री.) रामाचें एक सुप्रसिद्ध स्तोत्र; रामाच्या नाममंत्रानें भारलेली राख.

**रामराज्य** (सं. न.) श्रीरामचंद्रानें केलें तसें अतिशय सुखाचें राज्य.

**रामराम** (पु.) वंदनाचा शब्द. **रा० ठोकणें**—सोडणें.

**रामा** (सं. स्त्री.) सुंदर स्त्री.

**रामायण** (सं. न.) रामकथा; लांबलचक कंटाळवाणी गोष्ट. **ताकापुरतें रा०**—आपलें कार्य साधण्यापुरतें आर्जव.

**रामोशी** (पु.) चोऱ्या करण्याविषयीं प्रसिद्ध अशी एक जात; बिलंदर.

**राय** (सं. राजन् पु.) राजा, राव; (फा. स्त्री.) मत, अभिप्राय.

**रायकेळ** (स्त्री.) केळीची एक जात.

**रायण** (न.) कडू वृंदावन (फळ).

**रायणमाळ** (स्त्री.) गळयांत घालण्याचा स्त्रीचा एक अलंकार.

**रायत** (अर. स्त्री.) कृपा. [ वर्ग.
**रायतावा** (पु.) प्रजा (विशेषतः शेतकरी
**रायतें** (न.) मोहरी लावलेलें एक प्रकारचें तोंडीलावणें.
**रायभोग** (पु.) राजानें खाण्याजोगा उत्तम पदार्थ; तांदुळाची एक जात.
**रायवणी** (प्रा. न.) मोहऱ्याचें पाणी.
**रायवळ** (वि.) जंगली, साया, शिसव, खैर इ० लाकडांखेरीज इतर हलक्या लाकडास लावण्याची संज्ञा.
**रायविनोदी** (पु.) वहुरूपी, विदूषक, खुपमस्कऱ्या. [पू. ७।७२).
**रायाण** (प्रा. न.) कडू वृंदावन (विवे०
**रायात** (अर. स्त्री.) कृपा; मेहेरबानी.
**रारा** (पु.) मंत्र.
**राव** (पु.) राजा; सन्मानाची एक पदवी.
**रावाचा रंक होणें** मोठ्या श्रीमंत माणसाला दारिद्र्य येणें.
**रावटी** (हिं. स्त्री.) लहान तंबू, राहुटी.
**रावणराज्य** (सं. न.) रावणासारखें जुलमी राज्य; अंदाधुंदीचा कारभार.
**रावणाची लंका जळणें** कानाचीं भोकें बोटांनीं बंद केलीं असतां ऐकूं येणारा आवाज.
**रावणें, रांविणें** (प्रा. क्रि.) रंगविणें.
**रावण्या** (स्त्री. अने.) विनवण्या.
**रावताण** (न.), **रावताणी** (स्त्री.) घोडेस्वारांनीं केलेली लूटमार किंवा नासाडी. [ मासा.
**रावस** (पु.) तांबड्या रंगाचा समुद्रांतील
**रावा** (पु.) दळलेली हळद; पोपट.
**रावो** (पु.) राजा.
**राश** राशि पहा. [ वेडसर.
**राशा**(वि.)मध्यम प्रतीचा; दुर्बळ; नपुंसक;
**राशि** (सं. पु.) तारांचा पुंज; (स्त्री.) रास, ढीग. **राशीस लागणें**—पिच्छा पुरविणें. **रा०स बसणें**—छळणें, सतावणें.
**राशिघटित** (सं. न.) जन्मपत्रिकेवरून वधूवरांची मैत्री किंवा विरोध होईल याविषयींचें होणारें ज्ञान.
**राशिचक्र** (सं. न.) मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह , कन्या, तूळ, वृश्चिक,धन, मकर, कुंभ व मीन या बारा राशींचें चक्र.
**राशी, रास** (प्रा. स्त्री.) कणसाची झोड-पणी व मळणी झाल्यावर जो दाणा पहिल्यानें बाहेर पडतो तो (तुका० ११४९); (वि.) मध्यम.
**रासिवा** (प्रा. पु.) राशि (ज्ञा. १६।३५६).
**रासी, राशी** (वि.) मध्यम प्रतीचें.
**राष्ट्र** (सं. न.) देश; एका दिलाची व एकाच मनोभावनेनें प्रेरित झालेली देशांतली जनता.
**राष्ट्रपति** (पु.) राष्ट्राचा लोकनियुक्त अध्यक्ष. [पसारा.
**राष्टाण, राष्ट्राण** (सं. राष्ट्र न.) व्याप,
**राष्ट्रीय** (सं. वि.) राष्ट्राची, राष्ट्रहिताची.
**राष्ट्रीय सभा** (सं. स्त्री.) कॉंग्रेस; हिंदु-स्थानांतल्या एकंदर जनतेच्या प्रति-निधींची राजकारणविषयक सभा.
**रास** (सं. राशि स्त्री.) ढीग; (पु.) रासक्रीडा.
**रासक्रीडा** (सं. स्त्री.) गवळ्यांचें वर्तुळा-कार नृत्य. [ म्होरक्या.
**रासणी** (स्त्री.) बैलाच्या जातींतला
**रासनाहणें, रासन्हाण** (न.) लग्नांत वर-पक्षाकडील स्त्रियांना घालावयाचें मानाचें स्नान.
**रासनी** (स्त्री.) बीं पेरल्यावर तें झांकून टाकणारें शेतकऱ्यांचें एक औत; रेकली.
**रासभ** (सं. पु.) गाढव. [सारखें.
**रासभी** (स्त्री.) गाढवी; (वि.) गाढवा-
**रासमाथा** (पु.) खळवट; शेतमाल तयार होऊन खळयांत धान्याच्या राशि पड-ण्याचा हंगाम.
**रासमाथां** (अ.) धान्याची मळणी होऊन त्याची रास घालतात त्या वेळीं.
**रासलीला** (सं. स्त्री.) रासक्रीडा.
**रासवट** (वि.) मध्यम प्रतीचा.
**रासवटा, रासोठा** (पु.) खळयांतलें धान्य काढून नेल्यावर उरलें सुरलें धान्य नेण्याचा महाराचा हक्क.
**रास्त** (फा. वि.) खरें, न्यायाचें.
**रास्तगोई** (फा. स्त्री.) सत्यवादित्व, खरें-पण, सत्य भाषण.

**रास्ता** (पु.) लुगड्याचा एक प्रकार.
**राह** (हिं. स्त्री.) मार्ग; रस्ता. [गोंधळ.
**राहकळ** (स्त्री. न.) भीतीनें उडालेला
**राहणें** (सं. रह् क्रि.) वास करणें, स्थिर होणें; मावणें; बंद होणें; उरणें; क्षीण होणें.
**राहाट** (प्रा. पु.) व्यापार (ज्ञा० १८।४६५).
**राहाटणें** (क्रि.) वर्तणें, आचरणें.
**राहाटगाडगें** (न.) रहाटगाडगें पहा.
**राहाटमाळ** (प्रा. स्त्री.) रहाटगाडगें.
**राहाटी** (स्त्री.) वागणूक. [ खाई.
**राहाड** (प्रा. स्त्री.) धगधगीत निखाऱ्यांची
**राह्याडी** (प्रा. स्त्री.) राड, चिखल (तुका० ४४८). [(दा० ३।३।४४).
**राहाणें** (प्रा. ना.) अंगांत दैवत घालणें
**राहावलेपण, राहिलेपण** (प्रा. न.) उल्लास, रंगेलपणा (ज्ञा० १८।४२४).
**राहित्य** (सं. न.) शून्यता.
**राहु** (सं. पु.) एक ग्रह; भूमिच्छाया.
**राहुटी** रावटी पहा. [ २७२).
**राहुमेळ** (प्रा. पु.) ग्रहण (ज्ञा० १७।
**राहो** (पु.) राहु.
**राळ** (सं. राल स्त्री.) एक ज्वालाग्राही पदार्थ; फटफजिती; चांदीसोन्याचा गट.
**राळसाळ** (स्त्री.) केरकचरा; उरलेसुरलेले अवशेष.
**राळा** (पु.) एक धान्य. [ स्त्री; दुष्ट स्त्री.
**राक्षशीण** (सं. राक्षसी स्त्री.) राक्षसाची
**राक्षस** (सं. पु.) दैत्य; क्रूर मनुष्य.
**राक्षसगण** (सं. पु.) मनुष्याच्या जन्मकाळाच्या ग्रहस्थितीवरून देवगण, मनुष्यगण आणि राक्षसगण असे तीन वर्ग करतात, त्यांतला शेवटचा वर्ग.
**राक्षसविवाह** (सं. पु.) बलात्कारानें केलेला विवाह.
**राक्षसवेळ** (स्त्री.) तिनीसांजची वेळ.
**राक्षसान्न** (सं. न.) ज्याच्या खाण्यानें तामसीपणा अंगीं येतो असें अन्न.
**राक्षसी** (सं. स्त्री.) राक्षसाची बायको; (वि.) प्रचंड; क्रूरपणाचें; राक्षसास योग्य; अघोरी. **रा० उपचार**—अघोरी इलाज.

**राज्ञी** (सं. स्त्री.) राणी.
**रिकब, रिकबी, रिकाबी** (फा. स्त्री.) घोड्यावर चढण्यासाठीं व बसून पाय ठेवण्यासाठीं दोन बाजूंस सोडलेल्या दोन कड्या.
**रिकविणें** (क्रि.) रिकामें करणें; रिचविणें.
**रिकांडी** (स्त्री.) हातमागांत—धोट्यास घातलेली सूत गुंडाळलेली कांडी.
**रिकामचावडी** (स्त्री.) कुटाळांचा अड्डा; चांडाळचौकडी.
**रिकामचोट, रिकामटवळा** (वि.) निरुद्योगी.
**रिकामटी** (प्रा. स्त्री.) फुरसत; (वि.) रिकामी (तुका० ४२९४).
**रिकामटेकडा** (वि.) निरुद्योगी.
**रिकामपण** (न.) **रिकामपणा** (पु.) फुरसत.
**रिकामवाणी** (वि.) फुकट; व्यर्थ.
**रिकामा** (वि.) निरुद्योगी; कोरडा; (अ.) व्यर्थ.
**रिकामा ताठा** (पु.) पोकळ गर्व.
**रिकामीक** (प्रा. स्त्री.) रिकामपण.
**रिकीब, रिकेबी** (स्त्री.) रिकबी पहा.
**रिक्त** (सं. वि.) रिकामें; कोरडें.
**रिक्तपाणी, रिक्तहस्त** (सं. वि.) रिकाम्या हाताचा; देवाच्या किंवा राजाच्या दर्शनास जातांना त्याच्यापुढें ठेवण्यासाठीं हातांत कांहीं घेतल्यावांचून जाणारा.
**रिक्ता** (स्त्री.) शुद्ध पक्षांतली चतुर्थी, नवमी, किंवा चतुर्दशी या तिथि.
**रिंग** (इं. स्त्री.) अंगठी; कडें; वळें.
**रिंगण** (सं. अ.) मुलांचें रांगणें.
**रिंगणमूळ** (न.) रिंगणी नांवाच्या वनस्पतीचें औषधी मूळ.
**रिंगणा** (पु.) घराच्या तात्याच्या खालची व खांबांच्या आधारावर असलेली काठी (तुळई).
**रिंगणें** (न.) लहान मुलाची तोंडांत घालून चोखण्याची वस्तु; चोखणी.
**रिंगणें, रिघणें** (प्रा. क्रि.) शिरणें, प्रवेश करणें. [ अवकाश.
**रिगमु, रिगु** (प्रा. पु.) रिघाव, प्रवेश;
**रिगावा** (प्रा. पु.) प्रवेश, रिघाव; प्राप्ति

... वाचनालय, सातारा

**रिगिनिगी, रिघोनिघी** (प्रा.स्त्री.) जाणेंयेणें.
**रिघणी** (प्रा. स्त्री.) रिघाव, प्रवेश.
**रिघणें** (क्रि.) शिरणें; प्रवेशणें. [वाट.
**रिघाव, रिघावा** (पु.) शिरकाव; प्रवेश;
**रिघेंरिघे** (अ.) हळू हळू.
**रिचवणी** (स्त्री.) रिकामें करणें.
**रिचवणें, रिचविणें** (सं.रिच् क्रि.) रिजविणें; रचना करणें; रिकामें करणें; ओतणें.
**रिजणें, रिझणें** (सं. रंज् क्रि.) आनंदित होणें, रंजन होणें.
**रिजाला** (अर. वि.) नीच, हलकट.
**रिझविणें** (क्रि.) रंजविणें; आनंदित करणें.
**रिझाऊ** (वि.) चित्तरंजक, रम्य. [फळ.
**रिठा** (सं. रिष्ट पु.) मळ काढणारें एक
**रिणकरी** (सं. ऋण. पु.) धनको, सावकार.
**रिणको** (पु.) कर्जदार; कर्ज घेणारा.
**रिणाईत, रिणानुबंध** इ. ऋणाईत, ऋणानुबंध इत्यादि पहा.
**रिता** (सं. रिक्त वि.) रिकामा.
**रिताड**(स्त्री.)रिकामी केलेली गाडी इत्यादि.
**रितेंसोप** (प्रा. वि.) निरर्थक.
**रिद्धि** (सं. ऋद्धि स्त्री.) संपत्ति; समृद्धि.
**रिद्धिसिद्धि** (स्त्री.) ऋद्धि व सिद्धि या गणपतीच्या दोन दासी.
**रिपरिप** (स्त्री.) पिरपिर.
**रिपार** (पु. न.) छपराला ओंवण घालणें; ओंवण, कारवी; कूड.
**रिपु** (सं. पु.) शत्रु.
**रिपुंजय** (सं. वि.) शत्रूला जिंकणारा.
**रिपेर** (इं. स्त्री.) दुरुस्ती, मरामत.
**रिपोर्ट** (इं. पु.) अहवाल; बातमी; खालच्या अधिकाऱ्याकडून वरच्या अधिकाऱ्याकडे जाणारी कैफियत.
**रियासत** (फा. स्त्री.) राजवट, राज्य.
**रिवणें** (क्रि.) रवरवणें.
**रिवाज** (अर. पु.) वहिवाट, रीत.
**रिसा** (प्रा. पु.) मूर्ख माणूस(तुका० १७७२)
**रिस्तेदार, रिश्तेदार** (हिं. पु.) नातेवाईक; आप्त.
**रिसालदार** (फा. पु.) रिसाल्याचा मुख्य अंमलदार. [पलटण.
**रिसाला** (अर. पु.) घोडदळ; घोडेस्वारांची
**रिसीट** (इं. स्त्री.) पावती, पोंच.
**रिस्त** (स्त्री.) रसद (एक० ३७९७).
**रिसाला** (अर. पु.) घोडेस्वारांची पलटण.
**री** (स्त्री.) गायनांतल्या स्वरसप्तकांपैकीं दुसरा स्वर; मुख्य गायकाचें गायन चाललें असतां त्याचा हस्तक त्याच्या मागोमाग त्याचेच सूर म्हणत जातो तें.
**री ओढणें** दुसऱ्याच्या सुरांत सूर मिळवणें; त्याच्याच सारखें म्हणणें.
**रीग, रीघ** (स्त्री.) प्रवेश, शिरकाव; जागा.
**रीझ** (स्त्री.) आवड, करमणूक.
**रीढ** (न.) बखळ; पडक्या घराची जागा.
**रीण** (सं. ऋण न.) कर्ज; देणें.
**रीत** (सं. रीति स्त्री.) चाल, वहिवाट.
**रीतभात** (स्त्री.) रीतरिवाज.
**रीतरवेस** (पु.) चाल, सभ्यपणाची रीत.
**रीतसर** (वि.) सशास्त्र; रूढीप्रमाणें.
**रीति** (सं. स्त्री.) पद्धति, संवय; शैली; वहिवाट.
**रीप** (स्त्री.) ओंवण, कारव, चीप; शोभेकरितां लावण्याची एक इंग्लिश वनस्पति.
**रीम** (पोर्तु. रेमा इं. रीम न.) चोवीस कागदांचा एक दस्ता याप्रमाणें वीस दस्त्यांचें पुडकें. [चक्र; रीळ.
**रील** (इं. न.) बाबिन, सूत गुंडाळण्याचें
**रीस** (सं. ऋक्ष पु. न.) अस्वल; घाणेरडें, ओंगळ माणूस; (सं. रोष स्त्री.) अपराध; गैरमर्जी; त्रास; कंटाळा; राग (तुका० २९५८).
**रींस** (न.) अस्वल.
**रीळ** (न.) दोऱ्याचा गुंडा; दोरा गुंडाळण्याचें साधन.
**रुइटी, रुई** (हिं. स्त्री.) अर्कवृक्ष; त्याच्या बोंडांतला कापूस; पिंजलेला कापूस; नीलगाय; (फा. रू स्त्री.) रीत, रूढि.
**रुईफुली** (वि.) रुईच्या फुलासारख्या नक्षीचा.
**रुका, रुक्का** (पु.) आण्याचा बारावा भाग; पै; जमीन मोजण्याचें एक माप (हें २॥, विघ्यांपासून २० बिघ्यांपर्यंत निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळें आहे.); पत्ता.

**रुकार** (पु.)संमति; लिहिलेल्याची नक्कल केल्यावर रुजुवात घेतल्याबद्दल 'रु' असें केलेलें चिन्ह.
**रुकारणें** (क्रि.) संमति देणें; स्वीकारणें.
**रुकावट** (स्त्री.) विरोध; अडथळा.
**रुक्मिणी** (स्त्री.) श्रीकृष्णाची पट्टराणी. **रु० सुत** (पु.)—मदन.
**रुख** (सं. वृक्ष पु.) वृक्ष.
**रुखणें** (सं. रुष् क्रि.) रागें भरणें.
**रुखरुख** (स्त्री.) खेद, चिंता, टोचणी.
**रुखवत** (न.) लग्नांत नवरा मुलगा वधूच्या घराकडे लग्नासाठीं जाण्यापूर्वी वधूपक्षाकडून वराच्या घरीं त्याला व त्याच्या स्नेह्यांना जो उपाहार देण्यांत येतो तो.
**रुखसत** (अर. स्त्री.) रजा; विरोध.
**रुखा** (पु.) जड्याचें हत्यार; (सं. रुक्ष वि.) शुष्क, वेचव, भयाण, कठोर.
**रुखांडी, रुखी, रुख्या** (वि.) झाडावर चढण्यांत पटाईत.
**रुखाडू** (न.) तरुडावर चढणारा पायाला दोरीचा फास घालतो तो. [ पटाईत.
**रुखी, रुख्या** (पु.) झाडावर चढण्यांत
**रुगणें** (क्रि.) मंदावणें; रेंगाळणें.
**रुगाळा** (वि.) पातळ, कृश.
**रुगाळा** (पु.) कृशता, क्षीणता.
**रुगें** (प्रा. न.) रुपें.
**रुग्ण** (सं. वि.) रोगी.
**रुग्णालय** (सं. न.) इस्पितळ, शुश्रूषागृह.
**रुग्णपरिचर्या** (स्त्री.) रोग्याची शुश्रूषा.
**रुग्णपरिचर्यापथक** (न.) रोग्यांची सेवा करणारें पथक.
**रुचकर** (सं. रुचिकर वि.) चवदार.
**रुचणें** (सं. रुच् क्रि.) आवडणें.
**रुचि** (सं. स्त्री.) चव, आवड.
**रुचिकर** (सं. वि.) चवदार, रुचकर.
**रुचिर** (सं. वि.) मोहक, सुंदर.
**रुची** (स्त्री.) आवड, शोभा, गोडी.
**रुचीक**(सं. रुचक वि.)रुचकर, स्वादिष्ठ, आवडणारें. [ करणें.
**रुजणें** (सं. रुह् क्रि.)उगवणें; परिणाम
**रुंजणें** (अ. क्रि.) गुणगुणणें.
**रुजवट** (वि.) कोंब फुटलेलें.
**रुजवण**(न.)पेरलेलें बीज; फुटलेला अंकुर.
**रुजवात** रुजुवात पहा.
**रुजा** (सं. स्त्री.) रोग, पीडा.
**रुजामा** (फा. पु.) रू भरलेली बिछाईत.
**रुंजी** (स्त्री.)गुणगुणत घातलेली घिरटी; चक्कर; गुंजारव.
**रुजु** (सं. ऋजु वि.) सरळ.
**रुजुवात** (अर. रुजाअत स्त्री.) ताडून पाहणें; समक्षता. [ पसंत, मान्य.
**रुजू** (अर. वि.) तत्पर, कबूल; हजर;
**रुटका** (पु.) विघ्याहून लहान असें जमीनमोजणीचें एक माप.
**रुटुखुटु** (अ.) मंदगतीनें, हळू हळू.
**रुंड** (सं. न.) शिर, मुंडकें.
**रुंडमाला** (सं. स्त्री.) शंकराच्या किंवा काली देवीच्या गळयांत मुंडक्यांची माळ असते ती.
**रुढणें** (सं. रूढ क्रि.) बातमी पसरणें.
**रुण** (सं. ऋण न.) कर्ज; लोकांचें देणें.
**रुणझुणणें** (क्रि.) छन्छन् वाजणें.
**रुणा** (पु.) झुरणी; सतत होणारें दुःख.
**रुत** (प्रा. स्त्री.) कोरडी भिक्षा (स्वा० दि० ५।५।१४).
**रुत** (सं. ऋतु) हंगाम.
**रुतणें** (क्रि.) बोचणें, खुपणें.
**रुती** (स्त्री.) रुतण; अडकवण.
**रुतबा** (अर. पु.) दर्जा, पदवी.
**रुंद** (वि.) चवडा, आडवा.
**रुदन** (सं.न.) रडणें, शोक.
**रुदबा** (अर. रुतबा पु.) दर्जा, पदवी.
**रुंदाट** (वि.) फार रुंद.
**रुंदावणी**(स्त्री.)रुंद करणें, रुंदी वाढविणें.
**रुदित** (सं. न.) रडणें, रुदन.
**रुंदी** (स्त्री.) चवडाई, आडवी लांबी.
**रुद्ध** (सं. वि.) अडकून पडलेलें, थांबविलें गेलेलें, वेढलेलें.
**रुद्धकंठ**(वि.)गहिवरलेला, गळा दाटलेली.
**रुद्र** (सं. पु.) शिव; शिवस्तोत्र; (वि.) भयंकर.
**रुद्रगांठ** (स्त्री.) कापड विणतांना त्यांत चौकटीसारखें उठविलेलें चिन्ह.
**रुद्रभूमि** (सं. स्त्री.) स्मशान.

**रुद्रवात** (स्त्री.) सुताला अकरा वेळां पीळ देऊन केलेली वात.
**रुद्रवीणा** (सं. पु.) वीण्याचा एक प्रकार.
**रुद्रावतार** (सं. पु.) शिवाचें उग्र स्वरूप. रु० **धारण करणें**–संतापणें. [फळ.
**रुद्राक्ष** (सं. पु.) एक वृक्षविशेष व त्याचें
**रुधणें, रुंधणें** (सं. रुध् क्रि.) व्यापणें (ज्ञा० १५।५३); प्रतिबंध करणें.
**रुधविणें** (क्रि.) गुंतविणें, कामाला लावणें.
**रुधिर** (सं. न.) रक्त.
**रुधिराभिसरण** (सं. न.) रक्ताचा शरिरांत सर्वत्र संचार.
**रुपटका** (पु.), **रुपटकी, रुपडी** (स्त्री.) रुपया (तिरस्कारार्थी.)
**रुपडें** (न.) सुंदर रूप.
**रुपण** (न.) मऊ जमीन.
**रुपणें** (क्रि.) रुतणें, बोचणें.
**रुपया, रुपाया** (पु.) रुप्याचें १६ आणे किमतीचें नाणें.
**रुपें** (सं. रौप्य न.) चांदी. [दिसणारें.
**रुपेरी** (वि.) रुप्याचें केलेलें किंवा त्यासारखें
**रुबकार** (फा. अ.) समोर.
**रुबाइयात** (फा. स्त्री.) चतुष्पदी; चार चरणांची फारसी कविता.
**रुब्राई** (स्त्री.) विवाहगीत.
**रुबरु** (फा. अ.) समक्ष.
**रुवाब** (अर. पु.) ऐट; मिजास; दरारा; एक तऱ्हेचा ताशा.
**रुमझुम** (स्त्री.) घुंगरांचा आवाज.
**रुमणवाक** (पु.) वक्रता, वळण. [दांडा.
**रुमणी** (स्त्री.), **रुमणें** (न.) नांगराचा
**रुमाल** (फा. पु.) चौकोनी वस्त्र; कागदाचें गांठोडें. [एक प्रकार; चड्डी.
**रुमाली** (फा. स्त्री.) मुद्गल फिरवण्याचा
**रुमालीगज** (पु.) कापड मापण्याचा १४ तसूंचा गज. (दुसरा जमीन मोजण्याचा १६ तसूंचा असतो. त्याला रेशमी गज म्हणतात.)
**रुरयात** (अर. फा. स्त्री.) भीडभाड.
**रुशवत, रुश्वत** (फा. स्त्री.) लांच.
**रुष्ट** (सं. वि.) रागावलेला. [रजा.
**रुसकत** (फा. रुसकत स्त्री.) परवानगी;
**रुसका** (वि.) वारंवार रुसणारा.
**रुसणें** (सं. रुष् क्रि.) रागावणें; (प्रा.) झांकणें; दवडणें; (अमृ०७।१६); शासन करणें (ज्ञा० ११।३११).
**रुसवा** (पु.) राग, रुसवेपणा.
**रुसूम** (अर. रुसम पु.) जमिनीच्या उत्पन्नांतील देशमुखदेशपांडे यांचा विभाग.
**रुस्तम** (फा. पु.) मोठा पराक्रमी किंवा धाडसी पुरुष.
**रुह** (समासांत उत्तरपदीं वि.) वाढणारा.
**रुळणें** (सं. रुट् क्रि.) वहिवाटणें; शोभा देत हलणें; लोळणें; लोंबणें; मळणें (ज्ञा० ६।१७२).
**रुळें** (न.) स्त्रियांचा पायाच्या घोटयावर घालण्याचा एक अलंकार.
**रूक्ष** (सं. वि.) शुष्क, कोरडें, स्निग्धताशून्य. [पुढची बाजू, तोंड.
**रू** (हिं. पु.) पिंजलेला कापूस; (प्रा. पु.)
**रूं** (न.) खवडा, डोक्यांतला फोड.
**रूख** (सं. वृक्ष पु.) झाड.
**रूढ** (सं. वि.) प्रचारांत असलेला; सामान्य; जाहिर; (प्रा.) थोर; (स्त्री.) रूढि.
**रूढणें** (प्रा. क्रि.) बोलणें. [आणणें.
**रूढावणें** (प्रा. क्रि.) वाढविणें; प्रचारांत
**रूढि** (सं. स्त्री.) योग्यता, प्रसिद्धि (ज्ञा० १७।३९२); प्रघात, प्रचार, वहिवाट.
**रूदार** (हिं. वि.) आंत पिंजलेला कापूस भरलेलें.
**रूप** (सं. न.) आकार, आकृति; बाह्यस्वरूप; लक्षणा; सौंदर्य; मूळ धर्म; स्वभाव, प्रकार; सोंग; प्रतिबिंब; नामाची किंवा धातूची प्रत्यय लावल्यानंतर होणारी स्थिति. [१५।४४२)
**रूप करणें** (क्रि.) सांगणें, निरूपणें (ज्ञा०
**रूपक** (सं. पु.) एक भाषालंकार. जेथें उपमान व उपमेय यांचा अभेद वर्णिला असतो तेथें हा अलंकार होतो.
**रूपडें** (प्रा. न.) स्वरूप; मुखवटा; सुंदर.
**रूपरंग** (पु.) सामान्य स्वरूप.
**रूपरेखा, रूपरेषा** (सं. स्त्री.) घाट, अंगलट; बाह्यमर्यादा, कच्चा नकाशा.
**रूपवान्** (सं. वि.) सुंदर (पुरुष).

**रूपवती** (सं. वि.) सुंदर (स्त्री.)
**रूपस** (प्रा. वि.) नीटनेटकें, सुरेख, शोभिवंत; देखणा; (न.) सौंदर्य.
**रूपहानि** (स्त्री.) अपमान; मानखंडना.
**रूपान्तर** (सं. न.) अन्य रूप, नवें स्वरूप.
**रूपावळी** (सं. रूपावली स्त्री.) नामें किंवा क्रियापदें यांची प्रत्यय लाविल्या-नंतर होणाऱ्या रूपांची यादी किंवा संग्रह
**रूपी** (सं. वि.) रूप घेतलेला; त्यासारखा.
**रूप्य** (सं. न.) रुपें, चांदी.
**रूबरू** (फा. अ.) समक्षासमक्ष.
**रूव** (स्त्री.) रुई, पिंजलेला कापूस.
**रूळ** (इं. रूलर पु.) वाटोळी आंखणी; स्त्रियांचें एक पादभूषण; आगगाडीचा लोहमार्ग; (इं. रोलर) रस्त्यावरची खडी दावण्याचें यंत्र. [१।२।१९).
**रूळणें** (प्रा. क्रि.) विराजणें (दा०
**रे** (अ.) संबोधनार्थी.
**रेकणें** (क्रि.) म्हशीचें ओरडणें; बोगऱ्या गळयानें बोलणें; धावणें.
**रेकला** (हिं. पु.) छकडा, एक्का; जमि-नींत बीं पेरल्यानंतर वर माती टाक-ण्याचें आऊत. [ आवाजाचा.
**रेकाट्या** (वि.) रेकत बोलणारा; बोगऱ्या
**रेकार्ड** (इं. रेकर्ड न.) कागदपत्रें, दप्तर.
**रेखटणें, रेखाटणें** (क्रि.) रेघा काढणें; चितारणें. [करणें; वर्णन करणें.
**रेखणें** (क्रि.) रेघा काढणें, कोरणें, नीट
**रेखला** (वि.) नीटनेटका, प्रमाणबद्ध.
**रेखा** (सं. रेषा स्त्री.) रेषा, रेघ; (प्रा.) मर्यादा; काव्यरचना.
**रेखागणित** (न.) भूमिती.
**रेखाचित्र** (न.) नुसत्या रेषांनीं काढलेलें चित्र.
**रेखाटणी** (स्त्री.) आंखणी; रूळ.
**रेखावृत्त** (न.), **रेखांश** (सं. पु.) भूगोलावर उत्तर व दक्षिण ध्रुव यांना जोडणारें व भूमध्याला छेदून जाणारें जें वृत्त तें रेखावृत्त होय. अशा दोन वृत्तांमधील अंतराचे पाडलेले भाग ते रेखांश; पहिलें रेखावृत्त, इंग्लंडांतील ग्रीनिच या ठिकाणामधून गेलें आहे अशी कल्पना करून तेथून रेखांश मोजण्याचा प्रघात आहे.
**रेखीव** (वि.) नीटनीटकें.
**रेंगणें** (क्रि.) रांगणें.
**रेंगळणें, रेंगाळणें** (क्रि.) मागें राहणें, आजारांत खितपत पडणें.
**रेघ** (सं. रेषा स्त्री.) रेषा, ओळ.
**रेघोटी** (स्त्री.) रेघ .
**रेच** (सं. रिच् क्रि.) ढाळ; जुलाब; गर्व, तोरा; रग. **रेच उतरणें**–गर्वाचा परिहार करणें, खोड जिरवणें.
**रेचक** (सं. पु.) प्राणायाम करतांना आंत घेतलेला श्वास बाहेर टाकणें; (न.) रेच करणारें औषध.
**रेचणें** (प्रा. क्रि.) सोडणें (ज्ञा० १३।६६५).
**रेचन** (सं. न.) जोराचें मलविसर्जन.
**रेचित** (सं. वि.) रिकामें केलेलें.
**रेज** (सं. रज पु.) धातूचा कण.
**रेजगण, रेजगाण** (पु. न.) सोन्याचांदीचे कण. [ कौशल्य, शौर्य.
**रेजगिरी** (फा. राजगारी स्त्री.) लढण्याचें
**रेजणी** (फा. स्त्री.) चिल्लर, किरकोळ नाणें.
**रेंजर** (इं. पु.) जंगलखात्याचा फिरता अधिकारी.
**रेजा** (फा. पु.) कापडाचा लहान तुकडा; फांशावरील पगडा.
**रेजीम** (न.) कागदाचें रीम.
**रेट** (पु. स्त्री.) दाटी, गर्दी; पुढें ढकलणें.
**रेटणें** (क्रि.) जोरानें ढकलणें; संभाळून धरणें; कष्टानें चालविणें.
**रेटा** (पु.) नेट, जोर.
**रेटाई** (स्त्री.) रेटण्याची क्रिया; संकटें न जुमानतां काम चालू ठेवण्याची क्रिया.
**रेटारेट** (स्त्री.) ढकलाढकली.
**रेटून** (अ.) धिटाईनें, जोरानें.
**रेड** (स्त्री.) विपुलता, समृद्धि.
**रेडकूं** (न.) पारडूं.
**रेडा, रेडका** (पु.) टोणगा, हल्या.
**रेडी** (स्त्री.) म्हैस, पाडी.
**रेडिअम** (स्त्री.) अंधारांत प्रकाशणारी एक मौल्यवान् व औषधी धातु.
**रेड्डी** (स्त्री.) तेलंगी शेतकऱ्याची मुख्य जात

**रेणु** (सं. पु.) रज, कण.
**रेणुका** (स्त्री.) परशुरामाची आई व जमदग्नीची पत्नी.
**रेत** (सं. न.) वीर्य, धातु; (स्त्री.) रेती.
**रेतदाणी** (स्त्री.) रेती ठेवण्याचें जाळीदार पात्र.
**रेताड** (वि.) पुष्कळ रेती असलेली जमीन.
**रेती** (सं. रेतजा स्त्री. ) वारीक वाळू.
**रेंद** ( स्त्री.) चिखल, घाण, दारूचा गुत्ता; (वि.) मंद, सुस्त; (न.) मक्ता.
**रेंदकरी** (पु.) मक्तेदार
**रेंदा** (पु.) मिश्रण; चिखल; पू.
**रेंदसरा** (पु.) दारू गाळण्याची भट्टी.
**रेंदाड** (वि.) चिखलानें किंवा घाणीनें युक्त.
**रेंदेकरी** (पु.) दारू मक्तेदार.
**रेंप** (स्त्री.) शिणक.
**रेप** (स्त्री.) शिळा; चिखल.
**रेफ** (सं.पु.) र हें व्यंजनाक्षर, ॅ असें चिन्ह.
**रेब** (स्त्री.) चिखल; समुद्र खवळला म्हणजे कांठावर जो लोण्यासारखा मृदु गाळ येतो तो.
**रेबड** (स्त्री.) घाण, रक्तमिश्रित पू.
**रेबडी** (स्त्री.) पाघळणारा गूळ; बिलबिलीत झालेलें फळ.
**रेबीन** (इं. स्त्री.) पट्टी; फीत.
**रेभ** (स्त्री.) चीर, भेग. [२८४२).
**रेमट** (प्रा. वि.) लांवलचक (तुका०
**रेम्या, रेम्याडोक्या** (वि.) मंद; बुद्धिहीन.
**रे रे करीत** (अ.) हळू हळू.
**रेल** (हिं. स्त्री.) महापूर; विपुलता; रेती.
**रेलचेल** (स्त्री.) विपुलता, बाहुल्य.
**रेलणें** (क्रि.) झुकणें; दडणें.
**रेलवे** (इं. स्त्री.) आगगाडी.
**रेव, रेंव** (स्त्री.) रेती; धान्य, साखर, इत्यादींतली कचकच.
**रेवट** (वि.) रेतीची (जमीन).
**रेवठा** (पु.) रेतीचा ढीग.
**रेवड** (स्त्री.) गोफासारख्या गुंफलेल्या वस्त्राच्या दशा.
**रेवडी** (स्त्री.) साखरेच्या किंवा गुळाच्या पाकांत तीळ घालून केलेली वडी. **रे० उडणें, रे० होणें**—फजिती होणें.
**रेवण** (स्त्री.) किल्लयाच्या तटाच्या बाहेर किंवा खंदकाच्या बाजूला संरक्षणासाठीं उतरता मातीचा ढीग घालतात तो; खाच भरण्याची माती, दगड इत्यादि.
**रेवणी** खंदकाच्या बाहेर घातलेली. मातीची वरवंडी (अनंत० गृ० ४९).
**रेवणें** (क्रि.) खाली दवणें; चिखलांत रुतणें; खळगा भरणें. [रामाची वायको.
**रेवती** (स्त्री.) सत्ताविसावें नक्षत्र; बल-
**रेवसळ** (वि.) रेताड.
**रेवा** (सं. स्त्री.) नर्मदा नदी. [जमाव.
**रेवा, रेंवा** (पु.) रेती; गाळ; ढगांचा
**रेवाचिनी** (स्त्री.) एक औषधी वनस्पति.
**रेंवाळ, रेवाळें** (वि.) रेताळ, रेतीची; (न.) रेती.
**रेशमी** (फा. वि.) रेशमाचें; रेशमासारखें मऊ; (पु.) लढाऊ मुसलमान लोक.
**रेशमी गज** जमीन मापण्याचा गज. हा पूर्वी प्रचारांत होता. याची लांबी १८ तसू असे.
**रेशीम** (फा. न.) एका जातीच्या किडयानें आपल्या पोटांतून काढलेला तंतु.
**रेशीम गांठ** (स्त्री.) सुखकर बंधन.
**रेषा** (सं. स्त्री.) रेघ; तंतु.
**रेस** (पोर्तु. रीस पु.) आण्याचा पंचविसावा अंश. (इं. स्त्री.) घोडयाची शर्यत.
**रेसिडेंट** (इं. पु.) देशी संस्थानिकांच्या दरबारीं असणारा इंग्रज सरकारचा प्रतिनिधि.
**रेसिडेन्सी** (इं. स्त्री.) संस्थानांतील इंग्रज वकिलात; वसतिगृह.
**रेळ** (पु.) पाझरणारा ओघ, पाझर.
**रैयत** रयत पहा.
**रोकड** (हिं. स्त्री.) रोख रक्कम.
**रोकडा** (वि.) रोखठोक, स्पष्ट; तात्कालिक.
**रोकडें** (प्रा. वि.) प्रत्यक्ष (दा० ५।१।२).
**रोकडया** (पु.) प्रवासांत रोकड रक्कम नेणारा नोकर.
**रोख** (सं. रोक वि.) नगदी, रोकड; (सं. रोष पु.) क्रोध, संताप. [कटाक्ष.
**रोख** (फा. रुख पु.) झोक, वळण; नेम;
**रोखठोक** (वि.) तात्कालिक; हजर.

**रोखणी** (स्त्री.) सुताराचें एक हत्यार.
**रोखणें** (क्रि.) नेम धरणें; रोखणीनें साफ करणें; अडविणें; व्यापणें.
**रोखा** (अर. पु.) दस्तऐवज; कागद.
**रोखारोखी** (स्त्री.) उधारी न ठेवतां मालाची रोख किंमत घेऊन केलेला व्यवहार; समक्षासमक्ष भेट, बोलाचाल वगैरे.
**रोखी** (स्त्री.) नगदी.
**रोग** (सं. पु.) शरीरप्रकृतींत उत्पन्न होणारी विकृति; दुखणें, उपद्रव.
**रोगट** (वि.) रोगानें पीडलेला.
**रोगण** (फा. रोघन न.) तेल, राळ,मेण, इ० चें चिकट मिश्रण. हें लाकडास लाविल्यानें लाकूड पाण्यानें भिजत नाहीं व तकाकित दिसतें.
**रोगणें** (क्रि.) क्षीण होणें.
**रोगनिदान** (न.) रोगाचें मूळ शोधणें.
**रोगपणें** (स्त्री.) रोगानें पीडणें.
**रोगराई** (स्त्री.) लहानमोठे रोग.
**रोगिष्ठ, रोगी** (सं. वि.) रोगी, आजारी.
**रोगेल** (वि.) रोगट किंवा नाजूक प्रकृतीचा.
**रोचक** (सं. वि.) रुचकर.
**रोचणें** (क्रि.) खुपसणें; बोचणें; आंत ढकलणें.
**रोचन** (सं. न.) रुचि; रमणीयता.
**रोचना** (सं. स्त्री.) रमणीयता; सुखदायित्व.
**रोचष्मती** (स्त्री.) रुचि, आसक्ति.
**रोचिस** (सं. न.) प्रकाश, प्रभा, तेज.
**रोज** (फा. पु.) दिवस; दिवसाची मजुरी; (अ.) प्रत्यहीं; (न.) गलवताच्या बांधकामास लागणारें प्रारंभींचें मुख्य लाकूड.
**रोज उठून** (अ.) प्रत्यहीं.
**रोजकीर्द** (फा. स्त्री.) दिनचर्या; रोज रोज होणाऱ्या जमाखर्चाची नोंद ठेवून शिल्लक काढण्याची वही.
**रोजखर्डा** (पु.) दुकानदाराच्या रोजच्या व्यवहाराचें टाचण.
**रोजगार** (पु.) धंदा, उद्योग.
**रोजगुदस्त** (फा. अ.) काल. [मजुरी.
**रोजनदारी, रोजिनदारी** (स्त्री.) रोजची
**रोजना** (सं. रोदन स्त्री.) शोक, रडणें.
**रोजनामचा** (हिं. पु.) रोजनिशी; रोजच्या कामाचें टाचण.
**रोजनामा** (पु.), **रोजनिशी** (स्त्री.) रोजची हकीकत लिहिण्याची वही.
**रोजमरा, रोजमुरा** (फा. पु.) मजुरी, मुशाहिरा.
**रोजमेळ** (पु.) रोजच्या जमेचा व खर्चाचा मेळ; रोजकीर्द; रोजचा रोखीचा व्यवहार नोंदण्याची वही.
**रोजा** (फा. पु.) मुसलमानांतला उपवास; बाग; दर्गा; समाधिमंदिर.
**रोजिनदार** रोजनदार पहा.
**रोजिना** (अ.) रोज; (पु.) रोजची मजुरी.
**रोजी** (फा. स्त्री.) रोजचा खर्च; एका दिवसाची मजुरी.
**रोट, रोटगा** (पु.) कणिकेचा वरवंट्यासारखा जाड भाजलेला गोळा.
**रोटा** (प्रा. पु.) अन्न; पोटापाण्याची चिंता (तुका० २२६८).
**रोटी** (फा. स्त्री.) भाकर, पोळी.
**रोटीव्यवहार** (पु.) एकमेकांच्या हातचें खाणें; अन्नव्यवहार.
**रोटी सुटी** (प्रा. स्त्री.) भरित, रोडगा (तुका० २३८३).
**रोठा** (पु.), **रोठी सुपारी** (स्त्री.) पक्की झाल्यावर झाडावरून उतरलेली सुपारी.
**रोठ्या** (वि.) मूर्ख; ठोंब्या.
**रोड** (इं. पु.) रस्ता; (वि.) कृश.
**रोडका, रोडगा** (वि.) कृश.
**रोडगा** (पु.) रोट पहा.
**रोडगेला** (वि.) रोड, कृश.
**रोडणें, रोडावणें** (क्रि.) कृश होणें.
**रोडमल्ल** (वि.) कृश.
**रोडा** (पु.) भाजलेल्या विटेचा तुकडा.
**रोडावणें** रोडणें पहा.
**रोती सुरत** (हि. स्त्री.) रडकी मुद्रा.
**रोदन** (सं. न.) रडणें, आक्रोश.
**रोदा** (फा. पु.) बकऱ्याच्या आंतड्याची तांत (ही तंतुवाद्याच्या कामीं योजिली जाते).
**रोध** (सं. पु.) विरोध, अडथळा, प्रतिबंध.
**रोधणें** (क्रि.) कुंठित करणें.

...र वाचनालय, सातारा.

**रोप** (प्रा. पु.) बाण.
**रोप, रोंप, रोपटें** (न.), **रोपा, रोपटा** (पु.) लहान झाड; एका ठिकाणाहून उपटून दुसऱ्या स्थळीं नेलेलें लहान झाड.
**रोपण** (सं. न.) झाड किंवा दूषण लावणें.
**रोंपा** (पु.) झाडाचें रोप.
**रोंबटणें** (क्रि.) खुपसणें.
**रोंबी** (स्त्री.), **रोबें** (न.) तुंबडी लावणें.
**रोम** (सं. पु.) केस.
**रोमकूप** (सं. पु.) शरिराच्या कातडीचें रंध्र.
**रोमंथ** (सं. पु.) रवंथ; पोटांत गेलेला घास पुनः तोंडांत आणून गुरें जो चघळीत बसतात तो.
**रोमरंध्र** (सं. पु.) त्वचेंतील सूक्ष्म छिद्रें.
**रोमराजी** (सं. स्त्री.) केसांची रांग.
**रोमहर्ष** (सं. पु.) रोमांच.
**रोमागणिक** (अ.) प्रत्येक केसाबरोबर.
**रोमांच** (सं. पु.) अतिशय आनंदामुळें अंगावर उभा राहणारा कांटा.
**रोमांचित** (वि.) आनंदानें अंगावर कांटा उभा राहिला असा.
**रोमावली** (सं. स्त्री.) छातीपासून खालीं बेंबीपर्यंत गेलेली केसांची पंक्ति.
**रोमें** (न.) तुंबडी.
**रोराण** (न.) गोंगाट.
**रोव** (सं. रुह् पु.) कोंब.
**रोवण** (स्त्री.) जमिनीचा मृदुपणा.
**रोवणें** (सं. रोपण क्रि.) खोचणें, खुपसणें.
**रोवंथ** (सं. रोमंथ पु.) रवंथ.
**रोवळी** (स्त्री.) दुरडी.
**रोशन** (फा. वि.) स्पष्ट; विशद.
**रोशनाई** (फा. रोशनी स्त्री.) दिव्यांचा लखलखाट; दीपोत्साह.
**रोशनी** (फा. स्त्री.) उजेड.
**रोशेल** (न.) रोशा नांवाच्या गवताचें तेल.
**रोष** (सं. पु.) राग, क्रोध.
**रोषाविष्ट** (सं. वि.) क्रुद्ध, संतापलेला.
**रोस** (सं. रोष पु.) राग, संताप.
**रोह** (पु.) कोंब, अंकुर; हरिण.
**रोहक, रोहंक** (पु.) रोख; मनाचा कल.
**रोहटी, रोहिटी** (सं. रुह् स्त्री.) उगवतें धान्य.
**रोहिणी** (सं. स्त्री.) चवथें नक्षत्र; नऊ वर्षांची अविवाहित मुलगी; वीज; मृगजळ (ज्ञा० ५।११६); वसुदेवाची स्त्री (बलरामाची आई).
**रोहिणीपति, रोहिणीवर** (सं. पु.) चंद्र; वसुदेव.
**रोहिला** (पु.) पठाण.
**रोहो** (प्रा. पु.) वृद्धि (ज्ञा० १६।३६९); उपक्रम, आरंभ (ना० १९३२).
**रोहो** (स्त्री.) मत्स्य; हरिणाची एक जात.
**रोहोपोहो** (पु.) दळणवळण, व्यवहार.
**रोळ** (इं. रोलर पु.) रस्त्यावरची खडी दाबण्याचें यंत्र; (पु.) प्रघात, वहिवाट; क्रम; नियम.
**रोळा** (प्रा. पु.) वृष्टि, समुदाय.
**रोळू** (प्रा. पु.) नियम (विवे०पू० ३।५७.)
**रौद्र** (सं. पु.) नवरसांपैकीं एक रस.
**रौनक** (स्त्री.) शोभा; सौंदर्य.
**रौप्य** (सं. पु.) रुपें, चांदी. **रौ०मुद्रा** (स्त्री.) रुपया, चांदीचें नाणें.
**रौप्यचषक** (पु.) चांदीचा पेला.
**रौप्यमहोत्सव** (पु.) संस्थेच्या अथवा घटनेच्या २५ व्या वाढदिवसाचा समारंभ.
**रौप्यमुद्रा** (सं. स्त्री.) चांदीचें नाणें.
**रौप्यशृंखला** (स्त्री.) सरकारी नोकरी.
**रौरव** (सं. पु.) एक महानरक.
**ऱ्याऱ्या** (स्त्री.) मुलांची पीरपिर, चिरचीर, तरफड.
**ऱ्हद** (पु.) डोह; एक धातु.
**ऱ्हस्व** (वि.) आखुड; कमी लांबीचा.
**ऱ्हास** (पु.) नाश; उतरती कळा.
**ऱ्ही** (सं. स्त्री.) लाज; लज्जा.

---

## ल

**ल** मराठी व्यंजनमालेंतील अठ्ठाविसावें व्यंजन.
**लइ** (वि.) पुष्कळ; अतिशय; तंबाखूची एक जात.
**लईण, लईन** (इं. लाइन स्त्री.) रांग, ओळ.
**लईलूट** (स्त्री.) अतिशय विपुलता.

**लकन्, लकदिशीं** (क्रि. वि.) एका क्षणांत.
**लकडकोट** (हिं. पु.) लाकडाची तटबंदी.
**लकडखाना** (हिं. पु.) लाकडाची वखार.
**लकडा** (हिं. पु.) निकड, नेट.
**लकडी** (स्त्री.) लाकूड, काठी; लाकडासारखा कडक झालेला गुळाचा पाक.
**लकतर** (न.), **लकतरी** (स्त्री.) चिंधी; वाभाडा; फाटकें वस्त्र.
**लकपक** (वि.) नीटनेटका, छानदार.
**लकब** (अर. स्त्री.) खोड; दुर्गुण.
**लकलकणें** (स्त्री.) चकाकणें.
**लकलकाट** (पु.) प्रकाश, तेज.
**लकलकीत** (वि.) स्वच्छ, निर्मळ, तेजस्वी.
**लंका** (सं. स्त्री.) रावणाची राजधानी; सीलोन बेट; (सं. लंका = जारिणी स्त्री.) विनोदानें अपशब्दार्थी किंवा अवगुणार्थी लहान पोरीला लावण्याची संज्ञा; तंबाखूची एक जात. **लंकेची पार्वती**— अंगावर अगदी अलंकार नसलेली स्त्री.
**लकाकी** (स्त्री.) चकाकी, तजेला, तेज.
**लकारविल्हयांतला** आरंभीं ल आहे असा शब्द—लबाड, लुच्चा, लुब्रा, लुटारू.
**लकीर** (हिं. स्त्री.) ओळ, रेघ.
**लकेरी** (स्त्री.) चकाकी, ताना; छाट, झाक; (पु.) लाखेच्या बांगड्या वगैरे वस्तु करणारा.
**लक्क, लख्ख** (वि.) चक्क, निर्मळ.
**लकुच** (न.) एक फळ.
**लखपति** (सं. लक्षपति पु.) लक्षाधीश.
**लखलखणें, लखलखाट, लखाकी** इत्यादि शब्दांसाठीं लकलकणें, लकलकाट, लकाकी इत्यादि पहा.
**लखलूट, लखलोट** (वि.) विपुल, भरपूर.
**लखलाभ** (सं.लक्षलाभ पु.) अतिशय मोठा लाभ.
**लखापडी** (गुज. स्त्री.) पत्रव्यवहार.
**लखोटा** (पु.) पाकीट, बंद केलेलें पत्र.
**लग** (स्त्री.) खांबावर आडवी टाकलेली तुळई; खांदी मोडली असतां ती तुटून न पडतां ज्यामुळें लोंबत राहते तो अंश; संबंध; संयोगभूमि.
**लंग** (स्त्री.) दुकॉलमी यादींतल्या पैकीं एखादा कॉलम अपुरा राहिल्यास दुसऱ्याच्या बरोबर करण्यासाठीं पहिल्या कॉलमांत० ही रकम लिहून पूर्णता करतात ती; (फा. वि.) लंगडा; (सं. वि.) उपास, आजार, काळजी वगैरेनें अशक्त झालेला.
**लग्गा** (पु.) वशिला.
**लगट** (स्त्री.) पाठलाग; जोराचा हल्ला; चिकटून राहणें, दाट मैत्री.
**लगटण** (क्रि.) आंगसरपटीस जाणें, चिकटणें.
**लगड** (स्त्री.) सोनें, चांदी इ. ची कांब; वीट; माकण; ओझें (तुका० ११२७).
**लंगडणें** (क्रि.) एका पायावर भार देऊन चालणें.
**लगडतगड** (स्त्री.) काम अर्धवट करून टाकून देणें; (अ.) कसें तरी, निष्काळजीपणानें, वरवर.
**लंगडदीन, लंगडा** (वि.) पायानें अधू, पंगु; लंगडणारा. [खेळ.
**लंगडशाई** (स्त्री.) लंगडत चालणें; एक
**लंगडी** (स्त्री.) एक खेळ.
**लगत** (अ.) सोबत, जवळ, लागून. [व्यवहार.
**लगतग** (स्त्री.) लबाडीचा किंवा कपटाचा
**लगता** (वि.) लागून असलेला; (पु.) संधि, जोड; जोडून असलेला प्रदेश.
**लगदा** (पु.) भिजविलेला व मळलेला पदार्थाचा गोळा; (प्रा. पु.) खोटें सोनें.
**लगधग** (स्त्री.) झटपट काम करणें; चपळता.
**लगनटका** (पु.) लग्न करण्यास परवानगी मिळण्याबद्दलची फी.
**लगबग** (स्त्री.) धांदल, घाई; (अ.) घाईनें.
**लगबगां** (अ.) घाईघाईनें.
**लगभग** (हिं. क्रि. वि.) सरासरी.
**लंगर** (फा. पु.) गलबताचा नांगर; लोखंडाचा साखळदंड; मोहरमांत फकिरांना वांटतात तें अन्न. **लं० दोरी** (पु.)– दोरखंड. [ (वि.) उमट, बंडखोर.
**लगर** (स्त्री.) मोत्यांचा सर, फुलांची माळ;
**लगविणें** (क्रि.) लगावणें पहा.
**लगा** (प्रा. पु.) आश्रय (मोरो० कर्ण० ११।६९); संबंध.

**लगावांधा** (पु.) नात्याचा किंवा मित्रत्वाचा वगैरे संबंध.
**लगाम** (फा. पु.) घोड्याच्या तोंडांत घालण्याची शृंखला किंवा दावें. **लगामीं असणें**—स्वाधीन असणें.
**लगामी** (वि.) स्वाधीन.
**लगाव** (हिं. पु.) नेम, धोरण; संबंध.
**लगावणें** (क्रि.) मारणें.
**लगी** (स्त्री.) लग पहा; पताका.
**लगीन, लगीनघटका, लगीनघर** इत्यादि शब्दांबद्दल लग्न, लग्नघटका, लग्नघर इत्यादि शब्द पहा.
**लगेढोल** (अ.) त्वरेनें, चपळतेनें.
**लगेहात** (अ.) त्याच वेगानें; तसेंच.
**लंगोट** (पु.) लांग, लंगोटी, चड्डी.
**लंगोटी** (स्त्री.) नेसण्याची चिंधी; रुंदी थोडी व लांबी पुष्कळ असा तुकडा.
**लंगोटीमित्र, लंगोटीयार** (पु.) बाळमित्र.
**लगोऱ्या** (स्त्री.) लाकडाच्या पातळ फळीचे आकारानें लहान लहान होत गेलेले वाटोळे सात तुकडे एकावर एक ठेवून खेळावयाचा खेळ.
**लगोलग** (क्रि. वि.) लगेच, पाठोपाठ.
**लग्न** (सं. वि.) चिकटलेलें; तल्लीन; (न.) ऐक्य; विवाह साहचर्य; एकीकरण; राशीचा उदय व त्याचा काळ क्रान्तिवृत्त व क्षितिज यांचा छेदबिंदु.
**लग्नकुंडली** (सं. स्त्री.) माणसाच्या जन्माच्या दिवशीं सूर्योदयापासून जन्मकाळापर्यंत जितक्या घटका गेल्या असतील त्याच्या हिशेबानें जी राशि पूर्वेकडे उदय पावली असेल ती कोष्टकांत प्रथमस्थानीं मांडून पुढें बारा स्थानांत बारा राशि व त्या त्या राशीचे ग्रहहि तेथेंच लिहितात; अशा रीतीनें तयार केलेलें कोष्टक.
**लग्नघटिका** (स्त्री.) लग्नाची वेळ; लग्नाची वेळ मोजण्यासाठीं पाण्यांत टाकलेलें बुडाशीं बारीक छिद्र असलेलें पात्र; आणीबाणीची वेळ.
**लग्नघर** (न.) लग्नांतल्याप्रमाणें माणसांनीं गजबजलेलें घर.
**लग्नचिठ्ठी** (स्त्री.) लग्नाचें लेखी आमंत्रण, कुंकुमपत्रिका. [सरकारचा कर.
**लग्नटका—क्का** (पु.) लग्नावरचा
**लग्नटीप** (स्त्री.) विवाहाला योग्य अशा शुभमुहूर्तांची यादी.
**लग्नतीथ** (सं. लग्नतिथि स्त्री.) विवाहासाठीं शुभमुहूर्त असलेला दिवस.
**लग्नथर** (पु. न.) लग्नासाठीं घेतलेलें कापडचोपड.
**लग्नपत्रिका** (सं. स्त्री.) विवाहासाठीं योजिलेला शुभ मुहूर्त लिहून ठेविलेला कागद; विवाहप्रसंगीं या कागदाची पूजा करतात.
**लग्नसराई, लगिनसराई** (स्त्री.) लग्नांचा हंगाम (मार्गशीर्षपासून ज्येष्ठापर्यंत).
**लग्नसाडा** (पु.) लग्नाच्या वेळीं वधूपक्षाकडून वराच्या आईस देण्यांत येणारें लुगडें; कित्येक प्रांतांत—वराकडून वधूस देण्यांत येणारें लुगडें असाहि अर्थ करण्यांत येतो. [त्याचें कौतुक.
**लग्नसोहाळा** (पु.) लग्नाचा समारंभ व
**लंघणें** (सं. लंघ् क्रि.) शक्तिहीन होणें; ओलांडणें. [ओलांडणें; क्षीण होणें,
**लंघन** (सं. न.) उपास; पार जाणें,
**लघाळ** (स्त्री.) रांग; (वि.) बडबड्या; लोचट, कोडगा.
**लघाळकी** (स्त्री.) लघाळपणा, बडबड.
**लघाळभवानी, लघाळमावशी** (स्त्री.) फाजील, बडबडी, लोचट स्त्री.
**लघिमा** (सं. पु.) हलकेपणा; (स्त्री.) एक सिद्धि.
**लघिष्ठ** (वि.) अत्यंत हलका.
**लघु** (सं. वि.) लहान, हलका.
**लघुत्व** (सं. वि.) कमीपणा, नीचत्व.
**लघुलेखन** (सं. न.) ऐकलेलें भाषण, ठराविक चिन्हें इत्यादिकांनीं लिहून घेणें. **ल०पद्धति**—अशा रीतीनें भाषण लिहून काढण्याची रीत.
**लघुशंका** (सं. स्त्री.) लघ्वी, मूत्र.
**लघ्वी** (सं. स्त्री.) लघुशंका, मूत्र.
**लंच** (स्त्री) डाव; खेळाचा शेवट; (इं. स्त्री.) अल्पोपाहार.

**लचक** (हिं. स्त्री.) चमक, मुरगाळणें; आवड, छंद.
**लचकणें** (क्रि.) शिरेला धक्का बसून आचका येणें, मुरडणें, मुरगाळणें.
**लचका** (पु.) तुकडा, चावा.
**लचण** (क्रि.) कचणें; खचणें.
**लचाड** (वि.) चहाडखोर; वडवडया, चकाटया पिटणारा.
**लचांड** (न.) पीडा, भानगड, शुक्लकाष्ठ. **ल० खोर** (वि.)–लवाड, खोडसाळ, नसत्या भानगडी उपस्थित करणारा.
**लचांडी** (पु.) लुच्चा, भामटा; लचांडखोर.
**लचाळ** (प्रा. वि.) लोचट, वाचाळ.
**लज्जत** (अर. स्त्री.) स्वाद, चव, गोडी.
**लज्जा** (सं. स्त्री.) लाज, शरम.
**लज्जायमान** (सं. लज्जमान वि.) लाजलेला, शरमिंदा.
**लज्जित** (सं. वि.) शरमिंदा.
**लज्जालु** (सं. वि.) लाजाळू; (पु.) लाजाळू नांवाची वनस्पति.
**लज्जावती** (स्त्री.) लाजाळू वनस्पति; (वि.) लाजाळू (स्त्री).
**लज्जावान्** (सं. वि.) लाजाळू, मर्यादशील.
**लज्जाशील** (सं. वि.) लाजाळू.
**लट** (स्त्री.) गुंतागुंत.
**लटक** (हिं. स्त्री.) इतरांहून निराळी तऱ्हा; खोड, लकब; ओढ, भक्ती; (पु.) खोडसाळ किंवा दुष्ट मनुष्य.
**लटकणें** (क्रि.) लोंबणें; **लटकत चालणें**–नखऱ्यानें ठुमकत चालणें.
**लटका** (वि.) खोटा, रिकामा, निरर्थक.
**लटकाफटका, लटकालांडा** (वि.) खोटा, कपटी, लवाड, अप्रामाणिक.
**लटकुरा, लटकोरा** (वि.) लटका.
**लटकावणें** (क्रि.) टांगणें.
**लटपट** (स्त्री.) गडबड; धांदल; चलाखी; घाबरगुंडी; कडाक्याचें भांडण.
**लटपटणें** (क्रि.) व्यर्थ होणें; रद्द पडणें; गोंधळणें.
**लटपटपंची** (स्त्री.) पोपटाला म्हणायला शिकवतात असा एक शब्द; बढाई; गडबडगुंडा.
**लटपटीत** (वि.) डळमळीत, अस्थिर.
**लटपटया** (वि.) चलाख, फाजील, लटपटी करणारा.
**लटबर, लटांबर** (न.) मोठें खटलें.
**लटलट करणें** कांपणें.
**लटापटी** (स्त्री.) लटपट पहा.
**लटांबर** लटबर पहा.
**लटारणा** (वि.) मोठा, प्रचंड, विशाळ.
**लटिका** (वि.) लटका पहा.
**लटिगा** (पु.) खोटा.
**लटीक** (प्रा. वि.) खोटा. **ल० वाद** (पु.)––लटकेपणा, खोटेपणा; असत्यवादित्व.
**लटुपटु, लटुवटु** (वि.) लुटुपुटु पहा.
**लटू** (प्रा. वि.) अज्ञान (वामन––वामनचरित्र ४).
**लटू** (वि.) खूप झालेला.
**लटोरा** (वि.) जाड, लठ्ठ; (पु.) जाड सोटा. [सोटा.
**लठ्ठ** (हिं. वि.) पुष्ट, जाडा, स्थूल; (पु.)
**लठ्ठनिरंजन, लठ्ठंभारती** (वि.) धष्टपुष्ट, बेफिकीर, दांडगा.
**लठ्ठया** (पु.) दांडगा; स्वैर; एखाद्या स्त्रीनें ठेवलेला माणूस.
**लठ्ठालठ्ठी** (हिं. स्त्री.) मारामारी.
**लठ्ठेश्वर** (वि.) धष्टपुष्ट, दांडगा.
**लड** (स्त्री.) सर, माळ. [मुलगी.
**लडका** (हिं.पु.) मुलगा; **लडकी** (हिं.स्त्री.)–
**लडगत–थ** (स्त्री.) फुरसत किंवा साधन नसल्यामुळें कसेंबसें केलेलें काम किंवा तें करण्यांत केलेली लगबग किंवा घाई.
**लंड** (वि.) ठक, पक्का धूर्त, उन्मत्त; लांडा; (पु.) शिस्न.
**लंडाई** (स्त्री.) कावेबाजपणाची वर्तणूक.
**लडथड** (स्त्री.) भानगड, घोटाळा.
**लडथडणें** (क्रि.) मध्यें येऊन अडथळा करणें, लुडबुडणें. [करणारा.
**लडथडया** (वि.) भांडखोर; उलाढाली
**लडदु, लडधू** (वि.) गबदुल, लठ्ठ.
**लडफड, लडबड** (स्त्री.) लुडबुड; लबलबीतपणा. [घोटाळणें.
**लडबडणें** (क्रि.) बरबटणें; लुडबुडणें;

[illegible] वाचनालय, सातारा.

**लडबडीत** (वि.) बरबटलेला, माखलेला; लटपटणारा, डळमळीत.
**लडलड** (अ.) लडिवाळपणानें.
**लडा** (पु.) बोकड; एडका. [२८९३).
**लडाई** (प्रा. स्त्री.) दांडगेपणा (तुका०
**लडिवाळ** (वि.) लाडका; (पु.) लाड.
**लडिवाळी** (स्त्री.) लडिवाळपणा; (पु.) लाड, कौतुक.
**लडी** (स्त्री.) लड पहा.
**लॅंडीस** (इं. न.) पत्त्याच्या खेळांतील एक डाव; रुळावरून चालणारी हातगाडी.
**लंडी** (वि.) दांडगा, अविचारी; भित्रा (दा० २।१।३३).
**लंडीपण** (प्रा.) नामर्दपण.
**लंडोवा** (प्रा. वि.) लबाड.
**लड्ड** (वि.) मूर्ख; मंदबुद्धीचा.
**लड्डु** (सं. लड्डुक पु.) लाडू. [गाडी.
**लढ** (सं. लढ स्त्री.) गुंतागुंत; (न.) मोठी
**लढणें** (क्रि.) भांडणें, झुंजणें.
**लढत** (स्त्री.) लढाई, झुंज.
**लढवई** (वि.) लढाऊ.
**लढवय्या** (पु.) योद्धा.
**लढविणें** (क्रि.) भांडण लावणें; तोंड करणें; युक्ति करून पाहणें.
**लढा** (पु.) वाद, तंटा. [झुंज.
**लढाई** (हिं. स्त्री.) भांडण, तंटा, युद्ध,
**लढाऊ** (वि.) लढण्याच्या उपयोगी. [युक्ति.
**लत** (स्त्री.) खोड, वाईट संवय, लकब;
**लतकोडगा, लतकुटा** (वि.) निर्लज्ज; पुनः पुनः तीच चूक करणारा.
**लता** (सं. स्त्री.) वेल. [लिला मांडव.
**लतागृह, लतामंडप** (पु.) वेलीवर चढवि-
**लताफत** (फा. स्त्री.) स्नेहसंबंध.
**लतिका** (सं. स्त्री.) लता, वेल.
**लत्तरबाळया** (स्त्री. अने.) चिंध्या.
**लत्ता** (सं. स्त्री.) लाथ; (पु.) धडपा.
**लत्ताप्रहार** (सं. पु.) लाथेचा तडाखा.
**लथडणें** (क्रि.) बरबटणें.
**लथाडणें** लाथाडणें पहा.
**लदाव** (पु.) कमानीखालचा भराव.
**लद्दा** (पु.) लगदा, गोळा. [गोळा.
**लपका** (पु.) फेकून मारलेला ओला

**लंपट** (सं. वि.) कामुक, अतिशय आसक्त; ढिलें, लापट.
**लपटणी करणेल** (इं. लेफ्टनंट कर्नल पु.) सैन्यावरील एका वडा अंमलदार.
**लपटणें** (क्रि.) चिकटणें.
**लपंडाई** (स्त्री.), **लपंडाव** (पु.) मुलांचा लिपीछिपीचा खेळ; कपटी वर्तन; लपूनछपून केलेलें कृत्य. [जागा.
**लपण, लपणी** (प्रा. स्त्री.) आश्रय, लपण्याची
**लपणें** (क्रि.) दडणें, गुप्त राहणें, वाकणें.
**लपविणें** (क्रि.) दडविणें, दुसऱ्यास न दिसू देणें.
**लप्पं छप्पं** (न.) लपंडाव.
**लपांगा** (वि.) लफंगा, लबाड.
**लपीथपी** (प्रा. स्त्री.) लपंडाव (ज्ञा० १४।९).
**लपेट** (पु. स्त्री.) पदर, पट्टी; घेर; भाषणांतली धूर्तता; उष्णवायूची झोंप; पटकी.
**लपेटणें** (क्रि.) वेष्टणें.
**लपेटा** (पु.) पदर, पट्टी; वेष्टण; सारवण; बांगडीचा एक प्रकार.
**लपेटी** (स्त्री.) भाषणांतली किंवा लिहिण्यांतली लटपट; आडवेतिडवेपणा.
**लपेटीदार** (वि.) लपेटी असलेलें (अक्षर किंवा भाषण).
**लपोटशंख** (वि.) बोलण्यांत अघळपघळ पण कृतीच्या नांवानें शून्य.
**लप्फा** (हिं. लपा पु.) मोठा जरीचा पदर.
**लप्फेदार** (वि.) मोठ्या जरीचें.
**लफंगा** (पु.) लुच्चा, फसव्या मनुष्य.
**लफंगें** (न.) लचांड; लफडें; वायफळ गोष्ट.
**लफडा** (पु.), **लफडें** (न.) लचांड; त्रासदायक काम; निरर्थक वाद.
**लब** (स्त्री.) ओठ; निरोप्याचें काम; वाक; वक्रता. **लब खाणें—मोडणें.**
**लंब** (सं. पु.) एक रेषा दुसऱ्या रेषेला मिळून दोन काटकोन झाल्यास त्या मिळणाऱ्या रेषेला लंब म्हणतात; (वि.) लांब.
**लंबक** (सं. पु.) आंदोलक.
**लबक** (स्त्री.) लकब, खोड, रुचि; पद्धत.

**लवकणें** (क्रि.) पुढें वाकणें.
**लंबकर्ण** (सं. पु.) गाढव.
**लंबछडी** (वि.) लांब पल्ल्याची (तोफ).
**लंबन** (सं. न.) एखादा पदार्थ दोन स्थानांपासून पाहिला असतां त्यांच्या दिशांमध्यें (दर्शनरेषांमध्यें) होणारा कोन.
**लंबमान** (सं. वि.) लोंबणारा.
**लवराण** (स्त्री.) जड पदार्थ तोलून वर घेण्यासाठीं जहाजावर ठेविलेला दोरखंड.
**लवलव** (स्त्री.) जिभेची त्वरित गति.
**लबलबीत** (वि.) पचपचीत, पाणचट.
**लंबवर्तुळ** (न.) लंबवृत्त पहा.
**लंबवृत्त** (सं. न.) अंड्यासारखें लांबट वर्तुळ (इंग्रजींत ज्याला सिलिंडर म्हणतात तसें). [मृत; नष्ट.
**लंब्रा** (सं. लंब वि.) लांबवर पसरलेला;
**लबाड** (वि.) खोटा, लुच्चा. [लुच्चेगिरी.
**लबाडकी, लबाडी** (स्त्री.) खोटेपणा;
**लबाडलाताड, लबाडलाताळ** (वि.) लुच्चा, हलकट, खोटा.
**लबाडी, लबाडीलाताडी** (स्त्री.) खोटेपणा, लुच्चेगिरी, अप्रामाणिकपणा.
**लंबाण लंबाड** (न.) लमाण; वंजारी.
**लंबायमान** (सं. लंबमान वि.) लांबचलांब.
**लंबी** (स्त्री.) लांबी.
**लंबे** (वि.) लांब, लांबलचक; चीत, पराजित; (स्त्री.) फजिती, खोऱ्या; पराभव.
**लवेदा** (पु.) प्रवासांत बरोबर असलेला बायका मुलें इत्यादि परिवार.
**लबूद** (वि.) लब्ध, अधीन.
**लबेशाई** (स्त्री.) निरोप पोंचविण्याचें काम.
**लबोडशंख** लपोटशंख पहा.
**लंबोदर** (वि.) ढेरपोट्या; (सं. पु.) गणपती.
**लब्ध** (सं. वि.) मिळालेलें, प्राप्त.
**लब्धप्रतिष्ठ, लब्धप्रतिष्ठित** (सं. वि.) स्वतःला मोठा समजणारा; आढ्यतेखोर. [गर्व.
**लब्धप्रतिष्ठा** (सं. स्त्री.) प्रौढी; पोकळ
**लब्धि** (सं. स्त्री.) लाभ, प्राप्ति, नफा; भागाकार.

**लभ्य** (सं. वि.) मिळण्यासारखें.
**लभ्यांश** (सं. पु.) प्राप्ति, फायदा.
**लमाण** (पु.) धान्य, मीठ इ. जिन्नस एका देशाहून दुसऱ्या देशास नेणारे लोक; त्यांचा तांडा किंवा समूह.
**लय** (सं. पु.) नाश, प्रळय; एका पदार्थाची दुसऱ्याशीं तद्रूपता; काळाची अविच्छेदगति; गाण्याची गति; गायन, वादन व नृत्य यांचें ऐक्य; एकतानता; चित्ताची एकाग्रता; वाद्य वाजविल्यानंतर मागें कांहीं वेळ राहणारा त्याचा ध्वनि. [ ताल धरणें.
**लयक्रिया** (सं. स्त्री.) संहारकार्य; गाण्यांत–
**लयलूट** (स्त्री.) चंगळ, विपुलता.
**लयस्थ** (सं. वि.) तटस्थ. [गर्जना, पुकार.
**ललकार, ललकारणी** (स्त्री.) मोठा स्वर,
**ललकारणें** (क्रि.) दीर्घ स्वर काढणें; पुकारणें.
**ललकारी** (स्त्री.) आरोळी, दीर्घस्वर.
**ललत** (पु.) उत्तररात्रीं गाण्याचा एक राग.
**ललन** (सं. न.) क्रीडा; कंपन.
**ललना** (सं. स्त्री.) स्त्री, विलासिनी स्त्री.
**ललाट** (सं. न.) कपाळ.
**ललाटरेषा** (सं. स्त्री.) प्रारब्ध.
**ललाम** (सं. न.) भूषण; चिन्ह; कपाळावरचें चिन्ह.
**ललित** (सं. वि.) विलासी; मनोहर; कोमल; (न.) विलास, शृंगार; स्त्रीचें नृत्य.
**ललित** (सं. न.) एक वृत्त. याच्या चरणांत ११ अक्षरें व र, ज, स, हे गण असून शेवटीं लघुगुरु अक्षरें असतात.
**ललितकला** (सं. स्त्री.) काव्य, गायन, वादन, चित्र, नृत्य इत्यादि सौंदर्यविषयक कोमल कला.
**ललिता** (स्त्री.) पार्वती; सुंदरी.
**ललितापंचमी** (सं. स्त्री.) आश्विन शु० ५.
**ललुपुतु करणें** गोंजारणें, दादाबाबा करणें, लहान मुलाचें आर्जव करणें.
**ललेथोपे** (स्त्री.) मुलाला लाडानें किंवा प्रेमानें थोपटणें.
**ललोप** (पु.) लडिवाळपणा, गोंजारणें.

...र वाचनालय, सातारा.

**लल्ल** (प्रा. वि.) चंचल.
**लल्लाट** (सं. ललाट न.) ललाट पहा.
**लव** (सं. पु.) सूक्ष्म अंश; (सं. लोभ स्त्री.) अंगावरचे बारीक कोमल केस.
**लवक** (प्रा. स्त्री.) उभारणी; (वि.) किंचित्.
**लवकर** (अ.) जलदीनें, झटकन्.
**लवका** (वि.) लवचीक; (पु.) लचका; तुकडा.
**लवकिरा, लवखर** (वि.) लवचीक.
**लवखाद** (स्त्री.) उत्सुकतेची उडी.
**लवंग** (स्त्री.) गरम मसाल्यांतला एक तिखट पदार्थ.
**लवंगणें** (क्रि.) लचकणें, मुरगाळणें.
**लवंगी कुत्रें** कुत्र्याची एक लहान जात.
**लवंगी फटाकडा** लवंगेसारखा बारीक पण कणखर आवाज करणारा फटाकडा.
**लवंगी मिरची** लहान, बारीक, पण फार तिखट अशी मिरचीची एक जात.
**लवंघा** (प्रा. पु.) दाह, अतिशय तृष्णा.
**लवचीक** (वि.) न मोडतां लवणारें.
**लवटी** (स्त्री.) भारा आवळून बांधण्यासाठीं त्याच्या भोंवतालीं बांधलेल्या दोरींत घातलेली काडी किंवा चीप.
**लवटें** (प्रा. वि.) लवलेलें [विवे० उ० ९।७४).
**लवंडणें** (क्रि.) एका बाजूस पडणें; [सांडणें; आडवें होणें.
**लवडसवडी** (प्रा. स्त्री.) लगबग, त्वरा; (अ.) चपळतेनें.
**लवंडी** (स्त्री.) दासी, बटीक.
**लवण** (सं. न.) मीठ, क्षार; खोलगट [जागा.
**लवणजल** (सं. न.) समुद्र.
**लवणभंजन** (न.) नम्रतेचा देखावा.
**लवणशाक, लवणशाखा** (स्त्री.) लोणचें.
**लवणी** (स्त्री.) खळगी; बाक; वक्रता.
**लवणें** (क्रि.) वाकणें; स्फुरणें; नम्र होणें; (प्रा.) जाळणें.
**लवथवित** (प्रा. वि.) लवलवीत.
**लंवथा** (पु.) लचका.
**लवघट**(वि.)माथेफिरू, दुराग्रही, अविचारी.
**लवलव** (स्त्री.) बडबड; कोमलता; (अ.) चुरुचुरु.
**लवलवाट** (प्रा. पु.) उत्कंठा, घाई.
**लवलवीत** (वि.) थलथलीत.
**लवलक्षण** (वि.) सौंदर्य, देखणेपणा.
**लवलाव** (प्रा. पु.) चळवळ.
**लवलाहत** (प्रा. अ.) त्वरेनें (राम० वि० ३५।१६६).
**लवलाही, लवलाहें** (प्रा. अ.) लवकर.
**लवलाहो** (प्रा. अ.) त्वरा.
**लवलेश** (सं. पु.) किंचित् अंश.
**लवाजमा** (अर. लवाजमा पु.) डौल दिसण्यासारखें सामान, गाड्या, नोकर इत्यादि.
**लवाद** (अर. लवाज् पु.) पंच.
**लवादकोर्ट** (पोर्तु. लुवादो न.) आपसांतले तंटे सरकारी न्यायकोर्टांत न नेतां पंचांमार्फत तोडून घेण्यासाठीं स्थापन केलेली संस्था.
**लवाळा, लव्हाळा** (पु.) जलाशयाच्या कांठीं उगवणारें एका प्रकारचें गवत.
**लवियपी** (प्रा. स्त्री.) लपंडाव.[२२०३)
**लवी** (प्रा. स्त्री.) लवण, बाक (तुका०
**लव्हा** (पु.) लव्हाळा; (वि.) पाणीदार.
**लव्हेंडर** (इं. न.) एक सुवासिक पाणी.
**लशुन** (सं. न.) लसुण.
**लश्कर, लष्कर** (फा. न.) सैन्य, फौज. **ल० च्या भाकरी भाजणें**—निष्कारण दुसऱ्याच्या उठाठेवी करणें.
**लष्करी** (फा. वि.) फौजेंतली, सैन्यविषयक.
**लस** (हिं. स्त्री.) फोडांतून निघणारा द्रवांश.
**लसण** (सं. लशुन न.) लसुण.
**लसणा** (पु.) कुऱ्हाड पाजविण्याचा दगड.
**लसणी** (सं. लशुन स्त्री.) लसणाची पाकळी; तिच्या आकाराचा स्त्रियांचा एक अलंकार; वैदूर्यमणि.
**लसणें** (क्रि.) लचकणें. [उज्ज्वल.
**लसत** (सं. वि.) उत्कृष्ट, शोभायमान,
**लसती** (वि.) सुंदर; (स्त्री.) सुंदर स्त्री.
**लसलशीत** (वि.) रसरशीत, फार तापलेलें.
**लसलस** (स्त्री.) वळवळ; चळवळ.
**लसलसणें** (क्रि.) फार तापणें; वळवळणें; भर येणें.

**लसित** (सं. न.) विलास, उल्लास. [एक रस.
**लसीका** (सं. स्त्री.) लस, शरिरांतला
**लसूण** (सं. लशुन न.) एक उग्र वासाचा कंद.
**लस्कर** (हिं. पु.) खलाशी, नाखवा.
**लस्सी** (हिं. स्त्री.) दूध व पाणी मिसळून तयार केलेली थंडाई. [परकर.
**लहंगा** (हिं. पु.) घागरा; मोठ्या बाईचा
**लहणें** (वि.) लाभदायक.
**लहणें** (न.) ज्याच्याकडे आपले पैसे नाहींत अशा एखाद्या सावकारावर हुंडी पाठविली असतां त्या हुंडीवरोबर हुंडीची रक्कम किंवा तितक्या रकमेची दुसऱ्या कोणावर हुंडी पाठवितात ती.
**लहर** (सं. लहरी स्त्री.) लाट; झटका; हुक्की; छाया; मनाचा कल. [काळ.
**लहरवहर** (स्त्री.) भर; भरभराट; उत्कर्षाचा
**लहरा** (पु.) तान; सूर.
**लहरीदार** (वि.) पाण्याच्या लाटेप्रमाणें वर खालीं होणारें; नागमोडी; छांदिष्ठ.
**लहरी** ( वि. ) छांदिष्ठ; (सं. स्त्री.) तरंग; लाट; झटका.
**लहरीवहरी** लहरी, छांदिष्ठ.
**लहाणें** (प्रा. क्रि.) लाभणें; (वि.) आवडतें.
**लहान, लहानगा, लहाना** (वि.) छोटा; लघु.
**लहानखुरी** (वि.) लहान पायांची, ठेंगणी ठुसकी.
**लहांचट, लहांचड, लहांचर** (वि.) लोचट; हट्टी.
**लहानपण** (न.) लघुता; बाळपण.
**लहानसर** (वि.) कांहींसें लहान.
**लहानसहान** (वि.) छोटा, हलका; क्षुद्र.
**लहानावणें, लहानाळणें** (क्रि.) कमी होणें, आकुंचित होणें.
**लहानीव** (स्त्री.) लहानपण; लघुता.
**लहारी** (स्त्री.) तीन आण्यांचें एक नाणें.
**लहु** (वि.) लघु. [बसविलेली काठी.
**लहुडी, लहुंडी** (स्त्री.) लोखंडाचें अग्र
**लळतलोंबत** (अ.) लोळतलोंबत.
**लळा** (सं. लाल पु.) प्रेमा; माया; लाड.
**लळित** (सं. ललित न.) देवाच्या उत्सवाच्या शेवटीं सोंगें आणून कीर्तन करतात तें; (निंद्यार्थी) गोंधळ.
**लळित** (प्रा. न.) दुष्परिणाम, फजिती (तुका० ४८४). **ल० वर येणें**— रागावणें.
**लळिवाड** (वि.) लाडका.
**लक्ष** (सं. न.) शंभर हजार संख्या; चित्र; मन; नेम.
**लक्षण** (सं. न.) चिन्ह; गुणधर्म; व्याख्या.
**लक्षणा** (सं. स्त्री.) वाच्यार्थाहून निराळा पण तत्संबद्ध अर्थ; शब्दाच्या मुख्यार्थाबरोबरच तत्संबंधीं अन्य अर्थही उत्पन्न करण्याची शब्दाच्या अंगची शक्ति.
**लक्षणीय** (सं. वि.) दर्शनीय, विचारणीय.
**लक्षिणें** (क्रि.) निरखून पाहणें.
**लक्षा** (प्रा. स्त्री.) लक्ष्य; लक्ष संख्या.
**लक्षाधीश** (सं. पु.) लाखों रुपये जवळ असलेला.
**लक्षावधि** (वि.) लाखों. [ओळखणें.
**लक्षिणें** (क्रि.) लक्षपूर्वक पहाणें, लक्षणावरून
**लक्षेश्वरी** (सं. स्त्री.) लक्षाधीशपणा. **ल० किंवा भिक्षेश्वरी**—लक्षाधीश तरी असावें किंवा भिक्षा तरी मागावी म्हणजे चंगळ असते.
**लक्ष्मी** (सं. स्त्री.) संपत्तीची व शोभेची देवता; विष्णूची पत्नी; द्रव्य; बाई.
**लक्ष्मीपुत्र** (सं. पु.) श्रीमंत मनुष्य.
**लक्ष्मीपूजन** (सं. न.) लक्ष्मीची (धनाची) पूजा.
**लक्ष्य** (सं. न.) लक्ष ठेवण्याची किंवा नेम धरण्याची वस्तु; सावज; (वि.) द्रष्टव्य; लक्षणेनें ज्ञेय.
**लक्षपाल** (पु.) रक्षण करणारा (हॉकी, फूटबॉल इत्यादि खेळांतील गोलकीपर).
**लक्ष्यवेध** (वि.) अचूक नेम. [अर्थ.
**लक्ष्यार्थ** (सं. पु.) लक्षणेनें प्राप्त झालेला
**लांक** (पु. स्त्री.), **लांकण** (स्त्री.) सांधा, बंधन.
**लकाडी** (वि.) लाकडाचें.
**लाकण** (न.) मोठ्या तोंडाच्या लोखंडी कड्या ज्यांनीं बांधल्या असतात ती चामड्याची वादी.
**लाकणें** (क्रि.) जोडणें; लाख लावणें.
**लाकुड** (सं. लगुड न.) काष्ठ.

**लाख**(सं. लाक्षा स्त्री.) वड, पिंपळ इत्यादि झाडांपासून एक प्रकारच्या क्षुद्र जीवांनीं केलेला एक चिकट पदार्थ; (पु.) लक्ष-संख्या. [गळा) दाटणें.
**लाखटणें**(क्रि.) लाख लावणें; (घसा किंवा
**लांखण** (स्त्री.) गुरें, शेळयांना परस्परांशीं ज्यांनें बांधतात तें बंधन.
**लाखपंचोतऱ्या** (पु.) बेभरंवशाचा माणूस; ज्यानें लाख गोष्टी सांगितल्या त्यांतल्या पांच खऱ्या असतात असा.
**लाखलोटा** (पु.), **लाखलोटें** (न.) लाख लाविलेलें मडकें.
**लाखा** (पु.) भेकाड, भिरड; बुरशी.
**लाखाटा** (पु.) लाख लावणें.
**लाखी** (वि.) लाखेच्या रंगाचें, लाखेचें.
**लाखों** (अ.) लक्षावधि. [केलेलें पत्र.
**लाखोटा** (हिं. लखोटा पु.) लिफाफा; बंद
**लाखोपति** (पु.) लक्षाधीश.
**लाखोली** (सं. लाखावलि स्त्री.) लक्ष-संख्या; शिव्यांचा वर्षाव.
**लाख्या** (वि.) लाखांत एकादा सांपडणारा; उत्कृष्ट.
**लाग** (पु.) संधान; रीघ; प्रयत्न; खटपट; फ़ळ; प्रहार; आघात; संबंध; पीक; फळ; हंगाम; वेळ; आपत्ति; पाठलाग; नेम; उडी; चोळीला खाकेखालीं जो तुकडा लावतात तो; (प्रा.) गोडी; बंधन. **लागीं लागणें**—मार्गाला लागणें.
**लांग** (स्त्री.) समुद्राचा किनारा.
**लागट** (वि.) लोचट; कार्यसाधु; कीड लागलेलें; खाल्ला असतां भोंवळ आणितो असा (पदार्थ).
**लागटा** (पु.) सातत्य, संबद्धता, ओळ, रांग.
**लागण** (स्त्री.) लागवड; लागवडीखालची जमीन; पिशाचबाधा; जमिनीची वहिवाट; संसर्ग.
**लागणदार** (पु.) मिरासदार, ठिकाणदार, जमिनीचा मालक; जमीन वहीत करणारा; प्रथम लागवड करणारा.
**लागणें** (क्रि.) संबद्ध होणें; स्पर्श करणें; जरूर असणें; रुजणें; पोंचणें; सुरू होणें; अडखळणें; कुजणें; जडणें इ०
**लागतगुण** (पु.) संबंध जडल्यानें प्राप्त होणारा गुण.
**लागपाट** (प्रा. पु.) लगबग (तुका० ३२८९).
**लागभाग** (पु.) लागाबांधा, संबंध (तुका० १६७७). [वगैरे लागलेला.
**लागरा** (वि.) विकार करणारा; कीड
**लागलाच, लागलीच, लागलेंच** (अ.) तत्काळ, तावडतोब. [संधानी.
**लागलाव्य** (वि.) संधान बांधण्यांत पटाईत,
**लागवड** (स्त्री.) शेत नांगरणें, पेरणें इत्यादि कामें; पडीत जमीन शेतीच्या उपयोगाची करणें. [लावणी.
**लागवण** (प्रा. स्त्री.) पाठलाग; शेताची
**लागवग** (प्रा. पु.) अतिशय त्वरा.
**लागसर** (अ.) जवळ.
**लागाबांधा** (पु.) संबंध.
**लांगालुंगा** (वि.) क्षुद्र, हलका, वेडसर.
**लागावळ** (स्त्री.) रांग, ओळ, रेघ.
**लागावळ, लागावळी** (प्रा. स्त्री.) संबंध (तुका० ५२४); सागेलागे, संबंधी, नात्यागोत्याचीं माणसें (ना० १७५).
**लागीं** (प्रा. अ.) साठीं, प्रत, स्तव.
**लागी** (वि.) योग्य, लायक; आटोक्यांतला; लागलेला.
**लागींभागीं** (अ.) जवळ, समीप.
**लागीर** (वि.) कीड लागलेला; खराब झालेला; मादक; दुसऱ्याच्या प्रेमाला आकर्षून घेणारा; (स्त्री.) पिशाच-बाधा, पिशाच.
**लागू** (वि.) जुळता; परिणामकारक; प्राप्त; संबद्ध.
**लागू** (प्रा. पु.) स्पर्श, प्रीति, इच्छा. **ला० भागू** (वि.)—संबंधित; सांवलेलें.
**लांगूल** (सं. न.) शेपटी.
**लांगूलचालन** (सं. न.) कुत्र्यासारखें शेपटी हलविणें; नीच प्रकारची हांजी हांजी.
**लागोपाठ** (अ.) मागोमाग.
**लागोभागो दिवाळी** दैवावर हवाला ठेवून प्रयत्नास लागणें; यश आलें तर उत्तमच न आलें तरी वाहवा अशा समजुतीनें कामास लागणें.
**लाग्या** (पु.) वल्लभ, यार.

**लाघव**(सं. न.) लबाडी, बतावणी; चापल्य, कुशलता; पाल्हाळ, लघळपणा, मायावी प्रकार (तुका० ५५२).
**लाघवी** (वि.) मायावी, कपटी; आश्चर्यजनक; (स्त्री.) चापल्य; माया; (पु.) नट, बहुरूपी (ज्ञा० १३।१०२७); मांत्रिक.
**लांच, लांचलुचपत** ( स्त्री. ) स्वकार्यसाधनार्थ अन्यायानें गुप्तपणें द्यावें लागलेलें द्रव्य; (प्रा.) कुमार्ग, भाड.
**लांचकर** (प्रा. वि ) भाडखाऊ (ज्ञा० १३।२५).
**लाचकोडगा** (वि.) निर्लज्ज, लतकोडगा.
**लाचार** (फा. वि.) निरुपाय; दीन.
**लाचारी** (फा. स्त्री.) दीन दशा.
**लांचावणें** (क्रि.) सवकणें; लांच देणें.
**लांचु** (प्रा. पु.) लांच.
**लांचुगा** (प्रा. वि.) लांचखाऊ.
**लांछन** (सं. लांछन न.) कलंक, डाग, दोष.
**लांछित** (सं. वि.) कलंकित.
**लाज** (सं. लज्जा स्त्री.) शरम; संकोच, भीति; मर्यादा.
**लाजट** (वि.) लाजाळू.
**लाजणें** (क्रि.) शरमणें, मर्यादा राखणें.
**लाजबाब** (फा. वि.) निरुत्तर. [भाड.
**लाजमर्यादा, लाजलज्जा**(स्त्री.) शरम, भीड-
**लाजरा** (वि.) लाजाळू.
**लाजलावणा** (वि.) कलंक लावणारा.
**लाजन** (क्रि.) मर्यादशील, लाजाळू.
**लाजविणें** (क्रि.) दुसरा लाजेल असें करणें.
**लाजहिणें** (प्रा. क्रि.) लाजणें.
**लांजा** (पु.) संबंध.
**लाजा** (स्त्री. अने. ) लाह्या.
**लाजाहोम** (सं. पु.) लग्न झाल्यानंतर वधूवरांच्या हातून लाह्यांचा होम करवितात तो. [स्वभावाचा.
**लाजाळू** (सं. लज्जालु वि.) लाजऱ्या
**लाजिम, लाजीम** (अर. वि.) योग्य, न्यायाचें; (पु.) हक्क.
**लाजिमा** (अर. लवाजमा पु.) काम, हक्क.
**लाजिरवाणा** (वि.) शरमिंदा, ओशाळा; शरम वाटण्यासारखा.
**लांझा** (पु.) वाद, लफडा, लढा.
**लांझ्या** (पु.) आरोप; संबंध.
**लांम्या** (प्रा. पु.) ऋण, कर्ज (कथासारा० १४।१३६).
**लाट** (स्त्री.) तरंग, लहर, मोठें आडवें लाकूड; रस्ते दावण्याचा रूळ; धबाड; उंसाच्या चरकांत ऊंस गच्च दाबण्यासाठीं जे अनेक गोल वापरतात त्यांतला प्रत्येक; (इं. पु.) गट, गठ्ठा. **जंगीलाट** (पु.)—सर सेनानी. **मुलकीलाट**(पु.)—गव्हर्नर जनरल.
**लाटणें** (क्रि.) उपटणें, वळकावणें; (न.) पोळी पातळ करण्याचा लहान लाकडी रूळ.
**लाटण्या** (वि.) धष्टपुष्ट व दांडगा.
**लाटरी** (इं. स्त्री.) सोडत. [गोल गोळा.
**लाटा** (पु.) मळलेल्या कणिकेचा लांबट-
**लाटानुप्रास** (सं. पु.) एक भाषालंकार; त्याच अर्थाच्या पण निराळ्या ध्वनीच्या शब्दांची आवृत्ति यांत होते.
**लाटालाट** (स्त्री.) दडपादडपी, गडबडगुंडा.
**लाटी** (स्त्री.) मळून तयार केलेल्या पापडाच्या पिठाची गोळी.
**लाटी** (प्रा. स्त्री.) लाकडाचा खांब.
**लाटचा, लाटचागंगाजी** (वि.) जें दिसेल तें हस्तगत करण्याचा स्वभाव असलेला.
**लाठ** (प्रा. वि.) मोठा प्रबळ, दांडगा; (स्त्री.) लगट; गठ्ठा, भारा.
**लाठा** (प्रा. वि.) मोठा, दांडगा.
**लाठी** (स्त्री.) दंडुका; सोटा. **ला०राज्य** (न.)—दंडुक्यावर चालविलेलें राज्य.
**लाठू** (प्रा. वि.) थोर, बळकट.
**लाड** (सं. लड पु.) कौतुक, लालन.
**लाडकणें** (क्रि.) लाड करणें.
**लाडका** (वि.) प्रिय; विशेष आवडता.
**लांडगा** (पु.) एक क्रूर पशु.
**लांडगावें** (न.) लांडग्यांनीं केलेली नासाडी.
**लांडगी** (स्त्री.) लांडग्याची मादी; कोळप्याचें पातें.
**लांडगेतोड** (स्त्री.) पुष्कळांनीं शत्रूवर आवेशानें तुटून पडून त्यांचा सप्पा उडविणें.

**लांडरूं** (न.) तिरस्कारार्थी लांडोर; नायकांची शिवी.
**लाडझगडा** (पु.) प्रेमाचें भांडण. [प्रिय.
**लाडला, लाडिला, लाडेला** (वि.) लाडका;
**लांडा** (वि.) शेपटी तुटलेला; अग्रहीन; थोटा, आंखुड; (पु.) मुसलमान (तिरस्कारार्थी).
**लांडा कारभार** (पु.) नसती उठाठेव.
**लांडाभुंडा** (वि.) शेपूट किंवा अग्र तुटलेला.
**लांडालटका** (वि.) खोटा, लबाड.
**लाडावणें** (क्रि.) लाडिकपणा करणें.
**लाडिकपणा** (पु.) लडिवाळपणा.
**लाडिलें** (प्रा. वि.) लाडकें.
**लाडीगोडी** (स्त्री.) गोड बोलणें; गोंजारणें.
**लांडीलबाडी** (स्त्री.) कोणत्याही प्रकारची लबाडी, खोटेपणा. [गोडी.
**लाडुकपण** (न.), **लाडुकपणा** (पु.) लाडी
**लाड** (सं. लड्डु पु.) मिष्ट पदार्थाचा गोळा.
**लाडें गोडें** (अ.) लाडीगोडीनें, गोडीगळावीनें.
**लांडेलटकें** (न.) लबाडी, फसवणूक.
**लाडोबा** (पु.) लाडावलेला मुलगा.
**लांडोर** (स्त्री.) मोराची मादी.
**लाण, लाणी** (सं. लवन स्त्री.) कापणी; कोयती; हंगाम; प्राप्ति; मर्यादा; शेवट. [गोळा करणें.
**लाणें** (प्रा. न.) अवधि; शेवट; प्राप्ति,
**लात, लाथ** (सं. लत्ता स्त्री.) लत्ताप्रहार; तंगडी.—**वर लाथ मारणें**—अनादरपूर्वक त्याग करणें.
**लातडणें** (क्रि.) लाथा मारणें. [(न.) लाथ.
**लाताड** (प्रा. वि.) लाथ मारणारें; (स्त्री.)
**लाताडी** (स्त्री.) लाथ.
**लाताळें** (न.) लाथाळें पहा.
**लातिरा** (प्रा. वि.) लाथाळ.
**लाथ** (स्त्री.) लात, पायाचा तडाखा.
**लाथडणें** (क्रि.) लाथ मारणें; पायाखालीं तुडविणें; तुच्छ समजून टाकणें.
**लाथाळें** (न.) परस्परांची लाथांनीं होणारी मारामारी; आवेशयुक्त भांडण.
**लाद** (प्रा. स्त्री.) पाणवट, चिखल (दा० ११।७।३).

**लादणें** (क्रि.) ओझें घालणें.
**लादा** (पु.) लद्दा, लदगा, चोळामोळा.
**लादी** (स्त्री.) दगडाची पटाई.
**लाधण** (स्त्री.) झिलई.
**लाधणें** (प्रा. क्रि.) लाभणें, मिळणें.
**लानी** (प्रा. स्त्री.) शेवट.
**लापट** (वि.) ढिला; कोडगा, लोचट.
**लापटिका** (स्त्री.) बडबड.
**लापणिका, लापनिका** (सं. लापनिका स्त्री.) लांबलचक, कंटाळा आणणारी गोष्ट; लवाडीची मसलत; शब्दपांडित्य (दा० २।९।१६).
**लापणी** (प्रा. स्त्री.) भाषण.
**लापनिका** (स्त्री.) लापणिकापहा.
**लापशी** (स्त्री.) खीर.
**लाफा** (सं. लप् स्त्री. अने.) गप्पा; विस्तार; अतिशयोक्तीचीं भाषणें.
**लापया** (पु.) गप्पीदास.
**लांब** (सं. लंब वि.); दीर्घ. (अ.) दूर.
**लांबकान्या** (वि.) गाढव.
**लांबट** (वि.) जास्त लांब, लांबोडें.
**लांबटांग्या** (वि.) लांब तंगड्यांचा.
**लांबण** (स्त्री.) विस्तार, लांबचा रस्ता; विलंब. **ला० वर टाकणें**—पुढच्या काळावर ढकलणें.
**लांबणदिवा** (पु.) वर हातांत धरण्यासाठीं लांब दांडा असून खालीं तेलवातीचें टवळें असलेला धातूचा दिवा.
**लांबदस्त** (हिं. वि.) विस्तीर्ण.
**लांबलचक** (वि.) लांबीरुंदींत भरपूर; लांबच लांब.
**लांबवालांबव** (स्त्री.) हातीं लागलेली वस्तु युक्तीनें काढून नेणें; पळविणें.
**लांबविणें** (क्रि.) लांबी वाढविणें; पुढच्या काळावर नेणें; लबाडीनें काढून नेणें, पळविणें.
**लांबा** (पु.) शेत कापतांना पडलेल्या भातगोटयाचें पुनः उगविलेलें रोप (ज्ञा० ६।४४४). [लुकण.
**लांबी** (स्त्री.) दीर्घता; आडवी रुंदी;
**लांबोडा, लांबोळा** (वि.) लांबट; लंबवर्तुळाकार.

**लाभ** (सं. पु.) प्राप्ति, फायदा. [होणें.
**लाभणें** (क्रि.) प्राप्त होणें, लाधणें, शुभप्रद
**लाभलोभ** (सं. पु.) फायदा करून घेण्याची प्रबळ इच्छा; प्राप्ति किंवा प्रेम.
**लाभालाभ** (सं. पु.) नफानुकसान; दैव.
**लामणदिवा** (सं. लावण्यदीपक पु.) वर हातांत धरण्यास दांडी किंवा सांखळी असलेला धातूचा दिवा.
**लामा** (पु.) तिबेटी लोकांचा धर्मगुरु.
**लायक** (अर. वि.) योग्य, पात्र.
**लायकी** (स्त्री.) योग्यता, पात्रता.
**लायब्ररी** (इं. स्त्री.) ग्रंथालय.
**लाल** (फा. वि.) तांबडा; (पु.) माणिक.
**लाल कंदील** (पु.) धोक्याची सूचना.
**लालचणें** (सं. लस् क्रि.) लुब्ध होणें.
**लालची** (सं. लालसा वि.) लोभी.
**लाल झगडा** (पु.) प्रेमकलह. [माणिक.
**लालडी** (स्त्री.) हलक्या प्रतीचें लहान
**लालणें** (क्रि.) संगोपन करणें; लाड करणें.
**लालन, लालनपालन** (सं. न.) संगोपन, लाड.
**लाल बावटा** (पु.) साम्यवादी मजुरांचें निशाण.
**लालभडक** (हिं. वि.) अतिशय तांबडें.
**लालसा** (सं. स्त्री.) उत्कट इच्छा.
**लालसें** (प्रा. न.) प्रीतीनें खेळविणें.
**लाला** (पु.) पुत्र; मुलगा;. बहुमानार्थी विशेषण.
**लालित्य** (सं. न.) सौंदर्य; अर्थरचना किंवा पदरचना यांचें सौंदर्य.
**लाली** (स्त्री.) तांबडेपणा.
**लालचाई** (प्रा. स्त्री.) लालूच, लांच.
**लालुप्य** (सं. लोलुप्य न.) आसक्ति.
**लालूच** (हिं. लालच स्त्री.)मोह, लोभ, लांच.
**लालूचखोर** (वि.) लोभी.
**लांव** (स्त्री.) राक्षसी, डाकीण; (पु.) निशाण; एक पक्षी; (प्रा. वि.) घातक.
**लावण** (सं. लावणिक वि.) खारट.
**लावणी** (स्त्री.) लागवड, रोप वगैरे लावणें; कवितेचा एक ग्रामीण प्रकार; गणना (ज्ञा० १६।६३).
**लावणीजुंपनी** (स्त्री.) शेतकीचीं कामें.
**लावणीपत्रक** (न.) पडीत जमिनीपैकीं नवीन लागवडीस आलेल्या जमिनीविषयींचें पत्रक.
**लावणें** (क्रि.) लागेल असें करणें; पाठविणें; पेरणें; खंडानें देणें; योजना करणें.
**लावण्य** (सं. न.) सौंदर्य, रूप.
**लावतोड** (स्त्री.) घाई; अत्यंत जरुरी; त्रास. शीण; कडाक्याचें भांडण.
**लावा** (प्रा. पु.) खेळ (मारो० उद्योग० १०।१००); वर्णन करणारानें तें खुलविण्यासाठीं पदरचें घातलेलें तिखटमीठ; अलंकार.
**लावासट** (स्त्री.) राक्षसी, डाकीण.
**लावारिस** (वि.) बिनवारशी.
**लावालाव** (स्त्री.) चाहडी, चुगली; भांडण लावणें.
**लाविणें** (प्रा. क्रि.) जाळणें.
**लाविरा** (प्रा. वि.) लावालावी करणारा.
**लास**(पु.) डाव; डागणी; (स्त्री.) राक्षशीण.
**लासणें** (क्रि.) तापविलेल्या लोखंडानें डाग देणें; भाजणें.
**लास्य** (न.) एक नृत्य. [डाकीण.
**लासि, लासी** (प्रा. स्त्री.) मांजरी;
**लासें** (न.) माणसाच्या शरिरावरचा किंवा फळावरचा काळा डाग; डोळयास होणारा व्रण; हातमागांत—ताण्यावर कोळशानें खूण करतात ती.
**लाहकी** (स्त्री.) आग, काहिली; उत्कट इच्छा; चपलता.
**लाहडा** (पु.) पूर्णता, आवेश; तापाचा जोर किंवा आग; चिकटपणा.
**लाहणी** (स्त्री.) कापणी; ठाणवई.
**लाहणा** (वि.) मिळणारा, लाभदायक.
**लाहणें** (प्रा. क्रि.) लाभणें, मिळणें.
**लाहरी, लाहारी** (स्त्री.) जुन्या काळचें चार पांच आणे किमतीचें एक नाणें.
**लाहा** (स्त्री.) अतिशय इच्छा.
**लाहाणा** (वि.) लाभदायक; शुभ.
**लाहाणी** (प्रा. स्त्री.) प्राप्ति.
**लाहातें** (न.) लाभ; (वि.) लाभदायक.
**लाही** (सं. लाजिका स्त्री.) भाजून फुलविलेला धान्याचा दाणा; आग; संतप्तता.

**लाहेलाहे** (प्रा. अ.) त्वरेनें.
**लाहो** (पु.) लाभ; छंद; लोभ.
**लाहोटा** (पु.)फार लोभीपणा, उत्कट इच्छा.
**लाळ** (सं. लाला स्त्री.) मुखरस; गुरांचा एक मुखरोग. **लाळ घोटणें**—अभिलाष करणें, मिळावें असा ध्यास करणें; हांजी हांजी करणें. [नांगी.
**लाळ** (स्त्री.) बारीक टोक, कांटा, कुसळ;
**लाक्षणिक** (सं. वि.) लक्षणेवरून जाणावयाचा; अप्रत्यक्ष, गौण.
**लाक्षा** (सं. स्त्री.) लाख. [गोप्य.
**लिकचोरी** (स्त्री.) चोरून केलेलें काम,
**लिकटणें** (क्रि.) चिकटणें.
**लिकण**(स्त्री.)दडी, लपून बसण्याची जागा.
**लिकणें** (क्रि.) लपणें, छपणें.
**लिकलिकणें** (क्रि.) लुकलुकणें; मंद प्रकाशानें चमकणें.
**लिखणें** (प्रा. क्रि.) लिहिणें.
**लिखा** (सं. लिखं पु.) लेख, दस्तऐवज.
**लिखा पढी** (स्त्री.) लेखी व्यवहार.
**लिखित**(सं. न.)पत्र, लेख; (वि.) लिहिलेलें.
**लिंग** (सं. न.) चिन्ह; स्त्री—पुरुषत्व—भेद; शाळुंकेंतला मधला गोल; शिस्न.
**लिगटणें** (प्रा. क्रि.) लागणें, स्पर्शणें.
**लिंगदेह** (सं. पु.) सूक्ष्म देह.
**लिंगवंत, लिंगाईत** (पु.) शिवलिंगाच्या उपासकाची एक जात. हे लोक चांदीचें शिवलिंग गळ्यांत घालतात.
**लिंगविज्ञान**(न.)स्त्रीपुरुषविषयक संबंधाचें शास्त्र.
**लिगाड** (प्रा. पु. न.) चिकटा, चिकटेपणा (भा० १६।१९); अडचण, पंचाईत, कटकट (तुका० १४१८); एक कसरतीचा खेळ.
**लिगाडी, लिगाड्या** (प्रा. वि.) लचांडखोर, खोडसाळ, उलाढाल्या.
**लिंगिस्ताइ** (स्त्री.) दीर्घसूत्रीपणा; सुस्ती.
**लिथाडणें** (प्रा. क्रि.) बरबटणें; लाथाडणें; पायाखालीं तुडविणें.
**लिचपिचित** (वि.) लवचीक, बारीक; अशक्त, क्षीण, दुर्बल.
**लिदवळ** (वि.) घोड्याची लीद खाणारें (जनावर); लांचखाऊ; भाडोत्री; हलकट; पैशासाठीं घाणेरडें काम करणारा.
**लिदाड** (न.) घोड्याच्या लिदींची रास.
**लिपण** (न.) सारवण, लेप.
**लिपण** (स्त्री.) लपण्याची जागा. [रचणें,
**लिंपणें** (क्रि.) लेपानें बुजविणें; थापणें.
**लिपि** (सं. स्त्री.) लेखन, लेखनपद्धति.
**लिप्त** (सं. वि.) माखलेला, व्यापलेला; दूषित. [पावणें.
**लिताळणें** (क्रि.) दूषित होणें; बाधा
**लिप्ताळा** (वि.)दूषित; गोवलेला; अंकित, अधीन, मिंधा.
**लिप्सा** (सं. स्त्री.)लोभ, मिळण्याची इच्छा.
**लिफाफा** (फा. पु.) पाकीट, लखोटा.
**लिंब** (पु.) कडूनिंब.
**लिबलिबीत** (वि.)फार मऊ, बिलबिलीत.
**लिंबलोण** (न.) दृष्ट काढण्याचें साहित्य.
**लिंबू** (पोर्तु. लिमाव न.) एक फळ; त्याचें झाड.
**लिंबूर** (न.) पक्व झालेलें बाजरीचें कणीस.
**लिंबोटी** (स्त्री.) अर्धे लिंबू, साखर व आणखी कांहीं पदार्थ घालून तयार केलेलें औषध. [लवाजमा.
**लिभास** (अर. लिबास. पु.) पोषाख,
**लिमलेट** (न.) लिंबू व साखर यांच्या मिश्रणानें तयार केलेली मिठाई.
**लियाकत** (अर. स्त्री.) योग्यता; सामर्थ्य.
**लिलाम, लिलांव** (पोर्तु.) हरास; हर राजी; जाहीरपणें सर्वांत जास्त किंमत बोलणारास माल विकणें.
**लिवका** (वि.) लवचीक; ढिला.
**लिवलिवीत** (वि.) मऊ आणि ढिला.
**लिसा** (स्त्री.) बारीक कणांची दमट साखर. [फोपशा.
**लिसाळ** (प्रा. वि.) ढिसाळ, थिलथिलीत,
**लिहिणावळ** (स्त्री.) लिहिण्याची मजुरी.
**लिहिणें** (सं. लिख्. क्रि.) अक्षर काढणें.; रचणें.
**लिहिणें-पुसणें** (न.) लेखन,वाचन, हिशोब इत्यादि विद्या.
**लिळा** (सं. लीला स्त्री.) खेळ, मौज.
**ली** (प्रा. स्त्री.)लय (स्वा० दि० ८।४।७६).

**लीख** (सं. लिक्षा स्त्री.) डोक्याच्या केसांत होणारा एक लहान जीव. [ विष्ठा.
**लीद** (हिं. स्त्री.) हत्ती, घोडा, उंट इ०ची
**लीन** (सं. वि.) लय पावलेला; नम्र.
**लीला** (सं. स्त्री.) खेळ, मौज; गुण.
**लीलाधारी** (पु.) अवतार.
**लीलावती** (सं. वि.) खेळकर, विलासी (स्त्री); (सं. स्त्री.) भास्कराचार्यांचा गणितशास्त्रावरचा सुप्रसिद्ध ग्रंथ. आपल्या कन्येचें नांव त्यानें ग्रंथास दिलें.
**लीलाविग्रह** (सं. पु.) भक्तांच्या इच्छा पुरविण्यासाठीं देवानें धारण केलेला देह.
**लुकड, लुकडा** (वि.) कृश, रोड.
**लुकण** (न.) लांबी, एक चिकट पदार्थ.
**लुकलुकणें** (सं. लोक् क्रि.) चकचकणें.
**लुकलुकी** (स्त्री.) तेज, चकाकी.
**लुकसान** (न.) नुकसान, हानि.
**लुकसानी** (स्त्री.) हानि, तोटा.
**लुक्कड** (वि.) कृश, रोड.
**लुक्कण** (न.) वारनीस, लुकण, लांबी.
**लुक्कड पेंच** (पु.) कुस्तींतल्या एका पेंचाचें नांव. [मनुष्य.
**लुक्का** (अर. लुका पु.) धूर्त, कपटी
**लुगडें** (न.) महाराष्ट्रीय स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र. [ पदार्थाचा गोळा.
**लुगदा** (पु.), **लुगदी** (स्त्री.) मऊ व चिकट
**लुगा** (पु.) राळा, नाचणा, राजगिरा इत्यादि धान्याचें लहान कणीस.
**लुंगा, लुंगासुंगा** (वि.) वारीकसारीक.
**लुगाई** (हिं. स्त्री.) स्त्री; वायको.
**लुगारणी** (स्त्री.) लूट.
**लुगारणें** (क्रि.) लुटणें.
**लुगारा** (स्त्री.) लूट.
**लुगारी** (स्त्री.) लोळण.
**लुगारू** (पु.) लुटारू.
**लुगी** (प्रा. वि.) लहान.
**लुंगी** (फा. स्त्री.) अरुंद व लांब कापडाची पट्टी; पंचा, धोतर; पटका.
**लुंघणें** (क्रि.) थकणें.
**लुंघविणें** (क्रि.) लुटणें, लुबाडणें.
**लुंचणें** (सं. स्त्री.) उपटणें, तोडणें.
**लुचपणें** (क्रि.) लंगडणें.
**लुचपत** (स्त्री.) अन्यायाची प्राप्ति.
**लुचपता** (अ.) लंगडत.
**लुचाडणें** (क्रि.) लुटणें, लुबाडणें.
**लुचाबुचा, लुचाभुंडा, लुचामुंडा** (वि.) उघडा, अलंकारविरहित.
**लुच्चा** (वि.) लबाड, सोदा. [सोदेगिरी.
**लुच्चाई, लुच्चेगिरी** (स्त्री.) लबाडी,
**लुंचित** (वि.) टकल्या, डोक्यावर केस नसलेला. [ लबाडी.
**लुच्चेशाई** (स्त्री.) लुच्चे लोकांचा व्यवहार,
**लुटकणें** (क्रि.) लुडकणें पहा.
**लुटकन्** (अ.) पटकन्; त्वरित. [ लुबाडणें.
**लुटणें** (सं. लुठन क्रि.) अपहार करणें,
**लुटा** (प्रा. पु.) लुटारू.
**लुटार** (न.) लुटारू लोकांची टोळी.
**लुटारू** (पु.) लुटणारा मनुष्य.
**लुटालूट** (स्त्री.) सर्वत्र चाललेला लुटण्याचा प्रकार.
**लुटुपुटु, लुटुफुटु** (वि.) लटकें, कल्पित.
**लुंठन** (सं. न.) लूट, चोरी; लोळण.
**लुडकणें** (क्रि.) हळूंच निजणें; वरून हळूंच पडणें; सोकळणें.
**लुडगी** (स्त्री.) भांगेचा केलेला एक प्रकार; झोकांडचा खाणें.
**लुडतें** (न.) नकासगाराचें हत्यार.
**लुडबूड** (स्त्री.) चाललेल्या कामांत उगाच केलेली गडबड.
**लुडबुडणें** (क्रि.) गडबड करणें.
**लुडबुड्या** (वि.) लुडबुड करणारा.
**लुडवा** (प्रा. वि.) हस्तपादरहित.
**लुंडा** (प्रा. वि.) लुळा, पंगु.
**लुडाखुडा** (वि.) थकलेला, जीर्ण.
**लुडाबुच्चा** (वि.) बोडका; भुंडा.
**लुतकरी** (स्त्री.) चिंधी. [खोर.
**लुतरा** (वि.) लघळ, वडवड्या; चुगल-
**लुती** (प्रा. स्त्री.) लूत; त्वचारोग.
**लुप्त** (सं. वि.) लोपलेला.
**लुप्तोपमा** (सं. स्त्री.) साहित्यशास्त्रांत—अंशतः लागू पडणारी उपमा. [बसणें.
**लुबकणें** (प्रा. क्रि.) चिकटणें; आशा धरून
**लुबरा** (वि.) कारणावांचून मध्यें तोंड घालून बोलणारा.

**लुबलुब** (स्त्री.) टकटक, वटवट, कंटाळवाणें भाषण.
**लुबाडणें** (क्रि.) लुटणें, नागविणें.
**लुब्ध** (सं. वि.) आसक्त; लोभी..
**लुब्धक** (सं. पु.) पारधी.
**लुमणी** (स्त्री.);**लुमणें** (न.) रुमणी, रुमणें; नांगराचा दांडा.
**लुमणें** (न.) लोढणें, अडचण.
**लुलपणें** (प्रा.क्रि.) लोभ धरणें, इच्छिणें.
**लुला** (सं. लोल वि.) पंगु; ताठपणा नसलेला, ढिला.
**लुलावणें** (क्रि.) लुला किंवा पंगु होणें.
**लुलित** (वि ) रेंगाळणारा, कंपायमान, लोंवणारा.
**लुलाय** (प्रा. पु.) रेडा. [ लालसा.
**लुलूमिठी** ( प्रा. स्त्री. ) उत्कट इच्छा,
**लुलूपुतू** (स्त्री.) मनधरणी; आर्जव.
**लुसकान, लुसकानी** नुकसान, नुकसानी पहा.
**लुसलुशीत**(वि.)अतिशय कोवळा, टवटवीत.
**लुसलुसणें** (क्रि.) टवटवीत असणें.
**लुळणें** (प्रा. क्रि.) लोळणें.
**लुळा** लुला पहा.
**लुळाखुळा** (वि.) शरिरानें व मनानें पंगु.
**लुळें** (न.) बाजारबुणगे, हलक्यासलक्या लोकांचा समुदाय.
**लू, लूक, लूख** (स्त्री.) उन्हाचा तडाखा.
**लूट** (स्त्री.) लुटून आणिलेलें द्रव्य किंवा वस्तु; विपुलता; सढळ हातानें केलेला खर्च.
**लूत** (स्त्री.) एक त्वचारोग.
**लूता** (पु.) कोळी, कांतीण.
**लेक** (पु.) मुलगा; (स्त्री.) मुलगी.
**लेंकरूं** (न.) बालक.
**लेकवळा** (पु.) राखेचा मुलगा. **लेकवळी** (स्त्री.)–राखेची मुलगी.
**लेकविता** (प्रा. पु.) बाप.
**लेकिन्** (अर. फा. अ.)पण; परंतु; शिवाय.
**लेकुरछंद** (पु.) लहान मुलांचा लळा; पोरकटपणाचा नाद. [(स्त्री).
**लेकुरवाळी**(वि.)लहान लहान मुलें असलेली
**लेक्चर** (इं. न.) व्याख्यान.
**लेख** (सं. पु.) लिहिलेला कागद इत्यादि; प्रतिष्ठा; गणना; आकार; तुलना.
**लेखक** (सं. पु.) लिहिणारा; कारकून.
**लेखकी** (स्त्री.) लेखकाचें काम; कारकुनी.
**लेखणी** (सं. लेखनी स्त्री.) कलम; (प्रा.) पर्वा, गणना (ज्ञा० २।३६५).
**लेखणें** (क्रि.) मानणें, आदर करणें; (प्रा.) लिहिणें.
**लेखन**(सं. न.)लिहिणें. **ले०प्रशस्ति** (स्त्री.)–श्रीशिवाजी महाराजांच्या आज्ञेवरून सरकारी कागदपत्रें लिहिण्याचे ठराविक मायने वगैरे पद्धति बाळाजी आवजी चिटणीस यांनीं तयार केली ती.
**लेखन-स्वातंत्र्य** (न.) वर्तमानपत्रांतून लेख लिहिण्याचें स्वातंत्र्य.
**लेखनी** (सं. स्त्री.) लेखणी, कलम.
**लेखा** (सं. लेख पु.) हिशेब, गणती; मोठेपणा (यथार्थ० ४।६९९); स्थिति; अंदाज; लिखित; दस्तऐवज.
**लेखापुशीं** (अ.) लिहिण्यांत (तोंडातोंडी नव्हे.
**लेखीं** (क्रि. वि.) मतानें, परीनें.
**लेचापेचा** (वि.) कच्चा; दुर्बळ.
**लेजीम** (फा. स्त्री. न.) तालमींतल्या व्यायामाचें एक लोखंडी धनुष्याकृति आयुध.
**लेटणें** (क्रि.) पडणें, अंग टाकणें, निजणें.
**लेंड** (सं. न.) लेंडूक, विष्ठेचा लहान गोळा.
**लेंड** (तेलगु रोडू वि.) दोन या अर्थाची विटीदांडूच्या खेळांतली संज्ञा.
**लेंडओ (वो)हळ** (स्त्री. पु.) लहान ओढा.
**लेंडार, लेंढार** (न.) लटांबर.
**लेंडि** (प्रा. स्त्री.)ओढा (आ० ५।१४०).
**लेंडी** (स्त्री.),**लेंडूक** (न.) लेंड; विष्ठेचा लहान गोळा. **लेंड्या गाळणें**–भिणें; घाबरणें.
**लेंडोरें** (प्रा. न.) लेंड्या.
**लेणदेण** (न.) देणेंघेणें; व्यवहार.
**लेणें** (न.) अलंकार, भूषण; भिंतीवरचें चित्र; गुहादिकांतून प्राचीन काळीं कोरलेलें पांडवकृत्य, चित्रें इत्यादि; (क्रि.) घेणें; धारण करणें; भूषविणें.

**लेप** (सं. पु.) ओढा, सारवण; ओढा घालण्याचें द्रव्य; रजई; मळ; दोष; (प्रा.) वाहुलें.
**लेपडा** (स्त्री.) गादी.
**लेपणें** (क्रि.) माखणें.
**लेपन** (सं. न.) ओढा घालणें, लिपणें.
**लेपवणी** (न.) खरकटीं भांडीं; अन्नयुक्त पाणी.
**लेपवळ** (न.) खरकटें, जेवण झाल्यानंतर ताटांत राहिलेले अन्नाचे अवशेष.
**लेपाटा** (पु.) औषध चिखल इ० जाडा लेप.
**लेपाळा** (पु.) लेप.
**लेपाळणें** (क्रि.) लेप लावणें.
**लेपे** (प्रा. न.) वाहुलें.
**लेप्य** (प्रा.न.) चित्र (कथासारा०७।४२).
**लेफडा** (पु.) सारवणाचा पट्टा किंवा रेघ.
**लेबडा, लेभडा** (वि.) नेभळा; दुर्बळ.
**लेंभडणें** (क्रि.) क्षीण होणें.
**लेंभें** (न.) वाद, तंटा, लफडें. [पाऊण.
**लेवणू** (नंदभाषेंत वि.) तीन चतुर्थांश,
**लेवविणें** (प्रा. स्त्री.) धारण करणें, अंगावर घालणें.
**लेवा** (पु.) लेप, गिलावा, पुट; व्यापार; खानदेशांतील एक जात.
**लेवदेव, लेवादेवा** (हिं. पु.) व्यवहार.
**लेश** (सं. पु.) अल्प अंश.
**लेस** (हिं.वि.)तयार; (इं.स्त्री.) किनार; कांठ; फीत; जाळीदार फीत.
**लेसट, लेसपंड** (न.) लचांड; खरकटें; अपूर्ण काम.
**लेसां** (क्रि. वि.) तयारीनें.
**लेह** (सं. पु.) चाटण.
**लेहणें** (क्रि.) लिहिणें.
**लेह्य** (सं. न.) चाटण.
**लसन** (इं. न.) परवाना; मंजुरी.
**ला** (प्रा. पु.) लय, छन्द (दा० २।२।३२).
**लों** (स्त्री.) लंव, लोंकर.
**लोक** (सं. पु.) भुवन, वसतिस्थान; जन; प्रजा; परकीं माणसें; जाति; (अ.) पर्यंत, पावेतों; जसें = स्टेशनलोक:–स्टेशनपर्यंत. (बोली भाषेंत)

**लोककथा** (सं. स्त्री.) लोकांच्या तोंडीं असलेली गोष्ट; दंतकथा.
**लोकत्रय** (सं. न.) स्वर्ग, मृत्यु व पाताळ हे तीन लोक. [असलेलें नाट्य.
**लोकनाट्य** (न.) बहुजनसमाजांत प्रचलित
**लोकनृत्य** (न.) गरवा, भांडला इत्यादि परंपरेनें आलेलें नृत्य.
**लोकनायक** (वि.) लोकांचा नायक, पुढारी.
**लोकपाळ**(सं. पु.)प्रजेचा पालनकर्ता; राजा.
**लोकप्रवाद** (सं. पु.) बातमी, वार्ता, वदंता.
**लोकबाह्य** (सं. वि.) विचित्र; विलक्षण.
**लोकभांडें** (प्रा. वि.) भांडखोर; वडवड्या.
**लोकमत** (सं. न.) सामान्यतः जनसमूहाचा अभिप्राय. [मान.
**लोकमर्यादा** (सं. स्त्री.) जनरूढि; जनाचा
**लोकमान्य** (वि.) लोकांना मान्य, प्रिय; बाळ गंगाधर टिळक यांना लावण्यांत येणारी पदवी.
**लोंकर** (सं. लोम स्त्री.) मृदु केस; लंव.
**लोकवार्ता** (सं. स्त्री.) लोकांत प्रचलित असलेली गोष्ट, बातमी.
**लोकशाही** (स्त्री.) लोकांच्या सत्तेखालीं त्यांच्या संमतीनें चालणारी व त्यांच्याच हिताची अशी राज्यपद्धति.
**लोकसंख्या** (सं. स्त्री.) एका विशिष्ट स्थानीं राहाणाऱ्या एकंदर सर्व लोकांची संख्या.
**लोकसंग्रह** (सं. पु.) स्वतःला निराळया रीतीनें वागण्यास प्रत्यवाय नसतांही लोकांनीं आचारभ्रष्ट न व्हावें म्हणून स्वतःच्या इच्छेविरुद्ध कांहीं आचारांचा स्वीकार करून लोकांची जूट राखणें.
**लोकसंपादणी** (स्त्री.) लोकांचीं मनें अनुकूल करून घेणें.
**लोकसारस्वत** (न.) लोकवाङ्मय.
**लोकसिद्ध** (सं. वि.) लोकांत रूढ असलेलें.
**लोकस्थिति** (सं. स्त्री.) एकंदर जनतेची सामान्यतः स्थिति. [इच्छिणारा.
**लोकहितैषी** (सं. वि.) जनतेचें हित
**लोकाचार** (सं. पु.) रूढि.
**लोकांतीं** (अ.) जाहीर रीतीनें, उघड उघड.
**लोकातीत** (सं. वि.) अलौकिक.
**लोकांतर** (सं. न.) परलोक.

**लोकापवाद** (सं. पु.) लोकांकडून होणारी निंदा. [ भूति असणें.

**लोकाभिमुखता** (स्त्री.) जनतेकडे सहानु-

**लोकालोक** (सं. पु.) सप्तद्वीपा पृथिवी व सप्तसमुद्र यांना वेष्टणारा व सूर्यमंडळा-पर्यंतचा अवकाश व्यापून टाकणारा असा एक महान् विस्तृत पर्वत.

**लोकालोकीं** (अ.) लोकांच्या तोंडून ऐकलेलें.

**लोकेषणा** (सं. स्त्री.) स्वर्गादि लोकांच्या प्राप्तीची इच्छा; लोकांकडून बरें म्हणवून घेण्याची इच्छा.

**लोकोत्तर** (सं. वि.) अलौकिक, असामान्य, विलक्षण.

**लोकोपचार** (सं. पु.) केवळ लौकिकाच्या संरक्षणार्थ करण्याचा शिष्टाचार.

**लोखंड** (सं. लोहखंड न.) लोह, एक कठिण धातु. [ फार कष्ट सोसणें.

**लोखंडाचे चणे खाणें** खडतर तपश्चर्या करणें;

**लोखंडी** (वि.) लोखंडाचें, लोखंडाचें केलेलें; फार मजबूत.

**लोखंडी हळद** (स्त्री.) तांबडी व टणक हलक्या प्रतीची हळद.

**लोंग, लोंगी, लोंब** (स्त्री.) भात, गहूं, राळा इत्यादि धान्याचें कणीस.

**लोंगर** (पु. न.) घड, घोस.

**लोचका** (पु.) लचका पहा.

**लोचट** (वि.) कितीही झिडकारलें तरी पुनः लगट करणारा; लवकर न तुटणारा. [ चिमटा.

**लोचण** (स्त्री.) न्हाव्याचा केस उपटण्याचा

**लोचन** (सं. न.) नेत्र.

**लोंचा** (पु.) लांझा पहा. [ ठेवण; लूट.

**लोट** (पु.) पूर; लोंढा; समुदाय; समृद्धि;

**लोटणें** (क्रि.) पुढें ढकलणें; गर्दी करणें, कष्टानें (काळ) काढणें; (काळ) जाणें.

**लोटपोट** (स्त्री.) लोळण; बेसुमार मौज, आनंद, किंवा हंशा; चालढकल; विपुलता.

**लोटा** (हि. पु.) तांब्या, भांडें.

**लोटांगण** (न.) चरणापाशीं लोळणें; साष्टांग नमस्कार; गडबडत जातांना होणारे फेरे.

**लोटाबाडगी** (स्त्री.) स्वैंपाकाचीं भांडींकुंडीं.

**लोटालोटी** (स्त्री.) परस्परांना ढकलणें, ढकलाढकली.

**लोटी** (स्त्री.) तपेली, लहान तांब्या.

**लोठा, लोठ्या** (वि.) धष्टपुष्ट.

**लोठाश्रम** (पु.) सडेसोट.

**लोड, लोढ** (पु.) मृदंगाकार लांवट तक्या; सामत्याची मूठ; तुरपून शिवलें असतां होणारी वळकटी.

**लोढणें** (न.) ओढाळ गुराच्या गळ्यांत अडकविलेलें लाकूड; प्रतिबंधक गोष्ट; (क्रि.) कापसांतून सरकी काढणें; (प्रा.) शिकणें; ढवळणें.

**लोंढा** (पु.) अकस्मात् येणारा जोराचा लोट किंवा प्रवाह; पूर.

**लोण** (सं. लवण न.) मीठ, क्षार; आट्या-पाट्याच्या खेळांत सगळ्या पाट्यांतून निघून जाऊन पलीकडची थोडीशी माती परत आणणें (ती आणिली म्हणजे डाव जिंकला असें समजण्यांत येतें); (प्रा.) सौंदर्य; ओंवाळणी. [ गप्प.

**लोणकढी थाप** पूर्वी न ऐकलेली बनावट

**लोणकढें** (वि.) ताजें, साजूक; लोणी कढवून केलेलें. [ इत्यादि शस्त्र).

**लोणकाप्या** (वि.) बोथटलेल्या धारेचें (चाकू

**लोणचें** (सं. लवण न.) मीठ, मोहरी, हिंग वगैरेंत खारविलेले आंबे, लिंबें इत्यादि.

**लोणपट, लोणपाट** (न.) खेळांतली सरशी किंवा जय.

**लोणपाट्या** आट्यापाट्या.

**लोणा** (सं. लवण पु.) क्षारांश; भाताची एक जात; तजेला.

**लोणारी** (पु.) कोळसे करणारा. [अंश.

**लोणी** (सं. नवनीत न.) दुधांतला स्निग्ध

**लोथ, लोध** (स्त्री.) प्रेत; पुष्ट व स्थूल शरीर; धूड; फार मोठें फळ; (प्रा.) मोठी मोट.

**लोंदा** (प्रा. पु.) घास, पिंड, गोळा.

**लोद्या** (वि.) नको असलेला; तिरस्कृत.

**लोध** (स्त्री.) प्रेत; धूड.

**लोधणें** (प्रा. क्रि.) लुब्ध होणें; झोंबणें.

**लोधा** (पु.) प्रेत, शव; लचका.

**लोंधा** (पु.) चिकट, मऊ गोळा.
**लोप** (सं. पु.) अभाव, नाश. प्रचारांतून जाणें; गळणें. [होणें, मिळून जाणें.
**लोपणें** (क्रि.) दिसेनासें; होणें; गळणें; लीन
**लोंब** (स्त्री.) लोंग पहा. [ओळंबणें.
**लोंबकळणें, लोंबकाळणें** (क्रि.) लटकणें;
**लोंबट, लोंबड** (स्त्री.) फळें वगैरेचा समुदाय; संकट, अडचण. [ राहणें.
**लोंबणें** (सं. लंब् क्रि.) लटकणें, टांगलेला
**लोंबर** (न.) लोंबतें कणीस. [दार भाजी.
**लोंबरें** (न.) गोवारीच्या शेंगाची मसाले-
**लोंबी** (स्त्री.) लोंबतें कणीस. [प्रयत्न.
**लोंबी–झोंबी** (स्त्री.) झटापट, जोराचा
**लोभ** (सं. पु.) लाभाविषयीं उत्कट इच्छा; हातचें जाऊं नये अशी इच्छा; कृपादृष्टि; , ममता.
**लोभनीय** (सं. वि.) लोभजनक, स्पृहणीय.
**लोभसवाणें** (वि.) आकर्षक.
**लोभान** (अर. पु.) ऊद.
**लोभावणें** (क्रि.) लोभ सुटणें; प्राप्तीची इच्छा होणें.
**लोभाविष्ट, लोभाळु, लोभिट, लोभी** (वि.) हावरा, अधाशी.
**लोम** (सं. न.) केस, लंव.
**लोमराजी** (स्त्री.) केसांची रांग.
**लोमश** (सं. वि.) केसाळ.
**लोमहर्षण** (सं. वि.) अंगावर रोमांच उठविणारें; पुलकित करणारें.
**लोयली** (स्त्री.) गलबताचा एक प्रकारचा लहान नांगर.
**लोल** (सं. वि.) चंचल; लोलुप; आसक्त.
**लोलक** (सं. पु.) दागिन्यांतला लोंबता लांबट मणि.
**लोला** (सं. स्त्री.) घंटेची मोठी लोळी.
**लोलिंगणें** (प्रा. क्रि.) आसक्त होणें.
**लोलिंगता** (प्रा. स्त्री.) लोभीपणा; आसक्ति.
**लोलुप** (सं. वि.) अतिलोभी, आसक्त.
**लोलो** (प्रा. पु.) छंद. [वालाग्र.
**लोंव** (प्रा. स्त्री.) रोम, केस, लोकर,
**लोवया** (पु.) लचका. [पुष्ट,
**लोवाळ** (प्रा. वि.) दाट लोकरीचा,
**लोष्ट** (सं. न.) ढेकूळ; लोखंडाचें कीट.

**लोह** (सं. न.) लोखंड, लोहभस्म; शस्त्र (ज्ञा० ७।१२).
**लोहकार** (सं. पु.) लोहार.
**लोहकिट्ट** (सं. न.) लोखंडावरचा गंज.
**लोहंगी** (स्त्री.) लोखंडाचीं वेटाळीं जागजागीं लावून मजबूत केलेला प्राणघातक सोटा. [आकर्षण करणारा दगड.
**लोहचुंबक** (सं. न.) लोखंडाच्या वस्तूला
**लोहट, लोहटी** (स्त्री.) इमारती लाकडें वगैरे वहाण्यासाठीं केलेला मजबूत गाडा.
**लोहतुला** (सं. स्त्री.) लोखंडाची तागडी.
**लोहनाळी** (स्त्री.) प्रेमळपणा, मायाळूपणा, मार्दव.
**लोहबंद** (प्रा. वि.) सोनेरी.
**लोहभस्म, लोहमंडूर** (सं. न.) लोखंडाच्या गंजापासून केलेलें एक औषध.
**लोहमय** (सं. वि.) लोहनिर्मित.
**लोहवी** (प्रा. स्त्री.) तांबूसपणा. [करणारा.
**लोहार** (सं. लोहकार पु.) लोखंडाचें काम
**लोहारकी** (स्त्री.) लोहाराचा धंदा.
**लोहारसाळ** (सं. लोहकरशाला स्त्री.) लोहारकामाचा कारखाना.
**लोहाळा** (सं. लव पु.) लव्हाळा पहा.
**लोहित** (सं. वि.) आरक्त, तांबडा; (न.) रक्त.
**लोहिवा** (प्रा. वि.) रक्तवर्ण, तांबडा.
**लोही** (प्रा. स्त्री.) मोहोर; कढई (द्रव्याची).
**लोहीव** (प्रा. वि.) तांबडें. [७।५७०).
**लोहे** (प्रा. स्त्री.) पेटी, तिजोरी (भा०
**लोहो** (सं. लोह. पु.) लोखंड; लोहभस्म.
**लोहो** (प्रा. पु.) लोभ.
**लोहोकर** (स्त्री.) लोकर.
**लोळ** (पु.) कल्लोळ, ज्वाळा; समुदाय; लोळणें; धूड, लोंथ; गठ्ठा; पसारा.
**लोळकंड, लोळकण** (स्त्री.) लोळणें, लोटांगण.
**लोळकंबणें** (क्रि.) लोंबकळणें.
**लोळघोळ** (पु.) घोटाळा, मिश्रण; अव्यवस्था; लोळण.
**लोळण, लोळणी** (स्त्री.) लोळण, लोटांगण.
**लोळण-फुगडी** (स्त्री.) मुलींचा एक खेळ.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**लोळपट** (स्त्री.) लोळण, अंथरुणावर पडून लोळणें.

**लोळवडी** (स्त्री.) डाळीच्या चुरीची लांबट वळकुटी करून ती उकडल्यानंतर तिची पाडलेली वडी.

**लोळण** (सं. लोलन क्रि.) गडबडत जाण; अव्यवस्थितपणें पडणें; निरुद्योगी होऊन राहणें.

**लोळविणें** (क्रि.) पाडणें, मारणें.

**लोळा** (सं. लोला पु.) घंटेंतला आघात करणारा खिळा; लचका.

**लोळी** (स्त्री.) लहान लोळा; शेंवडाचा ओघ किंवा तार; बैलाच्या गळयाखालची मांसपोळी.

**लौकर** (अ.) लवकर, जलदीनें, त्वरेनें.

**लौकिक** (सं. पु.) नांव, कीर्ति; व्यवहार; (प्रा.) अवैदिक, केवळ लोकप्रसिद्ध.

**लौकिकाचार** (सं. पु.) शिष्टाचार, शिष्टसंप्रदाय.

**लौकिकी** (वि.) लोकांत रूढ असलेलें, व्यवहारचतुर.

**लौंडी** (हिं. स्त्री.) दासी, गुलाम स्त्री.

**लौट** (हिं. क्रि. वि.) परत.

**लौंद** (प्रा. वि.) गलेलठ्ठ, दांडगा.

**लौल्य** (सं. न.) चंचलता; लोलपणा, लोभ, स्पृहा.

---

## व

**व** मराठी व्यजनमालेंतील एकूणतिसावें व्यंजन.

**व** (अ.) आणि.

**वई** (सं. वृति स्त्री.) कुंपण; बोहोल्याच्या कोपऱ्यावरची मडक्यांची उतरंड.

**वकट** (तेलगू वि.) विटीदांडूच्या खेळांतली १ या अर्थाची संज्ञा.

**वकटें** (प्रा. न.) घुबड.

**वंकनाळ** (प्रा. न.) मातेनें खाल्लेल्या अन्नाचा रस गर्भाला पोचविणारी वाट.

**वकर** (अर. पु. स्त्री.) मान; प्रतिष्ठा.

**वकल, वक्कल** (अर. न.) कुटुंब; रखेली; खातें भाग.

**वकलात, वकालत, वकिलात, वकीली** (अर. फा. स्त्री.) वकिलाचें काम किंवा अधिकार; मुखत्यारी. [जाणें.

**वकसणें** (क्रि.) सालटें निघणें, घासटलें

**वकाई-या** (अर. स्त्री.) बातमी; वृत्तान्त.

**वंका** (प्रा. वि.) उघडाबोडका (तुका० ४२९७).

**वकार** (पु.) मोठेपणा; मान; प्रतिष्ठा (अनंतफंदी पृ० ६३).

**वकालत, वकिलात** वकलात पहा.

**वकील** (अर. पु.) मुखत्यार; प्रतिनिधि; आपल्यातर्फे कोर्टात किंवा राजदरबारीं बोलणें चालणें करण्यासाठीं नेमून पाठविलेला इसम. [धंदा; तरफदारी.

**वकीली** (स्त्री.) वकिलाचें काम किंवा

**वकूफ–ब** (अर. वकूफ पु.) हुशारी, शहाणपणा, अक्कल.

**वक्कर** (अर. पु. स्त्री.) मान, आदर.

**वक्त** (अर. पु. स्त्री.) वेळ; प्रसंग.

**वक्तव्य** (सं. वि.) जें बोलावयाचें तें, कथनीय.

**वक्तशीर** (अ.) वेळेवर, वेळच्या वेळीं.

**वक्ता** (सं. पु.) भाषणपटु, वाग्मी.

**वक्तृत्व** (सं. न.) भाषण, वाक्पटुता.

**वक्तृत्वशक्ति** (सं. स्त्री.) चांगलें भाषण करण्याचें सामर्थ्य.

**वक्त्र** (सं. न.) मुख.

**वक्त्री** (सं. स्त्री.) भाषणपटु स्त्री.

**वक्फ** (अर. पु.) दानधर्म.

**वक्र** (सं. वि.) वाकडें; कुटिल.

**वक्रगामी** (सं. वि.) वाकडया चालीचा.

**वक्रतुंड** (सं. वि.) वाकडया तोंडाचा; (पु.) गणपति. [कृपा.

**वक्रदृष्टि** (सं. स्त्री.) वाकडी नजर, अव–

**वक्रिम** (सं. वि.) वाकडा; कुटिल.

**वक्रिमा** (सं. स्त्री.) वाकडेपणा, कुटिलता.

**वक्री** (सं. वि.) वाकडा; उलट जाणारा.

**वक्रीभवन** (सं. न.) पदार्थ-विज्ञान-शास्त्रांत—प्रकाशाचे किरण एका पारदर्शक पदार्थांतून त्याहून घन किंवा पातळ अशा दुसऱ्या पारदर्शक पदार्थांत जातांना त्या किरणांचें किंचित् वाकडें होणें.

**वक्रोक्ति** (सं. स्त्री.) कुटिल भाषण; व्यंग्योक्ति; श्लेष, एक शब्दालंकार (जेथें वक्त्यानें एका अर्थानें योजिलेला शब्द दुसरा मनुष्य निराळ्याच अर्थानें ग्रहण करतो तेथें हा अलंकार होतो).
**वखट** (तेलगु वोकटि वि.) विटीदांडूच्या खेळांतली १ या संख्येची निदर्शक संज्ञा.
**वखत** (अर. वक्त पु. स्त्री.) काळ, वेळ, प्रसंग.
**वखद** (न.) औषध (अशिक्षितांत).
**वखर** (न.), **वखरा** (पु.) नांगरलेली जमीन साफ करण्याचें यंत्र. [ करणें.
**वखरणें** (क्रि.) नांगरलेली जमीन साफ
**वखवख** (स्त्री.) खा खा; खाण्याची अनावर इच्छा; फाडून तोडून खाणें (अतिशय त्रास देणें). [ नेमणूक.
**वखा** (पु.) रतीब, रोजचा ठराविक शेर;
**वखार** (हिं. स्त्री.) मालाची कोठी, साठा.
**वखारणें** (क्रि.) वखरणें पहा. [ मालक.
**वखारदार, वखारी** (पु.) वखारीचा
**वग** (स्त्री.) ओळख, वळण, वशिला; (पु.) तमाशांतील आख्यान. [प्रांत
**वंग** (सं. न.) कथिल; शिसें; (पु.) बंगाल
**वंगण** (न.) ओंगण.
**वगणें** (प्रा. क्रि.) भडकणें. [ येणें.
**वंगणें** (क्रि.) ओंगण लावणें; वठणीवर
**वंगभस्म** (सं. न.) एका औषधी भस्माचें नांव.
**वगर** (स्त्री.) म्हैस; (अ.) शिवाय.
**वगवशिला** (पु.) मोठ्या माणसाशीं संधान.
**वंगविणें** (क्रि.) ओंगण लावणें; ताळ्यावर येईपर्यंत चोपणें.
**वंगळ, वंगाळ** (प्रा. वि.) अमंगल, ओंगळ.
**वगळ** (स्त्री.) गाळसाळ. [ सोडणें.
**वगळणें** (सं. अवगल् क्रि.) गाळणें;
**वंगु, वंगू** (प्रा. पु.) कलंक; कथिल.
**वगैरे** (फा. वगेरा अ.) इत्यादि.
**वच** (सं. वचस् न.) भाषण, उक्ति.
**वचक** (हिं. पु.) धाक, दरारा, भय.
**वंचक** (सं. वंच् वि.) फसव्या.
**वचकणें** (क्रि.) भिऊन वागणें.
**वंचणूक** (प्रा. स्त्री.) फसवणूक.
**वंचणें** (प्रा. क्रि.) वेंचणें, खर्चणें, जाणें; नासणें. [ टाकणें.
**वंचणें** (सं. वंचन् क्रि.) ठकविणें; अंतरणें;
**वचन** (सं. न.) भाषण; आधारभूत वाक्य; भाक; प्रतिज्ञा; व्याकरणांत-- संख्या. **अर्ध्या व० त असणें**--सांगेल तें तत्परतेनें करायला तयार असणें; **वचनाचा खरा**--बोलल्याप्रमाणें वागणारा.
**वंचन** (सं. न.), **वंचना** (स्त्री.) फसवणूक.
**वचनभाक** (स्त्री.) तोंडीं वचन किंवा करार. [ व्यवहार.
**वचनावचनी** (स्त्री.) तोंडोतोंडीं झालेला
**वचनीय** (सं. वि.) बोलून दाखविण्यासारखें.
**वचपा** (पु.) एकीकडचा उणेपणा दुसरीकडे भरून काढणें; उट्टें; सूड.
वचवच, **वचवचां** (अ.) फाडून तोडून कोंबून मटमट आवाज करीत बोचून बोचून किंवा मूर्खपणानें तोंडास येईल तें बडबडत. [ वटवट्या.
**वचवच्या** (वि.) वचवच करणारा,
**वंचित** (सं. वि.) फसलेला, अंतरलेला.
**वछ** (सं. वत्स पु.) वासरूं.
**वज**(हिं. स्त्री.)कारवाराकडे--रीत, प्रकार.
**वजणें** (सं. ओज् क्रि.) व्यवस्थितपणें राखलें जाणें (रंग० यो० १०।४४).
**वंजणें** (क्रि.) घासणें; चोळणें, चोपडणें.
**वजन** (अर. न.) भार; तोल; इभ्रत; मान; गुरुत्व.
**वजनदार, वजनशीर** (फा. वि.) जड; प्रतिष्ठित, मान्य; लोकांवर छाप ठेवणारा.
**वजनी** (वि.) तोलण्याचें.
**वजा** (अर. अ.) कमती, काढून टाकलेला; सारखा; (स्त्री.) रीत, प्रकार; युक्ति.
**वजाई** (स्त्री.) हिशेबांतून काढून टाकलेली किंवा वजा घातलेली रक्कम; न्यून, उणीव.
**वजाबाकी** (अर. स्त्री.) वजावट; एका संख्येंतून दुसरी संख्या काढून टाकणें.
**वजारतमाहा** (अर. पु.) वजिरांत श्रेष्ठ.
**वंजारा, वंजारी** वणजारा, वणजारी पहा.

वाचनालय

**वजावाजव, वजावाजवी** (वि.) योग्य, दुरुस्त, न्यायाची.
**वजावाट** (स्त्री.) द्यावयाची रक्कम वजा घालून केलेला हिशेब.
**वजिरात** (अर. वजारत स्त्री.) वजीरी.
**वजीर** (अर. पु.) मुख्य प्रधान; बुद्धिबळांतलें एक मोहरें.
**वजीरमूठ** (स्त्री.) जडावाचें एक हत्यार.
**वजीरी** (फा. स्त्री.) वजिराची पदवी किंवा हुद्दा; त्याचें काम.
**वज्जर** (वि.) फार.
**वज्जू** (पु.न.) स्नान.
**वंजुळ** (सं. पु.) एक लता.
**वज्र** (सं. न.) इंद्राचें आयुध; हिरा; पोलाद; विद्युल्लता. [खत.
**वज्रकवच** (न.) वज्रासारखें अभेद्य चिल-
**वज्रचूडेमंडित** (वि.) सुवासिनीस पाठविण्याच्या पत्राचा हा मायना आहे.
**वज्रटीक** (स्त्री.) स्त्रियांचा एक अलंकार.
**वज्रदेह** (सं. पु.) वज्रासारखें अभेद्य शरीर.
**वज्रदेही** (सं. पु.) हनुमान्. [धार.
**वज्रधार** (सं. स्त्री.) शस्त्राची अतिशय तीक्ष्ण
**वज्रनाद, वज्रनिर्घोष** (सं. पु.) विजेचा कडकडाट.
**वज्रपाणि** (सं. पु.) इंद्र. [प्रसंग कोसळणें.
**वज्रपात** (सं. पु.) वीज पडणें; अतिशय दुर्धर
**वज्रप्रयोग** (सं. पु.) सगळे उपाय हरल्यानंतर करण्याचा अतिशय कठोर उपाय; एक प्रकारचा मंत्र.
**वज्रप्रहार** (सं. पु.) अतिशय जोराचा तडाखा.
**वज्रप्राय** (सं. वि.) वज्रासारखा अभेद्य; अतिशय जोराचा; अतिशय तीक्ष्ण; बहुतेक वज्रासारखा.
**वज्रबटु** (सं. पु.) वजरबट्टू पहा.
**वज्रमणि** (सं. पु.) हिरा.
**वज्रमुष्टि** (सं. स्त्री.) मल्लाचें एक आयुध.
**वज्रलेप** (सं. पु.) मालमसाला घालून केलेला अतिशय दृढताविशिष्ट चुना; न जाण्यासारखें त्याचें लिंपण.
**वज्रशलाका** (सं. स्त्री.) घरावर वीज पडूं नये म्हणून तार लावतात ती.
**वज्रशरीरी** (सं. वि.) वज्रासारख्या अभेद्य शरिराचा, वज्रदेही.
**वज्रहृदयी** (सं. वि.) अतिशय कठोर अंतःकरणाचा; अतिशय निग्रही; निधड्या छातीचा.
**वज्रक्षार** (सं. पु.) एका औषधाचें नांव.
**वज्रांगी** (प्रा. स्त्री.) चिलखत; कवच.
**वज्राघात** (सं. पु.) वज्रप्रहार, आकाशाची वीज़ पडण्याइतका भयंकर अनर्थापात.
**वज्रावळ** (स्त्री.) मुलाला दृष्ट लागूं नये म्हणून त्याच्या गळ्यांत मण्यांची माळ घालतात ती.
**वज्रासन** (सं. न.) योगशास्त्रांतली एक विशेष प्रकारची बैठक.
**वज्रास्त्र** (सं. न.) इंद्राचें एक अस्त्र (वीज). [झाला तो.
**वज्राहत** (सं. वि.) वज्राचा प्रहार ज्यावर
**वज्री** (स्त्री.) पाय घासण्याचा खरखरीत दगड; (सं. पु.) इंद्र. [जागा.
**वज्ञ** (अर. स्त्री.) रूप; चेहरा; पद्धत;
**वट** (सं. पु.) वड; कच्चें रेशीम धुतांना निघून जाणारा गाळसाळ; (स्त्री.) ऐट; डौल.
**वटक** (प्रा. स्त्री.) लेकरास होणारी ओकारी; (पु.) तांदूळ, उडीद इत्यादिकांचा केलेला व तळलेला वडा.
**वटकन–ण** (न.) टेंकण. [कापूस घालणें.
**वटणें** (क्रि.) सरकी काढण्यासाठीं चरकांत
**वटपौर्णिमा** (सं. स्त्री.) ज्येष्ठ शु. १५, वडाच्या झाडाची पूजा करण्याचा दिवस.
**वटवट** (स्त्री.) वडवड.
**वटविणें** (क्रि.) रुपया, हुंडी वगैरे देऊन त्यांचा मोबदला घेणें.
**वटवाघूळ** (सं. वग्गुली न.) रानवाघूळ.
**वटसावित्री** (सं. स्त्री.) ज्येष्ठ शु. १५ ला वडाच्या झाडाखालीं जिची पूजा करितात ती देवता.
**वटहुकूम** (पु.) सर्वत्र लागू असा हुकूम, सर्क्युलर; आणीबाणीच्या परिस्थितींत राष्ट्रपति किंवा राज्यपाल यांनीं काढलेलें फर्मान.
**वटारणें** (क्रि.) (डोळे) वासणें.

**वटाव** (हिं. वटाव पु.) बट्टा, वटणावळ.
**वटिका, वटी** (सं. स्त्री.) वडी; गोळी.
**वठणीस आणणें** नरम करणें; ताळ्यावर आणणें; नम्र होण्यास लावणें.
**वठणें** (क्रि.) नम्र होणें; उठणें, ठसा उमटणें; (शाप) फलद्रूप होणें; (झाड) वाळणें. [उठण्याची जागा.
**वठाण** (सं. अवस्थान न.) खोली, वसण्या-
**वठार** (पु.) गांवाचा भाग, पेठ.
**वठ्ठ्या** (वि.) दांडगेश्वर.
**वठ्ठ्याचें** (न.) आकंठ भोजन.
**वड** (सं. वट पु.) एक वृक्ष. **वडाची साल पिंपळास लावणें**—नसता संबंध जोडणें.
**वडग** (न.) मरायला टेकलेलें किंवा मेलेलें जनावर.
**वडगण** (न.) टेकण.
**वडप** (प्रा. पु.) शृंगार; आश्रय; वृष्टि.
**वडपुनव** (स्त्री.) वटपौर्णिमा (ज्येष्ठ शु. १५).
**वडलाई, वडलाइकी, वडायकी** (स्त्री.) वडीलपण.
**वडलावडलो** (अ.) वंशपरंपरागत.
**वडलोपार्जित** (सं. वि.) पूर्वजांनीं संपादलेलें.
**वडव** (स्त्री. न.) मोटवण.
**वडवडणें** (क्रि.) ओढवणें(हाना०पृ० ११२).
**वडवतें** (न.) नुकतेंच लग्न झालेल्या मुलीनें वटपौर्णिमेच्या दिवशीं वटपूजेच्या वेळीं ब्राह्मणास दिलेलें दान.
**वडवा** (सं. स्त्री.) घोडी; (प्रा.) वाहत्या पाण्याचें धरण.
**वडवागूळ, वडवाघूळ** वटवाघूळ पहा.
**वडवाग्नि, वडवानल** (सं. पु.) समुद्रांतला अग्नि.
**वडवाळी** (प्रा. स्त्री.) आहुति; राशि (भा० ५।४१३); घास (ज्ञा० ६।२३०).
**वडस** (पु.) डोळयांतल्या बुबुळावर येणारा कवडा.
**वडा** (सं. वटक पु.) डाळीच्या पिठाची तिखटमिठाची पुरी. **व० चें तेल वांग्यावर काढणें** — एकावरचा राग दुसऱ्यावर काढणें.
**वडांग** (स्त्री.) कुंपण.
**वडांगळें** (न.) वडाचें फळ.
**वडार** (पु.) एका जातीचें नांव.
**वडिलकी** (स्त्री.) वडीलपणा, वरचा कारभार पाहण्याचा अधिकार. [केलेली.
**वडिलोपार्जित** (वि.) वडिलांनीं संपादन
**वडी** (सं. वटिका स्त्री.) लहान, चापट, बहुधा चौकोनी तुकडा.
**वडील** (सं. वृद्ध वि.) माता, पिता इ० पूर्वज; बाप; वयानें किंवा विद्या, नातें इ० नीं श्रेष्ठ.
**वडीलघराणें** (न.) विभक्त झालेल्या भावांपैकीं वडीलभावाचें घराणें.
**वडीलधारा** (पु.), **वडीलधारें** (न.) कुटुंबांत शिस्त राखण्याचा ज्याला अधिकार आहे असें वडील माणूस.
**वढें** (न.) उट्टें, सूड.
**वण** (सं. व्रण पु.) गळू, जखम इ० चा शरिरावर राहाणारा डाग किंवा चिन्ह.
**वणज** (सं. वाणिज्य स्त्री.) व्यापारधंद्या-निमित्त बाहेर जाणें. [१८।९४८).
**वणजणें** (प्रा. क्रि.) व्यापार करणें (ज्ञा०
**वणजारा, वणजारी** (पु.) एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं धान्य नेणाऱ्या एका जातीचें नांव.
**वणत** (स्त्री.) कारवाराकडे–भित.
**वणवण करीत फिरणें** निरर्थक कष्ट सोसून फिरणें. [खालीं वाकणें.
**वणवणें** (क्रि.) ओणवें होणें, कमरेपासून
**वणवा** (सं. वन्हि पु.) जंगलांतली किंवा डोंगरावर पेटलेली आग.
**वणि, वणिज** (प्रा. पु.) व्यापार (ज्ञा० ६।११०).
**वणिक** (सं. पु.) वाणी; बनिया.
**वणिज** (सं. वणिज् पु.) व्यापारी; (न.) सहावें करण; तूळ. [होतो.
**वणी** समासान्तीं याचा अर्थ पाणी असा
**वत्** (सं. अ.) प्रमाणें; सारखें.
**वंत, वान्** हे शब्द एखाद्या नामाला जोडून आले म्हणजे त्यांचा अर्थ ज्या पाशीं आहे तो असा होतो.
**वतन** (अर. न.) वंशपरंपरा चालत आलेली वृत्ति, जमीन इ.

नगर वाचनालय, सातारा

**वतनदार** (पु.) ज्याला वतन आहे तो.
**वतनवाडी** (स्त्री.) जमीनजुमला.
**वतंस** (सं. पु.) तुरा, शिरोभूषण.
**वती** (अ.) वतीनें, बद्दल.
**वत्स** (सं. पु. न.) बालक, मूल.
**वत्सर** (सं. न.) वर्ष.
**वत्सल** (सं. वि.) मायाळु, ममताळु.
**वत्सलता** (सं. स्त्री.) वात्सल्य, स्नेह, मायाळूपणा. [ संपत्तीचा वांटा.
**वंथ** ( पु. ) वांटा; वडिलोपार्जित
**वथणें** (क्रि.) वटवट करणें; जें बोलावयास नको तें बोलून टाकणें.
**वदणूक** (स्त्री.) कबुली; भाषण.
**वदणें** (सं. क्रि.) बोलणें.
**वंदणें** (सं. वंद् क्रि.) नमस्कार करणें.
**वदंता** (सं. वद् स्त्री.) बोलवा, जनवार्ता.
**वदंती** (सं. स्त्री.) भाषण; गोष्ट,वार्ता (भा० ३।६६३).
**वदन** (सं. न.) मुख, तोंड.
**वंदन** (सं. न.) नमन, नमस्कार.
**वंदनीय** (सं. वि.) वंदण्यास योग्य.
**वदळ** (सं. अवदलन स्त्री.) गर्दी, जाणारा-येणारांची वरदळ इ०मुळें होणारी झीज.
**वदान्य** (सं. वि.) उदार.
**वंद्य** (सं. वि.) वंदनीय, पूज्य.
**वद्य** (सं. वि.) कृष्ण (पक्ष).
**वध** (सं. पु.) हनन, हत्या, ठार मारणें.
**वधणें** (सं. क्रि.) ठार मारणें.
**वधस्तंभ** (सं. पु.) अपराध्यास देहान्त शिक्षा देण्यासाठीं स्मशानासारख्या स्थळीं पुरलेला खांब.
**वधारा** (स्त्री.) वाढ.
**वधू** (सं. स्त्री.) नवरी मुलगी; सून; विवाहायोग्य झाल्यापासून प्रौढ वयाची होईपर्यंतच्या वयाची स्त्री.
**वधूप्रवेश** (सं. पु.) विवाहसमाप्तीनंतर वराच्या घरीं वरात आल्यावर नवरीनें त्या घरांत प्रवेश करण्यासंबंधींचा विधि.
**वधूवरें** (न. अने.) नवरा आणि नवरी यांचें जोडपें.
**वध्य** (सं. वि.) मारण्यास योग्य.
**वंध्या** (सं. स्त्री.) वांझ.
**वंध्यापुत्र** (सं. पु.) वांझ स्त्रीला पुत्र होण्याइतकीच असंभाव्य गोष्ट.
**वंध्यामैथुन** (सं. न.) निष्फल प्रयत्न.
**वन** (सं. न.) रान, अरण्य, जंगल.
**वनचर, वनचारी** (सं. वि.) जंगलांत फिरणारा, जंगली.
**वनचराई** (स्त्री.) गुरांना गावांबाहेर कुरणांत चरण्याबद्दल द्यावें लागणारें द्रव्य.
**वनदेवता** (सं. स्त्री.) वनाची अधिष्ठात्री देवता. [रानांतली सहल.
**वनभोजन** (सं. न.) बागेंतली किंवा
**वनमाला** (सं. स्त्री.) जंगलांत होणाऱ्या फुलांची पायापर्यंत पोंचणारी माळा; विष्णूचें कंठभूषण.
**वनमाली–ळी** (सं. पु.) श्रीकृष्ण.
**वनराजि** (स्त्री.) वनाची शोभा.
**वनवास** (सं. पु.) जंगलांत राहणें.
**वनवासी** (वि.) दुःखी; दुर्दैवी; रानांत राहणारा.
**वनविहार** (सं. पु.) वनांतली क्रीडा.
**वनसें, वन्सें** (सं. भगिनीसम स्त्री.) नणंद, नवऱ्याची बहीण.
**वनस्पति** (सं. स्त्री.) लता, वृक्ष इ०.
**वनाई** (स्त्री.) वनचराई.
**वनाळ** (प्रा. वि.) अंगावर वण असलेला; (पु.) वार, जखम; स्वभाव (दा० १४।६।२०).
**वनिता** (सं. स्त्री.) स्त्री.
**वनेचर** (सं. वि.) रानांत भटकणारा.
**वन्य** (सं. वि.) जंगली, रानटी; वनांत राहणारा.
**वपन** (सं. स्त्री.) श्मश्रु, हजामत.
**वपा** (सं. स्त्री.) चरबी.
**वपु** (सं. न.) शरीर. [हजाम.
**वप्ता** (सं. पु.) पेरणारा; शेतकरी; बाप;
**वप्र** (सं. पु. न.) शेत; टेकाड; उंचवटा; नदी; समुद्र वगैरेंचा किनारा;डोंगराचा माथा किंवा बाजू; वेस; प्राकार, तट.
**वफा** (अर. स्त्री.) नेकी; निष्ठा.
**वमक** (न.) वांती.
**वमणें** (क्रि.) ओकणें.
**वमन** (सं. न.) वांती, ओकारी.

**वय** (सं. न.) उमर, आयुष्याचीं गेलेलीं वर्षें; कुंपण. **व० त येणें**—तारुण्य प्राप्त होणें. [ (भा० ९।२६२).
**वयसा** (प्रा. स्त्री.) वय, आयुष्यविस्तार
**वयसें** (प्रा. न.) तरुणपण.
**वयस्क, वयस्कर, वयःस्थ** (सं. वि.) प्रौढ वयाचा, पोक्त.
**वयस्य** (सं. पु.) सारख्या वयाचा मित्र.
**वयातीत** (सं. वि.) फार वृद्ध.
**वयाळें** (न.) एक निर्विष सर्प. [जख्ख.
**वयोगत, वयोवृद्ध** (सं. वि.) म्हातारा,
**वर** (प्रा. स्त्री.) प्रसूतवेळची वार (तुका० ७७).
**वर** (सं. पु.) देणगी; आशीर्वाद; नवरा मुलगा; (वि.) श्रेष्ठ; (अ.) उपरि भागीं; नंतर; कांहीं मर्यादेच्या बाहेर; (प्रा. अ.) परंतु.
**वरई** (स्त्री.) वरी (एक तृण धान्य).
**वरउपचार** (पु.) बाह्यात्कारीं दाखविलेला शिष्टाचार किंवा सभ्यपणा; पोटांत न घेतां शरिराला वरून करण्याचा उपचार.
**वरकड** (वि.) इतर, बाकीचे. [वरकांती.
**वरकरणीं, वरकर्मीं** (अ.) बाहेरून;
**वरकस, वोरकस** (प्रा. स्त्री.) कसोटी (ज्ञा० पा० ४०). [ योग्य.
**वरकशी** (वि.) वरकस धान्यें पिकविण्यास
**वरकस** (पु. न.) हलकीं धान्यें (गहूं, बाजरी, जोंधळा इ० मुख्य धान्याशिवाय इतर म्हणजे तूर,हरभरा, मूग, मठ इ.).
**वरकस** (वि.) अधिक योग्यतेचा; श्रेष्ठ प्रतीचा; (पु.) वर्चस्व; अधिकार, सत्ता, अंमल.
**वरकसदार** (वि.) अंमल चालविणारा.
**वरकसल** (स्त्री.) वरकस धान्यें.
**वरकाम** (न.) पूरक काम (निवडणें, केर काढणें इ.). [दिसणारें.
**वरकांती** (वि.) दिखाऊ, बाह्यतः गोड
**वरख** (अर. पु.) वहीचें पान; वर्ख; पान.
**वरखर्च** (पु.) इतर किरकोळ खर्च; अधिक खर्च.
**वरगण** (प्रा. स्त्री.) वांटणी.
**वरंगळ, वरंघळ** (स्त्री.) उतरण.
**वरघडी** (स्त्री.) वस्त्राच्या सणंगाची वरची घडी. ही नेहमीं बारीक विणीची व भपकेदार असते. त्यावरून **व० चा-** दिखाऊ. [कोसळणें.
**वरंघळणें** (क्रि.) घडघडत खालीं येणें;
**वरघाट** (पु.) सह्याद्रिपर्वताच्या घाटा-वरील प्रांत. [मिरवणूक.
**वरघोडा** (पु.) लग्नांतली वरात, वराची
**वरचढ** (वि.) सरस, श्रेष्ठ.
**वरचष्मा** (पु.) वरचढपणा, वर्चस्व.
**वरचिलें** (प्रा. वि.) आणखी; (वि.) वरलें; बाकीचें.
**वरचेवर** (अ.) बारंवार, पुनः पुनः.
**वरजणें** (क्रि.) वर्जणें, टाकणें.
**वरट** (पु.) पेटका, आंचका.
**वरंड** (स्त्री.), **वरंडा** (पु.), **वरंडी** (स्त्री.), **वरांडा** (पु.) ठेंगणी भिंत; बांध; ओटा; दगडाची रास; भारा, ओझें.
**वरढाण** (स्त्री.) दुर्गंधी.
**वरण** (सं. वरान्न न.) शिजविलेली व ठेचून पातळ केलेली डाळ; लग्न; विवाह; नेमणूक.
**वरणभात** (पु.) वरण आणि भात हे दोन पदार्थ; साधें जेवण; वरापेक्षां वधू मोठाड असलेलें जोडपें.
**वरणा** (पु.) पावटा.
**वरणी** (स्त्री.) क्रमाक्रमानें येणारी देवाचें अनुष्ठान करण्याची पाळी; लग्नाचे वेळीं नवरीस नेसवितात तें वस्त्र. **वरणी लावणें**—प्राप्तीचें साधन मिळवून देणें, सोय लावणें.
**वरणें** (सं. वृ क्रि.) पसंत करणें, स्वीकारणें.
**वरता** (अ.) वर, आणखी.
**वरतावळा, वरताळा** (पु.) वटाव, बट्टा.
**वरतावा** (पु.) चटई; हल्ला.
**वरद** (सं. वि.) वर देणारा, प्रसन्न.
**वरदहस्त** (सं. पु.) वर देतांना देणारा हात वर करतो तो. **व० ठेवणें**—पूर्ण कृपा करणें; गुरूनें शिष्याला स्वतः-सारखें करून सोडणें.
**वरदवाणी** (सं. स्त्री.) आशीर्वादाचे शब्द-

**वरदळ** (स्त्री. न.) घरावर कौलें घालण्यासाठीं वासे, ओंवण वगैरे घालतात तें; (स्त्री.) जाणाऱ्या येणाऱ्यांची गर्दी; वहिवाट; गडबड; त्रास; सामानसुमान; नफा; (प्रा.) वरचा भाग, बाह्यांग. **व० वर (किंवा) वर्दळीवर येणें**—आवेशानें भांडणें.

**वरदक्षिणा** (सं. स्त्री.) नवऱ्या मुलास कन्यादानाचे वेळीं दिलेली देणगी.

**वरदान** (सं. न.) प्रसन्न होऊन दिलेली देणगी; एखाद्याचे हातून हटकून घडणारी गोष्ट. [ इतर दूध.

**वरदूध** (न.) आईच्या अंगावरच्या शिवाय

**वरधणी** (पु. न.) चुलीवरच्या भांड्यावरचें आच्छादन.

**वरधावा** (पु.) लग्नाचे वेळीं वरास आणण्यासाठीं जाणारा वधूचा भाऊ किंवा तत्सदृश मनुष्य मिरवीत जातो ती मिरवणूक.

**वरधाविणें** (क्रि.) गोड बोलून खुष करणें.

**वरपंकी, वरपंगी** (अ.) वरवर, बाहेरून.

**वरपंग** (प्रा. न.) वरवरचा देखावा (तुका० २८५५).

**वरपड, वरपडा** (प्रा. वि.) गुंतलेला; प्राप्त (मुक्ते०वन० १२।४७); दुःखी; स्वाधीन झालेला.

**वरपडी** (प्रा. स्त्री.) मिठी; उडी; मुरकुंडी; झाड. [कडची मंडळी.

**वरपक्ष** (सं. पु.) लग्नांत नवऱ्या मुला-

**वरपा** (प्रा. पु.) धाडा (दा० ३।७।४९).

**वरपिका, वरपीक** (वि.) झाडावर पिकलेलें. (घरांत अढी घालून पिकविलेल्या फळाला कोनपिका म्हणतात).

**वरपेकरी** (प्रा. पु.) लुटारू.

**वरप्रद** (सं. वि.) अभीष्ट देणारा.

**वरंबा, वरंभा** (पु.) बांध, वरवंडी; टेंगूळ.

**वरमणें** (सं. वर्म क्रि.) शरमणें, दबलें जाणें. [बसणें.

**वरमणें** (सं. विरम् क्रि.) कमी होणें;

**वरमाय** (स्त्री.) नवऱ्याची आई.

**वरमूठ** (स्त्री.) लग्नांत वधूवरांच्या वस्त्रांचे पदराला बांधलेली गांठ सोडण्याबद्दल वधूच्या वहिणीला द्यावी लागणारी देणगी.

**वरयितृ** (प्रा. पु.) वरणारा, भर्ता.

**वरव** (स्त्री.) एकसारखा तोच तो पदार्थ खाणें; पुरवठा; शिल्लक, साठा, समृद्धि.

**वरवंचाई** (स्त्री.) आंतून सगळें पोकळ बाहेरून मात्र भपका अशामुळें झालेली फसवणूक.

**वरवंट** (पु.) बायका लुगडें नेसतांना बेंबीपाशीं काढतात तें वरवंट्याच्या आकाराचें केळें; (प्रा.) सुंदर (ना० ९७५).

**वरवंटा** (पु.) पाट्यावर चटणी वगैरे ज्यानें वांटतात तो लंबगोल दगड; मोट लावण्याकरितां विहिरीवर बांधलेला चहुत्रा.

**वरवंठो** (प्रा. अ.) वरवर, वरकरणी.

**वरवड** (स्त्री.) गांठी दिलेल्या वस्त्राच्या दशा.

**वरवंडणें** (प्रा. क्रि.) कुरवंडी करणें.

**वरवंडा** (प्रा. पु.) बांध (ज्ञा० १३।६९४)

**वरवंडी** (स्त्री.) वरंड पहा. [ बाहेरून.

**वरवर** (अ.) आंत प्रवेश न करतां;

**वरवळा** (प्रा. पु.) वरचढपणा.

**वरवा** (पु.) मुक्काम; नांगर टाकून जहाज थांबविणें.

**वरवेश** (प्रा. पु.) बाह्यरूप.

**वरस** (प्रा. पु.) वर्षाव, पाऊस.

**वरसणें** (सं. वृष् क्रि.) वर्षणें.

**वरसल** (स्त्री.) वर्षल पहा.

**वरसोस** (पु.) श्वास लागणें.

**वरळ** (प्रा. न.) पाखडून स्वच्छ केलेले दाणे (तुका० १३४१).

**वरळा** (प्रा. पु.) फोल व धान्य यांची मिसळ; (न.) वरळ; फोल; दाणा.

**वरळें, वराई** (स्त्री.) एक सोन्याचें नाणें.

**वरा** (स्त्री.) जहाजाची मागची बाजू.

**वराक** (सं. वि.) बापडा, दुर्दैवी, गरीब.

**वरांगना** (सं. स्त्री.) श्रेष्ठ स्त्री.

**वरात** (सं. व्रात पु.) वधूवरांची मिरवणूक; वरघोडा; (फा. स्त्री.) चेक, पैसे देण्याविषयीं चिठ्ठी, हुंडी; झोपाळा किंवा पाळणा टांगण्याच्या दोऱ्या. **वाऱ्यावर वरात**—बेजबाबदारीचें काम.

**वरातीमागून घोडें** एखादी गोष्ट होऊन गेल्यावर मग तिच्यासंबंधाची सामग्री येऊन पोंचणें.
**वरान्न** (सं. न.) वरण.
**वराम** (पु.) गलवताचा मागचा भाग.
**वराय, वराई** (स्त्री.) सोन्याचें नाणें.
**वरावर, वरावरी** (स्त्री.) लग्नाची जुळवाजुळव; (अ.) वरचेवर; झपाट्यानें (तुका० २५३४).
**वरावर्द** (फा. स्त्री.) दरमहाचे हिशेब; मासिक हिशेबपत्रक.
**वराह** (सं. पु.) डुकर.
**वरिखणें** (प्रा. क्रि.) वर्षणें.
**वरिचिला** (प्रा. वि.) वरचा.
**वरितु, वरीतु** (प्रा. पु.) भ्रतार.
**वरियडें** (प्रा. न.) ज्ञान (ज्ञा.१३।७०).
**वरिव** (प्रा. स्त्री.) शोभा; उत्कृष्टपणा.
**वरिवरि** (अ.) वरवर, वाह्यतः.
**वरिवडणें** (प्रा. क्रि.) गोंधळणें; उताणें पडणें; (न.) अज्ञान.
**वरिवंडणें** (प्रा. क्रि.) सफळ होणें.
**वरिष्ठ** (सं. वि.) सर्वश्रेष्ठ.
**वरी** (स्त्री.) एक तृणधान्य.
**वरी, वंरीं** (अ.) पर्यंत.
**वरीस** (सं. वर्ष न.) वर्ष.
**वरुखणें** (सं. वर्ष् क्रि.) वर्षणें (विवे० पू० १।८१).
**वररुची** (स्त्री.) अधिक पसंत.
**वरुण** (सं. पु.) समुद्राची अधिष्ठात्री देवता.
**वरुता** (प्रा. अ.) वर.
**वरुषणें** (प्रा. क्रि.) वर्षणें.
**वरुषाव** (सं. वर्षण पु.) वर्षाव, पाऊस.
**वरू** (सं. वर पु.) पति; (स्त्री.) श्रेष्ठता.
**वरेकेज** (स्त्री.) लग्न जुळविणें.
**वरेकज्या** (वि.) लग्न जुळविणारा मध्यस्थ.
**वरेत, वरेंत** (प्रा. वि.) वरणारा; भर्ता (ज्ञा० १८।१०४९).
**वरो** (प्रा. वि.) वरव; पुष्कळ; (स्त्री.) अन्नसामुग्री (ज्ञा० १८।२५८); नित्य अन्नखर्च.
**वरोळा,** (पु.) **वरोळी** (स्त्री.) शेताच्या हद्दीच्या जागीं घातलेला बांध.
**वरौता** (प्रा. अ.) वर.
**वर्कशी, वर्कस** वरकशी, वरकस पहा.
**वर्ख** (प्रा. पु.) कागदाच्या बंदाचा एक अष्टमांश (तुका० २९१५); धातूचा अतिशय पातळ पत्रा.
**वर्ग** (सं. पु.) अंकगणितांत एकाद्या संख्येला तिनेंच गुणिलें असतां होणारी संख्या; सजातीय वस्तूंचा समूह; वदली; व्याकरणांत–वर्णसमूह; (अर. वरक पु.) पानपट्टी, पान.
**वर्गणी, वर्गत** (स्त्री.) सामुदायिक खर्चाचा हिस्सा; वर्तमानपत्रें, लायब्ररऱ्यासारख्या संस्था इ. ना ठराविक मुदतीनें द्यावयाची रक्कम.
**वर्गणीदार** (पु.) वर्गणी देणारा.
**वर्गमूळ** (सं. न.) अंकगणितांत-ज्या संख्येला तिनेंच गुणिलें असतां गुणाकार दिलेल्या संख्येइतका येतो ती मूळची संख्या.
**वर्गयुद्ध** श्रीमंत व गरीब या दोन वर्गांतील युद्ध.
**वर्गावर्गी** (स्त्री.) कमजास्त योग्यतेप्रमाणें निरनिराळे वर्ग करणें; वढती होऊन वर जाणें. [भेद.
**वर्गविग्रह** (पु.) भांडवलदार व मजूर असा
**वर्गीकरण** (न.) वर्ग किंवा गट पाडणें.
**वर्गीय** (सं. वि.) वर्गांतला.
**वर्चस्** (सं. न.) तेज, प्रभा शक्ति.
**वर्चस्व** (सं. वर्चस् न.) महत्त्व, श्रेष्ठपणा, प्रामुख्य.
**वर्ज** (सं. वि.) टाकून दिलेलें.
**वर्जणें** (सं. वृज् क्रि.) टाकणें, सोडणें; मना करणें.
**वर्जनीय, वर्ज्य** (सं. वि.) त्याज्य.
**वर्ढाणी** (प्रा. स्त्री.) दुर्गंधि.
**वर्ण** (सं. पु.) मुखाच्या वाटें स्पष्ट उच्चारले जाणारे मूल ध्वनि; अक्षर; रंग; ब्राह्मण क्षत्रियादि मुख्य जाति; व्रण.
**वर्णणें** (क्रि.) रूप, गुण, धर्म इ. सांगणें; वाखाणणें.
**वर्णधर्म** (सं. पु.) प्रत्येक वर्णाला लावून दिलेले विशिष्ट प्रकारचे नियम.

**वर्णन** (सं. न.), **वर्णना** (स्त्री.) शब्द; चित्र; स्तुति. [ स्तुत्य.
**वर्णनीय** (सं. वि.) वर्णन करण्यास पात्र;
**वर्णमाला** (सं. स्त्री.) मूळाक्षरें.
**वर्णविपर्यास** (सं. पु.) रंगांतला परस्पर-विरोध. [ उलटापालट.
**वर्णव्यत्यय** (सं. पु.) शब्दांतल्या अक्षरांची
**वर्णसंकर** (सं. पु.) रंगांची किंवा जातीची भेसळ. [पणा.
**वर्णांधत्व** (न.) रंग ओळखण्यांतील अध-
**वर्णाश्रमधर्म** (सं. पु.) ब्राह्मण–क्षत्रियादि चार वर्ण व ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य इ. चार आश्रम यांचे नियम पाळण्याविषयींची आज्ञा करणारा धर्म.
**वर्त** (प्रा. स्त्री.) वार्ता, गोष्ट (वामन–वाळक्रीडा० ३८).
**वर्तक** (सं. पु.) गांवच्या ठरावाची अंमलबजावणी करणारा एक गांवकामगार; व्यापारी. [ राहणी.
**वर्तणूक** (सं. वर्तन स्त्री.) वागणूक,
**वर्तणें** (सं. वृत् क्रि.) वागणें, असणें; चालू असणें; घडणें.
**वर्तन** (सं. न.) वागणूक, चाल.
**वर्तमान** (सं. वि.) सध्याचें; चालू; (न.) बातमी, खबर. [देणारें पत्र.
**वर्तमानपत्र**(सं.न.) ठिकठिकाणच्या बातम्या
**वर्तवळा, वर्ताळा, वर्तावळा** (पु.) निरनिराळया प्रकारच्या चलनी नाण्यांचा मोबदला करण्यास लागणारा बट्टा; हिशोबाचा निकाल केल्यानंतर हातांत उरलेली रकम.
**वर्तविणें** (क्रि.) ग्रह इ. च्या गतीसंबंधाचें गणित करणें; त्यादरून अमुक गोष्ट केव्हां कोठें कशी घडेल इ. बद्दलचें अनुमान तयार करणें. [ वात; बत्ती.
**वर्त्ति, वर्त्तिका, वर्त्ती** (स्त्री.) दिव्याची
**वर्तुल** (सं. न.) ज्या आकृतीची मर्यादा एकाच वक्ररेषेंत दाखविली जाते व जीमध्यें असा एक बिंदु असतो कीं त्यापासून त्या वक्ररेषेपर्यंत काढलेल्या सगळ्या सरळ रेषा सारख्या असतात, ती आकृति; मंडल, चक्र.
**वर्तुलाकार** (सं. वि.) वाटोळें, गोल.
**वर्तूळ** वर्तुल पहा.
**वर्त्म** (सं. न. पु.) मार्ग; वाट. [दुर्मिळता.
**वर्दावर्द** (स्त्री.) वरावर्द पहा; अन्नाची
**वर्दी** (फा. स्त्री.) बातमी, ख़बर.
**वर्धक** (सं. वि.) वाढविणारें.
**वर्धणें** (सं. वृध क्रि.) वाढणें.
**वर्धनीय** (सं. वि.) वाढवितां येणारें.
**वर्धमान** (सं. वि.) वाढतें; (पु.) जैन धर्माचा संस्थापक.
**वर्धिष्णु** (वि.) वाढणारा. [उणेपणा.
**वर्म** (सं. न.) चिलखत; (अर. न.) मर्म;
**वर्मणें** (क्रि.) वरमणें पहा.
**वर्मी** (वि.) टोचणारा, मर्मभेदक; गूढज्ञ, मर्मज्ञ; मार्मिक. [ वगैरे.
**वर्मं कर्मं** (न. अने.) मूर्खपणाचीं कृत्यें
**वर्य** (सं. वि.) श्रेष्ठ. [ वर्षाव.
**वर्ष** (सं. न.) संवत्सर, साल; खंड; (प्रा. पु.)
**वर्षगांठ** (स्त्री.) वाढदिवस.
**वर्षण** (सं. न.) पाऊस पडणें.
**वर्षणें** (सं. वृष् क्रि.) वृष्टि करणें.
**वर्षप्रतिपदा** (सं. स्त्री.) चैत्र शु. १; गुढी पाडवा.
**वर्षफल** (सं. न.) ज्योतिषाच्या आधारें नव्या वर्षांत घडणाऱ्या गोष्टींचा केलेला पूर्वनिश्चय.
**वर्षल, वर्षली** (स्त्री.) वतनाचा किंवा उत्पन्नाचा पाळीपाळीनें वर्षभर उपभोग घेणें.
**वर्षवृद्धि** (सं. पु.) गुरुग्रह एकाच राशींत ज्या ज्या वर्षांत राहतो तें वर्ष.
**वर्षसण** (पु.) लग्नाच्या पहिल्या वर्षाच्या अखेरीस जांवयाला देण्यांत येणारी मेजवानी, देणग्या इ.
**वर्षा** (स्त्री.) **वर्षाऋतु, वर्षाकाल** (पु.) पावसाळा.
**वर्षाचा दिवस** वाढदिवस; सण.
**वर्षाव** (सं. वर्षण पु.) वृष्टि.
**वर्षासन** (सं. न.) वार्षिक नेमणूक.
**वर्षोगणती** (अ.) अनेक वर्षांनीं मोजण्याइतकें.
**वर्षावर्ष** (अ.) कित्येक वर्षेपर्यंत, दरसाल.
**वर्सल** (स्त्री.) वर्षल पहा.

**वऱ्हा** (पु.) गुऱ्हाळांत उंसाचा कढत रस निवण्यासाठीं जींत ओततात ती खाच.
**वऱ्हाड** (न.) लग्नकार्यासाठीं जमलेली मंडळी; व्यवहार (तुका० ३४५९); समुदाय; एका प्रांताचें नांव.
**वऱ्हाडगोष्टी** (स्त्री. अने.) पोकळ प्रेमाच्या किंवा बढाईच्या गोष्टी. [ घर.
**वऱ्हाडघर** (न.) लग्नाचें वऱ्हाड उतरण्याचें
**वऱ्हाडणी** (स्त्री. अने.) लग्नकार्यासाठीं दोन्ही पक्षांकडे जमलेल्या स्त्रिया.
**वऱ्हाडी** (पु.) वऱ्हाड प्रांतांतला; लग्नकार्यासाठीं जमलेली मंडळी. [ स्त्री.
**वऱ्हाडीण** (स्त्री.) लग्नकार्यासाठीं आलेली
**वऱ्हें** (प्रा. अ.) वर.
**वलद, वल्लद** (अर. पु.) चा पुत्र.
**वलन** (सं. न.) वळणें, हलणें.
**वलभा** (प्रा. स्त्री.) आवड. [२।४२).
**वलभी** (प्रा. पु.) वासा (मुक्ते० सभा०
**वलय** (सं. न.) कडें, वर्तुळ.
**वलयांकित, वलयित** (सं. वि.) वेष्टलेलें.
**वलविणें, वल्हविणें** (क्रि.) वलें मारणें; (नाव) चालविणें.
**वलाट** (प्रा.) वलाढय.
**वलाट, वलाटी, वलाटी** (स्त्री.) समुद्रकिनाऱ्यापासून सह्याद्रीच्या पायथ्यापर्यंतची चढण; चढती जमीन.
**वलावा** (पु.) बरोबर असलेले हत्यारबंद संरक्षक लोक, लवाजमा.
**वली** (अर. पु.) साधु पुरुष; मालक; धनी.
**वलीअहद** (अर. पु.) युवराज.
**वलें, वल्हें** (न.) नाव चालवितांना पाणी तोडण्यासाठीं लांब दांडीला लाकडाची लहान फळी बसवून केलेलें साधन.
**वलेकरी** (पु.) वलें मारणारा, नावाडी.
**वल्कल** (सं. न.) वृक्षाची अंतर्साल; तिचें केलेलें वस्त्र.
**वल्गना** (सं. स्त्री.) बढाई, वडवड.
**वल्मीक** (सं. न.) वारुळ.
**वल्लकी** (सं. स्त्री.) पावा, मुरली; सनई.
**वल्लद** वलद पहा.
**वल्लभ** (सं. वि.) प्रिय; (पु.) नवरा; जार.
**वल्लभा** (सं. स्त्री.) प्रिया, पत्नी.
**वल्लरी** (सं. स्त्री.) वेल.
**वल्ली** (अर. वली पु.) साधु; स्वच्छंदी मनुष्य; (सं. स्त्री.) वेल.
**वल्हें** वलें पहा.
**वश** (सं. वि.) ताब्यांतला; अधीन.
**वंश** (सं. पु.) कुळ, घराणें; संतति; वेळू
**वशंगत** (सं. वि.) स्वाधीन झालेला.
**वंशच्छेद** (सं. पु.) कुळाचा नाश; वंश खुटणें; वांबू तोडणें.
**वंशज** (सं. पु.) कुलांत जन्मलेला.
**वशंड, वसंड** (सं. पु. वृषस्कंध न.) वैलाच्या मानेवरचा उंचवटा, कोळें.
**वशट** (फा. न.) मांस.
**वशता** (सं. स्त्री.) अधीनता.
**वंशपरंपरा** (अ.) वंशांतल्या प्रत्येक पिढीस प्राप्त होई अशा प्रकारें.
**वंशात्** (अ.) योगानें, मुळें.
**वंशावळ** (सं. वंशावलि स्त्री.) कुळांत झालेल्यांची यादी.
**वंशिक** (सं. वि.) वंशांतला, वंशसंबंधीं.
**वशिंड** वशंड पहा. [ओळख.
**वशिला** (अर. वसिला पु.) वग, आधार
**वंशी** (वि.) वेळूची केलेली; (स्त्री.) मुरली, पावा.
**वशीकरण** (सं. न.) एकाद्यास वश करून घेण्यासाठीं करावयाचें मंत्रादि साधन.
**वंशीय** (सं. वि.) वंशांतला.
**वशीयत** (फा. वसीयत पु.) हुकूम.
**वशीयतनामा** मृत्युपत्र.
**वशिष्ठ** (पु.) एक प्रसिद्ध ऋषि.
**वशेळी** (स्त्री.) व्रताचरण करणारी स्त्री.
**वश्य** (सं. वि.) वश; अधीन.
**वषट्कार** (सं. पु.) हवन; यज्ञ; जाळपोळ; लुटालूट.
**वस** (वि.) ओसाड; (प्रा.) वश.
**वंस** (प्रा. स्त्री.) चरबी.
**वसकणें** (क्रि.) चवताळून अंगावर येणें.
**वसकन्** (अ.) एकाएकीं; रागानें, चवताळून.
**वसंड** (वृषस्कंध न.) वशंड पहा.
**वसण** (न.) नदीच्या प्रवाहानें वाहून आणिलेला गाळ; वेसण.

(नगर) वा. वा. लय, सातारा.

**वसणें** (सं. वस् क्रि.) राहणें; (सं. वसा) व्रत आचरणें.
**वसंत** (सं. पु.) पहिला ऋतु; मधु; गायनांतला एक राग.
**वसतकरू** (पु.) अल्पकाळपर्यंत राहण्यासाठीं आलेला वाटसरू.
**वसंततिलका** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १४ अक्षरें व त, भ, ज, ज, असे गण असून शेवटचीं दोन अक्षरें गुरु असतात.
**वसंतपंचमी** (सं. स्त्री.) माघ शु० ५.
**वसंतपूजा** (सं. स्त्री.) वसंतऋतूंत ब्राह्मणांना बोलावून त्यांचेकडून मंत्र म्हणवितात व त्यांना चंदनाची उटी, आंब्याचें पन्हें इ० शीतलोपचार व दक्षिणा अर्पण करतात ती.
**वसता** (प्रा. वि.) गुंतलेला, वस्तीचा; (पु.) वाटसरु (मुक्त० वन० ७।१७०); रहदारीचा रस्ता.
**वसति** (सं. स्त्री.) वस्ती, राहणें.
**वसतिगृह** (सं. न.) पैसे दिले असतां राहण्याची व जेवण्याखाण्याची वगैरे सोय जेथें होते तें ठिकाण.
**वसतें** (वि.) राहतें, वस्तीचें.
**वसला** (पु.) पैमाषखात्यांतले लोक जमिनीचें क्षेत्रफळ काढण्याच्या सोयीसाठीं त्या जमिनीचे जे तुकडे पाडतात त्यांतला प्रत्येक तुकडा; जमिनीचा तुकडा; चिंधी.
**वसवटा** (प्रा. पु.) वास्तव्य.
**वसन** (सं. न.) वस्त्र.
**वसवसणें** (क्रि.) रागानें अंगावर ओरडणें.
**वसवसा** (अर. पु.) भीति; शंका; रुखरुख; कल्पना. [आड येणारी वस्तु.
**वसवा** (पु.) सावली, छाया; प्रकाशाच्या
**वसविणें** (सं. वस् क्रि.) वस्ती करणें.
**वसवी** (स्त्री.) मुसळाच्या खालच्या तोंडाला मजबुतीसाठीं लोखंडाचें कडें बसवितात तें. [पोळ.
**वसा** (पु.) व्रत; (सं. स्त्री.) चरबी; (पु.)
**वसात, वसाहत** (अर. वसअत स्त्री.) वस्ती; परमुलुखांत जूट करून राहिलेले लोक.
**वसार** (पु.) अरुंद जागेवरून जातांना स्वतः आपण बाजूला होऊन दुसऱ्याला जाण्यास दिलेला मार्ग.
**वसारा** (पु.) ओसार, आहोटी.
**वसाळी** वशेळी पहा.
**वसु** (सं. पु.) देवता विशेष; (न.) द्रव्य.
**वसुजणें** (क्रि.) सूज उतरणें.
**वसुंधरा, वसुधा, वसुमती** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**वसुली** (वि.) वसुलासंबंधीं. **व० आकार** (पु.)– ऐन वसूल.
**वसुसर्ग** (सं. वृषोत्सर्ग पु.) मृत माणसाची प्रेतावस्थेंतून मुक्तता करण्याच्या उद्देशानें त्याच्या आद्य श्राद्धाचे वेळीं (मृत व्यक्ति पुरुष असल्यास) पोळ व (स्त्री असल्यास) सवत्स धेनु सोडतात तो विधि.
**वसू** (सं. वृष पु.) पोळ.
**वसूं** (न.) नांगराचा फाळ, गाडीचें चाक, मुसळ इ० च्या तोंडाला बसविलेलें लोखंडाचें कडें.
**वसूबारस** (स्त्री.) गाईच्या वासरांच्या पूजेचा दिवस (आश्विन व० १२).
**वसूल** (अर. पु.) कर, सारा, वगैरेचें उत्पन्न. **व०करणें**–गोळा करणें; उगवणें.
**वसूलदार** (पु.) वसुली करणारा.
**वसूलबाकी** (स्त्री.) देण्याची राहिलेली वसुलाची रक्कम; वसूल गोळा करण्याचें काम.
**वसूलवार्तलात** (स्त्री.) वसुलाचा हिशेब.
**वसूलवासूल** (पु.) वसूल, कर, पट्टी इ. वसुलाची एकंदर व्यवस्था.
**वसैट** (प्रा. न.) वासस्थान.
**वसौट, वसौटा** (प्रा. पु.) वस्ती; आश्रय; संग्रह. [जिन्नस.
**वस्त, वस्तु** (सं. स्त्री.) अलंकार; पदार्थ,
**वस्तबांध** (प्रा. वि.) वस्ती करणारा.
**वस्तभाव** (सं. पु.), **वस्तवानी** (स्त्री.) दागदागिने, सामानसुमान.
**वस्तरा** (फा. पु.) वस्त्रा, केस काढण्याचें न्हाव्याचें हत्यार.
**वस्तवानी** (प्रा. स्त्री.) चीजवस्त.
**वस्ताद** (फा. उस्ताद पु.) निष्णात; गुरु; दमनकर्ता, शेराला सवाशेर.

**वस्तादगिरी** (फा. उस्तादगिरी स्त्री.) गुरूचें काम; चातुर्य, कौशल्य, धूर्तता; युक्तिबाजपणा.
**वस्तु** (सं. स्त्री.) पदार्थ; नाटकाचें कथानक.
**वस्तुगत** (वि.) वस्तूशीं संबंध.
**वस्तुतः** (सं. अ.) खरोखर.
**वस्तुबोध** (पु.) खरें स्वरूप कळणें.
**वस्ती** (सं: वसति स्त्री.) राहणें; लोकसंख्या; **व० स राहणें**—मुक्काम करणें.
**वस्तुस्थिति** (सं. स्त्री.) खरी खरी स्थिति किंवा गोष्ट.
**वस्तू** (अ.) कडून, हातानें.
**वस्त्र** (सं. न.) कापड, चिरगूट. **वस्त्रें मिळणें**—अधिकार प्राप्त होणें.
**वस्त्रगाळ** (वि.) कपड्यांतून गाळून घेतलेलें.
**वस्त्रपात्र** (सं. न.) भांडीं, वस्त्रें वगैरे आवश्यक सामान.
**वस्त्रप्रावरण** (सं. न.) कपडालत्ता.
**वस्त्रलोचन** (सं. वस्त्रलुंचन न.) नागविणें, अंगावरचीं वस्त्रें चोरून नेणें.
**वस्त्रहरण** (न.) अंगावरचा वस्त्रांचा अपहार.
**वस्त्रा** (फा उस्तरा पु.) वस्तरा पहा.
**वस्वी, वस्वें** यांच्याबद्दल वसवी, वसू पहा. [ वाहन.
**वहन** (सं. न.) वाहून नेणें; वाहून नेणारें,
**वहमा, वहिमा** (अर. वहम पु.) वहीम, संशय.
**वहाटळ** (सं. वातुलि स्त्री.) वावटळ; चक्रवात.
**वहाण** (सं. वह स्त्री.) ओघ, प्रवाह; ओढा; चर्मपादुका. **पायांची वहाण पायींच बरी**—ज्याला त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें वागवावें.
**वहावट** (स्त्री.) वहिवाट.
**वस्तुबोध** (पु.) खरें स्वरूप कळणें.
**वहिनी** (सं. भगिनी स्त्री.) भावाची वायको.
**वहिला** (प्रा. वि.) निराळा; श्रेष्ठ; सुंदर; (अ.) सत्वर.
**वहिली** (फा. स्त्री.) रथ; (प्रा. वि.) स्वतंत्र; (हिं. पु.) डोली, वाहन; नौका. **व०महाल** (फा. पु.)—रथशाळा.
**वहिलें** (प्रा. अ.) तत्काळ (वामन० नामसुधा ७).
**वहिलेंपण** (प्रा. न.) वेग. [ रिवाज; वर्तन.
**वहिवाट** (स्त्री.) भोगवटा, राबता; चाल,
**वहिवाटणें** (क्रि.) व्यवहार करणें; निभावून जाणें; उपभोग घेणें; वर्तन करणें; वापरणें; संवय होणें.
**वहिवाटदार** (पु.) मामलेदार.
**वही** (हिं. स्त्री.) चोपडी; कुंपण; बहुल्याच्या चारी कोपऱ्यांना मडक्याच्या उतरंडी असतात त्यांतली प्रत्येक; (प्रा.) आडकाठी.
**वहीत** (वि.) लागवडीस आणिलेली.
**वहीम** (अर. वहम पु.) संशय.
**वहू** (सं. वधू स्त्री.) सून.
**वन्हि** (सं. पु.) अग्नि; पचनशक्ति.
**वह्याळी** (प्रा. स्त्री.) क्रीडा.
**वळ** (सं. आवलि पु.) लांबट उठाणू; गांठ; मारल्याची खूण; ओळ; पीळ.
**वळई** (सं. वलय स्त्री.) गुरांसाठीं भूस ठेवण्याकरितां चौफेर बंद केलेली जागा; भुसाची वाटोळी रास; कडब्याची रास; गंजी (राम० १५।११८).
**वळकटी, वळकुटी** (स्त्री.) गुंडाळी.
**वळका** (पु.) वळवळ, आळापिळा.
**वळखर** (वि.) पीळ घातलेला.
**वळगणें, वळंगणें** (क्रि.) आलिंगणें, मिठी मारणें; लोंबणें; चिकटणें.
**वळघ** (प्रा. स्त्री.) वेंघ.
**वळघणी** (प्रा. स्त्री.) व्यापकपण.
**वळघणें** (प्रा. क्रि.) चढणें, आश्रय करणें.
**वळचण** (स्त्री.) पागोळीच्या खालची जागा; पाख्याचा अग्रभाग. **व० ची पाल**—आडून बोलणें ऐकणारा, चोरून ऐकणारा.
**वळण** (सं. वलन न.) वाक, वाकडी वाट; अक्षर काढण्याची तऱ्हा; प्रवृत्ति, चाल, रीत; शिक्षण; वशिला; संधान; पाण्याचें धरण. **व० चें पाणी वळणानेंच जाईल** – जें घडावयाचें तें क्रमानेंच घडेल; **वळणावर जाणें**—मूळ स्वभावाप्रमाणें किंवा जसा कित्ता घातला गेला असेल त्याप्रमाणें वागणें.

**वळणदार** (वि.) चांगलें वळणशुद्ध अक्षर.
**वळणशुद्ध** (सं. वि.) प्रमाणबद्ध.
**वळणी** (स्त्री.) वळण.
**वळणें** (सं. वल् क्रि.) फिरणें, रोख बदलणें; राखणें, चारणें; घटणें; वळकुटी करणें; वाकडें होणें; अनुकूल होणें.
**वळती** (स्त्री.) फेरी; वळण; (अ.) परत.
**वळंव** (न.) ओबडधोबड घडविलेला दगड.
**वळवट** (न.) गव्हलें, शेवई वगैरे वळून केलेले पदार्थ.
**वळवटा** (पु.) वहिवाट, पद्धत; घरोबा.
**वळवटी, वळवंटी** (स्त्री.) वळकुटी; भोंगळी.
**वळवणी** (स्त्री.) वळवाचा पाऊस.
**वळवळ** (स्त्री.) चलनवलन, चुटपुट, बेचैन होणें; (वि.) चपळ (रामजो० पृ० १०१)
**वळवळणें** (क्रि.) जलदीनें चलनवलन करणें, तळमळणें; अस्वस्थ होणें.
**वळवळाट** (पु.) अतिशय वळवळ, चुळबुळ.
**वळवळ्या** (वि.) अस्वस्थ, मुंगळा लागलेला.
**वळवा** (स्त्री. अने.) पावसाचे ढग पावसाळयांत पूर्वानिक्षत्रापर्यंत पूर्वेकडे जात असतात. त्यानंतर वळून ते परत पश्चिमेकडे येतात. त्या वेळचीं नक्षत्रें म्हणजे उत्तरा, हस्त, चित्रा व स्वाति यांना वळवा म्हणतात.
**वळवाचा पाऊस** (पु.) पूर्वानंतरच्या नक्षत्रांचा पाऊस; पूर्वेकडच्या वाऱ्यांनीं आणिलेला पाऊस; अलंकारिक अर्थानें–लहरी माणसाची तव्येत.
**वळविणें** (क्रि.) वळण्यास लावणें.
**वळशिणी** (स्त्री.) शेण वळून केलेली गोवरी.
**वळसणें** (क्रि.) वळसा किंवा प्रदक्षिणा घालणें ; इकडून तिकडे व तिकडून इकडे खेपा घालणें.
**वळसरा** (पु.) दुष्काळ.
**वळसा** (पु.) वेढा, फेरा; उपद्रव (दा० १७।६।११); घोटाळा (यथार्थ० २। १८९); नदीच्या पुरांतला कचरा भा० २।९४) ; गडबड; धामधूम.
**वळसें** (प्रा. वि.) अधिक.
**वळही** (प्रा. स्त्री.) वळई शब्द पहा.
**वळावळ** (स्त्री.) वळवळ, अस्वस्थता.
**वळावळी** (प्रा. अ.) चपळतेनें, तडक (ना०२१).
**वळित धरणें** मागें फिरणें.
**वळिबा** (पु.) ओळंबा.
**वळी** (स्त्री.) खोगिराखालची गादी; वळकटी; सुताचे धागे सांधणें; सांधणी; वेग (ज्ञा० ५।२१) सोंड. [धोरण.
**वळी** (सं. आवलि स्त्री.) ओळ, रांग;
**वळामूठ** (पु.) खोगीर; लग्नांत वरपक्षाकडून वधूच्या आईला देण्यांत येतें तें चोळी–लुगडें.
**वळींव** (वि.) पीळ देऊन केलेलें.
**वळीव (पाऊस)** (पु.) पावसाळयाच्या नंतर येणारा पूर्वेकडील पाऊस.
**वळू, वळहू, वळूघोडा** (पु.) वेण्याचा घोडा; अंड न जिरविलेला (प्रजोत्पत्ति करणारा) घोडा. [ कडें.
**वळें** (सं. वलय न.) बोटांत घालण्याचें वेढें,
**वक्ष, वक्षःस्थळ** (सं. न.) छाती.
**वा** (सं. अ.) अथवा, किंवा.
**वा!** (अ.) आश्चर्योद्गार.
**वाइ (ई) चाळ** (वि.) अश्लील; वात्रट.
**वाइ (ई) ला** (वि.) वेगळा; निराळा.
**वाईणें, वाणें** (प्रा. क्रि.) वाहणें, अर्पण करणें (दासो० गीता० १०९९).
**वाईलें** (प्रा. वि.) निराळें, भिन्न. [उवा.
**वाई** (प्रा. अ.) वायां, व्यर्थ; (स्त्री. अने.)
**वाई** (सं. वायु स्त्री.) वात, संधिवात; वायु.
**वाईच** (प्रा. वि.) क्षणिक, थोडासा.
**वाईचा** (प्रा. पु.) व्यर्थ श्रम; ढोंग (तुका० २१८६).
**वाईट** (वि.) चांगलें याच्या उलट; चांगलें नसलेलें, अयोग्य; (न.) अनिष्ट, अशुभ, हानि. **वा० करणें**– नुकसान, अपाय इ. करणें; **वा० वर असणें**— अपाय करण्याची संधि पाहत राहणें.
**वाईटसाईट** (वि.) वेडेंवाकडें, अमंगळ, निरुपयोगी.
**वाईटविडूळ** (वि.) वेडेंवाकडें, विद्रूप, कुरूप.
**वाईण, वाईन** (न.) दगडाची उखळी.

**वाईनसळ** (न.) उंसाच्या चरकांतलीं दोन मुसळें ज्यांत बसविलीं असतात तें खालचें लाकूड; काठवट.
**वाईल** (पु. न.) चुलीचा वेल, अवेल.
**वाउगें** (प्रा. वि.) मिथ्या; वाईट.
**वाउधान** (प्रा. न.) वादळ; व्यवधान.
**वाउर** (प्रा. वि.) वाईट, वादगें.
**वाऊठ** (न.) कातळावरील शेत; मासे धरण्याचा एक प्रकारचा गळ.
**वाक, वांक** (सं. वंक स्त्री.) स्त्रियांचें हाताच्या कोपरावर घालण्याचें भूषण; (सं. वक्र पु.) पोंक, वक्रता; वांकण; दोष; अपराध; धागा; तंतु.
**वांकड, वांकडी** (प्रा. स्त्री.) सतत वृष्टि, पावसाची झड.
**वांकडकोका, वांकडमुसका, वांकडातिकडा, वांकडादेहूडा** (वि.) वक्र, वाकलेला, वाकडा, सरळ नसलेला.
**वांकडणें** (क्रि.) आखडणें.
**वाकडा, वांकडा** (सं. वक्र वि.) सरळ नसलेला, वक्र; विरुद्ध.
**वांकडी** (वि.) वक्र; (स्त्री.) कडाक्याची हातपाय वाकडे करणारी (थंडी).
**वाकडी नजर** वाईट दृष्टि.
**वाकडी पगडी** अवज्ञासूचक वर्तणूक.
**वाकडें** (सं. वक्र वि.) सरळ नव्हे तें; (न.) द्वेष. [पाऊल; दुराचरण.
**वाकडें पाऊल** वाईट मार्गांत पडलेलें
**वांकण** (सं. वक्र न.) वक्रमार्ग.
**वांकणें, वाकणें** (क्रि.) पोंक येणें; लवणें.
**वांकती** (स्त्री.) वस्त्राच्या पदरांत घेण्यासाठीं झोळीसारखा केलेला पदर.
**वाकनिनीस, वाकनीस** (फा. वाकअनवीस पु.) वाड्यांतील खाजगी हिशेब, कागदपत्र, तैनात, भोजन वगैरेची व्यवस्था पाहणारा; खाजगीकडील कारभारी.
**वाकब, वाकबगार** (फा. वि.) हुशार, माहितगार. [गारी.
**वाकबगारी** (फा. स्त्री.) हुशारी; माहित-
**वाकविणें** (क्रि.) वाकण्यास लावणें.
**वाकस** (पु.) सुताराचें लाकूड तासण्याचें हत्यार.
**वाकसळ** (स्त्री.) तांदुळाची एक जात.
**वाकळ** (स्त्री.) गोधडी.
**वाका** (अर. वाका पु.) घटना; हकीकत.
**वांकाडी** (स्त्री.) वळण.
**वाकांडी** (स्त्री.) लुगडें; एका वेलीचें नांव.
**वांकी** (स्त्री.) स्त्रीचें एक बाहुभूषण.
**वाकिफ** (अर. वि.) ज्ञाता; अनुरूप.
**वाकीफ** (अर. पु.) माहीतगार; (वि.) ज्ञाता; अनुरूप.
**वाकुडी** (प्रा. स्त्री.) वृष्टि (हरि० २४।२४); लुगडें. [तोंडाचा चाळा.
**वाकुली** (स्त्री.) चिडविण्याकरितां केलेला
**वांकें** (न.) रहाटांत आढयाच्या तोंडास चाकासारखें बसविलेलें लाकूड.
**वांकेरी** (स्त्री.) एक ओषधी वनस्पति.
**वाकोरा** (पु.) ओरखडा.
**वाकोरें** (न.) वाफा; पाणी देण्याच्या सोईकरितां पाडलेला शेताचा लहान तुकडा.
**वाक्** (सं. स्त्री.) वाणी, भाषण.
**वाक्चतुष्टय**• (सं. न.) परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी या चार वाणी.
**वाक्चातुर्य** (सं. पु.) बोलण्याचें कौशल्य.
**वाक्चापल्य** (सं. न.) बडबड.
**वाक्छळ** (सं. पु.) शब्दांतली धरसोड.
**वाक्पाटव** (सं. न.) वाक्चातुर्य, बोलण्याचें कौशल्य.
**वाक्पांडित्य** (सं. न.) वक्तृत्व.
**वाक्य** (सं. न.) विचार पूर्णपणें व्यक्त करणारा शब्दसमुच्चय.
**वाख** (पु.) धागे, तंतु; (प्रा. स्त्री.) वस्त्राची दशी (अमृ० ७।२६७).
**वाखणें** (प्रा. क्रि.) वाकणें, भिणें.
**वाखती** (प्रा. स्त्री.) पोटाची खळी (तुका० ३२०९). [मोरो० द्रोण ९।७६).
**वाखर** (प्रा. पु.) वस्तरा (तुका० २३८०);
**वाखा** (प्रा. पु.) दुःख, पीडा (तुका० २३३१); नाश; संकट; महामारी, पटकी.
**वाखाण** (प्रा. न.) व्याख्यान, विवरण (ज्ञा० १८।१७४५).
**वाखाणणी, वाखाणा** (प्रा. स्त्री.) स्तुति.
**वाखाणणें** (प्रा. क्रि.) चर्चा करणें (सोहि० सिद्धांत०); स्तुति करणें.

**वाखार, वाखारी, वाखोर** (प्रा. स्त्री.) वखार, कोठी, दुकान.
**वाखोरा** (प्रा. पु.) घर.
**वाखोरी** (प्रा. स्त्री.) माळ (ना० ३४७).
**वाग** (पु.) ओझें; (स्त्री.) वागणूक.
**वांग** (प्रा. स्त्री.) मुरमाची पुळी (दा० ३।६।५०); चट्टा; डाग.
**वागणूक** (स्त्री.) वर्तन, वागण्याची तऱ्हा.
**वागणें** (क्रि.) वर्तन ठेवणें, राहणें.
**वागबारस** (स्त्री.) वसुबारसेसारखा कोंकणांतला एक सण.
**वागवणें, वागविणें** (क्रि.) भार संभाळणें, वर्तन करणें; निभावून घेणें; जोपासना करणें. [ दोर; लगाम.
**वागारा** (पु.), **वागारें** (न.) वाकाचा
**वागीबळ** (प्रा. न.) म्हातारपण (भा० ११।७६७).
**वागीश्वरी** (स्त्री.) सरस्वती.
**वागुर, वागुरा** (सं. स्त्री.) जाळें, पाश.
**वागुऱ्या** (स्त्री. अने.) चिंध्या, लकतऱ्या.
**वागूळ** (स्त्री.) वटवाघूळ.
**वांगें** (सं. वृंताक न.) वायंगण; एक फळभाजी. [शु. ६).
**वांगेसट** (स्त्री.) चंपाषष्ठी (मार्गशीर्ष
**वागोरा** (प्रा. पु.) लगाम.
**वाग्जल्पना** (सं. स्त्री.) वटवट, बडबड.
**वाग्जाल** (सं. न.) पोकळ भपकेदार भाषण.
**वाग्दत्त** (सं. वि.) दिलें म्हणून म्हटलेलें, शब्दानें दिलेलें. [ संयमन.
**वाग्दंड** (सं. पु.) तोंडी खरडपट्टी; वाक्-
**वाग्दान** (सं. न.) शाब्दिक दान.
**वाग्देवता** (सं. स्त्री.), **वाग्देवी** (सं. स्त्री.) सरस्वती.
**वाग्ध्वज** (सं. वाग्ध्वज पु.) प्रसिद्धि.
**वाग्निश्चय** (सं. वाङ्निश्चय पु.) लग्नाचा विधिपूर्वक तोंडीं करार. [शब्द.
**वाग्बाण** (सं. पु.) अंतःकरणास झोंबणारे
**वाग्मी** (सं. पु.) वक्ता; वावदूक.
**वाग्यत** (वि.) वाचेचा संयम असलेला.
**वाग्युद्ध** (सं. न.) जोराचें तोंडी भांडण.
**वाग्वल्लरी, वाग्वल्ली** (सं. स्त्री.) सरस्वती.
**वाग्विलास** (सं. पु.) शब्दकौतुक.
**वाघ** (सं. व्याघ्र पु.) मार्जार वर्गांतला एक भयंकर हिंस्र वन्य पशु. **वाघाची मावशी** (स्त्री.)—मांजर.
**वाघण, वाघीण** (इं. वॅगन स्त्री.) आगगाडीचा मालाचा डबा, उघडा डबा.
**वाघनख** (न.) वाघाचें नख; सोन्याच्या कोंदणांत वाघाचें नख बसवून केलेला मुलाचा दागिना; एक हत्यार.
**वाघरी** (पु.) फांसेपारधी.
**वाघरूं** (न.) वाघाविषयीं तुच्छतादर्शक शब्द. [ (तुका० ३०३८).
**वाघोडी** (प्रा. स्त्री.) मुलांचा एक खेळ
**वाघी** (स्त्री.) वाघ्याची; भंडार ठेवण्याची वाघाच्या कातड्याची पिशवी.
**वाघीण** (स्त्री.) वाघाची मादी; आगगाडीचा मालाचा डबा.
**वाघूळ** (सं. वाग्गुद न.) पाकोळीच्या जातीचा एक प्राणीः
**वाघ्या** (पु.) खंडोबाला वाहिलेला पुरुष.
**वाङ्निश्चय** (सं. पु.) वाग्निश्चय पहा.
**वाङ्मय** (सं. न.) भाषेंतला ग्रंथसमुच्चय; साहित्य.
**वॉच** (इं. न.) खिशांतलें घड्याळ. **वॉचमेकर** (पु.)—घड्याळें नीट करणारा.
**वाचक** (सं. पु.) वाचणारा; (वि.) दर्शविणारा, त्या अर्थाचा.
**वाचणें** (सं. वच् क्रि.) पठण करणें.
**वांचणें** (सं. वंच् क्रि.) जगणें, बचावणें.
**वाचन** (सं. न.) पठणक्रिया; वाचलेले ग्रंथ.
**वाचनालय** (सं. न.) ग्रंथ वाचण्याची जागा.
**वाचस्पति** (सं. पु.) बृहस्पति.
**वाचा** (सं. स्त्री.) बोलणें; वाणी; वाग्-इंद्रिय; सरस्वती. **वाचा फुटणें**—बोलण्याची शक्ति येणें; बोलून उठणें; **वा० विटाळणें**—खोटें बोलणें; **वा० बसणें**—स्तब्ध राहणें.
**वाचाट** (सं. वि.) वाचाळ, बडबड्या.
**वाचादत्त** (वि.) कबूल केलेलें; वचनानें दिलेलें.
**वाचाळ** (सं. वि.) बडबड्या, वावदूक.
**वाचाळता, वाचाळपंचविशी** (स्त्री.) बडबड.
**वाचिक** (सं. वि.) बोलण्यानें घडलेलें.
**वांचून** (सं. वंच् अ.) शिवाय, खेरीज.

**वाच्य** (सं. वि.) शब्दाचा मूळचा अर्थ.
**वाच्यता** (सं. स्त्री.) बोलून दाखविणें; सांगत फिरणें.
**वाच्यार्थ** (पु.) स्पष्टार्थ.
**वांच्छा** (सं. स्त्री.) इच्छा.
**वाज** (प्रा. पु.) खोड (सोहि० महदनु०); बोलणें, प्रवाद (ज्ञा० १३।१०२९); गोंगाट (तुका० ३२७६); (वि.) कंटाळलेला (तुका० २२०५) (अ.) व्यर्थ.
**वाजगस्त** (फा. न.) परत दिलेलें द्रव्य.
**वाजट, वांजट** (प्रा. वि.) व्यर्थ वाद घालणारा; वाचाळ; प्रसिद्ध; (न.) प्रसिद्धि.
**वाजटा** (प्रा. वि.) वाजणारा.
**वाजणें** (क्रि.) नाद करणें; (प्रा.) येणें; चिकटणें; आदळणें (भा० १३।२१७).
**वाजंतर, वाजंत्र, वाजंत्रें** (सं. वादित्र न.) वाद्य; सनई, सूर, संबळ.
**वाजंत्री** (पु.) सनई, सूर व संबळ वाजविणारा.
**वाजप** (प्रा. न.) वाद्य (सोहि० सिद्धांत).
**वाजपुशी, वाजपूस** (फा. वाजपूस स्त्री.) चौकशी, वास्तपुस्त. [ यज्ञविशेष.
**वाजपेय** (सं. पु.) सामवेदविहित एक
**वाजब** (हिं. वि.) योग्य, वाजवी.
**वाजविणें** (क्रि.) वाजण्यास लावणें.
**वाजागाजा** (पु.) बोभाटा, बभ्रा, दणका, प्रसिद्धि.
**वाजवी** (हिं. वाजव वि.) योग्य, रास्त.
**वाजिवाह** (प्रा. न.) अश्वशास्त्र (भा० ११।५१८).
**वाजी** (सं. पु.) घोडा; (प्रा. पु.) अपवाद (विवे० पु० ७।५१); कंटाळा (रामजो० पृ. ४३); (क्रि. वि.) यथेष्ट; मनास येईल तसें. [ कारक औषध.
**वाजीकरण** (सं. न.) कामोद्दीपन; वीर्यवृद्धि-
**वांझ, वांझटोळी** (सं. वंध्या स्त्री.) संतान न होणारी स्त्री; (वि.) निष्फळ.
**वांझा** (पु.), **वांझें** (न.) हिशोबासंबंधानें बाधा; भानगड, वाद. [ स्त्री.
**वांझोटी, वांझोली** (स्त्री.) वांझ; वंध्या
**वांझोळ** (प्रा. न.) वांझफूल (अमृ० ८।१७).
**वाट** (न.) वजन; (स्त्री.) रस्ता; वर्तनक्रम, पद्धति; बेंबीजवळचा टणक भाग; परिणाम, शेवट; **चौघांच्या चार वाटा करणें**—दाणादाण करणें; **चारही वाटा मोकळ्या**—सारें जग मोकळें; **वाट मारणें**—वाटेंत लुटणें; **वाटेस जाणें**—खोडी करणें; **वाटेस लावणें**—निरोप देणें; **वाट लावणें**—विल्हेवाट करणें.
**वाटेपत्र** (न.) आपसांत समजुतीनें वांटे झाल्याबद्दल दस्तऐवज.
**वाटखर्च** (पु.), **वाटखर्ची** (स्त्री.) प्रवासांत खर्चण्यासाठीं घेतलेले पैसे.
**वाटगा** (पु.) वाडगा.
**वाटगें** (न.) शिदोरी, पाथेय.
**वांटचा** (अ.) बद्दल, ऐवजीं.
**वांटणी** (स्त्री.) पृथक् पृथक् भाग करून देणें; हिस्सा. **वा० पत्रक** (न.)—कोणाला किती पैसे वांटावयाचे त्याबद्दलचा तक्ता.
**वाटणें** (क्रि.) भावना होणें; समजणें, इच्छा होणें; (प्रा.) आवडणें (ज्ञा० ७।२०८).
**वांटणें** (क्रि.) पाट्यावर ठेवून बारीक करणें; पृथक् पृथक् भाग करून देणें; विभागणें. **वांटून घाटून पिणें**—अतिशय छळणें; सर्वांना पुरून उरणें.
**वांटप** (न.) विभागणी.
**वाटपाडू, वाटपाड्या, वाटमाऱ्या, वाटला** (प्रा. पु.) वाटेंत लूटमार करणारा.
**वाटवधी** (क्रि. वि.) सभोंवार, भोंवतालीं.
**वाटवा** (हिं. पु.) बटवा.
**वाटशेक** (अ.) वाटेनें.
**वाटसरू** (पु.) पांथस्थ, मुशाफर; प्रवासी.
**वांटा** (पु.) हिस्सा, भाग.
**वाटाघाट** (स्त्री.) चर्चा, खल. [ दर्शक.
**वाटाड्या** (पु.) वाट दाखविणारा, मार्ग—
**वाटाणा** (पु.) एक प्रकारचा शेंगेंतला दाणा. **वा० च्या अक्षता लावणें** — विनंति अमान्य करणें.
**वाटाव** (प्रा. पु.) मोबदला. [ देणें.
**वांटावांट** (स्त्री.) तुकडे करून पुष्कळांना

**वाटावाट, वाटावाटी** (स्त्री.) वाद, चर्चा, ऩल.
**वाटिका, वाटी** (सं. स्त्री.) बाग, उपवन.
**वाटिवा, वाटीव** (प्रा. स्त्री.) पुरुषार्थ, पराक्रम (सोहि० महदनु०)
**वाटी** (स्त्री.) लहान वाडगा; चोपणी; अर्धा नारळ; गुडघ्यावरचें वाटोळें हाड, गुडघी रोग.
**वाटींव** (प्रा. स्त्री.) चर्चा, वाद; पुरुषार्थ; पराक्रम (मुक्ते० आदि० ३१।४५).
**वाटुली** (प्रा. स्त्री.) वाट.
**वाटुव** (प्रा. स्त्री.) वाट.
**वांटेकरी** (पु.) हिस्सेदार.
**वाटेय** (प्रा. पु.) विषय.
**वाटोगर** (पु.) वटमोगरा.
**वाटोवा** (प्रा. पु.) वटवा; झोळणा.
**वाटोळा** (सं. वर्तुल वि.) गोल. **वाटोळें करणें**—नाश करणें. [ पारडी.
**वांठ** (प्रा. वि.) तटस्थ, चकित; (स्त्री.)
**वाठार** (न.) बोळ, लहान गल्ली; गांवाचा भाग.
**वाड** (न.) रिकामपण; उंसाचें पीक; (प्रा. पु.) मोकळी जागा; फुरसद; विस्तार; आवरण; (सं. वृद्ध वि.) थोर; पुष्कळ; (अ.) आपोआप. **वा० कुडें**(न.)—घराचें अंगण.
**वांड** (वि.) खोडकर.
**वाडकर** (पु.) वाडीचा मालक.
**वाडकरी** (पु.) वाडींत राहणारा.
**वाडकोड** (न.) कौतुक; लडिवाळपणा.
**वाडगा** (पु.) मोठी वाटी.
**वाडगो** (वि.) म्हातारा; **वाडगोण** (स्त्री.)-म्हातारी. (वारली लोकांत).
**वाडगें** (न.) परूस, मळा.
**वाडवडील** (पु.) पूर्वज.
**वाडवेळ** (प्रा. पु.) उशीर.
**वाडा** (सं. वाट पु.) मोटें घर; राजवाडा किंवा श्रीमंताचें घर; गांवाचा भाग.
**वाडाळणें** (क्रि.) पाखडणें, हडसणें.
**वाडी** (सं. वाटी स्त्री.) कुंपणानें मर्यादित बागाईत जमीन; गांवाशेजारची लहानशी वस्ती; पिशाचाला अर्पण केलेला नैवेद्य.
**वांडें** (सं. वाणिज्य न.) विक्रीचा माल.
**वाडकोड** (प्रा. न.) मोठी आवड (नाम० ४९); मोठें कपट (भा० २।८९). (वि.) कोटीपट (भा० २।७१७).
**वाडूळ** (क्रि. वि.) वराच वेळ.
**वाडेंकोडें** (प्रा.अ.) कौतुकानें (एक० ४१६).
**वाडोवाड** (प्रा. वि.) मोठमोठी.
**वाढ** (सं. वृद्धि स्त्री.) मोठें होणें; वृद्धि, आधिक्य; उंसाचा वरचा भाग; (प्रा. वि.) उंच, मोठें.
**वाढण** (न.) जेवणाऱ्या मंडळींच्या पानांत घालणें; न्हाणवलीसाठीं नेण्याचें मिष्टान्नाचें ताट; हलक्या जातीच्या नोकराचाकरांना घरीं नेण्यासाठीं देण्याचें अन्न.
**वाढणें** (सं. वृध् क्रि.) वृद्धि होणें; भोजनाचे वेळीं पानांत घालणें; (कुंकू) पुसणें; (बांगड्या) फुटणें; (न.) वाढण.
**वाढती**(स्त्री.)वाढदिवस,वाढदीस; उचकी; (पु.) जन्मदिवस.
**वाढपा, वाढप्या** (पु.) वाढणारा.
**वाढवण** (स्त्री.) केरसुणी, खराटा.
**वाढवा** (पु.) वाढलेला भाग, वाढ.
**वाढविणें** (क्रि.) मोठें किंवा पुष्कळ करणें; विस्तारणें; पालनपोषण करणें.
**वाढवीस** (पु.) वाढदिवस, जन्मदिवस.
**वाढवेळ, वाढोळ** (अ.) फार वेळ.
**वाढा** (पु.) बीण, संतति, अवलाद.
**वाढावा** (पु.) वाढ.
**वाढी** (सं. वृद्धि स्त्री.) उसनें घेतलेलें धान्य परत देतांना व्याज म्हणून दिलेलें अधिक धान्य. **वाढी दिढी**—मूळ घेतलेल्या धान्यावर दीडपट धान्य देण्याचा करार.
**वाढीमोडी** (स्त्री.) चढउतार.
**वाढीव** (प्रा. स्त्री.) कीर्ति; पुरुषार्थकसोटी (रामवि० १९।११५); उत्कर्ष (मुक्ते० रामा० ६।३६४).
**वाढुपेलणें** वृद्धि होणें.
**वाढून ठेवणें** तयार असणें; वाट पहात असणें; दत्त म्हणून उभें राहणें.
**वाढें** (न.) उंसाचा वरचा भाग.

**वाण** (सं. वर्ण पु.) रंग; माल, जिन्नस; (स्त्री.) न्यून; उणेपणा; (सं. वायन न.) वायन.
**वाणका** (प्रा. वि.) लहान; दणगट.
**वाणगट** (पु.) वाण्याच्याबद्दल तुच्छतादर्शक शब्द.
**वाणजिन्नस** (पु.) किराणा माल.
**वाणणें** (सं. वर्ण् क्रि.) वर्णन करणें; स्तुति करणें.
**वाणवसा** (पु.) व्रत (प्रभा० पृ० २३४).
**वाणसवदा, वाणसौदा** (पु.) किराणा जिन्नस. [आडवीं सुतें); आडवीण.
**वाणा** (सं. वाणि पु.) वाणा (कापडाचीं
**वाणसी** (प्रा. स्त्री.) वेश्या.
**वाणिज्य** (सं. न.) व्यापार, उदीम, सौदागिरी. वा० **पोत** (पु.)—व्यापारी मालाचें जहाज. [करणें.
**वाणिणें** (क्रि.) वर्णन करणें, स्तुति
**वाणी** (सं. स्त्री.) वाचा, भाषण; (सं. वणिक् पु.) वैश्य, किराणा जिनसांचा दुकानदार; (प्रा. स्त्री.) वानगी (तुका० २८४६); वाण; न्यून, तोटा; (अ.) सारखें; (पु.) एक किडा.
**वाणीउदमी, वाणीबकाल** (पु. अने.) दुकानदार. [बहुमोल.
**वाणीकिणीचा, वाणीदेणीचा** (वि.) दुर्मिळ,
**वाणेउमट** (प्रा. पु.) नाना प्रकार.
**वाणेपण** (प्रा. न.) उणीव, काटकसर.
**वाणोवाण** (प्रा. पु.) माल (तुका० ४४३३).
**वात** (सं. वर्ति स्त्री.) वात्ती; (सं. पु.) वायु; शरिरांतील एक धातु; तज्जन्य विकार.
**वातचक्र** (सं. न.) वातावरण; वावटळ.
**वातट, वातड** (वि.) लवकर न तुटणारें; लोंचट. [वायूचें वेष्टन.
**वातावरण** (सं. न.) पृथ्वीच्या भोंवतालचें
**वाताहत, वाताहात** (सं. वाताहत स्त्री.) फुटाफूट, दाणादाण; नाश.
**वांति** (सं. स्त्री.) ओकारी. [कारक.
**वातुल, वातूळ** (सं. वातुल वि.) वात-
**वातेरें, वातरें** (न.) कुसूं बसविण्याची लाकडाची पट्टी, कापडाची चिंधी.
**वातो** (न.) कारवाराकडे—भोंक.
**वात्या** (सं. स्त्री.) वादळ, वावटळ.
**वात्रट** (वि.) पाचकळ, चावट, लोचट.
**वात्सल्य** (सं. न.) पुत्रप्रेम, कौतुक, लाड.
**वाथ्या कुटणें** रिकामा वाद घालणें.
**वाद** (सं. पु.) चर्चा; भांडण; मत; सिद्धान्त; (सं. वात पु.) शरिराची बधिरता.
**वादंग** (पु.) वादविवाद; चर्चा.
**वादग्रस्त** (सं. वि.) भानगडींचें, वादांत सापडलेलें.
**वादट** (वि.) सर्दलेलें.
**वादडा** (पु.) थापड. [निष्णात.
**वादचंचु** (सं. वादचंचुर वि.) वाद करण्यांत
**वादन** (सं. न.) वाजविणें. [न भवति
**वादविवाद** (सं. पु.) चर्चा, खल, भवति-
**वादळ** (सं. वात् न.) तुफान; वायूचा क्षोभ.
**वादाडा** (पु.) टवका; धडपा.
**वादानुवाद** (सं. पु.) तर्कवितर्क.
**वादाळ** (प्रा. वि.) वादग्रस्त.
**वादित्र** (न.) वाद्य; वाजंत्री.
**वादी** (सं. पु.) वाद करण्यास उभा राहिलेला; पंडित; वक्ता; फिर्यादी; (वि.) रागांत प्रामुख्यानें येणारा स्वर; (स्त्री.) चामड्याची अरुंद व लांब पट्टी.
**वादेली** (वि.) भांडखोर.
**वाद्य** (सं. न.) जें वाजवावयाचें तें.
**वाद्यवृंद** (सं. पु.) अनेक वाद्यांचा समुदाय.
**वाधंग** (पु.) धुसफुस.
**वाधंग्या** (पु.) नेहमीं धुसफुस करणारा.
**वाधणा** (पु.) अवधण पहा.
**वांधा** (पु.) देण्याघेण्याबद्दलचा तंटा किंवा भानगड; वांझी.
**वाधांग** वाधंग पहा.
**वाधावा** (प्रा. पु.) लग्नांत वर आल्याची सूचना; शुभ वर्तमान; आगमन; अरुणोदय. [लांब पट्टी.
**वाधी** (स्त्री.) वादी, चामड्याची अरुंद व
**वान** (सं. वर्ण पु.) वर्ण, रंग.
**वानगी** (हिं. स्त्री.) पदार्थाच्या रुचीची परीक्षा करून पाहण्यासाठीं त्यांतून

घेतलेला थोडा अंश; वालमुखी; दुकानदारास व्यापारी मालावरची योग्य जकात देऊन शिवाय त्या मालाचा अंश नमुन्याखातर देतात तो; नजर करण्यासाठीं दूरच्या प्रांतांतून आणिलेला दुर्मिळ जिन्नस.

**वानणें** (सं. वर्ण क्रि.) वर्णन करणें.

**वानप्रस्थ**(सं. पु.)चार आश्रमांपैकीं तिसरा.

**वानर** (सं. पु.) काळ्या तोंडाचें माकड.

**वानरखिचण** (स्त्री.) वानराला कांहीं इजा झाली असतां त्याचे जातभाई त्याच्याविषयीं सहानुभूति दाखविण्यास येतात. आणि कितीशी जखम झाली आहे तें पाहतां पाहतां विचकून ती मोठी करतात. यावरून अपायकारक सहानुभूति असा अर्थ झाला.

**वानरखाद** (स्त्री.) वानरांनीं केलेली लूट व नासाडी.

**वानरचेष्टा** (स्त्री.) वानरांच्या चेष्टांप्रमाणें अविचारानें व मूर्खपणानें केलेली चेष्टा.

**वानरी** (स्त्री.) वानराची मादी.

**वानवळा** (पु.) वानोळा; मासला; शेतांत प्रथम पिकलेल्या धान्याचा किंवा फळफळावळीचा जो अंश वतनदार, पाटील, देशमुख इ० ना द्यावा लागतो तो.

**वानवा** (सं. वा न वा पु. स्त्री.) शंका, अनिश्चितता.

**वाना** (पु.) विक्रीचा माल, जिन्नस.

**वानवसा** (प्रा. पु.), **वानिवसें** (न.) माजघर , भोजनशाळा.

**वानिवसें** (प्रा. अ.) सहज; दैववशात्.

**वानी** (प्रा. स्त्री.) मोल; कस; मासला, प्रकार; (अ.) प्रमाणें.

**वानेर, वानिर** (स्त्री.) एक जंगली झुडूप.

**वानोळा, वानवळा** (पु.) नानाविध धान्यें, भाजीपाला इत्यादिकांवरचा कर.

**वाप** (सं. पु.) पेरणी.

**वापर** (सं. व्यापार पु.) उपयोग, वहिवाट.

**वापरणें** (सं. व्यापार. क्रि.) उपयोगाला लावणें, माहिती किंवा अभ्यास होणें.

**वापस** (फा. अ.) परत.

**वापसा** (प्रा. पु.) पेरण्याजोगी जमिनीची ऊब.

**वापी** (सं. स्त्री.) विहीर, पायविहीर.

**वाफ** (सं. बाष्प स्त्री.) पाण्याचें वायुरूप; वापसा शब्द पहा; शुद्ध रूप (ज्ञा० १७।२३१). **तोंडाची वाफ दवडणें**—बोलणें निष्फळ होणें.

**वाफ** (न.) शेतकामासाठीं दुसऱ्याचा उसना आणिलेला बैल परत करतांना त्याच्या उपयोगाबद्दलचें भाडें, म्हणून द्यावें लागतें तें. [शिजणें; उगवणें.

**वाफणें, वाफविणें** (प्रा. क्रि.) पेरणें,

**वाफर, वाफोर**(न.)वाफेनें चालणारें जहाज.

**वाफरें** (न.) कांपरें.

**वाफलणें** (क्रि.) वाफेनें सुकविणें.

**वाफसा** वापसा पहा.

**वाफा** (सं. वप्र पु.) अळें, लहान खाचर.

**वाफा** (पु.) गूळ निवविण्याकरितां तो ओतण्यासाठीं केलेलें जमिनींतील कुंड; उंसाचा रस काढून दाट झाल्यानंतर तो निवण्यासाठीं ठेविलेलें भांडें.

**वाफारा** (पु.) वाफेचा शेक.

**वांब** (पु. स्त्री.) बधिरता, जडता; (स्त्री.) एक जलचर प्राणी.

**वांबळ, वांबाळ** (स्त्री.) आकाश अभ्राच्छादित असून हवेंत गारठा अशा प्रकारची हवेची स्थिति.

**वाभा, वाभारा** (पु.) मोठी चीर किंवा फट. **वाभारे काढणें**—चिंध्या करणें; वाक्ताडण करणें.

**वाम** (सं. वि.) डावें, उलटें.

**वाम** (अर. न.) कर्ज.

**वाम** (पु.) पायांत उठलेला गोळा; एक जलचर प्राणी.

**वामकुक्षि** (सं. स्त्री.) दुपारच्या भोजनानंतर घेतलेली अल्प निद्रा. [पहा.

**वामळ, वामाळ** (स्त्री.) वांबळ, वांबाळ

**वामनमूर्ति** (सं. स्त्री.) ठेंगणी आकृति.

**वाममार्ग** (सं. पु.) देवाची डाव्या हातानें पूजा करणें; मांसभक्षण, मद्यपान इ. गोष्टी ज्यांत विहित आहेत असा एक संप्रदाय.

**वामांगी** (स्त्री.) सुंदर स्त्री; पत्नी.
**वाय, वाया, वायावीण, वायें** (प्रा. अ.) व्यर्थ; खोटें.
**वायकरणी** (प्रा. अ.) व्यर्थ.
**वायकळ** (क्रि.) शुष्क, क्षुद्र; निर्बंधरहित.
**वायकळा** (स्त्री.) शरिरांत संधिवातानें होणाऱ्या वेदना.
**वायगोळा** (पु.) एक रोग.
**वायघोय** (न.) मेलेलें जनावर.
**वायचळ** (पु.) वेड, बुद्धिभ्रंश.
**वायचळणें** (क्रि.) बुद्धिभ्रंश होणें, स्वच्छंदी होणें. [बडबड.
**वायचाळा** (प्रा. पु.) वेड; भ्रम; व्यर्थ
**वायजाळ** (न.) उष्णवातानें हातापायाला भेगा पडणें.
**वायण** (न.) दगडाची उखळी.
**वायणें** (प्रा. क्रि.) वाहणें; दाखविणें.
**वायदा** (अर. पु.) मुदतीविषयींचा करार, वचन.
**वायधळ** वायकळ पहा.
**वायधूळ** (सं. वातुल स्त्री.) वावटळ.
**वायन** (सं. न.) स्त्रियांनीं ब्राह्मणास द्यावयाचें वाण.
**वायपोळ** (न.) वायघोय पहा. [स्वच्छंदी.
**वायफट** (वि.) निरर्थक; निःसत्त्व; क्षुद्र;
**वायफळ** (वि.) रिकामें, व्यर्थ.
**वायबार** (पु.) बंदुकींत गोळी न घालतां नुसती दारू घालून काढलेला बार.
**वायबुंधी** (प्रा. स्त्री.) आभासरूप वस्त्र.
**वायल** (स्त्री.) तलम वस्त्र.
**वायलें** (प्रा. पृथक् वि.) निराळें.
**वायवस** (प्रा. वि.) लटिकें.
**वायवसा** (प्रा. पु.) वायचाळा.
**वायवी** (वि.) हवेसारखा.
**वायव्य** (सं. स्त्री.) उत्तर–पश्चिम दिशा.
**वायस** (सं. पु.) कावळा.
**वायसें** (प्रा. वि.) लटकें.
**वायां** (अ.) व्यर्थ.
**वायाणी, वायाणें** (प्रा. वि.) व्यर्थ.
**वायु** (सं. पु.) वारा, चलित हवा; शरिरांतील एक दोष; त्याचे क्षोभानें झालेली विकृति.
**वायुचक्र** (सं. ना.) वातावरण.
**वायुचक्रशास्त्र** (सं. न.) हवेचें उष्णतामान बदलणें, वारें वाहणें, पर्जन्य पडणें, वीज चमकणें इ० जे हवेंतील व्यापार त्यांच्यासंबंधाचें विवरण करणारें शास्त्र.
**वायुपुत्र** (पु). हनुमान्.
**वायुभारमापक** (न.) वातावरणाचा दाब मोजण्याचें यंत्र.
**वायें** (प्रा. अ.) व्यर्थ.
**वार** (सं. पु.) दिवस; वेळ; विलंब; आठवड्यांतला ठरलेला दिवस; वारसा; (हिं.) घाव, जखम; (स्त्री.) गर्भाचें वेष्टन; तांदूळ सडल्यावर कोंड्यापेक्षां अधिक पडणारें तांदुळाचें प्रमाण; (अ.) वेळां. **वार लावणें**–क्रमाक्रमानें एकेकाकडें ठरलेल्या दिवशीं जेवण्यास जाणें.
**वारकरी** (पु.) क्षेत्राला किंवा यात्रेला नेमानें ठरलेल्या दिवशीं जाणारा; खेपा घालणारा; दुसऱ्याच्या घरीं वार लावून जेवण्यास जाणारा.
**वारकोंड** (वि.) कोंदट.
**वारंग** (पु.) शस्त्राचें निमुळतें टोक.
**वारंगुळा, वारगोळा** (पु.), **वारगुळें, वारगोळें** (न.) संबंध, जोडणी; व्यवहार; सलगी.
**वारघाटीं** (अ.) उघड्या वाऱ्यांत.
**वारचा** (अ.) बद्दल, ऐवजीं.
**वारंट** (इं. न.) पकडण्याबद्दल सरकारी अधिकाऱ्याचा लेखी हुकूम, पकडसमन्स.
**वारडें** (प्रा. न.) शिळें अन्न. [प्रतिबंध.
**वारण** (सं. पु.) हत्ती; (न.) निवारण,
**वारणें** (क्रि.) निवारण करणें, दूर करणें; हाकणें; (चवरी इ०) ढाळणें; मरणें.
**वारती** (सं. वारत्र स्त्री.) दोरी, शिडी (तुका० २४८५).
**वारद, वारिद** (अर. वि.) दाखल; प्राप्त.
**वारनीस** (इं. व्हार्निश न.) रोगण.
**वारयुवती, वारयोषिता** (स्त्री.) वेश्या.
**वारलें** (न.) बहुल्याच्या भोंवतालच्या वहींतलें मडकें.
**वारवण** (न.) मेंढ्या चारण्याबद्दलची मजुरी.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**वारवधू** (सं. स्त्री.) वेश्या.
**वारंवार** (सं. अ.) पुनः पुनः ; फिरफिरून.
**वारविलासिनी** (सं. स्त्री.) वेश्या.
**वारस, वारसा** (अर. पु.) उत्तराधिकार; वडिलोपार्जित संपत्तीवरचा हक्क; उत्तराधिकारी.
**वारस्त्री** (सं. स्त्री.) वेश्या. [ अडाणी जात.
**वारली** (पु.) उत्तर कोंकणांतली एक
**वारा** (पु.) वायु. **वाऱ्यास उभें न राहणें, वारा न घेणें, वारा पडूं न देणें**–अलिप्त राहणें; **वारा पडणें**–वारा वाहण्याचें बंद होणें; **वारा वाहील तशी पाठ देणें**–परिस्थिति बदलेल तसें वर्तन बदलणें; **वाऱ्याची मोट बांधणें**–दुर्घर काम करूं पाहणें; **वाऱ्याशीं भांडणें**–कारण नसतां भांडत सुटणें.
**वारांगना** (सं. स्त्री.) वेश्या.
**वारांगुळें** (न.) दाणादाण; फाकाफाक.
**वाराणशी, वाराणसी** (सं. स्त्री.) श्रीक्षेत्र काशी. [ व्यवस्था.
**वारावार** (स्त्री.) कर्जाची फेड; कामाची
**वारासार** (स्त्री.) व्यवस्था, वारावार.
**वारि** (सं. न.) पाणी; (प्रा. अ.) ऐवजीं.
**वारिक, वारिकें, वारिसें** (प्रा. न.) वाहन; घोडें.
**वारिका** (प्रा. पु.) वेग.
**वारिज** (सं. न.) कमळ.
**वारिराशि** (सं. पु.) समुद्र.
**वारी** (स्त्री.) पाळी; खेप; यात्रा; गति; क्रम; देवाच्या नांवावर मागितलेली भिक्षा; (प्रा.) जागा.
**वारीं** (अ.) नें; कडून; प्रमाणें; –च्या पायीं; –त; बद्दल; साठीं.
**वारीक** (पु.) औरंगाबादेकडे–न्हावी.
**वारीत, वारीद** (अर. न.) ऋणमुक्ति.
**वारीस** (अर. पु.) वडिलोपार्जित मालमत्ता; तिचा हक्कदार.
**वारीसदार** (पु.) वारसाचा हक्क मिळालेला.
**वारीस येणें** उरणें, बाकी राहणें; वांट्यास येणें.
**वारु, वारू** (सं. पु.) नामी घोडा.
**वारुणा** (स्त्री.) एक नदी. [ दिशा.
**वारुणी** (सं. स्त्री.) मद्य, दारू; पश्चिम
**वारुव** (प्रा. पु.) घोडा.
**वारूळ** (न.) मुंग्यांचें घर; सर्पाची राहण्याची जागा; व्रण; वाळा.
**वारें** (न.) वारा; पिशाचादिकांचा संचार; उन्माद; गुणाची द्योतक अशी चेहऱ्याची घडण; मनाचा कल; उत्साह; आविर्भाव. **वारें फिरणें**–परिस्थिति बदलणें; **वारें लागणें**–संसर्ग होणें; **अंगावरून वारें जाणें**–अंग लुळें पडणें; **वाऱ्याची मोट बांधणें**–दुर्घट काम करण्यास प्रवृत्त होणें; **वारा वाहील तशी पाठ देणें**—परिस्थित्यनुरूप स्वतःचें वर्तन बदलणें; **वारा पडणें**—वारा वाहण्याचें बंद होणें; **वाऱ्याशीं भांडणें**–कारण नसतां भांडत सुटणें; **वाऱ्यावर वरात**–बेजबाबदारीचें काम.
**वारेघशीं** (अ.) वाऱ्याच्या झोतांत, उघड्यावर.
**वारेमाप** (न.) घसघशीत (खऱ्या मापाहून फार मोठें) माप; बेताल, असंबद्ध भाषण.
**वारेळूं** (न.) वाळा नांवाचें सुगंधी गवत.
**वार्ता** (सं. स्त्री.) बातमी; गोष्ट; दोरी (ज्ञा० १८।६५); (वि.) निवारण करणारा.
**वार्ताहर** (सं. पु.) जासूद, बातमीदार.
**वार्तिक** (सं. पु.) बातमी पोंचविणारा, बातमीदार; एक तत्त्वज्ञानाचा पंथ; (न.) स्पष्टीकरण.
**वार्धक्य** (सं. न.) वृद्धपण. [ व्याज.
**वार्धुषिक** (सं. पु.) सावकार; **वार्धुष्य** (न.)
**वार्याबी** (फा. स्त्री.) भेटीची परवानगी.
**वार्राशि** (सं. पु.) समुद्र.
**वार्षिक** (सं. वि.) प्रतिवर्षाचें.
**वार्षी, वारिषी** (प्रा. स्त्री.) पर्जन्यकाळ (ज्ञा० ९।१०२); वेश्या (ज्ञा० १३।७०१).
**वाल** (सं. वल्ल पु.) एक धान्य; एक वजन.
**वालखिल्य** (सं. पु.) अंगुष्ठप्रमाण उंचीचे व अत्यंत तेजस्वी असे साठहजार मुनि. हे ब्रम्हदेवाचे मानसपुत्र होते.

**वालयर** (वि.) दुर्बळ, असमर्थ.
**वालदाणी–नी** (स्त्री.) वालुकापात्र.
**वालभ** (सं. न.) आवड; प्रेम; तादात्म्य.
**वालभणें** (प्रा. क्रि.) लांचाविणें.
**वालशीट, वालशेट** (इं. वॉलशेड न.) मेणवत्तीची ठाणवी.
**वाला** (प्रा. वि.) वेगळा; प्रिय; (पु.) पंचा; (वि.) थोर, मोठा; अर्थसूचक प्रत्यय; उदा :–बंदूकवाला; पैसेवाला.
**वाली, वाल्ही** (अर. वली पु.) रक्षणकर्ता, मालक; कैवारी.
**वालीद** (फा. पु.) बाप.
**वालीप, वालीफ** (प्रा. स्त्री.) त्वचा; आच्छादन; गवसणी; (वि.) झिरझिरीत.
**वालुका** (सं. स्त्री.) वाळू. **वा० यंत्र** (न.)—वाळूचें घड्याळ.
**वाल्मीकि** (पु.) रामायणकर्ता ऋषि.
**वालोवाल** (अ.) निःशेष, सर्व.
**वाल्ही** (पु.) कैवारी; वाली, रक्षणकर्ता.
**वाल्हेंदुळें** (प्रा. वि.) जिवलग; अपूर्व; नाजूक.
**वाव** (प्रा. वि.) व्यर्थ, निष्फळ.
**वांव** (सं. व्याम पु.) जागा, थारा; प्रवेश; वारा; आश्वास; विसावा; (स्त्री.) चार हात लांबीचें माप. **वांव घेणें**—व्यर्थ पसारा मांजविणें (तुका० १०६). [निरुपयोगी.
**वावगा** (वि.) हलका; रिकामा, व्यर्थ;
**वावझड, वावझडी** (स्त्री.) तुषार.
**वावटणें** (प्रा. क्रि.) विश्रांति घेणें; लीन होणें.
**वावटळ, वावटूळ** (स्त्री.) मंडलाकार भ्रमण पावणारा मोठा वारा.
**वावड** (वि.) भटक्या.
**वावडणें** (क्रि.) भटकणें.
**वावडा** (वि.) वातुळ; प्रतिकूल.
**वांवडा** (वि.) व्यर्थ, रिकामा, निष्फळ.
**वावडिंग** (स्त्री.) जंतुनाशक वनस्पति.
**वावडी** (स्त्री.) पतंग. [हानिकर.
**वावडें** (सं. व्यावृत्तक वि.) कुपथ्य, अयोग्य,
**वावदळ** (पु.) दांत (ज्ञा० १७।१४३).
**वावदूक** (सं. वि.) वाचाळ, बहुभाषी.
**वावधन, वावधाण** (न.), **वावधूळ** (स्त्री.) जोराचा वारा, चक्रवात.
**वावर** (न.) शेत, मळा, कुरण; (सं. व्यापार पु.) वहिवाट; उपयोग.
**वावरणें** (क्रि.) हिंडणें, फिरणें; काम करणें.
**वावरी** (स्त्री. न.) खूप मोठें जाळें.
**वावरिजेणें** (क्रि.) वावरणें (अमृता० ५।६३).
**वावसळणें** (क्रि.) वेड लागणें.
**वावसा** (वि.) चंचल मनाचा; वेडा, मूर्ख, अव्यवस्थित.
**वावसी, वावसें** (प्रा. वि.) निष्फळ, व्यर्थ.
**वावसें** (न.) वेड, चळ.
**वावी** (स्त्री.) गवाक्ष; खिडकी.
**वावीर** (न.) भाताचें निकस शेत.
**वाशेळें, वाशेरें, वासट** (वि.) दुर्गंधियुक्त.
**वांशिक** (वि.) वंशासंबंधी.
**वास** (सं. पु.) गंध; हिंग; राहणें; वस्ती; वस्त्र; वाट; मार्ग; सोय; (पु. स्त्री.) कपडा; वस्त्र; वाट; मार्ग.
**वासकट, वासट** (सं. वास वि.) दुर्गंधयुक्त.
**वांसकटी, वांसटी** (स्त्री.) लहान वांसा.
**वास्कूट** (इं. वेस्टकोट न.) जाकीट.
**वासणें** (सं. व्यास क्रि.) उघडणें; ताणणें; फाडणें.
**वासंतिक** (सं. वि.) वसंतऋतुसंबंधाचा.
**वासन** (सं. न.) वासन, गाठोड्यावरचें आच्छादन; वस्त्र.
**वासना** (सं. स्त्री.) कर्माचा मनावर राहणारा संस्कार; इच्छा, आवड; परिचय.
**वासपणें, वासिपणें** (प्रा. क्रि.) वड-बडणें (तुका० ७८); भिणें (ज्ञा० ११। ३५१); कोरडा होणें.
**वासपूस** (स्त्री.) चौकशी, विचारपूस.
**वासर** (सं. पु.) दिवस.
**वासरमणि** (सं. पु.) सूर्य.
**वासरी** (स्त्री.) ओटी, पडवी; दैनंदिनी.
**वासरूं** (सं. वत्स न.) पोर, बच्चें.
**वासरांत लंगडी गाय शहाणी** जेथें सगळेच अडाणी तेथें थोडासा शहाणा मोठ्या योग्यतेचा समजला जातो.

वाचनालय

**वासलात** (अर. स्त्री.) उत्पन्न; उत्पन्नाचा हिशेब; काम; खटला; निकाल, फैसला.
**वासव** (सं. पु.) इंद्र.
**वासवी शक्ति** (स्त्री.) इंद्राचें वज्र.
**वासळणें** (क्रि.) वास पसरणें.
**वासा, वांसा** (सं. वंश पु.) मोठा वेळू; बारीक खांब. **खाल्ल्या घरचे वासे मोजणें**—कृतघ्नपणा करणें.
**वासाळ** (वि.) दुर्गंधयुक्त.
**वासित** (सं. वि.) वास लावलेलें.
**वासिग** (प्रा. पु. न.) भय; काळ (मृत्यु).
**वासी** (सं. पु.) राहणारा; (प्रा. वि.) व्यर्थ.
**वासु** (पु.) वास्तव्य (भा० १।३).
**वासुकि** (सं. पु.) सर्पांचा राजा.
**वासुदेव** (सं. पु.) श्रीकृष्ण; मोरांच्या पिसांची उंच टोपी घालून भिक्षा मागणारी एक जात.
**वासेवीं** (सं. वंशबीज न.) वेळूचें बीं. हें एक उपधान्य गणिलें जातें.
**वांसोडी, वांसोळी** (स्त्री.) लहान वांसा.
**वास्तपुस्त.** (हिं. पूछापाछा स्त्री.) चौकशी.
**वास्तव** (सं. वि.) खरें; भरीव.
**वास्तववाद** (पु.) जीवनांतील सत्य तेंच रंगविणारा सांप्रदाय.
**वास्तविक** (सं. न.) खरें, न्यायाचें, योग्य.
**वास्तव्य** (सं. न.) राहणें; वसति.
**वास्तु** (सं. न.) घर, राहण्याची जागा; (अ.) कडून, —नें.
**वास्तुदेवता** (सं. स्त्री.) **वास्तुपुरुष** (सं. पु.) घराची अधिष्ठात्री देवता.
**वास्तुविद्या** (सं. स्त्री.), गृहनिर्माणशास्त्र.
**वास्तुशांत** (सं. वास्तुशांति स्त्री.) नवीन घरांत राहण्यापूर्वी करण्याचा एक धार्मिक विधि.
**वाह** (सं. पु.) प्रवाह; प्रचार; गति; वाहन (घोडा वगैरे) (मोरो० द्रोण० १०। १६); मार्ग; चाल (तुका० १३३४).
**वाहक** (सं. वि.) नेणारा; (पु.) हमाल.
**वाहटुळ** (न.), **वाहटुळी** (स्त्री.) वावटळ, वादळ.
**वाहणी, वाहाणी** (प्रा. स्त्री.) वाह पहा.
**वाहणें** (क्रि.) ओझें नेणें; (शेती) करणें; चढविणें; अर्पण करणें; प्रवाह चालणें; (प्रा.) वाळगणें; घेणें; वागवणें (दा० १।६।२०).
**वाहला** (वि.) वाहत असलेला, चालू.
**वाहती** (स्त्री.) प्रारंभ, सुरुवात. **वाहती गंगा**—चालू असलेलें काम; **वाहत्या गंगेंत हात धुवून घेणें**—अनुकूल परिस्थिति आहे तोंपर्यंत तिच्यापासून होणारा साहजिक फायदा करून घेणें.
**वाहता रस्ता** रहदारीचा रस्ता.
**वाहतुक, वाहतूक** (स्त्री.) रहदारी.
**वाहन** (सं. न.) नेणें; प्रवास—साधन; उखळ.
**वाह्यात** (न.) व्रात्य; खोडकर.
**वाहर** (प्रा. स्त्री.) पीडा, बाधा.
**वाहवट** (प्रा. स्त्री.) ओघ, प्रवास; रहदारीचा रस्ता.
**वाहवण** (स्त्री.) प्रवाह; ओढा.
**वाहवणी** (न.) वाहातें पाणी.
**वाहवा** (फा. अ.) शाबास; (स्त्री.) तारीफ, प्रशंसा.
**वाहळ, वाहाळ** (प्रा. पु.) ओढा, ओहोळ.
**वाहळी** (स्त्री.) झरा; तेरड्याच्या फुलाची एक जात.
**वाहातिक** (स्त्री.) वाहातूक, लागवड.
**वाहाण** (स्त्री.) चर्मपादुका; ओढा, झरा.
**वाहाणी** (प्रा. स्त्री.) प्रकार; मार्ग (ज्ञा० ७।१५०); क्रम (ज्ञा० १३।८५३); प्रवाह (ज्ञा० १६।४४९); गति (ज्ञा० १८।३३२).
**वाहाळी** (स्त्री.) शिकार. [सेना.
**वाहिनी** (सं. वि.) वाहणारी; (सं. स्त्री.)
**वाहिवा** (पु. स्त्री.) शेताची वहिवाट; लागवड; कारभार.
**वाही** (सं. वि.) वाहणारा; वाहून नेणारा.
**वाहीत** (वि.) वाहण्यांत (लागवडीखालीं) असलेली (जमीन).
**वाहीम** (प्रा. पु. न.) ओझ्याचें जनावर (वामन—विराट० १।३९).
**वाहील, वाहेल, वाहोळ** (स्त्री.) कृषिकर्म; (वि.) लागवड झालेली जमीन.
**वाहुटळ, वाहुटूळ** (स्त्री.) वावटळ.

**वाहुटी** (स्त्री.) वाहत जाणें.
**वाहोळ, वाहोळकी, वाहोळदारी** (स्त्री.) शेतकाम करणें.
**वाहाळ** (वि.) लागवडींतली.
**वाहोळकर–री** (पु.) शेतकाम करणारा.
**वाळ** (वि.) प्रचारांतून गेलेलें (नाणें); जातिवहिष्कृत; रिकामें; (स्त्री.) प्रचारांतून जाणें; वहिष्कार.
**वाळका, वाळकुडा** (वि.) वाळलेला, कृश.
**वाळणें** (क्रि.) सुकणें; कृश होणें; रोडणें; (प्रा.) त्यागणें (ज्ञा० १४।२७९); परावृत्त करणें; नाहींसें करणें (ज्ञा० १५। ५७४).
**वाळंबा** (पु.) वाळवी, उधई. [मैदान.
**वाळवंट, वाळवट, वाळुवट** (न.) वाळूचें
**वाळवण** (स्त्री.) सुकणावळ; झीज.
**वाळविणें** (क्रि.) सुकविणें.
**वाळवी** (सं. वल्मीक स्त्री.) उधई; वस्त्र, कागद, लाकूड इत्यादिकांस खाऊन टाकणारा एक क्षुद्र जीव; क्षीणता आणणारी गोष्ट (रोग, चिंता इ.).
**वाळसर** (वि.) वालुकामय, रेताड.
**वाळा** (सं. वल्लुक पु.) एक सुगंधि तृण; त्याचीं मुळें; (सं. वालक पु.) पायांतलें एक भूषण.
**वाळी** (स्त्री.) नथ. [टाकलेला.
**वाळीत** (वि.) वहिष्कृत; जातीबाहेर
**वाळुवंट** (न.) वाळवंट.
**वाळू** (सं. वालुका स्त्री.) कंकर, लहान खडे, जाड रेती.
**वाळूक** (सं. वालुक न.) लहान काकडी.
**वाळयाचा तांब्या** वसकट व मध्यें फुगीर अशा घाटाचा तांब्या.
**वि** (न.) ज्ञान (तुका० ४११८).
**विकट** (सं. वि.) भयंकर; कुरूप.
**विकटांत अध्ययन, विकटोपर्यंत ज्ञान** (न.) 'सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णकः। लंबोदरश्च विकटो विघ्नराजो गणाधिपः' हा श्लोक सर्व आबालवृद्धांना पाठ असतो. पण येवढा सुद्धां श्लोक सबंध येत नाहीं; विकटोपर्यंतच म्हणजे अर्धवट येतो -अशी (प्रचंड !) विद्वत्ता.
**विकडा** (प्रा. अ.) चातुर्यानें (सोहिअद्वया० ३)
**विकडी** (प्रा. स्त्री.) चातुर्याचें किंवा अलंकारिक भाषण (ज्ञा० १०।६०).
**विकण** (वि.) धान्याचा कणहि जवळ नसलेला.
**विकणें** (सं. विक्री क्रि.) मोल घेऊन देणें.
**विकत** (अ.) मोलानें. [लावून घेणें.
**विकत श्राद्ध घेणें** नसतें लचांड मागें
**विकरण** (सं. न.) विकार; बदल; क्षोभ.
**विकरणें** (वि.) विकार पावणें; पसरणें.
**विकरा** (पु.), **विकरी** (स्त्री.) विक्री; विक्रीचें उत्पन्न.
**विकराल** (सं. वि.) भयंकर.
**विकर्तन** (सं. पु.) सूर्य.
**विकर्षण** (सं. न.) ओढणें. [असंपूर्ण.
**विकल** (सं. वि.) असमर्थ, विव्हल;
**विकला** (सं. स्त्री.) कलेचा साठावा अंश.
**विकल्प** (सं. पु.) संशय; भ्रम.
**विकसणें** (क्रि.) उमलणें, खुलणें.
**विकसित** (सं. वि.) उमललेलें.
**विकळ** (वि.) विकल पहा.
**विकळणें** (क्रि.) भ्रम होणें; फोडणें.
**विकळी, विकळूत** (स्त्री.) शिसारी.
**विकाऊ** (वि.) विकावयाचा, विकण्यासाठीं मांडलेला.
**विकार** (सं. पु.) विकृति; फेरफार; अस्वास्थ्य; दोष; रोग; (प्रा.) विस्तार, भेद (ज्ञा० १६।५२१).
**विकारी** (सं. वि.) विकार करणारें; विकारयुक्त; परिवर्तनशील; बदलणारें
**विकाल** (सं. पु.) अनिष्ट किंवा टळून गेलेली वेळ.
**विकाश, विकास** (सं. पु.) उमलणें, वाढ.
**विकासवाद** (पु.) एका स्थितींतून अधिक उन्नत स्थितींत जाणें. [होणारें.
**विकासी** (सं. पु.) प्रफुल्लित करणारें किंवा
**विकिरण** (सं. न.) पसरणें, फैलाविणें.
**विकिरणें** (सं. विकृ क्रि.) उडविणें, पसरणें.
**विकीर** (पु.) प्रसरण.
**विकीरान्न** (न.), **विकीरपिंड** (पु.) श्राद्धांत असंस्कृत मृत-पितरांना अर्पण करण्याचें अन्न.

**विकीर्ण** (सं. वि.) विखुरलेलें.
**विकृत** (सं. वि.) बदललेला, बिघडलेला.
**विकृति**(सं. स्त्री )बदल; बिघाड; तिटकारा.
**विकेंद्रीकरण** (न.) सत्ता, संपत्ति, उत्पादन इ. एका केंद्रांत न साठवतां सर्वत्र पसरणें.
**विकोप** (सं. पु.)अतिराग. वि० **स जाणें**— बिघडण्याची सीमा होणें.
**विक्या** (वि.) विकणारा.
**विक्रंतणें** (प्रा. क्रि.) विकार पावणें.
**विक्रम** ( सं. पु. ) पराक्रम; उच्चांक; उज्जनीचा एक शककर्ता राजा.
**विक्रमसंवत्** (न.) विक्रमादित्य राजानें इ. स. पूर्वी ५७ व्या वर्षी सुरू केलेला स्वतःच्या नांवाचा शक; हा उत्तरहिंदुस्थानांत सर्वत्र प्रचलित आहे.
**विक्रय** (सं. पु.) विक्री.
**विक्रयविद्या** (स्त्री.)माल विकण्याची कला.
**विक्रांत** (सं. वि.) प्रतापशाली; पराक्रमी.
**विक्राळ** (सं. विकराल वि.) भयंकर.
**विक्रिया** (सं. स्त्री.) बदल, विकार; चित्तक्षोभ.
**विक्री**(सं. विक्रय स्त्री.) विकरा, विकणें.
**विक्रीडित** (सं. न.) लीला; खेळ.
**विक्रीत** (सं. वि.) विकलेलें.
**विक्रेता** (सं. पु.) विकणारा.
**विख** (सं. विष न.) जहर, विष.
**विखर** (वि.) विषारी (ना० १७०७).
**विखरणें, विखुरणें** (क्रि.) अस्ताव्यस्त करणें, पसरणें.
**विखळ** (वि.) अति दुष्ट.
**विखळणें** (क्रि.) उखळणें.
**विखार** (सं. विषार पु.) विषारी सर्प.
**विखारणें** (क्रि.) विषाची बाधा होणें.
**विखारा, विखारी** (वि.) विषारी.
**विखास** (प्रा. पु.) श्रम (अमृ० २।४७).
**विखीं** (सं. अ.) विषयीं.
**विखुरणें** (क्रि.) विखरणें, तळमळणें.
**विखुरी** (प्रा. स्त्री.) प्रसार.
**विखो** (सं. विषय पु.) विषय.
**विख्ख** (सं. विष वि.) विषासारखें कडू.
**विख्यात** (सं. वि.) प्रसिद्ध, कीर्तिमान्.
**विख्याति** (सं. स्त्री.) प्रसिद्धि, कीर्ति.
**विख्यापन** (सं. न.) स्पष्टीकरण, जाहीर करणें.
**विंग** (इं. स्त्री.) रंगभूमीवर जाण्यासाठीं रंगपटाकडून असलेलें प्रवेशद्वार.
**विगर्हणा** (सं. स्त्री.) निंदा, तिरस्कार.
**विगटणें** (क्रि.) भिडणें.
**विगत** (सं. वि.) गेलेला; गत.
**विगमन** (न.) तर्क; अनुमान.
**विगलित** (सं. वि.) नष्ट; ढिलें; गळालेलें.
**विंगळ, विंगळा, विंगोळ** (प्रा. पु.) इंगळ, निखारा.
**विगुण** (सं. वि.) गुणहीन.
**विग्रह** (सं. पु.) भांडण; युद्ध; देह; व्याकरणांत—समासांतर्गत शब्दांचा संबंध व्यक्त करून दाखविण्याची रीत.
**विघटित** (सं. वि.) दूर केलेलें; नष्ट केलेलें; मोडलेलें. [ वियोग.
**विघड** (सं. विघट पु.) बिघाड, बेबनाव;
**विघडणें** (प्रा. क्रि.)नाश करणें, मोडणें; बिघाड करणें; वियोग करणें.
**विघरणें** (क्रि.) पातळ होणें. [ विघ्न.
**विघात** (सं. पु.) नाश; तडाखा; निषेध;
**विघातक** (सं. वि.) नाशकारक.
**विघुरणें** (प्रा. क्रि.) पातळ होणें.
**विघ्न** (सं. न.) प्रतिबंध, अडचण.
**विघ्ननाशक, विघ्ननाशन, विघ्नराज, विघ्नहर्ता** (सं. पु.) गणपति.
**विघ्नसंतोषी** (सं. वि.) दुसऱ्याच्या कामांत विघ्न आलेलें पाहून संतोष मानणारा.
**विचकट** (वि.) अश्लील.
**विचकटणें** (क्रि.) उचकटणें, पसरणें, चिवडणें.
**विचकणें** (सं. विकोचन क्रि.) उघडणें, फाडणें; दांत काढणें (उपाहासार्थी).
**विचका** (पु.) घोटाळा, गोंधळ.
**विचकुरणें** (क्रि.) बोचकारणें, चिमटे घेणें.
**विचकुरा, विचकोरा** (पु.) बोचकरा, ओरखडा, चिमटा घेणें.
**विंचडा** (पु.) मोठा विंचू.
**विंचणी**(स्त्री.)विंचवाच्या डंखानें भांड्याला पडलेलें भोंक किंवा खळगी.
**विचंव** (प्रा. पु.) संकट (भा० २३।३९८).

**विचरणें** (सं. विचर क्रि.) हिंडणें, भटकणें; मनन करणें.
**विंचरणें** (क्रि.) जटा मोडणें, गुंतलेले केस फणीनें मोकळे करणें; पिंजणें.
**विंचरणी** (स्त्री.) फणी; कंगवा.
**विचंवणें** (प्रा. क्रि.) खोळंबणें; श्रम पावणें (ज्ञा० ४।५९); विघ्न करणें.
**विंचवी** (स्त्री.) विंचवाची मादी, इसप.
**विंचवीण** (स्त्री.) विंचवाची मादी.[दक्ष.
**विचळण** (सं. वि.) निपुण, व्यवहारचतुर,
**विचळणें** (सं. विचल क्रि.) वेडा होणें, भांबावणें; मोडणें (ज्ञा० २३।१६).
**विचक्षणा** (सं. स्त्री.) वारकाईची परीक्षा; फोड; स्पष्टीकरण.
**विचार** (सं. पु.) मनोव्यापार; चर्चा; मनन; तर्क; कल्पना; युक्तायुक्तता पाहणें; मर्यादा. [ चिंता.
**विचारणा** (सं. स्त्री.) शोध, चौकशी;
**विचारणीय** (सं. वि.) तपास करण्यास योग्य; विचारण्यास योग्य.
**विचारणें** (क्रि.) प्रश्न करणें; परामर्श किंवा समाचार घेणें; (प्रा. ) चिंतन करणें.
**विचारपूस** (स्त्री.) चौकशी, परामर्श.
**विचारवंत, विचारवान्, विचारशील** (सं. वि.) सुज्ञ, विचार करणारा.
**विचारक्षम** (सं. वि.) विचार करण्यास योग्य.
**विचारी** (सं. वि.) सुज्ञ, विचारवंत.
**विचिकित्सा** (सं. स्त्री.) शंका, तत्त्वनिर्णय.
**विचित्र** (सं. वि.) नाना तऱ्हेचा, आश्चर्यकारक; एक अर्थालंकार.
**विचित्रता** (सं. स्त्री.) रमणीयता, सौंदर्य; विचित्रपणा, नानावर्णयुक्तता, विस्मयकारिता.
**विचिंतित** (सं. वि.) चांगलें मनन केलेलें.
**विचित्रित** (सं. वि.) विचित्र.
**वीची** (सं. स्त्री.) लाट, तरंग.
**विंचू** (सं. वृश्चिक पु.) नांगीनें दंश करणारा एक विषारी प्राणी.
**विचूक** (वि.) भलभलतें, असंबद्ध.
**विचेतन** (सं. वि.) बेशुद्ध.
**विचेष्टित** (सं. न.) कार्य; कृत्य; हावभाव.
**विच्छय** (सं. वि.) पांढरें; फटफटीत.
**विच्छिन्न** (सं. वि.) छिन्नभिन्न झालेला, भंग पावलेला.
**विच्छेद** (सं. पु.) खंड; लोप; ताटातूट.
**विंजण** (प्रा. पु.) वारा.
**विंजणा** (सं. व्यजन पु.) पंखा.
**विंजणें** (प्रा. क्रि.) वारा घालणें.
**विंजन** (सं. व्यजन पु.) पंखा.
**विजन** (सं. वि.) ओसाड.
**विजमायली** (वि.) इजमायली; थातुरमातुर; दुर्बळ, फार वेळ न टिकणारें; तकलादी; निष्काळजीपणानें केलेलें.
**विजय** (सं. पु.) जय; अर्जुन; देवांचा एक द्वारपाळ.
**विजया** (सं. स्त्री.) भांग; पार्वती.
**विजयादशमी** (सं. स्त्री.) दसरा (आश्विन शु. १०).
**विजयी** (सं. वि.) यशस्वी, जय पावलेला.
**विजवटा** (वि.) द्वाड, व्रात्य. [ क्षण.
**विजातीय** (सं. वि.) भिन्न जातीचा; विल-
**विजार** (फा. स्त्री.) पायजमा.
**विजावळी** (फा. स्त्री.) भिन्नता.
**विजिगीषा** (सं. स्त्री.) जिंकण्याची इच्छा.
**विजु, विजुरी, विजू** (सं. विद्युत् स्त्री.) वीज.
**विजेरी** (स्त्री.) बॅटरी. [विषम.
**विजोड** (वि.) न जुळणारें, कमजास्त,
**विझणें** (क्रि.) शांत होणें, मावळणें, नाहींसा होणें.
**विंझण, विंझणा** (सं. व्यजन पु.) पंखा.
**विट** (सं. पु.) धूर्त; ठक; जार (वेणा० सीता० २८).
**विटकर** (स्त्री.) विटेचा तुकडा, टोला.
**विटकळणें** (प्रा. क्रि.) सुटें होणें; फांकणें.
**विटका** (वि.) विटलेला.
**विटकू** (प्रा. वि.) दाट, निबिड.
**विटकूर** (स्त्री. न.) विटेचा तुकडा.
**विटणें** (क्रि.) मळणें; मंद होणें; कंटाळणें; अन्न आंवणें.
**विटप** (सं. पु.) वृक्ष, झाड.
**विटंब** (सं. पु.) विटंबना, नाश.

**विटंबना** (सं. विडंबना स्त्री.) अप्रतिष्ठा; फटफजिती.
**विटवि** (सं. विटप पु.) वृक्ष.
**विटा** (पु.) एक प्रकारचा भाला.
**विटावणें** (प्रा. क्रि.) वेडावणें.
**विटाळ** (पु.) अस्पृश्याचा स्पर्श; स्त्रियांचा मासिक ऋतु; (प्रा.) दोष. **वि० कालवणें**—एकापासून अनेकांमध्यें विटाळ पसरणें.
**विटाळवंडाळ** (पु.) हरतऱ्हेचा स्पर्शदोष.
**विटाळणें** (क्रि.) विटाळ करणें किंवा होणें.
**विटाळशी** (स्त्री.) रजस्वला.
**विटाळें** (सं. इष्टकालय न.) विटा पाडण्याचा साचा.
**विटी** (स्त्री.) दांडूनें टोला मारून चेंडूसारखा फेंकतात तो लाकडाचा दोन्ही बाजूंनीं निमुळता लांबट तुकडा.
**विटीदांडू** (पु.) मुलांचा एक खेळ.
**विटेकरी** (पु.) वीट नांवाचें विटेच्या आकाराचें शस्त्र धारण करणारे.
**विट्ट** (पु.) अतिशय वीट; फटफजिती.
**विठ्ठल** (सं. वित् + ठ + ल पु.) वित् = ज्ञान; ठ = पूज्य; अर्थात् विठ्ठ = अज्ञान आणि ल = स्वीकारणारा; मिळून अज्ञानांचा पोशिंदा किंवा कैवारी .विठोबा (पंढरपूरची सुप्रसिद्ध देवता).
**विठ्ठलसवाष्ण** (स्त्री.) विधवा. [ नांव.
**विठाई** (स्त्री.) विठोबाचें प्रेमांतील लाडकें
**विठोबारखुमाई** (पु.) विठ्ठल व रखुमाई; अनुरूप जोडपें.
**विडकुली** (स्त्री.) लहान विडा, पानपट्टी.
**विडंबन** (सं. न.), **विडंबना** (स्त्री.) फजिती; नक्कल; सोंग; दुसऱ्याचें रूप धारण करणें.
**विडंबानुकरण** (न.) एखाद्या गोष्टीचें किंवा लेखनाचें हास्यरसात्मक विनोदी अनुकरण. [सारामृत २०।७५).
**विडवर** (प्रा. वि.) अव्यवस्थित (कथा-
**विडा** (सं. विटिका पु.) तांबूल. **विडा उचलणें**—प्रतिज्ञा करणें; **विडा देणें**—निरोप देणें. [ १८।४६)
**वडापाउड** (प्रा. पु.) विडादक्षिणा (ज्ञा०
**विडी** (प्रा. स्त्री.) तंबाखूचा चुट्टा; शेंबी; वलय; कडें.
**विडूळ** (वि.) वेचव; कंटाळवाणें.
**विणकर** (स्त्री.) वीण; विणण्याची तऱ्हा; विणणारा, साळी.
**विणकरी** (पु.) विणणारा, साळी.
**विणचो वेळ** ऐन सूर्यास्ताचा समय.
**विणणावळ** (स्त्री.) विणण्याबद्दलची मजुरी.
**विणणें** (सं. वे. क्रि.) गुंतून तयार करणें.
**विणती** (सं. विनंत स्त्री.) देवास लाविलेला कौल; त्याचें उत्तर.
**विणावणी** (प्रा. स्त्री.) उपाधि, याता–यात (विवे० पृ० १।४३); वीण (ज्ञा० १।४२). [ (अ.) विना, वांचून.
**विणें** (सं. वि क्रि.) प्रसवणें, जन्म देणें;
**वितकळणें** (क्रि.) विघडवून मोडणें.
**वितंड** (सं. वितड् वि.) अघटित; विशाळ; मोठें (दा० १।२।१०).
**वितंडवाद** (सं. पु.) खोटा वादविवाद; हट्टानें आपला खोटा पक्ष स्थापणें.
**वितंडा** (सं. स्त्री.) खोटा वादविवाद.
**वितणें, वीतणें** (प्रा. क्रि.) घडणें.
**वितत** (सं. वि.) पसरलेलें.
**वितत** (प्रा. वि.) सुसंगत, सुरळीत.
**वितथ** (वि.) असत्य; खोटें.
**वितरक** (पु.) चित्रपट किंवा अन्य गोष्टी चोहींकडे पसरविण्याचा व्यवसाय करणारा.
**वितरण** (प्रा. वि.) देणगी.
**वितरणें** (सं. क्रि.) देणें.
**वितर्क** (सं. पु.) अनुमान, अंदाज.
**वितल** (सं. न.) सप्त पाताळांपैकीं एक.
**वितस्ति** (सं. स्त्री.) वीत साफ पसरली असतां अंगठ्यापासून करंगळीपर्यंतचें अंतर.
**वितळणें** (क्रि.) पाघळणें, द्रवणें.
**वितन** (सं. न.) आकाश, छत.
**वितिपात** (पु.) व्यतिपात पहा.
**वितृष्ण** (वि.) निरिच्छ.
**वितुरणी** (प्रा. स्त्री.) वियोग.
**वितुष्ट** (सं. न.) वाकडें, भांडण.
**वितुळणें** (प्रा. क्रि.) वितळणें, मावळणें.

**वित्त** (सं. न.) धन; (वि.) जाणलेलें.
**वित्तद** (सं. पु.) कुबेर. [शास्त्र-पठण.
**वित्पत्ति** (सं. व्युत्पत्ति स्त्री.) अर्थज्ञान;
**वित्तेश** (पु.) कुबेर.
**वित्तेषणा** (सं. स्त्री.) धनलोभ.
**वियरणें** (क्रि.) वेताल वागणें.
**विद** (सं. पु.) जाणता पुरुष, ज्ञानी.
**विदग्ध** (सं. वि.) अर्धवट शिजलेलें; चतुर, सुंदर; ललित.
**विदर्भ** (पु.) वऱ्हाड.
**विदरूं** (प्रा. न.) लहान छिद्र.
**विदरें, विद्रें** (प्रा. वि.) कुरूप.
**विदळ** (प्रा. वि.) डाक लावलेलें (ज्ञा० १३।१०११).
**विंदाण, विंदान** (प्रा. न.) चातुर्य, कौशल्य (सोहि० अद्वयानंद ३); निग्रह (ज्ञा० ६।३६५); लक्षण (ना० ७११); बनावट मजकूर; युक्ति; कारस्थान. [कारागिरी.
**विंदाणी** (प्रा. वि.) कुशल; (स्त्री.)
**विदारक** (सं. वि.) चिरणारा, फाडणारा.
**विदारण** (सं. न.), **विदारणा** (स्त्री.) फाडणें; वध, कत्तल.
**विदारणें** (क्रि.) फाडणें, वधणें.
**विदारी** (सं. वैश्य पु.) क्षत्रिय जातीची आई आणि वैश्य बाप यांची संतति; मण्याला किंवा मोत्याला वेज पाडणारा.
**विदाह** (पु.) ज्वलन; पेटणें.
**विदित** (सं. वि.) ज्ञात, प्रख्यात.
**विदिशा** (सं. स्त्री.) चार मुख्य दिशांपैकीं कोणत्याही दोन एकमेकींना जेथें मिळतात त्या म्हणजे कोपऱ्यांतल्या दिशा (ईशान्य,आग्नेय,नैर्ऋत्य आणि वायव्य).
**विदीर्ण** (सं. वि.) फाडलेलें, भग्न.
**विदुर** (सं. वि.) शहाणा; (पु.) धृतराष्ट्राचा धाकटा भाऊ; अनौरस संतति; मराठी ऐतिहासिक कागदपत्रांत हा शब्द सांकेतिक अर्थानें महादाजी शिंदे यांस लाविलेला आढळतो.
**विदुषी** (सं. स्त्री.) विद्वान् स्त्री.
**विदूषक** (सं. पु.) नाटकांत—थट्टेखोर पात्र.
**विदेश** (सं. पु.) परदेश.
**विदेशी** (सं. स्त्री.) परदेशचा.
**विदेह** (सं. पु.) जनक राजा; एक देश. वैदेही (स्त्री.)—सीता.
**विदेहस्थिति** (सं. स्त्री.) देहाविषयीं आस्था नाहीं अशी ज्ञानी माणसाची निर्विकल्प स्थिति.
**विदेही** (सं. वि.) देहाभिमान सुटलेला.
**विदोर** (पु.) हातमागावरचा ताणा आवळण्यासाठीं हातखुंट्याला बांधलेली दोरी. [आत्मज्ञान.
**विद्गद** (प्रा. वि.) विदग्ध; (न.)
**विद्ध** (वि.) भोक पाडलेला, टोचलेला; आकर्षित.
**विद्यमान** (सं. वि.) हल्लीं असलेलें.
**विद्यमानें** (अ.) देखत; कडून, मार्फत.
**विद्या** (सं. स्त्री.) ज्ञान, ब्रह्मज्ञान; चौदा विद्या शब्द पहा.
**विद्यागुरु** (सं. पु.) विद्या शिकविणारा (गुरुमंत्र देणाऱ्या गुरूला मोक्षगुरु अशी संज्ञा आहे. तो याहून अगदीं निराळा असतो). [एक वर्ग.
**विद्याधर** (सं. पु.) स्वर्गांतल्या उपदेवांचा
**विद्यानुराग** (सं. पु.) विद्येची आवड.
**विद्यापीठ** (सं. न.) विद्येचें आगर किंवा मुख्य स्थान, युनिव्हर्सिटी.
**विद्याभ्यास** (सं. पु.) शिक्षण.
**विद्यार्थी** (सं. पु.) शिष्य; विद्या शिकणारा.
**विद्यालय** (सं. पु. न.) शाळा.
**विद्युच्चिन्ह** (न.) विजेच्या प्रकाशाच्या नळ्यांनीं केलेली अक्षरें व रचना.
**विद्युत** (सं. स्त्री.) वीज.
**विद्युत्क्षेत्र** (सं. न.) विजेनें व्यापलेली जागा.
**विद्युद्दीप** (सं. पु.) विजेचा दिवा.
**विद्युन्माला** (सं. स्त्री.) एक समवृत्त; याच्या चरणांत आठ अक्षरें व म म हे गण असून शेवटीं दोन गुरु अक्षरें असतात.
**विद्युल्लता** (सं. स्त्री.) नागमोडी वीज; वीज.
**विद्युल्लहरी** (सं. स्त्री.) विजेची लाट; विजेमुळें होणारें कंपन.
**विद्योत** (सं. पु.) प्रभा, तेज.
**विद्रधि** (सं. पु.) पू; स्रवणारा फोड.
**विद्रा, विद्रूप** (सं. विरूप पु.) कुरूप.

**विद्रुम** (सं. न.) पोवळें.
**विद्रोह** (सं. पु.) शत्रुत्व.
**विद्वत्कुल** (सं. न.) पंडितसमूह.
**विद्वत्ता** (सं. स्त्री.) पांडित्य.
**विद्वान्** (सं. पु.) पंडित, ज्ञाता.
**विद्वेषक, विद्वेषी** (सं. वि.) अत्यंत द्वेष करणारा, अत्यंत विरोधी.
**विध** (सं. पु.) प्रकार.
**विंध** (सं. न.) छिद्र पाडणें.
**विधडणें** (क्रि.) विघडणें, नासणें.
**विंधणें** (सं. विध् क्रि.) भोक पाडणें, टोंचणें; (न.) एक प्रकारचें किंकरें.
**विधर्मी** (सं. वि.) अधर्मानें वागणारा; अन्यधर्माचा.
**विंधरूं** (न.) लहान छिद्र.
**विधवा** (सं. स्त्री.) गतभर्तृका, नवरा मेलेली स्त्री. [पुनर्विवाह.
**विधवाविवाह** (सं. पु.) गतभर्तृकेचा
**विधवाट** (स्त्री.) फडशा.
**विधाता** (सं. पु.) निर्माणकर्ता, ब्रह्मदेव.
**विधान** (सं. वेधन न.) नेम.
**विधान** (सं. न.) आचरणें; पद्धत, कृत्य; आज्ञा; एखाद्यास उद्देशून सांगितलेलें.
**विधानपरिषद** (स्त्री.) प्रांतांतील वरिष्ठ कायदेमंडळ.
**विधानसभा** (स्त्री.) प्रांतिक कायदेमंडळ.
**विधायक, विधायी** (सं. वि.) व्यवस्था करणारा; प्रत्यक्ष कृतीचा.
**विधि** (सं. पु.) कृत्य; क्रिया; पद्धत; धर्मनियम; ब्रह्मदेव. वि०मंडळ (न.)— कायदेमंडळ.
**विधिघटना** (स्त्री.) दैवाची गति.
**विधिनिषेध** (सं. पु.) अमुक करावें किंवा करूं नये याविषयींचे नियम.
**विधिपूर्वक** (अ.) नियमानुसार, यथासांग.
**विधियुक्त** (सं. वि.) यथाशास्त्र केलेलें.
**विधु** (सं. पु.) चंद्र. [गतस्त्रीक.
**विधुर** (सं. पु.) पत्नी मेलेला पुरुष,
**विधेय** (सं. न.) कर्तव्य; व्याकरणांत— वाक्यांत उद्देशाविषयीं जें सांगितलें असतें तें.
**विधेयक** (न.) कायदेमंडळांत पास करून घेण्यासाठीं मांडावयाचें बिल.
**विंध्य** (सं. पु.) विंध्याद्रि.
**विध्यर्थ** (सं. पु.) व्याकरणांत—वाक्यांत कर्तव्य, शक्यता, आश्चर्य, उद्देश इत्यादि अर्थ ज्यानें ग्राह्य होतो तो अर्थ.
**विध्वंस** (सं. पु.) नाश.
**विध्वंसक** (सं. वि.) नाश करणारा.
**विध्वंसणें** (क्रि.) नाश करणें.
**विन, विना** (प्रा. अ.) वांचून.
**विनटणें** (क्रि.) तल्लीन होणें (भा०५। ३५०); खेळणें. [१४।११४).
**विनटु** (प्रा. पु.) खेळ, खेळगडी (ज्ञा०
**विनत** (सं. वि.) नम्र, वाकलेला.
**विनता** (सं. स्त्री.) गरुडाची आई.
**विनति** (सं. स्त्री.) नम्रता, विज्ञापना.
**विनंति** (सं. स्त्री.) प्रार्थना, अर्ज.
**विनय** (सं. पु.) नम्रता; तळ; छावणी.
**विनयन** (न.) शिक्षणशास्त्र.
**विनयशील, विनयी** (सं. वि.) नम्र.
**विनयोगणें** (सं. विनियुज् क्रि.) व्यवस्था करणें (ज्ञा० ६।२८१).
**विनवण, विनवणी** (स्त्री.) प्रार्थना.
**विनवणें** (क्रि.) प्रार्थना करणें, आर्जव करणें.
**विनष्ट** (वि.) नाश केलेला.
**विना** (सं. अ.) वांचून, शिवाय.
**विनाकारण** (अ.) निष्कारण, व्यर्थ.
**विनामूल्य** (सं. वि.) मोफत.
**विनायक** (सं. पु.) गणपति.
**विनायकी चतुर्थी** (स्त्री.)दर महिन्याच्या शुक्ल पक्षांतली चतुर्थी.
**विनाश** (सं. पु.) पूर्ण नाश.
**विनाशकाल** (सं. पु.) नष्ट होण्याचा काल.
**विनाशी** (सं. वि.) नाश करणारें; नाश पावणारें.
**विनाशिका** (स्त्री.) लढाऊ जहाज; क्रूझर.
**विनास** (सं. वि.) नकटा.
**विनिमय** (सं. पु.) अदलाबदल.
**विनियो** (प्रा. पु.) विनय, नम्रता.
**विनियोग** (सं. पु.) योजना, नेमणूक; खर्च; उपयोग.
**विनीत** (सं. वि.) सुशिक्षित, सभ्य, नम्र.

**विनेता** (सं. वि.) उपदेशक, पुढारी.
**विनोद** (सं. पु.) थट्टा, कौतुक, करमणूक.
**विनोदी** (सं. वि.) गमती, थट्टेखोर.
**विन्मुख** (सं. विमुख वि.) तोंड फिरविलेला; प्रतिकूल; रिकामा.
**विन्यास** (सं. पु.) ठेव, रचना, व्यवस्था; प्रतिपादन (ज्ञा० १५।६५).
**विपट** (प्रा. न.) वैषम्य (दा० १३।५।१३).
**विपत्‌—द्‌** (स्त्री.) संकट; अडचण.
**विपति** (सं. पु.) गरुड. [ संकट.
**विपत्ति, विपद, विपदा** (सं. स्त्री.) आपत्ति,
**विपत्नीक** (सं. वि.) विधुर.
**विपत्य** (प्रा. वि.) विपत्ति, दुर्दशा.
**विपथ** (पु.) कुमार्ग, वाईट मार्ग.
**विपनणें** (प्रा. क्रि.) शास्त्रदृष्टचा पाहणें (ज्ञा० २।२७४).
**विपन्न** सं. वि.) संकटांत पडलेला.
**विपराळ** (वि.) उखर, जलशून्य.
**विपरीत** (सं. वि.) उलट, विरुद्ध.
**विपरीतलक्षणा** (सं. स्त्री.) व्याजोक्ति; प्रत्यक्ष योजिलेल्या शब्दांच्या अर्थाला अगदीं विपरीत अर्थ विवक्षित असतो त्याला ही संज्ञा देतात.
**विपर्यय, विपर्यास** (सं. पु.) विपरीतपणा; बदल, रूपांतर. [अंश.
**विपल, विपळ** (सं. न.) पळाचा साठावा
**विपलाप** (सं. विप्रलाप पु.) शोक.
**विपसळा** (वि.) उपद्रवी; खोडकर.
**विपसळो** (पु.) उपद्रव.
**विपक्ष** (सं. पु.) शत्रु, विरुद्ध बाजू.
**विपाइलें** (प्रा. वि.) थोडें, विरळा.
**विपाक** (सं. पु.) परिणाम, शेवट.
**विपाड** (प्रा. पु.) भिन्नपणा (सोहि० अद्वयानन्द० ३)
**विपाय—व** (सं. पु.) अपाय. [ कदाचित्.
**विपायें** (प्रा. अ.) आपोआप, सहज,
**विपारणें** (क्रि.) उनाड होणें.
**विपारा** (प्रा. वि.) विरूप (दा० २।३।५२) उनाड, मूर्ख.
**विपावो** (प्रा. पु.) कठिणपणा.
**विपिन** (सं. पु.) अरण्य.
**विपुल** (सं. वि.) पुष्कळ (भा० ५१०५).
**विपुलता** (सं. स्त्री.) रेलचेल, समृद्धि.
**विपुळात** (प्रा. वि.) विपुल.
**विप्र** (सं. पु.) ब्राह्मण.
**विप्रकर्ष** (सं. पु.) अंतर; दूरपणा.
**विप्रकृष्ट** (सं. वि.) दूरचें.
**विप्रलंभ** (सं. पु.) अलंकारशास्त्रांत—शृंगाराचा एक प्रकार; यांत नायक व नायिका यांचा वियोग असून परस्परांस विरहामुळें मदनाची वगैरे बाधा होते असें वर्णिलें असतें.
**विप्रलाप** (सं. पु.) आरडाओरड, भांडण.
**विफल** (सं. वि.) व्यर्थ, निष्फळ.
**विफळात** (प्रा. वि.) व्यर्थ.
**विबुध** (सं. पु.) पंडित, शहाणा; देव, चंद्र.
**विबुधप्रिया** (सं. स्त्री.) छंदःशास्त्रांतल्या एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १८ अक्षरें व र, स, ज, ज, भ, र हे गण असतात.
**विभक्त** (सं. वि.) वेगळा झालेला; पृथक्.
**विभक्ति** (सं. स्त्री.) नामास व सर्वनामास जो विकार झाल्यानें त्यांचा वाक्यांतील इतर शब्दांशीं असलेला संबंध समजतो तो.
**विभव** (सं. पु.) ऐश्वर्य, संपत्ति.
**विभाग** (सं. पु.) भाग, हिस्सा, पोटभाग.
**विभाजन** (न.) विभाग पाडणें.
**विभाज्य** (सं. पु.) अंकगणितांत—दुसऱ्या संख्येला निःशेष भागणारी संख्या.
**विभांडणें** (प्रा. क्रि.) दूर करणें; पराभव करणें (ज्ञा० १७।२९९); जिंकणें; फोडणें (ज्ञा० १६।१२२).
**विभाव** (सं. पु.) रसोद्दीपक गोष्ट.
**विभावन—ना** (सं. स्त्री.) कल्पना, तर्क; अनुभव; दर्शन.
**विभावसु** (सं. पु.) अग्नि.
**विभिन्न** (सं. वि.) तुकडे केलेला; मिसळलेला.
**विभु** (सं. पु.) प्रभु; (वि.) बलाढ्य, महान्.
**विभू** (सं. व्यूह पु.) व्यूह; बालंट; कारस्थान.
**विभूत** (सं. विभूति स्त्री.) भस्म.
**विभूति** (सं. स्त्री.) कल्याण; तेज; ऐश्वर्य; भस्म; अष्टसिद्धि; लोकोत्तर पुरुष.

**विभूतिपूजा** (स्त्री.) थोर पुरुषाविषयींची परम भक्ति.
**विभूषित** (सं. वि.) अलंकृत.
**विभ्रम** (सं. पु.) चूक; भ्रमण; गोंधळ; स्त्रियांचा विलास.
**विमनस्क** (सं. वि.) गोंधळलेला, खिन्न.
**विमर्श** (सं. पु.) विचार, बोध, तपास.
**विमर्शक** (वि.) टीकाकार.
**विमल** (सं. वि.) स्वच्छ, निर्मळ.
**विमा** (हिं. विमा पु.) एखाद्या माणसास किंवा कंपनीस ठराविक रक्कम देत गेल्यास जिवास किंवा वस्तूस होणारें नुकसान त्यानें किंवा तिनें भरून द्यावें असा करार.
**विमाता** (सं. स्त्री.) सावत्र आई.
**विमान** (सं. न.) आकाशयान.
**विमुक्त** (सं. वि.) मोकळा सुटलेला.
**विमुख** (वि.) पाठमोरा; **वि० काल–ळ** (पु.)–संकटकाल.
**विमोचन** (सं. न.) मुक्ति, सुटका.
**वियत्** (सं. न.) आकाश.
**वियद्गंगा** (स्त्री.) आकाशगंगा.
**वियुक्त** (सं. वि.) निराळा झालेला, विरहित.
**वियोग.** (सं. पु.) ताटातूट.
**विरका** (वि.) कांडतांना तुटणारा तांदूळ.
**विरक्त** (सं. वि.) विदेही, उदासीन.
**विरक्ति** (सं. स्त्री.) वैराग्य.
**विरखुडी** (स्त्री.) रेघ.
**विरंगुळा, विरंगोळा** (प्रा. पु.) करमणूक; (प्रा.) हरकत; आळस (ज्ञा० १५।४६६).
**विरघळणें** (क्रि.) द्रवणें, पाघळणें.
**विरचित** (सं. वि.) जुळविलेलें, रचलेलें.
**विरंची** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**विरज** (सं. वि.) निर्मळ.
**विरजण** (न.) दुधाचें दहीं करण्यासाठीं त्यांत घातलेला आंबट पदार्थ; विरजलेलें दूध; सद्गुणाला कलंक लावणारी गोष्ट. **वि० पडणें**—विरस होणें.
**विरजणें** (क्रि.) दुधाला विरजण लावणें; दहीं होणें.
**विरजा, विरिजा** (प्रा. वि.) साहचकर्ता; (पु.) साहच; विरजण.
**विरड** (पु.) दिवसाचा अर्ध भाग (पूर्वाण्ह किंवा अपराण्ह).
**विरडी** (स्त्री.), **विरडें** (न.) विरडी.
**विरणें** (क्रि.) द्रवणें, जीर्ण होणें.
**विरत** (सं. वि.) निवृत्त, विन्मुख.
**विरथ** (सं. वि.) रथहीन; रथांतून उतरलेला.
**विरधाळें** (न.) वृद्धि, सुएर.
**विरपणें** (क्रि.) शेताची निंदणी करणें.
**विरक्षणें, विरमणें** (सं. क्रि.) ओशाळणें; विश्रांति घेणें. [दुर्मिळ; (अ.) क्वचित्.
**विरल–ळ** (सं. वि.) दूरदूर; झिरझिरीत;
**विरलागत** (सं. वि.) क्वचित् घडणारें.
**विरवड** (स्त्री.) मुख्य धान्याबरोबर पेरलेलें उपधान्य. [बोटांतलें एक भूषण.
**विरवदी** (स्त्री.) स्त्रियांच्या पायांच्या
**विरविरीत** (वि.) झिरझिरीत.
**विरस** (वि.) नीरस; (पु.) मनोभंग.
**विरह** (सं. पु.) वियोगजन्य दुःख.
**विरहण** (प्रा. पु.) आळ (हरि० ९।१८६).
**विरहाग्नि, विरहानल** (सं. पु.) वियोगजन्य शरीरदाह.
**विरहित** (सं. वि.) हीन; शून्य.
**विरळ** विरल पहा.
**विरळा** (वि.) दुर्मिळ; (अ.) क्वचित्.
**विरा** (पु.) सुपारीच्या फांदीच्या बुडाशीं असलेलें जाड आवरण.
**विराग** (सं. पु.) विरक्ति, वैराग्य.
**विराजणें** (क्रि.) शोभणें.
**विराजमान** (सं. वि.) शोभिवंत.
**विराजित** (सं. वि.) शोभिवंत झालेलें.
**विराट** (सं. पु.) सर्वव्यापी पुरुष, भगवान; (वि.) भव्य, प्रचंड. [ब्रह्म.
**विराट पुरुष** (सं. पु.) ब्रह्मांडव्यापी सगुण
**विराट स्वरूप** (सं. न.) ब्रह्मांडव्यापी आत्मस्वरूप.
**विराणा** (पु.) एक देवता (दा० १३।८।१४).
**विराणी** (स्त्री.) जमीन भाजण्यापूर्वी आग पसरूं नये म्हणून भाजतात ती जागा; विरहणीचें गाणें.
**विराम** (सं. पु.) विश्रांति, थांबणें.

**विरामचिन्ह** (न.) वाक्यांत कमी अधिक थांबण्यासाठीं केलेली खूण. जसें:— स्वल्पविराम, अर्धविराम; वगैरे.
**विरालेंपण** (प्रा. न.) शून्य.
**विरावा** (पु.) मध्यस्थ; अडचण; खोळंबा.
**विरावें** (प्रा. न.) शौर्य (दा० ३।१।७).
**विरिंचि** (सं. पु.) ब्रह्मदेव. [सत्त्वांश.
**विरी** (सं. वीर्य स्त्री.) बळ, सामर्थ्य;
**विरु** (सं. अ.) विरुद्ध; (न.) वैर.
**विरुगोळा** (पु.) विरंगुळा (ज्ञा० १५। ४६६).
**विरुद्ध** (सं. वि.) उलट, प्रतिकूळ.
**विरुळें** (प्रा. वि.) विरळ; फाटकें.
**विरूढणें** (प्रा. क्रि.) विस्तार पावणें (एक० १९५५); रुजणें.
**विरूढी** (प्रा. स्त्री.) अंकुर, पालवी.
**विरूप** (सं. वि.) कुरूप, विद्रूप.
**विरूपाक्ष** (सं. पु.) शंकर. [निःसरण.
**विरेचन** (सं. न.) मलशुद्धि, मलाचें
**विरोध** (सं. पु.) प्रतिकूळता; विरुद्धभाव; हरकत.
**विरोधभक्ति** (सं. स्त्री.) देवाच्या हातून नाश झाल्यानें आपणास मुक्ति मिळेल अशा भावनेनें शक्य तितकें त्याच्याशीं विरुद्ध भावाचें वर्तन ठेवणें.
**विरोधविकासवाद** (पु.) दोन द्वंद्वांतून जग अधिक वरच्या पातळीवर येतें असें मानणारी तत्त्वप्रणाली. कार्लमार्क्स हा या तत्त्वप्रणालीचा प्रवर्तक होता.
**विरोधी** (सं. वि.) प्रतिकूल; विरुद्ध जाणारा. **वि० पक्ष**—कायदेमंडळांत सत्तारूढ सरकारी पक्षाच्या खालोखाल महत्त्वाचा असलेला पक्ष.
**विरोली** (स्त्री.) स्त्रियांच्या पायाच्या बोटांतील एक अलंकार.
**विरोळा–ला** (पु.) पाणसर्प.
**विलग** (वि.) असंबद्ध, अलिप्त; (पु.) उपद्रव, त्रास (ज्ञा० १२।६२).
**विलगट** (प्रा. वि.) भ्रष्ट.
**विलग्न** (सं. वि.) चिकटलेलें; संलग्न.
**विलंघणें** (स्त्री.) उल्लंघणें.
**विलंची** (प्रा. वि.) कपटी, कुढ्या मनाचा.
**विलपणें** (सं. विलप् क्रि.) शोक करणें.
**विलंब** (सं. पु.) उशीर, अवकाश.
**विलय** (सं. पु.) नाश. [चकाकणें.
**विलसणें** (सं. विलस क्रि.) शोभणें;
**विलक्षण** (सं. वि.) असामान्य; चमत्कारिक; (प्रा.) विरुद्ध (भा० २०।४१).
**विलाप** (सं. पु.) शोक, दुःख.
**विलायत** (अर. स्त्री.) परदेश; युरोपखंड.
**विलायती** (वि.) परदेशी; काबुली; युरोपखंडांतील.
**विलायती वांगें** टोमाटो. [चैन.
**विलास** (सं. पु.) क्रीडा, शृंगार–चेष्टा;
**विलासी** (सं. वि.) विषयासक्त; गुलहौशी; सुखमग्न.
**विलीन** (वि.) अंतर्भूत.
**विलीनीकरण** (न.) समाविष्ट होणें.
**विलेपन** (सं. न.) उटी लावणें; उटी.
**विलोकणें** (क्रि.) पाहणें.
**विलोकन** (सं. न.) अवलोकन, पाहणें.
**विलोपन** (न.) लुप्त होऊन जाणें.
**विलोभन** (सं. न.) फसवणूक.
**विलोम** (सं. वि.) विपरीत, उलटें.
**विलोल** (सं. वि.) चंचल.
**विल्यावणें** (क्रि.) विलयास जाणें.
**विल्लत** (वि.) खोडकर; दुर्गुणी.
**विल्हय** (स्त्री.), **विल्हाणा** (पु.), **विल्हाणें** (न.) कुळ. [लावणें—व्यवस्था लावणें.
**विल्हा** (अर. स्त्री.) वर्ग, भाग. **विल्हेस**
**विल्हाळ** (प्रा. वि.) दुःखाच्या गोष्टी सांगणारा (तुका० १२६३).
**विल्हाळक** (प्रा. वि.) व्यर्थ, निष्कारण; (स्त्री.) काकळूत; पिरपिर (तुका० १३४३) [दर्जा.
**विल्हे** (अर. विल्हा स्त्री.) वर्ग; खातें;
**विल्हेवाट** (स्त्री.) उधळपट्टी, फडशा.
**विल्हेवार** (अ.) वर्गवारीनें.
**विवंचणें** (सं. विवंच् क्रि.) काळजी करणें.
**विवंच, विवंचना** (सं. स्त्री.) काळजी; विचार; चिंता; (प्रा.) घोटाळा (तु० ६७१).
**विवर** (सं. न.) छिद्र, बोळ, पोकळी; (प्रा.) स्पष्टीकरण.

**विवरण** (सं. न.) स्पष्टीकरण, सविस्तर निरूपण.
**विवर्जन** (क्रि.) टाळणें.
**विवर्ण** (सं. वि.) विटलेला; रंग गेलेला.
**विवर्त** (सं. पु.) बदल, रूपांतर, भोवरा.
**विवर्तन** (सं. न.) भ्रमण.
**विवश** (सं. वि.) पराधीन; परतंत्र.
**विवशी, विवसी** (स्त्री.) खाष्ट देवता, जखीण.
**विवसन, विवस्त्र** (सं. वि.) वस्त्ररहित; नग्न.
**विवसा** (प्रा. स्त्री.) इच्छा; कल.
**विवस्कंध** (सं. पु.) नक्षत्रमंडळापासून शनिमंडळापर्यंतचा म्हणजे पांचवा स्कंध.
**विवस्वान्** (सं. पु.) सूर्य.
**विवळ** (प्रा. वि.) सविस्तर (ज्ञा० ५। १६४); सुगम (एक० २१४०); स्पष्ट.
**विवळणें** (क्रि.) तळमळणें; (प्रा.) स्पष्ट करणें; विस्तारणें; समजणें; प्रकाशणें.
**विवक्षा** (सं. स्त्री.) बोलण्याची इच्छा.
**विवक्षित** (सं. वि.) उद्दिष्ट, नेमका.
**विवाद** (सं. पु.) चर्चा; वाद.
**विवाह** (सं. पु.) लग्न.
**विवाहित** (सं. वि.) लग्न झालेला.
**विविक्त** (सं. वि.) एकांत.
**विविध** (सं. वि.) नाना प्रकारचें.
**विवृत्त** (वि.) उलगडा केलेलें; स्पष्ट केलेलें.
**विवेक** (सं. पु.) सारासारविचार.
**विवेकवादी** (पु.) बुद्धिवादी; तर्ककर्कश.
**विवेकी** (सं. पु.) विचारी, समंजस.
**विवेचन** (सं. न.) स्पष्टीकरण.
**विवेची** (प्रा. स्त्री.) विवेचन; विचक्षणता.
**विव्हल–ळ** (सं. वि.) व्याकूळ; त्रस्त.
**विशंक** (वि.) निर्भय; शंकारहित.
**विशद** (सं. पु.) स्वच्छ, स्पष्ट.
**विशाखा** (स्त्री.) एक नक्षत्र.
**विशांपति** (सं. पु.) राजा. [१३७२).
**विशारत** (प्रा. स्त्री.) इशारत (तुका०
**विशारद** (सं. वि.) हुशार, प्रवीण.
**विशाल, विशाळ** (सं. वि.) प्रचंड, भव्य.
**विशिख** (सं. पु.) बाण. [नेमका; निराळा.
**विशिष्ट** (सं. वि.) लक्षणयुक्त; ठराविक,
**विशिष्टगुरुत्व** (सं. न.) एखादा पदार्थ आणि पाणी हीं सारख्या आकाराचीं घेऊन त्यांचें वजन केलें असतां त्या पदार्थाचें वजन पाण्याच्या जितकेपट भरतें तितकी पट.
**विशी** (स्त्री.) वीस वर्षांचें वय.
**विशीं एकोणिशी** किंचित चढउतार.
**विशुद्ध** (सं. वि.) निर्मळ, पवित्र.
**विशेख** (प्रा. वि.) विशेष.
**विशेष** (सं. वि.) अधिक, असामान्य; (पु.) अधिकता; श्रेष्ठता.
**विशेषण** (सं. न.) व्याकरणांत—नामाचा गुण अथवा संख्या दाखविणारा शब्द.
**विशेषणें** (प्रा. क्रि.) वर्णन करणें.
**विशेषतः** (सं. अ.) मुख्यत्वेंकरून.
**विशेषनाम** (सं. पु.) व्याकरणांत—ज्या नामानें एका विशेष वस्तूचा, प्राण्याचा, किंवा समूहाचा बोध होतो तें नाम.
**विशेषेंकरून** (अ.) विशेषतः.
**विशेषोक्ति** (सं. स्त्री.) एक अर्थालंकार; कारणसामग्री पुष्कळ असतांही कार्याची अनुत्पत्ति जेथें वर्णिली असते तेथें हा अलंकार होतो.
**विशेष्य** (सं. न.) व्याकरणांत—ज्या नामाची व्याप्ति विशेषणाच्या योगानें मर्यादित होते तें नाम.
**विशो** (प्रा. पु.) विषय.
**विशोधित** (सं. वि.) शुद्ध केलेलें.
**विश्रंभालाप, विश्रद्धालाप** (सं. पु.) विश्वासानें सांगितलेल्या किंवा प्रणयपूर्ण कथा.
**विश्रांति** (सं. स्त्री.) विसावा, आराम.
**विश्राम** (सं. पु.) विश्रांति, विसावा.
**विश्रुत** (सं. वि.) प्रख्यात, प्रसिद्ध.
**विश्लेष** (सं. पु.) वियोग, दुःख.
**विश्लेषण** (न.) पृथक्करण; विघटन.
**विश्व** (सं. न.) जग, सृष्टि.
**विश्वकर्मा** (सं. पु.) देवांचा कारागीर.
**विश्वकोश** (सं. पु.) सर्व प्रकारच्या ज्ञानाचा संग्रहग्रंथ.
**विश्वतोमुखीं** (अ.) सर्वांच्या तोंडीं.
**विश्वप्रयत्न** (सं. पु.) फार जंगी प्रयत्न.
**विश्वविद्यालय** (सं. वि.) युनिव्हर्सिटी, विद्यापीठ.

**विश्वसनीय** (सं. वि.) खात्रीलायक.
**विश्वसृट्** (सं. पु.) ब्रह्मा.
**विश्वस्त** (सं. वि.) विश्वास ठेवून राहिलेला; एकाद्या संस्थेचा अथवा निधीचा अवैतनिक व्यवस्थापक (इं. ट्रस्टी).
**विश्वा, विस्वा** (पु.) रतीच्या विसाव्या अंशाइतकें वजन; विसावा भाग.
**विश्वात्मक** (वि.) सृष्टिस्वरूपी.
**विश्वात्मा** (सं. पु.) ब्रह्म.
**विश्वाभिमान** (सं. पु.) हा देह, मी आणि विश्व सगळें माझ्या भोगाचें विषय असा अभिमान. [ (पु.) रेडा.
**विश्वामित्री** (प्रा. स्त्री.) गाढवी, म्हैस;
**विश्वास** (सं. पु.) भरंवसा, श्रद्धा.
**विश्वासघात** (सं. पु.) विश्वास दाखवून फसविणें; दगलबाजी.
**विश्वासणें** (सं. विश्वास् क्रि.) विश्वास ठेवणें; अवलंबून राहणें.
**विश्वासनिधि** (सं. पु.) अतिशय विश्वासांतला मनुष्य.
**विश्वासिक, विश्वासी, विश्वासुक, विश्वासू** (वि.) विश्वासास पात्र, भरंवशाचा; प्रामाणिक. [ समुदाय.
**विश्वेदेव** (पु.) स्वर्गांतील दहा देवांचा
**विश्वेश्वर** (सं. पु.) विश्वाचा प्रभु; क्षेत्र काशी येथील मुख्य अधिष्ठात्री देवता.
**विश्वोदयपथ** (सं. पु.) माया.
**विष** (सं. न.) जहर, विख.
**विषइक** (वि.) विषयासक्त.
**विषईं** (अ.) विषयीं.
**विषकंठ** (सं. पु.) शंकर.
**विषकठ** (प्रा. वि.) विशाल.
**विषण्ण** (सं. वि.) खिन्न.
**विषदू** (प्रा. वि.) स्पष्ट, विशद.
**विषप्रयोग** (सं. पु.) विष घालणें.
**विषम** (सं. वि.) तुल्य किंवा सम नसलेलें; उच्छृंखल; वाकडें; व्यस्त; कठिण.
**विषमज्वर** (सं. पु.) एक मुदतीचा ताप.
**विषमान्न** (न.) रोजच्या खाण्यांत नसलेलें अन्न.
**विषय** (सं. पु.) इंद्रियगोचर वस्तु; भोग्य वस्तु; पदार्थ; टप्पा, आटोका; उद्देश, हेतु; प्रकरण, गोष्ट; मुद्दा; वात्र; द्रव्य; संबंध; स्थान, प्रदेश.
**विषयवासना** (सं. स्त्री.) भोग्य वस्तूच्या सेवनाची इच्छा.
**विषयसुख** (सं. न.) भोग्य वस्तूच्या उपभोगापासून मिळणारें सुख.
**विषयी** (सं. वि.) विषयासक्त.
**विषयीं** (अ.) संबंधानें.
**विषयोपभोग** (सं. पु.) भोग्य वस्तूचें सेवन.
**विषाण** (सं. न.) शिंग.
**विषाद** (सं. पु.) खेद; दुःख; उत्साहभंग.
**विषार** (सं. पु.) सर्प. [होणें.
**विषारणें** (क्रि.) विषाचा शरिरावर अंमल
**विषारी** (सं. वि.) विषयुक्त.
**विषुव, विषुवत्** (सं. न.) दिवसाचें व रात्रीचें कालमान सारखें असतें तो काल (प्रायः २१ मार्च व २३ सप्टेंबर); मेषसंक्रमण व तूलसंक्रमण.
**विषुववृत्त** (सं. न.) पृथ्वीच्या दोन्ही ध्रुवांपासून सारख्या अंतरावर तिच्या पृष्ठभागावर काढलेलें कल्पित रेषावर्तुळ.
**विषूचिका** (सं. स्त्री.) पटकी, महामारी.
**विषो** (प्रा. वि.) विषय.
**विष्टप** (सं. पु.) देश.
**विष्टर** (सं. पु.) दर्भासन. [ काम.
**विष्टि** (स्त्री.) वेठ; मजुरीशिवाय घेतलेलें
**विष्ठा** (सं. स्त्री.) मळ, गू.
**विष्णु** (सं. पु.) तीन मुख्य देवांपैकीं एक; जगाचा पालनकर्ता.
**विष्णुपद** (सं. न.) विष्णूच्या पावलाची प्रतिमा; गया येथील विष्णूच्या पावलाची प्रतिमा.
**विष्णुपदी** (सं. स्त्री.) गंगा.
**विष्णुलोक** (सं. पु.) वैकुंठ.
**विष्णुवर्धन** (सं. पु.) ब्राह्मणांतला एक वर्ग.
**विसकटणें** (क्रि.) अस्ताव्यस्त करणें.
**विसकणें** (क्रि.) दूध देईनाशी होणें.
**विसकलणें** (क्रि.) अस्ताव्यस्त रीतीनें पसरणें.
**विसकळित** (वि.) सुटून अव्यवस्थित रीतीनें पसरलेलें. [ (अमृ० २।३९).
**विसकुस** (प्रा. स्त्री.) बिघाड, तुटातूट

**विसकुसणें** (प्रा. क्रि.) विघडणें (चांगदेव पासष्टी ४२).
**विसकुसें** (प्रा. न.) व्यर्थ; कासावीस.
**विसंगत** (सं. वि.) असंबद्ध, विजोड.
**विसंचणें** (प्रा. क्रि.) नासणें.
**विसण** (सं. विशमन न.) ऊन पाण्याची उष्णता कमी करण्यासाठीं त्यांत मिसळण्याचें थंड पाणी. [१।१३३).
**विसणणें** (प्रा. क्रि.) सरवासणें (ज्ञा०
**विसब** (सं. विसर्पिका पु.) इसब, एक त्वग्रोग. [२३।३५).
**विसंब** (प्रा. पु.) अवकाश; त्याग (भा०
**विसंवणें** (प्रा. क्रि.) विसरणें; सोडणें, दूर ठेवणें; विश्वास ठेवणें, अवलंबून राहणें.
**विसर** (सं. विस्मरण पु.) विस्मृति; संचय (मोरो० उद्योग० २।३८).
**विसरणें** (क्रि.) विस्मृति होणें.
**विसरी** (प्रा. स्त्री.) विस्मृति.
**विसराळू** (वि.) लवकर विसरणारा.
**विसरभोळा** (वि.) लवकर विसरणारा.
**विसरभोळ्या** (अ.) विस्मृतीमुळें.
**विसर्ग** (सं. पु.) सोळावा स्वर—त्याचें (:) असें चिन्ह असतें; त्याग; दान.
**विसर्जणें** (क्रि.) त्यागणें, सोडणें.
**विसर्जन** (सं. न.) सोडणें; निरोप देणें; समाप्ति.
**विसर्प** (सं. पु.) इसब, धावरें.
**विसवटा** (पु.) विसावा.
**विसवणें, विसावणें** (क्रि.) विश्राम पावणें; थांबणें; कुठणें; फार ऊन पाणी वेताचें करणें.
**विसवा** (पु.) रुक्याचा विसावा भाग. **अठरा विसवे दारिद्र्य**—पूर्ण दारिद्र्य.
**विसवाट** (न.) घराभोवतालचें कुंपण.
**विसंवाद** (सं. पु.) विरोध; विसंगति.
**विसविशीत** (वि.) मऊ.
**विसळणें** (सं. विक्षल क्रि.) धुणें.
**विसार, विसारा** (पु.) बयाणा.
**विसावतें** (प्रा. वि.) विसावा घेण्याचें.
**विसावा, विसांवा** (सं. विश्राम पु.) विश्रांति, आराम.
**विसाळ, इसाळ** (प्रा.) बाधा (दा० २।६। १३); ईर्षा.
**विसुरा** (प्रा. पु.) विस्मय; अभिप्राय; तात्पर्य; चित्र; समुदाय.
**विसुरें** (प्रा. न.) भ्रांति.
**विसृत** (सं. वि.) लांबरुंद; पसरलेलें.
**विसोळा** (पु.) घरटें. [सुटलेलें.
**विस्कळित** (सं. विस्खलित वि.) मोकळें
**विस्तर, विस्तार** (सं. पु.) लांबण, फैलाव.
**विस्तराळी** (प्रा. स्त्री.) विस्तार (ना० १९).
**विस्तव** (पु.) अग्नि. **दोघांमधून विस्तव न जाणें**—भांडण असणें.
**विस्तार** (सं. पु.) वाढ, फैलाव; पाल्हाळ.
**विस्तारण** (न.) प्रसरण. [लांबलचक.
**विस्तीर्ण** (सं. वि.) पसरलेलें, भव्य,
**विस्तृत** (सं. वि.) अघळपघळ, लांबरुंद.
**विस्मय** (सं. पु.) नवल, आश्चर्य.
**विस्मयजनक** (सं. वि.) आश्चर्यकारक.
**विस्मयावह** (सं. वि.) विस्मयकारक, आश्चर्यकारक.
**विस्मरण** (सं. न.) विसर, विस्मृति.
**विस्मापन** (सं. न.) आश्चर्यचकित करणें.
**विस्मित** (सं. न.) आश्चर्यचकित.
**विस्मृत** (सं. वि.) विसरलेलें.
**विस्मृति** (सं. स्त्री.) विसर, विस्मरण.
**विस्वर** (सं. वि.) बेसूर.
**विस्वाद** (सं. वि.) स्वादशून्य.
**विहग, विहंग, विहंगम** (सं. पु.) पक्षी.
**विहंगममार्ग** (सं. पु.) योगशास्त्रांत—समाधि त्वरित लावण्याचा मार्ग; कोणतेंहि कार्य त्वरितगतीनें साधण्याचा मार्ग.
**विहनन** (सं. न.) हत्या.
**विहरण** (सं. न.) विहार, क्रीडा.
**विहरणें** (सं. विहर क्रि.) क्रीडा करणें.
**विहरा** (प्रा. पु.) मोठा झरा.
**विहाय** (सं. न.) आकाश.
**विहार** (सं. पु.) सहल, क्रीडा; बौद्धमठ.
**विहारी** (सं. वि.) क्रीडा करणारा.
**विहित** (सं. वि.) शास्त्रोक्त, योग्य.
**विहिरा** (पु.) मोठा झरा. [बायको.
**विहीण** (सं. विवाही स्त्री.) व्याहयाची

**विहीन** (सं. वि.) रहित, शून्य.
**विहीर** (स्त्री.) मोठा आड, कुवा.
**विहीरहुंडा** (पु.) विहिरीवरची पट्टी किंवा कर. [वालंट.
**विहू** (सं. व्यूह पु.) विभू, कारस्थान,
**विव्हल (ळ)** (सं. वि.) व्याकुळ. [काळ.
**विळ** (प्रा. पु.) ब्रम्हदेवाचा दिवस; वेळ,
**विळखा** (पु.) वेढा, वेटाळें.
**विळविळीत** (वि.) गिळगिळीत, मऊ.
**विळा** (पु.) कोयता.
**विळी** (स्त्री.) भाजी इ. चिरण्याचें हत्यार.
**विळून** (प्रा. अ.) एका वेळांतून (भा० ८।२५२)
**विक्षिप्त** (सं. वि.) लहरी; क्षुब्ध.
**विक्षेप** (सं.पु.) उडविणें; व्यग्रता; घोटाळा; ज्योतिषांत– ग्रहांचें याम्योत्तर अंतर; वेदांतशास्त्रांत—मायेची भ्रम उत्पादन करण्याची शक्ति.
**विज्ञ** (सं. पु.) ज्ञानी, विशेषज्ञ.
**विज्ञप्ति** (सं. स्त्री.) विज्ञापना, निवेदन.
**विज्ञात** (सं. वि.) विशेष माहितीचा.
**विज्ञान** (सं. न.) विशेषज्ञान; शास्त्रशिल्प इ. चें ज्ञान; तत्त्वज्ञान. [असलेला.
**विज्ञानवादी** (न.) शास्त्रीय दृष्टिकोन
**विज्ञापक** (सं. वि.) उपदेशक; शिक्षक.
**विज्ञापना** (सं. स्त्री.) नम्रपणें श्रेष्ठास केलेली विनंति किंवा अर्ज.
**विज्ञानमयकोश** (सं. पु.) आत्म्याच्या पंचकोशांपैकीं चौथा; ज्ञानेंद्रियसंयुक्त बुद्धि.
**विज्ञेय** (सं. वि.) जाणण्यास योग्य.
**वी** (प्रा. पु.) पक्षी.
**वीख** (न.) विष.
**वीचि** (सं. पु.) लाट, तरंग. [विजणी.
**वीज** (सं. विद्युत् स्त्री.) विद्युत्, सौदामिनी,
**वीजण** (प्रा. पु.) वारा.
**वीट** (स्त्री.) ईट, मातीचा लहान चतुष्कोन; (पु.) कंटाळा, किळस.
**वीटबंदी** (वि.) विटांनीं बांधलेलें.
**वीड** (पु. न.) मनगटाचें माप.
**वीण** (स्त्री.) संतति; वस्त्राचें विणकाम.
**वीणा** (सं. स्त्री. पु.) तंबोरा; सात तारांचें एक वाद्य.
**वीणाकाव्य** (सं. न.) वीण्याच्या नादाबरोबर गाण्याची कविता; रसात्मक किंवा भावपूर्ण गाणें; लहरी-काव्य.
**वीणापाणि** (सं. स्त्री.) सरस्वती.
**वीत** (सं. वितस्ति स्त्री.) टीच; अर्ध्या हाताइतकें माप; (सं. वि.) गेलेला; नाहींसा झालेला.
**वीतणें** (प्रा. क्रि.) घडणें.
**वीतराग** (सं. वि.) आसक्तिरहित.
**वीतशोक** (सं. वि.) शोकरहित.
**वीर** (सं. पु.) शूर पुरुष, योद्धा.
**वीरगुंठी** (सं. स्त्री.) वीराच्या मस्तकावरील केसांचा जुंबाडा (मुक्ते० सभा० १५।७६).
**वीरचक्र** (न.) पराक्रमाकरितां भारत-सरकारकडून मिळणारें पदक.
**वीरठाण** (सं. वीरस्थान न.) वीरासन.
**वीरपीर** (पु.) धाडसी पुरुष; आडदांड, भांडखोर मनुष्य.
**वीरभद्र** (सं. पु.) एक शिवगण.
**वीरवैष्णव** (सं. पु.) वैष्णवांचे आचार कडकडीतपणानें पाळणारा एक वर्ग.
**वीरवो** (प्रा. पु.) विषय.
**वीरशय्या** (सं. स्त्री.) रणभूमि.
**वीरशैव** (पु.) लिंगायतांचा एक वर्ग.
**वीरश्री** (सं. स्त्री.) शौर्याचें वारें, स्फुरण; अवसान.
**वीरसू** (सं. स्त्री.) वीरमाता.
**वीरासन** (सं. न.) डावा गुडघा मोडून व उजवा उभा करून बसणें.
**वीर्य** (सं. न.) शुक्र, रेत; पराक्रम; प्रभाव, सामर्थ्य.
**वीर्यवान्, वीर्यशाली** (सं. वि.) शूर.
**वील, वुइल** (इं. न.) मृत्युपत्र.
**वीळ** (स्त्री.) भरती.
**वीक्षणें** (सं. वीक्ष् क्रि.) पाहणें.
**वुंडी** (प्रा. स्त्री.) बलिदान.
**वृक** (सं. पु.) लांडगा.
**वृकोदर** (सं. वि.) खादाड; (पु.) भीम.
**वृक्क** (सं. पु.) मूत्रपिंड.
**वृजिन** (सं. न.) दुःख; क्लेश.
**वृत्त** (सं. न.) देठ.

...वाचनालय, सातारा.

**वृत्त** (सं. न.) पद्याच्या अक्षर-नियमाचें व मात्रा–नियमाचें नांव; वर्तन; वर्तुळ; हकीकत, बातमी; इतिहास; (वि.) घडलेलें.
**वृत्तपत्र** (न.) वर्तमानपत्र. [बातमी.
**वृत्तांत** (सं. पु.) वार्ता; हकीकत; इतिहास;
**वृत्तांश** (सं. पु.) वर्तुळाचा अंश.
**वृत्ति** (सं. स्त्री.) वर्तन, वागणूक; पोटाचा धंदा; मनाची स्थिति; टीका; व्याख्या; अलंकारशास्त्रांत—रसाला अनुकूल वर्णरचना.
**वृत्तिच्छेद** (सं. पु.) वंशपरंपरागत असलेल्या निर्वाहसाधनाचा नाश. [ (इंद्र).
**वृत्रघ्न** (सं. पु.) वृत्रासुराला मारणारा
**वृथा** (अ.) व्यर्थ.
**वृंद** (सं. पु.) समुदाय.
**वृंदवादन–गायन** (न.) एकापेक्षां अधिक व्यक्तींनीं केलेलें गायन वादन.
**वृंदनर्तन** (न.) सामुदायिक नाच.
**वृंदारक** (सं. पु.) देव; नायक.
**वृंदावन** (सं. न.) तुळस लावण्यासाठीं बांधलेली उभी कुंडी; कवंडळ.
**वृंदी** (प्रा. स्त्री.) समुदाय.
**वृद्ध** (सं. वि.) म्हातारा, जरठ; वाढलेला.
**वृद्धापकाळ** (पु.) म्हातारपणचा काळ.
**वृद्धावस्था** (सं. स्त्री.) वार्धक्य; म्हातारपण.
**वृद्धि** (सं. स्त्री.) वाढ, आधिक्य; पुएर; व्याकरणांत—अ, इ, (ई), उ, (ऊ) व ऋ, (ॠ) यांचेबद्दल अनुक्रमें आ, ऐ, औ व आर् हे वर्ण येणें.
**वृद्धिंगत** (सं. वि.) वाढत गेलेली. [ नांव.
**वृश्चिक** (सं. पु.) विंचू; एका राशीचें
**वृष** (सं. पु.) बैल.
**वृषण** (सं. न.) अंडकोष. [ दुसरी.
**वृषभ** (सं. पु.) बैल; नंदी; बारा राशींतील
**वृषभध्वज** (सं. पु.) शंकर.
**वृषल** (सं. पु.) शूद्र, चांडाल. [ सोडणें.
**वृषोत्सर्ग** (सं. पु.) मृताप्रीत्यर्थ पोळ
**वृष्टि** (सं. स्त्री.) पर्जन्य; वर्षाव.
**वृष्णिप** (सं. पु.) कृष्ण.
**वृक्ष** (सं. पु.) झाड.
**वृक्षवाटिका** (स्त्री.) बाग, उपवन.
**वृक्षारोपण** (न.) झाडें लावणें.
**वेंउळी** (प्रा. स्त्री.) इंगळी (ज्ञा० १६। २५८–५९).
**वेंकट** (प्रा. वि.) वाकडा.
**वेख** (सं. वेष पु.) पोषाख; रूप.
**वेखंड** (सं. वचाखंड न.) एक औषध.
**वेखसें, वेखासें** (वि.) व्यर्थ, विरुद्ध (ज्ञा० ७।४७, अमृ० २।४७).
**वेंग** (स्त्री.) दोन्ही हातांची कव, कवळी.
**वेग** (सं. पु.) जोराची गति; घाई; त्वरा, आवेश; जोर, उत्साह; पेटका; उमाळा.
**वेंगडणें** (प्रा. क्रि.) याचनेसाठीं (तोंड) वाकडें करणें; आकुंचित होणें (दा० १।५।३०).[(१०); घावरगुंडी; गठडी.
**वेंगडी** (प्रा. स्त्री.) वक्रगति (दा. १।५।
**वेगवंत, वेगवान्** (सं. वि.) चपळ; वेगानें जाणारा.
**वेंगणें** (क्रि.) चढणें.
**वेगळा** (सं. विगल् वि.) निराळा; पृथक्.
**वेगळीक** (स्त्री.) भेद, वेगळें काढणें.
**वेंगाटी** (स्त्री.) वेग पहा.
**वेंगाडें** (प्रा. वि.) वेगवान् (हरि० २२।७३). (अ.) लवकर (भा० ६।३०९).
**वेगाळ** (प्रा. वि.) वेगवान्.
**वेंगाळणें** (क्रि.) आलिंगणें, मिठी मारणें.
**वेगीं** (अ.) त्वरेनें. [ १३।२७१).
**वेगु** (सं. पु.) वेग, त्वरा; दूषण (ज्ञा०
**वेंघणें** (प्रा. क्रि.) चढणें.
**वेच, वेचु** (प्रा. पु.) खर्च, क्षय.
**वेचक** (वि.) निवडक; खर्चिक.
**वेचकुली** (स्त्री.) वाकुली.
**वेचणी** (स्त्री.) लहान टोपली.
**वेंचणें** (क्रि.) खर्चणें.
**वेंचणें** (क्रि.) निवडून घेणें, उचलून घेणें. गोळा करणें. [ प्रकार.
**वेंचवी, वेंचवीग** (स्त्री.) खरजेचा एक
**वेंचा** (पु.) निवडक भाग; उतारा.
**वेज, वेझ, वेझें** (सं. वेध न.) छिद्र.
**वेझपट्टी** (स्त्री.) सूत ओढण्याचीं भोकें असलेली पट्टी; जंतरपट्टी.
**वेंट** (प्रा. स्त्री.) दोरी; पीळ; गुंडाळी. **वेंट वळणें**–गर्दी करणें.

**वेटणें, वेंटणें** (न.), **वेंटली, वेंटळी** (स्त्री.) पीळ घातलेली गवताची दोरी; पेंढी; वेंटाळें. [ पीळ घालणें.
**वेटणें** (क्रि.) कणसें, फुलें इ० तोडणें;
**वेटविणें** (सं. विडंवन क्रि.) चेष्टा करणें; वाकुल्या दाखविणें.
**वेटावण्या** (स्त्री. अने.) वाकुल्या.
**वेटाळ** (पु.) पेठ; मोहल्ला. **वे० संबंध** (पु.)—शेजारसंबंध.
**वेटाळणी** (स्त्री.) पेंढी बांधणें.
**वेटाळणें**(प्रा.क्रि.)गोळा करणें (ज्ञा०१६। २९९); मुरडणें; वेष्टणें; गर्दी करणें.
**वेटाळा** (पु.), **–ळी** (स्त्री.), **–ळें** (न.) गुंडाळी; वर्तुळ, वेढा, घेरा. [ दोरी.
**वेटी** (स्त्री.) गवताला पीळ घालून केलेली
**वेठ** (सं. विष्टि स्त्री.) विगार. **वेठीचें करणें**—वरवर कसें तरी निष्काळजी-पणानें केलेलें काम. [ हमाल.
**वेठकरी** (पु.) विगारीस धरलेला मनुष्य,
**वेठणें**(क्रि.)बांधणें, वेष्टणें(भा० १।४७).
**वेठबिगार** (स्त्री.),**वेठविरला** (पु.स्त्री.) विगार.
**वेठी** (स्त्री.) वळीव दोरी.
**वेड** (स्त्री.) मेंदूचा विकार व त्याचा परि-णाम; खूळ, मूर्खपणा; अतिशय आसक्ति. **वेड घेऊन पेडगांवास जाणें**—वेड्याचें सोंग घेऊन स्वतःचा मतलव साधणें; **वेड पांघरणें**—मुद्दाम वेड्या-सारखें करणें; **वेड लागणें**—भ्रम होणें; छंद लागणें. [ गणण्यासारखा.
**वेडगळ** (वि.) खुळचट; वेडसर, वेड्यांत
**वेडझवा** (वि.) व्यवहारज्ञानशून्य; भ्रमांत पडलेला, गोंधळलेला; मूर्ख व अडाणी.
**वेडथर, वेडदुल्ली, वेडपा** (वि.) वेडा, छांदिष्ट.
**वेडबंबू** (वि.) वेडा, मूर्ख.
**वेडामधुरा** (पु.) एक प्रकारचा दोषिक ताप.
**वेडसर** (वि.) कांहींसा वेडा; खुळचट.
**वेडा, वेडया** (सं.एडक वि.) वेड लागलेला; खुळा, भ्रमिष्ठ.
**वेडखुळा, वेडापिसा, वेडापीर** (पु.) वेडगळ,छांदिष्ठ मनुष्य.
**वेडावणें** (क्रि.) वाकुल्या दाखविणें.
**वेडाविद्रा** (वि.) कुरूप.
**वेडीव** (प्रा. स्त्री. न.) वेडेपणा.
**वेडेचार** (पु. अने.) वेडेपणाचीं कृत्यें.
**वेडेंपीक** (न.) मशागतीवांचून पुष्कळ येणारें पीक; आलें तर अतिशय, नाहीं तर मुळींच नाहीं असें पीक.
**वेडयांचा बाजार** विचार न करतां एकाद्या गोष्टीच्या नादीं लागणाऱ्या लोकांचा जमाव.
**वेढणें** (सं. वेष्टनम् क्रि.) घेरणें; शरिरा-भोंवतीं गुंडाळणें, नेसणें. [ वळसा.
**वेढा** (पु.) गराडा; चक्कर; फेरा; मात्रेचा
**वेढें** (न.) वळें, आंगठी. [ दुःख.
**वेण, वेणा** (स्त्री.) प्रसूतिवेदना; वेदना;
**वेणी** (स्त्री.) केसांच्या पेडांची विशेष प्रकारची रचना किंवा बांधणी.
**वेणीदान** (न.) प्रयाग क्षेत्रांत सुवासिनीनें आपल्या वेणीचीं दोन बोटें लांबीचीं टोकें कापून त्रिवेणीस करावयाचें दान.
**वेणीफणी** (स्त्री.) वेणी घालणें, काजळ कुंकूं करणें वगैरे कामें. [ किंवा पावा.
**वेणु** (सं. पु.) वेळू; वांबूची केलेली मुरली
**वेत** (सं. वेतस पु.) बोरूच्या जातीची एक वनस्पति; तिची छडी; (न.) विण्याची खेप; वीण.
**वेतंड** (प्रा. पु.) हत्ती.
**वेतन** (सं. न.) पगार, नेमणूक.
**वेतस** (पु.) वेत; चाबूक.
**वेतसवृत्ति** (स्त्री.) वारा वाहील तशी त्याला पाठ देणें; नम्र वृत्ति.
**वेवाटी** (स्त्री.) वेताची छडी.
**वेतारी** (पु.) मामलेदार; चोपदार (तुका० ४३५४).
**वेताळ** (सं. वेताल पु.) भुतांचा राजा. **वे० पूर्व स्थळीं येणें**—चौदावें रत्न दाखविल्यावर बिथरलेल्या मनुष्यानें वठणीवर येणें.
**वेत्ता** (सं. पु.) ज्ञाता; जाणता.
**वेत्र** (सं. न.) वेत, वेताची छडी.
**वेत्रधर, वेत्रधारि, वेत्रपाणि** (सं. पु.) भालदार, चोपदार.

कृष्ण वाचनालय, सातारा



**वेत्रवती** (स्त्री.) स्त्रीद्वारपाल.
**वेत्रासन** (सं. न.) वेताचो बैठक.
**वेद** (सं. पु.) श्रुति; धर्म; ब्रह्मप्रतिपादक मंत्र, ब्राह्मणात्मक ग्रंथ; ज्ञान.
**वेदकु** (प्रा. पु.) जाणणारा. [ हीं तीन.
**वेदत्रयी** (सं. स्त्री.) धर्म, अर्थ व काम
**वेदना** (सं. स्त्री.) कळ, यातना, दुःख.
**वेदमूर्ति** (सं. स्त्री.) विद्वान् भिक्षुक, शास्त्री इ० च्या नांवामागें लावण्याची सन्मानप्रदर्शक पदवी. [ १५।५५७).
**वेदलोक** (सं. पु.) वेद आणि शास्त्र (ज्ञा०
**वेदवती** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**वेदवाक्य** (न.) ज्याच्या प्रामाण्याला निराळा आधार लागत नाहीं असें वाक्य.
**वेदवाचा** (सं. स्त्री.) सरस्वती.
**वेदशास्त्रसंपन्न** (सं. वि.) वेदमूर्ति पहा.
**वेदांग** (सं. न.) शिक्षा, कल्प, व्याकरण, छंदस्, ज्योतिष व निरुक्त यांतलें प्रत्येक.
**वेदांत** (सं. पु.) ब्रह्म हेंच सत्य आहे जग हें मिथ्या आहे, असें सांगून ईश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाचें निरूपण करणारें उपनिषद् ग्रंथांत प्रतिपादिलेलें मत; अद्वैतमत; शास्त्रप्रतीति.
**वेदांती** (सं. पु.) वेदांताचे मताचा मनुष्य.
**वेदि, वेदिका** (स्त्री.) उंच आसन, ओटा.
**वेदोक्त** (सं. वि.) वेदमंत्रोच्चारपूर्वक.
**वेदोनारायण** (सं. पु.) सन्मान्य वैदिक ब्राह्मण.
**वेद्य** (सं. वि.) जाणण्यास योग्य.
**वेध** (सं. पु.) छंद; पुढें करण्याच्या गोष्टीचें आधीं लागलेलें व्यवधान; ज्योतिषांत —सूर्यग्रहणापूर्वी चार प्रहर आणि चंद्र ग्रहणापूर्वी तीन प्रहर अशी असलेली ग्रहणासंबंधीं धर्मदोषाची व्याप्ति; ग्रहाचें स्थान, ग्रहण, तिथि इ. संबंधाचा निर्णय; छिद्र; विरोध; काळजी; बाण वगैरेचा नेम; लक्ष्य; सूक्ष्म अवलोकन.
**वेधक** (वि.) भोक पाडणारा; आकर्षक. **मनोवेधक** (वि.)—चित्ताकर्षक.
**वेधणें** (क्रि.) भोक पाडणें; टक लावणें; आकर्षलें जाणें; ओढणें; (प्रा.) चिकटणें (विवेक पृ० १।७४).
**वेधशाला** (सं. स्त्री.) ग्रहांचे वेध घेण्यासाठीं उपकरणांनीं सज्जित केलेलें सोयीचें स्थान.
**वेंधळा** (वि.) वावळट.
**वेधा** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**वेपथणें** (क्रि.) चळवळां कापणें.
**वेमा** (सं. पु.) कोष्ट्याचा भाग; मागावर ताणा दाबून बसविण्याचें साधन, फणी.
**वेरजार, वेरझार** (स्त्री.) खेप, येरझार.
**वेरीं, वेऱ्ही** (अ.) पर्यंत, पावेतों.
**वेल** (सं. वल्लि स्त्री.) लता, वल्ली; मर्यादा (भा० ८।४४).
**वेलची** (स्त्री.) वेलदोडा.
**वेलदोडा** (पु.) वेलची. [ नक्षी.
**वेलपत्ती, वेलबुट्टी** (स्त्री.) वेल, पानें यांची
**वेलबुटी, वेलबुट्टी** (स्त्री.) वेली वगैरेंचीं काढलेलीं चित्रें, नक्षीकाम. [ १६।३६७).
**वेलरी** (सं. वल्लरी स्त्री.) वेल (ज्ञा०
**वेलवटी** (प्रा. स्त्री.) कृपण (भा० ९।४२४).
**वेलविस्तार** (पु.) वंश वाढणें.
**वेला** (सं. स्त्री.) वेळ; समुद्राची भरती; भरतीचें पाणी चढण्याची हद्द; किनारा.
**वेलांटी, वेलांटी** (स्त्री.) इ व ई या स्वरांचा व्यंजनाशीं संयोग होतांना या स्वरांबद्दल अनुक्रमें ि व ी अशीं येणारीं चिन्हें. [ १५।२८१).
**वेलांडी** (प्रा. स्त्री.) वृद्धि, विस्तार (ज्ञा०
**वेलावणें, वेल्हावणें** (प्रा. क्रि.) सुखावणें, भोगणें.
**वेल्हावणी** (स्त्री.) विस्तार, पाल्हाळ.
**वेलिंगणें** (प्रा. क्रि.) वाढणें (भा० २६। २५०). [सांगणारा.
**वेलिस्तदार** (फा. पु.) हक्कदार, दावा
**वेली** (स्त्री.) वेल.
**वेल्हाळ** (सं. वेल्लहल वि.) परम प्रीतिपात्र; सुंदर; सविस्तर; (पु.) प्राणप्रिय, भ्रतार; (स्त्री.) प्राणप्रिया; (निंदेनें स्त्री.) गप्पाष्टक झोडणारी स्त्री; (प्रा. पु.) पाल्हाळ, अतिशयोक्ति.
**वेवतणें, वेवंतणें** (क्रि.) वेष्टणें, त्रास देणें.
**वेवसाव** (सं. व्यवसाय पु.) कामधंदा.
**वेवादणें** (सं. विवद् क्रि.) वादविवाद करणें.

**वेव्हार** (सं. व्यवहार पु.) परस्परांमधील देवघेव; व्यापार; क्रिया; लोकरीति.
**वेव्हारा,वेव्हारी** (प्रा. पु.) सावकार; व्यापारी (ज्ञा० १४।१६).
**वेश** (सं. वेष पु.) सोंग; पोषाख.
**वेशभषा** (सं. स्त्री.) पोषाख व अलंकार; थाटमाट.
**वेशस्त्री** (सं. स्त्री.) वेश्या.
**वेश्म** (सं. न.) गृह.
**वेश्या** (सं. स्त्री.) कलावंतीण, कसबीण.
**वेश्यागमन** (न.) बाहेरख्यालीपणा.
**वेश्याव्यवसाय** (पु.) शरीरविक्रयाचा धंदा.
**वेष** (सं. पु.) वेश पहा.
**वेषधारी** (सं. पु.) सोंगाड्या.
**वेष्टण** (सं. वेष्टन न.) आवरण, गुंडाळण्याचें वस्त्र इ.
**वेष्टणें** (क्रि.) गुंडाळणें, वेढणें.
**वेष्टित** (सं. वि.) वेढलेला.
**वेस** (स्त्री.) गांवकुसवाचा मोठा दरवाजा; घराचें मोठें दार.
**वेसकर, वेसकरी** (पु.) वेशीचा रक्षक; पाटलाचा हरकाम्या नोकर; महार.
**वेसण** (सं. व्यसन स्त्री.) बैलाच्या नाकांतली दोरी.
**वेसवा** (सं. वेश्या स्त्री.) कसबीण.
**वेसवाटी** (पु.) घराचा द्वारपाल; भूतपिशाचांचा प्रवेश घरांत न होऊं देणारी देवता. [केलेलें कूट.
**वेसवार** (पु.) मोहऱ्या, हळद, इ. वाटून
**वेहेळा** (पु.) ओहोळ.
**वेळ** (सं. वेला पु. स्त्री.) काळ; अवकाश; उशीर, विलंब; प्रसंग; संधि.
**वेळअवेळ** (स्त्री.) योग्य वेळ किंवा अयोग्य वेळ.
**वेळण** (प्रा. स्त्री.) पेज.
**वेळणी** (स्त्री.) वाढणी; एक भांडें.
**वेळणें** (क्रि.) गाळणें; हलविणें.
**वेळप्रसंग** (पु.) वेळअवेळ.
**वेळेनुसार, वेळनुसार** (अ.) जशी वेळ असेल त्यासारखें; वेळप्रसंगीं.
**वेळा** (सं. एला स्त्री.) वेलची; समुद्रकिनारा; (प्रा.) कैवारी (ना०६५६).
**वेळाईत** (प्रा. पु.) आणीबाणीच्या वेळीं मदत करणारा (तुका० १०३७); कैवारी (विवेक० २।९।२३).
**वेळाउळ** (प्रा.न.) घर (ज्ञा० १३।३१२).
**वेळापत्रक** (न.) कामाची वेळ दाखविणारा तक्ता.
**वेळावणें, वेळणें, वेळविणें** (सं. क्रि.) सैल सोडून हलविणें (मान, डोकें इ.).
**वेळिलवाणें** (प्रा. वि.) दीनवाणें (दा० १४।१।५४).
**वेळू** (सं. वेणु पु.) वांबू, कळक.
**वेळेवारी** (अ.) योग्य वेळीं.
**वेळोवेळीं** (अ.) वारंवार. [तालची वही.
**वैं** (स्त्री.) कुंप, वई; बहुल्याच्या भोंव-
**वैकल्पिक** (सं. वि.) ऐच्छिक; हें किंवा तें असें अनिश्चित.
**वैकल्य** (सं. न.) व्यंग; उणें; असमर्थता.
**वैक्लव्य** (न.) दुःख.
**वैकुंठ** (सं. पु.) विष्णुलोक.
**वैकुंठचतुर्दशी** (सं.स्त्री.) कार्तिक शु० १४.
**वैकुंठवासी** (वि.) विष्णूचें नांव; मरण पावलेल्या विष्णुभक्तासंबंधीं हें योजतात.
**वैखरी** (सं. स्त्री.) स्पष्ट वाणी, भाषण.
**वैगुण्य** (सं. न.) व्यंग, उणीव.
**वैचणें, वेंचणें** (सं. विवेचन क्रि.) सूप कांहीं विशिष्ट प्रकारें हलवून त्यांतले दाणे, खडे, माती इ० पासून निराळे करणें.
**वैचक्षण्य** (सं. न.) विचक्षणता, नैपुण्य.
**वैचित्र्य** (सं. न.) विविधता, आश्चर्य.
**वैजयंती** (सं. स्त्री.) विष्णूच्या गळयांतली माळ; पताका, ध्वजा.
**वैडूर्य** (सं. न.) एका रत्नाचें नांव.
**वैतरणी** (सं. स्त्री.) यमलोकचीं नदी.
**वैताग** (सं. वै + त्याग पु.) संतापजन्य विरक्ति.
**वैतालिक** (सं. पु.) प्रातःकाळीं स्तुतिपाठ म्हणून राजाला जागें करणारा.
**वैदर्भी** (स्त्री.) काव्यरचनेची एक विशेष रीति. हींत लांब समास कमी असतात.
**वैदिक** (सं. वि.) वेदविहित; (पु.) वेद पढलेला.

**वैदिकी** (सं.स्त्री.) वैदिक ब्राह्मणाचा धंदा.
**वैदू** (तेलगू वैदू सं. वैद्य पु.) जडीबुटीचीं औषधें देणारा अपढिक वैद्य.
**वैदूर्य** (सं. न.) एक रत्न.
**वैदेही** (सं. स्त्री.) सीता. [असलेला, हकीम.
**वैद्य** (सं. पु.) रोगोपचारांची माहिती
**वैद्यक** (सं. न.) वैद्यशास्त्र.
**वैध** (सं. वि.) विधीसंबंधीं.
**वैधव्य** (सं. न.) विधवापण. [नांव.
**वैधृति** (सं. स्त्री.) एका अशुभ योगाचें
**वैनतेय** (सं. पु.) गरुड. [उलटेपणा.
**वैपरीत्य** (सं. न.) विरुद्धता, विपर्यय,
**वैपुल्य** (सं. न.) सुकाळ, समृद्धि.
**वैफल्य** (सं. न.) निष्फळता.
**वैभव** (सं. न.) ऐश्वर्य; सामर्थ्य.
**वैमनस्य** (सं. न.) वैर, शत्रुत्व.
**वैमात्रेय** (सं. वि.) सावत्र.
**वैमानिक** (सं. पु.) विमानांतून फिरणारा.
**वैयर्थ्य** (सं. न.) व्यर्थपणा.
**वैयाकरण, वैयाकरणी** (सं. पु.) व्याकरण-शास्त्रवेत्ता. [सूड घेणें.
**वैर** (सं. न.) शत्रुत्व. **वैर उगविणें**—
**वैरण** (स्त्री.) गुरांना घालावयाचें गवत, कडबा इ.; दळतांना जात्याच्या पाळीस घालण्याचें धान्य; (प्रा.) पांघरूण (मुक्ते० सभा० १०।९).
**वैरणें** (क्रि.) आधणाच्या पाण्यांत तांदूळ वगैरे ओतणें; जात्यांत धान्य घालणें; (प्रा.) खर्च करणें.
**वैरभाव** (सं. पु.) द्वेष.
**वैरल्य** (सं. न.) विरळपणा, दुर्भिक्ष.
**वैरस्य** (सं. न.) नीरसता; रसहीनता.
**वैरा** (पु.) रोजच्या खर्चासाठीं लागणारा शिधा.
**वैराकार** (सं. पु.) द्वेष (नाम० ४०६).
**वैरागर** (सं. वज्राकर पु.) हिऱ्यांची खाण; (प्रा. न.) दुकान. [अनासक्ति.
**वैराग्य** (सं. न.) विरक्तपणा, प्रपंचाबद्दल
**वैरागी** (सं. पु.) संन्यासी; साधु.
**वैराण** (वि.) ओसाड.
**वैरिणी** (सं. स्त्री.) द्वेष करणारी (स्त्री).
**वैरी** (सं. पु.) शत्रु.
**वैरोद्धार** (सं. पु.) सूड उगवणें.
**वैल** (पु. न.) शिजवलेला पदार्थ गरम राहण्यासाठीं चुलीच्या आश्रयानें तो ठेवण्याकरितां केलेली सोय; अवेल.
**वैलक्षण्य** (सं. न.) विचित्रता, भिन्नता.
**वैलाटी** (स्त्री.) वरचा प्रांत. [शनि.
**वैवस्वत** (सं. पु.) सातवा मनु; यम;
**वैवाहिक** (सं. पु.) विवाहासंबंधीं.
**वैशाख** (सं. पु.) हिंदु वर्षाचा दुसरा महिना.
**वैशिष्ट्य** (सं. पु.) भिन्नता, फरक.
**वैशेषिक** (सं. वि.) अतिशय; (न.) षड्दर्शनांपैकीं एक (कणादमत).
**वैश्य** (सं. पु.) वाणी, व्यापारी.
**वैश्रवण** (सं. पु.) कुबेर. [देण्याचा बलि.
**वैश्वदेव** (सं. पु.) गृहस्थानें अग्नीला नित्य
**वैश्वानर** (सं. पु.) अग्नि.
**वैषम्य** (सं. पु.) भिन्नपणा; द्वैत; वितुष्ट.
**वैषयिक** (वि.) विषयासंबंधीं.
**वैष्णव** (सं. पु.) विष्णुभक्त.
**वैसा** वायसा पहा.
**वो** (संबो. अ.) अहो.
**वोइरणें** (प्रा. क्रि.) घालणें; पुढें ठेवणें.
**वोक** (प्रा. पु.) वमन, ओकारा.
**वोकारणें** (प्रा. क्रि.) उकरणें.
**वोख** (प्रा. वि.) वाईट.
**वोखट, वोखटें** (प्रा. वि.) वाईट.
**वोखद** (न.) औषध.
**वोगर** (प्रा. पु.) वाढपी.
**वोगरणें** (प्रा. क्रि.) वाढणें (भोजनाचे पदार्थ); अर्पण करणें (तुका० ३५५३).
**वोंगळ** (वि.) अमंगळ.
**वोघरणी** (प्रा. स्त्री.) फोडणी.
**वोज** (प्रा. पु.) ओज; चांगुलपणा, शुद्धता (तुका० ३०१८); रीत (ना० ५६४).
**वोजा** (प्रा. पु.) चांगुलपणा (सोहि० अ-द्वया० ३); (अ.) खरें; चांगल्या रीतीनें; सहज.
**वोजावणी** (प्रा. स्त्री.) रीति.
**वोजावणें** (प्रा. क्रि.) सावरणें; शिकविणें.
**वोजी** (प्रा. स्त्री.) वर्तणूक, रीत.
**वोजें** (अ.) योग्य रीतीनें; (वि.) शुद्ध.
**वोझें** (न.) ओझें, भार.

वोटंगण (प्रा. न.) गिर्दी, तक्क्या.
वोठंगणा (प्रा. पु.) लोड, तक्क्या (शुभा० उद्योग० ५।४८).
वोठंगणें (प्रा. क्रि.) आश्रय करणें; टेकणें.
वोठशो (प्रा. पु.) आदरसत्कार.
वोडउ (प्रा. पु.) आदर. [४६००).
वोडगस्तपणा (प्रा. न.) ओढाताण (वाक्य०
वोडण (प्रा. न.) ढाल (रुक्मि० ८।४०).
वोडंबर (सं. आडंबर न.) दंभ, ढोंग.
वोडंबरी (प्रा. पु.) गारुडी; (स्त्री.) गारुडी विद्या.
वोडंबा (प्रा. स्त्री.) गडबड, गलबला.
वोडव, वोडवा (प्रा. स्त्री.) योग्यता.
वोडवणें (प्रा. क्रि.) प्राप्त होणें (ज्ञा० १६।६२); पुढें करणें (ज्ञा० ९।१५).
वोढक (प्रा. वि.) ओढणारा; आग्रही; द्वाड.
वोढंगा (प्रा. पु.) उशी, गिर्दी.
वोढण (प्रा. स्त्री. न.) ढाल.
वोढणें (प्रा. क्रि.) अंगावर घेणें, पांघरणें.
वोढवारा, वोढावारा (प्रा. पु.) प्रतिबंध.
वोढाळणें (क्रि.) भटकणें. [(वि.) वाहणारी.
वोढी (प्रा. स्त्री.) उणेंपण; प्रयास; स्नेह;
वोडें (प्रा. न.) उसनें.
वोणगा (पु.) वणवा.
वोत (प्रा. पु. स्त्री.) ओहटी; नदीचें पात्र; प्रवाह (ज्ञा० १८।५५५).
वोतटो (प्रा. स्त्री.) परिचय, संघट्टन.
वोतपलो (प्रा. स्त्री.) कोंवळें ऊन.
वोथंबा (प्रा. पु.) ओळंबा; आश्रय.
वोथर (प्रा. पु.) पडसाद.
वोथरणें (प्रा. क्रि.) घाबरणें; प्रतिध्वनि करणें (ना० पृ० ३६३).
वोथरा (प्रा. पु.) झोपेंत ओरडणें. [रणें.
वोथिजणें (प्रा. क्रि.) पातळ करणें; विस्ता-
वोनें (प्रा. न.) वोडण, नैवेद्य.
वोप (प्रा. न.) तेज, मुलामा.
वोपणें (प्रा. क्रि.) देणें; विकणें.
वोपसरा, वोपसारा, वोपसिरा (प्रा. पु.) रत्नाचें तेज खुलून दिसावें म्हणून त्याखालीं घालतात तो (ज्ञा० १५।७६).
वोपावोपि (प्रा. वि.) देण्याघेण्यासंबंधीं.
वोभण, वोभाण (प्रा. पु.) पूर, वेग.
वोभाण (प्रा. न.) वेग; (क्रि.) वेगानें वाहणें.
वोमथणें (प्रा. क्रि.) उमटणें; उगवणें; लोंवणें.
वोमाय (सं. वधूमाय स्त्री.) नवऱ्या मुलीची आई. [दगड.
वोरकल, वोरकली (स्त्री.) कसोटीचा
वोरढाणी, वर्ढाणी (प्रा. स्त्री.) दुर्गंधी.
वोरप (प्रा. स्त्री.) इच्छा; भुरका.
वोरवारी (स्त्री.), वोरवारें (न.) अपेक्षा; खटपट (अमृ० ६।३६).
वोरस (प्रा. पु.) पान्हा, स्नेहाचा भर.
वोरसणें (प्रा. क्रि.) पान्हा सोडणें.
वोरसें (प्रा. न.) पान्हा; प्रीति.
वोरें (प्रा. न.) प्रत्येक दिवसाकरितां त्या दिवसापुरती काढून ठेविलेली धान्याची सामग्री. [ओलावा.
वोल (प्रा. स्त्री.) हडप, तारण, ऐवज;
वोळंबें (न.), वोंलिबा (स्त्री.) वाळवी; मुंग्या. [८।१४४).
वोलिवटा (प्रा. स्त्री.) वाहती वाट (ज्ञा०
वोली (प्रा. स्त्री.) गहाण.
वोल्हाटणें (प्रा. क्रि.) परतविणें; हांकणें.
वोल्हावणें (प्रा. क्रि.) ओलें करणें, शांत करणें. [उल्लास.
वोल्हासा, वोल्हासु (प्रा. पु.) ओलावा;
वोवणी (प्रा. स्त्री.) ओंवलेली माळ.
वोवरा, वोवरी (प्रा. स्त्री.) ओवरी; एकांत जागा.
वोवसा (प्रा. पु.) व्रत, नियम.
वोवसी (प्रा. पु.) व्रत करणारा [पाडणें.
वोवांडणें (प्रा. क्रि.) ओलांडणें; पडणें;
वोंवारा (प्रा. पु.) आळा, मर्यादा.
वोवी (प्रा. स्त्री.) बंध. [तोटा.
वोस (प्रा. वि.) व्यर्थ, निरर्थक; (पु.)
वोसंग (सं. उत्संग पु.) मांडी.
वोसंडणें (प्रा. क्रि.) टाकणें; भरून वाहणें. [क्षीण होणें.
वोसणणें (प्रा. पु.) वरळणें (१०।३१२);
वोसणता (प्रा. वि.) झोपेंत वरळणारा.
वोसणें (प्रा. न.) पुरांत वाहून येणारी लाकडें वगैरे.

नगर वाचनालय

**वोसंतणें** (प्रा. क्रि.) आचरणें; मागें टाकणें; भोगून टाकणें.
**वोसन** (प्रा. वि.) फुकट. [होणें.
**वोसपणें** (प्रा. क्रि.) कंटाळणें; भयभीत
**वोसर** (प्रा. पु.) ओहोट.
**वोसरणें** (प्रा. क्रि.) ओसरणें; कमी होणें.
**वोसल, वोसळ, वोसाळ** (प्रा. वि) शून्य.
**वोसळणें** (प्रा. क्रि.) बरळणें.
**वोसाडा** (प्रा. पु.) शितोडा (भा० ११।१५).
**वोसाण** (प्रा. न.) ढीग; पुरांतलीं लाकडें वगैरे (ज्ञा० ७।७३).
**वोसारा, वोसरा** (प्रा. पु.) न्यूनता.
**वोसावणें** (प्रा. क्रि.) गळून जाणें; उदास होणें; अपूर्ण होणें.
**वोसिंगा** (सं. उत्संग पु.) मांडी.
**वोसिवा** (प्रा. पु.) न्यूनता.
**वोह** (सं. ऊध न.) ओटी, कांस (मुक्ते० वन० १२।६७).
**वोहटणें** (प्रा. क्रि.) आकर्षणें.
**वोहर** (सं. वधूवर न.) दांपत्य, मेहूण.
**वोहरणें** (प्रा. क्रि.) संपणें.
**वोहरी** (प्रा. स्त्री.) शून्य, पोकळ जागा.
**वोहळणें** (प्रा. क्रि.) वाहून जाणें.
**वोहा** (सं. ऊध स्त्री.) कास (अमृ० ७।६३).
**वोहोळ** (प्रा. पु.) ओहोळ.
**वोळग** (प्रा. स्त्री.) सेवा (ना० २८३).
**वोळंग** (स्त्री.) सभा; बैठक.
**वोळगण** (प्रा. स्त्री.) प्राप्ति; सेवा.
**वोळगणा, वोळंगणा** (प्रा. पु.) दास, सेवक, आश्रय करणारा. [सेवा करणें.
**वोळंगणें** (प्रा. क्रि.) धरणें; संचार करणें;
**वोळगा** (प्रा. पु.) दास, सेवक.
**वोळगी** (स्त्री.) वोळगें; (न.) सेवा.
**वोळघणें, वोळंघणें** (सं. उल्लंघ् क्रि.) चढणें, उल्लंघणें.
**वोळणें** (प्रा. क्रि.) वळणें, प्राप्त होणें; दिशा बदलून जवळ येणें (एक० १८७८); शमणें (भा० १०।११); तिरस्कारणें.
**वोळंब** (प्रा. पु.) सोंग, विष; कौतुक.
**वोळंबा** (प्रा. पु.) वाळवी (ज्ञा० ८।८९); मुंगी (ज्ञा० १८।६०९); वारूळ.
**वोळसा** (पु.) फेरा, गर्दी; समुदाय.
**वोळा** (प्रा. पु.) मेघ.
**वोळिंग** (प्रा. पु.) आश्रय.
**व्यंकट** (सं. वि.) वाकडा.
**व्यंकटी** (स्त्री.) वक्रता.
**व्यंकटेश, व्यंकोबा** (पु.) कृष्णाचा एक अवतार समजून कर्नाटकांत पूजिला जाणारा एक देव.
**व्यक्त** (सं. वि.) स्पष्ट; ज्ञात.
**व्यक्ति** (सं. स्त्री.) आकार, प्रकृति, स्पष्टता; प्राणी; मनुष्य; विचित्र माणूस.
**व्यक्तिदर्शन** (न.) लिखाणांतून साकार दाखविलेली मूर्ति.
**व्यक्तिमत्व** (न.) वैशिष्ट्यामुळें होणारें व्यक्तीचें स्वतंत्र दर्शन.
**व्यक्तिवाद** (पु.) व्यक्तीच्या सुखदुःखास महत्त्व देणारा विचार.
**व्यक्तिवैशिष्ट्य** (न.) व्यक्तीच्या ठिकाणीं असणारा विशेष गुण.
**व्यक्तिस्वातंत्र्य** (न.) व्यक्तीला आपल्या मनाप्रमाणें वागण्याची मोकळीक.
**व्यक्तीकरण** (न.) प्रकटीकरण; स्पष्टीकरण.
**व्यंग** (सं. न.) उणेंपण, न्यून, पंगुता; अंगावरचा तीळ; (वि.) पंगु.
**व्यंगचित्र** (न.) थोड्या रेषांनीं मूळ वस्तूचें विनोदी वैशिष्ट्य दाखविणारें चित्र; टीकात्मक चित्र. (इं. कार्टून).
**व्यंग्य** (सं. वि.) सुचविलेला; गर्भित; (न.) गर्भित अर्थ.
**व्यंग्योक्ति** (सं. स्त्री.) वर्मी भाषण.
**व्यग्र** (सं. वि.) गोंधळलेला; व्यापृत, गर्क झालेला.
**व्यंजक** (सं. वि.) दर्शक, सूचक.
**व्यजन** (सं. न.) पंखा.
**व्यंजन** (सं. न.) व्याकरणांत स्वतंत्रपणें म्हणजे दुसऱ्या वर्णांच्या साह्यावांचून ज्याचा उच्चार पूर्ण होत नाहीं असा वर्ण; खूण; चटणी इ. तोंडीं लावणें.
**व्यंजना** (सं. स्त्री.) गर्भितार्थ; व्याजोक्ति.
**व्यतिक्रम** (सं. पु.) विपर्यय, उलटपणा; उद्दामपणा. [(अ.) शिवाय.
**व्यतिरिक्त** (सं. वि.) भिन्न, निराळा;

**व्यतिरेक** (सं. पु.) भेद, वेगळेपणा; अव्याप्ति; अभाव; अपवाद;. ताण करणें; एक काव्यालंकार.
**व्यतिपात, व्यतीपात** (सं. पु.) ज्योतिषशास्त्रांत—चंद्र आणि सूर्य यांची क्रांति समान होणें; १७ वा योग; अप-शकुन, उत्पात; द्वाड मनुष्य.
**व्यत्यय** (सं. पु.) अडथळा, प्रतिबंध.
**व्यत्यास** (सं. पु.) व्यतिक्रम, विपर्यय, विपरीतपणा.
**व्यथा** (सं. पु.) पीडा, दुःख, रोग.
**व्यथित** (सं. वि.) पीडलेला, दुःखी.
**व्यपदेश** (सं. पु.) निमित्त, सबब; कपट.
**व्यपाय** (सं. पु.) नाश. [ ३।२३३).
**व्यभिचरणें** (क्रि.) सोडून जाणें (ज्ञा०
**व्यभिचार** (सं. पु.) एकनिष्ठ नसणें; उल्लंघन; परस्त्रीगमन किंवा परपुरुषगमन; दुराचार.
**व्यभिचारिणी** (सं. स्त्री.) परपुरुषाकडे जाणारी स्त्री, कुलटा.
**व्यभिचारी भाव** (सं. पु.) साहित्यशास्त्रांत रसाच्या उत्पत्तीस सहायकारी जो भाव तो.
**व्यभिचारी** (सं. वि.) जारकर्मी.
**व्यय** (सं. पु.) खर्च, वेच. [ निरर्थक.
**व्यर्थ** (सं. वि.) निरुपयोगी, रिकामा,
**व्यवच्छिन्न** (सं. वि.) निराळा; वेगळा.
**व्यवच्छेद** (सं. पु.) निराळा; अपवाद; पृथःकरण.
**व्यवच्छेदक** (सं. वि.) वेगळा दाखविणारा.
**व्यवधान** (सं. न.) अडथळा; अवकाश; आडपडदा.
**व्यवसा** (प्रा. पु.) व्यवसाय.
**व्यवसाय** (सं. पु.) धंदा, उद्योग; निश्चय; खात्री. - [ निकाल; निर्णय.
**व्यवस्था** (सं. स्त्री.) यथायोग्य योजना;
**व्यवस्थापक** (सं. पु.) नियामक, व्यवस्था लावणारा; कारभारी; मॅनेजर.
**व्यवस्थिणें** (प्रा. क्रि.) नियमानें चालणें.
**व्यवस्थित** (सं. वि.) नीट, योग्य, खरें (ज्ञा० १८।८९५).
**व्यवहार** (सं. पु.) परस्परांमधील देवघेव; व्यापार; कामकाज; धंदा; वर्तन, लोकरीति. [ चोख.
**व्यवहारशुद्ध** (वि.) व्यवहाराच्या दृष्टीनें
**व्यवहारशून्य** (सं. पु.) व्यवहार न जाणणारा, मूर्ख.
**व्यवहारज्ञ** (सं. पु.) व्यवहार जाणणारा, जगांत कसें वागावें तें चांगलें जाणणारा.
**व्यवहारज्ञान** (सं. न.) व्यवहारांतलें शहाणपण, अक्कल.
**व्यवहारी अपूर्णांक** (पु.) अंकगणितांत— ज्या अपूर्णांकाच्या प्रकारांत पाहिजे ती संख्या छेद होऊं शकते तो प्रकार.
**व्यवहार्य** (सं. वि.) आचरणांत आणण्यासारखा.
**व्यवाय** (प्रा. पु.) गृहस्थाश्रम.
**व्यष्टि** (सं. स्त्री.) वेगळेपणा; व्यक्ति; (प्रा.) पिंड; देह.
**व्यसन** (सं. न.) आसक्ति, छंद; नाद, खोड; संकट; आपत्ति. [लागलेला.
**व्यसनी** (सं. वि.) दुराचारी, वाईट नादीं
**व्यस्त** (सं. वि.) उलटें; भिन्न; अंकगणितांत—जेव्हां दोन परिमेयांचा परस्परांशीं असा संबंध असतो कीं त्यांतील एक जसजसें वाढत किंवा कमी होत जातें तसतसें दुसरें अनुक्रमानें कमी होत किंवा वाढत जातें तेव्हां तीं परिमेयें व्यस्त समजलीं जातात.
**व्याकरण** (सं. न.) भाषेच्या व्यवहाराचें नियमन करणारें शास्त्र. [ ग्रस्त.
**व्याकुल. व्याकुळ** (सं. वि.) विव्हळ,
**व्याक्रोश** (सं. पु.) मोठ्यानें आक्रोश; शोक.
**व्याख्या** (सं. स्त्री.) लक्षण, स्पष्टीकरण.
**व्याख्याता** (सं. पु.) व्याख्यान देणारा, वक्ता. [ प्रतिपादन.
**व्याख्यान** (सं. न.) भाषण, विषय-
**व्याघात** (सं. पु.) विघ्न, प्रतिबंध.
**व्याघ्र** (सं. पु.) वाघ.
**व्याघ्रांबर** (सं. न.) वाघाचें कातडें.
**व्याघ्रांबरी** (सं. स्त्री.) एक देवी.
**व्याज** (सं. न.) कपट, निमित्त, सोंग; पैशाची रकम वापरल्याबद्दलचें भाडें; भाडें; (प्रा. न.) मधमाशांच्या मोहोळाचें छिद्र-

**व्याजखाऊ, व्याजखोर** (वि.) फार व्याज घेणारा.
**व्याजनिंदा** (सं. स्त्री.) बाह्यतः दिसायला निंदापर पण वस्तुतः स्तुतिपर असें भाषण; अथवा दिसायला एकाची निंदा केलेली, पण वस्तुतः तिच्यांत दुसऱ्याचीच निंदा गर्भित असते अशी वाक्यरचना (लेकी बोले सुने लागे या म्हणीची सार्थकता दाखविणारें भाषण).
**व्याजबट्टा** (पु.) सावकारी.
**व्याजस्तुति** (सं. स्त्री.) वाक्यांत बाहेरून स्तुति असून आंतून निंदा असते ती.
**व्याजाऊ** (वि.) व्याजानें कर्जाऊ दिलेली.
**व्याजोक्ति** (सं. स्त्री.) कपटी भाषण; मनांतला भाव स्पष्टपणें व्यक्त न करतां निमित्तानें भाषण करून त्यापासून मनांतला खरा भाव सुचविला जावा असें भाषण.
**व्याध** (सं. पु.) पारधी; मृगशीर्ष नक्षत्रामागील तेजस्वी चांदणी.
**व्याधि** (सं. स्त्री.) रोग, आजार.
**व्याधिष्ठ** (वि.) व्याधिग्रस्त.
**व्यान** (सं. पु.) सर्व शरीर व्यापून राहिलेला व सर्व नाड्यांस अन्नरस पोंचविणारा वायु; पंचप्राणांपैकीं एक.
**व्याप** (सं. पु.) व्यवहाराचा पसारा; उपद्व्याप. **व्याप तितका संताप**—जेवढा पसारा अधिक तेवढी जिवाला अधिक काळजी. [ पसरणारा.
**व्यापक, व्यापी** (सं. वि.) व्यापणारा;
**व्यापणें** (सं. व्याप् क्रि.) पसरणें, भरणें.
**व्यापादणें** (क्रि.) नाश करणें.
**व्यापार** (सं. पु.) उद्योग, क्रिया, धंदा; खटपट; वाणिज्य; व्यवहार. [संबंधीं.
**व्यापारी** (सं. पु.) उदमी; (वि.) वाणिज्य-
**व्यापी** (सं. वि.) व्यापणारा; भरलेला.
**व्यापृत** (सं. वि.) भरलेला; गुंतलेला.
**व्याप्त** (सं. वि.) व्यापलेलें, वेष्टित; भरलेलें, पूर्ण.
**व्याप्ति** (सं. स्त्री.) व्यापणें; नित्य साहचर्य; क्षेत्र; सर्वसामान्य नियम.
**व्याप्य** (सं. वि.) अंतर्भाव करण्यासारखें.
**व्याप्यकोटि** (सं. स्त्री.) अंतर्भूत होण्यासारख्या गोष्टींचा नियम.
**व्याम** (सं. पु.) लांबी, वांव.
**व्यामिश्र** (सं. वि.) मिश्र; संकीर्ण. [गोंधळ.
**व्यामोह** (सं. पु.) अज्ञान, भ्रम; चित्ताचा
**व्यायाम** (सं. पु.) कसरत, मेहनत; श्रम.
**व्याल, व्याळ** (सं. पु.) सर्प. [ युक्त.
**व्यावर्तक** (सं. वि.) निराळया लक्षणांनीं
**व्यावर्तन** (सं. न.) फेरा.
**व्यावर्ति** (सं. स्त्री.) अव्याप्ति; पाहिजे त्यापेक्षां कमी अर्थाचें विधान.
**व्यावृत्त** (सं. वि.) अलग; बाहेर टाकलेला.
**व्यावहारिक** (सं. वि.) व्यवहारासंबंधीं.
**व्यावहारिक नाम** लोक शिष्टाचार म्हणून ज्या नांवानें हाक मारतात तें प्रतिष्ठित नांव (जसें —अण्णा, दादासाहेब इ.).
**व्यास** (सं. पु.) भूमितिशास्त्रांत—वर्तुळाच्या मध्यबिंदूतून जाऊन त्याच्या परिघास दोन्ही अंगांनीं मिळणारी सरळ रेषा; विस्तार; पुराणिक; महाभारताचा कर्ता (एक ऋषि).
**व्यासंग** (सं. पु.) अभ्यास; नाद; उद्योग.
**व्यासंगी** (सं. वि.) अभ्यासी, उद्योगी.
**व्यासपीठ** (सं. न.) पुराणिकाचें उंच आसन; उच्चासन. [ गुरुपूजा.
**व्यासपूजा** (सं. स्त्री.) आषाढ शु. १५ ची
**व्याहक** (प्रा. पु. न.) क्रीडा. [ ७।४३).
**व्याहळी** (प्रा. स्त्री.) अरण्य; हद्द (वा०
**व्याहाळ** (न) अरण्य, ओसाड जागा.
**व्याहाळी** (प्रा. स्त्री.) क्रीडा; शिकार.
**व्याही** (सं. विवाही पु.) वधूवरांचे बाप; उभयतांची आप्तमंडळी.
**व्याळ** (सं. व्याल पु.) सर्प.
**व्याळी** (प्रा. स्त्री.) रात्रीचें भोजन.
**व्युत्क्रम** (सं. पु.) उलट क्रम.
**व्युत्पत्ति** (सं. स्त्री.) व्याकरणांत—शब्दांची मूळ उत्पत्ति; विद्वत्ता; प्राविण्य.
**व्युत्पन्न** (सं. वि.) विद्वान्; प्रवीण; व्याकरणांत—साधित (शब्द).
**व्यूह** (सं. पु.) सैन्याच्या रचनेचा प्रकार; मसलत, विभू; बालंट, कारस्थान.
**व्योम** (सं. न.) आकाश.

**व्योमकेश** (सं. पु.) श्रीशंकर.
**व्योमगंगा** (स्त्री.) आकाशगंगा.
**व्रज** (सं. पु.) समुदाय; गवळ्यांची वाडी; हिंदी भाषेंतील एक बोली.
**व्रजांगना** (सं. स्त्री.) गवळण.
**व्रण** (सं. पु.) क्षत, जखम, छिद्र, व्रण.
**व्रत** (सं. न.) नियमपूर्वक आचरण्याचें पुण्यकर्म; नियम; वर्तन; ब्रह्मचर्य.
**व्रतबंध** (सं. पु.) मुंज.
**व्रतस्थ** (सं. वि.) ब्रह्मचारी.
**व्रतवैकल्य** (सं. न.) लहानसान व्रतें नियम वगैरे धार्मिक गोष्टी.
**व्रतस्थ, व्रती** (वि.) व्रत पाळणारा.
**व्रात** (सं. पु.) समूह.
**व्रात्य** (सं. पु.) मुंज न झाल्यामुळें बहिष्कृत झालेला ब्राह्मणपुत्र; (वि.) अवाच्य, द्वाड. [ काढण्याचा यज्ञ.
**व्रात्यस्तोम** (सं. पु.) व्रात्यावरचा बहिष्कार
**व्रीडा** (सं. स्त्री.) लज्जा; विनय.
**व्रीहि** (सं. पु.) तांदूळ; साळ.
**व्हायोलिन** (इं. न.) एक पाश्चात्य तंतुवाद्य.
**व्हाळी** (प्रा. स्त्री.) लहान ओहोळ.
**व्हिक्टोरिया** (इं. स्त्री.) तीन माणसांची घोड्याची गाडी; बग्गी.

---

## श

**श** मराठी व्यंजनमालेंतील तिसावें व्यंजन.
**शं** (सं. न.) सुख; कल्याण.
**शक** (फा. पु.) शंका, संशय.
**शक** (सं. पु.) वर्षगणना; शालिवाहनाच्या नांवाशीं युक्त असलेली वर्षगणना; एक जात; हूण लोक.
**शककर्ता** (सं. पु.) ज्या राजाच्या नांवानें वर्षगणना चालते तो सार्वभौम राजा.
**शकट** (सं. पु.) गाडा, गाडी.
**शकटभेद** (सं. स्त्री.) ज्योति०—चंद्राचें किंवा ग्रहाचें रोहिणी नक्षत्रांतून जाणें.
**शकटासुर** श्रीकृष्णास मारावयास मायावी रूप घेऊन आलेला राक्षस.
**शकणें** (क्रि.) समर्थ होणें, असणें.
**शंकणें** (सं. शंक् क्रि.) संशय घेणें.
**शंकनीय** (सं. वि.) शंकास्पद, संशयास पात्र.
**शंकर** (सं. पु.) महादेव; अद्वैतमत—प्रस्थापक आद्य शंकराचार्य; (वि.) शुभ; कल्याणकारक. [ खाद्य पदार्थ.
**शंकरपाळा** (फा. शकरपारा पु.) एक गोड
**शंकरा** (पु.) संगीतांतील एक राग.
**शंकराभरण** (सं. पु.) गायनांतला एक राग.
**शंकराचार्य** (सं. पु.) अद्वैतमतसंस्थापक; त्यांच्या गादीवर बसलेला पुरुष.
**शकल** (सं. न.) तुकडा; (अर. स्त्री.) युक्ति; तोड. [ आक्षेप.
**शंका** (सं. स्त्री.) संशय, भीति, भ्रांति;
**शकाब्द** (सं. न.) शालिवाहन शकाचें वर्ष.
**शकार** (सं. पु.) राजश्यालक; राजाच्या रखेलीचा भाऊ; मूर्ख पण आढ्यतेखोर आणि दुष्ट मनुष्य.
**शंकित** (सं. वि.) संशयित, संदिग्ध.
**शंकु** (सं. पु.) काटकोन–त्रिकोणाच्या कर्णालगतच्या दोन बाजूंपैकीं एक स्थिर राखून तिच्या भोंवतीं तो त्रिकोण फिरविल्यानें होणारी घनाकृति; खिळा; खुंटी; अंकगणितांत—दहा महापद्म किंवा एकावर तेरा शून्यें इतकी संख्या.
**शकुन** (सं. पु.) भविष्यसूचक शुभाशुभादि लक्षण; प्रश्न; पक्षी.
**शकुनगांठ** (स्त्री.) एखादा शुभ शकुन दिसतांच अंगावरच्या वस्त्राला बांधलेली गांठ; शुभशकुन.
**शकुनवंती** (सं. स्त्री.) भविष्य वर्तविण्याच्या पद्धतीसंबंधाचा ग्रंथ. [ मामा.
**शकुनि** (सं. पु.) पक्षी; गिधाड; दुर्योधनाचा
**शकुंत** (सं. पु.) पक्षी.
**शक्क** (अर. पु.) संशय; शंका.
**शके** (अ.) वर्षीं.
**शक्ति** (सं. स्त्री.) बळ; सामर्थ्य; पार्वती; अस्त्र; कुंडलिनी (ज्ञा० ६।२४७).
**शक्तिचक्र** (सं. न.) मायाचक्र.
**शक्तिपात** (सं. पु.) शक्तीची हानि.
**शक्तिमान्** (सं. वि.) बळवान, समर्थ.
**शक्तिहीन** (सं. पु.) दुर्बळ. [ येण्यासारखें
**शक्य** (सं. वि.) साध्य, संभवनीय, करता

**शक्यार्थ** (सं. पु.) व्याकरणांत शक्यता दाखविणारें क्रियापदाचें रूप.
**शक्र** (सं. पु.) इंद्र.
**शख्स,** शख़्स (अर. पु.) मनुष्य; माणूस.
**शंख** (सं. पु.) समुद्रांतल्या एका विशिष्ट प्राण्याचें कवच; त्याचें केलेलें वाद्य; बोटावरची शंखाकार रेखाकृति; पांचजन्य; बोंब; (वि.) ठोंब्या; मूर्ख. **शंख करणें**—बोंब मारणें.
**शंखतीर्थ** (सं. न.) फाल्गुनवाद्य, बोंब; देवपूजेंतलें अभिषेकानंतर देवावर शंखांतून ओतलेलें पाणी.
**शंखध्वनि** (सं. पु.) बोंब, पांचजन्य.
**शंखरपाळा** (सं. शंखपाल पु.) एक खाद्यविशेष; शंकरपाळा.
**शंखवलय** (सं. न.) शंखाची बांगडी.
**शंखवळा** (सं. शंखवलय पु. स्त्री.) बांगडी.
**शंखळा** (सं. शृंखला स्त्री.) सांखळी.
**शंखावळी** (स्त्री.) बांगडी.
**शंखिनी** (सं. स्त्री.) कामुक स्त्री.
**शंखोबा** (पु.) ठोंब्या, मूर्ख.
**शचि** (सं. स्त्री.) इंद्राणी.
**शठ** (सं. पु.) लुच्चा, सोदा, ठक, कृपण.
**शठता** (सं. स्त्री.) धूर्तता, मूर्खपणा.
**शड्डू** (पु.) दंड.
**शण** (सं. पु.) ताग, सण; अंबाडी.
**शणै** (पु.) लेखनव्यवसाय करणारी एक ब्राह्मण जात; सारस्वत.
**शत** (सं. वि.) शंभर.
**शतक** (सं. न.) शंभरांचा समुदाय; शंभर वर्षांचा काळ; शेंकडा.
**शतकूट** (प्रा. वि.) शतधा भिन्न (पांडव० ४१।२२).
**शतकृत्य** (सं. शतक्रतु न.) शंभर अश्वमेधयज्ञ करण्यासारखें कांहीं अचाट काम.
**शतक्रतु** (सं. पु.) शंभर अश्वमेधयज्ञ करणारा, इंद्र; अचाट कृत्य.
**शतगुण** (सं. वि.) शंभरपट.
**शतघ्नी** (सं. स्त्री.) एक प्रकारची तोफ.
**शतंजीव** (सं. अ.) शंभर वर्षें जग (असा आशीर्वाद).
**शततारका** (सं. स्त्री.) चोविसावें नक्षत्र.
**शतधा** (सं. अ.) शंभर प्रकारें.
**शतपत्र** (सं. न.) शंभर पाकळ्यांचें कमळ.
**शतपावली** (स्त्री.) भोजनोत्तर थोडेंसें मंदगतीनें फिरणें. [ बलाढ्य पुरुष.
**शतंभीष्म** (सं. पु.) एकाहून एक मोठे
**शतमख** (सं. पु.) इंद्र.
**शतमान** (सं. वि.) शंभर.
**शतमी** सप्तमी पहा.
**शतमूर्ख** (सं. पु.) महामूर्ख.
**शतरंज–शत्रंज** (अर. स्त्री.) बुद्धिबळें.
**शतवर्ष** (वि.) शंभर वर्षें जगलेला.
**शतशः** (अ.) शेंकडों, शेंकड्यानें.[वयाचा.
**शतायु, शतायुषी** (सं. वि.) शंभर वर्षें
**शतावरी** (सं. स्त्री.) एक औषधी वनस्पति.
**शत्रु** (सं. पु.) वैरी, दुष्मन.
**शत्रुता** (सं. स्त्री.) वैर.
**शनि** (सं. पु.) शनैश्चर, नवग्रहांपैकीं एक; छळणारा; नीळ नांवाचें रत्न. **शनि उदरीं येणें**—दैव फळफळणें; मोठा लाभ होणें; **शनीचा फेरा**—संकट–परंपरा.
**शनिप्रदोष** (सं. पु.) शनिवारीं आलेला प्रदोष व तत्प्रीत्यर्थ करावयाचा उपवास, शिवपूजा इ०.
**शनिवार** (सं. पु.) शुक्रवारच्या पुढचा दिवस; मंदवासर; आठवड्यांतील शेवटचा दिवस.
**शनैः शनैः** (सं. अ.) हळू हळू.
**शनैश्चर** (सं. पु.) शनिग्रह. **सूर्यापोटीं श०**—चांगल्या बापाचा खोडकर मुलगा.
**शपणें** (सं. क्रि.) शापणें.
**शपत** (स्त्री.) शपथ, आण.
**शपथ** (सं. स्त्री.) आण, भाक, वचन. **शपथ वहायला मोकळा होणें**—एखादें काम असें हलगर्जीपणानें किंवा थोडें करावयाचें कीं मुळींच केलें नाहीं असा दोष ठेवतां येणार नाहीं.
**शपथपूर्वक** (अ.) शपथ घेऊन.
**शंपा** (प्रा. स्त्री.) वीज.
**शफ** (सं. पु.) जनावराच्या पायाचा खूर.
**शफरीध्वज** (सं. पु.) मदन. [ भिल्लीण
**शबर** (सं. पु.) भिल्ल; शबरी (स्त्री.)

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**शबल, शंबल** (सं. शबल वि.) गढूळ; मिश्र. [ अन्नसामग्री (ज्ञा० १८।५९१).
**शबल, शंबळ** (प्रा. स्त्री.) शिदोरी,
**शब्द** (सं. पु.) ध्वनि, आवाज, अर्थयुक्त वर्ण; बोल; दोष. **शब्द ठेवणें**—ठपका देणें.
**शब्दाचा मार** (पु.) कानउघाडणी.
**शब्दकोश** (सं. पु.) शब्दांचा अर्थासह संग्रह.
**शब्दचित्र** (सं. न.) शब्दांनी केलेलें वर्णन; साहित्यशास्त्रांत ज्यामध्यें शब्द मात्र चमत्कारिक असतात असें काव्य.
**शब्दचोर** (सं. पु.) दुसऱ्याचा लेख चोरून तो आपलाच म्हणून दडपून देणारा.
**शब्दप्रमाण** (सं. न.) तोंडी पुरावा.
**शब्दब्रम्ह** (सं. न.) वेद.
**शब्दभेदी** (सं. वि.) अदृश्य वस्तूचा नुसता नाद ऐकून त्यावर विनचूक नेम मारण्याचें चातुर्य अंगीं असलेला.
**शब्दयोगी** (सं. वि.) व्याकरणांत—- नामें आणि नामाप्रमाणें योजिलेले इतर शब्द यांना जोडून येऊन त्यांचें सामान्यरूप करणारें.
**शब्दलालित्य** (सं. न.) शब्दांची मनोवेधक योजना; शब्दांची शोभा.
**शब्दविता** (पु.) परमात्मा. [रचना.
**शब्दविन्यास** (सं. पु.) शब्दयोजना, शब्द-
**शब्दविज्ञान** (न.) शब्दाचें श्रोत्रेंद्रियद्वारां ज्ञान होणें.
**शब्दवेधी** (सं. वि.) शब्दभेदी पहा.
**शब्दशक्ति** (सं. स्त्री.) साहित्यशास्त्रांत—- अभिधा, लक्षणा, व्यंजना इ० शब्दार्थ-बोधक वृत्ति; अभिधाव्यापार.
**शब्दसृष्टि** (सं. स्त्री.) कविता, लेख इ०.
**शब्दावडंबर** (सं. न.) शब्दपांडित्य, पोकळ वक्तृत्व.
**शब्दातीत** (सं. वि.) शब्दांनी वर्णन करण्यास अशक्य; अनिर्वाच्य.
**शब्दार्थ** (सं. पु.) आशय; अर्थ.
**शब्दानुप्रास** (सं. पु.) ज्यांत सबंध शब्दाची पुनःपुनः आवृत्ति ठराविक अंतरानें होते असा भाषालंकार.
**शब्दालंकार** (सं. पु.) वाक्यांतल्या ज्या विशेष शब्दरचनेपासून मुख्यत्वेंकरून चित्तरंजन होतें ती शब्दरचना. अनुप्रास, यमक व चित्र असे याचे तीन प्रकार आहेत.
**शंभर** (सं. शंवर पु.) सांबर, हरिणाची एक जात; (वि.) शें; शेंकडा.
**शंभु** (सं. पु.) शंकर, महादेव.
**शम** (सं. पु.) शांति, मनोनिग्रह.
**शमणें** (सं. शम् क्रि.) शांत होणें, कमी होणें.
**शमदममदनमदभेद** (सं. वि.) मनःसंयमन व इंद्रियविजय यांच्या योगानें कामाचा गर्व नाहींसा करणारा (ज्ञा० १८।७).
**शमन** (सं. न.) शांत करणें; निवारण; निवारण्याचा उपाय.
**शमल** (सं. न.) घाण; मळ.
**शमा** (फा. स्त्री.) ज्योत.
**शमिना** (फा. शामियाना पु.) शामियाना, डेरा, मोठा तंबू.
**शमी** (सं. स्त्री.) एक वृक्ष (दसऱ्याच्या दिवशीं हिची पूजा करतात).
**शय** (सं. पु.) हात (मोरो०कर्ण० २६।१०).
**शयन** (सं. न.) निजणें; शय्या, बिछाना.
**शयनी एकादशी** (स्त्री.) आषाढ शु० ११ (या दिवसापासून चातुर्मास्य संपेपर्यंत विष्णु शयन करतात).
**शय्या** (सं. स्त्री.) बिछाना; निद्रा.
**शर** (सं. पु.) बाण, तीर; बोरू; कमानीचा चढ.
**शरजन्मा** (सं. पु.) कार्तिकस्वामी.
**शरण** (सं. न.) रक्षण; रक्षणकर्ता; (वि.) आश्रय मागणारा. [ मागण्यास आलेला.
**शरणागत, शरणापन्न** (सं. वि.) आश्रय
**शरणार्थी** (सं. वि.) शरणागत पहा.
**शरण्य** (सं. वि.) रक्षणकर्ता.
**शरत्–द्** (सं. स्त्री.) वर्षाच्या सहा ऋतूंतला एक (आश्विन व कार्तिक या महिन्यांतला काळ).
**शरधि** (सं. पु.) बाणांचा भाता.
**शरपंजर** (सं. पु.) बाणांचा पिंजरा; ज्याच्या अंगास पुष्कळ बाण लागले आहेत असा. **शरपंजरीं पडणें**—-मरणोन्मुख होणें.
**शरबत** (फा. न.) सरबत; गोड, आंबट पेय.

शरभ (सं. पु.) सिंहाहून वलिष्ठ असा एक प्राणी; हत्तीचा छावा; टोळ.
शरम (फा. स्त्री.) लाज, लज्जा.
शरमिंदा–धा (फा. वि.) ओशाळा. लाजलेला. [ विछाना.
शरशय्या (सं. स्त्री.) बाणांचा केलेला
शरसंधान (सं. न.) बाणाचा नेम.
शरा (अर. पु.) मुसलमानी कायदा, शास्त्र; (हिं. स्त्री.) पगाराचा दर.
शराईत, सराईत (वि.) निपुण, निष्णात.
शराब (अर. स्त्री.) दारू, मद्य.
शरायणी गज जमीन मोजण्याचा गज.
शरारत (फा. स्त्री.) द्वेष; मत्सर.
शराऊ (प्रा. वि.) घातुक (मोरो० कृष्ण० १८।१५).
शराव (सं. पु.) परळ, उथळ भांडें.
शरासन (सं. न.) धनुष्य.
शरीक (अर. पु.) पातीदार, वांटेकरी.
शरीयत्पन्हा (फा. पु.) इस्लाम धर्म–शास्त्रज्ञ; काजी.
शरीर (सं. न.) देह, काय, वपु.
शरीरभाव (सं. पु.) अहंभाव. [ दुःख.
शरीरभोग (सं. पु.) शरिराला होणारें सुख–
शरीरयष्टि (सं. स्त्री.) आंगकाठी. [आरोग्य.
शरीरसंपत्ति (सं. स्त्री.) निरोगीपणा,
शरीरसंबंध (सं. पु.) विवाहसंबंध.
शरीरसांडोबा (प्रा. पु.) देहाचें निंबलोण (ज्ञा० ९।३८१).
शरीरी (सं. वि.) देह धारण करणारा.
शर्करा (सं. स्त्री.) साखर.
शर्करावगुंठित (सं. वि.) साखरेंत घोळलेलें, साखरेनें आच्छादलेलें.
शर्ट (अर. पु. न.) खमीस; विशेष प्रकारचा सदरा.
शर्त (अर. स्त्री.) अट; पैज; कमाल; विपुलता; शिरस्ता.
शर्तमर्दी (स्त्री.) पराक्रम; अचाट कृत्य.
शर्थ (स्त्री.) पराकाष्ठा, सीमा, कळस.
शर्था करणे पादणें (भा० २३।५५८).
शर्मा (सं. अ.) ब्राह्मणाच्या नांवापुढें लागणारें उपपद; (न.) सुख; कल्याण.
शर्मिंदा (वि.) लज्जित; ओशाळा.

शर्मिष्ठा (सं. स्त्री.) नक्षत्रपुंज; ययातीच्या स्त्रीचें नांव.
शर्यत (अर. शरायत स्त्री.) पैज.
शलक–ख (अर. शलघ स्त्री.) भडिमार.
शलभ (सं. पु.) टोळ. [ १२।४२).
शलल (सं. न.) कंटक (मोरो० द्रोण०
शलाका (सं. स्त्री.) काडी; सळई; खुंटी.
शलाकापरीक्षा (सं. स्त्री.) ग्रंथांत काडी घालून तो जेथें उघडला जाईल तेथील मजकुरावरून ग्रंथाची योग्यता ठरविणें.
शल्य (सं. न.) बाणाचें अग्र; टोक; कांटा; मनाला टोचणारी गोष्ट; (पु). नकुल आणि सहदेव यांचा मामा.
शव (सं. न.) प्रेत.
शश, शशक (सं. पु.) ससा.
शशधर, शशांक, शशी (सं. पु.) चंद्र.
शशविखान (सं. शशविषाण न.) सशाच्या शिंगासारखी मिथ्या कल्पना.
शशिमौळी (पु.) शंकर.
शशिकर (सं. पु.) चंद्रकिरण.
शशिकला (सं. स्त्री.) चंद्रकला.
शशिनी (सं. स्त्री.) चांदण्याची रात्र.
शशिशेखर (सं. पु.) शंकर.
शशी (सं. पु.) चंद्र.
शष्प (सं. न.) कोंवळें गवत; गुह्येंद्रियावरील केस.
शस्त्र (सं. न.) हत्यार.
शस्त्रविद्या (सं. स्त्री.) धनुर्वेद.
शस्त्रवैद्य (सं. पु.) शरिरांतला नासलेला भाग शस्त्रानें कापून रोग बरे करणारा.
शस्त्री (सं. स्त्री.) कट्यार, सुरी.
शस्य (सं. न.) धान्य.
शह (फा. पु.) बुद्धिबळाच्या डावांत उलट बाजूच्या राजावर आपल्या मोहऱ्याची उडी पडेल अशा ठिकाणीं तें मोहरें आणून बसविणें; इषारा, खूण.
शह देणें दुसऱ्याला हुसकावून लावणें.
शहर (फा. न.) नगर, मोठा गांव.
शहरपन्हा (फा. पु.) शहराची तटबंदी; पहारा.
शहरबटाऊ (पु.) शहराचा सौदा.
शहरें (न.) रोमांच.

**शहा** (प्रा. पु.) वेध, साक्षात्कार (सोहि० महदनु०); (फा. पु.) राजा, बादशहा; सावकार; पैसेवाला, इनामदार माणूस, जकातदार. [मंगलवाद्य.
**शहाजण** (फा. पु. न.) मोठा नगारा;
**शहाजादा** (फा. पु.) राजपुत्र.
**शहाजिरें** (फा. न.) जिन्याचा एक प्रकार.
**शहाजोग** (हि. वि.) भरंवशाचा; विश्वसनीय; पतदार.
**शहाजोगहुंडी** (स्त्री.) पेढीवर दाखविल्याबरोबर दाखविणाराला तिची रक्कम मिळावयाची अशी हुंडी.
**शहाडा** (प्रा. पु.) मोठा वृक्ष.
**शहाडें** (न.) कोंवळा नारळ.
**शहाणपण** (न.) अक्कल.
**शहाणा** (हि. शियाना वि.) अक्कलवंत, धूर्त, समजदार.
**शहाणीव** (प्रा. स्त्री.) शहाणपण.
**शहानिशा** (फा. पु. स्त्री.) संशय-निरसन, निकाल. [साहस; चातुर्य; करामत.
**शहामत** (अर. स्त्री.) धिटाई, पराक्रम,
**शहामृग** (फा. पु.) एक पक्षी.
**शहार** (प्रा. पु.) वृद्धिवळांतील शह.
**शहारा** (पु.) रोमांच. [जात.
**शहाळ** (स्त्री.) शाळू, जोंधळ्याची एक
**शहाळें** (न.) कोंवळा नारळ.
**शहीद** (फा. पु.) हुतात्मा.
**शाइदी** (अर. शाहद पु.) साक्ष.
**शाई** (फा. सियाही स्त्री.) मषी; लिहिण्यासाठीं काजळ वाटून केलेला पदार्थ; मृदंगाच्या तोंडाला लावण्याचें काळें रोगण.
**शाई, शाही** (फा. समासांत वि.) अमलांतला; प्रकारचा; (स्त्री.) अंमल; राजमंडळ.
**शाक** (सं. स्त्री.) भाजीपाला; झाडावर गदरलेला आंबा, पाडाचा आंबा; (पु.) सप्तद्वीपांपैकीं एक; शक, वर्षगणना.
**शाकंबरी, शाकंभरी** (सं. शाकंभरी स्त्री.) दुर्गा; पौष शु. १५ च्या रोजीं करण्याचें व्रत.
**शाकारणी** (स्त्री.) छपराची दुरुस्ती.
**शाकारणें** (क्रि.) कौलार दुरुस्त करून नवी कौलें घालणें.
**शाकाव्रत** (सं. शाकव्रत न.) चातुर्मास्यांत भाजीपाला, दही, दूध व डाळी हे पदार्थ अनुक्रमानें एकेक महिनापर्यंत न खाण्याचें व्रत.
**शाकाहार** (सं. पु.) वनस्पत्याहार.
**शाकिनी** (सं. स्त्री.) पिशाची.
**शाकुनिक** (सं. पु.) पारधी; (न.) शकुन सांगण्याची विद्या; (वि.) शकुन सांगणारी (विद्या).
**शाक्त** (सं. पु.) देवीचा उपासक.
**शाख** (सं. शाक स्त्री.) शाक पहा.
**शाखा** (सं. स्त्री.) फांदी; भाग; खातें.
**शाखामृग** (सं. पु.) वानर.
**शाखिया** (पु.) वृक्ष (ज्ञा० १८।८६८).
**शाखोट** (वि.) पतदार, विश्वसनीय.
**शागिर्द** (फा. पु.) उमेदवार, विद्यार्थी, शिष्य; मोठ्यांच्या घरीं देवपूजेचें साहित्य मांडणें, धोतरें धुणें, पाणी भरणें, इ० कामें करणारा.
**शागिर्दपेशा** (फा. पु.) राजघराण्यासंबंधाचीं घरगुती कामें करणारें खातें.
**शाटी** (सं. स्त्री.) संन्याशाची छाटी, वस्त्र.
**शाठ्य** (सं. न.) लबाडी, धूर्तता.
**शाडवट** (वि.) शाडूची.
**शाडवळ** (वि.) गांवढळ, अडाणी; हिरवेंगार; (पु.) धान्यांकुर.
**शांडिल्य** (सं. वि.) शांडिल्य नांवाच्या ऋषीच्या गोत्रांतला.
**शाडू** (स्त्री.) पांढऱ्या रंगाची चिकण माती.
**शाड्वळ** (सं. शाद्वल वि.) हिरवागार.
**शाड्वळ** (सं. शाद्वल न.) कोमल धान्यांकुर; (वि.) कोंवळा, लुसलुशीत.
**शाण** (सं. पु.) शस्त्राला धार लावण्याचा दगड, सहाण.
**शांत** (सं. वि.) शांतियुक्त, सौम्य; थांबलेलें; विझलेलें; मृत.
**शातकुंभ** (सं. न.) सोनें.
**शांतनव** (पु.) भीष्म.
**शांतवन** (न.) सांत्वन, शमन.

**शांति** (सं. स्त्री.) चित्ताची स्वस्थता; विकारशून्यता; शमन; थांबणें; विघ्न-निवारक धर्मकर्म.
**शांतिक** (सं. न.) अरिष्टनिवारक कर्म.
**शांतिपाठ** (सं. पु.) बाळंतिणीच्या पहिल्या बारा दिवसांत तिला व तिच्या लेंकराला अनिष्टापत्तीपासून राखण्या-साठीं रोज मंत्र म्हणतात ते.
**शांतिब्रह्म** (सं.न.) अतिशय शांत वृत्तीचा मनुष्य; वरून शांत वृत्ति दाखवून मनांत तीव्र द्वेष धरणारा.
**शांतिरस** (सं. पु.) नवरसांपैकीं एक.
**शांतोदक** (सं. न.) मृत्यूच्या जागीं तेराव्या दिवशीं मृत्युशमनार्थ करावयाची शांति.
**शादमानी** (फा. स्त्री.) कुशलवृत्त.
**शाद्वल** (सं. न.) कोंवळें गवत.
**शादी** (फा. स्त्री.) मुसलमानाचें लग्न.
**शाधी** (सं. संधि पु.) भांडण मिटविणें; साम.
**शान** (अर. स्त्री.) छानदारपणा, थाटमाट; (वि.) छानदार.
**शानशोक** (पु.), **शानशोकिता, शानशोकी** (स्त्री.) थाटमाट, डामडौल.
**शाप** (सं. पु.) रागाचें भाषण; अनिष्ट-चिंतन; तळतळाट, अभिश्राप.
**शापणें** (क्रि.) शाप देणें.
**शापादपि शरादपि** (सं. अ.) धर्मश्रेष्ठ-तेच्या किंवा सामर्थ्याच्या जोरावर; कोणत्याना कोणत्या तरी प्रकारें.
**शाबरीविद्या** (सं. स्त्री.) चेटूक, इंद्रजाल.
**शांबरी** (सं. स्त्री.) चेटकीण.
**शाबान** (अर. पु.) मुसलमानी वर्षाचा आठवा महिना. [ वाहवा.
**शाबास** (फा. शाबाश अ.) भलेबहाद्दर;
**शाबासकी** (स्त्री.) वाहवा, स्तुति, पाठ थोपटणें.
**शाबुदाणा** (पु.) एक उपवासाचा पदार्थ.
**शाबूत, शाबूद** (अर. वि.) दुरुस्त, कायम, अभंग.
**शाब्दिक** (सं. वि.) वाचिक, तोंडीं; वरवर.
**शाब्दी** (प्रा. स्त्री.) शब्दप्रवृत्ति (ज्ञा० १५।२३०).
**शांभवी** (सं. स्त्री.) पार्वती, भांग, घोटा.
**शाम** (सं. पु.) सयाम देश.
**शामक** (सं. वि.) शमविणारें.
**शामदान** (फा. शमअदान न.) ठाण-वई; ठाणवी, चिराखदान, मेणबत्ती बसविण्याची ठाणवी.
**शामळ** (वि.) नेभळट. [तडजोड.
**शामाट** (न.) कशीतरी करून टाकलेली
**शामाटचा** (वि.) मूर्ख; अडाणी, अडमुठ्या.
**शामाना, शामीना** (फा. शामियान पु.) छत लावून केलेली छाया; चांदवा, डेरा.
**शायद** (फा. क्रि. वि). कदाचित्.
**शायदी** (फा. शाहिदी स्त्री.) साक्ष.
**शायी** (सं. समासान्तीं वि.) निजणारा.
**शारद, शारदीय** (सं. वि.) शरदृतू-संबंधाचा; (स्त्री.) शरत्काल.
**शारदा** (सं. स्त्री.) सरस्वती.
**शारदी** (सं. शरद् स्त्री.) शरत्काल.
**शारा** (पु.), **शारी** (स्त्री.), **शारें** (न.) शहारा, कांटा. [शहारा.
**शारी** (स्त्री.) लहान सामता; भय, कंप;
**शारीर, शारीरक** (सं. न.) शरीर-विषयक शास्त्र. [संबंधीं.
**शारीरिक** (सं. वि.) शरिराचा, शरिरा-
**शारें** (न.) शहारें, थरकांप, कांटा.
**शार्ङ्गपाणी** (सं. पु.) श्रीकृष्ण.
**शार्दूल** (सं. पु.) वाघ, राक्षस; (समासो-त्तरपदीं वि.) श्रेष्ठ.
**शार्दूलविक्रीडित** (सं.न.) छंदःशास्त्रांतल्या एका वृत्ताचें नांव. याच्या चरणांत १९ अक्षरें व म, स, ज, स, त, त हे गण असून शेवटीं एक गुरु अक्षर असतें.
**शार्मण्य** (वि.) जर्मन देशीय.
**शाल** (फा. स्त्री.) महावस्त्र; लोकरीचें पांघरण्याचें उंची वस्त्र.
**शालक** (सं. पु.) मेहुणा, बायकोचा भाऊ.
**शालजोडी** (स्त्री.) शाल.
**शाला** (सं. स्त्री.) शाळा, विद्यागृह; वाडा; जागा.
**शालिका** (सं. स्त्री.) उत्पत्तिस्थान (ज्ञा० १४।६७).
**शालिग्राम** (सं. पु.) गंडकी नदींतला काळा वाटोळा दगड.

**शालिनी** (सं. स्त्री.) एक वृत्त; याच्या एकेका चरणांत ११ अक्षरें आणि म,त, त हे गण असून शेवटीं दोन गुरु अक्षरें असतात. [सुगृहिणी.
**शालिनी** (सं. वि.) शोभणारी; (स्त्री.)
**शालिवाहनशक**(सं. पु.) राजा विक्रमादित्य याचा पराभव करणाऱ्या एका शक-जातीय राजानें सुरू केलेली वर्ष-गणना-पद्धति. ही नर्मदेच्या दक्षिणे-कडील प्रांतांत चालते.
**शाली**(समासान्ती वि.) शोभिवंत, प्रख्यात.
**शालीन** (सं. वि.) लाजाळू.
**शालीनता** (सं. स्त्री.) लाजाळूपणा.
**शालीय** (सं. न.) मंदिर.
**शालू** (हिं. सालू पु.) उंची लुगडें.
**शाल्मलि** (सं. स्त्री.) सावरीचें झाड; (न.) सात द्वीपांपैकीं एक.
**शाल्योदन** (सं. न.) चमचमीत भोजन.
**शाव, शावक** (सं. पु.) छावा, बच्चे.
**शाश्वत** (सं. वि.) कायमचें टिकणारें.
**शाश्वती** (सं. शाश्वत स्त्री.) कायमपणा टिकण्याविषयींची खात्री.
**शासक** (सं. पु.) दंडकर्ता; नियमनकर्ता.
**शासणें** (सं. शास् क्रि.) शिक्षा करणें.
**शासन** (सं. न.) शिक्षा; अंमल; हुकूम, आज्ञा; सनद.
**शासनपत्र** (सं. न.) सनद, लेखी हुकूम.
**शासनशास्त्र** (वि.) राजनीतिशास्त्र.
**शासनसंस्था** (सं. स्त्री.) सरकार.
**शास्ता** (सं. पु.) नियमनकर्ता, शासक.
**शास्ति** (सं. स्त्री.) शिक्षा, दंड.
**शासित** (पु.) ज्यावर अंमल गाजविला जातो तो.
**शास्त्र** (सं. न.) धर्मनियम, धर्मग्रंथ; विद्येची शाखा; आज्ञा. **शा०स असणें**—अगदीं थोडें केवळ नांवाला असणें.
**शास्त्रवेत्ता, शास्त्रज्ञ** (सं. वि.) शास्त्र जाणणारा.
**शास्त्रार्थ** (सं. पु.) शास्त्रांतल्या वच-नाचा अर्थ; शास्त्राची आज्ञा; नियम. **शा० करणें**—उगाच नांवाला करणें.
**शास्त्री** (सं. पु.) शास्त्रवेत्ता, पंडित.
**शास्त्रीय** (सं. वि.) शास्त्रासंबंधीं.
**शाह, शाहजादा, शाहाजिरें, शाहा-जोग, शाहाणा** इ० बद्दल शहा, शहाजादा, शहाजिरें इ० शब्द पहा.
**शाहणीव** (प्रा. स्त्री.) शहाणपणा.
**शाहतीर** (प्रा. पु.) जासूद.
**शाहाडा** (प्रा. पु.) मोठा वृक्ष; सिंह.
**शाहिदी** (शाहद स्त्री.) साक्ष, पुरावा.
**शाही** (फा. स्त्री.) राज्य; सत्ता.
**शाहीर** (अर. पु.) कवि; कवन रचून तें म्हणून दाखविण्यावर चरितार्थ चालविणारा.
**शाही शिरस्ता** (हिं. पु.) राजमान्य रूढि.
**शाळ, शाळक** शाल, शालक पहा.
**शाळंकृत कन्यादान** सालंकृत कन्यादान पहा.
**शाळुंका—खा** (स्त्री.) ज्याच्या मध्यभागीं बाण बसवितात तो शिवलिंगाचा भाग.
**शाळू** (पु.) हिंवाळयांत पिकणारी एक प्रकारची ज्वार; (वि.) थोडा वेळ राहणारा.
**शाळें** (न.) कोंवळा नारळ. [वैद्य.
**शाळोत्री** (सं. शालिहोत्री पु.) घोड्याचा
**शिउ** (सं. शिव पु.) शंकर, ईश्वर.
**शिऊळ** (स्त्री.) शीळ, शिवळ पहा.
**शिंक** (हिं. शींक स्त्री.) नाकांतून वायूचें जोराचें निःसरण.
**शिककाई** (स्त्री.) शिकेकई पहा.
**शिकंजी** (प्रा. स्त्री.) सरबत.
**शिकणाऊ** (पु.) नवशिक्या, उमेदवार.
**शिंकणी** (स्त्री.) वासानें शिंका आणणारी एक वनस्पति.
**शिंकणें** (क्रि.) नाकांतून वायूचें जोरानें निःसरण करणें.
**शिकणें** (सं. शिक्ष् क्रि.) विद्या मिळविणें; अभ्यास करणें.
**शिकंदर** (अर. स्कंदर इं.) अलेक्झांडर; (पु.) एक बलवान् राजा; (वि.) बल-वत्तर, पराक्रमी.
**शिकरण, शिकण, शिखरण**(स्त्री.) केळीं दुधांत कुसकरून व गूळ किंवा साखर घालून केलेलें खाद्य.

**शिकरी** (स्त्री.) राहाटगाडग्यांत पोहऱ्यांच्या माळेची दोरी.
**शिकल** (अर. सिकल स्त्री.) हत्यारांची साफसुफी; तेज, चकाकी, शोभा; शि० उतरणें–मानहानि करणें.
**शिकलकर, शिकलगार** (फा. पु.) हत्यारें साफसूफ करणारा.
**शिकवण–णी** (स्त्री.) शिक्षण, शिकविणें.
**शिकविणें** (क्रि.) पढविणें, उपदेश करणें; प्रवृत्त करणें.
**शिकस्त** (फा. स्त्री.) पराभव; दुर्दशा; पराकाष्ठा. **शि० होणें**–हात टेकणें.
**शिकाऊ** (वि.) शिकणारा, विद्यार्थी.
**शिकायत** (अर. स्त्री.) फिर्याद; तक्रार.
**शिकार** (फा. स्त्री.) पारध; लाग, संधान.
**शिकारखाना** (फा. पु.) रानटी पशु, पक्षी इ० ठेवण्याची जागा.
**शिकारी** (वि.) शिकारीच्या उपयोगी; (पु.) पारधी; शिकार करणारा; (स्त्री.) शिकाळीची दोरी.
**शिकाळी, शिंकाळें** (स्त्री.) भांडें सर्व बाजूंनीं सारखें उचललें जाऊन नेण्यास सोयीवार पडावें म्हणून त्याच्या गळयाभोंवतीं दोरीचा फांस घालून वर हातांत धरतां येईल अशी केलेली तजवीज.
**शिकें, शिंकें** (सं. शिक्य न.) वस्तु अधांत्रीं ठेवण्यासाठीं दोरीची किंवा सांखळीची केलेली विशेष प्रकारची योजना.
**शिकेकई, शिकेकाई, शिकेकं** (कानडी शिगिकाई स्त्री.) केस स्वच्छ करणारी एक वनस्पति किंवा तिची शेंग; चिकाखारी. [२।१८).
**शिकेंदीती** (फा. स्त्री.) लाख (राजव्य०
**शिकोरा** (पु.) खापराचें झाकण.
**शिकोरी** (स्त्री.) खापराची पणती.
**शिक्का** (अर. शिका पु.) नाण्यावरचा छाप; ठसा; मोहोर; नांवाचा छाप.
**शिक्केकटार** (अर. हिं. स्त्री.) राज्याधिकाराचीं चिन्हें.
**शिक्केनीस, शिक्केनवीस** (फा. पु.) राजाचा शिक्का संभाळणारा अधिकारी.
**शिक्केबाजी** (स्त्री.) प्रत्येक भल्याबुऱ्या कायद्यावर व धोरणावर संमतीचा छाप मारण्याचें सरकारी धोरण.
**शिखंड** (सं. पु.) मयूरपुच्छ; लहान मुलाच्या डोक्यावरचे दोन्ही बाजूचे कल्ले.
**शिखंडी** (सं. पु.) द्रुपदाचा पुत्र व भारतीय काळांतला एक राजा (हा मूळचा स्त्री असून पुढें पुरुषत्व प्राप्त झालेला होता); नपुंसक; मोर.
**शिखणें** (सं. शिक्ष् क्रि.) शिकणें.
**शिखर** (सं. न.) शिरोभाग; वरचें अग्र, टोक, कळस. **शि०स जाणें**—पराकाष्ठा होणें.
**शिखरण** (सं. शिखरिणी स्त्री.) केळीं कुसकरून त्यांत दूध व साखर घालून केलेलें खाद्य.
**शिखरिणी** (सं. स्त्री.) हें एक वृत्त आहे. यांत १७ अक्षरें व य, म, न, स, भ, हे गण असून शेवटीं अनुक्रमें लघुगुरु अक्षरें असतात.
**शिखरी** (सं. पु.) पर्वत, डोंगर.
**शिखा** (सं. स्त्री.) शेंडी, तुरा, कलगी; अग्नीची ज्वाळा; (सं. पु.) पावसाची लहान सर.
**शिखानष्ट** (सं. वि.) शेंडी नसलेला; (पु.) निन्दार्थी–मुसलमान.
**शिखामणि** (सं. पु.) उत्कृष्ट रत्न.
**शिखासूत्र** (सं. न.) शेंडी व जानवें हीं ब्राह्मणत्वाचीं दोन मुख्य बाह्य चिन्हें; **शि० वर येणें**— रागाचा कळस होणें. [असलेला (पर्वत).
**शिखी** (सं. पु.) मोर; अग्नि; (वि.) शिखर
**शिंग** (सं. शृंग न.) जनावराचें शिंग; विषाण; त्या आकाराचें वाद्य. **शिंगें असणें**—भेद असणें; **शिंगें फुटणें**— वेडेपणा करूं लागणें; **शिंगें मोडून वासरांत शिरणें**—जाणत्या माणसानें पोरकटपणा करूं लागणें.
**शिंगटणें** (क्रि.) शिंग मारणें; शिंगावर घेऊन फेकणें. [(मुक्ते०वन०१३।५०).
**शिंग** (प्रा. स्त्री.) अत्युच्च शिखर; शीग
**शिगर** (न.) वेळूचा कांटा; पानें एकत्र टोंचण्याचें साधन; चोई.

**शिगरी** (स्त्री.) कोंवळा कोंब; भांडें ठेवण्याचें दोरीचें शिंकाळें.
**शिगरूं** (न.) घोडीचा बच्चा.
**शिगशिगोटी** (स्त्री.) जनावरांचीं शिंगें, हाडें इ० जनावरांच्या अंगाची ठेवण; जनावरांच्या विक्रीवरची सरकारी पट्टी.
**शिगा** (सं. शृंग पु.) शिगरूं.
**शिगाडा** (सं. शृंगारक पु.) उपासाला खाण्यासारखें पाण्यांत उगवणाऱ्या एका वनस्पतीचें फळ. [ उभे टेके.
**शिगाडी** (स्त्री.) गाडीच्या पुढच्या भागाचे
**शिगाळ** (वि.) लांब शिंगें असलेलें; उपद्रवी. [ घालून बांधलेली दोरी.
**शिगाळें** (न.) बैलाच्या दोन्ही शिंगांना वेढा
**शिगी** (स्त्री.) वाजविण्याचें लहान शिंग; शिगरूं (मादी).
**शिगोटी** (हिं. स्त्री.) शिंगें असलेलें जनावर; अशा जनावरांचा समुदाय; शिगाळें.
**शिगोशीग** (अ.) अगदीं भरून; सांडेतोंवर.
**शिचा** (पु.) शिंदळीचा; शिनळ स्त्रीचा मुलगा.
**शिजणें** (सं. सिध् क्रि.) रांधलें जाणें; पक्वहोणें; उकडणें; तयार होत राहणें; विचार चालणें.
**शिजदा** (फा. पु.) नमन, वंदन.
**शिजविणें** (क्रि.) रांधणें; उकडणें.
**शिजाळू** (वि.) लवकर शिजणारें.
**शिट** (हिं. छींट स्त्री.) तुषार.
**शिटवा** (पु.) पक्ष्यांची विष्ठा. [सोदा.
**शिटाऊ, शि०बंदरी** (वि.) हीन जात; पाजी,
**शिटी** (स्त्री.) शीळ.
**शिड़ी–ड़ो** (पु. स्त्री.) एक प्रकारचें भात.
**शिडकाव** (हिं. छिडकाव पु.) शिंपडणें.
**शिडशिडीत** (वि.) सडपातळ; कृश.
**शिडी** (सं. श्रेढी स्त्री.) चढणी, जिना, दादर.
**शिणक** (स्त्री.) चमक, कळ. [ अलंकार.
**शिणगार** (सं. शृंगार पु.) सजविणें; शोभा,
**शिणणें** (क्रि.) थकणें, भागणें, दमणें.
**शिणीग** (स्त्री.) शिणक, कळ, चमक.
**शिणोटा** (पु.) थकवा, शीण.
**शितडी** (स्त्री.) गुठळी, (दह्याची) कवडी.
**शितरपाडी** (स्त्री.) चपळता, हुषारी.
**शितरी** (स्त्री.) लहान झोपडी.

**शितरू** (प्रा. वि.) फसविणारें (दा०२। ३।२९).
**शितवड** (स्त्री.) भाताचीं सांडलेलीं शितें.
**शितळचंद** (पु.) रेंगाळणारा किंवा सुस्त मनुष्य.
**शितळचिनी** (स्त्री.) कंकोळ.
**शितळ शिमगा** (पु.) होळी थंड करण्याचा दिवस (फाल्गुन व० १); वसंतपंचमीलाही शि० म्हणतात.
**शितळाई** (सं. शीतल स्त्री.) थंडावा.
**शितळादेवी** (सं.शीतलादेवी स्त्री.) देवीच्या रोगाची देवता.
**शिता** (पु.) स्त्रियांच्या केसांचा भांग.
**शिताफळ** (सं. सीताफल न.) एका फळाचें नांव.
**शिताफी** (फा. शिताबी स्त्री.) चलाखी, चपलता; कौशल्य; हुषारी; युक्ति.
**शिताब** (फा. वि.) चपळ, हुषार; उत्साही.
**शिताबी** (फा. स्त्री.) शिताफी पहा.
**शितिकंठ** (सं. पु.) शंकर.
**शिती** (स्त्री.) एकविटी भिंत, पडदी.
**शितें** (न.) हातमागाचा एक भाग; बायकांच्या केसांचा भांग.
**शितैन** (अर. सितैन वि.) साठ.
**शितोडा** (हिं. छींटा पु.) उडालेला थेंब, तुषार, कळकाची फांदी.
**शिथड** (स्त्री.) हातमागाचा एक भाग.
**शिथिल** (सं. वि.) ढिला, सैल; मंद.
**शिद** (स्त्री.) कुडाची भिंत.
**शिंदळ** (हिं. छिनाल वि.) दुराचरणी, जारकर्मी.
**शिंदळकी** (स्त्री.) जारकर्म, दुराचरण.
**शिंदा** (हिं. सिंधिया पु.) लेकवळा; दासीपुत्र.
**शिदी, शिद्दी** (पु.) अबिसिनिया अथवा हबसाण देशचा.
**शिंदी** (स्त्री.) जंगली खजुरीचें झाड.
**शिंदेशाही** (स्त्री.) शिंदेसरकारचा अंमल; (वि.) पायांतल्या तोड्यांचा एक विशेष प्रकारचा घाट.
**शिदोरी** (स्त्री.) अन्य स्थळीं जातांना बरोबर घेतलेली अन्नाची गाठोडी.

**शिधा** (सं. सिद्ध पु.) भोजनार्थ लागणारी पाकसामग्री (डाळ, तांदूळ, तूप, तेल इ०); एक दिवसाच्या भोजनास लागणारें सामान.
**शिधोट** (वि.) सरळ व लांब.
**शिनक, शिनोक** (स्त्री.) चमक; कळ.
**शिनळ, शिनळकी** शिंदळ, शिंदळकी पहा.
**शिना, शिनाना** (प्रा. वि.) वेगळाला.
**शिंप** (स्त्री.) एका जलचर प्राण्याच्या अस्थीचें सुपाच्या आकृतीचें आवरण.
**शिपका, शिबका** (पु.) तडाखा; हबका.
**शिपटी** (स्त्री.) छडी, फोक, शिरटी.
**शिंपडणें** (क्रि.) सिंचन करणें; तुषार उडविणें.
**शिंपणें** (क्रि.) शिंपडणें, सिंचन करणें.
**शिपतर** (न.) उथळ टोपली.
**शिंपला, शिपला** (पु.) शिंप; सुपली.
**शिपाई** (फा. सिपाही पु.) प्यादा, खिदमतगार; दूत; रक्षक.
**शिपाईगिरी** (फा. स्त्री.) शिपायाचें काम.
**शिपाईबाणा** (पु.) लष्करी पेशा.
**शिंपी** (सं. शिल्पी पु.) शिवणकाम करणारा; शिंपला. [ दर्शक शब्द.
**शिपुरडा** (पु.) शिपाई या अर्थाचा तुच्छता-
**शिंपुला** (पु.) शिंपला.
**शिफारशी तट्टू** स्वतःच्या गुणावरून नव्हे तर केवळ वशिल्यामुळें पुढें आलेला मनुष्य.
**शिफारस** (फा. शिपारस स्त्री.) वशिला; आश्रय; गुणप्रशंसा, तारीफ.
**शिबका** (पु.) हबका, जोरानें शिंपडणें.
**शिबंदी** (फा. स्त्री.) किल्ला, नगर इ० च्या बंदोबस्तासाठीं ठेविलेली फौज.
**शिबरी** (प्रा. वि.) कृष्ठरोगी; शेंवडा.
**शिबाळी** (स्त्री.), **शिबाळें** (न.) गुऱ्हाळांत कढत रस गाळण्याची गाळणी.
**शिबिका** (सं. स्त्री.) पालखी.
**शिबिर** (सं. न.) सैन्याचा तळ.
**शिबुटलें** (न.) शिपतर.
**शिबें** (न.) उंसाच्या रसावरची मळी काढण्याचा झारा; कुष्ठ रोग.
**शिमगा** (सं. शृंगार पु.) होळीचे दिवस; कंदर्पक्रीडेचे दिवस; अचकट विचकट भाषण. **शि० चा मंत्र**—बोंब.
**शिमटणें** (क्रि.) चिमटणें.
**शिमरा** (वि.) नकटा.
**शियारी** (स्त्री.) शहारा.
**शिर** (सं. न.) डोकें, मस्तक; कोणत्याही वस्तूचा माथा; सैन्याची आघाडी; व्यक्ति. **हातावर शिर घेणें**— जिवावर उदार होऊन धाडसाचें कार्य करण्यास तयार होणें; **शिरावर असणें**—पाठराखण करणें.
**शिरकणें** (क्रि.) घुसणें, प्रवेश करणें.
**शिरकावणें** (क्रि.) घुसडणें, घालणें.
**शिरका** (फा. सिरका पु.) आसव.
**शिरकाण** (पु.) शिरक्याचा मुलख; सत्यानाश, उच्छेद.
**शिरकाव** (पु.) रिघाव, प्रवेश.
**शिरगोळा** (पु) रांगोळीचा दगड.
**शिरचष्मा** (फा. पु.) लावण्यांतली प्रियजनाविषयींची संज्ञा.
**शिरजोर** (फा. वि.) डोईजड, वरचढ.
**शिरटी** (स्त्री.) छडी; बारीक काठी.
**शिरटोप** (पु.) कानटोपी.
**शिरड** (स्त्री.) चिरड; चीड; छाट, काटकूट.
**शिरणीगार** (हिं. पु.) हलवाई.
**शिरणें** (क्रि.) घुसणें, शिरकणें.
**शिरताज, शिर्ताज** (फा. पु.) मुकुट.
**शिरपाव** (फा. सिरोपा पु.) मानाचें पागोटें; शिरोभूषण; जमाबंदीचे कतबे होण्याच्या वेळचा देशमुख देशपांडे इ० चा हक्क.
**शिरपेंच** (फा. शिरपेश पु.) पुरुषाचें पागोट्यावर बांधावयाचें जडावाचें एक भूषण.
**शिरबस्ता** (फा. पु.) पगडी.
**शिरयाणी** (प्रा. स्त्री.) शिराणी पहा.
**शिरयाळें** शिरियाळें पहा.
**शिरशिरी** (स्त्री.) थंडी, हुडहुडी, हींव.
**शिरच्छेद** (सं. पु.) डोकें उडविणें.
**शिरस, शिरसु** (सं. सर्षप पु.) एक प्रकारचें धान्य.
**शिरसावंद्य** (सं. वि.) अतिशय पूज्य.

**शिरसाष्टांग दंडवत** (किंवा) **नमस्कार** पत्रांत आरंभीं लिहिण्याचा मायना.
**शिरसेल** (न.) शिरसाचें तेल. [ रीत.
**शिरस्ता** (फा. सरिश्ता पु.) वहिवाट, नियम,
**शिरस्तेदार** (फा. पु.) कचेरींतला अव्वल दर्जाचा कारकून.
**शिरस्त्राण** (सं. न.) डोक्याचें रक्षण करणारें आच्छादन; पागोटें.
**शिरळक** (स्त्री.) वेळूची खीळ; अणकुचीदार कवची; शीळ.
**शिरा** (सं. श्रा पु.) गोड सांजा; शेताची किंवा गांवाची हद्द; (वि.) उत्कृष्ट.
**शिराडा** (पु.) चुराडा (रामजोशी पृ. ४६).
**शिराजी** (पु.) मद्य; एक प्रकारचें कवूतर.
**शिराणी** (स्त्री.) कौतुक; आवड (भामिनी विलास १७); महत्त्व (विवे० पू० ५१७); उपभोग (ना० १७८) (एक० ९७०; कळस; पुण्यसंचय; अपूर्वता (तुका० २१०); उशी.
**शिराळ** (न.) मेघांची छाया; थंडी वेळ; (वि.) फार शिरा असलेला.
**शिराळशेट** (पु.) पूर्वी या नांवाचा एक वाणी होऊन गेला. त्याच्यावर प्रसन्न होऊन राजानें त्यास साडेतीन घटकांपर्यंत सर्व राजाधिकार दिले. तेवढ्या अल्पकाळांतही त्यानें त्या अधिकाराचा सार्वजनिक कल्याणाकडे उपयोग केल्यावरून लोकांस तो पूज्य होऊन बसला अशी दंतकथा आहे. [सत्ता.
**शिराळशेटीचें राज्य** अल्पकाळ टिकणारी
**शिरियाळें** (न.) डोकें, डोक्याचा आधार (ज्ञा० १४।१८६).
**शिरी** (स्त्री.) हत्तीच्या किंवा घोड्याच्या डोक्यावरचें शोभिवंत आच्छादन.
**शिरीष** (सं. पु.) एक सुवासिक फुलझाड.
**शिरें** (न.) शाई करण्यासाठीं बाजरी वगैरे धान्य जाळून व पाणी घालून केलेला कषाय; वेल मांडवावर चढविण्यासाठीं त्याच्या जवळ पुरलेली (झाडाची फांदी.) [ भाग.
**शिरोभाग** (सं. पु.) डोक्याचा भाग; वरचा
**शिरोभूषण** (सं. न.) मस्तकीं धारण करण्याचा अलंकार. [नायक.
**शिरोमणि** (सं. पु.) मुकुटमणि; मुख्य;
**शिरोळ** (पु. स्त्री.) थंड वेळ. [ शिणक.
**शिलक** (अर. स्त्री.) उरलेली बाकी;
**शिलकझाडा** (पु.) हिशेब वगैरे पुरे होऊन निघालेली बाकी.
**शिलकणें** (हिं. क्रि.) पेटणें, पेट घेणें.
**शिलका** (वि.) उत्तम; निवडक.
**शिलकावणें** (क्रि.) पेटविणें; साऱ्याबद्दल तगादा करण्यासाठीं जाणारे सरकारी शिपाई शेतकऱ्याकडून अन्यायानें खाजगी प्राप्ति करून घेतात ती. [तला.
**शिलकी** (वि.) शिल्लक राहिलेला; संग्रहां-
**शिलंगण** (सं. सीमोल्लंघन न.) दसऱ्यास गांवच्या सीमेबाहेर जाण्याचा विधि.
**शिलगणें** (क्रि.) पेटणें.
**शिलशिला** (अर. सिलसिला पु.) तांडा, जमाव; परंपरा, क्रम; संबंध, स्नेहभाव.
**शिला** (सं. स्त्री.) पाषाण, दगडाची मोठी चीप. [ चिलखताचा भाग.
**शिला** (अर. सिलाआ पु.) चिलखत,
**शिलाई** (हिं. स्त्री.) शिवणावळ. [पदार्थ.
**शिलाजित** (पु.) एक ज्वालाग्राही खनिज
**शिलाणें** (सं. शील न.) स्वभाव, वर्तन.
**शिलारस** (पु.) ज्वालामुखींतून वाहणारा कढत द्रव पदार्थ; लाव्हा.
**शिलाराशि** (सं. पु.) पर्वत.
**शिलालेख** (सं. पु.) दगडावर कोरलेला लेख.
**शिलीमुख** (सं. पु.) बाण.
**शिलेखाना** (फा. सिलाहखाना पु.) शस्त्रें ठेवण्याची जागा, शस्त्रागार.
**शिलेटोप** (अर. हिं. पु.) चिलखत (वामन० विराट० ७।५५).
**शिलेदार** (फा. सिलाहदार पु.) स्वतःचा घोडा घेऊन सरकारची नौकरी करणारा राऊत.
**शिलेपाट** (इं. स्लीपर पु.) आगगाडीच्या रुळाखालीं घालावयाचे लाकडी तक्ते.
**शिलेपोस** (फा. सिलाआपोस वि.) चिलखत घातलेला; सज्ज; (पु.) चिलखत.
**शिलोच्चय** (सं. पु.) पर्वत.

**शिलोतरा, शिलोत्री** (स्त्री.) जमिनीच्या इजारदाराचा हक्क.
**शिल्प** (सं. न.) हातकाम; कलाकुसरीचें काम; हस्तकौशल्य, हुन्नर.
**शिल्पकार** (सं. पु.) कारागीर.
**शिल्पविद्या, शिल्पशास्त्र** ( सं. स्त्री. ) हस्तकौशल्य; गृहरचना, चित्रकला इ० कामाचें शास्त्र.
**शिल्पिक, शिल्पी** (सं. पु.) कारागीर.
**शिव** (सं. सीमा स्त्री.) हद्द, मर्यादा.
**शिव** (सं. पु.) शंकर, महादेव; (न.) कल्याण, मंगल; (वि.) मंगलकारक.
**शिवटणें** (क्रि.) शस्त्राला धार लावणें.
**शिवण** (सं. सीवन स्त्री.) टांचा घालून जोडलेला सांधा; दोरा घालणें.
**शिवणावळ** (स्त्री.) कपडा इ० शिवण्याबद्दलची मजुरी.
**शिवणें** (सं. सीव् क्रि.) टांचे घालणें, सांधणें.
**शिवतणें** (प्रा. क्रि.) शिवणें, स्पर्श करणें.
**शिवदिनी** (सं. स्त्री.) शिवरात्र; एकादशी.
**शिवधडी** (पु.) शेजारी.
**शिवधातु** (सं. पु.) गोमेद नांवाचें रत्न.
**शिवरा, शिवराळ** (वि.) शिव्या देणारा.
**शिवराई** (पु.) शिवाजी महाराजांनीं पाडलेला पैसा.
**शिवरात्र** (सं. शिवरात्रि स्त्री.) प्रत्येक महिन्याच्या कृष्ण १४ ची रात्र. **महाशि०—माघ व. १४.**
**शिवराळ** (वि.) शिव्या देणारा.
**शिवरू** (प्रा. स्त्री.) बंदुकीची दारू.
**शिवलिंग** (न.) शंकराचें लिंग; प्रतिमा.
**शिवशरणार्थ** ( पु. ) लिंगायत लोक नमस्काराच्या ऐवजीं या शब्दाचा उपयोग करतात.
**शिवशाही** (स्त्री.) श्रीशिवाजी महाराजांनीं स्थापलेलें मराठ्यांचें राज्य व घालून दिलेली राज्यपद्धति.
**शिवशिव** (अ.) हर हर! (दुःखोद्गार).
**शिवशिवणें** (क्रि.) फुरफुरणें, झणझणणें.
**शिवसर** (पु.) सिंहराशींत राहण्याचा सूर्याचा काळ.
**शिवस्व** (सं. पु.) शिवाला अर्पण केलेलें अर्थात् ज्याचा अपहार करणें म्हणजे महत्पाप असें द्रव्य.
**शिवळ** (स्त्री.) गाडीच्या जूंला दोन बाजूंस असलेल्या खुंट्या; शीळ.
**शिवळट, शिवळोटो** (स्त्री.) गाडीला जुंपलेल्या बैलाला मान हलवितां येऊं नये म्हणून त्याच्या मानेखालून नेऊन खुंटीला बांधलेला पट्टा.
**शिवा** (सं. स्त्री.) कोल्ही. [ शिवाय.
**शिवाई** (प्रा. पु.) शिवराई; पैसा; (अ.)
**शिवाजी** (पु.) महाराष्ट्राचा राष्ट्रपुरुष.
**शिवामूठ** (सं. शिवामुष्टि स्त्री.) विवाहित मुलीनें पांच वर्षेपर्यंत श्रावणांत प्रत्येक सोमवारीं शिवाला मूठभर तांदूळ वहावयाचे असतात ती मूठ. [आणखी.
**शिवाय** (हिं. सिवा अ.) खेरीज, वांचून,
**शिवाय जमा** ( स्त्री. ) ऐन जमेहून निराळी जमा.
**शिवार** (न.) गांवच्या सीमेच्या आंतील गांवठाणाव्यतिरिक्त सर्व जमीन.
**शिवालय** (सं. न.) शिवमंदिर.
**शिवाशिव** (स्त्री.) स्पृश्य आणि अस्पृश्य यांचा झालेला गोंधळ; विटाळाची कालवाकालव. [ मोट्टेचें जं.
**शिवाळ** (न.) शेतकीच्या औताचें किंवा
**शिवी, शिवीगाळ** (स्त्री.) अपशब्द, दुर्भाषण.
**शिशिपा** (सं. स्त्री.) सीताफळीचें झाड.
**शिशिर ऋतु** (सं. पु.) थंडीचा मोसम, हिंवाळा.
**शिशी** (फा. स्त्री.) कुपी.
**शिशु** (सं. पु.) लहान मूल, लेंकरूं.
**शिश्न** (सं. पु.) पुरुषांचें गुप्त इंद्रिय.
**शिश्नोदरपरायण** (सं. वि.) आहार व मैथुन यांत तत्पर.
**शिष्ट** (सं. वि.) उरलेलें; विद्वान्; सभ्य; संभावित. [ निधिमंडळी.
**शिष्टमंडळ** (सं. न.) प्रेषित किंवा प्रति-
**शिष्टसंप्रदाय** (पु.) संभावित लोकांची रीत; उत्तम सर्वमान्य चाल.
**शिष्टाई** (स्त्री.) समजुतीच्या चार गोष्टी सांगून तंटा मिटविण्याकरितां केलेली मध्यस्थी.

**शिष्टागम, शिष्टाचार** (सं. पु.) परंपरागत सभ्यपणाची रीत.
**शिष्य** (सं. पु.) चेला, विद्यार्थी, शागीर्द.
**शिष्या** (सं. शिष्य पु.) विद्यार्थी, चेला.
**शिष्यसंप्रदाय** (सं. पु.) शिष्य वर्ग, शिष्यमंडळ.
**शिस** (न.) डोकें; शिर.
**शिसकारी** (स्त्री.) शिसारी, वीट.
**शिसव, शिसव** (पु.), **शिसवी** (स्त्री.) काळया लाकडाचें झाड; (वि.) त्या लाकडाची केलेली (वस्तु).
**शिसळ** (न.) पाठीवर मोकळे सुटलेले डोक्याचे केस.
**शिसा** (फा. पु.) मोठी वाटली, बरणी.
**शिसा** (प्रा. पु.) मोहोळ; ओळंबा (सोहि० महदंनु०)
**शिसाटी** (स्त्री.) शिसारी.
**शिसाबासा, शिसाभासा** (पु.) मोड–तोड; दुखणेंबाणें (विशेषतः भूतबाधे-मुळें प्राप्त होणारें).
**शिसार** (प्रा. पु.) मस्तकरोग.
**शिसारी** (स्त्री.) वीट, कळमळणें, ओकारी.
**शिसाळ** (प्रा. न.) डोकें. [सिद्धान्त०)
**शिसाळें** (प्रा. न.) अर्धशिशी (सोहि०
**शिसें** (सं. सीसक न.) एक काळसर धातु.
**शिस्त** (फा. स्त्री.) नेम, निशाण; पद्धत-शीर शिष्टपणाचें वर्तन; रीत, नियम; (वि.) योग्य.
**शिस्तवो करणें** (क्रि.) नेम धरणें.
**शिस्तवार** (वि.) पद्धतशीर, योग्य प्रकारचें.
**शिळई** (स्त्री.) शीळ.
**शिळक** (स्त्री.) अणकुचीदार खुंटी किंवा चीप; चमक, शिणक.
**शिळट, शिळटी** (स्त्री.) सर्द हवा.
**शिळगधार, शिळंधार** (सं. शिलाधार वि.) फार मोठा जोराचा व अखंड (पाऊस). [निःसत्व.
**शिळपट** (सं. शिलापट वि.) पुळपुळीत,
**शिळवट** (स्त्री. न.), **शिळवटी** (स्त्री.) शिवळ, जुंपलेल्या बैलाची मान अडकविण्याची चौकट.
**शिळवड, शिळवट, शिळावट, शिळवण** (स्त्री.), **शिळवरें** (न.) शिळा पदार्थ किंवा अन्न.
**शिळा** (वि.) वासा; जुना, निःसत्व किंवा थंड झालेला; (सं. शिला स्त्री.) दगड; (प्रा. वि.) पारोसा.
**शिळाचुंबी** (पु.) लोहचुंबक.
**शिळाछाप** (पु.) हातानें लिहून एका विशेष प्रकारच्या दगडावर त्याचा छाप उठविल्यानंतर त्या शिळेला शाई लावून त्या लेखाच्या प्रति काढण्याची तजवीज.
**शिळापाका, शिळेंपाकें** (वि.) उरलें-सुरलेलें आदल्या दिवशींचें (अन्न).
**शिळाराशि** (सं. शिलाराशि पु.) पर्वत.
**शिळासप्तमी** (सं. स्त्री.) श्रावण शुद्ध सप्तमी.
**शिळीक** (स्त्री.) शिळक पहा.
**शिळ** (सं. शील पु. स्त्री.) शील, स्वभाव.
**शिळोच्चय** (सं. शिलोच्चय पु.) पर्वत.
**शिळोपा** (पु.) थंड वेळ, संध्याकाळ.
**शिक्षक** (सं. पु.) शिकविणारा, गुरु, पंतोजी. [शिकवणी.
**शिक्षण** (सं. न.) अध्यापन; अध्ययन;
**शिक्षा** (सं. स्त्री.) दंड, पारिपत्य, शासन; शिक्षण.
**शिक्षित** (सं. वि.) शिकलेला.
**शी** (स्त्री.) घाण, विष्ठा.
**शीं** (सं. शीतम् स्त्री.) कारवाराकडे–थंडी.
**शीक** (सं. शिक्षा स्त्री.) शिक्षण (एक०८५).
**शीग** (स्त्री.) शिखर; शिकवण; राशीचा चिंचोळा भाग; अवधि (सदाचार९); दुःख (तुका० ८६९)
**शीगलोट** (स्त्री.) विपुलता; (अ.) पुष्कळ.
**शीगलोटा** (वि.) ज्याच्या वरची शीग कापून काढली आहे असें (माप).
**शीगवर** (अ.) माप भरून वर शीग लागेल अशा रीतीनें [लवकर.
**शीघ्र** (सं. वि.) त्वरायुक्त; (अ०) सत्वर,
**शीघ्रकवि** (सं. पु.) जागच्या जागीं त्वरेनें कवन रचणारा. [तापट.
**शीघ्रकोपी** (सं. वि.) लवकर रागावणारा,
**शीट** (सं. न.) पांखराची विष्ठा; शिटी; शीळ.

नगर वाचनालय, सातारा

शीड (न.) गलबताचें अवजार.
शीडकाठी (स्त्री.) गलबतावरची अवजार बांधण्याची उंच काठी, डोलकाठी.
शीण (सं. शीर्ण वि.) थकवा, ग्लानि; खेद; (पु. स्त्री.) वय, उमर.
शीत (सं. वि.) थंड, गार; मंदोत्साह; (न.) थंडी, गारवा; ग्लानि; (स्त्री.) धनुष्याची दोरी; नांगराचा तास.
शीत (अर. वि.) सहा.
शीत (न.) शिजलेल्या भाताचा एकेक निरनिराळा अवयव.
शीतकटिबंध (पु.) ध्रुव व ध्रुव वृत्तें यांमधील प्रदेश.
शीतकर (सं. पु.) चंद्र.
शीतज्वर (सं. पु.) हिवताप.
शीतभानु (सं. पु.) चंद्र.
शीतयुद्ध (न.) प्रतिस्पर्ध्याशीं प्रत्यक्ष रणांगणावर न लढतां अप्रत्यक्ष दंड-योजना करून त्याची पारध करणें.
शीतल (सं. वि.) थंड, गार. [ देवता
शीतला (सं. स्त्री.) देवीचा रोग; तदधिष्ठात्री
शीतळा देवी शीतला पहा.
शीतळावो (प्रा. पु.) थंडपणा.
शीतवास (सं. पु.) थंडीच्या वेळीं पाण्यांत उभें राहणें.
शीतळ (सं. शीतल वि.) थंडगार.
शीतांशु (सं. पु.) चंद्र.
शीतोष्ण (सं. वि.) कोंबट.
शीन (सं. शीर्ण वि.) जुनें; मोडकेंतोडकें.
शीप (स्त्री.) शिप पहा.
शीर (सं. शिरा स्त्री.) नाडी; रक्तवाहिनी वनस्पतींत पोषक रस पोंचविणारे अवयव; (सं. शिरस् न.) मस्तक.
शीर्ण (सं. वि.) विस्कळित; कृश; मोडलेलें.
शीर्ष (सं. न.) मस्तक, डोकें.
शील (सं. न.) स्वभाव, वर्तणूक, चारित्र्य; सद्वर्तन.
शील (वि.) युक्त; संपन्न.
शीलवान्, शीलवंत (वि.) सद्वर्तनी, शीलयुक्त.
शीलवृत्ति (सं. स्त्री.) मालकानें शेतांतलें धान्य काढून नेल्यावर पडलेले दाणे जमा करून त्यावर केलेला निर्वाह.
शीव, शींव (सं. सीमा स्त्री.) हद्द, मर्यादा.
शीस (सं. शीर्ष न.) मस्तक, शिर.
शीळ (सं. शिला स्त्री.) सपाट दगड, पाषाण.
शीळ (स्त्री.) शीट.
शीळ (सं. शील न.) शील पहा.
शीळ (न.) समुद्र मागें हटविण्यासाठीं घातलेल्या बांधाला मधून मधून प्रथम ठेविलेल्या व मागाहून बुजवून टाकण्याच्या खुल्या जागा.
शुक् (अ.) मांजरास हांकण्यासाठीं उच्चारण्याचा शब्द.
शुक (सं. पु.) पोपट (नर); शुकाचार्य.
शुका (अर. पु.) पत्र.
शुकुर (फा. वि.) कुशल.
शुक्क (वि.) शून्य, निर्जन. [ शिंपली.
शुक्ति, शुक्तिका (सं. स्त्री.) मोत्याची
शुक्र (सं. पु.) आकाशांतली एक चांदणी; दैत्यगुरु; (न.) वीर्य, रेत.
शुक्रगुजार (अर. वि.) कृतज्ञ; आभारी.
शुक्रवार (सं. पु.) गुरुवारच्या पुढचा दिवस.
शुक्राचार्य (सं. पु.) दैत्यांचा गुरु.
शुक्ल (सं. वि.) पांढरें, तेजस्वी; चांदण्याचा (पंधरवडा).
शुक्लकाष्ठ (सं. शुष्ककाष्ठ न.) एकसारखें पाठीस लागलेलें लचांड.
शुक्लपक्ष (पु.) शुद्ध पक्ष; चांदण्याचा पंधरवडा. [धंदा.
शुक्लवृत्ति (सं. स्त्री.) पांढरपेशे लोकांचा
शुचा (प्रा. स्त्री.) शोक, चिंता.
शुचि (सं. वि.) स्वच्छ, शुद्ध, पवित्र.
शुचिर्भूत (सं. वि.) निर्दोष; सदाचरणी व स्वच्छता राखून वागणारा.
शुचिष्मंत, शुचिष्मान् (सं. वि.) शुद्ध, निर्दोष, पवित्र.
शुंठ, शुंठी (स्त्री.) सुंठ.
शुंडा (सं. स्त्री.), शुंडादंड (पु.) सोंड.
शुद्ध (सं. वि.) निर्दोष; स्वच्छ, पवित्र; (अ.) निव्वळ, फक्त; बरोबर; (स्त्री.) शुद्धि, चेतना, देहभान. [ पंधरवडा.
शुद्धपक्ष (सं. पु.) शुक्लपक्ष, चांदण्याचा
शुद्धबुद्ध (सं. शुद्धि + बुद्धि स्त्री.) चैतन्य; ज्ञान; देहभान; सावधपणा.

**शुद्धस्फटिक** (सं. पु.) ज्याच्या मनावर शिक्षणाचा कांहीं संस्कार घडूं शकत नाहीं असा मूर्ख.
**शुद्धि** (सं. स्त्री.) निर्दोषता, पवित्रता; शोध;फेड; दुरुस्ती ; खरेपणा;सावधपणा.
**शुद्धिपत्र** (सं. न.) चुकांच्या दुरुस्तीचें पान.
**शुद्धीकरण** (न.) धर्मांतरित लोकांना स्वधर्मांत घेण्याची चळवळ.
**शुनशुनक** (सं. पु.) कुत्रा; कुत्रें.
**शुनासीर** (सं. पु.) इंद्र, देवांचा अधिपति.
**शुनी** (सं. स्त्री.) कुत्री.
**शुनें** (सं. शुन न.) कुत्रें.
**शुंभ** (प्रा. वि.) बुद्धिमंद. [(न.) कल्याण.
**शुभ** (सं. वि.) कल्याणकारक, मंगलरूप;
**शुभमंगल** (सं. न.) विवाह.
**शुभवर्तमान** (न.) ख्रिस्ताच्या आगमनाची वार्ता; त्याचा संदेश.
**शुभा** (स्त्री.) गोवरी (राम० स्फु० श्लो०)
**शुभांगी** (सं. स्त्री.) सुंदर स्त्री.
**शुभानना** (सं. स्त्री.) सुंदर स्त्री.
**शुभ्र** (सं. वि.) पांढरें, स्वच्छ; उज्ज्वल.
**शुभ्रांशु** (सं. पु.) चंद्र.
**शुरू** (अर. पु.) प्रारंभ.
**शुल्क** (सं. न.) मुलीबद्दल वराकडून घेतलेलें द्रव्य; जकात; अहेर; किंमत.
**शुश्रूषण** (सं. स्त्री.) सेवा (ज्ञा० १८।८८३).
**शुश्रूषा** (सं. स्त्री.) सेवा, चाकरी.
**शुषुप्ति** (सं. सुषुप्ति स्त्री.) निद्रा.
**शुष्क** (सं. वि.) सुकलेलें; पोकळ.
**शुष्काशुष्की** (अ.) लाभावांचून.
**शूकर** (सं. पु.) डुक्कर.
**शूद्र** (सं. पु.) चार वर्णांपैकीं शेवटचा.
**शून्य** (सं. न.) अभाव; पूज्य (०); आकाश; पोकळी; (वि.) उजाड, निर्जन.
**शून्यलब्धी** (सं. स्त्री.) भाज्यापेक्षां मोठ्या रकमेनें भागिलें असतां उत्तर पूज्य येणें.
**शून्यशेज** (स्त्री.) माया.
**शून्याकार** (वि.) अभावरूप.
**शूर** (सं. वि.) लढण्यांत बाका.
**शूर्प** (सं. न.) सूप.
**शूल** (सं. पु.) सूळ, अपराध्यास शिक्षा देण्यासाठीं उभा केलेला तीक्ष्ण अग्राचा लोहस्तंभ; एक आयुध; तिडीक.
**शूलपाणि** (सं. पु.) शंकर, महादेव.
**शूळ, शूळपाणि** शूल, शूलपाणि पहा.
**शृंखला** (सं. स्त्री.) सांखळी.
**शृंग** (सं. न.) शिंग.
**शृंगापत्ति** (स्त्री.) दोन वैकल्पिक गोष्टींपैकीं कोणतीचाही स्वीकार केल्यास येणारी आपत्ति.
**शृंगार** (सं. पु.) नटणें, सजणें; अलंकार, भूषण, साज; नवरसांपैकीं पहिला.
**शृंगारणें** (क्रि.) सजविणें.
**शृंगारपण** (प्रा. न.) शोभा.
**शृंगारमरालिका, शृंगारमराळी** (प्रा. स्त्री.) सुंदर स्त्री.
**शृंगारिक** (सं. वि.) शृंगारविषयक.
**शृंगारित** (सं. वि.) सजविलेलें.
**शृंगारी, शृंगारीक** (वि.) कामी पुरुष.
**शृगाल, शृगाळ** (सं. पु.) कोल्हा.
**शृंगी** (सं. वि.) शिंगें असलेलें; (पु.) शिवाचा एक गण किंवा अनुचर.
**शें** (सं. शत वि.) शंभर.
**शेक** (हिं. पु.) धग, झळई. [शंभरास.
**शेंकडा** (हिं. पु.) शंभराचा गट; (अ.) दर
**शेंकडों** (अ.) शतशः.
**शेकणें** (क्रि.) शेक घेणें; सौम्य प्रकारची उष्णता देणें; नुकसान लागणें.
**शेकाटणें** (क्रि.) शेक घेणें.
**शेकाटा** (पु.) शेक; वेळू, वांबू.
**शेकाटी** (स्त्री.) आगटी.
**शेकारणें** (क्रि.) शाकारणें.
**शेकुटी, शेकोटी** (स्त्री.) शेकाटी पहा.
**शेख** (अर. पु.) पीर; वृद्ध; साधु.
**शेखचिल्ली** (हिं. पु.) वेडसर मनुष्य.
**शेखदार** (फा. पु.) वसुली कामदार.
**शेखर** (सं. पु.) डोक्यावरचा तुरा.
**शेखी** (फा. स्त्री.) कीर्ति; बढाई, डौल.
**शेखीं** (सं. शेष अ.) अखेर, शेवटीं.
**शेंग** (स्त्री.) अरुंद व लांब फळ, फल्ली.
**शेगडी** (स्त्री.) शेक घेण्यासाठीं विस्तव ठेवण्याचें पात्र.
**शेगाडा** (पु.) लांब व जाड वेळू. [हत्यार.
**शेग्रा** (पु.) वस्तु पेंचांत दाबून धरण्याचें

**शेज** (सं. शय्या स्त्री.) आंथरूण, बिछाना; कपाळीं भरलेला मळवट; (न.) क्रम, परंपरा. (जखम) **शेजेस येणें**—गांठ-ळणें, भरून येणें.
**शेजआरति** (स्त्री.) रात्रीं देवाला निज-विण्यापूर्वी आरती करतात ती.
**शेजार** (सं. शय्यागार न.) निद्रागृह.
**शेजार, शेजारपाजार** (न.) जवळचें घर किंवा वस्ती.
**शेजारती** शेजआरति पहा.
**शेजारी, शेजारीपाजारी** (पु.) जवळपास राहणारा.
**शेजिया** (वि.) जवळचा.
**शेजी** (स्त्री.) शेजारीण.
**शेजे** (अ.) शेजारीं, जवळ.
**शेट, शेठ** (सं. श्रेष्ठी पु.) व्यापारी, साव-कार, कारागीर इ. बद्दल त्यांच्या नांवा-पुढें जोडावयाचा सन्मानार्थक शब्द.
**शेंट, शेंटकूळ** (न.) शष्प; कःपदार्थ.
**शेटाई** (स्त्री.) दिमाख, डौल.
**शेटाणी** (स्त्री.) शेटाची बायको.
**शेटाळणें** (क्रि.) अनादर करणें; फसविणें.
**शेटी** (सं. श्रेष्ठिन् पु.) शेट.
**शेटचा** (पु.) व्यापाराच्या ठिकाणीं मापें, वजनें, भाव इ.ची चौकशी करण्याच्या कामावर नेमिलेला वतनदार अधिकारी.
**शेठ, शेठाणी, शेठी, शेठ्या** शेट, शेटाणी, शेटी, शेटचा हे शब्द पहा.
**शेड** (सं. स्त्री.) फोड; मागावर कापड ताणण्यास लागणारी धनुष्याकृति काठी; (इं. स्त्री.) निवाऱ्याची जागा.
**शेंडा** (पु.) घडयाळाची सांखळी.
**शेंडा** (पु.) शेवट; शिखर, वरचें अग्र.
**शेंडी** (सं. शिखंड स्त्री.) शिखा, हिंदुत्वाचें एक बाह्य चिन्ह; धूमकेतूची शेपटी.
**शेंडेधान्य** (न.) बाजरी इ० कित्येक धान्यांच्या रोपांना पहिलें पीक काढून घेतल्यानंतर पुनः जीं कणसें येतात त्यांतले दाणे.
**शेंडेनक्षत्र** (न.) धूमकेतु.
**शेण** (सं. छगण न.) गाय, म्हैस इ० ची विष्ठा; फार कुजून बिलबिलीत झालेलें फळ. **शेण खाणें**—मूर्खपणाचें कृत्य करणें; **शेणाचा दिवा लावणें**—दिवाळें काढणें.
**शेणई** (पु.) शेणवी.
**शेणकई, शेणकाई** (स्त्री.) गुरांचें शेण साठविण्यासाठीं केलेली खाच.
**शेणकूट, शेणकूर** (न.) वाळलेलें शेण.
**शेणखळा** (पु.) शेण कालविलेलें पाणी.
**शेणखळी, शेणखाई** (स्त्री.) शेणकई.
**शेणगोठा** (पु.) गोठ्यांतल्या जनावरांचें शेण गोळा करणें, गोठा साफ करणें इत्यादि.
**शेणय, शेणवई** (पु.) शेणवी.
**शेणवड** (स्त्री.) शेण व माती.
**शेणवी** (पु.) सारस्वत ब्राम्हण.
**शेणी** (स्त्री.) वाळलेलें शेण, गोवरी.
**शेण्या** (पु.) शेणाचा पोहो.
**शेत** (सं. क्षेत्र न.) धान्य वगैरेचें पीक काढण्यासाठीं तयार केलेली जमीन.
**शेतकरी** (पु.) शेतकीवर निर्वाह करणारा.
**शेतकी** (स्त्री.) शेतकऱ्याचा धंदा.
**शेतखाना** (फा. सिहतखाना पु.) शौच-कूप, पायखाना.
**शेतखेत** (न.) जमीनजुमला, वतनवाडी.
**शेतगण्या** (पु.) शेत. [पिकविलेला गहूं.
**शेतगहूं** (पु.) पाटाच्या पाण्यावांचून
**शेतपोत** (न.) शेतवाडी पहा.
**शेतभात** (न.), **शेतीभाती** (स्त्री.) शेतकी.
**शेतमजूर** (पु.) शेतावर राबणारा कामकरी.
**शेतवड, शेताड** (पु.) गावाभोंवतालची शेतजमीन.
**शेतवाडी** (स्त्री.) शेतें, मळे, बगीचे इत्यादि.
**शेतसनदी** (वि.) लष्करी किंवा इतर नोकरीबद्दल सरकारांतून सनदेसह जमीन मिळालेला.
**शेतसरी** (स्त्री.) शेतें, पिकें इत्यादि.
**शेतसारा** (पु.) शेताबद्दल सरकारांत दर-साल भरावी लागणारी रक्कम.
**शेतहेत** (न.) शेतखेत, वतनवाडी.
**शेताड** (पु.) शेतवड पहा.
**शेती** (स्त्री.) शेतकीजमीन.
**शेतीभाती** (स्त्री.) शेतकीचीं कामें.

**शेंदणें** (क्रि.) हातानें दोरी ओढून विहीर इत्यादींतून पाणी वगैरे वर काढणें.
**शेंदड, शेंदाड** (न.) एक फळ. [रंगाचा.
**शेंदरा, शेंदऱ्या, शेंदरी** (वि.) शेंदुराच्या
**शेंदरी** (स्त्री.) तांबडें अलवणाचें पातळ.
**शेंदाड** (न.) चिबूड; फूट; एक फळ.
**शेंदाडशिपाई** खरोखर भित्रा असतां शूरत्वाच्या पोकळ वढाया मारणारा.
**शेंदीव** (वि.) शेंदून काढलेलें.
**शेंदूर** (सं. सिंदूर पु.) शिसें व ऑक्सिजन वायु यांच्या रासायनिक मिश्रणानें तयार होणारा एक जड व लालभडक रंगाचा पदार्थ.
**शेंदेलोण** (न.) एक क्षार.
**शेन** (सं. श्येन पु.) ससाणा पक्षी.
**शेप** (स्त्री.) शेपटी, पुच्छ; वडीशोप.
**शेपटा, शेंपटा** (पु.) मोठी शेपटी.
**शेपरणें, शेपारणें, शेफरणें** शेफारणें.
**शेपाळणें** (क्रि.) शेपटी पिळवटणें.
**शेपाळा, शेपाळशा** (वि.) स्त्रीलंपट.
**शेपाळू** (स्त्री.) छिनाल स्त्री.
**शेपूट, शेंपूट** (स्त्री.) शेप, पुच्छ, अखेरचा भाग; पुरवणी. **शे० घालणें**— भित्रेपणा दाखविणें; **शे० हालविणें**— खुशामत करणें.
**शेफरणें, शेफारणें** (क्रि.) स्तुति झाल्यानें चढून जाणें; मिजास करणें.
**शेंब** (स्त्री.) शेंबूड; श्लेष्म. [अज्ञान.
**शेंबडें** (वि.) नाकांतून शेंबूड गळत असलेलें;
**शेंबी** (स्त्री.) काठीला बसविलेलें धातूचें टोपण; एका वेलीचें नांव.
**शेंबूड** (पु.) श्लेष्मा, नाकांतून वाहणारा चिकट बुळबुळीत पदार्थ.
**शेमला** (अर. पु.) पागोट्याचा पदर.
**शेर** (पु.) जिच्यांतून दुधासारखा पांढरा चीक निघतो अशी एक वनस्पति.
**शेर** (हिं.पु.) एक वजनी किंवा मापी परिमाण; ठराविक प्रमाण; अन्नोदकाचा संबंध; (स्त्री.) पक्ष्यांची विष्ठा; (फा. पु.) वाघ; जबरदस्त धाडशी व दुसऱ्यावर छाप बसविणारा मनुष्य. **शेरास सवाशेर भेटणें**—प्रतिपक्ष्याचे डावपेंच हाणून पाडण्याइतकें सामर्थ्य अंगीं असणें.
**शेरडी** (स्त्री.) बकरी, शेळी.
**शेरडूं** (न.) शेळी किंवा बोकड, बकरें.
**शेरणी** (फा. शेरणी स्त्री.) मिठाई, प्रसाद.
**शेरताट, शेरताटी, शेरताड** (स्त्री.) शेराच्या झाडांची ओळ.
**शेरा** (अर. शेरा पु.) खुलाशादाखल किंवा पसंती-नापसंतीदर्शक उल्लेख.
**शेरा** (सं. शिरस् पु.) शेवट, टोक.
**शेरी** (स्त्री.) दरमणीं २ शेरांप्रमाणें एकंदर उत्पन्नावरचा कमाविसदाराचा हक्क; शहरांतील बोळ; गांवशिवेच्या बाहेरची बागाईत जमीन; देशी संस्थानिकांच्या खाजगी मालकीची जमीन.
**शेल** (सं. शैल न.) उच्चपद; मान, गळा; उत्तम भाग.
**शेलका** (वि.) निवडक; चांगला.
**शेलणें** (प्रा. क्रि.) छळणें; (न.) पाणी झोकण्याचें काष्ठपात्र.
**शेला** (हिं. पु.) पांघरण्याचें उंची वस्त्र.
**शेलाटा-टी** (पु. स्त्री.) उंच व सडपातळ.
**शेलापागोटें** (न.) मानाचा पोषाख.
**शेलारी** (स्त्री.) उंची लुगडें, शालू.
**शेली** (स्त्री.) टोक; अग्र.
**शेलें** (न.) जूं, जोखड; कामाचा भार.
**शेव** (स्त्री.) खाद्यपदार्थ; (पु.) टोक, सीमा.
**शेवई** (कानडी शेविगे स्त्री.) सपिटाची सुतासारखी बारीक व लांब वळी.
**शेवगा** (पु.) एक झाड.
**शेवट** (सं. सीमान्त न.) अग्र; समाप्ति.
**शेवटणें** (क्रि.) चाटून जाणें; शेवटीं येणें; धार लावणें.
**शेवटा** (पु.) कुंभाराच्या चाकाचा खालचा निमुळता झालेला भाग.
**शेवडा** (पु.) गोसाव्यांचा एक पंथ; जैनयति; भाजीपाला इ० वरची जकात वसूल करणारा.
**शेवडी** (प्रा. स्त्री.) चर्म.
**शेवडी** (स्त्री.) नदीच्या पात्रांत खोदलेली विहीर, झिरा. [फुलझाड.
**शेवती, शेवंती** (सं. सेमंती स्त्री.) एक

ग्रंथालय

**शेवती** (स्त्री.) सीमान्तपूजन.
**शेवरी** (सं. शाल्मली स्त्री.) एक वनस्पति.
**शेवल, शेवाल, शेवाळ** (सं. शैवाल न.) पाण्यांत उगवणाऱ्या वनस्पतीचे वुळ-वुळीत तंतु.
**शेवसबजी** (स्त्री.) भाजीपाल्यावरची पट्टी.
**शेष** (सं. पु.) सर्पांचा राजा; बाकी.
**शेषाधिकार** (पु.) जादा अधिकार; कांहीं संघराज्यांत हे घटकाकडे असतात, तर कांहींत मध्यवर्ति सत्तेकडे असतात.
**शेंस** (सं. शीर्ष स्त्री.) मळवट.
**शेंसगांठ** (स्त्री.) सुरगांठ.
**शेंसपाट** (प्रा. पु.) शूद्रांतील पुनर्विवाह.
**शेसरा** (पु.) सरकफास.
**शेंसविधी** (पु.) वेश्याकर्माचा दीक्षाविधि.
**शेसाळणें** (क्रि.) चिडविणें; रागास चढणें, संतापणें; फुसफुसणें.
**शेसाळा** (पु.) त्वेष, क्षुब्धता.
**शेळ** (स्त्री.) जिच्यांत उन्हाळयांत सुद्धां ओलावा राहतो अशी भातजमीन.
**शेळक्या** (पु.) शेळया चारणारा.
**शेळणें** (क्रि.) शिळें होणें.
**शेळवंडी** (स्त्री.) सासरीं अगर माहेरीं आलेल्या मुलीवरून ओवाळून टाक-लेली तांदुळाची मूठ.
**शेळी** (स्त्री.) बकरी.
**शेळ** (पु. स्त्री.) शीळ.
**शेळोंदरा** (वि.) काळाकुट्ट.
**शैत्य** (सं. न.) सर्दी, थंडी.
**शैथिल्य** (सं. न.) ढिलेपणा, शिथिलता.
**शैल** (सं. पु.) पर्वत, डोंगर.
**शैली** (सं. स्त्री.) खुबी; रीत, पद्धति.
**शैव** (वि.) शिवाचा उपासक.
**शैवल, शैवाल** (न.) शेवाळ पहा.
**शोक** (सं. पु.) विलाप, दुःख.
**शोक** (अर. शोक पु.) नाद, छंद.
**शोकणें** (प्रा. क्रि.) शुष्क करणें.
**शोख** (सं. शोष पु.) कोरड.
**शोचणें** (सं. शुच् क्रि.) खेद करणें.
**शोचनीय** (सं. वि.) दुःखप्रद.
**शोण** (सं. न.) रक्त; (वि.) तांबडें.
**शोध** (सं. पु.) चौकशी; दुरुस्ती; फेड.
**शोधक** (वि.) चौकस.
**शोधणें** (क्रि.) तपास करणें, धुंडाळणें; शुद्ध करणें; दुरुस्त करणें.
**शोधणें** (न.) गाळण्याचें वस्त्र.
**शोधन** (सं. न.) दोषनिवारण; प्रायश्चित्त; वजावाकी; फेड; सूड.
**शोधित** (सं. वि.) स्वच्छ केलेलें.
**शोप** (हिं. शोफ स्त्री.) वडीशेप.
**शोपा, शोप्या** (वि.) शोपेसारखा वास ज्याला येतो तो.
**शोफ** (सं. पु.) सूज. [असणें.
**शोभणें** (क्रि.) चांगलें दिसणें; योग्य
**शोभन** (सं. वि.) तेजस्वी, सुंदर; (पु) मंगल-कार्य; शुभकर्मांतला अग्नि; ज्योतिषांत—एक योग, ग्रह.
**शोभनिक** (सं. वि.) शोभा देणारें.
**शोभविणें** (क्रि.) शृंगारणें.
**शोभा** (सं. स्त्री.) तेज, सौंदर्य, कांति, अलंकार; विपरीत लक्षणेनें—फजिती.
**शोभायमान** (सं. न.) शोभणारें, सुंदर.
**शोभिवंत** (वि.) शोभायुक्त, मजेदार.
**शोर** (हिं. पु.) आवाज, नाद, क्रोधावेश.
**शोष** (सं. पु.) कोरड; अतिशय तृषा.
**शोषक** (सं. वि.) शोषून घेणारा.
**शोषण** (सं. न.) शोषून घेणें.
**शोषणें** (सं. शुष् क्रि.) सुकणें, ओढणें.
**शौक** (अर. पु.) छंद, इष्क, आवड.
**शौकत** (अर. स्त्री.) भव्यपणा, मोठा दर्जा.
**शौकी** (वि.) नादी, इष्कबाज.
**शौच** (सं. न.) शुद्धता; मलोत्सर्ग.
**शौचकूप** (सं. पु.) शेतखाना, संडास.
**शौचविधि** (सं. पु.) मलोत्सर्ग.
**शौर** (फा. पु.) विवेक.
**शौरी** (सं. पु.) श्रीकृष्ण.
**शौर्य** (सं. न.) शूरत्व, पराक्रम, शक्ति.
**श्मशान** (सं. न.) स्मशान, मसण.
**श्मशान वैराग्य, स्मशान वैराग्य** (न.) तत्कालिक विरक्ति.
**श्मश्रु** (सं. स्त्री. न.) मिशा, दाढी इ. तोंडावरचे केस; हजामत.
**श्या** (अ.) शंभराला (ज्ञा० १५।४५).
**श्याम** (सं. वि.) काळा, निळा, अस्मानी.

**श्यामल** (सं. वि.) काळासावळा.
**श्यामशबल** (सं. पु.) पाताळ लोकचे संरक्षक कुत्रे; चांडाळांची दुक्कल.
**श्यामा** (स्त्री.) सावळी स्त्री; रमणी.
**श्यामक** (सं. पु.) सांवा नांवाचें धान्य.
**श्यामिका** (सं. स्त्री.) काळेपणा; काळा रंग; हीणकस धातु.
**श्याल, श्यालक**(पु.)बायकोचा भाऊ; मेहुणा.
**श्येन** (सं. पु.) ससाणा पक्षी.
**श्रद्धा** (सं. स्त्री.) विश्वास; भाव; निष्ठा; अपानद्वारा सोडलेला वायु.
**श्रद्धापत्नी** (सं. स्त्री.) धर्मपत्नी.
**श्रद्धालु, श्रद्धाळू** (वि.) भाविक.
**श्रद्धेय** (सं. वि.) विश्वासार्ह; (न.) ध्येय.
**श्रम** (सं. पु.) कष्ट, आयास, मेहनत.
**श्रमणें** (क्रि.) कष्ट होणें; थकणें.
**श्रमविणें** (क्रि.) कष्ट देणें.
**श्रमण, श्रमणक** (सं. पु.) संन्यासी.
**श्रमविभाग** (पु.) कष्टाची वांटणी.
**श्रमी** (सं. वि.) उद्योगी; थकलेला.
**श्रय** (सं. श्रेयस् न.) पुण्य, चांगुलपणा.
**श्रवण** (सं. न.) ऐकणें; कान; एक नक्षत्र.
**श्रांत** (सं. वि.) थकलेला, भागलेला.
**श्राद्ध** (सं. न.) मृत पितरांच्या उद्देशानें तत्प्रीत्यर्थ पिंडदान, ब्राह्मणभोजन इ. केलेलें कर्म.
**श्राप** (सं. शाप पु.) शाप.
**श्रावक** (सं. पु.) जैनमतानुयायी.
**श्रावण** (सं.पु.) हिंदु वर्षाचा पांचवा महिना.
**श्रावणपाटी** (स्त्री.) लग्नानंतरच्या पहिल्या श्रावण महिन्यांत नवऱ्यामुलाकडे खेळ वगैरे भरून पाटी पाठवितात ती.
**श्रावणी** (सं. स्त्री.) नवीन यज्ञोपवीत धारण करण्याचा विधि.
**श्राव्य** (सं. वि.) ऐकण्याचें, ऐकूं येण्याजोगें.
**श्री** (सं. स्त्री.) लक्ष्मी; संपत्ति; वैभव; कांति, शोभा.
**श्रीकंठ** (सं. पु.) महादेव.
**श्रीकार** (पु.) पत्राच्या माथ्यावर 'श्री' असें अक्षर लिहितात तें.
**श्रीखंड** (सं. न.) चक्का, दहीं, साखर व केशर यांचें केलेलें खाद्य; चंदन.
**श्रीगणेशा** (सं. पु.) पहिला धडा.
**श्रीधर, श्रीनिवास** (सं. पु.) विष्णु.
**श्रीपति** (सं. पु.) विष्णु; धनिक.
**श्रीपाद** (सं. पु.) संन्यासी.
**श्रीफल, श्रीफळ** (न.) नारळ.
**श्रीमन्महा** (पु.) आरंभ, सुरवात.
**श्रीमंत** (सं. वि.) संपत्तिमान्, श्रीमान्.
**श्रीमंतपूजन** सीमांतपूजन पहा.
**श्रीमाठ** (प्रा. पु.) संपत्तीचा गर्व.
**श्रीमान्** (सं. वि.) श्रीयुत, श्रीमंत.
**श्रीमुख** (सं. न.) तेजःपुंज चर्या; थोबाड.
**श्रीयुत** (सं. वि.) राजश्री.
**श्रीरंग** (सं. पु.) विष्णु.
**श्रीवत्स** (सं. पु.) विष्णु; विष्णूच्या छातीवरील पांढऱ्या केसांचा भोवरा.
**श्री० लांच्छन**—विष्णु.
**श्रुत** (सं. वि.) ऐकलेलें, प्रख्यात.
**श्रुतकीर्ति** (सं. वि.) उदार; प्रख्यात.
**श्रुति** (सं. स्त्री.) ऐकणें; कान; वेद; वेदवाक्य; स्वरावयव.
**श्रुतिपथ** (सं. पु.) श्रवणमार्ग, कर्णरंध्र.
**श्रेढी** (सं. श्रेणी स्त्री.) रांग, समुदाय; (गणितांत) कोणत्याहि संख्येस कांहीं विशिष्ट नियमांस धरून होणारा चढ-उतार; शिडी.
**श्रेणी** (सं. स्त्री.) पंक्ति; रांग.
**श्रेय** (सं. श्रेयस् न.) पुण्य, कल्याण.
**श्रेयस्कर** (सं. वि.) कल्याणकारक.
**श्रेष्ठ** (सं. वि.) मुख्य, वरिष्ठ, उत्तम.
**श्रोणवी** (प्रा. स्त्री.) निशाण; पताका; पृथ्वी.
**श्रोणि** (सं. स्त्री.) कंबर, ढुंगण.
**श्रोणित** (प्रा. न.) शोणित, रक्त.
**श्रोणी** (प्रा. पु.) वैदिक ब्राह्मण.
**श्रोता** (सं. पु.) ऐकणारा.
**श्रोत्र** (सं. न.) कर्णेंद्रिय, कान.
**श्रोत्रिय** (सं. पु.) वैदिक ब्राह्मण.
**श्रोत्री** (सं. पु.) अग्निहोत्री, वैदिक.
**श्रौत** (सं. वि.) वेदविषयक.
**श्रौतसमो** (प्रा. पु.) श्रुतिसमूह.
**श्रौती** (सं. पु.) वेदवेत्ता.
**श्लाघ** (प्रा. पु. स्त्री.) अभिमान.

नगर वाचनालय, सातारा.

**श्लाघणें** (प्रा. क्रि.) स्तुति करणें.
**श्लाघा** (सं. स्त्री.) स्तुति, बढाई, डौल.
**श्लाघ्य** (सं. वि.) वर्णनीय, प्रशंसनीय.
**श्लाघ्यता** (सं. स्त्री.) थोरवी, प्रशंसा.
**श्लिष्ट** (सं. वि.) द्वयर्थी.
**श्लीपद** (सं. न.) पायाकडून येणारी सूज.
**श्लेष** (सं. पु.) एक शब्दालंकार–यांत एकाच शब्दाचें अनेकार्थत्व असतें.
**श्लेष्मा** (सं. पु.) शेंबड; कफ.
**श्लोक** (सं. पु.) विशिष्ट प्रकारची पद्य-रचना; कीर्ति; स्तुति.
**श्वपच, श्वपाक** (सं. पु.) चांडाल.
**श्वशुर** (सं. पु.) सासरा.
**श्वश्रू** (सं. स्त्री.) सासू.
**श्वसन** (सं. पु.) वायु.
**श्वा, श्वान** (सं. पु.) कुत्रा.
**श्वापद** (सं. न.) हिंस्र पशु.
**श्वास** (सं. पु.) नाकानें किंवा तोंडानें आंत घेतलेला वायु; दमा.
**श्वासोच्छ्वास** (सं. पु.) वायु आंत घेणें व बाहेर सोडणें इ० क्रिया.
**श्वित्र** (सं. न.) कुष्ट.
**श्वेत** (सं. वि.) पांढरें.
**श्वेतकुष्ट** (सं. न.) पांढरें कोड.
**श्वेतप्रदर** (सं. पु.) पांढरी धुपणी.
**श्वेतमणि** (सं. पु.) स्फटिक.
**श्वेतवाह, श्वेतवाहन** (सं. पु.) अर्जुन.
**श्वेतांबर** (पु.) जैनांतील एक पंथ.
**श्वेतु** (सं. सेतु पु.) पूल.

---

## ष

**ष** मराठी व्यंजनमालेंतील एकतिसावें व्यंजन.
**षट्** (सं. वि.) सहा.
**षट्क** (सं. न.) सहांचा समुदाय.
**षट्कर्णी होणें** एकादी गोष्ट बोलणारा व ती ऐकणारा या दोघांच्या पलीकडे तिसऱ्या माणसास ती कळणें; जाहीर होणें.
**षट्कर्मी** (वि.) सहा कर्मांचा ज्याला अधिकार आहे तो म्हणजे पुरा (ब्राह्मण).
**षट्कर्में** (न. अने.) ब्राह्मणास विहित असलेली यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह हीं सहा कर्में.
**षट्कार** (पु.) क्रिकेटच्या खेळांतील सहा धावांचा टोला.
**षट्कोण** (सं. पु.) सहा कोनांचा.
**षट्चक्रभेद** (सं. पु.) देहाच्या ठायीं असलेलीं सहा पद्माकार चक्रें.
**षट्पद** (सं. पु.) भ्रमर; सहा पायांचा प्राणी (उदा०, ऊ, टोळ, इ०).
**षट्पदी** (सं. स्त्री.) सहा चरणांचें एक कडवें असलेली कविता.
**षट्प्रमाण** (सं. न.) जीव आणि अंतः-करणपंचक मिळून सहा.
**षट्शास्त्रसंपन्न** (सं. वि.) शास्त्रवेत्ता, विद्वान्.
**षड्ऋतु** (सं. पु.) वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद्, हेमंत व शिशिर हे सहा.
**षड्गुणैश्वर्यसंपन्न** (सं. वि.) ज्ञान, वैराग्य, धर्म, ऐश्वर्य, यश व श्री हे सहा गुण असलेला (परमेश्वर).
**षड्ज** (सं. पु.) गायनांतला पहिला स्वर.
**षड्दर्शनें** (सं. न. अने.) सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, मीमांसा आणि वेदांत, या तत्त्वज्ञानाच्या सहा मुख्य शाखा.
**षड्रस** (सं. पु. अने.) कटु, आम्ल, मधुर, लवण, तिक्त आणि कषाय हे अन्नाचे मुख्य सहा रस.
**षड्रिपु** (सं. पु.) काम, क्रोध, लोभ, मोह, मद व मत्सर हे मनुष्याचे शत्रु समजले गेलेले सहा मनोविकार.
**षड्विकार** (सं. पु.) उत्पन्न होणें, आहेसें दिसणें, वाटणें, पक्व होणें, क्षीण होणें आणि मरणें हे देहास होणारे सहा विकार.
**षंड, षंढ** (सं. पु.) नपुंसक.
**षडंगें** (सं. न. अने.) दोन हात, दोन पाय, मस्तक व कंबर हीं सहा मनुष्यदेहाचीं अंगें; शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष हीं वेदाचीं सहा अंगें.
**षडानन** (सं. पु.) कार्तिकस्वामी.
**षडूर्मि** (सं. स्त्री.) शोक, मोह, क्षुधा, तृषा, जन्म आणि मरण या सहा ऊर्मी.

**षण्मास** (सं. पु.) सहामाही.
**षण्मुख** (सं. पु.) कार्तिकस्वामी.
**षष्ठी** (सं. स्त्री.) पंधरवड्यांतली सहावी तिथि; व्याकरणांत—सहावी विभक्ति.
**षष्ठी करणें** (क्रि.)—खरड काढणें.
**षष्ठीपूजन** (न.) स्त्रीच्या प्रसूतीच्या सहावे दिवशीं दुर्गा व इतर देवता यांची करावयाची पूजा.
**षष्ठ्यब्दिपूर्ति** (सं. स्त्री.) मनुष्याच्या वयाला ६० वर्षें पूर्ण झालीं म्हणून करावयाचा समारंभ.
**षुतुर** (फा. पु.) उंट.
**षौक** (पु.) शौक पहा.
**षोडश** (सं. वि.) सोळा.
**षोडशोपचार** (सं. पु.) पूजेचे सोळा विधि सांगितले आहेत ते.
**षौकी** (वि.) शौकी पहा.

---

## स

**स** मराठी व्यंजनमालेंतील बत्तिसावें व्यंजन.
**स** हें पद नामाच्या मागें लागलें असतां त्याचा अर्थ सह, बरोबर, त्यानें युक्त असा विशेषणरूप होतो.
**सइराट** (प्रा.अ.) इकडे तिकडे; भलतीकडे.
**सई, सही** (अर. अ.) मान्य, कबूल, बरोबर; खरा; निदान.
**सई** (स्त्री.) सय, स्मरण, आठवण; सखी.
**सईनशिक्का** (सही आणि शिक्का पु.) सही व शिक्का.
**सईल** (प्रा.वि.) सारखीं (नाम० ११।२९).
**सईस** (अर. पु.) मोतद्दार.
**सईशुमार** (फा. सहीशुमार पु.) पुरापुरा अंदाज.
**सऊळ, सौळ** (वि.) किंचित् मचूळ (पाणी वगैरे).
**सकट** (अ.) मिळून, बरोबर, सहवर्तमान, धरून.
**संकट** (सं. न.) अडचण, कठिण प्रसंग.
**सकण** (सं. स + कण वि.) दाण्यांनीं भरलेलें (कणीस); कणसें आलेलीं (जोंधळा इत्यादिकांचीं ताटें).
**सकणें** (सं.शक् क्रि.) शकणें, समर्थ असणें किंवा होणें.
**संकर** (सं. पु.) मिश्रण, मिसळ.
**सकराई** (हिं. स्त्री.) हुंडी स्वीकारण्याबद्दल द्यावी लागणारी रक्कम, हुंडणावळ.
**सकरुण** (सं. वि.) दयामय; कृपाळु; करुणास्पद.
**सकरेजा** (पु.) फाशांच्या डावांत—सात.
**सकर्मक** (सं. वि.) व्याकरणांत—वाक्यांत कर्मावांचून ज्याचा अर्थ अपूर्ण राहतो असें (क्रियापद).
**संकर्षण** (सं. पु.) विष्णूचें एक नांव; शेष; आकर्षण.
**सकल** (सं. वि.) सर्व, पूर्ण, सगळा.
**सकलवी** (प्रा. स्त्री.) मिश्रण (ज्ञा० १८। ७१८).
**संकलन** (सं. न.) एकत्र करणें, संचय.
**सकलात, सकलाद** (तु. सखरात स्त्री.) एक प्रकारचें लोकरीचें कापड.
**संकलित** (सं. वि.) गोळा केलेलें, एकत्रित केलेलें.
**संकलै** (प्रा. स्त्री.) मिश्रण.
**संकल्प** (प्रा. पु.) इच्छा, हेतु; विचार, निश्चय; एकादें धार्मिक कृत्य करण्यापूर्वी तें करण्याविषयींचा मनाचा निश्चय स्पष्टपणें शब्दांनीं व्यक्त करण्याचा विधि.
**सकल्या फणस** (पु.) कापा नाहीं व बरकाहि नाहीं असा मध्यम प्रकारचा फणस.
**सकवार** (सं. सुकुमार वि.) सुकुमार; (पु.) एक प्रकारचा स्वादिष्ट तांदूळ.
**संकष्ट** (सं. संकट न.) संकट, अडचण, बिकट प्रसंग.
**संकष्टी, संकष्टी चतुर्थी** (सं. स्त्री.) प्रत्येक महिन्यांतल्या कृष्णपक्षांतली चतुर्थी.
**सकस** (वि.) दमदार, सत्त्वयुक्त, पौष्टिक.
**सकळ** (सं. सकल वि.) सर्व, संपूर्ण, अवघें.
**संकळणें** (प्रा. क्रि.) संक्षिप्त करणें.
**संकळित, संकळितीं** (प्रा. अ.) संक्षेपतः, संक्षिप्त.
**सकळीक** (वि.) सर्व, सगळें.
**सकळै** (प्रा. वि.) सर्व.
**सकाम** (सं. वि.) इच्छा बाळगणारा; इच्छा धरून केलेलें.
**सकार** (सं. स्वीकार पु.) हुंडीचा स्वीकार.
**सकारणें** (क्रि.) हुंडी घेणें, स्वीकारणें.

**सकाळ** (स्त्री.) सूर्योदय झाल्यापासून मध्यान्हापर्यंतचा काळ. [ प्रातःकाळीं.
**सकाळां, सकाळीं** (अ.) उद्यां प्रातःकाळीं;
**सकिरा** (सं. शर्करा स्त्री.) रेंव, कंकर; खडी; गारगोटी. [ व्याप्त; आकुंचित.
**संकीर्ण** (सं. वि.) मिश्रित, पसरलेलें;
**संकीर्तन** (सं. न.) स्तुति, गौरव, ईश्वर-नामोच्चारण.
**संकुचित** (सं. वि.) आकुंचित, बारीक झालेलें, मिटलेलें; संक्षिप्त.
**सकुडी** (क्रि. वि.) देहासहवर्तमान.
**सकुमार** (सं. सुकुमार वि.) नाजूक, मृदु.
**सकु** (स्त्री.) सत्ता.
**सकुल** (सं. वि.) व्याप्त, गर्द, संकीर्ण.
**संकुल** (सं. वि.) दाट; गर्द; व्याप्त.
**सकुली** (सं. शष्कुली स्त्री.) करंजी (भाग० २७।२९१).
**संकुळी** (स्त्री.) समुदाय.
**सकृत्** (सं. अ.) एकवार.
**सकृत्दर्शनीं** (सं. क्रि. वि.) प्रथमदर्शनीं; पहातांक्षणीं.
**सकें** (प्रा. अ.) एकलग, एकत्र.
**सकेकरी** (प्रा. पु.) केर काढणारा (स्वा० दि० ६।४।४१).
**संकेत** (सं. पु.) खूण, इषारा; करार; अट, शर्त; बेत, विचार; शब्दाची अर्थबोधक शक्ति; ठरविलेलें स्थान.
**संकेतित** (सं. वि.) दोघांनीं किंवा अनेकांनीं ठराव करून नेमलेलें (स्थळ, काळ इ.); नियोजित. [ राहिलेली विधवा.
**सकेशा** (सं. स्त्री.) वपन केल्याशिवाय
**संकोच** (सं. पु.) आकुंचन, मिटणें; संक्षेप; भीति, लज्जा, भीड.
**संकोचणें** (क्रि.) आकुंचित होणें; लाजणें.
**संकोचित** (वि.) संकुचित पहा.
**संकोची** (वि.) लाजाळू, भिडस्त.
**सक्करनातें** (साखर + नातें न.) प्रेमाचें बन्धन, गोडीचा संबंध. [ नोकर.
**सक्का** (अर. पु.) भिस्ती, पाणी देणारा
**सक्त** (सं. वि.) चिकटलेला; निमग्न, अधीन; (अर. सख्त वि.) कठोर, जुलमी; कडक.
**सक्ति** (सं. स्त्री.) संयोग; आसक्ति; अधीनता; निमग्नता.
**सक्ती** (अर. सख्ती स्त्री.) जबरी, जुलूम; कडकपणा; कठोरता.
**सक्तु** (सं. पु.) सातूचें पीठ, सातू.
**संक्रंदन** (सं. न.) कत्तल; चिरडून टाकणें.
**संक्रमण** (सं. न.) स्थलांतर, प्रगति; (ज्योतिषांत) ग्रहाचें एका राशीवरून दुसऱ्या राशीवर जाणें; (गणितांत) दोन संख्यांची बेरीज व त्याच संख्यांतला फरक हीं दिलीं असतां त्यावरून त्या संख्या काढण्याची क्रिया.
**संक्रांत, संक्रांति** (सं. संक्रांति स्त्री.) संक्रमण पहा; धाड; —वर सं० **बसणें**— त्याचा नाश होणें, ऱ्हास करणें.
**संक्रामक** (सं. वि.) स्थलांतर करणारा किंवा एकापासून दुसऱ्याकडे जाणारा; व्यापणारा.
**सख** (सं. पु.) मित्र.
**सखर** (प्रा. वि.) खडबडीत.
**सखर निखर** (वि.) उंचसखल, विषम.
**सखल** (वि.) खोल, खोलगट.
**सखलवट** (वि.) खोलगट.
**सखलात, सखलाद** सकलाद पहा.
**सखा** (सं. पु.) सोबती, मित्र.
**सखित्व** (सं. न.) मैत्री, स्नेहसंबंध.
**सखी** (सं. स्त्री.) मैत्रीण; शिमग्यांतलें शृंगारिक गाणें; लावणीच्या प्रारंभींचें गीत.
**सखोल** (वि.) फार खोल; गंभीर.
**सख्खा** (वि.) प्रत्यक्ष संबंधाचा (चुलता, मामा इ० संबंधाचा नव्हे).
**सख्त, सख्ती** सक्त, सक्ती पहा.
**सख्य** (सं. न.) मैत्री; युद्ध.
**सख्यभक्ति** (सं. स्त्री.) नवविधाभक्तीं-पैकीं एक.
**संख्या** (सं. स्त्री.) गणना, मोजदाद, इयत्ता, आंकडा, आंख.
**संख्यावान्** (सं. वि.) विद्वान्.
**संख्याविशेषण** (सं. वि.) व्याकरणांत— पदार्थाची संख्या दाखविणारें विशेषण.
**संख्याशास्त्र** (न.) आंकड्यांचें शास्त्र.

**संग** (सं. पु.) एकत्र येणें, संयोग, संबंध, सोबत, मैत्री; आसक्ति; मैथुन; (फा. पु.) दगड; फत्तर.
**सगट** (अ.) सकट, बरोबर, सारखें.
**सगडी** (स्त्री.) शेगडी.
**संगजिरें, संखजिरें** (फा. न.) संगजिरा; (पु.) एक खनिज पदार्थ.
**संगत** (सं. वि.) संबद्ध; (सं. संगति स्त्री.) सोबत, मैत्री; जुळणी.
**संगतवार** (वि.) संबद्ध; युक्त.
**संगतसोबत** (स्त्री.) सोबत, बरोबर असणारें माणूस.
**संगति** (सं. स्त्री.) संयोग, भेट, सहवास; पूर्वापर संबंध, जुळणी.
**संगतीं, संगत** (अ.) बरोबर.
**संगत्रास–श** (पु.) पाथरवट.
**सगंध** (सं. वि.) सुवासिक; आपल्या जातीचा.
**संगनमत** (न.) संयुक्त विचार, संकेत.
**संगम** (सं. पु.) संयोग, भेट; मैथुन; दोन प्रवाहांचें एकीकरण.
**संगमरवर** (फा. संगमरमर पु.) एक उंची जातीचा स्फटिकरूप, कणदार व घर्षणानें ज्यास सफाईदार तकाकी येते असा चुन्याचा दगड.
**संगर** (सं. न.) युद्ध.
**संगर** (स्त्री. न.) लुगड्याच्या कांठाखालीं असणारी चित्रविचित्र रंगांची बारीक कोर; डोंगरांतली लहान वाट.
**संगराल** (पु.) पाथरवट.
**सगर्भप्राणायाम** (सं. पु.) प्रवणयुक्त प्राणायाम.
**संगवई** (पु.) बाळमित्र; सहकारी; वाटाड्या.
**सगळा** (सं. सकल वि.) सर्व, संपूर्ण.
**सगा** (सं. सखा पु.) सोबती, मित्र, नातेवाईक.
**सगाई** (स्त्री.) नातें, नात्याचा संबंध.
**संगाती, संगती** (पु.) सोबती; मित्र.
**सगासोयरा** (पु.) नात्यागोत्याचा मनुष्य; इष्टमित्र.
**सगी, सवागी, सुहागी** (स्त्री.) डाग लावण्याच्या कामीं येणारा एक खनिज पदार्थ.
**संगी** (सं. पु.) मित्र, सोबती.
**संगीं** (अ.) संगतींत, बरोबर, सह.
**संगीत** (सं. न.) गीत, वाद्य व नृत्य यांचा समुदाय; (वि.) ज्यांत गायन आहे असें (नाटक).
**संगीन** (फा. वि.) यथास्थित (दा० १९।२५); मजबूत, पक्का.
**संगीन** (फा. स्त्री.) बंदुकीच्या अग्रभागीं लावण्याचें तीक्ष्ण अणीचें एक शस्त्र.
**सगुण** (सं. वि.) सत्त्व, रज, तम इ० गुणांनीं युक्त.
**संगें** (अ.) बरोबर, सह.
**सगोत्र** (वि.) एकाच गोत्रांतले. [पालन.
**संगोपन** (सं. न.) जोपासना, काळजीपूर्वक
**संग्रह** (सं. पु.) साठा, संचय, जमाव.
**संग्रहणी** (सं. स्त्री.) एका रोगाचें नांव.
**संग्रहित** (सं. वि.) गोळा केलेलें.
**संग्रही** (सं. वि.) संग्रह करणारा; लोभी.
**संग्राम** (सं. पु.) युद्ध.
**संग्राहक, संग्राही** (वि.) संग्रह करणारा; मळाचा अवष्टंभ करणारें (औषध).
**संग्राह्य** (सं. वि.) संग्रह करण्यास योग्य.
**संघ** (सं. पु.) समुदाय.
**संघटन, संघट्टन, संघष्टन** (न.) निकट संबंध, घरोबा.
**संघटना** (सं. स्त्री.) संयोग, जुळणी.
**सघन** (प्रा. वि.) सामर्थ्यवान् (कथासारा० २१।६); घट्ट, दाट, गर्द.
**संघनायक** (पु.) कप्तान (खेळाडूंच्या चमूचा).
**संघराज्य** (न.) अनेक घटक राज्यांचा मिळून झालेला समूह; जसें—भारत, अमेरिका, रशिया इ.
**संघर्ष** (सं. पु.) **संघर्षण** (सं. न.) घर्षण, टक्कर, स्पर्धा, कलह.
**संघशक्ति** (स्त्री.) ऐक्य; एकजुटीचें सामर्थ्य.
**संघाट** (सं. संघात पु.) समुदाय (ज्ञा० १३।३५०); लाकडांचा ताफा. [वध.
**संघात** (सं. पु.) ऐक्य; समुदाय; प्रवाह;
**संच** (सं. पु.) ढीग, साठा; जोड; बांधा.
**सचकर** (सं. सत्यकार पु.) विसार.

**सचकारणें** (क्रि.) स्वीकार करणें.
**संचणी** (स्त्री.) जमाव; जमिनीचा धारा मुक्रर करणें; संग्रह.
**संचणें** (प्रा. क्रि.) राहणें (वामन--भूगोलवर्णन १); सांचणें; जमा होणें.
**सचंतर, सचंत्र** (सं. स्वतंत्र वि.) स्वतंत्र.
**संचय** (सं. पु.) जमाव, सांठवण, संग्रह.
**संचरणें** (सं. क्रि.) अंगांत भरणें, शिरणें; फिरणें, चुकविणें.
**सचवटी** (स्त्री.) सचोटी, प्रामाणिकपणा.
**संचलन** (न.) सैनिकांचा शिस्तबद्ध संचार.
**संचळ** (न.) पादेलोण.
**संचार, संचारू** (सं. पु.) फिरणें; बाधा; चूक (ज्ञा० १२।२१७).
**संचारणें** (क्रि.) प्रविष्ट करणें, घुसडणें.
**संचारिका** (सं. स्त्री.) दूती; कुटीण.
**संचारित** (सं. वि.) खुपसलेला; पसरविलेला.
**सचि, सची** (सं. शची स्त्री.) इंद्रपत्नी, इंद्राणी.
**संचित** (सं. वि.) सांचलेलें; (न.) पूर्वजन्मार्जित पापपुण्य.
**सचिंत** (सं. वि.) चितायुक्त.
**सचित्र** (सं. वि.) चित्रांनीं शोभिवंत केलेलें (पुस्तक इ०).
**सचिव** (सं. पु.) प्रधान, मंत्री.
**सची** (सं. शची स्त्री.) इंद्राणी.
**सचेतन** (सं. वि.) सजीव, चेतनायुक्त.
**सचैल** (अ.) अंगावरील वस्त्रासुद्धां.
**सचोटी** (स्त्री.) प्रामाणिकपणा; न्यायबुद्धि.
**सच्चा** (सं. सत्य वि.) खरा, सत्यशील.
**सच्चिदानंद** (सं. पु.). सत्य, ज्ञान आणि आनंद यांनीं युक्त जें ईश्वरस्वरूप तें, परब्रह्म; ईश्वराचें निर्गुण स्वरूप.
**सच्छिद्र** (सं. वि.) भोकें असलेलें.
**सज, साज** संच पहा.
**सजगणी, सजगाणी** (स्त्री.) दोन पैसे; सहा रुक्यांचें क्षेत्रप्रमाण; कसबीण.
**सजगुरा** (पु.) बाजरी.
**सज्जड** (वि.) मजबूत; घट्ट.
**सजण** (सं. सज्जन पु.) प्यार; लावणींत--मित्र, नायक.
**सजणी** (स्त्री.) सखी (वामन--राधाविलास १०).
**सजणे** (पु. अने.) सोयरेधायरे.
**सजणें** (प्रा. क्रि.) असणें, होणें; करणें; (वामन० शुका० ५); शोभणें.
**सजदार** (वि.) शोभिवंत.
**सजन** (प्रा. पु.) प्रियकर. [योजना.
**सजल** (अर. स्त्री.) व्यवस्था; युक्ति;
**सजविणें** (क्रि.) शृंगारणें, नीट दिसेलसें करणें.
**सजा** (फा. स्त्री.) शिक्षा.
**संजाइती** (वि.) पसंत न झाल्यास परत करण्याचा बोलीनें आणिलेला (माल); जांगड.
**सजातीय** (सं. वि.) एकाच जातीचा.
**संजाप, संजाफ, संजाब** (फा. संजाफ पु.). वस्त्राचा शोभिवंत कांठ; शेंडीभोंवतालचा घेरा.
**सजीव** (सं. वि.) सचेतन, जिवंत.
**संजीखार, सज्जीखार** (पु.) एक क्षार.
**संजीवन** (सं. न.) पुनरुज्जीवन.
**संजीवनी** (सं. स्त्री.) मृतास जिवंत करणारी.
**संजीवनी विद्या** (स्त्री.) दैत्यगुरु शुक्राचार्य यानें तपस्यापूर्वक मिळविलेली माणसास सजीव करण्याची शक्ति.
**संजोग** (सं. संयोग पु.) संच, सांठा, सुव्यवस्था.
**संजोगणी** (स्त्री.) पर्याप्ति; योग्यता.
**संजोगणें** (सं. संयुज् क्रि.) जुंपणें; सिद्ध करणें. [१८।८३७)
**संजोडा** (प्रा. वि.) घोडे जोडलेला (ज्ञा०
**सज्ज** (सं. सज्जित वि.) तयार, सिद्ध; शृंगारलेला.
**सज्जन** (सं. पु.) सात्त्विक वृत्तीचा भला माणूस.
**सज्जा** (पु.) चंद्रशाला; घराच्या वरच्या मजल्यावर काढलेली पडवी; मध्यें खंड न पडतां क्रमानें लागत गेलेल्या शेतांमिळून होणारी जमीन.
**सट** (सं. षष्टि स्त्री.) षष्ठी; दुर्गा.
**सटकणें** (क्रि.) निसटणें, पाहतां पाहतां निघून जाणें.
**सटकन्** (अ.) त्वरेनें.

**सटका** (पु.) झटका.
**सटणें** (प्रा. क्रि.) मावणें (मुक्ते० आदि० ३७।८२); सोडणें, आवरणें (भा० ७।४८५); साठविणें (भा० २०।४५३).
**सटपट** (अ.) झटपट, लवकर.
**सटरफटर** (वि.) वारीक सारीक.
**सटवण, सठावणें** (प्रा. क्रि.) पडणें, क्षय पावणें; (न.) सहावीच्या बाधेनें अर्भकास येणारें मरण.
**सटवला** (प्रा. वि.) सहावीनें झपाटलेला (भा० २८।११४).
**सटवाई** (स्त्री.) षष्ठीदेवता; दुष्ट स्त्री.
**सटवी** (स्त्री.) सटवाई, दुष्ट स्त्री; प्रारब्ध देवता.
**सटसटीत** (वि.) टणक, कडक.
**सटारण, सटारा** (वि.) अवाढव्य, भव्य.
**सटाली** (स्त्री.) झुकांडी.
**सटी** (सं. षष्ठी स्त्री.) मूल जन्मल्यापासून सहावे दिवशींची तिथि; त्यादिवशीं जिची पूजा करतात ती क्षुद्र देवता.
**सटीक** (सं. वि.) व्याख्येसहित.
**सटीप** (वि.) टीपांसहित.
**सटीसामाशीं** (अ.) क्वचित् एखादे प्रसंगीं.
**सटीसावत्र** (न.) सवतीमत्सर.
**सटेंगोपाल** (पु.) मात्रागमनी माणूस, अट्टल सोदा, लफंगा माणूस.
**सट्टा** (हिं. पु.) पुढें मालाची किंमत चढेल किंवा उतरेल याचा नेम नसतां त्याचें आगाऊ सौदें करणें; व्यापारांतली किंवा हुंडीबाजारांतली एक प्रकारची जुगार; जोखमीचा व्यापार; मवता.
**सट्टाबट्टा** (प्रा. पु.) सराफीचा धंदा.
**सट्टेबाजी** (स्त्री.) सट्टे करण्याचा लागलेला नाद.
**सठवणें** (प्रा. क्रि.) पतन पावणें.
**सठींसामाशीं** (क्रि. वि.) सहा महिन्यांत एकदां; क्वचित् प्रसंगीं.
**सड** (पु.) खुंट; धस; आंचळ; साक्ष, पुरावा इत्यादिकांचे कागद; दाखला; क्रम, पद्धति; खाप; कात्रा; (स्त्री,) तांदूळ कांडणें.
**सडक** (प्रा. स्त्री.) वस्त्राचा पदर; दोरी; सखलाद वगैरे कापडाची पट्टी; रेशमी काढणी; गोंडा; चवरी; लांब व सरळ तरवार; चांगला बांधीव रस्ता; ताठ व सरळ बांधणीचा मनुष्य; (वि.) सरळ.
**सडकणें** (क्रि.) चोपणें, मारणें.
**सडका** (वि.) कुचका, नासलेला.
**सडकिव** (त्रि.) साधारण घडलेला दगड.
**सडकून** (अ.) सपाटून, अतिशय.
**सडणें** (क्रि.) कांडणें; (सं. सद् क्रि.) कुजणें, नासणें.
**संडणें** (प्रा. क्रि.) सोडणें.
**सडपातळ** (वि.) काटकोळा, किरकोळ, सटसटीत, एकेरी अंगाचा.
**सडसड–डा** (क्रि. वि.) पावसाच्या आवाजाप्रमाणें ध्वनीचा निर्देश.
**सडसडीत** (वि.) रुक्ष; मोकळा; उंच व सडपातळ.
**सडा** (वि.) बायकापोरें इ० प्रपंच ज्याच्या मागें नाहीं असा; निःसंग एकटा; शुद्ध; (पु.) शेणखळा, रंग इ०चें सिंचन; वृष्टि; पीळ घातलेली लांब दोरी-विशेषतः मखराच्या काठचा बांधण्याची दोरी; डोंगराच्या माथ्यावरील सपाट जमीन.
**सडाई** (स्त्री.) सडणावळ.
**सडाका** (पु.) पाऊस, गारा, इत्यादिकांचा सड् सड् आवाज होऊन होतो तो वर्षाव; सोसाट्याचा वारा; दोरी, काठी वगैरेंचा तडाखा किंवा प्रहार.
**सडाफटिंग** (पु.) कांहीं पाश नसलेला.
**संडास** (हिं. पु.) शेतखाना, शौचकूप.
**सडासंमार्जन** (पु.) झाडलोट, सडा शिंपणें इ० काम.
**सडासोट** (पु.) एकटा, बायकापोरांचें लफडें मागें नसलेला, निःसंग.
**सडिंसाट** (वि.) निपुत्रिक; एकटा.
**सडी (डे) स्वारी** (स्त्री.) बरोबर लवाजमा न घेतां निघालेली स्वारी.
**सडी** (स्त्री.) क्षयरोग; क्षतावर बसलेल्या माशांचें प्रजोत्पादन; साक्ष, पुरावा; खुट; बांबूचें कुसळ.

**सडीक** (वि.) कांडलेले, सडलेले.
**सडीपत्र** (न.) दाखला.
**सडेतोड** (वि.) एकदम निकाल करून टाकण्यासारखें; फटकळ.
**सडेल** (वि.) सडलेलें.
**सढळ** (वि.) सैल; खर्चिक; उदार.
**सण** (पु.) उत्साहाचा दिवस; त्या दिवशींची थाटाची मेजवानी.
**सण** (सं. शण पु.) ताग. [ तिडीक.
**सणक** (स्त्री.) **सणका** (पु.) कळ, शिणीक,
**सणकाडी** (स्त्री.) सणाच्या रोपांतून तंतु काढून घेतल्यावर राहिलेला खुंट.
**सणगर** (पु.) कांबळीं विणणारांची जात किंवा त्या जातीचा इसम.
**सणंग** (न.) वस्त्र, उंची वस्त्र.
**सणसुदी** (स्त्री.), **सणसुदीस, सणसूद** (पु.) सणाचा दिवस.
**सणवई** (स्त्री.) सणाच्या दिवशीं शेतकऱ्यांकडून बलुतेदारांना मिळणारें धान्य.
**सणवार** (पु.) सणाचे दिवस.
**सणसणणें** (क्रि.) सण् सण् आवाज करणें.
**सणसणीत** (वि.) उष्ण, तीव्र, जबर, भक्कम, सडेतोड, स्पष्ट, खणखणीत.
**सणाटा** (पु.) सनाटा पहा.
**सणाणा, सणाणें** (प्रा. वि.) तीव्र, तीक्ष्ण.
**सणी** (स्त्री.) डबल पैसा; सहा रुके.
**सणु, सणू** (प्रा. पु.) सण, उत्साह.
**सत्** (सं.वि.) असणारें; चांगलें; खरें, योग्य.
**सतनागत** (स्त्री.) पेंचांतून किंवा अडचणींतून मोकळीक किंवा सुटका यांचा अभाव.
**संत** (सं. पु.) प्रपंचाविषयींची आसक्ति सोडून ईश्वरभजनीं लागलेला पुरुष; (वि.) संथ, न गडबडणारा, शांत.
**सतका** (अर.पु.) ओवाळून टाकलेला जिन्नस.
**सतकामतका** (पु.) दर अमावास्येला उडिदाची डाळ, राळे, पीठ, मीठ, मिरच्या, तेल इ० पदार्थ अनिष्टनिवारणार्थ मांगांना देतात तें.
**सतत, संतत** (वि.) अखंड, निरंतर.
**संततधार** (स्त्री.) मध्यें खंड न होतां एकसारखी पडणारी धार.

**संतति** (सं. स्त्री.) विस्तार; अपत्य; ओळ. परंपरा. [ क्रुद्ध झालेलें.
**संतप्त** (सं.वि.) अतिशय तापलेलें; अतिशय
**सतल, सतलें, सतेल, सतेलें** (न.) उथळ, रुंद आणि पसरट असें धातूचें भांडें–परीट लोक ज्यांत कपडे शिजवितात तें.
**सतरंज–ग** (फा. पु.) बुद्धिबळाचा खेळ.
**सतरंजी, सत्रंजी** (स्त्री.) जाड रंगीबेरंगी जाजम.
**संतर्पण** (सं. न.) तृप्त करणें.
**सताड** (वि.) उभा, सरळ; (अ.) अगदीं.
**संतान** (सं. न.) संतति, देवांचा एक वृक्ष.
**संताप** (सं. पु.) अतिशय उष्णता; रागाचा आवेश; उद्वेग, एक वनस्पति.
**संतापणें** (क्रि.) रागावणें, कातवणें.
**संतापी** (सं. वि.) रागीट, तामसी.
**सतार** (फा. स्त्री.) एक तंतुवाद्य.
**सतावणें** (क्रि.) गांजणें, छळणें, त्रासवून सोडणें.
**संतावें, संताळें** (न.) निंदाद्योतक अर्थानें–संतमंडळी, संतांचें बंड; संतांच्या मताचा (भक्तिमार्गाचा) प्रचार.
**सतिक** (प्रा. न.) सत्यत्व.
**सती** (सं. स्त्री.) साध्वी, पतिव्रता, तपस्विनी; पार्वती. **सती जाणें**–मृतपतीच्या शवाबरोबर स्त्रीनें स्वतःस जाळून घेणें.
**सतीचें वाण** (न.) एकदां करीन म्हटल्यावर केल्यावांचून सुटका नाहीं असें काम. **स० घेणें**––कांहींहि होवो काम पुरें करावयाचेंच अशा निश्चयानें त्याला हात घालणें.
**सतीर्थ, सतीर्थ्य** (सं. पु.) गुरुबंधु.
**सतु** (सं. अ. वि.) सत् (अमृ० ६।३१).
**सतुवा** (सं. सक्तु पु.) जोंधळे, बाजरी इ० च्या लाह्यांचें पीठ.
**सतुष** (सं.वि.) टरफलासकट (तांदूळ, गहूं इ.)
**संतुष्ट** (सं. वि.) तृप्त, समाधानी.
**सतेज** (सं. वि.) टवटवीत, तेजस्वी.
**सतेल, सतेलें** (न.) मोठ्या तोंडाचें खोल भांडें. [ आनंद.
**संतोख, संतोखु** (सं. संतोष पु.) तृप्ति,

**संतोष** (सं. पु.) तृप्ति, समाधान, सुख.
**संतोषणें** (क्रि.) समाधान पावणें, आनंदणें.
**संतोषी** (वि.) समाधानी, तृप्त, राजी.
**सत्कार** (सं. पु.) आतिथ्य, मानपान.
**सत्कारणें** (क्रि.) मान देणें, आदर करणें.
**सत्तम** (सं. वि.) श्रेष्ठ, उत्कृष्ट.
**सत्ता** (सं. स्त्री.) अस्तित्व; अधिकार; अंमल; शक्ति; हक्क.
**सत्ताधिकारी** (पु.) अधिकारी, अंमलदार.
**सत्ताधीश** (सं. पु.) अधिकारी, समर्थ.
**सत्तू** (सं. सक्तु पु.) सातू, जव; सातूचें **पीठ.**
**सत्तेवाईक** (वि.) सत्तेचा, अधिकारांतला.
**सत्पंथ** (पु.) इमाम शहानें स्थापन केलेला महाराष्ट्रांतील एक पंथ.
**सत्पात्र** (सं. न.) योग्य मनुष्य.
**सत्य** (सं. वि.) खरें, प्रामाणिक; (न.) खरेंपण, खरी गोष्ट.
**सत्यंकार** (सं. पु.) सचकार, विसार.
**सत्यनारायण** (सं. पु.) एक देवता; त्या देवतेला केलेला नवस फेडण्यासाठीं कार्यसिद्धीनंतर केलेली तिची पूजा, व इष्टमित्रांसह केलेलें तीर्थप्रसादग्रहण.
**सत्यनिष्ठ** (सं. वि.) सत्यास न सोडणारा.
**सत्यप** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**सत्ययुग** (सं. न.) चार युगांपैकीं पहिलें.
**सत्यलोक** (सं. पु.) ब्रह्मलोक; सप्त-लोकांपैकीं सर्वांत वरचा. [बोलणारा.
**सत्यवक्ता**, **सत्यवादी** (सं. पु.) खरें
**सत्यव्रत** (सं. वि.) सत्यास चिकटून राहणारा; सत्यापासून न ढळणारा.
**सत्यसंकल्प** (सं. वि.) प्रामाणिकपणाचा संकल्प करणारा.
**सत्यसंध** (सं. वि.) सत्यप्रतिज्ञ.
**सत्या** (पु.) पत्त्याच्या खेळांतलें सात ठिपक्यांचें पान; (स्त्री.) सत्यभामा.
**सत्याग्रह** (सं. पु.) आत्मिक बळानें अन्यायाशीं झगडून मरणाची सुद्धां भीति न बाळगतां सत्याची बाजू संभाळणें.
**सत्यानास** (सं. सत्यनाश पु.) पुरा पुरा नाश.
**सत्र** (सं. न.) अनेक दिवस चालणारा यज्ञ; अन्नछत्र. **सत्र उघडणें**-कत्तल होणें किंवा करणें.
**सत्रप** (पु.) सुभेदार.
**संत्रा** (फा. पु.) नारिंग.
**संत्राण** (सं. न.) जोर (मुक्ते० आदि० ६।१९); (वि.) थोर, बळकट (ज्ञा० १५।१८३); (अ.) वेगानें (भा० २।१५०)
**संत्री** (इं. पु.) हत्यारबंद पहारेकरी.
**सत्त्व** (सं. न.) अस्तित्व; मन; सार, तत्त्वांश; खरेंपणा; सगुण; बळ; प्राणी.
**सत्त्वधीर** (सं. वि.) धैर्यानें सत्त्वास जागणारा. [शीघ्र, चपळ.
**सत्वर** (सं. अ.) त्वरेनें, लौकर; (वि.)
**सत्वरीं** (अ.) सत्वर, लवकर.
**सत्त्वशील** (सं. वि.) सदाचारी, सन्मार्गी.
**सत्त्वस्थ** (सं. वि.) योगी.
**सत्त्वहरण** (सं. न.) सदाचरणाविषयींच्या लौकिकाची हानि.
**सत्त्वहीन** (सं. वि.) निःसत्व, तेजोहीन.
**सत्वान्न** (न.) पौष्टिक व पथ्यकर अन्न.
**संथ** (वि.) मंद, सावकाश चालणारा.
**संथळ** (सं. सम + स्थळ न.) सपाट जमीन.
**संथा** (स्त्री.) रोजचा थोडथोडा पाठ.
**संथाविणें** (क्रि.) शांत करणें.
**सद** (सं. स्त्री.) सभा.
**सदका** (अर. पु.) ओवाळून टाकलेली वस्तु.
**सदट**, **सधट** (प्रा. वि.) गच्च; मोठें; बळकट; भारी; कष्टप्रद.
**सदन** (सं. न.) घर; वसतिस्थान.
**सदय** (सं. वि.) दयायुक्त, कृपाळु.
**सदर** (प्रा. स्त्री.) राजसभा, वरिष्ठ न्यायमंदिर; बाब, वर्ग, विल्हा; दिवाणखाना; (वि.) मुक्त; सररास. **स०हजारी** (पु.) -हजार शिपायांच्या टोळीवरला अधिकारी; **सदर बाजार** (पु.)-ब्रिटीश लष्करी छावणींतील बाजार.
**सदरेची खोली** (स्त्री.) उपसभागृह.
**सदरहू** (अर. अ.) वरच्याप्रमाणें.
**सदरा** (गुज. पु.) अंगांत कोटाच्या किंवा अंगरख्याच्या आंत घालण्याचा कपडा.

**संदर्भ** (सं. पु.) मागचा पुढचा संबंध; संधान; गुंफणें; मिश्रण; कथा.
**संदर्भ ग्रंथ** (पु.) प्रबंध, भाषण इ. साठीं आधार घेतलेला ग्रंथ.
**संदला, संधला, सनला** (सं. संधि पु.) दरजा वगैरे भरण्यासाठीं मुद्दाम कमावून तयार केलेला चुना; अशा चुन्याचा केलेला लेप.
**सदलाबदल** (स्त्री.) अदलाबदल.
**सदसत्** (सं. न.) बरें वाईट.
**सदसद्विचार, सदसद्विवेक** (सं. पु.) बऱ्या वाईटाचा विचार.
**सदस्य** (सं. पु.) सभासद.
**सदा** (सं. अ.) नेहमीं; निरंतर.
**सदाकत** ( अर. स्त्री. ) प्रामाणिकपणा; विश्वास.
**सदाकदा** (अ.) नेहमीं; निरंतर.
**सदाचरण** (सं. न.), **सदाचार** (पु.) चांगलें वर्तन, शिष्टाचार.
**सदान, संदान** (फा. स्त्री. न.) लोहाराची लहान ऐरण (मोठ्या ऐरणीला शिंगाडा म्हणतात ).
**सदाफुली** (स्त्री.) नेहमीं फुलणारी एक वेल.
**सदारत** (फा. स्त्री.) प्रधानपद; प्रधानाची कचेरी.
**सदावर्त** (न.) कोरड्या अन्नाचें छत्र; शिधा वाटणारी धर्मसंस्था.
**सदाबीळ** (प्रा. अ.) सतत; नेहमीं.
**सदाशिव** (सं. पु.) शंकर.
**सदासर्वदा** (अ.) नेहमीं.
**सदाळणें** (क्रि.) घट्ट बांधणें.
**संदिग्ध** (सं. वि.) संशययुक्त, अस्पष्ट.
**संदिष्ट** (सं. पु.) दूत, जासूद; (न.) निरोप, बातमी; (वि.) कळविलेलें; सांगून पाठविलेलें.
**संदिसा, संदिसें** (प्रा. अ.) आतांच, नुसतेंच (दा०३।३।३९).
**सदो, सद्दी** (फा. स्त्री.) अनुकूल काळ.
**सदों** (अ.) सदा, नेहमीं.
**सदु** (प्रा. पु.) छंद (ज्ञा०६।७४).
**सदुक्ति** (सं. स्त्री.) चांगलें भाषण.
**संदूक** (अर. स्त्री.) पेटी.
**सदृढ** (सं. सुदृढ वि.) बळकट.
**सदृश** (सं. वि.) सारखा.
**सदेवा** (प्रा. अ.) नेहमीं.
**संदेश** (सं. पु.) निरोप, बातमी.
**संदेसा** (सं. संदेश पु.) निरोप.
**संदेह** (सं. पु.) शंका, संशय, धोका.
**सदैव** (सं. वि.) दैववान्, भाग्यवान्; (अ.) नेहमीं.
**सदोदित** (सं. व.) नाशरहित; (अ.) नेहमीं.
**संदोली** (स्त्री.) पेटी, संदूक.
**संदोष** (सं. वि.) दोषयुक्त.
**संदोह** (सं. पु.) समूह.
**सद्गत, सदगति** (सं. सद्गति स्त्री.) चांगली गति, मोक्षप्राप्ति.
**सद्गदित** (सं. वि.) कंठ दाटून आलेला.
**सद्दा** (फा. स्त्री.) शतक; चलती, अनुकूल काळ; भाग्यशालित्व.
**सद्गुण** (सं. पु.) चांगले गुण.
**सद्गुरु** (सं. पु.) उपदेशक; ईश्वरप्राप्तीचा मार्गदर्शक.
**सद्गृहस्थ** (सं. पु.) प्रतिष्ठित गृहस्थ.
**सद्भाव** (सं. पु.) भलेपणा; साधुत्व; मनाची शुद्धता.
**सद्म** (सं. न.) घर.
**सद्यः** (सं. अ.) सध्यां, वर्तमानकाळीं.
**सद्वस्तु** (न.) परमेश्वर; ब्रह्म.
**संध** (स्त्री.) ऐक्य; मिलाप. [शुद्ध; स्पष्ट.
**सधट** (प्रा. वि.) मोठा; सबंध; सरळ;
**सधन** (सं. वि.) श्रीमंत, पैसेवाला.
**संधन** (न.) एक प्रकारची ऐरण.
**सधर, सधरू** (सं. वि.) आश्रययुक्त, बळकट.
**संधला** संदला पहा.
**सधवा** (सं. स्त्री.) सवाष्ण. [जुळणी.
**संधा** (सं. स्त्री.) प्रतिज्ञा, करार; मर्यादा;
**संधान** (सं. न.) सांधा, जुळणी, ऐक्य; लक्ष्य, नेम धरणें; वग, वशिला.
**संधानी** (वि.) हुशार, धूर्त, युक्तिबाज.
**संधि** (सं. पु.) सांधा, चीर, संयोग. मिलाफ, समेट; (स्त्री.) अनुकूल काळ.
**संधिगत** (सं. वि.) सांध्यांत असलेला.
**संधिप्रकाश** (सं. पु.) सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तानंतर असणारा उजेड.

**संधिवात** (सं. पु.) सांधे धरतात असा एक रोग. [मैत्री आणि कलह.
**संधिविग्रह** (सं. पु.) शांतता आणि युद्ध;
**संधिवेला** (सं. स्त्री.) संध्याकाळ.
**सध्या–ध्यां** (क्रि. वि.) या क्षणीं; आतां.
**संध्या** (सं. स्त्री.) रात्र व दिवस यांच्या मधला संधिकाळ; संधिप्रकाश; सायंकाळ; ब्राह्मणांनीं त्रिकाळ करण्याची उपासना.
**संध्याकाळ** (सं. स्त्री.) सूर्यास्ताचा समय.
**संध्याराग** (पु.) सायंकाळीं आकाशांत दिसणारा तांबूस रंग.
**संध्यावंदन** (न.) त्रैवर्णिकांनीं करावयाची संध्योपासना.
**सन** (अर. पु. न.) वर्ष. [वाद्य.
**सनई** (फा. सुनाई स्त्री.) वाजंत्र्याचें एक
**सनग** (न.) सणंग पहा.
**सनकाडी–कांडी** (स्त्री.) आगकाडी.
**सनत्कुमार** (सं.पु.) ब्रह्मदेवाचे मानसपुत्र.
**सनद** (अर. स्त्री.) सरकारचें शिक्कापत्र; दानपत्र, अखत्यारपत्र. [आलेला.
**सनदी** (वि.) राजपत्रानुसार अस्तित्वांत
**संबद्ध** (सं. वि.) सज्ज; संलग्न.
**सनपणें** (प्रा. क्रि.) उपमेस येणें.
**सनवदबाकी, सनवातबाकी** (स्त्री.) अनेक वर्षेपर्यंत थकलेली सरकारी देण्याची बाकी.
**सनागर** (प्रा. वि.) गोड, चांगली (भा० १०।२३५); (पु.) शृंगार.
**सनाटा** झपाटा पहा.
**सनाटून** (अ.) झपाट्यानें.
**सनातन** (सं. वि.) शाश्वत; चिरकाल.
**सनातनधर्म** (सं. पु.) अनादिकालापासून चालत आलेला धर्म.
**सनाथ** (सं.वि.) त्राता असलेला; सुवासिनी.
**संनद्ध** (सं. वि.) सज्ज; संलग्न.
**संनिकर्ष** (सं. पु.) संनिधता.
**संनिध** (सं. अ.) समीप, जवळ.
**संनिधान** (सं. न.), **संनिधि** (सं. पु.) सान्निध्य; जवळ किंवा शेजारीं असणें. एकीकरण, मिश्रण; ठेव; आश्रय.
**सन्निपात** (सं. पु.) भेट, संगम; वैद्यकांत —वात, कफ व पित्त या तिन्ही दोषांचा एकदम प्रकोप.
**सन्निविष्ट** (धा. वि.) आंत बसलेला; मग्न; पारंगत. [मग्नता.
**सन्निवेश** (सं. पु.) अंतःप्रवेश; नैपुण्य;
**सन्मान** (सं. पु.) आदर, सत्कार.
**सनोलख** (प्रा. वि.) ओळखीचा.
**सन्मुख** (सं. पु.) समोर.
**संन्यास** (सं. पु.) त्याग; काम्य कर्मांचा त्याग; चार आश्रमांपैकीं शेवटचा.
**संन्यासी** (सं. पु.) त्यागी, तपस्वी.
**संप** (पु.) एकी, संघ, जूट. **संप करणें**— जूट करून काम बंद पाडणें.
**सपक** (प्रा. वि.) नीरस; बेचव (मोरो० उद्यो० १३।१८२).
**संपणें** (क्रि.) खलास होणें; पूर्ण होणें; खपणें; शेवटास जाणें; मरणें.
**संपत्** (सं. स्त्री.) संपत्ति, धन; दौलत; प्राप्ति; संपादनी. [मूल्यवान् वस्तु.
**संपत्ति** (सं. स्त्री.) धन; दौलत; पैसा,
**संपत्तिमान्** (सं. वि.) श्रीमंत; धनिक.
**सपत्न** (सं. पु.) शत्रु.
**सपत्नी** (सं. स्त्री.) सवत.
**सपत्नीक** (सं. वि.) भार्येसहित.
**संपत् शनिवार** (पु.) श्रावण महिन्यांतले शनिवार.
**संपदा** (सं.स्त्री.) संपत्ति, दौलत; भरभराट.
**संपन्न** (सं. वि.) युक्त; सहित; श्रीमान्; वैभवशाली. [सह.
**सपरिवार** (सं.वि.) नोकर चाकर इ० च्या
**संपर्क** (सं. पु.) संयोग; स्पर्श, सहवास.
**संपविणें** (क्रि.) पूर्ण करणें, शेवटास नेणें; खर्चून टाकणें.
**सपशेल** (अ.) हातपाय पसरून सर्व अंग टेकून, निःसंकोच रीतीनें, ऐसपैस.
**सपसप, सपसपा** (अ.) भरभरा.
**सपाई** (प्रा. वि.) सर्व, संपूर्ण (ज्ञा० १४।१०९९); (अ.) सर्वस्वीं (भा० २३।३१६).
**सपाट** (वि.) समतल, उंचसखल नव्हे असा.
**सपाटणें** (क्रि.) झपाटणें.
**सपाट सुपली** (स्त्री.) नकटें नाक.

**सपाटा** (वि.) भव्य, मोठा, जोराचा; (पु.) झपाटा, जोर, आवेश.
**सपाटी** (स्त्री.) सपाटपणा, सपाट प्रदेश.
**संपात** (सं. पु.) टक्कर, धडक, तडाखा, प्रहार; गर्दी; पतन.
**संपात, संपातबिंदु** (सं. पु.) क्रांतिवृत्त व विषुववृत्त हीं दोन वर्तुळें ज्या बिंदूंत परस्परांस छेदतात तो बिंदु.
**सपातळ** (प्रा. न.) पडदा (ज्ञा० ६।१४).
**संपादक** (सं. पु.) मिळविणारा, जुळणी करणारा; संशोधक; वर्तमानपत्र वगैरेचा मुख्य जबाबदार लेखक, एडिटर.
**संपादणी** (स्त्री.) आचरण (भावार्थ० २।१।५); बतावणी.
**संपादणूक** (स्त्री.) कांहीं सबब सांगून वेळ मारून नेणें, बतावणी.
**संपादणें** (सं. संपद् क्रि.) मिळविणें.
**संपादन** (सं. न.) मिळविणें, प्राप्त करून घेणें; संशोधन. [वर्तमानपत्र इ०
**संपादित** (सं. वि.) मिळविलेलें; चालविलेलें
**सपासप** (अ.) एकामागून एक, त्वरेनें.
**सपिंडी** (स्त्री.) मृताच्या बाराव्या दिवशीं त्याच्या नांवानें पिंडदान करतात तें.
**सपीट, सपीठ** (सं. सपिष्ट न.) गव्हाचें बारीक पीठ, मैदा.
**सपिली** (प्रा. वि.) समूळ (ज्ञा० १३।७६८).
**सपील** (प्रा. न.) आईचें सगळें दूध पिणारा वत्स.
**सपोली** (हिं. स्त्री.) तटबंदी.
**संपुट** (सं. पु.) पूड, द्रोण, करंडा, संपुष्ट (लहानसें धातुपात्र).
**सपुत** (वि.) बालबच्चे असलेला.
**सपुर** (प्रा. वि.) बारीक (ज्ञा० ८।१६).
**सपुरता** (प्रा. वि.) पूर्ण, समर्थ.
**सपुरतें** (प्रा. अ.) पूर्णपणें (तुका० १८८६).
**सपूत** (सं. सुपुत्र पु.) आज्ञाधारक, कर्तव्यतत्पर मुलगा. [१२।३१२).
**सपूर** (प्रा. वि.) भरपूर, बारीक (भा०
**सपूरण** (प्रा. वि.) बारीक (ज्ञा० ८।१६).
**संपूर्ण** (सं. वि.) समाप्त, समग्र.
**संपूर्णता** (सं. स्त्री.) समाप्ति; शेवट; पूर्णपणा, अन्यूनता, सांगता.
**सपेली** सफेली पहा.
**सपोत** (वि.) बारीक पोताचें.
**सपोल** (वि.) व्यर्थ, निष्फळ.
**सपोश, सपोष** (वि.) पुष्ट (भा० ३।४७८).
**सप्टेंबर** (इं. पु.) इंग्रजी वर्षाचा नववा महिना.
**सप्त** (सं. वि.) सात.
**सप्तऋषि** (सं. पु.) मरीची, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रतु व वशिष्ठ हे ऋषि; याच नांवाचे ध्रुवाजवळचे सात तारे.
**सप्तक** (सं. न.) सातांचा समुदाय.
**सप्तकर** (सं. पु.) अग्नि.
**सप्तगोदावरीतीर** (सं. न.) गोदावरी नदीच्या सात शाखा ज्या प्रदेशांतून वहात जातात तो प्रदेश. [येणें.
**सप्तग्रही** (सं. स्त्री.) सात ग्रह एका राशींत
**सप्तचैतन्यें** (सं. न. अने.) मुख्य शाश्वत चैतन्य व इतर सहा मायिक चैतन्यें (ब्रह्म, ईश, जीव, प्रमाण, प्रमात्र व प्रमेय).
**सप्तद्वीपा** (सं. स्त्री.) जंबु, कुश, प्लक्ष, शाल्मली, क्रौंच, शाक व पुष्कर अशा सात खंडांमिळून झालेली पृथ्वी.
**सप्तधातु** (सं. पु. अने.) रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा आणि वीर्य अशीं शरिरांतील सात तत्त्वें; सोनें, रुपें, तांबें, कथिल, नाग, तीक्ष्ण आणि कांसें असे सात धातु.
**सप्तनद** (सं. पु.) शोण, सिंधु, हिरण्यवाह, कोक, घर्घर, लोहित आणि शतद्रू या सात मोठाल्या नद्या.
**सप्तपदी** (सं. स्त्री.) लग्नांत वधूवरांनीं तांदुळाच्या राशींवरून सात पावलें बरोबर चालण्याचा विधि.
**सप्तपर्वत** (सं. पु.) महेंद्र, मलय, सह्य, शुद्धिभाव, गंधमादन, विंध्य आणि पारियात्र हे सात मुख्य पर्वत.
**सप्तपाताल** (सं. न.) अतल, वितल, सुतल, महातल, रसातल, जलातल आणि पाताल असे सात पाताललोक.
**सप्तम** (सं. वि.) सातवा.

**सप्तमातृका** (सं. स्त्री.) ब्राह्मी, माहेश्वरी, कौमारी, वैष्णवी, वाराही, इंद्राणी व चामुंडा.
**सप्तमी** (सं. स्त्री.) सातवी तिथि; व्याकरणांत—सातवी विभक्ति.
**सप्तर्षि** (सं. पु.) सप्तऋषि पहा.
**सप्तलोक** (सं. पु.) भूर्लोक (मृत्युलोक), भुवर्लोक, स्वर्लोक, महार्लोक, जनोलोक तपोलोक आणि सत्यलोक.
**सप्तशती** (सं. स्त्री.) सातशें; सातशें श्लोकांचा ग्रंथ; चंडीपाठ.
**सप्तसमुद्र** (सं. पु.) क्षारोद, इक्षुरसोद, सुराद, घृतोद, क्षीरोद, दधिमंडोद व शुद्धोद.
**सप्तस्कंद** (सं. पु.) पृथ्वीपासून वर कल्पिलेले वायूचे सात भाग; ते असे—आवह, प्रवह, उद्वह, संवह, वैवह, पष्ठापरा आणि परिवाह.
**सप्तस्वर** (सं. पु.) षड्ज (सा), ऋषभ (री), गांधार (ग), मध्यम (म), पंचम (प), धैवत (ध) आणि निषाद (नी) हे गायनांतले मूळ सात स्वर.
**सप्तालू** (फा. न.) एका फळाचें नांव.
**सप्ताश्व** (सं. पु.) सूर्य.
**सप्ताह** (सं. पु.) आठवडा, सप्ता; सात दिवसांत केलेलें ग्रंथाचें पारायण.
**सप्पा** (पु.) चापटी; नाश; उध्वस्तता.
**सप्रवर, संप्रवर** (सं. वि.) ज्या कुटुंबाचा मूलपुरुष एकच आहे अशीं कुटुंबें.
**संप्रति** (सं. क्रि. वि.) सध्यां, सांप्रत.
**संप्रदान** (सं. न.) देणें; (व्याकरणांत) चतुर्थीचा अर्थ.
**संप्रदाय** (सं. पु.) चाल, रीत, वहिवाट; वाक्प्रचार; धर्मपंथ; मार्ग.
**संप्रदायी** (सं. वि.) विशिष्ट पंथाचा.
**संप्रधारणा** (सं. स्त्री.) विचार; युक्तायुक्तनिर्णय.
**सप्रभव** (सं. वि.) पराक्रमी.
**सप्रयुक्त** (क्रि. वि.) युक्तीनें.
**संप्रसारण** (सं. न.) संस्कृत व्याकरणांत य् र् ल् आणि व् यांचेवद्दल अनुक्रमें इ, ऋ, ऌ आणि उ येणें हा बदल.
**संप्रज्ञात** (सं. वि.) सविकल्प (समाधि).
**संप्राप्त** (सं. वि.) पूर्णपणें सिद्धीस गेलेलें किंवा प्राप्त झालेलें.
**सप्रेम** (सं. अ.) प्रेमपूर्वक.
**सफई** (स्त्री.) सफाई.
**सफर** (अर. स्त्री.) प्रवास, पर्यटन; जलप्रवास; खलाशाची मजुरी; (न.) मुसलमानी वर्षाचा दुसरा महिना.
**सफरचंद** (न.) एका फळाचें नांव.
**सफरजंगी** (स्त्री.) तुंबळ युद्ध.
**सफरी** (हिं. पु.) दर्यावर्दी.
**सफल, सफळ** (सं. वि.) यशस्वी, फलद्रूप.
**सफा** (अर. स्त्री.) रांग; ओळ; कत्तल; (वि.) साफ.
**सफाई** (अर. स्त्री.) स्वच्छता; गुळगुळीतपणा; नीटनेटकेपणा; संवयीनें येणारा कौशल्यांतील सहजपणा; चपलता.
**सफाईदार** (वि.) स्वच्छ; गुळगुळीत, नीटनेटकें; छानदार.
**सफाफ** (फा. स्त्री.) काच.
**सफील** (स्त्री.) सफेल, सफेली पहा.
**सफेजगी** (स्त्री.) हातघाईची लढाई; उध्वस्तता, उजाडी, समाप्ति.
**सफेत** (फा. वि.) पांढरा शुभ्र.
**सफेता** (फा. पु.) खडीसारखा पांढरा रंग.
**सफेती** (स्त्री.) पांढरेपणा; चुन्याचा लेप.
**सफेद** (वि.) सफेत, पांढरा.
**सफेल, सफेली** (स्त्री.) किल्ल्याची भिंत (स्वा० दि० १०।२।२२); तटबंदीच्या मागील बाजूचा धक्का.
**सफोल** (वि.) निष्फळ, व्यर्थ.
**सब, सबू** (सं. सर्व वि.) सगळें.
**सबक** (हिं. पु.) धडा; पाठ. [ वेताचें.
**सबकल, सबखल** (अ.) बरोबर; ठीक,
**सबगोलंकार** (वि.) नास्तिकपणाचें; घोटाळा असलेलें.
**सबजा** (फा. पु.) एक सुगंधि वनस्पति.
**सबजी** (फा. स्त्री.) हिरवेपणा, हिरवळ, टवटवी; भांग.
**संबद्ध** (सं. वि.) जोडलेला, युक्त.
**संबंध** (सं. पु.) संयोग, संसर्ग; नातें; (व्याक०) षष्ठीचा अर्थ.

नगर वाचनालय, सातारा



**सबंध** (वि.) सगळाचा सगळा, सर्व, न मोडतां.
**संबंधी** (सं. वि.) नात्यागोत्याचा, नातलग.
**सबनिशी** (स्त्री.) सबनिसाचें काम व हुद्दा.
**सबनीस** (फा. पु.) शिबंदी व दुसरे सरकारी नोकर यांस पगार वांटणारा अधिकारी.
**सबब** (अर. स्त्री.) कारण; (अ.) यामुळें.
**सबर** (वि.) गाभण.
**सबराभरित** (प्रा. वि.) सबाह्याभ्यंतरित, व्यापक (ना० ९९४; एक० २१०५).
**सबल, सबळ** (सं. वि.) बळकट, मजबूत.
**सबलस** (प्रा. वि.) सपशेल लोटांगण घातलेला (एक० ९७).
**सबळ** (सं. शबल वि.) औपाधिक; मायिक.
**संबळ** (प्रा. न.) शिदोरी (ज्ञा० १८।१३९); (पु. स्त्री.) दोन शिंगाटयांची ऐरण; पहार; एक चर्मवाद्य.
**संबळी** (स्त्री.) देवाचीं उपकरणीं ठेवण्यासाठीं बांबूची किंवा वेताची केलेली पेटी.
**सबां** (अर. वि.) सात.
**सबाह्य** (सं. वि.) आंतून बाहेरून; (वि.) कायिक व मानसिक.
**सबुडबुडी** (प्रा. अ.) कोणास ठावठिकाण न लागूं देतां (ज्ञा० १२।७८४).
**सबुद्धि** (सं. स्त्री.) ज्ञान, पूर्ण जाणीव.
**सबुराई, सबुरी** (अर. स्त्री.) धीर, दम; शान्ति; गम; मुलाजा.
**सबैन** (अर. वि.) सत्तर.
**सबोखणें** (प्रा. क्रि.) हाक मारणें; तृप्त करणें; समजावणें. [बोलणें.
**संबोधणें** (क्रि.) हाक मारणें, उद्देशून
**संबोधन** (सं. न.) हाक मारणें, उपदेश करणें.
**सबोंब** (प्रा. वि.) सुशोभित.
**सब्बा** (अर. वि.) पहा. [झपाटयानें.
**सभर** (वि.) गाभण, सबर; (अ.) जोरानें;
**सभराभरी** (प्रा. अ.) जिकडे तिकडे (रं० यो० १०।३२६).
**सभरित, संभरित** (प्रा. अ.) सह, बरोबर.
**सभर्तृका** (सं. वि.) सवाष्ण, सुवासिनी.
**संभव** (सं. पु.) जन्म, उत्पत्ति; हेतु; शक्यता. [जन्म पावणें.
**संभवणें** (क्रि.) शक्य असणें; उद्भवणें;
**सभंवता, सभंवतीं** (अ.) भोंवतालीं.
**संभवनीय** (सं. वि.) होण्यासारखें, घडण्यासारखें. [लहान पेटी; संबळी.
**संभळ** (स्त्री.) वेत, वेळू इ० ची केलेली
**सभळित** (प्रा. वि.) थबथबलेलें. [दरबार.
**सभा** (सं. स्त्री.) समाज, मंडळी; कचेरी.
**सभागृह** (न.) सभेची जागा; (पु.) सभेचे सदस्य.
**सभाजणें** (प्रा. क्रि.) सन्मान करणें.
**सभाजन** (सं. न.) पारितोषिक; देणगी; (पु.) सभेचा घटक.
**सभापति** (सं. पु.) सभेचा अध्यक्ष; लोकसभेचा अध्यक्ष. (इं. स्पीकर.)
**सभामंडप** (सं. पु.) सभास्थान; देवालयापुढें कथाकीर्तनासाठीं बांधिलेला मंडप.
**संभार** (सं. पु.) संग्रह; समुदाय, सामुग्री.
**संभावना** (सं. स्त्री.) तर्क, कल्पना; संभव; योग्यता; बिदागी; दक्षिणा, गौरव. **संभावनाद्रव्य** (न.)—सार्वजनिक किंवा खाजगी कामाकरितां प्रतीक म्हणून सन्मानपूर्वक दिलेलें वेतन; मानवेतन; मानद्रव्य.
**संभाषण** (सं. न.) भाषण, बोलणें.
**सभासद्** (सं. पु.) सभेंतला प्रत्येक मनुष्य; संस्थेचा घटकावयव.
**संभाळ** (पु.) रक्षण, पालन.
**संभाळणें** (क्रि.) बाळगणें, जमणें, रक्षण करणें.
**संभूति** (सं. स्त्री.) उत्पत्ति.
**संभूयसमुत्थान** (सं. न.) पातीदारीचा धंदा, संयुक्त भांडवलाचा व्यापार.
**संभोग** (सं. पु.) भोगवटा; सुख; विलास; मैथुन.
**सभ्य** (सं. वि.) संभावित, शिष्ट.
**संभ्रम** (सं. पु.) त्वरा, धांदल, धामधूम; उत्कंठा; उत्साह; आनंददायक कृत्य (तुका० १९६६); मोह (ज्ञा० १।२७१).
**सम्** (सं. अ.) सहित, बरोबर; अतिशय; सारखें इ.
**सम** (सं. वि.) सारखें, तुल्य; सपाट; दोहोंनें निःशेष भागली जाणारी (संख्या); उदासीन; निःपक्षपाती.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**समई** (स्त्री.) ठाणवई; दिवा लावण्यासाठीं केलेला धातूचा स्तंभ.
**समईक** (सं. सामयिक वि.) करारानें ठरलेलें; संयुक्त हक्काचें.
**समकणें** (क्रि.) संवकणें, गोडी लागणें.
**समकक्ष** (सं. वि.) बरोबर, सारखा.
**समकालीन** (सं. वि.) एका वेळचें, एका काळांतलें.
**समग्र** (सं. वि.) सर्व, संपूर्ण, सबंध.
**समचतुरस्त्र** (सं. वि.) चार सारखे कोन असलेली (आकृति).
**समज** (प्रा. पु.) समाज, समुदाय (ज्ञा० ११।१८६); (पु. स्त्री.) समजूत, ग्रहणशक्ति; सूचना, धमकावणी.
**समजणें** (क्रि.) जाणणें, ओळखणें, ताळ्यावर येणें.
**समजदार** (वि.) शहाणा, सुज्ञ, हुशार.
**समजपत्र** (न.) समजूत झाल्याबद्दलचें पत्र.
**समजविणें** (क्रि.) समजेल अशा रीतीनें सांगणें.
**समंजस** (वि.) समज़दार, हुशार, सुज्ञ.
**समजावण–णी** (स्त्री.) समजूत घालणें, मन वळविणें; स्पष्टीकरण, उलगडा.
**समजाविणें** (क्रि.) कळावयास लावणें; कळविणें; मनाचें समाधान करणें.
**समजाविशी, समजावीस, समजी** (स्त्री.) समजूत घालणें, मन वळविणें खात्री करणें; देण्याघेण्याचा हिशेव करून घातलेली समजूत.
**समजूत** (स्त्री.) समज, मनाचा ग्रह.
**समजूतदार** (वि.) समंजस, शहाणा.
**समजून उमजून** (अ.) जाणून बुजून; मुद्दाम, बुद्धिपुरःसर.
**संमत** (सं. वि.) मान्य, पसंत; पूज्य.
**समंततः,समंतात्**(अ.) सभोंवार, भोंवतालीं.
**समता** (सं. स्त्री.)सारखेपणा, एकरूपता; बरोबरी; निःपक्षपातपणा.
**संमति** (सं. स्त्री.) रुकार, पसंति; सत्कार.
**संमतिपत्रक** (सं. न.) पंचांच्या निवाड्याचें पत्रक.
**समतुक** (प्रा. वि.)सारख्या तोलाचें, सारखें.
**समतोल** (सं. वि.) सारख्या वजनाचें.
**समत्व** (सं. न.) समता पहा. [सहित.
**समंत्र, समंत्रक** (सं. वि.) मंत्रोच्चार–
**समत्रिभुज** (सं. पु.) ज्याच्या तिन्ही बाजू सारख्या आहेत असा त्रिकोण.
**समथळ** (सं. समतल न.) सपाट जागा.
**समंद, समंध** (पु.) पिशाच (विशेषतः ब्राह्मणाचें); संबंध (भाग० १।१९).
**समदर्शी** (वि.) निःपक्षपाती; तटस्थ.
**समदुःखी** (वि.) ज्यास एकाच प्रकारची पीडा आहे असा; दुःखाचा भागीदार.
**समधात** (सं. समधातु वि.) समशीतोष्ण.
**समन्वय** (सं. पु.) एकसारखा व्यवस्थित क्रम; परस्परसंबंध; तात्पर्य.
**समन्वित** (सं. वि.) युक्त; संबद्ध.
**समन्स** (इं. न.) कोर्टाचें बोलावणें.
**समबुद्धि** (सं. स्त्री.) सारखे विचार, सारख्या भावना; (वि.) सर्वांना सारखें समजणारा. [ग्रपथ; कुलाचार.
**समय** (सं. पु.) वेळ, काळ, प्रसंग; प्रतिज्ञा,
**समयसूचकता** (सं. स्त्री.) योग्य वेळीं योग्य गोष्ट सुचणें; हजरजबाबीपणा.
**समयोचित** (सं. वि.) वेळेस योग्य, प्रसंगास शोभणारें.
**समर** (सं. पु.) युद्ध, संग्राम.
**समरंग** (प्रा. न.) युद्धभूमि.
**समरप्रसंग** (पु.) ललित वाङ्मयांत येणारी संघर्षमय घटना.
**समरभूमि** (सं. स्त्री.) रणांगण, युद्धक्षेत्र.
**समरस** (सं. पु.) ऐक्य, तादात्म्य (ज्ञा० १८।२४६); ब्रह्मानंद; (वि.) सर्वांशीं मिळून राहणारा.
**समरसणें** (सं. क्रि.) लीन होणें; मिळून जाणें (भा० २।३९१).
**समरसता** (स्त्री.) मानसिक वृत्तींची एकरूपता, तल्लीनता.
**समरांगण** (सं. न.) युद्धभूमि, रणक्षेत्र.
**समरास** (सं. समराशि स्त्री.) शेतातल्या पिकाची अविभक्त रास; अविभक्त मालमत्ता.
**समर्घ** (सं. वि.) अल्प किंमतीचें, स्वस्त.
**समर्थ** (सं. वि.) शक्तिमान; बलिष्ठ; (पु.) रामदासस्वामी.

**समर्थणें** (क्रि.) बोलणें (ज्ञा० ९।१४८५); प्रतिपादन करणें.
**समर्थन** (सं. न.) पक्ष घेणें; सिद्ध करणें; पुष्टि देणें. [करण्यासारखें.
**समर्थनीय** (सं. वि.) प्रमाणांनीं सिद्ध
**संमर्द** (सं. पु.) घर्षण, गर्दी. [जुळतें.
**समर्पक** (सं. वि.) योग्य, असावें तसें;
**समर्पण** (सं. न.) देणें; अर्पण, दान.
**समर्पिणें** (क्रि.) देणें; अर्पण करणें.
**समर्याद** (सं. वि.) मर्यादायुक्त, मर्यादित.
**समला** (अर. पु.) पागोट्याचा किंवा रुमालाचा पाठीवर लोंबणारा पदर.
**समलातीपत्र** (न.) मदतीस बोलावण्याचें पत्र.
**समवयस्क, समवयी** (सं. वि.) सारख्या वयाचा.
**समवाय** (सं. पु.) संयोग, संबंध, समागम; समुदाय; एकोपा; साह्य; समूह.
**समवायिकारण** (सं. न.) कार्यांत मिळून असलेलें व त्यापासून भिन्न किंवा न काढतां येण्यासारखें कारण. [बरोबर.
**समवेत** (सं.वि.) मिश्रित, संबद्ध; (अ.) सह,
**समशेर** (फा. स्त्री.) तलवार.
**समशेरबहाद्दर** (फा. वि.) युद्धांत तलवार गाजविणारा; बडोद्याच्या गायकवाड सरकारची पदवी.
**समष्टि** (सं. स्त्री.) समुदाय, समग्रता.
**समसकी** (स्त्री.) दर सहा महिन्यांनीं विणारी किंवा सहा महिने दूध देणारी गाय.
**समसमान** (वि.) अगदीं सारखें, तुल्य.
**समसामत** (प्रा. वि.) कडक (ज्ञा० १।४२९).
**समस्त** (सं. वि.) सर्व, सगळे.
**समस्तराशिक** (सं. न.) अंकगणितांत—बहुराशिक.
**समस्या** (सं. स्त्री.) पूर्ण करण्याचा श्लोकांश; पूर्णता; आकांक्षा (स्वा० दि० १।२।६२); शंका.
**समळी, समळ, संबळ** (स्त्री.) संबळी, पेटी.
**समक्ष** (सं. अ.) प्रत्यक्ष, देखत.
**समक्षासमक्ष** (अ.) देखत, समोरासमोर.
**समा** (सं. स्त्री.) वर्ष, संवत्सर.
**समा** (प्रा. स्त्री.) पूर्ण भरतीची वेळ (तुका० ५७); पूर्ण ऐक्य.
**समाईक** (सं. सामायिक वि.) संयुक्त मालकीचा, अनेकांना सामान्य.
**समाकुळ, समाकूळ** (वि.) व्याप्त; व्यग्र, क्षुब्ध; हैराण. [पराभूत.
**समाक्रांत** (सं. वि.) विस्तृत; आक्रमित,
**समागत** (सं. वि.) युक्त, सहित. [संगत.
**समागम** (सं. पु.) संगम, संयोग, सहवास,
**समागमें** (अ.) बरोबर, सह.
**समाचार** (सं. पु.) वर्तमान, बातमी; परामर्श. [मंडळी.
**समाज** (सं. पु.) समुदाय, जमाव, सभा,
**समाजवाद, समाजसत्तावाद** (पु.) सत्ता व उत्पादनसाधनें समाजाच्या मालकीचीं असावीं असें मानणारा समतावादी पंथ.
**समाजशास्त्र** (सं. न.) मानवी समाजाची रचना, उत्क्रांति व सुधारणा यांचीं तत्त्वें, नियम इ० चें विवेचन करणारें शास्त्र.
**समांतर** (सं. वि.) सारख्या अंतरावरचा.
**समादेशक मंडळ** (न.) संचालक मंडळ.
**समाधान** (सं. न.) तृप्ति; संतोष, शंकानिवृत्ति; आराम.
**समाधानी** (सं. वि.) थोडक्यांत तृप्ति पावणारा; संतोषित वृत्तीचा.
**समाध, समाधि** (सं. वि.) ध्यान; चित्ताची एकाग्रता; संन्याशाचें प्राणोत्क्रमण; योगी, संन्यासी, साधु इ०च्या मृत्युस्थळीं पादुका वगैरे बांधतात तें, थडगें, कबर.
**समाधिस्त, समाधिस्थ** (सं. वि.) ध्यानस्थ, चिंतनांत गढलेला; मृत.
**समान** (अर. वि.) आठ.
**समान** (सं. वि.) तुल्य, सारखें; सपाट; (पु.) पंचप्राणांपैकीं एक; (अ.) बरोबरीनें, प्रमाणें. [कोर्टाचें बोलावणें.
**समान, सम्मान** (पु.) सन्मान; (इं. न.)
**समानशील** (सं. वि.) सारख्या स्वभावाचा.
**समानांतर** (सं. वि.) सारख्या अंतरावरचा.
**समानाधिकरण** (सं. न.) सामान्य गुण; एक अर्थ; (व्याक०) बहुव्रीहि समासाचा एक प्रकार (यांत विग्रह करतांना समासांतल्या दोन्ही पदांस एकच म्हणजे प्रथमा विभक्ति असते.).

**समानार्थक** (सं. वि.) एकाच अर्थाचें.
**समानीन** (अर. वि.) ऐंशीं.
**समानोदक** (सं. पु.) कुळांतल्या चवदा पुरुषांपलीकडे एकवीस पर्यंतचे सात पुरुष (हे उदकतर्पणाला मात्र अधिकारी असतात).
**समापत्र** (न.) संमतिपत्र.
**समापन** (सं. न.) समाप्ति.
**समाप्त** (सं. वि.) संपलेलें.
**समाप्ति** (सं. स्त्री.) शेवट, पूर्णता.
**समारंभ** (सं. पु.) कार्य, उद्योग; उत्साह, उत्सव.
**समारावन** (सं. न.) आनंदविण्याचें साधन.
**समाराधना** (सं. स्त्री.) ब्राह्मणभोजन, भंडारा.
**समारोप** (सं. पु.) उपसंहार.
**संमार्जन** (सं. न.) झाडणें, साफ करणें.
**संमार्जनी** (सं. स्त्री.) केरसुणी.
**समालोचन–ना** (सं. न. स्त्री.) निरीक्षण; विवरण; टीका. [होणें.
**समावणें** (क्रि.) समावेश होणें, अंतर्भाव
**समावर्तन** (सं. न.) परत येणें; सोडमुंज.
**समाविष्ट** (सं. वि.) अंतर्भूत, व्याप्त; पिशाचग्रस्त. [संग्रह.
**समावेश** (सं. पु.) अंतर्भाव, प्रवेश, शिघाव;
**समास** (सं. पु.) एकीकरण, संयोग; समुदाय; सारांश; व्याकरणांत—दोन किंवा अधिक शब्दांचा संयोग होऊन झालेला एक शब्द.
**समास्या** (सं. स्त्री.) संगति, सहवास.
**समाहार** (सं. पु.) समुदाय.
**समाहारद्वंद्व** (सं. पु.) व्याकरणांत ज्या द्वंद्व समासांत त्यांतील पदांच्या अर्थाशिवाय आणखी तशाच प्रकारच्या अर्थांचा अंतर्भाव होतो तो.
**समाहित** (सं. वि.) मान्य; विहित; एकाग्र; शांत. [जमाव, युद्ध.
**समिति** (सं. स्त्री.) संयोगसभा; संस्था;
**समितिंजय** (वि.) युद्धांत जय मिळवणारा.
**समिध** (सं. स्त्री.) होमाच्या उपयोगाचें इंधन. [चांदवा; अस्मानगिरी.
**समिना** (फा. शामियाना पु.) चांदणी,
**संमिश्र** (सं. वि.) मिसळलेलें.
**समीकरण** (सं. न.) सारखें करणें; बीजगणितांत—दोन राशींची परस्पर—समता दर्शविणारें बैजिक वाक्य.
**समीचीन** (सं. वि.) योग्य, चांगलें.
**समीननिमिन** (प्रा. वि.) अर्धे अर्ध (ज्ञा० १८।८२८). [जवळ.
**समीप** (सं. वि.) जवळचा; निकट; (अ.)
**समीपता** (सं. स्त्री.) जवळपणा; चतुर्विध मुक्तींतली एक (हींत नेहमीं ईश्वराचें सान्निध्य घडतें).
**समीर, समीरण** (सं. पु.) वायु.
**संमीलन** (सं. न.) एकत्र होणें; येणें.
**समीक्षण** (सं. न.) समीक्षा; (स्त्री.) अवलोकन, न्याहाळणें; आत्मविद्या; सांख्यशास्त्रबुद्धि.
**संमुख** (सं. वि.) समोर; पुढें.
**समुचित** (सं. वि.) योग्य, उपयुक्त.
**समुच्चय** (सं. पु.) समूह, ढीग.
**समुच्छेद** (सं. पु.) समूळ नाश.
**समुत्कट** (सं. वि.) अतिशय.
**समुत्कर्ष** (सं. पु.) श्रेष्ठत्व, उत्कर्ष.
**समुत्थान** (सं. न.) दीर्घोद्योग; धंदा.
**समुत्पादन** (सं. न.) संपादन, उद्योग:
**समुदाय** (सं. पु.) ढीग, समूह; समाज; जमाव.
**समुदायी–ई** (सं. पु.) शिष्य.
**समुद्र** (सं. पु.) सागर, दर्या.
**समुद्रफेस** (पु.) एका औषधाचें नांव.
**समुद्रमेखला** (सं. स्त्री.) पृथ्वी. [वेष्टिलेली.
**समुद्रवलयांकित** (सं. वि.) समुद्रांनीं
**समुदित** (सं. वि.) जमलेलें. [दाता.
**समुद्धर्ता** (सं. पु.) उद्धार करणारा; मोक्ष-
**समुवावो** (प्रा. पु.) समुदाय.
**समूर, समोर** (सं. संमुख क्रि. वि. श. अ.) पुढें, अग्रभागीं, नंतर (स्थळ किंवा काल या संबंधानें).
**समूल, समूळ** (सं. वि.) मुळासकट.
**समूह** (सं. पु.) समुदाय, कळप.
**समृद्ध** (सं. वि.) भरभराटलेला; संपन्न.
**समृद्धि** (सं. स्त्री.) विपुलता, भरभराट.
**समें** (प्रा. अ.) समयीं (एक० ५४०).

**समेट** (सं. पु.) सलोखा, ऐक्य, मेळ, एकीकरण. [ मिटविणें, संधि करणें.
**समेटणें** (क्रि.) एकवटणें; मिटेल असें करणें;
**समेत** (सं. वि.) युक्त, सहित, एकत्र.
**समेलन** (सं. न.) एकत्र जुळणें, मेळा, मिलाफ.
**समेळ** (पु.) संबळ, वाजंत्र्याचें चर्मवाद्य.
**समो** (प्रा. पु.) समूह (ज्ञा० १४।२६०); समय (ज्ञा० १७।२९४—५).
**समोखणें** (प्रा. क्रि.) सांत्वन करणें (तुका० ४५।८३). [ बाजूस.
**समोर** (सं. संमुखर अ.) पुढें; सरळ; विरुद्ध
**समोरासमोर** (अ.) परस्परांकडे तोंडें करून.
**समोरील** (वि.) समोरचा, पुढचा.
**संमोह** (सं. पु.) मूर्च्छा; भ्रांति; अज्ञान.
**सम्मान** (अर. वि.) सात.
**सम्राट्** (सं. पु.) सार्वभौम राजा.
**सय** (स्त्री.) स्मरण, आठवण.
**सय** (प्रा. स्त्री.) सखी, मैत्रीण.
**संयत** (सं. वि.) दमन केलेला, आवरलेला.
**संयति** (सं. स्त्री.) इंद्रियनियम.
**संयम** (सं. पु.) निग्रह, दाब, मनोनिग्रह; एकाग्रता. [ व्रत.
**संयमन** (सं. न.) अटकाव, निग्रह; आवरणें;
**संयमनी** (सं. स्त्री.) यमनगरी. [ योगी.
**संयमी** (सं. पु.) इंद्रियदमन केलेला तपस्वी;
**सयसुमार** (पु.) सईसुमार. [ क्रीडा९५).
**सया** ( संबोधन ) सख्या (वामन—रास-
**सयार** (पु.) चेटूक, जादूटोणा.
**सयारी** (प्रा. स्त्री.) डाकीण (ज्ञा० १३। ५०५).
**संयुक्त** (सं. वि.) जोडलेलें, संबद्ध; अनेकांनीं मिळून केलेलें.
**सयुक्तिक, संयुक्तिक** (सं. वि.) युक्तिसिद्ध; सारासार विचाराशीं मेळ ठेवणारें.
**संयोग** (सं. पु.) सांधा, मिलाफ; संघट्टन; संबंध; बेरीज; एकोपा, संगति.
**संयोगी भूमि** (सं. स्त्री.) जमिनीच्या दोन प्रदेशांना जोडणारी जमिनीची अरुंद पट्टी. [ कल्पक.
**संयोजक** (सं. पु.) जोडणारा; सांधणारा;
**संयोजन** (सं. न.) सांधा, मिलाफ, जोड.

**सय्यद** (अर. पु.) मालक; सरदार; शहाजादा; हुसेनचे वंशज.
**सर** (सं. पु.) मोत्यांची, पोवळ्यांची अथवा त्यासारखी दुसरी माळ; सरळ लांब वासा; लोंढा, आवेग; (फा.) अनेक अधिकाऱ्यांवरचा मुख्य; (इं. पु.) सरदारकीचा (नाइटहुडचा) किताब मिळालेला मनुष्य.
**सर** (स्त्री.) बरोबरी, तुलना; रांग, ओळ.
**सरई** (प्रा. स्त्री.) हंगाम, सुगी (तुका० ११४७).
**सरक** (हिं. पु.) फास.
**सरकट** (स्त्री.) पावसाचा लहान झपाटा.
**सरकठणें** (प्रा. क्रि.) गळणें; रगडणें.
**सरकणें** (क्रि.) सरणें, हलणें.
**सरकत** (स्त्री.) भागीदारी; वांटणी; हिस्सा.
**सरकतदार** (पु.) भागीदार.
**सरकतनामा** (पु.) भागीदारीच्या व्यवहाराबद्दल ठरलेल्या अटींचा दस्तऐवज.
**सरकफास** (पु.) गांठ सरकविली असतां पाहिजे तेवढा लहान मोठा करतां येईल असा फास.
**सरकविणें, सरकावणें** (क्रि.) पुढें करणें; ढकलणें.
**सरकार** (फा. न.) मालक; सरदार; राज्याचा कारभार; शासनसत्ता; सत्ता किंवा हुकमत चालविणारे व राज्यसूत्रें हातीं असलेले अधिकारी; राज्य, संस्थान, जिल्हा, सभा.
**सरकारवाडा** (पु.) राजवाडा. [ कारची.
**सरकारी** (वि.) राज्यासंबंधाची, सर-
**सरकावणें** (क्रि.) सरकविणें पहा. [ भाग.
**सरकाळें** (प्रा. न.) कडब्याचे तांटाचा अग्र
**सरकी** (स्त्री.) कापसाची बी.
**सरकें** (अ.) पुढें. [ अधिपति.
**सरखेल** (फा. पु.) स्वारांच्या तुकडीचा
**सरगड** (पु. न.) नुकताच लाविलेला पानमळा. [ संदिग्ध.
**सरगरम** (फा. वि.) कोंबट, अनिश्चित,
**सरघा** (सं. स्त्री.) मधमाशी.
**सरचश्मा, सरचष्मा** (फा. पु.) मुख्य, नायक, अध्यक्ष.

**सरजा** (का. सराजा पु.) नथेला मुख्य मोत्यांच्या वर कळीप्रमाणें मोत्यें लावितात तीं; बंदुकीचा तोडा अडकविण्याचा आंकडा.
**सरंजाम** (फा. पु.) सामुग्री, सामान; घोडीं, पालखी किंवा सैन्य यांच्या खर्चासाठीं इनाम म्हणून दिलेला गांव किंवा जमीन.
**सरंजामी पद्धति** जातीचीं वतनें व इनाम गांवें याशिवाय फौजेच्या खर्चासाठीं आणखी कांहीं नेमणूक व मुलुखगिरीसाठीं प्रांत तोडून देण्याची चाल.
**सरट, सरड** (पु.) सरडा. [ एक प्राणी.
**सरडा, सरडोका** (पु.) पालीच्या जातीचा
**सरण** (न.) चिता.
**सरणी** (सं. स्त्री.) मार्ग; पद्धत; रांग.
**सरणें** (प्रा. क्रि.) संपणें; सरकणें; पुढें होणें; मान्य होणें; योग्य होणें; शोभणें, बरोबरी करणें (मोरो०कृष्ण० ४८।४).
**सरत** (स्त्री.) शर्यत, चढाओढ.
**सरता** (प्रा. वि.) शेवटचा; वंद्य (नाम० ४००); (पु.) पुढारी (भा० २५।१४).
**सरता पालव** (पु.) शेवटचा भाग.
**सरता-पुरता** (वि.) पूर्ण झालेला.
**सरतीं-पुरतीं** (अ.) पूर्णपणें. [कृतकृत्य.
**सरतें** (प्रा. वि.) ग्राह्य, मान्य; पूर्ण;
**सरते शेवटीं** (अ.) अखेरीस.
**सरद** (फा. सरहद स्त्री.) सीमा, मर्यादा; दिशा; रांग, ओळ.
**सरद** (सं. शरद् वि.) थंड, ओलसर, आर्द्र.
**सरदगरमी** (स्त्री.) वेताची मध्यम उष्णता; एक रोग.
**सरदणें** (क्रि.) ओल येणें.
**सरदार** (फा. पु.) मुख्य नायक, ऑफिसर; राजाच्या दरबारांतील सभासद; हल्लींच्या लष्करी परिभाषेंत—सैन्यावरला हिंदी अधिकारी.
**सरदारकी, सरदारी** (स्त्री.) सरदाराचा हुद्दा किंवा मान.
**सरदावणें** (क्रि.) सरदणें, ओल खाणें.
**सरदावरदी** (फा. सर + आवर्द स्त्री.) सरासरी, स्थूलमान.
**सरदी** (फा. स्त्री.) थंडी; आर्द्रता.
**सरदेशमुखी** (स्त्री.) दक्षिणच्या मुसलमानी राज्यापासून उत्पन्नाचा दहावा अंश घेण्याचा मराठ्यांनीं मिळविलेला हक्क.
**सरदेस्त** (फा. अ.) सरहद्दीवर.
**सरधोपट** (वि.) सरळ, नीट, उजू.
**सरनामा** (पु.) नांव.
**सरनिखर** (अ.) सरसकट.
**सरनोबत** (फा. सरनोवत पु.) डंक्यावरील मुख्य अधिकारी; सेनापति.
**सरप** (प्रा. न.) रत्न.
**सरपट** (स्त्री.) सर्पाच्या गतीचें उमटलेलें चिन्ह; ओढून नेलेल्या वस्तूचें चिन्ह.
**सरपटणें** (क्रि.) पोट टेकून सरकणें; फरपटणें; पृष्ठभागावरून हळू हळू घसरत चालणें; खुरडणें.
**सरपण** (न.) जाळण्याचें लाकूड, इंधन.
**सरपागे, सरपाग्या** (पु.) पागेवरील मुख्य अंमलदार.
**सरपाठ** (प्रा. वि.) सारखें.
**सरपोस** (फा. सरपोश पु.) डोक्याचें आच्छादन; चादर; आच्छादनाचें वस्त्र.
**सरफराज, सरफराजी** (फा. स्त्री.) बढती, स्तुति, प्रशंसा. [ भूषण.
**सरफळी** (स्त्री.) सर्पाच्या आकाराचें एक
**सरफा** (अर. पु.) नफा, प्राप्ति, फायदा.
**सरफास** (पु.) सरकफास, सरकणारा फास. [ किंवा चाटून जाणें.
**सरबडणें** (क्रि.) सरपटत जाणें, स्पर्श करून
**सरबत** (अर. शरबत न.) लिंबू वगैरेचा रस आणि साखर व सुगंधि द्रव्य मिळून तयार केलेलें पेय.
**सरबत्ती** (स्त्री.) बंदूक किंवा तोफ यांचें एकामागून एक उडणें; गोळ्यांचा वर्षाव.
**सरबरा** (फा. सरबर स्त्री.) बरोबरी, स्पर्धा; कामाचा निकाल. [ पाहुणचार.
**सरबराई** (फा. स्त्री.) व्यवस्था, बंदोबस्त,
**सरबरीत** (वि.) पातळसर.
**सरबसर** (फा. वि.) विजोड; मिश्रित; (अ.) एकंदरीनें.
**सरमरा** (फा. स्त्री.) मदत, साह्य.
**सरमिसळ** (स्त्री.) मिश्रण.

वाचनालय

**सररहा** (फा. अ.) मोकळेपणानें; निर्वावितपणें.
**सररास** (फा. अ.) एकंदरीनें.
**सरल** (सं. वि.) सरळ, समोर; प्रामाणिक, निष्कपटी. [ पणा.
**सरलता** (सं. स्त्री.) सरळपणा, निष्कपट-
**सरवट** (न.) पावसाची जोराची सर; लहान सर.
**सरवा** (पु.) शेतांत पडलेला पिकाचा गाळमाळ; मळयांत राहिलेला भाजीपाल्याचा गाळ; नुकतीच लागवडीस आणिलेली जमीन; पावसाची सर.
**सरशी** (स्त्री.) श्रेष्ठपणा, जय, वर्चस्व.
**सरशीं** (अ.) जवळ, पाशीं; बरोबर.
**सरस** (पु.) प्राण्याचीं नखें, शिंगें इ० पासून तयार केलेला रांधा. [ अधिक.
**सरस** (सं. वि.) अधिक चांगला, श्रेष्ठ,
**सरसकट**, **सरसगट** (प्रा. अ.) एकंदरीनें, निवड न करतां.
**सरसपाट** (वि.) अगदीं सपाट.
**सरसा–सी–सें**, **सारिसें** (प्रा. वि.) सारखें; (अ.) जवळ, एकत्र, बरोबर; तत्काळ.
**सरसाई** (स्त्री.) श्रेष्ठता, सरसपणा.
**सरसाल** (न.) सबंध वर्ष.
**सरसाल–ला**, **सरसालीना** (अ.) सबंध वर्षासंबंधानें.
**सरसावणें** (क्रि.) पुढें होणें, धैर्य धरणें.
**सरसिज** (सं. न.) कमळ.
**सरसुभा** (फा. पु.), **सरसुभेदार** (फा. पु.) मामलतदाराच्या वरचा सरकारी अधिकारी. **सरसुभेदारी** (फा. स्त्री.)–सुभेदाराचें कार्यक्षेत्र, हुद्दा किंवा अधिकार.
**सरसुमार** (पु.) सारासार विचार; भाषण, वर्तन इत्यादींवर आळा किंवा नियंत्रण.
**सरसून** (अ.) जवळून, वाजूनें, चिकटून.
**सरसोंदा** (वि.) वयांत आलेला.
**सरस्वती** (सं. स्त्री.) विद्यादेवी, वाणी.
**सरहद** (फा. स्त्री.) सीमा, मर्यादा, शींव.
**सरळ** (सं. सरल वि.) नीट, समोर.
**सरळव्याज** (न.) मूळच्या मुदलावर आकारलें जाणारें व्याज.
**सरळी** (प्रा. वि.) मोकळीक (ज्ञा० १४। २२८); एकाच आवेशानें पाण्यांत मुसंडी मारून शिरल्यावर मग हातपाय न हालवितां सर्पासारखें पाण्यांत सरळ पोहण्याची खुबी.
**संरक्षक** (सं. वि.) रक्षणकर्ता, रखवालदार, पहारा करणारा.
**संरक्षण** (सं. न.) रक्षण, राखण.
**संरक्षित प्रदेश** (पु.) मोठ्या सत्तेच्या अप्रत्यक्ष नेतृत्वाखालीं असलेला भूभाग. (इं. मॅंडेटेड टेरिटरी).
**सरा** (सं. सुरा स्त्री.) मद्य (तुका० ४०३१); सरळ लांब वांसा.
**सराई** (फा. स्त्री.) धर्मशाळा; हंगाम.
**सराईत** (प्रा. वि.) पटाईत.
**सरागणें** (प्रा. क्रि.) शोभणें.
**सराटा** (पु.) एक प्रकारची कांटेरी वनस्पति; तिचें फळ किंवा बीं.
**सरायनी** शरायणी गज; जमीन मोजण्याचा गज. [करणारा; कृपण.
**सराफ** (अर. पु.) हुंडी नाणें इ० चा व्यवहार
**सराफकटा**, **सराफकट्टा** (पु.) सराफआळी, सराफा. [ कसब.
**सराफी** (स्त्री.) सराफाचा धंदा; सराफाचें
**सराब** (फा. शराब पु.) मद्य, दारू.
**सराबसरी** (अ.) सुमारें, सरासरी.
**सराय** (हिं. स्त्री.) विश्रांतिस्थान, धर्मशाळा.
**सरायंदा** (हिं. पु.) गाणारा, गायक.
**सराव** (पु.) संवय, अभ्यास. [ त्वरेनें.
**सरासर** (फा. सर अ.) पूर्ण, एकंदर;
**सरासरी** (फा. अ.) साधारणतः; वरवर; अंदाजानें; सरसकट; (वि.) मध्यम, हलका; (स्त्री.) अंकगणितांत—अनेक सजातीय संख्यांच्या बेरजेस त्या संख्या किती आहेत हें दाखविणाऱ्या संख्येनें भागिलें असतां येणारा भागाकार.
**सरिफा** (अर. पु.) नफा, लाभ. **सरिफेवार** (वि.)—फायदेशीर, लाभदायक.
**सरिखा** (वि.) सारखा.
**सरिगम** (स्त्री.) गायनांतले सप्तस्वर.
**सरित्**, **सरिता** (सं. स्त्री.) नदी.
**सरिसा** (प्रा. अ.) जवळ.

**सरिसें** (प्रा. वि.) सारखें, बरोबर.
**सरिसेंपण** (प्रा. न.) सारखेंपण, व्यापकता (ज्ञा० ६।२०). [सर.
**सरी, सर** (प्रा. स्त्री.) बरोबरी, तुलना,
**सरी** (स्त्री.) धातूची तार; तारेचा गुंफलेला गळ्यांतला एक दागिना; मातीचा किंवा दगडाचा पेंड; शेतांत पिकाला पाणी देण्यासाठीं खणलेला लहान चर.
**सरीक** (अर. शरीक पु.) मदतनीस, साथी; पातीदार.
**सरीसर्वत्र** (अ.) सर्व ठिकाणीं.
**सरू, सुरू** (पु.) डौलदार ख्रांवासारखें वाढणारें एक शोभिवंत झाड.
**सरूपता** (सं. स्त्री.) तुल्यरूप होणें; एकाच रूपांत असणें; चतुर्विध मुक्तींपैकीं एक.
**सरेकरी, सरेकार** ( पु. ) कलाल, दारू विकणारा.
**सरेसाल** (अ.) सबंध वर्षांत.
**सरोक** (प्रा. वि.) विनकिडीचा, चांगला (ज्ञा० १५।९८). [ (अ.) त्वरेनें.
**सरोख** (सं. सरोष वि.) क्रोधयुक्त;
**सरोग** (वि.) आजारी.
**सरोज** (सं. न.) कमल.
**सरोजिनी** (सं. स्त्री.) कमलांचा समूह.
**सरोता** (हिं. पु.) आडकित्ता.
**सरोत्तर, सरोत्तरी** (प्रा. अ.) बरोबरीनें.
**सरोदा** (प्रा. पु.) डाकोचा, दैवज्ञ (एक० ३७२९).
**सरोदा** (पु.) एक वाद्य. [ वेढा; गराडा;
**संरोध** (सं. पु.) प्रतिबंध; विघ्न; कैद;
**संरोधन** (सं. न.) संरोध पहा.
**सरोबरी, सरोभरी** (प्रा. स्त्री.) चढाओढ (तुका० १५५०); आदरातिथ्य (तुका० १३९९); वेग, भर (अमृ० १।२).
**सरोरुह** (सं. न.) कमळ.
**सरोवर** (सं. न.) मोठें तळें, जलाशय.
**सरोवरी** (प्रा. स्त्री.) बरोबरी (तुका० १५५०).
**सरोसर** (फा. स्त्री.) एक शिरोभूषण.
**सरोळा** (पु.) वेरजेचा ताळा.
**सर्कस** (इं. स्त्री.) जनावरांचा खेळ.
**सर्क्युलर** (इं. न.) प्रसिद्धिपत्र, वटहुकूम.
**सर्खवास** (फा. पु.) नोकरांवरील अधिकारी. [ करणारा.
**सर्खील** (हिं. पु.) राजाचें निशाण धारण
**सर्ग** (सं. पु.) उत्पत्ति, जन्म; सृष्टि; स्वभाव; त्याग; ग्रंथाचा भाग.
**सर्जा** (फा. पु.) सिंह.
**सर्जीभवन** (सं. न.) चरबीचें पृथक्करण करून त्यापासून साबू करण्याची कृति.
**सर्जेराव** (पु.) सिंहासारखा पराक्रमी.
**सर्टिफिकीट** (इं. न.) दाखला; शिफारसपत्र.
**सर्डी** (स्त्री.) कागद; कागदाचें पान.
**सर्द, सर्दी, सर्दार** इ० सरद, सरदी, सरदार इ० पहा.
**सर्प** (सं. पु.) साप, सरपटणारा प्राणी.
**सर्फराजी** (फा. स्त्री.) सरफराजी पहा.
**सर्वारी** (हिं. पु.) हमाल, भारवाहक.
**सर्व** (सं. वि.) सगळें, संपूर्ण. [ लावणारा.
**सर्वंकष** (सं. वि.) सर्वांना कसोटीला
**सर्वकाळ** (अ.) नेहमीं, सदोदित.
**सर्वगामी** (सं. वि.) सर्वत्र जाणारा.
**सर्वगुणसंपन्न** (सं. वि.) सर्व गुणांनीं युक्त.
**सर्वजनीन** (सं. वि.) सर्वांना हितकर.
**सर्वतोभद्र** (सं. पु. न.) चक्राकृति किंवा चतुष्कोणी व्यूहरचना; देवतास्थापनार्थ किंवा ग्रहादिकांचा वेध घेण्यासाठीं केलेलें रेखांकित चक्र; उफराटी, सुफराटी, उभी, आडवी, कशीहि वाचली तरी सारखाच अर्थ निघतो अशी कविता; चार बाजूंनीं समोरासमोर दरवाजे असलेला चतुष्कोणी व पुष्कळ मजल्यांचा राजवाडा किंवा देवमंदिर. [ सर्वदा.
**सर्वत्र** (सं. अ.) चोहींकडे, आसमंतात्;
**सर्वथा** (सं. अ.) सर्वप्रकारें; निश्चयानें, खचित; पूर्णपणें.
**सर्वदा** (सं. अ.) सर्वकाळीं, नेहमीं.
**सर्वधर्मसमभाव** (पु.) सर्व धर्मांचीं मूल तत्त्वें एकच आहेत ही श्रद्धा.
**सर्वनाम** (सं. न.) व्याकरणांत — जो विकारी शब्द विशिष्टार्थाचा द्योतक नसून ज्यास पूर्वापार संबंधानें सर्व प्रकारच्या नामांचा अर्थ येऊं शकतो म्हणजे

अमर वाचनालय, सातारा

वाटेल त्या नामाबद्दल जो उपयोगांत येतो तो.

**सर्वशः** (सं. अ.) दरोबस्त, झाडून, निःशेष.

**सर्वसाक्षी** (सं. वि.) सर्वभूतांच्या ठायीं साक्षीरूपानें राहणारा (परमेश्वर).

**सर्वसुखी** (वि.) संपूर्णपणें सुखी असलेला.

**सर्वस्व** (सं. न.) सगळी मालमत्ता; तत्त्वांश, सार.

**सर्वस्वीं** (अ.) सर्व प्रकारें.

**सर्वज्ञ** (सं. वि.) सर्व जाणणारा, सर्वसाक्ष.

**सर्वज्ञता** (सं. स्त्री.) सर्व जाणण्याची शक्ति.

**सर्वा** (स्त्री.) शेतमालाची वेटाळणी किंवा सोंगणी झाल्यावर पडलेलीं किंवा उरलेलीं कणसें इत्यादि.

**सर्वांगीण** (सं. वि.) सर्व शरीर व्यापणारा; सर्व अंगांसंबंधाचा.

**सर्वाधिकारी** (पु.) प्रमुख; सर्व-सत्ताधीश.

**सर्वात्मना** (सं. अ.) मनोभावें करून, मनःपूर्वक.

**सर्वात्मा** (सं. पु.) सर्वांचा प्राण (परमेश्वर).

**सर्वेश्वर** (सं. पु.) परमेश्वर, महादेव; विष्णु.

**सर्वोदयवाद** (पु.) समाजांतील सर्व थरांचा उत्कर्ष व्हावा असें पाहणारा पंथ.

**सर्षप** (सं. पु.) मोहरी, एक वजन.

**सल** (सं. शल्य न.) फार दिवस पोटांत राहिलेला गर्भ; उसण; छळ, दुःख; साल (ज्ञा० १५।२९); शरीर; तरवारीच्या म्यानाची दोरी; कमरपट्टा.

**सलक–ख** (स्त्री.) पावसाची जोराची सर; तोफांची किंवा वेंदुकांची सरबत्ती.

**सलकडें** (न.) दुःख निवारणासाठीं हातांत घातलेलें मंतरलेलें लोखंडाचें कडें; हातांत घालण्याचें चांदीसोन्याचें कडें.

**सलग** (सं. संलग्न वि.) अखंड, लागलेलें; (स्त्री.) विशेष परिचय.

**सलग, सलगी** (प्रा. स्त्री.) संगति; बरोबरी (भा० ६।३४८); विशेष परिचय, मैत्री.

**सलणें** (क्रि.) दुखणें, खुपणें, टोचणें; मारणें, गिळणें (ना० पृ. ५७०).

**सलटनगर** (पु.) कातडीं रंगविणारांची किंवा कमाविणारांची जात किंवा त्या जातीचा कोणी इसम.

**सलतनत** (अर. स्त्री.) सुलतानशाही; बादशाही सत्ता; राज्य.

**सलम** (अर. वि.) सबंध, सगळें, संपूर्ण, सलग, अखंड; ढिलें, सैल.

**सलमा** (अर. पु.) मखमल; उंची कापड.

**सलवडी** (प्रा. स्त्री.) एक खेळ.

**सलह** (फा. सलाह स्त्री.) सल्ला, विचार.

**सला** (पु. स्त्री.) शांतता, तह, मसलत; विचार; बोटांतलें वेढें; (अर. ) बरें तर.

**सलाई** (हि. स्त्री.) सळई.

**सलाबत** (अर. स्त्री.) वचक, भय, धाक इत्यादि दसविणारा; प्रताप; पगडा.

**सलाम** (अर. पु.) मुसलमानांनीं किंवा मुसलमानांना करण्याचा नमस्कार.

**सलामत** (अर. वि.) सुरक्षित; (अ.) सुरक्षितपणें.

**सलामालकी** (अर. स्त्री.) नमस्कार-चमत्कार; कुशलप्रश्न.

**सलामी** (हि. स्त्री.) पहिली भेट; नमस्कार-चमत्कार; पहिली झटापट.

**सलिता, सलिदा** (हिं. पु.) उंटावरचें खोगीर, (अनंत० पृ० ६७).

**सलिल** (सं. न.) **सलिली** (प्रा. स्त्री.) पाणी.

**सलील** (सं. वि.) खेळकर; सोपें.

**सलोंद** (वि.) ढिलें, सैल.

**सलूक, सलूख, सलूखा** (अर. पु.) मैत्री, सख्य; समेट. [११।२९१).

**सलेप** (प्रा. वि.) मलिन, अज्ञानी (ज्ञा०

**सलो** (प्रा. पु.) द्वेष; छळ.

**सलोकता** (सं. स्त्री.) चतुर्विध मुक्तींपैकीं एक (हींत ईश्वरलोकीं वास घडतो).

**सलोखा, सलोगा** (अर. सलूक पु.) स्नेह; मैत्री; समेट.

**संलग्न, सल्लग्न** (सं. वि.) चिकटलेलें.

**सल्ला, सला** (अर. सलाह पु. स्त्री.) विचार, मसलत; (पु.) करंगळींत घालण्याचें वेढें.

**सल्लागार** (पु.) सल्ला देणारा.

**सल्लागार मंडळ** (न.) सल्ला देणारें मंडळ.

**सल्लामसलत** (अर. स्त्री.) विचार.

**सल्लाशीन** (अर. सलासेन वि.) तीस.

**सल्लास** (अर. वि.) तीन.
**सल्लासी (सें) न** (अर. वि.) तीस.
**सव, संव, सवई, संवई** ( स्त्री. ) संवय, रावता, चाल, परिपाठ.
**सवकणें** (क्रि.) चट लागणें, सोकणें.
**सवंग** (वि.) स्वस्त; सोपा.
**सवंगडा, सवंगडी** (प्रा. पु.) सोबती.
**सवंगण** (न.), **संवगणी** (स्त्री.), **सवगणें** (न.) शेताची कापणी.
**सवंगाई** (स्त्री.) स्वस्ताई.
**सवघड** (वि.) सोपें, व्यवहार्य; संभवनीय.
**सवचा, सवेचा** (वि.) उत्तरेकडील.
**सवचोर** (प्रा. पु.) दिसायला साव पण खरा चोर (भा० १०।४२३).
**सवड** (स्त्री.) फुरसत, अवकाश; रिकामी जागा; मोकळीक; प्रदेश; (प्रा. स्त्री.) तादात्म्य (हरिपाठ २७). [उरकणें.
**सवडणें** (प्रा. क्रि.) जमविणें; (काम)
**सवडी** (प्रा. स्त्री.) शेवट; अंतर (ज्ञा० १०।६०)
**संवत्** (सं. पु.) वर्ष; विक्रमराजानें सुरू केलेला शक.
**सवत**(सं. सपत्नी स्त्री.) एकाच नवऱ्याची दुसरी वायको.
**सवता** (प्रा. पु.) आहार (अनंत० ४०); (वि.) स्वतंत्र, निराळा; स्वतः (ज्ञा० १७।१०१).
**सवतासुभा** (पु.) विरोध; द्वेष; दुसऱ्याला हाणून पाडण्यासाठीं केलेली स्वतंत्र योजना.
**सवतीमत्सर** (पु.) एकाच नवऱ्याच्या दोन वायकांना एकमेकींवद्दल वाटणारा द्वेष.
**संवतुकीं** (प्रा. वि.) समतोल.
**सवतें** (प्रा. न.)सार्थक(ज्ञा० १३।५८२); (वि.) निराळें, स्वतःचें.
**संवत्सर** (सं. न.) वर्ष.
**संवत्सर प्रतिपदा** (सं. स्त्री.) चैत्र शु० १.
**संवथळ** (सं. समस्थल न.) सपाट जमीन.
**संवदणी** (प्रा. स्त्री.) सांदणी; परटाची सताल (पात्र).
**संवदर** (पु.) मोटेच्या सोंडेला वांधलेली दोरी; (प्रा. वि.) सुंदर.
**सवदा, सौदा** (फा. पु.) क्रयविक्रय; व्यापार; व्यापाराचा माल.
**सवदागर, सवदागीर** (फा. पु.) व्यापारी.
**सवदालूत** (पु. न.) वाजारहाट, सवदा.
**सवन** (सं. पु.) सूर्य; (न.) यज्ञ; सूर; ध्वनि. [ चाल.
**संवय, सवय** (स्त्री.) सराव, रावता;
**सवंया** (सं. समता स्त्री.) वरोवरी.
**संवरणें, सवरणें** (क्रि.) धातूच्या रूपापुढें त्याच्या दृढीकरणार्थ येणारा एक शब्द.
**सवरात–थ** (पु.) सोस; हव्यास.
**संवरीत** (सं. संवृत वि.) आच्छादिलेला, वेष्टित. [ जातीचा.
**सवर्ण** (सं. वि.) एकाच रंगाचा किंवा
**संवर्त, संवर्तक** (सं. पु.) जगाचा प्रळय; प्रळयकाळचा मेघ; समुदाय.
**संवर्धक** (सं. वि.) वाढविणारें.
**संवर्धन** (सं. न.) पालनपोषण; वृद्धीकरण.
**संवर्धित** (सं. वि.) वाढविलेला, भरभराटलेला.
**सवलत, सोहलत** (अर. स्त्री.) मेळ, सुयंत्रितपणा, मान्यता, कबुली; सूट.
**संवसाट** (प्रा. पु.)सद्भाव(भा०८।२४८).
**संवसाटी** (प्रा. स्त्री.) वरोवरी ( भा० ११।६७०); प्रेमाचा भर ( भा० २४।३७६).
**संवसारें** (प्रा. अ.) वरोवर.
**सवळ**(प्रा. स्त्री.)प्रातःकाळ(ज्ञा०१६।३).
**सवळें** (प्रा. अ.) तत्काळ.
**सवा** (प्रा. स्त्री.) वाजू (तुका० ३९४०); किनारा; तीर (भा० २०।१७९).
**सवा** (प्रा. स्त्री.) कडे, वाजूस (तुका० ३१८८); वरोवर, समागमें; तत्क्षणीं.
**सवा** (सं. सपाद वि.) एक आणि पाव मिळून होणारी संख्या.
**सवाई** (प्रा. स्त्री.) चाल, संवय, कर्तव्य; सवापट; एका छंदाचें नांव (यांत सात सगण व पुढें गुरु अक्षर असतें).
**सवाईसूट** (स्त्री.) उत्पन्नाच्या पंचमांशाची माफी.
**सवाकी** (स्त्री.) एक सवें सवें पासून शंभर 'सवें सवाशें' पर्यंतचे पाढे.

**सवागी** (स्त्री.) एक क्षार; (सं. सौभाग्य पु.) सौभाग्य देणारा; कसबिणींचा गुरु.
**सवाणणें** (क्रि.) ठासणें, चेंदणें.
**सवाणा** (पु.) सोनाराचा बारका चिमटा.
**संवाद** (सं. पु.) प्रश्नोत्तररूप संभाषण, संभाषण; अनुरूपता.
**संवादी** (वि.) रागांतील दुय्यम प्रमुख स्वर; आपणाशीं जुळणारा.
**सवार, स्वार** (फा. वि.) स्वार झालेला; चढून बसलेला.
**संवार** (सं. पु.) आकर्षण, दाटणी.
**सवारी** (फा. स्त्री.) स्वारी.
**सवाल, सव्वाल** (अर. पु.) प्रश्न; मुसलमानी वर्षाचा दहावा महिना.
**सवाशीण, सवाष्ण** (सं. सुवासिनी स्त्री.) पति जिवंत असलेली स्त्री.
**संवास** (सं. पु.) सहवास; मैथुन; रहायाचें घर; माळ, मैदान. [ वाहणें.
**संवाहन** (सं. न.) अंग रगडणें; ओझें
**सविकार** (वि.) परिणाम; प्रकार.
**सविता** (सं. पु.) सूर्य, रवि.
**संविति, संवित्ति, संविती** (सं. स्त्री.) ज्ञान; स्नेह, मैत्री.
**संविधान** (सं. न.) व्यवस्था, तजवीज.
**संविधानक** (सं. न.) कथानकाची रचना; कथानक, गोष्ट.
**सविनय** (सं. वि.) विनयशील; नेमस्त; **स०कायदेभंग** (पु.)–स्वतः अनत्याचारी राहून व प्रतिकार न करतां सरकारचे जुलमी कायदे मोडण्याची क्रिया.
**संविभाग** (सं. पु.) विभागणी; वांटणी.
**सविया** (सं. अ.) सहज (स्वा० दि० ६।१।३२); तत्काळ (ज्ञा० ६।२१२); सर्वथा; अकस्मात्.
**सविला** (वि.) ओळखीचा, संवयीचा.
**सविवळ** (प्रा. वि.) स्पष्ट. [पूर्वक.
**सविस्तर** (सं. वि.) खुलासेवार, विस्तार-
**सविस्मय** (सं. वि.) आश्चर्यचकित.
**संवृद्धि** (सं. स्त्री.) भरभराट, उत्कर्ष; विपुलता.
**सवे, संवे** (प्रा. स्त्री.) संवय.

**सवे** (प्रा. अ.) बरोबर; लगेंच, पुनः, तत्काळ; स्वतः. [(ज्ञा० ५।१३).
**सवेशा, सवेसा** (प्रा. स्त्री.) स्वेच्छा
**सवेळ, सवळ** (प्रा. स्त्री.) प्रातःकाळ (ज्ञा० १६।३).
**सवेळे** (प्रा. अ.) तत्काळ.
**सवैल** (वि.) सोवळ्यांचे (ज्ञा० प्र०२४२).
**सव्य** (सं. वि.) डावा (रुक्मि० ९।४८); दक्षिणेकडचा; उफराटा; उजवा.
**सव्यसाची** (सं. पु.) अर्जुन.
**सव्यसाचित्व** (न.) डाव्या उजव्या हातानें काम करण्याचें कौशल्य. [ अधिक.
**सव्याज** (वि.) व्याजासह; मूळच्याहून
**सव्यापसव्य** (सं. न.) उफराटें-सुफराटें; न्याय-अन्याय; बरेवाईट; यातायात, कटकट.
**सशक्त** (सं. वि.) बळकट, जोरदार.
**संशय** (सं. पु.) शंका, संदेह; भय.
**संशयखोर** (वि.) हरएक गोष्टीसंबंधानें शंका घेणारा; अविश्वासी.
**संशयग्रस्त** (सं. वि.) संशयानें पीडलेला.
**संशयनिवृत्ति** (सं. स्त्री.) शंकेचें निवारण.
**संशयवाद** (पु.) अंतिम सत्याबद्दल निश्चितता नसलेली तत्त्वप्रणाली. [ खोर.
**संशयात्मक** (सं. वि.) शंकायुक्त; दिक्कत-
**संशयी** (सं. वि.) पदोपदीं शंका घेण्याचा स्वभाव असलेला, दिक्कतखोर.
**संशुद्धि** (सं. स्त्री.) स्वच्छता, शुद्धता; कर्जाची फेड. [ करणारा.
**संशोधक** (सं. पु.) शोध करणारा; शुद्ध
**संशोधन** (सं. न.) दुरुस्ती; कर्जाची फेड; सूड घेणें; खनिज धातु इ० शुद्ध करणें.
**संशोधित** (सं. वि.) शुद्ध केलेलें; शोधून काढलेलें.
**संश्लिष्ट** (सं. वि.) चिकटलेलें.
**संश्लेष** (सं. पु.) आलिंगन; मिठी.
**संश्लेषण** (न). अनेक प्रवाहांतून नवनिर्मिति (इं. सिंथिसिस्)
**ससकर** (पु.) बारीक खडा, रेव; दुसऱ्या धान्याचा मिसळलेला कण. [ द्रव्य.
**ससकार** (पु.) वकिलास आगाऊ दिलेलें

**सक्त** (सं. वि.) अनुरक्त, बद्ध; जवळचा.
**संसक्ति** (सं. स्त्री.) आसक्ति; नाद, व्यसन; घरोबा.
**संसद्** (सं. स्त्री.) भारताची लोकसभा.
**ससगणी, ससगाणी, सजगणी** (स्त्री.) जोड-पैसा, ढबू.
**संसर** (प्रा. पु.) पसारा; संगति.
**संसरण** (सं. न.) जन्ममरणाचा प्रवाह; मनुष्यलोकांतून पार जाणें.
**संसरणें** (सं. क्रि.) जन्ममरणाच्या फेऱ्यांतून जाणें; सरसावणें (रंग० पदें).
**संसर्ग** (सं. पु.) संगति, संयोग, संघट्टन; व्यसन, लंपटता, आसक्ति; मिसळ, भेसळ.
**ससा** (सं. शश पु.) एक भित्रें जनावर, खरगोष.
**संसाटी** (प्रा. स्त्री.) बरोबरी; सारखेपणा.
**ससाणा** (सं. श्येन पु.) एक पक्षी.
**ससाणें** (प्रा. वि.) लखलखीत.
**संसार** (सं. पु.) प्रपंच; विस्तार; लोक, जग; बंधन; अहंकार.
**संसारिक** (सं. वि.) व्यवहारज्ञ; प्रापंचिक.
**संसारी** (वि.) प्रापंचिक.
**संसिद्धि** (सं. स्त्री.) जातिस्वभाव; पूर्णदशा; इष्टप्राप्ति.
**ससेमिरा** (पु.) पाठलाग; त्रास.
**ससेहोलपट** (स्त्री.) गडबड; धांदल; मार.
**संसृति** (सं. स्त्री.) ओघ, प्रवाह; रस्ता; जन्ममरण, संसार.
**ससोरा** (पु.) मानगुटी.
**संस्कर्ता** (सं. पु.) संस्कार करणारा.
**संस्करण** (न.) आवृत्ति (पुस्तकाची).
**संस्कार** (सं. पु.) पूर्णता, समाप्ति; बोध, शिक्षण, आकलन; शुद्धि; शुद्ध करण्याचा विधि; छाप, ठसा; कार्य; परिणाम. (सोळा संस्कारांचीं नांवें—गर्भाधान, पुंसवन, अनवलोभन, विष्णुबलि, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, सूर्यावलोकन, अन्नप्राशन, चूडाकर्म, उपनयन, गायत्र्युपदेश समावर्तन, विवाह, स्वर्गारोहण).
**संस्कारक्षम** (सं. वि.) संस्कार होण्यास लायक.
**संस्कृत** (सं. वि.) शुद्ध केलेलें, संस्कार केलेलें; अलंकारित; पक्व; व्याकरणशुद्ध; विद्वान्; (न.) गीर्वाणभाषा.
**सस्तन** (सं. वि.) स्तनयुक्त; स्तन असलेला.
**सस्ता** (हिं. वि.) स्वस्त, सवंग, अल्पकिमतींत मिळणारें.
**सस्ताई** (हिं. स्त्री.) सवंगपणा.
**सस्तावणें** (क्रि.) स्वस्त होणें.
**संस्था** (सं. स्त्री.) स्थान; रचना; व्यवस्था; उद्योग; मंडळी, सभा.
**संस्थान** (सं. न.) लहानसें राज्य; राजवाडा; राजधानी; ज्याच्या खर्चासाठीं सरंजाम वगैरे सरकाराकडून दिलेला असतो अशी देवस्थान इ० मोठी संस्था.
**संस्थानिक** (सं. पु.) लहान राज्याचा किंवा संस्थानाचा मालक.
**संस्थापक** (सं. पु.) स्थापनकर्ता.
**संस्थापन** (न.), **संस्थापना** (सं. स्त्री.) प्रतिष्ठा, बसविणें; निश्चित करणें.
**संस्थिति** (सं. स्त्री.) कायम स्थान; टिकणें, एकाग्रता.
**संस्पर्श** (सं. पु.) शिवाशीव, स्पर्श.
**सस्मित** (सं. न.) गालांत हंसणें.
**सस्य** (सं. न.) फळ; धान्य; भाताचें रोप.
**सस्यांत** (प्रा. पु.) धान्य कापण्याची वेळ.
**सह** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) सोसणारा, सोशिक.
**सह** (सं. समासांत पूर्वपदीं वि.) बरोबरीचा; (अ.) बरोबर, संगतीनें.
**सहकार** (सं. पु.) दुसऱ्याशीं मिळून काम करणें; संयुक्त काम; आम्रवृक्ष.
**सहकारिता** (स्त्री.) जोडीनें काम करणें, मदत करणें.
**सहकारी** (सं. पु.) जोडीनें काम करणारा; मदतनीस.
**सहकारी पतपेढी** (स्त्री.) लोकांनीं आपल्या प्रापंचिक व सांपत्तिक गरजा भागविण्यासाठीं संघ स्थापून संयुक्त भांडवलानें किंवा सामुदायिक कर्ज काढून सचोटी व परस्पर-सहकारिता या गुणांवर चालविलेली पेढी.
**सहगमन** (सं. स्त्री.) सती जाणें.

**सहचर** (सं. पु.) सोबती बरोबर फिरणारा.
**सहचरी, सहचारिणी** (सं. स्त्री.) लग्नाची स्त्री; सोबतीण.
**सहज** (सं. वि.) बरोबर झालेला; स्वभावसिद्ध; सख्खा भाऊ किंवा बहीण; स्वल्प; सोपें; (अ.) निरुद्देशानें; उद्देशावांचून.
**सहजकळा** (सं. स्त्री.) स्वाभाविक शक्ति (यथार्थ० ५।२९१).
**सहज प्रवृत्ति** (स्त्री.) माणसांच्या अंगीं असणारी नैसर्गिक शक्ति (इं. इंस्टिंक्ट)
**सहजप्रेरणा** (स्त्री.) स्वाभाविक प्रवृत्ति.
**सहजसमाधि** (सं. स्त्री.) वृत्ति सविकल्प असो किंवा निर्विकल्प असो परंतु मनाचें एकसारखें समाधान राहण्याची स्थिति.
**सहजरीत्या, सहजाखालीं, सहजगत्या, सहजासहजीं** (अ.) सहज, उद्देशावांचून.
**सहदेवमत** (न.) सहदेव नांवाचा कोणी फलज्योतिषी होऊन गेला त्याचें मत.
**सहधर्मिणी** (सं. स्त्री.) पत्नी, लग्नाची स्त्री.
**सहन** (सं. न.) सोसणें.
**सहनशक्ति** (सं. स्त्री.) सोशिकपणा.
**सहनशील** (सं. वि.) सोशिक, सहिष्णु.
**सहप्रवासी** (वि.) एखाद्या सांप्रदायास अप्रत्यक्ष अनुकूल असलेला.
**सहभोजन** (सं. न.) एकत्र भोजन.
**सहमरण** (सं. न.) सती जाणें.
**सहल** (अर. सेल स्त्री.) रपेट, फिरण्याचा व्यायाम; मौजेनें फिरणें; (अ.) सोपें.
**सहली** (फा. स्त्री.) दासी.
**सहवर्तमान** (सं. अ.) बरोबर, सहित.
**सहवर्ती** (वि.) निकटचा.
**सहशिक्षण** (सं. न.) स्त्री आणि पुरुष यांचें एकत्र शिक्षण.
**सहवास** (सं. पु.) एका ठिकाणीं बसणें-उठणें; संगत. **स० खालीं पडणें**—अंगवळणीं पडणें.
**सहसा** (सं. अ.) अविचारानें; घाईनें; कदापि; एकाएकीं; बहुशः.
**सहस्कंध** (सं. पु.) पंचस्कंधांतला चौथा.
**सहस्र** (सं. वि.) हजार.
**सहस्रकर** (सं. पु.) सूर्य.
**सहस्रदल** (सं. न.) ब्रह्मरंध्र.
**सहस्रनयन** (सं. पु.) इंद्र.
**सहस्रनाम** (सं. न.) एकाच देवतेच्या हजार नामांची यादी.
**सहस्रभोजन** (सं. न.) हजार ब्राह्मणांस केलेलें अन्नदान.
**सहस्रमुख** (सं. पु.) शेष.
**सहस्ररश्मि** (सं. पु.) सूर्य.
**सहस्रशीर्ष** (सं. वि.) हजार डोकीं असलेला; हजार फणांचा शेष.
**सहस्राक्ष** (सं. पु.) हजार डोळयांचा, इंद्र.
**सहा** (सं. षट् वि.) ६.
**सहाण** (स्त्री.) गंध उगाळण्याचा दगड; हत्यार पाजळण्याचा दगड (निसणा).
**सहाध्यायी** (सं. पु.) गुरुबंधु; एकाच वेळीं एकाच वर्गात शिकणारे.
**सहानुभूति** (सं. स्त्री.) समदुःखित्व.
**सहाय** (सं. पु.) मदतनीस, सोबती; (न.) साह्य, मदत.
**संहार** (सं. पु.) नाश, उच्छेद; गोळा करणें; संक्षेप, संकोच.
**संहारक** (सं. वि.) संहार करणारा.
**संहारणें** (सं. संहृ क्रि.) नाश करणें.
**सहित** (सं. अ.) सह, बरोबर; (वि.) युक्त.
**संहिता** (सं. स्त्री.) वेदाचा सारग्रंथरूप भाग; शास्त्रविषय प्रतिपादक मूलग्रंथ.
**सहिष्णु** (सं. सहिष्णु वि.) सोशिक, सहनशील.
**सहिष्णुता** (सं. स्त्री.) सोशिकपणा; क्षमा.
**सही** (प्रा. वि.) खरें (तुका० ६५६).
**सही करणें**—हस्तगत करणें.
**सही** (अर. स्त्री.) स्वतःच्या हातानें लिहिलेलें स्वतःचें नांव.
**सहृदय** (वि.) दयाळु; प्रेमळ.
**सहेतुक** (सं. वि.) हेतुपुरःस्सर केलेलें.
**सहेली** (हिं. स्त्री.) फकिराच्या गळयांतली लांब माळ.
**सहोक्ति** (सं. स्त्री.) एक अर्थालंकार. दोन क्रिया चमत्कारिक रीतीनें एकसमयावच्छेदानें घडून आल्याचें यांत वर्णन असतें.
**सहोदर** (सं. पु.) सख्खा भाऊ.

**सह्य** (सं. वि.) सहन करण्यासारखें; (पु.) सह्याद्रि पर्वत.

**सह्याद्रि** (सं. पु.) कोंकण आणि देश यांच्या मध्यें दक्षिणोत्तर पसरलेला पर्वत.

**सळ** (प्रा. पु.) अभिमान (ज्ञा० १६।४५३४); घडामोड (दा० ३।५।४९); वैर; छळ (वामन० विराट० ७।१७२); उकळी; बळ (तुका० १८४६); युक्ति (भावार्थ० २।९।१७).

**सळ** (पु.) तरवारीचें म्यान; तिच्या मुठीला अडविण्याची दोरी; घडीचा मोड, दुमड.

**सळई** (स्त्री.) शलाका, धातूची बारीक काडी; गणना करतांना संख्या समजण्यासाठीं काढून ठेविलेला भाग; लोखंडाचें कडें बसविल्यावांचून असलेलें मुसळाचें लाकूड; जनानी मकटच्यावरच्या उभ्या रेघा.

**सळक** (स्त्री.) पावसाची सर.

**सळकणें** (क्रि.) विशेष गडबड न करतां निघून जाणें. [पावसाची सर.

**सळका** (पु.) चावण्याची प्रबळ इच्छा;

**सळणी** (प्रा. स्त्री.), **सळणें** (क्रि.) छळ, गांजणूक.

**सळनळीत** (वि.) संधिरहित; सरळ, ताठ.

**सळप, सळंप** (स्त्री. न.) लाकडाची लांब ढलपी किंवा चीप.

**सळपा** (पु.) धलपा, फोड.

**सळमिसळ** (स्त्री.) भेसळ, मिश्रण.

**सळसळणें, सळाळणें** (क्रि.) आधण येऊन उकळी फुटणें; खवखवणें; वळवळणें; हुळहुळणें; शिवशिवणें.

**सळसळीत** (वि.) गुळगुळीत, चकचकीत.

**सळा** (प्रा. पु.) छळ; तारेचा खिळा; टाचणी; टांचणी.

**सळाथी** (स्त्री.) केरसुणी.

**सळाळणें** (क्रि.) सळसळणें; फुसफुसणें, गर्जना करीत जाणें; आवेशानें बाहेर निघणें.

**सळी** (सं. शलाका स्त्री.) सळई.

**सळु** (प्रा. पु.) आग्रह (ज्ञा० १५।३०२); बळ; उणीव (अमृ० ७।२६१); (वि.) वाईट.

**सळे** (प्रा. स्त्री.) स्पर्धा, ईर्षा.

**सळें** (प्रा. न.) मोजमाप; (अ.) सत्वर (विवे० पू० १।९३) [सारांशरूप.

**संक्षिप्त** (सं. वि.) थोडक्यांत आणिलेलें,

**संक्षेप** (सं. पु.) सारांश; अंकगणितांत —अपूर्णांकाच्या अंशास व छेदास एकाच संख्येनें निःशेष भाग देणें.

**संक्षेपतः** (सं. अ.) सारांशरूपानें, थोडक्यांत.

**संज्ञा** (सं. स्त्री.) शुद्धि, चेतना; ज्ञान, बुद्धि; चिन्ह; संकेत; नांव; पदवी, पारिभाषिक नांव.

**संज्ञाप्रवाह** (पु.) अंतर्मनांतून सतत असणारा जागृतीचा प्रवाह.

**सज्ञान** (सं. वि.) जाणता, शहाणा.

**सा** (सं. षट् वि.) सहा.

**सा** (समासांत वि.) असा.

**साइकडे, साइखडे** (प्रा. अ.) कळसूत्री बाहुली (ज्ञा० ९।३०).

**साइपण, साइपणें** (प्रा. अ.) स्वत (अमृ० ७।७९).

**साई** (स्त्री.) साय, मलई; छाया.

**सांई** (सं. स्वामी पु.) गोसावी, स्वामी.

**साईर, सायर** (सं. स्वैर स्त्री.) समुदाय, जमाव.

**साउजी** (प्रा. वि.) गरीब.

**साउमा, साउमी** (प्रा. अ.) समोर, प्रत्यक्ष (ज्ञा० १६।६२); (वि.) सामोरा (भावार्थ० २।१३।११).

**साउली, सावली** (स्त्री.) छाया; प्रतिबिंब.

**साउळ** (प्रा. न.) पांढरेपण (ज्ञा० १३।७५९).

**साउळा, सांवळा** (वि.) सांवळा; अस्मानी.

**साऊ, साव** (पु.) साहू; सावकार.

**साक, साख** (स्त्री.) पत, साख; ओंजळ; (सं. साक्ष) साक्ष, पुरावा.

**सांकटण** (न.) लाकडाचा ठोकळा.

**सांकड** (प्रा. स्त्री.) अडचण; संकोच (ज्ञा० ११।८०); (वि.) कठिण; अल्प (ज्ञा० १४।१६३).

**सांकडणें** (प्रा. वि.) अवघडणें.

**साकडा** (पु.) गाडीची मधली चौकट.

**सांकडी** (प्रा. स्त्री.) संकट, अडचण (भावार्थ० १।१।४३).

**सांकडें** (न.) संकट; ओझें; (वि.) कठिण, संकुचित.

**साकण, सांकण** (स्त्री.) ओझ्याच्या गाड्याच्या आंख व जूं यांच्यामध्यें बांधलेला दोर.

**साकणें** (क्रि.) घट्ट होणें, गोठणें, वोळणें.

**साकर** (सं. शर्करा स्त्री.) साखर.

**साकर** (पु.) नदीच्या प्रवाहाला अडविणारा गाळ, कचरा इ०; गळ्यांत जमलेला कफ. [विस्तार.

**साकल्य** (सं. न.) संपूर्णता, एकंदरी;

**सांकव** (हि. सांखू पु.) तात्पुरता बांधलेला पूल.

**साकविणें** (क्रि.) गोठविणें, घट्ट करणें.

**सांकशी** (स्त्री.)गवत, वेत, बांबूच्या काड्या इ० ची बनविलेली लहानशी पेटी.

**साकतुरत** (अ.) उघडपणें, स्पष्टपणें, सर्वादेखत.

**सांकळ** (स्त्री.) साकर पहा.

**सांकळ** (सं. शृंखला स्त्री.) बंधन, बेडी, साखळ; ओळ; पंक्ति. [करणें; गोठणें.

**सांकळणें** (क्रि.) सांखळीनें बांधणें; नियंत्रण

**सांकळदंड** (पु.) जाड सांखळी. [कोष्ठता.

**साकळा, सांकळा** (पु.) घट्ट गोळा; बद्ध-

**सांकळी** (स्त्री.) लहान शृंखला, सांखळी.

**साकळी** (स्त्री.) बैलाचें पोळें; म्हाताऱ्या माणसाच्या गळ्यापासून लोंबणारी कातडी.

**साका** (पु.) सोन्याला डाक लावण्यासाठीं सोनें किंवा चांदी व तांबें यांचें केलेलें मिश्रण; सोन्याच्या दागिन्यांत लबाडीनें भरलेली दुसरी हीन धातु; पाण्याच्या प्रवाहांतून वाहून आलेला गाळ; गाळ-साळ, केरकचरा.

**सांकाटा** (पु.) सांगाडा.

**साकार** (वि.) आकारयुक्त.

**साकारणें** (क्रि.) आकार धारण करणें.

**साकांक्ष** (सं. वि.) इच्छाशील, उत्सुक; संशययुक्त (ज्ञा० १७।३४); श्रद्धाळु (भा० ३।३१).

**साकी** (स्त्री.) एका प्राकृत छंदाचें नांव. यांत दोन चरण किंवा दोन अर्धे असून प्रत्येक अर्धांत अठ्ठावीस मात्रा असतात.

**साकी** (स्त्री.) साख; पत; (अर. पु.) दारूचा पेला भरून देणारा पोऱ्या.

**साकीन** (अर. अ.) राहणार; वस्ती.

**सांकुळणें** (क्रि.) गोठणें, घट्ट होणें.

**सांकू** (हिं. पु.) तात्पुरता पूल.

**साकें** (प्रा. वि.) डांक लागलेलें, डाक-लग (ज्ञा० ८।३८).

**साकेत** (सं. न.) अयोध्या नगर.

**सांकेतिक** (सं. वि.) आपसांत ठरवून योजलेली (भाषा वगैरे).

**साख** (सं. साक्ष्य स्त्री.) पत, साक, अब्रू.

**सांखणें** (क्रि.) गोठणें.

**साखबाज** (हिं. वि.) पतवाला.

**साखर** (सं. शर्करा स्त्री.) साखर, चिनी, खांड. **सा० पेरणें**—आपला हेतु साध-ण्यासाठीं गोडगोड बोलणें किंवा मोह पडेल असें करणें; **सा० ची साल काढणें**—अतिशय बारकाईनें पाहणें; **सा० चा खाणार त्याला देव देणार**—भाग्यवंताला कांहीं उणें पडत नाहीं; **हातावर सा० मानेवर कातर**—वरून दिसायला गोड वर्तन ठेवून खरो-खर प्राणघातासारखें दुष्टपणाचें वर्तन करणें.

**साखरेची सुरी** (स्त्री.) वरून दिसायला गोड पण आंतून मर्मभेद करणारें भाषण किंवा घातकी मनुष्य.

**साखरचुंबा** (पु.) गोड पापा.

**साखरझोंप** (स्त्री.) थंडीच्या दिवसांतील पहाटेची अत्यंत प्रिय गुलाबी झोप.

**साखरपाणी** (न.) लिंबाचा रस घातलेलें सरबत; पहिला पाहुणचार.

**साखरपारा** (फा. पु.) एक प्रकारचें गोड खाद्य.

**साखरपुडा** (पु.) लग्नाचा निश्चय कर-ण्याच्या वेळीं नवऱ्यामुलीच्या हातांत साखरेचा पुडा देतात तो; तो देण्याचा समारंभ.

**साखरफुटाणा** (पु.) साखरेच्या पाकांत घोळलेला फुटाणा; चारोळीचा दाणा किंवा वेलदोडा.

**साखरभात** (पु.) साखर व बहुधा केशर घालून केलेला भात.
**साखरलिंबू** (न.) गोड लिंबाची एक जात.
**साखरशेला** (पु.) लहान शेला.
**साखसुरत** (फा. अ.) प्रत्यक्ष, समक्ष, उघडपणें.
**सांखळ, साखळ** (सं. शृंखला स्त्री.) मोठी किंवा जाड सांखळी; पंक्ति, रांग.
**साखळणें, साखळा, साखारा** साकळणें, साकळा, साकारा इ० शब्द पहा.
**सांखळी** (सं. शृंखला स्त्री.) अडकवण; पैमाशखात्यांत जमिनीची मोजणी करण्याचें ३३ फूट लांबीचें माप.
**साखी** (स्त्री.) साख, पत.
**सांखी** (प्रा. वि.) सज्ञान; सांख्य.
**सांख्य** (सं. न.) सर्व जग परमाणूंपासून झालें असें मत; (प्रा. पु.) विचार.
**साग** (सं. शाक पु.) सागवानी लाकूड.
**साग** (सं. स + आग वि.) अपराधयुक्त.
**सांग** (स्त्री.) सबंध लोखंडाचा केलेला.
**सांग** (सं. वि.) अंगासहित, पूर्ण.
**सांगोपांग** (वि.) यथासांग; परिपूर्ण.
**सांग** (स्त्री.) सांगणें, आज्ञा, शिवणकाम.
**सांगकाम्या** (वि.) अर्थाकडे दृष्टि न देतां किंवा स्वतःची अक्कल न चालवितां केवळ सांगितलेलें काम अक्षरशः करणारा.
**सांगठ्या** (वि.) ज्याच्या हाताला किंवा पायाला सहा बोटें आहेत असा.
**सागड** (सं. छाग स्त्री.) जोडयाची सागळ किंवा नरी.
**सांगड, सांगडी** (प्रा. स्त्री.) जोडी, गांठ; वाळलेल्या कडू भोपळयाचा ताफा; नाव, नौका (तुका० १३९६).
**सांगडणें** (क्रि.) जोडणें, बांधणें.
**सांगडा** (पु.) भोपळयाचें पेटें; (वि.) सारखें; सदृश.
**सांगडें** (प्रा. वि.) अवघड; सारखें; (न.) सादृश्य (ज्ञा० १५।५५५)); अडचण.
**सांगणी** (स्त्री.) समजावणी; शिकवण.
**सांगणें** (क्रि.) कथन करणें, कळविणें; समजाविणें; (जेवण्यास) बोलाविणें. सांगून येणें——(मुलगी) करतां का म्हणून विचारणें. [करणारा.
**सांगता** (सं. स्त्री.) पूर्णता; (पु.) कथन
**सागर** (सं. पु.) समुद्र, मोठा जलाशय.
**सागरगामी** (वि.) मोठया समुद्रांत हिंडणारी (नौका).
**सागरगोटा** (पु.) एक वनस्पतीचें फळ.
**सागलाग** (पु.) नेम, लक्ष्य.
**सागली** (वि.) सागवानी लाकडाचें.
**सागवान** (पु.) साग नांवाचें लाकूड.
**सांगसुगरण, सांगसुग्रण** (सं. सुगृहिणी स्त्री.) आपण स्वतां कांहींच काम न करतां लोकांना कामें सांगण्यांत पटाईत.
**सागळ** (प्रा. स्त्री.) बोकडाचें कातडें; त्याची केलेली जोडयाची नरी.
**सागळा** (प्रा. पु.) पाण्याची झारी धरणारा (तुका० १२७६).
**सांगाडा** (पु.) खोका, पिंजरा, सांपळा.
**सांगात** (पु.) संगति, सोबत.
**सांगाती** (प्रा. पु.) सोबती.
**सांगातीं, सांगातें** (अ.) सह, बरोबर.
**सांगावणें** (प्रा. क्रि.) भरून जाणें (मुक्ते० रामा० ६।३६६).
**सांगावा** (पु.) निरोप.
**सांगावांगीं, सांगासांगीं, सांगोवांगीं** (स्त्री.) प्रत्यक्ष प्रमाण नसतां एकानें दुसऱ्यास, दुसऱ्यानें तिसऱ्यास . सांगावें अशी परंपरा; दंतकथा.
**सांगी** (स्त्री.) संगत; उपदेश.
**सागुती** (हिं. सागौती स्त्री.) खाण्यायोग्य प्राण्याचें मांस, बहुधा बकऱ्याचें मांस.
**सांगुळणें** (क्रि.) गोठणें.
**सागू** (पोर्तु. पु.) साबू नांवाचा वृक्ष (याच्या गिराच्या गुठळया वळून साबूदाणा करतात); साबूदाणा.
**सागेलाग** (पु. अने.) सोबती, साथीदार.
**सांगोपांग** (सं. अ.) सर्वांशानें, यथासांग.
**सांगोवांगीं, सांगोसांगीं** सांगावांगीं पहा.
**साग्या** (पु.) साथीदार, सोबती.
**साग्यालाग्या** (वि.) लुच्चेगिरीच्या कारस्थानांतला साक्षीदार.
**साग्र** (सं. वि.) अणकुचीदार; संपूर्ण.

**सांग्रामिक** (सं. वि.) लष्करी, लढाऊ.
**सांघडें** (प्रा. न.) साइखडें पहा.
**सांघात** (सं. संघात पु.) समुदाय, मंडळी; संयोग; मिलाफ.
**सांघाती** (पु.) सोबती.
**सांघिक** (वि.) समूहाचें.
**सांच** (सं. संचय पु.) जागा, अवकाश.
**साच** (सं. सत्य वि.) खरें, योग्य; बरोबर.
**साच, साचल** (पु. स्त्री.) पावलाचा किंवा हालचालीचा आवाज, चाहूल.
**सांचणें** (क्रि.) जमणें, गोळा होणें.
**साचमेळें** (प्रा. अ.) खऱ्याप्रमाणें.
**सांचवणी** (न.) साचलेलें किंवा साचविलेलें पाणी.
**सांचविणें** (क्रि.) संग्रह करणें, जमा करणें.
**साचळ** (स्त्री.) चाहूल. [ठसा, छाप.
**सांचा** (हिं. पु.) मूस, ओतणी, नमुना;
**साचार** (प्रा. अ.) खरोखर.
**साचारीव** (प्रा. स्त्री.) सत्यपणा.
**साचाल** (प्रा. अ.) खरोखर (वामन० विराट० ६।१८२).
**साचिव्य** (सं. न.) मंत्रिपद; मैत्री.
**सांचीव** (वि.) साचविलेलें.
**साचें** (सं. सत्य वि.) खरें; बरें.
**साचेबंद** (वि.) सांच्यांत ओतल्याप्रमाणें; ठरीव.
**साचोकार** (प्रा. अ.) खरोखर.
**साचोकारा** (प्रा. अ.) खरोखर (भा० १।४); (पु.) सत्यता (ज्ञा० ५।१४६).
**साचोल, साचोळ** (पु. स्त्री.) चाहूल; अस्पष्ट ध्वनि.
**साज** (सं. सज्ज पु.) सच; सरंजाम; पखवाज; अलंकार; वेष.
**सांज** (प्रा. स्त्री.) रास (ज्ञा० १३।३९).
**सांज** (सं. संध्या स्त्री.) संध्याकाळ; श्रावण महिन्यांत रात्रीं देवापुढें कलाकौशल्याचीं कामें मांडून झाकी करतात ती; भुतांखेतांना अर्पण केलेला नवीन धान्याचा नैवेद्य; (सं. सत्य स्त्री.) ज्या जमिनीपासून जें पीक जितकें निघत आलें तें व तितकें आतांहि निघेल अशी जमिनीच्या सत्यत्वाविषयींची श्रद्धा.
**साजक** (सं. श्यामक पु.) सांवे नांवाचें धान्य; (वि.) पोटगी; ताट.
**साजकरी** (पु.) वाजंत्री, गवई, तमासगीर, गोंधळी इ० लोकांच्या मंडळींतल्या कामाच्या उठावाला लागणारा प्रत्येक इसम. [भंडार.
**साजकरोटी** (हि. स्त्री.) आणभाक, बेल-
**साजण** (सं. सज्जन पु.) प्यार, यार, साग्या.
**साजणी** (स्त्री.) जारिणी; सखी; (वि.) शोभिवंत.
**साजणें** (सं. सज्ज् क्रि.) शोभणें, भूषविणें, योग्य दिसणें; (न.) मैत्री, सख्य (विवे० पू० ३।५५); सज्जपण.
**सांजदिवा** (सं. संध्यादीप पु.) देवापुढें संध्याकाळापुरता लाविलेला दिवा.
**साजरा, साजिरा** (सं. सज्ज वि.) शोभिवंत, सुंदर.
**सांजवणी** (स्त्री.) संध्याकाळीं गाईम्हशीची काढलेली धार; सायंकाळ.
**सांजवणें** (क्रि.) संध्याकाळ होणें.
**सांजवरी, सांजोरी** (सांजा स्त्री.) पोटांत सांजा घालून तळून काढलेली पुरी; एक पक्वान्न.
**सांजवात** (स्त्री.) देवापुढें संध्याकाळापुरता लाविलेला मंद ज्योतीचा दिवा.
**सांजवेळ** (प्रा. स्त्री.) संध्याकाळ.
**साजा** (वि.) साजूक, नुकता केलेला.
**सांजा** (सं. संयाव पु.) जाड रवा; शिरा.
**सांजावण** (प्रा. स्त्री.) संध्याकाळीं काढलेली गाईम्हशीची धार.
**सांजावणें, सांजवणें, सांजळणें** (क्रि.) संध्याकाळ होणें.
**साजिंदा** (फा. साजंदा पु.) वादनकुशल; गाणारणीची साथ करणारा.
**साजिरा** (पु.) इमारती लाकडाचा एक वृक्ष.
**साजिरें** (प्रा. वि.) शोभिवंत, सुशोभित, सुंदर.
**साजिवता** (प्रा. स्त्री.) टवटवीतपणा.
**साजिसी** (स्त्री.) खुशामत.
**साजुकुळ** (प्रा. वि.) शांत. [केलेलें.
**साजूक** (सं. सद्यस्क वि.) ताजें, नुकतें
**साजें** (प्रा. वि.) टवटवीत, ताजें (अमृ० ७।९१).

**सांर्जे** (न.) व्रत, नवस; पीक मिळण्या-वयर्यींचा भरंवसा; (सं. संध्या न.) संध्याकाळीं काढतात ती दृष्ट.
**सांजें** (अ.) संध्याकाळीं.
**सांजोरी** (स्त्री.) सांजवरी पहा.
**सांजोळ, सांजाळ** (स्त्री.) संध्याकाळ.
**सांझ, सांझवर्णे, सांझें** सांज, सांजवणें, सांजें पहा.
**सांट** (पु. स्त्री.) जागा, अवकाश.
**साट, साठ** (अ.) आंब्याची किंवा फणसाची पोळी; (पु.) वांवूची केलेली आंथरी; (प्रा. पु.) टांच (शुभा० उद्यो० ३।७७); भय; मोवदल्यांत मिळालेला माल (तुका० ५७९); चावुक (भा० २९।११३); भय.
**साटका-विटका** (वि.) खराव झालेला, विटाळलेला, नासलेला.
**साटणी** (स्त्री.) साटी पहा.
**साटण** (सं. स्त्री.) वढाई; गप्प.
**साटणें** (क्रि.) सांचणें; जमणें; साठणें; भेदणें; वाजारांत आलेला माल एकदम खरीदणें.
**साटपा** (पु.) सांठा, संग्रह, कोठार; कोठारांतला माल.
**साटभाऊ, साडभाऊ** (पु.) साडू.
**साटमार** (पु.), **साटमारी** (हिं. स्त्री.) रंगणांत हत्ती सोडून त्याच्याशीं माणसांनीं लढण्याचा एक खेळ.
**साटमाऱ्या** (पु.) साटमारी खेळणारा.
**साटवण–णी** सांठवण, सांठवणी पहा.
**साटा** (प्रा. पु.) मोवदला; शिंतोडा; सांगाडा; सारण; (हिं. पु.) ऊंस.
**साटारा** (पु.) भव्य रास.
**साटी** (स्त्री.) बदला (तुका० १०७८); संग (दा० ३।४।४२); ज्यावर ओझें ठेवतात तो गाडीचा भाग; चौकट.
**साटीण** (इं. स्त्री.) एक प्रकारचें मऊ कापड.
**साटु, साटू** (प्रा. पु.) चाबूक; भय.
**साटें** (न.) सट्टा, एकदम केलेला सौदा.
**साटेखत, साटेपत्र** (न.) साटें केल्याबद्दलचा दस्तऐवज.

**साटें-लोटें** (न.) आपल्या घरची मुलगी दुसऱ्याच्या घरीं द्यावी; व त्याच्या घरची मुलगी आपल्या घरीं आणावी असा मोवदल्याचा विवाह; देवाण-घेवाण.
**साटोप** (प्रा. पु.) अतिनेट; अत्याग्रह; (वि.) व्यवहाराची आकलनशक्ति असलेला, व्यवहारज्ञ; खटपटी, अहंकार-युक्त; आटोपशीर, थोडक्यांत मावणारा.
**साटोपता** (अ.) उत्साहानें (भा० १७।३१६).
**साटोपा** (प्रा. पु.) काठी.
**साटोपु** (प्रा. वि.) अहंकारयुक्त.
**साटोरी** (स्त्री.) सारण घातलेली पुरी.
**साटोवा** (प्रा. पु.) सांठवण.
**साटोवाट, साटोवाटी** (प्रा. स्त्री.) अदलावदल, सवदा (भा० २९।४०९).
**साठ** (वि.) ६०; (पु.) सवदा; सांठा, संचय.
**साठमार–री–ऱ्या** साटमार, साटमारी, साटमाऱ्या पहा. [पात्र.
**सांठवण** (स्त्री.) संचय; (न.) सांठविण्याचें
**सांठवणी** (न.) सांठविलेलें पाणी.
**सांठवणी, सांठवणूक** (स्त्री.) संचय करण्याची क्रिया. [करणें.
**सांठवासांठव** (स्त्री.) घाईघाईनें संचय
**सांठविणें** (क्रि.) संचय करणें, संग्रह करणें.
**साठळणें** (क्रि.) वयाला साठ वर्षें होणें; वुद्धिभ्रंश होणें.
**सांठा** (पु.) संचय, संग्रह, ढीग.
**साठा** (पु.) चौकट, सांगाडा.
**साठी** (सं. षष्टि स्त्री.) साठ वर्षांची उमर; साठ दिवसांत पिकणारें भात. **साठी उलटणें**—म्हातारपण येणें; **साठी बुद्धि नाठी**—साठ वर्षांनंतरच्या वयांत मनुष्याच्या बुद्धीला भ्रंश होण्याचा संभव असतो.
**साठी** (प्रा. स्त्री.) गोणी; सांठा; सोबत; संगत; नाश; त्याग.
**साठीं** (अ.) करितां, कारणास्तव.
**साठेबाजी** (स्त्री.) साठा करून वस्तू दुर्मिळ करणें व मग ती भलत्या भावानें विकणें.
**साठेरा, साठेरी** (वि.) साठ दिवसांत पिकणारी भाताची एक जात; नाचणी.

**साठोरी** साटोरी पहा. [गाभा.
**साड** (सं. सार पु.) लाकडाचा आंतला
**सांड** (प्रा. पु.) त्याग, उपेक्षा; कोपरा (ज्ञा० १४।९३५); (स्त्री.) हरवण्याची संवय; (सं. षंड पु.) पोळ; (स्त्री.) हरवलेली वस्तु; सोडलेली बायको; उंटाची मादी.
**सांडई** (स्त्री.) तांदुळाच्या पिठाचें कुरडईसारखें एक खाद्य.
**सांडखत** (न.), **सांडचिठ्ठी** (स्त्री.) बायको, गुलाम, घर किंवा कांहीं पदार्थ यांवरचा हक्क, ताबा किंवा स्वामित्व आपण सोडून दिलें आहे अशा अर्थाचें पत्र; सोडचिठ्ठी.
**सांडगा** (पु.) भोपळा, काकडी इ० चे काप काढून ते वाळवून व तळून केलेलें रुचकर खाद्य.
**सांडणी** (प्रा. स्त्री.) कष्ट; यातायात.
**सांडणी** (हिं. स्त्री.) उंटाची मादी; भट्टींतला पदार्थ उचलण्याची सोनाराची आंकडी.
**सांडणीस्वार** (पु.) जासूद.
**सांडणी** (स्त्री.) गळून पडणें, हरवणें; अधिक झालेलें पाणी वाहून जाण्यासाठीं ठेविलेलें छिद्र; **सां० स पडणें**—विस्मरण होणें.
**सांडणें** (क्रि.) त्यागणें, सोडणें; हरवणें; लवंडणें; (न.) ओवाळून टाकलेला पदार्थ (मुक्ते० वन० १७।५२).
**सांडपाणी** (न.) धुणें, भांडीं घासणें वगैरेनें झालेलें घाण पाणी.
**सांडभोळा** (वि.) विसरभोळा.
**सांडरा** (वि.) उधळया; वस्तु हरवणारा.
**सांडरांड** (स्त्री.) नवऱ्यानें टाकलेली बायको.
**सांडरूं** (म. सांड न.) उंटाची स्त्री (तुच्छतेनें); नवऱ्यानें टाकून दिलेली बायको (तुच्छतेनें).
**सांडलवंड–डी** (प्रा. स्त्री.) हरवणें, सांडणें; गाळणें; हेळसांड; विपरीत स्थिति.
**सांडवणें** (प्रा. क्रि.) मुकणें; क्षीण होणें.
**सांडवर** (प्रा. वि.) नवऱ्यास सोडून जाणारी (तुका० २३१).
**सांडवा** (प्रा. पु.) पाण्याचा बांध; अधिक झालेलें पाणी वाहून जावें म्हणून धरणास ठेविलेलीं छिद्रें.
**सांडशी** (सं. संदशिनी स्त्री.) सोनाराचा लहान चिमटा.
**सांडस** (पु.) चिमटा. [सूट.
**सांडसूट** (स्त्री.) येण्याच्या रकमेंत दिलेली
**सांडा** (प्रा. वि.) टाकाऊ. [मोरी.
**सांडावा** (प्रा. पु.) पाणी जाण्याचा मार्ग;
**साडी** (सं. शाटी स्त्री.) सूट; लहान लुगडें; चिरडी.
**सांडी** (प्रा. स्त्री.) त्याग; अव्हेर. [२३५).
**सांडी पडणें** हरणें, पराजित होणें (ज्ञा० १५।
**सांडी मांडी** (प्रा. स्त्री.) टाकणें व घेणें (रं०यो०१०।३२७); यातायात, त्रास.
**सांडीस्वार** (पु.) सांडणीस्वार.
**साडू, साडभाऊ** (हिं. पु.) बायकोच्या बहिणीचा नवरा.
**साडे** (पु. अने.) ऐरणीपूजनाच्या वेळीं वधूस वस्त्रें देण्याचा समारंभ.
**साडे** (सं. सार्ध वि.) संख्यावाचक. शद्बाला जोडून हा आला म्हणजे याचा अर्थ अधिक असा होतो.
**सांडे** (प्रा. क्रि.) नव्हे.
**साडेतीन पोशाख** पूर्वीं दरबारांत कित्येक मोठाल्या अधिकाऱ्यांना १ पागोटें, १ शेला, पायजमा किंवा झगा याच्यासाठीं महामुदी नांवाच्या उंची वस्त्राचा तुकडा व पटक्यासाठीं किनखापाचें अर्धे ठाण मिळून ३॥ वस्त्रें देण्याचा रिवाज असे; त्यास साडेतीन पोशाख म्हणत.
**साडेतीन मुहूर्त** दसरा, दिवाळीची प्रतिपदा व चैत्र शु. १ (वर्षप्रतिपदा) हे तीन व नागपंचमी (कित्येकांच्या मतें अक्षय्यतृतीया) अर्धा असे साडेतीन मुहूर्त कोणतेंही कार्य आरंभण्यास उत्कृष्ट समजतात.
**साडेतीन शहाणे** पेशवाईंत सखारामबापू बोकील, विठ्ठल सुंदर व देवाजीराव चोरघडे हे तीन सबंध शहाणे व नाना फडणीस हे अर्धे शहाणे असे साडेतीन शहाणे पुरुष प्रसिद्ध होते.

**साडे पंधरें** (प्रा. न.) उत्तम सोनें (भा०२। ४८७). [भावी.
**साडे भावार्थी** (वि.) ढोंगी साधु; मान-
**साडेसाती** (स्त्री.) एकाद्या माणसाच्या जन्मराशीपासून १२, १ व २ या राशींत शनि असला म्हणजे या तीन राशी क्रमण्याला शनीला लागणारा काळ (७॥ वर्षे) त्या माणसाला कष्टाचा जातो असें समजतात. त्यावरून दुर्दैवाचा फेरा असा अर्थ.
**सांडोवा** (प्रा. पु.) पाण्याचा बांध; कुरवंडी; त्याग; ओवाळून टाकण्याचा पदार्थ.
**सांडोसांड** (अ.) अगदीं कांठावरून वाहील इतकें.
**साणा** (पु.) तरींचें नाकें; तरीनें उतारूंची ने–आण करण्याची जागा; तर, नाव.
**साणा** (सं. शाण पु.) निसणा; शस्त्रांना धार लावण्याचा दगड.
**साणा** (शहाणा पु.) शेत, गुऱ्हाळ इ० तून पातीदारांपैकीं कोणी माल काढून नेऊं नये म्हणून पातीदाराच्या वतीनें रक्षणार्थ ठेविलेला मनुष्य.
**साणी लाणी** (स्त्री.) सीमेची खूण (दगडांत कोरलेली असते ती).
**साणें** (न.) बुराडें, गवाक्ष, धारें.
**सात** (सं. सप्त वि.) ७; फार.
**सात** (स्त्री.), **साथ** (प्रा. अ.) सहित.
**सांत** (प्रा. पु.) बाजार.
**सात** (स्त्री.) संतत प्रवाह; परंपरा.
**सातडें** (न.) साल, कातडें, चामडें.
**सात ताड उंच** फार उंच.
**सातत्य, सांतत्य** (सं. न.) सततपणा, अखंडितपणा.
**सांतपन** (सं. न.) प्रायश्चित्ताचा एक प्रकार.
**सातपांच** (प्रा. वि.) पंच्याहत्तर. **सा० करणें**—विसंगतपणाचें भाषण करणें.
**सातपुडा** (पु.) एका पर्वताचें नांव.
**सातपुती** (स्त्री.) सातपुत्रांची आई.
**सान्तर** (सं. वि.) फटी असलेलें, विरळ; व्यवधानसहित; अट किंवा शर्त असलेलें.
**सातरणें** (क्रि.) छानदार पालवी फुटून विस्तार होणें.
**सातरवारा, सातरस** (पु.) ईशान्येकडचा वारा. [फळांचा समुदाय.
**सातरिया** (प्रा. पु.) सात संख्या; सात
**सातरी** (स्त्री.) सप्ताह, सप्तक.
**सातरें** (न.) सात दिवसांचा समुदाय, सप्ताह, सप्तक; दर सातव्या दिवशीं येणारें हींव.
**सांतवण** (प्रा. न.) सांठवण; संग्रह.
**सातवण, सातवीण** (सं. सप्तपर्ण पु. स्त्री. न.) एकेका दांड्याला सातसात पानें असणारी एक वनस्पति.
**सांतवन** (न.) सांत्वन, समाधान.
**सातवळा–ळी–ळें** (वि.) सात महिने गर्भांत राहून उपजलेलें (मूल); अशा मुलाची आई.
**सात वाकडी** (प्रा. स्त्री.) पावसाची झड.
**सांतविणें** (क्रि.) सांत्वन करणें.
**सात सडका** (स्त्री. अने.) हत्तीच्या गंडस्थळांतून होणारा मदस्राव. **सा० सुटणें**—उन्मत्त होणें, माजणें.
**सातसवाई** (वि.) अतिशय वरचढ.
**सातसायासानें** फार परिश्रमानें.
**सातसाय, सातसाया** सातसायास (पराकाष्ठेचे परिश्रम) या शब्दाचा संक्षेप.
**सातळणें** (क्रि.) तुपांत किंवा तेलांत भाजणें; तळणें.
**सातां** (प्रा. अ.) असतां (ज्ञा० ८।१९८).
**सातागुणांचा खंडोबा** सर्व दुर्गुण किंवा व्याधि ज्याच्या अंगीं भरल्या आहेत असा मनुष्य. [झालेला.
**सातारा** (वि.) उत्तम रीतीनें पल्लवित
**सातारी** (स्त्री.) मुंग्यांच्या वारुळांवरची जागा किंवा त्यावर बांधलेलें नागोबाचें देऊळ. [उपजलेलें मूल.
**सातारें** (न.) सात महिने गर्भांत राहून
**सातासमुद्राच्या पलीकडे ठेवणें** फार जपून बंदोबस्तानें ठेवणें.
**साती** (प्रा. अ.) बरोबर; असतां (ज्ञा० ७।४); (स्त्री.) सोबती, साथी.
**सांती** (स्त्री.) रोगाची सांथ.

**सातुळी** (प्रा. स्त्री.) सुतळी.
**सातू** (सं. सक्तु पु.) जव, भाजलेलें जव; गहूं आणि हरभरे यांचें मिश्र पीठ.
**सातेरूं** (न.) एक प्रकारचें मधाचें पोळें.
**सातेरें** (न.) सात दिवसांची पावसाची झड.
**सात्रक** (स्त्री.) घोड्याची एक चाल; सात दिवसांची मुदत.
**सात्मीकरण** (सं. न.) परिपाक; एकरसता.
**सात्वत** (पु.) भक्त; भागवत. **सा०धर्म** (पु.) –भागवत धर्म.
**सांत्वन** (सं. न.), **सांत्वना** (स्त्री.) राग, शोक, क्षोभ इ० शांत करणें, समाधान करणें.
**सात्त्विक** (सं. वि.) प्रामाणिक, सत्त्वगुणी; जोरदार.
**सात्त्विकभाव** (सं. पु.) साहित्य–शास्त्रांत —सुखादि भावांनीं भावित जें अंतः–करण तें सत्त्व; त्यांत उत्पन्न होणारे जे भाव ते. हे आठ आहेत. ते असेः–स्तंभ, स्वेद, रोमांच, स्वरभंग, वेपथु (कंप), वैवर्ण्य, अश्रुपात आणि प्रलय.
**साथ** (स्त्री.) सोबत; संगत.
**सांथ** (स्त्री.) आकस्मिकपणें पसरणारा रोग.
**साथकरी** (पु.) गायन वादनांत साथ करणारा.
**साथी** (सं. सार्थी पु.) सोबती, जोडीदार, मदतनीस; समाजवादी लोकांच्या मागें लावण्याचें उपपद.
**साथीदार** (पु.) जोडीदार; मदतगार.
**साथें** (प्रा. न.) मार्ग.
**साद** (सं. शब्द पु. स्त्री.) हाक; हाकेस उत्तर; शब्द; आवाज; स्मरण; थकवा; कृशता; नाश; शेवट.
**सादट** (प्रा. वि.) तिखट; मळकें. [खाद्य.
**सांदण, सांदणें** (न.) तांदुळाचें केलेलें एक
**सांदणी** (प्रा. स्त्री.) साधणूक.
**सांदणें** (प्रा. न.) जोड, संधि (स्वा० दि० ११।१।८); सांदण पहा.
**सादपरका** (वि.) बदललेल्या आवाजाचें (फळ कच्चें असतां त्यावर टिचकी मारून जो आवाज येतो त्याहून निराळा आवाज तें पिकलें असतां देतें).
**सादर** (सं. अ.) आदरपूर्वक.
**सादर** (अर. वि.) हजर; काढलेलें; निघालेलें. **सा० करणें**—पाठविणें, हजर करणें. [देणें; हाक मारणें.
**सादविणें** (सं. क्रि.) शब्द करणें, आवाज
**सादळणें** (सं. सार्द्र क्रि.) सर्द होणें; ओलसर होणें.
**सांदा** (पु.) सांधा.
**सादिल, सादिलवारी** (अर. सादिस वारिद स्त्री.) नैमित्तिक किंवा आगंतुक खर्च; किरकोळ खर्च.
**सादी** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) बसणारा; (पु.) घोडेस्वार, सारथि, योद्धा (मोरो० कर्ण० १०।१८).
**सांदी,, सांद** (सं.स्त्री.) बोळ; अंगण; परसू.
**सांदीकोंदी** (स्त्री.) जोड, भेग, कोपरे, इत्यादि.
**सादुकणें** (प्रा. क्रि.) प्रदीप्त होणें.
**सादुकपणा** (प्रा. पु.) प्रदीप्तता.
**सादृश्य** (सं. न.) सारखेपणा.
**सांदोसांदीं** (अ.) कोनाकोपऱ्यांत.
**साद्यंत** (सं. वि.) संपूर्ण, अथपासून इतिपर्यंतची.
**सांद्र** (सं. वि.) निबिड, दाट.
**सांद्रीभवन** (सं. न.) दृढीकरण.
**सांध** (सं. संधि स्त्री.) जोड, संधि; भेग, चीर; हातमागांतला ताण्याचा तिडा.
**साध** (प्रा. स्त्री.) इच्छा.
**साधक** (सं. वि.) इष्ट कार्याच्या सिद्धीला उपयोगी; उपकारक; (पु.) योगी; मंत्रतंत्रादि साधन करणारा.
**साधक-बाधक** (सं. वि.) अनुकूल किंवा प्रतिकूल. [ण्याचें काम.
**सांधकाम** (न.) निरनिराळे तुकडे जोड-
**सांधणी** (स्त्री.) सुतें जोडणें; तीं जोडण्याचें हत्यार.
**सांधणी, सांधणूक** (स्त्री.) जोडण्याचें काम; इष्ट कार्य सिद्धीस नेण्याचा व्यापार; त्याला लागणारें साहित्य इत्यादि.
**सांधणें** (क्रि.) जोडणें, जमविणें, मिळविणें; (प्रा. न.) मैत्री.
**साधणें** (क्रि.) कार्य सिद्धीस नेणें.

**साधन** (सं. न.) साहित्य, सामग्री; कार्य-साधनास साह्यभूत होणारें प्रत्येक उपकरण; तोड, उपाय, युक्ति; व्रत; ईश्वरभजन; दान, मंत्रतंत्र इत्यादि.
**साधनचतुष्टय** (सं. न.) ब्रह्मप्राप्तीचे चार मुख्य उपायः—वस्तुविवेक, वैराग्य, शमादि (यांत शम, दम, दया, तितिक्षा, उपरति व समाधान यांचा अंतर्भाव होतो) व मुमुक्षुत्व.
**साधनद्वादशी** (सं. स्त्री.) पहाटेस थोडा वेळ द्वादशी असून पुढें त्रयोदशी लागते तेव्हां त्या थोडक्या वेळांत एकादशीचा उपास सोडण्याची व्यवस्था करून ती द्वादशी साधावी लागते असा दिवस.
**साधनसामुग्री** (स्त्री.) प्राथमिक तयारीच्या वस्तु.
**साधना** (स्त्री.) तपश्चर्या.
**साधनालय** (स्त्री.) उपकरणें ठेवण्याची [ जागा.
**साधनी** (स्त्री.) एखादें कार्य साधण्यास लागणारी सामुग्री; गवंडी, सुतार इ० चें उच्चनीच, सरळ, वाकडें वगैरे पाहण्याचें साधन (जसें—ओळंबा, वुडीद, पाणसळ इत्यादि).
**सांधप** (न.) सांधणें, जोडणें.
**सांधमोड** (स्त्री.) भिंत रचतांना एका घरांत विटा किंवा दगड यांचा जेथें सांधा येतो तेथें दुसऱ्या घरांत सांधा न येऊं देतां विटेचा किंवा दगडाचा मध्य येईल अशा तऱ्हेची रचना.
**साधर्म्य** (न.) सारखेपणा.
**साधलाद –ध** (स्त्री.) दैवयोग, लाभालाभ.
**साधा** (वि.) अनलंकृत, बिनथाटमाटाचा, सरळ, धोपटमार्गानें चालणारा; भोळा; छक्केपंजे न जाणणारा; बाळबोध, निष्कपटी.
**सांधा** (सं. संधि पु.) जोड, संधि.
**साधार** (क्रि. वि.) आधारासहित.
**साधारण** (सं. वि.) सामान्य, सार्वत्रिक.
**साधित** (सं. वि.) सिद्ध केलेलें; एकापासून दुसरें तयार केलेलें.
**साधितणें** (प्रा. क्रि.) साधणें.
**सांधी** (सं. संधि स्त्री.) सांधा, जोड; चीर, [फट.
**सांधीकोंदी** (स्त्री.) जोड, शिवण, चीर, फट, कोपरे इ० संबंधानें सामान्य संज्ञा.
**सांधीव** (वि.) जोडून तयार केलेलें.
**साधु** (सं. पु.) सात्त्विक वृत्तीचा; शमदमादि गुणांनीं युक्त; ईश्वरभक्तिपरायण, पुण्यात्मा पुरुष; सज्जन.
**साधुसंत** (पु.) साधु आणि संत.
**सांधोरी** (स्त्री.) मोठा किंवा अव्यवस्थित प्रकारचा सांधा; गल्ली, बोळ.
**सांधोसांधीं** (अ.) कोनाकोपऱ्यांत.
**साध्य** (न.) जें काय साधावयाचें तें, उद्दिष्ट; (वि.) शक्य, होण्याजोगें.
**सांध्य** (वि.) संध्याकाळचें.
**साध्वस** (सं. न.) भय.
**साध्वी** (सं. स्त्री.) सती, पतिव्रता.
**सान, साना–नी–नें** (प्रा. वि.) लहान.
**सानक** (अर. साहन स्त्री.) ताटली; निर्वाहार्थ दिलेली इनाम जमीन इ०
**सानुकंप** (वि.) करुणायुक्त.
**सानुला** (वि.) लहान.
**सांनिध्य** (सं. न.) समीपता, शेजार, [संगत.
**सांनिपातिक** (सं. वि.) वात, पित्त आणि कफ या तीन दोषांच्या विकारानें उत्पन्न झालेला (रोग).
**सानीव** (प्रा. स्त्री.) लहानपण.
**सानुलें** (प्रा. वि.) लहानसें.
**सानें** (प्रा. वि.) लहान, बारीक; अल्प.
**सानेंजणें** (प्रा. क्रि.) लहान होणें.
**सानें-वानें** (प्रा. वि.) थोडेंबहुत.
**सान्न** (स्त्री.) कारवाराकडे—केरसुणी.
**सान्नें, सान्यें** (न.) पिशाचाला द्यावयाचा बळि, उतरून टाकिलेलें अन्न वगैरे.
**साप** (सं. सर्प पु.) सरपटणारा प्राणी; नाग, फुरसें, मण्यार, घोणस, जिवाणू, इ०). **साप साप म्हणून भुई बडविणें**—एखाद्यावर नसता दोष लावून त्याला शिक्षा करणें.
**सापका** (पु.) पत, अब्रू; धोक्याचा किंवा आणीबाणीचा प्रसंग; स्वप्न.
**सापट, सांपट** (स्त्री.) चीर, भेग, फट.
**सापट** (वि.) कुजट. [ जात.
**सापटोळी** (स्त्री.) सापाची एक विषारी

**सापड** (पु. स्त्री.) सर्वांनीं एकत्र जमून श्रमपरिहारार्थ गाणीं वगैरे म्हणत व परस्परांना उत्तेजन देत शेतसंबंधाचीं कामें करण्याचा प्रकार. [ताव्यांत येणें.
**सांपडणें** (सं. संपद् क्रि.) आढळणें, गवसणें
**सांपडा** (पु.) चौकट, तट्टचा; ताटी.
**सापती** (स्त्री.) जुंपलेल्या बैलांच्या गळ्यां-भोंवतालचा पट्टा.
**साप्ताहिक** (वि.) आठवड्याचें; (न.) आठवड्याचें वृत्तपत्र.
**सापत्न** (सं. वि.) सावत्र.
**सापत्नभाव** (सं. पु.) सवतीमत्सर.
**सांपसारणें** (क्रि.) उपसंहार करणें; व्यवस्थित रीतीनें जुळवून मांडणें; भाषणाच्या वेळीं घसरलेली गोष्ट सुधारून मांडणें.
**सापसुरळी, सापसोळी** (स्त्री.) पालीच्या जातीचा एक प्राणी.
**सांपळा** (पु.) उंदीर, घुशी वगैरे धरण्याचा पिंजरा; सांगाडा.
**सांपालें** (न.) जुनें, पडकें, ओसाड स्थान.
**सापिका** (पु.) अर्ध्या शिवराई पैशाचें एक तांब्याचें नाणें; दीड रुक्याचें जमिनीचें माप.
**सापीण** (स्त्री.) सापाची मादी.
**सांपूड** (स्त्री.) बारीक लवचीक काडी.
**सांपें** (प्रा. अ.) सांप्रत, हल्लीं.
**सांपेजणें** (क्रि.) कुजट घाण सोडणें–येणें.
**सापेक्ष** (सं. वि.) अपेक्षा धरून केलेलें; दुसऱ्याशीं तुलना करून होणारें.
**सापेक्षतावाद** (पु.) सृष्टींतील नैसर्गिक घटना व क्रिया या स्वतंत्र नसून परस्पर-सापेक्ष आहेत हा सिद्धान्त; हा आइन्स्टाईननें काढला. (इं. रिलेटिव्हिटी).
**सांप्रत** (सं. अ.) सध्यांच्या काळीं, आतां.
**सांप्रदाय** (सं. संप्रदाय पु.) संप्रदाय, प्रघात, रूढि.　[ संप्रदायांतला.
**सांप्रदायिक** ( सं. वि. ) परंपरागत,
**साफ** (अर. वि.) स्वच्छ, शुद्ध, पवित्र, निर्दोष, गुळगुळीत, सम; उघड, स्पष्ट; (अ.) निःसंकोचपणें, पूर्णपणें, अगदीं स्पष्टपणें.

**साफल्य** (सं. न.) सफळता, फलद्रूपता.
**साफसफाई, साफसुफी** (स्त्री.) स्वच्छता, चकाकी, गुळगुळीतपणा.
**साफा** (हिं. पु.) रुमाल; फेटा.
**साफी** (हिं. स्त्री.) गाळण्याचें वस्त्र.
**सांब** (सं. स + अंबा पु.) शिव, महादेव; भोळा मनुष्य.
**साबका** (पु.) पत, अब्रू, शील.
**साबडा** (प्रा. वि.) भोळा; भावडा.
**साबण** (पोर्तु. सावन पु.) स्वच्छ करणारें द्रव्य.　[ रसाची कांडी.
**साबणी** (स्त्री.) साखरेच्या घट्ट केलेल्या
**साबर** (सं. शाबर न.) जादूटोणा.
**साबर** (स्त्री.), **साबरकांडें** (न.) निवडुंग.
**सांबर** (न.) शिंगास फांटे असलेली हरिणाची एक जात.
**सांबरमीठ** (न.) खनिज मीठ.
**सांबरी** (वि.) सांबराच्या कातड्याचा; (स्त्री.) सांबराच्या कातड्याची पिशवी.
**साबरी विद्या** (स्त्री.) जादूविद्या, मंत्रशास्त्र.
**साबरें** (प्रा. न.) पाणी (ज्ञा० ९।३२४).
**साबळ, सांबळ** (प्रा. न.) बरची, भाला, पहार.　[ भाबडा.
**साबळा, भाबळा** (वि.) साधाभोळा, भोळा-
**साबळें** (न.) भाला, बर्ची, इत्यादि शस्त्राचें पोलादी पातें.
**साबान** (अर. शाबान पु.) मुसलमानी वर्षाचा आठवा महिना.
**सांबारें** (न.) काकडी, मुळे इत्यादि चिरून घातलेली कढी किंवा आमटी.
**साबीक** (अर. वि.) माजी, जुना, पूर्वीचा.
**साबीत** (अर. शाबीत वि.) शाबूत, मजबूत; सिद्ध झालेलें.
**साबू** (अर. साबून पु.) साबण.
**साबूत, साबूद** (वि.) साबीत पहा.
**साबूदाणा** (पु.) सागु झाडाच्या सत्वाच्या गोळ्या; एक उपासाचा पदार्थ.
**साभडा** (वि.) साबडा, साधा, शांत.
**सांभारें** (सं. संभृ न.) सांबारें पहा.
**सांभाळ** (पु.) रक्षण, पालनपोषण.
**सांभाळणें** (क्रि.) संभाळणें पहा.
**साभिमान** (सं. वि.) अभिमानयुक्त.

**साम**(सं. पु.)सामवेद; सलोखा, गोड बोलणें.
**सामक** (सं. न.) मुद्दल, भांडवल.
**सामका** (सं. सन्मुख अ.) समोर, सन्मुख.
**सामग्री** (सं. स्त्री.) साहित्य, साधनभूत पदार्थ, पुरवठा.
**सामग्र्य** (सं. न.) पूर्णता, एकंदरी.
**सामंत** (पु.) मांडलिक राजा.
**सामंतशाही** (स्त्री.) सरदार जमीनदार यांचें वर्चस्व असलेलें राज्य-शासन.
**सामता, सांवता** (पु.) सुताराचें भोक पाडण्याचें हत्यार.
**सामदस्तक** (न.) ऋणकोनें सावकाराच्या वहीवर कर्ज मिळाल्याबद्दल केलेली सही.
**साम-दाम-दंड-भेद** (पु.)एखाद्याला अनुकूल करण्याचे चार उपाय-साम(गोड बोलणें), दाम किंवा दान (पैशाची लालूच), दंड (शिक्षेची भीति दाखविणें), आणि भेद (फितुरी, फूट).
**सामना** (फा. पु.) समोरासमोर तोंड देणें, लढाई; खेळाडूंमध्यें होणारा चुरशीचा खेळ. [ कालिक.
**सामयिक** (सं. वि.) समयोचित; नियत-
**सामरस्य** (सं. न.) ब्रह्मानंद.
**सामराज्य** (न.) अनेक लहान राज्यांवर अंमल चालविणारें मोठें राज्य.
**सामरिक** (सं. वि.) युद्धविषयक.
**सामर्थ्य** (सं. न.) शक्ति, बळ.
**सामर्थ्यवान्** (सं. पु.) शक्तिमान, बलयुक्त.
**सामलात** (अर. स्त्री.) भागीदारी.
**सामवणें** (क्रि.) मावणें, समावणें.
**सामवेद** (सं. पु.) चार वेदांपैकीं तिसरा.
**सामसूम** (हिं. सुनसान स्त्री.) स्तब्धता, शांतता, एकांत.
**सामाईक** (वि.) समाईक, संयुक्त.
**सामाजिक** (सं. वि.) समाजसंबंधाचें. **सा० परिषद**—आपल्या समाजांतल्या दोषांची व त्यांवरील उपायांसंबंधाची चर्चा करणारी सभा.
**सामाणें** (प्रा. क्रि.) मावणें.
**सामान** (फा.न.) वस्त्र-पात्र,हत्यारें-पात्यारें, आउतें इ० समुच्चयानें सर्व वस्तु; असबाब.
**सामानसुमान** (न.) चीजवस्त, असबाब.
**सामानाधिकरण्य** (सं. न.) न्यायशास्त्रांत- एकदेशीयत्व; एककालिकत्व; एकार्थता.
**सामान्य** (सं. वि.) सर्वसाधारण; मध्यम; अलंकारशास्त्रांत—सादृश्येंकरून समान अशा वस्तूंचा भेद दाखविणारा गुण जेथें भासत नाहीं तेथें होणारा अलंकार.
**सामान्यतः** (सं. अ.) साधारणपणें, बहुशः
**सामान्यनाम** (सं. न.) व्याकरणांत— पदार्थमात्राचें नांव.
**सामान्यरूप** (सं.न.) व्याकरणांत—नामाला विभक्तिप्रत्यय लागल्यानें किंवा पुढें शब्दयोगी, अव्यय आल्यानें त्या नामाच्या मूळ रूपांत होणारा विकार.
**सामान्य सर्वनाम** (सं. न.) व्याकरणांत— अनिश्चित सर्वनाम.
**सामान्या** (सं. स्त्री.) वेश्या.
**सामायन** (न.) सामान.
**सामावणें** (क्रि.) मावणें, अंतर्भाव होणें.
**सामाशी** (स्त्री.)वर्षांतून सहा महिने दूध देणारी गाय किंवा म्हैस.
**सामाशें, सामासें** (न.) शूद्रांतलें मृता-संबंधाचें षाण्मासिक श्राद्ध.
**सामासिक** (सं. वि.) समासयुक्त.
**सामिलात** (स्त्री.) भागीदारी, सर्कत.
**सामीपत्र** (सं. स्वामिपत्र न.) स्वतःला सरकारची चाकरी करण्याचें सामर्थ्य नसलें म्हणजे त्या कामासाठीं भाऊबंद उभा करून त्याजपासून लिहून घेतलेला करार.
**सामीप्य** (सं. न.) सांनिध्य, शेजार.
**सामील** (अर. शामिल वि.) अंतर्भूत, प्रविष्ट, सहायक.
**सामीलनामा** (पु.) आपणांस समाविष्ट करून घेण्याबद्दल केलेला करार.
**सामुकें** (प्रा. अ.) सन्मुख (मुक्ते० रामा० ३।२५).
**सामुग्री** (सं. सामग्री स्त्री.) सामग्री पहा.
**सामुद्रधुनी** (सं. स्त्री.) पाण्याच्या दोन मोठ्या भागांना जोडणारी पाण्याची चिंचोळी पट्टी.

**सामुद्रिक** (सं. न.) हातापायांवरच्या वगैरे रेषा पाहून त्या माणसाचें भविष्य सांगणारा; (न.)असें भविष्य सांगण्या-विषयींचें शास्त्र.
**सामुदायिक** (वि.) जमाव; जमावासंबंधीं.
**सामें** (प्रा. न.) सामग्री (दा० १९।१।१४).
**सामोपाय, सामोपचार** (सं. पु.) सौम्य उपचार; गोड बोलून वश करून घेण्याचा उपाय.
**सामोरा** (अ.) सन्मुख, पुढें.
**साम्य** (सं. न.) सादृश्य, सारखेपणा; तुल्यता, बरोबरी. [ प्राप्ति.
**साम्यता** (स्त्री.) समता, समबुद्धि, ब्रह्म-
**साम्यवाद** (पु.) संपत्तीवरील खाजगी मालकी नष्ट करून सर्व उत्पादन साधनें समाजाच्या मालकीचीं करावीं हा सिद्धान्त. (इं. कम्युनिझम्).
**साम्राज्य** (सं. न.) सार्वभौमत्व; अनेक लहान लहान राज्यांवर अंमल चाल-विणारें मोठें राज्य.
**साम्राज्यवाद** (पु.) दुसरीं राष्ट्रें आपल्या पंखाखालीं आणण्याचें बलिष्ठ राष्ट्रांचें तत्त्वज्ञान.
**साय** (सं. शाक पु.) सागवान.
**साय** (सं. सार स्त्री.) मलई, सत्त्वांश.
**सायक** (सं. पु.) बाण.
**सायकल** (इं. स्त्री.) द्विचक्रपादयान; पायगाडी.
**सायंकाल–ळ** (सं. स्त्री.) संध्याकाळ.
**सायकासन** (सं. न.) धनुष्य.
**सायनपंचांग** (सं. न.) सायनपद्धतीनें तयार केलेलें पंचांग.
**सायनपद्धति** (सं. स्त्री.) ज्योतिषशास्त्रांत ग्रहांचें स्थान मोजतांना अयनगति हिशेबांत घेण्याची पद्धति.
**सायनसौरवर्ष** (सं. न.) संपातापासून सूर्य निघाल्यापासून पुनः तो तेथें येण्यास लागणारा काळ (३६५ दिवस १४ घटका ३२ पळें). [ जकात.
**सायर** (स्त्री.) ओळ, रांग; (अर. न.)
**सायरा** (पु.) पातळ पापुद्रा.
**सायल, सायला** (पु.) सागवान.
**सायवान** (फा. पु.) पागेसाठीं उभारलेला तंबू; पडवीच्या डोलाचा मंडपाचा उतरता भाग. [तयार, पूर्ण.
**सायसंगीत** ( वि. ) मिलाफाचा, अनुकूल;
**सायसंगीन** (वि.) संपूर्ण, तयार.
**साया** (सं. शाक पु.) सागवान.
**सायास** (सं. पु.) फार कष्ट, परिश्रम.
**सायान्ह** (सं. पु.) सायंकाळ.
**सायाळ** (सं. शल्य स्त्री.) साळू, सारसई, साळशिंदर.
**सायुज्य** (सं. न.) चतुर्विध मुक्तींतली एक (हींत जिवाचें ईश्वराशीं तादात्म्य होतें).
**सायुध** (सं. वि.) शस्त्र घेऊन सज्ज झालेला (वीर, योद्धा).
**सार** (सं. पु. न.) तात्पर्यार्थ; साय, लोणी; सत्त्वांश; जोर, शक्ति; सत्त्व; एक प्रकारचें कालवण; एका अलंकाराचें नांव; जेथें उत्तरोत्तर गुणादिकांचें आधिक्य वर्णिलें असतें तेथें हा अलंकार होतो; सोंगटी; बुद्धिबळाच्या खेळांतील मोहोरें किंवा प्यादें; जुगारीचा खेळ, द्यूत; गलबताचीं अवजारें; डोलकाठीला ज्या दोरीनें किंवा पट्टयानें आवळून बांधतात ती दोरी किंवा तो पट्टा; (वि.) तीक्ष्ण. [ करणारें.
**सारक** (सं. वि.) मलशुद्धि करणारें, जुलाब
**सारखा** (हिं. वि.) सदृश, तोंडीचा; (अ.) प्रमाणें; सतत.
**सारखाविणें** (वि.) विषमता काढून टाकणें; एकसारखें करणें.
**सारंग** (सं. शार्ङ्ग पु.) धनुष्य; गायनां-तला एक राग; भ्रमर (ज्ञा० १८। १६३६); हरिण; हत्ती; कोकिळ; (वि.) चित्रविचित्र रंगाचा; कबरा; मोर; सर्प; सिंह; चातक; हंस; वृक्ष; वस्त्र; कामदेव; कमळ; रत्न; सोनें; चंदन; पुष्प; प्रकाश; मेघ; खलाशी; नावाडी.
**सारंग, सारण** (स्त्री.) आंब्याचें जाळें.
**सारंगधर** (पु.) विष्णु.
**सारंगपाट** (पु.) सोंगट्यांचा पट.

**सारंगम** (प्रा. पु.) भ्रमर.
**सारंगी** (सं. स्त्री.) एक तंतुवाद्य.
**सारंगार** (प्रा. वि.) खरें खोटें.
**सारंग्या** (पु.) सारंगी वाजविणारा.
**सारजा** (सं. शारदा स्त्री.) सरस्वती.
**सारडेकर** (पु.) आंवट किंवा करपट ढेंकर.
**सारण** (सं. सारणि न.) पाट, कालवा; पुरी, करंजी, साटोरी वगैरे पक्वान्नांत भरण्याचा गूळ खोवरें इ० मसाला.
**सारणी** (सं. स्त्री.) पंचांग वगैरे करण्याच्या उपयोगाचें अंकजाल; रीत, मोड, मांडणी.
**सारणी** (स्त्री.) बैलांना मोट ओढतां यावी म्हणून केलेला उतरता रस्ता.
**सारणें** (क्रि.) खर्चणें, संपविणें (तुका० ३३९५); पुढें करणें; सिद्ध करणें (तुका० ११३). [ कर्ता.
**सारथि** (सं. पु.) रथ हांकणारा; साह्य-
**सारथ्य** (सं. न.) सारथ्याचें काम.
**सारनेटा** (प्रा. अ.) वेगानें, त्वरेनें.
**सारपा, सालपा** (पु.) झिलप्यांचा ढीग.
**सारमंडळ** (न.) एक तंतुवाद्य.
**सारमेय** (सं. न.) कुत्रा. [ साधेपणा.
**सारल्य** (सं. न.) सरळपणा, प्रामाणिकता;
**सारवण** (न.) पोतेरें; शेणानें लिंपणें.
**सारवत** (न.) नागवेलीवर पडतो तो रोग; नागवेलीचें जुनें पान.
**सारवान** (फा. सारवान पु.) उंट हांकणारा.
**सारविणें** (क्रि.) लिंपणें.
**सारस** (पु.) एक पक्षी; सुरमाडाच्या झावळीच्या बुंध्याकडचा जो पन्हळा-सारखा भाग असतो तो; हा भाग वांगीं, मिरच्या इ० वर पाणी शिंपडण्याच्या कामीं योजतात; (सं. न.) कमळ.
**सारसई** (स्त्री.) साळू, साळपीस.
**सारसुतर** (स्त्री. न.) लटांवर, सटरफटर, चीजवस्त.
**सारसुबी** साफसुफी.
**सारस्वत** (सं. पु.) वक्ता; सारस्वत ब्राह्मण (शेणवी); (न.) वाङ्मय; कर्तृत्व; (वि.) समुद्रविषयक; सरस्वती-संबंधाचें.
**सारा** (सं. सर्व वि.) सर्व, सगळा; (पु.) जमिनीवरील कर; केशकलाप.
**सारालंकार** (सं. पु.) एकापेक्षां एक अधिकाधिक गुणांचे पदार्थ क्रमाक्रमानें वर्णन करणें.
**सारांश** (सं. पु.) तात्पर्य.
**सारासार** (स्त्री.) पुढें ढकलणें, बाजूला सारणें, मागें पुढें करणें इ०; (वि.) बरें-वाईट, सरसनीरस; नित्यानित्य.
**सारासारविचार** (सं. पु.) चांगलें व वाईट यांविषयीचें तारतम्य ज्ञान.
**सारिका** (सं. स्त्री.) मैना; सोंगटी.
**सारिखा** (प्रा. वि.) समान, सारखा.
**सारिगम** सरिगम पहा.
**सारि, सारी** (प्रा. स्त्री.) सोंगटी. [ खेळ.
**सारिपाट** (प्रा. पु.) सोंगट्यांचा पट किंवा
**सारूख** (वि.) पतदार, अब्रूदार.
**सारूप्य** (सं. न.) चार मुक्तींपैकीं एक; सरूपता, सादृश्य, सारखेपणा.
**सारेकरी** (पु.) सारा भरणारा.
**सारोख** (प्रा. वि.) चांगला; (अ.) वेगानें.
**सारोखी** (स्त्री.) शहाणपण.
**सारोळा** (गुज. सवाळा पु.) वेरजेचा ताळा.
**सार्थ** (सं. वि.) अर्थयुक्त; (पु.) व्यापारी, व्यापाऱ्यांचा तांडा. [सिद्धि.
**सार्थक, सार्थक्य** (सं. सार्थक्य न.) सफलता;
**सार्थकीं लागणें** क्रि.) फलद्रूप होणें.
**सार्द्र** (सं. वि.) ओला, भिजलेला.
**सार्वजनिक** (सं. वि.) सर्व लोकांचा.
**सार्वत्रिक** (सं. वि.) सर्व ठिकाणचा.
**सार्वभौम** (सं. पु.) चक्रवर्ती राजा.
**सार्वमत** (न.) एखाद्या मुद्द्यावर देशांतील लोकांचें मत घेणें.
**साल** (फा. न.) वर्ष; (हिं. स्त्री.) त्वचा, सालपट, कातडें; (इं.) दिवाणखाना; दालन.
**सालंकृत कन्यादान** (सं. न.) मुलीच्या अंगावर दागिने घालून त्या दागिन्यांसह त्या मुलीचें वरास दान करणें.
**सालगिरा** (फा. सालगिरह पु.) वाढदिवस.
**सालगुदस्त** ( फा. सालगुजस्ता न. ) गतवर्ष; (अ.) गवतर्पी.

नगर वाचनालय

**सालट** (म. साल न.) थोडेसें साल किंवा टरफल ज्यांवर आहे असें (डाळ इ० धान्य); दाणे काढून घेतल्यानंतर राहिलेलें शेंगेचें टरफल.
**सालटी–डी** (स्त्री.), –डें (न.) कातडी.
**सालदरसाल** (फा. अ.) प्रतिवर्षी.
**सालपट** (न.) साल, त्वचा, कातडी.
**सालपा** (पु.) लाकडाच्या धलप्या, तास इ० समुच्चयानें.
**सालबंदी** (स्त्री.) सालापुरत्या उत्पन्ना-संबंधाचा, करासंबंधाचा किंवा देण्या-संबंधाचा करार. [चालू वर्षी.
**सालमजकूर** (फा. न.) चालू वर्ष; (अ.)
**सालवणी, सोलवणी** (न.) भाजी वगैरेमध्यें घालावयासाठीं कोळून तयार केलेलें अमसुलाचें पाणी.
**सालंमिश्री** (स्त्री.) एक पौष्टिक औषध.
**सालवारी** (स्त्री.) वर्षांत घडलेल्या गोष्टींचें टाचण.
**सालस** (अर. सलस वि.) गरीब, साधा, प्रामाणिक; नीतिमान्; शांत.
**साला** (सं. श्यालक पु.) बायकोचा भाऊ (मेहुणा); दुष्ट किंवा तिरस्करणीय मनुष्य (तुच्छार्थानें).
**सालाधाला** (वि.) अल्पसंतुष्ट; साधा-भोळा; आनंदी; सुखी; निष्कपट.
**सालाबाद** (फा. वि.) दरवर्षीचें.
**सालिना** (फा. सालियाना वि.) वार्षिक.
**सालोसाल** (अ.) दरवर्षी.
**साव** (हिं. पु.) सावकार; प्रामाणिक किंवा पतदार मनुष्य.
**सांव** (सं. स्नायु पु.) स्नायु; शीर; नाडी.
**सावकार** (हिं. पु.) व्याजानें कर्जाऊ रकमा देणारा; धनिक; व्यापारी.
**सावकारकी, सावकारी** (स्त्री.) साव-काराचा धंदा. [अवकाशानें.
**सावकाश** (सं. अ.) हळू हळू; संथपणानें;
**सावकाशी** (स्त्री.) मंदपणा; संथपणा.
**सावकें, सेवकें** (न.) घालून पाडून लावून (बोलणें).
**सावचित, सावचिति** (अ.)सावधान चित्तानें.
**सावचित्त** (सं. वि.) सावधान.
**सावचोर** (प्रा. पु.) दिसण्यांत साव पण खरोखर चोर.
**सावज** (सं. श्वापद न.) शिकार; श्वापद.
**सावजी** (पु.) सावकार.
**सावट** (सं. श्यामता स्त्री. न.) छाया; डाग; (क्रि. वि.) एकदम.
**सावटी** (वि.) झाकलेलें.
**सावड** (स्त्री.) शेतकामांत एकमेकांना जनावरें इत्यादींची मदत करणें.
**सावडणें** (क्रि.) गोळा करणें; सावरणें.
**सावतें** (अ.) सारखेंच (ना० पृ०३६४).
**सावत्र** (वि.) सवतीचा.
**सावत्रभाव** (पु.) सवतीमत्सर.
**सांवत्सरिक** (सं. वि.) वार्षिक.
**सावद** (न.) सावज, शिकार. [जागृत.
**सावध** (सं. सावधान वि.) दक्ष, हुशार;
**सावधगिरी** (स्त्री.) दक्षता, सावधानता.
**सावधान** (सं. वि.) लक्ष देणारा, दक्ष, हुशार; (न.) लग्नाच्या व मुंजीच्या वेळेस मंगलाष्टकें म्हणतांना शेवटीं 'सावध रहा' या अर्थाचा उच्चारण्याचा शब्द.
**सावधि, सावधिक** (सं. वि.) मर्यादित, निश्चित.
**सावन** सं. वि.)सूर्यविषयक; (हिं. पु.)श्रावण.
**सावनदिन** (सं. पु.) सूर्य एकदां मध्यान्हीं आल्यापासून पुनः तेथें येईपर्यंत जाणारा काळ.
**सावपणा** (पु.) प्रामाणिकपणा, सरळपणा.
**सावपा** (वि.) शुद्धीवर आलेला.
**सावयव** (सं. वि.) अवयव असलेला.
**सावर** (सं. शाल्मली स्त्री.) रेशमासारख्या मऊ कापसाचें रोप.
**सावर** (स्त्री. न.) स्नायु.
**सावर, सांवर** (पु.) दुखण्यानंतर पूर्वीची शक्ति, जोम, आरोग्य इ० पुनः प्राप्त होणें; पूर्वस्थितीवर येणें; थावरा-थावर.
**सावरणें** (क्रि.) आवरणें; आटोपतें घेणें, कैवार घेणें; तोंड संभाळणें; सुधारणें; पूर्वस्थितीवर येणें; स्थिरस्थावर होणें; संभाळणें.
**सांवरी** (स्त्री.) एक वनस्पति.

**सावर्ण्य** (सं. न.) वर्णाची समता; रंग किंवा जाति एक असणें.
**सांवर्तिक** (वि.) प्रलयकालीन.
**सावरें** (न.) अंगण.
**सावली** (सं. शामली स्त्री.) छाया, प्रतिबिंब. **सा०ला न उभें राहणें**—टाळणें.
**सावलें** (प्रा. न.) वस्त्र, लुगडें (तुका० ३१); दाटी; पांढरेंपण.
**सावव** (प्रा. वि.) प्रशस्त.
**सावशेष** (सं. वि.) ज्यांत मागल्याचा कांहीं अवशेष आहे असा.
**सावसावकारा** (पु.) व्यापार, उद्योग.
**सावळ** ( स्त्री. न. ) माड, ताड इ० ची मोठी फांदी (पान). [ ३।१८).
**सांवळगोंदा** (प्रा. वि.) घाणेरडा (दा०२०।
**सांवळगोंदें** (न.) अव्यवस्थेनंतर कसेंतरी करून एकदाची पुन: व्यवस्था स्थापित करणें; एखाद्या निर्णयाची संदिग्धता.
**सावळणें** (क्रि.) कमी होणें, मावळणें.
**सावळा, सांवळा** (सं. श्यामल वि.) अस्मानी रंगाचा.
**सावळा गोंधळ** (पु.) सावपणाच्या पांघरुणाखालीं मुकाटयानें केलेला अनिष्ट प्रकार. [ (पान).
**सावळी** (स्त्री.) ताड, माड, इ० ची खांदी
**सावळें–लें** (न.) एक प्रकारचें लुगडें.
**सांवा** (प्रा. स्त्री.) सावली; (पु.) सागवान; (वि.) कांटे नसलेला.
**सावाइकें** (प्रा. न.) इतिकर्तव्यता (ज्ञा० १८।१७२५).
**सावाइणें** (प्रा. क्रि.) सांगणें; पुष्ट होणें.
**सावाई** (प्रा. वि.) सांग, संपूर्ण.
**सावाधावा** (प्रा. पु.) धावून येऊन केलेलें साह्य.
**सावान** सायवान पहा.
**सावाय** (सं. सहाय पु.) साह्यकर्ता.
**सावायिणें** (प्रा. क्रि.) मदत करणें.
**सावाया** (प्रा. पु.) प्रकाश.
**सावायें** (प्रा. न.) साह्य, मदत.
**सावारे** (पु. अने.) पेटके येत असलेले स्नायु.
**सावालणें** (प्रा. क्रि.) पूर्ण करणें (ज्ञा० १७।३६६७).
**सावावणें** (प्रा. क्रि.) साह्य करणें.
**सावावो** (प्रा. पु.) आधिक्य, श्रेष्ठता (ज्ञा० ६।१६५); सबळता; उत्तेजन; जमाव; साह्य; साह्यकर्ता (ज्ञा० प्र० ३५१); (वि.) सहायक, उत्तेजक, प्रदीप्त (स्वा० दि० ९।५।३०).
**सावित्री** (सं. स्त्री.) गायत्री मंत्र.
**सावित्रीव्रत** (सं. न.) वटपूर्णिमेचें व्रत.
**सावित्रीसूत्र** (सं. न.) यज्ञोपवीत.
**साविया** (प्रा. अ.) सहज; तत्काळ, अकस्मात्; सर्वथा; (वि.) सरळ (ज्ञा० ८।२३७).
**सावुलें** (प्रा. न.) लुगडें (मुक्ते० सभा० १५।२२५).
**सावें** (प्रा. वि.) अवघें.
**सावेव** (प्रा. वि.) अवयवांसहित.
**सावेसा** (स्त्री.) स्वेच्छा, अभिलाष.
**साशंक** (सं. वि.) शंकायुक्त.
**सांशयिक** (सं. वि.) अनिश्चित, संशययुक्त.
**साष्टांग नमस्कार** (सं. पु.) शरिराचीं आठ अंगें (दोन हात, दोन गुडघे, दोन पाय, छाती आणि डोकें) जमिनीला टेकून केलेला नमस्कार; उत्कृष्ट व्यायाम प्रकार.
**सांसणें** (प्रा. क्रि.) साचविणें.
**सासन** (प्रा. न.) साधन.
**सासपणें** (क्रि.) चाचपणें; कुरवाळणें.
**सासर, सासरें** (न.) सासू-सासऱ्यांचें घर.
**सांसर्गिक** (वि.) स्पर्शजन्य.
**सासरा** (सं. श्वशुर पु.) नवऱ्याचा किंवा वायकोचा वाप. [ मोहरी.
**सासव** (सं. सर्षप स्त्री.) कारवाराकडे-
**सासान** (प्रा. न.) अंदण.
**सासिक** (सं. वि.) सशस्त्र.
**सासितलें** (प्रा. न.) निबिड छाया.
**सासिनणें** (प्रा. क्रि.) तयार होणें; पक्वतेस किंवा भरास येणें; पूर्ण होणें (ज्ञा० १८।२५९).
**सासिवणें** (प्रा. क्रि.) पिकणें, भरास येणें (ज्ञा० ६।२५७); पूर्ण होणें (ज्ञा० १८।२६९).
**सासु** (सं. वि.) जिवंत; सप्रमाण.

**सासुरवाट** (स्त्री.) स्त्रियांच्या केसांच्या मधल्या भांगामुळें होणारे जे दोन भाग त्यांपैकीं डाव्या बाजूला केस वळविणें.
**सासुरवाडी** (स्त्री.) बायकोच्या बापाचें घर.
**सासुरवाशी, सासुरवाशीण** (स्त्री.) सासू, सासरा, वडील दीर, जावा, नणंदा वगैरे माणसांच्या धाकांत जिला रहावें लागतें अशी मुलगी किंवा स्त्री; स्वतंत्रपणें वागतां येत नाहीं अशी स्त्री.
**सासुरवास** (पु.) सुनेला सासरीं होणारा जाच; सामान्यत: स्वतंत्रपणानें न वागूं देणाऱ्या माणसाकडून होणारा छळ किंवा जाच.
**सासुरें** (प्रा. न.) सासर.
**सासुवड** (न.) सासुरवाड.
**सासू, सासूस** (सं. श्वश्रू स्त्री.) नवऱ्याची किंवा बायकोची आई.
**सास्ना** (सं. स्त्री.) गाय, बैल इ० च्या मानेखालची पोळी.
**साहचर्य** (सं. न.) सहवास, संगतींत राहणें.
**साहजिक** (सं. वि.) स्वाभाविक; (अ.) सहज, अल्प श्रमानें.
**साहटणें** (न.) साय, वर आलेला पापुद्रा.
**साहणा** (प्रा. पु.) झरोका (हरि० ९।१५६).
**साहणें** (सं. सह् क्रि.) सोसणें, सहन करणें.
**साहता** (वि.) सहन करणारा.
**साहती** (प्रा. स्त्री.) एरंड; घर; वेस.
**साहन सज्ञान** (प्रा. न.) साधन, सामग्री (ज्ञा० १०।३०९).
**साहन, साहान, सान** (वि.) लहान, थोडें.
**साहनक** (स्त्री.) ताटली. [ जागा.
**साहनट, साहनवट** (स्त्री.) गांवांतली मोकळी
**साहना** (प्रा. स्त्री.) सेना; फौज. [ आश्रय.
**साहरा** (सं. सहकार पु.) साह्य, मदत,
**साहस** (सं. न.) धाडस, छाती, धैर्य.
**साहसिक** (सं. वि.) धाडसी, अविचारी.
**साहाजणें** (न.) साहाजन पहा.
**साहाजन** (फा. शाहादान सैदोन पु.) मोठा नगारा, डंका.
**साहाय्य** (सं. न.) मदत, साह्य.
**साहित्य** (सं. न.) सामान; सामुग्री; साह्य; वाङ्मय.
**साहित्यपत्र** (सं. न.) नव्या अंमलदाराच्या मदतीकरितां दिलेलें पत्र.
**साहित्यशास्त्र** (सं. न.) ज्या शास्त्रांत मुख्यत्वेंकरून काव्याचें (श्राव्य आणि दृश्य दोहींचें) आणि काव्यासंबंधीं शब्द, अर्थ, रस, अलंकार, गुण, दोष इ० चें विवेचन केलें असतें तें.
**साहित्यसंमेलन** (न.) साहित्य, चर्चा व ठराव यांसाठीं भरणारा साहित्यिकांचा मेळावा.
**साहुकार** (पु.) सावकार, लोकांना व्याजानें पैसे कर्जाऊ देणारा; व्यापारी.
**साहुकारा** (पु.) सराफा; नाणेंबाजार.
**साहे** (सं. साहाय्य न.) साह्य; मदतगार.
**साहेब** (फा. पु.) स्वामी; वरिष्ठ अधिकारी; युरोपियन.
**साहेबजादा** (फा. पु.) राजपुत्र. [ नौबत.
**साहेब नौबत** (हिं. स्त्री.) हत्तीवरील मोठी
**साहोत्रा** (पु.) दरसाल दरशेंकडा ६ टक्के व्याजाचा दर; शेंकडा ६ इतक्या अंशांवरचा हक्क.
**साह्य** (सं. न.) मदत. [ ठिकाण.
**साळ** (सं. शाला स्त्री.) शाळा; कारखाना;
**साळ** (स्त्री.) भात, वरच्या टरफलासहित तांदूळ.
**साळ, सायाळ** (सं. शल्य स्त्री.) साळू नांवाचा लांब अणकुचीदार पिसांचा प्राणी. [ टेकडचा बायका.
**साळकाया-माळकाया** (स्त्री. अने.) रिकाम-
**साळकोजी-माळकोजी** (पु.) कोणी अ-विवक्षित मनुष्य.
**साळढाळ** (वि.) साधा; खुल्या दिलाचा; विचारशील; सर्वांशीं मिळून राहणारा; सालस; (स्त्री.) निवडानिवड.
**साळणें** (क्रि.) साल काढणें, फांद्या छाटणें.
**साळपोस** (न.) साळू नांवाच्या जनावराच्या अंगावरलें अणकुचीदार कांटयासारखें पीस.
**साळमाळ** (वि.) लांबचलांब मैदान.
**साळयी** (प्रा. स्त्री.) साळी भात (भा० ३।१२७). [ विणलेलें.
**साळवट-टी, साळवी** (पु.) साळयानें

**साळशीट-त-द** (न.) साळू जनावराच्या अंगावरचा कांटा.
**साळसूद** (सं. शालाशुद्ध वि.) सालस, गरीब, छक्केपंजे माहित नसलेला.
**साळा** (सं. श्यालक पु.) साला, मेहुणा (बायकोचा भाऊ).
**साळाभोळा** (वि.) साधासिधा, निष्कपट, छक्केपंजे माहित नसलेला.
**साळिंदर, साळिंद्र** (न.) साळ नांवाचा प्राणी.
**साळी** (सं. शाली स्त्री.) साळ, भात.
**साळी** (पु.) विणकर.
**साळी** (स्त्री.) मेहुणी (बायकोची वहीण).
**साळीक, साळुक** (न.) कमळ; कमळासारखा डोक्यांत घालावयाचा दागिना.
**साळुंकी, साळुंखी** (स्त्री.) एक पक्षी.
**साळू** (स्त्री.) साळ नांवाचा प्राणी.
**साळें** (प्रा. न.) मस्तक (भावार्थ० १–१२–१६).
**साळोत्तरी, साळोत्री** (सं. शालिहोत्री पु.) घोड्याचा वैद्य.
**साक्ष** (सं. साक्षिन् पु.) पाहणारा, साक्षीदार; (स्त्री.) पाहणारानें दिलेली जबानी; पुरावा. [ अगत्य.
**साक्षप** (सं. साक्षेप पु.) निश्चय, निग्रह,
**साक्षपी** (सं. साक्षेपी वि.) यत्नवान्, उद्योगी.
**साक्षनोझें** (न.) साक्षीपुरावा.
**साक्षर** (सं. वि.) शिकलेला, लिहितां वाचतां येत असलेला.
**साक्षात्** (अ.) समोर, प्रत्यक्ष; धडधडीत.
**साक्षात्कार** (सं. पु.) प्रत्यक्षता; प्रत्यक्ष ज्ञान; अनुभव; स्वरूपाकारानें दर्शन; ब्रह्मात्मैक्य; चमत्कार.
**साक्षी** (सं. पु.) स्वतः पाहणारा; पुरावा.
**साक्षीदार** (पु.) ग्वाही देणारा; साक्ष.
**साक्षेप** (सं. पु.) यत्न; आस्थेवाईकपणा; साक्षप पहा.
**साक्षेपी** (वि.) तन्मय; प्रयत्नवादी.
**साक्षोपें** (प्रा. अ.) अगत्यानें.
**साक्ष्य** (सं. न.) पुरावा, साक्ष.
**सिक** (स्त्री. न.) शिक्षण, शिकवणी; (इं. वि.) आजारी.
**सिकता** (सं. स्त्री.) वाळू; मुतखडा.
**सिकंदर, सिकरण, सिकस्त, सिकार, सिकें, सिकेकाई इ०** शिकंदर, शिकरण, शिकस्त, शिकार, शिकें, शिकेकाई इ० पहा.
**सिका** (सं. शिक्षा स्त्री.) शिक्षा; शिकवण.
**सिग** (स्त्री.) अवधि, मर्यादा (राम० वि० २५।५४).
**सिंग-ध** (पु.) हें बहुमानार्थी उपपद (सिंह) उत्तर भारतांत पुरुषाच्या नांवापुढें लावतात. [ अद्वया० ३).
**सिगी** (प्रा. पु.) पुढारीपणा (सोहि०
**सिंचन** (सं. न.) शिंपडणें.
**सिचय** (न.) वस्त्र (मोरो० कृष्ण० २२।५).
**सिजील** (अर. स्त्री.) दाखला; नोंद.
**सिणगार** (पु.) शृंगार.
**सित** (सं. वि.) पांढरें; (न.) धनुष्याची दोरी, बाण.
**सितरणें** (प्रा. क्रि.) ठकविणें (दा० ३।३।९).
**सितरू** (प्रा. पु.) ठक (दा० २।३।२९).
**सिताब** (फा. शिताब अ.) त्वरेनें.
**सिती** (स्त्री.) पडदी, एकविटी भिंत.
**सितैन** (अर. वि.) साठ.
**सितें** (न.) दोरी.
**सिदणें** (सं. छिद् क्रि.) छेदणें.
**सिंदूर** (सं. पु.) शेंदूर.
**सिद्ध** (सं. वि.) तयार, स्थापित, निश्चित; पक्व, शिजलेलें; निष्णात; सिद्धि प्राप्त झालेला; जीवत्व—भ्रांतीचा निरास होऊन परब्रह्मस्वरूपीं लीन झालेला.
**सिद्धता** (सं. स्त्री.) सामग्री, तयारी; सिद्धपणा.
**सिद्धपुरुष** (सं. पु.) अणिमादि अष्टसिद्धि प्राप्त झालेला; मी जीव हें अज्ञान जाऊन ब्रह्मस्वरूपीं लीन झालेला.
**सिद्धसाधक** (पु.) दुसऱ्याला फसविण्याच्या कामीं संगनमत करून युक्तीनें आपलें खरें स्वरूप बाहेर कोणास न कळू देतां कार्यभाग साधणारे.
**सिद्धान्त** (सं. पु.) गुरुप्रतीति; निश्चित मत; निर्णय; उपपत्तियुक्त ग्रंथ.

**सिद्धान्ती** (वि.) सत्य, तत्त्व वगैरे प्रस्थापित करणारा; सिद्धान्त-ग्रंथ पढलेला.
**सिद्धावस्था** (स्त्री.) जीवन्मुक्तावस्था.
**सिद्धासन** (सं. न.) योगशास्त्रांत सांगितलेलें एक विशेष प्रकारचें आसन (बसण्याचा प्रकार).
**सिद्धि** (सं. स्त्री.) सिद्धता; पुरावा; तयारी; पूर्ण ज्ञान; दैवी शक्ति; तपश्चर्येची फलप्राप्ति; शेवटची मुक्ति; अष्टसिद्धि–अणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व.
**सिंधु** (सं. पु.) सागर, समुद्र; एक मोठी नदी; गायनांतला एक राग.
**सिंधुदुर्ग** (पु.) समुद्रांतील किल्ला; मालवणचा समुद्रांतील किल्ला.
**सिंधुसागर** (पु.) अरबी समुद्र.
**सिंधुर** (सं. पु.) हत्ती.
**सिनसाळ** (प्रा. वि.) क्षणिक.[१३।५६०).
**सिनसाळें** (प्रा. न.) अधःपात. (ज्ञा०
**सिनळ** शिदळ पहा.
**सिनाजोरी** (फा. स्त्री.) छातीचें बळ.
**सिनानें** (प्रा. न.) वेगळेंपण (ज्ञा० ६।३९); (वि.) वेगळें (अमृ० १।६०).
**सिनार, सिनारु** (प्रा. पु.) आपलपोटेपणाचा गुप्त द्रव्यसंग्रह, सांठा(सोहि०सिद्धान्त); वेगळेपण (ज्ञा० १८।१५८९); (वि.) वेगळा.
**सिनीवाली** (सं. स्त्री.) ज्या अमावास्येस चंद्रदर्शन होतें ती म्हणजे चतुर्दशीयुक्त अमावास्या. [ वेगळें.
**सिनें, सिन्हें** (प्रा. न.) वेगळेंपण; (वि.)
**सिनेमा** (इं. पु.) चलच्चित्रांचा खेळ.
**सिंपणें** (प्रा. क्रि.) स्पर्शणें (ज्ञा०५।७७).
**सिफला** (वि.) क्षुद्र. [शांतता.
**सिबुर** (अर. सब्र स्त्री.) सबुरी, समाधान;
**सिमुर** (प्रा. वि.) मुरलेलें, रुळलेलें (भा० ६।३९३). [ कापरें.
**सियारी** (प्रा. स्त्री.) डाकीण; शहारा,
**सिरपाव** (प्रा. पु.) शिरपाव पहा.
**सिराजणें** (प्रा. क्रि.) शोभणें.
**सिराणी** (प्रा. स्त्री.) श्रेष्ठता, महत्त्व; शिराणी शब्द पहा.
**सिरियाळणें** (प्रा. क्रि.) गुडघ्यांत मान घालून बसणें.
**सिरें** (सं. शिरस् न.) मस्तक. [ सलामी.
**सिलक** (हिं. स्त्री.) सन्मानार्थ तोफांची
**सिलसिला** (पु.) वळण, परंपरा.
**सिलसिलाट** (फा. पु.) उपद्रव.
**सिलें** (प्रा. न.) शस्त्र, हत्यार.
**सिल्प** (सं. सिल्प न.) शिल्प पहा.
**सिव** (सं. सीमा स्त्री.) सीमा, मर्यादा.
**सिवार** (प्रा. स्त्री.) वेस.
**सिंहार** (प्रा. न.) शेराचें लाकूड.
**सिसफूल** (प्रा.न.) डोक्यांतला एक अलंकार.
**सिसार** (प्रा. पु.), **सिसारें** (प्रा. न.) अर्धशिशी, मस्तकशूळ (ज्ञा० १८।१७९).
**सिसाळ, सिसाळी** (प्रा. स्त्री.) शिरांची पंक्ति (मुक्ते० आदि० ३७।२५); एक हक्क.
**सिसाळें** (प्रा. न.) मस्तक.
**सिंह** (सं. पु.) केसरी, मृगराज, पशूंचा राजा; सजातियांत श्रेष्ठ; (ज्योति०–) बारावी राशि.
**सिंहकटी** (स्त्री.) सिंहाप्रमाणें बारीक कंबर असलेली स्त्री.
**सिंहद्वार** (सं. न.) राजवाडा, किल्ला, इ० चा मुख्य दरवाजा.
**सिंहनाद** ( सं. पु. ) सिंहाचें ओरडणें, युद्धाची आरोळी; युद्धाचें आव्हान.
**सिंहलद्वीप** (सं. न. ) लंकाबेट, सिलोन.
**सिंहस्थ** (पु.) गुरु सिंहराशीस येण्याचा काल.
**सिंहाडा** (प्रा. पु.) सिंह.
**सिंहावलोकन** (सं. न.) क्रमून आलेल्या मार्गाकडे सिंहाप्रमाणें मागें वळून पहाणें.
**सिंहासन** (सं. न.) राजाचें आसन.
**सिंहिका** (सं. स्त्री.) राक्षसी(राहूची माता).
**सिंहीण** (स्त्री.) सिंहाची मादी.
**सीक** (सं. शिक्षा स्त्री.) शिक्षा, शिकवण.
**सींग** (प्रा. स्त्री.) शीग; राशीचा अग्रभाग; पूर्णता (स्वा० दि० १।२।६२).
**सीतरणें** (प्रा. क्रि.) फसविणें, ठकविणें.
**सीता** (स्त्री.) रामपत्नी. [ फळ.
**सीताफळ-ळी** (स्त्री. न.) एक झाड व त्याचें

**सीधा** (हिं. वि.) सरळ; प्रामाणिक.
**सीनसाळ** (प्रा. वि.) क्षणिक (ज्ञा० १५। १४०); संपूर्ण.
**सीबती** (प्रा. स्त्री.) तोफ. [जहाज.
**सीब्राडा** (पु.) एक प्रकारचें लढाऊ
**सीम** (फा. वि.) तिसरी प्रत; कनिष्ठ.
**सीमंत** (सं. पु.) बायकांच्या डोक्याच्या केसांचा भांग.
**सीमा** (सं. स्त्री.) मर्यादा, हद्द; पराकाष्ठा.
**सीमागत उपयुक्तता** (स्त्री.) अर्थशास्त्रांतील पदार्थांच्या मूल्याविषयींचा सिद्धान्त.
**सीमान्तपूजन** (सं. न.) लग्नासाठीं आलेल्या वराचा गांवाच्या सीमेवर वधूपक्षाकडून होणारा सत्कार.
**सीमाप्रांत** (पु.) सरहद्दीवरचा प्रदेश.
**सीमापार** (वि.) हद्दपार.
**सीमोल्लंघन** (सं. न.) दसऱ्याचें शिलंगण.
**सील** (हिं. पु.) पाटा; (न.) चिलखत; (इं.) मोहोर; एक प्रचंड मासा.
**सींव** (सं. सीमा स्त्री.) मर्यादा, हद्द.
**सीवणा** (प्रा. पु.) स्वप्न (मुक्ते० रामा० २।७९).
**सीवन** (सं. न.) शिवणें, दोरा घालणें.
**सीस** (सं. शीर्ष न.) मस्तक. [करून.
**सु** (सं. उपसर्ग) चांगला, फार, विशेषें-
**सुआर** (प्रा. पु.) आचारी (ज्ञा० १७।९०).
**सुआवणें** (प्रा. क्रि.) करणें, सेवन करणें.
**सुइणें, सुइजणें** (प्रा. क्रि.) घालणें.
**सुई** (सं. सूचि स्त्री.) कपडा इ० शिवण्याचें साधन; लहान दाभण.
**सुईण** (स्त्री.) स्त्रियांची प्रसूति सुलभ रीतीनें करून देऊन त्यांच्या बाळंतपणाची खटपट करणारी.
**सुएर** (न.) वृद्धि, जननाशौच.
**सुक** (स्त्री.) कारवाराकडे-एक हक्क.
**सुकट** (स्त्री.) वाळलेला बोंबिल मासा.
**सुकटणें** (क्रि.) वाळणें, शुष्क होणें.
**सुकटा** (वि.) वाळलेला (शरिराचा अवयव).
**सुकटी** (स्त्री.) वाळलेल्या माशाची पूड.
**सुकड–डी** (स्त्री.) पक्का आणि सुका झालेला चोडासकट नारळ.
**सुकडोजी** (वि.) आजारीपणानें वाळलेला.
**सुकणें** (स्त्री.) वाळणें, शुष्क होणें, पाणी आटणें.
**सुकताव** (पु.) सोनें-चांदी भट्टींत तापवून नंतर तें पाण्यानें थंड न करतां तसेंच हवेंत ठेवून गार होऊं देणें.
**सुकती** (स्त्री.) समुद्राची ओहोटी. **सु० भरती**– चढ-उतार; उत्कर्ष-अपकर्ष; परिवर्तन.
**सुकर** (सं. वि.) करण्यास सोपें.
**सुकरणें** (प्रा. क्रि.) आनंदविणें (अमृ० १०।१).
**सुकलें** (सं. शृंखला न.) मुलीच्या नाकांतलें किंवा कानांतलें तारेचें लहानसें वेटाळें.
**सुकवें** (न.) वाळून गेलेलें पीक.
**सुका, सुखा** (सं. शुष्क वि.) वाळलेला; ज्यापासून कांहीं फलप्राप्ति होणारी नाहीं असा; पोकळ, निरर्थक; (पु.) तंबाखू.
**सुकाड** (न.) शेतांत पांखरांसाठीं उभें केलेलें बुजगावणें.
**सुकाण, सुकाणू** (सं. सुकर्ण अर. सुकान न.) गलबत निराळ्या दिशेस वळविण्याचें साधन; त्याच्याच मागच्या बाजूस असतें तें; कर्ण; फळें.
**सुकाणदार, सुकाण्या** (पु.) कर्णधार, सुकाणू धरणारा; मुख्य नायक.
**सुकाताव** (पु.) भुकेची आग; शुष्क पाहुणचार; साफ नाकबुली; खरडपट्टी.
**सुका दुष्काळ** (पु.) अवर्षणामुळें पडणारा दुष्काळ.
**सुकान** सुकाण पहा.
**सुकाळ** (पु.) समृद्धि, विपुलता.
**सुकें केळ** (न.) वरची साल काढून त्याला तूप वगैरे लावून वाळविलेलें केळें.
**सुकीर्ति** (सं. स्त्री.) चांगला नांवलौकिक.
**सुकीर–क्र–कर** (पु.) शुक्र तारा.
**सुकुमार** (सं. वि.) नाजूक, कोमल.
**सुकृत** (सं. न.) पुण्य; देवता संतुष्ट करण्यासाठीं करावयाचें कर्म.
**सुकृति** (सं. पु.) पुण्यवान्.
**सुक्रात** (पु.) सॉक्रेटिस (एक प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्ता). [किंवा जागा.
**सुकेड** (सुकी + कड स्त्री.) वाळलेली बाजू
**सुकेळ** (न.) सुकें केळें.

**सुक्का** (फा. पु.) हातची चिठ्ठी.
**सुक्तासुक्त** (सं. सूक्त + असूक्त वि.) बरेंवाईट, भलेंबुरें.
**सुख** (सं. न.) मनास वाटणारी स्वस्थता, आराम, आनंद; चैन.
**सुखकर** (सं. वि.) सुख देणारें, सुखावह.
**सुखट, सुखटणें** सुकट, सुकटणें पहा.
**सुखढाळ** (पु.) स्वल्प जुलाब करणारें औषध.
**सुखतळ** (न.) तळपायाचा घाम शोपून घेण्यासाठीं जोड्यांत जो चामड्याचा सुटा तुकडा घालतात तो.
**सुखरूप** (सं. वि.) खुशाल, सुखी; (अ.) सुखानें, कांहीं त्रास न होतां सुरक्षितपणें.
**सुखवशी** (स्त्री.) कृशता, क्षीणता.
**सुखवस्तु** (वि.) वतनवाडी कामधंदा इ. संबंधाची काळजी मागें नसून केवळ पूर्वार्जित धनसंचयावर आराम भोगीत राहिलेला. [ झोप.
**सुखशयन** (न.) चांगला पलंग; सुखकारक
**सुखसोहळा** (पु.) अभ्यंगस्नान, अलंकार-धारण, प्रीतिभोजन, मिरवणूक इ० सुख देणारे विधि.
**सुखस्पर्श** (वि.) ज्याच्या स्पर्शापासून दुसऱ्यास सुख मिळतें असा.
**सुखांगणें** (अ. क्रि.) खाणें, पिणें, सुखोप-भोग इ० मनाप्रमाणें मिळत असतां आणि काळजी नसतां (मनुष्य) गुटगुटीत व तेजस्वी होणें; संकट निस्तरल्यावर आराम पावणें.
**सुखाड** (वि.) सुखावह, सुख देणारें.
**सुखाडणें, सुखडणें** (क्रि.) सुख पावणें, आनंदांत गर्क होणें.
**सुखाडी** (स्त्री.) शुष्कता.[(नाटक, प्रबंध इ.)
**सुखात्मक** (वि.) आनंदी शेवट असलेला
**सुखापा** (पु.) सुख, आराम.
**सुखापुरी** (पु.) चैनी, आनंदी मनुष्य; एक गोसाव्यांचा पंथ.
**सुखारुखा** (वि.) शुष्क, कोरडा.
**सुखार्थी** (सं. वि.) सुख इच्छिणारा.
**सुखावणें, सुखांडणें** (क्रि.) आनंद पावणें. सुखी होणें, सुखाची चट लागणें, सुखा-मुळें आळस उत्पन्न होणें.
**सुखावह** (सं. वि.) सुखकर.
**सुखावा** (पु.) सुख, आराम, चैन.
**सुखाविणें** (क्रि.) सुख देणें, आनंदित करणें.
**सुखासंतोषानें** (अ.) राजीखुषीनें.
**सुखासन** (सं. न.) पालखी, मेणा, वगैरे.
**सुखासुखी** (अ.) उगाच, निष्कारण; स्वेच्छेनें, राजीखुषीनें.
**सुखी** (सं. वि.) सुख भोगणारा, आनंदी, मौजा मारणारा.
**सुखेनैव** (क्रि. वि.) सुखानें; अनायासें.
**सुखोपा** (पु.) सुख, आराम, चैन.
**सुगउ** (वि.) चतुर (दा० २।८।१९); (सं. सुघट न.) लहान मडकें.
**सुंगणें** (सं. सु + घ्रा क्रि.) वास घेणें, हुंगणें.
**सुगंध, सुगंधि** (सं. पु.) सुवास.
**सुगंधमृग** (सं. पु.) कस्तूरीमग.
**सुगंधी** (सं. पु.) अत्तरें वगैरे सुवासिक वस्तु विकणारा.
**सुगम** (सं. वि.) सोपा, सुलभ.
**सुगर, सुगरण, सुगरीण** (वि.) चतुर, कुशल. [ चतुर (स्त्री).
**सुगरण** (स्त्री.) एक पक्षी; (वि.)
**सुगरणपणा** (पु.) हुशारी, दक्षता; कौशल्य.
**सुगराई** (हिं. स्त्री.) सुगरणपणा, चतुराई.
**सुगरावा** (प्रा. पु.) सुगरणपणा, चातुर्य, दक्षता. [ दक्षता ठेवणारी स्त्री.
**सुगरीण** (सं. सुगृहिणी स्त्री.) गृहकृत्यांत
**सुगरुवा** (प्रा. पु.) महत्त्व (ज्ञा० १३।८१३).
**सुगळ** (सं. पु.) सुग्रीव.
**सुगावणें** (क्रि.) अनुकूल होणें.
**सुगावा, सुदावा** (सं. पु.) गतवस्तूचा शोध, तपास, पत्ता. [ सुकाळ, समृद्धि.
**सुगी** (सं. सुगति स्त्री.) हंगाम; संपन्नता,
**सुग्रण, सुग्राई, सुग्रावा** इ० सुगरण, सुगराई, सुगावा इ० पहा.
**सुग्रास अन्न** (सं. न.) मिष्टान्न.
**सुघट** (वि.) चांगली घडलेली; घडविण्यास सोपी; सुव्यवस्थित.
**सुघटित** (वि.) चांगला बनविलेला; गोंडस; बांधेसूद; नीट जुळविलेला (बेत, योजना, युक्ति, मसलत इत्यादि).
**सुघटी** (प्रा. स्त्री.) टांच (ज्ञा० ६।१९३).

**सुघड** (वि.) सोपें; कुशल, शहाणा; (न.) मुगड.
**सुघरणी** (सं. सुगृहिणी स्त्री.) सुगृहिणी; स्वैंपाकांत व इतर गृहकृत्यांत निष्णात.
**सु–घाट** (वि.) चांगल्या घाटाचा.
**सुचणें** (सं. सूच् क्रि.) मनांत येणें, स्फुरणें, आठवणें; (प्रा.) आणणें, निर्माण करणें.
**सुचना** (सं. सूचना स्त्री.) सूचना पहा.
**सुचविणें** (क्रि.) सूचना करणें, कळविणें, इशारा करणें. [ निश्चिंत.
**सुचित(चि)त** (सं. सुचित्त वि.) स्वस्थ,
**सुचें** (प्रा. वि.) क्षुद्र, सूक्ष्म (तुका० १९७४); (न) सूचना, इशारा.
**सुजगर** (प्रा. वि.) जागृत.
**सुजट** (वि.) सुजलेला.
**सुजणें** (प्रा. क्रि.) घालणें (अमृ० ५।६५); अत्यंत आसक्त होणें (मोरो० कर्ण० २१।३५); (सं. शोथ क्रि.) सूज चढणें; फुगणें; खोळंबणें.
**सुजन** (सं. पु.) सज्जन, सुजाण.
**सुजनता** (सं. स्त्री.), **सुजनत्व** (सं. न.) चांगुलपणा, सज्जनता.
**सुजनी** (स्त्री.) कापूस व रेशीम यांची मिश्र वीण.
**सुजमरणें, सुजमिरणें** (क्रि.) किंचित् सुजणें.
**सुजमीर** (वि.) किंचित् सुजलेलें.
**सुजरा** (वि.) सुजणारा; लोभी, हाव धरणारा.
**सुजलें भूत** प्राप्तीसाठीं अत्यंत उत्सुक किंवा उत्कंठित झालेला मनुष्य.
**सुजाण** (वि.) सुज्ञ, जाणता.
**सुजीर** (वि.) किंचित् सुजलेलें.
**सुज्ञणें** (प्रा. क्रि.) समजणें (रं० यो० ७।१००); दिसणें (ज्ञा० १४।१५६); राहणें.
**सुटकणें** (क्रि.) चटकन् निघून जाणें.
**सुटकन्** (अ.) चटकन्, चटदिशीं.
**सुटंक** (प्रा. न.) सुचिन्ह (भा० २।१७८); (वि.) शुभ, सुचिन्हयुक्त (भा० ३।४४९); पाणीदार, तीक्ष्ण (रुक्मि० ५।४०). [ मोकळीक.
**सुटका** (हिं. छुटका स्त्री.) मुक्तता,
**सुटणूक** (स्त्री.) सुटका, मोकळीक.
**सुटणें** (क्रि.) मोकळें होणें; वियुक्त होणें; बाहेर पडणें; (वारा) वाहूं लागणें; भडकणें; (बंदुक) उडणें; स्फोट होणें.
**सुंटरूं, सुंटरें** (प्रा. न.) गळवासारखें होणारें उठाणूं, फोड; त्यावरील उतार (दा० ३।६।२५).
**सुटसुटीत** (प्रा. वि.) चपळ; मोकळा-चाकळा; लहान पण व्यवस्थित.
**सुटा** (वि.) मोकळा, न गुंतलेला.
**सुंटारा** (पु.) घाण्याभोंवतीं गरगर फिरण्याचें वळण बैलाला लावण्यासाठीं त्याला ज्या भोंवतीं प्रथम फिरवितात तो खांब.
**सुटावणें** (क्रि.) सुटणें, मोकळा होणें; घसरणें, धष्टपुष्ट होणें. [ टाळा.
**सुटी, सुट्टी** (स्त्री.) रजा, कामाला दिलेला
**सुट्यो** (न.) ऋणमुक्तता, कर्जाची फेड; (अ.) मुलांच्या खेळांतली एक संज्ञा.
**सुंठ** (सं. शुंठी स्त्री.) वाळविलेलें आलें.
**सुंठर–रूं–रें** (न.) गळवासारखें उठाणूं, फोड.
**सुंठवडा** (पु.) कथा–कीर्तनानंतर देवाचा प्रसाद म्हणून वांटतात तें सुंठ, खसखस, साखर इ० चें मिश्रण.
**सुंठवणी** (स्त्री.) सुंठीचा काढा.
**सुंठसाखर** (स्त्री.) पित्तनिरसनार्थ खावयाचें सुंठ-साखरेचें मिश्रण.
**सुडका** (प्रा.वि.) लंगोटी नेसलेला (एक० ३३२१); दैववान्.
**सुडकें** (न.) फाटकेंतुटकें फडकें, चिंधी.
**सुडबुड** (स्त्री.) रिकामी चुळबुळ.
**सुडबुडीत** (वि.) सुटसुटीत.
**सुडावणी** (प्रा. स्त्री.) सुरुवात; गर्जना.
**सुडावणें** (प्रा. क्रि.) कठिण काम करण्यास पुढें होणें (रुक्मि० ८।४).
**सुडी** (स्त्री.) जुडी, पेंढी. [ पाणीदार.
**सुढाळ** (प्रा. वि.) सुरेख, सुंदर, शोभिवंत,
**सुणा** (सं. श्वान पु.), **सुणें** (न.) कुत्रें; (सं. शून्य वि.) शून्य; निरर्थक.
**सुणी** (स्त्री.) झाडणारी.
**सुत** (सं. पु.) पुत्र, मुलगा.

**सुतक** (न.) अशौच, मृताशौच. [असलेला.
**सुतकाळा, सुतकी, सुतकील** (वि.) सुतक
**सुतकी** (स्त्री.) धोंडफोड्याचें एक हत्यार.
**सुतणें** (प्रा. क्रि.) निजणें.
**सुतरनाल–ळ** (फा. स्त्री.) उंटावरची तोफ.
**सुतर-फेणी** (स्त्री.) एक गुजराथी खाद्य पदार्थ.
**सुतरस्वार** (फा. पु.) सांडणीस्वार.
**सुतरा** (हिं. वि.) हुशार; तल्लख; कावेबाज.
**सुतराम्** (सं. अ.) अगदीं, सर्वथा, कधींहि.
**सुतल** (सं. न.) सप्त पाताळांपैकीं एक.
**सुतवणें** (प्रा.क्रि.) गोंवविणें, गुंफणें; वेधणें.
**सुतविणें** (क्रि.) भोंवतीं सूत गुंडाळणें.
**सुतसणें** (प्रा. क्रि.) घालणें.
**सुतळ, सुतळी** (स्त्री.) बारीक दोरी.
**सुता** (प्रा. पु.) विसार (तुका० ६९२); (सं. स्त्री.) मुलगी.
**सुंता** (अर. स्त्री.) सुनत; मुसलमानांच्या संबंधानें करण्याचा एक धर्मविधि.
**सुताडा** (पु.) कापसाच्या सुताचें विणलेलें जाड वस्त्र; झोऱ्या.
**सुताडें** (न.) नात्यागोत्याचें जाळें.
**सुतार** (सं. सूत्रकार पु.) लाकडाचें काम करणारा; एक पक्षी. [काम.
**सुतारकी** (स्त्री.) सुताराचा धंदा किंवा
**सुतारा** (पु.) हातमागाचा एक भाग.
**सुतिणें** (प्रा. क्रि.) मारणें.
**सुती** (वि.) कापसाच्या सुताचें केलेलें; सरळ, नीट, बिनचूक; (प्रा. स्त्री.) प्रवेश; विसार; जननी (भा० ७।५९७).
**सुतेरा** (पु.) कोळी (किडा).
**सुतोवाच** (सं. अपभ्रष्ट न.) गोष्टीची किंवा भाषणाची सुरुवात.
**सुथारणें** (क्रि.) शिस्तीवर आणणें; दुरुस्त करणें; सुरळीत चालेल असें करणें.
**सुंदडणें** (क्रि.) तुडविणें, हुंदडणें.
**सुदणें** (प्रा. क्रि.) घालणें.
**सुंदणें** (क्रि.) तुडविणें. [मनोरम.
**सुंदर** (सं. वि.) देखणें, रम्य, चांगलें,
**सुंदरा, सुंदरी** (स्त्री.) खुबसुरत स्त्री; स्त्री.
**सुदर्शन** (सं. न.) विष्णूचें चक्र; पाठीस लागलेलें लचांड.
**सुदविणें** (क्रि.) प्रवेश करविणें.
**सुदंश** (प्रा. वि.) ज्ञाता, मार्मिक (ज्ञा० ५।१६१). [सरळ (तुका० ६५२).
**सुदा** (सं. शुद्ध वि.) शुद्ध, चांगला,
**सुदामत** (अर. अ.) सुखरूपपणें, सुरक्षित रीतीनें, बिनधोक; सरळपणें.
**सुदामजी, सुदामदेव** (पु.) अतिशय दरिद्री मनुष्य; अत्यंत कृश मनुष्य.
**सुदावा** (पु.) सुगावा, थांग, तपास, पत्ता (ना० २८९०). [दिवस.
**सुदीस, सदीस** (क्रि. वि.) दिवसभर; सारा
**सुदुर्लभ** (सं. वि.) मिळावयाला फार कठिण.
**सुदुस्तर** (सं. वि.) तरून जावयाला कठिण.
**सुदृढ** (सं. वि.) मजबूत; वळकट.
**सुद्दबुद्द** (सं. स्त्री.) जाणीव, माहिती, ज्ञान; मूर्च्छेतून उठल्याची स्थिति. अशिक्षितांत–प्रयोग.
**सुद्धां** (अ.) सकट; सह; देखील.
**सुधा** (सं. स्त्री.) अमृत; (वि.) सरळ, योग्य मार्गानें जाणारा; फुलांमधील मध; चुना; वीज.
**सुधाकर** (सं. पु.) चंद्र.
**सुधापाणि** (सं. पु.) धन्वंतरि.
**सुधारक** (पु.) दोष नाहींसे करूं पाहणारा.
**सुधारणा** (सं. स्त्री.) अधिकाधिक पूर्णत्वाकडे जाण्याची किंवा नेण्याची क्रिया; दुरुस्ती.
**सुधारणें** (क्रि.) नीट करणें; दुरुस्त करणें, अधिक चांगलें होणें.
**सुधारस** (पु.) साखरेच्या पाकांत लिंबांचा रस घालून तयार केलेलें पक्वान्न.
**सुधांशु** (सं. पु.) चंद्र. [शहाणा.
**सुधी** (सं. पु.) बुद्धिवान् पुरुष; पंडित,
**सुधीर** (सं. वि.) दृढ, खंबीर मनाचा.
**सुनका** (वि.) सुना, शून्य, रिकामा, व्यर्थ.
**सुनत, सुनता** (अर. स्त्री.) सुंता पहा.
**सुनबहिरी** (हिं. स्त्री.) स्पर्शज्ञान नाहींसें होणें; एक रोगविशेष.
**सुनमुख** (न.) लग्नांत वरातीच्या अगोदरचा एक समारंभ.
**सुना** (प्रा. पु.) कुत्रा; (वि.) व्यर्थ, रिकामा, शून्य.

**सुनाट** (प्रा. वि.) शून्यरूप; (अ.) स्वैरपणानें.
**सुनाटें** (प्रा. वि.) व्यर्थ. [ दीचें वाचन.
**सुनावणी** (स्त्री.) न्यायाधिशापुढचें फिर्या-
**सुनी** (प्रा. स्त्री.) कुत्री; (वि.) शून्यरूप; (अ.) घालून (ज्ञा० १२।४७); पासून.
**सुनीत** (न.) चौदा ओळींची कविता (बहुधा शार्दूलविक्रीडित वृत्तांतील); (इं. सॉनेट); यास स्वनितक पण म्हणतात.
**सुनीळ** (सं. वि.) निळया रंगाचा.
**सुनें** (सं. न.) कुत्रें.
**सुन्न** (वि.) बधिर.
**सुन्नी** (अर. पु.) मुसलमानांतला एक पंथ.
**सुपक्व** (सं. वि.) चांगलें शिजलेलें किंवा भाजलेलें.
**सुपडें, सुपली** (न.) लहान सूप.
**सुपतळ** सुतळ पहा.
**सुपती** (प्रा. स्त्री.) गादी; हातोडी.
**सुपथ** (सं. पु.) चांगला मार्ग; सन्मार्ग.
**सुपरीत** (सं. वि.) सुलटें.
**सुपर्ण** (सं. पु.) गरुड.
**सुपली** (स्त्री.) लहान सूप.
**सुपाणी** (वि.) पाणीदार.
**सुपानी** (स्त्री.) सुंकलें.
**सुपारी** (स्त्री.) पूगीफल, पोफळीचें बीं. सु० देणें—नेमणें. [ शरिराचा.
**सुपिंड** (सं. वि.) धष्टपुष्ट, गोटीदार
**सुपीक** (वि.) चांगली पिकणारी (जमीन).
**सुपुर्त, सुपुर्द** (वि.) स्वाधीन.
**सुपेती** (स्त्री.) निजावयाची गादी.
**सुप्त** (सं. वि.) निजलेला.
**सुप्ति** (सं. स्त्री.) निद्रा, निद्रितावस्था.
**सुप्रत** (फा. सुपुर्द वि.) स्वाधीन. ताब्यांतला.
**सुप्रभात** (सं. स्त्री.) अगदीं पहाट.
**सुप्रभातें** (अ.) अगदीं पहाटेस.
**सुप्रसन्न** (सं. वि.) अतिशय खुष, अतिशय आनंदित.
**सुफराटा** (सं. सुपरीत वि.) सुलटा, सुरफाटा, योग्य, सरळ, उजू. [नाकें.
**सुफल** (न.) खांच; खाप; खोंगा; सुईचें
**सुफल** (सं. वि.) चांगलीं फळें लागलेला, फायदेशीर, परिणामकारक.
**सुफी** (फा. पु.) मुसलमानांतील एक गूढवादी पंथ.
**सुंब** (पु. न.) नारळाच्या कवचीवरचे तंतु; ताग, अंबाडी, मोळ इ०च्या तंतूंची विणलेली दोरी. **सुंभ जळतो पण पीळ जळत नाहीं**—गर्विष्ठ किंवा हट्टी माणसाचें नुकसान झालें तरी त्याचा ताठा किंवा हट्ट जात नाहीं.
**सुंब** (हिं. सुम पु.) खुर.
**सुंबणें, सुंभणें** (क्रि.) सुंभाच्या दोरीनें (बाज, पलंग, माचा इ० ) विणणें.
**सुबक** (सं. सुभग वि.) लहान पण छानदार चांगल्या घाटाचें; नीटनेटकें, सुंदर.
**सुबकणें** (क्रि.) धोतरें वगैरे धुतांना तीं न आपटतां चुबकणें, खळबळणें.
**सुबत्ता** (हिं. सुभत्ता स्त्री.) विपुलता, समृद्धि; सुख व शांति.
**सुंबा, सुंभा** (पु.) पाषाणाच्या शिळा फोडण्याचा जंगी लोखंडी घण; तोफ ठासण्याची ठोकणी.
**सुंबाडी** (स्त्री.) सुंभाचा तुकडा.
**सुबारा** (पु.) फसवून पळून जाणें.
**सुंबाल्या** (पु.) फसवून पळून जाणें.
**सुंबीचाक** (न.) चार जाड अऱ्यांचें चाक.
**सुबुद्ध** (सं. वि.) बुद्धिमान, शहाणा, जाणता, धूर्त.
**सुंबेकरी** (पु.) घणानें दगड फोडणारा.
**सुबोध** (सं. वि.) समजण्यास सोपें, बाळबोध, सरळ, साधें.
**सुंभ** (सं. शुंभ पु.) कृपण; मंदबुद्धि, सुस्त मनुष्य; सुंब पहा.
**सुभग** (सं. वि.) दैववान्, सुंदर.
**सुभट** (प्रा. वि.) चांगल्या घाटाचें, मोठें भव्य, चांगलें, पुण्यशीळ; (सं. पु.) उत्तम योद्धा; (वि.) शूर.
**सुभर** (प्रा. वि.) उत्तम भरलेलें.
**सुभरें** (प्रा. वि.) परिपूर्ण.
**सुभा** (अर. सुबा पु.) प्रांत; प्रांतावरील मुख्य अधिकारी. [ पृ० २१५)
**सुभावणा** (वि.) देखणा, सुंदर (प्रभा०

**सुभाषित** (सं. न.) चांगलें भाषण, वक्तृत्व; विनोदपर किंवा बोधपर सूत्रवचन.
**सुभित्ता** सुवत्ता पहा.
**सुभिक्ष** (सं. न.), **सुभिक्षता** (स्त्री.) समृद्धि, विपुलता, स्वस्ताई.
**सुभेदार** (फा. पु.) सुभ्यावरचा (प्रांतावरचा) मुख्य अधिकारी; इंग्रजांच्या देशी लष्करांतील एक अधिकारी.
**सुभेदारी** (स्त्री.) सुभेदाराचा हुद्दा किंवा काम.
**सुभेलष्कर** (न.) सेनापति व शिलेदार शिपाई इ० ची नेमणूक नोंदण्याचें हिशेबी सदर.
**सुम** (सं. न.) पुष्प, फूल.
**सुमंत** (सं. सुमंत्री पु.) प्रधान. [ धोपट.
**सुमधूम** (वि.) सरळ; स्वच्छ; विनचूक,
**सुमन** (सं. न.) पुष्प, फूल.
**सुमना** (सं. वि.) प्रसन्न मनाचा.
**सुमरु** (सं. पु.) स्मरण (अमृ० ७।१००).
**सुमसाम** (हिं. सुनसान स्त्री.) शांतता, स्तब्धता; (अ.) मुकाट्यानें, शांततेनें.
**सुमार** (फा. शुमार पु.) अजमास, अंदाज; सांनिध्य; मर्यादा.
**सुमारणें** (क्रि.) अटकळींत येणें; (धान्य, पिकें वगैरे) रंगारूपाला येणें; खटपट, प्रयत्न वगैरे) बऱ्याच पल्ल्यापर्यंत गेलेला असणें. [ अल्प.
**सुमारवट** (वि.) वेताबाताचा, मध्यम,
**सुमाराचा** (वि.) मध्यम.
**सुमारें** (अ.) अंदाजें.
**सुमुहूर्त** (सं. पु.) उत्तम प्रकारचा दिवस.
**सुमेधा** (सं. वि.) शहाणा, बुद्धिमान्.
**सुमेरु** (सं. पु.) मेरु पर्वत.
**सुयटा** (पु.), **सुयटी** (स्त्री.) केळीचा सोट.
**सुयणी** (स्त्री.) सुईण.
**सुयंत्र** (सं. वि.) व्यवस्थित, सुरळीत.
**सुयरा** (पु.) सुयटा पहा.
**सुयाज** (प्रा. पु), **सुयाणें** (न.) सुकाळ (ज्ञा० ११।३३८).
**सुयुक्तिक** (सं. वि.) युक्तिवादास चांगलें धरून असलेलें, तर्कशास्त्र–नियमसिद्ध, योग्य.
**सुयेर** (न.) सुएर, जननाशौच, वृद्धि.
**सुर** (सं. पु.) देव.
**सुरई** (हिं. स्त्री.) कुजा; उभें लांब व चिंचोळ मानेचें पाण्याचें भांडें; चंबू; खुजा.
**सुरई** (हिं. सुरही स्त्री.) कट्यारीसारखें एक शस्त्र.
**सुरकंडी, सुरकवडी, सुरकांडी, सुरकुंडी** (स्त्री.) माशासारखा अंगाचा आकार करून पाण्यांत बुडी मारून जाणें; सुरळी; अंगाचा संकोच करून आवेशानें गर्दींत घुसणें.
**सुरकुतणें** (क्रि.) सुरकुत्या पडणें.
**सुरकुती** (स्त्री.) चिरमी, चुरणी, वळी, आकुंचन.
**सुरक्या** (पु.) सूर-वाद्य वाजविणारा; आट्यापाट्याच्या डावांतला सुरदुंग्या.
**सुरखाई, सुरखी** (फा. स्त्री.) लाली; गुलाबी तेज.
**सुरंग** (सं. स्त्री.) रक्तचंदन; (वि.) चांगल्या रंगाचा; (पु.) भुयार, विवर, सुरुंग.
**सुरंगता** (प्रा. स्त्री.) लालपणा.
**सुरगांठ** (स्त्री.) सहज सुटण्यासारखी गांठ.
**सुरंगी** (स्त्री.) भुयार; मोठी पहार; एका अत्तराचें नांव.
**सुरगुरु** (सं. पु.) बृहस्पति. [ कीटक.
**सुरट, सुरंट** (पु.) सुरवंट, एक केसाळ
**सुरण** (सं. पु.) एका कंदाचें नांव.
**सुरत** (अर. स्त्री.) मुद्रा; चेहरा; तऱ्हा, प्रकार; (सं. न.) मैथुन. [ सुंदर.
**सुरतपाक** (फा. वि.) खबसुरत, देखणा,
**सुरतरु** (सं. पु.) कल्पवृक्ष.
**सुरत्ती** (प्रा. स्त्री.) ऐक्य. [ करणारा.
**सुरत्या** (वि.) वादनांत सूर देऊन साथ
**सुरद्रु, सुरद्रुम** (सं. पु.) कल्पवृक्ष.
**सुरधनु** (सं. न.) इंद्रधनुष्य.
**सुरनदी** (सं.स्त्री.) भागीरथी, आकाशगंगा.
**सुरनवीस, सुरनीस** (फा. पु.) सरकारांतून देण्यांत येणाऱ्या सनदा, वराती व कौलनामे इ० वर सुरू, सूद आणि वार अशा तीन शब्दांचा शिक्का मारण्याचें काम ज्याच्याकडे होतें तो

अधिकारी. यालाच पुढें सचिव असें नांव मिळालें.
**सुरपणें** (क्रि.) पोकळ होणें.
**सुरपति** (सं. पु.) देवांचा राजा, इंद्र.
**सुरपाटी** (स्त्री.) आट्यापाट्याच्या खेळांत दोन्ही बाजूंना पाट्या (चौकटी) पाडल्या असून मध्यें एक उभी थेटपर्यंत जाणारी रेघ असते ती; सुरदुंग्याची पाटी.
**सुरपारंबी** (स्त्री.) झाडावर सरसर चढावयाचें, खालीं धावत धावत यावयाचें आणि सूर नांवाची काठी फेकावयाची असा मुलांचा एक खेळ. [ नांव.
**सुरफाक** (पु.) गायनांतल्या एका तालाचें
**सुरफाटा** (वि.) सुफराटा पहा.
**सुरफुरें** (प्रा. वि.) भरपूर; सूचक.
**सुरभि** (सं. वि.) सुगंधी, सुवासिक.
**सुरभी** (सं. स्त्री.) कामधेनु.
**सुरमा** ( फा. पु. ) कुष्टरोग; डोळयांत घालण्याचें एक अंजन.
**सुरमाड** (पु.) माडाची एक जात.
**सुरमी** (स्त्री.) जेवण पुष्कळ झाल्यानंतर येणारी सुस्ती.
**सुरय, सुरयी** (स्त्री.) सुरई पहा.
**सुरयुवती** (सं. स्त्री.) देवांगना.
**सुरलोक** (सं. पु.) देवलोक, स्वर्ग.
**सुरवंट** (सुर + वंत पु.) घुला, एक केसाळ कीटक, कुसरूड.
**सुरवाड** (प्रा.पु.) स्वतंत्रता (ज्ञा० ९।२१४); अनुकूलता (ज्ञा० ५।६७) ; मर्जी, सुख (ज्ञा० ३।२३) ; पूर, सुकाळ (ज्ञा० १६।१६) ; (वि.) शुद्ध, चोख.
**सुरवाडणें** (प्रा. क्रि.) शोभणें, प्रफुल्लित होणें (रामवि० १।१३) ; सुखावणें.
**सुरवाडा** (पु.) देवाचें स्तोत्र, गाणें, स्तोत्र.
**सुरवाडिक** (प्रा. वि.) सुखदायक, सहज (विवे० पृ० २।४) [ सुकाळ.
**सुरवाडें** (न.) सुख, मर्जी; अनुकूलता,
**सुरवात** (अर. शुरुआत स्त्री.) प्रारंभ.
**सुरवार** (हिं. स्त्री.) विजार, पायचोळणा.
**सुरवारी हिरडा** (पु.) हिरड्याचा एक प्रकार.
**सुरस** (सं. वि.) मधुर, मिष्ट, रसयुक्त.
**सुरसन्न** सुरुसन पहा. [ नदी.
**सुरसरी** (सं. सुरसरित् स्त्री.) भागीरथी
**सुरसा** (पु.) दोन टोकांचा खिळा.
**सुरसाबीज** (न.) सवज्याचें बीं.
**सुरसी** (प्रा. स्त्री.) प्राप्ति. [ रिवरिव.
**सुरसुर** (स्त्री.) हातापायाला मुंग्या येणें;
**सुरसुरणें** (क्रि.) मुंग्या यणें; सुरसुर आवाज होणें. [ सुस्ती.
**सुरसुरी** (स्त्री.) आतषबाजीचा एक प्रकार;
**सुरसेप** (पु.) स्फोटक द्रव्य भरलेला गोळा; बाँब.
**सुरसोटा** (पु.) एक तंतुवाद्य.
**सुरळी** (स्त्री.) गुंडाळी, वळकटी; एक प्रकारचें रेशमी वस्त्र.
**सुरळीत** (सं. सरल वि.) सरळ, विनधोक, यथास्थित, निर्बाध.
**सुरक्षित** (सं. वि.) सुखरूप, यथास्थित.
**सुरा** (सं. क्षुरा पु.) मोठी सुरी.
**सुरा** (सं. स्त्री.) मद्य, दारू; (अर. पु.) मुसलमानांच्या कुराण ग्रंथाचा खंड.
**सुराख** (स्त्री.) चांगली देखरेख.
**सुराखार** (पु.) सोरा या नांवाचा क्षार.
**सुरांगना** (सं. स्त्री.) अप्सरा, देवांगना.
**सुराणी** (प्रा. स्त्री.) आवड, उपभोग (तुका० २६८४).
**सुरापान** (सं. न.) मद्यपान, दारू पिणें.
**सुरालय** (सं. पु.) स्वर्ग.
**सुरु** (स्त्री.) पेजेवरची जाड साय; कोंवळें खोबरें.
**सुरी** (हिं. छुरा स्त्री.) मोठा चाकू; कापण्याचें एक हत्यार.
**सुरावट** (स्त्री.) सुरांचा समूह. [ कोडगा.
**सुरुखुरु** (फा. सुर्ख रू वि.) निर्लज्ज,
**सुरुंग** (सं. सुरुंगा पु.) मजबूत तटबंदी किंवा खडक यास भगदाड पाडण्यासाठीं दारू भरण्याकरितां त्याला प्रथम लहानसें भोक पाडतात तें; भुयार.
**सुरुवात, सुरवात** (फा. शुरुआत स्त्री.) प्रारंभ, आरंभ.
**सुरुसन** (अर. शहुरसन पु.) हिजरी शकानंतर ७४५ वर्षांनीं म्हणजे इ. स. १३४४ सालीं सुरू झालेला एक शक.

**सुरू** (फा. सुरु पु.) खालीं फुगीर व वर निमुळता अशा मजेदार आकाराचा सरळ उंच वाढणारा एक वृक्ष.
**सुरू** (अर. शुरु आ वि.) प्रारंभलेला; शरम वाटत नाहीं असा. [सुंदर.
**सुरूप** (सं. वि.) स्वरूपवान, देखणा,
**सुरेख** (वि.) नीटनेटका, सुंदर, शोभिवंत, रेखीव; ठीक, योग्य.
**सुऱ्या** (पु.) कुरडया करण्याचा साचा.
**सुलखणें** (क्रि.) सोन्याची परीक्षा पाहणें.
**सुलट, सुलटा** (वि.) सरळ, योग्य प्रकारचा, अनुकूल.
**सुलणें** (क्रि.) सलणें, खुपणें.
**सुलतान** (फा. पु.) बादशहा. [पुरुष.
**सुलतानढवा** (फा. पु.) अतिशय धाडसी
**सुलतानी** (फा. स्त्री.) बादशहाचा अंमल; सरकारच्या हातून घडणारें जुलमाचें अगर इतर वाईट कृत्य.
**सुलभ** (सं. वि.) मिळण्यास किंवा करण्यास इ० सोपें, स्वल्प, सवघड.
**सुलक्षणी** (सं. वि.) शुभ चिन्हें असलेला.
**सुलाख** (फा. सुराख पु.) चांदी–सोन्याच्या दागिन्यांतल्या धातूच्या शुद्धतेची परीक्षा पाहण्यासाठीं त्याला पाडलेलें भोक.
**सुलाखणी** (स्त्री.) जडचाचें हत्यार.
**सुलाखणें** (क्रि.) दागिन्यांतली लाख बाहेर उघडकीस येणें.
**सुलूक, सुलूख** (अर. सलूक पु.) स्नेहभाव, सलोखा, मैत्री. [नांवाचा रोग.
**सुलें** (न.) मुलांच्या पोटांत होणारा डबा
**सुवण** (पु.) जन्म.
**सुंवरा** (पु.) केळीचा सोट. [सोनें.
**सुवर्ण** (सं. वि.) चांगल्या रंगाचें; (न.)
**सुवर्णकार** (सं. पु.) सोनार.
**सुवर्णकीटक** (सं. पु.) काजवा. [प्रचार.
**सुवर्णचलन** (न.) सोन्याच्या नाण्याचा
**सुवर्णपंथी** (प्रा. पु.) किमयागार.
**सुवर्णपुष्प** (न.) सोनचांफा.
**सुवर्णभूमि** (स्त्री.) हिंदुस्थान.
**सुवर्णमहोत्सव** (पु.) व्यक्तीस किंवा संस्थेस ५० वर्षें पूर्ण झालीं म्हणून करावयाचा आनंदोत्सव (इं. गोल्डन ज्युबिली).
**सुवर्णमालिनी वसंत** (सं. पु.) एका औषधी मात्रेचें नांव.
**सुवर्णमाक्षिक** (सं. न.) एक औषधी मात्रा.
**सुवा** (हिं. पु.) मोठी सुई, दाभण.
**सुवाच्य** (सं. वि.) वाचण्यास सोपें, सहज वाचतां येईल असें.
**सुवाड** (प्रा. वि.) सुरेख (हरि० २।१८).
**सुवाण** (प्रा. वि.) चंचल.
**सुवार, सुवारू** (प्रा. पु.) पाककर्ता, आचारी (ज्ञा० १३।४२१).
**सुवारा** (सं. सुवार्ता पु.) आनंदाची बातमी; सुखाचा शब्द.
**सुवार्ता** (सं. स्त्री.) चांगली बातमी.
**सुवाव** (प्रा. पु.) सहवास.
**सुवावो** (सं. सुवायु पु.) उत्तम वायु.
**सुवास** (सं. पु.) सुगंध; चांगली वस्ती.
**सुवासिक** (सं. वि.) सुगंधि; सुगंधयुक्त.
**सुवासित** (सं. वि.) गंधित केलेलें.
**सुवासिनी** (सं. स्त्री.) सवाष्ण, नवरा जिवंत असलेली स्त्री, सौभाग्यवती.
**सुवाळा** (पु.) फत्तेमारीसारखा माल नेणारा मचवा.
**सुवाळी-मवाळी** (स्त्री.) गोड व मृदु भाषण; लाडीगोडीचें भाषण.
**सुविद्य** (सं. वि.) विद्यासंपन्न, बहुश्रुत.
**सुवी** (स्त्री.) सुई.
**सुवीण** (स्त्री.) सुईण पहा. [झालेली प्रसूति.
**सुवेत** (न.) योग्य वेळीं व सुलभ रीतीनें
**सुवेनसी** (प्रा. स्त्री.) सामर्थ्य.
**सुवेर** (न.) वृद्धि, जननाशौच, सुएर.
**सुवेळ** (स्त्री.) शुभसमय, चांगली वेळ.
**सुशिक्षित** (सं. वि.) चांगला शिकलेला.
**सुशी** (हिं. स्त्री.) पट्ट्या पट्ट्याचें सुती कापड; मुलांचा पोटांतला रोग.
**सुशील** (सं. वि.) सुस्वभावी, सद्वर्तनी.
**सुशोभित** (सं. वि.) शृंगारलेलें; शोभिवंत.
**सुश्रांतणें** (क्रि.) अतिशय थकणें, श्रमणें.
**सुश्राव्य** (सं. वि.) कर्णमधुर, ऐकल्यावर मनाला प्रसन्नता देणारें.
**सुषमा** (सं. स्त्री.) मोठी शोभा.
**सुषुप्ति** (सं. स्त्री.) गाढ निद्रा; ज्ञानशून्य जीवावस्था.

**सुषुम्ना** (सं. स्त्री.) शरीरांतर्गत इडा व पिंगला या दोन नाड्यांमधली नाडी.
**सुष्ट** (सं. सुष्ठु वि.) चांगलें.
**सुष्टासुष्ट** (वि.) बरेंवाईट, शुभाशुभ.
**सुस** (प्रा. न.) सुख (अमृ० २।१३).
**सुसकारणें** (क्रि.) सुसकारे टाकणें.
**सुसकारा, सुस्कारा** (पु.) हृदयांतल्या खोल जागेपासून वेगानें व शब्द करीत बाहेर पडणारा उच्छ्वास.
**सुसंग** (सं. पु.), **सुसंगति** (स्त्री.) चांगल्या माणसांचा सहवास.
**सुसड** (प्रा. वि.) उत्तम सडीक.
**सुसंबद्ध** (सं. वि.) मागच्या पुढच्याशीं उत्तम मेळ असलेलें, सुसंगत.
**सुसर** (स्त्री.) नक्र, मगर.
**सुसा** (पु.) गुरांचा एक रोग; झारीसारखें एक भांडें.
**सुसाचणें** (प्रा. क्रि.) उसासा टाकणें.
**सुसाट, सुंसाट** (अ.) सूं सूं आवाज करीत.
**सुसाटणें** (क्रि.) सूं सूं आवाज करीत वेगानें व आवेशानें जाणें.
**सुसाटा** (पु.) झपाटा, सोसाटा.
**सुसाध्य** (सं. वि.) सहज साधण्याजोगें.
**सुसास** (प्रा. पु.) अवकाश; (वि.) सांगण्याजोगें.
**सुसासा** (पु.) सुसकारा, उसासा.
**सुसूत्र** (सं. वि.) नियमित, नियंत्रित; नीट चाललेलें; सरळ रेषेंत असलेलें.
**सुस्कारणें** (क्रि.) सुसकारणें पहा.
**सुस्कारा** (पु.) सुसकारा पहा.
**सुस्त** (फा. वि.) मंद, आळसावलेला.
**सुस्ताई, सुस्ती** (स्त्री.) मंदपणा, आळस, हयगय.
**सुस्तावणें** (क्रि.) सुस्त होणें, उत्साहहीन [होणें.
**सुस्ती** (स्त्री.) सुस्ताई पहा.
**सुस्थ** (सं. वि.) निरोगी, सुखी.
**सुस्वर** (सं. वि.) आवाजदार, चांगल्या आवाजांत म्हटलेलें (गाणें).
**सुस्वर** (स्त्री.) सुसर, नक्र.
**सुहडा** (प्रा. पु.) चांगला योद्धा.
**सुह्रा** (प्रा. पु.) द्वेष.
**सुहागिन** (हिं. स्त्री.) सवाष्ण.
**सुहाड** (प्रा. वि.) सुज्ञ (ज्ञा० ९।२०१); अत्यंत प्रिय (ज्ञा० ११।६७०); बळकट (ज्ञा० १७।९९).
**सुहाडणें** (प्रा. क्रि.) शोभणें.
**सुहाडा** (प्रा. पु.) अलंकार; सुखाचा ओढा; उत्तम योद्धा; (वि.) शोभिवंत, मनोरम (स्वा० दि० ७।३।३९); ज्ञानी, सुजाण.
**सुहाव** (प्रा. पु.) आवड, ब्रह्मसुख (ज्ञा० १५।६८); (वि.) सुशोभित (भा० १।१०९).
**सुहावणें** (क्रि.) आवडणें; कल्पिणें.
**सुहावा** (प्रा. वि.) आवडता (विवे० पू० ४।१३); साह्यकर्ता (ज्ञा० १४।२); (वि.) शोभिवंत (स्वा० दि० ७।५।४८).
**सुहास्यवदन** (सं. न.) हंसतमुख.
**सुहृद** (सं. पु.) प्रेमळ मित्र, सोबती.
**सुहेर** (न.) सुएर, सुवेर पहा.
**सुळकंडी** (स्त्री.) सुरकुंडी पहा.
**सुळकणें** (क्रि.) मुकाट्यानें निघून जाणें.
**सुळकंबा** सुळकुंबा पहा.
**सुळका** (सं. शूल पु.) शूलाप्रमाणें खालीं रुंद आणि वर क्रमाक्रमानें निमुळतें होत गेलेलें डोंगराचें उंच शिखर; सुळा दांत; धान्य कापल्यावर राहिलेला खुंट; सरळ व वर निमुळता होत गेलेला वृक्ष; दाराच्या चौकटीचा एक उभा भाग.
**सुळकी** (स्त्री.) खुंटीचें अग्र; अग्राकडे निमुळती झालेली कोणतीहि वस्तु.
**सुळकुंबा, सुळखांब, सुळखुंबा** (पु.)—राहाट—गाडग्यांत तुंब्याला आधार देणारा खांब.
**सुळकेपट्टी** (स्त्री.) दाराच्या बाहेरच्या बाजूच्या माथ्यावर जशी कपाळपट्टी किंवा गणेशपट्टी असते तशी आंतल्या चौकटीची वरची पट्टी.
**सुळबुळाट** (पु.) सुळसुळाट पहा.
**सुळबुळीत** (प्रा. वि.) बुळबुळीत.
**सुळसुळ** (स्त्री.) वळवळ, चुळबुळ मुंगळा.
**सुळसुळणें** (क्रि.) चुळबुळणें, वळवळणें; मुंगळा लागणें.

**सुळसुळाट** (पु.) अतिशय मोठी चुळबुळ; गर्दी, धांदल, विपुलता; फार त्रास.
**सुळसुळीत** (वि.) वुळवुळीत, निसरतें.
**सुळा** (पु.) टोकदार दांत, सुळका; लांडग्याचा, सर्पाचा, वाघाचा किंवा हत्तीचा दांत.
**सुळागीर** (वि.) मोठ्या चढणीचा.
**सुळ्** (प्रा. पु.) शूळ (ज्ञा० प्र० ३०६).
**सुज्ञ** (सं. वि.) जाणता, शहाणा.
**सू** (स्त्री.) सुई. [ देणारी.
**सू** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) जन्म
**सूं, सू** (अ.) जोरानें व वेगानें बाहेर पडल्यामुळें होणारा आवाज.
**सू करणें, सू म्हणणें** वेगानें निघणें, वेगानें पळून जाणें.
**सूक** (सं. शुक पु.) शुक्राची चांदणी.
**सूकर** (सं. पु.) डुकर.
**सूक्त** (सं. वि.) चांगलें म्हटलेलें; योग्य, प्रशस्त; (न.) वेदांतला मंत्र.
**सूचक** (सं. वि.) सुचविणारें, दर्शक, वोधक; (पु.) सूई; हेर.
**सूचना** (सं. स्त्री.) अप्रत्यक्ष रीतीनें कळविलेली गोष्ट, इषारा.
**सूचि, सूचिका, सूची** (सं. स्त्री.) सुई; अग्र; अनुक्रमणिका, विषयांची यादी; सुळका; ज्योतिषांत–पृथ्वीच्या गोलाची अत्यंत सूक्ष्म छाया (जिच्यांत चंद्र प्रवेश करितो म्हणून चंद्रग्रहण होतें).
**सूचि** (सं. स्त्री.) भूमितिशास्त्रांत—शंकु.
**सूचित** (सं. वि.) सुचविलेलें.
**सूज** (सं. शोथ हिं. सूज स्त्री.) शरिरावयवास कांहीं विकारामुळें येणारा फुगीरपणा.
**सूट** (स्त्री.) सोडलेली म्हणजे माफ केलेली रकम; सुटका; रांगेंत मध्यें पडणारा खंड.
**सूटपत्र** (न.) सोडचिठ्ठी; सोडखत.
**सूड** (सं. शोध पु.) शोध, तपास, वदला; अपकाराची प्रतिक्रिया; खतावणीतून काढलेला हिशेवाचा उतारा; अखंड क्रिया; ताण देऊन काम करणें.
**सूणें** (प्रा. क्रि.) घालणें, ठेवणें.
**सूत** (सं. सूत्र न.) धागा, दोरा; (सं. न.) अगदीं थोडी लांवी दाखविणारें माप; संधान; मित्रत्वाचा संवंध; (सं. पु.) सारथि; स्तुतिपाठक. **नाकीं सूत धरणें**—एखादा मनुष्य आतां मरतो कीं घटकेनें मरतो अशी स्थिति असणें; **सुतानें सूत लागणें**—एका गोष्टीच्या शोधामुळें दुसरीचा शोध लागणें; **सुतास (किंवा सुतीं) लागणें**—सुरळीतपणें चालू लागणें; **सुतानें स्वर्ग गांठणें**—यत्किंचित् सुगावा लागतांच त्यावरून तर्कानें एकंदर सर्व गोष्टीचें स्वरूप ओळखणें; **सुतीपातीं लागणें**—नीट व्यवस्था लागणें.
**सूतकताई** (स्त्री.) सूत कातणें.
**सूतकाडी** (स्त्री.) जिच्या भोंवतीं सूत गुंडाळलेलें असतें ती काडी, गणा, रिकांडी. [ ७।४५६).
**सूतणें** (प्रा. क्रि.) वेष्टणें (मुक्ते० रामा०
**सूतपणें** (प्रा. क्रि.) तन्मय होणें (ज्ञा० ५।१४८). [ किंमत.
**सूतपाड** (पु. न.) कापडाची वीण आणि
**सूतपात, सूतपोत** (न.) वीण, पोत, वनावट.
**सूतशेखर** (सं. पु.) एक औषधी मात्रा.
**सूति** (सं. स्त्री.) प्रसूति; जन्म; संतति; (प्रा.) सूत्र, संवंध (ज्ञा० १२।९५).
**सूतिका, सूता, सूतका** (सं. स्त्री.) वाळंतीण.
**सूतिकागृह** (सं. न.) वाळंतिणीची खोली.
**सूतोवाच** (न.) प्रारंभ करणें.
**सूत्र** (सं. न.) सूत, धागा, दोरा; संधान; शास्त्रप्रवर्तक आचार्यांनीं त्या त्या शास्त्रावर लिहिलेले मूलग्रंथ; त्यांतलीं सुटीं वाक्यें; जानवें.
**सूत्रकार** (पु.) सूत्रें रचणारा ऋषि.
**सूत्रधार** (सं. पु.) नाटकाध्यक्ष; नाटकाची माहिती करून देणारें मुख्य पात्र; ज्याच्या आज्ञेनें कामें चालतात तो मुख्य मनुष्य. [ ६।१०).
**सूत्री** (प्रा. वि.) चपळ (मुक्ते० रामा०
**सूदणें** (प्रा. क्रि.) वोलावणें; घालणें (शिवलीला० ५।८९).

नगर वाचनालय सातारा

**सूदन** (सं. न.) वध.
**सून** (सं. सूना स्त्री.) मुलाची नायको.
**सूनमुख** (न.) वरातीच्या अगोदर सासूनें सुनेचें तोंड पाहाण्याचा विधि.
**सूनि** (अ.) असून, डोळयापुढें ठेवून.
**सूनी** (प्रा. अ.) घालून (ज्ञा०७।२०२).
**सूनु** (सं. पु.) पुत्र.
**सूनृत** (सं. न.) सत्य; खरें; गोड.
**सूप** (सं. शूर्प न.) धान्य वगैरे पाखडावयाचें साधन, पाखडण; (सं.न.) वरण. **सूप फडफडणें**—विवाहकार्य समाप्त होणें.
**सूपरम, सूपराम** (सं. पु.) मरण.
**सूपशास्त्र** (सं. न.) पाकशास्त्र, स्वैपाक करण्याची विद्या.
**सूंबाल्या करणें** पळून जाणें.
**सूम** (वि.) कंजुष.
**सूय** (स्त्री.) सुई.
**सूर** (सं. स्वर पु.) स्वर, आवाज, मधुर ध्वनि; सप्तस्वरांवर वाजणाऱ्या वाद्याचें एक सामान्य स्वरूप धरून सतत सारखें वाजणारें वाद्य; नाकांतून बाहेर टाकण्यांत येणारी हवा; (सं. स्त्री.) नारळाची दारू; (पु.) सूर्य; शूर. **सूर वाहणें**—शक्यता किंवा संभव दिसणें; मनाचा कल होणें.
**सूरदास** (पु.) आंधळयाला लावण्याचा प्रतिष्ठायुक्त शब्द.
**सूरपारंबी** (स्त्री.) मुलांचा एक खेळ.
**सूरफाटा** (वि.) सरळ.
**सूर्य** (सं. पु.) रवि; भानु. **सूर्याचीं पिलें दाखविणें**—एखाद्याच्या कानशिलावर तळहातानें दाबून त्याला वर उचलणें.
**सूर्यकमल** (सं. न.) एक फूल.
**सूर्यकांत** (सं. पु.) सूर्यकिरणांचें एका केंद्रांत परावर्तन करून उष्णता उत्पन्न करणारा एक विशेष प्रकारचा मणि.
**सूर्यग्रहण** (सं. न.) सूर्यावर पडणारी छाया; जुन्या हिंदुमताप्रमाणें सूर्याचा केतुग्रहानें केलेला ग्रास; पाश्चात्य मताप्रमाणें सूर्यावर पडलेली चंद्राची छाया.
**सूर्यदर्शनव्रत** (न.) सूर्यदर्शन होईतों उपोषण करण्याचें व्रत.
**सूर्यनंदन** (सं. पु.) यम, शनि; सुग्रीव; कर्ण.
**सूर्यपान** (प्रा. न.) अबदागिरी.
**सूर्यपुटी** (वि.) उन्हांत वाळविलेलें औषध.
**सूर्यबिंब** (न.) सूर्याचें बिंब.
**सूर्यमाला** (सं. स्त्री.) सूर्य व त्याच्या भोंवतीं फिरणारे ग्रह, उपग्रह इत्यादि.
**सूर्यवंशी** (सं. वि.) सूर्याच्या कुळांत जन्मलेला; सूर्योदयानंतर निजून उठणारा.
**सूर्यविकासी** (सं. वि.) दिवसा उगवणारें व रात्रीं मिटणारें (फूल).
**सूर्यस्नान** (न.) उन्हांत बसणें.
**सूर्यास्त** (सं. पु.) सूर्य मावळणें.
**सूर्योदय** (सं. पु.) सूर्य उगवणें.
**सूर्योपासना** (सं. स्त्री.) सूर्याची पूजाअर्चा.
**सूळ** (सं. शूल पु.) जमिनींत रोवलेला अणकुचीदार स्तंभ; तीव्र वेदना. **सुळीं देणें**—सुळाच्या तीक्ष्ण अग्रावर आपटून किंवा दाबून मारणें; **सुळावरची पोळी**—जीव धोक्यांत घालण्यासारखें काम.
**सूळघेणें** (वि.) अत्यंत कष्टप्रद (काम).
**सूक्ष्म** (सं. वि.) बारीक, लहान.
**सूक्ष्मदर्शी, सूक्ष्मदृष्टि** (सं. वि.) बारकाईनें पाहणारा. [वासनात्मक शरीर.
**सूक्ष्मदेह** (सं. पु.) सूक्ष्म शरीर, लिंगदेह,
**सूक्ष्मबुद्धि** (सं. वि.) अतिबुद्धिमान्, मार्मिक बुद्धीचा.
**सूक्ष्मदर्शक** (पु.) अतिशय सूक्ष्म वस्तु मोठया करून दाखविणारें काचेचें यंत्र.
**सृगाल** (सं. शृगाल पु.) कोल्हा.
**सृजणें** (सं. सृज् क्रि.) निर्माण करणें
**सृष्टि** (सं. स्त्री.) जगाची उत्पत्ति, जग, विश्व. [ऐहिक जीवन.
**सृष्टिक्रम** (सं. पु.) सृष्टीची राहाटी,
**से** (प्रा. स्त्री.) छंद (ज्ञा० ६।७); सत्य, स्मरण (ज्ञा० १३।६४५).
**सेक** (सं. पु.) शिंपडणें, सिंचन.
**सेक्रेटरी** (इं. पु.) चिटणीस.
**सेखीं** (सं. शेष अ.) शेवटीं.
**सेचन** (सं. न.) शिंपडणें.
**सेज** (सं. शय्या स्त्री.) शय्या, बिछाना.
**सेज** (प्रा. पु.) क्रम.
**सेजसाळीं** (सं. शय्याशाला स्त्री.) शय्यागृह.

**सेजार** (प्रा. स्त्री.) शय्या.
**सेजारीं** (प्रा. अ.) जवळ.
**सेट्या** (प्रा. पु.) बाजारावरील अधिकारी (तुका० ४९२१).
**सेत** (सं. सेतु पु.) पूल; (सं. क्षेत्र न.) शेत.
**सेतु** (सं. पु.) बांध, धरण, पूल.
**सेतुबंध** (सं. पु.) वानरसेना लंकेंत नेण्यासाठीं रामाच्या आज्ञेवरून नलानें समुद्रावर बांधिलेला पूल; बांध, धक्का, धरण.
**सेंद** (प्रा. स्त्री.) एक जातीचें कडू फळ; वेलें (ज्ञा० १८।४२३); करंडा.
**सेंद्रिय** (सं. वि.) इंद्रिय-विशिष्ट. **सें० रसायनशास्त्र** (न.)—इंद्रिय–विशिष्ट प्राणी व वनस्पति आणि त्यांची द्रव्यावर रसायनकार्यें घडून बनलेले संयुक्त पदार्थ यांचें विवरण ज्यांत केलें असतें तो रसायनशास्त्राचा भाग.
**सेन** (सं. श्येन पु.) ससाणा.
**सेना** (सं. स्त्री.) सैन्य, फौज.
**सेनाखासखेल** (सं. अर. पु.) सेनापति (गायकवाड सरकारचा एक किताब.).
**सेनानिवेश** (सं. पु.) शिबिर, छावणी, सैन्याचा तळ.
**सेनानी** (सं. पु.) सैन्याचा नायक.
**सेनानायक** (सं. पु.) सेनापति. [ अधिकारी.
**सेनापति** (सं. पु.) सैन्यावरचा मुख्य
**सेनामुख** (सं. न.) तीन पत्ति (एक पत्ति = १ रथ, १ हत्ती, ३ घोडेस्वार व ५ पायदळ इतकें सैन्य).
**सेनासरखेल** (सं. अर. पु.) सेनापति (आंग्रे सरकारचा किताब).
**सेनासागर** (पु.) सेनापति.
**सेयारी** (प्रा. स्त्री.) डाकीण, पिशाची.
**सेर** (पु.) शेर.
**सेरिक** (प्रा. पु.) सरकारच्या हक्काचें धान्य वसूल करणारा अधिकारी.
**सेरी** (प्रा. स्त्री.) तृप्ति, समाधान.
**सेरू** (पु.) लाकडाची पळी.
**सेल** (प्रा. पु.) खाण्याचा पदार्थ; शेवट (अमृ० २।२१); (वि.) शेलका, निवडक (ज्ञा० १०।१३०).
**सेलडी, सेलडोरा, सेलदोरा** (प्रा. पु.) मुलांचा एक खेळ. [ दि० १।२।१६).
**सेलणें** (प्रा. क्रि.) उडणें, फिरणें (स्वा०
**सेली** (हिं. पु.) हार.
**सेवक** (सं. पु.) चाकर, नोकर.
**सेवकी** (प्रा. स्त्री.) सेवाधर्म.
**सेवडी** (प्रा. स्त्री.) चर्म (ज्ञा०६।१८२).
**सेवणें** (क्रि.) घेणें, उपभोग घेणें.
**सेवन** (सं. न.) चाकरी; पूजा, उपासना; उपभोग; शिवणें; दोरा घालणें.
**सेवा** (सं. स्त्री.) चाकरी, दास्य.
**सेवाधार** (सं. पु.) सेवेकरी.
**सेवेकरी** (पु.) देवाच्या सेवेला स्वतःला वाहून घेणारा, उपासक.
**सेवित** (सं.वि.) अवलंबिलेला; खाल्लेला; योजलेला; भोगलेला; ज्याची सेवा केली आहे असा.
**सेव्याठाय** (प्रा. पु.) ब्रह्म.
**सेस** (प्रा. न.) भरण.
**सैंग, सैंघ** (सं. संघ पु.) समूह (ज्ञा० प्र० २८७); (वि.) पुष्कळ; सर्व; (अ.) केवळ (ज्ञा० ६।१००); स्वतःसिद्ध (ज्ञा० ९।३२२).
**सैतान** (अर. पु.) पिशाचांचा राजा; लक्षणेनें–घोर कर्म आचरणारा पुरुष.
**सैती** (स्त्री.) बर्ची.
**सैदोन** (फा. पु.) एक प्रकारचा नगारा.
**सैंधव** (सं. पु.) शेंदेलोण; घोडा. [ काम.
**सैनापत्य** (सं. न.) सेनापतीची पदवी किंवा
**सैन्य** (सं. न.) फौज, लष्कर, सेना.
**सैंपाक** (सं. स्वयंपाक पु.) पाकक्रिया; तयार केलेलें अन्न. [ खोली.
**सैंपाकघर** (न.) पाकनिष्पत्ति करण्याची
**सैंपाकी** (पु.) आचारी; (स्त्री.) स्वैंपाक करण्यासाठीं ठेवलेली बाई किंवा पुरुष.
**सैफ** (फा. पु.) खड्ग, तलवार.
**सैयद** (अर. पु.) मालक, सरदार; महंमद पैगंबराचा नातू हुसेन याचे वंशज; मुसलमानांच्या चार पंथांपैकीं एक पंथ.
**सैय्या** (हिं. पु.) भय्या; प्रियकर.
**सैर** (सं. स्वैर वि.) स्वच्छंदी; (अर. स्त्री.) सहल, भटकणें.

**सैरट, सैराट** (सं. स्वैर वि.) स्वच्छंदी; हट्टी, हेकेखोर; दांडगा, आडदांड; कठोर.
**सैरणी** (स्त्री.) स्वैरसंचार. [द्रौपदी.
**सैरंध्री** (सं. स्त्री.) अंतःपुरांतली दासी;
**सैरा** (प्रा. वि.) अफाट, मोकाट; (अ.) स्वच्छंदानें.
**सैराट** (प्रा. वि.) वेडेंवांकडें (भा० ११। ३३७); स्वेच्छ (मनाचे श्लोक १०४); (पु.) कर्कश स्वर.
**सैरावैरा** (प्रा. अ.) इकडेतिकडे.
**सैरिभ** (प्रा. पु.) रेडा.
**सैल** (सं. शिथिल वि.) ढिला, पोकळ.
**सैल** (स्त्री.) कंगणी इ० दागिने घडविण्याचा दांडा.
**सैलणें**, **सैलावणें** (क्रि.) ढिलें होणें.
**सैलाविणें** (क्रि.) ढिलें करणें.
**सैली** (हिं. स्त्री.) फकिराच्या गळयांतली सुताची माळ. [त्याला वरणें.
**सैंवर** (सं. स्वयंवर पु.) स्वतः पति निवडून
**सोई** (प्रा. स्त्री.) परिस्थितीची अनुकूलता; सोय; फायदा; मार्ग.
**सोईवार** (वि.) फायदेशीर, सोयीचें.
**सोईसुमार** (पु.) प्रसंगाचें औचित्य किंवा अनुकूलता; मागचें पुढचें धोरण; समंजसपणा.
**सोकट** (न.) सुकट, वाळलेले बोंबील.
**सोकटी, सोंकटी** (स्त्री.) सोंगट्याच्या खेळांतला पटावर मांडण्याचा लहानसा लाकडी ठोकळा. [लागणें.
**सोकणें** (प्रा. क्रि.) गोडावणें; संवकणें, नाद
**सोंकरणें** (प्रा. क्रि.) राखणें, रक्षण करणें.
**सोकरा** (पु.) छोकरा.
**सोकरी** (स्त्री.) छोकरी.
**सोकरी** (प्रा. पु.) शेताचा रक्षक; जागल्या.
**सोकळ** (वि.) ठिसूळ.
**सोकाजी** (अर. वि.) छाकटा.
**सोंकारा, सोकारी** (प्रा. पु.) राखणदार.
**सोकील, सोंकील, सोकेल** (वि.) संवकलेला.
**सोक्त** (वि.) गंजिफांच्या खेळांत बारा पानांपैकीं एकही पान दुसऱ्याच्या हातांत राहिलें नाहीं असा जो रंग होतो तो.
**सोख** (सं. शोष पु.) कोरड.
**सोख्ता** (फा. पु.) जीर्ण वस्त्र; टीपकागद.
**सोंग** (सं. स्वंग न.) नाटकांत धारण केलेली भूमिका; वेष; मिष; कोंग; ढोंग; लोकविलक्षण, निरुपयोगी व व्यर्थ अडचण करणारी गोष्ट.
**सोंगटी** सोंकटी पहा. [शपथ.
**सोगण, सोंगद, सोगंध** (फा. सोगंद स्त्री.)
**सोंगणी** (स्त्री.) वेटाळणी पहा.
**सोंगसंपादणी** (स्त्री.) घेतलेल्या सोंगाची हुवेहूब बतावणी करणें. [८।४६).
**सोंगयाचें अंजन** सौवीरांजन (रामा० वि०
**सोंगळ** (सं. सुमंगल वि.) ओंगळ याच्या उलट म्हणजे मलिनपणाविषयीं ज्यास फार खंती वाटते असा; चोखंदळ.
**सोगा** (पु.) वस्त्राचा लोंबता पदर; तुरमा (राम० ८।४६).
**सोंगाडी, सोंगाड्या** (वि.) सोंग घेणारा; कोंग दाखविण्याचा स्वभाव असलेला; ढोंगी. [तांदूळ.
**सोजी** (सं. शुचि स्त्री.) भाजून शिजविलेले
**सोजीर** (इं. सोल्जर पु.) गोऱ्या पलटणींतील शिपाई. [चकचकीत.
**सोज्वल–ळ** (सं. वि.) स्वच्छ, निर्मळ,
**सोट** (प्रा. पु.) लांब, सरळ व जाड लाकूड, झाड, स्तंभ इ०; धष्टपुष्ट आडदांड मनुष्य, फटिंग; जंतुविशेष.
**सोटगा** (पु.), **सोटगें** (न.) दांडकें, सोटा.
**सोटबहिरी** (पु.) गलेलठ्ठ व आडदांड.
**सोट भैरव** (पु.) आडदांड मनुष्य, फटिंग, सडेसोट.
**सोटवाव** (प्रा. पु.) फोक.
**सोटा, सोंटा** (हिं. सोंटा पु.) जाड, गोल लाकूड; बडगा.
**सोटेबरदार** (हिं. पु.) भालदार, चोपदार; मोठ्या माणसाबरोबर त्याची काठी घेऊन चालणारा नोकर.
**सोटेशाही** (स्त्री.) दांडगाई, दंडुकेशाही.
**सोठ** (प्रा. वि.) आडदांड. [बानगी.
**सोड** (स्त्री.) सूट, सवलत, मुक्तता; पर-
**सोंड** (सं. शुंडा स्त्री.) लांबट भाग; हत्तीचें लांब नाक.

**सोंडसोळ** (पु.) विहिरींतून पाणी काढा-वयाच्या घागर, पोहोरा इ० ला ज्या दोरीचा फास घालतात ती दोरी.
**सोडगा** (पु.), **सोडगें** (न.) सोटा.
**सोडचिठ्ठी** (स्त्री.) आपल्या ताब्यांतली वस्तु सोडून दिल्याबद्दलचा लेख.
**सोडण** (न.) नारळावरचें तंतुमय आवरण; चोड; हट्टी मनुष्य; चिकट मनुष्य.
**सोडणी** (प्रा. स्त्री.) सोडवणूक.
**सोडणूक** (स्त्री.) मुक्तता; वियोग; सुट-ण्याचा मार्ग, पळवाट.
**सोडणें** (क्रि.) खुला करणें, मोकळा करणें; टाकून देणें; बाहेर जाऊं देणें; गाळणें.
**सोडत** (पोर्तु. सोर्टे स्त्री.) नशिबाची परीक्षा; एकाद्या पदार्थाची किंमत अने-कांनीं मिळून भरावी व पूर्वसंकेताप्रमाणें ज्याच्या नांवानें तो पदार्थ निघेल त्यानें तो घ्यावा असा व्यवहार; लॉटरी.
**सोडपत्र** (न.) सोडचिठ्ठी.
**सोडमुंज** (स्त्री.) मुलाच्या उपनयनाच्या वेळीं त्याच्या कमरेस जी मुंज्याची दोरी बांधली असते, ती सोडण्याचा विधि; गृहस्थाश्रमांत प्रवेश करण्याची मोकळीक.
**सोडवण** (स्त्री.) मुक्तता, मोकळीक; पळवाट.
**सोडवणी** (न.) शेतांत किंवा बगिच्यांत खणलेल्या चरांतून जाणारें पाणी.
**सोडवणी, सोडवणूक** (स्त्री.) मुक्तता, पळवाट.
**सोडविणें** (क्रि.) मोकळें करणें; सुटें असें करणें; एखादें गूढ उकलणें; गणि-तांत—प्रश्नाचें बरोबर उत्तर देणें.
**सोडवून ठेवणें** पळवाट ठेवणें.
**सोडा** (इं. पु.) एक क्षार. **सोडावॉटर**—हवा दाबून भरलेलें सोडामिश्रित पाणी.
**सोंडाळ, शोंडचा** (वि.) सोंड असलेला.
**सोंडी** (स्त्री.) देवडी.
**सोडचाळ** (वि.) खाद्य, पेय, वस्त्र इत्यादि पदार्थांत ज्याला यत्किंचित् अमंगल-पणा पतकरत नाहीं असा माणूस; चिकि-त्सेखोर; चोखंदळ.

**सोत्कंठ** (सं. स्त्री.) उत्सुक.
**सोदर, सौदर्य** (सं. पु.) सख्खा भाऊ; (वि.) सारखा, सदृश. [ लुच्चा.
**सोदा, सोद्या** (हिं. शोदा वि.) बदमाष,
**सोदेगिरी, सोदेशाई** (स्त्री.) लुच्चेगिरी, लबाडी.
**सोधणें** (क्रि.) शोधणें.
**सोनओळख** दसऱ्याच्या दिवशीं सोनें देण्याइतकी ओळख; तोंड-ओळख, अल्प परिचय.
**सोनकळी** (स्त्री.) फुलाच्या कळयासारख्या सोन्याच्या केलेल्या कळयांचा हार.
**सोनकुला** (वि.) लाडका.
**सोनकेळें** (न.) लहान, पिवळें धमक व गोड अशी केळयांची एक जात.
**सोनखत, सोनखात** (न.) माणसाच्या विष्ठेचें खत.
**सोनचडी, सोनचिडी, सोनचेड—डा—डी** (स्त्री.) डोंबाऱ्याचें काम करणारी स्त्री.
**सोनचांपा** (फा. पु.) पिवळा चांफा.
**सोनटका** (प्रा. पु.) सोन्याचें नाणें; एका जातीचें फूल.
**सोनताव** (पु.) सोनें तापविल्यावर तें पाण्यांत न बुडवितां तसेंच निवूं देणें; खरडपट्टी काढणें. [ दोरी.
**सोनदोर** (पु.) मोटेच्या सोंडेस बांधण्याची
**सोनपितळ** (स्त्री.) चकाकित पितळ, धातु.
**सोनमळी** (स्त्री.) उंसाचा रस कढवितांना ढोरमळीच्या नंतर येणारी मळी.
**सोनवणी** (न.) सोनें तापवून तें बुडविलेलें पाणी. हें आजारी माणसास व बाळंति-णीस पिण्यास देतात.
**सोनवी** (प्रा. स्त्री. न.) निशाण.
**सोनसळा, सोनसळी** (वि.) पिंवळया रंगाचे पट्टे असलेलें; पिंगट रंगाचें; (पु.) जरतारी पितांबर किंवा लुगडें; उत्तम प्रतीचा गहूं.
**सोनामुखी** (हिं. स्त्री.) एक रेचक औषधी.
**सोनार** (सं. सुवर्णकार पु.) सोन्यानांदीचे दागिने वगैरे घडविणारा. **सोनारानें कान टोंचणें**—तिऱ्हाइतानें कानउघाडणी करणें.

**सोनें** (सं. सुवर्ण न.) पिवळ्या रंगाची जड व मोलवान् अशी एक धातु; दसऱ्याच्या दिवशीं सीमोल्लंघन करून आल्यावर इष्टमित्रांस वांटण्यासाठीं आणलेलीं आपट्याचीं पानें. **एकाद्याचें सोनें होणें**—मरणोत्तर उत्तमगति प्राप्त होणें; **सोन्याचा दिवस**—आनंदाचा दिवस; **सोन्याचा धूर निघणें**—अतिशय श्रीमंती येणें; **सोन्याहून पिवळें**—फार उत्तम.

**सोनुला** (वि.) लाडका (मुलगा).

**सोनेरी** (वि.) सोन्याची, सोन्यासारखी दिसणारी. **सोनेरी टोळी**—दुसऱ्याला हरतऱ्हेनें फसवून लुबाडणारी धाडशी लोकांची टोळी. [अलंकार व०.

**सोनेंवानें** (न.) सोनें व दुसरे मौल्यवान्

**सोनेळ, सोनेळें** (न.) सोनकेळें.

**सोन्या** (वि.) लाडक्या मुलाची संज्ञा.

**सोप** (पु. न.), **सोपट** (न.) केळीची साल; तिची चिधोटी; साप.

**सोप, सोपट** (प्रा. वि.) फोल, निष्फळ; लटकें (ज्ञा० १६।१२२).

**सोपणें** (हिं. क्रि.) संपणें; स्वाधीन करणें.

**सोंपविणें** (क्रि.) दुसऱ्याकडे देणें.

**सोंपरी** (वि.) निमुळती.

**सोपस** (स्त्री.) हाव; इच्छा. (वि.) नीटनेटका.

**सोपस्कार** (पु.) एकाद्या गोष्टीच्या पूर्णतेला लागणाऱ्या साधनांची सिद्धता; संस्कार; अतिशय जपणूक.

**सोपा** (पु.) ओवरी; ओटी; गोठा; पडवी; (वि.) सहज समजण्यासारखा, स्वल्प.

**सोपाधिक विवर्त** (सं. पु.) जो विवर्त (भ्रम) ज्ञान झालें तरी उपाधि आहे तोंपर्यंत दिसतोच तो (उदा० मृगजळ).

**सोपान** (सं. पु. न.) जिना, शिडी; पायरी.

**सोपारा** (प्रा. वि.) सोपें, सुलभ.

**सोंपीव** (वि.) सोंपविलेलें.

**सोंपीव खातें** हिंदुस्थानच्या राज्यकारभारांतलें हिंदी दिवाणाकडे देण्यांत आलेलें खातें.

**सोपु** (प्रा. वि.) व्यर्थ. [(वि.) स्वल्प.

**सोपें** (न.) शाईत बुडवून ठेविलेली चिंधी;

**सोफ** (हिं. वि.) लटकें, फोल.

**सोफा** (इं. पु.) वेतानें विणलेला पलंग; कोच.

**सोबकणें** (क्रि.) वस्त्र धुतांना हलकेंच आपटणें.

**सोंबट, सोंमट** (वि.) किंचित् उष्ण (पाणी, दूध, आजाऱ्याचें अंग इत्यादि).

**सोबणी** (स्त्री.) पिशाचबाधेमुळें शरिराला येणारी कृशता.

**सोबत** (अर. सोहबत स्त्री.) संगत; बरोबर येणारा मनुष्य. [स्नेही, मित्र.

**सोबती** (पु.) बरोबर येणारा मनुष्य;

**सोंबटी** (स्त्री.) सोंगटी, सोंकटी.

**सोम** (सं. पु.) चंद्र; एक लता; तिचा रस; एक यज्ञ; (प्रा.) अमृत; (वि.) सौम्य; थंड.

**सोमकांत** (सं. पु.) चंद्रकांतमणि.

**सोमट** (सं. सोमल वि.) कोंबट, किंचित् उष्ण, सोमळ.

**सोमनाथ** (पु.) बारा ज्योतिर्लिंगांपैकीं एक; काठेवाडांतील शंकराचें प्रसिद्ध देऊळ.

**सोमप** (सं. पु.) सोम पिणारा.

**सोमयाग** (सं. पु.) ज्यांत सोमरस पितात असा एक विशेष प्रकारचा यज्ञ.

**सोम्यागोम्या** (वि.) बिनमहत्त्वाचा माणूस.

**सोमयाजी** (सं. पु.) सोमयाग करणारा.

**सोमरस** (पु.) सोमवल्लीचा रस (हा यज्ञांत प्राशन करतात).

**सोमल** (अर. पु.) एक प्रकारचा विषारी क्षार. [आलेली अमावास्या.

**सोमवती** (सं. सोमव्रत स्त्री.) सोमवारीं

**सोमवंश** (सं. पु.) चंद्रापासून उत्पन्न झालेला एक पुराणप्रसिद्ध क्षत्रियवंश.

**सोमवार** (सं. सोमवासर पु.) रविवारच्या पुढचा दिवस.

**सोमसिद्धान्त** (सं. पु.) शैवांतला एक पंथ.

**सोमसूत्र** (सं. न.) शिवलिंगाच्या तीर्थाचा पन्हळ.

**सोमसूत्री प्रदक्षिणा** (स्त्री.) शिवाला प्रदक्षिणा घालतांना सोमसूत्रापर्यंत येऊन परतावयाचें व उलट दिशेनें जाऊन पुनः सोमसूत्रापर्यंत यावयाचें अशा रीतीनें सोमसूत्राला न ओलांडतां केलेली प्रदक्षिणा.

**सोमळ** (सं. सोमल वि.) सोमट; कोंबट, किंचित उष्ण.
**सोमासा, सोमोला** (पु.) कंठीं चंद्रहार वगैरे अलंकाराचे निरनिराळे पदर जेथें एकत्र होतात ते.
**सोमाळा** (सं. सोमल वि.) सोमळ.
**सोय** (स्त्री.)आश्रय, आधार;(अमृ० २।५०); सोई, अनुकूलता.
**सोयरगत** (स्त्री.) विवाहाच्या संबंधामुळें उत्पन्न झालेलें नातें.
**सोयरा** (पु.) नात्याचा माणूस; वेश्येचा यजमान.
**सोयराधायरा** (पु.)नात्यागोत्याचा मनुष्य.
**सोयरी** (स्त्री.) रखेल स्त्री, वेश्या.
**सोयरीक** (स्त्री.) विवाहसंबंध.
**सोर** (फा. शोर पु.) आकांत, अनर्थ (मुक्ते० आदि० १६।१०१); सोयरा; (सं. शूकर पु.) डुकर.
**सोरट** (पु.) सौराष्ट्र देशचा म्हणजे काठेवाडी मनुष्य; (वि.)दांडगा(राम-जो०पृ०३९).
**सोरठ** (हिं. पु. स्त्री.) गाण्यांतील एका रागाचें नांव; सारट पहा.
**सोरठाई** (स्त्री.) दांडगाई.
**सोरा** (फा. शारा पु.) सूर्यखार.
**सोरा, सोऱ्या**(पु.)कुरडया करण्याचा सांचा.
**सोरी** (प्रा. स्त्री.) डाव. [१९६).
**सोरू** (सं. शूकर पु.) डुकर (भा० १३।
**सोऱ्या** (पु.) सोरा पहा; चुलवणाच्या बुडाशीं राख पाडण्यासाठीं ठेविलेलें भोक.
**सोल** (पु.) दोरखंड, जाड दोर; (न.) कोकंवसोल,अमसूल; (इं.पु.)पायतणाला मारण्याचें जाड कातडें.
**सोलणें** (क्रि.) साल काढणें.
**सोला, सोलाणा** (पु.) सोललेला ताजा हरभरा, वाटाणा इत्यादि.
**सोलाट** (प्रा. वि.) सडासोट, फटिंग (एक० २७७१). [ अस्सल.
**सोलींव** (वि.)साल काढलेलें,अंतर्गाभ्यांतलें,
**सोव** (पु.) ढोंग, मिष, कोंग.
**सोवतें, सवतें** (प्रा. वि.) निराळें; (अ.) स्वतः, स्वाधीनपणें.
**सोवन, सोवनें** (न.) गवाक्ष, धुराडें.
**सोवळ** (सं. सोमल वि.) नाजूक, मऊ, ठिसूळ.
**सोंवळा** (सं. सुमंगल वि.) शुद्ध, पवित्र; अलिप्त. (विधवेनें) **सोवळी होणें**— केशवपन करणें.
**सोवळें** (न.)संध्या, देवपूजा इ० कर्माच्या वेळीं शुद्धतेनें राहतां यावें म्हणून इतर अमंगल पदार्थांपासून दूर ठेविलेलें धूत-वस्त्र, किंवा रेशमी अथवा लोकरीचें वस्त्र.
**सोवा** (प्रा. स्त्री.) मनांतल्या गोष्टी.
**सोवाणी** (प्रा. स्त्री.) गणना (ज्ञा० ११। ४२४).
**सोवाणें** (सं. सोपान न.) पायरी (ज्ञा० ११।४२४).
**सोशी** (वि.) सोस किंवा हाव असलेला, हावरा, लोभी.
**सोशीक** (वि.) सहनशील, सहिष्णु.
**सोस** (सं. शोष पु.) प्रबळ इच्छा, हाव.
**सोसणी** (प्रा. स्त्री.) हावरेपणा; विचार (भा० ४।१८).
**सोसणूक**(स्त्री.)सोसण्याची ताकद, सहन-शीलता.
**सोसणें** (क्रि.) सहन करणें; मानवणें.
**सोसमावशी** (स्त्री.) दागिन्यांचें हवें तेवढें ओझें सहन करण्यास तयार अस-लेली स्त्री.
**सोसाट, सोसाटा** (पु.) झपाटा.
**सोसायटी**(इं. स्त्री.)मंडळी, मंडळ, समाज.
**सोसाळू** (वि.) सहनशील.
**सोसाळें** (प्रा. न.) सोनें.
**सोसी** (वि.) हावरा, लोभी.
**सोसीक** (वि.) सोशीक, सहनशील.
**सोस्ती जमीन** जिच्यावर साऱ्याची पूर्ण आकारणी करण्यांत येते अशी जमीन.
**सोहनें** (न.)धुराडें, गवाक्ष.
**सोहपें** (प्रा. वि.) सोपें.
**सोहं** (सं. पु.) मीच ब्रह्म असा भाव.
**सोहनी** (पु.) गायनांतील एक राग.
**सोहलत** (अर. सहोलत स्त्री.) सुरळीत चाललेला व्यवहार; सवलत.

**सोहळा, सोहाळा** (प्रा. पु.) उत्साह (विवे० पू० ५।४०); उत्सव; मौज; लग्नादि शोभनसंस्कार; सुखदुःखादि संस्कार.
**सोहळें** (प्रा. न.) लीला, आनंदजनक खेळ.
**सोहाग** (हिं. पु.) सौभाग्य.
**सोहागी** (स्त्री.) सवागीक्षार.
**सोहोरत** (स्त्री.) सोय; सोपेपणा; सुलभता.
**सोळकी** (स्त्री.) जड धोंडा, तुळया, इ० उचलण्यासाठीं लागलेल्या गड्यांची टोळी; (वि.) जें उचलावयाला सोळा गडी लागतात असें (ओझें.)
**सोळन्हाण** (न.) लग्नापासून सोळाव्या दिवशींचें वधूवरांचें स्नान.
**सोळभोंक** (पु.) अडमुठा, रानवट, दांडगेश्वर, खुशालचंद.
**सोळा आणे** उत्कृष्ट; भरपूर, पक्के.
**सोळा संस्कार** संस्कार या शब्दाखालीं दिलेली सोळा संस्कारांची यादी पहा.
**सोळूला** (वि.) सोळा पायल्यांचा (मण).
**सोळें** (प्रा. न.) सोळा रुपये भावाचें उत्तम सोनें (ज्ञा० १७।५४).
**सोक्षमोक्ष** (पु.) भिजत पडलेल्या व्यवहाराचा बरावाईट निकाल.
**सौकट** (प्रा. पु.) कोष्टयाचा माग.
**सौकर्य** (सं. न.) सोपेपणा; कौशल्य.
**सौंगडा–डी** (पु. स्त्री.) सवंगडी.
**सौगन्द** (फा. स्त्री.) शपथ.
**सौत्र** (सं. वि.) सूत्रासंबंधीं.
**सौजन्य** (सं. न.) चांगुलपणा.
**सौत्रामणी** (सं. पु.) एक प्रकारचा सूत्रकथित यज्ञ.
**सौतें, सवतें** (सं. क्रि. वि.) स्वतंत्रपणें; (वि.) वेगळा, स्वतंत्र.
**सौदणी** (प्रा. पु.) सवंगडी (मुक्ते० रामा० ६।१०७).
**सौंदणी** (स्त्री.) कपडे भिजवून ठेवण्याचें परटाचें भांडें; नदी; सरोवर(हरि० वि० १।८३).
**सौंदर** (प्रा. वि.)सुंदर (ज्ञा० १४।२०२).
**सौंदर्य** (सं. न.) सुंदरपणा, लावण्य, रूप.
**सौदा, सवदा** (फा. पु.) व्यापार; माल.
**सौदागर** (फा. पु.) व्यापारी.
**सौदामिनी, सौदामनी, सौदाम्नी** (सं. स्त्री.) वीज; अतिशय चमकणारी विद्युल्लता.
**सौदावणी** (प्रा. स्त्री.) सौदा, खरेदी.
**सौध** (सं. पु.) चुनेगच्ची; राजवाडा.
**सौधव** (प्रा. न.) भव्य मंदिर.
**सौभग** (प्रा. न.) सौंदर्य; सौभाग्य.
**सौभाग्य** (सं. न.) सुदैव; सुवासिनीत्व.
**सौभाग्यतंतु** (पु.) मंगळसूत्र.
**सौभाग्यद्रव्य** (सं. न.) हळद, कुंकू, शेंदूर इत्यादि.
**सौभाग्यवती** (सं. स्त्री.) सुवासिनी.
**सौभाग्यदायन, सौभाग्यवाण** (न.) स्वतःला सौभाग्य चिरकालपर्यंत लाभावें म्हणून सुवासिनी स्त्रिया सौभाग्यद्रव्यांचें ब्राह्मणांस वाण देतात तें.
**सौभाग्यसुंठ** (स्त्री.) एक औषध.
**सौमनस्य** (सं. न.) स्नेहभाव.
**सौमंगल्य** (सं. न.) शुभ, मंगल. [बुध.
**सौम्य** (सं. वि.) मृदु; हलकें; साधें; (पु.)
**सौम्यवार** (सं. सौम्यवासर पु.) बुधवार.
**सौर** (प्रा. वि.) शूर; (पु.) योद्धा (भा० १६।१२८); (सं. वि.) सूर्यासंबंधाचें.
**सौरदिवस** (पु.) सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंतचा काळ. [कन्या.
**सौरभेयी** (सं. स्त्री.) गाय; कामधेनूची
**सौरभ्य** (सं. न.) सुगंध; कीर्ति.
**सौरमान** (सं. न.) सूर्याच्या गतीवरून काल मोजण्याची पद्धति.
**सौरमास** (सं. पु.) सूर्याच्या गतीवरून ठरविलेला महिना.
**सौरवर्ष** (सं. न.) एखादा ऋतु आल्यापासून पुनः तो ऋतु येईपर्यंत जाणारा काळ.
**सौरस, सौरसु** (प्रा. पु.) प्रसाद, गोडी; यत्न; आसक्ति (एक० १५६५; ना० ६५७); योग्यता (ज्ञा० ११।६१८).
**सौरस्य** (सं. न.) सुरसपणा; प्रेमभाव.
**सौरी** (सं. स्त्री.) सूर्याची स्त्री; स्त्रीवेषधारी नपुंसक; मुरळी; (वि.) निर्लज्ज.
**सौर्य** (सं. न.) तेज. [सवलत पहा.
**सौलत, सोहलत, सवलत** (स्त्री.) सोहलत;

**सौलभ्य** (सं. न.) सुलभता, सोपेपणा.
**सौष्ठव** (सं. न.) उत्कृष्टपणा; सौंदर्य; चपलता.
**सौहार्द** (सं. न.) मित्रत्व, स्नेहभाव; आवड.
**सौहृद** (सं. न.) मैत्री, सख्य.
**स्कंद** (सं. पु.) षडानन, कार्तिकस्वामी; विभाग.
**स्कंध** (सं. पु.) खांदा; झाडाचें खोड; फांदी; ग्रंथाचा प्रत्येक मोठा भाग; ज्ञानशाखा.
**स्कूल** (इं. न.) शाळा.
**स्क्रू** (इं. पु.) मळसूत्र, पेंच, फिरकी.
**स्खलन** (सं. न.) घसरणें; गळून पडणें, भ्रंश; अडखळणें; चूक, दोष.
**स्टांप** (इं. पु.) तिकीट, शिक्का; छाप; शिक्याचा कागद, रोखा.
**स्टेशन** (इं. न.) ठिकाण, चौकी; आगगाडी थांबण्याचें ठिकाण.
**स्टेशनरी** (इं. स्त्री.) लिहिण्यासंबंधाचें सामान (कागद, शाई, टाक इ०).
**स्टोअर** (इं. न.) कोठार, संग्रहस्थान.
**स्टोव्ह** (इं. पु.) गॅसवर किंवा रॉकेलवर चालणारी शेगडी किंवा चूल.
**स्तन** (सं. पु.) थान.
**स्तनपान** (सं. न.) थान चोखणें.
**स्तनित** (सं. न.) मेघगर्जना.
**स्तन्य** (सं. न.) दूध.
**स्तंब** (सं. पु.) समूह; कांड.
**स्तबक** (सं. पु.) गुच्छ; ग्रंथाचा भाग.
**स्तंबेरम** (सं. पु.) हत्ती.
**स्तब्ध** (सं. वि.) कुंठित; निश्चल; निःशब्द; उगा. [असणें.
**स्तब्धणें** (प्रा. स्त्री.) थांबणें; निश्चल
**स्तंभ** (सं. पु.) खांब; वृक्षाचें खोड; कुंठितावस्था; जडता.
**स्तंभक** (सं. वि.) थांबविणारें.
**स्तंभन** (सं.न.) प्रतिबंध; प्रवाह; थांबविणें; नियमन, निग्रह.
**स्तर** (सं. पु.) थर; पडदा.
**स्तव** (सं. पु.) स्तुति, स्तोत्र, प्रशंसा; (अ.) साठीं, कारणें, करितां.
**स्तवणें** (क्रि.) स्तुति करणें, प्रशंसा करणें.
**स्तवन** (सं. न.) स्तुति, स्तोत्र, प्रशंसा.
**स्तुति** (सं. स्त्री.) प्रशंसा, स्तोत्र.
**स्तुतिपाठक** (सं. पु.) भाट; खुशामत करणारा.
**स्तुत्य** (सं. वि.) वाखाणण्याजोगें; प्रशंसनीय.
**स्तूप** (पु.) बुद्धाच्या अवशेषावर बांधलेली विशिष्ट आकाराची इमारत.
**स्तिमित** (सं. वि.) मंद; स्थिर; चकित झालेला.
**स्तेय** (सं. न.) चोरी.
**स्तोता** (सं. पु.) स्तुति करणारा.
**स्तोत्र** (सं. न.) स्तुति, प्रशंसा; प्रशंसापर गद्य किंवा पद्यरचना.
**स्तोम** (सं. पु.) स्तुति; ढीग, रास, समूह. **स्तोम माजविणें**—फाजील स्तुति करून एखाद्याचा नसता गौरव करणें.
**स्त्री** (सं. स्त्री.) भार्या, बायको; मादी.
**स्त्रीचरित्र** (न.) स्त्रीची वागणूक.
**स्त्रीधन** (सं. न.) स्त्रीची हक्काची मालमत्ता (लग्नाच्या वेळीं वधूला मिळालेले दागिने वगैरे).
**स्त्रैण** (सं. वि.) स्त्रीलंपट; स्त्रीच्या स्वाधीन असणारा.
**स्थ** (सं. वि.) राहणारा.
**स्थंडिल** (सं. न.) यज्ञासाठीं तयार केलेली जमीन; ओटा.
**स्थपति** (सं. वि.) मुख्य; श्रेष्ठ; अधिपति; शिल्पशास्त्रवेत्ता; सुतार; सारथि; अन्तःपुररक्षक.
**स्थल** (सं. न.) जागा, ठिकाण; जमीन.
**स्थलचर** (सं. वि.) जमिनीवर हिंडणारा.
**स्थलमार्ग** (सं. पु.) जमिनीवरचा रस्ता; खुष्कीचा रस्ता.
**स्थलांतर** (सं. न.) थारेपालट.
**स्थविर** (सं. वि.) म्हातारा.
**स्थळ** (सं. स्थल न.) जागा, ठिकाण; उपवर मुलीला देण्यायोग्य वर.
**स्थाणु** (सं. पु.) मेढ, खांब, खुंट.
**स्थातव्य** (सं. न.) थोडा वेळ मुक्काम.
**स्थान** (सं.न.) ठिकाण, राहण्याची जागा; प्रसंग; (व्याकरणांत)—वर्णोच्चार जेथून होतो तो शरिराचा भाग.

**स्थानक** (सं. न.) देऊळ; स्टेशन.
**स्थानभ्रष्ट** (सं. वि.) काढलेला.
**स्थानमहात्म्य** (सं. न.) एकाद्या स्थानाच्या अंगचा असा एखादा विशेष गुण कीं त्याच्या योगानें त्या स्थानावर किंवा पदावर आरूढ झालेल्या सामान्य माणसाचाहि लोकांच्या मनावर प्रभाव पडावा.
**स्थानापन्न** (सं. वि.) स्थानावर स्थापन केलेला.
**स्थानिक, स्थानीक** (सं. वि.) कांहीं विशिष्ट स्थानासंबंधाचा.
**स्थानिक स्वराज्य** (न.) गांवसभा; (इं.) म्युनिसिपालिटी.
**स्थापक** (सं. वि.) स्थापणारा.
**स्थापणें** (क्रि.) ठेवणें; उभारणें; व्यवस्था लावणें; सिद्ध करणें; लावणें, एकाग्र करणें.
**स्थापना** (सं. स्त्री.) स्थिर करण्याची क्रिया; नेमणूक, प्राणप्रतिष्ठा.
**स्थापत्य** (सं. न.) शिल्पविद्या.
**स्थायिक** (सं. वि.) टिकाऊ, कायमचा.
**स्थायी** (सं. वि.) राहाणारा, असणारा. टिकणारा.
**स्थायीभाव** (सं. पु.) साहित्यशास्त्रांत— विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या योगानें व्यक्ततेप्रत आल्यामुळें ज्या मनोविकारास रस ही संज्ञा प्राप्त होते तो मनोविकार.
**स्थायी समिति** (स्त्री.) संस्थेचें नियंत्रण करणारी लहान अधिकारी समिति.
**स्थाली** (सं. स्त्री.) पाक-पात्र, अन्न शिजविण्याचें भांडें.
**स्थावर** (सं. वि.) स्थिर, निश्चल.
**स्थावर जिंदगी** (स्त्री.) घरें, शेतें, बगीचे इ० न हलवितां येण्यासारखी मालमत्ता.
**स्थावरणें** (क्रि.) स्थिर होणें, आश्रय मिळणें; गेलेली शक्ति किंवा पत परत येणें. [ असलेला.
**स्थित** (सं. वि.) राहिलेला, आधार धरून
**स्थिति** (सं. स्त्री.) असणें, राहणें, थांबणें; अवस्था, दशा; रीति.
**स्थितिस्थापक** (सं. वि.) लवचीक, ताणल्यानें लांब होऊन सोडल्यावर पुनः पूर्वस्थितीवर येणारें.
**स्थिर** (सं. वि.) निश्चल, शांत; निश्चयी.
**स्थिरता** (सं. स्त्री.) स्थैर्य, कायमपणा.
**स्थिरस्थावर** (वि.) गडबड जाऊन शांत स्थितीला आलेलें. [ टिकणें.
**स्थिरावणें** (क्रि.) स्थिर होणें, थांबणें,
**स्थूल** (सं. वि.) मोठें, लठ्ठ,जाडें; ठोकळ.
**स्थूलदेह** (सं. पु.) पंचभूतात्मक शरीर.
**स्थूलबुद्धि** (वि.) जडबुद्धि.
**स्थूलमान** (सं. न.) ठोकळ मान.
**स्थूळ, स्थूळदेह, स्थूळमान** स्थूल, स्थूलदेह, स्थूलमान पहा.
**स्थूलमुद्रित** (न.) छापण्यासाठीं जुळविलेल्या मजकुराची कच्ची प्रत.
**स्थैर्य** (सं. न.) स्थिरता, निश्चलपणा, शाश्वतपणा.
**स्थौल्य** (सं. न.) स्थूलपणा, लठ्ठपणा.
**स्नात** (सं. वि.) आंघोळ केलेला.
**स्नातक** (सं. पु.) सोडमुंज झालेला ब्रह्मचारी; पदवीधर.
**स्नान** (सं. न.) आंघोळ, नहाणें.
**स्नानसंध्याशील** (सं. वि.) स्नान, देवपूजा, जपजाप्य इ० गोष्टी नेमानें करणारा.
**स्नायु** (सं. पु.) प्राण्याला गति किंवा चलनवलनाची शक्ति देणारा व वाटेल तेव्हां संकुचित किंवा ढिला करतां येण्यासारखा त्याच्या शरिरांतला तंतुयुक्त भाग.
**स्निग्ध** (सं. वि.) तेलकट, तुपट; ओशट; तुळतुळीत; मऊ; सौम्य; प्रेमयुक्त.
**स्नुषा** (सं. स्त्री.) सून.
**स्नेह** (सं. पु.) तेल; प्रेम; मैत्री.
**स्नेहाकर्षण** (सं. न.) एकाच प्रकारचे दोन परमाणू एकत्र ठेवणारी शक्ति.
**स्नेहाळ** (वि.) स्नेहशील, प्रेमळ.
**स्नेही** (सं. पु.) मित्र, सखा.
**स्पर्धा** (सं. स्त्री.) वरचढ होण्याची इच्छा, चढाओढ, मत्सर.
**स्पर्धी** (सं. पु.) मत्सरी, चढाओढ लावणारा.

**स्पंज** (इं. पु.) समुद्रांत किड्यांपासून उत्पन्न झालेला व छिद्रें असलेला मऊ, स्थितिस्थापक पदार्थ.
**स्पर्श** (सं. पु.) संपर्क, संयोग, शिवाशीव.
**स्पर्शणें** (क्रि.) स्पर्श करणें, लागणें.
**स्पर्शमणि** (सं. पु.) परिस.
**स्पष्ट** (सं. वि.) उघड, असंदिग्ध.
**स्पष्टवक्ता** (सं. पु.) मनांत कांहीं लपवून न ठेवतां उघडपणें बोलणारा.
**स्पष्टीकरण** (सं. न.) उघड करून सांगणें; विशदीकरण.
**स्पृश्य** (सं. वि.) स्पर्श करण्यास योग्य.
**स्पृष्ट** (वि.) स्पर्श झालेलें.
**स्पृहणीय** ( सं. वि. ) इच्छिण्याजोगें, प्रशंसनीय.
**स्पृहयालु** (सं. वि.) इच्छिणारा; उत्सुक.
**स्पृहा** (स्त्री.) इच्छा, आकांक्षा.
**स्पिरीट** (इं. न.) एक प्रकारची दारू; (वि.) उत्साह.
**स्प्रिंग** (इं. स्त्री.) स्थितिस्थापकत्वाचा गुण अंगीं असलेली पोलादी कमान.
**स्फटिक** (सं. पु.) पलूदार खडा; कांतियुक्त पारदर्शक दगडाची एक जात.
**स्फाटिक** (सं. वि.) स्फटिकाचा केलेला.
**स्फोति** (सं. स्त्री.) प्रतिष्ठा, प्रशंसा; थोरपणा, वैभव, उत्कृष्टपणा.
**स्फुंज** (प्रा. पु.) गर्व.
**स्फुंजणें** (क्रि.) स्फुंदणें, मुसमुसणें.
**स्फुट** (सं. वि.) विकसित, उघड; स्पष्ट; किरकोळ.
**स्फुंद** (सं. पु.) अभिमान.
**स्फुंदणें** (क्रि.) मुसमुसणें, हुंदके येणें.
**स्फुरण** (सं. न.) फुरफुरणें, कंप, स्फूर्ति, आवेशाचा संचार. [येणें; सुजणें.
**स्फुरणें** (क्रि.) कंप पावणें; मनांत एकाएकीं
**स्फुलिंग** (सं. पु.) विस्तवाची ठिणगी.
**स्फूर्ति** (सं. स्त्री.) स्फुरण, प्रादुर्भाव, एकाएकीं सुचणें.
**स्फोट** (सं. पु.) फुटणें; वाच्यता.
**स्फोटक** (पु.) फोड; (वि.) एकदम फुटणारें.
**स्मर** (सं. पु.) मदन.
**स्मरण** (सं. न.) आठवण, स्मृति, चिंतन.
**स्मरणवही** (स्त्री.) स्मरणार्थ टांचणें केलेलें पुस्तक.
**स्मरणी** (स्त्री.) जपमाळ. [योग्य.
**स्मरणी** (सं. वि.) स्मरणांत ठेवण्यास
**स्मरणें** (क्रि.) आठवणें, मनांत आणणें, चिंतन करणें.
**स्मरार, स्मरारि** (सं. स्मरादि पु.) शिव.
**स्मशान** (सं. श्मशान न.) मसणवटी.
**स्मार्त** (वि.) स्मृतींना अनुसरणारें.
**स्मारक** ( सं. न. ) एकाद्याची आठवण देणारें त्याच्यासंबंधाचें कृत्य.
**स्मित** (सं. न.) गालांत हंसणें.
**स्मृति** (सं. स्त्री.) स्मरण, आठवण; स्मरणशक्ति; धर्मशास्त्र; कायद्याचा ग्रंथ.
**स्मृतिशेष** (सं. वि.) फक्त आठवणींत राहिलेलें; नष्ट.
**स्यंदन** (सं. पु.) रथ; युद्धरथ.
**स्यमंतक** (सं. पु.) सत्राजितानें कृष्णास दिलेला मणि. [द्रोण० २०४).
**स्याला** (सं. श्यालक पु.) मेहुणा (मोरो०
**स्रग्धरा** (सं. स्त्री.) एका वृत्ताचें नांव; याच्या एकेका चरणांत २१ अक्षरें व म, र, भ, न, य, य, य हे गण असतात.
**स्रजणें** (सं. सृज् क्रि.) निर्माण करणें.
**स्रवणें** (क्रि.) पाझरणें.
**स्रष्टा** (सं. पु.) निर्माणकर्ता, ब्रह्मदेव.
**स्राव** (सं. पु.) पाझर, प्रवाह, झरा.
**स्रोत** (सं. पु.) प्रवाह.
**स्लेट** (इं. स्त्री.) दगडी पाटी.
**स्व** (सं. वि.) स्वतःचें, आपलें; आपण.
**स्वकर्म** (सं. न.) स्वतःचें करावयास हवें असें काम; कर्तव्यकर्म.
**स्वकपोलकल्पित** (सं. वि.) स्वतःच्या डोक्यांतून काढलेलें, स्वतःच्या कल्पनेनें रचिलेलें.
**स्वकीय** (सं. वि.) स्वतःचें.
**स्वच्छ** (सं. वि.) निर्मळ; स्पष्ट; साफ.
**स्वच्छंदी** (सं. वि.) स्वेच्छाचारी, स्वतंत्र.
**स्वजन** (सं. पु.) भाऊबंद.
**स्वतः** (सं. सर्व अ.) आपण; आपण होऊन; स्वभावतः.

**स्वतंत्र**(सं. वि.) दुसऱ्याच्या अधीन नसलेला; निराळा.
**स्वतंत्रता** (सं. स्त्री.) स्वातंत्र्य, मुखत्यारी; स्वच्छंदीपणा.
**स्वतां** (अ.) स्वतः [हक्क.
**स्वत्व** (सं. न.) स्वतःची मालकी, मालकी
**स्वदस्तूर** (न.) स्वतःची सही; स्वतः लिहिलेला मजकूर.
**स्वदेश** (सं. पु.) स्वतःचा देश.
**स्वदेशी** (वि.) स्वदेशांत उत्पन्न झालेलें.
**स्वदेशीव्रत** (सं. न.) स्वतःच्या देशांत उत्पन्न झालेल्या वस्तूच वापरावयाच्या, परदेशांतल्या नाहींत, असा केलेला दृढ नियम.
**स्वन** (सं. न.) आवाज, ध्वनि.
**स्वपरभाव** (सं. पु.) आपपरभाव.
**स्वप्न** (सं. न.) मनुष्याला निद्रावस्थेंत असतां जागृतींतल्याप्रमाणें सृष्टींतल्या गोष्टींचा होणारा भास; मनाच्या जाणिवेची एक स्थिति. [करणारा.
**स्वप्नद्रष्टा** (वि.) नवीन गोष्टींचें आकलन
**स्वप्नावस्था** (सं. स्त्री.) स्वप्नाची स्थिति; स्वप्नामध्यें होणारा वीर्यपात.
**स्वप्नाळू** (वि.) काल्पनिक गोष्टींत रममाण होणारा. [प्रकृति.
**स्वभाव** (सं. पु.) प्रकृतिगुण; सहजधर्म;
**स्वभावचित्र**(न.) थोडक्यांत केलेलें व्यक्तिवर्णन (एक वाङ्मय-प्रकार).
**स्वभावतः** (सं. अ.) नैसर्गिक गुणामुळें, साहजिकपणें, साहजिक रीत्या.
**स्वभावोक्ति** (सं. पु.) एका अर्थालंकाराचें नांव; जेथें जात्यादिकाच्या ठायीं राहणारा स्वभाव वर्णिला असतो तेथें हा अलंकार होतो.
**स्वयं** (सं. अ.) स्वतः, अंतःस्फूर्तीनें.
**स्वयंनिर्णय** (सं. पु.) आपल्यावर कोणी कसें राज्य करावें, राज्यपद्धति कशाप्रकारची असावी इ० गोष्टी स्वतः ठरविणें.
**स्वयंपाक** (सं. पु.) सैंपाक, अन्न शिजविणें.
**स्वयंपाकी** (सं. पु.) सैंपाक करणारा; अन्न शिजविणारा, आचारी.
**स्वयंभ** (सं. स्वयंभू वि.) स्वयंभू, मूळचा.
**स्वयंभू** (सं. वि.) स्वतः उत्पन्न होणारा, स्वतःसिद्ध, मूळचा.
**स्वयंमन्य** (वि.) आपलेंच म्हणणें खरें मानणारा. [विधि.
**स्वयंवर** (सं. पु.) स्वतः पति निवडण्याचा
**स्वयंसेवक** (पु.) स्वतः होऊन लोककार्य करणारा.
**स्वयें** (अ.) स्वतः, आपण होऊन; स्वतःच्या स्फूर्तीनें.
**स्वर** (सं. पु.) ध्वनि, आवाज; गायनांत —षड्ज, मध्यम, धैवत इ० सप्त सूर; वेदमंत्राच्या उच्चारांतले आघात; नाकपुड्यांवाटे वाहणारा वायु; (व्याकरणांत)—ज्याचा उच्चार स्वतंत्रपणें म्हणजे दुसऱ्या वर्णाच्या साह्यावांचून होतो तो वर्ण.
**स्वरमेळ** (पु.) दोन किंवा अधिक स्वरांचा मिलाफ.
**स्वरशूल** (सं. पु.) सूर लावण्याचें यंत्र.
**स्वरसप्तक** (सं. न.) गायनांत—षड्ज, ऋषभ, गांधार, मध्यम, पंचम, धैवत व निषाद यांचा समूह.
**स्वरसाम** (सं. पु.) गायनांतले सप्त स्वर.
**स्वराज्य** (सं. न.) मूळ अर्थ स्वतःचें राज्य. पण मराठ्यांच्या इतिहासांत भिन्न भिन्न काळीं भिन्न भिन्न अर्थ प्राप्त झाले. शिवाजी महाराजांच्या बालपणीं स्वराज्य म्हणजे शहाजी राजाची पुण्याजवळची जहागीर असा अर्थ होता; पुढें हिंदुपदपादशाही असा अर्थ झाला; व शाहू महाराजांच्या सुटकेनंतर त्यांच्या पदरांत पडलेलें राज्य असा मर्यादित अर्थ होऊन, आतां लोकांच्या हितासाठीं लोकांनीं नेमिलेल्या अधिकाऱ्यांनीं लोकमतास अनुसरून चालविलेली राज्यपद्धति असा व्यापक अर्थ झाला आहे.
**स्वरूप** (सं. न.) रूप, आकार, ढब; प्रकृति, स्वभाव; लावण्य, सौंदर्य.
**स्वरूपता, सरूपता** (स्त्री.) चार मुक्तींपैकीं एक.
**स्वरूपवान्** (वि.) सुंदर, देखणा.

**स्वर्ग** (सं. पु.) देवाचें वसतिस्थान; देवलोक. **स्वर्ग दोन बोटें उरणें**—गर्वानें फुगून जाणें; **स्वर्गाला हात पोंचणें**—इच्छिलेलें अतिशय उच्च पद प्राप्त होणें; कृतकृत्य होणें; **स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं**—स्वतः कष्ट केल्याशिवाय इष्टफलप्राप्ति होत नाहीं.
**स्वर्ण** (सं. न.) सोनें.
**स्वर्णकार** (सं. पु.) सोनार.
**स्वर्णदी** (सं. स्त्री.) भागीरथी; आकाश–गंगा.
**स्वर्लोक** (सं. पु.) स्वर्गलोक.
**स्वल्प** (सं. वि.) फार थोडें, क्षुल्लक, सोपें.
**स्ववश** (सं. वि.) स्वतंत्र.
**स्वसणें** (सं. श्वस् क्रि.) श्वास टाकणें.
**स्वसा** (सं. स्त्री.) वहीण. [मिळणारें.
**स्वस्त** (वि.) सवंग, कमी किंमतीस
**स्वस्ताई** (स्त्री.) सवंगपणा.
**स्वस्ति** (सं. अ.) कल्याण; उत्कर्ष, क्षेम (आशीर्वादाचा एक प्रकार.). [आकृति.
**स्वस्तिक** (सं. न.) 卐 असें चिन्ह किंवा
**स्वस्तिवाचन** (सं. न.) व्रत, शांति वगैरे मंगलकार्याच्या आरंभीं करण्याचा एक विधि, पुण्याहवाचन.
**स्वस्तिक्षेम** (सं. अ.) त्रास, गडवड इ० कांहीं न होतां कुशल किंवा यथास्थित असणें.
**स्वस्थ** (सं. वि.) तृप्त, सुखी; निरोगी; उगा, स्तब्ध; निश्चल, शांत.
**स्वस्थता** (सं. स्त्री.) गडवडीचा अभाव, शांतपणा, सुख; निश्चलता.
**स्वस्थावणें** (क्रि.) शांत होणें.
**स्वागत** (सं. न.) या बसा म्हणणें, आदरसत्कार.
**स्वाड** (वि.) बरा, चांगला, शुभ; हा शब्द द्वाड याच्या उलट अर्थाचा आहे.
**स्वातंत्र्य** (सं. न.) स्वाधीनता, स्वतंत्रता.
**स्वाती** (सं. स्त्री.) पंधरावें नक्षत्र. [सुगंध.
**स्वाद** (सं. पु.) गोडी, चव, रुचि; आमोद,
**स्वादिष्ट** (वि.) रुचकर; आमोदयुक्त.
**स्वादु** (सं. वि.) चवदार; गोड; रमणीय, सुंदर; प्रिय, आवडता.
**स्वादुपिंड** (पु.) पचनास पोषक रस देणारी पोटांतील ग्रंथी.
**स्वाधीन** (सं. वि.) स्ववश, स्वतंत्र, स्वतःच्या हातांतलें, कवज्यांतलें.
**स्वाध्याय** (सं. पु.) वेदाभ्यास, वेदपठन.
**स्वानंद** (सं. पु.) आत्मानंद; ब्रह्मानुभव.
**स्वाभाविक** (सं. वि.) स्वभावसिद्ध; नैसर्गिक.
**स्वाभिमान** (सं. पु.) स्वतःविषयींचा अभिमान; दुसऱ्यानें निष्कारण केलेल्या उपमर्दाची असहिष्णुता; तेजस्विता.
**स्वाम** (सं. स्वामी पु.) स्वामी, धनी, मालक. [मालकी हक्क.
**स्वामित्व** (सं. न.) मालकी, धनीपणा,
**स्वामिनी** (सं. स्त्री.) धनीण, मालकीण.
**स्वामी** (सं. पु.) संन्यासी; मालक, धनी; (वि.) मुख्य, श्रेष्ठ.
**स्वायत्त** (सं. वि.) स्वाधीन, स्ववश.
**स्वार** (अर. सवार पु.) राऊत; घोडा, उंट इ० वर आरूढ झालेला मनुष्य.
**स्वारस्य** (सं. न.) गोडी, चांगुलपणा, मर्म, खुबी. [स्वर्गलोक.
**स्वाराज्य** (सं. न.) परब्रह्मस्वरूपीं मिळणें;
**स्वारी** (फा. स्त्री.) घोडा, उंट इ० वर आरूढ झाल्याची स्थिति; डामडौल, सरंजाम; कोणत्याहि वाहनावर आरूढ झालेला मनुष्य; राजा, सरदार इ० थोर व्यक्ति; मिरवणूक; प्रेतयात्रा; एका पेचाचें नांव; मोहीम.
**स्वार्थ** (सं. पु.) स्वतःचा फायदा, स्वतःचा मतलब; व्याकरणांत—जेथें क्रियापदानें एकाद्या गोष्टीचें विधान साक्षात् होतें म्हणजे एकादी गोष्ट आहे किंवा नाहीं इतकें मात्र समजतें तेथें असणारा अर्थ.
**स्वार्थत्याग** (सं. पु.) स्वार्थावर किंवा स्वतःच्या मतलबावर पाणी सोडणें; स्वहितावर तिलांजलि देणें.
**स्वार्थपर, स्वार्थपरायण** (सं. वि.) स्वतः–चेंच हित पहाणारा, मतलबी.
**स्वार्थी** (सं. वि.) मतलबी, आपलपोट्या.
**स्वास्थु** (प्रा. पु.) स्वस्थपणा.

**स्वास्थ्य** (सं. न.) स्वस्थपणा, समाधान; आरोग्य; आराम.
**स्वाहा करणें** गिळून टाकणें.
**स्वाहाकार** (सं. पु.) देवतांना अग्नीच्या द्वारें हविर्भाग देणें.
**स्वाक्षरी** (स्त्री.) सही; स्वदस्तुर.
**स्वीकार** (सं. पु.) घेणें; अंगीकार; संमति; कबुली.
**स्वीकारणें** ( क्रि. ) घेणें, अंगीकारणें, संमति देणें.
**स्वीकृत** (सं. वि.) घेतलेलें, अंगीकारलेलें.
**स्वीय** (सं. वि.) आपलें, स्वतांचें.
**स्वेच्छ** (सं. वि.) स्वतांच्या लहरीनें वागणारा. [ लहर.
**स्वेच्छा** (सं. स्त्री.) स्वतांची इच्छा किंवा
**स्वेच्छाचार** (सं. पु.) स्वच्छंदीपणाचें आचरण.
**स्वेतु** (सं. सेतु पु.) सेतु, पूल.
**स्वेद** (सं. पु.) घाम; वाफ.
**स्वैर** (सं. वि.) स्वच्छंदी, अमर्याद.
**स्वैरिणी** (सं. स्त्री.) स्वच्छंदी स्त्री; व्यभिचारिणी.

---

# ह

ह मराठी व्यंजनमालेंतील तेहेतिसावें व्यंजन
**हं** (उद्गारवाचक अ.) ठीक ! समजलें ! पुरें ! पुढें !
**हक, हक्क** (अर. पु.) हक्क.
**हक होणें** मरणें.
**हकनाक, हकनाहक्क** (फा. हक नाहक अ.) सकारण म्हणा, किंवा निष्कारण म्हणा; न्यायानें म्हणा किंवा अन्यायानें म्हणा; अविचारानें (होना० पृ० ११५).
**हकमहकमात** (फा. अने.) राज्यकर्ते.
**हकणें, हाकणें** (क्रि.) घोडा, बैल वगैरे चालविणें; संसार, धंदा इ० चालविणें; हेका धरणें; प्रसृत करणें.
**हकलाजिमा** (पु.) न्यायाचा हक्क.
**हकाटा, हकाटी** हाकाटा, हाकाटी पहा.
**हकारणें, हाकारणें** (क्रि.) नाव, होडी इ० हांकणें, चालू करणें; बोलावणें.
**हकालणें** (क्रि.) हाकणें, काढून लावणें, हाकून देणें. [ लावणें.
**हकालपट्टी** (स्त्री.) हाकून लावणें, काढून
**हकाहाक** (स्त्री.) ओरड; आरडाओरडा; गवगवा.
**हकिकत, हकीकत, हकिगत, हकीगत** (फा. स्त्री.) वर्णन; गोष्ट, घडलेलें वर्तमान. [ पहा.
**हकीगत** (फा. हकीकत स्त्री.) हकिकत
**हकीम** (फा. पु.) वैद्य; (फा. हाकीम. पु.) मुख्य अधिकारी.
**हक्क** (प्रा. वि.) खाऊन पचलेलें.
**हक्क** (अर. हक पु.) स्वत्व, मालकी; परंपरागत न्यायाची मागणी. **हक्काटकांत येणें**—तावडींत सांपडणें, आटोक्यांत येणें.
**हक्कजवारी** (स्त्री.) हक्कदारपणा.
**हक्कदार** (फा. पु.) हक्क असलेला, वांटेकरी.
**हक्करूसूम** (फा. पु.) देशमुख, देशपांडे इ० वतनदारांचे हक्क वगैरे.
**हग** (सं. हद् पु.) विष्ठा, मळ, गू.
**हगटणें, हगणें** (सं. हद् क्रि.) विष्ठा शरिराबाहेर टाकणें. [हगण्याची जागा.
**हगंदरी, हगदारी** (स्त्री.) गांवच्या लोकांची
**हगरा** (वि.) वारंवार हगणारा; भित्रा.
**हगरी** (स्त्री.), **हगरें** (न.) हगण्यास बसण्यासाठीं केलेली उंच जागा.
**हगरें** (न.) गुऱ्हाळांत भोंवऱ्यांतली राख बाहेर काढण्याचा चर.
**हगलें-मुतलें** (न.) बारीकसारीक गोष्ट.
**हगवण** (स्त्री.) वारंवार शौचास होणें; आमांश.
**हगविणें** (क्रि.) हगायला लावणें; घाबरवून सोडणें; हाणून पाडणें, रडकुंडीस आणणें.
**हगाड** (स्त्री.) हगण्याची सर्वसामान्य जागा.
**हंगाम** (फा. पु.) मोसम, ऋतु.
**हंगामशीर** (अ.) हंगाम चालू असतां.
**हगामा** (फा. पु.) कुस्त्यांची दंगल.
**हंगामा** (फा. पु.) अशांतता, गडबड; धिंगाणा; आरडाओरड करून केलेला हल्ला; नाश.

... पुणर वा...

**हंगामी** (वि.) हंगामापुरता, तात्पुरता.
**हगिरडा** (वि.) हगणें झाल्यावर ढुंगण न धुतलेला; घाणेरडा. [भाषण.
**हंगें तंगें** (न.) असंबद्ध, उडवाउडवीचें
**हगेरें** (न.) विष्ठेनें भरलेलें वस्त्र.
**हंच त्वंच, हंचा त्वंचा** (स्त्री.) रागानें एकेरीवर येऊन केलेला वाद किंवा भांडण; असभ्यपणाची बोलाचाली.
**हजवी** (स्त्री.) जनावराच्या पाठीवरून पैसे नेण्यासाठीं केलेली मध्यें तोंड असलेली, लांब, दुहेरी पडशीसारखी पिशवी.
**हजर, हजरजबाबी, हजरनीस** हाजिर, हाजिरजबाबी, हाजिरनीस इ० शब्द पहा.
**हजरत, हज्रत** (अर. पु.) राजा, पैगंबर, इमाम इ० ना लावावयाची बहुमानाची पदवी.
**हजाम** (अर. पु.) न्हावी.
**हजामत** (अर. स्त्री.) श्मश्रु, डोक्यावरचे व चेहेऱ्यावरचे केस काढणें; खरडपट्टी.
**हजार, हज्जार** (फा. पु.) शंभराच्या दसपट संख्या.
**हजारा** (फा. पु.) सोंगट्याच्या खेळांतली एक संज्ञा; पुष्कळ छिद्रें राखलेलें कारंजास लावण्याचें तोंड.
**हजारी** (फा. स्त्री.) हजारा शब्दाचा दुसरा अर्थ पहा; (पु.) हजार सेनेवरचा अधिपति. [उडतात असें कारंजें.
**हजारी कारंजें** (न.) पुष्कळ धारा ज्यांतून
**हजारों, हजारोंहजार** (वि.) हजारांनीं मोजतां येण्यासारखें.
**हजिबा, हजिम्मा, हजिमा** (अर. हजिमत पु.) अतिशय गर्दी; अतिशय गडबड; फजिती.
**हजिर, हजिरी** हाजीर, हाजिरी पहा.
**हट** (सं. हठ पु.) हट्ट, आग्रह; (सं. हट्ट पु.) बाजार, जत्रा.
**हटक**(स्त्री.)हाक, आरोळी, कोणेकाशीं बोलण्यासाठीं त्याला चालतांना थांबविणें.
**हटकणें** (हिं. क्रि.) लसकारणें, बोलावणें, थांबविणें.
**हटकरी** (पु.) बाजारचा माणूस.
**हटकून** (अ.) हट्टानें, मुद्दाम, अवश्य.
**हटकोरी** (पु.) हटकरी पहा.
**हटणें** (सं. हत् क्रि.) मागें सरणें; पराभव पावणें; पळीच्या बोंडानें डाळ, पुरण इ० ठेंचून चूर्ण करणें; अहाटणें.
**हट तट** (पु.) हट्ट, हट्टाचें बोलणें; आग्रह.
**हटतटीं** (प्रा. अ.) तडकाफडकीं. [चौक.
**हटवट** (प्रा. पु.) भाजीबाजार; बाजारचा
**हटवाद** (पु.) हेकेखोरपणा.
**हटवादी** (वि.) हट्टी, हेकेखोर.
**हटविणें** (क्रि.) मागें सारणें.
**हटाऊ** (वि.) हलकट मनुष्य.
**हटातटानें** (अ.) हेकेखोरपणानें; बलात्कारानें (रामजोशी पृ० ८७).
**हटिया** (प्रा. वि.) हट्टी मनुष्य.
**हटी** (प्रा. वि.) निग्रही, हठयोगी.
**हटीं** (प्रा. अ.) हटकून; निश्चयानें.
**हटें तटें** (प्रा. अ.) हटकून; जबरीनें.
**हटेला** (वि.) हट्टी, दुराग्रही, हेकेखोर.
**हट्ट** (सं. हठ पु.) दुराग्रह, हेका; (सं. हट्ट पु.) बाजार. [खोरपणा.
**हट्टवाद** (सं. पु.) अतिदुराग्रह, हेके-
**हट्टी** (सं. स्त्री.) लहानसा बाजार किंवा जत्रा; एकाच जातीच्या किंवा धंद्यांतल्या माणसांच्या घरांचा समुदाय; गांवाजवळची भिल्ल, लुटारू इ० लोकांची वस्ती.
**हट्टी** (वि.) हेकेखोर.
**हठयोग** (सं. पु.) प्राणवायूचा निरोध करून त्याच्या द्वारें चित्तवृत्तीची एकाग्रता करण्याचा एक प्रकार योगशास्त्रांत सांगितला आहे तो.
**हड** (पु.) पाणमांजर; (स्त्री.) पाण्यांत उगवणाऱ्या वनस्पतींची दाटी; (अ.) कुत्र्याला हाकून लावतांना उच्चारण्याचा शब्द. [तडाखा देणें.
**हडकणें** (क्रि.) वाळणें, सुकणें; जोराचा
**हडकीहडोळा** (पु.) गांवच्या महाराच्या हक्काबद्दलची इनाम जमीन.
**हडकुळा, हडक्या** (वि.) ज्याचीं हाडें हाडें निघालीं आहेत असा, अतिशय कृश.
**हडक्या ऊंस** (पु.) रस थोडा पण गोड असलेला ऊंस.

**हडंगा, हडगा** (वि.) वायकांत वसणें, वायकांशीं गप्पा मारणें इत्यादिकांची ज्याला फार आवड असा; रांडचा-राघोजी.
**हडद** (स्त्री.), **हडदा** (पु.), **हडदें** (न.) मोठें कुटुंब किंवा पाहुण्यांची गर्दी यामुळें होणारी अडचण, कष्ट, खस्त.
**हडप** (न.) गहाण; पानदान; (वि.) गहाळ; गुप्त.
**हडपणें** (क्रि.) वारा घालणें, फुंकणें, झाडणें.
**हडपा** (पु.) पंखा; मोठा पेटारा; जिन्या-वरचें वाटेल तेव्हां बंद करण्याचें तोंड किंवा दार.
**हडपी, हडपेकरी** (प्रा. पु.) विडा लावून देणारा नोकर (भा० ९।१५७).
**हडबड** (हिं. स्त्री.) गोंधळ, वडवड, धांदल.
**हडबडणें** (क्रि.) गोंधळून जाणें.
**हॅंडबिल** (इं. न.) हस्तपत्रक.
**हडवंग** (पु.) मत्सरयुक्त स्पर्धा. [लागणें.
**हडवंगणें** (क्रि.) क्षीण होणें, हाडें दिसू
**हडवंगी** (वि.) हेकट; हेकेखोर.
**हडवळा, हाडोळा** (पु.) महाराला इनाम दिलेली जमीन; अशा जमिनीवरचें सरकारला द्यावें लागतें तें देय.
**हडस** (वि.) मजबूत हाडाचा कणखर, निरोगी.
**हडसणी** (स्त्री.) हातमागांतली फणी.
**हडसणें** (प्रा. क्रि.) जोरानें ओढणें, हिसडा देणें; आवळून बांधणें; वजाविणें.
**हडसून खडसून** (अ.) पूर्णपणें वजावून; निश्चयपूर्वक; जोरानें.
**हडहड** (स्त्री.) धुडकावणी.
**हडहडणें** (क्रि.) सुकणें, वाळणें, कृश होणें.
**हडळ, हडळी** (स्त्री.) जखीण, स्त्रीचें पिशाच.
**हंडा** (सं. हंड पु.) मोठ्या तोंडाचें मोठें भांडें; गर्भसुती लुगडें.
**हंडी** (सं. स्त्री.) स्वैपाकांतलें लहान भांडें; भांड्याच्या आकाराचें कांचपात्र.
**हंडीबाग** (हिं. पु.) गारुडी वगैरे लोकांचा हस्तक छोकरा.
**हडुक** (न.) लहान हाड.
**हडुंग, हडोंग** (पु. न.) अडथळा, हरकत, व्यत्यय.
**हडूक** (न.) लहान झाड.
**हडेलहप्पी** (स्त्री.) धटिंगणपणा.
**हडोळा** (पु.) गांवच्या महाराला निर्वाहा-साठीं दिलेली जमीन.
**हडोळी** (स्त्री.) हडळ पहा.
**हडौती** (प्रा. स्त्री.) गळ्याखालील हाडांचा खळगा (ज्ञा० ६।२८७).
**हड्यावर्ण** (पु.) हाड्यावर्ण पहा.
**हणगोबा** (पु.) मूर्ख, अडाणी, सुस्त मनुष्य.
**हणणें** (सं. हन् क्रि.) मारणें; तडाखा देणें; ठार मारणें.
**हणमंत, हनुमंत** (सं. पु.) मारुति.
**हणवटी** (सं. हनु स्त्री.) हनु, चेहऱ्याचें खालचें टोंक.
**हणवी** (प्रा. स्त्री.) हनुवटी.
**हणा** (फा. स्त्री.) घोड्याच्या जिनाची सोंड.
**हत** (सं. वि.) मारलेला, नाश पावलेला.
**हतगा, हातगा, हादगा** (पु.) एक झाड; शेवगा.
**हततुक** (प्रा. स्त्री.) अटकळ.
**हतभाग्य** (सं. वि.) दुर्दैवी.
**हतरूं, हतिरूं** (प्रा. न.) हत्ती.
**हतवसणें** (प्रा. क्रि.) हस्तगत करणें (भा० २८।२९९).
**हतवा** (पु.) केशरानें किंवा कुंकवानें भरलेल्या हातानें स्त्रीनें भिंतीवर उठ-विलेलें चिन्ह.
**हतवीर्य** (सं. वि.) ताकद नष्ट झालेला; दुर्बळ, नामर्द.
**हतश्री** (सं. वि.) ज्याचें वैभव नष्ट झालें आहे असा.
**हताश** (सं. वि.) निराश, दुर्बळ.
**हतासन** (प्रा. न.) मिष, निमित्त.
**हतियार, हतियेर, हतेर** (हिं. हथयार न.) शस्त्र, हत्यार.
**हतेर, हत्यार** (हिं. न.) शस्त्र; साधन.
**हतोडा, हातोडा** (हिं. हथोडा पु.) लहान घण.
**हतोडी** (स्त्री.) लहान हातोडा.

**हत्ता** (पु.) व्यायामशाळेंत दंड काढण्याच्या वेळीं हात टेकण्याकरितां विटेचे किंवा लाकडाचे ठोकळे किंवा लहान लहान ओटे केलेले असतात ते.
**हत्ती** (सं. हस्ती पु.) गज; हस्त नांवाचें नक्षत्र. **हत्तीचें मढें**—अवाढव्य बोजड प्रकरण; **दारांत हत्ती झुलणें**—वैभवाचा कळस होणें; **हत्तीच्या पायानें जाणें**—फार सावकाश जाणें.
**हत्तीखाना** (पु.) गजशाला; हत्ती ठेवण्याची जागा.
**हत्तीण** (स्त्री.) हत्तीची मादी.
**हत्या** (सं. स्त्री.) वध, हिंसा; हिंसेचें पातक; मरतुकडा मनुष्य.
**हत्यार** (हिं. हाथियार न.) शस्त्र, आयुध.
**हत्यारबंद** (हिं. वि.) शस्त्रांनीं सज्जित.
**हत्यारा** (सं. हत्याकार पु.) हत्या करणारा.
**हत्यारी** (वि.) हत्यारबंद.
**हदगा** (पु.) एक पुष्पवृक्ष.
**हदनहदून** (फा. स्त्री.) सीमा; मर्यादा.
**हदरणें** (क्रि.) हालणें; कंप पावणें.
**हदाल, हदाळ** (वि.) प्रचंड; मोठा; स्थूल.
**हदीस्** (अर. स्त्री.) पैगंबराचें वाक्य.
**हदोळ विदोळ** (प्रा. वि.) चळवळ्या; (स्त्री.) चळवळ.
**हद्द** (अर. हद् स्त्री.) सीमा; मर्यादा; पराकाष्ठा.
**हन** (प्रा. अ.) आणखी; हि.
**हनन** (सं. न.) वध; हिंसा; ठार मारणें.
**हनवट** (पु.) स्त्रियांचें एक पादभूषण.
**हनु, हनुवटी** (स्त्री.) हनवटी, तोंडाच्या खालच्या जबड्याचा पुढील भाग.
**हनुमज्जयंती** (सं. स्त्री.) चैत्र शु० १५.
**हनुमंत, हनुमान्** (सं. पु.) मारुति.
**हपका** (पु.) शितोडा; जोरानें पाणी शिंपडणें.
**हपशी** (अर. पु.) अबिसिनिया देशचा रहिवासी.
**हपसाण** (पु.) दक्षिण कोंकणांतला हबशी राजाच्या ताब्यांतला मुलूख.
**हपाप** (पु.) शिव्याशाप. **ह० चा माल गपापा**—जुलमानें दुसऱ्याकडून काढलेलें द्रव्य येतें तसें लवकर नाहींसें होतें.
**हपापणें** (क्रि.) हाव धरणें; लोभी दृष्टि ठेवणें.
**हपापी** (स्त्री.) भय, भीति.
**हपूस** (पोर्तु. अल्फान्सो पु.) एक उत्कृष्ट जातीचा आंबा.
**हप्ता** (फा. हफ्ता पु.) एकदम देतां न येणाऱ्या रकमेचा ठराविक मुदतीनें थोडथोडा देण्याकरितां ठरविलेला भाग; किस्तबंदी; आठवडा.
**हप्तेबंदी** (स्त्री.) हप्त्या हप्त्यानें रकम फेडण्याचा ठराव.
**हबक** (स्त्री.) धक्का बसण्याची जागा; व्यवसायांत येणारा तोटा; लचांड, त्रास.
**हबकणें** (क्रि.) जोरानें हलविणें; आपटणें; गर्जना करणें.
**हबका** (पु.) धक्का; व्यापारांतलें नुकसान; जोरानें पाणी वगैरे शिंपडणें.
**हंबरडा** (पु.) गाईचें ओरडणें; आक्रोश.
**हंबरणें** (क्रि.) गाईबैलाचें ओरडणें.
**हबसी** (अर. पु.) अबिसिनिया देशचा रहिवासी.
**हबसी, हबसाण** हपशी, हपसाण पहा.
**हबा** (अ.) खंडोबाच्या वाघ्याचा ओरडण्याचा शब्द.
**हंबिर, हंबीर** (प्रा. पु.) थोर पुरुष, अमीर; योद्धा (रामजो० पृ० १०८).
**हंबे तुंबे** (हिं. स्त्री. न.) अरे तुरे.
**हबेलंडी** (हिं. आबेलंडी स्त्री.) दुर्दशा, घाबरगुंडी.
**हमखास** (अर. आमखास अ.) प्रसिद्धपणें; निश्चयपूर्वक, खात्रीनें.
**हमजात** (फा. स्त्री.) सर्व जातीच्या किंवा प्रकारच्या लोकांचा जमाव.
**हमरस्ता** (फा. आमरस्ता पु.) रहदारीचा सार्वजनिक रस्ता.
**हमराई** (फा. स्त्री.) हुशारी, लायकी.
**हमरी-तुमरी** (हिं. स्त्री.) अरे तुरे; जोराचें भांडण.
**हमरू** (फा. आमरू पु.) किनारीदार रेशमी वस्त्र.
**हमशाई** (फा. स्त्री.) शेजारपाजार.
**हमामखाना** (अर. फा. पु.) स्नानगृह.
**हमामदस्ता** (फा. पु.) खलबत्ता.

हमामा (पु.) एक खेळ; घुमरचक्री; अव्यवस्थितपणें घातलेली रास.
हमाल (अर. पु.) ओझें वाहणारा मजूर.
हमाली (स्त्री.) हमालाचा धंदा; त्याची मजुरी. [पिशवी.
हमिचा (पु.) पैसे ठेवण्याची कातड्याची
हमिणी, हमिनी, हमेणी (फा. हमिनी स्त्री.) पैसे ठेवण्याचा कसा.
हमी (अर. हामी स्त्री.) जिम्मा, जामिनकी.
हमीदार (फा. पु.) जामीन राहणारा.
हमीधुमीचा (वि.) थाटामाटाचा.
हमु (प्रा. पु.) अहंकार.
हमेणी (स्त्री.) हमिणी पहा.
हमेश, हमेशा (फा. अ.) नेहमीं, सतत.
हम्रू (फा. पु.) घोडा फिरविणारा.
हय (सं. पु.) घोडा, अश्व.
हयकत (स्त्री.) हाल, अपेष्टा.
हयगई, हयगय (स्त्री.) दुर्लक्ष, हेळसांड.
हयवान (अर. पु. स्त्री. न.) पशु, जनावर.
हयात (अर. स्त्री.) आयुष्य, उमर; (वि.) जिवंत. [वादी.
हयासा (फा. पु.) खोगिराची चामड्याची
हर (सं. पु.) शिव, शंकर; (समासांत उत्तरपदीं वि.) हरण करणारा; (फा. वि.) प्रत्येक.
हरएक (फा. वि.) प्रत्येक.
हरक (सं. पु.) चोर, लुटारू; हरणकर्ता.
हरक (पु.) एक प्रकारचें कापसाचें कापड.
हरकत (अर. स्त्री.) विरोध; प्रतिकूल वर्तन; अडचळा, विलंब; खोटी.
हरकसबी (हि. वि.) हरएक कौशल्याचें काम करणारा.
हरकामी (वि.), हरकाम्या (पु.) जें पडेल तें काम करणारा. [वार्ताहर.
हरकार, हलकारा (फा. पु.) जासूद;
हरकी, हर्की (सं. हर्ष स्त्री.) दावा आपल्यासारखा झाला असता हर्षानें सरकारास द्यावयाचा नजराणा; हरवलेली वस्तु परत देणारास द्यावयाची बक्षिसी.
हरकीपत्र (न.) न्यायकचेरींत हरणारापासून द्रव्य घेण्याविषयींचें पत्र.
हरख, हरिख (सं. हर्ष पु.) मोठा आनंद.
हरखी (स्त्री.) हरकी पहा.
हरगिज (फा. अ.) सर्वथा; नेहमीं.
हरजिनशी (वि.) सर्व प्रकारचा.
हरडें (सं. हृदय न.) कारवाराकडे—अंतःकरण.
हरण (सं. न.) अपहार; (हिं. स्त्री.) ऐरण; (हरिण पु. न.) मृग.
हरणी (सं. हरिणी स्त्री.) हरिणाची मादी.
हरणें (क्रि.) उपटणें, नेणें, अपहार करणें; निवारणें; पराभव पावणें.
हरताळ (सं. हरिताल स्त्री.) एक पिवळें द्रव्य; (हि. हाटताल) दुकानें बंद ठेवणें, व्यवहारबंदी. ह० लावणें—रद्द करणें.
हरताळका (सं. हरितालिका स्त्री.) भाद्रपद शु. ३ च्या दिवशीं सुवासिनी स्त्रिया पार्वतीची पूजा करतात ती.
हरदम (फा. अ.) नेहमीं, क्षणोक्षणीं.
हरदास (सं. हरिदास पु.) कथेकरी.
हरदासी तट्टू (न.) हडकुळें, पोट खपाटीं गेलेलें, मंदगतीनें चालणारें तट्टू.
हरदू, हरदो (फा. वि.) दोघे; दोन्ही पक्षांचे.
हरदूमुसना जुमला (अर. अ.) हरवलेली सनद पुनः करून देते वेळीं तिच्यावर लिहिण्याचा शेरा. [अभिप्राय.
हरद्र, हरिद्र (सं. हार्द न.) हृद्गत,
हरपणें, हर्पणें (क्रि.) हलवणें, गमावणें, नष्ट होणें.
हरपर रेवडी (स्त्री.) एक फळ. [ठपका.
हरफ, हरप, हर्फ (अर. पु.) अक्षर; दोष,
हरबरा, हरभरा (पु.) चणा, एक धान्यविशेष. **एकाद्याला ह०-च्या झाडावर चढविणें**—त्याची फाजील स्तुति करून भुलायला लावणें.
हरबहाणा (फा. पु.) हरएक प्रकारचें सोंग, ढोंग किंवा सबब.
हरंबळणें, हरमळणें (क्रि.) तळमळणें (विवे० ५०; ७।१९ दा० ३।७।३९).
हरमहाल (पु.) राणीवसा, जनानखाना.
हरमाळ (स्त्री.) जाणारायेणारांची रीघ; रांग.

**हरमोर** (स्त्री.) हरमाळ पहा.
**हरराजी, हराजी, हर्राजी** (अर. स्त्री.) लिलांव.
**हरला** (पु.) लहान हारा; वांबूची पाटी; पाण्याचा ओहळ; पाणी काढून लावण्यासाठीं खणलेला चर.
**हरवळ** (स्त्री.) माणसांची किंवा प्राण्यांची रांग; (वि.) खेळकर. [मृदु.
**हरवार, हरवाळ** (वि.) अरुवार, हलकें;
**हरविणें** (क्रि.) गमावणें, सांडणें; दुसऱ्याला पराभूत करणें.
**हरसाळ** (न.) लुटारूंच्या किंवा शत्रूंच्या विरुद्ध हातांत शस्त्रें घेऊन उठलेले शेतकरी.
**हरहमेश, हरहमेशा** (फा. अ.) नेहमीं.
**हरहरमहादेव** (अ.) निकराचा हल्ला करतांना मराठे उच्चारीत तो शब्द; पंगत जेवावयाला लागतेवेळीं उच्चारण्याचा शब्द. [किंवा युक्ति.
**हरहुन्नर** (न.) प्रत्येक प्रकारचें कौशल्य
**हरळ, हरळी** (प्रा. स्त्री.) खडा (ज्ञा० १५।२२); कसपट; रेती; हरळी; त्रासदायक चाकरी; चर.
**हरळणें** (क्रि.) फट ठेवणें.
**हरळा** (प्रा. स्त्री.) गारगोटी; (पु.) ओहळ, चर.
**हरळी** (स्त्री.) एक प्रकारचें वारीक गवत; दूर्वा; आरोळी, आक्रोश.
**हरा, हारा** (पु.) मोठी टोपली.
**हराम** (अर. वि.) अन्यायाचें, बेकायदेशीर, गैरशिस्त. [अप्रामाणिक.
**हरामखोर** (फा. वि.) लाचखाऊ, बेइमान,
**हरामखोरी** (फा. स्त्री.) अन्यायाची प्राप्ति, बेइमानीपणा; अप्रामाणिकपणा.
**हरामजादा, हरामी** (फा. वि.) लुच्चा, लवाड, दुष्ट.
**हरावल** (पु.) सैन्याची पिछाडी.
**हराश, हरास, हरासू** (सं. ऱ्हास पु.) ऱ्हास, क्षय (दासो० गीता० १३२२).
**हरि** (सं. पु.) विष्णु; सिंह; घोडा; माकड.
**हरिख** (सं. हर्ष पु.) हर्ष, अतिशय आनंद.
**हरिजन** (पु.) हिंदु समाजांतील अस्पृश्य समजल्या गेलेल्या जाति. [जाग्रण.
**हरिजागर** (सं. पु.) एकादशीच्या रात्रींचें
**हरिण** (सं. पु.) मृग.
**हरिणी** (सं. स्त्री.) हरिणाची मादी; एका छंदाचें नांव (याच्या चरणांत १७ अक्षरें व न, स, म, र, स हे गण असून शेवटीं अनुक्रमें लघुगुरु अक्षरें असतात).
**हरित** (सं. वि.) हिरवें.
**हरिताल** (सं. पु. न.) हरताळ; एक पिवळा खनिज पदार्थ.
**हरितालिका** (सं. स्त्री.) हरताळका पहा.
**हरिदास** (सं. पु.) हरदास; कथेकरी.
**हरिदिनी** (प्रा. स्त्री.) एकादशी.
**हरिद्र** (सं. हार्द्र न.) मनांतलें गुह्य; रहस्य.
**हरिद्रा** (सं. स्त्री.) हळद.
**हरिप, हरीफ, हरिपी, हरिप्या** (अर. वि.) धूर्त; कावेबाज; (पु.) शत्रु.
**हरिपाठ** (पु.) हरीच्या स्तुतिपर कवन.
**हरिभक्त, ह. भ. परायण** (सं. पु.) हरदास; कीर्तनकार, कथेकरी.
**हरिवासर** (पु.) द्वादशी तिथीचा प्रथम पाद; आषाढ, भाद्रपद व कार्तिक या महिन्यांतल्या द्वादशीचा व अनुराधा, श्रवण आणि रेवती या नक्षत्रांचा योग.
**हरिविठ्ठल** (सं. पु.) देवाचें नांव; संपूर्ण नाश.
**हरिहय** (सं. पु.) इंद्र.
**हरी, हार** (स्त्री.) ओळ, रांग.
**हरीख** (सं. हर्ष पु.) हर्ष, अत्यानंद.
**हरीप, हरीफ** (अर. वि.) लबाड, धूर्त; शौर्यादि गुणांमुळें दुसऱ्याचें दमन करण्यास समर्थ.
**हरीफाई, हरीफी** (अर. स्त्री.) शौर्य, धाडस.
**हरीतकी** (सं. स्त्री.) हिरडा.
**हरूख, हरूष** हरख, हरीख पहा.
**हरूषमात** (प्रा. स्त्री.) आनंदाची बातमी.
**हरूषतें** (वि.) हर्षित.
**हरेंवारें, हरेंहोरें** (न.) क्षणभंगुरता.
**हरोल, हरोळ** (हिं. हरोल पु.) सैन्याची पिछाडी. [करून नेणारा.
**हर्ता** (सं. वि.) निवारण करणारा, हरण

हर्ष (सं. पु.) अतिशय आनंद.
हर्षणें (सं. हृष् क्रि.) आनंदित होणें.
हर्षामर्ष (सं. पु.) रागलोभ; भांडण.
हर्षित (सं. वि.) आनंदित.
हल् (सं. न.) व्यंजन (व्याकरण).
हल (सं. पु.) नांगर.
हलक, हल्लक (अर. वि.) निःशक्त झालेला; (स्त्री.) गाणाऱ्याचा गळा.
हलकट (वि.) नीच, हलका.
हलकडी(स्त्री.)नथेंतल्या जोडीच्या खालचीं मोत्यें; झोपाळा टांगण्याची वरची कडी.
हलकल्लोळ (पु.) आरडाओरड; सुरांचा गोंधळ.
हलका (हिं. वि.) वजनांत कमी; कमी प्रतीचा; हलकट; (पु.) झोपाळा टांगण्याची कडी.
हलकारती (स्त्री.) आंत दिवे ठेवून देवाच्या मूर्तीपुढें ओंवाळावयासाठीं घेतात तें लांबोडें आणि उथळ पात्र किंवा तबक.
हलकारा, हरकारा (पु.) जासूद, निरोप्या.
हलकी (स्त्री.) खंजिरी, डफडी.
हलक्त (वि.) नाजूक, मऊ. [सुस्त,
हलगरजी, हलगर्जी (वि.) निष्काळजी, मंद.
हलधर (सं. पु.) बलराम.
हलयाणें(प्रा. क्रि.)हाणणें (ज्ञा० १६।१२५).
हलवा (अर.पु.) एक प्रकारची मिठाई; साखरेच्या पाकांत घोळलेले तीळ लवंगा वेलदोडे इत्यादि.
हलवाई (हिं. पु.) मिठाई बनविणारा.
हलहवाल (अर. पु. स्त्री.) कैफीयत; दुर्दशा.
हलाक, हलाख (अर. वि.) निःशक्त; थकलेला; दरिद्री.
हलाकी, हलाखी (स्त्री.) थकवा, शीण; निःसत्त्वपणा; दारिद्र्य.
हलायुध (सं. पु.) बलराम.
हलाल (अर. वि.) शुद्ध, चांगला, न्यायाचा; श्रमाचा; प्रामाणिक. ह० करणें— मुसलमान धर्मशास्त्राच्या नियमाप्रमाणें पशु मारणें. [भंगी, झाडू.
हलालखोर (पु.) निढळाचें खाणारा;
हलासिणें (प्रा. क्रि.) हणणें.
हली (सं. पु.) नांगऱ्या.
हलीहरामी (वि.) लबाडीचें, लबाड.
हलुवट (प्रा. वि.) हलकें.
हलूमालू (स्त्री.) कांकू.
हलेणें (प्रा. क्रि.) वडविणें.
हलोहाल (अ.) आतांच; याक्षणीं.
हल्या (सं. हल्या पु.) हेला, टोणगा.
हल्लक, हल्लाखी हल्लक हलाकी पहा.
हल्लर, हल्लरू (प्रा. पु न.) गीत, गाणें (ज्ञा० १२।७); अंगाई, जो जो.
हल्ला (अर. हमला पु.) एखाद्यावर तुटून पडणें, चढाई.
हल्लाळ (प्रा. न.) हालाहल विष.
हल्लीं (अ.) सांप्रत, आतां.
हवई, हवाई, हवायी (स्त्री.) हवाई पहा.
हवडा (पु.) कपटानें गिळंकृत करणें.
हवणें (प्रा. क्रि.) होम करणें.
हवदा हौदा पहा. [टाकणें.
हवन (सं. न.) होम, अग्नींत आहुति
हवरा, हावरा (वि.) अधाशी; मागरा.
हवलदार हवालदार पहा.
हवस (फा. पु.) उत्साह. [हरभरा.
हवळा, हुळा (पु.) भाजलेला हिरवा
हवळा (वि.) लोभी; अधाशी; नाजूक, कोमल.
हवा (अर. स्त्री.) वारा; शीतोष्णमान.
हवा, हावा, व्हावा ('होणें'चें एक विध्यर्थी रूप वि.) पाहिजे असा, जरूर; इष्ट.
हवाई (फा. स्त्री.)चंद्रज्योत; (वि.) अंतराळांतील.
हवाल (अर. अहवाल पु. स्त्री.) सद्यःस्थिति.
हवालणें (क्रि.) दुसऱ्याच्या स्वाधीन करणें; दुसऱ्यावर जबाबदारी टाकणें; हवाला देणें.
हवालत (स्त्री.) सोंपवणूक; टाकलेली जबाबदारी किंवा ठेवलेली भिस्त.
हवालदार (फा. पु.) शिपायांवरचा एक अंमलदार. [सुटलेला.
हवालदिल (फा. वि.) घाबरलेला; धीर
हवाला (अर. पु.) दुसऱ्याकडे सोंपविणें; ताबा; हमी; भिस्त. [१३२).
हवाव, हवावा (प्रा. स्त्री.) शोभा (ज्ञा० ६।

नगर

**हवावी** (स्त्री.) धापा.
**हवाशीर** (वि.) ज्यांत हवा खेळती राहते असें मुवलक हवेचें.
**हवि** (सं. हविस् न.) होमांत टाकण्याचें द्रव्य.
**हविष्य** (सं. न.) आहुतिद्रव्य.
**हवेली** (अर. स्त्री.) मोठा वाडा, राजवाडा; जहागीरदार, जमीनदार इ० नीं स्वतःकरितां राखून ठेविलेला भोंवतालचा प्रांत.
**हव्य** (सं. न.) यज्ञयागादि कर्म.
**हव्यकव** (सं. पु.) अग्नि.
**हव्यकव्य** (सं. न.) श्राद्धपक्ष, होम हवन इत्यादि कर्म.
**हव्यास** (अर. हवस पु.) उत्कट इच्छा, तृष्णा; छंद, नाद.
**हशम, हशाम** (फा. अहशाम न.) परिवार; लवाजमा; जिलीबीचे लोक.
**हशमतपन्हा** (फा. पु.) वैभवशाली; वडेजाव राखणारा.
**हशमदस्तगाह** (अर. वि.) ऐश्वर्यसंपन्न.
**हशमनवीस** (फा. पु.) किल्ल्यावरच्या शिवंदी फौजेची हजेरी वगैरे ठेवणारा अधिकारी.
**हशा** (पु.) मोठ्यानें खो खो हसणें.
**हशीखुशी** (स्त्री.) प्रसन्न मर्जी.
**हंशील** (न.) सरकार-देणें; तात्पर्य; राम.
**हंस** (सं. पु.) हंसपक्षी; परमात्मा; संन्याशांतला एक भेद; (वि.) श्रेष्ठ.
**हसकार, हसकारा** (पु.) अश्रु.
**हसडणें** (क्रि.) हिसका देणें; ओढणें; द्रव्य काढणें; खरडपट्टी काढणें.
**हंसडा** (पु.) हिसका, आचका; खरडपट्टी.
**हंसणें** (सं. क्रि.) हास्य करणें; नांवें ठेवणें.
**हंसतमुख** (वि.) उल्लसित, आनंदी वृत्तीचा.
**हंसता** (वि.) हंसणारा, उल्लसित, आनंदी.
**हसबी** (अर. स्त्री.) लांब, अरुंद पिशवी; पडशी.
**हंसरा** (वि.) सदोदित हंसणारा.
**हंसवाहन** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**हंसवाहिनी** (सं. स्त्री.) सरस्वती.
**हसळी** (हिं. स्त्री.) गळयांत घालण्याचा चांदी-सोन्याचा एक अलंकार.
**हंसी** (सं. स्त्री.) हंसपक्ष्याची मादी.
**हंसूं, हंसें** (न.) हास्य; उपहास.
**हस्त** (सं. पु.) सोंड; कोपरापासून पुढचा हात; चोवीस अंगुळाचें परिमाण; तेरावें नक्षत्र.
**हस्तक** (सं. पु.) हात; हाताखालचा; आज्ञांकित मनुष्य.
**हस्तकौशल्य** (सं. न.) हाताची कारागिरी
**हस्तगत** (सं. वि.) हातीं आलेलें, मिळालेलें, काबीज केलेलें.
**हस्तचापल्य** (सं. न.) हाताची चपळता.
**हस्तदोष** (सं. पु.) असावधानतेमुळें हातून घडलेली चूक.
**हस्तपगस्त** (फा. स्त्री.) बुद्धिबळाच्या डावांत एकदां प्याद्याला हात लाविला कीं तें खेळलेंच पाहिजे किंवा एकदां एखादें प्यादें एकाद्या जागीं नेऊन बसविलें कीं तेथेंच ठेविलें पाहिजे अशा कडक नियमानें खेळण्याचा डाव.
**हस्तपत्रक** (सं. न.) थोडक्यांत माहिती देणारें पत्रक.
**हस्तबूद** (वि.) पूर्णपणें स्वाधीन.
**हस्तमात्रा** (सं. स्त्री.) करभूषणें.
**हस्तलाघव** (सं. न.) हस्तकौशल्य.
**हस्तव्यवसाय** (पु.) हातानें करतां येण्याजोगा धंदा किंवा कलाकुसर.
**हस्तांदोलन** (न.) हातांत हात घालून केलेलें अभिवादन (इं. शेकहॅंड).
**हस्ताक्षर** (सं. न.) हातचें अक्षर; सही.
**हस्तिदंत** (सं. पु.) हत्तीचा दांत.
**हस्तिदंती** (सं. वि.) हस्तिदंताचें केलेलें.
**हस्तिनी** (सं. स्त्री.) हत्तीण; लठ्ठ व कामुक स्त्री.
**हस्ती** (सं. पु.) हत्ती; हस्तनक्षत्र.
**हस्तें** (अ.) हातानें; मार्फत.
**हस्तेंपरहस्तें** (अ.) स्वतःच्या हातानें किंवा दुसऱ्याकडून; प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष.
**हस्तोदक** (सं. न.) हातावर घेतलेलें पाणी; हस्तनक्षत्रांत पडलेल्या पावसाचें पाणी.
**हळ** (सं. हल पु.) नांगर; लांब व अरुंद चर; (स्त्री.) उष्ण वाऱ्याचा झोत.
**हळकणें** (क्रि.) सुकणें, वाळणें.

**हळकुंड** (सं. हरिद्राखंड न.) हळदीचें कुडें. **अर्ध्या ह० नें पिवळें होणें**—यत्किंचित् यशःप्राप्ति झाली असतां तिनें फुगून जाणें; **हळदीसाठीं लग्न मोडणें**—क्षुद्र बाबीवरून महत्कार्य बिघडूं देणें.
**हळद** (सं. हरिद्रा स्त्री.) हळकुंडाचें पीठ. **ह० लागणें**—विवाह होणें; मोठेपण प्राप्त होणें; दुर्मिळ होणें; **पी हळद हो गोरी**—सावकाशपणानें जी गोष्ट साध्य व्हावयाची तिच्या संबंधांत उतावळेपणा करून लागलीच फलाची अपेक्षा करण्याचा मूर्खपणा.
**हळदीकुंकूं** (न.) चैत्राच्या महिन्यांत व इतरहि कित्येक प्रसंगीं सुवासिनी स्त्रियांना व कुमारींना हळद, कुंकू इ. सौभाग्यद्रव्यें देतात तें. [समारंभ.
**हळदुली** (प्रा. स्त्री.) हळद लावण्याचा
**हळदुटणें, हळदुष्ण** (न.) सुनमुखानंतर वधूवर परस्परांस हळदकुंकू, पानसुपारी इ. देतात तो समारंभ.
**हळद्या** (पु.) काविळीसारखा एक रोग.
**हळबळा** (वि.) गोड व मनमिळाऊ स्वभावाचा.
**हळवट** (प्रा. वि.) नाजूक; हलका; मऊ; गोड स्वभावाचा; नापीक (जमीन); उथळ बुद्धीचा; लवकर परिपक्व होणारें.
**हळवा** (वि.) लवकर पिकणारें (धान्य); सुपीक.
**हळवार** (प्रा. वि.) हलका, मृदु, नाजूक.
**हळवारपण** (प्रा. न.) सूक्ष्मपणा, हलकपणा.
**हळवें** (सं. लघीयस् न.) लवकर म्हणजे नागपंचमीच्या अगोदर येणारें कित्येक धान्यांचें पीक.
**हळहळ** (स्त्री.) चित्ताची अस्वस्थता; हुरहुर; खेद; कळवळा.
**हळहळणें** (क्रि.) खेद किंवा शोक करणें; हुरहुर वाटणें.
**हळाहळ, हाळाळ** (न.) हालाहल विष.
**हळी** (प्रा. स्त्री.) बायकांचा डोक्यांत घालण्याचा एक दागिना (कळे पट्टी); टोपली.
**हळुमाळ, हलुमळ** (प्रा. वि.) नाजूक, मऊ.
**हळुवट** (प्रा. स्त्री.) हलका, मऊ, नाजूक; सौम्य; क्षुद्र; तिरस्करणीय; (न.) उणें, न्यून. [फार हळू.
**हळुवार** (प्रा. वि.) हलका; मृदु; (अ.)
**हळुवारणें** (प्रा. क्रि.) हलकें होणें.
**हळुवें** (वि.) हलकें.
**हळू** (वि.) हलका; किंचित; (अ.) सावकाश, मंदगतीनें; आस्ते.
**हळूहळू** (अ.) सावकाश, मंदगतीनें.
**हा** (सं. उ. वा. अ.) हायहाय; अरेरे!
**हाईस येणें** थकणें, जेरीस येणें.
**हाक, हांक** (स्त्री.) बोलावणें, आरोळी; हाकाटी. **हाक देणें**—बोलावल्याबरोबर येतों म्हणून धावून येणें; **हाक मारणें**—चरफडत राहणें.
**हाकणें** (क्रि.) चालविणें, काढून लावणें.
**हाकम** (हि. पु.) मुख्य अंमलदार.
**हाकटणें, हाकाटणें** (प्रा. क्रि.) हाक मारणें (वामन-राधाविलास ५३).
**हाकाटी** (स्त्री.) गोंगाट; बोभाटा.
**हाकारणें** (प्रा. क्रि.) हाक मारणें; चालू करणें, गति देणें.
**हाकारा** (प्रा. पु.) दौंडी, दरारा.
**हाकाहाक** (स्त्री.) हाकाटी.
**हाकिम** (अर. पु.) मुख्य अधिकारी; गव्हर्नर; वैद्य (वामन-विराट० ६।५७)
**हांगा** (पु.) मानभावी ग्रंथांत—अंग.
**हांगा** (अ.) कारवाराकडे—येथें.
**हाजरमजालस** (फा. स्त्री.) समक्ष भेट; दरबारांत हजर असलेले लोक.
**हाजिरी** (फा. स्त्री.) हजर असणें; प्रत्यक्षता, विद्यमानता.
**हाजिरजबाबी** (फा. वि.) समयसूचकता असलेला; विचारल्याबरोबर उत्तर देणारा. [आलेला.
**हाजी** (अर. पु.) मक्केची यात्रा करून
**हांजी हांजी** (हिं. स्त्री.) पुढें पुढें करणें; खुशामत. [घरोबा.
**हाजुमा** (अर. हज्म स्त्री.) दाट मैत्री,
**हाट** (सं. हट पु.) बाजार, हट्ट.
**हाटक** (सं. न.) सोनें.

**हाटकर** (प्रा. पु.) बाजाराचा (ना० २२३४).
**हाटकरस** (प्रा. पु.) शाई.
**हाटवका** (पु.) मानभावी ग्रंथांत—बाजारांत घेतलेलें सामान.
**हाटवट** (प्रा. पु.) बाजार.
**हाटवलें** (प्रा. वि.) हट्टी (भा० २०।२०४).
**हाटील** (हिं. वि.) हट्टी; आडदांड.
**हाटेल** (इं. न.) खानावळ, फराळाचें दुकान.
**हाड** (सं. हट्ट न.) अस्थि, हडूक. **हाडें भाजणें**—शेकणें; उजवणें; लग्न-संस्कार करणें; **हाडाचीं काडें करणें**—फार परिश्रम करणें; **हाडें मोडणें**—खिळखिळीं करणें—घुसळणें— त्रास देऊन बेजार करणें; **हाडांचा पिंजरा-सांपळा** (पु.)—हाडांचा सांगाडा.
**हाडकी** (स्त्री.) हाडूक; गांवांतलीं मेलेलीं जनावरें नेऊन टाकण्यासाठीं महाराला दिलेली जागा.
**हाडगळ** (वि.) हाडें निघालेलें, कृश.
**हाडपेर** (न.) अंगकाठी.
**हाडमोडी** (स्त्री.) बांडगुळासारखी एक वेल.
**हाडवैर** (न.) अत्यंत तीव्र व फार जुनें वैर.
**हांडोरा** (पु.) हांडा.
**हांडोरिया** (प्रा. वि.) अडाणी, अज्ञान.
**हाडोळा** (स्त्री.) महाराला दिलेली इनाम-जमीन.
**हाड्यावर्ण** (पु.) हाडांत खोल गेलेला व्रण.
**हाण** (सं. हानि स्त्री.) हानि, नुकसान.
**हाणणें** हणणें पहा.
**हाणमार, हाणामारी, हाणाहाण, हाणाहाणी** (स्त्री.) जोराची मारामारी.
**हाणी** (सं. हानि स्त्री.) तोटा, नुकसान.
**हात** (सं. हस्त पु.) हस्त, बाहु; कोपरा-पासून मधल्या बोटाच्या अग्रापर्यंतचें परिमाण; बाजू; ताबा; हस्तकौशल्य; कर्तृत्वशक्ति; अंग, डाव, खेळण्याची पाळी; एका पक्षांतले खेळणारे गडी; मदतनीस; हातानें दिलेला थर; तडाखा; हातासाठीं केलेलें टेकणें. **हात आटोपणें**—हातानें करण्याचें मारण्याचें वगैरे काम बंद करणें; **हात घालणें**—ढवळाढवळ करणें; करावयास घेणें; **हात चालणें**—हातांत पैसा येणें, सामर्थ्य असणें; **हात आखडणें**—देण्यासाठीं पुढें केलेली वस्तु एकाएकीं मागें घेणें; खर्च कमी करणें; **हात कापून देणें**—लेखी करार करून देणें; **हात टाकणें**—मारणें; **हात चेपणें**—लाच देणें; **हात जोडणें**—प्रार्थना करणें, नमस्कार करणें, अव्हेरणें; **हात झाडणें**—झिडकारणें; **हात दाखविणें**—वैद्याला प्रकृति दाखविणें; अंगांत सामर्थ्य किती आहे तें शत्रूच्या अनुभवास आणून देणें; **हात देणें**—मदत करणें; **हात धरणें**—वरचढ होणें; **हात धुवून पाठीस लागणें**—पिच्छा पुरविणें; **हात टाकणें**—पोहतांना पाण्यावर हात मारणें; **हात टेकणें**—थकणें; पराभव कबूल करणें; **हात देणें**—मदत करणें; तारणें; **हात पोंचणें**—कृतकृत्य होणें; **कपाळावर हात मारणें**—नशिबाला दोष देणें; **हाताला हात लावणें**—स्वतः कांहीं न करतां दुसऱ्यानें केलेल्या कामाच्या यशांत वांटेकरी होणें; **हात-पाय गाळणें**—धीर सोडणें; **हात मारणें**—ताव देणें; **हातीं धरणें**—आपल्या देख-रेखीखालीं घेणें; **हातावर पोट भरणें**—रोजमजुरी करून तिच्यावर रोजचा निर्वाह करणें; **हातावर शिर घेऊन लढणें**-स्वतःच्या प्राणाची पर्वा न करतां लढणें; **हातावर तुरी देणें**—उघडपणें फसवून पळून जाणें; **हातावर पाणी पडणें**—भोजनोत्तर आंचवणें; **हात राखून खर्च करणें**—काटकसरीनें खर्च करणें; **दोन हाताचे चार हात करणें**—लग्न करणें; **हात वाहणें**—धजणें; **हातीं कंकण बांधणें**—एखादें कार्य करण्याविषयीं प्रतिज्ञा करणें; **हात लावणें**—मदत करणें; **हातच्या हातीं**—तत्काळ; **हातचा मळ**—हाता-वरचा मळ काढून टाकण्यासारखें सहज करतां येण्याजोगें काम; **हात चोखणें**—तान्ह्या मुलाच्या हातांत चोखण्यासाठीं देण्याची वस्तु; **हातींपायीं येणें**-मरगळणें.

**हातउगावा** (पु.) एखाद्या कामांतून अंग काढून घेणें; सूड; कर्जाची उग्राणी.

**हातउचल** (स्त्री.) बँकेंतून स्वतःची रक्कम आतां थोडी मग थोडी अशा रीतीनें खर्चण्यास घेणें.

**हातउसणा** (वि.) थोडा वेळ उसना घेतलेला.

**हातउसणें** (न.) थोड्या मुदतींत परत करण्याच्या बोलीनें उसनी घेतलेली रक्कम.

**हातकरीण** (स्त्री.) स्तनाला हात लावतांच पान्हा सोडून दूध देणारी गाय किंवा म्हैस.

**हातखंडा** (हिं. वि.) निष्णात; (पु.) करतलामलकवत् झालेली विद्या.

**हातखुंटा** (पु.) हातमागाचा एक भाग.

**हातखुरपें** (न.) आंतलें कोवळें खोबरें हातानें खरडून काढतां येतें असा नारळ; गवत वगैरे काढण्याचें एक हत्यार.

**हातखेवणें** (न.) हातानें चालविण्याचें वल्हें.

**हातखेरणें** (न.) कलथा, उलथणें.

**हातगुंडा** (पु.) हातानें उचलून फेकण्यासारखा धोंडा.

**हातघाई** (स्त्री.) हातानें वाजणारीं वाद्यें मंदगतीनें वाजत असतां पुढें आवेशानें व वेगानें वाजूं लागणें; उतावळेपणा. **हा० वर येणें**—मारामारी करणें.

**हातचलाखी** (स्त्री.) हस्तचापल्य.

**हातचा** (वि.) हातानें दिलेला; स्वाधीनचा; अंकगणितांत—पूर्णांकाची बेरीज करतांना बेरजेच्या संख्येंतला अंक ज्या स्थानचा त्या स्थानीं मांडून त्याच्या पुढल्या स्थानीं मिळविण्याकरितां उरलेला अंक.

**हातचाळा** (पु.) हाताला लागणारी चुळचुळ; हातानें कांहीं तरी उगीच करीत रहावें अशी लागलेली खोड.

**हातणी, हातनी** (स्त्री.) घोडे खाजवितांना हातांत घालण्याची काथ्याची पिशवी; खरारा.

**हातणें** (प्रा. क्रि.) हारवणें (ज्ञा० १८।५३२).

**हाततुक** (प्रा. न.) हातानें वजन करणें; अटकळ, अजमास (ज्ञा० १८।१६१).

**हातधरणी** (प्रा. स्त्री.) दासी (भा० २२।५२५).

**हातनळा** (पु.) हातांत धरून सोडण्याचा दारू भरलेला नळा.

**हातनळी** (स्त्री.) चपटें कौल.

**हातपा** (पु.) कपड्याची वाही.

**हातपाणी** (न.) बायकांच्या रासन्हाण्याचे वेळीं वधूच्या सासूनें तिच्या हातावर ओतावयाचें पाणी.

**हातपिटी** (स्त्री.) हातांची धक्काबुक्की.

**हातफळीं, हातोफळीं** (प्रा. अ.) हातोहातीं; लवकर. (ज्ञा० ६।२८२).

**हातबोनें** (प्रा. न.) हातांत घेतलेलें भक्ष्य

**हातभार लावणें** मदत करणें.

**हातभेटी** (प्रा. स्त्री.) प्रेमानें हातांत हात घालणें (भा० २८।५९२).

**हांतर** (पु.),**हांतरी** (स्त्री.) मोठी चटई.

**हातमात** (प्रा. स्त्री.) हात टेकणें.

**हातमोजा** (पु.) हातांत घालावयाचें कापडी किंवा लोकरीचें आवरण.

**हातरुमाल** (पु.) घाम वगैरे पुसण्यासाठीं खिशांत ठेवण्याचा लहानसा रुमाल.

**हातरूं** (प्रा. न.) हत्ती.

**हातलाग** (पु.) हातचा टप्पा.

**हातलावणी** (स्त्री.) कौमार्य—भंग (विशेषतः वेश्येच्या मुलीचा).

**हातलावा** (वि.) चोरी करण्यासाठीं ज्याचे हात फुरफुरतात असा.

**हातवटी** (स्त्री.) कुशलता; योग्यता (र० यो० १०।१९४); प्रकार; पद्धति.

**हातवडा** (पु.) हातोडा.

**हातवडी** (स्त्री.) लहान हातोडा.

**हातवणी** (न.) हात धुतलेलें पाणी.

**हातवश** (वि.) हस्तगत.

**हातवशी** (प्रा. स्त्री.) हात उगारणें.

**हातवसणें** (क्रि.) हस्तगत करणें किंवा होणें.

**हातवळा** (पु.) हस्तकौशल्य.

**हातवा, हातिवा** (पु.) काडवात.

**हातवारे** (पु. अने.) हातानें केलेले हावभाव.

**हातविरजा, हातविरंगुळा** (वि.) कामांत मदत करण्याच्या लायकीस पोचलेला (उमेदवार, शिष्य वगैरे).
**हातसर** (प्रा. पु.) हातांतला गजरा (एकं० पृ० ६३१).
**हातसुख** (न.) दुसऱ्याला मारण्यापासून मारणाराला मिळणारें समाधान.
**हातसुतकी** (स्त्री.) दगडफोड्याचें एक हत्यार.
**हातसोका** (प्रा. वि.) हाताच्या संवयीचा.
**हातसोरा, हातसोऱ्या** (पु.) कुरडया करण्याचा सांचा.
**हातळ** (वि.) हाताळ पहा.
**हातळी, हाताळी**(स्त्री.) घोड्याचा खरारा.
**हाता** (प्रा. पु.) सोनकवडा.
**हाताफळी** (स्त्री.) मारामारी, धक्काबुक्की.
**हातासन** (प्रा. न.) युक्ति, हतोटी (ज्ञा० ६।११९).
**हातासरसा** (क्रि. वि.) त्याच हातानें.
**हाताळ** (वि.) दुसऱ्याची वस्तु हातीं लागतांच ती लांबविण्याची खोड असलेला; चोरटा.
**हाताळू** (वि.) हाताळ, चोरटा.
**हातिणें** (प्रा. क्रि.) मारणें.
**हांतुलें** (प्रा. स्त्री.) लाकडाचें परळ.
**हातुल्यो** (अ.) मुलांच्या खेळांत-अटींतून मुक्त होण्याचे वेळीं उच्चारण्याचा शब्द.
**हातेणें** (प्रा. न.) घोडी किंवा गाढवी यांचा माज (मोरो०उद्यो०१३।२१७).
**हातेर** (प्रा. न.) हत्यार; पाटलाच्या शेतांत गांवच्या रयतेला करावें लागणारें बिगारीचें काम.
**हातोटी** (स्त्री.) खुबी, युक्ति, कौशल्य.
**हातोडा** (पु.) सोनार, लोहार इ० चें ठोकण्याचें एक हत्यार; लहान घण.
**हातोडी** (स्त्री.) लहान हातोडा.
**हातोपा** (पु.) हातपा पहा.
**हातोपातीं** (प्रा. अ.) वरचेवर (ज्ञा० १८।१५६); हातोहात.
**हातोफळी** (स्त्री.) हातांची झोंबी.
**हातोफळीं** (प्रा. अ.) हातोहातीं, तत्काळ.
**हातोसा** (पु.) मदत.
**हातोहात** (अ.) एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातीं, दुसऱ्याच्या हातून तिसऱ्याच्या हातीं याप्रमाणें.
**हातोहातीं, हातोपात, हातोहात** (अ.) त्वरेनें, हां हां म्हणतां.
**हातोळा** (पु.) हातोटी, हस्तकौशल्य.
**हात्या**(पु.) घोड्याचा खरारा; हातमागाचा एक भाग. [येणारा माज.
**हात्याण** (न.) घोडीला किंवा गाढवीला
**हाथरणें** (क्रि.) आंथरणें.
**हांदा** (पु.) परस्परांना मदत करण्याची शेतकऱ्यांची रीत. [झाड हालविणें.
**हांदुळणें** (सं. आंदोलन क्रि.) झोके खाणें;
**हांदेकरी, हांदलेकरी** (पु.) शेतकऱ्यांनीं परस्परांच्या मदतीसाठीं दिलेला मनुष्य किंवा बैल.
**हान** (प्रा. अ.) आणि (ज्ञा० ७।३२).
**हानि** (सं. स्त्री.) नुकसान, तोटा.
**हापटणें** (क्रि.) आपटणें.
**हांपा** (पु.) धापा.
**हाफीज** (फा. पु.) कुराण तोंडानें पाठ म्हणणारा मुसलमान.
**हाय** (अर. हय स्त्री.) आयुष्य; दुःखाचा सुस्कारा. **हाय खाणें**—भीतीनें घाबरून जाणें, धास्ती घेणें; **हाय मोकलणें**—दुःखाचे उद्गार काढणें; **हायास येणें**—थकणें, भागणें.
**हायकोर्ट** (इं. न.) वरिष्ठ न्यायमंदिर.
**हायत, हायात** (अर. स्त्री.) आयुष्य; आयुष्याची मर्यादा.
**हायदोस** (हिं. हायदोस्त दुल्हा पु.) हसन व हुसेन हे त्यांच्या लग्नानंतर लवकरच लढाईंत मरण पावले या गोष्टीस उद्देशून मोहरमांत मुसलमान लोक 'मित्रा नवरदेवा! हाय हाय!' असे शोकाचे उद्गार काढतात व ताबुतापुढें नाचतात त्यावरून धिंगामस्ती असा अर्थ झाला.
**हायन** (सं. न.) वर्ष.
**हायसें वाटणें** दुःखाच्या स्थितींतून सुटका झाल्याबद्दल आनंद होणें.
**हायस्कूल** (इं. न.) दुय्यम इंग्रजी शिक्षणाची शाळा.

**हायहाय, हायहूय** (अ.) दुःखोद्‌गार.
**हार** (सं. पु.) माळ, कंठा; पंक्ति, रांग; पराभव, नुकसान. **हार खाणें**—आपला कमीपणा कबूल करणें; मागें येणें; **हार जाणें**—पराभव पावणें.
**हारक** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) निवारण करणारा.
**हारकी** हरकी पहा.
**हारजीत** (स्त्री.) जयपराजय.
**हारपणें** (क्रि.) हरवणें; नष्ट होणें.
**हारवणें** (प्रा. क्रि.) हातचा घालविणें.
**हारसडणें** (क्रि.) आटोक्यांत आणणें.
**हारा** (पु.) मोठी पाटी.
**हारास** (सं. ऱ्हास पु.) क्षय; हानि.
**हारि** (प्रा. स्त्री.) हार, पराजय.
**हारिख** (सं. हर्ष पु.) हर्ष, आनंदातिशय.
**हारिद्र** (सं. न.) स्नेह, प्रेम; दया; अनुकंपा; मनांतील गुप्त गोष्ट, हृद्‌गत.
**हारी** (स्त्री.) तोटा, तूट; रांग; ओळ.
**हारी** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) हरण करणारा, निवारणारा.
**हारोहार** (अ.) ओळीनें, मागोमाग.
**हार्णाळ** (प्रा. स्त्री.) ओघ, प्रवाह.
**हार्द**(सं. वि.) मनांतलें; (न.) इंगित, हृद्‌गत.
**हार्मोनियम** (इं. पु.) वाजाची पेटी.
**हाल** (अर. पु.) दुर्दशा; कष्ट; (अ.) सांप्रत; सतत.
**हाल** (प्रा. स्त्री.) चढाओढ, शर्यत, पैज (तुका० १६९); मनाचा निश्चय.
**हॉल** (इं. पु.) दिवाणखाना.
**हालअपेष्टा** (स्त्री.) नानाप्रकारचे हाल.
**हालचाल** (हिं. स्त्री.) वळवळ, चलनवलन.
**हालणें** (क्रि.) सरणें, ढळणें.
**हालत** (अर. स्त्री.) हाल; त्राण; स्थिति.
**हालमस्त** (फा. अ. वि.) गरीब पण गर्विष्ठ.
**हालमाकलम** (प्रा. वि.) परस्परांची; मागली पुढली.
**हालविणें** (क्रि.) सरकविणें, गति देणें; सारणें; जागृत करणें, धामधूम करणें.
**हालहवाल** (अर. हाल. पु.) खबरबात; सद्यःस्थिति. [ ओरड.
**हालहूल** (स्त्री.) गडबड, गोंधळ, आरडा-
**हालाखी** (स्त्री.) हलाकी पहा. [ विष.
**हालाहल** (सं. न.) एक अतिशय जलाल
**हालीमवाली** (अर. हालीमुवाली वि.) लहानथोर, श्रीमंत व गरीब.
**हालीमाजी** (अर. स्त्री.) अधिकाऱ्यांची अदलाबदली. [हातोहातीं.
**हालोहाल** (हिं. अ.) तत्काळ, याक्षणीं,
**हाव** (सं. पु.) शृंगारचेष्टा; (फा. हवस स्त्री.) उत्कट इच्छा, हौस; (प्रा. स्त्री.) तेज, प्रभा (मुक्ते० रामा० ३।१०६)
**हाव** (स्त्री.) गप्प, वदंता.
**हावभरी** (प्रा. वि.) हावरा, आशायुक्त.
**हावभाव** (पु.) अभिनय, नखरा.
**हावर**(पु. स्त्री.) गळू, फोड; फोडाची सूज.
**हावर** (पु. स्त्री.), **हावरें**(न.) हावरेपणा.
**हावरा** (वि.) कितीहि मिळालें तरी तृप्ति नाहीं अशा स्वभावाचा; उतावळा; (पु.) पांढरा तीळ.
**हावळा** (वि.) हावरा.
**हावाव** (प्रा. स्त्री.) शोभा.
**हाशमनीस** (फा. पु.) शिपाई लोकांची हजेरी व हिशेब ठेवणारा.
**हाशीखुशी** (स्त्री.) प्रसन्न वृत्ति
**हाशील** (अर. न.) सारा, जकाती इ. चें सरकारचें उत्पन्न; महत्त्व; अर्थ; उपयोग.
**हास** (सं. पु.) हास्य.
**हासिया** (अर.पु.) कांठावरची नक्षी, कांठ.
**हॉस्पिटल** (इं. न.) दवाखाना, इस्पितळ.
**हास्य** (सं. न.) हंसणें, हंसू; उपहास, मौज.
**हास्यरस** (सं. पु.) नवरसांपैकीं एक.
**हास्यास्पद** (सं. वि.) हंसण्यासारखें.
**हाहा** (अ.) दुःखोद्‌गार.
**हांहां** (अ.) थांब, मागें सर अशा अर्थी.
**हाहाकार, हाहाःकार** (पु.) आक्रोश, विलाप.
**हांहां म्हणतां** (अ.) चटकन्, त्वरेनें.
**हाहू**(स्त्री.) खाकरा काढतांना होणारा शब्द.
**हाळ** (स्त्री.) हारा, टोपली; फेरीवाल्याजवळचा माल.
**हाळ** (पु.) गुरासाठीं बांधलेला पाण्याचा हौद; लांब व खोल चर; नाश.

वाचनालय

**हाळी** (स्त्री.) हाक; आरोळी.
**हाळदुळी** (प्रा. स्त्री.) हळद.
**हाळीव** (न.) अहाळीव.
**हि** (अ.) देखील, आणखी.
**हिकमत** (अर. स्त्री.) युक्ति; चातुर्य.
**हिका** (प्रा. पु.) हेका, दुराग्रह.
**हिकाती** (स्त्री.) अयोग्य प्रकारची किंवा दोषैकदृष्टीची तक्रार; (वि.) आडफाटचा; तक्रारी.
**हिकायत** (अर. स्त्री.) कहाणी, कथा.
**हिंग** (सं. पु.) अति उग्र वासाचा एक चीक. **हिंग लावून न विचारणें**—अगदीं टाकाऊ समजला जाणें.
**हिंगण, हिंगला** (पु.) हिंगणबेट.
**हिंगणबेट** (सं. इंगुदी पु.) एक फळ.
**हिंगरूड, हिंगुरडें** (न.) हिंग खाल्ल्यामुळें व्रणावर उठणारें वेंड.
**हिंगाचा खडा** (पु.) हिंगाचा लहान गोळा; निष्कारण फाटे फोडणारा मनुष्य.
**हिंगाष्टक** (न.) हिंग वगैरे आठ वस्तूंचें केलेलें औषधी चूर्ण.
**हिंगुरडें** (न.) हिंगरूड पहा.
**हिंगूळ** (सं. हिंगुल पु.) पारा व गंधक यांचें एक प्रकारचें मिश्रण. [ भाषण.
**हिंगें तिंगें** (न.) असंबद्ध व टाळाटाळीचें
**हिंगोतिंगो** (स्त्री.) टाळाटाळी.
**हिजडा** (हिं. पु.) पुरुषवेषधारी नपुंसक.
**हिजडी** (स्त्री.) स्त्रीवेषधारी नपुंसक.
**हिजरा** (पु.), **हिजरी** (स्त्री.), **हिजरी साल** (अर. न.) महंमद पैगंबरानें मक्केहून पलायन केल्या दिवसापासून प्रारंभ होणारें अरबी वर्ष.
**हिडगा** (पु.) छांदिष्ट, दुर्व्यसनी; भटक्या मारणारा मनुष्य.
**हिंडणवारा** (प्रा. पु.) भ्रमण. [करणें.
**हिंडणें** (सं. हिंड् क्रि.) फिरणें, भ्रमण
**हिडशा** (वि.) बीभत्स, घाणेरडें.
**हिडसावणें** (क्रि.) घाण करणें; हिडिसफिडिस करणें, तिरस्कार दाखविणें.
**हिडसणें** (प्रा. क्रि.) झिटकारणें.
**हिंडाळा** (पु.) हिंदोळा, झोपाळा. [बायको.
**हिडिंबा** (स्त्री.) कुरूप स्त्री; भीमाची
**हिडीस, हिडस** (न.) केरकचरा, मलमूत्र वगैरे पडलेली घाणेरडी जागा; (वि.) ओंगळ.
**हिडीस फिडीस करणें** तिरस्कारानें वागविणें.
**हिंडोल** (सं. हिंदोल पु.) गायनांतला एक राग. [ हेलकावा.
**हिंडोळा, हिंदोल** (सं. पु.) झोपाळा; पाळणा;
**हिणकट, हिणकस, हिणवट** (वि.) कमी कसाचें ( सोनें ); हलक्या प्रतीची (धातु). [ खोडसाळ.
**हिणकट** (प्रा. न.) खोटें नाणें; (वि.)
**हिणविणें, हिणावणें** (क्रि.) हीनपणा काढून लाजविणें.
**हिणें** (न.) उत्तम धातूंत हीन धातु घालून केलेली मिसळ. [ हलकेपणा.
**हिणाव, हिणावें** (प्रा. पु.) फजिती, लाज.
**हिणावणें** (प्रा. क्रि.) कमी पडणें (ज्ञा० १७।३८८); हिणविणें पहा.
**हित** (सं. वि.) हितकर, उपयुक्त, कायद्याचें; (न.) कल्याण, फायदा.
**हितकर** (सं. वि.) कल्याणकारक.
**हितगुज, हितगूज** (सं. हितगुह्य न.) हिताची गुप्त गोष्ट; कानगोष्टी.
**हितचिंतक** (वि.) कल्याण चिंतणारा.
**हितवादी** (सं. पु.) कल्याणाची किंवा फायद्याची गोष्ट सांगणारा.
**हितशत्रु** (सं. पु.) हिताच्या आड जाणारा.
**हिताळ, हिताळा, हिताळू** (वि.) दुसऱ्याचें हित करणारा; उपकारकर्ता.
**हितेच्छु** (सं. वि.) कल्याण इच्छिणारा.
**हितैषी** (सं. वि.) हितचिंतक.
**हितोपदेश** (सं. पु.) कल्याणाची सल्ला.
**हिंद** (पु.) हिंदुस्थान देश.
**हिंदण, हिंदन** (सं. विधन न.) नेम मारण्यासाठीं केलेलें चिन्ह; आणीवाणीची वेळ; कारस्थान. [ हिंदूंचें.
**हिंदवानी, हिंदवी** (हिं. वि.) हिंदुस्तानचें;
**हिंदळणें** (क्रि.) हिसके खाणें किंवा देणें.
**हिंदाण** हिंदण पहा.
**हिंदी** (वि.) हिंदुस्तानचा; (स्त्री.) उत्तर हिंदुस्थानांतल्या लोकांची संस्कृतनिष्ठ भाषा.

**हिंदु** (फा. पु.) हिंदुधर्म मानणारा.
**हिंदुस्तान, हिंदुस्थान** (फा. हिंदुस्तान पु. न.) नर्मदेच्या उत्तरेकडील प्रदेश; भारतभूमि, भरतखंड, भारतवर्ष.
**हिंदुस्थानी** (स्त्री.) जींत संस्कृतोत्द्भव तसेच उर्दू दोन्ही प्रकारचे शब्द आहेत अशी हिंदी भाषा; (वि.) हिंदुस्थानचा.
**हिंदोल** (सं. पु) झोपाळा; गायनांतला एक राग.
**हिंदोळा** (पु.) झुला; झोपाळा.
**हिनसुदें** (प्रा. वि) हिरमुसलें.
**हिनावणें** (प्रा. क्रि.) हिणविणें, लाजविणें.
**हिंपुटी** (प्रा. वि.) खिन्न, खेदयुक्त, कष्टी; (स्त्री.) शून्य (सोहि० अद्वया० ३.).
**हिम** (सं. न.) बर्फ, गार; थंडी; (पु.) हिमालय पर्वत.
**हिमकर** (पु.) चंद्र.
**हिमगिरि** (पु.) बर्फाचा डोंगर; हिमालय [पर्वत.
**हिमज्वर** (सं. पु.) शैत्यज्वर, हिंवताप.
**हिमट** (वि.) उदास.
**हिमटा, हिमटी** (वि.) कृपण.
**हिमत** (अर. स्त्री.) धैर्य, अवसान, धमक.
**हिमतदार, हिंमती** (वि.) धैर्यवान, धमक बाळगणारा.
**हिमनग** (सं. पु.) हिमालय पर्वत.
**हिमनगजा** (सं. स्त्री.) पार्वती.
**हिमवंत, हिमवान्** (सं. पु.) हिमालय.
**हिमळ** (वि.) बेचव, निःसत्त्व.
**हिमाईत** (अर. स्त्री.) आश्रय, आधार.
**हिमाचल** (सं. पु.) हिमालय पर्वत.
**हिमाद्रि** (सं. पु.) हिमालय पर्वत.
**हिमायत** (अर. स्त्री.) पाठबळ.
**हिमायतदार, हिमायती** (वि.) आश्रित.
**हिमालय** (सं. पु.) हिमाचल पहा.
**हिमांशु** (सं. पु.) चंद्र.
**हियें** (प्रा. न.) हृदय (ज्ञा० ६।३७६); धैर्य (ज्ञा० १।१६३)
**हिय्या** (सं. हृदय पु.) छाती, धैर्य, अवसान.
**हिरकणी** (स्त्री.) लहान हिरा.
**हिरका** (पु.) हीर, ताड, माड इ० कित्येक वृक्षांचे तंतु; लाकडांत दिसून येणारी तंतूंच्या गतीची रेषा.
**हिरकूट** (पु.) हिरा.
**हिरडा** (सं. हरीतकी पु.) हिरडा, एक औषधी फळ.
**हिरडी** (स्त्री.) ज्याच्या योगानें दांत परस्परांशीं संबद्ध असतात तें मांस.
**हिरणें** (सं. हृ क्रि.) हरण करणें.
**हिरण्मय** (वि.) सोन्याचें.
**हिरण्य** (सं. न.) सोनें.
**हिरण्यकेशी** (सं. स्त्री.) यजुर्वेदांतील आपस्तंभ शाखा; (पु.) त्या शाखेचा ब्राह्मण.
**हिरण्यगर्भ** (सं. पु.) ब्रह्मदेव.
**हिरण्यश्राद्ध** (सं. न.) अडचणीमुळें केवळ दक्षिणेवर उरकून घेण्यांत येणारें श्राद्ध.
**हिरमुशी, हिरमुष्टी** (वि.) भग्नोत्साह; हिंमत खचलेला.
**हिरमुसणें** (क्रि.) धैर्य खचणें, उत्साहहीन होणें, विरस होणें.
**हिरमोड** (स्त्री.) उत्साहभंग, मनोभंग.
**हिरवट, हिरवस** (वि.) कांहींसा हिरवा; किंचित् अपक्व; अडाणी; (प्रा.) तापट, एककल्ली (एक० २६२).
**हिरवळ, हिरवाळ** (स्त्री.) ओलें, हिरवेंचार गवत.
**हिरवा** (वि.) हिरव्या रंगाचा; कच्चा.
**हिरवेंचार** (वि.) अतिशय हिरवें.
**हिरशी, हिरसी** (वि.) लोभी, खादाड.
**हिरस** (अर. स्त्री.) हावरेपणा.
**हिरसा** (प्रा. वि.) उन्मत्त, नाठाळ.
**हिरसा तट्टू** (पु.) नाठाळ तट्टू; बढाईखोर मनुष्य; इष्कबाज, लंपट, दुर्व्यसनी मनुष्य.
**हिरहिरी** (स्त्री.) हिरीरी पहा.
**हिरा** (सं. हीरक पु.) एक पांढऱ्या रंगाचें [रत्न.
**हिराकशी, हिराकस** (स्त्री.) शाई वगैरे करण्याच्या उपयोगाचा एक पदार्थ.
**हिरामण** (पु.) एक लहान जातीचा पोपट.
**हिरावणें** (सं. हृ क्रि.) जबरीनें दुसऱ्यापासून घेणें, हिसकावणें.
**हिरावळी** (स्त्री.) बायकांचें पांघरण्याचें [वस्त्र.
**हिरीरी** (स्त्री.) आवेश, सपाटा; निकराचा हल्ला.
**हिरीस** (अर. स्त्री.) हाव, अधाशीपणा.

...र ...री.



**हिलगड** (स्त्री.) भानगड.
**हिलगणें** (क्रि.) ढिले बांधणें; लोंबतें ठेवणें.
**हिलारी** (स्त्री.) हिरीरी पहा.
**हिलाल** (अर. पु.) टेंभा, दिवटी.
**हिलावणें** (प्रा. क्रि.) हलविणें.
**हिल्लाल** (अर. हिलाल पु.) प्रतिपदेचा चंद्र.
**हिला हरकत** (हिं. स्त्री.) टाळाटाळीच्या युक्त्या; सबबी; खऱ्याखोट्या अडचणी.
**हिल्लेबाज** (अर. वि.) दंगेखोर; छट.
**हिंव** (सं. हिम न.) थंडी, सर्दी, हिमज्वर.
**हिमज्वर, हिंवताप** (पु.) थंडी वाजून येणारा ताप.
**हिंवणें** (प्रा. क्रि.) थंड होणें, गारठणें, कांपणें.
**हिंवली** (प्रा. स्त्री.) थंडी.
**हिंवस** (स्त्री.) सर्द हवा; शीत तुषार.
**हिंवसणें** (क्रि.) सर्द होणें; उत्साहहीन होणें.
**हिंवसा** (वि.) थंड, सर्द.
**हिंवारें** (प्रा. न.) हिंवताप (दा० ३।६।२६).
**हिंवाळा** (पु.), **हिंवाळी** (स्त्री.) थंड ऋतु.
**हिंवासलें** (प्रा. वि.) हिरमुसलेलें.
**हिशेब, हिशोब, हिसाब** (अर. हिसाब पु.) अंकांची घडामोड; जमाखर्च; गणती.
**हिशेबी** (वि.) हिशोबासंबंधाचा; हिशोबाच्या कामांत वाकबगार; न्यायाचा; सरळ.
**हिशोब** हिशेब पहा.
**हिंसक** (सं. वि.) हिंसा करणारा.
**हिसकणें** (क्रि.) हिरावणें, जबरदस्तीनें घेणें.
**हिसका** (पु.) आचका, झटका; हिसडा.
**हिसकावणें** (क्रि.) हिसका देणें.
**हिसडणें** (क्रि.) हिसका देणें.
**हिसणें** (सं. हेष् क्रि.) खिकाळणें.
**हिंसणें** (क्रि.) हिंसा करणें, मारणें, इजा करणें.
**हिसळणें** (क्रि.) उसळणें, शिंतोडे उडणें किंवा उडविणें.
**हिसळा** (पु.) कणसावर पडणारा एक रोग.
**हिसा** (पु.) हिस्सा, वांटा, भाग.
**हिंसा** (सं. स्त्री.) इजा, पीडा; वध.
**हिसार** (अर. पु.) किल्ला, गड.
**हिसेरशी, हिसेरसी** (फा. स्त्री.) अंकगणितांत—वांटावयाचें द्रव्य व वांटेदारांची संख्या हेच भाज्यभाजक मानून त्रैराशिकाच्या रीतीनें विभाग करण्याचा प्रकार.
**हिंस्र** (सं. वि.) क्रूर, भयंकर, घातक.
**हिस्सा** (अर. पु.) वांटा, भाग, अंश.
**हिस्सेदार** (पु.) वांटेकरी, भागीदार.
**हिळणें** (क्रि.) वठणीस येणें, कह्यांत येणें, माणसाळणें.
**ही, हि** (अ.) देखील, आणखी.
**हीड** (स्त्री.) वळचण.
**हीण** (सं. हीन न.) हलक्या प्रतीची धातु; हलकटपणा, नीचता; न्यून; दोष, उणीव.
**हीणकट, हीणकस** (वि.) हिणकट, हिणकस पहा.
**हीन** (सं. वि.) उणें, नीच, कमी प्रतीचें; विरहित.
**हीनगंड** (पु.) आपण कमी आहों अशी भावना.
**हीनवाद** (पु.) अस्वीकरणीय साक्ष.
**हीर** (पु.) माड, सुपारी इ० च्या पातींमध्यें असलेला दांडा; हिरा; कठिणपणा; (वि.) श्रेष्ठ.
**हीर** (स्त्री.) ईर्ष्या.
**हीरक** (सं. पु.) हिरा.
**हीरकमहोत्सव** (पु.) व्यक्तीला किंवा संस्थेला ६० वर्षें पुरीं झालीं असतां करावयाचा उत्सव.
**हीर भरणें** लचकणें.
**हींव** हिंव पहा.
**हीवर** (प्रा. पु.) वृक्ष (मुक्ते० रामा० २।११).
**हुकणें** (क्रि.) चुकणें.
**हुकमत** (अर. स्त्री.) अधिकार, अंमल. हु० पन्हा (पु.)—हुकुमाखालच्या प्रजेचा रक्षणकर्ता.
**हुकमी** (वि.) हुकुमाप्रमाणें वागणारा. हु० पत्र—कामगिरीवर रवाना होण्याविषयींचा लेखी हुकूम.
**हुंकार** (पु.) संमति, रुकार; एकादा मनुष्य कांहीं गोष्ट सांगत असतां श्रोत्यानें आपण ती सावधान चित्तानें ऐकत आहों असें दर्शविण्याचा उद्गार.
**हुंकार** (सं. पु.) धनुष्याचा टणत्कार; गर्जना.

**हुकी, हुक्की** (स्त्री.) कोल्ह्याचें ओरडणें; वाऱ्याचा झोत; एकाएकीं मनांत आलेली इच्छा किंवा विचार; लहर, उकळी.
**हुकुमत** हुकमत पहा.
**हुकुमदाज** (हिं. पु.) हुकूम करणारा.
**हुकूम** (अर. हुक्म पु.) आज्ञा; पत्त्यांच्या खेळांतली एक संज्ञा.
**हुकुमतपन्हा** (पु.) सत्ताधीश.
**हुकुमनामा** (फा. पु.) दिवाणी खटल्याचा निकाल झाल्यानंतर खऱ्या ठरलेल्या पक्षास कोर्टाकडून मिळणारें निर्णयपत्रक.
**हुकूमबरदार** (फा. वि.) आज्ञाधारक.
**हुकूमशाही** (स्त्री.) सोटेशाहीचें राज्य.
**हुक्का** (अर. पु.) गुडगुडी.
**हुक्कापाणी** (न.) खानपानादि व्यवहार. **हु० बंद करणें**—वाळींत टाकणें.
**हुक्का** (स्त्री.) हुकी पहा.
**हुंग** (स्त्री.) आलेला वास.
**हुंगणें** (क्रि. ) वास घेणें; सुंगणें.
**हुंगाड्या** ( वि. ) हरयुक्तीनें तपास लावणारा.
**हुचमणी** (पु.) हलकट मनुष्य.
**हुचमल्ली, हुचुमल्ली** (स्त्री.) बुद्धिबळाच्या खेळांतली एक संज्ञा.
**हुं का चूं , हूंचूं** (न.) एकाहि शब्दाचा.
**हुच्च, हुच्चा** (वि.) ख्यालीखुशाली करणारा; नीच, हलकट.
**हुजत** (अर. हुज्जत स्त्री.) रिकामा वाद, तक्रार; वहाणा; पावती.
**हुजतखोर** (वि.) तक्रारी, वितंडवादी.
**हुजती** (फा. स्त्री.) पावती.
**हुजरात** (अर.स्त्री.) खास सरकारची फौज.
**हुजऱ्या** (पु.) खिजमतगार, शागीर्द.
**हुजो** (प्रा. अ.) समोर.
**हुजुती** (हिं. स्त्री.) पावती.
**हुजुरात** (स्त्री.) खुद्द सरकारची फौज.
**हुजूर** (फा. पु.) सरकार; दरबार; (अ.) समक्ष (एक० ३९०८).
**हुजूर कामगार** (फा. पु.) खास राजाजवळचा अंमलदार.
**हुजूर चौकशी, हुजूर तपासणी** (फा. स्त्री.) खुद्द राजानें केलेली चौकशी.
**हुजूरपागा** (स्त्री.) खास राजाच्या उपयोगासाठीं ठेविलेले घोडे.
**हुजूर हशम** (अर. हुजूरहश्म पु.) खास राजाच्या संरक्षणार्थ असलेले शिपाई, बॉडीगार्ड.
**हुज्जत** (फा. स्त्री.) खजिन्यांत ऐवज जमा झाल्याबद्दलची पावती.
**हुज्जत, हुज्जतखोर** हुजत, हुजतखोर पहा.
**हुटकणें** (क्रि.) जोरानें हलविणें, उतावीळपणा करणें.
**हुटहुट, हुटहुटी** (स्त्री.) उतावळेपणा; उत्सुकता (अनंत० ८१); चित्ताची उद्विग्नता.
**हुटहुटणें** (प्रा. क्रि.) उतावीळ होणें (ज्ञा० १।३७९).
**हुंड** (स्त्री.) बिनडाकी दागिना उजळ दिसावा म्हणून त्याला देण्याची आच.
**हुडकणें** (क्रि.) शोधणें; धुंडणें.
**हुंडका** (पु.) हुंदका; थडक, मुसंडी.
**हुडकावणें** (क्रि.) झिडकारणें, तिरस्कारपूर्वक पिटाळणें.
**हुंडकी** (स्त्री.) थडक, मुसंडी.
**हुडंगणें** (क्रि.) उगाच भटकणें.
**हुंडगी** (प्रा. स्त्री.) आडदांड स्त्री (एक० ३८१०)
**हुंडण** (स्त्री.) थडक, धक्का बुक्की; गोंधळ; गर्दी; मुसंडी.
**हुंडणावळ** (स्त्री.) बट्टा, वटाव.
**हुडवा** (पु.) व्यापाराचा किंवा विक्रीचा कुलमक्ता; पूर्ण अखत्यार; करार.
**हुडहुड, हुडहुडी** (स्त्री.) हिंव, कांपरें, थंडीचा कडाका वाटणें.
**हुडा** (सं. हुड् पु.) जत्रा; रास, ढीग; बुरूज (एक० ३९० ; रामवि० ८।२९२).
**हुंडा** (सं. हुड् स्वीकारणें पु.) वरदक्षिणा; मुलीच्या बापानें मुलाच्या बापास देण्याबद्दल द्यावयाची ठराविक उक्ती रकम; हुंडवा पहा.
**हुंडारणें** (क्रि.) हुंदडा मारणें, ढकलणें, झिडकारणें; (न.) पाणी अडविण्याकरितां घातलेला बांध, बंधारा.
**हुंडावण** (हिं. स्त्री.) हुंडणावळ, बट्टा.

**हुंडी** (स्त्री.) एका ठिकाणचें झाड दुसऱ्या ठिकाणीं नेऊन लावावयाचें असलें म्हणजे मुळांस धक्का न लागू देतां मातीसकट उपटतात तें.

**हुंडी** (स्त्री.) बुधलीच्या तोंडास दोरी बांधून व फडक्यानें आच्छादून त्यांत माती वगैरे ठांसून दट्ट्यासारखें घट्ट बसवितात तें.

**हुंडी** (स्त्री.) जडयाचें हत्यार.

**हुंडी** (सं. हुड् = स्वीकारणें) परस्थळीं पैसे पाठवावयाचे असतां या ठिकाणच्या सावकाराच्या दुकानीं सदर रक्कम व वर थोडेसे पैसे दिले असतां तो दुसऱ्या ठिकाणच्या सावकाराला सदर रक्कम देण्याबद्दल देतो तें पत्र; लक्षणेनें— अविवाहित मुलगी; देशांतरीं मरण पावलेल्या गोत्रजाबद्दलचें अशौच.

**हुडू, हुडूक, हुडूका** (पु.) हुंदका.

**हुडूक** (न.) डमरू.

**हुंडेकरी** (पु.) थोडीशी दलाली घेऊन मालाची ने-आण करणारा दलाल.

**हुणूक** (स्त्री.) मुद्दाम गैरसमज करून देणारें भाषण; चिन्ह, खूण.

**हुत** (सं. वि.) अग्नीस अर्पण केलेलें; ज्यांत आहुति टाकली असा (अग्नि); जळून रक्षा झालेला; आमंत्रिलेला.

**हुतका** (पु.) गर्दी; खाज; उत्कंठा.

**हुतवह** (सं. पु.) अग्नि.

**हुताटणें** (क्रि.) उतावीळ होणें.

**हुतात्मा** (पु.) श्रेष्ठ कार्यासाठीं बलिदान करणारा मनुष्य.

**हुताश, हुताशन, हुतास** (सं. पु.) अग्नि.

**हुताशनि** (सं. स्त्री.) होळी.

**हुतुतु** (पु.) मुलांचा एक खेळ.

**हुंदका** (पु.) रडण्याचा उमाळा.

**हुंदडणें** (क्रि.) शिंगानें किंवा डोक्यानें हिसडा मारणें; घालवून देणें; निसरणें; नाचणें, वागडणें.

**हुंदडा** (पु.) थडक, धडका, धडक; मार्गांत कितीहि अडचणी आल्या तरी धडाक्यानें काम करणारा; सोंगट्यांच्या डावांत एकच फिरती राहणारी सोंगटी.

**हुंदडी** (स्त्री.) हुंदडा याचा पहिला अर्थ पहा.

**हुद्दा** (अर. पु.) अधिकार; ताशा.

**हुद्देकरी** (पु.) शस्त्रवाहक कामदार.

**हुद्देदार** (पु.) अधिकारी.

**हुनर, हुन्नर** (फा. हुनर पु. स्त्री.) कला.

**हुनरबंद** (फा. पु.) शिल्पकार.

**हुनरी** (वि.) कलावंत, कुशल.

**हुन्नर** (पु. स्त्री.) हुनर पहा. [मुख्य.

**हुपट, हुप्या** (पु.) वानरांच्या टोळींतला

**हुबकणें** (क्रि.) जोरानें एकाएकीं खालीं आदळणें.

**हुंबणें** (प्रा. क्रि.) विव्हळणें.

**हुंबतें** (प्रा. न.) भांडण, वाद. [एक खेळ.

**हुंबर, हुंबरी** (स्त्री.) गवळयांच्या मुलांचा

**हुंबरडे** (स्त्री.) गुरांचें मोठ्यानें ओरडणें.

**हुंबरडा** (पु.), **हुंबरडी** (स्त्री.) गाई बैलांचें हंबरणें. [ (भा०३।६००)

**हुंबरणें** (क्रि.) हंबरणें; ओरडणें; घुमणें

**हुंबरीतुंबरी** (स्त्री.) हुमरी तुमरी पहा.

**हुंबळी** (प्रा. स्त्री.) हुंबरी; हमामा.

**हुंबा** (प्रा. वि.) रडका (दा० १९।९।२९).

**हुबेहूब** (अर. हुबहू वि.) अत्यंत सादृश्य असलेलें, अनुरूप.

**हुमण** (पु. न.) घुबड.

**हुमणी** (प्रा. स्त्री.) बुक्की, थापटी, थडक.

**हुमरीतुमरी** (हिं. स्त्री.) अरे तुरे करणें, जोराचा तंटा.

**हुमरी, हुमल** (स्त्री.) एक खेळ; हुज्जत.

**हुमाणा** (पु.), **हुमाणें** (न.) कोडें, घोटाळयाचा प्रश्न. [पिसाचा तुरा.

**हुमा** (फा. पु.) घोडयाच्या डोक्यावरचा

**हुम्या** (वि.) घुम्या, तोंडांतून अक्षरहि न काढणारा; टोणपा, ठोंब्या.

**हुरडणें** (क्रि.) भाजणें.

**हुरडफुंक्या** (वि.) नांवाचा मात्र शिपाई पण खरोखर भित्रा; रिकामटेकडा.

**हुरडा** (पु.) भाजलेल्या कोंवळया धान्याच्या कणसांतले दाणे.

**हुरण** (न.) मुंग्यांचा थवा.

**हुरदंग, हुरदंगा** (पु.) गडबड; अशांति.

**हुरपळ, हुरपळा, हुरपाळा, हुरफळा** (पु.) वरवर भाजणें.

**हुरपळणी** (स्त्री.), **हुरपळणें** (न.) वरवर भाजणें.
**हुरमट** (वि.) हूड.
**हुरमत** (अर. स्त्री.) अब्रू, पत.
**हुरमुंज** (स्त्री.) कावेसारखी तांबडी माती.
**हुररेवडी** (स्त्री.) फजिती, हुर्यो.
**हुरशी** (स्त्री.) उमाळा; उत्सुकता.
**हुरसूल** (पु.) गांवांत येऊन राहिलेल्या परस्थांनीं सरकारांत भरण्याचा धारा.
**हुरहुर** (स्त्री.) चिंता, काळजी, चुटपुट.
**हुरहुरणें** (क्रि.) खेद करणें, शोक करणें.
**हुरळणें** (क्रि.) विचार न करतां उत्साहानें प्रेरित होणें.
**हुरूप** (पु. स्त्री.) उत्साह, उमेद, अवसान.
**हुरूम** (अर. स्त्री.) निश्चय, मनाची दृढता.
**हुरूरू** (प्रा. पु. स्त्री.) हुर्यो, हुररेवडी.
**हुर्द** (न.) हृदय.
**हुर्यो** (अ. ) पर्च्यां, फजिती.
**हुर्रेवडी** (स्त्री.) फजिती, बोऱ्या.
**हुलकट** (स्त्री.) लोकांत उडालेली गडबड, हुल्लड.
**हुलकावणी** (स्त्री.) भलतीकडे रोख दाखवून फसविणें; हूल, फसवणूक.
**हुलगा** (पु.) कुळीथ, एक हलकें धान्य.
**हुलचुतिया** (पु.) ठोंब्या, मूर्ख मनुष्य.
**हुलड, हुल्लड** (हिं. स्त्री.) गर्दी; ओरड; गडबड; जोराचा हल्ला.
**हुलरी** (स्त्री.) खेळांतील गलबला.
**हुलसार** (पु.) हूलस्वार पहा.
**हुला** (वि.) वेडा, खुळा.
**हुलीवर घालणं** (क्रि.) शिकार साधण्याकरितां सावज घेरणें.
**हुलूक** (फा. पु.) आवेश.
**हुल्लड** हुलड पहा.
**हुवळा** होवळा पहा. [ सावध.
**हुशार** (फा. हुशियार वि.)शहाणा, बुद्धिमान;
**हुशारी** (फा. स्त्री.) हुशारपणा, सावधगिरी, चलाखी; उल्लास.
**हुशी, हुसी** (स्त्री.) चेंडूचें उडणें.
**हुश्श** (अ.) अतिशय उष्णता भासमान झाल्याचा निदर्शक उद्गार.
**हुसकटणें** (क्रि.) उसकटणें, उलगडणें, अस्ताव्यस्त करणें; विघडविणें; भीतीनें घाबरणें, बुजणें.
**हुसकणें** (क्रि.) धुडकावणें, हाकलून लावणें.
**हुसका** (पु.) मनाला सारखा लागलेला ध्यास, चिंता, हुरहुर.
**हुस्कारा** (पु.) सुस्कारा.
**हुस्न** (अर. न.) सौंदर्य; लावण्य.
**हुळवाजणें** (क्रि.) माघार घेणें.
**हुळहुळ** (स्त्री.) किंचित् स्पर्शानें गुदगुल्या होण्याइतकी त्वचेची नाजुक स्थिति.
**हुळहुळा** (वि.) फारच नाजुक त्वचेचा.
**हुळा** (सं. होला पु.) भाजलेला ओला हरभरा. [ उद्गार.
**हूं** (अ.) उत्तेजनपर किंवा संमतिप्रदर्शक
**हूक** (हिं. स्त्री.) उसण, तीव्र वेदना; गटार बातमी; (इं. पु.) आंकडा.
**हूड** (वि.) तापट, अविचारी, आडदांड; धाडशी; खोडकर; (प्रा. स्त्री.) लीला.
**हूंतूं** (प्रा. न.) वाकडेपण, धिक्कार.
**हून** (अ.) पासून; पेक्षां. [ शब्द.
**हूप** (प्रा.पु.स्त्री.) धैर्य; (अ.) माकडांचा
**हूल** (हिं. स्त्री.) हुलकावणी; बतावणी, दंगा; गडबड; गप्प.
**हूलस्वार** (फा. पु.) आघाडीचे स्वार.
**हृत्, हृद्** (सं. न.) अंतःकरण, हृदय.
**हृत** (सं. वि.) हिरावून नेलेलें.
**हृदय** (सं. न.) अंतःकरण, मन, काळीज; छाती; रहस्य, मर्म; खुबी.
**हृदयंगम** (सं. वि.) मोहक, चित्ताकर्षक.
**हृदयशून्य** (सं. वि.) निर्दय, निष्करुण.
**हृदयस्थ** (सं. वि.) अंतर्यामीं असणारा.
**हृद्गत** (सं. न.) अभिप्राय; अंतस्थ हेतु; हरिद्र.
**हृद्य** (सं. वि.) सुंदर. [मोठी चिंता.
**हृद्रोग** (सं. पु.) काळजाचा रोग; सतत व
**हृष्ट** (सं. वि.) आनंदित.
**हे** (अ.) अरे.
**हेकणा** (वि.)काणा. [दुराग्रही, एककल्ली.
**हेकट, हेकड, हेकडखोर** (वि.) हट्टी,
**हेका** (पु.) हट्ट, छंद, नाद, दुराग्रह.
**हेकाड** (प्रा. वि.) हेकड, हट्टी, एककल्ली.
**हेक्का** (सं. स्त्री.) उचकी.

**हेकेखोर** (वि.) हट्टी, दुराग्रही; छांदिष्ट.
**हेंगड, हेंगडा** (वि.) हेंगाडा पहा; मूर्ख.
**हेंगडूमेंगडू** (वि.) हेंगाडा पहा.
**हेंगाड–डा–डें** (वि.) अडाणी, मूर्ख.
**हेंगाड मत** (न.) अडाणी मत.
**हेंगें** (प्रा. अ.) इकडे.
**हेजीव** (अर. पु.) दूत; कारकून; नोकर.
**हेट** (हिं. अ.) येथें; खालीं; (वि.) खालचा.
**हेटकरी** (पु.) बरकंदाज शिपाई; मराठ्यांच्या पायदळांत नोकरी करणारा तळकोंकणचा मनुष्य. [क्षुद्र.
**हेटा, हेटाशेंटा** (वि.) हलकट, नीच; हलका,
**हेटाळकी, हेटाळणी, हेटाळी** (स्त्री.) अवहेलना.
**हेटाळणें** (क्रि.) तिरस्कारानें वागविणें.
**हेटी** (स्त्री.) गौळीवाडा.
**हेटीमेटी** (स्त्री.) अवहेलना, पाणउतारा.
**हेड** (स्त्री.) विक्रीसाठीं नेलेलें गुरांचें खिल्लार.
**हेंडगा** (पु.) चिपाड, भातण इ० चा भारा.
**हेडंबा** (सं. हिडिंबा स्त्री.) एक पुराणप्रसिद्ध राक्षसी; भयंकर किंवा ओंगळ स्त्री.
**हेडमास्तर** (इं. पु.) मुख्य शिक्षक.
**हेडली** (स्त्री.) हडळ.
**हेडवणें** (प्रा. क्रि.) हेटाळणें (ना० १८३७).
**हेडसावणें** (क्रि.) हेटाळणें.
**हेत** (सं. हेतु पु.) हेतु, अभिप्राय; इच्छा, अनुमान, कारण.
**हेति** (सं. पु. स्त्री.) शस्त्र, तलवार.
**हेतु** (सं. पु.) बेत, उद्देश; निमित्त, कारण.
**हेतुक** (सं. वि.) कामनिक.
**हेतुकपण** (प्रा. स्त्री.) इच्छा, अभिलाष.
**हेतुगर्भ** (सं. वि.) हेतुगर्भित असलेलें.
**हेतुमंत** (वि.) सकारण बोलणारा.
**हेत्वाभास** (सं. पु.) भ्रामक हेतु; न्यायशास्त्रांत–व्यभिचार, विरुद्धता, असिद्धि, सप्रतिपक्षता व बाध या पांच दोषांनीं युक्त विधान.
**हेंदर** (स्त्री. न.) घाण, केरकचरा.
**हेंदरा** (वि.) घाणेरडा, ओंगळ; वेडगळ.
**हेंदोलणें** (प्रा. क्रि.) हेलकावणें.
**हेपलणें** (क्रि.) संभोगक्रिया करणें.
**हेबाळणें** (क्रि.) रेटणें, धक्का मारणें, चेंगरणें.
**हेम** (सं. न.) सोनें.
**हेमकट** (वि.) सोनेरी (दा० १।२।१५).
**हेमकूट** (सं. पु.) गंधर्वांनीं वस्ती केलेला एक पर्वत. [औषधी मात्रा.
**हेमगर्भ** (सं. पु.) सोनें घालून केलेली एक
**हेमटा** (पु.) धडक, धक्का.
**हेमंत** (सं. पु.) मार्गशीर्ष व पौष या दोन महिन्यांमिळून होणारा ऋतु.
**हेमधर** (सं. पु.) मेरुपर्वत. [आणिलेलें.
**हेमाडपंती** (वि.) हेमाडपंतानें प्रचारांत
**हेर** (सं. हेरक पु.) गुप्त दूत; (वि.) क्षुद्र.
**हेरणें** (क्रि.) बारकाईनें पहाणें; न्याहाळणें.
**हेरफेर** (पु.) फेरबदल, अंतर.
**हेरंब** (सं. पु.) गणपति.
**हेरूनफेरून** (अ.) उलथेंपालथें करून; इकडेतिकडे; पुनःपुनः.
**हेऱ्या** (पु.) गुप्त दूत; न्याहाळणारा.
**हेल** (पु.) मजुरी, हमाली; बोलतांना किंवा गातांना काढलेला लांबट सूर.
**हेलकरी** (पु.) ओझें वाहणारा मजूर, हमाल.
**हेलकावणें** (क्रि.) झोके खाणें.
**हेलकावा** (पु.) झोका, आंदोलन.
**हेलकाविणें** (क्रि.) हलविणें, झोके देणें.
**हेलगा** (पु.) रेडा, हेला. [हेटाळणी.
**हेलना** (सं. स्त्री.) अवहेलना, अपमान,
**हेलपटणें** (क्रि.) निष्कारण खेप करविणें; वाऱ्यानें उमळून पडणें; नाश पावणें.
**हेलपटा, हेलपाटा** (पु.) व्यर्थ जाण्यायेण्याचा त्रास. [अपमान; लीला.
**हेला** (पु.) रेडा, हल्या; (सं. पु.)
**हेलावणें** (क्रि.) हलणें, हेलकावे खाणें.
**हेलावा** (पु.) आंदोलन, हेलकावा, लाट.
**हेलि** (सं. पु.) सूर्य.
**हेवड** (प्रा. पु.) गुंताडा (दा० १५।१।५).
**हेवडदेवड** (स्त्री.) शेतकऱ्यांची परस्परांना मदत करण्याची चाल. [उत्कंठा.
**हेवा** (अर. पु.) मत्सर, द्वेष; हव्यास,
**हेवेखोर** (वि.) दुसऱ्याचा हेवा करण्याचा स्वभाव असलेला.
**हेषा** (सं. पु.) घोड्याचें खिंकाळणें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

**हेसणें** (क्रि.) खिकाळणें.
**हेसा** (पु) काजळ, धुरकट.
**हेळ** (स्त्री.) गुरांना पाणी पिण्याकरितां बांधलेला हौद; ओढ्यांतील विहीर.
**हेळणा** (सं. हेलना स्त्री.) हेळसांड, अपमान; तिरस्कार.
**हेळणें** (क्रि.) धिक्कारणें. [जडणें.
**हेळणें-मेळणें** (क्रि.) वरोब्याचा संबंध
**हेळसण–न** (स्त्री.) अवहेलना.
**हेळसणें** (क्रि.) तुच्छ मानणें, हेळसांड करणें.
**हेळसांड** (स्त्री.) हयगय, दुर्लक्ष, अवहेलना; अनादर.
**हेळा** (प्रा. स्त्री.) क्षण (विवे० पू० २।१); दृष्टि (सदा० ४८३); (अ.) सत्वर, क्षणांत.
**हेळावा** (प्रा. पु.) झोका; लाट.
**हेळी, हेळु** (सं. हेलि पु.) सूर्य.
**हेळीमेळी** (स्त्री.) स्नेहसंबंध, मेळ.
**हैक, हैकयैक** (अ.) गुरांना हांकतेवेळीं उच्चारण्याचा शब्द; (स्त्री.) वरचढपणानें लाविलेली टुमणी.
**हैकत** (स्त्री.) दुर्दशा.
**हैदोस** (अर. पु.) गोंधळ.
**हैबत** (अर. स्त्री.) भय, दरारा. **हैबत खाणें**—धास्ती घेणें. [गवाळ.
**हैबती** (वि.) भित्रा. **है० गैबती** (वि.) सुस्त,
**हैम** (सं. वि.) सोन्याचें.
**हैराणगत** (स्त्री.) दुर्दशा, व्याकुळता.
**हैरान** (अर. वि.) आजारी, दुर्दशाग्रस्त, अस्वस्थ.
**हैवान** (अर. पु.) पशु, जनावर.
**हो** (अ.) अहो; संमतिदर्शक शब्द. **होसहो लावणें–मिळविणें**—संमति दर्शविणें.
**होईक** (प्रा. वि.) होणारें (वामन० बालक्रीडा ७३); (न.) दैव.
**होऊन** (अ.) ऊन प्रत्ययान्त धातुसाधित अव्यय; स्वयंप्रेरणेनें, स्वतःच्या बुद्धीनें; आपखुषीनें; जाणून बुजून.
**होकरणें** (प्रा. क्रि.) बोलावणें, थांबविणें.
**होका** (फा. पु.) तोफेचा गोळा.
**होकायंत्र** (न.) गलबतावरील दिशा ओळखण्याचें यंत्र.
**होकार** (पु.) संमति, रुकार. [बोलावणें.
**होकारणें** (क्रि.) मोठ्यानें हाक मारणें,
**होगडणें, होगाडणें** (क्रि.) हाकलून लावणें; फेकून देणें. [आवरशक्ति नसलेला.
**होगा** (वि.) दांडगा, उर्मट; सुस्त; अंगीं
**होट** (सं. ओष्ठ पु.) ओठ.
**होटाळ** (वि.) बाबरओठ्या, जाड ओठांचा.
**होटाळी** (स्त्री.) घोड्याला खरारा करतेवेळीं त्यानें चावूं नये म्हणून त्याच्या खालच्या ओठाला बांधलेली दोरी.
**होड** (हिं. स्त्री.) शर्यत, पैज; करार.
**होडकी** (स्त्री.), **होडकें** (न.) लहान होडी.
**होडगा, होडंगा** (पु.) सोटा, काठी.
**होडत** (स्त्री.) होड, पैज, शर्यत.
**होंडा** (पु.) खळगा.
**होडा** (प्रा. पु.) पैज, अलंकार, मोठेपण.
**होडी** (स्त्री.) नाव, नौका.
**होणजे, होणसे** (स्त्री.) वन्सें, नणंद.
**होणसणें** (क्रि.) टोचणें.
**होणें** (क्रि.) घडणें; बनणें; असणें; संपणें.
**होतकर, होतकरू** (वि.) पुढें उत्कर्ष पावेल असें वाटण्याजोगा.
**होतव्य** (न.) भवितव्य, दैव.
**होता** (सं. पु.) यज्ञकर्ता.
**होत्र** (सं. न.) हवनद्रव्य, आहुति.
**होत्साता** (अ.) होत असतां.
**होन** (पु.) सोन्याचें एक नाणें.
**हो ना** (स्त्री.) होय नाहीं यांतलें एखादें उत्तर; संदिग्धता.
**होपळ, होपळसुतो** (प्रा. स्त्री.) पोकळ; निरर्थक; मंद; अव्यवस्थित; मूर्ख.
**होबा** (पु.) 'होय' असें उत्तर; (विचार न करतां) देणारा; खुशामत्या; समर्थाचा बगलबच्चा.
**होम** (सं. पु.) यज्ञ, हवन, आहुति.
**होमकुंड** (सं. न.) यज्ञकुंड. [जाळणें
**होमणें** (सं. क्रि.) अग्नीला अर्पण करणें;
**होमशाला** (सं. स्त्री.) यज्ञस्थान.
**होमिओपाथी** (इं. स्त्री.) समचिकित्सा शास्त्र. (हॅनिमान या जर्मन वैद्यानें ही पद्धति शोधून काढली.)
**होय** (अ.) संमतिसूचक शब्द.

**होय नव्हे** (स्त्री.) विचारपूस.
**होयबा** (पु.) दुसऱ्याच्या होस हो लावणारा; ज्याला स्वत:चें मत नाहीं असा.
**होया** (प्रा. वि.) होणारा.
**होर** (न.) वाहून आलेला गाळ.
**होरट** (प्रा. वि.) हटवादी, हट्टी.
**होरट, होरटचा** (वि.) गलवला करणारा;. हट्टी. [वुजविणें; व्यापणें.
**होरणें** (स्त्री.) माती, केर इ० टाकून खळगा
**होरपळणें** (क्रि.) भाजणें, डागणें.
**होरस** (प्रा. स्त्री.) लग्नांत वधूपक्षानें वरपक्षास दिलेली मेजवानी.
**होरा** (सं. पु.) राशीचा अर्ध; अडीच घटका; फलज्योतिषाचा एक प्रकार; अंदाज, अटकळ.
**होराबारी** (स्त्री.) जोराचा वाद.
**होरी** (हिं. स्त्री.) होळीचें गाणें.
**होलकांडा** (पु.) झुकांडी, झोक.
**होरेवारे** (पु.) वादप्रतिवाद, झटापट (तुका० २६४७).
**होला** (प्रा. पु.) एक पक्षिविशेष.
**होलाकोला** (पु.) नालायक मनुष्य.
**होलार** (पु.) महार, मांग इ० जातीचे वाजंत्री.
**होलाळा** (प्रा. पु.) लाट; वेग.
**होलिका** (सं. स्त्री.) होळी.
**होलिकोत्सव** (सं. पु.) शिमगा.
**होवरी** (प्रा. स्त्री.) सोपा.
**होवळा** (वि.) नसते कारभार करणारा, उपद्व्यापी.
**होवासा** (पु.) आश्वासन, वचन.
**होष** (फा. होश पु.) भान, शुद्धि; उत्साह, उत्सुकता. [(४१।१२१).
**होसरणें** (क्रि.) होणें (मुक्ते० वन०
**होळकर** (पु.) मूळचे होळचे राहणारे; इंदूरचे धनगर जातीचे संस्थानिक; धनगर; होळीच्या दिवसांत मजा मानणारे.
**होळणें** (क्रि.) सांडणें, पाझरणें, घुणें.
**होळपणें** (क्रि.) होरपळणें, वरवर भाजणें.
**होळंबण्या** (स्त्री. अने.) काळजी, चिंता, खेद, मनस्ताप इत्यादि.
**होळा** (पु.) मोठी होळी, हवळा.

**होळाव** (प्रा. पु.) पालन.
**होळी** (सं. होलिका स्त्री.) हुताशनि; शिमगा; लाकडें गवऱ्या इ० पदार्थांची पेटविलेली रास. **होळी शिपणें** (न.)—होळीच्या दिवसांत पडणारा लहानसा पाऊस; **होळीचे होळकर**—होळीच्या दिवसांत घाणेरडें वर्तन करण्यांत मौज मानणारे उडाणटप्पू लोक.
**होळीपोळी** (स्त्री.) होळीला पोळीचा नैवेद्य प्रथम अर्पण करण्याचा मान.
**होज्या उडविणें** फजिती करणें. [पात्र.
**हौद** (फा. पु.) टांकें; पाणी सांठविण्याचें
**हौदा** (फा. पु.) हत्तीवर बसण्याची उघडी अंबारी; कुस्तीसाठीं केलेला खळगा.
**हौर** (पु.) ऊर्मि, नदीला एकाएकीं आलेला पूर.
**हौरा** (पु.), **हौरो** (स्त्री.) पांढरे तीळ.
**हौल दिल** (फा. वि.) हवालदिल पहा.
**हौशा, हौशी** (वि.) हौस बाळगणारा, उत्साही. [इच्छा, उत्साह.
**हौस** (अर. हवस स्त्री.) आवड, उत्कट
**हौळा** (पु.) हुळा, भाजलेला ओला हरवरा.
**ह्यस्तन, ह्यस्थ** (सं. वि.) कालचा.
**ऱ्हद** (सं. न.) डोह, खोल तळें.
**ऱ्हस्व** (सं. वि.) आखूड.
**ऱ्हास** (सं. पु.) क्षय, उतरती कळा.
**ल्हाद** (सं. आल्हाद पु.) आनंद, हर्ष.
**ल्हाव** (सं. लाभ पु.) लोभ; आधाशीपणा.

---

## ळ

**ळ** मराठी व्यंजनमालेतील चवतिसावें व्यंजन. या व्यंजनानें सुरु होणारे शब्द मराठी भाषेत नाहींत.

---

## क्ष

**क्ष** (सं. क् + श्) मराठी व्यंजनमालेंतील पसतिसावें व्यंजन.
**क्षण** (सं. पु.) तीस कला इतका काळ; काळाचा सूक्ष्म अंश; पळ; श्राद्धाचें बोलावणें, श्राद्धभोजन.

**क्षणणें** (क्रि.) श्राद्धास आमंत्रण देणें.
**क्षणप्रभा** (सं. स्त्री.) वीज. [णारें.
**क्षणभंगुर** (सं. वि.) क्षणांत नाश पाव-
**क्षणक्षणां, क्षणोक्षणीं** (अ.) दर क्षणास.
**क्षणिक** (सं. वि.) अल्प काळ टिकणारें.
**क्षत** (सं. न.) जखम, व्रण.
**क्षतज** (सं. न.) रक्त. [चिंता, फिकीर.
**क्षति** (सं. स्त्री.) नुकसान, नाश, इजा,
**क्षत्र** (सं. पु.) क्षत्रियांची जात; योद्धा.
**क्षत्रिय** (सं. पु.) लढाऊ जातीचा मनुष्य.
**क्षपणें** (प्रा. क्रि.) नाश करणें (वामन० नामसु० १३)
**क्षपा** (सं. स्त्री.) रात्र.
**क्षम** (सं. वि.) सोशीक, क्षमाशील.
**क्षमण** (न.) क्षमा.
**क्षमा** (सं. स्त्री.) माफी.
**क्षमावान्** (सं. वि.) क्षमाशील.
**क्षय** (सं. पु.) ऱ्हास, उतरती कळा; नाश; एक रोग. [तिथि.
**क्षयतिथि** (सं. स्त्री.) सूर्योदयीं नसणारी
**क्षयमास** (सं. पु.) दोन संक्रान्ती ज्यांत येतात तो महिना.
**क्षयरोग** (पु.) राजयक्ष्मा.
**क्षयिष्णु** (सं. वि.) नश्वर.
**क्षयी** (सं. पु.) क्षयरोगी.
**क्षर** (सं. वि.) नाशिवंत.
**क्षरणें** (क्रि.) झिरपणें; पाझरणें, गळणें.
**क्षांत** (सं. वि.) क्षमाशील, सहनशील.
**क्षांति** (सं. स्त्री.) क्षमा, सहनशीलता.
**क्षात्र** (सं. स्त्री.) क्षत्रियासंबंधाचा.
**क्षार** (सं. पु.) खारट पदार्थ.
**क्षालणें** (क्रि.) धुणें.
**क्षालन** (सं. न.) धुणें.
**क्षिणणें** (क्रि.) कृश होणें; क्षय लागणें.
**क्षिति** (सं. स्त्री.) पृथ्वी; क्षय, ऱ्हास; चिंता, फिकीर, पर्वा.
**क्षितिज** (सं. न.) जेथें आकाश जमिनीला लागलेलें दिसतें तेथें त्याच्या परस्पर-स्पर्शानें झालेलें जें वर्तुळ दिसतें तें.
**क्षितीश** (पु.) राजा.
**क्षिप्रा** (सं. स्त्री.) खीर; उज्जनीची शिप्रा नांवाची नदी.
**क्षीण** (सं. वि.) रोडका, कृश, दुर्बळ. [खीर.
**क्षीर** (सं. न.) दूध; झाडाचा चीक; पाणी;
**क्षीरसागर** (सं. पु.) दुग्धसमुद्र.
**क्षीरपति** (सं. पु.) विष्णु.
**क्षीराब्धि** (सं. पु.) क्षीरसमुद्र.
**क्षीरारें** (प्रा. न.) खिल्लार.
**क्षुण्ण** (सं. वि.) चुरडलेलें; ठेंचाळलेलें.
**क्षुद्र** (सं. वि.) क्षुल्लक, लहान, हलकें.
**क्षुद्रदृष्टि** (सं. स्त्री.) बारीक सारीक दोष पाहण्याची प्रवृत्ति.
**क्षुधा** (सं. स्त्री.) भूक.
**क्षुधाक्रांत, क्षुधातुर** (सं. वि.) भुकेला.
**क्षुधित** (सं. वि.) भुकेला. [लेला.
**क्षुब्ध** (सं. वि.) रागावलेला; क्षोभ पाव-
**क्षुर** (सं. पु.) वस्तरा; गुराच्या पायाचा खूर.
**क्षुल्लक** (सं. वि.) अल्प, क्षुद्र, किरकोळ.
**क्षेत्र** (सं. न.) शेत; स्थान; देह; उत्पत्ति-स्थान; पुण्यभूमि.
**क्षेत्रफळ** (सं. न.) कोणतीहि पातळी अथवा क्षेत्र एखाद्या क्षेत्रपरिमाणानें मोजिलें असतां त्या परिमाणाची जी संख्या निष्पन्न होते ती.
**क्षेत्रगणित** (सं. न.) भूमितिशास्त्र.
**क्षेत्रप** (सं. पु.) दुसऱ्याच्या ग्रंथांत घुसड-लेला भाग.
**क्षेत्ररक्षक** (पु.) क्रिकेटच्या खेळांत चेंडू अडविणारा.
**क्षेत्रज्ञ** (सं. पु.) जीवात्मा, परमेश्वर.
**क्षेत्री** (सं. पु.) क्षत्रिय; शेतकरी.
**क्षेप** (सं. पु.) विलंब; अनादर.
**क्षेपक** (सं. पु.) घुसडून दिलेलें वचन किंवा श्लोक. [अनध्याय; वल्हें.
**क्षेपण** (सं. न.) फेंकणें; दूर सारणें;
**क्षेपणी** (सं. स्त्री.) गोफण; वल्हें.
**क्षेपनिक्षेप** (अ.) खात्रीपूर्वक; खास.
**क्षेम** (सं. न.) कल्याण; हित; आलिंगन; (वि.) सुखी; हितकर.
**क्षेमालिंगन** (न.) स्नेहालिंगन.
**क्षोणी** (सं. स्त्री.) पृथ्वी; संख्या.
**क्षोद** (सं. पु.) चूर्ण; भुकटी; विचार, चर्चा.

**क्षोभ** (सं. पु.) खळवळ, व्यग्रता.
**क्षोभणें** (सं. क्षुभ् क्रि.) रागावणें, चलविचल होणें.
**क्षौम** (सं. पु.) रेशमी वस्त्र.
**क्षौर** (सं. पु.) हजामत; तीर्थाच्या ठिकाणीं केलेली हजामत.
**क्ष्मा** (सं. स्त्री.) पृथ्वी.
**क्ष्वेड** (सं. न.) विष.

## ज्ञ

**ज्ञ** (सं. ज् + ञ्) मराठी व्यंजमालेंतील छत्तिसावें व्यंजन.
**ज्ञ** (सं. समासांत उत्तरपदीं वि.) जाणणारा.
**ज्ञपित** (सं. वि.) जाणलेलें; शिकविलेलें.
**ज्ञात** (सं. वि.) जाणलेलें.
**ज्ञाता** (सं. पु.) जाणणारा, शहाणा, विद्वान् मनुष्य.
**ज्ञाति** (सं. स्त्री.) जाति.
**ज्ञान** (सं. न.) जाणीव; विषयाचें आकलन; माहिती; ब्रह्मज्ञान.
**ज्ञानकळा** (सं. स्त्री.) बुद्धिवैभव.
**ज्ञानकांड** (सं. न.) आत्मज्ञानाचें प्रतिपादन केलेला वेदाचा भाग.
**ज्ञानकोश** (सं. पु.) विविध माहितीचा ग्रंथ (इं. एन्सायक्लोपीडिया).
**ज्ञानचक्षु** (सं. पु.) ज्ञानदृष्टि.
**ज्ञानमाला** (सं. स्त्री.) शिक्षणास आरंभ करतांना घातली जाणारी माळ.
**ज्ञानवल्ली** (सं. स्त्री.) थट्टेनें–भांग.
**ज्ञानी** (सं. पु.) शहाणा, सुज्ञ पुरुष.
**ज्ञानेंद्रियें** (सं. न. अने.) ज्यांच्या द्वारें वस्तूंचें ज्ञान होतें अशीं इंद्रियें म्हणजे त्वचा, नेत्र, जिव्हा, कान व नाक.
**ज्ञापक** (सं. वि.) ज्ञान करून देणारा.
**ज्ञेय** (सं. वि.) जाणण्यास योग्य.
**ज्ञानवाद** (सं. पु.) शास्त्रीय ज्ञान हेंच ज्ञेय असें मत.

परिशिष्ट १

# पुरवणी

[या परिशिष्टांत कोशाचें काम संपल्यावर आढळलेलें व घालावयाचे राहिलेले कांहीं महत्त्वाचे शब्द आणि विज्ञान, मानस-शास्त्र इ. शास्त्रांतील पारिभाषिक शब्द मुख्यतः आलेले आहेत. यांतील बहुतेक शब्द संस्कृतसाधित आहेत.]

**अकालप्रौढ** (वि.) लहानवयांतच प्रौढपण आलेला.
**अग्रहक्क** (पु.) मालकीहक्क (पुस्तक वगैरेवरचा) (इं. रॉयल्टी).
**अणुभार**(पु.)संयुगामध्यें समाविष्ट झालेल्या मौलांचें एकूण वजन.
**अतिमानव**(पु.) मनष्याहून श्रेष्ठ प्रतीचा प्राणी. [व्याप्ति.
**अतिरिक्तता** (स्त्री.) मर्यादेबाहेरील
**अध्यापनशास्त्र** (न.) शिक्षणशास्त्र.
**अध्यासन** (न.) विद्यापीठांत विशिष्ट अभ्यासाकरितां योजिलेलें पद (इं. चेअर).
**अपलाप** (पु.) अफरातफर.
**अपक्षय** (पु.) ऱ्हासापूर्वीची अवस्था.
**अपश्रद्धा** (स्त्री.) चुकीची श्रद्धा, मोह.
**अबोध** (वि.) न कळलेलें.
**अभ्यर्थन** (न.) प्रार्थना.
**अभियोग** (पु.) खटला.
**अभिमंत्रण** (न.) आवाहन.
**अर्भकावस्था** (स्त्री.) अजाणपणाचा काल.
**अभिसंपात** (पु.) द्वंद्व, विरोध, कलह.
**अमसृण** (वि.) विषम.
**अमृदु** (वि.) खरखरीत, विषम.
**अवरतम** (वि.) नीचतम.
**अवरोधित** (वि.) दाबलेलें. [काम.
**अवैतनिक** (वि.) मोबदला न घेतां केलेलें
**अश्वशक्ति** (स्त्री.) यंत्राचा काम करण्याचा वेग ज्या परिमाणांत मोजतात तें.
**अस्थिस्थिर** (वि.) अस्थिरूप झालेलें.
**अस्फुटबोध** (पु.) थोडेंसें दर्शन होणें.
**आंत्रपुच्छ** (न.) आंतड्याच्या शेवटचा भाग (इं. अॅपेंडिसायटिस)
**आंत्रवेदन** (न.) आंतड्यास होणारें दुःख.
**आदर्शवाद** (पु.) ध्येयवाद.
**आदिमानव** (पु.) मनुष्याच्या प्राथमिक अवस्थेंतला प्राणी.
**आत्मकेंद्री** (वि.) आत्मकेंद्रित.
**आत्मक्लेशी** (वि.) स्वतःला क्लेश करून घेण्यांत आनंद मानणारा.
**आत्मनिग्रह** (पु.) स्वतःवर ताबा.
**आत्मपीडनगंड** (पु.) स्वतःला दुःख देऊन आनंद मिळविण्याची वृत्ति.
**आम्ल** (न.) अॅसिड; अधातूच्या भस्माशीं पाण्याचा संयोग होऊन झालेलें द्रव्य.
**आरोग्यविज्ञान** (न.) आरोग्याचें शास्त्र.
**आलेख** (पु.) गणितांतील चढउतार दाखविणारी रेषा (इं. ग्राफ्).
**इतिवृत्त** (न.) अहवाल. [उपभोगणारा.
**इंद्रियसुखवादी** (वि.) इंद्रियाचे विषय
**इष्टानिष्टता** (स्त्री.) बरेवाईटपणा.
**ईप्सित** (न.) मनोरथ.
**उच्चगंड** (पु.) आपण मोठे आहोत ही भावना. [वारस.
**उत्तराधिकारी** (पु.) एखाद्या माणसाचा
**उत्पादितभाव** (पु.) प्रेरणा केलेली भावना.
**उदासीकरण** (न.) आम्ल व अल्क यांचें योग्य प्रमाणांत मिश्रण करून त्यांचे विशिष्ट गुणधर्म नष्ट झाल्यावर मिळणारें मिश्रण.

**उन्मार्गगामी** (वि.) वाईट मार्गानें जाणारा.
**उपपादक** (वि.) विवेचक.
**उपाख्य** (अ.) ऊर्फ.
**उद्वेगभाव** (पु.) तिटकारा.
**ऋणध्रुव** (पु.) विद्युत्घटामध्यें ज्या घटकावर रासायनिक क्रिया होऊन विद्युत्प्रवाह निर्माण होतो तो घटक. (**धनध्रुव**—याच रासायनिक क्रियेंत ज्या घटकावर एकाद्या मौलाचा थर बसतो तो.)
**एककालीन** (वि.) एकसमयिक.
**एकघटकी** (वि.) एकपरिमाणी.
**एकरूपत्व** (न.) ऐक्य.
**एकवादी** (पु.) जगांत एकत्व आहे असें पाहणारा.
**औद्भिद** (न.) उद्भिज्ज.
**अंतराय** (पु.) अडथळा. [मन.
**अंतर्मन** (न.) प्रगट मनाच्या आंतील दुसरें
**अंतर्लक्षी** (वि.) आंत पाहणारा.
**अंतःस्फुरण** (न.) अंतःप्रेरणा.
**अंतःस्फूर्ति** (स्त्री.) अंतःप्रेरणा.
**कर्णपटह** (न.) कानाचा पडदा.
**कल्पनारति** (स्त्री.) जागेपणीं स्वप्नें पाहण्याची वृत्ति.
**कल्पनावाद** (पु.) ध्येयवाद.
**कलागृह** (न.) कलाकृति तयार करण्याचें ठिकाण (इं. स्टुडिओ).
**कलाविज्ञान** (न.) शिल्पशास्त्र.
**कामजीवन** (न.) लैंगिक जीवन.
**कार्यक्रमपत्रिका** (स्त्री.) ज्यावर सभेचें काम लिहिलें आहे असा कागद.
**कार्यशक्ति** (स्त्री.) निसर्गशक्तीची काम करण्याची पात्रता (इं. एनर्जी).
**कारिका** (स्त्री.) संयुगाकरितां उपयोजिलेलें संक्षिप्त रूप (इं. फॉर्म्युला).
**कालापव्यय** (पु.) वेळ फुकट घालविणें.
**क्रियाशाळा** (स्त्री.) कारखाना.
**क्रीडन** (न.) विहार करणें.
**खुषबू** (फा. पु.) सुगंध.
**गतधवा** (सं. स्त्री.) विधवा.
**गतिजन्य** (वि.) पदार्थांना दिलेल्या गतीमुळें त्यामध्यें आलेली (कार्यशक्ति).

**गतिक्षमता** (स्त्री.) चपलत्व.
**गलनिका** (स्त्री.) नसराळें.
**गिनती** (हिं. स्त्री.) मोजदाद.
**गीतरव** (पु.) गीतनाद.
**गुणात्मक** (वि.) प्रकारविषयक.
**गोष्टीवेल्हाळ** (वि.) गोष्ट एकण्यांत रंगून जाणारा. [पियन).
**गौरकाय** (वि.) गोऱ्या रंगाचा, (युरो-
**गृहजीवनशास्त्र** (न.) पाकक्रियादि संसारांतील गोष्टींची माहिती.
**ग्रामपंचायत** (स्त्री.) गांवांतील नेतृत्व करणारी सभा.
**ग्रामीण** (वि.) खेडेगांवासंबधीं.
**घूर्णना** (स्त्री.) भ्रमाची अवस्था.
**चतुरोक्ति** (स्त्री.) कुशल भाषण.
**चित्रांकण** (न.) शब्दांत रंगविणें.
**चित्रोपम** (वि.) चित्रासारखें.
**छायायंत्र** (न.) कॅमेरा. [यंत्र.
**जनित्र** (न.) विद्युत्प्रवाह निर्माण करणारें
**जन्मसिद्ध** (वि.) जन्मापासूनचा.
**जलबंद** (वि.) जलाभेद्य; पाणी आंत शिरूं न देणारा.
**जुगुत्साभाव** (पु.) तिरस्काराची भावना.
**ज्वलनगर्भ** (वि.) ज्वालाग्राही.
**ज्वलनशील** (वि.) सहज पेट घेऊं शकणारा.
**ज्वलनांक** (पु.) ज्या तपमानास पदार्थ पेट घेतात तें तपमान.
**तटनिक्षेप** (पु.) कांठावर ठेवणें.
**तदात्म** (वि.) अभिन्न.
**तंतकवि** (पु.) शाहीर कवि.
**तन्द्रा स्वप्न** (न.) दिवा स्वप्न.
**तपमान** (न.) पदार्थाची थंडपणाची वा उष्णपणाची स्थिति.
**तुल्यदर्शन** (वि.) सारखें दिसणारें.
**तोषदान** (न.) नोकरी संपतांना द्यावयाची बक्षिसी (इं. ग्रॅच्युइटी).
**तंतुशीलता** (स्त्री.) धातूचा त्यांतून बारीक तारा काढतां येण्याचा गुण. [विलास).
**दर्दभरी** (वि.) उत्कट भावाचा (गायन
**दायित्व** (न.) जबाबदारी.
**दिवास्वप्न** (न.) जागेपणीं स्वप्नें पहाणें.
**दुःखात्म** (वि.) शोकानें युक्त.

**दुर्गमता** (स्त्री.) गूढता.
**दूरदर्शक** (वि.) लांबचें दाखविणारें.
**दूरश्रावक** (पु.) टेलिफोन (इं.)
**दंडविज्ञान** (न.) शासनाचें शास्त्र.
**द्रवक्षम** (वि.) निरसन होण्यास योग्य; वितळू शकणारें.
**द्राव** (पु.) द्रवामध्यें विरघळणारा पदार्थ व तो द्रव यांचें मिश्रण.
**दृष्टसाक्षी** (वि.) प्रत्यक्ष पाहणारा.
**धर्मप्रामाण्य** (न.) धर्म हाच अंतिम अधिकार ही श्रद्धा.
**धर्मोन्माद** (पु.) धर्मवेड.
**ध्येयकल्पन** (न.) आदर्शीकरण.
**नर्मचातुर्य** (न.) खुबीनें बोलण्याची चतुराई.
**नर्मयुक्त** (वि.) खुबीदार.
**नर्मोक्तिचातुर्य** (न.) खुबीनें बोलण्याचें कौशल्य.
**निद्राभ्रमण, निद्रासंचारण** (न.) झोंपेंत चालणें.
**निद्राभाषी** (वि.) झोंपेंत बोलणारा.
**निर्माणप्रवृत्ति** (स्त्री.) कांहीं तरी नवें करून दाखविण्याची नैसर्गिक इच्छा.
**नियतिवाद** (पु.) दैववाद.
**नियुक्तिपत्र** (न.) नेमणुकीचा हुकूम.
**निराकृत** (वि.) खोडून काढलेला (सिद्धांत इत्यादि).
**निर्बलनस** (वि.) ज्याचे मज्जातंतु क्षीण आहेत असा.
**निर्वाहण** (न.) व्यवस्था.
**निषेधन** (न.) विरोध करणें.
**निसर्गप्रेरण** (स्त्री.) सहज प्रवृत्ति.
**न्यूनधी** (वि.) मंद बुद्धीचा.
**न्यूनमहित्व** (न.) मंद बुद्धि.
**पदसिद्ध** (वि.) विशिष्ट पदामुळें आपोआप सदस्य झालेला (इं. एक्स् ऑफिशिओ).
**पर-क्लेशन गंड** (पु.) दुसऱ्याला अपाय करण्याची वृत्ति.
**परपीडनासक्ति** (स्त्री.) दुसऱ्याला त्रास देण्यांत आनंद वाटणें.
**परिग्रहण** (न.) एकाद्या गोष्टीचें सर्वांगीण आकलन करून घेणें.
**परिपोषण** (न.) पुष्टि.
**परिमेय** (न.) मापतां येण्यासारखें.
**परिसीमा** (स्त्री.) हद्द.
**परीक्षानळी** (स्त्री.) ज्यांत रसायन वगैरे टाकून प्रयोग केले जातात ती कांचेची नळी (इं. टेस्ट ट्यूब).
**पर्यवेक्षक** (पु.) देखरेख ठेवणारा.
**पर्यवेक्षण** (न.) देखरेख.
**पशुवाटिका** (स्त्री.) प्राणिसंग्रहालय.
**पांढरा हत्ती** (पु.) खर्चाच्या दृष्टीनें अवजड वाटणारी गोष्ट.
**पारपत्र** (न.) एका राष्ट्राची सरहद्द ओलांडतांना द्यावयाचा परवाना (इं. पासपोर्ट).
**पारंपरिक** (वि.) परंपरेंतील.
**पितृसावर्ण्य** (न.) बापाच्या वंशाशीं सारखेपणा.
**पुंजातीय** (वि.) पुरुषजातीचें (बीज वगैरे).
**पुनरावर्तन** (न.) पुनः आवृत्ति करणें.
**पुनरावाहन** (न.) पुनः स्मरण करणें.
**पुराणप्रियता** (स्त्री.) जुन्या गोष्टींची आवड.
**पूर्व प्रवृत्ति** (स्त्री.) मनाचा कल.
**प्रकृतिसिद्ध** (वि.) निसर्गसिद्ध.
**प्रक्रोधभाव** (पु.) राग.
**प्रचोदक** (पु.) प्रेरणा देणारा.
**प्रतिध्वनन** (न.) पडसाद उमटणें.
**प्रतिनामक्रिया** (न.) अप्रत्यक्ष रीतीनें घडणारा परिणाम.
**प्रतिनिधान** (न.) प्रतिनिधित्व.
**प्रतिसामाजिक** (वि.) समाज विरोधी.
**प्रत्यादेश** (पु.) आव्हान.
**प्रथमोपचार** (पु.) अपघात झाला असतां कांहीं आवश्यक अशी करावयाची प्राथमिक शुश्रूषा (इं. फर्स्टएड).
**प्रदर्शनवाद** (पु.) आपल्या भावना शक्यतेवढ्या प्रगट करण्याचा संप्रदाय.
**प्रभवन** (न.) तेजस्विता.
**प्रभविष्णुत्व** (न.) तेजस्वीपणा.
**प्रभावित्व** (न.) उज्ज्वलता.
**प्रवर्तित** (पु.) सुरू केलेला.
**प्रसूचन** (न.) इषारा.

भगर वाचनालय, सातारा.

**प्रक्षेपण** (न.) फेंकण्याची क्रिया; विज्ञानशास्त्रांत—सूर्य किंवा अग्नि यांचेपासून उष्णता संक्रमणाची पद्धति (इं. रेडिएशन).
**प्रज्ञाहत** (वि.) बुद्धि गुंग झालेला.
**प्राणवायु** (पु.) ऑक्सिजन.
**प्राणिवाटिका** (स्त्री.) पशुसंग्रहालय.
**प्राणिवृंद** (पु.) प्राणिसंग्रह.
**प्रायोगिक** (वि.) प्रयोगाविषयीं, प्रयोगाच्या.
**प्रेरणात्म** (वि.) प्रेरणा असलेलें, स्फूर्तिदायक. [आदेश.
**प्रेरणादेश** (पु.) मनाला आंतून होणारा
**प्रेक्षास्थान** (न.) चित्रमंदिर.
**बहुमुखी, प्रतिपद** (वि.) देवघेवीच्या प्रत्येक अवस्थेंत घ्यावयाचा (कर).
**बोधपूर्व** (वि.) जाणीव होण्याच्या अगोदरचा.
**भक्ष्यान्वेषण प्रवृत्ति** (स्त्री.) आपलें खाद्य शोधण्याची सहजप्रवृत्ति.
**भावगौरववाद** (पु.) भावनाधीनता.
**भावनाविष्करण** (न.) भावनांचें प्रगटीकरण.
**भावनिक** (वि.) भावनात्मक.
**भावप्रत्यय** (पु.) भावनेचा साक्षात्कार.
**भावप्रवण** (वि.) भावनेवर भर देणारा.
**भावबंध** (पु.) भावनेचा दुवा.
**भावसंक्षोभ** (पु.) भावनेचा आवेग.
**भावरूप** (वि.) करणरूप, भावात्मक.
**भूतलक्षी** (वि.) भूतकाळाकडे पाहणारा.
**भूताभिमुख** (वि.) भूतकाळाकडे पाहणारा.
**भ्रांतमति** (वि.) डोकें फिरलेला.
**मज्जाविकृति** (स्त्री.) मज्जातंतूची विघडलेली अवस्था. [करणें.
**मतप्रचार** (पु.) आपल्या पंथाचा प्रचार
**मतिभ्रम** (पु.) वेड.
**मद्यार्क** (पु.) मध.
**मलशुद्धि** (स्त्री.) मलोत्सर्जन.
**मर्षण** (न.) सहन करणें.
**मानसकंद** (पु.) भावग्रंथी, मानसगंड.
**मानसोपचार** (पु.) मनावर उपचार करून रोग बरे करण्याचें शास्त्र.
**मुंडेछाट पैरण** (स्त्री.) गळ्याबरोबर बसणारा (कॉलर नसलेला) सदरा.
**मृत्युमान** (न.) लोकसंख्येंतील मृत्यूचें शेंकडा प्रमाण.
**मौलिकता** (स्त्री.) नवीन निर्मिति.
**मौल** (न.) मूलद्रव्य (इं. एलेमेंट).
**यथादर्शन** (न.) जसें आहे तसें दिसणें.
**रियाज** (पु.) गाण्याची मेहनत.
**रोहित्र** (न.) बदलत्या दिशेच्या विद्युत्प्रवाहाचा (ए. सी.) दाब कमी किंवा अधिक करणारें यंत्र (इं. ट्रॅन्स्फॉर्मर).
**लष्करशाही** (स्त्री.) लष्कराचा कारभार.
**वशीकरण** (न.) वश करणें.
**लोळ** (पु.) अधिक माया.
**वक्रनलिका** (स्त्री.) सायफनची नळी.
**वर्खशीलता** (स्त्री.) धातूचा त्याचा बारीक पापुद्रा निघण्याचा गुण.
**वहन** (न.) घनरूप पदार्थामध्यें उष्णतेचें संक्रमण होण्याची पद्धति (इं. कंडक्शन).
**विद्राव्यता** (स्त्री.) शंभर ग्रॅम पाण्यामध्यें दिलेल्या तपमानाला द्राव संपृक्त (सॅच्युरेटेड) करण्याकरितां लागणारें त्या पदार्थाचें वजन (ग्रॅम्स).
**वियत्संचारी** (वि.) आकाशांत फिरणारा.
**विलेपन** (न.) थर बसविण्याची क्रिया.
**श्रद्धाप्रवणता** (स्त्री.) श्रद्धाळूपणा.
**श्रमजीवि** (वि.) शरीरश्रमावर जगणारा.
**श्रमिक** (पु.) मजूर.
**श्रांतवेतन** (न.) सेवानिवृत्तीनंतर मिळणारें वेतन.
**श्रुतिका** (स्त्री.) नभोवाणीवरील नाटिका.
**श्रेष्ठी** (पु.) नेता, व्यापारी, सावकार.
**श्रोतेंद्रिय** (न.) कान.
**षड्यंत्र** (न.) कारस्थान. [वाटणें.
**सभाभीरुत्व** (न.) लोकांपुढें येण्याची भीति
**समकणाकर्षण** (न.) एकाच पदार्थाच्या कणांमध्यें असलेलें परस्पराकर्षण.
**संयुग** (न.) दोन किंवा अधिक मौलांच्या रासायनिक संयोगानें बनलेला पदार्थ.
**संप्लवन** (न.) घनरूप पदार्थाचा एकदम वायुरूपांत जाण्याचा गुण.
**स्थितिजन्य कार्यशक्ति** (स्त्री.) पदार्थ उंचावर ठेवल्यानें त्याचे अंगीं आलेली काम करण्याची पात्रता.

**स्थितिस्थापकत्व** (न.) लवचीकपणा.
**स्वयंशासन** (न.) आपणच राज्य करणें.
**हरकत** (स्त्री.) हकारयुक्त जलद तानेचा तुकडा.
**हेतुकथन** (न.) अध्यापनांत–पाठाचें रहस्य पहिल्यानें सांगणें.
**क्षार** (पु.) लवण (इं. सॉल्ट).

---

## परिशिष्ट २

# कित्येक शब्दांची व्युत्पत्ति

[कै. वा. गो. आपटे यांची मूळ शब्दरत्नाकरास दिलेली टीप]

मराठी भाषेतल्या शब्दांच्या व्युत्पत्तीकडे अद्याप विद्वानांचें लक्ष जावें तसें गेलें नाहीं ही मोठी दुःखाची गोष्ट आहे. मराठी शब्दांचा नमुनेदार कोश अद्याप झालेला नाहीं. मोल्स्वर्थ साहेबांच्या कोशांत पुष्कळ शब्दांच्या व्युत्पत्ति दिल्या आहेत; त्याच खऱ्या मानून चालण्याकडे लोकांची प्रवृत्ति असल्यामुळें या कोशांतहि सामान्यतः त्याच व्युत्पत्ति दिल्या आहेत. कित्येक शब्दांची व्युत्पत्ति उघड उघड चुकीची दिसली तेथें तेवढा योग्य फरक केला आहे. पण अलीकडे रा. राजवाडे, साने, परांजपे, आपटे, मोडक, भारदे, पाटणकर, काळे, इ० गृहस्थांनीं विविधज्ञानविस्तार, सरस्वतीमंदिर, इ० मासिकांतून व इ. सं. मंडळापुढें वाचलेल्या निबंधांतून सुमारें दोन हजार शब्दांच्या नव्या व्युत्पत्ति सुचविल्या आहेत. त्यांतल्या कित्येक अगदींच विलक्षण असल्या तरी दुसऱ्या बऱ्याच विचार करण्यासारख्या असल्यामुळें व हीं निरनिराळीं मासिकें व इ. सं. मंडळाचे रिपोर्ट सर्वांच्याच संग्रहीं असण्याची संभवनीयता फारशी नसल्यामुळें या सर्व व्युत्पत्तींचा संग्रह या कोशाचें परिशिष्ट म्हणून जोडल्यास फार सोईचें होईल अशी सूचना अनेक विद्वान् मित्रांनीं मला केल्यावरून हें परिशिष्ट जोडण्यांत आलें आहे. या व्युत्पत्ति सर्वमान्य झालेल्या असत्या तर त्यांचा समावेश मूळ कोशांतच करण्यांत आला असता; पण त्यांतल्या बऱ्याच अद्याप वादग्रस्त असल्यामुळें मूळ कोशांत न देतां परिशिष्टाच्या रूपानेंच त्या देणें इष्ट दिसल्यावरून तसें केलें आहे.

### अ

**अख्खें** (सगळें)–सं. अक्षय.
**अंगलट**–सं. अंग + लुट्.
**अंगुस्तान**–फा. अंगुश्तान.
**अगोदर, आदोगर**–सं. आदावग्रे.
**अचाट**–सं. अत्यर्थ.
**अजगर**–सं. अलगर्द (काळा पाणसर्प).
**अटपाट**–का. अट्ट (भरवस्तीचें) + पट्ट (विस्तृत).
**अट्टल**–सं. अटल.
**अठळी**–सं. अष्टि.
**अडणी**–सं. अटनी.
**अडमुठ्ठा, आडमूठ**–सं. अनेड (मूर्ख) + मूक (बहिरा). [अडीच.
**अडीच**–सं. सार्धद्वि–साडइड–साडीच–
**अड्डा** (बाजारांतील व्यापाऱ्यांची सभा) सं. आड (उद्योग).
**अड्डा**–(मल्लांचा)–सं. अडड् (लढाई).
**अनाठायीं**–सं. अन्यस्मिन् स्थाने.

**अपकारा**–सं. अपस्कार (बैठक).
**अप्रें**–सं. अल्पतर.
**अफाट**–आटपाट.
**अंबाडा**–सं. आम्रातक.
**अभ्रा**–सं. अभ्र.
**अमूप**–सं. अनुपम.
**अरबट**–सं. अपभ्रष्ट. [गरज.
**अलगर्जी**–सं. अन् (नकारार्थी) + (हिं.)
**अलोट**–सं. अ + लुट् (बोलणें); अर्थ– अनिर्वचनीय.
**अवचित**–सं. अहोस्वित.
**अवदसा**–१ सं. अवध्वंसा: २ अयाचित.
**अवशीस**–सं. उषसि.
**अस्तमान**–सं. अस्तमयन.
**अस्ताव्यस्त**–सं. अस्तव्यस्त.
**अळणी**–सं. अलवण. [कायमचा).
**अक्षि**–(अगदीं) सं. अक्षयम् (पूर्णपणें,

---

## आ

**आइत्या पिठावर रेघा**–सं. अतिथे: पीठे रेघा (येथें पीठ म्हणजे पाट असा अर्थ आहे). [२ सं. आर्ये.
**आई**–१ सं. आत्प्रो (जीव मिळविणारी);
**आकार**–सं. कर (जमिनीचा सारा).
**आखडणें**–सं. आकुंचनम्.
**आखें**–सं. अक्षणम्.
**आगठी**–सं. अग्निस्थिति.
**आंगठी**–सं. अंगुलिस्थ.
**आगवाडा**–सं. अग्रवाट: (आघाडी).
**आंगारा**–सं. अंगार:
**आचारी**–सं. आचारिकिक:.
**आटणें**–सं. अट्ट (कमी होणें).
**आटपाट**–१ सं. अष्टप्रकोष्ठम् (आठ चौकांचें); २ सं. अट्ट (वाडा) + पट्ट (चौक); ३ म. आठ + पाट (विस्तार); ४ सं. अट् जाणें, पट् (जाणें) आलें गेलें (कोणतें तरी).
**आठवडा**–१ सं. अष्टावर्त: २ सं. सप्तावर्त: (मूळ संस्कृतांतल्या स् चा प्राकृतांत ह होऊन त्याचा पुढें आ झाला).
**आठवण**–सं. आस्थापन.
**आड** (विहीर)–सं. अवट.
**आड**–अड.
**आडखळणें**–सं. अन्त:स्खलनम्.
**आडगांव**–सं. अंतर्ग्राम (उपग्राम).
**आडत**–१ सं. आट्टपात्यं (अट्टपति म्ह० बाजाराचा मोकादम); २ सं. आड (उद्यम.)
**आडनांव**–सं. अंतर्नाम.
**आडमाप**–सं. अर्ध (दीड) + माप.
**आडरात**–सं. अर्धरात्रि:
**आडवस्त्र**–सं. अर्धवस्त्र.
**आंडिल**–सं. अंडीर.
**आढें**–हिं. आडें (आडवें लाकूड).
**आण**–(शपथ)–सं. आज्ञा.
**आणखी**–सं. अन्य + एक.
**आणा**–१ सं. आपणक: २ सं. अंकनक.
**आणि**– सं. हन्त.
**आणीक**–१ प्रा. आणिक्क (तिरकें, वाकडें) २ सं. अन्य + एक.
**आतां**–प्रा. इत्ताहे–इत्ता.
**आत्या**–सं. अत्तिका; २ सं. आप्तका.
**आंदू**–सं. अद् (बांधणें).
**आंधळी कोशिंबीर**–सं. अंधा कौशांबी (कौशांबी नगरींतला एक खेळ).
**आधीं**–सं. आदि.
**आपटणें**–सं. आपट् (फोडणें).
**आपण**–सं. आत्मन्.
**आप्पा**–सं. आत्मा.
**आंबवणी**–सं. आम्लपानीयं.
**आंबिल**–सं. आम्ल.
**आंबोशी**–सं. आम्रपेशी.
**आंबोळी**–सं. आम्लवोलिका.
**आयता**–१ सं. अयत्नत: २ सं. आयत्त.
**आवा** (कुंभाराचा)–सं. आपक:
**आहेर**–सं. आभर (ण).
**आहाच** (कदाचित्)–सं. आहत्य.
**आळ**–१ सं.अलीक:२ सं. हेडन (अनादर).
**आळवणें**–सं. आलपन.
**आळुमाळु**–अं. अलं अलं.

---

## इ

**इटकुलीमिटकुली**–सं. इतुक (ल) मितुक (मोजणें).
**इटीदांडू**–सं. यष्टिदंड.
**इटेकरी**–सं. यष्टिकर.
**इतका**–वैदिक-इयत्तक.
**इन् सिन् तीन**–हीं, मी आणि ती.
**इनसाफ्**–अर. निस्प (अर्ध).
**इशी, इश्श**–१ सं. विश् (विष्ठा); २ सं. ह्रीच्छ (लाजणें).
**इसाड**–सं. ईशा (नांगराचा दांडा).

---

## उ–ऊ

**उकडणें**–सं. उत्क्वथनम्.
**उकळणें**–सं. अवक्षल्.
**उकळी**–सं. उत्कलिका.
**उकिरडा**–सं. अवकरः.
**उक्तें**–सं. अवक्रय.
**उघड**–सं. उद्गाढ.
**उच्छाद**–सं. उत्साद.
**उजवणें, उजावणें**–१ सं. उद्यापन, २ उपयमनम्.
**उजवें, उजू**–सं. ऋजु.
**उजेड**–सं. उद्योत; उदयित.
**उटणें, उटी**–सं. उद्वर्तन.
**उठवणें**–सं. उत्थापन.
**उडवणें**–सं. उर्व (हिंसा करणें).
**उतराई**–सं. उत + तॄ.
**उथळ**–सं. उत्स्थल.
**उद्या**–सं. उदय.
**उधळणें**–सं. उद्धूलनम्.
**उधार**–सं. उद्धार (एक प्रकारचें ऋण).
**उपडा**–१ सं. उपावृत्त; २ उत्पाद; ३ उत्पाटित.
**उपरणें**–सं. उपाभरणम् किंवा उपवरणम्.
**उफळणें**–सं. उत्फुल्ल.
**उफाडा**–सं. उत्फाल.
**उबगणें**–सं. उपगमनम्.
**उबारा**–सं. उष्मतर.
**उभळणें**–उत् + भल्ल.
**उभा**–सं. ऊर्ध्व.
**उमळणें**–सं. उद्वमनम्.
**उमेट**–सं. उन्मत्त.
**उलट**–सं. उल्लट.
**उसणें**–उसण.
**उसना**–सं. वस्न (किंमत, भाडें).
**उसवणें**–सं. उत्सिवनम्.
**उसळणें**–उत्सरणम्.
**उसें**–प्रा. उसअं; सं. उत्शीर्षकम्.
**ऊन**–सं. उष्मन्.

---

## ए–ऐ

**ए**–सं. अयि.
**एकदम**–सं. एकपदम्.
**एकंदर**–सं. एकत्र.
**एकोत्री**–सं. एकोत्तरी.
**ऐकणें**–सं. आकर्णनम्.
**ऐट, ऐटा**–सं. अट्ट (तिरस्कार).
**ऐरणी**–सं. अयणी.
**ऐसा**–सं. ईदृश्.

---

## ओ–औ

**ओंगण**–सं. अंज्.
**ओंचा**–सं. अंचल.
**ओझें**–सं. वाह्य.
**ओटा**–सं. ओहट्टा.
**ओटी**–सं. उपस्थ.
**ओढ, ओढा**–सं. अवकर्ष, अवकर्षकः.
**ओथंबणें**–सं. उत्तंभनम्.
**ओचा**–सं. अवचयः. [तीनें धोबड.
**ओबडधोबड**–सं. उद्भट– उब्भड – आवृ-
**ओंवी**–प्रा. उंवी.
**ओवरी**–सं. अपवरक.
**ओवाळ** (दोष देणें)–सं. उपालंभ्.
**ओशट**–सं. अवशिष्ट.
**ओसरण**–सं. अवसरणम्.
**ओसरी**–सं. अपवरक.
**ओसाड**–सं. उत्साद.
**ओहट, ओहळ**–सं. ओघ.
**ओहोट**–सं. अवहोडण.
**औत**–सं. आवप्त.

---

## क

**कचरा**–१ सं. कच्चरक; २ सं. कशेरु (नागरमोथ्यासारखें तृण.)
**कचाटी**–सं. कृच्छ्र.
**कच्चें**–सं. कथ्थ (खोटें).
**कज्जा**–सं. कार्य.
**कटकट**–सं. कटकटा (घासण्याचा आवाज).
**कंटाळणें**–कंठन (कंठणें) सं. कट्.
**कट्यार**–सं. कटीतर
**कंठणें**–सं. कठ् (कष्टानें काळ काढणें).
**कंठाळ**–सं. कंठतलासिका.
**कड**–सं. कटि.
**कडक**–सं. कर्कर.
**कडकडणें**–सं. कड् (कर्कश आवाज करणें).
**कडबोळें**–सं. कट.
**कंडरा**–सं. कंधरा (गळयाचा दोर).
**कडा**–सं. कटक.
**कडें**–सं. कटकम्.
**कणगा**–सं. कानकः.
**कणा**–सं. कर्णक :
**कण्हणें**–सं. कण् (शब्द करणें).
**कथिल**–सं. कसीर.
**कंदील**–इं. कँडल.
**कद्रू**–सं. कदर्यु.
**कप्पा**–सं. कल्पः
**कफल्लक**–सं. कपालक.
**कफावत**–हिं. कहावत (लोकवार्ता).
**कबरा**–सं. कपिल.
**कभिन्न**–सं. कभल्ल.
**करकरीत**–सं. कर्कर (कठिण).
**करकोचा**–सं. क्रकच.
**करडा**–सं. कट्ट.
**करपणें**–सं. कृप् (दुर्बळ होणें).
**करवत**–सं. क्रकच, किंवा करपत्र.
**करार**–अर. इक्रार.
**कऱ्हा, कऱ्हें**–सं. करभः.
**कलकलाट, कलकल**–सं. कल्ल (अ.) व्यक्त शब्द).
**कवडा** (धूर्त)– सं. कपटक.
**कवण, कोण**–सं. कः नु.
**कवलार**–म. कऊल + सं. अगार.
**कवळी**–सं. कवली.
**कणसें**–सं. कस् (गतिवाचक).
**कसा**–सं. कीदृश.
**कसोटी**–सं. कषपट्टिका.
**कळक**–सं. कंटकिल.
**कळकळ**–सं. कल्.
**का**–सं. कामम्.
**कांकीं**–सं. किं, किल.
**काखी** (रंग)–सं. काषाय.
**काच** (जाच)–सं. कच् (बांधणें).
**काचणें**–सं. कच् (बांधणें).
**काचोळी**–सं. कंचुली.
**कांच्या**–सं. कंचुकः.
**काट देणें** (अपमान करणें)–सं. कात् + कृ.
**कात** (सापाची)–सं. कृत्ति.
**कातडी**–सं. कृत्ति.
**कानठाळ**–सं. कर्णताल.
**कानडें**–सं. कर्णकटु.
**कानशील**–१ सं. कर्णशिरस्; २ कर्णशष्कुलि.
**कापर**–सं. खर्पर (लुच्चा)
**कापूर**–ता. करप्पू; सं. कर्पूर.
**कावाडकष्ट**–सं. कर्वटकष्ट (कर्वट–उताराची जागा).
**काबू**–सं. कंबू (परद्रव्यापहारी).
**कामकरी**–सं. कर्मकर.
**कामसू**–सं. कर्मशूर.
**काय ?**–सं. किमिति. [दिवसाचें श्राद्ध).
**कारटा**–सं. करटः (मृताच्या ११ व्या
**कारटें**–सं. कुमार.
**कारली**–सं. कारवल्ली.
**काल** (उद्यां)–सं. कलिल; **काल** (मागच्या दिवशीं)–सं. कल्य (गत दिवस).
**कावळा**–हिं. कव्वा; सं. काकः.
**कालवड**–सं. कलभटी.
**कासंडी**–सं. कांस्यहंडि.
**कासार**–सं. कांस्यकारः.
**काहणी**–हिं. कहानी (सांगितलेली गोष्ट).
**कांहीं**–सं. किमपि.
**काळ**–(दुष्काळ)–ता. आकालि (क्षुधा).
**किचकट**–सं. कृच्छ्र.
**किचाट**–सं. कृत्या.

किचाटी–सं. कृच्छ्र.
किटकिट–सं. किट् (त्रासविणें.)
किटणें–सं. कीर्त्.
किटाळ–सं. कष्ट.
किनी–प्रा. किणो (प्रश्न).
किरसाण–सं. कृषाण (शेतकरी).
किसळ–सं. क्लिश.
कीं–सं. किल.
कींव–सं. कृपा.
कुंचा–सं. कूर्च.
कुटाळ–सं. कूट + आळ.
कुडकुडणें–सं. कुड् (विकल होणें).
कुडव–सं. कुटप.
कुंडाकुंडी–सं. कुंडक, कुंडिका.
कुडुक–सं. कुडुप (अडकवावयाचा दागिना).
कुत्रा–प्रांतिक संस्कृत कुतर.
कुपी–सं. कूपी.
कुबड–सं. कुब्जास्थि.
कुरकुली–सं. कर्करी.
कुवा–प्रा. कुहा; सं. कूप.
कुसळ करणें–सं. कुशलीकरणम् (वमन).
कुळकरणी– तेलगु. कुल (शेतकरी) + करणं (हिशेब).
कुळकुळीत–वैदिक कुल् (जळणें).
केरसुणी–सं. कर्षणी.
कैपक्ष–सं. कृपापक्ष.
कैबार–सं. कृपाकर.
कोकणें–सं. कू.
कोकलणें–सं. कल्.
कोंच–सं. कूर्च.
कोंठिंबा–प्रा. कोट्टिंबो.
कोड–(कुष्ट) प्रा. कोडु.
कोड–(कौतुक)–सं. कुतूहल.
कोडीसवाणा–सं. कपोतवर्णः.
कोतवाल–सं. कोट्टपाल.
कोंदी–सं. कुसंधि (भिंतीची सांधी किंवा [जोड).
कोपरखळी–सं. कूर्परखति.
कोमट–सं. कवोष्ण.
कोरा–सं. कुमार.
कोरींव–सं. उत्कृ.
कोलती–सं. वैदिक-कुल् (जळणें); देशज– कोलित्त; सं. अलीक.
कोल्हा–प्रा. कुल्हो.
कोल्हाटी–सं. कुलटा.
कोशेटा–सं. कोशकीटक.
कोहळा–सं. कुंभफला.
कोसळा–सं. वैदिक-कुल् (जळणें).
कौल–सं. कीलक–प्रा. कीलअं.—केलुं–कवेलू, कौल.

---

## ख

खाचरट–सं. क्लिष्ट.
खचित–सं. खल्ल चित.
खंजीर–सं. खड्गजीर.
खटपट–सं. खाट्कृत्य पाट्कृत्य.
खटला–खटलेवाईक–सं. खट्वा.
खटारा–सं. क्षत्ता.
खट्याळ–सं. खट + आल.
खडखडणें–सं. खड् (मंथन करणें).
खडबडून–सं. खटखटयित्वा.
खडी–सं. खटी (पांढरी माती).
खंडोबा–सं. स्कंद.
खड्डा–सं. खदा (गर्ता, खाच).
खण–सं. खंड.
खंदावीर–सं. स्कंध + वीर.
खपा–सं. खप्प (रागावलेला).
खप्पी–सं. खप्पिन् (बलात्कारानें हरण करणारा).
खरकटें–हिं० खारें खाटें.
खरूज–(द्वाड माणूस)–सं. खरु.
खर्ज–सं. षड्ज.
खलक–(फितुरी)–सं. खल (चहाडखोर).
खवखवणें–सं. क्षव (खोकला).
खवडा–सं. स्फोटकः.
खवणा–सं. क्षपणकः.
खस्ता–सं. कष्ट.
खळणें–सं. स्खल्.
खाई–सं. खादिका.
खाऊ–(खादाड)–सं. खादुक.
खाकरणें–१ सं. खातृकृ; २ सं. खक् (हंसणें).
खाटिक–सं. खट्टिक.
खाडा–(खड्डा) सं. खातः.
खाणें–सं. खै (दुःख देणें).

वाचनालय

**खादी**–सं. क्षद्.
**खारट**–सं. क्षारिष्ठ.
**खाली**–सं. खात–खाल–खाली (सप्तमी).
**खिटखिट**–सं. खिट् (त्रासविणें).
**खिडकी**–प्रा. खडुकी; सं. खडक्किका.
**खितपण**–सं. क्षिप्त + पण.
**खिरापत**–सं. क्षौरपत्र.
**खिळखिळा–करणें**–सं. खिलीकृ.
**खुजा**–सं. कुब्ज.
**खुदकन्**–सं. क्षुत् (शिंकणें).
**खुनशी**–सं. कुहनशील.
**खुबा**–१ सं. कूपकः २ सं. गुल्फः.
**खुरपें**–सं. कूर्पर.
**खुरसणी**–हिं. खोरासानी (खोरासानांतून प्रथम आलेलें).
**खुर्द**–सं. क्षुद्र. **खुर्दा**–सं. क्षुद्र.
**खुळा**–क्षुल्ल; प्रा. खुल्लणा.
**खेचर**–सं. खरज.
**खेडें**–सं. खेट.
**खेप**–सं. क्षेप.
**खो**–सं. क्षोभ. [खोटुं.
**खोटें**–१ सं. कूट; २ सं. क्षोट; ३ गुज०.
**खोंड**–सं. षंड.
**खोबरें**–सं. कर्पर.
**खोरें**–सं. क्षुरप्र; कुहरम्.
**खोळ**–खोलि (वाणांचा भाता).

---

## ग

**गच्च**–सं. गाढ.
**गजर**–गज् (नाद करणें).
**गटार**–पोर्तु. गटेर.
**गंडेरी**–प्रा. गंडीरी.
**गड्डा**–सं. गर्ता.
**गंधवाटी**–सं. गंधवर्त्ति.
**गबर**–सं. गव्हर.
**गयाळ**–गुज. घेला (वेडा).
**गरमी**–सं. ग्राम्य.
**गल्लीकुची**–गल्ली + कुत्सित.
**गरज**–सं. गृध (इच्छा).
**गरजू**–सं. गृध्.
**गरम**–सं. घर्म.
**गरती**–१ सं. गृहस्था; २ सं. गृहवती.
**गलेलठ्ठ**–सं. गल् (खाणें).
**गवत**–सं. गो + अत्त.
**गवसणी**–सं. गवाक्षन्.
**गवसणें**–सं. गवेषणम्.
**गहाण**–हिं. गहिना (दागिना).
**गळणें**–(म्लान होणें) सं. ग्लै.
**गळूं**–वैदिक सं. ग्लौ.
**गागजणें**–सं. १ गर्ज्; २ सं. गद्.
**गागणें**–सं. घग्घ् (हंसणें).
**गाजरपारखी**–सं. गर्भपरीक्षी.
**गांठी**–सं. गंत्री.
**गांडूळ**–सं. गंडूपद.
**गांधिल**–सं. गंधालि.
**गाय**–सं. गावी.
**गायकवाड**–गायकैवारी.
**गार**–(एका प्रकारचा दगड)–सं. कर्कर.
**गार**–सं. गौरवाय किंवा गुरु.
**गालगुंड**–सं. गलगुंडिका.
**गालफड**–सं. गल्लफलक.
**गावढें**–सं. ग्रामड.
**गाळी**–सं. गर्हिका.
**गिलावा**–प्रा. गिल + आवा.
**गुंग**–हिं. गूंगा (मुका).
**गुज**–सं. गुह्य.
**गुडदाणी**–सं. गुडधाना.
**गुंडाळणें**–सं. गुंड्.
**गुपचुप**–सं. गुप् (रक्षणें) + चुप् (मंदगतीनें जाणें).
**गुरगूर**–सं. घुर्घुरा.
**गुरूं**–१ सं.गोतर (गाय); २ सं. गोगु-गुरूं (लहान जनावर).
**गू**–सं. गू (विष्ठा).
**गोचीड**–सं. गो + हिं. चीटी (मुंगी, किडा).
**गोठणें**–सं. गोष्ट.
**गोठा**–सं. गोष्ठी. [पीठ).
**गोंडा**–(घोळणें)–सं. गुडिकाः (कणिक,
**गोतवळा, गोतावळा**–१ सं. गोत्रवलय; २ सं. गोत्रावलि.
**गोता**–सं. गोत्र.
**गोंधळ**–१ सं. गुध (खेळणें); २ सं. गुंदल (वाद्यविशेष).

**गोफ**–सं. गुफ् (गुंफणें).
**गोमटीं**–प्रा. गुमटी (मनोहर).
**गोमाजी**–१ सं. गोतम; २ सं. गोमान्.
**गोरा**–सं. गौरकः.
**गोळी**–सं. गुटी, गुली.
**गोष्ट**–सं. गोष्ठी; किंवा गीः (वाणी).
**गोहो**–१ सं. गोध (पति); २ सं.गुह्.
**ग्यानू, ग्यानी**–सं. ज्ञानी.

---

## घ

**घट्ट**–सं. घृष्ट.
**घण**–सं. हन्.
**घरघर**–सं. हृद्ग्रह.
**घरटी**–सं. गृहवाटी.
**घरत**–सं. गृहस्थ.
**घरपांड्या**–सं. गृहपंडितः.
**घराणें**–सं. गृहराज्य.
**घरांत, घरीं**–(वायकोच्या अर्थी)–सं.गृह, गृहासु.
**घागर**–सं. गर्गरी.
**घागरा**–सं. घर्घरः.
**घाण**–सं. घ्राण.
**घायपात**–प्रा. खाअपात.
**घारगा**–सं. घार्तिकः.
**घिवर**–सं. घृतवर किंवा घृतपूर.
**घेरा**–(घेरलेला भाग)–सं. गृहीतकः.
**घो**–प्रा. गोहो; सं. गुह्.
**घोंटणें**–(उगाळून वारीक करणें)–घृष्.
**घोटाळणें**–सं. गुंठ.
**घोडा**–सं. घोटक किंवा तेलगु– गुर्‍रा.
**घोणा**–सं. घ्राणम्.

---

## च

**च** (अव्यय)–सं. चित् (अव्यय).
**चणाका**–सं. चक्षुष्काणः.
**चकली**–सं. शष्कुली.
**चकाट्या**–सं. चक्राट (लुच्चा, सोद्या).
**चक्क**–सं. चक्र.
**चक्रवाढ**–सं. चक्रवृद्धि.
**चघळणें**–सं. गृ.
**चंची**–सं. चंच (पांच बोटें रुंदीचें माप, भर लांब पिशवी).
**चट**–(नाद, रुचि)–सं. चटु (स्तुति).
**चटकन्**–सं. चट्कृत्वा.
**चटकर**–सं. चट्कृत्य.
**चटका**–सं. चटका (मिऱ्याचें तिखट).
**चटणी**–सं. चट् (फोडणें).
**चटदिनीं**–सं. चट्दिति.
**चटपट**–सं. चाटुपटु.
**चढेल**–सं. चंड.
**चतकोर**–सं. चतुःकृत्वा.
**चबीना**–सं. चर्वण.
**चंबू**–सं. शंबु (शंख).
**चमकणें**–सं. क्रम्–चंक्रम् (वारंवार येणें).
**चमकणें**–सं. चमत्कृ.
**चमचमीत**–सं. चम् (खाणें).
**चमचा**–सं. चमस.
**चरवी**–सं. चरु.
**चरी**–सं. चरक.
**चर्या**–सं. चरितानि.
**चवडा**–सं. चपटकः.
**चवताळणें**–गाण्यांतला चौताल. [हट्टः.
**चवढाळ**–१ सं. समर्द्धक; २ सं. चतुर+
**चवाठा**–सं. चतुष्पथः.
**चव्वल, चवल, चवला, चवली**–सं. चतुर्थ (अर्ध्या रुपयाचा चतुर्थांश).
**चऱ्हाट**–सं. चराटक.
**चहा**–(कीर्ति, आवड)–सं. याच.
**चळो का पळो करणें**–सं. चलीकल्प्य (नाना संकल्पविकल्प करून).
**चांगलें**–सं. चंग.
**चाचपणें**–सं. चप्.
**चाचरणें**–सं. चर्.
**चांचरा**–सं. चंचरीकः.
**चांचा**–सं. चंचा (कुपुरुषः).
**चाड**–सं. चाटु.
**चांदरात**–सं. चंद्रात्मन्.
**चापट**–सं. चिपिट (थापटलेली).
**चापणें**–१ सं. ज्ञि (जापयति); २ सं. चप् (दावणें).
**चाखंदळ**–सं. चप् (खाण्यांत पटाईत).
**चार्‍ही**–म. चारही; सं. चत्वारि.

...


**चावट**–सं. वाचाळ.
**चावडी**–चौ–वाडी किंवा चव्हाटी.
**चाहटळ, चाटळ**–सं. चाटुलोल.
**चाळ**–सं. शाला.
**चिकट**– (घासाघीस करणारा)–सं. [चिकित्सक.
**चिघळणें**–सं. गल् (जागल्यते).
**चिटपांखरूं**–सं. कीट + हिं. पंखेरूं.
**चिठ्ठी**–सं. चिट् (निरोप देऊन पाठविणें).
**चित्तपावन**–१ सं. चित्तपूर्ण (चित्त नांवाचें गांव, गड किंवा खाडी असलेल्या ठिकाणचा; २ सं. क्षितिपावन; चित्त-पोलन (चिपळोण) चे राहणारे.
**चित्ता**–सं. चित्रकः.
**चिंधी**–सं. चिन्ह.
**चिबूड**–सं. चिर्भिट.
**चिमकणें**–सं. श्मीलनम्.
**चिमूट**–सं. मुचुटि (चुटकी).
**चिरटें**–सं. चीर.
**चिरफळी**–सं. ची + फलक.
**चिमणी**–चिवचिव–सं. चीव.
**चिवचिवाट**–सं. चेतस्–प्रा. चेड.
**चुई**–सं. सूचि.
**चुरगळ**–सं. चूर्णकला.
**चुरचुरणें**–सं. चुर् (दाह होणें).
**चुरणें**–सं. छुरणम्.
**चुरा**–सं. छुरा.
**चुलता**–१ सं. क्षुल्लतातः; २ सं. चुल्लस्थः (निराळी चूल करून राहणारा).
**चूप**–सं. चूप (मंदगति).
**चेंगट**–सं. चिरकार.
**चेटका**–सं.चाटुकार.(मिष्ट भाषण करणारा).
**चेटुक**–सं. चाटुक (मिष्ट भाषण).
**चेडा**–सं. चेटः.
**चेंडू**–सं. गेंडु.
**चेपणें**–सं. चप् (दाबणें).
**चेंव**–१ सं. चिति (जागृति)
**चेव**–१ सं. चेतस्–प्रा. चेड; २ सं. चेतन.
**चोख**–१ सं. शौच; २ सं. चोक्ष (शुद्ध).
**चोज**–सं. चोद्य.
**चोर**–सं. चतुर्.
**चोया**–सं. चुस्तः.
**चोपडें**–सं. चतुःपत्र, किंवा चतुःपद.
**चोळणें**–सं. चोदन.
**चौघडी**–सं. चतुर + घट्.

---

## छ

**छकडी**–सं. षट्क.
**छक्केपंजे**–सं. छेकपंचक (वाकडें भाषण).
**छचोर**–सं. छित्वर.
**छडा**–(तपास)–सं. छटा.
**छप्पर**–सं. छत्वर.
**छबि, छबिला, छबुकडी**–सं. छवि (शोभा, आवड.)
**छाकटा**–सं. शौंडः.
**छाताड**–छाती + हाड.
**छाती**–सं. वक्षःस्थिति.
**छानछोक**–हिं. शान शौक.
**छावा**–सं. शावकः
**छिनाल**–सं. क्षुद्रा.
**छोटा**–सं. क्षुद्र.

---

## ज

**जगणें**–सं. गम् + जंगम् (सातत्यानें जाणें).
**जटा**–सं. सटा.
**जडजवाहिर**–फा. जेरजेवर.
**जजु**–सं. यजुस् (यजुर्वेद).
**जनी**–सं. जानकी.
**जवळ**–सं. युगुल (सोदर, निकटसंबंधीं).
**जळण**– सं. ज्वलन.
**जाऊ**–सं. यातृ, यात्ता.
**जाग**–सं. याग (यज्ञ).
**जाच**–सं. यास.
**जाचणें**–सं. जस् (मारणें).
**जाड**–सं. जड.
**जातें**–सं. यंत्र.
**जानवसा–जानोसा**– १ सं. जन्यवास; २ सं. यानवासकः (प्रवासांत राहण्यास दिलेली जागा).
**जांब**–सं. जांबव.
**जाणविणें**–सं. ज्ञा. (जाज्ञायते–वारंवार समजावतो).
**जाभाड**–सं. जृंभास्थि.

जांवई–सं. जामेय (वहिणीचा मुलगा तो जावई–त्यापासून पुढें जांवाई असा अर्थ).
जावक–सं. यामल.
जिनगर–सं. अजिनकर.
जिभाळी–सं. जीव.
जुगारी–सं. युगहारी (फासे जिंकणारा).
जुडी–सं. जुड् (बांधणें).
जुनट, जुनाट–सं. जूर्णिष्ठ..
जुवारी– सं. द्यूतकारी.
जेठी–सं. युधिष्ठिर.
जेरी–सं. जिरी (नाश करणें).
जोकड, जोखड–सं. योक्त्र.
जोखा–(बाई)–सं. योषा.
जोखीम–सं. योगक्षेम.
जोगवा–सं. योगोपायनम्.
जोगवण–सं. योगापनम्.
जोड–सं. जुड् (बांधणें).
जोंधळा–सं. यावनाल:.
जोहार–सं. जयतु हर:.

---

## झ

झकास–सं. चकास् (स्पष्ट, चकचकीत, नामी).
झगझगीत–सं. झग् (व्यापणें).
झगा–सं. झग् (झाकणें).
झटणें–सं. झट् (येऊन भिडणें).
झड–सं. झटी.
झिजणें–सं. क्षि.
झिटी–सं. झिटि.
झिरझिरीत–सं. झष.
झुलणें, झुलवणें, झुलावणें–स. धूल.
झोंड, झोंडा–मूर्ख.

---

## ट

टका–सं. टंकक:.
टंगळमंगळ–सं. तंगनमंगनम्.
टरारणें–तरुणयति.
टवचणें–सं. त्वच् क्रि. (कातडें काढणें).
टांक–(देवांतला)–सं. टंक.
टांका–सं. टक् (बांधणें).
टांग–१ सं. टंगा; २ सं. टंक.
टांच–सं. टंक.
टारगा–सं. टारक:.
टाळकें–सं. तालकम्.
टाळें–सं. तालम्.
टिकणें–सं. टिक् (जाणें).
टिचकी–सं. छोटिका.
टोक, टोंक–सं. तोक्मन् (मोड).
टोंच–सं. त्रोटि (पक्ष्याचें तोंड).
टोप–सं. स्तूप.

---

## ठ

ठग–सं. स्थग (लुच्चा).
ठणाणा–सं. स्तनम्.
ठिपका–सं. स्तिप् (गळणें).
ठी–सं. स्थिति.
ठेंगणा–सं. स्थगीयान्.
ठेंगू–सं. स्थग.
ठेंगमत–सं. स्थग + मत (नास्तिकमत; दुराग्रह).
ठेला–सं. स्था.
ठेव–सं. स्थेमन्.
ठेवण–ठेव (रूप).
ठोकणें–सं. त्वक्ष्.
ठोकळ–सं. स्थूल.
ठोंब–ठोंब्या–सं. स्तुभ (बोकड).
ठोल्या–सं. स्थूल.

---

## ड

डगलें–सं. दुकूलम्.
डचणें–सं. दंशन.
डबी–सं. दर्वी.
डर–सं. दर.
डल्ला–सं. डल्ला (पिणें).
डाकिणी, डाकीण–सं. दाक्षायणी.
डांबरट–सं. डंब् (उपहास करणें).
डाव–सं. द्रम्म.
डावें–सं. वाम; हि. बाँए.
डाळ, डाळें–सं. दाल.
डुकर–सं. डुकर.

डोकें–सं. डुक् (डुलकणें).
डोंगर–डुंगर.
डोंचणें–(द्वेष करणें)–सं. द्रुह्.
डोंब–(चांडाळ)–सं. डोम.
डोंबल–सं. दौर्बल्य.
डोंबल–सं. डुंब् (बुडणें).
डोह–सं. ऱ्हद.
डोळा–सं. डोल् (हलणें).

---

## ढ

ढकलणें–सं. अध: कलनम्.
ढक्का–सं. धक्क (नाश करणें).
ढिला–सं. शिथिल.
ढुंगण–सं. अर्धांऽग.
ढुंगण–ढु (ढोपर शब्दांतील) ढु + अंगण (अवयव).
ढेकूण–सं. दंशकृमि.
ढोपर–सं. ढुर्पर (सध्यां हा शब्द लुप्त आहे).
ढोसणें–सं. अध्यशनम्.

---

## त

तंगडी–सं. टंगा.
तडतडणें–सं. तड् (आवाज करणें).
तडणें–सं. तड् (मारणें).
तडाका–सं. तटाघात.
तलफ–प्रा. तलप्फइ; सं. स्फुरति. [तुपला.
तलाव–सं. तडाग. तरवळा (पाचोळा)–सं.
तरांडें–सं. तरन्ती.
तवसें–सं. त्रपुस (कांकडी).
तवा–सं. तप:
तसनस–सं. तस् (क्षीण होणें) + वै० नस् (अपव्यय करणें.)
तसर–सं. त्रसर (कोळ्याचें सूत).
तळपट–सं. तालपट्ट.
तळवा–सं. तलपाद:.
ताठ–सं. दृढ.
तांतड–सं. तंति.
तात्या–सं. तातगु (चुलता); २ सं. तात.
तान्हा–सं. स्तन्य.
ताफा–सं. तल्प.
तांबट–सं. ताम्रकुट्ट.
ताम्हण–सं. ताम्रभांड.
तारणें–सं. त्रै.
तासडपट्टी–सं. तृस् (बोलणें) + पट् (बोलणें).
तिटकारा–सं. तिरस्कार:.
तिढा–सं. तिरस्.
तिढें–सं. तिरस्.
तिन्ही–म. तीनही; सं. त्रीणि.
तिरकून–(वांकून)–तिर्यक् कृत्य.
तिरपा–तिरसा–सं. तिरश्च; हिं. तीर्च्छा.
तिवई–सं. त्रिपदी.
तिवटी–सं. त्रिवर्तुली.
तीस–सं. त्रिंशत्.
तुटपुंजा–तूट + पुंजी.
तुडवणें–सं. तुर्वणम्.
तूप–१ का. तुप्पा; २ सं. तुप् (मारणें); यावरून तूप = मारलेल्या पशूची चरबी, चरबी, स्निग्धांश.
तेरवां–सं. तृतीयवासरे.
तेरा–प्रा. तेरह.
तेवणें–सं. तेजनम्.
तो–सं. तो.
तोंडली–सं. तुडिकावल्ली.
तोडणें–सं. तुड्.
तोडा–सं. तोडर.

---

## थ

थकणें–प्रा. थकइ–सं. तिष्ठति.
थंड–सं. स्तब्ध.
थंडगार–सं. स्तब्धगुरु.
थंडी–(पगडी)–सं. धटी.
थवा–सं. स्तबक:.
थरू–सं. त्सरु (शस्त्राची मूठ).
थिजणें–सं. स्त्यै.
थिबकणें–सं. स्तिप् (गळणें).
थिल्लर–सं. शिथिलतर.
थेट–सं. स्थेष्ठ.
थेंब–सं. स्तेम.
थेरडा–सं. स्थविर:.
थोडका–सं. स्तोक.

**थोडें**–सं. स्तोकम्.
**थोपणें**–सं. स्तुभ् (थांबणें).
**थोबाड**–सं. स्ताम + अस्थि.
**थोबाडणें**–सं. स्तुब्धापनम्.
**थोर**–सं. स्थूल.

---

## द

**दडपणें**–सं. दर्भयति.
**दंडुक्या**–सं. दंडुक (लुच्चा, अप्रामाणिक).
**ददात–दधात**–सं. दद्यात् (द्यावें).
**दरड**–सं. दरत् (पर्वत).
**दरारा**–सं. दृ (भिणें).
**दंव**–सं. द्रव.
**दाई**–सं. धात्री.
**दाईज**–सं. दायाद.
**दाठर**–सं. दृढतर.
**दांडगा**–सं. दंड.
**दांडपट्टा**–सं. दंडपट्टिशः.
**दांडा**–सं. दंडकः.
**दाढो**–सं. दाढा.
**दाणादाण**–सं. ध्वनि.
**दातारा, दादला–दादा**–सं. दातृक.
**दांतरा**–सं. दंतुर.
**दावण**–(गुरांची) सं. दामनी.
**दावें**–सं. दामन्.
**दिवटी**–सं. दीपवर्तुली.
**दिवड**–सं. द्विपद.
**दीड**–सं. द्व्यर्ध.
**दुगाणी**–सं. द्वि + आणिका.
**दुट्टें**–सं. दुष्ट.
**दुधारी**–सं. द्विधाकार.
**दुध्या**–सं. दुग्धिक.
**दुबेळकें**–सं. द्विविलकम्.
**दुलई**–सं. दुकूल.
**दूण**–सं. द्विगुण.
**देखत**–सं. दृश्.
**देवचार, देवाचार**–सं. देवाप्सरसः.
**देवरुखे**–सं. देवराष्ट्रीय (सह्याद्रि किनाऱ्या शेजारील कृष्णानदीच्या पूर्वबाजूचा टापू) किंवा सं. देवरक्षित.
**दोन्ही**–म. दोनही; सं. द्वौनि.
**दोसणा**–सं. दोपज्ञ.
**दोस्त**–सं. दोःस्थ (हातांतला).
**दौड**–सं. धौर्य (दुडकी चाल).

---

## ध

**धकणें**–(निभणें)–सं. दक्ष्.
**धक्का**–(माल उतरण्याची जागा) सं. धाक.
**धक्का**–सं. धक्क (नाश करणें).
**धग**–सं. इंधनाग्नि–धग्गी. [मारणारा).
**धश्चोट**–सं. अधश्चोदक (खालीं पाडून
**धड**–सं. दृढ.
**धडौतें**–म. धट(दांडगें) + ओत (विणलेलें).
**धण**–(धाकट); सं. धनिय (निबिड).
**धंदा**–सं. धनदाः.
**धपाटणें, धपाटा**–सं. अधःपाटन.
**धमनी**–गुज. दमणी (वैलगाडी).
**धमासा**–सं. धन्वयासः.
**धर्मलंड**–सं. धर्म + लेंड (झुगारणें)–धर्माला झुगारून देणारा.
**धाड**–सं. धाटी.
**धाम**–सं. धर्म.
**धांवा**–सं. ध्यै.
**धिवसा, धिवसा**–सं. अध्यवसाय.
**धुकें**–सं. धुक (वायु).
**धुव्वा**–सं. धुर्व (हिंसा करणें).
**धूड**–(पुष्टठ्ठ) सं. अध्यूढ.
**धूड**–सं. धोड (जाडा अवजड साप).
**धेड**–सं. अध्यूढ.
**धूण**–सं. धावन.
**धुत्**–सं. धूर्त.
**धेंड**–(मोठा माणूस)–सं. अध्येद्ध.
**धोका**–सं. धक्कः.
**ध्यास**–सं. अध्यास.

---

## न

**नको रे**–सं. न खलु.
**नक्कल**–सं. नक्कणम्.
**नखरूड**–सं. नखरुज्.
**नंगानाच**–सं. अनंगनर्तन.
**नडणें**–सं. नडनम्.

**नंतर**–सं. अनंतरम्.
**नथ**–सं. नस्तिका.
**नन्नाचा पाढा**–सं. अनन्वयस्य पाठः.
**नरडी**–सं. नर्दी (शब्द करणारी).
**नवरा, नवरी**–सं. नववरक.
**नवस**–सं. नमसित; प्रा. नवसिय.
**नस**–सं. स्नसा.
**ना**–(अ.) नाम (अ.)
**नाकाड**–सं. नासिकास्थि.
**नागडा**–सं. नग्राटः
**नाठाळ**–सं. अनास्थ.
**नाठाळ**–सं. अनास्थालु.
**नाडणें**–सं. नाथ् (छळणें).
**नाणें**–सं. नामांकन.
**नातू**–सं. नप्तृ.
**नातवंड**–सं. नप्तृगंड.
**नांदुरकी–नांदरूख**–सं. नंदवृक्ष.
**नारू**–पाली–नहारु = स्नायु.
**नावेकं**–सं. अन्हायक.
**निकें**–सं. निष्क (कांटेतोल, ठरीव).
**निचरा**–सं. निःस्त्राव.
**नितकोर**–सं. न्यङ्क्रुत्वा.
**नितांवी**–सं. निर्नामिक.
**निपजणें**–सं. निपद्.
**निपट**–सं. नि + स्पष्ट.
**निबेळी**–सं. निबगुलि.
**निराळें**–सं. अन्यतर.
**निरांजन**–सं. नीराजन.
**निरुंद**–सं. निर्वृन्द.
**निर्गांठ**–सं. निर्ग्रंथि.
**निवडुंग**–सं. स्नुहिदंडः.
**निवणें**–सं. निर्वाणम्.
**निशाण**–(नगारा) –प्रा. निःसाण.
**निसटणें**–सं. निसृष्टम्.
**निसरडें**–सं. निःसरत्.
**निहाळणें–न्याहाळणें**–सं. नि + भल् (निरीक्षणें:
**नुमगणें, नुगमणें**–सं. न अनुगमनम्.
**नेट**–सं. नेत्र.
**नेभळा**–सं. नाभिलः.
**नेसणें**–सं. निवसनम्.
**न्यारें**–सं. अन्यतर.
**न्हवट**–सं. नविष्ठ.
**न्हावगंड**–सं. न्हावी + गंड (उत्तम पुरुष).

---

## प

**पंकी**–सं. पंक्ति.
**पंक्तिपठाण**–सं. पंक्तिप्रष्ठः.
**पखवाज**–सं. पक्षवाद.
**पगडी, पगड**–सं. प्रकृति.
**पघळणें**–सं. प्रगलनम्.
**पंचा**–सं. पंच; फा. पंज (पांच हात लांब [वस्त्र.
**पच्ची**–सं. अपश्री (सौंदर्यनाश).
**पछाडणें**–सं. प्रच्छाद.
**पंजोळ**–सं. प्रायलिय.
**पटकूर**–सं. पट्टकुल.
**पटपट**–सं. पट् (शब्द करणें).
**पटवणें**–सं. पट्.
**पटविणें**–सं. पट् (विणणें).
**पटवेगार**–सं. पट्टिकावायकार.
**पटाईत** (वाघ)–सं. पट्टायत.
**पट्ट**–सं. पत्र.
**पठार**–सं. पृष्ठ.
**पडघा**–प्रा. पडवर.
**पडजीभ**–सं. पतज्जिव्हा.
**पडदणी**– १ सं. परिधानी; २ सं. पिधान.
**पडवळ**–सं. पटोल.
**पडाव**–सं. प्लव.
**पण**–(अ.) सं. पुनः.
**पणजा**–सं. प्रार्यकः.
**पणतू**–सं. प्रणप्तृ.
**पथारी**–सं. प्रस्तर.
**पदर**–सं. प्रदर.
**पंधरवडा**–सं. पंचदशावर्तः.
**पन्हा**–सं. परिणाह.
**पन्हाळ**–सं. प्रणाल.
**पन्हें**–सं. पानकम्.
**परडें**–सं. परिधि.
**परतणें**–(परत देणें)–सं. प्रत्त (दिलेलें).
**परतणें**–(उलट येणें)–सं. प्रति + इ.
**परभारा**–सं. परवहिः.
**परवड**–सं. प्रपत्ति.
**परवळणें**–सं. प्रक्षालन.

**पराणी**–सं. प्रवयणम्.
**परिपाठ**–सं. परिपाठि.
**परिस**–सं. स्पर्श्.
**परुस**–सं. परिसर.
**परेया**–सं. प्रेतः (मृत).
**पलिता**–सं. प्रज्वलितः.
**पवाडा**–(निंदा) सं. अपवादः.
**पवाडा**–(स्तोत्र)–सं. प्रवादः.
**पसा**–सं. प्रसारः; प्रसारकः; २. सं. प्रसृति.
**पहारा**–सं. प्रहरः.
**पहोपाहुणा**–सं. पथिक + प्राघूर्णिकः.
**पळणें**–सं. पल्.
**पळवापळवी**–सं. प्रलपना + अपलपनी.
**पळापळ**–सं. प्रलापना + अलापना.
**पाऊण**–सं. पादोन.
**पाऊल**–सं. पादावली.
**पाऊस**–सं. प्रावृष्.
**पाखरू**–सं. पक्षितर (लहान पक्षी.)
**पांघरणें**–सं. प्रघृणण.
**पांघरूण**–प्रा. पंगुरण.
**पाजणें**–सं. आप्यायनम्.
**पाजी**–सं. पाय्य (निंद्य).
**पाजी**–सं. पज्ज (शूद्र).
**पाठवणें**–सं. पथ् (जाणें).
**पाडी**–पड्डी.
**पाढा**–सं. पाठः.
**पाणलोट**–सं. पानीयम् + लुठ्.
**पातळ**–(बारीक) सं. पत्रल.
**पातळ**–सं. प्रतनु.
**पातें**–सं. पत्र.
**पाथरवट**–सं. प्रस्तरकुट्ट.
**पादेलोण**–सं. पदंक + लवण.
**पान**–(गोरागोरा) सं. पांडर.
**पान्हा**–सं. पानकः.
**पापणी**–सं. पक्ष्मणी (द्विवचन).
**पापिटला**–सं. पापिष्ठ.
**पार**–(साफ)–सं. पार.(पलीकडलें तीर).
**पारंबी**–१ सं. प्ररोह; २ सं. प्रालंब.
**पायाळू**–सं. पाताल (ज्याला पाताळांतली वस्तु दिसते तो).
**पारध**–सं. प्रार्थना; २ सं. पापर्द्धि (मृगया).
**पारधी**–सं. पापर्द्धि (मृगया).
**पाव**–सं. पाद.
**पावटा**–सं. प्रवटकः.
**पावला**–सं. पादः (चतुर्थांश).
**पाशीं, पासीं, पासून**–१ सं. पश्च (शेजार); २ सं. पार्श्व.
**पाहणें**–सं. दृश् (पश्य).
**पाहाड**–सं. पाठा.
**पाहार**–सं. प्रहार.
**पाहुणा**–सं. प्राघूर्णिकः
**पाळ**–सं. पाली.
**पिचकट**–सं. पिच्चट.
**पिचकारी**–सं. अपस्किरी.
**पिचणें**–सं. पिष् (दळणें).
**पिच्छा**–सं. पद् (जवळ जाणें); पित्सा (जवळ जाण्याची म्ह. मिळविण्याची इच्छा).
**पिटणें**–सं. पिट् (शब्द करणें).
**पिटाळणें**–सं. पिटनम् (पिटणें).
**पिटुकलें**–सं. प्रथुक (प्राण्याचें लहान अर्भक).
**पित्या**–सं. पित्रीय.
**पिपळ**–सं. पिप्लुः.
**पिल्लूं**–ता. पिल्लै (लहानसें पोर).
**पिसें**–सं. पिशाच.
**पिस्कारणें**–सं. अपिस्करण.
**पिळणें**–सं. पीडन.
**पुटपुटणें**–सं. पुट् (बोलणें).
**पुड**–पुड.
**पुतण्या**–सं. पुत्रान्यकः.
**पुरेपूर**–वैदिक सं. पुरपुरु.
**पुसणें**–सं. प्रोच्छनम्.
**पूड**–(खण) सं. पुट.
**पूड, पुडी**–सं. पुट् (चूर्ण करणें.).
**पेच**–सं. प्रेत्य.
**पेंड**–सं. पिण्याक.
**पेंढारी**–सं. पिंडार (गाईम्हशींचे कळप घेऊन जाणारे अहीर वगैरे).
**पेढी**–सं. पीठ.
**पेणें**–सं. अप्ययनम्.
**पेर**–सं. पर्व.
**पेरण**–सं. परिधानम्.
**पेरें**–सं. पर्व.

**पेलणें**–सं. प्रेर.
**पेला**–वैदिक सं. पेर्.
**पेहेरणें**–सं. परिधृ.
**पंकी**–प्रा. पैक (समुदाय).
**पोट**–सं. पुष्ट.
**पोटरी**–सं. प्रकोष्ठ.
**पोतें**–सं. पोतव (माप).
**पोथी**–सं. पुथ् (सांगणें).
**पोपट**–सं. पुट् (बोलणें).
(पोपट) **पंची**–सं. पंचिका (विस्तृत भाषण).
**पोपडा**–सं. पुड् (सोडणें, सुटणें).
**पोफळ**–सं. पुष्फल किंवा पूगीफल.
**पोर**–(पु.) पुत्रक.
**पोरगा**–सं. पुत्रकः.
**पोरेंसोरें**–सं. पुत्रक + सोदरक.
**पोहणें**–सं. प्रोहण.
**पोहरा**–१ सं. अपोहर; २ सं. पयोधरः.
**पोळ**–सं. प्रतोलि.
**पोळी**–सं. पुटी. [सं. पेरु.
**प्याला**–(पिण्याचें लहान भांडें) वैदिक.

---

## फ

**फड**–(निवडुंगाचा)–सं. स्फट.
**फडकें**–सं. वरकम्.
**फंद**–सं. स्फंड् (थट्टा करणें).
**फंद**–सं. स्फंद्.
**फंदी**–सं. स्फंडिन्.
**फन्ना**–सं. निष्पन्न; प्रा. निष्फन्न–फन्न.
**फरा**–(कमरेचा)–सं. फलकः.
**फस्त**–सं. अपहस्त.
**फळफळणें**–सं. फल्.
**फाड**–( दगडाचा चिरा)–सं. स्फटिक.
**फाड**–सं. स्फटी.
**फासणें**–सं. स्पर्शनम्.
**फासळी**–सं. स्पर्शु.
**फीत**–सं. स्फीति.
**फुकट**–सं. फूत्कृतम्.
**फुंकरणें**–सं. फुंकृ.
**फुटाणा**–सं. स्फुट्.
**फुणगी**–सं. स्फुलिंग.
**फुंदणें**–सं. स्पंद.
**फेंगडा**–सं. प्रज्ञटः.
**फेटाळणें**–सं. स्फिटनम् (फेडणें).
**फोंपसा**–१ सं. पुप्फुल; २ पोपुष्यः.

---

## ब

**बकरूं**–सं. वर्करतर (बकऱ्याचें पिलूं).
**बकाबक**–सं. भक्ष्याभक्ष्य.
**बचनाग**–सं. वत्सनाभ.
**बजरंग**–सं. वज्रांग.
**बट**–सं. वट (दोऱ्याचा लहान जुडगा).
**बटु**–सं. अवटु (मानेचा उंच भाग).
**बट्टा**–सं. व्रत्.
**बडवा**–सं. बटुकक.
**बडवणें**–सं. वृध् (लांब–लंबे करणें).
**बडा**–सं. वृद्धः.
**बत्ता**–प्रा. बत्ता (पात्र).
**बत्ती**–सं. वर्तिका.
**बद्द**–सं. अवद्य (निंद्य).
**बंधुला**–सं. बंधुलक (दासीपुत्र).
**बनणें**–सं. भूत; प्रा. भन.
**बनणें**–सं. वन् (सिद्ध होणें).
**बनात**–सं. ऊर्णावत्.
**बंभोला**–सं. ब्रह्म–प्रा. बंभ.
**बरकत**–वरी गति.
**बरगडी**–सं. उरोगड.
**बरवा**–सं. परम.
**बरें**–परमम्.
**बरवाटी**–सं. वक्षोस्थि (बरगडी, बाजू).
**बलुत्या**–सं. बली + अपत्य.
**बस**–सं. वश.
**बस्कर**–सं. विष्टर.
**बाका**–सं. पाक (आपत्ति).
**बाजारबसवी**–सं. भार्यारु + उपवेशनी.
**बाजीराव**–कानडी बाचीराज.
**बाणीवर येणें**–सं. वाणी.
**बात**–सं. वार्ता.
**बातमी**–सं. वार्ता.
**बाप**–सं. पा (पालव करणें); सं. वप्र, प्रा. बप्पो.
**बापू**–सं. पपु (पिणारा).

**बाबा**–सं. भावः.
**बाबू**–सं. भाव.
**बाभूळ**–सं. बभ्रल.
**बाल**–(केस)–सं. वाल.
**बावडी**–सं. वापी.
**बावरणें**–सं. भ्रंश्.
**बाष्कळ**–सं. बाष्कल (वेदाची एक शाखा).
**बासन**–सं. वासन.
**बाहणें–बाहाणें**–सं. व्याव्हानम्.
**बाळंतें**–सं. बाल.
**बिकट**–सं. विकट.
**बिघाड**–सं. अभिघात किंवा विघात.
**बिचकणें**–सं. वि + चक् (भिणें).
**बित्तंबातमी**–सं. वृत्तं + फा. बातमी.
**बिदि**–सं. वीथी.
**बिथरणें**–सं. वितर्जम्.
**बिब्बा**–(विकल्प)–सं. विभाषा.
**बिब्या**–(वाघ)–द्वीपिन्.
**बिलगणें**–सं. अपिलग्.
**बीड**–सं. व्यंडम्.
**बुगडी**–सं. मुकुट.
**बुचडणें**–सं. व्युच्चरणम्.
**बुचडा**–सं. वृज् (वांकडें होणें).
**बुचाडणें**–सं. व्युत्सादनम्.
**बुडणें**–सं. बुद्.
**बुजणें**–(घाबरणें)–सं. बुड्.
**बुढ्ढा**–सं. वृध्.
**बुद्रुक**–सं. वृद्ध.
**बुबुळ**–सं. बुद्बुद–प्रा. बुब्बुळ; सं. बुद्बुर.
**बुरणूस**–सं. ऊर्णायुः.
**बुरबुर**–सं. बुर्बुर (पाणी).
**बुळबुळीत**–सं. बुड् (बुडणें).
**बुळा**–सं. बुड् (बुडणें).
**बेचंगळ**–बीच + अंगुलि.
**बेपरवाई**–सं. द्विप्रव्राजिनी (स्वैरवृत्ति).
**बेंबटणें**–सं. बिट् (आक्रोशणें).
**बेंबल**–सं. विव्हल.
**बेंबळणें**–सं. बिल् (भेदणें.)
**बेंबी**–सं. बिंबका.
**बेसन**–सं. वेसन (डाळीचें पीठ).
**बेळकें**–सं. बिलकम्.
**बैठक**–सं. पीठिका.
**बैल**–प्रा. बइल्ल.
**बोकड**–सं. बुक्क.
**बोगणी**–सं. बहुगुणी.
**बोंचणें**–सं. ब्रूस् (इजा करणें).
**बोट**–सं. पुट.
**बोडका**–बुघ्न.
**बोडकें**–(डोकें)–सं. बुड् (हजामत करणें).
**बोडण**–सं. ओदन.
**बोडंती**–सं. मोटन्ति (मोडणें). [वर्धक.
**बोढ्यो**–(मुलगा)–बोड (तरुण); सं.
**बोभाट**–सं. भर्त्स्.
**बोहोरी**–सं. व्यवहार.
**बोळ**–(औषध)–सं. बोल.
**बोळकें**–प्रा. बोलअ.
**बोळवणें**–प्रा. वुल्लड.

---

## भ

**भगवें**–१ सं. भृगु; २ सं. भार्गव.
**भट्टी**–सं. भृष्टि.
**भडभडून**–सं. भटभटायित्वा.
**भडभुंजा**–सं. भृष्ट–भुंजकः.
**भपका**–सं. बाष्पकक.
**भप्प**–सं. बाष्प.
**भयाभीत**–सं. भिया भीत.
**भरकटणें**–सं. अभ्यवकषणम्.
**भरवसा**–सं. विश्रंभः.
**भराडी**–सं. भरटक.
**भसाडा**–सं. भस्.
**भाऊ**–सं. भाव.
**भाकर**–सं. भक्ष्याहार.
**भांग**–(केंसांचा)–सं. भंग.
**भाजणें**–सं. भ्राज्.
**भाडखाऊ**–सं. भाष्टि (भाडें) + खाद्.
**भांडवल**–सं. भांडमूल.
**भांबावणें**–सं. भ्राम्.
**भारूड**–सं. भार.
**भावंड**–सं. भावगंड.
**भावीण**–सं. भामिनी.
**भास**–(अभ्यास, ज्ञान)–सं. अभ्यास.
**भिकाटणें**–सं. भिक्षाटनम्.
**भिजणें**–सं. अभिषेचनम्.

... वाचनालय, ...री.



**भिडणें**–सं. अभ्यंजन.
**भिडा**–सं. अभिध्या (इच्छा).
**भिवई, भुंवई**–सं. भ्रूपंक्ति.
**भीतर**–सं. अभ्यंतर.
**भुतवळें**–सं. भूतवलय.
**भूपाळी**–प्रा. भोआवलि (सकाळीं बंदिजनांनीं म्हणण्याची राजस्तुति).
**भेटणें**–सं. अभ्यतनम्.
**भोंगळ**–सं. भूमंगल.
**भोजनभाऊ**–सं. भोजने बहुला:.
**भोपळा**–सं. वृहत्फल:.
**भोरपी**–सं. वहुरूपी.
**भोंवरा**–भ्रमर:.
**भोसडणें**–( शिव्या देणें )–सं. भसद् (योनि).
**भ्याड**–सं. भेल.

---

## म

**मखर**–सं. मखगृह.
**मजाल**–फा. मजास (सामर्थ्य).
**मणका**–सं. मणिकक:.
**मच्छर**–सं. मक्षितर (लहान माशी).
**मणगट**–सं. मणिगड.
**मण**–मनह (बाबिलोन येथील ४० पौंडांचें वजन).
**मलखांब**–सं. मल्लस्तंभ.
**महार**–१ सं. महा + अरि; २ महा + अर (पर्वताच्या गुहेंत राहाणारा). ३ मृत + हर (मेलेलें जनावर ओढणारा.)
**महाल**–प्रा. महल्लअ.
**माकडहाड**–सं. मर्कटास्थि.
**माघारा**–सं. मार्ग.
**मांजणें**–सं. मार्ज.
**मांजरपाट**–इं. म्यांचेस्टर + पाट.
**माणूस**–सं. मनु.
**मात**–(गोष्ट) सं. मंतु (विचार).
**मात**–सं. मात्रा.
**मान**–सं. मत्या.
**मावळण**–सं. मातुलानी.
**मासमच्छर**–सं. मांस + मत्स्यतर.
**मिचकणें**–सं. स्मीलनम्.
**मिरीं**–सं. मरीच.
**मिसरूं**–सं. श्मश्रु.
**मिशी**–सं. श्मश्रू.
**मुद्दल**–सं. मूलद.
**मुरमुरा**–सं. मुर्मुरक (तुसावर किंवा पानाच्या पाचोळ्यावर भाजलेलें भात).
**मुलगा**–सं. मूलक:.
**मुदुंग्या**–सं. मृदंगिक.
**मूग**–(गिळणें)–सं. मूक–प्रा. मूग.
**मूद**–(भाताची)–सं. मुद्रा.
**मेंग**–सं. मृतांग (सापाची मेलेली कातडी).
**मेतकूट**–सं. मिथ:कूट.
**मेंदू**–सं. मिद् (चिकट होणें).
**मेळा**–सं. मेलक:.
**मोगर**–सं. मुद्गर.
**मोटाळणें**–सं. मोटन (मोडणें).
**मोठा**–सं. महत्.
**म्यां**–सं. मया.
**म्हणें**–१ सं. मन्ये; २ सं. भण्.
**म्हातारा**–सं. महत्तर.
**म्हैस**–सं. महिषी.

---

## र

**रगट**–सं. लक्तिका.
**रती**–सं. रक्ति.
**रद्दा**–सं. रद् (फोडणें).
**रसोई**–सं. रससूदिका.
**रस्सी**–सं. रश्मि.
**राई**–(रांग) सं. राजि.
**राऊळ**–सं. राजकुल.
**रान**–सं. अरण्य.
**रामोशी**–सं. अरण्यवासी.
**राव**–सं. राजन्.
**रिंगणें**–सं. रिंग्.
**रुका**–सं. रुक्म (सोनें).
**रुंद**–सं. वृंद.
**रुपया**–सं. रूप्यक.
**रुळणें**–सं. रुह्.
**रेकणें**–सं. रेष् (खिंकाळणें).
**रेडा**–सं. रिष् (हिंसा करणें).
**रेफ**–सं. रिफ (कर्कश नाद करणें).
**रोड**–सं. रुद्.

**रोषनाई**–प्रा. रोसाअणम्.
**रोशें**–(गवत)–सं. रोहिषम्.
**रोळी**–वरळ (जींत दाणे धुतात तीं सच्छिद्र टोपली).

———

## ल

**लंगडा**–सं. लंग (पायानें व्यंग).
**लगतरी**–सं. लक्तक.
**लगोरी**–सं. लग्नगोलि.
**लग्गा**–सं. लग्.
**लडिवाळ**–सं. लाटी (लाटदेशीय स्त्री).
**लढणें**–सं. रध् (हिंसा करणें).
**लपेटी**–सं. लिप्.
**लव**–सं. लोमन्.
**लवणें**–नमनम्.
**लळा**–सं. लड्.
**लागलाच**–सं. द्राक् च.
**लागाबांधा**–सं. लग्नबंधन.
**लाट**–(स्तंभ,दांडी)–सं. यष्टि–प्रा. लठ्ठी.
**लाड**–सं. लाटी (लाटदेशीय स्त्री).
**लाडकी**–सं. लाटी (लाटदेशीय स्त्री).
**लापट**–(चिवट)–सं. लपट.
**लालची**–सं. लालस.
**लालूच**–सं. लालसा.
**लुगडें**–सं. दुकूलम्.
**लुच्चा**–सं. लुंच् (चोरणें).
**लोटणें**–( निजणें )–सं. लोट् ( स्वप्न पडणें).
**लोटणें**–(गत होणें)–सं. लोट्.
**लोटा**–सं. लुट् (लोळणें).
**लोढणें**–सं. लुठ् (लोळणें).
**लोणा**–सं. लवणक.
**लोघा**–सं. लुब्ध.

———

## व

**व**–सं. वा–प्रा. व.
**वचकणें**–सं. उच्चकनम्.
**वंजारी**–१ सं. वनचर; २ सं. विंध्याधरिन्.
**वठवणें**–सं. प्रस्थापन.
**वतन**–सं. वर्तन.
**वदन्ता**–सं. उदन्ता.
**वन्सें**–सं. पतिश्वसा.
**वर**–सं. उपरि.
**वरात**–सं. व्रात (समुदाय).
**वर्चस्व**–सं. वर्चस्त्व.
**वळचण**–सं. वलभीस्थान.
**वहिलें**–(निराळें)–सं. व्यवहित.
**वळी**–सं. वली.
**वाकळ**–सं. वल्कल.
**वाजणें**–सं. वाशृ (शब्द करणें).
**वाटाणा**–सं. वटधान्य.
**वाटोळें**–सं. वर्तुलम्.
(अन्न) **वाढणें**–सं. उपपाद्.
**वाढवणें**–( फुटणें; तुटणें )–सं. वर्ध् (कापणें.)
**वाढवणें**–(भर टाकणें)–सं. वर्धापनम्.
**वाढदिवस**–सं. वृद्ध दिवस.
**वात्रट**–सं. वातर (वायु झालेला).
**वारी**–सं. वर्या (स्वयंवर करणारी बाला).
**वारूळ**–सं. वामलूर.
**वाव**–सं. व्योम.
**वांव**–सं. व्याम.
**वावर**–(शेत)–सं. व्यापार.
**वावरणें**–सं. व्यापार.
**वांसा**–सं. वंशकः.
**वाळुक**–सं. वल्मीक.
**वाहणा**–सं. उपानहौ.
**विचकणें**–सं. विष्कनम्.
**विझवणें, विझविणें**–सं. विध्मा.
**विरजण**–सं. विजन.
**विस्कळित**–सं. वि + सकल.
**विस्तव**–सं. इष्टवह; २ सं. विष्णु; ३ हिं. बस्ती.
**विहीर**–सं. विवरः.
**वीत**–सं. वितस्ति.
**वेटाळणें**–सं. वेष्टन.
**वेठ**–१ तेलगु–वेट्टी (रोख मेहताऩ्यावांचून करावें लागणारें काम); २ सं. विष्टि.
**वेडावणें**–सं. विटंबनम्.
**वेढा**–सं. वेष्ट्.
**वेणा**–सं. वेदना.
**वेणी**–सं. वे (विणणें).

**वेणीफणी**–सं. वेणीप्रवेणी.
**वेळणी**–सं. वेळ् (हलविणें).
**वेळणें**–सं. वेळ (हलविणें).
**वैराण**–सं. विरिण (शून्य).
**वोज**–सं. ओजस्.
**वृद्धकपि**–सं. वृद्ध + कल्पीय–प्रा. कप्पिअ.

---

## श

**शरम**–सं. श्रम्.
**शरमणें**–सं. श्रम्.
**शहाणा**–सं. शिक्षाज्ञ.
**शाबास**–फा. शाहअब्बसा.
**शिंका**–सं. छिक्का.
**शिंगाडा**–सं. शृंगाटक.
**शिजणें**–सं. सिध्.
**शीण**–सं. खिन्न.
**शिनक**–छिण्णक.
**शिपणें**–सं. सिंच्.
**शिरा**–फा. शिरा (गोड पदार्थ).
**शिराणी**–सं. श्री.
**शिवशिवणें**–सं. सिमसिमाय.
**शिळें**–सं. शीतल.
**शीत**–सं. सिक्थ.
**शेगडी**–सं. शकटी.
**शेटजी**–सं. श्रेष्ठिन्.
**शेंडा**–हिं. छेंडा.
**शेंडी**–सं. शिखंड.
**शेण**–सं. शकन्.
**शेंबूड**–सं. श्लेष्मोदक.
**शेरणी**–१ फा. शीरीनी; २ सं. श्रेणी.
**शेलका**–प्रा. छइल्ल; सं. शिल् (वेंचणें).
**शेला**–प्रा. छइल्ल (विदग्ध).
**श्रद्धा**–(पादणें)–सं. शृधा.
**श्रीखंड**–गुज. शिकण.

---

## स

**सकट, सगट**–सं. सकृत्.
**सकटघोडे**–यांत सकट हा शब्द सं. शकट (रथ) यापासून निघाला आहे.
**सकाळ**– सं. सत्काळ.
**सचकार**–सं. सत्यकार.
**सढळ**–सं. श्रद्धावत्.
**सतावणें**–सं. सत्र (पाय).
**संत**–सं. शांति.
**सबर**–सं. सत्वहर.
**समई**–१ फा. शमय (दिवा); २ सं. संदीपिका.
**समदें**–सं. समुदित (एकत्र केलेलें).
**समाईक**–सं. सामाजिक.
**सरडा**–सं. शरट.
**सरसगट**–सं. सर्व + सकृत्.
**सर्दी**–सं. छर्दिः.
**सर्पण**–सं. श्रपण (शिजविणें).
**सलोखा**–सं. संलक्षः.
**सल्ला**–सं. संलापः.
**सवंग**–सं. समर्ध.
**सवता**–सं. स्वतंत्र.
**संवय**–सं. समय (चाल).
**सळई**–सं. शलाका.
**सांकडें**–सं. संकट.
**सांगणें**–सं. सम् + ख्या.
**सागळ**–सं. छागल (बकऱ्याचें मऊ कातडें)
**साज**–सं. सज्ज.
**सांज**–सं. संध्या.
**साजणी**–सं. सज्जन.
**सांजवणें**–सं. संध्या.
**सांजा**–सं. संधाव (ज्यांत गूळ इत्यादि पदार्थ मिसळलेले असतात).
**साजूक**–सं. सद्य–प्रा. सज्जु.
**साटें**–सं. शकट.
**साटेंलोटें**–यांत साटें हा शब्द सं. साटे (वांटा) यापासून झालेला आहे.
**सांठवणें**–सं. संस्थापन.
**सांडस**–सं. संडिश.
**साडी**–सं. शाटिका.
**साथ**–सं. साति (ओळ).
**साधा**–सं. साधु.
**सांबर**–सं. शंबर.
**सांपळा**–सं. पाशजालकः.
**सांभाळ**–सभरण.
**सांभारें**–सं. संभरणम्.
**साल**–सं. छल्ली.

**सावज**–सं. श्वापद.
**सांवरणें**–सं. संवृ.
**सावळागोंधळ**–सं. शांभलिकः गौंदलः (ज्यांत दुराचारी रांडा गातात असा गोंधळ).
**साहाण**–सं. शाण.
**साळसुद**–सं. शालाशुद्ध.
**साळी**–सं. शालिक.
**सुकट**–सं. शुष्कल.
**सुगरणें**–सं. सुकर.
**सुजणें**–(जाणें)–सं. श्वज्.
**सुटणें**–सं. श्वठ्.
**सुद्धां**–सं. सार्धं.
**सुंभ**–सं. शुल्ब.
**सुरई**–सं. सुरा.
**सुरवाडणें**–सं. सुवर्धनम्.
**सुरूखुरू**–फा. सुर्ख (तांबडें) + रू (चर्या).
**सूप**–सं. शूर्प.
**सैंपाक**–सं. सूदपाक.
**सैंपाकी**–सं. सूदपाकिन्.
**सैल**–सं. शिथिल.
**सोंगळ**–सं. सुमंगल.
**सोजी**–सं. सूद्या.
**सोट**–सं. शोठ (आळशी).
**सोटभैरव**–सं. स्वस्तिभैरवाय.
**सोडणें**–सं. छोरणम्.
**स्नोपणें**–सं. समर्पण.
**सोमळ**–सं. सोष्मन्.
**सोहाळा**–सं. सौहार्द.
**स्वार**–सं. अश्ववार.

---

## ह

**हजार**–सं. सहस्र.
**हड्डी**–सं. अस्थि.
**हंतरी**–सं. आस्तरण.
**हंतरूण**–सं. आस्तरण.
**हनवटी**–सं. हनुपाटी.
**हमाल**–फा. हमल (ओझें).
**हरभरा**–सं. हरिभरक (घोड्यानें फोडण्याचें धान्य).
**हळू**–सं. लघु.
**हाकारणें**–सं. आकार्य.
**हाड**–सं. अस्थि.
**हि**–(अव्यय)–वैदिक ई.
**हिणावणें**–सं. न्ही.
**हिंदुळा**–सं. आंदोलः.
**हिसकणें**–सं. हिष्कनम् (हिंसा).
**हुच्च**–सं. हुर्छा (कौटिल्य).
**हुंडी**–सं. हुड् (स्वीकारणें).
**हेटकरी**–सं. अधः—प्रा. हेट्ठ (खालचा, तळकोंकणचा).
**हेटाळणें**–सं. हेडनम्.
**हेरलें**–सं. दृश्–प्रा. हेर.
**हेसा**–सं. हल (नांगर).
**हो**–वैदिक–ओम्.
**होडी**–सं. होड् (जाणें).

परिशिष्ट ३

# प्राकृत ग्रंथांतली

# जुनी मराठी भाषा

## तिच्यासंबंधाचे कांहीं स्थूल नियम

मानभावी संप्रदायाचे ग्रंथ व मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, श्रीधर, महीपति इ. कवींचे ग्रंथ यांची भाषा लोकांत 'प्राकृत' या नांवानें प्रसिद्ध आहे. पण ती खरी प्राकृत भाषा नव्हे. प्राकृत भाषा फार जुन्या काळीं—कित्येक शतकांपूर्वीं-चालू होती. तिचा नमुना संस्कृत नाटकांतून, किंवा गौडवहो, गाथा-सप्तशती, कर्पूर-मंजरी इ. ग्रंथांतून पाहण्यास मिळतो. ज्ञानेश्वरी–प्रभृति ग्रंथांतली भाषा प्राकृत भाषेहून फार भिन्न आहे. तिच्यांत हल्लीं प्रचारांत नसलेले पुष्कळ जुने अपरिचित मराठी शब्द व रूपें आढळतात; म्हणून ती सध्यांच्या मराठी भाषेहून भिन्न असावी—प्राकृत असावी—असें लोकांना वाटलें व म्हणून या जुन्या मराठी भाषेला त्यांनीं प्राकृत हें नांव दिलें इतकेंच. हे जुने मराठी ग्रंथ पुष्कळ वृद्ध माणसें व बाया घरोघर वाचीत असतात. त्यांचा अर्थ नीट कळण्यास त्या भाषेची थोडीशी मांडणी कळणें अवश्य आहे. म्हणून तीविषयीं कांहीं नियम हंसकोशाचे कर्ते रा. रघुनाथशास्त्री गोडबोले यांनीं बांधिले आहेत. त्यांत आणखी कांहीं भर घालून पुढील उपयुक्त माहिती देण्यांत येत आहे—

१. ज्यांचें अंत्याक्षर य किंवा ह आहे, अशीं जीं अकारान्त पुंलिंगी संस्कृत नामें अथवा विशेषणें आहेत, तीं यमक, छंद, किंवा कविरूढि यांच्या साधणुकीसाठीं जुन्या मराठी कवितेंत ओकारान्त होतात. जसें–निश्चय, विषय, सदय, अतिशय, उपाय, अभिप्राय, स्वकीय, तुरीय, सूर्य, प्रमेय, अनुग्रह, विरह, दुःसह, दुःखावह, प्रवाह, सिंह, समूह, देह, लोह, प्ररोह इ. शब्दांचीं रूपें अनुक्रमें निश्चयो, विषयो, सदयो, अतिशयो, उपायो, अभिप्रायो, स्वकीयो, तुरीयो, सूर्यो, प्रमेयो, अनुग्रहो, विरहो, दुःसहो, दुःखावहो, प्रवाहो, सिंहो, समूहो, देहो, लोहो, प्ररोहो, याप्रमाणें होतात.

२. ज्यांचें अंत्याक्षर य किंवा ह नाहीं अशीं जीं अकारांत पुंलिंगी व क्वचित् नपुंसकलिंगी नामें अथवा विशेषणें आहेत तीं जुन्या मराठी कवितेंत उकारान्त अथवा

ऊकारान्त होतात. जसें--ईश्वर, लाभ, वसंत, पंथ, संसार, विस्तार, एक, हरिख, मठ, मार्ग, पंडित, अर्थ, कुंजर, भ्याड, चालक, निंदक, समर्थ, टवाळ, धीट, विद्वान इ. शब्दांचीं रूपें अनुक्रमें ईश्वरु, लाभु, वसंतु, पंथु, संसारु, विस्तारु, एकु, हरिखु, मठु, मार्गु, पंडितु, अर्थु, कुंजरु, भ्याडु, चाळकु, निंदकु, समर्थु, टवाळु, धीटु, विद्वानु याप्रमाणें होतात.

३. ज्यांचें अंत्याक्षर, य किंवा ह आहे, अशीं जीं उकारान्त पुंलिंगी संस्कृत नामें अथवा विशेषणें आहेत तीं मराठी कवितेंत ओकारान्त होतात. जसें--वायु, राहु, महाबाहु, इ. शब्द वायो, राहो, महाबाहो याप्रमाणें लिहिलेले आढळतात.

४. ज्यांत र, ळ, किंवा ल हीं अक्षरें असून त्यांच्याच मागें चवर्ग सोडून कोणतेंही अकारान्त अक्षर आहे, अशा शब्दांत जुन्या मराठी कवितेंत त्यांच्या अकारान्ताच्या स्थानीं उकारान्त किंवा ऊकारान्त होतात. जसें--लेंकरें, डिखळ, बगळा, घुंगरडें, वाव्हटळ, गांवढळ, पांढरकें, वातळ, बाभळ, विरळा, दादला, धाकला, आपला, चांगला हे शब्द लेंकुरें, डिखूळ, बगुळा, घुंगरडें, वाव्हटूळ, गांवढूळ, पांढुरकें, वातूळ, बाभूळ, विरुळा, दादुला, धाकुला, आपुला, चांगुला, याप्रमाणें होतात.

५. ज्यांत र, ळ किंवा ल असून त्याच्याच मागें चवर्गाचें अकारान्त अक्षर आहे, अशा शब्दांत जुन्या मराठी कवितेंत अकारान्त चवर्गस्थानीं इ किंवा ईकारान्त होतात--कुश्चळ, कुचर, साजरें, गोजरवाणें, कोजळी, फाजल, हे शब्द, कुश्चीळ, कुचीर, साजिरें, गोजिरवाणें, कोजिळी, फाजील याप्रमाणें होतात.

६. ज्यांत र, ळ किंवा ल असून त्याच्याच मागें ह अक्षर असतें अशा शब्दांत त्या हच्या स्थानीं 'हो' होतो. जसें--मोहरा, बोहळ, दोहरा, सोहळा, डोहळा, बोहलें, हे शब्द मोहोरा, बोहोळ, दोहोरा, सोहोळा, डोहोळा, बोहोलें, ह्याप्रमाणें होतात.

७. ज्यांत र, ळ किंवा ल असून त्याच्याच मागें 'य' आहे अशा शब्दांतल्या 'य' चा लोप होऊन त्याच्या जागीं केवळ इ किंवा ई हीं येतात. जसें--पायरी, सोयरी, सायळ, कायल हे शब्द पाइरी, सोइरीक, साईळ, काईल ह्याप्रमाणें होतात.

८. ज्यांत ट वर्गांतील अक्षरामागेंच अकारान्त च वर्गाचें अक्षर आहे अशा शब्दांत त्या आकारान्त च वर्गाक्षराच्या स्थानीं इ किंवा ईकारान्त होतात. जसें--गोचड कोजट, खुजट, इत्यादि शब्द गोचीड, कोजीट, खुजीट याप्रमाणें होतात.

९. ज्यांत ट वर्गांतील अक्षरामागेंच च वर्गाशिवाय कोणतेंही अकारान्त अक्षर आहे अशा शब्दांत त्या मागील अक्षराला उकार किंवा ऊकार होतात. जसें--धाकटा, बापडा, वांकडें, अखडणें, विरढणें, इत्यादि शब्द धाकुटा, बापुडा, वांकुडें, अखुडणें, विरूढणें याप्रमाणें होतात.

१०. ज्यांचें अंत्याक्षर य असून उपांत्य कोणतेंही आकारान्त अक्षर आहे, अशा शब्दांतलें अंत्याक्षर लोपून त्या स्थानीं 'व' किंवा 'वो' होतात. जसें--समुदाय,

अपाय, न्याय, अभिप्राय, राय, ठाय, वाय, घाय, डाय, थाय इत्यादि शब्द समुदाव, अपाव, न्याव, अभिप्राव, राव, ठाव, वाव, घाव, डाव, थाव किंवा समुदावो, अपावो, न्यावो, अभिप्रावो, रावो, ठावो, वावो, घावो, डावो, थावो याप्रमाणें होतात.

११. ज्याचें अंत्याक्षर य असून उपांत्याक्षर कोणतेंही अकारान्त अक्षर आहे असे जे पुंलिंगी शब्द आहेत त्यांत उपांत्य ओकारान्त होऊन अंत्याक्षराचा लोप होतो; आणि जर तोच 'य' पुंलिंगी शब्दांत मध्यें व स्त्रीलिंगी आणि नपुंसकलिंगी शब्दांच्या अंतीं असेल तर त्याचा लोप होऊन त्याच्याच मागलें अक्षर विकल्पानें एकारान्त किंवा ऐकारान्त होतें. जसें—विषय, निश्चय, विस्मय, उदय, सदय, अतिशय इत्यादि, शब्द विषो, निश्चो, विस्मो, उदो, सदो, अतिशो किंवा अतिसो, आणि अवयव, भय, सय, संवय हे शब्द अवेव, भे, से, संवे याप्रमाणें होतात.

१२. ज्यांत ष किंवा क्ष हें अक्षर आहे अशा शब्दांतल्या त्या अक्षरांचा लोप होऊन त्याजागीं 'ख' हें अक्षर येतें. जसें —विष, रेषा, पाषांड, अक्ष, अक्षता, निरीक्षण इत्यादि शब्द विख, विखो, रेखा, पाखांड, आंख, अखता, निरीखण याप्रमाणें होतात.

१३. शब्दांत एकाद्या अक्षरावर रेफ असल्यास त्या रेफाचा लोप होऊन त्या रेफयुक्त अक्षराच्या मागेंच त्या रेफाबद्दल रु किंवा रू हें अक्षर येतें. जसें—हर्ष, वर्ष, दर्शन, आर्ष, अर्भक, मार्ग, अर्ता, पर्ता, तुर्क इत्यादि शब्द हरुष, वरुष, दरुशन, आरुष, अरुभक, मारूग, अरुता, परुता, तुरूक याप्रमाणें लिहिले जातात.

१४. ज्यांत 'ष' या अक्षरावर रेफ आहे अशा शब्दांत 'ष' स्थानीं 'ख' होऊन रेफावद्दल त्याच्या मागेंच, रि किंवा री हें अक्षर येतें. जसें—हर्षणें—हरिखणें.

१५. ज्यांत 'व' हें अक्षर आहे, अशा शब्दांत जर तो 'व' अंतीं असला तर त्याच्या जागीं 'वो' किंवा 'उ' अथवा 'ऊ' येतात; परंतु तोच 'व' मध्याक्षर असतां 'वो' न होतां उ किंवा ऊ होतो. जसें—जीव, शिव, देव, ठाव, भाव, गौरव, कंवठ, देशावर, कावळा, पावलें, देवळें इत्यादि शब्द जिवो, शिवो, देवो, ठावो, भावो, गौरवो किंवा जिउ, शिउ, देऊ, भाऊ, ठाऊ, गौरउ, कंऊठ, देशाऊर, काउळा, पाउलें, देउळें याप्रमाणें होतात.

१६. ज्याचें अंत्याक्षर 'व' असून उपांत्य ओकारान्त असतो अशीं जीं आकारान्त पुंलिंगी विशेषनामें आहेत, तीं देवास उद्देशून असतां अंत्याक्षराचा लोप होतो व मनुष्यास उद्देशून असतां अंत्याक्षर व उपांत्याची मात्रा या दोहोंचाही लोप होतो. जसें—विठोबा, कान्होबा, तुकोबा, इ० शब्द देवास उद्देशून असतां विठो, कान्हो आणि मनुष्यास उद्देशून असल्यास विठा, कान्हा, तुका याप्रमाणें होतात.

हा शेवटचा नियम जुन्या मराठी शब्दांविषयीं आहे. हल्लींच्या मराठी भाषेंत तो प्रचारांत नाहीं. सध्यांच्या मराठी भाषेंत 'खंडो बल्लाळ,' 'नारो शंकर,' 'विठो जाधव' इ० नांवें माणसांस उद्देशून असतांहि आपण त्यांचीं रूपें वरील नियमाप्रमाणें 'खंडा बल्लाळ,' 'नारा शंकर' किंवा 'विठा जाधव' अशीं करीत नाहीं.

वरील नियमांशिवाय आणखी कित्येक गोष्टी ध्यानांत ठेवण्यासारख्या आहेत. उदाहरणार्थ—संस्कृत शब्दांतल्या अंत्य 'घ' च्या जागीं जुन्या मराठींत 'ह' होतो. जसें—सं. मेघ (जु. म.) मेह.

'थ' बद्दल 'ह' होतो; जसें—सं. नाथ–(जु. म.) नाहो.

'ल' बद्दल 'ळ' होतो; जसें—सं. जाल—(जु. म.) जाळ.

संस्कृत शब्दांत आरंभीं 'य' आल्यास त्याचा 'ज' होतो. जसें—सं. यव–(जु. म.) जव.

केव्हां केव्हां दोन स्वरांबद्दल एकाच स्वराचा आदेश होतो व तसें होतांना एखादें अक्षर अजिबात गळतें. जसें—सं. उपवास, म०—उपास, सं. अवस्थान, म०—वठाण.

द्ध च्या जागें ढ येतो. जसें—सं. वृद्धवेला—जु. म. वाढवेळ—वाढोळ किंवा वाढूळ.

संस्कृत शब्दांतल्या ईबद्दल ऐ हा स्वर येऊन शबद्दल स होतो. जसें—सं. कीदृश—जु. म. कैसा.

कित्येक संस्कृत शब्दांतले उपान्त्य दीर्घ स्वर मराठींत ते शब्द येतांना ऱ्हस्व होतात. जसें—कुमार—जु. म. कुमर.

सारांश, संस्कृत शब्दांचे प्राकृत भाषेंत अपभ्रंश होतांना जे नियम लागतात, त्यांतले बरेच नियम जुन्या मराठी शब्दांनाहि लागू पडतात. अलीकडे संस्कृत शब्दांचे असे अपभ्रंश करून त्या शब्दांना मराठी शब्दांचें रूप देण्यापेक्षां अस्सल संस्कृत शब्द जसेच्या तसेच मराठींत वापरण्याकडे सुशिक्षित लोकांची प्रवृत्ति जास्त आहे.

जुन्या मराठी नामांच्या व विशेषणांच्या रूपांसंबंधाचे हे थोडेसे स्थूल नियम मार्गदर्शक म्हणून सांगितले. परंतु कोणत्याहि नियमास धरून न होतां स्वच्छंदीपणानें झालेल्या शब्दरचनेचीं जुन्या मराठींतलीं शेकडों उदाहरणें देतां येतील. जसें :—

| **संस्कृत किंवा प्राकृत शब्द.** | **जुने मराठी शब्द** | **संस्कृत किंवा प्राकृत शब्द** | **जुने मराठी शब्द.** |
|---|---|---|---|
| पंख | पांखोवा | अघवें | अवघें |
| गोमांस | घाऊस | नवरा | नाहो |
| सोपें | सोपारें | माग | मागोवा |
| परीक्षा | पारख | दिन | दिव, दिह, देह |
| कलह | कळ, कळी | ज्ञाति | न्याती |
| स्वतंत्र | सतंतर | गृह, गेह | घर |
| शूर | सोर | रिगम | रिघ, रिघाव |
| धाकटें | धाकलें | तूट | तुटार इ० |

नगर वाचनालय, सातारा.



क, ग, च, ज, ट, ड, त, द, प, आणि ब यांच्यापुढें ' ह ' च्या बाराखडींतलें कोणतेंहि अक्षर आल्यास त्या कगादि अक्षरांत तो ह मिळून त्यांचे महाप्राण (म्हणजे अनुक्रमें ख, घ, छ, झ, ठ, ढ, थ, ध, फ, भ हीं अक्षरें) विकल्पें करून होतात. जसें—आग्रहो–आघ्रो; आग्रहार–आघ्रार इ०. हाच नियम उलट लावून पुढील रूपें झालेलीं आढळतात. जसें—भिणें बद्दल बिहणें, झाला बद्दल जाहला इ०.

**नामांस लागणारे विभक्ति-प्रत्यय**—हे बहुतेक विद्यमान मराठी नामप्रत्ययांप्रमाणेंच आहेत. द्वितीया विभक्तीच्या प्रत्ययांत ' शी ' हा जास्त आहे. तृतीयेच्या प्रत्ययांत ' न ', ' ण ', व ' नशीं ' हे अधिक आहेत. षष्ठीच्या प्रत्ययांत ' चेनी ' हा एक जास्त आहे.

**विभक्त्यर्थ अव्ययांतहि**—वरच्या सारखाच प्रकार आढळतो. म्हणजे हल्लीचीं सर्व विभक्त्यर्थक अव्ययें असून शिवाय द्वितीयेच्या अर्थाचीं ' लागोनी,' ' लागोनियां,' ' लागौनी ' हीं अधिक आहेत. तृतीयेचा अर्थ दाखविणारीं ' विंदानें,' ' वरों,' ' वसें,' ' मेळें ', ' सांगडें,' ' पाडें,' ' करवी,' ' वगें ' हीं जुनीं अव्ययें हल्लींच्या काळीं आढळत नाहींत, पण जुन्या मराठींत आहेत.

जुन्या मराठी कवितेंत आणखी एक विशेष हा आहे कीं पुष्कळ वेळां विभक्तिप्रत्यय न लावतां मानाचीं मूळरूपेंच सर्व विभक्तीचें कार्य करतांना आढळतात. उदा०– ' पत्र लिहिलें **रुक्मिणी**' = रुक्मिणीनें; **कृपा** ( = कृपेनें) कळवळला श्रीहरि ' इ०

**गुणविशेषणें कालवाचक व स्थलवाचक क्रिया-विशेषणें, शब्दयोगी अव्ययें इ०**—यांची संख्या जुन्या मराठींत फार मोठी होती. त्यांतली बरींच आतां लुप्त झालीं आहेत. उदा०—एउता (असा), तेतुलें (तसें), तेसणें (तेवढें), अंबुलें (अमकें), कितुकें (केवढें), परुतें, परौतें (पलीकडे), पऱ्हां (पलीकडे),पुढारां (पुढें), अखलेख (वारंवार), माधौतीं (पुनः), झणी, झणें (परंतु), ना तरी (अथवा), अवसात, एकी हेळा (अकस्मात्), अपैतें (स्वाधीन), पडिपाडें (सारखें), लागसर (जवळ) इ. यांचा उपयोग सध्यांच्या काळीं कवितेंतसुद्धां करीत नाहींत.

क्रियापदांतली धातूचीं रूपें चिंतनीय आहेत. तीं अशीं—' होय ' हें रूप भूत, वर्तमान व भविष्य या तिन्ही काळांत अविकृत राहिलेलें आढळतें.

अस् धातूच्या संकेतार्थी भूतकाळाच्या रूपांत तिन्ही पुरुषांत ' न ' हें अक्षर मध्येंच घुसडलेलें आढळतें; जसें—असलों–असिलों, असिनलों; असलें–असिलें–असिनलें.

अनेक सकर्मक व अकर्मक धातूंचीं स्वार्थी वर्तमानकाळीं तृतीय पुरुषाचीं एकवचनी रूपें व त्याच धातूंची आज्ञार्थी द्वितीय पुरुषीं एकवचनी रूपें यांच्यांतला सूक्ष्म भेद लक्षांत ठेवणें अवश्य आहे. पहिलीं सानुनासिक नाहींत; दुसरीं आहेत. जसें—वाची = (तो)वाचतो; वाचीं = (तूं) वाच; जिंकी = (तो)जिंकतो; जिंकीं = (तूं) जिंक.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकरण

जा, खा इ. कित्येक एकाक्षरी आकारान्त धातूंचीं स्वार्थी वर्तमानकाळीं पुरुषाचीं एकवचनी रूपें आकारान्तापुढें 'य' जोडून होतात; जसें—जाय = जातो; खाय = खातो. ये, दे, घे, ने, इ. एकारान्त धातूंचीं रूपें मात्र तशींच राहतात; जसें—ये = येतो; ने = नेतो इ०

ज्यांचें प्रथम अक्षर स्वर असतें अशा धातूंचीं सर्वकाळीं निषेधात्मक रूपें करतांना त्यांच्यांतला तो पहिला स्वर निषेधदर्शक 'न' या अक्षरांत मिळून लिहिण्याचाही प्रघात आहे. जसें—नुरे = न उरे; नोळखी = न ओळखी.

विध्यर्थी रूपें वा–वी–वें हे प्रत्यय लावून होतात, तशीं 'जे' प्रत्यय लावूनहि होतात. जसें—जाणावें, जाणिजे; करावें, करिजे (कर धातूचें 'कीजे' असेंहि विध्यर्थी रूप होतें.) द्यावें, दीजे.

जुन्या मराठी कवितेंत 'करिजेतें (वर्तमान)', 'करिजेलें (भूत)', 'करिजेल (भविष्य)' अशा प्रकारचीं कित्येक रूपें आढळतात. हीं सध्यां आपल्या भाषेमध्यें रूढ नाहींत. यांचीं आधुनिक रूपांतरें 'केलें जातें' (वर्तमान), 'केलें गेलें' (भूत), व 'केलें जाईल' (भविष्य) अशीं करण्यांत येत असतात.

---

वाचनालय

# मराठी भाषेची शब्दसंपत्ति

## ( वा. गो. आपटे )

हे तीन शब्द दिसण्यांत अगदीं साधे व लहान आहेत, पण त्यांत किती मोठा अर्थ सांठविलेला आहे त्याची यथार्थ कल्पना फार थोड्यांनाच करतां येईल. वामनासारख्या ब्राह्मण वटूनें बळिराजाजवळ मागितलेल्या ' त्रिपादभूमि ' या एका शब्दांत जसा विश्वव्यापी अर्थ समाविष्ट झाला होता, किंवा एकाद्या कागदाच्या तुकड्यावर चार वेड्यावाकड्या रेघोट्या ओढून तयार केलेल्या नकाशाच्या अंगीं साऱ्या भूगोलाची कल्पना प्रेक्षकांस करून देण्याचें सामर्थ्य जसें असतें, तसें मराठी भाषा बोलणाऱ्या दोन कोट लोकांचे सनातन काळापासून चालत आलेले धर्म, नीति, राजकारण, आचारविचार, व्यवहार, वैभव, पराक्रम, सुखदुःखादि अनुभव इत्यादि यच्चयावत् गोष्टींची साक्ष देणारे व त्यांचा महाभारतायेवढा प्रचंड इतिहास मंत्ररूपानें सांगणारे हे तीन शब्द आहेत. या तीन शब्दांचें यथास्थित विवेचन करण्यास तीन हजार पृष्ठांचा ग्रंथ पुरावयाचा नाहीं; मग या अल्पशा निबंधाच्या द्वारें त्यांचें विवेचन करूं पाहणें म्हणजे निखालस धाष्ट्यर्यच होय. तथापि मराठी वाचकांच्या विचारास थोडेंसें चालन देण्यापुरतांच हा प्रयत्न आहे, या पलीकडे या निबंधाचा अधिक कांहीं उद्देश नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेऊन सूत्ररूपानें या विषयाचें जें थोडेंसें दिग्दर्शन मी करणार आहें तिकडे वाचकांनीं लक्ष द्यावें अशी आरंभींच त्यांची प्रार्थना करून या एकेका शब्दाचें आतां क्रमाक्रमानें थोडेंसें विवेचन करतों.

आपण प्रथम ' भाषा ' हा शब्द घेऊं. भाषा प्रथम कधीं, कां व कशी निर्माण झाली ? तिची वाढ कशी व कोणत्या क्रमानें होत गेली ? जगांतली प्राचीनतम अशी भाषा कोणती ? सध्यां जगांतल्या निरनिराळ्या देशांतून निरनिराळ्या भाषा दिसतात त्या कां ? साऱ्या मनुष्यजातीची एकच भाषा कां असूं नये ? वगैरे अनेक प्रश्न ' भाषा ' हा शब्द उच्चारतांच आपल्या मनांत उद्भवतात, आणि आपणांस भंबावून सोडतात. या प्रश्नांचीं उत्तरें थोडक्यांत देणें ही अशक्य गोष्ट असली तरी या विषयासंबंधानें विचार करण्यांत ज्यांनीं सारा जन्म घालविला आहे, अशा विद्वानांच्या मताचें सार थोडक्यांत अशा रीतीनें देतां येण्यासारखें आहे कीं, भाषा प्रथम कधीं व कशी उत्पन्न झाली या गोष्टीचा इतिहास उपलब्ध नाहीं. विश्वसनीय इतिहासाच्या अभावीं केवळ युक्तिवादानें त्याबद्दलचीं निरनिराळीं मतें प्रचलित आहेत. हीं मतें अर्थात् केवळ तर्कमूलक आहेत. तर्काला प्रमाणाचा आधार मिळाल्यास तो तर्क ग्राह्य मानला जातो. पण येथें अशी एक अडचण उत्पन्न होते कीं, तर्काचे आधारावर विचारसरणी सुरू

केल्यास तर्क करणाराच्या मतवैचित्र्यामुळें एकाच वेळीं एकाच गोष्टीसंबंधानें निरनिराळ्या उपपत्ति लावतां येतात, आणि त्यांतली कोणती उपपत्ति प्रमाण व कोणती अप्रमाण मानावयाची हें ठरविणें मुष्किल होतें. ही अडचण खरी आहे. तथापि प्रमाणाचे अभावीं तर्कावरच विसंबून राहाणें मनुष्याला भाग असल्यामुळें त्यांतल्या त्यांत जो तर्क युक्तिसिद्ध वाटेल तो ग्राह्य धरूनच अशा विषयांसंबंधानें अधिक शोध व विचार केला पाहिजे.

## भाषेची उत्पत्ति व वाढ

तर्कपद्धति एकदां स्वीकारल्यानंतर भाषोत्पत्तीसारख्या विषयाचा शोध मनुष्य जसजसा करूं लागतो, तसतसा एकेक गोष्टीचा निर्णय तो आपल्या मनाशीं येणेंप्रमाणें करतो. प्रथम मनुष्याला पदार्थाचें ज्ञान होऊं लागलें, तेव्हां त्याला त्या ज्ञानाचा उपयोग वाटेल तेव्हां करतां यावा म्हणून त्या ज्ञानाचा संग्रह करणें व तसेंच त्या ज्ञानाचा उपयोग दुसऱ्याला करून देणें या दोन्ही गोष्टींची आवश्यकता वाटूं लागली असावी. मुखाच्या द्वारें निरनिराळ्या प्रकारचे ध्वनि काढण्याचें सामर्थ्य मनुष्याचे ठायीं आहे याची जाणीव त्याला अनुभवानें झाली असावी, व आपल्याप्रमाणें सृष्टींतले इतर प्राणी व जड पदार्थहि ध्वनि काढूं शकतात हें त्यानें पाहिलें असावें. हे दुसऱ्यांचे ध्वनि ऐकून त्यानें कांहीं अनुकरणवाचक शब्द ठरविले असावेत. उदाहरणार्थ—कावळ्याचा ‘ कावकाव ’ हा शब्द ऐकून तो शब्द करणाऱ्या प्राण्याला त्यानें काक हें नांव दिलें असेल; किंवा एकादी वस्तु पडतांना पट् असा जो ध्वनि निघतो तो ऐकून पडण्याच्या क्रियेला ‘ पत् ’ असें त्यानें म्हटलें असेल. अशा रीतीनें प्रत्यहीं घडणाऱ्या शेकडों गोष्टींचें सूक्ष्म अवलोकन करून व त्या त्या गोष्टींचे नित्यसंबंध लक्षांत ठेवून त्यानें प्रथम कांहीं अनुकरण–वाचक शब्द तयार केले असले पाहिजेत असें दिसतें.

प्रथम एकाक्षरी शब्द, नंतर त्याच अक्षराची द्विरावृत्ति करून बनविलेले शब्द, व त्याच्यानंतर अनेकाक्षरी शब्द अशा क्रमाक्रमानें त्यानें शब्दरचना केली असावी हा तर्क सयुक्तिक दिसतो. लहान मुलांच्या भाषेचें ज्यांनीं सूक्ष्मावलोकन केलें आहे त्यांना ही गोष्ट सांगावयाला नको कीं, लहान मुलांची भाषा याच क्रमानें हळू हळू बनत जाते. प्रथम तीं व्यवहारांत सर्वत्र एकाक्षरी शब्दच वापरतात; त्यानंतर काका, बाबा, मामा असे एकाक्षरी शब्दाची द्विरावृत्ती करणारे शब्द उच्चारतात; आणि अशा क्रमाक्रमानें जात जात त्यांची भाषा बनत जाते. माणसाच्या भाषेच्या उत्क्रांतीच्या बाल्यावस्थेंतहि अशाच पायऱ्या असणें सयुक्तिक दिसतें.

या क्रमानें शब्दरचनेची एक पायरी चढल्यानंतर पुढच्या पायरीचें आक्रमण करतांना गुणवाचक व नंतर क्रियावाचक शब्द असा क्रम असावासें दिसतें. या दोन प्रकारच्या शब्दांनंतर द्रव्यवाचक, जातिवाचक, वगैरे शब्द निर्माण झाले असावेत. कारण, या शब्दांच्या मुळाशीं असलेल्या सादृश्यभेदादिकांच्या ज्ञानाला बुद्धि थोडीशी परिणत असावी लागते हें सांगावयास नकोच.

याप्रमाणें बरीचशी शब्दरचना झाल्यानंतर पदार्थवाचक शब्दांचा क्रियार्थवाचक शब्दांशीं संबंध जोडण्याची आवश्यकता वाटूं लागून मनुष्य थोडथोडी सोपीशी वाक्यरचना करूं लागला असेल. यांतहि बराचसा अनुभव मिळाल्यानंतर व तर्कज्ञान वाढल्यानंतर शब्दरचनेंत व वाक्यरचनेंत होणारा घोटाळा टाळण्यासाठीं त्यानें त्यांच्यासंबंधानें कांहीं स्थूल नियम बांधले असावे. याच नियमांना पुढें व्यवस्थित स्वरूप मिळून त्यांचें व्याकरण बनलें असलें पाहिजे. अगोदर भाषा व मग व्याकरण हा क्रम निसर्गसिद्ध दिसतो. नियमबद्ध करण्यास कांहीं तरी साहित्य अगोदर पाहिजे. नाहींतर कशाला नियमबद्ध करणार ? पण हा साधा नियम आमच्या सध्यांच्या शिक्षणपद्धतींत मात्र पाळण्यांत येत नाहीं, आणि मुलांना शब्दज्ञान किंवा वाक्यार्थज्ञान होण्याचे अगोदरच त्यांच्या व्याकरण–शिक्षेस प्रारंभ होतो. हें शिक्षण कसचें ? शिक्षाच म्हणावयाची !

शब्दरचना, वाक्यरचना इत्यादिकांचा जो क्रम आतां सांगितला तो जर सर्व मनुष्यजातीस सामान्य आहे, तर माणसामाणसांत जें भाषाभिन्नत्व दिसतें तें कां ? सगळ्या पृथ्वीवर एकच भाषा कां दृष्टीस पडत नाहीं ? असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. या प्रश्नाचें उत्तर असें देतां येईल कीं, ध्वनि उचारण्याची शक्ति जशी नैसर्गिक आहे, तशी शब्दरचना किंवा वाक्यरचना करण्याची शक्ति नैसर्गिक असती तर सर्व मनुष्य, जातींत एकच भाषा प्रचलित असलेली दिसली असती. जसा कावळ्याचा, गाईचा-वाघाचा किंवा कोंबड्याचा शब्द कोणत्याहि देशांत पाहिला तरी बहुतेक एकसारखाच असतो, किंवा निर्जीव जड वस्तूपासून होणारा ध्वनि सर्वत्र सारखाच आढळतो (उदा०– ओढा वाहत असतांना होणारा झुळझुळ शब्द किंवा एखाद्याला थपाटा मारतांना होणारा धप धप आवाज ), तशी मनुष्यजातीचीहि भाषा सर्वत्र एकसारखीच दिसली असती. पण शब्दरचना व वाक्यरचना ही नैसर्गिक नाहीं; ती मनुष्यकृत आहे. म्हणजे तिच्या मुळाशीं माणसाचा अनुभव, त्याची बुद्धि व तर्कशक्ति या गोष्टी आहेत. आणि त्या सर्वांच्या सारख्या नसतात. यामुळें माणसांच्या भाषेंत साहजिकच भिन्नता येते. शिवाय निरनिराळ्या देशांतल्या माणसांच्या शरीररचनेंत सुद्धां भिन्नता आढळते व त्यामुळें एकाच वर्णाचे उच्चार निरनिराळ्या देशांतले लोक निरनिराळ्या प्रकारें करतात. कित्येक वर्णांचे उच्चार एका देशांतल्या माणसाला जितके स्पष्ट करतां येतात तितके स्पष्ट दुसऱ्या देशांतल्या माणसाला करतां येत नाहींत. साध्या ध्वनींतून वर्णरचना करतांनासुद्धां जर देशकालपरत्वें भिन्नता उत्पन्न होते, तर शब्दरचना व वाक्यरचना यांच्यासारख्या जटिल क्रियांतून ती दिसावी व त्यामुळें माणसांच्या भाषेंत भिन्नता उत्पन्न व्हावी यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं.

## मूळ भाषा व तिच्या शाखा

जगांत ज्या भिन्नभिन्न भाषा आहेत, त्या निरनिराळ्या लोकांच्या उत्क्रांतीचा क्रम दर्शविणाऱ्या आहेत असें कित्येक विद्वानांचें मत आहे. हें मत ग्राह्य धरल्यास तो क्रम कोणता ? कोणती भाषा प्रथम झाली ? व तिचीं अवस्थांतरें होऊन तिच्यापासून

इतर भाषाशाखा कशा निर्माण झाल्या ? यासंबंधानें पुष्कळ वादग्रस्त प्रश्न आहेत. इतक्या खोल पाण्यांत शिरण्याचें आपणांस तूर्त कारण नाहीं. इतकें सांगितलें म्हणजे पुरें आहे कीं, भाषाशास्त्रांत ज्यांनीं कित्येक वर्षें निमज्जन केलें आहे अशा अनेक पाश्चात्य विद्वानांचेंहि असें मत आहे कीं, आपली वैदिक भाषा हीच जगांत प्राचीनतम भाषा असून अपभ्रंशापासून इतर भाषा झाल्या आहेत. आपल्या हिंदुस्थानांतल्या भाषांपुरतेंच बोलावयाचें झालें तर वैदिक भाषा हीच आपल्या सर्व देशी भाषांची आद्य जननी होय, असें म्हणण्यास फारसा प्रत्यवाय नाहीं. या वैदिक भाषेपासून आपल्या सध्यांच्या देशी भाषा कसकशा पायऱ्यापायऱ्यांनीं व कोणकोणत्या काळीं निर्माण झाल्या यासंबंधानें पाश्चात्य लेखक अनेक वेळां पांडित्याचा आव घालून गंभीरपणानें चर्चा करतांना आढळतात. पण ते जो कालनिर्णय ठरवितात तो केवळ तर्कांच्या आधारावर असतो. त्याच्या उलट तर्कसुद्धां तितक्याच सशास्त्रपद्धतीनें व सयुक्तिक रीतीनें काढतां येतात. म्हणून त्यांनीं काढलेले सिद्धांत सर्वथैव प्रमाण मानतां येत नाहींत. पाश्चात्यांचा दांडगा उद्योग, परिश्रम, आणि शोधकबुद्धि या गोष्टी निःसंशय प्रशंसनीय आहेत; पण त्यांना आमच्यांत हजारों वर्षें चालत आलेली परंपरा जी आमच्या रोमारोमांत भिनली आहे तिचें यथार्थ ज्ञान नसतें, ( आणि भाषेच्या इतिहासांत तर परंपरेचें यथार्थ ज्ञान असणें ही अत्यंत आवश्यक गोष्ट आहे ) आणि त्यांची बुद्धिहि पुष्कळ वेळां पूर्वग्रहांनीं दूषित झालेली असते. यामुळें आमच्या भाषांसंबंधानें त्यांनीं काढलेले सिद्धांत पुष्कळ वेळां अगदीं चुकीचे ठरतात असा अनुभव आलेला आहे. आमच्या भाषेसंबंधानें शोध लावण्याला खरे अधिकारी पुरुष म्हणजे वस्तुतः आम्हीच आहों. आम्ही आमच्या भाषेसंबंधानें शोध करून जे सिद्धांत काढूं ते खरे असण्याचा अर्थात् अधिक संभव आहे. आमचे लोक भाषेसंबंधाच्या आमच्या कर्तव्यापासून अद्याप पराङ्मुख राहिले आहेत, येवढ्यावरूनच पाश्चात्य पंडित म्हणतील तें सत्य मानून आम्हीं चाललें पाहिजे असें म्हणणें हा न्याय नव्हे.

## पाश्चात्य पंडितांचे कुतर्क

या पाश्चात्य पंडितांच्या हातून आमच्या भाषेसंबंधानें पुष्कळ वेळां कुतर्कांच्या पायावर भलभलतीं विधानें करण्यांत येत असतात. हीं भ्रामक विधानें केवळ अज्ञानामुळेंच घडतीं तर तीं एक वेळ क्षम्य म्हणतां आलीं असतीं. पण कित्येक वेळां तर तीं आमच्या लोकांस, आमच्या धर्मास व आमच्या राष्ट्रास तुच्छ लेखून स्वतःची प्रतिष्ठा मिरविण्याच्या किंवा आमची विटंबना करण्याच्या अतिशय निंद्य हेतूनेंहि करण्यांत येत असतात. उदाहरणार्थ, एका सुप्रसिद्ध ख्रिस्ती पाद्र्यानें भाषाशास्त्राच्या ज्ञानाचा व शोधकत्वाचा मोठा आव घालून ' महाराष्ट्र ' या शब्दाची व्युत्पत्ति महार+राष्ट्र म्हणजे महारांचें राष्ट्र अशा प्रकारें केली आहे! ही व्युत्पत्ति सर्वथैव निराधार आहे हें सांगावयास नकोच. कारण–१. ' महार ' हा शब्द ' महाराष्ट्र ' या शब्दाइतका प्राचीन नाहीं. महाराष्ट्र हा शब्द बौद्धकालीन वाङ्मयांत आढळतो., वररुचिकृत प्राकृतप्रकाशांतहि तो आहे. २. ' महार ' हा शब्द प्राचीन काळीं नव्हता, इतकेंच नाहीं, तर तसल्या

...वाचनालय, ...ारा.



प्रकारच्या लोकांचें मोठें तर राहोच पण अल्पस्वल्प तरी राष्ट्र होतें असा उल्लेख कोठेंहि आढळत नाहीं. ३. गांवचा हरकामी नोकर म्हणून त्याला वेतन व इनामें वगैरे वंशपरंपरा दिलेलीं आढळतात; पण त्या लोकांची वस्ती पूर्वीं देखील तुरळकच असली पाहिजे. एरव्हीं महारवाडे गांवाबाहेर बांधण्याची चाल पूर्वापार चालत आली नसती. अशा तुरळक वस्तीच्या लोकांच्या नांवावरून राष्ट्राला त्यांचें नांव देण्यांत आलें असेल ही गोष्ट तर अगदींच असंभवनीय दिसते. ४. सीतेच्या शोधार्थ सुग्रीवानें आपले दूत तत्कालीन ज्ञात अशा ज्या निरनिराळ्या देशादेशांतून पाठविले त्यांचीं नांवें रामायणांत दिलेलीं आहेत, पण त्यांत महारांचें राष्ट्र अशा अर्थाच्या देशाचें नांव बिलकुल आढळत नाहीं. ५. अशोक राजानें राष्ट्रिकांच्या मुलुखांत धर्मोपदेशक पाठविल्याचा उल्लेख आहे, व तो देश महाराष्ट्र हाच होय, असें डॉ० सर रामकृष्ण भांडारकरांसारखे थोर शोधक पंडित म्हणत आहेत. हा महाराष्ट्र देश महारांचें राष्ट्र होता अशा विषयींचा उल्लेख मात्र आजपर्यंत कोणीही पंडित दाखवूं शकला नाहीं. सारांश, वरील पाश्चात्य महापंडितानें आपल्या विशाल मेंदूंतून काढलेली ‘ महाराष्ट्र ’ शब्दाची वरील व्युत्पत्ति सर्वथैव निर्बल, अप्रयोजक, अशास्त्र आणि पोरकट आहे. इतकेंच नाहीं, तर तिच्या सद्धेतुविषयीं सुद्धां शंका घेतली असतां ती वावगी होणार नाहीं. या व अशा प्रकारच्या दुसऱ्या अनुभवांवरून आमचा देश, धर्म, भाषा इ. संबंधानें कितीहि जाडया पाश्चात्य विद्वानानें एखादा तर्क काढलेला असला तरी तो नीट पारखून पाहिल्याशिवाय त्याला मान्यता देणें पुष्कळ वेळां धोक्याचें व स्वतःस मानहानिकारक असतें ही गोष्ट आमच्या लोकांनीं ध्यानांत ठेविली पाहिजे व अशा बाबतींत दुसऱ्यावर विसंबून न रहातां स्वतः शोध करून पूर्वपरंपरागत चालत आलेला इतिहास, रीतरिवाज, आचारविचार, धर्म, संस्कार, इत्यादिकांशीं अविसंगत असें एखादें अनुमान यथाशास्त्र काढून त्याच्या द्वारें जुन्याची नव्याशीं सांगड घालण्याचा यत्न केला पाहिजे. असा प्रयत्न हें खऱ्या देशाभिमानाचें एक महत्कृत्य निःसंशय गणिलें जाईल. आपल्या देशाचा पूर्वेतिहास प्राप्त करून देणें यासारखें दुसरें कोणतें पुण्यकृत्य असणार ?

## मराठी भाषेच्या उत्पत्तिसंबंधानें निरनिराळीं मतें

आतांपर्यंत केलेलें विवेचन मनुष्याच्या भाषेविषयीं सामान्यतः झालें. पण आपणास आज जगांतल्या साऱ्या भाषांविषयीं—किंबहुना हिंदुस्थानांतल्याहि साऱ्या भाषांविषयीं—बोलावयाचें नसून फक्त आपली मातृभाषा जी मराठी तिच्याविषयींच बोलावयाचें आहे, आणि तेंहि तिच्या व्याकरणाविषयीं नाहीं, मराठी वाङ्मय केवढें मोठें आहे किंवा त्यांत कोणकोणतीं व्यंगें आहेत याविषयीं नाहीं, मराठीचें छंदःशास्त्र, अलंकारशास्त्र वगैरे कोठून आलीं, त्याविषयींहि नाहीं, तर मराठी भाषेचें एकच अंग—म्हणजे तिची शब्दसंपत्ति अथवा शब्दसंग्रह—याविषयींचाच विचार आज कर्तव्य आहे. भाषेच्या शरिरांतले अस्थि, मज्जा, मांस, रक्त, धातु सगळे कांहीं शब्द होत. तऱ्हां अर्थातच महाराष्ट्रभाषारूपी शरिराचे हे घटकावयव कसे निर्माण झाले किंवा ते कोठून

व कसे आले हें प्रथम सांगितलें पाहिजे. मराठी भाषेची मूळपीठिका शोधली पाहिजे हें उघड आहे. हें काम आपणांस आज नव्यानें करावयाचें आहे असें नाहीं. यापूर्वी अनेक विद्वानांनीं त्यावर लिहिलें आहे व वाद केला आहे. या वादाचा मतितार्थ ज्याला त्याला आपल्या बुद्ध्यनुसार काढतां यावा म्हणून येथें थोडक्यांत त्याचें स्वरूप सांगतों.

मराठी भाषा ही वैदिक संस्कृत भाषेप्रमाणें आदिभाषा आहे असें कोणी म्हणत नाहीं. ती दुसऱ्या भाषेपासून निघालेली आहे याविषयीं सर्वांची एकवाक्यता आहे. मराठीची जननी अशी ही दुसरी भाषा कोणती याविषयीं काय ती मतभिन्नता आहे व या मतभिन्नतेमुळें सदर प्रश्नासंबंधानें तीन चार पक्ष निर्माण झाले आहेत. ते असे—

**पहिला पक्ष** असें म्हणतो कीं, मूळ संस्कृत भाषा. तिच्या प्राकृत व मराठी अशा दोन मुली. या मुलींच्या वयांत अंतर असलें-त्या जुळ्या नसल्या-तरी दोन्ही मुलीच होत. महाराष्ट्री म्हणून प्राकृत भाषेचा एक प्रकार होता; त्यापासून मराठी भाषा निघाली असें जे कित्येक म्हणतात तें खोटें. प्राकृत आणि मराठी यांच्यामध्यें बहिणी-बहिणींचें नातें आहे, मायलेकींचें नव्हे.

**दुसरा पक्ष** असें म्हणतो कीं, मराठी भाषा प्रत्यक्ष संस्कृत भाषेपासून निघालेली नाहीं, प्राकृत भाषेपासून निघालेली आहे; व ही प्राकृत भाषा संस्कृत भाषेची कन्या आहे, म्हणजे या पक्षाच्या म्हणण्याप्रमाणें संस्कृत भाषा ही मराठीची आई नसून आजी आहे.

**तिसरा पक्ष** असें म्हणणारा आहे कीं, मराठी भाषा प्रत्यक्ष संस्कृत भाषेपासून निघाली नाहीं. प्राकृत भाषेपासून जन्म पावली, येथपर्यंत दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आम्हांस मान्य आहे. पण प्राकृत भाषा ही संस्कृत भाषेची कन्या हें आम्हीं कबूल करीत नाहीं. प्राकृत भाषा ही स्वतंत्र भाषा अथवा बोली होती. लोक लिहिण्यांत संस्कृत भाषा वापरीत, पण बोलण्यांत प्राकृत भाषेचा उपयोग करीत. या प्राकृत बोलीपासून मराठी भाषा झाली.

**चवथा पक्ष** असें प्रतिपादितो कीं, आरंभीं प्राकृत भाषा होती, तिच्यावर संस्कार घडून झालेली जी भाषा ती संस्कृत. या संस्कृत भाषेपासून मराठी भाषा झाली.

याशिवाय आणखी एक **पांचवा पक्ष** किंवा तिसऱ्या पक्षाचाच एक पोटभेद आहे. या पक्षाचें असें म्हणणें आहे कीं, मराठी भाषा प्राकृत भाषेपासून निघाली आहे ही गोष्ट खरी आहे. पण त्याचा अर्थ प्राकृत भाषेची महाराष्ट्री म्हणून जी एक शाखा होती तिच्यापासून मराठी भाषा निघाली असा घ्यावयाचा नाहीं; तर ती महाराष्ट्री-प्रमाणेंच प्राकृत भाषेंतून स्वतंत्रपणें निर्माण झालेली आहे.

**कृष्णशास्त्री चिपळूणकर** यांचें मत मराठी ही बालभाषेपासून निघाली असें होतें.

मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधानें विद्वानांमध्यें निरनिराळ्या मतांचा असा गलबला झालेला आहे. त्यामुळें सामान्य बुद्धीच्या माणसास स्वतंत्रपणें विचार करून आपल्या मनाशीं निर्णय ठरविण्याचें काम फार कठिण झालें आहे. या वादांत पडलेल्या पंडितांचें

बहुमत पाहिलें तर मूळ संस्कृत भाषा, तिच्यापासून प्राकृत भाषा झाली व या प्राकृत भाषेची ' महाराष्ट्री ' नांवाची जी शाखा होती तिच्यापासून मराठी भाषा निघाली असें म्हणणाऱ्या पक्षाकडे तें आहेसें दिसतें.

## मराठी आणि प्राकृत

मराठी भाषेच्या उत्पत्तीसंबंधाच्या या वादग्रस्त प्रश्नाचा उलगडा करण्याच्या कामीं जुन्या मराठी कवींच्या उद्गारांचें कांहीं साह्य झालें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण दुर्दैवानें तिकडूनहि आपली निराशाच होण्यासारखी स्थिति आढळते. आमच्या जुन्या कवींचें सगळें लक्ष अध्यात्मचिंतन किंवा पौराणिक कथानिरूपण या दोन गोष्टींनीच बहुधा वेधिल्यामुळें व भाषाशास्त्राविषयीं त्यांचें पूर्ण औदासीन्य असल्यामुळें या वादग्रस्त प्रश्नासंबंधानें त्यांनीं पूर्ण मौन धरलेलें आढळतें. मुकुंदराज व ज्ञानेश्वर या दोन जुन्या कवींनीं आपल्या भाषेला सर्वत्र ' मराठी ' किंवा ' मऱ्हाठी ' म्हटलेलें आहे. उदाहरणार्थ पुढील स्थळें पहा—

वेदशास्त्राचा मथितार्थू । **मराठिया** होय फलितार्थू ।
तरी चतुरीं परमार्थू । कां न घ्यावा ? ॥
( विवेकसिंधु–पूर्वार्ध १।११ )

देशी हे कां **मराठी** । परी उपनिषदांची रहाटी ।
तरी हा अर्थू जीवाचिये गांठी । कां न बांधावा ? ॥
( विवेकसिंधु–पूर्वार्ध १।२६ )

जयासि नाहीं प्रतीति । तर्कमुद्रेची स्थिति ॥
तयालागीं **मराठिया** उक्ती । केली ग्रंथरचना ॥
( विवेकसिंधु–उत्तरार्ध ११।१३२ )

तसेंच ज्ञानेश्वर महाराज म्हणतात—

माझा **मराठाची** बोल कौतुकें । परी अमृतातेंहि पैजा जिंकें
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ॥
( ज्ञानेश्वरी ६।१४ )

मूळग्रंथाचिया संस्कृता- । वरी **मऱ्हाटी** नीट पाहतां
अभिप्राय मानलिया चित्ता । कवण भूमि हें न चोजवे ॥
( ज्ञानेश्वरी १०।४३ )

तीरें संस्कृताचीं गहनें । तोडोनि **मऱ्हाटी** शब्दसोपानें
रचिलीं धर्मनिधानें । श्रीनिवृत्तिदेवें ॥
( ज्ञानेश्वरी १।१९ )

या किंवा यासारख्या दुसऱ्या कित्येक अवतरणांवरून कित्येक लोक असा तर्क करतात कीं, ज्या अर्थी या जुन्या मराठी कवींनीं आपल्या भाषेला मराठी किंवा मऱ्हाटी

म्हटलें आहे, ' प्राकृत ' म्हटलेलें नाहीं, त्या अर्थी मराठी भाषा म्हणजे प्राकृत भाषेची कन्या होय अशी समजूत जुन्या मराठी कवींचे ठायीं नसावी. या तर्कपद्धतींत मला तरी कांहीं अर्थ दिसत नाहीं. आमच्या परमार्थपर कवींनीं मराठी भाषेच्या उत्पत्तीचा विचार करून सहेतुक रीतीनें 'प्राकृत' शब्दाच्या ऐवजीं 'मराठी' किंवा ' मऱ्हाटी ' या शब्दांचा बुद्धिपुरःसर प्रयोग केला असें म्हणण्यास मी तयार नाहीं.

अलीकडच्या काळांतल्या मोरोपंतांनीं मराठीबद्दल ' प्राकृत ' हा शब्द एके ठिकाणीं वापरला आहे. 'संस्कृत-**प्राकृत**-मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कथा।' या आर्यार्धांत त्यांनीं मराठीला ' प्राकृत ' म्हटलें आहे.

श्रीधर कवीनें ' महाराष्ट्री ' व ' प्राकृत ' हे दोन्ही शब्द मराठी भाषेला उद्देशून योजिलेले आढळतातः—

**महाराष्ट्रीचें** वचन निश्चित । परी अत्यंत रसभरित ॥
मधुमाक्षिकांचे मुखीं स्रवत । मधु सुरस जैसें का ॥

( रामविजय १।२९५ )

यांत मराठीला ' महाराष्ट्री ' म्हटलें आहे; आणि लागलीच चार ओव्या टाकून ते पुढें म्हणतात—

कष्टेंवीण राज्य आलें हातां । तरी कां सोडावें तत्त्वतां ॥
**प्राकृत** भाषा ऐकोनि कथा । लाभ श्रोतीं घेईजे ॥

यावरून श्रीधर किंवा मोरोपंत यांच्या काळीं मराठी भाषा प्राकृतापासून निघाली अशी समजूत प्रचलित होती असें अनुमान जर कोणी काढील तर तेंहि वरच्यासारखेंच अशास्त्र म्हटलें पाहिजे हें उघड आहे. खरी गोष्ट अशी दिसते कीं, मराठी भाषा संस्कृतापासून निघाली हा प्रश्नच जुन्या मराठी कवींच्यापुढें वरील ग्रंथ लिहितांना नव्हता, आणि अर्थातच वरील अवतरणांत त्यांनीं मराठी भाषेबद्दल योजिलेले पर्याय सहेतुक नव्हते, म्हणून त्या शब्दयोजनेवरून प्रस्तुत प्रश्नावर कांहींच प्रकाश पडत नाहीं असें म्हणणें योग्य होईल.

श्रीधर व मोरोपंत या कवींच्या काळीं व त्यानंतरच्या आतांपर्यंतच्या काळांतहि मराठीबद्दल ' प्राकृत ' शब्द वापरण्यांत येतो. पण तो अगदीं निराळ्या अर्थानें. जी भाषा शुद्ध संस्कृत नव्हे, संस्कृत भाषेच्या व्याकरणाच्या नियमांनीं जी बद्ध झालेली नाहीं, किंवा जींत संस्कृताशिवाय इतर भाषांतल्याहि शब्दांची भेसळ झालेली आहे अशी जी भाषा ती प्राकृत अशी या काळांतल्या लोकांची समजूत दिसते. सांप्रतच्या काळांत तर ' प्राकृत ' हा शब्द मोरोपंत व त्यांच्या पूर्वीचे कवि यांच्या ग्रंथांतल्या भाषेला लावतात. ' प्राकृत ग्रंथ ' म्हणजे मुकुंदराज, ज्ञानेश्वर प्रभृति कवींच्या काळापासून तों मोरोपंतांच्या काळापर्यंत झालेले ग्रंथ असें म्हणण्याचाच परिपाठ सध्यां आहे व प्रस्तुत कोशांत शब्दांच्यापुढें कंसांत जेथें ' प्रा. ' हें अक्षर संक्षेपानें योजिलें आहे. तेथें प्राकृत ग्रंथांतला हा शब्द आहे इतकाच अर्थ सूचित आहे असें समजावें. तो शब्द प्राकृत भाषेंतून आला आहे असें समजूं नये, येवढी सूचना येथें करून ठेवणें अवश्य आहे.

# बोली मराठी व लेखी मराठी

मराठी भाषेच्या मूळ उगमासंबंधानें विद्वानांमध्यें असलेल्या मतभेदासंबंधानें येथपर्यंत विवेचन झालें. तिच्या उत्पत्तिकालासंबंधानें मतभेद नाहीं, पण तो काल निश्चितपणें ठरविण्यास लागणाऱ्या साधनांचाच पूर्ण अभाव आहे. त्यामुळें मराठी भाषा केव्हां निघाली हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कोणत्याहि प्रौढ भाषेचीं बोली व लेखी अशीं बहुधा दोन रूपें असतात. लेखी भाषेचें स्वरूप जास्त व्याकरणशुद्ध, व्यवस्थित आणि प्रौढ असतें. बोलण्यांतल्या भाषेंत व लेखी भाषेंत मुख्य फरक हाच असतो. एरव्हीं दोघींच्या शब्दयोजनेंत विशेषसा फरक नसतो. अगोदर कित्येक वर्षे लोकांच्या बोलण्यांत राहून मग कालांतरानें तिला प्रौढावस्था प्राप्त होते व ती लेखनांत येते असा सामान्यतः नियम आहे. एखाद्या भाषेला बोलीचें स्वरूप केव्हां प्राप्त झालें हें कळण्यास मार्ग नसतो; पण तिला लेखी स्वरूप केव्हां मिळालें तें शिलालेख, ताम्रपट, पत्रें इ. साधनांवरून काढतां येतें. मराठी भाषा संस्कृतापासून निघाली असो, किंवा प्राकृतावरून निघालेली असो, वरील नियमाप्रमाणें ती प्रथम बोलण्यांत बरींच वर्षें राहिल्यानंतर तिचा उपयोग लेखनाच्या कामांत होऊं लागला असला पाहिजे यांत शंका नाहीं. मराठीला हें लेखी स्वरूप केव्हां प्राप्त झालें तें निश्चितपणें ठरविण्यास अवश्य अशी साधन–सामुग्री पुरेशा प्रमाणांत अद्याप उपलब्ध झाली नाहीं. तथापि शके ४१०सालीं लिहिलेला एक मराठी ताम्रपट मंगळवेढें येथें उपलब्ध झालेला आहे. तेव्हां त्याच्या अगोदरच्या काळांतला एखादा मराठी लेख उपलब्ध होईपर्यंत तरी निदान इसवी सनाचें ५ वें शतक हा मराठीला लेखी स्वरूप प्राप्त झाल्याचा काळ मानण्यास हरकत दिसत नाहीं. बोलीच्या स्वरूपांत मराठी भाषा त्याच्याहि पूर्वीं अनेक वर्षें अर्थात् असली पाहिजे हें उघड आहे. किती पूर्वी तें आज कांहीं सांगतां येत नाहीं. रा. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे लिहितात कीं, सुमारें शके १५० पासून शके ४०० पर्यंत महाराष्ट्रांत भयंकर अराजक माजलें होतें. या काळांत शिष्ट महाराष्ट्री भाषा लोपत जाऊन शके ४०० च्या सुमारास मराठी भाषा बनली. पण आरंभीं नाविन्यामुळें तिला लोकांत विशेषशी मान्यता न मिळाल्याकारणानें त्यावेळीं शिलालेख वगैरे बहुधा संस्कृत भाषेंतच कोरविले जात. रा. राजवाडे म्हणतात, अशी स्थिति शके ९०० च्या सुमारापर्यंत टिकली असावी असें दिसतें. कारण, शके ९०० च्या सुमारास कोरलेल्या एका शिलालेखांत बाकीचा सगळा मजकूर संस्कृत भाषेंत असून ‘ श्रीचावुण्डरायें करवियलें ’ येवढें एकच वाक्य मराठींत लिहिलेलें आढळतें.

चावुण्डरायाच्या उपरिनिर्दिष्ट शिलालेखांत निदान एक तरी सबंध वाक्य मराठींत आहे. पण त्यापूर्वीच्या शिलालेखांत एखाद दुसराच शब्द मराठींत आढळावयाचा अशी स्थिति होतीसें दिसतें. शके ६०० च्या सुमारास विक्रमादित्य सत्याश्रयाच्या कारकीर्दीत कोरलेला एक ताम्रपट सांपडला आहे. त्यांत ‘ पन्नास ’ असा एक शब्द आलेला आहे. रा. राजवाडे म्हणतात कीं हा शब्द महाराष्ट्री प्राकृत भाषेंत किंवा तिच्या अपभ्रंशांत नाहीं. त्या भाषेंत पण्णासुं, पण्णासा किंवा पन्ना अशीं रूपें आढळतात. पन्नास हें रूप

खास मराठी आहे; तेव्हां यावरून असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं कीं, शके ४०० पासून शके ७०० पर्यंत क्वचित्च कां होईना, पण मराठी भाषेचा उपयोग लिहिण्याच्या कामीं होऊं लागला होता.

## शब्दसंपत्ति

या निबंधाच्या मथळयांतल्या तीन शब्दांपैकीं पहिल्या दोन शब्दांच्या अर्थाविषयींचें अतिसंक्षिप्त विवेचन आतांपर्यंत झालें. आतां राहिलेला तिसरा शब्द जो ' शब्दसंपत्ति ' त्याकडे आपण वळूं. ' शब्दसंपत्ति ' हा सामासिक शब्द असून शब्द व संपत्ति हे त्या सामासिक शब्दाचे दोन अवयव आहेत. पैकीं शब्द म्हणजे काय? त्याच्या अंगीं केवढें सामर्थ्य आहे ? तें सामर्थ्य त्याचे अंगीं स्वयंभू आहे कीं कसें ? स्वयंभू असल्यास शास्त्रज्ञ त्याची मीमांसा कशाप्रकारें करतात ? तें सामर्थ्य परप्राप्त असल्यास कशापासून त्याला प्राप्त होतें ? भाषेंत शब्दाचें कार्य कोणतें असतें ? त्याला ' संपत्ति ' म्हणून जें गौरविण्यांत येतें तें कां ? इत्यादि प्रश्नांचें समाधान या निबंधांत पुढें येईल. तूर्त संपत्ति म्हणजे काय तें आपण पाहूं.

संपत्ति या शब्दाला एक सामान्य आणि एक विशेष असे दोन अर्थ आहेत. सामान्य अर्थानें संपत्ति म्हणजे धन, हत्ती, घोडे, वस्त्रपात्र इ. भोग्यपदार्थ व बुद्धि, कीर्ति, आरोग्य इत्यादिकांचा समुदाय; अर्थात् वैभव, शोभा इत्यादि गोष्टीहि त्यांत येतात. आणि विशेष अर्थ म्हणजे अर्थशास्त्रज्ञ संपत्ति या शब्दाचा जो अर्थ घेतात तो, म्हणजे विनिमयसाध्य वस्तु, अर्थात् जिला कांहीं किंमत पडते किंवा जी प्राप्त करून घेण्याला कांहीं श्रम पडतात ती वस्तु. विनियमसाध्यता हें संपत्तीचें प्रधान लक्षण आहे, असें अर्थशास्त्रज्ञ म्हणतात. आपणाला या विशेष अर्थाशीं कांहीं कर्तव्य नसल्यामुळें तो बाजूला सारून पहिला म्हणजे व्यावहारिकच अर्थ घेऊं. हा व्यावहारिक अर्थ संपत्ति शब्दाच्या व्युत्पत्त्यर्थाशीं जुळता असल्यामुळें तोच घेणें इष्ट आहे. जिच्या योगानें कांहीं कार्य संपादतां येतें ती संपत्ति. मग ती वस्तु, हत्ती घोडे असो, मानसन्मान, कीर्ति, किंवा प्रतिष्ठा वगैरे असो, किंवा अमूर्त असें दुसरें कांहीं इष्ट कार्य असो. शब्दाच्या साधनानेंच जगांतले सगळे व्यवहार संपादतां येत असल्यामुळें शब्दाला ' संपत्ति ' हें नांव शोभतें. त्यांतल्या त्यांत असे कित्येक शब्द असतात कीं, त्यांचा माणसाच्या मनावर विशेष परिणाम होतो. अशा शब्दांना संपत्ति ही संज्ञा अगदीं योग्य दिसते. तुकाराम महाराजांच्या अभंगवाणींतले शब्द असे होते; समर्थांच्या उक्तींतले शब्द असेच होते; व दुसरेहि अनेक सामर्थ्यवान् पुरुष आढळतील कीं त्यांच्या शब्दांवर लक्षावधि किंवा कोटयवधि माणसें शतकेंचीं शतकें झुलत आलीं आहेत. पुढेंहि झुलतील. अशा शब्दांना ' संपत्ति ' हें नांव सार्थ नाहीं असें कोण म्हणेल ? **' आम्हां घरीं धन शब्दांचींच रत्नें '** ही तुकोबारायाची उक्ति सुप्रसिद्धच आहे. या उक्तींत त्यांनीं शब्दांना नुसती संपत्तिच म्हटलें नाहीं, तर संपत्तीचें सर्व सार जीं रत्नें त्यांची उपमा दिली आहे. शब्द हे भाषेचे मोलवान् अलंकार. थोर विभूतींच्या विचारसंपत्तीचें भांडार, घोर निद्रेंत

नगर वाचनालय, सातारा.



पडलेल्या जनतेला हलवून जागृत करण्याचें कवींच्या, लेखकांच्या व वक्त्यांच्या हातांतलें उत्कृष्ट साधन किंवा वाग्युद्धांतलीं प्रखर शस्त्रें आहेत; इतका व्यापक अर्थ कदाचित् त्यावेळीं त्यांच्या मनींमानसीं नसेल. ' आमच्यासारख्या दरिद्री माणसांच्या घरांत काय सांपडावयाचें आहे ? आमचें घर चंद्रमौळी, आमचीं वस्त्रें म्हणजे लक्तरें, आणि भांडीं-कुंडीं म्हणजे चार हंडींमडकीं, यांशिवाय आमचेपाशीं कांहीं नाहीं. नाहीं म्हणायला एक मात्र भांडार आमचेपाशीं आहे आणि तें म्हणजे आमच्या अभंगाच्या वह्या. त्या शब्दांनीं भरलेल्या आहेत, आणि आमचें रत्नभांडार काय तें तेंच आहे ' असा वरील तुकोक्तीचा अर्थ आहे. या उद्गारांत महाराजांनीं शब्दभांडाराला रत्नभांडार म्हटलें आहे तें सहेतुक असो किंवा निर्हेतुक असो, पण येवढी गोष्ट खरी आहे कीं, भवभूतीनें म्हटल्याप्रमाणें या महाराष्ट्रीय महात्म्याच्या तोंडून सहज निघालेल्या शब्दांच्या मागोमाग अर्थ धावत गेला आहे आणि त्यांनीं शब्दांना जी रत्नांची उपमा दिली आहे ती सर्वथा खरी आहे. कसें तें पुढें सांगण्यांत येईल.

## शब्द आणि शब्दशक्ति

आतां आपण शब्द म्हणजे काय तें प्रथम पाहूं. ' शब्दकल्पद्रुम ' नांवाच्या कोशांत ' शब्द ' याचा अर्थ ' श्रोत्रग्राह्यगुणपदार्थविशेषः ' असा देऊन पुढें त्याचें स्पष्टीकरण केलें आहे. त्यावरुन शब्द हा ध्वन्यात्मक म्हणजे केवळ नाद आणि वर्णात्मक म्हणजे अक्षरबद्ध अशा दोन स्वरूपांचा असतो असें शास्त्रकार समजतात असें दिसतें. शब्द कसा उत्पन्न होतो, तो नित्य आहे कीं अनित्य आहे, त्याचीं लक्षणें काय आहेत वगैरे प्रश्नांसंबंधानें नैयायिक व व्याकरणकार काय म्हणतात, या गूढ विषयांत शिरण्याचें आपणांस कारण नाहीं. पण शब्दाच्या अंगभूत अशी कांहीं शक्ति आहे कीं काय, कीं जिच्यामुळें तुकाराम महाराजांसारख्यांनीं त्याला रत्न म्हणावें, हा प्रश्न मात्र खरोखर विचार करण्यासारखा आहे यांत शंका नाहीं. व्यवहारांत पुष्कळ वेळां शब्द म्हणजे केवळ ' तोंडाची वाफ,' किंवा ' तोंडांतून बाहेर सोडलेला वायु ' या पलीकडे त्याला महत्त्व देण्यांत येत नाहीं हें आपण पाहतों. शेक्सपिअरसारख्या महाकवीनें सुद्धां हॅम्लेट नाटकांत तशाच अर्थानें ' शब्द ' शब्दाचा उपयोग केलेला आहे. पोलोनियस नांवाच्या वृद्ध दरबाऱ्यानें युवराज हॅम्लेट यास ' महाराज, आपण काय वाचीत आहां ? ' असा प्रश्न केला असतां युवराजानें ' शब्द, शब्द, शब्द,' असें त्रिवार उत्तर केलें. यांत ' शब्द ' हा शब्द फोलपणाचाच सूचक आहे. दुसऱ्या एका नाटकांत ' शब्द ' म्हणजे ' पोकळडोक्या मूर्खांचे नोकर,' किंवा ' जादूगाराची मायावी सृष्टि ' आहे, असेहि उद्गार त्याच कवीनें दुसऱ्या एका पात्राच्या तोंडीं घातले आहेत. ज्या ' शब्दाला ' तुकाराम महाराजासारख्यांनीं रत्न म्हटलें त्यालाच शेक्सपियरसारख्या महाकवीनें फोल ठरविलें हें कसें ? अशी शंका सहसा कोणी घेणार नाहीं. पण घेतलीच तर त्याला असें उत्तर देतां येईल कीं, तुकाराममहाराज व शेक्सपियर या दोघांच्या उक्तींत दिसणारा विरोध खरा विरोध नाहीं, विरोधाभास आहे, आणि त्याचें निरसन सहज करतां

येण्यासारखें आहे. तें असें कीं, एक तर शेक्सपियर कवीनें शब्दांचा फोलपणा दाखविणारीं वाक्यें स्वतःचीं म्हणून दिलीं नाहींत. विशिष्ट प्रकारच्या नाटकांतल्या पात्रांच्या तोंडीं त्यांच्या स्वभावानुसार विशिष्ट प्रसंगांच्या ओघांत तीं घातलीं आहेत; आणि दुसरी गोष्ट—कोणत्याहि लेखकाच्या लेखांतल्या एखाद्या विधानाच्या सत्यतासत्यतेचा विचार करतांना तेवढ्याच एका वाक्याचा विचार करून चालत नाहीं, मागचा पुढचा संदर्भ व लेखकाचें त्या विषयींचें सामान्य मत ( हें त्याच्या एकंदर लेखांच्या धोरणानें व त्याच्या स्वतःच्या चरित्रावरून ठरवायाचें असतें ) यांच्या धोरणावरून आक्षेपित वाक्याचा अर्थ घ्यावयाचा असतो. तसें न केल्यास एकादे प्रसंगीं अर्थाचा अनर्थ व्हावयाचा ! याचें गमतीदार उदाहरण पहा—

मुक्तेश्वरानें एका अभंगांत म्हटलें आहे:—

> **गौहत्या** घडली ज्याला । आम्ही संत म्हणूं त्याला
> नाहीं केलें **मद्यपान** । वृथा त्याचें संतपण
> इतुकें घडे जया ठायीं । मुक्तेश्वर त्याच्या पायीं

या अभंगांतल्या **गौहत्या** व **मद्यपान** या दोन शब्दांचे सरळ व्यावहारिक अर्थ म्हणजे अनुक्रमें गाईचा वध व दारूबाजी हे होत. हे अर्थ घेऊन वरील अभंग कोणी लावूं लागला तर मुक्तेश्वरासारखा महा नीच, दुष्ट व अधम प्राणी हिंदुसमाजांत कोणी झाला नसेल असा त्याच्या मनाचा ग्रह झाल्यावांचून राहील काय ? बरें, त्याच शब्दांचा सारासारविचारपूर्वक अर्थ घेऊन वरील अभंग लाविला तर सगळी संगति उत्तम जुळते. हा अर्थ असा—गौहत्या म्हणजे इंद्रियदमन ( गौ = इंद्रिय; हत्या = नाश किंवा दमन ) आणि मद्यपान म्हणजे ब्रह्मानंद ( ज्याप्रमाणें मद्यपि कैफ चढल्यानंतर आपल्याच नादांत गुंग असतो, त्याप्रमाणें ब्रह्मस्वरूपाशीं तल्लीन झालेला मनुष्यहि आनंदसागरांत पोहत राहत असल्यामुळें ब्रह्मानंदाला या ठिकाणीं मद्यपानाची जी उपमा दिली आहे ती अगदीं यथार्थ आहे. ) असा अर्थ घेतल्यानंतर मुक्तेश्वराविषयींचा वाचकाच्या मनाचा ग्रह क्षणांत पालटून त्याची वृत्ति कशी आदरयुक्त होते !

सारांश, शब्दाच्या अंगचीं, वाचकाचीं मनोवृत्ति पालटण्याची जादुशक्ति अजब आहे, यांत शंका नाहीं. शब्द क्षणांत चोराला साव व सावाला चोर बनवूं शकतात, अत्यंत पापकर्मी चांडाळाच्या ठायींसुद्धां साधूच्या तोंडच्या शब्दानें उपरति झाल्याची उदाहरणें आहेत. शाहिरांचे वीररसयुक्त पोवाडे ऐकून नेभळट माणसाचेसुद्धां हात अस्तन्या वर सारूं लागतात. इतकी प्रचंड शक्ति ज्या शब्दाच्या ठायीं आहे त्या शब्दाला ' फोल ' म्हणणें हें केवढें धाडस आहे ! आणि तें शेक्सपिअरसारख्या महाकवीनें केलें ही गोष्ट तर उघड उघड असंभवनीय आहे.

## शब्दशक्तीची शास्त्रीय मीमांसा

शब्दाच्या ठायीं असलेल्या या शक्तीची थोडीशी शास्त्रीय मीमांसा करणें येथें अवश्य आहे. शास्त्रकारांनीं शब्दाचे दोन अर्थ केले आहेत. पहिला अर्थ म्हणजे

ध्वनि; दुसरा अर्थ-वर्ण. ध्वनि किंवा नाद याला कांहीं अर्थ नसला तरी त्यांच्या ठायीं कांहीं अद्‌भुत अतर्कित शक्ति आहे अशी समजूत आपल्या देशांत फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. गायनशास्त्रांतल्या रागांची रचना याच मूलभूत तत्त्वावर झालेली आहे व अमुक राग अमक्या वेळीं शास्त्रपद्धतीनें गाइला असतां त्याचे होणारे परिणामहि गायनशास्त्रकारांनीं नमूद करून ठेविले आहेत. अर्थहीन अशा ध्वनीच्या ठायीं अद्‌भुत शक्ति आहे ही गोष्ट आधुनिक शिक्षण घेतलेल्या लोकांना खरी वाटत नाहीं व त्यामुळें मंत्रांच्या ठायीं असलेल्या शक्तींवर त्यांची श्रद्धा बसत नाहीं यांत आश्चर्य नाहीं. पण प्रत्यक्ष अनुभवच या कामीं उत्तम गुरु आहे, आणि तो ज्यांना भेटला त्यांच्या मनांतली मंत्रशक्तीवरची अश्रद्धा नाहींशी झाली, किंवा निदान त्यांची तत्संबंधाची निश्चित नास्तिकवृत्ति डळमळीत तरी झाली अशीं शेकडों उदाहरणें घडलीं आहेत. प्रस्तुत लेखक कांहीं वर्षांपूर्वी मंत्रशक्तीविषयीं असाच अश्रद्ध होता. पण पंचवीस तीस वर्षांत त्याला जे थोडे पण ठळक अनुभव आले त्यांवरून मंत्रशक्ति निखालस झूट आहे असें छातीठोकपणानें त्याला आतां म्हणतां येत नाहीं. सापाचें, विंचवाचें व इतर कित्येक प्राण्यांचें माणसाच्या शरिरांत भिनलेलें विष दुरून केवळ मंत्रोच्चार केल्यानें उतरतें असा अनुभव पुष्कळांना आलेला आहे. हिंवताप, अर्धशिशी, उसण वगैरे शरीरव्याधि व पिशाचबाधा मंत्रप्रयोगानें बऱ्या होतात हा अनुभव श्रद्धाळू माणसांनाच नव्हे तर मजसारख्या अश्रद्धाळू माणसालाहि आलेला आहे. असा अनुभव आल्यावरहि जर तो मंत्रशक्ति अथवा ध्वनिशक्ति हिच्याविषयीं आपला नास्तिकपणा कायम ठेवील आणि सब झूट आहे म्हणेल तर त्याची सत्यनिष्ठा कांहीं अजब आहे असें म्हणावें लागेल. जगांत खऱ्या मांत्रिकांची संख्या फारच अल्प आणि भोंदू मांत्रिकांची संख्या फार मोठी आहे, येवढयावरून मंत्रशक्ति नाहींच असें अनुभवाअंतीहि कोणी म्हणेल तर तो निवळ हट्टवादच म्हटला पाहिजे. सारांश, शब्दाचें एक स्वरूप म्हणजे ध्वनि. त्याच्या ठायीं अद्‌भुत शक्ति आहे कीं नाहीं याचा निर्णय करण्यास इतर प्रमाणांचें साह्य न घेतलें तरी प्रत्यक्ष अनुभवाचें प्रमाण पुरें आहे.

मंत्रांचा उच्चार यथाशास्त्र झाला तर त्याचा सुपरिणाम होतो, तसा न झाला तर मांत्रिकावर त्याचा विपरीत परिणाम घडून तो भ्रमिष्ट होतो ही समजूत आज जशी आपल्या लोकांत आहे तशी इ. स. च्या १३ व्या शतकांत म्हणजे श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या काळींहि होती; याला प्रमाण ज्ञानेश्वरी ग्रंथांत आहे. ज्ञानेश्वरी अ० १ ओवी १९० मध्यें म्हटलें आहे—

**देखा मंत्रज्ञ बरळ जाय । तेथ का जैसा संचार होय**
**तैसा तो धनुर्धर महामोहें । आकळिला ।**

**अर्थः**—असें पहा कीं, मांत्रिक मंत्रोच्चार करण्यांत चुकला म्हणजे तो भ्रमिष्ट होतो. त्याप्रमाणें अर्जुन महामोहानें व्याप्त झाला होता.

या ओवीवरून खुद्द ज्ञानेश्वरासारख्या ज्ञानी मनुष्याची सुद्धां मंत्रशक्तीवर श्रद्धा होती असें दिसतें.

असो. शब्दाचें दुसरें स्वरूप जी वर्णात्मकता तिच्याठायीं अशी कांहीं शक्ति आहे काय व असल्यास ती त्याला कशामुळें प्राप्त होते हें आपण आतां पाहूं. नुसत्या वर्णाला किंवा वर्णसमुच्चयाला भाषाशास्त्रकार शब्द म्हणत नाहींत. वर्णाच्या किंवा वर्णसमुच्चयाच्या ठायीं अर्थवाहकता असेल तरच तो शब्द समजला जातो. अर्थात् अर्थवाहकता हा या दुसऱ्या स्वरूपाचा विशेष गुण म्हटला पाहिजे. भाषा अशा अर्थयुक्त वर्णांनीं बनते. भाषाच काय पण मनुष्याचें सारें जीवनच या अर्थयुक्त वर्णांशीं निगडित असतें. मनुष्याच्या डोक्यांतले विचार व कल्पना या शब्दांच्याच द्वारें व्यक्त होतात व समाजांतलें आपलें कार्य घडवून आणतात. जगांत आजपर्यंत जें जें म्हणून कांहीं कार्य घडून आलें आहे तें तें सगळें उच्चारित किंवा लिखित अर्थयुक्त वर्णांचेंच फळ आहे. कवि, तत्त्ववेत्ते, वक्ते, लेखक इ० मंडळी आपल्या विचारांचा व कल्पनांचा प्रभाव समाजावर प्रस्थापित करतात ते या शब्दांच्याच साधनानें. मी मी म्हणविणारे जगज्जेते शिकंदर, नेपोलियनप्रभृति वीरांना सुद्धां आपले हुकूम आपल्या सैनिकांस कळवितांना शब्दांनाच शरण जावें लागलें. राजकार्यधुरंधर मुत्सद्यांना आपल्या कारस्थानांत यशस्वी होण्याच्या व या बोटावरची थुंकी त्या बोटावर करून दाखवून देशचे देश गिळंकृत करण्याच्या कामांत शब्दांचें अनेकार्थत्वच उपयोगीं पडलेलें आपण पुष्कळ वेळां पाहतों. शास्त्रकारांना व शोधकांना आपापले सिद्धांत जगापुढें मांडून कीर्तिलाभ करून घेण्याचे कामीं शब्दच उपयोगीं पडतात. लोकांत जागृति व खळबळ उत्पन्न करण्याच्या उद्योगांत कवींना व वक्त्यांना शब्दासारखें उत्कृष्ट साधन दुसरें दिसत नाहीं. गतकालीन प्रतापशाली राजे व योद्धे यांचें स्मरण जगांत चिरकाल कायम ठेवण्याची कामगिरी आजपर्यंत शब्दच करीत आले आहेत. रामायण नसतें तर श्रीरामचंद्राची पुण्यस्मृति जगांत आज दिसली नसती. शब्द नसते तर शास्त्रें व तत्त्वज्ञान यांच्या शोधांना जग कधींच अंतरलें असतें. सारांश; सारें जग आणि त्याची सारी प्रगति शब्दांची अत्यंत ऋणी आहे, हें कबूल केल्याशिवाय गत्यंतर नाहीं.

शब्दाला जें येवढें महत्त्व प्राप्त झालें आहे तें कशामुळें हा खरोखर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. ध्वन्यात्मक शब्दाच्या शक्तीची मीमांसा करणें सध्यांच्या शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीच्या आवांक्याबाहेरचें आहे असें दिसतें. निदान तसा प्रयत्न अद्यापपर्यंत कोणी शास्त्रज्ञानें केलेला ऐकिवांत नाहीं. कारण, उघडच आहे कीं, जेथें मंत्रशक्तीचें अस्तित्वच अद्याप वादग्रस्त मानण्यांत येतें, तेथें तिच्या उत्पत्तीची मीमांसा करण्याची यातायात कोण करणार? अर्थात् कोणी ऑलिव्हर लॉजसारखा शास्त्रज्ञ धैर्यानें पुढें येऊन हा विषय हातीं घेईल आणि अनेक वर्षेपर्यंत त्यावर निर्विकार दृष्टीनें शोध व विचार करील, तोंपर्यंत या विषयानें अडगळींतच पडून राहिलें पाहिजे. वर्णात्मक शब्दाची गोष्ट याहून अगदीं निराळी आहे. त्या शब्दाच्या अंगच्या शक्तीची मीमांसा करण्याचें काम विशेषसें कठिण नाहीं. त्या शब्दाच्या ठायीं जें कांहीं महत्त्व दिसतें तें खरोखर त्याचें अंगभूत नाहीं. सूर्यतेजाच्या परिवर्तनशीलत्वामुळें जसें चंद्राला तेज प्राप्त होतें त्याप्रमाणें शब्दाच्या पाठीशीं असलेल्या कांहीं एका विशिष्ट शक्तीमुळें वर्णात्मक शब्द

प्रभावशाली होत असतात. ही पाठीमागची शक्ति ज्या मानानें जोरदार असेल त्या मानानें शब्दाच्या प्रभावाची मात्राहि कमीजास्त होत जाते. शब्दाच्या मागची ही शक्ति म्हणजे अर्थात् माणसाची विचारशक्ति ही होय. विचार हे अमूर्त आहेत. त्याचें जें मूर्त किंवा व्यक्तस्वरूप तिलाच आपण शब्द किंवा भाषा म्हणतों. वर्णात्मक शब्दाची ही उत्पत्ति लक्षांत घेतली म्हणजे शब्द फोल आहेत या म्हणण्यांत कांहीं तात्पर्य उरत नाहीं. शब्दांमध्यें प्रतिबिंबित झालेले विचार मूळचेच फोल असतील तर अर्थात शब्दहि फोल ठरतील. विचार जर भरीव असतील तर त्यांचें मूर्तस्वरूप अथवा शब्दहि भरीव आहेत ही गोष्ट कबूल करावी लागेल.

ज्याप्रमाणें भौतिकसृष्टींत विद्युच्छक्ति ही अमूर्त पण एक अत्यंत प्रबळ व आश्चर्यकारक शक्ति आहे त्याप्रमाणें मानससृष्टींत विचारशक्ति ही एक अत्यंत बलशाली आणि कौतुकावह शक्ति आहे यांत शंका नाहीं. या दोन्ही शक्ति अमूर्त असल्यामुळें त्यांच्या कार्यावरून त्यांचें मोजमाप ठरवावें लागतें आणि कार्य करण्यास दोहींनाहि एखाद्या माध्यमाची जरूरी लागत असते. तांब्याच्या तारा, पाणी किंवा त्यासारखी आणखी कांहीं वस्तु यांच्याशिवाय विद्युच्छक्तीचा प्रवाह कांहीं दृश्य कार्य करूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें शब्दासारख्या माध्यमाचा आश्रय केल्याशिवाय विचारशक्तीलाहि दृश्य कार्य करतां येत नाहीं. योग्य साधन प्राप्त झाल्यावर विचारशक्ति केवढें कार्य करूं शकते याचें प्रत्यंतर जगाचा आजपर्यंतचा इतिहास उत्तम प्रकारें देत आहे. विचारशक्तीचें माध्यम होण्याचा अर्थात् विचाराचा वाहक अथवा दूत होऊन इष्ट कार्य करण्याचा गुण शब्दाचे ठायीं जसा कमजास्त असेल त्या मानानें त्या शब्दाची योग्यता अर्थात् ठरते, आणि त्याचप्रमाणें ज्या भाषेंत ज्या प्रमाणानें विचारवाहक शब्दांची संख्या असेल त्या प्रमाणानें त्या भाषेच्या संपत्तीचें मानहि लौकिकदृष्ट्या ठरविण्यांत येत असतें हें उघड आहे.

## मराठी भाषेची वाढ

शब्द म्हणजे विचारांचें मूर्त प्रतिबिंब आहे असें वर म्हटलें आहे. विचार हा जनक आणि शब्द त्याचा पुत्र असें रूपक केलें तर तें विशेष युक्त दिसेल. कारण ' आत्मा वै पुत्र नामासि ' या उक्तीप्रमाणें पुत्र हा पित्याचेंच प्रतिबिंब असतो. इतकेंच नाहीं, तर पित्यानें अपूर्ण टाकलेलें काम पुढें चालवून पूर्ण करणें व अशा प्रकारें सातत्य कायम ठेवणें हा आपला धर्म समजून धर्मशील पुत्र जसा आपलें कर्तव्य करीत राहतो, त्याप्रमाणें शब्दहि त्याला अस्तित्वांत आणणाऱ्या विचाराला व्यक्त करण्याची कामगिरी करूनच थांबत नाहीं, तर पुष्कळ वेळां नव्या नव्या विचारांची प्रेरणा करून त्या त्या विचारांचे वाचक असे नवे नवे शब्द बनविण्याची व प्रचारांत आणण्याची आवश्यकता उत्पन्न करून ठेवतो. अशा रीतीनें विचाराच्या सातत्याबरोबर शब्दांचेंहि सातत्य चालून दोहोंच्या योगानें भाषेच्या संपन्नतेंत भर पडत जाते.

भाषेची वाढ आणि विचारांची वाढ यांची या प्रमाणें एक प्रकारची उत्कृष्ट सांगड जमलेली आहे. अनुभव हा मनुष्याच्या विचाराला चालना देणारा आहे आणि विचार शब्दांचा जनक आहे ही गोष्ट ध्यानांत ठेविली म्हणजे भाषेची वाढ होण्याला मनुष्याचा अनुभव वाढणें किती अवश्य आहे तें निराळें सांगावयास नको. भाषा संपन्न होण्याला त्याचा अनुभव म्हणजे त्याच्या कर्तव्यक्षेत्राचा परीघ विस्तृत झाला पाहिजे. यालाच कै. लोकमान्य टिळक यांनीं एक लहानसा पण पूर्णपणें समर्पक शब्द पुण्याच्या एका साहित्यसंमेलनापुढें झालेल्या आपल्या भाषणांत योजिला होता. मराठी भाषेची वाढ कशानें होईल यासंबंधानें बोलतांना ते असें म्हणाले होते कीं, 'आपल्या महाराष्ट्रीयांचा व्याप जोंपर्यंत वाढणार नाहीं, जोंपर्यंत आम्ही मराठे राजकारण, व्यापार, उदीम, कलाकौशल्य, लष्करीपेशा इ० पासून पराङ्गमुख राहूं किंवा परिस्थिति आम्हांला पराङ्गमुख ठेवील, तोंपर्यंत आजच्यासारख्या नुसत्या संमेलनानें भाषेची विशेषशी उन्नति होईल असें मानण्याइतकें आशावादित्व माझ्या ठायीं नाहीं. आमच्या लोकांना या निरनिराळ्या कार्यक्षेत्रांत संचार करून अनुभव घेण्याची मुभा जोंपर्यंत मिळाली नाहीं, जोंपर्यंत आमचे हातपाय पारतंत्र्याच्या शृंखलांनीं जखडले गेले आहेत. आणि आमच्या आकांक्षांना कांहीं ठराविक मर्यादेच्या पलीकडे न जाऊं देणारे निर्बंध काढून टाकण्यांत आले नाहींत, तोंपर्यंत आमची बुद्धि मर्यादित, आमचे अनुभव मर्यादित, आमचे विचार मर्यादित, आमचे शब्द मर्यादित व आमची भाषाहि अर्थात् मर्यादितच राहणार. यासाठीं आपल्या भाषेची वाढ खुंटविणाऱ्या प्रतिबंधक गोष्टी दूर करण्याची खटपट आपण प्रथम केली पाहिजे' हे विचार लोकमान्यांच्या तोंडच्या ओजस्वी शब्दांत मला देतां आले असते तर खरोखर मोठी बहार झाली असती. परंतु दुर्दैवानें त्या काळीं कोणी लघुलेखक सभेंत हजर नसल्यामुळें त्यांच्या विचारांचें सार माझ्या मोडक्यातोडक्या शब्दांनीं सांगणें मला प्राप्त झालें आहे.

मराठी भाषेचा आजपर्यंतचा इतिहास लोकमान्यांच्या वरील उद्गाराचें पूर्णपणें प्रत्यंतर देत आहे. समाजांत ज्या काळीं ज्या प्रकारच्या भावनांचा लोकांच्या मनावर विशेषेंकरून प्रभाव चालत असतो त्या प्रकारचे त्या त्या भावनांचे वाचक शब्द अधिकत्वानें त्या काळीं त्यांच्या भाषेंत प्रविष्ट होतात. आपल्या देशांत आध्यात्मिक ज्ञानाची अभिरुचि पूर्वींपासून लोकांचे ठायीं आहे म्हणून त्या विषयासंबंधाच्या शब्दांचा भरणा मराठी भाषेंत पूर्वींपासूनच मोठा आहे. पुढें नामदेवाच्या काळापासून भक्तिमार्गाकडे लोकांची प्रवृत्ति जास्त होऊं लागली, तेव्हां भक्तिरसानें ओथंबलेल्या अंतःकरणांत उचंबळणाऱ्या वृत्तींचे निदर्शक असे शेकडों शब्द विशेष रूढ झाले व कित्येक नवे शब्दहि तयार झाले. मनांत एकादी वृत्ति उचंबळूं लागली आणि बाहेर पडण्यासाठीं उत्कंठित झाली म्हणजे ती शब्दासाठीं अडून बसत नाहीं. मनांतल्या विचाराचा तंतोतंत वाचक असा एखादा जुना शब्द न आढळला तर त्या विचाराच्या उमींबरोबर एखादा नवा शब्द स्वयंस्फूर्तीनें तत्काळ तयार होऊन त्या वेळचें कार्य भागवितो व तोच शब्द पुढें त्या वृत्तीचा वाचक म्हणून भाषेंत कायमचें स्थान पटकावतो. आपल्या मराठी भाषेंत नामदेवतुकारामा-

अमर वाचनालय, सातारा.



सारख्या संतांनीं अशा प्रकारें अनेक भक्तिपर शब्द मराठी भाषेंत आणून तिच्या शब्द-संपत्तींत भर टाकली आहे. मुसलमानांचें राज्य दक्षिणेंत सुरू झालें, तेव्हां नव्या राज्य-पद्धतीबरोबर पुष्कळ नवे शब्द फारशी व अरबी भाषेंतून मराठींत आले, व भाषेच्या शब्द-कोशांत मिरासदार होऊन बसले. पुढें मराठ्यांच्या अमदानीच्या काळांत त्यांना हुसकावून लावण्यासाठीं व यावनी शब्दांबद्दल तदर्थवाचक संस्कृत शब्द रूढ करण्यासाठीं श्रीछत्रपति शिवाजी महाराजांनीं इ. स. १६७५।७६ च्या सुमारास आपल्या अष्टप्रधानांपैकीं वे. शा. सं. राजश्री रघुनाथ नारायण अध्वरी पंडितराव यांचेकडून मुद्दाम 'राजव्यवहारकोश' नांवाचा एक लहानसा कोश तयार करविला, पण पुढें पांच चार वर्षांनींच महाराजांचा अंत झाल्यामुळें व त्यानंतरच्या धामधुमीच्या काळांत महाराजांचा तो प्रयत्न त्यांच्या वंशजांना चालू न ठेवतां आल्यामुळें महाराजांचा मूळ हेतु सफळ न होतां यावनी शब्दांचा व्यवहार अधिकच झपाट्यानें वाढत गेला. हा जो प्रकार झाला त्याबद्दल मराठी भाषेच्या भक्तांस खेद वाटण्याचें बिलकुल कारण नाहीं. कारण कीं त्याच्या योगानें मराठी भाषेची हानि न होतां उलट तिचा फायदाच झाला आहे. मराठी भाषेच्या अंगीं जो मर्दानीपणा आला आहे तो पुष्कळ अंशीं या यावनी शब्दांनींच आलेला आहे. या यावनी शब्दांबद्दल त्यांचे संस्कृत पर्याय घालून वाक्यरचना केली तर तें वाक्य व्हावें तसें जोरदार होत नाहीं ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे. ज्यांना या गोष्टीबद्दल शंका वाटत असेल, त्यांनीं पाहिजे तर यावनी शब्द न वापरतां तत्पर्यायवाचक संस्कृत शब्द योजून एखाद्या लढाईचें वर्णन किंवा वीरश्रीयुक्त भाषण लिहून पहावें म्हणजे खात्री होईल. असो. मुसलमानांच्या संसर्गानें आमचा पोषाख, चालीरीति, रहाणी, घरांतले व बाहेरचे व्यवहार वगैरे सर्वच गोष्टींत मोठे फेरफार झाले व पुष्कळ नव्या नव्या वस्तूंशीं, संस्थांशीं, रूढींशीं, समजुतींशीं व विचारांशीं आमच्या लोकांचा परिचय झाला. नवी राज्यपद्धति अंमलांत आल्यामुळें नवे कर व पट्ट्या बसल्या; नवी वसुलीपद्धति व राज्यपद्धति सुरू झाली. वतनें, जहागिरी, इनामें इ. चे नवे प्रकार प्रविष्ट झाले; लढाईचीं व संरक्षणाचीं नवीं साधनें, नवे किताब, पदव्या, मानमरातब, हुद्दे, उद्योगधंदे, पत्रव्यवहाराचे मायने, शिल्प व कला इ. चे नवे नमुने, हीं प्रचारांत आलीं. भाषा व व्यवहार यांचा अन्योन्य दृढ संबंध असल्यामुळें अशा सर्वतोपरि क्रांतिमय स्थितींत मराठी भाषेनें यवनांच्या संसर्गापासून अलिप्त रहाणें अशक्य होतें. अर्थात् कसबा, जिल्हा, हवालदार, कारकून, पेशवा, तागाईत, समशेर, शिबंदी, किल्ला, मुनसफ, दौलतपन्हा, आमदानी, हुजूर, अत्तरदाणी, कमान, महिरप, बगीचा, जरतार, छबीना, सौदागर, पगडबंद, बंदूक, दस्तऐवज, वाकनीस, तोफखाना, बक्षीस, हक्क, फजिती, मनसब, इमारत, बेलाशक, अमीर, गैरवाजवी, मिरास, जहागीर इ. हजारों शब्द मराठींत येऊन कायमचे ठाणें देऊन बसले यांत नवल नाहीं. विद्या व व्यवहार यांच्या अनेक शाखा म्हणजे व्यापार, राजकारण, लष्करी पेशा, आरमार, ज्योतिष, शिल्प, शास्त्रें, कला, यांच्या संबंधाचे शेंकडों शब्द त्या त्या शाखेंत आमच्या लोकांची जसजशी प्रगति होत गेली त्या त्या मानानें मराठी भाषेंत येत गेले,

आणि ती प्रगति होण्याचें खुंटतांच शब्दांची वाढ होण्याचें कामहि अर्थात् खुंटलें; इतकेंच नाहीं, तर होते तेहि शब्द हळूहळू प्रचारांतून नष्ट होऊन आतां पुराणवस्तुसंग्रहालयांतल्या जुन्या दुर्मिळ वस्तूंप्रमाणें ते शब्दकोशाचे केवळ शोभेचे अलंकार होऊन बसले आहेत. सारांश, जोंपर्यंत आम्हां मराठ्यांची सत्ता साऱ्या हिंदुस्थानभर गाजत होती आणि लोकमान्यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे जोंपर्यंत आम्हां मराठयांचा 'व्याप' सर्वतोगामी होता, तोंपर्यंत मराठी भाषेंत नव्या नव्या शब्दांची भर झपाट्यानें पडत गेली आणि हा क्रम आणखी शंदोनशें वर्षें तसाच चालू राहता व देशाला शांतता प्राप्त होऊन विद्या आणि व्यवहार यांच्या भिन्न भिन्न शाखांत प्रगति करण्याचा आम्हां लोकांस अवसर प्राप्त झाला असता तर मराठी भाषा विलक्षण प्रकारें शब्दसंपन्न होऊन तिच्यांतलें वाङ्मय सध्यांच्या इंग्रजी, फ्रेंच किंवा जर्मन वाङ्मयाप्रमाणें साऱ्या जगाला आदरणीय होऊन बसलें असतें. पण आमच्या दुर्दैवानें त्याची वाढ न होतां तें उलट इतक्या दुःस्थितीला जाऊन पोंचलें कीं, आम्हांला आमच्या धर्मग्रंथांची ओळख करून घ्यावयाची झाली तरी तीं परक्या म्हणजे इंग्रज लेखकांच्या मध्यस्थीच्या द्वारें करून घ्यावी लागत आहे! आणि आमच्या मुलांना शिक्षण द्यावयाचें तें त्यांच्या मातृभाषेच्या द्वारें द्या असें युनिव्हर्सिटीसारख्या सत्ताधिकारी शिक्षणसंस्थेपुढें तोंड वेंगाडून म्हणावें लागत आहे!

## मराठी भाषेंतली शब्दसंख्या

भाषा हें लोकस्थितीचें मापक यंत्र आहे. विद्या आणि व्यवहार यांच्यांत लोकांची प्रगति किंवा परागति किती झाली आहे, लोकांचा व्याप किती वाढला किंवा कमी झाला आहे, याचें उत्कृष्ट प्रमाण म्हणजे त्यांची भाषा होय. प्रत्येक राष्ट्राची भाषा घेऊन तींतल्या शब्दसंग्रहाची मोजदाद व छाननी केली आणि त्यावरून तुलनात्मक पद्धतीनें त्या त्या राष्ट्राच्या स्थितीसंबंधानें सिद्धान्त काढले तर सहसा त्यांत चूक आढळावयाची नाहीं. उदाहरणार्थ—आपण इंग्रजी भाषा व आपली मराठी भाषा यांची तुलना घेऊं. इंग्रजी भाषेंतल्या शब्दसंख्येचा नक्की आंकडा सांगतां येत नाहीं. कारण, त्या भाषेंत दर दहा पांच वर्षांनीं एखाद दुसरा बृहत्कोश निर्माण होत असतो, आणि प्रत्येक नव्या कोशांत नव्या नव्या शब्दांचा भरणा दाखल केला जातो. गेल्या महायुद्धाच्या गडबडीच्या काळांत युद्धकलेसंबंधानें सुमारें दीड हजार नवे शब्द इंग्रजी भाषेंत प्रविष्ट झाले आहेत असें विधान एका इंग्रज भाषाशास्त्रज्ञानें केलेलें नुकतेंच आमच्या वाचण्यांत आलें आहे. या युद्धकालानंतरचा बृहत् इंग्रजी कोश अद्याप बाहेर पडला नाहीं. तथापि एक लहानसा कोश नुकताच निघाला आहे. त्याचें जें परीक्षण मुंबईच्या 'टाइम्स ऑफ इंडिया' पत्रांत आलें होतें, त्यावरून या लघु आंग्ल शब्दकोशांत (Pocket Oxford Dictionary) ३९१७१० इंग्रजी शब्द अर्थासह दिले आहेत असें कळतें. खिशांत मावण्यासारख्या लहान कोशांत इतके म्हणजे सुमारें चार लक्ष शब्द आहेत, तेव्हां बृहत्कोशांत पांच लक्ष तरी शब्द असण्याची संभवनीयता धरली तर ती गैरवाजवी होणार नाहीं. आतां आपण मराठी कोशांतली शब्दसंख्या पाहूं. स्वराज्याच्या काळांत शांततेच्या

अभावामुळें कोशरचनेसारखा उद्योग कोणीं हातीं घेणें शक्य नव्हतें. त्यानंतरच्या पन्नास वर्षांच्या काळांत म्हणजे इंग्रजी अंमल सुरू झाल्यानंतर इंग्रज सरकारला मराठे लोकांच्या भाषेचें ज्ञान करून घेण्याची आवश्यकता वाटूं लागली आणि मराठी शब्दांचे अर्थ इंग्रजी भाषेंत देणारा कोश मि. जे. टी. मोलस्वर्थ यांनीं अनेक देशी पंडित व मुनशी यांच्या साह्यानें प्रथम तयार केला. या कोशाची पहिली आवृत्ति इ. स. १८३१ मध्यें निघाली. तींत सुमारें ४०००० शब्द होते. दुसरी आवृत्ति १८५७ सालीं निघाली. तींत ही शब्दसंख्या ६०००० पर्यंत गेली; पण ही मराठी भाषेची खरी शब्दसंख्या धरून चालणें योग्य होणार नाहीं. कारण, या कोशांत गांवढळ, अश्लील, मासेविक्यांच्या तोंडचे व साहेबाच्या बुटलेरांच्या भाषेंतले असे शब्द पुष्कळ आहेत आणि कित्येक वेळां तर त्या शब्दांचें महत्त्व या साहेबांना इतकें वाटलें कीं, त्यांच्या अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ त्यांनीं आपल्या कोशाची बरीच जागा अडविली आहे! आणि मराठी भाषेला खरोखर ललामभूत अशा जुन्या काव्यग्रंथांतले शब्द मुळींच दिले नाहींत. शिवाय मराठी शब्दांचा हिशोब जुळवितांना आणखी एक गोष्ट विचारांत अवश्य घेतली पाहिजे. ती ही कीं, मोलस्वर्थसाहेबाचा कोश तयार होऊन जवळ जवळ शंभर वर्षे होत आलीं आहेत. या कोशाची द्वितीयावृत्ति निघूनहि ६५ वर्षे झालीं आहेत. या पासष्ट वर्षांच्या अवधींत महाराष्ट्रांत शनैःशनैः पण शिक्षणाचा प्रसार बराच झाला असून इंग्रज लोकांच्या संसर्गामुळें शेंकडों इंग्रजी शब्दांचे अपभ्रंश मराठी भाषेंत घुसडले आहेत. इंग्रजी भाषेच्या द्वारें इंजिनियरिंग, रसायन, वैद्यक, पदार्थविज्ञान, शिल्प, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, इ० अनेक विषयांशीं आमच्या लोकांचा परिचय घडून त्या त्या विषयांसंबंधाचे पुष्कळ जुने शब्द जाऊन नवे शब्द त्यांच्या जागीं आले आहेत, आणि कांहीं तर अगदीं नव्या कल्पना प्रचारांत येऊन तद्वाचक नव्या शब्दांची भर मराठी भाषेंत पडली आहे. गेल्या शंभर वर्षांत अशा निरनिराळ्या प्रकारांनीं मराठी भाषेची घडामोड झाल्याकारणानें मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीची नक्की मोजदाद करण्याचें काम फार दुर्घट झालें आहे. प्रचारांत आलेल्या या नव्या शब्दांची संख्या स्थूल मानानें पांच हजार धरली तर मोलस्वर्थच्या कोशांत न दिलेले १० हजार जुने मराठी शब्द, दिलेले ६० हजार मध्ययुगीन शब्द व मोलस्वर्थनंतरच्या काळांतले ५ हजार शब्द मिळून एकंदर शब्दसंख्या सुमारें ७५ हजार होते. याच्या पलीकडे ती जाऊं शकत नाहीं. ही मोजदाद अतिशय सढळ हातानें केलेली आहे हें सांगावयास नकोच. कोठें इंग्रजी भाषेंतले पांच लक्ष शब्द आणि कोठें आमच्या मराठी भाषेची पाऊण लाख शब्दसंख्या! विलायतेंतल्या किंवा अमेरिकेंतल्या अब्जाधिपति (Millionaire) पुढें जसे आमच्यांतले नवकोटनारायण फिके दिसतात, तशी मराठी भाषेची शब्दसंपत्ति इंग्रजी भाषेंतल्या शब्दसंपत्तीपुढें निस्तेज दिसूं लागते यांत आश्चर्य नाहीं.

## इंग्रजी भाषेची संपन्नता

इंग्रजी भाषा तरी इतकी शब्दसंपन्न कशी झाली हा एक विचार करण्यासारखा प्रश्न

आहे. इंग्रजी भाषेचें जुनें म्हणजे सॅक्सन वाङ्मय मोठेंसें संपन्न नव्हतें. तिची शब्दसंपत्ति बहुतेक अलीकडल्या काळांतली—गेल्या सात आठ शतकांतच संपादलेली-आहे असें इंग्रज भाषाशास्त्रवेत्त्यांचेंच म्हणणें आहे. ( Henderson's History of the English Literature पृ. ४७८ वरील टीप पहा.) इतक्या अल्पकाळांत त्या भाषेनें जी येवढी उडी मारली आहे त्यांतलें इंगित काय हें पाहणें अवश्य आहे. इंग्लंडच्या गेल्या सातआठ शतकांच्या इतिहासावरून हें इंगित कळण्यासारखें आहे; आणि तें हेंच कीं, या काळांतच इंग्रज लोकांच्या वसाहती व व्यापार यांचा अन्य देशांतून फैलाव झाला; याच काळांत इंग्लंडमध्यें उद्योगधंदे व कलाकौशल्य यांची वाढ झाली; याच काळांत लोकांत शास्त्रज्ञानाचा प्रसार होण्याचा उपक्रम झाला; याच काळांत श्रेष्ठ प्रतीचे तत्त्वज्ञ निर्माण झाले; याच काळांत इंग्रजांचें सैन्य, आरमार यांची अभिवृद्धि झाली; याच काळांत इंग्रजांचें राष्ट्र वैभवशैलाच्या शिखरावर चढण्याच्या मार्गाला लागलें; थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे या काळांत इंग्रजांच्या राष्ट्राचा ' व्याप ' वाढल्याकारणानें व्यवहार, व्यापार, उद्योगधंदे, कलाकौशल्य, शास्त्रें, तत्त्वज्ञान इ. निरनिराळ्या शाखांत जसजसे नवेनवे अनुभव व नवे नवे प्रसंग पहाण्यांत येऊन लोकांच्या मनःसृष्टीचें क्षेत्र विस्तृत झालें, तसतसे नवे नवे शब्दहि निर्माण करण्याची आवश्यकता भासूं लागली व वेळेस जो शब्द योग्यसा वाटला तो नवा बनवून किंवा परभाषेंतला उचलून इंग्रज लोकांनीं आपली भाषा संपन्न केली. इंग्रजांच्या देशाभिमानाला: ज्या वेळीं विलक्षण भरतें येऊन त्याची लाट साऱ्या देशभर जोरानें उचंबळली होती, त्याकाळीं म्हणजे राणी एलिझाबेथच्या कारकीर्दीत हा प्रकार विशेष जोरानें सुरू झाला व तोच प्रकार अद्यापहि अव्याहत सुरू आहे. इंग्रजी भाषेंत नुकता आलेला 'कामूफ्लाज' शब्द घ्या. हा इंग्रजांनीं परवां युद्धाच्या वेळीं फ्रेंच भाषेंतून घेतला. फ्रेंचांनीं तो अमेरिकेंतल्या रेडइंडियन लोकांपासून घेतला होता. इंग्रजांनीं तो शब्द घेऊन त्याचा अर्थ जास्त विस्तृत केला, आणि पक्का आपलासा करून टाकला.

इंग्रजी भाषेनें जर्मन, स्पॅनिश, पोर्तुगीज, रशियन इ. युरोपियन भाषांतूनच तेवढे शब्द घेऊन स्वतःची शब्दसंपत्ति वाढविली आहे असें नाहीं, तर हिंदुस्थान, अरबस्तान, चीन, वगैरे प्राच्य देशांतल्या भाषांतूनहि शब्द नेऊन ते आपलेसे करून टाकिले आहेत. उदाहरणार्थ—कर्म, महात्मा इ. शब्द संस्कृत भाषेंतून घेतले आहेत. बाजार, सिपॉय, खाकी, बक्षीस, लास्कर, हे शब्द उर्दू, आरबी व फारशी भाषांतून घेतले आहेत. कमकात हा विशिष्ट खाद्यवाचक शब्द चिनी भाषेपासून घेतला आहे. तसें करतांना आपण स्वाभिमानाला बाधक असें कांहीं कृत्य करीत आहों अशी शंकासुद्धां इंग्रजांच्या मनाला शिवलेली दिसत नाहीं. फ्रेंच लोकांनीं तसेंच केलें आहे. पोर्तुगीज लोक पांचचार शतकांपूर्वी इकडे आले, तेव्हां त्यांनींही आमच्या मराठी भाषेंतले कित्येक शब्द घेतले. उदाहरणार्थ—पोर्तु.—कांफ्रु ( मराठी कापूर ), आनील ( नीळ ), कोप्र ( खोबरें ), माकाकु ( माकड ), सेपाय ( शिपाई ), पापारी ( पापड ), प्राता ( परात ), लारु ( लाडू ), मांय ( माय=आई ), माजानिय ( महाजनी ) इत्यादि. अलीकडच्या काळांत

नगर वाचनालय

जपानी लोक स्वाभिमान व स्वदेशाभिमान या गुणांसंबंधानें साऱ्या जगाला आदर्शभूत झालेले आहेत. पण युरोप व अमेरिका या राष्ट्रांतून भौतिक शास्त्रांचें ज्ञान आपल्या देशांत नेतांना त्यावरोवर त्यांनीं युरोपियन शास्त्रीय परिभाषाहि नेली ! तसें केल्यानें त्यांच्या देशाभिमानाला यत्किंचितहि वैगुण्य आलेलें दिसत नाहीं. आमच्या इकडे मात्र सध्यांच्या काळीं मराठी भाषेंत शास्त्रीय परिभाषेची अत्यंत आवश्यकता असतां आमचा नकली स्वाभिमान परकीयांची आयती तयार झालेली परिभाषा घेण्याच्या आड येतो व साहित्यसंमेलनांत या विषयावर निष्कारण काथ्याकूट करण्यांत येऊन परकीयांची परिभाषा घेण्याच्या विरुद्ध ठराव पास होतो ! संस्कृत शब्दापासून नवे पारिभाषिक शब्द तयार करण्याचा प्रयत्न आपल्या अगोदर बंगाली व हिंदी साहित्य-परिषदांनीं करून पाहिला आहे. पण तो कितीसा सफल झाला आहे तें कोणा पाहत नाहीं व एकास ठेंच लागली तरी दुसरा शहाणा होत नाहीं. नायट्रोजन बद्दल 'नत्रवायु' असा शब्द घातला कीं, आमच्या लोकांचें समाधान होतें ! हें समाधान म्हणजे हर्बर्ट स्पेन्सर याचा अपभ्रंश हरभट पेंडसे किंवा ॲनी बिझांट या नांवाचा अप-भ्रंश अनुबाई संत असा करून होणाऱ्या समाधानाच्याच तोलाचा आहे हें विचारी वाचकांस सांगावयास नकोच.

## पूर्वींची उदार दृष्टि

परक्या भाषेंतले शब्द घेऊन स्वतःची भाषा संपन्न करणें यांत स्वाभिमानशून्यता कोठें आहे तें प्रस्तुत लेखकाला तरी नीटसें कळत नाहीं. त्याच्या मतें असें करणें हें प्रत्येक भाषाभिमान्याचें एक अवश्य कर्तव्यच आहे व तें न करणें ही कोती दृष्टि आहे. आपल्या पूर्वजांची अशी दृष्टि केव्हांहि नव्हती. ज्या वेळीं आपल्या देशांत संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषा प्रचारांत होत्या, त्या वेळीं सुद्धां या दोन भाषांमध्यें परस्परशब्द-विनिमय झालेले आहेत. या संबंधाचीं थोडींशीं उदाहरणें देऊन या मुद्द्यानें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे.

आपल्या भाषेंत एखाद्या वस्तूचा किंवा कल्पनेचा वाचक शब्द नसला तर तो परक्या भाषेंतून घेऊन आपल्या भाषेचें न्यून भरून काढणें या गोष्टीला आवश्यकता हें तरी एक सबळ कारण दाखवितां येतें, पण त्या वस्तूचा किंवा कल्पनेचा वाचक असा शब्द स्वभाषेंत असून त्याच शब्दाचा अपभ्रंश होऊन परक्या भाषेंत गेलेला शब्दहि संस्कृत भाषेनें परत आपल्यांत त्या नव्या स्वरूपांत घेतला आहे व अशा रीतीनें एकाच अर्थाचे वाचक दोन शब्द आपलेपाशीं झाल्याबद्दल समाधान मानलें आहे. उदाहरणार्थ— संस्कृतांत गळ्याचा वाचक 'गण्ड' असा शब्द आहे. त्याचाच अपभ्रंश होऊन प्राकृत भाषेंत 'गल्ल' असा शब्द बनला. पुढें कालांतरानें 'गल्ल' हाहि शब्द संस्कृत भाषेनें घेतला. 'पातालप्रतिमल्लगल्लविवरप्रक्षिप्तसप्तार्णवम्' (मालतीमाधव ५।२२). संस्कृत मकरंद; त्याचें प्राकृतांत 'मरंद' असें रूप झालें; पुढें हाहि शब्द संस्कृत भाषेंत गेला. संस्कृतांत 'प्रियाल' हा शब्द अगोदरच होता; त्याचें प्राकृतांत 'पियाल' असें रूप

झालें; कालांतरानें हाहि प्राकृत शब्द संस्कृतांत जाऊन कालिदासासारख्या प्रतिष्ठित कवींच्या काव्यांत झळकूं लागला. ('मृगाः पियालद्रुममंजिरीणाम्' कुमार संभव ३—३१).

संस्कृत शब्दांच्या पतितपरावर्तनाचीं हीं उदाहरणें झालीं. अस्सल प्राकृत शब्दही संस्कृत भाषेनें उचलल्याचीं अशींच उदाहरणें देतां येतील. मेघदूत १—५० यांत 'हित्वा हालामभिमतरसां रेवतीलोचनांकाम्' यांतला "हाला' हा शब्द अस्सल प्राकृत. प्राकृतांतून तो संस्कृत भाषेंत घुसला. याचप्रमाणें खिडकी या अर्थाचा संस्कृतांत 'खडक्किका' असा शब्द आहे. हा प्राकृतांतलाच हें त्याच्या रूपावरूनच दिसतें आहे. दाढा, खेल (क्रीडा) इ. शब्दहि असेच प्राकृतांतून संस्कृत भाषेंत गेले आहेत, पण त्यांना पतित समजून संस्कृत भाषेनें दूर लोटलें नाहीं.

मराठी भाषेचा पूर्वेतिहास पाहिला तरी परकीयांचें कांहीं घ्यावयाचें नाहीं अशी कोती दृष्टि त्या भाषेची दिसत नाहीं. आपल्या भाषेंत शब्द असूनहि त्याच अर्थाचे परकीय भाषेचे शब्द संग्रहित करण्याची संस्कृत भाषेची प्रवृत्ति मराठी भाषेनें कायम राखिली होती असें स्पष्ट दिसतें. तसें तिनें केलें नसतें, तर ती भाषा आज दिसत आहे तिच्याहून शतपटीनें अधिक दरिद्री दिसली असती यांत शंका नाहीं. पण मराठी भाषेवर पुढें येणारें संकट ओळखून दूरदृष्टीनें म्हणा, अगर परकीयांशीं विशेष संघटन झाल्यामुळें अनन्यगतित्वामुळें म्हणा, पण एकनाथ व त्यानंतरचे महाराष्ट्रीय कवि व ग्रंथकार यांना परकीय शब्द मराठींत विनदिक्कत घेतले व त्यामुळें सामान्यतः पारमार्थिक किंवा व्यावहारिक विचार व्यक्त करण्यास मराठी भाषेला सहसा अडचण पडली नाहीं.

## मराठी शब्दांचें वर्गीकरण

मराठी भाषेंतल्या शब्दांचें वर्गीकरण करून पाहिल्यानें व त्या शब्दांचा तत्कालीन देशस्थितीशीं असलेला निकट संबंध लक्षांत घेतल्यानें मराठी भाषेच्या शब्दसंग्रहशक्तीविषयींचें योग्य अनुमान काढतां येईल, आणि तेंच अनुमान खरें म्हटलें पाहिजे. निवळ वर वर पाहून कांहीं तरी केलेलें जें अनुमान तें खरें नव्हे. अशा तऱ्हेनें शब्दांचें वर्गीकरण करून व देशस्थितीशीं त्यांची सांगड घालून काय अनुमान काढतां येतें तें आतां आपण पाहूं.

स्थूल मानानें मराठी शब्दांचें वर्गीकरण असें करतां येतेंः—

१. **शुद्ध संस्कृत अथवा तत्सम शब्द**—कित्येकांच्या मतें संस्कृत ही मराठीची जननी व कित्येकांच्या मतें ती मराठीची मातामही असल्यामुळें मराठी भाषेच्या अंगांत संस्कृत भाषेचें रक्त विपुलत्वानें खेळत असल्याचें नवल नाहीं. स्थान, बुद्धिभ्रंश, राज्य, दुष्ट, तथापि, विद्वान्, विचार, तर्क इ. सहस्रावधि संस्कृत शब्द आज मराठी भाषेंत यथेच्छ संचार करीत आहेत; इतकेंच नाहीं, तर एखाद्या नव्या वस्तूचा किंवा भावनेचा वाचक असा नवा शब्द बनविणें झाल्यास सुशिक्षित महाराष्ट्रीय प्रथम संस्कृत भाषेकडेच धाव घेतात. गुरुत्वमध्य, केशाकर्षण, लोहचुंबक, द्विदलराज्य-

पद्धति इ. शब्द अशाच रीतीनें संस्कृत भाषेच्या साह्यानें बनवून मराठी भाषेंत प्रविष्ट करण्यांत आले आहेत. मराठीप्रमाणेंच संस्कृतोत्पन्न अशा ज्या बंगाली, हिंदी, गुजराथी इ. इतर देशी भाषा आहेत, त्यांतहि शुद्ध संस्कृत शब्दांची व संस्कृतच्या साह्यानें बनविलेल्या नव्या शब्दांची संख्या मोठी आहे. ज्या मूळच्या आर्यांच्या नव्हेत असें सामान्यतः समजलें जातें त्यांतून म्हणजे कानडी, तेलगु, तामिळ इ. द्राविडी भाषांतूनहि संस्कृत शब्दांचा भरणा कांहीं कमी नाहीं. कित्येक देशी भाषांतून कमी व कित्येकांत जास्त असें जें संस्कृत शब्दांचें प्रमाण आढळतें, त्याला कारण बहुधा निरनिराळ्या प्रांतांची निरनिराळ्या काळांतली देशस्थिति ही आहे असें आढळून येतें. आपल्या मराठी भाषेपुरतेंच पाहिलें तर असें दिसतें कीं, आपले धर्मग्रंथ, समाजशासनग्रंथ अथवा स्मृति इ० मूळचे संस्कृतांत असल्याकारणानें आपले आचारविचार, तत्त्वज्ञान, धर्मसंस्था इ० संबंधाचे सगळे शब्द शुद्ध संस्कृत आहेत; व्यवहारविषयक शब्द मात्र प्राकृत देशज किंवा परकीय आहेत. एकनाथमहाराजांच्या वेळीं महाराष्ट्रांत यावनी अंमल जारीनें सुरू होता, त्यावेळीं व्यवहारांतले, विशेषतः दरबारी व्यवहारांतले, यावनी शब्द घेतले, पण या यावनी शब्दांचा प्रवेश धार्मिक किंवा अध्यात्मपर ग्रंथांत मात्र म्हणण्यासारखा झाला नाहीं. पुढें स्वराज्याच्या काळीं ( विशेषतः पेशव्यांच्या अमदानींत ) संस्कृत भाषेला विशेष मान व उत्तेजन मिळाल्यामुळें शिष्ट लोकांच्या रोजच्या व्यवहारांतल्या भाषेंतसुद्धा संस्कृत शब्दांचा प्रचार विशेष झाला. मोरोपंतांच्या कवितेंत संस्कृत शब्दांची जी रेलचेल दिसते ती याच कारणामुळें होय. पुढें इंग्रजी अंमल सुरू झाल्यावरहि अनेक वर्षेपर्यंत मराठी भाषेवरचा हा संस्कृत भाषेचा प्रभाव कमी झाला नव्हता. कारण, अव्वल इंग्रजींतले बरेचसे मराठी लेखक येथील संस्कृत पाठशाळेंत अध्ययन करून बाहेर पडलेले शास्त्री हेच होते. ती पाठशाळा मोडून तिचें रूपांतर डेक्कन कॉलेजांत झालें, व संस्कृत भाषेला तोंपर्यंत मिळत गेलेला मान त्यापुढें इंग्रजी भाषेंतल्या पांडित्याला मिळूं लागला, तेव्हां संस्कृताचें बंड थोडेंसें कमी झालें, आणि युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. परीक्षेला मराठी हा ऐच्छिक विषय घेणारी माधवराव कुंट्यांसारखी कांहीं मंडळी निघाली व तिनें मराठी लेखनांतली संस्कृतप्रचुरता कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळें कांहीं दिवसपर्यंत विद्वानांच्या लेखांत शुद्ध मराठी भाषा झळकूं लागली होती. पण ही स्थिति फार काळपर्यंत टिकली नाहीं. युनिव्हर्सिटीच्या परीक्षांतून संस्कृत भाषेंत प्रावीण्य दाखविणारांना शिष्यवृत्त्या व इनामें ठेवण्यांत येऊं लागल्यामुळें संस्कृत भाषेनें पुनः उचल खाल्ली, आणि हेच सुशिक्षित बहुधा मराठी लेखक होऊं लागल्यामुळें व त्यांचें जुन्या मराठी ग्रंथांचें वाचन बेतावातांचेंच असल्या-, मुळें त्यांच्या लेखांत संस्कृत शब्दच फार येऊं लागले. संस्कृताकडे असलेला सुशिक्षितांच्या मनाचा ओढा अद्यापहि त्यांच्या लेखांत व कवितेंत ठळकपणानें दृष्टीस पडतो. रा. रावजी भवानराव पावगी यांच्या ‘ विलायतचा प्रवास ’ या पुस्तकांत तर संस्कृत शब्द वापरण्याची प्रवृत्ति कशी कळसाला जाऊन पोंचली आहे तें पुढील छोटयाशा उताऱ्यावरून वाचकांस दिसून येईल.

" वाटेनें जो प्रदेश दृष्टिगोचर झाला तो फारच सुंदर होता. भूपृष्ठ हरिततृणाच्छादित असल्याकारणानें प्रकृति-सुभग दिसत होतें. क्षुद्र पर्वत-राजीहि त्याचप्रमाणें अल्पवृक्षावृत असून दृग्विषयास भयानक न करतां मनोरम करीत होत्या."

( विलायतचा प्रवास : भाग २ पृ० २ )

या लहानशा उताऱ्यांत एकंदर २८ शब्द आहेत. त्यांतले चौदा काय ते मराठी आहेत, आणि हे सुद्धां क्रियापदें, अव्ययें व संबंधीं सर्वनामें आहेत, म्हणजे केवळ अपरिहार्य म्हणूनच ते मराठी असतांहि वापरले आहेत. जेथें संस्कृत शब्द सहज घालतां आला असता व शोभलाहि असता, पण घातला नाहीं असा ' वाटेनें ' हा एकच मराठी शब्द आहे. ह्याबद्दल ' मार्गानें ' हा शब्द कां घातला नाहीं कोण जाणे! दृष्टमणि म्हणून लेखकानें हा मराठी शब्द मुद्दाम ठेविला कीं काय तें कळत नाहीं.

२. **संस्कृतावरून अपभ्रंशरूपानें प्राकृत भाषेंत जाऊन तींतून मराठींत आलेले शब्द**–जसें–सं. अग्रतः, प्रा. अग्गदो, म. आघाडी; सं. मयूर, प्रा. मोरो, म. मोर; सं. सत्यम्, प्रा. सच्छम्, म. साच; सं. गर्दभ, प्रा. गद्दहो, म. गाढव; सं. काष्ठ, प्रा. कठ्ठ, म. काठी इ. हे शब्द मराठी भाषेंत केव्हांपासून आले हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. तथापि इ. स. च्या अगोदर दोन तीन शतकें तरी ही गोष्ट घडली असावी असें अनुमान आहे. प्रथम हे शब्द लोकांच्या केवळ बोलींत होते, व मागाहून कित्येक शतकांनंतर ते त्यांच्या लेखांत येऊं लागले असावे. सुमारें साताठशें वर्षांपासून अशा शब्दांची मराठी भाषेंत वाढ होण्याचें बहुतेक थांबलें आहे. याला कारण, प्राकृत भाषेचा पुरस्कर्ता कोणी राहिला नाहीं, ती भाषा संस्कृताप्रमाणें शिकविली जात नाहीं, त्या भाषेंत कांहीं उत्तम ग्रंथ असतां ते फारसे कोणी छापीत नाहींत व छापले असतां त्यांना वाचकहि मिळत नाहींत! थोड्या वर्षांपूर्वी प्राकृत भाषेंतल्या 'गौडवहो' नांवाच्या एका सुप्रसिद्ध काव्यास कै. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, यांच्याकडून संशोधन करवून मुंबई सरकारनें तें छापविलें होतें. पण कॉलेजासारख्या शिक्षणसंस्था व कांहीं थोडेसे भाषाशास्त्रज्ञ यांचे ग्रंथसंग्रह सुशोभित करण्यापलीकडे त्या बहुमोल ग्रंथाचा विशेषसा उपयोग झालेला दिसत नाहीं. याचें कारण गेल्या सात आठ शतकांत प्राकृत भाषेला राजाश्रय न मिळाल्याकारणानें तिच्याविषयीं लोकांचे ठायीं आदरच राहिला नाहीं, आणि ज्याप्रमाणें झाड वठून तें शुष्क होऊन पडल्यावर मागाहून त्यावर कितीहि जलसिंचन केलें तरी तें व्यर्थ होतें, तसें प्राकृत भाषेविषयीं लोकांच्या ठायीं पूर्ण अनादर प्रस्थापित होऊन प्राकृत वाङ्मय नष्ट झाल्यावर आतां तिच्या पुनरुज्जीवनार्थ प्रयत्न करणें हें शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखें व्यर्थ आहे. आज प्राकृत भाषेच्या व्याकरण-ग्रंथांचें अध्ययन केलेले पांच चार तरी विद्वान् गृहस्थ विद्यमान आहेत, पण आणखी पांच पंचवीस वर्षांनी तर तेहि दिसतील कीं नाहीं याची शंका वाटते.

**३. देशी शब्द**—देशी शब्द म्हणजे ज्याचें मूळ संस्कृतांत सांपडत नाहीं किंवा जे कोणत्याहि तर्कसिद्ध पद्धतीनें संस्कृताशीं जुळवितां येत नाहींत असे शब्द. हे शब्द या देशाचे मूळ रहिवासी जे भिल्ल, कोळी, गोंड वगैरे लोक त्यांच्या भाषेंतले मूळचे असावेत अशी लोकांची समजूत आहे आणि ती कांहीं अंशीं खरीहि आहे. आर्यांचा या लोकांशीं संसर्ग झाल्यामुळें आर्यांच्या भाषेंत या लोकांचे कांहीं शब्द येणें स्वाभाविक आहे; पण त्याबरोबर हेंहि संभवनीय दिसतें कीं आर्यांशीं जरी या लोकांचा संसर्ग प्रथमच झाला असला तरी द्रविड, कर्नाटक वगैरे प्रांतांशीं या लोकांचा व्यवहार पूर्वीपासून असल्यामुळें द्राविडी, कानडी वगैरे शब्दहि त्या लोकांच्या भाषेंत बरेचसे मिसळले असावे. हे लोक असंस्कृत असल्यामुळें त्यांच्या भाषेला व्याकरण वगैरेचे संस्कार झाले नाहींत व त्यामुळें त्यांचे शब्द विस्कळित स्वरूपांत राहिले. तथापि महाराष्ट्रीय आर्यांचा या अनार्य लोकांशीं व्यवहार चालत आल्यामुळें साहजिकच मराठी भाषेंत त्यांच्या शब्दांचा प्रवेश झाला, व पुढें मराठी व्याकरणाचा संस्कार त्यांच्यावर घडून ते राजरोसपणें मराठी शब्द म्हणून वापरण्यांत येऊं लागले. बहुतेक गांवढळ शब्द हे अशा रीतीनें मराठींत आलेले आहेत. जेथें जेथें या मूळच्या रानटी लोकांची वस्ती जास्त होती, त्या त्या प्रांतांतून किंवा तैलंगण, कर्नाटक, माळवा इ० देश जेथें महाराष्ट्र देशाशीं येऊन भिडले आहेत त्या सरहद्दीवरील प्रांतांतून चालणाऱ्या मराठी भाषेंत देशी शब्दांचा भरणा ज्यास्त दिसतो याचें कारण हेंच असलें पाहिजे. खानदेश, वऱ्हाड, नागपूर या प्रांतांतून किंवा तळकोंकणांत लोकांच्या बोलण्यांत देशी शब्द विशेषतः आढळतात; नासिक, पुणें, नगर-सारख्या मध्यवर्ती महाराष्ट्रीय जिल्ह्यांतून ते तितके आढळत नाहींत याला दुसरें कांहीं सयुक्तिक कारण दिसत नाहीं.

अशिक्षित व अडाणी लोकांच्या भाषेंतले सगळेच शब्द देशी म्हणून समजणें ही चूक आहे. पण पुष्कळ वेळां अशी चूक केलेली पाहण्यांत येते. कित्येक ग्राम्य शब्द त्यांच्या मूळ स्वरूपांत अगदीं शुद्ध संस्कृत, किंवा अपभ्रंश होऊन प्राकृतांतून आलेले आहेत. उदाहरणार्थ, पुणें प्रांतीं कुणबी वगैरे अशिक्षित जातींच्या तोंडीं ' ओपणें ' हा शब्द देणें या अर्थीं आढळतो. पण तो सं. अर्प या शुद्ध संस्कृत धातूपासून मराठींत आलेला आहे. तसेंच गांवढळ लोक ' मी **वाडूळ** किंवा **वाढोळ** बसलों आहें ' असें म्हणतात. या वाक्यांतले वाडूळ किंवा वाडोळ हे शब्द सं. वृद्धवेला ( प्रा. वाढवेळ ) यापासून अपभ्रंश पावून आलेले आहेत. महाराष्ट्रांतल्या सुशिक्षितांच्या भाषेचा ओढा संस्कृत भाषेकडे विशेष गेल्यापासून असले शब्द अशिक्षितांचा आश्रय करून राहिले. ज्ञानेश्वरीसारख्या उत्तम व श्रेष्ठ ग्रंथांत एके काळीं प्रतिष्ठेचें स्थान पावलेल्या अनेक मराठी शब्दांना, अडाणी किंवा अशिक्षितांचा आश्रय करावा लागला. पण कित्येक प्रांतांतून अद्यापहि सुशिक्षितांच्या बोलींत ते जसेचे तसे किंवा किंचित् विकार पावून वास्तव्य करीत आहेत. कोचीन, मलबार, कारवार वगैरे दूरदूरच्या प्रांतांतूनहि अद्याप ज्ञानेश्वरींतले भांगार ( सोनें ), आपै ( बोलाव. ), गुर्विण, सुणे, वच ( जा ), सपूर ( बारीक ) वेख ( वेज ), मुदी, बोबाणणें ( मोठ्यानें हाक मारणें ), बाबुळी ( शेवाळ ), पटा

( अधिकार ), डुडुळ ( घुबड ), विदी, बहाळ, बाप ( श्रेष्ठ ), पाउठी ( पायरी ) इ. शब्द जसेचे तसे लोकांच्या प्रचारांत असल्याचें रा. कृष्णाजी नारायण आठल्ये हे आपल्या ज्ञानेश्वरीच्या आवृत्तींत लिहितात. त्यांनीं त्या ठिकाणीं अशा ६८ शब्दांची यादी दिली आहे. आमच्या एका मित्रानें या कोशासाठीं कारवाराकडील कांहीं प्रादेशिक शब्दांची यादी पाठविली आहे. तींत जुन्या मराठी भाषेंतले पुढील शब्द आम्हांस आढळले. घो ( गोहो ) नवरा; अनवाळें ( अनाविल ) सोवळें; साज्ञ ( केरसुणी ); खै-कहीं-कोठें?, जाय-पाहिजे; फालें-पाहलें-उजेड; राजू-रज्जू-दोर; उजो ( उद्योत ) उजेड इ. वऱ्हाड, नागपूर, खानदेश, माळवा, सावंतवाडी, इ. प्रांतांतून आलेल्या याद्यांतूनहि अशा प्रकारचे शेकडों शब्द निवडून दाखवितां येतील. सारांश, लेखनप्रचारांतून गेलेले, केवळ बोलीच्या रूपानें असलेले किंवा अडाणी व अशिक्षितांच्या भाषेंत वापरण्यांत येणारे सगळे शब्द देशी अशी जी कित्येकांची समजूत आहे ती सर्वथैव चुकीची आहे. व्युत्पत्तिशास्त्राच्या उत्कृष्ट ज्ञानाचें साह्य घेतल्यावांचून देशी शब्द संस्कृतोत्पन्न किंवा प्राकृतोत्पन्न शब्दांहून निराळे करतां येत नाहींत व तसा प्रयत्नहि कोणीं व्युत्पन्न भाषाभिज्ञानें अद्याप केलेला नाहीं म्हणून निवळ देशी शब्द ओळखणें फार कठिण झालें आहे इतकेंच म्हणावयाचें.

४. महाराष्ट्र प्रांताला लागून असलेल्या प्रांतांतल्या भाषा म्हणजे कानडी, तेलुगू, गुजराथी व हिंदी होत. या भाषांतून मराठींत आलेल्या शब्दांचीं थोडींशीं उदाहरणें येथें देतों—

**कानडी**—कडबोळें, गाजर, चिंधी, मुंडासें, खोली, अण्णा, ताई, कोथिंबीर, शिकेकाई, हंडा, बांगडी, अडकित्ता, गडगनेर इ०

**तेलुगू**—बंडी, डबी, पुरजा, विटीदांडूच्या खेळांतल्या वखट, लेंड, मूड, इ० संज्ञा, वेठ, तांडेल, कुळकरणी, मिडकणें इ०

**तामिळ**—पिल्ल.

**हिंदी**—मराठींतला भुट्टेचोर हा शब्द हिंदींतल्या 'भुट्टा' = कणीस या शब्दापासून आला आहे. त्याचप्रमाणें म. यंत्र ( हिं. यू ), म. पाटील ( हिं. पटेल म्ह० शेतीचा पट्टा ज्याचे मार्फत दिला जातो तो ), म. हो ( संमतिसूचक अव्यय )-मारवाडी हिंदी-हाऊ, म. व्याही-हिंदी व्याह ( विवाह ), म. पंत-हिं. पंडित, म. खुर्दा-हिं. खुदरा, म. हुंबरी-तुंबरी-हिं. हूंभी तूंभी, म. रिकामटेकडा-हिं. निकम्मा टेगडा ( कुत्रा ) वगैरे शब्दांचें मूळ जरी संस्कृतांत असलें तरी हे शब्द हिंदी भाषेच्या द्वारें मराठींत आले असले पाहिजेत हें म्हणणें सयुक्तिक दिसतें.

हिंदी भाषेंतले शब्द मराठींत कसे आले तें तर्कानें जाणणें फारसें कठिण नाहीं. काशी, गंगोत्री, बदरीनारायण, प्रयाग, गया, पुष्कर, महाकाळ, ओंकारेश्वर इ. वरींचशीं धर्मक्षेत्रें उत्तर हिंदुस्थानांत ( हिंदी भाषेच्या मुलखांत ) असल्यामुळें आणि तीर्थयात्रेप्रीत्यर्थ या क्षेत्रांस जाण्याचा प्रघात आपल्या देशांत आज शेकडों वर्षांचा जुना असल्यामुळें महाराष्ट्रीय यात्रेकरूंनीं तिकडचे शब्द प्रथम मराठींत आणिले

असले पाहिजेत. पुढें स्वराज्याच्या काळांत मराठ्यांनीं अनेक वेळां उत्तर हिंदुस्थानांत मुलखगिऱ्या केल्या, त्या वेळीं तिकडून आणिलेल्या द्रव्याच्या लुटीबरोबर शब्दांचीहि लूट सहजगत्या त्याचबरोबर इकडे आली, आणि अशा रीतीनें दिग्विजयी मराठे वीरांनीं अप्रत्यक्ष रीतीनें आपली मराठी भाषा संपन्न केली.

**गुजराथी**—या भाषेंतून मराठी भाषेंत आलेले शब्द संख्येनें थोडे असले तरी महत्वाचे आहेत. उदा०—नवलकथा, चोपडें, नाणावटी, पथारी, वती ( तर्फेनें ), लागवड, लुगडें, भलामण, मथळा, सदरा, सारोळा, जेमतेम इ.

गुजराथेशीं महाराष्ट्राचा संबंध व्यापार व राजकारण या दोन्ही मार्गांनीं आलेला आहे. त्यामुळें या भाषेंतून मराठींत आलेल्या शब्दांची संख्या हिंदी शब्दांच्या खालोखाल आहे, यांत आश्चर्य नाहीं. गुजराथेला लागून असलेल्या महाराष्ट्रांतल्या जिल्ह्यांत ( उदा० पश्चिम खानदेशांत ) गुजराथी शब्द बायकामुलांच्या बोलण्यांत इतके येतात कीं, हे शब्द गुजराथी आहेत अशी शंका अपरिचितांशिवाय इतरांना केव्हांहि येत नाहीं. उदा०—भोंशी ( गुजराथी वीशी ) म्हणजे खाणावळ. हा शब्द पुणेकरांना अपरिचित वाटेल. पण धुळें नंदुरबारकडे तो आबालवृद्धांच्या तोंडीं आढळतो.

**बंगाली**--बंगाल प्रांत महाराष्ट्रापासून दूर आहे. त्याच्याशीं मराठ्यांचा संबंध पूर्वीच्या काळांत विशेषसा आला नव्हता. किंबहुना तो एक जादूगारांचा मुलूख आहे, अशीही भोळ्या लोकांची समजूत असावी असें ‘ गौंड बंगाल ’ या शब्दावरून वाटतें. अर्थात् अशा मुलुखांत कारणावांचून कोण जाणार ? म्हणून आपल्या पूर्वजांनीं तिकडे जाण्याचें बहुधा टाळलें असावें. पुढें स्वराज्याच्या काळांत म्हणजे श्री. नानासाहेब पेशव्यांचे वेळीं मराठ्यांनीं बंगाल प्रांतावर तीनचार स्वाऱ्या करून आपला जो दरारा तिकडे बसविला, त्यामुळें बंगाली लोकहि मराठ्यांच्यापासून दूरच राहूं लागले. अशा अनेक कारणांमुळें मराठी भाषेचा बंगाली भाषेशीं बहुधा संपर्क घडला नाहीं. अलीकडे गेल्या तीस चाळीस वर्षांत मात्र हा मनु पालटला आहे आणि बंगाली भाषेचा प्रभाव अलीकडे मराठी भाषेवर पडूं लागला आहे. श्रीयुत, उपन्यास, भाषांतराबद्दल ‘अनुवाद’ इ० शब्द ( मूळचे संस्कृत पण विशेष अर्थानें व विशेष प्रकारें बंगाली भाषेंत वापरण्यांत येणारे ) हळू हळू मराठी भाषेंतहि प्रविष्ट होऊं लागले आहेत.

परकीय भाषांतून मराठीनें वेळोवेळीं शब्द घेतले आहेत, आणि ते घेतांना त्या शब्दांच्या मूळ रूपाचें यथार्थ ज्ञान नसल्यामुळें म्हणा अगर परक्या शब्दांना आपल्यांत घेण्यापूर्वी स्वतःचा कांहीं तरी शिक्का त्यांच्यावर मारलेला बरा अशा बुद्धीनें म्हणा, पण त्या शब्दांच्या मूळच्या रूपांत कांहीं वेळां विलक्षण फेरबदल केलेला आहे. कांहीं शब्द जसेचे तसेहि घेतले आहेत, पण थोडे. शुद्ध संस्कृत शब्दांच्याइतकी त्यांची संख्या नाहीं. परभाषेंतून आलेल्या शब्दांचें वर्गीकरण असें करतां येईल--

**अरबी**—नजर, मजबूत, हशील, जामीन, लायक, शहर, मुरांबा, मुलामा, तकार, इरादा, मोताद, नकल, जबाब इ०.

**फारसी**—हिंदुस्तान, फडणीस, कारकून, बरोबर, दस्तैवज, पगडबंद, हत्यार, खानेसुमारी, नाचक्की, सतरंजी, बक्षीस, अडकित्ता, पायपोस इ०.

**हिंदुस्थानी अथवा उर्दू**—भाई; वत्ती; वडती; पकडणें; कुदणें ( प्रादेशिक शब्द ); उल्लू; नाका; बदली; बातमी; अरगजा; मेण इ०.

**तुर्की**—बंदूक; कजाग; कलगी; सकलाद इ०.

**फ्रेंच**—फ्रेंच लोकांबद्दल मराठी ऐतिहासिक कागदपत्रांतून फराशीस हा शब्द योजिलेला आढळतो. हा शब्द अपभ्रष्ट फ्रेंच आहे.

**पोर्तुगीज**—पगार; लिंबू; संत्रा; चावी; जुगार; तिजोरी; तुरुंग; पुरावा; आरमार; मेज; पाद्री; हपूस; टोपी; लिलाव; सावण; गरादा; गाडदी इ०.

**स्पॅनिश**—बटाटा.

**इंग्रजी**—कोर्ट; फी; स्टेशन; रेलवे; बुक; पेनसिल; पेन्शन; गंजीफ्राक; फी; तिकीट; पास; स्टेशनरी; इंजिनियर इ०.

**इटालियन**—( पोर्तुगीजच्या द्वारें ) कमीज.

## सावधगिरीची सूचना

अमका शब्द अमक्या भाषेंतून आला हें ठरविण्याचें काम फार कठिण व जबाबदारीचें आहे. त्या कामासाठीं भिन्न भिन्न भाषांचें ज्ञान तर लागतेंच; पण त्यापेक्षांहि समाजाच्या चालीरीतींची परंपरा, सामाजिक स्थित्यंतराचा इतिहास, तर्कशास्त्र व व्यवहार यांचें ज्ञान आणि मनाची सरलता यांची आवश्यकता विशेष आहे. सगळ्या देशी भाषांचें मूळ कमी अधिक मानानें बहुधा संस्कृतांत आढळतें. त्यामुळें एखादा शब्द मराठी, गुजराथी, हिंदी किंवा कानडी वगैरे भाषांत सामान्यतः आढळला तरी तो थेट संस्कृत भाषेंतूनच मराठींत आला असला पाहिजे असें आग्रहानें प्रतिपादतां येणार नाहीं. तो प्रथम हिंदी किंवा कानडी भाषेंत रूढ होऊन मग मराठींत किंवा गुजराथींत आला असेल. अशा ठिकाणीं त्या शब्दाची व्युत्पत्ति मूळ संस्कृत भाषेंतली द्यावयाची कीं काय या संबंधानें अद्याप कांहीं नियम ठरलेला नाहीं. राजवाडे प्रभृति मंडळी मूळ अस्सल संस्कृताकडे धाव घेते; तर इतर बरेचसे विद्वान् या मधल्या पायरीकडे बोट दाखवितात. उदा० श्रीयुत हा शब्द अस्सल संस्कृत आहे. पण एखाद्या गृहस्थाच्या नांवापूर्वीं तो जोडण्याचा प्रघात मराठीच्या अगोदरपासून बंगालप्रांतीं होता व बंगालीचें अनुकरण गेल्या पंचवीस तीस वर्षांत मराठींत होऊं लागलें. अशा ठिकाणीं व्युत्पत्ति देतांना हा शब्द संस्कृतांतून मराठींत आला असें सांगणें हें वस्तुतः सत्यास सोडून होईल, आणि त्याच्या योगानें मराठी भाषेच्या इतिहासांतला एक पुरावाहि नष्ट केल्याचें पाप लागेल. यासाठीं हा शब्द बंगाली भाषेंतूनच आला आहे असें व्युत्पत्तिकारानें स्पष्ट सांगणें प्राप्त आहे. आजपर्यंत अनेक शब्दांसंबंधाचा असा पुरावा नष्ट होऊन मोठी हानि झाली आहे. उदाहरणार्थ—नथ हा शब्द घ्या. मराठी, गुजराथी, हिंदी, बंगाली या ठळक देशी भाषांत नथ हा शब्द आढळतो. कानडींत नथ या

अर्थाचा नत्तु असा शब्द आहे. पण संस्कृत नाटक-कथादि वाङ्मयांतून स्त्रियांच्या निरनिराळ्या अलंकारांचीं जीं नांवें आढळतात त्यांत कोठेंहि नथेचा उल्लेख किंवा वर्णन आढळत नाहीं. स्त्रियांच्या बारीक सारीक अलंकारांचें सुद्धां पाल्हाळिक वर्णन करणाऱ्या संस्कृत कर्त्यांच्या सूक्ष्म दृष्टींतून येवढा ठळक अलंकार सुटणें संभवनीय दिसत नाहीं. यावरून नथ हा अलंकार प्राचीनकाळीं नव्हता, द्राविडांपासून तो आर्यांनीं घेतला असला पाहिजे; आणि परकीयांपासून उचललेल्या एखाद्या प्रघाताकडे तिरस्कारयुक्त दृष्टीनें पाहणें हा मनुष्यस्वभावच असल्यामुळें ' नत्तु ' या कानडी शब्दाला तिरस्कार्थी ' नाथ ' ( वेसण ) असें रूप देऊन आर्यांनीं त्या शब्दाचा संस्कृत भाषेंत समावेश करून घेतला असावा व त्यावरून तो शब्द जसा मराठींत तसा इतर देशी भाषांतून गेला असावा हें संभवनीय दिसतें. अशा ठिकाणीं नथ या शब्दाचा खरा उगम कानडी ' नत्तु ' हाच शब्द देणें योग्य आहे. तो न देतां संस्कृत ' नाथ ' शब्द देणें म्हणजे जाणून बुजून इतिहासाचा अपलाप करणें होय. प्रत्येक शब्दाची खरी व्युत्पत्ति अशा रीतीनें शोधून काढण्याचें काम महत्प्रयासाचें आहे खरें, पण तितके प्रयास केले तरच व्युत्पत्ति शोधून काढण्याचा उपयोग. अशा रीतीनें खरी व्युत्पत्ति शोधून काढण्याचा यत्न केल्यास तिचा नुसत्या भाषेलाच नव्हे तर इतिहासालाहि फार उपयोग होईल हें सांगावयास नकोच.

## शब्दांचें शेंकडा प्रमाण

मराठी भाषेंतल्या शब्दांच्या व्युत्पत्तिसंबंधानें वर ज्या अडचणी दाखविल्या आहेत, त्यांवरून निरनिराळ्या देशी व परदेशी भाषांतून मराठींत आलेल्या शब्दांचें शेंकडा प्रमाण ठरविण्याचें काम किती मुष्किलीचें आहे तें दिसून येईल. मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीची मोजदाद करून तींतला कोणता भाग मातृपरंपरेनें व कोणता इतरांकडून आलेला आहे याचा शोध लावणें भाषाशास्त्रज्ञांचें एक कर्तव्य आहे. हें काम अद्याप कोणीं केलेलें दिसत नाहीं. म्हणून मी या दिशेनें जो थोडासा प्रयत्न करून पाहिला आहे त्याचें फळ महाराष्ट्र बंधुभगिनींपुढें आदरपूर्वक ठेवतों. प्रस्तुत कोशाच्या रचनेच्या कामांत सुमारें पाऊण लाख मराठी शब्द माझ्या नजरेखालून गेले आहेत. या शब्दांची यथामति छाननी करून पाहिल्यावर माझ्या अल्पबुद्धीप्रमाणें मीं जीं अनुमानें काढलीं आहेत तीं अशीं आहेत—

( १ ) मराठी भाषेंतली एकंदर शब्दसंख्या एक लक्षावर जाऊं शकत नाहीं.

( २ ) वस्तुतः याहूनही ती संख्या कमी धरावयास पाहिजे; कारण कीं, एकच शब्द निरनिराळ्या प्रकारें लिहिण्याचा किंवा उच्चारण्याचा प्रघात आहे व अशा शब्दांची संख्या कांहीं लहान नाहीं. जसें—अडाकित्ता ( आडकित्ता ), कोमल ( कोमळ ), प्रकट ( प्रगट ), खूप ( खूब ), सामिल ( शामिल ), शहा ( शाह ), शाही ( शाई ) इ.

( ३ ) अनुकरणवाचक व स्पर्शज्ञानवाचक शब्दांची संख्या इतर भाषांशीं तुलना करूं पाहतां मराठींत फार मोठी आहे; जसें—पटकन [illegible]ीं,

संगणकीकृत

मटामट, पटापट, गुलगुलीत, पुळपुळीत, गिळगिळीत, मिळामिळीत इ. कित्येक वेळां तर एकच अनुकरणवाचक शब्द किंचित रूप बदलून अनेकवार आलेला दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ–पटकन् हाच शब्द पटकर, पटदिनीं, पटादिशी अशा आणखी तीन रूपांत आढळतो. अशा रीतीनें तोच तो शब्द वारंवार येऊन शब्दांची संख्या मात्र फुगलेली दिसते, पण वस्तुतः तिच्यापासून भाषेचें खरें कार्य कांहीं एक न होतां घरांतल्या अडगळीप्रमाणें भाषेच्या सुटसुटीतपणाला मात्र ती बाधक होते.

( ४ ) मराठी शब्दांचें वर्गीकरण करून प्रत्येक भाषेतले किती शब्द मराठींत आले आहेत याचें शतमान काढलें तर माझ्या अल्प समजुतीप्रमाणें तें असें निघतें-शुद्ध संस्कृत शब्द शेंकडा १४, किंचित् विकार पावून मराठींत आलेले संस्कृत शब्द शें. १८, प्राकृताच्या द्वारें आलेले शेंकडा ३०, देशज व निवळ प्रादेशिक शें. १६, कानडी शें. २, गुजराथी शें. ½, तामिळ व तेलगू ( हिशेबांत न धरण्याइतके थोडे ), हिंदी शें. ½ यावनी म्हणजे अरबी, फारसी, उर्दू व तुर्की मिळून शें. १७, पाश्चात्य म्हणजे इंग्रजी पोर्तुगीज, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन इ० शें. ३, व ज्यांचें मूळ अद्याप कळलें नाहीं असे शब्द. शें. ९.

हें शतमान अर्थात् सध्यां उपलब्ध असलेल्या माहितीवरून आणि अतिशय स्थूल प्रकारचें आहे हें मी कबूल करतों. आजच्या शब्दसंग्रहावरून हें काढलेलें आहे. मराठी भाषेच्या जीवनक्रमांतल्या सगळ्या अवस्थांत हेंच शतमान दिसून येईल अशी अपेक्षा धरणें निखालस चुकीचें होईल. मराठी भाषेच्या निरनिराळ्या अवस्थांतून हें शतमान निरनिराळें होतें यांत शंकाच नाहीं. या प्रत्येक अवस्थेंतलें असें शतमान काढण्याचा प्रयत्न मीं केला नाहीं; पण कोणीं केल्यास मराठी भाषेच्या वाढीचें यथार्थ ज्ञान होण्याच्या कामीं त्या प्रयत्नाचा चांगला उपयोग होईल. असें निरनिराळ्या अवस्थांतलें शतमान काढण्याचा प्रयत्न करणारास प्रत्येक अवस्थेच्या काळांतले मराठी भाषेचे ( गद्य व पद्य ) नमुने प्रथम मिळवावे लागतील. असे नमुने एके ठिकाणीं देण्याचा प्रयत्नहि अद्याप आपल्या इकडे झालेला ठाऊक नाहीं. म्हणून मीं जो या दिशेनें अल्पसा प्रयत्न केला आहे त्याचा मासला येथें देतों.

## निरनिराळ्या काळच्या मराठी भाषेचे नमुने

( १ ) शके ४१० ( इ. स. ४८८ ) मधली मराठी भाषा.

" स्री सालीवानसक वरूसच रत्नस ॥ ४१० नाम संवत्सरी सवमास सरावण नक्षत्र आत्रुदा सुक्रपक्षु सुदसमी सोमवार ते दीनी रघमालपत्र लीहील त्रुपवर राजा गोजराजसरीते पत्र लीहील मंगलवेढा पाआ सामी रघमाला वांदीती पानीरो पुडील राणन राजमुद्रा धीकरण......समसन मीलानी मंगलवडयासी आल मंगलवेट सोद्यासनीसा आवास सुराव भान......रघमाला बादल. "

( मंगळवेढ्याचा ताम्रपट )

[library stamp]

नगर वाचनालय, सातारा.



( २ ) शके ६५८ मधील चिकुर्डे येथील ताम्रपट.

'......जनमेजय चक्रवर्ति हस्तिनापुरी सुखसंकथा विनोदी राज्यं कारित दक्षिण-दिसावरे दिग्विजयात्री विजयं करवुन करहाटकंवलेश्वरदेवासंनिधी कटकमेलिकार करवुतन पित्रुसत्रुनिमिती सर्पयाग कारित अहेंद्रभक्षक स्वहा तथा लवणांबुधि माडलोहसुर्म्यंतरत धर्मपतिष्टे तदनंतरे करहाट ४५०० भ्यंतर कारिवेनद्वाड ग्रामौ च वलियवाड चिक्कलवाड ग्रामा मुलिका मंनेयराम-गावुंडेया मदहस्तीपाल-रक्षपाल कराया मंनवुन...भूमि ग्रामा दक्षण २००० त्रिणमल विमलागयि सहितं मागिलु माव्य ग्रिहे निषेवण हस्त ६० पाण १ हटा १ पडियदे १ मला १ मलवा १...इ. ( विश्ववृत्त. )

( ३ ) शके १०५१ मध्यें चालुक्य राजा सोमेश्वर यानें रचिलेल्या मानसोल्लास अथवा अभिलषितार्थ चिंतामणि या ग्रंथांतला मराठी पद्यरचनेचा नमुना-

**जेणें रसातळ उणु मत्स्यरूपें मनुशिवक वाणियेले ।**
**तो संसारसायरतारण मोहता रावो नारायणू ।। ४३ ।।**

( महाराष्ट्र सारस्वत पृ. १० )

( ४ ) शके ११०९ मधील परळ येथील शिलालेख--

**।। अथ तु जो कोणुहु वि ए शासन लोपी तेया**
**श्री वैद्यनाथ देवाची भाल सकुटुंबी आपडे ।।**

( ५ ) शके १११० मध्यें लिहिलेल्या मुकुंदराजकृत विवेकसिंधूतला एक उतारा-

**" जैसें अमृत चाखे आपुले चवी । तैसें स्वसुख अनुभवी**
**तेथें कोण आठवी । संसारासी ।।**
**बोले स्वानंदाचा घन । दाटे सुख परिपूर्ण**
**तयामाजी विवेक सुजाण । हारपोनी जाय ।। "**

( ६ ) शके ११२८ तला पाटण येथील शिलालेख—

" इयां पाटणीं जें केणें उघटे तेहाचा असि आइं जो राउला होता ग्राहकापासीं तो मढा दीन्हला । ब्राह्मणां जें विक्रेतयापासीं ब्रह्मोत्तर तें ब्राह्मणीं दिन्हलें । कापासीं दामाचा वीसोवा आसुपाठीं मगरें दीन्हला । जलदाइयां वैलां सिद्धवें । वाहिरिला आसुपाठीं ग्राहकापासीं पांच पोफली ग्राहकापासीं ।। "

( ७ ) शके ११८५ पासून ११९४ पर्यंतच्या काळांत महानुभाव पंथांतील व्यास अथवा महिंभट यांच्या गद्यरचनेचा नमुना--

" आबैसीः गोसावियातें ( सर्वज्ञानें ) पुसिलें: जी जी: हें देह सांडिलेयां: अनंतरें हा जीवू कोण देहे पावेः आनः कैसें सांडीः सर्वज्ञें भाणितलेः बाई लिंगदेहेसी निगेः अध उर्द्धगतीतें: परी लिंग पातचा मोक्षूः समानें पवणे सहितुलिंगदेहाचे उत्क्रमणः तो मृत्युः बोलिजे. "

( ८ ) शके ११९९ मधल्या पंढरपूर येथील ८४ च्या शिलालेखांतील एक दोन वाक्यें--

१. कोठारि ठाकवी तेयासि श्रीविठ्ठलाची आण.

२. स्वस्ती श्री सकु ११९५ श्रीमुख संवत्सरे फागनिपूर श्री विठ्ठल-देवरायासि तिसा सिति फुलें दांडे आचंद्रार्क चालावेआ नाना भक्त मालीआं दत्त पैकाचा विवरु ॥

( ९ ) इ० स० च्या तेराव्या शतकांतल्या पंचतंत्र नामक मराठी गद्यग्रंथांतल्या भाषेचा नमुना—

" पिंगलकु पुसे दमनकु सांघे. म्हणे कोणे एके नगरीं यज्ञदत्त नामें ब्राह्मणु असे. तो दुर्बलु. तपातें ब्राह्मणीनें म्हणितलें तुम्ही कांहीं उदीम न करा. आम्ही अवघे भुकें मरत असो. तंव तो चहूंकडे हिंडों निघाला. वाटेस जातां येके अरण्यि पातला. तयासी तृषा लागलि. म्हणोनि उदकाकारणें हिंडतां तंव एकु अड देखिला."

( १० ) इ. स. च्या तेराव्या शतकांत झालेल्या ज्ञानेश्वरी ग्रंथांतली मराठी भाषा–

**" राया जो निजनिर्मलु । निष्कलु लोककृपालु**
**शरणागतां स्नेहालु । शरण्य जो ॥ ३९ ॥**
**जो धर्मकीर्ति ढवलु । अगाध दातृत्वें सरलु**
**अतिवलु प्रवलु । वलिबंधनु ॥ ४० ॥**
**तो कृष्णुजु वैकुंठीचा । चक्रवर्ती निजाचा**
**सांघे एरु दैवांचा । आइकतु असे ॥ ४१ ॥ "**

( राजवाडी ज्ञानेश्वरी )

( ११ ) चौदाव्या शतकांतला कवि भानुदास ( एकनाथ महाराजांचा पणजा ) याच्या मराठी भाषेचा नमुना—

**" भाकितों करुणा । पंढरीच्या राया । अगा यादवराया रामकृष्णा ॥ तूं माय माऊली । जीवीं जीवनकळा । भक्तांचा ळळा पुरवीसी ॥ आवडे सावडे । भक्तांचें कीर्तन । नाचसी येऊन निराभिमानें ॥ भानुदास म्हणे । पुरवीं माझे ळळे । विठ्ठलें सावळे । माऊलीये ॥ "**

( महा० सारस्वत )

( १२ ) सोळाव्या शतकांतली मराठी पद्यरचना—

(अ) " तें हें राया भागवत जाण । मुख्यत्वें भक्तिप्रधान ॥
भावें करतां भगवद्भजन । अज्ञान जन उद्धरती ॥
हें भागवत नव्हे नव्हे । अज्ञानालागीं निज पव्हें ॥
भवाब्धि तरावया भजनभावें । महानाव देवें निर्मिली ॥ "

( एकनाथ )

(आ) " प्राकृत म्हणौनि दूषिती । ते चि यया ज्ञाना वंचती ॥
भाषाचि केवळ भजती । ते मूर्ख कीं ना ॥
हातीं देतां नवरत्नें । मऱ्हाटेन बोलें ने घेणें ॥
आतां हानी तया करणें । तें दूरी नसे ॥ "

( दासोपंत )

( इ ) या काळच्या दरबारी गद्यभाषेचा नमुना—

" अज रखतखाने राजश्री बाबाजी राजे भोसले दाम दौलतहू बिजानेबु कारकुनानी हाल व इस्तकबाल व मोकदमानी कसबें पेडगौऊ प ॥ पाडे पेडगौऊ विदानद सु ॥ समान तिसैन व तिसा मया दरवज इनाम बदल धर्मादाऊ वे ॥

रामेस्वर भट बिन नारायण भट चिंतामनी भट बिन बाळंभट सेकिन आरवी मुद्दल हर्चीमजी.........नख्तथाती व महुसुलु कुलबाव कुलकानू दिधले असे दुमाला कीजे अवलादी अफलादी चालो दीजे इ. "

( राजवाडे म. इ. सा. खंड १५, लेखांक ३६७ )

( ई ) याच कालांतल्या बखरीचा एक नमुना—

" देखिलें जे आपुले कानीचे मोती तोडून घेत होते बैसले सिंहासन हिरोन घेत असे आपणासी दूत येऊनु वोढीत असे पाहुनु घाबिरा होऊनु उठिला सवेची थोरथोरे जोइसी व पंडित व वेदशास्त्री व ग्रामजोसी बहुता दिवसांचे होते त्यासी बोलाऊ पाठविलें."

( राक्षसतागडीच्या लढाईची बखर )

( १३ ) सतराव्या शतकांतली मराठी पद्यरचना—

( अ ) " कांहीं आठवतें गड्या शिशुपणीं साळेंतलें खेळणें ।
नाना हास्यविनोद मोद सगडी कुस्ती करूं हेळणें ॥
मी तूं हा मज तूज भेद न जगीं ते मूळ मैत्री भली ।
येतें कीं स्मरणास जाण सखया ! पुण्यें बहू लाधली ॥ "

( आनंदतनय–सुदामचरित्र )

(आ) याच काळांतलें ( ता. १८ जानेवारी १६७५ चें ) एक पत्र—

"तुम्हांस समजलें असेल कीं याला ऐवज कोठें तरी ऐवज खजाना रसद पाठविलिया मजरा होईल म्हणत असाल, तरी पद्मदुर्ग वसवून राजपुरीच्या उरावरी दुसरी राजपुरी केली आहे त्याची मदत व्हावी. पाणी फाटी आदीकरून सामान पावावें या कामास आरमार वेगीनें पावावें तें नाहीं... हबशियांनीं कांहीं देऊन आपले चाकर तुम्हाला केले असतील. त्याकरितां ऐसी बुद्धि केली असेल. तरी ऐशा चाकरास ठीकठीक केले पाहिजेत. ब्राह्मण म्हणून कोण मुलाहिजा करूं पाहतो...गनीमाचे चाकर गनीम जालेस ऐसे जाणून बरा नतीजा तुम्हांस पावेल."

( राजवाडे म. इ. साधनें खंड ८ )

( इ ) या वेळचा ख्रिस्ती मिशनरीच्या मराठी गद्याचा मासला—

"भावार्थिया वरवेया ख्रिस्तावानो, ह्या पुराणांतु स्वामिया जेसुख्रिस्ता तारकाची कथा लिहिली आहे. तो कैसा मनुष्य संसारीं आला; आणी कवण कार्यासीं आला, त्या योगाचा विवेकु केला. हे कथेचे दोन भाग अथवा दोन पुराणें केलीं आहाती. पइलिया पुराणांतु संसाररचनेसाठीं आरंभु करूनु उदंड उत्तमी करणिया देवा स्वामियान आपुला येकुची पुत्रु पाठविण्याचे आदी केलेया, त्या करणियांची वेवस्ता निरोपितों."

( ख्रिस्त पुराण–प्रस्तावना )

( १४ ) अठराव्या शतकांतल्या मराठी पद्यरचनेचे नमुने म्हणून महिपति, राजाराम प्रासादी, मोरोपंत इ. कवींच्या काव्यांतून निरनिराळ्या तऱ्हेचे उतारे पुष्कळ देतां येतील, परंतु ते सर्वांना उपलब्ध असल्यामुळें विस्तारभयास्तव येथें देत नाहीं.

याच शतकांतल्या मराठी गद्यरचनेचा पुढील नमुना पहा—

ता. १२ जुलै १७५७ चें पत्र ( म. इ. साधनें खंड १ लेखांक ७१ )

"अवदाली जर कदाचित् मार्गशीर्ष पौषांत आला, तरी इकडे मनसुबा भारीच आहे...न आला तरी कासी बंगाला ये प्रांतीं स्वारी केलियास चार रुपये आकारतील. कपाळ स्वामीचें थोर आहे. प्रयत्न आमचा आहे. तेथें चार रुपये आकारतील ऐसा भरंवसा वाटतो. वरकड हिंदुस्थानांत कोठें जीव दिसत नाहीं, जाटांत आहे, द्रव्यवान् आहे. परंतु किले मातबर आहेत व मोठा काबूकार आहे. सारांश, मातबर मनसुबा केल्याखेरीज भारी दिसत नाहीं."

( १५ ) एकोणिसाव्या शतकांत मोरोपंत, वामनपंडित इत्यादि कवींच्या वळणा-वरच मराठी कविता बहुतेक रचण्यांत आली होती. अर्थात् या काळांतल्या मराठी पद्याचा नमुना देण्याचें कारण नाहीं. गद्यापैकीं तंजावरच्या शिलालेखांतला एक लहानसा उतारा येथें देतों. म्हणजे त्यावरून या शतकाच्या प्रारंभीं दक्षिणेकडे कोणत्या प्रकारची

मराठी भाषा प्रचलित होती, त्याविषयीं कांहीं कल्पना करतां येईल. हा शिलालेख तंजावरचे श्री छत्रपति सरफोर्जी राजे भोसले यांचे कारकीर्दीत कोरला गेलेला आहे—

शके १७२५ ( इ. स. १८०३ ) तंजावरचा शिलालेख.

"तेव्हां दत्ताजीस राग येऊन वहूत लोकांस जाया केला. हत्तींस मारावें म्हणालियांस तुम्ही अटकाविणें काय म्हणून येकास येक चर्चा वाढून हातांत हात मिळून खानीजंगी जाहली ! त्यांत विठोजी राजाचे लेक संभाजी राजाचा हात चालून दत्ताजी राजाचें डोसकें उडालें."

( १६ ) १९ व्या शतकाच्या उत्तरार्धाच्या आरंभीं वर्तमानपत्रांची संस्था जेव्हां महाराष्ट्रांत प्रथमच अवतीर्ण झाली, तेव्हांचें मराठी भाषेचें स्वरूप पुष्कळांना कौतुकावह वाटेल. म्हणून सन १८५४ सालच्या 'ज्ञानप्रकाश' ( वर्ष ६ पत्र ३ ) यांतून घेतलेला एक उतारा येथें देतों—

"आपल्या मुंबईचा नवा गवरनर लार्ड एलफिनस्तन, हा मागील पेशवाई राज्याच्या अखेरीस एथें होता व ज्याणें मोठें नांव संपादन केलें आणि जो अद्यापपावेतों एतद्देशीय लोकांच्या स्मरणांतून गेलेला नव्हे, जो मोर स्टुआर्ट एलफिन्स्टन ज्यास अलफिष्टन साहेब या नांवानें ओळखतात त्याचा हा पुतण्या लागतो. याचा चेहरा त्याचे काकाचे चेहेऱ्याशीं वहुतकरून मिळतो. मागील अलफिष्टन साहेब प्रत्येक जोखमीच्या कामांत पराकाष्ठेचें लक्ष पोचवीत असे. त्याचें फळ आजदिनपावेतों आपणास प्रत्यय होत आहे."

या उताऱ्यांतल्या भाषेवरून निरनिराळ्या काळांतल्या मराठी भाषेतली शब्दयोजना व व्याकरण यांवर पुष्कळ प्रकाश पडण्यासारखा आहे.

परकीय भाषेकडून गिळंकृत होण्याचें संकट पूर्वी १७ व्या शतकांत टळलें होतें, पण एकोणिसाव्या शतकांत तें पुनः येऊं पहात होतें. महाराष्ट्रांत इंग्रजी शिक्षणाचा प्रचार सुरू होऊन साहेबी थाटाचे आमचे सुशिक्षित व मिशनरी जेव्हां व्याख्यानें देण्यास व ग्रंथ लिहिण्यास सरसावूं लागले, तेव्हां पुनः मराठी भाषेची विटंबना होण्यास सुरवात झाली. पण या वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या लेखणीच्या प्रभावानें त्या संकटाचें निरसन होऊन मराठी भाषेचें लज्जारक्षण झालें, व तेव्हांपासून मराठी भाषेविषयींचा अभिमान लोकांत जागृत ठेवण्याचे प्रयत्न सारखे चालू राहिल्यामुळें आतां ती भाषा नष्ट होण्याची भीति उरली नाहीं. तथापि तिचें शुद्धत्व कायम राहण्यासाठीं व तिची अभिवृद्धि होण्यासाठीं अवश्य लागणाऱ्या प्रयत्नांची अद्याप वाणच आहे ही गोष्ट कबूल करणें प्राप्त आहे.

## मराठी भाषेविषयींचा दुरभिमान

मराठी भाषेविषयींच्या अभिमानशून्यतेपासून त्या भाषेची हानि होण्याची जितकी भीति विष्णुशास्त्र्यांच्या काळीं वाटत होती, तितकीच भीति तिच्याविषयींच्या आतांच्या फाजील अभिमानामुळें तिची प्रगति खुंटेल कीं काय याविषयीं वाटूं लागली आहे.

मराठी भाषेंत कोणत्याहि गोष्टीचें न्यून नाहीं; हरएक शास्त्रांतले पारिभाषिक शब्द संस्कृत भाषेच्या साह्यानें तयार करतां येतील; फार काय पण आज सुद्धां तिच्या अंगीं येवढें सामर्थ्य आहे कीं, तिची बरोबरी पृथ्वीवरील कोणत्याहि भाषेला करतां येणार नाहीं अशा प्रकारचे उद्गार मायभाषेविषयींच्या अभिमानाच्या अतिरेकाच्या भरांत निघूं लागले आहेत. रा. राजवाडे आपल्या ज्ञानेश्वरीच्या प्रस्तावनेंत ( पृ. ८ ) लिहितात कीं, ' मराठींतल्या शब्दप्राचुर्याची बरोबरी पृथ्वीवरील इतर कोणत्याहि भाषेला करतां यावयाची नाहीं. तसेंच, कोणताहि गूढ किंवा सूक्ष्म अर्थ नानातऱ्हांनीं यथेष्ट व्यक्त करण्याची तिची शक्ति अप्रतिम आहे. ' या अभिमानोक्तींतल्या पूर्वार्धाचा म्हणजे शब्द-प्राचुर्याविषयींच्या मुद्याचा फोलपणा वर मराठी भाषेच्या शब्दसंख्येसंबंधानें जें लिहिलें आहे त्यावरून कोणाही समंजस माणसाला सहज कळून येण्यासारखा आहे. इंग्रजी भाषेंत ५ लक्ष शब्द आहेत, आणि मराठींत पुरे एक लक्ष सुद्धां शब्द नाहींत ! असा धडधडीत प्रकार असून मराठींतल्या शब्दप्राचुर्यासंबंधानें येवढी दर्पोक्ति करणें रा. राजवाड्यासारख्यांनाच शोभतें ! मराठी भाषेच्या अर्थवाहक शक्तीविषयींचे रा. राजवाडे यांचे उद्गारहि असेच पोकळ घमेंडीचे आहेत. इंग्रजींतले Impulse, sentiment, buoyant, यांसारखे सुटे शब्द किंवा Telescopic, joint, dramatic effect, यांच्यासारखे शब्द-समूह घेऊन त्यांनीं व्यक्त होणारा अर्थ मराठींत थोडक्यांत उतरवूं म्हटलें तर योग्य शब्दांची वाण किती तीव्रतेनें भासते याचा अनुभव ज्यांना आला असेल त्यांना रा. राजवाडे यांची वरील दर्पोक्ति दुरभिमानमूलक वाटल्यावांचून राहणार नाहीं. अलीकडे पाश्चात्य राष्ट्रांतून मानसशास्त्र व अनेक भौतिकशास्त्रें यांचा झपाट्यानें विकास होत आहे. त्यांचें नुसतें पल्लवग्राही परिशीलन केल्यासही त्या त्या विषयांच्या विचारांना व्यक्त करण्याच्या कामीं मराठी भाषा कशी अपुरी पडते याचा जिज्ञासूंना अनुभव येईल. पाश्चात्य विद्यासंस्काराची व भाषाज्ञानाची जोड घेऊन आमचे लोक जेव्हां उत्साहानें या प्रगतिशील शास्त्रांचा अभ्यास करतील व त्यांतले विचार मराठींत उतरविण्याचा यत्न करूं लागतील, तेव्हांच तत्संबंधींच्या नव्या शब्दसंपत्तीची मराठींत भर पडेल. पण तोंपर्यंत मराठी भाषा पंगुच राहील हें प्रांजलपणें कबूल करणें प्राप्त आहे. या कबुलीला जरी कोणी अभिमानशून्यता असें दूषण दिलें तरी सत्यपालनासाठीं तें पतकरलें पाहिजे.

## मराठी भाषेची वाढ होण्यास उपाय

मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीचें यथार्थ स्वरूप वरील विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत बरेंचसें येईल, आणि तिची वाढ होण्यासाठीं कोणते उपाय केले पाहिजेत याविषयींचा विचार त्यांच्या मनांत घोळूं लागेल अशी मी आशा करतों. या उपायांचेंहि दिग्दर्शन वरील विवेचनांत प्रसंगोपात्त आलें आहे. तथापि तें पुनः एकवार येथें संकलित रूपानें सांगतों. मराठी भाषेची खरी वाढ होण्यास महाराष्ट्रीय लोकांनीं आपला 'व्याप' वाढविला पाहिजे; कूपमंडूकवृत्ति सोडून जगांतलीं सुधारलेलीं राष्ट्रें राजकीय सत्तेचें

संपादन, समाजसुधारणा, व्यापाराभिवृद्धि, शिल्पकलादिकांचा उत्कर्ष इ. गोष्टी कशा रीतीनें करीत आहेत तें पाहून जगांत चाललेल्या शर्यतींत मागें न पडतां प्रमुख राष्ट्रांच्या बरोबरीनें राहण्यासाठीं धडाडीचे प्रयत्न चालू ठेविले पाहिजेत ही पहिली आणि अत्यंत महत्त्वाची गोष्ट होय. दुसरा उपाय म्हणजे स्वत्वाचें रक्षण. परकीयांच्या अंमलाखालीं राहण्याचें दुर्दैव यापूर्वीहि महाराष्ट्राला प्राप्त झालें होतें, तरी त्यावेळीं त्यानें जसें स्वत्व राखिलें, तसें या वेळींहि आपण तें राखिलें पाहिजे, आणि आपल्या मराठी भाषेच्या पूर्वेतिहासाची थोरवी आणि संतांच्या वेळीं जनतेंत जागृति उत्पन्न करण्याचें तिनें केलेलें अचाट कार्य या गोष्टी लक्षांत घेऊन त्या भाषेवर व्यासंग करणारी वरीचशी विद्वान् मंडळी पुढें आली पाहिजेत. तिसरी गोष्ट—सुशिक्षितांनीं स्वभाषेंतच परस्परांशीं व्यवहार करण्याचा दृढ संकल्प करून जनतेला स्वभाषेंत शिक्षण देण्याचा हरएक प्रसंग साधला पाहिजे. चौथी गोष्ट—दुरभिमान सोडला पाहिजे, आणि आपल्या भाषेंतल्या उणीवा ओळखून त्या भरून काढण्यासाठीं परभाषेंतल्या शब्दांची लूट करण्यांत पाप न मानतां तिनें स्वभाषेची शब्दसमृद्धि करण्यास झटलें पाहिजे. आणि पांचवी गोष्ट म्हणजे मराठी भाषेविषयींची निष्ठा आणि आत्मश्रद्धा या दोन गोष्टी भावी पिढ्यांत उत्पन्न होतील अशा प्रकारचे कळकळीचे आणि जोराचे प्रयत्न केले पाहिजेत. काल प्रतिकूल आहे म्हणून हातपाय गाळून बसणें मराठ्यांच्या नांवाला व शीलाला शोभायचें नाहीं. स्वतःच्या कर्तृत्वानें कालाला स्ववश करून सोडण्यांतच खरा मराठेपणा आहे ही गोष्ट प्रत्येकानें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

माघ व. ८ शके १८४२.

# शब्दसिद्धि आणि भाषासौंदर्य

( लेखक–**गोपीनाथ तळवलकर**, सं. ' आनंद ' )

माणसाचें आंतर जीवन सुरू झालें तेव्हांपासूनच म्हणजे प्रारंभापासूनच आत्मप्रकटीकरणाची जरूरी त्याला वाटूं लागली. बुद्धि ही एक अपूर्व देणगी निसर्गानें त्याला दिली होती. या बुद्धीनें आहार-निद्रा-भयादि प्राथमिक प्रवृत्तींच्या पलीकडे आपला विकास करून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें प्रथमपासून बाळगली. आणि त्या दृष्टीनें तो प्रयत्न करूं लागला. आत्मप्रकटीकरणाबरोबरच दुसरी एक भावना त्याच्या मनांत उद्‌भूत झाली आणि ती म्हणजे जीवनांतील दृश्यादृश्य गोष्टींना कायम स्वरूप देणें ही होय. आपल्या समोरचें जग क्षणभंगुर आहे, तें सर्व जरी नाहीं तरी त्यांतलें महत्त्वाचें, सुंदर, व शाश्वत स्फूर्तिदायक जें असेल तें टिकून राहावें असें माणसाला उत्कटतेनें वाटूं लागलें. याच दोन प्रवृत्तींतून मुख्यतः भाषेचा विकास झाला. मात्र कार्लाइलनें आश्चर्य व्यक्त केल्याप्रमाणें अत्यंत क्षणजीवी अशा ध्वनीचा आधार घेऊन भाषेनें आपलें चिरजीवी शरीर तयार केलें हा चमत्कार नव्हे काय ?

## श्रवणाकडे भाषा सुपूर्द

आपलें जग हें स्थल आणि काल या दोन तत्त्वांनीं बद्ध आहे. डोळ्यांना दिसणारा पदार्थ हा स्थलाचा प्रतिनिधि तर कानांना ऐकूं येणारा ध्वनि हा कालाचा प्रतिनिधि म्हणतां येईल. मनुष्य प्रथम आपले भाव दुसऱ्याला सांगूं लागला तेव्हां हावभाव हेंच बोलण्याचें मुख्य साधन होतें. हातवारे व मुद्राभिनय करून तो आपलें म्हणणें इतरांना पटवून देई. परंतु लौकरच ही पद्धति मागें पडून त्यानें शब्दोच्चारांची भाषा तयार केली. जगांत सर्वत्र अभिनयाऐवजीं ध्वनियुक्त भाषा असावी ही एक निसर्गाची योजनाच दिसते. एकेका अवयवाकडे कांहीं कामें सोपवून त्यांनाच त्यांत वाकबगार करावयाचें आणि शक्तीची काटकसर करून मानवी देहाकडून अधिक काम करून घ्यावयाचें हें सृष्टीच्या विकासयोजनेंतील महत्त्वाचें सूत्र आहे. मानवी भाषेला श्रवणेंद्रियाचा मुख्य आधार देण्यांत काय सोय निसर्गानें पाहिली याचें डार्विननें पुढीलप्रमाणें विवरण केलें आहे. ( १ ) हातवारे करण्यांत माणसाचे हात गुंतले तर इतर कामें करण्याचें त्यांचें कौशल्य हळूं हळूं नष्ट होईल ही भीति सृष्टीला वाटत असावी. ( २ ) शब्दोच्चाराची भाषा अंधारांत ऐकूं येते, मनुष्याच्या मागें उभें राहिलें असतां ऐकूं येते, किंवा भिंतीआडूनहि ती कळते. हावभावांनीं एकादी गोष्ट सांगायची म्हटली तर श्रोता समोर पाहिजे आणि वक्ता उजेडांत पाहिजे. ( ३ ) ध्वनि वातावरणांत सर्वत्र पसरतो. अभिनयानें एकाद्याचे भाव जाणून घ्यावयाचे म्हणजे एका

विशिष्ट दिशेलाच ते दिसूं शकतील. डार्विन्च्या सिद्धांताप्रमाणें ज्या प्रक्रियेंत अडचणी होत्या ती एका इंद्रियाकडून काढून निसर्गानें दुसऱ्या इंद्रियाकडे सुपूर्द केली. आणि आज आपण बोलतों त्या भाषेची उत्पत्ति झाली.

## स्थलकालाला शाश्वती

भाषेनें मानवी जीवनांत एक प्रतिसृष्टि कशी निर्माण केली हें " The Miraculous Birth of language " या पुस्तकांत प्रो. रिचर्ड अलबर्ट विल्सन यांनीं साधार व सप्रमाण दाखविलें आहे. त्यांच्या मतें भाषेच्या निर्मितीपूर्वी कांहीं क्षणांपलीकडे काल-तत्त्व आणि कांहीं फुटांपलीकडे स्थल-तत्त्व माणसाला भासमान होत नसे. स्थल-कालांतील क्रिया मानस-कोशांत नेऊन तेथें स्थिर करण्याची त्याची मनीषा होती. समोर दिसणाऱ्या निसर्गाला व अनेक 'पळपुट्या गुपितां'ना पिंजऱ्यांत अडकवून ठेवावें असें माणसाला वाटत होतें. आणि तें त्यानें भाषेच्या शोधानें साधलें. चंचल काल-तत्त्वाला त्यानें इतिहासाचें रूप दिलें आणि विचारमालिकेचें तत्त्वज्ञान करून तिला शाश्वत-जीवी बनविलें. मानवी जीवनांतील हें पर्व अत्यंत उज्ज्वल असेंच म्हणतां येईल.

भाषेंतील शब्द मनुष्याला कसे स्फुरले याविषयीं निरनिराळ्या विचारप्रणीला प्रचलित आहेत. प्राण्यांच्या आवाजांचें अनुकरण करून त्यांचीं नांवें ठरविण्यांत आलीं, हें कावळा ( काव् काव् ), माऊ ( म्यॉव् म्यॉव् ), कोकिळ ( कू कू ) या शब्दांवरून दिसतें. पण ही प्राणिशब्दानुकरण–उपपत्ति अर्धसत्य आहे. निरनिराळ्या क्रियांच्या नादावरून शब्द तयार झाले, किंवा उद्गार व निःश्वास यांच्याशीं जुळते असे शब्द निघाले याहि उपपत्तींत संपूर्ण सत्य नाहीं. कांहींतरी उत्कट भावना प्रकट करण्याची अनिवार्य इच्छा माणसाला झाली आणि तीमधून पहिला शब्द जन्मास आला ही जेस्पर्सनची उपपत्ति आतां सर्वमान्य ठरली आहे. ही भावना प्रेमभावना आहे असें जेस्पर्सन म्हणतो. मात्र तेथें प्रेमभावनेची व्याप्ति वाढावयास पाहिजे. पहिला उद्गार याप्रमाणें जरी प्रेमभावनेमुळें निघालेला असला तरी पुढें भाषेचा विकास झाला तो मात्र तर्काधिष्ठित बुद्धीनेंच झाला. हेरडरनें हा वाद्यांतर संबंध पुढीलप्रमाणें व्यक्त केला आहे.

" Reason was incapable of action without word symbol, and the first moment of rationality must also have been the first begining of interior language——Man speaks with his mind and speaks while he thinks; therefore the development of language is as natural to man as his nature. "

–Herder " The origin of language. "

अर्थात् चिंतनाची शक्ति व पातळी ज्या मानानें वाढत गेली त्या मानानें भाषेची सर्गशक्तिहि वाढली हें उघड आहे. म्हणजे चिंतन जितकें सुंदर व सामर्थ्यवान् असेल तितकी भाषाहि सुरेख व ओजस्वी होणार हें उघड आहे.

# शब्दसिद्धि आणि भाषासौंदर्य

( लेखक–**गोपीनाथ तळवलकर**, सं. ' आनंद ' )

माणसाचें आंतर जीवन सुरू झालें तेव्हांपासूनच म्हणजे प्रारंभापासूनच आत्म-प्रकटीकरणाची जरूरी त्याला वाटूं लागली. बुद्धि ही एक अपूर्व देणगी निसर्गानें त्याला दिली होती. या बुद्धीनें आहार-निद्रा-भयादि प्राथमिक प्रवृत्तींच्या पलीकडे आपला विकास करून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्यानें प्रथमपासून बाळगली. आणि त्या दृष्टीनें तो प्रयत्न करूं लागला. आत्मप्रकटीकरणाबरोबरच दुसरी एक भावना त्याच्या मनांत उद्भूत झाली आणि ती म्हणजे जीवनांतील दृश्यादृश्य गोष्टींना कायम स्वरूप देणें ही होय. आपल्या समोरचें जग क्षणभंगुर आहे, तें सर्व जरी नाहीं तरी त्यांतलें महत्त्वाचें, सुंदर, व शाश्वत स्फूर्तिदायक जें असेल तें टिकून राहावें असें माणसाला उत्कटतेनें वाटूं लागलें. याच दोन प्रवृत्तींतून मुख्यतः भाषेचा विकास झाला. मात्र कार्लाइलनें आश्चर्य व्यक्त केल्याप्रमाणें अत्यंत क्षणजीवी अशा ध्वनीचा आधार घेऊन भाषेनें आपलें चिरजीवी शरीर तयार केलें हा चमत्कार नव्हे काय ?

## श्रवणाकडे भाषा सुपूर्द

आपलें जग हें स्थल आणि काल या दोन तत्त्वांनीं बद्ध आहे. डोळ्यांना दिसणारा पदार्थ हा स्थलाचा प्रतिनिधि तर कानांना ऐकूं येणारा ध्वनि हा कालाचा प्रतिनिधि म्हणतां येईल. मनुष्य प्रथम आपले भाव दुसऱ्याला सांगूं लागला तेव्हां हावभाव हेंच बोलण्याचें मुख्य साधन होतें. हातवारे व मुद्राभिनय करून तो आपलें म्हणणें इतरांना पटवून देई. परंतु लौकरच ही पद्धति मागें पडून त्यानें शब्दोच्चारांची भाषा तयार केली. जगांत सर्वत्र अभिनयाऐवजीं ध्वनियुक्त भाषा असावी ही एक निसर्गाची योजनाच दिसते. एकेका अवयवाकडे कांहीं कामें सोपवून त्यांनाच त्यांत वाकबगार करावयाचें आणि शक्तीची काटकसर करून मानवी देहाकडून अधिक काम करून घ्यावयाचें हें सृष्टीच्या विकासयोजनेंतील महत्त्वाचें सूत्र आहे. मानवी भाषेला श्रवणेंद्रियाचा मुख्य आधार देण्यांत काय सोय निसर्गानें पाहिली याचें डार्विननें पुढीलप्रमाणें विवरण केलें आहे. ( १ ) हातवारे करण्यांत माणसाचे हात गुंतले तर इतर कामें करण्याचें त्यांचें कौशल्य हळू हळू नष्ट होईल ही भीति सृष्टीला वाटत असावी. ( २ ) शब्दोच्चाराची भाषा अंधारांत ऐकूं येते, मनुष्याच्या मागें उभें राहिलें असतां ऐकूं येते, किंवा भिंतीआडूनहि ती कळते. हावभावांनीं एकादी गोष्ट सांगायची म्हटली तर श्रोता समोर पाहिजे आणि वक्ता उजेडांत पाहिजे. ( ३ ) ध्वनि वातावरणांत सर्वत्र पसरतो. अभिनयानें एकाद्याचे भाव जाणून घ्यावयाचे म्हणजे एका

भाषेप्रमाणें इतर कांहीं कलांच्याहि आधारें स्थलकालाला साकार व शाश्वत करून ठेवण्याचा प्रयत्न माणसांनीं केला आहे. यापैकीं गायन ही कला कालतत्त्वाशीं संबद्ध आहे. पण ध्वनिमुद्रिकेचा शोध लागेपर्यंत तरी गायनाचें सौंदर्य हें क्षणभंगुरच होतें असें म्हणावें लागेल. चित्र आणि शिल्प यांचा प्रकार कांहींसा वेगळा आहे. प्रत्यक्ष दिसणारें प्रमाणबद्ध असें सौंदर्य या कलांनीं चिरजीवी केलें. हें खरें असलें तरी या कला-कृति स्थानबद्ध होऊन राहतात हें त्यांचें वैगुण्यच नव्हे काय ? मदुरेचें मीनाक्षी मंदिर, ताजमहाल, किंवा अजंठा यांचें सौंदर्य पाहण्यासाठीं माणसाला तेथें प्रत्यक्ष जावें लागतें. या सौंदर्याच्या अनेक आवृत्ति निघूं शकत नाहीत. मनुष्याचें मन हें सर्वसंचारी आहे या दृष्टीनें त्याचें संपूर्ण प्रतिनिधित्व अखेर भाषेशिवाय कुणी करूं शकत नाहीं हेंच खरें. गायनानें सौंदर्याचें प्रवाहित्व प्रकट केलें असेल किंवा सौंदर्याची विलोभनीय आकृति शिल्पानें शाश्वत केली असेल. परंतु स्थल-कालानें बद्ध असणाऱ्या रम्योदात्त घटना अथवा भावना यांना सर्वकालीन, सर्वस्पर्शी रूप भाषाच देऊं शकली. आपल्या पुष्पपेलव प्रीतीला सुरक्षित व शाश्वत कसें ठेवावें, कुठें ठेवावें याचा विचार करतां करतां धातु, पाषाण, समुद्र हीं सर्व शेक्सपिअरनें रद्द ठरविलीं; कारण या सर्वांवरच मृत्यूची पोलादी पकड बसणार. अखेर काळ्या शाईतच तिला ‘ अक्षयरूपिणी ’ करून ठेवितां येईल असें शेक्सपीअरनें म्हटलें. भाषेच्या थोरवीविषयीं हेंच वेगळ्या पद्धतीनें मांडतांना ॲर्नोल्डनें पुढील उद्‌गार काढले आहेत—

“ Beethoven, Raphael cannot reach
The charm which Homer, Shakespeare teach. ”

[ होमर, शेक्सपीअर इ० नीं प्रवर्तिलेल्या सौंदर्याच्या पातळीपर्यंत ( संगीत सम्राट् ) बेथोव्हिन् किंवा ( चित्र-शिल्पी ) राफेल कधींच पोचूं शकणार नाहीं. ]

भाषेचा कणा ध्वनि हा असला आणि त्या ध्वनीचें फक्त काळाशींच नातें असलें तरी त्या ध्वनीला शब्दार्थ येतांच तो शाश्वत होतो. भावना किंवा दृश्य यांनीं मनुष्याच्य अंतःकरणाला जो साक्षात्कार व्हायचा तो पुनः पुनः किंवा पृथ्वीच्या पाठीवर कुठेंहि इतरांना घडवून देण्याचें सामर्थ्य भाषेमध्यें आहे. भाषेनें भूतकाल आणि भविष्यकाळ यांचा सांधा जुळवून दिला आणि मानवी संस्कृतींत चैतन्याचा प्रवाह खेळता ठेवला. भाषा नसती तर ज्ञान–विज्ञान वाऱ्यावर गेलें असतें आणि माणसाला कुठून आलों व कुठें जायचें हें कळलें नसतें. भाषेमुळें पुरुषार्थाचे जुने आदर्श मानवजातीपुढें सतत राहून माणसांना सतत स्फूर्ति येत गेली. रामाचा थोर पराक्रम व उदात्त चारित्र्य पिढ्यान्‌पिढ्यांना स्फूर्ति देत राहिलें त्याचें कारण काय ? तें सर्व वाल्मीकीनें भाषानिबद्ध करून ठेविलें म्हणून. यासाठींच ‘ त्या रामा तूं देसि रामपण ’ असा या आदिकवीचा गौरव करण्यांत आला आहे. मानवी संस्कृतींतलें भाषेचें हें अनन्य महत्त्व वाङ्मयाच्या विद्यार्थ्यांनीं प्रथम ध्यानांत घेतलें पाहिजे. लॅटिन किंवा संस्कृत भाषांच्या मानानें आमची मायबोली ही वयानें लहान असली तरी तिच्याहि मागें एका मानवसमूहाचा

सुमारें ८–१० शतकांचा इतिहास आहे. जगांतील रससिद्ध कवीश्वरांची परिषद भरली तर तीमध्यें सहज उठून दिसेल असा एकादा दुसरा वागीश्वर आम्हीं खास पाठवूं शकूं असा विश्वास आहे. आमच्या मायबोलीच्या सृष्टींत ' नवरसांचे सागर ' आणि ' भावार्थांचे गिरिवर ' अशी दोन्ही तऱ्हांची भव्य शोभा आहे. आपल्या अध्ययनाचा उपयोग त्या शोभेंत भर घालण्यासाठीं करणें हें प्रत्येक वाङ्मय–विद्यार्थ्यांचें कर्तव्य आहे.

## अनेक भाषांचे संस्कार

मराठी भाषेच्या उद्गम–विकासाचा विचार प्रस्तुत लेखाच्या कक्षेंत येत नाहीं. परंतु शब्दसिद्धीकरितां अवश्य अशीं जीं मूलभूत तत्त्वें आहेत त्यांच्याशीं भाषेच्या प्रारंभींच्या संस्कारांचा संबंध खास येतो, म्हणून तेवढा भाग दिला पाहिजे. संस्कृत-पासून मराठी भाषा निघाली हा स्थूल विचार सर्वत्र प्रचलित आहे. अर्थात् मराठीचा ऊहापोह करतांना संस्कृत भाषा हा पाया धरणें या विचारामुळें अपरिहार्य होतें. परंतु डॉ. कत्रे वगैरे अलीकडील नामवंत भाषाशास्त्रज्ञांच्या संशोधनामुळें खुद्द संस्कृतविषयीं ज्या रूढ कल्पना होत्या त्याच बदलत चालल्या आहेत. सामान्य समजूत अशी होती कीं संस्कृत ही एकत्र मूळ आर्यभाषा असून तिच्यापासून पुढें प्राकृत भाषा निघाली; किंबहुना तिची विकृति किंवा अपभ्रंश ही प्राकृत भाषा ठरली. आणि आजच्या भारतीय प्रांतिक भाषा या प्राकृतांतून जन्म पावल्या. मायकेल मधुसूदन दत्त यांच्या-सारखा थोर वंग कवि बंगाली भाषेला उद्देशून म्हणतो—

**" शकुन्तला तुमि, तव मेनका जननी**
**रूपहीना दुहिता, के मा ज्या'र अप्सरी."**

( हे वंगभाषे ! तूं शकुंतला असून तुझी माता ( संस्कृत ) मेनका आहे. अप्सरेची मुलगी कुरूप कशी होईल ? ) पण आज भाषाकोविद् वंगभाषा एकदम संस्कृतमधून निघाली असें म्हणणार नाहींत. तिची जननी संस्कृत नसून मागधी आहे. वेदरचनेच्या पूर्वी आर्यांची जी भाषा होती तिच्याबरोबर अनेक बोली या देशांत प्रचलित होत्या. या बोलींचे संस्कृतवर परिणाम झाले आणि या बोलींवरहि संस्कृतचे परिणाम झाले. परंतु एका अवस्थेंत संस्कृतचें रूप प्रवाही न राहतां घनरूप, नियमबद्ध व्हावें अशी आंच पंडितांना लागली आणि संस्कृत ही भाषा व्याकरणाच्या काटेकोर नियमांनीं चहूंकडून बांधली गेली. इतर भाषा मात्र व्यवहारांत राहून, विकसत व वाढत गेल्या; त्यांचें शरीर लवचिक व वर्धिष्णु राहिलें आणि पुढें त्या व्याकरणबद्ध झाल्या तेव्हां त्यांच्या वाढीला मर्यादा पडली.

मराठी भाषा ज्या मुख्य प्राकृत भाषेवरून घेतली गेली ती ' महाराष्ट्री ' होय. याविषयीं बऱ्याच तज्ज्ञांचें आतां एकमत आहे. ' महाराष्ट्री ' आणि ' शौरसेनी ' या प्राकृतांपैकीं दोन भाषा विशेष ज्ञात आहेत. प्राकृत वैय्याकरणांनीं ' महाराष्ट्री 'लाच अग्रपूजेचा मान दिला आहे. प्राकृत भाषांचें व्याकरण सांगतांना विशेष तेवढें नमूद केल्यानंतर ' शेषं महाराष्ट्रीवत् ' असें सूत्र सांगतात. हेमचंद्रानें प्राकृतचें व्याकरण

म्हणजे महाराष्ट्रीचेंच व्याकरण दिलें आहे. महाराष्ट्री ही प्राकृतांतील काव्याची भाषा आणि शौरसेनी ही गद्याची भाषा म्हणून संस्कृत नाटककारांनीं मान्य केलें आहे. अशोककालाच्या पूर्वीपासून महाराष्ट्रामध्यें आर्यांची वस्ती असून ' महाराष्ट्री ' ही भाषा त्यावेळीं प्रचारांत असली पाहिजे. महाराष्ट्रीचा प्रभाव जैन धर्मग्रंथांतील अर्ध-मागधी भाषेवरहि पडलेला दिसतो. ( अर्ध मागधी ही अर्धीमागधी नसून अर्ध्या मगधाची भाषा म्हणून तिला हें नांव पडलें. ) अर्थात् याच्या उलटहि झालेलें आहे. जैन मुनि धर्मोपदेशाकरितां सर्वत्र संचार करीत. तेव्हां अर्ध मागधीचा जन्मकाल वेदापर्यंत नेतां येत असला तरी त्या भाषेवर जैन मुनींच्या पर्यटनामुळें निरनिराळ्या प्रदेशांत असलेल्या बोलींचे संस्कार होत गेले.

तीच गोष्ट ' महाराष्ट्री ' भाषेसंबंधींहि म्हणतां येईल. महाराष्ट्रांत आर्य लोक वसाहत करावयास आले तेव्हां ते स्वतःची भाषा घेऊन आले. परंतु त्यांचें परिभ्रमण ज्या ज्या प्रदेशांतून झालें त्या त्या प्रदेशांतील भाषांचे शब्द, संप्रदाय व तऱ्हा त्यांच्या भाषेंत शिरल्या. महाराष्ट्री ही भाषा वैदिक, संस्कृत, प्राकृत इ० अनेक भाषांचे संस्कार घेऊन परिणत झाली असल्यानें तिच्यापासून निघालेल्या मराठीवर तीं चिन्हें दिसावीं यांत काय नवल ? आणि म्हणूनच मराठी ही भारताच्या पश्चिमकडे सिंधीलाहि जवळ आहे तर कांहीं बाबतींत पूर्वेकडील टोकाच्या बंगालीशींहि तिचें साम्य आहे. [ शब्द-कोश–प्रस्तावना, विभाग ४ था. ] सातव्या शतकामध्यें अरब लोक उत्तर कोंकणांत व्यापार करूं लागले तेव्हां अनेक अरबी शब्दहि मराठींत शिरले आणि त्यांनीं मराठींत सरूपता मिळविली. यानंतर पोर्तुगीज, फ्रेंच, डच, इंग्रज, या युरोपीयन राष्ट्रांचा भारताला जसजसा संसर्ग होत गेला तसतसा मराठींत त्यांचाहि भरणा होत गेला.

पण मराठीचें शब्दरूपी शरीर हें असें विविध पोटभाषांच्या व बोलींच्या संस्कारांनीं बनलेलें असलें तरी तिचें अंतरंग हें पुष्कळसें संस्कृतमय आहे ही गोष्ट मान्यच करायला हवी. 'अमृताशीं पैजा जिंकणारीं अक्षरें' निर्मिणाऱ्या मराठीच्या आद्य कवीश्वरानें व्यासशंकराचार्यांच्या आधारानेंच आपला ग्रंथ रचिला हें विसरून चालणार नाहीं. संतकवींच्या तत्त्वज्ञानावरच नव्हे तर भाषेच्या डौलावरहि संस्कृतची छाप आहे. पंडित कवि हे तर बोलून चालून संस्कृतवरच पोसलेले. फार काय पण होनाजी बाळासारख्या लोककवींनासुद्धा आपल्या लोककाव्याला सरसता व सौंदर्य आणण्यासाठीं **"गोपीमनःकमलभृंगा, प्रतापतुंगा, मुरहर, पंकजपाणि"** अशी संस्कृतप्रचुर रचना करावीशी वाटली. आधुनिक मराठी वाङ्मयांत भाषेला सौष्ठव व माधुर्य आणावयाचें म्हणजे संस्कृत वाङ्मयांतील अर्थगर्भ व गोड शब्द भाषेंत पेरायचे हा संकेत आजवर रूढ होता. अजूनहि संस्कृतची ही मोहिनी आमच्यावरून गेलेली नाहीं.

## भाषाशुद्धि–विवेक आणि विरोध

मराठीची उत्पत्ति व विकास आणि तिचा इतर भारतीय जुन्या भाषांशीं व संस्कृतशीं असलेला संबंध याचें एवढें निवेदन पुरें आहे. या निवेदनावरून भाषा-

[illegible] वाचनालय, सातारा.



विकासामध्यें अनेक भाषांचे व बोलींचे संस्कार कसे अपरिहार्य असतात हें दिसून येईल. हें लक्षांत घेऊनच आज भाषेची समृद्धि करणारांनीं ग्रंथरचना केली पाहिजे. परंतु आज कांहीं विचित्र प्रवृत्तींनीं साहित्यक्षेत्रांत आपली दहशत बसविली आहे आणि त्यामुळें साध्या व रसाळ भाषेला वेडत्रपणा येत आहे. या प्रवृत्तींची चिकित्सा केल्या-खेरीज खऱ्या भाषासौंदर्याचें मर्म नीट उमगणार नाहीं.

अनेक भाषा, पोटभाषा यांचे प्रवाह मिसळून परिणत झालेल्या मराठींतून अ-मराठी शब्द काढून टाकण्याची जी मोहीम सुरू झाली तिचें मूळ भाषिक नसून पुष्कळसें राजकीय होतें. भारतीय राष्ट्रवादांत पुनरुत्थानवादी ( revivalist ) पंथ मोठा प्रबळ होता. सुवर्णयुग कुठें तरी भूतकाळांत, हिंदु-साम्राज्यांत, संस्कृत वाङ्मयांत आहे आणि तें परत आणण्यासाठीं मध्ययुगाच्या व त्या मागच्या प्रवृत्तींची, परंपरांची, भाषेची पुनः प्रतिष्ठापना करावयाची हा या पंथाचा आग्रह होता. या पंथांतले सुशिक्षित अग्रणी विज्ञानाचें महत्त्व ओळखत नव्हते असें नाहीं. परंतु प्राचीन संस्कृती-वरील श्रद्धा आणि विज्ञाननिष्ठा यांचा कसावसा मेळ घालण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. मराठी भाषेवरहि या पंथाचा ठसा उमटल्याखेरीज राहिला नाहीं. या पंथानें भाषा-क्षेत्रांत आणलेल्या शुद्धीकरणाचे स्वातंत्र्यवीर 'सावरकर प्रवर्तक होत. उर्दू शब्दांवर तर सावरकरांचा विशेष कटाक्ष होता. ' सर्व हिंदुमय झालें पाहिजे.' या त्यांच्या सूत्राचें भाषेपुरतें ' सर्व संस्कृतमय झालें पाहिजे.' असें रूपांतर झाल्यास आश्चर्य तें कोणतें ? कारण संस्कृत हीच हिंदु संस्कृतीची गंगोत्री होय हें सिद्धच होतें.

स्वातंत्र्यवीरांना पुढें एक प्रभावशाली सहकारी मिळाले आणि वेगळ्या भूमिके-वरून यांनीं भाषाशुद्धीचा पुरस्कार हिरीरीनें केला. कै. गु. डॉ. माधवराव पटवर्धन ( माधव ज्यूलियन् ) हे ते गृहस्थ होत. कवि, कोशकार, समीक्षक अशा अनेक नात्यांनीं कीर्ति-मान् झालेले पटवर्धन प्रथम फार्शी भाषेचे एकनिष्ठ अभ्यासक म्हणून पुढें आले आणि मराठींत फार्शी शब्दांची त्यांनीं रेलचेल करून सोडली. परंतु अशा रीतीनें परकी शब्द वापरूं लागलों तर भाषेची सर्गशक्ति क्षीण होते असें त्यांना पुढें वाटूं लागलें. आणि एकदां एखादी गोष्ट पटली कीं तिचा प्राणपणानें पुरस्कार करायचा या पटवर्धनांच्या वृत्तीप्रमाणें ते भाषाशुद्धीचे कडवे पुरस्कर्ते बनले. संस्कृतप्रमाणें बोलींतलेहि समर्पक व अर्थवाही शब्द घ्यावे असा त्यांचा आग्रह असे. त्यामुळें एके बाजूस ' दिग्बुभुक्षा ' ( मुलुखगिरी ) हा दुर्बोध संस्कृत शब्द तर दुसरीकडे ' गावलें ' ( सांपडलें ) असा गांवठी शब्द अशा दोन टोकांत त्यांची भाषाशैली हेलकावत राहिली ! सावरकर-पटवर्धन या पराक्रमी जोडीच्या प्रचारामुळें अनेक हेंगाडे व विचित्र शब्द मराठीच्या संसारांत कायमचे नागरिक होऊन बसले आहेत ! प्रतिशोध, स्थानक, इच्छुक, उपाख्य, अर्थसंकल्प, हातभेट, षड्यंत्र, अभियोग, नि, शीर्षक इ० शब्द कांहीं पत्रकार व लेखक हट्टानें वापरतात. व्यवहारांत या शब्दांना थोडें फारच चलन मिळाल्यानें कोशांत त्यांचा अंतर्भाव करावा लागला तरी त्यांनीं मराठीला सौंदर्य आणलें असें म्हणवत नाहीं.

मात्र सावरकर–पटवर्धनांनीं भाषाशुद्धीची धूम उडविली त्यामुळें मराठी भाषेची घडण व सौंदर्य यांवर विचारमंथन सुरू झालें हें खास. आणि यासाठीं भाषाभ्यासकांनीं त्यांचें ऋण मान्य करावयास हवें. भाषाशुद्धीच्या प्रवर्तकांचा दावाच मुळांत चूक होता. पण त्यांच्यापाशीं निदान कळकळ, विद्वत्ता आणि प्रतिभा हीं भरपूर होतीं. पण टूम म्हणून या चळवळींत सामील झालेल्या व देशाभिमानाच्या खोटया कल्पनांच्या आहारीं गेलेल्या कांहीं उथळ पत्रकारांजवळ व लेखकांजवळ तें भांडवल मुळींच नव्हतें. मग या वारगीरांचे भाषाशुद्धीचे प्रयत्न भाषेला भयंकर विद्रूप करण्यास कारण झाले यांत आश्चर्य कसलें ? अव्वल इंग्रजींतील पंडित लेखकांप्रमाणें शुद्ध व सुडाळ संस्कृत शब्दहि हीं भाषाशुद्धिवादी मंडळी योजूं शकेनात. या अनिष्ट प्रवृत्तीविरुद्ध आमचे सौंदर्यवादी समीक्षक मित्र प्रा. श्री. के. क्षीरसागर यांनीं प्रथम कडाडून हल्ला चढविला. * हा हल्ला बिनतोड होता. प्रा. क्षीरसागरांच्या प्रतिपादनांत भाषाशुद्धिवाद्यांची नुसती रेवडी उडविली होती असें नाहीं तर भाषेला सामर्थ्य व रमणीयत्व येण्यास कोणतीं तत्त्वें प्रभावी ठरतात याचें सम्यक्‌दर्शन करून देण्यांत आलें होतें.

प्रा. क्षीरसागर यांनीं भाषाशुद्धीला विरोध करतांना ही मुख्यतः भाषाशुद्धि नसून शब्दशुद्धि आहे असा मुख्य आक्षेप घेतला होता. प्रतिभावान् माणसें आपल्या भावना-कल्पनांना जो सहजोद्गार देतात त्यामुळें भाषा सुंदर व समृद्ध बनते. चिमटा–पद्धतीनें परकी शब्द काढून त्या ठिकाणीं बोजड स्वदेशी शब्द ठेवल्यानें भाषा सुंदर कशी होणार ? वाक्यरचनेची ढब इंग्रजी पद्धतीची राहूं दिली आणि नुसते शब्द तेवढे अस्सल मराठी किंवा संस्कृत बसविले तर त्या भाषाशुद्धीनें कोणतें कार्य साधणार ? उर्दू किंवा इंग्रजी शब्दांचे अस्सल मराठी पर्याय बनवितांना या परकीय शब्दांच्या वजनांना व आकारांना वाजवीपेक्षां फाजील महत्त्व देणें ही एक चूक भाषाशुद्धिवाले करतात असेंहि प्रा. क्षीर-सागरांनीं दाखवून दिलें. ' मॅटर्निटी होम ' ला मातृप्रसूतिगृह ( येथें मातृ हा शब्द फालतू नाहीं का ? ) किंवा ' व ' ला नि हे शब्द हीं या हास्यास्पदतेचीं उदाहरणें होत.

प्रा. क्षीरसागर म्हणतात—

" एकादा संस्कृत शब्द, प्रतिशब्द अथवा परभाषेंतील शब्द प्रचारकी बाण्यानें आणणें स्वाभाविकतेस विघातक आहे. आजवर जे जे नवीन शब्द आले ते ते कोणी पंडितानें आणून सोडले नाहींत. सामान्य जनांच्या स्वाभाविक संपर्कांत ते केव्हां आले हें कळलेंहि नाहीं. त्यांतहि कांहीं रुजले व कांहीं रुजले नाहींत. कांहीं मूळचें स्वरूप अजिबात पालटून मराठी जिव्हेवर नांदूं लागले. या सर्व प्रक्रियेचा अर्थ या भाषावृक्षा-वरील शब्द तोडून त्या भाषेच्या फांदीवर चिकटवून दे असा प्रकार कधींच होत नाहीं. भाषेला कोणते शब्द मानवतात व कोणते मानवत नाहींत हें हळूहळू रूढ होणाऱ्या शब्दांच्या इतिहासाकडे पाहिल्यास स्पष्ट दिसून येईल.

* " खरी भाषाशुद्धि आणि तिचे खरे वैरी अर्थात् सावरकर आणि पटवर्धन " १९३६ ( फेब्रु–मार्च ) ' सह्याद्रि. '

भाषासिद्धीच्या प्रवाहाची मुख्य दिशा मात्र स्पष्ट आहे. प्रत्येक भाषेला कांहीं विशिष्ट नाद असतो. हें नादवैशिष्ट्य ही भाषा बोलणारांच्या उच्चारण-पद्धतीवर ( Accent and Intonation ) अवलंबून असतें. जुने शब्द हल्लींच्या स्वरुपांत कां आले याचें उत्तर या राष्ट्रीय वैशिष्ट्यांत सांपडतें. अशा स्थितींत भाषेच्या विशिष्ट रचनेचा भंग करून केवळ संस्कृत कोशांत आढळतात म्हणून हवे ते शब्द मराठीवर लादतां येणें शक्य नाहीं, त्यायोगें लिहिण्याची भाषा पंडिती व अस्वाभाविक होत जाईल आणि व्यवहाराची भाषा आणि पुस्तकी भाषा यांचा संबंध अजिबात तुटेल. मराठीनें स्वाभाविक रीत्या जे नवीन शब्द बनविले आहेत त्यायोगें हा वैशिष्ट्यभंग झालेला नाहीं. याचें कारण व्यवहाराच्या अकृत्रिम ओघांत आलेले शब्द पांडित्याची कदर न करतां शक्य तों मराठी पेहराव घेत घेत आले आहेत. तसेंच प्रत्यक्ष व्यवहाराच्या वातावरणांत जे शब्द प्रथम पदन्यास करतात ते भाषेंतील विशिष्ट रचनेमध्येंहि ( Idioms ) आपलें योग्य स्थान ठरवीत ठरवीत येतात. सारांश ते आगांतुक व उपटसुंभ वाटत नाहींत. या बाबतींत पंडिती वळणाचे लोक दोन चुका करतात. एक तर केवळ कोणताहि संस्कृत शब्द मराठींत दडपण्यास हरकत नाहीं या भ्रमानें मराठी शब्दसमूहाचें स्वरूप बिघडवितात, तर उलट दुसरें म्हणजे कधीं कधीं मराठीस अनुकूल असें रुप घेणाऱ्या शब्दांस उलट मूळ स्वरूपाप्रत पाठवितात. ”

[ ‘ व्यक्ति आणि वाङ्मय ’ पृ. ११०–११ ]

## शब्दसिद्धीचे कुशल कारागीर

तसें पाहिलें तर भाषाशुद्धिवादाचे अग्रणी म्हणविणारांपूर्वींहि नवे सार्थ व सुटसुटीत मराठी पर्याय बनविण्याचें काम व्युत्पन्न व कुशल लेखक-संपादकांनीं अव्याहत केलें होतें. आणि नंतरहि त्या कामाला कधीं खंड पडलेला नाहीं. मात्र भाषाशुद्धिवाद्यांचा धर्मवेडा आग्रह या वाग्भटांजवळ नव्हता. श्री. आबा चांदोरकर या प्रसिद्ध इतिहाससंशोधकांनीं ‘ केसरी ’ पत्रानें ५० वर्षांच्या कालावधींत प्रसृत केलेल्या परिभाषेवर फार सुंदर निबंध ‘ केसरी–प्रबोध ’ या ग्रंथांत लिहिला आहे. त्यावरून महाराष्ट्राच्या या एकाच ख्यातनाम नियतकालिकानें मराठी शब्दसंपत्तींत किती मोलाची भर घातली आहे हें दिसून येईल. श्री. चांदोरकरांच्या मतें ‘ केसरी ’ नें २८७० नवीन शब्द काढले. श्री. चांदोरकरांनीं यांपैकीं कांहीं निवडक शब्द दिले आहेत, त्यावरून सहज दृष्टि टाकली तरी कितीतरी ओळखीचे शब्द भेटतात. दडपशाही, सरकारनियुक्त, प्रतोद, राष्ट्रसंघ, पुच्छप्रगति, रणगाडा, सरक-पूल, हुजूर-पक्ष, मजूरपक्ष, सविनय कायदेभंग, गैरसनदशीर, ग्रंथिक संनिपात, संसर्ग-विरोध ( सेग्रेगेशन् ), कुलगुरु, कुलपति, विशारद्, लाठी-राज्य, हस्तांदोलन, रौप्यशृंखला इ. शब्द तयार करतांना ‘ केसरी ’ नें भाषाशुद्धिवाल्यांची ‘ सोवळी ’ दृष्टि ठेविली नव्हती आणि म्हणूनच लवचिक, वेधक व अर्थग्राहक असे शब्द त्यास तयार करतां आले. शतायु होऊन विराम पावलेला पुण्याचा ‘ ज्ञानप्रकाश ’, नागपूरचा ‘ तरुण भारत, ’ ‘ महाराष्ट्र, ’ मुंबईचें माजी ‘प्रगति’ साप्ताहिक, ‘ विविध-

वृत्त ' इ० अनेक नियतकालिकांनीं वेळोवेळीं येणाऱ्या नव्या परकीय कल्पना व शब्द यांना बेमालूम मराठी पेहेराव चढविले आहेत. अनेक शैलीकार लेखकांनीं या प्रक्रियेस उत्तम हातभार लाविला आहे.

पर्याय शब्द बनवितांना तो मूळ शब्दांतील सर्व अर्थच्छटा व्यक्त करतो कीं नाहीं हें प्रथम पाहणें आवश्यक असतें. पण तितकीच दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या भाषेंत तो शब्द सुशोभित दिसला पाहिजे व चपखल बसला पाहिजे. परदेशी शब्दामागील सूक्ष्म ध्वनि किंवा आख्यायिका याहि आपल्या प्रतिशब्दांत प्रतिबिंबित करतां आल्या तर दुधांत साखर पडली म्हणावी लागेल. एकदोन उदाहरणांवरून हें स्पष्ट होईल. ' राउंड टेबल कॉन्फरन्स ' यास ' गोल–मेज–परिषद् ' असा एक प्रतिशब्द निघाला. ' राउंड–टेबला'चें ' गोल–मेज ' हें सरळ रूपांतर होय. पण ' गोल–मेज ' हा शब्द कानाला आल्हाद्कारक वाटला नाहीं. पुढें निघालेला ' मंडलाकार–परिषद् ' हा पर्याय मात्र जितका सुबोध तितका प्रसन्न वाटूं लागला. पण या शब्दाला आणखीहि एक मोठी अर्थगौरवाची बाजू आहे. ' राउंड टेबल ' हें ऑर्थर या प्राचीन इंग्लिश राजाचें वैशिष्टय होतें. आपल्या सर्व सहकाऱ्यांना ऑर्थर गोल मेजाभोंवतीं बसवी; हेतु हा कीं, सर्वांचेंच अंतर आपणापासून सारखें असावें, कुणी कमी योग्यतेचा किंवा दूरचा असें वाटूं नये. ऑर्थरची ही समताबुद्धिच अलीकडील राउंड टेबल–कॉन्फरन्स या नांवांत सूचित केलेली आहे. ' मंडलाकार ' या शब्दांत ' टेबल ' न आलें तरी या समत्वबुद्धीचें दर्शन होतें. श्रीकृष्ण आपल्या सवंगड्यांना न्यूनाधिक भाव वाटूं नये म्हणून ऑर्थरच्या सरदारांप्रमाणेंच सभोंवतीं बसवून घेई. पंडित कवीनें याचें वर्णन " म्हणुनि बहुत पंक्ती **मंडलाकार** केल्या " असें दिलें आहे. तेव्हां ' राउंड टेबल ' प्रमाणें ' मंडलाकार ' शब्दहि एका प्राचीन उदारहृदयी पुरुषाच्या समत्वबुद्धीपर्यंत जाऊन पोंचतो हें सहज दिसून येईल आणि म्हणून त्याची समर्पकता एकाहून अधिक दृष्टींनीं कशी व किती आहे हें कळेल. ' ऑनररियम् ' म्हणजे कांहीं कामाकरितां मोबदला म्हणून नव्हे तर कृतज्ञतेचें प्रतीक म्हणून ' फूल ना फुलाची पाकळी ' या न्यायानें दिलेलें द्रव्य. याला ' मान–द्रव्य ' किंवा ' मान–वेतन ' असा प्रतिशब्द निघाला. ( ' मानधन ' असा शब्द कांहीं संपादक किंवा लेखक अत्यंत चुकीनें वापरतात ! ' मानधन ' हें विशेषण असून त्याचा अर्थ मान हेंच ज्याचें धन होय असा पुरुष, स्वाभिमानी पुरुष. उदा. **' मानधन प्रभु मी जें वदलों कर्तव्य तें करीन खरें, '** –मोरोपंत ). तथापि आतां ' संभावना द्रव्य ' म्हणून निघालेला पर्याय अधिक सुंदर, सार्थ व समर्पक आहे. पूर्वीं विद्वान् ब्राह्मणांची संभावना करीत. म्हणजे त्यांना त्यांच्या कामगिरीचा पुरेपूर मोबदला किंवा वेतन देत असें नाहीं, तर त्यांच्या कामाचा गौरव करण्यासाठीं कांहीं अल्पसा उपहार देत. ' ऑनररियम् ' मध्यें हाच अर्थ नाहीं काय ? असे अर्थवाहक व डौलदार पर्याय शब्द जितके निघतील तितके पाहिजेच आहेत. परंतु असे शब्द विटा पाडल्याप्रमाणें बनवितां येणार नाहींत. वऱ्हाडमधील एका जाहीर सभेंत व्याख्यान देत असतां, 'हीच ती–हीच ती.' असें थोडें अडखळून नंतर ' हीच ती

नोकरशाही ' असें लोकमान्य टिळक एकदम साक्षात्कार झाल्याप्रमाणें उद्गारले, आणि त्यादिवशीं रात्रीं मित्राशीं सुखसंवाद करीत असतां, " आज बारा वर्षे ज्या 'ब्यूरोक्रसी' शब्दाला प्रतिशब्द हुडकीत होतों तो अखेर सापडला. " असें समाधान त्यांनीं व्यक्त केलें. भाषाप्रभू अनेक वर्षांच्या चिंतनानें भावनेच्या ओघांत जे नवे शब्द बनवितात तेच भाषेचें सौंदर्य व सामर्थ्य वाढवितात्. भाषाशुद्धिवाल्यांच्या टांकसाळींतलीं नाणीं संख्येनें पुष्कळ निघत असलीं तरी त्यांत कलादृष्ट्या हिणकस भाग खूप असतो.

## परिभाषेचा जटिल प्रश्न

परंतु खोटीं नाणीं बाजारांत आलीं तर तीं खऱ्या नाण्यांना बाहेर घालवितात, हा अर्थशास्त्रांतला भयानक सिद्धांत साहित्यांतहि खरा ठरतो हें दुर्दैव होय. ' शीर्षका–' नें ' मथळा ' यासारखा सुटसुटीत शब्द मागें सारला, ' कादंबरी ' सारखा रम्य व सुंदर शब्द असतां ' उपन्यास ', ' नवलकथा ' असले शब्द तिची जागा बळकावूं पहात आहेत ! टूम म्हणून नवे शब्द निघाले कीं ते वापरून ' अद्ययावत् ' व देशप्रेमी ठरूं पाहणारे लेखक–संपादक निघतात ! म्हणून तर शब्दनिर्मिती व शब्दांची निवड यांचा सौंदर्यवादी दृष्टीनें विचार करणें जरूर आहे. असो. भाषाशुद्धि या चळवळीप्रमाणें आतां परिभाषा बनविण्याची जी मोहीम सर्वत्र सुरू आहे तीहि भाषेला बोजड बनवील कीं काय अशी भीति वाटते. कै. वा. गो. आपटे यांनीं परकीय परिभाषा सर्वच्या सर्व आपली म्हणून पत्करावी असा विचार मांडला होता. परंतु तो आज कुणी पत्करील असें चिन्ह दिसत नाहीं. अनेक प्रगत शास्त्रांची परिभाषा तयार करण्याचीच चळवळ आज बळ धरीत आहे. अशा वेळीं ही परिभाषा मराठीच्या निकोप व सुढाळ शरिराला कुरूपतेचें जाड्य आणणार नाहीं याची काळजी घेतली गेली पाहिजे.

वास्तविक परिभाषा हा स्वतंत्र अभ्यासकाचा खास विषय असतो. सर्वसामान्य भाषाविचार–विशेषतः ललित वाङ्मयाचा विचार–करतांना परिभाषेचा प्रश्न उद्भवूं नये. परंतु कांहीं शास्त्रें सामान्य ज्ञानांत मोडतात आणि त्यांच्यांत उत्पन्न झालेले पारिभाषिक शब्द नेहमींच्या बोलण्यालिहिण्यांत येऊं लागतात. यासाठीं परिभाषेची दखल घेतल्या-शिवाय चालत नाहीं. आज आपल्या राष्ट्रांत जी परिभाषा–निर्मितीची चळवळ सुरू आहे तिचा मुख्य आधार संस्कृत हाच आहे. जयपूर येथील राष्ट्रभाषा–परिषदेच्या अध्यक्षीय भाषणांत श्री. कन्हैयालाल मुनशी यांनीं म्हटलें होतें कीं, आज भारतातील सर्व लोकांना सांस्कृतिक स्फूर्ति व एकता देणारी म्हणून राष्ट्रभाषा कोणास म्हणावयाचें असेल तर ती संस्कृतच होय. भारत व ब्रह्मदेश यांत ३४,९८,८८००० भारतीय भाषा बोलतात. त्यांपैकीं संस्कृतोद्भव भाषा बोलणारे २५,३७,१२००० असून ४,६७,१८००० लोक संस्कृतचें वर्चस्व असलेल्या द्राविडी भाषा बोलणारे आणि २,१४,१२००० संस्कृत–द्राविड अशा मिश्र भाषा बोलणारे आहेत. ( १९३१ ची शिरगणती ) पंडितप्रवर डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनीं उत्तर व मध्य भारतांतील भाषा ' संस्कृतोद्भव ' असून 'अगदीं दक्षिणेकडील भाषांचें द्राविडी रक्ताचें नातें असलें

तरी त्या ' संस्कृताश्रय ' म्हणजे संस्कृतावर अवलंबून असलेल्या आहेत असें म्हटलें आहे. ' संस्कृतोद्भव ' भाषांचें स्थान गीर्वाणवाग्मंदिराच्या सभामंडपांत असलें तर ' संस्कृताश्रय ' भाषांचें त्या मंदिराच्या प्राकारांत आहे एवढेंच. अशा रीतीनें प्रमुख भारतीय भाषांचा आधार संस्कृत असल्यानें परिभाषा बनवितांना सर्व पंडितांनीं संस्कृत कोशागाराकडे धाव घ्यावी यांत गैर कांहीं नाहीं.

परिभाषा बनविणाराला या शास्त्राचें ज्ञान सखोल असलें पाहिजे आणि तो उत्कृष्ट संस्कृतज्ञ असला पाहिजे. पण हीं दोन्हीहि अंगें असून स्वभाषेचें वजन व व्यक्तित्व त्याला पूर्ण आकलन झालेलें नसेल तर त्यानें निर्मिलेले शब्द स्वभाषेच्या सौंदर्य वाढविण्यास कधींहि कारण होणार नाहींत. आज डॉ. रघुवीर परिभाषा–निर्मितीचें महान् कार्य करीत आहेत. तथापि त्यांच्या एतद्विषयक अधिकाराबद्दल योग्य तो आदर दर्शवूनहि त्यांनीं निर्मिलेली परिभाषा जशीच्या तशी पत्करल्यानें मराठीचें सौंदर्य वाढेल असें खास म्हणवत नाहीं. संस्कृतवर आधारलेले दुर्बोध व बोजड शब्द मध्यवर्ती संस्थेंत तयार व्हावेत व प्रांतिक भाषांनीं ते धाऊक रीतीनें आपल्या उपयोगासाठीं घेऊन जावेत ही क्रियाच मुळीं अनैसर्गिक आहे. याखेरीज रघुवीरप्रणीत नवे शब्द आमच्या भाषेंत असलेल्या तत्सम शब्दांच्या अर्थांना पदच्युत करून भाषिक अराजक माजविणार आहेत ही मोठीच भीति वाटते. ' संशोधन ' ( Research ) याचा आजवर आम्ही नवें ज्ञान व सिद्धांत शोधून काढणें असा अर्थ करीत होतों. पण डॉ. रघुवीर त्या शब्दाचा अर्थ ' दुरुस्ती करणें ' ( amendment ) असा सांगणार ! अशी तऱ्हा अनेक शब्दांची होईल. ' लोकसभा ' हा सुंदर शब्द पार्लमेंटाला आज अनेक वर्षे रूढ असतां ' संसद् ' हा व्यंजनान्त व उच्चारकठिन शब्द वापरण्याची पाळी डॉ. रघुवीरांनीं आणली आहे ! असो. भाषिक नेत्यांनीं याकडे वेळींच लक्ष दिलें पाहिजे. भाषाशुद्धिवाद्यांच्या पुनरुत्थानवादी धर्मवेडानें परिभाषानिर्मात्यांना पछाडलें तर प्रांतिक भाषा विद्रूप होण्यास फारसा विलंब लागणार नाहीं ! अमळनेर येथें भरलेल्या मराठी साहित्य संमेलनानें या बाबतींत ठराव करून डॉ. रघुवीरांना थोडी सबुरी करण्याचा इषारा दिला हें योग्यच झालें.

## निवडीचें क्षेत्र विस्तृत पाहिजे

जातिवंत लेखक कोशांत वेळोवेळीं शब्द पाहून आपलें लिखाण सजवीत नाहीं अध्ययनाचे वेळीं त्याला कोशाची मदत होते. पण समर्पक शब्द त्याच्या लेखनाच्या ओघांत आपोआप येत जातात आणि आपापलें योग्य ठिकाण शोधून उत्कृष्ट अर्थनिष्पत्ति करतात. भाषाभ्यासासाठीं विविध शब्दांची सामग्री असेल तर अर्थातच या प्रक्रियेस मोठी मदत होईल. या दृष्टीनें प्रा. दे. द. वाडेकर यांनीं आपल्या ' भारतीय मानसशास्त्र परिभाषा ' कोशांत एका परकीय शब्दाला अनेक पर्यायशब्द दिले आहेत हें भाषाभिवृद्धीस उपकारक ठरणारें आहे.

Interruption–व्याघात, विघ्न, अंतराय, खंड, भंग, व्याघातन, विघ्नन, अंतरायण, भंजन, खंडन, व्यत्यय. ( पृ. १६५ ).

Conflict–द्वंद, विसंवाद, विरोध, कलह, विग्रह, अभिसंपात ( पृ. ४५ ) हीं दोनच उदाहरणें घेतलीं तर निवड करण्यास लेखकाला किती वाव आहे हें दिसून येईल. यांतून पर्याय घेतांना विवेचनास व शैलीस योग्य तोच शब्द लेखक निवडील. यांतले कित्येक शब्द कदाचित् अजीवात मागें पडतील. एका परकीय शब्दासाठीं कदाचित् दोनतीन प्रतिशब्द यांतून रूढ केले जातील आणि त्यांपैकीं प्रत्येकांत पुढें कांहीं नवी अर्थच्छटा येईल. असो. शब्द आयते तयार करून लेखकास वापरायला दिल्यानें खरी शब्दसिद्धि होत नाहीं हें तर खरेंच आहे. परंतु निदान लेखकाच्या निवडीला असें विस्तृत क्षेत्र तरी परिभाषानिर्मात्यांनीं द्यावें असें म्हणतां येईल. परिभाषेबद्दल एवढा विवेक पुरे आहे.

## ग्रामीण वाङ्मयाची टूम !

शब्दसौंदर्याची हानि करणाऱ्या आणखी एका प्रवृत्तीला छेडणें अवश्य आहे. ही प्रवृत्ति जितकी गंभीर तितकीच नाजुक आहे. ग्रामीण अथवा प्रादेशिक वाङ्मय लिहून तें लोकाभिमुख करण्याचा ( किंवा भासविण्याचा ! ) प्रयत्न करणें ही ती प्रवृत्ति होय. लोकाभिमुखता हा आज जवळ जवळ सर्वच क्षेत्रांत परवलीचा शब्द आहे. 'लोकांसाठीं वाङ्मय, लोकांचें वाङ्मय, लोकनिर्मित वाङ्मय' हा आक्रोश सुरू आहे. (Goverment for the people, of the people, and by the people या लिंकनच्या सूत्रावरून मराठींतलें हें घोषवाक्य तयार करण्यांत आलें. ) केवळ आकर्षक नादाखेरीज या घोषणेंत कांहीं फारसा भरीव अर्थ आहे असें वाटत नाहीं. लोकांनीं निर्माण केलेलें वाङ्मय हा तर या घोषणेंतला विशेष हास्यास्पद भाग होय ! रस्तेबांधणी, शेतकाम याप्रमाणें कलाकृतीची निर्मिति सामुदायिक रीतीनें करतां येणें शक्य असतें काय ? वाङ्मय हीं काय समूह–विकास–योजना किंवा ग्रामसफाई आहे म्हणून जथ्यांनीं तें निर्मितां येईल ?

वाङ्मय अधिकांत अधिक लोकांना कळेल असें सुबोध असावें आणि समाजांतील शक्य तेवढया मोठ्या विभागाच्या भावना-कल्पना-आकांक्षा यांचें स्वच्छ प्रतिबिंब त्यांत उमटावें हें म्हणणें उजू आहे. आणि समंजस वाङ्मय-सेवक या म्हणण्याचा योग्य तो आदर आपल्या कला-कृतींत करतातच. परंतु बोलींतले शब्द इतस्ततः पेरून आपलें वाङ्मय लोकाभिमुख असल्याचा देखावा निर्माण करणें मूर्खपणाचें आहे. नागर शब्दांना अपभ्रष्ट करून ग्रामीण वातावरण उत्पन्न करण्याचा प्रयत्न होतो. 'प्रीती'ची 'पिरत्' झाली कीं लगेच तिला रानमातीचा सुगंध येऊं लागेल असें थोडेंच आहे ? अनुभूतीच्या अभावीं, फक्त आपणांस ठाऊक असलेले ग्रामीण शब्द पेरून कलाकृतीला ग्रामीण सौंदर्य

आणण्यास धजणें ही कलेशीं बेइमानी तर आहेच, परंतु भाषासौंदर्यालाहि तें अपायकारक आहे. मोप, वेश, लई इ० शब्द आंदोलन, हृदयंगम इ० शब्दांना खेटून बसले तर ग्रामीण अथवा नागर कुठल्याच सौंदर्याचा आढळ न होतां विरूप व बेडौल रांधा मात्र तयार झालेला दिसेल. केवळ ग्रामीण वर्णनासाठींच नव्हे तर नागर वातावरणाचें चित्रण करतांनाहि आपला बहुजनसंस्पर्श दाखविण्यासाठीं शिष्ट लेखक मुद्दाम मुर्दाड ग्रामीण शब्द योजतात ! त्यांचें लिखाण इतरांपेक्षां वेगळें आहे हें कळण्यास जरी त्यांयोगें मदत झाली तर त्यांनीं सौंदर्यनिर्मिती झाली असें खास म्हणतां येणार नाहीं.

बोलींतले शब्द किंवा ग्रामीण शब्द वाङ्मयांत घेऊं नयेत असें मुळींच म्हणावयाचें नाहीं. भाषा आणि बोली यांनीं एकमेकांना समृद्ध करणें हेंच चैतन्याचें लक्षण आहे. भाषेनें बोलीला व्यवस्थितपणा यावा आणि बोलींमुळें भाषा टवटवीत व गतिमान राहावी. लोकवाङ्मयांत उत्कृष्ट शब्दांच्या खाणी सांपडतील. तीं शब्दरत्नें उचलून व वाटल्यास संस्कारित करून भाषेमध्यें बसविणें हें जरूर व्हावयास पाहिजे. परंतु बहुजनसमाजाशीं जवळीक दाखविण्यासाठीं उगीच वेडेवांकडे ग्रामीण शब्द वापरून लोकाभिमुखतेचा जो भास निर्माण करण्यांत येतो तो आक्षेपार्ह वाटतो. पुढील उत्कृष्ट उतारे लक्षांत घेण्यासारखे आहेत.

( १ )

“ धरणीमाता प्रसन्न झाली, कणसें हीं पिकलीं,
हाय ! कशी रे ! तुकड्याकारण ‘वइ’ माझी विकली !
हीं बाळें आतां दूर नको व्हायला । रे सख्या ।
जाशील न टाकुनि तूंही आतां मला । रे सख्या ।
तें अभक्ष्य नलगे पोटा जाळायला । रे सख्या ।
स्मरण नको तें ! पुनः स्फुरण हो आठवता घावा
भुलवाया तें दुःख जिवाला पावा हा ठावा ॥

—तांबे

( २ )

बहुकडे ढगांच्या माळा
उभि दरडीवर ती बाला
वायुची, बसे थाप ती, चिरगुटें उडती
कां चढली दरडीवरती ॥

—तांबे

( ३ )

वघ थकुनि कसा निजला हा भूलोक
मम आशा जेविं अनेक
अंधार भरे चोहिकडे गगनांत
गरिबांच्या जेविं मनांत
खडबड हे उंदिर करती
कण शोधायातें फिरती
परि अंतीं निराश होती
लवकर हेही सोडतील सदनाला
गणगोत जसें अपणाला ॥ निज नीज० ॥
हें कळकीचें जीर्ण मोडकें द्वार
कर कर कर वाजे फार
तें दुःखानें कण्हुन कथी लोकांला
दारिद्र्य आपुलें वाळा
वाहतो फटींतुन वारा
सुकवीतो अश्रूधारा
तुज नीज म्हणे सुकुमारा
हा सूर धरी माझ्या या गीताला ॥ निज नीज० ॥

—दत्त

( ४ )

" सकाळीं गुरें सोडून नेण्याची प्रत्यक्ष वेळ येतांच जयाबाईची तर नुसतीच गडबड उडाली. मुलें अद्यापि निजलींच होतीं. तीं उठण्याच्या पूर्वी गुरांना घेऊन जावें, असा रामजीचा बेत. कारण त्या मुलांचाहि जीव त्या गुरांवर फार. तीं सोडून विकायला नेतांना त्यांनीं पाहिलें म्हणजे बाकीच्या चौघांना जरी कांहीं कळलें नाहीं, तरी दोघ मोठ्या मुलांना तें कळून तीं एकच आकांत करतील अशी त्याला भीति होती. पण त्य भीतीपेक्षां अधिक भीति उत्पन्न करणारें असलें वर्तन या वेळीं त्याच्या बायकोनें करण्याचा घाट घातला. आपल्या पोटच्या गोळ्यांपैकीं एखादा गोळा ओढून नेण्याला कोणी उभा राहिला असतां जसें आईनें वर्तन करावें, तसें तिनें चालविलें. प्रथम ती आरडली ओरडली नाहीं. " मी नाहीं नेऊं द्यायची माझ्या ढवळ्यापवळ्याला ! " असें म्हणून त्याच्यापुढें तिनें अंग टाकलें. तिची समजूत कोणत्या शब्दांनीं करावी, आणखी काय बोलावें हें त्या बिचाऱ्या नवऱ्याला मुळींसुद्धां समजेना. त्याचें स्वतःचें दुःख त्याला

आवरेना, आणि बायकोच्या दुःखानें तर तें अधिकच दुणावलें. त्यानें हळूहळू एकेका गुराचें दावें सोडलें आणि तें सोडतां सोडतां तो आपल्या बायकोची समजूत करीत होता. हो, ना, हो, ना, करितां करितां शेवटीं ती कांहीं तरी स्थिरस्थावर झाली, आणि "शेवटीं जातां जातां मी आपल्या हातानें कांहीं नाहीं तरी नाहीं पण मूठ मूठ बाजरी तरी चारतें, ती चारुं द्या आणखी मग न्या." असें तिनें फार केविलवाण्या आवाजानें म्हटलें. पांच मुठी बाजरी म्हणजे या प्रसंगाला काय आहे हें रामजीला समजलें नाहीं असें नाहीं. पण त्या वेळीं 'तेवढेंहि करूं नको' असें बायकोला म्हणणें म्हणजे केवळ तिच्या अंगावर कुऱ्हाडीचा घाव घालण्यापेक्षांहि निर्दयपणाचें होणार हें जाणून तो त्या गुरांना पुढें उभें करून स्तब्ध राहिला. गुरांचे पैसे येतील, त्याचे आपण दाणे आणूं ही त्याला उमेद होती.

जयाबाई आपले डोळे पुशीत पुशीत आंत गेली. दोन दिवसांपुरती सुद्धां बाजरी नव्हती. पण तिकडे बिलकुल लक्ष न देतां तिनें चांगल्या भरगच्च अशा पांच मुठी काढल्या आणि त्या आपल्या ओच्यांत घालून त्या गुरांकडे आली. आतां अगदीं झुंजू-मुंजू दिसूं लागलें होतें. रात्रीपासून तिनें आक्रांत केल्यामुळें तिची चर्या किती तरी विलक्षण झाली होती. तिच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा चालल्या होत्या. दुरून तीं उभीं राहिलेलीं गुरें पाहतांच ती किंचित् मोठ्यानें स्फुंदूं लागली. आपली ओंजळ भरून तिनें एकएका गुराच्या पुढें करावी, त्यानें थोडेसें खाल्लें म्हणजे दुसऱ्यापुढें न्यावी. ती बाजरी खातांना त्या गुरांचा अधीरपणा पाहून तर तिला फारच वाईट वाटलें. बाजरी संपतांच तिनें एका बैलाच्या गळ्यांत मिठी मारली आणि "पिऱ्या ! रे पिऱ्या ! तुझे ढवळ्या पवळ्या चालले रे !" असें म्हणून केवढ्या मोठ्यानें तरी गळा काढला !"

(हरिभाऊ आपटे-स्फुट गोष्टी भाग १ ला-पृ. ४६-४७)

तांबे यांनीं आपल्या गीतांत कांहीं ग्रामीण शब्द आणले आहे. पण एकतर ते अपरिचित व दुर्बोध असे नाहींत आणि योग्य ठिकाणीं ते आल्यामुळें त्यांना अधिक सौंदर्य आलें आहे. दत्तांच्या उताऱ्यांत तर ग्रामीण शब्द नाहींत आणि तरीहि एका दलित मातेचें चित्र दत्तांनीं किती हृदयस्पर्शी रेखाटलें आहे पहा ! दलितांचा कळवळा दाखविण्यासाठीं किंवा जगांतील दारिद्र्याचें भयानक वर्णन करण्यासाठीं रांगड्या शब्दांची कल्हई करावीच लागते असें नाहीं हें दत्तांनीं सिद्ध केलें आहे. हरिभाऊंचा उतारा उघड उघड ग्रामीण जीवनांतला आहे आणि तरी बोलींतील शब्दांचा आश्रय न घेतां त्यांनीं केवढी रसोत्पत्ति केली आहे हें दिसून येईल. अनुभूति विशाल असेल तर शब्दांचे नवे नवे प्रयोग मुद्दाम करावे लागणार नाहींत, योग्य शब्द सुचतील, आणि रसोत्कर्ष सहज साधेल. जेथें जिव्हाळाच कमी पडतो तेथें मग तकलुपी शोभेचा साज चढविण्यासाठीं मुद्दाम अ-नैसर्गिक शब्दयोजनेचा खटाटोप करावा लागतो. या सर्व चर्चेंत ग्रामीण किंवा लोकवाङ्मयांतील शब्दांचा बहिष्कार सूचित केला नसून असले शब्द वापरण्यास लागणाऱ्या कलादृष्टीच्या अभावीं भाषेला कसा कुरूपपणा येतो हें मुख्यतः दाखवावयाचें आहे.

## तें प्रादेशिक वाङ्मय

प्रादेशिक वाङ्मयाचा उल्लेख याच ओघांत येईल. याहि विषयांत वातावरणाऐवजीं नुसत्या शब्दांनाच प्राधान्य मिळतें. वास्तविक प्रादेशिक चित्रणांत एकंदर मानवतेच्या जीवनांतला एक वैशिष्टय पूर्ण सांचा दिसला पाहिजे. वर्ण्य प्रदेशांतला निसर्ग, तेथल्या परंपरा व समस्या या सर्वांचें स्वतंत्र चित्र दिसून पुनः त्यांत मानवाच्या मूलभूत प्रवृत्तींना संवादी असा भाग सापडणें हें प्रादेशिक वाङ्मयाचें यश होय. हार्डीची टेस ही वेसेक्स परगण्यांतील दुर्दैवी कुमारिका आहे. पण पृथ्वीच्या पाठीवरील कुठलाहि सहृदय वाचक तिची शोकांतिका वाचून उदास होतो. **'अंचल में है दूध और आँखोंमें पानी'** अशा वर्णनाच्या एकंदर 'अबला जीवना' ची टेस ही प्रतीक झाली आहे. टेसच्या कहाणीचें हें सार्वत्रिक आवाहन हार्डीनें वेसेक्स परगण्यांतल्या बोलींतले शब्द मनमुराद पेरले म्हणून उत्पन्न झालेलें नाहीं, तर आपल्या प्रदेशांतल्या एका व्यक्तीच्या जीवनाला त्यानें सर्वंकष असें मानवी रूप दिलें यामुळेंच उत्पन्न झालें आहे. प्रादेशिक ही पाटी लावून ज्या कथा–कादंबऱ्या आपणांस मराठींत वाचायला मिळतात त्यांत विचित्र प्रादेशिक शब्दच काय ते फक्त वाचायला मिळतात! असल्या शब्दांनीं रसापकर्ष तर होतोच, शिवाय पुस्तक दुर्बोधहि होऊन बसतें! कोल्हापूरकडला 'मसाला' ( मदिरा ) कुलाब्यांत कसा उमगणार? आणि खानदेशाच्या 'बाटी' ची (गव्हाचा रोट) चव सोलापूरच्या रसिकाला कशी कळणार? "सांतु शणै 'पुळणी' वर बसला होता आणि 'गाविता' ला त्यानें प्रश्न केला" असलें वाक्य सागराच्या सान्निध्यांत असणाऱ्या लोकांनाच फक्त समजेल! असो. प्रादेशिक चित्रणाच्या ओघांत एकादा सुरस शब्द आला तर तो नको असें मुळींच नाहीं. परंतु मुद्दाम लकब म्हणून प्रादेशिक शब्दांची पेरणी केल्यानें शुद्ध व सुबोध भाषेंत निष्कारण गुल्म तयार होतात आणि भाषेचें आवाहन मर्यादित होतें. प्रादेशिक वाङ्मय हें त्या प्रदेशांतल्या बाहेरच्या लोकांकरितां असतें. तें प्रादेशिक शब्दांनीं दुर्बोध होऊन बाहेरील लोकांना न कळलें तर त्याचा उपयोग तरी काय? खुद्द त्या त्या प्रदेशांत तें किती वाचलें जातें हा प्रश्न पुनः विवाद्यच आहे!

कुठल्याहि एकांतिक प्रवृत्तीनें भाषेचें सौंदर्य बिघडतें हें या सर्व विवेचनाचें सार होय. संस्कृतमधील दुर्बोध शब्दांनीं भाषेला बेढबपणा येतो आणि बहुजनांना ती भाषा अपरिचित वाटूं लागते. पण ग्रामीण व प्रादेशिक शब्दांची पखरण केल्यानें भाषा लगेच जोमदार किंवा बहुजनसुबोध होतेच असेंहि नाहीं. बारा कोसांवर बोली बदलते. अर्थात् बोलींतले शब्द ग्रंथांत आडमाप घालायचे म्हटले तर तो ग्रंथ दहापांच मैल त्रिज्येच्या वर्तुळाबाहेर कुणाला कळणार नाहीं. नामदेव व तुकाराम बहुजनसमाजांतून उदयाला आले तरी त्यांच्या काव्याची भाषा शुद्ध, प्रसन्न, डौलदार होती. त्यांत उगाच ग्रामीण शब्दांचा भरणा नव्हता. हरिभाऊ वरच्या थरांत जन्मले पण त्यांच्या कादंबऱ्या सर्व थरांतल्या शिक्षितांना समजतील अशाच आहेत. त्यांत संस्कृतप्राचुर्य

नाहीं. भिन्न शतकांत होऊन गेलेल्या या भाषासम्राटांनीं निर्मिलेल्या सारस्वतांवरून भाषासौंदर्याचें रहस्य सहजच ध्यानीं येईल.

## वृत्तपत्रांची जबाबदारी

भाषेचें सौंदर्य नष्ट करण्यांत आमचीं वृत्तपत्रें आजकाल आघाडीवर आहेत असा आरोप प्रा. क्षीरसागर यांनीं अलीकडे एका महत्त्वाच्या व्यासपीठावरून केला आहे.*आपल्या आरोपाला पुरावा म्हणून त्यांनीं अनेक उदाहरणें दिलीं आहेत. या आरोपाला कोलवून देणें पत्रकारांना सहज शक्य आहे. कारण आजच्या युगांत पत्रकार ही मोठी शक्ति आहे. परंतु असें करण्याऐवजीं पत्रकारांनीं अंतर्मुख होऊन खरोखर विचार केला पाहिजे. वेळोवेळीं पत्रकारांनीं जमून नव्यानव्या जन्मलेल्या शब्दांचें स्थान व अर्थ निश्चित केले तर आज वृत्तपत्रीय भाषेंत माजलेला गोंधळ नाहींसा होईल. घटकराज्याचा मुख्य मंत्री ( chief minister ) हाहि ' पंतप्रधान ' संबोधण्यांत येऊं लागला तर भारताच्या पंतप्रधानाला ( Prime minister ) कोणतें बिरुद उरलें ? ' प्रतीक ' आणि ' प्रत्यंतर ' यांच्यांतलें अंतर वृत्तपत्रसृष्टींत नाहींसेंच झालें आहे ? "नगराध्यक्षांनीं 'पुढचं पाऊल ' टाकणें जरूर आहे." या वाक्यांत ' पुढचं पाऊल ' या शब्दाला वास्तविक अवतरण चिन्हांची काय गरज आहे ? पण त्यावेळीं चालू असलेल्या प्रसिद्ध चित्रपटाचा अप्रत्यक्ष उल्लेख करण्याच्या मोहाला पत्रकार बळी पडतो. अशा अनेक गमती दररोज सकाळीं पाह्यला मिळतात.

भाषा सर्व समाजापर्यंत पोचविण्याचें कार्य वृत्तपत्रेंच प्रामुख्यानें करतात. तेव्हां भाषादूषणापासून अलिप्त राहण्यासाठीं त्यांनीं साक्षेपानें झटलें पाहिजे. नाहींतर अशुद्ध व बेढब भाषा सर्व समाजांत पसरेल. वृत्तपत्रीय वाङ्मय हें ' घाईतलें वाङ्मय ' ( Literature in hurry ) आहे असें मोर्ले म्हणत. पण ' घाईतलें ' असलें तरी तें ' वाङ्मय ' आहे हें विसरून चालणार नाहीं. त्यांतला बराच भाग दुसरे दिवशीं निर्माल्य होतो हें खरें असलें तरी कांहीं शाश्वत राहण्यासारखाहि असतो. पत्रकाराला शब्दनिर्मितीसाठीं लागणारी उसंत नसते हें कुणीहि मान्य करील. पण पत्रकार हाडाचा साहित्यिक असला व भाषेचें पूर्ण ज्ञान त्याला असलें तर शब्दांचे अपप्रयोग टाळणें त्यास खास शक्य होईल. आधुनिक मराठी सारस्वतांतले पहिले अग्रेसर साहित्यिक हे लोकप्रिय पत्रकार होते आणि त्यांनीं आपल्या प्रतिभाबलानें मराठीवर अमोल लेणीं चढविलीं. मराठींत भाषेचीं अमोल लेणीं म्हणून जे प्रबंध-संग्रह अभ्यासिले जातात ते प्रथम वृत्तपत्रांत संपादकीय लेख म्हणून प्रसिद्ध झाले होते. मुद्दाम भाषाभिवृद्धीसाठीं केलेली ती रचना नव्हती. ह्या आपल्या श्रेष्ठ परंपरेची कीर्ति आजच्या मराठी पत्रकारांनीं कलंकित होऊं देणें योग्य ठरेल का ?

---

* वाङ्मयपरिषद, बडोदें. ( १४ वें अधिवेशन ) जाने. १९५१.

## " भक्त्यात्त्वनन्यया शक्यम् "

भाषासौंदर्याला हानिकारक होणाऱ्या प्रवृत्ति कोणत्या यांची तपशीलवार चर्चा येथवर केली. या चर्चेच्या अनुरोधानेंच शब्दसिद्धीला अवश्य असणाऱ्या तंत्राचीं सूत्रेंहि मधून मधून येऊन गेलीं आहेत. आज इंग्रजीचें जोखड आमच्या खांद्यावरून हळूं हळूं खालीं येत आहे. राष्ट्रभाषा म्हणून ज्या हिंदीला प्राधान्य मिळत आहे ती आमच्या मायबोलीचीच ज्येष्ठ भगिनी आहे. भारतीय एकतेच्या साक्षात्कारासाठीं प्रांतभाषांनीं परस्पर सहकार्य वाढवावें ही चळवळ मूळ धरीत आहे. आमच्या जीवनाचीं क्षितिजें व व्याप वाढत आहेत हीं सर्व उत्तम चिन्हें आहेत. मात्र राष्ट्रभाषा किंवा इतर भाषा यांचे संस्कार मायबोलीवर करतांना तिचा देखणेपणा अणुमात्र कमी होऊं नये ही दक्षता आम्हीं घेतली पाहिजे.

आणि हें होण्यासाठीं आमचें शब्दसिद्धीचें मूलतत्त्व अबाधित राहिलें पाहिजे. कुठल्याहि साहित्येतर आंदोलनाच्या आहारीं जाऊन कांहीं प्रयोग करण्यासाठीं म्हणून भाषा न लिहितां, आपणांस जें उत्कटतेनें प्रतीत झालें तें इतरांना तितक्याच उत्कटतेनें अनुभवाला यावें या हेतूनें भाषा लिहिणें हें तें मूलतत्त्व आहे. शब्द हे अंतरंगातील सौंदर्य निम्मेच व्यक्त करतात. ' चिन्मय हृद्गत ' शब्दरूपांत येतांना कांहींसें ठेचाळून येतें.

"–Words like Nature half reveal
And half conceal the soul within. "

—Tennyson

हें गृहीत धरलें तरी शब्दांत व्यक्त झालेल्या निम्म्या हृद्गतानें राहिलेलें गुप्त अंतरंग सूचित झालें पाहिजे. वाणी आणि अर्थ यांनीं परस्परांना प्रेमभरानें दृढालिंगन दिलें म्हणजेच हें शक्य होतें. हनुमंतानें दग्ध केलेली लंका सोन्याची झाली त्याप्रमाणें वाणीनें जगांत जें निषिद्ध म्हणून सांगितलें त्याचेंहि वाङ्मयरूप मनोहर झालें पाहिजे. असें होण्यास हें वगळायचें, त्यावर बहिष्कार घालायचा असली निषेधात्मक वृत्ति उपयोगी पडणार नाहीं. शब्द सरस व सुंदर होण्यासाठीं अनन्य भक्ति अंतःकरणांत ओसंडत असली पाहिजे. ती भक्ति असली म्हणजे जुने शब्द नवा अर्थ घेतात, नवे सुंदर शब्द जन्माला येतात. प्रसाधन-चतुर रमणी सोनें–मोती काय, काजळ काय, अथवा सुंदर ताज्या करवंदाचा गेंद काय, सर्वांचाच उपयोग करून आपली रूपसंपदा अधिक रम्य करते. मात्र कुठें काय व किती बसवायचें यांचें सूक्ष्म व अचूक ज्ञान तिला असतें. भाषासौंदर्याचें तंत्र यांहून कांहींच वेगळें नाहीं. शब्द कुठलाहि कसाहि असो, प्राचीन भाषेंतला असो, पर-भाषेंतला असो, किंवा लोकभाषेंतला असो, प्रतिभासंपन्न साहित्यसेवक लेखनांत त्याला अशी बेमालूम जागा करून देईल कीं तीमुळें त्या शब्दाभोंवतालचीं मूळचीं अर्थवलयें तर अधिक तेजस्वी होतीलच, पण आणखी नव्या वलयांचीहि भर त्यांत पडेल. अशा शब्दरत्नांनीं मढविलेल्या वाङ्मयमूर्तींच्या सौंदर्याला जरामरणाचें भय कशाचें ? प्रलय-मेघांनीं वृष्टि केली तरी तिला लहानसाहि तडा जाणार नाहीं.

# वा. गो. आपटे यांचें समग्र वाङ्मय

## बालकांसाठीं

| | | | |
|---|---|---|---|
| बालरामायण | ०-६-० | चित्तरंजन भाग २ | ०-५-० |
| बालभारत | ०-१०-० | मुलांचें शहाणपण | ०-१२-० |
| बालभागवत | ०-१२-० | रवींचे उज्ज्वल किरण | १-०-० |
| रामायणांतल्या सोप्या गोष्टी | ०-१२-० | एका दिवसाच्या सुटींत | ०-४-० |
| महाभारतांतल्या सोप्या गोष्टी | ०-१२-० | मनी आणि मोत्या | ०-४-० |
| साधुसंतांच्या गोष्टी | ०-१२-० | कां व कसें भाग १ ते ३ | शिल्लक नाहीं |
| स्वर्गावर स्वारी | ०-१२-० | मुलांचा विविध ज्ञानसंग्रह | शिल्लक नाहीं |
| नाट्यरामायण | ०-८-० | राष्ट्रीयशिक्षणाचीं वाचनपुस्तकें | ,, |
| नाट्यभारत | ०-८-० | शिशुपाठ | ,, |
| महर्षींचा प्रसाद | | पहिलें | ०-४-० |
| भाग १-२ प्रत्येकीं | ०-६-० | दुसरें | ०-५-० |
| महाराष्ट्राचा बालबोध इतिहास | ०-४-० | तिसरें | शिल्लक नाहीं |
| वीरांच्या कथा | ०-४-० | चौथें | ०-९-० |
| देशावर प्रेम कां करावें ? | ०-२-६ | बालविनोदमाला भाग १ ते ४ | ०-८-० |
| देशावर प्रेम कसें करावें ? | ०-४-० | बालविहारमाला भाग १ ते ४ | ०-८-० |
| बालमनोरंजन | ०-५-० | मोती महाल | हीं पुस्तकें |
| परीस्तानांतल्या गोष्टी | ०-१२-० | कुतुब मिनार | अन्य प्रकाश- |
| चित्तरंजन भाग १ | ०-१२-० | भारत कन्या | कांचीं आहेत. |

## प्रौढांसाठीं

| | | | |
|---|---|---|---|
| टापटिपीचा संसार | १-८-० | मराठी शब्दरत्नाकर | १२-०-० |
| गांधी-गीता | ०-५-० | बंगाली मराठी कोश | ४-०-० |
| उत्तर-गीता | ०-८-० | मराठी बंगाली शिक्षक | २-०-० |
| अशोक-चरित्र | १-८-० | बौद्धपर्व | हीं पुस्तकें |
| सौंदर्य आणि ललितकला | १-०-० | वाल्मीकीचा जय | अन्य प्रकाश- |
| अरविंदबाबूंचीं आपल्या | | संपूर्ण बंकिमचंद्र भाग १ ते ३ | कांचीं आहेत. |
| पत्नीस पत्रें | ०-३-० | दुःखाअंतीं सुख | ,, |
| लेखनकला आणि लेखनव्यवसाय | २-०-० | माणिकबाग | ,, |
| मराठी भाषेचे संप्रदाय व म्हणी | २-०-० | मूर्तिमंत देशाभिमान | ,, |
| संस्कृत-मराठी कोश | १-८-० | विलक्षण भोळेपणा | ,, |